Barcode - 2990140052590
Title - Mahaaraashht'ar~ Shabdakosha P Bha
Subject - LANGUAGE. LINGUISTICS. LITERATURE
Author - Daate Raamakrxshhnd-a Yashavn't
Language - hindi
Pages - 575
Publication Year - 1936
Creator - Fast DLI Downloader
https://github.com/cancerian0684/dli-downloader
Barcode EAN.UCC-13
2990140052590

UNIVERSAL LIBRARY
OU_176585
UNIVERSAL LIBRARY

# महाराष्ट्र शब्दकोश

## विभाग पांचवा

## प – भ

कोशमंडळांतील व बाहेरील अनेक साहाय्यकांच्या मदतीनें तयार केलेला.


प्रकाशक—महाराष्ट्र कोशमंडळ लिमिटेड, पुणें; तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर यशवंत रामकृष्ण दाते, ४८१ शनिवार, पुणें २.

मुद्रक—यशवंत रामकृष्ण दाते, महाराष्ट्र कोशमंडळाचा शारदा प्रेस. ४८१ शनिवार, पुणें २.

किंमत १० रुपये

इ. सन १९३६ ] पुणें [ शा. श. १८५८

## संपादकमंडळ.

श्री. यशवंत रामकृष्ण दाते, बी. ए. एल्एल्. बी. (प्रमुख)

श्री. चिंतामण गणेश कर्वे, बी. ए.

श्री. आबा चांदोरकर.

श्री. चिंतामण शंकर दातार.

### प्रमुख शाखा—साहाय्यक संस्था

विदर्भसाहित्यसंघ (वऱ्हाडी बोली); गोमंतकसाहित्यसेवकमंडळ (गोमंतकी); वाङ्मयचर्चामंडळ (कर्नाटकी. बेळगांव); शारदोपासकमंडळ (कोंकणी. मालवणी); महाराष्ट्र शब्दकोशमंडळ (कुडाळी. पेडणें); पुणें भाषाशास्त्रमंडळ (व्युत्पत्ति); शारदाश्रम (महानुभावी. यवतमाळ); हेटकरी भंडारीमंडळ (दादर); साहित्यसेवकमंडळ (कऱ्हाड). इ. इ.

# संपादकीय निवेदन.

शब्दब्रह्म यदेकं यच्चैतन्यं च सर्वभूतानाम् ।
यत्परिणामस्त्रिभुवनमखिल मिदं जयति सा वाणी ॥ –हलायुध

महाराष्ट्र शब्दकोशाचा हा पांचवा विभाग आमच्या आश्रयदात्या-ग्राहकांच्या हातीं देतांना आम्हांस अत्यानंद होत आहे. यावेळचा आनंद विशेष अशाकरितां कीं, प्रथम कोशाची योजना करतांना कोशाचे (२५०० पृष्ठांचे) पांच विभाग होतील असा अजमास धरून कार्यारंभ केला व याच धोरणानें मंडळाच्या भागीची रक्कम २५ रुपये ठेविली; म्हणजे दर विभागाची भागीदारांना पांच रुपये किंमत पडावी व पांचवा विभाग समाप्त झाल्यावर भागीदारांना पंचवीस रुपयांचा मोबदला मिळून त्याबरोबरच कंपनीवरचा त्यांचा त्या रकमेचा बोजा उठावा. तेव्हां त्या पूर्व संकल्पाप्रमाणें हा विभाग प्रसिद्ध होतांच महाराष्ट्र कोशमंडळ व त्याचे चालक-संपादक ऋणमुक्त व कृतकृत्य झाले असें म्हणावयास हरकत नाहीं.

आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या विभागाची एकूण पृष्ठसंख्या (संपादकीय निवेदनें व प्रस्तावना धरून) २७०० आहे. तेव्हां आश्वासिलेल्या संख्येपेक्षां बरींच जास्त पृष्ठें मंडळानें आपल्या भागीदार-ग्राहकांना दिलेलीं आहेत. तसेंच साहित्यविषयक पांच भरीव प्रस्तावना या विभागांतून आलेल्या आहेत. त्यांची किंमत स्वतंत्र केल्यास ग्रंथाच्या किंमती इतकीच होईल हें आम्हींच सांगावें असें नाहीं.

या विभागांत भ अक्षर पुरें झालें आहे. त्यापुढील ज्ञपर्यंतचीं अक्षरें आणखी दोन विभाग तरी व्यापतील हें निःसंशय. तेव्हां कोश संपूर्ण करण्यासाठीं पुढें दोन विभाग काढावेच लागणार. यासाठीं आम्ही आमच्याशीं आजवर सहानुभूतीनें वागून सक्रिय मदत देणाऱ्या सर्व ग्राहकांची या दोन भागाकरितां परवानगी मागत आहों व ती मिळणार हीहि खात्री बाळगून आहों.

दोन विभाग वाढण्याचें कारण अगदीं स्वाभाविकच आहे. मागील विभागांत दिग्दर्शित केल्याप्रमाणें कोशरचनेचें धोरण मूळ सर्वांच्या संमतीनें जें आंखिलें होतें तेंच सतत ठेविलें आहे व शेवटपर्यंत ठेवणार आहों. वाढत्या पृष्ठसंख्येच्या भीतीनें अनिष्ट छाटछाट करीत नाहीं. तेव्हां आर्थिक आणि पृष्ठविषयक मर्यादा या विभागानें गांठली असली तरी अखेर साधावयाचीच आहे. भ पावेतोंच कोश अपुरा ठेवणें अयोग्य होईल. यासाठीं कितीहि अडचणी वाटेंत असल्या तरी त्या ओलांडून ज्ञचा पल्ला दोन विभागांत गांठण्याचा हा नवा संकल्प सर्वमान्य होईल अशी आशा आहे.

या दोन विभागांची किंमत पूर्वीच्या विभागांच्या प्रमाणांतच ठेविली जाईल. यामुळें मंडळाला थोडें नुकसान सोसावें लागलें तरी हरकत नाहीं पण आमच्या जुन्या ग्राहकांवर विशेष बोजा पडूं नये.

तरी आमचे आश्रयदाते आम्हांवर आतांपर्यंत दाखविल्याप्रमाणें लोभ कायम ठेवून या वाङ्मययज्ञाच्या पूर्णतेकरितां आम्हांस साहाय्य करून या मातृभाषेच्या ऋणांतून आम्हांस मुक्त करतील अशी आशा प्रदर्शित करून व परमेश्वरानें या कामांत आम्हांस यश द्यावें अशी प्रार्थना करून हें निवेदन पूर्ण करतों.

यशवंत रामकृष्ण दाते

# प्रस्तावना

## मराठी भाषेची वाढ

"तारांमधें बारा रासी । सप्तवारांमाजी रवीशसी ।
यां दिपिचेआं भासांमधें तैसी । बोली मराठिया ॥"—खिस्तपुराण, अवस्वर १. १२५

**विषयप्रवेशः**—चवथ्या विभागाच्या प्रस्तावनेंत मराठी भाषेची उत्पत्ति पूर्ववैदिक कालापासून, वैदिक संस्कृत, ब्राह्मणें व सूत्रकालीन संस्कृत, अभिजात संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश इत्यादि निरनिराळ्या टप्प्यांनीं व अनेक स्वरूपांत रूपांतर पावत आली हें दाखविलें आहे. प्रस्तुत स्थलीं मराठी भाषेची उत्पत्ति झाल्यानंतर तिची वाढ व तिचा विस्तार कसकसा होत गेला याचें स्थूल अवलोकन करावयाचें आहे. याकरितां आपणांस प्रथम ज्या भाषेला "मराठी" असें स्पष्टपणें म्हणता येईल, असें तिचें स्वरूप कोणत्या कालीं विशेषत्वानें दृष्टीस पडतें तें पाहिलें पाहिजे. कोणतीहि भाषा लोकांच्या प्रचारांत असतां तिच्या स्वरूपांत जो फरक पडत जातो त्याला निश्चित स्वरूप येऊन पूर्वरूपापासून उत्तरकालीन रूप स्पष्टपणें निराळें होऊन त्याला निराळें नामाभिधान प्राप्त होण्यास दीर्घ काळ लागत असला पाहिजे. जरी प्रत्येक जीवंत अथवा प्रचलित भाषेच्या स्वरूपांत नित्यशः थोडाफार फरक पडण्याची क्रिया अबाधितपणें चालेली असते तरी या क्रियेनें तिच्या स्वरूपांत विशेष पालट होऊन पूर्व स्वरूप व उत्तर स्वरूप यांस भिन्न भिन्न नांवांनीं संबोधण्याइतका त्यांच्यांत फरक पडावयास अनेक बाबतींत तो दृग्गोचर व्हावा लागतो; एरवीं कांहीं किरकोळ बाबतींत भाषेंत फरक पडल्यास त्यावरून कोणी भाषेला निराळें नांव देत नाहीं. तेव्हां ज्या ज्या निरनिराळ्या स्वरूपांतून मराठी भाषा स्थित्यंतरें पावत "मराठी" या नामाभिधानास पावली त्या त्या भाषांचे निरनिराळे कालखंड असले पाहिजेत व ते तसे आपणांस पाडतां येतात, ही गोष्ट मागील विभागांत विशद केली आहे. आतां प्रत्यक्ष "मराठी" या स्वरूपांत या भाषेच्या प्रचारास आरंभ केव्हां झाला ही गोष्ट निश्चितपणें सांगणें कठिण आहे. कारण भाषेंत पडणारे फरक, प्रथम बोलींत दृग्गोचर होऊं लागतात व असे ते बोलींत केव्हां आले याचें गमक आपणांस उत्तरकालीं सांपडणें शक्य नसतें. असे बोलींतील फरक जेव्हां वाङ्मयांत रूढ होतात व असें भिन्नकालीन वाङ्मय जेव्हां आपल्या दृष्टीस पडतें तेव्हां आपणांस या दोन कालांतील भाषेंत पडलेले फरक स्पष्टपणें नजरेस येऊन आपण या दोन कालीं दोन भिन्न भाषा अथवा एकाच भाषेचीं दोन भिन्न स्वरूपें रूढ होतीं असे म्हणतों. तेव्हां एखादी भाषा विशिष्ट प्रदेशांत केव्हां रूढ होती हें पाहावयास त्या प्रदेशांतील वाङ्मय हेंच खरें गमक होय.

**आद्य वाङ्मयः**—या दृष्टीनें आपण महाराष्ट्राकडे पाहिलें असतां आपणांस महाराष्ट्री किंवा अपभ्रंश वाङ्मयानंतर मराठी ग्रंथ ज्ञानेश्वराच्या कालीं दृष्टीस पडतात. ज्ञानेश्वरांनी श्रीमद्भगवद्गीतेवर मराठी भाषेंत केलेली टीका जी ज्ञानदेवी त्या ग्रंथांत आपणास मराठीचें चांगलें प्रगल्भ व पूर्वकालीन भाषापासून स्वतंत्र असें स्वरूप दृष्टीस पडतें. परंतु त्या स्वरूपासहि प्रगल्भता प्राप्त होण्यास बराच दीर्घ काल लागला असला पाहिजे. एरवीं भगवद्गीतेसारख्या तत्त्वज्ञानप्रधान ग्रंथांतील उच्च कोटीप्रत पोंचलेले विचार इतक्या सुगमतेनें व विस्तारशः प्रकट करणें या नवीन भाषेस शक्य झालें नसतें. तेव्हां ज्ञानेश्वरकाल हा मराठीच्या तत्कालीन स्वरूपाच्या पूर्ण वाढीचा अथवा वैभवकाल होता असेंच म्हटलें पाहिजे व ज्या अर्थी ज्ञानेश्वरींतील मराठीचें स्वरूप अनेक अलंकारादि सामग्रीनें नटलेलें दृष्टीस पडतें. त्या अर्थी असें परिणत स्वरूप प्राप्त होण्यापूर्वी मराठीची पूर्वावस्था आपणांस माहीत करून घ्यावयाची असल्यास या कालाच्या मागें दीर्घकालपर्यंत आपणांस शोध केला पाहिजे.

. . अशा तऱ्हेनें भाषेच्या अस्तित्वाचा शोध आपणांस करावयाचा झाल्यास उच्च कोटीच्या ग्रंथांपूर्वीच्या कालांत तत्कालीन कांहीं लौकिक वाङ्मय किंवा त्रुटित काव्यें वगैरे असल्यास त्यांचा शोध करणें, त्यापूर्वी कांहीं टिपणें, टांचणें असल्यास त्यांचा शोध करणें हें आवश्यक होय. यांच्याहि पलीकडे जावयाचें म्हणजे ताम्रपट, शिलालेखादि चिरंजीवि लिखाणें असतील त्यांचा शोध व छाननी केल्यास भाषेच्या पूर्वावस्थेचा छडा लावणें शक्य असतें. याखेरीज इतर भाषांतील वाङ्मय अथवा ग्रंथ व लेख यांमध्ये या भाषेंतील त्रुटित उल्लेख येण्याचा संभव असतो,

अशा तऱ्हेनें शोध घेत घेत आपणांस कोणत्याहि भाषेच्या प्राचीनतम उल्लेखाकडे जातां येतें व तेथून त्या भाषेची वाढ व प्रसार कसकसा होत गेला हें पाहतां येतें.

**जुना लेख:**—या दृष्टीनें पाहतां मराठी भाषेंतील सर्वांत जुना लेख म्हणून रा. राजवाडे यांनीं शके ६५८ म्हणजे इ. स. ७३६ मधील चिकुर्डे येथील ताम्रपट संपादन करून जो ग्रंथमालेंत प्रसिद्ध केला आहे त्यापैकीं थोडा उतारा पुढें दिला आहे.

"...हस्तीनापुरी सुखसंकथा विनोदी राज्य करित दक्षिणदिशाबरे दिग्विजययात्री विजयं करवुन करहाट-कंबलेश्वर देवा संनिधी कटकमेलिकार करवुन पित्रुसत्रुनिर्मिती सर्पयाग करित अर्हेद्रभक्षक स्वहा तथा लवणांबुधि-माडलौह सुम्यंतरत धर्मपतिष्टे तदनंतरे करहाट ४५०० भ्यंतर कारिवेनहाड ग्रामौच वलियवाड चिकलवाड ग्रामा मुलिका मंनेयराम गावुंडेया मद्हस्तीपात्ररक्षपालकराया मंनवुन भाव संवछरे वैशाखमासे क्रिष्ण पक्षे भौमदिने अष्टम्यां तिथौ दत्त...।"

या उताऱ्यांत जरी कांहीं संस्कृत शब्द व रूपें आढळतात तरी भाषेची मोडणी मराठी आहे. परंतु या लेखाच्या कालाबद्दल निश्चित मत देतां येत नाही. कारण रा. राजवाडे यांनीं शके ६५८ हा जरी या लेखाचा काल म्हणून दिला असला तरी त्यांतील भाषेचें स्वरूप पुढें जे या कालांतील किंवा कालापुढील शिलालेख दिले आहेत त्यांपेक्षां अधिक अर्वाचीन दिसतें. तथापि हा काल जर बरोबर असेल तर देशी भाषा ख्रिस्ती शकाच्या सातव्या शतकांत रूढ झाल्या म्हणून चवथ्या भागाच्या प्रस्तावनेंत पूर्वी जें विवेचन करण्यांत आलें आहे त्यास वरील लेखा-वरून बळकटी येईल. यापूर्वीचे व या सुमाराचे कांहीं शिलालेख, ताम्रपट वगैरे पाहतां पुढें दिलेल्या निरनिराळ्या लेखांत मधून मधून मराठी शब्द वापरलेले आढळून येतात.

( १ ) शक ६०२ मधल्या ताम्रपटांत–पन्नास, प्रिथिवी ( पृथिवी ). ( २ ) शक ६२१ ( चालुक्यांचा शिलालेख )–सुंक, बादावी, हित. ( ३ ) शक ६७५ ( सामानगड ताम्रपट )–देऊळवाडे, पारगांव, आईतवाडें. ( ४ ) शक ६८० चा ताम्रपट—दोशिराज ( जोशिराज ), भंडारगविठ्ठगे ( भांडारकवठें ). ( ५ ) शक ७२८ चा वणीचा ताम्रपट–वारिखेड ( सध्यांचें वारखेड ). ( ६ ) शक ७३५ चा ताम्रपट–खळखळ, ( ७ ) शक ७५७ चा ताम्रपट–येश ( यश ). ( ८ ) शक ८१० चा राष्ट्रकूटांचा ताम्रपट—न्हा, पुन्य, जो ( सर्वनाम ), सिध ( सिंह ), दह ( दश ), थिति ( स्थिति ), रिपू, इ० ( ९ ) श. ८३२ चा ताम्रपट–वइरि (वैरी), निशेष, सिंध. ( १० ) शके ९०० चा ताम्रपट–सांम्राज्य. ( ११ ) श. ९२२ चा शिलालेख–करणिक, थीर. ( १२ ) श. १०१६ चा ताम्रपट–कोंकण, रिषि, सोमण, सवतु, छेपाटी, भाभण ( बामण ), नोर, राय. ( १३ ) श. १०४९ च्या शिलाहारांच्या ताम्रपटांत–सकु (शक), संवतु, घोरपड, बरवली, ऊसर, मोर, मोवली, गोंडीमार्ग.

**परप्रांतीय उल्लेख:**—याप्रमाणेंच मराठी भाषा ही याच सुमारास महाराष्ट्रशेजारील प्रांतांसहि "मरहट्ट" म्हणून प्रचारांतील भाषा या नात्यानें परिचित होती, ही गोष्ट मागील विभागाच्या प्रस्तावनेंत कुवलयमालाकथेमधील देशी भाषांच्या नमुन्यांचा जो उतारा ( इ. स. ७७७ ) दिला आहे त्यावरून स्पष्ट होईल. तसेंच प्राकृत पैंगलामध्यें "मरहट्टा" म्हणून एक सवाईच्या चालीसारखें वृत्त दिलें आहे. यावरून मराठी भाषेंतील छंदांचा परिचय त्या काळीं इतर प्रांतीयांस झाला होता असें दिसतें. 'एहु छंद सुलक्खण भणइ विअक्खण जंपइ पिंगलणाउ। बिसमइ दह अक्खर पुणु अठ्ठक्खर पुणु एगारह ठाउ। गण आइहि छक्कलु पंच चउक्कलु अंत गुरु लहु देहु। सउसोलह अग्गल मत्तस मग्गल भण मरहट्ठा एहु ॥२०८॥' प्राकृत पैंगलाचा काल निश्चित नाहीं, तथापि त्यामध्यें आलेल्या कळचुरी राजघरा-ण्याच्या उल्लेखावरून तो कळचुरी सत्तेच्या सुमारास ( दहावें, अकरावें शतक ) झाला असावा असें वाटतें. तो उल्लेख असा:—हणु उज्जर गुज्जर राअ दलं। दल दलिअ चलिअ मरहट्ठ बलं। बल मोलिअ मालव राअ कुला। कुल उज्जल कलचुलि कणफुला। १८५।. याप्रमाणें या मरहट्ट भाषेचें ज्ञान महाराष्ट्राबाहेरच्या प्रांतांसहि बऱ्याच पूर्वीपासून असलें पाहिजे असें दिसतें.

चालुक्यवंशी दुसऱ्या विक्रमादित्याचा मुलगा सोमेश्वर हा इ. स. ११२७ ते ११३८ पर्यंत राजा होता. त्यानें मानसोल्लास अथवा 'अभिलषितार्थचिंतामणि' या नांवाचा एक संस्कृत ग्रंथ शके १०५१ ( इ. स. ११२९ ) मध्यें लिहिला. यांत ठिकठिकाणीं मराठी उद्याचीं रूपें व शब्द आढळतात, व ग्रंथाच्या थोडाशा असलेल्या भाग हर

मराठींत आहे. शिवाय महाराष्ट्र स्त्रियांच्या मराठी गाण्यांचा व आत्यावरील ओव्यांचा उल्लेख केला आहे. इतकेंच नव्हे, तर एका भागांत मराठी पद्येंहि आलीं आहेत. त्यांतील एक पुढील पद्य आहे.

" जेणें रसातल उणु मत्स्यरूपें वेद आणियले मनुशिवक गणियलें तौ संसारसायरतारण मोहंतो रावो नारायणु जो गीची. "

मराठी भाषेची शिष्ट ग्रंथांत आलेली ही पहिलीच झुळूक दिसते, म्हणून तिचें विशेष कौतुक करण्यासारखें आहे.

**मराठी शिलालेख-ताम्रपट**—शके ९०० च्या सुमारास अथवा ख्रिस्ती शकाच्या दहाव्या शतकाच्या अखेरीस आपणांस प्रत्यक्ष मराठी भाषेंत खोदलेले शिलालेख वगैरे आढळूं लागतात. कालानुक्रमानें पाहूं गेल्यास आपणास एकामागून एक पुढें दिलेले लेख आज उपलब्ध आहेत.

१. म्हैसूरजवळ श्रवणबेळगोळ येथील शिलालेख हा मराठींतील पहिला शिलालेख असल्यामुळें याचें विशेष महत्त्व आहे. हा लेख शके ९०५ ( सन ९८३ ) म्हणजे ज्ञानेश्वरीच्या पूर्वी ३०७ या वर्षी कोरला. गंग घराण्यांतील राचमल्ल राजाच्या कारकीर्दीत ( इ. स. ९७४-९८४ ) त्याच्या चावुण्डराय नांवाच्या प्रधानानें बाहुबलजी ऊर्फ गोमटेश्वराचा एक अतिशय प्रचंड असा दगडी पुतळा उभारला, आणि सर्व लोकांच्या माहितीसाठीं पुतळ्याच्या खालीं निरनिराळ्या देशभाषांत ती गोष्ट कोरविली. मराठींतील मजकूर पुढीलप्रमाणें आहे.

श्री चावुण्डरायें करवियलें ।

गंगराजे सुत्ताले करवियले ।

ह्या दोन्ही ओळी एकाच काळीं खोदल्या गेल्या नाहींत. दुसरी ओळ कांहीं वर्षें मागाहून कोरली असावी.

२. चालुक्य खंभ याचा भोर ताम्रपट शक १००१ (सन १०७९) मधील आहे. या लेखांत कालाचा उल्लेख ' सकु एकोत्तरसहसु अंकातोपि १००१ नृपकालातींत सिद्धार्थ संवत्सरांतर्गत...' असा आहे. हा ताम्रपट चालुक्य खंभदेव याच्या वेळचा आहे. याची माहिती ताम्रपटांत आली आहे ती अशी—श्रीवल्य ( = शिरवळ ) देशामध्यें चालुक्य वंशांतील खंभ म्हणून राजा होता. त्यानें स्वपराक्रमानें राजा ही पदवी मिळविली. त्याचा मुलगा तैलप्प हा होता. तैलप्पाचा पुन्हा खंभ. या खंभानेंच ताम्रपट दिला आहे. खंभाच्या प्रधानांचीं नांवें देऊन पुढें 'एते पंच प्रधानाः' असा शेरा आहे. खंभराजानें पूर्वी दान केलेलें असें महास्थान विङ्ग पुन्हां दान केलें आहे, असें या दानपत्रांत मुख्यतः नमूद आहे. याची भाषा सामान्यतः अशुद्ध संस्कृत आहे. तीवर मराठी व कानडी या दोन्ही भाषांची छाया तर पडली आहेच, पण शुद्ध मराठी वाक्येंहि आहेत. सहसु ( ओळ १ ली ) आणि ओ. ११–१५ तील बहुतेक सर्व शब्द हे मराठीची छाया दाखवितात; आणि ८ व ९ या दोन ओळींत तर ' बाउ बाइ सुर्यु तपे वरिल पुइल तेलटि माल्लीक कारक देणें ' अशीं स्पष्टपणें मराठी भाषेंतील वाक्यें व शब्द आहेत.

३. यानंतरचा शिलालेख म्ह. शके १०७९ (सन ११५७) मधील पळसदेव येथील होय. हा ज्ञानेश्वरीच्यापूर्वी १३३ वर्षांचा आहे. पळसदेव हें गांव गारदौंडापासून सहा मैलांवर भीमेच्या कांठीं आहे. तेथें सरडेश्वराच्या देवळावर हा लेख आहे. यादवांच्या पूर्वी राष्ट्रकूटांच्या राजवटींत मराठी भाषा चांगली प्रचलित होती, असें ह्यावरून दिसतें.

श्रीचंगदेव दंडनाके विष्णुगृह केले । ईश्वर संवछरी नीफजले प्रासादी व स व ण स व गा तेहाचे पुत्र भाउया । स्तंभा निष्कृती सोनेया साहसु एकु १००० प्रासादि अस कर वातोत्तरे भूमि १०० दाउ पसाउ वाहिरा। सकु १०७९ मंगल मह श्री ।

४. ह्यानंतरचा शिलालेख मोंगलाईतील उस्मानाबाद जिल्ह्यांतील तुळजापूर तालुक्यांतील सावरगांव येथील महामंडलेश्वर कदंबकुलतिलक मासाडदेवानें दिलेल्या दानासंबंधीं आहे. ह्याचा काळ ' १०८६ शके आश्विन शु. १ गुरौ ' असा आहे. ह्याला इंग्रजी तारीख १९ सप्टेंबर ११६४ इसवी अशी येते.

सकु १०८६ तारण संवत्सरे आश्विन शुध २ गुरौ कदं ( व )। कुलतिलक महामंडलेश्वर मा रड (?) गणक तत्पादपद्मोपजी । वि भाली अंबादेवींचेंआ कीर्तनासि वीसांवे म माधवनायके लाहिपनायकें मासप्रति द्रा म २ दत्त ( म ) फेडी तो स्वान गावपल्लुल्य स्व वस्थ व ( दा ) ( भू ) मी तस्व तस्य तदा फ ( ळं )।

५. ह्यानंतरचा शिलालेख म्हणजे परळ येथील सरकारी बंगला बांधीत असतांना सांपडलेला. हा शके ११०९ (सन ११८७) मध्यें कोरलेला असल्यामुळें ज्ञानेश्वरीच्या पूर्वी १०३ वर्षांचा ठरतो. त्यांत कोंकणच्या अपरादित्य नांवाच्या राजानें श्री वैद्यनाथ देवाच्या पूजेसाठी 'षट्षष्टि' म्हणजे साष्टी प्रांतांतील माहुलीजवळ २४ द्राम उत्पन्नाच्या जमिनीची देणगी नमूद केली आहे. ह्यांतील प्रारंभींचा मजकूर संस्कृतांत असून शेवटच्या दोन ओळींतील शपथ मात्र मराठींत आहे. त्यावरून एक गोष्ट उघड आहे कीं, ह्या सुमारास शिष्टांची दरबारी भाषा जरी संस्कृत असली तरी सामान्य लोकांची भाषा सरसहा मराठी होती; सर्वांना ती शपथ किंवा तो शाप समजावा म्हणून जी भाषा वापरली ती पुढीलप्रमाणें आहे. ॥ अथ तु जो कोणु हुवि ए शासन लोपी तेया श्रीवैद्यनाथ देवाची भाल सकुटुंबीआ पडे ॥ तेहाची माय गाढवे *विजे ॥

६. खानदेशांत चाळीसगांवापासून दहा मैलांवर असलेल्या पाटण ह्या गांवांतील श्रीभवानीच्या मंदिरांतील शिलालेख वरील लेखानंतरचा आहे. हा लेख ज्ञानेश्वरीच्या पूर्वी ८४ वर्षांचा म्हणजे शके ११२८ (सन १२०६) मधील आहे. हा लेख भाषेच्या दृष्टीनें अधिक स्पष्ट आहे. लीलावतीचे कर्ते प्रसिद्ध गणिती भास्कराचार्य यांच्या चांगदेव नांवाच्या नातवानें हा लेख खोदविला आहे. देवगिरीच्या सिंघण यादवाचे मांडलीक म्हणून असलेल्या निकुंभ नांवाच्या राजकुलाच्या आश्रयानें ज्योतिषशास्त्राचें अध्ययन अध्यापन करण्यासाठीं मठाच्या स्थापनेसंबंधीं ह्यांत उल्लेख आहे. मठाच्या योगक्षेमासाठीं कोणकोणत्या गोष्टी द्यावयाच्या त्यांचें वर्णन त्यांत आहे. लेखाच्या शेवटच्या चार ओळी मराठीचें पूर्ण स्वरूप प्रगट करतात. ह्या लेखांत 'इया, पाटणी, केणे, तेहाच्रा, ब्राह्मणा, दिन्हला, तेलिया, मविजे, मवावे' इत्यादि मराठी व्याकरणानें मान्य केलेलीं रूपें आढळतात.

स्वति श्री शके ११२८ प्रभव संवत्सरे श्रावणमासे पौर्णमास्यां चंद्रग्रहणसमये श्री सोइदेवेन सर्वजनसंनिद्धौ हस्तोदकपूर्व्वकं निजगुरुरचितमठायायस्थान । दत्तं ॥ तद्यथा ॥ इयां पाटणी जें केणें उघटे तेहाचा असि आउं औ राउला होता ग्राहकापासी तो मठा दिन्हला ॥ ब्राह्मणा जें विक (ते)या पासी ब्रह्मोत्तर ते ब्राह्मणीं दिन्हले ग्राह

कापासी दामाचा वीसोवा आसू पाठी नग (रे) दिन्हला ॥ तुलदाइयां बैलां सिद्धवै ॥ बाहीरिला आसू-पाठी गिधवे ग्राहकापासी । पांच पोफली ग्राहकापासीं ॥ पहि

लेआ घाणे आदाणाची लोटि मठा दिन्हली ॥ जेती घाणं वाहति तेतीयां प्रति पली पली तेला ॥ येथ (जें) मविजे तें मढीजेन मापें मवावें मापाउ मढा अर्द्ध ॥ अर्द्ध

मापहारी । (रु) पाचें सूक । तथा भूमिः ॥ चतुराघाट विशुद्ध ॐ डुग्रामु पषड बालेआ कामतामध्यें चहवंटा ॥ एकल वंटा ॥ पंडिताचा कामतु ॥ श्री ते ग्रा

मी चाउरा धामोजीचीअ सोंढिआं

७. ह्यानतरचा शिलालेख शक ११५० (सन १२२८) मधील आहे. ज्ञानेश्वरीच्या पूर्वी ६२ वर्षें ह्याचा काळ येतो. हा लेख आंबेजोगाई येथें मिळाला असून ह्याला खोलेश्वराचा शिलालेख असें म्हणतात. ह्यांत कोरलेल्या एकदर ४७ ओळींपैकीं पहिल्या ३५ ओळी आणि शेवटच्या पांच ओळी संस्कृतमध्यें आहेत. मधील ४–५ ओळी मराठी आहेतशा वाटतात; कारण त्यांतील मराठी स्पष्ट नाही. संस्कृत लिहून झाल्यावर तोच मजकूर महाराष्ट्र भाषेमध्यें लिहिला. "तदेव महाराष्ट्रभाषयात्र लिख्यते"–असें लेखांतच म्हटलें आहे.

तदेव महाराष्ट्र भाषयात्र लिख्यते । ळ । ळ ! आंम्रदेशे ल्घुवाड । धी नाम ग्रामो दत्तः ॥ तथा बेढे खुकेडांदेउ । असिदत्त । उदागिरि । रघुवेसिगें । विडिबोसह प्रति...लिक ॥ तथां आंब्र–पुरे

—ढयलोल किं...तथा पुर। गुरवा सत्रसोम स्वर्ण संयथे...चौंदेशी चौबिडी मात्य प्रतिपा ॐ वातडेभा॥ दाव विडेसह...दशी पालवि वेल पल्सपणु सर्वनमस्य ॥.....आ पालिवे गाढव लोले समीप म १–१....हलकी मला–देवा समीप

मला–तथा पूर्वता मला–पूर्व मले ७॥ हा (द्रा) ष्टी (टी) माक्टिणी प्र.... घाणे ॥ ६ ॥ आंम्रदक्षिणे कामत ॥ तथा पूर्वता कामड १ ॥ माय प्रविकोणत...कं ॥ णा...बा ॥ आंम्रगण पोफळा... १२॥ पाळे आ फळां गूकां ॥ खाटुली ॥ आडसी–मेंढ

८. ह्या लेखानंतरचा शक ११६१ ( सन १२३९ ) मधील नेवासें येथील शिलालेख होय. हा ज्ञानेश्वरीपेक्षां ५१ वर्षांनीं जुना आहे. ज्ञानेश्वरमहाराजांनीं ज्या खांबाला टेकून ज्ञानेश्वरी लिहिली, अशी समजूत आहे त्याजवळ कणेरेश्वराचें जुनें हेमाडपंती देऊळ होतें. त्या देवळाच्या एका दगडावरील हा लेख आहे. ह्याची भाषा संस्कृत मराठी मिश्र असून त्यांत सीळू पंडित वृत्तिकाराला १८ निवर्तनें जमीन दिल्याचा उल्लेख आहे. लेख पुढीलप्रमाणें आहेः—

स्वस्ति श्री शकु ११६१ विकारी संवत्सरे ॥ श्री कणैरेस्वरदेवालये ॥ पुराण वृत्तिकारः । शौनकगोत्रीय माध्यंदिनः ॥ श्री सीळूपंडितः तथा पांपूवीहरि सीमागारे पुराणवृत्ती भूमी निवर्तने सर्वनमतें अठरा १८ ईए भूमीः कणेरेश्वर दे ३० मूळी ॥ हे भूमि देवें पुरुषण । जीवणा दिधली ॥

९. यादवकृष्ण याच्या वेळचा तासगांव-ताम्रपट हा नेवासें येथील शिलालेखानंतरचा असावा; कारण त्यांत काळाचा स्पष्ट उल्लेख नाहीं. पण 'तस्मिन् कृष्ण नरेशे शासति...' या पंक्तीवरून हा ताम्रपट यादव कृष्ण अथवा कन्हर याच्या कारकीर्दीत म्हणजे शके ११६८–६९ ते ११८१ च्या दरम्यान खोदला गेला असें दिसतें.

ताम्रपटाच्या पहिल्या ८२ ओळींपर्यंतची भाषा संस्कृत असून पुढें ९७ व्या ओळीपर्यंतची भाषा मराठी आहे. ज्ञानेश्वरपूर्वकालीन मराठीचा नमुना म्हणून या भागास महत्त्व आहे. ९७ व्या ओळींत पुन्हां संस्कृत भाषा सुरू होते ती शेवटपर्यंत.

या लेखांत आरंभीं जैत्रपालाची स्तुति असून जैत्रपालाचा वंश यादव कृष्णापर्यंत देऊन त्या राजाच्या प्रसादानें शतानंदाचा वंशज गुर्जर द्विज चंद्र व त्याचा भाऊ केशव यांचा वंश उत्कर्ष पावत होता इ० दिलें आहे. यादवांचा मांडलिक अशा या चंद्राला खड्गहस्तमल्ल ही पदवी होती. त्याचा भाऊ केशव व तो यांनीं मोठ्या भक्तीनें कलिदेव नांवाचें शिवालय बांधिलें; व त्या देवाच्या अष्टांगभोगांसाठीं मंजरवाटक गांवाचा अर्धा भाग व २५ ब्राह्मणांच्या भोजनासाठीं अर्धा भाग अग्रहार करून दिला. नंतर त्या गांवाच्या सीमा दिल्या आहेत व धर्मकार्याची चिंता करणारे आठजण होते, त्यांचीं नांवें दिलीं आहेत. हें शासन लिहिणारा म्हाइंदेव नांवाचा षड्भाषा-चक्रवर्ती कवि होता.

मराठी भाषा असलेल्या ओळी पुढीलप्रमाणें ॥ मजरवाडे गावु अर्धु कलिदेवा अष्टांग भोगा अर्धु पंचवीसा ब्राह्मणभोजना ग्रामासि पूर्वदीसे गोवरु मर्याद सीमा दक्षिण दिसे वाल्गवाड सीमा पश्चिमे हृषिनौर मर्याद सीमा उत्तर पेढ मर्याद सीमा एया धर्मकार्या चिंता करितें वेदांगराशि गुरोस्छा(स्था)नापती कांतवाहू नरसिंघभट्ट ऊणभट्ट गंगाधरभट्ट महादेवभट्ट गोहूदभट्ट विष्णुभट्ट चांचासु लालणभट्ट हे आठ मुख्य करुनु चौदाही वृत्तिमंत सत्रपालक देवस्छ(स्थ)लासि गुर्वि ओडेरि सत्रस्छ(स्थ)लासि ब्राह्मण ओडेर सत्र भोगु प(पा)ळावा गुरवी देवभोगु प(पा)ळावा ब्राह्मणीं देवासि नित्य पचामृत त्रिकाल धूपारत्ति नैवेद्यु दीपवर्त्ति पुष्पे ॥

१०. ज्ञानेश्वरीच्या पूर्वी १७ वर्षें म्हणजे शके ११९५ ( सन १२७३ ) मध्यें कोरलेला पंढरपूरच्या श्रीविठ्ठलाच्या मंदिरांतील शिलालेख आहे. ह्यालाच लोक भाविकपणें चौऱ्यांयशीची शिळा म्हणतात. ह्या शिळेस पाठ लाविली म्हणजे मनुष्य चौऱ्यांयशी योनींतून मुक्त होतो अशी समजूत आहे. श्रीविठ्ठलाचें मंदिर बांधण्यासाठीं वर्गणी गोळा करण्यांत आली त्या वेळेस ज्यांनी ज्यांनीं मदत केली त्यांचीं नांवें वर्षानुक्रमानुसार त्या शिळेवर आठ रकाने काढून त्यांत कोरलीं आहेत. ह्या यादींत त्या वेळच्या अनेक व्यक्तींचीं नांवें व कांहीं नाण्यांचा उल्लेख आहे. या यादींतील वर्गण्या श. ११९५ ते ११९९ पर्यंतच्या आहेत. यांत हेमाडपंतानें श. ११९८ ( इ.स. १२७६ ) मध्यें वर्गणी दिल्याचा निर्देश आहे. पुढल्या वर्षी रामदेवराव जाधवानें केलेल्या साहाय्याची टीप पुढील शब्दांत केली आहेः—श्री. सकु ११९९ ईश्वरसंवत्सरे मार्गसिर सुदि १५ सुके ॥ श्री विठलदेव रायासि पांदरी फडदुल्य आचन्द्रार्क श्री जादव नारायण प्रौढप्रतापचक्रवर्ति श्री रामचन्द्र देवराए द ॥. एकंदर नांवें जरी पुष्कळ असलीं तरी त्यांपैकीं कांहीं नांवें व शब्द मराठी व्याकरणनियमांशी सुसंगत आढळतात. "दादाकेदा देकादा, रामचंद्र देवरावें, देवरायाली, करनु, सेंठी, तेयाची, विठ्ठलाची आण" इत्यादि शब्द मराठी वळणाचे आहेत. इंग्रलीक ... अक्षर तेवढा भाग पुढें दिला आहे.

स्वस्ती श्री सकु ११९५ श्रीमुख संवत्सरे फागनिपूर श्री. बिठ्ठलदेवरायासि तिला शिति फुलें फुलें दांडे आचंद्रार्क चालावेआ नानाभक्त मालीआं दत्त पैकाचा विवरु.

११. ह्यानंतरचा रामदेव जाधवांच्या राजवटींतील शक १२०७ म्हणजे ज्ञानेश्वरीच्या ५ वर्षे पूर्वीचा सासवड-(पुणें) जवळ पूर गांवांत एक शिलालेख आहे. ह्यामध्यें ११ ओळी असून त्यांतील बराच भाग त्रुटित आहे. लेख पुढीलप्रमाणें आहेः—स्वस्ति स्री सकू १२०७ वर्षे प (पा)र्थिव सवछरे आस्विन (ना)दौ अद्येह स्री म प्रौ-(प्रौ) ढप्रताप चक्रवर्ती स्रीरामच(चं)द्रदेवविजय राज्योदै तदपादपदुमोपजिवि सकळकर्णा (रणा) धीप...हेमाडि पंडितो। त बोहं...दंडनायक स्रीपत प (प्र) मु(भु?)णें नायक। रामचंद्रदेवों नाडिती जीविळक कुळ......सोडि...

१२. ज्ञानेश्वरीच्या एकच वर्ष पूर्वींचा म्हणजे शक १२११ (सन १२८९) मधील निझामशाहींतील उनकेश्वराचा शिलालेख आहे. ह्या लेखांत रामचंद्र यादव, त्याचा एक नातलग बंकदेव, त्याचा करणाधिप हेमाडी पंडित, त्याचा हस्तक सोमदेव पंडित व माहूरचा रहिवासी सरणनायक, इतक्यांचीं नांवें असून सरण नायकानें उनकेश्वराच्या देवाल्याचा जीर्णोद्धार केल्याचा उल्लेख आहेत. लेखांत १८ ओळी आहे. त्यांपैकीं पहिल्या आठ ओळी पुढें दिल्या आहेतः—

ॐ नमो गणाधिपतये नमः स्वस्ती स्री सके १२११॥ वीक्रम सवत्सरे आ...स्व... प्रतापचक्रवर्तिः स्री रामचंद्रदेवः विजयोप्रत पाद पदुमोपजिविः इाचि साहा स्सी बकदे वः प्राधान हेमाडिपंडित...तं निरोपील नाएकु ठकतु सोमदेयें पंडितः तस्मिन्काले वर्तमाने त्रेता-युगी रामुः वनवासप्रसंगीः सरभंगाच आ आस्रमा आले. सर भंग प्रीत्यर्थ हे उद दक उप्ल केलेः तदा काल्ये स्सि देवरचित तीर्थ हेः हरीहरा प्रसादे मातापुरनिवासी क-सी-ध्यः कौडण्य गोत्रः सरणुना एकः स्तेमेर्तुतेः सकल प्रासादारंतु केले. तो राम प्रासादं संपूर्णु जाला: तेयाचा नमस्कारुः हरीहरा... देवता सकलांसि नमस्कारु त्रिकाल: वाचिता विजैया......इटिप्रामु ॥ २ ॥

ह्यापुढें देवाल्यास दान दिल्याचा उल्लेख आहे. ह्या लेखांतील भाषा संस्कृतमिश्र मराठी आहे. कांहीं रूपें अस्सल मराठी शिक्याचीं आहेत.

१३. ज्ञानेश्वरकालीन गोमांतकी मराठी ताम्रपट—

हा ताम्रपट फोंडें महालांतील बेरें गांवचा रहिवासी रा. आत्माराम शेट बेरेकर नांवाच्या वाण्याच्या घरीं सांपडला. याचा शक १२२१ प्रारंभींच दिलेला आहे. परंतु हल्लींच्या पद्धतीनें शके १२२२ या वर्षी सावरी म्हणजे शार्वरी संवत्सर येत असल्यानें हाच काल येतो.

खाडेगांवचे वाणी व सोनार यांचा तंटा पडल्यावेळीं बेरेगांवचे वाणी आपल्या जातीच्या मदतीस धांवून गेले. या उपकाराची फेड करण्याकरितां कांहीं मान व दान ठरवून दिले आहेत असें दिसतें. हा ताम्रपट जेथें लिहिला तें खाडेग्राम, खंडोळें या नांवानें सध्यां ओळखिलें जातें. तेथें गणनाथाची मूर्ति फार जुनी आहे. त्याच देवळांत बसून हा अग्रहार लिहिण्यांत आला आहे.

या ताम्रपटांतील लिपी जुनी कानडी (हळेकनड) व भाषा मराठी आहे. पोर्तुगीज किंवा आदिलशाहा यांचा अंमल गोमंतकांत बसण्यापूर्वी बरींच वर्षे गोमंतकांत कर्नाटकी राजांचा अम्मल चालत होता. या कानडी राजांबरोबर कांहीं कानडी वाणी गोमंतकांत शिरले. त्यांचें लिहिणें हिशेब वगैरे कानडींत चाले, परंतु भाषा मराठी असे. हा प्रकार ७५ वर्षांपूर्वीपर्यंत म्हापसें येथें प्रचारांत होता.

(पहिला पत्रा) स्वस्ति श्री सालिवान सक १२२१ वरता वरतमन सावरी संवदर श्रांवण बहुळ ८ सि सोमवारी तिम्ममंतरि धर्माधमि मरिकु भादुरु राज करीत असतां अग्राहरं खाडेग्रामे बारातु श्री. गणनाथा देवाचा देउळीं वइ सिके नगर समस्त मळल्याचा विवरु गोवें नगर पयिकीं सेटिया नागसेटी जणु १ तथा नगर पयिकीं गोम सेटी जणु १ तथा भयिरसेटी जणु १ तथा कायिसेटी जणु १ तथा खुसेटी जणु १ यवं गोवेंचे नगराचे निनमि (यि?) जण ५ नारवें नगर पयिकीं सेटिया बिठळ सेटी जणु १ तथा नगर पयिकीं सात (?व) सेटी जणु १ तथा सोमसेटी जण १ तथा बजरसेठी जणु १ यंवं नारवेनगराचेनि निमित्ते जण ४ यवग यवं समस्त आम्हीं नगरानं बेरे-कारासी अंबजे मितरी अग्रालेरें ग्रामे लकसेटी सिवा चांदसेटी सिवा विसर सेटीसि यवं जण ३ रीं वरगासी क्ष

तुडि थलादानें मान्य चावी नरुतं तुमी आमचे जाति समबाचा कारे( ? रि )थासि उपगा अलेत कवण कार्य म्हणाल तरी आमासी आणि सोनारांसि सवादा होउनु हाणमारी जाले समर्थी तुमी बेरेंकार अमचेया बाणियाचा समयाचे संमदि विढिसि तुमी वाणी समयासि यउनु मानु समेचा राकिला समर्थी आमीं नगरा दोसी जानि तुमासी आमी दोंसि जा नगरातु जातीतु कार्य निहासी ( ? ओ ) प्रंसओ तुमासी आमीं दांन मान लुगडीं विडा गंध आकेत दिधले...भोगावया दिधले आमी वा आमचा जातपरजातान यावचंद्र पाळावा लिहिलेप्रमाणें तुमी वा तुमच्या जात परजातान यावचंद्रक भोगावे म्हणउनु दिधला दानमानेचा सासनपटु होय...ग्रामसेटु जण ५ लिहित सेणवी कुळ तळी ग्रामे सारांतु आहेत मांग सेणवी स्वस्ति...श्री. कपिलेस्वर देउ श्री. नागनाथ देउ...

**लिखित व अलिखित वाङ्मय**—शिलालेखांनीं व्यापलेल्या कालांत मराठी भाषा ही सामान्य जनतेची भाषा होती ही गोष्ट उघड होते. कारण शिलालेखांतील मजकूर सामान्य जनतेस, येणाऱ्या जाणाऱ्या कोणाहि मनुष्यास कळावा म्हणून लौकिक अथवा सामान्य जनांच्या भाषेत लेखकानें खोदून ठेवलेला असतो. याप्रमाणें मराठी ही बोलीरूपानें या दीर्घ काळांत वावरत होती. आतां या बोलींत कांहीं जानपदगीतें, कथा वगैरे वाङ्मय तयार होत असलेंच पाहिजे. पण हें बहुधा अलिखित स्वरूपांत व तोंडी परंपरेनें चाललें असलें पाहिजे व तें फारसें शिष्टस्वरूपांत असणें संभवत नाहीं. त्यामुळें त्याचें संशोधन करणें कठिण असतें व म्हणून अमुक काळचें अमुक लौकिक वाङ्मय आहे असें निश्चितपणें सांगणें कठिण असतें. शिवाय त्या कालीं लेखनकला विशेष सुलभ व प्रचारांत नसल्यामुळें विशेष महत्त्वाचें तेवढेंच वाङ्मय लेखरूपांत उतरत असलें पाहिजे व अशा विशेष महत्त्वाच्या वाङ्मयाचेंचे लोकांनीं जतन करून ठेवणें शक्य असतें. तेव्हां आपणांस आज जें मराठीच्या प्राथमिक अवस्थेंतील वाङ्मय उपलब्ध असेल तें अशा रीतीनें जें कमी महत्त्वाचें वाङ्मय नष्ट होऊन व अधिक महत्त्वाचें जतन होऊन किंवा कांहीं कारणामुळें परंपरेनें आपणांपर्यंत चालत आलें असेल तेवढेंच आहे. यांतहि परंपरागत वाङ्मयाच्या भाषेचें स्वरूप तिला उत्तरोत्तर प्रचलित भाषेशीं एकरूप बनविण्याकरितां निरनिराळ्या लोकांनीं तीवर हात फिरवून कालौघाप्रमाणें वरचेवर पालटत असतें ही गोष्टहि आपणांस लक्षांत घेतली पाहिजे व तसें मराठी भाषेंतील अनेक प्राचीन ग्रंथांच्या बाबतींत झालें आहे ही गोष्ट आपणांस राजवाडे-संपादित ज्ञानेश्वरी व सांप्रदायिक ज्ञानेश्वरी, तसेंच तुकारामाची जगनाडी गाथा व सांप्रदायिक गाथा यांवरून दिसून येईल.

**भाषेचें बदलतें स्वरूपः**—कोणत्याहि भाषेंत देशकालानुसार बदल होत जात असतो व हा बदल होण्यास अनेक कारणें असतात ही गोष्ट विस्तृत रीतीनें दुसऱ्या भागाच्या प्रस्तावनेंत नमूद केली आहे. तेव्हां त्या कारणांची येथें विचिकित्सा करण्याचें कारण नाहीं. परंतु थोडक्यांत सांगावयाचें तर ( १ ) वंश, ( २ ) हवामान, ( ३ ) व्यवसाय, ( ४ ) वागिंद्रियाची रचना, ( ५ ) व्यक्तिगत उच्चारभिन्नता, ( ६ ) ऐतिहासिक व सांस्कृतिक परिस्थिति, ( ७ ) उच्चारसुलभतेकडे प्रवृत्ति, ( ८ ) मानवस्वभाव, ( ९ ) अनुकरणप्रियता, ( १० ) परकीयांचा संसर्ग, ( ११ ) आनुवंशिक संस्कार, इत्यादि कारणांनीं भाषेच्या स्वरूपांत वरचेवर बदल होत जातो. तसेंच सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक क्रांति अथवा दुष्काळ वगैरेसारखी राष्ट्रीय आपत्ति यांमुळें समाजांत जी खळबळ होते तिचाहि भाषेच्या स्वरूपावर परिणाम होतो. तरी आतां आपण कालानुक्रमानें मराठी भाषेचें स्वरूप कसकसें बदलत गेलें तें पाहूं.

**कालानुक्रमानें मराठी भाषेंत झालेले भेदः**—मराठीचा उत्पत्तिकाल सातवें शतक हा आहे, असें पूर्वी दाखविलें आहेच. परंतु ती ग्रंथनिविष्ट होण्यास आणखी पांच शतकें जावीं लागलीं. या पांच शतकांत मराठीमध्यें कांहींतरी जानपद स्वरूपाचें वाङ्मय निर्माण झालें असावें, परंतु तें उपलब्ध नाहीं. या पांच शतकांतील भाषेचें स्वरूप आपणांस फक्त शिलालेख व ताम्रपट यांतच दृष्टीस पडतें. सातव्या शतकाच्या सुरवातीपासून तों मुकुंदराज-ज्ञानेश्वरांच्या कालापर्यंत म्हणजे बाराव्या तेराव्या शतकापर्यंत ज्या ज्या शिलालेखांत किंवा ताम्रपटांत मराठी शब्द, रूपें अगर वाक्यें आढळलीं तीं यथानुक्रम पूर्वी दिलीं आहेत. त्यावरून आपणास बाराव्या-तेराव्या शतकापर्यंतच्या मराठीच्या स्थितीची थोडीशी कल्पना येईल. या एकाच्या कालांतील ग्रंथ उपलब्ध नसल्यानें आपणास बाराव्या शतकापर्यंतच्या वाङ्मयबद्ध मराठीची स्थिति कळणें कठीण झालें आहे. म्हणून वरील लेखांवरच संतुष्ट राहून आपण तेराव्या शतकापासून पुढील कालांतील या भाषेच्या अवस्था पाहूं.

**बारावें शतकः**—मराठीचे आद्यकवि आज मुकुंदराज हे समजण्यांत येतात. त्यांचा काल इ.स. ११२८-११९८ हा आहे. यांनीं विवेकसिंधु व परमामृत असे दोन वेदान्तपर ग्रंथ लिहिले आहेत. हे ग्रंथ त्या वेळच्या भाषेंत जसे लिहिले गेले तसे मिळणें दुरापास्त झालें आहे. ग्रंथाच्या नकला व त्या नकलांच्या पुन्हां नकला, असें होत होत प्रत्येक नकलाकाराच्या व्युत्पन्नतेप्रमाणें किंवा अडाणीपणाप्रमाणें शुद्धलेखन, प्रत्यय, काना, मात्रा, ऱ्हस्वदीर्घ इत्यादिकांत कालमानाप्रमाणें फरक होत होत पधराव्या-सोळाव्या शतकांत लेखनाच्या प्रती आपणापर्यंत आल्या आहेत. त्यांतल्या त्यांत पुन्हां जे ग्रंथ किंवा जीं पद्यें लोकांच्या पाठांत अधिक येत गेलीं त्यांचें अर्वाचीकरण फार झालें आहे. या कारणानें आज उपलब्ध असलेल्या विवेकसिंधूंतील मराठी भाषा ही शुद्ध बाराव्या शतकांतील आहे असें म्हणतां येत नाहीं. मुकुंदराजांनीं हा ग्रंथ शक ११९० (सन ११८८) मध्यें रचिला. याला आधार म्हणून विवेकसिंधूच्या कांहीं हस्तलिखित पोथ्यांतून खालील दोन ओंव्या आढळतात:

शके अकरा दाहोत्तरू। साधारण संवत्सरू। राजा शारंगधरू। राज्य करी ॥

ऐसा समयो सर्वोत्तमू। तेथ मुकुंद द्विजोत्तमू। विवेकसिंधू मनोरमू। निर्मिता जाला ॥

मूळ ग्रंथ इतका जरी जुना असला तरी तो मूळच्या स्वरूपांत नसल्यानें आपणास त्या वेळच्या मराठीचे विशेष प्रचार किंवा भाषेची अवस्था कशी होती ती ठरवितां येत नाहीं. म्हणून त्या वेळच्या भाषेच्या अवस्थेचें विवरण न करतां फक्त विवेकसिंधूंतील एक उतारा देतों:

वेदशास्त्राचा मतितार्थ। मराठिया होय फलितार्थू। तरी चतुरीं परमार्थू। कां न ध्यावा ॥ ११ ॥ चाडा चातुर्यातें जिणे। ऐसें बोलती शाहाणे। तरी येथींचिये परमार्थखुणे। ग्राहिक कां न व्हावें ॥१२॥ जरी दर्भेचे झाडीं। भरती मधाचिया कावडी। तरी हिंडावयाची आवडी। कां पडों द्यावी ॥ १३ ॥ जरी हे अरुष बोल। तरी रोकडें ब्रह्मज्ञान हें नवल। तरी अवज्ञा कोण करील। येथ विपर्यी ॥ १४ ॥ ऊस कीर दिसे काळा। परी घे पैं रसाचा गळाळा। तैसे अरुष बोल परी झळाळा। दिसे विवेकाचा ॥ १५ ॥ विवेकसिंधु—पूर्वार्ध १.

**तेरावें शतकः**—या शतकातील मुख्य ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी. यांत आपणास मराठीचा वाग्विलास पूर्ण रीतीनें पाहावयास सांपडतो. यांतील उपमा, रूपकें इ. अलंकारांची समृद्धि, विषयप्रतिपादनाची उत्कृष्ट हातोटी, शांतिरसाला मूर्धाभिषिक्त करून ग्रंथ वेदांतपर असला तरी शृंगाररसाचीहि उदाहरणरूपांनीं दाखविलेली चुणूक, प्रसाद-प्रतिभादि गुणांची उज्ज्वलता इत्यादि पाहून मराठीची योग्यता व संपन्नता प्रत्ययास येते. याहूनहि विशेष गोष्ट म्हणजे 'माझा मऱ्हाठाचि बोल' म्हणून मराठीचा विशेष अभिमान दाखविला आहे ही होय. वेदांतासारखे गहन विषय संस्कृतमधूनच सांगितले पाहिजेत हा दंडक मोडण्याचें धारिष्ट ज्ञानेश्वरांनी केलें तें उगाच नव्हे. त्या वेळीं मराठी भाषेला उन्नत व संपन्न स्वरूप आलें होतें.

मराठीचा अभिमान आपणांस इतर ग्रंथांतूनहि आढळतो. महानुभाव पंथाचा आद्यप्रवर्तक चक्रधर यानें आपल्या आचारप्रकरणांत 'कानडदेशा, तेलगदेशा न वचावें... महाराष्ट्रीं असावें' असा नियम घालून महाराष्ट्र व मराठी भाषा यांबद्दलचा अभिमान व्यक्त केला आहे. त्याप्रमाणें रुक्मणीस्वयंवरकर्ता नरेंद्रपंडित म्हणतो, 'हे पुण्यवान मराठी। आइकती आदरें कर्णपुटीं। तेयासी कव्हनी न पडे कामाठी। संसाराची ॥' आणखी ऋद्धिपुरवर्णनकर्ता नारायण पंडित बहाळे यानेंहि 'जेथची नांव तऱ्ही मऱ्हाटी। परि षड्दर्शनातें दळवटी। प्रमेय धांडोळितां सृष्टीं। आथीचिना।' अशा तऱ्हेचे उद्गार काढून मराठीचा अभिमान वाहिला आहे. अशा रीतीनें या शतकांत मराठीचा अभिमान उत्पन्न झाला होता, भलत्याच गोष्टीविषयीं कोणीहि अभिमान बाळगीत नाही. यावरून हें शतक हा मराठीचा वैभवकाल होता, असें ज्ञानेश्वरी ग्रंथ पाहून म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

ज्ञानेश्वराच्या पूर्वीपासून महानुभावीयांनीं ग्रंथ लिहिण्यास सुरवात केली. लीळाचरित्र, चक्रधरसूत्रें, वत्सहरण, रुक्मिणीस्वयंवर, धवळे हे ग्रंथ ज्ञानेश्वरीच्या पूर्वीचे आहेत. या पंथाच्या लोकांनी त्या वेळीं पद्याप्रमाणें गद्यांतहि ग्रंथरचना केली. चक्रधराचा विद्वान् शिष्य महींद्र व्यास यानें आपल्या गुरूचें लीळाचरित्र गायिलें. शिशुपालवध व एकादशस्कंध किंवा उद्धवगीता असे दोन ग्रंथ भास्कर व्यास यानें रचिले आणि आपलें नांव त्या ग्रंथांतील भाषाप्रभुत्व, कोमल पदलालित्य, वर्णनकौशल्य, कल्पनावैभव इत्यादि गुणांत ज्ञानदेवाच्या बरोबरीनें कायम केलें. हे दोन ग्रंथ शक १२२८-१२३१ च्या सुमारास म्हणजे खिस्ती सनाच्या चौदाव्या शतकाच्या सुरवातीस लिहिले गेले असावे,

व ग्रंथकाल देणारी ओवी ( १०८८ ) प्रक्षिप्त असून तींत दिलेला ११९५ ग्रंथकाल बरोबर नाहीं, असें श्री. कोल्हते यांचे मत आहे. भावे व्यास यानें ' पूजावसर ' नावाचा एक चांगला ग्रंथ व इतर तीनचार गद्यांत लिहिले. पूजावसर यांत श्रीचक्रधराची दिनचर्या दिलेली आहे. त्यामध्यें आपणास त्या काळच्या समाजस्थितीचें चित्र चांगलें उमटलेलें पाहावयास मिळतें. यानंतर गोपाळपंडित ऊर्फ आनेराज व्यास व केशव व्यास हेहि नांवाजण्यासारखे महानुभाव ग्रंथकार होऊन गेले. चक्रधराची शिष्या रूपाई ऊर्फ महदंबा ही ज्ञानेश्वरांची समकालीन होती. हिचे धवळे-यशोगीतें-प्रसिद्ध आहेत. यांची नवी आवृत्ति नुकतीच यवतमाळचे रा. वामनराव देशपांडे यांनी संपादन केली आहे. ही मराठीची आद्य कवयित्री होय. ज्ञानेश्वरांना समकालीन असा दुसरा एक महानुभावपंथीय लेखक दामोदरपंडित हा होय. याचा प्रसिद्ध ग्रंथ ' वच्छ( त्स )रण ' हा ज्ञानेश्वरीपूर्वी बाराच वर्षे लिहिला गेला.

ह्या वेळच्या महानुभावीय वाङ्मयातील मराठीचें स्वरूप आपणांस निश्चित करण्यास कठीण झालेलें आहे, कारण या पंथाचें सर्व वाङ्मय सांकेतलिपीत लिहिलें आहे. या लिपीचा जनक रवळ व्यास एकनाथकालीन असल्यामुळें साहजिकच भाषेचें मूळचें वळण जाऊन त्याऐवजीं एकनाथकालीन वळण आलेले आहे. ज्ञानेश्वरीची सुद्धां तीच स्थिति आहे. स्वतः एकनाथांनींच ज्ञानेश्वरी परिशुद्ध केली, परंतु, जशी ज्ञानेश्वरांनीं रचिली तशीच जरी नसली तरी एकनाथपूर्वकालीन रा. राजवाडे यांनीं संशोधित करून छापलेली ज्ञानेश्वरीची एक प्रत उपलब्ध झाली आहे. त्यावरून आपणांस तेराव्या शतकांत मराठी भाषेचें स्वरूप कसें होतें तें काहींसें पाहतां येतें.

वरील लेखकांशिवाय निवृत्तिनाथ, सोपानदेव, मुक्ताई, नामदेव, आणि त्यांचें सर्व कुटुंब आणि इतर अनेक भक्त-मंडळी यांचे अभंग वगैरे आज जरी उपलब्ध असले तरी ते नेहमींच्या पाठांत फार असल्यानें त्यांचें अर्वाचीकरण फार झालें आहे, व यामुळें तेराव्या शतकातील भाषेचें स्वरूप ठरविण्यास त्यांचा उपयोग नाहीं.

शिलालेख व ताम्रपट यांवरील लेखांत कोणाला ढवळाढवळ करणें शक्य नसल्यामुळें ह्या लेखांतील भाषा त्या काळीं जशी होती तशीच्या तशीच आपणांस पाहावयास मिळते व या भाषेवरून आपणांस त्या काळचें तिचें स्वरूप समजतें.

तेराव्या शतकांतील शिलालेख अनुक्रमानें पुढीलप्रमाणें उपलब्ध आहेत:— १ पाटण येथील भवानीच्या मंदिरांतील-सन १२०६. २ आंबेजोगाई येथील-सन १२२८. ३ नेवासें येथील-सन १२३९. ४ पंढरपूर येथील चौर्‍यांयशींच्या शिळेवरील-सन १२७३. ५ निझामशाहींतील उनकेश्वराचा शिलालेख-सन १२८९. ६ वेळापूर येथील-सन १३००.

यांपैकीं पहिले पांच पूर्वी आले आहेत. वेळापूर येथील शिलालेख पुढीलप्रमाणें:—

स्वस्ति श्री शकु १२२२ सर्वरि स ( व ) । स ( त्स ) रे ज्येष्ठादौ श्रीमत्प्रोढ । प्रतापचक्रवर्ति श्रीराम । चंद्रदेव विजयराज्योदयित । दुगादपदुमोपजीवी सर्वाधि । कारी श्री जोइदेव तं ( त ) नि ( त्रि ) रोपि । त ब्रह्मदेॐ राणे तद्भ्रातर बाइ । देॐराण माणदेशासवध वे । ला ग्रुर तेथल ध ( र्म ) स्थल बटेस्व । राचे गुण मठ अ केले वा वांव । र बाईदेवें दत पाली स्वर्गा । जाए न प ( पा ) ली तो नरका जाए लेष । क दामोदर पंडित सुत माइदेव मंगल ॥

राजवाडे यांनीं संपादिलेली ज्ञानेश्वरी आणि शिलालेख यांवरून या शतकांतील मराठी भाषेच्या स्वरूपाविषयीं सामान्यतः असें म्हणतां येईल:-मराठी भाषेचें अस्सल व निष्कलंक असें स्वरूप आपणास या कालांत पाहावयास मिळतें. त्या वेळचे यादव राजे हे विद्वान् ग्रंथकार व सत्कवि यांची चांगलीच वास्तपुस्त करीत. म्हणजे मराठीला राजाश्रय मिळाल्यामुळें ती चांगलीच फोफावलेली एकदम दृष्टीस पडते. तिचे मूळचे अंकुर अदृश्य आहेत. या काळांत सौंदर्य, प्रसाद, गांभीर्य, अलंकारप्रचुरता, इत्यादि गुण तिच्या ठिकाणीं चांगलेच दृष्टीस पडतात.

महानुभावी वाङ्मय कांहीं गद्यांतहि आहे. ज्ञानेश्वरी आदिकरून पद्य ग्रंथांत आपणास भाषावैभव पूर्णत्वानें आढळून येतें; परंतु या महानुभावी गद्य ग्रंथांची भाषा अगदीं साधी, सुटसुटीत, सरळ व सुबोध अशी आहे. लहान लहान व तुटक वाक्यें आढळतात. पांडित्याचें प्रदर्शन आजिबात टाळलें आहे.

मराठी संस्कृतप्राकृतोद्भव असल्यानें तींत संस्कृत प्राकृत शब्द येणें अपरिहार्य आहे; परंतु संस्कृतचा पगडा बसलेला मात्र कोठेंहि दिसत नाहीं. यावनी भाषांचा त्या वेळीं तिला विटाळहि झालेला नाहीं. नाहीं म्हणावयास मराठी

भाषेच्या जन्माच्या वेळीं मराठीचा आणि कानडी, तेलगू ह्या द्राविडी भाषांचा अति निकट संबंध आल्यामुळें त्या भाषांच्या कांहीं खुणा मराठी भाषेवर उमटल्या आहेत. ज्ञानेश्वरींत कांहीं तेलगु शब्द आढळतात पण ते फारच थोडे. उदा. बुरि, उबर, एकवंकी आणि जकलिले एवढेच शब्द प्रत्यक्ष तेलगु दिसतात. त्या मानानें कानडी शब्द बरेच, सुमारें ६०, आढळतात. उदा. अड्डर (भय), आदु, आराइणें, आरोगणें, आळ, आळुकी, आळुकेलें, उडप, उडवा, उंडी, उवगणें, उळीग(सेवा), ओगर (जेवण), गुंडा, गुढी, मातु, मेच्छु, हडप, परी, कुसरी, चोखाळणें, मिरवती, किडाळ, आरोप, भीड, बरडी, चवी, पिलें, पोकळ, तळपणें, पोट, पहुडणें, कोंदण, मुद्दल, बोबरी, कडे, नाप, तूप, दाटी, सोसु, पैकीं, कैवारें, विढार, काडी, तूक, राडी.

या कालातील मराठी भाषेंत होणारे वर्णांचे फरक आणि व्याकरणविशेष पुढें दिल्याप्रमाणें आढळतात. स्वरः–संस्कृतमधील ऋ (ऱ्हस्व आणि दीर्घ) खेरीज सर्व स्वर आहेत. ऱ्हस्व ऋ फक्त तत्सम शब्दांत आढळतो. तद्भव शब्दांत ऋ बद्दल 'रु' किंवा 'रि' येत असत. उदा. नैरुत, रुते, नृपवर, ग्रिह, त्रिधि. शब्दारंभीं 'अ' ऐवजीं 'आ' येत असे. उदा. माहा, साहाजे. 'ए', 'आ' आणि 'ये', 'वो' यांमध्यें बराच घोटाळा दिसतो. एका ऐवजीं दुसरा वर्ण येतो. 'ए आणि ओ' बद्दल 'ये आणि वो' येणें ही द्राविडी भाषांची प्रवृत्ति मराठीनें या काळांत उचलिली. उदा. ठाउ (वो), हातपाउ, सोहंभाउ, येकमेकां, बोलखो, वोगर, येऱ्हवे. निरनुनासिक अक्षर कित्येक वेळां सानुनासिक होत असे. कांहीं शब्दांतून ऱ्हस्व स्वराऐवजीं दीर्घ स्वर आलेले आढळतात. उदा. मा(म)हा सुख, साहाजें (सहज). याच्या उलट कांहीं ठिकाणीं दीर्घाऐवजीं ऱ्हस्व स्वर आढळतात. उदा. कुम(आ)र, यऱ्हवी (येऱ्हवी), काइं (कांहीं), कसवटी (कसोटी). त्याचप्रमाणें ऱ्हस्व किंवा दीर्घ स्वराऐवजीं संयुक्त स्वरहि आलेले आहेत. उदा. येदुकुळी, जैसेतैसे, अतशो (अतिशय), उपेगा (उपयोग). व्यंजनें:—'ळ'चा मूर्धन्य उच्चार सहसा आढळत नाहीं. फक्त त्या उच्चाराला या काळीं सुरुवात झाली असावी असें पंढरपूरच्या शिलालेखांतील 'ळ' वरून वाटतें. तालव्य आणि दंततालव्य ह्या दोन उच्चारांत फरक करण्याची प्रवृत्ति ह्याच काळांत सुरू झालेली दिसते. कारण विचार, जांति या शब्दांबरोबर 'विच्यार, ज्योंति' असे 'य' मिश्रित शब्दहि वापरलेले दिसतात. 'ख' बद्दल 'ष' वापरलेला दिसतो. उदा. लेषक (लेखक), रत्नषचिति, षोविला; याच्या उलटहि आढळतें–सुखेख, वीखो. रेफानंतर नेहमीं वर्ण द्वित्त होतो. उदा. कर्द्दमी, धर्म्म, कर्म्म. 'न' आणि 'ण' यांचा घोटाळा आहे. उदा. जाळीण(न), म्हनेरे (णे), सर्पिनी(णी). कांहीं ठिकाणीं स्वरलोप होऊन वर्णसंयोग दिसतो. उदा. म्हाल्क्ष्मी, (महा.)म्हाजन, कुल्कर्णी(करणी); तर कांहीं ठिकाणीं स्वरागम आढळतो. उदा. सरावण, वरुषा, लक्षुमी, पदुम, पृथुवी. त्याप्रमाणें वर्णागमहि आहेच. वर्णियला (वर्णिला), आइक (ऐक), सोहोपा (सोपा). 'श' बद्दल 'ष' आणि 'स'; व 'स' बद्दल 'श' आणि 'ष' आलेले आहेत. उदा. गुडाकेष (श), असक्त (अशक्त), स्वष्ती (स्वस्ती), वैशेळ (वैसेळ).

| | | | |
|---|---|---|---|
| विभक्तिप्रत्ययः —एव. | अ. व. | विभक्तिप्रत्यय–एव. | अ. व. |
| प्रथमा–उ, अ, ओ, आ, ऐं | ए. अ. | चतुर्थी–इया, एया, आं, सी, आते–थे | औं, सी, औंते |
| द्वितीया–उ, आ, एया, ते, आ, इया, सि; | ,, | पंचमी–औनि, औनिया, हूनि | हूनि |
| तृतीया–आं, ऐं, ऐंन, ने, ईं. | हीं. ईं. | षष्ठी–चा, ची, चें | चा, ची, चें |
| | | सप्तमी–ईं, आंतु, ए. | औं, ईं |

कांहीं रूपें:—प्रथमाः–गणेशु, सूर्यू, नारायणु, संशयो, विस्मो, आश्रो, ठाय, केणें. द्वितीयाः–जीर्णघाव, अभिप्राये, भावीं, रायौं, गोसावियातें. तृतीयाः–ईश्वरें, राणेन, हरिदेवें, सर्वज्ञें, ब्राह्मणीनें. चतुर्थीः–चोकीच्यिया, फल्हेया, देवा, तेयासी, तुसी, मढा, सागरा. पंचमीः–मेघौनि, समुद्रौनि, सनकादिकौंहूनि. षष्ठीः–नामिकाचा, विठलाची, व्यासाचा, देवा, कृष्णा. सप्तमीः–देउळी, पाटणीं, देहीं, ग्रामांतु. षष्ठ्यंत नामांना आणि सर्वनामांना 'नि' हा आगम लागलेला आढळतो. उदा. तुझेनि नामे, संग्रामाचेनि अवसरे.

| सर्वनामांचीं कांहीं रूपें | अव, |
| --- | --- |
| प्रथमाः–तुआ, कव्हणी, जो, जें, काई, एव-कोणहु, मि, मी, तूं. | आम्ही, तुम्ही, तिया–ये |
| द्वितीयाः–मां, मिये, तां, इया, मातें. | आम्हां |
| तृतीयाः–विया, मिया, जेणें, तेणें, तेया, तिआ, मासीं, तुवां. | तिहीं, तेंहीं, जेही, |
| चतुर्थीः–तेयाते, येया, आपुलेया, ऐसेया, तेया. | तुम्हां--सि, तयांतें |
| पंचमीः—ययाहोनि, आपणपें. | |
| षष्ठीः–जेयाचा, तेयाचे, जेयांचेया, केहाचा, तेहाचा, माझा. | आमचा, तुमचा, तयांचें |

ज्ञानेश्वरीमध्यें शब्दयोगी अव्ययें विभक्तीच्या रूपांना जोडलेलीं अशीं सांपडतात. उदा. ईश्वरवांचुनि, ढावोवरी. यांत 'वांचूनि, वरी' हीं शब्दयोगी अव्ययें द्वितीयेच्या रूपांना जोडलेलीं आहेत. याप्रमाणें जीवनेंसीं, भरंवसेंनि, नानाभूतेंसहितें, भर्तारेंहीन यांत तृतीयेच्या रूपांना शब्दयोगी अव्ययें जोडलेलीं आहेत. चतुर्थी व सप्तमी यांच्या रूपांनाहि जोडलेलीं अव्ययें सांपडतात.

क्रियापदेंः---वर्तमानकाळचीं रूपें साधारणतः दोन प्रकारांनीं झालेलीं आढळतात. (१) 'त'कारान्त धातुसाधित विशेषण घेऊन त्याच्यापुढें अस ह्या धातूच्या वर्तमानकाळाचीं रूपें लाविल्यानें वर्तमानकाळ साधणें. उदा. आचरत+आहाती = आचारताती; याप्रमाणें बोलताती, वर्तताती इ०. करीत+आहों=करितों (अ. व.), दिसत+असे= दिसतसे, किजतसे. (२) फक्त कृदन्त वापरून वर्तमानकाळ साधणें. उदा. डळमळित, आन्दोलत, उसळत. आणखी निरनिराळयां रीतींनीं वर्तमानकाळ साधिल्याचीं उदाहरणें:—जाणौ, आइकै, चाखे, अनुभवी, आठवी, बोले, घेई, वीए, जात, भीत, विसरलेति. भूतकाळचीं कांहीं रूपें:–सरले, निगाला, आरंबळैला, सांगितैनली, स्वीकरिजली, दिन्हली, धरिएला, काढिनला, भणितले, वोभाविली, खोविनली, सांघीतली. भविष्यकाळचीं रूपें:–होवबैल, अभिनवैल, असैल, सांडिजैल, नव्हैल, उरैल, नाशैल. हीं रूपें ऐल प्रत्यय लागून झालेलीं आहेत. होए (होईल) हें विशेषरूप आहे. ल्यबन्तें:–नि, ऊनि, ओनि, औनि, उतन इ० प्रत्यय लागून होतात. उदा० झालोंनिया, रिगौनि, भवडौनि, जाऊनि, उठौनि, हासौनि, म्हणौनि, भिऊनु, देखोनु, धरुनु, करवुतुन, हारपोनि इ०.

तेराव्या शतकांतील भाषेचे निरनिराळे नमुने–पूजावसर (महानुभावी वाङ्मय–गद्यः)–समस्त भक्तजनें एतिः सर्वज्ञेचेया श्रीचरणा लागतिः पासि बैसतिः सर्वज्ञास निरूपणाची प्रवृत्ति असे तरि निरूपण करीतिः ना रात्रि वडील असे तरि पहुडु होयेः नातरि आसनी नीश्चलु बैसतिः महदंबे प्रस्नु करीतिः जी जी आम्हीं सर्वज्ञातें चींतु सर्वज्ञ काई चींतीतिः म्हणति बाइ हें सकळ जीवांतें चींतिः नागंबे प्रस्नु करीतिः बावा आम्हीं बाबातें चींतु बाबा काई चींतीतिः सर्वज्ञ भणति बाइ हें श्रीप्रभूची थापु चींति.—

ज्ञानेश्वरी—हें सारस्वताचें गोड । तुम्हींचि लाविलें जी झाड । तरि अवधानामृतें वाड । सिंपौनि कीजो ॥१९॥ मग हें रसभाव फुलीं फुलैल । नाना फळभारें भरैल । तुमचेनि प्रसादें होईल । उपयोगु जगा ॥ २० ॥ येया बोला संत रिझले । म्हणति तोखलों गा भलें केलें । आतां सांघें जें बोलिलें । अर्जुनें तेथ ॥ २१ ॥ तवं निवृत्तिदासु म्हणे । कृष्णा अर्जुनाचें बोलणें । मीं प्राकृतु काइ सांघों जाणें । परि बोलवाल तुम्ही ॥ २२ ॥ आहो रानिचेया पालेखाइरां । नेवाणें करविलें लंकेश्वरा । एकला अर्जुनु परि अकरा । न जिणे क्षोणी ॥ २३ ॥ म्हणौनि समर्थु होवे साहाकारी । मान्हवे कैसें सचराचारीं । तुम्हीं संत तियापरीं । बोलवा मातें ॥ २४ ॥ तरि आतां बोलतसें आइकां । हा गीता अभिप्राऊ नीका । जो वैकुंठनायका । मुखौनि निगाला ॥ २५ ॥ बापु ग्रंथु गीता । जो वेदीं प्रतिपाद्य देवता । तो श्रीकृष्णु वक्ता । जिये ग्रंथीं ॥ २६ ॥ राजवाडे–ज्ञानेश्वरी, अध्याय ११.

महदाइसेचे 'धवळे', पूर्वार्धः–एकले देव नीगाले रामु करी अवस्वरी । चला चला म्हणौनि आफाविलिया भेरी । नीसान लागलें पढियारां टाळ फोकरीती । पेंणें केलें कौंडण्या वळिभद्रा-उग्रसेना जाणवीती ॥ २५ ॥ ऋषी-मुनी देव ते तेतिस कोडी । यादवां चालतां पृथ्वी थोडी । नगरींचे सकळै लोक रायमंडलीक चालती उछावें । पातले पवनवेगें जेथ भेतिकार केला श्रीकृष्णरायें ॥ २६ ॥ रामा कृष्णा भेटि प्रीतीं देती आलिंगन । समस्त नमिती कृष्णा जगजीवना । पातले परमानंद कृपाळदी अवलोकिलें देवकीनंदनें । जाणती तया होय कृष्णदरुशन ॥ २७ ॥

रुक्मी रथी रामकृष्ण उद्धवदेवोर्जुन । अश्वथाटीं वसुदेवो गजभारी उग्रसेन । वरमाया पुर्ष्पी मेघडबरी अंधाकार । चालती शीघ्र वेगें ब्रह्मादीक देव करीती जयजयकार ॥ २८ ॥

चक्रधरोक्त सूत्रपाठः—स्वातंत्र्य हा मोक्ष; पारतंत्र्य हा बंध ॥ १ ॥ मायावहिनी आशंसिति आमचा रांडिये डोळिये कै जाइल; परमेश्वर आशंसिति कटकटियेमान गव्हरी कपाटीं ऐसा कै असेल ॥ २ ॥ पोरा जीवा म्हणी सामग्री न होआवी ॥ ३ ॥ पोरा जीवा सामग्री भणिजे गडदरा ॥ ४ ॥ सकळही सामग्रिया परित्यजौनि त्यचिया व्युत्पत्ती व्युपन्ना होआवें ॥ ५ ॥ एषणात्रय त्यजावें ॥ ६ ॥ लोकीचा श्रेष्ठ तो एथीचा नष्टः एथीचा श्रेष्ठ तो लोकीचा नष्ट ॥ ७ ॥ जवं जवं प्रयोजकु तवं तवं अप्रयोजकुः जवं जव अप्रयोजकु तवं तवं प्रयोजकु ॥ ८ ॥ पर्यंत असावें जंव आपुलें श्रेष्ठत्व नष्टत्व प्रकाशेना ॥ ९ ॥ अन्यधर्मे पुरुषु धर्मापासौनि जाए ॥ १० ॥ विकारें पुरुषु धर्मापासौनि जाए ॥ ११ ॥ आपणेयां उपद्रो उठी तेयाचा असंबंधु कीज ॥ १२ ॥ —आचारमालिका.

**चौदावें शतकः**—तेराव्या शतकांतील कविराज ज्ञानेश्वरानंतर चौदाव्या शतकांत अनेक कवि झाले. तथापि ते या कविराजाच्या योग्यतेचे नव्हते. परंतु या कविग्रंथकारांचें लिखाण जें उपलब्ध आहे त्यांतील बऱ्याचशा भागाचें अर्वाचीकरण झालें आहे. ज्ञानेश्वरसमकालीन असलेले व ज्ञानेश्वरानंतरहि पुष्कळ वर्षे वैष्णव संप्रदायाचे धुरीण नामदेव व त्यांच्या घरची त्यांच्या जनीदासीसह सर्व मंडळी आणि इतर भक्तमंडळी यांचे सध्यां आढळणारे अभंग हे चौदाव्या शतकांतील आहेत. परंतु आपणांस हल्लीं ते जसे पाहावयास मिळतात त्यापेक्षां त्यांचें मूळ स्वरूप फारच निराळें असलें पाहिजे. ज्ञानेश्वरांच्या संगतीचा लाभ मिळालेल्या या संतकवींची भाषा ज्ञानेश्वरीसारखीच असावी. परंतु अस्सल मूळच्या स्थितींतील अभंग सध्यां उपलब्ध नसल्यानें हे सांप्रतचे अभंग चौदाव्या शतकांत लिहिले गेले एवढ्या नामनिर्देशाखेरीज तत्कालीन भाषेच्या अवस्थेच्या दृष्टीनें अधिक उपयोगी नाहीत. नामदेवांनीं इ. स. १३५० सालीं समाधि घेतली. परंतु त्यांच्या प्रभावळींतील इतर संतकवि यांनीं त्यांच्यापूर्वीच आपले देह ठेविले. सेनान्हावी, परिसाभागवत, विसोबाखेचर (१३०९), नरहरी सोनार (१३१४), बंका महार (१३१९), जगमित्र नागा (१३३०), चोखामेळा (१३३९), इ० वारकरी संप्रदायांतील चौदाव्या शतकांतील संतकवींचे अभंग सतत पाठानें फार बदलून त्यांचें मूळ स्वरूप नाहीसें झालें आहे.

वरीलप्रमाणेंच अज्ञानकवि याच्या वरदनागेश या ग्रंथाची स्थिति आहे. हा कवि चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेला. याचे ग्रंथ वरदनागेश, कालज्ञान, गुरुशिष्यसंवाद, पंचीकरणप्रमेय व कांही अभंग हे जे उपलब्ध आहेत, ते एकनाथकालीं नकललेले आहेत. अर्थातच त्यांचें चौदाव्या शतकांतील भाषिक रूप बदललेलें आहे सत्यामलनाथ आणि बहिरापिसा यांचे सिद्धांतरहस्य, बहिरवी टीका, संकटहरणी, लिंगग्रंथ इत्यादि ग्रंथ हेहि या शतकाच्या उत्तरार्धांतील किंवा समाप्तिकालांतील आहेत. हे जरी अस्सल मिळालेले नसले तरी त्यांचें फारसें अर्वाचीकरण झालेलें नाहीं. कांहीं शब्द व रूपे ज्ञानेश्वरीसारखीं आढळतात.

ज्ञानेश्वरांना शरण आलेला महासिद्ध चांगदेव, याचे कांहीं अभंग आहेत. परंतु यापेक्षां अधिक महत्त्वाचा असा त्याचा 'तत्त्वसार' नांवाचा ग्रंथ असून त्याचा कांही भाग उपलब्ध झाला आहे. याचा रचनाकाल 'शके चौतिसे बारा' (इ. स. १३१२) हा आहे. म्हणजे ज्ञानेश्वरानंतर बावीस वर्षांनी हा ग्रंथ लिहिला गेला. ज्ञानेश्वर-मुक्ताबाईला गुरु केल्यामुळें व त्यांच्या सान्निध्यांत असल्यानें या ग्रंथाची भाषा ज्ञानेश्वरीसदृश असावी यांत आश्चर्य नाहीं.

ज्याचें अर्वाचीकरण किमपिहि न होतां मूळांतील अस्सल भाषा कायम आहे असा या शतकांतील उप-लब्ध ग्रंथ म्हणजे चोंभा कविकृत उषाहरण. या ग्रंथाचा रचनाकाल अंतःप्रमाणावरून व भाषेवरून श्री. राजवाडे शके १३०० ते १४०० असा देतात. भाषेच्या दृष्टीनें हा ग्रंथ ज्ञानेश्वरीला अगदी जवळचा आहे. यांत ज्ञानेश्वरींतील शब्द, वर्णनशैली आणि रूपें जशींच्या तशीच आहेत. भाषा शुद्ध मराठी असून फारशीचा संपर्क नाहीं आणि संस्कृतहि कार्याकारण आहे. भाषेचा ओघ सहज असून कृत्रिमता मुळींच नाहीं; इत्यादि कारणांनीं या ग्रंथाला या शतकाचा आदर्शग्रंथ मानण्यास हरकत नाहीं. या शतकांतील भाषेचें स्वरूप ठरविण्याला याचाच पुष्कळसा उपयोग आहे.

परशुराम पंडिताचा पर्शरामोपदेश हा ग्रंथ इ. स. १३५६ मधील आहे. याचीहि भाषेचें स्वरूप

महानुभावीयांना ज्याप्रमाणे ' महाराष्ट्रीं असावें ' अशी चक्रधराची आज्ञा होती त्याप्रमाणे त्याच्या पट्ट-शिष्यानें म्हणजे नागदेवाचार्यानें मराठीचा अभिमान बाळगून आपल्या केशवव्यास नामक शिष्यास संस्कृतरचनेपासून परावृत्त केलें. "नको गा केशवदेया, यॆणें माझिये स्वामीचा सामान्य परिवारु नागवैल.भणोनि केशवा संस्कृत सूत्रबद्ध प्रकरण न करीं तूं कीं " अशा तऱ्हेनें मराठी हीच आपल्या पंथाची भाषा या महानुभावीयांनी मुकरर केली व अनेक गद्यपद्य ग्रंथ मराठींत लिहिले. या शतकांत अनेक कवि व लेखक झाले. त्यांपैकी नारोव्यास बहाळे, बोपदेव-शिष्य पंडित भीष्माचार्य आणि मुनिव्यास हे मुख्य होत. पैकी नारोव्यास बहाळिये याचा ऋद्धिपूरवर्णन हा ग्रंथ ' साती ग्रंथां'तील आहे व भीष्माचार्यांचें पंचवार्तिक हा ग्रंथ भाषाशास्त्रावरील असल्यामुळें महत्त्वाचा आहे.

या पंथाच्या वाङ्मयांतील या कालाची महत्त्वाची गोष्ट म्हणजे गुप्तलिपि. सह्याद्रिवर्णनकर्ता रवळोव्यास यानें ' सकळ ' लिपि काढली व या लिपीनंतर आणखीहि अशा गुप्त लिप्या निघाल्या. इतर लोकांपासून आपलें वाङ्मय गुप्त ठेवण्याची जरूरी या पंथीयांना वाटली व त्यामुळे या निरनिराळ्या सांकेतिक गुप्तलिप्या निघून त्यांतच त्यांचें वाङ्मय लिहिलें गेलें. यामुळें यांच्या वाङ्मयाचा इतर लोकांवर किंवा त्या काळांतील प्रमुख असलेल्या वारकरी संप्रदायावर कांहीच परिणाम झाला नाही. या लिप्यांमुळें निरनिराळ्या ग्रंथांतील पाठ मात्र शुद्ध राहिले आहेत. यामुळें महानुभावीय ग्रंथ आपल्या उपयोगीं पडणारे आहेत.

या शतकांतील मुख्य गोष्ट म्हणजे राज्यक्रान्ति. यादवांची सत्ता नाहींशी होऊन यवनांच्या अमलाखालीं महाराष्ट्र देश गेला. इ. स. १२९३ साली अल्लाउद्दीन पहिल्यानें दक्षिणेंत उतरला. तेव्हांपासून मुसलमानांनीं महाराष्ट्रांत धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. रामदेवराव मुसलमानांशी सलोखा ठेवून होता. परंतु त्याचा मुलगा वेळेवर खंडणी देईना म्हणून मलिककाफूरनें त्याला ठार मारून देवगडचें राज्य इ. स. १३१२ मध्यें मुसलमानी राज्यास जोडलें व तेव्हांपासून महाराष्ट्र मुसलमानी सत्तेखाली शिवाजीच्या स्वराज्य-स्थापनेपर्यंत होता. या राज्यक्रान्तीचा परिणाम ज्याप्रमाणें धर्म आणि संस्कृति यावर झाला त्याप्रमाणें तो भाषेवरही झाला; किंबहुना त्यापेक्षां अधिक झाला. कारण स्वराज्यस्थापनेनंतर आणि शिवाजीच्या स्वभाषाभिमानालाहि न जुमानतां फारसी, अरबी इत्यादि यावनी भाषांनीं आपला पगडा कायम ठेविला. मुसलमान राज्यकर्ते असल्यामुळें यावनी भाषा ही दरबारी भाषा झाली आणि त्यामुळें ज्या लोकांचा सरकारदरबाराशीं ज्यास्त संबंध येई त्यांच्या बोलण्यांत यावनी शब्द येऊं लागले. परंतु जितका सरकारदरबारीं या भाषेचा परिणाम लवकर झाला तितका सामान्य लोकांच्या भाषेवर किंवा आध्यात्मिक वाङ्मयावर झालेला दिसत नाही.

सारांश, तेराव्या शतकांतील भाषा ही ज्ञानेश्वरींतील भाषेहून फारशी भिन्न अशी आढळणार नाहीं. ती ज्ञानेश्वरीसदृश आहे. या वेळचे असे जे विशेष दिसतात ते देतों.

'इ'कार दीर्घ विशेष आढळतो. पदारंभीं किंवा इतरत्रहि हल्लीं जेथें ऱ्हस्व इकार आहे तेथें दीर्घ ईकारच आढळतो. ऱ्हस्व इकार क्वचितच आढळतो. उदा० मेनीका, त्रीभुवन, तीये, बीधावा, बीसरौनु, दीनरजन, इंद्रीयें, चीत्र. 'ओ' ऐवजीं ' वो ' येतो. उदा० वोढवील, वो, वोबिआ. याच्या उलटहि प्रकार आढळतो. उदा० जीऊ ( जीव ), राओ. महादेओ. चोंभाकृत उदाहरणांत 'ख' बद्दल सर्वत्र 'ष' आढळतो. 'ए' च्या ठिकाणी 'ये' येतो. उदा. येकत्र, येक, यॆसे. र् नंतर अगर पूर्वी येणाऱ्या 'अ'चा लोप होतो. उदा. प्रार्भीला, कर्बिंजे, पादार्बिंदीं, प्रजीर्ले (परजीर्ले). याच्या उलटहि स्थिति आढळते. उदा० धरमु ( धर्म ). 'ष' आणि 'श' यांबद्दल 'स' येतो. उदा० सेवा ( शैवा ), कृस्णातें ( कृष्णातें ), सासनविषय ( शासनविषय ), बीस्वासु (विश्वासु). महाप्राणाचा लोपः—प्रल्हादिदेवें (प्रल्हाददेवें). 'य' बद्दल 'ज':—जुगानजुगाबरी, जमाचे कालदंड. 'ळ' कार भरपूर आढळतोः—उफळताये, धुळौरा, प्रळयकाळींचे जळंधर, बोळलें. कांहीं ठिकाणीं वर्णागम दिसून येतो. उदा० आपणयातें, वाक्क्य, द्दीस ( दीस ), संसारी ( संसारी ). अनुस्वार कांहीं ठिकाणीं विनाकारण दिला आहे तसाच तो मूळचा असलेला गाळलाहि आहे. उदा० उमंटला, पांवती, ईद्रा, राहावरांचे घोडे. तालव्य आणि दंततालव्य यांमधील घोटाळाः—रायाच्य निरोपें, च्यारी. 'म्ह' ऐवजीं 'भ' येतो, उदा० भणोनि, भणे. नामेंः—उकारान्त प्रथमेचीं रूपें बाहुल्यानें दिसतात. ओकारान्त व अकारान्तहि आहेत. उदा० ब्राह्मणु, पवित्रु, समर्थु, सेवु, अनुषं, येकु, बापु, बोरराओ, बाबो, ठाबो, वीर, तप, धुप, सासनविषय. ज्ञानेश्वरींतील उकारान्त आणि ओकारान्त रूपांप्रमाणें या कालांतहि तशीं रूपें पुष्कळ आहेत. परंतु अकारान्त

रूपें योजण्याचा जास्ती प्रघात दिसतो. द्वितीयेचीं रूपें प्रथमेप्रमाणेंच आहेत. तृतीयेचे प्रत्यय न, एँ, ई, हीं; किंवा नुसत्या शब्दाच्या मूळ रूपावरूनहि तृतीयेचा अर्थ होतो. उदा० रुक्मिणी धरिले हात ।, भेण (भीतीनें), उबारेन, आगरियांहि, तिहीं, हरणीं, नादें, येणेंक्रमें, एणें नावें, मियां, सकळहीं. चतुर्थी:–तीयेयें (थें चतुर्थीचा व द्वितीयेचाहि प्रत्यय), भाटाळैये, दिशे, तिये, मनातें, बुद्धीतें, आगरियांस, चद्रा, इंद्रा, सेवकांप्रति, पक्षीयांथे, राजपुरुषायें, आळंदीये. पंचमी:–अंतराळौनि. षष्ठी:–तेयांचा, राशिचेयां, जीये तीये, तीयाची (त्याची), बायाचे, जेयासी. षष्ठ्यंत सामान्य रूप:–पुंडलिकाचा घरीं, आपुलां डोळां, गीताचेन नादें, माझेया घायाचे, प्रीजेचां बीव्हाई, समुद्राचीया लता, जेयाचेया तेजा, रायाच्यें निरोपें, भूमीचिए घानौडि, काळयुनासा भेण (काळयवनाच्या भीतीनें). सप्तमी:–आंगीं, बीव्हाई, ठाई, मनासी माझारीं (मनामध्यें), भवसागरीं, तीये वेळ (त्या वेळीं). सख्याविशेषणें:– तीघे, पांचै, सतै. क्रियापद:–वर्तमानकाळ:–धडधडितु, उधळताये, गर्जत, जाणत, असे, बांधीजताती, वाहे, बिकोळि आहे, घेतले वर्ते, बैसे, विये, होये, होए, जाए, भणे, बोलिजेति. भूतकाळ:–चाळवीला, भुलवीला, जाला, नीगाला, जाणीतलें, कापडीली, मेळवीली, गळीनले, भणितलें, म्हणितळे, बोळिला, बोलिलेति, अनुवादली, विसरलिया, ठेलिया, खेळते होतीं. भविष्यकाळ:–सांगैन, बसो नेदु, निर्वचैल, पाविजैल, होईल, अनुवादैन, देऊं. विध्यर्थ:– कीजे, दीजे, मेळविजे, कर्विजे, घालीजे, भेयावें, प्रतिकारावें, प्रतिपाळावें. अकरणरूपी क्रियापदें:–नेघती, नेदावी (न द्यावी), नुपजेची, नोळखसी (न ओळखसी), नेदु (देणार नाही), बाधिजेना, नेणो, नेघैल (घेणार नाहीं). अव्ययें:- तेव्हली (तेव्हां), केउती (कोठेंहि), तेथ, परौता, तेथौनी, म्हणौनु, भणौनि (म्हणून), वांचौनि (वांचून), तंव, कवि. पूर्वकालवाचक धातुसाधितें:–दीउनी, देउनी, घेउनी, बोलाउनि, बळघौनि, बांधौनि, सांगौनि, जाणौनि, म्हणौनि. वर्तमानकालवाचक:–पळतु, रिंगतु (रंगत), देतु, येतु, पाहात, रडत, गीवसीतु, ग्रासीतु.

या चौदाव्या शतकांतील आध्यात्मिक मराठीवर फारसी इ० यावनी भाषांचा विशेष परिणाम झाला नाही हें पूर्वीच सांगितलें. चौंभाकृत उधाहरणांत यावनी भाषेंतील शब्द मुळींच नाहीत. मुसलमानी राज्याच्या योगानें लोकांच्या बोलींत थोडेथोडे यावनी शब्द येऊं लागले. नागांव येथील शिलालेखांत 'हिजरत' साल घातलें आहे. तसेंच जमात हा शब्द आला आहे. याशिवाय या शतकांतील वाङ्मयांत किंवा लेखनांत मुसलमानी शब्द नाहींत. इ. स. १३४७ सालीं बहामनी राज्याची स्थापना झाली तेव्हांपासून मुसलमानी अमल खरा चालू झाला. लोकांच्या बोलण्यांत मुसलमानी शब्द येण्यास कांहीं काळ लोटणें साहजिकच आहे. आणि परकीय शब्द आत्मसात् होऊन वाङ्मयांत शिरण्यास अधिक काळ लागणार. यामुळें बहामनी राज्याच्या स्थापनेनंतर ५० वर्षांनीं म्हणजे पुढील पंधराव्या शतकांतील वाङ्मयांत फारसी शब्द आलेले दिसतात.

**चवदाव्या शतकांतील भाषेचे नमुने चौंभाकृत उधाहरण.** (पृष्ठ ६९ अ ब आ)—आला आला नारदमुनी । पाहाती बगाटें उचलौणी । अरथानी तेणें देर्षालीं आंसुवे । अवघेयांचां लोचणी ॥ ७७६ ॥ ते बीनोद देषत असे । केहीं न माये तेने संतोसे । मादीये माजी उभा टेला । कांहीं न बोले ना न बैसे ॥ ७७ ॥ राजो करीतु आहे इंद्राहुनु । तो बळीया उग्रसेनु । मुनी बैसा सीहासनी । साउमा पावो अवधारनु ॥ ७८ ॥ आतां जालें आमचेया ऐसें । धरीतां धरीतां येताये हांसे । तव अर्ध सीहासन । सोडीलें रुपीकसें ॥ ७९ ॥ तेव्हळी म्हणत असे मुनीरावो । न बैसों मांटा असे संदेहो । बाइलां माजी बैसतां । आंगा येईल अन्यावो ॥ ८० ॥ आंसुवें अवघेयांचां डोळां । रडते असा धरुनु कपाळ । नपुसकां माजी बैसतां । कवण होईल फळ ॥ ८१ ॥ यादवां जरी तुम्हां होये बळ । असे आपुले पणाचें सळ । अनघुं बाणाचीये बांधवडी । त्यावरी पंचवीस सांकळा ॥ ८२ ॥ बांधवडी पाहों गेला । म्यां देषीला कोमाइला । गहीवरु न सवरेची मज । अंतकरणी उचंबळला ॥ ८३ ॥ नीच नीच कार्डाजे मारुं । सुमर सुमर म्हणे बाणासुरु । ऐरु म्हणे कवणु राषेल । दुरी ठेला सारंग धरु ॥ ७८४ ॥

**पंचतंत्र**–(प्रो. पोतदार, भा. इ. सं. म. त्रैमासिक, १८४४) तें बोलणें आइकोनि दधिकर्णु म्हणे सुखोपायें आपुली वर्तणुक सिद्धी न पावे या कपटें तयासि विश्वासे या उपजऊं लागला । सूर्यासन्मुख हं दोहीं चरणीं उभा राहिला । हात उभारुनु उन्मीलित नयन वरबेया बुद्धीयायें वंचावेया धर्मोपदेशु बोलता झाला । अहो हा संसार असारु । प्रासारुणा एका मध्यें नाश पावती । स्वप्नासारिषा पर्दीयेतयाचा संगमु इंद्रजाळासारिषा । कुटुंब

परिग्रहो तरि धर्मु वांचुन आणीष नाहीं। बोलिले असे। जया पुरुषा दिवस धर्मेंवीण जाति। तो लोहकाराच्या मातेया परी श्वासु घाली परि जियेना।

**चांगा वटेश्वरकृत तत्त्वसार:—** श्रीगुरु झाले प्रसन्न। पसरौनि विशाळ वदन। जैसें उजळलें गगन। चंद्रबिंबीं॥ १०१३॥ मग श्रीगुरु म्हणे शिष्यातें। आतां तूं प्रवेश गा येथें। पावलासि मातें। अभेदरूपें॥ १४॥ ऐसा ध्वनि आइकला। तंव शिष्यु मुखिं प्रवेशला। जैसा प्रकाशु मीनला। प्रकाशासि॥ १५॥ कां समुद्रिं समुद्रु मिसळला। कां आकाशिं आकाशल्यो जाला। हरिहरां जाला। ऐक्यवादु॥ १६॥ तैसें उभयतां मीनले। ब्रह्मतेजिं एकवटले। गुरुराशी वाढिनले। असंख्यात॥ १७॥ गुरूनु शिष्याचा घोंटु भरूनु। आपण याहीं मिठी देउनु। प्रतीति मागु सांडौनु। राहिला पैं॥ १८॥ आतां मागां पुढां एकुचि। घनदाट गुरूचि। तया सुखा नयेचि। रूप करूं॥ १९॥ गुरुशिष्य एक झालें। तें जालेंपणहि गेलें। गेलेंपण राहिलें। वटेश्वरीं॥ २०॥ ऐसा शिष्यु गुरुभक्ति बोधला। वेद गुह्य पातला। कविता धर्में संपला। प्रबंधु हा॥ २१॥ हे चतुर्विध भक्ति। हा पांचवा पुरुषार्थ जाणती। तैं कष्टीं समाप्ति। पाववीली॥ २२॥ मऱ्हाटी बोलिलां आरज। बाल्बोधपणें विरज। गुरुवटेश्वरीं वाहली पुजा। चांगा म्हणे॥ १०२३॥

**ऋद्धिपूर वर्णन:—**हा तंवचि आदर बहु। जंव मुहूर्तांचा संभहु। मग निगाबा चक्रवीहु। भारिवा तो॥ १७१॥ दाऊनि साकुरेची गोडी। माती भरीति तोंडीं। जैसीं लाघवीयें वेडी। चाळविलीं॥७२॥ तैसें स्वर्गादि सुखा। रातलेआं जीवां अशेखा। परिणामीं भवदुःखा। वांचौनि आन नाहीं॥ ७३॥ कीं बळघौनि झाडा। एरझारा करी माकोडा। तैसा भवरासि बापुडा। संचरतुसें॥ ७४॥ संसार कुपाचा पोटीं। कर्म माळिका घटीं। माया यंत्ररूढ जीव सृष्टी। भ्रमतुसे॥ ७५॥ कीं बुडतां भवसागरीं। भणौनि देवता चक्रीं। माया मोही भवंडितां ही परी। न जीएतीचि ते॥ ७६॥ कर्मभूमीचिए घानौडि। बांधौनि मिथ्या ज्ञानाची झांपडी। काळे भवंडिलीं बापुडीं। जीव पशुवें॥ ७७॥ मेरु पासाव घनवटें। जीहिसीं जालीं तुकमटें। तेव्हडीं दुःखें भोगितां जरि न खिटे। जीवरासि हा॥ ७८॥ विपायें प्रर्जन्याचिया धारा। वरि गणवती गगनिचिया तारा। नां तरि पवें घाल्तिां वारा। उमानैल कीरू॥ ७९॥ परि जीव भोगाचा जीणसी। नाहीं देवताही सौरसीं। भणौनि आपुलाला कर्म लेपेंसी। उऌखेति तियां॥ ८०॥ असो हे भवबाधौडीचे। जे हि सुटिक बोलिजेति जीवाचे। ते मिया उपाए धांडोळिले सृष्टीचे। भणे नारायणु॥१८१॥

**पंचवार्तिक:—**अध्याहारें कां पूर्वपदानुवृत्तिसमवेत अल्पाक्षरें असंदिग्ध पदें असेतिः तेंही पदींकरून जेणें प्रयोगें अर्थज्ञान सूत्रिजे म्हणिजे मुद्रिजे, तया प्रयोगातें सूत्र म्हणिजे. आतां सूत्राचे चार भेद कैसे? तर सूत्राचे चार भेद: —वचन, वाक्य, प्रकरण, महावाक्य. तें केवि? तर वचनापासौनि अर्थ निफजला तो वचनार्थः वचनापासौनि वाक्य निफजलें: वाक्यापासौनि प्रकरण निफजलें: प्रकरणापासौनि महावाक्य निफजलें.

एकी दों शब्दीं आचारविचाराचा निर्वच तें निर्वचन बोलिजे. जेथें निर्वच नाही ते शब्द. लीलेचे दों चौं वचनांचा समुच्चय तें वाक्य. सातापांचा वाक्यांचा मेळावा तें प्रकरण. सातापांचा प्रकरणांचा बांधा तें महावाक्य बोलिजे आणि अवघेया महावाक्यांचा आवांका तो पेंडी बोलिजे. अवघेया निरूपणाचा आवांका अवघेया प्रकरणांचा समुच्चय यातें पेंडी बोलिजे.

**नागांव येथील शिलालेख (इ. स. १३६७)—**स्वस्तिश्री हिजरत ६९ सकु १२८९ पळवंग सवंसरे आधेअ × × श्रीमत्य प्रौढिप्रतापचक्रवर्ति माहाराजाधिराज श्रीहंबिर राओ ठाणें कोंकणराज्यं करोति सत्येतस्मिन् काळे प्रवर्तमाने धर्मादिपत्र लिखितं यथा सर्वव्यापारिसिहिप्रो तंनिरोपित अठागर अधिकारिआ कुसना अहासण नाकाचा सेणवै देऊं प्रोण्हान्ह वेळित स+रंध चिचावळिग्राम पैकी तेथीला मिजिगिति सिहिप्रो काळि सेथे मरंगीआ ळावेयालागी आठागर समंध ......... दातारे हिन अरुनि जाळिआ म्हणौनि समळि आगरियांस त्याति विकळिते गुंतिकैवाह सोडवुनि सिहिप्रो लागौनि वाडिआ विकिळि आहे वाडिया कोण्हि दातारु ठम्ठेळित गुंती करि तर समस्ति आगरियांहि प्रति(का)रावें हा धर्मु सिहिप्रोचा तितिवड समस्ति आगरियाहिं समग्रि प्रतिपाळावें झाडेआचि अमेतित जेतुके आगर साहिआ ढंस पाठे तेतुके आगरास आप्रझाडावें ... ... ... सासनविषय भोगवारी हा धर्मु समग्रि प्रतिपाळावा ...... .. हे अन १८ मुख्य करूनि समग्रि प्रतिपाळावे ......

**परशराम पंडितकृत पर्शरामोपदेशः—** गणातिथि दुणा । वार चतुर्गुणा । नक्षत्र मेळविजे । ध्रुवक ४ मेळविजे । तिहिं भागु । उरलेय । शेष लोह पाहिजे । एकें जळ । दोहो स्थल । शून्य आकाश । स्थली सावली । जली आडाउं । आकाशी सावलीये आडाउ तीरदार । हे जयेति । आडवार । आदित्या पासौनु । नक्षत्रें ९ उत्तमें । दाहावें मध्यम । तथा पुढील २ उत्तमें । वरिला तिही । खेळु पाहु १७ उत्तमें । वीसाठायींच आहे निर्वदैल । २२ । लोह होईल । पूर्ण यश पाविजेल । हातीयेरें साडिती । फल होईल ।

**पंधरावें शतक—** हें शतक मराठी वाङ्मयाच्या दृष्टीनें बरेंचसें कठीण गेलेलें दिसतें, कारण या काळांत ग्रंथकार व कवि फारच कमी झालेले दिसतात. या काळी मुसलमानांच्या राज्यकारभाराचे व बेबंदशाहीचे जुलूम लोक सोशीत होते. मुसलमान आपला धर्म व भाषा वाढविण्यास लागले होते. त्यांच्या धर्मवेडामुळे लोक फार त्रासून गेले होते व शक्य तितका प्रतिकारहि करीत होते. मुसलमान, हिंदूंना जुलूमजबरदस्तीनें बाटवीत होते व पुष्कळ अन्य तऱ्हांनीं त्यांची स्वैर वागणूक हिंदूंना जाचदायक होत होती. या संकटाच्या जोडीला आणखीहि संकटें होतीं. दुर्गादेवीचा दुष्काळ इ. स. १४६८ ते १४७५ पर्यंत होता. या दुष्काळांत अवर्षणामुळे जिकडेतिकडे अन्नान्नदशा होऊन अनेक लोक प्राणास मुकले. या दुष्काळाची प्रत्यक्ष गाजणूक महाराष्ट्रास बारा वर्षे भोंवली. धान्याचा कण आणि पाण्याचा थेंब जिकडे सापडेल तिकडे लोक धांव घेऊं लागले. अशा आपत्तींत धर्म, भाषा व संस्कृति यांकडे लोकांचें लक्ष राहिलें नाहीं ह्यांत आश्चर्य नाहीं. ज्ञानेश्वर-नामदेवांच्या वेळीं मराठीचा भरभराटीचा काळ होता. त्यांच्या पश्चात् एक प्रकारची उतरती कळा मराठी वाङ्मयाला लागली ती एकनाथकालापर्यंत. ही उतरती कळा लागण्यास वरील गोष्टी कारणीभूत झाल्या असाव्या.

या शतकांत एकनाथाचे पणजोबा भानुदास हे होऊन गेले. यांचा काल इ. स. १४४८-१५१३ हा आहे. कान्हूपात्रा इ. स. १४८० च्या सुमारास झाली; व दामाजीपंतानें प्रसिद्ध दुर्गादेवीच्या दुष्काळांत सरकारी कोठार लुटविलें. या तिघांनीहि अभंग केले आहेत. या शतकांत महानुभावीय लेखक, चाल्हणशिष्य नृसिंहकवि, कवीश्वर आम्नाय दीक्षित श्रीगोविंदराजगुरु बल्लाळ, आणि कृष्णमुनीश्वराम्नाय इ. होऊन गेले. त्यांनीं अनुक्रमें संकेत-गीता व रुक्मिणीस्वयंवर, भक्तिप्रबोध व ब्रह्माण्डगोलक हे ग्रंथ लिहिले. हें शतक मराठीच्या स्वरूपाच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. तेराव्या-चौदाव्या शतकातील ज्ञानेश्वरीसारखी भाषा बदलून तिला निराळें स्वरूप येऊं लागलें होतें. तिच्यांत मुसलमानांच्या राज्ययंत्रामुळें फारसी-अरबी शब्द शिरत होते. तिचें शुद्ध मराठी रूप बदलून दुसरें जरा निराळें रूप येत होतें. फारशी भाषेच्या प्रवेशाविरुद्ध प्रतिक्रिया म्हणूनच कीं काय, संस्कृतचाहि परिणाम तिच्यावर ज्यास्त होऊं लागला. प्राकृत किंवा अपभ्रष्ट शब्दांच्या ऐवजीं शुद्ध संस्कृत शब्द घालण्याची जी पुढें सोळाव्या शतकांत प्रथा पडली तिची सुरुवात याच शतकांत झाली असावी. यावनी भाषांच्या प्रतिकारांत तद्भव शब्दांना चाट मिळून तत्सम शब्द जास्त प्रचारांत येऊं लागले. ही प्रवृत्ति पुढील शतकांत जो जोरावलेली दिसते तिला सुरुवात याच शतकांत झालेली असावी.

या वेळचें भाषेचें स्वरूप आपणास फक्त महानुभावीय ग्रंथावरून समजून घेतलें पाहिजे. कारण भानुदास, दामाजीपंत इ. चे अभंग त्या काळच्या भाषेच्या स्वरूपांत न राहतां फार बदलले आहेत. या शतकांत फारशी शब्द बोलण्यांत आणि सरकारी कामकाजाच्या लेखनांत येऊं लागले होते. उदा. दामाजीच्या हातच्या महजरांत पुढील शब्द पहा: —पाच्छाय, हक, तगादा, रसद, चौकशी, दर, बंदोबस्त. या वेळी शब्दांचे उच्चार बहुधा ठरून गेले असावे व त्याप्रमाणेच ते आजपर्यंत चालू आहेत. एका वर्णाऐवजीं दुसरा वर्ण येणें बंद झालें. फक्त ' न ' ' ण ' यामध्यें घोटाळा राहिला. उदा. वाच्छाणे, महारानें, याणो, पातशहाणी. नामें सामान्यतः उकारान्त आणि अकारान्त उपयोगांत येऊं लागली. पूर्वीचें ओकारान्त रूप दिसत नाहीं. उदा. कागद, महार, मत्र, मान, कुमर, अंशू, प्रकाशू, बहुतु. विभक्तींचीं रूपें हल्लींप्रमाणेंच आढळतात. ज्ञानेश्वरकालीन प्रत्यय गेले. उदा० महारानें, महारास, वंळंस, याच्ची, कामीं, बंशीं. आधुनिक सामान्यरूपांतील य दिसत नाहीं. उदा. चाल्हराजाचा वशीं, कवीन्द्रेनि मतु, याचे हातचा, पाछायाचे कामी, ते वंळस. स्त्रीलिंगी ' जी ', ' हा ' याबद्दल जे, हे अशीं रूपें आढळतात. अव्ययें:—जसी, कैची, जेथ, जन्ही, क्रियापदें:—वर्तमानकाळच्या प्रथमपुरुषाचीं रूपें:—बोलों, वदों; तृतीयपुरुषा या एकवचनाचीं रूपें:—रंजवीतु; विणताये; असे. भूतकाळ:—दिल्ही, दिली, केली, जाले, देखिले, दर्सीले. भविष्यकाळ:—बोलैन, रकुरैल, आईन,

पूर्वकालवाचकः—उतरौनि, विस्तारौनि, देवौनि, म्हणोन, आणोन, धरून, भरून, करून. याप्रमाणे निरनिराळीं रूपें आहेत. यांतील कांहीं जुनीं आहेत व कांही नवीन आहेत. यावरून हें शतक ज्ञानेश्वरकालीन मराठी व एकनाथकालीन मराठी यांमधील दुवा आहे.

**पंधराव्या शतकांतील भाषेचे नमुने—भानुदासः**—कोरडीया काष्ठी अंकुर फुटले । येणें येथें जालें विठोबाचें ॥ समर्थाचा आम्ही धरिला आधार । तरीच मत्वर आला येथें ॥ माझिया सकटीं आलासी धांउनी । भानुदास चरणीं लागतसे ॥

× × × ×

वृंदावनीं वेणू कवणाचा माय वाजे । वेणुनादें गोवर्धनु गाजे । पुच्छ पसरूनि मयोर विराजे । मज पाहतां भासती यादवराजे ॥ १ ॥ तृणचारा चरूं विसरलीं । गाईव्याघ्र एके ठायीं जालीं । पक्षीकुळें निवांत राहिली । वैरभाव समूळ विसरलीं ॥ २ ॥ यमुनाजळ स्थिरस्थिर वाहे । रवीमंडळ चालतां स्तब्ध होय । शेषकूर्मवराहा चकित राहे । बाळा स्तन देऊं विसरली माय ॥ ३ ॥ ध्वनी मंजुळमंजुळ उमटती । वांकी रुणझुण रुणझुण वाजती । देव विमानीं बैसोनि स्तुतिगाती । भानुदासा फावली प्रेमभक्ति ॥ ४ ॥

**दामाजीच्या हातच्या महजरांतील कांहीं भाग**—हे देणे पाछायाचे व दामाजीपंत यांचे हातचा कागद असे. विठ्या महार पाछायाचे कामी पडला व दामाजीपंत कामी पडला म्हणोन पातशहाणी विठ्या महारास हक करून दिल्हे. . . . . . .बाच्छाव याचीतील कोठीतील कोठाडी लुटल्या त्याजबद्दल तगादा दामाजीपतास केला. ते वेळेस श्री विठोबाचे विठया महारानें रूप धरून बाच्छात याची रसद पोहचती केली दामाजीपंताचा पैका भरून विठया महारानें दिल्हा आणि बाच्छाणे पुन्हां पावती दिली व दामाजीपंत याजपाशी विठया महारानें आणोन दिल्ही बाच्छाव याणी चौकशी केली व दामाजीपंत याची चौकशी केली त्याजवरून विठया माहार यास हक दर उपकार पोटास भाकरी व बसावयास जागा करून दिल्ही महाराचे बंदोबस्त करून दिल्हे..........

**कान्हूपात्रा**—पुरविली पाठ न सोडी खळ । अधम चांडाळ पापराशी ॥ १ ॥ वारितां नायके दुष्ट दुराचार । काय करूं विचार पांडुरंगे ॥ २ ॥ तू माय माउली जगाची जननी । म्हणोनी मिठी चरणीं घालितसें ॥ ३ ॥ विनवी कान्हुपात्रा जोडोनियां हात । आतां देहांतसमय पातलासे ॥ ४ ॥

**चाल्हणशिष्य नृसिंहकवि**—चाल्हराजाचा वंशी । मत्र जाले नरसिंहासी । तो विणताये सतासी । प्रबंधकरणी ॥ ६७ ॥ कवित्वाचेनि मिषें । गाईन देवांची चरित्रें सुरसें । जे कां भागवतीं शुकव्यासें । कथन केली ॥ ६८ ॥ न बोलों कथेविरहितु । पसरु नेणेंचि बहुतु । महाकवीचेनि मतु । प्रबंधीं वदों ॥ ७० ॥ परी आपुलेया मतीसारिखें । कांहींएक बोलैन मुखें । बोबडा बोली बाळकें । रंजवीतु जैसें ॥ ७१ ॥ आतां असो हे रंकवृत्ती । श्रोते असलगै भाविती । भजति वेडेयासि मति । कैची स्फुरेल ॥ ७२ ॥ आतां आरंभु कथा । मान देवौनि समस्तां । कां जें जन्ही जाला जाणता । तन्ही नेणीव हे निकी ॥ ७३ ॥ —रुक्मिणीस्वयंवर

**कवीश्वर आम्नाय दिक्षीत श्रीगोविंदराज गुरु बल्लाळ**—सात खण चौदा उथाळी । बाहातर ओवरिया एकवीस पानतळी । तेथ बाहुले रेखिले तळी । कुमर उमेशकराचा ॥ २७४ ॥ नाना परिचे प्रकाशू । सात खणी आसीमसाहासु । चहु वेदांचे अंशू । तेथ बेली रखिलीया ॥ २७५ ॥ तेतीस कोडीसहित इन्द्र । उमेसहित ब्रह्मरुद्र । परिवारेसहित फनेन्द्र । देखीले खनोखनी ॥ २७६ ॥ अनुसरण विडा ओळगौनी । जीवें निंबलोण उतरौनि । स्मरण विस्तारौनि । घाली दंडवते ॥ २८ ॥ —भक्तिप्रबोध

**सोळावें शतक**—तेराव्या शतकांत मुसलमानांची टोळधाड दक्षिणेंत आली व तिनें मराठी राज्य फस्त केलें, तेव्हांपासून सोळाव्या शतकापर्यंत मुसलमानी सत्तेला स्थिरस्थावर होण्यास काळ लागला. या शतकांत महाराष्ट्राला राजकीय स्थैर्य प्राप्त झालें. हिंदूंचा धर्मछळ कमी होऊं लागला व मुसलमान राजांविषयीं हिंदूंच्या मनांत थोडाबहुत आदरभाव किंवा विश्वास बसूं लागला. याचा परिणाम म्हणजे लोकांना धार्मिक व पारमार्थिक गोष्टींत मन घालतां येऊं लागलें व मध्यंतरींच्या दोनतीन शतकांतील अंदाधुंदीमुळें वाङ्मयाला जी उतरती कळा लागली होती ती बदलून वाङ्मयाच्या गगनरेषेनें एकदम उच्च बिंदु गांठला. या शतकांत एकनाथ-दासोपंतांसारखे प्रतिभाशाली संतकवि निर्माण झाले आणि त्यांनीं अर्णवासारखें वाङ्मय संपादिलें. दत्तसांप्रदायिकांचा वेदतुल्य ग्रंथ ‘ गुरु-

चरित्र' याच शतकांतला. ज्याप्रमाणें हे शतक वाङ्मयनिर्मितीच्या दृष्टीनें वरच्या दर्जाचें म्हणून एक प्रकारचे महत्त्व पावलें आहे त्याप्रमाणें या शतकाचा दुसरा विशेष म्हणजे जुन्या ग्रंथांचें संशोधन हा होय. एकनाथांनीं पूर्वीचा अतिशुद्ध परंतु 'पाठांतरें शुद्धाबद्ध' झालेला ज्ञानेश्वरी ग्रंथ 'शोधूनी प्रतिशुद्ध' केला. महानुभावी वाङ्मयांतहि निष्कळंक, गीतगोविंदाची महाराष्ट्र टीका इत्यादि ग्रंथांवरहि शोधकारांची लेखणी फिरून ते ग्रंथ नव्यानें प्रचारांत आले. या शतकाचा आणखी एक विशेष म्हणजे मराठीची मुलूखगिरी. शिवाजीनें स्वराज्यस्थापना करून त्याच्यानंतरच्या लोकांनीं अटकेस झेंडे लावण्याच्या किती तरी अगोदरच मराठीनें मुलूखगिरी सुरू केली होती. याचें श्रेय महानुभावपंथालाच आहे. या शतकांत महानुभावपंथाचा प्रसार पंजाबांत झाला व तेथून पुढें तो सरहद्द प्रांत, काश्मीर आणि अफगाणिस्तान येथवरहि जाऊन पोंचला. या पंथानें आपली भाषा मराठी ही निश्चित केल्यामुळें व याच भाषेंत या पंथाचे ग्रंथ असल्यामुळें महाराष्ट्राबाहेरहि या पंथीयांनीं याच भाषेंतील ग्रंथांचा प्रसार केला. काश्मीर, काबूल येथील मठांत आणि कृष्णमंदिरांत पूजास्तोत्रें इत्यादि मराठींतून होत असून मराठी ग्रंथांचा संग्रह प्रत्येक मठांत व मंदिरांत असतो.

या शतकांतील मराठीवर, मुसलमानी सत्तेच्या योगानें झालेला फारशीचा परिणाम चांगल्या रीतीनें प्रत्ययास येतो. परमार्थपर अशा वाङ्मयांत फारशी शब्द सहसा येत नाहींत. तथापि एकनाथांनीं जीं रूपकें केलीं आहेत त्यांपैकीं अर्जदस्त, ताकीदपत्र, जाबचिठी, कऊलपत्र, जमाखर्च इ. सामान्य व्यवहारावर जीं आहेत, त्यांमध्यें फारशी शब्द जवळजवळ निम्मे आहेत. राजसत्ता मुसलमानी असल्यामुळें सरकारदरबारांत फारशी भाषा सुरू झाली व हळुहळू सरकार-कामासंबंधें सर्व कागदपत्र फारशींत राहू लागले. पूर्वापार धर्मग्रंथांत आढळणाऱ्या संज्ञा नाहींशा झाल्या व त्यांच्या जागा मुसलमानी शब्दांनीं घेतल्या. या फरकाचें दृश्य आपणांस एकनाथाच्या वरील रूपकांतून पाहावयास मिळतें. अशा रीतीनें फारशी-मराठीचा संबंध जो ह्या कालांत सुरू झाला तो पुढें मुसलमानी राजवटी होत्या तोंपर्यंत चालला एवढेंच नव्हे, तर पुढें पेशवाईमध्यें सुद्धां ढिलावला नाहीं, व अजून इंग्रजी अंमलांत सुद्धां विशेषतः कोर्टांत फारशी शब्दांनीं आपलें बस्तान कायम राखिलें आहे.

'व' हें उभयान्वयी अव्यय, ला हा द्वितीयेचा प्रत्यय, विशेषण विशेष्याच्या पुढें ठेवणें, अ ह्या स्वराचा तोकडा उच्चार, शब्द व्यंजनान्त उच्चारण्याची लकब, 'गी', 'दार', 'बाज,' 'खाना,' ह्यांसारखे शब्द-सिद्धीचे प्रत्यय वगैरे विशेष जे मराठींत आढळून येतात ते फारशी भाषेंतूनच आले आहेत व ते ह्याच काळांत आले आहेत.

कानडी तलगूचा परिणाम मराठीवर तिच्या जन्मापासून होत आहेच. पूर्वीच्या 'ल' बद्दल 'ळ' या कालांत अधिक येऊं लागला. याला उदाहरणें सिंहासनबत्तिशींतील पुढील उताऱ्यांत भरपूर दिसतील. 'न' ऐवजी 'ण' घातलेला पुष्कळ ठिकाणीं आढळतो. उदा. तेणें ( त्यानें ), णाणा ( नाना ), कल्पणा.

संस्कृत शब्द पूर्वीच्या शुद्ध देशी शब्दांची जागा पटकावूं लागले. पहिले देशी शब्द अपभ्रष्ट वाटल्यानें त्यांच्या ऐवजीं शुद्ध संस्कृत शब्द घालण्याची ऐट जास्त प्रचारांत आली असावी.

या शतकांत पूर्वीचे जुने विभक्तिप्रत्यय बहुतेक गेले व हल्लींच्या रूपांना जवळ असलेलीं अशीं रूपें जास्त प्रचारांत येऊं लागलीं. प्रथमाः—देहो, रावो, भोजु, धनु, मानु, शूद्र, अशीं ओकारान्त व ऊकारान्त रूपें आढळतात त्यापेक्षां अकारान्त रूपें जास्त आहेत. द्वितीयेचीं रूपें निष्प्रत्यय आहेत. शिवाय मूर्खा, येरां, गुरुतें, ज्ञाना, इ० सामान्य रूपांवरून आणि प्रत्यय लागूनहि द्वितीयेचें रूप सिद्ध केलेलें आढळतें. तृतीयेचीं रूपें:—तेहीं, मन्हाटेन, बोलें, तुझेनि, हातें, सुमनेंसीं, तेणें इ० जुन्या पद्धतीचीं आहेतच, तथापि 'नें' प्रत्यय लागून झालेलींहि आढळतात. उदा. जाणतयानें, इनें, धास्तीनें. चतुर्थीः—जया, तया, स्थाना, मठासी, तयासी, नाकापुरास, डोळसवाडीस, धन्यास. षष्ठीचीं रूपें अगदीं हल्लींप्रमाणें चा, ची, चें हे प्रत्यय लागून झालेलीं आहेत. सप्तमीचीं रूपें:—संस्कृतें, बांदोडीं, ब्रह्मीं, घरा, गांठिं. विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्ययें लागून नामाचीं सामान्यरूपें झालेलीं आहेत तीं जुन्या पद्धतीप्रमाणें. उदा. जाणतया( नें ), पापीया( संगें ), तया( ची ), पुतळीये (संनिध), ऐसियां, यया, सतरावीये, नुचींहें. षष्ठ्यंत सामान्यरूपाचाहि असाच प्रकार. यांत कांहीं ठिकाणीं य आढळत नाहीं, तर कांहीं ठिकाणीं य आलेला दिसतो. उदा. तुझां स्थानीं, जीचां बांदोडी, बहुतांच्या उपकारा, श्रीसिद्धेश्वराच्या आचोळा. संस्कृतप्रमाणें विशेष्याच्या रूपाप्रमाणें विशेषणाचेंहि सविभक्तिक रूप ठेवण्याची पद्धत आढळून येते. उदा. नुचींहें हातें, सतरावीये पुतळीये संनिध,

म्हाटेन बोलें. स्त्रीलिंगी सर्वनामें जी, ही, ती, ह्यांबद्दल सर्व ठिकाणी जे, हे, ते, अशीं रूपें आढळतात. क्रियापदांची रूपें:—वर्तमानकाळ रूपें:—म्हुणे, म्हणे, आहेत, बसतात, देत नाहींत, बिंबे, जाणे, फुटे, घटे, असे, होतसे, कष्टतोसी, दूषिती, बंचिती, म्हणती, भजती. भूतकाळ:—संचली, सामावली, बोळिली, आथिली, जाली, वाढली, आला, बोलती, तिनविला, पाहे, जाये, म्हणे. भविष्यकाळ:—प्रसवैल, होसी ( असशील ). विध्यर्थ:—बोलिजे, बांधिजे, किजे, आसीजे, आइकावी, सांडावें, म्हणावी, आणावा. आज्ञार्थ:—बैसें, बैस, सांगें, परियेसा. धातुसाधितें:—म्हणौनि, बोलिलें ( बोलिलेलें ) देखोनि, येऊनी, धरूनी, वाढोनि, गेलिया, होउनि, केलिया. तैसें, जैसी, जैशा रीतीं अशी जुनी रूपेंहि आढळतात.

**सोळाव्या शतकांतील उतारे. दासोपंतकृत गीतार्णव.**—स्वसंप्रदायिक जे योगी । यया मननाचे विभागी । टीका हे तयांची जोगी । तेहीं आइकावी ॥ २१ ॥ स्वानुभवचि येथिंचें प्रमाण । स्वानुभव हेंचि साधन । अन्यत्र शास्त्रश्रवण । तैसें हें नव्हे ॥ २२ ॥ प्राकृत म्हणौनि दूषिती । तेचि यया ज्ञाना बंचिती । भाषाचि केवळ भजती । ते मूर्ख की ना ॥ २३ ॥ हाती देतां नवरत्नें । म्हाटेन बोलें नेघेणें । आतां ज्ञानी तयाकारणें । ते दूरि नसे ॥ २४ ॥ संस्कृतें बोलिलें सेवणें । तेंचि सांडावें प्राकृत वचनें । ऐसियां मूर्खां मुंडणें । किती आता ॥ २५ ॥ ( अध्याय १ ला )

**त्र्यंबकराजकृत बालबोध.**—अनादिमूर्ति श्रीसिद्धेशा । प्रकाश स्वयंप्रकाशा । जगदात्मया जगदीशा । जगत्पूर्णा ॥ २ ॥ जे हे प्रपंच उभारणी । ते तुजपासोनि तुझां स्थानी । जैसी अंबरा बिंबे वाणी । निजतंतुसी ॥४॥ शक्ति तुझां अहंभावीं । तुं शक्तिचक्रांचा गोसावी । रूपें धरूनि मायावी । प्रकट होसी ॥ ५ ॥ ते माया तुझेनि घटे । तुं न भुल्तां देहो फुटे । येरा वाजे कांबिटे । संसारांचें ॥ ६ ॥ इंद्रादिकें बापुडीं । अखंड जीचा वांदोडी । ते माया देवीचि प्रौढी । कवण जाणे ॥ ७ ॥ जे ब्रह्मीं ब्रम्ह संचली । वाढोनि विश्वाकार जाली । ते मोकटी सामावली । सप्तहांगीं ॥ १३ ॥

**महालिंगदास कृत (पद्य) सिंहासनबत्तिशी.** ( १५६५ )—पुनरपि राजा मुहुर्त पाहे । सतरावीये पुतळीये सनीध जाये । तंव तीस वाचा होउनी बोळिली काये । ते परियेसां पां ॥ ५१ ॥ तु विक्रमासारीखा धीर्य उदार्य होसि । तरीच यें सीहासनीं बैसें । भोजु म्हणें ते कैसें । सांगें मज ॥ ५२ ॥ रावो विक्रम उदार्य अति । त्रीलोकी वाढली ज्याची कीर्ती । बहुळोक्तीं जया भळा म्हणति । तोचि धन्यु ॥ ५३ ॥ उदार्य धीर्य जया । परउपकार आळा वांटेया । सत्त्व भक्ती तया । तीहि ळोकी मानु ॥ ५४ ॥ म्हणौनि ळौकिकी जो भळा म्हणती । तया सत्य म्हणावी गती । जया अनोपकारी जन म्हणती । ते कोठे न सरती ॥ ५५ ॥ जो देवो धर्मु नेणे । नुचीष्टे हातें न हाणी सुने । घरा गेळिया बैस न म्हुणे । तो अनोपकारी बोळिजे ॥ ५६ ॥

**विष्णुदासनाम्याची बावण आख्नरी.**—कल्पणा बोलटि मोडिजे । कलि जवळी उभे न राहिंज । कळाबंता मानु दीजे । धुरे देखतां ॥ १ ॥ खरें खोटे जाणीजे । खरें गांठि बांधिजे । खळाळें नदी न उतरीजे । जाणतयाने ॥२॥ गर्व बहुत न किजे । गंभीर होउनिं आसीजे । गमन किजे । चतुरा संगे ॥ ३ ॥ घणबटपणें आसीजे । घडे ते चि काम किजे । घडी भरी न राहीजे । पापीया संगे ॥ ४ ॥ णाणा विद्या आभ्यासीजे । नास फुडा होउं न दीजे । नावं राखीजे । वडिलांचें ॥ ५ ॥ ( २ रा अध्याय ).

**गुरुचरित्र.** ( १५५८ )—सिद्ध म्हणे नामधारकासी । अपूर्व झाले परियेसी । गुरुचरित्र विस्तारेंसी । सांगतां संतोष होतसे ॥ १ ॥ गाणगापुरी असतां गुरु । ख्याती झाली अपरंपारु । भक्त होता एक शूद्रु । तयाची कथा ऐक पां ॥ २ ॥ श्रीगुरु नित्य संगमासी । जात असतां अनुष्ठानासी । मार्गी तो शूद्र परियेसीं । आपुले शेती उभा असे ॥ ३ ॥ श्रीगुरुतें नित्य देखोनी । धांवत येऊनि शेतांतूनि । आपण साष्टांगीं नमोनी । पुनरपि जात आपुले स्थाना ॥ ४ ॥ माध्यान्हकाळीं मठासीं येतां । पुनरपि चरणीं ठेवी माथा । ऐसे कितीएक दिवस होतां । शूद्राची भक्ती वाढली ॥ ५ ॥ श्रीगुरु तयासी न बोलती । नमन केलिया उभे असती । येणेंविधि बहुकाळ क्रमिती । आला शूद्र नमस्कारा ॥ ६ ॥ नमस्कारितां शूद्रासी । श्रीगुरु पुसती संतोषीं । कां गा नित्य तूं कष्टतोसी । नमन करिसी येऊनिसां ॥ ७ ॥ ( अध्याय ४८ वा. )

**एकनाथी भागवत:**–तुवां पुशिलें जैशा रीतीं। तैसियाची गा उपपत्ती। धर्में पुशिलें भीष्माप्रती। देहांतीं शरपंजरीं॥ ३७॥ एक त्या धर्माची थोरी। ज्यासि शत्रु नाहीं संसारीं। सत्यवादी निजनिर्धारीं। जो ऋषिमंत्री जन्मला॥ ३८॥ करावया पांडवनिर्दळण। वज्रदेही व्हावया आपण। धर्मं पुसतां दुर्योधन। धर्म असत्यवचन न बोले॥ ३९॥ ऐसा राजा युधिष्ठिर। निर्मत्सर परम पवित्र। तेणें करूनि अत्यादर। भीष्म महावीर विनविला॥ ४०॥

**रुक्मिणीस्वयंवर:**–आपुले आर्तीचें अंजन। शुद्धसत्वाचें पत्र जाण। बुद्धिबोधें केलें लेखन। वर्णाक्षरीं अक्षर॥ १॥ मनोवेगाचा पैं वारू। त्यावरी बैसविला द्विजवरू। कृष्णापाशीं सत्वरू। समूळ मूळ पाठविला॥ २॥ माझे पूर्वपुण्यें तूं द्विजवरू। कृष्णप्राप्तीसी तू मज गुरू। म्हणवोनि केला नमस्कारू। वेगी यदुवीरू आणावा॥ ३॥ द्विज पावला द्वारका। वैकुंठ केलासाहून अधिका। जेथें निवास जगन्नायका। विश्वव्यापका श्रीकृष्णा॥ ४॥ द्वारका बाह्य-प्रदेशीं। आराम रमवी जीवशिवांसी। वसत निववी सदां सुमनेंसी। संताप कोणासी असेना॥ ५॥ —प्रसंग ३

**अर्जेदस्त:**-अर्जेदस्त अर्जेदार बंदगी। बदेनवाज साहेब आलेक्म् सलाम। कायापुरीवर जिवाजीपंत सुभेदार। बुधाजीपंत फडणीस। परगणें शरीराबाद॥ हकिकत॥ सरकारची रजा घेऊन निघाले। तों स्वार होऊन किल्ल कायापूर येथें दाखल जाहले॥ दरोबस्त अंमलदार सर्व सरकारकामास वाकब नव्हते॥ ऐशियास परगणें मजकूरचें कायपुरांतील उखडे रुजू झाले॥ सदरहू परगणा व जमातदार सरकारचे पुढारी लोक यांची नावें॥ पाटील कुलकर्णी शेटे महाजन। देशमुख दशपांडे। याची खालीं लिहिल्याप्रमाणें नांवें। दंभाजी शेटे। कामाजीराव महाजन। मनाजीराव देशमुख। ममताई देशमुखीण। वरसाई पाटलीण। कंसाजीपंत कुलकर्णी। जराजीराव देशपांडे। हे फार हरामजादे आहेत। कचेरींत जांम धरून बसतात। सरकारचें काम सुरू होऊं देत नाहीत।

**सतरावें शतक:**—सतरावें शतक म्हणजे महाराष्ट्राचा अभ्युदयकाल. याच कालांत छत्रपति शिवाजीनें स्वराज्यस्थापना केली. सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याचें वारें शिवाजीच्या नसानसांतून खेळत होतें. त्याच्या दिव्य चारित्र्यानें महाराष्ट्रांत नवचैतन्य उत्पन्न होऊन स्वातंत्र्याची लाट महाराष्ट्र देशभर उठली होती. स्वराज्याच्या स्थापनेबरोबर स्वधर्म व स्वभाषा यांच्या सुधारणेकडे लक्ष जाणें अपरिहार्य होतें. या शतकाच्या सुरवातीला फारशीनें मराठीवर आपली मगरमिठी इतकी घट्ट मारली होती व तिला जबड्यांत इतकें ओढून धरलें होतें कीं, तिला गिळंकृत करा-वयाचीच फक्त ठेविली होती. सरकारी कामांतील कागदपत्र पाहिले म्हणजे याची साक्ष पटते. शिवाजीला प्रत्येक परकीय गोष्टीबद्दल अत्यंत तिटकारा व द्वेष असल्यानें, त्यानें फारशीवर टोला मारला आणि मराठीला तिच्या तडाख्यां-तून सोडविण्याचा प्रयत्न केला. राजदरबारांत नेहमीं लागणाऱ्या शब्दांचा राज्यव्यवहारकोश करण्यास रघुनाथ पंडि-तास त्यानें आज्ञा केली व अशा रीतीनें मराठीच्या शुद्धीकरणाचा प्रथम उपक्रम केला. तेराव्या शतकानंतर मराठी वाङ्मयाचा प्रवाह क्षीण होत चालला होता, परंतु सोळाव्या शतकांत मराठी भाषारूप नदीला एकदम भरती आली आणि तिच्या पात्राची रुंदी व खोली वाढून तिला पूर्ववत् म्हणजे तेराव्या शतकांतील स्वरूपाप्रमाणें किंबा त्याहूनहि अधिक मोठें असें रूप प्राप्त झालें हें मागें सांगितलेंच. हा प्रवाह अशाच स्वरूपांत या शतकांतहि वाहत होता. या शतकाच्या पूर्वभागांत फारशीच्या योगानें हिचा प्रवाह बराचसा गढूळ झाला होता तो पुढें निवळूं लागला; आणि तो स्वच्छ, आल्हादकारक आणि नवचैतन्योत्पादक जीवनानें पूर्ण होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. भाषिक उलाढाल आणि वाङ्मयीन खटाटोप यांत शिवकाल कसा चिरस्मरणीय कालखंड आहे, हें पुढें दिलेल्या कर्त्यांच्या नांवांवरून कळून येईल. मुक्तेश्वर, रमावल्लभदास, शिवकल्याण, लोलिंबराज, शामराज, तुकाराम, बोधलेबुवा, निंब-राज, मोरयागोसावी, गणेशनाथ, विठ्ठलदास, शेख महंमद, रामदास, गंगाधर, रंगनाथस्वामी, आनंदमूर्ति, केशव-स्वामी, वामनपंडित, नागेश, विठ्ठल बीडकर या संतमंडळीच्या कामगिरीनें शिवकाल म्हणजे वाङ्मयाच्या खटाटोपांत चिरस्मरणीय असा कालखंड झाला आहे. ह्यांशिवाय रामदास, तुकाराम व इतर संत ह्यांचा शिष्यगण व वेणाबाई, आक्काबाई, बहिणाबाई या स्त्रिया आपापल्या परीनें हातभार लावीत होत्या. ह्या सर्वांचा जनपदामध्यें परिणाम झाल्यानेंच फारशीचा लोंढा थोपविता आला.

पोर्तुगीजांचा उपसर्ग मराठीस पंधराव्या शतकापासून भोवूं लागला होता. त्यांनीं तेव्हांपासून या काला-पर्यंत आरमारी शब्द, हत्यारांचीं नावें, खलाशांची भाषा, पोषाखाचे शब्द, सैन्यांतील हुकूम, धर्मासंबंधीं परिभाषा, कांहीं युरोपीय पदार्थांचीं नांवें, कांहीं पक्वान्नांचीं नांवें असा पुष्कळ शब्दांचें लोण मराठींत आणून सोडिलें होतें.

उदाहरणार्थ–चेपें, शिरपेंच, कुतनो, फाल्तु, कंतु, कपिना, काडतूस, घमेलें, गर्णाल, पिस्तुल, परात, बतेला, काफर, साबण, कार्दो, मेस्त्री, फर्मा इत्यादि पोर्तुगीज शब्द आहेत.

या शतकांत मराठीच्या आयुष्यांतील एक महत्त्वाची गोष्ट घडली. फादर स्टीफन ह्या एका इंग्लिश मिशनरी गृहस्थानें मराठी भाषेत लिहिलेलें ख्रिस्त पुराण इ. स. १६१५मध्यें छापिलें गेलें ही ती गोष्ट होय. हेंच मराठी भाषेतील छापलेलें पहिलें पुस्तक होय. मात्र हें देवनागरी लिपींत नाहीं, रोमन लिपींत आहे. यावेळच्या उच्चारावर फारशी उच्चारांचा परिणाम झालेला दिसतो. अ, इ, उ, ऋ, ऐ या स्वरांना फारशी भाषेत स्वतंत्र प्रतीकें नाहींत. त्यामुळें मराठींतील विशेषनामें फारशी बोलणाऱ्याच्या तोंडून व फारशी नावें मराठ्यांच्या तोंडून उच्चारिलीं जातांना वरील स्वरांच्या बाबतींत विशेष फरक झाला आहे शब्द व्यंजनान्त न उच्चारितां स्वरान्त उच्चारण्याची लकब मराठी भाषेमध्यें आहे. ह्या तिच्या स्वभावामुळें फारशी भाषेतून मराठीमध्यें जे जे व्यंजनान्त शब्द आले ते सर्व स्वरान्त झाले. स्वरांचा निभृत उच्चार करण्याचा एक नवीनच प्रकार मराठींत फारसी जाणणाऱ्यांच्या तोंडांत रूढ होऊन बसला. पुणें, नगर, नाशिक, खानदेश या जिल्ह्यात विशेषतः गांवढळ लोकांच्या भाषेत हा निभृत उच्चाराचा प्रकार तितकासा रुजलेला दिसत नाहीं. हे लोक शब्दांतील आंतर स्वर साधात उच्चारतात. नागर भाषप्रमाणें पडला, घेतला, जेव्हो, कर्तो, जागृतो असे उच्चार ते करीत नाहींत. ह्यावरून नागर भाषेतील उच्चारांवर जितका फारशीचा परिणाम झाला तितका ग्रामिक भाषेतील उच्चारांवर झालेला दिसत नाही.

या कालच्या महानुभावीय वाङ्मयाकडे पाहिल्यास त्यांत जुने शब्द आणि रूपें वापरण्याचा शक्य तितका प्रयत्न केलेला दिसतो. इतर वाङ्मय आणि हें महानुभावीय वाङ्मय यात यामुळें पुष्कळ फरक दिसतो. या पथाच्या लेखकांना पूर्वीचीं जुनीं रूपें वापरण्याचा मोह आवरतां आला नसावा, किंवा परपरेपासून एकदम निराळें होणंहि त्यांना शास्त्रविरुद्ध वाटलें असावें. इतरांनीं या पथाला नावें ठेविल्यानें व या पथाची अवहेलना होत गेल्यानें हा पथ एकांगी झाला. त्यानें आपलें वाङ्मय गुप्त ठेवण्याचा प्रयत्न केला. अशा रीतीनें इतरांशीं फटकून वागल्यानेहि या पंथाच्या भाषेची अशी स्थिति राहणें संभवतें.

मागील शतकांतील भाषेच्या स्वरूपांत आणि या शतकाच्या भाषेच्या स्वरूपांत विशेष फरक नाहीं. क्रियापदांचीं रूपें पुष्कळशीं अलीकडीलसारखीं भासतात. नामांचीं रूपें जुनीं व नवींहि आहेत, तीं पुढे दिलीं आहेत. वर्णामधील थोडा फरक पाहिल्यानें देतों. य च्या ऐवजीं ये किंवा ए. उदा.–गणनायेका, फळदायेका, नयेन: एथें, वाए. श किंवा ष बद्दल बहुधा 'स' येतो. उदा. वाक्सुन्य, सकेना, देसमुख, भासेन, देसींच्या. उलट 'स'च्या ऐवजी 'श'-हि आलेला आढळतो. उदा.–दाश्यत्व. नामें:–प्रथमा:–छायारंगु, ओघु, नागे, फलु, गोष्टी (एकवचन). द्वितीया, चतुर्थी:–ऋषिचरणां, पूर्वे, तुतें, मातें, देसपांडियासी, लोकांसी, वाक्सुन्यास, मज, जेयाथे. तृतीया:––दित्तें ( इन्द्रिजे ), भासेन, काळें, रीती, निसवतीनें, मिरासदारांनीं. पंचमी:––त्रिवर्कींहूनि. षष्ठी:––माझिये, तुझिये, जयाचें, यासीं, तेआचा. सप्तमी:––अंतरीं, नेत्रीं, लोकीं, जीवीं, चरणीं, ललाटी. सामान्यरूप:–नामाला जीं विशेषणें लागलेलीं असतात त्यांचीं रूपेंहि नामाप्रमाणेंच करण्याचा प्रघात दिसतो. संस्कृतच्या पद्धतीचा हा परिणाम असावा. उदा.–बहुतेंकें अवघडें उत्तरें, आणियेकें उत्तरें, बहुतां जनांसि. किंवा विशेषणाचें नुसतें सामान्यरूप केलेलें दिसतें. उदा.–आम्हां अनाथांचें, मराठिये भासेन. सामान्यरूपांत हल्लीं जेथें 'य' जोडून आलेला असतो तेथें इय आलेला आढळतो. उदा.–देसपांडियांनी, कवेश्वरांचिये, माझिये, तुझिये. षष्ठ्यंत सामान्यरूपांत 'य' आढळतो आणि त्याप्रमाणें पूर्वीच्या तऱ्हेचीं 'य' कारविरहित रूपेंहि आहेत. उदा.–देसींच्या, कवेश्वरांचिये, कृपेचेनि, ब्राह्मणांचे भारुचीं, रयतें ( निसवतीने ). शब्दयोगी अव्ययें वापरण्याचा प्रघातहि फार होता. नामाचें विभक्तीचें रूप घेऊन त्याला शब्दयोगी अव्ययें जोडलेलीं सांपडतात. उदा.–कृपाकटाक्षें-करूनि. त्याप्रमाणें नाम आणि शब्दयोगी अव्यय यांमध्यें दुसरा शब्दहि आणतां येत असे. उदा.–मयकृतसभे हो सारखी. 'ही', 'ती', 'जी' या सर्वनामांचीं रूपें पूर्वीप्रमाणें हे, ते, जे अशीच आढळतात. क्रियापदांचीं रूपें या कालीं बहुधा हल्लीसारखीं दिसतात. कारण हल्लींचीं क्रियापदांचीं रूपें व या कालचीं रूपें यांत विशेष फरक आढळत नाही. कांहीं जुन्या रीतीचीं रूपेंहि आढळतात. ' आहे ' याऐवजी ' असे ' हें रूप आढळतें. दुसरीं कांहीं रूपें–चालों देत नाहीं, देत तें करणें, कीजे, वर्ततसे, चालवीत एसे केलें पाहिजे, पातला, वाखता जाहला,

पूर्वकालवाचक धातुसाधितांची सर्व प्रकारची रूपे आढळतात. उदा.—म्हणौन, म्हणांन, म्हणउनु, नमस्कारूनि, करूनी; देखुनु, करुनु; वंदूनियां, होऊन, येऊन, लावून. तुमन्तें:—चालावया, करावया, होऊंसी, निरोपूसी.

**सतराव्या शतकांतील उतारे:—रामदास:—**ओं नमो जि गणनायेका। सर्वसिद्धि फळदायेका। अज्ञान-भ्रांतिछेदका। बोधरूपा॥ १॥ माझिये अतरीं भरावें। सर्वकाळ वास्तव्य करावें। मज वाक्‌शून्यास वदवावें। कृपा-कटाक्षेंकरूनी॥ २॥ तुझिये कृपेचेनि बळें। वितुळती भ्रांतीची पडळें। आणी विश्वभक्षक काळे। दास्यत्व कीजे॥३॥ येतां कृपेची निज उडी। विघ्नें कांपती बापुडी। होऊन जाती देशधडी। नाममात्रें॥ ४॥ म्हणौन नामें विघ्नहर। आम्हा अनाथांचे माहेर। आदिकरूनी हरीहर। अमर वदिती॥ ५॥ वंदूनियां मंगळनिधी। कार्यकरितां सर्व सिद्धि। आघात अडथाळे उपाधी। बाधू सकेना॥ ६॥ जयाचें आठवितां ध्यान। वाटे परम समाधान। नेत्रीं रिघोनिया मन। पांगुळे सर्वांगीं॥ ७॥ द. १ स. २

**मुक्तेश्वर:—**नमस्कारूनि ऋषिचरणा। राजा म्हणे सर्वज्ञा। जे जे स्वामीनी केली आज्ञा। तेचि रीती वर्ततसे॥ १॥ पूर्वे उगऊनि छायारगु। पश्चिमे चाले अवक्रमार्गु। की त्रिंबकींहूनि गोतमी ओघु। प्राची उजू चमके॥ २॥ हेही एथें न घडे युक्ती। स्वामीनी निरोपिली जे नीती। त्यामाजी कांहीं यथाशक्ती। घडे न घडे नेणवे॥ ३॥ आतां एक इच्छिजे चित्तें। ते सादर कथिजे मातें। करतळप्राय विश्व तूतें। द्रिष्टी असे या हेतु॥ ५॥ मयकृतसभेहो सारखी। आणीक सभा आणीक लोकीं। असे की नसे हे कौतुकीं। सांगीतलें पाहिजे॥ ६॥ महाभारत सभापर्व अध्याय ४.

**पत्रव्यवहार**—माघ शु. ४ श. १५९०—मसरूल अनाम राजश्री नारो भिकाजी सुभेदार व कारकून सरदेसमुखी सरकार महालहाय तलकोकन प्रती राजश्री शिवाजी राजे. सु॥ तिसा सितैन अलफ. त्रिंबकजी नरस प्रभु हुजूर येऊन मालूम केलें की, कसबे कल्याणचे कुलकर्ण व हुदेदारी आपली मिरास सालाबाद माहात कदम कारकीर्दी मालिकंबर बाजे कारकीर्दी दर कारकीर्दी चालत आलें असे, हाली मोगलाचे कमाविसीमधें देसमुख व देसपांडियानी कुसूर करून चालों देत नाहीं, चिटणीस व नाईकवाडी यांचा मुशारा सरकारी पोते खर्च पडत होता तो हाली मिरासदारानीं रयतेनिसबत लावून त्यांचें चालवितात, आणि आपणास हुदेदारीचा मुशारा दरमाहे टके १० व कागदबाब दरमाहे टका १ एकून टके ११ होते हे चालवीत नाही, तर आपलाहि मुशारा सदहू रयतेनिसबतीनें लावून चालवीत व कुलकर्ण हि बिलाकुसूर चालवीत ऐसें केले पाहिजे. म्हणून मालूम केलें. तर, बाजे मिरासदारांच्या मिरासीच्या मिरासी चालवावया आणि यासी कुसूर करावया काय गरज आहे? हाली तुम्ही देसमुख देसपांडियासी ताकीद करून त्रिंबक प्रभु मजकुराचे कुळकर्ण व हुदेदारी सालाबादप्रमाणें हुदेदारीचा मुशारा बाजे मिरास-प्रमाणें रयतेनिसबतीने देत तें करणें. बोभाट येऊ न देणें.—मराठ्यांच्या इतिहासाची साधनें खंड २० पृ. ३०२.

**फादर स्टीफन्स १६१५**—तें सांगावेया कारणें आतां। प्रघट करावेया समस्ता। थोरी उठिली उत्कंठा। माजां जीवी॥ १२०॥ परम शास्त्र जगीं प्रघटावेया। बहुतां जनां फळसिद्धी होवावेया। भासा बोदोनी मराठिया। कथा निरोपिली॥ १२१॥ जैसी हरळांमाजी रत्नकिळा। कीं रत्नांमाजी हिरा निळा। तैसी भासांमाजी चोखळा। भासा मराठी॥ १२२॥ जैसी पुस्पामाजी पुस्प मोगरी। कीं परिमळामाजी कस्तुरी। तैसी भासांमाजी साजिरी। मराठिया॥ १२३॥ पखिआं मधें मयोरू। वृखिआंमधें कल्पतरू। भासांमधें मानु थोरु। मराठियेसी॥ १२४॥ तारांमधें बारा रासी। सप्तवारांमाजी रविशासी। या दीपिच्यां भासांमधें तैसी। बोली मराठिया॥ १२५॥—पैलें पुराण अवस्वरू १.

येतुकेया अवस्वरी। फिलिस्तेवो नायेका सरी। निगता जाहाला दाविदा वरी। कुळतु पातला जंबळी॥ ६९॥ चालतां जेयाचां चरणी। भारें कांपे मेघिणी। जेयाथे देखतां प्राणी। पळों पाहे॥ ७०॥ येरी कडां इशाई कुमरा। पिंगट केंस शोभती त्या सुंदरा। जैसें अस्तमानी अंबर। दिसे लोहित॥ ७१॥ पोले हाती रक्तवर्ण। श्वेत पांडरें वदन। झगझगिती नयन। माणिकां सारिखे॥ ७२॥ येरु देखोनी दाविदासी। तेआचा पाडु नकरी मानसीं। काए बोलता जाहाला तेयासी। तें ऐका तुमी॥ ७३॥

**प्रस्तावना**—हें सर्व मराठिये भासेन लिहिलें आहे. ह्या देशींच्या भासा भितुर ही भास परमेश्वराच्या वस्तू निरोपूंसि योग्य ऐसी दिसलि म्हणवुन पण शुद्ध मराठी मधिमा लोकासि नकळे देखुनु ह्या पुराणाचा फलु बहुतां

जनांसि सुफळु होऊंसि, काय केलें, मागिल्या कवेश्वरांचीं बहुतेकें अवघडें उत्तरें सांडुनु सांपुचेयां कवेश्वराचिये रितु प्रमाणें आणियेंकें सोपीं ब्राह्मणाचे भासेचीं उत्तरें ठाईं ठाईं मिसरित करुनु कवित्व सोपें केलें.

**वामनपंडित**--हे यथार्थदीपिका । यथास्थित अर्थाची प्रकाशिका । स्वयें भगवत करितां टीका । भीड येथें कोणाची ॥ १९८ ॥ आतां त्याग बोलतां जें श्रीपती । बोलिला की ' विचक्षण सर्वकर्मफलत्यागातें ' ये रीती । अगा अर्जुना प्रकर्षें बोलती । पूर्वापर विचारें ॥ १९९ ॥ त्याचा ऐसा सिद्धांत । पोटीं धरूनी बोलिला भगवंत । कीं कर्म नित्य वेदोक्त तें निश्चित । करावे आणि फल त्याचें त्यागावें ॥ २०० ॥ सिद्धांत ऐसा अंतरीं । आणि गोष्टी टाकिली विचक्षणांवरी । कीं विचक्षण ऐसें बोलती म्हणूनी परी । जनास अविचक्षणही वाटती विचक्षण ॥ २०१ ॥ यथार्थदीपिका १८.

व्यापक नसे शरीरीं । तों भोग घडे कोणेपरी । अत एव सूक्ष्मतर परी । भिउनी भेदवादी म्हणती व्यापक ॥ ९५०॥ की चंदनाचा बिंदु सूक्ष्मतर । परी शैत्यें व्यापी शरीर । ऐसें बोलती परंतु चरणीं पडतां नीर । नव्हे ओला टिळा ललाटीं, हें नकळे ॥ ९५१ ॥ चरण भिजती जळीं । परी टिळा ओला नव्हे चंदनाचा कपाळीं । पाय पोळतां अग्निज्वाळीं । चंदन ललाटीं नव्हे उष्ण ॥९५२॥ तैसा छेदितां हात । जीव दुःखी नव्हे हृदयांत । तरी हा समजेल दृष्टांत । व्यापकत्वीं ॥ ९५३ ॥ यथार्थदीपिका अध्याय १५.

**तुकारामः**--वाघे उपदेसीला कोल्हा । सुखें खावें यावें मळा ॥ अंती मरसी तें न चुके । मज ही मारीतोसी भुकें ॥ येरु भळा भळा । निवाड तुझ्या तोंडें जाळा ॥ देहे तो जान्हार । घडेल हा उपकार ॥ येरु म्हणे मनीं । ऐसे जावें समजोनी ॥ गांठी ठकां ठकां । त्यांचा धर्म बोले तुका ॥ ( ज. गा. ३०५१ )

**महानुभावीय गोपीभास्करकृत शुकचरित्र**:--भगें पडलीं राया इंद्रा । कलंक लागला चंद्रा । रुखमांगदा नरींद्रा । घडला पुत्रवधु ॥ ९८ ॥ स्त्रीत्व जालें नारदा । विटंबना जाली ऋषीशृंगा । रावण पावला भंगा । राक्षसां-सहित् ॥ ९९ ॥ ब्रह्मया जाला अपमान । भस्मासुरा जालें दहन । मृत्यु पावला दुर्योधन । श्रापें द्रौपदीचेनि ॥७००॥ तिलोत्तमें कारणें । दोन्ही दैत्यां जालें मरणें ॥ पुरुरवा भुलविला उर्वशीनें ॥...७०१ ॥ कामाचेनि अभिमानें । सैवरीं आटतीं सैन्यें । नाडले बहुताकारणें । आयुष्य तुटती ॥७०२॥ जन्ममरणाचा ठेवा । स्त्रीसंगेंचि जोडला जीवां । जन्माजन्मीं तुझियां सेवा । गेलिया रंभे ॥३॥ तुवां अर्जुना केला नपुंसक । पक्षिया केला वेदघोष । तैसा नको मज देख । रंभे जाय जाय ॥४ ॥

**एल्हणकृत अष्टविवाहवर्णन**:--पाहावा जेणें विरविला शंकरू । तो महान दाटला कैसा लेकरू । ते मायराणी आदिगुरु । आम्हा बायलांचा ॥ विष्णु धरिले स्त्रीरूप मोहिनी । देखोनि ब्रह्मा भुलविला ततक्षणी । कैसा विचळला तपापासौनि । आमुचेनि बालंभें ॥ लवणासुराचेनि मांसें । नारायणु बुडाला न दिसे । तो हात देवोनि अनियासें । काढिला कमलजा देवी ॥ पतिव्रते दमयंतिचेनि अभिलाषें । देव नळ जाले तनासरिसें । ते सामर्थ्यबळ नेणवे कैसें । आम्हां बाइलांचे ॥ गौतमाचिये अहिल्ये लागौनी । इंद्रें केली कपटकरणी । तैहौनि चंद्र कळांकिया सहस्रनयनी । मूर्ती इंद्राची ॥९५५

**अठरावें शतक**--या अठराव्या शतकांत मागील शिवशाहीच्या वेळची एकंदर परिस्थिति बदलली. त्यावेळचें वातावरण पार बदललें. मुसलमानांविषयीं वाटणारा परकीयपणा बहुतेक नाहींसा झाला. शिवशाहीचा व त्याबरोबरच स्वराज्यस्थापनेचा उत्साह व आनंद ओसरून मराठ्यांच्या हाडीमाशीं शंभुछत्रपतींच्या अमानुष छळामुळें व शाहूच्या कैदेमुळें एक प्रकारची सूडाची भावना सळसळत होती, परंतु शाहूच्या सुटकेनें सर्व परिस्थिति एकदम बद-लली. स्वार्जित स्वराज्याबद्दल जो एक जागता अभिमान होता तो शाहूकाली राहिला नाहीं. दिल्लीपतीच्या मोहबतीनें आपण मुक्त झालों व त्याच्याच मोहबतीनें आपण तख्तनशीन झालों आहों; तेव्हां त्याच्या कृपाकटाक्षाप्रमाणें मराठ्यांचें राज्ययंत्र फिरलें पाहिजे अशी शाहूची कल्पना होती. मुख्य केंद्रवर्ती राजसत्तेची परकीयांबद्दल भावना ही अशा प्रकारची होती. हीच परकीयांबद्दल आत्मीयत्वाची भुरळ त्यांना भाषेसंबंधीही पडली. ह्याच परानुवर्तित्वाचा ठसा शाहूकालीन किंवा पेशवेकालीन भाषेंत उमटल्यास नवल काय? मूळ समजूतच तशी असल्यानें मराठी भाषेच्या बाबत किंवा मराठा धर्माच्या बाबत जितकी जाज्वल्य ज्योत शिव व शंभु ह्या छत्रपतींच्या काळांत तेवली तशी शाहू-कालीं तेवली नाहीं. भाषेची मगरमिठी जी बहामनी काळांत बसली ती शिवकालांत तशीच राहिली किंवा थोडीशी

ढिलावली, परंतु पेशवाईत मात्र ती ज्यास्त जखडून आवळली गेली व शिवशाहीत भाषेसंबंधीं जे थोडेसे प्रयत्न झाले ते निरर्थक झाले. लेखक सुशिक्षित संस्कृतज्ञ असला तरी त्याला फारशीच्या कचाट्यांतून मराठीला सोडवितां आलें नाहीं. काव्यांत मात्र फारशी शब्द फार कमी आढळतात. राजदरबार, घरव्यवहार, बाजारहाट, सैन्यमुकाबला वगैरे हरएक क्षेत्रांत फारशीमय मराठीच वापरली जात होती असें तत्कालीन पत्रव्यवहारावरून दिसतें. मराठी व फारशी यांचा संबंध दृढावण्यास आणखीहि एक कारण झालें. पेशवाईच्या प्रथमार्धांत मुलुख-गिरीची परमावधि झाली. मुलुखगिरींत हर्षामर्षाचे प्रसंग यावयाचे ते महमदीयांशी किंवा अन्य भाषीयांशी. तेव्हां या धुमश्चक्रींत कोण कोणाचे किती शब्द घेतो, कोणाच्या भाषेचा परिणाम आपल्या भाषेवर झाला याजकडे लक्ष देण्यास कोणास फावत नव्हतें. म्हणूनच बहामनी कालांत मराठीच्या भोंवती जी एक फारशी भाषेची पोलादी चौकट घातली गेली त्याच चौकटींत पेशव्यांच्या ब्राह्मणशाहींतहि मराठी भाषा जखडलेली दिसत. शिवाय बहामनी बादशाही किंवा तिची झालेली उत्तरकालीन शकलें किंवा त्यांच्यानंतर आलेली निजामत ह्या सर्व राशियती महमदी धर्माच्या होत्या तरी त्यांचा धर्माचा कडवेपणा इतका विकोपास न गेल्यामुळे इतर दृष्टीनें त्या स्थानिक लोकांत सामावून गेल्या. ह्या सत्तांबद्दल तेथील लोकांना परकीपणा वाटला नाहीं. यामुळे त्यांच्या भाषेवर महमदीयांच्या सान्निध्याचा परिणाम झाला. मराठीवरील फारशीचा परिणाम दृढावण्याचे हें आणखी एक कारण. फारशी शब्द मराठींत शिरून त्यांचा परकीपणा सामान्य लोकांच्या लक्षांत न येण्याइतके ते शब्द लोकांच्या अंगवळणीं पडले. परंतु मोरोपंतासारखे विद्वान् संस्कृत पंडित यांना परकी म्हणून दूरच ठेवीत. मोरो-पंताची कविता संस्कृतप्रचुर व स्वतः त्याने म्हटल्याप्रमाणे 'संस्कृतप्राकृतमिश्रित' अशीच आहे. परकी फारशी शब्द त्यांत सहसा सांपडत नाहींत. मोरोपंताची एकंदर कविता पाउण लाखावर आहे व ती रामजोशीसारख्या उत्कृष्ट कथेकऱ्याच्या रसाळ वाणीतून लोकांत प्रसृत झाली व लोकांना त्या कवितेची गोडी उत्पन्न झाली. याचा परिणाम एकंदर मराठी भाषेवर झाल्याशिवाय राहिला नसला पाहिजे. भक्त वाङ्मयांतच एकंदरींत हे परकी शब्द न वापर-ण्याचा कटाक्ष दिसतो. परंतु त्यांतहि मोरोपंताच्या वाङ्मयसंपत्तीत ते फारच कमी सांपडतात. मोरोपंताप्रमाणे महि-पतीच्या भक्तलीलामृत इत्यादि लोकांच्या आवडीच्या ग्रंथांचाहि परिणाम एकंदर फारसीचा जो जोर होत होता त्याला कांहीं तरी प्रतिकारक झाला असावा. महिपतीची भाषा सोपी, सरळ व रसाळ असल्यामुळें सामान्य लोकांना ती सहज समजते व यामुळें असल्या भाषेचा इतर विद्वत्तापूर्ण संस्कृतमिश्रित भाषेहून लोकांच्या मनांवर अधिक परिणाम होतो. महिपतीच्या ग्रंथासारखेच श्रीधराचे पांडवप्रताप, हरिविजय, रामविजय इत्यादि ग्रंथहि लोकप्रसिद्ध होते. मात्र याची भाषा महिपतीपेक्षां जरा वरच्या दर्जाची आहे. अशा रीतीने मोरोपंत, महिपती, श्रीधर इत्यादि कवींनीं वाङ्मयनिर्मिति करून मराठी भाषेला उत्कर्षाप्रत नेली व फारशीचा जोर आपल्या प्रांतांत तरी कमी केला आणि तिला एक निराळें वळण लाविलें. यामुळें मराठीचे निरनिराळे दोन प्रवाह झाले. दुसरा प्रवाह शाहिरी वाङ्म-यांत व लोकप्रचारांतील भाषेत पाहावयास मिळतो. या शतकाच्या उत्तरार्धांत लावण्या व पोवाडे यांच्या रचनेला जोर येत चालला व पुढील एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत तो तसाच असलेला दिसतो. हें शाहिरी-वाङ्मय सामान्य लोकांनीं रचलेलें व सामान्य लोकांकरितांच असल्यामुळें त्यांत फारशी शब्द जरा अधिक आढळतात. ते शब्द त्या वेळीं सामान्य लोकांच्या प्रचारांत असले पाहिजेत. यावरून आपणास असें दिसून येईल की, फारशी ही मराठीवर आपला अमल चालवीत होती व मोरोपंतासारखे विद्वान् तिच्या प्रसाराला प्रतिकार करीत होते व मराठीला संस्कृत वळण लावीत होते. अशाच रीतीने या काळांत कचेश्वर, निरंजनमाधव, शामराज, कृष्णदयार्णव, मध्वमुनी, इत्यादि कवींनीं मराठी भाषेची उत्तम सेवा केली. ह्या त्यांच्या सेवेनें मराठीला एक सुसंस्कृत असें वळण लागलें. सामान्य भाषेहून किंवा राजदरबारच्या भाषेहून ही बरीच निराळी होती. या वेळी फारशीचा उच्चारांवर झालेला परिणाम कंठ्य, दन्ततालव्य, महाप्राणमिश्रित वर्ण इत्यादि वर्णांच्या बाबतींत जास्त दृग्गोचर होतो. शब्दांतील अ अर्धा किंवा तोकडा उच्चारण्याची फारशीची लकब मराठींत आली. उदा० गवत, नवल, इ०. मूळचे व्यंजनान्त फारशी शब्द मराठींत स्वरान्त उच्चारले जाऊं लागले आणि आंतर व्यंजनेहि स्वरान्त, झालें. उदा० गुजरान्, निशान् हे शब्द गुजराण, निशाण असे मराठींत रूपांतर पावले. त्याप्रमाणें सर्कार, अप्कारी, जर्तार यांच्या ऐवजी, सरकार, अपकारी, जरतार हे शब्द आले.

**विशेषः**--ए, ऐ, ओ, औ हे उच्चार जेव्हां शब्दाच्या आरंभीं येतात तेव्हां त्याचा उच्चार ये, यै, वो, वौ केले जातात. ही लकब सर्व द्राविडी भाषांमध्यें आहे तीच पेशवेकालीन मराठीनें कानडीच्या संसर्गानें उचललेली असावी. उदा० यीची, यैसीजे, यैवजी, येथान्याय, येक, वोक, वोषध. इ आणि उ हे स्वर अंती असल्यास त्यांच्याऐवजीं अ उच्चारण्याची लकब दिसून येते. उदा० सतत ( सतति ), भाव ( भाऊ ), अग्न ( अग्नि ). व्यंजनांचें द्वित्व गाळलेलें दिसतें. उदा० हाली ( हाल्ली ), अठावीस, शुध. क्रियापदांच्या रूपांत उपान्त्य इकार फार आढळतो. उदा० म्हणिजे, करिताहे, असिले, करिजेतो, काढिले. असें या ऐवजी ऐसें हें रूप होतें. उदा० ऐशास, ऐसी, ऐशीं इ० त्याप्रमाणे तैशामध्ये असें रूप तशामध्ये या ऐवजीं आलेलें दिसते. तृतीयेच्या 'नें', 'नीं' या प्रत्ययांच्या ऐवजीं णे, णी हे प्रत्यय फार उपयोगात आणलेले दिसतात. उदा० याणी, त्याणे, त्यांणी. 'ष' आणि 'श' याऐवजी 'स' येतो. उदा० निरंटने, सिवाजी, असी, जसी, च्यारसे. तालव्य आणि दंततालव्य यामध्यें घोंटाळा झालेलाहि क्वचित् दिसतो. उदा० च्यारसें. काही विशेष रूपेंः--दिधल्यानें, दिल्ही, आयके, प्रजन्यकाल. नामांचीं व सर्वनामांचीं विभक्तिरूपें पुढें दिल्याप्रमाणे होतात. त्यात आणि हल्लींच्या रूपांत विशेष फरक आढळणार नाहीं. प्रथमेचा 'उ' प्रत्यय या कालीं नाहीसा झाला. शब्दाचें मूळरूप तेंच प्रथमेचें. द्वितीया व चतुर्थी--यांसि, स्वामीस, राज्यास, यांसी, कामगिरीस, रयतीस, तयासी, लिगाते, गुणा, वनाप्रती. तृतीयाः--याणी, निरंटने, सौदागरे, त्याणें. पञ्चमीः--नगराहून, सूर्यप्रभेहून, देशींहून. षष्ठीः--यांची, दाणापाणियाची. सप्तमीः--ईश्वरभजनीं, मुक्कामी, अस्तमानी, शहरात, हस्तकीं, फौजेत, जागां. विशेषणाचे सामान्यरूपः--पांचा श्लोकेंकरून, असितें विषें. नामाच्या पुढें विशेषणे ठेवण्याची फारशी भाषेतील पद्धत मराठीत कधी कधी आढळते. उदा० अनानासें शभर, लारी च्यारसें, ग्रथ श्रीशंकरभगवत्पूज्यपादकृत, अनानासें प्रजन्यकालाची. शब्दयोगी अव्ययाच्या पूर्वी सामान्यरूपाऐवजी विभक्तीचें रूप आढळतें. उदा० प्राकृतभाषेकरून, गुरुशिष्यसंवादरूपें-करून, श्लोकेंकरून. ही, ती, जी, ह्या स्त्रीलिंगी सर्वनामाची रूपें ह, त, जे, अशींच आढळतात. 'त्या' हे तो याचें जें सामान्यरूप. तेंहि 'ते' असेंच आढळतें. उदा० 'ते समयीं.' क्रियापदांची रूपेंः--वर्तमानकाळः--करिताहे, रचिजेत आहेत, प्रवर्तले आहेत, प्रवर्तलों आहे, करिजेतो, होय, करी, आयके, म्हणे, मेळवी, वंदी, करिती, करिसी, नसे, जाणिजे, असे, गेले आहेत, सांगितले आहे, आहेत, नव्हे, वर्णिले नवजाय. भूतकाळः--धावों लागले, जाहलों, दीधले, करिते झाले, असिले, दिल्ही, मानले, केली, पाठविले, पावले, केला, आलों, पोहोंचलों, होते, झालें, घडों न दे. भविष्यकाळः--देईन, म्हणाल, असेल, घडेल. आज्ञार्थः--न पाठवीत जाणे. पूर्वकाल-वाचक धातुसाधितेंः--निघोन, होवोनी, देखोन, म्हणोनी, जावोन, म्हणोन, म्हणवून, करून, सोडून, घेऊन, जाऊन, काढून, घालून इ०. तुमंतः--आणावयास, करावयासी, वधाया.

**अठराव्या शतकांतील उतारे**--**पत्रव्यवहारः**--सन १७२२, श. १६४४ भाद्रपद शुद्ध १४. स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४९ शुभकृत नाम संवत्सरे भाद्रपद शुध त्रयोदसी मदवार क्षत्रियकुलावतंस श्रीराजा छत्रपतीस्वामी याणी समस्तराजकार्यधुरधर...राजश्री कान्होजी आंगरे सरखेल यांसि आज्ञा केली ऐसी जे राजश्री नारो कृष्ण उपनाम जोशी शांडिल्य गोत्र हे स्वामीच्या राज्यांतील पुरातन सेवक या राज्यांत निरंटने सेवा केली त्याउपर सेवा सोडून आपला काल सार्थक व्हावा याकरितां स्नानसंध्या करून ईश्वरभजनी लागले. यांची योगक्षेमाची अनुकूलता करून दिधल्यानें स्वामीस व स्वामीच्या राज्यास श्रेयस्कर याकरितां विशाळगडचें मुक्कामीं कैलासवासी थोरले स्वामी कसबा मुरूड ता पचनदी प्रा दाभोळ पैकी त्कारी दाभोली लारी च्यारसें पुत्रपौत्री वृती पूर्वी राजश्री शिवाजी राजे दाजी याणी दिल्ही प्रस्तुत नारो कृष्ण याणी वैकुंठवास केला. त्यांचे पोटीं संतत नाही या-करितां त्यांचे भाव राजश्री माहादाजी कृष्ण व गोविंद कृष्ण याणी विनंति केली व पत्रें आणून दाखविली.--मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड २०, पृ. ४१५.

इ. स. १७६१--राजश्री मोराजी शिंदे नामजाद, जजीरे रत्नागिरी गोसावी यासी अखंडितलक्ष्मी राज-मान्य श्री रघुनाथ बाजीराव. सुा इसने सितैन मया व अलफ. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. अनानासें शभर पाठविलीं आहेत म्हणोन लिहिलें ते कळलें. ऐशास शंभर अनानास पैा अठावीस येथें आलीं, तीहि नासलीं.

असला नासका जिन्नस हुरून न पाठवीत जाणें. असें पूर्वी लिहिले असतां हाली रयतीस हैराण करून अनानासें प्रजंनकालाचीं पाठविलीत हे गोष्ट कामाची नसे. याउपरी पाठवीत न जाणें. जाणिजे.—म. इ. सा. १०, पृ. १

सेवेसी सां नमस्कार विज्ञापना ता मंदवार पावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष. काळ निरोप घेऊन आलों ते अस्तमानीं पोहोंचलों. चि. रा. नरहर बापू शहरांत भेटले. त्याणीं सांगितलें कीं मी कामगिरीस जातों. तेथून आल्यावर पत्र देईन. ते लष्करांतून चद्रोदयीं निघोन नगरास गेले. फडणीस तेथें होते त्यांस नेलें. बरोबर फौज आहे. हें वर्तमान श्रीमंतास आज कळलें. त्याजवरून मर्जी दिक आहे. रा. बाळोजी बाबा सकाळीं वाड्यांत जाऊन लष्करांत गेले आहेत. नगराहून बक्षी व बाळोबा तात्यास आणावयास सांगितलें आहे.—म.इ. सा. १०, पृ. ३८६

**निरंजनमाधव:**—आतां वाक्यसुधानाम ग्रंथ श्रीशंकर भगवत्पूज्यपादकृत त्याची टीका प्राकृतभाषेंकरून कवि निरंजन करिताहे। त्यास प्राकृत म्हणिजे अपशब्द होय असें असतां करावयासी प्रयोजन काय म्हणाल तरि प्राकृत अर्थानृत असिले तरि दोषावह आहे। शब्दानृत दोषावह नव्हे। म्हणवून बालबोधार्थ रचिजेत आहेत।...... ऐसीं वाक्यें आहेत। पुरातन शिष्टही प्रवर्तले आहेत । हें पाहून मीही प्रवर्तलो आहें। गुरुशिष्यसंवादरूपेंकरून तत्त्वमसिवाक्य प्रवृत्त झालें। त्यामध्यें त्वंपदार्थ जीव त्याचा विवेक पांचा श्लोकेंकरून प्रथम करिजेतो।

असो कन्या धन्या त्रिजगजनमान्या सुचरिता। नव्हे हे सामान्या नवतरुणि कदर्पभरिता। स्पृहा यीची सोर करिति नृपती ऐकुनि गुणा। न आणी जे पार्थाविण अणिक तो वल्लभ मना ॥ ४४ ॥—सुभद्राचंपू.

**श्रीधरकृत शिवलीलामृत:** —सौदागरें तें काढून। तीच्या हस्तकी घातलें ककण। येरी होवोनि आनद-घन। नेम करी तयासीं ॥ ५८ ॥ पृथ्वीचें मोल हें ककण। मीही बत्तीसलक्षणी पद्मिण। तीन दिवस संपूर्ण। दासी तुमची झालें मी ॥ ५९ ॥ तयासि तें मानले। सवेंचि त्याणें दिव्यलिंग काढिलें। सूर्यप्रभेहून आगळें। तेज वर्णिलें नवजाय ॥ ६० ॥ लिग देखोनि ते वेळी। महानंदा तन्मय झाली। म्हणे जय जय चद्रमौळी। म्हणोनि वंदी लिंगातें ॥ ६१ ॥ त्याच्या आज्ञेकरून। नृत्यशाळेस लागला अग्न। जन धांवों लागले चहूकडोन। एकचि हांक जाहली ॥ ६६ ॥ तीस सावध करी मदनारी। म्हणे अग्नि लागला ऊठ लवकरी। येरी उठली घाबरी। तव वाता-त्मज चेतला ॥ ६७ ॥ तैशामाजी उडी घालून। कठपाश त्यांचे काढून। कुक्कुटमर्कट दीधले सोडून। गेले पळोन वनाप्रती ॥ ६८ ॥ —शिवलीलामृत अध्याय ११

**मोरोपंत-केकावली:**—सुविद्य धन मेळवी वचन आयके आवरी। प्रपंचभर घे शिरीं करि कृपा पिता त्यावरी ॥ असा जरि नसे रुचे तरि न तो अभद्र क्षण। तसा तुजचि आवडे करिसि तूचि तद्रक्षण ॥ ९४ ॥ पिता जरि विटे विटो न जननी कुपुत्रीं विटे। दयामृतरसार्द्रधी न कुलकज्जलें त्या किटे। प्रसादपट झांकिती परि परा गुरूचे थिटे। म्हणूनि म्हणती भले न ऋण जन्मदेचें फिटे ॥ ९५ ॥

ऐसीं वचनें वमला धर्म पयोनिधि जसीं विषें असितें।
तेव्हां त्यासि वधाया क्षुब्धमना श्वेतवाह घे असितें ॥ १ ॥
झाला क्रुद्ध धनंजय मारीन म्हणे मनी न लेश वदे।
तें समजे स्वाश्रितजनतारक भलतें घडों न केशव दे ॥ २ ॥—कर्णपर्व—अध्याय ४१.

**भाऊसाहेबांची बखर:**—इकडे भाऊसाहेबांकडील वर्तमान तरि लष्करांत महागाई झाली. भोंवताले गिलचे फिरों लागले. दाणापाणियांची रस्त फौजेंत पोंचेनाशी झाली आणि जामदारखान्यांतील खजिना कुल खालीं आला. अन्नदुष्काळ आणि दामदुष्काळ, दोनींस ऐक्य जालें. मनुष्यास अन्नाचें खोबरें जालें. दिवसामध्यें मनुष्यास अर्धशेर भाकर मिळेनाशी जाली. येथें हत्ती घोडे यांचा विचार काय पहावा? लष्कर केवळ जेरीस आलें. घोडे मनुष्यांची हिंमत हरली. तमाम फौजेंत निरवानिरव होऊं लागली. कोणास जगून कसा जाऊं असा भरंवसा नाहींसा जाला. ते समयीं भाऊसाहेब याणी प्राणांतसमय जाणून आपले जागा विस्मय करिते जाले कीं, "आम्ही गनीम, मोंगलाचे अन्नपाणी बंद करावें. तें न करतां आमचाच आटा बंद जाला. तेव्हां सर्व उपाय राहिला. देशींहून कोणी कुमक करावी, तेही आस्था राहिली. समागमें मुलें मनुष्यें आणिलीं एवढें बाईट केलें. असो. आप मेला जग बुडाला. ज्याचे दैवीं असेल तें घडेल." म्हणोन मनांत चढउतार करूं लागले.

**एकोणिसावें शतक:**—आधुनिक मराठी किंवा शिष्ट अभिजात मराठी, या शतकात बनली. या शतकांतील मराठीचीं दोन स्थित्यंतरें दिसतात. या शतकाच्या सुरवातीला कांहीं वर्षे पेशवाई होती. त्या वेळीं पूर्वीची जुनी फारसीमिश्र मराठीच उपयोगांत होती. ही गोष्ट पुढें दिलेल्या पेशवाईतील पत्रव्यवहारावरून चांगली स्पष्ट होते. पेशवाईनंतरहि कांही वर्षे हा पूर्वीच्या भाषेचा परिणाम कायम होता. शाहिरी पोवाड्यांतून आणि लावण्यांतून फारशी शब्द असलेले आढळतात. अशा रीतीनें साधारण मानानें, इ. स. १८१८ मध्यें पेशवाई बुडाल्यानंतरचीं आणखी ७–८ वर्षे मिळून या एकोणिसाव्या शतकाची पहिलीं पचवीस वर्षे हीं फारशीमिश्र मराठीचा किंवा जुन्या मराठीचा काल असें म्हणतां येईल.

इ. स. १८१८ पासून इंग्रजी अमल सुरू झाला. ही जी राज्यक्रांति झाली तिच्याबरोबर भाषेच्या स्वरूपांत आणि पेहेराव इत्यादि गोष्टीतहि फरक झाला. हिंदुस्थानला विद्यादान करणें हें आपलें श्रेष्ठ कर्तव्य आहे असें त्या वेळीं गव्हर्नर असलेल्या एल्फिन्स्टनसाहेबाला वाटलें व त्याप्रमाणें विद्यादान करून हिंदुस्थानला सुधारण्याचें काम त्यानें हातांत घेतलें. इ. स. १८२२ सालीं 'बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' नांवाची एक संस्था स्थापन झाली होती, तिला एल्फिन्स्टननें सरकारांतून बक्षिसें देण्याकरितां आणि नवीन पुस्तकें छापण्याकरितां म्हणून पांच हजार पौंडांची मदत देवविली.

एल्फिन्स्टनसाहेबाची कारकीर्द सुरू होण्यापूर्वी ढाकाबंगाला प्रांतांत एक मोठें आंदोलन सुरू झालें होतें. त्याचें मुख्य ठिकाण श्रीरामपूर हें होय. येथें ख्रिस्ती मिशनऱ्यांनी देशी भाषेची कोशव्याकरणें तयार करून प्रसिद्ध करण्याचा उद्योग चालविला होता. डॉ. विलियम कॅरे हा मिशनरी पंडित या मंडळींत अग्रेसर होता. त्यानें इ. स. १८१० मध्यें विद्यानाथ नांवाच्या पंडिताच्या साहाय्यानें मराठी-इंग्रजी कोश छापून प्रसिद्ध केला. या ग्रंथांत मराठी शब्द मोडी ठसे करून छापले आहेत. यानंतर आणखी सिंहासनबत्तिशी, रघूजी भोंसल्याची वंशावळी, गीताभावचंद्रिका हीं पुस्तकें बाहेर पडली, आणि नंतर इंग्रजी कारकीर्द सुरू झाली आणि पुस्तकें तयार करण्यास आणि छापण्यास सरकारांतून उत्तेजन मिळाल्यामुळें तीं पुष्कळच अधिकाधिक तयार होऊं लागलीं. छापण्याची कला मुंबईत हळु हळू पसरत चालली आणि वरील पुस्तकांतील शेवटचें पुस्तक प्रसिद्ध आणि अत्यंत जुन्या अशा गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत छापलेलें आहे. अशा रीतीनें सरकारी उत्तेजनानें आणि छापण्याच्या कलेच्या प्रसारानें मराठीत ग्रंथांची वाढ झपाट्यानें होऊं लागली.

यापूर्वी मराठीत थोडी पुस्तकें होतीं व जी होतीं त्यांची माहितीहि फारशी कोणास असावीसें दिसत नाहीं. किंबहुना तो वाङ्मयप्रवाह लुप्त झाला आणि सर्व मंडळी इंग्रजी नव्या अवताराच्या झळाळीनें दिपून गेली. गणितादि शास्त्रें किंवा व्याकरणकोश यांसारखी पुस्तकें नसल्यानें तसलीं पुस्तकें तयार करण्याचा प्रयत्न सुरू झाला आणि अनेकविध विषयांवर पुस्तकें तयार होऊं लागलीं.

इंग्रजी अमदानीमुळें आणखी महत्त्वाचा फायदा म्हणजे इंग्रजी भाषेतील वाङ्मयाचें भलें मोठें दालन महाराष्ट्रीयांना उघडें झालें हा होय. पाश्चात्य वाङ्मय आणि विद्या शिकविण्याचें ठरल्यावर पुढें तर अनेक लोक हें वाघिणीचें दूध पिऊन तयार झाले आणि त्यांनीं इंग्रजी वाङ्मयवनांत विहरून निरनिराळ्या ग्रंथांची शिकार करून ती मायघरीं आणून ठेविली. अशा रीतीनें इंग्रजी ग्रंथांचें मराठींत भाषांतर करण्याचा एक नवीन प्रघात पडला. यापूर्वी सरकारी भाषा जशी फारशी होती व ज्याप्रमाणें तिनें मराठीवर जबरदस्त पगडा बसविला तशी यापुढें इंग्रजी राजभाषा झाली आणि तिनें मराठीच्या घरांत आपला चंचुप्रवेश करण्यास सुरवात केली. इंग्रजी पुस्तकांच्या भाषांतरांतून इंग्रजी तऱ्हेची वाक्यरचना आढळते.

मराठींत विरामचिन्हें या काळांतच उपयोगांत येऊं लागलीं. हीं इंग्रजींतूनच मराठींत आलीं. विरामचिन्हांच्या उपयोगानें अर्थबोध स्पष्ट होतो. त्याप्रमाणेंच प्रत्येक शब्द तोडून लिहिण्याचीहि प्रथा पडली.

या शतकांत इंग्रजी भाषेच्या परिणामापेक्षां संस्कृत भाषेचाच परिणाम मराठीवर अधिक झालेला आहे. फारशी नामोहरम झाली ती इंग्रजीच्या परिणामामुळें नसून संस्कृतच्या परिणामामुळें. हा संस्कृतचा परिणाम संस्कृतज्ञ शास्त्रीपंडितांनीं मराठींत लिहिण्यास सुरवात केल्यामुळें झाला. सरकारनें या शास्त्रीपंडितांकडून त्यांच्या मदतीनें अनेक पुस्तकें तयार केलीं व तींच पुस्तकें छापिल्यामुळें व त्यांचा प्रसार झाल्यामुळें तसलीच भाषा रूढ झाली.

इंग्रजी अमलाच्या अव्वल अमदानींत विद्याखातें जें स्थापिलें गेलें व त्याच्यामार्फत जीं पुस्तकें लिहिलीं गेलीं ती सर्व पुस्तकें शास्त्रीलोकाकडून लिहिली गेलीं व त्यामुळें त्यांच्या संस्कृतप्रचुर भाषेचा मराठीवर परिणाम झाला. जांभेकर, तळेकर, चिपळूणकर वगैरे कर्ती मंडळी शास्त्री होती आणि त्यांनीं लिहिलेल्या अनेक प्राथमिक पुस्तकांत उर्दू शब्दास थारा मिळाला नाही. मराठी जुन्या पद्यांत उर्दू शब्द कमीच होते व त्याच भाषापद्धतीचा त्यांनीं स्वीकार केला; आणि अशा रीतीनें मराठीचें पहिलें साधें रूप जाऊन तिला पंडिती किंवा शास्त्रीय वळण लागलें; आणि तिला भारदस्त व पोक्त स्वरूप प्राप्त झालें. शास्त्रीमंडळी मराठी लिखाणांत फारशी उर्दू शब्द वापरण्याच्या बाबतींत किती प्रतिकूल होती ही गोष्ट मराठी भाषेचा कोश म्हणून जो शास्त्रीमंडळीकडून पहिला मराठी कोश तयार करण्यांत आला त्याच्या प्रस्तावनेमध्यें त्यांनीं फारशी शब्दांबद्दल जे मत व्यक्त केलें आहे त्यावरून स्पष्ट होईल.

"या देशीचे राज्य पूर्वी कितीएक वर्षें यवनांनीं केलें. त्यामुळें यवनी भाषेंतील दर, तयार, रोज, शाल्गुदस्त इत्यादि कितीएक शब्द या भाषेंत मिसळले आहेत. ते राजकीय व्यवहाराचे अनुरोधानें आले असून राजकीय व्यवहारींच प्राधान्येंकरून वर्ततात आणि तेथेंच शोभतात. इतर साधारण व्यवहारीं सरासरी बरे दिसतात; परंतु शास्त्रीय व्यवहारासंबंधीं प्रौढ म्हणून जी भाषा तींत तर अगदींच शोभत नाहींत. याकरितां प्रौढ भाषेंत ते शब्द घेऊं नयेत."

या शतकांत भाषेचें जें स्वरूप साधारण मानानें निश्चित झालें त्यांत शुद्ध देशीपणा दिसत नाही. 'इंग्रजांची अमदानी प्रथम सुरू झाली ती कोंकणांत व तिच्या सुराज्याचें व स्वास्थ्याचें सुख प्रथम लाभलें तें तेथील लोकांना. त्यांच्या शिक्षणाचें, सुधारणांचें व संस्कृतीचें बीज तेथें रुजून तेथील लोक त्यांच्याशीं लवकर समरस होऊं शकले. नवीन पादाक्रांत केलेल्या प्रदेशांत इंग्रजांनीं ज्या काही सुधारणा सुरू केल्या त्या अर्थात् ह्या लोकांच्याच सल्ल्यानें केल्या असल्या पाहिजेत. ह्या लोकांत मुंबईच्या आणि कोंकणच्या लोकांचा भरणा विशेष होता. त्यामुळें इंग्रजांनीं जें भाषा-शिक्षण सुरू केलें त्यावर कोंकणी भाषेचा परिणाम झाला. पूर्वीचा शुद्ध देशीपणा जाऊन मराठीवर कोंकणी भाषेचा थोडासा ठसा उमटला. ही स्थिति विष्णुशास्त्र्यांच्या निबंधमालेपर्यंत होती. म्हणजे या शतकांत पहिलीं पंचवीस वर्षें जुन्या मराठीचीं आणि नतरचीं पन्नास वर्षें ही कोंकणी ठसा उमटलेल्या व शास्त्रीय वळण प्राप्त झालेल्या अशा मराठीचीं व नतरचीं वर्षें आधुनिक भारदस्त आणि शिष्ट मराठीचीं. विष्णुशास्त्र्यांनीच भाषेला हें उच्च स्वरूप प्राप्त करून दिलें व त्यांची भाषा हीच शिष्ट किंवा मध्यवर्ति मराठी म्हणून मानली गेली. हे जे तीन भाग पाडले हे मराठीच्या या शतकांतील तीन अवस्थांस धरून पाडले. मात्र त्यांतील भेद सूक्ष्म आहेत. पहिल्या पाव शतकांतील भाषेचें स्वरूप पुढील दोनहि भागांतील स्वरूपापेक्षा निराळें आहे हें मात्र चटकन् लक्षांत येण्यासारखें आहे.

या शतकांत वाङ्मयनिर्मिति फार झाली. कोश, व्याकरणें, इत्यादि शास्त्रीय ग्रंथ, नाटकें, नावलें, कथा, इत्यादि ललितवाङ्मय, चरित्रें, निबंध, इतिहास, भूगोल इत्यादि वाङ्मयाच्या प्रत्येक शाखेंतील ग्रंथ तयार झाले. बापू छत्रे, बाळशास्त्री जांभेकर, परशरामपंत गोडबोले, दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री, लोकहितवादी, बाबा पदमनजी, विठोबा अण्णा, विष्णुशास्त्री, टिळक, आगरकर, केशवसुत इत्यादि अनेक ग्रंथकार या शतकांतील होत.

या शतकांतील मराठी व हल्लीं प्रचलित असलेली मराठी यामध्यें फरक आढळत नसल्यानें पुढें भाषेच्या स्वरूपासंबंधीं विवरण केलें नाही. चिपळूणकरांच्या पूर्वीच्या कालांत काही थोडीं रूपें व शब्द मात्र जुन्या तऱ्हेचे आहेत. हल्लीं तशीं रूपें व ते शब्द प्रचारांत नाहींत. उदाहरणार्थ काहीं देतों.

त्यांला, ( त्यांना ), त्यांणीं (त्यांनी), घेऊं आदरिलें ( घेतलें, स्वीकारिलें ), पण चालला ( पण लाविला ), त्यांपासून ( त्यांच्याकडून ), त्यांची आईबापें ( त्याचे आईबाप), बोलायाची (बोलण्याची), मुख्यत्वेंकरून ( मुख्यतः ), याकडे ( यांत ), याजकरितां ( याकरिता ), वाग्व्यवहारकर्ता जो काणी त्यास ( वाग्व्यवहारकर्त्यास ) जा जा ( ज्या-ज्या), भाषेचा (भाषेच्या), अखवानजो (गुरुजी), बोलवावें (बोलावीत असे), बसावयास लागत असे ( बसावें लागे ).

**एकोणिसाव्या शतकांतील उतारे—पत्रव्यवहार**:—दंडवत विनंति उपरी. तुम्ही चिठी पाठविली ती पावली. लिहिला मजकूर कळला. त्यास आम्रजांशीं तह दारमदार करून जाला. त्यांजकडून आतां आगळीक व्हावी ऐसें राहिलें नाहीं. पलटणें चाकर होतील, हा संशय तुम्हांस होता. त्यास, श्रीदयेनें तो प्रकार जाला नाहीं व आम्ही

केला नाही. तहाचा तपशीलही, तुम्हाकडील ग्रहस्थ येथें आहेत, त्यांचे लिहिल्यावरून कळेल. मसलतीचे प्रकर्णी तुम्ही व राजश्री श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव ऐसे त्रिवर्ग, त्यांत कृष्णराव माधव याचा प्रकार श्रीजीने तैसा केला. आतां राहतांना तुम्ही उभयता आहां. तुमचे मनांत जो जो अदेश होता, तो कोणताहि एक नाही. पुढें धैर्य धरून चालणें आहे. ज्या स्थळीं तुम्ही जाण्याचें योजिलें होतें त्याप्रों जाणे तों जालें असेल. परतु तुमची भेट जालियानतर हे सर्व प्रकार बोलण्यांत येतील, तेव्हां सविस्तर समजण्यांत येईल. धैर्य व विचार तुम्हासारखियानीं सोडूं नये. जैसें लिहून पाठविलें तैसें मनात तुम्हीही टेऊन असावे. नारायण रावजी तुम्हास माझे लिहिनें हेंच की जे कर्नें ते काळावर नजर देऊन केले. त्यास आता सर्व माझे तुम्ही. जे जे सोबती आहां त्यांहींनी धैर्य व मस्लत चुकू नये हे तुमची व माझी व उभयताची बोलनीं जाहलींच होती. याप्रमानें उद्दोग असावा......बहुत काय लिहिणें हें विनति.–राजवाडे, खड १०, पृ. ४८४.

ब्राह्मण जातीत कोणीं कन्येचा नक्त ऐवज वगैरे देखील कर्जवाम काहीएक वरपक्षापासून न घेता कन्या देऊन विवाह करावे. याप्रमाणें तुम्ही तालुके मजकूर येथील धर्माधिकारी व जोशी व उपाध्ये व समस्त ब्राह्मण व देशमुख व देशपांडे व खोत व कुलकर्णी व महाजन यास ताकीद करावी. ताकीद केली असता कन्येचा नक्त ऐवज वगैर व कर्जवाम घेऊन विवाह करितील त्यांस विवाह होताच वरचेवर वरपक्षानें व मध्यस्थाने सरकारात तुम्हास समजवावें. नतर येविशीची चौकशी तुम्ही करून कन्यापक्षाने वरपक्षापासून घेतलें असेल ते वरपक्षास माघारें देऊन कन्यापक्षापासून तितकी गुन्हेगारी सरकारात घ्यावी. व मध्यस्थानें घेतले असेल ते मध्यस्थास माफ करावें. वरपक्ष व मध्यस्थ या उभयतानी सरकारात न समजाविता परभारें सरकारात समजल्यास कन्यापक्षाने वरपक्षापासून घेतलें असेल तें व तितकी गुन्हेगारी व वरपक्षापासून दुप्पट गुन्हेगारी व मध्यस्थापासून मध्यस्थीबद्दल घेतले असेल तें व तितकी गुन्हेगारी याप्रमाणे सरकारांत तालुके मजकुराकडे घ्यावयाचा ठराव करून हे सनद तुम्हांस सादर केली असे.

(वाड रोजनिशी—दुसरा बाजीराव, ५ पृ. २६६ ).

**पोवाडाः**—प्रतिवर्षिक दक्षणा लक्ष ब्राह्मण श्रावणमासी। असा धर्म आहे कुठे आवतर कोण्या ग्रामासी। निरिच्छ योगी ध्याती गाती जे ईश्वरनामासी।। अन्नवस्त्र धनधान्य तयांच्या धाडिती धामासी। नदादिप नैवेद्य ठाई ठाई विठ्ठल रामासी। उच्छाहास दिल्हे गांव सुभद्रासुताच्या मामासी।। कितीक विडे उचलून पावले मृत सग्रामासी। त्यांचे पुत्र पौत्रास मार्गे नाही दुष्काळदामासी। मुलुख सरजामास टेऊन केली कायम गल्मिाई। मनुष्यमात्रादिकांचे माहेर होति पेशवाई।। ( ए. पो. ४२१ )

आबाजीनें त्यांला तें औषध दिलें. त्यांणी पूर्वी करीत असत तशी वेडीवाकडीं तोडें न करिता तें घेऊ आदरिलें. तें अधिक संतोषानें कोण घेतो याविषयीं स्याचा पण चालला. त्या औषधानें गुण लवकरच आला आणि तीं बरीं झालीं. त्यानतर त्यांपासून कधीं अन्याय होई तेव्हां पारिपत्याचा धाक दाखविणे झाले तर त्यांचीं आईबापें त्यांस म्हणत कीं "आम्हीं तुम्हास स्वतत्र करूं." त्या शब्दानें त्यास असें भय होई कीं तुम्हांस बंदिशाळेंत टाकू असें म्हटल्यानें तसें भय वाटत नसे.—बालमित्र, आवृत्ति १ ली.

महाराष्ट्र भाषा म्हणजे महाराष्ट्रदेशीं राहणार जे देशस्थ ब्राह्मणादिक लोक त्याची बोलायाची प्राकृत भाषा. तिचा कोश म्हणजे त्या भार्षेत शब्द येतात त्यांचा कोश. कोश शब्दाचा सामान्यतः हा अर्थ आहे की प्रसगीं प्रयोगार्थ बाहेर काढावयाचा जो अर्थसघात त्याचें सग्रहाचें सांठवण. राजकीयादि व्यवहारोपयोगी जी मोहरा, पुतळ्या, होन, रुपये इत्यादि द्रव्यें यांचें सांठवण जें भांडारगृह त्यास जशी कोश ही संज्ञा प्रसिद्ध आहे तशी वाग्व्यहारोपयोगी जे शब्द तत्सग्रहरूप जो ग्रथ त्यास ही संज्ञा प्रसिद्ध आहे. राजकीयादि व्यवहारास मुख्य वेंकरून आश्रय जसे द्रव्य, त्याच प्रकारें या वाग्व्यवहारास आश्रय शब्द होत. द्रव्यकोश आणि शब्दकोश यांचें सर्व गोष्टींनी साधर्म्य आहे. परतु द्रव्यकोश क्षय्य आणि हा अक्षय्य एवढा मात्र याकडे विशेष आहे. याजकरितां वाग्व्यवहारकर्ता जो कोणी त्यास शब्दकोश पाहिजे म्हणून जा जा भाषेनें व्यवहार करावयाचा त्या त्या भाषेचा कोशावर सर्वांचा आदर अवश्य असावा.– महाराष्ट्र भाषेचा कोश १८२९ प्रस्तावना.

आमच्या अलखानजीला व्याकरण किंवा गणित फार चांगले येत होतें असे नाही. तसेच त्यांचे मोडी अक्षरहि चांगलें नव्हतें. ते ब्राह्मणजातीचे असून त्यास सही करण्यापुरतें इग्रजी येत होतें. ते फार लालची होते.

मुलांस शाळेंत घालतांना सरस्वतीपूजनाच्या निमित्तानें त्यांस शक्तीप्रमाणे पागोटें वगैरे देण्याची तेव्हां चाल होती. निदान कांहीं दक्षिणा तरी द्यावी लागत असे. शिवाय शाळेंतील मुलांस मिठाई वगैरे वांटीत. आमच्या गुरुपत्नीनें कधींमधीं सचन आईबापांच्या मुलांस घरीं जेवावयास बोलवावें. अब्राह्मण मुलांस दूर ओट्यावर बसावयास लागत असे. इतकेंच नाही तर त्यांस त्यांच्या उष्ट्या पत्रावळी बाहेर उचलून टाकून जेवणाची जागा शेणानें सारवून काढावी लागत असे. ही जेवणावळ स्वार्थाची असे. मुलांस आमच्या गुरुपत्नीस भोजनाच्या दामदुप्पट दक्षिणा चोळखण वगैरे द्यावें लागत असे.--बाबा पदमनजी, अरुणोदय.

भाषेंत गद्य ग्रथांचा प्रचार सुरू होणें हे लोकसुधारणेचे एक मोठें चिन्ह आहे. कारण पद्यरचना सोडून देऊन गद्याकडे जेव्हां लोकांचा कल होतो, तेव्हां केवळ मनोरंजन करणाऱ्या विषयांहून अधिक योग्यतेच्या विषयांकडे त्यांची मनें प्रवृत्त झालीं असे दिसून येते. गद्यांत जो विषय लिहावयाचा तो अर्थातच शास्त्रीय वगैरे असावयाचा. तो छंदांत रचणें केवळ अप्रयोजक असून सर्वांस सरळ रीतीने समजण्याकरिता अर्थातच व्यावहारिक भाषेंत लिहावा लागतो. तेव्हां ही दुसरी रीत पडणे हें राष्ट्राच्या सज्ञान अवस्थेचे विशेष सूचक होय हें उघड आहे.--निबंधमाला, पृ. ५५४.

कोणतेहि मोठें कृत्य होण्यास मनुष्याची कर्तबगारी आणि ईश्वरी कृपा अथवा अज्ञेय साधनाची अनुकूलता दोन्ही गोष्टी असाव्या लागतात. पैकी एक गोष्ट जरी आपल्या ताब्यांतील नसली तरी दुसरी थोडीबहुत तरी प्रयत्नसाध्य आहे व तेवढ्याचपुरता मनुष्यानें नेहमी प्रयत्न केला पाहिजे. प्रयत्नवाद आणि दैववाद यांचा ज्यांनी ज्यांनीं म्हणून मिलाफ घातला आहे त्यांनी त्यांनी तो अशाच प्रकारें घातलेला आहे. नुसत्या प्रयत्नाने कांही होत नाही व नुसत्या दैवानेंही कांही होत नाही व विशेषेंकरून मोठमोठ्या गोष्टी घडून येण्यास दोहोंचीही सारखीच अनुकूलता लागते. --टिळक, केसरी १८९६.

**सृष्टि आणि कवि**:--वयस्या गाते ही मृदुघनरवें सृष्टि मधुर। कसा गाऊं तीच्यापुढति वद मी पामर नर। तशी ती गातांना श्रुतिसुभग ती पाक्षिकवनें। कशासाठीं गावी अरस कवने मी स्वबदनें ॥ १ ॥ मिषानें वृष्टीच्या खळखळ अशी सृष्टि रडतां। कुणाची ढाळाया धजल तसले अश्रु कविता। निशीथी ती तैशी हळु मृदुमरुच्छ्वास करितां। कवीची गा कोण्या त्यजिल तसले श्वास दुहिता ॥ २ ॥ केशवसुत पृ. ६.

या शतकांत बायबलाचें भाषांतर व इतर ख्रिस्ती वाङ्मय कांही तयार झालें. त्याची भाषापद्धति अगदींच निराळी असल्यामुळें तिचे दोन नमुने पुढे दिले आहेत.

**प्राचीन--करार**:--१. तुझा देव परमेश्वर तुला ज्याचा देश देतो, त्या राष्ट्राचा विनाश जेव्हां तुझा देव परमेश्वर करील आणि तूं त्यांचे वतन घेऊन त्यांच्या नगरांत व त्यांच्या घरांत वस्ती करसील, २. तेव्हा तुझा देव परमेश्वर तुला जो देश वतनसाठीं देतो, त्या आपल्या देशांत तूं आपल्यासाठी तीन नगरे वेगळी ठेव. ३. तुझा देव परमेश्वर तुला जो देश वतन करून देईल त्याच्या विस्ताराचे तूं तीन विभाग करून आपल्यासाठी मार्ग सिद्ध कर; आणि असें व्हावें कीं ज्यानें घात केला त्या प्रत्येकानें तेथें पळून जावें. --अध्याय १९, अनुवाद

जो आकाशांत राहतो त्या तुजकडे मी आपली दृष्टि वर लावितों. पाहा जसी चाकरांची दृष्टि आपल्या धन्याच्या हाताकडे, जसी चाकरिणीची दृष्टि आपल्या धनिणीच्या हाताकडे असती, तसी आमची दृष्टि आमचा देव परमेश्वर आम्हांवर कृपा करी तोंपर्यंत, त्याकडे आहे. हे परमेश्वरा, तूं आम्हांवर कृपा कर, आम्हांवर कृपा कर, कारण कीं आम्ही फार तुच्छ झालों. जे निष्काळजी, त्यांच्या निंदेनें आणि गर्विष्ठांच्या तुच्छतेनें आमचा प्राण आम्हांमध्यें फार व्यापला आहे. --चढण्याचें गीत, १२३८

**विसावें शतकः**--विसावें म्हणजे सध्यांचे चालू शतक असून आजकालची शिष्ट मराठी सर्वांस परिचित आहे. एकोणिसाव्या शतकांतील व विसाव्या शतकांतील भाषेंत फारसा फरक करतां येणार नाही. विशेषतः गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्रो. आगरकर, वगैरेसारख्या गद्य लेखकांनीं जी भाषा आपल्या लेखनांत वापरली तीच भाषा आजहि मान्य असून त्यांच्यानंतर हरि नारायण आपटे यांच्यासारखे कादंबरीकार, किंवा केसरीसारखीं प्रमुख वर्तमानपत्रें यांनीं तेंच भाषेचें वळण कायम ठेवलें आहे. विसाव्या शतकांत अनेक गद्य-

पद्य लेखक व वर्तमानपत्रें व मासिकें पुढें येऊन मराठी वाङ्मयांत पुष्कळच भर पडली आहे व त्यामुळें आजच्या भाषेच्या स्वरूपास अधिक स्थिरता प्राप्त झाली आहे. विसाव्या शतकांतील दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षणाचा प्रसार फार झपाट्यानें होत असून मासिकें व वर्तमानपत्रांची वगैरे वाढ महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत त्वरेनें होत आहे. यामुळें भाषेस लिखितस्वरूप प्राप्त झाल्यामुळें जशी स्थिरता तशी शिष्टता प्राप्त होत असते. याचा परिणाम निरनिराळे प्रांतिक विशेष कमी कमी होत जाऊन एकाच तऱ्हेचें शिष्ट स्वरूपाचें वळण सर्व प्रदेशांतील भाषेस येत चाललें आहे. त्याप्रमाणेंच दळणवळणाचीं साधनेंहि झपाट्यानें वाढत आहेत. आगगाड्या, मोटारी, वगैरेमुळें प्रवास अतिशय सुलभ झाल्यामुळें महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांतील लोकांचा संबंध अधिकाधिक येत जाऊन परस्परांशीं बोलणें, पत्रव्यवहार वगैरे रूपांनी विचारविनिमय वगैरे वाढत आहे आणि त्यामुळें या विचारविनिमयाचें साधन जी भाषा तिचें स्वरूप परस्परांस परिचित व त्यामुळे शक्य तितकें एकजिनसी व एकस्वरूपी होण्याकडे अधिक अधिक झुकत आहे.

अशा तऱ्हेने मराठी भाषा बोलणाऱ्या निरनिराळ्या गटांचा परस्पर व्यवहार वाढला म्हणजे निरनिराळे वाक्प्रचार व शब्दविशेष यांची देवाण घेवाण होऊन भाषेचें सर्वपरिचित व सर्वप्रांतीय विशेषांचें संग्राहक असें एक स्वरूप निश्चित होऊन त्यास शिष्टत्व येईल व विद्यापीठासारखी सर्वमान्य संस्था महाराष्ट्रामध्यें स्थापन झाली व तिने अशा भाषेच्या शिष्टस्वरूपास मान्यता दिली म्हणजे त्या स्वरूपांत ती भाषा सर्व महाराष्ट्रांत स्थिरत्व व मान्यता पावेल व महाराष्ट्रांतील कोणत्याहि भागांतील मान्य ग्रंथ घेतला तर तो याच भाषेत लिहिलेला आढळेल व अशा तऱ्हेनें या भाषेस कोणतेंहि स्थानिक स्वरूप अथवा नांव प्राप्त न होतां तिचें वास्तविक नांव जे मराठी तेंच तिचे नांव प्रचारांत राहील.

**मराठीचे प्रांतिक भेदः**—आतांपर्यंत कालमानानुरूप मराठी भाषेमध्ये जी स्थित्यतरें झाली त्यांचें वर्णन केलें. कालमानाप्रमाणें भिन्न भिन्न प्रदेशांत प्रचलित असलेल्या एकाच भाषेच्या स्वरूपांत स्थानिक परिस्थितीमुळें थोडाफार फरक आढळतो तसा तो मराठी भाषेच्या एकंदर क्षेत्राकडे अवलोकन केलें असतां आपणांस या भाषेंतहि प्रतीत होतो. भाषेचें क्षेत्र जितकें विस्तृत व त्यांतील भौगोलिक परिस्थिति जितकी भिन्न तितकें तिचें स्वरूप अधिक विविध प्रकारचें दिसून येईल. हिंदी भाषा ही फार विस्तृत क्षेत्रांत पसरली असल्यामुळें तीमध्यें अनेक स्थानिक भेद पडले आहेत व त्यांच्या परस्परस्वरूपामध्येंहि पुष्कळ अंतर असलेले आपणांस आढळते. तींत मुख्यतः पूर्व हिंदी व पश्चिम हिंदी या तर जवळ जवळ स्वतंत्र भाषा मानण्याकडे अर्वाचीन भाषाशास्त्री व विशेषतः खानेसुमारीकार यांचा कल दिसतो व त्यांतहि अनेक पोटभेद करण्यांत येतात; ही गोष्ट आपणांस दुसऱ्या भागाच्या प्रस्तावनेच्या शेवटीं जें कोष्टक दिलें आहे त्यावरून दिसून येईल. 'बारा कोसांवर भाषा बदलते' म्हणून जी आपणांत म्हण पडली आहे तीहि या भाषाप्रवृत्तीचीच द्योतक आहे. मराठीचें क्षेत्र जरी हिंदीइतकें विस्तृत नसलें तरी गोवें किंवा कारवारपासून तों सरळ उत्तरेस दमण व पूर्वेस नागपूर-भंडाऱ्यावरून निजामचे कांहीं जिल्हे व्यापून पसरलें आहे हें आपण तिसऱ्या विभागाच्या प्रस्तावनेंत पाहिलेंच आहे. तेव्हां या विस्तीर्ण प्रदेशांत मराठी हीच जरी एक भाषा प्रचलित असली तरी तिच्या स्वरूपांत थोडाफार फरक असून तीस ठिकठिकाणी निरनिराळीं स्थानिक नांवेंहि प्राप्त झालीं आहेत. तसेंच या क्षेत्रांतील देश्य अथवा परकीय निरनिराळ्या लोकांच्या बोलींचाहि तत्तत्प्रदेशांतील भाषेवर थोडा फार परिणाम झालेला आहे. तथापि मराठीमध्ये जरी थोडा फार स्थानिक फरक पडला असला तरी मराठीची स्वतंत्र पोट भाषा म्हणतां येईल अशी कोंकणीशिवाय दुसरी कोणतीहि भाषा आढळत नाही. ग्रिअर्सननें या कोंकणीस तेवढीच मराठीची पोट भाषा मानलें आहे व बाकीच्या सर्व भाषांस मराठीचींच भिन्न रूपें मानलीं आहेत.

तेव्हां या दृष्टीनें आतां आपण सर्व मराठी भाषाक्षेत्राचें अवलोकन करून निरनिराळ्या स्थानिक भेदांचें वर्णन करूं. त्यांत सर्वांत अधिक मोठ्या क्षेत्रांत पसरलेली व अधिक लोकसंख्येकडून बोलली जाणारी व आज वाङ्मयीन अथवा शिष्टस्वरूप पावलेली जी भाषा तिचें स्वरूपवर्णन प्रथम पुढें दिलें आहे.

**देशी मराठीः**—दक्षिणेंतील मराठी हिला देशी, देशावरील किंवा दख्खनी भाषा असें म्हणतात. मध्यवर्ती पुणेरी मराठी भाषा किंवा पुणेरी या शब्दांनीं आज हिचाच बोध होतो. इतर कोंकणी, वऱ्हाडी वगैरे यांस प्रांतिक भेद मानतात.

**देशीच्या सीमा:**—उत्तरेस व दक्षिणेस मराठी भाषाक्षेत्राची जी सरहद्द तीच हिचीही आहे. पश्चिमेला ही, देश व कोंकण हे प्रांत ज्या सह्याद्रीच्या रांगेनें विभक्त केले जातात त्या सह्याद्रीच्या डोंगराळ प्रदेशांतील कोंकणींत हळूहळू रूपांतर पावते; व पूर्वेला बुलढाणा जिल्ह्यांतील पश्चिम भाग व्यापून पुढे वऱ्हाडींत मिळून जाते.

यासेरीज ही बडोदा संस्थानची राजभाषा असून नुकतीच सरकारदरबारची भाषाहि होती व त्या संस्थानच्या हद्दीत कांहीं जिल्ह्यांत ती अद्यापि प्रचलित आहे. विजापूर व धारवाड या जिल्ह्यांची मुख्य भाषा कानडी असूनहि वरील दोन्ही शहरीं ही बोलली जाते. देशी भाषा म्हणजेच मराठी शिष्ट भाषा असल्यानें सर्व सुशिक्षित महाराष्ट्रीय कोठेंहि असले तरी हीच भाषा बोलतात. वऱ्हाडात गेलेले दक्षिणेंतील लोक आपली मूळचीच बोली धरून आहेत. मध्य हिंदुस्तानात इंदूर संस्थानची ती राजभाषा असून ग्वाल्हेर व भोपाळ संस्थानांत जे दक्षिणी ब्राह्मण आहेत ते हीच भाषा बोलतात. मध्यप्रांतांत हिला पुणेरी भाषा असे म्हणतात. विंध्याच्या उत्तरेकडील सागर प्रांतांत व नर्मदेच्या आसपासच्या मुलुखांत ही भाषा बोलणारे लोक आढळतात. हुशंगाबाद व मकाई, नरसिंगपूर, जबलपूर, दमो व चांदा हे जिल्हे वरील प्रांतांत येतात. या सर्व जिल्ह्यात बरेच लोक ही भाषा बोलतात. देशीच्या ज्या सीमा सांगितल्या त्यांत ठाणें, नाशिक, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, बेळगांव, धारवाड, विजापूर, बुलढाणा हे जिल्हे; भोर, अक्कलकोट, औंध, फलटण, जत, कोल्हापूर ही संस्थानें, दक्षिणेंतील जहागिरी, निजामशाहींतील मराठवाडा व मुंबई शहर एवढ्या सर्वांचा अंतर्भाव होतो.

ह्या देशी बोलींत जरी ती इतक्या मोठ्या प्रदेशांत बोलली जाते तरी क्वचितच थोडाफार फरक कांहीं कांहीं रूपांतून आढळून येतो. नाशिक जिल्ह्याच्या पश्चिम सरहद्दीवर असणाऱ्या दोन पोटभाषांचा थोडासा परिणाम तेथील भाषेवर झालेला असला तरी तो फारसा महत्त्वाचा नाही.

बेळगांव जिल्ह्यांतील मुख्य भाषा कानडी असली तरी पश्चिम पट्टीतील बहुतेक लोक मराठीच बोलतात. तेथील लोक 'न' आणि 'ण' ह्यांचा गोंधळ करतात. 'त्याने' व 'त्याणें' अशी दोन्ही रूपें आढळतात. 'एक' हा शब्द 'येक' असा म्हणतात. 'झाला' न म्हणतां 'जाहला' म्हणतात. असे बारीकसारीक भेद असले तरी ते अगदींच क्षुल्लक आहेत. कोल्हापुरी भाषेत व कोकणात भूतकाळी द्वितीय पुरुषाच्या अनेकवचनाला 'त' लावतात. जसे-दिलेंत, घेतलेत, केले नाहीत; दिलें नाहींत. दक्षिणेकडे विजापूर व धारवाड जिल्ह्यात म्हणजे ज्या ठिकाणीं मराठी संपते व कानडी लागते तेथील सीमेवरील मराठीवर कानडीचा थोडासा परिणाम झालेला दिसतो. हा परिणाम लिंगभेद बरोबर न करणें व सकर्मक क्रियापदांच्या कर्मणि व कर्तरी रूपांतील भेद नीट न मानणें, या गोष्टींत दिसून येतो.

**विजापुरी:**—विजापुरांतील जेवढे मराठी बोलणारे लोक आहेत त्यांपैकी बहुतेक शुद्ध मराठीच बोलतात. परंतु कांही अडाणी लोकांमध्यें जरा निराळी बोली प्रचलित आहे. ती बहुतेक शुद्ध मराठीप्रमाणेंच पण कांहीं अंशी ती कोंकणीप्रमाणें आहे.

**विजापुरीचे विशेष:**—' ए ' ऐवजीं ' अ ', ' ण ' बद्दल ' न ', महाप्राणोच्चार गाळणे, इ, ई, ए च्या पूर्वी असलेल्या वचा उच्चार न करणे, इत्यादि आहेत. उदा.–' तेथें ' बद्दल ' तत ', ' कोणी ' बद्दल ' कुनी ', ' नाही ' बद्दल ' नाई ', ' विरुद्ध ' बद्दल ' इरुद्द ', ' वीस ' बद्दल ' यीस ' इत्यादि रूपें होतात.

त्याचप्रमाणें वर जो लिंगभेद नीट मानीत नाहीत म्हणून म्हटलें त्याचें उदाहरण 'समदा किंवा समदी जिनगी' हें आहे. ' त्याच्या मुलास मी लै फटके मारलो आहे ' अशा तऱ्हेचे प्रयोगहि आढळतात. खालील उताऱ्यावरून ह्या बोलीचें स्वरूप जास्त चांगलें दिसेल.

' कुनि योक माणसाला दोन ल्योक होते. त्यातला ल्हानगा बापास म्हटला, " बाबा, माजे वाटनीचा माल मला दे. " मग त्येन वाटनी करून दिली. मग थोडक्या दिवसानि दाकटा ल्योक समदि माल गोळा करून गेवून श्यानि दूर मुलकास गेला. तत उदळेपन करून समदि जिंदगी हाळ केला. मग समदि जिंदगी हाळ केल्यावर मोटा दुकूळ पडला. त्यामुळ त्यासनि अडचन होवू लागली. तवा तकडच योक मानसाजवळ चाकरी राहिला. '

**धारवाडी मराठी:**—धारवाड जिल्ह्याची मुख्य भाषा कानडी असली तरी शिक्षित लोक शुद्ध मराठी बोलतात. परंतु धारवाड व कलघटगी तालुक्यांतील कुणबी ' कुळवाडी ' नांवाची बोली बोलतात. हिच्यावर शेजारीक कानडीचा परिणाम झालेला तिच्या कठोर व कर्णकटु शब्दोच्चारांत दिसून येतो. हींत निरनिराळीं क्रियापदांचीं

रूपें व लिंगें ह्यांत गोंधळ झालेला दिसतो. उदा.- आपला सर्व जिंदगी; गृहस्थाची घरीं; तू मेजवानी दिले; मी पाप केलो इ०. खालील गोष्टींत हे सर्व चांगलें दिसून येईल.

'येक कोला व कोली होती. ते येक दिवस फिरण्यास गेले. जाताना वाटेमधे येक वाघाचा घर होता. ते पाहून कोली, 'मी इथेच प्रसूत होतो' म्हणू लागली. हे ऐकून कोला म्हणाला कीं, "अग रांडे, वाघ सायंकाळीं येवून तुला खाऊन टाकील. खाल्यावर तुझा जन्म नाहिसा होतो." हे न ऐकता कोली वाघाच्या घरात गेली. सायंकाळी वाघ आपल्या घराला आला. हे पाहून कोला कोलीस, 'मूल कशासाठीं रडतात', म्हणून विचारला. त्याला ती 'वाघाचा मास दे म्हणतात', म्हणून सांगितली. त्याला कोला 'आणून दिला आहे कीं' म्हणून उत्तर दिला. हे ऐकून कोली ते सगळे सपले म्हणून सांगितली. तेवडे वाघ ऐकून मला मारतात म्हणून पळून गेला. इतक्यांत मूल थोर झाली आणि आई व मूल मिळून आपल्या घराला जाऊन प्रपंच करू लागले. वाघ ते गेलेले पाहून आपल्या घराला आला.'

नगर जिल्ह्यांतहि देशी मराठीच प्रचलित आहे. परतु तेथील भाषेंतहि कांहीं स्थानिक विशेष आढळतात. निजामशाहीतील मराठवाड्यांत जवळजवळ याच बोलीसारखी भाषा प्रचलित आहे. पुढील उदाहरणावरून या भाषेचें स्वरूप लक्षांत येईल.

**नगरी बोलीचा नमुनाः**—"दोन पहार झाल. वाढूळचा मी तुपली वाट पघत या वक्ताला इठ येऊन बसलों. पर तुझा पत्ता बी न्हवता. म्हून कटाळून घराकड जाया लागलों. तिक्ल्यांत वऱ्हल्या आंगून कांहीं वाजल म्हून तिकडे पघितल. तवां लांबूनश्येन तूच नदर पल्डी. देवाच्यान् इक्त येड कोन्हापायी बी लागल नव्हत मपल्याला. पर त्वा मातुर निऱ्ह येड केलय् मपल्येला." वाल मैतरणीची वाट पघून कटाळलेला गोइंद हिरा नेटी येतांच तिला म्हंगाला. "म्यां आन्, कऱ्हां?" मुरका मारीत हिरा म्हगाली. "कऱ्हा म्हून काय इच्यारतीस! समदा ईळच्या ईळ बी तुपल्या नादांत जातोय मपला. काम बी सुसना आन् कांई बी सुसाना! मग ह्ये काय तुपल्या येडाबिगर असं व्हतं व्हय?" "गोइंद ह्या कह्याला वरं गप्पा करावात? गड्याची जात, बोलाया गज आघळपघळ. येकदां गरज सरल्येवर उजून इच्यारनार बी न्हाई कधीं."

**कोंकणांतील मराठी:**—सह्याद्रीच्या योगानें महाराष्ट्राचे देश व कोंकण असे दोन भाग पडले आहेत व त्यांना अनुसरून भाषेचेहि देशी व कोंकणी असे दोन भेद मुख्यतः मानले जातात. सह्याद्रीच्या पश्चिमेकडील समुद्रापर्यंतच्या पट्टीला जरी कोंकण मानण्यांत येतें तरी हा सर्व कोंकणी भाषेचा मुलूख नव्हे. उत्तरेस दमणपासून दक्षिणेस राजापूरपर्यंत जो भाग आहे त्यांतील बोली ही देशीप्रमाणेंच आहे, व राजापूरपासून खालीं कोंकणी बोलीचा प्रांत लागतो. अशा रीतीनें कोंकणाचे, भाषेच्या दृष्टीनें दोन भाग पडतात. ह्या दोन भागांपैकीं दमणपासून राजापूरपर्यंतचा जो उत्तरेकडील भाग आहे त्यांत शुद्ध मराठी किंवा दक्षिणेकडील मराठी भाषा बोलली जाते. हिचें स्वरूप जवळजवळ देशीप्रमाणेंच आहे. यांत निरनिराळ्या अनेक पोटभाषा असल्या तरी सामान्यपणे हिला संगमेश्वरी अगर उत्तर कोंकणी या नांवानें संबोधितां येईल. हिच्या उत्तरेकडे गुजराथी भाषा असल्याने दमणपासून उंबरगांवपर्यंतच्या प्रदेशांतील भाषेवर गुजराथीचे परिणाम झालेले दिसतात. तेथील भाषेंत गुजराथी शब्द फार आहेत. दक्षिणेकडे ही कुडाळी व नंतर कोंकणींत मिळते. म्हणजे ही ठाणें जिल्हा, जव्हार संस्थान, कुलाबा जिल्हा, जंजिरा व रत्नागिरी जिल्ह्याचा उत्तरभाग एवढ्या प्रदेशांत आहे. ह्या प्रदेशांत निरनिराळ्या अनेक बोली चालू आहेत. त्यांचे मुख्यतः दोन प्रकार पाडतां येतात: (१) स्थलावरून नांवें पडलेल्या: जसें-बाणकोटी, दमणी, घाटी, मावळी, व संगमेश्वरी; (२) जाति किंवा धंदा यांवरून नांवें पडलेल्याः जसें-आग्री, भंडारी, धनगरी, कऱ्हाडी, किरिस्तांव, कोळी, कुणबी, परभी व ठाकरी. यांपैकीं स्थलविशिष्ट भाषांचें वर्णन पुढें दिलें आहे.

**उत्तर कोंकणी उच्चाराचे विशेषः**—दीर्घ स्वर कधींकधीं ऱ्हस्वहि उच्चारिला जातो. जसें-हुतु किंवा होतों, उठुन किंवा उठून, नय, नाय इ. 'ए' चा उच्चार, 'ये', 'या' किंवा 'यो' असा करतात. उदा.-एक = येक, योक. लेक = ल्येक, ल्याक, ल्योक. ओ चा 'वो' किंवा 'वा' उच्चार होतो. पोट = प्वाट; प्वोट. सोनें = स्वाना. कांहीं रूपांतून ज्या ठिकाणीं शुद्ध मराठींत ए असतो तेथें या बोलींत अ असतो. उदा.-सोनं, डुकरं, बोलन (बोलेन), तवां,

भुकन ( भुकेनें ). महाप्राण नसल्यास घालण्याचा व असल्यास गाळण्याचाहि प्रघात आहे. उदा.-जीव, आमी, आनून किंवा हानून. मूर्धन्य ड, ढ हे स्वरापुढें आले म्हणजे त्याचा र होतो. घोरा ( घोडा ), परला ( पडला ), अवरा ( एवढा ). त्याचप्रमाणे मूर्धन्य 'ण'बद्दल 'न' येतो. उदा० कोन, पन. 'ळ'बद्दल 'ल' येतो; उदा.-डोला, सगला, इ. ईच्या व ए च्या पूर्वी येणाऱ्या 'व'चा अगदी अस्पष्ट उच्चार केला जातो किंवा गाळला जातो. उदा. इस्तु, विस्तु; ईस-वीस; येल, वेल. इत्यादि उच्चारातील विशेष आहेत. हे सामान्यपणे उत्तर कोंकणीतील बहुतेक बोलींना लागू पडतात. ज्या बोलीवर मध्यवर्ती मराठीचा जास्त संस्कार झालेला आहे तेथे ती बोली मध्यवर्तीच्या धर्तीवर गेली आहे. उदा.-'ळ' बद्दल 'ल' किंवा 'ण' बद्दल 'न'. न येणें इ० वरील विशेषहि अगदीं उत्तरेकडे, रत्नागिरी जिल्ह्यांत किंवा मुंबईच्या शिक्षित कऱ्हाडे ब्राह्मणाच्या भाषणात दिसत नाहीत. हे जे विशेष सांगितले त्याशिवाय बहुतेक बाबतीत मध्यवर्ती मराठीशीं उच्चाराच्या बाबतीत हिचा सारखेपणाच आहे.

**नामें**:— नामाची रूपे बहुधा मध्यवर्ती मराठीप्रमाणेंच होतात. कांही थोडे फरक खाली दिल्याप्रमाणें होतात. बापुस याचें सामान्यरूप बापास असें होतें. उदा.-बापासचा. मानूस—मानसासला. ऊकारान्त शब्दाचे सामान्य रूप होतांना ऊ चा व होतो. लेकरूं याचें लेकूर्वास असे रूप होते. विभक्तिप्रत्ययहि बहुतेक तेच आहेत. परतु तृतीयेच्या रूपाच्या शेवटीं न्, न, नी येतात. उदा.-सांकान्; बाबान, बापासनी. पंचमी किंवा तृतीयेला शी किंवा शी प्रत्यय लावण्याचा प्रघात पुष्कळ आहे. 'चाकरान्शी'. सप्तमी आन् किंवा आत् लावून केली जाते. 'घरान्' 'घरात्'. कोंकणीप्रमाणे लहान स्त्रीलिंगी प्राण्यांना नपुंसकलिंग योजतात. उदा.-तें चेंडू ( मुलगी ).

**क्रियापदें**:—असणे या धातूची रूपें पुढीलप्रमाणे होतात.

| | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुषः | हॉय | हॉव |
| द्वितीय पु. | हॉयस, हास | हॉं; हॉव |
| तृतीय पु. | हाय | हात, हान्, हातीन ( क. ) |

**मारणें**

| | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | मारतांय | मारतांव |
| द्वि. पु. | मारतायस | मारतांव |
| तृ. पु. | मारताय | मारतायत, मारतात. |

भूतकाळच्या स्त्रीलिंगी प्रथमपुरुषाच्या एकवचनाचें रूप फक्त निराळें आहे. बाकी सर्व रूपें शुद्ध मराठीप्रमाणेच होतात. 'होते' बद्दल होये, हातीं. असणेचा भविष्यकाळ 'आसन,' होईन असा होतो. आज्ञार्थाच्या द्वितीयपुरुषाच्या एकवचनाला 'स' प्रत्यय लागतो. उदा.—देस; घेस. भूतकाळीं सकर्मक क्रियापदाच्या तृतीय-पुरुषाच्या एकवचनाला 'न' जोडतात व 'आन'नें अंत होणारें सामान्यरूप पुल्लिंगाप्रमाणें स्त्रीलिंगाचे वेळींहि योजतात. 'त्यान मिटि मारलान किंवा मारलीन.' पूर्णभूतकाळी तो गेलाय ( गेला हाय ), तो मेलाता ( मेला होता ) अशी रूपें होतात. भविष्यकाळीं द्वितीयपुरुषाच्या एकवचनाचे रूप 'शी'नें अन्त होणारें असतें. 'तुं मारशी.' शी, शेनी, श्यानी उभयान्वयी अव्ययाचा पुष्कळ उपयोग केला जातो. उठूनशी; जाऊनशेनी. शब्दसंग्रहः—गुजराथीच्या शेजारी वावरणाऱ्या ज्या उत्तर कोंकणी बोली आहेत, त्यांत गुजराथीचे शब्द जास्त आढळतात. उदा.—कोळी बोली, यांत सोकरा, (मुलगा), जकल (सर्व), बिजा (दुसरा), मेरे (जवळ), जापन (बोलणें) इ० शब्द दिसतात. ठाण्याच्या दक्षिणेकडील भागात जी बोली बोलली जाते, ती, म्हणजे या उत्तर कोंकणीचा विशेष प्रकार आहे. ही भाषा म्हणजे सामान्यतः कोळी भाषा होय. सतराव्या शतकांत एका पोर्तुगीज धर्मोपदेशकानें हिचें व्याकरण लिहिले आणि दुसऱ्या एका फ्रान्सिस्को वास् डी गिमरीनस् नांवाच्या मिशनऱ्यानें या बोलीत एक ( खिस्ती ) पुराण लिहिलें आहे. त्यांतील एक उतारा पुढें दिला आहे.

ऐकिली वार्ता मिस्साची । का बरं करते आमांचे गरजे । त्याती परमेशोर सर्व देते । तुमी मिस्स ऐका परमेशोर पावतील ॥ १ ॥ एके नगरान होते दोन दोस्त । एक मिस्स ऐके सदा । बिज्रा नैशे करीत मिस्साची

पडआ । वगा त्याला का विचलां ।। २ ।। दोगनी सदां जात हासत पारदे । एके दिसा गेले रनान । तइ वगा का विचलां त्यानां । ऐकुन होआल हैरान ।। ३ ।। रनान पाऊन जैल्या हांत्या नऊ गर्या । ठेप गिमाच होत । जउलां धाऊ लागलीं तदाना । विजा बारा गुर्गुराठ आणि मेठ परला ।। ४ ।। एका एका विज झळकली जोराशी । गुर्गुराठ मोठा जैला । आवावरशीं ऐसा बोल ऐकिला । मार, मार तुरुत जां मिरस ऐके नाय ।। ५ ।।

—फ्रान्सिस्को वास डी गिमेरीन्सच्या पुराणांतील उतारा ( इ. स. १६५९ ).

**कऱ्हाडीः**—कऱ्हाडे ब्राह्मणांची ही भाषा आहे. हे कऱ्हाडे, रत्नागिरी जिल्हा व सावतवाडी संस्थान व गोव्यातील कांही भाग येथें आहेत. परंतु यांचा मूळचा प्रांत घाटावरील कोयना व वारणा या दोन नद्यांमधील कृष्णाकांठ होय. यांचें नांव सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड या गांवावरून पडले आहे. उत्तर कोंकणीशी हिचें फार साम्य आहे. मात्र साताऱ्यांतील मराठीशी कांही बाबतींत ही जुळते. ळ, ल, ण, न, यांतील उच्चारांत पूर्ण फरक राखिला जातो. डचा र होत नाही; व वर्तमानकाळाचीं रूपें देशीप्रमाणेंच होतात. हल्ली कऱ्हाडी ही जरी कोंकणांतील एक बोली आहे तरी मूळची ती सातारा जिल्ह्यांतील असण्याचा संभव आहे. हल्ली तिच्यांत कांहीं कोंकणी रूपें आढळतात. उदा०–चापूस, आऊस, चेडं इ. मी हाय, तू हास, तो हाय इ० क्रियापदाचीं रूपेंहि आढळतात. अनुस्वाराचा उच्चार करतांना पुढील अक्षराच्या वर्गाचा अनुनासिकाचा उच्चार करतात. उदा०—'तेतला' या शब्दाचा उच्चार 'तेन्तला' असा करतात. त्याप्रमाणे तेणा (त्याने) इ० रूपांतील णहि लक्षांत ठेवण्यासारखा आहे. चतुर्थीच्या रूपांतील शेवटीं जो 'स' असतो त्याचा विसर्ग होतो. हा या बोलीचा विशेष आहे. उदा०–माणसाः (माणसास). शिवाय 'आपणास', 'तेस' (त्याला) अशीहि रूपें आढळतात.

**घाटीः** –मावळी भाषा ही बहुतांशी या घाटीसारखीच आहे; किंबहुना ही निराळी नाहीं. ही ठाणे व पुणें जिल्ह्याच्या दरम्यानच्या सह्याद्रीच्या घाटावर म्हणजे मावळांत बोलली जाते. नाणें मावळ व पवन मावळ असे मावळाचे दोन भेद मुख्य आहेत. कोंकणालगतच्या सह्याद्रीच्या घाटावर कुलाबा आणि भोर संस्थान या दरम्यानच्या टापूत ही पोटभाषा बोलली जाते. हिचा मुलूख देशी भाषेच्या मुलखाला जोडून असल्याने मध्यवर्ती मराठीचीं रूपें व उच्चार हिच्यांत आहेत. स्वरानंतर येणाऱ्या डचा र केला जात नाही व ळचा नेहमी ल असाहि उच्चार नाहीं. वर्तमानकाळाचीं रूपें देशीप्रमाणेंच होतात. परंतु कोंकणीप्रमाणेंहि रूपें होतात. उदा०–मी हाय, तू हैस, तो हाय, आम्ही हाऊ, तुम्ही हायसा, ते हायती. ही बोली उत्तर कोंकणीहून फारशी निराळी नाही.

**संगमेश्वरीः**—रत्नागिरी जिल्ह्यांतील देवरुख तालुक्यांतील लोकांची संगमेश्वरी ही बोली आहे. मुंबईपासून राजापूरपर्यंत जी बोली बोलली जाते तिला सामान्यपणे संगमेश्वरी हें नांव दिलें जातें. उत्तर कोंकणांतील ज्या उपभाषा आहेत त्यांत ही महत्त्वाची आहे व हिच्यांत थोडेसे प्रांतपरत्वें किंवा जाति अगर धंद्यांपरत्वें भेद होऊन इतर उपभाषा बनल्या आहेत. या कारणास्तव उत्तर कोंकणी म्हणजे संगमेश्वरी असें म्हणतां येते.

**विशेषः**—ए आणि ओ हे स्वर ऱ्हस्व आणि दीर्घ अशा दोन्ही रीतींनी उच्चारिले जातात. उदा०—देखिल व दिखिल, असे दोन्ही उच्चार होतात. त्याचप्रमाणें 'हुतां' व 'होतो' हेहि दोन उच्चार रूढ आहेत. दर्शक सर्वनाम व संबंधी सर्वनाम ह्यांचें पुल्लिंगी एकवचनाहि ह्या भाषेंत जरा चमत्कारिक रीतीनें होते. उदा०—हा, ता, जा. असणें ह्या धातूची रूपें पुढीलप्रमाणें होतात.

| | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | हांय | हांव |
| द्वि. पु. | हांयस | हांव |
| तृ. पु. | हाय | हाईत, हैत. |

'मारणें' धातूचीं रूपें

| | | |
|---|---|---|
| प्र. पु. | मारतांय | मारतांव |
| द्वि. पु. | मारतायस | मारतांव |
| तृ. पु. | मारताय | मारतायत, मारतात. |

'पाणी शिरलो' असा प्रयोग ह्या भाषेंत होतो.

**बाणकोटी:**—रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड पेट्यांतील बाणकोट येथील ही भाषा आहे. या प्रांतांत मुसलमान लोकांची वस्ती पुष्कळ असल्यानें येथील भाषेत ऊर्दू भाषेची छटा उमटली आहे. बाकी इतर बाबतींत ही संगमेश्वरीच आहे.

संगमेश्वरी व बाणकोटी या दोन्ही पोटभाषा उत्तर कोंकणीपैकीं शेवटच्या मर्यादेवरील भाषा होत. ह्यांच्यानंतर दक्षिण कोंकणीचा पोटभेद असलेली कुडाळी लागते.

**बाणकोटी भाषेचा नमुना**

( खालील संवाद दोन मुसलमानांमधील आहे. )

पहिला:—सलाम् आलेकुम्.

दुसरा:—आलेकूं सलाम.

पहिला:—काय चिच्या, ब्येस हैना ? खिकरशीं ऐलांव् ?

दुसरा:—आमी काप्शीं ऐलू; गुरुबावाहिक्रे ग्येलू हुतू. तुमला खिकरे जायाचां हाय ?

पहिला:—आमला कापांत वकीलाहिक्रे जायाचां हाय. चुकटो वकील कोन हैय बरी ?

दुसरा:—काय तटो तरी काय हैय ?

पहिला:—तटो मोटो लई सांगन्यासारखो नाय्, अल्पद् हाय. दीरदोन रुपिये किमतीचा येक भेंडीचां झार् आमी तोर्लांव. त्येचो आमवर आमच्यो धुवरीच्या पुतुसुनी दावो घत्लान् हाय. आमला समान् बी लागलां हाय. भ्येस्तरवारची तारीख हाय. तवां आज मोर्ट्रशीं जातूं.

दुसरा:—बरां तर ! तो बरिया ( बर्वे ) वकील है नाय ? त्यो तुमच्यो चिच्याच्यो टावराणाशीं ? त्यो मोटो चुकटो बोलणारो हाय. झुट्टो भांडण पर चुकूटा भांडवील. बरा बैसा. आमी जातू.

**दक्षिण कोंकणी:**—कोंकणाचे भाषेच्या दृष्टीनें दोन भाग पडतात. दमणपासून राजापूरपर्यंतचा उत्तरभाग व राजापूरपासून कारवारपर्यंतचा दक्षिणभाग. उत्तरभागांत जी भाषा बोलली जाते ती मध्यवर्ती मराठीहून फारशी निराळी नाहीं, हे आतापर्यंत जे भाषाभेद पाहिले त्यांवरून दिसून येईल. परंतु दक्षिणभागांतील जी भाषा आहे ती या मध्यवर्ती मराठीहून फार भिन्न आहे. नुसत्या ' कोंकणी भाषा ' या शब्दद्वयानें हिचाच बोध होतो व उत्तर कोंकणी देशींत मोडली जाते. दख्खनी व कोंकणी असे जे मराठीचे दोन भेद मानले जातात त्यांत कोंकणी म्हणजे दक्षिण कोंकणीच समजली जाते. या भाषेचें मूळ ठिकाण गोमंतक असल्यानें तिला गोमंतकी असेंहि म्हटलें जातें.

या भाषेचें क्षेत्र फार मोठें आहे. राजापूरच्या दक्षिणेपासून कोंकणी भाषेचें क्षेत्र सुरू होतें तें दक्षिणेस गोवें ओलांडून खालीं कारवारची परम सीमा गांठते. होनावर, मंगलोर व कोचीन येथें कोंकणी लोक जाऊन राहिलेले आहेत. त्यांनीं ही भाषा आपणाबरोबर तिकडे नेली. बेळगांव जिल्ह्याच्या नैर्ऋत्यभागांतहि ही भाषा चालू आहे. अशा रीतीनें ह्या भाषेच्या क्षेत्रमर्यादा पुढीलप्रमाणें होतातः—उत्तरेस मालवण व दक्षिणेस कारवार, पूर्वेस सह्याद्रीच्या रांगा व पश्चिमेस समुद्र. भाषेच्या दृष्टीनें हिच्या दक्षिणेस व पूर्वेस कानडी भाषा व उत्तरेस संगमेश्वरी व बाणकोटी आहेत व शेवटच्या दोन भाषांच्या योगानें ही शुद्ध मराठीला जाऊन मिळते.

अस्सल उत्तम कोंकणी भाषा गोव्यांतील साष्टी प्रांतांत तिसवाडीच्या आसपास बोलली जाते. सर्वसामान्य असें जर निरीक्षण केलें तर कोंकणांत एकसारखी, एकजिनसी अशी कोंकणी बोलली जात नाहीं. प्रत्येक भागांत कांही थोडेसे फरक आढळून येतात. प्रांत, धंदा, संस्कृति वगैरे बाबींमुळें आणखी कांही पोटभेद दिसून येतात. या दृष्टीनें कोंकणी भाषेत तीन उपभेद पडले आहेत. १ बारदेसकरी २ कुडाळी आणि ३ मालवणी. हे जे तीन भेद झाले आहेत ते प्रांतपरत्वेंच झाले आहेत. गोव्यांत जी भाषा बोलली जाते तिच्यांतील एकदशांश शब्द पोर्तुगीज भाषेतील आहेत. कारवारमधील बोलींत कानडी शब्द फार आढळतात व जसजसें दक्षिणेकडे जावें तसे ते जास्त जास्त आढळतात. हे वर जे प्रांत-परत्वं भेद सांगितले त्यांच्याहून जातिपरत्वें होणारे भेद म्हणजे चित्पावनी व दाल्दी हे जरा विशेष प्रकारचे आहेत. कुडाळी ही उत्तर कोंकणी व दक्षिण कोंकणी यांचा मिलाफ आहे. तेव्हां कोंकणीच्या मुख्य उपभाषा ह्या तीन ( १ ) चित्पावनी, ( २ ) दाल्दी व ( ३ ) कुडाळी.

**कोंकणीचा मराठीशीं संबंध**:–मध्यवर्ती मराठीपासून ही कोंकणी इतकी निराळी आहे कीं, कांहीं लोक हिला मराठीची उपभाषा न मानतां स्वतंत्र भाषा मानतात. ही एक स्वतंत्रच भाषा आहे, खुद्द मध्यवर्ती मराठी ह्या कोंकणीपासूनच उद्भवली, ग्रांथिक भाषा म्हणून या कोंकणी भाषेचा दर्जा मध्यवर्ती भाषेहून अगदी कमी नाहीं व या भाषेंत अभिजात वाङ्मय उत्पन्न करून हिला मध्यवर्ती मराठीच्या जोडीला आणून बसविणें शक्य आहे, अशी कांहीं विद्वानांची ह्या भाषेसंबंधीं विचारसरणी आहे. प्राकृतभाषेपासून स्वतंत्रपणें ही भाषा निघाली; त्रिहोत्राहून परशुरामानें जे शेणवी ब्राह्मण आणले व ज्याचे वंशज सध्या गोंव्यांत जिकडे तिकडे आढळतात त्यांच्या सारस्वती बालभाषा नावाच्या बोलीपासून ही निघालेली आहे; इत्यादि कारणें, ही एक स्वतंत्र भाषा समजण्यास, हे विद्वान् देतात.

**कोंकणी वाङ्मयः**—पार्तुगीज लोकांनी गोवें जिंकण्यापूर्वी या भाषेत कांहीं वाङ्मय होते असें म्हणतात; परंतु मिशनरी लोकांनीं परधर्मीय वाङ्मय म्हणून या भाषेंतील हस्तलिखितें जाळून टाकिली व जुनें सर्व कोंकणी वाङ्मय नष्ट झालें. १६८४ मध्यें सर्वांनीं कोंकणी न बोलतां पोर्तुगीज भाषा बोलावी, असा जाहीरनामा काढून कोंकणीला मारण्याचाहि प्रयत्न झाला.

१५७९ मध्यें थॉमस स्टिफन्स नांवाचा एक इंग्रज गोंव्यास आला आणि त्यानें पहिल्यानें कोंकणी भाषेचें व्याकरण लिहिलें. शिवाय त्यानें नव्या करारावर मराठींत ओंवीबद्ध काव्य केलें. तें १६१६ सालीं छापलें व तेव्हांपासून अजूनपर्यंत खिस्ती झालेल्या गोंवेकरांचे तें आवडतें पुस्तक आहे. कोंकणी लिहितांना देवनागरी, कानडी व रोमन लिपीहि उपयोगात आणलेली आहे. वरील पुस्तकानंतर आणखीहि पुष्कळ पुस्तकें खिस्ती लोकांनी कोंकणींत लिहिलीं आहेत.

उच्चारांतील विशेष : १ ह्या भाषेचें उच्चारण बरेंचसे नासिक्य आहे व त्याची परमावधि कारवाराकडील सारस्वत ब्राह्मणांच्या बोलींत दिसून येते. २ अगदीं दक्षिणेकडील मंगलोरजवळ व कारवारच्या शेणवी लोकांच्या भाषेंत कानडीभाषेप्रमाणें व्यजनान्त असा शब्द सांपडणें कठीण. प्रत्येक शब्दाच्या शेवटीं अ सारखा ऱ्हस्व स्वर जोडण्याची चाल आहे. ३ ई व ऊ हे कधीं कधी ऱ्हस्व उच्चारिले जातात व गाळलेहि जातात. उदा.–घेतली, घेतलि; मारून, मारन. ४ ए व ओ या स्वरांचे प्रत्येकी दोन दोन उच्चार आहेत. (१) ऱ्हस्व परंतु स्पष्ट (२) दीर्घ. ५ सुरवातीचे ए आणि ओ यांचे ये आणि वो असे उच्चार केले जातात. ऐ आणि औ ह्यांचे उच्चार व लेखन आय व आव असें होतें. ६ महाप्राणयुक्त व्यजनांतील महाप्राणाचा उच्चार नाहीसा करण्याकडे प्रवृत्ति दिसून येते. उदा. बोइम (भइण), बाव (भाऊ), गेर (घर), ७ इपूर्वी येणारा ' व ' बहुधा गाळतात. उदा. इकूक, विकूक; कधींकधीं एच्या पूर्वीचाहि ' व ' गाळतात आणि ' व 'चा महाप्राणयुक्तहि उच्चार आढळतो. उदा. व्हाड, व्होड, व होड (मोठा); ' ब ' बद्दल ' य ' येऊ शकतो. उदा. तुवें, तुये (तुझ्याकडून).

**नामें**:–वयांत येणाच्या पूर्वी किंवा हलक्या जातीच्या किंवा प्रतीच्या स्त्रियांचीं नामें नपुसकलिंगी मानतात. उदा. चेडूं (मुलगी). तें (चेडूं) खंय गेलें? मनुष्येतर प्राण्यांतील नर मादी दादलो व बाइलो हे शब्द जोडून दाखवितात. उदा. सुनें (कुत्रा). बाइल (बाइलें) सुने = कुत्री. दादलें डोकं = बगळा. स्त्रीलिंगी नामांचें अनेकवचन ई व ओकारान्त व नपुसकलिंगी नामांचें आकारान्त असतें. उदा. राण्यो (राण्या), वोर्सा (वर्षे). सामान्यरूपाचा उपयोग कधीं कधीं षष्ठी व चतुर्थीहि दाखविण्याकडे होतो. उदा. ' देवा कुर्पा (देवाची कृपा) कित्या, कित्याक (कितीला). तृतीयेचा न प्रत्यय आहे. कारवारकडील सारस्वत निराळ्या तऱ्हेनें तृतीया करतात. उदा. बापसुने आशिल्ले कडे ? (बाप कोठें होता ?). षष्ठीच्या चो प्रत्ययाशिवाय ' गेलो ' हा आणखी एक प्रत्यय आहे, 'मागेल्या बापसुगेल्या चाकरांपैकीं' (माझ्या बापाच्या चाकरांतील). बापायलो (बापाचा) असेंहि रूप आढळतें. सप्तमी र लागून होते. सजीव प्राण्यांच्या नामांची सप्तमी षष्ठीच्या रूपाला र लागून होते. उदा. बाटेर, बापाचेर. **सर्वनामें**:--अहम् या संस्कृत शब्दापासून हांव (मी) हें प्रथमेचें रूप झालेलें आहे. तृतीया हांवें अशी आहे.

**क्रियापदें**:—वर्तमानकाळांत सर्व पुरुषांत रूपें सारखींच राहतात. उदा. वच = जाणें. एकवचन वत्ता. अनेकवचन वत्तानी. मध्यवर्ती मराठीप्रमाणें या काळीं क्रियापदाचें लिंग कर्त्याप्रमाणे न बदलतां तसेंच राहतें. उदा. तो, ती, तें निदता. या काळाचा भविष्यकाळ दाखविण्याकडेहि उपयोग होतो. शिवाय ' लो ' हा प्रत्यय लावून भविष्यकाळ करण्याचाहि प्रघात आहे. ' हांव निदतोलों ' (मी निजेन). ' तालों ' लावून अपूर्ण काळ साधितात.

उदा. 'हाव निदतालों–ली-लें' ( मी निजत होतों-त्यें-तें ). निषेधार्थक क्रियापदें हा एक कोंकणीचा विशेष आहे. वर्तमानकाळाची व अपूर्णभूतकाळाची नसणें या धातूचीं रूपें मूळ धातूला लावून ते ते काळ केले जातात. उदा. निद ना = तो निजत नाहीं. निदनातलों = मी निजत नव्हतो. वर्तमानकाळच्या रूपाना 'जालों' लावून भूत-काळची रूपें केलीं जातात. 'वचना जालो' ( तो ) गेला नाहीं.

| | असणें | वर्तमानकाळ | भूतकाळ | |
|---|---|---|---|---|
| प्र. पु. | आसां, | आहां | आसांव, | आहाव |
| द्वि. पु. | आसाय, | आहाय | आसात, | आहात |
| तृ. पु. | आसा, | आहा | आसात, | आहात |
| | निजणें | वर्तमान. | भूतकाळ. | |
| प्र. पु. | हांव निदता | आमी निदतांव | निदलों | निदले |
| द्वि. पु. | तू निदताय | तुमी निदतात | निदलोय | ,, |
| तृ. पु. | तो निदता | ते निदतात | निदलो | ,, |

भविष्यकाळ

| | | | |
|---|---|---|---|
| प्र. पु. | निदतोलो | निदतेल्यांव, | निदतेले |
| द्वि. पु. | निदतोलोय | निदतेल्यात, | ,, |
| तृ पु. | निदतोलो | ,, | ,, |

'निदू (दों) क' या धातूचीं निरनिराळीं धातुसाधितें पुढीलप्रमाणें होतात:–

धातुसाधित नामें : निदचें, निदुचें, निदूक. वर्तमानकालवाचक : निदत, निदतोलो. अपूर्णकालवाचक : निदतालो. भूतकालवाचल : निदलो. भविष्यकालवाचक : निदचो. ऊन प्रत्ययांत : निदून, निदोन, निदून. क्रिया-विशेषणात्मक : निदतांना, निदता.

**कांहीं गोमंतकी शब्द:**–चेडों ( मुलगा ), भुरगे ( लहान मूल ), तामसेर ( पहाटेला ), आल्फान ( जकात ), फोस्क ( आगपेटी ), सोलदार ( शिपाई ), पुडवें ( धोतर ), घोव ( नवरा ), धु ( मुलगी ), पेल्यान ( पलीकडे ), मेस्त ( सुतार ), चडशाणो ( जास्त शहाणा ), केरतांव ( भांडण ), पेपारे ( वाजा ), हांगा ( येथे ), कवट ( अंडें ), भावीण ( मुरळी ), हावान ( तीर्थ ), उलावणां ( सभाषण ), पिसाट ( वेडसर ), लेवप ( चाटणे ), पेवप ( पोहणें ) माड ( दुकान ), भायर पडप ( मरणें ), वोढवी ( लग्न न झालेली कन्या ), वाफोर ( स्टीम लॉंच ), सात ( आठवड्याचा बाजार ), सुणे ( कुत्रें ), हळदुळा ( पिवळा ).

**बारदेसकरी कोंकणी**:—बेळगाव जिल्ह्याच्या नैर्ऋत्य भागांतील लोक ही भाषा बोलतात. हिचे विशेष म्हणजे नासिक्य उच्चार शुद्ध कोंकणीहून कमी करणे व महाप्राणयुक्त व्यजनें गाळणें. उदा.-चालोक = चालूक. आव = हांव. ड आणि ळ ह्यांची अदलाबदलहि होऊ शकते. उदा.-दुकोड, दुकोळ = दुष्काळ. त्याचप्रमाणें कठीण व्यजनाबद्दल मृदु व्यजनेंहि घालण्याची रीत आहे उदा.--नेसांग = नेसूक; येक, योग, येक. शेवटचे दोन विशेष कानडीच्या सहवासाने या बोलीत आलेले आहेत. शेणवी किंवा गौड ब्राह्मणाचे जे ४ भेद आहेत त्यांतील बारदेस-करांची ही भाषा आहे.

**गोमंतकी भाषेचा नमुना**:––म्हापस्या शअराव एक व्हॉडलों श्रीमत गिरेस्त आसलों. तॅका चार चॅडॅ, चार सुनो, तीन चेड्वा असी सतती आसली. तॅचे चॅडॅ, सुनों, चेड्वा तेची सेवाचाकरी अॅकापरास एक जास्त चडाओडीन करताली कित्यापासून तर तॅणॅ आपणांग सपतीची वांटणी ज्यास्त दिवची म्हणून. तॅका किदॅ जाय किदॅ नाकां, प्रकृतीची विचारपूस, वैय वैतलॉ, पतलॉ, बसतलॉ, उठतलॉ, खातलॉ, जेवतलॉ वी सगळी तॅच्या बऱ्याची चौकसी सगळी मनस्यां मन लावून करुग लागली. तॉ सदींच तेनचेर चडखोसी आसलॉ जॅन्नां तॉ चड म्हातारॉ जालॉ तॅन्नां तॅणॅ सगळ्या सपत्तीची आपणाकडे कांयच दवरी नासतांना वांटणी करून सगळ्यांग दिली.

**नमुना २ रा:**—घरच्या सुखार दोंगां इस्टीनींचॅ उलावणॅ.–लक्ष्मीबाय–दुर्गाबाय, तुमनेर हांव पळेतां कॅन्नांच झगडॅ तटॉ म्हणून माकां दिसाना. सदींच पळे जाल्यार येळे खेपेक शान्त थडगार दिसता. माकां मॉइॅ नवल

दिसता. नाजाल्यार आमगेर पळय. हांव आमच्यांची आनी आमच्या माव मायची माज्या जिवाकडेन पळैतां कितली सॅवाचाकरी करतां पणून तॅय झगटतात, गाळी सागतात आनी माव मायूक तू तर पळैताय हाव कसी तॅकां करतां तीं कॅन्नाकॅन्ना चडूच जातकुच हाव रडटासुद्धां तॅन्ना हॅकसॅं, हाव किदॅं करू माका किदॅंतरी उपाय साग.

दुर्गीबाय—लक्षीम-बाय, तुका जर वायट दिसाना तर हाव सागता हॅं कसॅं जाता-तॅं. हाव सागतां तसॅं करसी जाल्यार तू सुखाक पावशी. किदॅं सागू ?

लक्षीमबायः—सांगूं म्हणून किदॅं विचारताय ? तू जर माज्या बऱ्याक सांगताय तर माका कित्याक वायट दिसतलॅं. खुशाल सांग. तुजॅं उपकार माजेर खूब जायत.

**नमुना तिसराः**—कोंकणी भास ही गोंयाभायर पाविल्ल्या गोंयकारांक आपले मुळचे भुयेक सांदैणो एक घट बरो दुवो आस. तो केन्नाच सदळ जावक आनी निखळूक फावना. परत मोऱ्या खेदाची आनी दुखाची गजाल ही कि आमगेले खाशेले गोयचे हिंदु हो दुवो मोडून ताची पूड करून उडौंच्या वावराक मंझ्या नेटान लागल्यात. तांका आपशी खाशा आवे नाकाशी जाल्या. ते वाटेवैले परके बायलेक आवै समजून सुमाराभायर भुरकुटल्यात. ह्या तांगेल्या नष्टेरणाक लागून कोंकणी भास आपल्या हकाच्या घरात आज बदिणीवरी दीस काडटा. परकी मराठी थैं दिसानदीस इतलीं धुमशणा घालूक लागल्या कि घरदाराचे यजमान्नीक ती खिणाखिणात तोंडात उडेतली म्हण्टा.—गोंयकाराची गोंयाभायली वसणूक १५१.

**एक पदः**—तुमि कितलेंय् सोदलें विचार कित्लोय् केलो ।। तरि गुरूवगर देव तुमका मेळचो ना पेलो ।। ।। ध्रु० ।। आजले मिर् हजारावेर साधु जावून् गेले । तरेतरन् उपकार त्याणि लोकाचेर् केले ।। त्या साधुत येक पुण् गुरूशिवाय जालो ना । गुरुशिवाय केन्नाच माक्षाक कोण गेलो ना ।। या ससारात पुण् गुरु नास्ल्यार कांय जाता ?। येक अक्षर तरि पुण शिकनस्ल्यार काय येता ? ।। गुरु नास्ल्यार कुस्कुट हाताक् गावूनें ना । गांवलेंच तरि तें पदराक् रावूनें ना । रावूलेंच तरि ते देवाक् फावूचें ना । ह्य भाशेन जण येक मनीस गुरूचो पाग्लो । आस्तना लेखिना गुरूक् दखुन् तो भग्लो ।। तुमि० ।। १ ।।—भा इ. स. म. वार्षिक इतिवृत्त शक १८३७ पृ. २५७

**कारवारमधील सारस्वत ब्राह्मणांची बोलीः**—कारवारमधील सारस्वत हे त्रिहोत्राहून परशुरामाने आणलेल्या लोकांचे वंशज असे स्वतःस मानतात. स्कंदपुराणांतील सह्याद्रिखंडाचा याला आधार देतात. हे लोक पोर्तुगीजांच्या स्वारीनंतर गोंव्यांतून बाहेर राहावयास गेले व हल्लीं कारवार, अकोला, हलियाल, सुपा व शिरसी येथें पुष्कळ आढळतात. हे लोक फार जलद परंतु हेल काढून बोलतात, व याच्या बोलण्यात कानडी व पोर्तुगीज शब्द फार कमी येतात. या बोलीची चटकन् लक्षात येण्यासारखी गोष्ट म्हणजे कोणताहि शब्द व्यंजनान्त असा उच्चारिला न जाणे. उदा० पुतु=पूत; दोनि=दोन. शब्दाच्या शेवटचे ऱ्हस्व स्वर हे जुन्या प्राकृत प्रत्ययाचे अवशेष दिसतात. उदा० एकु पुतु=महाराष्ट्री प्राकृत—एक्को पुत्तो. एकि धुवा=महाराष्ट्री. एक्की धूआ; दोनि=माहाराष्ट्री—दोन्नि. अन्त्य दीर्घ स्वर ऱ्हस्व होतात. आस्स=आहे. दि=दे. नासिक्य उच्चार अधिक प्रमाणांत आहे व अन्त्य स्वराचा उच्चार नासिक्य करतात. दोन स्वरांमधील व्यंजनाचे पुष्कळ वेळां द्वित्व होते. उदा० माक्का, तान्ने. आणि कठोर व्यंजनाऐवजीं मृदु व्यंजनें येतात. इतर बहुतेक बाबतीत शुद्ध कोंकणीहून ही निराळी नाही.

**कुडाळीः**—मराठीच्या उपभाषापैकीं कोंकणी म्हणून जर एक मुख्य उपभाषा अशी मानली तर त्या कोंकणीची कुडाळी एक पोटभाषा म्हणतां येईल. कोंकणपट्टीवर ज्या उपभाषा चालू आहेत त्यांमध्ये उत्तर कोंकणी व दक्षिण कोंकणी असे दोन मुख्य स्थूल भेद आहेत. या दोन मुख्य भाषाभेदांच्या सर्घीवर कुडाळी येते. हिचा प्रांत उत्तर व दक्षिण कोंकण यांच्यामध्यें आहे. या बोलीचें नांव कुडाळ देशावरून पडले आहे. हिला हल्लीं मालवणी असेंहि दुसरें नांव आहे. पूर्वी कुडाळ देशाची मर्यादा फार मोठी होती, सध्यां सावंतवाडीत कुडाळपेटा आहे. हल्लीं ही बोली दक्षिणेस तेरेखोलची खाडी आहे तेथपासून उत्तरेस देवगड, कणकवली आणि फोंडा घाटापर्यंतच्या कोंकणपट्टीत बोलली जाते. अर्थात् हिच्या पूर्व व पश्चिम सीमेवर सह्याद्रि व अरबी समुद्र आहेत. वर दिलेल्या प्रांतांतील सर्व सुशिक्षित व अशिक्षित लोकांची कुडाळी ही भाषा आहे. सुशिक्षितांच्या बोलीवर शिष्ट मराठीचा थोडाबहुत परिणाम झालेला दिसतो. हे लोक शुद्ध मराठी शब्द जास्त वापरून त्याना कुडाळी विभक्तिप्रत्यय

व क्रियापदांचीं रूपें वापरतात व कुडाळीच्या उच्चारांतील विशिष्ट हेलांमध्यें त्यांचा उच्चार करतात. कुडाळी भाषेत वाङ्मय जानपद स्वरूपाचें आहे.

कुडाळी भाषेचे विशेष पुढीलप्रमाणें आहेत.—१ मराठी शब्दाच्या शेवटी इ अक्षर असल्यास कुडाळींत त्याचें य रूप होतें. उदा० समय ( समई ), घाय ( घाई ). २ मध्यें इ असेल तर तीबद्दल य किंवा वि, वी, अशीं रूपांतरें होतात. उदा० वायल ( बाईल ), काविल ( काईल ), नायक ( नाईक ), सुवीण ( सुईण ). ३ आकारान्त नामें ओकारान्त होतात. उदा० आंबो, मुळो. ४ एकारान्त नामें आकारान्त उच्चारिलीं जातात. उदा० कोळम्या ( कोळमे ), आळम्या ( अळमे ), नाणां ( नाणें ), पानां ( पानें ), जातां ( जातें ) इ०. ५ कांहीं कांहीं ठिकाणी महाप्राण मिसळतात. उदा० हडे, इकडे ( इकडे ), फाटी ( पाठी ), फुडें ( पुढें ) इ०. कोंकणीप्रमाणेंच ह्यांतील नामें चालतात. कोंकणी हांव याबद्दल मराठीप्रमाणें ' मी ' हाच शब्द या बोलींत आहे.

असणें ह्या क्रियापदाचीं रूपें पुढीलप्रमाणें:

| वर्तमानकाळ | | भूतकाळ | |
|---|---|---|---|
| मी आसंय | आमी आसव | मी होतांय | आमी होतांव |
| तू { आसय, आसस / इ'स, आइस | तुमी आसात | तू होताय | तुमी होत्यात |
| तो आसा; हा, आहा. | ते आसात. | तो होतो | ते होते. |

भविष्यकाळाचीं कांहीं रूपें:–म्हणान ( म्हणेन ), मेळात ( मिळेल ), येतलो ( येईल ). पुष्कळ अशीं ही बोली शुद्ध कोंकणीहून वेगळी नाहीं, हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल.

**कुडाळी बोलीचा नमुना:**—गोमा गणेश पितळी दरवाजा. कुडाळ परांताचे पयले मालक बामण परभु सरदेसाय हेंचो पूर्वज गोमा गणेश परभु म्हणान होवून गेलो. तेची कथा अशी सांगतत :-गोम परभुक त्या परांताच्या सरकाराची गांठ घेवची होती, पण दरबारांत काय तेची दाद लागयना. अरज लीवून धाडलो तरी त्याच्या व मधल्या अमलदाराचो सयशिको झाल्याशिवाय तो वरतोच जाय नाय, आणि मधल्या अमलदाराक चिरीमिरी दिल्याशिवाय त्याच्यार सयशिको होय नाय. चिरीमिरी देवक गोम परभूकडे काय नाय होतां. मगे त्याकां येक इगुत सुचली. त्याणा ' गोमा गणेश पितळी दरवाजा' ह्या अक्षराचो एक शिको करून घेतलो. आणि पितळी दरवाज्याच्या भायर दारांतच मांडी घालून बसलो; आणि जो कोण अरज घेवून भितुर जाय त्याच्या अरजार आपलो शिको मारून भितुर सोडुक लागलो. असां कांय म्हयने चाललां तेंवां म्हदल्या अमलदाराक वाटलां सरकारानच अरज पयल्यान पास करून भितुर सोडुक कोण तरी अमलदार नेमलो हा. म्हणांन त्यांच्याकडे गेल्ल्याल्या अरजार ' गोमा गणेश पितळी दरवाजा ' हो शिको नसलो तर तो मारुन आणुक अरजदाराक परत पाठवूंक लागले.

**नमुना दुसरा:**—येकदां दत्तगिरी म्हाराज आमच्या गांवांत खूप दिवस ऱ्हले. एक दिवस असां जालां. ते लिंगाच्या देवळांत बसलेले. जवळ आमचे वडील होते. तेंकां तेणीं सांगलां, " तू आपलो देवळाचां दार ढांकान् वे आणि भायर पायऱ्यांवर बसान भजन करीत राव. " तशे आमचे बाबा भायर येऊन बसले. बरोच वेळ जाला. म्हाराज काय दार उगडुक सांगयनत, तेंवां बाबा भायरसून साद घालूक लागले. तरीय् भितुरसून काय शब्द येयना. तेंवां तेणीं आपण म्हणानच दार उगडलां. बगतत तर म्हाराज भितुर दिसले नाय्. तें दाराखेरीज भायर् जांवक तर दुसरी वाट नाय. तेंवां तेंका सोदूक ते सरकारी रस्त्यान् न्हैहार अर्दो मैलपर्यांत गेले. इतक्यांत फुडसून पांचपन्नास मंडळीम्हदीं म्हाराज दत्त नामाचो गजर करीत येत हतसां त्यांकां दिसलां.

**चित्पावनी :**—चित्पावनी भाषा कोंकणांत रत्नागिरी तालुक्याच्या उत्तर सीमेपासून म्हणजे जयगड खाडीच्या दक्षिणतीरापासून दक्षिणेकडे समुद्रालगतच्या चिंचोळ्या प्रदेशांत तहत वेंगुर्ले, सावंतवाडी, गोमंतक आणि कदाचित् ह्याच्याही पलीकडे फार लांबपर्यंत चित्पावन ब्राह्मणांची खास भाषा म्हणजे आपसांत बोलण्याची भाषा आहे. बाहेर बोलतांना ते शुद्ध मराठींतून बोलतात. परंतु तेव्हां आपल्या मूळच्या भाषेप्रमाणें नासिक्य उच्चार फार

करितात. ही भाषा बोलणारे लोक कमी कमी आढळूं लागले आहेत. ही चित्पावनी भाषा व कोंकणी भाषा यांचा फार निकटचा संबंध आहे, व ही शुद्ध कोंकणी व उत्तर कोंकणी किंवा संगमेश्वरी, यांना जोडणारी भाषा आहे.

**उच्चारविशेष** :— १ कुडाळीप्रमाणें ए च्या ऐवजी आं येतो. उदा०–केळां, सोनां, फुलां, तां, जां, गेल्यां, हवां, बोलल्यां; जां, माझां, तां, सगळां, तुझां. २ आकारान्त शब्द ओकारान्त होतात. उदा०—घोडो, भोपळो, पोश्यो, शाहणो, ह्यो, हो, आयलो (आला), हवो ठेयलो. ३ आज्ञार्थ व प्रयोजक रूपांच्या वेळीं 'व'च्या ठिकाणीं 'य' धातूंच्या रूपात आलेला दिसतो. उदा०–फिरयलो, करय, जेय, ठेय, चाल्यली. ४ नात्याचे शब्द शकारान्त असतात व त्यांना पुढें प्रत्यय लागतात. उदा०–आईश, बापूश, भाऊश, बेहणीश, नदश, चूलतूश इ.

नामें:—नामांचीं सामान्यरूपें पुढीलप्रमाणें होतात : १ अकारान्त (पु. न.) देव–देवा, माणुस–माणसा, चित्र–चित्रा. अकारान्त (स्त्री.) जीभ–जिभा, वाट–वाटा, भिंत–भिती, चेड–चेडी, थाळ–थाळी. २ आकारान्त (न.) तळां–तळे, लोणचां–लोणचे, फुरसा–फुरसे. ३ ईकारान्त (स्त्री. न.) भिमी–भिम्या, घोडी–घोड्या, खुटी–खुट्या, लोणी–लोण्या. ४ ऊकारान्त (न.) लिंबू–लिंबा, गोरू–गोर्वा, वांसरू–वासर्वा, काडूं–काडवा. ५ ओकारान्त (पु.) घोडो–घोडे, माचो–माचे, आंबो–आंबे, हो–हे, जो–जे, तो–ते. ओकारान्त (स्त्री.) बायको–बायका.

खालीं विभक्तिप्रत्यय देऊन एक नाम चालवून दाखविलें आहे.

| | ए. व. | अ. व. | ए. व. | अ. व. |
|---|---|---|---|---|
| प्र. | ० | आ, ई, ईं, ए, ओ, यो, या | आंबो | आंबे |
| द्वि. | ला | ना | आंबेला | आंबेना |
| तृ. | न, णीन | य, न् | आंबेन | आंबेय-न् |
| च. | ला | ना | आंबेला | आंबेना |
| पं. | पाशी, पक्षा, हारठी | पाशी, पक्षा, हारठीं | आंबेपाशी | आंबेपाशी |
| ष. | चो, ची, चां | चो, ची, चां | आंबेचो | आंबेंचे |
| स. | त | त | आंबेत | आंबेंत |

सर्वनामांचीं रूपें सामान्यतः वरील प्रत्यय लागूनच होतात. मी याची प्र. व तृ. मे-आम्हीं. द्वि. च-आमला (अ. व.) तू-च. अ. व. तुमला. तो- तृ. ए. व. तेणीन्, तेणें.

क्रियापदें:—असणें ह्याचें रूपांतर 'सणां' असें होतें. त्याचीं पुढीलप्रमाणें रूपें होतात :

'सणां' वर्तमानकाळ

| | | |
|---|---|---|
| प्र. पु. | सां | सों |
| द्वि. पु. | सस | सां |
| तृ. पु. | से | सत |

रीतिवर्तमानकाळचीं कांहीं रूपें: मे सचां = मीं असतों. तू सचस = तूं असतोस.

पुढें 'ये' तिन्ही काळांत चालवून दाखविला आहे.

| | वर्तमान | | भूतकाळ | |
|---|---|---|---|---|
| प्र. पु. | येचां | येचों | आयलों | आयलों |
| द्वि. पु. | येचश | येचा | आयलोश | आयलेत |
| तृ. पु. | येचे | येचत | आयलो | आयले |
| | **भविष्यकाळ** | | **विध्यर्थ** | |
| प्र. पु | येन | ऐऊ | येवां | येवां |
| द्वि. पु. | येशील | याल | येवांश | येवांत |
| तृ. पु. | येल | येतील | येवा | येवीं |

पूर्वकालवाचक धातुसाधित उनी, वनी किंवा नी लागून होतें. उदा.-मारुनी, मारनी; जावनी, येवनी, खावनी इ.

**कांहीं चित्पावनी शब्दः**—अहुर ( पूर ), आंदुळो ( झोंपाळा ), चटोर (चावट), बळकट (पुष्कळ), इतलां ( इतकें ), चेड ( मुलगी ), बोड्यो ( मुलगा ), एठाठी ( यथून ), जोवणां ( वीज ), ठवणस ( करार ), माश्यो ( रवी ), खळ ( आंगण ), डवरा ( खळगा ), मिरसाग ( मिरची ), गातां ( बाज ), थाळ ( चुला ), मोरळी ( विवी ), घडशी ( विटाळशी ), चखोट ( चांगलें ), वाढवण ( केरसुणी ), जरडी ( म्हतारी ), केड्ला ( कधी, केव्हा ), नतणे ( नसणे ), मुंबईहारची ( मुंबईकडील ), पहू ( पांहे ), हासामूस ( दमलेला ), सोपारा ( सोपें ), वाथरणा ( पसरणें ), कितां ( काय ), कं ( कोठें ), किणूला ( कशाला ), ठावकां ( भाडें ), ढाळ ( जुलाब ), पारो ( कोवळा फणस ), पोंड ( पाणी साठविण्याचा खळगा ), वळचण ( घराच्या भितीपासून पावळी-पर्यंतची जागा ), घोऊश ( नवरा ), परवो ( परका ), हेगडायणां ( वेडावणें ), नाका ( नको ), शेड ( फांक ), खेड ( मिसळ ), आदवेचा ( प्रथम परिचयाचा ), आघोट ( उन्हाळा ), अद्रून ( मुद्दाम ).

**चित्पावनीचा नमुनाः**—कोणतीच बोली हेगाडी नाही नी आमची हेगाडी कशी सेल. उलटी आमचीच बोली संस्कृताजवळ से असा शास्त्रीबावाच म्हणचत. एता इतला खरा की, ह्या बोल्यांत ल्यंहलेले ग्रंथ नी पुस्तकां आमल्या के आढळत नाही, असां पुष्कळ म्हणचत. पण हेवरटी फाग्त चांगले शिकले सवरलेले विद्वानांची ही व्यवहारभाषा नसंवी. एता ही बोली के नि केंवेरी बोलचत ता सागचां. रत्नागिरीचे उत्तरा जयगड म्हणी बंदर से, ते जयगडाचे उत्तराहार ही नाही. पण जयगड पाष्टी दक्षिणाहार रत्नगिरी, राजापूर, देवगड, मालवण, वेंगुर्ला, सावंतवाडी, गोवां, एठांपावत सेच. पण तेचेय दक्षिणाहारी कदाचित् चालत सेल.

**चित्पावनीचा दुसरा नमुनाः**—माणसान घे म्हटले आपलेपण सोडू नये. दुसरेचां चखोट सेल तां घेवां. पण उठले सुटले दुसरेच्या सगळयोच तऱ्हा घेणा अगदी वाईट. आताशा पुरुष, बायाको, धाकटी बघेवी ती अगदीच आपली शिळपत दिसचत. दिवसान दिवस सगळयाच गोष्टीत् भिकारपण नी दुबळेपण वाढत चालला. हेचों सगळेंच विचार करनी आपलां हितसाधन करवें हवां. नि हे साधवें शिकलेसवरलेले नी तारणे लोकाज मनापाष्टी झटवें हावा.

**वऱ्हाडी :**—देशी मराठीचे जें क्षेत्र मागें सांगितले आहे ते पूर्वेस बुलढाण्याच्या पश्चिमार्धापर्यंत आहे. त्यापुढें वऱ्हाडी लागते. वऱ्हाड व मध्यप्रांताच्या दक्षिणभागांत जी मराठी बोलली जाते ती मध्यवर्ती मराठीहून जरा निराळी आहे व ती सामान्यपणे वऱ्हाडी या नावानें संबोधिली जाते. वऱ्हाडी भाषेचे क्षेत्र बरेंच विस्तीर्ण आहे. पश्चिमेपासून सुरवात केल्यास हिची सरहद्द बुलढाण्याच्या मध्यातून पश्चिमार्ध वगळून उत्तरेस तापी नदीपर्यंत जाते. तेथून पूर्वेकडे एलिचपूर, बेतूल, छिंदवाडा, शिवणी व बालाघाट यांचा दक्षिणभाग पोटांत घेऊन दक्षिणेकडे वळते. नंतर भंडारा, चांद्याचा वायव्यभाग, वणी व वाशीम इतका प्रदेश वेढून परत बुलढाण्यापर्यंत येते. कोंकणी भाषेचे ज्याप्रमाणें प्रांतांवरून, जातींवरून, व धंद्यांवरून निरनिराळे उपभेद पडलेले आहेत तसेच वऱ्हाडी भाषेचेहि आहेत. घाटावरची वऱ्हाडी किंवा घाटोळी व घाटाखालची वऱ्हाडी असे दोन स्थूल भेद आहेत. नागपुरी, बालाघाटी, चांदा इ. देशनिष्ठ व झाडपी, धनगरी, कतिया, कुणबी, कुंभारी, महारी, गोवारी हे जातीवरून पडलले उपभेद आहेत. केवटी हा आणखी एक पोटभेद बंगेली भाषेशीं मिसळून झाला आहे. हळबी म्हणून जो पोटभेद आहे तो वऱ्हाडीच्या शेवटच्या परिसरावर वापरला जातो. ह्या प्रत्येकींत मध्यवर्ती वऱ्हाडीपासून थोडे निराळे असे सूक्ष्म भेद आहेत.

**वर्णप्रक्रियाः**—१ दीर्घस्वर विशेषतः अन्त्य दीर्घस्वर ऱ्हस्व उच्चारिले जातात. उदा. मी अथवा मि. माहि अथवा माही. माहा, मह्य ( माझा ) २ पुणेरी भाषेंत जेथें 'ए' अन्त्य स्वर येतो तेथे वऱ्हाडींत 'अ' घालतात. उदा० सांगितल, त्यान, भुकेन, असल. ३ 'ए' किंवा 'य' बद्दल वऱ्हाडी भाषेत इ स्वर येतो. उदा.- दिळ, देळ, यळ. इळ, येळ, वेळ. राह्यला, त्यव्हा. ४ 'आद्य 'ए' चा उच्चार 'ये' असा करतात. कोंकणी भाषेंत असाच फरक होतो. 'ए' बद्दल 'य' किंवा 'ओ' बद्दल 'वो' येणें हा प्रकार कानडीच्या संसर्गानें मराठीत शिरला असण्याचा संभव आहे. उदा. येक, वोंगळ. ५ 'अव' आणि 'अवि' ह्या दोहोंबद्दल ओ हा स्वर उच्चारतात. जोळ ( जवळ ) उडोंश ( उडविला ) ६ अनुनासिकांचा उच्चार अर्धवट न करतां अगदीं स्पष्ट करतात. उदा 'तू' चा तून. देवाशीं

देवाशीन्. ७ 'ड' च्या उच्चारासबधीं वऱ्हाडींत बरीच भानगड आहे. एकाद्या स्वराच्या नतर ड आला तर त्या 'ड'चा उच्चार 'र' होतो. 'ळ'चा उच्चार 'र' किंवा ऋच्या जवळ जवळ होतो. कधीं कधीं 'य' त्यासारखाहि होतो. बुलढाणा मलकापूरकडील भाषेंत त्याचा नियमानें य होतो. उदा.--डोळा-डोया, जवळ-जोय, जवय. माळी या शब्दाचे मारी, मायी, माई इतके भिन्न उच्चार होतात. ८ वऱ्हाडी भाषेंत न बद्दल ण घालतात, तर नागपुरीत ह्याच्या उलट ण बद्दल न घालतात. ९ ल आणि न हे वर्ण भविष्यकाळी एकमेकांबद्दल येऊ शकतात, उदा. मी मारीन-मी मारील. तो मारन-तो मारल. १० इ, ई, ए ह्या स्वराच्या पूर्वीचा 'व' अस्पष्ट उच्चारिला जातो. कधीं कधीं त्याचा लोपहि होतो. उदा.-विस्तू, वस्तु. वीस-ईस. वेळ-येळ. ११ व्हचा उच्चार भ असा कधीं कधीं करतात. उदा.-नव्हते-नभते.

**नामें** :—अन्त्य स्वर दीर्घ असेल तर तो ऱ्हस्व करण्याची लकब वऱ्हाडींत आहे म्हणून वर सांगितलें. तिचा परिणाम असा झाला आहे की, नपुसकलिंगी अनेकवचनी जे 'एँ' कारान्त रूप असतें तें बऱ्याच ठिकाणी अकारान्त होतें आणि असें अकारान्त रूप झालें म्हणजे त्याचें विशेषण साहजिकच पुल्लिंगी अनेकवचनांत राहतें. उदा०—चांगले माणस. अशा रीतीनें पुल्लिंग व नपुंसकलिंग यांमध्यें घोटाळा केलेला आढळतो. हा फरक मराठी व गुजराथी या दोन भाषांमध्यें प्रामुख्यानें आढळतो. हिंदींत तो तसा फारसा नाही. तेव्हा या दोहोंमधील दुवा वऱ्हाडी भाषा सांधते. विभक्तिप्रत्यय मध्यवर्ती मराठीप्रमाणेच आहेत. फक्त चतुर्थीच्या ला प्रत्ययाच्या ऐवजी 'ले' हा प्रत्यय वापरण्यांत येतो. उदा०—बापाले. अनेकवचनाच्या प्रत्ययांपूर्वी ही किंवा ई हा एक आगम येत असतो. उदा०—बापाईस, बापाहीस; माणसाईले.

**सर्वनामें** :—सर्वनामांच्या कांहीं विभक्तींची रूपें चमत्कारिक होतात. पुरुषवाचक सर्वनामें-द्वितीया-मज, मजले, मले. तृतीया—तुवा, त्वा, त्या. षष्ठी, माहा, तुहा. पुणेरी भाषेंतील माझा, तुझा हीं रूपेहि वापरिलीं जातात.

**दर्शकसर्वनामें** :—जो, तो यांचीं रूपें पुणेरी मराठीप्रमाणेच होतात. स्त्रीलिंगी एकवचन मात्र हे, ते, जे असें होतें. काव्यामध्यें, जुन्या भाषेत व पत्रव्यवहारात स्त्रीलिंगी एकवचनीं रूप एकारान्तच आढळून येते. उदा० 'कळावें हे विनति!' प्रश्नार्थक सर्वनाम 'काय' ह्याचीं पचमीचीं रूपें काव्हून, वाहून, कायहून अशीं होतात.

**क्रियापदें** :—पुणेरी भाषेंतील क्रियापदांचीं सामान्य रूपें शिष्टांच्या वापरात आहेतच. त्याशिवाय जी रूपे प्रामुख्याने वापरात आहेत ती ही : मी म्हणीन, मी असल-असीन. द्वितीय पुरुष आणि तृतीय पुरुष यांचीं एकवचनाचीं रूपें सारखींच होतात. तू आहे, तो आहे, तू गेला, तो गेला. त्याचप्रमाणें भूतकाळातील द्वितीयपुरुष आणि तृतीयपुरुष यांच्या अनेकवचनाचीं रूपें सारखीच होतात. उदा० तुम्ही गेले, ते गेले. वर्तमानकाळची प्रथमपुरुषाच्या एकवचनाची असणे किंवा हो धातूचीं रूपें : मी आहो-आहे-व्हय अशीं होतात. द्वितीय व तृतीय पुरुषाचीं एकवचनाचीं रूपें आणि तृतीय पुरुषाची अनेकवचनाचीं रूपें सारखीच होतात; त्यांच्यामध्ये लिंगभेद नसतो. उदा० तू राहतेस, तो येते, तो करत्ये, ते करतेत, ते जातेत. 'मी जातो' असें स्त्रियाहि म्हणतात. 'मी गहधदा विसरली.' 'तो काम केला' असे चमत्कारिक प्रयोगहि द्राविडीभाषांच्या संसर्गाने वऱ्हाडींत आढळतात. आज्ञार्थीचीं द्वितीय-पुरुषीं एकवचनाचीं रूपें यकारान्त होतात. उदा० जाय, खाय, पाह्य इ. रीतिभूतकाळाचा उपयोग भूतकाळाप्रमाणें होतो. 'ओ' कारान्तरूपेंही क्वचित् आढळतात. उदा० मी निजो. अकरणरूपांत इच्या ऐवजी ये हे अक्षर येते. उदा० तो जायेना, तो देयेना. कोंकणीप्रमाणें अन लागूनहि रूपें होतात. उदा० धाडलन, सांगितलन. 'म्या मारले' या प्रयोगाप्रमाणें 'त्या मारलें' (तू मारिलेस) असाहि प्रयोग होतो. भविष्यकाळचीं रूपें पाहण्यासारखीं आहेत.

| | |
|---|---|
| मी मारल | आम्ही मारू |
| तू मारसीन | तुम्ही मारसान |
| तो मारील | ते मारतीन |

धातुसाधित नामें पुणेरी मराठीप्रमाणें आहेत. परतु त्यांचीं रूपें निराळ्या तऱ्हेने होतात. या, आ, आय मूळ धातूला लागून सामान्यरूप होते, व मग इतर प्रत्यय लागतात. उदा० चारायलं, राखावाले, कराले. पुणें-साताऱ्याच्या कुणबाऊ भाषेंत ल्यबन्ताला शानि, शान शब्द जोडलेला आढळतो, तसा वऱ्हाडींतहि तो वापरण्याची वहिवाट आहे. करूनशान, धावूनशान, म्हणूनशान.

**वऱ्हाडीचा नमुना:—एका साक्षीदाराची जबानी:**— रामजी वल्द सोनाजी. जात माळी. उंबर वर्स पंचेचाळीस. बस्ती सोमठान. प्रतिज्ञेवर कळवितो कीं, आजमास पधरा दिवस झाले असतील रोज शुक्करवारी रात्रीं मी व माही बायको आनी दोन पोरं असे घरांत निजलों असतां दोन प्रहर रात्रीचे सुमारास माह्या बायकोन मला जाग केल. आन म्हनू लागली की घरांत भांडे वाजत असून माणसाचा चाहाळ येते. तेंव्हा उठा. त्यावरुन मी उठलो आनी भीतीकडे पाहिले त मला भोक दिसल. त्यावरून खास वाटल की कोनी तरी घर फोडून आत शिरल आहे. घरात दिवा नव्हता. माह्या आथरुनाखाले आगपेटी व्हती, ती लगेच काढून पेटविली. इतक्यात हाच आरोपी भीतीस पाडलेल्या भोकाजवळ जाऊ लागला. त्याच्यावर माही नजर गेल्याबरोबर म्या त्यास पकडल. आणि त्याचा हात धरून त्यास म्हनालो की, " अरे चोरा, कोठ जात ?" त्यावरून त्याची व माही झोबाझोंबी बरीच झाली. मी घरांतून कलमाई भल्ला केला. त्यावरून घराचे शेजारी लोक सिताराम व इठोबा हे आले. इतक्यांत माह्या बायकोन दिवा लावला आनी घरातली साखळी काहाडली. व सदरहू इसम आंत आले. मग मला भल्ल जोर आल. व मग आम्ही तिघान त्याचे हात बांधले. आनी लगेच पाटलाकडे घेऊन गेलों.

**घाटोळीचा किंवा घाटावरील वऱ्हाडीचा नमुना:**—एक दीस एक सिंव्ह झोपी गेलता. एक उंदीर तेच्या अंगाऊन पळाला. मून तो जागा झाला. त्या सिंव्हान् ऽ त्या ल्हानशा जीवाले धरलऽ. आन् त्यान ऽ त्याले जाग केलऽ. मून माराव इतल्यात मले मारू नको आस मोठ्या मिनतवारीन ऽ म्हटल मून त्यान ऽ तेला सोडून देलऽ. जराशानऽ तो सिंव्ह रानांत शिकार करायसाटी गेला आन जाळ्यामदी आडकला. ते जाळऽ कोन्या गांवकऱ्यायनऽ त्याले धरायले टाकलतऽ. मंग जेचा का जीव त्यान वाचवलता तो उदीर आपल्याकड येतोय आसऽ त्यानऽ पाह्यलऽ. "त्वा मले वाचवल तस म्या बी तुले वाचवल." आस तो उदीर बोलला. मग समदे उंदीर कामास लागले आन लय मोठे दोरखड त्याइन् कुरतुडले आन सिंव्ह मोकळा झाला.

वऱ्हाडीचा स्वतःचा असा शब्दसंग्रह आहे. उदा० भेटणें (मिळणें), वावर (शेत), पोऱ्या, फोटर (फोलकटें), टगी (अडचण), डावलें (करंडा), पारीस (सहाण), घडली (घागर), पावशी (विळी), ठेपाडू (पितांबर), बोथरी (गोधडी, वाकळ), दाल्ला (नवरा), जिजी (मोठी बहीण), गोऱ्हा (गाईचें वासरूं) आकू (कुत्रा), कोठा (गोठा), राइ (मोहरी), मडांसरी (फोडणीचें वरण), पोपट (पावटे), भेद्री (टमाटो), कोहळ (तांबडा भोपळा), आलू (बटाटे), आंबारणें (पक्क होणें), हाड्या (कावळा), अढाऊ (लुच्चा), चबरा (बडबड्या), धकणें (चालू होणें), तिरपी (लहानशी खिडकी), बरपणें (भुरके मारणें), भदे (मडकें), डिंगर (लुच्चा), हातोली (लग्न).

**नागपुरी:**–नागपूर, वर्धा, चांदा, भंडारा, बालाघाट, रायपूर या जिल्ह्यांत जी भाषा बोलली जाते ती नागपुरी होय. वास्तविक ही व वऱ्हाडी यांत भिन्नता नाहीं. परंतु वऱ्हाडांत वरील जिल्हे नसल्यानें मध्यप्रांताची राजधानी जें नागपूर शहर त्यावरून हीस हें नामाभिधान देण्यांत आलें आहे. व हिला वऱ्हाडीची एक उपभाषा म्हणून मानण्यांत आलें आहे. फक्त यांतील जो भाग उरिया किंवा हिंदी यांना जवळ आहे तेथें संधिप्रदेशावर या भाषांचा तेथील मराठीवर परिणाम झालेला दिसतो.

**चंद्रपुरी:**–चांद्याकडील वऱ्हाडीला चंद्रपुरी असें नांव आहे. या बोलीचे वऱ्हाडीहून आणखी विशेष आहेत ते पुढीलप्रमाणेंः–

ळ च्या ऐवजीं र येतो. उदा. जवर (जवळ), डोरे (डोळे). लिंगाचा निर्बंध क्रियापदाच्या रूपावर नाहीं. उदा. 'तो म्हणते.' 'जार तोडून टाकला' पूर्वकालवाचक अव्ययाला 'श्यानि' जोडण्यात येतो. 'घेऊन श्यानि.' 'हात जोडून श्यानि.' षष्ठीचीं रूपें 'चा' प्रत्यय लागून होतात. आणखी विशेष व इतर गोष्टी पुढील उताऱ्यावरून जास्त चांगल्या समजतील.

**नागपुरीचा नमुना:**—"पटवारीचा चिंधु लोधी याच्याकडे तु चाकरी होतास का?" "होतो. सात आठ महिने चाकरी केली. गेल्या चैताचे मधात चाकरी सोडली." "चाकरीवर होता तेव्हा कोठ राहत होता?" "माहि ठेवलेली बायको इस घेऊन मि चिंधुचे घरात राहत होतो. माझ्याकडे किरसानकीच काम होत. आनखिन

माळकान जे काम सांगितळ ते कराव. जेव्हां सार पिक जमा झाळ व वावरात खळ केल तहि मि खळ्यात रात्रंदिवस रखवालिस राहत होतो व माहि बायको घरि राहे. " " चिंधु कहीतरी खळ्यात राहिला होता ? " " तो कधीकधी खळ्यात निजे. एक कडब्याच्या पेंढ्याची लहानसी झोपडी केली होती. त्यात मि निजो. " " चिंधु त्या दिवशी खळ्यावर निजला होता, तर त्याच्या आंगावर डागिने होते ? " " चिंधु दिवसभर खळ्यावर होता. जेवावयास घरि गेला नाहि. संध्याकाळी त्याचि सासु बलाउ आलि पर गेला नाहि. भुक नाहि म्हुन सांगितले. त्याच्या अंगावर सोन्याच कड, चांदिच कड, चांदिचा करदोडा आनि सोन्याचा छल्ला इतक होत. "

**चंद्रपुरी भाषा:**—"कोन ? मोठी माय ?" "व ऽऽ" " कोठी जाते माय ? " "दडाकड जातो बये सदवाले भाकर घेऊन स्यानी. " " काऊन ? सदबादादा घरी नाई आला कावो ? " " कसा येईल बये ? वावरात जोंधळ्याचा चुरना चालला हाये, पाखराच्या मारे उसत नाई, नईच्यान ढोरावासराचा आदरा, कोनाच्या भरोस्यान कोठ चुरना होते. दादल्यावानी माणसाच्या उराबर राहाव लागते तेवा कोठ दाणा दिसते डोऱ्याल." "खरा आहे माय तुझा म्हणन. आजकाल पोटच्या पोराबर इश्वास राहला नाई. तुले त माहीत आहे. हरबा पाटलाच्या पोरान मागच्या हाडोखात राती पडतांनुझानी ढोलीतून गहू चोरून नेले. आखीर काय झाल ? " " आहे बये माहित. का कराव लागते आपल्याले लोकाच, बर बये, जातो वावराकडे. बारा का बाई भकभक वाह्यते, विस्तो लागला जसा काई. "

**मऱ्हेटी:**—बालाघाट जिल्ह्याच्या दक्षिण भागांतील लोक मराठी बोलतात. वरच्या जातीचे लोक नागपुरी बोली बोलतात व खालच्या जातीचे लोक मऱ्हेटी नांवाची बोली बोलतात. या मऱ्हेटीवर शेजारील पूर्व हिंदीच्या उपभाषांचा परिणाम होऊन ती एक मिश्र बोली झालेली आहे. या भाषेतील उच्चार वऱ्हाडीप्रमाणेंच आहेत. उदा० येर (वेळ), जवर (जवळ); मनला (म्हणाला), इरुध. या भाषेचे स्वतांचे विशेष पुढीलप्रमाणें. स्वरानतर येणाऱ्या डचा र होतो. उदा० झार (झाड). श्वासयुक्त उच्चार गाळण्याकडे प्रवृत्ति दिसते. उदा० मनला, दोबनी. पुष्कळ वेळां नपुसकलिंगाऐवजीं पुंल्लिगच वापरलेलें दिसतें. उदा. 'चांगला पांघरून,' 'आपला पोट,' 'मी त्याले खालता पाह्लो,' 'बापानें दया केला ' असे प्रयोग होतात. भुका (भुकेलेला), चाला ( गेलेला ), पांघाव, इत्यादि रूपें हिंदीच्या सहवासानें झालीं आहेत.

**मऱ्हेटीचा नमुना:**—मी त्या पोऱ्याला आपल्या सांगात जांबुर खावाले नेलो होतो. मी येका मोठ्या झाडापासी गेलो. मंग त्या झाडावर चंगलो. पोरगा झाडाच्या खाली उभा होता. मी वरताऊन जांबुर टाकत होतो. पोरगा कांही जांबुर खात होता अन कांही टेवत होता. मी मग झाडावरना उतरलो अन त्या पोराले घेऊन घराकड येत होतो. मोठ्या तऱ्यापासी आलो. मग मी त्याचा गरा दोही हाताना धरून त्याले खालता पाह्लो, त्याच्या गऱ्यावर टोंघरा ठेऊन गरा मुरडून देला. थोड्या येरामंधी पोरगा फडफडून मरून गेला.

**खानदेशी--अहिराणी भाषा**--डॉ. ग्रियर्सन यांनी संपादिलेल्या भाषापाहणी ( लिंग्विस्टिक सर्व्हे ) ग्रंथांत या भाषेला मराठीची पोटभाषा न मानतां गुजराथीची पोटभाषा म्हणून गणली आहे. अशा तऱ्हेचा संशय मोठमोठ्या पंडितांनाहि पडावा इतका गुजराथीचा या भाषेवर परिणाम झालेला आहे. हिच्या या स्वरूपामुळें हिला एक प्रकारचें महत्त्व प्राप्त झालें आहे. या भाषेला नांव प्रांतावरूनच पडलें आहे. शिवाय दुसरें नांव ' अहिराणी', हें जे लोक ती भाषा बोलतात त्यांच्या नांवावरून आलेलें आहे. ही अहीर-आभीर लोकांची भाषा आहे. या भाषेचें क्षेत्र साधारणपणें पूर्व व पश्चिम खानदेश जिल्हे, दक्षिणेकडे नाशिक जिल्ह्याच्या उत्तर हद्दीपर्यंत व उत्तरेकडे बऱ्हाणपूरपर्यंत आहे. शिवाय ही भाषा बोलणारे आभीर किंवा अहीर लोक खानदेशाच्या बाहेर नाशिक, नेमाड व बुलढाण्यापर्यंतहि आहेत. म्हणजे या भाषेचें क्षेत्र फार विस्तृत व भाषा बोलणारे लोकहि पुष्कळ आहेत. खानदेशाचा उत्तरभाग डोंगराळ आहे व तेथें भिल्ल, ठाकूर, गोंड, कातकरी, वारली इ. रानटी लोक राहतात. शिवाय खानदेशमधील हल्लीं स्थायिक असलेले आभीर लोकहि मूळचे उत्तरेकडचे. या भाषेचें क्षेत्र मोठें व त्यांत निसर्गनिर्मित अडथळेहि पुष्कळ. शिवाय निरनिराळ्या लोकांनीं येथें वसाहत केलेली असून त्यांचे निरनिराळे पंथ, समजुती, चाली इत्यादिमध्यें भिन्नता आहे. या सर्व कारणांनीं या भाषेला बहुरूपत्व प्राप्त झालें आहे व ठिकठिकाणीं पोटभेदहि झालेले आहेत.

**उच्चारविशेष:**--'स' बद्दल 'छ'. उदा.-छोड, छावली. च वर्गांतील व्यंजनानतर येणाऱ्या अच्या ठिकाणीं क आणि ' ळ ' ऐवजीं ' य ' येतो. उदा.-जयगांव, झाय, काया, पिवया, केयी इ. कधीं ळ ऐवजीं ' ड '

येतो. उदा.-जयगांव, जडगांव, ( जळगांव ), 'ण' बद्दल नेहमी ' न ' येतो. उदा.-पानी, पन. ' र ' नतर ड आल्यास ' र ' बद्दल ' ल ' येतो. उदा.-लडणें, पल्डे ( पर्डे ), बलडणें ( ओरडणें ). ' त 'च्या ऐवजीं ' ट ' येतो, आणि महाप्राणोच्चार उच्चारिला जात नाहीं.

**नामें**:--विभक्तिप्रत्यय लागण्यापूर्वी नामाचे सामान्यरूप होत नाहीं. एकवचनाच्या प्रत्ययांना पूर्वी ' स ' जोडलें म्हणजे ते अनेकवचनाचे होतात. प्रत्यय पुढे दिल्याप्रमाणेः-- द्वितीया--ले. तृतीया--न्हीं, नी, कडतीन, कड, नाकन, वगैरे. चतुर्थी--ले, से. पचमी--तिन, थिन, पान. षष्ठी--न्ह, न्हा, न, नी. सप्तमी-- म, मा, मझार. उदाहरणार्थ काही रूपेः--घरले, घरतीन, घरमझार, खानदेशमा.

**सर्वनामें**:--' मी ' आणि तू या सर्वनामांची रूपे खालीलप्रमाणें.

| | | |
|---|---|---|
| प्रथमा | मी | आम्हू, आमु |
| द्वितीया, चतुर्थी. | मले, माले, मल्ये, | आम्हले, आमल्ये |
| तृतीया | मिन, मावरी, आम्ही | आम्हनावरी. आमुन |
| पचमी | मनपान, मानाथीन; मनाथीन | आम्हनपान-थीन. |
| षष्ठी | मन्ह-ना-नी; माह्य | आम्हना नी; आमन |
| सप्तमी | मनमा, मनामा | आम्हनामा. |

| | | |
|---|---|---|
| प्रथमा | तू | तुम्हू |
| द्वितीया, चतुर्थी. | तुले | तुम्हले |
| तृतीया | तू, तुवरी, तुनी. | तुम्हू, तुम्हनी, तुम्ही. |
| पचमी | तुनपान, तुनुथीन | तुमपान, तुमुनाथीन |
| षष्ठी | तुन्ह, तुना, तुनी | तुमनी-ना |
| सप्तमी | तुमा | तुमनामा |

इतर सर्व नामांना वर दिलेले प्रत्यय लागतात. क्रियापदें:--क्रियापदांची रूपे कर्त्यांच्या लिंगाप्रमाणें बदलत नाहींत. वर्तमानकाळांत तिन्ही पुरुषांचीं रूपें एकच आहेत. उदा.-मी, तू , तो करस; आम्हू, तुम्हू, ते करतस.

भूतकाळ क्रियापदाच्या नुसत्या मूळरूपावरूनच सिद्ध होतो. कोणत्याहि पुरुषाचा व वचनाचा अर्थ त्यावरून होतो. उदा -मी, तू, आम्हू, तुम्हू, त्यास्नी त्यानी, मी, तू , इ० केलें.

कांहीं धातूची फक्त निराळी रूपें होतात. उदा मी बोल्नु; तू बोलना, त्या बोल्नात.

भविष्यकाळची के ( करणें ) या धातूची रूपें.

| | | | |
|---|---|---|---|
| मी | करसु | आम्हू | करसूत |
| तू | करशी | तुम्हू | करशात-शाल |
| तो-ती-ते | करी | त्या | करतीन-तील. |

**कांहीं अहिराणी शब्द**:--कथाकन ( कोणीकडून ), अथाकन ( इकडून ), उनात (•आलांत ), पह्य ( कपाशी ), गावडी ( गाय ), अंडोर ( मुलगा ), निरताईन ( हळूहळु ), गुमणे ( हरवणें ), गवांद्या ( सोबती, मित्र ), टिमकारणें ( चोपणें ), बा ( बाप ), अठे ( येथें ), चितांग ( कुणबी बायकांच्या गळ्यांतील अलंकार ), वऱ्हे ( वर ), जरुक्सा ( थोडा ), हाड्या ( कावळा ), लव्हलव्ह ( लवकर ), खायलाय ( खोडकी ), थाट ( परात ), गोठ ( गोष्ट ), ढोरकी ( गुराखी ), चिडी ( चिमणी ), वाहारी ( सून ), वगार ( पारडूं ), बडांग ( कुंरण ), टोच्याबापू ( देवी डॉक्टर ).

**अहिराणी भाषेचा नमुनाः**—एका पत्रांतील उतारा-तुम्हीनं ज्ये पत्र धाडलत, त्ये मल्ये कालदी मंगयवारी भेटल. मांगो दुला आठीं कालदी उनता. त्याल्ये मिन सांगल की वावरात पळह्यामधुन सन तूर नी शेंग प्येरी दे. औंदा कपाशील्ये भाव नाही आन गेल्या वरसी मेघराजाकन कपाशीच येक बोंडवी भेटलं नाहीं. माझी अवस्था मल्ये मालूम की देवाल्ये मालूम. कसातरी दिवस काढी राहिनो आहे बारे. रववारच्या बाजारल्ये दोन गोऱ्हे घेइसन टाकतो. नवरीचा चितांग अन वाकरवाळ्या गहान टाकीसन रुपये कहाडीन.

बिस्तरवारी टोच्या बापू आमच्या गावाल्ये उनता. गणू बान्याच्या वटल्यावर मंचवावर जपला व्हता. तठी त्याल्ये राती इच्चू डुंबला. गणू बान्याचा अंडोर अन् माही बहारी गावल्ये जायेल शे. धन्याच्या पोरल्ये कुक लायाल्ये. धन्यान डाव पेयींचे जेवन दिल्त. गुयाचा शिरावी करल्ता. जडगावी नयाच पानी लई येत, तठी होडी झाल्यावर जान शे. वकील बुवाल्ये भेटीसन कागद करी टाकू. इ०

**हळबी:**—हळब लोक मध्यप्रांतांतील बस्तर आणि कांकेर ह्या संस्थानांत व चांदा, रायपूर आणि भंडारा ह्या बाजूच्या आसपास पसरले आहेत. मध्यप्रांताच्या बाहेरहि काही ठिकाणी हळबी लोकांच्या तुरळक वसाहती आहेत. वऱ्हाडांत एलिचपूर जिल्ह्यांत पुष्कळ हळब आहेत व ते कोष्ट्याचा धंदा करतात. हळब हे गोंडांपैकीं आहेत असें समजण्यात येतें. मद्रास इलाख्यातील व रायपूर मधील हळब लोक गोंडापैकीच आपणास समजतात तर भंडारा येथील हळब आपला व गोंडाचा कांहीं संबध नाही असे तितक्याच जोराने सांगतात. ओढ्या प्रांताच्या राजांच्या तैनातींत हे लोक सेवाचाकरी करून राहत. मानववंशशास्त्राच्या दृष्टीने हळब लोकांबद्दल बरेच मतवैचित्र्य दिसून आलें तरी भाषाशास्त्राच्या दृष्टीने ते मूळचे अनार्य एतद्देशीय असून त्यांनी आर्य भाषा स्वीकारिल्या आणि भाषेबरोबर आर्य-धर्महि स्वीकारला. हळबी लोकांच्या भाषेत मराठी, उरिया आणि छत्तिसगडी या तीन भाषांचे मिश्रण आढळून येतें. बस्तर येथील हळबीच्या पुढील पोटभाषा आहेत. महारी किंवा मेहरी, अड्कुरी, बस्तरी, चदारी, गच्चिकोला, मिरगानी, मुरिआ व शुंडी ह्या निरनिराळ्या पोटभाषा निरनिराळ्या जातीच्या व धंद्यांच्या नावांवरून मानल्या आहेत. वस्तुतः हळबीहून त्या भिन्न नाहीत. कर्नल ग्लासफर्ड हळबी भाषेसंबधी पुढीलप्रमाणे लिहितो. 'हळबी बहुतांशी छत्तिसगडी सारखी आहे. तीत मराठीचे पुष्कळच मिश्रण झाले आहे, किंबहुना बहुतेक प्रत्यय मराठी आहेत. बहुधा असें होतें की शुद्ध हिंदी शब्द घेऊन त्याला प्रत्यय इ० मराठी लाविले जातात. उदा० 'मी देखलों नाही.' हें जगदलपूरजवळील मुरिया लोकांच्या तोंडांतील वाक्य. या ठिकाणी मी नाही हे मराठी शब्द, 'देख' हा हिंदी शब्द व त्याला 'लों' हा भूतकाळचा मराठी प्रत्यय लागलेला आहे. एकदरीत ही भाषा म्हणजे मराठी व हिंदी यांचे मिश्रण आहे; व त्यांत व्याकरण आणि वाक्यप्रचार यांचा तर पूर्ण गोंधळ झालेला आहे."

या भाषेत शब्दांचा भरणा हिंदी असला तरी त्यांना ज्या अर्थी प्रत्यय मराठी भाषेतील आहेत त्या अर्थी हळबी भाषा ही हिंदीची उपभाषा न समजतां मराठीची उपभाषा समजणे जास्त सशास्त्र आहे.

**विशेष:**—स्वराच्या उच्चाराच्या बाबतीतहि हिंदी आणि मराठी भाषांतील उच्चारांची सरभेसळ हळबी भाषेत झाली आहे. मराठीपेक्षां छत्तिसगडीकडे ओढा फार आहे. 'अ आणि आं' व 'ऐ आणि उई' हे एकमेकांबद्दल येतात. उदा० बलो, बोलो; मै, मुइ ( मी ); बैला, बुइला. त्याप्रमाणे ऐ आणि ए व औ आणि ओ एकमेकांबद्दल कधीकधी येतात. उदा० मै, मे, गेला गेलो; कौनी, कोनी. तालव्यव्यंजनांचा उच्चार हिंदी तालव्याप्रमाणे होतो. डचा कधींकधीं छत्तिसगडीप्रमाणें 'र' असाहि होतो. उदा० कपरा ( कपडा ) 'ण'चा 'न' असा उच्चार करतात. ल चा र कधीकधी झालेला दिसतो. उदा० परा ( पळा ), बेरा ( वेळा ); व बद्दल हिंदी व उरिया भाषांप्रमाणें ब येतो. बेर ( वेळ ), बीस ( वीस ).

**नामें:**—'बिता' ( व्यक्ति ) ह्या शब्दाचा उपयोग नामाशीं जोडून करतात व असा केला असतां मूळ शब्दांच्या अर्थांत बदल होत नाही. 'बापबिता'; बेटाबिताके ( मुलाला ). लिंग दोनच आहेत. पुल्लिंग व स्त्रीलिंग. मराठींतील नपुंसक लिंगाऐवजी येथें पुल्लिंगच वापरण्यांत येतें. वचनें दोन आहेत. पैकी अनेकवचन 'मन' हा शब्द एकवचनाच्या रूपापुढें ठेवून तयार होतें. उदा० बाबामन; हूनमन ( ते ). कधीं कधीं अशा रीतीनें अनेकवचन न साधतां एकवचनावरूनच अनेकवचनाचा बोध पुष्कळ अशा अर्थाचा शब्द जोडून उत्पन्न करतात. उदा०-नौकर सबोके ( सर्व नोकरांना ), खुबे घोडा. नामाचें सामान्यरूप न होतां छत्तिसगडीप्रमाणे नुसता विभक्तिप्रत्यय लागतो. मुख्य विभक्तिप्रत्यय पुढीलप्रमाणें:- चतुर्थी-के, पचमी-ले, लगे, लले. षष्ठी-चो, के. सप्तमी-में, ने. तृतीयेचा प्रत्यय नाही. दोरीनें याचें भाषांतर 'दोरीसगे,' काठीनें याचें भाषांतर 'बडगीमें,' असे करतात. विशेषणांच्या रूपांत लिंग आणि वचन यामुळें फरक पडत नाही.

**सर्वनामें:**—ह्या भाषेतील सर्वनामांचीं रूपें ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत.

| | | |
|---|---|---|
| प्रथमपुरुष | मुइ, मुइं, मइ, मइ, मैं. | आमी, हममन |
| द्वितीया | मोके, मके | |
| षष्ठी | मोचो, माचो | अमचो, आमर |
| द्वितीयपुरुष | तुइ, तुइ, तू | तुमी, तुम |
| द्वितीया. | तुके | |
| षष्ठी | तुचो, तोर | तुमचो, तुमर |

**इतर सर्वनामें**:--तों, ये ( हा ), जो, जे, जउन, कोन ( काचो-षष्ठी ), हुन, हुनी ( तो ).

**क्रियापदें**:--क्रियापदांची रूपें लिंगाप्रमाणें बदलीत नाहीं. 'ना' हें अव्यय पादपूरणार्थ लावतात. उदा० तूचो नाव काय आये ना ? मुइं हिडले ना.

असणें क्रियापदाचीं रूपें--वर्तमानकाळ

| | |
|---|---|
| आसे | आसू |
| आसीस | असास |
| आसे | आसत. |

इतर धातूंना हीं रूपें लागून त्यांची वर्तमानकाळचीं रूपें होतात. भूतकाळांत ल हें विकरण लागतें. प्रत्यय मराठी, उरिया व छत्तिसगडी भाषांतील आहेत.

राहणें--भूतकाळ

| | |
|---|---|
| रले, रली | रले, रला, रलो |
| रला, रले, रली | रलास, रले |
| रलो, रले, रली, रला | रले, रला, रली, रलो. |

ल ऐवजीं व लावून भूतकाळ साधण्याचा आणखी एक प्रकार आहे. उदा० मंई करवेसे ( मीं केलें आहे ). मोके मारवा आसत ( मला मारलें ).

भविष्यकाळीं 'दे' किंवा कधीं कधीं 'ते' प्रत्यय लागतो. उदा० मई मारेंदे, मारून्दे, बोलेन्दे, देदे. या दे ऐवजीं क्वचित् से आढळतो. मई करूसे ( मी करीन ).

आज्ञार्थ नुसत्या क्रियापदाच्या रूपानेंच सिद्ध होतो. कधीं कधीं 'आस' लागून व मराठी आणि हिंदी-प्रमाणें आकारान्त व ओकारान्त आज्ञार्थाचीं रूपें होतात. उदा० बस, आनास, दियास, राखा, देखो इ० .

ह्या वरील विवेचनावरून हें कळून येईल की, हळबी भाषेमध्यें कांहीं नाहीं तरी तीनचार भाषांचें मिश्रण आहे. आमर तुमर ह्या रूपांत बंगालीचा अवशेष दिसतो. षष्ठीचा 'च' प्रत्यय आणि भूतकाळचा 'ल' प्रत्यय ह्या दोहोंत मराठीचा अवशेष दिसतो. शब्दांचे उच्चार, नामांच्या विभक्ति, संख्याविशेषणें, सर्वनामें व शब्दसग्रह ह्यांमध्यें छत्तिसगडी भाषेचा ठसा चांगला दिसतो. उरिया भाषेचाहि संपर्क भूतकाळच्या रूपांत दिसतोच. ह्याशिवाय हळब लोकांची मूळची द्राविडी भाषा असल्यानें हल्लीं यांच्या बोलींत त्याहि भाषेचे अवशेष दिसून येतातच. ह्यावरून ह्या भाषेला मराठीची उपभाषा म्हणावी कीं नाहीं ह्याविषयीं विद्वानांना शंका आहे.

**कांकेर येथील हळबीचा नमुना**:-- एक-दुन बाघ कोनी बनमें पडे सोउ रली. एकदम खुबझन हुनके पास अपलो बिलले निकरलो. हुनके आरोंसे बाघ उठलो आउर हुनके डावला एकदुन मुसापर एकदम पडला. रीसमें इलो. बाघनें हुन मुसाको मारेबर तैयार हो रहिलो. मुसा अर्जी करलो. तुमचो आपन बाट देखो मोचो थोर देख मोचो मारलेसे तुचो का बडाई मील्ते. इतनो सुन बाघने मुसाको छोंडेन थाती. मुसाने अर्जी करलो. वो कहलो, कोनी दिनमे आपलो यंचे दायाका बदला दीहो. हुनकेसुन बाघ हसलो आउर बनबाट गैलो. थोडे दिन पाछे हुन बनके पासके रहिलो बीतामन फांदा लगावलो. बाघको फसावलो. क्योंकि हुन हुनके ढोरके कन्तु कन्तु मारते रेलो. बाघने फांदोसे निकलन रहलो, फेर निकल नही सकलो. आखिर हुन दुखके मारे नरिआवलो. हुनीं मुसाने जिनके बाघ छोडाउन दिले रहलो हुन नरिआलो सुनलो. हुन आपलो उपकार करियाके बोली जानलो आउर खोजत उथा उम-रलो. हुता बाघ फसा पडा रहलो. हुन आपलो तेजचो दांतोंसे फांदाको कतरलो आउर बाघको छडावलो.

**गण अथवा जातिभाषा:**—ज्याप्रमाणें भौगोलिक दृष्ट्या पृथक् अशा निरनिराळ्या भागात एकाच भाषेचे निरनिराळे प्रकार दृष्टीस पडतात त्याचप्रमाणें निरनिराळे व्यवसाय अथवा धंदे करणाऱ्या लोकांमध्यें ज्या बोली रूढ असतात त्यांतहि आपणांस थोडाफार फरक असलेला बारकाईनें निरोक्षण केल्यास आढळून येतो. विशेषतः भरतखंडामध्यें अनेक धंदे आनुवंशिक पद्धतीनें कांहीं विशिष्ट संघांमध्यें चालू असण्याची प्रथा फार प्राचीन काळापासून पडली असून या वहिवाटीमुळें कांहीं धंद्यावरून स्वतंत्र जातीहि अस्तित्वांत आल्या आहेत. अशा जाती अथवा गण जरी सामान्यतः मराठीच भाषा बोलत असले तरी त्यांच्या राहणी व संवयी यांवरून कांहीं शब्दांचे उच्चार करण्याची विशिष्ट लकब त्यांच्यामध्यें उद्भूत होते. तसेंच त्यांच्या व्यवसायासंबंधीं अनेक शब्द त्यांच्यामध्यें तयार होतात. त्यांपैकीं कांहीं शब्द इतके वैशिष्ट्यपूर्ण असतात कीं ते त्यांच्या व्यवसायाशीं संबद्ध असणाऱ्या लोकांसच परिचित असतात. अशा तऱ्हेचे अनेक शब्द निरनिराळ्या जातींत रूढ असून अत्यंत अन्वर्थकहि असतात, परंतु त्यांचा वाङ्मयामध्यें क्वचितच समावेश होतो. कारण वाङ्मयीन भाषा ही शिष्ट व सुशिक्षित लोकांचीच भाषा सामान्यतः असून तिला शिक्षणामुळें एक प्रकारचें ठरीव व एकसूत्री वळण येतें व लेखकवर्गहि सामान्यतः नागर राहणीशीं विशेष परिचित असल्यामुळें व सामान्य जनतेशीं त्या मानानें कमी परिचित असल्यामुळे त्यांच्या लेखनांत या अनागर गणभाषेचा क्वचितच संबंध येतो व त्यामुळें या बोलींतील शब्द किंवा विशेष लकबी फक्त या जातींपुरत्या रूढ होऊन त्यांना सार्वत्रिक स्वरूप न येतां विशिष्ट समाजनिबद्धता येते. अशा तऱ्हेच्या कांहीं भाषांची माहिती पुढें दिली आहे.

**कोळी:**—कोळी लोकांची वस्ती गुजराथ, कोंकण व देश यांतील बहुतेक खेड्यांतून आढळते. अतिप्राचीन राष्ट्रजाती म्हणून ज्या मानल्या जातात त्यांपैकीं मुंडा नांवाच्या राष्ट्रजातीशी यांचा संबंध जोडला जातो. कोळ्यांत तीन भेद आहेत—( १ ) डोंगरावरील कोळी किंवा महादेव कोळी; ( २ ) किनाऱ्यावरील कोळी, किंवा मच्छिमारी कोळी अगर सोन कोळी; व ( ३ ) या दोहोंहून कमी दर्जाचे कोळी.

कोळ्यांच्या भाषेंतील विशेष लकबा:--नाकांतील उच्चार तर सर्व कोंकणांत सर्वसाधारण आहेच: परंतु ह्या लोकांमध्यें हा उच्चार कधीं नासिक्य तर कधीं निर्नासिक्य होतो. तों व तो, तें व ते असे दोन्ही प्रकारचे उच्चार आढळून येतात. ओ आणि औं त्याबद्दल ऱ्हस्व स्वर उच्चारण्यांत येतो किंवा त्यांच्याबद्दल ऊ आणि ऊं येतात. होतोंबद्दल हुतूं असें रूप येतें. व्यंजनोच्चारांमध्यें अशीच अदलाबदल होते. ल बद्दल न, र बद्दल न असे विपर्यय होतात. रागबद्दल नाग म्हणतात व नांव ( लांब ), नागला ( लागला ), नोटी ( रोटी ) असे शब्द आढळतात. श, ष, स ह्या तिन्ही उच्चारांबद्दल एक 'स' चाच उच्चार करतात. उदा. देस (देश), जांवसी (जाऊनशी), जाईन बद्दल जान येतें. त्याचप्रमाणें पुढील रूपें लक्ष देण्यासारखीं आहेत. मी, मे, में. ( मी ची तृतीया ), तू ( तूं किंवा तृतीयेचें तूं शब्दाचें रूप ), हांता—ते = आहेत.

महादेव कोळी जी भाषा बोलतात ती पुष्कळ अशांनी ठाण्यांतील पूर्वेकडील इतर भाषांप्रमाणें देशी किंवा मध्यवर्ती मराठीच्या सारखी आहे. किनाऱ्यावरील कोळी भाषा देशीला पुष्कळ दूरची आहे. ड व ळ चा देशावरील लोकांप्रमाणेंच महादेव कोळी उच्चार करतात. उदा. पडला, दुकाळ. वर्तमान काळाचीं रूपे देशीप्रमाणेंच आहेत. उदा. मी मरतो. विशेष रूपें पुढील आहेत:—माह्या ( माझा ), तुह्या ( तुझा ), त्यासा—त्याशा (त्याचा), दोघाली ( दोघांना ). बाकी इतर बाबतींत कोळी भाषेचे विशेष हिंन्यांत आहेतच. सामान्य कोळी भाषेचा एक नमुना पुढील गोष्टींत पाहावयास मिळतो.

'एक कुळवी आपल्या मरनाच्या येळी आपल्या समद्या सोकऱ्यास जवळ बाहून त्यास बोल्लो, "बालांनो मांजे जवळ तुमाला देयाला मांज्या सेतासिवाय बिसरे काय नाय. आनी त्या सेताचे मिनी तुमाना समद्याना सारके वारस केले हातीन. मांजे जवळी जी काय संपाती हाय ती समगली मिनी त्या सेतात पुरलेली हाय. ती खनशी ते तुमाला गवेल." असा बोलले आनी त्यानी आपला परान सोरला. मंग ते सोकरे पावडी कुदली घेऊन त्या सेतातला बाबत जेले, आन दरबे करता सेत खनायला लागले. त्यासनी ते समगला सेत खनला. त्यातला त्याला दरबे कयांच गवला नाय. तवा त्याना वाईट वाटला आन ते घरा जेले. मंग त्यानी त्या सेतातला भात पेरला. तवां ती जमीन चकोट खनल्यामुळे त्या वरसी त्या सेतातला वर्सापक्षी भात मोप एका. तवां ते सोकरे बोलले 'आपल्या बाबांनीं सेतातला

दरवे पुरून ठेवला हाय ते आपून त्याची चकोट मेनत करावी म्हनूनशानी सांगला आसवा व त्या परमान आपल्याास त्याच फळ गावला.'

**किरिस्तांवः**—ठाणें जिल्ह्यांतील जे कॅथॉलिक ख्रिश्चन आहेत त्यांची भाषा किरिस्ताव ह्या निराळ्या नांवानें ओळखिली जाते. हे मूळचे कोळी परतु पोर्तुगीज मिशनऱ्यांनी यांना बाटविलें, म्हणून त्यांच्या भाषेत थोडासा पोर्तुगीज शब्दांचा भरणा झालेला दिसतो. उदा० पाय ( बाप ), माय ( आई ), मिस्स ( मास–प्रार्थना ), इगार ( उपदेशक ). यांच्या बोलण्यांत 'ण' अधिक येतो. कांहीं चमत्कारिक रूपें:–बोटला ( बोलला ), ऐकटल ( ऐकलें ). इतर बाबतींत ही कोळी भाषेहून निराळी नाही.

**कुणबी ( कुणबाऊ )**:—कुणबी लोक हे सामान्यतः शेतकरी आहेत. ते जेथें असतात तेथील भाषा बोलतात. मुंबई, ठाणें, जंजिरा इ. ठिकाणचे कुणबी तेथील भाषा म्हणजे उत्तर कोंकणीच बोलतात. त्यांच्या धंद्याचा वगैरे त्यांच्या बोलीवर परिणाम होऊन तिच्यांत थोडी निराळी लकब उत्पन्न झालेली दिसून येते. पुणे जिल्ह्यांतील कुणबी किंवा मराठे जी भाषा बोलतात ती ह्या उत्तर कोंकणातील कुणबाऊप्रमाणेंच आहे. फक्त तिच्यावर देशी भाषेचा थोडासा परिणाम झालेला दिसतो. उदा. ड व ळ चा उच्चार ते करतात व वर्तमानकाळाची रूपें देशी किंवा पुणेरीप्रमाणें असतात. खालील गोष्टीवरून ही कुणबाऊ भाषा म्हणजे एक स्वतंत्र बोली नसून थोड्या स्थानिक बदलांनीं युक्त अशी उत्तरकोंकणीच आहे हें दिसून येईल.

'एक रांडमुंड्चा पोर होता, त्याला एक बय होती. ती राज्याकर दलाकांडा कराया जात आस. ततना ती कोंडामुंडा घेऊन ये. तवा त्या रांडमुड्च्या पोराच्या दोन गाया होत्या. तवां एक तला होता. त्या तल्यावर तो गाया चरवीत आस. तवां त्याची बय त्या तल्यावर भाकरतुकडा त्या पोरासाठना घेऊन ये. तवां त्या पोराच्या राखनांत राजान आपली गाय देली. तवां तो पोर तल्याच्या पारीवर आपली भाकरी बसून खाताय तवां एक नागीन आनि एक आरदल्या या दोगाचा मेल लागला. तवां त्या पोरान त्या आरदल्यावर काठी टाकलान. तवा काठी टाकल्या-बरोबर नागीन पातालांत गेली. ती पातालात गेल्याबरोबर तिचा बाप पातालांत व्हता. तवां ती त्यास आसी सांगताय रांडमुंड्च्या पोरान माझेवर काठी टाकलान. तवां नांग दुसऱ्या सापास म्हत, तुमी रांडमुडच्या पोरास डसायला जा. तंवा थीतना च्यार साप निगाल आनि जित पोर व्हता तिथ आल, आनि त्याच्या बाटल झाल. तवां त्या पोरान च्यार पानाच च्यार दुरून लावलान आन एक गाय च्यार दुरनामदी पाजलान. आन ते च्यार दुरून च्यार सापाच्या तोंडांत बतलान. तवां साप त्याला सांगतात. तुला नांगानी बोलवना केलाय, तू गेल्याबरोबर नांग तुला हटकील कीं, नागनींनी कशी काय येवस्ता केली, तां सांग. तो तुला धनदौलत देल. तवां तू म्हन, मना तुमची धनदौलत नको. तुमच्या हाती आंगठी हाय ती मना द्या. मग त्या नांगान त्या लेकीचा सात पाट काढून भुड्या गाडवावर बसवलान, आनि तिचो धींड गावातना काडलान आनि तिला हाकलून लावलान.'

**वऱ्हाडी कुणबाऊ**—चांदा जिल्ह्यांतील कुणबी जी भाषा बोलतात ती एक स्वतंत्र बोली कुणबाऊ या नांवानें ओळखिली जाते. ही बोली भात पिकविणारे व तळी विहिरी बांधणारे शेतकरी यांच्या कोहळी भाषेहून निराळी नाहीं. हिचा विशेष म्हणजे नपुसकलिंगाबद्दल पुल्लिंग वापरणें हा होय. उदा. 'दोघ लेकर होते.' 'लेकरू गेला.'

**परभीः**—परभी म्हणजे परभू किंवा प्रभू लोकांची भाषा; परंतु हिला आणखीहि नांवें आहेत; कायस्थी, दमणी व मुंबापुरी. मुंबईतील सर्व मराठी बोलणारे लोक व ठाणें जिल्ह्याच्या दमणपर्यंतच्या भागांतील सर्व लोक ही बोलतात. हे परभू लोक गुजराथ व उत्तरहिंदुस्थानांतून आलेले आहेत असें समजण्यांत येतें. सतराव्या व अठराव्या शतकांत मुसलमान व मराठी राजांकडे हे लेखक म्हणून राहिले होते. ऐतिहासिक बखरी पहिल्यानें गद्यांत लिहून ठेविल्यानें मराठी भाषेची मोठीच सेवा यांनी केली आहे. ण, ळ, व ड यांचा देशीप्रमाणें उपयोग केला जातो. उदा.--थोडें दिसान; फार दुकाळ पडला. वर्तमान भविष्यकाळाची रूपें मध्यवर्ती मराठीप्रमाणें होतात. 'मी मारतों, मारताव,' 'मी सांगन.' या बोलींत गुजराथी शब्द आढळतात; विशेषतः उत्तरेकडे ज्या ठिकाणीं गुजराथीचा निकट सहवास आहे तेथें तर जास्त आढळतात.

**आगरीः**—आगरी लोक हे शेतकरी आहेत. कोळी लोकांपैकीच हे आहेत असें मानण्यांत येतें. पुष्कळसे आगरी लोक मीठ व खाऱ्या जमिनींतील भात पिकवितात. कुलाबा जिल्ह्यांत यांची वस्ती आहे. मागील काळीं

मध्यवर्ती मराठीपासून ही फार भिन्न होती. परंतु सध्यां ती उत्तरकोंकणीहून भिन्न नाहीं; शिवाय ळ चा उपयोग व कांहीं शुद्ध देशी रूपें यांत आढळतात. त्यामुळें ही मध्यवर्ती मराठीला पुष्कळच जवळची आहे.

**धनगरी:**–धनगर लोकांची ही बोली ठाणे जिल्हा, जव्हार संस्थान, जंजिरा व बेळगांव जिल्हा यांत आढळते. ठाणें जिल्ह्यांत मुरबाड तालुक्यांत धनगरांची वस्ती विशेष आहे. जंजिऱ्यात जे आहेत ते देशावरून व कर्नाटकांतून आलेले आहेत आणि म्हशेळयाला त्यांची पुष्कळ वस्ती आहे. बेळगांव जिल्ह्यांत सावंतवाडी संस्थानच्या बाजूला ही भाषा बोलणारे लोक आहेत. ठाण्याच्या धनगरी बोलींत ड आणि ळ चा उपयोग केला जातो. उदा. घोडा, सगळा. वर्तमानकाळचीं रूपें देशीप्रमाणे होतात. स्वरापूर्वी य घालण्याची विशेष पद्धत आहे. 'य्वाटा' (वाटा), 'य्वो' (तो). जंजिऱ्याची धनगरी बोली उत्तरकोंकणीहून फारशी निराळी नाही. भूतकाळच्या तृतीय पुरुषाच्या एकवचनाचें रूप 'आन' लागून होतें. उदा. 'बान सांगितलान.' वर्तमानकाळचीं रूपें व डचा उच्चार देशीप्रमाणें केला जातो. 'मी खातों;' तू खातास, 'तो म्हणतो' इ०. बेळगावांतील बोलीत ड, ळ आणि ण चा उपयोग देशीप्रमाणें केला जातो. उदा. घोडा, डोळ, आणि, इ० ह्या बोलीचा विशेष म्हणजे अन्त्य स्वरोच्चार गाळणें हा होय. उदा. सोन् (सोनें), घोड (घोडा), वासर (वासरु), तुज नाव (तुझें नांव) इ०. कांही विशेष शब्दोच्चार:–याक, योक (एक), योन (दोन); ईस (वीस); हा (आहे), हास (तू आहेस); हा (तो आहे.); हाव (आहों) इ०. बेळगांव जिल्ह्याचा वायव्य भाग जरी सह्याद्रीच्या पूर्वेला आहे तरी भाषेच्या दृष्टीनें कोंकणातच मोडतो. पुढील उताऱ्यावरून ही बोली जवळजवळ उत्तरकोंकणीप्रमाणेंच आहे हें दिसून येईल. (पुष्कळशी देशीप्रमाणेंहि दिसते.)

(बेळगांवी धनगरी). सकाळपासून सध्याकाळपर्यंतच काम—'सकाळचा उठल्यावरोबर वासर सोडली. वासर सोडून मशीची वार गाहिल्या त्याबद्दल दोन गडी पाठवून वशीद आनल. ते वशीद दोनतीन वशीद मिळवून मशीस घातल. तिथून पुढ ताक ढवळल. तिथून पुढ बाकरी खाऊन सात आठ आळाची लोक बलिवली. आळाची लोक बलवून कामास लाऊन बाकरी खाऊन गोराकड गेलो. पुना गोराकड जाऊन मस पाहली. मस पाहली तर निकाल ठकली. तिथून पुना ही मरतं समजून काहीतरी वशीद वगाव म्हणून दुर्गास गेलो. पुना मदकोपास गेलो, नागुरड्यास गेलो, अवशीद घेऊन तीन तास रात्रीस गरास गेलो. तिथून पुढे जेव्हन ते वलाद मशीस पाजिवल. नुकडा खाऊन जरा पडलो. दोन तास रात्र असतांना गोर सोडली. तिथून गरास आनून वासर सोडली. वासर सोडून हातावर घेघी घेघी बाकरी घेऊन लवकर तीर्थकुंडेस आलो. तिथून कचेरीस आलो.'

वऱ्हाडांतील धनगरी ही वऱ्हाडीहून फक्त खालील थोड्या बाबतीत भिन्न आहे. मध्यवर्ती मराठींत जेथें शब्दाच्या शेवटीं एं असतां त्याबद्दल वऱ्हाडीत अ येतो. व ह्या अचा उच्चार धनगरीत गाळतात. उदा. त्यान् सगळ् धन. आदर दाखविण्याच्या वेळची आज्ञार्थाची रूपें, येजो, पाहेजो. इ० होतात. त्याप्रमाणें बस्लेत (बसला होता), खाते (खातात), जातेत (जातात) इ., रूपें विशेष तऱ्हेची आहेत.

**लोककथा**—'एक धनगर होता तो बकरे चारायले गेला. त्यान आपल्या सुनेले सांगितल, माही भाकर घेऊन येजो. बारा वाजाची येळ झाली. तिले त्या भाकरीची याद राहली नाही. एका आवरामधी एक कुनबी आऊत वाहात होता. तो धनगर त्याच्यापाशीं गेला. त्या कुनब्याला म्हनते कीं माहे बकरे आंब्याखाले बसलेत. माहे बकरे पाहेजो; मी जेऊन येतो. तो जेवासाटी गेला. जेऊन पुनः आला. बकरे बसलेच होत्या. पुन्हा त्यान आपल्या बकऱ्या घेऊन गेला चारायले.

**भंडारी (हेटकरी):**—भंडारी लोकांची भाषा ही उत्तर कोंकणीहून विशेष निराळी नाहीं. फक्त डचा उपयोग देशीप्रमाणें केला जातो; कधींकधी डचा र होतो. उदा० 'तुझा शब्द मी कदीबी मोरला नाय.'

**ठाकरी:**–ठाकूर लोक गुजराथ देश व कोंकण यांत विशेष आढळतात. ते रजपूत आणि कोळी लोकांचे वंशज आहेत असें समजण्यांत येतें. ठाणें, कुलाबा व नाशिक जिल्ह्यांतील ठाकुरांची ही बोली देश व कोंकण यांच्या सांधीवर आढळते व ती ह्या दोहोंमधील भाषेचा दुवाच आहे. कुलाबा जिल्ह्यांतील ठाकूर जी भाषा बोलतात तिच्या-वर देशी मराठीचा पुष्कळ परिणाम झालेला दिसतो. 'ळ' व 'ण'चा 'ल' व 'न' पासून भिन्न उच्चार मानला जातो. व ड ही तसाच राहतो. एकदरींत ही भाषा म्हणजे उत्तर व मध्य कोंकणीची सरमिसळ होऊन झालेली

आहे. नाशिकची ठाकरी हिचा देशी किंवा मध्यवर्ती मराठीशीं जास्त संबंध पोंचतो. ड आणि ळ हे उच्चार आहेत. णचा कधींकधीं न असा उच्चार आढळतो. उदा. पानी. त्याप्रमाणें कोंकणी शब्दहि पुष्कळ आढळतात. उदा. इस्तव, येळ, त्यान, डुकर, असन, ज्येला, ( गेला ). 'ती डुकर खात होते' या वाक्यांत जे होते असें रूप आहे हें गुजराथीचा परिणाम होऊन झालेलें आहे. वास्तविक नपुसकलिंगी रूप पाहिजे तें पुल्लिंगी अनेकवचनाचें आहे. ठाणें जिल्ह्यांतील ठाकरींत गुजराथी मिसळलेली दिसते. उदा. देईजो, भुका ( भुकेनें ), आखोन ( अखेर ). चतुर्थीचा प्रत्यय पुष्कळ वेळां ल असतो; आब्याल ( बापाला ), माल ( मला ), त्याइल ( त्याला ). पुरुषवाचक सर्वनामांची तृतीया 'हान' लागून होते. महान ( म्यां, माझ्यावडून), तुहान ( तुझ्यावडून ). त्याप्रमाणें माहा, तुहा अशींहि रूपें आहेत. त्याप्रमाणें करी ( कां, कसे ). बाकी इतरबाबतींत ही त्या जिल्ह्याच्या भाषेप्रमाणेंच आहे.

दालदी:—दालदी हे मुसलमान असून यांचा धंदा मासे मारण्याचा आहे. ते स्वतःला अरबांचे वंशज असें मानतात. परंतु कोंकणी बोलीच बोलतात. हे कारवार, रत्नागिरी जिल्हा, जंजिरा, मुंबई व मद्रास इलाख्यांतहि आहेत. या लोकांची ही दालदी भाषा सर्व ठिकाणीं सारखीच नाहीं. हे ज्या ठिकाणीं राहतात तेथील बोलीचे परिणाम होऊन ठिकठिकाणीं थोडथोडा फरक यांच्या बोलींत पडलेला आहे. पुष्कळशा दालदी लोकांना हिंदुस्तानी येते व यामुळें हिंदुस्तानीचा थोडासा परिणाम यांच्या भाषेवर झालेला दिसतो. उदा० कांहीं शब्द व उच्चार-विशेष हिंदींतील आहेत. ळ बद्दल ल येणें, स्वरांमधील ड बद्दल र येणें हे हिंदीवरूनच आलेले उच्चार विशेष होत. उदा० घोरो ( घोडा ). दालदी भाषा कुडाळी भाषेप्रमाणेच आहे. उदा० प्रथमपुरुष एकवचन 'मी' आहे व भूतकाळचें तृतीय पुरुषाचें एकवचन 'आन' कारान्तच कुडाळीप्रमाणें आहे. 'तेना बोलान'=तो बोलला. या भाषेचा विशेष 'कर' या धातूचें 'केर'मध्यें रूपांतर करण्यांत दिसून येतो. उदा. केरुला ( करण्याकरतां ), केरलां ( केलें ). त्याप्रमाणें पुष्कळ रूपांच्या शेवटी स असणें हाहि एक विशेष आहे. उदा. पुतुस, भावस, पुताच्छिस रहम. पुढील उताऱ्यावरून दालदींचें स्वरूप कळून येईल.

'एक फकीर साई होते. त्याचे चार सोकरे होते. त्याची बायको आपल्या घोवाला बोलते, " तुमी घरांत बसून-रेल्याव, धंदारोजगार नाय. तवां हीं लेकरां खातील पितील काय ?" तवां तो बायकोला बोलते, "बिवी आजचे दीस सबुर करा आनि सवा चार रोटी मला भुजून द्या, म्हनजे मी धंद्याला जान." आतां बायकोनी सुबोची आपल्या घोवाला चार रोटी भुजून दिलान. त्यो रोट्यो तो घो घेऊन जगलच्या तरफ रवाना झलो. तो मुख्या कोंकस्थानांत गेलो. त्याला दिसा बारा वाजल्याच्या सुमाराला एक बाव नजर पडली. त्या बावीवर बैठून सोबनच्यो चार रोट्यो सोडून बावीच्या चार कोनावर ठेवलान आनि बोलवे लागलो, "एकक खांव कीं दोकु खांव." आवऱ्यांत त्या बावितला शेखनागाची धू होती. तवां बापानी धुवेला बोलबे लागलो कीं, "बावीवर एक फकीर भुका येऊन बेठलेलो हाय त्याला काई खावेला द्ये." धू बोलव्या लागली "आपल्याजवल खावेला काय नाय. तंवा बाप बोलल्लो, आपली हांडी हाय ती वरतीं घेऊन जा, आणि त्या हांडीच्या खलतीं लुबान जाल. म्हनजे त्या हांडींत काय तरी शिजून तयार होईल. तां त्याला खावे देस." त्यापरमान धू वरती येऊन बापानें सांगितल्यापरमान करून फकिराला खाव्या घातलान आनि ती हांडी बी फकिराच्या हवालीं केलान. फाकिरानें ती हांडी घेऊन थनशी चालतो झलो. तो वाट चालतां चालतां एका खापरी चोराच्या गावात गेलो. रात झली होती, आनि त्या गावचे सगलं लोक चोरीला गेले होते. म्हनून एकाच्या ओटीवर त्यान आपला बिस्तार लावलान. चोराची बायको घरात होती. त्या बायकोनी त्या फकिराच्या सोबनची हांडी बगलान. तिच्या दिलाला लागलां कीं ही हांडी मुटी गुनवान् हाय. आवऱ्यात तिचो घो चोरी करून ऐलो. ती आपल्या घोवाला सांगते "ह्या फकिराजवल एक हांडी हाय. ती मोठी गुनवान् हाय. म्हनून फकिर निजल्यावर आपल्या घरानची एक हांडी न्या आनि फकिराची हांडी हाय ती आपल्या घरांतला हना." त्या परमाने तेंच्या घोवान केलान. बायकोनी ती हांडी चुलीवर ठेवल्याबरोबर त्यांत आखनी बिरयानी शिजली. तीं दोघा घो बायलानी बैठून खाल्ये. तिनवरती बायको आपल्या घोवाला बोलव्या लागली, "तुमला आतां चोरी करव्या जाण्याची काय जरूर नाय. आपल्याला आतां पोटभर खाण्याला मिलाय." '

**कातकरी किंवा काथोडीः**—हा आणखी एक कोंकणी भाषेचा प्रकार आहे. ही भाषा बोलणारे लोक कातकरी ह्या नांवानें ओळखिले जातात. त्यांचें नांव कात ह्या शब्दावरून पडलें असावें. कारण त्यांचा खैरापासून कात काढण्याचा धंदा आहे. हे लोक मूळचे आर्य आहेत कीं काय ह्याबद्दल मतभेद आहे. ते सह्याद्रीच्या खबदाडींत व कोंकणांतील दऱ्याखोऱ्यांत राहतात. यांची बोली ही मूळची खानदेशीशीं निगडित अशा एका भिल्ल भाषेपैकीं आहे. परंतु हिच्यावर मराठीचा अतिशय संस्कार झाल्यानें ही कोंकणची एक उपभाषा म्हणून मानली जाते. या बोलीला कातकरी, काथोडी किंवा काटवाडी असें म्हणतात.

विशेषः—कातकरी भाषेत गुजराथी किंवा खानदेशी भाषेसारखा षष्ठीचा प्रत्यय 'ना' आहे. उदा. बाहासना = बापाचा, यांत बाहास हें सामान्यरूप कोंकणी मराठीप्रमाणे आहे, परंतु प्रत्यय ना गुजराथी आहे. कधीं कधीं 'चा' ही योजतात. उदा० 'माज्या बाप्या चाकराला' त्याप्रमाणें 'घरामां' व 'घरांत' ही दोन्ही रूपें आहेत. 'माना' = माझा, 'तुना' = तुझा. क्रियापद सामान्य कोंकणीप्रमाणें चालतें.

**असणें**

| | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | आहां | आहांव |
| द्वि. पु. | आहांस | आहां |
| तृ. पु. | आहां | आहात, आहांत. |

'मा पाप करा हा' ( मी पाप केलें ) असे प्रयोग होतात. पुढील गोष्टीवरून काथोडी ही जरी हल्लीं मराठींत मोडते तरी ती मूळची वेगळी भाषा होती असें दिसून येईल.

गोष्टः—'दोन दोस एकेच वाटन सगत जाइंव. त्याना नदरमा एक आस्वल पडनेऊ. त्यामा एक बिहीनी एका झाडावर चढनेल, आन झाडाच्या खांद्यामा आपना जीव जगवा दपना. बीसरा आपल्या एकल्याच्यान अस्वला समोरानी नीवाव लागार नाहा, आसा हेरानी जमिनीवर पडना आन मरनाना नीमीत लीदा. त्यान मडना ढोंग लीदाना कारन त्यान ऐकेला व्हाता, आस्वल मुरदाना सीवत नाहा. तो पडना आहा ती आस्वल त्याच्या डोयपा आनी आन त्याना काळीज कान आन नाक गदशा पर त्या मानसान हालवेल नाहीं, दम धरी रहना, आन ती आस्वल तो मरीगई ये ध्यानमा लीदा. तीं आस्वल हेरी गई. तीं आस्वल दूर पडनी पीईला मानूस झाडावरून खाल उतरना आन बीसऱ्याना आखा, "आस्वल तुज्या कानामां काय गुदव हती." तो आखा, "मी त्याना तोंड तुज्या कानापा हेरा." त्याना दोसदार बोला, "त्यामा मोठासा दपाडा नाहा. त्यान बडाच आखा जा मानूस कासनोमा आहा ता आपल्या बचावाचा ईचार करवाहा आन आपल्या दोसदाराना फसवाहा ये लोकासी संगत करवा नाहीं."'

**वारलीः**—कातकरी लोकांसारखीच वारली म्हणून एक रानटी लोकांची जात ठाणें जिल्ह्यांत आहे. त्यांची वस्ती डहाणूजवळ फार आहे. हे मूळचे सातपुड्यांतील भिल्ल लोक असल्यानें त्यांची मूळची भाषाहि भिल्ल भाषाच होती. परंतु पुष्कळ काळच्या मराठीच्या मुलखांतील रहाणीनें या वारली लोकांची भाषा मराठीची उपभाषा बनण्याइतका तिच्यावर मराठीचा सस्कार झाला आहे. विशेषः—ह्या बोलींत दीर्घ स्वर ऱ्हस्व उच्चारण्याची फार ढकव आहे. 'कोठें जातोस' याच्याबद्दल 'कोठ जास' असें ऱ्हस्व उच्चाराचें वाक्य म्हटलें जातें. 'तेथें' बद्दल 'तथ', 'दिलें' बद्दल 'दिलह', 'बापाला' बद्दल 'बासला', 'भाऊ' बद्दल 'भास' सामान्यरूप 'ए'कारान्त होणें इ० वारली भाषेचे विशेष आहेत. नांगरणें = पहाणें असाहि शब्द आढळतो. ही बोली म्हणजे निरनिराळ्या बोलींचें मिश्रण आहे. पुष्कळ अशीं ती ठाण्याच्या बोलीशीं जुळते. इतर बाबतींत ती मध्यवर्ती किंवा पुणेरी मराठी-प्रमाणें आहे व शिवाय तिच्यावर गुजराथी भाषेचा परिणाम झालेला आहेच. उदा० तथ, सांगन, पडल इ० रूपें कोंकणीप्रमाणें आहेत. ण, ड आणि ळ यांचा देशी भाषेप्रमाणें उपयोग केला जातो व गुजराथी शब्द बिजा ( दुसरा ), पोते ( स्वतां ), त्याने (याचा ), मरेल ( मेलेला ) इ० आहेतच.

**वाडवलः**—पांचकळशी कुणबी जातीची वाडवल या नांवाची एक पोटजात आहे. ठाणें जिल्ह्यांतील समुद्रकांठच्या वसई, माहीम व डहाणू या तालुक्यांत यांची वस्ती जास्त आहे. इतर पांचकळशी लोकांप्रमाणेंच हेहि

गुजराथमधून आलेले आहेत असे समजले जातें. या लोकांच्या बोलीचे कांही विशेष आहेत व त्यामुळे तिला एक स्वतंत्र उपभाषा मानली आहे. ' च ' चा उच्चार या बोलीत ' स ' किंवा ' श ' होतो. उदा०—साकर ( चाकर ), संद ( चंद्र ), शार ( चार ). ' स ' आणि ' श ' ह्यांच्याबद्दल ह येतो. उदा०—होन ( सोनें ), बाह ( बस ), हागितला ( सांगितला ), हेत ( शेत ), हेमर ( शभर ); ' ह ' चा कधी कधी लोप होतो. उदा० आत ( हात ), आय ( हाय, आहे ). असणें या क्रियापदाचें वर्तमानकाळचें तिन्ही पुरुषाचे एकवचन हाय किंवा आय असें होतें. अनेकवचन अनुक्रमाने १ आत ( हात ), २ आहा, आत, ३ आत, हात असें आहे. भविष्यकाळची कांही रूपे: अहेन ( असेन ), सालान ( चालेन, जाईन ), हांगेन ( सांगेन ), मारिहील ( मारशील ). कांही शब्द व रूपे गुजराथी आहेत. उदा०—सा, छ ( सहा ), मेरे ( जवळ ), पोतेही ( स्वतःची ), भुके ( भुकेने ), त्यातना ( त्याच्यापकी ). या बोलीचे इतके विशेष असले व गुजराथीचें यात मिश्रण असले तरी हिचा उत्तरकोंकणीशी अधिक संबंध असल्याने तिच्यांत हिचा समावेश केला जातो.

**फुडगी:**—ठाणें जिल्ह्यांतील एका भटक्या जातीची ही बोली आहे. ही वाडवल बोलीहून निराळी नाही असें मानण्याइतका अगदी थोडासाच भेद दोहोंत आहे. उदा० साकर, सार, घोडा इ० शब्द दोहोंत आहेत, आणि ' तुया बाबा ह्या घरात कवडेर पोर हात ' इ० वाक्यरचना व शब्दांची रूपेंहि दोन्ही बोलींत एकच आहेत.

**सामवेदी:**—ठाणें जिल्ह्यांतील वसई व माहीम या तालुक्यात सामवेदी ब्राह्मणाची वस्ती आहे. ते सर्व शेतकीचा किंवा गवळ्याचा धंदा करितात. या लोकांची भाषा मराठी व गुजराथी यांचें मिश्रण होऊन झालेली आहे. यांच्या भाषेत वाडवल भाषेप्रमाणे च बद्दल स किंवा ह येतो. मराठीच्या प्रांतातून जसजसें आपण खानदेशी किंवा गुजराथीच्या प्रांताकडे जातों तसतसे ' च ' बद्दल ' स ' वापरण्याची प्रवृत्ति दिसून येते. उदा. साकर(चाकर), नासत्यात ( नाचत्यात ), अडहण (अडचण). षष्ठीचे प्रत्यय हो, हा किंवा आ आहेत. बापाहा, रांडाआ. ' स ' चा ह होतो. उदा. दिहात ( दिसात, दिवसांत ), होकरो ( छोकरा ). बोलिलो, घालिली यांच्याबद्दल बोइलो, घाइली अशी रूपें होतात. प्रथमेचें पुल्लिंगी रूप गुजराथी व कोंकणीप्रमाणे ओकारान्त होतें. उदा० होकरो, वाटो. तृतीया ए, हे व दे लागून होते. उदा. निर्भेय, आनदाहे, भुकेदे. चतुर्थी दो लागून होते. माहणादो. क्रियापदांची रूपें ठाण्यांतील इतर बोलीप्रमाणेंच मुख्यतः होतात. भूतकाळ खानदेशीप्रमाणे होतो.

असणें भूतकाळ

| | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | हात | हातांव |
| द्वि. पु. | हातस | हाता |
| तृ. पु. | हात | हालात, हुतात. |

' हा ' च्या ऐवजी ' ही ' हें अंग घेऊनहि भूतकाळची दुसरी रूपे होतात. उदा० हिना; हिनात.

**महारी:**—महार मुंबई इलाख्यात सर्वत्र आहेत. हे जेथें असतात तेथील बोली बोलतात. महार, धेड, होलिआ व पर्वारी या नांवांनीहि ओळखिले जातात. ठाणें जिल्ह्यांतील महार हे मराठ्यांनी देशमुख व देशपांडे यांना मदत करण्याकरितां म्हणून दक्षिणेंतून आणिलेले आहेत अशी समजूत आहे. कोंकणातील या महारांची बोली ही मुख्यत्वेंकरून उत्तरकोंकणीहून निराळी नाही. थोडे जे विशेष भेद आहेत ते पुढें दिल्याप्रमाणें:—' ए ' आणि ' ओ ' हे 'या' आणि ' वा ' होतात. त्या (तें). घ्वारा (घोडा). 'य'च्या ऐवजी य व यो ही कधीं कधीं आढळतात. यक, योक. ण, ड, ळ चा उच्चार न, र आणि ल करतात. हाट ( आठ ), न्हव ( नऊ ), धात (दांत), ज्येला, ग्येला ( गेला ) इ० शब्द व रूपें आढळतात. नपुंसकलिंग जवळजवळ नाहीसें झालेलें आहे, व त्याऐवजीं पुल्लिंग योजितात.

असणें.

| | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. पु. | हाये | हावो |
| द्वि. पु. | हायेस, हायस | हा |
| तृ. पु. | हाये, हाय | हायेत, हायेती. |

इतर क्रियापदांची रूपें सरळ होतात. सांगला, चारायास्नी, म्हंगायला, वाटुनशानी इ० रूपें पाहण्या-सारखीं आहेत.

**वऱ्हाडांतील महारीः**—महार जेथें असतात तेथील भाषा बोलतात. उदा० ठाणें जिल्ह्यातील महार कोंकणी व बस्तरमधील महार हळबी भाषा बोलतात. त्याप्रमाणें वऱ्हाडातील वऱ्हाडी बोलतात. त्यांच्या जातींमुळें व धंद्यामुळें काही कांहीं रूपांत व उच्चारांत फरक होतात. दोन स्वरांमधील ड चा र उच्चार होतो. उदा० परला ( पडला ), घोरा ( घोडा ), इस्तु, ईस, पानी, मी आसल ( असेन ), तो मारीन ( मारील ), मारतन ( मारतात ), मानसान त्याले टवलन, 'मी तुही चाकरी केलो ' इ० शब्द, रूपें व प्रयोग पाहण्यासारखे आहेत.

**झारपीः**-एलिचपूर जिल्ह्यांतील पांच हजारांवर लोक ही बोली बोलतात. डच्या पूर्वी जर स्वर असेल तर त्या डबद्दल 'ळ' उच्चारिला जातो. उदा० घोळा ( घोडा ). ज्या शब्दांत मूळचा 'ळ' असतो तेथें त्या ळबद्दल र येतो. उदा० कार ( काळ, दुष्काळ ), ईर ( वेळ ). शिवाय डबद्दल येणारा ळ हा सुद्धां र सारखाच कांहीसा उच्चा-रला जातो. म्हणून झाडपी असेंहि नाव या भाषेचें आहे असे म्हटले जातें. राखवाले, धाडलान् इ० रूपें लक्ष्यांत ठेवण्यासारखीं आहेत. इतर बाबतींत ही बोली वऱ्हाडीहून भिन्न नाही. या बोलींतील एक लोकगीत पुढें देतो.

गोपिचद राजियाचे सोनियाचे बाल । बिजल्या घोळिवर स्वार झाला ॥
आंगी लेला झगाबागा कानी कुंडल लिकलेला । चेला गोसायाचा झाला ॥
माता बोलली मैनावंती जोगदड नोको घेऊ । राज कोनाले देऊ भोवर बंगल्याचा ॥
गोपिचद जाते वना रयत रळते डुरडुर । नाही नेतराले जल मैनावतिच्या ॥
गोपिचद जाते वना रयत मनी गयवरली । मनी खुशाल झाली मैनावंती ॥
बारा गोपिचदा जोगदड देईन । पुळ चालवून घेईन भोवर बगल्याच राज ॥
रळू नको झुरू नोको चफावती बहेनी । आला जोग घेऊनी गोपिचद राजा ॥
गोपिचदन भाया पोरा आला सन । बैला जेवू वाइले कोन बहीन बोलली चंफावन ॥
गोपिचदन भाया आसीन आला सन । पाठी बसवल कोण माह्या काशीच्या वरजुन ॥
गोपिचंदन माह्या भाया दिवारी आला सन । बोखन करल कोन सजना वाचुन ॥
बारा वरस झाले गोपिचंदाच्या ज्यानीले । मुदरका येनीले बहीनी चफावतीच्या ॥
भाया माह्या गोपिचदा बारा वरसाची तुही जानी। कोन देईल पानी तुह्या आंघोरीले ॥
गोपिचंद बोलला वरसाची माही जानी । अळचा वरसाची माही राणी देईन मले पानी आंघोरीले ॥
भाया माह्या गोपिचदा कोवरी तुही जानी । तुह्या आंघोरीले कोन्या घागरीचा पानी ॥ '

**गोवारीः**—वास्तविक ही स्वतंत्र बोली नाही. हुशगाबादमधील गोवार लोक बुदेली भाषा बोलतात. छिंदवाडा, चांदा आणि भंडारा जिल्ह्यांतील कांही भाग एवढ्या प्रांतांतील गोवार वऱ्हाडी बोलतात. परतु त्यांचे असे कांहीं विशेष त्यांच्या बोलींत आहेत ते पुढीलप्रमाणेः--१ तृतीयेच्या शेवटच्या एचा व क्रियापदांच्या रूपांतील अंत्य एचा लोप होतो. उदा० त्यान्, मुकन्, पोट भराव्. २ कधीकधी इ बद्दल ए आणि उ बद्दल ओ येतात. उदा० देल्ल, दिला, तोहा ( तुझा ). ३ 'ण' चा 'न' आणि 'ल' चा 'ळ' नेहमीं होतो. ४ कांहीं विशिष्ट शब्दः--तुत ( तूं ), तु या, तुच्या ( तुझ्या ), ते खाते. गोवारी बोलींत जे विशेष दिसतात ते पुष्कळ अशी शेजारील बुंदेलीच्या सहवासानें आलेले आहेत. एरवीं ती वऱ्हाडीच आहे. ५ पुल्लिंग आणि नपुसकलिंग यांमध्ये घोटाळा आहे. उदा० 'इतले वर्सा झाले. ' ' आपला काम '.

**कोष्टीः**—अकोला, एलिचपूर आणि बुलढाणा या जिल्ह्यांतील कोष्टयांची ही बोली आहे. अकोला व बुलढाणा येथील कोष्टी शुद्ध वऱ्हाडीच बोलतात. फक्त एलिचपूरमधील कोष्टी किंवा रगारी यांच्या बोलींत थोडे विशेष दिसतात. १ झारपीप्रमाणें स्वरांमधील ड चा ळ उच्चार करतात. उदा० पोळा. मूळच्या ळ बद्दल य किंवा ड येतो. उदा० डोळा-डोया, जोळ-जोड ( जवळ ). २ अव, अवि यांबद्दल ओ येतो. उदा० जोळ ( जवळ ), ' समृद धन उडाला. '

**कुंभारीः**--अकोल्यांतील कुंभार शुद्ध वऱ्हाडी बोलतात; परंतु बुलढाण्यातील कुंभार बुंदेलीची एक बोली बोलतात. छिंदवाड्यांतील कांहीं बुंदेली व काही मराठी बोलतात. चांद्यांतील कुंभारी कोमटाऊ नावाची तेलगूची उपभाषा आणि भंडारा जिल्ह्याची कुंभारी भाषा ही बघेलीची एक बोली आहे. छिंदवाड्यांतील कुंभारी ही तेथील इतर धनगरी, गोवारी इ० बोलीप्रमाणेंच आहे. तिचे असे विशेष नाहींत.

**नटकानीः**--चांदा जिल्ह्यांतील सिरोंचा तहशिलींतील थोडे लोक ही भाषा बोलतात. तेथें मुख्य भाषा तेलगू आहे व तिचा परिणाम या मराठीच्या उपभाषेवर झाला आहे. अ चा कधीं कधीं ओ होतो. उदा० मोंत-लोन, मंतलन. नको, नोको. दीर्घ स्वर वरचेवर ऱ्हस्व केलेले आढळतात. उदा० मि, ति, त्याच बाप. महाप्राण-युक्त उच्चार बहुधा गाळले जातात. उदा० माजा, माझा. लिंगामधील फरक नीटपणें पाळला जात नाहीं. उदा० त्याले दया आला. त्याले राग आली. क्रियापदांच्या पुष्कळ रूपांच्या अंती न आढळतो. ' मी जातन', ' मी मतोन', 'तुजा भाऊ आलन '. सकर्मक क्रियापदांचा भूतकाळ नपुंसकलिंगांत अंती ' लन ' येऊन होतो. ' मी पाप केलन, ' ' तूं पिलु नही देलन. ' खाउनु ( आम्ही खावें ), राहुनु ( राहावें ), पाये ( पहा ), ज्याय ( जा ), इ० विशेष रूपें पाहण्यासारखीं आहेत. उकारान्त रूपें हीं तेलगूच्या परिणामानें आलेलीं आहेत.

नटकानीचा नमुना:—' एके गांवामदे बीरप्पा मनाचा लेकरु राहिलन. एके दिसि त्याचे बाप त्याले बोलबिलन. त्याले भाजेन्चि टोपलि देलन. आपले दोस्तिले देयाले सांगितलन. मंग बीरप्पा टोपलि डोकीवर घेतलन. अभिराममाजवर जाऊन ते तिले दिलन. भाजि घेऊन अभिराममा मनालि, माझे लरका बीरप्पा तू साठि भू रोज त्याले बाट पाहलन. '

**कतिआ किंवा कतियाईः**—मध्यप्रांतात कतिआ नांवाची विणकऱ्यांची एक जात आहे. ते सात-पुड्याच्या दऱ्याखोऱ्यात व हुशंगाबाद जिल्ह्यांत आहेत. हुशंगाबाद, शिवणी व छिंदवाडा या जिल्ह्यांत यांची वस्ती लोकसंख्येच्या शेंकडा दोन या प्रमाणांत आहे. छिंदवाड्यांत या भाषेला कतियाई व नरसिंगपूरमध्यें कतिआ म्हणतात. ही भाषा म्हणजे मराठी व हिंदी यांचें मिश्रण आहे. बोलण्याची लकब हिंदीप्रमाणें आहे; परंतु नामें व क्रियापदें यांचीं रूपें मराठीप्रमाणें होतात; व त्यामुळें हिला मराठीची उपभाषा मानली आहे. क्वचित् हिंदी प्रत्यय लागूनहि रूपें होतात. उदा० घरीं, घरांत, घरमें. पुरुषवाचक सर्वनामांची रूपेंहि दोन्ही तऱ्हेनें होतात. मे, मी, मै. मंने ( माझ्याकडून ), हम्, आम्ही. असणें या धातूचीं रूपें मराठीप्रमाणेंच आहेत. क्वचित है, था, इ० हिंदी रूपें आढळतात. क्रियापदांचा भूतकाळ ल प्रत्यय लागून होतो. उदा० गेला, करले ( मी केलें ), केला ( त्यानें केलें ). अन आणि तन लागून छिंदवाड्यांतील भाषेत भूतकाळचें तृतीय पुरुषाचें एकवचन होतें. उदा० ' बोलन ' (तो बोलला), ' करन ' ( त्यानें केलें ), देतन, देतम (त्यानें दिलें). एकंदरींत ही भाषा हिंदी व मराठी यांच्या मिश्रणानें बनलेली मिश्र भाषा आहे.

**भुंजिआः**--भुंजिआ लोक हुशंगाबाद, रायपूर, संबळपूर, पाटना, कलहंडी इत्यादि मध्यप्रांतांतील जिल्हे व संस्थानें यांत आणि मद्रास इलाख्यांतील जयपूर प्रांतांत आढळतात. भुंजिआ लोकांची बोली हल्बीहून फारशी वेगळी नाहीं. उच्चारांची पद्धत व नामांचीं रूपें हल्बीप्रमाणें आहेत. हल्बीचा षष्ठीचा ' के ' प्रत्यय नामांना आणि ' चो ' प्रत्यय सर्वनामांना लागतो. उदा० मानुशके, माचो, तूचो. चतुर्थीचा के, को, का या प्रत्ययांशिवाय आणखी ' ला ' हाहि प्रत्यय आहे. तूचो ( तू ) यांतील च हें शुद्ध शब्दयोगी अव्यय आहे. षष्ठी तूचो यांतील चो हा प्रत्यय निराळा आहे. त्याप्रमाणें, कांचां=कांहीं. हारा=तो. हा शब्द हुन याशीं जोडण्याचा प्रघात आहे. उदा० हुनहारा. क्रियापदांचीं रूपेंहि मुख्यत्वें हल्बीसारखींच होतात. असणें याचीं वर्तमानकाळचीं एकवचनाचीं रूपें पुढील प्रमाणें. प्र. पु. आछे, आये; द्वि. पु. तूचो आछत; तृ. पु. आछे, आहे. भूतकाळच्या रूपांत ल ऐवजी न दिसतो. उदा० करनी ( मी केलें ). बइनी, बइनीत ( तो झाला ). भविष्यकाळचीं कांहीं रूपें नमुन्यादाखल देतों. जाइदे ( जाईन ), गुथियावां ( म्हणेन ); खावन ( खाऊ ); रहन ( राहूं ). भुंजिआ भाषा ही हिंदीची अपभ्रष्ट भाषा आहे व हे लोक गोंड लोकांशीं मिसळल्यानें या बोलींत गोंड शब्द आले आहेत. भुंजिआ लोकांची स्वतांची निराळी भाषा नाहीं, असें कांहींचें मत आहे. वरील विवेचनावरून भुंजिआ ही हल्बीहून भिन्न नाही हें दिसून येईल.

**नाहरी:**—नाहरी हें नांव नाहर नांवाच्या लोकांच्या नांवावरून आलें आहे. हे लोक रायपूर, बिलासपूर, संबळपूर, आणि छत्तिसगड व उरिया यातील बारीकसारीक संस्थानें यांत आहेत. नाहरी ही भुंजिआप्रमाणें हळबीची पोटभाषा आहे. आणि उच्चार व नामांची रूपें हळबीसारखींच आहेत. चतुर्थीचे प्रत्यय, के, क, को, का आणि ला हे आहेत. पचमीचे से आणि बे, उदा. दूरबे; षष्ठीचे प्रत्यय हळबीतील आहेत. कांहीं विशिष्ट रूपें:- मानेचा ( मनुष्याचा ), दयाकरलो बदला ( दयेची परतफेड ). अनेकवचनांत छत्तिसगडी रूपें आढळतात. उदा० मितान-सगे ( मित्रांबरोबर ). क्रियापदाचीं रूपें हळबीप्रमाणें होतात. उदा० रहलो, रहले, रहला ( तो होता ); चाहो ( त्यानें इच्छिलें ), गइलो ( तो गेला ), करवें ( मी केलें ), जाइंदे ( जाईन ), सांगुदे (सांगेन), देशो (देईन). कांहीं विशेष रूपें:-आसत् ( आहेस ), रह्यो ( होता ), हांसिडा ( हसला ), इलिस (आला), दिलास ( दिलें ), खाइलूं ( खाऊ ), पीलूं (पिउ). पुढील उताऱ्यावरून ही नाहरी बोली हळबीसारखीच आहे असें दिसून येईल.

नमुनाः—'एकलो बाघेडो कोनटा बनमें पडदो सोबवो. हुरहा सुबसे उंचेलो हुनाचो पास आपलो बीळमेसे निकरलो. हुन आरोसे बाघेडो उठलो और हुनाचो डौलौ एकले उचेलोपर हुरहा पडलो. रीसमें ऐना बाघेडोने हुन उचेलोको बीधाना चाहो. उचेलोने अरजी करलो " आपलो तुचो बोर और मोचो बोर देख. हमचो मारीदासे आपले केदा बडाई होलो " इहचो सुनलो बाघेडोने उचेलोके छाडून दिलो. '

**कमारी किंवा कंवारी:**—कमार किंवा कवार नांवाच्या एका अनार्य जातीच्या लोकांची ही भाषा आहे. मध्यप्रांतांतील पुढील जिल्हे व संस्थानें यांत हे लोक आढळतात. रायपूर, बिलासपूर, संबळपूर, बस्तर, कांकेर, रायगड, बामूरा, रहरखोल, सोनपूर, पाटना, कलहंडी. सामान्यतः मध्यप्रांतात उरिया भाषा ज्या ज्या जिल्ह्यांत किंवा संस्थानांत बोलली जाते तेथें तेथें हे लोक आहेत, आणि रायपूर व बामूरा यांत या लोकांची बस्ती फार आहे. हे कमार लोक रानटी असून अरण्यांत राहतात आणि कंद, मुळें, फळें व शिकार यांवर उपजीविका करतात. कमारी ही द्राविडी भाषा म्हणून मानली जात होती, परंतु हल्लीं तिला आर्यभाषांपैकींच एक मानली जाते. कारण, हिचीं रूपें वगैरे आर्यभाषेप्रमाणें होतात. हळबी भाषेसारखीच ही भाषा आहे. छत्तिसगडी, उरिया आणि मराठी या भाषांतील रूपें आणि वाक्प्रचार हिच्यांत घुसडलेले दिसतात. हळबीहून हिच्यांत रूपांची इ० सुसंगतता कमी आहे. कमारीचें हें हल्लींचें स्वरूप अगदीं अलीकडचें आहे, आणि त्यामुळें एकाच रूपावर निरनिराळ्या विभक्त्यांच्या रूपांचें काम भागतें. उदा० 'हुना-चे' ही 'हुन' (तो) याची षष्ठी, चतुर्थी किंवा प्रथमाहि होते. कमार हे गोंड लोकांसारखे दिसतात आणि यावरून त्यांची मूळची भाषा गोंडी असण्याचा फार संभव आहे. शब्दोच्चाराची पद्धत हळबीप्रमाणें असून छत्तिसगडीशीं तर ती फारच जुळणारी आहे. हळबीप्रमाणें या बोलींत नामांचें सामान्यरूप निराळें होत नाहीं. विभक्तिप्रत्यय पुढीलप्रमाणें आहेतः तृतीया-ने, चतुर्थी-को. पचमी--से. षष्ठी--के, का, दे. सप्तमी--में. हे प्रत्यय लागून रूपें होतात. उदा० अभारके उलटा ( आकाशाच्या विरुद्ध ), नाच दे शबद ( नाचाचा आवाज ). 'हो' आणि 'आछ' या असणें या धातूच्या दोन अंगांवरून निरनिराळीं रूपें होतात. हो ( आहे ), आछे ( आहेस, आहे, आहेत ). हळबीप्रमाणें या भाषेतील क्रियापदांच्या रूपांनाहि 'दे' हें विकरण लागलेलें दिसतें. उदा० करूंदे ( करतों ), मरूंदे ( मी मरत आहें ), जाऊंदे ( मी जाईन ), बोलुंदे, बोलादे, बल्दे ( तो बोलला ). 'दे' ऐवजीं 'दी' कधीं कधीं दिसतें. उदा० परेदी ( पडला ), देवदी ( दिलें ). अशा तऱ्हेचीं रूपें तिन्ही काळीं योजिलीं जातात. प्रयोजक रूपें मराठीप्रमाणें केलीं जातात. वरील सर्व गोष्टींवरून ही कमारी भाषा हळबीप्रमाणें निरनिराळ्या भाषांच्या मिश्रणानें बनली आहे असें दिसून येईल.

**कारु भाषा:**—ज्याप्रमाणें निरनिराळ्या जाती अथवा गण यांमध्यें एखाद्या भाषेचें विशेष स्वरूप अथवा कांहीं व्याकरणविषयक, उच्चारविषयक भेद व कांही विशिष्ट वाक्प्रचार दृष्टीस पडतात त्याप्रमाणेंच निरनिराळे व्यवसाय करणारे जे धंदेवाईक अथवा जातिमूलक संघ असतात, त्यांमध्यें कांही भाषाविषयक विशेष आपणांस दृष्टीस पडतात. निरनिराळ्या व्यवसायांमध्यें त्यांचीं साधनें, क्रिया व तयार होणारे पदार्थ हे निरनिराळे असतात त्यामुळें सामान्य भाषेमध्ये जे सामान्य शब्द असतात ते विशिष्ट धंद्यांतील जवळ जवळ सारखींच पण परस्परांपासून आकार, उपयोग इत्यादींमुळें भिन्न अशीं जीं साधनें असतात, त्यांस विशिष्टत्व येण्यासाठीं हे व्यवसायी लोक निरनिराळीं नांवें देतात व अशा

रीतीनें नवीन नवीन विशेष शब्द तयार करून त्यांच्या अर्थकक्षा अधिक निश्चित करतात. उदाहरणार्थ— एखादा पदार्थ धरण्याकरितां सामान्य व्यवहारांत चिमटा हा सामान्य शब्द आहे परंतु सोनारास किंवा लोहारास निरनिराळ्या आकारांचे जिन्नस निरनिराळ्या पद्धतींनीं पकडावयाचे असल्यामुळें त्यांस भिन्न भिन्न आकारांचे व भिन्न भिन्न उपयोगांचे निरनिराळे अनेक प्रकारचे चिमटे वापरावे लागतात, व विशिष्ट चिमट्याचा बोध होण्याकरितां त्यांस स्वतंत्र नावें द्यावीं लागतात. अशा रीतीनें चिमटा, सांडस, सवाणा, गावी इत्यादि शब्द प्रचारांत येतात. अशाच तऱ्हेनें आपणास जरी सर्व प्रकारच्या कातड्यांस चामडें हा सामान्य शब्द चालतो तरी चांभारास निरनिराळ्या जनावरांचीं कातडीं निरनिराळ्या शब्दांनीं दर्शविणें जरूर असल्यामुळें तो स्वतःच आपले निरनिराळे शब्द बनवून आपलें काम भागवितो. उदा० म्हसडे ( म्हशीचें ), बालदी ( बैलाचें ), गायबट ( गाईचें ), मेसी ( मेंढराचें ), सागळ ( बकऱ्याचें ), हरणाळें ( हरणाचें ), वासुरटें ( वासराचें ), पारडकें ( म्हशीच्या पारडाचें ), खारडें ( करडाचें ), चरकी ( कोंकराचें ) इ०. तसेंच बुरुड आपल्या निरनिराळ्या आकाराच्या टोपल्यांस निरनिराळीं नावें देतो. उदा० पाटी, टोपली, टोपला, दुरडी, रोवळी, हारा, मजा, कणगी, दुल्लारा, खुराडे, करडी, कुरकुलें, घायसांडें, डालगें, टोकरी इत्यादि. तसेंच तो भिन्न भिन्न जातींच्या बांबूसहि निरनिराळी नावे देतो. उदा० चेवली, चिवा, वेळू, बाबू, मेस, मेंच, तारापुरी, उढा, गळू, माणगा, कळक वगैरे.

याप्रमाणेंच कुंभार आपल्या मडक्यास त्याच्या आकारावरून व उपयोगावरून निरनिराळ्या संज्ञा वापरतो. उदा० मडकें, लोटा, घागर, माठ, तवली, एकोटी, खापर, पाडगी, सुगड, कलश, डेरा, हांडा, रांजण, बोळकें, गुडी, खारा, कोयमें इत्यादि. दासोपंतानें तर शब्दसपत्तीच्या बाबतींत प्राकृत भाषेनें संस्कृत भाषेसहि मागें टाकलें आहे असें म्हटलें आहे व त्यानें संस्कृत घट शब्द हाच दृष्टान्तादाखल घेऊन प्राकृत भाषेंत घटाच्या प्रकाराप्रमाणें अनेक नावें प्राकृत भाषेंत आढळतात म्हणून तिचें संस्कृतवर वर्चस्व आहे असें दाखविलें आहे. तो म्हणतो, ' संस्कृतें घटु म्हणती । आतां तयांचे भेद किती । कवणा घटाची प्राप्ती । पावावी तेणें ॥ हारा, डेरा, रांजणू । मुढा, पडगा आनु । सुगड, तौली, सुजाणु । कैसी बोलेल ॥ घडी, घागरी, घडौली । अलंदें, बाचिकें, बौळी, । चिटकी, मोरवा, पातली । सांजवणें ते ॥ ऐसे प्रांतभाषे वेगळाले । घट असती नामाथिले । एकें संस्कृतें सर्व कळे । ऐसें कैसेन ॥' तसेंच नाविकास निरनिराळ्या दिशांनी वाहणाऱ्या वाऱ्यांमध्यें भेद करून निरनिराळीं नावें द्यावीं लागतात. उदा० हेटवारा, उपरवारा, मतलई, बारदानी, करपट हेलमी, सूरमदी, सोसावारा, गारवान, पोयशी, सप्तर्षिवारा इ०. याप्रमाणेंच तो आपल्या कामास लागणाऱ्या अनेक प्रकारच्या लहानमोठ्या दोऱ्यांस, निरनिराळ्या आकारांच्या शिडांस स्वतंत्र नावें देऊन अनेक शब्दांची भर भाषेंत घालीत असतो. अशाच तऱ्हेचे अनेक व्यवसायी लोक आपली विशिष्ट भाषा व शब्दसपत्ति तयार करीत असतात व अनेक शब्दांची भर सामान्य भाषेंत घालीत असतात. उदा० एक बैलरहाट घेतला तरी त्याच्या निरनिराळ्या अनेक अवयवांस निरनिराळीं नावें असून त्यामुळें अनेक शब्द मराठी भाषेंत आले आहेत व त्यांतील कांहीं फार गमतीचेहि असून त्यांवरून कांहीं वाक्प्रचारहि बनले आहेत. उदा० कनेकडाचें खांपेकड करणें, यांत कनेकड हें लांकूड बरेंच मोठें असून तो रहाटाचा मुख्य आंस असतो व त्यावर खं ठोकून रहाटाचें भलें मोठें चक्र तयार होतें तर खांपेकड ही फक्त वीतभर लांबीची एक इंच जाडीची काठी असून तिला खांचा पाडलेल्या असून ती माळेच्या दोरखंडांत बसविलेली असते व तीवर लोटा बांधला जातो. तसेंच महारहाट हें लाकूड रहाटापेक्षां मोठें तर नसतेंच पण तो केवळ एक वासा असून विहीरीच्या तोंडावर माळ सरकूं नये म्हणून आडवा टाकलेला असतो. अशा तऱ्हेनें अनेक विशिष्ट शब्द या भिन्नभिन्न व्यवसायांतील लोकांकडून भाषेंत रूढ असतात. अशा तऱ्हेचे कांहीं व्यवसायांतील शब्द पुढें दिले आहेत.

**चांभारी**—खांद, मुखतळ, शिरामें, वास, आरी, शेज, जिभी, टाळा, खुरा, ढेंपर, पान, अधोड, खुरे, चीप, गोठ, बचकते, पायतण, खोडसा, निकाटणी, शिसी, इत्राब. इंग्रजी तऱ्हेच्या जोड्याबरोबर अनेक इंग्रजी शब्दही या बोलींत घुसले. उदा० टो, प्लेट, कटीन प्रेअर, पच, शेप, ट्रंक, बॉर्डर, पेटंट, पॉलिस, लेदर, हाफकुश्म इ०. निरनिराळ्या जोड्यांच्या पद्धति, बुटांचे प्रकार, वहाणा व चपलांच्या तऱ्हा यांना प्रत्येकी निरनिराळीं नावें असून त्यांच्या योगानें एक जात किंवा तऱ्हा दुसरीपासून स्पष्टपणें निराळी दर्शविली जाते. यांच्या धंद्याला लागणाऱ्या कांहीं हत्यारांचीं नावें:—रापी, आरी, दस्ती, खुरपें, इंगा, कोळंबें,

कलभूत, शिंगाडी, पुडा, टेपा, चीप, निष्णापलसनी, तेव्हण इ० एकाच हत्याराचे अनेक प्रकार असल्यास त्यांना परत निराळीं नावें आहेत. उदा० आरीचे प्रकार:--आडआरी, फराची आरी, रेशमाची आरी, तळाची आरी, कटार आरी.

**न्हावी**:–धोकटी, शीळ, नऱ्हाणी, शेवटणें, पलाटणें, आयना, मळी, मळई, कोयरी, चोंच, चोंच करणें, टाळू, कवडी, खुट, कारागीर, फ्रेंचकट, शेंबूडकट, मद्रासीकट, क्षौरीकट.

**बुरूड**:--पिर्दे, किंकरें, पाते, बेळसा, अर्धफोड, वरकारी, पाऊक, तावडीतासन, वळ, अढण, सळई-वाकूट, बद.

**नाविक**:--भंडारी दालदी आणि कोळी हे सामान्यतः दर्यावर्दी आहेत. निरनिराळ्या समुद्रयानांना, त्यांच्या भागांना, अधिकारी लोकांना, निरनिराळ्या दिशांकडून येणाऱ्या वाऱ्यांना या लोकांचीं स्वतंत्र नावें आहेत. उदा० समुद्रयानाचे प्रकार:--नौका, महागिरी, तारू, गलबत, फतेमारी, मचवा, बल्यांव, पडाव, सपाटा, दोण, बोट, कोटवा, बतेला, मजी, डाव, छबिना, पगार, इ०. इतर शब्द:--सुकती, ताण, जुवें, हेट, खोची, नस्त, चिरण, दर्या, पोय, खांजण, तड, डुगी, हेस, टास, सवार, तांडेल, नाखवा, नाळ, उलांडी, आडावणी, बावकांड इ०. यांच्या भाषेंत दोऱ्यासहि उपयोगाप्रमाणें निरनिराळीं नावें असून सर्वांत मोठ्या व मजबूत दोरास मराठ्यांचा आरमारसंस्थापक 'शिवाजी ' याचें नांव दिलेलें आहे.

**सुतार**:--रंधणे, अरेकसणें, घोळणें, शारणे, खतावणी, गांल्या, खचरा, कुडली, निशाणा, पांगर, फिनफिन, चापन, दारण, शेजोट, मेंडला, टिटव इ०

**सोनार**:--निखुड, पगे, नाळ, गावा, घास्या, वाली, ढाळणी, हात, बकनळी, जतरपट्टी, गबली, सवागी, उचाळा, बटग, खाळें, आवटी.

**तेली**:–घाण्याच्या भागांची नावें–चौकट, लाट, ढोक, जांगी, मुडो, नाडवळ, कुपरी, गरबखिळी, बद जांखड, इतो, शेळू. इतर शब्द:--सापटी, डोळे ढापणें, पहार, तुडकें, पातेलें, टोप, टवणें, टीप, नांद.

**कुंभार**:—चाक, बुडी, गुंडा, फळा, सुरा, फळाटी, चिरोट, घाटणें, एकोटी, बाडगी, ढापे, गुंडग्या, खारा, कोयम.

**विणकर**:— मागाचे भाग—घोडी, फाळका, असारा, वर्ग, ताणसाळ, फासा, फणी, बेली, लाखनकाठी आरसड, बेलकें, घाड, डांग, गातडी, धोटा, सटेल इ०. लुगड्याचे बाण:–गंगाजमनी, वळखुगडी, पेट्या, पाटली, गोमी, जिरते, खावला, धनवड, बावधनी, करवती, रुईफूल, बुगडी, पडवळी, अंजिरी, रास्ता, चंद्रकळा, वेंगणी, मुगी, दोरवा, फुटाणी, बांड, पोफळी, चंचणी इ०

**धनगरी**:—खाड, खेंडी, पाजणी, लाणी, लाखा कातरणें, सांडोर, वासर, वाघुर, भाला, परशु, मेंढ्याचें प्रकार:--भोरी, मळी, कबरी, खदरी, इजारी, मोरी, टिकी इ०

**स्त्रियांची भाषा**:--आतांपर्यंत ज्या प्रांतवारीनें व निरनिराळ्या धंद्यांप्रमाणें मराठीच्या निरनिराळ्या बोली अस्तित्वांत आलेल्या आहेत त्यांची माहिती व नमुने दिले. आतां एकाच घरांत व एकाच कुटुंबांत वावरणाऱ्या स्त्री व पुरुष यांच्याहि भाषेंत, सूक्ष्मपणें अवलोकन केल्यास आपणांस जो फरक दिसतो त्याकडे लक्ष्य देऊ. स्त्रियांची भाषा ही पुरुषांच्या भाषेहून अगदीं भिन्न नाही. तथापि तिच्यामध्यें कांहीं सूक्ष्म भेद आहेत. स्त्रियांच्या भाषेंत असा फरक पडण्याची कारणें दुसऱ्या विभागाच्या प्रस्तावनेंत सविस्तर आलीं आहेत, तेव्हां त्याची पुनरावृत्ति करण्याचें येथें कारण नाही. परंतु स्त्रियांच्या वांटणीस आलेले सामाजिक निर्बंध, नैसर्गिक कोमलता, त्यांची भावनावशता, परंपरेला चिकटून राहण्याचा गुण इत्यादि गोष्टी कारणीभूत आहेत, एवढेंच थोडक्यांत सोईकरतां देतां येईल. स्त्रियांच्या बोलींतील कांही शब्द व प्रयोग पुढें लिहिल्याप्रमाणें आढळतात.

**शब्द**:—अगबाई, अद्रष्ट, अन, अवदसा, आक्काबाई, आपलं, इथ, इश्श, ईनमीन, कनी, किनई, किनी, कोंकण, कित्ती, खेट्टर, गडे, घरीं, जल्म, जळ्ळं मेलं, डोंबल, तिकडे (नवरा), धुणारा (परीट, कारण रात्रीं नांव घेत नाहींत), नी, न्हातीधुती, ध्यान, पोतर, पावतर, बाइबाई, बाहेरची, मार्गेसर किंवा मार्गेश्वर, मेला, म्हटलं, लगीन.

वन्सं, वरीस, वेरी, सवाष्ण, सवरणें, सैंपाक, स्वतः ( नवरा ), धिंडका, उजवणें, पुनव, अवस, त्रेपतवार, कुवारीण, दुष्ट, आखाड, पूस, माही इ०

प्रयोगविशेषः--अगावर विटाळ जाणें, घर पाहणें, जिवात धस्स होणें, बाहेरची होणें, ओटींत घालणें, घरीं येणें, दहिंभात लिंपणें, देवाला जाणें, लगीन काढणें, सोवळें घेणें, मांडीवर येणें, जीभ रेटेना, नांव घेणें, पदरांत घेणें, माणसानें काय बोलायचें ? कुकू वाढवणें, थोर करणें, ओटी भरणें, ओवळणी काढणें, काळ्या दगडावरची रेघ इ.

**मुलांची भाषा:**--स्त्रियाची भाषा पुरुषांच्या भाषेहून निराळी झाली आहे, ती लिंगभेदानें झाली आहे. ह्या भेदाप्रमाणें वयाच्या भेदानेंहि भाषेंत भेद होत असतो. मुलांची भाषा आणि थोरांची भाषा असा फरक मराठीमध्येंहि झाला आहे. मुलांची अशी निराळी भाषा होण्यास मुख्य कारण म्हणजे त्यांच्या कठनाड्यांची व जिभेची कमावणी व्हावयाची असते. मुलें अनुकरणशील असतात व त्या स्वभावानें ती ऐकलेले शब्द पुन्हां उच्चारण्याचा प्रयत्न करतात. परंतु असें करतांना एक तर त्यांच्या स्वरोत्पादक नाड्यांची भरपूर वाढ झालेली नसते व त्यांना तसें नीट वळणहि लागलेलें नसतें, आणि दुसरें म्हणजे त्या मुलांना तो शब्द जसाचा तसाच आटवतो असें नाहीं. यामुळें नागर शब्दाला मुलांच्या भाषेंत विकृत रूप प्राप्त होतें. एका शब्दासारखेंच दुसरें रूप करतांना त्यांना व्युत्पत्तिज्ञान अगर व्याकरणज्ञान इत्यादि नसल्यानें भलतेंच रूप प्राप्त होतें. परंतु मुलांसवर्षीच्या मायेनें मोठीं माणसें त्यांच्याशीं बोलतांना तेच शब्द त्याच स्वरूपांत योजतात आणि अशा रीतीनें मुलांची अशी वेगळी भाषा बनते. शिवाय 'प', 'ब', 'म' हे वर्ण मुलांस प्रथमतः उच्चारावयास येतात व ह्या वर्णांनी युक्त असे शब्द तीं बनवितात. ह्याविषयीं दुसऱ्या भागाच्या प्रस्तावनेंत विवरण आलें आहेच.

मुलांच्या भाषेंत वर्णव्यत्यास कसा होतो याचीं कांहीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत. 'क'च्या ठिकाणीं 'ट', 'स', 'च' किंवा 'क' याबद्दल 'त,' 'ल'च्या ऐवजीं 'द', 'र' बद्दल 'ल' इत्यादि. सामान्यतः कठोर व्यंजनांबद्दल मृदु अधिक येतात. शिवाय पुष्कळ ठिकाणीं वर्णांचा लोप होतो. एका मुलाच्या बाबतींत जो वर्णव्यत्यास आढळतो तोच दुसऱ्या बाबतींत आढळतो असें नाहीं. एखादें मूल 'क' बद्दल'त' म्हणेल, दुसरें 'ट' म्हणेल. कांहीं शब्द मात्र सर्व-सामान्य मुलांच्या भाषेंतील म्हणून मानले गेले आहेत. उदा० पापा, काऊ, माऊ, चिऊ, बू , माई, हम्मा, भ्यंवभ्यव, भोंभों, तोतो, नतो, पाणी, भाता, अंगाई, मंमं, इ०

स्वभावोक्ति साधण्याकरितां ग्रंथकार मुलांच्या बोबड्या बोलाचा उपयोग करतां. त्याचीं कांहीं उदाहरणें:-

**बालभाषा**-उचचि नावदशाकल खोवलें खजुल देउनि गाय बलें बलें ।
वसुनियां मग तू गलुलावली मजनुलें उलवी बलि बावली ॥
चालांलियां देइन गोल गोला गोलांविया देइन फाळफाला ।
मी ईहुनी आवल्तों खलें कीं ऐसा हली खेलवि लेकलें कीं ॥

--वामन, द्वारकाविजय, सर्ग तिसरा, २१ व २२.

माला आइ उर्थीव लौकल बलें अगास मी लाविन । दादाच्या म्हनुनी गले उथव तूं हांका मला मालुन ॥

--केशवसुतांची कविता, दिवाळी.

गोपशिशु म्हणति पलिसा ललता हल्लिनेच झालिला पाय । गाला उलोनि पलला सल्व खले नवळ कलितसा काय ॥

मोरोपंत कृ. वि.

**नंदभाषाः**—ही व्यापारी लोकांची सांकेतिक भाषा आहे. वस्तूची किंमत किंवा इतर फायदा इ० गोष्टी नोकर किंवा इतर लोक यांना कळू नये म्हणून संख्यावाचक शब्द व नाण्यांचे शब्द यांच्याबद्दल व्यापारीवर्गांत सांकेतिक शब्द प्रचलित आहेत. ज्ञानेश्वराच्या कालापासून आजपर्यंत म्हणजे सुमारें सहाशें वर्षें ही भाषा महाराष्ट्रांत अस्तित्वांत आहे. ही कोठून कशी आली व हिला नंदभाषा कां म्हणतात इत्यादि माहिती अजून उपलब्ध झाली नाहीं. फक्त संख्यावाचक शब्द व नाण्यांचे शब्द यांच्याबद्दलच संकेत आहेत. कारण व्यापाऱ्यांना वस्तूची किंमत गुप्त ठेवतांना हेच शब्द लागतात. इतर शब्द नेहमींच्या बोलींतील असतात. विसोबा खेचराचे अभंग, महिपतीच्या भक्तिविजयांतील अठरावा व बेचाळिसावा अध्याय व तुकारामाचे कांहीं अभंग यांत ही भाषा सांपडते.

या भाषेतील शब्द येणेंप्रमाणें:— केवली ( १ ) अबारू ( २ ), उधानु ( ३ ), पोकू ( ४ ), मुलु (५), होली ( ६ ), पवित्र ( ७ ), मंगी ( ८ ), तेदस् ( ९ ), लेवन् (९), अंगुलु ( १० ), एकळु ( ११ ), रंधा(१२), ठेपरू ( १३ ), चोपडू ( १४ ), तळी (१५), तान ( १६ ) भुरकातान तळी ( १७ ), उधानुतान तळी ( १८ ), काटी ( २० ), भुरका तानकाटी ( २१ ), चिटी ( १०० ), ढका ( १००० ), फाटा ( १ आणा ), अबारू फाटे ( २ आणे ), दुकार ( आणेली ), चकार ( चवली ), पकार ( पावली ), टाली ( अधेली), भुरका (रुपया ), टोकळा ( एक पैसा ).

आभारः—ही प्रस्तावना लिहिण्याच्या कामीं संपादकवर्गापैकी रा. विठ्ठल दिनकर आघारकर, बी.ए., यांची मदत बरीच झाली आहे, हें येथें नमूद करणें इष्ट आहे. तसेंच पुढें दिलेल्या ग्रंथांचा उपयोग करण्यांत आला आहे व त्या ग्रंथकारांचे आम्ही आभारी आहों. (१) Dr. Grierson :—Linguistic Survey of India, Vol. VII. ( २ ) Proceedings and Transactions of the Seventh All-India Oriental Conference, Baroda. (३) रा. रा. कृ. पां. कुलकर्णी:–मराठी भाषा, उद्गम व विकास. (४) कै. बाळकृष्ण अनंत भिडे:— मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास. (५) रा. रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर:–मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १ ला आणि २ रा. ( ६ ) कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे:–ज्ञानेश्वरीचें व्याकरण, ज्ञानेश्वरी, मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १० आणि २०. ( ७ ) प्रो. पोतदार–मराठी गद्याचा इंग्रजी अवतार. ( ८ ) भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त शके १८३३, १८३७.

निरनिराळ्या प्रांतांच्या निरनिराळ्या बोलींचे नमुने आम्हीं अनेक गृहस्थांस पत्रें लिहून मागविले होते. त्यांपैकीं पुढील सद्गृहस्थांनीं पाठविले त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. ( १ ) रा. रा. हरिश्चंद्र विनायक धर्माधिकारी, मु. पोफरण, जि. ठाणें. ( २ ) रा. रा. कृ. ना. देशपांडे, कोल्हापूर. ( ३ ) रा. रा. मु. शं. देशपांडे, फलटण ( माणदेशी ). ( ४ ) रा. रा. विश्वनाथ नारायण कोल्हारकर ( नगरी ). ( ५ ) रा. रा. रखमाजी गणपत बोंदरडे भिंगार ( नागपुरी ). ( ६ ) रा. रा. रा. म. काटे ( घाटी ). (७) रा. रा. विष्णु गणेश कविमंडन, मेहेकर ( वऱ्हाडी ). ( ८ ) डॉ. ह. सी. राजदेकर, राजदा, (वऱ्हाडी). ( ९ ) रा. रा. वि. बा. जोशी, चांदा (चंद्रपुरी). ( १० ) रा. रा. कृष्णाजी गोविंद साठे, देवाचें गोठणे, रत्नागिरी (चित्तपावनी). (११) रा. रा. परशुराम गोपाळ मंडपे, दापोली, रत्नागिरी ( बाणकोटी ). ( १२ ) रा. ब. वासुदेव अनंत बांबर्डेकर, मुंबई ( कुडाळी ). ( १३ ) डॉ. रघुनाथ सिताराम देसाई, पेडणें, गोवा ( कुडाळी ). (१४) रा. रा. बाळकृष्ण अनंत पाटील, मुंबई (कुडाळी). ( १५ ) रा. रा. विष्णु काशीनाथ प्रभु शिरवरे, फोंडा, गोवा ( कोंकणी ). ( १६ ) रा. रा. गोपाळ बळवंत आमोणकर, म्हापसें, गोवा ( कोंकणी ). ( १७ ) रा. रा. नारायण भास्कर नाईक, गोमंतक ( कोंकणी ). ( १८ ) रा. रा. गंगाधर आबाजी भागवत, भुसावळ ( खानदेशी ). ( १९ ) रा. रा. य. रा. लाळे, कासारें, मलकापूर ( खानदेशी ). ( २० ) डॉ. भी. गु. चिकेरूर, जळगांव ( खानदेशी ). ( २१ ) रा. रा. पुरुषोत्तम पांडुरंग गोखले ( कऱ्हाड ). सर्वच आलेल्या उताऱ्यांस स्थलाभावामुळें स्थान देतां आलें नाहीं. त्यांतून कांहीं निवडून घेतले आहेत.

यशवंत रामकृष्ण दाते

॥ श्री ॥

# महाराष्ट्र शब्दकोश

## विभाग पांचवा

## प

**प**—व्यंजनमालेंतील एकविसावें व्यंजन अक्षरविकास:-या वर्णाच्या तीन अवस्था असून त्यांपैकीं पहिली गिरनार लेखांत (इ. स. पूर्वी ३ रें शतक), दुसरी मथुरा येथील जैन लेखांत (इ. स. पूर्वी पहिल्या शतकाच्या आसपास) व तिसरी इ स च्या चौथ्या शतकाच्या मध्याच्या आसपासच्या काळांतील अलाहाबादच्या स्तंभावरील लेखांत दृष्टीस पडते.

**प**—वि. १ (समासांत उत्तरपदीं) रक्षण, संभाळ करणारा; पालन करणारा. जसें:-भूमिप (=पृथ्वीचें संरक्षण करणारा-राजा); धनप (=द्रव्यरक्षक-कुबेर). [सं. पा=पालन करणें] २ पान करणारा; पिणारा. जसें:-रक्तप(=रक्त पिणारा-मधमाशी-भ्रमर). असे सामासिक शब्द काव्यात नेहमीं येतात. [सं. पा=पिणें]

**प**—अ. (व.) कडे; जवळ.

**पा**—(संक्षेप) १ परगणे. २ पथक. ३ पाठविलें. ४ पाहिजे. ५ पर्यंत. ६ पाटील. ७ पातशाही. ८ पासून.

**पो**—(संक्षेप) १ पावेतों. २ पोष्य.

**पइक**—पु. (गो.) निबंध.

**पइंडा**—पु. (गो.) सांकव; लांकडी धक्का; पायंडा पहा.

**पई**—स्त्री. (खा.) पळी.

**पईज, पईल, पईस इ०**—या शब्दासारखे पई पासून आरंभ होणारे शब्द पै मध्यें पहा.

**पईलवान**—पु. जेठी; पहिलवान पहा.

**पउतें, पउल**—पउ-ऊ पासून आरंभ होणारे शब्द पौ मध्यें पहा.

**पक**—न. (प्र.) पग; आश्रय; पद. —माज्ञा(को). [सं. पद; हिं. पग]

**पंक**—पु. (गो.) (मिठाई इ० करण्यासाठीं) साखर, गूळ इ०चा केलेला पाक, रांधा. [सं. पाक]

**पंक**—पु चिखल; कर्दम [सं] ०ज—न. कमळ. 'पदपंकज.' [सं.]

**पकटी**—स्त्री १ (कों) मधाच्या पोळ्यांतील सुका मेणाचा भाग; पाकडी पहा. २ (दादर) भाग; तुकडा. ३ (दादर) बंदराचें एक टोंक

**पक(क्क)ड**—स्त्री १ (मल्लविद्या) प्रतिपक्ष्यास कचाट्यांत धरण्याचा प्रकार, डाव, पेंच. २ (वक्तृत्व) प्रतिस्पर्ध्याच्या भाषणांतील त्याला अडवितां येईल असा दोषयुक्त भाग; भाषणातील दोष 'ज्याची पकड धरावयाची असेल त्यास बहुत वेळ बोलवावें' ३ (ल) दुसऱ्याची छाप आपल्यावर न बसूं देतां, आपली मात्र छाप दुसऱ्यावर पडेल अशी युक्ति. 'ही एक बोलण्याची पकड आहे.' ४ जाणून बुजून केलेलें द्व्यर्थी भाषण (करार, विनंति करताना, वचन देतांना), प्रसंगानुसार पाहिजे तसा अर्थ व्हावयाजोगें भाषण, युक्ति. सोडवणूक; सवड, पळवाट 'बहुधा गुण पडेल म्हणून पकड ठेवून प्रतिज्ञा केली.' ५ खिळा उपटण्याचें एक हत्यार; अंबूर; चिमटा ६ मलखांबावर करावयाची कसरत, घेतलेली उडी. [पकडणें] ०धरून बोलणें—पळवाट ठेवून सावधगिरीनें व अंगावर बाजू न येईल असें बोलणें. ०वारंट-समान-समन्स—न. निकडीचा, धरून आणण्याविषयींचा, पकडण्याविषयींचा हुकूम. [हिं. पकडना]

**पक(क्क)ड**—स्त्री. (संगीत) रागवाचक मुख्य स्वरसमुदाय. [हिं.]

**पकडणें**—उक्रि. १ (हात इ०नीं) धरणें; आटोक्यांत घेणें, आणणें; मुठींत आणणें; झडप घालणें. २ (ल.) भाषण वगैरेमध्यें अडविणें; व्यंग, दोष काढणें; मर्मी धरणें [हिं. पकडना] म्ह० (व.) पकडला रोही त्याच राना जाई=संवय लागल्यावर ती गोष्ट फिरून फिरून करावीशी वाटणें याअर्थी. **पकडणी**—स्त्री. पकडण्याची क्रिया.

**पकवा**—पु. (बायकी) फुगडी, झिंमा वगैरे खेळतांना मुली तोंडातून पक् पक् फुः असा काढतात तो आवाज. [ध्व. पक्]

**पकसाल-ळ**—स्त्री. तांदुळाची एक जात.

**पकाडी**—पाकडी पहा.

**पकार-रा**—पु. १ पावली या नाण्याचा एक संकेत. २ (सामा.) पैसा; छदाम; द्रव्य (पनें आरंभ होतो म्हणून) चकार पहा. ' जवळी नाहीं एक पकार । '—अमृत ३६.

**पकारी**—स्त्री. १ पकार पहा. २ (बुद्धीबळांचा खेळ) (संकेत) प्यादेमात.

**पकोडा-डी**—पुस्त्री. भजें. [ हिं.; तुल० सं. पच्-पक्व+वडी ]

**पकोरडी**—स्त्री शीळ घालणारा एक पक्षी.

**पक्का**—वि. (शब्दशः व ल ). कच्च्याच्या उलट. १ पिकलेला; प्रगल्भ; पूर्णावस्थेस आलेला. २ शिजविलेला; सिद्ध झालेला. ३ तयार असलेला; निश्चित; नक्की झालेला ( बेत, मसलत इ० ). ४ भाजलेलें (मडकें, वीट इ० ). ५ पुष्कळ दिवस टिकणारा ( रंग ). ६ तरबेज; हुशार, निष्णात, पूर्ण, श्रेष्ठ (मनुष्य वस्तु इ० ) जसें–'पक्का-कारकून-पंडित-चोर इ०' ७ पूर्ण केलेलें, तयार केलेलें; गणित करून काढलेलें ( त्रैराशिकांतील उत्तराचें चवथें पद. कच्चा पहा). पक्का शब्दाचे निरनिराळ्या शब्दांशीं संयोग होतांना निरनिराळे अर्थ होतात. पक्का धोंडा=अतिशय कठिण धोंडा. पक्का पैसा=ढबू. पक्का कोस=सबंध, पुरा कोस. पक्कें दूध= तापविलेलें दूध. पक्कें तूप=फार कढविलेलें तूप. पक्कें रेशीम=उकळून तयार केलेलें रेशीम; पक्की शाई=शिजविलेली, फिकी न पडणारी, पुसून न जाणारी शाई पक्का डाक=सोनें, चांदी, पितळ यांनीं दिलेला डाक, कस्तूर; याच्याउलट कच्चा=कथलाचा डाक. [ सं. पक्व ] **०कच्चा**–वि ( पक्का आणि कच्चा ) अर्धवट पिकलेला, शिजलेला, तयार, लिहिलेला, पुरा केलेला ( अन्न, पीक, जमाखर्च, रंग इ० ). **०खरडा-खर्डा-हिसाब**–पु. रोजखर्डयावरून तयार केलेला हिशोब; कच्च्या टांचणावरून कायमच्या चोपडींत मांडलेला हिशोब; पक्की कीर्द. **०ख्याल**–पु. ( संगीत ) ख्यालामधील एक प्रकार. **०तोळा**–पु. ९६ (भार) गुंजांचा तोळा (कच्चा तोळा= एक रुपयाभार=९० गुंजा ) **०रंग**–पु. ( तिफाशी सोंगट्यांचा खेळ ) ( दोन बाजूंस दोन दोन रंग वांटून घेतात त्यांतील ) एका बाजूच्या, तांबड्या व एका बाजूच्या पिवळ्या रंगाच्या सोंगट्या. काळ्या आणि हिरव्या रंगाच्या सोंगट्यांनां कच्चे रंग म्हणतात. **०शेर**–पु. ८० तोळ्यांचा ( भार ) शेर. **पक्की कुंदी**–स्त्री. खळ वगैरे लावून कपडे स्वच्छ धुणें व कडक इस्तरी करणें. याच्या उलट कच्चीकुंदी. **०जप्ती**–स्त्री. (कायदा ) फैसला, निकाल झाल्यानंतरची जप्ती. याच्या उलट कच्ची, अवल जप्ती. **०मुदत**–स्त्री. बंदी मुदत पहा; संपलेली, भरून गेलेली मुदत (हुंडी इ०ची ). **पक्कें खातें**–न. ( जमाखर्च ) ज्या खात्याचें येणें-येणें पुढील सालास उतरावें लागतें तें खातें.

**पंक्चर**—न. सायकलच्या हवा भरलेल्या रबरी नळीला पडलेलें भोंक. [ इं. ]

**पंक्ति**—स्त्री. १ ओळ; रांग; मालिका; माळ. २ जेवावयास बसणारांची पंगत, ओळ. ३ ( ल. ) साहचर्य; बंधुत्व; सोबत; संगत. ४ मंडळी, संघ; गट; टोळी; मेळा, समाज. 'त्याला पंक्तीस घेतलें-पंक्तींतून काढलें.' 'आपले पंक्तीचे गृहस्थासीं सोईरगत करावी.' ५ दहा; १० ही संख्या. 'पंक्ति सहस्र सुवर्ण प्रतिमासीं करुनि वेतन स्थापी । ' —मोवन ४.१७७. ६ (साहित्य) एक छंद याच्या चरणांत अक्षरें दहा असतात. चंपकमाला, विराट इ० वृत्तांत हा छंद येतो. [ सं. ] **०कार**–वि. पंक्तीला जेवणारा. ' रसखाद पक्वान्न । पंक्तिकारु जाण मी होईन । ' —एभा १२. ५४०. [ सं. ] **०दोष**–पु. १ अपांक्त माणूस पक्तींत बसल्यानें तेथील सर्व माणसांस लागणारा दोष; शूद्रादि कमी प्रतीच्या मनुष्याच्या पंक्तीस जेवल्याचा दोष. २ सगळ्या जातीला लागू होणारा दोष-कलक. ३ ज्याच्या योगानें मनुष्य अपांक्त होतो असा अपराध, दोष. **०पठाण-बारगीर**–पु. १ जेऊन खाऊन चाकरीस ठेवलेला बारगीर ( घोडेस्वार ). याला पगाराच्या ऐवजीं मालकाच्या पंक्तीस जेवण मिळतें ( या वरून ). २ –वि. ( ल ) ऐदी; आळशी; भोजनभाऊ; तुकडमोड्या; नुसता पुरूल्याला हजर असणारा. [ सं. पंक्ति+हिं. पठाण; फा. बारगीर] **०पावन**–वि. पंक्तिदोष नसलेला; पंक्तीस बसण्यास योग्य; रोटीव्यवहाराला लायक. **०प्रपंच**–पु. १ पंक्तींत वाढतांना केलेला पक्षपात, भेदभाव; पंक्तींत श्रीमंत, शिष्ट किंवा परिचित अशा लोकांस भरपूर व चांगलीं पक्वान्नें वाढणें व दुसऱ्यास हलके सलके पदार्थ वाढणें. २ (ल.) पक्षपात; भेदभाव. (क्रि० करणें). [पंक्ति+ प्रपंच=भेद, पक्षपात ] **०बाह्य**–वि. अपांक्त; सामाजिक इ० कारणांमुळें ज्याला पंक्तींत घेत नाहींत असा. **०भाऊ**–पु. (सहभोजी) एका ताटांत जेवणारा; मोठा मित्र, सोबती. **०भेद**–पु. १ पंक्तिप्रपंच पहा. 'दशशत बाणांनीं तो एकैकातें रणांगणीं हाणी । न करीच पंक्तिभेद श्रीकर्णाचा उदारवर पाणी । ' —मोकर्ण ३०.६९. २ भोजनाचे वेळीं ज्यांना एकाच पंक्तींत बसतां येत नाहीं त्यांची मध्यें जागा टाकून किंवा दिशा बदलून निराळी पंक्ति करणें. ' पंक्तिभेद असल्यास गोळक आणि आम्ही एकत्र जेवलों तरी चिंता नाहीं. ' —शास्त्रीको. ३ एकाच जातींतील लोकांची त्यांच्या राहाण्यासवरण्याच्या, चालचलणुकीच्या फरकामुळें निराळी पंगत होणें. ' गुजराथी ब्राह्मण आणि दक्षिणी ब्राह्मण यांचा पंक्तिभेद आहे. ' **०भ्रष्ट**–वि. पंक्तिबाह्य पहा. **०लाभ, पंक्तीचा लाभ**–पु. एकत्र पंगत; सहभोजन. **०व्यवहार**–पु. १ पंक्ति अर्थ २ पहा.

२ सहभोजन. ०**संसर्ग**–पु. एका पंक्तींत भोजन करण्याचा व्यवहार; सहभोजन. **पंक्तींतला नळा**–पु. भोजनाच्या पंक्तींत उडवावयाचा दारूचा नळा. **पंक्त्यंतर**–न. पंक्तिभेद अर्थ २ पहा.

**पक्क**—वि. १ पक्का पहा. २ शिजलेला; तयार केलेला. ३ पचविलेला; जिरलेला. ४ पिकलेला. ५ (ल.) प्रौढ; परिणत. सामाशब्द पक्का शब्दामध्यें पहा. [सं.] ०**दस्त**–वि. (गो) भारदस्त. ०**रस**–पु. शरीरांतील अन्नपाचक अम्लरस, पित्तरस, अन्नरस; आमरस; **पक्कान्न**–न. १ लाडू, पुरणपोळी इ० उंची खाद्यपदार्थ; मिष्टान्न. २ खाद्य पदार्थ [पक्क+अन्न] **पक्काशय**–पु पोट, कोठा, अन्न पचण्याची जागा. [पक्क+आशय]

**पक्कासी**—स्त्री. लोखंडी गज, सळई; कटवणी.

**पख, पंख**—पु. १ पक्ष्याच्या एक अवयवरूप पिसाचा समुदाय; पक्ष. याच्या योगानें पक्ष्याला उडता येतें २ पंखांतील एक पीस. ३ पंधरवडा; महिन्यातील १५ दिवस; पक्ष. महिन्याचा एक अर्ध. ४ बाजू; पक्ष. ५ वर्ग; समुदाय, संघ (सप्तमी विभक्तींत उपयोग). 'म्यां उखाणा घातला तो पक्ष्यांचे पंखीं नाहीं' [सं. पक्ष; प्रा. पंख; हिं. पख; फ्रेंजि. पक] ०**फुटणें**–१ वयांत येणें; मोठा होणें; २ उडून जाणें; पळणें. ३ (ल.) लबाडी करण्यांत तरबेज होणें. ०**चञ्ची**–स्त्री. एक जातीचा पोपट. याच्या मानेच्या वरचा भाग व पंखाचा कांहीं भाग लालसर असतो. याला रामनगरी असेंहि नांव आहे. ०**बाळी, पंखेबाळी**–स्त्री. स्त्रियांच्या कानांतील एक दागिना. ०**मांजर**–न. (व.) घुबडाच्या जातीचा एक लहान पक्षी. ०**शूल**–पु. डाव्या बरगडींत उठणारा शूळ [सं. पक्ष+शूल] **पंखडी, पंखाड**–स्त्रीन. (निंदार्थी) पक्ष्याचा पंख.

**पखॅ**—पु. (गो.) केंस विंचरण्याच्या पद्धतींतील एक प्रकार; बाजूस झुबके काढणें; कुररीं. [सं. पक्ष; म. पंख]

**पंख**—पु. (गो.) साखरेंत पाणी घालून आटवून करतात तो साखरेचा पाक पंक पहा.

**पखचें**—क्रि. (गो.) तोंड बंद होऊन जखम किंवा फोड बुजत जाणें. [पिकणें]

**पख(खा)रडा, पखळ, पखळ(र)ण, पखाडा**—पुस्त्रीपु. १ अस्ताव्यस्त पडलेला पसारा. २ अशा पडलेल्या वस्तू. 'पखरडा पडला बदरीतळीं। फकिर रक्षित एक महाबळी।' ३ अव्यवस्था; अडगळ; ४ सडा (फळें, फुलें यांचा). (क्रि० पडणें). 'पहा फुलांचि पखरण क्षिप्।' –केक ७६. [सं. प्रक्षरण किंवा सं. प्रक्षलन–पक्खलन–पखळण–भाअ १८३२]

**पखरणी**—स्त्री पसरण्याची, विस्कळित करण्याची क्रिया.

**पखर(ळ)णें**—उक्रि. विस्कळीत करणें, पडणें; सडा टाकणें, पडणें. पसरणें; उधळणें. [पखळण; सिं. पखिरणु]

**पखवा**—पु. पकवा पहा. [ध्व.]

**पखवा**—पु (कर. शिवण काम) चोळीचें पाखें; उभार; पुढचा भाग. 'पाठीच्या निंपट पखवा असावा' [सं. पक्ष, म. पख; हिं. पखवा]

**पखवाज**—पु. (वाद्य) एक वाद्य; मृदंग, तबला. खैर, साग इ० लांकडाचा सुमारें सवा हात लांबीचा व १५ इंच व्यासाचा गोल तुकडा आरपार पोखरलेला असतो. दोन्ही तोंडांशीं याचा व्यास मध्यापेक्षां सुमारे तीन इंचांनीं कमी असतो. तोंडें कातडयानें मढविलेलीं असतात. एका तोंडाचा मध्यभाग शाईनें मढविलेला असतो व दुसऱ्या बाजूस वादनाच्या वेळीं कणकेचा गोळा लिंपतात दोन्ही तोंडांच्या काठावर बसविलेल्या गजऱ्यामधून वादी ओढून त्यात लांकडी गट्टे बसविलेले असतात गायन, कीर्तन, भजन वगैरेच्या तालाच्या साथीस याचा उपयोग करतात. [पख+वाजणें; सं. पक्षवाद्य ? हिं. पखावज] **पखवाजची–जी**–वि. पखवाज वाजविणारा. [हिं. पखावजी]

**पखा**—पु पंखा अर्थ ८ व पंखबाळी पहा.

**पंखा**—पु कानांतील एक दागिना यास झुबे असतात. –थोमारो २.३४७

**पंखा**—पु. १ वारा घेण्याचें, घालण्याचें एक पंखाच्या आकाराचें साधन; विंझणा. २ चोळीचें पाखें. पखवा पहा. 'पंखे झमकती तेजखाणी।' –वेसीस्व ९.१२९. ३ एक मोठा पतंग, वावडी. ४ पगडीच्या पदराचा जरतारी तुरा (हे दोन्ही कानावर खालवर असे ताठ असतात). ५ (घिसाडी धंदा) घिसाडयाच्या भट्टीस हवा पुरविणारें यंत्र, भाता. ६ (कर.) गाडीवान बसण्याची साटीजवळची धुरीवरील जागा. ७ (पिंजारी धंदा) कापूस पिंजण्याचे कमानीस एका बाजूस असलेली अर्धवर्तुळ फळी. ८ पंखबाळी पहा. ९ (गवंडी धंदा) भिंत इ० मध्यें कमान रचतांना पंख्याच्या आकाराप्रमाणें बसविलेल्या विटा. १० छापण्याच्या यंत्रावरील छापून आलेला एक एक कागद व्यवस्थितपणें एका जागीं ठेवला जाण्याचें साधन. [सं पक्ष; म. पंख]

**पखाटी**—स्त्री. (गो.) झडप (पाऊसवगैरे लागू नये म्हणून खिडकीला बाधतात तें) [पक्ष]

**पंखाडा तिकीट**—रेशमाची एक जात. –मुंव्या ९५.

**पखाणभेद**—पु (प्र.) पाषाणभेद पहा. [हिं पखान=पाषाण]

**पखाल**—स्त्री. १ पाणी आणण्या–नेण्याची, बैलाच्या पाठीवरून वाहून नेण्याची कातडी मोठी पडशी, पिशवी. २ मोट. ३ (ल.) ढेरपोट; दोंदील. [सं पयस्+खल=चामडें, चामडयाची पिशवी; हिं. सिं. पखाल] **पखालची–जी, पखाल्या**–वि. १ पखाल वाहणारा. २ पखाल वाहणाऱ्या बैलाला हांकलणारा. ०**पार्वती**–स्त्री. ढेरपोटी स्त्री.

**पखाळ(ल)णी–णें, पखाळपुजा**—पाखळणी पहा.

**पखिलेया, पखिल्या**—वि पक्ष्याच्या जातीचा. ' येतुकेया दिनाचा सांगणेकरु । जो कां सागे रात्रींचा प्राहारु । तो पखिलेया माजु घाली गंभेरु । पाखे फापुडोनी ।' –ख्रिपु २.४६, १२१.

**प(पं)खी, पंखिल, पंखेरू**—स्त्री. (काव्य) पक्षी; पाखरूं. ' पखिया मधें मयोरु ।' –ख्रिपु १.१.१२४. [सं. पक्षी]

**पंखी**—स्त्री. पिसापासून तयार केलेलें एक प्रकारचें कापड, वस्तु. [पंख]

**पंखेबाळी**—पंखबाळी पहा.

**पंख्या**—पु. उडणारी खार. [पंख]

**पग**—न. १ पाय; पाद. ' पग पाहून मोर झुरे । ' २ पाऊल; पावलाची खूण. ३ (ल) पाया; मूलाधार, मर्मांश; मूलतत्त्व (शास्त्र, कला इ०चें). ' हा बारा वर्षे हिशोब शिकतो आहे पण हिशोबाचें पग अजून याचे मनांत आले नाहीं ' ४ बुद्धिबळाच्या किंवा सोंगटयाच्या पटातील घर, चौकट; मोहऱ्याच्या गतींत येणारी घरांची सर्व ओळ. ५ (खा.) (सोनारी धंदा) शेगडींतील विस्तवाच्या भोंवतीं चार बाजूंस ज्या चार विटा ठेविलेल्या असतात त्या प्रत्येकी [सं. पद, हिं पग] **पगीं धरणें**–बोलण्यांत, शब्दांत पकडणें. **पगीं सांपडणें**–बोलण्यांत, शब्दात सापडणें. पगदस्ती धरणें–सांपडणें पहा **०दस्त–स्ती**–वि. १ (बुद्धिबळांचा खेळ) एकदां एका घरांत दिलेलें बुद्धिबळ पुन्हां मागें न घेतां खेळणें. –वि. (ल.) अढळ; अचल; न बदलणारा (निश्चय, वचन, माणूस) २ सावध; दूरदर्शी; सहजासहजीं न फसणारा, अडकणारा (भाषण इ०मध्यें); दुसऱ्याला बोलण्यांत पकडणारा; पगीं धरणारा. **०दस्तीं–दस्तीं धरणें–आणणें**–दुसऱ्याला भाषणात पकडणें. **०दस्तीं सांपडणें**–भाषण वगैरेंत स्वत अडकलें जाणें.

**पग**—पु. (कर.) बाजू; कड; पक्ष. ' याच्या पगनं तो बोलतो ' [सं. पक्ष]

**पंगड**—न. (गो.) पक्ष; तट (गांवांतील, लोकांतील). [सं. पंक्ति; म. पंगत]

**पगडडाव**—पु. सोंगटयांचा एक खेळ. [पगडा=एक दान+डाव]

**पगडा**—पु. १ फांशावरील एक संख्या, चिन्ह, टिंब. २ (ल.) पाऊल; शिरकाव; प्रवेश. ' चार पैसे पदरीं असल्यावांचून व्यवहारांत पगडा पडत नाहीं..' ३ पायंडा; प्रघात. ' अलीकडे यानें आमचे घरीं येण्याजाण्याचा पगडा घातला आहे ' ४ प्रावीण्य. ५ वर्चस्व; सत्ता; दाब. (क्रि० घालणें; पडणें; पाडणें; बसविणें इ०) ' त्या पंडिताचा राजाजवळ पगडा चांगला पडला. ' [सं. पद] **०पाडणें**–श्रेष्ठता स्थापणें. ' पगडा पाडीन जगीं शरटंकें करिन चूर्ण त्या दगडा ।' –मोकर्ण २७.२४. **०बसणें–बसविणें**–(सोंगटयांच्या खेळांत) कांहीं विवक्षित दान पडलें म्हणजे एक नरद पटावर बसविण्याचा हक्क मिळतो. पगडें बसलें म्हणजे विरुद्ध पक्षावर आपला जोर अधिक चालतो. या वरून) छाप पडणें, पाडणें, प्रतिष्ठा मिळविणें. ' इंग्रजीसारख्या प्रबल परभाषेचा मराठीवर अगदीं पगडा बसून तिचें स्वत्व नष्ट होण्याच्या बेतांत आहे. ' –नि ६.

**पगडी**—स्त्री. १ लहान पागोटें; विशेषत. लहानांसाठीं पागोटयाप्रमाणें शिवलेलें शिरोभूषण, टोपी. २ (डौलाचे भाषणांत) पागोटें; शिरोभूषण. [हिं.] **म्ह०** शीर सलामत तर पगडया पचीस. **०उतरणें**–अपमान करणें. **०घेणें**–विद्यादि गुणांनीं एखाद्याहून वरचढ होणें **०फिरविणें**–१ करार, वचन, शब्द न पाळणें; मत, मन बदलणें; अश्लाघ्य मार्गाकडे वळणें. २ रागानें एखाद्याच्या अंगावर येणें; सामोपचार सोडून विरोध करणें. **०फेकणें**–झोकानें पागोटें चढविणें **०फेकून जाणें**–पगडी फिरविणें अर्थ २ पहा. फेरपगडी करणें. **०बांधणें**–सन्मान करणें ' ' तो श्रीकृष्ण गडी तुम्हासि पगडी बाधी, मला लुगडी ।' –आसु ६ **पगडबंद–ध**–पु पागोटीं बाधण्याचा धंद' करणारा माणूस **पगडबंदकी**–स्त्री. पगडबंदाचा धंदा; पागोटीं बांधून वेऊन उपजीविका करणें. **पगडबंदी**–स्त्री. १ पगडबंदकी. २ पागोटें बांधण्याची मजूरी **पगडीभाई**–वि. एकमेकांची पगडी एकमेकांनीं घालून झालेले मित्र (परस्पर पगडया बदलण्यानें बंधुत्व स्वीकारल्यासारखें होतें. ही एक इमानाची शपथ असे). ' हिंदुस्थानांतील स्वधर्म कीं, पगडीभाई झाल्यावर पोटचें द्यावें पण पाठचें देऊं नये, त्यास रक्षावें. ' –भाब ५. **०वाला**–वि. पगडी घालणारा (ब्राह्मण). ' कोंकणचा पगडीवाला । ' –संग्राममगीतें २८.

**पंगत**—स्त्री. पंक्ति अर्थ १ ते ४ पहा. [सं. पंक्ति] **०मांडणें**–पाट-रांगोळया करणें; पानें मांडणें; भोजनाच्या पंक्तीची तयारी करणें. **०वाजविणें**–पंगत (विशेषतः लग्नांतील मंडळी) जेवावयास बसली असतां वाजंत्री वाजविणें. **०वाढणें**–सर्व पंगतीस जेवणाचे पदार्थ वाढणें; पंक्तींत वाढण्याचें काम करणें. **०साधणें**–जेवणाची वेळ साधणें. **पंगतीस घेणें**–१ आपल्या बरोबर जेवावयास घेणें. २ रोटीव्यवहार करणें; स्नेहसंबंध ठेवणें. **पंगतीस चुकणें**–(उशीर झाल्यामुळें) पंक्तींतील आपली जागा गमावणें; पंगत बसण्याच्या वेळेला न येणें. **म्ह०** पंक्तीस चुकला तो जेवायाला मुकला. **पंगतीस बसणें**–१ बरोबर भोजनास व इतर वेळीं एकत्र बसणें. २ समसमान होणें; एकाच माळेंत ओंवलें जाणें.

**पगर**—पु. (प्र.) प्रदर पहा. याचे तांबडा व पांढरा असे दोन भेद आहेत. (क्रि० लागणें).

**पगरा**—पु. महार लोकांच्या कानांतील एक दागिना. [सं. प्रग्रह ?]

**पगाना**—पु. (विणकाम) वशारनास जोडण्याकरितां जे कांहीं तार राखून ठेवतात व आसावर गुंडाळतात ते. [ हिं. पगा= दोर ? ]

**पगार**—पु. (नाविक) एक प्रकारची होडी. ही साध्या होडीपेक्षां चांगली असुन हिला उलांडीची जरूर नसते ही कमी हलते.

**पगार**—पु. मुशाहिरा, वेतन; तनखा; पैशाच्या रूपांत नोकरीबद्दल मिळालेला मोबदला. [पोर्तु. पागा=वेतन; गो. पगार] ०**पत्रक**-न. तनखापत्रक; ज्यावर लिहिल्याप्रमाणें पगार देऊन सही घेण्यांत येते ती वही. **बैठा पगार**-पु. चाकरी न करतां, घर बसल्या मिळणारा पगार

**पंगारा**—पु. (व.) पसारा, व्याप. ' कागदाचा पंगारा घालून ठेविला. '

**प(पं)गिस्त-त**—वि. १ लंगडा; पाय तुटलेला २ (ल) पराधीन; ओशाळा: ताबेदार; परतंत्र. ' रसनापंगिस्त नाहीं होणें। आहारू सेवणें निजबोधें।'-एभा ८.२८ [ पंगु किंवा पग=पाय] **पंगिस्तता**-स्त्री. १ पराधीनता. २ गरज; जरूर. ' माझें भजन करितां। न पडे ज्ञानाची पंगिस्तता।' -एभा ११.६५७.

**पंगु-गू**—वि १ पांगळा; लंगडा; पाय गेलेला, विकळ; व्यंग. २ विकृत; व्यंग अवयवाचा; एखाद्या अवयवांत खोड असलेला. ' हा डोळयानें पंगू-तो हातानें पंगू ' ३ (ल.) दरिद्री; मित्ररहित; असहाय; साधनविरहित; निराधार; असमर्थ ' धान्यावांचून दुनिया पंगू ' [ सं.; फ्रेंजि. पंगो ] ०**वात**-पु. एक प्रकारचा अर्धांगवायु, पक्षघात. यानें माणसाचे पाय जातात. **पंगुळवेल**-स्त्री. (झाडावर चढणारी) एक वेल.

**पंगेरा**—पु. पांगारा पहा. (कु.) पंग्यारो.

**पंगोजी**—स्त्री. नारळाची खव मैद्यांत घालून भज्याप्रमाणें तयार करतात तें पक्वान्न. -गृशि १.४५०.

**पग्गळ**—क्रिवि. (कर.) तब्बल: भरपूर; पुष्कळ. पघळ पहा. 'जपानी मांजरपाटाचा पन्हा पग्गळ तीन हात आहे.' [पघळ पुष्कळ]

**पग्या**—पुस्त्री. (सोनारी धंदा) सोन्याची लगड पाडण्यासाठीं, सोन्याचा रस ओतण्यासाठीं जाड लांबट पन्हाळ व तितकाच मागें दांडा असलेली एक लोखंडी पळी. पघा, पडघणी पहा. [ पघा ]

**पघणें**—सक्रि. (अशिष्ट) पाहणें; बघणें. [ सं. पश्य ]

**पंघणें**—न. डुलकी; पेंग. ( क्रि० घेणें; देणें; खाणें; मारणें ). -अक्रि. पेंगणें; डुकली घेणें.

**पघळ**—वि. १ ऐसपैस; भरपूर; विस्तीर्ण क्षेत्रफळाचा; अवाढव्य; अघळपघळ. ' आकाश जेणें पघळ। पवन जयानें चपळ। जयाचेनि अनळ । दाहक पै तो।' -सिसं १.२२. २ (ल.) विस्तृत; पाल्हाळीक ( भाषण.). -क्रिवि. ऐसपैस; मोकळेपणें. ' पघळ बसा-मांडा. ' [ पघळणें ]

**पघळणें**—अक्रि. १ विरघळणें; पाघळणें; पातळ द्रव होणें; वितळणें. २ (ल) दयार्द्र होणें; कळवळा येणें; द्रवणें. ३ विस्तृत, मोठा, सैल होणें; पसरणें, वाढणें (घट्ट जोडा) ' तयांही तळीं पघळे। वेल पाल्हु। '-ज्ञा १५ १४५. -उक्रि (राजा) (धान्य चिरगट इ०) जमीनीवर पसरणें; ऐसपैस मांडणें. [ सं प्रगलनम् ] **पघळणी**-स्त्री. पघळण्याची क्रिया; विरघळणें; वितळणें.

**पघा**—पु साचा, मूस (धातूचा रस ओतण्याची); लगड होण्यासाठीं ज्यांत धातूचा रस ओततात तें साधन. [ सं. प्र+गल् ]

**पच**—वि. हा शब्द स्वतंत्र न येतां समासांत उत्तरपदीं शिजविणारा, पिकविणारा, शिजणारा. पिकणारा. याअर्थी येतो जसें-सुखंपच=सहज शिजणारा दु खंपच=शिजायला कठिण [ सं. पच् ]

**पंच**—पु अव. १ वादग्रस्त बाबींत निवाडा देणारे; लवाद; पंचायतींतील एक किंवा सर्व व्यक्ती यांत बहुधा पांच माणसें असतात पंचांचे दोन प्रकार आहेतः-न्यायपंच (ज्युरी) आणि व्यवस्थापंच (ट्रस्टी) २ उभयपक्षांनीं मान्य केलेला लवाद. [सं. पंच=पाच] ०**कमेटी**-स्त्री (ना.) पंच; लवाद; व्यवस्थापक मंडळ; कार्यकारी मंडळ, पंचांची सभा. [ पंच+इं. कमिटी ] ०**कयास**-पु. पंचांनीं केलेला अंदाज, निकाल निवाडा. ०**नामा**-पु. पंचांच्या समोर केलेल्या तपासाचें नोंदपत्रक. ०**मत**-न. पंचाचा निकाल; त्याचें म्हणणें. ०**सभा**-स्त्री लवाद; पंचांची बैठक; ज्युरी. **पंचाई(य)त**-स्त्री. १ पंच. २ पंचामार्फत केलेली चवकशी. 'पंचायतींत ठरेल असें उभयतांनीं वर्तावें.' ३ भांडण्याचें कारण; कज्जा; खटला. ४ पंचांनीं निकाल देण्याजोगा खटला. ' आम्ही ही पंचाईत घेऊन त्या पंचाकडे गेलों ' ५ पंचांचा निर्णय, निकाल; न्याय. ' आतां संतांनीं करावी पंचाईत। कोण हा फजितखोर येथें।' -तुगा १२१८. ६ (ल.) उठाठेव; अनावश्यक चवकशी; सार्वजनिक चर्चा. (क्रि० करणें ). ७ अडचण; गोंधळ; संकट. ' जाण्यायेण्याची पंचाईत. ' 'नुसत्या अटकळीहि बांधण्यास मोठमोठ्या इतिहासवेत्त्यासुद्धा पंचाईत पडते. ' -नि १. ८ ददात; दुर्भिक्ष. ' त्याचे घरीं अन्नाची पंचाईत आहे.' ९ विचका; नासाडी. १० निष्कारण वादविवाद, प्रतिकार. (क्रि० मांडणें; लावणें; घालणें ). ११ भांडण; तंटा; तक्रार; झगडा. (क्रि० सांगणें ). १२ पंचांची सभा, बैठक; पंचमंडळ. [ हिं. पंचायत ] **पंचाईतदार**-वि. १ पंचांतील इसम; पंच. २ पंचाईत करण्याविषयीं कुशल. **पंचाईतनामा**-पु. पंचांचा लेखी निकाल; निर्णय. [ पंचाईत+फा. नामा ] **पंचाईतमत**-न. पंचांनीं दिलेला निकाल.

**पंच**—वि.पांच; ५ संख्या. [ सं. ] ०**उपप्राण**-पुअव. पांच वायुः-नाग=शिंक येणारा वायु, कूर्म=जांभई येणारा, कृकल=ढेकर

येणारा, देवदत्त=उचकी येणारा व धनंजय=सर्व शरीरात राहून तें पुष्ट करणारा व मनुष्य मेल्यावर त्याचें प्रेत फुगविणारा वायु. 'नाग कूर्म कृकल देवदत्त । पांचवा धनंजय जाण तेथ।' –एभा १३.३२०. ०**कन्या**–स्त्रीअ. पांच सुविख्यात पतिव्रता स्त्रिया; अहल्या, द्रौपदी, सीता, तारा आणि मंदोदरी. ०**कर्म**–नअव. शरीराचीं मुख्य पांच कामें–ओकणें, रक्तस्राव होणें, मलोत्सर्ग, मूत्रोत्सर्ग, नाक शिंकरणें इ०. किंवा गतीचे पुढील पांच प्रकार:– उत्क्षेपण (वर करणें), अपक्षेपण (खालीं करणें), आकुंचन (आखडणें), प्रसारण (पसरणें) व गमन (जाणें). ०**कर्मेंद्रियें**–हात, पाय, वाणी, शिश्न व गुद कर्मेंद्रिय पहा. ०**कल्याण–णी**–वि. १ गुडघ्यापर्यंत पांढरे पाय व तोंडावर पांढरा पट्टा असलेला (घोडा) हा शुभ असतो –अश्वप १९० 'पंच कल्याणी घोडा अबलख।' २ (उप.) सर्व अवयव विकृत असलेला (माणूस) ३ (उप) भाडयाचें तट्टू, घोडा (याला दोन्ही टाचांनीं, दोन्हीं मुठींनीं व दांडक्यानें मारून किंवा तोंडानें चकूचक् करून चालवावें लागतें म्हणून). ४ (उप.) ज्याच्या नाकाला निरंतर शेंबूड असून तो वारंवार मणगटांनीं काढून ढिरीस पुसत असणारा असा (पोर) ०**काजय**–स्त्री. (गो.) पंचखाद्य पहा. ०**कृष्ण**–पुअव. (१) महानुभाव संप्रदायांतील ५ कृष्ण–कृष्णचक्रवर्ती, मातापूर येथील दत्त, ऋद्धिपूरचा गुंडम राउळ, द्वारावतीचा व प्रतिष्ठानचा चांगदेव राउळ. –चक्रधर सि सूत्रें पृष्ठ २१. (२) हंस, दत्त, कृष्ण, प्रशांत व चक्रधर –ज्ञाको (म) ७७. ०**केणें**–न. मसाल्यांतील मिरी. मोहरी, जिरें, हिंग, दगडफूल इ० पदार्थ. ०**केण्याचें दुकान**–न. छोटेसें किराण्याचें दुकान. ०**केदार**–पुअव. केदार, ममद, तुंग, रुद्र, गोपेश्वर. ०**कोटी**–स्त्री. उत्तर हिंदुस्थानांतील शंकराचें तीर्थक्षेत्र. ०**कोण**–पु. पांच कोनांची एक आकृति. –वि. पांच कोनांची. ०**कोश–ष**–पुअव. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय अशीं देहाचीं पांच आवरणें. या कोशांचा त्रिदेहाशीं पुढीलप्रमाणें समन्वय करतात–अन्नमयाचा स्थूलदेहाशीं, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, यांचा सूक्ष्म किंवा लिंगदेहाशीं व आनंदमयाचा कारणदेहाशीं. ०**कोशी**–स्त्री. १ चार, पांच कोसांच्या आंतील गांवें; एखाद्या क्षेत्राच्या भोंवतालची पांचकोस जमीन 'पुरलें देशासी भरलें शीगेसी । अवघी पंचक्रोशी दुमदुमीत ।' –तुगा २६१०. ३ (ल.) या गांवांतील जोशाची वृत्ति. ४ पंचक्रोशी यात्रा पहा. ०**क्रोशी यात्रा**–स्त्री. क्षेत्राची (विशेषत: काशी क्षेत्राच्या भोंवतालच्या पांच कोसातील देवस्थानांना प्रदक्षिणा, तीर्थाची यात्रा. ०**खंडें**–नअव. आशिया, यूरोप, अमेरिका, आफ्रिका, ओशियानिया. ०**खाज–जें–खाद्य**–नपुन. १ ख या अक्षरानें प्रारंभ होणारे खाण्यायोग्य असे पांच पदार्थ (खारीक, खोबरें, खसखस (किंवा खवा) खिसमिस व खडी साखर). –एभा १०.४९२. 'पूर्ण मोदक पंचखाजा । तूं वऱ्हाडी आर्धी ।' –वेसीस्व ३ २ (गो.) नारळाचा खव, गूळ, चण्याची डाळ इ० पाच जिन्नसांचा देवाला दाखवावयाचा नैवेद्य. ३ (को.) तांदूळ किंवा गहू, काजळ, कुंकू, उडदाची डाळ व खोबरें यांचा भूतपिशाचांना द्यावयाचा बळी; या पांच वाणजिनसा. ०**गंगा**–स्त्री. १ महाबळेश्वरांतील एक तीर्थ येथें कृष्णा, वेणा, कोयना, गायत्री (सरस्वती) व सावित्री याचा उगम आहे. २ काशी क्षेत्रांतील एक तीर्थ. 'गंगा भारति सूर्यसुनु किरणा बा धूतपापा तसे। पाची एकवटोनि तीर्थ निपजे ते पंच–गंगा असें।' –नरहरी, गंगारत्नमाला १५७ (नवनीत पृ ४३३) ३ पंचधारा पहा. (क्रि० वाहणें). ०**गति**–स्त्री. घोडयाच्या पांच चाली–भरपल्ला किंवा चौवड चाल; तुरकी किंवा गाम चाल, दुडकी, बाजी, आणि चौक चाल. याचीं संस्कृत नांवें अनुक्रमें:-आस्कंदित, धौरितक, रेचित, वल्गित, प्लुत. ०**गव्य**–न गाईपासून निघालेले, काढलेले पांच पदार्थ दूध, दहीं, तूप, गोमूत्र, शेण यांचें मिश्रण (याचा धार्मिक शुद्धिकार्याकडे उपयोग करतात). ०**गोदानें**–नअव. पापधेनु, उत्क्रांतिधेनु, वैतरणी, ऋणधेनु, कामधेनु हीं पंचगोदानें और्ध्वदेहिक कर्मांत करतात. ०**गौड**–पु. ब्राह्मणांतील पांच पोट जाती–(अ) गौड, कनोज (कान्यकुब्ज), मैथिल, मिश्र व गुर्जर; किंवा सारस्वत, कान्यकुब्ज, गौड, उत्कल आणि मैथिल. ०**ग्रंथ**–पुअव. यजुर्वेदाचे पाच ग्रंथ– संहिता, ब्राह्मण, आरण्यक, पदें आणि क्रम. ०**ग्रही**–स्त्री. एका राशींत पांच ग्रहांची युति. [पंच+ग्रह] ०**तत्त्वें**–नअव. पंचमहाभूतें पहा. ०**तन्मात्रा**–स्त्रीअव. पंचमहाभूतांचीं मूलतत्त्वें, गंध रस, रूप, स्पर्श, शब्द हे गुण. 'प्रकृति पुरुष महत्तत्त्व। पंच, तन्मात्रा सूक्ष्मभाव।' –एभा १९.१६८. ०**तीर्थ**–नअव. हरिद्वार किंवा त्र्यंबकेश्वर येथील गंगाद्वार, कुशावर्त, बिल्वक, नीलपर्वत आणि कनखल हीं पांच तीर्थें. ०**दंती**–वि. पांच दांत असलेला (घोडा), समदंती व अशुभलक्षण पहा. ०**दाळी**–स्त्रीअव. तूर, हरभरा, मूग, उडीद व वाटाणा या पांच धान्यांच्या डाळी ०**देवी**–स्त्रीअव दुर्गा, पार्वती, सावित्री, सरस्वती व राधिका. ०**द्रविड**–पुअव ब्राह्मणांतील पांच पोटजाती-तैलंग, द्राविड, करनाटकी, महाराष्ट्रीय व कोंकणी; किंवा तैलंगी, द्राविड, महाराष्ट्रीय, करनाटकी व गुर्जर. ०**द्रयी**–स्त्री. १ दक्षिणा द्यावयाच्या रकमेचे (ती कमी करणें झाल्यास) पांच भाग करून त्यांतील दोन किंवा तीन ठेवून बाकीचे वाटणें. २ अशा रीतीनें शेत, काम, रक्कम, वस्तु इ०ची वांटणी करणें. ०**धान्यें**–नअव. हवन करण्यास योग्य अशीं पांच धान्यें–गहूं, जव, तांदूळ, तीळ व मूग. महादेवाला याची लाखोली वाहतात ०**धान्याचा काढा**–पु. हा धने, वाळा, सुंठ, नागरमोथा व दालचिनी यांचा करतात. ०**धार**–स्त्री. १ जेवतांना तूप पडलें न पडलें इतकें कमी वाढणें; तुपाच्या भांडयांत पांच बोटें बुडवून अन्नावर शिंपडणें. २ झाडास पाणी घालण्याची पांच

धारांची झारी. ' जगजीवनाचिया आवडी । पंचधार करी वरी पडी । ' –ऋ ७३. ०**धारा**–स्त्री. ( विनोदानें ) तिखट पदार्थ खाल्ला असता किंवा नाकांत गेला असतां दोन डोळे, दोन नाकपुडया व तोंड यांतून वाहणाऱ्या पाण्याच्या पांच धारा. ०**धारें**–न. देवावर अभिषेक करावयाचें पांच भोंकांचें पात्र. [ पांच+धारा ] ०**नख–नखी**–वि. १ पांच नखें असलेला (मनुष्य, माकड, वाघ). २ ज्यांचें मांस खाण्यास योग्य मानिलें आहे असे पांच नखें असणारे सायाळ, घोरपड, गेंडा, कांसव, ससा इ० प्राणी. 'पंचपंच नखा भक्ष्याः । ' –भट्टिकाव्य ६.१३१. ३ छातीवर, खुरावर पांच उभ्या रेषा असणारा (घोडा). हें अशुभलक्षण होय. –अश्वप १.९५. ४ ज्याच्या चार पायांपैकीं कोणत्याहि एका पायाला फाटा फुटल्यासारखी आकृति असते असा (घोडा). –अश्वप १.९८. ०**नवटे**–पुअव. ( राजा. कु. ) संसारादिकांचा अनेकांनीं मिळून अनेक प्रकारचा केलेला नाश; ( एखाद्या संस्थेंत, मंडळांत झालेली ) फाटाफूट; बिघाड. (क्रि० करणें). २ गोंधळ; घालमेल; अडचण. [पंच+नव] ०**पक्वान्नें**–नअव. १ लाडू, पुरणपोळी इ० पाच उंची मिष्टान्नें. २ भारी, उंची खाद्यपदार्थ, जेवण. ०**पंचउषःकाल**–पु. सूर्योदयापूर्वी पांच घटिकांचा काळ; अगदीं पहाट. ' पंच पंचउषःकालीं रविचक्र निघोआलें । ' –होला १७. ०**पदी**–स्त्री. देवापुढें नित्य नियमानें पांच पदें, अभंग भक्तगण म्हणतात ती. ' पंचपदी राम कलिसंकीर्तन । ' –सप्र २१.३६. ०**पर्व**–वि कोणत्याहि एका पायास फरगडयाची आकृति असणारा (घोडा). –अश्वप १.१०२. १०२. ०**पल्लव**–पुअव. आंबा, पिंपळ, पिंपरी, वड व उंबर या किंवा इतर पांच वृक्षाचे डहाळे ( किंवा पानें ). स्मार्त याज्ञिकांत हे कलशामध्यें घालतात. ' पंचपल्लव घालोनि आंत । आणि अशोकें केलें वेष्टित । नरनारी मिळाल्या समस्त । लग्नसोहळिया कारणें । ' –जै ५६.१४. ०**पाखंड**–न. जैन, बौद्ध, चार्वाक इ० पांच मुख्य प्रकारचीं अवैदिक मतें, संप्रदाय. ०**पाखंडी**–वि. वरील पाखंड मतांपैकीं कोणत्याहि मताचा अनुयायी. ०**पात्र–पात्री**–नस्त्री. पाणी पिण्याचें किंवा इतर उपयोगाचें नळयाच्या आकाराचें मोठें भांडें. ०**पाळें**–न. लांकडाचें, किंवा धातूचें पांच वाटया अथवा खण असलेलें पात्र. हळद, कुंकु, इ० पूजासाहित्य ठेवण्याच्या उपयोगी; किंवा फोडणीचें सामान ठेवण्याच्या उपयोगी पात्र. (गो.) पंचफळें. ०**पुरुषार्थ**–पु. धर्म, अर्थ, काम, मोक्ष ( सलोकता, समीपता, सरूपता सायुज्यता ) व परमप्रेमरूपा–परानुरक्ति–पराभक्ति हें पांच पुरुषार्थ. ' जैसा ज्यासी भावार्थ। तैसा पुरवी मनोरथ। पहिये पंचपुरुषार्थ। तो हरि नांदत वैकुंठीं।' –एभा २४.२७०. ०**प्रमाणें**–नअव. शब्दप्रमाण, आप्तवाक्यप्रमाण, अनुमानप्रमाण, उपमानप्रमाण व प्रत्यक्षप्रमाण. ०**प्रयाग**–पुअव. नंदप्रयाग, स्कंदप्रयाग, रुद्रप्रयाग, देवेंद्रप्रयाग व कणप्रयाग हे पांच प्रयाग. ०**प्रलय**–पु. निद्राप्रलय, मरणप्रलय, ब्रह्मयाचा निद्राप्रलय, ब्रह्मयाचा मरणप्रलय, व विवेकप्रलय. ०**प्रवर**–पुअव. ब्राह्मणांत कांहीं पंचप्रवरी ब्राह्मण आहेत त्यांचे पांच प्रवर असे–भार्गव, च्यावन, आप्नवान, और्व व जामदग्न्य. प्रवर पहा. ०**प्राण**–पु. १ प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान. हे पांच प्राण प्राण्याच्या आयुष्यास कारणीभूत आहेत. यांचीं स्थानें आणि कार्यें भिन्न भिन्न आहेत. ( क्रि० ओढणें; आकर्षणें; सोडणें; टाकणें लागणें ). ' देह त्यागुन पंचप्राणीं । गमन केलें तात्काळीं। ' –मुआदि २८.२४. २ ( ल. ) अतिशय आवडती, प्रियकर वस्तु. ' तो पंचप्राण धन्याचा । '–संग्रामगीतें ११९. **(एखाद्यावर) पंचप्राण ओवाळणें – पंचप्राणांची आरती करणें**–दुसऱ्याकरितां सर्वस्व, प्राणहि देणें; सर्व भावें करून आरती ओवाळणें; खरी, उत्कटभक्ति किंवा प्रेम दाखविणें. ' पंच प्राणांची आरती। मुक्ताबाई ओवाळती । ' ०**प्राणाहु(व)ती**–स्त्री. पांच प्राणांना द्यावयाच्या लहान लहान आहुती किंवा घास या त्रैवर्णिकांनीं भोजनाच्या आरंभीं द्यावयाच्या असतात. पांच आहुती घेणें म्हणजे घासभर, थोडेंसें खाणें. (क्रि० घेणें). [पंच+प्राण+आहुती] ०**बदरी**–स्त्रीअव. योग, राज, आदि, वृद्ध, ध्यान. या सर्व बदरी बदरी नारायणाच्याच रस्त्यावर आहेत. ०**बाण**–पु (काव्य) मदन; कामदेव. मदनाच्या पाच बाणांसाठीं बाण शब्द पहा. ०**बेऊळी**–स्त्री. पाच नाग्यांची इंगळी. –मनको. ०**बेळी**–स्त्री. बोंबिल, कुटें इ० विक्रीकरितां एकत्र मिसळलेले लहान मासे. ०**भद्र**–वि. सर्व शरीर पिवळें असुन पाय आणि तोंड मात्र श्वेतवर्ण असणारा (घोडा) –अश्वप १.२१. ०**भूतातीत**–वि. १ पंचभूतांपासुन अलिप्त, सुटलेला (मुक्त मनुष्य, लिंगदेह). २ निरवयव; निराकार (ईश्वर). ०**भू(भौ)तिक**–वि. पाच तत्त्वांनीं युक्त; जड; मूर्त; सगुण. ०**भूतें**–नअव. पंचमहाभूतें पहा. ०**भे(मे)ळ**–पुस्त्री. पंचमिसळ पहा. अनेक पदार्थांचें मिश्रण –वि. पांच प्रकार एकत्र केलेलें. ' मोहोरा पंचमेळ वरहुकूम पत्र पुरंदर. ' –वाडसमा ३.८३. ०**मघा**–स्त्रीअव. १ मघा नक्षत्रात सूर्य आल्यानंतरचे पांच दिवस. २ मघापासुन पुढचीं पांच सूर्यसंक्रमणाचीं नक्षत्रें. ०**महाकाव्यें**–नअव. रघुवंश, कुमारसंभव, माघ, किरात, नैषध हीं पांच मोठीं संस्कृत काव्यें. ०**महातत्त्वांचीं देवस्थानें**–१ पृथ्वी=कांचीवरम ( कांची स्टेशन ). आप–जंबुकेश्वर ( श्रीरंगम् स्टेशनपासुन १२ मैल ). तेज=अरुणाचल (एम्. एस्. एम्. रेलवेच्या मलय स्टेशन नजीक). वायु=कालहस्ती (वरील रेलवेच्या रेणीगुंठा स्टेशनपासुन गुडुर रस्त्यावर). आकाश–चिदंबरम् (चेंगलपट रस्त्यावर). ०**महापातकें**–नअव ब्रह्महत्या, मद्यपान, सुवर्णचौर्य, मात्रागमन किंवा गुरुस्त्रीसंभोग व वरील चार महापातक्यांची संगत. ०**महापातकी**–वि. वरील महापातकें करणारा. ०**महाभूतें**–नअव. पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश हीं पांच.

गंध, रस, रूप, स्पर्श व शब्द हीं यांचीं अनुक्रमें सूक्ष्मरूपें होत. यांना पंचसूक्ष्मभूतें असें म्हणतात. पंचमहाभूतांचीं हीं मूलकारणें आहेत. ह्यावरून जगदुत्पत्तिविषयक ग्रंथांतून पंचभूत व पंचतन्मात्रा अशा संज्ञा ज्या येतात त्याचा अर्थ पंचमहा(सूक्ष्म)भूतें असाच होय तन्मात्र पहा. **०महायज्ञ, पंचयज्ञ**–पुअव. ब्रह्मयज्ञ (वेदाध्ययन), पितृयज्ञ (तर्पण), देवयज्ञ (होम, वैश्वदेव), भूतयज्ञ (बलि), मनुष्ययज्ञ (अतिथिसंतर्पण). भोजनाच्यापूर्वी ब्राह्मणानें नित्य करावयाचे हे पांच यज्ञ आह्निकांपैकीं होत. **०महासरोवरें**–नअव. बिंदुसरोवर (सिद्धपूर–मातृगया), नारायणसरोवर (कच्छप्रांतीं मांडवी), मानस सरोवर (हिमालयामध्यें उत्तरेस), पुष्कर (अजमीर), पंपासरोवर (एम्. एम्. एस् रेलवेच्या होसपेट स्टेशननजीक) **०महासागर**–पुअव. उत्तर, दक्षिण, हिंदी, पॅसिफिक व अटलांटिक महासागर. **०माता**–स्त्रीअव. स्वमाता, सासू, थोरली भावजय, गुरुपत्नी व राजपत्नी. **०मिसळ–मेळ**–पुस्त्री. १ पाच डाळींचें केलेलें कालवण, आमटी. २ पाचसहा प्रकारच्या डाळी किंवा धान्यें यांचें मिश्रण. ३ (ल.) एका जातीच्या पोटभेदातील झालेल्या मिश्रविवाहाची संतति, कुटुंब, जात; कोणत्याहि वेगवेगळया जातीच्या संकरापासून झालेली जात; संकरजात ४ भिन्न भिन्न पाच जातींतील लोकाचा समाज. ५ (ल.) निरनिराळया जातींचा एकत्र जुळलेला समाज. –वि. मिश्र; भेसळीचें. 'हे तांदूळ पंचमिसळ आहेत.' **०मुख**–पु. १ शंकर. 'चतुर्मुख पंचमुख। वेगे षण्मुख पातला।' –एभा ६.२५ २ सिंह **०मुखी**–वि. १ उरावर भोंवरा असून त्यांत पाच डोळे असणारा (घाडा). –मसाप २ ५५. २ पाच तोंडाचा (मारुती, महादेव, रुद्राक्ष) **०मुद्रा**–स्त्रीअव. (योग) भूचरी, खेचरी, चाचरी, अगोचरी आणि अलक्ष अशा पाच मुद्रा आहेत. 'योगी स्थिर करूनिया तेथें मन। शनै शनै साधिती पवन। पंचमुद्रांचें अतर्क्य विंदान। तें अभ्यासयोगें साधिती।' –स्वादि ९.३.६२. **०रंगी**–वि. १ पांच रंगाचें (रेशीम, नाडा इ०). २ घोतरा, अफू, इ० पांच कैफी पदार्थ घालून तयार केलेला (घोटा). **०रत्नीगीता**–स्त्री. भगवद्गीता, विष्णुसहस्रनाम, भीष्मस्तवराज, अनुस्मृति व गजेंद्रमोक्ष हे पाच अध्यात्म ग्रंथ. **०रत्नें**–नअव. सोनें, हिरा, नीळ, पाच व मोतीं किंवा सोनें, रुपें, पोवळें, मोतीं, राजावर्त (हिऱ्याची निकृष्ट जात). **०रसी**–वि. १ पाच (किंवा जास्त) धातूंच्या रसापासून तयार केलेली (वस्तु). २ तोफांचा एक प्रकार. 'पंचरशी आणि बिडी लोखंडी।' –ऐपो २२५. **०राशिक–राशि**–पुस्त्री. (गणित) बहुराशिक; दोन त्रैराशिकें एकत्र करून तीं थोडक्यांत सोडविण्याचा प्रकार; संयुक्त प्रमाणातील चार पदांपैकीं संयुक्त गुणोत्तरातील दोन पदें आणि साध्या गुणोत्तरांतील एक पद हीं दिलीं असतां साध्या गुणोत्तरांतील दुसरें पद काढण्याची रीत. **०रुखी–रूढ**–वि. साधारण; सामान्य; रायवळ; अनेक प्रकारचें; जंगली (लांकूड–सागवान, खैर, शिसवी इ० इमारतीस लागणाऱ्या पांच प्रकारच्या लांकडाशिवाय). **०लवणें**–नअव. मीठ, बांगडखार, सैंधव, बिडलोण व संचळ. **०लवी**–वि. (गो.) पंचरसी पहा. **०लोह**–न. तांबें, पितळ, जस्त, शिसें व लोखंड यांचें मिश्रण. **०वकार**–पुअव. व नें आरंभ होणारे व प्रत्येकास लागणारे पांच शब्द म्हणजे विद्या, वपु, वाचा, वस्त्र आणि विभव. 'विद्यया वपुषा वाचा वस्त्रेण विभवेन वा। वकारैः पंचभिर्हीनो नरो नाप्नोति गौरवम्।' **०वक्त्र-वदन**–पु. महादेव. 'भक्तोत्सल पंचवदन। सुंदर अति अधररदन।' –देप २००. याच्या पांच तोंडांचीं नावें:–सद्योजात, तत्पुरुष, अघोर, वामदेव आणि ईशान. **०वर्ज्यनामें**–नअव. आत्मनाम, गुरुनाम, कृपणनाम, ज्येष्ठापत्यनाम व पत्निनाम. या पांच नामांचा उच्चार करूं नये. **०विध**–वि. पांच प्रकारचें. **०विशी**–स्त्री. १ पंचवीस वर्षांचें वय. २ पंचवीस वस्तूंचा समूह. **पहिल्या पंचवीशींतलें पोरगें**–तरणाबांड **०विषय**–पुअव. (कर्ण, त्वचा, चक्षु, रसना, घ्राण या) पांच ज्ञानेंद्रियांचे अनुक्रमें पाच विषयः–शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध. **पंचवीस**–२५ संख्या; वीस आणि पाच. **०विसावा**–वि. सांख्य मताप्रमाणें मूल-प्रकृत्यादि जीं चोवीस तत्त्वें आहेत त्यांपलीकडील पंचविसावा (आत्मा). 'तूं परम दैवत तिहीं देवा। तूं पुरुष जी पंचविसावा। दिव्य तूं प्रकृतिभावा–। पैलीकडील।' –ज्ञा १०.१५०. **०शर**–पु. पंचबाण पहा. **०सार**–न. तूप, मध, तापविलेलें दूध, पिंपळी व खडीसाखर हे पदार्थ एकत्र घुसळून तयार केलेलें सार. हें विषमज्वर, हृद्रोग, श्वास, कास व क्षय याचा नाश करतें. –योर १.३५३. **०सूत्र–सूत्री**–वि. १ पांच दोऱ्याचें, धान्याचें, रेषाचें. २ सारख्या लांबीच्या पांच सुतामध्यें केलेलें, बसविलेलें (शाळुंकेसह बनविलेलें शिवलिंग). 'पंचसूत्री दिव्य लिंग करी। मणिमय शिवसह गौरी।' **०सूना**–स्त्रीअव. कांडण, दळण, चूल पेटविणें, पाणी भरणें, सारवणें यापासून जीवहिंसादि घडणारे दोष. 'पंचसूना किल्बिषें म्हणूनि। एथें वाखाणिती।' –यथादी ३.२३. **०सूक्तें**–नअव. ऋग्वेद संहितेंतील पुरुषसूक्त, देवीसूक्त, सुर्यसूक्त (सौर), पर्जन्यसूक्त व श्रीसूक्त हीं पांच सूक्तें. **०सूक्ष्मभूतें**–नअव. पंचमहाभूतें पहा. **०स्कंध**–पुअव. सौगताच्या अथवा बौद्धांच्या दर्शनाला अनुसरून मानवी ज्ञानाचे पांच भाग. म्हणजे रूप, वेदना, विज्ञान, संज्ञा व संस्कार. या शब्दाचे विषयप्रपंच, ज्ञानप्रपंच, आलयविज्ञान संतान, नामप्रपंच आणि वासनाप्रपंच ह्या अनुक्रमें पांच शब्दांनीं स्पष्टीकरण केलें आहे. **०स्नानें**–नअव. पांच स्नानें–प्रातः–संगव–माध्यान्ह–अपराण्ह–सायंस्नान. **०हत्यारी**–वि. १ ढाल, तरवार, तीरकमान, बंदूक, भाला किंवा पेशकबज या पांच हत्यारांनीं

युक्त. २ चार पाय व तोंड याचा शस्त्राप्रमाणें उपयोग करणारें (जनावर–सिंह, वाघ इ०). ३ (ल ) हुशार; योग्य; समर्थ; संपन्न; सिद्ध असा (मनुष्य). ४ (व्यंग्यार्थी) शेंदाडशिपाई; तिसमारखान. ०**हत्त्या**–स्त्रीअव. ब्रह्महत्त्या, भ्रूणहत्त्या, बालहत्त्या, गोहत्त्या व स्त्रीहत्त्या. **पंचाग्नि–ग्नी**–पुअव. १ चारी दिशाना चार पेटविलेले व डोक्यावरील तप्त असा सूर्य मिळून पांच अग्नी. 'पंचाग्नी गोरांजनें। जें प्राप्त नव्हे।' –दा ५ ६ २९. २ शरीरांतील पांच अग्नी ३ –वि. पांच श्रौताग्नी धारण करणारा गृहस्थाश्रमी ब्राह्मण. हे पांच अग्नी–दक्षिणाग्नि, गार्हपत्य, आहवनीय, सभ्य व आवसथ्य हे होत. –**ग्नि साधन**–न चारी दिशांनां चार कुंडें पेटवून दिवसभर उन्हांत बसणें. हा तपश्चर्येचा एक प्रकार आहे याला पंचाग्निसेवन, धूम्रपान असेंहि म्हणतात. 'चोहींकडे ज्वलन पेटवुनी दुपारीं। माथ्यावरी तपतसे जंव सूर्य भारी। बैसोनिया मुनि सुतीक्ष्ण म्हणोनि हा कीं। पंचाग्निसाधन करी अबले विलोकी।' **पंचादुयी–दिवी–दुवी–देवी**–स्त्री पंचद्वयी पहा. [अप] **पंचादेवी**–स्त्री. शेताच्या उत्पन्नाचे ५ वाटे करून ज्याचे बैल असतील त्याला ३ व दुसऱ्याला (मालकाला) २ वाटे देण्याची रीत **पंचानन**–पु. १ शंकर. २ (सामा) पाच तोंडांची किंवा बाजूंची वस्तु. ३ सिंह. **पंचामृत**–न. १ दूध, दहीं, तूप, मध आणि साखर या पांचांचें मिश्रण यानीं देवाच्या मूर्तीला स्नान घालतात 'पय दधि आणि घृत। मधु शर्करा गुड संयुक्त। मूर्ति न्हाणोनि पंचामृतें। अभिषेक करिती मग तेव्हा।' २ शेंगदाणे, मिरच्या, चिंच, गूळ, खोबऱ्याचे तुकडे इ० पदार्थ एकत्र शिजवून त्यास तेलाची फोडणी देऊन केलेला पदार्थ ३ एक पक्वान्न, मिष्टान्न. [सं.] **म्ह०** १ जेवावयास पंचामृत आंचवावयास खारे पाणी २ पंचामृत खाई त्यास देव देई. ०**मृत सोडणें**–(बायकी) चातुर्मासातील पहिल्या महिन्यात दूध, दुसऱ्यात दहीं, तिसऱ्यांत तूप, चौथ्यात मध व पाचव्यांत (अधिकांत) साखर किंवा पाचवा (अधिक) नसल्यास चौथ्यांतच मध व साखर यानीं युक्त असे पदार्थ न खाणें. ०**मृतानें–पंचामृतें न्हाणणें**–पंचामृताच्या पदार्थांनीं देवास स्नान घालणें. **पंचायतन**–न. १ शिव, विष्णु, सूर्य, गणपति व देवी या पांच देवता व त्यांचा समुदाय. या पांच देवतांपैकी प्रत्येक देवतेस प्राधान्य देऊन शिव, विष्णु, गणपति इ० चीं पांच पंचायतनें मानण्याचीहि पद्धत आहे. (गो.) पंचिष्ट २ (ल.) एकचित्त असलेले पांच जण. ३ पंचमहाभूतांचें स्थान; शरीर. 'तें अधिदैव जाणावें। पंचायतनीचें।' –ज्ञा ८.३६. **पंचारती, पंचारत**–स्त्री. १ तबकांत पांच दिवे ठेवून आरती ओवाळणें. २ आरती करिता लावलेले पांच दिवे. ३ असे दिवे ठेवण्याचें पात्र. **पंचाक्षरी**–वि. पंचाक्षरीमंत्र म्हणणारा व अंगांतील भूतपिशाच्च काढणारा; देवऋषी. 'पंचाक्षरी काढिती समंध।' ०**क्षरीकर्म**–न. पंचाक्षरीमंत्र म्हणून अंगांतील भूत काढणें. ०**क्षरीमंत्र**–पु १ भूतपिशाच्च काढून टाकण्याचा पांच अक्षरांचा मंत्र २ ॐनम शिवाय हा मंत्र **पंचास्त्र**–न पंचकोण. –वि पंचकोणी. [सं] **पंचाळ**–स्त्री (विणकाम) १ पांच पंचाकरितां लावलेला ताणा. २ एक शिवी. –वि १ फार तोंडाळ, बडबड करणारी (स्त्री) **पंचीकरण**–न १ पाच महाभूतापैकीं प्रत्येकाचा कमीजास्त भाग घेऊन त्या सर्वांच्या मिश्रणानें नवा पदार्थ तयार होणें. –गीर १८१. २ आकाशादि पंचभूतें, त्याचे देहादिकांच्या उत्पत्तीसाठीं ईश्वरशक्तीनें झालेलें परस्पर संमिश्रण तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ हा देह किंवा विश्व हें पंचमहाभूतात्मक कसें आहे याचें विवरण करणारा ग्रंथ **पंचीकृत**–वि पाच मूलतत्त्वें एकत्र झालेली (स्थिती) **पंचेचाळ–चाळीस–ताळ–ताळीस**–वि. चाळीसामध्यें पाच मिळवून झालेली संख्या; ४५ **पंचेंद्रिय**–नअव. पाच इंद्रियें डोळे, कान, नाक, जिव्हा व त्वचा याचीं कामें अनुक्रमें–पहाणें, ऐकणें, वास घेणें, चव घेणें व स्पर्श करणें. **पंचोतरा**–पु १ दरमहा दरशेकडा पाच टक्के व्याजाचा दर २ शेकडा पाच प्रमाणें द्यावयाचा कर. ३ सरकारसारा वसूल करताना पाच टक्के अधिक वसूल करण्याचा हक्क ४ सरकाराकरिता शंभर बिघे किंवा एकर जमीन लागवडीखालीं आणली असतां पाटलाला पाच बिघे किंवा एकर सारामाफीनें द्यावयाची जमीन **पंचोतरा, पंचोतरी**–पुस्त्री. गवताच्या शंभर पेंढया किंवा आंबे विकत देतांना पाच अधिक देणें **पंचोपचार**–पुअव. गंध, पुष्प, धूप, दीप व नैवेद्य या वस्तू व त्या देवाला समर्पण करणें **पंचोपप्राण**–पुअव नाग, कूर्म, कृकल, देवदत्त व धनंजय हे पाच उपप्राण कूर्म अर्थ ३ पहा **पंचोपाख्यानी**–वि १ (पांच प्रकरणाचें पंचोपाख्यान नावाचा विष्णुशर्म्याचा नीतिपर एक ग्रंथ आहे त्यावरून) अनेक कथा, संदर्भ, उदाहरण, दृष्टांत इ० नीं परिपूर्ण २ कल्पित; विलक्षण; अद्भुत ३ अभद्र, शिवराळ (स्त्रिया संबंधीं योजितात) **पंच्यापेशी–पंच्याशी**–वि. ८५ संख्या **पंच्याणव**–वि ९५ संख्या. **पंच्याहत्तर**–वि ७५ संख्या

**पचक**—न. (गो.) १ कुडयाच्या मुळाचें एक औषध. २ दारूचा एक प्रकार. [पाचक]

**पंचक**—न. १ पांचांचा समुदाय. २ धनिष्ठा नक्षत्राच्या उत्तरार्धापासून अश्विनीच्या पूर्वार्धापर्यंतचीं पांच नक्षत्रें. हीं मरणकालीं आल्यास निषिद्ध मानितात. ३ कांहीं विशिष्ट संख्या. विवक्षित लग्नसंख्येंत गत चांद्रतिथींची संख्या मिळवून त्या बेरजेला नवांनीं भागावें व १, २, ४, ६, किंवा ८ बाकी आल्यास तो पंचक होय. या पंचकास निरनिराळीं नांवें असून हे अशुभ मानितात. ४ मढेपंचक पहा. **पंचकडी**–स्त्री. (कागद, पेंढया, रुपये इ०). पांचांचा समुदाय पंचक अर्थ १ पहा.

**पच-कन-कर- दिनीं- दिशीं**—क्रिवि. थुंकतांना, दोरी तोडतांना, झुडूप खुडतांना, चिखलांतून चालतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. [ ध्व. ]

**पचकरणें**—सक्रि. धरणें; ( विशेषतः साखर वगैरेची ) चुचकुली भरणें. [ पंजा · पंचा=हाताचा पंजा ]

**पचकवणी, पंचकपाणी**—स्त्री. ( गो. ) फार पाणी घातल्यानें बेचव लागणारी कढी. [ पचक+पाणी ]

**पचकळ**—वि. १ नि.सत्त्व; बेचव; ढप्पळ २(ल ) अभद्र;हलकें; बिन ताळतंत्राचें; असभ्य; मूर्खपणाचें (भाषण, कृत्य, माणूस. [पच्]

**पचकों**—वि. ( गो. ) नि.सत्त्व; बेचव. [ पचक ]

**पचकापूर**—वि. ( गो. ) अपूर्व

**पचकी**—स्त्री. दमडीच्या किंमतीचें एक तांब्याचें नाणें.

**पचंग-गी**—नस्त्री. १ पासोडी, कांबळें इ० वस्त्र मानेपासून कमरेपर्यंत पोट, पाठ झाकेल असें गुंडाळून गळयामागें गांठ देण्याचा प्रकार. ( क्रि० घालणें; बांधणें ). २ धोतराची कांस. ( क्रि० कसणें; घालणें ). [ पांच+अंग ] ०**बांधणें**-(ल.) कार्यास सिद्ध, बद्धपरिकार होणें. 'ऐकोनी संज्ञा भाऊनीं। पचंग बांधिला म्हातारपणीं।' -अफला ४.१७. 'पचंग बांधुनि तयार व्हा रे।' -मराठी २ रें पुस्तक.

**पॅचचॅं**—अक्रि. ( गो. ) फुटणें. [ ध्व. ]

**पचडें-डी**—नस्त्री. ( बे. ) हिरवी मेथी, दहीं व हरभऱ्याची डाळ यांची कोशिंबीर.

**पचणी**—स्त्री. १ जिरणी; पचणें. २ मानवणें; पोटास किंवा कोठयास सोसणें ( अन्न, औषध इ० ); अपकार न होणें.[ पचणें ] ०**स पडणें**-असाध्य रोगानें खितपणें. [ सं. पच् ]

**पचणें**—सक्रि. १ जिरणें; जठराग्नीनें भक्षिलेल्या पदार्थाचा परिणाम, परिपाक होणें. २ (ल. ) निस्तरावयास न पडेल असें करणें; साफ जिरवून टाकणें ( हरामखोरी इ० ); उमगण्याची, शिक्षा होण्याची मुळींच भीति न राहील अशा रीतीनें उपभोग घेऊन व्यवस्था लागणें; पश्चात्ताप किंवा मनास हुरहुर न लागतां गिळंकृत होणें. ३ भाकर, पोळी इ० भाजली जाणें; शिजणें; उकडणें. ४ (ल. ) दुखणें वगैरेंत फार दिवस क्लेश पावणें; रखडत पडणें; खितपणें. [ सं. पच्=शिजणें ] **म्ह०** पचेल तितकें खावें शोभेल तितकें बोलावें.

**पंचत्व**—न. १ मृत्यु; मरण; देहांतील पांच तत्त्वें निरनिराळीं होणें. 'किं पंचत्व पावला तोही। तुझेनि विरहें।' -भाए १५१. २ पांचांचें अस्तित्व. [ पंच+त्व ]

**पचन**—न. १ जिरणी; पचणें अर्थ १ पहा. परिपाक. २ शिजणें; पिकणें; परिपक्व होणें. [सं.] **पचनीं पडणें**-१ मानवणें; उपद्रव न होतां पोटांत जिरणें. २ लाभणें; आत्मसात् होणें.

**पचपच**—स्त्री. १ चिखलांतून चालतांना होणारा आवाज इ० २ -पु. ( गो. ) अर्थशून्य भाषण. [ ध्व. ]

**पचपच-पचां**—क्रिवि. पचकन पहा; त्या शब्दांत सांगितलेल्या क्रिया वारंवार होणें. [ ध्व. ]

**पचपचीत**—वि. १ पाणचट; बेचव; बरबरीत; कवकवीत (फळें भाजी). यावरून. २ (ल.) मळमळीत; फिक्का; निर्जीव; पुळपुळीत; नीरस; भेदरट ( भाषण, गाणें ); कमकुवत; बेहिंमती; मेणचट; उत्साहशून्य ( काम ).

**पचेबा**—पु. १ एखाद्या प्रसिद्ध शाहीराच्या समाधीपाशीं दर श्रावणी सोमवारीं जमून शाहीर लोक जी गाण्याची हजेरी देतात ती. २ ( कर. वांई. ) ( ल. ) फजीती; दुर्यो; टर.

**पंचम**—वि.पांचवा. **पंचम-पंचमस्वन-स्वर-आलाप**-पुन. १ ( संगीत ) स्वरमालेंतील (सात स्वरांपैकीं) पांचवा स्वर; प. -एभा ५.५५५. 'कोकिळा आळविती पंचमस्वर। विपिन तें सुवासित मनोहर।' -ह १०.१६७. 'पंचमस्वनीं या गाती कोकिळा।' -शापसंभ्रम. २ एक राग. याचे तीन प्रकार आहेत. प्रकार १ ला-यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी कोमल मध्यम, संवादी षड्ज. गानसमय रात्रीचा चौथा प्रहर. प्रकार २ रा-यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, तीव्र मध्यम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति षाडव-षाडव. वादी कोमल मध्यम. संवादी षड्ज. गानसमय रात्रीचा चवथा प्रहर. प्रकार ३ रा-यांत षड्ज, तीव्र गांधार, कोमल मध्यम, तीव्र मध्यम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति औडुव-औडुव. वादी कोमल मध्यम. संवादी षड्ज. गानसमय रात्रीचा चवथा प्रहर. ३ ( ल. ) खाण्याची तंबाकू. ४ श्रावक ( वाणी ) जातींतील एक भेद. दुसरा भेद चतुर. ५ वीणा वाद्याची पहिली तार. हिच्यांतून पंचम स्वर निघतो. शेजारच्या दोन तारांना जोड व चवथ्या पितळेच्या तारेला घोर म्हणतात. या चवथींतून खर्ज स्वर निघतो. ६ (ल) दुर्लौकिक; अपकीर्ति. ( क्रि० करणें ). ७ मद्रासकडील एक अस्पृश्य वर्ग. **पंचमसाळी**-पु. लिंगाईत जातींतील एक भेद. बाकीचे भेद चिलवंत शब्दामध्यें पहा.

**पचमणें**—अक्रि. ( कों. ) थांबणें; मोडणें; व्यर्थ होणें; ठार होणें, पालथा पडणें ( धंदा ).

**पंचमी**—स्त्री. १ चैत्रादि महिन्यांच्या शुक्ल किंवा कृष्ण पक्षांतील पांचवी तिथि. २ ( व्याकरण ) पांचवी विभक्ति. [ सं. ] ०**पूजन**-न. पांचवी पहा.

**पचमान**—वि. ( प्र. ) पच्यमान. शिजत, तयार होत, पिकत परिपक्व होत असलेला. [ सं. पच्यमान ]

**पचर**—न. (गो.) आंबट आंबा.

**पचरट**—वि. १ घाणेरडा; वाईट वासाचा (विशेषतः मूत्राच्या). २ पचकळ (-वि.) पहा. [पच्] ०**वास, पचरटाण** –पुस्त्री. वाईट घाण (विशेषतः मूत्राची). [पचरट+घाण]

**पच(चु)रणें**—अक्रि. शरीरावरील नायटा, व्रण इ० पसरणें, चरणें. [सं. प्र+चर्, प्रसर]

**पचविणें**—सक्रि. १ जिरविणें; पचन करणें. २ शिजविणें. 'पचवूनि घाली मज आतां।' –शिली १४ १२९. [सं. पच्= शिजविणें]

**पंचा**—पु. १ हात-सव्वा हात रुंद व पांच-सहा हात लांब असें नेसावयाचें लहान धोतर. (क्रि० नेसणें). २ (राजा.) हाताचा पंजा. [सं. पंच=पांच] **पंचेजोडी**–स्त्री. दोन पंचे; धोतराप्रमाणें नेसावयाचें दुपट्टी वस्त्र. (क्रि० नेसणें).

**पंचाई**—पु. (व.) लोहार; घिसाडी. [पांचाल]

**पचांग**—न. पचंग-गी पहा.

**पंचाँग, पचाग**—पु (कों.) दीर्घोद्योग; भगीरथ प्रयत्न. [पंच+अंग]

**पंचांग**—न. १ तिथि, वार, नक्षत्र, योग व करण ज्यांत दिलेलीं असतात असें पत्रक. २ जप, होम, तर्पण, अभिषेक व ब्राह्मणभोजन अशीं उपासनेचीं पांच अंगें. ३ पांच भाग-अंगें अथवा वस्तूंचा समुदाय. ४ हात पसरून, गुडघे व डोकें लववून आणि भाषणानें व दृष्टीनें पूज्यबुद्धि दाखविण्याचा प्रकार. ५ (वैद्यक) एकाच झाडाचीं पानें, फळें, मुळें, फुलें आणि साल. –योर १.१७३. –वि. पांच अंगें, भाग, अवयव, विषय ज्याला आहेत असा [सं.] ०**शुद्धि**–स्त्री. शुभ कार्याला तिथि, वार, इ० पंचांगांतील योगांची अनुकूलता. ०**श्रवण**–न. वर्षप्रतिपदेच्या दिवशीं किंवा रोज पंचांग ऐकणें.

**पचांगी**—स्त्री. (कु) बोचकें.

**पंचागी**—पु. (तंजा.) तेलगु जातीचा पुरोहित. [पंचांग]

**पंचांगुळें**—नअव. लहान मुलाच्या हातांतील एक दागिना; पांच बोटांत घालावयाच्या पांच आंगठ्या साखळ्यांनीं जोडून मनगटास बांधण्याचा दागिना. **पंचांगुळ**–वि. पांच बोटें मापाचा.

**पचाचां-पचापच-पचां**—क्रिवि पचपच-पचां पहा. [ध्व. पच]

**पचाण**—न. (बे.) जोगली. [का.]

**पंचानन**—पु. १ सिंह; वाघ. 'जों वरि तों वरि जंबुक करी गर्जना। जंव त्या पंचानना देखिलें नाहीं।' –तुगा ३२३८. २ अत्यंत रागीट माणूस. पंच पहा. [पंच=विस्तृत+आनन]

**पचापच**—क्रिवि. (गो.) निर्दयपणें.

**पंचारणें**—अक्रि. पांच वर्षांचा होणें (घोडा).

**पचाल-ळ**—वि. पागल. पचकळ पहा.

**पंचाळ**—पु. सोनार, सुतार, लोहार, कासार व पाथरवट या पांच जाती (हे जानवीं घालतात). पंच पहा.

**पंचाळणें**—अक्रि. बारगळणें; बाष्कळणें; चौढाळ-बेढंग-अव्यवस्थितपणें (हलक्या समाजांत मिसळल्यामुळें) भरकटणें, बाष्कळ बनणें. [पंचाळ]

**पचाळी**—स्त्री. (व.) फजीति; पच्ची. [पच्ची]

**पंचिका**—स्त्री. पांचाचा समुदाय. ऋग्वेदाच्या ऐतरेय ब्राह्मणाच्या आठ भागांपैकीं प्रत्येकास संज्ञा या प्रत्येक पंचिकेंत पाच अध्याय असतात. [सं.]

**पची**—पु. (कु.) पाच किंवा सात दगड किंवा गोट्याचा लहान मुलांचा एक खेळ. [सं पंचिका]

**पंची**—स्त्री. विस्तृत भाषण. [सं पंचिका]

**पंची, पंछी**—पु पक्षी (विशेषतः पोपट) –वि. (ल.) चतुर. 'अहो पंछी मुशाफर तुम्ही कोटिल रहिवासी।' –प्रला १९१. [सं. पक्षिन्=पंछि] **पंचीप्यारा**–वि. प्रिय; प्रियकर. 'तो पंचीप्यारा चिरिला।' –संग्रामगीतें ७८.

**पंचू**—पु. पक्षी. –वि. चतुर; कुशल. 'धरि सुदृढ जया तो काय सोडील पंचू।' –र १०. [सं. पक्षिन्]

**पचे ढाँग, पच्याल**—न. (कु.) अजागळ माणूस.

**पच्ची**—स्त्री. रेशीम न दिसेल असें गुंडाळलेलें जरतार. –क्रिवि. घट्ट; गच्च; सुरक्षित; पक्केपणें. (क्रि० बांधणें; जोडणें, जुळविणें; करणें). ०**करणें**–आपलें पूर्ण वर्चस्व किंवा कौशल्य दाखवून एखाद्याला मारणें, जिंकणें अथवा एखादें काम उरकणें; पुरें करणें. ०**काम**–न. जडाव काम. (बडोदें) बुरुजी काम; सोन्याचे किंवा चांदीचे बंद अगर खुले घाटांत नखवजा तीळ घालून रत्न बसविण्याचें काम –जनि ७. **पच्चीगर-पंचीगर**–पु. जडाव काम करणारा सोनार.

**पच्ची**—स्त्री. फजीति; दुर्दशा; हुर्रेवडी; हुर्यो; टर; पाणउतारा; उपहास; दपटून पूर्णपणें आपल्या कह्यांत आणणें; निष्प्रभ करणें. (क्रि० करणें; उडविणें). [सं. अपश्री=सौंदर्यनाश; हिं. पच्ची]

**छाडणी**—स्त्री. १ (मल्लविद्या) चीतपट; झापटणी. २ (वाद इ० मध्यें) पराभव; कुंठित करणें. ३ धरणें; झपाटणी (भूत इ०ची). [सं. प्रच्छाद्; हिं. पछाडना] **पछाडणें**–उक्रि. १ (मल्लविद्या) खालीं पाडणें; चीतपट करणें; जमीनीवर आदळणें; आपटणें. २ (ल.) वादविवादांत जिंकणें; पराभूत करणें; कुंठित, निरुत्तर करणें. ३ भाषणांत किंवा वर्तनांत पकडणें; धरणें. ४ तापानें; भुतानें, त्रासानें, दैवानें झपाटणें; पिच्छा पुरविणें; गांठणें किंवा जेरीस आणणें; (बहुशः) धरणें, पकडणें.

**पंछी**—पु पंची पहा

**पंज**—वि १ पांच ५ संख्या २ पाच वर्षांचा (घोडा) [सं पंच, फा पंज]

**पंज**—पु झाळण्याच्या, डांक बसविण्याच्या कामीं उपयोगी पडणारी एक पूड

**पंज**—स्त्री. (गो) पेज, पेय

**पंजट, पंजर(रू)ट, पंजरा**—नक्षीअव अर्धवट भरलेले, पोचट किंवा रोग पडल्यानें लहान झालेले धान्याचे दाणे.

**पंजडी**—स्त्री. फाशावरील पाचाचें दान (क्रि० टाकणे). [सं पंच]

**.पंजम**—न (पांचव्या प्रतीची) रेशमाची एक हलकी जात. –मुव्या ९६

**पंजर**—पु १ पिंजरा. 'हिरे जडित सुंदरी कनक पंजरींहि वसे।' –अन्योक्तिकलाप. २ (ल.) पिंजऱ्याप्रमाणें उरलेला नुसता हाडांचा सांपळा, सागाडा (माणूस, पशु इ० चा). 'झुर्झुरों पंजर होऊन झिजे।' –दा ३ ८ २६. ३ छाती, ऊर, वक्ष स्थल. [सं.]

**पंजरी**—स्त्री. सुंठ, धने, ओंवा, मिरें (खोबरें) व साखर याचा सुंठवडा. हा रामनवमी, गोकुळअष्टमी इ० उत्सवांत वाटतात. [सं. पंच; हिं]

**पंजा**—पु १ पाच ठिपक्यांचें गंजीफाचें, पत्त्याचें पान; फाशावरील पांच चिन्हें किंवा फाशांनीं पडणारा पाचाचा डाव. २ पसरलेला, उघडलेला हात, ५ बोटें व तळहात ३ वाघ, मांजर इ०चें पाऊल, वानराचा हात; पांच पवित्र पुरुष दर्शविणारा मुसलमान लोकाचा एक लोखंडाचा केलेला हात ऊर्फ पंजतन पाक (हजरत अली याचाहि हा पंजा समजतात व तो मोहरमचे दिवसांत मिरवितात); गोसाव्याचें पंज्याच्या आकाराचें एक उपकरण. ४ हातमोजा; अंगुलित्राण. ५ (ल.) चपेटा, थप्पड. [सं. पंच; फा. पंजा]

**पंजा**—पु (अशिष्ट) पणजा; प्रपितामह. [सं. प्रार्य]

**पंजादुई-धी, पंजादिवी-देवी**—स्त्री. पंचद्वयी पहा.

**पंजाबी**—वि १ पंजाब देशाचा २ (ल.) धूर्त; लुच्चा; हुशार. 'पंजाबी फसाऊ पाणी येथिल दिसतें।' –प्रला १९३. [फा.] **०ताल**-पु सोळा मात्रा व चार विभागांचा एक ताल. **०सालंमिश्री**-स्त्री. मोठी सालंमिश्री: लहान जातीच्या मिश्रीस लसणी सालंमिश्री म्हणतात.

**पंजामंजा**—पु. कलगी व तुऱ्यावरील गाणीं, लावण्या. कलगी व तुरा हे शब्द पहा. **पंजेवाला**-पंजा गाणारा: याच्या विरुद्ध दुसरा मंजेवाला=मंजा गाणारा.

**पंजारणें**—अक्रि पांच वर्षांचा होणें (घोडा); घोडीनें वयांत येणें. [सं. पंच्]

**पजावा**—न. (व.) विटाची भट्टी. 'विटाचा पजावा या गांवीं नाहीं.' [सं पच्. हिं]

**पंजी, पंजोळ**—पणजी, पणजोळ पहा. [सं. प्रार्यिका–पज्जिआ–पंजी, प्रार्यालय–पज्जाल–पणजोळ]

**पंजो**—पु. (कु.) नेसण्याचा पंचा

**पट**—पुस्त्री १ बुद्धिबळें किंवा सोंगट्या खेळण्याचें, घरें पाडून तयार केलेलें एक वस्त्र. २ (बडोदें) नांवांचें पत्रक, यादी रिकार्ड; फेरिस्तपत्रक; विशेष गोष्टींच्या नोंदणीचें लिखाण; नियम किंवा चालीरीती दर्शविणारी यादी किंवा लेख, तक्ता, कोठा 'नोकर लोकांचे पगार खाजगीच्या पगारपटांतून मिळत असतात.' –चिमा २ ३ (ज्यो) संक्रांतिपट (सूर्य कोणत्या राशीला केव्हां जाणार इ० ज्यात लिहिलें असतें तो), ग्रहणपट (ग्रहणाविषयीं माहिती असलेला), लग्नपट, मुहूर्तपट इ०, अनेक कागद एकाखालीं एक चिकटवून ज्यावर नाना प्रकारचीं चित्रें काढिलेलीं असतात अशी गुंडाळी. ४ कापड, वस्त्र. 'त्यात मेरेनचि शिरता काटयावरि घालितां चिरे पट कीं।' –मोविराट ३ ४१. ५ जमीनीची अतिशय मोठी वरंघळ; उतरण. ६ पडदा. 'ऐसें वदोनि राघव तीव्र शरांचा क्षणें करूनि पट।' –मोमंत्ररामायण युद्ध ६८८. ७ (व.) बैलगाडयांची शर्यत; शंकरपट (क्रि० खेदणें). ८ पाट; फळी. ९ राजाची गादी; सिंहासन. 'जो दमनशील जगजेठी। अकरांचीही नळी निमटी। तो निजसुखाचें साम्राज्यपटीं। बैसे उठाउठीं तत्काळ।' –एभा १४ १०४. १० गांवचें जमाबंदी किंवा शेतसारा–यांचें पत्रक ११ स्थान; ठिकाण 'लाऊनि बैसवी पटीं। मोक्षश्रियेच्या।' –ज्ञा ९ ४६ –न. दोन, तीन फळ्यांच्या, घडी घालतां येण्यासारख्या झडपाच्या फळ्यापैकीं एक फळी, भाग. [सं. पट्ट] **०कर**-न पटकूर; फटकूर. **०का**-पु. १ वीतभर रुंदीचें व ५।४ हात लांबीचें कमरेस बांधावयाचें कापड, कांचा, कमरपट्टा. २ डोईस बांधावयाचा ८ ते १५ हात लांबीचा फेटा. **०कुडॉ**-पु (गो.) पापुद्रा **०कूर-कुरें-कूळ**-न. (निंदार्थी) एकेरी पन्ह्याची घोंगडी किंवा वस्त्र 'टाकलें पटकूर निजलें थटकूर' फटकूर पहा. [सं पट्टकुल] **०खळणें**-सक्रि (महानु;) आच्छादणें; पांघरूण घालणें. धवळे, उत्तरार्ध ६. **०चीर**-न. वस्त्र; पताका; ध्वज. 'टके पटचिरें। तळपती रुचिरें।' –आसु·१३. **०ल-ळ**-न. १ आच्छादन, पडदा; आवरण; आवरणत्वचा. 'प्रथमचि पार्थशराच्या पटळें तम दाट दाटलें होतें।' –मोकर्ण १९.३३ २ नेत्रावरील त्वचा. ३ डोळ्यावर रोगानें आलेला दृष्टिबंधक पडदा, सारा इ०. ४ (ल.) बुद्धीवर असलेलें आवरण, आच्छादन. जसें–'मोह–माया–अज्ञान–द्वैत–पटल.' 'झाला व्याकुळ दुर्मति आपुलियाचि भ्रमाचिया पटलें।' –मोसभा ३.३. ५ (सं. समुदाय, राशी, ढीग यावरून) ढग, समूह; राशी; लोट (धूळ,

धूर यांचा ) ६ फळी ७ पापुद्रा **पटांतर**-वि. परोक्ष; प्रत्यक्ष नव्हे असें. 'आरकिजती पटातरीं।' -ज्ञा १६.४२८. **पटाधिकार**-पु पटाचा अधिकार, मूळच्या कामावरील, वेणगीवरील अधिकार, अधिकारपत्र; हक्क किंवा अधिकार धारण करणें किंवा असणें. [ पट+अधिकार ] **पटाधिकारी**-वि. हा अधिकार धारण करणारा किंवा असणारा.

**पट**—पु (गो.) १ चऱ्हाट २ यादी.

**पट**—वि. तोंड खालीं असलेलें, पालथें (पैसा, कवडी). याच्या उलट चीत=उताणा ०**काढणें**-(मल्लविद्या) प्रतिस्पर्ध्याचा पाय ओढून त्यास उताणा पाडणें. ०**कोडगें**-न. निजविलें असता चटकन उठून बसणारें बाहुलें ०**घुसणें**-(व) (मल्लविद्या) माडयात घुसणें.

**पट**—स्त्री. संख्यावाचक शब्दास हा शब्द जोडला असतां त्या संख्येची तितकी आवृत्ति दर्शविली जाते जसें-धान्याची दहापट झाली. -अ. संख्यावाचक शब्दापुढें आणि क्रियाविशेषणापुढें येणारा आवृत्तिदर्शक प्रत्यय, जसें-दुप्पट, पांचपट, कितीपट, जितकेपट. [ सं. प्रति ] **पटीचें गुणोत्तर**-न. हिश्याच्या गुणोत्तराची उलटापालट केली असतां निघणारें गुणोत्तर.

**पट**—पु संयुक्त किंवा एकत्रित असलेला समूह

**पॅट**—स्त्री. १ (गो.) पेटी. २ बत्ती. [ पेटी ]

**पट(टा)ई**—स्त्री. पाटणी; पाटणी करणें, कडीपाट; तक्तपोशी; घराचा मजला चढवितांना जमीन तयार करण्यासाठीं तुळयावर एकास एक लावून घालावयाच्या फळया किंवा त्यांची जोडणी. [ सं पट, हिं. ]

**पटकणें**—सक्रि. जोरानें हापटणें; आदळणें; खालीं टाकणें; मारणें; फेकणें; पाडणें. 'पाऊलें पटकती।' -राला ३ [ ध्व. हिं. पटकना ]

**पट-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. १ वस्तु वरून खालीं पडली असतां होणाऱ्या पट या आवाजासारखा आवाज होऊन २ अतिशय थोडक्या काळांत. चटकन् 'पटकन-ये-जा-बोल.' त्वरेनें; झटकन; ताडदिशीं; झटपट [ ध्व पट! ]

**पटका**—पु मोठा नाश; गळती (सांथीनें माणसें व गुरें यांची, वादळानें फळांची इ०). (क्रि० लागणें)

**पटका**—पु फेटा

**पटकावणी**—स्त्री. चटदिशीं पकडणें; पकडणी; झडपणी; मटकावणी; पकडींत धरणें

**पटकाविणें**—सक्रि. १ चटकन धरणें; वेगानें एखाद्याच्या अंगावर तुटून पडणें; झडप घालणें; झपाट्यांत पकडणें; युक्तीनें धरणें (पळण्याच्या बेतांत असलेल्या किंवा भाषणांत चुकत असलेल्या माणसास; दुर्मिळ मौल्यवान पदार्थास ); एकाएकीं पकडणें, धरणें, मटकावणें, झटदिशीं ताब्यांत घेणें २ (व) खाऊन टाकणें. ३ साधारणतः लवकर व अनायासें एखाद्या वस्तूची प्राप्ति करून घेणें. 'आज त्यां १० रु पटकाविले' ४ (ल.) गिळंकृत करणें; खाणें (पैसा इ०)

**पटकी**—स्त्री. १ सांथीचा रोग, विशेषत महामारी, मरी; वाखा; जरीमरी, कॉलरा. २ मोठ्या प्रमाणात (माणसें, जनावरें) मरणें. ३ लागोपाठ, एकामागून एक फळें किंवा घरें पडणें (क्रि० लागणें, येणें, होणें).

**पटकी**—स्त्री आपटण्याची क्रिया [ ध्व पट ] ०**खाणें-बसणें**-१ मोठा तडाखा बसणें, चागली अद्दल घडणें (एखाद्या मूर्खपणाच्या कृत्यानें) २ अपथ्य केल्यानें मोठें दुखणें प्राप्त होणें. ०**दाखविणें-देणें-लावणें**-फसविणें, हुलकाविणें. झकविणें. [ ध्व पट ]

**पटकूळ**—स्त्री एक रानटी फुलझाड पेटकुळी, वकाळी.

**पटकोडगा**—वि. पक्का निलाजरा; निगरगट्ट [ पट+कोडगा ]

**पटखळणी, पटखेणी**—स्त्री (गो.) धातूचा रस ओतण्याचें सोनाराचें खोबणीसारखें एक साधन.

**पटंगण**—न. पटांगण पहा.

**पटंगा**—पु आश्रय -शर (तुगा २९९६).

**पटडी**—स्त्री. (व.) शैली; पठडी; पध्दत. 'बोवाची कीर्तनाची पटडी चांगली आहे.' [ पठाडी ]

**पटण-णी, पटनी**—स्त्री. (कों) तादुळाची एक जात; याचे पुष्कळ प्रकार आहेत. उदा० वरंगळ इ०

**पटणें**—अक्रि १ स्वीकारलें किंवा मानलें जाणें, मान्य होणें (हुंडी) २ चालणें; निर्दोष म्हणून स्वीकृत होणें (रुपये, पैका) 'तुम्ही रुपये पाठविल्याप्रमाणें दुकानीं पटले' ३ जुळणें; मनास येणें; पसंत पडणें (नोकर, विक्रीची वस्तु). 'धोत्रजोडे पटतील तितके ठेवा बाकीचे आमचेकडे पाठवून द्या.' 'तुम्ही माणूस पाठविला तो चाकरीवर पटत नाहीं' ४ खरी ठरणें, घडून येणें, अनुभवास येणें (वार्ता, बातमी, अटकळ, भविष्य). 'तुम्ही या ज्वराचें कारण तक्रपान म्हणून सांगितलें तें पटलें, का कीं काल मी तक्रपान केलें होतें खरें' ५ खऱ्या गोष्टीशीं जुळणें; मेळ बसणें (पुरावा, साक्ष याचा) ६ चांगली विक्री होणें 'जिन्नस पटला=चांगली विक्री झाली.' ७ चांगलें होणें; उत्तम प्रकारें किंवा मनाजोगें होणें. 'काम पटलें' ८ (सामा) मान्य, कबूल होणें. [ सं. पतन; हिं. पटना ]

**पटणें**—अक्रि (क) गांठविलें जाणें; ओंवून घट्ट बसणें (रत्नें, मणी इ० तार किंवा दोरा यांत). [ स पट्ट ]

**पॅटणें**—न. (गो.) ओली माती, जमीन चोपण्याचें साधन; चोपणी. [ पिटणें ]

**पटदीपिकी**—पु (संगीत) एक राग यात षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यय, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत ऋषभ व धैवत वर्ज्य. जाति औडुव-संपूर्ण. वादी षड्ज. संवादी पंचम गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर.

**पटपट-पटां**—क्रिवि. १ एकामागून एक होणाऱ्या त्वरेच्या पटपट या शब्दाचें अनुकरण होऊन; पाण्याचे ठिपके किंवा हलक्या आणि कठिण वस्तू पडतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन.' रागे भरतांच डोळ्यावाटे पटपट टिपें गळूं लागलीं.' २ झटझट, चटपट; तडकाफडकीं. ' चार कामें पटपट करून टाकावीं आणि मग स्वस्थ निजावें. ' [ पट ]

**पटमंजिरी**—पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी षड्ज संवादी पंचम. गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर. याच्या दुसऱ्या प्रकारात कोमल गांधार व कोमल निषाद हे स्वर आणि गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर एवढाच भेद आहे.

**पटरी**—स्त्री. १ फळी; सुरकुतलेल्या जुन्या शाली, पागोटीं इ० पसरून साफ करण्याकरितां केलेला फळ्यांचा एक संच, साधन. २ (काशी) फरसबंदी. [ सं. पट्टिका; हिं. ]

**पटल**—न. पडदा. पट शब्द पहा.

**पटव(वि)णें**—सक्रि. १ पुतळ्या, रुद्राक्ष इ० सोन्याच्या तारेंत किंवा रेशमी दोऱ्यांत इकडचें तिकडे न होई असें गांठी देऊन घट्ट ओंवणें. विणणें. [ सं. पट्=विणणें ] **पटणी, पटवणी**-स्त्री. १ पटविण्याची, ओंवण्याची क्रिया. २ पटविण्याची, मान्यता मिळण्याची क्रिया. 'कुस्तींत पटणी पटवाजी।' -होला १४३.

**पटव(वि)णें**—सक्रि. स्वीकारणें; मान्य करणें ( पत्र, लेख, हुंडी इ० ). [ पटणें प्रयोजक ] **पटवणी**-स्त्री. पटविण्याची क्रिया.

**पटवर्धन**—पु. एक आडनांव. पटवारी, कुळकर्णी यासारख्या हुद्यावरून हें पडलें. पटवारी पहा. -वि. घोड्याचा एक प्रकार; गुद, पाय व तोंड हे भाग पांढऱ्या रंगाचे असलेला ( घोडा ). -अश्वप १.२१. [ सं. पट्टवर्धन ]

**पटवा, पटवेकरी-कर-गार**—पु. पुरणी केलेल्या किंवा जडित काम असलेल्या नगास पट्टी, गोफ, गोंडे लावून तयार करणारा; दागिने पटविण्याचें काम करणारा कारागीर. [ सं. पट्टिकाकार ] **पटवा दोर**-पु. भाताचा सुडा इ० बांधण्याचें केळीचें सोपट. [ हिं. ]

**पटवारी**—पु. गांव कुळकरणी; पांड्या; तलाठी. 'पाटील म्हणे रे ठोका ठोका। पटवारी वदे अनुमान कां।' -दावि ३०९. [ हिं. ]

**पटह**—पु. पडघमसारखें एक जुनें वाद्य; नगारा. ' निशान पटहो भेरी। ' -शिशु १०२७. -सारुह ३.३७. [ सं. ]

**पटा, पटाईत, पटाधिकार-कारी**—पट्टामध्यें पहा.

**पटाऊ**—पु. ( व. ) पाटाऊ पहा.

**पटाड्या**—वि. ( व. ) पट्टे असणारा जाड रेघांचा.

**पटांगण**—न. मोकळें व विस्तृत आंगण; मैदान; मोकळी जागा, प्रदेश. [ पट्टा=जमीनीचा तुकडा+आंगण ]

**पटाटां**—क्रिवि.पटापट; पटपट ( विशेषतः अधिक जोरानें किंवा त्वरेनें ). [ ध्व. ]

**पटाड**—स्त्री. बैलाच्या मुठी(खोगिरा)चा आवळण्याचा पट्टा; पठाड; पठार. [ सं. पट्ट ] ०बंद-( व. ) व्यापारी.

**पटाडा**—वि. १ सखल व पसरट; चपटा व जाड; आखुड व घट्ट. २ ( व. ) मोठी, फताडी. ' पटाडी घेवडी, पटाडी गोम.' ३ दूरदूर अंतर ठेवून विणलेली (खाट). [हिं. पटडा=फळा; तक्ता]

**पटाडा**—पु. पटापटा पडण्याची क्रिया; पटका; गळती; नाश. [ पट ]

**पटापट-पटां**—पटपट-पटां पहा.

**पटाविणें**—सक्रि. पटविणें, वटविणें; मान्य करणें; स्वीकारणें ( हुंडी, लेख इ० ). [ पटणें ]

**पटाशी-सी**—स्त्री. ( सुतारी धंदा ) रुंद पातीचें किकरें; चौरशी.

**पटि(ट)की**—स्त्री. ( गो. ) ल्हान सुंगटाचा थवा.

**पटिंग**—पु. ( गो. ) खेंकडा.

**पटिंग**—न. जाड निबरट, डोंगरी गवत.

**पटिसाळा**—स्त्री. पाठशाळा; राजमठ. ' तैसे स्तंभु मीरवैले। पटिसाळेचे। ' -ऋ ५७.

**पटी**—पट्टी पहा.

**पटी**—स्त्री. १ वस्त्र. -शर. २ ( कु.) चोपडी. ३ ( गो. ) पोथी ४ खिडक्यांना तावदानें बसविण्याचें लुकण. -शर.

**पटु**—वि. १ हुशार; तरबेज; निष्णात; चतुर; कुशल. ' हळुहळु पटु स्वयें सुपथिं लावियेलें करा।' -केका ६५. २ चलाख; तल्लख. [ सं. ] ०त्व-न. चतुरता; कौशल्य. ' पटुत्व सकलेंद्रियीं मनुजता सुवंशीं जनीं।' -केका १२.

**पटेकरी**—पट्टेकरी पहा.

**पटेल**—पु. पाटील पहा.

**पटेस**—स्त्री. ( हेट. ) अर्जी. [ ? इं. पिटिशन ]

**पटोळडी**—स्त्री. ( कों. ) माशांची एक जात.

**पट्ट**—पु. १ रेशमी वस्त्र; सुंदर, रंगीत कापड. २ पाट. ३ ( ल. ) गादी; पद; पदवी; सिंहासन. ' समर्थें स्वस्थानीं महंतासी पट्ट नाहीं दिधलें। ' -सप्र १२.३६. ४ मुकुट. [ सं. ] ०कूल-न.

उंची रेशमी वस्त्र. पट्ट अर्थ १ पहा. –वि. श्रेष्ठ; मुख्य. 'पट्टशिष्य.' [सं.] **०गज**–पु. मुख्य हत्ती. 'विरथ केला वंगराजा। सर्वेचि चढे पट्टगजा।' –एरुस्व ९.५४. **०अंत**–पु. चपटा; अरुंद व लांब जंत (इं.) टिनियाडा. –प्राणिमो १३१. **०तंतु**–पु. रेशीम. 'पट्टतंतु स्वयें पुनीतु। वायूनें शुद्ध ऊर्णातंतू।' –एभा २१.१३९. **०पूजा**–स्त्री. राज्याभिषेक; अग्रपूजा. 'घरामध्यें राजा। नोहे न्हावी पट्ट पूजा।' –तुगा २७९०. **०राणी**–स्त्री. राजाबरोबर जिला राज्याभिषेक होतो ती मुख्य राणी. [सं. पट्टराज्ञी] **०शिष्य**–पु. मुख्य शिष्य.

**पट्टण–न**—न. १ शहर; राजधानी; पत्तन. 'त्यांहीं माजी अति दुखणी। द्वारकापट्टणीं तें नाहीं।' –एरुस्व ३.१३. २ अन हिलपट्टण. गुजराथेंतील एक शहर. [सं.]

**पट्टण**—न. (नाविक) दोन्ही रोजांस सांधणारें व दोन्ही रोजांसहित भागाचें लांकूड. हा गलबताचा पाया होय. या लांकडास वरच्या अंगास दोन्ही बाजूस खांचा पाडून त्यांत फळ्या बसवितात. [पट्ट=फळी]

**पट्टाळा**—पु. (गो.) बाळंतभेट, बाळंतविडा. पडतळ, पडथळा पहा.

**पट्टा, पटा**—पु. १ एक जातीची लांब, दुधारी, खोबळ्याच्या मुठीची, ५० अंगुळें लांबीची तरवार. हिला कोंपरापावेतों हाताचें संरक्षण करणारी मूठ असते. 'इटयापटयाचे झोंक कानडे लोक ...।' –ऐपो ३४२. २ शिकाऊ तरवार. 'दाडपट्टा.' ३ पट्टी; रांग; ओळ; रेघ; रेषा. ४ जमीनीची लांब पट्टी. ५ पट्टी; चिंचोळा व लांबट तुकडा (फीत, कापड, रांगोळी, कांठ, इ॰चा); नाडी; दाल; नवार; सखलादीचा तुकडा. 'शिपायाचा पट्टा.' ६ सोनें–चांदीचा किंवा साधा कमरेस घालावयाचा दागिना. तरवारीचा गळयांत अडकविण्याचा चामडी बंद. ७ कौल; कबुलायतपत्र; लेखीपत्र (शेताचें वगैरे खंडपत्र); गांवच्या जमाबंदीचें ताळेबंदपत्रक; कराराचा कागद. 'भाडें पट्टा.' ८ डोईवर वस्तऱ्यानें काढलेला पाट. ९ शरीर, वस्त्र इ॰वर कांहीं एक रंगाचें इ॰ चिन्ह. १० दोराची विशिष्ट गुंफण करून केलेलें आउतास बैल जोडण्याचें साधन. शिकारी. –मसाप १.२.७. ११ (पगडबंद) (पगडी घामानें खराब होऊं नये म्हणून लाविलेली) पगडीच्या आंतील मेणकापडाची पट्टी. १२ (चांभारी) गिरणींतील चाकावरची चामडी रुंद पट्टी. १३ (हेट. नाविक) भोयांनां व काठीला बांधलेली दोरी. १४ अधिकार; अधिकारपत्र. 'तेवीं मी तयां। जैसे असती तैसियां। कळिकाळ नोकोनियां। घेतला पटा।' –ज्ञा १२.८४. [सं. पट्ट; हिं. पट्टा] **०ओढणें–घालणें–पाडणें**–१ हजामत करतांना डोईवरून कसा तरी वस्तरा खरडणें. यावरून. २ (ल.) सरासरी अथवा कसें तरी करणें; ओबडधोबडपणें किंवा धसकफसक कामाला प्रारंभ करणें. ३ (विद्यार्थी) काम अर्धवट करून लोंबत ठेवणें **०फरजणें**–१ पट्टा फिरविणें; खेळणें. २ (ल.) सभापांडित्यांत किंवा कडक भाषणांत एकसारखें व अकुंठितपणें बोलणें. **०मारणें–देणें**–बलात्कारानें लुबाडणें; हात मारणें. (**तोंडचा**) **०सोडणें**–एकसारखी बडबड करणें. **पट्टयाचा हात फिरविणें**–१ पट्टा पेलणें; चालविणें. २ (ल) भुलथापा देणें; खोटा आविर्भाव आणणें; अवडंबर माजविणें. **पट्टाईत**–वि. १ पट्टा (हत्यार) चालविण्यांत तरबेज किंवा त्याचा व्यायाम घेणारा. २ (ल.) निष्णात; निपुण; कुशल; वस्ताद (माणूस). ३ अंगावर पट्टे असलेला; ढाण्या (वाघ, इ॰). **०ईत वाघ**–पु. अंगावर पट्टे असलेला, चांगल्या जातीचा वाघ. **०ईत–शराईत**–वि. निष्णात; कुशल (चांगल्या व वाईट दोन्ही अर्थी). **०धूळ**–स्त्री. १ धूळधाण; पूर्ण नाश; मोड; दुर्दशा (सैन्याची). २ संपूर्ण मोडतोड, पडझड (इमारत, यंत्र, वस्तु यांची). ३ पुरा दुर्लौकिक; उपहास; अप्रतिष्ठा (मनुष्याची). ४ नाश; बिघाड (मसलत, मंत्र यांचा). ५ वाताहात, सत्यानाश (जिंदगी, काम यांचा) [पट्टा+धूळ] **०पट्टी**–स्त्री. १ अंगावर भस्माचे पट्टे ओढण्याची क्रिया; भस्मविलेपन यावरून २ टिळाटोपी; चट्टीपट्टी. ३ (ल.) आडवे उभे पट्टे, उरफाटे सुरफाटे पट्टे; उभ्या आडव्या पट्टयांनीं युक्त अशी स्थिति (सत्रंजी इ॰ची). [पट्टा द्वि.] **०पट्टीचा**–वि. पट्टा, रेघा, ओळी ज्यावर काढलेल्या आहेत असा; पट्टाईत. **पट्टाधिकार**–पु. १ दिवाणगिरी; प्रधानकी. २ पट्टयाचा (करारपत्राचा) अधिकार; पटाधिकार. [सं.] **पट्टाधिकारी**–पु. १ दिवाण; मुख्य प्रधान. २ महंत, मठ वगैरेच्या गादीवरील व्यक्ति. [सं.] **पट्टाभिषिक्त**–वि. ज्यास राज्याभिषेक झाला आहे असा (राजा, राणी). [सं.] **पट्टाभिषेक**–पु (राजा किंवा राणी यास) सिंहासनावर बसवून करावयाचा यथाशास्त्र राज्याभिषेक. [सं.]

**पट्टी**—स्त्री. १ चिंधी; चिंधोटी; चिरोटी; अरुंद व लांब तुकडा (कापड, धातु, लांकूड यांचा). २ जमीनीचा लांब अरुंद तुकडा. ३ दोन भाग जोडणारा तुकडा; जोरपट्टी; अड्डु; (लोखंड इ॰चा). ४ सरकारनें गांवापासून केलेल्या जमाबंदीची, धर्मकृत्याकरितां वगैरे जमविलेल्या वर्गणीची अथवा कर, दंड किंवा खंडणी इ॰ची यादी. 'आम्ही चौघांनीं पट्टी करून गरीबाचें घर बांधून दिलें.' (सध्यां यादी हा अर्थ नाहींसा होऊन त्याऐवजीं या यादींतील कर किंवा दंड भरण्याच्या विषयाचा बोध होऊं लागला आहे). व्यपदेशक नाम पट्टी शब्दाच्या मागें लागून असले अनेक समास होत असतात. असे कांहीं समास पुढें दिले आहेत–स्वारी पट्टी=राजा किंवा अधिकारी यांच्या सफरीचा खर्च भागविण्याचा कर. पालखीपट्टी=गांवांत आलेल्या गोसाव्यांच्या मेळयास शिधापाणी इ॰ देण्याकरितां बसविलेला कर. खुशालपट्टी=पुत्रजन्म इ॰ उत्सवाचा खर्च भागविण्यासाठीं बसविलेला कर. लग्नपट्टी=एखाद्याच्या घरीं लग्नकार्य झालें असतां

त्यासाठीं भरावयाचा कर. केरपट्टी=गावांतील केर काढण्यासाठीं (भंग्याना द्यावयाच्या पगारासाठीं) बसविलेला कर; भंगीपट्टी. कोंबडीपट्टी=कोंबड्याच्या खरेदी-विक्रीवरील कर. घर-झाड-म्हैस पट्टी=घर इ०च्या खरेदी-विक्रीवरील कर. पासोडी पट्टी=पाटलाच्या पासोडी-मुंडासें साठीं बसविलेली पट्टी इ०. ५ (सामा) कर, खंड. ६ सर्व लोकावर बसविलेल्या कराची, वर्गणीची यादी; यादीचा कागद. 'हातीं पट्टी घेऊन शिपाई वसुलास आला आहे.' ७ घडी, दुमड; चुणी (पागोटें इ०ची) ८ विड्याच्या पानाची गुडाळी (त्यामध्यें चुना कात, सुपारी इ० घालून केलेली) ९ गांवाचा विभाग, आळी, गल्ली, पेठ; एक प्रादेशिक विभाग; वार्ड. 'कोंकणपट्टी.' १० (बायकी) वेणी घालताना कपाळावर दोहों बाजूंनीं बसविलेला केशसमुदाय, केसाचा पुढला कपाळावरचा एका बाजूचा भाग ११ वस्त्राचा बुट्टेदार काठ, पदर, किनार. १२ फुलांची माळ; तुरा पहा. १३ वेदपठण करण्याकरिता किंवा सभेत वेदमंत्र म्हणण्याकरिता बसलेली वैदिकाची ओळ, भोजनपंक्तींत बसलेली ब्राह्मणांची राग १४ पट्टी शब्दाच्या चवथ्या अर्थी विनोदी, लाक्षणिक उपयोग या शब्दाचे पुष्कळ समास होतात व त्यांचा अर्थ बहुधा आवेशानें रागें भरणें, शिव्या देणें असा होतो. असे काहीं समास-खडसपट्टी; खरडपट्टी; भोसड-फोदल-उधळ-भादर-झवर-वसर-पट्टी इ०. १५ (सोनारी धंदा) सुमारें ९ इंच लांब व १॥ इंच जाड अशा लोखंडी तुकड्यास ४० ते ६० लहान-मोठीं भोकें पाडून धातूची तार बारीक करण्यासाठीं त्यांतुन ओढण्यासाठीं केलेलें साधन १६ खरें व उंची रेशीम १७ जखमेस लावावयाचा मलमासह कापडाचा तुकडा १८ (व्यापारी) माल विकल्याबद्दल गिऱ्हाईकास करून दिलेल्या आकड्याची यादी. १९ रेघा ओढण्याचा, आखण्याचा लाकडी तुकडा; आकृति काढण्याचें साधन 'फूटपट्टी.' २० (बुद्धिबळाचा खेळ) मोहऱ्यानें (विशेषत हत्तीनें किंवा वजिरानें) रोखलेलें पग. २१ वर्गणी; फंड; फाळा; कर २२ शेत, शेताचा लांबट तुकडा. २३ (मल्लविद्या) आपला हात जोडीदाराच्या कानावरून गालफडावर दाबून आपल्या कोपराच्या लवणींत जोडीदाराचे गाल, मान व कान धरून जोडीदारास चीत करणें याला पट्टी देणें असेंहि म्हणतात. २४ (संगीत) बाजाच्या पेटीचा सूर, ध्वनि. 'पांचवी पट्टी धर.' [सं. पट्ट] **०काढणें**-गर्व नाहींसा करणें; खरडपट्टी काढणें. **०चालणें-लागणें**-वर्गणी गोळा करण्याचें काम सुरू होणें. (व.) मार देणें. **०पढविणें**-(व) मनाप्रमाणें शिकवून ठेवणें. **०देणें**-१ कामावरून दूर करणें, निरोप देणें २ वाटेस लावणें **०लावणें**-शेतसारा भरणें 'गेलो होतो पट्टी लावायला।' -ऐपो ४६. **०फाडणें-तासणें**-मागावयाची रक्कम प्रत्येक नांवापुढें लिहून नांवाची यादी तयार करणें. **पट्टीचा, पट्टींतला**-वि. विद्वानांच्या, निष्णातांच्या रांगेंत बसण्यास योग्य; पंडित, निष्णात, श्रेष्ठ; अग्रगण्य (वैदिक, कारकून, वाजंत्री, लबाड वगैरे). **०चा दबका**-(तांबट-कासारी धंदा) फुलपात्राची कड, किनार पाडण्याचा, करण्याचा हातोडा. **०पछोडी-पासोडी**-स्त्री. पट्टी; कर; वर्गणी **०लंगोटी**-स्त्री कुणब्यावर बसविलेला सरकारी कर; जमीनीवरील कर, सारा. (क्रि० भरणें; देणें; करणें).

**पट्टटी, पत्ती**-स्त्री (गो.) पश्चिम दिशा

**पट्टू**-पु एक उंची लोंकरीचें कापड: तेल्याबोर रंगाचा, लोंकरीचा खरबरीत धाग्याचा कपडा; ऊर्णावस्त्र 'घोंगडी, धाबळी, बुरणूस, पट्टू.. हीं सगळीं लोकरीचींच करितात' -मराठी ३ रें पुस्तक पृ. १५ (१८७३) [सं पट्ट; हिं]

**पट्टे**-न १ शालजोडी, धोतरजोडा, काबळेजोडी इ० यांतील एक एक फर्द, पान २ जोडवस्त्र; दुहेरी कापड [सं पट; म. पट्टा]

**पट्टेकरी, पट्टेवाला**-पु. गळयात, कमरेस पट्टा बांधणारा शिपाई, चपरासी [पट्टा]

**पट्टेकरी**-पु पट्टा (तरवार) खेळणारा किंवा बाळगणारा. [पट्टा+करी]

**पठं(ठिं)गा, पठिंबा**-पु १ पाठिंबा, आधार; आश्रय; पाठबळ 'मुख्य आहे आम्हा मातेचा पठंगा। तुज पांडुरंगा कोण लेखी।' -तुगा ४०८४ २ पाठिराखा; मदत करणारा. [पाठ; हिं. पठिंगा]

**पठ(ठा)डा, पठाडी, पठारा**-वि. १ आंखुड; ठेंगणा व मजबूत; धट्टाकट्टा; खबीर, घटमूट. २ सपाट; पसरट; मोठ्या व रुंद पाठीचा, फताडा पहा. [सं. पृष्ठ] **पठाडी गोम**-स्त्री. १ मोठ्या, जाड व रुंद पाठीची गोम (किडा). २ घोड्याच्या पाठीवरील केसाची गोम. हें अशुभ चिह्न आहे. ३ (ल.) ढोबळ चूक; मोठा दोष. **पठाडी बाळी**-स्त्री. १ बायकांच्या कानांतील एक प्रकारची बाळी. 'मुदबाळ्या पठाडीबाळ्या नथेवर मोर।' -अफला ५५.

**पठणें**-उक्रि. १ (काव्य) पठण करणें; वाचणें. २ तोंडपाठ म्हणणें; पाठ करणें; आवृत्ति करणें. [सं. पठन] **पठक**-वि. पढणारा; पाठक पहा **पठकपरंपरा**-स्त्री. तोंडीं पाठ करण्याची गुरुशिष्य परंपरा. 'लेखनकला त्यावेळीं नसतांहि आपल्या वेदांप्रमाणें तीं काव्यें पठकपरंपरेनें त्या लोकांत राहिलीं' -नि ४०. **पठन-ण**-न. १ वाचन; अभ्यास. 'हा ग्रंथ मी पठण केला.' २ पाठ म्हणणें; आवृत्ति करणें; आवर्तन. (क्रि० करणें). 'वेदपठण' **पठनीय**-वि. वाचनीय; पठण करण्यास योग्य. **पठित**-वि. १ वाचलेलें. २ पाठ केलेलें; म्हटलेलें.

**पठाड**—स्त्री. बैलाच्या पाठीवरील खोगीर आंवळण्याचें साधन. पटाड पहा. ' आपुलेनि हातें आपण । पठाडेसी खोंविला दाभण । रात्रीं रुपताचि तें जाण । सर्पभयें प्राण सोडिला । ' –एभा २३.५९६ [सं. पृष्ठ–पाठ]

**पठाड**—न. रुंद व सपाट पाठ (मार देण्याच्या किंवा माराचा धाक दाखविण्याच्या वेळीं म्हणतात). [सं पृष्ठ–पाठ]

**पठाडी**—वि. विस्तृत; रुंदट; पसरट पाठीची (गोम, धामण शेंग इ०).

**पठाण**—न. १ रुंद पाठ. पठाड पहा. २ रुंद व पसरट, जाड कौल; आढयावरील किंवा कुंदावरील कौल [पाठ]

**पठाण**—पु. मुसलमानांतील एक जात व तींतील एक व्यक्ति [हिं. पठान; वै. सं. पक्थन्?] **पठाणी**–वि. पठाणासंबंधीं, पठाणाचें. ०**खातें–वही–याद–हिशोब**–न. १ अव्यवस्थितपणें ठेवलेल्या रोजच्या जमाखर्चाची वही २ (सामा) अव्यवस्थित पत्रक, सूचना इ०. ०**मिरची**–स्त्री. एक प्रकारची लांबट मिरची. ०**लोध्र**–पु. एक झाड किंवा त्याची साल; औषधी धूप.

**पठाण**—न. (कों.) गलबताच्या तळाचें लाकूड. हें चौकोनी असतें. पठार पहा.

**पठार**—स्त्री. खोगिराचा तंग; पटाड, पठाड पहा. [पाठ]

**पठार**—न. १ डोंगरावरील सपाटी, मैदान, सडा. 'मेरुपठारवासी समग्र। देतां भुभुःकार पातले।'–रावि १८.९३. २ जहाजाचा, होडीचा तळभाग. ३ (ल.) व्यवस्था; प्रारंभ, पूर्वतयारी. (क्रि० घालणें). ' त्यानें घर बांधावयाचें पठार घातलें आहे ' ४ (काव्य) पाठ; मागील बाजू. ५ (निंदार्थी) पाठीचा ओबडधोबड रुंद भाग; फताडी पाठ. [सं. पृष्ठ; म. पाठ; हिं. पटरा=तक्ता, फळा, सं. प्रस्तर]

**पठारा**—पु. डोंगरावरचा सपाट भाग. पठार पहा. –वि. पठाडी; रुंद, चपटी, फताड पाठ असलेली (गोम इ०).

**पठाल**—न. (व.) वखराची फास काढून तो उलटा करून त्यास बैल जुंपून तें औत जमीनीवरून फिरविणें; जमीन ढेंकळें मोडून सपाट करण्याचें साधन. . ' बीं पेरण्याच्या अगोदर शेतावर पठाल करतात. ' –महाराष्ट्र कृषीवल ३४ ८ १९३०.

**पठावा**—पु. पाठिंबा; पठंगा पहा. –शर.

**पठ्ठा–पठ्या**—वि. बळकट; धट्टाकट्टा; धष्टपुष्ट; बहाद्दर; लढाऊ; पहिलवान (मनुष्य, जनावर, पक्षी इ०). [अर. पट्ठा; हिं.]

**पठ्ठाळॉ**—पु. (गो.) अनुभव; पडताळा; प्रचीति. [पडताळा]

**पड**—न. (गो.) पार; चौथरा; वृक्षाच्या सभोंवतालची दगडी बांधणावळ; चबुतरा; ओटा.

**पड**—पु. (बायकी) पुष्कळ कप्पे, खण असलेली पेटी, पिशवी.

**पड**—पु. १ दोराचा एक पेड; एका पदराचा दोर; अनेक पदरांचा दोर; अनेक धागे एकत्र करून पीळ घातलेलें सूत. २ (व.) पिळा; पीळ (क्रि० घालणें)

**पड**—स्त्री. १ (कु.) (मापी) दोन शेर. ' पडी उणे दहा शेर ' २ (गो.) पाऊण शेर (मापी) [का पडि]

**पड**—पु (गो) शिधा; अन्नसामुग्री.

**पड**—स्त्री. १ ओझें सहन करण्याची ताकद नसतां किंवा कामचुकारपणानें (बैल इ० कांचें) मटकन खालीं बसणें. २ (ल.) नकार, नाकारणें; झिडकारणें ३ मागें, माघार घेणें (भांडण, वादविवाद इ० कांत); स्तब्ध, गुपचिप बसणें; शांत राहणें; याच्या उलट उचंबळ (उचंबळ खाणें पहा). (क्रि० खाणें; घेणें, पत्करणें) ' कालच्या भाडणांत गोविंदरावानीं पड घेतली नसती तर मोठा अनर्थ झाला असता ' ४ झाडावरून आपोआप गळून पडलेले आंबे, फळें. याच्या उलट आढींत घालून पिकविलेले आबे. ५ पडित किंवा विन लागवडीची जमीन. ६ एकदम पुष्कळ माणसांचें आजारी पडणें. 'ज्वरानें दोनशें मनुष्याची पड पडली आहे ' ७ (अनेक गांवें वगैरे) उजाड होणें. ८ (पुष्कळ जमीन) पडित पडणें, असणें. (क्रि० पडणें) ९ (पत्त्याचा खेळ) अंगावर डाव, हार येणें; नाट. (क्रि० लागणें). १० मेलेलें जनावर. ' देशमुखाचे घरीं पड झाली असतां महारानें म्हशीचें कातडें मागूं नये. ' –चसंग्र ४५७ ११ मेलेलें जनावर नेण्याचा व त्याचें चामडें घेण्याचा महाराचा हक्क [सं. पत, पडणें प्रा. पड] ०**कर**–वि (कु) १ पडित (जमीन) २ ओसाड (खेडें) ३ रिकामें (घर). ४ उपयोगात न आणलेली (वस्तु) ५ बेकार (मनुष्य) ०**केणें**–न १ बाजारांतील पडून राहिलेला, शिळा, न विकलेला, परत केलेला माल. २ लवकर नासणारा, वाळणारा माल ०**घर**–न. उजाड, रिकामें, ओसाड, वस्ती करणारानीं सोडून दिलेलें घर. ०**जमीन**–स्त्री पडित, लागवड न केलेली, ओसाड (जमीन). ०**झड**–स्त्री. १ पडणें झडणें; मोडतोड. २ पडलेलें, राहिलेलें सामान. ३ केरकचरा; गदळ. ०**सार**–वि. उजाड, पडित (जमीन). [पडणें+सर=सारखी]

**पड**—अ हाताखालील, दुय्यम, दुसऱ्या प्रतीचा, मुख्य वस्तूच्या ऐवजीं घ्यावयाची या अर्थाचा एक प्रत्यय. जसें·– पड–चाकर–शिष्य–लंका–जीभ–कोट–साक्ष इ०. ' तूं लंका पाहिलीस तर काय झालें मी पडलंका पाहिली. ' [प्रति=दुसरा किंवा सं. पर=पलीकडचा] ०**केश–स**–पुअव. डोळयाच्या पापणीच्या खालीं आंतील बाजुला उगवणारे केंस; डोळयाचा एक रोग. ०**कोट**–पु किल्ल्याच्या बाहेरचा तट ०**गादी**–स्त्री. गालिचा; लहान गादी. ०**गहाण, गाहाण**–न. गहाण ठेवणारानें किंवा सावकारानें आपल्याकडे गहाण ठेवलेले दुसऱ्याकडे गहाण टाकलेले जिन्नस.

**०गहाणदार**–पु. पडगहाण ठेवून घेणारा. **०छाया**-स्त्री १ प्रतिबिंब २ छाया; साउली. [ सं. प्रतिच्छाया ] **०जावई**–पु (व.) जावयाचा भाऊ. **०जीभ**–स्त्री. जिभेच्या मागे असणारी दुसरी लहान जीभ, जिभेच्या मुळाशीं लोंबणारी मांसाची लोळी [ सं पतज्जिव्हा ] **०थळ**–न (राजा) पिशाच्चाच्या उपद्रवाचा एका देवानें कांहीं निर्णय सागितला असता इतर गावचे देवाला विचारून जो त्याचा पडताळा पहातात तें; किंवा त्या देवानें सागितल्याप्रमाणें पुजाऱ्याकडून करून घेतलेला लेख; पडताळा. [प्रति+स्थळ ] **०दोरा**–पु. गळयांतील माळ, हार इ०कास जोडलेला व गळयाभोंवती बाधावयाचा जोड दोरा. **०नांव**–न. टोपण, व्यावहारिक नाव **०नाळ**–(कों.) (नाविक) मागच्या खांद्यास बाहेरच्या बाजूस जोडलेलीं लाकडें. **०पापणी**–स्त्री. पडकेश पहा. **०बंद**–पु (गंजिफाचा खेळ) बंदाच्या (राजा, वजीर यांच्या खालील पानाच्या) खालचें पान. **०भिंत**–स्त्री. मुख्य भिंतीच्या बाहेरची दुसरी भिंत. **०भोज-भोजन**–न. १ वरपक्षाकडून लग्नाचे दुसरे दिवशीं वधूपक्षास दिलेली मेजवानी २ परत जेवण. [ पड=प्रति किंवा परत+भोजन ] **०लंका**–स्त्री. एक रावणाची लंका व दुसरी तिच्याहि पलीकडे दूर असलेली लंका. **०विद्यार्थी**–पु. विद्यार्थ्यांच्या हाताखालचा दुसरा विद्यार्थी. 'शिवाय त्या शाळेंत पडविद्यार्थी असत ते निराळेच' –चं १६. **०शब्द-साद**–पु प्रतिध्वनि; प्रतिशब्द; पडिसाद. 'का पडसादाचा अवचिता। गजर उठे।' –दा ६.८.१९. 'शब्द पडसाद ऊटला। म्हणे कोणरे बोल्लिला।' –रामदासी स्फुट अभंग २७ नवनीत पृ. १५०) [ सं. प्रतिशब्द ] **०शाळा-ळ-शाला**–स्त्री. १ घरापासुन थोडयाशा अंतरावर बांधलेलें छोटेखानी घर; ओंवरी. २ उतारूंसाठीं देवालयालगत बाधलेली धर्मशाळा. 'मठ मंडपा धर्मशाळा। देवद्वारीं पडशाळा।' –दा ४.५.२३. **०सरी**–स्त्री. १ उतार असलेल्या जमीनीवरील पाणी वाहून जाण्यासाठीं काढून दिलेला नाला, पाट, जलमार्ग. २ बागाईत जमीन. [ पर+सरी ] **०साई**–स्त्री. १ छाया; काळोख; झावळेपण. 'आंधार कोंडोनि घरीं। घरा पडसाई न करी।' –अमृ ७.२१. (जुनी प्रत) २ सावली; पडछाया. 'दीपामागें पडसाई। तैश्या डोळयामागें भोंवई।' –भाराबाल ६.५०. [ पड+छाया ] **०सावली**–स्त्री. पडछाया; प्रतिबिंब. **०साळ**–स्त्री. १ पडशाळा पहा. २ (कु.) पडवी; ओटी. 'तेव्हां ती लवकर घरातून बाहेर जाऊन पडसाळेंत एक वर्षाच्या वयाची हंसी होती तिला तिनें त्या घरांत आणिलें।' –मराठी सहावें पुस्तक, पृ. १८. (१८७५) **०साक्ष**–स्त्री. १ पुराव्याला बळकटी देणारा दुसरा पुरावा. २ पडसाक्षी पहा. **०साक्षी**–पु. १ पुराव्याला बळकटी किंवा पुष्टि देणारा साक्षीदार. २ साक्षीदाराचा साक्षी; दुसऱ्याच्या विश्वासूपणाबद्दल शपथपूर्वक खात्री देणारा. **०सूत्र-दोरा**–नपु. मंगळसूत्र, गळसरी इ० ओंवून गांठ दिल्यावर जीं त्या दोऱ्याचीं टोकें राहिलीं असतात तीं **०स्थळ**–न. पडथळ पहा. **०हात**–पु. (गो.) प्रतिहस्त.

**पंड**—न (गो) जमीन मोजण्याचें एक परिमाण. पांड पहा.

**पडक**—न झाडावरून पडलेलें पोफळ. –वि (राजा.) पिकून गळलेली (सुपारी), कोंवळेपणीच झाडावरून गळून पडलेलें (पोफळ). [ पडणें ]

**पडकणें**—अक्रि. संवय लागणें, सोकणें (चागल्या किंवा वाईट अर्थी); चटक, व्यसन, छंद लागणें; लालचावणें; सोकावणें; नादीं लागणें; चटावणें; संवकणें; लुब्ध होणें. 'पाहतां कृष्णस्वरूपासी। आराणुक नाहीं डोळियांसी। यालागीं न येती दृश्यापाशीं। कृष्णसुखासी पडकले।' –एरुस्व १८.२३. [ सं. प्रतिकरण ]

**पडकय**—स्त्री. (कों.) शेतकऱ्यांनीं परस्परास हंगामाच्या वेळीं गुरें, मजूर वगैरे देण्याची रीत; कामाची व साधनांची देवघेव [ सं. प्रति+कृ ]

**पडका**—वि १ लवकर पडणारा, घोगरा (आवाज, गळा, कंठध्वनि). २ मोडकी; पडलेली; (इमारत)

**पडकी विळी**—स्त्री. जिचें पातें पाडता येतें, मिटतां येतें अशी विळी. हिच्या उलट उभी विळी.

**पडकें**—न (कों.) गुराच्या दाव्याची एक कानी; गुळकी.

**पडकें**—न. (खा.) माल वाहणाऱ्या बिन तट्टयाच्या गाडीला दोहों बाजूंस माल पडूं नये म्हणून लावलेल्या दोन ताटया प्रत्येकीं.

**पडकेल**—वि. शेतीच्या साधनाची, मजुरांची देवघेव करणारा; पडकय करणारा. पडकय पहा.

**पडखर**—वि. रोखठोक; खणखणीत; खरमरीत; चणचणीत; स्पष्ट; भीडभाड न धरतां केलेलें (भाषण). [ पड+खर ]

**पड(डि)खरणें**—उक्रि. (महानु.) ओळखणें; पंठखळणें. 'आंधळेयाचा नगरीं। कवण कवणातें पडिखरी।' –भाए ५५४. [ सं. परि+ईक्ष् ]

**पडखलण**—न (बायकी) १ पायांतील जोडवीं निसटून जाऊं नयेत म्हणून त्यांना लागून घालावयाचें तांब्याचें वेढें; २ टोंचलेल्या कानाचें भोंक बुजूं नये म्हणून त्यांत घालावयाचें हलकें तारेचें वेढें. [ सं. प्रतिक्षलन ]

**पडखळणें**—अक्रि. १ आदळणें; एकमेकांवर पडणें. 'वीर पडखळले वीरीं। परस्परें हाणती।' –एरुस्व ८.३८. २ उठावणी करणें. 'वीरीं घेतला रणकावों। देखोनि धाविन्नला शावो। मिळोनि वीरांचा समुदावो। महाबाहो पडखळिला।' –एरुस्व १०.६२.

**पडंग**—वि. (गो.) लागवड न झालेली; पडित (जमीन).

**पडगण**—न. (गो.) ताम्हन. [ पडगा ]

**पडगा—घा**—पु. १ लाकडी लहान काथवट, पाळें, वाडगा. २ चवघडा, संबळ इ० कांच्या जोडीपैकीं प्रत्येक. ३ (कुंभारी धंदा) आव्यांतून मडकीं काढलीं असता साफ व गुळगुळीत करण्याचें एक साधन [ स. प्रतिग्रह ]

**पडगी-घी**—स्त्री १ भाडयाची पेंदी, बूड किंवा पेला वगैरेची बैठक. २ धातूचा रस ओतून लगड बनविण्याची मूस. पडणीस पहा. ३ किनरी आवाजाचा संबळाचा भाग. ४ लहान पडगा.

**पडगें-घें**—न. १ नगाऱ्याचें गंगाळ, पडगा, चवघडा, तबला, समेळ इ० सजोड चर्मवाद्यांपैकीं प्रत्येक अवयव. २ पडगी अर्थ ३ पहा. ३ पडाव, होडी ४ लाकडी पडगा; पाळें.

**पडगें पाळें**—न (व्यापक) पडगें, काथवट, पेला.

**पडघण**—स्त्री (सोनारी धंदा) धातूचा रस ओतण्याची पन्हाळी मूस (गो) पडघळणी. पडघ(घा)णी पहा. [सं. प्रतिग्रहणी]

**पडघणी**—स्त्री (कों.) ओक्तीचा आडवा वासा ज्यावर ठेवतात तें लांकूड, दुबेळक्यांत बसविलेलें लहान लांकूड.

**पडघ(घा)णा**—स्त्री धातूचा रस ओतण्याचा साचा; मूस.

**पडघ(घा)म-घांव**—न. एक चर्मवाद्य, सैन्यातील मोठ्या आवाजाचा नगारा, ढोल. (इं.) ड्रम 'वाजवीत पडघम ढोल।' —संग्रामगीतें ६०.

**पडघाणी**—स्त्री. कळसाची बैठक. 'उपरि सोळावा अध्यावो। तो ग्रीवेघंटेचा आवो। सप्तदशु तोचि ठावो। पडघाणिये।' —ज्ञा १८.४०. [ सं. प्रतिग्रहणी ]

**पडण**—न पडाव; होडी

**पडण**—न. १ थांबण्याची, विश्रांतीची जागा, तळ, अड्डा. 'बैल उतारवयाचें हें एक पडण आहे येथें उतरले नाहीं तर कोसावर दुसरें पडण आहे, तेथें उतरतील.' 'वंध्यापुत्र पडणीं कैसा ठकलावा।' -स्वादि १२.५.९१. २ गुरांची बसण्याची किंवा रवंथ करण्याची जागा. ३ भेट, सभा इ० ची ठराविक जागा व वेळ ४ फळें वगैरे पाडण्याचा, उतरण्याचा, काढण्याचा हंगाम; नियमित ऋतु; काल. 'यंदाच्या पडणास आवे लागले नाहींत. पुढच्या पडणास बहुत लागतील.' ५ उतार; उतरण. 'पडणीवरून घालून घ्यावें। तो तमोगुण।' —दा २.६.३१. [ सं. पतन ]

**पडणी**—स्त्री. १ (क) पडणें. २ (ल) नाश पावणें; तोटा येणें (व्यापारांत). म्हातारपणांत शारीरिक ऱ्हास होणें; दुर्बळ होणें.

**पडणीस येणें**-१ शेत चांगलें पिकणें; दाणा भरणें; दाण्याच्या भारानें कणसें वांकणें. २ (मनुष्य) म्हातारा होणें.

**पडणें**—अक्रि. १ खालीं येणें; गळणें; पतन पावणें; एखाद्या स्थानापासुन भ्रष्ट होणें; आधार तुटून खालीं येणें; खालीं-नीच स्थितीप्रत जाणें. 'किल्ल्यावरून दगड खालीं पडला.' 'वाऱ्यानें झाडें मोडून पडलीं.' २ (ल.) थांबणें; बंद होणें; पडून रहाणें; सतत चाललेला धंदा-व्यवहार कांहीं कारणामुळें बंद पडणें, थांबणें' 'पैसा नाहीं म्हणून सावकारी पडली.' 'बीं मिळालें नाहीं म्हणून यंदा शेत पडेल.' ३ घडणें; घडून येणें; होणें, असणें. 'तुम्ही धनी पडला मी चाकर पडलों.' 'तुमचें घर लांब पडलें.' 'हें शहर पडलें म्हणून लाकूडफाटयाची महागाई' ४ प्रवृत्त होणें; करूं लागणें, सुरू करणें. 'तो आतासा लिहिण्यावर पडला आहे.' ५ जोराचा हल्ला करणें; चालून जाणें 'अकस्मात् गनीम पडला आणि निसतान केलें.' ६ उद्भवणें; घडणें; होणें; जाणवूं, दिसूं लागणें (थंडी, अंधार, उजेड, उष्णता इ०). ७ कमी होणें; थंडावणें, शात होणें (वारा), कमी होणें; उतरणें (दर). ८ जमिनीवर अंग टाकणें, निजणें; आडवें होणें, लवंडणें; पहुडणें. ९ आळसानें निजणें; सुस्त पडणें. 'येथें काय पडलास कामावर जा.' १० रिकामा, बेकार, निर्वस्त, वस्तीशिवाय, पेरल्याशिवाय, बिन वहिवाटीचा, बिन वापरलेला किंवा उपयोगांत न आणलेला असा राहणें, असणें (मनुष्य, खेडें घर, जमीन, रस्ता, वस्तु इ०). 'पांच शालजोडया पडल्या आहेत. तुला पाहिजे ती घे.' ११ (लढाईत) मरणें; धारातीर्थी पतन पावणें. 'पडतांचि भीष्म, पडले रडले कुरुवीर भूप सुर सगळे।' —मोभीष्म ११.११७. १२ गुंतणें; उद्योगांत शिरणें; संबंध ठेवणें 'तूं त्या कामात पडशील तर रडशील.' १३ आवश्यकता प्राप्त होणें; भाग पडणें. 'तूं ज्वरग्रस्त झालास म्हणून मला खेपा घालावयास पडतें.' 'बायको केली तर घर बांधावयास पडलें.' १४ किंमत द्यावयास लागणें. 'शालजोडीला पांचशें रुपये पडतील.' १५ होणें; घडणें; घडून येणें; उपस्थित होणें. १६ ठरणें; शेवटीं दिसणें; उघडकीस येणें. १७ पराभूत होणें; मार खाणें (वाद इ०त). १८ कोसळणें; गुदरणें; प्राप्त होणें (त्रास, दु:ख) १९ रूपांतर होणें, स्थित्यंतर होणें. 'हात पाय गार पडले.' 'हा रंग काळा पडेल.' २० उद्भवणें; उत्पन्न होणें, परिणाम होणें. 'क्षतांत किडे पडेल.' 'मध्यें चार रेषा काढल्या म्हणजे तीन कोष्टकें पडतात.' 'ह्या भिंगाच्या दोन आरशा पडतील.' २१ बुडणें; खचणें (दारिद्य, दुर्बलता, हलकेपणा, दुष्कीर्ति इ० त). २२ दाटणें; घोगरा होणें; हलका पडणें; बसणें (आवाज). २३ (पत्त्यांचा, जुगारीचा खेळ) गमावणें; हरणें. 'मी दहा रुपये पडलों.' २४ सुरू, प्रारंभ होणें; चालणें; प्रचारांत, व्यवहारांत असणें (धंदा, उद्योग, चाल, द्रम इ०). २५ बाहेर येणें; (तोंडातून); ओकणें. 'अन्न पडलें.' २६ (गणित) त्रैराशिकादि गणितावरून कांहीं एक फल फलित होणें.' 'कोशास आठ हजार हात तेव्हां अर्धे कोशास काय पडतें?' २७ सतत चालू असणारा व्यापार-फड इ० चालू रहाणें. 'पत्रावळीचा एकदां फड पडला म्हणजे कोणी येईल तो लावील' २८ कर्मधर्म संयोगानें असणं. 'तो पडला अधिकारी नाहीं तर पाहून घेतलें

असतें ' २९ दाखल होणें, समाविष्ट होणें ' रक्कम दरमहा कपात होऊन जो फंड जमा जाहलेला असतो त्यांत पडावयाची आहे. ' -(बडोदें) कलावंतखातें ३३. ३० (कु.) मानवणें 'माझ्या जिवाक पडता ' ३१ (अकर्तृक) परस्पर जुळणें, जमणें; जम बसणें; योग्य असणें; पटणें ' विंचस आणि लक्ष्मीस पडत नाहीं.' ' अंबाडीची भाजी आणि भाकरी यास चांगलें पडतें ' [सं पत्, प्रा. पड; गु हि. पडवुं-ना; फ्रेंजि पेर; आर्मे. पर] म्ह० पडलेलें शेण माती घेऊन उठतें=चागल्या मनुष्यावर कांहीं टपका आला आणि त्या टपक्याचें जरी त्यानें सर्वांशीं निरसन केलें तरी त्याची थोडी तरी बदनामी होतेच **पडतझडत**-क्रिवि. झडतपडत पहा [पडणें+झडणें] म्ह० (व) पडेझडे माल वाढे=एखादा मुलगा पडला म्हणजे त्याला म्हणतात म्हणजे असें पडल्या पडल्यानेंच शक्ति येते. **पडत उभें**-न १ (प्रशंसार्थी) उत्पन्न होताच, जन्मताच उभें राहणारें, वावरूं शकणारें गाय इ० कांचें वासरूं. २ (ल) यशस्वी उपाययोजना, श्रेयस्कर वागणूक. ३ अनुकूल प्रारब्ध [पडणें+उभें] **पडता काळ**-पु. उतरती कळा; ऱ्हासाचा काळ, निकृष्ट दशा. **पडता पाया**-पु. १ ऱ्हास; पडता काळ. २ (क्र) खालावलेली स्थिति. **पडती भावना**-स्त्री. १ (पाऊस) पडूं लागणें, येऊं लागणें; (पावसास) सुरवात होणें. २ (क्र) ऊन्ह, थंडी पडणें, सुरू होणें; पडूं लागणें. (क्रि० होणें). ' थंडीची, उन्हाची पडती भावना ' ३ आरंभाचें किंवा सुरवातीचें चिन्ह; सूचक लक्षण. **पडत्या पुठ्याचा**-वि. (माण.) उतरत्या कुल्याचा (घोडा, बैल वगैरे). **पडत्या फळाची आज्ञा**-स्त्री मारुतीस सीतेनें पडलेलीं फळें खाण्यास तेवढी परवानगी दिल्याबरोबर झाडें उपटून त्यांचीं फळें पाडून त्यानें अशोकवनाचा विध्वंस केला यावरून एकदां थोडीशी सवलत दिल्याबरोबर तिचा फायदा घेऊन अपेक्षेबाहेर काम करणें; आपल्या इच्छेप्रमाणें आयतेंच कार्य घडून येत असतां तें तात्काळ घडवून आणावें अशा विषयींची माणसाची आतुरता. **पडला-झडला**-वि पडलेला व झडलेला; गळून पडलेला; सांडलेला; विसकटलेला; पसरलेला [पडणें+झडणें] **पडलें पान**-न खेड्यां-तील सर्वाधिकार (पडलेलें पानहि घेण्याचा ज्याला अधिकार आहे असा). ' जोशीपणा व कुळकर्ण हे दोनच अधिकार त्याच्याकडे आहेत असें नाहीं तर पडले पान त्याचें आहे.' **पडल्या पानावर हक्क असणें**-गावासंबंधीं सर्वाधिकार, हक्क स्वतःकडे असणें. **पडीचा आंबा**-पु (पिकलेला किंवा कच्चा) झाडावरून पड-लेला आंबा. याच्या उलट उतरलेला, काढलेला. **पडी पडणें**-१ (पडलेल्यांत पडणें) नाहींसा होणें; विसरला जाणें; उपयोगांतून जाणें; नष्ट होणें; बाजूला पडणें. २ अडथळयानीं अडविला जाणें. **पडल्यापडल्या**-क्रिवि. १ पडता पडतां; पडत, लोळत असतां; लोळतां लोळतां. २ आळसानें; धिमेपणानें. [पडणें] ०**गोष्टी सांगणें**-विचार न करता कांहीं तरी गोष्टी सांगणें. ०**जिंकणें-करणें**-सहज लीलेनें जिंकणें, करणें.

**पडत**—स्त्री (जकाती शब्द) जकात, कर यांची माफी, सूट (संख्या, परिमाण यांतून)

**पंडत**—पु. पंडित; ब्राह्मण. ' तुम्ही पंडत लोकांकडेस फार बाजे वाजविण्यास जाता ! ' -विक्षिप्त १ ५८. [सं. पंडित; हिं.]

**पडतन**—न परतन पहा.

**पडत(द्)रणें**—अक्रि विस्तारणें. 'चराचराचेनि मिषें पडत-रैलें। चिद्रूपा पडियासे।' -भाए ७००. [सं प्रस्तरण]

**पडत(ता)ळ**—न. बाड, बिछाईत, सामानसुमान. [हिं.]

**पडताळ्या**-वि ओझें, पडतळ वाहणारा (तट्टू, उंट वगैरे).

**पडतळ-ताळा**—पु. उपचार; आदरसत्कार. ' आनंदु जाहाला सकळा। तेयासी करिती पडताळा। ' -ख्रिपु २.६ ६५. पडतळ पहा.

**पडतळ-ताळा**—पु. १ अनुभव; प्रतीति ' ऐसा मागील पडताळा घेउनी। पुढां अभिप्रावो दृष्टी सूनी। ' -ज्ञा ७.२०२. २ संदेह निरसन करण्याकरितां ताडून पाहणें; अजमावून पाहणें; जोखणें; दुसऱ्याशीं मिळवून, तुलना करून पाहणें; सिद्ध करण्या-साठीं उलटसुलट रीतीनें परीक्षा घेणें; मेळ; प्रयोग; मोजमाप; गणणें. (क्रि० पाहणें; ताडून पाहणें). ३ अनुवाद. ' म्हणोनि एक वेळ देवा। तोचि पडताळा घेयावा। विस्तरेल तरी सांगावा। सायंतुचि। ' -ज्ञा ५ १६७ [प्रति+ताडणें]

**पडत(ता)ळणें**—अक्रि. १ प्रतीति, परीक्षा पाहणें. ताळा पाहणें; अजमावून पाहणें; तुलना करणें; मेळ पाहणें; रुजुवात करणें; लावून पाहणें, मोजणें; मापणें, तोलणें; वजन करणें (पुन्हा रुजु-वात घेण्याकरितां); गणणें; मोजणें. ' भीष्म पडताळी विद्या-भ्यास। ' -मुआदि ३०१२६. २ पकडणें; हातांत घेणें; धरणें (चालविण्याच्या हेतूनें हत्यार, शस्त्र इ०); पेलणें; पाजळणें. बाहेर काढणें. ' पडताळूनि सुरी बैसली सेजारीं। यमफासा करीं घेऊनियां।'-तुगा १.५४३. 'जरासंध आणि भीम। उभे टाकले गदा पडताळून। '-ह ३३ ८०. ' राजानें पट्टा पडताळिला। ' -ऐपो १९ ३ सज्ज होणें, पोषाख वगैरे चढविणें, घालणें (जोडे, पागोटें, अंगरखा इ०). ४ ऐटीनें धारण करणें; गुंडाळणें; लपे-टणें; बांधणें. ५ परत देणें; फेडणें (शिव्या इ०). ' त्यानें गालिप्रदान केलें तें म्यां आज पडताळलें. ' [पर+ताळा]

**पडती**—स्त्री. उतरती कळा; दुर्दशा; अपकर्ष.

**पडतोरा**—पु. (तंजा.) तळयांत किंवा नदींत उतरण्यास बांधलेला घांट. [तामिळ पडित्तोरै; पडि=पायरी; तुरै, तोरै=वाट, बंदर]

**पडथाळा**—पु. १ (गो.) प्रसुतीनंतर बाळंतिणीला सासराहून किंवा माहेराहून लवकरच येणारें सामान पडताळ पहा. २ (कु) बाळंतविडा.

**पडद्**—स्त्री. १ पडदा अर्थ ८ पहा. २ ढेंपाळयाला गूळ चिकटूं नये म्हणून ढेंपाळयात घातलेलें फडकें.

**पडद(त)पोशी,**—स्त्री. १ पडदा; गोप्य; छपवणूक; २ पडदा, भिंत इ०नीं निर्माण केलेला आडोसा; एकांताचें स्थळ; विश्रांति घेण्याची, विसावा घेण्याची जागा; अंतर्गृह; ३ पडद्याची चाल; पडदानशीनपणा. –शिदि ६९ 'पडदपोशीची आणि उन्हापासून त्रास न होईल अशा व्यवस्थेनें बिछायत करविणें।' –ऐरापुप्र ४ २२३. [फा पर्दा+पोशी]

**पडदणी**—स्त्री. १ स्नान करताना आडवें लावून घ्यावयाचें लहान वस्त्र. 'ब्राह्मण संसार कठीण फार। दुसरें पडदणीस नाहीं वस्त्र।' २ स्त्रिया नाहण्याचे वेळीं अर्ध, फाटकें वस्त्र नेसतात तें 'ये पां न्हाणुदे घेई पडदणी। जटा जाहल्या उकलुंदे वेणी।' –कथा १.१०.६२. ३ (व.) पडदोनी; सोवळें नेसतांना बायकांमध्यें एक आडवस्त्र वेढून घेतात तें. ४ पडदा, पडद अर्थ १ पहा. [पडदा; तुल० सं.परिधानी–पडिदाणी–पडदाणी–पडदणी –भाअ १८३३]

**पडदळ**—न. १ सामान, बाड–बिछात, परगांवीं जातांना बरोबर नेण्याचें सामान, पडतळ पहा. पालपडदळ या सारख्या ठिकाणींच फक्त क्वचित् उपयोग. २ पडदळें पहा.

**पडद(दा)ळें**—न. तरवार अडकविण्याचा (गळयापासून कमरेपर्यंतचा) पट्टा. 'पाटो पडदाळे सिले टोप ओझें। हें तों झालें दुजें मरणमूळ।' –तुगा ३०२१. [पडतळ]

**पडद(दा)ळ्या**—वि ओझे वाहणारा; ओझेल; कंठाळया (बैल, उंट, तट्टू इ०).

**पडदा**—पु. १ आड लावलेलें वस्त्र; एकादें मोठें लांबरुंद कापड भिंतीसारखें प्रतिबंधाकरितां मध्यें आड लावितात तें; कापडी आवरण. २ आडोसा; आडबाजू; अंतर्धान; एकांत; निवांत जागा. ३ बुरखा; गोषा; झांकण; जवनिका. ४ (ल) गुप्तपणा; लाज; लज्जा; शरम; विनयानें मागें राहणें; मर्यादा. म्ह० पडद्यांतील बाहुली पडद्यांत शोभतात 'कोणतेंही एक पडलें अंतर धन्यास कळलें नाहीं, इतका पडदा आहे तोंच बरें, इतक्यानें माणूस मर्यादवंत असतें.' –मराआ १६. ५ थर; पापुद्रा; कवच; साल; पदर (फळ, कांदा, भाकर, दगड, लांकूड इ० वरील). ६ डोळयावरील पडळ, पटल, सारा. ७ भाग (विभक्त) करणारा अवयव. असें:–कानाचा–नाकाचा–डोळयाचा–पडदा. ८ भांड्यांतील शिजविलेलें अन्न (भात वगैरे) ओतण्यासाठीं आंथरलेलें वस्त्र किंवा कापड; पडद. ९ आंगरख्याचा पुढील (छातीवरील) भाग १० पेटी, पिशवी इ०चे कप्पे, भाग पाडणारें जाड कापड किंवा लांकडी फळी. ११ (भाषण करताना किंवा बोलतांना) मनांत ठेवलेला, गुप्त राखलेला भाग. (क्रि० ठेवणें; राखणें) १२ गुप्तता; छपवणूक; गोपन; आंतबाहेर, दुजाभाव 'आपल्याशीं पडदा स्वप्नींहि नाहीं.' –पया ३०९. 'त्याचे माझे स्नेहामध्यें पडदा नाहीं.' १३ गाडीच्या तोंडाच्या पुढचा आडोसा १४ अडथळा; आळा. १५ अंतर. 'आता दुरून दुरून पडद्यानें शब्द बोलतां.' –प्रला. १६ नाटकाचा पट. 'अगोदर दहा पांच वर्षें तरी त्या कंपनीचे पडदे ओढायचें काम करावें लागतें.' –नाकु ३ २५ १७ (बुरूडकाम) उन्हापासून रक्षण व्हावें म्हणून बारीक कामटया सुतळींत विणून केलेला चिकाचा आडोसा १८ (यंत्रशास्त्र) अडकाठी करणारें साधन. (इं.) व्हाल्व. याचा उपयोग त्यांमधून जाणारा प्रवाही पदार्थ (तेल, वाफ, पाणी वगैरे) जाऊं देणें अगर थांबविणें व त्याचें प्रमाण कमीजास्त करण्याकडे करतात 'वाफेचे पडदे बहुतेक लोखंडी असतात' १९ सतार, बीन इ० वाद्याच्या दांडीवर स्वराची जागा निश्चित करण्यासाठीं बसविलेला पितळी अगर लांकडी बाकदार तुकडा. यावर तार दाबून स्वर काढावयाचा असतो. [फा. पर्दा; तुल० सं. परिधा–पडिधा–पडदा–भाअ १८३४. सं. पट, पटल.] ०**उघडणें**–एखादी गोष्ट उघड करणें. ०**उघडविणें**–लाज सोडणें, बाजूला सारणें. ०**पाडणें–ओढणें**–दृष्टीआड करणें; लपविण; छपविणें. ०**राखणें**–मर्यादा राखणें, पाळणें; छपवणुकीस जागा ठेवणें (बोलण्यांत वगैरे). **सातव्या पडद्यांत बसणें**–अत्यंत गुप्त अशा जागीं जाऊन बसणें. म्ह० (व) पडदा मारी झडदा=एखाद्या स्त्रीला पडदा असून ती वाईट चालीची असल्यास तिला म्हणतात

**पडदी**—स्त्री. एक विटेची घातलेली भिंत (सामान्यतः विभाग करण्यासाठीं), पडदा, कूड.

**पडन**—न. पडण पहा.

**पडन्**—न. (व) आश्विन शुद्ध नवमीस महारांच्या देवीजवळ रेडयाचा बळी देण्याचा विधि. [पड]

**पडप**—न १ अतिशय लडिवाळपणा; कौतुक, लाड. एखाद्याचे गुण वाखाणण्याची हौस अगर आवड. 'आहे पंडुतनयकृत दिग्विजयाचें नृपा पडप यास।' –मोवन ७ १०३ २ स्तुति; वाखाणलेले सद्गुण; चांगुलपणा. (क्रि० सांगणें; बोलणें) 'दिवसभर माहेरचें पडप सांगते.' ३ पक्षपात; कोणाएकास कोणाची सर्वदा प्रतिष्ठा व्हावी, ती वर्णावी, असें जें तद्विषयीं पक्षपातानें वाटतें तें ४ ओढून ताणून आणलेली प्रतिष्ठा; उसना दिमाख; तोरा; कुर्रा; नस्ता डौल, अक्कड; उद्धटपणा. 'चाकराचे इतके पडप कशास पहिजे.' ५ नावीन्य; नवलाई; विलक्षणपणा. 'त्या गोष्टीचें मोठें पडप वाटतें–झालें.' ६ थक्क करणारा सुरेखपणा;

शोभा; शृंगार 'अंग बोल मारूनि तपें। विकावया आपणपें। अंगहीन पडपें। जियापरी।' –ज्ञा १७.२४६ 'तैसें सोलिव मोहाचें रूप। तें जाण योषितास्वरूप। त्याहीवरी खटाटोप। वस्त्रें पडप भूषणें।' –एभा ८.८४ ७ (महानु.) भूषणाचें, भूष विणारें वस्त्र 'पडप दे संध्यावधूसि अंगरागाचें।' –एभा २५ [ पडियंता=प्रिय ] ०पुरविणें–लाड करणें, पुरविणें 'एसें निज भक्ताचें पडप। तूं मायबाप पुरविता।' –महिपति पांडुरंग स्तोत्र. ०दानी–नि–वि (महानु) १ भूषणवस्त्र देणारा 'कैवल्याचा पडपदानि।' –भाए ६४९ २ शोभा देणारा. [ पट+दा ]

**पडप**—स्त्री बरोबरी

**पडपावणी, पडपणी**—स्त्री १ न्हाव्यानें एखाद्या कुटुंबातील व्यक्तीच्या ज्या हजामती कराव्या लागतील त्या कराव्या आणि त्यास वर्षास किंवा सहा महिन्यांनीं अमुक द्यावें अशी केलेली बोली, करार. २ अशा कराराची रक्कम; धान्य वगैरे हक्क. [ पडण= ठराविक वेळ+पावणें ]

**पडपेंठ**—स्त्री. संपूर्ण हकीकत, मूळ, उगम, वाढ इ० पूर्ण माहिती, कुळगोत इ० (क्रि० पहाणें; लावणें, शोधणें, लागणें). 'मुलाची पडपेंठ पाहून मुलगी द्यावी.' [ पेंठ=बातमी, खबर ]

**पडम**—न. जाड व सुती कापड (पिशवी, गोणपाट, पडश्या इ० करण्याच्या उपयोगाचें); गोणपाट; दुहेरी तिहेरी सुतानें विणलेलें अरुंद वस्त्र.

**पडमूत**—न. घोडीवर स्वार बसल्यावर किंवा ती रस्त्यानें चालली असता तिनें केलेली लघवी, मूत, इराकत. –वि. अशा तऱ्हेनें मुतणारी (घोडी).

**पडमूर**—वि (गो) निष्ठुर; बेमुर्वत.

**पडयें**—न (कु) मेलेलें गुरुं, जनावर. पड पहा

**पडलस**—पु शिवडयासारखा पण अधिक काळा मासा. याला खवले नसतात याचें तोंड वाटोळें असतें व ओटांवर मिशा असतात यास दोन पख असतात. छातीवरील पंख बळकट असतात.

**पडलाी**—स्त्री. (कु.) १ फुलाची परडी; बांबूची, वेताची विणलेली लहान टोपली. २ (बे) जोगवा मागण्याची टोपली. [ परडी ]

**पडवण**—न. (चाभारी) जुना आसूड लांबवून देणें.

**पडवळ, पडोळ**—स्त्री १ भोपळयाच्या वर्गातील एक वेल. हा बराच वाढतो. यास २।३ हात लांबीचीं हिरवट अगर पांढरीं पट्टेदार फळें येतात. –न या वेलीचें फळ; फळभाजी ही भाजी पथ्यकर, हृदयाला हितकर व कृमिनाशक आहे –वगु ४.५३. [ सं. पटोल, पटोलिका; प्रा. पडोल ] हाता पायांचे पडवळ होणें–अशक्त व हाडकुळें होणें. पडवळाची वात–(कों.) फुलांतून फळ होण्यास सुरवात झाल्याबरोबर बारीक लांब दिसणारें फळ' 'अळयावर किती पडवळ वाती दिसतात.!' ०काठी–स्त्री. (महानु) छत्रकाठी 'स्याहाणौ कोंडी तेजियां। पुढा डौलतांती पडवळकाठिया।' –शिशु १०३४ [ सं. पटोल=वस्त्रप्रकार; म. पडवळ+काठी ]

**पडवा**—पु एक प्रकारचें सुकलेलें फळ हें औषधोपयोगी आहे.

**पडवा–वें**—पुन. (कु) अनायासें झालेला लाभ. 'जावोनि गोवर्धना तळी। पर्वत उचलिला समूळी। पडवा जाहला तयेवेळीं। गाई गौळी सुखी केले।' –कथा ४.५.१५४. [ का पडु=प्राप्त होणें ]

**पडवी**—स्त्री. खांबाचा तळखडा. –शर

**पडवी**—स्त्री. १ घराची मागील बाजूची अरुंद ओसरी; ओवरी, इं. व्हरांडा २ घराला लागून काढलेली जागा; भिंतीला लागून बांधलेली छायेची जागा; एकपाखी इमारत, अडोसा. ३ डोकीवर घेतलेल्या ओझ्यावर आच्छादन घालण्यासाठीं इरल्यास जोडलेलें चुंबळ.

**पडवें**—न (कों.) देवडी; द्वारमंडप; ढेलज; (इं.) पोर्च.

**पडशी**—स्त्री. दुमोट करावयाच्या सोयीचें मध्यें तोंड ठेवून केलेलें पडम इ०कांचें पोतें; दोहों बाजूंस दोन तोंडें असून मध्यें जोडलेली, घडी करण्यासारखी मोठी पिशवी; कंठाळ.

**पडस(सा)र**—वि. पडकें झालेलें, ओसाड; ओस; पडित; पडिक (खेडें, जमीन). [ पडणें+सर=सारखे ]

**पडस(सा)ळ**—स्त्री १ देवीनंतर अंगावर उठणारे फोड, पुरळ. २ पिकाची कापणी झाल्यावर सडाशीं अगर पिकाच्या कापलेल्या बुडख्याशीं उगवणारे कोंब; कापणीनंतरची फूट. [पड+सळ]

**पडसें**—न. थंडी, सरदी; सर्दीमुळें नाकांतून पाणी गळणें. 'पडसें झालें–कोंदलें–कोंदाटलें–वाहतें.' [ सं. प्रतिश्याय ]

**पडसावणें–पडसेणें**–अक्रि. नाक गळणें; पडसें येणें; सर्दी होणें. **पडसेकरी**–वि. पडसें ज्यास झालें आहे असा.

**पडळ**—न. १ डोळयावरील सारा, पटल; पडदा; डोळयांतील मोतिबिंदु. 'जितुकें अभिमानाचें बळ। तितुकें निजदृष्टी पडळ।' –एरुस्व १६.१०८. २ आच्छादन; आवरण. [ सं. पटल ]

**पडळ–ळी**—स्त्री (काव्य) (गांधीलमाशांचा) थवा; जमाव; समुदाय. पटल पहा.

**पडळ, पडाळ**—स्त्री. १ मोकळी जागा. २ शेतांत, बागेंत बांधलेली पडवी, झोपडी. [ ? सं. पट+आलय ]

**पडळें**—न. अभ्र; ढग; मेघ. 'आला श्रावणमास जाण पडळें गर्जे कसें अंबरीं।' –अकक २. बसव, द्वादशमास २८. [ सं. पटल ]

**पडाण**—न. (कु) १ भजनांत चाल व ताल बदलण्याचा टप्पा. २ पाटाचें पाणी बदलण्याचा, अडविण्याचा बाध.

**पडाव**—पु १ (सैन्याचा, कळपवाल्यांच्या टोळीचा, देव-घेव करणाऱ्या लोकांचा, यात्रेकरूंचा इ०) तळ; मुक्काम २ तळ देण्याची किंवा मुक्काम करण्याची जागा; उतरण्याची जागा; शिबिर, छावणी, डेरा; कंपू, वस्ती. 'आसमंतात पंचवीस पंचवीस कोस-पर्यंत मेळयाचा पडाव असतो' –तीप्र ३१ [हिं.]

**पडा(डां)व**—पुन. पांचपासुन वीस खंडीपर्यंत वजन वाहून नेणारी नाव; होडी; मचवा. [का. पडगु. तुल० सं प्लव]

**पडासणें**—क्रि. उलगडा करणें –शर

**पडाळ**—न (व.) एक प्रकारचें गवत 'शेतांत पडाळ वाढलें'

**पडिकर**—वि. सुंदर; डोळस. 'का पुढांसुनि पडिकरा। अक्षमु चाले।' –ज्ञा १७४२.

**पडिकार**—पु उपाय. 'नाना पडिकाराचेनि सळें। काढी आपलेचि डोळे। तें वानवसा आंधळें। जैसें टाकें।' –ज्ञा १७ १०२. [सं. प्रतिकार]

**पडिखरणें**—सक्रि. (महानु) ओळखणें, पहाणें; पारख करणें. 'आंधळेयाचा नगरीं। कवण कवणातें पडिखरी।' –भाए ५५८ पडखरणें पहा. [परीक्षणें]

**पडिघ(घा)णें, पडिघाइणें**—क्रि. १ धरणें; दाबणें. 'यया-परी मतमुक्तकीं। तेथ पडिघायिलें आणिकीं। म्हणती हां हो विवेकी। तरी तुम्ही भले।' –ज्ञा१३.५१. २ प्राप्त होणें; पुढें येणें. 'तैसेंचि नाना रोग। पडिघाती पुढां आग। आरोग्याचे उपेग। करूनि घाली।' –ज्ञा १३.५८७. [? सं. प्रतिग्रहण]

**पडिघा**—पु. तस्त; पीकदाणी. पडगा पहा. 'मीचि होईन सागळा। करूं सुईन गुरुळां। सांडिती तो नेपाळा। पडिघा मीचि।' –ज्ञा १३.४१८. [पडघा; सं. पतत्ग्रह ?]

**पडिघाणी**—स्त्री. कळसाची बैठक पडघाणी पहा. 'दास्यें पडिघाणियें केला मेळावा। सख्येंसी वरी कळस शोभला बरवा।' –स्वानु ७.३.५९. [सं. प्रतिग्रहणी]

**पडिघातणें**—क्रि. आदळणें; ताडन करणें. [सं प्रतिघात]

**पंडित**—पु. १ विद्वान ब्राह्मण; विद्यासंपन्न, अधीत, विद्वत्तेंत निष्णात; व्यासंगी; शास्त्रज्ञ; विद्वान. 'दुर्बल वस्तु न वांछी न करी जो नष्ट वस्तुचा शोक। आपत्तींत न मोहे त्या पंडित म्हणति जाणते लोक।' –मोउद्योग ३.९१. 'मग तिसरा पंडित बोलत।' –शनिम २१. २ (पत्रांतील मायन्यात) मोठ्या मनुष्याच्या नांवाच्या अगोदर किंवा पुढें लिहितात ३ (ल.) एखाद्या शास्त्रांत किंवा कलेंत निष्णात, हुषार; चतुर; कलाभिज्ञ, तज्ञ. ४ शिक्षक; पंतोजी 'हें बहु असो पंडितु। धरूनि बाळ-काचा हातु। वोळी लिही व्यक्तु। आपणची।' –ज्ञा १३ ३०७. [सं. पंड्=जाणणें] **पंडितंमन्य-मान्य, पंडितमानी**-पु. अभिमानी, गर्विष्ठ, मिजासखोर पंडित, दांभिक व अज्ञानी इसम; विद्येचा नसता डौल दाखविणारा, अवडंबर माजविणारा मनुष्य –वि अंगीं विद्वत्ता नसुन स्वत स मोठा विद्वान समजणारा किंवा तशी ऐट मारणारा. 'जेवीं का निर्दैवाहातीं। कनक पडलें होय माती। तेवीं पंडितमान्यचि व्युत्पत्ती। विषयासक्ती नाशिली।' –एभा ११ ५४०. **०राव**-पु राजदरबारातील पंडित; छत्रपतींच्या अष्टप्रधानापैकीं एक

**पडिपाड**—पु (काव्य) १ साम्यता, सारखेपणा, बरोबरी तुलना (क्रि० येणें) 'सूर्यासी खद्योत रणांगणीं। भिडों शके झोटधरणी। तरी तुज मजलागोनी। पडिपाड रणीं घडेना।' –एरुस्व ११ ३१; १५ ४६ 'आनंद तुळितां पडिपाडीं। स्वर्गही दिसे ठेंगणा।' –मुआदि १६.६२. २ पराक्रम, प्रताप, सामर्थ्य. 'नवल काळसर्पाचा पडिपाडु। विषप्राय विषय केला गोडु।' –एभा १९.१२२. ३ व्याप्ति. –मनको [सं प्रति–म. पडि+पार–पाड] **पडिपाडीं**-क्रिवि मोठ्या युक्तीनें 'परी निःशेष पीडी ना सोडी। ऐसें पडिपाडीं राखत।' –एभा २० २१८.

**पडि(डी)भर-भार**—पु १ अधिकता, अतिशयपणा –ज्ञा २ १९३ 'पायांवरी डोई ठेवीन आदरें। प्रीतिपडिभरें आलिंगून।' –तुगा ५९८ २ भर 'त्याचे गावीं निद्रेचा पडिभरू।' –दावि ८०९ ३ आसक्ति 'अभेदाचें पाठांतर। अति विषयीं पडि-भर।' –तुगा. ४बडेजाव. 'सर्वेचि विषयाचा पडिभरू।'–नामदेव १४०८. ५ सोवती 'परि ठाकिलियाहि सागरु। जैसा मागीलही यावा अनिवारु। तिये गंगेचिये ऐसा पडिभरु। प्रेमभावा।' –ज्ञा १८०८. ६ आधार. 'कीं हे कल्पनेचे कल्पतरु। कीं हे मोक्षाचे मुख्य पडीभरू। नाना सायोज्यतेचे विस्तारु। विस्तारले।' –दा १.७.६. –वि. श्रेष्ठ. [सं. प्रति+भार]

**पडिभार-वार**—पु पडप, बडिवार पहा

**पडिभा(या)सणें**—क्रि. १ भासणें. 'परि लटिकेपणाची नवाई। पडिभासे गा।' –ज्ञा १५.२३९ २ शोभणें. 'तैसा कटि प्रदेश गंभीरु। पडिभासे देवाचा।' –ज्ञाप्र ४३३ पडियासणें पहा. [सं. प्रतिभास्]

**पडिमठ**—पु (महानु.) प्रत्येक स्थान, प्रतिमठ अर्थ १ पहा. 'खरीचें पडिमठें गाइलें। ते नेणों कैसे रहावलें।' –शिशु १६९. [सं. प्रति+मठ]

**पडियंत**—स्त्री. प्रतिष्ठा. –शर.

**पडियावो**—पु. आवड –शर. पडिभार पहा.

**पडिसाई**--स्त्री. पडसावली पहा. 'चंद्रमा आलिया घरा। म्हणिजे निगे करितोसि उबारा। पडिसायि पाडितोसि दिनकरा। परता सर।' -ज्ञा ११.६२७. [ सं. प्रतिच्छाया ]

**पडिसाद्**—पु पडसाद पहा. 'कां आपुलींचि उत्तरें। पडिसादां होती प्रत्युत्तरें। तें मिथ्याचि परी साचोकारें। श्रवणीं अक्षरें उमटती।' -एभा २८ ८८.

**पडिसादु-पडिया**--पु. पडसाद पहा. 'तंव सिंहाचे शब्दें पडिसादु थोरु जाला।' -पंच ३.२३.

**पडी**—स्त्री पड; माघार. पड पहा. 'मिळोन जाऊन मिळवावें। पडी घेऊन उलथावें।' -दा १५.६ १६.

**पडीक-त**—वि. १ पड; बिन लागवडीची (जमीन) २उपयोगांत नसलेली, न लावलेली (वस्तु). [ पडणें ]

**पडीतचाराव**-पु. १ पड जमीनीवर गुराना चारणें. २ अशा चराईबद्दल वसूल केलेला पैसा-कर. [ पडीत+चारणें ]

**पंडु**—पु. १ पांडुरोग; रक्तहीनत्व; रक्तक्षय २ पांडवांचा पिता. [सं. पांडु] **पंडुछाया**-स्त्री. पांडुरोगाचीं आरंभीचीं चिन्हें. **पंड्यारोग**-पु. पंडुरोग.

**पडुलि**—स्त्री. पडळ पहा.'त्याहिं पडुलि वाढे।'-पंच ५.९.

**पडू**—वि. (कु. कों.) पडया पहा.

**पडें**—न. आपोआप,अपघाताशिवाय मेलेल्या जनावराचें प्रेत; मेलेलें किंवा मृत जनावर; पड.

**पडोशी-सी**—पु. शेजारी.

**पडोस**—क्रिवि. शेजारचा, आसपासचा, आसमंतांतील. [ सं. प्रति+वस्, हिं. ]

**पडोसरी**—स्त्री. मागील बाजूची ओसरी किंवा पडवी.

**पडोसा**—पु. १ शेजार. 'ह्याच्या पडोशास दुसरा पाहिजे.' २ (ल.) जवळपणा; जुळतेपणा; सारखेपणा 'ह्या शालजोडीचा पडोसा पाहून घ्यावा.' ३ पडताळा. [ सं. प्रति+वस्-वास-वासी ?वेशी; हिं. ] **पडोस पाहणें**-ताडून पाहणें, तुलना करणें. **पडोशास उतरणें**-तुलनेंत जुळणें; उतरणें.

**पड्डें**—न. (बे.) परसूं; परडें.

**पड्या**—वि. मठ्ठ; सुस्त, मंद; आळशी; कामाचा कंटाळा व तिटकारा असलेलें (जनावर इ०). [ पडणें ] **म्ह०** उडया पुरवतो पडया पुरवत नाहीं.'

**पंड्या**—पु. क्षेत्रांतील हिंदुस्थानी ब्राह्मणांचा एक वर्ग, जात व तींतील व्यक्ति. २ (उत्तरहिंदुस्थान) उपाध्याय. [ सं. पंडित; किंवा पंडा=विद्वत्ता; हिं. ]

**पंड्या, पंड्याऊस**—पु. एक जातीचा ऊंस; पुंडया पहा.

**पड्याल**—क्रिवि. (अशिष्ट) पलीकडे; पलीकडच्या बाजूस; त्या बाजूस किंवा दुसऱ्या बाजूस. याच्या उलट अलयाल.

**पड्याळ**—न. (व.) दर्भ; नदीकाठीं उगवणारें गवत. 'नदी वरील पडयाळ श्राद्धाकरितां घेऊन ये.'

**पढण**—न. झिजून गेलेल्या किंवा बोथट झालेल्या हत्याराला नवीन पोलाद घालण्याची क्रिया. (क्रि० करणें; घालणें).

**पढणें**—उक्रि १ वाचणें २ एखाद्या ग्रंथांत स्पष्ट उल्लेख केलेला, झालेला असणें. 'ग्रंथकार पढला आहे' ३ म्हणणें; पठण करणें. 'रामनामाचे पवाडे। अखंड ज्याची वाचा पढे।' -तुगा ४२२९. ४ शिकणें; घोकंपट्टी करणें; शास्त्रादि विद्या पठन करणें. 'पढला गुरुपाशीं तें प्रकटीं शत्रु क्रोधें कढला।' -मोरामायण पंचशती ३७०. [ सं. पठ्; प्रा. पढ ]

**पढणें**--न. ज्ञान, विद्या; शिक्षण; लिहावयास, वाचावयास येणें. 'तुला कांहीं पढणें येतें?' 'तुझें पढणें किती झालें?'

**पढतमूर्ख-पशु**-वि शिकलेला असून व्यवहारज्ञानशून्य; शिकलेला असून मूर्ख; शिकलेला सवरलेला असून कार्याकार्याचा विचार न करतां मूर्खासारखें वागणारा. 'तया नाव पढतमूर्ख।' -दा २.१० २ **पढता**-वि. पढीक. 'वारी वो पढतेयां पुंसां। कोप कलहंसासीं।' -शिशु ८३६. **पढयंता**-वि. बोलका; पढीक. 'तंव भणे कमलावती। सांडौनि सत्यभामा पढयंती।' -शिशु १८१. **पढविणें**-शिकविणें. 'ठकवी किति दिवस असे दारिद्र्यचि कपट तीस तें पढवी।' -मोअनु ३ ४. **पढीक**-वि विद्वान; शिकलेला; पढलेला; बहुश्रुत. **पढियावो**-पु. (महानु) पढियेतेपण; शिक्षण. 'माझा पढियाओ। गोसावी बोलती तो अवघाचि वावो।' -भाए ८१.

**पंढरपूर, पंढरी**—नस्त्री. पंढरपूर शहर 'पंढरपूर परगणा। विठूच्या दरवाजावर मोत्याचा पाळणा।' 'काया ही पंढरी। आत्मा हा विठ्ठल।' [ सं. पांडुर; म. पांढर+पूर ] **म्ह०** आळशाला गंगा दूर आणि पाप्याला काय पंढरपूर. **पंढरपुरी**-वि. पंढरपुरासंबंधीं; पंढरपूरची. **पंढरीची वारी**-वारकरी म्हणून जे विठोबाचे भक्त आहेत ते दर महिन्याच्या शुक्लपक्षांतील एकादशीस किंवा दर आषाढी कार्तिकी एकादशीला पंढरपुरास विठोबाच्या दर्शनास जातात. यावरून सामान्यतः वारंवार होणारी खेप. 'चांगला अभ्यास न करतां परीक्षेस जाणें म्हणजे पंढरीची वारी करणेंच आहे.' **पंढरीनाथ-निधान**-पुन. (पंढरीचा नाथ किंवा निधिभांडार) विठोबा; पांडुरंग. 'हृदयीं धरिलें पंढरीनिधान। तेंहून आटता काळ आला।' **पंढरी पिकणें**-अत्यंत भरभराट व उत्कर्ष होणें; विपुलता, मुबलकता असणें (हंगाम, पीकपाणी इ० ची).

**पढवळकाठी**—स्त्री. (महानु) उंच भाला. 'दीर्घ कसेयाचा भाला. पडवळकाठी पहा. 'डोलतीं पडवळकाठिआं।' -शिशु ५२७.

**पढळ**—न टाळ; टाळाची वाटी; टाळाच्या दोन भागांपैकीं एक. [ ? सं. पटल ]

**पढिकर**—पु. १ साहाय्यक. २ रोग बरे करणारा वैद्य. –शर.

**पढियासणें**—अक्रि. प्रतिभासणें; भासणें; पडिभासणें पहा. 'ना तरी पवनें स्पर्शिलें नीर। पढियासें तरंगाकार। का परापेक्षा अळंकार-। व्यक्ती कनकीं।' –ज्ञा २.१६७. [ सं. प्रति+भास ]

**पढियासणें**—अक्रि. आवडणें; प्रिय असणें. 'तेवी कथा अंतःकरणी। मजे पढियासली।' –शिशु ३५. 'जे पढियेसी तूं मज। म्हणऊनिया।' –ज्ञा ४.२८. **पढियंता, पढिया-आ**–वि. प्रिय; आवडता, लाडका; प्रेमाचा. 'देवयानी शुक्रतनया। प्राणापरीस पढियंती पितया।' –मुआदि १७.३६. 'जेआ कवी पढिअे शृंगारू।' –दाव ४७. 'प्राणाहूनि पढिये मित्र।' –एभा २३.२९३. [सं. प्रति+भास् ]

**पढियावो**—पु. आवड, प्रेम. 'संताचा पढियावो कैशापरि-लाहो। नामाचा आठवो कैसा राहे।' –तुगा १६१८

**पढयान्, पढयान खोकला**—वि. (न.) काम न करणारा; आळशी.

**पण**—पु. १ वचन; नियम, प्रतिज्ञा. 'जनकाचा पण पुरवी त्र्यंबक कोदंडदंड मोडूनी।' –मोहनुमद्रामायण ९. २ पैज; होड. (क्रि० करणें; घालणें) ३ (द्यूतांत, पत्त्यांच्या खेळांत) लावलेली रक्कम, पैजेचा जिन्नस. [सं.] ०**भोगणें**–निश्चिति, खात्री असणें, पैज किंवा होड लावण्यास तयार असणें. ०**जित**–वि. प्रतिज्ञापूर्वक वादांत पराजित झालेला; पणात जिंकला गेलेला.

**पण**—उअ. १ परंतु; अद्यापि; यद्यपि; तथापि. २ देखील, सुद्धा, त्याचप्रमाणें, तथा; तसेंच. 'त्यानें त्याला सुद्धां एक तारेची तसबीर काढून दिली आहे व ती सलाबतखानाजवळ अद्याप आहे पण.' –आनंदीरमण. ३ कीं, ना याप्रमाणें वाक्यास जोर, खात्री देण्याकरितां योजितात जसें:–जातो पण, येतो पण. 'मी पण आलों–गेलों.' ४ हि ह्याअर्थी योजितात. जसें.–शपथा पण वाहिल्या पण खरें नाहीं बोलला. शिवी पण दिली पण म्या सोसली. '५ कोणताहि दोहोंपैकीं वाटेल तो. 'मला फिरावयास जाण्यास घोडा पण चालेल, गाडी पण चालेल' [सं. पुन.; प्रा पुणो; गो पणून, पोण्ण ]

**पण**—भाववाचक नाम बनविण्यासाठीं नामास व विशेषणास हा प्रत्यय लावतात. जसें–चांगलेपण, वाईटपण इ० हीं सर्व पणांत नामें नपुसकलिंगी होत. शब्दाचा अंत्य आ असेल तर त्याचा ए होतो. जसें–जाणता याचें जाणतेपण. क्वचित आचा अ होतो. जसें:–शाहाणा, म्हातारा इ० यांचें शहाणपण; म्हातारपण इ० (पुष्कळदां चुकीनें संस्कृत शब्दालाहि हा मराठी प्रत्यय लावतात. उदा० बकपणा) [? सं. पद्–पन्न; हिं. पन ]

**पण**—पु. यौवनावस्था; ज्वानी; वय. 'मुलगी मुलगा–पणांत आला.' **पणांत असणें**–बारां वर्षांच्या वयानंतर ज्वानी संपेपर्यंतच्या वयात असणें. **पणांत येणें**–(बायकी) वयांत येणें. यौवनावस्था प्राप्त होणें. **म्ह०** बाई आली पणांत बोवा बसले कोनांत.

**पण**—न. ऐंशी गुंजा भार वजनाचें नाणें. –धर्मसिंधु. [सं.]

**पॅण**—न (गो.) पालखी, रथ वगैरे मिरवणुकींत ठिकठिकाणीं थांबणें व थांबल्यानंतर करण्यांत येणारा कलावंतिणीचा नाच [पेणें]

**पण आजा-आजी, पणआजोळ**—(अशिष्ट) पणजा–जी पहा

**पणक**—पु पैसा. [सं पण् ]

**पणकेसर**—न. एक दागिना 'तानिवडें हृस्तकङ्गे कळविया। पणकेसरें गळसरी भोवरिया। अणेकें भूषेणें ढिधलीं तेया।' –ख्रिपु १.१६.१४४ [सं पर्ण+केसरी ? ]

**पणंज, पणजें**—न. (कों) पोकळ दाणा किंवा कणीस; करपलेलें किंवा न भरलेलें धान्याचें कणीस, ओंबी (विशेषतः भाताची)

**पणजा**—पु. आज्याचा बाप, बापाचा, आईचा आजा [? पर वद्दल पण+आजा ]

**पणजी**—स्त्री. पणज्याची बायको, बापाची, आईची आजी. पणजेसासू–सासरा इ० समासहि होतात

**पणजोळ, पणंज्वळ, पणजवळ**—न बापाचें किंवा आईचें आजोळ

**पणत-ती, पणथी, पणतोली**—स्त्री नातीची मुलगी [सं प्रनप्त्री ]

**पणतसून**—स्त्री पणतूची बायको

**पणती-थी, पणतोली**—स्त्री. दिवा लावण्याचें मातीचें पात्र; मातीचा दिवा

**पणतुंड-तोंड, पणतवंड**—न. पणतू, पणत, नातीचें, नातवाचें मूल.

**पणतू**—पु. नातवाचा किंवा नातीचा मुलगा (गो.) पणतुर [सं. प्रणप्तृ ]

**पणंद**—न पणंज पहा.

**पणपणें**—क्रि १ वेली, झुडूप इ० जोरानें मूळ धरून जोमाला लागणें; जोमानें वाढीस लागणें २ (ल) चांगला पाया, आधार मिळणें; उत्कर्ष पावणें; भरभराट होणें; संपत्तिमान होणें.

**पणव**—न. एक प्रकारचें वाद्य. 'पणव शृंगें मोहरी काहळा।' –कृमुरा ४० ११. –ह २२.२७. [सं ]

**पणस**—पु. (राजा) फणसाचें झाड व त्याचें फळ. फणस पहा 'शरचितदेहें जिंकी फळ भीष्म मनुष्यदेव पणसाचें।' –मोभीष्म ११.११८. [सं. पनस; म. फणस] **पणशी**–वि. (गो.) फणसाच्या लांकडाचें केलेलें.

**पणा**—पण प्रत्यय. पण पहा. या प्रत्ययापासून बनलेलीं नामें पुल्लिंगी असतात. उदा० लहानपणा, मोठेपणा इ०.

**पणाजा-जी, पणाजोळ**—पणजा-जी पहा.

**पणासणें**—क्रि. रचणें. पन्नासणें पहा. -शर.

**पणित**—वि. वचन, शब्द दिलेला; सौदा कबूल केलेला. [ सं. पण् ]

**पणीत**—न. सोनाराचें एक हत्यार

**पणून, पोण्ण**—अ. (गो.) परंतु; पण.

**पणेरी**—पन्हेरी पहा.

**पण्य**—वि. विकावयाचा; विकावयासाठीं बाजारात मांडलेला (माल); विकण्यास शक्य, योग्य; विक्रीचा; बाजारी [सं.]

**पण्यांगना**—स्त्री. वेश्या; कसबीण, बाजारबसवी 'जें व्याघ्राचें क्षेत्र। जें पण्यांगनेचें मैत्र। जें विषयविज्ञानयंत्र। सुपूजित।' -ज्ञा ८ १४६ [सं. पण्य+अंगना]

**पण्हरें**—नपु. उत्तम सोनें. पंधरें पहा. 'आंगाचेनि गोरेपणें। हे पण्हरेयांवरी पढवी आंकणें।' -शिशु ८०७.

**पत**—स्त्री. १ नावलौकिक; इमानीपणा, विश्वासुकपणा ह्या बद्दलची कीर्ति (विशेषतः व्यापारी लोकांत); अब्रू, सचोटी या विषयीं दुसऱ्याचा विश्वास. 'पुरुषाला पत आणि स्त्रीला पति.' -प्रेम २८. २ वजन. [सं. प्रति-इ=प्रत्यय-प्रतीति] **पत असणें**-व्यापाराच्या वगैरे कामांत पैशाचे बाबतींत लोकाचा विश्वास असणें **पतीवर पाणी पडणें**-व्यापारातील पत, अब्रू किंवा वजन अगर विश्वास नाहींसा होणें, बुडणें, त्यास धक्का पोहोंचणें. **पतीस चढणें**-नांवलौकिक, विश्वास, मानमरातब वाढणें. **पतपात, पतपातेरा, पतपासोडी**-स्त्रीपुस्त्री. सचोटी. पत पहा. 'सावकारांतहि पतपात भारी जहाली.' -भाव १९. [पत द्वि.] ०**पेढी**-स्त्री. लोकांनीं संयुक्त भांडवलावर काढलेलें सावकारी दुकान. (इं.) क्रेडिटबँक. ०**घाण**-स्त्री. १ नापत; बेअब्रू. २ (व्यापारात) नुकसान; तोटा. [पत+घाण]

**पंत**—पु. १ अष्टप्रधानातील प्रत्येक मंत्री याच्या पाठीमागें लावावयाची मानाची पदवी अगर किताब जसें:-पंत प्रतिनिधि, पंत अमात्य. २ शास्त्राचें अध्ययन न केलेल्या पण कारकुनी इ० करणाऱ्या गृहस्थ ब्राह्मणाच्या नांवापुढें लावतात; गृहस्थ धर्मी ब्राह्मण (शास्त्री, भट नव्हे असा). ३ बहुमानाची पदवी जसें:-केसोपंत, मोरोपंत. आंध्र प्रांतांत पंतलु (पंताचें अव.) असें रूप येतें. ४ पंतोजी; शिक्षक. 'अर्भकाचे साठीं। पंतें दातीं धरली पाटी।' -तुगा २१८० [सं. पंडित याचें संक्षिप्त रूप. हें बनारसकडे अजून या अर्थी योजितात] ०**प्रधान**-पु. पेशवा; मुख्य प्रधान; अष्टप्रधान पहा.

**पतक**—नपु १ घोडेस्वारांचा, राउतांचा समुदाय; स्वतंत्र सरदाराच्या हुकमतींत सुमारें शंभर घोडे असलेलें पथक. २ पतकीचा हुद्दा, धंदा. [सं. पत्ति; पत्तिक] **पतकी-क्या**-पु. १ पथकावरील मुख्य अधिकारी. 'एकएकाबरोबर ऐसे पतके किती।' -ऐपो १०७ **पतकी**-पु (क.) जकातीकडील दुय्यम अधिकारी.

**पतक(का)र, पतकरा**—पु मान्यता; स्वीकार; अंगीकार. **पतक(का)रणें**-सक्रि. १ संमत, मान्य असणें, कबूल करणें. २ हातीं घेणें; अंगीकारणें; अंगावर, शिरावर घेणें (काम इ०). ३ आवडणें; पटणें; परवडणें. 'हें काम मला पतकरलें.' [सं. पथ+कृ]

**पतखल**—स्त्री. फतकल पहा. (क्रि० मारणें; घालून बसणें).

**पतग**—पु. पक्षी. 'दे आपुली तनु तरी पतग प्रमाण।' -आशिबि २६ [सं. पत्+ग?]

**पतंग**—पु १ दिव्यावर झडप घालणारें एक जातीचें मच्छर. 'बा दावपावकासीं समर करुनि पावतिल पतंग जया' -मोउद्योग ९९२. २ कागदाची वावडी, तुक्कल ३ सुर्य. [सं] ०**फुगडी**-स्त्री. दंडफुगडी पहा

**पतंग**—पु. १ एक झाड. याच्या लाकडाचा रंग तांबडा असतो. त्या पासून गुलाल करतात. २ या झाडापासून तयार होणारा रंग. 'गुलाल आणि अनिवार पतंग।' -ऐपो २१३. [सं पत्रांग; हिं.]

**पतंगी**—वि. पतंगाच्या लाकडापासून केलेला. 'कीं लागतां सूर्यकिरण। पतंगी रंग उडतसे।' -भवि १०.१९५.

**पतंगी**—स्त्री. पाण्यात उडी टाकण्याचा एक प्रकार.

**पतंगी बाळी**—स्त्री. कानांतील एक प्रकारची बाळी. 'हौदी बाळया पतंगीबाळया तुटती तार।' -अफला ५५.

**पतन**—न. पडणें; नाश; अधोगति. 'कर्म धर्म नव्हती सांग। उण्या अंगे पतन।' -तुगा २५१८. [सं.] ०**पावणें-भोगणें**-१ नाश होणें; संकटांत पडणें. २ बेअब्रू होणें; खालावणें; केल्या कर्माचें, दुष्कर्माचें फळ भोगणें. ०**किरण**-पु. (शाप.) वर पडणारा किरण; आपातकिरण. (इं.) इन्सिडेंट रे. ०**केंद्र**-केंद्र पहा. ०**कोन**-पु. किरण पडण्याची दिशा, रोख, (इं.) अँगल ऑफ इन्सिडन्स. **पतनीय**-वि. पडण्याच्या बेतांत असणारा; पडण्यास योग्य.

**पतपाणी**—न. (अशिष्ट) पथ्यपाणी पहा.

**पतर**—न लांकडाचें, भोपळ्याचें भिक्षापात्र (गोसावी इ० चें). (कु.) पतिर.

**प(पं)तवंड**—न. नातवाचें किंवा नातीचें मूल; पणतुंड इ० पहा. [पणतू]

**पतवा**—पु. (कों. सोनारी धंदा) दोन बाजूंवर वेगळाल्या देवता-प्रतिमांचा उठाव असलेला ठसा. पुतळी वगैरेवर दोन्ही बाजूंनी दोन वेगळाल्या मूर्ती उठवितात त्यास हा उपयोगी असतो

**पतवार**—न. (काशी) सुकाणूं. [हिं.]

**पतवाळ**—स्त्री. (कु.) पत्रावळ पहा.

**पतळी**—स्त्री. (प्र.) पातळी; सोनें, लोखंड इ० धातू तोडण्याचें एक पोलादी हत्यार; छनी.

**पताक**—पु. (गो.) एक रुप्याचें नाणें. [पोर्तु]

**पताक-का**—स्त्री. १ लहान निशाण, ध्वज, बावटा. २ चिह्न; निशाणी, ध्वजचिह्न. ३ हाताचीं पांचीं बोटें जुळवून हात पसरणें. पताकहस्त पहा. 'पताकाचिया वोडवना।' -भाए ४५५. [सं.] ०**हस्त**-पु. (नृत्य) हाताचीं बोटें सरळ पसरून आंगठा किंचित् आखडणें.

**पताड**—स्त्री. १ गलबतांत सांठवण रहावी म्हणून त्याचे काठावर काठया, कांबटया, आंथऱ्या बांधून गलबताचा कांठ उंच करितात ती. २ बैलाच्या खोगिराचा तंग; पठार.

**पताडा-डें**—वि. फताडा-डें पहा.

**पताडें**—न. १ (म्हैस इ० जनावरांचें) पसरट शिंग. २ पातडें पहा.

**पति**—पु. १ नवरा. २ धनी; मालक; स्वामी. 'पृथ्वीपति, अश्वपति इ०.' 'पतिसहि अकर्णधार-प्रहिता उतरूं नदी न नाव रिघे।' -मोभीष्म ३.३ [सं.] ०**वंचका**-वि. नवऱ्यास फसवणारी; व्यभिचारी (स्त्री). 'पतिवंचकेसी सांगता उदंड। परि ते पाखंड तिचे मनीं।' -तुगा ३११४. ०**वंता**-वि. सभर्तृका; सधवा; सवाष्ण. 'पतिवंतेनें टिळाचि लाविला। कुंकुवाचा।' -सिसं ४.१८२. [पति+वती] ०**लाड**-पु. सुरतक्रीडा; शृंगारिक विलास. ०**वत्नी**-स्त्री. सवाष्ण; सभर्तृका स्त्री-बायको. **पतिंवरा**-स्त्री. लग्नाला योग्य झालेली मुलगी; उपवर कन्या. [पति+वृ] **पतिव्रता**-स्त्री. १ साध्वी; सती; अव्यभिचारी, पवित्र स्त्री. २ पतीच्या आज्ञेंत वागणारी, पतीला देव मानणारी व त्याची अखंड सेवा करणारी स्त्री. [सं.]

**पतिकर**—पु. १ उपाय. २ अनुभव. 'ना तरी गुणाचेनि पतिकरें। आर्तीचेनि पडिभरें। हे कीर्तीचि स्वयंवरें। आली तुज।' -ज्ञा २.१९३. [सं. प्रतिकार]

**पतिंगा**—पु १ (कों.) मोठें वल्हें. २ वल्ह्याचा दांडा. ३ उथळ पाण्यांत लांब काठी जमीनीस टेकून नाव चालवितात ती काठी; ताज.

**पतित**—वि. १ पडलेला. 'आकाशपतिता नीरा। जैसा सिंधूचि येक थारा।' -ज्ञा १८.५६५. २ भ्रष्ट (जाति, नीति इ० पासून). 'जाति-स्थान-कर्म-मार्ग-पतित.' ३ दुर्गुणी; नीच; दुराचरणी. 'पतित मी पापी शरण आलों तुज। राखे माजी लाज पांडुरंगा।' -तुगा. ४ जातिभ्रष्ट; जात गेलेला. ५ पापी. 'भगवद्भजनीं अविश्वासे। ऐसा कोण पतित असे।' -दा १.१.२१. 'पतितपावन म्हणविशी आधी।' -तुगा-कान्होपात्रा नाटक अंक ५, प्र १. [सं. पत्] ०**परावर्तन**-वि. धर्मभ्रष्ट झालेल्याला पूर्वीच्या धर्मात परत घेणें; धर्मांतर करून परत जातींत, धर्मात घेणें. ०**पावन**-न. पतितपरावर्तन पहा. -वि. पतितांचा, पाप्यांचा उद्धार करणारा (देव, साधू, प्रायश्चित्तादि कर्मे इ०). 'करी ब्रीद साचें आपलें आपण। पतितपावन दीनानाथ।' -तुगा ९. **पतितोद्धार**-वि. पतितांचा उद्धार करणारा. पतितपावन पहा.

**पंती, पंतोली, पंतुंड, पंतू, पंतोंड**—पणती, पणतोली इ० पहा.

**पतीचा कोलंबा**—पु. हळवा कोळंबा. हा तोरण्याचेहि अगोदर दोन-चार दिवस तयार होतो. भर पावसात हें पीक तयार होतें. -बदलापूर २८९.

**पतेमारी**—स्त्री. एक जलद जाणारें गलबत. फतेमारी पहा. [पत्ता=बातमी+मारणेंपासून मारी; गो पातमार, इं. फ्रें. पात्तिमार]

**पंतोजी**—पु. १ पगारी शिक्षक; मास्तर; गुरु. २ (कों.) बेशिस्त वर्तणुकीबद्दल शिक्षा देण्याचा अधिकार असलेला माणूस; धनी. 'सुनेला सासू पंतोजी.' [पंत+जी]

**पत्तन**—न. नगर; शहर. 'पुण्यपत्तन.' [सं.]

**पत्तर**—न. भिक्षापात्र. पतर पहा. भैरोबाचे भक्त याची पूजा करतात मांगणीचें पतर पहा. [सं. पात्र] **म्ह**० बाबू जेवले पत्तर पालथें केलें=फाजील उधळया माणसास लावतात. ०**पूजा**-स्त्री. भैरोबाचे भक्त करतात ती पत्तराची पूजा.

**पत्तर**—पत्थर पहा ०**पूजा**-स्त्री. १ (ल.) दगड मारणें; चोपणें. २ शिव्या देणें; भोसडणें.

**पत्तर**—न. पत्र; कागद. [सं. पत्र] ०**वडी**-स्त्री, पत्रवडी पहा.

**पत्ता**—पु. १ शोध; माग; बातमी; खबर; माहिती; वर्तमान. (क्रि० लावणें; लागणें). 'यंदा तें लग्न होणार कीं नाहीं त्याचा पत्ता लावून ये.' २ थांग; मुद्दा, दिशा; माणसाचा ठावठिकाणा; शोधण्याची खूण. 'तुम्ही दौत कोठें ठेवणार तो पत्ता मला सांगून ठेवा.' ३ राहण्याचें स्थळ व त्याचें टिपण. 'पत्रावरचा पत्ता' [सं. पथ. हिं. पता] ०**दोरा**-पु. धागादोरा; पत्ता अर्थ १,२ पहा. ०**मुद्दा**-पु (सामा.) पुरावा; माग; माहिती; थांग. **पत्त्यामुद्यानिशीं**-क्रिवि. योग्य पुराव्यासह; मुद्देमालासहित; साधार; सप्रमाण **पत्तेवार**-वि. आवश्यक माहिती, पत्ता वगैरे असलेलें (पत्र, सूचनांचा कागद). -क्रिवि. आवश्यक सूचना, माहिती वगैरेंनें युक्त होऊन.

**पत्ता**—पु. १ तंबाखूचें हिरवें, बिन चुरलेलें पान. २ (खेळ) गंजिफांतील, पत्त्यांतील एक पान. ३ (वाद्य) लांकडाचे नकशीदार

चपटे तुकडे. [ सं पत्र, हिं पत्ता ] ०**जळणें**-योग्य प्रसंगीं पत्ते, गंजीफा यातील पान न टाकल्यामुळें तें निरुपयोगी होणें.

**पत्ति** - पु १ ( सैन्याची ) एक लहान तुकडी. यात एक हत्ती, एक रथ, तीन घोडेस्वार व पाच पायदळ शिपाई असतात २ पदाति; पायदळस्वार ' हय सुत मथुनि झाले ते यदुकुलवंशनलिन-रवि पत्ती । ' -मोभीष्म ६ ६४ [ सं ]

**पत्री**—स्त्री १ भागेचीं पानें २ पत्री; निरनिराळ्या झाडांचीं पानें (पूजेसाठीं आणलेलीं) ३ कोळशातील बारीक चपटे तुकडे. [ हि ] ०**चहा**-पु. पानाचा चहा याच्या उलट भुकटी, पूड ( पावडर ) [ स पत्र, हिं ]

**पत्थर**—पु १ दगड; पाषाण, फत्तर. २ ( ल ) मंद बुद्धीचा, ढ, मठ्ठ मनुष्य [ग प्रस्तर, हिं.]

**पत्न**—पु १ ( व ) प्रायश्चित्त, दु ख 'दुसऱ्याला छळल्यानें पत्न भोगतो ' २ पतन पहा ( क्रि० पावणें, भोगणें ) [सं पतन]

**पत्नी**—स्त्री. लग्नाची बायको, भार्या, जाया; स्त्री [ सं ]

**पत्य**—स्त्री. पत; सचोटी. ' पत्य राखों नेणे कदा । ' -दा २ १.४८. [ पत ]

**पत्र**—न १ चिठ्ठी; लिहिलेला कागद; लेखी मजकूर, दस्तैवज. २ झाडाचें पान. ३ फुलाची पाकळी; पटल. ४ पुस्तकाचें, पोथीचें पान. ५ धातूचा पातळ पत्रा ६ वर्ख. ७ चिठ्ठीचपाटी, हुंडी, लेख, कागद इ० अर्थानें समासांत वापरतात. जसें:-आवरू-कमजास्त-करार-गहाण-जामीन-पाहणी-मलावण-लावणी-वकील- शिफारस-पत्र ८ दाखला; परवाना ' अहंतादिभावा आपुलिया । झाडा वेऊनि आघवेया । पत्र घेती ज्ञानिये जया । मूळघरासी । ' -ज्ञा १५ २७९. ९ ( कायदा ) सनद; लेख ( इं ) चार्टर, डीड. [ सं ] ०**दर्शनी**- क्रिवि पत्र पहाताच ( पत्रीं लिहिल्या-प्रमाणें करणें ) या शब्दाचा पत्रव्यवहारांत उपयोग करतात. ०**द्वारां**-क्रिवि पत्रामार्फत; पत्रानें; पत्र लिहून. ०**वडी**-स्त्री. आलु इ०कांच्या पानांची (तळलेली) वडी. [पत्र+वडी] ०**वल्ली, पत्रावली**-स्त्री. ( शृंगार ) अंगावेर गोंदून काढलेली नक्षी, चित्रें, वेलपत्ती. ( क्रि० काढणें; लिहिणें; करणें ). ' रमाकुच तटीं लिही न बहुवार पत्रावळी ।' -केका ७. ०**वेल**-स्त्री विड्याच्या पानाची वेल. ' पत्रवेलीचें पान । वाऱ्यानें हाले सणसण । ' -खिपु १.५२३. ०**शाक**-स्त्री पालेभाजी; ज्यांच्या पानांची भाजी करतात तीं भाजीचीं झाडें.

**पत्रक**—न. १ पुस्तकाचें पान; लिहिलेलें पान. २ जमा-खर्चाचा खर्डा; उतारा. ३ यादी; तक्ता; जंत्री; कोष्टक, टांचण. ४ सूचनापत्र; नोटीस. लहानसें चोपडें; हस्तपत्रक; ( इं. ) पॅम्प्लेट.

**पत्रॅ**—न. ( गो ) एक पक्षी.

**पत्रज**—पु. एक झाड.

**पत्रा**—पु. १ एखाद्या धातूचा तक्ता, पातळ पान, तकट; पत्र अर्थ ५ पहा. २ ( गो. ) सुका पाचोळा. [ सं. पत्र ]

**पत्राज-स**—स्त्री ( निदार्थी ) मिजास, डौल; दिमाख; मोठे-पणाचा आव. [ फा ] **पत्राजी-सी**-वि. पत्रास मिरविणारा; मिजासी, डौली, गर्विष्ठ

**पत्रावळ**—स्त्री १ झाडाचीं पानें चोयांनीं टाचून केलेलें पात्र, पानाचें ताट, जेवण्यासाठीं अन्न घेण्याचें एक साधन ( व. ) पत्राळ ( क ) पतवाळ. २ ठिगळें लावलेली वस्तू, ठिगळ [ सं. पत्रावलि ] ०**उडणें**-१ मोठ्याच्या पंगतींतून पान काढून टाकणें २ ( ल. ) फजीती उडणें ०**चलप**-(गो.) पंगतीला जेवण मिळणें. ०**साधणें**-( व ) पत्रावळी वाढणें. **भर पत्रावळींत राख घालणें, भर पत्रावळीवरून उठवणें, भरली पत्रावळ ओढणें-हिसकणें**-एखाद्याच्या चांगल्या निर्वाहसाधनांचा नाश करणें, पोटावर पाय आणणें, दंडणें.

**पत्राळ**—स्त्री ( व ) पत्रावळ पहा ०**साधणें**-( व ) पान वाढणें.

**पत्रिका**—स्त्री १ जन्मवेळीं जीं तिथि, वार, नक्षत्र, योग, करण वगैरे असतील त्यांचीं नोंद केलेला कागद. २ यावरून काढलेलें शुभाशुभ फल ज्यात दिलें आहे असें जन्मटिपण; संपूर्ण आयु-ष्याचें भविष्य, कुंडली. ३ लग्न, मुंज इ०चा मुहूर्त ज्यांत लिहिलेला आहे तो कागद (पत्रिकापूजनाच्या वेळीं हा लागतो). ३ (काव्य) चिठ्ठी; पत्र, लेखी संदेश 'प्रणयपत्रिका.' ' कृष्णासी नाहीं विषय गोडी । म्या पत्रिका लिहिली कुडी ।' -एरुस्व ५.४४. ४ (समासांत) पत्र, लेख, मजकूर याअर्थी ' निमंत्रण-कुंकुम-पत्रिका. ' [ सं. ] ०**पूजन**-न. लग्न, मुंज इ० कार्यांत मुहूर्ताच्या पत्रिकेची केलेली पूजा पत्रिका अर्थ ३ पहा.

**पत्री**—स्त्री. १ जायपत्री. २ देवाला वाहण्यासाठीं आणलेलीं अनेक झाडांचीं पानें; पत्ती. ३ ( ल. ) तंबाखूचें पान; पत्ता. ४ पादत्राणाच्या तळाला मारावयाचा लोखंडी तुकडा; ( इं. ) स्टार. ( व. ) बैलाच्या पायाची नाल, लोखंडी पत्रा. ५ कोळशाचे बारीक चपटे तुकडे; पत्ती. ६ ( सामा. ) लहान पत्रा; पत्र्याचा तुकडा. [ सं. पत्र ] ०**बीड**-न. बिडाचा एक प्रकार; घडकाम कर-तांना उडणारे पापुद्रे, यांचा उपयोग शोभेच्या दारूंत पांढरा प्रकाश उत्पन्न करण्याकडे होतो.

**पत्रोडा**—पु ( बे. ) अंबोळीसारखें भजें.

**पत्र्या हरताळ**—पु सोनेरी रंगाचा हरताळ.

**पथ** —स्त्री. पत पहा.

**पथ**—पु रस्ता; मार्ग; वाट; पंथ. ' जो श्रुतिस्मृतिनेणता । भावें भजे भगवत्पथा । त्यासि विधिनिषेधबाधकता । स्वप्नींही

सर्वथा प्रमाद न घडे।' -एभा २ ३२३. २ रीत; चाल, पद्धत. 'म्हणसी ऐसा जगीं न पथ वाहे।' -मोआदि ३४५५ पंथ पहा [सं पथ्=चालणें-पार्थिन ?]

**पंथ**—पु १ पथ अर्थ १, २ पहा 'वृत्तात पुसिला कोठोनि आलात। चालतसा पंथ कवण कार्या।'-ब ४४५. २ धार्मिक संप्रदाय, वर्ग, शाखा, ईश्वरप्राप्तीचा मार्ग जसें.-नाथपंथ, कबीर पंथ ३ (ल) प्रवास. [सं. पथ्; आर्मे. जिप्सी पथ] **म्ह०** एक पंथ दो काज= एकाच गोष्टीनें दोन कामें करणें **आल्या पंथें**-क्रिवि आलेल्या रस्त्यानें 'मागुती जावें आल्यापंथें।' **०लागणें**-निकाल लागणें. 'माझा एकदां पथ लागला म्हणजे मग मार्गे होईल तें होऊं.' **पंथास टेकणें-लागणें**-मरणोन्मुख होणें **पंथास पोहोंचणें**-मरणें **पंथी**-वि एखाद्या धार्मिक पंथाचा, संप्रदायाचा अनुयायी पंथस्थापकाच्या नावास जोडून प्रयोग जसें:-नाथ-नानक-ज्ञानेश्वर-पंथी

**पथक**—न. घोडेस्वाराची तुकडी; पतक पहा.

**पथकरणें**—पतकरणें पहा. 'राम म्हणे कार्य तुझें जें, तें मी जानकीश पथकरितों।'-मोवन ११९९. [सं पथ+कृ]

**पथक लष्कर**—न. सरंजामी सरदार व शिलेदार शिपाई वगैरे लोकांची नेमणूक नोंदण्याचें सदर. -शर.

**पथवर**— पु (प्र) प्रथमवर पहा.

**पथाडा**—वि. फताडा पहा.

**पथाडी-ड्या निवडुंग**—पु. नागफणी निवडुंग; फड्या निवडुंग

**पंथा प्रश्न**—पु १ परगांवास गेलेला मनुष्य परत केव्हा येईल याबद्दल जोशाला विचारलेला प्रश्न २ त्याचें उत्तर [सं. पथिन्+प्रश्न]

**पथारी**—स्त्री १ बसण्याची बैठक (चटई, सतरंजी इ०) २ सहज पसरून निजावयाचा लहान बिछाना; अंथरूण (क्रि० पसरणें). ३ (ल.) जवळच्या सामानाचा पसारा, मांड ४ पसरलेलें सामान, जिन्नसा [सं. प्रस्तर; प्रा. पत्थर]

**पथिक**—वि. वाटसरू; प्रवासी; पांथस्थ. [सं.]

**पंथिकर**—वि. १ भोजनाच्या पंक्तींत बसणारा; जेवणार असलेला. 'येतुकेया पंथिकर जाणविती। जी जी परियेसईं विनंति। जाहाली भोजनाची ऐति। उसिरु आला स्वामिया।' -ख्रिपु १.१४.२७. २ आचारी; वाढपी. [सं. पंक्तिकर]

**पंथी, पंथोली**—स्त्री. पणती, पणतोली पहा.

**पथुरली**—स्त्री. (गंगथडी) लहान पथारी. [पथारी अल्प.]

**पथ्य**—न. १ दुखणेकऱ्यास हितकारक असें नियमित खाद्य; युक्ताहार; रोग्याचें खाणें. २ रोग्यानें काय खावें, काय वर्जावें यासंबंधीं नियम, शास्त्र. ३ दुखणेकरी, बाळंतीण इ०चें अन्न, जेवण. 'तुमचें पथ्य झालें म्हणजे ही मात्रा घ्या.' -वि. १ हितकारक, फायदेशीर 'राया! भलेंतेंचि वदमि, पथ्य हित स्वगुरुवच न आइकसी।' -मोभीष्म ४७. 'अंधार हा चोराम पथ्य.' २ पथ्यकारक, पथ्याचें (अन्न, आहार इ०) [सं] **०अपथ्य, पथ्यापथ्य**-वि हितकारक व अहितकारक. 'पथ्यअपथ्य न म्हणतां परि सोसावें मदुक्त हें तथ्य।'-मोकर्ण २१ ३९ **०कर-कारक**-वि. १ योग्य; युक्त, मानणारें; फायदेशीर; हितकारक. २ पथ्याचें, रोग्याला युक्त (अन्न, आहार इ०), पथ्य पहा. (गो.) पथीक **०करी**-वि. पथ्य करणारा, पाळणारा, पथ्यावर असणारा **०पाणी**-न आजारी माणसाच्या शुश्रुषेची, पथ्याची व्यवस्था **पथ्याचा**-वि. १ हितकारक, मानवणारा. २ रोग्याच्या पथ्यासंबंधींचा, जेवणाचा **पथ्यावर पडणें**-हितावह, फायदेशीर, उपयुक्त होणें, अनायासें अनुकूल, सोयीचें होणें. 'एकंदरींत पाहता आमच्या नव्या लोकांची चाल ही दिसते कीं, पथ्यावर पडण्यापुरती मात्र ते सुधारणा उचलतात.' -नि

**पद**—न. १ पाऊल; पाय. 'सदैव नमिता जरी पदल्लाट केलें किणें।' -केका ११. २ पाऊल (ठसा), पादुका. 'विष्णुपद' ३ अधिकार, हुद्दा. ४ सबंध शब्द, प्रातिपदिक. ५ विभक्त्यंत, सप्रत्यय शब्द. ६ काव्यांतील एक प्रकार, पद्य; गाणें. ७ वर्तुळाचा एकचतुर्थांश ८ जागा; स्थळ; ठिकाण 'प्रथम पद' ९ और्ध्वदेहिक क्रियेच्या वेळीं ब्राह्मणास योग्यतेप्रमाणें दान करावयाच्या वस्तू (छत्री, जोडा, भांडें वगैरे) १० (गणित) मालेंतील कोणतीहि विवक्षित संख्या उदा० गुणोत्तरांतील आदि-अंत्य पद. ११ अवयव, भाग १२ वर्गमूळ, (समासात) मूळ जसें.-घनपद=घनमूळ १३ राज्य. 'द्रोणहि असेंचि नमिता, होऊनि परम प्रसन्न, पद लाहो।' -मोभीष्म १८२ १४ महत्त्व; दर्जा; योग्यता. 'बोलावेया जयाचें पद। मुके जाले वेद।' -ऋ ३१ १५ परमात्मा 'जे गुरुशिष्याची गोठी। पदपिंडाची गाठी।' -ज्ञा ३ २७२. १६ स्थिति 'हें पद होतां चमत्कार। पिंडजनीं।' -ज्ञा ६.२९६ [सं.] **०कृत्य**-न. १ कांहीं एक अर्थाचे लक्षणांत जीं विशेषणादिरूप अनेक पदें असतात त्यांचें अव्याप्त्यादि दोषपरिहाररूप जें त्या पदाचें असाधारण प्रयोजन तें; व्याख्या इ०तील शब्दाचें प्रयोजन, कार्य इ० २ पदकृत्यप्रदर्शनाचें संक्षिप्त रूप; व्याख्येंतील कित्येक शब्दांचें स्पष्टीकरण, विवरण (जोर, अर्थ, संबंध इ० दाखविणारें) **०गळ**-न पायांतील सांखळी. 'तोडोनि पदगळ बंधनातें।' -राम ५६०९. **०चिन्ह**-न. पावलाचा ठसा. (क्रि० उमटणें; दिसणें; पडणें). **०च्छेद**-पु वाक्य, समास यांचे शब्दावयव पाडणें. **०च्युत-भ्रष्ट**-वि. अधिकार-स्थान-भ्रष्ट; जागेवरून निघालेला, काढलेला. **०दान**-न. पद अर्थ ९ पहा. **०पिंड**-पु. जीव व परमात्मा

याचें ऐक्य ०बंध-पु. (काव्य) शब्दाची विशिष्ट प्रकारची रचना जसें. कमलबंध, छत्रबंध 'पदबंध नागर। तेंचि रंगाथिलें अंबर। जेथ साहित्य वाणे सपूर। उजळाचें।'-ज्ञा १.६. ०योजना-रचना-स्त्री श्लोकादिकात अर्थ, रस, छंद, प्रास इ० काव्यगुणास अनुरूप पदाची जी योजना ती; शब्दाची जुळणी: प्रबंध. ०लालित्य-न. पदांतील किंवा पद्यातील यमक, प्रास, अनुप्रास यापासून प्राप्त होणारें सौंदर्य, वाक्यातील पदरचनेचें सौंदर्य; अर्थबोध न होताहि केवळ शब्दश्रवणमात्रेंकरून चमत्कार वाटावयाजोगी श्लोकात असणारी प्रासादिक विशिष्ट योजना **पदशः**-क्रिवि. क्रमाक्रमानें, पायरी पायरीनें **पदसंव्हान**-न. (प्र.) पादसंवाहन, पाय चेपणें, रगडणें [पद-पाद+संवाहन] **पदांबुज, पदाब्ज**-न (काव्य) चरणकमल 'मार्गे सारूनी सकळ बोभाट। वदी पदाबुजें ठेवुनी ललाट वो।'-तुगा ११८ [सं. पद+अंबुज, अब्ज=कमल] **पदाब्जरज**-न (काव्य) पायाची धूळ. **पदोपदीं**-क्रिवि १ कवितेच्या प्रत्येक शब्द-चरणागणिक. 'त्यानें श्लोकांत पदोपदीं दोष दाखविले' २ पावलोपावलीं. ३ (ल) क्षणोक्षणीं; वारंवार. 'हें पोर मला पदोपदीं अडवितें' [पद द्वि.]

**पदक**-न १ (हारामधील किंवा स्वतंत्र असा) छातीवर रुळणारा पिंपळाच्या पानासारखा एक अलंकार, बिल्ला. २ खाण्याच्या (साखरेच्या) गांठींतील प्रत्येक अवयव, भाग. ३ (गो) मुलींच्या कमरेचा एक दागिना. ४ (सामा) बक्षीस देण्यांत येणारा बिल्ला, मुद्रा; प्रशस्तिमुद्रा (इं) मेडल. [सं.]

**पदर**-पु १ वस्त्राचा, कापडाचा शेवटचा भाग, अंचल. 'ओढूं नको फरफरां, घेऊं दे सांवरूनिया पदर।'-मोसभा ५ ७. २ वस्त्राचा नकशीदार काठ. ३ कापड, दोर, हार याची घडी, दुमड (एकेरी, दुहेरी), सर. 'चार पदरी कंठा.' ४ ऋणानुबंध, स्नेहभाव. ५ नातें; आप्तसंबंध ६ कांहीं स्वीकार करण्याकरिता पसरलेलें वस्त्र, वस्त्राचा भाग; ओटी; घोळ. यावरून ७ (ल) (अ) ताबा मालकी; कब्जा; स्वामित्व; अधिकार; संबंध 'हें भात तुम्ही आपल्या पदरीं घ्या' 'हा दोष तुमच्या पदरीं पडेल.' (आ) आसरा, थारा, पाखर. 'न दर स्पर्शो दे तुजवरि विद्येचा सदा वसे पदर।'-मोशांति ७.३३ 'मी तुमच्या पदरीं पडलों'' घालि पदर कृपेचा।'-बयाबाई रामदासी. (इ) संबंध; अवलंबून असणें; स्वामित्व 'आपले पदराचा माणूस जाऊं देऊं नये' (ई) स्वतःची खाजगी मिळकत, पैसा, प्राप्ति; इस्टेट; संग्रह 'मी सध्यां पदर मोडून खातों.' 'तुझे पदरास काय खार पडला?' ८ थर; आवरण; घडी; कपटा; पापुद्रा (कांदा, भाकरी इ०च्या वरचा); डोळयाच्या बुबुळावर येणारा सारा, पडळ. ९ वयात आलेल्या मुलीनें लुगडयाचा छातीवरून घ्यावयाचा वस्त्राचा भाग. परवंट नेसण्याचें सोडून अंगावरून पदर घ्यावयाचा विधि. (क्रि० घालणें; काढणें) परवंट पहा. यावरून १० ऋतुस्नात होणें; नहाण येणें (क्रि० येणें) [सं पल्लव] ०उतरणें-विधवा होणें; पदर टाकणें पहा. ०खरचणें-खाणें-मोडणें-स्वतःच्या खर्चानें जगणें; स्वतः धंदा, संसार चालविणें. ०घालणें-१ झांकण घालून एखादी वस्तु उघडकीस न येऊं देणें. २ वयात येणें; ऋतुप्राप्ति होणें 'बाईसाहेब यास पदर घातला.' (दिव्यास) ०घालणें-देणें-दिवा मालवणें. ०घालण-भरणें-गमावणें-एखाद्या धंद्यांत गाठचा पैसा खर्च करावा, भरावा लागणें, नुकसान लागणें. **पदरचा**-स्वतःचा, खुद्द आपला, आपल्या कल्पनेनें योजलेला किंवा ठरविलेला 'ही माझ्या पदरची बातमी नाहीं' स्वतःच्या तैनातींत असलेला, नोकरीस ठेवलेला. 'पदरचा माणूस, आश्रित.' स्वत.जवळचें, स्वतःच्या गाठीस असलेलें. 'ती आपल्या पदरचें पापही देणार नाहीं.' (अतिशय चिक्कू माणसासंबंधीं म्हणतात). **पदरचें घालणें**-१ मुळांत नसता एखादें वाक्य वगैरे (एखाद्या ग्रंथात, बोलण्यात) घुसडून देणें, तिखटमीठ लावणें. २ कमताई पडली असता आपल्या जवळचा पैसा वगैरे घालून भरती करणें. ०टाकणें-१ (डोक्यावरील पदर खालीं काढणें) विधवा होणें. २ पदराच्या खुणेनें एखाद्यास जवळ बोलावणें. **पदर पसरणें**-१ नम्रपणानें, कळकळीनें याचना करणें. 'पदर पसरिला तुजला रिपुगज पंचानना नृपांमाजीं।'-मोकर्ण २१ ३ २ क्षमा मागण्यासाठीं ओटी पुढें पसरणें, लीन होऊन क्षमेची याचना करणें. 'चुकलें क्षमा करावी, पसराया उशिर काय पदर मला।'-मोस्त्री ४४३. ०फाडून देणें-लग्नाचा संबंध तोडणें. ०येणें-रजोदर्शन होणें; वयात येणें (मुलगी). 'दूर दूर सरा, पदर मशि आला दुरुनि चाल शहाण्या!।'-लावणी. ०लागणें-१ नातें, आप्तसंबंध जुळणें (मराठ्यांत लग्न ठरविताना वधूवरांच्या घराण्याशीं आपणांपैकीं एखाद्या घराण्याचा संबंध येतो कीं नाहीं हें पाहतात; अगदीं नवख्या घराण्याशीं शरीरसंबंध करीत नाहींत). २ वाईट जातकुळीचा संबंध असणें. 'गोविंदरावाची मुलगी तुम्ही करूं नका, त्यांच्या घराला पदर लागला आहे' ०सारणें-कड घेणें; बाजू संभाळणें; लाज राखणें. 'माया माउली कोणी नुरली। पदर साराया। धांवरे धाव यदुराया।'-धावा (जननीजनकज). **पदरांत घेणें**-१ घेणें; स्वीकार करणें; स्वाधीन करून घेणें, कबूल करणें. 'माझी चुकी मी पदरांत घेतली.' २ आश्रय देणें. 'काय करूं काळानें अभय दिलें घेतलासि तूं पदरीं।'-मोकर्ण ४५ २९. ३ मुलीचा (लग्नासाठीं) स्वीकार करणें; लग्न लावणें. **पदरांत घालणें-टाकणें**-मुलगी देणें **पदरांत-पदरीं पडणें**-१मिळणें, हातीं येणें. 'आजचा दिवस पदरीं(पार) पडला.' २ताब्यांत येणें; सांपडणें. 'त्या भूमिकेवांचुनि सांपडेना।

अन्यत्र ठायीं पदरीं पडेना।' **म्ह०** पदरीं पडलें पवित्र झालें. **पदरांत बांधणें**-१ जवळ, नजीक असणें. 'अद्यापि बांधिलेसें तुजिया मतिनें अधैर्य का पदरें।'-मोविराट ४.३. २ माथीं मारणें (आरोप, चूक इ०). **पदरांत येणें**-ताब्यात येणें. 'मेल्या विना न देइल आलें जें भव्य राज्य पदरा तें।' -मोशल्य२ ८१ **पदराला(स)गांठ बांधणें-मारणें**-आठवण राहण्यासाठीं वस्त्रास गाठ मारणें; आठवण ठेवणें, आलेला अनुभव लक्षात ठेवणें. **पदराला(स)खांच पडणें**-नुकसान लागणें. **पदराला(स)खार लागणें-पडणें-लाविणें-लावून घेणें**-नुकसान लागणें; झीज सोसावी लागणें **पदरीं असणें**-आश्रयाखालीं किंवा ताब्यांत असणें **म्ह०** अंगीं असेल तें काम आणि पदरीं असेल तो दाम **पदरीं-पदरांत घालणें**-१ स्वाधीन करणें. 'रवि गेल्यावर तो सुत गंगेच्या घातला तिनें पदरीं।' -मोआदि १५.१६. २ ठरलेलें भरपूर देणें. **पदरीं घेणें**-कबूल करणें, मान्य करणें (अपराध, दोष इ०). **पदरीं माप घालणें**-खात्री पटवून देणें; सिद्ध करणें (दोष, पाप); चुकी, अपराध, लबाडी वगैरे पूर्णपणें दाखवून देणें; खात्री पटविणें **पदरीं धरणें**-चोर वगैरेंना चोरी करताना पकडणें. **पदरीं बांधणें**-१ स्वाधीन करणें. २ जबरदस्तीनें देणें; माथीं मारणें **एक पदरीवर येणें**-अरेतुरे करणें, म्हणणें; एकेरीवर येणें. सामाशब्द- **पदरकर-करीण**-स्त्री. १ (कों.) नहाण येण्याच्या पूर्वी पदर घेणारी मुलगी, पदर घेण्यालायख मुलगी. २ नुकताच पदर घेतला आहे अशी मुलगी. पदर अर्थ ९ पहा **०गांठ**-स्त्री. गांठचा पैसा. पदर अर्थ ७ (ई) पहा. **०पेशा**-वि आश्रित. 'विप्रास शालजोडया पदरपेशास कडेतोडे पुष्कळ द्रव्य वाटलें।'-गापो ७७ **०फेणी**-स्त्री (तं.) चिरोटा **०मोड**-स्त्री. स्वतःच्या जवळचा पैसा खर्चणें, शिलकींतील (नफ्यांतील नव्हे) पैसा खर्च करणें. (क्रि० करणें). 'स्नेह्यासाठीं पदरमोड कर परंतु जामिन होऊं नको।'-अफला. **पदरानपदर**-पु. (पदरानें पदर) विवाहसंबंधामुळें जडलेला दूरचा संबंध; लांबचा आप्तसंबंध. [पदर+अनु+पदर]

**पंढरपूर**—पु. (गो.) खोखोचा खेळ.

**पदवी**—स्त्री. १ हुद्दा; अधिकार; अधिकाराची जागा; पद. 'जीचा प्रसाद देतो वाचस्पतिची जडास ही पदवी।' -मोआदि १.४. २ किताब; नांवापुढचें मानाचें उपपद. ३ मानमरातब; कीर्ति. 'देव म्हणे धृतराष्ट्रा राया मोठी जगीं तुझी पदवी।' -मोउद्योग ८१ [सं. पद्=जाणें]

**पदॉ**—पु. (गो.) स्मशानरक्षक

**पंदाड**—न. पंदें-धें, पंधाड पहा.

**पदाति-ती**—पु. १ पायदळातील सैनिक; पायीं चालणारा माणूस; पाईक. 'किती गज किती रथ। अश्व पदाती समस्त।' -एरुस्व १२.७५. २ नोकर, सेवक [सं] **०भार**-पु. पायदळ सैन्य.

**पदार्थ**—पु. १ वस्तु; जडद्रव्य; (शाप) आकारविशिष्ट प्रकृति. २ पक्वान्न, खाण्याचा उत्तम जिन्नस. ३ वाक्याचा, पदाचा अर्थ ४ (तर्कशास्त्र) वस्तुजाताच्या विभागाचें नांव यांत पदार्थाच्या पुढील सात जाती सांगितलेल्या आहेत-द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय आणि अभाव ५ अस्तित्व किंवा अभाव जिचा मानता येईल अशी वस्तु; अर्थ. ६ (निंदार्थी) प्राणी, ईश्वरनिर्मित वस्तु (गण्यकोटींत न घालण्याजोगी). 'तूं काय पदार्थ आहेस!' [सं.] **०विज्ञान**-न द्रव्यादिकांच्या स्वाभाविक धर्माविषयींचें ज्ञान (इं) फिजिक्स, भौतिकशास्त्र. यांत पदार्थांचे गुरुत्वादि सामान्य धर्म-ध्वनि, उष्णता, प्रकाश, लोहचुंबक व विद्युत् याविषयीं नियमाचा समावेश होतो) **०वेथा**-स्त्री. पंचाभूतापासून होणारा त्रास. 'मुनी बोले महेंद्रा। पदार्थवेथा रामचंद्रा। न लागेत नरेंद्रा। यासी आम्ही जाणों।'-वेसीस्व १.७८. [पदार्थ+व्यथा] **पदार्थाचे सांसिद्धिक धर्म**-पुअव. हे पुढीलप्रमाणें आहेत-निर्भेद्यता, विभाज्यत्व, सच्छिद्रता, संकोचत्व, स्थितिस्थापकत्व, जडत्व, अविनाशित्व इ०. **पदार्थानुसमय**-पु. वाटण्याची विशिष्ट पद्धत, प्रकार. काहीं पदार्थ अनेक व्यक्तींना द्यावयाचे असताना पहिल्या वेळीं प्रत्येकाला एक एक असे देऊन झाल्यानंतर दुसरा पदार्थ देणें, नंतर तिसरा, असे देण्याची रीत, व्यवस्था. याच्या उलट कांडानुसमय. **पदार्थाभाविनी**-स्त्री. ज्ञानी जीवाच्या सात भूमिकांतील सहावी भूमिका

**पदावणें**—क्रि. (व) १ मारणें. २ जबरदस्तीनें वसूल करणें, घेणें. 'विटीदाइनें राज्य पदावून घेतलें.' पादाविणें पहा.

**पंदें-धें**—न. १ एक प्रकारचें निवर, राठ गवत. २ एक वनस्पति (अंकोला तालुक्याकडे) हिच्या मुळाचें पीठ करून त्यात मीठ घालून लाडू करतात. [सं. पण्यंध]

**पदेर**—पु. (गो.) पाव विकणारा. [पोर्तु पादीरो]

**पद्धत**—स्त्री. (व.) पत. 'तेव्हापासुन त्याची पद्धतच उडाली.'

**पद्धत-ति-ती**—स्त्री. १ चाल; रीत; आचार, नेहमींचा, योग्य मार्ग, आचरण, संवय. २ धार्मिक विधि, आचार सांगणारा ग्रंथ; विधिसंग्रहग्रंथ. ३ ओळ, रांग, मालिका; ४ रचना. 'अष्टादश पुराणें। तींचि मणिभूषणें। पदपद्धती खेवणें। प्रमेयरत्नांचीं।' -ज्ञा १.५. [सं. पद्धति] **पद्धत लावणें, जमविणें**-(ना.) संधान बांधणें, वशिला लावणें. **पद्धतवार**-क्रिवि. व्यवस्थितपणें, योग्य रीतीनें; नियमितपणें.

**पद्म**—न. १ कमळ; नीलकमल. २ एकावर बारा पूज्यें असणारी एक संख्या; दहा हजार लाख; शतकोटी. ३ नागाच्या

फणीवरचा दहाचा आकडा. ४ घोड्याचें एक शुभ लक्षण. [सं.] ०काष्ठ-न. एक औषधी लांकूड. हें थंड व शक्तिवर्धक आहे. याचा वृक्ष हिमालयात होतो ०कोश(हस्त)-पु (नृत्य) हात उताणा करून अंगठ्यासह सर्व बोटें विरळ ठेवून तळहाताच्या बाजूला वांकडीं करणें ०ज-भव-योनी-पु. ब्रह्मदेव. 'स्वाधीन हें पद्मभवें फुकाचें।' -वामन, स्फुटश्लोक (नवनीत पृ. १३३) ०दल-न कमळाची पाकळी 'इंद्रादिक निजविभूती। त्यातें देखोनि श्रीपती। स्वनेत्र पद्मदलाकृति । ते सहजस्थितीं झांकिले।' -एभा ३१.३९. ०जनंदिनी-स्त्री सरस्वती. ०नाभ-पु. ज्याच्या नाभीपासुन कमळ निघालें आहे असा विष्णु 'पद्मनाभ तिष्ठे त्याजवळ। सप्रेम कळवळ देखोनी।' ०नाल-न कमळाचा देंठ, तंतु ०योग-पु. विशाखा नक्षत्रीं सूर्य असतां ज्या तिथीला कृत्तिका हें चंद्रनक्षत्र येतें तो योग याचें महत्त्व पुष्करतीर्थी फार आहे -धर्मसिंधु ०राग-पु लाल, माणिक 'पाची हीरक पद्मराग लसणें गोमेद मुक्ताफळें।' -सारुह ३ ४२. ०रेखा-स्त्री. तळहातावरील द्रव्यसूचक रेषा. ०संध-पु घोड्याच्या खांद्यावरचा किंवा पुठ्यावरचा भोंवरा हें घोड्याचें शुभलक्षण आहे. ०सुरंग-पु एका रागाचें नांव 'वसंत पावक पद्मसुरंग। नीलांबर राग वाजवित।' -ह १० ११७ ०हस्त-हस्ती-वि. १ दैववान; यशस्वी, हाताला यश असणारा; हाताचा यशस्वी (वैद्य, पंडित). 'धन्वंतरी परोपकारी। पद्महस्ती।' -दा २ ८ ८. २ ज्याच्या हातावर पद्मचिन्ह आहे असा. हें एक हस्तसामुद्रिकांतील शुभलक्षण आहे. पद्माकर-पु. १ ज्यांत कमळें उत्पन्न होतात असें सरोवर. 'आणि जालेनि फुलें फळें। शाखिया जैसी मोकळे। का उदार परिमळें। पद्माकरु।' -ज्ञा १८ ८६८. २ कमळाचा समुदाय ३ विष्णूचें नाव (प्र) पद्मकर. पद्मासन-पु ब्रह्मदेव -न (योग) उजवा पाय डावे मांडीवर व डावा पाय उजवे मांडीवर व उजवे गुडघ्यावर उजवा, डावे गुडघ्यावर डावा हात ताठ ठेवून, मान व पाठ सरळ ताठ करून बसणें बौद्धासन (बुद्धाचें ध्यान असेंच असतें) पद्मा-स्त्री. लक्ष्मी. पद्मिनी, पद्मीण-स्त्री. १ स्त्रियांच्या पद्मिनी, हस्तिनी, चित्रिणी, शंखिनी या चार प्रकारांपैकीं पहिल्या प्रकारची स्त्री. (ल) अति उत्कृष्ट, सुंदर स्त्री. २ कमळीण. पद्म. [सं] म्ह० नपुंसकाच्या हातीं पद्मीण पद्मिणी मित्र-पु. सुर्य.

पद्य-पु. १ काव्य; श्लोक, पद; (ज्याला पाद किंवा चरण आहे अशी) छंदोवद्ध रचना, अक्षरें, मात्रा इ०कांचा ज्यांत नियम असतो अशी कविता. 'आतां कृपाभांडवल सोडीं। भरीं मति माझी पोतडी। करीं ज्ञानपद्यजोडी। थोरा मातें।' -ज्ञा १४.१७. २ छंद, वृत्त. [सं.]

पद्या-पद्ये-पु. (कों.) गोमंतकस्थ कऱ्हाडे ब्राह्मणांतील एक जात व तींतील व्यक्ति.

पद्रा-पु डोळ्यावरील पटल, पडदा पदर अर्थ ६ पहा. [पदर]

पंद्राळें-न. (गो) पंधरवडा, पक्ष.

पंधरा-वि. १५ ही संख्या. [सं. पंचदश; प्रा. पण्णदह; हिं. पंद्रह, पं पदरां; सिं. पंध्रां; गु उ पंधर] पंधरकी-स्त्री १ पंधरांचा समुदाय २ पंधरा विघ्यांचें परिमाण (जमीनीचें). ३ पंधरा माणसांना उचलतां येईल, करतां येईल असें ओझें-काम. पंधरवडा-पु अर्धा महिना; पक्ष; दोन आठवडे; पंधरा दिवसांचा काळ; (गो) पंद्रस्त; पंध्रम. [सं पंचदशावर्त] पंधरस-पु (कु) देवळातील नोकरांची सेवेची पंधरा दिवसांची पाळी. पंधरा मुहूर्ती संक्रांत-स्त्री. आर्द्रा, स्वाती, भरणी, शततारका, आश्लेषा व ज्येष्ठा या नक्षत्रीं येणारी संक्रांत. हा योग आला असतां दुर्भिक्षता प्राप्त होते पंधरावें-पंधरें-न उत्तम सोनें (शभर नंवरी) (ज्ञानेश्वरकाळीं सोन्याचा भाव पंधरा रुपये तोळा होता त्यावरून) 'जैसा किडाळाचा दोषु जाये। तरी पंधरें तेंचि होये।' -ज्ञा ६.८२. -अमृ १० २७.

पंधाड-न निबर गवत पंदें पहा.

पनकूळ-स्त्री (कु.) एक झाड.

पनपणें-क्रि जोरानें वाढणें. पणपणें पहा

पनपात्र-पात्री-नस्त्री. पंचपात्र-पात्री पहा. [सं. पान+पात्र, पंच अप. पन+पात्र]

पनवार-पु (गो.) (शेवणी फळांचे तुकडे इ०चा) देवाचा नैवेद्य.

पनवाळ-पु. एक वाद्य 'ताशा मरफी पनवाळ थोर।' -नव ११.६९

पनवेल-ळ-स्त्रीपु. एक जातीचा तांदूळ.

पनस-पु. फणस पहा. 'पनस जंबू जंबीर विविध निंबें।' -र ८. [सं. पनस]

पनसाळ-पु. जडयाचें, जडाव करणाराचें हत्यार. -शर.

पनस्कार-पु. (गो.) एक देवकृत्य.

पन(ना)ळ, पन्याळ, पन्ह(न्हा)ळ-पु. १ नळ; पाट; पाणी वाहून नेण्याचा, जाण्याचा मार्ग; चर; दगडां-विटांनीं बांधलेलें गटार; मोरी; लांकूड, पत्रा इ०चा तयार केलेला नळ, पाट. 'कोंकणात रहाटाचे पन्हळ सुरमाडाचे केलेले असतात.' २(ल.) पुष्ट जनावराच्या पाठीच्या कण्यास पडलेला खोलगट चरासारखा भाग. ३ अरुंद व खोलगट रस्ता. (क्रि० पडणें; होणें; असणें). (व) पन्याल, पन्न्याल. [सं. प्रणाल; प्रा पणाल] पन्याळी, पनाळी, पन्ह(न्हा)ळी-स्त्री. १ लहान नळ, नळी; अरुंद पन्हळ. (गो.) पन्हेळी. २ नळ, पाट बांधून नेलेला पाण्याचा प्रवाह; पन्हळांतून वाहणारें पाणी. ०कौल-न. उंच कडांचें व

सपाट कौल; थापी कौल. ०पाटली–स्त्री. आंतील बाजूस गटार, पन्हळ काढला आहे अशी पाटली.

**पना**—पु. एक झाड. याचीं फळें चण्यासारखीं असतात. याचे लहान व मोठा असे दोन प्रकार आहेत.

**पने(न्हे)र–री, पनीर**—स्त्री. विरजलेल्या दुधांतील पाणी काढून टाकून त्यांत मीठ वगैरे घालून केलेलें एक घट्ट खाद्य;(इं.) चीज. [फा. पनीर्]

**पनेळ, पन्हळ**—पु. (गो.) लहान होडी.

**पन्नग**—पु. साप; सर्प. 'सुरनरपन्नगाच्या ठायीं। हिंडतां सौंदर्या विश्रांती नाहीं। म्हणोनी धाविन्नले लवलाहीं। भीमकी देहीं विश्रांती।' –एरुस्व ७.३. [सं.] ०मणी–पु. पाचू रत्न.

**पन्ना**—पु. पाच नांवाचें रत्न; पन्नगमणी. [सं. पन्नग]

**पन्नास**—वि. ५० ही संख्या. [सं. पंचाशत्; प्रा. पण्णास; पन्नास] **पन्नाशी**–स्त्री. १ पन्नासाचा समुदाय २ पन्नास वर्षांचें वय 'पन्नाशीची झुळुक लागली बाइल दुसरी करूं नको।' –शारदा.

**पन्नासणें**—१ बंदोबस्त करणें. २ सुशोभित करणें; शृंगारणें. मातां याचेनिबळें गवसलें। हें दुर्ग जैसे पन्नासिलें।' –ज्ञा ११६. –एभा २२.३०६. [ता. ते.का. पण्णु=तयार करणें; डेत करणें; का. पण्णिसु=तयार करणें] **पन्नास**–पु. बंदोबस्त. तार.

**पन्नीर**—न. (तंजा.) गुलाबपाणी. [का. ता. पनि=ण्याचा थेंब, दंव+नीर=जल] ०चंबू–पु. गुलाबदाणी.

**पन्याकार**—पुअव. (कों.) १ भाजी इ० पदार्थ रुचकर व्हावा म्हणून त्यास हिंग, जिरें, मिरीं इ०कांनीं करावे लागणारे अनेक संस्कार. २ अशा संस्कारांनीं तयार केलेले पदार्थ. ३ पाहुण्यांची उत्कृष्ट सरबराई, जेवण्याची व्यवस्था. ४ (ल.) तिखटमीठ लावून फुगवून सांगणें (एखादा प्रसंग. गोष्ट). ५ बढाईखोरपणा; आत्मप्रौढी. [अन्य(पन्य)+प्रकार; किंवा सं. पण्य+कृ]

**पन्हरें**—न. उत्तम सोनें, पंधरें. पण्हरें पहा. 'सोनें परिणामलें साखळें। कीं साडे पन्हरें जालें कडिवळें।' –ऋ ९३.

**पन्हा**—पु. (कापडाची) रुंदी. [फा. पह्ना=रुंद]

**पन्हा, पन्हाई**—स्त्री. १ छाया; सावली. 'प्यार मोहबत मेहेरचा पन्हा फकिरावर असों दिला पाहिजे.' –ब्रच ३०८. २ आश्रय. 'सरकारच्या दुश्मनास पन्हा न द्यावी.' –ख ७.३५६७. ३ ताबा. 'जीं इंग्रजांच्या पन्हाईत असतील....' –वाडसमा २.६५. [फा. पनाह्]

**पन्हावणें**—सक्रि. (व. ना.) १ जास्त लांब करणें, होणें (रबर इ०); फैलावणें; विस्तृत होणें. २ चोप, मार देणें. [पन्हा]

**पन्हावन**—न. (व.) वाहन. 'स्टेशनावर बसावयास पन्हावन ठेवा.'

**पन्हाळी**—स्त्री. (सोनारी धंदा) मणी तयार करण्याचें एक हत्यार; मणीघोळणी.

**पन्हाळी रुपया**—पु. पन्हाळगड येथील एक विशिष्ट चलन; कोल्हापुरी टाकसाळींत पाडलेला रुपया.

**पन्ही**—स्त्री. (चांभारी धंदा) ढोंपरास बसविलेला सागळेचा तुकडा; पान. [पान]

**पन्हें**—न. आंब्याची कैरी, चिंच इ०कांचें आंबट पाणी करून त्यामध्यें गूळ किंवा साखर घालून तयार केलेलें पेय; आंबा इ० चें सरबत. (गो.) पनक. [सं. पानक]

**पन्हेरी**—स्त्री. फळ झाडाचा किंवा फूलझाडाचा मुळासह व भोंवतालच्या मातीसह बांधलेला गड्डा, रोपा (दुसरीकडे लावण्यासाठीं तयार केलेला); झाडाचें कलम.

**पन्हेरी**—स्त्री. १ रस्त्यावरील पाणपोयी; जलस्थान; पाणीघर २ आल्यागेल्यास पाणी पुरविण्याचा धंदा, व्यवसाय. [सं. पानगृह]

**पप**—उद्गा. उजव्या हाताकडील बैल हांकण्यासाठीं म्हटला जाणारा शब्द; पो! पो! याच्या उलट मप. [ध्व तुल० ते. पो पो=चला चला! गो. पपा=पळ]

**पंप**—पु १ कोणताहि प्रवाही पदार्थ द्रवरूप किंवा वायुरूप असला तरी त्याला खालच्या पातळीवरून उचलून वरच्या पातळीवर नेणें किंवा त्याला जोरानें दाबणें यासाठीं जें यंत्र लावितात तें. 'पंपाचा मुख्य उपयोग दाब उत्पन्न करण्याकडे होतो.' २ मोटार, सायकल यांच्या चाकांतील रबरी नळींत हवा भरण्याचें साधन. ३ मोटारींत पेट्रोल भरण्याचें साधन. [इं.]

**पपई–यी, पपय्या, पपैय्या**—पु एक फळझाड व त्याचें फळ. याचीं फळें नारळासारखीं पानाच्या खालीं लागतात. हिरव्या फळाची भाजी करतात. पिकलेलीं फळें गोड व खाण्यासारखीं असतात. फळ वातुळ, जखम फोडणारें आहे. याचें लांकूड ढिसूळ असतें. –वगु ४.५३. [स्पॅनिश-पोर्तु. पापाया; गो. पपाय; हिं. पपैया]

**पपन(न–नी)स**—स्त्रीपु. एक झाड व त्याचें फळ; चकोत्रा; हें मूळचें मलायाद्वीपांतील असावें. याला भोपळ्याएवढीं फळें बारमहा येतात. फळें आंबटगोड असतात. फळावरील त्वचा तळहाताएवढी जाड असते. [द. अमेरिकन पॉपेलमूस]

**पपा**—स्त्री. (गो.) पळणें; पळ पप पहा. 'त्येणें थैंचान् पपा काढली.'

**पंपाळें**—(कर.) १ बंबाळें; बाजा. (क्रि० वाजणें) २ बेअब्रू; फजीती. बंबाळें पहा. [ध्व. पंपां+आळें प्रत्यय]

**पपिता**—पु. एक औषधी झाड. याची बी हगवणीवर उपयोगी आहे.

**पपेटी**—स्त्री. पारशी लोकांचा नव्या वर्षाचा पहिला दिवस, पाडवा.

**पय**—न. १ दूध. 'तुका म्हणे घ्यारे पया। कैं पावाल या ठाया।' –तुगा २१४. २ पाणी. [सं.] **पयःफेनधवल**–पु (पाण्याच्या फेसाप्रमाणें शुभ्र) शंकर. **पयस्विनी**–स्त्री. १ दुभती गाय, म्हैस. २ नदी. ३ सुवासिनी मरण पावली म्हणजे तिच्या और्ध्वदेहिक कर्मांत ब्राह्मणास दान करावयाची गाय. **पयोधर**–पु. १ स्त्रीचे स्तन; कुच. 'सलगी धरी पयोधर। साहाते कुरमुर सर्वे।' –तुगा १२७. २ जनावराची कास. ३ मेघ. 'अंबरगत परि पयोधरातें मर्दुनि पळतो दुरी।' –राला ३५. ४ एक सुवासिक गवत. [सं.] **पयोधि**–पु. समुद्र. 'एणें परी परिसतां अतिदीन वाचा। हेलावला नलपयोधि दयारसाचा।' –र १२. **पयोव्रत**–न. महिनाभर दुधाच्या आहारावर रहावयाचें व्रत. अयोग्य दान घेतलें असतां प्रायश्चित्त म्हणून गोठ्यांत राहून वरील व्रत करावयाचें असतें.

**पयदरपय**—क्रिवि. पावलोपावलीं, पदोपदीं; एकामागून एक. 'येविसीचा तरतुदीचा प्रकार आपणास पयदरपय लिहिलाच आहे.' –पेद २०.१८४. [पय=पाय+दर=प्रत्येक+पय]

**पयलू**—पु. १ बाजू. २ रत्न, मणी यांचा एक पृष्ठ भाग. पैलू पहा. [फा.]

**पयाळ**—स्त्री. जहाज, होडी यांतील एक प्रकारचें फडताळ, कपाट.

**पयाळ-ळू**—वि. पायाळ-ळू पहा.

**पयेण**—न. (कों.) (प्र.) पयाण; वाळलेलें गवत. (बे.) पयाण=उन्हाळ्यासाठीं कापलेलें गवत.

**पयूर**—क्रिवि. (गो.) परवां (कालच्या मागला दिवस).

**पर**—पु. पंख; पीस. 'कसे मुंगीला पर फुटले घेउं म्हणती गगन।' –पला ७१. [फा. पर्] ०**फुटणें**–१ पंख फुटणें. २ (ल.) वयांत येणें; जोमांत येणें; वाढीस लागणें. ३ (मूल) खोडकर, स्वैर होणें. ४ आश्रय, आधार, पाठिंबा मिळणें; साधन, उपाय सांपडणें. ०**लावून जाणें-पळणें-धांवणें-चालणें**–जलदीनें चालणें. **पराचा कावळा करणें**–अतिशयोक्ति करणें; फुगवून सांगणें; राईचा डोंगर करणें. (एखादें पक्ष्याचें पर, पीस असलें तर कावळा आहे असें सांगणें).

**पर**—स्त्री. १ परी; चाल; रीत; पद्धत (भाषण, काम इ०ची) प्रकार; गत. 'ती पर केली मर्शी चंद्रहारा।' –पला ४.६. २ रूढी; प्रकार; दम. [सं. प्रकार] **परीचा**–वि. चमत्कारिक; अपूर्व; विशिष्ट प्रकारचा. **परी प्रकारचा**–क्रिवि. नाना प्रकारचा; पुष्कळ तऱ्हेचा; विविध. **परी प्रकारें**–क्रिवि. नाना तऱ्हांनीं.

**पर**—उभ. परंतु; तथापि; पण; तरी. [सं.]

**पर**—न. १ ब्रह्म; परमेश्वर. 'पर सुखाची उर्मि।' –ऋ १. २ वस्तु (ब्रह्म). 'आतां अर्जुना आणिक कांहीं एक। सांगेन मी आइक। जे विचारें पर लोक। वोळखिती।' –ज्ञा २.१२५. ३ –पु. शत्रु; अरि. 'कुरु कटकाला बहु भय देती गर्जूनि सिंहसे पर ते।' –मोभीष्म ५.६२. [सं.] –वि. १ आत्मीय नव्हे असा; परका; परकीय; विदेशी. (समासात) परचक्र-देश-मुलूख इ० २ दुसरा; इतर; भिन्न, निराळा; वेगळा. 'आप आणि पर नाहीं दोन्ही।' –तुगा २११७. 'कपटादरें वळो पर, परि परमेश्वर कसा वळेल हरी।' –मोउद्योग ७.१०. ३ संबंध असलेला; अनुसरणारा; (एखाद्यास) वाहिलेला; आधीन; जोडलेला. 'ज्ञानपर शास्त्र तुम्ही कर्मपर लावूं म्हणतां तर लागणार नाहीं.' 'लोकनिंदापर भाषण करूं नये.' ४ अद्भुत; असाधारण; अपूर्व. ५ श्रेष्ठ; उच्च; थोर. 'जो पतीहून पर।' –रास १.२६७. ६ नंतरचा. –क्रिवि. पलीकडे. 'ईश्वर स्वरूप मायेचे पर आहे.' ज्याच्या पूर्वपदीं हा शब्द येतो असे अनेक तद्धित व सामासिक शब्द आहेत. त्यांतील कांहीं पुढें दिले आहेत. **परका-क्का**–वि. १ दुसरा; बाहेरचा; परकीय; अनोळखी (माणूस). २ नवीन; निराळी; वेगळी (वस्तु) [स. परकीय] **परकाई-क्काई**–स्त्री. १ परकेपणा (माणसाचा). २ नवलाई; नावीन्य (वस्तूंचें). [परका] ०**कामिनी**–स्त्री. दुसऱ्याची बायको; परदारा; परस्त्री. 'मन हें ओढाळ गुरूं परधन परकामिनीकडे धांवे।' –मोरोपंत (कीर्तन १ २४.) ०**काय(या)प्रवेश**–पु. मंत्रादि सिद्धीनें आपला देह सोडून एखाद्या प्रेतांत किंवा दुसऱ्याच्या देहांत शिरणें; ती विद्या. **परकी, परकीय**–वि. १ परका पहा. अनोळखी; नवीन (माणूस). २ दुसऱ्यासंबंधीं, दुसऱ्याचा. **परकीया**–स्त्री. दुसऱ्याची बायको (प्रेमविषयक तीन वस्तूंपैकीं एक). ०**कोट**–पु. एक तटाच्या बाहेरचा दुसरा तट; पडकोट. ०**क्रांति**–स्त्री. (ज्यो.) क्रांतिवृत्ताचा वांकडेपणा. ०**गति**–स्त्री. स्वर्ग. 'परगति पावों पाहसि, पर पदरीं फार पाहिजे शुचिता।' –मोआदि २४.५६. ०**गमन**–न. स्वस्त्री किंवा पति सोडून दुसऱ्याशीं व्यभिचार करणें; व्यभिचार. ०**गृह-घर**–न. १ दुसऱ्याचें घर. २ दुसऱ्याच्या घराचा आश्रय घेणें. 'तो फार गर्भश्रीमंत आहे, त्याला परगृह माहीत नाहीं.' ३ व्यभिचार; परगमन पहा. ०**घर निवारण**–न. इतःपर दुसऱ्याच्या मदतीची आवश्यकता न पडेल अशी स्थिति (देणगी). ०**गोत्री**–वि. निराळ्या गोत्राचा. 'श्राद्धास परगोत्री ब्राह्मण बोलवावे.' ०**चक्र**–१ स्वारी करणारें सैन्य. २ शत्रूची स्वारी, हल्ला, चढाई. 'परचक्र कोठें हरिदासांच्या वासे। न देखिजे तद्देशे राहातिया।' –तुगा ६४६. ३ परकीय अंमल, ताबा. ०**छंद**–वि. दुसऱ्याच्या स्वाधीन, ताब्यांत असलेला; दुसऱ्याच्या तंत्रानें मर्जीनें चालणारा; पराधीन. ०**तंत्र**–वि. १ दुसऱ्याच्या स्वाधीन, ताब्यांत असलेला; दुसऱ्याच्या

तंत्रानें चालणारा. २ (ल.) शरीर. 'हा लोकु कर्मे बांधिला। जो पर तंत्रा भूतला। तो नित्ययज्ञातें चुकला। म्हणोनियां।' –ज्ञा ३ ८४. ०**तत्त्व**–न. परब्रह्म. 'तैसी प्रकृति हे आड होती। ते देवेंचि सारोनि परौती। मग परतत्व माझिये मती। शेजारें केलें।' –ज्ञा ११.७६. ०**तीर**–न (नदी इ० च्या) पलीकडचा, दुसरा कांठ, तीर. ०**त्र**–न. १ परलोक; याच्या उलट अत्र. 'म्हणोनि देवो गोसावी। तो धर्माधर्मु भोगवी। आणि परत्राच्या गांवीं। करी तो भोगी।' –ज्ञा १६;३०६; –दा २.४.१९. २ (महानु.) परमेश्वर पद; परमार्थ. 'कव्हणी परत्र पाहौनि न बोले। नि:प्रपंचु।' –ॠ ४४. –क्रिवि. नाहींतर; अन्यथा; अन्यत्र. ०**त्रगति**–स्त्री. दुसरी स्थिति; परलोक; स्वर्ग. (क्रि० साधणें; होणें; मिळणें). ०**त्र साधन**–न. परलोक किंवा स्वर्ग मिळविणें. ०**त्व**–न. १ दूरपणा; पलीकडे असणें. २ परकेपणा; दुजा भाव. ३ दुसरेपणा. 'म्हणोनि परत्वें ब्रह्म असे। तें आत्मत्वें परियवसे। सच्छब्द या रिणादोषें। ठेविला देवें।' –ज्ञा १७.३७७. ०**थडी**–परतीर पहा. 'त्यासि भवार्णवपरथडी। तत्काळ रोकडी मी पाववीं।' –एभा १७.४४०. 'क्रमावी पावोनि परथडी।' –सिसं ८.२७२. ०**थळ्या**–वि. परस्थ. 'पंच ब्राह्मण वगैरेस विडे देऊन नंतर परथळ्या कोणीं असल्यास त्यास विडा देतात.' –बदलापूर ३७. [पर+स्थल] ०**दरबार**–न. पेशव्यांच्या बरोबरीच्या राजांस किंवा त्यांच्या वकीलांस वगैरे पेशव्यांकडून दिलेल्या नेमणुका, जवाहीर, कापड वगैरे नोंदण्याचें हिशेबाचें सदर ०**दार**–पु. दुसऱ्याची बायको. [सं. परदारा] ०**दार**–न. परद्वार; व्यभिचार परद्वार पहा ०**दारगामी**–वि. परदारा भोगणारा; व्यभिचारी. ०**दारा**–स्त्री. दुसऱ्याची बायको; परदार. 'परदारादिक पडे। परी विरुद्ध ऐसें नावडे। मग शेळियेचेनि तोंडें। सैंघ चारी।' –ज्ञा १४.२२९. 'परदारा परधन। आम्हां विषसमान।' ०**दुःखेन दुःखित**–वि. दुसऱ्याच्या दु:खानें दु:खित होणारा. 'परदु:खेन दु:खिता विरला.' ०**देश**–पु. १ स्वदेशाहून भिन्न देश; परकीय देश. २ दुसऱ्या देशांत केलेला प्रवास ०**देशी**–पु. १ परका; दुसऱ्या देशांतील माणूस; स्वदेश सोडून परदेशांत आलेला मनुष्य इ० २ उत्तरहिंदुस्थानी माणूस; पुरभय्या. –वि. परका. दुसऱ्या देशांतील (माल) ०**द्वार**–न १ परदारागमन पहा. स्वस्त्रीखेरीज अन्य स्त्रीशीं (वेश्या सोडून) गमन करणें; व्यभिचार. 'वालमें परद्वार केलें। कोढी कोणी होय।' –ज्ञा १६.३०५. २ पतीखेरीज अन्य पुरुषाशीं कुलीन स्त्रीनें केलेलें गमन; जारकर्म. (क्रि० करणें) 'घरस्वामि सोडुनी नारि ज्या परद्वार करिती।' –होला १६६. ०**द्वारी**–वि. व्यभिचारी; जारकर्म करणारी (स्त्री, पुरुष). 'मैद भोंदु परद्वारी। भुरटेकरी चेटकी।' –दा २.३.३१. ०**धन**–न. १ दुसऱ्याचा पैसा. 'परदारा परधन। आम्हां विषसमान।' २ (ल.) मुलगी. कारण लग्न झाल्यावर ती परक्याची होते. ०**धारजिणा**–वि. (निंदार्थी) दुसऱ्याच्या उपयोगीं पडणारा; दुसऱ्याला फायदेशीर, उपकारक (स्त्री, मुलगा, नोकर). ०**नार–नारी**–स्त्री. दुसऱ्याची बायको. 'परधन परनारी। आम्हां विषाचिया परी।' 'परनार विषाची धार घात करि जीवा।' ०**न्यास**–वि. वाटेल त्यास शिव्या इ० देण्यास लावणारा. (एक वातविकार). ०**पाकरुचि**–वि. नेहमीं दुसऱ्याच्या घरीं जेवणारा; परान्नभोजी. [पर+पाक+रुचि] ०**पांडित्य**–न. (निंदार्थी) (स्वत: त्याप्रमाणें न वागतां) दुसऱ्याला उपदेश करणें. ०**पार**–पु १ पलीकडचा कांठ–किनारा; परतीर. 'तेथ भक्त संत सज्ञान नर। स्वयें पावविशी परपार।' –एभा २०.५.२ (भवाच्या पलीकडचा तीर) मोक्ष 'जेणें पाविजे परपार। तिये नांव यात्रा पवित्र।' –एभा २१.५८. ०**पीडा**–स्त्री. १ दुसऱ्याला त्रास, दु:ख देणें. 'परपीडेसारखें पाप नाहीं.' (क्रि० करणें; देणें). २ दुसऱ्याचें दु:ख ०**पुरुष**–पु १ परका माणूस २ (बायकी) नवरा, भाऊ इ० जवळचे आप्त सोडून इतर माणूस. ३ ईश्वर; परमेश्वर. ०**पूर्वस्त्री**–स्त्री. स्वैरिणी, व्यभिचारिणी स्त्री. ०**पेठ**–स्त्री. १ दुसरें गांव. २ हुंडीची तिसरी प्रत; एक हुंडी गहाळ झाली असतां दुसरी देतात तिला पेठ म्हणतात व तीहि गहाळ झाली तर जी तिसरी देतात ती. ०**बुद्धि**–स्त्री. दुसऱ्याची बुद्धि, अक्कल. –वि. दुसऱ्याच्या बुद्धीनें, तंत्रानें चालणारा. ०**भाग्योपजीवी**–वि. दुसऱ्याच्या नशीबावर जगणारा; आश्रित; पोष्य; पराधीन. ०**मार**–पु. दुसऱ्याचा नाश 'प्रतिष्ठीन परमारु। यागवरी।' –ज्ञा १६ ३६० ०**मार्ग**–पु १ परमेश्वराचा मार्ग परमार्थ 'जेथ कैवल्य वस्तु सांटवे। परमार्गु वाहाति सदैवें। जेआलागिं।' –ॠ १००. २ महानुभाव धर्म 'तो नमस्करूं प मार्गु। दातारांचा।' –ॠ ६ ०**मुलूख**–पु. परदेश. ०**रत**–वि. व्यभिचारी (स्त्री, पुरुष). ०**राज्य**–न. १ दुसऱ्यांचें, परक्या लोकांचें राज्य; ‍ कीय सरकार २ परकीय लोकांचा अंमल, ताबा याच्या उलट स्वराज्य. ०**रूपसंधि**–पु (व्या.) दोन्ही स्वराच्या जागीं पुढला स्वर मात्र होतो असा संधि. ०**लक्ष्मी नारायण**–वि दुसऱ्या, दान मिळालेल्या संपत्तीवर डौल मिरवणारा. ०**लोक**–पु. १ मृत्यूनंतर प्राप्त होणारा लोक, ठिकाण (स्वर्ग, नरक, इ०); मृत्यूनंतरची स्थिति. २ (व्यापक) अक्षय सुखकल्याणाच्या जागा प्रत्येकीं (कैलास, वैकुंठ. इ०). ०**लोकवासी होणें**–मरणें; मृत्यु पावणें. ०**वधू**–स्त्री. दुसऱ्याची भार्या; परदारा. ०**वश**–वि. दुसऱ्याच्या ताब्यांत असणारा; पराधीन; परतंत्र. ०**वशता**–स्त्री. पारतंत्र्य; पराधीनता. 'फारचि बरी निरयगति, परवशता शतगुणें करी जाच।' –मोविराट १.५६. ०**वस्तु**–स्त्री. १ उत्कृष्ट वस्तु; श्रेष्ठ वस्तु. 'विदेसारखी परवस्तु नाहीं.' –न. परब्रह्म. [सं.] ०**शय्या**–

स्त्री. व्यभिचार; परपुरुषाशीं त्याच्याच घरीं संग करणें. ०शास्त्र-न. (महानु ) श्रेष्ठ शास्त्र, ब्रह्मविद्या; अध्यात्म. ' आक्षेप परिहारीं निर्धारू। करितां परशास्त्र विचारू।' -ऋ २३ ०स्त-स्थ-वि. १ परक्या गांवात किंवा देशांत रहाणारा:'परगांवचा. २ (ल.) तटस्थ; तिऱ्हाईत; नि:पक्षपाती ०स्त्री-स्त्री आपल्या स्त्रियेवांचून इतर स्त्री; दुसऱ्याची बायको. ' नका लाऊं जिवलगा प्रीत तुम्ही परस्त्रीचे ठाईं।' -होला १०८. ०स्थळ-न. दुसरी जागा, स्थळ ( ज्याच्या विरुद्ध निकाल झाला तो दुसरी कडील निकालाची खटपट करतांना वापरतो). ०स्व-न दुसऱ्याची मालमत्ता, धन. ' नातरी परस्वापहारें। जें सुख अवतरे ।' -ज्ञा १८.८०७. ०स्वाधीन-वि. परतंत्र; परवश. म्ह० परस्वाधीन जिणें व पुस्तकी विद्या उपयोगी नाहीं. ०हस्तगत-वि. दुसऱ्याच्या हातांत गेलेलें.

**परकपाल**—न (ज्यो ) पश्चिम गोलार्ध. [ सं. पर=पली-कडचें+कपाल ]

**परक(को)र**—पु लहान मुलीचा नेसावयाचा झगा. (व.) परकोल. [ सं. परिकर; तुल फा. पर्कार्; म. परकार ]

**परक(का)ळा, परकाळें**—पुन १ कापडांतील एक प्रकार. ' कोणासी पागोटें परकाळा। कोणी मागती अष्टगोली शेला।' -भवि ३०.४१. २ कापडाची चिंधी. ३ (ल.) ( अनेकवचनी प्रयोग ) दैना; नासाडी, मोडकळीची स्थिति ' जीवाचे, संसाराचे परकळे झाले ' ४ खिरींत घालावयाचे गव्हले, मालत्या, शेवई इ० [ फा. परकाला ]

**परकार-रा**—पु. १ कंपास, घेर. २ फेरा; गर्का; वळसा. [ फा. पर्कार्; तुल० सं प्राकार ]

**परकेल**—पु शेतीकरितां आऊत, गडी, बैल यांची एकमेकानीं एकमेकास मदत करणें; हंदा. -बदलापूर १६. पडकय, पडकेल पहा. [ सं. प्रतिक्रिया ]

**परक्यान**—क्रिवि. (गो.) सुद्धां. ' आबें परक्यान आइलें.'

**परखंडा**—पु पुढचा शेंडा तोडलेलें केळीचें पान. [ पर+खंडणें ]

**परखंद-खन**—न. (गो) मुंजा मुलगा, नवरा किंवा नवरी यांना मुंज, लग्न इ०च्या वेळीं करण्याचा आहेर.

**परगणा**—पु १ एक देशविभाग; जिल्हा. देश पहा. किल्ला अथवा मोठें शहर याच्या नांवावरून परगण्याला नांव पडलेलें असतें ' वाची अक्षरें कीं पाहूनराव चिठया करी परगण्यावर।' -ऐपो ४०८ ' पंढरपूर परगणा। विठ्ठल्या दरवाजावर मोत्याचा पाळणा।' २ (ल) कामाचा मोठा व्याप, पसारा, खटला, प्रपंच. 'कामाचा येवढा परगणा पडला आहे तो केव्हां आटपेल ?' [ फा. ] ०पाटील-कुळकर्णी-पु. परगण्याचा पाटील, कुळकर्णी.

**परगुणें**—न. १ मेजवानी. ' क्षीरसागरा परगुणें। कीजे क्षीरसागरचिपणें।' -ज्ञा १५.५६५. २ पक्वान्न. 'कां पाहालेनि सुयाणें। जाल्या परगुणें। पढियंतें पाहुणें। स्वर्गोनियां।' -ज्ञा १४.२१६. ' घरोघरीं परगुणे।' -दाव ३०८.

**परचीत**—स्त्री. (काव्यांतील अप. रूप.) (प्र.) प्रचीति; प्रचीत पहा.

**परचुरण**—न. १ नाण्याचा खुर्दा; रेजगण, रेजगारी; मोड. २ मोडकेतोडके दागदागिने. ३ किरकोळ, सटरफटर वस्तू. [ सं. परि+चूर्ण; गु परचुरण ]

**परज**—पु तरवारीची, ढालीची, पट्टयाची मूठ; खोबळा. ' वडिलार्जित परज होता तया अंत।' -रामदासी २.१५४ [हिं. पर्जे ] परजणें-उक्रि १ तरवार, पट्टा इ० फिरविणें; पेलणें; चमकावणें; मारण्यासाठीं सिद्ध करणें ( तरवार ). ' गदा परजति हस्तमुढाळें।' -मुआदि ३१.६५. २ हत्या करणें; छेदणें. 'संसारेसीं परजी सेवटीं। मीचि तयालागि।' -भाए ८०८.

**परज**—पु. (संगीत) एक राग. या रागात षड्ज, कोमलऋषभ, तीव्र मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी तार षड्ज. संवादी पंचम. गानसमय रात्रीचा चौथा प्रहर. [ हिं. पर्जे ]

**परजकुंवर**—पु. पुष्य नक्षत्र. या नक्षत्रांत पुष्कळ पाऊस पडतो म्हणून यास हें नांव. [ पर्जन्यकुमार ]

**परजणें**—उक्रि. स्वाधीन ठेवणें ' मनास परजी ऐसा थोर। सुर नर असुर दिसेना।' -एभा २३.६८१. [ सं. प्रजा ]

**परजणें**—उक्रि. (व.) परवडणें; पसंत असणें. ' परजेल तर घोडा घ्या.'

**परंजय-ल, परंजळ**—वि. शुद्ध; सत्य; खरें; प्रांजळ; प्रामाणिक. [ सं. प्रांजल ]

**परजळणें**—सक्रि. प्रज्वलित करणें; पाजळणें; पेटविणें. 'जैसी अग्न परजळली।' -ऐपो १०. [ सं. प्रज्वलन ]

**परटवणें**—न परिटाकडे धुवावयास टाकलेला किंवा त्याच्याकडून धुवून आलेला कपडा; धुण्याचे किंवा धुतलेले कपडे. [परीट]

**परटी**—वि. परटाकडून धुवून आलेला ( कपडा ).

**परटीण**—स्त्री. १ धोबीण. २ एक काळया-पांढऱ्या रंगाचा पक्षी. ह्याची शेपटी नेहमीं हलत असते.

**परटीस**—क्रिवि. धोब्याकडे; धुण्यासाठीं. ( क्रि० घालणें; देणें; टाकणें ). परटीहून-क्रिवि. धोब्याकडून ( धुवून ). [परीट]

**परड-डी**—पुस्त्री एक सापाची जात हा दोन पुरुष लांब, फार चपळ असून विषारी नसतो. लहान मूल सहज गिळतो.

'परड सोडसे महाडुळें। शुद्ध नाग सोनसळे।' –कथा ४.४.३१. [ प्रा. परडा=सर्पविशेष ]

**परडा**—पु. ( व. ) शिपतर; परडी पहा

**परडी**—स्त्री. १ बांबूच्या काडयांची केलेली गोल पाटी; टोपली; शिपतर; करंडी. २ ( कु. ) परडीच्या आकाराचें बायकांच्या डोक्यांतील फूल [ ? सं. परिधि; का परटे ]

**परडी-डे**—स्त्रीन धान्याचीं कणसें खळयावर आणल्यावर धान्य पुष्कळ भरावें म्हणून बोकड फुलें इ० चा देवीला किंवा पिशाचाला द्यावयाचा बळी डवरा पहा.

**परडूल**—न. १ ( निंदार्थी ) लहान परडी, टोपली. २ लहान परडें; आवार, वाडगें.

**परडें**—न. १ तराजूचें एक पारडें; शिंपल्याचा अर्धा भाग, शिंप. 'वांकेल ताजव्याचें भारावांचोनि काय बा परडें।' –मोद्रोण ( नवनीत ३२१ ). २ चमच्याचें टवळें, वाटी ३ लांकडी परळ; थाळा. ४ घराच्या मागचें आंगण; परसूं; घराजवळची बाग करण्याकरितां राखिलेली जागा. [ परडी ] **०उतरणें, बसणें**–१ वजनांत कमी भरणें. २ (ल.) योग्यता कमी होणें. **०जड होणें-चढणें**–१ वजनांत जड, जास्त भरणें. २ ( ल. ) अभिमान चढणें. **०बसणें**–योग्यता उतरणें, कमी होणें.

**परडें**—न. बारीक रेशीम किंवा जरतार गुंडाळण्याचें यंत्र.

**परण**—पु ( ताल ) एक ताल; समेपासून ठेक्याच्या बोला हून निराळे लावलेले त्याच लईतील अधिक बोल. 'पखवाज वाल्यास तालाबरोबर परण व तुकडे वाजवितां आले पाहिजेत.' –( बडोदें ) कलावंतखातें ३२३.

**परणन**—न. (काव्य) वरणें; लग्न करणें; लग्न. [सं. परिणयन]

**परणणें**–उक्रि. वरणें; विवाह करणें; लग्न लावणें. 'परणूं पाहे राक्षसविधीं। तें मी सिद्धी जाऊं नेदीं।' –एरुस्व १२.६६.

**परणाळी**—स्त्री. १ मोरी; पाट; नाला. २ ( ल. ) रचना; व्यवस्थेशीर मांडणी; ठराविक किंवा योग्य मार्ग; परंपरा. [ सं. प्रणाली; परणेल=इं. पॅनेल ]

**परत**—स्त्री १ फेड; उलट, परत करणें; दिलेला मोबदला; प्रतिक्रिया, कर्म. २ खजीन्यांतून परत पाठविलेलें खोटें नाणें. ३ माघारी वळणें; फिरणें; परतणें. ४ पुन्हां काळजी घेणें, लक्ष देणें. ( क्रि० करणें ). ५ शुश्रूषा; समाचार. 'तो आजारी पडला तेव्हां कोणी त्याची परतहि केली नाहीं' ६ समासांत आवृत्ति किंवा फेड या अर्थानें योजतात जसें:–परत-जेवण–चौकशी–खतावणी–पाहणी इ०. –क्रिवि. पुन्हां; माघारी; मागें; उलट, फिरून. (देणें; करणें=माघारी देणें). [ सं. प्रति ] **०जाणें, येणें**–माघारी जाणें, येणें. **०घेणें**–सासरहून मुलगी विधवा होऊन माहेरी येणें. सामा-शब्द– **०अर्जी**–स्त्री पुन्हां केलेला अर्ज. **०अहेर**–पु. अहेर करणाऱ्यांना फेड म्हणून आपला दुसरा अहेर करणें **०कळवी**–स्त्री. सरकारी खजिन्यांतून प्रांतीं पाठविलेली रक्कम, पैसा ( बदलून पाठविण्यासाटीं ). **०कूळ**–न. साटेलोटें; परतवेल; ज्या घरीं आपले घरची मुलगी दिली ती जिवंत असता त्या घरची मुलगी आपले घरीं करण्याचा प्रकार. **०गोष्ट**–स्त्री. उद्धटपणाचें, उलट उत्तर **०सांगणें**–उलट सुलट शब्द बोलणें, तोंडासतोंड देणें. **०जमा**–स्त्री. कर्जाऊ रक्कम परत आली असता ती जमेच्या बाजूस लिहिणें, माडणें. **०जबाब-जाब**–पु. प्रत्युत्तर. ( क्रि० देणें; करणें ) **०जामीन-जामिनकी**–स्त्री आपण ज्यास जामीन राहिलों आहों त्याजकडून जामीन घेण्याचा प्रकार **०जिम्मा**–पु. जिम्म्याला मोठा जिम्मा पाहणें. **०जिम्मेदार**–पु परत जामीन पहा. **०जिम्मेदारी**–पु. परत जिम्मेदाराचें काम **०ताप**–पु. पुन्हां आलेला ताप; उलटलेला ताप **०निशा**–स्त्री. ज्याच्यासाठीं स्वत. जबाबदारी पतकरावयाची त्याच्याबद्दलची अधिक खातरी करून घेणें. **०पंचाईत**–स्त्री पंचाईतीनें केलेली फेर चौकशी. **०फैसला**–पु ( कायदा ) फिरून तपासणी करून दिलेला निकाल. **०बहुडा**–पु. बहुडा पहा. **०भाडें**–न. माघारी येण्याचें, आणण्याचें भाडें. **०मांडव**–पु. लग्नांतील मांडव परतणें. 'परत मांडव परतला।' –दावि ४१. **०मुकद्दमा**–पु. ( कायदा ) पुन्हां चवकशीकरतां घेतलेला दावा, खटला **०वाघ**–पु ( ना ) मनुष्याचा वाघांत रूपांतर झालेला वाघ (एक अडाणी लोकसमजूत) **०वेल**–स्त्री. परतकूल पहा **०वेळ**–स्त्री. तिसरा प्रहर; दुपार परतल्यावरची वेळ **०व्याज**–न. कर्जाची फेड करतांना आलेल्या जास्त रकमेवरील सावकारानें कुळाला परत केलेलें व्याज. **०हामी**–पु परत जामीन–जामीनकी पहा. **०हुंडी**–स्त्री नाकारलेली हुंडी.

**परतून**–क्रिवि. १ परत फिरून: माघारी वळून २ पुन्हां; फिरून ( गोष्ट इ० सांगणें ). **परतून-पडणें**–(कर. ) क्रि. विरुद्ध होणें; उलटून पडणें.

**परतण**—वि. (कर ) लुगडयाच्या पोतामध्यें चौकटी वाण करण्याकरितां मध्यें पांढरे, हिरवे किंवा दुसऱ्या रंगाचे दोरे, तातू घालतात, ते काठांत न जाता मध्येंच परतून लुगडें विणण्याचा एक प्रकार. अशा लुगडयाचा भाव चार आणे चढ असतो.

**परतणी**—स्त्री. या अंगावरून त्या अंगावर वळणें, पालटणें; बदलणें; परतण्याची क्रिया. [ परतणें ]

**परतणें**—उक्रि. १ दुसऱ्या बाजूला अंगावर वळणें 'भाकरी सुटली म्हणजे परतावी.' २ दिशा किंवा रोख बदलणें; स्थान किंवा जागा बदलणें. ३ उलटणें; पालटणें; बदलणें ४ परत करणें, देणें; पाठविणें 'परत्री कीर विख। होऊनि परते।' –ज्ञा १८. ८०१. ५ एखादा पदार्थ तव्यावर ( घाईघाईनें, अपुरा ) भाजणें;

घाईनें पदार्थ तयार करणें. ६ चोळणें; मिसळणें. ' पवित्रा गंगोदका । सरिसी परतिजे कस्तुरिका । तरि परिमळाचेया कवतिका । का न लवावि ।' –भाए ३२. –अक्रि. १ मागें फिरणें, वळणें, जाणें, येणें २ (वर्तुल, मुदत संपून) उलटणें; परत येणें ( वर्ष, रास इ० ). ' ऐसें आपत्ती जें सुख । ऐहिकीं परिणामे देख । परत्री कीर विख । होऊनि परते ।' –ज्ञा १८ ८०१. ३ संपणें; निघून जाणें ( दुपार, मध्यरात्र ). ४ बदल होणें; फरक पडणें ( स्वभाव, बेत, निश्चय यांत ) ५ माघार घेणें; पाठीमागें सरणें; मोडता घेणें. ६ व्यायल्यानंतर लगेच गाभण राहणें ( गाय, म्हैस इ० ). ७ पहिल्या स्थितीप्रत जाणें. [ सं. प्रत्ययन ] **परतनी**–स्त्री. परत फिरण्याची क्रिया. ' घेउणि बळाची परतनी । प्राणा करी खोंचणी । आयुष्याची तोडी तवनि । हलु हलु । ' –भाए ५२३. [ परतणें ]

**परत(ता)न**—न १ नागराच्या एका उलट सुलट फेरींत जितकी जमीन नांगरली जाईल तेवढी जमीन यावरून. २ जमीनीची पट्टी; एक पट्टा; चार पांच बिघ्यांचें लहान शेत. –भात्रै ७. १ ते ४. ३ नागराचा फेरा. ४ जमीन मोजण्याचें एक परिमाण. [ परतणें ]

**परतभाव**—पु (व.) प्रताप; सामर्थ्य. ' हा तुमच्याच कृत्याचा परतभाव. ' [ प्रभाव अप. ]

**परतवण**—न. १ द्विरागमन, पुनरागमन. २ लग्नानंतर नवऱ्या-मुलीची माहेराहून सासरी परत पाठवणी

**परत(ना)ळणें, परत(ता)ळा**—पडताळणें, पडताळा पहा.

**परता–ती–तें**—वि. पलीकडचा; लांबचा; दूरचा. याच्या उलट अरता. –क्रिवि १ पलीकडे. दुसऱ्या बाजूस. ' वें प्रेमालाप रती, टाकी मी यापुढें सुधेला परती । ' –मोकृष्ण ३१.२८. –उभ ( काव्य ) पेक्षा; शिवाय. ' ह्या परता तो चांगला. ' ' त्या वेदातापरतें कांहीं । सर्वथा श्रेष्ठ नाहीं । ' –दा ५.६.१७. –शअ. खेरीज; वांचून; शिवाय. ' युद्धें जय कीं स्वर्ग श्रेष्ठ जगीं लाभ कोणया परता । ' -मोशल्य ३.३२. ' कर्ता हर्ता पाळिता । मज परता नसेचि । ' [ सं. पार ] **परता**–वि. श्रेष्ठ.

**परता**—क्रिवि. परत; मागें; दूर. ' तेथूनि परतें पाहतां । ' –परमा ४.३ ' सुंद म्हणे म्या वरिली सर परता धरूनि हात नोडावा । ' –मोआदि ३६.२८. ' परता होई चांडाळा । ' [ परत सं. प्रति ]

**परता**—अ. ( वाक्यालंकारार्थी ) तर मग; बरें तर. उदा० ' जा परता '; ' म्हणा परता. '

**परती**—स्त्री. औदासिन्य; उपरति; विरक्ति. [ सं. उपरति ]

**परतावाण**—पु. (गो.) लग्नानंतर वरासह पांच माणसांचें पुनरागमन. [ सं. प्रति+आवर्तन–आगमन ]

**परताळणें**—अक्रि. ( बे ) दुखणें उलटणें. [ परत+आळणें ]

**परती**—स्त्री. ( विणकाम ) लडीचें सूत ज्यावर गुंडाळतात ती काडी, नळकाडी; बॉबीन ( इ ) [ परत ] **परतीचेंकाम**–दोन्ही काठासाठीं दोन व मधील पोतासाठीं एक अशा तीन धोटयांनीं काम करणें. यामुळें आडवणाचें रेशीम काठांत जात नाहीं. परतण पहा.

**परंतु**—उभ. १ पण; किंतु, पूर्ववाक्यार्थ अंगिकारून त्यास दोषप्रतिपादनादिरूप विरुद्ध वाक्याचा उपन्यास कर्तव्य असतां मध्यें याचा प्रयोग होतो. २ तरी सुद्धां; तरीहि; तथापि; तत्राप. [ सं. ]

**परत्र**—क्रिवि. नाहीं तर; अन्यत्र. –न. पर शब्द पहा. [ सं ]

**परत्वें**—शअ अनुरोधानें; मुळें; अनुसरून; नें. उदा० ' अधिकार–जाती–परत्वें. ' काल–देश–ज्ञान–गुण–योग्यता–स्थान–एतत्–तत्–परत्वें. ' कधीं करून शब्दार्शी पूर्वी जोडून हा शब्द येतो. उदा० कालपरत्वें करून=समयाला, काळाला अनुसरून.

**परदेश–शी, परदेशी खुंटा**—पु. ( विणकाम ) उभाराचें पसरलेलें सूत ( वशारन ) यास जो ताण देतात त्याची दोरी ज्या खुंटावरून मागाच्या उजव्याबाजूस आणली असते ती खुंटी; ताण्याचें सूत ( वशारणें ) ज्या भोंवतीं गुंडाळतात ती खुंटी.

**परनाळ(ळि)का**—स्त्री. परिनाळिका पहा.

**परनिष्ठ**—वि १ देवताविषयक गोष्टींत मग्न असलेला; परमार्थनिष्ठ. २ सत्यवादी; न्यायनिष्ठ; निःपक्षपाती. ' राजश्रीजवळ बऱ्या परनिष्ठ गोष्टी . सांगितलें. ' –पेद ६.६२. ३ स्पष्ट; खरा. ' परनिष्ठ लिहून पाठविणें । ' –खरे ८८५. ४ उपकारी; दाता [ सं ]

**परनिष्ठा**—स्त्री १ पारमार्थिकपणा; परमार्थचिंतन. २ लोकोपकारबुद्धि; लोकाबद्दलची कळकळ [ सं ]

**परं(रिं)द**—पु. पक्षी. ' पाच परिंदाची शिकार करून आंबराईंतून आले. ' –रा ७.१०४. [ फा. परन्दा ]

**परपर–रां**—क्रिवि. कापड फाडणें, शौचाला होणें इत्यादि प्रसंगीं होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन. टरटर–रां पहा. ' जे मदमत्त मतगज हगले मदसेकहीन परपर ते । ' –मोभीष्म १०.११५. [ ध्व ]

**परंपरा**—स्त्री. १ एकापुढें एक किंवा एका मागें एक अशा क्रमानें अनेक संबद्ध पदार्थांची मालिका; रांग; व्यवस्था; क्रम. उदा० धर्मपरंपरा; राजपरंपरा. ' मनूनें आपण अनुष्ठिली । मग इक्ष्वाकुवा उपदेशिली । ऐसी परंपरा विस्तारिली । आद्य हे गा । ' –ज्ञा ४.१८ २ वंशपरंपराचें संक्षेपरूप; एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे या क्रमानें चालत येणें. ३ विस्तार. ' आतां जयाचेनि संकल्पें । हे लोकपरंपरा होय हारपे । ' –ज्ञा ११ ८२. [ सं. ]

**०गत-आयात**-वि १ परंपरेनें आलेलें; पूर्वीपासून सारखें चालत आलेलें. २ वंशादि परंपरेनें चालत आलेली (वृत्ति, आचार). **०विटाळ**-पु. परंपरागत स्पर्शजन्य विटाळ; सांस्कारिक अशुद्धता. **०संबंध**-पु. परंपरेनें जडलेला किंवा मध्यस्थामार्फत जमलेला संबंध. **०स्पर्श**-पु परंपरासंबंधाचा किंवा अन्य द्वारां झालेला स्पर्श.

**परंपोक**—स्त्री. नापीक जमीन; लागवडीस निरुपयोगी जमीन. ' हीशेबा पडेल बरवे नीके । लायक परंपोक कळावया ।' –पैमा १ ४५. [ तेलगू ]

**परब**—पु. १ एक रत्न; चपटा हिरा. २ दोन्ही बाजूंस सपाट ( पैलू नसलेला ) असा हिऱ्याचा पातळ तुकडा. –जनि ( पारिभाषिक शब्द ) ८. [ हिं ]

**परब**—न. (कु. गो.) सण [ सं. पर्व; हिं. गु. परब ]

**परबा(भा)ण-न**—न (नाविक) शिडाला जोडलेली काठी. ' गाबी परबान जायां जालें. ' –वाडमा १ २३६. [ हिं. परबान ]

**परबाहिरा**—क्रिवि. परभारा; बाहेरच्याबाहेर; परस्पर. ' म्हणुनी त्यजिला परबाहिरा । नव्हे सोयरा निजाचा । ' –एरुस्व ६.६३. [ पर+बाहेर ]

**परब्रह्म**—न परमेश्वराचें निरुपाधिक, निराकार असें स्वरूप. [सं.]

**परभाण**—न. १ (ऐतिहासिक) ( संख्या, महत्त्व इ० मुळें असलेलें ) परभू ( प्रभू ) लोकांचें वर्चस्व; प्राबल्य. २ त्यांच्या वर्चस्वाचें स्थान. [ परभू ]

**परभारा-रां-भारीं-भारे-रें**—क्रिवि. १ एखाद्या इसमास वगळून. २ ज्याच्याबद्दल आदर, कळकळ दाखविणें योग्य आहे असा विषय, वस्तु किंवा माणूस यांची हेळसांड करून. ' मला न सांगतां त्यांस तूं परभारा निरोप देऊं नको. ' ३ जी गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे त्याकडे दुर्लक्ष करून. ४ परस्पर; बाहेरच्या बाहेर. ' घरीं जाण्याची त्वरा होती म्हणून तुमची भेट न घेतां मी परभारा गेलों. ' ५ नेहमींच्या परिपाठाव्यतिरिक्त. ६ अप्रत्यक्ष रीतीनें; अन्य द्वारें. ' तुमच्या शत्रूचें परभारा परिपत्य झालें. ' ७ कांहीं प्रयत्न न करतां सहज. 'प्रतिवर्षी घरी [illegible] चालुन येती परभारी । ' –ऐपो ४०६. ( समासांत ) परभारा-अंमल-खर्च-मिळकत; शिल्लक ८ ( कु ) पाठीमागें; परोक्ष. [सं. पर+बहिः]

**परभारें**-न. ( जमाखर्च ) वराती दिलेल्या रकमांच्या तपशीलाचें सदर.

**परभू**—पु, एक ब्राह्मणेतर हिंदु जात व तींतील व्यक्ति; प्रभु हे आपणांस चांद्रसेनीय कायस्थ क्षत्रिय म्हणवितात. दुसरा पाठारे म्हणून एक भेद आहे. परभू हा जुना शब्द असून अलीकडे त्याबद्दल प्रभु असा शब्द रूढ झाला आहे. [ सं. प्रभु ]

**परम**—वि. १ अत्युत्तम; अत्युच्च; श्रेष्ठ; अतिशय चांगला. ' ॐ नमो सद्‌गुरु परम । जयजय सद्‌गुरु पुरुषोत्तम । ' –एभा २८.१. २ मुख्य; प्रमुख. परमावधि दर्शविण्यासाठीं समासांत योजतात. असें:–परम–कठोर–निर्दय–चतुर. –क्रिवि. पुष्कळ; अतिशय; फार [सं ] **०क्रांति**-स्त्री. ( ज्यो. ) परमापम; परापम; क्रांतिवृत्ताची वक्रता **०गति-ती**-स्त्री. शेवटचें आश्रयस्थान; सर्वस्व ' तूं माझी परमगती म्हणुनि विनवितो अगा महाबाहो । ' –मोकर्ण ७ १४. **०गुरु**-पु. १ स्वतःच्या गुरूचा गुरू २ श्रेष्ठ गुरु **०तत्त्व**-न १ अति उच्चतत्व २ परब्रह्म; परमेश्वर. **०पुरुष**-पु १ श्रेष्ठ माणूस. २ विष्णु; परमेश्वर **०धाम**-न मोक्ष. ' कीं परमधाम प्रकट । सर्व विद्यांचें मूळ पीठ । शास्त्रजातां वरिष्ठ । अशेषाचें । ' –ज्ञा १.३०. **०मर्यादा**-स्त्री. शेवटची स्थिति, सीमा; परमावधि. **०वरिष्ठ**-वि. अत्यंत श्रेष्ठ; उच्च; परमेश्वराचें विशेषण. **०वस्तु-वस्त**-न अतिशय उत्तम वस्तु; परमेश्वराचें विशेषण **०हंस**-पु १ संन्याशांचा एक वर्ग; ( सामा. ) संन्यासी. ' परमंहसरूपें देऊनि उपदेश । ' –दावि २८९ २ परमेश्वर. **परमागति**-स्त्री. अत्युच्च अवस्था; जीवब्रह्मैक्यस्थिति, अवस्था. ' गुरुविण न घडे परमागति । ' **परमानंद**-पु १ अतिशय आनंद. २ परब्रह्म; परमेश्वर; ईश्वराचें विशेषण. [ परम+आनंद ] **परमान्न**-न १ उत्तम पक्वान्न. ' भक्ष परमान्न पत्रशाका । ब्राह्मण वाढिताती अनेका । ' –गुच ३८.५९. २ साखर आणि दूध घालून शिजविलेला भात ( पिंडासाठीं ). **परमाप्त**-वि. अत्यंत प्रिय; लाडका. ' श्रीराम भक्तपरमाप्त तयास वाटे । ' [ परम+आप्त ] **परमायु**-न दीर्घ आयुष्य. **परमावधि**-पु परममर्यादा पहा. **परमोत्कृष्ट**-वि. अतिशय उत्तम; उच्च पदवीला पोंचलेला ( परमगुरूला म्हणतात ). **परमोन्नति**-स्त्री. ( ज्यो. ) खस्वस्तिक; कळस; मध्याह्नवृत्तांतील बिंदु; डोक्यावरील बिंदु.

**परमणी**—स्त्री. (ज्यो.) पर्व अर्थ १, २ पहा. [सं पर्वणी]

**परमणी**—स्त्री. ( विणकाम ) बैलीवर पसरलेलीं सुतें कुंच्यानें साफ करण्याची क्रिया. याच्यानंतर पाजणी, सांदणी, पोपती ( वळी ) ह्या क्रिया करतात.

**परमळ, परमळणें**—परिमळ–णें पहा. [सं. परिमल] **परमळिक**-वि. (गो.) सुवासिक.

**परमा-मे**—पुन. प्रमेह; गर्मी; धातुरोग; शिश्नद्वारां पू वाहणें. [ सं. प्रमेह ]

**परमाई**—स्त्री. (श्रेष्ठमाता ) वीरमाता. ' जोंवरि तोंवरि शूरत्वाच्या गोष्टी । जंव परमाईचा पुत्र दृष्टीं देखिला नाहीं । ' –तुगा ३२३८. [ पर=श्रेष्ठ+माता ]

**परमाठीव**—वि. चांगला टाकीनें घडलेला, दुसऱ्यांदा गुळगुळीत, साफ केलेला ( दगड ). [ पर+माठीव ]

**परमाण**—न. शिडाला जोडलेली काठी. परबाण पहा.

**परमाण(न)गी**—स्त्री. (अप.) परवानगी पहा.

**परमाणु**—पु. (अणूपेक्षा सूक्ष्म) पृथ्वी, जल, तेज, वायु यांचा केवळ सूक्ष्म अंश (याहून पुढें सूक्ष्मतेची कल्पना रहात नाहीं); अति सूक्ष्म कण; अविभाज्य स्थितींतील पदार्थ. उन्हाच्या कवडाशात दिसणाऱ्या एका त्रसरेणूचा सहावा भाग. कित्येक इं. 'ॲटम' याला तर कित्येक 'मोलेक्यूल' याला हा प्रतिशब्द म्हणून वापरतात. [सं. परम+अणु] **०वाद**-पु. परमाणूपासून जग बनलें आहे असें मत.

**परमातखाऊ**—वि पराग्रपुष्ट; दुसऱ्यावर अवलंबून राहणारा. [परमार्थ+खाऊ]

**परमात्मा**—पु १ विश्वाचा आत्मा, सर्वश्रेष्ठ आत्मा; जगच्चालक, सर्वव्यापी, सर्वसाक्षी परमेश्वर २ सर्व वस्तूंना आधारभूत असलेलें परब्रह्म. ३ मुक्तात्मा. '(आणि तोच आत्मा) या प्राकृत म्हणजे प्रकृतीच्या किंवा देहाच्या गुणापासून मुक्त झाला म्हणजे त्यास परमात्मा म्हणतात.' —गीर १९७. याच्या उलट जीवात्मा. जीवात्मा पहा. [सं परम+आत्मा]

**परमापम**—पु. (ज्यो.) कक्षावृत्त व क्रांतिवृत्त यांमधील अंतर; परापम. [सं. परम+अपम]

**परमार**—पु. १ शत्रूचा उच्छेद करणारा. २ माळव्यांतील एक जुनें राजघराणें. पवार हें आडनांव यापासुन निघालें. [सं.]

**परमार्थ**—पु. १ ईश्वरसाधनरूप पुरुषार्थ; मोक्ष; सद्गति. २ ब्रह्मज्ञान 'ऐसी जगीं सुरम्य कथा। जे जन्मभूमि परमार्था मुनि सांगे नृपनाथा। जन्मेजया।' —ज्ञा १.४८ ३ केवल सत्य; सत्यांश. याच्या उलट माया, असत्य 'कवि वर्णनप्रसंगीं मुखापेक्षां चंद्रास केवल तुच्छ करतात परतु परमार्थे पाहता मुख तें मुख व चंद्र तो चंद्र.' —क्रिवि. सद्हेतूसाठीं; धर्मार्थ जसें:—परमार्थ-इनाम-गांव-औषध **म्ह०** प्रपंचाला धन परमार्थाला वैराग्य. **परमार्थत**.-क्रिवि सत्यत.; खऱ्या दृष्टीनें; प्रामाणिकपणें (भाषण, वर्तन). **०दृष्टि**-स्त्री-. परमार्थाची आसक्ति, इच्छा. -वि. परमार्थाची बुद्धि असलेला. **०प्राप्ति**-स्त्री. ब्रह्मप्राप्ति; मोक्ष. **०बुध्दि**-स्त्री. १ कपटादि रहित भावार्थरूप बुद्धि; (व्यापक) सत्य, पावित्र्य, अकृत्रिमता, अहेतुकता इ० बद्दल योजतात. २ दैवी प्रेम; शुद्ध, पवित्र भक्ति; आत्म्याचा परमार्थाकडे ओढा. **०भिक्षा**-स्त्री. धर्माकरितां, धार्मिक विचारानें मागितलेली भिक्षा. **०साधन**-न. १ परमार्थ मिळविणें, प्राप्त करून घेणें. २ परमार्थ मिळविण्याचा उपाय; साधन. **परमार्थी**-वि १ प्रपंचापेक्षां ईश्वरसाधनरूप मार्गाकडे जास्त लक्ष लावणारा; ब्रह्मप्राप्तीसाठीं झटणारा. २ भावार्थी, कळकळीचा; प्रामाणिक; निष्कपट.

**परमीत**—स्त्रीन १ मोजमाप; प्रमाण; परिमाण. २ मर्यादा; सीमा. [सं. परिमिति]

**परमुख्य**—वि. प्रमुख. 'नियां वासुगी परमुख्य सकळा। जाण माझें रूप।' —भाए ६९८. [सं. प्रमुख]

**परमेटा**—पु. कापडांतील एक प्रकार. [? इं.]

**परमेश्वर**—पु १ परब्रह्म; परमात्मा; जगदीश्वर; सर्वव्यापी, शक्तिमान ईश्वर. २ शंकर किंवा विष्णु. [सं. परम+ईश्वर]

**परमेश्वरी**—स्त्री (अशिष्ट) वचनचिठ्ठी; रोखा. (इं.) प्रॉमीसरी नोट. [इं प्रॉमिसरी अप.]

**परमेष्ठी**—पु. ब्रह्मदेव 'द्विजदेह आरंभूनी येथ। परमेष्ठिदेहपर्यंत। स्वर्गसुख देहसमस्त। भोगवी निश्चित पुण्याभिमान।' —एभा २२.५७०. [सं.]

**परमौणु**—पु. परमाणु. 'परमौणु चिये भुमिके।' —भाए २१०

**परयेळ**—न. परळ पहा.

**परव(वा)चा-वजा**—पु. १ तोंडानें म्हटलेली उजळणी; धुळाक्षराचा पाठ (सांजसकाळचा). (क्रि० म्हणणें; वाचणें). २ आपल्या कर्माची रडकथा, कर्मकहाणी घरगुती, सांसारिक गोष्टींचा पाल्हाळ. (क्रि० सागणें; लावणें; लागणें). [पर=पुन्हां+वाचणें]

**परवंटा-घंट**—पु. (बायकी) साडी नेसण्याचा एक प्रकार; लहान मुलीस साडीचा पदर न काढतां निऱ्या साडीच्या पदरापर्यंत काढून ती साडी पदरानेंच कमरेभोंवतीं आंवळणें, लुगड्याचा पदर न काढणें. या नेसण्यांत पुढें वरवंट्याच्या आकाराचा आडवा लांबोडा भाग (केळें) दिसून येतो. (क्रि० काढणें; नेसणें). 'कंचुकी वस्त्राच्या परवंटीं। मुक्ताफळें झळकती।' —मुसभा १४.६२. —वसा ६८ **०करीण-करी, परवंटी**-स्त्री. परवंट्याची साडी नेसणारी, पांच ते दहा वर्षांची मुलगी. दहा वर्षांची मुलगी झाली म्हणजे तिला पदर देतात, तेव्हां तिला पदरकर-करीण म्हणतात.

**परवंटा**—पु वरवंटा. -शर.

**परवड-वडी**—स्त्री. १ खाद्यपदार्थांचे अनेक प्रकार; पक्वान्न. पन्याकार पहा. २ तऱ्हा; रीत; पद्धत; चाल; ढंग (चमत्कारिक, तऱ्हेवाईक); विशिष्ट प्रकार. 'हा पोर परवडीनें जेवतो.' ३ अव्यवस्थितपणाचा, दुर्दशेचा प्रकार-तऱ्हा-रीत. 'मी माझे घरीं नव्हतों म्हणून माझे संसाराची परवड झाली.' ४ (सामा.) त्रास; दगदग. ५ अव्यवस्था; गोंधळ; धांदल. 'तारुण्य पावतां परवडी। कन्या जनकें मांडिली।' —मुआदि २२.७. ६ यथानुक्रम मार्ग-रीत. 'परवडीनें पाणी भरावें, विहीर एकच आहे.' ७ व्यवस्था, वासलात लावण्याकरितां घेतलेली वस्तु. ८ (कों.) थर; रांग; ओळ (दगड, विटा यांचा) 'शंभर परवडीनें ही भिंत तयार होईल' ९ (कु) परवचा; उजळणी. (क्रि० वाचणें). १० रडकथा; चऱ्हाट; कंटाळवाणी हकीकत. (क्रि० सांगणें; लावणें; मांडणें). ११ दुर्दशा. १२ आवड; आनंद. 'गोडीसहित रस निवडी। जाण परवडी तेचि येकी।' —रंयो ७.४६. १३ (कर.) सार्वजनिक; जातिविशिष्ट जेवण. १४ सुकाळ; समृद्धि. [सं. परिपाठी] **परवडी**

**करणें**-नाना तऱ्हेनें त्रास देणें. **परवडीचें काम**-न. पाळी-पाळीनें, आळीपाळीनें करावयाचें काम.

**परवडणें**—अक्रि. पुरवणें; फायदेशीर होणें; पटणें; पंसतीस येणें. 'तुला परवडेल तर घे.' (हा शब्द प्रथम मुंबईकडे रूढ असे).

**परवणी**—स्त्री. (विणकाम) परमणी पहा

**परवणें**—अक्रि. (गो) कण्हणें; कुंथणें. [सं. परिवेदन] **परवणी**-स्त्री. (गो.) कण्हणें; कुंथणें.

**परवत**—पु. (कुण.) देवघेव; व्यापारी देणें-घेणें-धंदा-उद्योग. -क्रिवि. साठीं; करितां; मुळें [सं. परिवर्तन] ०**संबंधी**-क्रिवि. देवघेवीविषयीं; धंद्याच्यासंबंधीं **आत्मकार्या परवत**-स्वतःच्या व्यापार-धंद्यासंबंधीं.

**परवत**—पु. पर्वत (कागदपत्रांत) कामाचा, व्यापारधंद्याचा बोजा, डोंगर. [पर्वत]

**परवता**—पु. परवचा पहा (क्रि० वाचणें).

**परवर**—स्त्रीन. एक फळभाजीचा वेल व तिचें फळ ही वेल काहींशी तोंडलीसारखी असते फळाची भाजी पथ्यकर असते. [हिं.]

**परवर**—वि. पोशिंदा; पालनकर्ता. 'गरीब परवर'=गरिबाचा पोशिंदा. 'बक्कर परवर हत्तीवर दौलतराव शिंदा।' -ऐपो २४४. [फा परवर्] ०**दिगार**-पु आश्रयदाता परमेश्वर. [फा]

**परवर**—पु. १ घराची जमीन; भुई २ (ल) खळ्यांतील रास काढून घेतल्यानंतर राहिलेलें धान्य ह्यावर महाराचा हक्क असतो. ३ तलाव किंवा विहीर याच्या भोंवतालीं दगडाचा किंवा मातीचा बांधलेला बांध किंवा पाळ ४ (बांधकाम) जमीनींतील पायाचा सपाटीचा भाग. यावर दुसरा नवा थर सुरू होतो **परवारास आणणें-येणें**-एखादी गोष्ट उघडकीस आणणें, येणें तिचा दुर्लौकिक करणें, होणें

**परवस, परवरीस, परवरस्ती, परवरसी**—स्त्री पोषण परामर्ष; आश्रय, साभाळ; संगोपन, पोषण, साभाळ केलेली स्थिति. 'आबादीचे कौल रयतेस सादर आहेत त्या बमोजिब पाळून रयत परवस करावयासी आमीलास आज्ञा केली पाहिजे. -वाडबाबा १ २०४ [तुल० सं. परामर्षः फा परवरिश]

**पर(पा'र)वस्न**—पु (महानु) स्पर्श. धक्का 'हातपरिवसेया नेगिजे आपेपर।' -भाए ३४३

**परवा**—पु पाण्याचा पाट

**परवा, पर्वा**—स्त्री १ आदर; कळकळ; फिकीर; आस्था; महत्त्व किंमत (क्रि० करणें बाळगणें) 'हे जेव्हा भांगेचे कैफांत गुंग होतात तेव्हा राजाचीहि परवा बाळगीत नाहींत' २काळजी. चिंता, घोर. (क्रि० बाळगणें) 'हें काम तुमचें मला पावलें तुम्ही परवा बाळगूं नये' [फा पर्वा]

**परवां, परव्हां**—नस्त्री. मागचा किंवा पुढचा दिवस, थोडा काल मागील; पुढील अल्प काळ. 'हें पोर परवाचें पण फार बोलतें' -क्रिवि कालच्या मागच्या किंवा उद्याच्या पुढच्या दिवशीं. [सं. परस्वस्, परश्वः पर+वासर]

**परवान(ण)गी**—स्त्री. १ हुकूम; अनुज्ञा; आज्ञा (काहीं कार्य करण्याविषयीं मागून घेतलेली). २ सुटी; सुटका; मोकळीक. [फा पर्वानगी] ०**चिठी**-स्त्री. परवाना; आज्ञा असल्याची रजेची चिठ्ठी-दाखला. ०**बरदार**-पु. मालकाला कोणी बाहेरचा आला गेल्याची वर्दी देणारा व आत जाण्याची परवानगी आणणारा नोकर. [परवानगी+बरदार] ०**रसवानगी-रसानगी**-स्त्री. (सामा) आज्ञा, परवानगी. [परवानगी द्वि.]

**परवाना**—पु १ हुकूम; परवानगी, पास; दाखला; अधिकार-पत्र २ सनद; शिक्कामोर्तब असलेलें अधिकारपत्र. ३ (बायकी) नातें, एखादी माहिती वगैरेसंबंधीं कथा, हकीकत. (क्रि० गाणें; सागणें). [फा. पर्वाना]

**परवार**—क्रिवि. (राजा.) गाय, म्हैस इ० फळण्याच्या दिवसांत न फळतां (रहाणें) (क्रि० जाणें). अभराड पहा

**परवारी**—पु. गांवचा महारनोकर, जागल्या; वेस राखणारा; निरोप्या, वाटाड्या, बिगारी इ०चीं कामें याला करावीं लागतात. परवारी हें नांव धेड या अस्पृश्य नोकराला सहज सौम्यपणें बोलावयाचें झाल्यासच वापरतात. एरवीं रागात धेड किंवा महार असें संबोधितात 'याखेरीज २ शिपायी १ मोजणा परवारी एकूण ३' -वाडबाबा १ २०५.

**परवशी-सी**—स्त्री. परवरीस पहा.

**परव्हा**—पु मूल तान्हें असतां आई गरोदर राहिल्यास तिचें दूध प्याल्यानें मुलास एक रोग (सुखवशी) होतो तो. [? पर= दुसरें मूल+वहन=वाहणें]

**परव्हाण-न**—न. गाडी, घोडा इ० वाहन. जसें:-गाडीचें-घोडयाचें-गाढवाचें परव्हाण. [सं पर+वाहन]

**परशु-शा**—पु कुऱ्हाड; फरस. [सं. परशु] ०**राम**-पु एक परमेश्वराचा अंशात्मक व प्रख्यात वीर. तीन रामांपैकीं पहिला राम व दशावतारांतील सहावा अवतार यानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली. **परशुरामक्षेत्र**-न. कोंकण. उत्तरेस विमल-निर्मल, पूर्वेस सह्याद्रि, दक्षिणेस गोकर्ण व पश्चिमेस समुद्र या चतुःसीमेंतील प्रदेश परशुरामानें हा कोंकण प्रांत वसविला.

**परस**—उभ हून, ऊन; पेक्षां (प्र) परीस पहा.

**परस**—पुन (मोजमाप) पुरुष; माणसाची उंची, (प्र.) पुरुष पहा [सं पुरुष]

**परस-सूं**—न. घराची मागील बाजू, अंगण खुली जागा. परडें अर्थ ४ पहा. [सं. पार्श्व] **परसांतील भाजी**-(परसांतील

भाजी हवी त्यावेळीं काढतां येते यावरून) (ल.) सहज आत्मसात् होणारें काम, धंदा, उद्योग इ०, सहज छाप ठेवतां येणारा, जिंकता येणारा माणूस, शत्रु. (तुच्छता दर्शवितांना वापरतात). ०**दार, दरवाजा**–नपु. घराचा मागील दरवाजा. 'धांवली बिबाई परस दरवाजा लाविला।'–ऐपो ६९. **परसाकड-कडे-डेस**–नस्त्री. शौच, शौचास जाणें, लागणें; मलाची बाहेर अपानद्वाराकडे गति 'मला परसाकडे लागलें, नेहटली' –क्रिवि. शौचास, मलविसर्गार्थ (क्रि० जाणें; बसणें).

**परसणें**—उक्रि. १ (काव्य) ऐकणें; परिसणें. २ (गो.) समजणें (प्र.) परिसणें पहा.

**परसणें**—न. (बे.) उलथणें

**परसणें**--क्रि. (बे) परतणें; परत येणें. वळविणें; उलटणें.

**परसणें**—क्रि. (हिं.) वाढणें; पानांत घालणें [सं. परिवेषण]

**पर(रो)सणें**—अक्रि. (व) अंगावरून हात फिरविणें 'मुलाला घेऊन जरा परोसलें.' [सं. परि+सृ-सर; परिवेषण]

**परसविणें**—उक्रि. उकळलेलें पाणी घालून किंवा तूप चोपडून मडक्याचा सच्छिद्रपणा घालवून तें पक्कें करणें. निर्ढावणें पहा

**परसा**—पु. (कों.) शेकोटी; आगटी; चुलीखेरीज इतरत्र भूमीवर पेटविलेला अग्नि. [परस]

**परसाइ**—न. (ठाणें कों.) जुन्या काळचें सरकारी अधिकाऱ्याची बरदास्त ठेवण्याबद्दलचें एक राजकीय वतन. [परसणें]

**परसाड**—पु. (व) परकर.

**परसुंदा**—पु. (चांभारी धंदा) जोडा शिवून उरलेला दोऱ्याचा तुकडा.

**परस्पर**—वि. एकमेक; एकमेकांचा–पहिल्याचा दुसऱ्याशीं जो संबंध तोच दुसऱ्याचा पहिल्याशीं असा असणारा; समान गोष्टी करणारे उभयता ते अन्योन्य. 'यांचें परस्पर चांगलें आहे.' 'परस्परानें परस्पराच्या तोंडांत मारिली.' [सं] **परस्पर-रां-रें**–क्रिवि. १ एकमेकांस; मिथः. २ परभारां; बाहेरच्या बाहेर. **परस्परं समर्पयामी**–बाहेरच्या बाहेर, परभारें, स्वत.चा कांहीं एक संबंध न येऊं देतां एखादी गोष्ट करणें, कामाची परभारी वासलात लावणें.

**परस्मैपद**—न. (व्या.) कर्तरी प्रयोग. संस्कृत धातू ज्या दोन प्रयोगात चालवितात त्यांतील एक (दुसरा आत्मनेपद). दुसऱ्यास उद्देशून केलेली क्रिया. [सं.]

**परळ**—पु. मातीचें उथळ पात्र, परात, थाळी. गरीब लोक यात जेवतात. यावर भाकरीहि भाजतां येते [प्रा. परिअल] **परळी**–स्त्री. लहान परळ.

**परळ**—पु. एक झाड.

**परळी वैजनाथ**—पु बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक. हें हैद्राबाद संस्थानांत परळी गांवीं आहे.

**परक्षवंत**—वि. (अशिष्ट) परीक्षावंत. परीक्षा करणारा.

**परा**—स्त्री. वाचेच्या चार अवस्थांपैकीं पहिली: नाभिस्थानस्थित निर्विकल्प आठवरूप चतुर्विध वाचेंतील पहिली वाचा. श्वासाचें पहिलें स्फुरण. 'नाभीपासून उन्मेषवृत्ती। तेचि परा जाणिजे श्रोतीं।'–दा १७.८१; –ह २०.१२७ पश्यंती, मध्यमा, वैखरी पहा. [सं] **परा**–स्त्रीवि. श्रेष्ठ. **परादिवाचा**–स्त्रीअव. परा, पश्यंति, मध्यमा आणि वैखरी या चार वाचा; सर्व अवस्थांतील किंवा कोणत्याहि अवस्थेंतील वाचा, वाणी. 'परादिवाचा कुंठित जेथें। निजे तेथें निजबाळा।' (व्यापक.) वाचा; वाणी. **पराभक्ति**–स्त्री. श्रेष्ठ भक्ति. 'पराभक्ति हे शुद्ध तुम्हीं जाणा। तुका म्हणे ऐसें कळों यावें या जना वो।'–तुगा १११.

**पराई**—स्त्री. १ मानवी आयुष्याचे दोन भाग; तारुण्य आणि वार्धक्य प्रत्येकीं; चढतें आणि उतरतें वय. 'चढती पराई जाऊन उतरती पराई लागली.' २ ज्वानी. 'निरोगी आपली समसमान ऐन पराई हो। कसुन भोगावी पलंगावर सौख्य सराई हो।'–प्रला १५३. [सं. परार्ध]

**पराई**—स्त्री. परकेपणा; दुजा भाव. पर पहा. [सं. पर=परका]

**पराकाष्ठा**—स्त्री परमावधि; अतिशयपणाची शेवटची हद्द, मर्यादा, दशा; हा शब्द कोठल्याहि प्रकारची अतिशयितता, विशेषतः क्रियेच्या आवेशासह दाखवितो. 'पावसाची पराकाष्ठा झाली' 'पावसानें पराकाष्ठा केली.' पराकाष्ठेची लढाई; पराकाष्ठेचा बोलणारा–चालणारा–खाणारा इ० –क्रिवि. परमावधीनें; अतिशयपणें. 'यंदा पराकाष्ठा स्वस्ताई झाली.' [सं. परा=वर्चस्व, टोंक+काष्ठा=सीमा; शर्यतीच्या शेवटीं मर्यादादर्शक पुरलेलें लांकूड, खांब]

**पराकृत**—वि. (प्र. प्राकृत); स्वाभाविक; नैसर्गिक; नेहमींचा; साधारण. 'तैसींच माझीं वचनें। पराकृतें।'–दा १.६.१२. 'आहे तैसा नोव्हे ऐसा हा अनंत। नये पराकृत म्हणो यासि।'–तुगा. [सं. प्राकृत अप.]

**पराक्रम**—पु. १ शक्ति; बळ; सामर्थ्य. २ बहादुरी; शौर्य; बळाचें कार्य. [सं.] ०**करणें-दाखविणें**–अचाट कृत्यें करणें; शौर्य गाजविणें. **पराक्रमी**–वि. पराक्रम करणारा; शूर; वीर; सामर्थ्यवान.

**पराक्रांत**—वि. जित; जिंकलेला; काबीज, हस्तगत केलेला; पादाक्रांत [सं. पर=आक्रांत]

**पराग**—पु. फुलांतील रजःकण; बारीक चूर्ण; बुका. 'परागाची पोटळी। घालावी मकरंद जळीं।'–शिशु १९७. 'पराग ही सांद्र तयांत रंगती।'–र ८ [सं.]

**परागंदा**—वि. १ भटक्या; दुर्दशा प्राप्त झाल्यामुळें घराबाहेर भटकत फिरणारा; घरदार, वतन इ० सोडून देशांतरीं गेलेला; देशत्यागी. 'आपण समस्त गांवकरी यांस साक्ष ठेऊन परागंदा

झालों आहे. '-वाडसमा २.२१७. 'आम्ही दहा वर्षे परागंदा होतों म्हणून वतनाचा भोगवटा आम्हांकडे नवता.' २ घर सोडून बाहेर गेलेला; फरारी. (क्रि० होणें; असणें). ३ अस्ताव्यस्त; विखुरलेलें; विकीर्ण. [फा तुल० सं. परागत] ०जमीन-स्त्री. परागंदा झालेल्या माणसाची जमीन. हीवरचा त्याचा हक्क बुडा-लेला असतो.

**पराङ्मुख**—वि. १ तोंड, पाठ फिरविलेला; मागें फिरलेला. २ एखाद्या विषयाची, कार्याची वाट सोडलेला; त्याला विन्मुख झालेला. [सं.]

**पराचा लखोटा**—पु १ ज्या लखोटयास पीस खोंचलेलें असतें तो. ह्याचा अर्थ जलदीनें पोंचवावयाचें पत्र असा होतो. लखोटा नेणारा महार हें पीस पाहून पत्र लवकर पोंचतें करावयाचें आहे असें समजतो. २ (ल) तातडीचें पत्र. [पर=पीस+लखोटा]

**परांची**—स्त्री. (बांधकाम) माळा; पहाड; पालख; माचोळी इमारतीचें काम करतांना गवंडी, सुतार इ० लांकडांचा घडवंची-प्रमाणें उपयोग व्हावा म्हणून जो माळा करतात ती.

**परांची गावी-उशी**—पर (पंख) हा शब्द पहा.

**पराजय**—पु. पराभव; पाडाव; मोड; अपजय; अपकर्ष (वाद, युद्ध इ० कामांत झालेला). [सं.] **पराजित**-वि. पराजय झालेला; पराभूत. [सं.]

**परांजल-ळ**—वि. शुद्ध; प्रामाणिक; खरा. (प्र.) प्रांजल पहा. [सं. प्रांजल]

**पराटा-ठा-डा**—पु. रोटीचा एक प्रकार; तव्यावर तुपांत तळलेली सपिटाची घडीची लहान पोळी. हिला विरोटयाप्रमाणें पापुद्रे असतात. [हिं. पराठा]

**परा(न्हा)टी**—स्त्री. १ (खा. व.) कापसाचें झाड. २ कापूस काढल्यानंतर राहिलेलें कापसाच्या झाडाचें काड. पळ्हाटी पहा.

**पराठें**—वि. (गो.) उलट.

**पराड**—न. शंभर यार्डाचें अंतर. 'ही जागा एक पराड आहे.'

**पराड-डी**—स्त्री. पर्वतांची रांग.

**पराणी**—स्त्री. १ बैलास टोंचण्याची अणी; टोंचणी; आर. २ (ल.) नेट; जोर. [सं. प्रवयण]

**पराण्ह-ह्ण**—न. सूर्योदयापासून सहा सहा घटकांचा एक असा पांच भागांपैकीं तिसरा भाग अपराण्ह पहा. दिवसाचे पांच भाग पुढीलप्रमाणें:-प्रातः, संगव, पूर्वाह्ण, पराह्ण व सायाह्ण. [सं.]

**परात**—स्त्री. ताटाच्या आकाराचें धातूचें मोठें पात्र; मोठी पितळी. [? हिं. का.]

**परात्पर**—वि. अत्यंत श्रेष्ठ; उच्च (ईश्वर). 'तरि साक्षा-त्परात्परु। जो सकळ प्रमाणां अगोचरु।' -ऋ ४१. [महानु. टीप-देवता समूहांत पर जी माया तिये पासावही जो पर तो परात्परू]

**परात्मा**—पु. परा वाचेच्या पलीकडील आत्मा; अत्युच्च आत्मा. शिव, शिवात्मा पहा. 'नित्य तो परात्मा। अनित्य तो अनात्मा।' [सं. पर+आत्मा]

**पराधीन**—वि. परस्वाधीन, परतंत्र; दुसऱ्यावर अवलंबिलेला. [सं. पर+अधीन] म्ह० पराधीन जिणें पुस्तकी विद्या.

**परान्न**—न. १ दुसऱ्याचें अन्न, जेवण. २ दुसऱ्याच्या येथें भोजन, जेवणें. 'आज परान्न झालें त्यामुळें पथ्याचा विचार राहिला नाहीं.' ३ घराबाहेर जेवण. [सं. पर+अन्न] म्ह० परान्नं प्राणसंकटं ०पुष्ट-वि दुसऱ्याच्या येथील, फुकटचें खाऊन लठ्ठ बनलेला. ०रुचि-वि. परान्नाची आवड असणारा; परान्न-भोजी. परपाकरुचि पहा. [पर+अन्न+रुचि]

**परापम**—पु (ज्यो.) परमक्रांति पहा. [सं.]

**परापर-रां**—क्रिवि परपर-रां पहा. [ध्व.]

**परापवाद**—पु परनिंदा; दुसऱ्याची कुचेष्टा. 'न देखे आपुलें केलें। परापवाद स्वयें बोले।' -एभा २३.२७४. [सं. पर+अपवाद]

**पराब**—स्त्री. (कु.) सणाच्या दिवशीं आश्रितांस द्यावयाची नारळ वगैरेची देणगी. 'श्रीमंताच्या घरीं गणेशचतुर्थी व शिमगा या सणांस लोकांस पराब देतात.' [हिं. परब=सण; सं. पर्व]

**पराभव**—पु. पराजय पहा. [सं. परा+भू] **पराभविणें**-उक्रि. पराजय करणें, होणें; हरणें. 'इतें अवलोकितां डोळां। परा-भवती अरिकुळें।'-मुआदि १३.५४. **पराभवव्या**-वि. पराभव करणारा. 'बलाढ्य शत्रु पराभवव्ये।' -ऐपो २२६. **पराभूत**-वि. पराजित; जिंकलेला.

**परामणी**—स्त्री (विणकाम) परमणी पहा.

**परामर्श**—पु १ विचारपूस; समाचार (गरीब लोकांच्या सुखदुःखाचा, आप्तेष्टांच्या प्रकृतीचा, पाहुण्यांच्या मेजवानीचा वगैरे). (क्रि० घेणें; करणें). २ (ल.) मदत करणें; विपत्ति दूर करणें (स्वकीय, गोरगरीब यांची). ३ (तर्कशास्त्र) नियम लागू करण्याच्या उदाहरणाची जाणीव; अनुभवानें तत्त्वाची, सत्याची झालेली जाणीव; एखादी विवक्षित कृति किंवा परिणाम पाहिल्या-मुळें त्यापासून काढलेला सर्वसाधारण निष्कर्ष. ४ जाणवणें; पटणें; कळवळा. [सं.] **परामर्ष, परामृष-शा**-परामर्श अर्थ १ पहा. 'नानापरीनें परामृष। करितां न मानी उबगलेश।' -दावि २७१. **परामर्शी-र्षी**-वि. परामर्श घेणारा.

**पराय, प्राय**—स्त्री. (गो.) बोटीचा धक्का. (क्रि० करणें). [पोर्तु. प्रेआ]

**परायण**—वि. १ अनुसरणारा; चिकटून राहणारा; आसक्त; तल्लीन. 'या मनोवृत्ति ईश्वरपरायण झाल्या.' २ वाहिलेली; योग्य;

जोगती; नेमून दिलेली. 'ही विहीर ब्राह्मणपरायण आहे' ३ संबद्ध. निगडित ज्ञानपरायण शास्त्र' ४ तत्पर; सिद्ध, उत्सुक 'प्राण-त्राण-परायण जिके निरपत्रपाप्रणी पळतां।' -मोविराट ४८० [सं]

**परायाय**—वि १ तिऱ्हाईत, परका; परस्थ. २ दुसऱ्याचा [सं. परकीय, प्रा पराय; हिं.] **म्ह०** आपली गाय परायाचा वेल खाय=दुसऱ्याच्या श्रमाचा फायदा आपल्याला मिळणें ०**धन**-न. दुसऱ्याची संपत्ति. **म्ह०** परायधन परलक्ष्मीनारायण= दुसऱ्याच्या पैशावर उदार **पराया गांडीवा पलिता**-पु तोडयाची किंवा रंजकेची बंदूक (तलवार, भाला इ०प्रमाणें स्वतंत्र नसून पेटण्यासाठीं तोडयावर अवलंबून असणारी).

**परायी**—स्त्री मानवी आयुष्याचे दोन भाग, तारुण्य आणि वार्धक्य प्रत्येकी. पराई पहा.

**परार्थ**—पु. दुसऱ्याची मालमत्ता, संपत्ति, धंदा, उद्दिष्ट इ० 'स्वार्थपरार्थ पहावा.' -क्रिवि दुसऱ्याकरितां. [सं.] ०**शूर**-वि. १ दुसऱ्याचें काम करण्यास तत्पर; सार्वजनिक हितासंबंधीं कळकळ बाळगणारा. २ दुसऱ्यानें स्वार्थत्याग करावा असें सांगणारा पण स्वत: मात्र पैसा न खर्चणारा; परोपदेशपंडित. ३ दुसऱ्याच्या वस्तूचा फायदा घेणारा; दुसऱ्याचें लुबाडणारा [सं]

**परार्ध**—न. १ उत्तरार्ध २ एकाच्या आंकड्यावर सतरा शून्यें इतकी संख्या ३ ब्रह्मदेवाचें अर्धे आयुष्य. [सं.]

**परावर्त, परावर्तन**—पुन. १ पराङ्मुख होणें; मागें फिरणें; वळणें; परतणें. २ उलटविणें, रद्द करणें (शिक्षा). ३ (शाप) परत जाणें, उलटणें (इं) रिफ्लेक्शन. ४ शुद्धि; मूळ पदाला परत येणें. 'पतितपरावर्तन.' [सं] **परावर्तक**-पु (शाप) परावर्तन करणारें (भिंग इ०). (इं) रिफ्लेक्टर **परावर्त्य व्यवहार**-पु. (कायदा) १ अपील; दाद. २ निकाल फिरविणें. परावर्त अर्थ २ पहा.

**परावनू**—न. (व.) वहाण. [सं. उपानह? पर+वहन]

**परावा**—पु. १ दुसरा; तिऱ्हाईत (माणूस); परका पहा. 'आपुली धरूनिया दुरी। पराव्यासीं करी मीत्री।' -दा २.१.१४. २ वेगळी; नवीन (वस्तु). 'धरून परावी आस। प्रेत्न सांडी सावकास।' -दा २.१.१७. [सं. परकीय; प्रा पराय]

**परावृत्त**—वि. १ पराङ्मुख पहा. २ उलटलेलें; उलटविलेलें. ३ परत दिलेलें, केलेलें [सं.] **परावृत्ति**-स्त्री. १ माघारी वळणें; परत येण्याची अवस्था. २ उलटणें; बदलणें; फिरविणें ३ परत देणें, मिळणें (पैसा, संपत्ति).

**पराशव पुत्र**—पु (कायदा) रखेलीपासून झालेला पुत्र [सं.]

**पराश्रम**—पु. परकीयांचा प्रवेश. 'नबाबास आपल्या स्थळामध्यें पराश्रम होऊ न देणें.' -शाछ १ ११ [सं. पर+आश्रम]

**परास**—उअ (कु) पेक्षा; परस, परीस पहा.

**परास्कंध**—पु शनिमंडळापासून सप्तर्षिपावेतों ज्याची मर्यादा आहे असा सप्तस्कंधातील सहावा स्कंध हे सप्तस्कंध म्हणजे अवाकंध, गवस्कंध, उद्वस्कंध, सहस्कंध, विवस्कंध, परास्कंध व परिवाहकस्कंध हे होत. -हंको [सं]

**परास्त**—वि मागें परतविलेला, सारलेला, दूर केलेला; 'रडलों आम्हीं सर्वहि होउनि धवलाश्वशरपरास्त रणीं।' -मोभीष्म ११ १३०. [सं]

**पराहत**—वि दुसऱ्यानें पराभव केलेला, मार दिलेला; पराभूत; जिंकलेला (अक्षरश. व लक्षणेनें). [सं पर+हत]

**पराही**—स्त्री पराई पहा.

**पराह्ण**—पराण्ह पहा

**पराळ**—न (कों) भाताचें काड, भात्याण, पेंढा. [सं. पलाल]

**पराळ**—पु. परळ अर्थ १ पहा.

**परि**—उअ (काव्य) परंतु; पण. 'स्पष्ट बुडालों होतों, बा गेलों शरण मीं परि भवातें।' -मोअनु ६ ३१.

**परि**—स्त्री प्रकार; तऱ्हा. 'असो हे तैसी परि जाली। श्री ऋद्धिपुर देखिलेआं।' -ऋ ११.

**परि**—एक संस्कृत उपसर्ग, प्रत्यय. हा धातु आणि धातु-साधित नामें यांना लागतो याचे कांहीं अर्थ:-१ जिकडे तिकडे; सभोंवार, चहूंकडे. 'परित.' 'परित्वा' परिभ्रमण' २ आणखी; खेरीज 'परिपाक' 'परिपाठ' ३ विरुद्ध; उलट 'परिच्छिन्न' ४ अतिशय, फार 'परिशुद्ध' ५ परिपूर्ण. 'परिपक्व' इ०.

**परिअवसान**—न (पर्यवसान चुकीचें रूप) शक्ति; सामर्थ्य; धीर (क्रि० खचणें; सुटणें; जाणें; कचकणें; कचरणें). [सं. पर्यवसान अप]

**परिआ-या**—पु झोंका; परिया पहा. 'गोपी परिअें वेतीं।' -दाव ६४. [तुल० का. परि=हलणें, पुढें जाणें]

**परिआळोच**—स्त्री. पर्यालोचन. [सं पर्यालोच अप.]

**परिकर**—पु १ कमरेभोंवताली गुंडाळावयाचें एक वस्त्र. 'ध्यान पाहतां भगवीं वस्त्रें परिकर लंगोटी।' -दत्तपदें ३८. परकर पहा २ विस्तार; पंचाचा पसारा. 'टाकूनि एक घर। दुजे गृहांत जातांवर। खादीं घेऊनि परिकर। त्या घरीचा ने जसा।' -यथादी २.११३७. ३ अंगण; भोंवतालची जागा; परसूं; कांपाउंड. [सं]

**परिकर**—पु (काव्य) १ रीत: पद्धत. चाल: तऱ्हा २ जात: प्रकार 'ऐसे संताचे बोल परिकर। ऐकोनि परमानंदे श्रीधर। -वि चांगलें सुंदर: मधुर 'मुक्त सांडून परिकरें। कां पदरीं बांधावी खापरें।' -रावि १४ १२३ (पाठभेद) [सं प्रकार]

**परिकर, परिकरांकुर**—पु (साहित्य) जेथें विशेष्य साभिप्राय आहे तेथें हा अलंकार होतो उदा० 'कपातें भीष्मार्जुन देती अचळेसि शस्त्र संपातें।' -मोभीष्म ३ ३०

**परिकरणें**—उक्रि नेमून देणें, नियाजिणें 'असें परिकरानि प्रमाण। अचिन न पै गेला।' -नव २ ५५ [सं परि+कृ]

**परिकर्म**—न १ प्रारंभाचें, आनुषंगिक काम २ (अंकगणित) एक प्राथमिक मूलभूत नियम असे आठ आहेत [सं] **परिकर्माष्टक**—न. (अंकगणित) प्राथमिक, मूलभूत आठ नियम -बेरीज, वजाबाकी, गुणाकार भागाकार, वर्ग वर्गमूळ, घन आणि घनमूळ

**परिक्रम, परिक्रमण**—पुन १ प्रदक्षिणा २ मोकळें फिरणें, भटकणें. [सं परि+क्रम्]

**परिखा**—स्त्री. किल्ला, राजवाडा इ० च्या भोंवतालचा खंदक, चर 'परिखा करवा मोठी या शरतल्पासभोंवतीं खोल।' -मोभीष्म ११.१४६ [सं]

**परिखा**—वि परावा; परका पहा 'ते दंपत्याचे सुख भेटी। परिखे देखता लाज उठी।' -एभा १३ ५९४ [परका]

**परिगणन-गणना**—नस्त्री १ वेंचणी निवड २ मोजणी, मोजदाद, गणती. [सं] **परिगणनीय**-वि मोजण्यास, गणण्यास, निवडण्यास योग्य **परिगणित**-वि १ मोजलेलें २ वेगळें काढलेलें, निवडलेलें.

**परिगुण**—पु १ सुसंधि, योग्य संयोग, प्रसंग. 'ययालागीं हें बोलणें। अनुभवामृतपण। स्वानुभूति परिगुणें। वोगरिलें।' -अमृ १० २४ २ पाहुणचार. परगुणें पहा.

**परिग्रह**—पु १ परिवार; लवाजमा; आश्रित लोक, खटला, कुटुंब 'आणि समर्थु आपुला खोडा। शिसिं वाहवी जैसा होडा। तैसा भुंजौनि जो गाढा। परिग्रहो।' -ज्ञा १८.१०६२, -एभा ११.९०१. २ (कायदा) (अविनियुक्त अशा कोणत्याहि वस्तूचा) ताबा किंवा कबजा घेणें जसें:-जमीन, पाणी इ०चा परिग्रह ३ घेणें, स्वीकारणें. ४ गोळा करणें; जमविणें ५ पसारा. 'जो निर्द्वंद्व निरभिमान पहा हो। त्यास समूळ मिथ्या निजदेहो। तेथ देहसंबंधें परिग्रहो। उरावया ठावो मग कैंचा।' -एभा २६ ३४५. ६ दान; इनाम ७ संग्रह [सं] **परिग्रही**-वि १ कुटुंबवत्सल. 'सडे जे देखिले। ते ध्यानकामें लाविले। परिग्रही घातले। तरिया वरी।' -ज्ञा १२ ९१ २ दान घेणारा. **परिगृहीत**-वि अंगीकृत; पसंत, मान्य केलेलें; घेतलेलें. 'ही गोष्ट शिष्टपरिगृहीत आहे'

**परिग्राफ**—पु लेखखंड: लेख; परिच्छेद [इं.]

**परिघ**—पु १ घर, आवार यांच्या भोंवतालची भिंत: कुंपण; कुसूं: कोट: कांपाउंड २ लोखंडाचें गदेसारखें हत्यार. ३ (ज्यो.) सत्तावीस योगांतील एकोणिसावा योग. ४ घेर; वर्तुळाची मर्यादा दाखविणारी गोल रेषा. [सं.]

**परिघाटणें**—सक्रि सभोंवतीं ढवळणें. घाटणें 'काढणें कुटणें परिघाटणें। पाटा पसरोनि वरी लाटणें। पाकक्रियेचीं लक्षणें। तुज दावूं जेठिया।' -मुविराट २ ७५ [सं परि+घट्ट]

**परिचय**—पु १ ओळख सहवास संपर्क, संबंध, माहिती (मनुष्य, धंदा, विषय, ज्ञानक्षेत्र इ० विषयं) २ (प्रत्यय याबद्दल चुकीने) अनुभव अनुभविक ज्ञान प्रतीति (क्रि० घेणें; पाहणें, येणें उतरणें) [सं परि+ची] **परिचायक**-वि (व्या) निर्देश करणारा, दाखविणारा, व्याख्या, विवरण करणारा, परिचय करून देणारा [सं.]

**परिचर्-चर्या**—नस्त्री. सेवा, चाकरी, शुश्रूषा 'आणिकां एवढें नाहीं धैर्य। यालागीं तुझें परिचर्य।' -एभा ४ १३६ [सं परि+चर्]

**परिचार**—पु १ प्रदक्षिणा, परिक्रम पहा २ देशाटण परिभ्रमण ३ प्रचार, इकडेतिकडे हिंडणें 'परिचारी केली आपुलीच रूढी। पोटींची ती कुडी ठावी नाहीं।' -तुगा ३५६१ ४ व्यापार 'निमिषोन्मेषाचे संचार। श्वासोच्छ्वासाचे परिचार।' -एभा ३१ ५१० ५ चाल, रीत प्रचार पहा [सं परिचार, प्रचार]

**परिचारक** वि सेवक चाकर, अनुयायी 'याचीं इसमें पुजारी व बेणारी व डिंगरे व परिचारक व हरिदास व दिवटे एकूण सहा.' -वाडसमा ३ ६५. [सं.] **परिचारिका**-स्त्री दासी; सेविका: सखी

**परिचित**—वि १ ओळखीचा, माहितीचा (मनुष्य, गोष्ट). २ ओळखणारा, माहीत असलेला [सं]

**परिछि(च्छि)न्न**—वि १ अलग केलेला; तोडलेला, निराळा; निश्चित २ मर्यादित: विभागलेला, भाग पाडलेला (परिच्छेद, प्रकरण, भाग इ० नीं) 'तो (परमात्मा) व्यापक मी परिच्छिन्न। तरि ऐक्य कैसेन।' -क्रिवि १ निश्चितपणें; नक्की; हमखास. 'मी परिच्छिन्न रुपये घेईन मग उठेन' २ उघडपणें, स्पष्टपणें; निश्चितपणें, खडखडीत: खसखशीतपणें (सांगणें, बोलणें) ३ (नकारार्थी) केव्हांहि नाहीं, मुळींच नाहीं; कोणत्याहि प्रकारें, हरीनें नाहीं. 'त्याचा पैका परिछिन्न मजूरा पडणार नाहीं.' -वाडसमा १ २ [सं]

**परिच्छिन्न(करण)**—न. (नृत्य) दोन्ही हात वक्ष स्थळावर ठेवणें, डोकें संनत करणें व कंबर पुढें मागें हलविणें.

**परिछे(च्छे)द**—पु १ वेगळा करणें; भिन्न करणें, निश्चित करणें २ विभागणी, खंड, भाग, प्रकरण इ० पाडणें; इयत्तीकरण. २ भिन्नपणा, वाटणी ३ प्रकरण; अध्याय: भाग; सीमा ४ लेखखंड (इं) प्यारा, पॅरिग्राफ. [सं.] **परिच्छेदक**-वि तुकडे, भाग पाडणारा; वेगळें करणारा; विभागणीदार.

**परिजन**—पु चाकर; सेवक. परिचारक पहा. [ सं ]

**परिजिणें**—सक्रि. परजणें पहा. ‘ तेंचि हें वरिलिये हातीं। चक्र परिजितया आयती । ’ –ज्ञा ११.२९५.

**परिणत**—वि. १ परिपक्क, परिपूर्ण; पूर्णावस्थेस प्राप्त झालेला; प्रौढ ‘जयजय देव अद्वितीय । परिणतोपरमैकप्रिय । ’–ज्ञा १८.९ २ नम्र, वांकलेला, वांकणारा. ३ (ल.) लक्ष वेधलेला, वेधणारा; निर्दिष्ट. [ सं. ] **परिणति**–स्त्री. १ पूर्णावस्था; पक्कता. २ वांकलेली अवस्था; विनीत स्थिति. ३ नमस्कार; प्रणाम ४ उतरतेपणा; उतार ५ निर्दिष्ट स्थिति. ६ ( गणित ) फल. ( इं. ) फंक्शन.

**परिणय, परिणयन**—पुन. लग्न करणें; लग्न; विवाह. ‘शांति पतिव्रते झालें परिणयन । काम संतर्पण निष्कामता । ’ –तुगा ४१५६. [ सं. परि+नी ]

**परिणाम**—पु. १ शेवट; निकाल; अखेरी; सार; फळ; निष्पत्ति. ‘ पापाचा परिणाम नर्क. ’ २ ( व्यापक. सामा. ) सुखकारक शेवट (धंदा, काम वगैरेचा); सिद्धि. ३ अडचणींतून निभावून गेलेली गोष्ट; यशस्वी निकाल; धडगत ( नकारार्थी प्रयोग ). (क्रि० लागणें). ‘पांचशे रुपये दिल्यावाचून माझा परिणाम लागणार नाहीं. ’ ४ आकार, स्थिति यांचें रूपांतर; बदल; अवस्थांतर; स्थित्यंतर. ‘ पाण्याचा धूमरूप परिणाम होऊन त्याचा पुन्हां पर्जन्यरूप परिणाम होतो. ’ ५ अंतिम अवस्था; अखेर; चरमावस्था. ६ ( ल ) ब्रह्म ‘ जो निजानंदें धाला । परिणामु आयुष्या आला । पूर्णतें जाहला । वल्लभु जो । ’ –ज्ञा १२.१७१. [ सं. ] **परिण(णा)मणें**–१ परिणामाला पावणें. ‘ ऐसें स्वानुभवविश्रामें। वैराग्यमूळ जें परिणमे । तें सात्त्विक येणें नामें । बोलिजे सुख । ’ –ज्ञा १८.७९३. २ पालटणें; बदलणें. ‘ चुकलें मत्प्राप्तीचें वर्म । तो धर्म अधर्म परिणमे । ’ –एभा १४.२९९. ३ परिपक्क होणें. ४ विस्तारणें. ‘ सोनें परिणामलें सांखळें । कीं साडे पन्हरें जालें कडिवळें । ’ –ऋ ९३. ०**कार्य**–न पूर्व कारणाचा लोप होऊन जें त्यास रूपांतर प्राप्त होतें त्याचें नाव जसें–दूध मूळ कारण लोपून त्याचें झालेलें दहीं हें रूपांतर. –हंको ०**दाह**–पु. १ मरण्याच्या वेळीं शरीराची होणारी आग, जाळ, भडका, दाह. २ अन्नपचन होत आल्यावर पोटांत उठणारी आग ( रिकाम्या पोटांत ही उठते ). ०**शुभ**–वि. ज्याचा शेवट गोड होतो तें; सुपरिणामी; सुखपर्यवसायी. ०**शूल**–पु. १ चांगलें अन्नपचन झालें नसतां पोटांत उटणारी कळ. २ अन्नपचन पुरें झालें असतां पोटांत होणारी आग. परिणामदाह अर्थ २ पहा. ३ मरणाच्या वेळच्या वेदना; शेवटची धडपड. ४ कोणताहि असाध्य रोग.

**परिणीत**—वि. विवाहित; लग्न झालेली ( स्त्री ). [ सं. ]

**परितः**— क्रिवि. सभोंवतीं; चहूंकडे. [ सं. ]

**परिता**—पु ( व. ) मोटेचें खालचें लांबोळें चाक.

**परितोख**—पु. आनंद; संतोष. परितोष पहा. ‘ ऐणेकरूनि समस्तां । परितोखु होईल देवतां । ’ –राज्ञा ३.९५.

**परितोष, परितोषण**—पुन. १ संतोष; समाधान; आनंद. २ आनंद, समाधान होणें; संतोष पावणें. [सं ] **परितुष्ट**–वि संतुष्ट; आनंद, समाधान झालेला. ‘ परितुष्टें एकें आर्ते । प्रसभें एकें । ’ –ज्ञा ११ १२८. **परितोषिक**–न. देणगी; मेहनताना. पारितोषिक पहा.

**परित्याग**—पु. त्याग; सोडणें; सर्वस्वी टाकणें. [ सं. ] **परित्यक्त**–वि. सर्वथा सोडलेला, टाकलेला.

**परित्राण**—न. १ संरक्षण; रक्षण २ नीट, दुरुस्त करणें; परिपूर्ण करणें. [ सं. ] **परित्राता**–वि. रक्षणकर्ता; संगोपन करणारा; राखणारा. [ सं. ]

**परित्वा**—पु. परिभ्रमण; प्रवास. ( क्रि० करणें; पडणें ). [सं. परीत्वा ]

**परिंद**—वि. १ प्रवीण; निपुण; निष्णात. २ समर्थ; लायख; हुषार. [ सं. प्रवीण अप. ]

**परिदान**—न. १ साटेंलोटें. २ फेर मोबदल्याचा व्यवहार; विनिमय. ३ परत करणें; मोबदला देणें. [ सं. ]

**परिधान**—न. १ नेसणें; पांघरणें; वापरणें; अंगावर घेणें ( वस्त्र ). २ पांघरावयाचें, नेसावयाचें वस्त्र. ‘ परिधानें तें झळकती । ’ –वेसीस्व ९.९१. [ सं. ] **परधानीय, परिधेय**–वि. परिधान करण्यास, नेसण्यास योग्य ( वस्त्र ).

**परिधि**—पु. १ श्रौताग्नीच्या कुंडाच्या दक्षिण, पश्चिम व उत्तर या तीन बाजूंस ठेवावयाच्या तीन लांबट समिधांपैकीं प्रत्येक. २ भोंवतालची रेघ; सभोंवार घेर. परिघ अर्थ ४ पहा. कांहीं वस्तूभोंवतीं वेढा. ३ वेढणारा, वेढणारा पदार्थ, वस्तु. ४ सूर्यचंद्राचें खळें; अंशुमाला. ५ प्राक्चक्र; नीचोच्चवृत्त [ सं. ]

**परिनाळिका**—स्त्री. १ नाला; पाट; गटार. २ (ल.) व्यवस्था; पद्धत; व्यवस्थित मांडणी, लावणी; रूढ झालेला, योग्य मार्ग, रीत, क्रम, परंपरा. ३ रडगाणें; कंटाळवाणी लांबलचक गोष्ट. ( क्रि० लावणें; करणें; लागणें; पडणें; चालणें ). ४ शाळुंकेच्या वरचें तीर्थ जाण्याची पन्हाळी. [ सं. प्रणालिका ]

**परिनिष्ठ**—वि. निपुण; निष्णात. ‘ वेदशास्त्रपरिनिष्ठ । श्रवणमनन अभ्यासयुक्त । ’ –एभा १९.२५. [ सं ]

**परिपक्व**—वि १ पूर्ण पिकलेला; पूर्ण तयार झालेला; पक्का. २ ( ल. ) प्रौढ. [ सं. ] ०**बुद्धि**–वि. प्रौढ बुद्धि.

**परिपंथना**—स्त्री. १ ( व. ) ( औषधाचें ) पथ्य. ‘ औषध घेतलें म्हणजे चांगली परिपंथना ठेवणें अवश्य आहे.’ २ (व.) तजवीज. ‘तुम्ही तर चाललां, पुढें आमची परिपंथना कोण राखील. ’

**परिपाक**—पु. १ पूर्णावस्था; विकास ( फळें, अन्न, धान्य, मूर्खपणा, दुष्टपणा इ० कांचा ). 'क्रोधाऐसा महादोखु। जयाचा देखां परिपाकु।' –ज्ञा १८.१०५८. २ ( दुष्कृत्याचें ) फळ; परिणाम; शेवट. 'आचरे दोष न धरी धाक। परीपाक दुःखाचा।' –तुगा ३१४२. ३ अन्नपचन. ४ काढ्यांतील महत्त्वाची वनस्पति, द्रव्य. ५ शिजविणें. 'तुका म्हणे जैसा कुचराचा दाणा। परिपाकीं आणा खोटा तैसा।' –तुगा ५१६८. [ सं. परि+पच् ]

**परिपाटक**—पु. ( गो. ) एक औषधी वनस्पति.

**परिपाटी-ठी**—स्त्री. १ क्रम; अनुक्रम; व्यवस्था; प्रघात; प्रस्थापित रीत, मार्ग; परिनालिका. 'कार्य भोग्य हें परिपाठी।' –विपू ३.८६. २ ( अंकगणित ) संख्यालेखनपद्धति. –वि. व्यावहारिक; रूढ. 'जरत्कारी नाम परिपाटी। कन्या असेल जयाच्या पोटीं।' –मुआदि ९.९. [ सं. परिपाटी ] **परिपाठ**–पु १ परिपाठी; चाल; रीत; रुढी, 'आमचा त्याचे घरीं जाण्याचा परिपाठ नाहीं ' २ प्रघात, वहिवाट 'ह्या गोष्टीचा त्या देशांत परिपाठ आहे.' ३ पद्धत; प्रकार; चाल; रूढी; टूम. (क्रि० घालणें). ४ प्रवृत्ति; बळ. 'मत्स्यमैथुन देखित्यासाठीं। खवळल्या कामाच्या परिपाठीं।' –एभा १७.३५१.

**परिपार्श्व**—क्रिवि. सर्व बाजूंनीं; सभोंवतीं. परितः पहा. [सं.]

**परिपालन**—न. पूर्णपणें संरक्षण; संगोपन; पालन पोषण. [सं.] **परिपालित**–वि. परिपालन केलेलें; संरक्षित; बाळगलेलें. [सं.]

**परिपीठिका**—स्त्री. मूळपीठिका. पीठिका पहा. [ सं ]

**परिपुष्ट**—वि. धष्टपुष्ट; गबदुल; लठ्ठ. [ सं ]

**परिपूरण**—न. पूर्ण करणें; तयार करणें; शेवट, तड लावणें. [ सं. ]

**परिपूर्ण**—वि. १ संपूर्ण; अगदीं भरगच्च; सगळें. २ तयार; अत्यंत; सिद्ध. ३ पुरा झालेला; संपविलेला. ४ तृप्त. [ सं. ] **परिपूर्ति**–स्त्री. १ संपूर्णता; समाप्ति. २ पूर्ण तृप्ति; समाधान.

**परिपैसी**—स्त्री. व्यापकता. –शर. [ ? परि+पैस=व्यापक ]

**परिप्लुतता**—स्त्री. पुरेपूर भरणें. ( इं. ) सॅच्युरेशन. [ सं. परि+प्लु ]

**परिभव**—पु. अनादर; पराभव; अनादराची, अमान्यतेची स्थिति. ( समासांत ) काम–क्रोध–लोभ–पितृ–पुत्र–स्त्री–विषय–परिभव. [ सं. ]

**परिभाष**—स्त्री. टीकाग्रंथ; भाष्य. 'वैद्यक गायनविद्या नाना परिभाष।' –स्वादि ४.५.२०. [ सं ]

**परिभाषा**—स्त्री. १ शास्त्रीय ग्रंथांतील विशेष अर्थांच्या शब्दांची सूची; शास्त्रीय ग्रंथांतील संकेत, संज्ञा; शास्त्रीय संज्ञा. २ स्पष्टीकरणांची, व्याख्यांची यादी; ग्रंथांतील संक्षिप्त चिन्हें, खुणा इ० कांचा तक्ता. ३ प्रस्तावना; प्रास्ताविक भाग; पूर्वपीठिका. ४ ( ल. ) ( धंदा इ० कांचीं ) मूलतत्त्वें; सामान्य सिद्धांत; पहिले मुद्दे. 'कोण्ही एक व्यवहाराची परिभाषा समजेतों तो व्यवहार कठीण वाटतो.' ५ ( वैद्यक ) चिकित्सा; साध्यासाध्य विचार. ६ ( व्या. ) पाणिनीच्या नियमांच्या स्पष्टीकरणार्थ केलेलें विवरण, विवेचन. ७ ( सामा. ) विवेचन; विवरण. 'हें काय एकेक ऐसैसें। नाना परिभाषावशें।' –ज्ञा १८.११. [ सं. ]

**परिभ्रमण**—न. १ भटकणें; फिरणें. २ प्रदक्षिणा घालणें; वाटोळें फिरणें. [ सं. ] **परिभ्रमणें**–अक्रि. ( काव्य ) भटकणें; फिरणें. 'विचारवनीं परिभ्रमे मन।'

**परिमल-ळ**—पु. सुवास; सुगंध. [ सं. ] **परिमळणें**–अक्रि. सुगंध सुटणें; सुवास दरवळणें. 'तेव्हां सुवासें करून। परिमळत अवघें गगन।'

**परिमाण**—न. १ माप; मान; परिमिति; संख्या. २ ज्यामुळें वस्तु इ०चा आकारमान, प्रमाण इ० निश्चित केलें जातें अशी रीत, नियम. ३ लांबी, वजन, आकार, काळ इ०चें मोजमाप, त्याचें साधन. उदा० घड्याळ, घटकापात्र. ४ मोजणी; मापन; मिति. ५ मापाचे किंवा मोजण्याचे तीन प्रकार–अणु ( परमाणु ). महत् आणि परम महत् परिमाण. ( पहिलें सूक्ष्म, दुसरें प्रत्यक्ष अणुपासून पृथ्वी–समुद्रापर्यंत व तिसरें आकाश, काळ, वायु, दिशा, आत्मा यांच्यासंबंधीं ). ६ भूमितिविषयक मापन, मोजमाप.

**परिमार्गण**—न. सभोंवार केलेला शोध. [ सं. ]

**परिमार्जन**—न. १ धुणें; स्वच्छ करणें; शुद्ध करणें; प्रक्षालन. २ ( ल. ) क्रोध, शोक इ०कांचें कांहीं उपायेंकरून निरसन करणें. [ सं. ] **परिमार्जित**–वि. १ प्रक्षालित, शुद्ध केलेला; धुतलेला. 'धवया ज्या वस्त्रांच्या रजक परिमार्जीत तितुक्या।' २ निरसन केलेला.

**परिमिति-मीत**—स्त्री. १ परिमाण पहा. मोजून निश्चित केलेली संख्या. २ मोजणी; गणना. ३ मर्यादा; नक्की प्रमाण. ४ ( गणित ) आकृतीची मर्यादा दाखविणाऱ्या सर्व रेषांची बेरीज; आकृतीची परिमिति. –मसमा २० [ सं. ] **परिमित**–वि. १ मोजलेला; मापलेला; निश्चित केलेला (कांहीं नियम, प्रमाण यांनीं). २ साधारण; मध्यम; बेताचा; योग्य प्रमाणांत असलेला; मोजका; जितक्यास तितका. मित पहा. **परिमेय**–वि. मोजण्यासारखें, लायक, योग्य.

**परियवसणें**—अक्रि. १ अनुभवास येणें. 'म्हणोनि परत्वें ब्रह्म असे। तें आत्मत्वें परियवसे।' –ज्ञा१७.३७७. २ शेवट होणें, घडणें. [ सं. पर्यवसान ]

**परिय(ये)सणें**—उक्रि. ( काव्य ) ऐकणें; लक्ष देणें. 'देवा आदिदेवा जगत्रयाजीवा। परियेसी केशवा विनंति माझी।' –तुगा ९. [ सं. परिश्रवण ]

**परियळ-याळ**—पुन एक खाण्याचा पदार्थ; मांडा (पक्वान्न). 'मनोरथाचें परियळ। आरोगिजतु का लक्षवेळ।' –अमृ ६.३३

**परिया**—पु झोंका. 'हृदयाकाशपल्लकीं। परिये देसी निजे।' –ज्ञा १२५ [का. परि=हालणें, वाहणें; तुल० सं. परि+इ=भोंवती फिरणें]

**परिया**—पु (कों) नाला; ओढा; पऱ्ह्या. [स. प्रवाह]

**परियाळ**—न. १ भिक्षापात्र; परळ. २ जेवणाचें पात्र; ताट. '(तुलसी) दळ घालोनिया परियाळी।' –कथा ४.१८ १४३. [प्रा. दे परिअल=थाळी]

**परिरंभ**—पु. आलिंगन 'त्या विजयश्री देउनि परिरंभा का न नातव राहो।' –मोद्रोण ३ ८८ [सं]

**परिलेख**—पु नकाशा. 'जलयान, पादत्राण, परिलेख वगैरे अपरिचित शब्द प्रथमत. योजून ...' –नि ४४८. [सं.]

**परिवडणें**—सक्रि. १ प्रकार करणें; प्रत लावणें, वस्तु विशिष्ट पद्धतीनें माडणें २ वर घालणें 'आधींच द्रव्यें चुरमुरीं। वरि परिवडिजती मोहरी। जिये घेतां होती धुवारी। नाकें तोंडें।' –ज्ञा१७ १४६ ३ कालवणें; माखणें. 'गुळें गूळ परिवडिला। मेरू सुवर्णे मढिला।' –अमृ ७ २४९ [परवड, स परि+वृ]

**परिवर**—न घर, माजघर. 'दारीं परिवरीं। कुडीं कवाडीं मी घरीं।' –तुगा १३९७

**परिवर**—पु प्रकार. –शर. [परवड]

**परिवर**—न गुप्तस्थान –शर. [सं. परिवार]

**परिवर्जन**—न परित्याग पहा. [सं.] **परिवर्जित**-वि. परित्यक्त पहा

**परिवर्त, परिवर्तन**—पुन १ सभोंवतीं फिरणें; प्रदक्षिणा करणें. २ फेड. मोबदला [सं.]

**परिवर्तनी**—स्त्री. भाद्रपद वद्य एकादशी [सं]

**परिवसणें**—सक्रि स्पर्श करणें 'कीं परिवसलिया पोथी। वाचिली होय।' –ज्ञा १५ ३९४ [सं. परि+वस्]

**परिवाण**—न भाषा; शब्द, बोलणें. –शर

**परिवार**—पु. १ आश्रित; लवाजमा; घरचा, पदरचा खटला; कुटुंब; अनुयायी. २ मर्यादित केलेली जागा. 'फाकलिया इंदीवरा। परिवारु नाहीं धनुर्धरा।' –ज्ञा १३ ३६१. ३ विस्तार. [सं.] **परिवारणें**-सक्रि १ वेष्टणें; सभोंवतीं जमा होणें; वेढणें. 'असो तिहीं परिवारला।' –रास १.१०९५ २ विस्तारणें.

**परिवाहित**—पु (अभिनय-नृत्य) क्रमानें एकदां उजवीकडे व एकदा डावीकडे वळून विस्मय आनंद, स्मरण, विचारमग्नता इ० गोष्टी या अभिनयानें दाखविल्या जातात

**परिवेदन**—न. सविस्तर मागणें विस्तारपूर्वक कथन करणें.

**परिवेष**—पु. १ चंद्र-सूर्याभोंवतालचें खळें. २ परिधि; परीघ. [सं.]

**परिवेषण**—न. १ अन्न, पदार्थ वाढणें. 'परिवेषण करितां। चतुर्विधें अन्नें।' –रास १ १९७. २ गुंडाळणें; वेढा घालणें; वेढणें. [सं] **परिवेष्टा**-पु वाढपी; अन्न वाढणारा **परिवेष्टित**-वि. वेढा घातलेलें; गुंडाळलेलें. **परिवेष्य**-वि १ देण्यास, पुढें करण्यास योग्य. २ भोजनांत वाढण्याजोगें.

**परिव्राज-व्राजक**—पु संन्यासी. [सं. परि+व्रज्] **परिव्राजन**-पु. संन्यास. 'जेविं भगवंति रंगलें मन। उक्त धर्म विसर्जुन। जाणते जे जन। परिव्राजन करिती।' –रास १.१०६.

**परिशीलन**—न मनापासुनचा अभ्यास; छंद; एखाद्या विषयापाठीमागें लागणें; जबर व्यासंग, दीर्घ संघटन [सं.] **परिशीलित**-वि अभ्यास केलेला (विषय, माणूस)

**परिशुद्ध**—वि अत्यंत शुद्ध, पवित्र, निष्कलंक [सं]

**परिशेष**—पु १ प्रमाणाचा एक प्रकार. 'अर्थापत्ति उपमान। इतिहास परिशेषादि प्रमाण। तयामीं ही स्वतत्र कवण। प्रमाण तो बोलेल।' –विवेकसिंधु २ विशिष्टाचा उल्लेख करून अवशिष्ट (अनुल्लिखित) भागाला मान्यता किंवा अमान्यता देणें उदा० चवघांपैकीं एकानेंच यावें. (म्हणजे बाकीच्या तिघांना बंदी केली) विगमनाचा एक मार्ग ३ अवशेष; शिल्लक राहिलेली वस्तु किंवा पदार्थ. 'प्रस्तुत उपयुक्त कोशाचा उत्कंठापूर्वक आदर करून वर जो त्याचा परिशेष सांगितला तो रचून आपल्या देशबंधूस सादर करण्याचाहि काळें करून प्रसंग आणतील' - नि ४५७

**परिश्रम**—पु १ अतिशय श्रम, कष्ट, मेहनत. २ थकवा; दमणूक. [स] **परिश्रांत**-वि. थकलेला; दमलेला.

**परिश्रा**—पु. परसु. –शर [वै. सं परिश्रय=कुंपण]

**परिषत्-द्-द**—स्त्री. संस्था, सभा, मंडळी महाराष्ट्र साहित्य परि..' [सं.]

**परिष्कार**—पु समर्थन, परिश्रमानें पाठपुरावा करणें, उजळा देणें (वाङ्मयीन निबंध वगैरेस) [सं.] **परिष्कृत**-वि ज्याचा परिष्कार, समर्थन केलें आहे असा (निबंध)

**परिष्वंग**—पु आलिंगन 'पतिव्रतचेनि परिष्वंगे। प्रियातें जैसें।' –ज्ञा १८ ५८६. [सं.]

**परिस**—क्रिवि प्रमाणें सारखें. परीस पहा चांपेकळीपरिसही सरलत्व नाहीं।' –र १५

**परिसंख्या**—स्त्री इतरत्र प्रतिबंध गर्भित असलेली आज्ञा, परवानगी; करणार तर एवढें मात्र करावें (इतर करूं नये) अशा तात्पर्याचा जो कांहीं एक गोष्टीविषयीं विधि असतो तो जसें:– अनध्यायदिवशीं खेळावें=अध्ययनदिवशीं सर्वथा खेळू नये असें या विधीचें निषेधार्थी तात्पर्य आहे [स]

**परिसंख्यालंकार**—पु. साहित्य शास्त्रातील एक अलंकार. उदा० स्नेहक्षय दीपांतचि होय न हृदयांतरांत सुंदरिचा ।

**परिसणें**—उक्रि (काव्य) ऐकणें; लक्ष देणें. परियेसणें पहा ' एणेंपरी परिसनां अति दीन वाचा । हेलावला नळपयोधि दयारसाचा ।'–र १२. –मोभीष्म १.९. [सं. परि+श्रवण] **परिसणा**–वि. ऐकणारा. ' म्हणे परिसणे यांच्या राया । आइकें बापा धनंजया ।' –ज्ञा ८.५८. **परिसविणें**–उक्रि. ऐकविणें; समजूत सांगणें; विवरण करणें. 'तें कैसेनि हें शार्ङ्गपाणी । परिसवा मातें ।' –ज्ञा ८.५ ' तरी उजविलें कोण्यापथें । ते आम्हास परिसवी । '

**परिसमूहन**—न. अग्नीभोंवतीं जलसिंचन करणें; अग्नीच्या भोंवतीं, ईशान्येस आरंभ करून प्रादक्षिणिक पाणी फिरविणें–पाण्यानें भोंवतालची जागा सारविणें. ' तेथ करूनि अन्वाधान । प्रतिष्ठिला जो हुताशन । त्यासि करूनि करस्पर्शन । परिसमूहन करावें । ' –एभा २७.३०६. [सं.]

**परिसर**—पु. १ जवळचा प्रदेश, भाग, स्थान ' शैलकक्षाचीं कुहरें । जलाशय परिसरें । ' –ज्ञा १३.६१२ २ नदीचा काठ तीर. –एभा १८.११६ ' तें शैव तेज परिसरीं । गाळिती होय नेत्रद्वारें । ' –कथा ७ ६.५९ [सं.]

**परिसोय**—स्त्री. संबंध. ' सांडियेली तुम्ही गोत परिसोय । फोडविली डोय कर्माहातीं । ' –तुगा १३१९. [परि+सोयरा]

**परिस्तरण**—न. यज्ञ–यागासाठीं स्थापन केलेल्या अग्नीच्या चारी बाजूंस दर्भ टाकणें. ' इध्मा बर्हि त्रिसंधान । करोनियां परिस्तरण । ' –भाराबाल २.७०. [सं.]

**परिस्थिति**—स्त्री. भोंवतालची स्थिति, वातावरण; प्राप्तदशा. [सं.]

**परिस्पंदन**—न. हालचाल; क्रिया; इकडे तिकडे सरणें, हलणें; कामें करणें. 'प्राणाचें परिस्पंदन । मनासरिसें झालें लीन । ' [सं.]

**परिस्फुट**—स्त्री. १ उघडकीस आणणें; उघड करणें; गुप्त गोष्टीची प्रसिद्धि. २ डांगोरा; बोभाटा; गवगवा. –वि. स्पष्ट, साफ; रोखठोक; स्वच्छ; उघड ( भाषण इ० ). [सं] **परिस्फोट**–पु. १ उमलणें (कळी इ०); बाहेर पडण्याचा, फुटण्याचा व्यापार. २ (ल.) परिस्फुट पहा. ३ सूक्ष्म स्पष्टीकरण; विवरण; फोड. [सं.]

**परिहरण**—न. निरसन; खुलासा; परिस्फोट. परिहार पहा. ' केलें प्रश्नार्थे परिहरण । ' –रास १.४९३ [सं.]

**परिहसणें**—क्रि. ( महानु. ) ऐकणें. ' परिहसैं भूपाळा । मि क्षेमेचा निर्वाळा । ' –भाए २७३.

**परिहार**—पु. १ दूर करणें; काढून टाकणें; उपाययोजना करणें; नाहींसें करणें (अडचण, त्रास, आळ इ०); निरसन. 'आठविती मार्गे पापपुण्य दोष । परिहार एकीस एक देती । ' –तुगा १०९. २ खुलासा, स्पष्टीकरण. ' परिहारमिषे प्रबोध । भीमकीसी करील हलायुध । एका जनार्दनीं विनोद । परमानंद प्रगटला ।'–एरुस्व १२.१५२. ३ त्याग; टाकणें; सोडणें. [सं.] **परिहृ(हा)रणें**–सक्रि १ त्याग करणें; टाकणें ' आहारातें स्वीकारी त्यजावें तें परिहरी । ' –ज्ञा ५४३. २ दूर करणें; उपाय करणें ( अडचणी, त्रास ). **परिहारक**–वि. परिहार, उपाय करणारा. **परिहार्य**–वि. ( दोष इ० ) दूर करण्यास, नाहींसे करण्यास, निरसन करण्यास योग्य. नाहींसा करता, टाळतां येण्याजोगा.

**परिहास**—पु. थट्टा; मस्करी; विनोद [सं.]

**परिहित**—वि. धारण केलेलें; अंगावर घेतलेलें ( वस्त्र इ० ). [सं]

**परिहृत**—वि. परिहार केलेलें, दूर केलेलें; प्रतिकार केलेलें. [सं.]

**परिळ**—पु. एक प्रकारचें पात्र; परळ पहा.

**परिज्ञान**—न. पूर्ण ज्ञान, परिचय. २ प्रावीण्य; निपुणता. **परिज्ञात**–वि. पूर्णपणें समजलेलें, माहीत असलेलें. **परिज्ञाता**–वि. परिज्ञान असलेला; पूर्ण ज्ञानी; तरबेज; निष्णात.

**परी**—स्त्री. युक्ति; मार्ग; प्रकार. ' तेथ दुर्जनी । पराभविला परी आननी । ' –भाए ७२८.

**परी**—स्त्री (काव्य) १ प्रकार, जात; मार्ग; रीत; दम. 'कामधेनू सदनाप्रती आली । ते काष्ठप्रहारें मारून पिटली । परी केली तैसीच । ' –पांप्र २७.३२. २ हकीकत; गोष्ट. 'तंव दिसे एक नगरी । तेथें काय झाली परी । ' –शनि २८२. –शअ. प्रकारानें; रीतीनें; प्रमाणें; योग्यतेप्रमाणें. ' वडील वडिलापरी बोलणार लेंकरें लेंकरांपरी छळणार. ' ' त्या आपल्यापरी काय सांगायाचें तें सांगितलें. ' शिरस्त्याप्रमाणें; नेहेमीप्रमाणें; वाजवीप्रकारें; स्वाभाविकपणें इ० अर्थी योजतात. उदा० पैक्यापरी पैका पाहिजे खरचला; ताकापरी ताक पाहिजे खरचलें. ' [पर] **म्ह०** १ बापापरी बाप गेला, भोंवळतांना हात गेला. ( बाप खात्रीनें मरावयाचेच त्याप्रमाणें माझाहि बाप मेला पण त्याच्याबद्दल शोक करतांना माझा हात दुखावला ). २ घरा( द्रव्य )परी घर ( द्रव्य ) गेलें बायको परी बायको गेली. **०प्रकारचा**–वि. नाना तऱ्हेचा. **०प्रकारें**–क्रिवि. नाना तऱ्हेनें. **ज्याच्या त्याच्या परी**–क्रिवि. जसा माणूस असेल त्याप्रमाणें; जशा माणसाच्या गरजा असतील त्याप्रमाणें. ' घरांत वडील मनुष्यास ज्याच्या त्याच्यापरी मर्जी सांभाळावी लागते, मन धरावें लागतें. ' 'आजच्या–रोजच्या–नित्य–दिवसा–काळा–परी.'

**परी**—स्त्री. बरोबरी; सारखेपणा; सर. ' नव्हे मानवी बळाची परी । पांडव बांधले लाक्षाजोहरीं । ' –मुआदि ४१.९९.

**परी-रीं**—शअ. परीस; प्रमाणें; सारखें. 'ह्या परी ऐकुनी वाणी। बोलती रामाप्रती कपी सारे।' [सं. परि]

**परी**—स्त्री. १ घोड्याचें शरीर, माणसाचें तोंड व मोराप्रमाणें पंख असलेला असा कल्पित प्राणी. मोहरमांतील ताबूतांना अशा परी बसवितात. २ (ल.) सुंदर स्त्री; अप्सरा [फा] ०**जावा**-पु. पुरुषपरी. [फा.]

**परी**—उअ. परिस; पेक्षां 'सर्वोपरी मी दीन दुर्बळ।'-दावि ६०. [सं. परि] **परी-रीं** उअ. (काव्य) परंतु, तथापि. 'परी माझा पांडवांकडे ओढा।' [सं. पर]

**परीकाळ**—पु. विलंब; उशीर -शर. [प्रा.]

**परीघ**—पु. १ सभोंवतालची भिंत; कोट. परिघ पहा. २ भोंवतालची, घेराची रेषा. [सं परिघ]

**परीट**—पु. १ धोबी जात व तींतील व्यक्ति २ लांब शेपटीची, राखी रंगाची चिमणी [हिं] ०**घडी**-स्त्री. धोब्याकडून नुकतेच धुवून आलेलें, घडी घातलेलें, न वापरलेलें वस्त्र -वि. परटाकडून धुवून आलेले; घडीचे (कपडे). ०**घाट**-पु. नदीवरील परीट लोकांची धुण्याची जागा; धोबीघाट. ०**धुणा**-वि. परटाकडून धुवून आलेलें. ०**धुणी**-स्त्री. धोब्याची धुण्याची जागा. ०**धुणें**-न. परीटाकडून धुवून आलेले किंवा धुवावयास द्यावयाचे कपडे ०**वाडा**-पु. परटाचा मोहल्ला, गल्ली ०**शीळ**-पु. धोब्याचा धुण्याचा धोंडा, दगड.

**परीन**—वि. (व) प्रवीण; निपुण. [सं प्रवीण]

**परीभांड**—न. घरांतील सूप, टोपलें वगैरे उपसाहित्य.

**परीश्रय**—पु. (महानु.) शौचाची जागा. 'खीडकीए बाहीरि बाव्ये परीश्रये।' -ॠ ११५ [सं परिश्रय]

**परीस**—पु. १ स्पर्शानें लोखंडाचें सोनें करणारा एक काल्पनिक दगड; स्पर्शमणी. 'परिसाचें सन्निधानें। अष्टधातू होय सोनें।' -विपू १.६५. -एभा ७ ६४७. २ (ल.) सुंदर मुलगा; श्रीमंत माणूस; यशस्वी, उत्कर्षशाली मनुष्य, वस्तु, इ०. [सं स्पर्श; प्रा. परिस]

**परीस**—उअ. पेक्षां; हून; परिस पहा. 'जीवापरीस तें वाल्हें। मज आवडतें।' -तुगा १२५. [परी]

**परीहास**—पु. यथा. परिहास पहा.

**परीक्षा**—स्त्री. १ पारख; शोध; तपास; कसोटीस लावणें; गुणदोष जाणण्याचा व्यापार. 'मला रुपयांची परीक्षा नाहीं, तूं खराखोटा सराफास दाखीव.' २ प्रचीति; अनुभव, कसोटी; दिव्य. ३ (अनुभवानें किंवा परिचयानें आलेली) लायकी; ज्ञान; बुद्धि; कौशल्य. 'वैद्याला रोगाची परीक्षा असावी.' ४ अनुभवानें मिळविलेलें ज्ञान, अनुभव. ५ विद्यार्थ्याला एखाद्या विषयांत किती गम्य आहे, त्या विषयाचा अभ्यास कितपत झाला आहे हें लेखी, तोंडी प्रश्न विचारून ठरविणें; असे प्रश्न विचारण्याचा व्यापार. [सं.] ०**करणें**-प्रयोगानें किंवा तपासणीनें ठरविणें; पाहणें. ०**घेणें**-स्वतःच्या अनुभवानें, स्वतःवरच प्रयोग करून ठरविणें. ०**नळी**-स्त्री. (शाप.) प्रयोगानें परीक्षा करण्यासाठीं लागणारी नळी. (इं.) टेस्टट्यूब ०**वंत-वान, परीक्षवंत**-वि. पारख असलेला; पारख, निवाडा करणारा; परीक्षक पहा. 'दिव्य रत्नाच्या सभोंवतीं। जोहरी परीक्षवंत जैसे मिळती।' -संतलीलामृत ३.२ (नवनीत पृ. २४३) **परीक्षक**-वि. १ परीक्षा घेणारा, कसोटी लावून पाहणारा; तपासणी, शोध करणारा, गुणावगुण पाहणारा; बऱ्यावाइटाचा निवाडा करणारा. 'अंधानें टाकिलें रत्न सुरेख। परी परीक्षक संरक्षिती।' २ पारखी; कस लावणारा. ३ प्रयोग करणारा; अनुभव, प्रचीति पाहणारा. **परीक्षण**-न. परीक्षा; पारख; तपासणी; पर्यालोचन: गुणदोषांची पहाणी. 'ग्रंथपरीक्षण.' **परीक्षणें**-उक्रि. १ परीक्षा पाहणें; प्रयोग करून, कस लावून गुणदोष पाहणें, तपासणें २ शोध, तलास, चौकशी करणें; निरखून पहाणें; निरीक्षण. ३ स्वतः अनुभवणें, अजमावणें, प्रचीति पाहणें. **परीक्षित**-पु एका राजाचें नांव. अभिमन्यूचा मुलगा. -वि १ परीक्षा घेतलेलें; तपासून, शोधून पाहिलेलें. २ अनुभविलेलें; प्रयोग करून, अनुभव घेऊन पाहिलेलें.

**परुता-तें**—क्रिवि. पलीकडे; परता पहा. -शअ. शिवाय; परतें. 'कां जे धर्मनाशींया परुते। समर्थ नाहीं।' -ज्ञाप्र १६४.

**परुष**—वि. १ कठोर; अवघड; जहाल (भाषण). २ निर्दय; रानटी; जंगली, असभ्य (माणूस, कृत्य). [सं.]

**परुषाम्ल**—न. (रसायन) हा एक ज्वालाग्राही व रंगास उपयुक्त असा पदार्थ आहे. हा नीळ, राळ, अनिल, रेशीम, लोंकर, कातडें वगैरेवर तीव्र नत्राम्लाच्या क्रियेच्या योगानें तयार करता येतो. (इं.) पिक्रिक ॲसिड -ज्ञाको (न) ३८. [सं· परुष=(इं.) पिक्रिक+अम्ल]

**परूशी, परोशी**—पु. १ खिस्ताच्या काळीं यहुदी लोकांमध्यें एक पंथ होता त्यांच्यापैकीं कर्मठ, गर्विष्ठ व बाह्यशुद्धीला महत्त्व देणारा मनुष्य. 'तेव्हां योहानाचे शिष्य त्याजकडे येऊन म्हणाले, आम्ही व परूशी पुष्कळ उपास करतों.' -मत्त १५. २ ढोंगी. [हिब्रू परूशीम=वेगळे केलेले]

**परूस**—न. परस; परसूं पहा. [सं. परिसर] ०**दार**-न. १ परसाकडील दार; परसदार पहा. २ परसदाराच्या आसपासचा भाग.

**परेच्छा**—स्त्री. दुसऱ्याची इच्छा. [सं.] **परेच्छाप्रारब्ध**-न. एखाद्याकरितां दुसऱ्यानें केलेल्या इच्छेमुळें उघडलेलें दैव, नशीब; ह्याच्या उलट अनिच्छाप्रारब्ध व स्वेच्छाप्रारब्ध. [सं.]

**परेज**—न. (व.) पथ्य. 'वैद्याच्या औषधावर कडक परेज असतें.' [फा पर्हेज़्]

**परेत**—न. प्रेत; शव. 'रवि वंशोत्तम वाक्यें जाउनि तो बंधुतें परेतातें।' –मोमंत्ररामायण युद्ध ७१५. [सं. प्र+इत] **०राट–पु.** यम.

**परेल**—पु. घोडयाचा एक रंग –अश्वप १.२८.

**परेश**—पु. १ परमेश्वर; सर्वश्रेष्ठ ईश्वर; मायानियंता; परमात्मा. 'अंगार करणी बहुवसीं। उष्णता समान जैशी। तैसा नाना जीवराशीं। परेशु असे।' –ज्ञा १३.१०६२. २ परमात्मस्वरूप. [सं]

**परेशान**—वि चिन्तातुर; हतबुद्ध; हैराण, त्रस्त; कष्टी. [फा. परेशान्; सं. परिश्रांत] **परेशानी–स्त्री.** व्याकुळता; त्रास; संकट; काळजी. 'दाण्याची महर्गता याजमुळें बहुत परेशानींत आहे.' –पदमव ७०. [फा.]

**परेळ**—पु. १ मातीचें एक ताटासारखें उथळ पात्र; परळ पहा. २ (व.) लग्नातील गृहप्रवेशानंतर पूजावयाचें कुलदैवत; दैवतपात्र. 'परेळाची पूजा आज करूं.'

**परैय्या**—पु. मद्रास प्रांतांतील एक अस्पृश्य जात, परया. [ता. का. परै=डफ; हा कातडयाचा असतो यावरून अस्पृश्यता]

**परोचा–ता**—पु संध्याकाळचे पाडे परवचा पहा;

**परोज**—न. एक रत्न. पिरोज पहा. 'माणिक मुक्ता पाच परोज। नीळ वैडूर्य पुष्कराज।' –मुरंशु ६८२.

**परोड**—स्त्री. परवड पहा.

**परोड**—पु. (व. घाटी) एक प्रकारचा सर्प. परड पहा.

**परोत्कर्ष**—पु दुसऱ्याचा अभ्युदय; दुसऱ्याची भरभराट. 'वृद्ध म्हणे रे संजय मज न परोत्कर्ष परिसवे चावे।' –मोभीष्म ५.१६. [सं.] **परोत्कर्षासहन–न.** दुसऱ्याचा उत्कर्ष, भरभराट सहन न होणें, न पाहवणें; मत्सर, हेवा वाटणें.

**परोपकार**—पु. १ दुसऱ्यावर केलेला उपकार; मेहेरबानी; दया; कृपा. २ लोकोपकारबुद्धि; भूतदया; सर्वांशीं ममतेनें वागणें. [पर+उपकार] **परोपकारी–वि.** १ परोपकार करणारा; दुसऱ्याच्या उपयोगी पडणारा. २ भूतदया असलेला; जनहितेच्छु; सदैव उपकारक. **परोपकारीं लागणें–क्रि** लोकोपकार करण्यासाठीं स्वतःला वाहून घेणें; परोपकारार्थ झटणें.

**परोपदेश**—पु. दुसऱ्यास उपदेश; दुसऱ्याला सांगणें, शिकविणें. [सं. पर+उपदेश] **०पंडित–पु.** (निंदार्थी) दुसऱ्याला मात्र उपदेश करण्यांत पटाईत पण स्वतः त्याप्रमाणें न वागणारा मनुष्य **–शेपांडित्य–न** दुसऱ्याला उपदेश करण्यांत किंवा त्याची निंदा, टीका वगैरे करण्यांत पटाईत, कुशल पण स्वतः कृतींत मात्र कांहीं नसणें. म्ह० परोपदेशे पांडित्यम्=दुसऱ्याला उपदेश करण्याचेवेळीं मात्र पंडित, बृहस्पति, जीभ चुरुचुरु चालविणारा पण स्वतः कृति करतांना त्याच्या अगदीं उलट! लोकां सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडा पाषाण, या अर्थी.

**परोपरी**—क्रिवि. निरनिराळया प्रकारांनीं, रीतीनीं, तऱ्हांनीं, पद्धतीनीं; अनेक प्रकारांनीं. 'संबंधीं जनवाद पीडलो परोपरी। अंतरलों दुरी तुजसी तेणें।' –तुगा ११३०. [पर=तऱ्हा, प्रकार] **परोपरीचा–वि.** निरनिराळया प्रकारचा, रीतीचा, पद्धतीचा, जातीचा, तऱ्हेचा.

**परोवरी**—पु. आजूबाजूचा प्रदेश. –शर.

**परोळ, प(पा)रोळें**—न. एक प्रकारचें मातीचें भांडें; थाळी; परळ पहा.

**परोळ**—स्त्री. (व.) चुलीसमोरील शेकण्याची जागा; चुलीच्या बाहेर ओढलेला निखारा. 'भाकर परोळीं लावली.'

**परोक्ष**—क्रिवि. १एखाद्याच्या पाठीमागें, गैरहजरींत; डोळयाआड; असमक्ष. २ (चुकीनें) समक्ष. अडाणी माणसें परोक्ष याचा समक्ष या अर्थी उपयोग करतात व असमक्ष करिता अपरोक्ष योजतात. –वि. अदृश्य; अदृष्ट, न पाहिलेलें. [सं] **०ज्ञान–न.** न पाहिलेल्या वस्तूंचें ज्ञान. हा शब्द अप्रत्यक्ष विषयदर्शन ह्यासाठींहि योजतात.

**परोक्षभूत**—पु. (व्या.) भूतकाळचा एक प्रकार; अनद्यतन; लिट्. [सं.]

**परौतां–तें, परता**—क्रिवि. पलीकडे; पर. 'यया परौतां नाहीं अध्यात्मयोगु।' –दाव ६२. 'कीं जाति वेव्हारा परौता। जेया परिकर्मे संकळिता।' –ऋ १४. –उक्रि. यापेक्षां (जास्त); परता पहा. 'न तर्पे परौता। बारां हीं मासां।' –शिशु ३१८. 'परौता तेयाचा अंधकारु।' –उषा १५७९ [पर]

**पर्गणा**—पु जिल्हा; प्रांत; परगणा पहा. [फा. पर्गना]

**पर्गेरी**—स्त्री कंठी. –दिमरा १.७५. [फा. पर्गेर]

**पर्चा**—पु. (व) अधिकारपत्र; हुकुमाचा कागद. पुर्जा पहा. 'पटवाऱ्याकडून शेताचा पर्चा मिळाला.' [फा पुरझा; फा. हिं. परचा]

**पर्जंद**—पु. (कों.) गुलाम. फर्जंद पहा.

**पर्जन्य**—पु मेघापासून पडणारें पाणी; पाऊस; वर्षाव; वृष्टि. [सं.] **०काळ–पु.** पावसाळा; उन्हाळा व हिवाळा यामधला पर्जन्य पडण्याचा काळ.

**पर्ण**—न. पान. [सं.] **०कुटी–शाला–स्त्री.** १ गवत, पानें इ०ची केलेली झोंपडी. २ (विनयानें किंवा निंदार्थी) लहानसें रहातें घर. **०बीज–न.** ज्याच्या पानासच अंकुर फुटून झाड होतें असें एक झाड; चुका–चाकवत इ०. **पर्णा(ळि)ळी–ली–स्त्री.** पानावरील आळी; पानकिडा. 'पर्णाळि पाहोन उचले। जीवसृष्टी विवेकें चाले।' –दा १२.१.११.

**पर्णणें**—अक्रि. वरणें; लग्न करणें. परणणें पहा. 'सखा जिवलग बंधु सबळ। मागध अष्टधा प्रबळ। मंयोनि चैद्यादि दळ। मज केवळ पर्णावें।' –एरुस्व ४.३५. [सं. परि+नी, परिणयन]

**पर्णीक**–वि. पर्णिलेली; वरिलेली; लग्न केलेली (स्त्री) 'तूं हो तयाची पर्णीक। हें तुजचि जाण पातक। आतां व्रत सांडोनि भाक। करी साच।' –कथा २.९,१०९

**पर्ते**—शअ (गो.) परत शब्दाचें रूप. [परत] **०चावी**–स्त्री. (गो.) उलट, परत किल्ली; किल्ली नसतां पेटी (कुलुप) उघडण्याचें हत्यार [पर्ते=परत+हिं. चावी=किल्ली] **०हूरण**–न (गो.) नवऱ्याला लग्नमंडपांत पोचविल्यानंतर परत फिरलेली वऱ्हाडमंडळी. [परत+होणें]

**पर्ता**—वि. पलीकडचा; परता पहा. 'सकळजनविवर्ता जाण त्याहूनि पर्ता।' –दावि १९८. 'परेहून पर्ता न लिंपे विवर्ता।' –राम १९०. [पर=पलीकडे]

**पर्तेल**—वि. शेतकरी एकमेकांचीं कामें आळीपाळीनें करतात तें पडकेल पहा. [परतणें]

**पर्दन**—न. पाद; पादणें, वायु सरणें. [सं.]

**पर्पट**—पु. पापड. 'तिया वाढती कुरवंडिया। पर्पटेंसी।' –ऋ ८२. [सं.]

**पर्वाण–न**—न. शीड ज्यास लाविलेलें असतें तों वासा. परवाण पहा. [फा. पर्वान]

**पर्मानगी**—स्त्री. १ पर्वानगी. २ भेट करून देण्याबद्दल बक्षीस. 'नानाजवळ उभे रहावयाचे प्यादयांचे नाईक आहेत ते पर्मानगी लावितात. पर्मानगी खेरीज पालखीपदस्थाची देखील गांठ पडत नाहीं.' –ख ११.६०५९. [फा पर्वानगी]

**पर्यंक**—पु. पलंग; मंचक; कोच. 'पर्यंकीं निद्रा करावें शयन। रखुमाई आपण समवेत।' –तुगा ४६६ [सं] **०पंडित**–वि (निंदार्थी) आरामशीर बसून (स्वत. कष्ट न घेता) दुसऱ्यास उपदेश करणारा. (इं.) आर्मचेअर पॉलिटिशियन.

**पर्यटन–ण**—न. (अप. प्रयोग पर्याटन); प्रवास; फिरणें; हिंडणें; भटकणें; दौरा; फेरी. 'समुद्रपर्यटन.' [सं.]

**पर्यंत**—पु. शेवट; टोंक; मर्यादा; मर्यादेचा बिंदु; रेषा. [सं. परि+अंत]

**पर्यंत**—शअ. १ पावेतों (स्थळ–कालाला उद्देशून). 'त्याला मी त्याच्या घरापर्यंत पोचविलें.' 'त्याचा पक्ष मरेपर्यंत मी सोडणार नाहीं.' २ सबंध; अव्वल अखेर; सर्व होईपावेतों असें:–मासपर्यंत=महिनाभर, महिना संपेपावेतों; वर्षपर्यंत इ०. ३ अमुक मर्यादेपावेतों; अखेरच्या साधनापावेतों. उदा० भिक्षाचें ज्ञान तीरापर्यंत; कारकुनाचें ज्ञान लेखणीपर्यंत; पंडिताचें ज्ञान सभेपर्यंत; सोनाराचें ज्ञान अटणीपर्यंत. [सं.]

**पर्यंद**—पु. अंगाईगीत; पाळणागाणें. 'पाळणा घालोनी बाळकासी। पर्यंद गायन अतिहर्षी।' –गुच ११.३६ (पाठभेद).

**पर्यय**—पु. (कालचक्र) चौकडी (कृत, त्रेता, द्वापार व कलि या चार युगांची); एका मन्वंतरांत असे ७१ पर्यय असतात. सरासरी साडेतीन कोटी वर्षांचें एक मन्वंतर मानितात. [सं. परि+अय्]

**पर्यवसान**—न. १ शेवट; अखेर; अंत. २ निकाल; परिणाम; निष्कर्ष. [सं. परि+अवसान] **पर्यवसन्न, पर्यवसित**–वि. १ संपलेलें; शेवटास गेलेलें; अखेरीस पोचलेलें; पूर्ण झालेलें, केलेलें. २ निकाल लागलेलें, परिणाम पावलेलें ३ साध्य झालेलें; शेवटीं स्थापन केलेलें. [सं.]

**पर्यस्तक**—पु. (अंगहार) (नृत्य) तलपुष्प, अपविद्ध, वर्तित, निकुट्टक, ऊरूद्वृत्त, आक्षिप्त, उरोमंडल, नितंब व कटिछिन्न हीं करणें क्रमानें करणें. [सं परि+अस्]

**पर्या, पऱ्हा**—पु. (राजा.) ओढा; नाला; ओहोळ; झरा; प्रवाह. 'जपुन टाकी पाउलें असा परद्वारीचा पर्या।' –होला १०८. [सं. प्रवाह]

**पर्याप्ति, पर्याप्त**—स्त्री. १ समाधान; तृप्ति; पूर्णता. २ योग्य पुरवठा; पुरेसा असणें; समाधानकारक समृद्धि [सं.] **पर्याप्त**–वि. १ पूर्ण. 'पावसानें सगळीं सरोवरें पर्याप्त झालीं.' २ (ल.) तृप्त; समाधान पावलेला 'शंभर रुपये मिळाले म्हणजे माझे इच्छेस पर्याप्त.' ३ पुरेसा, पुरता; पुरा होणारा. 'एवढा कागद इतकें लिहिण्यास पर्याप्त होईल'

**पर्याय**—पु १ रीत; पद्धत; मार्ग; योजना; एखादें काम साधण्याची युक्ति, शेवटास नेण्याची रीत, योजना. 'जलमार्गानें जावें किंवा पायवाटेनें जावें हे दोन पर्याय आहेत.' 'सावकार सोडीना तेव्हां शेत पिकलें म्हणजे तुझे स्वाधीन करीन असा पर्याय काढून मी निघून आलों.' 'ह्या दोघांचा कज्जा तुम्ही एक पर्याय काढून तोडा.' २ शैली; धाटी; विशेष पद्धत; वैशिष्ट्य. 'त्याचे बोलण्याचा पर्याय निराळा ह्याचे बोलण्याचा निराळा.' ३ आवृत्ति; क्रम; एक वेळचा प्रयोग; एकदां केलेली कृति. 'शास्त्र केवळ पहिल्या पर्यायास समजतें असें नाहीं, दोन तीन पर्याय करावे लागतात.' 'तीन पर्याय जेव्हां करावे तेव्हां हें शेत होईल' ४ कांहीं गौण किंवा निराळा प्रकार, रीत, चाल, उपाय, पंथ इ० 'एकादशीचा मुख्य पक्ष होईना तर कांहीं पर्याय करावा.' ५ टप्पा, पायरी; खंड; भाग; क्रमाक्रमानें व्हावयाच्या क्रियेंतील एक अवस्था. 'एकदम दहा कोस चालण्याची शक्ति नाहीं, पर्यायपर्यायांनीं चालूं.' 'चार पर्यायांनीं ब्राह्मणभोजन झालें.' ६ निरनिराळे मार्ग प्रत्येकीं (काम लवकर होण्यासाठीं); एकसमयावच्छेदेंकरून चालू केलेले कामाचे भाग; स्वतंत्र योजना. 'एकदांच चार पर्याय चालविले तेव्हां हजार ब्राह्मणांस चार घटकांत दक्षिणा आटपली.' ७ क्षुल्लक, खोटी सबब, उडवाउडवी; बयादा. 'होय किंवा नाहीं म्हणून सांगावें तो हजार पर्याय

सांगतो.' ' हिशोब विचारिला असतां तो अनेक पर्याय सांगतो.' ८ समान, एकाच अर्थाचे दोन शब्द परस्पर; प्रतिशब्द. ९ व्यवस्था; पद्धतशीर मांडणी; क्रम. १० गौण, समाविष्ट, अंतर्भूत गोष्ट किंवा बाब; पोटविभाग. 'त्या कामामध्यें पर्याय पुष्कळ आहेत.' ११ गोष्ट, भावार्थ. 'माझा हा पर्याय पुसे त्यासी।' –रामदासी २.१२७. [सं.] **पर्यायापर्यायानें**–क्रिवि. आलटून पालटून; अदलून बदलून.

**पर्यालोच, पर्यालोचन**—पुन. १ विचार. 'तैसें अधिकारपर्यालोचें। चिंतन हें यत्न करणें सर्वाचें। परी विष फळाशेचें। न घापे मार्जी।' –ज्ञा १६.९७ 'श्रुतिगुरुवाक्य निरूपण। ऐकतां अद्वैतश्रवण। युक्तिप्रयुक्तीं पर्यालोचन। मनन गुण या नांव।' –एभा ११.९६९. २ अवलोकन; पहाणी; सभोंवार दृष्टि. [सं. परि+आलोचन]

**पर्याव**—पु. १ प्रकार, पर्याय. 'हा भक्तीचा पर्यावो। आवडीच्या गोडिया सांगे देवो।' –एभा ११.११०५. २ प्रतिशब्द; पर्यायशब्द; दुसरें नाव. 'तेथ दुजी जे जीवदशा। तिये नांव विरेशा। येथे अव्यक्त ऐसा। पर्यावो हा।' –ज्ञा १३.९२. [सं पर्याय]

**पर्युदास**—पु (पंडिती) मनाई, प्रतिबंध इ० विषयीं आज्ञा करणें; निराळी किंवा विरुद्ध गोष्ट कबूल करणें; एखादी गोष्ट खात्रीपूर्वक सांगणें किंवा पसंत अगर नापसंत ठरविणें; अदमास करणें, काढणें. जसें– 'खोटें बोलूं नये' यावरून खरें बोलावें असें निघतें (ही गर्भित आज्ञा) पांच नक्षत्रें मुंजीचे उपयोगी नाहींत म्हणजे कांहीं विवक्षित पाच नक्षत्रें मुंजीला लागू न पडणारीं सांगितलीं व त्या बरोबरच बाकीचीं नक्षत्रें मुंजीला योग्य आहेत असें दाखविलें. 'अब्राह्मण' यावरून ब्राह्मण नव्हे पण दुसरा कोणी मनुष्य आहे असें अनुमान निघतें. ह्या शब्दाची प्राथिक–पंडिती व्याख्या अशी:– 'तद्भिन्न तत्सदृशसदृशार्थबोधकनिषेध.।' [सं]

**पर्युषित**—वि. शिळा; पारोसा (एक रात्र गेल्यामुळें दोषयुक्त झालेलें अन्न, पाणी, इ०).[सं]

**पर्युक्षण**—न. अग्नीच्या भोंवतीं, ईशान्येस आरंभ करून प्रादक्षिणिक पाणी फिरविणें, शिंपडणें. परिसमूहन पहा. [सं.]

**पर्ल**—न (गो.) परल; चुलीजवळील जागा. **परेळ** (व) पहा.

**पर्व**—न. १ अमावास्या, पौर्णिमा, वैधृती, व्यतीपात, संक्रांत, ग्रहण इ० जे समुद्रस्नान, श्राद्ध, दान इ० पुण्यकर्माविषयीं काल (जेव्हां पुण्यकर्म केलें असतां कोटिगुणित फळ प्राप्त होतें असे) सांगितले आहेत ते काल प्रत्येकीं; पर्वणी; सणाचा दिवस; पुण्यकाळ. 'माझा मोडियेला गर्व। अकाळीं काळ आघवें पर्व।' –तुगा ७१८. 'तुमच्या मानियलें ते स्त्रीचेष्टांचेंचि पर्व तातें, हो।' –मोभीष्म ६.४०. २ चांद्रमासांतील शुद्ध व कृष्ण दोन्ही पक्षांतील कांहीं दिवसांना दिलेलें नांव. पौर्णिमा, षष्ठी, अष्टमी, दशमी इ० ३ सूर्य नवीन राशीमध्यें जाण्याचा काल; संक्रांत. ४ युति किंवा जुळून आलेला योग; संयोगकाळ. ५ (ल.) समृद्धतेचा, उत्कर्षाचा काळ, हंगाम, ऋतु; मोठ्या सार्वजनिक आचाररूढीचा काळ; बाहुल्य; विपुलता; बहर. 'कीं आर्यानंदाचें रसिकांची नित्य हो सभा पर्व।' –मोसभा ७.९२. ६ सांधा; वेळू, बोरू, बोट इ० कांचें पेर; कांड. ७ पुस्तकाचा भाग, प्रकरण (ज्यांत पुष्कळ अध्याय असतात असें). 'भारताचीं मुख्य १८ पर्वे आहेत.' [सं.] ०**चुकणें–टळणें**–हातची संधी गमावणें. ०**साधणें–गांठणें**–संधी साधणें; एखाद्या कामांत फायदा करून घेणें. ०**काल–ळ**–पु पर्व अर्थ १ ते ५ पहा. 'तीर्थे पर्वकाळ। अवघीं पायांपें सकळ।' –तुगा २१८६. ०**भेद**–पु. (वैद्यक) संधिवात; सांधे दुखणें. [सं.] ०**संधि**–पु पौर्णिमा किंवा अमावास्या आणि प्रतिपदा यांचा संधिकाल. **पर्वणी**–स्त्री. १ पर्व अर्थ १, २ पहा. २ (ल.) दुर्मिळ सुसंधि; फारा दिवसांनीं येणारा शुभकाल, संधि. [पर्व]

**पर्वत**—पु १ मोठा डोंगर; गिरि, अद्रि; हिमालय, सह्याद्री इ० पर्वत २ (ल.) मोठें ओझें; बोजा; असह्य भार. 'कामाचा पर्वत'=अतिशय काम; 'दुःखाचा पर्वत'=अतिशय दुःख; 'कर्जाचा पर्वत' 'बापानें कर्जाचे पर्वत मात्र करून ठेविले आहेत.' (वाप्र.) **पर्वताची राई होणें**–मोठेपणा जाणें; गर्वहरण होणें; महत्त्वाचा नाश होणें 'नकळे ईश्वरी सूत्र झाली पाहा पर्वताची राई।' –ऐपो ४०८. याच्या उलट राईचा पर्वत होणें ०**फळ**–न (ल.) दगड; खडक. **पर्वतीय, पर्वती**–वि १ पर्वतासंबंधीं, पर्वतविषयक; पहाडी; डोंगरी २ पहाडी, डोंगरात राहणारा (मनुष्य). ३ डोंगर चढणारा; उंच घाट चढण्यास योग्य (घोडा). 'चढे शैल नीट। लहान घोडा लांबीस थोडा। तो पर्वती॥'

**पर्वत**—पु देवघेव; व्यापार; सावकारी. 'पत्रेंविण पर्वत करूं नये।' –दा २ २.२०. [सं. पर+वत्]

**पर्वर्दा**—स्त्री. पालन; रक्षण. 'स्वामी कृपादृष्टीनें पालन करून पर्वर्दा करीत आहेत.' –रा १.३२. –वि. १ पाळलेला २ वयांत आलेला. 'त्यावर सोनाजीपंत पर्वर्दा जाले परंतु वतनावर गेले नाहींत.' –रा ८ ३३ [फा]

**पर्वर्दिगार**—पु. पोषण करणारा; ईश्वर. परवर पहा [फा. पर्वर्दगार]

**पर्वरा, पर्वरीस, पर्वरिशी**—स्त्री पोषण; निभावणी. परवरीस पहा.' आमची पर्वरीश करणार धनी समर्थ आहेत '–पदमव ७४. –रा ५.७१. [फा. पर्वरिश्]

**पर्वा**—स्त्री. आस्था; काळजी. परवा पहा. [फा. पर्वा]

**पर्वा(र्मा)न(ण)गी**—स्त्री.आज्ञा; मोकळीक; हुकूम; परवानगी पहा. 'पर्माणगी होत नाहीं.' –ख ११.५७७१. [फा. पर्वानगी]

०रसानगी—स्त्री. बंदोबस्त. 'पर्वानगी रसानगी दरवाज्यास गाड-यांची नाहीं.' –ख ४.१९९०.

**पर्वाना**—पु. आज्ञापत्र; पास. परवाना पहा. [फा.] **०अल्तम्गा**–पु. राजानें दिलेली जमीनबक्षिसाची सनद. 'पर्वाना अल्तम्गा करून घेतले आहेत.' –पया २३. [तुर्की. अल्तम्घा=सनद, हुकूम]

**पर्वेशी**—स्त्री. पर्वरिशी; पोषण; पेन्शन. परवरीस पहा.[फा.]

**पऱ्हवाणा, पऱ्हावण**—पुन. वाहन; परव्हाण पहा. 'पऱ्ह-वाणावरि समग्र। घालूनियां।' –गीता २.३४३७. [पर+वाहन]

**पऱ्हा-ऱ्ह्या, पऱ्हिवा**—पु. नाला; झरा; पर्जन्य काळीं पाणी जाण्यासाठीं खणलेली चरी; खांचखळगा. पर्या पहा. 'रांधवणी चुलीपुढें। पऱ्हे उन्मादती खातवडे।' –ज्ञा१३.५६२. [सं प्रवाह]

**पऱ्हा**—क्रिवि. पलीकडे; दूर. 'म्हणोनि थोरपण पऱ्हांचि सांडिजे। एथ व्युत्पत्ति आघवी विसरिजे।' -ज्ञा ९.३७८. [पर]

**पऱ्हाटी**—स्त्री. १ कापसाचें झाड; कपाशीच्या झाडाची वाळलेली काडी. २ (व.) कपाशी. पराटी पहा. [पळहे+काठी]

**पऱ्हावणें**—अक्रि. (व.) परिणामकारक होणें.

**पऱ्हेज**—न. (व.) पथ्य. परेज पहा. [फा. पऱ्हज]

**पल**—न. १ पळ; घटिकेचा साठावा भाग; अडीच पळांचें एक मिनिट होतें. २ मास. ३ चाळीस मासे (३८० गुंजांचें) वजन. –पु विषुववृत्तापासून अंतर; अक्ष. [सं.] **०ज्या**–स्त्री. एखाद्या स्थळाच्या अक्षाची ज्या; अक्षज्या. [सं.] **०पैतृक**–न.श्राद्धाच्या दिवशीं स्वयंपाकांत मांसाचा उपयोग करणें. 'पल-पैतृक घे भ्रातुरंगना। करूं नये म्हणताती।' –गुच १२.९४. [सं. पल=मांस+पितृ-पैतृक]

**पलक-ख**—पुन. डोळयाची पापणी लवण्यास लागणारा काळ, निमिष, क्षण. पल अर्थ १ पहा. 'हें भुवन सुशोभित सुवन नसे कलिपवन पलख एक न्याया।' –दत्तपदें २५. [फा. पलक्] **०दर्याव**–पु अतिशय मोठी पर्जन्यवृष्टी; अकस्मात् जलप्रलय करणारा पाऊस पडणें; जोराचा पाऊस. 'पाऊस काय पलख-दर्याव, पलखामध्यें जिकडे तिकडे पाणजंजाळ करणार.' [पलक–ख+दर्या=समुद्र]

**पलंग**—पु मंचक, माचा; पर्यंक; जमिनीपासून वर निज-ण्याचें साधन; उच्च प्रतीची चारपाई; खाट; बाज. [सं.पर्यंक; प्रा. पल्लंक; हिं. पं. पलंघ; सिं पलंगु; बं पाल्क-ङ; ओरिया पलंक; का. पल्लंकि; तुल० फा. पलंग्] **०पोश-स**–पु. चादर; बिछान्यावर घालण्याचें वस्त्र, आच्छादन, गर्दपोस. [फा. पलंग्+पोश्] **पलं-गडी**–स्त्री. १ लहानसा पलंग. २ (तुच्छतेनें) जुना, वाईट पलंग. **पलंगी**–पु. (कर) शय्येची तजवीज, व्यवस्था करणारा. 'पलंगी-कडून नुकसान भरून घ्या.'

**पलट-टी**—स्त्री. उलथ; कलथी; मागें उडी. [सं. परिवर्त; प्रा. पल्लट; हिं. पलटा] **०खाणें**–१ माघारी फिरणें; उलट खाणें. २ कोलांटी उडी घेणें. **पलटणें**–क्रि. (व.) परतणें. [हिं. पल टना] **पलटन**–न. (व.) फेरी; जाऊन परत येण्याची क्रिया. **पलटवणें**–क्रि. (व.) फिरविणें. [हिं, पलटाना]

**पलटण-न**—नस्त्री. फौजेची टोळी; फौज; तुकडी; अकराशें पर्यंत पायदळाचा समुदाय. [पोर्तु; इं. प्लॅटून. हिं. पलटन] **पल-टणी-नी**–वि. पलटणसंबंधीं (मनुष्य वगैरे)

**पलटा**—पु १ एक जंबियाचा डाव आपल्या हातांतील जंबियानें जोडीदाराच्या डाव्या बाजूच्या शेवटच्या बरगडीवर छातीवर मारणें (पूर्वीच्या मारलेल्या जागेपासून त्याचे शेवटाकडून उलट बाजूस मारतात म्हणून हा शब्द). २ (संगीत) स्वरांचा अवरोह. [पलट]

**पलतड**—स्त्री. पलीकडचें तीर. पैलथड पहा. [सं. पर+तट]

**पलपल, पलपलाट**—स्त्रीपु. १ (मावळ) चैन; चंगळ. 'त्याची तेथें पलपल चालते.' २ भरभराट; उत्कर्ष; सामर्थ्याची वर्चस्वाची स्थिति. ३ फाजील पीक; अतिशय समृद्धि. ४ सुळ-सुळाट; अतिशय माजणें (लुटारू, चोर, टोळ, उंदीर इ०). [का. पल=फार, पुष्कळ]

**पलभा**—स्त्री. (ज्यो.) अयनांशासहित सूर्य केवळ विषुवसूत्रा-वर असतां मध्याह्नकाळच्या वेळीं बारा अंगुळें उंचीच्या खुंटीची पडलेली छाया [सं.]

**पलवाघळी**—स्त्री. वाघळी नांवाचा समुद्रांतील एक प्रका-रचा मासा. याची पाठ रांठ, खरखरीत असते.

**पलाखतीमार, पलाखतीवामार**—पु. खरपूस, खूप जोराचा मार; फरमाशी मार, ठोक. [हिं.]

**पलाड**—क्रिवि. पलीकडे. पल्याड पहा.

**पलाटणें**—न. (न्हाव्याचा धंदा) वस्तऱ्याची धार साफ कर-ण्याचें चामडें; धार लावण्याची तळहाताएवढी कातड्याची पट्टी; चटपट. [पालटणें ?]

**पलाटन-ण**—न. १ भ्रमण; भटकणें; हिंडणें; देशाटन. २ पलांटी; फेरा; वळसा; गिरका; इकडे तिकडे आसपास थोडेसें फिरणें. (क्रि० मारणें). 'शार्दूल करूं गेला पलाटण।' –रावि २०.१३८. [सं. पर्यटन]

**पलाटी**—स्त्री.कापसाची काडी; पऱ्हाटी अर्थ २ पहा. 'पेरणी टाकून पलाटिया उपडावयास गेलेत.' –पेद २१.१५. [पळहें+काठी]

**पलांटी**—स्त्री. पलाटन अर्थ २ पहा. 'तुम्ही अशी पलांटी मारून या तों मी रुपये तयार करून ठेवतों.'

**पलांडु**—पु. कांदा; कंदर्पे. 'चिंतामणी टाकोनि रोकडा। पलांडु घेतला बळेंचि। '—रावि १२.१०३. 'शेर तांदुळ, कशाचा गुळ मिळेना जळ खाया नाहीं पलांडु। '—ऐपो २४५. [सं.]

**पलाण**—न. १ खोगीर (मुख्यत: उंटाचें व हत्तीचें); पल्याण; मूठ; (ल.) आच्छादन. 'दर्यास पलाण (शिवाजी) राजियांनीं घातलें.' —सभासद ५१. 'पृतनावर्षे करून। घातलें पृथ्वीस पलाण।' २ घोडयावर पहिल्याप्रथम घातलेलें खोगीर. ३ पहिल्यांदाच घोडयावर खोगीर घालणें. (क्रि० करणें). ४ (ल.) लांबची विहीर जोडणारी जमीनीची पट्टी; विहिरीचें पाणी दूरच्या जमीनीस पोंचावें म्हणून पाण्याचा पाट नेण्यासाठीं घातलेली मातीची लांबट उंच वरवंडी, बाध. [सं पल्ययन, पर्याण; प्रा. पल्लाण=घोडयाचा साद; तुल० फा. पालान्] **पलाणणें**—उक्रि. (काव्य) १ खोगीर चढविणें; घोडयावर पलाण घालून सज्ज करणें, तयार ठेवणें. २ (ल.) हाताखालीं आणणें 'जेणें सत्ता-वस्त्र पसरोनी। पलाणिली कुंभिनी।'

**पलाण**—न. लांब पल्ला. पल्लाण पहा.

**पलाद्**—पु. (शाप) हा एक प्लातिन वर्गातील धातू आहे. (इं.) प्यालेडियम्. या धातूस रजतासारखी चकाकी असून हा चिवट असतो. पलादाचा उपयोग मिश्र धातूमध्यें, दंतरोगाकडे व घडयाळाच्या कमानी करण्याकडे करतात.

**पलायन**—न. पळ; जलदीनें पळून जाणें (भयादिकामुळें किंवा दुसऱ्याला न सांपडावें म्हणून); युक्तीनें निसटून जाणें. [सं. पल्] **पलायमान**—वि. पळणारा. **पलायित**—वि. पळालेला; पळून गेलेला.

**पलाल**—नपु. भाताचें काड; गवत; पेंढा; कडबा; बाटुक; केर. 'कृष्ण म्हणे बहु बरें, व्हा मारुत हो पलाल खळ-बळ तें।' —मोविराट नवनीत २९७. [सं.]

**पलाश**—पु. पळस; पळसाचें झाड. [सं.]

**पलित**—न. पिकलेपणा; पांढरे केस होणें. —वि. पिकलेला; वृद्ध. [सं.]

**पलिता-दा**—स्त्री. १ हिलाल, दिवटी, मशाल या करितां केलेली कापडाची वाटोळी गुंडाळी. २ तोफ डागण्याचा तोडा, बत्ती, आमगी, कांकडा. (क्रि० लावणें; देणें; ठेवणें). ३ बंदुकीची दारू घालून तयार केलेला काकडा. ४ (तोफा, बंदुका यांची) फेर; सरबत्ती; झड; भडिमार. (क्रि० झाडणें; झडणें). 'तिसऱ्या पलित्यास स्वार फुटले.' [सं. प्रदीप्त; प्रा. पलित्त. तुल० अर. फतीला]

**पलिता**—पु. (व.) मोटेच्या खालचा सोंडदोर ज्या लांकडावरून येतो तें फिरतें चाक.

**पलिती**—स्त्री. पलिता अर्थ २ व ४ पहा.

**पलिस्त**—न. (निंदार्थी) पीडा देणारा माणूस, वस्तु, धंदा, रोग, वारा, पाऊस इ०; पीडा; रोग. [फा. पिलिश्त=अपवित्र; घाण]

**पलिस्तर**—न. शरीराचें कातडें भाजल्यासारखें होऊन त्यावर फोड आणणारें औषध. [इं. ब्लिस्टर]

**पलीस्तर**—न. गिलावा. (इं.) प्लॅस्टर.

**पलीकडचा-ला, पलीकडील**—वि. पलीकडे असलेला; दूरच्या स्थळा-काळासंबंधीं, संबंधाचा; दूरचा; मागील; पूर्वगामी.

**पलीकडून**—क्रिवि. दुरून; दूरच्या बाजूकडून; पूर्वीच्या, मागल्या दिवसापासून.

**पलीकडे**—क्रिवि. १ (स्थलवाचक) दुसऱ्या बाजूस; दूर; बाजूस; दुसरीकडे. २ (कालवाचक) पुढें; नंतर; पूर्वी; अगोदर; मागें (विशिष्ट कालाच्या). याच्या उलट अलीकडे. [ ] **०होणें**—(एखाद्या स्थलापासून) दूर होणें; अंग काढून घेणें.

**पलेटण**—न. भटकणें; पलाटन पहा. [सं. पर्यटन] **पलेटणें**—अक्रि. (काव्य. अशिष्ट) भटकणें; हिंडणें; इकडेतिकडे फिरणें.

**पल्याड**—क्रिवि. (त्या) पार. पलीकडे अर्थ १ पहा. याच्या उलट अल्याड. [पैल+तट]

**पल्याण**—न. खोगीर; जीन. पलाण पहा. **०घालणें**—ताब्यांत ठेवणें. 'याचा प्रसाद होतां सिंहीं घालील शशहि पल्याण।' —मोभीष्म ६.२२.

**पल्ल**—न. (गो.) चुलखंड.

**पल्लक**—पु. पाळणा. पालक-ख पहा. 'आधारशक्तीचिया अंकीं। वाढविसी कौतुकीं। हृदयाकाशपल्लकीं। परियें देसी निजे।' —ज्ञा १२.५.

**पल्लव**—पु. १ पालवी; पानें (विशेषत: अव. प्रयोग); अंकुर; कोंम. (क्रि० फुटणें; लागणें; येणें). 'म्हणोनि जाणतेनो गुरु भजिजे। जेणें कृतकार्य होईजे। जैसें मूळसिंचनें सहजें। शाखापल्लव संतोषती।' —ज्ञा १.२५. २ नवीन पालवी फुटलेल्या डाहळीचा शेंडा; शाखाग्र; पानांनीं भरलेल्या फांदीचा शेंडा; नवी फूट; पालवीचा झुबका. ३ (ल.) एखादी हकीकत सांगत असतां त्यांत पदरची घातलेली भर; तिखटमीठ, मसाला भरणें. 'त्यानें सांगितलें असेल तितकेंच बोल. नवा पल्लव लावूं नको.' ४ कापडाच्या तुकडयाचा, वस्त्राचा शेवट; (धोतर इ० वस्त्राचा) पदर. 'ऐकतां गुरुचें वचन। गांठीं बांधी पल्लवीं शकुन।' —गुच ९.१२. 'पल्लवीं बांधवेल वायु कैसा।' ५ पुरवणी; पुरणिका, शेंपूट; जोड. [सं.] **०सडक**—स्त्री. पदराची दशी 'तेथ व्यासादिकांच्या मती। तेचि मेखळा मिरवती। चोखाळणें झळकती। पल्लवसडका।' —ज्ञा १.९. **०हस्त (संयुतहस्त)**—पु. (नृत्य) पताकहस्त

मनगटांत सैल करून हलविणें. **पल्लवित**-वि १ नवीन पालवी आणि अंकुर फुटलेलें (झाड). २ (ल) विस्तृत.

**पल्ला**—पु १ तीस पायली किंवा १२० शेरांचें माप २ (पातळ पदार्थ, तेल, सुपारी इ० वाणजिन्नस मोजण्याचें) १२० शेरांचें अडीच मणाचें पक्कें वजन. ३ पल्लाभर धान्याचें पोतें, थैला अगर गोणी. [वैस. पल्यं=धान्याची गोणी; प्रा. पल्ल]

**पल्ला**—पु. १ (खोली, जागा इ० कांची) लांबी; विस्तार. 'हा पल्ला लांब आहे.' 'याचा पल्ला लांब पडला.' २ अवधि; अंतर; मुदत; मजला; टप्पा (चाल, मार्ग, काळ, धंदा याजबद्दल) 'एका दिवसात विसा कोसांचा पल्ला मारला' 'इतक्या द्रव्यानें पुढील वर्षपर्यंत पल्ला येणार नाहीं.' 'मनसुबीचें प्रकरण इतक्या पल्ल्यास आणून ठेवलें.' 'हें काम दोन दिवसांनीं पल्ल्यास जाईल' ३ (ल.) आटोका; व्याप्ति; लांबी; सामर्थ्य; अवलंबून असणाऱ्यांची मालिका. 'माझे चार पल्ले होते म्हणून मी सुखरूप पार पडलों.' 'पल्ला जमला-लागू झाला-सिद्धीस गेला-विसकटला इ०' [हिं. पल्ला] ०**करणें**-**बांधणें**-आधार, आश्रय, पाठबळ इ० मिळविणें, मदतनीस, सहाय्यक मिळविणें. ०**गांठणें**-१ कड पोंचणें. २ अपेक्षित स्थळीं जाऊन पोंचणें ०**घेणें**-(ना) सुबाल्या; धूम ठोकणें; पळणें 'मला पहातांच त्यानें पल्ला घेतला'.०**देणें**-जागा, अवधि देणें. 'पेंढार पल्ला देइना उभे भोंवताले।' -ऐपो २३५. **पल्ल्यावर असणें**-अगदीं जवळ, पाठीशीं असणें (मैत्री करण्यासाठीं किंवा दुखापत करण्यासाठीं).

**पल्ला**—पु. वस्त्राचा जरीचा, बुट्टीदार काठ [सं. पल्लव, गु. पल्लो]

**पल्ला**—पु. कबूतर इ० पक्ष्यांचा कळप

**पल्ला**—पु. नवऱ्यानें वधूस दिलेला पैसा, जिन्नस; किरकोळ खर्चास दिलेला पैसा; चोळीखर्च. हा वधूच्या बापाजवळ ठेवितात. ही चाल गुजराथेंत आहे. [गु. पल्लु]

**पल्लाण**—न. (कु.) अवधि; अंतर. पल्ला पहा.

**पल्ली**—स्त्री. एक क्षुद्र जंतु; पाल पहा. [सं.]

**पल्ली**—स्त्री. लहान गांव, खेडें. [सं.]

**पल्ली**—स्त्री. (गो.) धुमी; शेकोटी; आगटी पोल्ली असेंहि रूप रूढ आहे.

**पल्लेकरी**—पु. पल्लाभर धान्य, धान्याची गोणी वाहून नेणारा व त्या हमालीवर उपजीविका करणारा हमाल, हेलकरी. [पल्ला+करी]

**पल्लेदार**—वि. शोभिवंत, वेलबुट्टीदार पदराचें, काठाचें; लप्पेदार (वस्त्र). 'पल्लेदार दोरवा पैठणी लालभडक नेसुन। आंगीवर चोळामधीं बसन।' -प्रला २२७. [पल्ला+कांठ, पदर]

**पल्लेदार**—वि. लांबपर्यंत पोंच असलेली; लांब चोळा जावयाजोगी (तोफ इ०). [पल्ला=अंतर, लांबी]

**पल्वल**—न. डबकें. 'वे पल्वलीं जीवन मेघ जैसा।'-अकक २. हरीराज मुद्गलाचार्य विरचित रामार्याचें भाषांतर १४. [सं.]

**पल्हाटी**—स्त्री कापशी; पन्हाटी, पळ्हाटी पहा. 'पल्हाटीचें पुष्प सुवासहीन। परि राया रंका तेंचि भूषण।' -भवि १०.१३३. २ कापसाच्या झाडाची काडी. [पळ्हे+काठी]

**पव**—पु. (खेळांतील) फांशावरील १ संख्येची खूण, चिन्ह [हिं.] ०**बारा**, **पोबारा**-पु. (फाशांचा खेळ) एक दान; तीन फाशांपैकीं एकावर एक व दोहोंवर सहा सहा ठिपके मिळून १३ पडणें. **पवबारा करणें-म्हणणें**-(या दानानें सोंगटी दूर जाते यावरून ल.) पळ काढणें, पळून जाणें. पोबारा पहा. 'चोरांनीं भांडीं चोरून पवबारा केला.' -विवि ८.११.२०८.

**पव**—स्त्री. १ (व) सांध्यात बसविण्याची केलेली लांकडाची खीळ. २ फणसाचा आतील गाभा, पाव; पाऊ.

**पवणें**—अक्रि. (काव्य) पावणें; प्राप्त होणें; मिळणें; पोंचणें; पावणें पहा. 'न पवे त्या मारी धोंडी।' -मुआदि ३४ ८८. 'हरीविण सौजन्य न पवे कोण्ही।' [पावणें]

**पवन**—पु वायु; वारा; पंचमहाभूतांपैकीं एक. [सं] ०**चक्की**-स्त्री. वाऱ्याच्या जोरावर, शक्तीनें चालणारी गिरणी, जातें, यंत्र. [पवन+हिं. चक्की=जातें]

**पवन**—पु. (गो.) पौंड (नाणें). [इं. पौंड]

**पवना-न्या**—पु. हरळीसारखें एक तृण, गवत. [सं. पवन]

**पवमान**—पु. १ वायु. २ एक यज्ञाग्नि; गार्हपत्य. ३ एक विशिष्ट मंत्रसमूह. [सं.]

**पवली**—स्त्री. राजमार्ग. -शर.

**पवळ**—पु. १ पल्लव; पान. -हंको २ होडगें. -मनको. [प्रा.]

**प(पं)वळें**—न. पोंवळें; प्रवाळ. पोंवळें पहा. 'पवळेंयाचिआं दंती। जावडे कालऊनि मीगुती।' -शिशु ५९०. [सं. प्रकार]

**प(पं)वा**—पु. पांवा; अलगुज; बांसरी. पावा पहा.

**पवाड-डु**—पु. १ मोठेपणा; कीर्ति; महत्त्व. 'हे मारिले ते वर थोडे। आणीकही साधीन गाढे। मग नांदेन पवाडें। येकलाचि मी।' -ज्ञा १६.३५२. 'कीं हा ईश्वराचा पवाड।' -दा १.७.३३. २ विस्तार. 'निश्चळ चंचळ आणी जड। अवघा मायेचा पवाड।' -दा १२.३.८. ३ ठाव; अवकाश. 'जयाचिये प्रतीतीचा वाखारां। पवाडु होय चराचरा। तो महात्मा धनुर्धरा। दुर्लभु आथी।' -ज्ञा ७.१३७. ४ इच्छा. 'जें विटे ना सरे। भोगितयाचेनि पवाडें पुरे।' -ज्ञा ८.२६४. ५ ठिकाण. ६ कौशल्य. 'मग फेडूं यया बुद्धी। पवाडु कीजे।' -अमृ ७.६३. ७ एक काव्यप्रकार. पोवाडा पहा. [सं. अवद्; प्रा. पवड्ढ; तुल० सं. प्रवाद]

**पवाड**—पु. रिकामपण. ' मज आगसेवे नाहीं पवाडु। तरि त्यागा भोगा होए अपवाडु।' –भाए १४१.

**पवाड**—स्त्री. प्रकार; परवड पहा. ' तेथ संयमाग्नीचीं कुंडें। इंद्रियद्रव्याचेनि पवाडें। यजिती उदंडें। युक्तिघोषें।' –ज्ञा ८.५०. [ परवड ]

**पवाडणें**—क्रि. १ आंत शिरणें; घुसणें. ' काच म्हणोन उदकांत पडे। का सभा देखोन दर्पणीं पवाडे। द्वार चुकोन भलतीकडे। जाणें या नांव भ्रम।' –दा १० ६.२२. २ सामर्थ्य असणें. ' एऱ्हवीं ऐसें घडे। जो जळत घरीं सापडे। तो मग न पवाडे। कुढाखणों।'–ज्ञा १३ ५४८. ३ टिकाव धरणें. ' तेथें मज मूर्खाची मती। पवाडेल कोठें।' –दा १.४ २. ४ स्तुति करणें; नांवाजणें.

**प(पं-पो)वाडा**—पु. १ वीराच्या पराक्रमाचें, विद्वानांच्या बुद्धिमत्तेचें, तसेंच एखाद्याचें सामर्थ्य, गुण, कौशल्य इ०कांचें काव्यात्मक वर्णन, प्रशस्ति, स्तुति-स्तोत्र २ पराक्रम; कीर्ति. ' अनंत हे थोरी। गर्जताती पवाडे।' –तुगा १५७८ ' कृष्णें पवाडा हा केला।' –निगा १८ ३ विस्तार, महत्त्व इ० अर्थी पवाड पहा [ पवाड. तुल० का. पाडु=गाणें ]

**पवारी**—स्त्री. १ एक औषधी वनस्पति. २ तिजपासून तयार केलेलें एक सुवासिक औषधी द्रव्य.

**पवालें**—न. (गु.) प्याला, एक प्रकारचें भांडें; फुलपात्र. –मौज २ ६.१९३०. [ सं पव=पुनीत+आलय; गु. पावालुं ]

**पवि**—पु इंद्राचें वज्र. [ सं. ]

**पवित्र**—न. १ ब्राह्मणाचें जानवें; यज्ञोपवीत २ पवित्रक, बोटांत घालण्याची दर्भाची (गांठ देऊन केलेली) किंवा सोन्याची अंगठी. ही अनामिकेमध्यें पूजादि धार्मिक विधि करताना घालतात –वि. १ शुद्ध; निर्मळ; स्वच्छ, धार्मिक, सास्कारिक दोषरहित, सोवळें (अन्न, उदक इ०) २ निष्पाप, पापरहित; पुण्यकारक; नीतिमान; सद्वर्तनी; नीतिशुद्ध (माणूस). ३ पुण्यकारक. पापक्षयकारक (कर्म, वस्तु, जागा इ०). [सं] **पवित्रक**–न दर्भाची किंवा त्या आकाराची सोन्याची अंगठी. पवित्र अर्थ २ पहा. **पवित्रारोपण**–न. श्रावणाच्या महिन्यातील एक विधि. नव्या सुताचे तयार केलेले दोरे पवित्र व्हावेत म्हणून देवाच्या मूर्तीवर वाहणें आणि नंतर ते मूर्तीवरून काढून स्वतः घालण्यासाठीं घेणें. **पवित्रित**–वि. १ पवित्र केलेलें. २ सोवळें; विधिपूर्वक शुद्ध केलेलें. **पवित्री**–स्त्री. पवित्रक; पवित्र अर्थ २ पहा. **पवित्रीकरण**–न. (ख्रि.) आपली कृपा दानरूपें देण्याचें परमेश्वराचें एक कार्य. (इं.) सँक्टिफिकेशन या कार्यानें मनुष्य देवाच्या प्रतिमेनुरूप सर्वस्वी नवा होतो असें ख्रिस्तानुयायी समजतात –इफि ४.२३,२४. **पवित्रीपूर्णिमा**–स्त्री. श्रावण महिन्यांतील पौर्णिमा (या दिवशीं पवित्रारोपण करितात); पोवतीपौर्णिमा. पोवत्यांची पुनव.

**पविन्न**—न. वरण. ' मुगाचें पवित्र। आणि लोणकढें तूप साजूक।' –बदलापूर २१३.

**पवित्रा**—पु. (मल्लविद्या) डावा पाय पुढें करून कुस्तीच्या तयारीनें उभें रहाण्याचा प्रकार; दस्ती. (क्रि० करणें) **पवित्र्यांत असणें–उभें राहणें**–भांडणाच्या तयारींत असणें; भांडण करावयाचेंच अशा इरादानें बोलणें, उभें राहणें इ०

**पविनु-त्रू**—वि (नंदभाषा) सात; ७ संख्या. ' केवळाकाटी पवित्रु त्यासी। सांगोनियां दीधलें।' –भवि ४२.४५.

**पव्हणें**—अक्रि. पोहणें पहा. ' जैसा आब्रह्म पूर्णोदकीं। पव्हे मार्कंडेय एकाकी।' –ज्ञा ११.१८७. [सं. प्रवाहनम्; प्रा.] **पव्हणा**–पु पोहण्याजोगा पाण्याचा डोह **पव्हणारु**–वि. पोहणारा. ' आला शिष्यसरितेसि थोरू। तेथें अविवेक पव्हणारू।' –विपू १ १००.

**पव्हणी**—स्त्री. नौका; होडी. [सं. प्रवहण; प्रा. पवहण]

**पव्हरी**—स्त्री. (व.) उंसावरील एक रोग. यामुळें उंसाचे शेंडे पिवळे पडून वाळतात.

**पव्हे**—स्त्री. पाणपोई ' आहा आहा रे भाई हें अन्नदानाचें सत्र। पव्हे घातली सर्वत्र।' –तुगा३३९ [सं प्रवाह; प्रा. पवाह]

**पशम**—न. १ लोंकर. २ (संकेतानें) गुह्यभागावरील केंस; शेट; शष्प (क्रि० उखडणें) ' ते आमचे स्नेही असतां त्यांनीं तेथें पत्र पाठविले तर काय पशमं उखडली!' –रा ६.६१९ (हिं. पश्म उखडना असा वाक्प्रचार आहे). ३ क.पदार्थ ' कोल्हापूर मिरजेच्या किल्लयापुढें पशम आहे ' –ख १२.६२९६. [फा पश्म्] **पशमी**–वि लोंकरी, लोकरीचें (वस्त्र इ०). [फा. पश्मी] **पशमीना**–पु. लोकरीचें वस्त्र, कापड [फा. पश्मीना]

**पशीना**—पु. (व) घाम. 'पशीना फुटला. आता ताप उतरेल ' [सं. प्रस्विन्न, हिं. पसीना]

**पशु**—पु. १ जनावर; चतुष्पाद. २ (ल.) मूर्ख मनुष्य. ३ अविचारी, निर्दय, आडदांड मनुष्य. [सं.] **०पति**–पु. १ (सर्व सजीव प्राण्यांचा प्रभु) शंकर; महादेव. ' केला मातीचा पशुपति। परि मातीसी काय महती।' –तुगा ३४६७. ' आहे ठाउक पुरुषार्थ तुझा तुज प्रिय असो पशुपती।' –प्रला ५ २ (उप.) गुराचा डॉक्टर; व्हेटरनरी सर्जन. [सं.] **०वळ**–वि गुराखी; गुरें चारणारा, पाळणारा. ' माता ही दोन ठायीं पशुवळ। विकिती दुग्ध घेऊन डोई।' –अकक २, किंसुदाम ७२.

**पशेमानी**—स्त्री. पस्तावा; पश्चात्ताप; दुःख. [फा.] **पशेमान**–वि. पस्तावलेला; पश्चात्ताप पावलेला; दुःखी. [फा. पशेमान्]

**पशेरी**—स्त्री. १ पांच शेरांचें वजन; पासरी; पंचशेरी. २ (ल.) उपजीविका; उदरनिर्वाह. [पांच+शेर]

**पश्चात्**—क्रिवि. १ नंतर; मागून. २ पाठीमागें; आड; परोक्ष; पश्चिमेकडे. [सं.] **०स्वतिक**–न. क्षितिजाचा पश्चिम बिंदु [सं] **०द्वारगामी**–वि. गुदमैथुन करणारा; बच्चेबाज. [सं.]

**पश्चात्ताप**—पु (मागाहून होणारा ताप) पाठीमागून वाईट वाटणें; पस्तावा; पस्तावणी; अनुताप; दुःख; खेद. [सं.]

**पश्चात्ताप**—पु (ख्रि) पापी मनुष्यास आपल्या पापाविषयीं खरी जाणीव होऊन ख्रिस्तद्वारें देवाच्या दयेचें ज्ञान प्राप्त झाल्यानें त्याला त्याच्या पापांचा तिरस्कार व खेद उत्पन्न होतो आणि तो दृढनिश्चयानें व परिश्रमानें नवीन प्रकारें आज्ञापालन करायाला पापापासून देवाकडे फिरतो ती स्थिति. (इं.) रिपेन्टन्स. 'दास म्हणे आग लागे मीपणाला । पश्चात्ताप झाला सुरू तेथें ।' –उसं १९६.

**पश्चिम**—स्त्री. १ मावळत, सूर्य मावळण्याची दिशा 'एथून समुद्र शुद्ध पश्चिम आहे' २ पश्चिम दिशेचा वारा –वि. १ पश्चिमेचा पश्चिमेकडील, पाश्चात्य २ पाठीमागचा, नंतरचा; पाश्चात्त्य; अपर; अवर. [सं.] **०कपाल**–न पश्चिमगोलार्थ. **०द्वार**–न. १ पश्चिमेकडील, मागील दार, फाटक (शहर, राजवाडा, घर इ० चें). २ (ल.) गुद ३ (संकेतानें) अपानवायु. **०धान्य**–न. १ सालअखेर, उशीरा पिकणारें धान्य; मागून तयार होणारें धान्य. २ उशीरांचें पीक; हिवाळयांतील पीक; रबीधान्य पहा **०बुद्धि**–स्त्री. पश्चात्बुद्धि; मागाहून सुचणारा विचार, बुद्धि **०रात्र**–स्त्री. उत्तररात्र, मध्यान्हीनंतरची रात्र **०वायु**–पु (ल) पाद; पर्दन; अपानवायु **पश्चिमाग्र**–स्त्री. पश्चिमेकडील अग्र; सूर्य तारा जेथें मावळतो तो क्षितिजबिंदु, पश्चिमदिगंश **पश्चिमास्त**–नपु. बुध, शुक्र यांचें पश्चिमेकडे (सुर्यासांनिध्यामुळें) मावळणें, अस्तास जाणें. **पश्चिमोदय**–पु. बुध व शुक्र हे सुर्यास्तानंतर पंश्चिमेकडे दिसणें (पश्चिमेकडे यांचा उदय बरेच दिवस होतो)

**पश्मी**—वि लोंकरी; पशमी पहा. 'परमी रुमाल एक तांबडा पाठविला आहे.' –ख ११.५७०१. [फा.] **पश्मीना**–पु लोंकरी वस्त्र; पशमीना पहा.

**पश्य**—वि. दिसणारा; दृष्टीस पडणारा; वाटणारा. हा शब्द या अर्थानें समासांतच येतो. उदा० रुद्रं–क्रूरं–शुभं–हितं–मितं–तुच्छं–क्षुद्रं–दूरं–दीर्घं–पश्य. [सं.]

**पश्यंती**—स्त्री. (परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या) चार वाचांतील दुसरी वाचा; परेपासून हृदयस्थानीं ईषन्मात्र उमटणारी भासरूप वाणी. परा, मध्यमा, वैखरी पहा. 'जया तुझिया उद्देशासाठीं । पश्यंती मध्यमा पोटीं । सुनि परेसींही पाठीं । वैखरी विरे ।' -ज्ञा १६.२०. 'वैखरी मध्यमा पश्यंती परा । चहूं वाचातीत क्षराक्षरपरा । तो तूं परात्पर सोयरा । कालियामर्दना श्रीकृष्णा ।' –हवि २०.१२७. [सं.]

**पश्यतोहर**—पु १ देखत, समोर चोरी करणारा. 'कोठें जाल उभे रे मत्स्येश्वरधेनुपश्यतोहर हो ।' –मोविराट ४.८४. ३०३. २ (सामा. ल.) सोनार. [सं. पश्यतः+हर]

**पष्ट**—वि. (काव्यांतील अप) स्पष्ट; उघड; साफ; स्वच्छ. 'येथें सांगितलें पष्ट । सद्गुरु भजन ।' –दा ७.१०.४२. –क्रिवि. स्पष्टपणें; उघडपणें. 'अंगना माझिया वरिष्ठ । ऐसें बोलती तोष्ठ श्रेष्ठ । परी त्या दीपका होती पष्ट । सूर्य भये सन्मुखा ।' –मुवि ३.१७. [सं. स्पष्ट]

**पसगैबत**—क्रिवि. गैरहजेरीत; हजर नसतां; पश्चात् [फा. पस्+घैबत्]

**पसंत-द**—वि. १ मान्य; मनास आलेला; कबूल; स्वीकार केलेला; संमत; प्रिय; निवडलेला; पटलेला; आवडलेला. २ अनुकूल, कबूलीचा; कबूल; राजी. (क्रि० करणें). [फा. पसंद्]

**पसंती-दी**—स्त्री. १ संमति; मान्यता; कबुली. 'तुम्ही वरचेवर लिहितां, परंतु ज्यांत गोष्ट पसंदीस पडे, शाहाण्याची निशा होये ऐसें करण्यांत येत नाहीं.' –रा ६.३९४. २ आवड. 'पाहिल्यानंतर पसंदीस येतील त्या खन्या.' –रा ऐकिप्र ६२ [फा. पसंदी]

**पसतक**—पु घोडयाच्या मागील पायांतील एक रोग.–अश्वप २.२८१.

**पसतीस**—वि. ३५ ही संख्या, तीस आणि पांच.

**पसय**—पु. (गो.) पसा पसा जमविलेलें धान्य, फंड.[पसा]

**पसर**—पु. १ (काव्य) पसारा; विस्तार. 'आतां असो हा युद्धविचार । सर्व वर्णावा तरी अपार । ग्रंथा होईल पसर ।' –कथा १.७.१५९. २ पसरणें; फैलावणें; चालू राहणें. 'अखंड लागली धार । खंड नसे गंगापसर ।' ३ पसरा–रु पहा. [सं. प्रसर; प्रा. पसर] **०कार**–पु. (गो.) दुकानदार.

**पसरडी**—पु. (कों.) पावसाचें पाणी काढून बाजूनें लावण्यासाठीं खणलेला ओहोळ. [पसरणें]

**पसरणें**—उक्रि.अक्रि. १ विस्तार पावणें; विस्तारणें; उघडणें (तोंड, हात इ०) २ ताठ, लांब करणें; विस्तृत करणें(पाय इ०). ३ पांगापांग होणें; विस्कटणें. ४(ल) निजणें; हातपाय लांब करणें. 'तो जेवण झाल्याबरोबर पसरतो.' ५ आंथरणें; वर घालणें. 'गादी पसर व त्यावर नीज.' ६ अधिक प्रदेश व्यापणें; संकुचितपणा सोडणें; फैलावणें. [सं. प्रसरण; प्रा. पसरण] **पसरट-डा**–वि. १ पसरलेलें; विस्तारित. २ उथळ; रुंदट; प्रशस्त (भांडें इ०). [पसत] **पसरणी**–स्त्री. १ पसरण्याची क्रिया; वाढ; विस्तार. २ पांगापांग; फैलावणी.

**पसरा–रू**—पु. १ दुकान. (गो.) पसरो. –शर. (–तुगा ६१६). २ पसर; पसारा; विस्तार. ' साडी स्तवनाचा पसरु । ग्रंथा होतसे अवसरु । ' –कालिकापुराण ३.८. [सं. प्रसर, प्रा. पसर]

**पसरूं**—न (कु. गो.) पशु; गुरूं. [सं. पशु]

**पसव(वि)णें**—उक्रि. १ प्रसूत होणें; प्रसवणें; विणें; वेत देणें (घोडी, गाढवीण यांनीं). ' घोडी सबर झाल्यापासून प्रायः अकरा महिन्यांनीं पसवते. ' –मराठी ३ रें पुस्तक पृ. १०८. (१८७३) २ कोका बाहेर टाकणें (केळीनें). ३ तुरे, कणसें बाहेर टाकणें (नाचणी, वरी, सावा इ० नीं); निसवणें. [सं. प्र+सू; प्रा. पसव]

**पसा**—पु १ हाताचा विशिष्ट केलेला आकार (धान्यादिक घेण्यासाठीं), खोंगा; हाताचीं बोटें जुळलेलीं शेवटास थोडीं वर वळवून त्यांस आंगठा जुळला असतां होणारा खोलगट आकार. २ ओंजळ; अंजलि. ' गुरुसागर बहु गर्जे, परि मुनिचा एक ही भरे न पसा । ' –मोकर्ण २९.३५. ३ (ल.) पसाभर धान्य. 'मुळींच पदरी नसतां पसा । ' –नव १०.१७०. [सं प्रसृत; प्रा. पसय] **उलथा पसा, पालथा पसा**–(ल) उधळपट्टी; उधळा कारभार; उधळेपणाची वागणूक. **पसाचें पायलीस उठेना**–जो प्रथम पसाभर म्हणजे थोडें घेऊन कांहीं काम करण्यास तयार असतो तोच पुढें चढून गेल्यामुळें पायलीभर (पुष्कळ) घेऊनहि ऐकेनासा होतो. ०**मूठ**–स्त्री. ओंजळभर किंवा मूठभर धान्य इ०. बलुतेदार आपला हक्क मागण्यासंबंधांत हा शब्द फार योजतात. कित्येकांचा पशाचा व कित्येकांचा मुठीचा असा हक्क असतो.

**पसाइता**—स्त्री. (बडोदें) सरकारी कामदाराकरितां राखून ठेवलेली जमीन. –बडोद्याचे राज्यकर्ते ३६०; नोकरीचा मोबदला म्हणून दिलेली जमीन. [सं. प्रसाद; प्रा पसाय; ? गु. पसायतु]

**पसाघोडी**—स्त्री. पैदाशीसाठीं राखून ठेवलेली घोडी. –पेद ५.४२. [पसविणें+घोडी]

**पसाट**—न. (ना.) बैलगाडीतील मागच्या बाजूला बसावयाची जागा; बैलगाडीचा मागचा भाग; फमाट.

**पसाड**—पु. (खा.) मोठा परकर; घागरा.

**पसाद्**—वि. १ (व.) उशीरा झालेले २ उशीर किंवा वेळ असलेलें. [फा. पस्=मागून]

**पसाय**—पु. प्रसाद; कृपा; मेहेरबानी. ' आता तेणेंचि पसायें तुम्हां संतांचे मी पाये । ' –ज्ञा १५.२८. ' असो हें सांगतां कथा रंभु । तेणें परितोषोनि प्रभु । पसाय दे परमलाभु । म्हणे मुनी बिश्वनाथु । ' –ज्ञाप्र ६० ०**दान**–न. प्रसाद; वर. ' तोषोनि मज यावें । पसायदान हें । –ज्ञा १८.१७९३. [सं. प्रसाद; प्रा. पसाय]

**पसार**—पु. १ व्यायामासाठीं फेऱ्या घालणें; शतपावली. २ इकडून तिकडे फेऱ्या घालणें (पहारेकरी, संत्री यांनीं). –वि. १ गेलेला; झालेला; गत उदा० आठ पसार=आठ वाजून (गेले). २ मान्य; बहुमतानें पसंत. (इं) पास्ड (क्रि० होणें). ' तो ठराव पसार झाला. ' ३ उत्तीर्ण; पास (क्रि० होणें) ' तो परिक्षेंत पसार झाला. ' ४ निघून जाणें; पळणें. (क्रि० होणें) ' तो येथून मघाशींच पसार झाला. ' [पोर्तु पासार=जाणें; इं. पास]

**पसार–रा**—पु. दुकान; पसर–रा पहा. ' ते वेळें ते चौत्री जणी । पसार घातले तत्क्षणीं । विकरा करुनी । सुवर्णसंख्या । –कालिका पुराण ३०.३३.

**पसारा**—पु १ (वस्तु, काम इ०चा) विस्तार; व्याप; फैलाव, प्रसार. ' म्हणौनि वाचेचा चौबारा । घातलिया धर्माचा पसारा ' –ज्ञा १६.२२३. २ जाहीर होणें; प्रसिद्धि (एखाद्या गोष्टीची). ३ चहूंकडे पसरलें जाणें; अव्यवस्थितपणें पडणें; गोंधळ. ४ पसरलेल्या, अस्ताव्यस्त पडलेल्या वस्तू. (क्रि० करणें; पडणें) ' बाहेर धान्याचा पसारा पडला आहे तो आटपून ठेव ' ५ मूल आडवें आलें असतांना बाळंतिणीनें पसरणें. (क्रि० पडणें). ६ दुकानांतील सामान इ० भरण्याचें एक प्रकारचें तबक, ताट. ७ (खा.) बारदान; पक्की कपाशी ज्यांत बांधतात तें गोणपाट. [सं. प्रसर; म. पसरणें] **पसारी–ऱ्या**–पु. १ औषधें विकणारा; भेषजी; गांधी. २ वाणी; किराण्या जिनसांचा दुकानदार. [हिं. पनसारी, पसारी; पसार=दुकान]

**पसारा**—पु. गुरांचें रात्रीचेवेळीं चरणें. गुरांस रात्रीं चरावयास नेणें. [हिं. पसर]

**पसाव–वो**—पु. प्रसाद; कृपा; उपकार. पसाय पहा. 'आतां ऐसिया अपराधा । मर्यादा नाहीं मुकुंदा । म्हणोनि रक्ष रक्ष प्रमादा । पसावो म्हणुनी । ' –ज्ञा ११.५७१. [सं. प्रसाद; प्रा. पसाय]

**पसि**—क्रिवि. पेक्षां. ' तें चैतन्यरत्नापसि उजाळें । अधीक दीसे । ' –भाए ७९६. [तुल० गु. पछी]

**पसु(सो)रडी**—स्त्री. (निंदार्थी) पैसा.

**पसू**—स्त्री. पैदाशीकरितां ठेवलेली घोडी. पसघोडी पहा. [सं. प्र+सु; पसवणें]

**पसोपेश**—स्त्री. हरकत; अडचण. ' मुलाकत ही होण्यास काय पसोपेश आहे ' –रा १.१४५. त्या पक्षीं सरकारची खातरजमा होय ऐसे अहद पैमान यावयास पसोपेश करणार नाहींत. ' –रा १२.२२ [फा. पस्–उ–पेश्]

**पस्त**—क्रिवि. पूर्णपणें; संपूर्णतेनें; सर्वस्वी; निखालसपणें; निःशेष; साफ (नाश करणें, फन्ना उडविणें इ० अर्थाच्या क्रियापदां बरोबर योजतात.) उदा० लुटणें; नागविणें; बुडवणें; घर धुणें. [फा. पस्त्=खालीं, अवनत (ल) जमीनदोस्त] ०**करणें**–नाश करणें; खलास करणें; नागवणूक करणें; समूळ नाश करणें. ' सफेजंग लढाई करून कृष्णराव खटावकर यास मोडून पस्त केलें. '

–रा ४ ३२ 'वरकड त्याचें लष्कर अवघें लुटून पस्त केलें.' –ख ५ २४०६ ०खाणें–चाटूनपुसून सर्व खाणें; निखालस खाऊन टाकणें ०चोरणें–प्रत्येक चीजवस्त चोरून नेणें, घर धुवून नेणें. ०जाळणें–जाळून राख करणें.

**पस्तावणें**—अक्रि पश्चात्ताप पावणें, होणें, करणें; पस्तावा होणें, स्वतःच्या (नीति–अनीतीच्या) कृत्याबद्दल खेद होणें, मागाहून शोक करणें. [स पश्चात्ताप] **पस्ताव–वा, पस्ताई–** पुस्त्री. पश्चात्ताप, अनुताप, स्वतःच्या नीति–अनीतीच्या वर्तनाबद्दल किंवा नुकसानकारक गोष्टीबद्दल वाटणारें दुःख, शोक, खेद. **पस्तावणी**–स्त्री. पश्चात्ताप. पस्तावा होणें, करणें, खेद, दुःख पस्ताव पहा

**पस्ताळीस**—वि (अशिष्ट) पंचेचाळीस.

**पस्तीस**—वि पसतीस; ३५ ही संख्या.

**पस्तु**—पु. एक ताल यांत सात मात्रा व तीन विभाग असतात

**पस्तु(स्तो)री**—स्त्री. (व. ना.) वाढावा, मखलत. वरताळा, कोणताहि जिन्नस मोजून घ्यावयाचा तितका घेतल्यावर थोडा वर जो अधिक घेतात तो 'शंभर आंब्यावर पांच पस्तोरीचे देतात.'

**पस्तोर**—क्रिवि. (व) पर्यंत 'तो माळापस्तोर पळाला' [पस+तोर=तोंवर]

**पस्पा होणें**—क्रि पराभूत, परागंदा होणें. पळ काढणें. 'तेव्हां पल्टणें फौजेच्या मुकाबल्यास ठरूं न सकतां झाडींत पस्पा झालीं'–पया ४७९ [फा. पस्पा=मांडी घालणें; हिं पस्पा होना]

**पहडणें**—न ज्ञान; विद्या, वाचन; पाठ; पठन. –उक्रि. (प्र) पढणें पहा [सं पठण]

**पहा(हां)ट**—स्त्री. १ सुर्योदयापूर्वीचा सहा घटिकांचा काळ; उषःकालापासुन सूर्योदयापर्यंतचा काळ; प्रभात; प्रातःकाळ. २ (व.) सकाळ. 'मी पहाटें ८ वाजतां जाईन.' ३ उत्तररात्र. 'तो पहाटेचे प्रहरीं रात्रीं उठला.' [सं. प्रभा–प्रभात; प्रा. पहा, पहाअ, पहाद; हिं पह, पोह; गु. पोह; सिं. पिरिह] ०फुटणें–उगवणें; आरंभ होणें. 'तो ज्यासि भेटे अदृष्टें। त्यास सुखाची पहाट फुटे।' –एभा १४.१११. ०पटीं–क्रिवि. (राजा.) प्रभातकाळीं; उजडण्यापूर्वी, मोठ्या पहाटेस.

**पहाड**—स्त्री. एक जातीची वेल; गजग्याचें झाड. –वगु ७ २६. [सं. पाठा] ०मूळ–न. या वेलीचें मूळ.

**पहाड**—पु. (बांधकाम) घराचें वरच्या मजल्याचें बांधकाम करताना मजुरांना, कामगारांना उतरण्या–चढण्यासाठीं आडवे–उभे वासे बांधून माचा करतात तो; परांची; पाड. 'पहाड दुहेरी असावा' –मॅरट १२

**पहाड**—पु १ डोंगर; लहान पर्वत, टेंकाड. 'चढे वैकुंठींचे पहाडीं। क्षीरसागरीं देतसे बुडी।'–एरुस्व २ १२ २ (ल.) अतिशय मोठा व उंच, खणखणीत आवाज, कंठध्वनि (गाणाऱ्याचा, गवयाचा). [हिं] **पहाडची यात्रा**–स्त्री. डोंगरावरील, डोंगराळ मुलखातील प्रवास, यात्रा; विशेषत. हिमालय पर्वताची यात्रा. **पहाडी**–वि १ पहाडाचा, पहाडासंबंधीं, डोंगरी. २ मोठा; उंच; खणखणीत (आवाज). **पहाडी किल्ला**–पु डोंगरावरील किल्ला.

**पहाडी**—पु (संगीत) एक राग यांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात जाति संपूर्ण–संपूर्ण वादी षड्ज संवादी पंचम. गानसमय सार्वकालिक [पहाड] ०जिल्हा–पु एक रागिणी.

**पहाडी**—स्त्री पालखी, मेणा इ० वहायास जे भोयाचे समुदाय ठेवलेले असतात ते प्रत्येकीं, पाहडी पहा

**पहाण(णी)खरडा, पहाणदार, पहाणी–णें, पहाण्या** इ०—पाहणीखरडा, पाहणीदार इ० पाहमध्यें पहा

**पहाता**—पु प्रेक्षक, पाहणारा 'तर्कित होते निज पर भट विधु कीं रवि असें पहाते ज्या।' –मोभीष्म १ ३९ [पाहणें]

**पहार, पहारय**—स्त्री. लोखंडाची भली जाड टोंकदार कांब (खडक फोडणें, जमीन खणणें, उखळांत कुटणें इ० कामाकरितां उपयोगी असलेली), खणण्याचें, कुटण्या–फोडण्याचें एक लोखंडी हत्यार. [सं. प्रहार]

**पहार**—पु तीन तासांचा काळ, प्रहर, याम, दिवसाचा आठवा भाग 'जिये गांवींचा पहारु दिवोवेरी।एका अमरेंद्राचें आयुष्य न धरी।' –ज्ञा ८.१५५ [सं. प्रहर]

**पहारा**—पु १ रखवाली, चौकी; राखण; जागल. २ चौकीदार; रखवालदार; संरक्षकांची तुकडी ३ चौकीदारी; रखवालदारी; पहारा करणें. 'आतां पहारा कोण करितो?' 'माझा पहारा भरला.' ४ निरोधन; प्रतिबंधक इलाज; रोखण. (इं) पिकेटिंग.' दारूच्या गुत्त्यांपुढें पहारा ठेवून गुत्त्यांत दारू पिण्यासाठीं जाणाऱ्या लोकांस ... पराङ्मुख करण्याची जी चळवळ सध्या पुण्यांत चालू आहे ...' –टि ३.२६६. [फा पह्रा: सं. प्रहर. दर प्रहरास हा बदलीत असत यावरून] **पहारेकरी, पहारेदार**–पु पहाऱ्यावरचा शिपाई; संत्री; चौकीदार, रखवालदार. **पहारेबंदी**–स्त्री. पहारेकऱ्यांची रांग; नाकेबंदी करण्यासाठीं जागजागीं पहारे ठेवून केलेला बंदोबस्त.

**पहाळ**—स्त्री १ वृष्टि, वर्षाव; पावसाची सर. २ डोंगरांतील प्रवाह; ओढा ३ झाडाला पाणी मिळावें म्हणून त्याच्या सभोंवार खणलेला खळगा, आळें. ४ उपासामुळें पोटाला पडलेली खळी.

**पहाळ**—पु एक झुबकेदार वनस्पति, रोपडें.

**पहाळ**—न. मोठी रांग. –शर.

**पहाळी**—स्त्री. पावसाची सर पहाळ अर्थ १ ते ३ पहा

**पहिरणी, पहिरणें**—(कों.) पेरणी, पेरणें पहा.

**पहिरा**—पु (औंध) अदलाबदल, शेतकऱ्यां नीं एकमेकांचे बैल एकमेकांस देणें किंवा एकमेकांच्या कामावर जाणें, पडकेल पहा.

**पहिलू उलटा**—पु. (जंबिया) एक डाव, आपल्या हातांतील जंबियानें आपल्या डाव्या बाजूस अर्थात जोडीदाराच्या उजव्या बाजूस जोडीदाराच्या कोंपराची लवण ज्या ठिकाणीं टेकते त्या ठिकाणीं मारणें **पहिलू सीधा**-पु आपल्या हातांतील जंबियानें आपल्या उजव्या बाजूला म्हणजे जोडीदाराच्या डाव्या बाजूला मारणें [पहिलू=बगलेची बाजू+उलटा, सीधा]

**पहिलटकर-करू, पहिलार-रू, पहिलटकरीण**—विस्त्री. १ पहिल्यानेंच विणारी, गाभण राहिलेली (गाय, म्हैस इ०): प्रथम गर्भिणी स्त्री 'मी पहिलारु कळेना यात मला काहीं।' –होला १५६. २ एकदांच बाळतीण झालेली स्त्री [पहिला]

**पहिलमपरता**—क्रिवि (ना) पहिल्यादा, सर्वांत प्रथम, प्रथमत. [पहिला]

**पहिलवान, पहीलवान, पैलवान**—पु १ मल्ल; वीर: कुस्तीबाज, जेठी: तालीमबाज, शक्तीचीं कामें करणारा; शक्तिमान. कुस्त्या करणारा याचे चोबे, जेठी, पंजाबी व वज्रमुष्टी असे चार प्रकार आहेत पहिल्या तीन प्रकारचे पहिलवान साधी कुस्ती करतात शेवटचे हातात कचकड्याच्या फण्या घालून परस्पर मुष्टिप्रहार करून कुस्ती करतात –(बडोदें) पहिलवान व कुस्ती २ २ या नावाचा एक शक्तीचीं कामें करणारा वर्ग, जात यांचें गोपाळ नावाच्या लोकांशीं बंधुत्व असतें ३ उकरड्यावरील एक मोठा किडा [फा. पहलवान्. हिं] **पहिलवानकी**-स्त्री पहिलवानाचें काम, धंदा किंवा कौशल्य.

**पहिला**—पु. घोड्याचा अवयव; बैसीक संधीचा (पोटरीचा बाजूचा) अग्रभाग (मागील भाग) –अश्वप १६३.

**पहिला**—वि १ प्रथम, प्रथमचा –क्रिवि पहिल्यानें; आरंभीं सुरवातीस; प्रथमत.; पहिल्यांदा. 'जैसा निंब जिभे कडवटु। हिरडा पहिलें तुरटु। तैसा कर्मा ऐल शेवटु। खणुवाळा होय।' –ज्ञा १८१८६ २ प्रथम; अगोदर, पूर्वी. 'माझा हा इतुका निरोप पहिले जाऊनि सांगा तिला।' [प्रा. पहिल; सं प्रथम]

**पहिलीगंगा**—स्त्री पावसाळ्यांत नदीला येणारें पहिलें पाणी. –बदलापूर १२१.

**पहिलील**—वि पहिला; प्रथमचा [पहिला]

**पहिलेंप्रथम**—क्रिवि सर्वांत पहिल्यांदा; अगदीं पहिल्याप्रथम. [पहिला]

**पहिल्याघरचा**—वि. (दुसरें लग्न करणाऱ्या विधवेच्या मुलासंबंधी वापरतात) पहिल्या. पूर्वीच्या नवऱ्यापासुन झालेला मुलगा.

**पहिल्यान**—क्रिवि. १ पहिल्या वेळीं; प्रथमत.. २ आरंभीं; अगोदर, अगदीं पहिल्याप्रथम. [पहिला]

**पहिल्यापहील**—विक्रिवि. १ अगदीं प्रथमचा, आरंभीचा. २ प्रथमत:; पहिल्यानेंच. [पहिला द्वि]

**पहीत**—न. (महानु.) वरण 'तूप भात पहीत दोन्ही साकवतीया कढी।' –पूजावसार.

**पहीपाहुणा**—पु. (व्यापक, अनिश्चितार्थी) आलागेला मनुष्य, पाहुणा वगैरे: उतारू; वाटसरू, अतिथि. [सं. पथिक; प्रा पहिअ, गुज. पहीं=दुसऱ्या दिवशीं राहणारा पाहुणा]

**पहुंची**—स्त्री. १ मणगट. २ पुरुषांच्या मनगटावर बांधावयाचा एक दागिना; पोंची [फा. हिं.]

**पहु(हों)डणें**—अक्रि. १ (काव्य.) (विश्रांति घेण्यासाठीं) कलंडणें लवंडणें; अंग टाकणें २ निजणें 'तो तूं देवकीकुंसीचा सेजारी। पहोंडलासी राया मुरारी।' –शिशु १२२. 'करूनिया भोजन घातलें आचवण। आनंदें नारायण पहुडले।' –तुगा४६४. [प्रा. पवड्ड=निजणें, का पवडिसु] **पहुडु**-स्त्री. निद्रा –शर.

**पहुरणी**—स्त्री. १ विईपर्यंत दूध देणारी गाय किंवा म्हैस. 'परी पहुरणी जें दुहिलें। तें तें गुरूं न दुभेचि व्यालें। का उभें शेत चारिलें। पिकावया नुरे।' –ज्ञा१७.२४८. २ ओढाळ गाय. –शर. ३ एक किडा

**पहेदणें**—अक्रि. (व.) लालचावणें, मोहांत पडणें. 'खायला पहेदला आहे.'

**पह्याण**—न (कों) वैरणीसाठीं कापून उन्हात वाळविलेलें गवत.

**पळ**—पु (व ना.) मोठी पळी; पळा

**पळ**—न. १ घटिकेचा साठावा अंश; तासाचा १५० वा भाग, क्षण 'चुकतां न लागता तुज पळही शापावया उशीर मला।' –मोभीष्म ११४३ २ (लोणी, तूप इ० वजन करावयाचें) अठ्ठावीस ढबूंचें वजन. [सं. पल] **०घडी**-क्रिवि. पळभर; क्षणभर 'नको प्राणसख्या विसरूं मजला पळघडी।' –सला १. [पळ+घटिका]

**पळ**—पु १ (शहर, खेडें, देश इ०मधील लोकांची, उधळून लावलेल्या सैन्यातील लोकांची) पळापळ; धांवाधांव; पळत सुटावें अशी अवस्था. (क्रि० सुटणें) २ (ल) पळणारे लोक; पळपुटीं माणसें. 'आमच्या गावांत पळ आला आहे.' –स्त्री. १ धावणें; जोरानें धावत सुटणें, धाव. (क्रि० घेणें). २ शर्यत; दौड; धूम. (क्रि० मारणें) ३ कोणी पाठीस लागल्यामुळें होणारी तिरपीट. [पळणें] **०काढणें**–१ भीतीमुळें किंवा संकट टाळण्यासाठीं एखाद्या ठिकाणापासून पळून जाणें: निसटून जाणें; पोबारा करणें. 'पळ काढिलाचि तुमच्या पाहुनि तें कर्म तडक लेंकांहीं।'

–मोद्रोण १६ ४४. २ (एखाद्यास) पळून जाण्यास लावणें ०सुटणें–पळावें लागणें. 'धाके तुझ्या पळ सुटे रिपु दानवांची।' –भकक २, गोसावीनंदन –रेणुकाष्टक ४.

**पळ**—स्त्री. (कों.) शेतांतील पाण्याचा निचरा होण्यासाठीं काढलेला पाट, नाला, जलमार्ग.

**पळका**—वि. १ पळण्यांत जलद; चपळ. २ पळपुटया स्वभावाचा; पळून जाणारा. [पळणें]

**पळका**—पु विस्तवानें पोळल्यामुळें निघणारी कातडी. [पोळणें]

**पळंज**—न. १ हलकें धान्य, किंवा न भरलेलें कणीस; भुसकें, निरुपयोगी धान्य, धान्याचें फोलकट. २ (कों.) बिन पोसलेलें, पोंचट भात. **पळंजी**–स्त्री. (कों.) हलक्या प्रतीचें, पोंचट धान्य. वेशावरील पंजी धान्य

**पळटेल**—वि. शेतांतील पेरणी, मळणी इ० कामीं दुसऱ्यांना मदत करणारा व आपल्या गरजेच्या वेळीं त्यांची मदत घेणारा (शेतकरी); पडकेल पहा.

**पळण–णी, पळपट, पळापळ**—नस्त्री. एखाद्या सैन्यानें शत्रु पाहून पळ काढणें. जीव वांचविण्यासाठीं केलेली धांवाधांव; एखाद्या लोकसमुदायानें पळत सुटणें. पळ अर्थ १ पहा. 'देवांसीं मांडिली महा पळणी।' [पळणें]

**पळणें**—अक्रि. १ पलायन करणें, पळून जाणें; धांवत जाणें; धूम ठोकणें. २ (सामा) धावणें. ३ पळवाट ठेवणें (भाषण, लेखन यांत). [सं. पलायन] **पळो पळो सें करणें**–त्रासवून, सतावून सोडणें; सळो कीं पळो करणें **पळो पळो सें होणें**–अगदीं त्रासून, दमून जाणें; फार कष्टी होणें.

**पळतें पीक**—न. १ शेवटचें पिक; शेवटचा बहर (फळझाडांचा). २ (ल) व्यापार–धंद्यांतील किंवा कांहीं पदार्थापासून मिळालेला शेवटचा नफा, लाभ. ३ विद्यमान पण थोडेच दिवस टिकणारें सुख. [पळणें+पीक]

**पळपटा–टया, पळपुटा–टया**—वि. १ पळण्याची संवय, प्रवृत्ति, स्वभाव आलेला; पळून जाणारा. २ (अव. उदा० पळपटे) पळालेले, पळून जाणारे (लोक). [पळणें]

**पळपणें, पळिपणें**—क्रि. पेटणें; जळणें. 'पळपत विरहाग्नी।' –ऋ ६५. –ज्ञा १६.३९४ [प्रा; पलीवइ; सं. प्रदीपन ?]

**पळपळाट**—पु. १ भरभराट; विलपुता; उत्कर्ष; समृद्धि; अभ्युदय. २ फाजील, बेफाम वाढ; माजणें. फळफळाट पहा. [फळणें द्वि]

**पळपळाट**—पु. (क्व.) पळापळ; पळणें. [पळापळ चा अतिशय]

**पळपळीत**—वि. १ अविश्वसनीय; पुळपुळीत; मोघम; अनिश्चित; नीरस; फिक्कें (भाषण इ०). २ दुर्बळ; शेळपट; नामर्द; ढिला; निरुत्साही. ३ ढिला; शिथिल; निष्काळजी; बेफिकीर; चालढकलीचा (मनुष्य, काम). पिळपिळीत, पुळपुळीत पहा.

**पळवा**—पु. १ (उन्हाळयांत, भाजी नसेल तेव्हां) वाळवून ठेवलेली पालेभाजी (पळवा व उसरी एक नव्हे). २ झाडावरून गळालेला पालापाचोळा. 'भीम प्रतापतपनें झाले बहु शुष्क ते जसे पळवे।' –मोविराट १.१६७ ३ पालेभाजींत पीठ घालून परतून केलेली मोकळी भाजी [सं. पल्लव] **०मिरची**–स्त्री. (कर.) हिरवी वाळवलेली मिरची. 'पळवा मिरची पांढरी व कमी तिखट असते.'

**पळवाढा**—वि. अगदीं पातळ नव्हे असा, पळीनें वाढतां येण्याजोगा (शिजलेला पदार्थ). (प्र) पळीवाढा पहा.

**पळविणें**—उक्रि. १ पळविण्यास लावणें; धांवविणें; पळण्यास भाग पाडणें. २ हांकून लावणें, घालवून देणें. २ (एखादी वस्तु) हिसकून, घेऊन पळून जाणें 'कुतऱ्यानें भाकर पळविली.' ३ सोडविणें; सोडवणूक करणें; ४ नाहींशी करणें; दूर करणें; दूर सारणें. 'तुमची शंका अशेष पळवाया।' –मोआदि ११.८३. ५ पराभव करून पिटाळणें. 'भगदत्तेंहि घटोत्कच विरथ करुनि संगरीं पळविला हो।' –मोभीष्म ८.३०. [पळणें प्रयोजक]

**पळशी**—स्त्री. एक वेलीसारखें झाड. याचीं पानें पळसाच्या पानांसारखीं असतात याचा भारे वगैरे बांधण्याच्या कामीं दोरीसारखा उपयोग करितात. [सं पलाशी]

**पळशे–से**—पुअव. माध्यंदिनशाखीय ब्राह्मणजात. पळशीकर ब्राह्मण.

**पळस**—पु. पल्स; पलाश. एक झाड. 'स–सख प्रभुहि वसंतीं बहु फुलला होय हो पळस साचा।' –मोभीष्म ४.२९. [सं. पलाश] **म्ह०** पळसाला–स पानें तीनच=कोठेंहि गेलें तरी मनुष्यस्वभाव सारखाच, कोणतीहि स्थिति घेतली, तरी तीत सुखदुःखें सारखींच असतात. **०पापडी**–स्त्री. पळसाचें बी. याचा औषधांत उपयोग करतात.

**पळसुला**—पु. उपनयन संस्कारांत चौथ्या दिवशीं करावयाचा एक विधि; मेधाजनन (या विधींत पळसाच्या डहाळीच्या भोंवतीं पाणी घालावयाचें असतें). [पळस+ओला (करणें, ठेवणें)]

**पळा**—पु. मोठी पळी.

**पळाटी**—स्त्री. कापसाच्या झाडाची वाळकी काटकी. पळहाटी पहा.

**पळापळ**—स्त्री. पळण पहा.

**पळिंज–जी**—पळंज–जी पहा.

**पळित**—वि. पिकलेले (केस). पलित पहा. 'लपौनि चोरखांचेचा वोहळीं। वळीत पळितांचे ताडवन घाली।' -भाए ५२१. [सं. पलित]

**पळिताइ**—स्त्री (गो.) कुरूपपणा.

**पळी**—स्त्री. १ पातळ कालवण, आमटी, कढी वगैरे पदार्थ वाढता येण्याच्या उपयोगाचें एक लोखंडी किंवा पितळी साधन (दांडयाचें); लहान पळा; डाव. २ सध्येच्या, पूजेच्या वगैरे नित्य नैमित्तिक कर्मासाठीं उपयोगातील एक उपकरण; दर्वी. ३ चुन्याच्या घाणीच्या चाकामागून एक लोखंडी लाब दाडयाचें उलथनें घाणींतून फिरवितात तें [हिं पली] ०आडकण-न. (कर) पळी ठेवण्याकरितां असलेली लाकडी वस्तू. ०वाढा-ढ्या-वि. पळीनें वाढतां येण्याजोगा (आमटी, कढी इ० पातळ पदार्थ). [पळी+वाढणें]

**पळीव**—न (राजा.) सापास मारण्याचें त्रिशूळासारखें, दाते असलेलें हत्यार.

**पळींव**—न. १ (कु.) नांगराचा फाळ. २ लहान पावडें (पाण्याचे पाट तयार करण्यासाठीं लादे खणण्याच्या उपयोगाचें); मागें लांकडात बसविण्यासाठीं वर्तुळाकृति व पुढें खणण्यासाठीं चापट केलेलें लोखंडी हत्यार.

**पळु**—पु (कों.) एक प्रकारचा मासा

**पळूं**—न. (कों.) पळीचें टवळें, तोंड. [पळी]

**पळ्हाटी, पळाटी**—स्त्री. १ (खा. व) कापसाच्या झाडाची वाळकी काटकी. २ कापसाचें झाड. [पळ्हें]

**पळ्हें, पळें**—न. १ कापसाचें झाड. २ कापसाचें शेत, लागवड. रानकापशी पहा. [प्रा. पलहि=कापूस]

**पक्ष**—पु. १ पक्ष्याचें उडण्याचें साधन; पंख. 'फुटतील पक्ष केव्हांतरि दैवबळें तुटेलही बंध।'-मोकर्ण ६ ४४.' शुकें नळिकेशीं गोवियेले पाय। विसरोनि जाय पक्ष दोन्ही।' -तुगा ३०५२. २ चैत्रादि महिन्यांचा (चांद्रमासाचा) अर्धाभाग; पंधरवडा; शुक्ल (शुद्ध) व कृष्ण (वद्य) अशा दोन अर्धातील प्रत्येक. 'तेरा वर्षात अधिक दश पक्ष द्वादश क्षपा पडती।'-मोविराट ४.६२. ३ भाद्रपद महिन्यांतील वद्य पक्षांत (कन्या राशीस सूर्य असतां) सर्व पितरांस उद्देशून जें श्राद्धकर्म करतात तें; अपरपक्षीय श्राद्ध; महालयश्राद्ध. ४ (लढा, वादविवाद, दोघाचें काम, धर्म वगैरेंतील) बाजू; भाग; तट; तड; पंथ; भेद; प्रकार 'हा श्रीकृष्ण प्रभु ज्या पक्षीं तेथें समस्त कल्याण।' -मोभीष्म ६.२२. ५ मुद्दा; मत; तत्त्व; मूळ सिद्धांत. ६ पद्धत; रीत; चाल, संप्रदाय; विकल्प; कृतिप्रकार. ७ बाणास लावलेलें पीस, पंख. ८ प्रतिपादन करावयाचें तत्त्व; मत; प्रमेय. ९ अजमास, अनुमानाचा विषय; सिद्धांताचा प्रकार. 'म्हणौनि विश्वतश्चक्षु। हा अचक्षुच्या ठायीं पक्षु।' -ज्ञा १३ ८७७. १० जात; वर्ग. ११ वहिवाटींत जी वादीची अर्जी घेतात तिचा पर्यायवाचक शब्द. 'भाषा, प्रतिज्ञा, पक्ष हे अर्जीचे पर्यायवाचक शब्द जाणावे.' -मिताक्षरा, व्यवहारमयूख १३. १२ बाजू; पार्श्व भाग; एक अंग १३ (सामा) मतभेद, मतभेदाचे प्रकार; पंथ प्रत्येकीं. [सं.] ०धरणें-१ कैवार घेणें. २ एक बाजू पत्करणें. ०कर-कार-पु. (कायदा) न्यायाच्या कचेरींत भांडणारा वादी किंवा प्रतिवादी. ०घात-पु. अर्धांगवायु; अंगाचा कांहीं भाग चेतनाशून्य होणें. (रूढ) पक्षाघात ०पात-पु १ एका पक्षाकडे, बाजूकडे मनाचा ओढा; विशेष आवड. २ कैवार; बाजू घेणें; एका पक्षाची तरफदारी. ३ पंक्तिप्रपंच; असमदृष्टि ०पाती-वि. १ एका बाजूस किंवा पक्षास अनुकूल; तरफदारी करणारा; पक्षपात करणारा. २ कैवारी; आश्रयदाता; पाटिराखा. ०प्रदोष-पु. प्रत्येक पंधरवडयांतील प्रदोष. 'त्याच दिवशीं पक्षप्रदोषहि आहे.' -चद्र ४३. ०द्वार-न. बाजूचें दार; लहान दार. 'पक्षद्वारें विप्र बाहेर आला।' -साछ्ह ४५३. ०भिंत-स्त्री. बाजूची भिंत. ०वात-वायु-पु. अर्धांगवायु; पक्षघात पहा. ०वान्-वि पंख असलेला, सपक्ष; पंख फुटलेला. **पक्षाघात**-पु. पक्षघात-वायु पहा. **पक्षांत**-पु. पंधरवड्यातील (शुक्ल किंवा कृष्ण पक्षाचा) शेवटचा दिवस; पौर्णिमा किंवा अमावास्या. [पक्ष+अंत] **पक्षाभास**-पु १ (कायदा) खोटी फिर्याद २ (तर्कशास्त्र) खरें भासणारें पण दिखाऊ प्रमाण; सिद्धांताभास; बिनसमर्पक प्रमेय; अपसिद्धांत. **पक्षारंभ**-पु भाद्रपद वद्य पक्षाचा, पितृपक्षाचा आरंभ. **पक्षीं**-क्रिवि. एका दृष्टीनें; एका बाजूनें, विचारानें; एका अर्थी; यदाकदाचित्; विकल्पेंकरून; शक्यतर. [पक्ष याची सप्तमी विभक्ति]

**पक्षिणी**—स्त्री. १ एक रात्र व दोन दिवस; किंवा दोन रात्री व एक दिवस असा काल. २ वरील मुदतीचा आशौचकाल. 'पक्षिणी आशौच.' ३ पक्ष्यांतील मादी. 'पक्षिणी प्रभातीं चारियासीं जाय।' [सं.]

**पक्षी**—पु पंख असणारा, पंखांनीं उडणारा प्राणी; पाखरूं. [सं.] ०प्राणी-पु. ज्याला मागेंपुढें कोणी नाहीं असा, एकटा, निराधार, निराश्रित मनुष्य. [पक्ष+प्राणी]

**पक्षीं**—शअ. तर; त्याअर्थी. पेक्षां पहा. 'तथापि आपण म्हणतां त्या पक्षीं हें असो.' -कमं ४.११९.

**पा, पां**—उद्गा. १ अरे ! अहो ! बापा ! बा ! 'मना सांग पा रावणा काय जालें।' -राम १३. २ (काव्य) पादपूरणार्थ किंवा चरणांतील मात्रा कमी पडल्यास हा शब्द योजतात; याच्या समानार्थक दुसरा शब्द पै हा आहे; वाक्यालंकारार्थक किंवा निश्चयार्थक अव्यय. 'तंव उजरिया केले दैवाचिआ। ते परिसा पां।' -ज्ञा

१०. ' देवा अधियज्ञ तो काई । कवण पां इये देहीं । ' –ज्ञा ८ ४ ' कोण सोडवी तेथें पा । '- राचि १.९४.(नवनीत पृ २१७) ' मातें पाहुनि चित्र काय करितां ? कां पां ! तुम्हींही असे ! । ' –आसु ४३. ३ जरी; यद्यपि. ' झाला पां सर्वेश्वरू । धरिला जाणिवेचा अहंकारु । तरी तोही नेणें पारु । तया स्वरूपाचा । ' –विपू ३ १७.

**पाइ(ई)क(कु), पायक**—पु १ सेवक, चाकर ' आहोजी परिसा पां पाइकु । जरि होये स्वामि वंचकु । ' –ऋ ४५ २ दूत; निरोप्या; जासूद; हरकारा. ' एकाएकींच पाइक येऊन मुजरा केला आणि अर्ज केला कीं... ' –भाब ५४ ३ पायदळांतील शिपाई, सैनिक ' फिरंग ठेवी त्याला जाऊं द्या, त्याला । राखु नका तुम्ही उगारल्या पाइकाला । ' –ऐपो २१ ४ खेड्यांतील एक छोटा अधिकारी ५ (ल) दास, सेवक; अंकित, भक्त; सैनिक. ' आम्ही रामाचे पाईक । आमचा श्रीराम नाईक । ' म्ह० नऊ पायक दाहवा नायक ६ मद्रास व ओरिसा प्रांतांतील लष्करी नौकरी करणारी एक जात [ सं. पदातिक, पदिक, पत्तिक, प्रा. पाइक्क; फा. पैक् ] ०पण–न सेवा; चाकरी, दास्य. ' पाईकपणें जोतिला सिद्धांत । ' –तुगा ३७३. **पाइ(ईय)की**–स्त्री १ सेवा; चाकरी, दास्य; पायकाचा हुद्दा ' जाण ज्ञान तयापासी । पाइकी करी । ' –ज्ञा १३ ३८३. ' तेथें स्वामिनी मी स्वतंत्र । पाइकी मात्र त्वा कीजे । ' –मुआदि १ ३९ २ सेवा, दूतपणा. ' दीवकी पाइकैचेनि बीकें । जगीं भणिजतु सुनीकें । तें धाइ पांतां अससी मिषें एकें । तरी हें तूं जाणमीं । ' –शिशु ७७

**पाइट**—वि. (व) वरून खालीं उतरता, निमुळता विहीरीच्या भोंवतालचा भाग ' कामकऱ्यांनीं पॉइट खोदला आहे. '

**पॉइंट**—पु १ (मुद्रणकला) टाइपाची जाडी मोजण्याचें परिमाण हें एकबहात्तराश इंच प्रमाणाचें असतें. २ टोंक ३ बिंदु. ४ मुद्दा, विषय; हेतु, प्रकरण; बाब. ५ पायरी; प्रमाण; मर्यादा, स्थिति, अवस्था. [ इं ]

**पाइंड, पाईड**—स्त्री. लांबीचें एकचतुर्थांश इंच प्रमाणाचें एक परिमाण. [ पाव इंच ? ]

**पाइ(य)तन**—न. वहाण; जोडा. ' नाहीं पाइतन भूपतीशीं दावा । धिग त्या कर्तव्या आगी लागो । ' –तुगा ३१६२. [ सं. पादत्राण ]

**पाइमाइश, पैमाश**— स्त्री (जमीनीची) मोजणी. [फा.]

**पाई**—स्त्री. १ चवथा हिस्सा; पाव भाग; चतुर्थांश २ पाव आणा; पैसा ३ पै. ४ राहुटीच्या दोऱ्यांच्या खालच्या व वरच्या अशा दोऱ्यांच्या दोन रांगामधील अंतर. ५ तंबूच्या भोंवतालचा खंदक. [ सं. पाद ]

**पाई**—शअ. (अशिष्ट) साठीं; करितां ' तरवार मला गरिबाला कशापाई व्होई ' –मृ १८ [ सं. प्रीत्यर्थ ]

**पाई(इ)क**—पु. नद्यांच्या डोहांत असणारा एका जातीचा क्रूर व खादाड मासा. –प्राणिमो ८८.

**पाईचा**—वि पायदळातील शिपाई; सैनिक पाइक पहा. ' किल्ले अमदानगर येथें गडबडेमुळें शभर माणूस पाईचें व पंचवीस राउत नवे ठेविले आहेत. ' –वाडसमा १.९.

**पाईट**—स्त्री. द्रव पदार्थ (विशेषतः दारू) मोजण्याचें, मापण्याचें एक इंग्रजी परिमाण ' किंचित संगीत ब्रांडीची पाईट तोंडास लाविली कीं ...' –संगीत घोटाळा २ [ इं. पिंट ]

**पाईण**—न. १ पाच परतन किंवा तीस चौरस विध्याइतक्या जमीनीचें परिमाण २ एकचतुर्थांश इंच लांबीचें परिमाण; पाइंड.

**पाईत**—न. १ (अंथरूण, डोंगर, शेत इ० कांचा) पायथ्याचा भाग पायथा, पायतें पहा. २ डांग प्रदेशातील डोंगराच्या पायथ्यालगत असलेला सपाट जमीनीचा लागवडीस आणलेला तुकडा. [ पाय ]

**पाईन**—वि. पायांकडील बाजूचा; खालचा. [पाय] ०**घाट**–पु १ पायाकडील बाजूचा, खालचा घाट, याच्या विरुद्ध बालाघाट २ कर्नाटकाच्या बालेघाटाखालील पूर्वसमुद्राकडील प्रदेश. [ पाईन+घाट ]

**पाईमार्ग**—पु पाऊलवाट, पायरस्ता. ' महाल मजकुरी घाट व खिंडी पाईमार्ग.. ' –मसाप २ २ १३९ [ पाय+मार्ग ]

**पाईर**—पुस्त्री पिंपळासारखीं पण जरा लांबट पानें असलेला एक वृक्ष. ' त पाईरहि खैर किंजळ तिथे आईनही वाढती । ' –केक १२९.

**पाईरी**—स्त्री. पायरी पहा. ' पाईरीया नदीतीरीं भांडारगृहें देवद्वारीं बाधे तो सत्त्वगुण । ' –दास २ ७.२२ [ पायरी ]

**पाईळ, पायळा, पाळा**—पु. लहान कोयता.

**पाउ**—न. (ना.) जात्याची वरची तळी. –शर

**पाउ**—वि. चतुर्थांश; पाव. ' पारा पाऊसेरु भरेल । '–वैद्यक ७९. ( –भाअ १८३३ ) [ सं. पाद; म. पाव ]

**पाउखणें**—अक्रि. वाट पहाणें. ' आतां चंदनाच्या तरुवरीं । परिमळालागीं फूलवरी । पाउखणें जियापरी । लागेना कीं । '–माज्ञा १८ १७४४.

**पाउटी-ठी, पाउठणी**—स्त्री. १ पायरी; पावठणी. 'आइकें प्राणाचा हात धरुनी । गगनाची पाउटी करूनी । मध्यचेनि दादरेहुनी । हृदया आली । ' –ज्ञा ६ २७१. २ (ल.) दर्जा; योग्यता. ' मग तया पुण्याची पाउटी सरे । सर्वेंचि इंद्रपणाची उटी उतरे । ' –ज्ञा ९.३२८. [ सं. पादस्थानी=पाय+ठानी ]

**पाउ(ऊ)ड(डी)**—पुस्त्री. १ देवादिकापुढें ठेवलेली दक्षिणा, पानसुपारी. 'वैराग्याचें नवसिजें माणिजे। महातपाचा पाउड बाइजे।'—शिशु १२१. 'एक ते अवधानाचा पुरा। विडा पाऊड भीतरा।'—ज्ञा १८४६. २ वाघ्या, वासुदेव, पांगूळ इ० भिक्षेकरी धर्मार्थ 'पाउड' या शब्दानें पैसा मागतात; गोंधळयास द्यावयाचा पैसा

**पाउड**—पु. (महानु.) रिकाबी; पावडी. 'पाउडां पाउॅं घातिला।'—शिशु ५१२. [पाय]

**पाउंड**—पु पाऊल, पावंड पहा.

**पाउ(ऊ)डा**—वि. माघार घेतलेला; मागें फिरलेला, प्राहुडा -शर. [सं. परावृत्त]

**पाउण**—वि पाऊण, तीनचतुर्थांश, पाऊण पहा [सं पादोन; प्रा पाओन, पाऊन, हिं. पौन] ०की—स्त्री एक पाउणें पासून शंभर पाउणें पाऊणशें पर्यंतचे पाढे ०कें—न पाऊण, तीनचतुर्थांश; पाऊणकी तीनचतुर्थांशची कोणतीहि पट जसें—१॥, २।, ३ इ० **पाउणे आठ**—वि. १ सातपूर्णांक तीनचतुर्थांश संख्या. २ (ल.) नपुंसक; नामर्द; बुळा (पुरुष) [पाऊण+आठ] **पाउणे पांच**—चतुर्थांशानें कमी अशी पांच ही संख्या **घे मेरे पाउणे पांच**—कसल्याहि युक्तिवादानें, बुद्धिवादानें ज्याची समजूत पटत नाहीं, जो आपला हेका सोडीत नाहीं अशा व्यक्तीस उद्देशून त्रासानें हा वाक्प्रचार योजतात; येरे माझ्या मागल्या; पहिले पाढे पढ पंचावन या अर्थी. [पाऊण+पांच]

**पाउतका**—स्त्री (अशिष्ट) पादुका. पादुका पहा [पादुका]

**पाउदी**—स्त्री. दरमहा किंवा वर्षाअखेर कांहीं द्रव्य देण्याच्या करारानें दुभत्यासाठीं आणलेली गाय, म्हैस इ०; पावदुक; पावधी पहा. 'तरी कामधेनु पाउदी यावी।'—गीता २४१७०. पावधी पहा

**पाउल**—न. पाय; पादक्षेप; गति. पाऊल पहा. 'आंधळें पाउलीं वोळखावें। विचक्षणें।'—दास ९.५.२२. [पाऊल] ०पाउली—क्रिवि. पावलागणिक; पावलोंपावलीं. 'जातीं पाउलपाउली अघगणें नासोनि सर्वात्मना।'—निमा १.१९.

**पाउलवा**—पु. १ पाउलाची खूण, ठसा. २ नाचतांना केलेला ढबदार पदविक्षेप [पाऊल]

**पाउली**—स्त्री. १ कृपा; कृपादृष्टि. –मनको. २ पावली पहा.

**पाउवा**—स्त्रीअव. खडावा; पादुका 'पाउवा मी होईन। तियां मीचि लेववीन।'—ज्ञा १३.४१६. 'सोनियाच्या पाउवा पायीं ल्यायिल्या।'—वसा ७०. [सं. पादुका; प्रा. पाउआ]

**पाउसाळा, पाउसाळी, पाउसाल**—पावसाळा इ० पहा.

**पाऊ**—स्त्री. १ (कों.) फणस, अननस, रामफळ इ०कांच्या आंत शिरलेलें देंठाचें अग्र. 'फणसाची पाऊ जशी नणंद कशी?'—लोक २.७८.२ (ना. व.) जात्याची वरची तळी.

**पाऊक**—न. (बुरुडकाम) रुंदट व पातळ कामटी. [पाय=पाव?]

**पाऊखलक**—पुअव पायदळ. यांत कटकी, बाजे लोक, तुळवे, अडाऊ, लवे, तुबकी, कमानी, इटेकरी, आहीर, बाणकरी, गोलंदाज व गुंडकल हे लोक येत. –भाअ १८३४.५१. [पाऊ(व)+खलक]

**पाऊठ**—स्त्री (कु) १ जाणें आणि येणें; फेरी; खेप, येरझार २ पाळी, खेप, वेळ. 'मी चार पाऊठी गेलों आणि त्यां चार पाऊटी त्याला सांगितलें' [पाय+उठणें]

**पाऊठणी**—स्त्री पायरी, पाउटी पहा.

**पाऊड**—पुन. देवादिकांपुढें ठेवलेला पैसा, दक्षिणा. पाउड पहा.

**पाऊंड, पावंडा**—पु १ पाउंड पहा २ समांतर सारखी चाल; मोजक्या अंतरावर चालणें, दुडकी चाल [पावंड]

**पाऊण**—वि चतुर्थांशानें कमी असलेली, तीनचतुर्थांशाइतकी (संख्या, परिमाण इ०). समासात पूर्वपदीं योजतात जसें—पाउणहात, पाऊणशेर, पाऊणभाकरी इ० संख्यावाचकापूर्वी याचें पाऊणे असें रूप होतें. [सं. पाद=पाव हिस्सा+सं ऊन=कमी; प्रा पाओन, पाऊन हिं पौने] सामाशब्द— ०म्हातारी—स्त्री (तिरस्कारार्थी) साठीला टेंकलेली म्हातारी, वृद्धा, थेरडी. ०वांटा—पु १ तीनचतुर्थांश हिस्सा. २ (ल.) (विवक्षित असलेल्यापैकीं) बरीच मोठी संख्या, भाग, रक्कम. [पाऊण+वांटा=अंश, भाग]

**पाऊल**—न. १ पायाचा घोटयाखालचा भाग, तळवा. 'बोले तैसा चाले। त्याचीं वंदावीं पाउलें.' 'वाजे पाऊल आपुलें। म्हणे मागें कोण आलें।' 'सुकुमार पाउलं पोळती।'—मुक्तेश्वर हरिश्चंद्राख्यान १९६ (नवनीत पृ १९४). २ चालतांना दोन्ही पायांत, पायाच्या तळव्यांत पडणारें अंतर. 'ह्या खोलीची लांबी पंधरा पावलें व रुंदी अकरा पावलें आहे.' ३ पायाच्या तळव्याची उमटलेली खूण, ठसा, चिन्ह, आकृति. ४ चालण्याची ढब, गति, तऱ्हा; चाल 'आमच्या तट्टाला तुर्की पाऊल चांगलें साधलें.' ५ चालण्याचा वेग. 'रामाचें पाऊल हरीच्यापेक्षां सावकाश आहे.' ६ पायाच्या तळव्याची लांबी. 'सगळयांचीं पावलें हत्तीच्या पावलांत' ७ (ल.) कारस्थान. ८ (ल.) कल; स्वभाव. [सं. पद्=चालणें] (वाप्र.) ०उचलणें–उचलून चालणें–जलदीनें, झरझर पावलें टाकून चालणें; त्वरा करणें. ०ओळखणें–जाणणें–

**समजणें**-(एखाद्याचा) स्वभाव, कल इ० जाणणें. ०**जपून टाकणें-ठेवणें**-एखादी गोष्ट, कृत्य इ० विचारपूर्वक करणें; काळजीपूर्वक वर्तन करणें. ०**पडणें-शिरणें**-(एखाद्या विषयांत) गति होणें. ०**पुढें ठेवणें**-एखाद्या कार्याचा भार शिरावर घेण्यास तयार होणें. ०**पुढें पडणें**-(एखाद्या कार्याची) प्रगति होणें, (कार्य) वाढीस लागणें, पुढें पुढें जाणें; वाढणें. ०**बाहेर टाकणें**-अनीतीनें वागणें; वाकडें पाऊल टाकणें. 'पोरीनें पाऊल बाहेर टाकल्यापासून बापानें बाहेर टाकावयाचें सोडलें आहे.' -प्रेमसंन्यास. ०**माघारें घेणें-काढणें**-(एखाद्या गोष्टीपासून, कार्यापासून) परावृत्त होणें; हटणें; माघार घेणें; पाय काढणें. ०**मोजत चालणें**-१ सावकाश चालणें. २ गंभीरपणानें चालणें. ०**वांकडें पडणें**-सरळमार्ग सोडून आडमार्गानें, अनीतीच्या मार्गानें जाणें; दुर्वर्तन (व्यभिचारादि) घडणें. 'तरुण बिधवांच्या हातून वांकडें पाऊल पडण्याचा संभव असतो, असें म्हणणाऱ्यांनीं त्या गोष्टीच्या प्रतिबंधार्थ काय केलें आहे?' **वाटेचें पाऊल आड वाटेस पडणें**-घडूं नये अशी गोष्ट प्रमादानें घडणें. (एखाद्याच्या) **पाउलावर पाऊल ठेवणे**-(एखाद्याचें) सर्व गोष्टींत अनुकरण करणें. (पाऊल हा शब्द बऱ्याच अर्थांत व वाक्प्रचारांत सामान्यतः पाय शब्दाप्रमाणें आहे. आणखी बरींच उदाहरणें व वाक्प्रचार पाय शब्दात पहा) **म्ह**० १ चोराचीं पावलें चोर ओळखतो=चोराला चोर पुरतेपणीं ओळखूं शकतो २ जेथें जावें तेथें पाऊलभर पाणी=अपुरें ज्ञान. सामाशब्द. ०**बुद्धि-बुध्द-बुध्द्य**-स्त्री. १ क्षणिक बुद्धि, मनाची चचलता, छादिष्टपणा; लहरीपणा. २ -वि. (क्व.) चंचल मनाचा, छांदिष्ट, क्षणिक वृत्तीचा; लहरी. [पाऊल+बुद्धि] ०**बुध्द्या**-वि पाऊलबुद्धि अर्थ २ पहा. [पाऊल+बुद्धि] ०**मेड-ढ**-स्त्री (गो) गोठ्याच्या बाजूचा लहान खाब. [पाऊल+मेढ=खाब] ०**वाट-वट**-स्त्री घोडें, गाडी इ० ज्या वाटेनें जाऊं शकत नाहीं, फक्त मनुष्यास जातां येईल अशी अरुंद वाट, पायवाट [पाऊल+वाट]

**पाऊस**—पु १ हवेंत असलेली वाफ वितुळण्याची शक्ति कमी झाली तर ती घन होऊन मेघरूपानें दिसते व पाण्याच्या थेंबाच्या रूपानें किंवा गारांच्या रूपानें पृथ्वीवर पडते त्यास पाऊस म्हणतात.(-भिडेकृत सृष्टिज्ञान २०). धुक्याचे बारीक कण वाऱ्याच्या योगानें एके ठिकाणीं जमून हवेंतून खालीं उतरून जमीनीवर पडूं लागतात त्यास पाऊस म्हणतात. हा सृष्टीला जीवन देणारा आहे. -ज्ञाको. प. ५९. पर्जन्य; आकाशांतुन पडणारी जलवृष्टि. २ पर्जन्याचा वर्षाव, सर. ३ (ल.) मिळकत, प्राप्ति इ० कांची समृद्धि, विपुलता, रेलचेल, पूर, चंगळ. 'आजकाल बालगंधर्वांवर द्रव्याचा नुसता पाऊस पडला असता.' -नाकु ३.१३. [सं. प्रावृष्; प्रा. पाउस; हिं. बारिष] (वाप्र.) ०**उघडणें**-पाऊस पडण्याचें थांबणें; पर्जन्य खळणें. ०**उतरणें**-आकाशांत पुष्कळ ढग येऊन मोठा पाऊस पडण्याचीं चिन्हें दिसूं लागणें. ०**डोईवर येणें**-मेघांनीं आकाश भरून येऊन पाऊस पडण्याचीं चिन्हें दिसणें; पावसाळ्याच्या आरंभाचीं चिन्हें दिसूं लागणें. ०**भर**-क्रिवि. सर्व पावसाळाभर ०**हुडकणें**-पाऊस पडण्याचें अजिबात थांबणें. **पावसाचें पोट फुटणें**-मुसळधार पाऊस पडणें **पावसानें झाडणें**-पाऊस न पडणें. **-सानें डोळे उघडणें**-पाऊस बंद होणें; आकाश निरभ्र होणें. **-सानें-डोळे वटारणें-दिवा लावणें**-पाऊस पडण्याचीं बिलकूल चिन्हें न दिसणें; अवर्षणानें दुष्काळ पडण्याचीं चिन्हें दिसूं लागणें. **-सानें तोंड बाहेर काढूं न देणें**-घराबाहेर पडणें मुष्कील होण्याइतका जोराचा व सतत पाउस पडणें **-सानें भिजविलें बापानें मारलें, सरकारनें लुटलें कोणाजवळ फिर्याद करावी**-न निवारता येण्यासारख्या गोष्टी सहन केल्याच पाहिजेत अशी स्थिति असतां योजतात **पाऊस म्हणतो मी**-एकसारखी लागलेली पावसाची झड **दोनशें पाऊस**-(उप.) अतिशय थोडा, शिंपडल्यासारखा पडलेला पाऊस **पडत्या पावसांत**-क्रिवि. भर पावसाळ्यांत, पावसांत. (क्रि० येणें; जाणें; करणें). ०**काळ-ळा**-पु पावसाळा; सूर्यगत, मृग आणि हस्त या दोन पर्जन्यनक्षत्रांमधील दिवस [पाऊस+काळ] ०**पाणी** -न. पाऊस, पीक इ० कांची स्थिति; पर्जन्यमान वगैरे [पाऊस+पाणी]

**पाए, पाॐ**—पु पाय. 'कवणा बंधसोडीयाचे पाए। धरुनि राहो।' -ऋ २८ 'पाउडां पाॐ घातिला' -शिशु ५१२.[सं. पाद, हिं. पाव] **पाएमळें**-क्रिवि (महानु.) डोक्यावर घेतलेल्या ओझ्याच्या भारानें दमून गेलेल्या स्थितींत; अतिश्रमित होऊन 'कीं अनुभवाचा माथां। वाउणि सुखाचिया लोथा। तेणें पाएमळें दाटता। सादु कापे।' -ऋ ६४.

**पाक**—पु. १ अग्निसंस्कारानें (अन्न इ०) शिजविणें; स्वयंपाक; भोजनाकरितां अन्न सिद्ध करण्याची क्रिया. 'पाक सिद्ध करितां सीताबाई।' -दावि ४४. 'मग सावकारें करविला पाक।' -शनि १२०. २ फळें इ० (आढींत घालून) पिकविण्याची क्रिया. ३ पक्वता; पिकलेली स्थिति; परिपक्वपणा; पक्वपणा. 'केली फळे तंव वाढे वाढी। फळपाकें माळी झाड तोडी।' -एभा १.२२४. ४ पोटांत अन्नपचन होण्याची क्रिया; अन्नावर होणारा जाठररसाचा परिणाम ५ गळूं इ० पिकणें, पुवळणें. ६ पक्वान्न; शिजवून तयार केलेला खाद्यपदार्थ. 'इंद्रियरुचीसारखे। करविती पाक निके।' -ज्ञा ३.१२९ ७ (धान्याचें) पीक. 'मार्गशीर्ष मी मासां आंतु। जो धान्यपाक युक्तु आल्हादी।' -एभा १६.२२०. ८ परिणाम; पर्यवसान; फळ. 'जेव्हां द्राक्षीं दूध घातलें। तेव्हा वायां गेलें गमलें। परी फळपाकीं दुणावले। देखिजे जेवीं।' -ज्ञा १५.५११.

९ दहापांच औषधें एकत्र करून केलेला काढा १० महाकवि इ० कांच्या वाणीच्या, काव्याच्या ठिकाणीं असणारा रसोत्पादक गुण-विशेष, शोभा, सौंदर्य 'कालीदासाच्या काव्याचा पाकच निराळा ' ११ (सल्ला, योजना इ० कांची) परिणति, सिद्धि, सफलता १२ साखरेंत पाणी घालून उकळून केलेला रस [ सं पच्=शिजणें, तुल. गुज. पाक=पीक ] ०**कंडू**-स्त्री पोटांतील अन्नाचें पचन झाल्यावर उठणारी कंडू [पाक+कंडू] ०**निष्पत्ति**-स्त्री. १ स्वयं पाक करणें; अन्न शिजविणें. २ स्वयंपाकातील कौशल्य. [ सं. पाक= स्वयंपाक+सं. निष्पत्ति=तयार करणें, होणें ] ०**शाला-ळा-साळ**-स्त्री. स्वयंपाकघर [ पाक+सं. शाला=घर, खोली ]

**पाक**—वि. १ स्वच्छ; शुद्ध, निर्मळ; पवित्र. २ (ल) विशुद्ध अंतःकरणाचा; निष्कपट; सचोटीचा ( मनुष्य ). [ वैसं पाक. 'योमा पाकेन मनसा चरन्तम्' -ऋग्वे. फा. पाक, सिं. पाकु ] म्ह० लावली राख आणि झाली पाक ०**दोस्ती**-स्त्री. एखादी स्त्री व एखादा पुरुष या दोहोंतील केवळ पवित्र भावयुक्त मैत्री [ पाक+दोस्ती ]

**पाक, पांक**—पु साखरेंत पाणी घालून तें मिश्रण अग्नीवर ठेवून उकळून व त्यांतील मळी काढून मिठाई इ० करितां तयार करितात तो रस, चाचणी. [ सं पच्, पाक ]

**पांक-ख**—पु पक्ष. -मनको. [ सं. पक्ष ]

**पाकचंदन**—पु. तांबड्या पखाचा पोपट [पंख+(रक्त)चंदन]

**पाकट**—वि. ( कर ) लुच्चा; कपटी, सोदा.

**पाकट**—वि. (गो.) चिकटणारा; चिकट; प्रवाही ( पदार्थ ) [ पाक ]

**पाकट(पांगट)वागळ**—पु (अलीबाग, एक प्रकारचा मासा. याच्या शेंपटीला करवतीच्या दांत्यासारख्या व पुढें टोंक असलेल्या विषारी पट्या असतात माजराच्या नखांप्रमाणें ह्या पट्या तो आंत-बाहेर करूं शकतो कोणी धरण्यास आल्यास तो त्याला ह्या पट्यांनीं मारतो. या विषारी पट्यांनीं इजा पावलेला मनुष्य योग्य उपाय लौकर झाल्यास वांचतो, नाहीं तर मरतो.

**पाकटी**—स्त्री ( कों. ) आंतील दाणे पूर्णपणें पोसण्यापूर्वीच वाळलेलें भात; असल्या भातापासून निघालेले तांदूळाचे अपक्व व न पोसले गेलेले दाणे.

**पाकड**—पु. भाताच्या शेतांत उगवणारें एक तृणधान्य. ह्याची गणना उपधान्यात होते. -स्त्री. ( बे ) एक जातीचें गवत, ( वाई ) पाकडी.

**पा(पै)कडी**—स्त्री. मोहोळांतील मधमाशीची राहण्याची जागा.

**पाकणें**—अकि. १ वाढणें, अधिक होणें. २ (भि ) पिकणें (फळ इ०). 'तिर्यीं हारें गुलें आन पाकलें बोरे लावीनें तें रामाल देर्दे '=तिनें चांगलीं गोड आणि पिकलेलीं बोरें आणून तीं रामाला दिलीं. -भिल्ली २७. [ पाक ]

**पा(पां)कणें**—सकि. बुंदीच्या कळ्या, चिरोटे इ० ( साखरेच्या ) पाकानें युक्त करणें. [ पाक, पांक ]

**पांकवणें**—सकि. ( गो ) पांकाचें ( फणसाच्या चिकाचें ) रोगण करणें. [ गो पांख=फणसाचा चीक ]

**पाकवडा**—पु (कु.) देवसेवकांची पंधरा दिवसाची देवाच्या सेवेची पाळी. [ सं. पक्ष=पंधरा+म. वडा प्रत्यय ]

**पाकशासन**—पु पाक नामक दैत्याचें निर्दालन करणारा इंद्र [ सं. पाक=एक दैत्य+सं शासन=अंमल गाजविणारा, कह्यांत आणणारा ]

**पाकळ**—पु (गो ) एक तृणधान्य पाकड पहा म्ह० ( गो ) पाकळाक शिताक टाण दिवो, मागार भाताक शिताक किते घराक उजो

**पॉकलॉमालदेस**—पु ( गो. ) आंब्याची एक जात.

**पा(पां)कळी**—स्त्री १ फुलातील दलापैकीं प्रत्येक. २ संत्रें, लसूण इ०कातील प्रत्येक अलग, फोड, कुडें, कांडी इ० ३ (क्व) पाकोळी. [ सं. पक्ष. पाख, का पकळि ]

**पाकळी**—वि. पाकळ्या असलेलें ( फूल इ० ). या शब्दा पूर्वी एक, दु, ति, इ० सारखे अनेक शब्द जोडून समास बनतात. जसें:-एकपाकळी=पाकळ्याचें एकच वर्तुल असलेलें (फूल), दुपाकळी=पाकळ्यांचीं दोन वर्तुलें, रांगा असलेलें; तिपाकळी, चौपाकळी, बहुपाकळी, अनेकपाकळी इ० [ पाकळी ]

**पाकार**—पु ( नाविक गो. ) कापडाचा तागा उभा फाडून त्याचे दोन भाग करितात त्यापैकीं प्रत्येक; शिडाचा उभा तुकडा. [ सं. पक्ष ? ]

**पाकारि**—पु इंद्र: पाकशासन पहा. [ सं. पाक+अरि=शत्रु ]

**पांकारी**—स्त्री. (गो.) वहाणेच्या वरचा रुंद पट्टा चामड्याच्या ज्या तुकड्यांत शिवून टाकितात तो तुकडा.

**पाकासों**—पु. ( गो ) वांसा.

**पाकी**—स्त्री. १ व्यवहारांतील सरळपणा; चोखपणा; निष्कपटपणा; परस्परांबद्दलचा सलोखा; मनाचा शुद्ध भाव; मित्रभाव. २ ( ल. ) गुह्येंद्रियावरील केंस काढण्याचा वस्तरा, किंवा केंस काढणें [ फा पाकी ]

**पा(पां)की**—वि साखरेच्या पाकांत तयार केलेला ( पदार्थ, हलवा इ० ). ' पाकी दुध्या हलवा. ' -गृशि १.४२०. [ पाक ]

**पाकीट**—न १ लखोटा; लिफाफा. २ पैसे ठेवण्याची चामड्याची पिशवी. पुस्तकें, कागद इ० ठेवण्याची चामड्याची मोठी पिशवी [ इं पॉकेट ]

**पांकुलें**—न ( राजा. ) ( बालभाषा ) वांसरूं.

**पाकुळका, पाकुळकी, पाकुळता**—स्त्री. अंतःकरणाच्या आठ सात्त्विक भावापैकीं प्रत्येक; अष्टभाव पहा. दया, प्रेम इ० भावनानीं मनाला आलेला द्रव, गहिंवर इ०. ' आठवे मासीं अष्ट पाकुळका आकारल्या सत्वर।' –भज ८५ ' आशा मनशा। त्या पाकुळका चंचल झाल्या तिघी जणी।' [ पाकुळणें ]

**पाकु(को)ळणें**—पुक्रि. १ ( फूल, प्राणी इ० ) विगलित, शिथिल होणें, गळाठणें, जोम नाहींसा होणें, ढिलें पडणें, पेंगळणें ' तुमच्या कामात मजकडून कधींहि जरी माशी पाकुळली असेल तर पहा ' ( असें म्हणतात कीं पावसाचा भर असला कीं माशा गलितगात्र होतात म्हणजेच पाकुळण्याची अवस्था त्याना प्राप्त होते ) २ ( ल ) दयेनें द्रवणें, पाझर फुटणें, ( इच्छा, वासना इ० कानीं मन, जीव इ०) आकर्षिलें जाणें; पाघळणें 'द्रव्याकडे, स्त्रीकडे, विषयाकडे मन पाघळलें, जीव पाघ ला. ' ३ विस्कळित होणें ' साहतचि नाहीं काहीं पाकुळलें । उगल्या उगलें ढळत आहे।' –तुगा ३५१३ [ पाक=साखरेचा पाक ]

**पाकु(को)ळणें**—अक्रि. ( ताक, तेल, तूप इ० ) पाकोळी नावाच्या पतंगासारख्या पाढऱ्या कीटकविशेषानीं भरून जाणें, विकृत होणें [ पाकोळी–क्षुद्र कीटकविशेष ]

**पाकोडी**—स्त्री हरभऱ्याचें पीठ दह्यांत भिजवून त्यात मसाल्याचे पदार्थ घालून तळलेलें भजें. –गृशि १ ३५८ [पाक+वडी]

**पाकोळी**—स्त्री १ वाघुळाची एक लहान जात २ पाकळी; पुष्पदल, आरी. ' त्याचें केलें सुनाभचक्र। सहस्र पाकोळ्या भयंकर।' –कथा ३ १३ १६५ ३ ( ल. ) ( संत्रें, महाळुंग इ०कातील ) फोड, फाक. ४ चिमणीसारखा एक पक्षिविशेष. ५ लहान वाघूळ. ६ एक जातीचा पतंग, फुलपाखरूं. ७ ताक, तूप, तेल इ० विकृत करणारा बारीक व पाढरा पतंगासारखा कीटकविशेष ८ (गो.) डोकींतील एक फूल [ पांख ] ०**किनार**–स्त्री. ( खडीकामाचा धंदा ) पाकोळयांच्या आकाराची वेलबुट्टी.

**पांक्त**—वि. १ पंक्तींत, ओळींत लिहिलेला ( ग्रंथ, पुस्तक, पोथी इ० ); ओळीसंबंधीं, ओळींचा. २ ( जेवतांना ) एका पंक्तीस बसविण्यास योग्य; पंक्तिव्यवहाराला लायक ( मनुष्य ). [ सं ] ०**ग्रंथ**–पु. ग्रंथाचें मूळ ( टीका इ० भाग सोडून ). [ पांक्त+ग्रंथ ] **पांक्तोपस्थिति**–स्त्री. ( एखाद्या ) ग्रंथाचें अतिसूक्ष्म, प्रत्येक ओळीचें ज्ञान, ग्रंथांतील प्रत्येक ओळ माहीत असणें, पाठ म्हणतां येणें. [ पांक्त+सं. उपस्थिति=ज्ञान, तयारी ]

**पाक्या**—वि. स्वयंपाकी; बबर्जी ' कांहीं पाके आपल्या इच्छेप्रमाणें पाणी कमी किंवा अधिक प्रमाणात आटवितात. '–गृशि २.१२. [ पाक=स्वयंपाक ]

**पाख**—वि शुद्ध; पवित्र, निर्मळ; पाक (–वि ) पहा. ' तुका म्हणे पाख मन। नारायण तें भोगी।' –तुगा ३६७४. ' पाखस्नेहामध्यें कल्प कदाकाळीं न पडे तें करी।' –होला १०५. [ वैसं. पाक; फा पाक ]

**पा(पां)ख**—पु १ पक्ष; बाजू. ' या देहाचीं आवश्यकें। सुहृद बंधू जे कां सखे। देहाचेनि सुखावती सुखें। देह एकें पाखें त्याचाही।' –एभा २६. २१९ २ –न. छपराची उतरती बाजू; पाखें ३ उरोभाग आच्छादणाऱ्या चोळीच्या दोन भागांपैकीं प्रत्येक. ' विद्या अविद्या पाखें दोनी। दोन्ही आच्छादिले दोहीं स्तनीं।' –एरुस्व ७ ४१. ४ ( अशिष्ट ) महिन्यांतील दोन पक्षांपैकी, पंधरवड्यापैकीं प्रत्येक –भाअ १८३४. ' पाखे चंद्रपराभवाब्द अयन मध्यान्ह शुक्रे दिने।' –भाद्रै १० ३.११४. ५ पंख, पीस ' कीं पाखांचा मेरु जैसा। रहंवरु मिरवितसे तैसा।' –ज्ञा १.१३९. ' पांखांच्या फडत्कारीं उद्धरूनी नेली घारी।' –तुगा ३६८८. [ सं. पक्ष; प्रा. पक्ख; गुज पांख=पंख ] ०**वात**–पु. पंखांचा वारा. ' भंवराचेनि पांखवातें। हे कदंबिनी चाचरी जाते।' –शिशु ६८९. [ पाख=पंख+सं. वात=वारा ]

**पांख**—पु ( गो. ) फणसाचा चीक. ०**ट**–वि. (गो.) पांखासारखा चिकट.

**पाखट**—पु एका जातीचा मासा. –बदलापूर १४५.

**पाखड**—पु राताड पाकड पहा.

**पाखं(खां)ड**—न १ एका देवतेस पूज्यत्व देऊन इतर देवांची निंदा करावी अशीं जीं हिंदुस्थानांत अनेक मतें झालीं आहेत त्यापैकीं प्रत्येक, नास्तिकमत; वेदप्रामाण्यास झुगारून बुद्धिप्रामाण्य मानणारें मत, धर्मविरोधी मत; ( ल. ) वितंडवाद. ' किंबहुना उघड। आगीं भरूनिया पाखांड। नास्तिकपणाचें हाड। रोविलें जीवीं।' –ज्ञा १६ ३१५. ' हरि तुझें नाम गाईन अखंड। याविण पाखंड नेणें कांहीं।' –तुगा १११०. २ ( एखाद्याविरुद्ध रचलेलें ) कुभांड; तोहमत; तुफान; कपटजाल. ३ ( ढोंगी, दांभिक मनुष्याचें ) थोतांड; ढोंग; भोंदूपणाचें कृत्य, गोष्ट. [ सं. ] **पाखं(खां)डी**–वि. १ नास्तिक; धर्मलंड; वाममार्गी; जडवादी; वेदांना न मानणारा ( मनुष्य, मत, पंथ ). २ ( ल. ) पाखंड, थोतांड रचणारा; दांभिक; भोंदू. [ पाखंड ]

**पाखडण**—न. १ सुपानें पाखडून धान्य इ०कांतून काढलेला कोंडा, भूस, फोल इ० २ पाखडण्यासाठीं घेतलेलें धान्य. ३ धान्य इ० सुपानें पाखडण्याची क्रिया. [ पाखडणें ] **पाखडणावळ, पाखडाई**–स्त्री. धान्य इ० पाखडण्याची मजुरी. **पाखडणी**–स्त्री. पाखडण अर्थ ३ पहा.

**पाखडणें**—सक्रि. १ धान्य इ० सुपानें स्वच्छ करणें, कोंडा, फोल, माती इ०कानीं रहित करणें. ' नंतर तो रवा वेंचावा व पाखडावा. ' –पाठककृत पाकशास्त्र २२. २ ( पक्ष्यानें पंख इ० ) फडफडविणें; फडफड करणें. ' हे काळनळाच्या कुंडीं। घातली

लोणियाची उंडी। माझी पाखु पाखडी। तंव हें सरे।' -ज्ञा १३ ११०३. ३ (ल.) वगळणें; काढून टाकणें; गाळणें. 'मूळ खर्डा वाचतां त्यांतील बरेचसें पाखडून टाकतां आलें असतें.' -के २७.५.३०. [सं. प्रक्षालन; सिं. पखेडणु=पसरणें, फैलावणें] (वाप्र) (एखाद्यावर) **आग पाखडणें**-(एखाद्याचा) सर्वस्वी नाश होईल असें कुभांड रचणें, दोषारोप, चहाडी करणें; रागें भरणें; झाडणें. आग शब्दामध्यें आगपाखडणें पहा. **हात पाय पाखडणें**-मरणोन्मुख स्थितीमुळें; क्रोधावेशामुळें हात पाय इकडेतिकडे आपटणें. **पाखडींव**-वि. सुपांत घालून पाखडलेलें, पाखडून स्वच्छ केलेलें.

**पाखडी**—स्त्री. किंमत 'यांत सुगर म्हणू नये जळो गाई बटकिंचि किति पाखडी।' -राला ८०.

**पाख(खा)डी**—स्त्री १ चिरेबंदी अरुंद वाट, फरसबंदी रस्ता. २ (कों) गांवांतील घरांची आळी ३ (कु) घराची पडवी, छपरी. ४ छपराच्या पाख्याचें आडवें लांकूड. -मनको [पाखें]

**पाखनीशी**—स्त्री. शोधकता. 'पाखनीशी शोधकता' -राव्य ८.७५ [पाख=शुद्ध]

**पाखर**—स्त्री. १ पक्षी आपल्या पिलावर पंखांचें आच्छादन घालतात तें (क्रि० घालणें). २ (ल.) आसरा, संरक्षण, आश्रय; कृपा (क्रि० घालणें). 'ऐसा तूं माझा दातार। भक्तासि घालिसी कृपेची पाखर।' -व्यं १००. 'गोपाळा हे म्हणे पाखर मज त्याची। सूर्यवंशी ज्याची महिमा थोर।' ३ छाया, सावली 'ऐसी शरीराबाहेरलीकडे। अभ्यासाची पाखर पडे।' -ज्ञा ६.२११. ४ गाय, म्हैस इ०काच्या कांसेचा आंचळाचा उजवा किंवा डावा भाग. 'एक पाखर पिळली एक वासरास ठेविली.' ५ पखालीची एक बाजू, अर्ध. ६ टेकडीचा, डोंगराचा उतरणीचा भाग. ७ (घर इ०काच्या) छपराचा उतरता भाग, पाखें. -वि. कृपालु. -शर; -हंको [सं. पक्ष, म. पांख, सिं. पाखर=कृपा, दया, गुरूनें दिलेला वस्त्राचा प्रसाद.]

**पाखर**—स्त्री. १ घोडा, हत्ती इ० कांस युद्धांत शरीरसंरक्षणार्थ घालतात तें लोखंडी चिलखत. 'पताकांसि रथ कुंजर। रणीं पाडिले अपार। पांखरांसि असिवार। मारिले खरउष्ट्र रणामाजीं।' -एभा ३० ११८. 'चिलखतें, पाखरा, ताज, हुके, दारूगोळी, बाणादि सामान बरें सजून मजबूदींत असावें' -मराआ १४. २ घोडा, हत्ती इ० कांवर शोभेकरितां घालावयाची झूल, झालर. 'घोडिया बाणली मोहाळी। कंगणटोप रागावळी। पाखरा झळकती तेजाळी।' -एरुस्व ८.१५. 'रंगविले हत्ती पाखरा भरजरी जरा।' -ऐपो १११. [सं. प्रखर, प्रक्षर; प्रा. पक्खर=हत्तीची, घोड्याची झूल (-कुमारपालचरित ४४९); हिं. पाखर] **पाखरणें**-सक्रि. सिद्ध, तयार करणें. 'पाखरीला घोडा न पाहावा.' -सूत्रपाठ आचार उत्तरार्ध २०९.

**पाखर**—स्त्री. एक वनस्पतिविशेष.

**पांख(खा)र**—स्त्री. (गो) झाडाची ढोली.

**पांखरखाद**—स्त्री. फळबागा, पीक इ०कांची पक्ष्यांनीं केलेली नासाडी; खराबी -वि. पाखरांनी अर्धवट खाल्लेलें, चोचीनें फोडलेलें (फळ). [पाखरूं+खाद]

**पाखरणें**—सक्रि. १ पसरणें; उभारणें; तयार करणें. 'जो कां तुम्हीं शिक्षापिला। विद्या देऊनि कुरुठा केला। तेणें हा सैन्यसिंधु पाखरिला। देखदेख।' -ज्ञा १ ९५. 'गज पाखरिले अमित।' -वेसीस्व ७ ३. [सं. प्र+कॄ=प्रकिरणं=पसरणें; सिं पखेरणुं= पसरणें]

**पांखरपारधी**—पु. पक्षी पकडणारा पारधी. [पाखरूं+ पारधी]

**पांखरराख्या**—वि. शेतांतील पिकाचें पांखरांपासून रक्षण करणारा. [पांखरूं+राखणें=रक्षण करणें]

**पाखरा-री**—पु. घोड्याच्या अंगावरील चिलखत. पाखर पहा. -शर. 'हाणौनि सेलाटी। फोडिती पाखरां दुपटी।' -शिशु ९६९

**पाखरिया**—पु. आंब्याची एक जात. पुणें येथें हिराबागेंत या जातीचें एक आंब्याचें झाड आहे याच्या फळाचें वजन सुमारें २० तोळ्यांपर्यंत असतें. फळ पिकल्यावर त्यास सोनेरी रंग येतो. -कृषि ६७८.

**पा(पां)खरूं**—न. १ पक्षी. 'तें खादलें तेणें पाखरुवें।' -उषा ८५६. 'घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पाखरें।' -केका ४०. २ (ल.) सुंदर स्त्री; छानछबेली; रखेली 'पाच-पन्नास रुपये दरमहा झाडूं लागले कीं ... ठेव एखादें पाखरूं, किंवा आण तांबडें पाणी...' -टि ४.२४. ३ (व्यापक) फुलपाखरूं, पतंग इ० कासारख्या प्राण्यांपैकीं प्रत्येक. [सं. पक्षितर=लहान पक्षी] **पांखरासारखी वाट पाहणें**-अतिशय उत्कंठेनें व उत्सुकतेनें वाट पाहणें (चातक पक्षी स्वतःला पिण्याला पाणी मिळावें म्हणून मेघाची अत्यंत उत्सुकतेनें वाट पाहत असतो त्यावरून). **पाखरें राखणें**-पाखरांपासुन शेताचें संरक्षण करणें. 'मजसीं बोलिला उत्तर। माळ्यावर बसून राखीं पाखरें। म्यां उडविलीं असतीं तर। मरतीं उपवासें बापुडीं।'

**पाखल**—स्त्री. १ भुकेनें पोट खपाटीस लागल्यामुळें त्याला पडणारी खळी; भकाटी; भकाळी. २ (कु.) आसरा; संरक्षण. पाखर अर्थ २ व ३ पहा. [सं पक्ष; म पाख] ०**मारणें**-अक्रि. (कु.) कासावीस होणें.

**पाखलपूजा**—स्त्री. यात्रादिकाच्या वेळीं लोकाच्या गर्दीमुळें देवापाशीं खळमळ ( घाण ) जमतो तो सर्व धुवून तें स्थल स्वच्छ करून जी देवाची पूजा करितात ती. [ सं. प्रक्षालन+पूजा ]

**पाखलो**—पु. १ युरोपियन; गौरवर्ण; सोजीर. 'पणजेचे पाखले झाले भयभीत। पळाले साखळे जिव घालति तारवांत।' –सह्याद्री १६४. २ ( ल. ) (गो.) व्यवहारशून्य; आडदाड, सरळ स्वभावाचा.

**पाखवा**—पु. ( महानु. ) ( पक्ष्याच्या ) पंखामधील, पंखाखालची उबाऱ्याची जागा; पंखाची ऊब. 'अपक्षा पाखवा देउनि। जे जीव जीववी पक्षिणी।' –ऋ ५. 'मोरांचा पाखवा विश्रामतु। फणिकु देखा।' –दाव १८६. [ पाख=पंख ]

**पाखळ**—स्त्री ( तोडलेल्या फळाचा, फुलाचा ) अस्ताव्यस्त रीतीनें पडलेला पसारा. ( क्रि० पडणें ). पखरण पहा.

**पाखळणी**—स्त्री १ देवांच्या मूर्ति इ० उजळणें; स्नान इ० घालून स्वच्छ करणें. २ ( ल. ) हंगाम संपल्यानंतर शेतकरी करितात तो भोजनसमारंभ. हंगामाचें सर्व काम निवटल्याचें द्योतक असा हा समारंभ असतो. 'आज आमच्या येथें पाखळणी आहे, जेवायला या.' [ पाखळणें ]

**पाख(खा)ळणें**—सक्रि. ( यात्रा इ० काच्या आरंभीं किंवा नंतर देवताच्या मूर्तीस दहीं, दूध, तूप इ० पंचामृतानीं स्नान घालणें; शुद्ध, स्वच्छ करणें. 'जें संसारातें उन्मूळी। संकल्पपंकु पाखाळी।' –ज्ञा १३.१७२. [ स प्रक्षालन; प्रा. पक्खालण ]

**पाख(खा)ळ पूजा**—स्त्री १ पंचामृत स्नानानंतर केलेली देवाची पूजा. पाखलपूजा पहा. 'ससांग यात्रा जाली महाराजा। संपादूनिया पाखळपूजा।' –दावि १६८. २ ( ल ) ( एखाद्यास ) तिरस्कारपूर्वक हांकलून लावणें. [ पाखळणें+पूजा ]

**पाखा**—पु १ उरोभाग झांकणारा चोळीचा प्रत्येक भाग २ ( कु. गो. ) वाघुळाची लहान जात; पाकोळी, घुबड. ३ छपराची उतरती बाजू, ( प्र. ) पाखें.

**पाखाटो**—पु. पंख; पीस ( पक्ष्याचें ).

**पाखाड-डें**—न १ छपराचा, पाख्याचा एक भाग; पाखें. २ छपराची उतरती बाजू. ३ पक्ष्याचा पंख. ४ ( मेज, दार, कपाट इ०कातील ) एक पान, पाखें, फळी [ पाख ]

**पाखांड**—न. पाखंड पहा –वि. नास्तिकवादी. 'पाखाडाचे कडे। नागवीं लुंचिती मुंडे। नियोजिलीं वितंडें। ताळासि येती।' –ज्ञा १३.२१. [ सं. ] **०ज्ञान**—न. नास्तिक मत; थोतांड, बडवाद. 'मूर्ख जल्पति पाखांडज्ञान।' [ पाखांड+ज्ञान ]

**पाखाडा**—पु. सुपानें पाखडून काढलेला, निघालेला कोंडा इ० सारखा नि.सत्व भाग; फोलकट. [ पाखडणें ]

**पाखाडी**—स्त्री. १ पाखडी अर्थ १ ते ४ पहा. २ उतरत्या छपराचे उभे वासे ठोकण्यासाठीं ( घराच्या ) आढ्यापासुन कांहीं अंतरावर ( आढ्याच्या ) दोन्ही बाजूस ठेवलेल्या तुळयांपैकीं प्रत्येक; कैच्यावरील आडव्या लाकडांपैकीं प्रत्येक 'नरशरीर गृह साकडें। आढी पाखाडया तुसधीं हाडें।' –एभा ८२३३. 'पाखाडया जितक्या लांब मिळतील तितक्या असाव्या.' –मॅरट ८२. [ पाखें ]

**पाखांडी**—वि. पाखंडी पहा

**पाखाडें**—न. १ पाखाड सर्व अर्थी पहा २ पाखाडी अर्थ २ पहा.

**पाखाण**—पु दगड; पाषाण 'च्यूताकुराचा थोरकांडीं। प्रमदांचे हृदय पाखाण फोडी।' –शिशु ८२५. 'मच्छरटंक सहाया कैचें सामर्थ्य पार्थपाखाणीं।' –मोविराट ४.२२ [ सं पाषाण ]

**पाखाणणें**—अक्रि उडणें; आक्रमणें. –शर [ पक्ष, पंख ]

**पाखार**—स्त्री. ( कों. ) शिडाच्या कापडाचा लांब तुकडा. [ पाख ]

**पांखारी**—स्त्री. ( गो. ) पांख ठेवलेली, पिसें लावलेली काठी [ पांख=पीस ]

**पाखाळ**—पु. शुद्धता, पवित्रता; उज्वलता. 'बाहेरीं कर्में क्षाळला। भितरीं ज्ञानें उजळला। इहीं दोहीं परी आला। पाखाळा एका।' –ज्ञा १३.४६३. [ सं प्र+क्षल्=धुणें, स्वच्छ करणें ]

**पाखाळ**—न ( बे. ) कबूतर [ ता पारवई=पक्षी ]

**पाखाळणी, पाखाळणें, पाखाळपूजा**—पाखळणी इ० पहा.

**पाखाळा**—पु. स्वच्छता; शुद्धता –शर. [ पाखळणें ]

**पाखाळी, पाखाळीव**—स्त्री शुद्धता; निर्मळता –वि धुतलेला; स्वच्छ केलेला. 'कविता भली पाखाळीं। सुरंग दिसे।' –शिशु २३. 'करचरण तळें। जैसी कां रातोत्पलें। पाखाळीं होती डोळे काय सांगो।' –ज्ञा ६.२६५ [ पाखळणें+स्वच्छ करणें, धुणें ]

**पाखाळीं कीड**—वि. निर्णयांतीं वाईट, अहितकर ठरलेलें. 'एऱ्ही गोरी कीर कानां गोड। परी साचाचा पाखाळीं कीड।' –ज्ञा १६.१२१.

**पांखिरू**—न. पक्षी; पांखरू. 'पाखिरुवें जालीं आनंदभरितें।' –दाव १८४. 'पढविलें पाखिरु ऐसे न बोले।' –ज्ञा ११.१७० [ पांख ]

**पाखी**—स्त्री (प्र.) पाकी; पाकी ( –स्त्री. ) पहा

**पाखुडा**—वि. थोडा. 'तेहि परंतु पाखुडी।' –ग्रंथराज ३६.

**पांखुरडें**—न ( तिरस्कारार्थी ) पक्षी; पाखरूं. [ पाख ]

**पाखें**—न १ छपराची एक उतरती बाजू १ गाय, म्हैस, इ०कांच्या कांसेतील एका बाजूचे दोन आंचळ समन्वयामें

३ डोंगराच्या रांगेची उतरती बाजू; उतार. –सृष्टि ५९. ४ उरोभाग झांकणाऱ्या चोळीच्या दोन भागापैकीं प्रत्येक; पाखाडी. ' चोळिया-चेआं पाखेयां । गांठीं देऊ लागलिया । '–शिशु ६५५. [ सं. पक्ष=बाजू; म. पाख ]

**पाखो**—पु (कु.) पंख असलेला कीटक [ पांख=पंख ]

**पाखोडी**—स्त्री. ( ना ) कामकऱ्याला ( विशेषत: शेताची लागवड करणाऱ्या मनुष्याला ) दर पंधरवडयाला द्यावयाचें ठराविक धान्य, वेतन [ पाख=पंधरवडा ]

**पाखोवा**—पु पंख ' जेवीं चंद्रकिरण चकोरांसी । पाखोवा जेवीं पिलियासीं । ' –एभा ७ ४६५. [ पाख ]

**पाग**—पु. १ ( कों. ) गलबतास पिछाडीस बाधलेला नाडा; यास लहान होडी किंवा उंडी, उलंडी बांधून टेवतात २ समुद्र इ०कांत मासे धरण्याचें मोठें जाळें. ३ पगार; वेतन ४ एक प्रकारची होडी; पगार ५ ओढावयाचा दोर, ओढ; ओढण ६ बैलाच्या वेसणीस बाधलेला दोर, कासरा –स्त्री १ बंदराच्या बाहेर पडताना जहाजास द्यावा लागणारा कर. २ पटका; पागोटें. 'माथा निर्मळस केशरी पाग लपेटिली आहे । ' –सप्र ४.१७ ३ अंगावर घेतलेला शेला. 'सहज सुंदर ते नीळ तन । कनक पाग विराजमान । ' –वेसीस्व ९.११.

**पाग**—पु ( भि. ) पाय. ' ती रोद्हिही हाक्काली उठीनें मूञ, आथ, पाग तोवे ' = ती रोज सकाळीं उठून तोंड, हात, पाय धुई. –भिल्ली २७. [ सं पाद; गु. पग ]

**पांग**—पु. १ उत्कट इच्छा, आशा; तृष्णा; आसक्ति. ( क्रि० फिटणें; निवारणें; फेडणें ). ' आजि असतें वेंचिजेल । परी पाहे काय कीजेल । ऐसा पांगीं वडील । व्यवसाय मांडी । ' –ज्ञा १४. १६५. 'वर्णाश्रमाचा पाग । न करी राम नि.संग। ' –विउ ११ ६. 'वासना कुरण इचा नको करूं पांग । ' –ब ५९१. ' जिव्हा अमृतरसें वेष्ठे । अन्य रसाचा पांग फिटे । ' २ पराधीनता: ताबेदारी. ' येथ श्रवणाचेनि पागें– । वीण श्रोत्या व्हावें लागे । हे मनाचेनि निजागे । भोगिजे गा । ' –ज्ञा ६.२४. ' त्यजूनि अहंममता पांग । विचरती नि:संग हरिकीर्तनीं । ' –एभा २.५४९. ३ गरज; इच्छा; अपेक्षा. जरूरी. 'त्यासि क्षणी कोणाची दृष्टी लागे । यालागीं देवो त्या पुढें मागें । त्या सभोंवता सर्वांगें । भक्तिचेनि पागें भुलला । ' –एभा २.७१९ ; ४ उणीव; दारिद्र्य; पंगूपणा; हाल; अन्नवस्त्र इ०कांची ददात (चिंता; सामान्यत: अनेकवचनीं प्रयोग). ' जेथ वैराग्याचा पांगु फिटे । विवेकाचाही सोसु तुटे । ' –ज्ञा ४ १६४. ' मोठयाच्या पदरीं पडलें म्हणजे खाण्यापिण्याचे पांग फिटतात. ' ' हा मुलगा मोठा झाला म्हणजे तुझे पांग फेडील. ' ५ यातायात; श्रम; कष्ट. ' न लगे वेदशास्त्राचा पांग । ' –विउ ११.१७. ६ ( सावकार, उपकारकर्ता इ०कांविषयींचा ) मिंधेपणा; ओझें; ओशाळगत; संकोच; पराधीनतेची जाणीव. 'ह्या कर्जदाराचा मला पांग वाटतो. ' [ सं. पंगु=लंगडा ] ०**फिटणें**–मनोरथ सफल होणें; उणीव, यातायात, काळजी दूर होणें. ' समस्ता भक्तांचा नयनगत हा पाग फिटला । ' –सारुह ८.१६७ ०**फेडणें**–मनोरथ सफल करणें; चिंता दूर करणें. ' जेणें फेडिला पांग ब्रह्मादिकांचा । ' –राक १.७. म्ह० येतील वाग तर फिटतील पाग.

**पांगड**—स्त्री. दोर. 'कटारे, कोहते, भिंडिमाळा । पाश पांगडी शकळा । '–कृमुरा २५.१६ [ पाग=होडीला, बैलाला बांधलेला दोर ]

**पांगडा**—पु. पारतंत्र्य; पराधीनता; पंगुपणा. ' क्षुधेचिया तोंडा । मिळो कोंडा अथवा मांडा । परी रसनेचा पागडा । न करी धडफुडा तयासी । ' –एभा ७.४१२. ' अक्षै ठेवा सकळांचा । परी पांगडा फिटना शरीराचा । ' –दा ५.२.३९. [ पाग ]

**पागडी**—स्त्री. ( मुंबईत रूढ ) पगडी; घरभाडयाचा कायदा होण्यापूर्वी, भाडेकरी जागेंत येतेवेळीं त्याच्यापासुन घराचा मालक कांहीं उक्त रक्कम घेत असे ती; कधीं कधीं चाळींतला मेथा (क.रकून, भैय्या) असली रक्कम घेत असे. [गुज. पाघडी=पागोटें; म पगडी]

**पा(पां)गण**—न. ( गो. ) आदण द्यावयाची वस्तु; अहेर.

**पांगणी**—स्त्री. पागणें; अस्ताव्यस्त होणें; इकडे तिकडे फांकणें; पसरणें, पळणें. [ पागणें ]

**पागणें**—सक्रि. पागानें, जाळयानें मासे धरणें. [ पाग=मासे धरण्याचें मोठें (फेकण्याचें) जाळें ]

**पांगणें**—अक्रि. १ ( मनुष्याचा जमाव इ० ) अस्ताव्यस्त होणें. सैरावैरा पळणें, विस्कळित होऊन निरनिराळया दिशांनीं पळूं लागणें; पसरणें. ' कीं संसारसागरीं । वाग्जाळु पांगीलें ढीवरीं । ' –ऋ २४. 'जें जाळ जळीं पागिलें । तेथ चंद्रबिंब दिसे आतुडलें । ' –ज्ञा ९.१३८. –तुगा १४७४ [ सं. पद; गु पग=पाय ]

**पांगापांग-पांगी**–स्त्री. १ दाणादाण; फुटाफूट; फाकाफांक; विस्कळिकपणा. २ दाणादाण झालेली स्थिति [ पागणें द्वि. ]

**पांगणें**—सक्रि. वश होणें; परतंत्र होणें ' भक्तभावें आभारला । देवो उपकारें दाटला । यालागीं नुल्लंघवे बोला । पांगें पांगला भक्तांच्या । ' –एभा ७.४८३. [ पांग ]

**पागनीस**—पु. पागेवरील अधिकारी, कारकून. [ फा. पाग–नीस ]

**पागर**—पु. उंच वरवंडीची भिंत. –खिपु [ का. पागर; सं. प्राकार ]

**पांगरा**—पु. एक वृक्षविशेष; पांगारा पहा.

**पांगराण**—न. ( कु ) पांघरूण पहा.

**पागल**—वि. (व.) वेडा; उल्लू; खुळचट. [ सं. हिं पागल ] ०**पणा**–पु. मूर्खपणा; वेडेपणा; उल्लूपणा. ' शिवाजी महाराजांचा

अशा प्रकारचा पागलपणा हल्लींच्या चार दोन महिन्यांतलाच आहे असें नाहीं.' -विक्षिप्त १.२७. [पागल] **पागलाश्रम**-पु वेड्यांचें इस्पितळ, रुग्णालय. -घका १५३. [पागल+सं. आश्रम= घर]

**पांगेल**—न. (गो.) वर्तुलाकार जाळें. [पाग=मासे पकडावयाचें मोठें जाळें]

**पांगली-ळी**—स्त्री. एक वनस्पति; (कु) पांगळो.

**पांगवात**—स्त्री. (भि.) पंगत; मेजवानीचा समारंभ. 'एक दिही एका को वोराडा पांगवात आथी.' =एके दिवशीं एकाच्या घरीं लग्नाची पंगत होती. -भिल्ली २५. [म. पंगत]

**पांगविणें**—अक्रि. पसरणें; फांकणें. 'स्थिरावली गंगा। पांगविली म्हणे उगा।' -तुगा १९७. [पांगणें]

**पांगविणें**—सक्रि. दुबळा, परतंत्र, पराधीन, पंगु करणें. 'बहु पांगवीलों बहु नागविलों। बहु दीस झालों कासावीस।' -तुगा १५०५. [सं. पंगु]

**पांगशी**—स्त्री. झाड, पालेभाजी इ० खुडल्यानंतर त्यास फुटणारा अंकुर, धुमारा, फूट (क्रि० फुटणें). -वि ज्याचा बहर ओसरून गेला आहे असा (वेल, मिरचीचें झाड इ०). **-चा**-वि. पांगशी (-वि) पहा. **-ची तमाखू**-स्त्री. तंबाखूच्या खुंटास, ठोंबास फुटलेली दुसऱ्या बहराची तमाखू. **पांगशीचें फळ, पांगशीफळ**-न. १ (भोपळा, कलिंगड इ०कांच्या वेलास येणारें) दुसऱ्या बहराचें फळ. २ (ल.) उतारवयांत झालेलें अपत्य.

**पागळ, पागळणें**—(प्र.) पाघळ, पाघळणें पहा.

**पांगळपोवा-पोहा-पोहो**—पु. पांगुळपोवा इ० पहा.

**पांगळा-पांगु(गू)ळ**—पु. पहाटेच्यावेळीं गांवात फेरी घालून भिक्षा मागणारी किंवा नंदीबैल फिरवून उपजीविका करणारी एक जात व तींतील व्यक्ति. 'बैलाची करी वानी। पांगुळाचीया।' -ज्ञा १४.१५८.

**पांगळा, पांगा**—वि. जन्मापासून किंवा कांहीं विकृतीमुळें ज्याचा एक अथवा दोन्ही पाय निकामी झाले आहेत असा (मनुष्य). (अशा मनुष्याचा) लंगडा, लुळा (पाय); पंगु; लंगडा; लुळा. २ अपूर्ण; अपुरा (उपाय, इलाज). 'इच्छा बळावलेली आणि इलाज अगदीं पांगळा, अशी अवकळा जीवाला वेड लावते' -राजसंन्यास ५४. [सं. पंगु; सिं. पिंगुलो]

**पागळी**—स्त्री. (बे.) १ कवलाच्या पन्हाळींतून पडणारें पाणी; पागोळी. २ छपराचा शेवट. [पाघळणें+ओळ]

**पागा**—स्त्री. १ घोडशाळा; घोड्यांचा तबेला. २ (सामा.) पुष्कळ घोडे बांधण्याचा तबेला. ३ एका अम्मलदाराच्या हाताखालीं असलेली घोडेस्वारांची टोळी, पथक, दळ; रिसाला. यांत दोन बगारजी, एक लगीदार, एक निशाणदार, एक शिंगाड्या, एक शुतरी (उटावरील) नौबत, एक दफेदार व दहा स्वार असतात. -ऐरापुप्र ४.२६९. ४ एकाच धन्याच्या मालकीचा घोड्यांचा समुदाय, पथक. [फा. पाय्-गाह्] **पागेस लागणें**-१ (एखाद्याच्या) ताब्यांत दिला जाणें; स्वाधीन केला जाणें. २ (एखाद्याच्या) धोरणानें वागणें. ३ (एखादी वस्तु) जेथल्या तेथें ठेविली जाणें **पागेस लावणें**-१ (एखाद्याच्या) हवालीं करणें; ताब्यांत देणें. २ (एखाद्याच्या) तंत्राखालीं ठेवणें. ३ जेथल्या तेथें, योग्य स्थळीं ठेवणें. ४ सरकारी पागेंत (घोडा) जमा करणें. **पागेची मुजुमदारी**-स्त्री. पागेवरील मुजुमदाराचा हुद्दा, काम. 'नारोपंतास पायरी पायरीनें वाढवीत शेवटीं आपल्या पागेची मुजुमदारी दिली.' -स्वप ५३. **पागेचें तट्टू**-न. १ (घोड्याच्या) पागेंतील तट्टू. २ (ल.) चुणचुणीत, चलाख माणूस, मूल. **०जुमलेदार**-पु पागेवरील एक अधिकारी. हा जाप्त्या प्रमाणें कामें करून मुख्य सेनापति व प्रधान यांच्या समागमें काम पहात असे. -इतिहास व ऐतिहासिक २२.२४ **०दार-पागेदार**-पु पागेवरील मुख्य अधिकारी. **०नवीस, पागनवीस, पागनीस**-पु पागेचा जमाखर्च इ० काम पहाणारा कारकून. [फा.] **पागेकरी**-पु. १ पागेंतील मनुष्य. २ पागेचा मालक.

**पांगा**—वि. १ पांगळा; लंगडा; लुळा; पंगू. २ (ल) फिक्का; निस्तेज. 'अन्याचें तेज किती काळाचें तेज त्यापुढें पांगें।' -मोकर्ण ४६.१२ ३ (राजा.) वांकदार पाय असलेला; फेंगडा (पाय). [पगु]

**पाँगॉ, पोंगयॉ**—वि. कुबडा; पाठीवर आवाळूं वाढलेला; पोंक निघालेला. [गो. पोंग]

**पागाणी**—स्त्री. (कों.) पागोळी पहा.

**पागार**—न. (कु.) बांगडा, पेडवा इ०मासे पागण्याचें जाळें.

**पागार**—पु. धान्याचें बीं पेरण्याचें एक लांकडी औत.

**पागार**—पु पदर. 'अश्वपति नरपति पुण्य पागारीं। धर्मशील धर्मऐसा धर्मविचारी।' -वसा १२. [पागोरा]

**पागार**—वि. (महानु.) रक्षक; रक्षणकर्ता. 'जो पांडवां पागारू। वैरिआं बडिवारू।' -शिशु ७३१.

**पांगार**—पु. (कों.) होडीचा एक प्रकार; पिंगे. पगार पहा.

**पांगारा**—पु. एक वृक्षविशेष हा मोठा असतो. याचे पांढरा व तांबडा असे दोन प्रकार आहेत. पांढरा पांगारा क्वचितच आढळतो. याचें लांकूड हलकें असतें. तरवारीचीं म्यानें व मुलांचीं खेळणीं याच्या लांकडाचीं करितात.-वगु ४.५९. [देशी-पांगारा] म्ह० (गो.) पांगारा मातलो म्होण पाटयेक उपकारा ना=पांगाऱ्याचें झाड कितीहि वाढलें म्हणून त्याचा वहालाला उपयोग होणार नाहीं.

**पांगित्व**—न. प्रसर. -मनको. [ पागणें-पसरणें ]

**पांगि(गी)ला**—वि. १ दुसऱ्यावर ज्याच्या पोषणाचा भार आहे असा; मिंधा; ओशाळा, अंकित; पराश्रित. 'या पोटाकारणें गा झालों पांगिला जना।' -तुगा ३४९ २ (ल.) चिकटलेला; दुसऱ्यावर अवलंबून असलेला. ३ शरण आलेला. 'एका जनार्दनीं अंबे तुजला पांगिले जन।' -भज ७५. ४ अधु; पंगु; दुबळा. 'येक देहाचे पांगिले। ते आंगीं हुपेळले।' -दावि ४०३. [ पांग ]

**पागी**—वि. (गो.) मासे पकडणारा कोळी [ पाग=मासे पकडावयाचें मोठें जाळें ]

**पागी**—वि (कु नाविक) नावेच्या नाळीवर बसणारा.

**पांगी**—स्त्री ओशाळगत; मिंधेपणा; पराधीनता. -शर. [ पांग ]

**पागुडें**—न (महानु.) पायांतील अलंकारविशेष. 'अंदु पायवटें पागुडें पदका साखळी। हीरे झळकती सातां आगां लेणें।' -धवळे उत्तरार्ध ३३ [ पाय+गु डें ? ]

**पांगुतणें**—अक्रि. व्याप्त, आच्छादित होणें; पायापर्यंत व्यापलें जाणें 'आंतु महानंदा चेइरें जाहलें। बाहेरि गात्रांचें बळ हारपोनि गेलें। आपाद पांगुतलें। पुलकांचलें।' -ज्ञा ११ २४६. [ पग=पाय+गुतणें ]

**पांगुरणें**—सक्रि. (गो) पाघरणें; झांकणें. [ पांघरणें ]

**पांगुरविणें**—सक्रि (महानु) लपविणें. 'वालिपेचिआं उल्ली। पाइंचीं नूपुरें पांगुरविलीं।' -शिशु १७५.

**पांगु(गू)ळ**—वि १ पंगु; पांगळा (-वि.) पहा. 'देवा पांगुळ एकादें विरजे। तरी जन्मौनि जोजारु साहिजे।' -ज्ञा ४.३४. 'नरदेह पागुळ असतां। तरी तो कार्यास न येतां।' -दा १.१०.२८. २ स्थिर. 'मोतियाची कीळ। होय मोतियावरी पांगुळ।' -अमृ १.५७ [ सं. पंगु ] ०**गाडा**-पु लहान मुलाना चालण्यास शिकविण्याचा तीनचाकी गाडा [ पांगुळ+गाडा ]

**पांगु(गू)ळणें**—अक्रि. १ पंगु होणें; गति खुंटणें; थोटावणें 'एथ वेद मुके जाहाले। मन पवन पांगुळले।' -ज्ञा १०.६४. २ (ल.) कुंठित होणें; स्तिमित होणें; खुंटणें. 'माझ्या मूर्खपणाचा पार। पाहतां विचार पांगुळे।' -एभा ८ २१६. [ सं. पंगु ]

**पांगूळ**—पु. १ एक पहाटे येणारा भिक्षेकरी. पांगळा (-पु.) पहा. २ घाण सोडणारा एक किडा; पिंगूळ; पागूळ किडा. ३ अंगावर ठिपके असलेला घुबड, (प्र) पिंगळा [ देशी; सं. पंगु ] ०**किडा**-पु पिंगूळ, पांगूळ अर्थ २ पहा. ०**बैल**-पु. पांगूळ या नांवाच्या भिक्षेकऱ्याचा नंदीबैल. ०**वेळ**-स्त्री पांगूळ भिक्षेकऱ्याची गांवांत भिक्षेकरितां फेरी घालण्याची वेळ. ही साधारणपणें पहांटेस एक तासभर असते.

**पांगूळ**—वि. १ पागळा; पंगु लंगडा 'गूळ क्ष्वेडचि वाटे मज तातविचार होय पागूळ।' -मोकृष्ण ८३.१९. २ कुंठित; खुंटलेला. 'कापूर आणि परिमळु। निवडूं जातां पांगूळु। निवाड होये।' -अमृ १२३. [ सं. पंगु ] ०**काठी-घोडा-धिरा**-स्त्रीपु १ लंगड्या मनुष्यास चालतांना आधारभूत असलेली काठी, कुबडी २ (ल.) पांगळ्यांचा, दुबळ्यांचा, दीनाचा कनवाळू, मित्र, साहाय्यकर्ता. ०**गाडा-गाडी**-पुस्त्री. पांगुळगाडा पहा. ०**पोवा-पोहा-पोहो**-पु पांगळ्या, दुबळ्या, लंगड्या मनुष्यांचा जमाव, टोळी; सामान्यतः प्रवास करणाऱ्या असल्या स्त्रिया व मुलें याच्या जमावास उद्देशून वापरतात. [ पांगूळ+पोवा=जमाव, समूह (यात्रेकरू, प्रवासी) ] ०**वाडा**-पु लुळ्यापांगळ्या लोकाच्या वस्तीचा मोहल्ला, पुरा, पेठ [ पागुळ+वाडा ]

**पागें**—न. (गो) लहान होडी झाड इ०कास बांधून ठेवण्याचा दोर [ पाग ]

**पांगेरा**—पु. पांगारा पहा.

**पागोटी**—स्त्री (व) लहान पागोटें, पगडी.

**पागोटें**—न. १ पुरुषांचें डोकीस बांधावयाचें सुमारें हातभर रुंद व पन्नासपासून सव्वाशें हात लांब असें वस्त्र. (क्रि० बांधणें; घालणें; ठेवणें). २ पगडी. -शर [ का पागु, गु. पाघडी ](वाप्र) ०**खालीं करणें**-(एखाद्यानें) एखाद्याच्या नावास कालिमा आणणें; (एखाद्याचा) दुर्लौकिक करणें 'मुलानें बापाचें पागोटें खालीं केलें' ०**गमाविणें**-(व्यवहार इ०कांत) टोकर खाणें; अपमान करून घेणें; फसविलें जाणें, अपकीर्ति होणें. ०**गुंडाळणें**-(ल) (एखाद्यास) लुबाडणें, भोंदणें, मुंडणें; चट्टी बसविणें, ठेवणें. ०**घेणें**-स्वतः न फसता दुसऱ्यास फसविणें, चकविणें; दुसऱ्यास फसवून आपला फायदा करून घेणें. ०**टाकणें**-सर्वसंगपरित्याग करून संन्यासी होणें. ०**पडणें-पालथें पडणें-वांकडें होणें**-(एखाद्याची) फजीती होणें. ०**बांधणें-बांधून देणें**-(एखाद्यास) पागोटें इनाम देणें, पागोट्याचा अहेर करणें. ०**बाळगणें, पागोट्याची लाज धरणें-बाळगणें**-स्वतःचा नांवलौकिक राखणें; नांवलौकिकाची चाड बाळगणें. ०**वागविणें-सांभाळणें, पागोट्याचे पेच संभाळणें**-(धंदा, व्यवहार इ० कांत) स्वतःची पत राखणें; बोज सांभाळणें; पत कमी होऊं न देणें. -**ट्याचे पेच गळ्यांत येणें**-केलेलें कृत्य अंगलट, गळ्याशीं येणें; (स्वतःच्या) दुष्कृत्याचीं, फळें भोगणें. -**ट्यास फुलें बांधणें**-(एखाद्याचें) आर्जव, करणें, लुटुपुटु करणें; एखाद्यास गोंजारणें; फूस लावणें; खुशामत करणें. **आपलें पागोटें बगलेंत मारणें**-मारामारीस, भांडणास सिद्ध होणें, कंबर बांधणें; बदनामी करणाऱ्या कृत्यांत भाग घेण्यास तयार होणें. **पागोट्याचा धनी**-पु. (सामा.) (व्यापार इ० कांत)

पत असलेला, ऐपतदार, अब्रूदार मनुष्य. म्ह० आपल्या पागोट्याशीं भांडावें=अगोदर आपल्या घरची स्थिति नीटनेटकी करावी व मग दुसऱ्याच्या गृहस्थितींत दोष काढावे.

**पागोडा**—पु १ दक्षिण हिंदुस्थानांतील हिंदू देवळांना यूरोपियनांनीं दिलेलें नांव. २ मद्रासेकडील एक सोन्याचें जुनें नाणें यावर देवळाची आकृति असते [ पोर्तु. पागोद् ]

**पा(पां)गोरा**—पु १ रोंविलेल्या खांबास दोर इ०कांचा दिलेला तणावा. २ मासे पकडावयाच्या जाळ्याची दोरी ३ पिशवी, कसा इ०काचा बंद. ४ चाबकाची दोरी, वादी ( जिनें मारावयाचें ती ). ५ ( वस्त्र, अंगरखा इ० कांचा ) लाब, फडफडणारा टोंकाचा भाग, पदर. ६ वृक्ष, वेल इ० कांच्या मुळांशीं फुटणाऱ्या व चोहोंकडे जाळ्याप्रमाणें पसरणाऱ्या तंतुरूप मुळ्यांपैकीं प्रत्येक 'मुळ्याचे बारीक पागोरे। तेणें पंथें उदक भरे।'–दा ९.६ ८६ ७ वेली आपल्या आधारभूत वस्तूस ज्यानें आवळून धरितात तो तंतु, ताणा ८ धान्याचें पीक, गवत इ०कांच्या कापून राहिलेल्या खुंटांना, टोंकाना पुन. फुटलेला अंकुर, फूट, पात, काडी 'तरी महदहंकारा। लागुनियां धनुर्धरा। तृणातीचा पांगोरा–। वरी पै गा।'–ज्ञा १५ ८७८. ९ गोफण. 'तेथ शुक बैसला सोंकारा। तेणें फोडिला हरिकथापांगोरा। पापपक्ष्याचा थारा। उडविला पुरा नि.शेष।'–एभा ३१ ४८३. 'नाहीं यमाचें चोरटें। विठ्ठलपागोऱ्याच्या नेटें।'–तुगा ३६०. १० घोंस. 'नेत्र संकीर्ण मनोहरे। जैसे रत्नाचे पागोरे।' –कथा १.१.१६. ११ डोंगर इ०काची शाखा, फाटा १२ नदी इ०कांचा फाटा १३ (ल) संबंध; धागा, दुवा १४ ( भाषण इ०कास फोडलेला ) विषयांतररूप फांटा [ म पाग=जाळ्याची दोरी+दोरा ] ०**फोडणें**–फाटा फोडणें –शास्त्रीको.

**पागोळी(ळी), पागोळा**—स्त्रीपु १ इमारतीच्या पाख्यावरील पर्जन्य इ०कांचें पाणी जमीनीवर पडावयास जेथून सुरवात होते तो इमारतीच्या छपराचा भाग; छपराची खालची धार. २ इमारतीच्या पाख्यावरून खालीं जमीनीवर पडणारी ( पर्जन्य इ०कांच्या ) पाण्याची धार; पावळी. ३ ( ल ) वळचणीच्या पाण्यासारखी ( डोळे इ०कांतून वाहणारी ) पाण्याची धार. [ पाघळणें+ओळ ] **पागोळ्या सोडणें**–( ल. ) रडणें.

**पाग्या**—पु. १ रिसाल्यावरील घोडदळावरील अधिकारी 'तमाम पागेपतके बेरोजगारी घेऊनि कुतके।'–ऐपो २५२. २ घोडदळांतील घोड्यावर देखरेख ठेवणारा, घोडशाळेवरील हवालदारासारखा अधिकारी. ३ पागेचा मालक. [ पागा; हिं. पाग्या ] म्ह० आधीं होता वाघ्या दैवयोगें झाला पाग्या, त्याचा एळकोट राहिना मूळस्वभाव जाईना. –तुगा.

**पांग्रु(घ्रु)ण**—न. ( गो. ) पांघरूण.

**पांघरणें**—उक्रि. १ (पोट, पाठ इ० विवक्षित अवयव झाकले जातील अशा तऱ्हेनें वस्त्र इ० ) अंगावर घेणें; आच्छादणें. पांघरणें हा धातु, (पागोटें, अंगरखा इ०) घालणें, तसेंच नेसणें ह्या धातूंहून अर्थानें भिन्न आहे व त्याच्या ऐवजीं ह्याचा उपयोग कधींहि होत नाहीं २ पाहाणें –मनको. [सं प्रघृण्ण्–पाघरण–पांघरणें; घृण्ण्=घरणें, घेणें –राजवाडे भाअ १८३३ सं प्रांगावरण, प्रा. पावरण]

**पांघरूण**—न १ पांघरलें जाईल अशा तऱ्हेनें अगावर घ्यावयाचें, धारण करावयाचें वस्त्र. उदा० शेला, शाल, रजई इ० 'भक्ति पांघरूण तें माझें सांडलें। मज वोसंडिलें संतजनीं।'–रामदास–स्फुट अभंग ४१ (नवनीत पृ. १५३) 'आणलें जरतार पाघरूण।'–ऐपो ८८३ २ (अनेकवचनीं प्रयोग) पाघरण्याच्या, नेसण्याच्या पोषाखाच्या उपयोगाचीं वस्त्रें समुच्चयानें 'परटाकडचीं पांघरुणें आलीं नाहींत' ३ ( ल ) ( आपल्या ) निर्वाहाचा, संरक्षणाचा भार ज्यावर आहे असा पुरुष, व्यक्ति, आईबाप, यजमान, आश्रयदाता इ० 'राजा राज्याचें पाघरुण' 'आई हें मुलाचें पाघरूण ' [ सं प्रागावरण ८ सं प्रावरण. प्रा पावरण; पंगुरण–पाइ] ०**करणें**–वस्त्रें इ० धारण करणें, पोषाख करणें. या अर्थी वाक्प्रचाराचा प्रयोग अशिष्ट असून प्राय तो युरोपियनाच्या नोकरांत 'कपडा करना' या हिंदी वाक्प्रचाराप्रमाणें रूढ आहे घालणें, घेणें इ० क्रियापदासह प्रयोग शिष्ट आहे. ०**घालणें**–( ल ) वाईट गोष्ट, गुन्हा इ० छपविणें, झाकण्याचा प्रयत्न करणें, उघडकीस येऊं न देणें. 'ते ( गुन्हेगार लोक ) आपल्यावर पांघरूण घालणाऱ्या गांवकामगाराना पानसुपारी देतात.'–गुजा ३१ **पांघरुणें जाळणें**–पत्राचा जबाब मिळण्यासाठीं पूर्वीच्या काळचा धरणें घेण्याचा एक प्रकार; त्रागा करणें. 'खिजमतगारानीं पांघरुणें जाळलीं तथापि हुजूर न आले.'–पया ११८.

**पाघळ**—पु गूळ, साखर इ० पदार्थास सुटणारा द्रव, पाझर; ओघळ [ पाघळणें ]

**पाघळणी**—स्त्री वितळण्याची, विरघळण्याची किंवा ठिबकण्याची क्रिया. गूळ; साखर इ०कांस द्रव सुटणें. [ पाघळणें ]

**पाघळणें**—अक्रि. १ ( ओलें वस्त्र इ० कांतून पाणी इ०कांसारखा द्रव ) गळणें, ठिबकणें; टपकणें 'ओंजळीवरी ओंजळी हात ओले पाघळती।'–वसा ५०. २ गूळ, साखर इ० पदार्थ हवेंतील उष्णतेनें द्रवानें युक्त होणें; पाझरणें; चिघळणें. [सं. प्रगलन; हिं. पाघलना ] **पाघळत येणें–जाणें**–(ल) मानखंडना, तेजोभंग होऊन खालीं मान घालून जावें लागणें, जाणें **जीभ पाघळणें**–बोलण्याच्या भरांत भोसळटपणानें न बोलावयाच्या गोष्टी बोलून जाणें

**पांगुरण**—न ( व ) पांघरूण; वस्त्र; कपडा. [ पांघरूण ]

**पांघुरणें**—उक्रि. पांघरणें पहा.

**पांघुरविणें**—सक्रि लेवविणें; आच्छादित करणें. 'सेना वसनें सर्व जगती। पाङ्घुरविलीं समर्थें।'–मुआदि १५.३१. [ पांघरणें ]

**पाच**—स्त्रीपु. हातभर उंच वाढणारें एक क्षुद्रुप. याच्या पानांस व तुऱ्याना चागला वास येतो व त्यापासून अत्तर काढतात आसाम, मध्यप्रांत वगैरे प्रदेशात हें झाड विशेष आढळतें -झाको प ६०. ' तिनें आपल्या बागेंत मरवा, पाच वगैरे झाडें लाविली होतीं ' -पाव्ह ४१ [ हिं. पाच; गुज पानडी ] ०**पाला**-पु. पाच या झाडाचा पाला. -मुंम्या ११०.

**पाच**—पुस्त्री. वैडूर्य मण्याच्या जातींतील एक हिरव्या रंगाचें रत्न. यास फारशींत जमरूद म्हणतात. -झाको प. ६१. या वैडूर्य जातीच्या रत्नाचा रंग पोपट, वेळूचें पान, हिरवें केळें याच्यासारखा असतो. हिरव्या रंगात सोनेरी झाक असल्यास त्यास पन्ना म्हणतात. पाचेचें तेज कोमल असतें. ब्राझिल, पेरू वगैरे देशांत हें रत्न सापडतें. याची पोटजात सागरराज ( मार्गानाइट् ) ही हिरव्या गवती रंगाची असते तिला चारा असें म्हणतात. ' पाचहि हिरवी गार लेशिल '-शारदा अंक ३.प्र.१.[सं.] ०**बंद**-वि. पाचेच्या खडयाची फरशी केलेली जमीन. 'मातेनें कृष्ण धरून करीं। पाचबंद भूमीवरी। हळू हळू चालवित।' -ह ५.६०.

**पांच**—वि. १ अनुक्रमानें चार या संख्येच्या नंतर येणारी संख्या, ५. २ चार या शब्दाप्रमाणेंच थोडकीशी संख्या निर्दिष्ट करतांना योजितात. पंच; निवाडा करणारे. ' बहिणी म्हणे पांचामध्यें घेई आण। मग मी जाईन कळे तेथें।' -ब ४९४. 'त्याजपाशीं पांच रुपये आहेत.' 'पांच करतील तें आपण करावें.' [ सं पंचन्; प्रा. पंच, हि. पॉच, सि. पंजो; फ्रेंजि. पंच ] **पांच तेथें परमेश्वर, पांचामुखी परमेश्वर**-पाच शिष्ट लोक म्हणतील तें खरें; एखाद्या गोष्टीची पाच संभावित माणसांनीं शहानिशा करून दिलेला अभिप्राय ईश्वराच्या अभिप्रायाइतकाच ग्राह्य असतो. ' पांचां मुखि परमेश्वर म्हणुनी तया देउनि माना।' -टिक १४८. **पांचाची पांचबुध्दि किंवा पांचाचे पांच प्रकार**-निरनिराळया माणसांचीं निरनिराळीं मतें असतात, एकमत होत नाहीं. या अर्थी. **पांचावर धारण बसणें**-पूर्वी लष्करात रुपयास पांचशेर धान्य झालें म्हणजे अत्यंत दुष्काळाची स्थिति होई व ती फार भयंकर महागाई वाटे यावरून लक्षणेनें-पंचप्राण निघून जातात कीं काय अशी अवस्था होणें; गर्भगळित होणें, अत्यंत विस्मित व भयभीत होणें. **पांचांतून उठणें**-माणसांतून उठणें; समाजाशीं बेपर्वाईनें वागणें; समाजबाह्य होणें, वर्तन करणें. म्ह० माझें घ्या आणि पांचांत न्या. सामाशब्द- ०**अवस्था**-स्त्रीअव. जीवानें भोगावयाच्या पांच अवस्था जागृति, स्वप्न, निद्रा, तुर्या व गताव्रुत्ती अशा पांच अवस्था. 'जागृति स्वप्न आणि निद्रा। गताव्रुत्ती तुर्या पुत्रा। या पांच अवस्था विचित्रा। असती देहीं।' -कथा ५.७.२३. ०**कुल**-न. (कर.) पांच वस्तूंचा चिंचोके इ०कांचा समुदाय. ' पांचकुलाचें आकुल कर.' ०**खाणी**-स्त्रीअव. सृष्टीच्या, सृष्ट पदार्थांच्या उत्पत्तीचे पांच प्रकार.-(अ) मानसिक, (आ) जरायुज, (इ) अंडज, (ई) स्वेदज, (उ) उद्भिज. -हंको [पाच+खाण=उत्पत्तिस्थान] ०**चार नऊ**-(तिफाशी सोंगट्याच्या खेळात) तीन फांशावर अनुक्रमें पाच, दोन व दोन असें पडणारें तिफांशी सोंगट्यांतील दान. ०**जिन्नस**-पुअव (न्यायशास्त्र) न्यायांतील बत्तीस पदार्थांचे खालीलप्रमाणें पांच जिन्नस कल्पिले आहेतः-(अ) पांच भूतें व पांच खाणी मिळून दहा (आ) पांच कर्मेंद्रियें व पांच प्राण एकूण दहा. (इ) पाच ज्ञानेंद्रियें, मन व बुद्धि मिळून सात. (ई) मूळ माया, विद्या व अविद्या मिळून तीन. (उ) जीव आणि ईश्वर हे दोन. -हंको. ०**तीन आठ**-(तिफांशी सोंगटयांचा खेळ) तीन फांशांवर अनुक्रमें पांच, दोन व एक असें पडणारें दान. ०**दोन सात**-(तिफाशी सोंगटयाचा खेळ) तीन फांशांवर अनुक्रमें पांच, एक व एक मिळून झालेलें दान ०**धारी, पंचधारी निवडुंग**-पुन. पाच कडा, कोरा, धारा असलेली निवडुंगाची एक जात ०**पंचकें**-नअव. (वेदांतशास्त्र) पंचवीस तत्त्वें. याचे पुढील ओवींत सांगितल्याप्रमाणें पाचापाचांचे गट आहेत- ' अंत:करण प्राणपंचक। ज्ञानेंद्रियें कर्मेंद्रियें पंचक। पांचवें विषयपंचक। ऐसीं हे पांच पंचकें।' -दा १७ ८ १५. [पांच+पंचक=पाचांचा समुदाय, गट] ०**परतणें**-न. लग्नानंतर वर वधूला घेऊन घरीं आला कीं तो पाच दिवस आपल्या घरीं राहून वधूसुद्धां परत तिच्या माहेरीं जातो तो प्रकार. -बदलापूर १२०,१५०. [पांच+परतणें] ०**परतावण**-स्त्री. (गो) माडवपरतणी. ०**पर्यावण**-न (कु) लग्न लागल्यावर वधू पतिगृहीं गेल्यावर पुन. चार, पांच मंडळीसह वधूवर वधूच्या पितृगृहीं येतात तो विधि, पांच परतणें पहा. ०**पाखांड**-नअव. (प्र) पचपाखंड, पंचपाखंड पहा. ०**पाखांडी**-वि. पंचपाखांडी पहा. ०**पाट**-पुअव. एखाद्याची धिंड काढतांना त्याला विद्रूप करण्याकरितां वस्तऱ्यानें त्याच्या डोक्यावरील केसांचे पाच पट्टे काढीत ते. [पांच+पाट=पट्टा] ०**पांडव**-पुअव. धर्म, भीम, अर्जुन, नकुळ व सहदेव हे पडुराजाचे पांच पुत्र [पांच+पांडव=पंडुचा मुलगा] ०**पाली-पाली भाजी**-स्त्री. (राजा.) उडीद, चवळी माट, पोकळा. इ०कांचे चार, पाच प्रकारचे पाले एकत्र करून त्यांची केलेली भाजी. ०**पावली**-स्त्री. (व.) मंगलकार्यांत तळहात व पाय याना हळद व कुंकू याचे पट्टे ओढण्याचा विधि. 'वर मायला पांचपावली करा.' ०**पावली**-स्त्री. लांब अंतरावर असलेल्या देवतेस केलेला नवस कांहीं अडचणीमुळें फेडण्याचा राहिल्यास, लांबणीवर पडल्यास, त्या देवतेच्या स्थानाच्या दिशेनें कांहीं पावलें चालून जाऊन कांहीं वेळानें घरीं परत येण्याचा एक प्रकार, विधि. [पांच+पावलें] ०**पावली**-स्त्री. सापाची एक जात. ही हातभरापेक्षां कमी लांब असून बोटभर जाड असते.

हिला चार पाय असतात ही चावली असता माणसास पाच पावलेंहि चालून जाऊं देत नाहीं म्हणून हीस हें नाव सापसरडी असेंहि हिचें दुसरें नाव आहे –बदलापूर ३४८. [पाच+पावलें] ०पिसें–न १ वेड; भ्रम, भ्रांति 'मज तुवा केलें जी तैसें। माझें मीपण धाडूनि देशें। स्तुतिमिषें पांचपिसें। बाधलें वाचे।' –माज्ञा १८. १८. २ वर्णन.–मनको,–हंको. [पाच=अधिक+पिसें] ०पोषाख–पु. पोषाखातील पांच वस्त्रें इ०. 'शिवाजीमहाराज पाच पोषाख नटला।'–ऐपो ३२ [पाच+पोषाख] ०प्रमाणें–नअव शब्द, आप्तवाक्य, उपमान, अनुमान व प्रत्यक्ष अशीं पांच प्रमाणें. ०पालव–पुअव. १ पंचप्राण 'ऐसें अपार तुझें केलें। एकी वाचा काय मी बोलें। परि पाचही पालव मोकलिले। मजप्रती।' –ज्ञा ११.६३ २ अंत करणपंचकः–मन, बुद्धि, चित्त, अहंकार व अंत करण. –माज्ञा. (कठिण शब्दाचा कोश) [पाच+पालव] ०बोटें–नअव अंगुष्ठ (आंगठा), तर्जनी (अंगठ्याजवळचें बोट) मध्यमा (मधलें बोट), अनामिका (करंगळीजवळचें बोट) व करांगुळी (करंगुळी) हीं हाताचीं पाच बोटें म्ह० पाची बोटें सारखीं नसतात=सर्व मनुष्यें सारख्या स्वभावाचीं नसतात. मूर्ति तितक्या प्रकृती याअर्थी ०भौतिक–वि. पांच महाभूतांनीं बनलेलें (शरीर). 'मम पांचभौतिक संचलें। जेव्हां शरीर असें निदेलें।' –ज्ञा ५ ५३. [पाच+सं. भौतिक=भूतासंबंधीं] ०वट–वटें–नपु. १ पांचांचा गट, समुदाय 'ऐसीं पाचवटें जवळिके। करूनि वाहावीति अभिलाषें।' –ऋ ५५ 'यावरी आदी। पांचवटेयाची बांधी। बाधली प्रभेदीं। पचभूतिकीं।' –ज्ञा १३ ४६. ०वटा–पु. पाच वाटा जेथें एकत्र होतात तो प्रदेश, ठिकाण. –शर. [पाच+वाटा] ०वनी–न्ही–पुअव पाच प्रकारचे अग्नि–प्रलयानल, विद्युदनल, वडवानल, शिवनेत्रानल व द्वादशादित्यानल 'तैसें पसरलेनि प्रकाशें। सैघ पाचवनिया ज्वाळांचे वळसे। पडतां ब्रह्मकटाह कोळिसे। होत आहाती।' –ज्ञा ११ ३०५ 'ना ते पाचवने जाळु वेढिले। प्रलयपावकाचें।' –शिशु ९३५. [पाच+वन्हि=अग्नि] –वि. (महानु.) पाच वर्णाचा; पाच प्रकारचा. 'जें विरहाग्नीचें पाचवनें चीर। नेसों देत असा।' –भाए १२१. ०वेडली–ळी–स्त्री. पाच नाग्या असलेली इंगळी. 'हे उघड पांचवेडली। पंचधा आगी लागली।'–ज्ञा १३.१०६९. [पांच+वेडळी, विंगळी?] ०शेरी–स्त्री १ पांचशेर प्रमाणाचें वजन. २ (ल.) उपजीविका; चरितार्थ [पांच+शेर] पांचामुखांचा–वि पांच तोंडें असलेला (महादेव, शंकर) 'चहूं मुखांचा वर्णितां भागला। पांचांमुखांचा तटस्थ राहिला।' –ह ३ ७. पाचोत्रा–पंचुत्रा–पंचुत्री–पुस्त्री. १ पांच वस्तूंचा समुदाय (फळें, पेंढ्या वगैरे). २ (कर.) (कडब्याच्या पेंढ्या, विडचा इ० कांच्या व्यवहारात) विकतांना शंभरांमागें मोफत द्यावयाचा पाच नगांचा समुदाय 'पाचोत्र्यासह चार हजार विडी पाठवा.' 'एक हजारावरचे दहा पाचोत्रे टाक.' [पाच]

**पाचक**—वि. १ स्वयंपाक करणारा; आचारी. २ जेणें करून अन्नाचें चांगलें पचन होतें असें (औषध इ०). ३ (फोड, गळू इ०) पिकविणारा पूयजनक (पदार्थ) [सं.]

**पांचक (कें)**—वि. हलकें; हिणकस (सोनें इ०). पांचिक पहा.

**पाचकळ**—वि. (ध्व.) चावट, वात्रट; फाजील, पचकळ पहा. 'असल्या पाचकळ स्त्रीचा त्याला संशय व तिरस्कार येऊन तिला त्यानें केव्हाच हांकून लाविली असती.' –नाकु ३.४७. २ नीरस; पाणचट [पच!]

**पांचकळशी–शा**—खोपु पाठारे प्रभूतील एक पोटजात. सोमवंशी क्षत्रिय पाठारे असेंहि याचें दुसरें नांव आहे –ज्ञाको.प. ६१. लग्नप्रसंगीं बोहोल्यावर पांच कलश ठेवण्याचा प्रघात या जातींत आहे त्यावरून यांनां हें नांव रूढ झालें. [पांच+कलश=तांब्या]

**पांचकों**—पु (गो.) (पत्त्यांचा खेळ) पांच ठिपक्यांचें पान; पंजा. [पाच]

**पाचंग**—न धोतर इ० नेसण्याची, पासोडी लपेटण्याची एक विशिष्ट तऱ्हा, प्रकार पचंग पहा. (क्रि० घालणें). [सं. पंच+अंग]

**पाचंग्या शिणगाण**—पु कुडमुडया जोशांच्या जातीचा प्रमुख पंच, प्रधान –गांगा ३०.

**पांचजन्य**—पु १ विष्णूच्या हातातील शंख. 'पाइकु पाठीसीं घातला। आपण पुढां राहिला। तेणें पाचजन्यु आस्फुरिला। अवलीळाचि।' –ज्ञा १ १४३. २ (ल.) शंखध्वनि; बोंब. (क्रि० करणें). [सं] ०करणें–(ल) १ बोंब मारणें; शंखध्वनि करणें; आरडाओरडा करणें. 'कोणाचे हात तुटले, कोणाचे पाय तुटले...म्हणून ते पांचजन्य करूं लागले.' –लक्ष्मी आणि सरस्वती. २ (माण.ल.) तट्टानें लौकर चालावें म्हणून दोन्ही हात, दोन्ही पाय व तोंड अशीं पाचहि अंगें चालविणें

**पाचट**—न. १ उंसाचा वाळलेला पाला. २ उंसाचें चिपाड. ३ कुकडें; चातीवरील सुताची केलेली गुंडाळी; मुंडा हात व कोपर यावर गुंडाळलेली काथ्याची दोरी वगैरेची गुंडी. कोपरी अर्थ १ पहा. पाचुटें, पाचूट, पाचोट पहा. ४ (प्रां.) खुंटा इ० घट्ट बसविण्याचें साधन पाचर पहा.

**पांचट**—वि. (कर. व) फाजील; वात्रट. [पाणचट] ०पणा–पु. चावटपणा; फाजीलपणा 'बस झाला हा पांचटपणा.'–अस्तंभा ६०.

**पाचत घालणें**—सक्रि. (कु.) अळूं, आलें इ० कंद कोंब आणण्याकरितां ओल्या मातींत पुरणें. [सं. पचन]

**पाचन**—न. १ अनेक औषधींचा केलेला काढा २ (वैद्यक) रेचन, शमन, क्लेदन इ० आयुर्वेदातील सप्तोपचारांपैकीं अन्नाचें पृथक्करण, पचन करण्याचा एक उपचार. सप्तोपचार पहा ३ शिजविणें; (खाद्य पदार्थ इ०) शिजवून खाण्यास योग्य करण्याची क्रिया. ४ अन्न इ० पचविणें, पचन करणें –पु जठराग्नि –वि. १ पचनशक्तीस मदत करणारें (औषध इ०). २ (गळूं इ०) पिकविणारें; पूयजनक [सं.]

**पांचपट**—स्त्री (कु) पहांट, प्रभातसमय [सं पंच+प्रहर; किंवा म पहांट]

**पाचपेच, पांचपेच**—पु १ मल्लयुद्धांत करतात ते डावपेच. २ (ल.) वाद, युद्ध इ०कांत दुसऱ्याचा पाडाव करण्याकरिता योजितात ते डावपेंच, गुप्त मसलत, हिकमत इ०, छक्केपंजे, (प्र.) पेंचपांच. 'ईश्वरच आमच्या बऱ्यावर असल्यास त्याणीं वाईट इच्छून होणें काय व वरकडांनीं पाचपेच करून होणें काय?' –पया २. [फा. पेच् द्वि.]

**पाचर, पाचरवट**—स्त्रीन. १ खुंटा वगैरे घट्ट बसविण्याकरितां, करवतीनें तिरकस कापलेली लाकडाच्या फटींत मारण्याकरिता, भोंक इ० बुजविण्याकरितां करतात ती लाकडाची चपटी व निमुळती खुंटी, ढपली. २ निमुळती खुंटी 'पाचर ही फिरती दुहेरी उतरण आहे.' –यंस्थि ९९ [हिं. पाचर] ०**मारणें**–(ल एखाद्या कार्यांत, कामात) विघ्न आणून तें कार्य बंद पाडणें.

**पांचरात्र, पांचरात्रधर्म**—पु वैष्णवधर्मीय एक प्रमुख पंथ व मत यांत चार वेद आणि सांख्य व योग या पांचांचाहि समावेश होतो म्हणून त्यास हें नांव मिळालें आहे –गीर ५४८.

**पांचव**—न. (गो.) गोमुख.

**पांचवणें**—अक्रि. दृष्ट होणें; नजर लागणें [पाचाव]

**पाचधंदा**—पु. (विरू) पाचुंदा. पाचुंदा पहा

**पाचवा**—पु १ दुखणें बरें होत आलें असतां जरा बाहेर फिरल्यानें तें उलटतें, तेव्हां दृष्ट लागली अशी जी समजूत होते ती. 'प्रभूस व्याधि लागली अखंड होत पाचवा।' –रामसुतात्मजकृत द्रौपदीवस्त्रहरण ११७. २ पांचव्या दिवशीं नियमानें येणारा ताप पाचाव पहा. ३ दृष्टीचा उतार म्हणून गळयांत बांधलेला मणि.

**पाचवा**—वि. (गो.) हिरवा. [पाच=रत्न]

**पांचवा**—वि. अनुक्रमानें चौथ्याच्या नंतर येणारा. [सं. पञ्चम; हिं. पांचवां; पं. पंजवां]

**पाचवी**—स्त्री १ स्त्रीच्या प्रसूतीच्या पांचव्या दिवशीं षष्ठी देवी, जीवंतिका इ० देवतांची करितात ती पूजा. 'झाले शतशः प्रमुदित ज्यांची पाहोनि पांचवी राजे।' –मोसौप्तिक २ ४३. २ वरील प्रसंगीं पूजावयाची देवता. 'साधू ही म्हणती अशा क्षितिभरा कां पांचवी वांचवी।' –मोकृष्ण ७२.१८. 'पोराला पांचवीचें कांहीं झालेंसें दिसतें.' [पांच] (एखादी गोष्ट एखाद्याच्या) **पांचवीला पुजणें, पुजलेली असणें**–(एखाद्यास एखादी गोष्ट, खोड इ०) जन्माची लागणें; जन्मापासून जडणें.

**पावळा**—पु (कों) लाकडें तोडण्याचें एक हत्यार

**पाचा**—पु (कु.) पोय अर्थ ३ पहा.

**पांचाखरी**—पु (महानु) मांत्रिक, पंचाक्षरी. 'की कामतत्त्वांची भारदोरी। बांधिता पांचाखरी।' –शिशु २६३. 'पांतां ए चराचरीं। भव भुजगाचें विष उतरी। ऐसा कव्हणी न देखे पाचाखरी। तुं वांचुनि।' –भाए ७६८. [सं पंचाक्षरी]

**पाचार**—पु १ पाचारण; बोलावणें. –शर. २ सत्कार; सेवा. 'बहु याचक राज्यधर। यांशीं करून उचित पाचार। प्रसन्न करूं म्हणे जो नर। तो एक मूर्ख जाणावा।' –मुक्तेश्वरमूल १११. [सं. प्राचारण; उपचार?]

**पाचार**—स्त्रीन. (कु.) पाचर पहा.

**पाचारण**—न. बोलावणें; आमंत्रण. [सं. प्राचारण]

**पाचारणें**—न १ बोलावणें. २ आमंत्रण ३ कुशल प्रश्न विचारून घेतलेला समाचार ४ (कु) मृताच्या नातेवाइकांस भेटावयास जाण्याचा, द्वारदर्शनाचा विधि [सं. प्राचारण]

**पाचारणें**—सक्रि. १ बोलावणें; हांक मारणें. 'क्षत्रिया रणीं पळोनि जाणें। तें कोण साहे लाजिरवाणें। कां वैधर्म्ये पाचारणें। महासतियेतें।' –ज्ञा१६ १७७ 'क्षात्रव्रत स्मरोनि दूतीं पाचारिलें म्हणुनि आला।' –मोसभा ५.३९ २ आमंत्रण देणें: आवाहन करणें 'चौक मांडिला आसनीं। पाचारिली कुलस्वामिनी।' 'पाचारिले व्याळ लाविले शरीरीं। अंग चहुफेरी वेष्टियेलें।' ३ कुशलप्रश्न विचारणें; समाचार घेणें. ४ (कु) मृताच्या नातेवाइकांस भेटावयास जाणें; द्वारदर्शन करणें ५ आठवणें, स्मरण करणें 'ते हवेळीं हातीं काष्ट दंड घेतलें। कृष्णाजिनाचें उन्दुण केलें। मग मिआं हीं पाचारिलें। कां पितयाची आण।' –शिशु १४२. [सं. प्राचारण]

**पाचारा**—पु. (विरू) पाचावा, पाचवा. पाचवा(-पु)पहा.

**पाचारिका**—स्त्री. दासी; दूती; परिचारिका. 'ऐसें सांगून नृपें सर्वांला। राव सभेस्थानीं गेला। येरीकडे पाचारिकेला। पाठविलें बोलावूं।' –नव १८.५६ [पाचारणें; सं परिचारिका अप.?]

**पाचारी-रें**—स्त्रीन. (गो.) पाचर.

**पांचाल-ळ**—पु. सुतार, कोष्टी, न्हावी, धोबी व चांभार या पांच कारागीर जातींचा समुदाय, गट, त्या जातींपैकीं कोणतीहि एक जात –मोल. 'स्वयें पांचाळा सांगत समर्थ। निर्माण करविला सुंदर रथ।' –दावि २०४. शिवाय यासारखे दुसऱ्या अनेक प्रकारांनीं पांचाळ या नांवानें निर्दिष्ट केलेल्या पांच पांच

जातींचे गट आहेत उदा० सुतार, सोनार, लोहार, कासार व पाथरवट (-थर्स्टन्-कास्ट् ६). यांपैकीं बरेचसे लोक स्वत.स पाचाल ब्राह्मण म्हणवून घेतात व गळयांत जानवें घालतात. (प्र) पांचाळ, पंचाळ पहा.

**पांचाल**—पु पांच नद्यांमधील प्रदेश; पंजाब. [सं.]

**पांचाली**—स्त्री पांडवांची बायको; द्रौपदी -वि पांचाल देशातील. 'पांचालीहि कृती चकोर तकिका त्या ज्योत्स्निकेला जशा।' -कर्म १.१९. [सं.]

**पाचाव, पाचावा**—पु. (विरू.) पाचवा, पाचवा पहा. १ दृष्ट लागून दुखणें उलटणें. २ पांचव्या दिवशीं नियमानें येणारा ताप. 'ज्वर पाचाव आणि शारें।' -दा ३.६.२६. ३ (मुंबई) पांचांना कळणें, बोभाटा.

**पाचावा**—पु. पाचुंदा. -शास्त्रीको.

**पांचाळ**—वि. पाचकळ; बडबड करणारी; मूर्ख (स्त्री).

**पांचाळी**—स्त्री पाचाल देशाच्या द्रुपद राजाची मुलगी, द्रौपदी. पांचाली पहा 'पांचाळीसी गांजिता वैरी। वस्त्रें आपण झाला हरी।' -तुगा २५२७. [सं]

**पा(पां)चिक**—वि हीणकस (सोनें). 'नाना पांचिकें आणि सोळें। हें सोनया तंवचि आलें। जंव परिसु आगमेलें। एकवटीना।' -ज्ञा १८.१२५४. [पचपचित ?]

**पाचिखंड**—न. (महानु) पाचेचा खडा. 'कीं चैतन्याचिअे मांदुसें। कैवल्याचें पाचिखंड जैसें।' -शिशु ५९. [पाच+सं खंड=तुकडा, खडा]

**पाचित**—वि. शिजविलेला, शिजवून, तळून तयार केलेला (खाद्यपदार्थ इ०). उदा० तैलपाचित=तेलात तळलेला, घृतपाचित-तुपांत तळून तयार केलेला; ब्राह्मणपाचित=ब्राह्मणानें तयार केलेला; स्त्रीपाचित=स्त्रीनें शिजविलेला. [सं.]

**पाची**—स्त्री. पाच; पाचेचा खडा. 'पाचीचा गुण घे ढाळाचें मोतीं।' -शिशु २९. 'पाची हीरक पद्मराग लसणें गोमेद मुक्ता फळें।' -सारुह ३.४२. [पाच]

**पांची**—स्त्री. ऐतरेय ब्राह्मणाच्या चाळीस अध्यायांच्या प्रत्येकी पांच याप्रमाणें पाडलेल्या आठ गटापैकीं प्रत्येक पंचिका; पंचिका पहा. 'कित्येक तेथें पढताति पांच्या। कित्येक माळा धरिती जपांच्या।' -सारुह ६.४६. [सं. पंचक]

**पांची**—स्त्री. पांच रुपये किंमतीचें सोन्याचें नाणें. [पांच]

**पांची**—अ. एक या संख्येस पांच या संख्येनें गुणतांना योजावयाचा शब्द. जसें:-एके पांची पांच. [पाच]

**पांचीव**—न. १ (राजा.) गुरांचें मूत्र. २ पशूंच्या मूत्राचें खत. [वे. सं. पच्=पचलेलें, कुजलेलें]

**पाचुटें, पाचूट, पाचोट-टें**—न. (विणकाम) कुकडें; चातीवरील, पाटावरील सुताची केलेली गुंडाळी. ही चिवटाच्या निम्मी असते [वे.]

**पाचुंडा**—पु (कों.) पाचुंदा अर्थ १ पहा.

**पाचुंडी**—स्त्री. (बे. सोनारी धंदा) पांच रव्यांचा एकत्र केलेला मणी इ०. [पांच]

**पाचुंदा**—पु १ कडब्याच्या पांच पेंढयांचा गट; पंचकडी. 'मामूलप्रमाणें महारांना गांवकी घरकीबद्दल नांगरामागें आठ पाचुंदे बलुतें मिळे' -गांगा ५४. २ (उ.) लाडू, पोळया इ० कांची पंचकडी. [पांच]

**पाचुंदा**—पु एक वृक्ष. यास बारीक कांटे असतात. याचीं पानें बेलाच्या पानासारखीं असतात. फुलें श्वेतकेसरयुक्त असून फळें बारीक असतात लांकूड हलकें असून त्याचे मणी दुखणेकऱ्याचें दुखणें उलटूं (पाचाव) नये म्हणून त्याच्या हातांत बांधतात. -वगु ४ ६१. [सं. पत्तर]

**पाचुली**—वि. (भि.) पांचवा. 'गोठ पाचुली.'=गोष्ट पांचवी. -भिल्ली १५. [पांच]

**पाचू**—स्त्री. (काव्य.) रत्नविशेष; पाच 'पाचूचें नेसणें आणखी मोतिया जाळी।' -वसा २६. [पाच]

**पाचूचा ठसा**—पु (कों. सोनारी धंदा) एका बाजूस देवताप्रतिमा व दुसऱ्या बाजूस वेलबुट्टी असलेला ठसा.

**पांचेट**—वि. (प्र.) पाणचट; पाणचट पहा. [पाणचट अप]

**पांचेणें**—अक्रि. (कु) कोंब, मोड फुटणें; अंकुरणें.

**पांचेरूं**—न. (राजा.) पाचर पहा.

**पाचोंडा**—पु. (व.) पाचोळा पहा.

**पाचोंदा**—पु. पाचुंदा पहा.

**पाचोरा**—पु. १ पाचुंदा वृक्ष. २ पाचोळा पहा.

**पाचोळा**—पु. १ कडबा, वेळू, मका, ऊंस इ०कांचीं शुष्क पानें; पात; (झाडावरून) गळून पडलेलीं शुष्क पानें; कांदा, लसूण इ० कांचीं सुकीं टरफलें, सालपटें २ (प्रां.) मळणी केलेल्या धान्यांतील बारीक कोंडा, भूस इ०. ३ (ल.) धुळधाण; धुव्वा; दाणादाण. 'इंग्रजी सैन्याचा त्यानें पाचोळा करून टाकला.' -इंप १३९. [पात=पान+चोळा=चोळामोळा]

**पाछा, पाच्छा, पाच्छाय, पाच्छाह्-पाच्छाव**—पु. पादशाह; सम्राट. 'असतां पाछा तो झोपीं निमग्न।' -दावि २१. 'वसविलें हस्तिनापुर राज्य पाच्छाव।' -ऐपो १५४. 'पाछाह्याचा बाग आझेवांचोनीया। कैसें तोडावें या म्हणती स्वामी।' -रामदासी २.८. [फा. पादशाह=सम्राट]

**पाच्छाई, पाच्छाय, पाच्छायत, पाच्छाहा, पाच्छाही**—स्त्री. (प्र.) पादशाही इ० पहा.

**पाच्छाणें**—अक्रि. (कु) वाढणें; प्रक्षुब्ध होणें; उलटणें. 'दूध घेतल्यामुळें हा ताप पाच्छाला.' [ सं. पश्चात् ]

**पाज-झ**—स्त्री. १ (राजा.) डोंगरांतील पाऊलवाट. २ (गो.) सोपानपरंपरा; जिना. [ पोर्तु. पासो=पाऊल, कदम ]

**पांज**—स्त्री. (कु. गो.) कोंबडया झांकण्याकरितां केलेला बळकाच्या कांबटयांचा हारा, टोपल्याच्या आकाराचा पिंजरा. [ सं. पंजर ]

**पाजचें**—अक्रि. (गो.) पाजळणें. 'निबरा बगर लोखंड पाजेना.' [ पाजळणें ]

**पाजणा कुणबी**—पु. (खा. व) कुणब्यांची एक पोटजात. ही खानदेश व वऱ्हाड या भागांत आहे.

**पाजणी**—वि. (जुन्नरी) स्वतःच्या आईनें न पाजल्यामुळें दुसऱ्या मेंढीनें पाजून पोसलेलें (कोंकरूं). 'तें पाजणी कोंकरूं आहे.' [ पाजणें ]

**पा(पां)जणी**—स्त्रीन. कोऱ्या कापडास, सुतास लावतात ती जोंधळा, बाजरी किंवा तांदूळ याची केलेली खळ (क्रि० करणें; देणें). [ पेज, पाजणें ]

**पा(पां)जणी-नी**—स्त्री. १ पाणी पाजणें. २ शस्त्र इ०कास धार लावण्याची क्रिया ३ विणावयाचें सूत बळकट होण्याकरिता त्यास खळ लावण्याचा, पाजण करावयाचा संस्कार. 'ऊर्णे तंतुचिया विणवणी। करौनि चंडवाताची पाजनी।' –ज्ञाप्र ६४८. 'साडयाही नौपटीच्या कतिपय लुगडीं जे नवे पाजणीचीं।'–सारुह ३.४१. 'पाजणीच्या यंत्राची अडचण दूर झाली असतां लहान कारखाने उपयोगी पडतील.' –टि ३ ३.५४. ४ नवें सूत, वस्त्र इ०कास लावण्याची खळ; पाजण. ५ (ल.) खळ लावून विणण्या करितां मागावर लावलेलें सूत. [ पाजणें ]

**पाजणें**—सक्रि. १ प्यावयास लावणें; पिण्यास घेणें. 'जातीनें तान्हुल्यांना पाजण्याचेंहि काम बायकाच्या गळयांत घातलें.'–बाय ३.१. २ (शस्त्र इ०कास) धार लावणें; पाजळणें; परजणें. ३ (ल.) टकविणें; भोंदणें; मुंडणें. [ सं. प्राशन; –मोल; सं. आप्यायनम्–शर. सं. पाययति=पाजतो ]

**पांजणें**—उक्रि. १ सूत, नवीन वळलेली दोरी, दोर इ० गुळगुळीत, मऊ करण्याकरितां एखादें लांकुड, खांब इ०कांवर घासणें. २ विणावयाचें सूत खळीनें युक्त करणें. [ दे ]

**पांजणें**—अक्रि. हात इ० शरीरावयवावरून दोरी, दोर घासत गेल्यानें हात इ० खरवडला, घसरवटला जाणें. [ दे. ]

**पाजतिक**—पु. (महानु.) पारिजात; पारिजातक. 'कवण गणी ते चंपक। जेथ असंख्यातु पाजतिक।' दाव १३८. [ सं. पारिजातक ]

**पाजप**—अक्रि. (गो.) धार काढणें. [ पाजणें ? ]

**पांजरण**—न छपराच्या वाशांच्या वर व कौलाच्याखालीं गवत, पानें इ०कांचें करितात तें आच्छादन, ओमण [ सं. पंजर ]

**पांजरणें**—अक्रि. १ विस्तारणें; पसरणें. 'शिष्टागमविधानें। विविधयागवितानें। इयें पानावरी पानें। पांजरती।' -ज्ञा १५. १८९. २ पिंजारणें. [ पिंजारणें ]

**पांजर(रा)पोळ, पांजरपोळा**—पु म्हातारपणामुळें कुचकामी झालेल्या, लंगडया, लुळया गुरांचें मोफत निगा ठेवण्याचें ठिकाण. [ सं. पंजर+म पोळ; गु. पांजरापोळ ]

**पांजरा**—पु १ (पशु, पक्षी इ०) कोंडून ठेवण्याचा पिंजरा; सांपळा. 'एकु घरा नेउनि कवतिकें पाजरां घातला।' –पंच १.५१. 'त्रिविध भोग या शरीरा। कर्म कोटार पाजरा।' –तुगा ७१३. २ ताड, माड इ० वृक्षाला जेथें झावळया फुटतात तो शेंडयाचा, माथ्याचा भाग. ३ प्राणी, मनुष्य इ०कांच्या बरगडयाचा सांगाडा, सांपळा. 'ते प्रलयभैरवाचें पाजेंरें। कीं कृतांताचे चाकवारे। कीं कामकांति धवळारें। काळरात्रीचीं।' –शिशु ९४६. 'स्त्री देहाचा उभारा। केवळ अस्थींचा पाजरा।' –एभा २६.२३०. ४ (घर, गलबत इ०कांचा) आच्छादनावांचून असलेला सांगाडा. [ सं. पंजर; हिं. पॉजर; गु. पाजरूं ] **अंगाचा-शरीराचा-हाडांचा पांजरा**–पु. अस्थिपंजर, अतिशय रोड मनुष्य.

**पांजरी**—स्त्री. (खा.) खटाऱ्यांतील सामान पडूं नये म्हणून त्याच्या मागील बाजूस बसवितात ती बाबूची चौकट. [ सं. पंजर ]

**पाजवणी**—स्त्री. १ पाजण्याची, पिऊं घालण्याची क्रिया. २ शस्त्र इ० पाजळण्याची, परजण्याची क्रिया. [ पाजणें ]

**पाजवणें**—सक्रि. १ (शस्त्र इ०स) धार लावणें; पाजळणें; परजणें. २ (व.) ठोकणें; बडवणें; ठोक देणें. ३ पाणी पिण्यास देणें. [ पाजणें ] **मिशी पाजवणें**–गर्वानें मिशीवरून हात फिरविणें.

**पाजवा उंदीर**—पु. उंदिराची एक जात. हे घरांत न राहतां बाहेर शेतवाडींत राहतात.

**पाजविणें**—सक्रि. १ प्यावयास लावणें; पिऊं घालणें. २ (शस्त्र इ०कास) धार लावणें; परजणें. 'हे पाजवीली छुरिका अनंगें।' –सारुह २.५३. 'नवे पाजविलेले भाले हातीं देऊन ...' –कमं ४.१०६. [ सं. पा=पिणें ? ]

**पाजळणी**—स्त्री. १ प्रदीप्त, प्रज्वलित करणें. २ (शस्त्र इ०कांस) धार लावून तीक्ष्ण करणें; परजणें; पाजवणें. [ पाजळणें ]

**पाजळणें**—सक्रि. १ शिलगावणें, पेटविणें; चेतविणें; प्रज्वलित करणें (दिवा, दिवटी, मशाल इ०) 'दुर्वासमंत्र मुखानिळें। फुंकोनि पाजळिले तेजाळें।' –मुआदि १४.१४६. 'रत्नदीपप्रभा कैशा पाजळल्या ज्योति।' –तुगा ४७७. 'कर्पूरदीप सतेज

थोर। पाजळोन उभे असुर। विशाल शरीर जयांचें।' २ (ल.) शस्त्र वगैरेस धार लावणें. [सं. प्रज्वलन; प्रा पज्जलण; सिं. पजिणु] (एखाद्याचा) **टेंभा पाजळणें**-(एखाद्यास) राजदरबार इ० ठिकाणीं मोठी प्रतिष्ठा प्राप्त होणें.

**पांजळी**—स्त्री. दिव्याची ज्योत. [पाजळणें]

**पांजो** —पु. (गो) पांच कोऱ्या कागदांचा एक दस्त. [पांच]

**पाजी**—वि. १ हलकट; नीच; घाणेरड्या मनाचा; खेटरखाऊ; निलाजरा, असभ्य. 'झक मारितात पाजी! आपल्या आपण फजीत पावतील.' –ख ११९८. २ पागल; मूर्ख. 'चाकराचा आब व चुगलखोरी या प्रकारची, व आपली त्या पाजीकरिता आम्हांवर इतराजी.' –रा ६.६०५. ३ (ल.) अनिष्ट; वाईट. 'कल्पवृक्ष देवोनि घेतली भाजी। वसुदेव तैसा झाला राजी। समयो पाजी म्हणोनिया।'–देकृष्णजन्म ६०. [सं. पाज्य=नीच; फा पाजी; सिं. पाजी] ०**पंचक**-न. नीच माणसांची पंचकडी, चांडाळचौकडी. –राको. [पाजी+पंचक] ०**पणा**-वि. मनाचा क्षुद्रपणा; नीचपणा, हलकटपणा; बेशरमपणा. 'आणि अज्ञान नसेल तर पाजीपणा व्यक्त होतो.' –टि ३.३.१०८ [पाजी+पणा प्रत्यय]

**पांजी**—स्त्री. १ टोंक; अग्र; अग्रभाग 'येऱ्हवीं अभक्तवार्दे आम्हांमाजी। वाचेची पाजी विटाळली नाहीं।'–एभा ५ ३०२ २ शेतकऱ्यांचा एक कुळाचार यांत देवतेला, पिशाचाला कोंबडें किंवा बकरा बली देऊन तो प्रसाद म्हणून खातात. ३ भूत, पिशाच इ०कांस शांत करण्याकरिता अन्नबली समर्पण करण्याचा विधि. (क्रि० करणें). ४ सदर विधीनें समर्पण केलेला अन्नबली. (क्रि० देणें). 'इंद्राचि पांजी आपणचि खाय। त्याचिया क्रोधें पाउसाचें भय।' –निगा ८८ ५ (ल) (एखाद्यास) कुंठित, चकित, निरुत्तर करणें; घोटाळ्यात पाडणें; मति गुंग करणें; कोडें. (क्रि० करणें) [दे]

**पांजी**—स्त्री. पंचांग. –शर.

**पांजें**—न. (नंदभाषा) (व्यापाऱ्यांत रूढ) घर.

**पाझर**—पु. १ (पाणी, तूप इ० द्रव पदार्थ भरलेल्या मडक्यातून त्या पदार्थाचा किंवा खडकांतून पाण्याचा डोळ्यातून अश्रूंचा) थोडा थोडा होणारा स्राव; झिरपण; ठिबकी; टप्‌टप् गळणें. 'ऐकतांचि नेत्रीं लागले पाझर।' –रामदासी २.५७. २ झरा ओघळ; ओहळ. 'कडे कपाट पाझर।' –दावि २८४. ३ गूळ, साखर इ०कांस हवेंतील ओलाव्यानें सुटणारें पाणी; पाघळ; चिद्दाळ. ४ दयार्द्रता. –शर. (क्रि. फुटणें) [सं. प्र+क्षर्=पाझरणें प्रा. पज्जर] **दगडास पाझर फुटणें**–अतिशय कठोर हृदयाच्या मनुष्याच्या ठिकाणीं दया इ० मृदु भावना उत्पन्न होणें.

**पांझर-रा**—पु. १ पिंजरा. २ अस्थिपंजर, अतिशय रोड झालेलें शरीर, अशा शरीरानें युक्त व्यक्ति. 'झुरझुरूं पांझर झालें कंठीं उरला प्राण।' –प्रला १३७. [सं. पंजर]

**पांझरट**—न नवरात्रादि उत्सवप्रसंगीं देव्हारा इ०कांवर, किंवा मखर इ०स शोभेकरितां लावण्याची कातरकाम केलेली कागदाची जाळी [पांझर=पिंजरा]

**पाझरणी**—स्त्री. १ पाझरण्याची, ठिबकण्याची, गळण्याची क्रिया; गळती २ (गूळ इ०) पाघळण्याची क्रिया. [पाझरणें]

**पाझरणें**—क्रि. १ (गूळ, साखर इ० पदार्थ हवेंतील जलांशानें) पाघळणें, द्रवयुक्त होऊन वाहूं लागणें; (भांडें, मडकें इ० कांतून आंतील पाणी इ० द्रव पदार्थ) गळणें; ठिबकणें; झरणें; झिरपणें; स्रवणें 'कीं शृंगाराचे मेघु उन्नले। तैसें रुख–राए पाझिरैले। अंतराळीं।' –शिशु ६१७ 'त्वचा वेढिली पाझरे आश्वलाची।' –मुरा युद्धकांड ६.२१३. २ (अंत करण इ०) द्रवणें; कळवळणें; पिळवटणें [सं प्रक्षरण; प्रा. पज्झरई=पाझरतें; सिं. पघिर्जणु]

**पाझरीव**—वि पाझरलेला, स्रवलेला; ठिपकलेला [पाझरणें]

**पाझळ पाझळ**—स्त्री (ना) निष्कारण बडबड; कटकट; वटवट. (क्रि लावणें). [सं. पाल्हाळ ?]

**पॉत्र्**—शअ. (राजा. कुण.). मुळें; करितां; सार्टी; पाईं; पायीं 'संपा पॉत्र् भत्तेक गिरण्यो बंद झाल्यो.' [सं. प्रीत्यर्थ]

**पाट**—पु १ चौकोनी लहान लांकडी फळीला खालीं आंखुड पाय जोडून बसण्यासाठीं केलेलें आसन, बैठक. 'तेव्हां धांवुनि बैसे पार्थ सुभद्रार्थी जसा पाटीं। सुचिर क्षुधित ब्राह्मण हां हा म्हणतांहि वाढिल्या ताटीं।' –मोकृष्ण ८६ २२ २ सिंहासन; गादी; पीठ. 'ते वेळीं विजयश्रियेच्या पाटीं। एकुचि बैसे।' –ज्ञा ७.१२. 'योगसाम्राज्य शेष पाट। तुजचि साजे।' –विपू ७.१०५. ३ श्रेष्ठपणाचा मुख्य मान, अधिकार. 'वरी क्षत्रियांमाजी श्रेष्ठु। जो जगजेठी जगीं सुभटु। तया दळवैपणाचा पाटु। भीष्मासि पैं।' –ज्ञा १ ११५. 'एकाएकीं इच्छी पाट। नेणे चाट काउळें।' –तुगा २८७०. ४ श्रेष्ठपणा; मोठेपणा. 'कां बाळका एकी माये–। वांचोनि जिणें काय आहे। म्हणौनि सेविजे कीं तो होये। पाटाचा धर्मु।' –ज्ञा १८.९०८. ५ (खडीकामाचा धंदा). ठसे उठविण्यासाठीं खालीं धरावयाचें फळीसारखें साधन. ६ (विणकामाचा धंदा) सूत उकलण्यासाठीं ताणा घालण्यासाठीं फळीवर खुंट्यांच्या रांगा ठोकून केलेलें साधन. ७ खांबाची उंची वाढावी म्हणून त्याच्या माथ्यावर तुळईखालीं बसविलेली लांकडी बैठक, चौकोनी तुकडा. [सं. पीठ; पट्ट] ०**बांधणें**–पट्टाभिषेक, सिंहासनाभिषेक, करणें. 'इया गुरुचरणसेवा। हों पात्र तया दैवा। जे सकळार्थमेळावा। पाटु बांधे।' –ज्ञा १५.९. **पाटीं बसणें**–अक्रि. १ कोणत्याहि विधि अथवा संस्काराच्या वेळीं पत्नीनें पती शेजारीं उजवे बाजूस बसणें. २ (एखादी स्त्री) रजस्वला, विटाळशी होणें. ३ अधिकाराचें, मानाचें स्थान प्राप्त होणें, मिळविणें. 'कीं तयाही

पाठीं। जे वेळीं लोह मांसातें घाटी। ते वेळीं विजयश्रियेच्या पाटीं। एकुचि बैसे।' –ज्ञा ७.१२ **पाटीं बसविणें**–मान देणें; प्रतिष्ठेचें स्थान देणें. 'सकळा ज्ञानाचां सेवटी। करूनि आगमा टी। निगमा बैसवी पाटीं। परज्ञानाचा।' –ऋ ३. **पाटाचा**–वि. १ सर्वोत्कृष्ट; मुख्य 'तें माझें निजधाम पाहीं। पाटाचें गा।' –ज्ञा १५.३१६. २ ऐक्याचा –मनको ३ (महानु) अधिकारपत्र मिळालेला; हक्काचा 'वसंतां वाउगें बीकु। तें मुख चौ–गुणां अधिकु। भणऊनि ते पाटाचे अंकु। मन्मथाचें।' –शिशु ६७२ सामाशब्द– **०पाणी**–न. १ (जेवावयास आलेल्या) पाहुण्यास, इष्टमित्रास बसण्यास पाट व पाय धुण्यास पाणी वगैरे देऊन करावयाची सरबराई. (क्रि० देणें) २ भोजनास बसणाऱ्या मंडळीकरितां पाट मांडून, त्यापुढें ताटें मांडून व पाण्यानें तांबे भरून ठेवून करावयाची (भोजनाची) पूर्वतयारी (क्रि० करणें) [पाट+पाणी] **०पासोडा**–पु. विवाह, मुंज इ० मंगलकार्यांत वधूवरें बटु इ०कांना बसण्याकरितां केलेली शालजोडी, सखलाद इ० कानीं आच्छादित अशी दोनतीन पाट जोडून मांडलेली बैठक या बैठकीवर धान्य इ०काचा चौक भरतात. [पाट+पासोडा] **०पिढें**–न १ (व्यापक) खुर्ची, मेज, पाट इ० संसारोपयुक्त लाकडी सामान, जिन्नस २ पाट वगैरे आसन 'तूं देत जा पाटपिढें बसाया।'–सारुह७ १११ [पाट+ सं. पीठ] **०रस**–पु (राजा) आंब्यांचा एकदा रस काढून झाल्यावर पुनः त्या साली व कोया यांच्यांत पाणी घालून (पाटावर दाबून) काढतात तो रस. [पाट+रस] **०वडी**–स्त्री हरभऱ्याच्या पिठात तिखट, मीठ, मसाला इ० घालून तें उकडून पाट इ०कावर थापटून केलेली वडी. 'वड्या पाटवड्या शाखा बहुत।' –नव ९.११८. [पाट+वडी] **०वर्धन**–वि. अधिकार, पदवी वाढविणारा 'सकल–मुकुट–पाटवर्धन। वन–माला विराजमान।' –दाव ३६१. [पाट+ सं. वर्धन=वाढविणारा, वाढविणें] **०शेवई**–स्त्री. पाट, लांब फळी इ० कांच्या मदतीनें केलेला शेवयांचा एक प्रकार. याच्या उलट हातशेवई. ही केवळ हातांनींच करितात. [पाट+शेवई] **०सरी**–स्त्री. जेथें भिंत छपरास मिळते त्या ठिकाणची आंतील बाजूस राहिलेली जागा; जई.

**पाट**—पु. १ शेतांत, बागाईतांत विहीरीचें, नदीचें, तलावाचें पाणी खेळविण्यासाठीं केलेली पाण्याची सारणी, लहान कालवा. २ (ल.) असल्या सारणींतून वाहणारें पाणी. 'वसु जैसा मोकाटु। वारा जैसा अफाटु। फुटला जैसा पाटु। निरंजनीं।' –ज्ञा १३.६९७. 'जळ तुंबतां तडागीं फोडावा लागतो जसा पाट।' –उत्तररामचरित्र (गोडबोलेकृत) (मराठी ६ वें पुस्तक पृ. १७७.) ३ (कों.) नदीचें पात्र. [सं. पाटक] **०करी**–पु १ पाटाच्या पाण्यावर व दुरुस्तीवर देखरेख ठेवणारा खेडेगांवातील नोकर. २ पाटाच्या पाण्याचा भागीदार. [पाट+करी] **०कुळी**–स्त्री. (राजा) लहानसा पाट, पाण्याची सारणी. [सं पाटक+कुल्या] **०वड**–स्त्री (राजा.) पाटवण पट्टा. [पाट+वाट ?] **०वण**–न. पाटाचें पाणी वाहून नेण्याकरितां खणून केलेला मार्ग; पाण्याचा लहान पाट 'असल्या पाटवणांत कोणतेंहि पीक बागाइतदारानें करतां कामा नये' –के २ १२ ३०. **०वणी**–न. १ पाटानें वाहून नेलेलें पाणी २ पाटाच्या पाण्यानें उत्पन्न केलेलें फळ इ०. ऋषिपंचमीस असलें फळ खाण्यास योग्य असतें [पाट+पाणी] **०स्थळ–स्थळजमीन**–नस्त्री पाटाच्या पाण्यानें भिजणारी (लागवडीखालीं असलेली) जमीन याच्या उलट मोटस्थळ= मोटेच्या पाण्यानें भिजणारी जमीन [पाट+स्थळ] **पाटागर**– न (को) पाटाचें पाणी दिलें जाणारें नारळीचें आगर [पाट+आगर]

**पाट**—पु खालच्या जातींतील, शूद्रातील विधवेनें पुन्हा लग्न करण्याचा विधि, मोहतूर (क्रि० लावणें, करणें) [सं. पीठ, पट्ट] **पाटीं बसणें**–(एखाद्याशीं एखाद्या स्त्रीनें) लग्न लावणें; विवाहबद्ध होणें 'याचिये बैसोनि पाटीं। जन्में देखिली नाहीं सुखगोष्टी।' –स्वादि २ १ ५८ **०कर–कर बायको, पाट-करीण**–स्त्री दुसरें लग्न करणारी विधवा स्त्री **०करी**–पु विधवा, काडीमोड केलेल्या स्त्रीशीं विवाह करणारा पुरुष [पाट+करणें] **०करूं**–न (तिरस्करार्थी) पाटकरीण; जिनें पाट लावला आहे अशी स्त्री. [पाट+करणें] **म्ह०** पाटकरूं ते बटकरूं. **०दाम**–पु. पाट लावण्याच्या वेळीं पाटील–कुलकर्णी वगैरे हक्कदारांना द्यावयाची कराच्या रूपाची बाब. [पाट+दाम]

**पाट**—पु. १ गोणताट, पडम इ० विणताना जी रुंदी धरलेली असते त्या रुंदीचा कापडाचा लांब पट्टा, तागा. 'चादर पाट पांच, वार १५ ची.' –ऐरापुप्र ३ १९५ २ (सामा.) (महानु.) वस्त्र. 'मृणाळसुताचेनि पाटें विणिलें।' –शिशु ७७४. ३ शेतांतील, बागाइतांतील पिकाचा, भाजीचा लांब पट्टा, वाफा. ४ एखाद्याची धिंड काढतांना त्याच्या डोक्यावर शेंडीपासुन डोक्याच्या शेवटापर्यंत वस्तऱ्यानें तासलेल्या पट्ट्यांसारख्या लांबट भागांपैकीं प्रत्येक. हा शिक्षेचा अथवा मानखंडना करण्याचा एक प्रकार आहे. (क्रि० काढणें) 'अर्धेंदुशरें त्याच्या माथां काढूनि पांच पाट वदे।' –मोवन ९.५३. ५ गोणपाट. [सं. पट्ट] **०सुत**–न. नवार. 'आगम ठाउए जेथें। सामवेदांदि गाते। सत्वाचेनि पाट-सुतें। वीणिला जो।' –ऋ ८५ 'अवचित पाळणा आणिला विश्वकर्म्यानें। तो विणिला पाटसुतानें।' –वसा ३५. [पाट+सूत]

**पाट**—न. रेशीम. [सं. पट्ट; हिं. पाट] **०सूत्र**–न रेशमी दोरा; कडदोरा. –खिपु

**पाट**—पु. (संगीत) मृदंगादि वाद्यांचे बोल.

**पाट**—न. बैल, टोणगा इ०कांचा गाय, म्हैस इ० कांवर उडण्याच्या आवृत्तींपैकीं प्रत्येक. [पट]

**पाट-ठ**—स्त्री. (कर.) स्त्रीजातीय करडूं, बकरूं.

**पाट**—स्त्री पाठ, शरीराचा कंबरेपासून वरचा पृष्ठभाग, मागील बाजू. 'बंधा पाटी पावो देउनु बंधा, षाडीया दोनी घावा' –वैद्यक ७७. [सं. पृष्ठ. अप.]

**पॉटकळ**—न. (गो.) पोटाकडची जागा; पोटकुळी. [पोट]

**पाटकॉ**– पु (गो) सण; गोणपाट.

**पाटखंड**—न. १ (चटणी इ० वाटण्याच्या) पाटयाचा तुकडा; फुटलेला पाटयाचा भाग. २ (तिरस्कारार्थी) लहान पाटा [पाटा+खंड]

**पाटंगण**—न पटांगण पहा [पटांगण]

**पाटगा**—पु. (फुलझाडें इ०कांचा) वाफा, ताटवा; (प्र) पाठगा.

**पाटगें**—न. एकेरी रुंदीचें, पाटाच्या रुंदीचें वस्त्र, कापड. [पाट]

**पाटगें**—न. (खा) तीन वाफे मिळून झालेलें जमीनीचें, बागाइताचें क्षेत्र. –काव्यकेतकी ६६.

**पाटडी**—स्त्री. (गुज) तुळई. –मौज २.६.३०.

**पाटण**—न. नगर; शहर; पट्टण. 'ते विदेहाचा पाटणीं। पुर्वी असती जाली।' –भाए ३७६. 'जैसी सगळिये पाटणीं। एकेंचि दीपें दिवेलावणी।' –ज्ञा १५४१३. 'नादे भीमातीर। पंढरपुरपाटणीं।' –तुगा २८१. [सं. पत्तन; प्रा. पट्टण; हिं पाटन]

**पाटण**—न १ (कु.) चुलीच्या वरचा भाग. २ (कु.) फणसांतील गरे व कांटेरी त्वचा यांच्यामधला भाग, तळखंड. ३ (कु.) फणसाची खरबरीत, कांटेरी त्वचा ४ (कु) मोठें कौल.

**पाटण-न**—स्त्री. सांचा; नमुना. –राको २८७.

**पाटणी-ण**—स्त्री. १ तक्तपोशी; पाटण्याची क्रिया. –मॅरट ५९. २ कडीपाट; लांकडी छत. [पाटणें] **पाटणें**–उक्रि. (कु.) तक्तपोशीनें गृहप्रदेश आच्छादित करणें. [पाट=फळी]

**पाटणी**—स्त्री. तांदुळाची एक जात; पटणी पहा. [पटणी]

**पॉटतिडक**—स्त्री. (गो.) कळकळ. [पोट तिडिक]

**पाटथर-थरा**—पु. १ जोत्याच्या अगदीं वरचा (घडींव दगडांचा) थर. २ इमारतकामास उपयोगी असा घडीव व गुळगुळीत दगड. याचा उपयोग जोत्याचा सर्वांत वरचा थर बांधताना करितात. 'इमारतीकरितां लागणारे दगड म्हणजे गुंडे, पाटथरे, ढोकळे, तोडी वगैरे ज्या नमुन्याचे पाहिजेत त्या नमुन्याबरहुकूम खाणीवरच साधारण घडावे.' –मॅरट १. ३ दरवाज्यासमोरील पायरीचा घडीव गुळगुळीत दगड. [पाट+थर]

**पॉट फुगरॉ**—वि (गो.) फुगीर पोटाचा. [पोट+फुगणें]

**पाटल**—वि. १ तांबूस; गुलाबी रंगाचा. 'जो भजेरी सरस पाटल वर्ण चेलें। शोभे जयास लघुसें निटळीं अबाळें।' –र ५०. २ पांढऱ्या रंगांत तांबडया रंगाचें मिश्रण असलेला (गाईचा एक रंग). [सं.]

**पाटला**—पु. (जरतार धंदा) १ लहान पट्टयावर चालणारें व झिलई देण्याचें एक यंत्र. २ रीळ भरण्याचें यंत्र. ३ सोन्याची चीप.

**पॉटलॉ**—पु (गो.) द्रव्यनिधि. [गु पोटली=द्रव्याची पिशवी ?]

**पॉटलॉ**—पु (गो.) मोठी टोपली. [पाटी]

**पाटलाग**—पु. (बे. गवंडी, सुतारी काम) दारास लागणारा कडीच्या पट्टीचा भाग अथवा पट्टीची कडी.

**पाटली**—स्त्री. १ सुमारें पाव इंच रुंद अशा सोन्याच्या लांबट पट्टीचा बांगडीच्या आकाराचा हातांत घालण्याचा स्त्रियांचा एक दागिना. हिच्या तोंडाच्या दोन्ही टोंकांवर पाच ते एकपर्यंत ठिपके उतरत्या त्रिकोणी आकारांत खोदलेले असतात. पाटलीचे तोडीच्या, फाशाच्या, पुरणाच्या असे प्रकार आहेत. २ जीभ खरवडून साफ करण्याचें एक साधन जिभी, जिभली पहा. ३ (बैलगाडी) गाडीच्या चाकाच्या तुंबाच्या बाहेरील बाजूस बसविलेलें वर्तुळाकार लोखंडी कडें [सं. पट्ट गु. पाटा=पट्टी]

**पाटली**—स्त्री. एक दुर्मिळ फुलझाड. याचें फूल फार सुकुमार व सुवासिक असतें या वृक्षास पारिजातकाप्रमाणें दाट फुलें येतात. –वगु ४ ६०.

**पाटली**—स्त्री (विणकामाचा धंदा) किनारीचा मूळचा भाग. काठांतील साधे दोरे यास गादी असेंहि म्हणतात.

**पाटली**—स्त्री. दोन इंचांपेक्षां अधिक जाड नसलेली व जाडीच्या दुप्पट रुंदी असलेली लांकडाची फळी, तक्ता –मॅरट २७.

**पाटली**—स्त्री रेशमाची एक जात. –मुंव्या ९७.

**पाटली**—वि. गुलाबी; तांबूस. 'असुरवंश वैश्यकुळीं। अल्प शुद्धवर्ण पाटली। तुंबर मुनी देवता सकळी। सर्व देवता अवधारीं।' –गुच ६.६१. [पाटल=गुलाबी]

**पाटलू(लो)ण**—स्त्री. एक प्रकारची विजार. [इं. पॅटॅलून्]

**पाटलें**—न. (खा.) (जेवतांना बसावयास घेतात तो) लांकडाचा पाट. [पाट]

**पाटलें**—न. (व.) जम; बस्तान. 'आता त्याचें पाटलें जमलें.'

**पाटव**—न. १ कौशल्य; पटुता; चातुर्य 'सविवेकमति पाटव। तेंचि मंत्र विद्यागौरव।' –ज्ञा ९.२४२. २ (बुध्दीचा) तल्लखपणा; चलाखी; हुशारी; तरतरीतपणा. [स. पटु–पाटव]

**पाटव्य**—न. १ निपुणता; कौशल्य. 'देह कल्पावा जो एथ। पूर्ण पाटव्य इंद्रियुक्त।' –एभा २७.१८७. २ तरतरीतपणा; सामर्थ्य; शक्ति. 'पाटव्य असतां स्वदेहासी। कर्म न करितां महादोषी।' –एभा २१ १३५ [पाटव अप.]

**पाटस**—न. (व.) चाकाच्या घेराचा धावेजवळचा लांकडी भाग पाटा अर्थ ८ पहा

**पाटसरी**—स्त्री. जई पहा.

**पाटसून**—अ. (राजा. कुण.) पाटीमागून; मागोमाग 'जोताच्या पाटसून हिंडवत नाय.' –मसाप २.४.३६८. [पाठ]

**पाटा**—पु १ पुरण, चटणी इ० वाटण्याचा टांकीनें घडलेला दगडाचा तुकडा. २ (ल) सपाट जमीनीचा लांब पट्टा; पटांगण; माळरान. 'बरवें कांहीं न दिसे दृष्टीं। पाटा वाटेल सर्व सृष्टी।' –मुआदि २८.११५ ३ दहा तिफणी इतका जमीनीचा भाग ४ एक झाड. ५ (कु) एक प्रकारचें लहान जाळें. ६ लहान होड्यांना नांगर म्हणून बांधलेला दगड, लोखंडाचा तुकडा 'फोडुनिया नौका पाटीं। उतरीन म्हणे मार्गस्था।' –मुवन १७.२१. (सामा.) मोठा दगड, शिळा 'उरीं लोटता वाटलें त्यास पाटा। उठे संकटीं आठवी नीळकंठा।' –मुरा बाल ९१. ७ लोखंडी तुळईचा माथ्यावरील सपाट भाग. ज्यावर कड्या ठेवतां येतात किंवा बांधकामहि करता येतें ८ चाकाचा परिघ लांकडाच्या ज्या तुकड्यांनीं बनलेला असतो त्यापैकीं प्रत्येक. ९ (व) पोळपाट. १० (व.) कपाशीच्या शेतांतील मेंडी, गवारी इ० पेरण्यासाठीं राखून ठेवलेली एक तासभर जमीन. [सं पट्ट; प्रा. पट्ट; बं. पाटा=रुंदी, जमीनीचा पट्टा] **पाट्याचा आंगठा**–पु (बैलगाडीचे शब्द) चाकाच्या आऱ्याचें कुसूं. ०**पूजन**–न. स्त्री प्रसूत झाल्यानंतर पांचव्या दिवशीं करितात तें सटवीपूजन 'पांचव्या दिवशीं पाटापूजन।' –पाळणेसंग्रह ३ [पाटा+स पूजन=पूजा] ०**वरवंटा**–पु. १ पाटा व त्यावर ज्यानें पुरण, चटणी इ० पदार्थ वाटतात तो वर्तुलाकार लांबट घडीव दगड २ (ल) (मंगळागौरी पूजन) मंगळागौरीस व अन्नपूर्णेस बसविण्यासाठीं कणकेची जी गादी करितात तिला पाटा म्हणतात व कणकेचा लोढ करितात त्यास आकारसादृश्यावरून वरवंटा असें म्हणतात. ३ (ल.) चक्काचूर; विध्वंस, सत्यानाश (क्रि० होणें, करणें). 'संसाराचा–व्यापाराचा–घराचा–गांवाचा–पृथ्वीचा–लोकाचा - पाटावरवंटा.' [पाटा+वरवंटा] **पाटेकार**—पु (कु) पाट्यावर बसविलेली देवता; कुडाळ देशकर ब्राह्मण राजवटींतील गज्याचा देव [पाटा]

**पाटा**—पु. पायघडी घालण्याच्या उपयोगाचा वस्त्राचा अरुंद व लांब पट्टा. [सं. पट्ट] **पाटे मोडणें**–पायघड्या घालणें 'मराठे लोक वगैरे याजकडे लग्न होतात तेथे पाटे मोडावे' –मसाप २.२.१७४.

**पाटा**—पु. (महानु) वस्त्राचा तुकडा, चिंधी 'रणीं जुझारू घायेवटे। तरि वणियां न बंधिजाति पाटे।' –भाए २४१. [स. पट]

**पाटां(टा)ऊ, पाटांव, पाटावू**—पुन. १ उंची व चित्रविचित्र रेशमी वस्त्र २ पैठणी; पितांबर. 'एऱ्हवीं तरी सवणेयांच्या गावीं। पाटाउवें काय करावीं।' –ज्ञा ४.२२. 'पाटाऊं म्यानबंध तडप आणि घट्या भेद खंबायिताचे।' –सारुह ३.४१. 'शेले शालू साड्या क्षीरोदक लाबरुंद पाटावे।' –मोसभा ५ ८३. [हिं पाट=रेशीम, स. पट्ट] म्ह० १ नेसीन तर पाटाऊ नेसीन नाहीं तर नागवी असेन. २ वेडीचें सोंग घेतलें म्हणजे पाटाऊ फाडलें पाहिजे

**पाटांगडो**—पु (गो.) मुख्य विद्यार्थी.

**पाटांगण**—न (प्र.) पटांगण

**पॉटाचा**—वि. (गो) रांडलेक. [पाट=मोहतूर]

**पॉटारॉ**—वि. (गो.) भुकेबंगाल; खादाड. [पोट]

**पाटिलकी**—स्त्री पाटलाचें काम, अधिकार, हक्क.

**पाटिली**—स्त्री. १ पाटलास मिळणारा मुशाहिरा. २ पाटलाचा अधिकार, काम [पाटील]

**पाटी**—स्त्री. १ लहान मुलाची मूळाक्षरें लिहिण्याची फळी, धूळपाटी. हिच्याबद्दल हल्लीं दगडी (स्लेट्) पाटी वापरतात. 'माहेरीं बाळपणीं मज झाली रत्नमूर्ति परि पाटी। शिकलें तीवरि बाई! साध्वीची कांतभक्ति परिपाटी।' –मोकृष्ण ८३.१६८. २ पोथीच्या खालीं व वर (आच्छादनार्थ) ठेवतात त्या फळ्यांपैकीं प्रत्येक. ३ उंसांच्या चरकांतील लाटांच्या वर व खालीं असणाऱ्या लाकडाच्या जाड फळ्यांपैकीं प्रत्येक. या फळ्यांना खालची पाटी व वरची पाटी अशीं नांवें आहेत. ४ जिच्यावर शेवया तयार करितात ती लांकडाची फळी ५ (आट्यापाट्यांचा खेळ) क्रीडाक्षेत्रावर पाडलेल्या आडव्या जाड रेघांपैकीं प्रत्येक. हिची लांबी सुमारें बावीस फूट व रुंदी सुमारें एक फूट असते ६ (राजा खा व.) लांकडाची जाड फळी, लहान तुळई. 'बुचकुंदांचिआं पाटियां। कल्हारांचिआं मोहटियां।' –शिशु ७६६. 'दशरथ बुडतां तळवटीं। रामनाम स्मरे वाक्पुटीं। तव सांपडली फुटकी पाटी। नाम तारक।' –कथा ६ १४.३७. ७ अरुंद जमीनीचा लांब पट्टा. ८ शेताचा पाडलेला लहान तुकडा –कृषि २१० (राजा) भातजमीन. ९ (कों) घरटाच्या वरच्या तळीच्या मध्यभागीं बसविलेली लोखंडाची जाड पट्टी हिच्या मध्यभागीं असलेल्या छिद्रांत खालील तळीचा खुंटा फिरतो. १० स्त्रियांचें एक कंठभूषण. 'कंठीं मिरवे मुक्तमाळती, पेट्या पाटी नाना जाती.' –अमृत ५५. ११ रीत; पद्धत; परिपाठ. १२ (उदबत्त्यांचा कारखाना) उदबत्त्या तयार करण्याचा पाट. १३ (वाद्य) तंबोऱ्याच्या भोंपळ्यावर आच्छादनासाठीं बसविलेली लांकडाची फळी, तबकडी. १४ (खान) दाराची एक फळी [सं पट्ट] ०**उधळणें**–शाळा सुटतेवेळीं धूळपाटीवरील धूळ किंवा विटकरांचा भुगा उधळून लावून लिहिलेलीं अक्षरें नाहींशीं करणें. जुन्या काळीं धूळपाट्या वापरीत असत त्यावेळीं शाळेंतील दररोजचा अभ्यास संपला म्हणजे धूळपाटीवरील धूळ उधळून टाकण्याचा परिपाठ होता. (मुलगा, मूल)

**पाटीवर घालणें-बसविणें-लावणें**-शिक्षण देण्यास योग्य झालेल्या मुलास मूळाक्षरें शिकविण्यास आरंभ करणें; शाळेंत घालणें; ओनामा देणें **पाटी गणित**-न. अंकगणित [ पाटी+गणित ] **पाट्या बदलणें**-वर्गातील मुलानीं पाटीवर लिहिलेला अभ्यास, परस्परांत पाट्या बदलून पाठ तपासण्याचा एक प्रकार -अध्यापन ९९

**पा(पां)टी**—स्त्री बांबू इ०काची केलेली मोठी टोपली; हारा. [ सिं पाटि ] **पाटींतलें मास**-न ( तिरस्कारार्थी ) क्षुद्र व अगतिक व्यक्ति, लाचार व दीन मनुष्य 'मी पाटींतली मास परमान सायासी लाधलें। अभवेसी नको टाकू जसें जळ वळवाचें वाहवलें।' -होला ११४ **म्ह**० पाटीभर बोलणें गुंजभर अर्थ=अवडंबरयुक्त, निरर्थक बोलणें [ सि पाटि ]

**पाटी**—स्त्री पाठ; शरीराचा पृष्ठभाग. 'आतां सांज जाली। निगुती पाटी पसरिली। अविद्याभेरें झोंप येते।' -दावि २६०. [ पाठ ]

**पाटीं**—क्रिवि. नंतर. 'पाटीं समाधिश्रियेचा अशेखा। आत्मानुभवराज्यसुखा। पट्टाभिषेकु देखा। समरसें जाहला।' -ज्ञा ९.२१८. [ पाठ ]

**पांटी**—स्त्री. ( व. ) सुताची गुंजडी.

**पाटीदार**—पु. १ ( बडोदें-गुजराथेंत रूढ ) पाटील. 'तेथें प्रत्येक मुखी, मतादार व पाटीदार यांनीं (सरकारस्वारीस) नजराणा करावा ' -स्वारीनियम १२६ **२** शेतकरी. [ गुज. पाटीदार; पट्टीदार अप. ]

**पाटीर**—पु १ चंदनाचा वृक्ष, खोड. २ चंदनाच्या खोडाचें उगाळलेलें गंध. 'पाटीर हेममय वाटींत घे, विनय तार्टी फळें फुल जळें।' -आविश्वा ६. [ सं. ]

**पाटील**—पु. **१** गावचा कारभार पाहणारा वतनदार अधिकारी याच्याजवळ गावच्या शिवारांतील एकूण एक जमीनीचें पट्ट असतें. याला गावची पीकपहाणी, आणेवारी, पोलीसबंदोबस्त, लवाद होऊन न्याय करणें, पंचायत नेमून निवाडा करणें गांवचा वसूल जमा करणें इ० कामें करावीं लागतात. पाटील, कुळकर्णी व चौगुला या तिघांत मिळून गांवच्या शेतजमीनीपैकीं एकंपचवीसाश जमीन इनाम असे:-ग्रँटडफ याच्या हातीं शिलाहार व यादव याच्या काळीं गावातील फौजदारी व लष्करी अधिकार असून गावाचें रक्षण करण्याची जबाबदारी याच्यावर असे. लढाईच्या प्रसंगीं राजाला कांहीं विशिष्ट संख्याक सैनिक यानें गांवातून पुरविले पाहिजेत असे तह यादव कालापासून पेशवाईच्या अंतापर्यंत होते (-शा गे १४८) हल्लीं गावच्या बंदोबस्ताचें, सारावसूलीचें व कांहीं विशिष्ट मर्यादेपर्यंत मॅजिस्ट्रेटचें काम याच्याकडे असतें. गावच्या पोलीसाचा हा मुख्य समजला जातो गावासंबंधीं सर्व सरकारी पत्रव्यवहार याच्या मार्फत होतो. याची नेमणूक सरकाराकडून होते व ती वंशपरंपरा असते. पाटिलकीचा हक्क सरकारच्या परवानगीनें विकता येतो किंवा त्यांत भागीदारहि घेता येतो याच्या मानाच्या व हक्काच्या कांहीं बाबी असतात. 'महाप्रतापशाली महादजी शिंद्याना पाटील म्हणवून घेण्यांत भूषण वाटे ' -गागा ४६. **२** मराठा कुणबी व्यक्तीस आदरानें, सन्मानानें संबोधण्याची संज्ञा. [ सं पट्टकील; गु हिं. पटेल ] **पाटलाची घोडी**-( उप. ) ( पाटलाच्या गोठ्यांत गवताची काडी नसली तरी त्याची घोडी मात्र नेहमीं पुष्ट असते यावरून ) दुसऱ्याच्या जिवावर मजा मारणारी व्यक्ति. **म्ह**० १ कांहीं नसो पण दादला पाटील असो=घरात कांहीं नसलें तरी नवऱ्याला मात्र लोकात मानमरातब मिळो, नवरा मात्र पाटील असावा २ ( व ) पाटलाचें घोडें महाराला भुसकूट. सामाशब्द- ०**कुळकर्णी-पटवारी**-पुअव. पाटील, कुळकर्णी इ० गांवचे अधिकारी समुच्चयानें. ०**गढी**-स्त्री. पाटलाची रहाण्याची गढी 'बहुतेक गांवामध्यें सुरक्षिततेसाठीं इतर वस्ती मध्यभागांत व पाटीलगढी गांवकुसाजवळ मोऱ्याच्या ठिकाणीं घातलेली आढळते ' -गागा ४६ [ पाटील+गढी ] ०**पाहणी**-स्त्री. पाटलानें केलेली गांवच्या पिकाची पाहणी. ०**बा(बो)वा**-पु. **१** (सांकेतिक ) महादजी शिंदे. -रा १९ १११. **२** शिंद्याच्या गादीवरील पुरुष. दत्ताजी, जनकोजी, दौलतराव यांनांहि ह्या शब्दानें संबोधीत

**पाटीव**--वि. फळयांनीं पाटलेली तक्तपोशी, छत [ पाटणें ]

**पाटु-टू**—वि. श्रेष्ठ, उच्चासनावर बसण्यास योग्य [ पाट=श्रेष्ठ ] ०**बांध**-पु पट्टाभिषेक. -मनको

**पाटुला**--पु ( कु. ) लहान टोपली. [ पाटी ]

**पाटें**—न रुंद तोंडाची मोठी पाटी; टोपलें; हारा [ पाटी=टोपली ]

**पाटेफुटे**—पुअव झेलापागोटें. 'जीवोद्धारणाचे पाटेफुटे। जि कवणा दीधले।' -भाए १२२.

**पाटेल, पाटेलकी, पाटेलपटवारी, पाटेली, पाटैलु**—पाटील इ० पहा.

**पाटेलु, पाटैलु-लु**—पाटांगणाचा मुख्य अधिकारी; पाटील. -राजवाडे ग्रंथमाला -जनीजनार्दन. 'साजकार सोमदेअ जोरादेअ वारैकरु वरतअ मुपलपाटैलु नागला पाटैलु .. ' -नागाव येथील यादवाचा शिलालेख शके १२८९. ( राजवाडे ग्रंथमाला ).

**पाटेस**—पु. ( को ) छपराचें आढें; दांडा. [ पाठ+आंस; सं. पृष्ठवंश ]

**पाटो**—पु ( कु ) १ लहान कंथा [ पट ] **२** प्रदेश. [ पाट=लहान जमीनीचा पट्टा ]

**पाटोरी**—स्त्री. पोट. -शर (तुगा. ५५८).

**पाटोला-ळा, पाटोळी**—पुस्त्री १ चित्रविचित्र रेशमी वस्त्र; पाटाऊ. 'नेसली क्षीरोदक पाटोळा।' -एरुस्व ७.४४. 'वेढून रविरश्मि पाटोळा।' -मुआदि १३५१ २ अंथरूण, बिछाना. 'झाडोनिया मंचक। वरी पाटोळा क्षीरोदक।' -ह १०. १२६ 'कासें शोभे पाटोळी।' -कथा १२१६५ [सं. पटोल= वस्त्रविशेष -मेदिनीकोश ]

**पाटोवाटीं**—क्रिवि १ आपापल्यापरी. -शर. २ पाठोपाठ 'न बाहतां धांवे पाटोवाटीं' -दावि २१८.

**पाटोळी**—स्त्री (कु.) पाटाची बायको. [ पाट=मोहतूर ]

**पाटोळें**—न. (कु.) पाटाच्या बायकोपासून झालेलें मूल. [पाट=होतूर]

**पाटौला-ळें**—पुन. (महानु.) वस्त्र; रेशमीवस्त्र. 'कटिप्रदेश सावळा।' वरि वेढिला पाटौळा।' -ऋ ८९. [सं. पटोल =वस्त्रविशेष. -मेदिनीकोश. ]

**पाठ**—पु. १ वेदपठन; वेदादि ग्रंथांची आवृत्ति करणें. पंचमहायज्ञांपैकीं हा एक यज्ञ आहे. २ (सामा.) वाचणें; पठण करणें (स्तोत्र इ०). ३ मुखोद्गत करण्याकरितां अभ्यासासाठीं विद्यार्थ्यानें गुरूपासून घेतलेला भाग; धडा. 'राजकारणाचा अगोदरचा हा पाठ' -इंप ११९. ४ पुस्तक इ०कांतील धडा. ५ एखाद्या ग्रंथाच्या प्रतींतील वाक्य, शब्द, अक्षर क्रम इ० विषयक भेद, फरक. 'मूळ पुस्तकांतील पाठ निराळे असावेत.' -विवि ८४८९ तसेंच एका ग्रंथाच्या दोन प्रतींत एकीवर एक व दुसऱ्या प्रतींत दुसऱ्या प्रकारचा परंतु अशुद्ध नसलेला अर्थ ज्याच्या पासून निघतो असे जे दोन प्रकारचे अक्षरक्रम ते प्रत्येकीं; आणि त्यावर करावयाचें=असें चिन्ह. ६ वहिवाट; पद्धत परिपाठ 'जेतुनि जो झाला तो त्यात शिरे एकरूप हा पाठ।' -मोस्वर्गारोहण २.२२ ७ -वि. मुखोद्गत; ग्रंथाच्या मदतीवाचून त्यांतील भाग तोंडानें म्हणून दाखविण्याइतका स्मरणांत असलेला. 'सुजना सुनीति तैसा माया बहुसाल पाठवीरा ज्या।' -मोभीष्म १०.४० [स ](वाप्र) ०**करणें**-१ घोकणें; (एखाद्या ग्रंथांतील भाग, धडा, पाठ) स्मरणांत राहील अशा तऱ्हेनें पुन्हा पुन्हा म्हणणें. २ (एखादा ग्रंथ, पोथी, स्तोत्र इ०) समग्र वाचणें, म्हणणें; पठन करणें. ०**पडणें**-वहिवाट, शिरस्ता पडणें; परिपाठ, प्रघात चालू होणें. **पाठांत असणें**-(एखादी गोष्ट, काम इ०) परिचयाची, सरावांतील, राबत्यांतील असणें. **पुढें पाठ मागें सपाट**-नेहमीं घोकंपट्टी करणाऱ्या परंतु घोकलेलें विसरणाऱ्या मनुष्यास उद्देशून योजतात. ०**शक्ति**-स्त्री. (एखादा ग्रंथ इ०) पाठ, मुखोद्गत करण्याची बुद्धीची शक्ति; स्मरणशक्ति; [ पाठ+शक्ति ] ०**शाला-ळा**-स्त्री शास्त्र इ०कांचे पाठ सांगण्याकरितां असलेली शाळा; विद्यालय; शिकविण्याची जागा. **पाठांतर**-न १ एखाद्या ग्रंथांत श्लोक, वाक्य, शब्द इत्यादि विषयक असणारा भिन्न पाठ; पाठभेद 'येचि पदीं पाठांतर। तितिक्षा म्हणती थोर थोर।' -एभा १७१०४ २ मुखोद्गत असलेला श्लोकांचा, गोष्टींचा, ग्रंथांतील भागाचा भरणा. 'अर्थेविण पाठांतर कासया करावें। व्यर्थचि मरावें घोकुनिया।' -तुगा ४३५७ ३ (ग्रंथ इ०) पुन , दुसऱ्यांदा वाचणें, पठण करणें 'पाठांतर व्हावें मनीं धरिता। जिव्हेसी आली प्रसादता।' ४ (एखादा ग्रंथ इ०कांतील भाग) मुखोद्गत असणें. 'त्याचें पाठांतर मोठें आहे.' 'मला भागवताचें पाठांतर आहे.' ५ -वि. पाठ, मुखोद्गत 'कीर्तनामाजीं साचार। चरित्र नसलें पाठांतर।' [ सं. पाठांतर; पाठ+अंतर ] **पाठाशक्ति**-स्त्री. पाठशक्ति पहा [ पाठशक्ति अप. ]

**पाठ**—स्त्री १ कंबरेपासून मानेपर्यंतचा शरीराचा मागचा भाग. २ (ल ) तवा, सहाण, पाट, आरसा इ० सारख्या वस्तूच्या मागची, कार्योपयोगी बाजूच्या उलट बाजू. ३ (ल.) मदत; साहाय्य, टेका. (क्रि० देणें) 'इग्रजाचा अन्यायी निघाला पाठ पेशव्याची। म्हणून साहेब लोकांनीं आरंभिली आगळिक दाव्याची।' -ऐपो ३९७ ४ (ल.) (पृथ्वी, समुद्र इ०कांचा) पृष्ठभाग; पृष्ठविस्तार; पातळी. ५ साल, बाह्यत्वचा; सालपट. ६ (भरतकाम) टोपी इ०च्या कपाळपट्टीचा भाग सोडून चांदव्याशीं सभोंवार शिवलेलें कापड ७ (भरतकाम, शिवणकाम) कंबरेपासून मानेपर्यंतचा शरीराचा मागचा भाग झाकणारा कापडाचा तुकडा ८ मश्रू, किनखाब इ०कांची दर्शनीय भागाव्यतिरिक्त असलेली दुसरी, मागची, आतील बाजू. ९ शेळीचें स्त्रीजातीय अपत्य. पिढी या अर्थानें वापरण्यात येणाऱ्या डोई या शब्दाप्रमाणें हा शब्द, फक्त बकऱ्यांच्या बाबतींत पिढी या अर्थानें वापरतात 'ह्या बकरीच्या चार पाठी माझ्या हयातींत झाल्या.' [ सं पृष्ठ, प्रा. पट्ठ, पिट्ठ, पुट्ठ, हिं. पीठ गुज पूठ; सिं पुठि; बं. पिट ] (वाप्र ) ०**उघडी पडणें**-(ल ) पाठचें भावंड मरणें. ०**उचलणें** व्यवसाय सावरणें, गतवैभव परत मिळविणें, मिळणें; गमावलेली शक्ति, तेज इ० पुन्हा मिळविणें. याच्या उलट पाठ भुईस लागणें. ०**काढणें**-(एखाद्या कामांत) कुचरपणा, अंग चोरपणा करणें ०**कांपणें**-(भीति इ० कानीं) शरीर थरथर कांपणें ०**घेणें**-१ पाठोपाठ जाणें, पाठलाग करणें पिच्छा पुरविणें. २ (एखाद्या गोष्टीबद्दल एखाद्यास) सतावणें; गळ घालणें. जेरीस आणणें; राशीस लागणें; खणपटीस बसणें. ३ (एखादें त्रासदायक काम, आजार इ० एखाद्याच्या) बोकांडीं बसणें ०**चोरणें**-१ (बैल, घोडा इ० वाहनास जुंपलेल्या जनावरानें) फार ओझें लादलें जाऊं नये म्हणून पाठ आकुंचित करून तें चुकविण्याचा प्रयत्न करणें. २ (एखादें काम करतांना) अंग चोरणें; चुकारपणा करणें; पाठ

काढणें पहा **०झांकणें**-(एखाद्यानें एखाद्याच्या) पाटीवर जन्मास येणें. **०टाकणें**-विश्रांतिसाठीं (जमीन इ०कावर) अंग आडवें करणें, आडवें पडणें. **०था(थो)पटणें**-(एखाद्यास) उत्तेजनार्थ पाटीवर प्रेमानें थाप मारणें; शाबासकी देणें, वाहवा करणें. 'पाटविला काळानें जाणों थापटुनि पाठ वीर गडी।' -मोभीष्म ६.४७ 'हनुमंताची पाठी थापटी। प्रेमें संतुष्टी आलिंगी।' -भाराकिष्किंधा ३ १८ 'लोकाग्रणींनीं लोकांची मर्जी संपादण्यासाठीं अथवा त्यांजकडून आपली पाठ थोपटून घेण्यासाठीं त्यांच्या दोषाचें मंडन करणें अत्यंत लज्जास्पद आहे' -आगरकर. **०दाखविणें**-(युद्ध इ०कांतून) भीतीनें पळून जाणें, पोबारा करणें 'त्यांस रडावें मेले असतिल दावूनि जे परा पाठ।' -मोशांति ८ ३५ [तुल. सिं पुट्ठि डिअणु=पाठ देणें] **०देणें**-१ (युद्धात शत्रुसमोरून) भीतिनें पळून जाणें; पाठदाखविणें. 'असुहरखरतरशरगुरुपुत्रा धर्म पाठि दे चुकवी।' -मोकर्ण ३८ २९ २ मदत, सहाय्य देणें 'मिथ्यावादाची कुटी आली। तें निवातचि साहिली। विशेषा दिधली। पाठी जेणें।' -अमृ ७ १०५. ३ (एखाद्याचा उपदेश, विनंति इ०कांचा) अव्हेर करणें; आवमानणें, न ऐकणें. 'पितृवचनासी पाठ दिधली।' -एकनाथ. ४ मुकाट्यानें संकट, विपत्ति इ० सहन करणें 'देवोनि पाठ त्याला सर्वेहि मी सोशितों मुकाट्यानें।' -कृ ना आठल्ये. 'आल्या प्रसंगाला पाठ दिली पाहिजे' **०धरणें**-पाठलाग करून पकडणें **०निघणें-रिघणें**-(स्वत.चें) संरक्षण व्हावें म्हणून, आश्रयासाठीं एखाद्याच्या मागोमाग जाणें; एखाद्यास शरण जाणें, पाय धरणें **०पुरतीं घेणें-पुरविणें**-१ अतिशय आग्रह करणें; गळ घालणें, खणपटीस बसणें. 'मद्वात्सल्यें माझी तूं ही दे म्हणुनि पुरविली पाठ।' -मोअनुशासन ५ ७२. २ (एखाद्या गोष्टीचा, कामाचा) पिच्छा पुरविणें; नेटाचा प्रयत्न चालू ठेवणें. **०पुरविणें**-मदत देणें, साहाय्य, पाठबळ देणें. 'आधींचि देखणी दिठी। वरी सूर्य पुरवी पाठी। तैं न दिसे ऐसी गोठी। केंही आहे।' -ज्ञा १८ १७३३ **०पोट सारखें होणें**-(उपासमार, आजार इ० कानीं) अत्यंत रोड होणें **०फोडून निघणें**-(एखाद्यानें आपल्या) वडील भावाच्या, बहिणीच्या पाठीमागून जन्मास येणें. **०भुईस लागणें**-(द्रव्य, शक्ति इ० बाबतींत एखाद्याची स्थिति) अतिशय खालावणें, असमर्थ होणें; डबघाईस येणें. याच्या उलट पाठ उचलणें. **०भुईस लावणें**-चीत करणें; दडपणें **०मऊ करणें**-(एखाद्याच्या) पाटीवर मारणें, बडविणें; पिटणें. 'माझी पाठ मऊ करणें आपणाला नेहमीं हवें असतें.' -गुप्तमंजूष **०राखणें**-मदत करणें; पाठबळ देणें 'लोकीं अत्यंत क्षमा करिती। आलियां लोकांचे प्रचिती। मग ते लोक पाठी राखती। नाना प्रकारीं।' -दा १९.४ २९. **०वळणें**-विवक्षित स्थलाकडे पाठ व्हावयाजोगें फिरणें, पाटमोरें होणें, परत फिरणें. **०वळणें, पाहणें**-मागें वळून पाहणें **०सोडणें**-१ एखादा व्यवसाय, काम इ० नेटानें चालविण्याचें सोडून देणें २ एखाद्याच्या गळीं पडण्याचें, खणपटीस बसण्याचें, मागें लागण्याचें सोडून देणें. 'पाटी न सोडिती नको म्हणताही।' -दावि ३४४. **पाठीचे चकदे काढणें**-खूप मार देणें, बडविणें. **पाठीचे चकदे निघणें**-खूप मार बसणें. **पाठीचें धिरडें करणें-काढणें**-(एखाद्यास) खूप मारून पाठ धिरड्यासारखी लाल व खरबरीत करणें 'आई, ही माझी पाठ पहा हें पाटीचें धिरडें तुझ्या जामदारानें करविलें.' -संभाजी **पाठीचें साल जाणें**-१ मार मिळणें २ (ल. व्यापार इ० कांत) नुकसान येणें; ठोकर बसणें ३ लुबाडला, नागविला जाणें **पाठीमागें ठेवणें**-(पैसा, माणसें इ०) मेल्यावर मागें ठेवणें. 'त्या म्हातान्यानें पाटीमागें एक पैसाही ठेवला नाहीं.' **पाठीमागें देणें**-परत देणें **पाठीमागें पडणें**-१ (एखादी गोष्ट इ०) जुनी झाल्यामुळें प्रचारातून कमी होत जाणें, स्मृतिशेष होणें २ (एखादी गोष्ट) तीव्रता, महत्त्व इ० बाबतींत कमी होत जाणें. ३ (एखादें काम इ०) लांबणीवर पडणें; मुदत टळून मागें राहणें ४ कमी प्रगति होणें; मागें राहणें; मंद गति असणें. **पाठीमागें भुंगा लावणें**-(एखाद्यास) सतत त्रास देणें; ससेमिरा लावणें. **पाठीमागें लागणें**-(एखादी गोष्ट, व्यक्ति इ०कांच्या) नादीं लागणें **पाठीमागं सरणें**-मागें हटणें; हार खाणें **पाठीवर**-क्रिवि. १ (पिच्छा पुरविण्याकरितां, खणपटीस बसण्याकरितां, उत्तेजन देण्याकरितां एखाद्याच्या) मागें, पाठीशीं; मागोमाग (असणें) २ (जन्म इ० बाबतींत एखाद्याच्या) नंतर; पाठोपाठ **पाठीवर असणें**-१ मालक इ०कानें देखरेख करण्यास, चाकर इ०कांची चूक झाली असता शिक्षा करण्यास आश्रयभूत, मागें असणें 'या माणसांच्या पाटीवर कोणी असल्याशिवाय काम करणार नाहींत' २ मित्र, बंधु इ०कांनीं आपत्ति दूर करण्यास (एखाद्याच्या) मागें, पाटीशीं असणें. 'आमच्या पाठीवर ईश्वर आहे' ३ शत्रुचा नाश, पाठलाग करण्यास मागोमाग असणें. 'चोरांच्या पाठीवर दोनशें स्वार पाठविले आहेत.' ४ संततिक्रमानें कनिष्ठ, सोदरस्थानीं असणें. 'माझ्या पाठीवर पांच भावंडें आहेत.' **पाठीवर टाकणें**-(एखादें काम) लांबणीवर टाकणें; दिरंगाईनें करणें **पाठीवर, पाठीला तेल लावून ठेवणें**-खरपूस मार खाण्यास तयार होणें, असणें. **पाठीला पाय देऊन येणें**-(एखाद्याच्या) नंतर, पाठीवर, मागाहून जन्मास येणें (मूल इ०); (एखाद्याच्या) नंतर अधिकारारूढ होणें (राजा, मंत्री इ० कानीं). **पाठीवरून**-अ. नंतर, मागोमाग. **पाठीवरून हात फिरविणें**-गोंजारणें, प्रेमानें कुरवाळणें **पाठीवाटे काळीज निघणें**-पुरें पारिपत्य होणें, करणें. 'जो कोणी

पंतप्रतिनिधीची अखत्यारी सुभेदारी काढूं म्हणेल त्याचें पाटीवाटें काळीज निघेल.' –रा ६ ३५७. **पाठीशीं**–अंगावर; मागें. 'माझ्या पाठीशीं शंभर लचांडें आहेत.' **पाठीशीं घेणें**–अंगावर घेणें; पतकरणें (काम इ०) **पाठीस काळीज असणें**–स्वभावानें धाडसी, साहसी, बेडर असणें **पाठीस पोट लागणें**–१ (आजार, उपासमार इ०कानीं) पोट खपाटीस लागणें; रोड होणें २ उदर-निर्वाहाची जबाबदारी अंगावर असणें; उदरनिर्वाह करण्यास अतिशय श्रम; कष्ट, यातायात पडणें, या अर्थी पोट पाठीस लागणें असाहि वाक्प्रचार आहे 'पोट लागलें पाठीशीं। हिंडवितें देशो देशीं।' –तुगा ४१९६ **पाठीस(ला)लागणें** १ (एखाद्याचा) पिच्छा पुरविणें, पाठलाग करणें 'पाठीस लागले ते पांडवपाचालभट असें म्हणती।' –मोशल्य ३ १५ 'तुझ्या पाठीला हा महादेव लागला आहे ना?' –नामना १५. २ खणपटीस बसणें; गळीं पडणें पाठ घेणें पहा. **पाठासीं–शीं**–क्रिवि (अक्षरश. व लक्षणेनें) (एखाद्याच्या) पाटीमागें **पाठीशीं(सीं)घालणें**–१ आश्रय देणें, रक्षण करणें २ स्वीकारणें 'रायें पाठिसी दामी घाल्तिा। तिची सर्वावरी चाले सत्ता।' –रावि १.८१ (नवनीत पृ २१४) **पाठीशीं घेणें**–(एखादें काम इ०) अंगीकारणें, पत्करणें **पाठीं हटणें**–मागें जाणें, मागें पडणें –देशीभाषा १६ **झांकल्या पाठीचा**–वि प्रतिष्ठितपणाच्या पांघरुणाखालीं केलेला (गुन्हा, पाप इ०). उदा० विवाहित स्त्रीचें परपुरुषगमन इ० **झांकल्या पाठीनें**–क्रिवि अब्रूदारपणानें, प्रतिष्ठा न गमाविता **तापल्या पाठानें**–क्रिवि. जोंपर्यंत शरीरांत जोम, ताकद, उत्साह आहे तोंपर्यंत; शरीर शिथिल व दुबळें होण्यापूर्वी. साधितशब्द–**पाठचा**–वि. १ (एखाद्याच्या) नंतर, पाठीवर जन्मलेला (भाऊ, बहीण इ० भावंड) 'मी तुझ्या पाठची बहीण आहे' –नामना ११२. २ जीव वांचविण्यासाठीं आश्रयास आलेला. [पाठ] **म्ह०** पोटचा द्यावा पाठचा देऊं नये=प्रसंगविशेषीं पोटच्या मुलालाहि बळी द्यावें परंतु शरण आलेल्यास दगा देऊं नये. **पाठला**–वि. पाठचा अर्थ १ पहा. **पाठीं**–क्रिवि. १ एखाद्यावर अवलंबून (असलेला मुलाबाळाचा परिवार इ०). 'माझ्या पाठीं चार पोरें आहेत.' २ मागोमाग; पाठीमागें. 'भीमविजय त्यापाठीं नकुळसहदेव।' –मोप्रस्थान १ २३. ३ नंतर; मागाहून. 'पाठीं आपण जाइजे। अ–भोल–पणें।' –शिशु ४७४. 'स्वपद पावलीयापाठीं। जेवीं का वृत्ति होय उफराटी।' –एरुस्व १.३१. **पाठीकडून**–क्रिवि मागें वळून, तोंड मुरडून. 'दिठी मुखाचिये बरवे। जरी पाठीकडून फावे। तैं आरिसे धांडोळावे लागती काई।' –अमृ २ ७६. **पाठीचा**–वि. पाठीवर ओझें वाहून नेणारा (घोडा इ०). **पाठीचा कणा**–पु कंबरेपासून मानेपर्यंतच्या शरीरास ताठपणा देणारा हाडांच्या मणक्यांचा पाठींतील दंड; पृष्ठवंश. **पाठीचा कोंका**–पु. पोंक; कुबड. **पाठीचा तखता**–पु पाठीचा पृष्ठभाग; विस्तृत भाग. **पाठीं ना पोटीं**–क्रिवि ज्यास पाठचा भाऊ किंवा पोटीं संतति नाहीं अशा व्यापरहित, बेजबाबदार माणसाच्या स्थितीस उद्देशून वापरावयाचा वाक्प्रचार **पाठीमागचा–मागला–मागील**–वि १ (एखाद्या गोष्टीच्या) नंतर, मागाहून घडलेला; नंतरचा; मागला. २ (वडील भावंडाच्या) पाठीवर, नंतर जन्मास आलेला (भाऊ इ० भावंड); पाठचा **पाठीमागून**–क्रिवि १ (एखादा पदार्थ, व्यक्ति इ० काच्या) मागच्या बाजूनें, पाठीकडून 'माझ्या पाठीमागून विस्तव नेऊं नकोस.' २ (एखादी गोष्ट, क्रिया इ० काच्या) नंतर पश्चात् 'बाप मेल्यावर पाठीमागून त्यानें पैसा मिळविला' ३ (एखाद्याच्या) गैरहजेरींत, मागें 'हा पाठीमागून शिव्या देतो' [स पश्चात्; प्रा. पच्छा, पं पिच्छे; हिं पीछे, पाछे, गु पाछुं] **पाठीमागें**–क्रिवि १ (एखाद्यावर) अवलंबून; आश्रयाखालीं 'त्याच्या पाठीमागें मोठा परिवार आहे' २ (एखाद्याच्या) पश्चात्, मरणानंतर. 'त्यास माझ्या पाठी मागें राज्यावर बसविण्याचा अधिकार मिळेल' –मसाप २ ३ ३ (एखादी क्रिया, गोष्ट इ०काच्या) नंतर. ४ गैरहजेरींत; परोक्ष; समक्ष नव्हे अशा रीतीनें **म्ह०** १ आपली पाठ आपणास दिसत नाहीं =आपल्या अगदीं सान्निध्यात घडणाऱ्या पण आपणांस माहीत न पडणाऱ्या गोष्टीस उद्देशून योजावयाची म्हण. २ पाठीवर मारावें पण पोटावर मारूं नये. = एखाद्यास त्याच्या अपराधाबद्दल देहदंड खुशाल करावा पण त्याच्या निर्वाहाचीं साधनें कमी, नाहींशीं करूं नयेत. सामाशब्द– **०कांब**–स्त्री बांबूच्या पाठीची, बाहेरील बाजूची काढलेली साल, कावटी. याच्या उलट पोटकाव=आंतील बाजूची काढलेली कावीट. [पाठ+कांब] **०कुळी–कुळीस–कोळी–कोळीस, पाठगुळी–गुळीस, पाठंगुळी, पाठंगुळीस**–क्रिवि. (एखाद्याच्या) पाठीवर. (क्रि० घेणें; मारणें; आणणें; बसणें). [पाठ] **०कोरा**–वि एकाच बाजूस लिहिल्यानें दुसऱ्या बाजूस कोरा असलेला (कागद). **०कोरें**–न. एका बाजूस न लिहिलेला कागद. **०गा**–वि. पाठीवर स्वारी, ओझें नेण्यास शिकविलेला (घोडा, बैल). (क्रि० करणें; होणें). [पाठ] **म्ह०** शेट शहाणे आणि बैल पाठगे **०गुळी**–क्रिवि (ना) पाठकुळी पहा. **०जाळ**–पु पाठच्या भावंडाचें मरण इ० अनिष्ट गोष्टीचा शोक [पाठ+जाळ] **म्ह०** पाठजाळ पुरवेल पण पोटजाळ पुरवत नाहीं=पाठच्या भावंडाच्या मृत्यूबद्दलच्या शोकापेक्षां पुत्रशोक अधिक भयंकर असतो **०तगड**–न (सोनारी धंदा) (सोनें इ० धातूच्या) पत्र्याच्या दागिन्यांतील अथवा, पेटी इ० सारख्या दागिन्याच्या मागील, तळचा, दृष्टीस न पडणारा भाग. [पाठ+तगड=तकट, पत्रा] **०थोपटणी**–स्त्री. एखाद्यास उत्तेजन देण्याकरितां त्याची पाठ थोपटण्याची क्रिया;

शाबासकी, वाहवा. 'कारण युरोपियन कामदारांच्या ह्या पाठथोपटणीनें ते फुशारून जाऊन आपलें दोषाहि वर्तन पूर्ववत् कायम ठेवतील हें सांगावयास नको' -टि ११४६१ [पाठ+थोपटणें] ०नळ-पुअव. १ पाठीच्या कण्याच्या दोन्ही बाजूस असलेले कटिप्रदेशाचे दोन नळाकृति स्नायू. याच्या उलट पोटनळ २ (ल.) बराच वेळ एकाच स्थितींत बसण्यानें, वातादि विकारानें पोट फुगल्यामुळें पृष्ठवंशाच्या दोन्ही बाजूंच्या कमरेजवळ असलेल्या स्नायूंस आलेला जडपणा, ताठरपणा; त्यानें होणारी पीडा [पाठ+नळ] ०निघ्या-वि. आश्रयाकरितां, रक्षणाकरितां आलेला, शरण आलेला [पाठ+निघणें] ०पलाणें-न १ (विवाहसमारंभात रूढ) वरपक्षाकडून वराच्या सासूस चोळखण आणि लुगडें यांच्या अंतरास विनोदानें दिलेलें नाव २ पायघड्या संपून विहीणी घरात शिरताना वरमातेस वराच्या सासूनें खणलुगड्याचा करावयाचा अहेर. [पाठ+पलाणें] ०पुरावा-पु. सहाय्य; मदत. पाठिंबा [पाठ+पुरविणें] ०पुराव्या-वि. मदत करणारा; साहाय्य, पाठिंबा देणारा. [पाठ+पुरावा] ०पोट-न. पणतींत बोळकें उपडें घालून, तें सुतानें बांधून मकरसंक्रांतीच्या दिवशीं स्त्रिया परस्परांस देतात तें वाण. -क्रिवि. दोन्ही बाजूंनीं, पृष्ठावर (लिहिलेला, वाचलेला कागद इ०). [पाठ+पोट] ०पोटीं-क्रिवि समोरासमोर 'जैसी उदया आणिली गोष्टी। तैसी दाखवा प्रत्यक्षदृष्टी। सूर्ये जयद्रथ पाठपोटीं। मिरवा महाराजा।' -नव १२.८९. [पाठ+पोट] ०फळी-स्त्री आड तोडल्यानंतर त्याचे ओंडे सारखे व चौकोनी करण्यासाठी त्यांच्या बाहेरील चारी बाजूंनीं काढलेली ओबडधोबड फळ्यांपैकीं प्रत्येक. [पाठ+फळी] ०बंद-पु. बैलाला, घोड्याला गाडीला जोडण्याचा बंद, पट्टा. -राको. [पाठ+बंद=पट्टा] ०बळ-न. इष्टमित्र, भाऊबंद इ०काची (एखाद्या कार्यास होणारी) मदत, साहाय्य. [पठ+बळ=शक्ती.] ०बील-बेल-न. (राजा.) बांबूची बाहेरील बाजूची काढलेली कांबटी, चिपाटी; पाठकांब. पहा. [पाठ+बील=पाटी इ० विणण्याची बांबूची चिपाटी.] ०मोड-स्त्री. पाठीस कळ येईल अशा तऱ्हेचें (लिहिणें, ओझें वाहणें, खणणें इ०सारखें) कष्टाचें, परिश्रमाचें काम. [पाठ+मोडणें] ०मोरा-वि. १ पाठ फिरविलेला, (एखाद्या वस्तूकडे) पाठ करून असलेला २ (ल) विमुख; पराङ्मुख; विरुद्ध; उलट झालेला; वक्रदृष्टीनें पाहणारा. 'माझें अदृष्ट पाठमोरें देख।' -ह २९.१७७. 'ईश्वर होता पाठमोरा। नसतींच विघ्नें येतीं घरां।' -क्रिवि. पाठीकडून, पाठीच्या बाजूनें. [पाठ+मोहरा] ०राखण-राखणा-राख्या-स्त्रीपु १ लग्नानंतर नव्यानेंच मुलगी सासरीं जातेवेळीं तिला सोबत म्हणून जाणारें माहेरचें माणूस. २ दिवाळसणाकरितां जावई सासुरवाडीस जातेवेळीं त्याच्याबरोबर जाणारें माणूस. ३ साहाय्यकर्ता, मदत करणारा; पाठीराखा; वाली. [पाठ+राखणें] ०रिगा(घा)वा-पु. (कु.) साहाय्य, पाठबळ. [पाठ+रिघणें] ०रिघ्या-वि. रक्षणाकरितां आश्रयाची याचना करणारा; शरण गेलेला. [पाठ+रिघणें] ०लग-पु. (प्रां.) सान्निध्यांत, निकटून (विद्यादि साधनाकरिता शिष्यानें गुरूजवळ इ०सारखें) राहणें. 'तूं त्याचा पाठलग सोडूं नको म्हणजे बरें होईल.' [पाठ+लग] ०लाग-पु. १ (एखाद्यास पकडण्याकरितां त्याच्या) पाठोपाठ जाणें; पिच्छा पुरविणें, पाठपुरावा. २ तपास; छडा. ०वटीं-डीं-क्रिवि. (राजा) (एखादें कार्य आरंभिलें जात असतांना, केलें जात असतांना) पाठपुराव्यास, पाठबळ देण्यास; मागें; पाठीस (असणें) [पाठ] ०वशास-क्रिवि. पाठीमागें. -राको. ०वळ-न १ स्वारी वहाण्यासाठीं शिकवून तयार केलेलें जनावर. २ ओझ्याचें जनावर (विशेषत. घोडा). ३ (ल.) कोणतेंहि काम मुकाट्यानें करणारा धट्टाकट्टा किंवा धिम्मा मनुष्य. ४ (ल.) नेहमीं थट्टेचा विषय बनणारा सोशीक मनुष्य ५ (ल.) गलेलठ्ठ स्त्री. ६ (ल.) रखेली; राख [पाठ+वळणें] म्ह० शेट शाहणा आणि बैल पाठवळ ०वळण-न. नवरा मुलगा आपल्या सासूस लुगडें चोळी देतो त्याला विनोदानें म्हणतात -थोमारो २.३५७. ०वाड-स्त्री. मदत; पाठपुरावा. [पाठ] ०शिंगी-गा-ग्या-वि. ज्याचीं शिंगें मागें, पाठीकडे वळलेलीं आहेत असें (जनावर). [पाठ+शिंग] ०शाल-न. (कों.) नारळावरील काथ्याच्या आच्छादनावरील साल, त्वचा; नारळाच्या चोडाची साल. [पाठ+साल] ०सरीं-क्रिवि. मागच्या बाजूस पाठाण-न. (को.) १ पाठ; पाठीवर मारतांना किंवा तिच्यावरील फोड इ० दुखतांना तिरस्कारानें म्हणतात. 'माझे पाठाणात कळ आली.' -रोज्यु ९४. २ (राजा.) चोळीचा पाठीचा तुकडा. [पाठ] पाठावळ-ळू-स्त्री. (कों.) घराचें आढें. 'आज घराची पाठावळ बसवावयाची आहे.' [पाठ+वळ प्रत्यय] पाठाळ-न. पाठीवरून ओझें, मनुष्य वाहून नेणारें बैल, घोडा इ० जनावर; पाठवळ. 'जो जैसें काम सागत। तितुकें करी वैष्णवभक्त। चारा पाणी आणूनि देत। पाठाळें बांधीत निजांगें।' 'कोसपर्यंत गिल्चे यानीं पाटलाग केला, परंतु पाठाळ सक्त शीर (?) होतें म्हणून तशांतून (पार्वतीबाई) निभाऊन गेली.' -भाब १५४. (नवी प्रत). -वि. १ मोठ्या, रुंद पाठीचें (जनावर). २ चांगल्या पाठीचा (घोडा). ३ ओझीं वाहण्याच्या उपयोगाचा (घोडा इ० जनावर). [पाठ] पाठीमागून-क्रिवि. नंतर; पश्चात्. पाठुं(ठों)गळीं-क्रिवि. पाठीवर. पाठकुळी पहा. [पाठ] पाठून-क्रिवि. पाठीमागून पहा. पाठेळ-न. ओझ्याचें जनावर; पाठवळ. 'पाठेळ करितां न साहावे वारा। साहेलिया ढोरा गोणी चाले।' -तुगा २७९३. पाठोपाठ-ठी-ठीं-क्रिवि. १ लागलीच; मागोमाग. २ पाठीमागें; लागोपाठ. 'देव भोळा धांवे भक्तापाठोपाठीं।' -तुगा १३. [पाठ द्वि] पाठोवाटा-टीं-ठीं-क्रिवि. १ पाठोपाठ; मार्गेमार्गे;

पाठीमागें. 'देखौनि श्रीमूर्ति उघडी। ब्रह्मविद्या डोळे मोडी। मुक्ति धावे उघडी। पाठोंवाटीं।' -शिशु ३७२. 'धावे योषितांचे पाठोवाटी।' -एभा ८.१६४. २ वरचेवर; वारंवार; एकामागून एक. 'कां पाठोवाटीं पुर्टे। भागारा खारु देणें घटे।' -ज्ञा १८.१५७ [पाठ द्वि] **पाठोशीं**-क्रिवि. पाठीमागें. [पाठ] **पाठ्याळ**-न. पाठवळ अर्थ १ व २ पहा. [पाठ]

**पाठक**—पु. १ देवळांत, सार्वजनिकरीत्या पुराण वाचणारा पढीक ब्राह्मण; पुराणीक. 'जोसी पंडित पुराणीक। वैद्य वैदीक पाठक।' -दावि ४७३ २ धर्मशास्त्रविषयक निर्णय देणारा पडित. ३ उपाध्याय ४ अध्यापक, गुरु ५ ब्राह्मणातील एक आडनांव [सं]

**पाठवण-वणी, पाठवणूक**—स्त्री. १ निरोप देणें; बोळवण (क्रि० करणें). 'असो हें बुझावनी जाली। सखिया पाठवणी दीह्लली।' -शिशु २२९ २ (घरीं आलेल्या) अतिथीची, पाहुण्याची बोळवण करतांना द्रव्य देऊन केलेली सभावना व तें द्रव्य, बिदागी (क्रि० देणें) ३ हरिदास, पुराणिक वगैरेस दिलेली बिदागी. ४ (क) (पैसे इ०) पाठविण्याची क्रिया [पाठविणें]

**पाठव(वि)णें**—सक्रि. रवाना करणें; धाडणें [सं. प्रस्थापन; प्रा. पट्ठावण, हिं पठाना, पठौनौ, सिं पठणु बं पाठाइवा]

**पाठवळणें**—अक्रि परावृत्त, विमुख, पराङ्मुख होणें, माघारें फिरणें. [पाठ+वळणें]

**पाठसून**—क्रिवि (कु) मागाहून, नंतर [पाठ]

**पाठा**—पु (काव्य) विस्तारपूर्वक, तपशीलवार, पाल्हाळानें सांगितलेली माहिती; सविस्तर यादी, पाढा 'वाचे हरिनामाचा पाठा। व्यापार खोटा न करणें।' [पाठ=मुखाद्गत केलेले स्तोत्र इ०काचे पठण]

**पाठाउ**—वि. समर्थ; लायक; योग्य. 'कैवल्यकनकाचिया दाना। जो न कडसी थोर माना। द्रष्टयाचिया दर्शना। पाठाउ जो।' -अमृ २.५.

**पाठाड, पाठाण, पाठार**—न. (तिरस्कारार्थी) पाठ; पठाड, पठाण, पठार इ० पाठ या अर्थी पहा.

**पाठाड**—वि. पठाडी पहा.

**पाठार**—न. १ पर्वताच्या माथ्यावरील सपाट भूप्रदेश, पृष्ठभाग पठार पहा. 'गोवर्धनाचा पाठारीं। गोधनें चारितांति खीरारीं।' -दाव ३१७ २ आश्रय; पाठबळ 'ऐसा पवनाचेनि पाठारें। येतां धारणेचेनि पैसारें।' -ज्ञा ६ ५८ ३ (तिरस्कारार्थी) पाठ; पठार अर्थ ४ पहा. [पठार]

**पाठारणें**—अक्रि. (महानु) (अवस्था, दशा, दिवस इ०) उलटणें; पालटणें; जाणें; व्यतीत होणें. 'तारुण्य पाठारूनी उतरीनिली। लावण्याची झळाळी।' -शिशु ३९६. [पाठार=पाठ]

**पाठारा**—पु. धुव्वा; फन्ना; दाणादाण. 'रजपूत लोक पहिल्याच सपाटयास आमच्या सैन्याचा पाठारा उडवितील.' -इलासुंदरी २७.

**पाठारा**—पु. प्रभू समाजांतील एक पोटभेद व त्यांतील व्यक्ति.

**पाठारी**—पु. सुतार जातींतील एक पोटभेद व त्यांतील व्यक्ति; पाचकळशी.

**पाठिंगा-बा**—पु. पाठबळ; साहाय्य; मदत. -शर. -वि. मदत, पाठबळ देणारा, पाठीराखा; साहाय्यकर्ता [पाठ]

**पाठिरा**—पु. कंबरेपासून मानेपर्यंतचा शरीराचा मागचा भाग; पाठ; पठार. 'जे गेले सिंहगडाला। त्याचे पाठिरें पाहिले। नाहीं पुढारें पाहिले।' -ऐपो ३६. [पाठ]

**पाठी**—स्त्री. १ कंबरेपासुन मानेपर्यंतचा शरीराचा पृष्ठभाग; पाठ. २ साहाय्य, आश्रय; मदत 'निर्बळापाशीं निर्बळाला। पाठी कैची।' -दा ६.१.२६. ३ पाठ (-स्त्री.) इतर अर्थी पहा. [पाठ]

**पाठिमोरा**-वि. १ पराङ्मुख 'पुण्याविषयीं पाठिमोरा। साधुसंता पाहुनि झुरा।' -सिसं ४९ १७५ २ मार्गे वळलेला; तोंड फिरविलेला. 'जेथ भ्रपल्लवा पडे गाठी। तेथ पाठिमोरी दिठी।' -ज्ञा ५ १५२ ३ परत; माघारा 'गांडीव त्यासि दे हें क्लीबा हो शीघ्र पाठिमोरा जा।' -मोकर्ण ४० ७३. [पाठ+मोहरा]

**पाठीराखा-ख्या**-पु. (काव्य.) रक्षणकर्ता. (विरू.) पाठराखा. 'हिरण्याक्षासी साह्य देखा। हिरण्यकशिपु पाठीराखा।' [पाठ+राखणें] **पाठीलागा**-वि पाठीस लागणारा; मागोमाग येणारा; पिच्छा पुरविणारा. 'पाठीलागा काळ येतसे या लागें।' -तुगा १८५९. [पाठ+लागणें] **पाठिलागीं**-क्रिवि. पाठीमागें. 'बळें लागला काळ हा पाठिलागीं।' -राम १३. [पाठी+लागणें]

**पाठी**—वि. १ वाचल्याबरोबर ज्याच्या लक्ष्यांत राहतें असा; चांगली पाठशक्ति असलेला. उदा० एकपाठी. २ ज्यास एखादा ग्रंथ किंवा विशेषतः वेद तोंडानें पाठ म्हणतां येतात असा. 'जटापाठी, घनपाठी.' [पाठ=वाचन]

**पाठुरका**—वि. (व.) पाठराखा; साहाय्यकर्ता. [पाठ+राख्या]

**पाठें**—न. (व.) गाडीच्या चाकाचा परीघ लांकडाच्या ज्या वर्तुलाकार तुकडयाचा बनविलेला असतो त्यापैकीं प्रत्येक; पाटा अर्थ ८ पहा.

**पाठोरापिठोरा**—पु. श्रावणी अमावास्येच्या दिवशीं चौसष्ट योगिनींच्या पिठाच्या प्रतिमा काढून किंवा त्यांचीं कागदावर चित्रें काढून पूजा करितात तो विधि. [पिठोरा द्वि.]

**पाठ्य**—न. (नाटय) पात्रानें, नटानें बोलावयाचें भाषण, नक्कल. [सं. पाठ्य=पाठ करावयाचें, पाठ करण्यास योग्य, शक्य]

**पाळ्याळें**—न. भात-जमीनींत चिखलकरण्याचा बिनपासेचा कुळव. -मसाप २ ३.२५४. [पाठ]

**पाड**—पु. १ बाजारभाव, दर, निरख 'सद्याप्रमाणें पहिला पाड होता' -ख ९१४. २ (ल.) योग्यता; बरोबरी; साम्य किंमत 'त्रिभुवनसुंदर हें रूपडें। माझी कन्या त्याच्या पाडें।' -वेसीस्व ३ ६३. ३ महत्त्व 'आमुचिया काजाचेनि पाडें। देखती आपुलें जीवित थोकडें।' -ज्ञा १ ११२ ४ प्रमाण, मान. 'वीज चमके जेणें पाडें। तैसा गरुड झेंपावे पुढें।' -मुआदि ६ ७३ ५ झाडावरील फळांची विशेषतः आंब्यांची कच्चेपणा जाऊन पक्के पिकण्यापूर्वीची अवस्था. 'आबया पाडु लागला जाण।' -एभा १२.५९९. ६ पिकण्याच्या अवस्थेस आलेला झाडावरील आंबा 'हिराबाईजवळ आंब्याच्या पाडांनीं भरलेली टोपली आहे' -बाळ २ ४३. ७ माळोचा; माची. ८ परवा, क्षिति. 'द्रोणाचा पाडु न करीं। भीष्माचें भय न धरीं।' -ज्ञा ११ ४७२ ९ अंतर; भेद. 'संसर्गें चेष्टिजे लोहें। परि लोह भ्रामक नोहे। क्षेत्र क्षेत्रज्ञां आहे। तेतुला पाडु।' -ज्ञा १३ ११२२. १० (ना) जोड; प्रतिस्पर्धित्व. ११ संगति, मेळ; जुळणी -खिपु १२ परिणाम -शर. १३ (नागिक भागात रूढ) रेशमी कांठाचें व सुती पोताचें वस्त्र १४ (-वि) योग्य; साजेसा; अनुरूप 'राजा बोले वसिष्ठासी। रामापाड हे गुणरासी।' -वेसीस्व ९.१०९. [का पाडु=समता, बरोबरी; का. पड्डि] **म्ह०** आंबे आले पाडां निंबुणी आल्या रसा (वाप्र.) **पाडास जाणें**-१ फळझाडाचा पाडाचा ऋतु टळणें. २ गाय, म्हैस इ० जनावर फळण्याच्या समयापलीकडे जाणें; फळण्याचें टळणें. **पाडास येणें-लागणें**-फळ पिकण्याच्या अवस्थेस प्राप्त होणें. 'हेंचि आंब्यांचें सदा फळलें वन। पाडा आलें प्रेमेंकरून।' -ह १९.२२४ सामाशब्द-**०कुला**-वि (राजा.) वयानें प्रौढ असूनहि शरीरानें नाजुक व पुष्ट असलेला (पुरुष इ० व्यक्ति); ताजातवाना. 'तिला पंधरा मुलें झालीं तरी ती पाडकुली दिसते' [पाड=पिकलेली स्थिति] **०पंचाईत**-स्त्री. १ (एखाद्या वस्तूची) किंमत इ० विषयीं बारीक चौकशी. २ (सामा.) पंचायतीनें केलेली चौकशी; विचारपूस. [पाड=किंमत+पंचाईत=तपास, चौकशी] **पाडाचा**-वि. पिकून झाडावरून काढण्याच्या, गळण्याच्या स्थितींत आलेला (आंबा इ० फळ).

**पाड**—पु डोंगर. 'जे तो विषयांची मोट झाडी-। माजी कामक्रोधांचीं सांकडीं। चुकावूनि आला पाडीं। सद्वासनेच्या।' -ज्ञा ७.१२७. [पहाड]

**पाड**—न. (गो.) मासे धरण्याचें जाळें.

**पाड**—वि. (गो.) ओसाड; पडीत. 'तुमच्यासारख्या पापी डोळ्यांची दृष्ट लागून तर आमचा हा गांव असा पाड पडला.' -सह्याद्रीच्या पायथ्याशीं ९०. **०पडचें**-अक्रि (गो.) धुळधाण होणें; ओसाड पडणें.

**पाड**—क्रिवि. पलीकडे. -शर. [पार]

**पांड**—पु. १ जमीन मोजण्याचें एक परिमाण. हें बिघ्याच्या एकवीसांशाइतकें किंवा चारशें चौरस काठ्यांइतकें असतें. 'किती पांड मोजीन म्हणतां गगन। लोक हांसती तयातें।' -जै ७७.४५. २ (वेशांत उत्तरेकडे रूढ) जमीनीचा तुकडा, ठिकें, फाळी.

**पांड**—न पाऊल; पावंड. 'वचन वदुनि ऐसें चालिला चार पाडें।' -आविश्वा २५. [पावंड अप.]

**पाडकॉ**—पु (गो.) गाईचें वासरूं; पाडा. [पाडा]

**पाडकू**—न. (बे.) लहान पाडा, पाडी. [पाडा]

**पाडगण**—स्त्री. (बे.) मोतिया वनस्पति.

**पाडगा**—वि. (प्रां.) पाठीवर ओझें, स्वारी वाहण्यास शिकविलेला (घोडा इ० जनावर); (प्र.) पाठगा पहा. [पाठगा]

**पांडगा**—पु पाड अर्थ २ पहा [पांड]

**पाडगुण**—पु (गो) दुर्गुण, अवगुण. [पडलेला?+गुण]

**पाडगें**—न. १ पासोडी इ०कांचें एक पट्टें; पाटगें; तागा. २ (बडोदें-मराटवाडा, खालच्या जातींत रूढ.) पैठणी; रेशमी साडी 'शालू अगर पाडगें.' -अहेर-बहुमान पोशाखाचा नियम ७. ३ कापडाच्या तागयाच्या गाठींपैकीं प्रत्येक; [पाटगें]

**पाडगें**—न. (व) गांधर्वविवाह; मोहतूर; पाट. [पाट=मोहतूर]

**पाडणायो मॉडॉ**—पु (गो. बायकी.) द्वाड मुलगा.

**पाडणी**—स्त्री. पाडण्याची क्रिया. पाडणें क्रियापद सर्व अर्थी पहा. [पाडणें]

**पाडणें**—सक्रि. १ खालीं येईल असें करणें; पडेल असा करणें; जमीनदोस्त करणें; तोडून टाकणें (झाड इ०). 'म्हणती हाणा मारा पाडा ह्या काय पाहतां तोंडा।' -मोद्रोण ३.१२५. २ मागें टाकणें. 'वावदळ पाडूनि ठाये। साबलु डाहारला आहे।' -ज्ञा १७ १४३. ३ (एखादा व्यवहार, धंदा इ०) मोडणें; मोडून टाकणें; दाबून टाकणें; नाहींसा करणें ४ घालणें; ठेवणें; टाकणें. 'काळ मोरानि न सोडी। यातना भोगवी गाढी। सर्वेंचि गर्भवासीं पाडी।' -एभा १०.४२७. ५ विभागणें; भाग करणें. 'नियमाप्रमाणें वर्षांत दोन हप्ते पाडणें.' -(बडोदें). खानगी खात्यांतील आर्डलींरूम संबंधीं नियमाची दुरुस्ती १. ६ कैदी करणें. -पया १०२ या धातूच्या अर्थाच्या निरनिराळ्या अनेक छटा निरनिराळ्या संदर्भानें भार्षेत रूढ आहेत त्या सर्वांचा जोरानें खालीं आणणें, ठेवणें, करणें इ० गर्भितार्थ आहे. मारणें, लावणें, घासणें यांच्या वर्गातीलच हा धातू आहे. निरनिराळ्या नामांच्या संबंधांत या क्रियापदाचे निरनिराळे अर्थ होतात. त्यांपैकीं कांहीं पुढें दिले

आहेत इतर ठिकाणीं संदर्भावरून अर्थ समजण्यास कठिण जाणार नाहीं. [सं. पातम्; प्रा. पाड, हिं पाडना] (वाप्र) उजेड, नाव पाडणें=कीर्ति मिळविणें; कीर्तीनें लोकांस दिपविणें. कोष्टक, क्रम पाडणें=कोष्टक करणें, क्रम लावणें चाल, सराव, संवय पाडणें=एखादी पद्धत रूढ करणें; संवय लावणें जमाव पाडणें=एकत्र जमाव करणें. 'घोडीं, हत्ती देणे ऐसें करून फौज व जमाव पाडिला.' –मराचिथोरा ४०. जिलब्या, बुंदी पाडणें=जिलबी–बुंदीच्या कळ्या तयार करणें. तक्ते पाडणें=लांकडाच्या मोठ्या ओंडयाच्या फळ्या करवतून काढणें. तुटी, ताटातूट पाडणें=एकमेकांपासून तोडणें, ताटातूट, वियोग, करणें 'ऐसी लोकीं पाडिली तुटी। नव्हे राधेसी कृष्णभेटी।' –ह ८ ९९. दार, खिडकी, भोंक पाडणें=(भिंत, कुंपण इ०स) दार खिडकी, भोंक इ० करणें, ठेवणें. पायऱ्या पाडणें=डोंगर इ०कांत खणून, खोदून पायऱ्यांच्या आकृती करणें. पैका, रुपये पाडणें=श्रमानें पैसा मिळविणें. फणीला दाते पाडणें=बोथट झालेल्या फणीला दाते तयार करणें मुरकुंडी पाडणें=नाश करणें. 'अकस्मात घालोनि धाडी। थोरथोरांची पाडी मुरकुंडी।' –जै ७८.४५ रण पाडणें=युद्धांत शत्रूंना मारणें, ठार करणें. 'अभिमन्युनें रण पाडिलें देखोन। आश्चर्य करिती कृष्णार्जुन।' –पांप्र ४५ ८५. रस्ता पाडणें=पूर्वी रस्ता नसलेल्या ठिकाणीं रस्ता चालू करणें; रस्त्याची वहिवाट करणें. रुपये पाडणें=टाकसाळींतून रुपयांचीं नाणीं काढून प्रचारांत आणणें. रेघा पाडणें=रेघा, ओळी ओढणें, काढणें, आंखणें. वळी पाडणें=कापड इ० दुमडणें; कापड इ० दुमडीनें, सळानें युक्त करणें. विटा पाडणें=साच्यानें माती इ०च्या विटा तयार करणें. विहीर पाडणें=विहीर खणणें शेत पाडणें=नवीनच लागवडीस आणलेल्या जमीनीचा लागवडीस सोईस्कर असा तुकडा, भाग करणें. शोध, ठिकाण पाडणें=(एखादी वस्तु) शोधून काढणें; तपास लावणें समजूत, उमज पाडणें=(एखादी गोष्ट एखाद्याच्या) डोक्यात उतरवून देणें, समजावून सागून स्पष्ट करणें इ०. (वाप्र.) **पाडून नेणें**–लढाईंत जिंकणें; काबीज करणें. 'तेथें सदाशिव यमाजी यांणीं लोकाचीं घोडीं, उंटें, पाडून नेलीं होतीं' –थोमारो ११७. **पाडून देणें, घेणें**–(सौदा इ० ठरवितांना माल वगैरे) किंमत इ० कमी करून देणें, घेणें. **पाडापाड**–स्त्री. १ (घर इ०) पाडण्याची अव्याहत क्रिया. २ लूटालूट. [पाडणें द्वि.]

**पाडथर-रा**—पु. (विप्र. पाटथर) पाटथर पहा.

**पाडथळ**—न. पाटाच्या पाण्यानें भिजणारी लागवडीची जमीन. पाटस्थळ पहा याच्या उलट कुडथळ. [पाट+स्थल] **०बिघा, पाडथळी बिघा**–पु पंधरा पांडांचा बिघा; याच्याउलट कुडथळबिघा [पाडथळ+बिघा]

**पांडरा**—पु (गो) (साकेतिक) नाग; सर्प; पांढरा पहा.

**पांडरी**—स्त्री. ग्रामसंस्था; पाढर पहा. [पाढर] **०फड मुख्य**–पु. राज्यांतील सर्व ग्रामसंस्थाचा अधिपति. 'सि पांडरी –फड-मुख्य समंतातभाग आचंद्रार्क श्री' –चौऱ्यांशीचा शिलालेख (पंढरपूर). [पांडरी=ग्रामसंस्था+फड=कचेरी+मुख्य=अधिपति]

**पाडव**—पु १ (संगीत) अवरोह. (क्रि० करणें) २ पराभव; (प्र.) पाडाव; पाडाव पहा. –वि. (प्र.) पाडाव (–वि.) पहा.

**पाडव**—पु. (बे.) चार मेटींमधला दगड; जमीन इ०च्या सीमेची खूण म्हणून चारी बाजूस चार सखल दगड पुरून त्यामध्यें पुरलेला एक उंच दगड. [का. पाड=चौकट]

**पांडव**—पु १ पंडुराजाचा वंशज; विशेषत युधिष्ठिर, भीम, अर्जुन, नकुळ व सहदेव या पंडुराजाच्या पांच मुलाना समुच्चयानें हा शब्द लावण्यांत येतो २ (ल) पांच रुपये इ०कांचा समुदाय. ३ एक प्रकारचा पाणकोंबडा. [सं.] **पांडवांचें लेणें**–न. डोंगर, खडक इ० पोखरून केलेली मनुष्यशक्तीस करण्यास अशक्य दिसण्याजोगी देवालय, मूर्ति; राहण्याच्या खोल्या इ०कांची रचना. **०कृत्य**–न. लेणें. लेणीं हीं मनुष्यशक्तीच्या आटोक्यांत नाहींत असा प्रायः समज आहे. तीं पराक्रमी पांडवानीं केलीं असावींत अशा समजुतीवरून हा अर्थ. 'एका टेकडीच्या गुहेंत पांडवकृत्य आहे.' –कोरकि २२३. [पांडव+कृत्य] **०प्रताप**–पु. कौरव–पांडवांच्या कथाचा श्रीधरकवीनें लिहिलेला ओवीबद्ध ग्रंथ. [पांडव+प्रताप=पराक्रम]

**पाडवकी**—स्त्री. (कु.) (झाडावरून नारळ इ०) पाडण्याची, काढण्याची क्रिया; पाडा. (क्रि० करणें) [पाडणें]

**पाडव(वि)णें**—सक्रि. पाडण्यास लावणें, भाग पाडणें. [पाडणें याचें प्रयोजक रूप]

**पाडवा**—पु. (क) पाडण्याची क्रिया (क्रि० करणें). [पाडणें]

**पाडवा**—पु. १ चैत्रादि महिन्यांचा शुक्ल व कृष्ण पक्षांतील पहिला दिवस; प्रतिपदा पाडिवा पहा. २ (गौरवार्थी) वर्षप्रतिपदा. चैत्रशुद्ध अथवा कार्तिकशुद्ध प्रतिपदा. 'लोकां महोत्सवप्रद तोचि सदा त्यासि पाडवा नलगे।' –मोवन ४.३१ [सं. प्रतिपद्; प्रा. पाडिव; गुज. पडवो; हिं पडिवा.] **पाडव्याचें साल**–न. चैत्रशुद्ध प्रतिपदेपासुन सुरू होणारें वर्ष; शालिवाहन शकाचें साल; चैत्रीसाल. हें साधारणपणें सामान्य व्यवहारांतील वर्ष समजलें जातें याहून भिन्न म्हणजे मृगसाल, दिवाळीचें साल हीं होत 'या (शालीवाहन) शकांतील वर्षास कोणी पाडव्याचें साल असें म्हणतात.' –मराठी ६ वें पुस्तक पृ २१३ (१८७५).

**पाड(डा)वेल**—स्त्री. (गो.) एक प्रकारचा वेल.

**पाडशी**—स्त्री. पडशी; मोठी पिशवी [बे. पडच्छी]

**पाडस**—न. १ हरिणीचें वत्स; मृगशावक. 'पाडस वागुर करांडी। जरी मुंगी मेरु वोलांडी।' –ज्ञा ७.९५. 'आळवितो जैसें

पाडस कुरंगिणी। पीडिलिया वनीं तहानभूकें।' -तुगा १६०५. २ गाईचें वांसरूं. ३ (ल.) (लडिवाळपणानें) लहान मूल. 'म्हणे बाळा रोहिदासा। भेटी देई बा पाडसा।' -मुक्न-हरिश्चंद्राख्यान (नवनीत पृ. १९७). [दे]

**पाडस**—पु. (गो.) छपराचें मुख्य आढें. पाडस पहा. [दे]

**पाडसावयलो कुंवाळो**-पु १ (गो.) आढयावरील कोहळा. २ (ल.) सुरक्षित ठिकाणीं असलेला जिन्नस. **पाडसावयली कीट**-स्त्री. (गो.) आढयावरील ठिणगी.

**पाडस-सा**—वि. (विप्र पारठा) पारठा पहा

**पाडसडणें**—अक्रि. (कों.) (वृक्ष इ०) पर्णरहित होणें, पारसडणें.

**पाडसडें**—न. मुख्य आढयाच्या दोन्हीं बाजूंस असलेल्या छपराच्या पाख्यांपैकीं प्रत्येक [पडिस+आढें]

**पाडसारु**—पु. दोरखंड, जाड दोर; चऱ्हाट -शर.

**पाडसे**—न. पात्र. -शर.

**पाडळ-ळी**—स्त्री एक औषधी झाड. याच्या वेलपाडळ व वृक्षपाडळ अशा दोन जाती आहेत पाडळीस फळाचे घोंस येतात हीं फळें पांढरीं, लहान मोत्यांएवढीं असून गोड असतात. वेलपाडळीचें मूळ कडू असतें. वृक्षपाडळीचीं पानें बकुळीच्या पानांप्रमाणें असतात. -वगु ४.६०. पाटली पहा. 'योजनसुगंध पाडळ। आळिकुळामंद बकुळ।' -दाव १५६. 'नव्हाळी दावितांति पाडळ। परिमळाची।' -शिशु २९६. [सं. पाटल-ली]

**पाडा**—पु. १ गाईच्या वांसरांतील नर; गोऱ्हा. 'किरीटी कामधेनूचा पाडा। वरी कल्पतरूचा आहे मांदोडा।' -ज्ञा ८.८. २ खोंड; पोळ 'कांहीं केला ताडामोडा। विकिला घरींचा पाडारेडा।' -दा ३ ४.१३. ३ (बडोदें) रेडा. -लागतीचे नियम ५८. 'आमच्या सरकारची परवानगी घेतल्याशिवाय पाडे बांधण्यास व शिकारीस परवानगी नाहीं.' -विक्षिप्त ३.१७४. [गु. पाडो=रेडा] ०पेटविणें-खोंडाला नांगर ओढण्यास शिकविणें. 'कीं न पेटवितांचि पाडा।' -सिसं ८.१९१.

**पाडा**—पु. १ शेतकीच्या कामाच्या सोयीसाठीं शेतकऱ्यांनीं आपल्या गांवापासुन किंचित् दूर व शेतापासून जवळ बांधलेल्या झोपडयाची वाडी, (सामा.) लहान खेडें. 'त्याला लागून भोपी वाडी म्हणून लहानसा पाडा आहे.' -बदलापूर ३२. २ शेतकऱ्याची झोंपडी; खोपटें. -शर. ३ शहरांतील पेठ, मोठी गल्ली, मोहल्ला. [सं. पद्रक-पड्अ-पाडा. -राजवाडे भाअ १८३३; गु. पाडो=खेडें; वं. पाडा=पेठ, मोहल्ला; सिं. पाडो=मोहल्ला]

**पाडा**—पु (गो.) नारळ, सुपारी इ० फळें झाडावरून पाडण्याचा हंगाम, क्रिया. 'जेथें पूर्वी दर पाडयाला वीस-पंचवीस हजार नारळ पडत, तेथेंच आतां पंधरासोळा हजारहि पडण्याची मारामार!' -सह्याद्रीच्या पायथ्याशीं ९५. [पाडणें] **पाडेकरी**-पु (कों.) नारळ, पोफळ इ०कांचा पाडा करण्यांत कुशल मनुष्य.

**पाडा**—पु १ उजळणीचा पाठ, पाढा (तीन एके तीन, तीन दुणे सहा याप्रमाणें उजळणीचे पाठ). २ (क, का, कि, की इ०सारखा) बाराखडीचा धडा. ३ (ल.) तपशीलवार कथन; लांबलचक तपशील, चऱ्हाट [सं पठण, पाठ; पाटी=पाटा (अंकगणित) -राजवाडे भाअ १८३२] ०वाचणें-पु (गोष्टीचा, कज्ज्याचा, कामाचा) लांबलचक तपशील सांगणें.

**पाडा**—पु रोपटें, लहान रोंप. 'पृथ्वीवरील तृणाचे पाडे। त्याचीहि गणती होईल कोडे।'

**पाडा**—वि (गो) नि:संतान, निर्वंश [पडणें] ०घालचें-(गो) जमीन उध्वस्त करणें, नासाडी करणें ०पडचें-(गो.) निर्वंश होणें.

**पाडों**—वि (गो) १ द्वाड; दुष्ट स्वभावाचा (मनुष्य). २ ओसाड; पडीत प्रदेश [पडणें]

**पांडा**—पु. उत्तरहिंदुस्थानी ब्राह्मणाची एक पदवी. पंडया पहा. [सं. पंडित; हिं. पंडा=पुरोहित]

**पांडा**—पु. (वाघाचा) बच्चा, पिलूं; वाघाच्या पिलाची साधारणपणें अर्धी वाढ होईपर्यंत त्यास, पांडा, विशेषेंकरून वाघाचा पांडा असें म्हणतात

**पाडाऊ**—वि स्वसत्ताधीन करणारा; पाडाव, काबीज करणारा -शर [पाडाव]

**पाडाव**—पु. १ पराभव, पराजय; मोड. 'मी त्याचा दोन शब्दांत पाडाव करीन' २ लढाईत पकडलेले लोक, कैदी. 'पाटील अबदुलअली हरामी याची गाठ पडली तर आमचें व यांचें शिर कापून नेतील, त्याहून त्यांजकडे पाडाव सांपडले ते उत्तम.' -भाब ६२. -वि. पराजित; पराभव केलेला, लढाईत पकडलेला; कैद केलेला 'अगोदर दोनशें घोडीं पाडाव केलीं नंतर खासा पाडाव केला.' [पाडणें] ०करून घेणें-(सौदा ठरवितांना) किंमत फारच कमी करून (जिन्नस) विकत घेणें. ०विकणें-(जिन्नस विकतांना) बळजबरीनें जास्त किंमत मागणें. ०जिन्नस-पुअव लढाईत जिंकलेलें, लुटून मिळविलेलें द्रव्य

**पाडाव**—पु (हेट) मोठी होडी, पडाव. [पडाव]

**पाडावळ**—स्त्री. (गो) एक झाड; पाडळ.

**पाडावा**—पु (कु.) नारळ इ० झाडावरून पाडण्याचा धंदा करणारा. [पाडणें]

**पाडि**—स्त्री (महानु) किल्ला. 'म्हणौनि दडवांदडीं। तुं रीगें कैवल्याची पाडि।' -भाए ५२६. [पहाड]

**पांडित्य**—न. १ शास्त्रार्थ सांगणें इ० प्रकारचें पंडिताचें काम. विद्वत्ता; ज्ञातृत्व. 'सभे पाडित्याचा प्रसर समर्गी शौर्य सिरवं।' -वामन-स्फुटश्लोक (नवनीत पृ. १३३) २ भाषणचातुर्य; विद्येचें आडंबर, डौल. 'चित्या, हें पाडित्य आतां पुरें कर!' -मोर ५. [ सं ]

**पाडिप**—न. भूषण; कौतुक; शोभा पडप पहा. [ पडप ]

**पाडिवा**—पु. प्रतिपदा. पाडवा 'पाडिव्याची चंद्ररेखा।' -ज्ञा १५.४७०. [ पाडवा ]

**पाडी**—स्त्री. १ कालवड. 'तें नर असल्यास पाडा व मादी असल्यास पाडी म्हणतात.' -मराठी ३ रें पुस्तक पृ. ११३ (१८७३) २ पारडी (म्हशीची) [ प्रा पड्डी=पारडी; गुज. पाडी=पारडी ]

**पाडी**—स्त्री. नदींतील माशाची एक जात.

**पाडी**—स्त्री. १ डोंगर, टेकाड. -शर. २ डोंगरांतून डोली इ० वाहून नेणारे भोई, डोलकर इ० लोकाचा जमाव, समूह. [ हिं. पहाडी=लहानशी टेकडी ]

**पाडीबांय**—स्त्री. (गो.) ओसाड विहीर [ पडिक+बाव ]

**पांडीया**—पु. पुढारी 'रयान पांडीये आमदाबाद प्रात गुजराथ याचे नावें कौल.' -थोमारो २.८७. [ पाड्या ]

**पाडीव**—वि. १ (झाड इ० हालवून) पाडलेलें (फळ इ०) (पिकून गळून पडलेल्याच्या उलट). २ केलेला, बनविलला, तयार केलेला (रस्ता, पूल, शेत इ०). ३ शत्रूस लढाईत जिंकून, पाडून मिळविलेला, हस्तगत केलेला माल. [ पाडणें ]

**पांडीवड**—पु. (को) नदींत, डबक्यांत आढळणारा एक निर्विष साप

**पांडु, पांडुर**—वि पांढरा, फिका [ स ]

**पांडु, पांडुरोग, पांडुकामला**—पुस्त्री रक्तक्षयाचा एक रोग. हा वात, पित्त व कफ या त्रिदोषापासून तीन प्रकारचा, चौथा त्रिदोषजन्य व माती खाण्यापासुन होणारा पाचवा अशा पांच प्रकारचा असतो. अंगाची त्वचा फुटणें, तोंडास अति थुंकी येणें, अंग गळाल्यासारखें होणें, माती खाण्याची इच्छा होणें, डोळ्याच्या पापण्या सुजणें, मळमूत्र यांना पिवळटपणा असणें, अन्नपचन न होणें हीं याचीं पूर्वलक्षणें होत. -योर १.५१९

**पाडु(डू)क**—न. (कु) गाईचें वांसरूं [ पाडा ]

**पांडुक**—पु. पादुकेच्या आकाराचा घोड्याच्या अंगावरील केंसांचा भोंवरा -अश्वप १ ८५

**पांडुर**—वि. पांढरा. 'पांडुरवर्णे झाले डोळे।' -एरुस्व १२ २ 'वृद्ध वदे वत्सा कां पांडुर कृश जाहलासि सांग मला।' -मोसभा ३.२७ [ सं. ] **पांडुरत्व-ता**-नस्त्री पांढरेपणा. 'परि पांडुरत्वें कांती। राहे जैसी।' -अमृ ३.२८. 'व्रतनियमाच्या कष्टें आली पांडुरता वदनीं।' -शाकुंतल अंक ६ [ पांडुर+त्व भाववाचक नामाचा प्रत्यय ]

**पांडुरी**—स्त्री. पांढरी, चुनखडीयुक्त जमीन. [ पांडुर=पांढरा ]

**पाडूक**—स्त्री (गो) चोरी. **पाडूक करप**-(गो) चोरी करणें

**पाड**—न गाईचें वांसरूं. [ पाडस ]

**पाडें**—१ (काव्य) प्रमाणें, सारखें, मानानें 'परमाणुचेनि पाडें। रोमें लपालीं ब्रह्मांडें।' -ऋ ४३ २ प्रकारें. 'देउं सकुळ सुरशरण्यु। मी हीनु बहुतें पाडें।' -ऋ ४६ ३ (राजा. कुण) पेक्षा. परस 'ते पाडें हिकडेच काय...गावाद तें बरेंसें गमों लागलें' -मसाप २ ४ ३६९ [ पाडची तृतीया ]

**पांडे**—पुअव (व) वतनदार कुळकर्णी. 'पाडेस बोलावा म्हणे झडकरी।' -दावि ४११. 'देसाई, देशमुख, पाडे, जमादार कचेरी ...' -मसाप १.१५. [ सं. पंडा ] ०**पणा**-न. पाड्याचें, गावच्या कारभाराचें काम 'सेट्या ना चौधरी। पाडेपण वाहे शिरीं।' -तुगा २०५९ [ पांडे+पण प्रत्यय ]

**पाडेकरी**—पु झाडांवरून फळें वगैरे पाडून वेंचणारा [पाडणें]

**पाडेखोत**—पु. ठाकुरवाडीचा कारभारी. 'गावकरी, पाटील, पाडेखोत वगैरे मंडळीस यजमान बोलावतो' -बदलापूर १४८. [ पाडा+खोत ]

**पाडेजणें**—क्रि विस्तारणें. -शर. -मनको.

**पांडेपांडे**—क्रिवि. (व.) हळु हळु (चालणें) [ पाउंड ]

**पाडेली**—पु (गो) फळें पाडणारा, झाडावरून काढणारा धंदेवाईक इसम, पाडेकरी [ पाडणें ]

**पा(पां)डेवार**—पु (व काव्य) गावकामदारी करणारा वतनदार महार. -गागा ५०. 'मिराबाईसाठीं घेतो विषप्याला। दामाजीचा जाला पाडेवार।' -तुगा ३६९१ [ पाडा=गाव ]

**पाडेसार**—वि हीणकस; ओंगळ

**पाडोशी**—पु (गुज) शेजारी पडोशी पहा [सं प्रतिवेशिन्; हिं पडोसी, गु. पडोशी-सी] **पाडोसें**-पु (व) शेजार

**पांड्या**—पु मोठा झालेला वाघाचा बच्चा. पाडा पहा.

**पांड्या**—पु १ वतनदार कुळकर्णी; पटवारी 'मूल वाटे त्या पाड्याचें।' -दावि २२. २ पंचगौड ब्राह्मणांतील एक आडनांव. ३ भय्ये, परदेशी लोकांतील उपाध्याय. [ सं. पंडा; म. पांडा; हिं पंडा; बं पॉडे=चार वेद व महाभारत यांचें उत्तम ज्ञान असलेला ब्राह्मण ]

**पांड्याऊंस**—पु. उंसाची एक जात; पुंड्या ऊंस [सं पाडुर+म. ऊंस ]

**पाढउ**—पु. संग्रह. -शर.

**पांढर**—स्त्री. १ गावाच्या चतुःसीमेंतील सर्व जमीन, गांवठाण. 'ह्या पांढरीचें पाणी कोणास बाधणार नाहीं.' २ गांवचीं घरेंदारें जिच्यावर बांधिलीं जातात ती गांवच्या वसाहतीची पांढरी जमीन. इच्या उलट काळी जमीन, ही लागवडीच्या उपयोगी आणतात. 'हस्तनापुरीं कांहीं वस्ती नाहीं. साक्षा मात्र जुनी पांढर आहे.' –भाब ४४. ३ काळ्या जमीनींत मधून मधून असलेली पांढरी जमीन किंवा तिचा पट्टा. ४ गावाच्या शिवारांतील जमीनीचा (एखाद्या शेतकऱ्याचा) शेताचा भाग, शेत 'मी आपली पांढर ओसाड टाकीन.' ५ पांढरी माती किंवा जमीन. ६ गांवातील यच्चयावत् लोक; सर्व गावकरी मंडळी (गावकीच्या कामासाठीं एकत्र जमलेली) 'त्याची पंचाईत मौजे मजकूरचे पांढरीनें करून ...' –समारो ३ ६७. ७ गांवाची ग्रामदेवता किंवा शेताची वास्तु देवता. 'ही गोष्ट तूं करतोस पांढरीस सोसणार नाहीं.' 'पांढरीनें पीक सोडलें.' ८ (गावठाणाची) वसाहत झालेली, वस्ती असलेली स्थिति, लोकवस्ती. 'एथून पांढरी उठली–ओसाड पडली.' ९ व्यापारी जिन्नस जंगम मिळकत इ०कांवरील सरकारी जकात, जकातीचें उत्पन्न. [सं. पाण्डुर=पांढरा] **-रीचा डोळा**–पु (ल.) गांवचा वतनदार महार. **पांढरीचा भेंडा**–पु. गांवच्या वतनदारांनीं आपली गरीबी, दैन्य इ०कांस उद्देशून गांवासंबंधीं किंवा वतनदारासंबंधीं योजावयाचा शब्द **-रीचे प्रभू**–पुअव (माण.) पाटीलकुळकर्णी. सामाशब्द- **०कूळ**–न गांवांतील सर्व समाज, मंडळी समुच्चयानें. [पांढर+कूळ] **०गण**–न सर्व गावकरी मंडळी समुच्चयानें. [पांढर+सं. गण=समुदाय] **०गणा**–पु. गावचे बारा बलुते [पांढर+गण] **०झाडा**–पु गांवठाणाचा हिशेब. 'मौजे मजकूरचा थलझाडा व पांढरझाडा कुलकैफत दस्तक . .' –शाछ १.१२९. [पांढर+झाडा=आढावा] **०पट्टी**–स्त्री. गावातील कारागीर, दुकानदार, व्यापारी इ० शेतकीव्यतिरिक्त धंदा करणाऱ्या रहिवाशांस यावा लागणारा कर; मोहतर्फा. [पांढर+पट्टी=कर] **०पेशा**–पु शेतीव्यतिरिक्त इतर धंद्यावर किंवा पांढरीवर उपजीविका करणारा (अंगमेहनतीचीं कामें न करणारा) समाजांतील उच्चवर्गीय म्हणून मानला गेलेला लेखक, वकील, शिक्षक, ब्राह्मण, प्रभु, सोनार इ० वर्ग, त्या वर्गातील व्यक्ति. 'प्रि. गोळे यांनीं सामान्यतः महाराष्ट्र देशांतील ब्राह्मण म्हणजे पांढरपेशे उर्फ विद्या व्यासंगी वर्गाच्या निकृष्ट स्थितीचें वर्णन यथार्थ केलें आहे.' –टिळे ४.१.२१०. 'ज्या धंद्याचा काळीशीं निकट संबंध नाहीं ते करणारांना पांढरपेशे म्हणतात.' -गांगा ८. [पांढर+फा. पेशा=धंदा, वृत्ति]

**पांढर**—वि. पांढरा या शब्दाचे समासांत पूर्वपदीं येणारें रूप जसें:–पांढरमाती–पांढरपोटा–पांढरवणी इ०. पांढरा या शब्दांत या रूपाचे सामासिक शब्द पहा. [पांढरा]

**पांढरा**—पु (कों.) १ (सांकेतिक) सर्प; साप. सापाला प्रत्यक्ष साप, सर्प या नांवानें उल्लेखणें अशुभ मानतात म्हणून हें नांव. २ फार विषारी अशी सापाची एक जात. याला अकरमाशा पांढरा असें म्हणतात ह्याचा रंग काळा असून हा धामणीच्या पोटचा असतो. याच्या मानेखालच्या रेषा काळ्या असून हा आपण होऊन दंश करितो. याला फणा असते. –बदलापूर ३४७.

**पांढरा**—वि १ सफेत, शुभ्र, श्वेतवर्ण. २ (ल.) (महानु.) लुच्चा; मोदा, कपटी; अमंगळ. 'हा पांढरा संन्यासी। तूं कांहीं जाणैसी ना।' –शिशु २२०. [सं. पाण्डुर] (वाप्र) **पांढऱ्याचा काळा–पांढऱ्यावर काळें करणें**–१ (एखादी गोष्ट करार इ० पांढऱ्या कागदावर काळ्या शाईनें) लिहून नमूद करणें; लेखबद्ध करणें. (सामा.) लिहिणें. 'ज्यास पांढऱ्यावर काळें करता येत नव्हतें ते हल्लीं मानसशास्त्राच्या गोष्टी सांगूं लागले आहेत.' –ओक **पांढऱ्या कपाळाची**–वि. विधवा; (कपाळावरील) कुंकुमतिलकहीन; गतभर्तृका. **पांढऱ्या पायाचा**–वि. (ल) जेथें जाईल तेथें वाटोळें करील असा; अपशकुनी; वाईट पायगुणाचा (मनुष्य). **उखळ पांढरें होणें**–दारिद्र्य जाऊन श्रीमंती येणें. सामाशब्द- **०अभ्रक**–पु. अभ्रकाची पांढरी जात. **०ऊंस**–पु पिवळसर पांढऱ्या उंसाची एक जात (वेडा किंवा विलायती ऊंस याहून निराळा). **०कांदा–बटाटा**–पु (उप.) (कु.) कोंबडीचें अंडें. **०कावळा**–पु निसर्गात अविद्यमान, अप्राप्य वस्तु. जसें–शशशृंग, खपुष्प, वंध्यापुत्र इ०. कावळा हा काळ्या रंगाचा असतो त्यावरून हा अर्थ. **पांढऱ्या कावळ्याकडे जाणें**–देशांतर करून भीक मागणें. 'आम्हांस पांढऱ्या कावळ्याकडे जावें लागेल' –हरिवंशबखर ५४ **जिकडे पांढरे कावळे असतील तिकडे जा**–'येथून काळें कर' या अर्थी लोचट मनुष्य इ०कांस उद्देशून योजावयाचा वाक्प्रचार. **०गहूं**–पु. गव्हाची एक जात **०चित्रक**–पु. चित्रकाची पांढरी जात. **०तित्तिर**–पु. कपिंजल. –योर १.५९. **०धोतरा**–पु. पांढरीं फुलें येणारी धोत्र्याची एक जात **०परीस**–पु (उप.) १ दगड; पांढऱ्या पायाचा मनुष्य; कपाळकरंटा. 'आईबापाच्या पोटीं असला पांढरा परीस जन्माला आला.' –नामना ९९. २ अट्टल सोदा; लुच्चा. [पांढरा+परीस] म्ह० (व.) पांढरा परीस नमेद्या गणेश =आंत निराळें व बाहेर निराळें असें ज्याचें वर्तन असतें त्यास उद्देशून म्हणतात **०पाल**–वि. आजार इ०कांमुळें शरीर रक्तहीन झाल्यामुळें पांढऱ्या पालीसारखा दिसूं लागलेला. **०फटफटीत–सफेत–शुभ्र–फेक**–वि. अतिशय पांढरा; केवळ पांढरा; पांढरा स्वच्छ. **०फटफटीत–फिटूक**–वि. अतिशय फिक्का; निस्तेज. 'त्याचा चेहराहि पांढराफिटुक दिसायला लागला आहे.' –कमला नाटक अंक १. प्र. २. **०भोपळा**–पु. दुध्या

भोंपळा. ०राळा-पु राळ्याची पांढरी जात. कांहीं लोक खसखस व हें धान्य यांचा अंतर्भाव अठरा उपधान्यांत करून एकूण उपधान्याची संख्या वीस मानतात. ०वडस-पु डोळ्याच्या बुबुळावर पांढऱ्या रंगाचा होणारा रोग सं. शुक्लार्म -योर २.५३३. ०सफेत-द्-वि पांढरा स्वच्छ; अतिशय पांढरा (वस्त्र, कागद इ० पदार्थ) [पांढरा+फा. सफेद्=पांढरा] ०हत्ती-पु (ल.) मोठ्या खर्चानें पाळता, पोषितां येण्यासारखें, पोसण्यास जड असें जनावर, मनुष्य इ० (इं) व्हाइट् एलेफंट् यास प्रतिशब्द ०हत्या-वि तांदुळाचा एक भेद. पांढरपायी-वि मागचा एक पायपांढरा असलेला (घोडा) हा अवयव मानतात अशुभ चिन्हें पहा. [पांढरा+पाय] -र पाल-स्त्री. (ल) अतिशय रोड, निस्तेज मनुष्य. -र पोटा-वि १ गव्हाची एक हलकी जात ह्या जातीचा गहूं एका बाजूस तांबडा व दुसऱ्या बाजूस पांढरा असतो २ अव्यवस्थितपणें भाजलेली व मध्यभागीं पांढरी राहिलेली (भाकरी) [पांढरें+पोट] -फळी-स्त्री. एक तृणधान्य व त्याचें तृण. पांढरफळीचीं कांडें ल्हान असून हात-दीड हात उंच असतात. या झाडांचा रंग पांढरा असतो. यास मोहरीहून जरासें मोठें असें पांढरें बीं येतें हें बीं गुरें खातात दुष्काळात माणसेंहि या बियाच्या भाकरी करून खातात -वगु ८ ६२. [पांढरें+फळ,] -रमाती-स्त्री. १ पांढऱ्या रंगाची माती २ पांढरी जमीन -रवट-वि किंचित् पांढरा, पांढुरका [पांढरा+वत्] -रवणी-नी-न पांढरा प्रदर 'पांढरवनी पडे तें राहे.' -वैद्यक ८५ ८६. [पांढरें+पाणी] पांढरे केश-स-पुअव. १ पिकलेले पांढरे झालेले केस. २ (ल) म्हातारपण; उतारवय. -रे गोलक-पुअव रक्तातील पांढऱ्या पेशी. -रे तारे-पु. (शोभेचें दारूकाम) दारू कामाचा एक प्रकार. 'बाण, नळे वगैरे सामानांत पांढरे तारे तयार होतात.' -अग्निक्रीडा ११ -रे तीळ-पु. तिळाची पांढरी जात -रे पिशी-विअव. गव्हाची एक जात. या जातीच्या गव्हाचा दाणा गिड्डा असून भरींव व चमकदार असतो. -मुव्या ४२. पांढरी-स्त्री. १ (गावठाणावरील) लोकवस्ती. 'ययापरी उद्वस समस्त। पांढरी पडली।' -गीता २.२२७१ २ गांवची सीमा; शिवारांतील (गाळाची मळी साचून तयार झालेली) जमीन, गावठाण. 'गांवची पांढरी सोडून लोकांनीं वस्ती लांब नेली' -खेया २५. ३ पांढर (-स्त्री) इतर सर्व अर्थी पहा [सं पाण्डुर] पांढरी घेट्ळ-घेटोळी-स्त्री घेटोळीची, पुनर्नव्याची पांढरी जात -री जमीन-स्त्री. पांढरसर जमीन. ही आवळ व निबर असून पाणी ढाळते. -गांगा १. -री झीक-स्त्री. (भरतकाम) रुपेरी जरतार असलेली मखमल. -री तुळस-स्त्री. रामतुळस; हिच्या उलट कृष्णतुळस. ही काळसर रंगाची असते. -री पोळी-स्त्री. गव्हाची साधी पोळी. पुरणपोळी, गुळाचीपोळी इ०कांच्या उलट. -री माट-स्त्री. माठ या पाले भाजीची पांढरी जात. तांबडी व कांटे माठ असे हिचे दुसरे प्रकार आहेत -री माती-स्त्री. चिकणमातीचा एक प्रकार; चिनी माती. पांढर माती पहा -पदाव ३५ -री रुई-स्त्री. फिक्कट पांढऱ्या रंगाची रुईची जात -री साल-स्त्री तांदुळाची एक जात याच्या उलट काळी साल -री सुरळी-स्त्री. (विणकाम) १ फणींतील एका घरांत काळें व एका घरात पांढरें उभार सूत असून आडवण सर्व काळें व कोणतीहि किनार असलेलें लुगडें. २ फणींतील एका घरांत तांबडें व एकात पांढरें असें उभार आणि आडवण सर्व तांबडें असून कोणत्याहि किनारीनें युक्त असा लुगड्याचा प्रकार. पांढरें अळूं-न. अळवाची पांढरी जात हें अग्निदीपक व सारक असून मूळव्याध, कृमि, पित्त यांचें नाशक आहे -योर १ ४७ -रें निशाण-न (ल) मुसलमानाचें, मोंगलाचें निशाण. 'नउशें पठाण कापिला। पांढरें निशाण उपटलें।' -ऐपो ६१. -रें पाणी-न. अगदीं पातळ, पाणचट ताक; ताकवणी. -रें पातळ-न. (विणकाम) सर्व पोत पांढरें व कोणतीहि किनार असें विणलेलें पातळ -रें फेक-वि पांढरें शुभ्र -रें बुबुळ-न डोळ्यातील पांढरा भाग, याच्या उलट काळें बुबुळ -रें मीठ-न. समुद्राच्या पाण्यापासुन बनविलेलें मीठ; याच्या उलट मातीमीठ, खाणींतील मीठ, काळें मीठ -रें वांगें-न. (सांकेतिक) (क) कोंबडीचें अंडें.

पांढरी—स्त्री. एक झाड. हें डोंगराळ प्रदेशात होतें ह्याची पानें निर्गुणीच्या पानासारखीं असून दडस असतात. लांकूड जड, कठिण व पांढरें असतें. पांढरीची काठी हातात असल्यास भूतबाधा होत नाहीं, तसेंच सर्प अंगावर चालून येत नाहीं असें म्हणतात. वेलपांढरी म्हणून हिची दुसरी एक जात आहे पांढरीचें लाकूड हस्तिदंताप्रमाणें मजबूत असतें. -वगु ४ ६२.

पांढरूक—स्त्री. (कु.) एक झाड.

पांढरूस—वि. (कों.) पांढरसर; किंचित् पांढरा, पांढुरका. [पांढरा]

पांढरोबेळो—पु. (कु.) एक जातीचें भात.

पाढव—पु. पढीक; विद्वान. 'चित्तज्ञ पाढव चातुर्यखाणी।' -नव १३.८८. [पढणें]

पाढा—पु. १ घडा. २ उजळणींतील दशक ३ लांबलचक, पाल्हाळाची हकीकत. [सं. पाठ; प्रा पाढ] ०वाचणें-(एखादी गोष्ट) सविस्तर, साद्यंत, तपशीलवार सांगणें.

पाढाऊ—पु मार्गदर्शक; वाटाड्या; पढविणारा; बोधक. 'जी गीतारत्न-प्रासादाचा कळसु अर्थचिंतामणीचा। सर्व गीता दर्शनाचा। पाढाऊ जो।' -ज्ञा १८.३०.

पांडुरका-गा—वि. १ कांहींसा पांढरा; तक्तकीत (अस्पष्ट, अंधुक दिसणाऱ्या वस्तूसंबंधानें प्रयोगांत रूढ). 'तो मार्गावर

कोणसा पांडुरका दिसतो.' 'हा बैल पांडुरकें पाहून बुजतो.' [ पांढरा ]

**पांडुरकी**—स्त्री. १ ( कागद, कापड, पाण्यांत उडी मारणारा मासा इ०कांची ) पांढरी चकाकी. २ डोळयाच्या काळया बुबुळावर आलेला पांढरेपणा, भुरी ३ प्रभातीं, सूर्योदयीं दिसणारी आकाशाची पांढरी चकाकी. याच्या उलट तांबडें. [ पांढरा ]

**पाण**—पाणी या शब्दाचें समासांत पूर्वपदीं येणारें रूप. जसें:–पाणकोंबडा–पाणबुडी–पाणचक्की इ०. सामासिक शब्दांकरितां पाणी शब्द पहा.

**पाणकुदळ**—स्त्री. ( बे. ) एक टोंक रुंद असलेली कुदळ.

**पाणथा**—पु. (गो. खा.) नदी इ० ठिकाणीं गावांतील लोक जेथें पाणी भरणें, कपडे धुणें इ० क्रिया करतात तें ठिकाण. पाणवठा पहा

**पाणद, पाणंद, पाणंध, पाणंदी-धी**—स्त्री. गावातून शेतांतून, दोन कुंपणामधून जाणारी अरुंद वाट 'धात्रों आवडे पाणधों। शून्याचियें।' –ज्ञा १६.१८८. 'गावातून बाहेर पडताना पाणदींत, ओढयात व रस्त्याच्या कडेस विष्टा नाहीं किंवा नाकास पदर न लावता मार्ग क्रमितां येतो असें कधींच नाहीं.' –खेया ७. [ पाणी ]

**पाणपट-त**—न. विध्वंस. सत्यानाश; संहार; कत्तल. (क्रि० होणें ) ( पानिपत येथें पेशव्यांच्या सैन्याचा संहार झाला त्यावरून हा अर्थ ) [ पानिपत अप. ]

**पाणवाळ**—स्त्री (गो ) लष्करी लोकांचा, शिपायाचा समुदाय.

**पाणसाबर**—स्त्री. ( मालेगावी ) फडया निवडुंग; ( प्र. ) पानसाबर. [ पान+सबार ]

**पाणारणें**—अक्रि. फणस, आंबा, ऊंस इ०कांचें फळ पावसाच्या पाण्यानें स्वाद बिघडण्याइतकें विकृत होणें; पाणचट बनणें. [ पाणी ]

**पाणि**—पु. हात; हस्त. समासांत उत्तरपदीं विशेष उपयोग उदा० कोदंडपाणि–वज्रपाणि–चक्रपाणि इ० 'सेवूनि जोडिलें कुरुकुळतिलकें परमहर्षितें पाणी।' –मोसभा १.१३ [सं ] सामाशब्द– ०**ग्रह–ग्रहण**–पुन. विवाहविधीनें स्त्रीचा स्वीकार करणें; लग्न; विवाह. 'आंता अविवेकुकुमारत्वा मुकले। जयां विरक्तीचें पाणिग्रहण जाहलें।' –ज्ञा ४ १२२. [ स पाणि+सं ग्रह, ग्रहण= स्वीकारणें, धरणें ] ०**पात्र**–न. दोन्ही हात जुळवून केलेली भांड्यासारखी रचना; ओंजळ 'भिक्षेलागीं पाणिपात्र। सांठवण उदरमात्र।' –एभा ८.१११. [ पाणि+सं पात्र=भांडें ]

**पाणिअेडा**—पु. ( महानु ) पानोथा; पाणवठा 'जमुनेचा पाणिअेडा। एनें थोरु केला पवाडा।' –शिशु ८६७. [ पाणी+ठाव ? ]

**पाणिबाळा**—पु. ( महानु. ) स्त्रियांचें एक कर्णभूषण; पानबाळी. 'मग पद्मिनीचा पाणिबाळां। वीजितीं हलु हलुं।' –शिशु ७८८. [ पान+बाळी ]

**पाणी**—न. १ उदक; जीवन; जल; सलिल. 'पाणियां छाया दुनावली। परिमळाचि।' –शिशु ६२८ 'चोखे पाणिया न्हाली।' –वसा २५ २ पाऊस; पर्जन्य ३ हत्यारें भट्टींत तापवून नंतर तीं पाण्यांत बुडवून त्यांच्या अांगीं आणिलेली दृढता (क्रि० देणें; चढविणें; उतरणें ) ४ (ल एखाद्याच्या अंगांतील) धमक; अवसान; वीर्य; शक्ति; तेज 'आलें न रजपुतांचें परि यवना सर्व हरविलां पाणी।' –विक ६८. ५ ( मोत्यें, रत्न, हिरा इ०कांचें ) तेज; कांति; झकाकी. 'नाना मुक्ताफळांचें पाणी।' –दा १६ ४.१६. ६ चेहऱ्यावरील टवटवी; कांति; तजेला ७ धातूचें भांडें इ०कांस सोनें, चांदी इ०कांचा देतात तो मुलामा; झिलई. ८ शस्त्र इ० घासून त्याच्या धारेस आणलेली तीक्ष्णता; कडकपणा. ( क्रि० देणें; पाजणें ). 'नाना शस्त्रामधें पाणी।' –दा १६ ४ १६. ९ अब्रू, लौकिक, कीर्ति ( क्रि० जाणें, उतरणें; चढणें). १० ( राग, गाणें इ०कांची ) नीरसता; रुक्षपणा. रसहीनता. ११ ( डोळ्यांतील ) चमक; तेज. १२ अश्रू. 'दुर्गा देवीच्या डोळयांतून पाणी येऊं लागलें.' –विवि ८.३.४९. पाणी याचें समासांत पूर्वपदीं 'पाण' असें रूप होऊन अनेक सामासिक शब्द होतात. उदा० पाणकोंबडा, पाणघोडा, पाणलोट इ० सामासिक शब्द पहा. [ सं. पानीय; प्रा. पाणिअ, गुज. पाणी; हिं. पानी; फ्रें.जिप्सी. पनी; पं तु जिप्सी पानी ] ( वाप्र ) ०**उतरणें**–१ पराभूत, पराजित होणें 'पानिपतच्या लढाईनंतर मराठ्यांचें पाणी उतरल्यानंतर निजामास संधी सांपडली.' –विवि ८ ६ १०९. २ अब्रू जाणें; अपकीर्ति होणें. 'ज्या स्नेहानें पाणी उतरतें, तो स्नेह रुपये पाण्यांत टाकून राखावा, त्यापेक्षां रुपये राखावे हें फार चांगलें आहे.' –बाळ २.३. ३ (डोळे इ०कांतील) तेज, चमक, कमी होणें. 'तिच्या सतेज डोळयांचें पाणी उतरूं लागलें.' –पाव्ह ५४. ०**ओळखणें–जोखणें**–( एखाद्याच्या अंगांतील) गुण, धमक, धैर्य, विद्वत्ता इ० कल्पनेनें ताडणें. **(अंगाचें, रक्ताचें)** ०**करणें**–अतिशय खपणें; कष्ट करणें; फार मेहनतीनें (एखादें काम, कर्तव्य इ०) करणें. म्ह० रक्ताचें पाणी हाडाचा मणी. ०**काढून टाकणें**–सक्रि. ( रसा. ) ( एखाद्या पदार्थांतील ) द्रव, द्रवांश नाहींसा करणें, घालविणें. (इं ) डीहायड्रेट् ०**कोंडणें**–( सैन्य इ०कांचें ) पाणी बंद करणें, त्यास पिण्यास पाणी मिळूं न देणें. 'कडबा दाणा बंद कोंडिलें पाणी कहर वर्षला।' –ऐपो २३६. ०**घालणें**–१ (बायकी) ( विटाळशी इ० स्त्रीस जेवतांना ) पाणी वाढणें, देणें. २ ( बायकी ) विटाळशीस, बाळंतिणीस स्नान घालून शुद्ध करून घेणें. ३ नाश करणें; खराबी करणें; गमावून बसणें. 'त्यानें आपल्या हातानें आपल्या रोजगारावर

पाणी घातलें.’ ४ (ल.) ( एखाद्या गोष्टीच्या ) अभिवृद्ध्यर्थ प्रयत्न करणें, जोपासनेबद्दल उपाय करणें. ५ ( एखाद्या वस्तूवर ) पाणी सोडणें; त्याग करणें. ६ (कों.) सर्पाचें विष उतरविण्यासाठीं सर्प चावलेल्या मनुष्यास मंत्रित पाणी पिण्यास देणें व अंगावर घालणें. ७ वृक्ष इ० कांच्या वाढीला जरूर तें पाणी त्याच्या मुळाशीं ओतणें. **०चढणें**–महत्त्व प्राप्त होणें; वीरश्री, त्वेष संचरणें. ‘थोरासंगें दुर्बळास पाणी चढे।’ –पला ४.१९. **०छाटणें–कापणें**–१ (पोहणारानें, बोटीनें आपल्या अंगच्या जोरानें) पाणी दुभंगून पुढें सरणें. २ (पोहणाराच्या, नावेच्या) गतीमुळें पाणी दुभंगलें जाणें. **०जाळणें**–(ल.) करडा अंमल चालविणें, क्रूरपणाचीं कृत्यें करणें **०जोखणें–ओळखणें**–( एखाद्याची ) कर्तृत्वशक्ति, धमक, विद्वत्ता, पराक्रम इ० अजमावणें. **०तावणें**–( एखाद्याच्या नावानें, नावावर, नावाविषयीं इ० शब्दासह प्रयोग असल्यास–एखाद्याचें ) मरण, अनिष्ट इच्छिणें. ( शवदहनासाठीं नेताना तें उचलण्यापूर्वी, पाणी तापवून त्यास स्नान घालितात त्यावरून हा अर्थ ). **०तुटणें**–( पोहणाराच्या, नावेच्या गतीनें ) पाणी दुभंगलें जाणें. ‘पंनावेणा दळ बहुतें मीनलें। वाटे पाणी तुटलें।’ –शिशु ५७८ **०तुंबविणें**–( धरण इ० बांधून ) पाणी कोंडून धरणें. **०तोडणें**–पाणी छाटणें अर्थ १ पहा. **०दाखविणें**–( कर ) ( शेतकऱ्यांत रूढ ) ( गुरांस ) पाणी पाजून आणणें; पाण्यावर नेणें. **०देखील न घोटणें**–( एखाद्याचे ) प्राण कंठीं येणें, मरणासन्न होणें. पाणी घशाखालीं उतरण्याइतकाहि अवकाश, धीर नसणें. **०देणें**–१ पोलादाच्या अंगीं नरमपणा, कडकपणा, चिवटपणा इ० निरनिराळे गुण आणण्याकरितां तें भिन्न भिन्न ठराविक प्रमाणांत तापवून पाण्यांत बुडविणें. या क्रियेचे कडक पाणी, नरम पाणी, जांभळें पाणी, पिवळें पाणी इ० निरनिराळे भेद आहेत.–ज्ञाको प ७४. ‘पाणी देण्याच्या कृतीनें लोखंडांत फेरफार होतात.’ –पदाव १.१५५. २ शस्त्र इ०कास धार लावणें. ३ (मृताचा) श्राद्धविधि करून (त्याला) तिलांजलि देणें; (सामा.) तर्पण करणें **०देणें–सोडणें**–१ (एखादी वस्तु इ० ) गमावून बसणें. २ सोडून देणें; आशा सोडणें; ( वस्तु इ०काचा ) उत्सर्ग करणें ( एखाद्या वस्तूचें दान देतांना तीवर थोडेसें पाणी–आपला हक्क नाहींसा करण्याचें द्योतक म्हणून–सोडण्याचा प्रघात आहे त्यावरून हा अर्थ ). (कर्माला ‘वर’ अथवा ‘ला’ हे प्रत्यय लावून प्रयोग). ‘मागें एक पुढें एक। दोन्ही मिळुनि विठ्ठल देख। ऐसी होताचि मिळणी। दिलें संसारासि पाणी।’ –एकनाथ **०पडणें**–फुकट जाणें; निरुपयोगी होणें; खराब होणें; दर्जा, गुण, महत्त्व, उपयुक्तता इ० बाबतींत मागें पडणें; नाश पावणें. कर्मस्थानीं असलेल्या शब्दास ‘वर’ हें शब्दयोगी अव्यय जोडून प्रयोग असें:–रोजगारावर–पोटावर–संसारावर–कामावर–स्नेहावर–पाणी पडलें. ‘त्या कार्यावर तर सर्वस्वीं पाणीच पडलें असतें.’ –इंप ८.

शको ५. १३

**०पाजणें**–१ ( मृतास ) तिलांजली देणें; प्रेतदहन होत असतांना प्रेताच्या कपाळमोक्षानंतर चितेभोंवतीं सच्छिद्र मडक्यानें पाण्याची धार धरणें; श्राद्ध इ० करून तर्पण करणें. २ (ल) ( एखाद्यास ) मरेमरेतों खूप मारणें, बडवणें (१ ल्या अर्थावरून रूढ). ३ पराजित करणें; जिंकणें, चीत करणें. **०पाणी करणें**–१ तहानेनें ‘पाणी द्या’ ‘पाणी द्या’ असें म्हणत सुटणें; एकसारखें पाणी मागत राहणें. २ ( एखादें जनावर मनुष्य इ०कास फार ) राबवून, पादाडून बेदम करणें. ३ ( अन्न. वस्त्र, पदार्थ इ०कांची ) पूर्णपणें नासाडी करणें **०पाणी होणें**–१ पुन:पुन्हा पाणी पिण्याची प्रवृत्ति ( मिष्टान्न खाण्यानें, उन्हाच्या त्रासानें ) होणें. २ ( एखाद्या वस्तूचा ) नाश, खराबी होणें ‘हें कठोर मांस झडून जाईल तर किंवा याचें पाणी पाणी होईल तर किती बहार होईल.’ –विकारविलसित **०पिऊन भांडणें–वाद करणें**–(ल) नेटानें व जोराजोरानें, आवेशानें भांडणें **०फिरणें**–(बडोदें) व्यर्थ, फुकट जाणें; पाणी पडणें पहा ‘सेनापतीच्या चातुर्यावर व सैनिकांच्या शौर्यावर पाणी फिरतें.’ सेवामाहात्म्य १०. **०भरणें–वाहणें–घालणें**–( एखाद्याच्या घरीं विद्वत्ता, संपत्ति, विशिष्ट व्यक्ति इ०कानीं ) बटकीप्रमाणें राबणें: दास्य पत्करून राहणें; वश असणें ( एखाद्याच्या घरीं या शब्दासह प्रयोग ). ‘रूपाचेनि आहे। ऐरावतु पाणि वाहे।’ –शिशु ५०८ ‘उद्योगाच्या घरीं ऋद्धिसिद्धि पाणी भरी।’ **०मरणें**–१ ( एखाद्याचें ) धैर्य गळणें; गर्भगळित होणें; धाबें दणाणणें २ ( एखाद्या गोष्टींत किंवा हिशेब, भाषण इ०कांत ) खोटेपणा, पोकळपणा, लबाडी इ० असणें. **०मागूं न देणें**–एकदम, तडाक्यासरशीं ठार करणें ( मरतांना पाण्याकरितां मनुष्य तडफडतो, पाणी मागत असतो त्यावरून हा वाक्प्रचार ). ‘तुला मी बडविलें तर पाणी मागूं देणार नाहीं.’ **०मारणें**–पाणी कापणें–छाटणें पहा. **०मुरणें**–१ ( एखाद्याचें भाषण, वर्तन इ०कांत काहीं तरी संशयास्पद असा ) कमीपणा, वैगुण्य, दोष, मर्मस्थान असणें. २ भिंत वगैरेंत पाणी जिरणें. **०लागणें**–१ वाईट पाणी पिण्यांत आल्यानें आजारी होणें; पाणी बाधणें. ‘कैक जणाला पाणी लागलें मासोळी मागें खारी।’ –ऐपो ३५४. २ ज्याची संगति धरली असेल त्याचे किंवा जेथें कांहीं काळ रहिवास झाला असेल त्या ठिकाणचे गुणदोष, ढंग अंगीं जडणें. (आंत) **०शिरणें**–( धंदा, रोजगार, काम इ०कास ) अवदशा; उतरती कळा येणें; नासाडी होणें; फसगत होणें; आंत बट्यांत येणें. **०शोषून घेणें**–(रसा.) (एखाद्या पदार्थांतील) द्रव रस शोषून घेणें; ( इं. ) डेलिक्वीस्. **०सारणें**–( व. ) आंघोळीसाठीं पाणी उपसणें. **०सोडणें**–१ ( ब्राह्मणास दिलेल्या दानावर पाणी सोडलें म्हणजे दानाची सांगता होऊन त्यावरचें आपलें स्वामित्व नाहींसें होऊन ब्राह्मणाकडे जातें या धार्मिक कल्पनेवरून पुढील अर्थ ) ( एखादी

वस्तु ) स्वेच्छेनें कायमची देऊन टाकणें; (एखाद्या वस्तूचा) त्याग करणें. 'हे स्त्री नव्हे प्रतिष्ठा तुमची जरि ईस सोडितां पाणी।' –मोविराट १.१०३. २ (ल.) (एखाद्या वस्तूची) आशा सोडणें, ती गेली असें समजून स्वस्थ बसणें. ३ (एखादी वस्तु, भावना इ०) नाइलाजास्तव सोडण्यास, तिच्याकडे दुर्लक्ष करण्यास, विसरून जाण्यास, नाश करावयास तयार व्हावें लागणें. 'परि त्याहीं आम्ही त्या प्रेमासि रणात सोडिलें पाणी।' –मोद्रोण १७.९०. ०होणें–(एखाद्या वस्तूची) खराबी, नाश होणें; नाहींसें होणें. 'त्या दुःखाचें तुमच्या दर्शनानें पाणीच होऊन गेलें.' –रत्न ५ २. **पाण्याआधीं वळण बांधणें**–नदी, ओढा इ०कास पूर येण्यापूर्वीच पुराच्या पाण्याचा निकाल लावण्याची व्यवस्था करणें. २ (ल.) भावी संकटाची उपाययोजना आधींच करून ठेवणें. 'पाण्याआधीं वळण बांधितां उत्तम. नाहीं तर शेणामेणाचे लोखंडाचे जालियावर पुढें भारी पडेल.' –भाब ८३. **पाण्याचा कांटा मोडणें**–अभिसंयोगानें पाणी कोमट होणें, करणें (अतिशय थंड पाणी अंगावर घेतल्यास अंगावर कांटा उभा राहतो, किंवा तें अंगाला काट्याप्रमाणें बोचतें ह्यावरून वरील अर्थ). **पाण्याची गार गोठणें**–पाणी गोठून बर्फ होणें. **पाण्यांत घाम येणें**–(एखाद्यानें) अतोनात संतापणें; रागानें अंगाचा भडका होणें. **पाण्यांत घालणें**–बुडविणें; नाश करणें; खराब करणें. 'संसार घातला पाण्यात। स्वतें समस्त बुडविलें।' **पाण्यांत जाणें**–व्यर्थ होणें; फुकट जाणें. 'नानाची मुत्सद्देगिरी सारी पाण्यांत जात असली तर ...' –नि. **पाण्यांत दिसणें**–(ल. एखादी व्यक्ति एखाद्याच्या) द्वेषास पात्र होणें, असणें. **पाण्यांत पडल्यासारखें होणें**–फजीत होणें; लाजिरवाणें होणें. 'मग देवाला लाज वाटली. पाण्यांत पडल्यासारखें झालें.' –नामना ६९. **पाण्यांत पाहणें**–(एखाद्याचा एखाद्यानें) अतिशय द्वेष करणें (एखाद्याचा कट्टा शत्रु किंवा त्याला ज्याचा अतिशय दरारा आहे अशी व्यक्ति भीतीमुळें त्यास सर्वत्र जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं दिसूं लागते त्यावरून). **पाण्यानें वाती पाजळणें**–(महानु.) अशक्य गोष्ट शक्य करूं पाहणें. 'अवो दुजी कनुधार लागती। तरि पाणिअें वाति पाजळती।' –शिशु ६७५. **पाण्यापेक्षां, पाण्याहून पातळ करणें**–(एखाद्याची) फजिती, पाणउतारा, तेजोभंग करणें; फार लाजविणें. 'नामचि करि पाण्याहुनि पातळ यश भास्करादि तेजाचें।' –मोवन १२.५०. **पाण्यावर घालणें–नेणें**–(कर.) (गुरांना) पाणी पाजण्यासाठीं विहीर, नदी इ०कांवर नेणें. **पाण्यावर लोणी काढणें**–(कर. ल) अतिशय कंजूषपणा करणें. **गळ्याशीं पाणी लागणें**–१ पाणी गळ्यापर्यंत येणें. २ (कर्ज इ० गोष्टींची) पराकाष्ठा होणें. **दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणें**–१ दुसरा पाजील तेवढेंच पाणी पिऊन स्वस्थ बसणें. २ (ल) दुसरा सांगेल तसें मुकाट्यानें वागणें. **उन्हा पाण्यानें घर जाळणें–जळणें**–(ल.) खोट्या आरोपानें, निंदेनें रसातळास नेणें, जाणें; (एखाद्याचा) नाश करणें, करूं पाहणें, होणें (अकरणरूपात योजितात व हें घडणें अशक्य असें दर्शवितात). **खोल पाण्यांत शिरणें**–१ आपल्या आवांक्याबाहेरचें काम शिरावर घेणें. २ (एखाद्या गोष्टीची) फाजील चिकित्सा करणें. ३ (एखादें गूढ, गुपित) उकलण्याचा प्रयत्न करणें. **पाणी कॅस तोडतें**–पाण्याच्या अतिशय जोराच्या प्रवाहाचें वर्णन करतांना योजितात. **पाणी खाल्लेला**–वि. पाण्यांत ठेवल्यामुळें आंत पाणी मुरलेला. **पाण्यांतील पावप्यादे**–जलसंचारांत प्रवीण; आरमारातील प्रबळ लोक. 'इंग्रज लोक पाण्यांतील पावप्यादे.' –इतिहाससंग्रह-ऐतिहासिकचरित्र ११५. **पाण्यापाण्यानें**–क्रिवि. नदीच्या कांठाकांठानें. **पाण्यापेक्षां शीतळ**–वि. अत्यंत सोशीक; सौम्य; शात; गंभीर स्वभावाचा. **पाण्यावर**–क्रिवि. नदीच्या काठीं. 'कऱ्हेच्या पाण्यावर.' –ख ३१९३. **पाण्यावरचा बुडबुडा, पाण्यावरची रेघ**–पुस्त्री. (ल.) क्षणभंगुर, अशाश्वत वस्तु. क्षणभंगुरतादर्शक इतरहि वाक्प्रचार आहेत ते पुढें दिले आहेत.–जलबुद्बुद; धुळीवरचें सारवण; दुपारची सावली; विजेचें चमकणें; विजेसारखा; बीजच; अभ्रच्छाया; आभाळाची सावली; कमलिनीवरचा बिंदु; काजव्याचा उजेड; खुंटावरचा कावळा; तेरड्याचा रंग (तीन दिवस); शिराळशेटाचें राज्य; आवाहन व विसर्जन बरोबर; औट घटिकेचें राज्य; घडीचें, घटिकेचें घड्याळें; उपळवणी; तृणाचा शेक; पुष्करपत्रतोयतरल; पळतें पीक इ०. 'चिताडसी कां? चित्र जिवाचें पाण्यावरच्या रेघानीं।' –वाग्वैजयंती–गोविंदाग्रज. **पाण्यास आश्रय–आसरा**–पु. अतिशय तहानेल्यानें उपाशीपोटीं पाणी पिणें आरोग्यदृष्ट्या अनिष्ट असतें, म्हणून आधीं अन्नाचे एक दोन घांस खाऊन नंतर पाणी पितात. अन्नाच्या ह्या दोन-तीन घासांस, अल्पाशास उद्देशून हा वाक्प्रचार योजतात. **म्ह०** १ पाण्यांत राहून माशाशीं वैर करूं नये=आपल्या कार्यक्षेत्रांतील मंडळीशीं वैर करूं नये. त्यांच्याशीं मिळूनमिसळून वागण्यातच फायदा असतो. २ (हिं.) पाणी तेरा रंग कैसा, जिसमें मिलाया वैसा=जशी वेळ येईल तसें वागणें. ३ पाण्यापासून जवळ सोयऱ्यापासून दूर=मनुष्यानें पाण्याच्या जवळ राहणें सोईचें असतें, तसेंच सोयऱ्यापासून दूर रहावें म्हणजे प्रेमांत बिघाड करणाऱ्या गोष्टी टाळतां येतात. ४ पाण्यांत म्हैस बाहेर मोल=अनिश्चित, आगामी गोष्टीविषयीं, निरर्थक चर्चेस, चिकित्सेस उद्देशून ही म्हण योजितात. सामाशब्द– **पाणआघाडा**–पु. आघाड्याची एक जात. हा आघाडा सूज, कफ, खोकला, वायु, शोष यांचा नाश करतो. –वगु १.९. [पाणी+आघाडा] **०उतार**–पु. १ नदींतून चालून जातां येण्याजोगा, कमी पाणी असलेला मार्ग. २ (नदी इ०कांचें) ओसरणें;

कमी होणें 'गंगेसि भंग बहु पाणउतार होतो।' -र २ [पाणी+उतार] ०उतारा-पु १ मानखंडना, तेजोभंग; अपमान, क्षुद्रपणानें लेखून (एखाद्याची) केलेली विडंबना. अवहेलना. २ (क) पाणउतार पहा. [पाणी+उतरणें] ०कणीस-न ओहळांत, ढोंपरभर पाण्यांत कसईच्या झाडाप्रमाणें होणारें पुरुषभर उंचीचें एक झाड याचीं पानें बाजरीच्या पानांसारखीं असून याचें कणीस बाजरीच्या कणसासारखेंच असतें. हें कणीस वाळवून त्यावरील कापूस चकमक पेटविण्यास घेतात. हें तेलांत बुडवून पेटविलें असता काकड्याप्रमाणें जळतें. -वगु ४.६२. रामबाण ०कसर-स्त्री पाटस्थळाच्या पाण्याकरील कर, पट्टी. 'गांवची पाणकसर गेल्यावर्षापासून दीडपट वाढविण्यांत आली.' -के १९ ७.३०. [पाणि+कसर] ०काठी-स्त्री. १ (गो) विहिरींतून पाणी बाहेर काढण्याचें एक साधन. ओकती पहा २ (ल गो.) उठाबशी [पाणी+काठी] ०काढो-पु. (कु) शेतांस पाणी काढून पैरीप्रमाणें आळीपाळीनें वाटून देणारा; पाणकाढा. हा शेतकऱ्यांनीं आपसांत पाण्याविषयीं तंटा होऊं नये म्हणून निवडलेला असतो [पाणी+काढणें] ०कापड-न. जखमेवर, शरीराच्या कापलेल्या भागावर बांधतात ती ओल्या वस्त्राची चिंधी. [पाणी+कापड] ०कांदा-कंद-पु नदींत होणारा एक विशिष्ट कंद. यास नागदवणीच्या फुलासारखीं फुलें येतात -वगु ४.६३. [पाणी+कांदा] ०कावळें-न (विशेषत· गुरांची) गर्भोदकाची पिशवी. पाणकी-स्त्री. पाणी भरण्याची मजुरी करणारी स्त्री. 'कुणि विधवा ठेविती घरामधें पाणकी।'-ऐपो ३६९. पाणकुकडें-कोंबडें-न घशांत किंवा जिभेच्या खालच्या बाजूस होणारा एक विकार. ०कुक्कुट-पु (महानु) पाणकोंबडा 'चंद्र चकोरा चोखटीं। बोले अमृतधारी आतुटी। ते गोडपणें पाणकुक्कुटी। लाहिजे कैसा।' -ऋ ५२ [पाणी+सं कुक्कुट=कोंबडा] ०कोंबडा-डें-पुन. १ जलचर पक्षी. 'पाणकोंबडे कोंबडे। वडवाघुळा घुबडे।' -दावि २४४. २ चंद्राभोवतालीं पडणारें खळें. [पाणी+कोंबड] ०केश-पुअव. शेवाळ ०कोंबडी-स्त्री एक जलचर कोंबडी. ०कोळी-पु. मासे खाणारा एक पक्षी. -प्राणिमो ५७. ०क्या-पु. १ लोकांच्या घरीं पाणी भरून त्यावर उपजीविका करणारा मनुष्य. 'एखादा पाणक्या नवरा मिळता तरी पतकरता.' -मोर ३४. २ (ल.) निरक्षर व धटिंगण मनुष्य. [सं. पानीयक-पाणकअ-पाणका-पाणक्या. -राजवाडे (ग्रंथ. माला).] ०खार-पु. (कों.) उकडआंबे इ० खारविण्यासाठीं पाण्यांत मीठ घालून केलेला खार. [पाणी+खार] ०गहूं-पु मोटेच्या, पाटाच्या पाण्यानें होणारा गहूं. [पाणी+गहूं] ०घर-न. १ पाणी तापवून स्नान करण्याकरितां असलेली खोली; न्हाणीघर. २ विहीर इ० खणतांना जेथें पाणी लागतें तो जमिनींतील खोल थर. [पाणि+घर] ०घोडा-पु. आफ्रिका खंडांत मोठ्या नद्यांत, सरोवरांत आढळणारा एक अजस्त्र पण निरुपद्रवी प्राणी. याचा वंश करणाऱ्या प्राण्यांत समवेश होतो. याचा रंग काळसर तपकिरी असतो याच्या कातड्याच्या ढाली करतात. -ज्ञाको प ६७. (इं) हिपॉपोटेमस् [पाणी+घोडा] ०घोणस-पु. पाण्यांत असणारी सापाची एक निरुपद्रवी जात [पाणी+घोणस] ०चक्की-स्त्री पाण्याच्या जोरानें, साहाय्यानें चालणारी चक्की. [पाणी+चक्की] ०चट-वि. १ ज्यास गोडी कमी आहे असा (द्रव पदार्थ); बेचव २ (ल.) शुष्क; बाष्कळ; नीरस; अर्थशून्य (बोलणें, लेखन, गाणें, बोलणारा, लिहिणारा, गाणारा इ०). 'शेवटीं आपल्या निस्सीम भक्तांकडूनहि वरच्या सारख्या पाणचट प्रशंसेपेक्षां अधिक कांहीं सर्टिफिकीट मिळूं नये ...' -टि १.१.२६४. [पाणी+छटा] ०चूल-स्त्री पाणघरांतील, स्नानाचें पाणी इ० तापविण्याची चूल. 'तेथें पाणचुलींत विस्तव घालून त्यावर पाणी तापत ठेविलें.' -कोरकि ५१२. [पाणी+चूल] ०चोर-रा-पु. गारोड्याजवळील पाणी भरण्याचें सच्छिद्र पात्र. 'पाणचोऱ्याचें दार। वरिल दाटलें तें थोर।' -तुगा २५८३ [पाणी+चोर] ०जंजाळ-न. (कों.) पर्जन्य, पाण्याचा पूर इ०कानीं जिकडे तिकडे होते ती जलमय स्थिति. 'बहु पाणजंजाळ देखोनि डोळां।' -राक १.३२. [पाणी+जंजाळ] ०जांबई-पु (येथें) जांबयाचा भाऊ; पडजांवई. [पाणी+जांवई] ०झुकाव-पु. पाणी बाजूनें टिपकवून लावण्यासाठीं दरवाज्यावर केलेलें झुकाळ कारनिस, गलथा; पाणकारनिस. -राको ५९२. [पाणी+झुकविणें] ०झेली-स्त्री (चेंडू, विटीदांडू इ० खेळांत) झाडावरून खालीं पडतांना किंवा पाण्यांतून चेंडू, कोललेली विटी इ० जमिनीवर पडण्यापूर्वी झेलणें. याच्या उलट आणझेली. [पाणी+झेलणें] ०टका-टका-पु पाटस्थळ जमिनीवरील एक लहानसा कर. [पाणी+टका] ०टिटवी-स्त्री. तांबडा कल्ला असलेली टिटवीची एक जात. पाणड्या, पाणाडी-ड्या-वि. जमीनींत कुठें व किती खोल खणलें असतां पाणी लागेल हें काहीं आडाख्यांच्या सहाय्यानें आणणारा [पाणी] पाणढाळ-पु पाणी वाहून जाण्याजोगा जमीन, छपराचें पाखें इ०कांस दिलेला, असलेला उंचसा उतार; सखलपणा. -वि. पाणी वाहून जाण्यायोग्या उतारानें युक्त, उंच उताराची (जमीन इ०). [पाणी+ढाळ=उतार] ०ताव-पु सोनें, चांदी इ० तापवून पाण्यांत बुडवून त्याचा कस पाहण्याची पद्धत; याच्या उलट सुकताव=सोनें इ० तापवून नुसतेंच थंड करणें. [पाणी+ताव] ०तीर-पु. (युद्धशास्त्र) स्फोटक व ज्वालाग्राही पदार्थांनीं भरलेलें चिरूटासारखें निमुळत्या आकाराचें एक युद्धोपयोगी साधन. याचा व्यास दीड-दोन फूट असून लांबी सदा याड असते. याच्या आघातानें मोठमोठीं जहाजें समुद्राच्या तळाशीं जातात. (इं) टॉर्पेडो. -ज्ञाको (प) ६७. 'गेल्या महायुद्धांत योजलेल्या

अनेक शस्त्रास्त्रांत पाणतीराचा पहिला नंबर लागेल.' –ज्ञाको. प ६७. [ पाणी+तीर=बाण ] **०तुटी**–वि. जींतील रसांश, द्रवांश कमी झाला आहे अशी, कांहींशी पिकलेली (पालेभाजी) [पाणी+तुटणें] **०थरा**–पु. घराच्या जोत्याच्या सर्वांत वरच्या थरांतील दगड, चिरा; पाटथर पहा. **०थरी**–स्त्री. १ आंत्रपेशी; प्लीहा २ प्लीहेचा एक विकार; पोटांतील चीप. ३ प्लीहा, आंत्रपेशी वाढणें. [ पाणी+थर ] **०थळ**–स्त्रीन. १ पाऊस गेल्यानंतरहि जेथील ओल जात नाहीं व उन्हाळ्यांतहि खणलें असतां पाणी लागतें अशी जमीन. 'आणि पाणथळ असे तेथें भात लावी.' –पाव्ह ११. २ पाटाच्या पाण्यानें भिजणारी जमीन [ पाणी+थळ ] **०दळ**–न (क.) पाणथळ अर्थ १ पहा. [ पाणी+दळ ] **०दिवड**–स्त्रीन.. (कों.) पाण्यांतील सापाची निर्विष जात. [ पाणी+दिवड ] **०दोरी**–स्त्री विहीरींतून पाणी काढण्याच्या उपयोगाची दोरी; बारीक दोर. [पाणी+दोरी] **०नेचा**–पु पाण्यांत, दलदलींत उगवणारी एक वनस्पति; ( इं ) हायड्रोटेरिडि. –ज्ञाको. अ २२१. [ पाणी+नेचा ] **०पट्टी**–स्त्री. पाणकापड पहा. **०पिकलें, पाणपीक**–न. (कों.) ज्या पिकास सबंध पावसाळ्यांतील पावसाची जरूरी असतें तें पीक; पहिलें पीक; खरीप. याच्या उलट रब्बीचें पीक. [ पाणी+पिकणें, पीक ] **०पिता**–वि १ फार पाणी खाल्लेलें; फाजील पावसानें नासलेलें ( पिकाचें कणीस इ० ) २ (ल) पचपचीत; पाणचट पचकळ; मुळमुळीत ( भाषण, कारभार, मसलत, व्यवहार, गोष्ट, काम इ० ). ३ (झटकन् पाणी पिण्यासारखें) तलख; चलाखीचें; तडफेचें (कृत्य, कृति इ०) ४ रोखठोक, चोख, स्पष्ट ( जबाब, जाब, उत्तर इ० ) [ पाणी+पिणें ] **०पिशी**–स्त्री फाजील पावसामुळें न भरलेलें, पोचट राहिलेलें धान्याचें कणीस **०पिसा**–वि पर्जन्यातिरेकामुळें पोचट, दाणे झडून गेलेलें, दाण्यांनीं न भरलेलें (कणीस इ०) **०पिसें**–न. वेड, वेडगळपणा, भ्रमिष्टपणा –शर. –मनको. –वि. वेडगळ; खुळचट –मनको. [पाणी+पिसें] **०पेटी**–स्त्री ( स्थापत्यशास्त्र ) पाण्यात काम करतेवेळीं पाणी आंत येऊं नये म्हणून कामाभोंवतीं बसविलेली उभ्या फळ्यांची मुंढे मारून केलेली पेटी. (इं.) कॉफर्डॅम् –राको ३६० [ पाणी+पेटी ] **०पोई**–स्त्री १ वाटसरूंना, आल्यागेल्यांना पाणी पाजण्यासाठीं केलेली सोय; पन्हेरी. 'येह भाई येथ पाही। घातलीसे पाणपोई।' –यशोधन. २ अशा ठिकाणीं आल्यागेल्यास पाणी देण्याची क्रिया [ पाणी+पोई ] **०फोल**–न. (राजा) भाताच्या फुलांवर पाऊस अतिशय पडल्यामुळें त्यामध्यें होणारें फोल, पोचटपणा; असलें न भरलेलें पोचट कणीस. [पाणी=पाऊस+फोल=पोचटपणा] **०बुड**–स्त्री पाटाच्या पाण्यानें भिजणाऱ्या जमीनीवरील कर. [ पाणी+बुडणें ] **०बुड**–पु (कों) पाणकोंबड्यासारखा एक पक्षी. [ पाणी+बुडण ] **०बुडा-ड्या, पाणिबुडया**–पाणबुड्यी–पु १ मासे धरणारा कोळी. 'तरी माशालागीं भुलला। ब्राह्मण पाणबुडां रिघाला।' –ज्ञा १६.४५१. २ पाण्याच्या तळाशीं असलेल्या वस्तू वर काढण्याकरितां पाण्यांत बुडी मारून बराच वेळ पाण्यांत राहण्याचा सराव ज्यास आहे तो; समुद्रांत बुडी मारून मोत्यें वर काढणारा. 'ते वाक्समुद्रिचे पाणिबुडे। कीं सारासारसीमेचे गुंडे।' –ऋ २४. ३ एक प्रकारचा पक्षी [पाणी+बुडणें] **०बुडी**–स्त्री. १ पाण्यांत मारलेली बुडी; सुरकांडी. ( क्रि० मारणें ). २ पाण्याच्या पृष्ठभागाखालून संचार करणारी युद्धोपयोगी नौका. ( इं ) सब्मरीन्. 'तें आरमार पाणबुड्यांच्या आघातामुळें इतउत्तर आपली पूर्वकामगिरी देण्यास क्वचित समर्थ राहील....' –टि ३.३.३४८. [ पाणी+बुडी ] **०बुडीत**–वि. पुरानें, पावसानें जलमय झालेली (जमीन, पीक) [ पाणी+बुडणें ] **०बोदाड**–वि. (ना.) पाणथळ; दलदलीची ( जमीन ). [पाणी+बुडणें] **०भर-भरजमीन**–स्त्री. १ नवीनच खोदलेल्या विहिरीच्या पाण्यानें, ओढ्याच्या, पाटाच्या पाण्यानें भिजणारी शेत जमीन. २ पुराच्या पाण्यानें भिजणारी जमीन. ३ असल्या जमीनीवरील सरकारी सारा. [ पाणी + भरणें + जमीन ] **०भर जिराईत**–स्त्री. पाटाच्या पाण्यानें भिजणारी परंतु कोरड म्हणून गणली गेलेली जमीन [ पाणभर+जिराईत ] **०भरणीचा-भरीत-भरिताचा**–वि १ पाटाचें पाणी मिळणारें ( शेत, मळा इ० ). याच्या उलट कोरडवाय–वाही २ पाटाच्या, विहिरीच्या पाण्यानें तयार झालेलें, काढलेलें ( पीक इ० ). **०भरा**–वि. १ विहिरीच्या, पाटाच्या पाण्याची जरूरी असलेला ( गहूं, जोंधळा इ० ). २ सदर पाण्यानें भिजणारी ( जमीन ). [ पाणी+भरणें ] **०भऱ्या-भर्या**–पु. पाणक्या; पाणी भरण्याचा धंदा करणारा. [ पाणी+भरणें ] **०भाकरी**–स्त्री. नदीच्या, तलावाच्या पाण्याच्या पृष्ठभागावर खापऱ्या फेकण्याचा मुलांचा खेळ; भाकरीचा खेळ. 'तें गलबत वाऱ्याच्या सोसाट्यांत सांपडून मुलांच्या पाणभाकरीच्या खेळांतल्या खापरीप्रमाणें भलतीकडे गेलें' –कोरकि ७७. [पाणी+भाकरी] **०मांजर**–न. मांजरासारखा एक जलचर प्राणी. [ पाणी+मांजर ] **०मोट, पाणमोटली–स्त्री–मोटळी, पाण्याची मोट**–स्त्री. प्रसूतीसमयीं गर्भ बाहेर पडण्यापूर्वी गर्भोदकानें भरलेली गर्भाशयातून बाहेर पडणारी पिशवी ( क्रि० येणें; पडणें; फुटणें; निघणें ) [पाणी+मोट, मोटली=चामड्याची मोठी पिशवी] **०रस**–पु. पूर्वी रस काढून घेतलेल्या आंब्यावर पाणी ओतून ते हालवून, चेंदून पुन्हां त्यांपासून काढलेला पाणचट रस. [पाणी+रस] **०रहाट**–पु. पाण्याच्या साहाय्यानें चालणारा रहाट; पाणचक्की. [ पाणी+रहाट ] **पाणरॉ, पाणसर्प**–पु (गो.) पाण्यांत असणारी सापाची एक जात. [ पाणी+सर्प ] **पाणलव्हा–पाणलांव**–पु. (कों.) पक्षिविशेष; यास निबुड असेंहि म्हणतात. [ पाणी+लाव,

लांव्हा=पक्षिविशेष ] ०**लोट**–पु. १ पाणी, वाहून जाईल असा उतार; पाणढाळ २ टेकडीची, डोंगराची उतरती बाजू; उतरण ३ पाण्याचा जोराचा प्रवाह; लोंढा; स्रोत, धोत. ४ डोंगरमाथा; जेथें पाणी पडलें असतां तेथें न थांबतां दोहोंबाजूंस वाहून जातें अशी डोंगर माथ्याची धार. उदा० सह्याद्रीचा पाणलोट. [ पाणी+लोट ] ०**वटा–ठा**, **पाणवथ–वथा**–पु. नदी इ०कांवर गांवचे लोक जेथें पिण्यासाठीं पाणी भरणें, वस्त्रें धुणें इ० क्रिया करतात तें ठिकाण ' दिवसा पाणवठा म्हणुनियां रात्र आम्ही ही धरली। ' –रासक्रीडा १२. ' पौलपर्णी येऊनि शुद्ध। पाणवथीं बैसला। ' –नव १८.४३. [ पाणि+वर्त्तिकः –वटा ] म्ह० बारा कोसांवरचा पाऊस, शिवेचा राऊत, पाणवठ्याची घागर बरोबर गावांत येतात. ०**वड**–स्त्री पाण्याचे रांजण, घागरी, डेरे इ० भरून ठेवण्यासाठीं ( घरांत ) केलेला ओटा, ओटली. [ पाणी+ठाव ] **पाणवडा–वाडा**–पु. पाणवठा पहा. ' क्लेशगाविंचा उकरडां। भवपुरिचां पानवाडां। ' –राज्ञा १६ ४०५. [ पाणि+वर्त्तिक ] **पाणवसा**–पु ( कों. ) गाई, म्हशी इ० गुरांच्या जीवनास हेतुभूत असणारें ( गावचें ) पाणी, गवत इ० समुच्चयानें पाणसा [ पाणी+वास ] ०**वळ**–न १ ( कों. ) पावसाळयानंतरच काहीं काळपर्यंत जींत ओलावा टिकून राहतो अशी जमीन; पाणथळ अर्थ १ पहा. २ –वि बेचव; पाणचट. पाणचट अर्थ १ पहा. [ पाणी+ओल ] ०**वाट**–स्त्री १ पाणी वाहून जाण्यासारखा उतार; सखल पृष्ठभाग; ओहोळ; पाणलोट ' पाणी पाणवाटें जैसें। आपणचि धांवे। ' –दा ७९.११ २ पाण्याची वाट [पाणी+वाट] ०**वारू**–पु ( प्राचीन पौराणिक कथात रूढ ) होडी, नाव [पाणी+वारू=घोडा] ०**शाई**–स्त्री तारस्वर काढण्याकरितां मृदंग इ०कास लोहकीट इ०काच्या लुकणाचा, शाईचा देतात तो पातळ थर; याच्या उलट भरशाई. [ पाणी+शाई ] ०**शेंग**–स्त्री. ( ल. ) मासळी. [ पाणी+शेंग ] ०**शोष**–पु. पाणसोस पहा [पाणी+सं शोष=सुकणें] ०**सरकी**–स्त्री. पाणसऱ्याचें काम, हुद्दा पाणसरा पहा [पाणसरा] ०**सरडें**–न. पाण्यांत असणारी एक निर्विष सापाची जात [ पाण+सरडा ] ०**सरडें**–न रहाटाची माळ सरूं नये म्हणून बसवितात तें प्रतिबंधक लांकूड. [ पाणी+सरा=आडवीतुकई ] ०**सरा**–पु. डोंगराच्या घाटातील वंशपरंपरागतचा जकातदार. याला वतन व ठराविक दक्ष असत. घाटदुरुस्तीचें काम याच्याकडे असे. [ पाणी+सरणें? ] ०**सळ–साळ**–स्त्री. १ ( गवंड्याचा धंदा ) बांधकाम इ० समपातळींत आहे कीं नाहीं हें पाहण्याचें गवंड्याचें साधन; साधणी. ( इं. ) लेव्हल् बॉटल २ समपातळी. ' भिंतीचें बांधकाम थराचें असेल तर भिंतीच्या प्रत्येक १८ इंच उंचीस माथा पाणसळींत आणावा व त्यावर पातळ चुन्याचा रद्दा करून घालावा. ' –मॅरट १४. ३ पाणी वाहून जाईल असा उतार. [ पाणी+राज्ञ ]

**पाणसा**–पु. गुराढोरांच्या जीवनोपयोगी अर्थे (एखाद्या ठिकाणाचें) गवत व पाणी; पाणवस. ' ह्या गावचा पाणसा गुरांस मानवत नाहीं. ' ०**साप**–पु. पाण्यांत असणारी सर्पाची जात [पाणी+साप] ०**सापूड**–स्त्री घर इ०कांच्या छपराच्या खालच्या बाजूस वाशांच्या टोंकांजवळ कामट्यांच्या, रिफांच्या, ओंबणाच्या शेवटीं बांधतात ती जाड कामटी; सापूड. [पाणी+सापूड] ०**सासरा**–पु (विनोदानें) जांवयाच्या भावानें आपल्या भावाच्या सासऱ्यास विनोदानें, थट्टेनें उल्लेखण्याची संज्ञा जावयाच्या भावास पाणजावई असें थट्टेनें म्हणतात त्याप्रमाणेंच हाहि शब्द आहे. ०**सासू**–स्त्री. पाणजांवयानें स्वत च्या भावाच्या सासुस थट्टेनें उल्लेखण्याची संज्ञा. [पाणी+सासू] ०**साळ**–वि. (क) समपातळींत असलेली ( जमीन इ० ) [पाणसळ] ०**साळ करणें**–जमीन इ० समपातळींत आहे कीं नाहीं तें पाहणें. ०**साळ**–स्त्री. प्रवासी, वाटसरू इ०कांना पाणी पुरविण्याच्या सोयीकरितां रस्त्याच्या बाजूस बांधलेली छपरी इ०; पाणपोई. [ पाणी+सं शाला=घर ] ०**साळ**, **पाणसळी भात**–स्त्रीन. पाटाच्या, विहीरीच्या पाण्यावर केलेलें ( मळा इ०तील ) भाताचें पीक [ पाणी+साळ ] ०**सुरंग**–पु. समुद्रांतील आगबोटी इ०काचा नाश करण्याकरितां समुद्राच्या पृष्ठभागाखालीं योजून ठेवण्याचें सुरुंगासारखें आधुनिक युद्धोपयोगी साधन. ' बंदरात घातलेल्या पाणसुरुंगानीं व पाणबुड्यांनीं हें समुद्रावरील वर्चस्व पोखरण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. ' –टि ३.३.३५०. [ पाणी+सुरुंग ] ०**सोस**, **पाणशोष**, **पाणसोक**.–पु. १ ताप इ०कांत पुन. पुनः लागणारी अतिशय तहान; घशास पडणारी कोरड. २ प्रकृतीला होणारा एक ( पुनः पुनः तहान लागण्याचा ) विकार. [ पाणी+शोष=कोरडें पडणें, होणें ] ०**सोळा**–पु. दिवडाच्या जातीचा, बांड्या रंगाचा, पाण्यात राहणारा एक निर्विष साप. –बदलापूर ३४७. **पाणिढाळ**–पु. १ ओहोटी. ' अनुरागाचा निरु ताउनी। पाणिढाळु। ' –ज्ञा ७९९. २ पाण्याचा ओघ खालीं सोडून देणें. ' पाणिढाळु गिरीशें। गंगेचा केला। ' –ज्ञा १८.१६८८. [ पाणी+ढाळणें ] **पाणिपद**–न. ( महानु. ) तेजाचें स्थान; गांभीर्य; ढाळ. ' परिजाणतां उपहासावें। बोलाचें पाणिपद निहाळावें। ' –शिशु ३६५. [पाणी=तेज+पद=स्थान] **पाणिपात्र**–न पाणी प्यावयाचें भांडें. ' एकें हरितलें पाणिपात्र। एकें नेलें पीठ पवित्र। ' –एभा २३.५२०. [ पाणि+पात्र=भांडें ] **पाणिय(ये)डा**–पु (महानु.) पाणवठा. ' आत्मगंगेचां पाणियेडा। थोरला अज्ञान–सीहांचा दडा। ' –भाए १०६. [पाणी+वटा, ठाव] **पाणियाडा–डें–ढें**–पुन. १ पाण्याचा सांठा; तळें. ' सतरावियेचें पाणियाडें। बळियाविलें। ' –ज्ञा ९.२१४. ' शुक्रें धरिलें पाणियाडें। अवर्षण पडे बहुकाळ। ' –भाराबाल १.७८. २ जलपात्र. –माज्ञा–कठिणशब्दांचा

कोश. [पाणीवडा] **पाणिलग**–वि पाण्याच्या सान्निध्यानें राहणारा 'पाणिलगें हंसें। दोनी चारी सारसें।' –ज्ञा ६ १७७. [पाणि+लग] **पाणिवथा**–पु. पाणवठा पहा. **पाणिवैद्य**–पु (कों.) विषार इ०उपद्रवावर पाणी अभिमंत्रून देणारा वैद्य. [पाणि+वैद्य] **पाणीकांजी**–न. (व्यापक) पाणी काढणें व भरणें इ० गृहसंबंधीं कामांविषयीं व्यापक अर्थी योजावयाचा शब्द [पाणी+कांजी] **पाणीचोर**–पु पाणचोर पहा 'जैसें पाणी चोराच्या द्वारीं। वरील रंध्र दाटिजे जरी।' –विपू २.६६ [पाणी+चोर] **पाणीटाळ**–पु ओहोटी –हंको, –शर, –मनको पाणिढाळ अर्थ १ पहा. [पाणी+ढाळ] **पाणी तावणें**–न. (ना.) आंघोळीचें पाणी तापविण्याचें भांडें किंवा जागा. [पाणी+तावणें] **पाणीदाम**–पु पाणीपट्टी [पाणी+दाम=किंमत] **पाणीदार**–वि. १ ज्याच्या अंगीं चांगलें पाणी, तेज आहे असा (हिरा, रत्न, मोत्यें इ०). २ तीक्ष्ण; चांगल्या धारेचें (शस्त्र इ०). ३ तेजस्वी; स्वाभिमानी; रग, धमक इ०कानीं युक्त (मनुष्य, पशु इ०). [पाणी+फा. दार=युक्त] **पाणीपट्टी**–स्त्री. म्युनिसिपालिटी इ० स्थानिक संस्था नगरवासीयांकडून पाणीपुरवठ्याबाबत घेतात तो कर. 'म्युनिसिपालिटीनें पाणीपट्टी वाढविली.' –के १७.६.३०. [पाणी+पट्टी=कर] **पाणीपण**–न. पाण्याचा भाव. 'का गंगायमुनाउदक। वोघबळें वेगळिक। दावी होऊनि एक। पाणीपणें।' –ज्ञा १८.५२. [पाणी+पण=भाववाचक नामाचा प्रत्यय] **पाणीपाऊस**–पु १ नद्या, तळीं, विहीरी इ०कांना पाण्याचा पुरवठा करून देणारा पाऊस. 'पीकपाऊस आहे, पाणीपाऊस अझून नाहीं.' २ पाऊस, पीक इ०; पाऊसपाणी [पाणी+पाऊस] **पाणीपिसा**–वि स्नान करणें, कपडे धुणें इ० पाण्याच्या व्यापारांचें ज्यास वेड आहे असा. पाणीपिसें पहा. 'एक राखे एक शंखे। एक ते अत्यंत बोलके। पाणीपिसीं झाली उदकें। कुशमृत्तिकें विगुंतलीं।' –एभा १४.२०९ [पाणी+पिसा=वेडा] **पाणीभरा**–वि पाणभरा पहा. **पाणीमळ**–पु पाण्यांतला मळ. 'तेणें बहुतीं जन्मीं मागिलीं। विक्षेपांचीं पाणिवळें झाडिलीं।' –ज्ञा ६ ४७१. **पाणीशेणी**–न. झाड–सारवण, पाणी भरणें इ० गृहसंबंधीं स्त्रीनें करावयाचीं कृत्यें समुच्चयानें [पाणी+शेण] **पाणेरा**–रें–पुन पाणी भरलेलीं भांडीं ठेवण्याकरितां केलेली चिरेबंदी ओटली. [पाणी] **पाणोटा–ठा, पाणोथा**–पु. १ पाणवठा पहा २ (वे.) नदीचा उतार. [पाणी]

**पाणीवणें**—अक्रि. पळणें –हंको –शर. –मनको.

**पाणे**—न उदकपात्र. 'कापुरें सहीतु घेतला वीडा। मुखी फोडी हातीं पाणे।' –उषा २१.३५.

**पाणोवाणी**—क्रिवि. पाठोपाठ. 'कोण जाय संगीं। पाणोवाणी तयाच्या।' –तुगा ३८३२ [पाणी+वाणी=प्रमाणें ?]

**पाण्यत्**—न. पैसा, द्रव्य, खंडणी. 'याचा त्याचा पाण्यत् वरूनि तंटा झाला।' –ऐपो २५२ [सं. पण्य=पैसा, किंमत]

**पाण्याड**—न पाण्याचा सांठा; पाणियाडा पहा. 'गगनामाजीं येक उफराटा आड। तेथील पाण्याड चोजवेना।' –दावि ७८९ [पाणियाडें]

**पाण्हाऊ**—पु (महानु.) पान्हा. 'ऊरसे पाण्हाऊ न धरे माता।' –दाव ३०५ [पान्हा]

**पात**—न. १ पान; झाडाचें अरुंद व लांब पान. २ पान; पातें (शस्त्र, हत्यार इ०चें). ३ डोळ्याची पापणी: पापणीचे केस ४ (कों.) लहानसें नारळीचें झाड, रोप. –स्त्रीपु (कु) एक सुवासिक वनस्पति; पाच पहा. –स्त्री. १ (गो) कांद्याचें रोपडें २ कांदा; लसूण इ०चें पान; पाला [सं पत्र. तुल० फ्रेंजिप्सी पत्र; पोर्तु. जिप्सी पु] **म्ह०** हातावर मिळवावें आणि पातावर खावें=हातावर पोट भरणें ०**फणस**–पु फणसाची एक जात या जातीच्या झाडाचीं पानें फार मोठीं असून फळांत गरे फारसे नसून पातीं असल्यामुळें फारशीं खाण्याच्या उपयोगी नमतात. (गो.) पा[illegible]. [पातळ+फणस]

**पात**—पु. एक [illegible]तील मासा.

**पात**—न. तासणी; वांकस, कुऱ्हाड इ०चें दांडा घालण्याचें भोंक, नेढें.

**पात**—पु. १ पतन; पडणें; खालीं येणें; निःपात; (ल.)नाश. २ (ज्यो.) सतरावा योग; व्यतीपात. ३ चंद्रसूर्यांचें क्रांतिसाम्य; क्षेपपात. ४ उड्डाण; उडण्याचा प्रकार 'एका पातांतचि या हंसाला हा स्वबंधु हारवितो।' –मोकर्ण २८.३८. 'उडेन एकैक पात शतगांवें।' –मोकर्ण २८.२९. ५ प्रहार [सं. पत्=पडणें]

**पात**—स्त्री. (व घाटी) जोड जुवाची खालची बाजू;शिवाळ्याची खालची दांडी. [सं पंक्ति; पत्]

**पात**—स्त्री (कों. नाविक) १ परभाणाचा वरचा भाग. हा भाग पेटीच्यावर निमुळता असतो. २ वल्ह्यास पुढच्या टोकांस बांधलेली फळी; वल्ह्याचें पान, चपटा भाग. [सं. पत्र]

**पा(पां)त**—स्त्री ओळ; रांग; भाताचे रोपे शेतांत ज्या रांगेनें लावतात किंवा कापतात ती रांग; कापणी किंवा बेणणीच्यावेळीं एका माणसानें धरलेली ओळ घर शाकारण्याचे वेळची लावावयाची कवलांची इ० रांग; धान्य मळण्यासाठीं खळ्यांत जुंपलेली तिवडा नांवाच्या खांबाभोंवती फिरणारी बैलांची रांग. (सामा) ओळ; रांग. (कोंकणांत पांत व देशांत पात असा हा शब्द वापरतात). (क्रि० धरणें; लागणें). 'मजूरकऱ्यांचे बरोबरीं। आपण पात धरी दुसरी। सप्रेम प्रेमाचिये गजरीं। तुकया करी संवगणी।' [सं. पंक्ति]

**पात, पातकोंबा**—पु (गो.) कलहंस

**पातक**—न. अधर्म; पाप; दोष; अपराध; एखादें दुष्कृत्य; गुन्हा. [ सं. ] ०**खाणें**-पापाबद्दल पश्चात्ताप होणें ०**निरास**-पु पाप नाहींसें करणें, घालविणें. **पातकी**-वि. पापी; पापाचरण करणारा, केलेला; दुराचारी; कुमार्गवर्ती; अपराधी. [ सं. ]

**पातरारी**—पु (कु ) कुळवाडी लोकांत पूर्वजाच्या नांवें जेवण वाढण्यासाठीं बोलावलेला पाहुणा. [ पातक+अरि ]

**पातकिरला**—वि. ( कों ) ( बायकी ) बारीक, पातळ; रोड; कृश; सडपातळ; पातलागी ( माणूस ). [ पात=पान+केर= कचरा, भूस ]

**पातड-डी-डें**—पुस्त्रीन १ पंचांग, भविष्य वर्तविण्यासंबंधीं लिखाणाची वगैरे चोपडी, चोपडें. ' पातड वाचे वेदमाळी । ' –दावि ४९०. ' ब्रह्म होऊनिया वेडें । सन्मुख वाची पातडें । ' २ एखाद्याच्या धंद्याची, उद्योगाची साधनसामुग्री ( कागदपत्र, लेख, पुस्तकें, कामाच्या वस्तू इ० ) ( क्रि० पसरणें, उघडणें, माडणें; बांधणें; झाकणें, अटपणें ). [ सं. पत्र ]

**पातणी**—स्त्री ( व. ) डोळयाची पापणी, पातें. ' रात्रभर पातणीला पातणी नाहीं लागली. '

**पातणें**—अक्रि. विश्वास टाकणें; भरंवसा ठेवणें. ' तो त्याजवर पातला म्हणून ठकला. ' [ सं. प्रत्यय, म पात्यविणें ]

**पातणें**—अक्रि ( काव्य. ) १ येऊन पोंचणें; येणें; दाखल होणें; पावणें. ' भूप म्हणे भगवंता लिखिता ज्या पातलासि कार्यातें । ' –मोशांति ४.१०. २ प्राप्त होणें. ' तैसें व्यासोक्ति अळंकारिलें । आवडतें बरवेंपण पातलें । ' –ज्ञा १ ४५. ३ घडणें, घडून येणें. [ पावणें ]

**पातण्या**—पु. परभूमधील एक भेद; अव. पाताणे.

**पातन**—न. एक रासायनिक क्रिया; पदार्थाची उष्णतेच्या साह्याय्यानें वाफ करून त्या वाफेस द्रवरूप देणें. ' हिंदुस्थानांत व चीनांत खिस्ती शकापूर्वी हजारों वर्षे पातनाच्या क्रियेनें अर्क काढीत असत. ' –ज्ञाको प ७६. [ सं. ]

**पातन( तारा )**—पु. ( नृत्य ) डोळयांचीं बुबुळें ( तारा ) खालच्या बाजूस नेणें हा अभिनय करुणरसास युक्त आहे [ सं. ]

**पातन( भुवई )**—स्त्री. ( नृत्य ) एकावेळीं एक किंवा दोनहि भुंवया खालीं करणें. हास्य, असूया ह्या भावांच्या वेळीं या भ्रूकर्माचा उपयोग होतो. [ सं. पातन+भुंवई ]

**पातमार**—स्त्री. ( गो. ) फत्तेमारी. [ हिं. ]

**पातमुळा**— पु. पातीचा मुळा.

**पातयी, पातय**—स्त्री. डोळयाची पापणी; पातणी. ' पातयाची मिठी । नुकलितां दिठी । ' –अमृ ७.१४८. [ सं. पत्र ]

**पाँतर**—न. ( गो. ) विडी ओढून झाल्यावर तिचा राहिलेला अवशेष; थोटूक. [ सं. पत्र ]

**पातरकुरळी**—स्त्री एक पक्षी.

**पातरवडी**—न. ( गो. ) अळवाची वडी. [ पत्र+वडी ]

**पातरी**—स्त्री. ( प्र ) पाथरी; रानांतील एक वनस्पति; हिची भाजी करतात [ सं. पत्री ]

**पातरींग**—न ( चांभारी धंदा ) चपलांच्या आकाराचें मेज, माप. ( क्रि० कापणें ) [ इं पॅटर्न ]

**पातल जीवन**—न. जीवन मोत्यें, मोत्यांचा एक प्रकार.

**पातवड**—स्त्री. ( कु. ) पाण्याचा पाट साफसूफ करण्याची क्रिया. [ सं पात्र ]

**पातवडा**—पु. खपला, पोपडा; टप्पल, पदर; पापुद्रा; पाचोळा. पापुदरा पहा. ' तैसा आह्मचवरी कोरडा । त्वचेचा असे पातवडा । ' –ज्ञा ६.२५२ [ सं. पत्रवत् ]

**पातवडी-वड**—स्त्रीपु. १ तळून खाण्याची पापडी ( विशेषत· तादळाच्या किंवा जोंधळयाच्या पिठाची ). २ हरभऱ्याच्या पिठाचें धिरडें; पाटवडी पहा ३ अळू इ०काच्या पानास डाळीचें पीठ लावून गुंडाळून, उकडून, तळून केलेली वडी [ पत्र+वडी ]

**पातशाप**—पु. ( गो. ) विटाळ.

**पातशोंबें**—सक्रि. ( गो. ) दुखणें विकोपास जाणें.

**पातसडला**—वि. ज्याचीं पानें झडून किंवा वाळून गेलीं आहेत असें ( झाड, फांदी ). पाटसडणें पहा. [ पात=पान+सडणें= कुजणें, झडणें ]

**पातसांडा**—पु. ( कु ) एक प्रकारचा मासा.

**पातळ**—न. लुगडयासारखें स्त्रियांचें नेसण्याचें एक हलकें वस्त्र. ' पातळ पैठणी हिरवे चौकडीदार । ' –भाऱ्रै १०.३ ११६. [ सं. पत्रल=बारीक ]

**पातळ**—वि. १ बारीक; जाड नव्हे असें. जाडीला कमी ( फळी इ० ). २ द्रवरूप; प्रवाही; द्रवयुक्त; द्रवांश अधिक असलेलें ( ताक इ० ). ३ विरविरीत; वीण दाट नसलेलें; सैल विणीचें ( वस्त्र ) ४ चिकटून, घट्ट, दाट नसणारें; अंतराअंतरांवर असणारें; दूर दूर असलेलें, पसरलेलें ( पीक ). 'शेत भारी पातळ पेरलेंस.' ५ किडकिडीत; कृश; सडपातळ; रोड. ६ बेताबाताची; थोडीशी; कमी; वरवर; दाट नसलेली ( ओळख, प्रेम, लोभ, स्नेह, कृपा इ० ). ' तुसी कृपा पातळ फार झाली । ' –साछ ४.१६ [ सं. पत्रल; हिं. पातल ] ०**पोटया**-वि. पातळ, सपाट पोटाचा. याच्या उलट ढेरपोटया. **पातळाई**-स्त्री. १ दाटी नसलेली स्थिति, पातळपणा, विरलता; गर्दीचा अभाव. 'मघा देवळांत दाटी होती, आतां पातळाई आहे. ' ( सामा. ) विस्कळित स्थिति, पांगापांग. २ द्रवपणा; सैलपणा; विरळपणा; बारीकपणा; किडकिडीतपणा; ( पातळ (–वि.)चा पहिला अर्थ सोडून सर्व नामांच्या अर्थी भाववाचक

नामें ). पातळांगी-अंग्या-वि. किडकिडीत, बारीक,कृश; रोड; पातळ अंगाचा. [ पातळ+अंग ]

**पातळ जीवन**—न. मोत्यांचा एक प्रकार, जीवन मोत्यें. हीं एका चवात १० ते १९० पर्यंत येत असलीं तर त्यास म्हणतात. पातल जीवन पहा

**पातळांवचें**—सक्रि. (गो.) पालयें टाकणें; पसरविणें. [ पातळ ]

**पातळी**—स्त्री. १ पातळपणा; विरळपणा; पातळाई अर्थ २ पहा. २ गर्दी, दाटी नसणें. पातळाई अर्थ १ पहा ३ स्वयंपाकातील लहानसें भांडें. ४ धातूचे गज तोडण्याचें हत्यार, फेर; लोहाराची छिनी, छिलणी ५ सपाटी, एका समतलात असून उंच किंवा सखल नाहीं अशी स्थिति ( भूमिति ) ज्याला लांबी व रुंदी मात्र आहेत असें पृष्ठ किंवा क्षेत्र ६ ( बे. सुतारी ) लांकूड फोडण्याचें साधन, पटाशी. [ पातळ ]

**पातांजली, पातंजल योग**—पु. पतंजलि नांवाच्या प्राचीन ऋषीनें शोधिलेली हटयोगाची पद्धत, शास्त्र. ' पातांजली योगसाधन। साधुनि योगी पावती निरंजन।' [ पतंजली+योग ]

**पाताडें**—न. १ ( रेडा, म्हैस इ०चें ) सपाट शिंग. २ पताडें पहा.

**पाताण्या**—पु. पाठाराप्रभू; एक जात किंवा तीतील व्यक्ति. परभू आणि कायस्थ पहा.

**पाताल-ळ**—न. १ पृथ्वीच्या खालचा लोक; नागलोक; भूलोकाच्या खालीं सात लोक आहेत ते प्रत्येकीं. २ सप्तपाताळ पहा. २ ( ल ) फार खोलपणा वर्णावयाचा असता अतिशयोक्तीनें म्हणतात. जसें.-पोट पाताळास गेलें-उपासानें डोळे पाताळांत गेले. सं ] ०फोडून, पाताळांतून काढणें-१(ल.)एखादें अंधारांत केलेलें कृत्य उजेडांत, उघडकीस आणणें. २ ओढून ताणून तर्क, कल्पना काढणें. पातळीं घालणें-(ल) पूर्ण नाश करणें. ०गंगा-स्त्री हिमालयांत उगमाजवळील गंगेचें नाव. तेथें ती जमीनीखालून वाहते अशी समजूत आहे. पाताळची गंगा. ०पाणी-न. १ विहीर इ०त जमिनीखालून झऱ्यानें येणारें पाणी. ' विहीरीला पाताळपाणी लागलें ' २ (सामा ) खोल पाणी. ०यंत्री-वि. खोल, गूढ, गुप्त, पत्ता न लागणाऱ्या मसलती करणारा; कारस्थानी; पाताळापर्यंत ( फार खोलपर्यंत ) ज्याचें यंत्र ( मसलत, धोरण ) पोंचतें असा गूढ ( मनुष्य ). [ पाताळ+यंत्र ]

**पातारो**—स्त्री. (गो.) एक मासळी.

**पाताळयंत्र**—न. उवेल इ० तेल काढण्याचें यंत्र; तेल, अर्क, सत्त्व काढण्याचें किंवा धातूचें भस्म करण्याचें साधन, यंत्र. मातीचीं दोन भांडीं तोंडास तोंड लावून वरून तीं चांगलीं लिंपून जमीनींत भट्टी इ० तयार करून तींत ठेवणें. [सं. पाताल+यंत्र]

**पांति**—स्त्री. पंक्ति; पंगत. ' तेथ कोकिळांची पाति दर्दुरा। केवि लाभे।' -ज्ञा ५२. [सं. पंक्ति] ०कर-पु. १ पंक्तीस बसणारा, जेवणारा; पक्तीचा. ' जेथ शांताचिया घरा। अद्भुत आला आहे पाहुणेरा। आणि येराही रसा पातिकरा। जाहला मानु।' -ज्ञा ११ २. २ हिस्सेदार ३ सोबती.

**पातित्य**—न १ पतितपणा ( दुष्कर्म केल्यामुळें येणारा ). २ बहिष्कार, पतनत्व ( जातींतून, अधिकाराच्या जागेवरून ). [ सं. ]

**पातिय्रोचें**—अक्रि. ( गो. ) विश्वासणें, विश्वास टाकणें

**पातिव्रत्य**—न. पातिव्रतेचा धर्म, स्त्रीनें पतीच्या मनोदयाप्रमाणें, पतीच्या आज्ञेंत वागणें, पतिव्रतापणा; पतिव्रताधर्म. [स]

**पाती**—स्त्री. १ धातूचा पातळ तुकडा, साधकामाच्या डाकाची पट्टी. पट्टी ( लोखंडी ) २ फऱ्याचें आडवें पातें, ज्यावर शींग मारणारें लाकूड फिरवितात तें ३ जानवीं इ० करताना त्याची तिसुती इ० गुंडाळण्याचें काबीट. ४ लांबट आकाराचें पान किंवा पात (उसाचें, नारळाचें इ०). ५ फणसाच्या गऱ्याचे सांगुळाभोंवतीं असलेले तंतु [ सं. पत्र, पट्टी ]

**पाती**—स्त्री खळयांतील मळणीसाठीं जुंपलेल्या बैलांची ओळ, रांग, पात [ सं. पंक्ति ]

**पाती**—स्त्री. घराणें; घराण्याची शाखा. ' धाकटे पातींतील मंडळी येणेंप्रमाणें होती. ' -विक्षिप्त २.४२ [ सं. पक्ति ]

**पाती**—स्त्री. पापणी ( डोळयाची )' 'कोणा नाठवे हा कोण कुळ याति। झाल्या तटस्थ सकळा नेत्रपातीं वो।' -तुगा १३५ [ स पत्र ]

**पाती**—स्त्री. कापसाच्या झाडाचें फूल. -शर [ सं. पत्र ]

**पाती**—स्त्री. बरोबरी. -मनको. [ सं. पंक्ति ]

**पा(पा)ती**—स्त्री. वांटणी; भागी; अंश; हिस्सा; सामाईक व्यवहारांतील वाटा. ' आपुलिया मानवले या धर्ममखात देव पात्याते।' -मोअश्व ६ ४६. ' या सावकारींत चौघांची पाती आहे.' [ सं. प्राप्ति; हिं. ] ०दार-वि. भागीदार; हिस्सेदार; वाटेकरी

**पातीकांदा**—स्त्री. पाती असलेला कांदा याच्या उलट बोडका कांदा. [ पात+कादा ]

**पातीचा चहा**—पु. गवती चहा ( वनस्पति ) किंवा त्याचा काढा. [ पात+चहा ]

**पांतु, पांतूचें**—स्त्रीन. १ ब्राह्मणास दिलेली दक्षिणा; दान. ' पडली पांतु नबाबाला।' -ऐपो २५३. २ -पुअव. पांतू; रुपये. [ सं. दक्षिणाःपांतु=दक्षिणा देतांना म्हणतात ]

**पातें**—न. १ डोळयाची पापणी. ' भीष्म प्रभु दुसरे धनु सज्य करी जों न हालते पातें।' -मोभीष्म १०.८४. २ पान

(तरवार, सुरी इ०चें). ३ (ल.) रहाटाचें आडवें लांकूड. ४ (बैलगाडी) खुटल्याच्या वर ठोकलेलें घोडक्याशीं समांतर असें लांकूड. ५ फणसाच्या गऱ्याभोंवतालचे तंतू. ६ लांबट पान (ऊंस, नारळ झाड इ०चें) ७ जोखडाच्या खालचा समांतर भाग, खालचें लांकूड. देशांत जोखडाच्या वरच्या भागास जोकड किंवा शिवळ, शिऊळ, शिवूळ शिवाळ इ० म्हणतात. [सं. पत्र; पात] **पात्यास पातें न लागणें**-थोडी सुद्धां झोंप न लागणें.

**पाते(ति)जणें**—उक्रि. सोंपविणें; विश्वास ठेवणें; विश्वासणें; पात्यवणें. 'म्हणोनि ज्ञाना कर्मा कर्तेया। पातेजों नये धनंजया।' -ज्ञा १८.५१८. [सं. प्रत्यय]

**पातेरा-रें**—पुन. १ पाला, पाचोळा; कचरा; कडवा; टर फल. २ (ल) (काव्य) व्यापारांतील पत; नांवलौकिक. ३ (ल) आश्रय. -शर. [पात] **०उडणें**-(ल) पत, बोज उडणें, नाहींसा होणें. 'जनाचारामध्यें उडाला पातेरा। झालों निलाजिरा म्हणवूनि।' -तुगा १२२९.

**पाते(ये)लें**—न बगुणें; बोघणें, कढी सांबारें इ० करण्याचें धातूचें एक पात्र; (कों.) पातयेलें (व.) भगुणें. [सं पात्र]

**पातेली**-स्त्री. लहान पातेलें.

**पातेविणें**—उक्रि. (सामा.) पात्यविणें पहा.

**पातो(तों)डा**—पु. पापोडा; पापुडा; पापडा. पापुदरा पहा. [सं. पत्र]

**पातोडी**—स्त्री. पाटवडी, पातवडी पहा.

**पातोवळा, पातोळा**—पु. तांदुळाच्या पिठांत कांकडी, मूळ व खोबऱ्याचा कीस इ० घालून हळदीच्या पानावर तें पीठ थापटून मोदकाप्रमाणें उकडून केलेलें पक्वान्न हें दोन तीन दिवसपर्यंत टिकतें. (गो.) पातोळी. 'घावन पातोळ्याच्या ओळी।'-मसाप २.२३. [पात+पोळी]

**पातोळी**—वि. (गो.) (ल) जीभ चुरचुर चालविणारी (स्त्री).

**पातोळी**—स्त्री. (कु.) दुखण्याचा घाला, साथ. [सं. पात]

**पातोळें**—न. (गो.) गप्पीदास, बोलघेवडा माणूस.

**पात्यविणें**—उक्रि. (काव्य) १ सोंपविणें; विश्वासणें; हवाला, भरंवसा ठेवणें. पातणें पहा. 'नेणत्या मुलावर घर पात्यवून बाहेर जाऊं नये.' २ निर्धास्त राहणें; विसंबणें; निःशंकपणें वागविणें. 'विहिरीवर मुलास एकटें पात्यवूं नका.' [सं. प्रत्यय; हिं. पत= विश्वास]

**पात्या**—न. हळवार जमीनींत पेरतात असें भात. -बदलापूर २८३. [सं पत्र]

**पात्र, पात्री**—न. १ (सामा.) भांडें; ताट, तबक, पेला, वाटी, पातेली इ० 'घरीं घावया अन्न हस्तांत पात्री।' -नरहरि गंगारत्नमाला १५५. (नवनीत पृ. ४३३). २ कांहीं एक पदार्थ ठेवायास आधारभूत वस्तु. जसें-पेला, उदळें, जलाशय, आमाशय, मलाशय इ० प्रतिग्राहक (दान, आशीर्वाद, शाप इ०चा); खाण; समुद्र; निधि (गुण, दुर्गुण इ०चा). ३ नदीचा प्रवाह जेथून जातो त्या जागेची रुंदी. 'आकारें द्विगुणित पात्र होय तीचें।' ४ (नाटय) वेष; सोंग; भूमिका. ५ अतिथी. 'या सदुदारापासुनि पात्रें वरिती गुणानुरूपार्थं।' -मोकर्ण ११.१६. ६ (व.) पत्रावळ ७ वेश्या; राख; रखेली -वि १ योग्य; लायक; युक्त. जसें:-प्रशंसापात्र-निंदापात्र-दानपात्र-मोहपात्र इ० 'परि पात्र होय गुरुमखसुकृतें तो सुतलाभा जीन।' -मोरामायणपंचशती-बाल २. २ आधार. 'करितां आज्ञाभंग क्षोभाचें पात्र जाहले चवघे।' -मोआदि ११.६७ [सं.] **०नाचविणें**-उधळेपणानें राहणें, वर्तणें **पात्रांत राख कालविणें**-जीवनाच्या किंवा निर्वाहाच्या साधनांचा नाश करणें. **पात्रावरून उठविणें**-(ल) उपजीविकेचें साधन काढून टाकणें, नाहींसें करणें. **पात्रीं बसणें**-पानावर भोजनास बसणें. **पात्रें पुजणें**-पानावर थोडेंसें नांवाला वाढणें; वाढलेसें करणें. **पात्रें वाढणें**-१ जेवणाचीं पानें मांडणें. २ (ल.) साज मांडणें; सर्व तयारी करणें. **म्ह०** पात्र पाहून दान करावें **०वस्त्र**-न. (व्यापक) भांडींकुंडीं व कपडेलत्ते; संसारांतील अवश्य लागणाऱ्या वस्तू.

**पात्रा**—स्त्री नर्तकी; नाचणारी; नायकीण; वेश्या; रांड. [सं. पात्र]

**पात्री, पाथरी-रा**—स्त्री. शेतांत उगवणारी, लांब व पानांची कड कातरल्यासारखी असणारी एक रानभाजी; पाथरी [सं. पत्र]

**पात्रूट-ड**—पु. दगडफोड्या; पाथरवट. [पाथरवट अप.]

**पात्रसमित**—वि. १ तुकडमोड्या; पंक्तिबारगीर; पराग्नरुचि. २ भोजनभाऊ; आयतोजी; फुकटखाऊ. [सं. पात्र]

**/ पात्स(त्सा)र**—पु. (कु.) विश्वास; भरंवसा; प्रत्यय. [सं. प्रत्यय]

**पात्साण**—स्त्री. (गो.) दुर्गंधि. [पाद+घाण]

**पात्साळी**—न. (कु.) एक जातीचा मासा.

**पा(पां)थ**—स्त्री. (कों.) ओळ; रांग; पंक्ति. (व.) जमाव; समुदाय [सं. पंक्ति]

**पाथ**—स्त्री. १ (ना. व.) पिकांच्या दोन उभ्या रांगांतील मोकळी जागा किंवा रांग. 'किती पाथा दिवसांतून निंदून होतील.' २ (व.) निंदण्याकरितां बायका ३ तास व मनुष्य ४ तास घेतात व असें घेतलेलें तास ज्याचे त्यानें पूर्ण निंदले म्हणजे एक पूर्ण पाथ होते. पात पहा. [सं. पंक्ति] **०धरणें**-(खा.) खळ्यांत मळणी करतां कणसावरून बैल फिरविणें.

**पांथ**—पु. १ मार्ग; रस्ता; वाट; सडक. २ प्रवासी; यात्रेकरू. 'तूं पांथ तापस छाया घनु। होसि पर मार्गिचा संताजु।' –ऋ ५०. –वि. १ पांथस्थ, वाटसरू. २ मार्गासंबंधीं; रस्त्यासंबंधी. [सं. पथ] **पांथस्थ, पा(पां)थिक**–पु. वाटसरू; मुशाफर; प्रवासी; मार्गस्थ. 'जैसें बापें जोडिलें लेंका। वांटिले सूर्यें मार्ग पांथिका।' –ज्ञा १८८२६. [सं. पंथस्थ] **पाथेय**–न. १ प्रवाससामुग्री; शिदोरी; प्रवासांत लागणाऱ्या खाण्याच्या वगैरे वस्तू. २ और्ध्वदेहिक कर्मांत करावयाचें एक विशिष्ट श्राद्ध. [सं.]

**पाथर**—स्त्री. १ कपडे धुणें, स्नान करणें, बसणें, मसाल्याचे पदार्थ वाटणें इत्यादि करितां असलेला मोठा, चपटा आणि नितळ दगड. २ –पु (काव्य.) (सामा.) दगड 'कोणे एके ऋतु आहारा। बळराम चेतसे मदिरा। तो घट ह्मणोनिया पाथरा। फोडिला तेणें।' –कथा ४.१५५७. [सं. प्रस्तर; प्रा. हिं. पत्थर; पं पथ्थर; सिं पथरु; बं पाथर, पातर; ओ. पथर] **॰आंबटी**–स्त्री. जांबोत्री दगडावर पर्जन्यकाळीं एक आंबट वनस्पति रुजत असते ती. **॰फोड-फोडया**–पु. १ चोचीनें दगड फोडणारा एक पक्षी. २ दगडफोडया; पाथरवट. [हिं.] **॰वट, पाथरट-ड, पाथरूट-ड**–पु. १ दगडफोडया; दगडाचें घडीव काम करणारा; शिलावट जात व तींतील व्यक्ति. २ एक पक्षी. पाथरफोड अर्थ १ पहा. [सं प्रस्तरकृत] **पाथरी**–स्त्री. धुण्याचा लहान दगड; लहान पाटा; लहान पाथर. [पाथर]

**पाथरणें**–सक्रि. पसरणें; अंथरणें. 'बुरुडी करंडयांत बुडाशीं केंदाळ गवत पाथरावें'–(बडोदें)मरळमाशाची पैदास ४. [सं प्रस्तृ]

**पाथरा**—पु. वाळण्याकरितां पडलेली, पसरलेली ओळ, रांग (कापलेल्या पिकाची, तंबाखूच्या जुडयांची इ०). [सं. पंक्ति; पात]

**पाथरी**—स्त्री. १ (कातकरी) चिचोरी; खेकडयाची एक जात. –बदलापूर १२८. २ एक रानभाजी. पात्री पहा.

**पांथरी**—स्त्री. प्लीहा; (प्र.) पाणथरी पहा. [पाणथरी]

**पांथा**—पु रीत; पद्धति; तऱ्हा; मार्ग. 'घेतु आला पांथा। महारथिआं चिआं।' –शिशु ९८२. –स्त्री. (कों) पांत पहा. [सं. पथ]

**पाथावेळ**—स्त्री. १ (गो.) पुरावा. २ (गो.) मालिका. [सं. पथ]

**पाथी-ती**—स्त्री. (कु.) फुलांची वेणी. [सं.पंक्ति]

**पा(पां)थी**—स्त्री. १ खळयांतील बैलांची रांग; पात. २ (सामा) रांग; ओळ; रेघ. '(हनुमंत) पुच्छपांथी फिरवितसे.' २ समुदाय. ३ भागी; पाती; हिस्सा. ४ मार्ग; पंक्ति इ०. पाती पहा. [पाती] **॰दार**–वि. भागीदार; हिस्सेदार; वांटेकरी

**पाथेणें**—क्रि. (कु.) गळणें.

**पांथ्या**—पु. (कों.) खळयांतील मळणी करणाऱ्या पातींतील मुख्य बैल. [पांथ=ओळ, रांग]

**पाथ्यौवें**—क्रि. (गो.) पाझरणें. [सं. पाथस्=पाणी]

**पाद**—पु १ अपानवायु; गुदद्वारानें सुटलेला वायु. [सं. पर्दन] **पादणें**–अक्रि. अपानवायु सोडणें.

**पाद**—पु. १ चतुर्थांश; चवथा हिस्सा. २ वर्तुळाचा चतुर्थांश; ३ श्लोकाचा एक चरण. 'एका श्लोकाचा एक पाद पूर्व श्लोकाशीं संबद्ध' –विवि ८.७.१२४. [सं.] **॰पूरण**–न. १ वाक्याची, श्लोकाच्या चरणाची भरती; श्लोक इ० पूर्ण करणें. २ कवितेचे चरण पूर्ण करण्याकरितां योजिलेलीं सहा अक्षरें (तु, हि, च, स्म, ह, वै इ०). ३ (ल) अर्थपूरक पद इ०. ४ (ल.) उणीव भरून काढणें; असली भरून काढलेली उणीव किंवा वस्तु.

**पाद**—पु पाय; चालण्याचा अवयव. [सं.] **॰अभिनय**–पु (नृत्य) नृत्यामधील पायाच्या अवस्था. ह्या सहा प्रकारच्या आहेत–समपाद, उद्घट्टितपाद, अग्रतलसंचरपाद, अंचितपाद, कुंचितपाद व सुचीपाद [सं पद्=चालणें] **॰ग्रहण**–न (ब्राह्मणाच्या इ०) पायाला स्पर्श करणें; वंदन, नमस्कार करणें; अभिवादन (विशेषतः उपदेश घेण्याचे वेळीं). [पाद+ग्रहण] **॰चारी**–वि. पायानें चालत जाणारा; पायीं चालणारा; पाईक. 'पादचारी असो वा नसो बापुडा शस्त्रधारी।' –विक ११४५. [सं.] **॰चाल**–स्त्री. पायानें जाणें, चालणें. बहुधा पादचालीनें, पादचालीं असा प्रयोग होतो. **॰छाया**–स्त्री. किती वाजले हें निश्चित करण्याकरितां, पायांनीं मोजलेली माणसाची छाया. याहून निराळी शंकुछाया [सं.] **॰तलचारी**–पु. पायाच्या तळव्यावर चालणारे प्राणी अस्वलें व त्यासारखे दुसरे प्राणी या वर्गांत येतात तसेंच अमेरिकेंतील राकून आणि विलायतेंतील ब्याजर नांवाचे प्राणी याच वर्गांत येतात. –प्राणिमो २८. [सं.] **॰त्राण**–न. (सामा.) पायांच्या रक्षणाचें साधन; जोडा; पायतण; वहाणा; बूट इ० 'हात लावीतांची सोडीन मी त्राण। शिरीं पादत्राण कोण वाहे।' –मोसीतागीत ३९. (नवनीत पृ २५७). [सं.] **॰दाह-दाहवात**–पु. ज्यांत पायांची आग होते असा वातरोग; वातविकार. [सं.] **॰न्यास**–पु. पाय ठेवणें; पाऊल टाकणें. [सं.] **॰पाश**–पु. १ पायदोरी, (गुराच्या विशेषतः घोडयाच्या) पायाला घातलेला फास; कळाबा. २ पायांतील वाळा; घागऱ्यांचा वाळा. [सं] **॰पीठ**–पु बसण्याचा लाकडी पाट. [सं.] **॰पूजा**–स्त्री. १ आचार्यादि श्रेष्ठ व्यक्तींचा पूजाविधि. २ मोठ्या यज्ञांत श्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या व्यक्तींचा केलेला सन्मानविधि. ३ (ल.) खरडपट्टी. [सं.] **॰प्रमाण**–पु पायांवर डोकें ठेवणें; पायांना वंदन करणें [सं.] **॰प्रहार**–पु. लाथ मारणें; लत्ताप्रहार. [सं.] **॰पृष्ठ**–तळपाय; पायाची धूर; तळवा. [सं.] **॰बंधन**–न. पायाला बांधण्याचें कोणतेंहि साधन. [सं.] **॰रक्षा**–स्त्री. पादत्राण पहा. 'चोरटे लोक चोरून आती। पादरक्षा।' –ज्ञा

१८.१० २६. [ पाद+रक्षण ] ०लग्न–न. पादग्रहण पहा. [ सं. ] ०वंदनिक–न. एक प्रकारचें स्त्रीधन; जेव्हां वधू सासू-सासरा यांच्या पाया पडावयास जाते त्यावेळीं त्यांनीं प्रीतीनें तिला दिलेलें धन –मिताक्षरा. व्यवहार मयूख दायविभाग २३९. [ सं. ] ०शोथ–पु पायाची सुज; पायाचा संधिवात. [सं.] ०संवाहन–न. पाय चोळणें, हलके हलके रगडणें, दाबणें. 'तांबूल देती आणून। करिती पादसंवाहन।' –गुच ५.६८. [ सं. ] ०सेवन–स्त्री. १ चरणसेवा ( देवाची पूजा, अर्चा, पादप्रक्षालन इ० ). २ नवविधा भक्तीपैकीं चौथी भक्ति. ( सामा. ) चाकरी; सेवा. [सं.] ०सेवनभक्ति–स्त्री. पादसेवन अर्थ २ पहा. [सं ] ०संस्थान–न. घोडयाच्या पायाचा एक रोग. अश्वप २ ३८. [सं ] ०स्फोट–पु. पायांतील चीर, भेग, फट, कातरा. [ सं. ] ०हर्ष–पु. पायास आलेल्या मुंग्या; पायाची खरख. [सं.] पादांगुली–स्त्री. पायाचें बोट; अंगुली. [ सं. ] पादांगुष्ठ–पु. पायाचा आंगठा. [ सं. ] पादोदक–न. ज्यात ब्राह्मणाचें किंवा दुसऱ्या पवित्र माणसाचे पाय धुतले किंवा बुडविले आहेत असें पाणी; चरणांचें तीर्थ. [ पाद+उदक ] पादोदर–पु. सर्प; उरग; शेष. 'तव गुणार्णवीं नचले पादोदर स्फूर्ति।' –होला ३. [ पाद+उदर ]

पांद—स्त्री. गावांतून, शेतांमधून, कुंपणामधून जाणारी वाट, अरुंद रस्ता; पाणंद. ( हेटकरी ) पांदण. [ स. पाद ? ]

पादडणें—सक्रि. ताबडणें; जोरानें हांकणें; टांके ढिले करणें; सपाटून काम घेणें; दमविणें. [ पादणें ? ]

पादडा—पु. १ अति श्रम; थकवा; पुष्कळ पादल्यामुळें अजेर अवस्था होणें; टांके ढिले होणें. (क्रि० निघणें). २ (एखाद्याकडून) सक्त रीतीनें घेतलेले श्रम; थकेल अशा रीतीनें घेतलेलें काम. ( क्रि० काढणें; घालणें ). [ पादडणें ]

पादप—पु. झाड; वृक्ष. झाडें पायानीं (मुळयांनीं) पाणी पितात म्हणून. 'श्वापदें पाषाण पादप। सीता म्हणोनि आलिंगी।' [ सं. पाद+प ]

पादभेकाड—वि. ( ना. ) भित्रट; भेकड. [ पाद+भेकट ]

पादरटाण, पादरघाण—स्त्री. पादल्यामुळें सुटलेली घाण; पादाची घाण. [ पादरा+घाण, पादणें+घाण ]

पादरधीट—वि. बढाईखोर; फुकट फुशारकी मारणारा. प्रसंगाच्या वेळीं भीतीनें पादणारा, एरवीं धीट. 'एका नेमें कोठें दुसरा पालट। पादर तो धीट म्हणती त्यासी।' –तुगा १२८६. [ पादरा+धीट ] पादरधिटाई–स्त्री. अंगीं सामर्थ्य व धीटपणा नसतां तोंडानें दाखविला जाणारा धीटपणाचा डौल; बढाई. [ पादरा+धिटाई ]

पादरा—पु. एक किडा. पिंगूळ पहा. –वि. १ पादण्याची सवय असणारा; नेहमीं पादणारा. २ (ल.) भितरा; भुजका; हगरा. ३ दुर्बल; निर्बल; अशक्त; फुसका; निःसत्व; क्षुद्र; क्षुल्लक; कमजोर (इमारत, वस्तु, उद्योग, मत, भाषण, मनुष्य इ०). [पादणें] म्ह० पादऱ्यास बालाचें मीस–पावटयाचें निमित्त. पादरफुसका–वि. हलका; कवडीमोल; तिरस्करणीय; भितरा ( मनुष्य ); निर्जीव; निर्बल; हलकी; नादान ( वस्तु, पदार्थ ).

पांदरा—पु. ( बे. ) कोंबडीचीं पिलें झांकण्याची वेळूची टोपली. [ पिंजरा ]

पादरीमामी—स्त्री. एक वनस्पति.

पादविणें—सक्रि. १ पादण्यास लावणें २ ( ल. ) ताबडणें; पादडणें; श्रमविणें; भागविणें; दमविणें; कष्ट करावयास लावणें. ३ खेळांत मार देणें; पराभव करणें. [ पादणें ]

पादशहा–शाह—पु सम्राट; बादशहा; मुसलमान राजा. [ फा. ] पादशाही, पादशाहत–स्त्री. साम्राज्य; बादशहाचा अंमल; बादशहाचा अधिकार, सत्ता, वैभव. [फा.] म्ह० पादशहास पादशाही झाली म्हणून पिंजाऱ्यानें तार तोडूं नये. पादशाही–वि. १ बादशहानें दिलेला, बादशहास शोभेसा, साजेसा; बादशहा-संबंधीं ( मोहर, सनद, शिक्का, परवाना, रिवाज, शिरस्ता, डौल, सरंजाम इ० ). २ दरबारी; बादशाही; थोर; भव्य; उमदा; थाटाचा. ३ विलक्षण; अतिशय; पराकाष्ठेचा. असें:–पादशाही जुलूम, जबरी =भयंकर जुलूम; पातशाहीलबाडी = अतिशय खोटें बोलणें. याप्रमाणेंच पातशाही–कारखाना–कारभार–मुलूख–पीक–आमदनी इ०. [फा.] म्ह० मनं पादशाही पण दैव गांडू.

पादा—क्रिवि. ( गो. ) खालीं. [ सं. पत् ]

पादाक्रांत—वि. पायाखालीं तुडविलेला; पायानीं आक्रमिलेला; पायाखालीं घातलेला (देश, जागा); जिंकिलेला; वश केलेला; पराक्रमानें हस्तगत केलेला ( शत्रु, देश इ० ). [ सं. ]

पादाडणें—सक्रि. ताबडणें; ( प्र. ) पादडणें पहा. [पादडणें]

पांदी–धी—स्त्री. १ गांवांतून, शेतांमधून; कुंपणामधून गेलेला अरुंद गाडीरस्ता; लहान वाट; ( प्र. ) पाणंद. ( व. ना. ) पांध, पांधण–न २ ( ल. व. ) आकाशगंगा. [ सं. पाद ? ]

पादुका—स्त्री. १ जोडा; वहाण; (विशेषतः) लांकडी खडावा. २ देव, गुरु इ०च्या पायाचा दगडावरील ठसा ( पूजेकरितां असलेला); पायांची प्रतिमा. [ सं. पाद ] ०धर–वि. जोडा उचलणारा. 'पादुकाधर सेवेचा।' –दावि १८३. [ पादुका+धरणें ]

पादेलोण—न. एक काळया रंगाचें, कृत्रिम अग्निदीपक, सौम्य रेचक असें मीठ, क्षार. बिडलवण पहा. [सं. पर्दक+लवण]

पाद्य—न. पाय धुण्याचें पाणी किंवा पाण्यानें पाय धुण्याची क्रिया. 'नवरा नेईल नोवरी घरां। पूजन वरा पाद्यांचें।' –तुगा ३०९५. देवास स्नानाचे वेळीं गंध, अक्षता, फुलें, पाणी वगैरे अर्पण करतात तें. पूजा, सत्कार करण्यांतील एक विधि [ सं. ] पाद्यार्घ

घालणें-करणें-( उप. ) यथेच्छ लाथा मारणें. पाद्यार्घ्य-न. ( ब्राह्मण, अतिथि इ०स ) पाय धुण्यास दिलेलें पाणी इ०, पूजा, सत्कार. [ पाद्य+अर्घ्य ]

पांद्राच—पु. ( गो. ) दिमाख; बढाई; फुशारकी.

पाद्री—पु १ ख्रिस्तीधर्मप्रचारक; ख्रिस्ती धर्माचा भटजी. २ लष्कर, आरमार अगर इतर सरकारी खातीं यांमधील ख्रिस्ती धर्माचार्य. [ पोर्तु पाद्री; इं. फादर ]

पाद्री—पु. बुद्धिबळाच्या खेळांतील उंट. [ पोर्तु. पेड्रो ]

पाधाणी-नी—वि. अजागळ; अडाणी ( बायको ). ' काय धोंगाणी पाधाणी। ताकामध्यें घाटी लोणी।' –तुगा ६२३.

पान—न १ झाडाचें पान; पर्ण; पत्र; दल. २ ( सामा. ) नागवेलीचें, विड्याचें पान. ३ (ल.) विडा;नागवेलीचे पानास चुना लावून त्यांत कात, सुपारी इ० घालून खाण्यासाठीं केलेला विडा. ४ पुस्तकाचें पृष्ठ, पत्र. ५ कागदाचा ताव,बंद. ६ धातूच्या वर्खाचा पातळ पत्रा. ७ लहान मुलाच्या कपाळावर, स्त्री-पुरुषांच्या गळयांत, घोड्याच्या गळयांत अथवा कपाळावर बांधण्याचा पानाच्या आकाराचा एक दागिना; पिंपळपान ८ धोतरजोडी पैकीं एक नग; एक धोतर. ९ केतकीच्या फुलाची एक पाकळी, दळ. १० पत्त्याचें, गंजिफांचें पान. ११ शस्त्राचें, हत्याराचें पातें. १२ ( ल. ) सर्प; साप; नाग ( याची फणी पानासारखी असते त्यावरून किंवा संस्कृत पन्नग या शब्दावरून व्युत्पादित ). ( ल. ) ( व. ) सर्पदंश. ( क्रि० लागणें; लावणें ). १३ माहुटीचें लाकूड, फळी; छपराच्या वाशांचे शेवट ज्यांत बसवितात तें लाकूड,फळी. १४ किल्ल्याच्या तटाचा वरचा दोन जंग्यांमधील भाग किंवा भिंत (हा पिंपळाच्या पानाच्या आकाराचा असतो त्यावरून) १५ एका जातीचें औषधी गवत; ( सं. ) एरका. एरका पहा. १६ संबळाचें व ताशाचें तोंड. १७ ( गो. ) तंबाखू. १८ ( कु. ) नांगराचें टोंक, भाग. ( बे. ) नांगराच्या फाळावरील लाकडी तुकडा. १९ जेवणाचें पात्र; पत्रावळ. [ सं. पर्ण; गु. पान, पं. पण्ण, पन्ना; सिं. पनु ] (वाप्र.) ०न हलणें-( झाडाचें पान हलण्याला यत्किंचित् तरी वारा लागतो. त्यावाचून तें कार्य होत नाहीं, यावरून ) ( एखाद्याच्या वाचून ) कोणतेंहि कार्य न होणें. उदा० त्याच्या वांचून पान हालत नाहीं. ०पुजणें-( ल. ) पानावर थोडेंसें अन्न वाढणें. ( तोंडाला ) ०पुसणें–फसविणें; ठकविणें. ०लागणें–सर्पदंश होणें; साप चावणें. पानावर पान टाकणें–घालणें–ठेवणें–दडपणें, दाबादाबी करणें; छपविणें. ' त्या कज्ज्याची चौकशी कांहीं न करितां ह्यानें उगीच पानावर पान टाकलें, घातलें. ' पानावर पान ठेवणें–लपविणें; गूढ, संदिग्ध ठेवणें. पांचा पानांचा विडा-पट्टी देणें-( एखाद्या कामावर नेमणूक करतांना पूर्वी सरदारास पांच विड्याचीं पानें व सुपारी देत असत यावरून ) निरोप देणें; नोकरीवरून काढून टाकणें. (दुसऱ्याच्या) पुढलें पान, ओढूं नये, पुढल्या पानास माती घालूं नये–(ल) दुसऱ्याच्या पोटावर पाय आणूं नये; दुसऱ्याच्या पोटापाण्याचें साधन काढून घेऊं नये. पुढें वाढलेल्या पानास लात मारणें–१ (ल.) सहजासहजीं प्राप्त झालेल्या किंवा एखाद्याच्या कृपेमुळें मिळालेल्या फायद्याच्या गोष्टी झिडकारणें, नाकारणें. २ (ल) ऐन तारुण्याच्या किंवा उत्कर्षाच्या काळांत मरणें, मरण येणें. सामाशब्द- ०आवळा–ळी–पुस्त्री. लहान कांटेरी व फळें येणारें झाड; आवळीचा एक प्रकार. ०उवा–स्त्रीअव. झाडांचीं पानें खाणारे उवांसारखे किडे. ०कांडी–स्त्री. ( तंजा. ) पानपट्टया खोवण्याकरितां दांडी; रावा. ०कातर–कापें–न. (कों.) केळीचीं पानें कापण्याचें हत्यार, कातरी; (राजा) टोकास विळा बांधलेली आंकडी. ०घोंगडें–न. इरलें. ०झाड–न. ( कों. ) पानापासून उगवणारी, फुटणारी वनस्पति; पानफुटी ०तारटी–स्त्री. पत्रावळीचीं पानें दुमडूं नयेत म्हणून त्यांच्या भोवतीं कांबटया बांधल्या आहेत असा पत्रावळींचा किंवा द्रोणांचा गठ्ठा, बंडल. ०तुळी–स्त्री. (महानु.) पर्णशय्या; पानांची शेज. ' तंव भणे रत्नावली। न करीं वो न करीं पानतुळी।' –शिशु ७९९. ०दान–न. १ विड्याचीं पानें वगैरे ठेवण्याचा डबा. २ ( व. ) पानाचें तबक. [ पान+फा. दान=पात्र ] ०पट्टी–स्त्री १ विड्याच्या पानांत सुपारी कात इ० घालून केलेला विडा, गुंडाळी. २ एकत्र दुमडलेलीं नागवेलीचीं पानें (पानसुपारी देतांना देण्याकरितां केलेली ). ३ (घर) मोहटीचें शेवटचें लाकूड. वाशाचीं टोकें दिसूं नयेत म्हणून छपराच्या तोंडाशीं मारलेली फळी. ०पत्रावळ–स्त्री. पत्रावळ; घरात जेवण्यास लागणारीं पानें आणणें, साटवणें, मांडणें इ० काम. ०पुड–पूड–पुडा–पुन विड्याचीं पानें ठेवण्याचा गवताचा ताड, शिंदी यांच्या पातींचा किंवा पितळ इ० धातूचा ओंजळीच्या आकाराचा केलेला पुडा, बुरुडी डबा. [ सं पत्रपुट ] ०पेंढा–ढा–पु पत्रावळीचा भारा, गठ्ठा खोतवेठीपैकीं एक बाब. ' खोतवेठ ' पहा. ०पोत–स्त्री. बायकाचा गळयांतील एक दागिना; चिंचपेटी व मोत्यांचा पोत, पेंडें. ०बाजी–बाजू–स्त्री. (गंजीफाचा खेळ) राजा व वजीर यांशिवाय असलेलीं डावातील मोठी पानें; बंद. ०बाळी–स्त्री. कानांतील एक दागिना; मोती इ० लावलेला पानाच्या आकाराचा सोन्याचा अलंकार. ' पानबाळया तिथें मासबाळया मारो लष्कर। ' –अफला ५५ ०बोर–न. लहान मुलाच्या कपाळावरील केसाला बांधण्याचें, सोन्याच्या कोंदणात हिरे बसविलेलें एक भूषण. ०भारा–पु. पानपेंडा पहा. ०मळा–पु. नागवेलीच्या, विड्याच्या पानांचा मळा, शेत. ०लागी–स्त्री. ज्यामध्यें एकमेकांवर पानें देणें घेणें लागतात असा पत्त्यांचा खेळ. ' एक तुरी काढून टेवून तिचे पानलागी खेळूं लागले. ' –सुदे २६. ०वडी–स्त्री. अळवाच्या पानाची

तळून केलेली वडी. -गृशि १.३६१. ०वेल-स्त्री. विड्याच्या पानाचा वेल; नागवेल. ०वेल खळी-स्त्री. पानवेलीस द्यावयाच्या पाण्याकरितां केलेला खळगा; पाडलेली सरी, चर. ०सडें-न. पानदान. पानपूड पहा. ०सर-न. (पावसापासून बचाव व्हावा म्हणून) पानांचें किंवा गवताचें केलेलें एक आच्छादन, इरलें. ०सांखळी-स्त्री. पुस्तकांतील पानवार विषयसूची; अनुक्रमणिका. ०साबर-स्त्री. फड्या निवडुंग. पाणसाबर पहा. याच्याशिवाय कांडेसाबर निराळा ०सुपारी-स्त्री. १ विड्याचें सर्व साहित्य; विडा २ लोकांस बोलावून सन्मान करण्याचा समारंभ; अत्तर, गुलाब, पान-सुपारी देणें. ३ (ल.) बक्षिशी; पोस्त; लांच. 'साहेबास भेटावयाचें म्हणजे चपराशाला पानसुपारी द्यावी लागते.' पानेवाटणी-स्त्री. (कों.) लग्न ठरविण्याच्या वेळीं गोताला आमंत्रण करण्याचा समारंभ; पानसुपारी. 'पानेवाटणी झाली म्हणजे लग्न निश्चित झालें. -महाराष्ट्र शारदा पृ. ५० जुलै १९३५.

**पान**—न. १ पिणें; प्राशन (पाणी, दारू इ०). 'पैं प्राकृतही अमृतपाना। ना न म्हणवे जी।' -ज्ञा १०.१९१. (समासांत) अमृत-मधु-रस-क्षीर-पान. २ मद्यपान; सुरापान. [सं.] ०करणें- पिणें. 'तो धृतराष्ट्रराया। सुतसे पान कराया।' -ज्ञा १५.५८९. ०पात्र-न (सामा.) पाणी पिण्याचें भांडें; पेला.

**पान**—स्त्री. ओरिसामधील एक गुन्हेगार जात, व्यक्ति. -गुजा.

**पान**—न. (कर) पावशेर (शेंगा गूळ यांच्या व्यापारांत रूढ). 'शेंगांत दहा पान माती निघाली.'

**पानई**—स्त्री. (अशिष्ट) पाण्याचें भांडें ठेवण्याची जागा. [पाणी]

**पान-उतारा-कापड-काळ-कोंबडा-घोणस-चकचकी-चट-चूल-जवाई-ढाळ-पानथरी-थर**—(प्र.) पाण उतारा-कापड-काळ इ० पहा [पाणी]

**पानक**—न. (सामा.) आंबटसर पेय; पन्हें. जसें:- लिमलेट, चिंचवणी इ०; सरबत; साखर घातलेलें पाणी व लिंबाचा रस यांचें केलेलें पेय -गृशि १.४७६. [सं.]

**पानक**—पु. साप; पन्नग; नाग. 'आठ अस्तार्के राघीलीं। म्हणौनी अस्टकुळ पानक।' -उषा ८५८. [सं. पन्नग]

**पानकळा**—पु. पावसाळा. 'राघोबा दादा म्हणे नारायण- राव आतां पुढें पानकळा आला।' -ऐपो ९९. [पाणी+काळ]

**पानकावशी**—स्त्री. (व) दिवसभर पाण्यांत बसणारी गाय अथवा म्हैस [पाणी+बसणें]

**पानकी**—पु. (गो.) स्वयंपाक्याचा सहाय्यक; पाणक्या. [पाणकी]

**पानकी**—स्त्री. एक रोग; अंगाचा दाह, मळ पातळ होणें, अंतर्बाह्य पिवळटपणा आणि डोळ्याला पांढरेपणा हीं लक्षणें यांत होतात. -योर १.५३५.

**पानकेलि-ळि**—स्त्री. (महानु) पाण्यामध्यें केलेली क्रीडा; जलक्रीडा. 'तरि अमृताची पानकेळि। केवि करिते।' -भाए २२२. [सं. पानकेली]

**पानको**—पु. (गो.) गूळ घालून भाजलेला पावाचा एक प्रकार.

**पानगा**—पु. पानाला पीठ लावून निखाऱ्यावर भाजलेली भाकरी; आहारोळी. 'स्नानसंध्यादि कर्म जाहलें। पिष्टाचे पानगे भाजले।' -पांप्र ३०.२३१. पानगी- स्त्री. लहान पानगा. [पान]

**पानछत्री**—स्त्री. (तंजा.) दोन काठ्यांस मधीं लुगडीं चुणून, बांधून ठेवणें (लग्नातील एक प्रकार).

**पानट**—न. (विद्यार्थी) झाडाचें पान; कागदाचें चिटोरें; पुस्तकाचें पान इ० [पान+ट]

**पानडी**—स्त्री. १ पदक. २ साजाची पेटी. ३ कापशीच्या पानासारखी सर्व घेरभर कातरे कातरे असलेली साजांत घालावयाची पेटी; बायकांचा गळयांत घालावयाचा एक दागिना. [पानट]

**पान(ना)डी-ड्या**—वि. जमीनींत पाणी कोठें लागेल तें सांगणारा. पाणाडी पहा. [पाणी+नाडी]

**पानतावन**—स्त्री. (व.) पाणी तापविण्याची खोली; आंग- धुण्याची खोली; न्हाणी; स्नानगृह [पाणी+तावणें]

**पान(नं)द-ध**—स्त्री. (प्र.) पाणद पहा.

**पानपणें**—सकि. १ जखम भरून येणें. २ घाबरें करणें, होणें.

**पानपोई-पोय**—स्त्री. एक वेल हिचा गुरांच्या औषधाच्या कामीं उपयोग होतो. हिचीं पानें हातावर चोळलीं असतां हाताला तांबूस रंग येतो. [पाणी+पोय]

**पानफुंकणी-फुंकी**—स्त्री. (ना) मुलींचा एक शिवाशिवीचा खेळ. -मराठी खेळांचें पुस्तक ६१.

**पानबसन, पानबोदाड**—नस्त्री. (व) पाणी धरून ठेव- णारी, पाणथळ जमीन. [पाणी]

**पान बसविणें**—न. (चांभारी धंदा) तळाच्या बाहेरील बाजूस बसविलेला सागळेचा तुकडा. [पान]

**पानबुडी-ड्या, पानलोट**—स्त्री. (प्र.) पाणबुडी-ड्या इ० पहा.

**पानरट**—न. पानट पहा.

**पानवटा-ठा-पानवडा-था**—पु (प्र) पाणवठा; जलाशय; पाण्याची जागा; धुण्याची, अंघोळ करण्याची जागा. 'जे क्लेश- गांवींचा उकरडा। भवपुरींचा पानवडा।' -ज्ञा १६.४०७ 'अबली तळमळीत मनीं। पानवटा सांगे गान्हाणीं।' [पाणी+ठाव]

**पानवळ**—न. (गो.) हत्यारास पाणी देणें. (क्रि० दिवप). [पाणी]

**पानवाहलेत**—एका हक्काचें नांव ? -शर.

**पानसत्र**—न. पाणपोई [सं.]

**पानसरडे,पानसापूड**—पाणसरडे-सापूड पहा.

**पानसरा-सरकी**—पाणसरा-सरकी इ० पहा.

**पानस(सा)ळ**—स्त्री. जमीनीची पातळी दाखविणारें चढ-उतार दाखविणारें गवंड्याचें एक हत्यार; साधनी. पाणसळ पहा. [पाणी]

**पानसळाई**—स्त्री. सोनाराचें एक हत्यार.

**पाणसाळ**—स्त्री. (बैलगाडी) गाडींत ठेवलेला माल पडूं नये म्हणून गाडीस मागच्या बाजूस आडसर, झडप लावतात ती.

**पाना**—वि. (राजा. कु.) (शेतांतील धान्य, भात इ०) एके ठिकाणीं सांठविल्यावर किंवा तयार झाल्यावर त्यावर पाऊस पडल्यामुळें पिवळसर पडून उबले गेलेलें, कुजलेलें; पाणी खाल्लेलें. **पानेतांदूळ**-पुअव. अशा तऱ्हेनें बिघडलेले, भिजून कुजरलेले तांदूळ, भात इ० [पाणी]

**पाना**—पु. बोलटास बसविलेला नट खोलणारें एक हत्यार; चावी. [इं. स्पॅनर]

**पानाचॉ**—स्त्री. तंबाखु. [पान]

**पानारी**—पु पत्रावळीच्या पानांचे भारे आणणारे लोक, ओझेकरी किंवा त्यांतील एक व्यक्ति. [पान]

**पानिएडा**—पु. जलाशय. पानेड पहा.

**पानी**—वि. पिणारा (समासांत) मद्य-क्षीर-अमृत-पानी. [सं.]

**पानीय**—न. पाणी. -वि. पिण्यास योग्य, लायक. [सं.]

**पानेड**—न. १ पाचट. २ सरोवर; जलाशय; पाणवठा; पानिएडा. -शर. [पाणी+ठाय]

**पानेणें**—अक्रि (राजा कु ) (तांदुळ वगैरे ) धान्य पक्क झालें असतां त्यावर पाऊस पडल्यामुळें तें खराब होणें, त्यास धाण सुटणें; पाणेरणें. [पाणी]

**पानो**—पु (कु.) सुताराचें एक हत्यार. [पान-हत्याराचें]

**पानोवानी**—क्रिवि. प्रत्येक पानास; या पानापासून त्या पानापर्यंत 'ऐसीं जिये ज्ञानी। मुनीश्वरांसी उतान्हीं। वेवत-रूच्या पानोवानीं। हिंडताती।' -ज्ञा १३ १६६.

**पानोळी**—स्त्री. (व ना ) शिंदीच्या झाडाचें पान; शिंदीची झावळी. [सं. पर्ण]

**पान्हणें, पान्ह(व)विणें, पान्हेणें**—सक्रि कासेंतून दूध सोडणें, पान्हा फुटणें किंवा सोडणें (मातृवात्सल्यामुळें, मातेनें किंवा आंबोण इ० पाहून गाय, म्हैस इ०नीं). [पान्हा] **पान्हवण**—न १ पान्हा सोडावा म्हणून गाय, म्हैस इ०च्या पुढें ठेवावयाचें अंबोण, दाणा वगैरे. २ (ल.) मन वळविण्याकरितां, वश करण्याकरितां, समजूत घालण्याकरितां दिलेलें बक्षीस; लाच. **पान्हवणकरीण**—स्त्री पान्हवण दाखविल्याशिवाय जी कधींहि दूध देत नाहीं अशी गाय, म्हैस वगैरे.

**पान्हा**—पु १ मातृवात्सल्यामुळें जनावराच्या कासेंत दूध उतरणें, फुटणें; प्रेमातिशयानें मातेच्या स्तनांतून जोरानें बाहेर येणारें दूध ' गायीला पान्हा फुटला-आला. ' 'स्तन दाटून फुटला पान्हा। नेत्रीं ढाळी अश्रुजीवना।' २ दयेनें अंतःकरणास येणारा कळवळा [सं. प्रस्नव; प्रस्नु] (**लाजवून) पान्हा आणणें**-(ल) बळेंच आस्था, कळवळ इ० उत्पन्न करणें. ०**घालणें-धरणें-पळविणें-सोडणें**-(गाईनें) पान्हा चोरणें; थांबणें. 'अहो वासरूं देखिलयांचिसाटीं। धेनु खडफडोनि मोहें उठी। मग स्तनामुखाचिये भेटी। काय पान्हा धरे।' -माज्ञा ११४०. ०**फुटणें**-दूध येऊं लागणें; स्तनांतून दूध वाहूं लागणें. ' अहो तान्ह्याचें लागतां झटें। तेणें अधिकचि पान्हा फुटे।' -ज्ञा ९१८. ०**चोर, पान्हेचोर**-वि पान्हा चोरणारी (गाय इ०). [पान्हा+चोर]

**पान्हा**—वि. पाना पहा. **पान्हेतांदूळ**-पुअव पाना पहा.

**पान्हेरी**—स्त्री. पाणपोई. ' दासें दासत्वें आगळी। पान्हेरीनें मार्ग मळी।' -तुगा ३३८. [पानीय]

**पाप**—न. १ अपराध; कुकर्म; दुष्टपणा; दोष; पातक; नीति-बाह्य वर्तन 'पापापासुन ईश्वरक्षोभ, ईश्वरक्षोभापासून नरक-प्राप्ति, नरकप्राप्तीपासुन स्वहितनाश.' याच्या उलट पुण्य. २ वाईट हेतु; कुकल्पना; कुडा भाव; दुष्ट वासना. 'मनांत कांहीं पाप आलेंसें वाटतें.' ३ -पुस्त्री (ल.) दुष्ट, त्रासदायक, पापी मनुष्य. ' ससतक थोडेसे असति न धरतील तेहि पाप तग।' -मोकर्ण ४२ ७१. ४ व्याधि; पीडा; अडचण; संकट; लचांड [सं] (वाप्र.) ०**उभें राहणें**-पाप भोगणें; पाप उघडकीस येणें; मार्गांत आडवें येणें. ०**खाणें**-पश्चात्तापानें मन खाणें; मनास हुरहुर लागणें. ०**बोंब मारून-देऊन उठणें, ज्याचें पाप त्याचे पुढें येऊन नाचणें**-स्पष्टपणें पाप उघडकीस येणें. **पापाचा घांटा उचलणें**-पापकृत्याचे परिणाम भोगण्यास सिद्ध असणें किंवा नाइलाजानें तयार होणें (मागील जन्मांतील पापाचीं फळें भोगावी लागतात अशी समजूत आहे त्यावरून). **पापानें पाय धुणें**-सर्वदा पापाचरण करणें. **पापानें पाय धुतलेला**-वि अतिशय पापी; दुष्ट; महान्‌पातकी (मनुष्य) **तो पाप देणार नाहीं तर पुण्य कोठून देईल**-तो फारच कृपण आहे वाईट वस्तु देखील दुसऱ्याला त्याच्यानें देववत नाहीं, मग चांगली देववत नाहीं, यांत काय नवल? सामाशब्द- ०**कर्मी**-वि. दुष्कर्मी; वाईट कृत्यें करणारा; दुष्ट, पापी. ०**कष्ट**-पुअव. अतिशय श्रम, कष्ट; अत्यंत दुःख; काबाडकष्ट (रागानें, त्रासानें वैतागून बोलतांना योज-तात). 'म्यां पापकष्टानें स्वयंपाक केला तो कुत्र्यानें विटाळला.' ०**कळी**-स्त्री कलियुग. 'ऐसी आली पापकळी। आश्रियें मानिलें

**सकळीं**।' –दा ३.५.२२. [पाप+कलि] **०खाण**–स्त्री. अत्यंत, भयंकर, पापी मनुष्य; महान् पातकी; पापाचें आगर. **०ग्रह**–पु. मंगळ, शनि, राहु, केतु हे अशुभ मानलेले ग्रह; आकाशांतील ग्रहांची अपशकुनकारक, दुश्चिन्हकारक युति, योग. **०दृष्टि**–स्त्री. पापी नजर; काम, मत्सर इ०नीं युक्त अशी दृष्टि, पहाण्याचा प्रकार. –वि. कामुक; पापी, कलुषित, दुष्ट, दोषी नजरेचा. **०द्वेषा**–वि पापाचा तिरस्कार करणारा. **०धुणी**–स्त्री. पाप धुतलें जाणें, पापापासुन मुक्तता. 'जें श्रवण करतां पापधुणी। होय एकदां सर्वांची।' –ह ४ ४४. [पाप+धुणें] **०निरास**–पु पाप धुवून टाकणें, दूर करणें. **०पिंड**–पु. (स्त्री रजस्वला असतांना गर्भ राहतो यावेळीं मातेचें अशुद्ध रक्त वाहत असतें, त्यावरून या काळांतील) गर्भ पिंड; गर्भ. **०पुत्र**–पु. कुपुत्र. 'बाप तयाला ताप वृद्धपणि पापपुत्र हा करी।' –ऐपो ३६८ **०बुद्धि-मति**–वि. कुबुद्धि; दुष्ट, वाईट मनाचा; पापी वृत्तीचा. **०भी(भे)रु**–वि. पापाला भिणारा, भिऊन वागणारा **०मूर्ति-राशि-रूप-स्वरूप**–वि. घोर, महान् पातकी, मूर्तिमंत पातकी **०योनि-नी**–स्त्री १ पापजाति 'तिये पापयोनींही किरीटी। जन्मले जे।' –ज्ञा ९.४४३. २ गुन्हेगार जाती. 'पापयोनि शब्दानें अलीकडे सरकारदरबारांत ज्यांना गुन्हेगार जाती असें म्हणतात तशा प्रकारचा अर्थ विवक्षित असून....' –गीर ७४८. –वि. पापी; पातकी (माणूस). **०वासना**–स्त्री अपवित्र, पापी इच्छा; दुष्ट वासना. **०वेळ**–स्त्री रात्रीं अकरा वाजल्या पासून तों पहाटे तीन वाजेपर्यंतचा काळ. धार्मिक व पवित्र कार्याला ही वेळ अयोग्य समजतात. **०संग्रह**–पु पापांचा सांठा, संचय. **०संताप**–पु पापामुळें होणारें दुःख; मनस्ताप; कांचणी. **पापाचा बाप**–पु. जन्मदाता बाप (कारण तो मुलामुलीचा उत्पत्तिकारण असल्यामुळें त्यांच्या पापांची त्याच्यावर जबाबदारी येते). याच्या उलट पुण्याचा, धर्माचा बाप **पापाचे पर्वत**–पुअव मोठीं आणि पुष्कळ पापें. 'अपार जीव मारले। पापांचे पर्वत सांचले।' –रावि १.११० **पापात्मा**–पु. अत्यंत पापी; दुष्ट मनुष्य; पापमूर्ति, पापाचा केवळ अर्क. **पापापूर्व**–न. अनीतीच्या कृत्यांपासून उत्पन्न होणारें वाईट फळ, परिणाम इ०. अपूर्व पहा. **पापिष्ठ, पापी**–वि. अतिशय पापाचरणी; दुष्ट; अनीतीनें वागणारा; पातकी; पापयुक्त. **पाप्याचा पितर**–न. (ल.) अतिशय रोड, दुर्बल व क्षीण, मनुष्य (पापी माणसानें दिलेले पिंड त्याचे पितर खात नाहींत त्यामुळें ते रोड बनतात त्यावरून).

**पाप**—न. (गो.) पोटीस.

**पापड**—पु. उडीद वगैरेच्या डाळीच्या पिठांत हिंग इ० मसाला घालून तें भिजवून लाटून व उन्हांत वाळवून (विस्तवावर भाजून) तोंडी लावावयास पोळीसारखी केलेली चकती. [सं. पर्पट; प्रा. पप्पड] **०खार**–पु. (पापडांत घालावयाचा) एक क्षार; साजीक्षार; सज्जीखार. इं. कंट्रीअल्कली. **०पीठ**–न. पापड, चटणी इ०करितां केलेलें (मुख्यतः उडदाच्या डाळीचें) पीठ; डांगर.

**पाप(पा)डी**—स्त्री. १ तांदुळाच्या पिठांत मसाल्याचे पदार्थ मीठ घालून तें पीठ पाण्यांत भिजवून त्याचा पातळसा थर एखाद्या पानावर किंवा पातळ पत्र्यावर घालून तो वाफेंत उकडून, उन्हांत वाळवून केलेली आणि मग तळलेली पातळ, कुडकुडीत पोळी; लहान पापड; फेणी. २ कढणाऱ्या उसाच्या रसाच्या वरची मळी व तिची थापटी, पापुद्रा. ३ तांदुळाच्या किंवा गव्हाच्या पिठांत गूळ घालून तयार केलेली आणि तळलेली थापटी; गूळपापडी. ४ (राजा.) सपाट दगडांची फरशी; फरसबंदी रस्ता. ५ (गो.) (सामा.) पापुद्रा. [पापड]

**पापडी**—पु. पिंवळया रंगाच्या रेशमाचा एक प्रकार. –मुंव्या ९७

**पापणी**—स्त्री. १ डोळयाचे केस २ डोळयावरचें कातडें. ३ डोळयाच्या वर व खालीं असलेलें चामडयाचें सकेश आच्छादन. [सं. पक्ष्म]

**पाप(पु)द्रा, पापुद्रा, पापोद्रा-पोद्रा, पापोडा-डा**—पु १ शरीर, फळ, पोळी, भाकरी, कंद इ०काच्या वरील पातळ त्वचा, पदर; पापडी; जखमेवरील खपली; भिंतीचा, शेणानें सारवलेल्या भुईचा पोपडा; टरफल; कवची. २ आवरण; वेष्टण (कांदा इ० वरील). [का. हाप्पळ=खपली]

**पापर-रा-री, पांपरा**—स्त्री. लाथ; लत्ताप्रहार. 'ती हे पांपरा हाणेन।' –पंच ५९ [प्रा. सं. पदप्रहार]

**पापलिट-लेट**—पु. (कों.) एक पांढरा, तळहाताएवढा, समुद्रांतील मासा.

**पापा**—पु (बालभाषा) लहान मुलाचा मुका, चुंबन. [ध्व.]

**पापा**—पु बापाबद्दल शब्द. [बाप]

**पापा**—स्त्री. भाकरी.

**पांप्राय**—स्त्री. (गो.) बढाई; दिमाख.

**पाप्रेर**—वि (गो.) गप्पीदास; बाताडया (माणूस)

**पांप्लु**—पु (गो.) एक मासळी.

**पापुडणें**—अक्रि. १ पापोडा, पापुद्रा, खपली धरणें; पदर सुटणें. २ पित्त खवळणें; रागांत, त्वेषांत येणें. [पापड, पापुदरा]

**पांबरी, पामरी**—स्त्री. एक प्रकारचें पांघरावयाचें रेशमी वस्त्र (लहान मुलांचें).

**पावळ**—पु. १ झरा २ ओढा; नाला; ओहोळ. 'पौषापर्यंत विपुल पाणी; पुढें पावळांतून ... झरे खणून ...' –खेया ४५ ३ तीर; किनारा. 'यमुने पावळीं। गडियां बोले वनमाळी।' –तुगा २३०.

**पावळ-ळा-ळी-ळें**—वि. १ पामर; तुच्छ; दुर्बळ. 'हां हो तयाही आणि मोहाची भेटी। हे कायसी पावळी गोठी।' –ज्ञा ११.६६. २ नाशवंत; नश्वर. 'असतु हें पावळें बोला। वाउगें काई बोलो।' -शिशु १०००. [प्रा.]

**पाभ**—न (गो.) एक प्रकारचें माप.

**पाभ(भा)र,पाभारी**—स्त्री. १ शेतांत बीं पेरण्याचें आऊत. याचे दुफणी, तिफणी, चौफणी, सहा फणी असे प्रकार आहेत. 'ज्ञानपाभरी तीफणी। न लागे करावी पेरणी।' –तुगा ३६०. २ पेरणी [वें]

**पाभळ**—स्त्री (राजा) भरगच्च वृष्टि किंवा वर्षाव; पुष्कळ पडणें, निघणें, गळणें (झाडावरून फुलें, पानें, फळें इ०, चाळणींतून दाणे इ०) [प्रवाह]

**पामर**—वि. क्षुद्र, क्षुल्लक; कःपदार्थ; हलका; नीच; तेजोहीन (नीतीनें नसून परिस्थितीनें क्षुद्र असा मनुष्य).' विना न हृदयीं धरीं सरुज पामर प्रत्यया।' –केका ४४.[सं] **पामरता**—स्त्री. क्षुद्रता; लघुता; हलकेपणा दुर्बलता. 'मजकरितां भ्रात्यांनीं वरिली जोडुन हात पामरता।' -मोभीष्म ३.७.

**पामा**—स्त्री. खरूज; इसब; दद्रु; त्वचेचा रोग. 'सुतापुत्र वामा समस्तांस पामा।'-किंसुदाम ४.[सं.]

**पामा**—पु. भुस्सा. 'मालात पामा म्हणजे भुस्सा नसावा' –मुंग्या ४५.

**पाय**—पु १ (शब्दशः व लक्षणेनें) पाऊल; पद; चरण. ईश्वर, गुरु, पति, धनी इ०स उद्देशून विनयानें म्हणतात. 'मला तरी हे पाय सोडून राहिल्यानें चैन का पडणार आहे?'–कोरकि २०. २ तंगडी. ३ कंबरेपासुन तों खालीं बोटापर्यंतचा सर्व भाग; चालण्यास साधनभूत अवयय. ४ (ल.) पायाच्या आकाराची, उपयोगाची कोणतीहि वस्तु. (पलंग, चौरंग, खुर्ची, टेबल, पोळपाट इ०चा) खूर ५ डोंगराचा पायथा, खालचा, सपाटीचा भाग. ६ अक्षराचा किंवा पत्राचा खालचा भाग. ७ झाडाचें मूळ. ८ चवथा भाग; चतुर्थांश; चरण; पाद. ९ शिडीची पायरी, पावका; पायंडा १० (ल) कारण; लक्षण; चिन्ह; रंग. 'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात' [सं. पाद; प्रा. पाअ; सिं. पाओ, पाय, फा. पाए; हिं. पाव] (वाप्र) **०उखलणें**—भरभर चालणें; न रेंगाळणें. **०उतारा-र्‍यां आणणें-येणें**—नम्र करणें, होणें; तोरा, अभिमान कमी करणें, होणें. **०काढणें**—१ निघून जाणें; निसटणें; नाहींसें होणें 'वैराग्यलहरीचा फायदा घेऊन पन्हाळगडावरून रातोरात पाय काढला.' –भक्तमयूरकेकावली पृ. ३. २ (व्यवहारातून) अंग काढून घेणें. **०कांपणें**—घाबरणें; भिणें; भीति वाटणें; भयभीत होणें **०खोडणें-खुडणें-खुडकणें**—निजतांना पाय अंगाशीं घेणें. **०खोडणें**—मरणसमयीं पाय झाडणें, पाखडणें. **०घेणें**—प्रवृत्ति होणें; इच्छा होणें. 'त्या कामाला माझा पाय घेत नाहीं.' **०तोडणें**—(ल.) एखाद्याच्या कामांत विघ्न आणणें. **०दाखविणें**- दर्शन देणें; भेट देणें. 'तो मज दावील काय पाय सखा।' –मोविराट ६.११८. **०देणें**—१ पायाचा भार घालून अंग चेपणें २ तुडविणें; उपद्रव देण्यासाठीं, कुरापत काढण्यासाठीं एखाद्याला पायानें ताडन करणें. ३ पाय लावणें; पायाचा स्पर्श करणें. **०धरणें**—१ पायां पडणें; शरण जाणें; विनंति करणें, आश्रयाखालीं जाणें. २ अर्धांगवायु इ० रोगांनीं पाय दुखणें. **०धुवून-फुंकून टाकणें-ठेवणें**—(ल) मोठ्या खबरदारीनें, काळजीनें वागणें; मागें-पुढें पाहून चालणें, वागणें. **०धुणें**—१ संध्यावंदनादि कर्मापूर्वी किंवा बाहेरून आल्याबरोबर पादप्रक्षालन करणें. २ कोणाची पूजा वगैरे करतांना, आदरसत्कारार्थ त्याचे पादप्रक्षालन करणें. ३ (बायकी) (ल) लघवी करणें; मूत्रोत्सर्गाला जाणें, (मूत्रोत्सर्जनानंतर हातपाय धुण्याची चाल बायकात रूढ आहे त्यावरून). **०न ठरणें**—सारखें हिंडणें; भटकत रहाणें; विश्रांति न मिळणें; पायाला विसावा नसणें. **०निघणें**—मुक्त होणें; मोकळें होणें; बाहेर जाणें, पडणें. 'ह्या गांवांतुन एकदां माझा पाय निघो म्हणजे झालें.' –विवि ८ ११.२०९. **०पसरणें**—१ अधिकार प्रस्थापित करणें; पूर्णपणें उपभोग घेणें; अल्प प्रवेश झाला असतां हळू हळू पूर्ण प्रवेश करून घेणें. २ मरणें (मरतांना पाय लांब होतात यावरून). 'शेवटीं म्हातार्‍या आईपुढें त्यानें पाय पसरले.' **म्ह०** १ भटास दिली ओसरी, भट हातपाय पसरी. २ अंथरूण पाहून पाय पसरावेत. **०पसरून निजणें**—निश्चित, आळशी राहणें; निरुद्योगी असणें. **०पोटीं जाणें**—भयभीत होणें; अतिशय भीति वाटणें. निजलेला मनुष्य भीतीनें हातपाय आंखडून घेतो यावरून. 'जंव भेणें पाय पोटीं गेले नाहीं।' –दावि १६०. **०फांसटणें**—पाय झिजविणें; पायपिटी करणें; तंगडया तोडणें; एखादें काम करण्यासाठीं कोठें तरी फार दूरवर किंवा एकसारखें पायानें चालत जाणें. 'कांहीं लाभ नसतां उगीच पाय फांसटीत चार कोस जातो कोण?' **०फुटणें**—१ विस्तार पावणें; वाढणें. 'पहिल्यानें तुझें एक काम होतें, नंतर दुसरें आलें, आतां तिसरें. आणखी त्याला किती पाय फुटणार आहेत कोणास ठाऊक?' २ हळूच नाहींसा होणें; चोरीला जाणें (वस्तु) ३ थंडीच्या योगानें किंवा जळवातानें पाय भेगलणें, चिरटणें. **०फोडणें**—भलतीकडे नेणें; विषयांतर करणें; मुद्याला सोडून अघळपघळ बोलणें; फाटे फोडणें. **०भुईशीं(ला)लागणें**—१ (एखाद्या कामास) कायमपणा येणें; निश्चितपणा येणें.२ जिवावरच्या संकटांतून वाचणें. **०मोकळा करणें-होणें** १ अडवणींतून बाहेर पडणें, काढणें. २ फेरफटका करणें; पायांचा आंबडलेपणा नाहींसा करणें, होणें. **०मोडणें**—१ पायांत शक्ति नसणें. २ निराशेमुळें गलितधैर्य

होणें; निराश होणें. ' माझा भाऊ गेल्यापासून माझे पाय मोडले.' ३ एखाद्याच्या कामांत हरकत आणणें; धीर खचविणें; मोडता घालणें; काम करूं न देणें. ४ (नगरी) एखाद्या मुलाच्या पाठीवर त्याच्या मातेस कांहीं दिवस जाणें; गरोदर राहणें. ' नरहरीचे पाय मोडले कां ? ' ( त्याच्या पाठीवर कांहीं दिवस गेले आहेत काय ? ) **०येणें**–चालतां येणें; ( लहान मूल ) चालूं लागणें. **०रोवणें**–स्थिर, कायम होणें. **०लागणें**–पाय भुईशीं लागणें पहा. **(वर) ०येणें**–प्रतिबंध, अडचण होणें, येणें. पोटावर पाय येणें=उदर निर्वाहाचें साधन नाहींसें होणें. **०वरपणें-ओरपणें**–( कर. ) चिंचपाण्यांत पाय बुडवून ते तापलेल्या तव्यावरून ओढणें व पुन्हां चिंचपाण्यांत बुडविणें, याचप्रमाणें पांच दहा मिनिटें सारखें करीत रहाणें ( डोळ्यांची जळजळ यासारखा विकार नाहींसा होण्यावर हा उपाय आहे ) [ओरपणें पहा] **०वळणें**–१ दुसरीकडे प्रवृत्ति होणें; मुरडणें; वळले जाणें (प्रेम ६०). २ वातविकारानें पायांत वेदना उत्पन्न होणें; पाय तिडकूं लागणें; गोळे येणें. **०वाहणें**–एखाद्या स्थलीं जाण्याचा मनाचा कल, प्रवृत्ति होणें. **०शिंपणें**–( मुलाला पायावर घेऊन दूध पाजण्यापूर्वी स्वत. ) पाय धुणें. ' ते माय आगोदर पाय शिंपी । ' –सारुह १.५३. **०शिवणें**–पायांस स्पर्श करणें; पायाची शपथ वाहणें. **पायांखालीं तुडविणें**–१ दुःख देणें; क्लेश देणें; छळ करणें. २ कस्पटाप्रमाणें मानणें; मानहानि करणें. **पायाचा गू पायीं पुसणें**–(ल.) कोणत्याहि घाणेरड्या गोष्टीची घाण जास्त वाढूं न देता तिचा ताबडतोब बंदोबस्त करणें. **पायांचा जाळ-पायांची आग-पायांचें पित्त मस्तकास जाणें**–अतिशय रागावणें; क्रोधाविष्ट होणें; संतापणें. **पायांची वळ भागविणें**–व्यर्थ खेपा घालणें, फिरणें; निरर्थक कार्यास प्रवृत्त होणें. **पायांजवळ येणें**–( आदरार्थी ) एखाद्याकडे जाणें, येणें, भेटणें. **पायानें जेवणें-खाणें**–अत्यंत मूर्ख, वेडा असणें, होणें. **पायानें लोटणें**–तिरस्कार करणें; अवहेलना करणें. ' म्हणतो युधिष्ठिर नको पायें लोटूं मला अवनतातें । ' –मोउद्योग ८.१८. **पायां पडणें**–पायांवर डोकें ठेवणें; नमस्कार करणें; विनविणें; याचना करणें. ' उत्तर म्हणे नको गे ! पायां पडतों बृहन्नडे ! सोड । ' –मोविराट ३.७४. **पायांपाशीं पाहणें**–जवळ असेल त्याचाच विचार करणें; अदूरदृष्टि असणें; आपल्याच परिस्थितीचा, आपल्यापुरताच विचार करणें. **पायांपाशीं येणें**–पायाजवळ येणें पहा. **पायांला-त, पायांअढी पडणें**–(म्हातारपणामुळें) चालतांना एका पायाला दुसरा पाय घासणें. **पायांला खुंट्या येणें**–एकाच जागीं फार वेळ बसल्यानें पाय ताठणें. **पायां लागणें**–पायां पडणें. ' मीं पायां लागें कां । कांहसेयां लागीं । ' –शिशु २२४. **पायांवर कुत्रीं-मांजरें घालणें**–( ल. ) अतिशय प्रार्थना व विनवण्या करून एखाद्यास कांहीं काम करावयास उठविणें. **पायांवर घेणें**–मूल जन्मल्यावर त्यास स्वच्छ करण्यासाठीं न्हाऊं घालणें व जरूर तें सुइणीचें काम करणें. **पायांवर नक्षत्र पडणें**–सदोदित फिरत असणें; एकसारखें भटकणें; पायाला विसावा नसणें. ' कायरे, घटकाभर कांहीं तुझा पाय एका जागीं ठरेना, पायावर नक्षत्र पडलें आहे काय ? ' **पायांवर पाय टाकून निजणें**–चैनींत व ऐटींत निजणें. **पायांवर पाय ठेवणें-देणें**–एखाद्याच्या पाठोपाठ जाणें; एखाद्याचें अनुकरण करणें. **पायांवर भोंवरा असणें-पडणें**–एकसारखें भटकत असणें; भटक्या मारणें. पायावर नक्षत्र पडणें पहा **पायावर हात मारणें**–पायाची शपथ घेणें. –नामना ११०. **पायाशीं पाय बांधून बसणें**–एखाद्याचा एकसारखा पिच्छा पुरवून कांहीं मागणे. **पायांस कुत्रें बांधणें**–(ल ) शिव्या देत सुटणें, भरमसाट शिव्या देणें, फार शिवराळ असणें **पायांस पाय बांधणें**–एखाद्याच्या संगतींत एकसारखें रहाणें. **पायांस भिंगरी-भोंवरा असणें**–पायावर भोंवरा असणें पहा. **पायांस-पायीं लागणें**–नमस्कार करणें; पायां पडणें. ' तूं येकली त्वरित जाउनि लाग पायीं । ' –सारुह ८.११२. **पायांस वहाण बांधणें-बांधलेली असणें**–एकसारखें भटकत राहणें; पायपीट करणें. **पायीं**–क्रिवि. १ पायानें, पायाच्या ठिकाणीं. 'भूपें हळूच धरिला कलहंस पायीं ' –र १०. [पाय] २ मुळें; साठीं; करितां. 'काय जालें देणें निघालें दिवाळें । कीं बाधलासि बळें ऋणेंपायीं । ' –तुगा ८४५. ( कुण. ) ' कशापायीं '=कशाकरतां; कां. पाई. [सं. प्रीतये; प्रीत्यर्थ] **पायीं बांधणें**–( हत्ती इ०च्या पायाशीं बांधणें या शिक्षेवरून ) हानि, पराभव करण्यास तयार असणें. **आपले पाय माझ्या घरीं लागावे**–(आदरार्थी ल ) आपण माझ्या घरीं येऊन मला धन्य करावें. **आपल्या पायांची धूळ माझ्या घरीं झाडावी**–( नम्रपणाचें आमंत्रण ) माझ्या घरीं आपण यावें. **आपल्या पायांवर धोंडा पाडून-ओढून घेणें**–आपलें नुकसान आपणच करून घेणें; आपल्या हातांनीं स्वत वर संकट आणणें; विकत श्राद्ध घेणें. **एका पायावर तयार-सिद्ध असणें**–अत्यंत उत्सुक असणें. ' बाजीराव शिपाई आहेत तसा मीही आहें. त्याच्याप्रमाणेंच हा प्रतिनिधि योग्य प्रसंगीं पाहिजे त्या मोहिमेवर जाण्यास एका पायावर सिद्ध आहे.' –बाजीराव. **घोड्याच्या-हत्तीच्या पायीं येणें आणि मुंगीच्या पायीं जाणें**–( आजारीपण, संकट, बिकट परिस्थिति इ० ) हीं येतांना जलदीनें येतात पण जावयास दीर्घकाळ लागतो. याच्या उलट श्रीमंतीबद्दल म्हणतात. **चहूं-दोहों पायांनीं उतरणें**–( शिंगरूं, वासरूं, पाडा इ०नीं ) चार किंवा दोन पांढऱ्या पायांसह जन्मणें. **जळता पाय जाळणें**–एखाद्या कामांत, व्यवहारांत, व्यापारांत नुकसान

होत असतांहि तो तसाच चालू ठेवणें. **त्या पायींच**–क्रिवि तावडतोब; त्याच पावलीं. **भरल्या पायांचा**–(रस्त्यांत चालून आल्या मुळें) ज्याचे पाय (बाहेरून आल्यामुळें धुळीनें वगैरे) घाणेरडे झाले आहेत असा. ' तूं भरल्या पायांचा घरांत येऊं नकोस. ' **भरल्या पायांनीं, पायीं भरलें**–क्रिवि. बाहेरून चालून आल्यावर पाय न धुतां; घाणेरड्या पायानीं. ( बाहेरच्या दोषासह; स्पृष्टा स्पृष्टादि दोष किंवा भूतपिशाच्चादि बाधा घेऊन ). ' मुलाच्या जेवणाच्या वेळेस कोणी पायीं भरलें आलें म्हणून आज हें मूल जेवीत नाहीं. ' ' ज्या घरीं बाळंतीण आहे त्यांत एकाएकीं पायीं भरलें जाऊं नये. ' **मागला पाय पुढें न घालूं देणें**–( ल. ) केलेली मागणी पुरविल्याशिवाय पुढें पाऊल टाकूं न देणें; मुळींच हालूं न देणें. **मागला पाय पुढें न ठेवणें**–मागितलेली वस्तु दिल्याशिवाय एखाद्यास सोडावयाचें नाहीं, तेथून जाऊं द्यावयाचें नाहीं असा निश्चय करणें. **मागील पाय पुढें नाहीं पुढील पाय मागें नाहीं**–हट्टीपणा; करारीपणा; ठाम निश्चय; जागच्या-जागीं करारीपणानें ठाव धरून बसणें याअर्थी उपयोग. **मागल्या पायीं येणें**–एखादें काम करून तावडतोब परत येणें; त्याच पावलीं परत येणें. **म्ह०** १ पाय धू म्हणे तोडे केवढ्याचे ? २ पाय ल्हान मोठा, न्याय खरा खोटा. ३ पायांखालीं मुंगी मरणार नाहीं ( निरुपद्रवी माणसाबद्दल योजतात ) ४ ( व. ) पायावर पाय हवालदाराची माय=आळशी स्त्रीबद्दल योजतात. ५ पायींची वहाण पायींच छान–बरी (हलक्या मनुष्यास फाजील महत्त्व देऊं नये या अर्थी ) ' मज पामरा हें काय थोरपण। पायींची वहाण पायीं बरी। ' –तुगा ५३५. ६ हत्तीच्या पायांत सगळ्यांचे पाय येतात सामाशब्द– **०आंग**–न ( व. ) गर्भाशय. **०उतार–रा**–पु. नदींतून पायीं चालत जाण्यासारखी वाट. ' ए-हवी तरी अवधारा। जो दाविला तुम्हीं अनुसारा। तो पव्हण्याहूनि पायउतारा। सोहपा जैसा। ' –ज्ञा ५.१६५. –वि. १ पायांनीं ओलांडून जातां येण्याजोगा. २ पायीं चालणारा; पायदळ. ' आम्ही गाडदी लोक केवळ आम्ही पायउतारे. ' –भाव १००. [ पाय+उतार ] **०उतारां–रा**–क्रिवि. पायीं; पायानें. ( क्रि० येणें; जाणें; चालणें ). 'पायउतारा येइन मागें पळभर ना सोडी।' –सला २०. **पायउतारा होणें–येणें**–(ल.) शिव्यागाळी, भांडण करण्यास तयार होणें. **०कडी**–स्त्री. पायांतील बेडी. ' तुम्ही हातकड्या, पायकड्या घातल्या. ' –तोबं. १२६. [ पाय+कडी ] **०क(ख)स्त**–स्त्री. पायपीट; एकसारखें भटकणें; वणवण; [पाय+कष्ट, खस्त] **०कस्ता**–पु. एका गांवीं राहून दुसऱ्या गांवचें शेत करणारें कूळ; ओवंडेकरी. 'दर गांवास छपरबंद व पायकस्ता देखील करार असे. ' –वाडबाबा १.२२९. [ फा. पाएकाश्त ] **०कस्ता, पायींकस्ता**–क्रिवि. पायीं जाऊन; पायांनीं कष्ट करून; ओवंड्यानें. ' आसपास गांव लगते असतील त्यांनीं पायीं कस्ता शेतें करून लागवड करावी .. ' –वाडबाबा २.२८३. **०काळा**–पु. (कों.) (सामान्यतः) कुणबी; नांगऱ्या; शेतावरचा मजूर. [ पाय+काळा ] **०खाना**–पु शौचकूप; संडास; शेतखाना. [ फा. पाएखाना ] **०खिळॉ**–पु ( गो. ) पायखाना पहा. **०खुंट-खुंटी**–पुस्त्री. जनावर पळून जाऊं नये म्हणून त्याच्या गळ्यास व पायास मिळून बांधलेली दोरी, किंवा ओंडा; लोढणें. [पाय+खुंट, खुंटी] **०खोळ**–पु लाथ. ' कां वैद्यातें करी सळा। रसु सांडी पायखोळां। तो रोगिया जेवीं विव्हळा–। सवता होय। ' –ज्ञा १७.१०१. २ शेतखाना? [ गो. पायखिळॉ ] **०खोळा–ळां**–क्रिवि. पायतळीं; पायदळी. ' चंदन चढे देवनिढळा। येक काष्ठ पडे पायखोळा। ' –मुरंशु ३७९. **०खोळणी**–वि. शेतखान्याची ? ' जैसी पायखोळणी मोहरी। भरणाश्रय आमध्यनीरीं। तैसा द्रव योनिद्वारीं। म्हणोनि सदा अशौच।' –मुरंशु ३५४. [गो. पायखिळॉ=शेतखाना] **०गत**–न स्त्री. १ बिछान्याची पायाकडची बाजू; पायतें. ' सरकारनें खडकवासल्याचें धरण बांधून आमच्या पायगतची नदी उशागती जेव्हा नेऊन ठेवली... ' –टि २ १७४ २ ( डोंगर, टेंकडी, शेत इ०चा ) पायथा; पायतरा. ३ पलंग, खाट यांचें पायाच्या बाजूकडील गात. [ पाय+सं. गात्र ] **०गत घेणें**–बाज इ०च्या पायगताच्या दोऱ्या ओढून बाज ताठ करणें, ताणणें. **०गम**–पु. ( व. ) पाया; पूर्वतयारी; पेगम पहा. ' आधीं पासून पायगम बाधला म्हणजे वेळेवर अशी धांदल होत नाहीं ' **०गुण**–पु. ( पायाचा गुण ) एखाद्याचें येणें किंवा हजर असणें व त्यानंतर लगेच कांहीं बऱ्यावाईट गोष्टी घडणें याच्यामध्यें जोडण्यांत येणारा काल्पनिक कार्यकारणसंबंध; बरेंवाईट फळ; शुभाशुभ शकुन. हातगुण शब्द याच अर्थाचा पण थोडा निराळा आहे. एखाद्या माणसाचें काम, कृत्य याशीं हातगुणाचा संबंध जोडतात. ' धनाजीला नौकरीला ठेवल्यापासून हंबीरराव पुनः पूर्वीच्या वैभवाला चढले, आणि धनाजीचा हा पायगुण समजून त्याला प्यार करूं लागले.' –बाजीराव १२७. **०गुंता**–पु. अडचण; आडकाठी; अडथळा, पायबंद पायगोवा पहा. ' दिल्लीस गेले आणि तिकडेच राहिले तर मग यत्न नाहीं. यास्तव समागमें पायगुंता विश्वासराव यास द्यावें ' –भाव १०७. 'हीं मायेचीं माणसं स्वारींत जवळ असलीं कीं पायगुंता होतो.' -स्वप ४८. [ पाय+गुंतणें ] **०गोवा**–पु. १ पायगुता; एखाद्या झुंबाडांत पाय अडकल्यामुळें होणारी अडचण; पायामुळें झालेली अडवणूक. २ (ल.) अडचण; अडथळा; नड; हरकत; आडकाठी; अटकाव. ' निरोपण सुपर्थी आडथळा। पायगोवा वाटे सकळा। ' –मुसभा. २.९५. 'देवधर्म तीर्थे करावयास चिरंजीवाचा पायगोवा होईल ऐसे आहे' –पेद ९.११. ३ शत्रूच्या सैन्याला पिछाडीकडून अडविणें. [पाय+गोवणें]

०घडया–स्त्रीअव लग्नात वरमाय व मानकरिणी यांना त्यांच्या जनवसघर पासुन वधूमंडपीं आणताना त्याच्या रस्त्यावर आंथरावयाच्या पायघड्या (मोठ्या सत्काराचें चिन्ह). पायघड्या घालण्याचें काम परिटाकडे असतें. 'वाजंत्री पायघड्याशिरीगिरी विहणी चालती।' -वसा ५३ [पाय+घडी] ०घाळ वि पायापर्यंत पोंचसें (वस्त्र.). 'कौसुमरंगी पातळ। नेसली असे पायघोळ।' –कथा १ ११ ११२ –क्रिवि दोन्ही पाय झांकले जातील असें (नेसणें) पायावर घोळे असे. [पाय+घोळणें] ०चंपी–स्त्री. पाय चेपणें, सेवेचा एक प्रकार 'हातदाबणी, पायचंपी, विनवणी, चोळणी इत्यादि प्रकार करण्याचे अपूर्व प्रसग जुन्या लोकांच्या परिचयाचे नव्हते असे ते सागतात' –खेया २८ [पाय+चपी=चेपणीं] ०चाळ पुस्त्री अशुभ अपशकुनी पाऊल पायगुण, कोणत्याहि कायाचा बिघाड विकृति, मकटाची वाढ इ० होण्याचें कारण रस्त्यावरून जाणारा एखादा अपशकुनी माणूस किंवा भूत असें समजतात, पायरवा [पाय+चळ] ०चाल–स्त्री. पायानें चालणें, चालत जाणें; चरणचाल 'कीं येथ हे हलुच चालत पायचाली।' -सारुह ८ १४४. [पाय+चाल] ०चाळा–पु. १ विनाकारण केलेली पायांची हालचाल. २ (विणकाम) पायांच्या हालचालीमुळें हातमागास दिलेली चालना किंवा अशा रीतीनें चालणारा माग ३ अपशकुनी पायगुण, पायचळ [पाय+चाळा] ०चोरी-वि धार काढतांना मागील पाय वर उचलणारी (गाय, म्हैस इ०) [पाय+चोरी] ०ज(जा)मा–पु विजार: तुमान; चोळणा: सुर्वार. [फा पाएजमा] ०जिबी–जिब–जीब–स्त्रीन. बारिक घागऱ्या असलेला पायांत घालण्याचा एक दागिना; तोरडी; पैंजण वऱ्हाडांत श्याप्पुपायजिबा घालतात 'सोन्याचे पायजिब तळीं।' –राला ५६. [फा पाएझेब्] ०टा–पु. १ पायरी (शिडी, जिना इ०ची). २ विहिरींत उतरण्यासाठीं केलेले कोनाडे किंवा बांधीव विहीरींत बांधकामाच्या बाहेर येतील असे पुढें बसविलेले जे दगड ते प्रत्येक; नारळाच्या झाडास वर चढतांना पाय ठेवण्यासाठीं पाडलेली खांच. ३ पायवाट; पाऊलवाट. ४ (ल.) वहिवाट; पायंडा; शिरस्ता; प्रघात, (क्रि० पडणें; लागणें; बसणें). ५ चाकाच्या परिघाचा प्रत्येक तुकडा, अवयव; पाटा. ६ (मोटेच्या विहिरीच्या) थारोळ्याच्या दोन्ही बाजूचे दगड, प्रत्येकी [पाय+ठाय] ०टांगी–स्त्री. (ना.) खालीं पाय सोडून बसतां येईल अशी योजना असणारी बैलगाडी. रेंडू. [पाय+टांगणें] ०ठ(ठा)ण–ठणी–नस्त्री पायरी; पायटा पहा. 'हीं चार पांच चढुनी हलु पायठाणें।' –केक २५. [सं. पदस्थान; म पाय+ठाणें] ०ठा–पु. १ चाकाच्या परिघाचा अवयव; पाटा. २ (राजा.) सपाट जमीन भाजून तेथें नाचणी इ० पेरण्यासाठीं तयार केलेलें शेत. ३ ज्यांत मोटेचे सुळे, बगाडाचे खांब बसवितात ते विहिरींचे, भोकें पाडलेले दोन दगड. [सं. पदस्थ; पाय+टेवणें] ०त(ता)ण–न–न. (अशिष्ट.) १ जोडा; जुता; कुणबाऊ जोडा; पादत्राण. (सामा.) पायात घालण्याचें साधन 'विठ्ठल चिंतण दिवसारात्रीं ध्यान। होईन पायतन त्याचे पायीं।' –तुगा ११२७. 'कपट चोरुनि पळे तेव्हा कैचीं नळास पायतणें।' –मोवन ४ १५५ २ (को) वहाणा; चेपल्या [सं. पादत्राण. प्रा पायत्ताण] ०तणसवणें– (चाभारी धंदा) जोडा व्यवस्थित करणें पायतण–पायतें पहा ०तरें–न पायरी. 'एथ अमी हें पहिलें पायतरें। ज्योतिर्मय हें दुसरें।' –ज्ञा ८ २२३. [पाय+थारणें] ०तांदूळ–पुअव. (पायाखालचे तांदूळ) साधे, स्वच्छ तांदूळ निरनिराळ्या दोन पाटींत, शिपीरात (ब्राह्मणेतरांत) किंवा पत्र व तिवई (ब्राह्मणात) टेवतात व त्यांवर नियोजित वधूवर व वगास लग्नासाठीं उभे करितात या तांदुळावर उपाध्यायाचा हक्क असतो. परंतु बहुधा तो महारास देतो. वधूवराच्या मस्तकावर तांदूळ गहूं किंवा जोंधळे जे टाकतात ते जे नंतर एकत्र करितात त्यासहि पायतांदूळ असें म्हणतात ह्या तांदुळावर वेसकर–महाराचा हक्क असतो [पाय+तांदूळ] ०थ(था)–ता–थर(था)–था–पायतें–थें–पुन १ बिछान्याची पायगतची बाजू २ (टेकडी, शेत बगीचा इ०ची) पायगत; पायतळची बाजू [सं पाय+थारणें; पादांत; म पायतें] ०थण–न–न (विरू) पायतण पहा. ०थरी–स्त्री. (खा) दुकानाच्यापुढें लाकडी किंवा दगडी तीन चार पायऱ्या असतात त्यापैकीं प्रत्येक पायरी; पायटा. ०दळ–न. पायानें चालणारी फौज, पाइकांचें सैन्य. पदाति [पाय+दळ(सं. दल–सैन्य)] ०दळीं–क्रिवि जाण्यायेण्याच्या वाटेवर; पायानें तुडविलें जाईल असें (पडणें) 'फुलें कुसकरिलीं कुणिग मेल्यानं पायदळीं तुडवीलीं.' –उषःकाल १२८. ०दळणीं–क्रिवि. पायाखालीं; पायदळीं. (क्रि० पडणें). [सं. पाददलन] ०दान–न. (व.) टांग्याच्या, बैलगाडीच्या मागच्या बाजूस पाय ठेवण्यासाटीं केलेली जागा. [सं. पाद+दा=देणें, दान] ०दामा-पु. १ पक्षी पकडण्याचें जाळें. २ फूस लाविणारा पक्षी; ससाणा. –मराचिथोशा ३३. [फा पाय्दाम्; सं. पाद+दाम=दावें] ०दाज–न. पाय पुसणें; पायपुसें; हें बहुतेक काथ्याचें केलेलें असतें. [पाय] ०धरणी–स्त्री १ पायां पडणें; अत्यंत नम्रतेची, काकुळतीची विनवणी; पराकाष्ठेचें आर्जव. 'कशीहि पायधरणी मनधरणी करावयास तयार झालों.'–भक्तमयूरकेका प्रस्तावना १६. [पाय+धरणी] ०धूळ–स्त्री. १ पायाची, पायास लागलेली, धूळ. 'नाचत बोले श्रीदावळी। घेऊन लावी पायधुळी।' –दा २.७.४१. २ स्वतःबद्दल दुसऱ्याशीं तुलना करतांना, बोलतांना (गुरु, इ०कांजवळ) नम्रतादर्शक योजावयाचा शब्द. [पाय+धूळ] (एखाद्याचा) ०धूळ झाडणें–(एखाद्याच्या घरीं) आगमन करणें; भेट देणें; समाचार

घेणें ( गौरवार्थी प्रयोग ). ' मज गरिबावर पायधूळ झाडीत जा.' ' जगीं जरी ठायीं ठायीं पायधूळ झाडुन येई।' –टिक ५ ०**पाखाळणी**–स्त्री. पाय धुणें. ' तयापरी जो अशेषा। विश्वा चिया अभिलाषा। पायपाखाळणिया देखा। घरटा जाला।' –ज्ञा १८.६५१ [सं. पादप्रक्षालन; प्रा. पायपक्खालण; म पाय+ पाखाळणी ] ०**पाटी–पांटी**–स्त्री. लग्नाच्या वेळीं पायतांदूळांनीं भरलेली पांटी, शिपतर इ०. [ पाय+पांटी ] ०**पा(पां)टीचे तांदूळ**–पुअव. पायतांदूळ पहा ०**पिटी–पीट**–स्त्री विनाकारण चालण्याचे श्रम; वणवण; इकडे तिकडे धांवाधांव ' बहु केली वणवण। पायपिटी झाला सिण।' –तुगा २०० [पाय+पिटणें] ०**पुसणें,०पुसें**–न. पायपुसण्यासाठीं दाराशीं ठेविलेली काथ्याची जाड गादी; पायदाज; पायपुसण्याचें साधन. ( महानु ) पायें पुसणें. ' तया वैराग्याचें बैसणें। शांभव सुखाचें पायेंपुसणें।' –भाए ८११. [ पाय+पुसणें ] ०**पेटी**–स्त्री. हार्मोनियमचा एक प्रकार. हींत पायानें भाता चालविण्याची योजना केली असल्यानें दोन्ही हातांनीं पेटी वाजवितां येते. याच्या उलट हातपेटी [ पाय+पेटी ] ०**पैस**–(व.) पाय टाकण्यास जागा [ पाय+पैस= प्रशस्त ] ०**पोश–स**–पु. (ल.) जोडा; वहाण; चप्पल; पादत्राण. ' सालाबादप्रमाणें ऐन जिन्नस पायपोसाचे जोडच यापासून घेत जाणें.' –दा २०१२. [ फा. पाय्पोश्; सं. पाद+स्पृश् ] ०**पोस अळाला, गेला–तुटला**–कांहीं पर्वा नाहीं, हरकत नाहीं, शप्प गेलें याअर्थी वाक्प्रचार 'एका महारुद्राची सामग्री राधाबाई काय लागेल ती पुण्याहून माळशिरसास पाटवील न पाटवील तरी आमचा पायपोस गेला ! तीन महारुद्र करून आम्हींच श्रेय घेऊ.' –ब्रप २७३ ०**पोस मारणें**–मानहानि करणें; निर्भर्त्सना करणें. ०**पोस दातीं धरणें**–अत्यंत लीन होऊन क्षमा मागणें; याचना करणें; आश्रय घेणें. ०**पोसासारिखें तोंड करणें**–फजिती झाल्यामुळें तोंड वाईट करणें; दुर्मुखलेलें असणें. **कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नसणें**–गोंधळ उडणें (पुष्कळ मंडळी जमली असली आणि व्यवस्था नसली म्हणजे ज्याचा जोडा त्याला सांपडणें मुष्किल होतें त्यावरून). ०**पोसखाऊ**–वि. खेटरखाऊ; हलकट; अत्यंत क्षुद्र; निर्लज्ज ( मनुष्य ) [ पाय+ पोस+खाणें ] ०**पोसगिरी**–स्त्री. जोड्यांनीं मारणें; दोन पक्षांतील व्यक्तींनीं केलेली जोड्यांची मारामारी; जोडाजोडी. (क्रि० करणें; मांडणें; चालणें). [ फा. ] ०**पोसपोहरा**–पु. जोड्याच्या आकाराचा विहिरींतून पाणी काढण्याचा पोहरा. [ पायपोस+पोहरा ] ०**पोसापायपोशी**–स्त्री. परस्परांतील जोड्यांची मारामारी; जोडाजोडी; पायपोसगिरी. ०**पोशी**–स्त्री दर चांभारापासुन दरसाल एक जोडा नजराणा घेण्याचा पाटील–कुलकर्णी इ०चा हक्क ०**पोशी**–वि. पायपोसाच्या डौलाचें, घाटाचें बांधलेलें पागोटें.

०**पोळ**–पुस्त्री. १ (तापलेली जमीन, खडक, वाळू इ०वरून चालल्यामुळें )पाय भाजणें. २ ( ल.) मध्याह्नीची वेळ. ३ जमीनीची तप्तावस्था; जमीन अतिशय तापलेली असणें ' एव्हां पायपोळ झाली आहे संध्याकाळीं कां जाना ?' [ पाय+पोळणें ] ०**फळें**–न. ( राजा ) ओकतीच्याजवळ पाय देण्यासाठीं बसविलेली फळी. [ पाय+फळी ] ०**फोडणी**–स्त्री. १ घरीं रोग्यास पहाण्याकरितां आल्याबद्दल वैद्यास द्यावयाचें वेतन; वैद्याच्या भेटीचें शुल्क. २ पायपोळ [पाय+फोडणें] ०**फौज**–स्त्री. (गो.) पायदळ [ पाय+फौज ] ०**बंद**–पु. १ घोड्याचे मागचे पाय बांधण्याची दोरी. ' एक उपलाणी बैसले। पायबंद सोडूं विसरले।' –जै ७६.६०. २ अडथळा; बंदी. ' इंग्रज व मोंगल यांस तिकडे पायबंद जरूर पोंचला पाहिजे.' –वाडसमा १.१६. ३ (फौजेच्या पिछाडीवर) हल्ला करून व्यत्यय आणणें. ' रायगडास वेढा पडला, आपण पायबंद लावावा म्हणजे ओढ पडेल. रायगडचा वेढा उठेल.' –मराचिथोशा ३४. ४ संसाराचा पाश. [ फा. पाएबंद् ] ०**बंद लावणें–लागणें–घालणें–देणें–पडणें**–आळा घालणें, बसणें; व्यत्यय आणणें, येणें; अडथळा, बंदी असणें, करणें. ' भलत्या आशा व आकांक्षा यांना इतिहासादिशास्त्रांकडून पायबंद पडेल ' –विचावि ५२. ' निजामाला पायबंद लागणें शक्यच नाहीं.' –भाऊ (१.१) २ ०**भार**–पु. पायदळ. याच्या उलट अश्वभार, कुंजरभार, रथभार इ० ' अश्वरथ कुंजरा। गणित नाहीं पायभारा।' –कथा १२.५९. [ पाय+भार ] ०**मर्दी**–स्त्री. भरभर ये जा करणें, चालणें; धांवाधांवी, धांवपळ करणें; एखाद्या कामावर फार खपणें. ' पायमर्दी केली तेव्हां काम झालें.' ( क्रि० घेणें; करणें ) [फा पाएमर्दी=धैर्य; निश्चय] ०**मल्ली–म(मा)ल्ली–मेली**–स्त्री. १ सैन्य, गुरें इ०नीं केलेली देश, शेत इ०ची नासाडी; पायांखालीं तुडविणें; नासधूस; तुडवातुडव. ' आपले सरकारची फौज मलक महमदखान वगैरे गेले आहेत त्यांनीं पायमाली केली आहे.' –दिमरा १.१५०. २ शत्रूनें आपला मुलुख लुटला असतां, तहांत त्याच्या कडून त्या लुटीबद्दल घेण्यांत येणारा दंड किंवा खंडणी. ( सामा. ) मोबदला; भरपाई. ' सर्व आमचे कर्ज सरकारांतून कारभारी देतील तेव्हां काय पायमल्ली दहापांच लक्ष रुपये ( वजा ) घालणें ती घालावी.' –ख ९.४८५४. ' शेतकऱ्यांस नुकसानीदाखल पायमाली देण्यांत येत असते.' –हिंलढ १७४. ३ (ल.) दुर्दशा; अपमान; हेटाळणी; अवहेलना. ( क्रि० करणें; होणें ). ' आमच्या भाषेची अशी पायमल्ली व्हावी हा मोठा चमत्कार नव्हे काय ?' –नि ११३. ४ नाश; नुकसान. 'महादजी गदाधर यांनीं दरबारची जुनी राहटी राखिली नाहीं, याजमुळें पायमाली आहे.' –रा ८.२०१. [ फा. पाएमाली; सं. पाद+मर्दन; म. पाय+मळणें ] ०**मळणी**–स्त्री.

सारखी चाल, वसट, वहिवाट; एकसारखें चालणें वहिवाट ठेवणें 'जो रस्ता सध्यां बिकट व अडचणीचा वाटतो तोच पुढें पाय-मळणीनें बराच सुधारेल ' –नि ४२९ [पाय+मळणें] **०मांडे**–पु (काव्य) पायघड्या पहा. 'विषयसुख मार्गे सांडे। तेचि पायातळीं पायमांडे।'–एभा ८ ६.–वेसीस्व १०.१९ **०मार्ग**–पु १ पायवाट, पाऊलवाट. २ जमीनीवरचा रस्ता; भूमिमार्ग खुष्कीचा मार्ग. याच्याउलट जलमार्ग. **०माल, पामाल**–वि पायमल्ली केलेला, तुडविला गेलेला; उध्वस्त; नष्ट [फा. पाएमाल्] **०मोजा**–पु. पायात घालावयाचा विणून तयार केलेला पिशवी-सारखा कपडा हा पाऊस, थंडी, वारा यांपासुन पायाचा बचाव करण्यासाठीं वापरतात. [पाय+मोजा] **०मोड**–स्त्री. १ प्रवासाला निघालेल्या किंवा चालत असलेल्या मनुष्यास जाऊं न देणें. २ अशी केलेली थांबवणूक; थांबवून ठेविलेली स्थिति. [पाय+मोडणें] **०मोडें**–न. १ (कों) उत्साहभंग, अडथळा करणारी गोष्ट. (हातीं घेतलेल्या किंवा घ्यावयाच्या कामांत) एखाद्याचा उत्साहाचा, आशांचा बीमोड; तीव्र निराशा २ आयुष्यातील अडचणी अडथळे, संकटें इ० वाढत्या व्यवहाराची गति कुंठित होण्याम निमित्त. 'हें पोर अमळ चालूं लागलें म्हणजे खोकला, पडसें अशीं अनेक पायमोडीं येतात.' [पाय+मोडणें] **०मोडें घेणें**–(हातीं घेतलेल्या कार्यापासून) भीतीनें परावृत्त होणें. **०रव**–पु. वरदळ; वहिवाट; दळणवळण; पायंडा. पैरव पहा 'आणीकही एक पहावें। जें साधकीं वसतें होआवें। आणि जनाचेनि पायरवें। मैळेचिना।'–ज्ञा ६. १७२. –स्त्री. १ पायतळ; पायदळ. पाय ठेवण्याची जागा. 'रावण जंव भद्रीं चढे। तंव मुगुट पायरवीं पडे।'–भारा बाल ७५ २ (राजा.) चाहूल; साचल. ३ पायवाट; रस्ता. ४ प्रवेश 'प्रथम चाकरीस येतों म्हणून नम्रतेनें पायरव करून घेतली'–ऐटि १.२९ ५ दृष्ट, नजर; बाहेरवसा, भूतबाधा; पायरवा; पायचळ पहा. 'करंज्यांस पायरव लागून लागलीच सरबत झालें'–कफा ४. ६ पायगुण. 'घरांत आल्या-बरोबर लागलेंच करंजांचें सरबत झालें. काय हा पायरव!'–कफा ४. ७ पैरव पहा. [सं पाद+रव; पाय+रव; हिं. पैरव] **०रवा**–पु. १ पायरव; शिरस्ता; पायंडा. 'त्या माणसाचा येथें येण्याचा पायरवा आहे.' २ पायचळ; दृष्ट लागणें. 'विहिरीवर तुम्ही मूल तिनीसांजची गेली होती तेथें तिला बाहेरचा पायरवा झाला.'–वेड्यांचा बाजार. **०रस्ता**–पु. १ पायवाट. २ जमीनीवरचा रस्ता, पायमार्ग. [पाय+रस्ता] **०रहाट**–पु. (अल्पार्थी) **रहाटी**–स्त्री पायानें पाणी लाटण्याचा रहाट; रहाटगाडगें. [पाय+रहाट] **०रावणी**–स्त्री. पायधरणी; विनवणी. रावण्या पहा. 'देवकी बैसविली सुखासनीं। लागल्या वाजंत्र्याच्या ध्वनी। विजणे वारिती दोघीजणी। पायरावणीं पदोपदीं।'–एरुस्व १६.३२. [पाय+रावण्या] **०लाग**–पु १ गुरांच्या पायांस होणारा एक रोग. हा गुरांच्या तोंडावर व पायांवर परिणाम करितो. २ स्त्रियांना होणारी पिशाचबाधा. (एखाद्या स्त्रीकडून भूत पायीं तुडविलें गेल्यास तें तिला पछाडतें अशी कल्पना आहे) [पाय+लागणें] **०वट**–स्त्री. १ रहदारीचा रस्ता आहे असें दाखविणाऱ्या पावलांच्या खुणा; पावलाच्या खुणा. २ पायगुण 'नेणों कोणाचा पायवट जाहला। एक म्हणती समय पुरला। एक म्हणती होता भला। वेनराव।'–कथा ६.५९१. [पाय+वठणें] **०वट**–(प्र) पायवाट पहा. **०वट-टा**–पु (महानु.) पाय, पायाच्या शिरा; (टीप–ओहटळ पांचाहि मुख्य शिराचा सागातु ऋ ८८). 'समसा गुल्फाचा उंचवटा। श्रीप्रभुचिया पायवटा।'–ऋ ८८ **०वणी**–न चरणोदक; चरणतीर्थ; ज्या पाण्यांत एखाद्या ब्राह्मणानें किंवा पवित्र विभूतीनें पावलें बुडविलीं आहेत किंवा धुतलीं आहेत असें पाणी. 'करितां तापसांची कडसणी। कवणु जवळां ठेविजैल शूलपाणी। तोहि अभिमानु साडूनि पायवणी। माथां वाहे।'–ज्ञा ९.३७२ 'कोणी राम देखिला माजा। त्याचें पायवणी मज पाजा।' [पाय+वणी–पाणी] **०वाट**–स्त्री. १ पाऊलवाट; पायरस्ता. 'तिकडे जय; तुज देतिल मेरूचे पायवाट आजि कडे।'–मोभीष्म ११.४५. २ जमीनीवरचा, खुष्कीचा मार्ग; भूमिमार्ग. याच्या उलट जलमार्ग. 'समुद्रावरी सैन्य ये पायवाटें।'–लोपामुद्रा वामन–नवनीत १०८. [पाय+वाट] ३ (गो.) पालखी देवालयांत शिरण्यापूर्वी धोब्या-कडून घालण्यांत येणारा धुतलेला पायपोस **०वाट करणें**–उतरून, ओलांडून जाणें. 'पायवाट केले भवाब्धी।'–दावि ३३०. 'भवसिंधु पायवाट कराल'–नाना १३५. **०शिरकाव**–पु. १ प्रवेश मिळवणें. २ मिळालेला प्रवेश. [पाय+शिरकाव] **०शूर**–वि. चालण्याच्या, वाटेच्या कामीं अतिशय वाकबगार; निष्णात. 'कोळी लोक कंटक व पायशूर असल्यानें त्याना जंगलांतील वाट ना वाट माहीत असते.'–गुजा ६०. **०संगर**–पु (खा व) पायवाट; पाऊलवाट; पायरस्ता [पाय+संगर=लहान वाट] **०सर**–पु पायरी; पाय ठेवण्याची (जिना इ०ची) जागा, फळी. [पाय+सर=फळी] **०सूट**–वि. चपळ; चलाख; भरभर चालणारा [पाय+सुटणें] **०सोर**–पु (गो.) पायगुण. **०स्वार**–वि (उप) पायीं चालणारा; पादचारी; पाईक. [पाय+स्वारी] **पायाखायला**–वि. (कों) (पायांखालील) सापांची भीति, उपद्रव असलेलें (अरण्य, रस्ता). **पायाखायलें**–न १ (कों.) फुरसें; साप. २ सर्पदंश. **पायाखालची वाट**–स्त्री. नेहमीं ज्या वाटेनें जाणें येणें आहे अशी वाट; अंगवळणी पडलेली वाट. **पायाचा**–वि. पायदळ (शिपाई). 'पायाचे भिडतां। तोडिति जानिवसे जे।'–शिशु १०४५. **पायाचाजड**–वि. १ हळुहळु चालणारा; मंदगतीनें चालणारा. २ चांगलें चालतां न येणारा. **पायाचा डोळा**–पु.

घोटा पायाचा • कांकी कस-पु (मल्लविद्या) एक डाव. आपला पाय जोडीदाराच्या बगलेतून जोडीदाराच्या मानेवर घालून मान फिरवून मानेवर घातलेल्या पायाच्या पंजानें मानेस दाब देऊन मारणें, किंवा चीत करणें [पाय+कसणें] **पायाचा नरम**-वि (बालकाप्रमाणें मऊ पाय असलेला) षंढ नपुंसक. **पायाचा पारवा**-पु (पारव्याप्रमाणें गति असलेला) जलद भरभर किंवा पुष्कळ चालणारा मनुष्य. **पायाचा पट्टळ**-वि लाथा मारणारें, लाथाड (जनावर) **पायाचा हुलकस**-पु (मल्लविद्या) जोडीदारानें खालीं येऊन आपला एक पाय धरला असतां आपला दुसरा पाय जोडीदाराच्या बगलेतून घालून आपल्या पायाच्या पंजानें त्याच्या कोपराजवळ तट देऊन आपला दुसरा हात त्याच्या बगलेतून देऊन जोडीदाराचा हात आपल्या पायाच्या बोटीनें धरून तो पाय लांब करून ताणें व हिसका देऊन जास्त जोर देऊन मुरगळून चीत करणें. **पायाची करंगळी**-स्त्री पायाच्या बोटां-पैकीं सर्वांत लहान असलेलें शेवटचें बोट. **पायांची माणसें**-नअव पायदळ. 'पायाच्या माणसांची सलाबत फोजेवर.' -ख ३५९४ **पायाची मोळी**-स्त्री (मल्लविद्या) एक डाव (मागें पाय बांधून गड्यास मारणें याला मोळी म्हणतात) जोडीदाराचा एक पाय उचलून आपल्या मांडीच्या लवणीत दाबून ठेवावा. दुसऱ्या हातानें जोडीदाराचा दुसरा पाय धरून जोडीदाराच्या दोन्ही पायास तिढा घालून मुरगळून मारणें **पायांचे खुबे**-पुअव पाठीच्या कण्याच्या खालच्या बाजूकडील वेडावाकडा, बळकट, आणि घट्ट असा हाडाचा सांगाडा. -मराठी ६ वें पुस्तक (१८७५) २५३ **पायाचें भेंडें**-न. अनवाणी चालून पायास खडे वगैरे बोचून पाय खरखरीत होणें; पायाची खराबी; पाय खडबडीत होणें. 'चालतांना पायाचें भेंडें होऊं नये म्हणून पाव लांकरितां कातड्याचें वेष्टण तयार करण्याचें काम....' -उषा-ग्रंथमालिका (हा येथें कोण उभा). **पायांच्या पोळ्या**-स्त्रीअव. तापलेल्या जमीनीवरून चालल्यामुळें पोळलेले पाय; पायपोळ. (क्रि० होणें, करून घेणें). **पायांतर**-न. पायरी. [पाय+अंतर] **पायापुरती वहाण कापणारा**-वि. कंजुष; कृपण; कवडीचुंबक; अतिशय जपून खर्च करणारा. **पायांपैस**-स्त्री. पायापुरती मोकळी जागा. (अगदीं गर्दी, दाटी संबंधीं वापरतांना प्रयोग). [पाय+पैस (अघळपघळ, मोकळी)] **पायींचा पारवा**-पु. पायांचा पारवा पहा.

**पाय**—न. (भि.) पाणी. 'लाकडे रोंडतां रोंडतां तिया कुवाड पायांम् पोडी.' -भि १५. [सं. प्रा. पाय=पाणी, पान]

**पाय**—पु (खा.) लांकडी पाळें; पडगें.

**पाय**—पु (तंजा) लुगड्याच्या किनारीचा एक प्रकार.

**पायक**—पु. पाईक पहा.

**पायक**—पु. सेवक; चाकर. 'घरीं पायका, ऋद्धीसिद्धी रमानायका।' -अमृत २९.

**पायका**—पु. (गो.) एक दैवत. गांवांतील दैवतांचा सरदार.

**पायका**—पु (मुद्रण) टाइपाच्या एका जातीचें नाव हा बारा पाइंट म्हणजे एक षष्ठांश इंच उंचीचा असतो

**पायका**—पु (विरू) पवका पहा

**पायकी**—स्त्री मेवा, पाइकी पहा

**पायगा जहागीर**—स्त्री फौजेच्या सरंजामासाठीं दिलेली जहागीर अशा जहागिरी हैद्राबाद संस्थानांत बऱ्याच आहेत. [फा पाए+गाह्=दर्जा]

**पायगीर**--पु मासे पकडावयाची एक प्रकारची टोपली. [पागणें पहा]

**पायजमा**—पु १ विजारीचा पाय २ (पर्वत, डोंगर इ० चा) पायथा [पायजमा]

**पायडा**—पु १ प्रारंभ. सुरवात कोणत्याहि कामाच्या आरंभींचें कृत्य. हा पुढें सतत चालावा अशा इच्छेनें करावयाच्या व्यवहाराचा आरंभ २ झाडावर चढतांना पाय ठेवण्यासाठीं झाडाला केलेली लहानशी खोबण; विहिरींत उतरतां यावें म्हणून विहिरीच्या बांधकामांत ठेवलेले कोनाडे किंवा बसविलेले पुढें आलेले दगड प्र. पायटा ३ (राजा) नारळाच्या झाडावर चढणारे लोक जी दोरी पाय, हात अडकविण्याकरितां घेतात ती. ४ पायंडी; पायरी (शिडीची) ५ शिरस्ता चाल, वहिवाट; प्रघात 'वतनदारांची खुशामत बरी करीत जावी परंतु त्यास वर्तावयाचा पायंडा आहे त्या पायंड्यास तिळतुल्य जाजती होऊं न द्यावें' -मराआ २३. [पाय] (वाप्र.) ०**करणें-घालणें-पाडणें**-सुरवात करणें; वहिवाट पाडणें; बस्तान बसविणें ०**पडणें-होणें**-शिरस्ता, चाल, वहिवाट सुरू होणें.

**पायंडी**—स्त्री. पायरी; पायंडा अर्थ ४ पहा.

**पायण, पाळण**—स्त्री. (गो.) दगडाच्या तटांतून गेलेली अरुंद वाट; बोळ.

**पायणी**—पु. (गो.) शेतास पाणी देणारा.

**पायणू**—वि (कों) दलदलीच्या प्रदेशांत केलेली व पायांनीं तुडविलेली (भात, नाचणी इ०) [पाय]

**पायर**—पुस्त्री. एक वृक्षविशेष; पाईर.

**पायरव**—पु. नेहेमीं जाणें येणें; दळणवळण; पैरव. पायें पहा. [फा. पैरवी]

**पायरवणें**—उक्रि. १ (कों.) पायरवामुळें बिघडणें; दृष्ट लागणें; नजर लागून अन्न वगैरे नासणें. 'पायरवे अन्न। मग करी खेदक्षीण।' -तुगा ३२३९. २ (राजा.) एखाद्या हरवलेल्या

वस्तूविषयीं ऐकणें किंवा पाहणें. ३ चाहुलीनें किंवा प्रत्यक्षतः आढळणें (मनुष्य).

**पायरिका**—स्त्री. खडावा. -बदलापूर ५१. [पाय]

**पायरी**—स्त्री. १ शिडी, जिना इ०वर चढतांना एक एक पाऊल ठेवण्यासाठीं केलेला आधार, पायठणी; पायटा; टप्पा. 'चिंतामणि फोडून घातला। पायरीस अभाग्यें।'-रावि १.१३७. २ (ल.) योग्यता; दर्जा; अधिकार; मान्यता. ही आमची पायरी नव्हे.' -निचं ७२. 'प्रत्येकानें आपआपल्या पायरीनें राहावें.' ३ बोरू इ०ची लेखणी करतांना शोभेसाठीं घेतलेला उतरता तास. ४ (चांभारी) कातडयाचा एक भाग. [पाय] (वाप्र) **०चा धोंडा होणें-होऊन पडणें**-स्वतःच्या योग्य जागीं कायम चिकटून असणें. **०नें ठेवणें**-एखाद्यास त्याच्या योग्यते-प्रमाणें वागविणें (**पाप, पुण्य, भोग, सुख, दुःख इ०ची**) **०भरणें**-घडा भरणें; परमावधि होणें; पूर्णतेस जाणें. **०वर पाय देणें-०स पाय लावणें**-चिरकाल चालत आलेली मर्यादा उल्लंघन करणें, अपमान करणें; बरोबरी करणें; बरोबरीच्या नात्यानें वागणें. **०सोडणें-टाकणें** स्वतःचा दर्जा सोडणें. 'मी पायरी सोडून बोललें याची मला क्षमा करा.' -स्वप ४५३. **पायरी पायरीनें चढणें**-आज थोडें, उद्यां थोडें असें कार्य करीत जाणें **आपल्या पायरीवर असणें, आपली पायरी धरणें**-स्वतःच्या योग्य जागीं राहणें, स्वतःचा दर्जा सोडून न वागणें

**पायरी**—स्त्री. कलमी आंब्याची एक उत्तम जात परेरा नामक गृहस्थानें या जातीची लागवड केली यावरून त्यास पायरी हें नांव पडलें. -कृषि ६८०. [पोर्तु-परेरा]

**पायरी**—स्त्री. उंबर, वड इ०च्या वर्गांतील एक वृक्षविशेष. पायर, पाईर पहा.

**पायरी**—स्त्री. (कु.) आंब्याची कोय

**पायरीक**—पु. कनिष्ठ जातीचा मनुष्य, अतिशूद्र. -शर.

**पायरीव**—स्त्री. रीत; पद्धत. 'मोडावया जनपायरीव।' -दावि ११४. [पायरव]

**पायली**—स्त्री. १ धान्य मोजण्याचें चार शेरांचें (पक्का किंवा कच्चा) एक माप. बारा किंवा सोळा पायल्यांचा एक मण होतो. खानदेशांत अठ्ठेचाळीस शेरांची एक पायली होते. [पाय= एक चतुर्थांश; पाव] डोळा पहा. (वाप्र.) **०भरणें**-१ (स्वतःच्या गरजा, आयुष्य, भरभराटीची स्थिति इ०चें) माप भरून घेणें; स्वार्थ साधणें; काम करून घेणें. २ एखाद्याला उतरती कळा लागणें. घडा, पायरी भरणें पहा. **०चा पसा करणें-होणें**-परद्रव्याचा गुप्तपणें अपहार करणें; कमी करून सांगणें; कमी करणें; होणें. **०चे पंधरा**-अतिविपुल; पुष्कळ; फार स्वस्त; ज्यास फारशी किंमत, महत्त्व नाहीं असें; क्षुद्र; 'छप्पन्न.' 'तुझ्यासारखे पायलीचे पंधरा आहेत.' गोव्याकडे 'पायलेड पन्नास'=पायलीचे पन्नास असा प्रचार आहे. **आपली पायली भरणें**-स्वतः पुरतें पाहणें; स्वार्थ, आपलपोटेपणा करणें म्ह० आण पायली करूं दे वायली.

**पायली**—स्त्री. जात्याच्या वरच्या तळीला धान्य घालण्या-साठीं असलेलें भोंक.

**पायली**—स्त्री. १ (ना.) कंदिलाची कांच. २ कागदाच्या कंदिलांत फिरणारी पायलीच्या आकाराची रचना.

**पायवटणें**—अक्रि. १ रहदारीमुळें किंवा अनेक लोकांच्या जाण्यायेण्यामुळें चोळवटलेली, मळलेली असणें (वाट, रस्ता) २ नेहमींच्या जाण्यायेण्यामुळें एखादी वाट परिचयाची होणें, अंग-वळणी पडणें. [पाय+वटणें; पायवट]

**पायवंस, पायांस**—न. (गजा.) बिछान्याची पाया-कडची बाजू; पायतें [सं पाद+वंश=बांबू]

**पायवा**—पु. (ना.) घराचा पाया.

**पायस्**—न. (व.) बाज, पलंग, बिछाना इ०चा पाया-कडचा भाग; पायतें. पायवंस पहा.

**पायस**—न. १ खीर. विशेषतः तांदुळाची (शिजविलेल्या भाताची) खीर. 'पायसादि बरवीं पक्वान्नें।' -शशिसेना २ यज्ञांतील अवशिष्ट प्रसाद. 'जननी यज्ञजपायसपानें करि, दे सुखा वरा महिला।' -मोरा १.१९६. [सं.]

**पायस्त**—क्रिवि. (कों.) पावलास पाऊल लावून (चालणें).

**पायळा**—पु. लहानसा कोयता; पाळा; पाईळ.

**पायळी**—स्त्री. गवत कापावयाचें खुरपें.

**पाया**—पु १ घर वगैरे बाधण्यापूर्वी जमीन खणून तींत दगड, चुना इ० घालून केलेला भक्कम बंदोबस्त; घराचा तळ. जमीनींतलें बांधकाम. (ल.) बूड; तळ; बैठक. 'पाया खोटा आणि खोटया पायावर रचलेली इमारतहि खोटी.' -टिले २.३६. २ प्रारंभ; सुरुवात. ३ आधार; आसरा; आधारभूत गोष्ट. 'तुझे कृपेचा परि हैस पाया।'-सारुह १.३०. ४ (भूमापन) ज्या रेषेला अनुलक्षून लांबी, रुंदी, चढ, उतार इ० मोजतात ती. (भूमिति) त्रिकोणाची कोणतीहि एक (विशेषत. खालची) बाजू. ५ डोंगराचा, टेंकडीचा पायथा. ६ शिरस्ता. [म. पाय. फा. पाया] **०घालणें**-आरंभ करणें. 'यास्तव सरकारनें तीं तयार करवून भाषेच्या उत्कर्षास प्रथम पाया घातला.' -नि ८. **०तळीं घालणें**-१ इमारतीच्या पाया-मध्यें जिवंत मनुष्य पुरणें. २ (ल) सपशेल चिरडणें; नाश करणें. सामाशब्द- **०भूत**-वि. (अशुद्धसमास) मूलभूत. (इं.) फंडामेंटल **०शुद्ध**-वि. १ मजबूत पायाची (इमारत); योग्य व व्यवस्थेशीर प्रारंभाचा (उद्योग, धंदा इ०) २ कांहीं अपूर्णता, व्यंग इ० नसलेलें (कार्य). [पाया+शुद्ध]

**पायाब**—पु. नदीचा पायउतार. ' उभयता यमुना पायाब पाहून बोराडीजवळ उतरले. ' –दिमरा १.२५७. [ फा. पायाब् ]

**पायांस**—न. ( राजा. ) पायवंस पहा.

**पायाळ-ळू**—वि. १ पायाकडून जन्मलेला. चोरी वगैरे गुन्हे पकडण्याच्या बाबतींत पायाळू मनुष्यास कांहीं दैवी शक्ति असते असा समज आहे. त्याचप्रमाणें त्यास विजेपासुन धोका असतो व अशाला गुप्त धन व पाणी कुठें आहे तें कळतें असाहि समज आहे. ' पृथ्वी निधानें भरली आहे। परी पायाळेंवीण प्राप्ति नोहे। ' –एभा २४.३७२. २ योग्य; पात्र, लायक. ' ज्यासि आवडे संतसंगाचा मेळू। जो साधुवचनीं अतिभुकाळू। जो पडिलें वचन नेणें उगळू। तोचि पायाळू निजभक्ती। ' –एभा ११ ७८४. ३ दर्दी; निष्णात ' सनंग एकहाती–एकतंत्री–म्हणजे एका पायाळूच्या नजरेखालीं तयार झाले तर बळकट व उपयुक्त होतील. ' –गांगा २३४. [ पाय+आळू प्रत्यय ]

**पायिक**—पु. पायदळांतील शिपाई. पाईक. ' पायिक पडले थोर आवेशी। ' –दावि २३२. [ सं. पदाति ]

**पायी**—स्त्री. १ राहुटीच्या तनाव्यावरचा हातभर लांबीचा जो अंश तो. २ राहुटीच्या आत पाणी न यावें म्हणून तिच्याभोंवतीं जो चर खणतात तो. पाई पहा. [ सं. पय, पाय=पाणी; पद=पाय ]

**पायीत**—न सोनाराची जमीनींत पुरलेली, आडवी नळी लावून केलेली शेगडी; पुरलेली बागेसरी [ पाय, पायींत ]

**पायींत**—न. पायतर; पायतें पहा. [ सं. पादांत ]

**पायु**—न. गुद, मलविसर्जनमार्ग. ' मग वाचा आणि कर। चरण आणि अधोद्वार। पायू हे प्रकार। पाच आणिक। ' –ज्ञा १३.१००. [ सं. ]

**पायेदामी**—पु जाळी टाकून पक्षी पकडणारे. ' तेथें आज्ञा कीं रामचंद्र पायेदामी व माहादजी खापणा लावबाज पाठविले आहेत. ' –पेद ८.२७. [ फा. पायदामा ]

**पॉयू**—अ. (राजा. कुण.) मुळें; साठीं पाई, पायीं, पायीं पहा. ' झिलापॉयू मी हवलों. '=मुलग्यामुळें मी राहिलों. [ सं. प्रीतये, प्रीत्यर्थ ]

**पार**—पु. १ अंत; ठाव; शेवट; मर्यादा; सीमा. ' एवं ब्रह्मा आणि शंकर। चरणाचा नपवती पार। तेथें त्रैलोक्य वैभव थोर। मानी तो पामर अति मंदभाग्य। ' –एभा २.७५१. २ पलीकडचा कांठ, किनारा. 'मग जेउती वास पाहिजे। तेउती शांतीची देखिजे। तेथ अपारा पारु नेणिजे। निर्धारता। ' –ज्ञा ४ १९१. ३ ( कों. ) नदींतून पलिकडे उतरून जाण्याची वाट; पायउतार. ४ ( राजा. ) जमीनींत शिरलेला समुद्राचा भाग. ५ (गो ) पाण्यांत बुडालेला खडक. [ सं. ]

**पार**—पु झाडोरा; वड, पिंपळ इ० वृक्षाच्या भोंवतालीं घातलेला ओटा; कट्टा; चौथरा, चबुतरा. या ठिकाणीं गांवकरी बहुधा जमतात. यावरून गांवचा अड्डा; गांवसभा. ' राजद्वारीं कां सभेमाझारीं। बैसावें पारीं अथवा वेव्हारीं। वां मंडपीं तोरणा भीतरीं। सन्मानें करी उपविष्ट। ' –एभा १३.१४३. ०**झिजविणें**–१ पिंपळाला किंवा एखाद्या देवाला प्रदक्षिणा घालणें. २ इष्ट हेतुसिद्धीसाठीं देवाला संकट घालणें. [ सं. प्राकार; प्रा पाआर; म. पार ? ]

**पार**—पु १ तीन तासांचा काल; प्रहर. ' काळोखी रात्र, पार–। रात्रीचा अम्मल झाला। ' –ऐपो ५२ २ (नाविक) पहारा. [ सं. प्रहर. ( अप. ) ]

**पार**—स्त्री. (नाविक कों.) अस्तमनास काटी उभी करण्यासाठीं खोदलेली खांच

**पार**—क्रिवि. १ पलीकडे, वलांडून; आरपार; मधून. 'वक्तृत्व गोडपणें। अमृतातें पारु म्हणे। रस होती वोळंगणें। अक्षरासी। ' –ज्ञा १३ ३ २ पूर्णपणें; साफ; अजिबात. ' घारीनें माझ्या दशम्या पार लांबविल्या. ' [ सं. पारम् ] ०**करणें**–उक्रि. १ समाप्त करणें; फडशा पाडणें. २ निभावणें. ३ पैल तीराला नेणें. ०**जाणें**–१ मधून जाणें; आरपार जाणें; पलीकडे जाणें. २ उद्दिष्ट स्थळीं पोंचणें. ३ निभावणें. ( वाप्र. ) ०**पडणें**–१ कांहीं अडचण, संकट इ०तून निभावणें. ' अंधळा व लंगडा एकमेकांच्या मदतीनें त्या बिकट वाटेंतून पार पडले. ' २ कार्य, इ० समाप्त होणें; शेवटास जाणें; पूर्ण होणें; उरकणें. ०**पाडणें**–१ संकटांतून सोडविणें, निभावून नेणें. २ संपविणें; समाप्त करणें. **पारद**–वि. पार करणारा, नेणारा. ' स्मरे घडिघडि प्रभो भव पयोधिच्या पारदा। ' –केका ११५.

**पारई**—स्त्री. पहार; जमीन खणणें, उकरणें इ०साठीं असलेलें लोखंडी हत्यार, पारय . [ सं. प्रहार–री; वेप्रा. पाराई; गो. पार ]

**पारका**—वि. १ अपरिचित; दुसरा; परका, पारखा पहा. ' ऐसा उपकारी देखा। या देहासारिखा नाहीं सखा। म्हणसी राखावा नेटका। तंव तो पारका मुळींची। ' –एभा ९.२९७. २ शत्रु. 'यादवाचेआ कटकां भीतरीं। पारकां आटाआटीं केलीं थोरी।' –शिशु ९८८. [ सं. परकीय ]

**पारका**—स्त्री. निवळी; निवळीचें बीं. ' तरी विषयेंद्रिय मिळणी। करूनि घापे विटुटणी। जैसें तोडिजे खडु पाणी। पार केया। ' –ज्ञा १६ ८९. [ स. पारक; हिं. पारक=शुद्ध करणारे ]

**पारकिडा**—पु. १ गुरांच्या पोटामध्यें भयंकर विकार उत्पन्न करणारा एक किडा. २ गवतांत सांपडणारा एक किडा; किरळ. ०**उठणें**–(घोडा इ०चे) पोटात पारकिडा होऊन तो चावूं लागणें.

**पारख**—स्त्री. १ परीक्षा; तपासणी; चांचणी. ‘ पहिल्याच भेटीबरोबर पारख केली म्हणायची. ’ –नाकु ३.११. २ नाणें, हिरा, मोती, माणिक इ०ची किंमत ठरविणें; दर्जा, भाव ठरविण्याचें ज्ञान. ‘ स्तुति करायला गुणांची पारख पाहिजे. ’ –गर्वनिर्वाण ८८. ३ किंमत; योग्यता; दर्जा. ‘ मी तों नसें रे तुज पारखीसी। पदोपदीं कां मज पारखीसी। ’ –सारुह ४.१४. –पु. १ पोतदार; पैसा पारखून घेणारा अधिकारी. २ सावकार ‘ त्याचा पारख त्याला कर्ज देईनासा झाला. ’ –धर्माजी ८. [ सं. परीक्ष् प्रा. परिक्खा; गुज. सिं. पारख ] **पारखणावळ, पारखाई**–स्त्री. नाणें, हिरा, मोती इ०चा दर्जा, कस, किंमत इ०ची परीक्षा करण्याबद्दल दिलेली मजुरी; पारखण्याची मजुरी, सराफी [ पारख ] **पारखणी**–स्त्री ( नाणें इ०ची ) पारख करणें; परीक्षा, तपासणी. [ पारखणें ] **पारखणें**–क्रि. १ परीक्षा करणें; तपासणें २ ( नाणें इ०ची ) किंमत, दर्जा इ० ठरविणें. ‘ म्हणोनि फुडे। पारखावें खरें कुडें। ’ –ज्ञा ८ २४२. ४ ( गो. ) अजमास करणें. [ सं परीक्ष् ( परीक्षा करणें ) ] ०**सुलाखणें**–उक्रि. परीक्षा करून खात्री करून घेणें, प्रचीति पाहून अनुभव घेणें; सारासार विचार, न्याय करून ठरविणें ( सोनें पारखतांना तें एक जिन्नसी आहे किंवा नाहीं तें पाहण्याकरितां त्यास सुराख म्हणजे छिद्र पाडतात त्यावरून, तावून सुलावून पहा ) **पारखून सुलाखून**– असा प्रयोग रूढ आहे. ( क्रि० पाहणें–ठेवणें–देणें–घेणें–आणणें ). **म्ह**० पारखून केला पति आन् त्याला भरली रक्तपिती. **पारखनीस**–पु. पारख करणारा अधिकारी; पोतदार. **पारखावण**– स्त्री. परीक्षा करण्याबद्दलची मजुरी; पारखाई; पारखणावळ **पारखी**–पु. १ ( गो. ) ज्योतिषी; भूतभविष्य सागणारा. २ पोतदार; नाणीं पारखून घेणारा माणूस, अधिकारी. ३ सराफ; निधिधारक सावकार इ० यावरून आडनांवहि पडलें आहे. –वि. १ पारख करणारा; परीक्षक; तपासणारा; मर्मज्ञ ‘ ऐसेनि कार्याकार्यविवेकी जे प्रवृत्तिनिवृत्ति मापकी। खरा कुडापारखी। जियापरी। ’–ज्ञा १८.७१६. २ निवाडा करणारा.

**पारखा**—वि. १ परका; परकीय; अपरिचित; तिऱ्हाईत; अनोळखी ( माणूस ). ‘ तेथ जैताचीएक घायीं। अनुहत निशाण लागलें पाहीं। शोधितां पारखें कोणी नाहीं। केलें ठायीं स्ववश। ’ –एभा ९.१३७. २ नवीन; भिन्न; अपूर्व ( वस्तु ). ३ एखाद्या गोष्टीस अपरिचित, नवीन, परका असलेला. ( समासांत ) घरपारखा, गांव–देश–गोत–जातपारखा इ० ४ विन्मुख. ५ शत्रु. अमित्र. ‘ कां परिचियां उजियेडु करावा। पारखिया आंधारु पाडावा। ’ –ज्ञा १२.१९८. ‘ येतां देखोनि पारखे भार। मग सामोरे लोटले। ’ –एरुस्व १२ ८२. ‘ सांपत्तिक सहाय्यानें कुटुंबाला पारख्या झालेल्या मनुष्यबलाची हानि भरून येत नाहीं. ’ –विधि लिखित ११. [ सं. परकीय ]

**पारखीव**—वि. पारख केलेला; परीक्षा केलेला; तपासलेला. [ पारखणें ]

**पारखे**—वि. परोक्ष; पाठीमागें; मागें; पश्चात्. [ सं. परोक्ष ]

**पारग-गी**—स्त्री ( ना. व ) मजुरीची किंवा कामाला जाण्याची सकाळची किंवा दुपारची वेळ. ‘ एक पारगी ’=एक सांज.

**पारंग**—वि ( प्र. ) पारंगत पहा. ‘ हा पारंग सर्वविषयीं। ’ –शिक १३. [ सं. पारंगत ]

**पारंगत**—वि ( पार शेवटास, पलीकडे गेलेला ). १ पूर्ण अध्ययन केलेला. हातीं घेतलेल्या व्यापाराचा, विषयाचा ज्यास अंत लागला आहे असा. ‘ तो ब्राह्मण एका शास्त्रामध्यें पारंगत आहे. ’ ‘ शाब्दबोधें सदोदित। ब्रह्मज्ञानें पारंगत। ’ –एभा २ १६७. २ निपुण, कुशल, वाकबगार. ‘ जें अपेक्षिजे विरक्तीं। सदा अनुभविजे सतीं। सोहंभावें पारंगतीं। रमिजे जेथ। ’ –ज्ञा १.५३. [ सं. पारम्+गत ] **पारंगती मिळणें–लाध(भ)णें**–मुक्ति मिळणें; मरणें. ‘ कृष्णातीर्थें पुनीत रक्षतगडी पारंगती लाधला। ’ –भाग्रै १०.३, पृ ११५

**पारंगा**—पु ( विरू. ) पांगारा; एक वृक्षविशेष.

**पारगीवारगी**—स्त्री. आळीपाळी; अदलाबदल. या शब्दाचे **पारगीवारगीचा–नें**–हे दोनच प्रयोग वापरण्यात आहेत. ‘ हें ओझें पारगीवारगीचें आहे ’ ‘ हें ओझें पारगीवारगीनें नेलें तर जाईल. ’

**पारचा**—पु १ मानाचा रेशमी पोशाख; वस्त्र. २ एक रेशमी कापड. ‘ १० पारचे उच दर ७५ प्रमाणें. ’ –वाडबाबा २. १५३. [ फा. पार्चा तुल इं पार्चमेंट ]

**पारचा–जा, पारजापरजा**—पु. कागदाचा तुकडा; कागदपत्र, चिटोरें पुरजा पहा [ फा. पार्चा, फा. पुर्झा; म. पुरजा ]

**पारच**—क्रि. ( गो. ) गुण देणें.

**पारज**—पु पारा. ‘ नसतेंचि अहंपण धरूनि अंतरीं। नाना लिंगांची पूजा करी। मृत्तिका पाषाण कां पारज प्रतिमेवरी। धरी अत्यंत भावार्थे। ’ –स्वादि ७.३.२५. [ सं. पारद; गो. पारज ]

**पारजक**—पु पारिजातक पहा. [ पारिजातक अप गो. पारजत ]

**पारजत**—उ ( गो. ) पारिजातक पहा. [ सं. पारिजात ]

**पारंजी**—स्त्री. राहुटी, तंबू इ०च्या खांबाच्या माथ्यावर बसविलेली लांकडी तबकडी, वाटोळा तक्ता.

**पारठा**—वि. १ व्यालयाला पुष्कळ दिवस उलटून गेलेले असूनहि अजून जी दूध देत आहे अशी ( गाय, म्हैस इ० ). २ ज्याचें स्तनपान सुटलेलें आहे असें ( वरील प्रकारच्या जनावराचं वासरूं ). ३ चांगलें, कसदार, पक्कें व मुरलेलें ( पारठी गाय, म्हैस

इ०चें दूध ) ४ पाडसा; प्रौढ; वयस्क; पोक्त;पक्व 'तान्ही आणि पारठी। इया कामधेनूतें दिठी। सुनि जैसिया गोठी।कीजतीना।' –ज्ञा १ १६७९. ५ परिपक्व दशेस आलेला (नारळ). [ सं. प्रष्ठ– प्रष्ठवाह=शेतीच्या उपयोगी झालेला तरुण बैल ] (वाप्र) ०पडणें– शिलकीस पडणें; वांचणें. ०पाडणें–शिलकीस टाकणें; वांचविणें; राखून ठेवणें.

**पारंडा**—पु. छप्पराचें आढें व कोपरे.

**पारडी**—स्त्री. म्हशीचें स्त्रीजातिवाचक वासरूं; रेडी.

**पारडी**—वि मलिन वाणाची. 'एकें मोहरीं मोरी पारडीं। एके वात्री चितळी पुंडीं।' –दाव २८१.

**पारडूं**—न. म्हशीचें वासरूं; रेडकूं. ०गळयांत बांधणें– (ल एखाद्यावर) कष्टप्रद काम सोंपविणें, लादणें.

**पारडें**—न. १ तराजूच्या दोन बाजूस असलेल्या, वजन करावयाचा जिन्नस ज्यात घालतात त्या पात्रापैकीं प्रत्येक; परडें. तागडीची एक बाजू. 'उपमे तुळिता गगनात। स्वर्ग पारडें वरतें।' –मुसभा २ ६९. २ ताक घुसळण्याच्या रवीची दोरी (वाप्र.) ०फिरणें-खालीं असलेलें वर जाणें व वरचें खालीं येणें, परिस्थिति विपरीत होणें; स्थितीमध्यें परिवर्तन होणें. 'परंतु एकाएकीं फिरलें युद्धाचें पारडें।' –विक २९. **पारडा–डां**–क्रिवि. पारड्यात. 'उभय दिशाद्वय पारडा।' –मुसभा ५ २३. 'असो पारडा घालोनि कपोता। घेतलें शस्त्र।' –कथा ३.१६.२०४. **पारड्यांत घालणें**–प्रतिदिवशीं वजन करून तें कमी भरत जाईल अशा तऱ्हेनें अपराध्याचे हाल करणें. मनुष्याचें वजन व मारण्याची दिनसंख्या या मानानुरूप प्रतिदिवशीं काहीं अवयव कापणें. 'पारड्यामध्यें घालणें। कां कडेलोट करणें।' –दा ३.७ ७२.

**पारडें**—न. (कुलाबा) खोरें.

**पारण–णें**—न. १ उपवास सोडणें; व्रतानंतर भोजन करणें; पूर्वदिवशीं सर्व दिवस उपवास करून दुसऱ्या दिवशीं भोजन करणें. 'सहजें ब्रह्मरसाचें पारणें। केलें अर्जुनालागीं नारायणें।' –ज्ञा ६. २. –एभा ३.४७२. २ समाधान; तृप्ति; आनंद. (क्रि० होणें). 'त्याचें रूप विलोकिताचि घडलें तल्लोचना पारणें।' –मोकृष्ण ५५.१०. ३ मेजवानी; तृप्ति. 'माझे ये मूर्तीचेनि दर्शनें। होत डोळयां पारणें।' –एभा ११.१४९२. [ सं. पारण–णा ] ०फिटणें-फेडणें–(डोळे–कान इ० इंद्रियांचें) समाधान, तृप्ति होणें, करणें 'मज फेडूं या नयनाचें पारणें।' –विक २४.

**पारणा–णी**—स्त्री. १ उपवास सोडणें; पारण–पारणें पहा. 'करपारणा क्षुधा बहु पूर्ववयामाजि कन्यके! लागे।' –मोवन १३.३८. २ आनंद; तृप्ति. 'देखता दिनमणी नेत्रा होय पारणी।' –दावि २८५. ०फिटणें–समाधान, तृप्ति होणें. 'फिटेल हे लोचनपारणाही।' –सारुह ८.१११. [ सं. ]

**पारणें**—अक्रि. (कु.) हितावह होणें; (अन्न, पाणी, हवा, औषध इ० ) मानवणें.

**पारणेत**—स्त्री. (दैवज्ञ) विवाहसमयीं वधूची नेसावयाची रेशमी साडी; व.वस्त्र; गाळॉ. गाळॉ पहा. –बदलापूर ४८३.

**पारत**—पु. (अशिष्ट. कुण ) पर्वत 'धरलन् धरती बसले पारती।' –मसाप २.२६. [ सं पर्वत अप ]

**पारतंत्र्य**—न परतंत्रता; दुसऱ्यावर अवलंबून असणें; परवशता; परावलंबन; परस्वाधीनता; पराधीनपणा. 'पारतंत्र्यशृंखला। वाजते पायीं खळखळ ते।' –विक १२३ [ सं. पर+ तंत्र ]

**पारत्रिक**—वि. परलोकसंबंधींचें; पारलौकिक; दुसऱ्या जगासंबंधीचें. 'हे असतिये कीर्तीसी नाशु। आणि पारत्रिकासि अपभ्रंशु। म्हणे जगन्निवासु। अर्जुनातें।' –ज्ञा २ २०. [ सं परत्र ]

**पारथा**—वि (ना ) १ पारोसा, अंघोळ न केलेला २ (व ) पारठा पहा [ पारठा ]

**पारद**—पु. पारा हा धातु आहे. नेहमींच्या उष्णमानावर हा धातु द्रवरूपात असतो. याचा रंग चांदीसारखा पांढरा असतो. हा जड, द्रवरूप व लवकर वाफ न होणारा असल्यामुळें उष्णतामापक यंत्रें करण्याकडे याची योजना करतात. –ज्ञाको(प) ८९. 'जो सोधुनि भवपारदु। अनादिरस सिध्दु।' –ऋ ४ 'श्रीमहादेवो कापुरें उठिला। कैलासु पारदें द्रवरिला।' –ज्ञा ११.२२२. [ सं. ]

**पारद–दी**—स्त्री (विरूपारध) शिकार. पारध पहा.

**पारदर्शक**—वि. प्रकाशास पलीकडे जाऊं देणारा. ज्यामधून दुसरा पदार्थ दिसतो असा. उदा. काच, पातळ कागद, पातळ वस्त्र. (इं.) ट्रॅन्सपरंट. [ पार=पलीकडे+दर्शक ]

**पारदारिक**—पु. दुसऱ्याच्या पत्नीशीं संभोग करणारा; परस्त्रीगमनी; व्यभिचारी [ सं. पर+दारा ]

**पारदार्य**—न. परस्त्रीशीं संग; परस्त्रीगमन, व्यभिचार; जारकर्म. [ सं. पर+दारा ]

**पारदिक**—पु (कु.) पारिजातक पहा.

**पारदोज–जी**—पुस्त्री. (प्र.) पारादोज, पारादोजी पहा.

**पारध–धी**—स्त्री. १ शिकार; मृगया; अरण्यातील पशु, पक्षी इ० धरणें, मारणें. 'क्षत्रियासि लागल्या अनुपत्ती। पूर्वोक्त करावी वणिग्वृत्ती। कां पारधी करावी वनांतीं। तेणें अनुपत्ती कंठावी।' –एभा १७.४६२. 'पारध करण्यास या पठारावर रोज लोक येत.' –विवि १.७.८. २ अरण्यांतील शिकार करावयाचे, मारावयाचे पशु शिकार. 'हे तापसा, माझ्या अरण्यांत येऊन ही पारध

धरितोस हे काय!!!' -किरातअर्जुन अंक १. प्र. ६. [सं. पापर्द्धि; प्रा. पारद्धि] ०खेळणें-शिकार करणें; मृगया करणें. 'उदका आला त्वरिती। पारधी खेळतां।' -कथा १.५.२३.

**पारधी**—स्त्री. १ एक गुन्हेगार जात. फासेपारधी, वाघरी पारधी, गायपारधी, चित्तेपारधी, हरणशिकारी, टकारी असे याच्यांत पारध करण्याच्या साधनांवरून बरेच पोटभेद आहेत याचे मुख्य धंदे जनावराची (हरिण, डुकर इ०) पारध, वनस्पति, औषधें विकणें, बजरबट्टू व जंगली माल विकणें, मजुरी व आगलकी हे आहेत. याच्यात लंगोटीपारधी म्हणून एक पोटजात आहे ही गुन्हे करिते -गुजा ८६. २ पारध करणारा, शिकारी. 'जाला सिद्ध रिपुक्षया मृगवधा जाणों हरी पारधी।' -मोकृष्ण ७२.१०. म्ह० ज्याच्या हातीं ससा तो पारधी. [सं. पापर्द्धिक; प्रा. पारद्धिअ]

**पारपती**—पु. (गो.) ग्रामसंस्थेचा, देवस्थानाचा शिपाई; पारिपत्यदार. [सं. पारिपत्य]

**पारपत्य**—पु. देखरेख ठेवणारा, व्यवस्था पाहणारा; (सामा.) शिपाई; सेवक; चाकर; शिष्य इ० 'पारपत्ये म्हणती जी सतोष द्यावया राजयाला।' -सप्र ८.२९. 'पारपत्यादि नारीनर। जेऊनि धाले इत्यादि समग्र।' -दावि १७५ -न १ शिक्षा; दंड; शासन; खटल्याचा निकाल 'त्याचा तोचि करी। पारपत्य सकळां।' -तुगा २६८५. २ धनीपणा; यजमानपणा. 'सकळांचें करावें पारपत्य। आलयाचें करावें आतित्य।' -दा ४.७.२५. ३ रक्षण. -मनको. [सं. परि+पत्=हल्ला करणें; किंवा परिपति=रक्षक] ०कर्ता-रखवालदार; नोकरचाकर. 'पारपत्यकर्ते सावध असती।' -दावि ४७४. ०गार-पु. अम्मलदार; व्यवस्था, देखरेख इ० ठेवणारा माणूस; किल्ल्याचा हवालदार इ०.

**पारंपर-रा-री**—क्रिवि. परंपरागत; परंपरेनें. 'एकाहुनी एक थोर। मुख्य पूजा पारंपर।' -रामदासस्फुट अभंग १९ (नवनीत पृ. १४८) 'येतील उपकारा पारंपरा।' -दावि २१७. 'बहुता कामा येती पारंपरी।' -दावि २१५. [परंपरा]

**पारपरिक**—वि. परंपरागतचा; क्रमानें येणारा. [परंपरा]

**पारंपर्य**—न. १ एकसारखा क्रम; परंपरा; माळका; लागोपाठ येणें; पूर्वीपासुन चालत आलेली गोष्ट; परपरा कथा. [सं.]

**पार(रं)पळ, पार(रं)पोळ**—वि. (कों. गो.) स्वच्छंदी पणानें भटकणारा, वागणारा; स्वैराचारी; मनाप्रमाणें वागणारा. [पार+पळणें, पोळ]

**पारंबा**—पु. (व.) कणगीची दगडी बैठक.

**पारंबा-बी**—पुस्त्री. १ वड, पिंपरी इ० झाडांची फांदीपासून खालीं लोंबणारी मुळें. -ज्ञा १५.५८. 'दिसती वटा तीन डहाळिया। एक मूळ सहा फाटे तया। आणि अठरा पारंबिया।' -कथा १.१५. 'अठरा पारंब्र पत्रीं फुलीं। अनंत तो।' -कथा ७.२.८९. २ आंब्याच्या बाठीच्या आतील बी; अठळी. [सं. प्रालंब] म्ह० शेंडी तुटो कीं पारंबी तुटो.

**पारमार्थिक**—वि. १ परमार्थाच्या मार्गे असणारा; सत्यान्वेषी, ब्रह्म हुडकून काढण्यात गुंतलेला २ सत्य; खरें; वास्तविक. ३ अध्यात्मकविषयक; परमार्थासंबंधीं [सं परम+अर्थ] ०भेद-पु खरा, सत्य, वास्तविक किंवा आध्यात्मिक भेद. याच्या उलट औपाधिक भेद 'ब्रह्म आणि जीव या दोहोंत औपाधिक भेद, पारमार्थिक नाहीं'

**पारय**—स्त्री. (कों. गो) पहार. पारई पहा [सं. प्रहार प्रा. दे. पाराई]

**पारय**—स्त्री (गो.) मूत्रवाहिनी. [सं. पार]

**पारया**—वि. (व.) पारोसा, अंघोळ न केलेला

**पारयेल**—स्त्री (गो) पहाडवेल. [पहाड+वेल]

**पारलौकिक**—वि. परलोकाविषयींचें. याच्या उलट ऐहिक. [सं. पर+लोक]

**पारवडा**—पु (कों.) खेड्याचा भाग; पेठ; मोहल्ला; पाडा.

**पारवसा**—वि. पारोसा पहा.

**पारवा**—पु १ कबुतराची एक जात; जंगली कबूतर. २ पांढरा व काळा मिळून होणारा रंग पारवा पक्ष्याचा रंग. 'काळें पाढरें मेळविता। पारवें होतें तत्त्वता।' -दा ९.७.४०. -वि कबूतराच्या रंगासारखा. (सामासांत) पारवा 'अंगरखा-पागोटें-शेला-पातळ इ०. [सं पारावत, प्रा पारेवय; का. पारवाळ]

**पारवी**—स्त्री. नाचणीची एक जात. हिचा दाणा पारवा असतो. ही जात गरवी आहे. -कृषि २८३.

**पारवी-वें**—स्त्रीन. पारव्या रंगाचें कापड.

**पारशी-सी**—पु. इराण देशांतील एक लोकराष्ट्र व धर्म; त्या धर्माचा मनुष्य. [सं. पारसीक, पारसी; फा. पारसी]

**पारस**—पु परीस पहा [सं. स्पर्श; प्रा हिं.]

**पारसडणें**—अक्रि (राजा) झाडाचीं पानें गळून पडणें, झडणें; झाड पर्णरहित होणें. [पान+सडणें]

**पारसनाथ**—पु जैन (श्रावक) संप्रदायांतील लोकांचा एक धर्मप्रणेता, तीर्थंकर [सं. पार्श्वनाथ]

**पारसनीस, पारसनवीस**—पु. १ दरबारचा फारशी पत्रव्यवहार करणारा चिटणीस; मुनशी. २ यावरून पडलेलें आडनांव. [फा पार्सी+नवीस]

**पारसा-सी**—वि शिळा; पारोसा. पारोसा पहा.

**पारसि-सी**—स्त्री. फारशी भाषा. 'यावणि भाषा पारसि। वेदात सिद्धांत सौरसि।' -ज्ञानप्रदीप ८५५. [फा. पार्सी]

**पारसेपण**—न. पारोसेपण; शिळेपण; जुनेपणा. 'हां गा सूर्य काय शिळा । अग्नि म्हणों येत आहे वोंविळा । कां नित्य वाहातया गंगाजळा । पारसेपण । ' –ज्ञा १०.२०२.

**पारळा**—पु. तपशील; हकीकत; इतिहास; माहिती. (क्रि० देणें). [ पल्लव ]

**पारा**—पु. एक पातळ खनिज पदार्थ; रसायन पारज, पारद पहा. [ सं. पार, पारद; प्रा. पारओ; हिं. पं. बं उरिया पारा ]

**पारा**—पु. (कों.) कोंवळा फणस. [ पाडा ]

**पारा**—पु घायपात, घायाळ नांवाच्या झाडाची पाती.

**पारा**—वि. पांढरे व काळे ठिपके असलेला ( गाय, बैल इ० प्राणी ). [ पारवा ]

**पारॉ**—पु. ( गो. ) १ भिंतीच्या रचाईंतील दगड, विटा इ०चा थर. २ (गो ) भिंत. [सं. पार ]

**पॉरा**—पु (गो.) नाश; नुकसान. [ पार ] ०**घालचें**-नाश करणें; नष्ट करणें. ०**पडचें**-नासणें.

**पाराकॉ**—पु. (गो.) एक विषारी सर्प.

**पारादोज**—पु. जोडे, बूट इ० शिवणारा; मोची; चांभार. 'याखेरीज पारादोज असामी येक पाठवून देणें.' –पेद १८. १७३. [ फा. पार–दोज़ ]

**पारादोजी**—स्त्री. किरकोळ चांभारकाम [ फा. पार+दोज़ ]

**पारायण**—न. १ एखादा ग्रंथ, वेद रोज अमुक अध्याय वगैरे वाचून अमुक दिवसांत संपविण्याचा संकल्प करून जें त्या ग्रंथाचें वाचन, पठण करतात तें; पुराणादि ग्रंथाचें साद्यंत वाचन. २ पार जाणें; ओलांडणें; उत्तीर्ण होणें. [ सं. ]

**पारायणी**—वि. पारायण करणारा, पुराणादि ग्रंथांचें साद्यंत वाचन, पठण करणारा. [ पारायण ]

**पॉरावचें**—क्रि. (गो ) कवडयाचें ओरडणें. [ पारवा ]

**पारावार-वारा**—पु. १ अलीकडील व पलीकडील तीर. २ मर्यादा; अंत; शेवट ( बहुधा निषेधार्थी प्रयोग ) 'पारावर रहित निरीक्षी । ' –परमा ८.११. 'ह्या भाषेंत शब्दांचा पारावार लागणार नाहीं.' ३ समुद्र 'मी पारावारातें आलों लंघुनि त्यामाजी । ' –मोरामायणें –मंत्ररामायण सुंदरकांड ११९. –क्रिवि. अलीकडे व पलीकडे 'तैसें विवेकाचिये कांठीं । उभें ठाकलिया किरीटी । पारावाराचिया गोठी । करणें वेदां । ' –ज्ञा १५.५३७. [ सं. पार=पलीकडचा+अवार=अलीकडचा ] ०**नसणें**–मर्यादा नसणें; अंत नसणें. 'याच्या खोडकरपणाला पारावार नाहींसा झाला आहे.'

**पारिका-खा**—वि. १ परका; अन्य; दुसरा. 'साधला पारिका प्रसंगें । ' –कृमुरा २९.८५. 'या नांव क्षमा म्हणिजे । अभय तें ऐसें जाणिजे । जें जें पारिखे देखिजे । तें तें होइजे आपणची । ' –एभा १९.३९१. २ शत्रु. 'साता पाताळां चा भरीं । अरेरे पारिके हो रीगालु जरीं । '–शिशु १००३. ३ (महानु ) अलभ्य; अप्राप्य. 'जैसें कामे कवळिलिया माराकें । विरहिणी भोग होती पारिकें । ' –ज्ञाप्र ७६७. [ सं. परकीय ]

**पारिजात, पारिजातक**—पु. स्वर्गांतील पांच देववृक्षांपैकीं एक; प्राजक्त; मंदार. हें झाड फार मोठें नसतें. त्यास कुमळें असलेल्या फांद्या व कात्रीदार पानें व पतंगाप्रमाणें फुलें येतात फुलें नाजुक असून त्यांचा सुवास मधुर असतो. चौदा रत्नांपैकीं हें एक मानतात. 'कल्पद्रुम हन पारिजातु । गुणें चंदनुही वाड विख्यातु । ' –ज्ञा १०.२३५ [ सं. ]

**पारिजातक**—पु. मुलींचा शिवाशिवीचा एक खेळ. –मराठी खेळाचें पुस्तक ३०७.

**पारिजें**—न पारा; पारज पहा. [ सं. पारद अप ]

**पारितोषक**—न. कांहीं काम, करमणूक इ० संतोषकारक केल्यामुळें खूष होऊन दिलेलें इनाम; बक्षीस; देणगी; पुस्तक, निबंध, कविता इ०ला पसंतीदाखल दिलेलें ठराविक बक्षीस. ( इं ) प्राइझ. [ सं ]

**पारिपत्य**—न. १ शिक्षा; दंड; शासन. २ पारपत्य या अर्थीहि वापरतात. पारपत्य पहा. 'सकळ पारिपत्य त्यांआधीन । रायें केलें सत्रींचें । ' –पांप्र १५८. 'कीं स्त्री राज्यांतील पारिपत्यपूर्ण । जारासीं प्राप्त जाहालें । ' [ सं. परि+पत् ] **पारिपत्यागार**–पु. प्रशासक, योजक; मुत्सद्दी पारपत्यागार पहा 'समर्थांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे उत्तम पारिपत्यागार पाहिजेत '–खेया ३९.

**पारिपार्श्वक**—पु. कथेचा प्रस्ताव करणारी व्यक्ति; सूत्रधाराचा हस्तक ( मारिष ). 'तदनंतर पारिपार्श्वक पडद्यांतून बाहेर रंगस्थलांत येतो. ' –कमं १२१. [ सं. ]

**पारिबर्ह**—पु. लवाजमा. 'शूर रुयात पळेना नेऊं या पारिबर्ह अक्रूर । ' –मोकृष्ण ८६.३९. [ सं. परिबर्ह ]

**पारिभद्र**—पु. १ कडुनिंब. 'तेथें श्रीकुलस्वामीचें दर्शन घेतल्यानंतर पारिभद्र सेवन करून ... ' –ऐरा ४. २ देवदारवृक्ष. ३ मंदारवृक्ष. [ सं. ]

**पारिभाषिक**—वि परिभाषेसंबंधींचा, संज्ञाविषयक; सांकेतिक; शास्त्रांत योजावयाचा; शास्त्रीय नांवाचा ( शब्द ). ( इं. ) टेक्निकल [ सं ]

**पारियात्र**—पु पर्वत. [ सं. ]

**पारिये(य)णें**—उक्रि. ऐकणें –मनको.

**पारिसा**—वि. स्नान न केलेला. पारोसा पहा.

**पारी**—स्त्री. (महानु ) पायरी पहा. 'वळकट भावार्थ पाऱ्या यास । आचार भिंतीस सद्भुक्ति । ' –भाए ७९७. [ पायरी ]

**पारी**—स्त्री. १ केळफुलाच्या बाहेरील जाड आवरणापैकीं प्रत्येक २ केळफुलाच्या पोटांतील फण्यावरच्या आवरणापैकीं प्रत्येक. यांतील पांढऱ्या-आंतील कोवळ्या-आवरणास विनोदानें गाय व काळ्या आवरणास म्हैस असें म्हणतात. ३ मोदकाचें कवच ( ज्याच्या आत पुरण भरलेलें असतें ). ४ आच्छादन; आवरण. ५ आब्याची कोय, बाठ [ सं. परि ? ]

**पारी**—स्त्री. धान्यावर पडणारी कीड; पोरकिडा पोरा पहा ' जेथ मंगळाचिया अंकुरीं । सवेंचि अमंगळाची पडे पारी । मृत्यु उदराचिया परिवरीं । गर्भु गिवसी । ' –ज्ञा ९.५०३.

**पारीख**—क्रिवि पारखें, निराळें; मोकळें. पारिका–खा पहा. ' कर्जापासून पारीख जाला. ' –ख ८६२ [ सं परकीय; प्रा. पारक्क ]

**पारीण**—वि. पारंगत; तज्ज्ञ; पंडित; माहितगार 'आमच्या देशीं भाषेचे पारीण मानिले गेलेले हे गृहस्थ. ' –देशीभाषा ८. [ सं. पारं नी ? किंवा पारण, का पारीण ]

**पारीस**—पु ( ना व. ) सहाण; गंध उगाळण्याचा एक विशिष्ट प्रकारचा कुरुंदाचा वर्तुळाकार किंवा चौकोनी दगड. पारीसखोड=सहाणखोड. [ म. परीस; हिं पारस ]

**पारु-रू**—पु १ पार; तीर; तट. पार पहा. ' कीं कैवल्यमूर्तितरू । दृढ वैराग्याचा पारू । तैसा कटिप्रदेश गंभिरु । पडियासे देवाचा । ' –ज्ञाप्र ४३३. २ अंत; शेवट. ' झाला पां सर्वेश्वरु । धरिला जाणिवेचा अहंकारु । तरी तोही नेणे पारु । तया स्वरूपाचा । ' –विपू ३.१७. [ पार ]

**पारुका**—पु ( कर. ) पाळी; खेप; उंसाच्या गुऱ्हाळातील चालू चरकाचा दोन मादणें रस निघेपर्यंतचा काल. ' रात्रीचा पारुका माझ्याकडे आहे ' ' दोन पारुके होईपर्यंत पात हाणली ' [ हिं पारी=पाळी; सं. प्रहर ? ]

**पारु(रू)खणें**—उक्रि १ वाट पाहणें; थांबणें, बंद करणें. ' ऐसें कैवल्यनाथें वीण । पारुखें ना आगमन । ' –दाव २५१. २ स्थिर रहाणें ' हें असो दिठी जयावरी झळके । कीं हा पद्मकरु माथा पारुखे । तो जीवचि परि तुके । महेशेंशीं । ' –ज्ञा १०.९. [ पारुषणें ]

**पारुखणें**—उक्रि. स्पर्श करणें. [ सं. स्पर्श; म. परिस ]

**पारुखणें**—अक्रि. खिन्न होणें; रुसणें, रागावणें. ' जो येथालाभें तोखे । अलाभें न पारुखे । पाडसेंवीण न सुके । समुद्र जैसा । ' –ज्ञा १२.२१०. [ सं. परुष–पारुष्य ]

**पारुखणें**—अक्रि नष्ट होणें; लोपणें. ' सद्भावें भगवत्परिचर्या । करितां पारुखे कर्मक्रिया । ' –एभा ३.६०४ [ पारुषणें ]

**पारुखणें**—अक्रि. पारखा होणें. चुकणें. ' ऐसें ईश्वरकृपेवीण । कांहीं न पारुखें भ्रमण । ' –ज्ञाप्र २४८. [ पारखा ]

**पारुखणें**—परीक्षा करणें पारखणें पहा.

**पारु(रू)खविणें**—उक्रि थांबविणें; राहविणें ' आजि रात्रिचां अवसरीं । आम्हीं राहूं येके बिढारीं । ऐसा प्रार्थुनि अनेका उत्तरीं । पारुखविला । ' –खिपु २ ५४.५७. [ पारुखणें ]

**पारुखविणें**—उक्रि परीक्षा करणें, पारख करणें ' दळ बाहिरी पारुखविलें । रिगाला सारितु मांदियालें । ' –शिशु ३३८ [ पारखणें ]

**पारुखा**—पु. हेर. –खिपु [ पारख ]

**पारुखा**—पु १ पाहुणा. २ शत्रु –खिपु [ परका ]

**पारुडकें**—न. ( चाभारी ) पारडाचें, म्हशीच्या रेडकाचें कातडें [ पारडूं ]

**पारुण**—वि पारखा पहा –शर

**पारुष**—न पारुष्य पहा.

**पारुषण**—न माघारें फिरणें; परतणें.

**पारुषणा**—वि फिका; निस्तेज

**पारु(रू)षणें**—उक्रि १ शिळा होणें, बेचव होणें. २ फिकें पडणें; निस्तेज होणें. ' बाळसुर्याची ही ओप । जया पाहतां पारुषे । ' –मुसभा १४४९ ३ बंद पडणें; थांबणें; खुंटणें. ' एथ सारासार विचारावें । कवणें काय आचरावें । आणि विधिनिषेध आघवे । पारुषती । ' –ज्ञा १.२४६ ' नाठवे तें मीपण पडला वीसरू । इंद्रियव्यापारु पारुषला । ' –ब ४५६. [ म. पर्युषित, म. पारोसा ]

**पारु(रू)षणें**—उक्रि नष्ट होणें; सुटणें; पारखी होणें ' काय हें खंडईल कर्म । पारुषतील धर्माधर्म । ' –तुगा ६९८ [ सं. परकीय; म. पारखा ]

**पारुषणें**—उक्रि तुच्छ करणें [ सं परुष, पारुष्य ]

**पारुषविणें**—उक्रि खुंटविणें; थांबविणें; बंद करणें. ' कीं येऊनि फळाचा घडु । पारुषवी केळीची वाढु । श्रीगुरु भेटोनि करी पाडु । बभुत्सु जैसा । ' –ज्ञा १८.९६८. [ पारुषणें प्रयोजक ]

**पारुष्य**—न कठोरपणा; कठिणपणा ( भाषण, वागणूक इ० तील). ' तो मनुष्यांत अधमु जाण । पारुष्याचें अवतरण । आतां आइक खूण । अज्ञानाची । ' –ज्ञा १६.२४५. [ सं. ]

**पारुसा**—वि. पारोसा पहा. मागिलिये क्षणींचीं आंगें । पारुसीं म्हणोनि वेगें । ' –अमृ ७.१२७

**पारूं**—न. ( मावळ ) दंव [ सं पार=पारा ? ]

**पारे(रो)ज**—पु. ( गो. ) पारा; पारज पहा. [ सं. पारद ]

**पारेठा**—वि. ( कों. ) ( विरू. ) पारठा पहा.

**पारेरा**—पु आठवण; स्मरण. ' स्वहित घडाया जनालागीं । घडीघडी पारेरा देती योगी । ' –दावि ३५०. [ सं. प्रेर् ? ]

**पारो**—पु कच्ची किंवा अर्धवट भिंत. पारॉ पहा.

**पारोशी, पारोशी घोसाळी, पारोशी दोडकी**—स्त्री गिलकें, घोसाळयाची एक जात.

**पारोसा**—वि. १ धुणें, स्नान, घासणें, इ० संस्कार ज्यावर केलेले नाहींत असें (वस्त्र, भांडें, माणूस, तोंड इ०). 'तूं पारोसा आहेस तों पारोशी भांडी घास.' २ शिळा (घरांत सांठलेला केर, पूर्वदिवशीं आणलेलें पाणी फुलें इ०). ३ अद्याप न झाडलें–सारविलेलें (घर, अंगण, चूल इ०) [सं. पर्युषित–पर्रुसिअ–पारुस–पारोस–सा–सी–सें] ०**केर**–पु. आदल्या दिवशींचा, पारोशानें काढावयाचा केर; स्वयपाकघर, देवघर यांतील अंगधुण्यापूर्वी काढावयाचा केर. ०**थुंका**–पु. सकाळीं निजून उठल्यावरची व तोंड धुण्यापूर्वीची तोंडांतील थुंकी या थुंकीच्या ठिकाणीं बरे–वाईट पुष्कळसे गुण असल्याचें मानितात. **पारोसें**–वि. आदल्या दिवसाचें; शिळें. ०**कपाळ**–न. आदल्या दिवसाचें गंध कायम असलेलें, न धुतलेलें कपाळ. ०**काम** न. (जमलेला केर काढणें, खरकटीं भांडीं घासणें, शेण–पाणी करणें इ०) आदल्या दिवसाचें करावयाचें राहिलेलें काम.

**पारोसा दोडका**—पु. दोडक्याची एक जात; घोसाळें; पारोसें.

**पारोसा पिंपळ**—पु एक पिंपळाच्या जातीचा वृक्ष, कोकणांत यास मणेर; अष्टा कडेपाईर म्हणतात. २ (ल) कोणासहि चिकटून न राहाणारा, बेपर्वाई मनुष्य; ज्यास आईबाप, मुलेंबाळें नाहींत किंवा ज्यावर कोणी अवलंबून नाहींत असा फटिंग माणूस. [सं. पार्श्वपिप्पल, पारिग. गुज. पारसपीपळो; सिं पारसुपिपिरु]

**पारोसें, पारोसें घोसाळें**—न घोसाळयाची एक जात

**पारोळा–ळें**—पुन पाभर किंवा मोघण ह्या आउताच्या दांत्याचें टोंक, टोपण. फारोळें पहा.

**पारोळी**—वि. पारोळें गांवची (पळी, उपकरणीं इ०). ०**पळी**–स्त्री. खानदेशातील पारोळें नांवाच्या गांवीं तयार केलेली संध्येची पळी.

**पार्चा**—पु १ मांसाचा लहान व चपटा तुकडा. –गृशि २. ९. २ वस्त्र; पोशाख. पारचा पहा [फा.]

**पार्ट**—पु १ नाटकांतील भूमिका; वेष; सोंग. जसें:–स्त्रीपार्ट, पुरुषपार्ट इ० २ भाग [इं.]

**पार्टी**—पु. नाटकांतील भूमिका घेणारा; पार्ट करणारा; पात्र; वेषधारी. उदा० स्त्री–देव–राक्षस–पार्टी. 'त्या पार्टयांच्या तोंडात मक्कामदीनेवरील शोकतअलीचीं भाषणें हे खुशाल घालतील हें खास समजा.' –नाह ३ ३८. –स्त्री. १ पक्ष; बाजू. 'मास्तर आदिकरून मंडळी एका पार्टीची असावी असें अनुमान करण्यास बळकटी आली.' –विक्षिप्त २.४२. २ उपाहार; मेजवानी. 'तुम्ही एखादे वेळीं असतां घरीं नाहींतर कोठें पार्टीला गेलेले.' –संगीतघोटाळा पृ. २. ३ तुकडी; संघ; समूह. 'पोलीसपार्टी रवाना झाली.' –के २६.७.३०. ४ आसामी; व्यक्ति. 'व्यवहार करतांना पार्टी चांगली पाहून करावा.' [इं.]

**पार्ण**—पु. (गो.) ज्यांत पुष्कळ जुनाट झाडें असतात अशी सोडलेल्या घराची जागा. [सं. पर्ण]

**पार्थक्य**—न. पृथक्पणा; भिन्नपणा; वेगळेपणा. [सं.]

**पार्था**—वि. (व) पारोसा. 'आज तो पार्था राहिला'

**पार्थिव**—पु राजा. –न. नित्यपूजेसाठीं केलेलें मातीचें शिवलिंग [सं पृथा, पृथ्वी] –वि १ पृथ्वीसंबंधीं; पृथ्वीपासून उत्पन्न झालेला (पदार्थ इ०).' तेवीं पार्थिवें पार्थिवासी। सुखदुःखबाधा न घडे त्यासी।' –एभा २३ ७७६. २ मातीचें; मृण्मय. 'आइकें पार्थिव धातु आघवी। आरोगितां कांहीं नुरवी।' –ज्ञा ६ २३९. 'चुना, क्षार हीं पार्थिव द्रव्यें आहेत.' ३ (ल) जड; नाशवंत. 'अहो देहो पार्थिव कीर जाये। ययाची काकुळती कवणा आहे।' –ज्ञा ११.३६७. ४ भूगोलासंबंधीं; भौगोलिक. [सं.]

**पार्दाव**—पु (गो.) एक जुनें नाणें.

**पार्यातक**—पु. (महानु.) पारिजातक 'वनोवनीं चापेयाचीं झाडें। परि नाहीं पार्यातकु।' –भाए ५१५. [सं. पारिजातक]

**पार्लमेंट**—न. १ ब्रिटिश साम्राज्याचें राज्यव्यवस्थामंडळ. यांत हौस ऑफ लॉर्ड्स व हौस ऑफ कामन्स अशीं दोन कायदेमंडळें असतात. 'पार्लमेंटानें राजाचा शिरच्छेद करवला.' –के १२.७ ३०. २ कायदेमंडळ; सभागार मंडळ; कौन्सिल. [इं.]

**पार्लमेंटरी**—वि. १ पार्लमेंटसबंधीं. २ (ल) कायदेमंडळांतून शिष्ट समजली जाणारी; सनदशीर; सभ्य (भाषा). –विचावि ११. [इं.]

**पार्वण**—न. १ पर्वकाळसंबधाचें नैमित्तिक पितृश्राद्ध 'आणि सोमसूर्यग्रहणें। येऊनि करविती पार्वणें। कां मातापितरमरणें। अंकित जे दिवस।' –ज्ञा १८.११०. २ बाप–आजा–पणजा, आई आजी–पणजी, आईचा बाप, आईचा आजा, आईचा पणजा या प्रत्येक त्रयीस पार्वण म्हणतात. [सं.]

**पार्वती**—स्त्री. शिवपत्नी; उमा; अपर्णा; महादेवी [सं.]

**पार्श्व**—वि. १ शरीराच्या एका बाजूचा; कुशीचा. २ अवळचा. [सं.] ०**अभिनय**–पु. (नृत्य) कुशींनीं दाखविलेला अभिनय. नृत्यामध्यें पार्श्वकर्म पांच आहेत. त्यांचीं नावें:–नत, उन्नत, प्रसारित, विवर्तित व अपसृत. [पार्श्व+अभिनय] ०**क्रांत**–(**आकाशीचारी**)–न. (नृत्य.) दोन्ही मांडया हलवून कुंचित पाय उचलून बाजूस टाकणें. ०**क्रांत(करण)**–(नृत्य) दोन्ही मांडया हलवून कुंचित पाय उचलून पुढें टाकणें. ०**छेद्क(अंगहार)**–न. (नृत्य) हात वक्षस्थळावर निकुंचित करणें व ऊर्ध्वजानु, आक्षिप्त व स्वतिक हीं करणें करणें. नतर त्रिक फिरविणें. नंतर हात उरोमंडल

करून नितंब व करिहस्त व कटिच्छिन्न हीं करणें क्रमानें करणें. ०जानु(करण)-न (नृत्य) एक पाय सरळ ताठ ठेवणें, दुसरा पाय दुमडून त्याचें पाऊल त्याच पायाच्या मांडीच्या मागच्या बाजूस लावणें, म्हणजे गुडघा बाजूस येतो ०निकुट्टक(करण)-न (नृत्य) एका बाजूस हात स्वस्तिकाकार करून टेवून पाय निकुट्टित करणें. ०पथ-पु फलाट, (इं) प्लॅटफॉर्म. -विलायतचा प्रवास भा. २ पृ १६. ०पिप्पल-पु पिंपळाच्या जातीचा एक वृक्ष पारोसा पिंपळ. [सं] ०भाग-पु १ मनुष्य, गृह इ०चे मागील व पुढील भागाखेरीज कडेचे जे दोन भाग ते प्रत्येक बाजूकडील भाग २ (स्थापत्य) बाजूची उभारणी. (इं) साईड एलेव्हशन. ०मंडल-न. (नृत्य) दोन्ही हात वर करून वाटोळे फिरवून बाजूस आणणें. ०मुख-न. (नृत्य) मान पुरती, सबंध एका बाजूस वळविणें. ०शूल-न छातींतील कळ; चमक, उसण. ०स्वस्तिक-न. (नृत्य) पार्श्वस्वस्तिक पाय करून अर्धनिकुट्टक करण, मग हीच क्रिया त्याच क्रमानें दुसऱ्या बाजूस वळून पुन्हां करणें व हात फिरवून मांडीच्या मागें टेवणें. नंतर आक्षिप्त, नितंब, करिहस्त व कटिच्छिन्न हीं करणें करणें.

**पार्श्वक, पार्श्वानुचर**—पु १ चाकर; सेवक; देहसंरक्षक; हुजऱ्या. २ (काव्य) भालदार; चोपदार. [सं पार्श्व+अनुचर]

**पार्श्विक**-वि पार्श्व पहा. [सं.]

**पार्षद**—पु १ सेवक; चाकर; नोकरवर्ग. 'काठीकर दोघे प्रबळ। पार्षद उभे असती।' -गुच २९.११९. २ विष्णूच्या परिवारातील नंद-सुनंदादिक गण. 'मूर्ति चतुर्भुज वेल्हाळ। शंख चक्र गदा कमळ। सुनंदादि पार्षदमेळ। चिंतावे सकळ सायुधादिक।' -एभा ३.८३१. [सं.]

**पार्ष्णि**—पु टांच; खोंट. 'मग शरीरसंचु पार्थां। अशेषही सर्वथा। पार्ष्णीचा माथा। स्वयंभु होय।' -ज्ञा ६.१९८. [सं.]

**पार्सल**—न. गठ्ठा; डाग; एका गावाहून दुसऱ्या गांवीं पोस्ट, रेल्वे इ०नीं माल पाठवितांना सोयीसाठीं त्याचा केलेला गठ्ठा. 'शकुंतलेचं पार्सल कण्वाच्या पंढरपुरांत!' -नाकु ३ ७१ [इं.]

**पाल्हेरा**—पु संगत, सोबत. -तुगा. -शर.

**पाल्हेरा-ळा**—पु १ सविस्तर हकीकत; इतिहास; वृत्तांत (एखाद्या गोष्टीविषयींचा). (क्रि० देणें). २ कंटाळवाणी व लांबलचक गोष्ट; पाल्हाळ; चऱ्हाट (क्रि० सागणें; लावणें; पडणें). [? सं. पल्लव; म. पाल्हाळ]

**पाल**—स्त्री. सरड्याच्या जातीचा एक सरपटणारा क्षुद्र प्राणी. हिच्या तोंडांतून एक तऱ्हेची चिकट लाळ येते. त्या योगानें हिला किड्यासारखे प्राणी विशेष त्रासाशिवाय गिळतां येतात पाल चुकचुकणें हें एक अशुभ चिन्ह समजतात. [सं. पल्ली]

**पालीचें तेल**-न. तेलांत पाल टाकून उकळलेलें तेल. याचा विंचवाच्या दंशावर लावण्यास उपयोग करितात.

**पाल**—पु. (गो.) संशय; किंतु; शंका (क्रि० पडप).

**पाल**—न. १ एखाद्या जाड कापडास दोन बाजूंस उतार देऊन पुढील व मागील भाग उघडा ठेवितां येईल अशा तऱ्हेनें तंबूप्रमाणें उभारलेलें लांबरुंद कापड. उघड्या जागेंत दुकानें माडल्यास त्यावर आच्छादनासाठीं केलेलें तरट. गोणपाट किंवा जाड कापड. २ पांच-दहा सुताडें एकत्र जोडून-बैटक घालणें, छाया करणें इ०करितां केलेलें मोठें वस्त्र; जाजमाचा एक प्रकार. ३ पहिल्या प्रकारचा लहानसा तंबू; राहुटी. 'देवोनिया पाल राहिले तेथेंचि।' -रामदासी २ ७५. ४ -पु लढाऊ गलबताचा एक प्रकार 'इंग्रजाचे पाल आहेत त्याजवर बेजरब घालून पाल शिकस्त केले तर...' -समारो २ २१. ५ शीड, कनात, पडम. ६ (ल.) दुकान 'यात्रेंत ठिकठिकाणचे दुकानदार पाल लावतात.' -मसाप २ ३८ ७ कराची सूट. माफी 'तरी आकार होईल त्यापैकीं चौथाई यासीं पाल देणें.' -बाडबावा २ ११२. 'देशपांडे कुळकर्णी यांची दुकानें असल्यास पाल द्यावयाची चाल आहे.' -मसाप २.१८३ ८ (कों.) मासे पकडण्याचें एक जाळें. ९ रताळ्यावरील एक प्रकारची कीड -कृषि ५५१. १० झाडाचीं कोंवळीं पानें; अंकुर (क्रि० फुटणें, निघणें; येणें, होणें). [सं. पल्लव] ०घालणें-मांडणें-(ल.) स्त्रीनें उघडपणें व्यभिचारावर पैसा मिळविणें. ०करी-पु पाल उभारून त्यात आपला माल मांडणारा वाणी किंवा त्यात राहणारा मनुष्य ०कोयती-स्त्री जहाजावरील ताडेलाचा टहाळ तोडण्याचा लहान कोयता; सावंतवाडीकडे याचा शस्त्रासारखा उपयोग करीत. त्याचा दांडा लांब असतो. [पाला+कोयती] ०घर-न. कर माफ असलेलें घर. -बदलापूर ३६१. [पाल+घर] ०छत्र-न. मराठ्यात लग्नप्रसंगीं काठीच्या टोंकास मोकळें व लोबतें पागोटें बाधून गुढीसारखें जें नवरदेवापुढें धरतात तें. [पाल+छत्र] ०जत्रा-स्त्री. कापणी व मळणी झाल्यानंतर शेतकऱ्यांनीं शेतात एकत्र जमून केलेली मेजवानी; डवरा. ह्यावेळीं शेताच्या संरक्षक देवतेस कोंबडी, बकरा इ० अर्पण करितात. ही देशांतील चाल झाली कोंकणांत, छपरावर घालण्यासाठीं किंवा भाजावळीकरितां झाडाच्या लहान फांद्या किंवा पाला इ० टहाळ आणण्यासाठीं लोक जंगलांत जातात त्यावेळीं वनदेवतेची आराधना करण्यासाठीं केलेला जमाव, पालेजत्रा. [पाला+जत्रा] ०पट्टी-स्त्री. १ प्रवासांत लहान राहुटीसाठीं किंवा बैठकीसाठीं वापरावयाचें जाडेभरडें कापड. २ लहान पाल; अगदीं लहान तंबू. [पाल+पट्टी] ०पडदळ-न. पाल व तदनुषंगिक इतर वस्तू यांचा समुदाय; पाल वगैरे. [पाल+पडदळ]

**पालउ-ऊ**—पु. पालव; पदर. 'जैसा मातेयाये पालउ। जे लाजे तोंडा दाऊ।' -ज्ञाप्र ९८८. [सं. पल्लव; म. पालव]

**पालक, पाल**—वि. पालन, पोषण, रक्षण करणारा. (समासांत) भूपाल–महीपाल इ०. 'नीचाच्या संगतीनें चितुराचा पालक। विक्रम हा मग्न झाला दुर्व्यसनीं घातक।' –विक १९. [सं.] **०गोत्र**–न एखादा मुलगा ज्या कुलांत दत्तक गेला त्या कुलाचें गोत्र. [पालक+गोत्र]

**पालक–ख**—पु १ (काव्य) पाळणा. 'सुवासिणी मिळवूनि सकळा। घातलें बाळ पालखांत।' २ झोपाळा. 'बसा पालखा तुम्हा हलविलें हळूच देतें झोका।' –पला २. [सं. पल्यंक]

**पालक–ख**—स्त्रीपु एक प्रकारची पालेभाजी; बडिशेपेचा पाला; शेपालक. [सं. पल्लव]

**पालक**—पु. १ बाजारांतील पालांवर घेण्यांत येणारा एक कर. २ (पालांतील) दुकानदार. [पाल]

**पालक**—पु (गुरें इ०) पाळण्याचा खर्च [पाळणें]

**पालक–ख**—पु सोनेंरुपें यांची परीक्षा करतांना त्यांना तापवून पाहण्यापूर्वी कानस किंवा सुराख इ०नें जें चिन्ह करतात तें.

**पालकांडे, पालकांडे वेल**—नस्त्री एक प्रकारचा वेल. त्याचे तंतू घट्ट व मजबूत असून त्याचा गद्दा, भारा इ० बांधण्याकडे उपयोग करितात.

**पालकी**—स्त्री. (विरू.) पालखी पहा.

**पालंकी**—स्त्री एक प्रकारची पालेभाजी.

**पालकुना**—पु. (कु) चांभाराच्या अरीला धार लावण्याचा दगड. हा सावंतवाडी संस्थानांतील साकळी मणीयारमध्यें सांपडतो तो काळा असून सोन्याचा कस पाहण्यासहि उपयोगी आहे. [पारख ?]

**पालख**—स्त्री १ (परीक्षा करण्याकरितां) विस्तवांत घालण्यापूर्वी सोनें, चांदी इ०चा तुकडा कानशीनें घासणें, अशा तऱ्हेनें कानशीनें घासून केलेली खूण. (क्रि० घालणें) २ भट्टीतून बाहेर काढलेल्या गरम सोन्यावर पाणी घालणें; नवेपणा व चकाकी देणें. (क्रि० घालणें) [पारख ?]

**पालखन–ट–खंड**—स्त्री (महानु ना) मांडी; मांडी घालून बसण्याचें आसन 'चतुर्मुखाचियें पालखती जवळि। बैसले होते।' –भाए ६६९ [पल्यंक] **०घालणें**–मांडी घालून बसणें

**पालखणें**—सक्रि सोनें, चांदी इ०ची तापवून त्याची परीक्षा करणें पालख करणें. [पालख]

**पालखी**—स्त्री १ राजादिकांनी बसून जावयाचें व मनुष्यादिकांनीं वाहून न्यावयाचें वर धनुष्याकार दांडी असलेलें एक लांकडी वाहन; डोलीसारखें एक यान, शिबिका. 'क्षितिकांची वाणी मृषा वदुनि हालकी। धनियास पालखी चाकरास नालकी।'–ऐपो ३६९. २ (ल.) प्रेताची तिरडी पुढें उतरूनि विप्र पालखी।'–दावि १४७. [हिं. व. फा. पाल्की; का. पल्लक्कि] **०वचप**–क्रि. (गो.) उचलणें. **०चा गोंडा**–पु. पालखींत बसणाऱ्या इसमास धरण्यासाठीं पालखीच्या वरच्या दांडीपासून सोडलेला लोंबत्या दोरीचा रेशमी गोंडा. **०नशीन**–वि. पालखीचा ज्याला मान आहे असा बडा सरदार. [फा. पालखी+नशीन=आरूढ, बसलेला] **०पदस्थ**–वि. पालखींत बसण्याचा राजाकडून ज्यास अधिकार मिळाला आहे असा.

**पालखी**—स्त्री. एक लहान मुलांचा खेळ. –मराठी खेळांचें पुस्तक ६४.

**पालज**—स्त्री. काकडी, खरबूज, कलिंगड, भोपळा, कोहळा, दुध्या इ० जातींच्या फळवेलांची लागवड. [फा. पालीज्, फालीज्]

**पालट**—पु. १ पाळी; खेप; बारी; आलटापालट, अदलाबदल (काम, श्रम, मनुष्य इ०ची). 'चाकरी करावयास चार चार बटकांचे पालट बांधून दिले.' 'काल जेवलों आज उपोषणाचा पालट' २ बदल, अदलाबदल; भिन्नता; निराळेपणा 'सकळांचा जाहला एकवट। घाईनें वस्त्रासि होई पालट।' –कथा १.५८. ३ फरक; बदल, स्थित्यंतर 'त्याला पैसा मिळतांच बुद्धीम पालट झाला' ''ऐसी अनवच्छिन्न समता। भूतमात्रासीं सद्‌गता। आणि पालटु नाहीं चित्ता। कवणे वेळे।' –ज्ञा २ २९८. ४ (जंबिया) आपल्या हातांतील जंबियानें जोडीदाराच्या उजव्या पायाच्या आंतील घोटयावर मारणें ५ पंधरवड्याच्या न्हाव्यानें येऊन हजामत करण्याचा दिवस. –क्रिवि मोबदला; बदला; ऐवजीं. 'जेवीं कां चिंतामणीचियेसाठीं। मार्गे चातीलागीं खापरखुंटी। कां परीस देवोनि पालटीं। काळी गोमटी वीट मार्गे।' –एभा १८. ५८. [सं. पर्यस्त, प्रा. पल्लठ; पल्लत्थ; पं. हिं. पलटा; पं. पळट; गुज पालटो] **०वाणी**–स्त्री. (अन्न, स्थल, उद्योग इ०चा) बदल; फरक, पर्याय. **०वाणी–वाणा**–क्रिवि. (हवा, अन्नपाणी, उद्योगधंदा इ०चा) फेरबदल करण्यासाठीं. [पालट+वाणा=प्रत्यय] **०वाणें**–न. खाण्यापिण्यांतील बदल; नेहमींच्या अन्नांत कांहीं फरक करून त्यास रुचि आणणें; (ल.) नेहमींचा, मार्ग, चाल, रीत, पद्धत इ० बदलणें. (क्रि० करणें).

**पालटणी**—स्त्री बदल करणें; फरक करणें; फेरबदल, अदलाबदल करणें; (दुखणें) माघारी येणें; उलटणें. [पालटणें]

**पालटणें**—उक्रि. १ दुसऱ्या बाजूस वळविणें; वळणें; फिरणें. २ बदलणें; एक टाकून त्याच्या जागीं दुसरें घेणें, स्वीकारणें; (मार्ग, रीत यांत) फरक करणें; बदलणें (पहारा इ०). ३ (ल) बदलणें; फरक करणें; वेगळें भिन्न करणें; फिरणें 'ऐसा ज्ञानाचिये निजगती। पालटु पडे गा सुमती। डोळयांची शोभा राती। पालटे जैसी।' –ज्ञा १८४९५. 'शतखंड माझी होईल रसना। जरी या वचना पालटेन।' –तुगा ७५९. ४ (दुखणें) उलटणें; परत येणें. [सं. प्रवर्तन; परिवर्तन; प्रा. पलट्ट; गुज. पालटवुं]

**पालटींव**–वि. पालट केलेलें; वळविलेलें; बदललेलें; अदलाबदल केलेलें; फरक केलेलें. [ पालटणें ] **पालटें**–क्रिवि. बद्दल; ऐवजीं. ' ज्यांचिया आवडीच्या लोभा। भगवंतू पालटें आला गर्भा। दशावतारांची शोभा। आहली पद्मनाभा ज्यांचेनी। ' –एभा २.२३४.

**पालटी–टें**—स्त्रीन. (कों.) भात ठेवण्यासाठीं चार–पांच बांबूंच्या भोंवतीं तट्ट्या लावून करतात ती तात्पुरती कणिंग, कणगी; पालें.

**पालटया**—पु. (कों. बा.) (ल.) न्हावी; पालटाचे पालटास येऊन हजामत करणारा. पालट ५ अर्थ पहा.

**पालडें**—न. पारडें पहा. ' स्वानंद तुकावया काटाळें। सर्वजीवानंद तुकितां तुळे। परि पालडें गेलें अंतराळें। स्वानंद तुकेना। ' –स्वादि १२ ४.२७. [ पारडें ]

**पालणूक**—स्त्री. जकातीमधील देशपांडयाचा एक हक्क, करापासून माफी पाल अर्थ ७ पहा.

**पालत–थ, पालती–थी**—पाळत इ० पहा.

**पालती**—पु. भाव.

**पालथणें**—उक्रि पालथें, उपडें करणें, होणें; दुसऱ्या बाजूवर करणें; उलटून टाकणें, उलटणें.

**पालथा**—वि. ज्याचें तोंड (किंवा वरची बाजू) खालीं झालेली आहे किंवा केलें आहे असा, उपडा. ०**घालणें**–१ धुंडाळणें; शोधणें. ' आपण शोधीत असलेली वस्तु जवळच कोठें अचानक सांपडली म्हणजे आपलें आपणालाच आश्चर्य वाटूं लागतें कीं, इतकी जवळ वस्तु असून सारा गांव पालथा घातला. ' –पण लक्षांत कोण घेतो. २ पराजित करणें; पराभव करणें; एखाद्याचें सपशेल नुकसान करणें. [ सं. पर्यस्त; प्रा. पल्लत्थ ] ०**येणें**–जन्मसमयीं ( मूल ) मातेच्या उदरांतून खालीं तोंड करून बाहेर येणें. हें एक अशुभ चिन्ह समजतात. **पालथें उताणें करणें**–लोळविणें; हालहाल करून पराजित करणें. ' यूरोपांतील मल्लांना पालथें उताणें करून विजयश्री खेचून आणणारा अहमदबक्ष हिंदीच ना ? ' –भाग्योदय, लोकमान्यांचा व्यायाम. **पालथ्या घागरीवर पाणी**–( पालथ्या घागरीवर ओतलेलें पाणी आंत जात नाहीं त्यावरून ल. ) निष्फळ प्रयत्न, खटपट, श्रम; हट्टी व स्वैराचारी मनुष्यास केलेला निष्फळ उपदेश. ' दुराग्रहाच्या पालथ्या घागरीवर अनुभवाच्या पाण्याचा कितीहि वर्षाव केला तरी फुकट.' –प्रेमशोधन १४१ सामाशब्द– ०**डुब्बा**–पु लहान मुलांच्या पोटांत होणाऱ्या एका रोगाचा प्रकार; मुडदूस. ०**मांड्या**–पुस्त्री. (ल. बा.) विटाळशी बसणें. ०**राजयक्ष्मा**–पु. कफक्षयाचा तीव्र प्रकार. **पालथी सुशी**-स्त्री. सुशी नांवाचा पोटांतील आंतड्याचा एक असाध्य रोग. ०**थी सूज**–स्त्री. प्रथम ढुंगणाच्या प्रदेशाजवळ येणारी व नंतर मांड्या, पाय व सर्व शरीरभर पसरणारी सूज.

**पालन**—न. १ रक्षण; संगोपन; पोषण; संवर्धन; सांभाळणें. २ (व्रत, वचन, प्रतिज्ञा इ० ) पाळणें; पूर्ण करणें; राखणें; पुरी पाडणें. [ सं. पाल्=सांभाळ करणें ] ०**पोषण**–न. संरक्षण व संगोपन; सांभाळ व संवर्धन. [ सं. ]

**पालपटी**—स्त्री. (व.) सवलतीनें वहितीस मिळालेली शेत जमीन. [ पाळणें+पट्टी=जमीन ]

**पालंपेड**—स्त्री. (कु.) एक प्रकारचा मासा.

**पालंबी**—स्त्री. (कों.) ( विरू. ) (वड इ० झाडाची)पारंबी पहा. [ पारंबी ]

**पालभारा**—पु. १झाडांच्या पाल्याचा भारा. २ हा गावांत विक्रीस आणला असतां त्यावर घेण्यात येणारी जकात. [ पाला+भारा ]

**पालमत्री**—स्त्री (गो.) लांकडाची थापटी. [पोर्तु. पुल्मातोरी]

**पालमांडें**—न. ( महानु. ) एक प्रकारचें भांडें. ' नागांबा उष्णोदक पालमांडें आणीत. ' –पूजावसर.

**पालय**—स्त्री. ( गो. ) भाताची पालवी; कोंवळे अकुर; पानें. [ सं. पल्लव ]

**पालव**—पु. १ झाडाचीं शेंड्यास फुटलेलीं कोंवळीं पानें व अंकुर समुच्चयानें; पालवी. 'तेथ विधि निषेधी सपल्लव। वेदवाक्यांचे अभिनव। पालव डोलती बरव। आणिती तया। ' –ज्ञा १५.१५७. २ झाडाची कोंवळी फांदी; कोंवळ्या पानांचा व अंकुराचा झुबका, तुरा ३ ( शेला, लुगडें इ०चा ) पदर; ( गो ) डोकीवरचा पदर. ४ (ल ) दृष्ट. ' कीं लागला पालव पापिणीचा। ' –साह्र २.९३. ५ वस्त्राच्या पदरानें केलेली दूरच्या इसमास इशारत, खूण; दिवा मालविण्यासाठीं घेतलेला वस्त्राचा पदर. ' देह लावी वात। पालव घाली जाली रात। ' –तुगा ३१३७ ( क्रि० घालणें; टाकणें; करणें; देणें). ६ (ल.) मर्यादा; सीमा; हद्द; कड; कांठ; शीव. ७ (ल.) भिंतीच्या पुढें आलेला घराच्या छपराचा भाग. ८ (ल.) गोष्ट; मनोरंजक वृत्तांत इ० सांगतांना तो जास्त रंगविण्यासाठीं त्यांत घातलेली भर. ९ नातें; आप्तपणा; सोयरगत; पदर; घरोब्याचा संबंध. (क्रि० मिळणें; भिडणें; लावणें). १० कुटुंबांत अनेक पुरुष जन्मल्यामुळें झालेला विस्तार; वंशविस्तार. ११ आच्छादन; आवरण; पदर. ' यज्ञोपवीत कानीं ठेवोनी। डोईस पालव घालुनी। ' –गुच ३६ १३०. १२ (व.) फडकें; चिरगूट; चिंधी; वस्त्राचा लहान तुकडा. १३ (ल.) ऋतु; न्हाण; पदर. ' आजच आला पालव मजला किती जीवा झुरशी। दिवस पांचवा ऋतु संपादून मग जा गुणराशी। ' –पला ३.१८. १४ (ल.) पिच्छा; नाद; आधार. ' परी पालव न धरिसी विचाराचा। ' –परमा ४.११. १५ ( अलीबाग कों.) बैलांना मारण्याची दोन–अडीच फूट लांब व दीड–दोन इंच घेराची काठी. १६ (कों.) हातभर लांबीचा एक मासा. १७

(कासारधंदा) भांड्यांच्या अगदीं वरच्या कांठाच्या करकोच्याचा पत्रा. -बदलापूर ९७. १८ (गो) दळणाऱ्यास सहाय्य, मदत. १९ (गो.) बांबूच्या बारीक काठ्या दोऱ्यांनीं विणून केलेलें जाळें; कडसरी. २० (गो.) रुंद पाटली. २१ -पु (ल) दया; द्रव; पाझर. 'वाळल्या झाडास पालव फुटेल पण याचे हृदयास पालव फुटणार नाहीं.' २२ (ल) इंद्रियवृत्ति. -मनको. २३ -स्त्री. (गो) मदत. २४ (कु.) वालाच्या दोरीचें, वेलाचें शेवटलें टोंक, अग्र. [सं. पल्लव] म्ह० सदैवाचा पालव बरा. ०कापून देणें-काडी मोडून देणें; लग्नसंबंध रद्द करणें. ०पसरणें-पदर पसरणें; काकुळतीस येऊन विनविणें. 'पालव पसरोनि तुम्हांसी। मी मागतों अवधियासी।' -भाराकिष्किंधा १२.९८. ०करीण-स्त्री. न्हाण आलेली व पदर घेणारी स्त्री; पदरकरीण. ०दार-पु (कों.) गोंव्याकडील एक लोकसमाज. 'कुडाळी, महाजन, भजक, ग्रामस्थ, पालवदार वगैरे भेद.'-हिंदु ११.२.३०. ०पद-न. १ गाण्याच्या दर कडव्याच्या शेवटीं गाण्याचा जो भाग पुन पुन्हा म्हणतात तो; पालुपद; पूर्वपद; आंकणकडवें; ध्रुपद. 'कीर्तनकाराचें आख्यान पालवपदावर आलें.'-राको. २ एखाद्याचे तोंडीं असलेला एखादा शब्द; वाक्य इ०. ०पाचें-न. १ पंचपल्लव. २ अंतःकरणपंचक. -हंको. [पालव+पाचें=पंचक; पांचांचा समुदाय] ०फकीर-पु. (गो.) प्रथम पतीचें पिशाच्च. ०साती-स्त्री. (महानु) कापडाची पताका; निशाण. 'झळंबति पालव-सातिया। पाखेयांचिया।' -भाए ४४१. ०देणार-पु. (गो.) सहाय्य करणारा माणूस, विशेषतः परमेश्वर. **पालवानपालव**-पु. विवाहामुळें जडलेला फार लांबचा संबंध; एका कुटुंबाचा दुसऱ्या कुटुंबाशीं दुसऱ्याचा तिसऱ्याशीं आशा तऱ्हेनें दोन दूरच्या कुटुंबांत लग्नामुळें झालेला संबंध; लांबचें नातें. [पालव+अनु+पालव]

**पालवट**—पु. कोष्टयाच्या मागाच्या आडव्या काठ्या [पाल+काठी]

**पॅलवण**—न. (कु.) झाडाला फुटलेलीं कोंवळीं पानें; अंकुर. [सं. पल्लव; म. पालव]

**पालवणी**—न. दुखण्यांतून उठलेल्या मनुष्यास प्रथम स्नान घालण्यासाठीं औषधी, कडूलिंब इ० घालून तापविलेलें पाणी. [पाला+पाणी]

**पालवणी**—न. वस्त्राच्या पदरानें केलेली इशारत; खूण. कळविलेला संकेत. [पालवणें]

**पालव(वि)णें**—उक्रि. १ (काव्य.) झाडास अंकुर फुटणें; नवीन पालवी येणें. २ वस्त्राच्या पदरानें किंवा हातानें बोलाविणें; खुणाविणें. 'आला वेऊनियां यमुने बाहेरी। पालवितो हरी गडियांसी।' -तुगा ५३. ३ पदरानें दिवा मालवणें; पदरानें (माशा, धूळ इ०). उडविणें. 'म्हणौनि दिवा पालवें। सवेंचि तेज मालवे। कां रविबिंबासवें। प्रकाश जाय।' -माज्ञा १२.१००. ४ विस्तार करणें; मोकळें करणें. 'तो प्रसंगु आहे पुढां। जेथ शांतु दिसेल उघडा। तो पालविजेल मुडा। प्रमेयबीजांचा।'-ज्ञा ६.४८९. ५ प्रगट करणें. 'न दिसणें दिसणेंनसीं मावळवी। दोहीं झांकिलें तें सैंघ पालवी।' -ज्ञा १६.१५. ६ सत्कारणें; संतोषविणें. 'अन्नार्थी आल्या सत्कारून पालविला। तो कसा भाग्य उदयाचा दीप मालविला।' -प्रला २१०. ७ पदराखालीं घालणें; झांकणें. ८ अभय देणें. ९ मदत करणें. १० काबीज करणें. ११ डोलविणें; झोंके देणें; लाड करणें; आळविणें. 'गुणें गोविंदें मला दाहा वेळ पलंगावर पालवा।' -प्रला ९७. [पालव]

**पालवा**—पु. १ (कों.) झाडाची तोडलेली हिरवी फांदी, फोंक; लहान काठी (नांगराचे बैल हाकण्यासाठीं घेतलेली). २ (सुतार काम.) दोन लांकडाचे भाग एकत्र करणाऱ्या सांध्यांच्या प्रकारांपैकीं एक. -तपशीलपत्रकें पृ. २८. [पालव]

**पालवी**—स्त्री. १ झाडास फुटलेलीं कोंवळीं पानें; अंकुर. (क्रि० येणें; फुटणें). २ (ल) आजारांतून उठलेल्या मनुष्याच्या शरीरांत येणारी नवीन शक्ति, जोम, तजेला इ० (क्रि० येणें; फुटणें). ३ (ल.) एखाद्याची सांपत्तिक स्थिति सुधारून त्याला प्राप्त झालेली उन्नति. (क्रि० येणें, फुटणें). ४ हांकेस उत्तर. ५ (व.) वहीत जमीनींतील निरुपयोगी झुडपें. ६ (कु.) भाताचीं पातीं. ७(गो.) उपकुलदेवता. ८ आच्छादन. -मनको. [पालव]

**पालवीं**—क्रिवि. खालीं. -मनको.

**पालवें**—न वस्त्राचा पदर. [सं. पल्लव]

**पाल(ख)षती**—शअ. जवळ; बाजूला. 'विघ्नेश्वराचीये पालषती।' -उषा ९.९५. [सं. परिपार्श्वतः]

**पालसेण**—न. (गो.) कचरा.

**पालसत्र**—न. पालांचा समुदाय; लहान तंबूंचा समुदाय. 'शतदशसंख्या शोभती पालसत्रें।' [पाल=राहुटी]

**पालसॉ**—वि. (गो.) तिरकस; कललेला.

**पाला**—पु. १ झाडांचीं पानें; पाचोळा; पानांचा समुदाय. पानें, कोंवळे अंकुर इ०चे झुबके इ० 'सेवुनि संतत पाला संततपाला यदर्थ करितात।' -नवनीत २५५. २ (ल.) समूह; समुदाय. 'राक्षसांचा यज्ञांत उठे पाला।' -आराम ११. [सं. पल्लव] ०करणें-(पुणें) कच्च्या कडाचें लोणी करणें. ०भरविणें-दुःख देणें; पीडणें. 'दैवें मृतपुत्रविपच्छामेचा तीस भरविला पाला।' -मोस्त्री ४.१३. ०होणें-वाळलेल्या पाल्याप्रमाणें शुष्क होणें. 'मृदुलत्व म्लानत्व स्वीकारुनि जाहलासि कां पाला।' -मोविराट ३.७७. पाला ह्या शब्दाचें समासांत पाले असें रूप होतें. जसें-पालेभाजी; पालेदार इ०. [सं. पल्लव; गो. पालें] ०खोलणें-(ना.) बिंग बाहेर काढणें; भ्रमाचा भोपळा फोडणें. **पाल्याचा**

चहा-पु. १ चहाचीं पानें. २ पानें उकळून तयार केलेला चहा. **पालेखाइर**-वि. झाडाचा पाला खाणारा. -पु. वानर. 'अहो रानीचिया पालेखाइरा। नेवाणें करविजे लंकेश्वरा।' -ज्ञा ११.२३. -राधि २५.६२. ०**जत्रा**-स्त्री. (कों) पालजत्रा पहा. ०**दार**, ०**भरू-री**-वि पुष्कळ पाला, पातीं असलेला (कडबा वगैरेचीं ताटें); पाल्यांनीं युक्त; भरपूर पाला असलेला. ०**पट्टी**-स्त्री. शेतांत पिकांचीं कोवळीं पानें दिसूं लागतांच त्यावर बसविलेला कर. ०**भाजी**-स्त्री. पाला असणारी भाजी; ज्या भाजीचा पाला खाण्याच्या उपयोगी येतो ती भाजी (मेथी; माठ; पोकळा इ०). याच्या उलट फळभाजी ०**माळ**-पाल्याची माळ, हार. 'पाले-माळा सुमनमाळा।' -दा १३.९.१. ०**मोड**-पु. कर्जफेडीकरितां शेतकऱ्यानें सावकाराला पुढें पिकणारें भात अगाऊच विकणें -बदलापूर ३०२. ०**वन**-न. पर्णकुटि; पाल्याची झोंपडी. -ज्ञा २.३६३.

**पॉलॉ**—वि. (गो.) गाल.

**पॉलॉ**—वि. (गो.) गीर नसलेलें (फळ); पोंचट. 'पॉल्या पणसाक पांख चड. [गुज पोलुं=पोकळ; म. पोल]

**पालाटणें**—न. (कर.) (न्हाव्यांत रूढ) धार लावण्याचा कातडी पट्टा; लपाटणें. 'पालाटणें मऊ नाहीं, पालाटण्यानें वस्त-ऱ्याला धार येते.' [ध्व.]

**पालाण**—न. पलाण पहा. आच्छादन; खोगीर. 'मुंगीवरी भार गजाचें पालाण। घालितां ते कोण कार्यसिद्धि।' -तुगा३५२५ [सं. पल्ययन, पर्याण; प्रा. पल्लाण=घोड्याचा साज; फा. पालान] ०**पडणें**-वर्चस्व मिळविणें. 'राज्यांची अनेक बंडें जालीं। गो-ब्राह्मणावरी पालाणें पडिलीं।' -स्वादि ९.१.७५.

**पालाणणें**—उक्रि. १ खोगीर चढविणें; घोड्यावर पलाण घालून सज्ज करणें; तयार ठेवणें. 'प्राणापान जिणती पैजा। तैसें वारू पालाणीं।' -एरुस्व ४.२९. २ जोडणें; सज्ज करणें; सिद्ध करणें; अंगावर घालणें. 'रत्नमणींचीं बाळ लेणीं। पालाणिलीं अरवारें।' -मुसभा ४.१०७. 'घाव दीधला निशाणा। म्हणे सैन्य पालाणा पालाणा।' -जै ७४ ४५. ३ (ल) तरंगण्यास लावणें; पसरणें. 'जळनिधिवर यांनीं शैल पालाणवावे।' -मुरा १.४४. ४ आच्छादणें. ५ बोलावणें. 'पालाणवी मग दळाप्रति शीघ्र काळें।' -माधव रामायण बाल २९. [पालाण]

**पालाणापालाणी**—स्त्री. तयारी; सिद्धता; सज्जता. 'मग झाली पालाणापालाणी। पारधी निघाले तीन क्षोणी।' -कालिका-पुराण १४.२१९. [पालाण द्वि.]

**पॉलारों**—पु. (गो.) पायांच्या बोटांत घालण्याचा रुपेरी दागिना. [पोल्हारा]

**पालालणें**—सक्रि. (पालाणणें?) ओलांडणें; उल्लंघणें. -शर.

**पालाशविधि**—पु. एखाद्या माणसाचा मरेपर्यंत शोध न लागल्यास व तो मेला असें पक्कें समजल्यानंतर आणि त्याचें प्रेत किंवा अस्थी सांपडत नसल्यास त्याचा पळसांच्या पानांचा पुतळा करून त्याचें और्ध्वदेहिक करण्याची क्रिया. [सं.]

**पालिंग, पालिंगन, पालेगण**—पुन. समुदाय; समूह; पंक्ति. 'तंव नानावर्णे कमळवनें। विकाशिलीं तैसे अर्जुनें। नेत्र देखिले पालिंगनें। आदित्याचीं।' -ज्ञा ११.२०३. [पाळा=समुदाय+गण]

**पालिजणें**—सक्रि. फांकणें. -शर.

**पॉलिटिक्स्**—न. (इं) राजकारण. 'अलीकडे ते पॉलिटिक्स्-मध्यें पडल्याचा आरोप ज्यात्यावर लादतात.' -केले १ १०२. [इं.]

**पालित**—वि. पालन केलेला; संगोपन केलेला; सांभाळलेला; पोसलेला. [सं]

**पालिध्वज**—पु. माला, कमल, हंस, सिंह, वृषभ, कुंजर, चक्र इ० १० चिन्हांनीं युक्त पताका. अशा १०८ म्हणजे १०८० पताकांचा समुदाय. हें सार्वभौमत्वदर्शक आहे. -शक ६९७. पिंपरी राष्ट्रकूट ताम्रपट.

**पालिवण, पालेवन**—न. पाल्याची केलेली झोंपडी; पर्ण-कुटि. 'जो आपुलेनि नागरपणें। इंद्रभुवनातें पाबळें म्हणे। तो केवीं रंजे पालिवणें। भिल्लांचेनि।' -ज्ञा २.३६३. [सं. पल्लव+अयन]

**पॉलिश**—न. १ रोगण; सफाईचा रंग; चकाकी आणणारा घट्ट रंग. २ जिल्हई; चकाकी; सतेजता. [इं.]

**पॉलिसी**—स्त्री. (इं.) कार्याची दिशा; कार्यक्रमपद्धति; धोरण; कपट-नीति; बेत. 'महाराजांच्या हुकुमाप्रमाणें अजून कारवाई चालते तेव्हां ही सरकारची काय पॉलिसी आहे कळत नाहीं.' -विक्षिप्त ३.५. 'सरकारास शाब्दिक विरोध करणें हें पॉलिसीचें लक्षण कांहीं लोक समजतात.' -टिले २.५०४. [इं.]

**पॉलिसी**—स्त्री. विमापत्रक. [इं.]

**पाली-लि**—स्त्री. १ कानाची पाळी. २ (तळ्याचा) परिघ; पाळ. [सं. पाली]

**पाली**—स्त्री. जिच्यांत गौतमबुद्धानें लोकांस उपदेश केला ती भाषा. [सं. प्रकट; प्रा. पाअड]

**पालीज**—स्त्री. (विरू.) पालंज पहा.

**पालु**—पु. (कों.) एक प्रकारचा मासा

**पालु-लू**—न. (व) फडकें; वस्त्राचा लहान तुकडा. [सं. पल्लव]

**पालुपद**—न. वारंवार म्हणावयाचा पद्यांतील भाग; ध्रुपद; आंकणकडवें; पालवपद पहा. [सं. पल्लव-पालव-पालु+पद]

**पालुपाग**—न. (कों.) मासे पकडण्याच्या एका जाळ्याचें नांव. [पालू=मासा+पाग=जाळें]

**पाळू**—स्त्रीपु (गो.) खार्डीतील एक मासा.

**पाळूघाल्या**—वि. बायल्या; नेभळट; अजागळ. 'बेटा बिलकुल पाळूघाल्या निघाला, त्याच्यानें स्वतःची बायको संभाळवत नाहीं.' [पल्लव-पालू=शेपटी+घालणें]

**पाळें**—न. १ पानें; गवत इ०चीं पातीं; पानांचे शेंडे; पान-पागोरा; पालवण. २ (कु.) धान्य सांठविण्यासाठीं चारपांच बांबूंच्याभोंवतीं तट्टया गुंडाळून करतात ती कणगी, कणिंग; पालोटी. ३ दुकानासाठीं केलेली लहान राहुटी; पाल. 'मग ते चौसष्टी उष्टरा। पात्रें भरोनि गेले कांतीपुरा। पाळें देवोनि पसारा। विस्तारिलीं मांडीं।' -कथा ३.१७.१०४. ४ (गो.) कुंभाचें वेटोळें.

**पालेआ(अ)सण**—पु. (गो.) आसण किंवा आसाणा नांवाच्या झाडाचा एक प्रकार.

**पालेजणें, पालेणें**—अक्रि. १ (कु. कों.) पालवी फुटणें; अंकुर येणें; वृक्षानें पल्लवयुक्त होणें. २ (ल.) उत्कर्षाच्या किंवा भरभराटीच्या स्थितींत असणें (गो.) पालेवचें. [पालें]

**पालेजविणें**—सक्रि. जिवंत करणें; सचेतन करणें. 'यापरी एकातें मारवी। जीवें गेलिया जीववी। अचेतनातें पालेजवी। ये सिद्धीची पदवी ईशत्व।' -एभा १५.९२. [पालेजणें प्रयोजक]

**पालेवचें**—अक्रि. (गो.) पालवी फुटणें. पालेजणें पहा. [पालवणें]

**पालोटी**—स्त्री. भात वगैरे ठेवण्यासाठीं तट्टया व बांबू यांची केलेली मोठी कणग. [पाल+ताटी]

**पालोपद**—न. पालुपद पहा.

**पालोव**—पु. (गो.) वस्त्राचा पदर. [सं पल्लव; म. पाल्लव]

**पालोवेली**—स्त्री. विस्तार; पसारा; व्याप. 'पाठीं रूपपत्र-पालोवेली। चक्षु लांब तें कांडें घाली। तेथें व्यामोहता भली। पाहाळीं जाय।' -माज्ञा १५.१०२. [पाला+वेली]

**पालौ**—पु. (महानु.) पदर; पाल्लव पहा. 'झोंबतां पालौ फिटे। तेथ कुचतटी देवाची दृष्टी काजवटे।' -शिशु ७११. [पाल्लव]

**पालौचें**—सक्रि. (गो) मालविणें. पालविणें पहा. 'दिवा पालव'=दिवा मालव. [पालविणें]

**पाल्या**—स्त्रीअव. (व.) सपीटाचा लाटून व तळून केलेला एक खाद्यविशेष

**पाल्लक**—पु. (महानु) पाळणा; पालख. 'जो असे भूत-ग्रामीं सकळीं। तो खेळे एकी गोकुळीं। ब्रह्माण्डे नाभीकमळीं। तो पाल्लकीं सूतें।' -दाव ५९. [पालक-ख]

**पाल्लव**—पु. (महानु) पल्लव पहा. 'चंदन पाल्लव कोंवळे। घातिलें सेजेवरी।' -शिशु ७७४. [सं. पल्लव]

**पॉल्लॉ, पल्लॉ**—पु (गो.) गरोदरपणामुळें दुग्धोत्पत्ति कमी होत गेली म्हणजे अर्भकास जो हावरेपणा उत्पन्न होतो तो. ०पडप-हावरेपण उत्पन्न होणें.

**पाल्ली**—स्त्री. (गो.) पाल. [सं. पल्ली; म. पाल]

**पाल्हणें**—पाल्हेणें पहा. -शिशु १०२०.

**पाल्हविणें**—सक्रि. पेरणें. -ज्ञा ६.४८९. -हंको. [पालविणें]

**पाल्हाण, पाल्लाण-न**—नपु. १ (हत्ती व उंट यांच्या पाठी-वर घालावयाचें) एक प्रकारचें खोगीर; (विरू.) पलाण. 'एक म्हणती त्रिभुवनावरी। पाल्हाण घालील पुरुषार्थीं।' २ वेढा; आच्छादन 'तों महामेघ वोळला जाण। पृथ्वीस पाल्हाण घातलें तेणें।' -मक ११.१२१ पालाण, पलाण पहा. [पलाण]

**पाल्हाणणें**—उक्रि. १ (काव्य) खोगीर चढविणें; पाल्हाण घालून सज्ज करणें. (ल) बांधणें; आच्छादणें; पसरणें; वेढणें. 'शुद्धि आणितांचि राघवेंद्र। पाषाणीं पाल्हाणील समुद्र।' २ सज्ज करणें; सजवून तयार ठेवणें. 'पाल्हाणिले रथकुंजर समस्त सैन्य।' 'पाल्हाणुनी करीं त्रिशूल वसविला' पलाणणें पहा.

**पाल्हावणें**—सक्रि. विस्तारणें; प्रगट करणें. 'न दिसणें दिसणेनसीं मावळवी। दोहीं झाकिलें तें सैंघ पाल्हावी।' -माज्ञा १६ १५. [पाल्व]

**पाल्हाळ**—पु १ विस्तार, वाढ; फैलाव; पसारा. 'जयां-चिये आस्थेचेनि वोलें। सत्कर्म पाल्हाळीं गेलें। संकल्पें सत्य जियालें। जयाचेनि।' -ज्ञा ९.४७८. 'दयापालनाचे सुजळीं। प्रजावल्ली गेली पाल्हाळीं।' -मुआदि २२.१७४. २ सजावट; अलंकारयुक्त भर. 'कविजन गोष्टीचा क्वचित् संक्षेप क्वचित् पाल्हाळ करितात' ३ गोष्ट सांगणारानें गोष्टीला रंग यावा म्हणून स्वतःच्या पदरची भर घालून केलेला विस्तार (विशेषणादि अंश). 'मी यास थोडें बोलायास सांगितलें पण यानें पदरचा पाल्हाळ लावला.' ४ दया; करुणा इ०मुळें हृदयास येणारा द्रव. -शाको. ५ कंटाळ-वाणें कथन; चऱ्हाट; निष्फळ बोलणें. 'कासया पाल्हाळ आणिकांचे देखी। सांगतां नव्हे मुखीं साखरेसी।' -तुगा २८७६. [सं. पल्लव]

**पाल्हाळणें**—अक्रि. १ विस्तार पावणें; पसरणें. 'कां सोम-कांतु सोमे पघळे। सूर्यें फांकती कमळें। एथ असे तेचि पाल्हाळे। आन नये।' -ज्ञा १८.११३. २ फोफावणें; पालवणें. 'वल्ली पाल्हाळली।' -दा १०.१०.२२. ३ -उक्रि. विस्तार करणें. 'म्हणोनि कथा नये गाळितां। सुविस्तारें नये पाल्हाळितां।' -मुआदि १.९९. [पाल्हाळ]

**पाल्हाळीक**—वि. लांबलचक; विस्तृत; कंटाळवाणा. [पाल्हाळ]

**पाल्हेणें, पाल्हेजणें**—उक्रि. १ विस्तार पावणें; पाल्हाळणें. 'जैसा वर्षाकालु गगनी। पाल्हेजे नवघनी।' -ज्ञा १५.१५२.

२ पालवी फुटणें; प्रफुल्लित, टवटवीत होणें. ' हो कां जे शारदियेचे बोलें। चंद्रबिंब पाल्हेलें। कां तेजचि मूर्तिमंत बैसलें। आसनावरी।' –ज्ञा ६ २५८. ' पाल्हेजती तेथें सुमनें।'–मुआदि १.२८. ३ उत्पन्न होणें. ' संहारवातें प्रचंडें। पडती प्रळयांतींचीं सालडें। तंव कल्पादीचीं जुंबाडें। पाल्हेजती।' –ज्ञा १५ १२७. [सं. पल्लव]

**पाल्हैणें**—अक्रि. ( महानु ) १ पाल्हरणें; पालवणें. 'देखोनि रूपुं सावळें। वैराग्य काम–कळां पाल्हैलें।' –शिशु ३७१. २ पालवणें; विस्तारणें. –शिशु ५९७.

**पाव**—पु १ चवथा भाग; चतुर्थांश. जसें:–पाव–आणा–शेर–मण, इ० २ ( काव्य ) पाय, पाऊ. ' जैसा महासर्पें धरिला डाव। त्याचेच फणेवर पडला पाव।' 'माझा पावोचि मोडला।' परी मी मोडला ' हें न म्हणे।'–एभा १०.२५७. ३ तीस चौरस बिघ्यांचें जमीन मोजावयाचें परिमाण. ४ (लहान मुलांच्या खेळांत) नवीन गडी; भिडू. ' नवा पाव नवा डाव.' ५ ( मुलांत रूढ ) ( विटीदांडूचा खेळ) पहिल्या दाडूचें अंतर. ६ ( गो. ) दारू विकणार्‍यांचें एक माप; एक चतुर्थांश बाटली. **पावमारणें**–( क गो. ) वकटचा टोला मारणें; पायाच्या बोटांवर विटी ठेवून वर उडवून तिला दांडूनें तडाखा मारणें. ' पाव बसत नाहीं; पाव मारायचा चुकला.' [सं. पाद; प्रा. हिं. पॉव; सिं. पाऊ] **०प्यादा**–पु. पायदळ शिपाई. 'पावप्यादे नवे ठेवाल यांणेंच बंदोबस्त होईल ' –समारो १ १६. **०शेर**–पु. वजनी किंवा मापी शेराचा चतुर्थांश. **०शेरी**–स्त्री. खेडयांत धान्य विकणार्‍यांनीं मोकाशी किंवा इतरांस द्यावयाचा धान्यरूपी कर.

**पाव**—स्त्री. १ फणस, अननस, रामफळ इ० फळांच्या आंत देठांचें शिरलेलें अग्र. ह्यास फळाचे गरे चिकटलेले असतात. २ आरारूट ३ जात्याचे दोन अथवा एक डोळा आणि तोंड यां मधील दांडा, भाग. ४ जात्याच्या वरच्या तळीच्या खालच्या बाजूस डोळयाचें भोंक असलेली लांकडी पट्टी. ५ (गो.)जात्याची तळी. ६ (व ) मातीची परात. 'पावांत कणीक घे; पावांत भाकरी आहेत.' [सं. पाद]

**पाव**—पुन. गव्हाचें पीठ आंबवून तयार केलेला पोळी, भाकरी इ० सारखा एक खाद्यविशेष; रोटी. [पो. पाओ; म. पावरोटी]

**पावक**—पु. १ ( पावन करणारा ) अग्नि. ' ना तरी पवनु मेघासी मिळे। कीं अमृतासि मरण आहे। पाहे पां इंधनचि गिळोनि आये। पावकातें।' -ज्ञा २.१४. २ एका रागाचें नांव. ' कल्याण गोटी श्रीराग। मुरलींत आळवी श्रीरंग। वसंत पावक पद्मसुरंग। नीलांबर राग वाजवित।' –ह १०.११७.–दावि १३८. [सं.]

**पावका**—पु १ शिडीची पायरी. २ ( ताड, माड इ० ) झाडांवर चढण्यासाठीं किंवा विहिरींत उतरण्यासाठीं पाडलेली खांच) खोबण. २ ( घडवंची, पलंग, मेज इ०चा ) पाय, खूर. ' बाळंतिणीच्या बाजेच्या चार पावक्याशीं ..' –प्रसूतिकृत्यादर्श पृ२५ ४ लहान डबा ( तूप, तेल, इ०चा एक चतुर्थांश डबा ). [ पाव+क प्रत्यय ]

**पावकी**—स्त्री. उजळणीचा एक प्रकार; एक, दोन, तीन इ० शंभरापर्यंत जे क्रमांक त्यांच्या पावपटींची पंक्ति. जसें:–एक पाव पाव, बे पाव आर्धा, तीन पाव पाऊण इ० पावकें. [ पाव+की प्रत्यय ]

**पावकें**—न. १ ( लोणी, तूप इ०चा ) चवथा हिस्सा; चवथा भाग, अंश; एकचतुर्थांश भाग. २ (लोणी, तूप इ०चा) लहान डबा. पावका अर्थ ४ पहा. ३ एक चतुर्थांश किंवा त्याची कोणतीहि पट; पावकी पहा. ४ रहाटाचा हात –मसाप २ ३.७६. [ पाव ]

**पावगर**—स्त्रीपु ( विणकर धंदा ) बैलीच्या आंकडयांतून ओवून गुलडयाला बांधलेली दोरी.

**पावजी**—पु. (पेण) मीठ पिकविणारा व्यापारी,मिठागर्‍या.

**पावटा**—पु. एक द्विदल धान्य; वाल;वरणा; एक कडधान्य. याचा वेल असतो. शेंगा आंखूड व चपटया असतात [ सं. प्रावट ]

**पावटा**—पु. १ ( नृत्य, दांडपट्टा इ० मध्यें ) कुशलतेनें पाऊल टाकण्याचा प्रकार; पदन्यास–विक्षेप, पदार्पण, पायाचा पवित्रा. ' तिला अजून नाचाचा पावटा साधला नाहीं. ' २ वर्तन, क्रम इ० ' त्याचा पावटा वांकडा. ' ३ पाऊल; पाऊल ह्या शब्दावरील वाक्प्रचार पहा. ४ प्रारंभींचा भाग; पूर्वचिन्हें ( एखाद्या गोष्टीचीं, कामाचीं ). ५ ( सोनार धंदा ) ( सोनें; चांदी इ०धातूंची ) तार ओढण्याचा रहाट. [ पाव+टा प्रत्यय ]

**पावटी**—स्त्री. १ पाऊल; पायाचा ठसा, खूण २ शिडीची पायरी; पायरी.' हें उपपत्ती चढावनी। जें कैवल्यदुर्गींची निशानी। ते मज न क्रमे अज्ञानखावनी। योगपावटी तुझी।'–ज्ञाप्र१०९७. ३ पायघडया. **पावटवा**–स्त्रीअव. पायाच्या रहदारीनें मळलेला रस्ता. [ पाव ]

**पावटीं**—क्रिवि. वेळीं; खेपेला. जसें:–एक पावटीं, दोन पावटीं इ० 'शंभर पावटीं सांगितलें परंतु रीत सोडी ना.' 'म्होरच्या पावटीं लोणी आणीन.' [ पाव ]

**पावटेकरी**—पु. पावटा नांवाच्या रहाटावर ( सोनें, चांदी इ०ची ) तार बारीक ( सांखळया वगैरे करण्यासाठीं ) काढून त्यावर उपजीविका करणारा इसम. [ पावटा ]

**पावठ**—स्त्री. ( गो. ) खेप; पाळी; वेळ. उदा० दोन पावठी दोन खेपा पावटीं पहा.

**पावठ(ट)णी**—स्त्री. १ ( जिना, विहीर इ०ची ) पायरी. 'नाचती वैष्णव भाई रे। क्रोध अभिमान केला पावटणी। एक एक

लागतील पायीं रे।' –तुगा २४४. २ (विणकाम) मागाची पायानें दाबावयाची पायरी. ह्या दोन असतात. ३ (शिडी इ० ची) पायरी; पाय ठेवण्याची जागा. ४ पाऊल; पायाचा ठसा, खूण; पदचिन्ह. पावटी, पाउठणी पहा. 'लसणें सुदलें पाउठणिया।' –मुसभा २.४३. [पाव+ठाण]

**पावठाण-ठाणा**—नपु. १ (झाडावर चढण्यासाठीं किंवा विहिरींत उतरण्यासाठीं केलेली) खांच, खोबण, पायरी इ० २ पाऊल ठेवण्याची जागा, पादस्थान. [सं. पादस्थान–म. पावठाण]

**पावटी**—स्त्री. १ पाय ठेवण्यासाठीं झाडांस पाडलेली खांच; विहिरींत उतरण्यासाठीं केलेला लहान कोनाडा, खोबण, पावठाण अर्थ १ पहा. २ (विणकाम) मागची पायरी; पावठणी अर्थ २ पहा. ३ (सप्तमी विभक्तींत प्रयोग) पावटीं पहा. [सं. पादस्थ; प्रा. पायट्ठ; पाव=पाय+ठाय=ठाव, ठिकाण]

**पावंड**—पु. १ पावलाचें अंतर; पाऊल, कदम. (क्रि० टाकणें; घालणें). २ पावंडा पहा. [पाव] **पावंडाखालीं हाकणें-लावणें-धरणें-चालविणें**-गाडीचे बैल हळूहळू चालविणें; संथपणें गाडी हाकणें. **पावंडाखालीं-वर चालणें-जाणें**-हळूहळू चालणें; संथपणानें जाणें, चालणें.

**पावडा**—पु. १ (नाविक) जहाजाच्या नांगराचा फाळ, कांटा, आंकडा. २ (सामा.) मोठा नांगर (पदाकृती). [पाव=पाय]

**पावडा**—वि. पाय सरळ पडत नसलेला; चालतांना वांकडें पाऊल पडणारा; पांगळा. 'पावडा पाय अशा समयांत पावला।' –यथार्दी ३.१६. 'मुळें बधीर राखोंडें। थोटे चळलें आणी वेडें। पांगुळ कुन्टें, आणी पावडें। या नांव आध्यात्मिक।' –दा ३.६ ४१. [पाव=पाय+अडा-अडणें]

**पाँवडा, पावंडा**—पु. १ विहिरींत उतरण्यासाठीं किंवा झाडांवर चढण्यासाठीं पाडलेली खाच; खोबण, कोनाडा इ०. २ माड इ० झाडावर चढणाऱ्या इसमाचा (गवत, दोर इ०चा) फांस. ३ पाऊलभर अंतर; पाऊल; कदम. (क्रि० टाकणें; घालणें). ४ पाऊल; पायाचा उमटलेला ठसा, खूण. ५ (विणकाम) मागाची पायरी; पावसारा; पावठणी ६ (क्र) (पलंग; चौरंग; मेज इ०चा पाय; खूर. ७ (क.) शिडी इ०ची पायरी. ८ (कु.) दोरीचा लहान तुकडा ९ संथ गती. पावंडयावर चालणें. पावंड पहा. [पाव]

**पावडी**—स्त्री. फावडी, फावडें पहा.

**पावडी**—स्त्री. (व) लग्नांत वरपक्षास द्यावयाचीं वस्त्रप्रावरणें व आंदण वगैरे; करणेर; देकार. [सं. प्रावर; का. पावड=बायकी कपडा]

**पावडी**—स्त्री. १ (कु.) लांकडाचा उंचसखलपणा दाखविणारें हत्यार २ लांकडावर कडेपासून समांतर रेघा मारावयाचें एक हत्यार; खतावणी.

**पावडी**—स्त्री. खेळाचें एक साधन. चार साडेचार हात लांब बांबूचा तुकडा घेऊन त्याच्या एका टोंकापासून दोन हातांच्या अंतरावर लहानशी फळी बसविलेली असते. अशा दोन पावडयावर पाय ठेवून मुलें फिरतात; उडया मारतात. [पाव=पाय]

**पावंडी**—स्त्री. पावंडा अर्थ १ पहा.

**पावडें**—न. १ दांडा घालण्यासाठीं मागें वर्तुळाकृति भोंक असलेलें व बाकी सपाट पत्र्याप्रमाणें सुमारें वीतभर लांबीरुंदीचें पुढें धार असलेलें सामान्यतः चौकोनाकृति लोखंडी हत्यार; फावडें; खोरें. २ महानुभावी पंथाचे लोक व इतर जोगी आंकडयासारखा वांकलेला दंड हातांत घेतात तो. ३ कानफाटे लोक जवळ बाळगतात तें एक लांकडाचें साधन. फावडी पहा. ४ गूळ करतांना आळलेला रस जमीनीवर ओतून घट्ट करण्याचें एक लांकडी हत्यार. इतर अर्थीं फावडें पहा. ०ओढ–स्त्री. खोऱ्यानें पैसा ओढणें; अतिशय लूट. 'हिंदुस्थानच्या द्रव्याची जी पावडेओढ चालली आहे.' –टि २.२९६.

**पावडेकरी**—पावटेकरी पहा.

**पावण**—पु १ नव्या नवरीला माहेराहून सासरीं किंवा सासराहून माहेरीं पोंचवितो तो मनुष्य; मुऱ्हाळी; पावता; पाठराखण; पाठराख्या. –न. १ (कों.) वधूला प्रथम सासरीं आणण्याचा विधि; गृहप्रवेश. २ (राजा.) माहेराहून निघते वेळीं वधूस दिलेला खाऊ. [पावणें]

**पावणा**—पु. (राजा.) (सारा किंवा सरकारी वेठ म्हणून गांवकऱ्यांनीं सरकारला दिलेला) खलाशी; नावाडी.

**पावणा**—पु. (गो.) पावआणा; पैसा. [पाव+आणा]

**पावणा, पावणेचार, पावणारावळा इ०**—(कु.) पाहुणा, पाहुणचार इ० पहा.

**पावणी**—स्त्री. (कों. गो.) लिलांव –हिंदुपत्र १९ ८.३०. ०दार-पु. (गो.) मक्तेदार.

**पावणी**—स्त्री. १ (कु) प्रवासांत अडथळा होऊं नये म्हणून सरकारचे शिपाई किंवा परवाना घेतात तो. २ पोंचता करणें, मार्गरक्षण करून नेणें. [पावणें]

**पावणी**—स्त्री. सरकारजमा होणारी रक्कम; वसुली; पट्टी. 'तुमचे मातबरीप्रमाणें बहुमान केला जाईल व पावणीचा ऐवज जमा होईल.' –बाडबाबा १.१७. [पावणें]

**पावणें**—उक्रिअक्रि. १ पोंचविणें; पोचती करणें; नेणें; (एखादी वस्तु; मनुष्य) पाठवणी करणें; नेऊन सोडणें; 'भंग पावोनि ये तूर्ण करि स्वजनाधि चूर्ण।' –मोराघनाक्षर रामायण ३८. 'आवूनि सभाद्वारापावेतों प्रभुवरासि पावाया।' –मोउद्योग १०.२३. २ (एखादें स्थल; स्थिति; दशा इ० प्रत) पोंहोंचणें; येणें; प्राप्त होणें. 'धर्माप्रति वात्सल्यस्वीकृतदूतत्व देव तो पावे।' –मोउद्योग ११.३३. 'मी गांवांस संध्याकाळीं पावलों.' 'हा वृद्धत्व पावल्यावर बधिरत्व पावला.' 'हृदयाची डावी बाजू आकुंचन पावली म्हणजे

धमनींत रक्त जातें.' ३ मिळणें; प्राप्त होणें. 'म्हणोनि अवसरे जें जें पावे। कीं तेणेंचि तो सुखावे।' —ज्ञा ४.१०९. 'चित्तीं नित्य असोत, सर्व म्हणजे या याचका पावलें।' —मोकृष्ण १५.२९७, ४ हातीं लागणें; मिळणें; सांपडणें. 'मागील कर्जापैकीं काय पावलें तें सांग.' 'तो विळा मला तेथेंच पावला.' ५ प्रसन्न होणें; कृपा करणें; (देवानें भक्ताचा नवस; अभीष्ट इ०) पूर्ण करणें; वोळणें. 'देव नवसास पावला.' 'मानूं हृदयांत कृतघ्नत्वा वास मज नको पावें।' —मोरामा १.५११. 'अगा प्रणतवत्सला म्हणति त्या जनां पावला।' —केका ९. ६ समजणें; लक्षांत येणें; अंगीकाराचा विषय होणें 'ही गोष्ट मला पावली.' ७ अवसर सांपडणें; मोकळीक मिळणें; समर्थ होणें; शक्य असणें. 'तुला एक दोन काठया रगडून लावल्या म्हणजे तूं हासूं पावणार नाहींस.' ८ जबाबदार असणें; जबाबदारी घेणें. 'भीम म्हणे संसप्तक कौरव मज सर्व पावले जा गा!' —मोकर्ण ३९.५६. ९ हरकत नसणें; मोकळीक असणें. 'संसारांत तरा, म्हणाल मजला खोटा म्हणा पावलें।' —मोअंबरीषाख्यान (नवनीत ३६०). [सं आप्; प्रा. पाव; गुज. पामवुं; हिं. पाना; बं. पाओवा; सिं. पाइणु] **परत्र पावणें**—परलोकीं जाणें; मरणें. 'कळला कंसासी समाचार। व्योमासुर पावला परत्र। धगधगिलें कंसाचें अंतर। म्हणे विचार कैसा करूं।' —ह १२.१७१.

**पावणेआठ**—वि. नपुंसक; क्लीब. पाउणेआठ. पहा

**पावणेबारा**—वि. (गो.) मूर्ख; बेअकली.

**पावणेर**—पु. १ (कु.) पाहुणेर, पाहुणचार पहा. २ (गो) देवालयाकडील जेवणाचा एक समारंभ.

**पावणोत्रा**—पु. दरमहादरशेंकडा तीन चतुर्थांश ह्या दराप्रमाणें व्याज [पाऊण+उत्तर]

**पावत**—क्रिवि. (राजा. कुण.) पावेतों; पर्यंत. 'पाडवे पावत इलस मजे झालें.'

**पावत**—स्त्री. (गो.) आंखणी.

**पावतकी**—स्त्री. १ (कों. चिपळूण) पाय ठेवण्याची जागा. २ (क.) सक्की काढण्याची लाट. ३ (सातारी) पादुका. [पाव=पाय]

**पावतर**—क्रिवि. (व.) पावेतों; पर्यंत.

**पावता**—पु. वधूला सासराहून माहेरीं व माहेराहून सासरीं पोंचवितो तो इसम. पावण पहा. [पावणें]

**पावता**—वि. पोंचलेला; हातीं आलेला; पाठवून दिलेला; पोंचता; दाखल. 'मला तुम्हाकडला कागद पावता झाला.' ज्याची पोथी त्यास पावती करून ये.' **०करणें**—पोंचता करणें; पोंचविणें; देणें. 'पावतीं करावीं जीवनें। तया वृक्षांसी।' —दा ४.७.१२. [पावणें]

**पावती**—स्त्री. १ मिळाल्याबद्दल लेख; लेखी कबुली; एखादी वस्तु, रक्कम इ० पोंचल्याबद्दलचा दाखला; पोंच; रसीद. 'परभारें ऐवज पावला ती पावती.' —भाअ १८३२. २ पाठविलेल्या वस्तूची सुरक्षित रवानगी, आगमन; पोंच, पावणें; पावलेपणा. [पावणें] **०वही**—स्त्री. पावती, पोंचल्याची नोंद लिहून घेण्याकरितां तयार केलेलें पुस्तक; पावती पुस्तक.

**पावंद**—स्त्री. (कों.) भात झोडतेवेळीं झोडणाऱ्याच्या पायांपाशीं किंवा मांदीच्या आसपास पडतें तें भात. [पाव=पाय]

**पावधी**—स्त्री. (कों.) वर्षास किंवा महिन्यास ठराविक द्रव्य देण्याच्या करारानें आणलेली दुभती गाय किंवा म्हैस.

**पावधूक**—स्त्री. १ दुभतें जनावर ठराविक मुदतीच्या बोलीनें आणल्याबद्दल त्याच्या मालकास द्यावयाचें द्रव्य. (क्रि० घेणें; देणें). २ अशा करारानें आणलेलें जनावर, गाय, म्हैस. [सं. पाद+दुह्; बहुधा हें द्रव्य दुधाच्या पावपट किंमती इतकें असावें. यावरून]

**पावधें**—न (तिरस्कारार्थी) पावधी पहा.

**पावन**—वि १ पवित्र; शुद्ध; निर्मल. 'परब्रह्ममूर्ती श्रीकृष्ण। सादरें करितां अवलोकन। तेणें दृष्टी होय पावन। डोळयां संपूर्ण सुखावबोधू।' —एभा ५.५०६. २ निर्दोष; निष्पाप. 'आम्ही स्वधर्मनिष्ठापावन।' —एभा २३.२४३. ३ पवित्र करणारा; शुद्ध करणारा; पावक. 'मी खरा पतित तूं खरा पावन।' —नवनीत १५५. [सं.] **०पण**—न. १ पवित्रपणा; शुद्ध करण्याचें सामर्थ्य. 'याचें पावनपण सोडवाजी तुम्ही। पतितपावन आम्ही आहों खरें।' —तुगा १२१८. २ सार्थकता. 'चरणाचें पावनपण या नांव जाण उद्धवा।' —एभा ११.१२११.

**पावय**—स्त्री. मधुरवाणी; गोड शब्द. 'ऐकुनियां पावय अंगनेची।' —शशिसेना १७०. [पावा]

**पांवरी**—स्त्री. लहान पांवा; मुरली; बांसरी. [पांवा+री लघुत्व दर्शक प्रत्यय]

**पावलट, पावलटणें**—(राजा.) पायवट; पायवटणें पहा.

**पावला, पावली**—पुस्त्री. चार आणे किंमतीचें एक चांदीचें नाणें; रुपयाचा चतुर्थांश. [पाव+ला, ली प्रत्यय]

**पावला**—पु. १ पायाचा ठसा; खूण; पाऊल; पदचिन्ह. २ पाऊल; कदम. ३ दांडपट्टा खेळतांना किंवा नाचतांना कौशल्यानें करावयाचा पादप्रक्षेप; पावटा पहा. ४ कांहीं वाक्प्रचारांत पाऊल ह्या शब्दाप्रमाणेंच योजितात. [पाऊल] **पावलापावलीं**—क्रिवि. पावलापावलानें; हळूहळू; पायरीपायरीनें [पाऊल द्वि.] **पावलावर पाऊल टाकणें, ठेवून जाणें**—एखाद्याच्या प्रमाणें, सारखें वागणें; अनुकरण करणें.

**पावलिक**—स्त्री. पाद्री लोकांची एक जात; जेसुइट.

**पावलोक**—पु पायदळ. ' यांत हुजुरात म्हणजे राजाचे हुद्देकरी किंवा राजवाड्यांतील सुभे, मामले, हवाले व फुटनाईक म्हणजे बाहेरील कामगार यांचा समावेश होतो. –भाअ १८३३. १३८.

**पावलोंपावलीं**—क्रिवि १ पावलागणीक; पदोपदीं, वेळोवेळीं; वारंवार. २ (व) चटकन; उभाउभी; पावलापावलीं [पावला द्वि.]

**पावश्या**—पु. उंसाचें बियाणें लावतात त्यावेळीं कांडीं तुडवून पुरतात तो ऊंस. –कृषि ३४५. [पाऊल]

**पावव(वि)णें**—उक्रि. पोंचविणें; पावता करणें. [पावणें प्रयोजक]

**पावशा, पावशागुगूळ, पावशाधो**—पु चातक पक्षी. [पाऊस]

**पावशी**—स्त्री. (ना व. खा.) विळी. ' भाजी चिरण्यास पावशी आण. '

**पावस**—पु (अशिष्ट) पाऊस पहा. [सं. प्रावृट्; प्रा. पावस]

**पावसरा, पावसारा**—पु. (विणकाम) १ कोष्टी माग चालवितांना ज्या फळ्या पायांनीं दाबतो त्या प्रत्येक. २ मागाखालीं वही किंवा ओवी ज्याना जोडलेली असते त्या दांड्या. [पाव=पाय+सरणें]

**पावसरी**—स्त्री. (विणकाम) मागाच्या पावंड्याची दोरी.

**पावसॉ**—वि (गो) पावसासंबंधीं; पावसाळी.

**पावसारा**—पु पावसरा पहा.

**पावसाळा, पावसाळी**—पुस्त्री. मृग व हस्त ह्या दोन नक्षत्रांमधील काळ; पर्जन्यकाळ. पाऊस पडण्याचा हंगाम. म्ह० बारा महिन्यांचा उन्हाळा आणि घटकेचा पावसाळा. [सं. प्रावृट्काल; म. पाऊस+काळ] **पावसाचाकोंडा**-पु. बुरबुर; बुरंगट; बुरंगें; अत्यंत बारीक व दाट थेंबांच्या रूपानें पडणारा पाऊस. **पावसाचा तोडगा**-पु पाऊस पडत नाहीं असें वाटल्यावर तो पाडण्यासाठीं एक तोडगा करीत असत. वस्त्र सोडून व पाला नेसून रात्रींच्या वेळीं कोणीतरी बाई घरोघर हिंडत असे. तिच्या अंगावर लोक पाणी घालीत. अर्थात् ती बाई काळोखांतच हिंडावयाची पण तोंडानें गाणें म्हणत फिरावयाची. तें गाणें– अरगुंड बुरगुंड बैल बुका। चंदनी चुका मृगराजा। पाणी दे रे बाबा पाणी दे। ' –मसाप २.३२. अशा तऱ्हेनें लिंबाचा पाला अंगाभोवती गुंडाळून पाणी अंगावर घेत व ' मेघोराजा वरसरे इ० ' गाणें म्हणत कांहीं मुलें फिरण्याची चाल खानदेशांत आहे. **पावसाचीझांक**-स्त्री. १ जोराची परंतु थोडा वेळ टिकणारी पावसाची सर. (क्रि० येणें; जाणें). २ ढगांची काळोखी; अभ्र. **पावसाचें घर**–न. १ (वेदावरील शब्द) पावसापासून रक्षण व्हावें म्हणून तयार केलेलें आच्छादन. इरलें पहा. २ ज्याठिकाणीं सतत व जोराचा पाऊस पडतो तो प्रदेश, भाग. **पावसाचें पिलूं**–न. अत्यंत थोड्या प्रमाणांत पडणारा पाऊस. **पावसाचे वारे**-पुअव. पाऊस आणणारे (हिंदी महासागरांतून हिंदुस्थानकडे वाहणारे) वारे; नैर्ऋत्य किंवा ईशान्य वारे; पाण वारे. (इं.) मान्सून.

**पावसाळें**—न. (कों.) पावसाळी हवा; पाऊस पडेल अशी आकाशाची स्थिति. ' काल उघड होती आज पावसाळें दिसतें. ' [पावसाळा]

**पावळणी**—स्त्री. पावळी पहा.

**पावळी**—स्त्री. (कों. कु. गो.) १ पागोळी पहा. २ सडा; वर्षाव; सिंचन. ' तुझ्या दारीं माझ्या रक्ताची पावळी करीन. ' –निचं ८२.

**पांवा**—पु. बांबूच्या नळीस अनेक छिद्रें पाडून सप्तसुर साधून केलेलें वाद्य; अलगुज; वेणु; बांसरी मुरली पहा. ' गाई चारी मोहोरी पावा वाहे पाठीं। धन्य जाली काठी कांबळी ते। ' –तुगा १६. [ध्व. प्रा. पावय]

**पाविजणें**—क्रि. पावणें पहा. ' सत्संगेंविण देवाधिदेव। पाविजेत नाहीं। ' –दा ५.१.२३.

**पावित्र्य**—न. मानसिक व शारीरिक शुद्धपणा: शुचिता; पवित्रपणा. ' ब्राह्मणजात पावित्र्य, शुद्धता व स्वच्छपणा यांस जितकी जपते तितकी इतर कशांसहि जपत नसेल. ' –ज्ञाको (प) ११०. [सं.]

**पावीत**—वि. (राजा.) पावता, पोंचता केलेला, पावलेला; हातीं पडलेला. [पावणें]

**पावूल, पावूलबुद्धि, पावूलवाट इ०**—पाऊल इ० पहा.

**पावेतों**—शअ. पर्यंत (स्थल किंवा काल ह्यासंबंधीं).

**पावो**—पु. पाय; चरण. पाव पहा. ' कां पावो शीतळता लाहे। कीं ते डोळ्यांचिलागीं होये। ' –ज्ञा १६.१६०. ' पावो आदळतां देख। क्षणी पृथ्वी पावेल दुःख। ' –एभा ३.४५१. ' त्याचा पावो दुखावला. ' –पंच. [पाव]

**पावोन**—शअ. पासून. ' जळीं चंद्रिकेचिया पसरती वेली। ते वाढी चंद्रें नाहीं वाढविली। तेविं मातें पावोनि ठेली। दुरी कर्में। ' –ज्ञा ९.१२३.

**पावोंसरणें**—सक्रि. कळून येणें; वाटूं लागणें; कळणें. ' तेथ आदिलापासुनि पार्था। ऐकिजे ऐसीचि अवस्था। दुणावली हे यदुनाथा। पावो सरलें। ' –ज्ञा ६.४८७.

**पाव्हणा, पाव्हणारावळा, पाव्हणचार इ०**—पाहुणा इ० पहा.

**पाव्हणा**—पु. १ (कों. राजा.) उखळ, बाहीन. २ भाताची कणग, तट्या लावून केलेलें सांठवण. पाहुणें पहा.

**पाव्हतोर, पास्तो(स्तो)र**—शअ. (व) पावेतों; पर्यंत. 'त्या गांवापास्तोर गेलों होतों.'

**पाव्हळी**—स्त्री. पावळी पहा.

**पाश**—पु १ फांस; वलयाकार करून गांठ मारलेली दोरी. 'कितीयेक ते पाश घेऊनि आले।' –राक १.६. २ पक्षी; जनावरें इ० पकडण्याचें जाळें. ३ (ल.) (कामधंदा, परिस्थिति, हेतुसिद्धि इ०संबंधीचें) बंधन; अडथळा; गुंता. जसें–भवपाश; यमपाश; कालपाश; स्नेहपाश; मायापाश; आशापाश इ०. 'ऐशा चिन्हीं चिन्हितु। देखसी तोचि मुक्तु। आशापाश रहितु। वोलख पां।' –ज्ञा ३.७४. 'रमणरमणी परस्परांच्या सौंदर्यावर भाळून एकदां कां परस्परांच्या प्रेमपाशात गुरफटलीं.' –वधूपरीक्षा पृ १३६. ४ सोंगट्या इ० खेळांतील फासा. 'पाश अपवित्र सज्जन। सहसा हातीं न धरिती।' –मुसभा १४ १९. ५ (ल.) आपल्याला पाहिजे तसें दुसरा वागेल असें करण्याचें, वश करण्याचें साधन. [सं.] ०टाकणें–१ भूल पाडणें; मोहिनी घालणें; वश करणें. २ फसविणें; टकविणें. ३ आटोक्यांत आणणें. 'पाहा मी आतां त्याजवर कसा पाश टाकतो तो.' –विवि ८.१०.२०७. ०बंद–पु. १ कैद; अटक. २ फांस; दोर. 'तिहीं रक्षिलें पाशबंदीं तयाला।' –राक १.१९.

**पाश(शि)क**—पु. पाश; फांस. 'तरि एकु मी अनेकीं। गोंविजे देहपाशकीं। त्रिगुणीं लुब्धकीं। कवणेपरी।' –ज्ञा १४.६४. [सं.]

**पाशिष्ट**—न. (राजा.) घराचें आढें. पाष्ट पहा.

**पाशी**—पु पश्चिम दिशेचा स्वामी; वरुण; (याचें शस्त्र पाश आहे अशा समजुतीवरून) [सं.]

**पा(पां)शी**—स्त्री. गुरांना योग्य वेळीं पाणी प्यावयास न दिल्या कारणानें त्यांना होतो तो रोग; फांशी; पोटफुगी. [पाश] ०फुगणें–(कों.) पोटाला तडस तिडका लागणें, उदरव्यथा होऊन मरणें.

**पाशीं–सी**—शअ. १ जवळ; समीप; शेजारीं. 'शेतापाशीं गाय चरते.' 'सेवेसही मग करोनि तयाचपाशीं।' –र २५. २ जवळ; संन्निधीस; संग्रहास; ताब्यांत; हातांत (मालकी दाखविणारा). 'त्यापाशीं चार पैसे आहेत.' ३ स; ला या चतुर्थीच्या प्रत्ययार्थी (दान; दिशा; ठिकाण इ० दाखविणारा). 'त्यापाशीं दे, त्यापाशीं सांग.' 'तुला कोणी जोड्यापाशीं देखील उभे करणार नाहीं.' [सं. पार्श्व; प्रा. पास] **पाशील**–वि. जवळचा; शेजारचा; बाजूचा. 'व्यास शंकरा पाशील गंगा।' –मुआ १.१०८. [प्रा. पासिल्ल]

**पाशीट**—न. (कु. गो.) घराचें अगदीं वरचें आडवें लांकूड; घराचें आढें. पाष्ट; पाशिष्ट पहा.

**पांशुता**—स्त्री. माती. –मनको. [सं. पांसु–शु=धूळ]

**पाशुपत**—पु. १ शिवोपासनेंतील एका विशिष्ट मताप्रमाणें वागणारा; भैरवउपासक; हातांत नरकपाल, गळ्यांत हाडांच्या माळा, श्मशानवास, नरकपालांत भिक्षा व भोजन, पशुबलिदान, मांसभक्षण इ० गोष्टी यांच्यांत आहेत. –वि. १ या संप्रदायाविषयींचें. २ शिवासंबंधींचें (व्रत, दीक्षा, मत, मंत्र, अस्त्र इ०). [सं. पशुपति=शंकर]

**पाशुपतास्त्र**—न. एक शंकराधिष्ठित अस्त्र. 'पाशुपतास्त्र तेजें करून। ब्रह्मास्त्र गेलें लपोन।' –जै ५.४८. [पशुपति]

**पाशुपाल्य**—न. १ गुराख्याचा, धनगराचा धंदा. २ गुरें पाळणें. [सं पशुपाल]

**पांशेरी**—स्त्री प्र. पांचशेरी. १ पांच शेरांचें वजन. २ (ल.) चरितार्थाचें साधन ३ (ल.) रोजच्या खावयाच्या अन्नाचें प्रमाण. [पांच+शेर]

**पाश्चात्त्य**—वि. पश्चिम खंडांतील; युरोपांतील (लोक; देश; वस्तु इ०) यूरोपियन, अमेरिकन इ० प्राच्येतर. –पया ४९. (इं.) वेस्टर्न याला प्रतिशब्द म्हणून फार रूढ आहे. पाश्चिमात्य पहा. [सं. पश्चात्]

**पाश्चिमात्य**—वि. (पौर्वात्य शब्दाप्रमाणेंच हा चुकीचा प्रयोग आहे) पश्चिमेकडील; यूरोपीय; पाश्चात्त्य. 'पण अशीं शब्दरत्नें व काव्यरत्नें ज्यास यथेच्छ हवीं असतील त्यानें पाश्चिमात्य लोकांचें भाषण, लिहिणें यांकडे अमळ लक्ष पुरवावें म्हणजे झालें.' –नि ११५. –टि २.५६०.; ३.१६. [सं. पश्चिम–पाश्चिम]

**पॉश्य**—स्त्री. (गो.) ताबा; अधिकार. [पोर्तु. पास]

**पाष**—पु. पंख; पक्ष. 'तंव पाषाचा धुधुवांट्।' –उषा १७११. [सं. पक्ष; म. पाख]

**पाषं(षां)ड**—न. पाखंड पहा. 'एकाची वेदबाह्य व्युत्पत्ती। ते आपुलालिये स्वमतीं। पाषांडातें प्रतिष्ठिती। तेंच उपदेशिती शिष्यातें।' –एभा १४.६०. 'घेउनि उठती पाषांड। भलतेंचि।' –सिसं ४.१ **पाषं(षां)डी**–वि. पाखंडी पहा.

**पाषत**—क्रिवि. (राजा.) पर्यंत; पावेतों.

**पाषाण**—पु. दगड; खडक; धोंडा. 'तो पाषाणामाजि परिसु। रसांमाजी सिद्धरसु।' –ज्ञा १०.७६ 'तृणवत तनु सोनें ज्या पाषाण। पाईका त्या भिन्न नाहीं स्वामी।' –तुगा ३७७. [सं.] म्ह० १ पाषाणाला घाम येईल पण त्याला येणार नाहीं २ लोकां सांगे ब्रह्मज्ञान। आपण कोरडा पाषाण।' ०गर्दभ–पु. हनुवटीखालीं सूज येऊन शक्तिपात करणारा एक रोग. ०चुंबक–

पु. एक खनिज पदार्थ. (इं) लोडस्टोन. या खनिजपदार्थापासून लोखंड काढतां येतें. हा पाषाण लोखंडाप्रमाणेंच काळा, अपारदर्शक व कठीण असून त्याच्या अंगीं धातूप्रमाणेंच चकाकी आहे. त्याच्या अंगीं चुंबकत्वहि असतें -ज्ञाको (प) ११२. ०भेद-पु १ कांहीं दगडावर उगवणारी क्षारयुक्त उगवण. २एक औषधी;पाथरफोड. [सं. पाषाण+भेद. हिं. पाखानभेद; बं पाथरकुचा; गु. पाखाणभेद] ०माळा-स्त्री. दगडाच्या मण्यांची माळ. 'पाषाणमाळा कवडेमाळा।' -दा १३.१०.१. ०युग-न. जगाच्या संस्कृतीचा एक काळ; या काळांत भांडीं, हत्यारें इ० दगडाचीं करीत. (इं.) स्टोन एज. ०शास्त्र-न. खडक कसे बनतात यासंबंधीचें शास्त्र; प्रस्तरविज्ञान. (इं) पेट्रॉलॉजी. ०हिय्या-पु. दगडासारखा कठोर निश्चय; मन निष्टुर करणें. 'रमाबाई पाषाणहिय्या केला।' -ऐपो १४८. ०हृदय-वि दगडाप्रमाणें कठीण; कठोर मनाचा; निर्दय; दुष्ट. [सं.] पाषाणी-वि. दगडासंबंधीं; पाषाणाचा (पदार्थ). [पाषाण] ०बरप-न. (गो) शिलालेख. [गो. बरप=लेख] पाषाणीभूत-वि. पाषाणभूत; प्रस्तरीभूत; अश्मीभूत. दगडाप्रमाणें कठीण झालेलें; दगडी थरांत रूपांतर, दगडरूप झालेलें. -पदाव २३.

**पाषाणा**—पु घोड्यांना होणारा एक रोग.

**पाष्ट**—न. (व.) बैलगाडीच्या चाकाच्या ज्या लांकडी वर्तुळाकार फळींत आरे बसवितात ते; पास.

**पाष्ट**—शअ. पेक्षां 'त्यापाष्ट तुम्ही अक्कल कमी.' -वि (गो.) (अमुक एका गोष्टी) पेक्षां वाईट, कमी, कुचकामी. 'कुंड्या पाष्ट' =कोंड्यापेक्षां कुचकामी.

**पाष्ट-ष्टा**—नपु. घराचें आढें; घराच्या छपराचें आडवें लांकूड. पाठाळ्; अढेपाट

**पाष्ट-ष्टे, पाष्टा, पाष्टी**—नपुस्त्री. पाटापासुन काढलेलें (अर्धे चिवट लांबीचें) सूत; सुताची गुंडी. 'बुरूड होउनि दुरड्या केल्या। कोष्टी होउनि पाष्टा विणिल्या।' -अमृत १५. [पाट]

**पाष्टा**—पु. सोन्याची तार. पाष्ट-ष्टे पहा.

**पाष्टीं**—शअ. (राजा.) पासुन.

**पास**—शअ. (ना. कों. व. काव्य.) जवळ; समीप; पाशीं. [सं. पार्श्व; प्रा. पास; हिं. पास; फ्रें जि. पशो]

**पास**—स्त्री. १ कुळवाचें लोखंडी पातें (शेतांतील जमीन साफ करण्याचें). २ कुळव. ३ (खा.) नांगराला लावतात तो फाळ. ४ बादला, इ० करावयासाठीं करतात ती (अजमासें पसतीस तोळे वजनाची) चांदीची लगड.

**पास**—स्त्री. १ काळजी; आस्था. 'मदारुलमहाम दुरंदेश आहेत, नबाबाची पास त्यांस सर्वोपरी आहे.' -रा ५ ७९. २ दुजोरा; पाठिंबा. ३ (व.) पत; वजन. 'एवढी आमची पास नाहीं.' ४ एकनिष्ठता. 'पास तेथेंच फजल इलाही.' -पया ४९३. [फा. पास्]

**पास**—पु. (गो.) १ पाश; फांस. २ दोरखंड. [सं. पाश]

**पास**—पु. (गो.) किसमिस; बेदाणा. [पोर्तु. पासा]

**पास**—पु. १ दाखला पत्र, परवाना; तिकिट. (आगगाडीचें, नाटकाचें इ०). 'विवक्षित हद्दींत ज्यांस पुनःपुनः फिरावयाचें आहे त्यांच्यासाठीं त्रैमासिक, षण्मासिक किंवा वार्षिक पास काढण्याच्या कशा पद्धती आहेत.' -आगर ३.७३. -वि. १ मंजूर; मान्य; पसंत. 'कितीहि आर्जव केले तरी कामाच्या दिवसांत आठचार दिवसांची देखील रजा पास करावयाची नाहीं.' -आगर ३.४५. २ परिक्षेंत उत्तीर्ण. याच्या उलट नापास. [इं.]

**पास**—न (व) चाकाचे धावेस लागून असलेलें वर्तुळाकार लांकूड; पाटा; पाष्ट.

**पासक. पास्क**—पु ज्यू लोकांचा पासोव्हर किंवा ख्रिस्त्यांचा ईस्टर सण. [पोर्तु. ?]

**पासको**—पु. (गो.) इरणटोळीसारखें करड्या रंगाचें एक जिवाणू; एक प्रकारचा लहान साप.

**पासंग**—पुन. १ तराजूच्या तोलांतील विषमपणा (एक पारडें हलकें व एक जड असणें). २ तराजूंतील विषमपणा काढून टाकण्याकरितां, दोन्ही पारडीं सारखीं करण्याकरितां एका पारड्यांत घातलेलें वजन किंवा कांहीं वस्तु; धडा. 'विश्वकर्म्यानें धरूनि मुष्टीं। पासंगा घातलें तेतीसकोटी। तरी न बैसे तळवटीं। हाळवटपणें अद्यापी।' -मुसभा २.७० ३ ज्यालेचा झोंक, रोख. ४ (ल.) बरोबरी; योग्यता. 'हे खर[illegible] माजविणारांची योग्यता आणि अधिकार पाहूं गेलें तर तेही श्रीशिवाजीमहाराजाच्या अधिकारतेजापुढें खद्योतवत् देखील पासंगास लागावयाचे नाहींत?' -टि ४ ३१८. [फा. पा-संग्]. (वाप्र.) पासंगास देणें-दोन पारडीं, पक्ष, बाजू इ०सारख्या प्रमाणांचीं करण्यासाठीं घातलेली (पदार्थ, मनुष्य इ०ची) भर. पासंगास न पुरणें, न लागणें-फारच थोडें किंवा कमी योग्यतेचें असणें. 'लागेल न पासंगातें.' -संग्रामगीतें १३९. पासंगीं आणणें-मान देणें; किंमत देणें (बहुधा निषेधार्थी प्रयोग). पासंगीं न आणणें-कमी लेखणें; कुचकिंमतीचा आहे असें समजणें.

**पासगाळ-गाळी**—स्त्री. १ (कु.) आढ्यापासुन पाख्यापर्यंतचे खालीं आलेले वासे टेकून राहण्यासाठीं तुळयांच्या टोंकावर आडवें लांकूड बसविलेलें असतें तें; इंद्रकट. २ वळचणीखालचा भाग.

**पासचा**—वि. १ जवळचा; शेजारचा. २ मालकीचा; कबज्यांतील. ३ नात्याचा; कोणत्याहि संबंधाचा. [सं. पार्श्व; प्रा. हिं. पास]

**पासवें**—सक्रि. (गो.) सांधणें; जोड देणें (धातू इ० स). पासप पहा.

**पांसट**—वि. (प्र.) पांसष्ट; ६५ ही संख्या. [पांच+साठ; गु. पासेठ]

**पासडी**—स्त्री. (गो.) वर्षप्रतिपदेच्या दिवशीं नववधूला सासरहून पाठविण्यांत येणारीं वस्त्रें, खाऊ व इतर जिनसा.

**पासणें**—अक्रि. (बे.) वळणें; मागें पाहणें. पासवणें पहा.

**पासंद्वार**—पु. (ना.) उतारूः प्रवासी. [इं. पॅसेंजर अप.]

**पासप**—न. (गो.) (धातू इ०स दिलेला) सांधा; जोड; डाग.

**पासपूस**—स्त्री. (विरू.) पास्तपुस्त किंवा पुस्तापास; पुस्तापास्त; विचारपूस; वास्तपुस्त. [पुसणें द्वि]

**पासंबा**—पु. केळीच्या कांद्यास फुटलेला कोंब; मोना; केळीचें पिलूं; केळंबा.

**पासबान**—पु. पहारेकरी; द्वारपाळ. 'पासबानस्त्वसौ राज्ञो द्वारपालइतीरितः।' —राज्य १.२१. [फा. पास्+बान्]

**पा(पां)स(से)री**—स्त्री पाचशेरी; पांशेरी पहा.

**पासल**—स्त्री. (राजा.) आडवे होणें; अंग टाकणें; कलंडणें; कुशीवर किंवा उताणें निजणें. (क्रि० घेणें). [सं. पार्श्व; प्रा. पासल्ल] **पासलणें**–अक्रि. (विरू.) पासल घेणें; जमीनीवर अंग टाकून विश्रांति घेत पडणें; कलंडणें (निद्रार्थी उपयोग); कामधंदा न करतां निजणें; निरुद्योगी असणें. [पासल] **पासल पट्टी**–स्त्री. पासल घेणें; लोळणें. (क्रि० करणें). [पासल+पट्टी प्रत्यय]

**पासला**—वि. जमीनीवर आडवा पडलेला; उताणा. 'मध्यें भुले निषादी पडले तत्सुतहि पासले शवसे।'—मोआदि २७.६८. 'पाहुनियां पासला तोंडीं सुधा। वोती त्याला न म्हणावा खोटा क्वा।' —दावि ३६१. [सं. पार्श्विक; प्रा. पासिल्ल] ०**पडणें**–१ नसता कारभार किंवा लुडबुड करणें; मध्यें तोंड घालणें. २ पासलणें. 'साळि उन्मत्त होउनि पासला पडला।' —पंच १.३०. **पासलें पाडणें**–१ (वाद, युद्ध इ०मध्यें) पराजित करणें; पाडाव करणें. २ (एखादा व्यूह, बेत, कावा इ०) हाणून पाडणें; डांसळविणें.

**पासला**—वि. जवळचा; (विरू.) पासचा पहा.

**पासळी**—स्त्री. (व) फांसळी; बरगडी. (प्र) फांसळी पहा

**पासली**—स्त्री. एक वनस्पति. हिचीं पानें युरोपियन लोक कोथिंबिरीऐवजीं उपयोगांत आणितात. —ज्ञाको. (प) ११२.

**पासवडा**—पु. (महानु.) बैठक; पासोडी; चादर 'मृणाळसुताचा पासवडा घातला।' —शिशु १७७. 'तया आस्तुरणांवरि पासवडा निर्मळे। ब्रह्मविद्येचा।' —ऋ ८५.

**पासवण**—स्त्री. पाश; बंधन. —हंको. —मनको. [सं. पाश]

**पासवणा-णें**—पुन. माघार; पाठमोरेपणा; बाजूस होणें; मागें हटणें. 'हाती हाला फुलीं। पासवणा जेवीं न घाली।' -ज्ञा १३.४९६. 'ऐसे विकल्पाचे वांयाणे। कांटे देखोनि सणाणे। जे मतिभ्रमाचें पसवणें। घेतीच्चिना।' —ज्ञा ७.१७२. [सं. पार्श्व; प्रा पास]

**पासवणी**—स्त्री. एक वृक्षविशेष. 'पिंपरी शेवगे महारुख। पासवणी आणि सेलाटक।' —भवि २७.८२.

**पासवणें**—अक्रि. १ मागें पाहणें २ (बे) वळणें पासणें पहा. [सं. पार्श्व; प्रा. पास]

**पासवत**—शअ. (कों.) करितां; मुळें. —ख्रिपु.

**पासवा**—पु. १ नेसल्या वस्त्राचा आंतला पदर; पदर; याच्या उलट बाहेरील पदर. २ नदीचा फांटा.

**पांसष्ट**—वि. ६५ ही संख्या. [पांच+साठ]

**पासा**—पु. (महानु.) पाश; फासा; बंधन. 'बापु मोहाचा पासा। कवणांतें न बधी।' —भाए ३२९. [सं पाश; प्रा. पास]

**पासा**—पु. (जरतार धंदा) पन्नासभार चांदीची लगड. पास पहा.

**पासों**—पु. १ फासा (खेळण्याचा). २ कुदळीचें नेडें.

**पॉसों**—पु. (गो.) पसा पहा.

**पासाक**—वि. (गो.) सताड मोकळें.

**पासांग**—पुन. (विरू.) पासंग पहा.

**पासांबो**—पु (चि.) केळीला कोंब फुटून कांहींसा मोठा झालेला रोपा पासंबा पहा.

**पासाव**—शअ. १ (काव्य) पासून, कडून. 'आतां प्रेम तें गेलें लाजोन। पासाव मज।' —गीता १.२१. 'दुजिया पासाव परतलें मन। केलें घ्यावें दान होईल तें।' —तुगा ७५२. २ पेक्षां. 'कांहींच न व्हावया पासाव। सर्वही होणें हें बरव।' —विपू ७.५५. ३ (गो) साठीं, करितां, या अर्थी प्रत्यय. [सं. पार्श्वात्]

**पासाव**—पु. प्रसाद; आश्रय; पसाय पहा. 'बाणासी दीधला पासावो।' —उषा ६६.

**पासांवचें**—क्रि. (गो.) पाश घालणें.

**पासावणें**—उक्रि जवळ होणें. —शर [पास=जवळ]

**पासावणें**—उक्रि. पसरणें. 'खचित मंचक संख्येविणें। पासाविले मृदासनें।' —वेसीस्व १४.४२.

**पांसाळी**—स्त्री. धुळीचा लोट. 'मोंटका देओ बागारां हातु घालीं। सवेंचि बैसे मागिलीं पांसाळी।' —शिशु १०११. [सं. पांसु+आली]

**पासि(शि)क**—पु. पाश; फांस; जाळें. 'हे चिखलेंवीण रोंविती। पाशिकेंवीण गोंविती।' —ज्ञा ३.२५९. [सं. पाश]

**पासिल**—वि. जवळचा; निकटवर्ती. ' पासिला हाणे शर्ले । ' –गीता १.२३७४.

**पासीं**—शअ. जवळ; पाशीं पहा. ' पापपुण्यें अशेषें । पासींचि असतु न देखें । ' –ज्ञा ५.८०. ' एकीं असतील घरीं । चित्त तया-पासीं परी । ' –तुगा १२५.

**पांसी**—स्त्री. गुरांचा एक रोग. पांशी, फांशी पहा.

**पासीट**—न. ( हेट. नाविक. ) छप्पर.

**पांसु**—पु. धूळ; माती; रजःकण. ' मी रिगालों असें भूतळीं । म्हणौनि समुद्रमहाजळीं । हे पांसुची डेंपुळी । विरेचिना । ' –ज्ञा १५.४०१. [ सं. ] **पांसुता**–स्त्री. मातीपणा; मृण्मयता. ' पांसुता निःशेष जाये । ना घटभांडादिकें होये । ' –ज्ञा १५ ५०५. **पांसु-खुर**—पु. घोड्याच्या पायाचा एक रोग. –अश्वप २.३८.

**पासून**—शअ. १ (परिगणना करताना) विशिष्ट काल धरून; नंतर ' त्या दिवसापासून मी घरीं आहे. ' २ ( गति किंवा अंतर सांगतांना) विशिष्ट स्थळ धरून. 'पुण्यापासून मुंबई एकशें एकोणीस मैल आहे. ' ३ उत्पत्तिदर्शक. ' ह्या झाडापासून फळ होतें ' ४ ( गमन दर्शक अव्यय ) कडून. ' मी त्यापासून आलों. ' ५वियोग दर्शक अव्यय. ' त्यानें ह्यापासून रुपये नेले. ' ६ साधन–कर्तृत्व दर्शक; कडून: ' हें भांडें मजपासून फुटलें ' (म्हणजे माझ्या हातून फुटलें). ७ (गमन मार्गदर्शक अव्यय) बाजूनें; जवळून. 'तो आमचे गांवापासून गेला. ' ८ सान्निध्य, संबंध इ० दर्शविणारें अव्यय ९ (तरतमभावदर्शक अव्यय) पेक्षां. 'वज्रा पासुनी कठीणे । '–उषा ७०३. ' दुजा ऐसा कोण बळी आहे आतां । हरि या अनंता पासुनियां । ' –तुगा ३०७. [सं. पार्श्व; प्रा. पास+हून, ऊन प्रत्यय]

**पासोडणें**—सक्रि. मांडणें; पसरणें. ' सोन्याचा पाट पासो-डुनी ओटी भरिती । ' –वसा १०.

**पासोडा**—पु. ( बे. ) पळस.

**पासोडा**—१ रंगीत पासोडी. २ मोठी पासोडी; सुताडा. ३ उंची वस्त्र. ' मंडपीं पासोडा पाटावरी घातला । तेथें एक वीरु बैसला । '–कालिकापुराण १६.६९. ४ एक मुलींचा लपंडावाचा खेळ. खेळांतील पुढारी मुलींनीं एक पासोडी अगर दुसरा कसलाहि लांबरुंद कपडा घेऊन त्याचीं दोन बाजूंचीं दोन टोकें हातांत धरून उभें राहावें. याप्रमाणें धरलेल्या कपड्यास ' आगीन पासोडा ' असें म्हणतात. –मराठी खेळांचें पुस्तक २७३. पासोडी पहा.

**पासोडी**—स्त्री. १ खादी इ०च्या दोन किंवा चार पट्या ( आटपळीं ) एकत्र शिवून केलेलें जाड पांघरूण; जोठ; सुताचें जाड पांघरूण; द्विपटी –राज्य २.३९. ' कुरुसेनेवरि पसरीं शरपटला जैंवि भव्य पासोडी । ' –मोकर्ण १९.२७. २ बस-ण्याचें वस्त्र; बैठक. ' पासोडी विचित्र वरी । बैसुं घातलीसे सारी । ' –श्रीगीतमाला पृ १६. ३ विणकराकडून गांवच्या पाटील वगैरेंनीं एक पासोडी घेण्याचा हक्क. ४ पाटलाचें इनामी शेत; गांवच्या पाटलास चाकरीबद्दल खाण्यास दिलेली जमीन. –इनाम २८. अडेपारडे आणि इनामपासोडी पहा. ५ तोंडावर घालावयाचें पांघरूण; झापड–डी. ' ऐसें वदोनि मार्गणवृष्टि तया-वरि महातपा सोडी । जैसी आटोपाया मत्तगजशिरीं महात पासोडी । ' –मोद्रोण ९.३१. [ सं. पांसुकूल=( चिंध्यांचा ढीग ) पांसुकुड–पांसुड–पासोडी. चिंध्या शिवून बुद्ध भिक्षू पांघरूण करीत. –भाअ १८३५. तुल० का. पच्चड सं. प्रच्छद्–प्रच्छाद् पासून पासोडी ] **एके पासोडीचीं पाटगीं**–एकाच माळेचे मणी.

**पासोनि–नी**—पासून पहा. ' आदिला पासोनि अपाडे । जियापरी । ' –ज्ञा १.४३.

**पांसोळां**—क्रिवि. कुशींत; बाजूला. ' हृदुचि माझा बाळु चोरुनि । आपुले पासोळां ठेविलां । ' –शिपु १.२६.१७. [ सं. पार्श्व; प्रा. पासल ]

**पां(पा)सोळी**—स्त्री. बरगडी, फांसळी पहा. **एका पासो-ळीचा**–वि. ( ल. ) अत्यंत किडकिडीत; काटकुळा; हाडकुळा ( मनुष्य ).

**पासौनि**—शअ. ( काव्य ) १ पासून. ' तैं राखिलें संकटा-पासौनि । ' –दाव १०९. २ पेक्षां. ' तिऔं बरवी उभ्यपुटे । बिंब फलापासौनी । ' –शिशु ४११. पासून पहा.

**पास्कॉ**—पु. ( गो. ) एक सर्पविशेष. पासको पहा.

**पास्कुल्यो**—स्त्री. ( गो. ) वृषण; अंड.

**पास्टा**—पु. ( सोनारी ) कोणत्याहि धातूचा समपातळीचा लांब पत्रा.

**पॉस्त**—न. (गो.) मासळीचा आडवा तुकडा. [पोर्तु. पोस्ता]

**पास्तपुस्त**—स्त्री. १ विचारपूस; वास्तपुस्त; बारीक चौकशी, शोध, तपास. ( क्रि० करणें ). २ एखाद्याचा घेतलेला समाचार, काळजी. ( क्रि० करणें; घेणें ); पुस्तापास्त पहा. [ पूसतपास; हिं' पाछनापूछना ]

**पास्तर**—स्त्रीन पाचर पहा.

**पास्बान**—पु पहारेकरी; पासबान पहा. [ फा. ]

**पाहडी**—स्त्री. पालखी वाहून नेणाऱ्या लोकांची टोळी, जमाव; डोलकर; पाडी. –वि डोंगरी; पहाडी पहा. [ पहाड ]

**पाहणी**—स्त्री. १ पाहणें; बघणें; अवलोकन; दृष्टि; लक्ष इ० २ ( जमीन, पिकें, घर, झाड इ०ची ) तपासणी; देखरेख. ३ जमाबंदीची तपासणी, अजमास; अंदाज करणें. ४ परीक्षा; देख-रेख. [ पाहणें ] **पहाणी मागणें**–भाकरी मागणें; महाराचा एक हक्क. ' कामगार अथवा वापरता महार असेल त्याला घरोघर भाकरी मिळे. भाकरी मागणें याला पहाणी मागणें म्हणतात. ' –बदलापूर १६६. **पहाणीचा**–वि. अनुकरण, नक्कल करण्यासाठीं

लक्ष देणारा, बघणारा. ०**कमजास्ती**–स्त्री. निरनिराळ्यापाहणींत पडलेला फेर, तफावत. ०**खरडा, पाहणखरडा, पाहणी पत्रक**–पुन १ कामाविसी पाहणी; कच्चें टिपण. २ हक्कनोंदणीचा कागद. ०**ताळा**–पु. जमाबंदीची पुन्हां तपासणी, पाहणी बरोबर आहे किंवा नाहीं याचा ताळा पाहणें. ०**दार, पाहण दार**–पु. जमाबंदीची, किंवा वसुलाची पाहणी करणारा इसम; कमाविसदार.

**पाहणें**—उक्रि. १ बघणें; अवलोकन करणें; दृष्टि, नजर टाकणें; विचार करणें. २ (डोळ्यांनीं) बघणें; अवलोकन करणें. 'हें चित्र पहा आणि तें चित्र पहा.' ३ कोणत्याहि इंद्रियानें जाणणें किंवा समजून घेणें; अनुभवणें. जसें–ह्या फळाची चव पहा–फुलाचा सुवास किती मधुर आहे तो पहा इ० ४ काळजी घेणें; तपास, समाचार घेणें; लक्ष देणें; अंगावर भार घेऊन करणें. 'मुलगा संसार पाहतो.' ५ परवा करणें, बाळगणें; काळजी करणें; लक्ष देणें. 'पैशाकडे पाहूं नये गुणांकडे, योग्यतेकडे पाहावें.' ६ पारखणें; तपासणें; परीक्षा करणें; कसाला लावून निश्चित करणें, सिद्ध करणें 'हें सोनें पाहा.' 'याच्या अक्षराचें वळण पाहा' ७ पाहणी, तपासणी करणें; समालोचन करणें. ८ शोधणें; तपास करणें; हुडकणें. 'कामाच्या वेळेस पाहावा तो कोठें नाहीं जेवावयाला मात्र तेवढा सत्तेचा येतो.' ९ इच्छिणें; चाहणें; मागणें; अर्थणें; (जाणें, येणें, बोलणें, करणें इ० काची) इच्छा ठेवणें, असणें. 'शोकीं बुडवूं पाहे स्वावासा, पर जसा परावासा।' –मोभीष्म ३४८. 'हा तुला बोलूं पाहतो.' 'हा जाऊं–येऊं–बसूं–उठूं–जेवूं–मारूं–करूं–पाहतो' १० पाहणें ह्या धातूचा उपयोग पुष्कळ वेळां अजमावणें, तपासणें, चाखणें, खाणें, तोलणें इ० अर्थाच्या धातूंबरोबर त्यांच्या अर्थास पुष्टि देण्याकरितां करितात. जसें–कसुन पाहणें; अजमावून पाहणें; तपासुन–पडताळून–चाखून–खाऊन–जोखून–तोलून–वळखून–पाहणें. 'नळरहित वरार्शी तूज योजूनि पाहे।' -र २८ ११ भोगणें; संग करणें. 'परपुरुषाला तुमच्या वचनें पुत्रोद्भवार्थ पाहेन।' –मोआदि १७.६१ १२ मदत करणें; रक्षण करणें. १३ हानि करणें; नाश करणें. 'कोण राम–राया पाहों शके।' –मो सीतागीत ३५ (नवनीत पृ २५७). [सं. प्रेक्षण; प्रा. पेहण] **पाहत–ता अर्थी, पहातार्थी पहिलें असतां, पाहिल्या अर्थी**–विचार केला असतां; वास्तविक; खरोखरी. 'त्यास शिक्षा देणें पाहिलें असतां कांहीं कारण नाहीं.' 'बरोबरी तयांची कोण करील पहातार्थी।' –ऐपो ४१५. **पाहतां पाहतां**–क्रिवि १ डोळ्यांदेखत; अगदीं समोर; उघडपणें. २ मोठ्या चातुर्यानें, कुशलतेनें. **पाहापाहा करणें**–(व) मागें लागणें; त्रास देणें. 'तिची पाहापाहा कां करतां' **पाहायासी**–क्रिवि. लोकांत दिसावें म्हणून; वरवर. 'पाहायासी दरबारी उगीच चर्चा करितो.' –पेद १० १२. **पाहून घेणें**–१ योग्य तें शासन करणें; सूड घेणें; उट्टें काढणें. 'बरं आहे, बच्चंजी, पाहून घेईन.' २ बंदोबस्त करणें; नीटनेटकें करणें.

**पाहणें**—अक्रि. उजाडणें; उजेड होणें; उदय होणें. 'देखें भूतजात निदेलें। तेथेंचि जयां पाहलें। आणि जीव जेथ चेइले। तेथ निद्रितु जो।' –ज्ञा २.३५५. 'फिटला दु:ख दुष्काळु। पाहला सुखाचा सुकाळु।' –एभा ११.१३. [सं. प्रभा; प्रा. पहा].

**पाहणें**—क्रि. (व.) दोहणें; (म्हैस, गाय इ० कांची) धार काढणें. 'त्यानें गाय पाहिली.'

**पाहणें**—क्रि. प्रार्थना करणें. 'पाये धूनी पाहीजे ईश्वरू।' –उषा ३३. [सं. प्रार्थय; प्रा. पाह]

**पाहण्या**—वि. १ हरवलेली किंवा चोरीस गेलेली वस्तू परत मिळवून देणारा; हरवल्याचा थांग लावण्याची मंत्रादि विद्या जाणणारा. २ अमुक ठिकाणीं विहीर खणली असतां पाणी लागेल असें सांगूं शकतो तो; पानाड्या. ३ शकून पाहणारा. [पाहणें]

**पाहता**—वि. १ पाहणारा. 'अतर्क्य त्याची पाहती दिठी। मद्रूपें देखे सकळ सृष्टी।' –एभा ७.१४१. २ डोळस; द्रष्टा 'पाहतया भेद न उरेचि।' –दावि १८५. –अमृ ६.२

**पाहरा, पाहरेकरी–बंदी, पाहळी**—पहारा, पहारेकरी, पहाळ इ० पहा.

**पाहरी**—पु. रात्रीचा पहारा करणाऱ्या घोडेस्वाराचा घोडा; यामिकाश्व. 'यामिकाश्वस्तु पाहरी।' –राव्य ५.३७. [पहारा]

**पाहाट**—स्त्री. प्रभात; पहाट पहा 'तयातें इंद्रियबैलांची पेटी। न म्हणे अवसीं पाहाटीं।' –ज्ञा १३ २९.

**पाहाड, पाहार, पाहारय, पाहाळ**—पहाड, पहार, पहारय, पहाळ इ० पहा.

**पाहाडून**—आहाडून पाहाडून पहा.

**पाहाण(न)पट**—(महानु.) पहांट. पाहातपट पहा 'एकादीं नीरोपण करितां पाहाणपट जाली.' –पूजावसर

**पाहाणा**—स्त्री. (पाहण्यासारखा) सुंदर –शर [पाहणें]

**पाहाणी**—स्त्री. पाहणी पहा.

**पाहाणें**—अक्रि. १ उजाडणें. २ प्रकाशणें; पाहणें पहा.

**पाहात**—स्त्री. (महानु.) प्रभात, पहांट. 'पाहातिजे निशी। तो रसु भरिजे हेमकळसीं।' –शिशु ७७८. [सं. प्रभात; प्रा. पहात] ०**पट**–पु. प्रभातकाल; पहाट. 'ताहण्याचीये पाहातपटी। इंद्रियें घेति विषयांची दाराठी।' –भाए ५०८. –शिशु ७९०. ०**पाहार**–पु. पहांटेचा प्रहर, काळ. 'पाहातेआ पांहारां। तें उदकु भरिजे कनकधारा।' –शिशु ७८३. 'पाहातीये बाहारी।' –उषा ८९८.

**पाहाती**—वि. प्रकाश पावणारी; पहाटलेली; उजळलेली; उद्दीपित; प्रकाशमान. 'तंव बोले अरुणावती। रात्री जाहली वो

पाहाती।' -शिशु २२२ 'तंव कर्मक्षयाची पाहाती। पाहांट जाली।' -ज्ञा ७.१३०.

**पाहार**—पु. प्रहर, पहार पहा. 'हा हो जयाचेनि सोसें। शिणत आठही पाहार योगी जैसे।' -माज्ञा १२.१६७. -एभा १०.३४३.

**पाहार**—स्त्री. पहार पहा.

**पाहारा**—पहारा पहा.

**पाहाल**—पु. प्रातःकाळ; प्रभातकाळ. -मनको.

**पाहाल**—न. 'पुढां कनकाचें कळसु देखिलें। जैसें तेजाचें पाहाल उघडिलें।' -शिशु ३२४.

**पाहाल(ळ)णें**—अक्रि. उजाडणें. 'तन्ही पाहालया रजनी। तारा लोपती गगनीं।' -ज्ञा १३.९३.

**पाहाल**—न. १ प्रभात; पहाट. २ उजेड; प्रकाश. -शर 'अथवा चकोरा पाहालें। चंद्राचें जेवि।' -स्वादि १.२.५२.

**पाहावणें**—सक्रि. उजाडवणें. 'ते पाहटेवीण पाहावित। अमृतेवीण जीववित।'-ज्ञा ९.२०१. [सं. प्रभावय; प्रा. पहावय]

**पाहावणें**—पाहणें पहा. 'पाहावियां उठीनिलियां असाखिता।' -शिशु ६००. 'कष्टत आवें पाहाव्यासी।' -दा २०. १०.७.

**पाहाळ**—पु. १ विस्तार; पाल्हाळ. 'ते वेळीं व्यामोहता भली। पाहाळीं जाय।' -ज्ञा १५.१०२. २ वृष्टि; वर्षाव. पहाळ पहा. 'पढतां श्रीकृष्ण पवाडे। ठिकसां बोलां घोंषु पडे। रसरंगाचें पाहाळ उघडे। श्रोतेयांसीं।' -शिशु २०. ३ झुमका. 'रुळती चामरांचे पाहाळ।' -कृमुरा २५.३८. ४ ढीग. 'तेथ पसिमे लागलाचि कापुस पाहाळीं बालक लपविणें।' -ऋ १२६.

**पाहाळ**—न. 'पूर्णचंद्राडोनि आभाळु काढिलें। कीं शृंगारें पाहाळ उपटिलें। तैसें अवयेवु उमटलें। वालिपें आडौनी।' -शिशु ७२०.

**पाहाळी**—स्त्री. पावसाची सर. पहाळी पहा. ०**जाणें**—पान्हणें. 'आता श्रीचरण तीर्थिंचेनि ओलें। वरील सुख पाहाळीं गेलें।' -ऋ ९७.

**पाहिजणें**—क्रि. पाहाणें पहा. 'पाहिजे कीं वर योग्य पाहिजेला।' -र ३३ [पाहणें-पाहिजे]

**पाहिजे, पाहिजेल**—क्रि. (पाह धातूचें कर्मणिरूप) इष्ट; हवें; अपेक्षित, जरूर असणें; इष्ट असणें. 'हा घोडा मला पाहिजे.' 'हें काम केलें पाहिजे.' 'गांवास गेला पाहिजे.' क्रियापदापुढें उपयोग केला असतां क्रियापदाचें भूतकाळीं रूप किंवा आयास—आवयास अशीं हेत्वर्थक रूपें होतात. उदा० हें तुम्हास लिहिलें—लिहायास किंवा लिहावयास पाहिजे. पाहिजेल हें पाहिजे, याचें भविष्यकाळाचें रूप होतें परंतु हल्लीं तें फारसें प्रचारांत नाहीं. अनेकवचनीं पाहिजेत हें रूप आहे. जसें:—पन्नास आंबे पाहिजेत. नामाचें कोणतेंहि लिंग असलें तरी या शब्दांत फरक होत नाहीं. द्वितीयपुरुषी एकवचनी स हा प्रत्यय लागतो. जसें —तूं मला पाहिजेस. असें ह्या साहाय्यक क्रियापदाचीं रूपें पाहिजे ह्यापुढें पुष्कळ वेळां येतात. उदा० पाहिजे होता, पाहिजे असला.

**पाहिजे**—क्रि. (पाह धातूचें कर्मणिरूप) (इंग्रजी) वॉन्टेड याला प्रतिशब्द. हा जाहिरात देतांना योजितात 'त्याच साप्ताहिकाच्या अंकात 'पाहिजे' या सदराखालीं खालील जाहिरात प्रसिद्ध झाली.' -विचावि १४१. [पाहणें भाववाच्य रूप] ०**तेव्हां**—क्रिवि कोणत्याहि वेळीं; मागाल तेव्हां.

**पाहुडा**—पु पाऊल. -शर. ०**पावणें**—क्रि. मागें पाऊल घेणें.

**पाहुणा**—पु. (कों. कुलाबा) घुसळखांब.

**पाहुणा**—पु. १ नेहमीं आपल्या घरीं रहात नसून जो प्रसंगविशेषीं आपल्या घरीं रहावयास किंवा जेवावयास येतो तो किंवा परगांवाहून आपल्या घरीं कांहीं दिवस रहावयास बोलाविलेला (एखादा नातलग, ओळखीचा किंवा अपरिचित मनुष्य); अतिथि; अभ्यागत २ तिन्हाईत; नवशिक्या. 'पाहिजे तें मागून घ्यावें, तूं का पाहुणा आहेस?' ३ (ल.) मातबर योद्धा; वीर. 'सरस बासन, वजनदार पाहुणे मेले बहुत फार.' -ऐपो १८५. [तुल० सं. प्रधान; प्रा; पहाण] ४ भोक्ता; अधिकारी. 'ते पाहुणे होती अविचार। खरवाचे।' -विपू २.२०. ५ (ल.) चांचड; तांबडी मुंगी (ही पावसाळ्यांत जेव्हां प्रथम दिसूं लागते तेव्हां तिला म्हणतात). [सं. प्राघुण, प्राघुणक, प्राघुणिक, प्राघूर्णिक; प्रा. पाहुणअ; हिं. पाहुना] **म्ह**० १ पाहुणें जावें आणि दैवें खावें. २ एक पाहुणा घर पाहुणें. ३ हंसतीला पाहुणा रडतीलाही पाहुणा (आनंद माना कीं दुःख माना संकट टरलेलेंच). ४ दोहों घरचा पाहुणा उपवासी (मेला), किंवा बहुताचा पाहुणा उपवासी. 'एक न धरितां उपासना। साधकीं प्रयत्न केले नाना। तरी साक्षात्कार नव्हेचि जाणा। बहुताचा पाहुणा उपवासी।' ०**राउळा**-पु (व्यापक) पैपाहुणा; पाहुणाबिहुणा, पाहुणा वगैरे. [पाहुणा द्वि.] **पाहुणचार**-पु १ आलेल्या पाहुण्याचा आदरसत्कार; आदरातिथ्य. पाहुणेर पहा. २ मेजवानी. [पाहुणा+आचार] **पाहुणपण**-न. (व.) पाहुणचार पहा. **पाहुणर-रु-रू**-पु (महानु.) पाहुणचार पाहुणेर पहा. 'जाणौनि आपला पतिकरु। तया करावया पाहुणरु।' -आए ४७८. 'दीनलीं राउळें भीमकें केला पाहुणरु।' -धवळे पूर्वार्ध ४७.

**पाहुणें**—न. उखळ. [सं. पाषाण; प्रा. पाहाण]

**पाहुणें**—वि. अल्पकाल टिकणारें; अशाश्वत; क्षणभंगुर. 'आणि शुक्लबीजेचें चांदणें। तैसें तारुण्य पाहुणें।' -मुरंशु २७६.

**पाहुणेर-रु-रू-रें**—पुन. १ (काव्य) पाहुणचार; पाहुण्यांचा आदरसत्कार; आतिथ्य; पाहुण्याची सरबराई. 'केउता

कल्पतरूवरी फुलौरा। कायसेनि पाहुणेर क्षीरसागरा।' -ज्ञा १०.११. 'सकळा केला पाहुणेर। स्वर्गी गेले ब्रह्मानंद।' -कथा १.१४.२१. २ (लक्षणेनें व शब्दशः) मेजवानी. 'विठो लावण्याची राशी। जननयनासी पाहुणेरु।' -निगा १२४. **पाहूंनरू-नेरूं**-(महानु.) पाहुणेर पहा. 'देवां करितां जाला पाहूंनरू।' -शिशु ७२३. 'पाहूनेरूं सारौनि श्रीअनंतु।' -शिशु १६७.

**पाहे**—स्त्री. पहाट; प्रभात. -शअ. १ उद्यां; उदयिक. 'पाहेचा पेणा वाटवधा। तंव आजीचि होईजे सावधा।' -ज्ञा १३.५४७. २ पुढें. 'म्हणऊनि सामान्य गा नोहे। हें सांगतां वडिल गोठि गा आहे। परी तें बोलों येईल पाहें। आतां प्रस्तुत ऐकें।' -ज्ञा ७.१४. [सं. प्रभा; प्रा. पहा]

**पाहेणें**—अक्रि १ उजाडणें; पाहणें पहा. २ प्रवेश करणें. 'कानाचेनि गवाक्षद्वारें। बोलाचे रश्मी अभ्यंतरें। पाहेना तंव चमत्कारें। अवधान टकलें।' -ज्ञा ७.२००.

**पाहेरी**—स्त्री. पायरी. 'पाहेऱ्या तळापर्यंत जावें धडधडा।' -ऐपो ४२४ [पायरी]

**पाहोणा**—पु (विरू) पाहुणा पहा.

**पाहोनरूं-नेरूं**—पाहुणेर, पाहूनरूं पहा. 'वाढौनि केला पाहोनरूं। मागधादिकांचा।' -शिशु ४४३. 'क्षीराब्धा दुधांचां पाहोनेरूं।' -दाव ४०८.

**पाह्योपाह्यो**—उद्गा. (व.) तमासगिरी; वाहवा! मजा केली! असें म्हणणें; पाहापाहा! 'पाह्यो पाह्यो सर्वच करतात पण खरी मदत कोणी करीत नाहीं.' [पाहणें, पहाहो द्वि.]

**पाळ**—पु घेर; घेरा. -स्त्री १ विहीर, सरोवर इ०च्या कांठाकांठानें बांधलेली उंच व रुंद भिंत; कटडा; कांठ; कांठचा प्रदेश. 'वस्त्र ठेवोनि सरोवरपाळीं।' -मुआदि १५.१३४. -रावि २४.४. २ जात्याच्या वरल्या तळीचें जें तोंड त्याच्या सभोंवती असलेली उंच कड, जींत वैरण घालतात ती; जात्याचें टवळें. ३ कानाची कड (जी किंचित् दुमडलेली असते ती; नाक इ० ची खालची कड, शेंडा. ४ धान्याचीं कणसें झोडपतेवेळीं धान्य उडूं नये म्हणून खळ्यावर कडबा, सरम इ०चें केलेलें कोंडाळें, कडें. ५ पाणी रहावयासाठीं मध्यें खळगा करून सभोंवती केलेला (माती, चुना इ०चा) उंचवटा, वाटोळा बांध; कालवण इ० पातळ पदार्थ वाहून जाऊं नये म्हणून भाताचा घातलेला बांध. ६ झाडाच्या मुळाशीं पाणी राहण्यासाठीं केलेलें आळें. ७ जात्यास भोंवती पडलेली पिठाची वर्तुलाकार कड ८ किल्ल्यासभोंवतालची भिंत; तट. ९ (झाड, खांब, मनुष्य इ०चा) घेर; घेरा; वेढा. १० (सामा.) कोणत्याहि प्रकारचें कोणत्याहि पदार्थाच्या भोंवतीं केलेलें क[illegible]. ११ पाण्याच्या जोराच्या प्रवाहानें जमिनींत पडलेला चर; (किनाऱ्यावरील) लाटेची खूण. १२ (सामा.) बंधारा. १३ टोंक. १४ (बा.) आंब्याची आढी. [सं. पालि. तुल० का. पाळि=रांग] **०पट्टी**-स्त्री. सारा माफ असलेल्या जमीनीवर घेण्यांत येणारा एक कर. **०भार**-पु १ धान्याची झोडपणी संपल्यानंतर महारास देण्यासाठीं पाळ मोडून कडबा, सरम इ०काचा केलेला भारा किंवा गड्डा. २ (कांहीं प्रांतांत) शेतकऱ्याकडून पाटील किंवा जहागीरदार यांनीं घेतलेलें गूड किंवा न झोडपलेल्या कणसांचा गट्ठा किंवा भारा.

**पाळ**—वि. १ कराची माफी असलेलें (जनावर इ०). 'चार म्हशी पाळ आहेत.' २ कोणेकाची वेठ बिगार पडेल ती करून त्याचे जागेंत घर बांधून पण घराचा कर न देता रहातें असें (कूळ); ज्याला कर, सारा इ० कांहीं द्यावें लागत नाहीं असा (मनुष्य, कुटुंब इ०). ३ माफ; मुक्त (कर, देणें इ०). 'करदेणें पाळ आहे.' पाल पहा.

**पाळ**—न (गो.) लांकूड इ० तोडण्याचें एक हत्यार. याचा तोडण्याचा भाग कोयत्यासारखा असून याला कुऱ्हाडीसारखा दांडा घातलेला असतो.

**पाळ**—पु. १ धनगर इ०च्या ताब्यांतील, त्यानें पाळलेला कळप. २ पाळलेली वस्तु, माणूस इ० -वि. (प्र) पालन; रक्षण करणारा; बाळगणारा; जोपासना करणारा; पालनकर्ता. 'झळाळिआं देवांचा पाळा।' -शिशु १५५. 'ताडी कपाळ पाळ क्षितिचा खेदा धरूनि ह्या हातें।' -मोमंभा १६३. (समासांत) भूपाळ-लोकपाळ इ० 'या उपरी राक्षसपाळ। सीते जवळी बोले अमंगळ।' -रावि २४.२६. [सं. पाल]

**पाळ, पाळक**—न. १ झाडाच्या मुळाची शाखा, फाटा; लहान मूळ; उपमूळ; कुडी. 'मुळांच्या प्रत्येक पाळाचे शेवटीं एक जाळें असतें.' -मराठी सहावें पुस्तक पृ. २२७ (१८७५). २ (ल.) वस्तूंची अस्ताव्यस्त, विखुरलेली, पसरलेली स्थिति. (क्रि० घालणें; मांडणें; पसरणें; पडणें). **पाळेंपाळें-पाळेंमुळें खणून टाकणें**-पूर्ण नाश करणें; विध्वंस करणें.

**पाळक**—वि. पाळ पहा. [सं. पालक] **०पुत्र-बेटा**-पु. पुत्र म्हणून बाळगलेला दुसऱ्याचा मुलगा. **०बेटी**-स्त्री. कन्या म्हणून बाळगलेली दुसऱ्याची मुलगी. **०लेक**-पुस्त्रीन बाळगलेला मुलगा, मुलगी किंवा मूल.

**पाळक**—पु. १ (ख्रि.) मेषपाल. २ (ल.) ख्रिस्ताच्या मंडळीला पाळणारा. ३ धार्मिकदृष्ट्या मंडळीची सेवा करणारा. (इं) पास्टर. 'पाळक प्रतिनिधि येशूचा। बंधु सखा निजसंघाचा।' -उसं ५८९ 'त्यांपैकीं एकजण स्काटलंडास जाऊन विशेष विद्याभ्यास करून पाळकाची दीक्षा पाऊन तेथेंच राहिला.' -अरुणोदय ६६. [सं. पालक]

**पाळका**—पु. उंसाच्या चरकास जुंपलेल्या बैलांना हांकणारा. -कृषि ४७३. [सं. पालक; म पाळक]

**पाळग्रहण**—न. पालन; सांभाळ; संगोपन करणें; पोषण करणें; बाळगणें; वाढविणें. 'ज्याजकडे त्यांच्या पाळग्रहणाचा अधिकार आहे त्यांनीं त्यास उद्योगी मनुष्य करण्यास झटावें.'–व्यनि ८७ [पालन+ग्रहण]

**पाळजी**—स्त्री. (बे) जोंधळा कापल्यानंतर कापलेल्या सडांतून फुटलेला कोंब, धुमारा. पळंजी पहा.

**पाळण-लन**—न. १ रक्षण; सांभाळ; पालनपोषण. २ शपथ, वचन, आश्वासन इ० प्रमाणें वागणें; पाळणें; उल्लंघन न करणें ३ (व्रत, नियम इ०) पाळणें; आचरणें; अनुसरणें. [सं. पालन] ०**पोषण**–न. संगोपन. संवर्धन; रक्षण, पोषण इ०; वाढविणें. ०**वाला**–पु. (काव्य) जो एखाद्याचें पालन, पोषण, रक्षण, संगोपन इ० करतो तो, पालनकर्ता. 'धर्माचा पालनवाला तो शिवाजी राजा झाला।'–गोविंदकवि [हिं.]

**पाळणा**—पु. १ लहान मुलाला निजवून झोंके देण्याच्या सोयीचा, लाकूड इ० चा एक प्रकारचा झोंपाळा; पालख, झोला. 'पाळणा लावोनि आनंदें। हालवीतसे।'–कथा १.४.१२४. २ जत्रा इ०त उभें केलेलें, रहाटाप्रमाणें फिरणारें पाळणे लावलेलें एक खेळणें. रहाटपाळणा पहा. ३ मुलाला पाळण्यांत निजवून स्त्रिया जीं कृष्णाच्या बाललीलांचीं गाणीं म्हणतात तीं प्रत्येक; देवाच्या जन्मोत्सवाच्या दिवशीं हरिदास असे पाळणे म्हणतात. यांच्या शेवटीं जो जो, जोजोरे, अशा तऱ्हेचीं पालुपदें असतात (क्रि० गाणें; म्हणणें). 'ऐशा रीति विश्वजननी। पाळणा गातसे तये क्षणीं।' ४ मूल होण्याची पाळी; बाळंतपण; वेत. 'तिचा दोन वर्षांचा पाळणा आहे.' ५ (व.) गाडीचा साटा. [सं पालन; सिं.पाल्णो] **पाळणा हलणें**–१ लहान, तान्हें मूल होत असणें. २ (ल) कुटुंबवत्सल, पोरेंबाळें असणें. 'आतां कुठं आमचे पाळणे हलायला लागलेत म्हणून काळजी करायची!' 'पाळणे हलत असणाऱ्यांनीं स्वैर वागून चालणार नाहीं.' **पाळणेरहाट**–पु. (विरू.) रहाटपाळणा पहा. **पाळण्यांतलें नांव**–न. १ मुलाच्या जन्मनक्षत्रावरून ठेविलेलें नांव. २ बारशाच्या दिवशीं ठेवलेलें नांव. जन्मनाम पहा.

**पाळणूक**—स्त्री. पालनपोषण; संगोपन; पाळण्याची क्रिया. [पालन]

**पाळणूक-णुक**—स्त्री. कर, सारा इ० सरकारी देण्यासंबंधीं माफी 'पाळणुक देशमुख व देशपांडिये यांच्या शिरस्तियाप्रमाणें चालवणें कलम?'–वाडशाछ १४२. [पाळ]

**पाळणें**—न. (विरू.) पाळणा पहा.

**पाळणें**—सक्रि १ मनुष्य, जनावर, पक्षी इ० ना खाऊंपिऊं घालून त्यांचें संरक्षण व संगोपन करणें; बाळगणें; वाढविणें; रक्षण करणें. 'म्हणौनि गा सुमती। जे कुमनोरथां पाळिती।'–ज्ञा १६.३७२ २ (ल.) (कांहीं व्रत, नियम, आचार इ०) आचरणें, अनुसरणें; प्रतिज्ञेप्रमाणें वागणें. ३ आज्ञा इ० मानणें. ४ (धर्म, कायदा इ०चें) रक्षण करणें; राखणें. –अक्रि. (अन्न, पाणी, औषध इ०) मानवणें; हितकर होणें. 'हें जल पाणी तुम्हास पाळणार नाहीं.' [सं. पाल्=रक्षण करणें; पालन]

**पाळत-थ**—स्त्री. १ (दुसऱ्याच्या हालचालीवर असलेली) बारीक नजर; गुप्त देखरेख. 'ते त्याचे पाळतीवर आहेत.' २ (चोरी वगैरे शोधून काढण्यासाठीं काढलेला) माग; सुगावा काढणें, शोध; तलास. 'गोरक्षापाशीं शीघ्र येऊन। म्हणे तूं माय माझें न देशील धन। तूं कोण कोणाचा येऊन। पाळतीनें मिरवसी।'–नव २३.८१. 'गावांत दरोडा पडला असतां गावचा रामोसी पाळत लावून देतो.' ३ (एखाद्यानें पळून जाण्याच्या किंवा चोरी करण्याच्या हेतूनें त्यावर) लक्ष ठेवणें; चोरून किंवा लपून पाहणें; डोळा ठेवणें (क्रि० घेणें; लावणें; काढणें; राखणें; ठेवणें). 'त्यांनीं पाळत ठेवली आणि घर मारलें.' ३ रक्षण; जतन; पालन –हंको –शर [पाळणें] **पाळतीवर असणें**–एखाद्यास कळूं न देतां त्याच्या हालचालीवर गुप्तपणें नजर ठेवणें. 'ते म्हणाले–अहमद, तूं माझ्या पाळतीवर आहेस कीं काय?'–उषःकाल.

**पाळतणें**—अक्रि. पाळत ठेवून असणें; टपून बसणें. 'चाले झडझडां उसंतूनी वाट। पाहे पाळतूनी उभा तोचि नीट वो।' –तुगा ११२. 'चोरें पाळतीले घालण पाहोनी।'–रामदासी २.१३१. [पाळत]

**पाळतव(वि)णें**—उक्रि. (कु.) एखाद्याच्या हालचाली गुप्तपणें जाणणें; पाळत ठेवणें; टेहळणी करणें; सुगावा काढणें. पाळतणें पहा. [पाळत]

**पाळती-थी**—स्त्री. १ क्षेम; रक्षण; जतन; बाळगण. 'जिये पदवीचेनि पोषकें। ते मातें यथासुखें। हे पाळती मज विशेखें। आवडे करूं।'–ज्ञा १०.१३६. २ बातमी; शोध; तलास. पाळत पहा. 'कां रे न सांगा आम्हांस। पाळती तुमच्या गृहींची।'–ह ७.१२१. –वि पाळत ठेवणारा; दुसऱ्याच्या हालचालीवर गुप्तपणें लक्ष ठेवणारा; गुप्तहेर. 'पाळती येवोनियां तेथ। शुद्धी सांगती वालीसी।'–भारा किष्किंधा ५.३. [पाळत] ०**पाहणें-घेणें**–पाळत ठेवणें; शोध घेणें; तपास काढणें. 'मी विप्र होऊनि त्वरित। पाळती घेतों गोकुळीं।'–ह ४.११०.

**पाळद**—पाळत पहा. 'दोन डोळे एकमेकांशीं भिडले कीं तिसऱ्या डोळ्याची पाळद तेथें आहेच म्हणून समजावें.'–मानाप ८.

**पाळंद**—स्त्री. १ शेतांतील वाट; गल्ली. पाणद, पाणंद इ० पहा. २ डोंगर चढावयाची फरसबंदी वाट; घाटी.

**पाळंदिवड**—स्त्रीन. पाण्यांत राहणारा एक निर्विष साप. [पाणी+दिवड]

**पाळला**—पु. (कों.) लांकूड तोडण्याचें एक हत्यार. पाळ पहा.

**पाळवी**—वि. (गो.) सहाय्यक; मदत करणारा; मदतनीस. [सं पालय]

**पाळा**—पु. झाडाच्या बारीक फांद्या वगैरे तोडण्याचा एक लहान कोयता; पाळ. पाळला पहा.

**पाळा**—पु. १ (काव्य) पाळ; वेढा; गरका; घेर; गराडा; कडें. 'त्याभोंवता मिळाला वीरांचा रण पहावया पाळा।' –मोकर्ण १४.२०. 'हातीं घेऊनी घनसांवळा। व्रजांगना धरिती पाळा।' 'उंच तरी मर्यादेवेगळा। भूमीमधें सहस्र सोळा। तया भोंवता वेष्टित पाळा। लोकालोक पर्वताचा।' –दा ४.१०.६ 'मिळे पांडुचा त्या सभोंवता पाळा।' –मोकर्ण ३१.१०. २ समूह; समुदाय; थवा; टोळी; मेळा. 'तरी कंदर्पाचेनि बळें। इंद्रियें वृत्तीचेनि मेळे। विभाडूनि येती पाळे। विषयांचे।' –ज्ञा १३.८४. –शिली १३.७. 'लोटला पौरजांचा पाळा। नेत्रीं उदकें डळडळां।' –मुवन (नवनीत पृ. १९२). 'तिजजवळि सख्यांचा बैसला थोर पाळा।' –सारुह ३.६७. 'भूतांचे पाळे अपार। मंदराचळीं मिळाले।' ३ कळप; तांडा; थवा. 'जैसे गुराचे पाळे बहुत। एक गुराखी राखीत।' 'विठू माझा लेकुरवाळा। संगे लेकूरांचा पाळा।' –ब ५४६. ४ पदार्थांची अस्ताव्यस्त स्थिति; पसारा. (क्रि॰ घालणें; मांडणें; पसरणें; पाडणें; पडणें). ५ (ल.) आसन; पीठ; बैठक. 'कीं सत्वगुणी विद्युल्लता। पाळा मांडिला शरीराधरता।' –नव ११.१२१. ६ बंधन; वेष्टन. 'घालूं पाळा अविवेका।' –दावि २५९. [सं. पालि; म. पाळ]

**पाळा**—पु. (कु.) आज्ञापालन; आज्ञा, वचन इ॰ पूर्ण करणें. [पाळणें]

**पाळा**—पु. (कों.) समुद्रांतील एक तांबूस लहान मासा.

**पॉळों**—पु. १ (गो.) भाकरी. २ (गो.) लहान गोधडी.

**पाळाइणें, पाळांतणें**—सक्रि. (महानु.) १ टेहेळणें; पाळत ठेवणें. 'आनंदे पाळांति श्रीमूर्तितें।' –दाव १८८. २ न्याहाळणें; अवलोकणें. 'मग पाळाइलें वत्सगोपाळांतें।' –दाव ३३९. [पाळत]

**पाळावणें**—अक्रि. मुळें येणें; मुळया फुटणें. [पाळ=मूळ]

**पाळि(ळीं)गण–न**—पुन. १ सांठवण. –हेको. २ समूह; समुदाय. पालिंग–न पहा. 'घालोनिया आसनें। देव भेटता जरी ध्यानें। तरी बकाचीं पाळींगणें। कां पां तत्क्षणें नुद्धरती।' –एभा ५.११६. [पाळ+गण]

**पाळिंगा**—पु. थवा; तांडा.

शको. ५. १९

**पाळिग्रहण**—न. (प्र) पाळग्रहण पहा.

**पाळिजणें**—न फांकणें; पसरणें; पालेजणें पहा. –हंको.

**पाळित**—वि. पाळलेला; पाल्य. (ई.) वार्ड. [सं. पालित]

**पाळी**—स्त्री. १ खेप; क्रम; फेरा; बारी. २ नांगराचा किंवा कुळवाचा फेरा. (क्रि॰ घालणें). 'क्रमें कुळवणी। न लगे धर्मपाळी।' –तुगा ३६० 'मी आपलें शेत पाळी घालून तयार केलें आहे.' ४ भोग; क्रमप्राप्त अवसर; प्रसंग 'मी आज छत्री आणली नाहीं म्हणून फजीतीची पाळी दिसते.' ५ (ल) स्त्रियांच्या मासिक रजःस्रावाची खेप; विटाळसपण. **पाळी टळणें–चुकणें**–गरोदर राहणें; विटाळशी बसण्याची मासिक पाळी बंद होणें; दिवस जाणें. 'पाळी केव्हां टळली होती.' –निचं १३.९३.

**पाळी**—स्त्री. कानाच्या खालच्या टोंकाचा भाग; चापा. 'तव कर्णाची निर्भय धरुनी पाळी।' –विक ९१. [सं. पालि]

**पाळी**—स्त्री. शिक्षण. 'गृहधर्माची कुतुकें दे तो भगवान् विरक्त परि पाळी।' –मोआदि ११.५४. [सं. पाल्]

**पाळी**—स्त्री. १ पाट; ओटा; उंचवटा. 'अधरी प्रवाळ पाळी।' –दावि १५४. २ दंड किंवा जोर काढतांना ज्यावर हात टेकतात तो ठोकळा; हत्ता. –संव्या ६१. [पाळा]

**पाळी**—स्त्री. (काव्य) १ (सैन्य, झाडें, भिंत, कुंपण इ॰ चा) वेढा; गरका; समूह; समुदाय 'होळकराची फिरती पाळी।' –ऐपो २२४. २ बांध; काठ; कड 'वर्म्रे ठेवोनिया पाळीं। जळीं नभे निघालिया।' –कथा १.५६ –क्रिवि. भोंवतालीं; आसपास; सभोंवार. [सं. पालि]

**पाळीव**—वि. १ पाळलेला; बाळगलेला; वाढविलेला. २ माणसांच्या वस्तींत राहणारा; रानटी नव्हे असा (कुत्रा, बैल इ॰ जनावर). [पाळणें] ०**बकरा**–पु. (ल) सांगितलेलें काम कशाचीहि पर्वा न करतां करणारा.

**पाळुं–ळूं**—न. (काव्य) जात्याच्या तोंडाची उंच कड; पाळ; पाळें.

**पाळूक**—न. गोगलगाय; पिकूळ; शंबूक. [सं. पल्लिका]

**पाळें**—न. १ जात्याच्या तोंडाची उंच कड; पाळ; पाळूं. २ (तिखट, मीठ इ॰ ठेवण्यासाठीं केलेलें) लांकडाचें भांडें; लांकडी. वाडगा. 'जें कां खरकटलें पाळें। अत्यंत गोंगाणीं गोंगाइलें।' –एरुस्व १८.४३. ३ झाडाच्या बुडाशीं पाणी घालण्यासाठीं केलेला खळगा; आळें. ४ डोंगराळ प्रदेशांतील सखल जमीन; दरी. 'खंडाळ्याच्या घाटांत फारच भयंकर पाळीं आहेत.' ५ तळें, डबकें इत्यादिकांच्या आंतील जागा; अवकाश. ६ (राजा.) मुशीच्या तोंडावरचें झांकण. ७ कोठे किंवा खण असलेला पानसुपारीच्या डब्याचा भाग. ८ समूह; समुदाय; मेळा. 'राजा मारिशि व्याघ्र

पाळें। हरुनि जनदुःख।'-रत्नकांता १७. ९ सांठा; आश्रय. 'तया ईश्वरें जो दयेचेंच पाळें।' -विवि ८.३.५९. [सं. पालि] ०पडगें-न. (व्यापक) ताटवाटया, भांडींकुंडीं वगैरे संसारोपयोगी जिनसा. ०गण-पु. (महानु.) समूह; समुदाय. 'ऐसें असोस पाळेगण। यादवांचें।' -शिशु ५४४. [पाळ]

**पाळेकर-करी**—पु पाळेगार पहा. 'पळाले पुंड पाळेकर।' -ऐपो २७३.

**पाळेगार**—पु. डोंगराळ प्रदेशांत राहणारा कर्नाटक प्रांतांतील लुटारू व बंडखोर लोकांचा मुख्य;बंडखोर सरदार. हे प्राचीन काळीं महालकरी अधिकारी असत; पुढें मुसल्मानी अंमलांत स्वतंत्र वागणारे जहागीरदार बनले. [पाळें=दरी+गार प्रत्यय; तुल० का. पालेय=वस्ती, गांव; तळ (पल्ली म. पाली=गाव तळ)] ०गारी-स्त्री.पाळेगाराचा धंदा. 'समशेरबहाद्दर यांनीं झाडींत राहून पाळेगारी करून मुलूख मारावा.' -मराचिथोरा ५४. 'त्या प्रांतांत जाऊन पाळेगारीनें मुलूख मारून, चौथ सरदेशमुखी घांसदाणा अंमल बसवून राहतो.' -स्वप २३२.

**पाळूठा**—पु. (वे.) लांकूड तोडण्याचा विळा. पाळ, पाळा पहा.

**पाक्षिक**—न. पंधरा दिवसांनीं प्रसिद्ध होणारें वृत्तपत्र; नियतकालिक इ० -वि. १ पंधरवड्याचें, पक्ष पहा. २ (लढा, वादविवाद, धर्म इ०तील) बाजू, तड, पंथ, प्रकार इ०चा असणारा; पक्षाचा. [पक्ष]

**पाख्या**—स्त्रीअव (खा) दाणे काढलेलीं कणसें. -भाग्रे ७.१.४.

**पिक**—पु कोकिळ पक्षी. 'आम्रा त्या पिक सेवितां सम समां संयोग कीं जाहला।' -कृष्णशास्त्री चिपळूणकरकृत अन्योक्ति (मराठी ७ वें पुस्तक). 'परी पिकचि एकला मधुर वाणि लाधे कृती।' -कोकिलान्योक्ति (मराठी ६ वें पुस्तक पृ. १२४ स. १८९६). [सं.]

**पि(पिं)क**—स्त्री. (तंबाखू किंवा विडा वगैरे खाल्ल्यानंतर) तोंडांतून टाकलेली किंवा टाकावयाची थुंकी. (क्रि० मारणें; टाकणें; सोडणें). [हिं. पिक] ०दाणी-नी-स्त्री. तस्त; विड्याची किंवा तंबाखूची थुंकी थुंकण्याचें एक विवक्षित आकाराचें भांडें. [पिक्दिनी-पिकदाणी-भा. अ. १८३४; हिं. पिक+फा. दान] ०दान-न. पिकदाणी पहा. 'पिकदानें उर्ध्वमुखें। तांबूलपात्रें अतिसुरेखें।' -ह ३४.१५८. [हिं] ०धरणी-स्त्री. पिकदाणी. 'तांबुलाची पिकधरणी। ते मी असें मुख पसरूनी।' -तुगा १७४६. ०पात्र-न. पिकदाणी. 'मृदुमवाळ वोटिंगणें पिकपात्रें झळकती।' -मुआदि ४८.१७. पिकणें-न. गुळणा; पाण्याची चूळ. पि(पिं)की-स्त्री. थुंकी पिंक पहा.

**पिक**—न. १ शेतांतील धान्य. २ (ल.) फळ. 'आणि कृष्णस्नेहाचें पिक.' -ज्ञा ४९. [पीक] ०दाव-राड-वाड,

**पिकलें**-पुस्त्रीन. १ पिकाचा हंगाम, सुगी. २ शेतांतील पीक' [पीक] **पिकावळ**-स्त्री. (कु.) शेतांतील पीक. [पीक+आवली] **पिकाळ**-वि. (गो.) सुपीक पीक देणारी (जमीन).

**पिकट**—वि. १ फिकट; निस्तेज. २ पिकूट; पिवळसर; पिकटलेलें.

**पिकटणें, पिकुटणें**—अक्रि. फिके होणें; निस्तेज होणें; पिवळसर होणें (रोगामुळें माणसाचें शरीर, झाडाचें पान इ०) [पिकणें] **पिकटाण**-स्त्री. (राजा.) पिकलेल्या फळांचा वास (विशेषतः फणसाचा, केळ्यांचा). [पिकणें+घाण] **पिकटी**-स्त्री. (राजा.) आजारीपणांत शरीरावर व चेहऱ्यावर आलेला फिकटपणा. [पिकणें]

**पिकणें**—अक्रि. १ पक्व होणें; पूर्णावस्थेस जाणें. २ (अक्षरशः व ल.) टवटवीतपणा, तजेला, गर्दपणा वगैरे नाहींसा होणें. ३ उत्पन्न होणें (पीक वगैरे) 'बिघ्यास दहा मण भात पिकतें.' ४ (बातमी, वदंता इ०). प्रसृत होणें; पसरणें. ५ (सोंगट्यांचा खेळ) सोंगटी सर्व पट फिरून घरांत जाऊन बसणें. ६ उत्कर्ष, भरभराट होणें; एखाद्याचा धंदा, योजना, बेत यशस्वी होणें. ७ (पोटांत) गर्भ वाढणें; पोट पिकणें. ८ चंगळ, चैन होणें. ९ फलद्रूप होणें. 'तैसा युक्तिमंतु कौतुकें। अभ्यासाचिया मोहरा ठाके। आणि आत्मसिद्धीचि पिके अनुभवु तयाचा।' -ज्ञा ६.३५५. [सं. पच्] म्ह० पिकल्यावाचून गावांत विकत नाहीं. (वाप्र.) **पिकलें झाड**-(ल.) अतिशय श्रीमंत व उदार मनुष्य; पुष्कळ मिळकत होणारा धंदा, उद्योग. म्ह० पिकल्या झाडावर धोंडा कोणीहि टाकील. **पिकल्या झाडाखालीं उपाशी मरायाचा किंवा मरणारा**-अतिशय आळशी मनुष्यास उद्देशून योजावयाचा वाक्प्रचार. **पिकलें पान**-अतिशय वृद्ध मनुष्य. 'आम्ही म्हातारीं पिकलीं पानें झालों आहोंत.' -नामना १३१. **पिकलेलें शेणखत**-न. कुजलेलें, नासलेलें, उपयोगास योग्य झालेलें शेणाचें खत. **कौल पिकणें**-एखाद्या गोष्टीस भर येणें; मनासारखी गोष्ट होणें; इच्छिलेली वस्तु प्राप्त होणें. 'लाभा नाहीं उणें पिकला कौल.' -निगा ३२५.

**पिकं(कां)द्दर, पिकं(कां)खोर**—न. एका बाजूस टोक व एका बाजूस चपटा भाग असून त्यास धार असलेलें एक हत्यार; पिकाव; टिकाव; कुदळी. [इं. पिक ॲक्स]

**पिकर-स**—पु. (विणकाम) धावत्या धोटयाच्या मार्गांतील धोटयास गति देणारा ठोकळा. [इं. पिक्=उचलणें]

**पिकला**—वि. पिकलेला; पक्व. [पिकणें]

**पिकवण**—न. १ फळें पिकविण्यासाठीं लागणारें गवत, पेंढा वगैरे. २ गळूं वगैरे पिकविण्यासाठीं त्यावर बांधावयाचें पोटीस, लेप वगैरे. [पिकविणें]

**पिकविणें**—सक्रि. १ परिपक्व करणें (धान्य, फळें इ०); पिकण्यास लावणें. २ (बातमी, कंडी) पसरविणें; प्रसृत करणें. 'त्यानें कोणची बातमी खीसेनेंत पिकविली?' -बाय ४.३. ३ चोप देणें; झोडपणें; जोराचा मार देणें; बडविणें. ४ उत्पन्न करणें. 'ईतें गाउनि तरतो सुज्ञान मनांत हरिकथा पिकवी।' -मोमंभा २.९९. ५ सांगणें; प्रसिद्ध करणें. 'श्रीभूतिजयनयांतें ज्याची सर्वत्र गुणकथा पिकवी।' -मोभीष्म ११.४६. -मोउद्योग ११.१५. [सं. पच्]

**पिकळी, पिकु(कू)ळ**—स्त्री. गोगलगाय; शंबूक. [दे.]

**पिका**—वि. पिकलेला; परिपक्व झालेला. [सं. पक्व; प्रा.पिक्क; पोतु. जि. पेक]

**पिकाऊ**—वि. १ पिकण्याच्या स्थितीस आलेला; पिकावयास झालेला. २ सुपीक (जमीन). [पिकणें]

**पिंकाणी**—स्त्री. केळीच्या पानाची गुंडाळी करून, आंब्याची कोय घासून, कागद वगैरे गुंडाळून केलेलें वाजविण्याचें मुलांचें खेळणें; पिंपाणी. [ध्व.]

**पिकाव**—न. (व्हट.) टिकाव; कुदळी. पिकंदर पहा.

**पिकास**—न. (गो.) मोठें पिकंदर; पिकाव.

**पिकूट**—वि. फिक्कट; निस्तेज (वस्त्र, रंग, चेहरा इ०). [सं. स्फट्? म. पिकणें]

**पिकेटिंग**—न. दारू पिणें, विलायती कापड वापरणें इ० सारखी एखादी अनिष्ट गोष्ट करणाऱ्या इसमास सविनय प्रतिबंध करणें; तसें न करण्याविषयीं त्याची समजूत घालणें; निरोधन. 'त्यांनीं चक्क ताडीचे व दारूचे अड्डे दाखवून पिकेटिंगचे सीन दाखविले होते.'-नाकु ३.१६. 'पिकेटिंगमध्यें सारासार विचार चालवावा.' -के १७.६.३०. [इं. पिकेट]

**पिको**—पु. पोल्कीं वगैरे करितां वापरतात ते कलाबतूचे कांठ.

**पिक्कोटा**—पु. विहीर अथवा पाण्याचा झरा, डबकें यांतून पिकास पाणी देण्याचें साधन. ओक्ती पहा.

**पिक्कल**—न. एक माप, वजन, ५३२० सुर्ती रुपये भार. 'पिक्कलचें वजन ५३२० सुर्ती रुपये भार असतें.' -मुंव्या १०५.

**पिख(खु)रणें**—उक्रि. अस्ताव्यस्त करणें, टाकणें (केंस वगैरे); अव्यस्थित होणें, पसरणें, असणें; पिस्कारणें; विखुरणें. [सं. विकॄ]

**पिखोली**—स्त्री. (ना.) एक प्रकारचें फुलपाखरूं.

**पिंगट**—वि. १ पिवळट; पिवळसर; फिकट. २ पिंगूळ किड्याची घाण येत असलेला. [सं. पिंग]

**पिंगटणें**—अक्रि. १ पिंगट होणें; पिवळट होणें; सडून पिवळें होणें. 'पिकें आतवी पिंगटली गे।' -दावि २५२. २ पिंगूळ किड्याच्या घाणीप्रमाणें घाण, दुर्गंधि सुटणें. [सं. पिंग]

**पिंगल**—न. साठ संवत्सरांतील एकावन्नावें संवत्सर. [सं.]

**पिंगला-ळा**—स्त्री. (योग.) उजव्या नाकपुडींतून वाहणारी एक श्वासनाडी. 'इडा पिंगळा एकवटती.' -ज्ञा ६.२४४. -एभा १४.२२२. [सं.]

**पिंगवी**—स्त्री. कांगणी; कांगोणी; एक वनस्पति **पिंगवें**-न. कांगोणीचें बी. **पिंगवेल**-न. पिंगवीच्या बियापासून काढलेलें तेल; कांगणेल; कांगणीचें तेल. [पिंगवें+तेल]

**पिंगळ-ळा, पिंगूळ**—पु. १ एक प्रकारची दुर्गंधि सोडणारा एक किडा. (ल.) २ कांहीं तरी बीभत्स किंवा अभद्र बोलणाऱ्या इसमास योजितात. [सं. पिंगल] **०पाद्णें**-(ल.) अमंगळ, अचकटविचकट, बीभत्स बोलणें.

**पिंगळ**—पु. भोंवरा; गुंतागुंत; भ्रमाचें आवरण. 'खेळ मोडा पिंगळ तोडा। म्हातारीचें डोचकें फोडा।' -दावि २३१.

**पिंगळ(ळा), पिंगा**—वि. पिंगट; पिवळट; फिकट. 'तेथेंचि कृष्णमेघाचिया दाटी। माजीं कल्पांतविजूचिया स्फुटी। तैसिया वन्हि पिंगळा दिठी। भ्रूभंगातळीं।' -ज्ञा ११.२०४. [सं. पिंगल]

**पिंगळा**—पु. १ अंगावर लहान ठिपके असलेलें एका जातीचें घुबड. 'सिंक पिंगळा आणि पाली। वोखटें होला काक कलाली।' -दा ३.७.५८. 'जसा पिंगळा गिजबिजला नाना शब्द बोले लोकांला।' -ऐपो १६२. २ डमरू किंवा कुडबुडें वाजवून पहाटेच्या वेळीं भिक्षा मागणारा एक भिक्षेकरी. 'पिंगळा माहाद्वारीं। बोली बोलतो देखा। डौर फिरवीतो डुगडुग ऐका।' -भज ४४. [सं. पिंगला] **पिंगळा जोशी**-पु. नेहमीं भविष्यासंबंधीं चांगल्या गोष्टी सांगणारा ज्योतिषी; कुडबुड्या जोशी.

**पिंगळा**—स्त्री. एक नाडी. पिंगला पहा.

**पिंगळी**—स्त्री. वाचा; वाणी; बोलणें; भाषण. 'होम करितो हें वीरपिंगळी। वदली बिभीषणाची।' -कृमुरा ४१.५.

**पिंगळी**—पु. (गो.) कुडबुड्या जोशी; पिंगळा.

**पिंगा, पिंगारा**—पु. लहान मुलींचा (विवक्षित तऱ्हेनें आवाज करून खेळण्याचा) एक खेळ. (क्रि० घालणें). 'पिंगा म्हणिजे पिलंगोनि भिरभिरियाचे परी। फिराविसी माज मान तरि तुम्ही थोरी।' -निगा ९२. 'नका घालूं पिंगा गे। तुम्ही रामरंगी रंगा गे।' -एकनाथ २. (ल.) जागचे जागीं भ्रमण करणें; भ्रमंती; बखेड्याचा, घोटाळ्याचा कारभार. [सं. पिंज्=आवाज करणें]

**पिंगाणें**—न. दिव्याच्या भोंवती घिरट्या घालणारा, एक पंख असलेला किडा; पतंग. फुलपाखरूं. कु. पिंगाणां. [ध्व.]

**पिंगाळें**—न. (वे.) लहान पितळी, परात.

**पिंगाक्षी**—पु. वानर; माकड 'सावें फळा तैं अकस्मात। उडोनि पिंगाक्षी पातला।' -दावि २६१ [सं. पिंग+अक्षिन्]

**पिंगी, पिंगें, पिंगेल**—एक वनस्पति. (विल.) पिंगवी, पिंगवें, पिंगवेल पहा.

**पिंगुटणें**—अक्रि. पिंगटणें पहा.

**पिंगुळ**—पु. (गो.) काथा.

**पिंगूट**—वि पिंगट पहा.

**पिंगूळ**—पु. पिंगळ पहा.

**पिंगूळवेल**—पुस्त्री. एक जातीचा वेल. पुंगळवेल पहा.

**पिघळणें**—अक्रि (प्रां.) १ पघळणें. २ वितळणें; पातळ होणें. [ गुज. पिगळवुं; हिं. पिघलना ]

**पिचकन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. (थुंकी, पिचकारी, रक्त इ०ची) चिपळी उडतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. [ ध्व. ]

**पिचकट**—वि. १ चीर पडलेला; किंचित् फुटका; तडकलेला; पिचका. २ ज्याच्या डोळयाच्या काचेला (बुबुळाभोंवतालच्या भागास) चीर पडली आहे असा; मिचमिचा. [ सं. पिच्चट= नेत्ररोग ]

**पिचकणें**—अक्रि फुटणें; तुटणें; भंगणें. -सक्रि. (ना.) जोरानें दाबणें. [ पेचणें ]

**पिचकळी**—स्त्री. पिंक, थुंकी वगैरेची टाकलेली पिचकारी; गुळणा. [ ध्व. ]

**पिचका**—वि. १ पिचलेला; चीर, भेग, तडा पडलेला. २ ज्यास नेहमीं पाणी येतें व जो अर्धवट उघडा असतो अशा डोळयाबद्दल किंवा अशा डोळयाच्या मनुष्याबद्दल योजितात ३ ज्याचे अंगीं इष्ट कामापुरतें सामर्थ्य नाहीं असा इसम; पादरफुसका. [ ध्व. का. पिच्चु ] (वाप्र.) **पिचक्या डोळयाचा**-वि अर्धवट मिटलेल्या डोळयाचा.

**पिचकाट**—स्त्री. (ना.) नसती क्याद; शुष्ककाष्ठ; कटकट. [ पेंच ]

**पिचकारी**—स्त्री. १ (मागील बाजूस दट्टयानें दाबून) रंग, औषध वगैरे उडविण्याची नळी; चिपनळी. २ (रक्त, रस, पाणी इ०चा) जोरांत उडणारा फवारा. [ सं. अपरिकरी-पिसकरी-पिचकरी-पिचकारी. -भाअ १८३२; हिं.; ध्व. ]

**पिचकुडा**—वि. (विरू.) पिचका पहा.

**पिचको**—पु (व.) शिजवून तयार केलेलें निरुपयोगी मिश्रण; खराब झालेले अन्नादिक पदार्थ. 'शिरा तयार करावयाला तिला सांगितलें तर तिनें हें करून ठेविलें कांहीं तरी पिचको.' [ सं. पच्; म. पिचणें ]

**पिचड**—न. (कों.) डोळयांतून येणारी घाण्‍पू; चिपड. [ चिपड वर्णव्यत्यास ]

**पिचडी**—स्त्री. (प्रां.) थुंकी; थुंकीची पिचकारी. 'जैसे बाभुळीचें खोड। गिरबडुनि जाती सरड। तैसें पिचडीं तोंड। सरकटिजेल।' -ज्ञा १३.५६१. [ पिक्; ध्व. ]

**पिचंड्या**—स्त्रीअव. (कु.) पाठीमागें वळवून हात बांधण्याची क्रिया. (विरू.) पिचुंडया पहा.

**पिचणें**—अक्रि. १ फुटणें (बांगडी, कांच, घट इ०); चीर, तडा, भेग पडणें; मोडणें. 'त्या बिचाऱ्याच्या बरगडया पिचून ...' -नाकु ३ २५. २ (तांदूळ वगैरे फार भिजविल्यामुळें) फुगणें; फुलणें; ठिसूळ होणें. ३ (हाड, शिंपा, चुनखडी इ० फार भाजल्यामुळें) उलणें. ४ तांदूळ वगैरे फार शिजल्यामुळें, गिचगिचीत, गोळा होणें; मऊ, चिकट होणें. ५ सडणें; कुजणें. 'तिला पश्चात्तापाच्या नरकांत पिचत टाकून बाजूला व्हावं हेंच बरं दिसतं.' -तोबं ६५. ६ दळणें. -शर. [ सं. पच् ; ध्व. पेचणें ] **पिचलेला चुना**-पु पाणी घातलेला, भिजविलेला, उमलविलेला चुना. **पिचून टाकणें**-मारहीणें करणें. **पिचूनपिचून**-क्रिवि हाल हाल करून.

**पिचणें**—सक्रि. (पत्ते वगैरे) पिसणें पहा.

**पिचनळी**—स्त्री. पिचकारी पहा.

**पिचपिच-पिचा**—क्रिवि. १ थुंकीची पिचकारी वारंवार टाकल्यामुळें होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन; दोरा, ठिसूळ पदार्थ एकसारखे फुटल्यातुटल्यामुळें होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. २ डोळयांची उघडझांप करून; डोळे मिचकावून. [ ध्व. ]

**पिचपिचणें**—अक्रि. १ (डोळे इ०ची) वरचेवर उघडझांक करणें; मिचकाविणें. २ पिचकारीप्रमाणें आवाज करणें; पिचपिच असा आवाज करणें. [ ध्व. ]

**पिचपिचीत**—वि. बारीक; मिचका; मिचमिचा; लुबलुका (डोळा, असे डोळे असलेला मनुष्य).

**पिचपीच**—क्रिवि. पिचपिच अर्थ १ पहा. [ ध्व. ]

**पिचबाही**—स्त्री. जाड भिंतीला असलेल्या दुहेरी चौकटीच्या दरवाज्याच्या आंतील बाजूच्या चौकटीच्या दोन्ही खांबापैकीं प्रत्येक. [ पिच्छा+बाही ]

**पिचर**—न. (कों.) पाथरवटाचें एक हत्यार.

**पिचला**—न. (भिल्ली) पिलूं. 'एक पिचलाम तें काय उनायों नेम.' =एका पिलानें तें कांहीं ऐकलें नाहीं. -भिल्ली ९.

**पिचवणें**—अक्रि. १ (कढत अन्न खाल्ल्यामुळें घशांत, पोटांत, उरांत) जळजळणें. २ (विरू.) (राजा.) पिचणें पहा. **पिचविलेला चुना**-पु. पिचलेला चुना पहा. [ ध्व. ]

**पिचाचा, पिचापीच**—क्रिवि. लवकर लवकर केलेल्या पिचपिच अशा मोठया आवाजानें. [ ध्व. ]

**पिचिक**—शब्द. (गो) थुंकी टाकतांना होणारा आवाज; पिचकन पहा. [ ध्व. ]

**पिछुं(चों)ड्या**—स्त्रीअव. पाठीमागें वळवून बांधलेले हात. •बांधणें-बांधून घेणें-लेख, पत्रें, करार इ० ज्या सहाय्यानें पूर्णपणें गुंतवून घेणें.

**पिचुमंद**—पु. कडु निंब. 'पिचुमंद नित्य सेविल्या वेख। त्यासि बाधीना कोणी विख।' -एभा १५.२०६. 'धुंद मंद मकरंद धुंद पिचुमंद बकुळवन खुलल्या खुली।' -राला ३२. [सं.]

**पिचूं**—न. १ (कु.) खेळाची लहान गोटी. २ (कु.) माशाचें अगर कुत्रीचें लहान पोर [बच्चा?]

**पिचोंत्री**—स्त्री. (कों.) माडाच्या झाडास पानांच्या मधून मधून उपपर्णांप्रमाणें येणारी आवरणें.

**पिचोळी**—स्त्री. १ पिचकारी; पिचनळी. २ रक्त, रस, पाणी इ०ची जोराची धार; चिळकांडी. [ध्व.]

**पिच्छ**—पु. शेपूट. [सं.]

**पिच्छ**—न. १ पक्ष्याचें पीस २ मोराचा पिसारा. ३ कोंबड्याचा तुरा. [सं.]

**पिच्छल**—वि. १ ओलें चिंब; निसरडा; बुळबुळीत. 'स्वेदोदकें करुनि पिच्छल आंग बाई।' -विठ्ठल, रसमंजरी ३६. -अक्क ३. २ पक्ष्याच्या पिसासारखें [सं. पिच्छल, पिच्छिल]

**पिच्छा**—पु. १ पाठीकडचा, मागील बाजूचा भाग. २ मागच्या बाजूचा तुकडा (आंगरखा इ०चा). ३ एखाद्याच्या मागें लाविलेला तगादा; एखाद्याची एखाद्या कामासाठीं पाठ पुरविणें [सं. पश्चात्; गु. पिछो] (वाप्र.) **पिच्छा करणें**-बंदूक उडवितांना तिनें मागें धक्का देणें; मागें हटणें. **०घेणें-पुरविणें-धरणें**-नेट, निकड लावणें; पाठपुरावा करणें; नाद, छंद घेणें; पाठलाग करणें. **०सोडणें**-नाद सोडणें; मोकळें होणें. **पिच्छ्यास बसणें-लागणें**-पिच्छा पुरविणें. **पिच्छ्यावर असणें**-पिच्छा पुरविणें.

**पिच्छाविपाक**—पु. (रसा.)ज्या विपाकांत गोंद किंवा गोंदासारखीं द्रव्यें उत्पन्न होतात त्यास पिच्छाविपाक म्हणतात.

**पिच्छुंड्या**—स्त्रीअव. (विरू.) पिचुंड्या पहा. **पिच्छोंडे**-पुअव. (विरू.) पिचुंड्या पहा.

**पिछवा**—पु. बसावयाच्या जागीं ज्या वस्तूवर पाठ टेकली जाते त्या ठिकाणीं लाविलेलें भरजरीचें वस्त्र. 'वंवाकरितां मोठा पाट मांडण्यांत येतो व त्याचे मागें भरगच्ची पिछवा लाविला असतो.' -ऐरा ३४१. [पिच्छा]

**पिछवाडा**—पु. घराची मागची बाजू; परसूं. 'दोदो लक्षांचा एक वाडा। त्याच्या फोडोनिया कवाडा। मोकळा अवघा पिछवाडा।' -अफला २७. [हिं. पीछे=मागें असलेलें+वाडा=आंगण]

**पिछा**—पु. पिच्छा पहा. [हिं.]

**पिछाडा**—स्त्री. मागील भाग, बाजू. [हिं.]

**पिछाडी**—पु १ मागील भाग, बाजू. २ घोड्याचे मागील पाय. ३ पायबंद. ४ (सैन्य, घर इ०चा) मागील भाग. [हिं. पीछे] (वाप्र.) **०ड्या बांधणें**-हात मागें बांधणें; शिक्षेचा एक प्रकार. 'त्या दुष्टाच्या पिछाड्या बांधून इकडे घेऊन या.' -रत्न ७.१. **०मारणें**-लाथ मारणें; हल्ला करणें. [हिं.]

**पिछो(छों)डा**—पु मागील बाजूस हात बांधण्याची शिक्षा; पिचुंड्या पहा. 'टांगणें टिपऱ्या पिछोडे। बेडी मुधनाल कोल दंडे।' -दा ३ ७.६७. [हिं.]

**पिछोडी**—स्त्री. पिछोडा पहा. 'सावजभावें बांधोनि पिछोडी।' -दावि २११. [हिं.]

**पिंजकट-कर**—वि. सहज पिंजण्याजोगें; सहज तुटणारें; जीर्ण. [पिंजणें]

**पिंजका**—वि. पिंजकट पहा.

**पिंजट**—न. वरू, बांबू इ०ची काढलेली लहान कामटी.

**पिंजट**—वि. पिंजकट पहा.

**पिंजणावळ**—स्त्री. (कापूस इ०) पिंजण्याची मजुरी. [पिंजणें]

**पिंजणी**—स्त्री. १ (कापूस, लोंकर इ०) पिंजण्याची क्रिया. २ फुटणें, पिचणें, तुटणें इ० क्रिया. ३ पिंजण्याचें हत्यार. ४ (प्र.) पिंजरी; गाडीचा चांदवा, चवरडोल.

**पिंजणें**—उक्रि. १ धुणकणें; मोकळा करणें; (कापूस, लोंकर इ०) विंचरणें; (बांबू, वरू, काठी इ०स). चीर, भेग पडणें. २ उभा फाडणें (कापड, कागद इ०) [सं. पिंज्; सं पिंजा=कापूस हिं. पिंजना]

**पिंजणें**—अक्रि. १ शिणकणें; धमकणें; धुसधुसणें. २ (हाड अथवा हाडें) दुःखकारक रीतीनें शिवशिवणें; टसटसणें. ३ (सोनार धंदा) सोनें मुशीला चिकटणें. ४ (ल.) तटाटणें. 'गौळी म्हणती पिंजल्या गाई।' -निगा २२. [सं. पिंजा]

**पिंजपिंजणें**—अक्रि. १ मिचकावणें; उघडझांक करणें; पिचपिच करणें (दुखरे डोळे व अशा डोळ्यांच्या मनुष्यास उद्देशून योजितात) २ शिणकणें; धमकणें. ३ दुखणें; शिवशिवणें (हाड हाडें). [पिंजणें द्वि]

**पिंजर**—स्त्री. एक लाल रंगाची पूड. धवधवीत तांबडें व कोरडें कुंकू. तें तेलांत घालून तयार करण्यापूर्वीच्या, देशांत कुंकू म्हटल्या जाणाऱ्या चूर्णास कोंकणांत पिंजर म्हणतात व तेलांत कालविल्यानंतर त्यास कुंकू म्हणतात. [हिं.]

**पिंजर**—न. १ पिंजरा; पंजर. २ (ल) (मनुष्य, पशु इ०चा) हाडांचा सांगाडा. ३ बरगड्या [सं. पंजर]

**पिंजरणी**—स्त्री. पिंजरणें; विस्करणें; विखुरणें; पसरणें. [ पिंजरणें ]

**पिंजरणें**—अक्रि. १ विखुरणें ( केस; पिसें इ० ); विस्कटणें; अस्ताव्यस्त होणें; दूरवर पसरणें ( गवत इ० ). २ ( विरू. ) पिंजारणें ( -उक्रि. ) पहा.

**पिंजरा**—पु. १ पंजर; सांपळा; पांजरा. २ गज बसवून केलेली लहान खोली. ३ माडाचा शेंडा, बोंखा. ४ घर, जहाज, गाडी, पालखी इ०चा सांगाडा. ५ तुरुंग. 'श्रीमंतांच्या मुलास महाराजांनीं एकदम कैद करून आठ दिवस कोतवालाचे पिंजऱ्यांत ठेविला.' -विक्षिप्त ३.११७. [मि. पंजर] **अंगाचा शरीराचा हाडांचा पिंजरा**-अत्यंत कृश, रोड मनुष्यास म्हणतात. **पिंजरा होणें**-अत्यंत अशक्त होणें; हाडांचा सांपळा रहाणें.

**पिंजरा**—पु. (सागरगोटयांचा खेळ) प्रथम जमीनीवर डाव्या हाताचीं बोटें निरनिराळीं उभीं ठेवावीं. हा पिंजरा झाला. नंतर उजव्या हातांत खडे घेऊन ते पिंजऱ्याबाहेर जमीनीवर टाकावे व झेलखडा हातांत घेऊन वर उडवावा व तो खालीं पडण्यापूर्वीच हातानें एक खडा पिंजऱ्याखालीं ढकलून हात उलटून झेलखडा झेलावा याप्रमाणें पुढेंहि खेळावें. -मराठी खेळाचें पुस्तक पृ. ३४३.

**पिंजरापोळ**—पु. पोळानें लोकांस त्रास देऊं नये म्हणून बंदींत ठेवण्यासाठीं केलेलें किंवा करण्यासाठीं राखलेलें आवार; ( विरू. ) पांजरपोळ पहा. [ पिंजरा+पोळ ]

**पिंजरी**—स्त्री. १ पिंजरा. २ पालखीवरील सुशोभित आच्छादन. ३ गाडीचा चंवरडोल; चांदवा. ४ छत. 'धूम्रजांची पिंजरी। वाजतिया वायूतें जरी होकारी। कां सूर्यबिंबा माझारीं। आंधारें शिरे।' -ज्ञा ९.१२५. ५ ( ल ) उटी. 'जैसीं चंद्रमयाची घडी उपलविली। मग गगनाकरवी बुंथी घेववीली। तैसी चंदनपिंजरी देखिली। सर्वांगीं तेणें।' -ज्ञा ११.२२३. [ सं. पंजर ]

**पिंजळ**—पु. एक वृक्षविशेष.

**पिंजार**—न. मळणीमध्यें गुंतलेले आंखूड भात्याणाचे लहान तुकडे. [ पिंजरणें ]

**पिंजारणावळ**—स्त्री. ( कापूस, लोंकर इ० ) धुणकण्याची मजुरी; पिंजणावळ. [ पिंजारणें ]

**पिंजारणी**—स्त्री. १ धुणकणी; पिंजणी. २ विखुरणें; पसरणें. [ पिंजारणें ]

**पिंजारणें**—उक्रि. १ (कापूस, लोकर इ०) धुणकणें; मोकळें करणें; पिंजणें. २ विस्करणें; विखुरणें; पसरणें ( गवत, पिसें, केंस इ० ). [ पिंजणें ]

**पिंजारणें**—अक्रि. १ हेलावणाऱ्या पालवीनें आच्छादित होणें. २ क्रोधादिकानीं ( डोळे, नाक, शेपूट इ० फुगणें; मोठें होणें; विस्फारणें ). ३ खवळणें; रागावणें. 'त्रिंबकराव नानाचा लष्करी। पंचमुख व्याघ्र जैसा पिंजारी।' -ऐपो ८८ [ पिंजणें ]

**पिंजारी**—पु. ( कापूस, लोंकर इ० ) पिंजणारा. -स्त्री. पालखीच्या दांडीवर बांधण्याचें रेशमी आच्छादन; पिंजरी. [ हिं. पिंजारा; गु. पिंजारो; ता. पंजारी, पंजुकोटी; सं. पिंजिक=कापसाचा पेळू ]

**पिंजिरा**—वि. मंजूर. 'त्याचे योगक्षेमाविसी तुम्ही हुजुर अर्जे कराल त्याप्रमाणें पिंजिरा होईल.' -रा २२.६२. [ फा. पिझीरा ]

**पिंजु(जू, जो)ळी**—स्त्री. धांदोटी; चिरफळी; कांबट; फाडलेला लांब व अरुंद तुकडा ( पान वेत, इ० काचा ). [ पिंजणें+ओळी ]

**पिटकन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. बेडकीच्या उडी मुळें, हलकीं फळें किंवा बिया पडल्यामुळें किंवा पाण्याचे थेंब पडल्यामुळें होणाऱ्या टप, टप, आवाजाचें अनुकरण होऊन.[ध्व.]

**पिटकी**—स्त्री. ( मनुष्य, जनावर इ० काचा ) विष्ठेचा लहानसा लपका; लेंड; (अळण, कढी इ०कांतील) लहान गोळा. [ध्व]

**पिटकु(को)ला**—वि. लहान; चिमकुला; छोटा; गोंडस. [ सं. पृथुक ]

**पिटकुली**—स्त्री. १ लहान आकाराचें फळ ( आंबा, पेरू, डाळिंब इ० ). २ पिवळया रंगाचें एक फूल. [ सं. पृथुक ]

**पिटकें**—न. एक माप; कोळवें; अदपाव; शेराचा एकअष्टमांश भाग. [ दे ]

**पिटकें, पिटकुलें**—न. लहान व सुरेख असा जिवंत प्राणी; उंदीर, इ०कांचें पिलूं. 'परंतु तुपाचे घागरीवर उंदराचें पिटकुलें बसलें तैसा प्रकार जाहला.' -भाव ४५. [ सं. पृथुक ]

**पिटकोळी**—स्त्री. ( गो. ) १ एक वृक्षविशेष २ ( गो. ) एक पक्षिविशेष.

**पिटण**—न. मारणें; बडविणें. 'येकेचि समयें त्राहटण। घनातें केलें पिटण।' -गीता १.७७६. [ सं. पीडन; म. पिटणें ]

**पिटणी**—स्त्री. मारणें; कुटणें; बडविणें. [ सं. पीडन ]

**पिटणें**—सक्रि. १ मारणें; बडविणें; झोडपणें; चोप देणें; (हातोडी, काठी, मुसळ, दांडकें इ० कानीं) ठोकणें. 'परि तें ऐसें पंडुसुता। तातलें लोह पिटितां।' -ज्ञा १३.१०१५. 'पोटें पिटिलें काहारे। दया नाहीं या विचारें।' -तुगा ६५४. २ जोरानें हाकारणें (जनावर, सैन्य इ०); घोडा दवडणें; वेगानें पाठविणें(आसुद); पळवून लावणें ( शत्रु, सैन्य इ० ). 'पार्थेत वधार्थ कर्णे शर एक यमें स्वदूतसा पिटिला।' -मोकर्ण ३६.११. 'सर्वस्व हरुनि कपटें नळसाचि पिटूनि लाविला पार्थ।' -मोस्त्री ३.१०. ३ (टाळी इ०) वाजविणें, शब्द करणें. 'हरीमंदिरीं नारदें लमटाळी। पिटोनी

म्हणे ऐक कांतारमाळी। '–कीर्तन १.५२. [ सं. पीडन; हिं. पिटना; सिं. पिटणु ]

**पिटपिट**—स्त्री. त्रास; कटकट; कंटाळवाणें मागणें ( उद्दाम मुलाचें ); चिरचिर; पावसाची रिपरीप. 'गोविंदावाचोनि वदे ज्याची वाणी। हगवण घाणी पिटपिट ते।'–तुगा ३०३९. [ ध्व ]

**पिटपिटणें**—अक्रि. १ दुसऱ्यास शीण येईल अशा रीतीनें आग्रहानें मागणें; किरकिरणें; चिरचिरणें. २ मिचकाविणें; उघड-झांक करणें ( डोळे इ० ची ). [ ध्व. ]

**पिटपिटें**—वि. ( गो. ) तुटणारें. 'पिटपिटें सूत' [ ध्व. ]

**पिटपिट्या**—वि. १ असंतुष्ट सदा धुसमुसणारा आणि दोष काढणारा. २ पिरपिर, रडवें तोंड करून याचना करणारा. [ पिटपिट ]

**पिटपीट**—स्त्री. ( विरू. ) पिटपिट पहा.

**पिटविणें**—सक्रि. (विरू.) दवडणें. पिटणें पहा. 'ठायीं ठायीं सुभ्यांशीं पत्रें लिहुन सांडणीस्वार पिटविले।'–ऐपो २३०. 'या पिटविण्यांत गनीम अमाविणें मरावे, परंतु रानसुबत्ता. ओले हुबेरे व गहूं व गाजरें पुष्कळ.' –भाव (नवी प्रत) ९७. [ हिं. पिटवाना ]

**पिट(टा)ळणी**— स्त्री. जोरानें हांकून लावणें (जनावर, मनुष्य इ० कास ). [ पिटाळणें ]

**पिट(टा)ळणें**—उक्रि. १ जोरानें आपल्यापुढें हांकणें ( जनावर, भग्न सैन्य इ० ). २ भरधांव सोडणें; दवडणें ( घोडा इ० ); 'सुकवि प्रभु मंडळगति रथ फिरवी, त्वरित घोटक पिटाळी।' –मोभीष्म १०.८८. ३ घालवून लावणें, हांकलून लावणें (मनुष्य, भिकारी इ० ).

**पिटी**—स्त्री. १ गरगट; कांजी; राब. २ टाळी; थप्पड; थापटी.

**पिटुकलें**—न. पिटकें पहा. [सं. प्रथुक ]

**पिटुर्डी**—पु. एक विशिष्ट मासा. याच्या छातीशीं व गुद-द्वारावर दोन पंख असतात. अंगावर तीन–चार काळे पट्टे असतात.

**पिटुलें**—न ( कों. ) एक विशिष्ट मासा.

**पिटोळी**—स्त्री. ( गो. ) एक पक्षिविशेष.

**पिट्टू–ट्टा पाडणें**—अक्रि. पिठ्या पाडणें पहा.

**पिट्टोळ**—पु. (गो ) एक गोड्या पाण्यांत राहणारी मासळी.

**पिठ**—न. ( व. ) खांब व खांड यांमधील लांकडाचा ठोकळा; पटा [ सं पीठ ]

**पिठँ**—न. ( गो. ) थंडीच्या दिवसांत होणारा एक त्वचारोग.

**पिठडा**—पु. ( विरू. ) पिठाड पहा.

**पिठरडी भाजी**—स्त्री. पीठ लावून केलेली भाजी.

**पिठरपाकवाद**—पु. ( न्याय परिभाषेंत पिठर म्हणजे अव-यवी आणि वाद म्हणजे मत ) एखाद्या गोष्टीचे गुणधर्म निव्वळ घटनेपासून उत्पन्न होतात अशा मताचें स्थापन. याच्या उलट पिलु-पाकवाद ( पिलु नैयायिक भाषेंत परमाणु ) म्हणजे सर्व गुणधर्म मूलतत्त्वाचे आहेत अशा मताचें स्थापन. पिठरपाकवाद वैशेषिकांचा आणि पिलुपाकवाद नैयायिकांचा आहे. पिठरपाकवादी आणि पिलुपाकवादी हे पिठरपाकवाद आणि पिलुपाकवाद याचे अनुक्रमें अनुवादक होत. [ सं. ]

**पिठलें**—न. हरभऱ्याच्या डाळीच्या पिठाचें एक तोंडीलावणें; बेसन; झुणका. (गो. ) पिटलें; (राजा. ) पिटलां. [ सं. पिष्ट ]

**पिठवण**—न. एक प्रकारची वनस्पति.

**पिठा**—पु. दारूचें दुकान; गुत्ता. 'दारुडे ताडदेवीच्या चमेली बागेच्या पिठ्याला उदार आश्रय देत आहेत.' –के २१.६.३०. [ सं. पैष्टी=दारू ]

**पिठा**—वि. १ ठिसूळ; भुसभुशीत; रेवाळ ( दगड ). २ गिच-गिचीत; अर्धवट भाजलेल्या पोळी किंवा भाकरीसारखा ( विशिष्ट फळांचा गीर ). [ पीठ ]

**पिठां**—न. ( कु. ) १ एक जातीचा मासा. २ नवीन जन्म-लेल्या मुलाच्या अंगास जो चिकट पदार्थ असतो तो. [ पीठ ? ]

**पिठाड–र, पिठाळा**—पु. १ चुरा केलेली, चूर्ण केलेली, खंदळलेली, जमीनदोस्त झालेली; फन्ना केलेली स्थिति ( भोजन समारंभांत अन्न, शेतांतील उभें पीक इ०ची) (ल.) शीण; थकलेली स्थिति. ०करणें, पाडणें–फन्ना उडविणें [ सं पिष्ट ]

**पिठावें**—न. निंदा. [ दे. ]

**पिठाळ**—वि. मऊ; लिबलिबीत; पिठुळलेली ( भाकरी इ० ); पिठूळ पहिल्या तीन अर्थी पहा. [ सं. पिष्ट ]

**पिठा(ठु)ळणें**—अक्रि. गिचगिचीत होणें (भाकरी इ०); पाण-चट होणें; पचपचीत होणें ( भात, शिजविलेलें अन्न इ० ).

**पिठाळें**—न. एका जातीचें मऊ व खवणारें पोळें हें मधा-बरोबर खातात. [ सं. पिष्ट ? ]

**पिठी**—स्त्री. १ ( तांदुळाचें ) बारीक पीठ. 'कीं स्नाना जाईन गंगातटीं। मागें शून्य आहे पर्णकुटी। यास्तव शस्त्रांची करोनि पिठी। घातली कमंडली।' –कथा २.७.४८. २ पाण्यांत शिजविलेलें पीठ ( खाण्याचा पातळ पदार्थ म्हणून ); कोणतेंहि पीठ शिजवून केलेलें कालवण. ३ ( कु. हेट. ) कुळिथाच्या पिठाची आमटी किंवा पिठलें ४ (गो ) पापडासाठीं कालवून तयार केलेलें पीठ ( विशेषतः उडदाचें ). [ स. पिष्=चुरा करणें; पिष्ट ) ]

**पिठी साखर**—स्त्री. मऊ व बारीक साखर. [ पीठ+साखर ]

**पिठुळणें**—सक्रि. १ गाभुळणें; पाडास येणें ( फळ इ० ). २ पिठाळ होणें; फुसफुशित होणें ( भाकर, भात इ० ). [ पीठ ]

**पिठूर**—वि. पिठाप्रमाणें पांढरें; स्वच्छ; चकचकीत (विशेषतः चंद्रकिरणें, चांदणें ). [ पीठ ]

**पिठूळ, पिठोळा**—वि १ पिठासारखें मऊ; गिचगिचीत; कच्चा ( भात इ० ). २ मऊ; पाणचट ( भात इ० ). ३ मऊ; ठिसूळ; भुसभुशीत ( दगड इ० ). ४ बेचव; पाणचट ( फळें, शिजविलेलें अन्न इ० ). [ पीठ ]

**पिठें**—न. ( कु. ) पिठां अर्थ २ पहा. [ पीठ ]

**पिठेरा**—पु. एक प्रकारचा कुंचला. कोष्टी लोक सुताच्या ताण्याला पांजण किंवा खळ लावितांना हा उपयोगांत आणतात. [ पीठ ]

**पिठोबा**—पु एक देवता. 'देवनामें जोतीबा ...गणोबा, पिठोबा, राघोबा, मोरोबा... ' –ख्रेया ५६.

**पिठोरा, पिठोरापाठोरा**—पु. श्रावण महिन्यांतील अमावास्येच्या दिवशीं पिठानें चौसष्ट योगिनींच्या आकृती काढून त्याचें पूजनरूप करावयाचें व्रत. [ सं. पिष्ट ]

**पिठोरी**—स्त्री. श्रावण वद्य अमावास्या व त्या दिवशीं करावयाचें व्रत [ सं. पिष्ट ]

**पिठोळा**—वि. पिठूळ पहा.

**पिठोळी**—स्त्री. (कु.) पीठ झाडण्याकरिता केलेली काथ्याची लहान कुंचली.

**पिठ्या**—वि. १ भुसभुशीत; ठिसूळ; रेवाळ (दगड इ०). २ गिचगिचीत; चांगल्या न भाजलेल्या भाकरीप्रमाणें असलेला ( फळांचा गीर इ० ). ३ ( ल. ) मऊ; नरम; सहज वश होणारा; याच्या उलट कणक्या. ४ ज्वारीच्या पिठाची भाकरी ज्याला घालावयाची असा साधारण पाव्हणा. याच्या उलट गव्ह्या ( हा पहिल्यापेक्षां मानानें मोठा असतो ). [ सं. पिष्ट ] ०पाडणें– १ ( ना ) घोकंपट्टी करणें. २ एखादें काम नेटानें तडीस नेणें. ३ ( सोलापुरी ) एखाद्यास दमविणें.

**पिड–डें–ढें**—न. ( व. ) पाट; ( कर. ) बसणं. [ सं. पीठ ]

**पिंड**—पु. १ गोळा; पुंज; समुदाय; ढीग. 'का कर्में एके पिंडें । वेंचितां अवतरे भांडें । मग भवंडीजे दंडें । भ्रमें चक्र । '–ज्ञा १८.३१०. २ मृत पितरांना जवळच्या नातेवाइकानें श्राद्धाचे वेळीं अर्पण करावयाचा भाताचा गोळा. ३ शरीर; देह. 'पिंड पोसावे हें अधमाचें ज्ञान। –तुगा ३३५६. 'जंव यशोदा करी न्याहाळ। तंव जवळी न दिसे बाळ। मग पिंड पडिला विकळ। यशोदेचा।' –कथा ४.३.८३. ४ गोल; कोणताही वाटोळा पदार्थ. 'उदा० मांसपिंड इ०; ग्रंथी. ५ ( भूमिति ) घनतेचें माप. ६ नुकताच धरलेला गर्भ; भ्रूण. ७ ( गणित ) त्रिज्येचा एकचोविसांश ८ एक प्रकारचें रान. ९ जीव. 'पदपिंडाची गांठी।'–ज्ञा ३.२७२. [सं] (वाप्र.) **पिंडास खिळणें–जडणें–बसणें–लागणें–जडलेला,** खिळलेला, चिकटलेला असणें (खोड, आजार, उपद्रव इ०) म्ह० १ जें पिंडीं तें ब्रह्मांडीं=आपणावरून जग ओळखावें किंवा माणूस हा एक लहानसें ब्रह्मांडच आहे याअर्थी. २ पिंडे पिंडे मतिर्भिन्ना=व्यक्ती तितक्या प्रकृती. सामाशब्द– ०जन–पु. जीवसृष्टि; देहधारी लोक. 'तैसें होय शरीर। तैं तें म्हणिजे खेचर। हें पद होता चमत्कार। पिंडजनीं।' –ज्ञा ६.२९६. **पिंडदंड**–वि. आडदांड. 'चेल्यांचा सुकाळ। पिंडदंड भगपाळ।'–तुगा २८.१९. ०दान–प्रदान–न. मृतांना श्राद्धांत भाताचे पिंड अर्पण करणें. ०**पितृयज्ञ**–पु. पितरास उद्देशून अमावास्येस करावयाचें पिंडदान. ०**ब्रह्मांडरचना**–स्त्री. मानवी देहाची जी रचना तीच अखिल विश्वाची घटना (माणसाचे डोळे, रक्तवाहिन्या, केंस इ०च्या ठाईं चंद्रसूर्य, नद्या, झाडें इ० कल्पिणें ) असें समजणें; अशी समजूत. ०रोगी–वि. जन्मापासूनचा आजारी; गर्भावस्थेपासूनचा आजारी; जन्मरोगी. ०ज्ञान–न. शरीररचनाशास्त्र. ०ज्ञानी–पु शरीररचनाशास्त्रज्ञ. **पिंडोदक**–न. मृतास उत्तम गति मिळण्यासाठीं त्यास पिंड ( भाताचा गोळा ) व उदक ( पाणी ) देण्याचा धार्मिक विधि. [ सं. ]

**पिडणूक**—स्त्री. त्रास; जाच; छळणूक. [ सं. पीडा ]

**पिड(ढ)णें**—उक्रि. १ दुःख देणें; पीडा करणें; त्रास देणें. २ दुःखी असणें; त्रासांत असणें. [ सं. पीडनम् ]

**पिंडरी**—स्त्री. १ पायाची पोटरी. २ (ल.) ज्यांत दाणे ठासून भरले आहेत असें कणीस; पोटरा. ३ व्यायामानें जाड व टणक झालेले दंड, पोटऱ्या इ०. [ सं. पिंड; हिं. ]

**पिडा**—स्त्री. १ पीडा; त्रास; दुःख; आजार. २ ज्यापासून आपणास त्रास होतो तो इसम. ३ बाळंतपणापूर्वीची वेण; कळा. ०जावप–( गो. ) वेणा येणें. [ सं. पीड्=त्रास देणें ]

**पिडा–ढा**—पु. नारळाच्या फांदीचा बुडख्याचा भाग; झांवळीच्या मधला दांडा. २ ( गो कु. ) चुडताचा देंठ, पिडो.

**पिंडा**—पु. सूत, रेशीम, सुंभ इ०चा गोळा; बिंडा. [सं. पिंड]

**पिंडी**—स्त्री. १ औषधें फडक्यांत घालून केलेली, आलेल्या डोळ्यावर ठेवावयाची पुरचुंडी. २ शिवाचें लिंग; शाळुंकेमधील बाण. 'जे शून्यलिंगाची पिंडी।'–ज्ञा ६.२७३. ३ ( कुंभार धंदा ) चाकावर ठेवून, चाक फिरवून ज्यास मडकें, रांजण इ०चा आकार देतात असा मातीचा गोळा. [ सं. पिंड ] **पिंडीबंध**–पु. ( नृत्य ) अनेक व्यक्तींनीं मिळून विशिष्ट प्रकारच्या निरनिराळ्या आकृतींत उभें राहून करावयाचें नृत्य. याचे पिंडीबंध, शृंखलाबंध, लताबंध व भेद्यबंध असे चार प्रकार आहेत. [ सं. ]

**पिडें–ढें**—न आसन; पाट. म्ह० ढेंग बघून पिडें। तोंड बघून विडा. -लोक २.७३. [ सं. पीठ ]

**पिडेवंत, पिडेखोर**—वि. ( गो ) रोगी; दुखणेकरी. [सं. पीडा+वंत ]

**पिडूडुक**—स्त्री. ( गो. ) कांचेचे काळे बारीक मणी; काळी पोत; पिडूडुकांचा सर. [ सं. पिंड ]

**पिढलें**—न. (व.) बसावयाचा पाट; आसन; चौरंग. (व.) पिढ; (कों.) पिढ्डि. [सं. पीठ]

**पिढा**—पु. १ आसन; बसावयाचा पाट. २ (राजा.) माडाच्या फांदीचा, झावळीचा बुंधा; डेख; थरपील; पिढा. [सं. पीठ]

**पिढा**—पु. पाठलाग. 'पिढा करावयासी पाठविलें.' –शिचप्र ६७. [सं. पृष्ठ]

**पिढावणें**—सक्रि. (व.) मारणें.

**पिढी**—स्त्री. पुत्र, नातू, पणतू, बाप, आजा, पणजा इ० जे वंशपरंपरेंतील पुरुष ते प्रत्येक; पुस्त; कुळी. [सं.] (वाप्र.) **०लागणें**–लग्नसंबंधामुळें दोन गोत्रांच्या पिढ्यांचें परस्परांत मिश्रण होणें (ब्राह्मणांमध्यें मातेकडून व पित्याकडून अनुक्रमें पहिल्या पांच व सात पिढ्यांत लग्नसंबंध होत नाहीं). **पिढीचा**–वंशपरंपरागत; पिढीजाद 'पिढीचा संपत्तिवान्–बुद्धिमान्–रोगी–दरिद्री.' **०ला लाता मारणें–देणें–पाय लावणें**–१ पूर्वपरंपरेला झुगारून देणें; तिच्या विरुद्ध बंड करणें. २ कर्जफेडींत मुद्दलाला सुद्धां कमी पडणें. **पिढ्या तुटणें–तोडणें**–दोन घराण्यांतील संबंध (जन्म, मरण इ०च्या संबंधानें सुतक, सोहेर, वगैरेचा) नाहींसा होणें. असा संबंध सात पिढ्यांनंतर नाहींसा होतो. सामाशब्द– **०दर पिढी**–क्रिवि. वंशपरंपरेनें; पुस्तदरपुस्त. **०न पिढी**–क्रिवि. वंशपरंपरेनें; प्रत्येक घराण्यांत. **०जाद–जादा–न दाज**–वि. १ कुलीन; घरंदाज. २ पिढीचा ह्याबद्दलहि कुवीनें योजितात. [फा. पिढी+ज़ादा] **०पेस्तर**–क्रिवि पिढ्यानपिढ्या; वंशपरंपरागत; पिढीदरपिढी. [सं. पीठिका]

**पिढें**—न १ बसावयाचा पाट; आसन; बसण्याची चौकी. २ घिरट ठेवण्यासाठीं असलेले लांकडी तीन ठोकळे. ३ तुळई आणि खांब यांच्या मध्यें असलेला लांकडाचा तुकडा; खांबाखालीं घालतात ती उथळी. ४ सूत कातण्याच्या चरख्याखालीं असलेला लांकडाचा तुकडा, बैठक. ५ गाडीच्या साटीच्या पुढच्या बाजूला जोडलेला आडवा लांकडाचा तुकडा. ६ (सुतार काम) फळक तोडण्यास व फोडण्यास आधार म्हणून घेतलेला लाकडी ओंडा. [सं. पीठ] **०दान**–न. पाट, मुसळ, काठी इ०चा मार. 'तंव पिढेदान त्या प्राप्त झालें.' –निगा १०. **पिढ्याचें काम, पिढ्यापाटाचें काम**–ज्यांत घराचें छप्पर पिढ्यावर ठेविलेलें असतें अशी इमारत. पाण्याच्या उलट कमीचें काम,

**पिणीचा**—वि. १ मुख्यत्वें आईच्या दुधावर वाढलेलें (मूल, वासरूं इ०). २ अंगावर पिणारा; पानचा; बाळपणीं आईचें दूध पुष्कळ प्याल्यामुळें हृष्टपुष्ट, गोंडस असलेला. [पिणें]

**पिणें**—सक्रि. १ प्राशन करणें, जल, वायु इ० पातळ पदार्थ तोंडानें पोटाखालीं उतरविणें. २ घोटणें; शोषणें; मटमट पिणें, घोटणें. ३ (तंबाखू, अफू इ०च्या धुराचें) सेवन करणें; धूम्रपान करणें. ४ शोषणें; जिरविणें (कागद, लांकूड, कापड इ०नीं तेल, रंग, पाणी इ०). ५ बंदुकीनें ठासलेल्या दारूचा बार न होणें. ६ (ल) दाबणें, गिळणें; सहन करणें; पोटांत घालणें (राग, अपमान, चेष्टा, खोड्या इ०). (ल.) प्रीतीनें ऐकणें. 'कवी तव यशःकथा नवसुधा नवद्या पिती।' –केका ५१. [सं. पा.; सिं पिअणी; पोर्तु.जि. पिलार]

...कवो. ५. २०

**पिण्णळता**—स्त्री. (गो.) रागानें थोडेसें खेकसून बोलणें.

**पित**—न (खा) पित्त; (गो.) पित.

**पितम**—क्रिवि. (गो.) प्रथम; आधीं [सं. प्रथम]

**पितर**—पु स्वर्गांत किंवा चंद्रमंडलांत राहणारे मनुष्य जातीचे मृत पूर्वज 'तरी पितर काय करिती। जैसेनि स्वर्गी बसती।' –ज्ञा १.२५५ २ –पुनश्च श्राद्ध विधीनें ज्यांना पिंडोदक दिलें पाहिजे असे नातेवाईक (आई, बाप, भाऊ, बहीण, पुत्र, कन्या, पत्नी, मित्र इ०). ३ –नश्च. मातापिता. ४ भाद्रपद कृष्णपक्षांत समुदायानें केलेलें महालय श्राद्ध. [सं.] **०उद्धरणें–स्वर्गावर नेणें**–(उप.) पूर्वजाची निंदा करणें; आईबापावरून शिव्या देणें. **पितरें झालणें**–(माण.) कोंकणांतील देवीच्या पुजाऱ्यास पांच-दहा रुपये देऊन भुतें असलेले धोंडे आणवून त्याजकडून दुसऱ्यास त्रास देवविणें. **म्ह०** काल मेला आणि आज पितर झाला. सामाशब्द– **०खस्ता**–स्त्री.१ श्राद्धाचे वेळीं करावी लागणारी खटपट, त्रास, गोंधळ. २ (ल.) अल्प कार्याविषयीं कंटाळा येण्याजोगी करावी लागणारी मोठी खटपट; त्रासदायक काळजी व परिश्रम. **०पक्ष–पाख–पाट–पाटा–पाठ**–पु.भाद्रपद कृष्णपक्ष; पितरांचें श्राद्ध करावयाचा पंधरवडा. **०लंड**–वि. जो पितरांचें श्राद्ध करीत नाहीं असा [सं. पितृ, पितर्]

**पितऱ्या**—पु. (कातकरी) १ भूपण. –बदलापूर १२८. २ (ल.) देवक बसविणारा (ठाकूर). –बदलापूर १४७. [पितर]

**पितळ**—न. जस्त व तांबें यांच्या विशिष्ट मिश्रणानें बनविलेला एक धातु. [सं. पित्तल] (वाप्र.) **०बाहेर पडणें–दिसणें–निघणें**–१ मुलामा दिलेल्या, मढविलेल्या दागिन्यांतील मूळचें पितळ बाहेर दिसूं लागणें. २ (ल.) वरपांगी केलेला बहाणा, मिष, ढोंग नजरेस येणें. सामाशब्द– **०पान**–न पितळेचा अतिशय पातळ पत्रा; पितळेचा वर्ख. **०पात्र**–न. पितळेचें भांडें. 'किती कासपात्रें पितळपात्रें।' –सप्र ९.२९. **पितळी**–स्त्री. पितळेची, उंच कांठाची लहान ताटली; लहान परात. –वि. पितळेचा; पितळमय.

**पितळ**—वि. पित्तयुक्त; पित्तल.

**पितळा**—वि. (राजा.) चिडखोर; तापट; तामसी [सं. पित्त]

**पिता**—पु. बाप; जनक; 'पैं जयाचेनि अंगसंगे। इये प्रकृती-स्तव अष्टांगें। जन्म पाविजत असे जगें। तो पिता मी गा।' -ज्ञा ९.२६९ [सं. तुल० पोर्तु जि. पतरों, बाता, पात] **म्ह०** यो वै पिता स वै पुत्रः। =बाप तैसा बेटा.

**पितांबर**—पु. निरनिराळ्या (विशेषतः पिवळ्या) रंगाचें, रेशमी काठ असलेलें वस्त्र. [सं. पीत+अंबर] **पितांबरी**—स्त्री. अल्पमोलाचा लहान पितांबर. 'लंगोटी नसली तर नसूंदे, आमच्या-कडची पितांबरी वेईन त्याला मी.'-सुदे १४. **पितांबऱ्या**—वि. (ना.) अंगावर पट्टे असणारा (वाघ).

**पितां(त्तां)बी**—स्त्री. पित्तोद्भवामुळें अंगावरील येणाऱ्या गांठी. [सं. पित्त+बी]

**पिता(त्ता)म**—स्त्री. (गो.) एक त्वचारोग; पित्तांबी. [सं. पित्त]

**पितामह**—पु. १ आजा; बापाचा बाप. 'तंव तेथ पार्थु सकळ। पितृ पितामह केवळ। गुरुबंधु मातुळ। देखता जाहला।' -ज्ञा १.१८०. २ ब्रह्मदेव. 'मी पितामहाचा पिता। हें आठ-विताही नाठवे चित्ता।' -ज्ञा १०.२०६. ३ भीष्माचार्य. 'पिता-मह वदे तदां प्रबल तूं पृथानंदना।' -भीष्मप्रतिज्ञा (मराठी ५ वें पुस्तक पृ. ०५७). [सं.]

**पितामहंत**—पु आजा. -ख्रिपु.

**पितामही**—स्त्री. बापाची आई; आजी.

**पितारणें**—क्रि. (गो.) रंगविणें. [पोर्तु. पिंतर]

**पिती**—स्त्री (गो) संतति. [सं पुत्र ?] **म्ह०** (गो.) मातीसारखी पिती=खाणीसारखी माती.'

**पितुइयो**—पु (गो) मत्स्यविशेष; पापनीट. [इं. पाम्फ्लेट ?]

**पितृ**—पु. १ बाप, जनक; पिता. २ चुलता; वडील माणूस. 'तेथ पार्थु सकळ। पितृ पितामह केवळ। गुरुबंधु मातुळ। देखता जाहला।' -ज्ञा १.१८०. ३ पितर पहा [सं.] सामासिकशब्द— **०ऋण**—न. बापानें मुलाचें पालनपोषण केल्यामुळें त्याची परत-फेड व्हावी म्हणून पुत्राला आवश्यक असलेलीं कर्तव्यें; पूर्वजा-संबंधीं असलेलीं कर्तव्यें. हें ऋण श्राद्धादिक करून फेडलें जातें. दुसरीं दोन ऋणें म्हणजे देवऋण, ऋषिऋण. [सं. पितृ+ऋण] **०कर्म**—न. श्राद्ध, तर्पण इ० कर्मे. [सं पितृ+ऋण] **०गण**—न. १ ज्यांचें श्राद्ध करणें जरूर असतें असे पितर. २ पितरांच्या निरनिराळ्या वर्गास, समूहास सामान्य शब्द. [सं. पितृ+गण=समुदाय] **०गया**—स्त्री. गयेस केलेलें बापाचें श्राद्ध. **०गृह**—न. १ बापाचें घर; (स्त्रिया-संबंधीं) माहेर. २ स्मशान. [सं. पितृ+बाप; गृह+घर; प्रा. पिइघर; पिइहर; हि. पीहर; गु. पीयेर] **०तर्पण**—न. १ स्नान केल्यानंतर, ब्रह्मयज्ञामध्यें पितरांस पाणी देण्याचा विधि. २ मृत पितरांच्या तुष्टयर्थ श्राद्धाचे वेळीं दिलेलें दान. [सं. पितृ+तर्पण] **०तिथि**—स्त्री. आई किंवा बाप यांचा श्राद्धदिन. [सं. पितृ+तिथि] **०तीर्थ**—न. उजव्या तळहाताचा आंगठा व त्याजवळील बोट (तर्जनी) यांमधील भाग. तिलतर्पणामध्यें या भागावरून पाणी सोडतात [सं. पितृ+तीर्थ] **०त्व**—न. जनकत्व; बापाचें नातें, पद, गुण किंवा लक्षण. **०द्रोह**—पु बाप, पूर्वज इ०संबंधींचा द्वेष. [सं. पितृ+द्रोह=द्वेष] **०द्रोही**—वि. पितृद्रोह करणारा; बाप, पूर्वज इ०चा द्वेष करणारा. [सं. पितृ+द्रोही=द्वेष करणारा] **०प**—पु. यम. [सं. पितृ=पितर+पा=पालन करणें] **०पक्ष-पाख-पारट-पाठ**—पु. १ भाद्रपद कृष्णपक्ष. २ पितरसमूह. [सं. पितृ+पक्ष=पंधरवडा] **०पूजा**—स्त्री. मृत पितरांच्या संबंधीचा श्राद्ध-विधि. पृथ्वीवरील सर्व प्राचीन व अर्वाचीन राष्ट्रांत थोडयाफार फरकानें याचें अस्तित्व आढळतें. [सं पितृ+पूजा] **०बंधु**—पु. बापाच्या आतेचे, मावशीचे व मामाचे पुत्र. [सं. पितृ=बाप+बंधु=भाऊ] **०भक्त**—वि. बाप, पूर्वज इ०संबंधींचीं कर्तव्यें बजा-वणारा [सं. पितृ+भक्त] **०भक्ति**—स्त्री बाप, पूर्वज इ०संबंधींची कर्तव्यदक्षता [सं पितृ+भक्ति] **०यज्ञ**—पु पंचमहायज्ञापैकीं चौथा; पितृश्राद्ध; सिद्ध अन्नापैकीं पितराना उद्देशून अन्नदानाचा विधि; तर्पण. [सं. पितृ+यज्ञ] **०यान**—पु पितृमार्ग; देहपातानंतर चितेचा धूर, रात्र, कृष्णपक्ष, दक्षिणायन या मार्गानें चंद्रलोकाप्रत जाण्याचा जीवाचा क्रम. हा जीव क्षीणपुण्य झाला म्हणजे चंद्रलोकांतून पुन्हां मृत्युलोकीं जन्म घेतो. [पितृ+यान] **०लंड**—वि. पितरांचें श्राद्ध वगैरे न करणारा 'देवलंड पितृलंड। शक्तीवीण करी तोंड।'-दा २.१.२०. [स] **०लोक**—पु. मृत पितरांचा रहाण्याचा प्रदेश; स्वर्ग; चंद्रलोक. [सं. पितृ+लोक] **०वधकर्ता**-वि. बापास ठार मारणारा. [सं] **०वन**—न. स्मशानभूमि. 'बहुधा तो पितृवनीं न मृत नेला।' -मोविराट ३.६८. [सं. पितृ+वन] **०व्य**—पु चुलता; बापाचा भाऊ. [सं.] **०शांति**—स्त्री. पितरांस अथवा वडील माणसास ठार मारणें. 'पंचभ्रतार द्रौपदी ते सती। करितां पितृशांती पुण्यधर्मा।' -तुगा ९४८. [स. पितृ+शांति] **०सदन**—न. पितृगृह; बापाचें घर. [सं. पितृ+सदन] **०हत्या-वध**—स्त्रीपु. बापास ठार मारणं. **०हत्यार**—वि. पितृवधकर्ता; बापास ठार मारणारा.

**पितोशी**—स्त्री. (गो.) एक प्रकारची मासळी. पितुइयो पहा.

**पित्त**—न. १ यकृताच्या योगानें रक्तांतून निघणारा आणि अन्नपचनास मदत करणारा एक पिवळा रस; एक शरीरदोष. 'आणि अंगग्राही हात। लाकडिं काढिलें पित्त। मग राखिले शिणत। आणिक जीव।' -ज्ञा १३.२२९. २ तापटपणा; तामसीपणा; रागीट-पणा. [सं.] (वाप्र.) **०उसळणें-खवळणें-चढणें-भडकणें**—(ल.) रागावणें; संतापणें; खवळणें.' व्यर्थ लेकी च होती म्हणुनि उसळतें सज्जनांचेंहि पित्त।' -मोकृष्ण ५६.५७. **०तापविणें**—

संतापविणें; कोपविणें; क्रोध आणविणें. **पित्ताची कुप्पी, पिशवी**–पित्ताशय; पित्त शरीरांत सांठण्याची पिशवी. **पित्ताची जोत भरणें**–पित्तामुळें घशात, उरांत जळजळणें. **पित्तानें उचमळणें-जळजळणें**–पित्तामुळें उरांत, घशांत जळजळ वाटणें. सामाशब्द- ०**कर-करी**–वि. पित्त करणारा; जो पदार्थ खाल्यानें पित्त होतें तो [सं. पित्त+कृ=करणें] ०**कुरुपण**-न. ज्वालावमन. 'मग वोसंडिलेनि दर्पें। कामाही पित्तकुरुपें। तया घर्मी सैंध पळिपे। क्रोधाग्नि तो।' –ज्ञा १६.३९४. ०**जन्य-विकार**–पु. पित्तामुळें होणारा एक रोग. [सं.] ०**ज्वर**–पु. पित्तदोषामुळें उद्भवलेला ताप. [सं. पित्त+ज्वर] ०**पत्र-पापडा**–नपु. एक पित्तशामक औषधी वनस्पति उंची ३–४ हात असून हिचीं पानें बारीक व फुलेंहि लहान असतात [सं. पित्त+पर्पटक; बं. क्षेत्पापडा; हिं. पित्तपापडा; गु. पित्तपापडो; कर्ना. पर्पाटक; तेल. पर्पाटकमु] ०**प्रकृति**–स्त्री. पित्तकर तब्यत; पित्तदोषानें युक्त असलेली तब्यत. –वि. ज्यास वरचेवर पित्ताधिक्य होतें असा (मनुष्य). [सं. पित्त+प्रकृति] ०**प्रकोप**–पु. पित्तदोषाची झालेली जास्त वाढ; पित्तातिशय. [सं. पित्त+प्रकोप] ०**भावना**–स्त्री. प्रकृतीची पित्तकारक स्थिति. [सं.] ०**मारी**–स्त्री. एक प्रकारची वनस्पति. ०**ल–ळ**- वि. (विशे.) पित्ताळू पहा. ०**वायु**–पु. पित्तप्रकोप होऊन झालेली वातविकृति. [सं. पित्त+वायु] ०**वेगी**–वि. शीघ्रकोपी; रागीट; संतापी; तापट. [पित्त+वेग] ०**वेळा**–स्त्री. पित्ताची वेळ; पहिला प्रहर आणि दुपार यांमधील काळ. [पित्त+वेळा] ०**शामक**–वि. पित्त शमविणारा; पित्त शांत करणारा. [सं. पित्त+शामक] ०**क्षोभ**–पु पित्तदोषाची वाढ व बिघाड; पित्तप्रकोप, पित्तातिशय. [सं. पित्त+क्षोभ] **पित्ताशय**–पु. पोटांत पित्त ज्या ठिकाणीं सांठलेलें असतें ती पिशवी. [सं. पित्त+आशय=सांठा] **पित्ताळू**–वि. पित्तकारी; पित्तदोष उत्पन्न करणारा; पित्तप्रकृतीचा. [पित्त+आलुच् किंवा आलु प्रत्यय]

**पित्तरपाठ**—पु. (व.) पितृपक्ष. पितरपाठ पहा.

**पित्तू**—पु. (ना.) पित्त्या पहा.

**पित्त्या**—पु. (खेळांत) कमी असलेल्या खेळाडूची जागा भरून काढण्यासाठीं दिलेला गडी; पोटगडी. पोट गडी पहा. 'रावबाला एक पित्त्या दिला व सुनंद आणि बाळू एका बाजूला झाले.' –सुदे ६. [सं. पित्रीय] ०**देणें-पोटामध्यें घेणें**-कमी असलेल्या खेळाडूची जागा भरून काढणें.

**पिथान**—पु. आफ्रिकेंतील एक प्रचंड अजगर. प्राणिमो ७०. [इं. पायथॉन]

**पिधान**—न. १ झांकण; टोपण. २ आच्छादन; आवरण; आच्छादनाची जागा किंवा कारण. ३ (ज्योतिष) आकाशस्थ एका ज्योतीचें दुसऱ्या ज्योतीकडून आच्छादन. [सं.]

**पिनलकोड**—न. फौजदारी कायद्यांचा संग्रह. 'भाषेवर बलात्कार करणें हा साहित्याच्या पिनलकोडामध्यें मोठा गुन्हा समजला जातो.' –नाकु ३.३४. [इं पीनल+कोड]

**पिन(ना)स, पिनस**—पु. नाकाचा रोग. [सं पीनस]

**पिनाक**—न. १ शिवधनुष्य. २ एक वाद्य. 'टाळ मृदंग मोहरिया। पांवे शृंगें घुमरिया। रुद्रवीणे पिनाकिया। वाजविती सुस्वरें।' –रु १०.१४०. 'गिडबिडियांचेनि नादें। फुरणें उठिलें संदें। लाविलेया विनोदें। पिनाकिया।' –शिपु २.३१.१५. [सं.] ०**पाणि-णी**–पु. शंकर; शिव. 'काय पिनाकपाणीचिया भाता। वायकांडीं आहाती।' –ज्ञा ११.२०७. [सं.]

**पिन्हा**— पु. (व.) पिच्छा; पाठलाग. [?] ०**काढणें-पुरविणें-पाडणें**–(व.) पिच्छा पुरविणें; मागें लागणें. 'कामाचा पिन्हा पाडला म्हणून काम उरकलें.

**पिंप**—न. पीप; टीप.

**पिंपर-रू-रें**—न. १पिंपळाच्या झाडाचें फळ. 'पिंपरुवांचिया आशा। न शिंपिजे पिंपळु जैसा।' –ज्ञा १८.१७३. २ (रा.) कोणतेंहि कोंवळें फळ; भाजीचें फळ. [पिंपळ] **पिंपरासारखा आपटणें**–एकदम जोरानें आपटणें.

**पिंपरणी, पिंपरी**—स्त्री. एक झाड; पायरी. याचीं पानें नांदुरकीसारखीं असून लांकूड इमारतीस उपयोगी असतें; (गो.) केळ. [सं. पिप्परीजटी; सिं. पिपिरी]

**पिपरमीठ**—न. (गो.) पुदिन्याचा अर्क; पेपरमिंटच्या वड्या. [इं. पेप्परमिंट]

**पिंपरी**—स्त्री. (गो.) लहान, कोंवळी काकडी.

**पिपलिका**—स्त्री. मुंगी पिपीलिका पहा.

**पिंपळ**—पु १ एक अत्यंत पवित्र मानलेलें झाड; अश्वत्थ. हा उंच असून फार वर्षें जगतो. याच्या लांकडावर लाख तयार होते. २ पिंपळाचें फळ. [सं पिप्पल] (वाप्र.) **पिंपळास पार बांधणें**–(ल) एखादें पुण्यकारक धर्मकृत्य करणें **कुडाची साल पिंपळास लावणें**–एक्याचें खोटें व खोट्याचें खरें करून सांगणें; लटपट करणें एखाद्या गोष्टीचा भलत्याच गोष्टीशीं संबंध जोडणें. **पिंपळाचें फूल**-न. (पिंपळास फूल कधींच आढळत नाहीं यावरून ल.) क्वचित् व फार दिवसांनीं भेट देणाऱ्या इसमास उद्देशून योजितात. सामाशब्द- ०**पान-वण-वन-वाण**–न. १ लहान मुलाच्या कपाळावर केसास बांधावयाचा सोन्याचा, मोत्यांनीं गुंफलेला व पिंपळाच्या पानासारखा एक दागिना. २ (गो) स्त्रियांच्या भांगास मागें जे दोन फांटे फुटतात त्यांमधील आकार भाग ३ त्या ठिकाणीं घालावयाचें पदक, फूल. ०**वासी, पिंपळावरचा मुंज्या**–वि. १ (पिंपळावरील

भूत नेहमीं जागा बदलतें त्यावरून ) भूत-पिशाचादिकांची भीति न बाळगतां रात्रीं अपरात्रीं भयाण प्रदेशांत हिंडणाऱ्याला उद्देशून योजितात. २ भटक्या; भटकणारा; निश्चित एके ठिकाणीं न सांपडणारा

**पिंपळमूळ**—न. एक औषधी मुळ [ सं. पिप्पलीमूल; हिं. पीपलामूल; सिं. पिपिरामूर; बं. पिपुलमूल; गुज. पिंपरीमूल्ना गंठोडा; कर्ना. पिप्पलियवेस, तेल. पिप्पलीदेस ]

**पिंप(पि)ळा**—पु. ( कों ) केळीचीं पानें कापण्याचें एक हत्यार. कधीं कधीं हें काळकाच्या टोंकास बांधून त्यानें झाडाचीं पानें, फुलें इ० काढतात

**पिंपळाई देवी**—स्त्री एक क्षुद्र देवता. ' पिंपळाई देवी म्हणे श्री नारायणा। अश्वत्थ संसार हा स्वस्थ नाहीं जाणा। ' –सप्र ५.२१.

**पिंपळी**—स्त्री. १ एक औषधोपयोगी वनस्पति; हिचीं फळें हिरव्या रंगाचीं असतात. त्यांना तिखट-गोड स्वाद येतो; पिंपळीचे गांठीपिंपळी व लेंडीपिंपळी असे दोन प्रकार आहेत. पिंपळी वातनाशक व उष्ण आहे. २ पिंपळीची शेंग ३ पिंपळीच्या शेंगेसारखा आनक्यास पडलेला पीळ. ४ मोत्यांनीं मढविलेला एक कानांतील किंवा नाकांतील पिंपरी सारखा दागिना; भिकबाळीचें मधलें मोतीं. ५ ( सोनारी ) झेलरक्याचें सूत मोत्यांत ओवून तें मोतीं झेलरक्याच्या गोलाकाराजवळ बसवल्यावर मोत्याच्या दुसऱ्या बाजूस जो फासा किंवा मुढनी करतात ती [ सं पिप्पली; हिं. पिप्पल-र; बं. पिपुल; गु. लिंडिपीपळ; कर्ना. हिप्पली; तेल. पिप्पलु; ता. पिंपिल; फा. पिल्पिल्दराज; अर दार फिल्फिल्; इं लॉंग पेप्पर; लॅ. पाइपर लौंगम् ] ०**पाक**–पु. पिंपळी घालून तयार केलेलें एक औषध.

**पिंपळी**—स्त्री. ( व. ) लोखंडी लहान पीप.

**पिपा**—पु. ( व. ना. ) ( राकेल इ० चें ) पीप; डबा; टीप.

**पिंपाणी-री, पिंपोणी**—स्त्री. पिंकाणी पहा. [ ध्व ]

**पिपासा-शा**—स्त्री. तृषा; तहान; शोष. [ सं. पिपासा; हिं. पियास ] **पिपासु**–वि. तहानेलेला; पिण्याची इच्छा करणारा. [ सं ; हिं. पियासा ]

**पिपि**—क्रिवि. पिंपाणी, सनई इ० कांच्या तीक्ष्ण व कर्कश आवाजाचें अनुकरण करून. [ ध्व. ] ( बाप्र. ) ०**करणें-वाजविणें**–कर्कश आवाज करणें; किंकाळणें. [ ध्व. ]

**पिपी**—स्त्री. ( बालभाषेंत ) मातृस्तन.

**पिपीटें**—न. ( राजा. ) पिंपाणी.

**पिपीलिका**—स्त्री. लहान, तांबड्या रंगाची मुंगी. ' ब्रह्मादि पिपीलिकावरी। ' -ज्ञा १०.१०५. ' इतुक्यामध्यें दुसरी मार्गक्रमिका पिपीलिका आली ' –मराठी तिसरें पुस्तक [ सं. ] ०भक्षक–पु. दक्षिण अमेरिकेंतील एक दंतहीन प्राणी. हा आपल्या तीक्ष्ण पंज्यानीं मुंग्यांचें वारुळ फोडतो आणि आपल्या लांब जिभेनें त्यांतील मुंग्या ओढून घेऊन गिळून टाकतो. ०**मार्ग**–पु. १ ( योगशास्त्र ) समाधि साधण्याची एक सोपी व पायरीपायरीची रीत. ह्याच्या उलट विहंगममार्ग. २ जगाविषयीं विरक्त, सर्व मनोवृत्तींचें, वासनांचें, इंद्रियांचें दमन करण्याची एक रीत. ३ ( ल ) कोणतेंहि कार्य संथपणें व सावकाश करण्याची रीत. ०**यति**–स्त्री. ( संगीत ) गायनारंभीं मध्य, मध्यें द्रुत, अंतीं मध्य; किंवा प्रारंभीं विलंबित, मध्यें द्रुत व अंतीं विलंबित अशा प्रकारच्या लयींच्या गती असणें. [ सं. ]

**पिपेल**—स्त्री. ( गो. ) दारू पिणें. [ पीप+एल ? ]

**पिपोणी, पिप्पाणी**—स्त्री. (विरू ) पिंपाणी; पिंकाणी पहा.

**पिप्पल**—न. पिंपळाचें फळ. ' तया वृक्षाचीं फळें। तुरटें तिखटें तोंडाळें। पक्कें अपक्कें सकळें। त्यांसि पिप्पलें म्हणताती। ' –एभा ११.१९९ [ सं. ]

**पिप्ली(प्लि)का**—स्त्री. पिपीलिका पहा. ' ब्रह्मादि पिप्लीका देहधारी। ' –दा १३.१.२७ [ सं. पिपीलिका ]

**पियडी**—स्त्री. ( भि. ) भिल्लीण. ' एक रानाम शबरी नांवा पियडी रेयतली आथी. ' –भिल्ली २६.

**पियांकास**—स्त्री. ( गो. ) देवदारी पेटी. [ पोर्तु ? ]

**पियानो**—पु. एक तंतुवाद्य. हें मूळ जर्मनींत तयार झालें. [ इं. ]

**पियाल**—पुस्त्री एक प्रकारचें झाड. [ सं. ]

**पियु(यू)ख-ष**—न. अमृत ' अक्षरसंज्ञेचे अपूर्वश्लोक। चोळिके भक्ती भक्तिरसपियुखें। ' –दावि १९ [ सं. पीयूष ]

**पिर**—स्त्री. ( गो. ) वाटी; चिनीमातीची लहान उथळ तगारी. [ पोर्तु. पिरि ]

**पिरकणें**—अक्रि. एकदम थोडेसें पातळ हगणें; चिरकणें. [ ध्व. ]

**पिरंगणें**—अक्रि. ( राजा. ) १ पिरपिर करणें; किरकिरणें; रड लावणें. २ गयांवयां करून भीक मागणें. [ ध्व. ] **पिरंगणी**–स्त्री. ( गो. राजा. ) पिरपिर; कुरकुर; किरकिर.

**पिरग(गा)ळणी**—स्त्री. मुरगाळणें; मुरडणें; पिळवटणें. [ पिरगळणें ]

**पिर(रं)ग(गा)ळणें**—सक्रि. मुरगाळणें; मुरडणें; पिळवटणें; पीळ घालणें. [ पिळणें ]

**पिरगळा**—पु. चक्कर; फेरफटका. 'थोडासा गेल्याचा देखावा करून मी पिरगळा मारला अन् घरी आलों. ' –के १.७.३०. [ पिरगळणी ]

**पिर(रं)गा(गा)ळा**—पु. १ मुरगाळा ( शरीर, अवयव इ० कांचा ); पीळ; वळ. २ पिळवटलेली, पिरगळलेली स्थिति. [ पिरगळणें ]

**पिरणा**—पु. (कों. नाविक) दुरीच्या आळयाचा दगडी नांगर.

**पिरंगा**—वि. (कु) कुरकुऱ्या; पिरपिऱ्या; कुरकुरणारा.

**पिरंगुणें**—अक्रि. (गो.) पिरपिर करणें; कुरकुर करणें; कण्हणें; कुंथणें. [ पिरपीर ]

**पिरंजणें**—अक्रि. (गो.) त्रासणें; उबगणें; तडफडणें.

**पिरडुक**—स्त्री. (कु.) स्त्रियांच्या गळ्यांतील मंगळसूत्राचे काळे किंवा हिरवे लहान कांचेचे मणी. पिड्डुक पहा.

**पिरतुम**—स्त्री. (राजा. कुण.) पृथ्वी. [ सं. पृथ्वी ]

**पिरपि(पी)र-री**—स्त्री. १ किरकिर; कटकट (लहान मुलाची); पिरंगणी; कळवळून विनंति करणें. २ एकसारखी कटकट; जिकीर; त्रास. 'तुम्ही कां इतकी पिरपिर लागली आहे?' —नाज्ञ ३.८९. ३ एकसारखी लागलेली (झिमझिम पाऊस इ०ची) रिपरिप. [ ध्व. ] **पिरपिरणें**—अक्रि. किरकिर करणें; कटकट करणें; पिरंगणें; याचना करणें. [ ध्व. ]

**पिरपिरा-ऱ्या**—वि. किरकिर करणारें (लहान मूल); कटकट करणारा; त्रासदायक (भिकारी).

**पिरलुक**—स्त्री. (कु.) शिटी; अल्गूज. [ ध्व. ]

**पिरसां**—पु. (अशिष्ट.) (कों.) गवत, काटक्या इ० कांचा केलेला लहान विस्तव; शेकोटी; परसा पहा.

**पिरसुपी**—स्त्री. खाऱ्या पाण्यांतील एक लहान पांढरा मासा.

**पिराडन**—न. (व.) संकट; आपत्ति. [ सं. पीडन ]

**पिराडों**—पु. (गो.) खुडताचा देंठ.

**पिराय**—स्त्री. (गो.) अमदानी; काळ. [ परी=परिस्थिति? फा. पीरी=वार्धक्य? ]

**पिराळवा**—पु. (उंसाचा चरक) भरकवळा.

**पिरिपिरि**—क्रिवि. पाऊस इ० कांच्या एकसारखें पडण्याच्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन; रिपरिप. [ ध्व. ]

**पिरी**—स्त्री. वार्धक्य; म्हातारपणा. 'यावरी नियत धरिली जे आपला पिरी-वक्त आला, आतां मक्केस जावें.' —भा १८३४, पृ. १४४. [ फा. पीरी (पीरपासून) ]

**पिर्थ(थु)म, पिर्थ(र्थी)म**—स्त्री. (कु. गो.) पृथ्वी. —मसाप ४.४.२८०.

**पिल**—न. (ना.) केळीचें रोपटें. [ पिल्लुं? ]

**पिलकूं**—न. लहान मूल, छावा, मांजरीचें पिलूं, कुत्रीचें पिलूं इ० कांस लडिवाळपणानें योजावयाचा शब्द. [ पिल्लुं ] ०**पाठीमागें लावणें-काढणें**-एखाद्याच्या पाठीशीं लचांड लावणें.

**पिलखाना**—पु. हत्ती बांधावयाची जागा; हत्तीखाना. 'तम्ह-तम्हेचा शिकारखाना। बाबाराच्या पुढें पिलखाना। दिला किनी-वर तोफखाना।' —ऐपो २१५. [ फा. ]

**पिलंगणें**—अक्रि. पुढें पुढें धावणें; लपतलपत जाणें; पकडूं पहाणें. 'जो का नानाविषयस्वार्था। न लाजे नीचापुढें पिलंगता।' —एभा ११.१२०९.

**पिलंडा**—पु. (प्रा.) गोळा; गुंडा; गुंडाळा; पिंडा (दोरा, दोरी, काथ्या इ० कांचा).

**पिल(लु)पाकवाद-वादी**—पु पिठरपाकवाद-वादी पहा.

**पिलपील**—स्त्री. (सुतारी धंदा) खचरा; चिरणी नांवाचें हत्यार; खतावणी.

**पिलंपोवा-ळा, पिलमपावा**—पु (व. ना.) पांवा; बांसरी.

**पिलयेंत्सून**—क्रिवि. (गो.) गर्भाशयांतून; (पक्ष्यादिकांच्या) अंड्यांतून. [ पिल्लुं ]

**पिलवा**—पु. (कों.) पिलूं पहा.

**पिलवान्-न**—पु. हत्ती हांकणारा; महात. [ फा. फीलवान ]

**पिलस-सा**—वि. मळकट; अस्वच्छ. 'खाशांच्या पिलसो नसोत म्हणती त्याला बहु रागिजे।' —सारुह ३.४६. [ फा. पिलिश्त ]

**पिला**—पु. (कों.) पिलूं पहा. ०**पांज**-स्त्री. (गो.) जीस पुष्कळ मुलें आहेत अशी स्त्री; लेंकुरवाळी.

**पिलॉ**—स्त्री. (गो.) कोंबडी.

**पिली**—स्त्री. १ (गो. कु.) रंग देण्याची कुंचली. २ (कु) नाक, कान इ० टोंचल्यानंतर त्यांत घालावयाची गवताची लहान काडी; नाकांत घालावयाची चमकी.

**पिलू**—पु. गायनांतील एक राग.

**पिलूं-ल्लूं, पिलें**—न. पशु, पक्षी इ० कांचें लहान पोर; बालक; बच्चा; छावा. [ दे. पीलुक, पिल्ह; प्रा. पीलुअ=बच्चा; शावक. ता. पिळ्ळै; तेल. पिल्ल; का. पिळ्ळे; मल. पिळ्ळ; दे. लॅ. प्युएल्लस, प्युएल्ला=मूल ]

**पिल्लर**—पु. दगडी खांब. [ इं. पिलर ]

**पिल्ला**—पु. (राजा. सुतारी धंदा) भोंक पाडण्यासाठीं किंवा ठसे उमटविण्याकरितां केलेला सांचा;

**पिल्लूक**—स्त्री. (गो.) मुरली; पुंगी; शीळ; शिटी.

**पि(पे)वडी**—स्त्री. रंगाची पिंवळी माती. [ सं. पीत; म. पिवळा ]

**पिंवडी**—न. झाडाचें कलम. (क्रि० करणें; बांधणें). —बागेची माहिती १२.

**पिवशी**—स्त्री. (व.) पिशवी; थैली. [ पिशवी वर्णव्यत्यास ]

**पिवळ**—पु. १ एक प्रकारचा पक्षी. २ (गो.) पीळ.

**पिवळकी**—स्त्री. पिवळेपणा [ पिवळा ]

**पिवळणें**—सक्रि. (कु.) पिरगाळणें; मुरगळणें; मुरडणें; काळेपिळे देणें. [ पिळणें ]

**पिवळट**—स्त्री. पिवळेपणा. [पिवळा] •**पिवळट, पिवळसर, पिवळवट**—वि. किंचित् पिवळा; पिंगट. [पिवळा]

**पिवळणी**—स्त्री. पिरगाळणी; मुरगाळणी; मुरडणी. [पिवळणें]

**पिवळा**—वि. पीतवर्ण; पिवळया रंगाचा. [सं. पीत; प्रा. पीअ: पीवल=एक रंग; सिं पीलो; का. हिताळी] (वाप्र.) **पिवळें करणें-होणें**-हळद लावणें (ल.) लग्न करणें 'पोरगी पिवळी करून तुमच्या पदरांत टाकायची.'—भा १३. सामाशब्द- ०**अभ्रक**—पु पिवळया रंगाचा अभ्रक; एक खनिज पदार्थ. ०**गहूं**—पु. गव्हाची एक जात ०**चटक-जरद-जर्द-धमक-धमधमीत-रसरशीत**-वि. अतिशय पिवळा. ०**चांपा-फा**—पु. पिवळें फूल येणारा चांफा; सोनचांफा ०**जोंधळा**—पु. पिवळया जातीचा जोंधळा. ०**धतरा**—पु. पिवळया रंगाचीं फुलें येणारें धोतऱ्याचें झाड. ०**पंजम लडी**—पु एक रेशमाची जात. —मुंव्या ९७. **पिवळी पगडी**—स्त्री. १ पिवळी पगडी घालणारा. २ (ल.) मुंबईचा पोलीस शिपाई. 'या सर्वांचें मुसलमान लोकांपासून रक्षण करण्यास दोनशें पिवळया पगडया पुरे आहेत ...' —टि १.२६२. ०**कोरांटी**—स्त्री. पिवळीं फुलें असलेली कोरांटी; एक फूलझाड. ०**छाया**—स्त्री. १ (आजारीपणामुळें शरीरावर येणारा) फिकटपणा, पिकटी. (क्रि० येणें; जाणें). २ धुकें, सूर्यग्रहण इ० मुळें पदार्थावर येणारा पिवळेपणा. ०**जरतार**—स्त्री. पांढऱ्या तारेला इलेक्ट्रोप्लेटिंग करून सोन्याचें पाणी चढवून तयार केलेली जरतार. ०**जुई**—स्त्री. एक प्रकारचें फुलझाड; नागमल्ली. ०**मज्जा**—स्त्री. हाडांतील पिवळा द्रव पदार्थ. ०**माती**—स्त्री. सोनकाव ०**राई**—स्त्री. मोहरी; शिरसु. **पिवळोखी**—स्त्री पिवळेपणा; फिकटपणा; पिंगटपणा. **पिवळोखी चढणें येणें**-पिवळेपणा येणें; पिंगट होणें. [पिवळा]

**पिवा**—वि. जाड; लठ्ठ; गुबगुबीत, धिप्पाड. [सं. पीवा]

**पिशंग**—वि. कवरा (रंग). 'मध्यमस्वर पिशंगवर्ण। ऐसें करा तुम्ही ध्यान।' —गुच ३६.३३९. [सं.]

**पिशँपण**—न. (गो.) खुळेपणा; वेडेपणा. [पिसा]

**पिशवाज-त-द्**—पु. पेशवाज पहा.

**पिशवी**—स्त्री. १ थैली; कोथळी. २ पोटांतील पित्ताशय. [का. हिशिबे]

**पिशा**—वि. पिसा पहा. 'तो फुफुवातेंनि जृंभणाखें। पिसा केला तुआं।' —शिशु ४५७. [पिसा]

**पिशाच**—पु. १ क्षुद्रयोनींतील एक जातिविशेष. २ मरणसमयीं ज्याची इच्छा तृप्त झाली नाहीं असा मनुष्यजीव वायुरूप होऊन इतर मनुष्यादिकांस त्रास देतो तो; भूत; समंध. 'आतां जाहालिया भ्रमहत। जैसें पिशाचाचें चित्त।' —ज्ञा ५.५७. ३ (ल) अघोरी, साहसी मनुष्य. [सं] म्ह० पिशाचाच्या हातीं कोलीत= आधींच खोडकर असून त्यांत उत्तेजनाची भर पडणें या अर्थी. सामाशब्द- ०**पक्कान**—न. (कों.) वडे, कोडबुळी इ० कांस उद्देशून योजतात. कोंकणांत पिशाच्चांच्या नैवेद्यांत हें अन्न असतें. [सं. पिशाच+पक्कान्न] ०**बाधा**—स्त्री. भूतबाधा; भुतानें झपाटणें. [सं. पिशाच+बाधा] ०**भावना**—स्त्री. पिशाचबाधेमुळें उद्भवलेला आजार; पिशाचाचा अंमल. [सं. पिशाच+भावना] ०**भाषा**—स्त्री. चार प्राकृत भाषांपैकीं एक भाषा. हिचा उपयोग विशेषतः नाटकांत करतात. [सं. पिशाच+भाषा] ०**मोचन**—न. पिशाचयोनीपासून मुक्तता. [सं. पिशाच+मोचन] ०**लिपी-लिप्त-लीप**—स्त्री. मोडी लिपी. ही हेमाडपंतानें लंकेहून इकडे आणली असें म्हणतात. [सं. पिशाच+लिपी] ०**विद्या**—स्त्री. भूत, पिशाच, ब्रह्मराक्षस, समंध इ०वर अंमल चालविण्याची कला सं. पिशाच+विद्या] ०**विवाह**—पु विवाहाच्या आठ प्रकारांपैकीं एक. स्त्री झोपेंत असतांना किंवा तिला खूप दारू पाजून बेहोष असतांना बळजबरीनें तिच्याशीं विवाह करणें. 'विवाह तव बहुतां परी। पिशाच गांधर्व आसुरी।' —एरुस्व ४.४२. [सं. पिशाच+विवाह] ०**संचार**—पु. पिशाचबाधा; भूत बाधा. [सं. पिशाच+संचार] **पिशाचाधिपति**—पु १ शिव किंवा वेताळ. २ (ल.) लहान मुलांत खेळणारा प्रौढ इसम; भीतिप्रद मनुष्य. [सं. पिशाच+अधिपति] **पिशाचिका**—स्त्री. हडळ; डाकिणी. 'तें माझें जन्मनाम कीर्तिगुण। जे वाचेसि नाहीं पठण। ते वाचा पिशाचिका जाण। क्रमक्रमपणें वटवटी।' —एभा ११.६२९. **पिशाची**—स्त्री. १ पिशाचिका. २ (ल.) कुरूप स्त्री. **पिशाच्च**—पु. पिशाच पहा.

**पिशानदेवरू, पिशानवल्ली**—पु. खुळचट, बावळट, वेडपट मनुष्य. [पिशाच+देवरू, वल्ली]

**पिशाब**—पुस्त्री. लघवी; मूत्र. [फा. पेशाब]

**पिशाल**—पु एक प्रकारचें झाड; (विल.) पिसा.

**पिशित**—न मांस 'कुहिलें पिशित जैसें। श्वानाचें कां।' —ज्ञा १३.५२१ [सं.] **पिशिताशन**—पु. मांस खाणारा राक्षस. [सं. पिशित+अशन]

**पिशी**—स्त्री. १ दाणे काढल्यानंतर उरणारें, मक्याखेरीज कोणत्याहि धान्याचें कणीस. हुरडा खातांना पानें दहीं खातात. २ (खा.) पिशवी; थैली. ३ एक गव्हाची जात. [दे.]

**पिशुन**—वि. चहाडखोर; दुष्ट; चुगलखोर; द्वाड. 'हरिचें काय करावें परिसो तो हितकथा पिशुनकानें।' —मोउद्योग ६.७. [सं.] **पिशुनता**—स्त्री. कपट; लबाडी; दुष्टपणा; चहाडखोरपणा. 'हें कां दुर्गुण लोभ जैं पिशुन। जै, कां महापातकें।' —वामन, स्फुटश्लोक (नवनीत पृ. १२६). [सं]

**पिशुलोद**—पु. कापूर आणि नत्रिक अम्लांत कापूस भिजवून केलेल्या रासायनिक पदार्थाच्या संयोगानें झालेला रासायनिक

पदार्थ. याचा उपयोग फण्या, बाहुल्या, खेळणी इ० बारीकसारीक वस्तू तयार करण्याकडे करितात. [ इं. सेल्युलॉईड ]

**पिशुलोस**—पु. वनस्पतीच्या मूळ पेशी ज्यापासून उत्पन्न होतात तें द्रव्य; उद्भिजपेशीद्रव्य. [ इं. सेल्युलोज ]

**पिशेल**—न. पिसा झाडाच्या बियांपासून काढलेलें तेल. [ पिसा+तेल ]

**पिश्यॉद्-ल**—न. (गो.) कुंचला. [ पो. पिन्सेल ]

**पिष्ट**—न. धान्यादिकांचें पीठ; चूर्ण. 'ब्रह्मशापाचें समुल घन। यादवीं पिष्ट करितां जाण।' –एमा ३०.२१५. [ सं ] (वाप्र.) **०करणें**–चूर्ण करणें; ठार मारणें. 'ऐसें म्हणे रणीं तो केला कीं त्वां शरोत्करें पिष्ट।' –मोकर्ण ४०.२१. सामाशब्द– **०पेषण**–न. पुनः पुनः तेंच तें सांगणें किंवा करणें, एखाद्या गोष्टीचा निरर्थक खल करणें; चर्वितचर्वण. [ सं. पिष्ट+पेषण=दळणें ] **०मयद्रव्य**–न. पिष्टसत्व पहा. **०मेह**–पु. पीठ कालविलेल्या पाण्याप्रमाणें होणारी लघवी; प्रमेहाचा एक प्रकार. [ सं. पिष्ट+मेह ] **०शर्करा**–स्त्री. पिष्टसत्वा-पासून तयार केलेली स्फटिकसदृश साखर. [ सं. पिष्ट+शर्करा= साखर ] **०सत्त्व**–न. कंद, धान्य इ०कांत होणारा अन्नाचा पिठूळ सत्त्वांश. [ सं. पिष्ट+सत्त्व ]

**पिसक(का)रणें**—उक्रि. विसकटणें; अस्ताव्यस्त होणें; विखु-रणें; विस्कारणें. 'केंस पिसकरलेले, दाढी वाढलेली. –नपुक ९७. [ सं. अपिस्करण ]

**पिसटणें**—अक्रि. वेडपट होणें; वेडे चाळे करणें, पिशाचबाधा होणें. [ पिसें ]

**पिसणें**—सक्रि. १ दळणें; पीठ करणें; चूर्ण करणें. २वाटणें; घोटणें; उगाळणें; गरगटणें. ३ पत्त्यांच्या पानांची मेसळ करणें; गल्लत करणें. [ सं. पिष्, पेषण, प्रा. पीसण, गु. पिसवुं; हिं. पिसना= दळणें फ्रें. जि. पिस ] **पिसणावळ**–स्त्री. दळणावळ; दळण्याची मजुरी; पिसाई. [ पिसणें ]

**पिस(सो)रा**—पु. एक वनस्पति.

**पिसवळा**—पु. पिसोळा पहा.

**पिसवाज**—पु. पेशवाज पहा. 'कुसुंबी जरी पिसवाज रेल चरित कंठी।' –सला २७.

**पिसवी**—स्त्री. गोमुखी; पिशवी. 'हुंदकी पिसवी झालविता दाढी। माळेमणी ओढी निदेचे ते।' –तुगा ३०९८. [ पिशवी ]

**पिस(सा)ळणें**—अक्रि. १ कोल्हा, कुत्रा इ०कांस एक प्रकारचा रोग होऊन त्यामुळें त्यास वेड लागणें, असा रोगयुक्त प्राणी मनुष्यास चावल्यामुळें त्यास त्याच प्रकारचा रोग होणें २ वेड्या-सारखें करणें, संतापणें; खवळणें. ३ पिशाचबाधा होणें. [ सं. पिशाच; प्रा. पिसल्ल=वेडे होणें. ] **पिसाळून सोडणें**–वेडे पणांत त्रास देणें.

**पिसा-शा**—पु. १ एक प्रकारचें झाड. हीं झाडें महाबळेश्वर, माथेरान व दुसऱ्या पुष्कळ ठिकाणीं आहेत 'पिशेयांचे पालव दाटनी। डोळेंयांचिआ वागा उन्हौनी।' –शिशु ६०८. २ कापूस. –शर. [ पीस ]

**पिसा-शा**—पु हातोड्याचें वजनदार व घाव मारावयाचें टोंक. याच्या उलट मुखा=पसरट तोंड. [ पिच्छा ]

**पिसा, पिशा**—वि. वेडा; भ्रमिष्ट; पिसाट, पिशाचासारखी चेष्टा करणारा. 'घेसी आडवेडे मुक्तीच्या अभिळासें। चाळवीं जा पिसे ब्रह्मज्ञानी।' –तुगा १५२२. [ पिसें ] **म्ह०** १ आधीं पिसा त्याचें हातीं दिलें कोलीत. २ बायको वेडी पोर पिसें जावई मिळाले तेहि तसेच.

**पिसाई**—स्त्री. दळणावळ; दळण्याची मजुरी [ पिसणें ]

**पिसाट**—न. पिशाच; भूत; ब्रह्मराक्षस. –वि. १ वेडा; वेडपट; खुळचट; खुळा. २ ज्यास पिशाचबाधा झाली आहे असा. [ सं. पिशाच ] **पिसाटणी**–स्त्री. वेड; खूळ; भ्रम. [ पिसाट ] **पिसाटणें**–अक्रि. (कों.) १ पिशाचबाधा होणें. २ भ्रमिष्ट होणें; वेडे चाळे करणें. [ पिसें ] **पिसाटीक**–वि. वेडा; भ्रमिष्ट; खुळचट; खोडकर; पिशाचासारखा. [ पिसें, पिशाच ] **पिसांतर**–वि. (कु.) पिसा; वेडा; भ्रमिष्ट.

**पिसाब**—पु लघवी; मूत्र; पिशाब. [ सं. प्रस्राव; फा. पेशाब ] **०करणें**–लघवी करणें.

**पिसाय**—न.. १ (गो.) वेडेपणा; २ पिसें उभारणें (पक्ष्यानें).

**पिसारा**—पु. १ पिसांचा समुदाय; उभारलेले पंख. २ बाणाच्या शेवटीं लाविलेलीं पिसें. ३ पीस. ४ धान्याचें पोचट कणीस. 'शेती पिसारे राहिले त्यासीं। निजगृहासीं तुम्ही न्यावें।' ५ अंड्यांतील बलक ? 'दुधात कोंबडीचे अंड्याचा पिसारा खलून देणें' –बालरोगचिकित्सा २८. ६ चिपारीहून बारीक असें चाभा-रांचें हत्यार. –बदलापूर २८०. ७ पिसें असलेली लहान मुलांची टोपी. [ पीस ] **पिसारणें**–उक्रि पिसें उभारणें (पक्ष्यानें).

**पिसावचें-णें**—अक्रि. (गो) वेडें होणें; पिसाटणें. [ पिसें ]

**पिसाळणी**—स्त्री वेड; पिसाळणें; भ्रमिष्ट होणें. [ पिसाळणें ]

**पिसाळा-ळें**—पु. त्रास; कटकट; कंटाळा. 'मी दागि-न्याकरितां हट्ट करून त्याला पिसाळा आणते.' –कोरकि ३२१. –न. वेड; खूळ; भूतबाधा [ पिसें ] **म्ह०** इसाळा शेजारीं पिसाळा.

**पिसॉळें**—न. (गो.) पतंग; फुलपाखरूं [ पीस ]

**पिसुडणें**—सक्रि (रा. कु) (पिसें, फुलाच्या पाकळ्या, पुस्तकाचीं पानं इ०चे) ओढून तुकडे करणें; कुरतडणें; (गो) पिसुडचें [ पीस ]

**पिसुंडी, पिसुर(रं)डी, पिसुंद्री**—स्त्री. नारळाच्या फांदीच्या मुळाशीं असलेलें तंतुयुक्त आळें; पोयीच्या वरची त्वचा. [ पीस ]

**पिसुण-णा**—वि. पिशुन पहा.

**पिसुरडें**—न. सापाच्या जातीचा एक प्राणी.

**पिसुवा, पिसू**—स्त्री. दंश करणारा एक सपक्ष क्षुद्र जंतु; पंख असलेली ऊ. ' पिसुवा म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी।' —दा १.१०.४०. [ हिं. ]

**पिसूक**—न. (शाप, मंत्र जादूटोणा इ०नीं) वाघ, लांडगा, कुत्रा इ० झालेला मनुष्य.

**पिसूड**—न. (गो.) अंबाडा बांधल्यावर राहिलेलें केसांचें टोंक. पिसुंडी पहा. [ पीस ]

**पिसें**—न. १ वेड; भ्रम; पिशाचबाधा, म्हातारपण इ०मुळें लागलेलें वेड. ' जात्यंधा लागे पिसें । मग तें सैरा धावें जैसें।' —ज्ञा २.९३. [ पिशाच ] **पिसेंपण**-न. वेडेपणा; वेड. ' ते ज्ञाते पण न मिरविती । पिसेपण न दाखविती।' —एभा १.४९.

**पिसोटी पिसोंडी, पिसोणी**—स्त्री. (गो) एक प्रकारची गवताची केरसुणी. [ पिंसुडी ]

**पिसोंडे, पिसुंडे, पिसोंडया, पिसुंडया**—पिंचुंण्या पहा.

**पिसोंद्र**—स्त्री. (गो.) पिसुंडी पहा.

**पिसोर-रा**—पु. हरिणाची एक लहान जात. हींत कस्तूरी-मृगाचाहि अंतर्भाव होतो.

**पिसोळा**—पु. एक तांबडा, उडणारा व दंश करणारा किडा. ' पिसोळा चाऊन पळाला । तेणें प्राणी दुश्चीत जाला।' —दा १८.१०.२५. २ पिसवांचा नाश करणारी एक उग्र वनस्पति; हिची उंची हात-दीडहात असून पानें लहान असतात. ही रेचक आहे. —वगु ४.७५. [ सं. पटुकर्मा; पिसू ]

**पिसोळें**—न. (गो.) कुसरी; फुलपाखरूं; पतंग. [ पीत ]

**पिस्कात**—स्त्री. (गो.) झांकतां न येणारी सुरी.

**पिस्कारणें**—सक्रि. पिसकारणें पहा.

**पिस्ता**—पु पिस्त्याचें झाड व फळ. हीं झाडें सिरिया, दमास्कस, मेसापोटेमिया या प्रांतांत होतात. फळाचें तेल औषधी आहे. [फा.] **पिस्ताई**-वि. काळसर हिरव्या रंगाचा; तसलें वस्त्र.

**पिस्तुल**—न. खिशांत ठेवण्यासारखी लहान बंदूक. हें स्फोटक हत्यारापैकीं आहे. हें एका हातानें वापरतां येतें. [ इं. पिस्टोल ]

**पिस्तोल**—न. एक नाणें. याची किंमत सवा आठ रुपये आहे. —छअ ७०.

**पिस्तोलफेर्नाद**—वि. (गो.) बाहेरख्याली मनुष्य.

**पिस्वाद**—पु. पिशवाज, पेशवाज पहा. [ फा. पेशवाज ]

**पिहा**—पु. पानथरी; प्लीहा पहा.

**पिहू**—न. कोकिळेच्या आवाजाचें अनुकरण. [ ध्व. ]

**पिहू**—पु. प्रियकर; जार; उपपति. [ सं. प्रियकर ]

**पिळकणें**—अक्रि. एकदम थोडेसें पातळ हगणें; लहानसा जुलाब. [ ध्व. ]

**पिळक(का)वणें**—न. पीळ घट्ट बसण्यासाठीं दोरीच्या पदरांत जें (गाडीच्या सांकणीमधील किंवा तेल्याच्या घाण्याच्या लाटेच्या दोरामधील) लांकूड घालून पिळतात तें. [ पिळणें ]

**पिळकी**—स्त्री. (लहान मुलांस) एकदम व थोडा होणारा जुलाब. [ पिळकणें ]

**पिळगी**—स्त्री (गो.) कूळ, पिढी; संतति. ' आमच्यो पांच पिळग्यो याच घरांत झाल्यो ' [ पिढी ]

**पिळगुटणें**—सक्रि पिळणें; पिळवटणें; मुरगाळणें; जोरानें फिरविणें. [ पिळणें ]

**पिळण**—न (व) १ ऐन उताराबर एक बाजूस वळणारें रस्त्याचें वळण २ आंखेतून घेऊन दमणीच्या धुऱ्यांच्या भोंवतीं बांधलेला दोर. [ पिळणें ]

**पिळणी, पिळण**—स्त्री. (कों.) कापड इ०चें पिळणें; पिळवटणें. [ पिळणें ]

**पिळणें**—सक्रि. १ पीळ घालणें; वळणें. २ पिरगाळणें; मुरगाळणें; पिळून काढणें (अचळ, फळ इ०तून दूध, रस इ०); दाबून काढणें. ३ (ल.) जुलमानें काढणें; उकळणें. [ सं. पीडनं; प्रा. पीलण, पिलेइ; गु. पिळवुं; हिं. पिलना; का. पिळि ]

**पिळपिळीत**—वि. १ चांगला पीळ न घातलेली; सैल विणीची (दोरी इ०). २ (ल.) सैल विणीचें, ठासणीचें (कापड); विसविशीत. ३ (ल.) मुळमुळीत; नेभळट; निःसत्व; कमजोर (उपाय, भाषण, वर्तणूक इ०). [ ध्व. ]

**पिळपिळें**—न. (कों.) सुताराचें एक हत्यार; पिळपीळ.

**पिळवट**—वि. घट्ट पीळ दिलेला; पीळदार. **पिळवटणी**—स्त्री. पिळणें; पीळ घालणें.

**पिळवटणें**—सक्रि. १ पीळ घालणें; पिळणें; पिरगाळणें. २ (ल.) व्यथित होणें; दुःखानें करपणें. ' पिळवटलेल्या हृदयाच्या।' —संग्रामगीतें ६८. [ पिळणें ]

**पिळवणी**—न. कपडे वगैरे पिळून निघालेलें पाणी. [पिळणें+ पाणी ]

**पिळसुटाणी**—स्त्री. (गो.) एक प्रकारची दुर्गंधि.

**पिळा**—पु. १ पीळ; वळ; पिळलेलें वस्त्र वगैरे. २ (ल.) शरीराला दिलेले आळेपिळे. ३ घोड्याचा एक रोग. —अश्वप १. १३०. [ पिळणें; सं. पीडन; पीळ्—अडविणें ]

**पिळाई**—स्त्री. घाण्यांतून तेल पिळण्याची मजुरी [ सं. पीड्= दाबणें; सिं. पिडाई ]

**पिळाचंपा**—पु. पिवळा चांफा; सोनचांफा. [पिवळा+चंपक]

**पिळिपिळि**—क्रिवि. ( तंजा. ) वेड्यासारखें; भावशून्यतेनें ( पाहणें ).

**पिळिह्लीसोय**—वि. ( गो. ) निःसत्व; भेभळट ( मनुष्य ). [ पिळणें ]

**पिळू**—पुस्त्री. सूत काढण्यासाठीं केलेला कापसाचा वेळू; पेळू ( पिळवटून केलेला काप्या, कापूस इ०चा ). 'पिंजून पिंजून केला पिळू।'–भज ५६. [ प्रा. पिडली ]

**पिळें**—न. पिळकवणें पहा.

**पी**—वि. पिणारा ( समासांत अंत्यपदीं ); मद्यपी; क्षीरपी इ० [ सं. पा=पिणें ]

**पी**—स्त्री. प्लीहा पहा.

**पीक**—न. पिंक पहा. 'पीक अंगावरी टाकी अकस्मात।' –रामदासी २.७८. **०दाणी-नी-दान**–स्त्रीन. पिकदाणी–दानी पहा. [ पीक+दान ]

**पीक**—न. १ पेरलेलें धान्य इ०कांची परिपक्वता. २ शेतांत उभें असलेलें किंवा नुकतीच कापणी केलेलें काडासह धान्य.'सेवटीं पीक होतां घनदाट। कुणबट अंतरीं संतोषे।' ३ मळून तयार झालेलें धान्य. [सं. पच्, पक्व] (वाप्र.) **०जळणें**–अतिशय उन्हानें पीक वाळणें; पिकाचें नुकसान होणें. **०सोडणें**–जमीनीची पीक देण्याची शक्ति कमी होणें; जमीनीची सुपीकता कमी होणें. **पिकाचा फुफाटा उडणें**–पिकाची धूळधाण होणें; पिकाची राखरांगोळी होणें. सामाशब्द– **०नुकसान**–न. पिकास ( अतिशय पाऊस, उष्णता, थंडी इ०मुळें ) झालेली नुकसानी; पिकाची नासाडी **०नुकसानी**–स्त्री. १ पिकाची नासाडी; पीकनुकसान. २ पीक बुडाल्यामुळें सरकारनें दिलेली सूट. **०पाऊस**–पु. पीक पिकावयास योग्य असा पाऊस. **०पाणी**–न. पिकाबद्दल सामान्यपणें बोलतांना योजावयाचा शब्द. 'यंदा पीकपाणी बुडालें.' पावसाचें एकंदर मान लक्षांत घेऊन पिकाबद्दल योजावयाचा शब्द. 'तुमच्या गांवाकडे पीकपाणी कसें आहे बरें?' **०पाहणी**–स्त्री. पिकाची तपासणी, अंदाज, आणेवारी.

**पीक**—पु. कोकीळ ( विरू. ) पिक पहा. [ सं. पिक ]

**पीक**—स्त्री. ( बे. ) गोगलगाय. [ दे. ]

**पीक**—पु. ( व. ) फोड, जखम इ०तून येणारा द्रवपदार्थ; पू. 'फोडांतून पीक गेला.' [ पिकणें ]

**पींग**—न. ( गो. ) दोन माणसांचें ओझें. ( वाप्र. ) **०बांधणें**–दोन माणसांस ओझें उचलतां यावें म्हणून आडवा दांडा बांधणें.

**पीछेहाट**—स्त्री. माघार; मागें हटणें. [ हिं. पीछे+हटनें ]

**पीटांगूळ**—न. ( गो. ) एक प्रकारचा पक्षी

**पीटिका**—स्त्री. पुळी; लहान फोड. [ सं. ]

**पीठ**—न. १ ( विशेषतः कणिक सोडून इतर ). धान्यादिकांचें दळून केलेलें चूर्ण. २ जमीनदोस्त, चिरडलेली, नाश पावलेली स्थिति; पराभूत, पादाक्रांत केलेली स्थिति; पूर्ण खर्च; चूर; चुराडा; धूळ, माती, राख इ० शब्दाबद्दल योजितात. 'तंव द्वादशादित्यांचा मेळा। एकत्र होय रविमंडळा। तो पीठ करी पर्वतशिळा। तृणशाळा उरोंनेदी।'–एभा २४.५२६. ३ आधिक्य दाखविण्यासाठीं गोरा या शब्दापुढें योजितात. उदा० 'गोरा गोरा पीठ' ४ स्वच्छ व शुभ्र चांदण्यास उद्देशून क्रियाविशेषणाप्रमाणें योजितात. उदा० 'चांदणें पीठ पडलें' [ स. पिष्ट ] म्ह० १ आधीं पिठोबा मग विठोबा=प्रथम पोट मग इतर कामें. २ पिठाण्यांत पीठ नाहीं मिठाण्यांत मीठ नाहीं. सामाशब्द– **०कूट**–न. स्वयंपाकास लागणाऱ्या नेहमींच्या व आवश्यक वस्तू [ पीठ+कूट ] **०गांठ्या**–पु. आळवाच्या पानाची पीठ लावून तेलांत तळलेली वडी. **०पाणी**–न. साखर घालून पाण्यांत कालविलेलें लाह्यांचें पीठ, आजारी माणसाचें एक पेय. **०पोळी**–स्त्री. तांदुळाचें पीठ शिजवून त्यास गव्हाचें अस्तर लावून केलेली पोळी.

**पीठ**—न. १ आसन; बैठक. २ वेदाभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याचें दर्भाचें केलेलें आसन. ३ मुख्य स्थान जसें गुरुपीठ इ० 'तेचि ब्रह्मविद्या जाणा। कैंमेनि प्राप्त होय आपणा। ते पूर्वपीठविवंचना। सावधानमनां परियेसी।'–एभा १०.३२५. ४ विष्णूच्या चक्रानें झालेले पार्वतीच्या मृत शरीराचे तुकडे ज्या ठिकाणीं पडले ती एक कल्पिलेली जागा; पीठस्थान अशीं पीठें एकंदर एकावन्न आहेत. महा पीठ पहा [ सं. ] **०न्यास**–पु. पूजा करतांना पीठास विशिष्ट जागीं करावयाचे स्पर्श. [ स ]

**पीठवण**—स्त्री. कोडावरील एक औषध. [ सं. पृष्ठिपर्णि ]

**पीठा**—पु १ वखार. 'लकडपीठा.' २ दारूचें दुकान. [ सं. पीठ ]

**पीठिका**—स्त्री. १ वंशपरंपरा; कुळपरंपरा; सर्व गोत्र, कुल किंवा वंश २ पाया; भूमिका; आसन. 'हो कां आत्मनिवेदनातळींची। जे पीठिका होय सख्याची। पार्थु अधिष्ठात्री तेथिंची। मातृका गा।'–ज्ञा ६.१२७. ३ ( ल ) कोणत्याहि गोष्टीची, धंद्याची इ० साग्र हकीकत [ सं. ]

**पीड**—उक्रि. ताडाच्या झाडाचा बुंधा. –कृषि ७५८. [ हिं. पेड ]

**पीडणें**—उक्रि. १ त्रासणें; त्रासविणें; दुःख देणें. २ दाबणें. 'सव्य तें तळीं ठेविजे। तेणें सिवणीमध्यु पीडिजे।'–ज्ञा ६.१९४. [ सं पीडन ]

**पीडन**—न. त्रास; पीडा; दुःख. [ सं. ]

**पीडा**—स्त्री. १ दुःख; त्रास; कटकट. २ व्याधि; उपाधि; त्रासदायक मनुष्य, गोष्ट, धंदा इ० ३ भूतबाधा. [सं.] **०काढणें**—ब्याद टाळणें; त्रासदायक माणसास हांकलून लावणें. **पीडावणें**—अक्रि. त्रासणें; दुःखित होणें, पीडणें. 'तंव ते अत्यंत पीडावलीं। वाट पाहात बैसलीं।' –दा ३.४.१८. [सं. पीडा] **पीडित**–वि. त्रासलेला; गांजलेला; पीडलेला; कष्टलेला.

**पीढ**—न. (व.) पाट. [सं. पीठ; गु. पीढियुं]

**पीण**—स्त्री. (कों.) स्तनपान; थान पिणें. [सं. पा=पिणें]

**पीत**—वि. पिवळा. [सं.] **०चंदन**–न. पिवळें चंदन. **पीतांजनविषांग**–वि. उजव्या बाजूस पिवळे ठिपके असलेला (घोडा). **पीतांबर**–पु. पिवळ्या रेशमाचें वस्त्र; नेसावयाचें वस्त्र; नेसावयाचें उंची रेशमी वस्त्र. [पीत+अंबर=वस्त्र]

**पीत**—पु. (ल.) दिवा; ज्योत. 'पीतापासुन कृष्ण आलें। भूमंडळीं विस्तारलें। तेणेंविण उमजलें। हें तों घडेना।' –दा १५.६.१.

**पीत**—वि. १ प्यायलेला; प्राशन केलेला. २ प्राशन केला गेलेला. [सं. पा=पिणें]

**पीताम्ल**—न. एक रंगहीन तेल; ह्या अम्लाच्या ताम्राच्या क्षाराचा रंग पिवळा असल्याकारणानें यास पीताम्ल म्हणतात. –ज्ञाको प १३७. [सं. पीत+अम्ल]

**पीन**—वि पुष्ट; लठ्ठ; मांसल. 'एकें पीनावयव मांसाळें। एकें शुष्कें अतिविकाळें।' –ज्ञा ११.१३९. [सं.]

**पीनस**—पु. (विरू.) पिनास; नाकाचा एक रोग. [सं पीनस]

**पीप**—न. पाणी भरण्याचें लांकडाचें एक मोठें पात्र; टीप [पोर्तु. पिपा]

**पीयु(यू)ख-ष**—पु. १ अमृत. 'तुझे मुखींचें कथापीयूख। बिंदुमात्र लागतां देख।' –एभा १९.१२८. २ पाणी. 'आतां निर्वाळूनि कनकें। भरिला गागेपीयूखें।' –ज्ञा १६.१९७. ३ कोंवळें दूध; चीक (जनावर व्यालें असतां प्रथम काढलेलें). [सं.]

**पीर**—पु. १ मुसलमान साधु, किंवा त्याचें थडगें. २ वृद्ध माणूस. ३ वस्ताद; वरचढ माणूस ४ खुळा, वेडा माणूस [फा.] म्ह० त्याला पीर भेटला म्हणजे तो दबेल. **०जादा**–पु. साधुपुत्र. 'त्या ठिकाणीं हुसैनीसाहेब म्हणून मशायख पीरजादा आहे.' –रा ५.११२. [फा. पीर्झादा]

**पीर**—स्त्री (गो.) बशी; पिण्याचें उथळ पात्र [पोर्तु. पीरेस]

**पील**—न. १ (कोंबडी, पोपट, कावळा, मांजर इ० पशु-पक्ष्यांचें) पिलूं. २ –पुन. केळ, कळक इ० कांचा कोंब, अंकुर

**पील**—न. एक उपरत्न. हें जपानी व चिनी लोकांस फार प्रिय आहे. त्यास ते आपलें राष्ट्रीय रत्न समजतात. हें भुरकट रंगाचें, पांढरें, पांढरट हिरवें असून कठिण व अपारदर्शक आहे. (इं. जेड)

**पीलखाना**—पु. १ गजशाला; हत्तीखाना. २ गजदळाचें खातें. 'पीलखाना व अस्तबालास व उंटास दाणा नाहीं. फाके गुजरतात.' –रा १.५४. [फा. पीलखाना]

**पीलभक्त**—वि. दांभिक; ढोंगी; भोंदू. **पीलभक्ति**–स्त्री. १ जग परमाणूपासून उत्पन्न झालें आहे असें मत. २ प्रेम व मैत्री याविषयींच्या पोकळ बाता. ३ ढोंगीपणा; दांभिकता. [सं. पिलु·भक्ति]

**पीलवान**—पु. हत्ती हांकणारा; महात. [फा]

**पीलु**—पु. (संगीत) गायनांतील एक राग. यांत षड्ज, कोमल ऋषभ, कोमल गांधार, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र धैवत, कोमल निषाद, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण–संपूर्ण वादी कोमल गांधार व संवादी तीव्र निषाद. गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर. कोणी सार्वकालिकहि मानतात. आरोहांत तीव्र स्वर व अवरोहांत कोमल स्वर घेतले जातात.

**पीलु**—न. एक कोंकण–गुजरातप्रांतीय झाड. याचीं पानें धायटीसारखीं व फळें तोरणासारखीं असून फळांचें तेल वायुहारक आहे. कोंकणी नांव किंकण, सारी. –वगु ४.७६.

**पीषांट**—स्त्री. पिछाड. 'येक दंडी मुद्ध पीषांटीं घात। मनकट वरी गुंढाळत। तोंडें काढूनी येरी मोहोरे। तेथें आणीकें डसती।' –उषा १६९९. [हिं पिछाडी]

**पी(पीं)स**—न. १ लहान व बारीक पंख. २ बाणाचें टोंकास लावलेलीं पिसें प्रत्येकी. ३ –स्त्रीन. भाताच्या रोपास लागणारी कीड; कीड लागून रोगटलेलें कणीस. 'भातानें पिसा टाकल्या.' 'शेताला पिसा पडल्या.' 'हें पीस तोडून आणलें.' ४ पळी, उचटणें इ०चा दांडा. 'पळीचें पीस भातांत फिरवून वर झांकण ठेवावें.' –पाकशास्त्र २. [सं. पिच्छ] **पिसाचा कावळा करणें**–अतिशयोक्ति करणें.

**पीस**—न. पिसवा. [पिसूं]

**पिहु**—न. कोकीळ पक्ष्याचा आवाज [ध्व.]

**पीळ**—पु. १ वळ; मुरड; पिरगळा; पिरगाळलेली स्थिति (दोर इ० ची) २ (ल) ताठा; मगरुरी; शिरजोरपणा ३ (ल.) प्रेमाचा किंवा दयेचा कळवळा. ४ (ल.) मनांतील अढी; पेंच; वाक; तिढा. 'जाणत्याचे पेंच जाणावे। जाणत्याचे पीळ उक-लावे।' –दा १८.२.११. [पिळणें] म्ह० सुंभ जळेल पण पीळ जळत नाहीं. (बाप्र.) **०पडणें**–मनांत अढी धरणें; विपरीत ग्रह करून घेणें **पिळाचा वाळा**–पु. (सोनारी) लहान मुलांच्या पायांत घालावयाचा एक दागिना (चांदीचा) चार सुतांना एक

ठिकाणीं पीळ घालून घोटयाच्या आकाराचें त्याचें वर्तुळ बनवून व त्या वर्तुळावर तीन ठिकाणीं धागऱ्या बसवून तोंडाशीं दोनही बाजूस मोगरे केलेले असतात. **पिळाची गांठ**–रांगोळीचा एक प्रकार. ही वर्तुळात्मक असते. ही अकरा ठिपक्यांच्या चौकांत बसते. **पिळाची फुली**–रांगोळीचा एक प्रकार. **पिळाचें कमळ**–रांगोळीचा एक प्रकार हें कमळ सात ठिपक्यांच्या चौकडींत बसतें. हें वक्ररेषात्मक असतें. **पीळणी**–स्त्री. पीळ. 'आसुडी गजाचे प्रहात। पाये देउनी उपडी दांत। तेची पीळणी घेउनी। पुरवी राउतासी जुगांत।' –उषा १४८३. **पीळदार**–वि. चांगलें पिळ लेलें; वसलेलें; मजबूत. २ गर्विष्ठ; आढयतेखोर; मिजासखोर (मनुष्य).

**पीळ**—पु. (पगडबंद) पागोटयाच्या बांधणींतील एक विशिष्ट रचना. राठ चिरगुटाच्या सुरळीभोंवतीं नव्या कापडाच्या पट्टया मुडपून गुंडाळतात व भक्कम शिवतात. पगडीच्या कोंक्याच्या एका बाजूस सारखे पीळ व दुसऱ्या बाजूस सपाट पट्टया असतात [पिळणें सं पील=अडविणें]

**पीळकाणें**—न. (ढोरांचा धंदा) चामडें पिळून काढण्याचें लांकुड.

**पु॥**—(सांकेतिक) पुरवणी, पुरवणीपत्र इ० बद्दलचा संक्षेप.

**पुं**—वि. पुरुषवाचक पद. समासांत उपयोग. उदा० पुंकेसर; पुंगव; पुंलिंग इ०. [सं. पुंस; प्रा. पुं] **पुंजननेंद्रिय**–न. पुरुषाचें जननेंद्रिय; लिंग, शिश्न. [सं. पुंस+जनन+इंद्रिय]

**पुआळणें**—अक्रि. (महानु.) पळणें; धांवणें; चालणें; स्थिर न राहणें.' राउळांपुडें वाढत। राजवाहान पुआळित। हो हो भणतां राउत। आखूडती ना।' –शिशु ५३०; शिवाय ६८२; १००६. [सं. प्लवन=घोडयाची एक चाल, दौड]

**पुई**—स्त्री. १ पुळी; पुरळी. २ एक प्रकारची वनस्पति, झुडुप. हें साधारण पुरुषभर उंचीचें असतें. याचा पाला वाटून ताकांत कालवून व्रणावर लावला असतां व्रणांतील सर्व पू बाहेर येतो. [पू. सं. पूति; प्रा. पुइ=पू]

**पुई**—स्त्री. पोय पहा.

**पुंई**—क्रिवि. (भि.) खालीं. 'इं विईनें बांदरांहीबी टोप्या काढिनें पुंई टाकया।' =हें पाहून वानरांनींहि टोप्या काढून खालीं टाकल्या. –भिली १९.

**पुका**—पु. (कों.) एक प्रकारचा मासा. हा हातभर लांब असतो.

**पुकानंद**—वि. (उप.) खादाड; पुख्खा झोडणारा. पुखानंद पहा. 'अलीकडचे साधू तुसते पुकानंद.' [पुख्खा+आनंद]

**पुकार, पुकारणी**—पुस्त्री. १ मोठ्यानें हांक मारणें; आरोळी मारणें; बोलावणें. २ हाकाटी; गवगवा; बोभाटा; बातमी. 'गांवो-गांवच्या वर्तमानपत्रांतून नेहमीं पुकार होतच असतो.' –नि ३१९. ३ (सामा.) आरडाओरड; ओरडा. [सं. पूत्कार; प्रा. पुक्कार. हिं. पुकारना; सिं. पुकारणु] (वाप्र.) **पुकार कळणें–पडणें**–बातमी पसरणें; आवई पडणें; जाहीर होणें; विदित होणें 'मग पुकार कळली पुणेंशहराला। गर्भार बाया चालल्या पाहायाला।' –ऐपो १६७. 'सारे शहरामधें पुकार पडली उभे सुभे माडीमाडीं।' –पला ४.१३. –ऐपो २१४. **पुकारा**–पु पुकार पहा. 'शिवाजी राजांची नजर अंधःकारांत रुतली असल्यामुळें एवढा पुकारा झाला आहे.' –विक्षिप्त १.५०. **पुकारणें**–१ ओरडणें; मोठ्यानें आवाज करणें. २ एखाद्याविरुद्ध ओरडा करणें; हाकाटी करणें. ३ जाहीर करणें; बातमी पसरविणें. 'लष्करी कायदा पुकारला तो कोणत्या आधारें?' –के १०.६.३०. ४ आरडाओरड करणें [पुकार]

**पुकारा**—पु ताठा; अभिमान, फुगणें 'नको मानसीं ज्ञान गर्वे पुकारा.' –रामदास, करुणाष्टक ४. [फुंकार]

**पुंकेसर**—पु. फुलांत स्त्रीकेसराच्या भोंवतालीं असणारे केसर. [सं. पुंस+केसर; प्रा. पुं+केसर]

**पुंख**—पुन १ पिसें लावलेलें बाणाचें अग्र. 'रणा माजवी तोरण, पुंखबाणी मेघवर्णे।' –आपद ५८. २ पुच्छ; पिसारा. 'शार्ङ्गधनुष्य अतिसबळ। सुवर्णपुंख बाण सरळ। हल आणि मुसळ। आयुधें प्रबळ पूजावीं।' –एभा २७.२५६. [सं.]

**पुखा–ख्खा**—पु. यथेच्छ जेवण; भरपूर, आकंठ जेवण. (क्रि० पाडणें; करणें; उरकणें) 'तेथून परत आल्यावर तयार करून ठेवलेल्या पुख्ख्यावर यथास्थित हात मारतात.' –आगर ३.१५८. [पूर्ते? +खाणें] **०झोडणें**–स्वतः श्रम न करतां मिळालेल्या अन्नावर यथेच्छ हात मारणें. 'जोंपर्यंत पुख्खा झोडायला मिळे तोंपर्यंतच 'रावसाहेब' करीत.' –कोरकि ८८. **पुखानंद**–पु पोटभर मिष्टान्न मिळालें म्हणजे कृतार्थ मानून कांहीं उद्योग न करणारा; केवळ पोटभरू. 'कुटाळ ब्राह्मण येक पुखानद।' –रामदासी २.४१. [पुखा+आनंद] **म्ह०** पुखानंद आणि सुखानंद.

**पुख्त**—वि. पोक्त; परिपक्व. 'जो विचार करणें तो पुख्तच कराल.' –जोरा १२३. [फा. पुख्ता]

**पुंगट–स**—वि. पुंगळाच्या अंगास येणाऱ्या दुर्गंधीप्रमाणें घाण येणारा; वाईट वास असलेला.

**पुंगळ**—पु. एक पादरा किडा; पिंगूळ पहा. 'पुंगळ म्हणती आमुचें घर। वाळव्या म्हणती आमुचें घर।' –दा १.१०.४०. [सं. पिंगल] **०वेल–ली–पुस्त्री**. एक दुर्गंधि येणारी वेल. 'कां पुंगळवेलीचें जैसें सुमन। नेत्रास साजिरें दिसे पूर्ण।'

**पुंगळी**—स्त्री. (ना.) कागद वगैरेची सुरळी; वळकटी; नळी; भोंगळी पहा. [? पोकळी]

**पुंगी**—स्त्री. तोंडानें वाजविण्याचें गारुडी इ०चें एक वाद्य. हें कडु भोपळ्याचें करतात. सापास मोहून टाकण्यासाठीं हें उपयोगांत आणतात. 'अनुहात वाजवी पुंगी। बाबा जोगी।' –भज ११६. [ दे. प्रा. पुग्ग=एक वाद्य ? ] (वाप्र.) **०बंद करणें**–एखाद्यास गप्प बसविणें; निरुत्तर करणें; दुसऱ्याचें वर्चस्व चालू न देणें 'एखाद्या लुच्चाची ठकविद्या जाणून त्याची पुंगी कोणी बंद केली असता त्याचा जना माथा भडकून जावा ...' –नि ३९७. **म्ह०** गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीं तर मोडून खाल्ली. सामाशब्द– **०पेटारा**–पु (व.) सामानसुमान [ पुंगी+पेटारा ] **०वाला**–पु. गारुडी; पुंगी वाजविणारा.

**पुगीफल-ळ**—न. सुपारी; पोफळीचें फळ, पूगीफल. [ पूगी+फल ]

**पुचकणें**—अक्रि (कु.) मरणें; गचकणें. [ ध्व. ]

**पुचकारणें**—अक्रि. पुचकारणें. 'जामदार तेथूनच पुचकरतो.' –चिमा १४ [ ध्व. ]

**पुचट**—वि. (प्र) पोंचट; पोकळ; निकस; नि.सत्त्व (शब्दशः व लक्षणेनें). [ दे प्रा. पोच्चड, म पोचट ]

**पुचं(चुं, चों)डी**—स्त्री. (प्र) पुरचुंडी पहा.

**पुचपुच**—स्त्री. १ हलक्या व खोल आवाजांत बोलणें; कुजबुजणें; कानगोष्टी. २ कुणकुण; गुणगुण; थोडा बभ्रा. [ ध्व. ]

**पुचाट**—वि १ पोचट; हलका, पुचट. २ दुर्बल; नामर्द. [ पुचट ]

**पुचुपुचु**—स्त्री. (खा) कुजबुज. पुचपुच पहा. [ध्व.] **०रंगण**–न. एक कवड्यांचा खेळ. –मराठी खेळांचें पुस्तक पृ. १२५.

**पुच्चा**, **पुची**, **पुच्ची**—स्त्री. (अश्लील) स्त्रियांचें जननेंद्रिय; चूत; योनि. [ का. पुक्की–च्ची ]

**पुच्छ**—न. शेपूट; पशु, पक्षी इ०चा गुदद्वारावरील अवयव. –ज्ञा १०.२५५. 'शरीर वज्रा ऐसें। कवळी ब्रह्मांड जो पुच्छें।' –तुगा ४०१. [ सं. ] (वाप्र.) **०फुटणें-लांबणें-वाढणें**–(श्रम, धंदा, खर्च इ०) मूळ योजनेपेक्षां अधिक वाढणें; अनपेक्षित विस्तार होणें (मारुतीच्या शेंपटी वाढण्याच्या गोष्टीवरून) सामाशब्द– **०प्रगति**–स्त्री. (ल.) (शेंपटाच्या दिशेनें जाणें) मागें हटणें; माघार घेणें; परागति; पिछेहाट. 'परांजपे साहेबांची पुच्छप्रगति पाहून बिचाऱ्या शिक्षकवर्गाला काय वाटेल ?' –केले १.२६७. [सं. पुच्छ+प्रगति] **पुच्छावर्त**–वि. शेंपटीजवळ भोंवरा असलेला (घोडा). [ सं. पुच्छ+आवर्त ]

**पुच्छापताई**—स्त्री (नरवेशी तेली) मुलाच्या बापानें वधूकडील माणसास पैसे देण्यासंबंधी वा विधि; कनपुनई. –बदलापूर २६९

**पुंज**—पु. १ धान्यादिकांची रास; ढीग; समुदाय; झुबका; गुच्छ. 'जयाचा रश्मिपुंज निबरु।' –ज्ञा ११.९. २ खोत किंवा धारेकरी यांनीं गुरव आणि महार यांस त्यांच्या त्या वर्षातील कामाबद्दल दिलेली धान्याची लहानशी रास. ३ मेळा; गट. [ सं ]

**पुंजका**—पु. झेला; झुबका; तुरा; घोंस; समूह; रास; जुडगा; जुडी; गठडी (केंस, पानें, पातीं, मधमाशा इ०चा). [ पुंज ]

**पुंजट**, **पुंजर(रू)ट**—न. धान्यादिकांतील हलके, पोचट दाणे. [ ? पुचट ]

**पुजणें**—सक्रि. १ पूज्य मानणें; आदरसत्कार करणें; मान देणें २ पूजा करणें; देव, ब्राह्मण इ०ची गंध, फुलें इ०नीं संभावना करणें; अर्चिणें; उपासना करणें. [ सं. पूजन ] (वाप्र.) **(एखादा पदार्थ) पूजून ठेवणें**–त्याचा उपयोग, दान इ० न करितां उगीच संग्रहीं ठेवणें **पानें पुजणें**–खाद्यपदार्थ पानावर थोडा थोडा वाढणें; नुसते नांवाला पदार्थ वाढणें. पानावर वाढल्यासारखें करणें. **पान पुजणें**–फार न खाणें; नांवाला जेवणें. **(लोकांचीं) घरेंदारें पुजणें**–आपल्या कामाकरितां लोकांच्या घरीं वारंवार खेपा घालणें.

**पुंजनी**—न रेशमाची एक जात. –मुंव्या ९०.

**पुजमाल**—पु घोड्याला खरारा करतेवेळीं किंवा नाल ठोकतेवेळीं त्याच्या तोंडाच्या खालच्या जबड्याला बांधून मग शेपटीच्या खालीं बांधलेली दोरी; ओठाळी. [ फा. पूझ्माल ]

**पुजरट**—न. (व) घाणेरडें फडकें किंवा कपडा.

**पुंजवणी**—स्त्री. गोळा करण्याची क्रिया. (महारी) मृताची तिसऱ्या दिवसाची उत्तरक्रिया; राख सावडणें. –बदलापूर १७२.

**पुंजा**—पु. १ (विणकाम) तळहाताभोंवती गुंडाळलेले धागे किंवा तंतु ह्या तंतूंची संख्या साठापासुन ऐंशींपर्यंत असते. (**सामा.**) साठ तारांचा समूह. ३ शेण, राख, केरकचरा इ०चा ढीग. 'नांव ठेवीत केर-पुंजा।' –दा ३.३.४२. (खराब झालेलें, वाळवीनें खाल्लेलें, कुजकें धान्य, लांकूड, कापड इ० पदार्थांचा) गंज; ढीग; रास. ४ (सामा.) राशी; समुदाय. 'विधिनिषेध पैजा। जळाली पंचायतनदेवपूजा। होता संचितक्रियमाणपुंजा। तोही वोजा जळाला।' –एभा ७.७६८. [ सं. पुंज ]

**पुंजा**—स्त्री. (कों. खा. अशिष्ट) पुजा पहा.

**पुजा**—स्त्री. १ (प्र. पूजा) देव, मोठी विभूति इ०चा आदरसत्कार; अर्चा; मानसन्मान; उपासना; भक्ति. २ पूजेचें साहित्य व पूजा करतांना करावयाचे विधि. ३ भूतबाधा झाली असतां शूद्र लोक करितात तो संस्कार. [सं पूजा] (वाप्र) **०करणें-घालणें**–१ (ल.) बडविणें; चोप देणें; मारणें; पिटणें. २ भोसडणें; खरडपट्टी काढणें. **०बांधणें**–देवाच्या मूर्तीस पुष्पादिकांनीं सजविणें; देवाला शृंगार घालणें. 'जोड करितां खुरपुटीं। तोंडौनि अरिशिरें गोमटीं। जैसीं रचाता थुर्जेठी। पुजा बांधितुसें।' –शिशु १००९. 'पुजा बांधिली माणिकामोतीं हांचीं।' **म्ह०** भांभाराच्या देवाला खेटराची पुजा.

सामाशब्द- ०पत्री-स्त्री. १ फुलें, पत्री वगैरे पूजेचें साहित्य. २ (ल.) बडविणें; मारणें; खुदळणें. (क्रि० करणें)

पुंज णा-ना—पु. (तिरस्कारार्थी) केरकचरा, गवत, घाण इ०चा ढीग; उकिरडा.

पुंजाणा—पु (खा.) पूजेचें साहित्य; पूजापत्री. [हिं. पुजापा]

पुजारा-री—पु देवालयांत देवाची पूजा करण्यासाठीं नेम लेला माणूस; ब्राह्मणाखेरीज इतर जातीचेहि पुजारी असतात 'मह जदी बाधान पुजारं । ठाईं ठाईं स्थापिले ।' -नव २३ १७८ ०रीण-स्त्री स्त्री पुजारी; पुजाऱ्याची स्त्री. 'पुजारिणी दासें द । ग १ दे दां १ ।' -शके ११९५ तील पंढरपूरचा शिलालेख. [पूजा]

पुंजा(ज)व(वि)णें—उक्रि. १ एकत्र करणें; गोळा करणें (जमीनीवर पसरलेलें धान्य वगैरे). २ जळलेल्या प्रेताची राख गोळा करणें; राख सावडणें. [पुंज]

पुंजाळ—पु. (काव्य) ढीग, रास; जमाव. 'परम तेजस्वी प्रळयाग्र । पुंजाळ लक्ष जीवांचा ।' 'पुंजाळ ते झळकती बहुरत्न कीळा ।' -दावि ४८२. [पुंज] पुंजाळणें-अक्रि. एकत्र गोळा होणें; जमणें.

पुंजाळ—वि तेजस्वी; चकाकित 'पैल सांवळें तेज पुंजाळ कैसें । सिरीं तुर्बिली साजिरी मोरपिसें ।' -तुगा ४२५. [पुंज]

पुंजाळणें—अक्रि. १ तेजस्वी होणें; चकाकणें. 'प्राण पांगुळला जेथिचा तेथ । शरीर मंदमंद कांपत । नयन पुंजाळले निश्चित । अर्धोन्मीलित ते जाहले ।' -एभा २९ ६५४. २ पसरणें 'वरचिलें पातीं ढळती । तळींचीं तळीं पुंजाळती । तेथ अर्धोन्मीलित स्थिती । उपजे तया ।' -ज्ञा ६ २०३. 'भानुउदयाचली तेज पुंजाळलें' -मूपाळी

पुंजी—स्त्री १ (रुपये, धान्य इ०चा) लहान ढीग; रास; समूह २ (सामा) सांठा; संग्रह; कोठार; भांडवल; भरणा; भांडार (वस्तु, विद्या, द्रव्य इ० चें); द्रव्य; पैसा. [सं. पुंज] ०करणें-१ रास, ढीग करणें; जमा, गोळा करणें. २ पैसा सांठविणें.

पुंजी—स्त्री घोड्याला शृंगारण्याच्या सामानापैकीं एक; शिरोबंद. [फा. पुश्ती]

पुंजी—स्त्री. (लुगड्याच्या) कांठाचा एक इंचाचा भाग; (सामा) मागावरील ताण्याचे ६० दोरे. [पुंजा]

पुंजी—स्त्री. एक सागरगोट्यांचा खेळ. -मराठी खेळाचें पुस्तक पृ ३४२.

पुंजुलाँ—पु. (गो.) पुंजी; पुजाळ पहा.

पुट—न. १ (हात, कान, पानें इ०) दुमडून केलेली पोकळी; द्रोण; घडी; पुडा (समासांत) अंजलीपुट; चंचुपुट; पर्णपुट; कर्णपुट इ० २ अर्धगोल; अर्धवर्तुळ. ३ औषधादिकांस एकदा केलेला संस्कार, क्रिया, पातळ बराचा लेप, उदा० औषधादिक भाजण्या- व ळविण्यासाठीं विस्तव, करून हवा इ०त एक वेळ ठेवणें; तसेंच एखाद्या रसानें एक वेळ माखणें किंवा त्या रसांत बुडविणें (क्रि० देणें). (समासात) अग्निपुट, सूर्यपुट, औषधपुट, रसपुट इ० 'माझे या विरहाग्निचेनि पुटें जिवाचें अंगार आटे ।' -भाए १७० ४ पुट देण्याचा पदार्थ (रस, लेप इ०) ५(ल) मुलामा भरी 'सोनें जेवी पुटीं पडे । मळ तुटे वाणी चढे । तेवीं गुरुसेवा जडत्व मोडे । चिनशुद्धी जोडे निर्दुष्ट ।' -एभा ३ ३८८ जैसें पुटीं पडता सुवर्ण। तेजस्वी दिसे दैदिप्यमान ।' ६ संकोचित जागा तशी सुबद्ध आटली । पुटीं होती दाटली । ते वज्रासनें चिमुटली । सावध होय ।' -ज्ञा ६ २२५. ७ तेज. कृष्ण अंगा जडलेपणें विजुशीं पुट जाले चौगुणें ।' -एरुस्व १.२६ ८ घोड्याच्या पृष्ठभागाच्या ठिकाणीं कंबरेपर्यंत ज्या दोन बाजू असतात त्या प्रत्येक. -अश्वप १.६३. ९ (नृत्य) पापण्यांच्या द्वारा केलेला अभिनय. नृत्यामध्यें पापण्याचे नऊ प्रकारचे अभिनय करतात ते-सम, उन्मेष, प्रसृत, कुंचित, निमेष, पिहित, विवर्तित, स्फुरित व विलोकित 'लागती कटाक्ष सर्वांचिया पुटीं । कळहारिये जिवाचिये ।' -भाए ४५३ १० पुड, पुडी. समासात नासिका, नासा, घ्राण ह्या शब्दाबरोबर योजतात जसें-नासिकापुट इ० [सं.] सामाशब्द- ०पाक-पु १ औषधादिकाच्या सभोंवार पानें घालून व वर माती लावून तीं भट्टींत भाजण्याची क्रिया. २ मुशीमध्यें सोनें वितळविणें. [सं पुट+पाक] पुटीकरण-न. (भूशास्त्र) पुटें बसणें; थर बसणें; एकावर एक लेप बसणें. गाळाच्या निरनिराळ्या तऱ्हा निवडल्या जाऊन प्रत्येकाचे निरनिराळे व्यवस्थित थर एकावर एक रचले जातात त्यास पुटीकरण म्हणतात -भू ४६ [पुट+करण]

पुट-टी—शअ. (ना.) प्रत्येक वेळीं; गणिक; पट पहा. जसें-घासापुट-जाण्यापुट-येण्यापुट-बसण्यापुट इ०.

पुट-टी—नस्त्री. (महानु) वेटोळे. 'ना हे उकलली पुटी । क्रोध भुजंगाची ।' -भाए ७५५.

पुटक(कु)ळणें—अक्रि. पुटकळ्यांनीं व्यापून जाणें; पुळया होणें; पुरळ उठणें. [पुटकुळी]

पुटक(कु)ळी—स्त्री पाणी किंवा पू असलेली पुळी; लहान फोड. [सं पिटक; स्फोटक; स्फोट]

पुटपु(पु)ट—स्त्री. १ तोंडांतून काढलेला एकसारखा पण बारीक आवाज; कुजबुज; कुरकुर. (क्रि० करणें; बोलणें) २ पटपट मारलेली उडी (बेडकीची) (क्रि० येणें; जाणें; पडणें). क्रिवि. एकसारख्या बारीक आवाजानें; रिपरीप; पिटपिट (पाऊस इ० पडणें). 'पाऊस पुटपुट पडतो' 'बेडकी पुटपुट उडते.' [ध्व.]

पुटपुटणें—अक्रि १ रिपरीप, पुटपुट पडणें (पाऊस). २ नांडातल्या तोंडांत अस्पष्ट बोलणें; हळू हळू बोलणें 'उगी वारंवार क्षितिपतिसुते जें पुटपुटी ।' -सारुह ७.१५६. ३ कुरकुरणें;

धुसमुसणें. ' आंगाचा संताप होऊन ती आपल्याशींच पुटपुटली. ' -मोर ३३. [ पु पुट ]

**पुटंवचें**—सक्रि. ( गो. ) पुरवणें.

**पुटिकाळी**—स्त्री. ( महानु. ) वेटाळें; वळसा. पुट–टी पहा. ' आनंदनिधानावरी बैसीनिर्ली । मोक्षभुजंगाची पुटिकाळी । तैसी देहुडी वेणी खोविली । आठाइती । ' –शिशु ४२५. [ पुटकुळी ]

**पुटिला**—पु पटल. ' तोंडा येतो फेस पुटिला नाचसिल बा रे । ' –निगा ९४.

**पुटी**—वि. औषध, रस, लेप इ०चीं ज्यास पुटें किंवा हवा, ऊष्णता दिली आहे असा (रासायनिक पदार्थ). पुट पहा. (समासांत) अग्निपुटी; सूर्यपुटी; सहस्रपुटी इ० [ पुट ]

**पुटुकुळी**—स्त्री पुटकुळी पहा.

**पुटणें**—( महानु ) १ प्रकाशणें. २ घासणें: घसटणें; एकमेकात गुरफटणें ( टिप्पणींतील अर्थ ). ' आंगिचेनि कसमसाठें। रसरंगाचां पूर पुटे । ' –शिशु ४११. ३ उसळणें; उडणें. [ सं. स्फुट; का पुटि ]

**पुटें**—न ( बे. ) कर्नाटक प्रांतांत होणारें टरबूज.

**पुट्टकरून**—क्रिवि. ( गो ) चट्टदिशीं; पटदिशीं; पटकन पहा.

**पुट्टा**—पु ( कर. ) गाडीच्या साटाऱ्याखालचा कण्यावरील लांकडी आडवा भाग. ' कण्यावर पुट्टा बेतानें ठेवा. '

**पुठ**—न. पुट अर्थ ७ पहा. ०**चढविणें**–( महानु ) स्तुति करणें; प्रशंसा करणें. ' सु–देवें ब्राह्मणें । पुठ चढविलें वायानें । सेवटीं एकें हीं गुणें । भुंजों नये । ' –शिशु २०३.

**पुठा–ठ्ठा**–पु. १ घोडा इ०च्या पुच्छाजवळचा भाग; ढुंगण; टिरी; कुल्ला; नितंब. २ घोडा विकत घेतांना एका घोड्याबद्दल योजावयाचा शब्द. ३ वही, पुस्तक इ०वर असलेलें जाड व मजबूत आच्छादन; मळपृष्ठ. ' पुठ्ठे रंगित पत्रकें कनकितें आनंदतो यां वरी । ' –केक ३९. ४ कागदपत्रें ठेवण्यासाठीं दोन पुष्टिपत्रें एकत्र करून केलेली वही; फाईल. ५ जूट; जमाव; गठ्ठा; माणसांचा जमाव; संघ; टोळकें; कंपू. ६ पांचसात खेड्यांचा टापू; शेजारीं शेजारीं असलेल्या पांचसात खेड्यांचा संघ, प्रदेश. ७ विक्रीसाठीं ठेविलेल्या वस्तूंचा गट; संच. ८ गाडीच्या चाकास ज्या लांकडी तुकड्यांमुळें वर्तुळाकार येतो तो बांकदार तुकडा. चाकाच्या आऱ्यांची जाड फळी, पाटा. ९ ( जरतारीचा ) पिंडोळा; गुंडा. १० पक्ष; गोट. ( ल ) विश्वास. 'फडणविसांच्या पुठ्यांत शिरलें पाहिजे असें विसुभाऊस वाटलें. ' –अस्तंभा ३५. ११ पुष्टिपत्र; कार्डबोर्ड; जाड कागद. १२ पृष्ठभाग; पाठ; मागचा भाग. ' कां पुठीं बळला असीं । गोडी जैसी । ' –ज्ञा १८.८४२. [ सं. पृष्ठ; प्रा. पुट्ठ ] **पुठ्यांतील मंडळी**–पक्षांतील, कूटांतील, विश्वासांतील माणसें; गलबच्चे. ०**पाट**–पु. पुठ्ठा अर्थ ८ पहा.

**पुट्ठी**—स्त्री. कुस्तींतील एक डाव. आपल्या एका हातानें जोडीदाराच्या चड्डींत कुल्ल्यावर हात घालून आपला दुसरा हात जोडीदाराच्या बगलेंतून उराच्या खड्ड्यांत घालून आपल्या जोडीदारास उचलून उताणा पाडणें.

**पुड**—क्रिवि. पुढें. 'जैसें विश्व अति गोड । गोडचि म्हणून करावा पुड । मग त मिरवें शत्रुचाड । द्वंद्व सुख वाटावया । ' –नव १४ १५६. [ पुढें ]

**पुंड**—वि. १ बंडखोर; गांवगुंड; दांडगा; उलाढाल्या. ' पुंड घरोघरीं बंड कुणावर दंड कोण बाधिती । '–ऐपो ३६६. (सामा.) दरोडेखोर; लुटारू; चोर. [ ? दे. प्रा. पुअंड=तरुण, युवा.तुल० सं. पौगंड, पुंड्र ] सामाशब्द– ०**गिरी**–स्त्री. बंड; गुंडपणा; दांडगेपणा; उलाढाली. ' आपण भालेरावाप्रमाणें पुंडगिरी चालविली. ' –स्वप ४११. ०**पाळ**–पु लुटारूंचा मुख्य. [पुंड+पाल] ०**पाळेगार**–पु. लुटारू व बंडखोर लोकांबद्दल सामान्यतः योजावयाचा शब्द. [ पुंड+पाळेगार ] ०**मवासी**–पु. पुंड आणि मवाशी; पुंड पाळेगार भुमे वगैरे लोक. ' देशोदेशिंच्या खंडण्या घाडुन देती पुंडमवासी । ' –ऐपो १७७ [ पुंड+मवासी ]

**पुडका**—पु. १ कागद, पत्रावळी, पानें इ०चा एकत्र बांधून केलेला गठ्ठा; पुडा; बंडल. २ ( व. ) पत्राचें पाकीट; लिफाफा. ३ ( बे. विणकाम ) दहा पौंड वजनाचें सुताचें बंडल. [ पुडा ]

**पुडका–की**—पुस्त्री. ( चांभारी ) जेप्याच्या पाठीमागें लागणारा चामड्याचा तुकडा; सोमुसें. [ पुडा ]

**पुडकें**—न पुडका पहा.

**पुडयाँ–यें**—न. ( कु. ) प्रसंगविशेषीं नेसण्यासाठीं ठेविलेलें वस्त्र वगैरे; धोतर. ( गो. ) पुडवें.

**पुंडरीक**—न. १ पांढरें कमळ. २ अष्टदिग्गजांपैकीं एका दिग्गजाचें नांव. [ सं. ]

**पुडवटी**—स्त्री. लहान पुडी. [ पुडा+वटी प्रत्यय ]

**पुडवाटवा**—पु. ( महानु. ) डबा किंवा बटवा. वाटवा पहा. ' बाइसें पुडवाटवा घेति । ' –पूजावसर [ पुडा+वाटवा ]

**पुडवें**—न. ( गो. ) धोतर.

**पुडसावणें**—अक्रि. धमकावणें; धमकी देणें; दटावणें.–शर

**पुडा**—पु. १ पानें, कागद इ०चा गुमडून बांधलेला गठ्ठा; पुडका. २ साखर इ० पदार्थ कागद, पान इ०त गुंडाळून बांधिला असतां जो आकार होतो तो; पिशवी. ३ मृदंगादिकांचें पुड, वाजणारा कातडी भाग. ' वाजता पुडा, धुमाचा पुडा. ' ४ ( चांभार धंदा ) टांचेचा भाग उजरण्याकरितां उपयोगांत आणावयाचा कातड्याचा अर्धगोल ठोकळा. ५ (गो.) पुड्याच्या आकृतीची एक प्रकारची पोळी. [ सं. पुट; प्रा. पुड; हिं. पुडा; सिं. पुडो ] ०**घालप**–( गो. ) दाणे कुपांत घालून निवडण्याचा एक प्रकार.

**पुंडा**—वि. (प्रां.) पांढरा (गाय, बैल इ०). ' एकें मोहरीं मोरी पारवीं । एके वाघी चितळी पुंडीं ।' –दाव २८१. [सं. पुंड्र=पांढरें कमळ; प्रा. पुंड; सं. पांडु=पांढरा]

**पुंडा-पुंडा ऊंस, पुंडया, पुंडया ऊस**—पु. उंसाचा एक प्रकार. तावुस ऊंस. ' सप्ताळें ऊंस पुंडे कविठ कमरखें वाळकें सूक्ष्म थोरें ।' –सारुह ३.८९. [सं. पुंड्र; प्रा पुंड; पांडु]

**पुंडाई, पुंडायकी**—स्त्री. १ बंडखोरपणा; लुटारूपणा; बेकायदेशीरपणा. २ जुलूम; उपद्रव; जबरदस्ती; लुटालूट; बंड (गो.) पुंडाय. [पुंड] **०माजविणें**-रण माजविणें; वखेडा माजविणें; गोंधळ करणें. ' कांहीं तरी सभेंत पुंडाई माजविणें हें शहाण्याला शोभत नाहीं ' –टि ४.१३०.

**पुंडाय**—स्त्री. (गो.) पुंडाई.

**पुंडाव-वा, पुंडावकें, पुंडावें**—न. पुंडाई पहा. ' संसारी पुंडावें चुकलें ।' –दा ६ २.२५?

**पुडी**—स्त्री. लहान पुडा. १ कागद, औषध इ० कांचें लहान पुडकें. २ साखर इ० बांधून केलेला लहान पुडा. ३ संन्याशाचें जेवण (हें फार थोडें असतें यावरून पुडी हें नांव). (ल. उप.) जेवण; जेवणाचें आमंत्रण. ४ (चांभारी) सागळ रंगविण्याचा कच्चा रंग ५ पखवाज इ० कास बसविण्याची शाई. ६ (ल.) गुप्त गोष्ट, बातमी इ०; फूट. (क्रि० फुटणें; फोडणें). ' पुडी फुटल्यामुळें हा अनर्थ ओढवला. ' [पुडा] (वाप्र.) **०आणणें**-बाहेर न फुटलेली बातमी आणणें. **०फुटणें**-बातमी बाहेर फुटणें. **०फोडणें**-बातमी फोडणें; खरी गोष्ट बाहेर आणणें **पुडीस जाणें**-संन्याशानें जेवणास जाणें **पुडी सोडणें**-गप्पा मारणें. **म्ह०** कुडीला पुडी (पाहिजे). सामाशब्द- **०मांस**-न. सागोती व मांस शिजवून त्यांत चाकवताचा पाला घालून तयार केलेला पदार्थ. –गृशि २.९८. [पुडी+मांस]

**पुडी**—स्त्री. (गो) एक प्रकारचें झाड.

**पुडीस**—वि. गोट्याच्या खेळांत ज्याची पाळी अगदीं शेवटीं येईल त्या खेळणारास पुडीस असें म्हणतात. –मराठी खेळांचें पुस्तक पृ. १४२. फडी पहा.

**पुंड्र**—पु. कपाळास लावलेला चंदन, भस्म इ० कांचा टिळा; गंध त्रिपुंड्र हा शब्द जास्त रूढ आहे. ' उर्ध्वपुंड्र भाळ कंठीं शोभे माळ । कांपिजे कळिकाळ तया भेणें । ' –तुगा २२१४ [सं]

**पुंड्रक**—पु. घोड्याचे प्रपाणावर असणारा पांढरा पट्टा.–अश्वप १ १०७. [सं.]

**पुढचा, पुढला, पुढील**—वि. १ अगोदरचा; पूर्वीचा; पुढें आणारा; (स्थलकालासंबंधांत) अग्रिम. २ भविष्यकाळची ' पुढची गोष्ट कोण सांगेल. ' ३ (वारांच्या, नांवांच्या पाठीमागें योजला असतां) तावडतोब येणारा; आगामी; आतां यापुढें येणारा. असें:–पुढला सोमवार. [सं प्रथम; प्रा. पुढम] (वाप्र.) **पुढचे दांत**-लहान मुलास प्रथम जे चार दांत येतात ते; वरचे दोन व खालचे दोन दांत. **पुढच्या जोताचा**-वि. १ पुढच्या जुंवास जुंपण्यास योग्य. २ (ल) चलाख; तल्लख; हुशार; तरतरीत ३ पुढारी; सूत्रधार; सुकाणुदार. **म्ह०** पुढच्यास ठेंच मागला (चा) शहाणा (दुसऱ्याच्या अनुभवानें मनुष्य शहाणा होतो या अर्थी). ' इतिहास, बखरी व चरित्रें हीं पुढच्यास ठेंच मागचा शहाणा या न्यायानें सर्वांस अत्यंत हितावह आहेत. ' –बाजीराव. **पुढच्या पुढें**-शब्द क्रिवि. १ अगदीं समोर; समक्ष; एकदम पुढें (क्रियावाचक धातूंसमवेत प्रयोग). २ इतर सर्वांच्या पुढें; इतरांस मागें टाकून; एखाद्या बाबतींत पुढाकार घेण्यासाठीं सर्वांत पुढें. [पुढें] (वाप्र.) **०करणें**-लुडबुड करणें; विनाकारण लुब्रेपणा, लघळपणा करणें. **०नाचणें**-मनधरणी करणें; खुशामत करणें; थुंकी झेलणें

**पुढतपुढत, पुढतपुढतीं, पुढतांपुढतीं, पुढतोपुढतीं**—क्रिवि. (काव्य) वारंवार; पुनःपुन्हा; पुढेंपुढें. ' सर्वेस्वेंसीं तुझा आधार । दुस्तराहूनि पाववी पार । दीन जनाचा करी उद्धार । पुढतपुढत साभाळी । ' –दावि १२. ' तैसा पुढतपुढती तोचि । मिया अभिवंदिला श्रीगुरुचि । ' –ज्ञा १ २७. ' आतां ऐसा राजा मागुती । होणार नाहीं पुढतांपुढती । ' –नव १८ ८. ' विदुर म्हणे पुढतोपुढतीं । तेंचि तें तुज सांगिजे किती ! ' –मुवन १ ७०. [पुढती द्वि.]

**पुढता-तीं**—क्रिवि. (काव्य) पुन्हां. ' तरी कर्मयोगी केवीं अतिरसु । पोखीतसां पुढती । ' –ज्ञा ५.२ –शअ. (विप्र) पुढें पहा. ' आता तेंचि तप पुढती । तामसाचिये रीती । ' –ज्ञा १७. २५३.

**पुढपुढें**—क्रिवि. १ पुढेंपुढें; आरंभापासुन पुढें जातो तसातसा; उत्तरोत्तर. ' हा ग्रंथ पुढपुढें चांगला आहे. ' २ इतरांस मागें टाकून आपण एकट्यानेंच पुढाकार घेण्यासाठीं पुढें सरून, होऊन (बोलणें); पुढच्यापुढें. [पुढें द्वि.]

**पुढला**—वि. पुढचा पहा.

**पुढवसा**—पु. पुढला, पुढचा भाग [पुढें+वसणें]

**पुढा**—पु. १ (राजा.) पुढचा, तोंडाकडील भाग ' दक्षिणेकडे पुढा करून बसूं नको. ' २ (शिंपी) कोट इत्यादींचा पुढें येणारा भाग, आगा. [पुढें]

**पुढां**—शअ क्रिवि. पुढें; पुढारां ' पुढां कुरंग एक नयनीं । दूर देखोनि विंधिला बाणीं । घायाळ मृग पळतां वनीं । पाठीं धांवे नृपाळ । ' –मुआदि ७.६५. [पुढें]

**पुढाईत, पुढाकारी, पुढारी**—वि. १ पुढाकार घेणारा; नेता; नायक; पुढें होऊन हुकमत चालविणारा. अर्धा गांव केला

पुढाईंत हातपाय जोडून।' -पला ७७. 'पुढारी हे लोकांचे धनी नव्हत तर चाकर होत.' -टिसू २२१. २ अधिकारी; कारभारी; व्यवस्थापक; प्रमुख. [पुढा]

**पुढाकार, पुढार-रा**—पु १ पुढारीपणा; अग्रेसरत्व; नेतृत्व; हुकमत 'समाजाचा पुढाकार घ्यावयाचा म्हणजे स्वतः पायाशुद्ध वर्तन पाहिजे'-टिसू १४३. २ कारभार; अधिकार; व्यवस्था. [पुढें+कार] **पुढाकारी**-वि पुढाईत पहा.

**पुढाय(र)की**—स्त्री पुढाकार पहा. [पुढें+कार]

**पुढार-री**—वि पुढील; पुढें येणारी.-ज्ञा १.२७५. 'पुढारी दोपायीं तनुभर उपायीं उतरतो।' -र ५६.

**पुढार**—पु बोल; वचन. -भाए १४५. 'मग म्या बोलिलें उत्तर। माझा एक हो पुढार। हिमवंत होईल नृपवर। रेणुरावो।' -कथा २.१२ ४७. [पुढें]

**पुढारणें**—अक्रि. १ पुढें होणें; सरसावणें. 'मारीचाख्य पुढारला भुजबळें झुंझावया रूढला।' -आय २५. २ बोलणें. 'आणि आत्मया एथ काहीं। सर्वथा लागु नाहीं। हें पुढारलासि तें देईं। लाहाणें माझें।' -ज्ञा १८.२९९. ३ उत्कर्षास, प्रगतीस चढणें; पुढें येणें.

**पुढारां**—शअ. (काव्य.) १ पुढें; समोर. 'प्रकट तिजपुढारां जाहला राजमौळी।' -र ४०. २ निमित्तानें. 'का पितृवचन पुढारां। सीतेचिया वियोगद्वारां। रीसा आणि वानरां। उद्धरी निशाचरां रघुनाथ।' -एभा १६.३३३ -क्रिवि (काव्य.) १ पुढें; कालांतरानें. 'मग ते दयाळु द्वारपाळ। म्हणती नाथा न करी तळमळ। तुम्हां मायलेकरांचा मेळ। ईश्वर करील पुढारां।' -नव १५ ३७. २ पुढें होऊन; आगाऊ; अगोदर.

**पुढारी**—वि. पुढाईत पहा.

**पुढारीं-रें**—शअ.क्रिवि. (काव्य.) पुढें. 'शीर्षे वाट झाडी पुढारीं। तो नारायण नररूपें।' -मुआदि १ ५१. 'नेऊन घाल्रिती पुढारें।' -दा ३.९.४ 'मोलें उणें व्यजन तें धरिता पुढारीं।' -र १४.

**पुढारेसी** क्रिवि (काव्य) पुढें पुढारीं पहा. 'धाडूनि जाणाऱ्या स्वस्थळाप्रती। सीराळकराची मानूनि विज्ञप्ती। सद्गीतम्मृदाव कृपामूर्ती। पुढारेसी चालिले।' -दावि ३१७.

**पुढावणें**—क्रि (गो.) पुढें जाणें; पुढारणें पहा.

**पुढामणें**—क्रि पुढें घालणें करणें. 'हें असो बावें रूपें। पु [illegible] न अमूपें। [illegible] भाली वासिपें। अविद्या हे।' -अमृ [illegible] ११८

**पुढ(ढी)ल**—वि. १ पुढचा; अगोदरचा-नंतरचा (स्थल कालसंबधीं) पुढचा पहा. २ अन्य. दुसरा; लोक. 'आपुले अंगीचें मळ। पुढिलीं क्षाळितां सकळ।' -एभा २३.७२. 'केल्याविण निखंदूं नये। पुढिलांसी कदा।' -दा २.२.१२. ३ पुढें येणारी; भावी (पिढी, लोक). 'पुढिला सिकवण। ते घ्यावी आपण।' -दावि १०३. ४ पुढें-खालीं-यानंतर येणारी, सांगितलेली (गोष्ट, मुद्दा इ०). ५ जवळचा. -ज्ञा ३.१७७. [पुढें तुल० सं. पुरस्; अर्धमागधी. पुरिल्ल] सामाशब्द- ०पाय-पु. प्रवृत्ति; प्रपंचाकडील वृत्ति. 'ऐसाही जरी विपायें। सांडूनि पुढील पाये। सर्वेंद्रियांसि होये। पाठिमोरा जो।' -ज्ञा १० ७२. **पुढिल्यो**-क्रिवि (कर.) (विटीदांडूचा खेळ) विटीच्या पुढल्या टोकापासून (मोजणें). **पुढीं**-क्रिवि. पुढयांत; पोटाशीं. 'घेऊन पुढीं नुसती सौख्यांत विडी तांडावी।' -प्रला १६०.

**पुढून**—क्रिवि. १ पुढील बाजूनें; समोरून. २ पूर्वी, अगोदर (कालवाचक). [पुढें]

**पुढें**—क्रिवि १ समोर; अग्रभागीं. २ विवक्षित अवधीपासून; अग्रिमप्रदेशीं; नंतर; पलीकडे [सं. पुरस् किंवा सं. प्रथम; प्रा पुढुम] (वाप्र) ०पाऊल पडणें-प्रगति होणें. 'तुमच्या सारख्याच्या मदतीवाचून आमचं एक पाऊलसुद्धां पुढें पडणार नाहीं.' -भयंकरदिव्य. ०पुढें करणें-लुडबुड करणें; खुशामत करणें. ०वाढून जाणें-येणें-फौजेसह शत्रूवर हला करणें. 'इंग्रज पुढें वाढून येत नाहींत' -पया १७६. म्ह० १ पुढें तिखट आणि मागें पोंचट. २ पुढें पाठ मागें सपाट ०पाठीं-क्रिवि. पुढें आणि मागें.

**पुढोसा**—पु. पुढचा भाग. [पुढें]

**पुढ्या**—पु. एक प्रकारचें लव्हाळें.

**पढ्यां**—न (कु.) धोतर. (गो) पुढवें, पुढ्या पहा.

**पुढ्यांत**—क्रिवि १ पुढें; पुढच्या भागांत; समोर. 'आपल्या प्रेमाच्या माणसांची फार दिवसांनीं भेट होऊन त्यांच्या हातचं सुग्रास अन्न पुढयांत येतं.' -स्वप ८२. २ ओटींत; पायापाशीं-मध्यें (गुपचिप पायांत ठेवलेल्या लांचलुचपतीबद्दल योजितात). [पुढें+आंत]

**पुण**—उभ. (महानु.) परंतु. 'म्हणौनि मज आत्मारामा। पुण पढियो तो।' -भाए ८०४.

**पुणती**—क्रिवि पुन्हां -शिपु १.१.४७. [पुनः]

**पुणी**—स्त्री. पिंजलेल्या कापसाची वळी; पेळू. [गु.]

**पुणु**—पु पण; होड; पैज -शिपु. [पण]

**पुणेरी**—वि पुणें शहरासंबंधींचा; पुण्याचा (जोडा, भाषा, चाल इ०). [पुणें]

**पुण्य**—न. १ उत्तम आचरण केल्यानें ईश्वरप्राप्तिद्वारा सुख प्राप्त करून देणारा आत्म्याच्या ठिकाणीं असलेला विशिष्ट धर्म; धार्मिक, नैतिक गुण; उत्तम आचरणाचें फळ. २ सत्कृत्य, धार्मिक, परोपकारी कर्मे. याच्या उलट पाप. [सं पुण्=धर्मक

करणें ] (वाप्र.) ०खरचणें-वाईट कृत्य करणें; वाईट कृत्यांत गुंतणें. पुण्याचा-धार्मिकदृष्ट्या मानिलेला, कल्पिलेला; धर्माचा (बाप, आई, भाऊ, बहीण, पुत्र इ०). जसें-पुण्याचा बाप, पुण्याची आई इ०. पुण्याच्या पारीं-पुण्यद्वारीं बसणें, पुण्याचा पार बांधणें-परोपकारी किंवा धार्मिक कृत्यात नेहमीं गुंतलेलें असणें; पुण्यकृत्यें करणें. सामाशब्द- ०कर्म-न पुण्यजनक कर्म; पुण्यकृत्य. [ सं. पुण्य+कर्म ] ०काल-पु संक्रांति, ग्रहण इ०चा पर्वकाळ; ज्या काळांत पुण्यकृत्य करणारास अधिक फळ मिळतें असा काळ. [ सं. ] ०कीर्ति-स्त्री. पुण्यकारक कृत्याची प्रसिद्धि; लौकिक. [ सं. ] ०गिरि-पु. (अध्यात्म) ज्ञानाचें स्थान; आज्ञाचक्ररूपी पर्वत 'नाचतया पुण्यगिरी। चिद्भैरवाच्या खापरीं। मनपवनाची खीचपुरी। वाढूनियां।' -ज्ञा १८.१०४० [ सं ] ०जन-पु १ पुण्यवान मनुष्य 'अहो प्राकृत आणि हीनु। तयाही कीं गुणत्वाचा मानु। परी न म्हणिजे पुण्यजनु। राक्षसु काई।' -ज्ञा १८ ७५० २ राक्षस [सं ] ०तिथि-स्त्री १ पवित्र दिवस. २ संन्यासी मृत झाला असता बाराव्या दिवशीं किंवा प्रतिवार्षिक मृततिथीस त्याचे पुत्र-शिष्यादि श्राद्धस्थानीं जें कर्म करितात तें किंवा ती तिथि. ३ (सामा) थोर सत्पुरुषाची प्रतिवार्षिक मृत्युतिथि; श्राद्धतिथि. [ सं. ] ०धाम-न. काशी, प्रयाग इ० पवित्र स्थान; क्षेत्र [सं.] ०नदी-स्त्री. १ पवित्र नदी २ (ल.) पुण्याचा, सदाचाराचा नदीसारखा जोराचा प्रवाह [सं. पुण्य+नदी] ०परायण-वि पुण्यकृत्यें करण्यास तत्पर असणारा; पुण्यकर्माला वाहिलेला. [ सं. ] ०पात्र-न पुण्याचा विषय; पुण्यशील मनुष्य. ०पावन-वि. १ पुण्य संपादन करून पवित्र झालेला. २ स्वतःच्या पुण्याईनें इतरांस पवित्र करणारा ( कथा, सत्पुरुष, पवित्र स्थान, नदी, वृक्ष इ०बद्दल योजितात). 'उखाहरण पुण्यपावन। ऐकावें चित्त देऊन। चित्ररेखा तिची मैत्रिण।' -स्त्रीगीत. [ सं ] ०पुंज-पु पुण्याचा सांठा, संचय, राशि. ' स्थावरा गिरींआंतु। पुण्यपुंज जो हिमवंतु।' -ज्ञा १०.२३४. -एरुस्व १४.५०.[सं.] ०पुरुष-पु १ ज्यानें पुण्यसंचय केलेला आहे असा मनुष्य; पुण्यवान् इसम. २ सद्गुणी, सदाचरणी मनुष्य. [ सं. ] ०प्रताप-पु पुण्य कृत्यामुळें, सद्गुणांमुळें आलेली शक्ति, प्रभाव, वजन, मान्यता; लोकोत्तर कार्यास इष्ट असें पुण्यसामर्थ्य. [सं.] ०प्रतापी-वि. पुण्याचें सामर्थ्य अंगीं असलेला. [ सं. ] ०प्राणी-पु. परोपकारी, सद्गुणी, पुण्यशील मनुष्याबद्दल योजावयाचा शब्द. [ सं ] ०फल-न. सत्कृत्यांचें फळ, बक्षीस. [सं.] ०भूमि-स्त्री. यज्ञादि कर्म करण्याविषयीं शास्त्रानें योग्य म्हणून सांगितलेली भूमि; हिमालय व विंध्य यांमधील प्रदेश; आर्यावर्त. [ सं. ] ०मार्ग-पु पुण्य संपादन करण्याचा मार्ग, रस्ता, पंथ, पद्धत इ०. [सं.] ०लोक-स्वर्ग; इहलोक सोडून गेल्यानंतर स्वतःच्या पुण्याईमुळें मिळणारी सुखाची जागा; ब्रह्मलोक [ सं. ] ०वान्-वंत-वि सद्गुणी; सदाचरणी, नैतिक व धार्मिक गुण असलेला [ सं पुण्य+वत् ] ०वासना-स्त्री चांगली इच्छा; सदिच्छा 'सत्वगुण चित्तीं प्रगटे। ते वेळीं पुण्यवासना उमटे।' [ सं ] ०वेळ-स्त्री सकाळची विवक्षित वेळ ही वेळ पुण्यकारक कृत्यासाठीं शुभ व योग्य मानिली आहे [पुण्य+वेळ] ०शील-वि सत्कृत्यें करण्याकडे ज्याची प्रवृत्ति आहे असा; सद्गुणी; सद्वर्तनी [सं ] ०श्लोक-पु. पुण्यकारक कृत्यानें प्रसिद्ध असलेला मानवी किंवा दैवी पुरुष, ज्याच्या नामस्मरणानें पुण्य लागतें असे संत, देवदेवता याना हें विशेषण योजितात ( धर्मराज, नल जानकी इ० ). [ सं पुण्य+श्लोक=कीर्ति ] ०सामग्री-स्त्री. इष्ट कार्य सिद्धीस नेण्यासाठीं साधन म्हणून असलेला एखादा सद्गुण [ सं. पुण्य+स सामग्री ] ०क्षेत्र-न पवित्र स्थान. ज्या ठिकाणीं राहिलें असता, गेलें असता पुण्य लागतें असें स्थान (काशी, कुरुक्षेत्र इ० ) [ सं पुण्य+क्षेत्र ] पुण्यात्मा-पु अत्यंत सद्गुणी व सदाचरणी मनुष्य [ स पुण्य+आत्मा ] पुण्यपर्व-न चांगल्या नैतिक गुणाच्या-पुण्यकृत्यापासून उद्भवणारें फल, सुकृत अपूर्व पहा. [ सं. पुण्य+अपूर्व ] पुण्याई-स्त्री १ पुण्याचा संचय; पुण्यसामग्री. २ ( ल ) सामर्थ्य; वकूब [ पुण्य ] (वाप्र) ०खर्चणें-आटोकाट प्रयत्न करणें; शिकस्त करणें 'तो ठरात पास होणेकरिता केतकरांनीं सारी पुण्याई खर्चिली ' -के १६ ४ ३० पुण्याह-न. पुण्यकारक, पवित्र दिवस [ सं. पुण्य+अहन् ] पुण्याहवाचन-न १ मांगलिक... विवाहादि मंगलकार्यांत प्रारंभीं करतात तें कर्म २ (ल) प्रारंभ मुहूर्त [सं पुण्य+अहन्+वाचन] पुण्योदक-न पवित्र पाणी तीर्थ जसें-तीर्थोदक पादोदक इ० [ सं पुण्य+उदक ] पुण्योदय-पु पूर्वजन्मीं केलेलें पुण्य फलद्रूप होणें, द्रव्य, मान्यता इ० मिळूं लागलें असतां त्याचें कारण सांगताना हा त्याचा पुण्योदय आहे असें म्हणतात. [सं. पुण्य+उदय]

पुत--पु पुत्र; मुलगा 'संचित सांडवलें कांहीं तोतें तें जवळीं। वित्त गोत पुत माया तुटली हे लागावळी।' -तुगा ३५० [ सं पुत्र; प्रा. पुत्त ] बाबापुता करणें-समजूत घालणें; गोंजारणें. 'शेवटीं लातूर बाईनें बाबा पुता करून, गोंजारून त्याचें सांत्वन केलें.' -पाब्ह ८३.

पुतणी--स्त्री. पुरुषाच्या भावाची मुलगी; स्त्रीच्या दिराची मुलगी; ध्वाडी.

पुतण्या--पु पुरुषाच्या भावाचा मुलगा, स्त्रीच्या दिराचा मुलगा ( गो. ) पुतणयो; पुतोणयो [ सं पुत्रान्यक ]

पुतळा--पु. १ धातु, लांकूड, माती, दगड इ०चें पुरुषाकार बाहुलें; प्रतिमा, मूर्ति वगैरे 'हातीं घेऊन कर्दमगोळा। पूर्णपणीं रचिला पुतळा।' -नव १० १०१ २ गुणाचें आत्यंतिकत्व, मूर्तिमंतत्व दाखविण्यास योजतात उदा० क्रोधाचा, प्रेमाचा,

धर्माचा पुतळा. [सं. पुत्तल. तुल० सं. पुत्रक, पुत्रिका; प्रा. पुत्तल्य, पुत्तली; हिं. पूतला–ली ]

**पुतळी**—स्त्री. १ दगड, लांकूड, धातु इ०ची स्त्रीच्या आकाराची प्रतिमा, मूर्ति वगैरे. 'नातरी घृताची पुतळी।' –विउ ५.७०. २ सुमारें चार रुपये किंमतीचें एक सोन्याचें नाणें. (या नाण्यांची माळ करतात). दागिन्यांत घालतात तो-सोन्या–चांदीचा वाटोळा व चपटा तुकडा. 'तूं मज पुतळीचा ठसा आवडसी कसा। मी कलेवर तूं आत्मराज माझा राजसा।' –होला ११५. ३ तलवारीचें टोंक ४ घोड्याच्या तळव्यावरचा नाजूक व मऊ शिंगासारखा उंचवटा ५ दसऱ्याच्या दिवशीं आपट्याच्या पानाबद्दल म्हणतात. ६ डोळ्यांतील बाहुली ७ एका माशाचें नांव. ८ सुंदर स्त्री. ९ (विणकाम वे.) काठातल्या नक्षीचा एक प्रकार. दुहेरी धाग्याचा एकद्वितीयांश इंच आकाराचा चौकडा (चौकडा सिंगल धाग्याचा असतो). [सं. पुत्तली ]

**पुतळी घर**—न. (ना.) कापडाची गिरणी.

**पुती**—स्त्री संतान; अपत्य; मूल. –वि संख्यावाचक शब्द मागें जोडून विशेषणाप्रमाणें उपयोग करतात. जसें–एकपुती, सातपुती वगैरे. [सं. पुत्र] **म्ह०** १ एकपुती रडती; दुपुती रडती; सातपुती रडती; निपुती रडती (एकपुती रडे व सातपुती रडे). २ जाती तशी पुती खाण तशी माती.

**पुतुर**—पु. पुत्र. 'त्याच्या मागनें क्षेतर भाऊचा पुतुर आबासाहेब केला राजाला।' –ऐपो ३४६.

**पुतो**—पु. (कों राजा.) वरवंटा

**पुत्त**—पु. १ (गो.) पुत्र; मुलगा. २ (गो) पुष्य नक्षत्र. [सं. पुत्र; प्रा. पुत्त ]

**पुत्तलिकाम्ल**—न (रसा) तैलस वर्गातील एक अम्ल. हें तांबड्या मुंग्यामध्यें सापडतें. (इं.) फॉर्मिक ॲसिड.

**पुत्येण**—न. एक प्रकारचें गवत.

**पुत्र**—पु. १ मुलगा. २ दत्तक. हिंदुधर्मशास्त्रांत बारा प्रकारचे पुत्र सांगितले आहेत ते प्रत्येकीं. द्वादशविधपुत्र पहा. [सं] **म्ह०** सोळा वर्षे पुत्र मग मित्र. सामाशब्द– **०जीव**–पु. एक झाड. पुत्रवंती पहा. **०दृष्टि**–स्त्री. (एखाद्यास) स्वतःच्या मुलाप्रमाणें मानणें, लेखणें. [सं. पुत्र+दृष्टि] **०धर्म**–पु. मुलाचें कर्तव्यकर्म (मातापितरांची शुश्रुषा इ०). **०पौत्रादि वंशपरंपरा**–स्त्री. मुलगा, नातू, पणतू इ० जी संततीची परंपरा ती [सं. पुत्र+पौत्र+आदि+वंश+परंपरा] **०भाव**–पु. १पुत्रपणा; पुत्रविषयक संबंध, स्थिति. २ पुत्राप्रमाणें मानणें, वागणें; पुत्रवत् समजणें 'मर्थी पुत्रभावें असी गाय माये। स्तनीं प्रेमपान्हा रिचवः काय माये।' [सं] **०राग**–पु (संगीत) रागांच्या एका प्रकाराचें नांव कांहीं ग्रंथकार रागांचें भार्याराग, पुरुषराग, पुत्रराग असें वर्गीकरण करितात. [सं. पुत्र+राग] **०वंता**–वि. मुलें असलेला; विशेषतः ओंक्षणाच्या वेळीं स्त्रिया हा शब्द वापरतात. [सं. पुत्र+वत्] **०वती-वंती**–स्त्री. १ जिला मुलगे आहेत अशी स्त्री. 'म्हणेति तूं होसिल पुत्रवंती।' –सारुह ८.९७. २ एक प्रकारचें झाड. या झाडाच्या बियांची माळ ज्या स्त्रियांस पुत्र आहेत त्या घालतात. [सं. पुत्र+वत्] **०वंतीचा मणी**–पु. पुत्रवंती नांवाच्या झाडाचें बी. **०वंतीची माळा**–स्त्री. पुत्रवती स्त्रियांनीं घालावयाची पुत्रवंती झाडाच्या बियांची माळ. **०वान्**–वि. ज्यास पुत्र आहे असा. [सं. पुत्र+वत्] **०संतान**–न. पुत्ररूप संतान; पुत्रसंतति. [सं.]

**पुत्रावण**–न. सोळा संस्कारांपैकीं एक संस्कार; पुत्रमुखावलोकनाचा विधि; जातकर्म; त्यांत नालच्छेदनापूर्वीं मुलास सोन्याच्या स्पर्शानें युक्त असें तूप व मध देतात 'रायें केलें पुत्रवण। नानाधर्में भूरितर्पण।' –कथा ३ ३ १६२ 'भय्यासाहेब, तुम्हाला मुलगा झाला तर त्याच्या तोंडाला मधानें बोट लावून त्याचें पुत्रावण करण्याला मुलाच्या बापानें आलें पाहिजे।' –विंध्याचल १०६ [म पुत्र+अवन=रक्षण] **पुत्रीकरण**–न १ दत्तक घेणें; पुत्र करणें २ (ख्रि) आपली कृपा दानरूपें देण्याचा ईश्वराचा एक संकल्प; यामुळें उद्धारार्थ निवडलेल्या जनसमूहांत ख्रिस्ती माणसांनां प्रवेश मिळून देवाच्या पुत्रास जे अधिकार आहेत, त्या सर्वांवर त्यांचा अधिकार राहतो. (इं) ॲडॉप्शन. –योहा १.१२ **पुत्रेषणा**–स्त्री. १ पुत्राविषयीं लोभ, प्रीति, आदर इ० (हा अर्थ रूढीनें झाला आहे). २ पुत्रप्राप्तीची इच्छा. [सं. पुत्र+ईषणा] **पुत्रेष्टि**–स्त्री. पुत्रप्राप्तीसाठीं करावयाचा एक याग, पुत्रकामेष्टि 'ऋषीशृंग आणूनि बुद्धीचा ठाया। करी पुत्र-इष्टी महायाग राया।' –मुरामायणबाल ३१ [सं. पुत्र+इष्टि] **पुत्रोत्सव**–पु. १ पुत्रजन्मामुळें झालेला आनंद, उत्सव वगैरे. २ या प्रसंगीं होणारा समारंभ. [सं. पुत्र+उत्सव]

**पुत्रक**—पु. पुत्र; मुलगा. [सं.]

**पुत्रिका, पुत्री**—स्त्री. १ कन्या; मुलगी; पुत्रस्थानीं मानिलेली कन्या. २ बाहुली; प्रतिमा. [सं.] **पुत्रिकासुत**–पु बारा पुत्रांतील दुसरा; मुलीचा मुलगा. हाहि औरसासारखाच असतो. –मिताक्षरा. [सं. पुत्रिका+सुत]

**पुत्री**—वि. पुत्र असलेला; पुत्रवान्

**पुत्रीय**—वि. पुत्रासंबंधींचें; पुत्रविषयक. [सं.]

**पुद(दा)डणी, पुदल(ळ)णी**—स्त्री. निष्काळजीपणानें वापर, उपयोग, वागविणें; गुधडा. [पुदलणें]

**पुद(दा)डणें, पुदल(ळ)णें**—उक्रि. (अशिष्ट) गुधडणें; खराब करणें; (मनुष्य, प्राणी, वस्तू इ०) निष्काळजीपणानें वापरणें, वागविणें, उपभोग घेणें 'तो आमचीच गाडी चार महिन्यापासून पुदाळतो आहे.'

**पुव(वा)डा, पुवाला-ळा**—पु. (अशिष्ट) (मनुष्य, प्राणी, वस्तु इ०चा) बेफिकीरपणें, निष्काळजीपणानें वापर, उपयोग, उपभोग वगैरे. पादाडा पहा.

**पुदरट**—न. अत्यंत जीर्ण व फाटकें वस्त्र. 'जुनें पुदरट' असा प्रयोग. -वि. फाटका; मळका. [फाटण्याचा ध्वनि.]

**पुवळ**—वि. (माण.) कोणतेंहि काम सावकाश करणारा, उरक नसणारा.

**पुदाक-ख**—स्त्री. (व. खा.) रिकामा त्रास, कटकट. 'आमच्या मागें काय पुदाख लाविली ही?'

**पुदिना, पुदाणा-ना**—पु. तुळशीच्या वर्गातील एक वनस्पति याच्या पानास तिखट ओंव्यासारखा वास येतो. पाला औषधी असून त्याचा चटणी-भाजीकडेहि उपयोग करितात. [फा. पूदिना, हिं पोदिना; बं पुदिना; सिं फुदिनो; गु फोदिना]

**पुन**—क्रिवि. (महानु) पुन्हा. 'पुन हे प्रकटली श्रीचक्रपाणी। तो कळसोद्धरु।' -ॠ ३. -उअ. (महानु) पण; परंतु. 'चापेगोरटी आगें उघडी टेंली पुन पडतीचि ना।' -शिशु ५५८. [पुनः]

**पुनः**—क्रिवि. १ आणखी एकदां, पुन्हा; दुसऱ्यांदा. २ फिरून; परतून. [सं.]

**पुन**—स्त्री. बाजू. 'आगि मध्यस्थान सोडोनि सविता। दक्षिणेचे पुनी उगवे सविता।' -कथा ६.४.३४.

**पुनई-य**—स्त्री. एक जंगली झाड; पुनर्नवा.

**पुनःखुर**—पु घोडयाच्या पायाचा एक रोग. -अश्वप २.३८.

**पुनति-ती**—क्रिवि. (काव्य) पुन्हा 'जन्मौनि मरणें पुनति उपजणें ऐसा जो संसृतिभ्रमण तो तोडिला।' -ॠ २६ (टीप).

**पुनःपुन**—क्रिवि. पुन्हां; वारंवार; वरचेवर. [सं. पुनः द्वि]

**पुनर्**—क्रिवि पुनः पहा. [स] (सामाशब्द) **पुनरपि**—क्रिवि. पुन्हांहि; वारंवार; वरचेवर; फिरून. [सं. पुनर्+अपि] **म्ह०** पुनरपि जननं पुनरपि मरणं=पुनःपुन्हा तीच ती गोष्ट करणें व तिच्याबद्दल शिक्षा भोगणें. **पुनरागमन**-न पुन्हां परत येणें; माघारी येणें; निघालेल्या ठिकाणीं परत येणें [सं पुनर्+आगमन] **पुनरावृत्ति**-स्त्री. १ ग्रंथादिकांची पुन्हां आवृत्ति. २ उजळणी; पुन्हां करणें; घडणें. ३ पुन्हां मागें येणें; माघारी येणें; पुनरागमन. ४ पुन्हां जन्मास येणें; पुनर्जन्म. 'पैं पुनरावृत्तीचेनि उभडें। झळंबती सत्यलोकींचे हुडे।' -ज्ञा ७.८०. -एभा २९.६०८. [सं. पुनर्+आवृत्ति] **पुनराशा**-स्त्री. निराशेनंतरची आशा; पुन्हां आशा जागृत होणें; खात्री वाटणें. [सं. पुनर्+आशा] **पुनरुक्त**-वि. पुन्हां सांगितलेलें; एकदां उच्चारिलेलें (वाक्य). 'तो ब्रह्मज्ञान उपदेशविधी। शुक बोलिला तृतीयस्कंधीं। म्हणोनि तें निरूपण ये संधीं। न प्रतिपादीं पुनरुक्त।' -एभा ३०.४०२. ४०२. [सं. पुनर्+उक्त] **पुनरुक्तदोष**-पु. एके ठिकाणीं सांगितलेला प्रकार किंवा विधि पुन्हां सांगणें; हा शास्त्रांत वाक्यदोष सांगितला आहे. [सं. पुनरुक्त+दोष] **पुनरुक्ति**-स्त्री. १ एकदां बोललेलें वाक्य किंवा शब्द फिरून बोलणें; पुनरुच्चार. २ द्विरुक्ति; अनुवाद. [सं. पुनर्+उक्ति] **पुनरुत्थान**-न. १ पुन्हां उठणें; (ल.) जिवंत होणें. २ (ख्रि.) येशू ख्रिस्ताचें पुनरुज्जीवन. ३ (ख्रि.) मृतोत्थापन; मेलेलीं सर्व माणसें न्यायाच्या दिवशीं पुनः उठणें, (इं.) रेसरेक्शन. -योहा ५.२८. [सं. पुनर्+उत्थान] **पुनरूढा**-स्त्री. पुनर्विवाहित विधवा. 'मूळ नाटकांत राणी पुनरूढा आहे.' -नि ५४१. [सं. पुनर्+ऊढा] **पुनर्जन्म**-पु. १ दुसरा जन्म; आत्म्याचें एका शरीरांतून दुसऱ्या शरीरांत जाणें. मेल्याबरोबर जीव पुन्हां जन्म घेऊन मागील जन्मांतल्या कर्मांचें बरें वाईट फळ भोगतात हा पुनर्जन्माचा सिद्धांत आहे. २ (ल.) मृत्यु यावयाजोग्या मोठया संकटातून झालेला बचाव. ३ (ख्रि.) ख्रिस्तद्वारा नवीन व पवित्र मन प्राप्त होणें. 'पुनर्जन्म झाल्याविना। ख्रिस्तकृपा त्या कळेना।' -उसं १९७. [सं. पुनर्+जन्म (-न.)] **पुनर्भू**-स्त्री पुनर्विवाह झालेली, पाटाची स्त्री. पुनर्भू तीन प्रकारची असू शकते:-(अ) जिचें लग्न मात्र झालें परंतु पहिल्या नवऱ्याशीं संग झाला नाहीं अशी. (आ) जिचें प्रथमत. एकाशीं लग्न झालें असून जी पुढें व्यभिचारिणी म्हणून उघडकीस येते ती; व (इ) लग्नाचा नवरा मेला असतां जी सवर्ण व सपिंड अशा दुसऱ्यास दिली जाते ती. [सं. पुनर्+भू] **पुनर्लग्न**-न. एक बायको मेल्यावर पुन्हां केलेलें लग्न. पुरुषाच्या पुनर्विवाहास हा शब्द योजतात. 'गृहस्थाश्रमीयानें करावा लागणारा यज्ञ सहधर्मचारिणी नसल्यामुळें करता येत नाहीं...करिता पुनर्लग्न करणें जरूर आहे.' -उषाग्रंथमालिका ४ [सं पुनर्+लग्न] **पुनर्लभ्य**-वि. पुन्हां मिळण्याजोगें; पुन्हा संपादण्याजोगें. [सं पुनर्+लभ्य] **पुनर्विवाह**-पु. विधवाविवाह; विधवेनें पुन्हा विवाह करणें (इं.) विडो रिमॅरेज याला प्रतिशब्द. [सं पुनर्+विवाह]

**पुनरा**- वि. पूर्ण. 'पोटरिया केळी गाभ पुनरा सोडिले।' -वसा ३८.

**पुनर्नवा**—पुस्त्री. एक औषधी वृक्ष; घेटुळी; खापरी. हिचे तांबडा व पाढरा असे दोन प्रकार आहेत. [सं.]

**पुनर्वसु**—पुस्त्रीन. सातवें नक्षत्र व त्याच्या तारका.

**पुनव**—पु. एक प्रकारचें झाड; पुनर्नवा.

**पुन(ना)व, पुनीव, पुन्यो, पुन्योव**—स्त्री. पौर्णिमा. 'पुनिवसाटीं शीतांशु। पालटे जैसा।' -ज्ञा १८.४९६. 'अभिमन्यु विवाहोत्सव जग निववी जेवि चंद्र पुनिवेचा।' -मोविराट ७.३०. [सं. पूर्णिमा; प्रा. अप पुण्णिवां; हिं. पुन्यों; गु. पुनम]

**पुनवस**—पु. (कु.) पुनर्वसु पहा.

**पुनश्च**—क्रिवि. पुनःपुनः; पुनरपि; आणखी; वारंवार. [सं. पुनः+च]

**पुनस्पुनः**—क्रिवि पुनःपुनः; वारंवार. [ पुनःपुनः अप. ]

**पुनस्संस्कार**—पु. पुनस्संधान पहा. [ सं. पुनः+संस्कार ]

**पुनस्संधान**—न. १ पुनः आवश्यक संस्कार करणें ( पहिल्यात व्यत्यय आल्यानें ) २ गृह्याग्नि (गृहस्थानें विवाह झाल्यादिवसापासून धारण करावयाचा अग्नि) नाहींसा झाल्यास तो पुनः उत्पन्न करण्याचा विधि, कोणताहि संस्कार चूक झाल्यामुळें पुन्हा करणें ३ ( ल ) कोणतेंहि आरंभिलेलें कार्य तडीस न जाता विसकटल्यामुळें पुनः मूळापासून करणें; त्यासाठीं करावी लागणारी खटपट [ सं पुन +सधान ]

**पुनीत**—वि. पवित्र, शुद्ध; प्रायश्चित्तादिकांनीं पावन झालेला; (महानु ) पुनैतु 'जेआचेनि चरणें पुनैतु। जगीं वाणिजेति तीर्थें।' –ऋ १८ 'केला पुनीत सायुज्या।' –एभा ७ १९०. [ सं ]

**पुनै**—क्रिवि ( महानु ) पुन्हा पुन, पुनर् पहा. 'पुनै तें जीयें म्यानें सेविन पुण्यातें। जरि शास्त्र बोलें।' –ऋ ४१.

**पुन्नपोळी**—स्त्री (गो ) पुरणपोळी. [सं. पूर्ण; प्रा. पुन्न+पोळी]

**पुन्नाग**—पु. १ नागचाफा २ उंडीण [ सं ]

**पुन्हा-न्हां**—क्रिवि. पुन , फिरून; आणखी एकदा पुन पहा. [ सं पुनर् ]

**पुमपत्य**—न. पुरुष जातीचें अपत्य [सं. पुंस; प्रा पुम्+अपत्य]

**पुमर्थ**—पु. मनुष्याच्या इहलोकींच्या वास्तव्याचें ध्येय; पुरुषार्थ पहा [ पुम्+अर्थ ]

**पुमान्**—पु पुरुष. [ सं ]

**पुयनण**—न. ( कों ) एक प्रकारचें गवत.

**पुयशिरें**—न. ( कों.) एक झुडप, वेल चढविण्यासाठीं याचा उपयोग करतात.

**पुयाड**—वि. (व.) कुजका; फुसका. 'घर फार दिवसांत फेरलेलें नाहीं तें पुयाड होऊन गेलें आहे, आतां घरावर कोणी चढला कीं पाय आत जाईल.' [ पूं ]

**पुयी**—स्त्री. पुई पहा.

**पुर**—न. १ नगर; शहर; मोठें गांव; लोकवस्तीचें ठिकाण. 'तें अवघेंचि साकार। कल्पुनी आपणपयां पुर। जालें असे तदनुसार। चैतन्यचि।' –ज्ञा १५.४८६ २ किल्ला. ३ घर. ४ अंतर्भाग [सं ] **पुरजात**–पु पेठ; शहराचा भाग. 'तमाम पुरजात व कारखाने व राजमंदिरी चौक्या' –इमं २३६. **पुरद्वार**–न. ( शहर, राजवाडा, देऊळ इ०चा ) पुढचा दरवाजा; महाद्वार. [ पुर+द्वार ]

**पुर**—क्रिवि. पूर्णपणें; पुरेपूर. 'पुर पालख्या तमाम केल्या फुन्ना।' –ऐपो १३९. [ फा. पुर्. तुल० सं. पूर्ण ]

**पुरकणें**—अक्रि. १ (लहान मुलानें) पुरकी वाजविणें; पुर्पुर् असा आवाज काढणें 'पोर पुरकतें आहे त्याला कांहीं दुखणें येणार असें दिसतें' २ एकदम व थोडेसें हगणें; पिळकणें; चिरपणें. [ध्व.]

**पुर**—क्रिवि १ ( समासांत उपयोग ) पुढें; समोर. २ प्रथम; आधीं ३ पूर्वी; एके काळीं. (समासांत) पुरोगामी; पुरोवर्ती; पुरस्सर वगैरे. [ सं. ]

**पुरकी**—स्त्री. ( लहान मुलांनीं ) मिटलेल्या ओंठांतून काढलेला पुर्पुर् असा आवाज; फुरकी. [ ध्व. ]

**पुरखा**—पु जुना माणूस; वडील, वयस्क, प्रौढ, म्हातारा गृहस्थ. -वि १ प्रौढ, मोठा. 'पडतां उरावर धनुष्य घेतला लज्जेचा बुरखा। तें रामानें सहज मोडिलें नसतां वीर पुरखा॥' –पला ४२. २ अनुभवी, समंजस. 'शहाणे पुरखे अकलवंत हेवट म्हातारे बिनकाजी।' –पला ६९. **पुरखा-खी**–पु. ( विशेषतः दक्षिणेंतील कुणबी लोकांत ) आदरणीय वयस्क गृहस्थ; अनुभवी, समंजस मनुष्य. [ सं. पुरुष; हिं. पुरुख, पुर्खे ]

**पुरखांब**—पु जमिनींत पुरलेला खांब ह्याच्या उलट उथळयावरचा खांब [ पुरणें+खांब ]

**पुरंगळी**—स्त्री १ (व.) टुमणें; कटकट, त्रास, लचांड; शुक्रकाष्ठ 'माझ्या मागें पुरंगळी लागली' २ एकसारखी धार; गळती. 'साखरेचें पोतें फुटून पुरंगळी लागली.' [ पुर्पुर्+गळणें ]

**पुरचुं(चों)डी**—स्त्री. अगदी लहान गाठोडी; लहान मोटळी. वस्त्राच्या कोंपऱ्याला गांठ मारून ठेवलेला लहान जिन्नस ( क्रि० बांधणें, करणें ).

**पुरंजन**—पु. आत्मा. -शर.

**पुरजा-जें**—पुन. १ कागद; चिठ्ठी; चिठोरी; कागदाचा कपटा. २ खत; पत्र; दस्तऐवज. पुर्जा पहा. [ फा पुर्झा ] **पुरजेपुरजे**–पुअव. तुकडे तुकडे. ( क्रि० करणें; होणें ).

**पुरजारी**—स्त्री. जप्त होऊन पुन्हा परत मिळालेलें इनाम किंवा इनाम जमीन. [ सं. पुरः=पूर्वी+अर. जारी=चालू ]

**पुरड, पुरडली**—वि. (व.) म्हातारी; वयस्क, जिची संतति थोर झाली आहे अशी. 'पुरड गाईला लोभ मोठा, हुंबरू हुंबरू मोडला गोठा.'

**पुरडैला**—वि. ( महानु.) पुरेसें खालेला; पूर्ण बळी मिळाला आहे ज्यास असा. 'काळयवनाचा उन्गारू। पुरडैला वेतुसें ढेकरू।' –शिशु ४४०. [पुर(पूर्ण)+इड् -इडा(देवांस–दिलेला बळी]

**पुरढणें, पुरढावणें**—उक्रि. १ ( मातीचें मडकें इ० कांहीं विशिष्ट कृतीनें ) मजबूत करणें, होणें; रांपविणें निरढावणें पहा. २ (ल ) कोणत्याहि व्यसनांत पक्के करणें, मुरविणें. –अक्रि. फार व्यसन लागणें; निरढावणें, मुरणें.

**पुरण**—नस्त्री १ सारण; करंजी, पोळी, मोदक इ० खाण्याच्या पदार्थांत नारळाचा चव, शिजवून वाटलेली डाळ; खवा इ० घालतात तें. २ सोन्याच्या पाटल्या, गोठ वगैरे पोकळ दागिन्यांत तांबें, रुपें इ० हलका धातु घालतात तें. ३ कोणत्याहि पदार्थाचा

आकार मोठा करण्यासाठीं त्याच्या आंत जें घालतात तें ४ भित, जोत्याची आतील बाजू इ० मध्यें दगड, धोंडे, माती इ० समुच्च यानें घालतात तें. ५ नुकत्याच लाविलेल्या रोपटाभोंवतीं जी माती घालतात ती; भर. ६ (सामा.) आत भरण्याची, समाविष्ट करण्याची वस्तु क्रिया [सं. पूरण] सामाशब्द- ०पोळी-स्त्री. पुरण घालून केलेली गव्हाची पोळी; एक प्रकारची गोड पोळी. [पुरण+पोळी, तुल० का हूरण होळगी] ०भरण-न वरचेवर घातलेली भर; भित इ०कांत घातलेली दगड, विटा, चिखल इ०ची भर; झाडाच्या मुळाशीं घातलेली माती. (क्रि० करणें; घालणें). [पुरण+भरण] पुरणावरणाचें-न पाहुणे, देवधर्म यासाठीं नेहमींपेक्षा अधिक केलेला स्वयपाक [पुरण+वरण]

**पुरणी**—स्त्री १ (खाब, झाडें इ०) जमीनींत पुरणें; रोवणें; जमिनींत गच्च बसविणें २ भर; भरकाम पुरण (२ त ५) पहा. ३ दशा असलेलें पागोटें (याळा मागाहून काठ लाविता येतो). ४ (कर) सुत ताणण्याची लाकडी नळी ५ (व) हाताचें किंवा पायाचें लाब हाड ६ (बडोदें) रेशीम, दोरा यात मोतीं, मणी ओंवण्याची कृति. साधी, गांठीची व फांदीची असे पुरणीचे तीन प्रकार आहेत. -जनि (पारिभाषिक शब्द) ८. ७ साठा, पुरवठा; पुरवणी 'केली मळमुत्राची पुरणी।' -भाए ७६२. [पुरणें] (वाप्र.) पुरणीचा ऊंस-लावणी केल्यानंतर पाण्याशिवाय वाढीस लागून परिपक्क होणारा ऊंस. ह्याच्या उलट शिंपणीचा ऊंस. पुरणीग(गा)र-पु. (बडोदें) दागिन्याची दुरुस्ती, पुरणी करणारा; पटवेकरी.

**पुरणी पराटे**—पुअव. पराट्यातील एक प्रकार; विरई पराटे. -गृशि २.३४. पराटा पहा.

**पुरणें**—उक्रि. १ गाडणें; द्रव्य, काहीं पदार्थ जमिनींत ठेवणें, घालणें. २ (झाड, काठी, खाब इ०) जमिनींत माती घालून रोवणें, स्थिर राहील असा करणें. ३ पूर्ण, पुरा, होणें; पुरें पडणें; बेताचा होणें. 'परी कायकीजे वांजटा। पूरीजत असे।' -ज्ञा १३.५९. ४ समाधान होणें, पावणें, संतोषणें. 'ऐकोन पुरे गुरूचे कान।' -मुआदि १७.१०९. ५ संपणें; थांबणें. 'नातरी आयुष्य पुरलें आहे। तरी औषधें काहीं नोहे।' -ज्ञा २ ६७. ६ टिकणें. 'प्रियदार बंधु न पर्थी पुरले ...।' -मोमहाप्रस्थान २.२३. [सं. पूर्=भरणें, संतोषविणें]

**पुरत**—क्रिवि. (विरू.) पुरेत; पुरे आहेत.

**पुरतकाली**—वि. पुरतकाल (पोर्तुगाल) देशांतील कागद, भाषा, चाल इ० -शास्त्रीको [पोर्तुगाल]

**पुरता**—वि. १ बेताचा; पुरेसा. 'पुण्यसामग्री पुरती। तयासीच घडे भगवद्भक्ती।' -दा २.४.२७. २ समग्र; संपूर्ण; व्यंग नसलेला. 'हा जनकु हे माता। हा मी गौर हीन पुरता।' -ज्ञा १५ ४९२. ३ पुरण्याजोगता; चालण्यासारखा 'संसारापुरता पैसा मिळाला म्हणजे पुरे' ४ निष्णात; निपुण 'जरी स्वयें झाला व्याख्याता। पुराणपठणें पुरता।' -एभा ११ १२३९. ५ संपन्न. -क्रिवि बरोबर; तंतोतंत; नक्की. 'हा धोतरजोडा पुरता दहा हात नाहीं' [सं पृ-पूर्त] पुरती-स्त्री (बडोदें) पावती, पूर्तता करणें. 'भार्डी परत आलीं म्हणजे पुरतीचा शेरा करून..' -ऐरापुप्र २.१२० [सं. पूर्ति] पुरतेपणीं-क्रिवि काहीं एक कमीपणा न राहतां पूर्ण होई असें (ऐकून घेणें, करणें, बोलणें वगैरे)

**पुरंदर**—पु १ इंद्र. २ महाराष्ट्रांतील एक किल्ला. [सं.]

**पुरंद्री**—स्त्री (अप) विलासी स्त्री -हंको [सं पुरंध्री]

**पुरपुराट**—पु. विपुलता; समृद्धि; भरपूरपणा [पुरणें द्वि]

**पुरपुरे**-क्रिवि. १ पुरे, आतां नको, बस याप्रमाणें (होणें वाटणें); (नामाप्रमाणेंहि उपयोग करितात). 'यंदा पावसानें पुरपुरे केलें' [पुरणें द्वि.]

**पुरभय्या**—न. १ परदेशी; हिंदुस्थानी मनुष्य २ हिंदूंतील एक जात व तींतील व्यक्ति. भय्या पहा [सं पूर्व; हिं पुरबिया= पूर्वदेशीय] म्ह० आठ पुरभय्ये नऊ चौके (चुली).

**पुरमगज**—वि. (व) पुरून उरण्याइतका, भरपूर, पुरपुराट पहा 'नळ आल्यानें आतां आम्हाला पुरमगज पाणी मिळतें.' [पुरणें+गज प्रत्यय]

**पुरमाशीण**—स्त्री (अप) गरोदरपणाचे दिवस पूर्ण भरलेली, लोटलेली स्त्री. [पूर्ण+मास+ईण स्त्रीलिंगी प्रत्यय]

**पुरव**—स्त्री १ पुरेसेपणा, पुरवठा; (एखादें कार्य, हेतु, इ० साधण्यास) पुरवठा, समाधान होण्यासारखा गुण (क्रि० येणें). पुरवेस पडणें असाहि प्रयोग होतो. २ समाधान, पुरवठा झालेली स्थिति. (क्रि० होणें) [पुरणें]

**पुरवटा-ठा**—पु १ पुरेसेपण; तोटा न येणें, भरपूर होणें; समृद्धि, विपुलता २ समाधान, पुरतेपणा पावलेली स्थिति (क्रि० घालणें भरणें, येणें) पुरवठ्यास पडणें असाहि प्रयोग होतो. ३ साठा; संग्रह; बेगमी; साहित्य. ४ (अर्थशास्त्र) मागणीप्रमाणें देणें, पुरें करणें; गरज भागविणें. 'मागणीपेक्षा पुरवठा जास्त असल्यास मालाची किंमत उतरते.' ५ (स्त्रिया एकत्र गाणें गात असताना) एकीनें दुसरी पासुन घेतलेला, मागच्या शब्दापासुन पुढें चालू केलेला गाण्याचा भाग भेंडीसारखा एक प्रकार. ६ (कु) कप्पे असलेली पिशवी; बटवा. पुरवटेसार-वि. जितकें पाहिजे तितकें; विशिष्ट कार्याला पुरण्याइतकें; विपुल, भरपूर; शेवटपर्यंत पुरणारें (अन्न इ०) [पुरवठा+सारखें]

**पुरवंडा-ढा**—पु मृदंगवाला; तबलजी. 'तै कटीं कवळून मृदंगातें। कुशल बाजवी पुरवंडा।' -नव २०.१२४.

**पुरवणा**—पु थोर व्यक्ती व राजे यांचा इतिहास. [पुराण]

**पुरवणी**—स्त्री. १ पुरवठा; भर; समृद्धि. ' पुरवणी मानसी कीं । जिती आथी ।' –ज्ञा १३.५१२. २ कागद संपल्यामुळें दुसऱ्या कागदावर लिहिलेला मजकूर. ३ परिशिष्ट; जोड; पुस्ती. ' औषधाचिया कडुवटपणी । जैसी अमृताची पुरवणी । '- ज्ञा २ ८९. ४ पुराव्यानें सिद्ध करणें, पाठपुरावा करणें. ५ उणीव भरून काढणें; त्यासाठीं घातलेली भर ६ (क) नदीस आलेला पूर, लोंढा [ पुरविणें ] सामाशब्द- ०**अर्ज-र्जी**-पुस्त्री. १ पूर्वीच्या अर्जास जोड म्हणून केलेला नवीन अर्ज; न्यूनतापूरक अर्ज २ काम चाल- विण्यासाठीं वकिलास पुरविलेली अधिक माहिती [पुरवणी+अर्ज] ०**परीक्षा**-स्त्री. वार्षिक परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्यांची मागाहून घेण्यात येणारी परीक्षा. ०**बंद**-पु. पुरवणी म्हणून उप योगांत आणलेला कागद; जोडबंद. ०**वाचन**-न स्थूल अभ्यासा- साठीं नेमलेल्या पुस्तकांचें वाचन. ( इं. ) रॅपिड रीडिंग. **पुरव- णीचा**-वि. पाहिजे तितका; बेताचा; पुरवंटेसार पहा. [ पुरविणें ]

**पुरवणी**—स्त्री. मोत्याची माळ. ०**गार**-पु मोत्यांस भोकें पाडून तीं ओंवणारा; पटवेकरी; पुरणीगार. [ पुरवणी+गार ]

**पुरवणूक**—स्त्री १ परिशिष्ट, पुरवणी, ग्रंथशेष २ भर; पुर- वठा; कमी असलेल्या भागाची पूर्तता. ' ह्या रीतीनें त्या यंत्रात स्वच्छ वायूची पुरवणूक करितां येते. ' –मराठी ६ वें पुस्तक पृ. ८४ (१८७५). [ पुरविणें ]

**पुरवणें**—अक्रि. १ व्यापणें; समावणें; जेथें तेथें हजर असणें. ' उपासना करूनिया पुढें । पुरवलें पाहिजे चहुंकडे ।' –दा १९. १० ८. २ परवडणें; पत्करणें; आवडणें, मान्य होणें. 'माजा घात पुरवला, तुज त्यांचा मात्र घात पुरवेना । ' –मोउद्योग ११.२१. [पुरणें ]

**पुरवार**—स्त्री. (क) पुराव्यानें खरें करून दाखविणें. –वि. पुराव्यासहित. [ पुरणें; गु. पुरवार ]

**पुरविणें**—सक्रि १ पुरवठा करणें; पुरेसें वाढणें, देणें. ' मी तुम्हास तूप पुरवीन. ' २ पुरेल अशा बेतानें खर्च करणें; टिकविणें. ३ पुरेसें होणें; सबंध वेळ पुरणें. ' हें काम मला सारा दिवस पुर- विलें. ' ४ पूर्ण करणें; पुरवणी लावणें; कमीपणा भरून काढणें. ' तयाची ते चाड पुरी । पुरविता मी । '–ज्ञा ७.१४३. ५ समजा- विणें; सिद्ध करणें. ' असें तो पुरवून देई. ' –मराठी ६ वें पुस्तक पृ. १८४. ( १८७५ ) ६ कडे लक्ष लावणें, देणें. ' परमेश्वरास पुरवी मन । ' –दावि २८२. ७ धरणें; बाळगणें. ' धीर न पुरवे कवणाही प्रस्तुत । ' –दावि २१८. [ पुरणें ] **पुरव्या**–वि. १ पुर- विणारा; पुरवठा करणारा; पूर्ण करणारा. २ सेवा, चाकरी करणारा; उपयोगी पडणारा. ( समासांत ) खटखट–पट पुरव्या ( खटपट्या= आचाऱ्याचा मदतनीस ), पाणीपुरव्या, सामानपुरव्या इ० [पुरविणें]

**पुरवुं(गु)र्दी**—पु. ( गो. ) मलद्वार

**पुरशिदा**—स्त्री. चौकशी; विचारणा पुरशीस पहा. [ फा. पुर्सीदा ]

**पुरशी(सी)स**—स्त्री. १ चौकशी; विचारणा, मुख्य तपासणी. ' मौजे मजकूरचे मोकदमास बोलावून आणून पुरशीस केली. ' –वाडबाबा २.४२. २ प्रश्नास दिलेला जबाब; जबानी. ' राजश्री मल्हार जगन्नाथ कारकून यासी हुजूर आणून दरबार खर्चाची पुरसीस केली. ' –थोमारो २ ३३. ' बावाजी बिन मोत्याजी यास पुरसीस करिता त्याणें विदित केलें कीं.. ' –समारो २ ३२९. ३ सर्व पक्षाचें म्हणणें विचारून लिहिलेला कागद; जबाबाचा कागद; कैफीयत (क्रि० घालणें, पाडणें; करणें; लावणें इ०). ४ अर्ज; सवाल. ' देवकुटे यास पुरशीस केली. ' –वाडसमा ३.६२. [ फा. पुर्सिदन्=विचारणें ]

**पुरश्चरण**–न. १ मंत्रसामर्थ्य मिळविण्यासाठीं मंत्रशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें मंत्राचें जपानुष्ठान करणें. 'शुद्ध मंत्राचें पुरश्चरण। करी विघ्नाचें निर्दळण । ' –एभा २८.६०९ २ ( सामा ) अनु- ष्ठान, जप; पाठ. ' व्यर्थ करिती पुरश्चरण । स्त्रियेनें हरुनि नेलें मन ।' [ सं ] **पुरश्चरणी**–वि. पुरश्चरण करणारा ' रजस्वलेची ऐकोनि वाणी । दूर पळे पुरश्चरणी । –एभा १२ २४८.

**पुरसॉ**—वि. ( गो. ) लठ्ठ, स्थूल मनुष्य. [ सं ]

**पुरस्कर**—वि. ( चुकीनें ) पुरस्सर ( पूर्वक ) या अर्थी पुर स्सर पहा.

**पुरस्कर्ता, पुरस्कारी**—पु १ चालना, उत्तेजन देणारा; पुरस्कार करणारा: पुष्टि देणारा; पक्षपाती, सहाय्यक. २ स्वतः पुढाकार घेऊन काम करणारा; कारभार पाहणारा. ३ पुढारी; म्होरक्या; कारभारी; व्यवस्थापक; संचालक [ सं. पुरस्+कर्ता–कारी ] **पुरस्करणें**-उक्रि १ पुरस्कार देणें; साहाय्य करणें. २ सन्मान करणें; शाबासकी देणें; बक्षीस देणें. ' ऐसें पुरस्करोनि श्रीहरी । आदरिलें बोलों । ' –ज्ञा ९.२३८. [ सं. पुरस्कार ] **पुरस्कार**–पु. १ पुढें नेणें, करणें; चालना, पुष्टि देणें; पुढें ढकलणें. २ पुढाकार; ( एखादें कार्य ) अंगावर घेणें, चालविणें; व्यवस्था पाहणें. ३ सन्मान; प्रशंसा; सत्कार. ' या ग्रंथाचा त्यांनीं पुरस्कार केला. ' –के १७.५.३०. ४ बक्षीस, साहाय्य. [ सं. ]

**पुरस्सर**—वि. १ मुख्य पुढारी; अग्रेसर २ पुढें जाणारा, सरणारा. ' पुरस्सर गदासवें झगडितां तनू भागली । ' –केका ४६. ३ ( समासांत ) सहित; पूर्वक. ' शपथपुरस्सर–बुद्धिपुरस्सर–आदर- पुरस्सर–इच्छापुरस्सर इ० ' इंद्रपुरस्सर देव शरण गेले. '[सं. पुरस्+सृ]

**पुरळ-ळा**—पु पित्तादि विकृतीमुळें अंगावर येणाऱ्या पुट- कुळया (क्रि० येणें; उठणें; निघणें). **पुरळणें**–अक्रि. अंगावर बारीक पुटकळया उठणें. [ पुरळ ] **पुरळी**–स्त्री. पुळी; पुटकुळी. [ पुरळ ]

**पुरा**—वि. १ पुरता; पूर्ण; कमीपणा नसलेला; निर्दोष; अव्यंग. 'उणा पुरा यासीं नाहीं कोणी ठाव।' –तुगा २२ २ पूर्ण झालेला; संपविलेला; साध्य केलेला. ३ निष्णात; निपुण; पक्का; कुशल, पारंगत. 'धनवंत रत्नपारखी पुरा। तेणें धुळीमाजीं देखिल्या हिरा।' –एभा ९.४९७ ४ पुरेसा; बेताचा, पाहिजे तितका –क्रिवि १ पूर्णपणें; कुशलतेनें २ भरपूरपणें; पुरतेपणीं 'कधीं घाण वस्त्रें पुरा होय पानी।' [सं पूर] (वाप्र) ०**करणें**–१ पार पाडणें; अमलांत आणणें (कोर्टाचा हुकुमनामा, खटला, निकाल इ० ). २ शेवट करणें; नायनाट, खलास करणें. 'केला नसे मन्मथ तां पुरा रे।' –सारुह ३.१२५ ०**जाणें**–(गो) थकणें; दमणें; श्रमणें ०**होणें**–ठार होणें. 'म्हाडीक तुमाजीराया पुढें पुरा झाला।' -ऐपो ८७.

**पुरा**—पु १ शहराची पेठ, भाग, मोहोल्ला २ उपनगर; सभोंवतालचा प्रदेश, टापू [सं पुर]

**पुरा-राः**—क्रिवि पूर्वीं, प्राचीनकाळीं 'जेवें पुरा वारवधू जनांचे।' –विवि ८.७१२३.[सं.]

**पुराड-ट**—न नदीच्या पुराबरोबर वहात आलेलें गवत, लाकडें, पानें, केरकचरा इ०.' पुरीं पुराडें भेटलीं।' –ग्रंथराज ७५ [पूर]

**पुराण**—न १ प्राचीन इतिहासपर व चरित्रपर काव्यग्रंथ ह्यांत सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व लय, देव–दानव, राजे, ऋषी इ०च्या कथा, पराक्रमांचीं वर्णनें, वंशावळी इ० माहिती असते. पुराणें म्हणजे पांचवा वेद म्हणण्याचा जुना प्रघात आहे. हें धार्मिक वाङ्मय समजलें जातें पुराणें अठरा आहेत, त्यांचीं नावें.–ब्रह्म, पद्म, विष्णु, वायु किंवा शिव, लिंग, गरुड नारद, भागवत, अग्नि, स्कंद, भविष्य, ब्रह्मवैवर्त, मार्कंडेय, वामन, वराह, मत्स्य, कूर्म, ब्रह्मांड. 'अष्टादश पुराणें। तींचि मणिभूषणें।' –ज्ञा १.५. २ (ल) चर्‍हाट; कंटाळवाणी गोष्ट –वि. पुरातन; जुनाट; प्राचीन. 'पुराण पुरुष'. 'विस्तारिली जे पुर्वी पुराणीं।' –सारुह १.३१ [सं] (वाप्र.) ०**काढणें–चालविणें–मांडणें–लावणें–सोडणें**–कंटाळवाणी गोष्ट सांगणें; चर्‍हाट लावणें म्ह० पुराणांतली वांगीं पुराणांत. सामाशब्द– ०**पिसें**–न. पुराण वाचण्याची, ऐकण्याची उत्सुकता, आवड; पुराणाचें वेड. [पुराण+पिसें] ०**पुरुष**–पु १ ईश्वर.' किंवा पुराणपुरुषा संप्रति बहु भागलासि या कार्मी।' –मोसंशयरत्न माला १९ (नवनीत ३५०). २ (ल) जुन्या तर्‍हेचा, अगदीं म्हातारा माणूस ०**मतवादी**–वि. जुन्या मताचा; सनातनी. ०**वस्तुसंशोधक**–पु जुन्या व ऐतिहासिक वस्तूंचें संशोधन करणारा. ०**वस्तुसंशोधन**–न १ जुन्या ऐतिहासिक महत्त्वाच्या वस्तूंचें संशोधन करणें. (इं) आर्किआलॉजी. २ पुरातनकाळांतील लोकांसंबंधीं त्या काळांतल्या उपलब्ध वस्तूवरून ज्ञान. पुराणांतरीच्या ग्रंथांतील वेचे, निवडक कथा यांचा संग्रह, व अभ्यास. –गांगा १३८. ०**वैराग्य**–न पुराण ऐकत असतांना जगाच्या फोलपणाबद्दल वाटणारा तिटकारा; संसारासंबंधीं नावड, विरक्ति; धर्मोपदेशामुळें वाटणारा तात्पुरता पश्चात्ताप. [सं पुराण+वैराग्य] **पुराणोक्त**–वि. १ पुराणांत सांगितलेला (मंत्र, स्तोत्र, उपदेश इ०). २ पुराणाच्या आधारें केलेलें (कर्म, संस्कार इ०) [सं. पुराण+उक्त] **पुराणोक्त आशीर्वाद**–पु ज्यास वेदाधिकार नाहीं अशास लिहावयाचा आशीर्वाद **पुराणोक्त कर्म-संस्कार**–पु वेदाधिकार नसणार्‍यांचे संस्कार पुराणातील वचनाप्रमाणें करणें.

**पुराण-णी-णें**—नस्त्री. (खा व ) बैलास हाकतांना त्याला टोंचण्याकरितां टोंकास अणीदार खिळा, आर इ० बसविलेली काठी, चाबूक; टोंचणी; पराणी.

**पुराणीक**—पु १ पुराणाचा अभ्यास केलेला पुराणांत पारंगत असलेला ब्राह्मण. २ देऊळ इ० जाहीर ठिकाणीं पुराण वाचून त्याचा अर्थ सांगणारा, पुराणावर वृत्ति असणारा [सं पौराणिक] –वि जुना; पुरातन 'तंव कोणे एके काळीं। कंबल अश्वतर पाताळीं। पुराणीक शेषाजवळीं। असती दोघे भुजंगा।' –कथा ५ ६ १०९.

**पुरातन**—वि जुना; प्राचीन; पूर्वीचा; जुन्या काळचा. 'स्वयें तूं अनादी। पुरातनु।' –ज्ञा ११ १५४. [सं.]

**पुराय**—वि (गो.) पुरेपूर; भरपूर; पुरता [सं. पुर, पूर्ण]

**पुरारणें**—अक्रि. भरणें; व्यापणें, परिपूर्ण असणें 'वीरश्रीनें अगदीं पुरारलेले लोक' –सूर्योदय ९९. [पूर द्वि]

**पुराव-वा**—पु. १ पुरवठा; पुरविण्याचा व्यापार 'करुनि पुरावा कृष्णागरुकर्पूरादि पुण्यगंधाचा।' –मोअनुशासन ८.६५ २ पुरवणी; भर ३ साक्ष, प्रमाण; आधार 'पण स्त्रीवांचून सृष्टी उत्पन्न करण्याचा दृढ विश्वामित्रानें धरल्याचा पुरावा काहीं नाहीं' –नाकु ३ २१ ४ (कायदा) चौकशी चालू असलेल्या गोष्टीबद्दल कोर्टासमक्ष साक्षीदारानें सांगितलेली हकीकत, हजर केलेला दस्तऐवज. ५ मदत; साहाय्य; कुमक; पाठबळ 'याणीं ठिकाणीं राहूनच फौजेचा पुरावा करावयाचा होता.' –भाब ११०. [पुरणें; पुरविणें तुल० पोर्तु. प्रोव्हा; ई. प्रूव्ह] ०**दाखविणें**–आधार, प्रमाण दाखविणें.

**पुरि(रु)मेंत**—पु (गो) पुरवठा; बेगमी 'पावसाळ्या पुरुमेंत.' [पोर्तु प्राव्हिमेंतो]

**पुरी**—स्त्री. १ नगरी, लहान शहर २ जगन्नाथपुरी (चार धामांतील एक). ३ पवित्र नगर; क्षेत्रस्थान पुरी सात आहेतः– अयोध्या, मथुरा, माया (हरिद्वार), काशी, कांची, अवंतिका (उज्जैन), द्वारावती (द्वारका) 'द्वारावती सातवी पुरी।' –एभा ३०.७६.

**पुरी**—पु. दसनाम गोसाव्याचा एक वर्ग [सं.]

**पुरी**—स्त्री. १ रवा भिजवून गोल लाटून तुपांत तळून केलेला पदार्थ; एक पक्वान्न. 'जगीं दाविती बाबा। परि आतुनि कावा. भोंदुनि खाती पुरी।'-ऐपो ३६८. २ (खा) पुरणपोळी.

**पुरी**—स्त्री. पुरवठा; पूर्तता, पुरतेपणा. (क्रि० करणें; पडणें; पाडणें). -वि. परिपूर्ण; तृप्त 'मनपवनाची खीच पुरी। वाढूनियां।' -माज्ञा १८.१०४०. [पुरणें] ०पडणें-पुरविणें, परवडणें ०ताजीम-स्त्री पाहुणा भेटावयास आला असता किंवा भेटून परत जाताना त्यास उभे राहून दिलेला मान. याच्या उलट नीमताजीम. ताजीम पहा (क्रि० देणें; घेणें)

**पुरीश**—पु नगराध्यक्ष; शहराचा मुख्य; पुराधिपति [सं]

**पुरीष**—पु विष्ठा; गू; शेण [सं]

**पुरु**—पु पूर पहा 'तंव आनंदाचा पुरु।' -विपू १ १००

**पुरुख**—पु १ पुरुष. -ऋ ३५.-ज्ञा १४७६. 'ज्याहुनि अन्य प्रियतर नरलोकीं न च मना पुरुख गमला।' -मोऐषिक १ ६१ २ (राजा.) महाराचा देव. [सं पुरुष]

**पुरुतां**—क्रिवि (महानु) पुरता पहा. 'तो गाता तरी एकटिका। परी स्वरें पुरुतां नीका।' -शिशु १६८.

**पुरुष**—पु १ ज्याच्या अंगीं प्रजोत्पादक बीज आहे असा मनुष्यप्राणी; नर २ वयांत आलेला माणूस; बाप्या. ३ फळझाडां मधील नर; ज्या झाडांत पुंकेसर असतात तें झाड ४ (व्या) पुरुषवाचक लिंग; पुल्लिंग 'वृक्ष हा पुरुष. झाड नपुंसक.' ५ (व्या.) वक्ता, श्रोता व उक्तविषय असे सर्वनामांचे जे तीन प्रकार करतात त्यास 'पुरुष' ही संज्ञा लावतात. प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन पुरुष आहेत. ६ साडेतीन हात उंचीचें प्रमाण ७ पिढी; पिढीची एक एक व्यक्ति; पिढींतील पूर्वज ८ पति; नवरा 'तुझा जन्म कवणें वंशीं। पुरुष तुझा कोण सांगे।' -गुच ३५.२४१. ९ ज्ञाता, जाणणारा, उपभोग घेणारा माणूस. १० जगताच्या उत्पत्तीस प्रकृतिसमवेत कारणीभूत व्यक्ति. 'प्रकृति आणी पुरुष। यां दोहींस जेथें निरास।' -दा ९ २.३९ ११ (तत्त्वज्ञान) आत्मा; क्षेत्रज्ञ. 'ज्याला क्षेत्रज्ञ किंवा आत्मा म्हटलें ... यासच सांख्यशास्त्रांत ... पुरुष म्हणतात.' -गीर १५९ १२ (गो.) मूळ पुरुष [सं.] ०गांठ-स्त्री. नाडेगांठ; बोटांत घालावयाच्या सोन्याच्या पवित्रकावर असते तशी गाठ याच्या उलट राडगांठ किंवा बाईलगांठ ०त्व-न. १ पुरुषाच्या ठिकाणीं प्रजोत्पादनाविषयीं उपयुक्त जी शक्ति असते ती; वीर्य. २ (ल) सामर्थ्य; शौर्य, पराक्रमाचा उत्साह. 'वृषकेतूचें पुरुषत्व पाहोन। डोलती मान आनंदें॥' -जै १८.७७ ३ (व्या.) पुल्लिंग. [सं. पुरुष+त्व प्रत्यय] ०प्रयत्न-पु. मानवी प्रयत्न; मनुष्यानें केलेली धडपड. (इं) ह्यूमन एफर्ट 'फला म्हटली कीं पुरुषप्रयत्न आलाच' -(रा ग. हर्षे) गोविंदाग्रज. [सं. पुरुष+प्रयत्न] ०वाचक(सर्वनाम)-न. (व्या.) सर्वनामाचा एक प्रकार; मी, तूं, तो इ० जातीचें सर्वनाम; प्रथम, द्वितीय व तृतीय असे याचे तीन प्रकार आहेत **पुरुषाकार**-पु. शौर्य; पुरुषत्व. 'तुझा जाणे पुरुषाकारु।' -उषा १४३८. [पुरुष+आकार] **पुरुषांतर**-न एक पिढी. -खिपु. [पुरुष+अंतर] **पुरुषाद**-वि. नरभक्षक; नरमांसभक्षक. 'म्हणति मारूनिया पुरुषाद। हा करील शुभ्र यशें खदिशा दाहा।' [सं. पुरुष+अद्=खाणें] **पुरुषार्थ**-पु १ पुरुषानें साधावयाच्या चार गोष्टी, कर्तव्यें; धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष; पुरुषाच्या इच्छेचा विषय; ईप्सित वस्तु. 'पुरुषार्थसिद्धि चौथी। घेऊनि आपुलिया हातीं।' -ज्ञा १२.१९. २ धाडस; पराक्रम, शौर्य 'लटिका पुरुषार्थ बोलों नये।' -दा २ २.१० [सं पुरुष+अर्थ] **पुरुषार्थचतुष्टय**-न पुरुषानें साधावयाच्या चार गोष्टी; धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष. **पुरुषार्थराज**-पु मोक्ष. 'म्हणोनि करावा स्वधर्मु। जो करितां हिरोनि घे श्रमु। उचित देईल परमु। पुरुषार्थराजु।' -ज्ञा १८.९४९ **पुरुषार्थी**-वि. पुरुषार्थचतुष्टयापैकीं कोणताहि एक पुरुषार्थ साधण्याविषयीं प्रयत्न करणारा 'मिळाले येथें सर्व नृपति। जे पुरुषार्थी थोर थोर।' [सं पुरुष+अर्थी] **पुरुषाशन**-न. नरमांसभक्षण. -वि. नरभक्षक. पुरुषाद पहा. [सं पुरुष+अशन] **पुरुषोत्तम**-पु. १ उत्तम पुरुष, पुरुषश्रेष्ठ. २ परमात्मा; विष्णु. 'व्याप्यु मी व्यापकु। पुरुषोत्तमु मी।' -ज्ञा १८.११९८. [सं. पुरुष+उत्तम] **पुरुषोत्तममास**-पु. अधिकमास, मलमास; धोंडा महिना. हा दर ३३ महिन्यांनीं येतो. [सं पुरुषोत्तम+मास]

**पुरु(रू)ळ**—पु पुरळ पहा.

**पुरूख**—पु १ (राजा.) अतिशूद्रांचा, महाराचा देव २ (अप) पुरुष पुरुख पहा. [सं. पुरुष]

**पुरें, पुरेंपुरें**—क्रिवि १ पुरेसें, पुरेपूर. 'मला दहा हात धोतरजोडा पुरे' २ बस्स; बसबस. 'वसवा पुरें पुरे कां म्हणतां धनवंत कण कसा वेंची।' -मोसंशयरत्नमाला २६ (नवनीत ३५१). (अव.) पुरेत **पुरेंपुरे करणें**-त्रासवून सोडणें [पुरणें]

**पुरें**—न. पूर्णपणा. 'म्हणोनि मागील जे अध्याय। ते चढते भूमीचे आय। तयांचें पुरें दाविताहे। आपुल्या आंगीं।' -ज्ञा १८.४२. पुरा पहा. [पूर]

**पुरेजात**—पुअव. पुरे; पेठा; शहरांतील भाग. 'राजश्रींनीं परलोकसाधन करितांच तमाम पुरेंजात व कारखाने व राजमंदिरीं चौक्या ठेऊन बंदोबस्त केला' -ऐटि १.६५. [पुरा=पेठ अव.]

**पुरेत**—क्रिवि पुरेसें; बस. पुरे पहा. 'पन्नास आंबे पुरेत.' [पुरे+आहेत; पुरे अव.]

**पुरेपूर**—क्रिवि. पुष्कळ, भरपूर. 'पुरेपूर दूध प्यालों.' [पुरे द्वि. तुल० वै. पुरु+पुरु=पुष्कळ. -भाअ १८३०]

**पुरोटा, पुरोटेसार**—वि. पुरवटा-ठा, पुरवटेसार पहा.

**पुरोडाश**—पु. १ इष्टि, यज्ञ इ० श्रौतकर्मांत देवतांना हवि देण्याकरितां, तांदुळाचें पीठ तुपावर भाजून त्यांत कढत पाणी ओतून घट्ट झालेल्या पिठाचा कांसवाच्या आकाराचा गोळा करतात तो; हविर्द्रव्य. २ सातूच्या पिठाचे गाकर ज्या तुपांत बुडवून हवन करतात तें तूप. ३ यज्ञांत हवन करून जें शिल्लक रहातें तें; हवनीयद्रव्यशेष. 'मग आत्मबोधींचें सुख। जें संयमाग्नीचें हुतशेष। तोचि पुरोडाशु देख। घेतला तिहीं।' –ज्ञा ४.१३९ [सं.]

**पुरोधा**—पु. उपाध्याय; पुरोहित. [सं.]

**पुरोभागी**—वि. व्यवस्थापक, देखरेख करणारा; पुढारी, [सं]

**पुरोवर्ती**—वि. समोर उभा असणारा; पुढें असणारा [सं]

**पुरोहित**—पु. यज्ञयाग, धार्मिकविधि आदिकरून धर्मकृत्यें यजमानाकडून यथासांग रीतीनें करवून घेऊन, त्याजवर देवाची कृपा संपादन करूं इच्छिणारा वर्ग किंवा त्यांतील व्यक्ति. हिंदुस्थानांतल्या प्रमाणेंच इराणांतहि प्राचीनकाळीं पुरोहितांची संस्था अस्तित्वांत असलेली आढळते –ज्ञाको (प) २२१; कुळाचा उपाध्याय; कुटुंबातील सर्व धर्मकृत्यें चालविणारा भिक्षुक. 'पुरोहितु नाविष्करे दातेपणें।' –ज्ञा १८.१६९. [सं] **०गुण**–पु १ पुरोहिताचा धर्म, पेशा. 'तऱ्ही पुरोहितगुणें। मी बोलिलों पुरें उणें।' –ज्ञा १८.१७६६. २ पराधीनता. –मनको [पुरोहित+गुण]

**पुरौंचे**—उक्ति (गो.) लिंपणें; पुरणें. 'वाट पुरौंची' (मार्ग लिंपून बंद करणें)

**पुर्कस**—पु. लढाई· तंटा; बखेडा 'तरी पुर्कस–बखेडा पडल्यास खावंद प्रतापी आहेत' –ऐटि ३ ४२. [फा. पुर्खाश्]

**पुर्गतोर–री**—स्त्री. (गो) ज्या ठिकाणीं मरणानंतर आत्मा पापापासून मुक्त होतो अशी जागा किंवा स्थिति. (इं.) पर्गेटरी –खिपु ५६३. [पोर्तु पुर्गातोरिओ]

**पुर्गुटली**—स्त्री. (गो.) अंगाची कवळी; फुरंगटून बसणें. [फुरंगुटणें]

**पुर्जा**—पु. १ कागदाचा तुकडा; पुरजा पहा. 'सर्व घर शोधून कागदाचा पुर्जा न् पुर्जा घरांतून वोढून काढून सरकार कचेरींत न्यावा.' –इनाम ६२. २ कागद; लेख; पत्र.' तरी आम्ही यांस दरम्यान होऊन पुर्जा दिल्हा होता.' -पेद २०.१०१. ३ दस्तैवज; खत. [पुरजा]

**पुर्ती**—स्त्री. (गो.) पाण्याच्या प्रवाहांतून वाहून आलेली माती; झाडाला घालतात ती माती, गाळ. [पूर]

**पुर्भा**—पु. पुरभय्या पहा. 'गर्दीत खासे शिरले। मराठे मोंगल पठाण पुर्भे इतर बरोबर भरले।' –ऐपो २२४. [हिं. पुर्बिया; म. पुरभय्या]

**पुर्या**—स्त्री. (प्र.) पूर्वा; एक रागिणी. 'जे स्थैर्या धैर्यधैर्या हृदयिं वसविती चक्रवड्वर्य पुर्या।' –मुराअयोध्या १०१. [सं. पूर्या]

**पुर्वंस**—पु. (कु) मूळ पुरुषाच्या नांवें स्थापन केलेली देवता. [सं. पूर्ववंश]

**पुर्विल्लॉ, पुर्वील**—वि. (गो.) (प्र.) पूर्वील; प्राचीन [पूर्व]

**पुर्शि(सि)दा**—स्त्री चौकशी; विचारणा. 'सांप्रत पुन्हां सरकारात पुर्सिदा जाली.' –दिमरा २ १८२ [फा पुर्सीदा]

**पुर्शी(सि)स**—स्त्री. चौकशी पुरशीस पहा. 'हल्लीं चिंतोपंत, बाळाजीपंत, जयरामपंत यास पुर्सिसा सरकारांतून होत आहेत.' –ख १०.५०२९.

**पुऱ्हळ**—पु. पुरळ पहा

**पुऱ्हाणें**—न (खा) बैलांस टोचण्याची आर; टोंचणी; पराणी. पुराणी–णें पहा

**पुलक**—पु रोमांच; (भय, आनंद, शीत इ०मुळें) अंगावर उभा राहिलेला कांटा 'पोषी जशी पति शुभाऽशुभ–भव–मुदऽमुद्भूरें पुलक लंका।' –मोसभा ७ २५ [सं] **पुलकांकित, पुलकित**–वि. रोमांच उठलेलें (शरीर) 'पुलकांकित रोमांच उठी। उन्मीलित दृष्टी पुंजाळे।' –एभा ३ ५९२ **पुलकांचल**–न रोमांच. 'आपाद पांगुतलें पुलकांचलें।' –ज्ञा ११.२४६ [सं पुलक+ अंचल]

**पुलका**—स्त्री अश्वाच्या विक्रमा, पुलका, पूर्णकंठी, त्वरीता आणि नीललंबा या पांच गतींपैकीं एक. –अश्वप १.१८५.

**पुलन**—न. (जखम, गळूं इ०मध्यें) पू उत्पन्न करणारा, विकार वर्धक खाद्यपदार्थ (पावटा इ०). [पू]

**पुलबंदी**—स्त्री. १ पुलाची बांधणी २ पुलाची रचना, मांडणी ३ धरण; धक्का; बंधारा. [फा पुल+बंदी]

**पुलस्ती**—स्त्री. (ना) पोलीस; पोलीस ठाणें

**पुला**—पुस्त्री (गवत, चारा, कडबा इ०ची) पेंढी, गड्डा; भारा. 'वैरण चोवीस पंचवीस पुले अशी महागाई' –भाव १४. [हिं. पूला; तुल० सं. पुल्=गोळा केलें जाणें]

**पुलाव–वा**—पु. मांसमिश्रित मसालेदार भात; बिर्याणी; ही वस्तु मुसलमानी पाकशास्त्रांत अग्रगण्य मानिली जाते, संस्कृतांत याला पलान्न असें नांव आहे. –ग्रशि २.१३५. 'बलखशाह अलेख पुलाव सेवी।' –सप्र १६.४१. [सं पुलाक=भाताचा पिंड, पलान्न (पल=मांस+अन्न); फा पुला–ओ]

**पुलांवचें**—उक्ति (गो.) (फोड फोडून) पू काढणें. पुलेजणें, पुलेणें पहा. [पूं]

**पुलिका**—स्त्री. १ कण; बिंदु. पुलिका स्वेदजळीं। जिरऊनिया।' –ज्ञा १८ १५५३. २ पुळिका पहा. [पुळी]

**पुलिंजन**—न. एक प्रकारची वनस्पति.

**पुलिंद**—पु १ एक जंगली, रानटी मनुष्यजात, मनुष्य. –वि. २ अशुद्ध, ग्राम्य, बीभत्स भाषा बोलणारा. [सं.] **०देश**–पु. बलुचिस्थान. –अश्वप १.३४.

**पुलिन**—न. १ नुकतेंच तयार झालेलें बेट; नुकताच उघडा पडलेला नदींतील खडक. २ वाळवंट 'नरामर शतावधी पुलिनिं बैसुनी ते किती।' –नरहरि गंगारत्नमाला (नवनीत ४३१) पुळण पहा. [सं.]

**पुली**—स्त्री. (गवत–कडब्याची) लहान पेंढी. पुला याचें अल्पत्वदर्शक रूप. [हिं. पूली]

**पुली**—स्त्री. (यंत्र) कप्पी; खोबणीचें चाक. हिचा उपयोग वजन उचलण्याकडे होतो [इं.]

**पुलेजणें, पुलेणें, पुवळणें, पुवारणें**—अक्रि. (अखम, फोड इ०तून) पू वाहणें; पुवानें युक्त होणें. [पुलन, पू] **पुलें चचें**–अक्रि. (गो.) पू तयार होणें. पुलेजणें पहा

**पुल्कस**—स्त्री. एक अत्यंज नीच, चांडाळाप्रमाणें जात. 'भिल्ल कोळी मांग अंत्यज प्रभृति। चांडाळ आणि पुल्कस।' –स्वादि ६.५.३७. [सं. पुक्कस] ०रूप–वि. अधम; चांडाळ. 'कामुक जे परिपुर्णी। पुल्करूप अंत:करणीं।' –गुच ३४.३८.

**पुल्याण**—न. (कु.) पू उत्पन्न करणारें खाद्य (पावटा, हरभऱ्याची डाळ इ०) पुलन पहा. [पू]

**पुल्याणें**—अक्रि. (कु.) पुलेजणें, पुलेणें पहा

**पुल्ला–ल्ली**—पुस्त्री. जुडी, पेंढी. पुला, पुली पहा. 'गोविंदराव बुंदेले अग्नीचा पुल्ला गेला होता रस्त्यावर।' –ऐपो १३३.

**पुल्लिंग**—न. (व्या.) ज्या नामामुळें प्राणिवाचक अथवा अप्राणिवाचक पदार्थाच्या पुरुषत्वाचा बोध होतो तें. लिंग पहा. –वि पुल्लिंगी; पुरुषवाचक. [सं]

**पुल्हो**—पु (महानु) पेंढा; जुडगा; ढीग. पुला पहा. 'कस्तुरीचा पुल्हो चिवडौनी।' –शिशु ७६१.

**पुव(वा)ळणें**—अक्रि. पू होणें, सडणें.

**पुवा**—पु. एक प्रकारची भाकरी. [हिं. पुआ]

**पुवाळणें**—अक्रि (महानु.) चुचकारणें; शांत करणें (घोड्याला). 'घन थीरू भणतु। खाखांळिया तें पुवाळितु। उपलानें निगालें वरवंतु। हाटांमाजि।' –शिशु ५०३.

**पुवो**—स्त्री. (गो.) पूर्वा नक्षत्र.

**पुंव्यक्ति**—स्त्री. पुरुषव्यक्ति; पुरुष जातीचें माणूस; पुरुष. [सं. पुंस्+व्यक्ति]

**पुशी**—स्त्री. १ (कों.) (विरू.) पिसू पहा. २ (गो.) भोपळ्यांतील कीड. [फा. पश=पिसू]

**पुशी**—स्त्री. प्रश्न; चौकशी; विचारपूस. (क्रि० घालणें). 'वेउळाच्या कळसीं नांदे एक ऋषी। तया घातली पुशी योगेश्वरी।' –(ह्यागा) मुक्ताबाई ४१. [पुसणें]

**पुंश्चली**—स्त्री. स्वैरिणी; वेश्या; व्यभिचारिणी. 'पुरुष सदा स्त्रीअनुराग। परी सहसा न करावे प्रसंग। त्यासि पुंश्चलीचा घडल्या संग। ते बाधी निलाग हावभावीं।' –एभा २६.१७५. [सं.] ०चरित्र–न वेश्यावृत्ति; व्यभिचारवृत्ति. [सं. पुंश्चली+चरित्र]

**पुष्कर**—न. १ अजमीराजवळचें एक तीर्थ. हल्लीं त्यास पोखर असें म्हणतात २ हत्तीच्या सोंडेचें अग्र; शुंडाग्रभाग. ३ एक औषधी; पोखर ४ निळें कमळ. ५ सप्तद्वीपांपैकीं एक सप्तद्वीप पहा. ६ तळें; तलाव. ७ आकाश; अंतराळ. 'तिरस्कारहुंकार लावोनि रामीं। निघे पुष्करीं दुष्कराचार कामीं।' –मुरामा ३. ६६. ८ एरंड. 'शरभा आणि सुपर्णा। का रासभा आणि ऐरावना। पाड कां जैसा हरिचंदना। पुष्करेंसीं।' –ज्ञा १७. –पु. राजलक्षणी घोडा; घोड्याचा एक प्रकार. –अश्वप २४. [सं.] सामाशब्द– ०पत्र–न. कमळाचें पान; कमलपत्र. ०पत्रतोयतरल–वि. कमळाच्या पानावरील पाण्याप्रमाणें चंचल. [सं. पुष्कर+पत्र+तोय (पाणी)+तरल (अस्थिर, चंचल)] ०मूल–ळ–न. पुष्कर औषधीची मुळी. [सं. पुष्कर+मूल]

**पुष्कराग–ज**—पु एक प्रकारचें रत्न याच्या वोरटक, इंद्रनील आणि सोमलक अशा पोटजाती आहेत त्याचे रंगहि अनेक असून त्यांपैकीं पिवळा व पांढरा हे रंग चांगले. [सं. पुष्पराग]

**पुष्करि(र)णी**—स्त्री. १ (विशेषत: कमळें असलेलें) बांधीव लहान तळें, हौद. 'कैलासनाथाच्या मंदिराप्रमाणेंच पुष्करिण्या वगैरे होत्या.' -चंद्र ४८. २ पायऱ्या असलेली मोठी विहीर. [सं पुष्करिणी]

**पुष्कल–ळ**—वि. १ भरपूर; रगड, विपुल, असंख्य; अतिशय. २ विशाल, मोठें 'जें कृश ना पुष्कळ। जें वक्र ना वर्तुळ। जें सूक्ष्म ना नव्हे स्थूल। वस्तु केवळ निर्विकार।' –एभा ३. ६७७. ३ श्रेष्ठ; उच्च. 'ऐसें करितां अनुसंधान। चैतन्यीं समरसे मन। त्यातें म्हणिजे पुष्कल ज्ञान। उपदेश पूर्ण या नांव।' –एभा २९. ४३९ ४ हितकर; फायदेशीर; चांगलें. 'जें मुळींचि चंचळ। तें कदा नव्हे पुष्कळ। क्षणां भासे क्षणां चपळ। तेणें तळमळ साधकां।' –एभा ९.४०४. [सं पुष्कल]

**पुष्ट–ष्टी**—नस्त्री. (व.) शेंपूट; पुच्छ पहा.

**पुष्ट**—वि. १ लठ्ठ; मांसल; स्थूल; गुबगुबीत. २ पोसलेला; वाढविलेला; पोषण केलेला. ३ (गो.) पुष्कळ; भरपूर. 'पुष्ट साखर घाल.' [सं. पुष्–पोसणें] सामाशब्द– ०गंड–वि. फुगीर गालाचा (ल.) ताठा धरणारा. 'ऐसा मान्यतेचा पुष्टगंडु। तो अभिमानी परम लंडु। रौरवाचा रूढु। मार्गुचि तो हा।' –ज्ञा १६.२३६.

**पुष्टि–ष्टी, पुष्टाई**—स्त्री १ लठ्ठपणा; मांसलपणा; स्थूलता; गुबगुबीतपणा. 'हे विरुक्तांचिये दिठी। जैं न्याहाळिजे किरीटी। तै पांडुरोगाचिये पुष्टी। सारिखें दिसे।' –ज्ञा ५.११९ २ परमेश्वराचा अनुग्रह, कृपा. –गीर १७. ३ (ल) दुजोरा; पाठबळ; पाठपुरावा. ४ वाढ; भरभराट; उन्नतावस्था; प्रगति [सं. पुष्टि (पुष्–पोसणें) तुल०

फा. पुश्ती=आधार, मदत; फा पुश्त=पाठ] सामाशब्द- ०पत्र-न. १ पुस्तक न मळावें म्हणून घातलेला जाड पुठ्ठा. २ पोथीच्या किंवा ग्रंथाच्या खालींवर घालता येईल असा सुपारीच्या विरीचा दुमडलेला तुकडा. ३ (सामा.) कोणत्याहि पुस्तकाचें जाड आवरण. (इ) कव्हर. ४ लिहितांना कागदाखालीं घेतलेला जाड आधार; पुठ्ठा. ५ दुजोरा; पाठिंबा; मदत. (क्रि० देणें) ६ दुजोरा देणारा; मदतनीस; साहाय्यक. [सं.] ०प्रद-वि. मदत करणारा; साहाय्य करणारा 'यांसि रणीं पुष्टिप्रद होतिल शतपूर्वमन्युसह देव।' -मोभीष्म ३ १७. [सं पुष्टि+प्रद(प्र+दा-देणें)] ०भाग-पु पाठ; पाठीमागची बाजू. 'बंधू तिचे सुंदर पुष्टिभागीं।' -दावि ४८२. ०मार्ग-(परमेश्वराच्या अनुग्रहाचा मार्ग) वल्लभसंप्रदाय.

पुष्टिक-वि (व.) शक्तिवर्धक; (प्र.) पौष्टिक. [सं. पौष्टिक]

पुष्टीकरण—न. दृढ करणें, दुजोरा; पाठिंबा; बळकटी. [सं.]

पुष्टें—न. (व.) पुच्छ; शेपूट. पुष्ट-ष्टी पहा. 'म्हशीचें पुष्टें पकड.'

पुष्ठ—स्त्री पाठ 'लावूनीयां पुष्ठी फेरें। आणि करकर कथेमाजी।' -तुगा २४४४. [सं पृष्ठ]

पुश्तपन्हा—वि. मदतनीस; सहकारी. -राव्य ८.९४. [फा. पुश्त+पनाह्]

पुष्प—न. १ फूल. २ स्त्रियांचा विटाळ; स्त्रीरज; आर्तव; ऋतु. ३ डोळ्याचा एक रोग; फूल. ४ गर्भाशय; गर्भकोश. [सं.] (वाप्र) ०ठेवणें-दोष काढणें; नावें ठेवणें. सामाशब्द- ०कोश-पु फुलाच्या पाच भागांपैकीं एक ०द्रव-पु. फुलांतील मध. ०धरी-पु. जयदत्तानीं सांगितलेल्या घोड्याच्या बारा प्रकारच्या लगामांपैकीं एक. -अश्वप १.१८५ ०निर्यास-सार-स्वेद-पु. फुलांतील मध ०पण-न. मोठेपण [पुष्प+पण] ०पुट-न. (नृत्य.) उजवा हात सर्पशीर्ष करून त्याच्या तळहातावर डाव्या हाताचीं बोटें चिटकवून ठेवणें पुष्पांजलि पहा [पुष्प+पुट] ०मुकुट-पु फुलाच्या पांच भागांपैकीं एक [पुष्प+मुकुट] ०रेणु-पु फुलांतील पराग ०लिट्-पु (काव्य) मधमाशी; भुंगा [सं पुष्प+लिट्=चाटणारा] ०वती-स्त्री. विटाळशी स्त्री; रजस्वला. ऋतुमती. ०वती-पु. लगामाच्या बारा प्रकारांपैकीं एक. -अश्वप १.१८५. ०वर्षाव-पु पुष्पवर्षाव; फुलें उधळणें. 'मोतियांचा सायारू बांधिला। कीं देवीं पुष्पवर्षाओ केला।' -शिशु ७१५ [सं. पुष्प+वर्षाव] ०वा(व)टिका, वाटी-स्त्री फुलबाग; उद्यान. 'नानाजातीचे वृक्ष तें वन। फळभक्षी वृक्ष तें उपवन। पुष्पवाटिका तें उद्यान। कृष्णार्पण पूजेसी।' -एभा ११.१२९२. 'तोडुनि पुष्पवटिका फळवृक्षयाती। राखिती बामळा करूनि सार।' -तुगा ३१५८. ०वृष्टि-स्त्री १ फुलांचा वर्षाव. २ (ल.) अस्खलित व अर्थपूर्ण भाषण किंवा वादविवाद. ३ (ल.) शिव्या, अपशब्द यांचा भडिमार. 'महाराजांची जांवई व शालकमंडळी राहिली त्यांच्यावर पुष्पवृष्टि पडत असते.' -विक्षिप्त १ ६५ ०संकोच-पु. फुलाचें मिटणें ०सार-पु पराग; परिमल; सुगंध. 'नाना पुष्पांचिया उदरा। न येतां पुष्पसारा। आपणचि भ्रमरा। होआवें पडे।' -अमृ ५ ४२. पुष्पांजलि-जुळी-स्त्री १ पूजेच्या शेवटीं दोन्ही हातांच्या ओंजळींत फुलें घेऊन देवास वाहतात ती. (क्रि० वाहणें; करणें; टाकणें; घालणें; सोडणें) 'पुष्पांजुळी मंत्रघोष जयजयकार। दुमदुमी अंबर तेणें नादें।' -तुगा ८१. २ (महानु.) उजवा हात सर्पशीर्ष करून त्याच्या तळहातावर डाव्या हाताचीं बोटें चिटकवून ठेवणें. पुष्पपुट पहा 'ते रंगी उभी ठेली। सर्वेचि विचारें लागि केली। तेथ पुढां जुळे पुष्पाजुळि। खेवंगी मनकटाचां।' -भाए ४५१. ०(मंत्र)पुष्पांजलि-ळी-स्त्री मंत्रपुष्प. पूजा, आरती झाल्यानंतर मंत्र म्हणून देवाला फुलें वाहतात तो विधी. [सं. पुष्प+अंजलि] (वर) ०करणें-देणें-शिव्या देणें; अपशब्द बोलणें, लाखोली वाहणें. पुष्पासव-पु फुलांपासून काढलेली दारू. [सं पुष्प+आसव] पुष्पास्तरण-न. शय्येवर फुलें पसरण्याची कला फुलांचा गालिचा करणें. चौसष्ट कलापैकीं एक. [सं. पुष्प+आस्तरण] पुष्पाळी-स्त्री. फुलाची पंक्ति. 'अहो वाक्पुष्पाळी भरुनि रसनेच्या करतळीं।' -निमा १.९२. [सं. पुष्प+आलि]

पुष्पक—न. डोळ्यांतील फूल, वडस. -पुन. कुबेराचें विमान. 'तों पातला प्रयाणकाळ। वैकुंठींहून तये वेळे। पुष्पकविमान जवळ। आलें दासाच्या सन्निध।' [सं.]

पुष्पित—वि. फुलें ज्यास आलीं आहेत असें; फुलांनीं युक्त. [सं.]

पुष्पे(पै)ल—न. पुष्पतेल; पुष्पापासून काढलेलें सुगंधी द्रव्य; अत्तर 'सुगंध पुष्पैलेंकरूनी। चर्चिले कबरी मूर्धनी।' -कृमुरा ७५.२ [पुष्प+तेल]

पुष्य—पु १ सत्तावीस नक्षत्रांपैकीं आठवें नक्षत्र (यांत तीन तारा असतात); तिष्य २ पौष महिना. [सं] पुष्यार्क-०योग-रविवारीं पुष्यनक्षत्रीं चंद्र येतो तो काल [सं पुष्य+अर्क]

पुस—स्त्री. (व) विचार; समाचार [पुसणें] ०घेणें-विचारणें; विचार घेणें.

पु(पुं)स—न. पुच्छ; शेंपूट. 'पुसीं आंखुडी दावणी कुंजरांच्या। नभीं भोंवणीं दाविती मोवणीच्या।' -मुरामा ६.११७ 'पुंस वरते पळाला.' -पंच ४.३. [सं. पुच्छ]

पुंस—पु. पुरुष पुंसा पहा [सं. पुंस्]

पुसक—वि. (गो.) पिसा; वेडा.

पुसकट-पुसट—वि. किंचित् पुसका; किंचित् अस्पष्ट; अंधुक; पुसका पहा. [पुसका]

**पुसकटणें, पुसटणें**—उक्रि १ अक्षर, चित्र इ० पुसणें; अस्पष्ट नाहींसें करणें, होणें २ जोरानें चोळणें; घासणें; पुसणें. [ पुसणें ]

**पुसकट**—वि १ ( पुसलें गेल्यामुळें ) अस्पष्ट; अंधुक; अर्धवट ( अक्षर, चित्र इ० ) २ अस्पष्ट दिसणारा ( पदार्थ, चित्र, देखावा इ० ). [ पुसणें ]

**पुसकुवरी-ली, पुसकुंवरी-ली**—स्त्री. पौष महिन्यांत येणारा कोंवळा लहान फणस. [ पूस=पौषमास+कुंवरी, कुंवरी=कोंवळा फणस ]

**पुसट, पुसटणें**—वि. पुसकट पहा. [ पुसणें ]

**पुसटता**—वि थोडासा; विस्तारानें नव्हे असा; ओझरता. 'रामायणातील वादग्रस्त विषयांचा पुसटता परामर्ष घेणें आवांक्यांत नाहीं.' –मसाप २ २.२९ [ पुसणें ]

**पुसणारा**—वि. १ विचारणारा, चौकशी, वास्तपुस्त करणारा २ विचारण्याचा किंवा रागें भरण्याचा ज्याला हक्क, अधिकार आहे असा ( गुन्हा इ० काहीं केले असतां ) [ पुसणें ]

**पुसणारी**—स्त्री (व) कणकेला तूप किंवा तेल पुसुन केलेली पोळी. 'देवीच्या नवरात्रात आमच्या घरीं साधी पोळी चालत नाहीं, पुसणारी करावी लागते.' [ पुसणें ]

**पुसणें**—उक्रि. १ विचारणें; प्रश्न करणें; चौकशी करणें 'येणारचि तरि साध्वी! श्वश्रूश्वशुरासि पूस, मग ये, तें।' –मोवन १३.४४. २ समाचार घेणें, वास्तपुस्त, आदरातिथ्य करणें. ३ आज्ञा मानणें; मान देणें, काळजी घेणें; आदर असणें. 'त्याला कोणी पुसत नाहीं' ४ तपास करणें; बोलविणें. **पुसता आकार-सोय नसणें**-विचारणें शक्य नसणें; विचारण्याची सोय नसणें ( अतोनात; बेसुमार गोष्टीबद्दल नावसंती ). [ सं पृच्छ्; प्रा पृच्छ; फा पुर्सि; पं पुच्छ( णा ); सिं. पुछ( णु ); हिं. गुज पूछ( ना-वुं ) ]

**पुसणें**—उक्रि. १ ( कागद, शरीर, वस्त्र इ०चा मळ, फडकें इ०नें ) घासून नाहींसा करणें; साफ करणें; चोळून स्वच्छ करणें. २ नाहींसें होणें; करणें; नष्ट करणें; नाश करणें. 'तें उगाणिलें मज कर्म। तेव्हांचि पुसिलें मरणजन्म।' –ज्ञा ९.४०४. 'शूराचें शौर्य तें कैसें। शत्रूंचें निःशेष नांवचि पुसे।' –एभा १७.१४५. ३ कोरडें करणें. ४ लिहिणें या क्रियापदाबरोबर निरर्थक योजितात. 'त्याला लिहितां पुसतां येत नाहीं.' म्हणजे त्याला मुळींच लिहितां येत नाहीं. तो अडाणी; अशिक्षित; निरक्षर आहे. [ सं. स्पृश् प्रोञ्छन-पुञ्छण-पूसणें-पुसणें-राजवाडे ग्रंथमाला ]

**पुसणें**—न. १ स्वच्छ किंवा कोरडें करावयाचें फडकें. जसें- नाक पुसणें, तोंड पुसणें, पाय पुसणें इ०. २ (व.) तिखट घालून व तेल लावून केलेली पोळी. पुसणारी पहा. **०पुसण्याच्या साटोन्या**–स्त्रीअव. (व.) वरून तूप पुसुन केलेल्या साटोन्या ( न तळलेल्या ). [ पुसणें ]

**पुसणें**—न. (बायकी) निरोप; विचारपूस; पुसापुसी. 'माझी बहीण काशीस राहिली आहे तिला जातांना माझें पुसणें सांग.' [ पुसणें=विचारणें ]

**पुसता**—वि. १ विचारणारा; चौकशी करणारा. 'हरिकथेची महिमा कैसी। आदरें पुसल्या सांगत्यासी। होती पुण्याचिया राशी। पाप वोखरासी मिळेना।' –एभा ३.५८७. २ जबाबदार धरणारा; जाब विचारणारा; रागें भरण्याचा ज्यास अधिकार आहे असा. [ पुसणें ]

**पुसलाणी**—स्त्री. (जुन्नरी) पौषांत केलेली मेंढरांच्या केसांची कातरणी. [ पुस(पौष)+लाणी ( सं. लवन )=कापणी ]

**पुसवण**—न. पुंसवन पहा. [ सं. पुंसवन ]

**पुसवणें**—न. ( महानु. ) उपचार; उपाय. 'एकैके वेळे जालें दुखणें। तें आम्हीं केलें पुसवणें।' –शिशु ८१६,८१८ [ पुसणें ]

**पुंसवन**—न सोळा संस्कारांपैकीं एक; स्त्रीच्या ठिकाणीं गर्भधारणा झाल्यापासून तीन महिन्यांनीं त्या गर्भाला पुंस्त्व प्राप्त होण्यासाठीं अथवा त्या गर्भाची उत्तम प्रकारें वाढ होण्यासाठीं जो संस्कार करतात तो. 'गर्भाधान पुंसवन। जातकर्म अन्नप्राशन। हीं समस्त कर्में पूर्वी जाण। केलीं संपूर्ण चौलांत।' –एभा १७. २७०. [ सं. ]

**पुसा**—वि. पूस-पौष महिन्यासंबंधीं.

**पुंसा**—पु. पक्षी; पोपट. 'अहो पुंसा आपणचि पढविजे। मग पढे तरी माथा तुकिजे।' –ज्ञा ११.१७. [ सं. पुच्छ+क; पुंशुक-पुंसुअ-पुसअ-पुंसा-मसाप २.३९ ] **पुंसि-सी**–स्त्री. स्त्रीपोपट; पोपटी. 'कोण्ह एके पर्वतिं पुंसि व्यालि.' –पंच ५१.

**पु(पुं)सा**—पु पुरुष; मनुष्य. 'जयाचा भावार्थ जैसा। तयास लाभ तैसा। मत्सर धरी जो पुसा। तयास तेंचि प्राप्त।' –दा १.१.३८. [ सं. पुंस्; प्रा. पुंस ]

**पुसाटी**—स्त्री. पुच्छ; शेपटी. 'रागें आपटोनि पुसाटी।' –भाराकिष्किंधा ३.५१. 'अंगीं अंगा होता भेटी। सक्रोध शुनी लागे पाठीं। तरी न सोडी पुसाटी। कुंकांत उठी कानासी।' –एभा १३.२०८. [ सं पुच्छ; गु. पुछडी ]

**पुसापुसी**—स्त्री. ( पुष्कळांची, पुष्कळांनीं केलेली) चौकशी; विचारपूस; पूसतपास. 'होईल जरि पुसापुसी। उतर त्यासी योजावें।' –तुगा १४००. [ पुसणें ]

**पुसावर्त**—पु. घोड्याच्या पुच्छाजवळचा भोंवरा. –अश्वप १.९७ [ पुस+आवर्त ]

**पुसी**—स्त्री. १ प्रश्न; पृच्छा; विचारणा; शंका. 'तया अध्यात्मज्ञानासीं। जैं साचपणाची ये पुसी। तैं येइजे जया ठायासी।

ते गीता।' –ज्ञा १८.१२३४ २ समाचार; शोध; तपास (क्रि० करणें). 'पुसी करितो विवरितो व्यापक त्रैलोक्याचा।' –दावि १७१. ३ कल्पना; विचार. 'ऐसें बळीसि राज्य करितां। कंटक नाहीं पै सर्वथा। तंव पुसी आठवली बहुता। दिवसी एक।' –कथा २६९. **०करणें**–विचारणें; प्रश्न करणें. 'ऋषीनें मग प्रसन्नमनें करुनिया तिजला पुसी केली।' –होला ४८. **पुसीचा**–वि. विचारण्यास योग्य; विचारावयाचा; फार दिवसांचा मनांतला. 'तुवां पुसिले पुसीचा प्रश्न। ऐक आता।' –कथा २.६.३ [पुसणें]

**पुस्त**—स्त्री. १ गंजिफेची (पानाची) मागील बाजू. २ पाठ; पिछाडी. [सं पृष्ठ; फा. पुश्त]

**पुस्त**—पु. पिढी; वंश. 'सन १७५० इसवी व सन १७९६ यांचे दरम्यान जे दिल्हेले असतील ते दोन पुस्त चालवावे व तिसरे पुस्तास निम्मे पेनशन द्यावें.' –इनाम ३८. [सं. पृष्ठ, फा पुश्त] **०गर्मी**–स्त्री मनःपूर्वक साहाय्य; उपराळा; पाठराखणी; मदत. 'राव पंतप्रधान याच्या फौजा कुंपनीचे जमीयातीचे पुस्तगर्मीवर पेशकदमी करून जाणें जरूर' –ख ४४३८ [फा पुश्तगर्मी] **०गारी**–पुस्तपना पहा. **०दरपुस्त**–क्रिवि पिढयानपिढया; वंशपरंपरागत पिढीदरपिढी 'तुमचे पुस्तदरपुस्त इनाम अनुभवून सरकारलक्षांत चालत जावें.' –समारो १.२९१. [फा. पुश्तदरपुश्त] **०पना–पन्हा–पन्हाई**–पु. मदत; टेका; आश्रय; कुमक; पाठराखण; पाठपुरावा; (क्रि० करणें; देणें; ठेवणें). 'धोंडजी लवंडे तुम्हास लिहून पाठवितील त्याप्रमाणें पुस्तपन्हा करणें.' –दुसरेबाजीराव ७५. 'त्याचे पुस्तपन्हाईस आणखी दोन पलटणें व एक इंग्रज मातबर पालखीनशीन ऐसे गेले.' –मदबा १.६७. [फा. पुश्तपनाह्] **पुस्तवानी–णी**–स्त्री पाठिंबा; आधार; आश्रय; मदत (शब्दशः व अलंकारिक); (क्रि० करणें; देणें). 'या उपरी साहेब लष्करची पुस्तवानी फौज उत्तम व दारु...' –पेद ३.१२६. फा. पुश्त्+वानी प्रत्यय]

**पुस्त**—स्त्री. (चांभारी) तजा; जोडयाची सागळ. पुस्ती पहा.

**पुस्तक**—न. ग्रंथ. पोथी; चोपडी. 'हस्तें पुस्तकसें समस्त धरुनी रेखात्र नामावळी।' –आसेतु ३४. 'स्वामीचें पुस्तक येकनाथापासीं।' –सप्र २.८. [सं.] (वाप्र) **पुस्तकांवरून ओढणें**–वरवर वाचणें; कोणत्याहि विषयाचें अर्धवट ज्ञान असणें **म्ह०** पराधीन जिणें पुस्तकी विद्या. सामाशब्द–**०पाठ**–वि. पुस्तकावरून सहज वाचतां येईल किंवा समजावून सांगतां येईल अशा तऱ्हेनें माहित असणें; पोथीपाठ. याच्याउलट मुखपाठ (तोंडपाठ) [पुस्तक+पाठ] **०पानट, पानरट**–न. पोथ्या, पुस्तकें, कागदपत्रें इ० समुच्चयानें [पुस्तक+पानट, पानरट=पृष्ट, पान] **०विक्या**–पु. पुस्तकें विकणारा; पुस्तकें विकून पोट भरणारा. (इं.) बुकसेलर 'महाराजांच्या आवडीच्या शिव्या पुस्तकविक्यांनीं दिल्या नाहींत तोंपर्यंत त्यांचा अधिक फायदा होणें नाहीं.' –विक्षिप्त ३.३९. [पुस्तक+विकणें]

**पुस्तंग**—पु. (पुस्त+तंग) १ पोटाखालून जाणारा घोडयाच्या खोगिराचा तंग २ (कुस्ती) एक डाव; जोडीदारानें आपल्यास खालती धरल्यास जोडीदाराचें मणगट आपल्या ज्या बाजूला आलें असेल त्या बाजूच्या आपल्या हातानें जोडीदाराचें मणगट धरून आपल्या बाहेरील पायानें जोडीदाराच्या घोटयाजवळ पायाचा पंजा टेकून जोडीदाराला आपल्या टेकलेल्या पायाकडे झटका देऊन व हात ओढून चीत करणें. [फा. पश्तंक्]

**पुस्तनी**—स्त्री. पुस्ती ८ पहा.

**पुस्तापास–स्त**—स्त्री विचारपूस; शोध; बारकाईनें केलेली चौकशी, वास्तपुस्त (क्रि० करणें, घेणें). 'ज्यांची चोंहोंकडे मानमान्यता व्हावी त्यांची फारशी पुस्तापास्तहि न होऊन ते कोनाकोपऱ्यात कसरीच्या भक्ष्यस्थानीं पडतात –नि १३ [पूस+तपास. हिं]

**पुस्ती**—स्त्री. १ मुलांचें अक्षर कितपत सुधारलें हें पाहण्यासाठीं ठराविक दिवसांनीं त्यांच्याकडून लिहवून घेतात तो चांगला खर्डा, कागद; अक्षराचा नमुना २ (ल) काय येतें, समजतें हें पाहण्याची परीक्षा. ३ जोडा इ० कास दिलेले कातडयाचें ठिगळ. ४ मदत; साहाय्य; पाठबळ; पाठिंबा; आधार 'दाभाडिये, गायेकवाड, व बाडे यांचे फौयेस पुस्ती दाखवावी.' –पेद १० ६१. ५ कोणत्याहि पदार्थास बळकटीसाठीं त्याच पदार्थाचा दिलेला जोड (कागदास चिकटलेला कागद, वस्त्रास शिवलेलें वस्त्र, भिंतीस आधार म्हणून बांधलेली भिंत). ६ जोड; पुरवणी. 'पुढें होत खस्ती नसे पुण्यपुस्ती।' –दावि २१६. ७ (कों) दारास दिलेली उभी पट्टी. [सं पृष्ठ, फा पुश्त्–श्ती; गु पुस्तो] **०लावणें**–(चांभारी) फाटलेला जोडा इ०स ठिगळ लावणें **०वंत**–वि. (गो.) साहाय्यकारी; मदतनीस. **पुस्तीची भिंत**–(बांधकाम) आधाराची भिंत. –मॅरेट १२.

**पुस्तु**—स्त्री एक भाषा, पठाणाची भाषा. 'मेजर फार्लें यांनीं पुस्तु भाषेंत त्याना ती रक्कम कमी करण्यास विनविलें.' –के १७६.३०. [फा. पुश्तू]

**पुस्तैन**—पुनव. दोन पिढया. पुस्त पहा. 'दोन्ही रियासती पुस्तैन पासोन येक; जुदाई नाहीं.' –रा ७ १५१. [फा.]

**पुंस्त्व**—न. १ पुरुषत्व. २ सामर्थ्य; शौर्य; शक्ति; पराक्रम. ३ पुल्लिंगत्व [सं.]

**पुहपकी**—स्त्री. (महानु.) माळीण; फुलें देणारी. 'रथु संजोगिले गुढरिले हाथी पुहपकीं रुखुमिणी श्रीकृष्ण चारू।' –सिद्धांतसूत्र पाठ, पूजावसर, धवळे [सं. पुष्पकी]

**पुळकणें**—अक्रि. थोडें व पातळ एकदम शौचास होणें; चिरपणें [ध्व ]

**पुळका**—पु १ थोडें व पातळ शौचास होणें; पिळकी. २ पावसाची जोराची व अल्पकाळ टिकणारी सर ३ एकसारखें व त्रासदायक रितीनें मागणें; टुरटुर; पिरपीर (क्रि० लागणें, लावणें). [ध्व. पुळ ! पुळ ! ]

**पुळका**—पु. उमाळा; लहर; इच्छा; प्रेमाचा मोठा आवेग. (क्रि० येणें ) [सं. पुलक ]

**पुळका**—पु. (व.) भुसकट. फुलका पहा.

**पुळवट**—वि (व ) नेभळट, भितरा; कर्तृत्वशून्य.

**पुळण**—नस्त्री. वाळवंट; वाळूचें मैदान. –स्त्री रेती वाळू. [सं पुलिन ] ०**वट**–वि १ रेताड, वालुकामय (जमीन ) २ किनाऱ्यावरील, फक्त पावसाळी पीक देणारी. [पुळण+वत् (प्रत्यय)]

**पुळण** —न. (कु ) शारीरिक दोष उत्पन्न करणारा खाण्याचा पदार्थ, जखम, फोड इ० मध्यें पू उत्पन्न करणारा पुलन पहा. [पू ] **पुळगास येणें**–जखम, गळूं, फोड इ० पूमय होणें.

**पुळपुळ**—स्त्री १ एकसारखें शौचास होणें. २ एकसारखा पाऊस पडत राहणें. ३ एकसारखें बोलणें; पुटपुटणें; कुरकुरणें; भीक मागणें किंवा कोणतीहि त्रासदायक किंवा कंटाळवाणी क्रिया करणें. [ध्व. ]

**पुळपुळ-ळां**—क्रिवि पुळपुळ अशा एकसारख्या पिळकण्याच्या आवाजानें. [ध्व ]

**पुळपुळाट**—पु १ (पुळपुळचा अतिशय ) एकसारखें पिळकणें २ एकसारखा बारीक पाऊस पडणें. ३ एकसारखें बडबडणें; पुटपुटणें, रागावणें, कुरकुरणें इ० [पुळपुळ ]

**पुळपुळीत, पुळपुळा**—वि १ बेचव, नि.सत्व; पचपचीत (खाद्य) २ सौम्य, नीरस, कंटाळवाणें; मिळमिळीत आवेश नसलेलें (भाषण ) ३ इष्ट कार्य घडवून आणीलच अशी खात्री ज्यांत नाहीं अशी; मुळमुळीत (वागणूक; युक्ति; माणूस इ० ) ४ भित्रा; नेभळट; कर्तृत्वशून्य; नपुंसक; नि.सत्व. 'नाहींतर हल्लींचीं मुलें पुळपुळीत '–विवि ८ १ ८ [पुळपुळ ]

**पुळा**—पु पेंढा पुला पहा. 'हातांत घासाचे पुळे पेटवून घेऊन.'–चिमा ८. [पुला ]

**पुळाटी** —स्त्री रामकांटी जातीच्या बाभळीचें लहान झाड.

**पुळिका**—स्त्री. १ दिव्याची ज्योत. 'गुणा तेलाचिया सोयरिका। निर्वाहे दीपकळिका। ते कां होईल पुळिका। कापुराची।' –अमृ २.५१. २ (ल) बुद्धीची स्फूर्ति; उठाव 'बुद्धीची पुळिका विरे। परिमळु घ्राणीं उरे।'–ज्ञा ६.२४६ [सं. पुलक; म. पुळी]

**पुळी**—स्त्री. १ पुटकुळी; लहान फोड. 'खरूज खवडे पुळिया नारू।'–दा ३.६.१६. २ मोठा होणारा व्रण; चकंदळा, स्फोट. [सं पुलक; प्रा. पुल ] **पुळीचें फांपर करणें**–लहान गोष्ट मोठी करून सांगणें; क्षुद्र गोष्टीस जास्त महत्त्व देणें; राईचा पर्वत करणें.

**पुळुक**—पु. (महानु ) केंस; रोमांच. 'प्रेमसमुद्राचें भरितें जैसें। आनंदाश्रु येति तैसे। किं सुखा डीर फुटले मीषे। पुळु कांचेनि।'–भाए ७९८ [सं पुलक ]

**पुक्ष**—पु (कु.) पौष महिना [सं. पौष ]

**पू**—पु. १ दूषित रक्त; फोड, जखम इ० मध्यें उत्पन्न होणारा दुर्गंधियुक्त पातळ पदार्थ. २ डोळयांतून येणारा विकटस्राव ३ अत्यंत जीर्ण, कुजका झालेला पदार्थ (लांकूड, वस्त्र, कागद इ० ). [सं. पूय; प्रा पूअ] ०**करणें**-(ल.) अतिशय बिघाड, नुकसान करणें.

**पूकु**—वि. (नंदभाषा) चार ही संख्या. 'आज मी पूकु सातकीं (लुगडीं ) दिलीं.' ०**काटी**–वि (नंदभाषा ) ऐंशी ही संख्या. 'या जरचौकडी रुमालाला पूकुकाटी रुपये पडतील.'[पूकु+काटी=वीस ]

**पूक**—न. (गो.) कांचेचा पेला. [पोर्तु. पुकारो ]

**पूग**—पु. सुपारीचें झाड; पोफळ. –न. सुपारी (फळ) [सं.] ०**पात्र**–न. सुपारी ठेवण्याचें भांडें; सुपारीची डबी. ०**फल, पूगीफल**–न. सुपारी. 'पूगीफळें आणी पानें। उत्तम संभ्रमाचीं अन्नें।'–वेसीस्व ७ ७. [सं. पूग+फल ]

**पूज**—न. (विरू.) पूज्य पहा.

**पूजक**—वि. पूजा करणारा; आदरसत्कार करणारा; पूज्यबुद्धि ठेवणारा; भक्त. [सं.] **पूजणें**–उक्रि. पुजणें पहा. [सं. पूज् ] **पूजन**–न. पूजा; अर्चा; सत्कार; सन्मान. [सं.] **पूजनीय, पूजार्ह**–वि. पूजनास योग्य; वंद्य, आदरणीय, सन्माननीय. [सं.] **पूजमान**–वि (प्र.) पूज्यमान पूजनीय पहा. [सं. ] **पूजित**–वि पूजिलेला; वंद्य; आदरणीय. [सं ] **पूजिता**–वि. पूजणारा; पूजक 'पुजित्या होते जयप्रद।'–दावि १८२. **पूज्य**–वि १ पूजा करण्यास योग्य (देव, गुरु इ० ). २ माननीय; वंदनीय. ज्याची आज्ञा पाळली पाहिजे असा (पिता, बंधु इ० ). [सं. ] ०**मान**–वि पूजमान पहा.

**पूजा**—स्त्री. १ पूजन; अर्चा; उपास्य दैवताची आराधना. पूजेचे पंचोपचार व षोडशोपचार असे प्रकार आहेत २ पूजनासाठीं गंध, फुलें इ० रूप आणलेली सामग्री. ३ सत्कार; सन्मान; आदर ठेवणें; भक्ति. ४ (ल ) द्रव्यरूप सत्कार; पैसा 'पे कळांतर गांठीं बांधिजे। मग पुढिलांचें काज कीजे। पूजा घेऊनि रसु दीजे। पीडितांसी।'–ज्ञा १७.२८७. ५ (ल.) अपमान; खरडपट्टी. 'नागोपताची पूजा होऊन ते घरीं गेले.'–विक्षिप्त १.३२. ६ लांचलुचपत. –ख ३७००. पुजा पहा. [सं. ] (वाप्र.) ०**करणें–घालणें**–मारणें; बडविणें; झुदलणें, भोसडपट्टी काढणें; फार रागें भरणें. 'बायकोनें खेटरानें नवऱ्याची, पूजा केली–घातली अशीं

उदाहरणें पहायला सांपडतात.' ०बांधणें–फुलें इ०नीं मूर्ति सजविणें; मूर्तीला शृंगारणें. सामाशब्द- ०अर्चा–स्त्री. १ पूजा व तिच्या अंगभूत इतर कृत्यें; पूजन. २ (ल) शिव्या; अपमान; खरडपट्टी 'सासरे मंडळींची पूजाअर्चा चालूच आहे.' –विक्षिप्त १ ६५. ०आरती-आर्ती–स्त्री. १ पूजाअर्चा पहा २ (ल) अपमान; खरडपट्टी. 'लोंढयाची पूजाआर्ती महाराजांनीं केल्यामुळें ते छावणींत जाऊन राहिले.' –विक्षिप्त १ ३३. ०उर्जा–स्त्री. पूजाअर्चा. 'हे वृंदावनाची पूजाउर्जा चालवतील येविषयीं ताकीदपत्रें ...' –शाछ ३६. ०द्रव्य–न. पूजेस लागणारा किंवा अवश्य असलेला जिन्नस (फूल, गंध, पाणी इ०). [सं. पूजा+द्रव्य] ०पत्री–स्त्री. १ (फुलें, पत्री, बेलाचीं पानें इ०) पूजेचें साहित्य; देवपूजा. २ (ग्रा.) पूजा करणें. –भात्रै ७ १ ते ४. [पूजा+पत्री] ०पाती–स्त्री. (ना.) पूजाअर्चा; पूजा वगैरे [पूजा+पाती (सं. पत्री)] ०पात्र–न. पूजेचें साहित्य ठेवण्याचें एक विशिष्ट प्रकारचें भांडें. [स पूजा+पात्र] ०पुरस्कार–पु पूजा व तदनुषंगिक इतर कर्में. ०बंध–पु. बांधलेली पूजा.' मुगुटावरी स्तबक। ठायीं ठायीं पूजाबंध अनेक।' –ज्ञा ११.२२०. पूजोपचार–पुअव. देवाची पूजा करण्याचीं सर्व उपकरणें, कर्में, तंत्रें इ०. षोडशोपचार पहा.

**पूज्य**—न. १ अक्षराच्या डोक्यावर देतात तें टिंब; अनुस्वाराचें चिन्ह; अनुस्वार. २ दशांश अपूर्णांक मांडला असतां डावीकडे देतात तें टिंब; दशांश अपूर्णांकाची खूण ३ यादींतील विशिष्ट नाव किंवा पदार्थ नाहीं, पाहिजे, असें दर्शविण्यासाठीं त्यापुढें केलेलें वर्तुळ किंवा खूण. ४ खोट; अभाव; कमीपणा. 'अस्मत्सुखासि पडलें तेव्हांपासुनि आजिवरि पूज्य।' –मोकर्ण ४२.४३. ०करणें–१ वगळणें; विसरून जाणें; दुर्लक्ष करणें. २ खाऊन सफा करणें; चापणें. (विद्या, स्नानसंध्या इ० वर) पूज्य पडणें–विद्या; स्नानसंध्या इ० बाजूस सारणें, बंद करणें; करण्याचें विसरणें. (विद्या, पैसा इ०च्या) नांवानें पूज्य–विद्या, पैसा इ० चा पूर्ण अभाव असणें. 'बाग चांगला पण झाडाच्या नांवानें पूज्य.'

**पूट-ठ**—न. पूड; चूर्ण; भुकटी. पूड पहा.

**पूट-ठ**—पु. लेप; एखाद्या पदार्थात एखादा विशिष्ट गुण उतरविण्यासाठीं केलेली रासायनिक क्रिया; लेपाचें द्रव्य. पुट पहा.

**पूट करणें-घेणें**—(फणस, आंबा, चिंच इ०) फळझाडांच्या पिकाचा अजमास करून तें खरेदी करणें. पूट देणें–पुढें येणारें पीक विकणें.

**पूड**—स्त्री १ चूर्ण; भुकटी; पीठ २ (गो) तपकीर [का. पुडि; तुल० सं. पुट्=दळणें]

**पूड**—न. १ नगारा, नौबत इ०चें भांडें; पडघम २ वाद्याचें तोंड. पुडा पहा. ३ –पुन. खण; घर; कप्पा (पेटी, पिशवी इ०चा). ४ चुनाळें, तपकिरीची डबी इ०च्या दोन अर्धुकां (टोपणां)पैकीं प्रत्येक ५ (वेत, बांबू, माडाच्या पाती, गवत इ०चें) विड्याचीं पानें ठेवण्यासाठीं केलेलें बारदान. ६ दुहेरी तंबूच्या आंतील किंवा बाहेरील आवरण. जसें:–आतलें पूड, बाहेरलें पूड. ७ (मृदंग, तबला, ढोल इ०चें) चर्मबद्ध तोंड किंवा आवरण; चामड्याच्या एक, दोन किंवा अनेक आवरणांपैकीं प्रत्येक. (हिं.) पुडी; यावरून एकपुडी, दुपुडी, तिपुडी इ०. [सं. पुट; प्रा. पुड] ०फुटणें-बाहेर येणें–रहस्य प्रकट, जाहीर होणें. ०फोडणें–रहस्य प्रकट करणें

**पूढिल**—वि. पुढील पहा 'नको रे मना द्रव्य तें पूढिलाचें।' –राम ९. [पुढें]

**पूत**—पु. पुत्र, मुलगा (मर्यादित प्रयोग) 'असा कोण मायेचा पूत आहे.' 'पूत सुपूत कोठें ओळखावा जो दुनयेमध्यें नाव करील.' 'तो जोडता पूत आहे' [सं पुत्र, प्रा. पुत्त]

**पूत**—वि. पवित्र; शुद्ध, निर्मळ, स्वच्छ 'मोही तन्मन जैसें साधूचें पूतहि मन गाढ केलीं।' –मोभीष्म ५ ८४ [सं]

**पूत**—स्त्री. रीत, पद्धत 'लुटीचीं वस्त्रें अपरिमित। महार पोरग्यास झालीं प्राप्त। परंतु पाघरावयाची पूत। काय त्याला ठाऊकी।' –अफला २७. [प्रत]

**पूतना, पूतनामावशी**—स्त्री. १ एक राक्षसी कंसाच्या सांगण्यावरून ही मायावी रूप धारण करून कृष्णाचा नाश करण्यासाठीं गोकुळांत आली होती २ (यावरून ल) त्रासदायक, नावडती मावशी. ३ दिसण्यांत सुंदर व सभ्य पण अंतर्यामी दुष्ट अशी स्त्री. [सं. पूतना]

**पूतिव्रण**—पु आग करणारा व पसरणारा व्रण, क्षत, जाळपुळी. [सं.]

**पून**—अ. १ (अशिष्ट) पासून जसें –मत्रापून=मत्रापासून केव्हांपून–कोणापून इ० 'प्राजक्तावरचा बहार निथळे केव्हांपुनी अंगणीं।' –केशवकुमार

**पून**—न. (अशिष्ट) धर्म; पुण्य. 'केलें दानपून पालखी दिली ब्राह्मणाला।' –ऐपो ८९ [सं. पुण्य; प्रा. पुण्ण]

**पूप**—न. अपूप; एक खाद्यविशेष. [सं. अपूप]

**पूपी**—स्त्री. १ पोपी; रव्याची लहान पोळी. २ पूप पहा. [सं. पूपिका]

**पूय**—न. पू; दूषित रक्त. 'सांगे पूयपंकींचे किडे। काय चिळसी घेती।' –ज्ञा ५ १२१. [सं.] ०प्रदर–पु. पूयुक्त प्रदर नांवाचा स्त्रियांचा एक रोग ०प्रमेह–पु. मूत्रवाहक नलिकेंतून पुवानें युक्त असा पदार्थ वाहणें; एक मूत्ररोग; पुवाचा परमा ०रक्त-शोणित–न रक्त मिश्रित पू पूयास्राव–पु. पूमय पदार्थाचा स्राव; प्रदराचा एक प्रकार पूयालस–पु १ सांध्यांचा एक विकार; गुडघी; ढोपरी. २ गळूं इ० पुवाळणें. [सं]

**पूर**—वि. (समासांत उपयोग) पूर्ण. ‘खजानपूर आहों’ –रा १२.७०. ‘पैकेपूर होऊन पार उतरोन गेला.’ –दिमरा १.२७३. ‘सर्व गोष्टीनें तुम्ही पढे फाजल आहां व सर्व किताब जाणून अक्ल–पूर.’ –रा ३.१८६ [फा. पूर्; तुल० सं. पूर]

**पूर**—पु. १ (नदी, ओढा, नाला इ०स येणारा) पाण्याचा लोंढा, अतिशय वृद्धि. २ (ल.) वृद्धि; विपुलता; समृद्धि. ‘मजवरि करुणेचा राघवा पूर लोटी।’ –करुणाष्टक **म्ह०** मुंगीस मुताचा पूर.

**पूर**—पु. शहर; मोठा गांव; पुरी. सामासिक शब्दांत विशेष योजितात. उदा० कोल्हापूर, पंढरपूर इ० [सं पुर]

**पूरक**—पु. (योग) उजवी नाकपुडी दाबून डावींतून श्वास आंत घेणें. ‘आत ओढून घेतलेल्या श्वासात ... उच्छ्वासाचा होम केला म्हणजे पूरक नांवाचा प्राणायाम होतो –गीर ६७८. पूरक, कुंभक व रेचक अशा प्राणायामाच्या तीन क्रिया आहेत. –वि. १ पूर्ण करणारा; भर घालणारा २ समाधान, तृप्ति करणारा. ३ (शाप गणित) पुरवणीचा; भरतीचा, (इं.) सप्लिमेंटरी. जसें:– पूरककोन–ज्या इ० [सं पृ=पूर्ण करणें] **पूरण**–न. १ भर; एखाद्या न्यूनतेची पूर्तता करणें, पूर्ण करणें. ‘पंडितरायानीं ज्याप्रमाणें स्वकृत व्याख्याचें पूरण स्वरचित उदाहरणांनीं केलें आहे ...’ –नि ८६७. १ पूर्ण करणारा भाग; पुरवणी. न्यूनता घालविणारा, तृप्ति देणारा अंश ३ तृप्ति; समाधान. (विणकाम) आडवी वीण, बाणा; अडवण. [सं] **पूरणिका, पूरणी**–स्त्री. भरती; भर; पुरवणी, पूरण पहा [सं]

**पूरणी**—स्त्री. (गवंडी काम) विटा, दगड, भेंडा इ०च्या बांध-कामांत मधून भर घालतात ती; मसाला; पुरण.

**पूरणें**—उक्रि. (योग.) उजवी नाकपुडी बंद करून डाव्या नाकपुडीनें श्वास आत घेणें. ‘वायुबीजें आवाहूनी। पिंगला प्राण पूरूनि।’ –एभा २७.१८२. [सं. पृ–पूरण]

**पूरिका**—स्त्री. (महानु.) पुरी; एक खाद्यविशेष. ‘वाढितां उदंबरें सरिसें। पूरिकांसी।’ –ॠ ८२.

**पूरित**—वि. १ पूर्ण केलेला; भरलेला; पूर्ण. २ तृप्त. [सं.]

**पूरिया**—पु. (संगीत) एक राग. ह्या रागांत षड्ज, कोमल ॠषभ, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति षाडव–षाडव, वादी गांधार, संवादी निषाद. गानसमय रात्रीचा पहिला प्रहर.

**पूर्ण**—न. १ वेळेच्या विवक्षित भागाचा अभाव दर्शविण्या-साठीं पंचांगांत शून्याबद्दल योजावयाचा शब्द. ‘आदितवारीं षष्ठी पूर्ण घटिका पांच पळें.’ २ संख्येचें अभावबोधक चिन्ह; शून्य. ‘आधीं एक पुढें पूर्ण। त्या नांव दहावें लक्षण।’ –एभा ११. १४३३. [सं.]

**पूर्ण**—वि. १ भरलेला. २ इच्छा, आकांक्षा इ० शेवटास गेली आहे असा; सफल. ३ पुरता; सर्व; कोणत्याहि बाबींत न्यूनता नसलेला. ४ कुशल; निष्णात. ५ उच्च अवस्थेस पोहोंचलेला. ‘आतां आणिक एक गहन। पूर्णाचें चिन्ह। अर्जुना तुज सांगेन। परिस पां।’ –ज्ञा २ ३५४ [सं पृ=पूर्ण करणें] सामाशब्द– ०**कंठी**–स्त्री. घोडयाचा एक गतिप्रकार. –अश्वप १ १८५. ०**कपोल**–पु. (नृत्य) गर्व व उत्साह अशी मनःस्थिति दाखविण्याच्या वेळीं गाल फुगीर दाखविणें. ०**काम**–वि. १ ज्याचे मनोरथ सफळ झाले आहेत असा; संतुष्ट; तृप्त. २ ऐन उमेदींत असलेला; उत्साही (तरुण). ०**गर्भा**–स्त्री. १ गरोदरपणाचे नऊ महिने भरले आहेत अशी स्त्री. १ पुरणपोळी. ‘तरी पूर्णगर्भा करूनि सत्वर। भोजन पोटभरी घालावें।’ –भवि ५६.५७. ०**घटिका**–स्त्री. लग्न, मुंज, इ०विधीसाठीं मुहूर्त दाखविणारी पाण्यांत तरंगत सोडलेली व पूर्ण भरलेली शेवटची घटिका. (क्रि० घालणें; भरणें; होणें). ०**घन**–वि सर्वत्र भरून राहणारा; सर्वव्यापक. ‘परमात्मा तो पूर्णघन.’ ०**चंद्र**–पु पौर्णिमेचा चंद्र; सोळा कलानीं युक्त असा चंद्र ‘बारे शिष्या तूं पूर्णचंद्र।’ –गुच [सं. पूर्ण+चंद्र] ०**चंद्रोदय**–पु. १ पुरें चांदणें पडणें; चंद्र चांगला उगवणें. २ एक औषधी मात्रा. ०**चैतन्य**–न पूर्ण प्रवर्तकत्व, चालकत्व, जीवाची पूर्णता. –वि. चैतन्यानें युक्त; अत्यंत उत्साही, उद्योगी असणारा (परमेश्वर). ‘तत् शब्दे पूर्णचैतन्य ते त्वंशब्दे प्रत्येक चैतन्य बोलिजे.’ ०**पणा**–पु १ पूर्णत्व; पुरतेपणा; भरपूरपणा. २ कौशल्य; निपुणता. ०**पात्र**–न १ राजादिकांनीं ब्राह्मणास दिलेले पंचपात्रासारखें भांडें. हें कोणासहि दाखवून धान्यानें भरून घेण्याचा यामुळें हक्क प्राप्त होतो. पुष्कळ भिक्षा मिळावी म्हणून थोरांनीं दिलेलें भिक्षा साधन २ कांहीं धार्मिक विधींत कलशावर तांदुळ इ० नीं भरून ठेवलेलें भांडें. यांत आराध्य देवतेची स्थापना करतात. ३ एक कैली माप. –वाडदुबा २३६. ०**पात्री**–पु. ज्यास राजाकडून पूर्णपात्र मिळालें आहे असा ब्राह्मण. ०**पुरी**–स्त्री. पुरण भरलेली पुरी; साटोरी. ‘पूर्णपुरी पूर्णपुरी। प्रेमबोध लाडू त्यावरी।’ –भज ४२. ०**पोळी**–स्त्री. पुरणपोळी पहा. ‘चोटी मुगदळ बुंदीविशेष। पूर्ण-पोळिया विस्तीर्णपात्रास।’ –नव ९.११७. ०**बोध**–वि. अत्यंत ज्ञानी, विद्वान्, तत्त्व जाणणारा (सत्पुरुष). ‘मग बोले श्रीगुरु पूर्णबोधु।’ ०**ब्रह्म**–न. १ केवळ ब्रह्म; ब्रह्मसार. २ ब्रह्माशीं (परमेश्वराशीं) तादात्म्य; एकरूपता. ०**भूत**–वि. (व्या.) कालनिदर्शक शब्द. ज्या काळीं क्रियेची केवळ पूर्णता किंवा परिसमाप्ति दर्शविली जाते तो काळ. **पूर्णांक**–पु. पूर्ण असलेला आंकडा जसें:– १, २, ३ इ० याच्या उलट अपूर्णांक. **पूर्णांकगणित**–न. पूर्ण आंकड्यांचें गणित. **पूर्णागमी**–पु. वेद, श्रुति इ० पूर्णपणें जाणणारा; वैदिक. ‘मृत्य न म्हणे हा श्रोत्री। मृत्य न म्हणे मंत्र

यंत्री। पूर्णागमी।'-दा ३.९.२०. [पूर्ण+आगमी] **पूर्णाभिषिक्त, पूर्णाभिषेकी**-वि पूर्णाभिषेक ज्यास झाला आहे असा. [सं.] **पूर्णाभिषेक**-पु. १ कांही धार्मिक विधि समाप्त झाल्यावर ऋत्विजानें यजमानावर कलशोदकानें (किंवा शेवटीं भरलेल्या घटिकेंतील उदकानें) केलेले सिंचन २ मंत्रोपदेश दिल्यानंतर गुरूनें शिष्यावर केलेला अभिषेक. ३ (ल. उप) एखाद्या मनुष्याच्या अंगीं असलेल्या सर्व सद्गुण, दुर्गुण इ०चें अनेकार्नी केलेलें वर्णन [सं] **पूर्णावतार**-पु सोळा कलांनीं युक्त असा ईश्वराचा अवतार. दशावतारांपैकी नरसिंह, राम आणि कृष्ण हे तीन अवतार [सं पूर्ण+अवतार] **पूर्णावस्था**-स्त्री. परिपक्वदशा, शेवटास गेलेली स्थिति [सं पूर्ण+अवस्था] **पूर्णाहंता**-स्त्री. पूर्ण आत्मभाव 'तैसी ते पूर्णाहंता। का देहपणें पाडुरता।'-माज्ञा १८ ४१४ [पूर्ण+अहंता] **पूर्णाहुति**-स्त्री. १ यज्ञाच्या शेवटीं सर्व देवताना दिलेली आहुति 'होईल यागपूर्णाहुति। मग कर्म भागस्थिती।'-कथा १ २ २ (ल.) (सैन्याची) भयंकर कत्तल, रक्तपात; सर्व गारद होणें. 'भाऊसाहेबाबरोबर मोठ्या मोठ्या सरदारांची पूर्णाहुति झाली' ३ लढाईत मरण; मृत्यु (एकाहि व्यक्तीचा) 'त्याची पूर्णाहुति घेतली.' [सं पूर्ण+आहुति] **पूर्णोदर**-न (नृत्य) टाचांवर उभे राहून श्वास कोंडून धरून पोट थोडें पुढें आणणें श्वास सोडणें, उदररोग दाखविणें वगैरे वेळीं हा अभिनय करितात [पूर्ण+उदर] **पूर्णोपमा**-स्त्री (साहित्य) उपमेय, उपमान, सामान्य धर्म आणि साम्य(उपमा)वाचक शब्द हीं उपमेचीं चारहि अंगें ज्या उपमेंत आहेत ती. 'जो धैर्यें धरणी सहस्रकरसा तेजें तमा दूरसा।' इ० श्लोक. 'गजा तृणाच्छादित कूप जैसा। नृपा असत्यप्रियचार तैसा। नाशास हो कारण, जो तयास। येना मुलींही चुकवावयास।' लुप्तोपमा पहा. [सं पूर्ण+उपमा]

**पूर्णो, पूर्णातिथि**—स्त्री. अमावास्या, पौर्णिमा, पंचमी आणि दशमी या तिथींपैकीं प्रत्येक. [सं.]

**पूर्णिमा**—स्त्री. ज्या तिथीस चंद्रबिंब सोळाहि कलांनीं युक्त असतें ती तिथि; पौर्णिमा [सं] **पूर्णिमांत मास**-पु वद्य प्रतिपदेपासून शुद्ध पूर्णिमेपर्यंत महिना.

**पूर्त**—न. विहीर, तळें, देऊळ, धर्मशाळा इ० बांधणें, झाडें लावणें, अन्नदान करणें इ० रूप धर्मकृत्य.' यापरी ज्यास विषयविरक्ती। तेही इष्टापूर्तें जें करिती। योग याग त्याग साधिती। माझी भक्ति तै उपजे।'-एभा ११ १५१४. -स्त्री. पूर्ति पहा -वि. १ पूर्ण; पूर्ण भरलेलें; संपूर्ण; समग्र. २ पूर्ण केलेला, शेवटास नेलेला. परिपूर्ण पहा. 'पूर्त कवणी ही न कळे चरित्र। जव चाफळीं केले लीळा विचित्र।'-दावि ४५६. [सं]

**पूर्तकाल**—पु. (अप) पोर्तुगाल देश.

**पूर्तकेश**—पु. पोर्तुगीज लोक. जुन्या ऐतिहासिक कागदपत्रांतून असे परकीय विशेषनामाचे अपभ्रंश आढळतात

**पूर्तता**-- स्त्री. परिपूर्णता. पूर्ति पहा. [पूर्त]

**पूर्ति-र्ती**—स्त्री. १ समाप्ति; अखेर; शेवट, संपूर्णता. २ तृप्ति; समाधान; संतोष. 'हे दुर्दशा बरी कीं पूर्ति असे कीं न अक्ष तृष्णेची?।'-मोसभा ५ ३२. ३ परिपूर्णता; पूर्णपणा ४ पूर्त (-न) पहा 'पूर्ती मखादिक यांचि व त्यांचीं कर्में म्हणू नका हो खरी।'-ऐपो ३६८. [सं.]

**पूर्ति-र्ती**—वि. पुरती पहा. 'बरी अंतरीं मात घेऊनि पूर्ति।' -राक ११४. [पुरणें]

**पूर्भ(र्वे)य्या**—पु. उत्तरहिंदुस्थानी लोकांची एक जात; पुरभय्या पहा. [पूर्व, पूर्बिया]

**पूर्या**—पु. (संगीत) एक राग. पूरिया प.ा. **०धनाश्री**-पु एक राग ह्या रागात षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात जाति संपूर्ण-संपूर्ण वादी पंचम, संवादी ऋषभ गानसमय सायंकाळ.

**पूर्व**—स्त्री. उगवत, सूर्योदय ज्या दिशेस होतो ती दिशा. 'कां पूर्वापर सरिता। भिन्न दिसती पाहता। मग सिंधु मिळणीं ऐक्यता। पावती शेखीं।'-ज्ञा ३.३९. 'बौद्ध धर्माचा प्रसार काश्मीरात व काबुलात होऊन पूर्वेकडे इराण व तुर्कस्थानापर्यंत त्याची मजल गेलेली होती...'-गीर५८६ -वि पूर्व दिशेचा, पूर्व दिशेकडील. [सं] (वाप्र) **पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगवणें**-(ल.) अत्यंत अशक्य गोष्ट सुद्धा घडून येणें म्ह० १ राजा करील ती पूर्व (दिशा). २ सागाल ती पूर्वदिशा सामाशब्द- **०कपाल-गोलार्ध**-न. पूर्वेकडील गोलार्ध **०दिशा**-स्त्री पूर्व पहा 'पूर्व दिशे मुख धुतलें, होतसे नाश तिमिरा।'-होला **०द्वार**-न १ (शहर, राजवाडा, घर इ०चा) पूर्वेकडील किंवा पुढील दरवाजा २ (ल) तोंड; पश्चिमद्वार किंवा गुदद्वार याच्या उलट. **०पश्चिम**-वि. पूर्वेकडून पश्चिमेकडे ज्याची लांबी आहे असें. **०समुद्र**-पु पूर्व दिशेकडील समुद्र. **०स्वस्तिक**-न क्षितिजाचा पूर्वेकडील बिंदु **पूर्वाग्र** स्त्री. पूर्वेकडील अग्र; सूर्य व तारा जेथें मावळतो तो क्षितिजबिंदु, पूर्वदिगंश. [सं पूर्व+अग्र] **पूर्वास्त**-नपु. (बुध, शुक्र इ०चें) पूर्व दिशेस सूर्याजवळ गेल्यानें अदर्शन होणें **पूर्वोदय**-पु सूर्यापूर्वी बराच वेळ उदय पावूं लागल्यामुळें शुक्र, बुध इ० चें दर्शन होणें

**पूर्व**—वि. १ पहिला; अगोदरचा; आधींचा, सुरवातीचा २ प्राचीन; मागला; गतकालीन. ३ पुढील किंवा मागील (भाग, बाजू इ०) जेथ पूर्वानुक्रमु दिसे। चोखाळत।'-ज्ञा २.२२३. ४ ज्या दोन गोष्टींत आनुपूर्व्यसंबंध असतो त्यांपैकीं आधींच्या वस्तूस पूर्व व नंतरच्या वस्तूस उत्तर म्हणतात 'भुलले पूर्व विसरले सारें। अंगीं भरलें नूतन वारें।'-विक ५ समासात पूर्वपदीं व उत्तरपदींहि

हा शब्द योजितात जसें:--दृष्टपूर्व, श्रुतपूर्व, उक्तपूर्व, पूर्वदृष्ट, वयपूर्व (तरुण इ०) ' वयपूर्व तृप वाढीत वाकोनी। ' -रामदासी २.१५६ सह, बरोबर इ० अर्थी क प्रत्यय लावून (पूर्वक) समासात योजितात जसें:-आग्रहपूर्वक 'ईश्वराचें नाम श्रीशब्दपूर्वक घ्यावें ' **०कथा**-स्त्री १ संदर्भ लागावा म्हणून पूर्वी सांगून आलेल्या कथेचा जो भाग पुन्हा साराशरूपानें सांगतात तो २ मागील हकीकत, इतिहास **०कर्म**-न सद्य स्थितींत सुखदु:खास कारणीभूत असे मागें किंवा पूर्वजन्मीं केलेलें कर्म. पूर्वीचें कृत्य **म्ह०** चुलीपाशीं हगावें आणि पूर्वकर्मास रडावें **०कालवाचक अव्यय**-न (व्या.) मूळ धातूस ऊन, टून प्रत्यय लागून होणारें अव्यय उदा० करून, बोलून इ० **०ग्रह**-पु प्रथम, पूर्वी झालेली कल्पना, मत, समज इ०, आरंभीं झालेला ग्रह (बरावाईट) **०ग्रहदूषित**-वि पूर्वीच्या मताचा, ग्रहाचा परिणाम झालेला, पूर्वग्रहानें कलुषित असें (मन) (इं.) प्रेजुडिस्ड **०ज**-पु आपल्या अगोदरच्या पिढींतील माणूस, पुरुष, वाडवडील ' विगा(?)वग ता जिणें पूर्वजाची वृत्ति असोहि हातींची गेली रे। ' -दावि ४१५. -वि पूर्वी, आधीं जन्मलेला (बंधु) [सं पूर्व + ज (जन्मलेला) प्रत्यय] **०जन्म**-नपु मागला जन्म; हल्लींच्या जन्माच्या पूर्वीचा जन्म **०जन्मार्जित**-वि. पूर्वजन्मीं संपादन केलेलें (पाप, पुण्य इ०) [सं पूर्व+जन्म+अर्जित] **०ठेवा**-पु चालू जन्मांत सुखदु:खास कारणीभूत असा पूर्वजन्मातील पापपुण्याचा संचय पूर्वकर्म पहा. **०दत्त**-वि. (पूर्वजन्मीं दिलेले) ह्या जन्मीं बरे वाईट अनुभव येण्यास कारणीभूत असें पूर्वजन्मीं केलेलें दानादि कर्म. आपण जसें पूर्वजन्मीं दिलें-आचरलें असतें तसें परमेश्वर या जन्मीं आपणास देतो असा समज. **०धन**-न वडिलोपार्जित पैसा 'माझें पूर्वधन। तुम्ही यावें ऋण। ' -गुच ११२० [पूर्व+धन] **०धरी**-वि पूर्वापार चालत आलेला; सनातन. ' राउळीची चोरी केली थोरी। ते उपसाहावा जी मुरारी। का सृष्टिकर्ता पूर्वधरी। भणऔनिया। ' -दाव ३८०. **०धान्य**-न पावसाळ्यात येणारें पीक, खरीपाचें पीक. अग्रधान्य पहा **०पद**-न १ हरिदासानें कथेच्या सुरवातीस घेतलेलें एखादें विधान, सूत्र, नीतिवचन याचें तो निरनिराळीं उदाहरणें देऊन विवरण करतो व शेवटीं पुन्हा सिद्धांत म्हणून त्याच पदावर येतो यावरून. २ समास, वाक्य, कविता इ० चें पहिलें पद. ३ (ल.) पूर्वस्थिति. **पूर्वपदावर येणें**-मध्यंतरीं केलेले श्रम फुकट जाऊन पुनः पूर्वीच्या वाईट मार्गाकडे वळणें. **०पक्ष**-१ (तर्क, न्याय) वादविवादांत एका पक्षानें केलेली आपल्या मताची मांडणी; दुसरा, विरुद्ध पक्ष याला उत्तर देतो पूर्वपक्षाचें खंडण किंवा मंडण करणें जरूर असतें. एका बाजूचा उपन्यास. 'पूर्वपक्ष त्यागून सिद्धांत। निरूपण करावें नेमस्त। ' -दा ४.२.१८ २ (कायदा) तक्रार; फिर्यादीचें म्हणणें, वादीचें म्हणणें. ३ सिद्धांत, प्रमेय. ४ महिन्याचा शुद्ध पंधरवडा ५ आशंकामय स्थिति; माया ' पूर्वपक्ष म्हणिजे माया। सिद्धांतें जाये विलया। ' -दा २० ३.२०. ६ पूर्वीची अविचल, अविकल स्थिति (मनाची); मूळ सिद्धांतमय स्थिति. ' तुकाराम रूपें येयोनि प्रत्यक्ष। म्हणे पूर्वपक्ष साभाळीजे। ' -ब २५ **०पाठ**-पु पूर्वापार चालत आलेली रूढी, प्रघात, रिवाज, वहिवाट. **०पीठिका**-स्त्री १ पहिली, मागील, पूर्वीची किंवा प्राचीन पद्धत, मार्ग, चाल, रीत इ० 'आता त्यानें साधूपणा धरिला परंतु त्याची पूर्वपीठिका तर बहुत विरुद्ध आहे ' २ (एखादा, वादविवाद किंवा इतर प्रसंग याच्या) हकिकतीचा पहिला भाग; पूर्वीचा इत्थंभूत वृत्तांत, पूर्ववृत्त, आरंभींचा किंवा मूळचा भाग. ३ ग्रंथाचा प्रास्ताविक भाग, प्रस्तावना **पू(पु)र्वपुजा-पूजा**-स्त्री. १ पूर्वपुण्य पहा ' साब कृपा परिपुर्ण पुर्व पुजा बहुत चागली। ' -ऐपो ३२० २ देवपूजेत देवतेस अभिषेक करण्यापूर्वी करावयाची पूजा **पूर्वपुण्य, पुण्याई**-नस्त्री पूर्वजन्मीं सत्कृत्यें करून मिळविलेलें पुण्य. **०पुरुष**-पुअव पूर्वीचे वंशज, पूर्वज 'मग बोवाडिती स्वर्गस्थ। पूर्वपुरुष। ' -ज्ञा १ २५३. **०प्रवाह**-पु प्राचीन, पूर्वीचा मार्ग (शब्दश. व ल). **०बस्ती**-स्त्री. वरचें पोट, ओटीच्या वरचें पोट; छातीचें मध्यपटल व बेंबी याच्यामधील भाग, मणिपूर. ह्याच्या उलट उत्तरबस्ति. **०भूमिका**-स्त्री. पूर्वस्थल पहा. संन्यास घेतलिया जाण। पूर्वभूमिका अवलोकन। ' -एभा २३.५०२. **०मीमांसा**-स्त्री मीमांसाशास्त्राचा एक भाग. हा भाग जैमिनीनें केला असून त्यात कर्म-मार्गाचें प्रतिपादन आहे कर्मकांड ' तैसी हिंसाचि करूनि अहिंसा। निफजविजे हा ऐसा। पै पूर्वमीमांसा। निर्णो केला। ' -ज्ञा १३.२२० उत्तरमीमांसा पहा **०रात्र**-स्त्री रात्रीचा पहिला भाग; संध्याकाळपासून मध्यरात्रीपर्यंतचा काळ. **०रूप**-न १ पूर्वसूचना, (रोगाचें) पूर्वचिन्ह, पूर्वलक्षण 'कामला (कावीळ) ही पाडूचें पूर्वरूप. ' २ आधींचें स्वरूप, आकार; प्रथम दिसूं लागणारीं चिन्हें ३ कानउघाडणी; आगाऊ दिलेली सूचना **०रूपसंधि**-पु (व्या.) ज्यांत दोन स्वराच्या जागीं प्रथम स्वर कायम होतो असा संधि. **०रूपज्ञान**-न. १ पूर्वचिन्हावरून होणारें ज्ञान; प्रथमचीं लक्षणें, सूचना इ० वरून होणारें ज्ञान. २ (वैद्यक, रोगाचा साध्यासाध्य विचार, चिकित्सा **०रेषा-खा**-स्त्री. कपाळावर लिहून ठेविलेल्या पुढील आयुष्यांतील बऱ्यावाईट भाग्याविषयींच्या गोष्टी; दैव; नशीब; भाग्य; ललाटरेषा. ' दास म्हणे पूर्व-रेखा। प्राप्त न टळे ब्रह्मादिकां। ' -रामदासाचे अभंग (नवनीत पृ. १४८). **०वत्**-क्रिवि पूर्वीप्रमाणें; पहिल्यासारखें. **०वय**-न. मनुष्याच्या आयुष्याचा पहिला अर्धा भाग, बालपण; लहानपण. ' पूर्ववयीं चित्त निश्चित। तारुण्यीं तेंचि कामासक्त। ' -एभा २०.२७. **०वयस्क**-वि. आयुष्याच्या पहिल्या अर्धांत असलेला; लहान वयाचा, अल्पवयस्क; तरुण. **०वाद**-पु. (कायदा) आधींपासूनचा

ताबा असल्याबद्दल तक्रार. पहिल्या भोगवटा-मालकीबद्दलची सबब पुढें करणें. ०**वादी**-वि १ (वादविवादात) वादविवादास सुरवात करणारा, पूर्वपक्षी २ (कायदा) तक्रार करणारा फिर्यादी; वादी ३ प्रथमचा ताबा, भोगवटा दाखविणारा पूर्वीपासून चालत आलेली मालकी प्रस्थापित करणारा ०**वृत्त-वृत्तांत**-नपु पूर्वीचा इतिहास (एखादा मनुष्य, प्रकरण इ०ची) आरंभींची हकीकत; पूर्वकथा; पूर्वपीठिका ०**वेत-वेट-ठ, पूर्वेट**-वि प्रथमच गाभण असलेली किंवा व्यालेली [पूर्व+वेत] ०**सदर्भ**-पु (भाषण, कथानक इ०चा) पूर्वीचा संबंध ०**संध्या**-स्त्री (ख्रि) सणाच्या आदल्या दिवसाची सायंकाळ (इं) ईव्ह 'ज्या कोणत्या सणाला...पूर्वसंध्या आहे, त्यासाठीं नेमलेली सारप्रार्थना पूर्वीच्या संध्याकाळच्या उपासनेंत म्हणावी ' -साप्रा २९ ०**स्थल-स्थान**-न. १ (एखादी गोष्ट, मनुष्य इ०ची) पहिली किंवा पूर्वीची स्थिति, ठिकाण, देश, जागा इ० २ ज्या ठिकाणाहून निघून देशांतर केलें तें ठिकाण ०**स्थिति**-स्त्री पहिली किंवा पूर्वीची अवस्था, प्रकृतिभूत स्थिति **पूर्वांग**-न १ आरंभीचा, प्रास्ताविक भाग, अंश (एखादें पुस्तक, धंदा किंवा काम यांचीं) सुरवातीचीं कामें प्राथमिक योजना, एखाद्या धार्मिक विधीतील मुख्य कर्मापूर्वीचे कर्म. ह्याच्या उलट उत्तरांग २ (संगीत) रागाच्या सा, री, ग, म ह्या चार स्वरांचा समुदाय **पूर्वांग-वादीराग**-पु (संगीत) ज्या रागाचा वादी स्वर त्याच्या पूर्वांगामध्यें असतो असा राग ह्या वर्गांत येणारे राग दिवसा बारा वाजल्यापासुन रात्रीं बारा वाजेपर्यंत गाइले जातात **पूर्वापर**-वि १ मागील व पुढील, पूर्वीचें व नंतरचें 'पूर्वापरसंबंध' 'नव या पूर्वापर बोलाचा। विचारूनि कुमरु पंडूचा। कैसा प्रश्नु हन अव सरीचा। करिता होईल।' -ज्ञा ४ २११. २ -क्रिवि आधीं आणि नंतर; पहिल्यापासून शेवटपर्यंत, अथपासून इतिपर्यंत 'अथ पूर्वापर पाहिल्यावाचून लागणार नाहीं ' 'तया माधवविप्राघरीं। शुभाचारें होती नारी वासना तिची पूर्वापरी। ईश्वरपूजा करितसे।' -गुच ११८ [सं.] **पूर्वापरविरोध**-पु (ग्रंथादिकांत पहिला व शेवटचा भाग यांत भिन्नता) असंबद्धपणा; विसंगति **पूर्वापरवृत्त**-न समवृत्त, सममंडल स्थलाच्या माध्यान्ह वृत्ताला लंबरूपानें छेदणारें दृङ्मंडल -सूर्य ५. [सं.] **पूर्वा(र्वो)पार**-क्रिवि १ पूर्वापर पहा. २ पूर्वीपासून; प्रथमपासून: प्राचीनकाळापासून 'ह्या गावची पूर्वापार वहिवाट अशीच आहे.' -वि पूर्वापार पहा **पूर्वाभ्यास**-पु मागील किंवा पूर्वीची संवय, चिकाटी, अभ्यास इ० **पूर्वार्जन**-न (प्र. पूर्वार्जन) पूर्वपुण्य पहा 'होनाजी बाळा म्हणे मुख्य जन्मांतर पूर्वार्चन नीढळीं।' -होला ८८. [सं.] **पूर्वार्ध**-पु स्थलकालादिकाचा पहिला, अलीकडचा, जवळचा अर्धा भाग. ह्याच्या उलट उत्तरार्ध 'पंधरा अध्याय पूर्वार्ध। व्याख्यान झालें सिद्ध। सूत्रप्राय उत्तरार्ध। दाखविला विशद अध्यायार्थे।' -एभा १६ ६९ [सं.] **पूर्वावलोकन**-न. आधी किंवा प्रारंभीं केलेली पाहणी, पूर्वी केलेली परीक्षा, विचार इ० [सं] **पूर्वाह्ण**-पु सूर्य उगवल्यापासून सहा घटिकेचा तिसरा भाग. दुपारच्या अगोदरच्या सहा घटिका पराह्ण, पराण्ह पहा [सं] **पूर्वेत-ट-ठ**-वि पूर्ववेत (अप) पहा **पूर्वोत्तर**-वि १ पुढील व मागील, आधींचा व नंतरचा 'पूर्वोत्तरसंबंध' -क्रिवि सुरवातीस व शेवटीं, प्रथम व अखेर २ आरंभापासून अखेरपर्यंत, सगळेपणें. 'कथा ऐकणें तर पूर्वोत्तर ऐकावी मग तिचा रंग कळतो ' [सं] **पूर्वोत्तर मीमांसा**-स्त्री पूर्व आणि उत्तरमीमांसा; दर्शनांतील कर्मकांड व ज्ञानकांड 'पूर्वोत्तरमीमांसा दोनी। कुंडलें जाहलीं कृष्णश्रवणीं।' -एरुस्व १५७ [सं]

**पूर्वस**-पु (कु) एक देवता पितृदेवता. [सं पूर्ववंश]

**पूर्वा**-स्त्रीअव सत्तावीस नक्षत्रांपैकीं अकरावें नक्षत्र [सं] ०**फाल्गुनी**-स्त्री फल्गुनी नावाच्या नक्षत्रपुंजातील पहिल्या दोन तारका व सत्तावीस नक्षत्रांपैकीं अकरावें नक्षत्र ०**भाद्रपदा**-स्त्री भाद्रपदा नावाच्या नक्षत्रपुंजातील पहिल्या दोन तारका व सत्तावीस नक्षत्रांपैकीं पंचविसावें नक्षत्र **पूर्वाषाढा**-स्त्री आषाढा नावाच्या नक्षत्रपुंजातील पहिल्या दोन तारका व सत्तावीस नक्षत्रांपैकीं विसावें नक्षत्र [सं]

**पूर्विक-ल**-वि पूर्वीचा, प्राचीन, मागच्या जन्माचा. 'विद्या नाहीं वैभव नाहीं हा तों पूर्विल ठेवा।' -दावि ८३. २ पूर्व दिशेकडील, पूर्व दिशेची 'निगिजे पूर्विलिया मोहरा। कीं येइजे पश्चिमेचिया घरा।' -ज्ञा ६ १५२.

**पूर्विका**-स्त्री पूर्व पीठिका, वंशाची हकीकत पूर्वज, वाडवडील 'प्रश्न केला बरवा निका। सांगेन आता तुज विवेका। अत्रि ऋषीची पूर्विका। ऋषिप्रामोनि सकळ।' -गुच ४ ३ [पूर्व]

**पूर्वी**-क्रिवि १ प्रथमत आरंभी, अगोदर २ मागें प्राचीन काळीं 'पूर्वी जेथे फुलांची वृष्टी होत होती तेथें गोळ्यांची वृष्टी होण्याचा प्रसंग आला आहे ' -टिळे २ ५८ [पूर्व] ०**चा**-वि आरंभींचा, अगोदरचा, प्राचीन, गतकाळचा. ०**पासून**-क्रिवि सुरवातीपासून, प्राचीनकाळापासुन **पूर्वील**-वि. अगोदरचा, पूर्वीचा; प्राचीन, सुरवातीचा, मागील, गतकालीन; पूर्विल पहा. 'तें पहावया धैर्य नोव्हे नेत्रा। म्हणोनि पूर्वील बाळमित्रा।' -मुआदि ३० १२७ [पूर्व]

**पूर्वी**-स्त्री. १ (संगीत) एक राग यात षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, तीव्र मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात जाति संपूर्ण-संपूर्ण वादी गांधार, संवादी निषाद गानसमय सायंकाळ 'आधींच स्त्रियाचा कंठ तशामधीं पूर्वी खुले तिसरे प्रहरीं।' -प्रला २३६. २ पत्राचा

आरंभींचा भाग; उपोद्घात. [ पूर्व ] ०**थाट**–पु. ( संगीत ) एका थाटाचें, स्वरमालिकेचें नांव त्याचे सात स्वर असे असतात –शुद्ध षड्ज, कोमल ऋषभ, शुद्ध गांधार, तीव्र मध्यम, शुद्ध पंचम, कोमल धैवत, शुद्ध निषाद.

**पूल**—पु नदीचें पात्र, आगगाडीचा फाटा, इ० ओलांडून जाण्यासाठीं उंचावरून बांधलेला रस्ता; दादर; सेतु; दोन उंचावरच्या, किंवा लांब असणारीं टोंकें जोडण्याचें साधन. [ फा पुल् ]

**पूलिका**—स्त्री. १ दिव्याची ज्योत पुलिका पहा. २ स्फूर्ति, उर्मि 'बुद्धीची पूलिका विरे। परिमळ घ्राणीं उरे।' –ज्ञा ६ २४६ [ सं पुलिका, म पुली ? ]

**पूलिका**—स्त्री राशी, ढीग; जमाव. [ सं. पूल्=ढीग होणें; हिं; पूली ]

**पूषा**—पु. सूर्य [ सं पूषन् ]

**पूस**—पु. १ ( बायकी ) पौष महिना. २ पुष्य नक्षत्र [सं पौष; सं. पुष्य, प्रा पुस्स, पूस ] ०**लाहणी**–स्त्री पौष महिन्यांत केलेली मेंढयाच्या लोकरीची कापणी. [ पूस+लाणी=कापणी ]

**पूस**—स्त्री. चौकशी; तपास. पुस पहा. [ पुसणें ] ०**गवस**–स्त्री. खोल चौकशी; बारीक विचारणा, तपास. 'येथें आल्यावरी शत्रूस पूसगवस करून पारिपत्य करतील.' –दिमरा १.२९७. [ पूस+अर घोस ]

**पूंस**—पु. (महानु) पक्षी; पोपट 'बनकराचिआं आंडौरी। रत्नाचे हात-गुंडे वेर्‍हीं। सोंकरितांति तुरंबिआंवरी। पूंसेयां तें।' –शिशु २५५ –न पुच्छ; शेपूट [ सं. पुच्छ, प्रा. पुस ]

**पृच्छक**—वि प्रश्न विचारणारा, चौकशी करणारा [ सं ]

**पृच्छा**—स्त्री प्रश्न, सवाल विचारपूस चौकशी [ सं ]

**पृतना**—स्त्री १ सेना सैन्य, फौज 'असतां तुम्ही पति पृथा–पुत्र मथिति या मदीय पृतनेतें। –मोभीष्म ४.४ २ सैन्याचा एकतृतीयांश भाग. -शर [ स ]

**पृत्सा**—स्त्री. पृच्छा पहा. 'आणिक जे तुज दुर्बोध्य असेल पृत्सा। तें करी गा तूं अवश्य।' –स्वादि ९.१.८९.

**पृथक्**—वि वेगळा; निराळा, भिन्न. –क्रिवि निरनिराळें; वेगळेपणानें भिन्नपणानें 'तें पृथग्विधकरण। कर्माचें इया कारण।' –ज्ञा १८ ३३०. [सं.] **पृथक्करण**–न १ (शाप.) पदार्थाचीं घटकद्रव्यें निरनिराळीं करणें. निराळें करणें; वर्गीकरण करणें, फोड. विघटन; विभजन. (इं) डिकॉंपोझिशन, ॲनॅलिसिस २ (व्या.) वाक्यपदच्छेद; वाक्यमीमांसा. ०**जन**–पु मूर्ख मनुष्य. 'मनी म्हणे हे सतीरत्न। म्यां वनीं सांडिलें आपण। तरी मी जाहलों पृथक्जन। यथार्थ देवा।' –कथा १.१०.१६०. [ सं. ] **पृथक्त्व**–न. वेगळेपणा; निराळेपणा, भिन्नत्व. 'एक जिनसीपणा मोडून बहुजिनसीपणा उत्पन्न होणें यासच पृथक्त्व म्हणतात.' –गीर १७१.

०**मिळकत**–स्त्री. ( कायदा ) वडिलार्जितखेरीज म्हणजे भाऊ, चुलता इ०कडून वारस या नात्यानें किंवा इतर रीतीनें प्राप्त झालेली मिळकत. **पृथगात्मिका**–स्त्री. प्राण्याची, जीवाची निराळी स्थिति; व्यक्तित्व; स्वतंत्र अस्तित्व. [पृथक्+आत्मन्] **पृथग्भवन**–पृथक्करण पहा. –सेंपू २ १. –पदाव १४. **पृथग्भूत**–वि विलग; पृथक् झालेला; वियुक्त. –पदाव ५९. **पृथग्भूतकिरण**–नअव. विच्छिन्न किरण. ( इं ) स्पेक्ट्रम. **पृथग्विध**–वि. निरनिराळया प्रकारचा; बहुविध, नानाविध.

**पृथा**—स्त्री. ( प्र ) प्रतीति; अनुभव. प्रथा पहा. 'तरि कांहीं नाहीं सर्वथा। ऐसी जरी व्यवस्था। तरी नाहीं हे पृथा। कवणासी पां।' –अमृ ४.२६ (पाठभेद). [ प्रथा ]

**पृथा**—स्त्री. पोहे. 'पुरामाजि जाऊन भिक्षा पहातें। मिळाल्या पृथा देत मुष्टीक हातें।' –किंसुदाम १५ [ सं पृथुक ]

**पृथा**—स्त्री. कुंतीचे नाव 'पितामह वंदे तया प्रबळ तूं पृथानंदना।' –वामन भीष्मप्रतिज्ञा ८.

**पृथिमी**—स्त्री. पृथ्वी पहा. 'प्रभा पृथिमीवरी। यकायकी झाकळली बरी।' –ऐपो १२७

**पृथिवी**—स्त्री. पृथ्वी पहा. [सं.] ०**पति**–पु. राजा. 'पृथिवीपति आणिक। बहुत आहाती।' –ज्ञा १.१७५ ०**वर**–पु. राजा. 'स्वरूपानें त्याच्या पृथिविवर रूपें हरपती।' –विवि ८.१.२०.

**पृथु**—वि. १ मोठा; जाड, स्थूल. २ अवाढव्य, विस्तृत; गुरु. 'पृथुनितंबनितंबिनिचा बरी। कटितटीं कटिसूत्रचि सांवरी।' –वामन [ सं ] ०**करण**–न. ( शाप ) महत्करण, मोठा करणें, दाखविणें (इं.) मॅग्निफिकेशन ०**तर**–वि फार जाडा; विस्तृत; स्थूल. 'एकें कुर्ढें एकें स्थूळें। एकें र्‍हस्वें एकें विशाळें। पृथुतरें सरळें। अप्रांतें एकें।' –ज्ञा ११ १२४. [ सं. पृथु+तर प्रत्यय ]

**पृथु. पृथुक**—पु पोहा, पोहे. [ सं. ]

**पृथ्वी**—स्त्री १ भूमि, जमीन. २ जेथें गंधरूप गुण राहतो असें पंचमहाभूतांपैकीं एक भूत. ३ भूगोल; सूर्यमालेमधील पृथ्वी हा सूर्यापासूनचा तिसरा ग्रह आहे. वातावरण, जमीन व पाणी हे तीन विषय पृथ्वीशीं संबद्ध आहेत. ४ भूगोलावर राहणारे मनुष्य, पशु, वृक्ष, पर्वत इ० सर्व; जग ५ माती. 'अवतरली गाडग्यां घडां। पृथ्वी अनोळख जाली मूढां।' –ज्ञा १८ ५४३. [सं.] ०**दिग्विजय**–पु. पृथ्वी जिंकणें; सार्वभौमत्व. 'दुर्ग तो असाध्य आणि एक जागां अवघी फौज राहिलिया पृथ्वी–दिग्विजय होणार नाहीं.' –भाव १३

**पृथ्वी**—स्त्री. एक वृत्ताचें नांव. याच्या चरणांत सतरा अक्षरें व ज, स, ज, स, य, ल, ग हे गण असतात. उदा० 'सुसंगति सदा घडो सुजनवाक्य कानीं पडो।' –केका ११८.

**पृष्ठ**—न. १ मनुष्यादिकांची पाठ 'कूर्मरूप हो वनमाळी पृष्ठीं धरिली मेदिनी।' –दशावतारांची भूपाळी पृ ८. २ मागची

बाजू; पाठीमागचा भाग, पिछाडी. ३ कागदाचीं दोन अंगें प्रत्येकीं; पुस्तकाचें पान. ४ पदार्थाची वरची बाजू ५ (ज्यो पदार्थ) (गोल इ०ची) बाहेरची पातळी. –सूर्य ८. ६ (महत्त्वमापन) जिला फक्त लांबी व रुंदी आहेत अशी पातळी (इं.) सरफेस. ७ (कों.) बसण्याचा लहान पाट. [सं] सामा शब्द– ०केंद्र–न वर्तुळाचा आंस, कणा, ध्रुव [सं] ०केंद्रग-वृत्त–न. एका वर्तुळाच्या ध्रुवांतून जाणारें दुसरें वर्तुळ, गौणवर्तुळ **पृष्ठतोनुपृष्ठ**–क्रिवि. १ एका मागून एक; पाठोपाठ; एकाच्या पुढें दुसऱ्याची पाठ येईल अशा तऱ्हेनें (चालत असलेला समाज इ०) २ लागोपाठ, अनुक्रमें. [पृष्ठ+अनु+पृष्ठ] **पृष्ठदेश**–पु १ घोड्याचा मध्यभाग आणि कंबरेपासून खुरापर्यंत पश्चिम भाग –अश्वप १६८. २ पृष्ठभाग पहा ०फल–ळ–न (महत्त्वमापन) कोण त्याहि घनाकृतीची मर्यादा दाखविणाऱ्या सर्व पृष्ठाच्या क्षेत्र फळांची बेरीज, भरीव पदार्थाच्या वरील भागाचें क्षेत्रफळ 'परि-भाषा व्यासानें गुणिलें असतां गोलाचें पृष्ठफळ निघतें' –मराठी ६ वें पुस्तक, पृ ३२८ ०भाग–पु १ पृष्ठ, पाठ २ सपाटी, पातळी; सपाटीवरचा भाग. (इं) सरफेस ३ (स्थापत्य) मागली उभारणी. (इं) बॅक् एलेव्हेशन. ०मात्रा–स्त्री. (के, कै, को, कौ प्रमाणें) अक्षराच्या डोक्यावर न देता पाठीमागें दिलेली मात्रा बंगालीप्रमाणें जसें:–सैधव, कपोत याजबद्दल ‍सधव, क ‍पात अशा पृष्ठमात्रा जुन्या कागद पत्रातून उपयोजीत असत ०मैथुन–न गुदमैथुन; अनैसर्गिक संभोग, बच्चेबाजी. ०वंश–पु (शाप.) पाठीचा कणा, मणिस्तंभ (इं) स्पाइन, बॅकबोन ०वंशी–वंशीय–वि कणा, हाडें इ० असलेला (प्राणी) (इं) व्हर्टेब्रेट. –प्राणिमो ११. प्राण्यांचे दोन वर्ग आहेत, एकाला पाठीचा कणा असतो तर दुसऱ्याला नसतो. ०वंशहीन–वि. पाठीचा कणा नसलेला (प्राणिवर्ग) (इं) इनव्हर्टेब्रेट ०वंशाधर–न १ शेवटचा कटिमणि; कटिकशेरुका २ शेवटचा कटिमणि व माकडहाडाच्या वरच्या बाजूचें त्रिकोणाकृति हाड यामधील प्रदेश ०स्वस्तिक–न (नृत्य) हात सारखे वेडेवांकडे फेकणें व हात फेकतां फेकतां त्याचें स्वस्तिक करणें. तसेंच पायांनीं अपक्रांत-आकाशचारी करून अर्धसूचीकरणाप्रमाणे पाठीमागचे बाजूस पायाचें स्वस्तिक करणें **पृष्ठाकृति**–स्त्री (महत्त्वमापन) एक किंवा अनेक रेषांनीं सर्वांगाकडून मर्यादिलेली पातळी [पृष्ठ+आकृति] **पृष्ठांत**–पु. पाठीचा खालचा भाग 'उचललें कां नेणिजे। तैसें पृष्ठांत उचलिजे।' –ज्ञा ६.१९७. [पृष्ठ+अंत] **पृष्ठानुसारी(बाहु)**–पु (नृत्य.) बाहू पाठीकडे नेणें.

**पैं**—शअ. १ (काव्य, पार्शी करिता) पाशीं; जवळ. 'मन न वळे मज जैसा गज अंकुश न वसतां महाता पैं।' –मोआदि ७.१०. २ कडे; शीं; सीं. 'खोंचि कीं निवटी मार्गे। येवढया जैता नित्रे। आपण पे जो।' –अमृ २ १९. 'साधुपायापे बोळगती सकळ।' –दावि ६२. ३ स, ला, तें. 'ते तीर्थें पांतां न स्मरे। आपण पे।' –ऋ १९ ४ पासुन; पाशीं. 'तंव गिरिजा म्हणे वेगें। मज हिमवं तापें मागावें।' –कालिका पुराण ५४८. ५वर. 'तियाज चाडापें वांदरें आथें।' –भिल्ली १९. (सातारा–वाकडील कुणबाऊ भाषेत मप=मजपाशीं हा शब्द वापरतात).

**पेऊली**—स्त्री. (चादा) लहान बांसाची (कळकाची) पेटी

**पेक**—न पोंक, कुबड; पोंग; कोंग

**पे(पें)कट–ड, पेकाड, पेगट**—न. १ (निंदार्थी) कंबर; कंबरेचा सांधा, कमरेपासुन मांड्यापर्यंतचा भाग. २ (कों.) कटि-प्रदेश, कंबर **पेकडहाड**–न. (कों) पाठीच्या कण्याचा खालचा शेवट; अगदीं खालचा मणका, कमरेचा काटा पेकडहाड व माक-डहाड एक नव्हेत.

**पेक(ख)णें**—सक्रि (काव्य) वाट पहाणें, मार्गप्रतीक्षा करणें, थोडा वेळ, अंमळ थांबणें हा शब्द कोंकणी व अशिष्ट सुद्धा आहे [सं प्रेक्षण, सं प्र+ईक्ष्; प्रा. पेक्ख; प्रा. पेक्खण]

**पेकप**—अक्रि. (गो) जखम इ० बरें होणें.

**पेंका**—पु बेडकाच्या जातीचा एक प्राणी

**पेंका–क्या**—वि. कुबडा; पोंक असलेला. [पेक]

**पेखण**—न. १ नृत्य; नाचरंग. 'घरोघरी वृंदावनें। गीत पेखणीं देवाचेनें।' –कथा २.६.६ २ काथ्याकूट. ३ छंद –मनको [सं पेख्]

**पेखणी**—स्त्री (महानु) नर्तकी, नाचणारी 'मध्यें कन्हणी ठाई पेखणी।' –ऋ ६९. [सं. प्रेख्]

**पेखणें**—न. (महानु) नाच, नृत्य, नाचरंग. 'पेखणें या करिती तिआ विद्याधरा नारी।' –धवळे पूर्वार्ध ७१. 'तव पेखणें माडले श्रीपती। सभारंगीं।' –कथा ७१०१०९ [सं. प्रेख्= हलणें–हलविणें]

**पेखणें**—सक्रि चूर्ण होणें, पीठ होणें. [सं. पेषण]

**पेखणें**—सक्रि (कों) जखम सुधारणें –खिपु

**पेंग**—स्त्री डुलकी; झोपेमुळें मान डोलणें. (क्रि० येणें). [हिं] **पेंगणें**–अक्रि. १ (झोपेच्या गुंगीमुळें) डुलकी घेणें. २ लंग-डणें; एका पायावर चालणें. ३ (रोगादिकांनीं) निरुत्साही, उदास होणें, दुबळें होणें, अशक्त होणें [हिं.] **पेंगणी, पेंगणें**–स्त्रीन. १ पेंग; डुलकी घेण्याची क्रिया (क्रि० देणें; घेणें, खाणें; मारणें; येणें) २ लंगडी; लंगडणें; लंगडशाई **पेंग(गु)ळणें**–अक्रि. निरु-त्साही, उदास होणें, अशक्त होणें; ग्लानी किंवा सुस्ती चढणें; नि सत्त्व होणें; गळणें; कमजोर होणें [पेंगणें] **पेंगळा**–वि ढिला; जड; सुस्त; निरुत्साही; उदासीन; कमजोर (मनुष्य, पशु).

**पे(पै)गंबर, पेगमबर**—पु ईश्वराचा दूत; स्वर्गाहून निरोप आणणारा. मोसेस, येशू, महंमद आणि अली यांस कांहींशा विशेष अर्थानें व भेदानें हा शब्द लावतात [फा]

**पेगम, पे(पै)गाम**—पु १ विनवणी; उपाय; युक्ति; मार्ग काढण्याचा किंवा प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न. ' ज्यार इमानी . मेळून पेगाम केला कीं . ।' –पेद २० १७६ २ पत्रव्यवहार, दळणवळण चालू करणे, निरोप, युक्तीने बांधलेले संधान इ०च्या गांखळीचा दुवा, एकरूपता; परस्पर माहिती किंवा संदेश, खटपट (क्रि० करणें; बांधणे, घालणें). ' राजाची भेट घ्यायाला मी चार र्षे पेगम करीत आहे ' ' सखारामबापूचे चहुंकडे पेगम होते ' २ पल्ला; आटोका, टप्पा, आवांका; शक्ति; सामर्थ्य ३ बोली (तहाची) ' तहोत्तर पांचसावेगेजी सल्ळखाचा पेगाम नवाबाकडून आला ' –पेद ११

**पेगमबरी नवसागर**—पु एक प्रकारचा नवसागर हिं.]

**पेगांव**—पु. (गो) मातीचा खांब. ' पेगांव घालूंक जाय= ातीचे खांब घातले पाहिजेत '

**पेंगूळ**—पु. एक घाण वास सोडणारा कीटक, पिंगूळ.

**पे(पें)च**—पु. १ पीळ; वेढा, आटा, वळसा (पागोटयाचा). पाचपेंच अलबेली आणा कोणी बांधुन पगडीला ।' –राला ८१ रीचा वेढा, विळखा (एखाद्या वस्तूभोवतीं असलेला), पिरंगळा, टोळें; वर्तुळ (एखाद्या पिळलेल्या वस्तूचें) २ (ल) खुबीची लपेट, ल, शक्कल; हिकमत, कुस्तींतील, मल्लयुद्धातील डाव, प्रतिपक्ष्याला डण्याची युक्ति. ' भीमानें एक अवघड पेंच घालून राक्षसाची बर मोडली.' ३ (वाद–व्यवहारातील) कोडें, डाव, आढावेढा. ाळें; तेढ, वक्रता, कुटिलता; कपट ' ज्या राजकारणात पीळ पेच सेल त्या कामांत मी येणार नाहीं ' –रा ११८८. ४ त्रास, डचण, खेकटें. दु.ख, संकट ' सुज्ञें समजुनि गुर्वंध करिता नमनें ठेल का पेंच.' –मोशांति २.४७ ५ पंचाईत: गोंधळ, घोटा- ्याची स्थिति. (क्रि० येणें किंवा पेचांत पडणें; सांपडणें; धरणें डणें; आणणें). ६ मळसूत्र; स्क्रू किंवा त्याचा आटा. ' ह्या क्रूचे पेच चांगले नाहींत.' ७ पोंच; समज ' नुसत्या शिपायाला नका पेंच कुठला.' –इंप १२३. ८ खोंच (भाषणांतील) ' त्यांच्या ालण्यातला पेंच प्रथम आपणाला कळला नाहीं.' –इंप ११४ (भाषण वगैरेंतील) खुबी; युक्ति. ' अंतरीं पीळ पेंच वळसा । तोचि ढवी बहुवसा ।' –दा १५.६.१४. १० कूट; गूढ. जाणत्याचे पेच णावे ।' –दा १८.२.११. ११ (वि..चा धंदा) साधा, शेवट ानाचा). [सं. प्रेत्य; फा. पेच] ०कस–पु (ना.) स्क्रू व ..ण्याचें त्यार. ०दार–वि. १ गुंतागुंतीचा: घोटाळ्याचा २ आटे असलेला; पेंच असलेला; वांकविलेला. ०दार पेंच–वि. आटयामध्यें आटे असलेला; फार गुंतागुंतीचा. ०पट्टी–पाटी–स्त्री (सुतारी धंदा) पेच पाडण्याचें हत्यार. आटे पाडण्याचें चपटें यंत्र. ०पाच–पाड–पु. १ (मल्लविद्या) डावपेच; खुबीदार लपेट. हिकमत; पक्कड २ (ल) त्रासदायक धोरण, कारस्थान, युक्ति; छक्केपंजे, घावडाव ' प्रीतिचिया बोला नाहीं पेचपाड । भलतैसें गोड करूनि घेई ।' –तुगा १६६५ ३ संकट. अडचण ' एकाएकी भलती गोष्ट आम्ही करीत नाहीं, मागील पेच–पाच बहुत आहेत ' –पगा [पेच द्वि हिं.]

**पेचक**—स्त्री १ पितळी तार; जरतारी कामांत हिचा उपयोग करितात. २ (फुलमाळी धंदा) हाराची कलाबतु (पादरी क्वचित पिवळी). ३ पक्क्या दोऱ्याची गुंडी [हिं.]

**पेचकट**—पु. (मुद्रण) जुळविलेल्या मजकुराचें, टाइपाचें पृष्ठ बांधण्यासाठीं वापरलेला पक्का दोरा. [हिं.]

**पेचकळी**—स्त्री (प्र) पेशकळी

**पेंचकाड**—न. (व) (विद्यार्थी) कंबर; कंबरडें, पेकाड. ' त्याचें पेंचकाड मोडलें.' [पेकाड]

**पेंचणें**—उक्रि. (राजा गो.) मधोमध दोन भाग करणें; उभा चिरणें, फोडणें. (बांबू इ० उभा) फोडणें, फुटणें, काष्ठादिक पिंजलें जाणें [पेच]

**पे(पें)चणें**—सक्रि १ पिळणें, पीळ घालणें; पिळवटणें, पिरगाळणें, जोरानें फिरविणें २ घोटाळयात, वुचकळयांत पाडणें, अडखळविणें: निरुत्तर कुंठित करणें. (वादात) भाषणात कोंडणें पेचांत धरणें. ' त्यामी हरएक जाबसालीं पेचन माकूल करीत नाहीं हें अपूर्व आहे.' –रा १३ १९ ३ अडचणींत संकटात पकडणें; पेचात, संकटात आणणें. ' घोळितो नृपाला पेचुनी ।' –दावि ४५७ ४ लचकणें, तिरपणें. दुमडणें: कचकणें: मुरगाळणें (हात, पाय इ० अवयव). [पेच] **पे(पें)चणी** स्त्री पीळ, विळखा, पिळणें; पिरगाळणें

**पे(पें)चाटी**—स्त्री गोंधळून जाण्यासारखी, पेच पडल्याची स्थिति, कचाटी; अडचण, पचाईत, खेंकटें (क्रि० सापडणें; धरणें). (सामान्यत सप्तम्यंत प्रयोग). [पेच]

**पेचापक्षी**—पु. एक पक्षी.

**पेज, पेजवणी, पेजपाणी**—स्त्रीन कांजी, भातावरचें काढून घेतलेले पाणी; कण्हेरी, तांदूळ शिजल्यानंतर जें भातांतील वेळून पाणी काढतात तें. ' पसरिल तरि कर पेजें चातक रसना तृषें करुनि करपे जे ।' –मोकृष्ण ४६९ [सं. पेय] **पेजट, पेजकट, पेजचरा**–वि १ पचपचीत; ज्यांत पेज फार आहे असा (भात). २ (ल) फोपशा; वातपुष्ट; स्थूल; दिसण्यात पुष्ट पण शक्तिहीन (मनुष्य) ०पात्र, पेजा–नवि. फोपशा. पेजट अर्थ २ पहा [पेज+पात्र] ०बुडा–वि. (कों.) पेजट; ज्यांत पुष्कळ पेज आहे असा; पचपचीत (भात). ०बुडा भात–पु. पातळ भात; आजारी माणसास सहज पचावा म्हणून ज्यांत पेज राखली आहे

असा भात. ०बुडें-न पेज घालून घट्ट केलेलें ताक. ०मारप-क्रि. (गो.) पेज जेवणें.

**पेजवणें, पेजवत, पेजळूक**—नस्त्री. (कु. राजा.) दुभत्या जनावरांचें भाडें. [पेजे] **पेजळी**-स्त्री (राजा) भाड्यानें घेतलेलें दुभतें जनावर [पेजें] **पेजें**-न (राजा.) गाय किंवा म्हैस व्यायल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या दोन पैदासीं (पेजें आणि जावपें) पैकीं एक, म्हणजे दूध (दुसरी पैदास म्हणजे जावपें=वासरूं). [सं. पेय] **पेजेंजापें, पेजेंजावपें**-न दुभतें व वासरूं न घेतां गाय किंवा म्हैस परत मिळण्याच्या अटीवर ती पाळण्यासाठीं एखाद्याकडे ठेवण्याची चाल 'ही पाडी मी पेजेंजावप्याचे बोलीनें आणली आहे.' [पेजें+जावपें]

**पेट**—स्त्री (व) नदी वगैरे तरून जाण्यासाठीं केलेली भोपळ्यांची सागड, पेटें [पेटारा]

**पेट**—पु १ तोफेची दारू भरण्याची कोठी, (विशेषत) तोफेचा, बंदुकीचा भरलेला बार २ बंदुकीचा, तोफेचा आवाज, बार -स्त्रीपु पेट घेणें, शिलगणें, चेतणें. (क्रि० घेणें) [पेटणें]

**पेट**—पु (कु) एखादी वस्तु सारखी किंवा सपाट करण्याकरिता थापटणें; ठोकणें, प्रहार, तडाखा, चपेटा [पिटणें]

**पेट**—स्त्री (कु) पेटी, संदूक [स पेटिका] ०कुली-स्त्री (ना.) बांसाची तयार केलेली लहानशी पेटी.

**पेट**—न (गु हिं) पोट [दे प्रा पेट हिं पेट]

**पेटका-की**—पुस्त्री. १ साप चावल्यामुळें अंगांत ओढी येणें गात्रसंकोच, झटका; लहर; वळ २ स्नायु जोरानें ओढल्यामुळें उठणारी बेडकी, वळ (क्रि० काढणें, उठवणें, दाखविणें, निघणें, उठणें, येणें) [हिं ?] **पेटगा-पेटगी**-पुस्त्री स्नायूंत उठणारा गोळा, वरवंटा, बेडका, पेडका, झटका, आचका (क्रि० येणें, उठणें).

**पेटणें-णां**—न (कु.) चोपणें; थोपटणें, जमीन चोपण्याचें लांकूड. जमीन ठोकून सपाट करण्याकरिता याचा उपयोग करितात [हिं. पीटना]

**पेटणें**—अक्रि. १ चेतणें; शिलगणें, आग लागणें; पेट घेणें. २ (ल) रागावणें; क्षुब्ध होणें, संतापणें; भडकणें ३ (बैल) जोताला धरणें; वठणीस येणें [देशी] **पेटणी**-स्त्री. पेट घेणें; शिलगणें; चेतणें. **पेटवा**-पु १ आग. २ (ल) चिताग्नि 'तरी तुज पेटवा किमर्थअर्थे। कामानळें दाटला।' -नव १३.१३९. [पेटणें] **पेटविणें**-सक्रि. १ चेतविणें; शिलगावणें २ (ल) संतापविणें; क्षुब्ध करणें ३ वठणीस आणणें; कामाला लावणें (बैल) [पेटणें] **पेटवण**-नस्त्री. १ विस्तव पेटविण्यासाठीं उपयोगांत आणावयाचें गवत, काटक्या, सरपण, झिलप्या वगैरे साधन २ अग्नि पेटण्यासाठीं त्यावर गोवरीचे तुकडे, बारीक काटक्या इ० रचून ठेवतात तें. **पेटवणी**-स्त्री. १ चेतवणी; शिलगावणें; क्षुब्ध करणें. २ वठणीस आणणें. **पेटीव**-वि. १ पेटलेला; पेटविलेला. २ (ल.) वठणीस आणलेलें; निरढावलेलें (जनावर). [पेटणें, पेटविणें]

**पेटा**—पु. १ वर्तुळ; घेर; पोट २ (ल) ताबा; अधिकार. ३ अनेक गावांचा समुदाय व त्याचें मुख्य ठिकाण; साप्रतचा तालुक्याहून लहान देशविभाग, बरींचशीं लहान गावें आणि खेडीं ज्यांत आहेत असा देशाचा विभाग, परगण्याचा, तालुक्याचा पोटविभाग. देश पहा ३ किल्ल्याच्या घेरातील गांवांचा समुदाय व तो किल्ला. 'एक नगराच्या पेट्यात शंभर गांव असतात.' ४ अधिकारी पुरुष व त्याचे हाताखालील नोकर किंवा लवाजमा 'मोठ्या पुरुषास आमंत्रण केलें म्हणजे त्याच्या पेट्यात लहानसहान येतात.' ५ वाघाचा पेटीसारखा पिंजरा, सापळा. ६ (कों.) नदी वगैरे तरून जाण्यासाठीं केलेला भोपळ्याचा तराफा पेटें पहा. ७ पेटा; एक प्रकारचा भोपळा. ८ मुळासकट उपटलेल्या काटेरी झुडुपाचा (मुख्यत्वें करडई, हरभरा, अंबाडी, ताग इ० चा) केलेला भारा; आझें, काटक्याचा भारा; तसल्या झुडुपाची रास, गंजी. ९ वाघाचा किंवा सिंहाचा बच्चा 'व्याघ्रीचे अविकुळी जसे पेटे।'-मोआदि २१.१३ १० ज्या जातीचें पिलूं असेल त्या (कुत्रा, मांजर, ससा इ०) जातीचा शब्द पाठीमागे योजून हा शब्द योजितात. जसें-कुत्र्याचा पेटा; डुकराचा पेटा ११ (बीजगणित) समीकरणाची एक बाजू. [हिं. पेट=पोट]

**पेटा**—पु बाजार, पेठ 'उकलू विषयाचा पेटा। होत मनाचा चोहटा।' -ज्ञा ८ १८४ [पेठ]

**पेटारा-री**—पुस्त्री. १ बांबूची, वेताची-साधारणपणें लांब, चौरस व १५-१८ इंच खोल, अशी केलेली झाकणाची पेटी, टोपली; पेटीसारखा मोठा करंडा २ -स्त्री (अष्टागरी) नांगरलेल्या जमीनीतील ढेकळें फोडून ती सारखी करण्याचें व डिफळ्यामागून फिरविण्याचें सुपासारखें एक लोखंडी आऊत. ३ गारुड्याची साप ठेवण्याची झाकणाची टोपली 'कोपे मानधनाचा पेटारा जो पृथाभुतद्वेषी।'-मोशल्य ३.४७. [सं. पेटक]

**पेटारें**—न १ (बांबूची, वेताची, लाकडाची) लहान वाटोळी पाटी, टोपली, करंडा २ (कों.) पेटाळें; शेत साफ करण्याचा मोठा कुळव, फावडी, शेतातील कचरा, माती काढून जमीन साफ करण्याचें बैलांनीं ओढलें जाणारें आऊत. [सं. पेटक]

**पेटारी, पेटरी**—स्त्री (गो.) एक झाड.

**पेटिया**—पु दाणाचारा; चंदी, आहार (भोजन किंवा त्याच्या खर्चाइतका पैसा): पोटापुरतें अन्न; भत्ता; साक्षीदार, चपराशी वगैरेंना दूर पाठवावयाचें असता त्यांना देण्यांत येणारा खर्च, भत्ता. [हिं. पेट=पोट] म्ह० घासिया घोडा पेटिया चाकर काय कामाचा

**पेटी**—स्त्री. १ संदूक; वस्तु बंदोबस्तानें ठेवण्याचें लांकडाचें आच्छादनसहित साधन; लहान पेटारा. २ पुरुषाच्या मणगटावर; दंडावर बांधावयाचें एक भूषण. ३ बायकांचा गळ्यांतील एक जडावाचा, लहान लहान पेट्या असलेला दागिना; चिंचपेटी. ४ फटाक्यांच्या सरांचें बंद पुडकें ५ दगडी जोत्याचा मधला थर, बेंदरी व पाटथर यांमधील लहान थर. ६ बालातंगी; तंगी; घोडयाच्या पोटाखालून घ्यावयाचा खोगीर आवळण्याचा पट्टा ७ कमरेपासून खांद्यापर्यंतचें चिलखत, जाकीट. ८ गाडीच्या दांड्या ज्यांत बसवितात तो व गाडीच्या कण्यावर असलेला पेटीच्या आकाराचा लांकडी भाग ९ नदींतून तरण्याचा तराफा; सांगड. 'पेटी आणायासी गेले तेव्हां।'—रामदासी २ २८. १० (कों. नाविक) परभाणाचे तुकडे मध्यभागीं ज्या ठिकाणीं काड बांधतात, त्या ठिकाणीं विशिष्ट पद्धतीनें साधतात तें साधकाम ११ (विणकाम) सुताचे थोक एकत्र बांधलेलें बंडल, पुडकें. जितक्या नंबरचें सुत असेल तितके थोक त्या नंबरच्या सुताच्या पेटींत असतात. १२ (ल) खजीना. 'सबळ जनक माझा राम लावण्यपेटी।'—स्तोत्रमाला—रामदास, करुणाष्टक १. १३ बाजाची पेटी; (इं.) हार्मोनियम. १४ (ल) समूह; समुदाय. 'तयातें इंद्रियबैलांची पेटी। न म्हणे अवसीं पाहाटीं।'—ज्ञा १३ २९. [सं पेटक; हिं पेटी] **०वाला**—पु हार्मोनियमची पेटी वाजविणारा. **पेटी(टीं)ची, साखर**—स्त्री एक प्रकारची मऊ, पिठीसाखर ही चीनमधून पेटींतून येते **पेटु(टू)ळ**—न. लहान पेटी [पेटी]

**पेटें**—न. नदींतून तरण्याकरितां अनेक भोंपळे एकत्र बांधून केलेलें साधन; तराफा.सांगड; लहान नाव, पेटी 'कारभाराचें व्यसन खोटें। जैसें फुटकें पेटें।'—अमृत ११३ [हिं पेठा=भोंपळा] **पेटेकरी**—पु. १ माणसांना वरील पेट्यावर बसवून नद्यादिकांतून नेणारा इसम, सांगडवाला; नावाडी. २ ज्याच्याजवळ पेटें आहे तो.

**पेटें**—क्रिवि. बाबतींत; (कर्जफेडीच्या) पोटीं 'सरकार घेण्यापेटें जमा करविण्याची तजवीज केली पाहिजे.'—(बडोदें) खानगी खात्यांतील अंमलदारांचे अधिकार १५७ [गु पेट; पोट]

**पेटोली**—स्त्री. जिच्यावर घोडयाचा तंग बांधावयाचा ती पोटाखालची पट्टी —अश्वप [पोट]

**पे(पें)ठ**—स्त्री १ अनेक कारखाने असलेलें, व्यापाराचें शहर; बाजार गांव; कसबा. 'लुटली पेठ फिरंग्यानें।'—ऐपो ४४५. २ खरेदीविक्रीचें, देवघेवीचें ठिकाण; (कापड, धान्य वगैरेचा) विवक्षित बाजार. 'प्रणवाचिये पेठे। जाहलें शब्दब्रह्म माजिठें।'—ज्ञा ६.१०९. दुतर्फा दुकानें असलेला शहरांतील लांब रस्ता; दुकानांची ओळ. 'बाजार असा थाटाचा भरला होता कीं जणूं काय एक पेठ बसली आहे.' ३ शहराचा मोठा भाग. जसें.—पुण्याची शनवारपेठ; नारायण पेठ. ४ बाजारभावाची बातमी; सावकाराची खबर; बाजारभावाच्या चढ—उताराची माहिती. (क्रि० येणें) ५ खाजगी गुप्त बातमी; (सामा.) खबर; बातमी. ६ बाजारभाव. 'पेठ उतरली.' ७ किल्ल्याच्या किंवा गडाच्या खालचा मोठा गाव. ८ पेढीवाल्याचें बातमीपत्र ९ (अस्सल हुंडी हरवल्यामुळें) नवी केलेली हुंडी; हुंडीची पहिली नक्कल [सं पीठ=स्थान; द्रा पॅट=बाजार; हिं] (वाप्र) **०नसावी हो**—हें प्रसिद्ध होऊं देऊं नका, कोणास कळूं देऊं नका **०लागणें**—गुप्त गोष्ट बोलल्याची वगैरे बातमी फुटणें, पसरणें. सामाशब्द— **०करी**—पु. १ पेठेवरील, बाजारांतील मुख्य मनुष्य; पेठेवरील अधिकारी, वाकबगार, शेट्या पहा २ प्रत्येक गोष्ट जाणणारा व ती करणारा गांवचा कुळकर्णी. ३ एखाद्या परगण्याच्या किंवा गावाच्या जोशीपणाची पाळी क्रमाक्रमानें ज्याच्याकडे आली आहे असा माणूस **०चलन—नी, पेठ चाल—ली**—वि. पेठेंत किंवा मोठ्या गावात चालणारें (चलन, नाणें) [पेठ+चालणें] **०पाड**—पु पेठेंतील बाजारभाव. **पेठेचा गांव**—पु बाजारपेठ किंवा काहीं चांगलीं दुकानें असलेला व कधीं कधीं बाजार भरत असलेला गाव, लहानसें शहर, उतारमालाच्या खरेदी विक्रीचें गांव.

**पे(पें)ठवणी, पेठवणूक, पेठविणें**—स्त्रीन बिदागी पाठवणी इ० पहा. 'पेंठवणी मागा नका ठेऊं लिगाड।'—तुगा २८३. [पाठविणें]

**पेठा**—पु. गोल दुध्या भोंपळा [सं पिंडी; हिं. पेठा]

**पेड**—स्त्री. (गो.) एक मासळी

**पेड**—न. १ झाड; वृक्ष; बहुधा एखाद्या झाडाच्या नांवापूर्वी योजतात जसें.—आंब्याचें—खिरणीचें—बाभळीचें—पेड २ —नस्त्री. झाडाचें खोड, मुख्यत्वें जमीनीपासून फांद्या फुटेपर्यंतचा झाडाचा भाग. ३ —न (कों) (माड, पोफळी यांचा) दुसरीकडे लावण्यासाठीं, मुळांस इजा होऊं नये म्हणून बुंधाशीं थोडी माती ठेवून खणून काढलेला रोपा, कुंडी; हांडी. 'रोपाचा पेड जरा मोठा काढ.' ४ —न. झाडाचा घेर, घेरा. ५ (गो.) झाडाचा पार; वृंदावन. [हिं.]

**पेड**—पु १ पेढ; वेठ; एकेरी दोरी; पदर (दोरी, वेणी, पीळ इ०कांचा). २ —स्त्रीन. (कों.) जात्याची तळी. ३ —स्त्री. (कों.) उच्च आसन; बसण्याची जागा. ४ —न. (कों.) डोंगराच्या उतरणीवरचा सपाट जमीनीचा तुकडा, भाग. ५ (कु.) सापाचें वारूळ (विशेषतः मुंग्यांनीं केलेलें). असल्या जागेवर नागाच्या पूजेकरितां बहुधा देऊळ बांधतात. [का. पिडी]

**पेंड**—स्त्री. १ तीळ, खोबरें इ० कांतील तेल काढून घेतल्यावर राहणारा चोथा. जसें:—खोबऱ्याची—तिळाची—करडीची—उंडिणीची—पेंड. या पेंडीच्या सामान्य चार जाती आहेत. पैकीं पहिल्या तीन गुरांना घालतात व चवथीचा खताप्रमाणें उपयोग करतात. २ —पु पायाला किंवा जोडयाला चालतांना चिकटणारा चिखलाचा (ओल्या काळ्या मातीचा) गोळा; धान्याचा किंवा

दुसऱ्या ओल्या पदार्थाचा भिजून झालेला लगदा. ३ कोंवळ्या नारळांचा घड; नारळीस येणाऱ्या शहाळ्यांचा झुबका. ४ (शेकण्यासाठीं) चेचलेलीं आणि ऊन केलेलीं पानें; दुखलेल्या भागावर बांधावयाचा नारळाचा चव. ५ वेठीला धरलेल्या मनुष्यांनीं वाहिलेलें ओझें; अशा तऱ्हेनें वेठीचें ओझें वाहणें. ६ घराच्या पाटणीवर किंवा ओमणावर पसरलेला मातीचा थर. ७ (कों) मोठें ढेंकूळ; मातीच्या भिंती इ० घालण्यांत उपयोग केला जाणारा मातीचा गोळा; भेंडा. 'कीं पेंड आणि कर्पूर। कीं हंस आणि बुबड अपवित्र।' -ह २१.१६५. [सं. पिण्याक, सं. पिंड, प्रा. पेंड] **पेंडणें**-सक्रि. १ पेंड (वाफललेलीं पानें इ० चें) पोटीस बांधणें. २ छपरावर किंवा पहिल्या मजल्याच्या वरच्या जमीनीवर पेंड टाकणें. ३ कणगीचें तोंड चिखलानें बंद करणें. ४ बांधणें; गुंडाळणें. ५ गुंडाळणें; वळकटी करणें. [पेंड] **पेंड टाकणें**-लागवडीस आणण्याच्या जमीनीवर बाजूनें खुणेसाठीं ढेकळें टाकून बांध-वरळ्या घालणें ०वळणें-१ (मोठ्या प्रमाणांत, संख्येंत मनुष्यें, जनावरें इ०) मरणें; आजारी पडणें २ घरात अडकविणें, कोंडणें (ज्याप्रमाणें धनको रिणकोला कोंडतो त्याप्रमाणें). **पेंडओल**-स्त्री पेंडवल पहा. **पेंडखजूर**-पु. ओला, लगदा, गोळा झालेला खजूर. [पेंड=गोळा+खजूर] **पेंडवल**-स्त्री. (थोडासा पाऊस पडल्यामुळें झालेली) ढेकळाची ओल; जमीन ओली होणें; ओलावा. (समासांत) पेंडवल-जमीन-भुई-काळी-शेत-मार्ग-रस्ता. -वि. १ (क) किंचित् ओली झालेली (जमीन) २ (जोंधळा या शब्दासह) कणसांत दाणा असलेला **पेंडवल पाऊस**-पु केवळ जमीन भिजण्यापुरता पडलेला पाऊस. **पेंडसणें**-न. (कों.) तीळ, खोबरें इ० काचें तेल काढून घेतल्यानंतर राहिलेला चोथा. पेंड अर्थ १ पहा. [पेंड] **पेंडीचा खडा**-पु. गाणाऱ्या किंवा नाचणाऱ्याच्या कुरूपतेवरून श्रोते मंडळीचें लक्ष दूर करण्याकरिता तमासगिरामध्यें बसविलेला सुंदर, खूबसूरत मनुष्य. [पेंड=चोथा+खडा] **पेंडीचें गुरूं**-न. १ पेंडीची आवड असलेलें, पेंडीवर पोसलेलें जनावर. २ (ल.) लांचखाऊ; लांच घेणारा मनुष्य. [पेंड+गुरूं]

**पेंड**—पु. (मुद्रण) सरस चिकटविण्याचा रुळाचा दांडा.

**पेंड**—पु. खानदेश, नाशीक, सोलापूर या प्रांतांतील मांगांतील एक पोटजात. -अस्पृ ४७.

**पेंड**—पु. (व.) नदीचा घाट किंवा उतार असलेली जागा. जसें:-धोब्याचा पेंड. 'नांदुऱ्याचा पेंड सोपा.'

**पेंडकण**—न. कुंपणाचें कवाड, दार.

**पेंडका-गा**—पु. पेटका अर्थ ३ पहा.

**पेंडका-की-कें**—पुस्त्रीन. गवत, कडबा इ० काचा भारा, गठ्ठा, ओझें. 'पेंडकें टाकलें आहे त्याची मजुरी द्या.' [पेंड]

**पेंडु(डू)क**—न (कों) गवत, कडबा इ०चा लहान भारा, गठ्ठा.

**पेंडकें**—न. दोरीचें पेंढें किंवा धातुचें कडें. पेंढें पहा. [सं. पिंड]

**पेंडगूळ**—स्त्री. एक मोठी वेल.

**पेंडण**—न. (राजा.) मोदक इ० उकडताना त्यांस पाणी न लागावें म्हणून भांड्यांत घालावयाचा पाचोळा, पानें इ०.

**पेंडणें**—न (बे.) नांगराचा भाग; नांगराचें रुमणें.

**पेंडपोहो**—पु. आळशी ऐदी, जड, कांहीं, केलें तरी जो काम करीत नाहीं असा मनुष्य. [पेंड+पोहो]

**पेंडवळा-ळें**—पुन. १ मर्यादा; सीमा 'लाजेचा पेंडवळा। खाणोनि घाली।' -ज्ञा १३.६९५. २ (ल) भेंडोळा. 'तरि हे गंधर्वनगरीचे उमाळे। जाण पोकळीचे पेंडवळे।' -ज्ञा ११.४६४. [पेंड=ढेकळें+ओल]

**पेंडवॉ-वो**—पु (गो कु.) एक जातीचा लहान मासा

**पेंडस**—पुन १ (कों) दोन हात लांब, लाकडी दांडा असलेलें व खालीं चापट सरळ टोक असलेलें खोदण्याचें एक लोखंडी हत्यार २-पु (राजा) खळगे खणण्याचें फावडें; (कुंपण करताना) जमिनींत खळगे करण्याची मुसळासारखी लांकडी पहार, उत्कड; याच्या शेवटच्या लोखंडी पात्याला भाल म्हणतात. [पेंड]

**पेंडसळ, पेंडसा**—स्त्रीपु (राजा कों) पावसाळा संपल्यानंतर घराच्या वाश्यांवर पसरून टाकलेल्या गवताच्या पेंढ्या, भारे, ओमण (क्रि० घालणें, घेणें, टाकणें) [पेंड+सळ]

**पेंडळी**—स्त्री पुष्टता -हंको

**पेंडा**—पु. १ (कों.) ओल्या गवताचा किंवा वड इ०च्या पानांचा भारा २ भाताचें काड; भात्याण ३ विस्तव कायम राहावा म्हणून चुलींतल्या आहाराखालीं, फुफाट्यात ठेवलेला, अर्धवट वाळलेला शेणाचा गोळा [सं पिंड; म. पेंढा]

**पेंडा, पेंडार-री, पेंडी**—पेंढा, पेंढार इ० पहा

**पेंडापट्टी**—स्त्री. (नगदी किंवा मालाच्या रूपानें) फळझाडावर बसविलेला कर [पेंढा+पट्टी]

**पेंडाबंद**—पु. (संगीत) गाण्याचें ध्रुपद किंवा पालुपद. [?]

**पेंडाऱ्या**—वि. एका गांवापासुन दुसऱ्या गांवापर्यंत ओझें नेण्यास वेठीस धरलेला (माणुस). [पेंड]

**पेंडाळ**—पुन. एक कंदविशेष [पेंड+अळू]

**पेंडी**—स्त्री. (गो.) एक प्रकारचा मासा.

**पेंडी**—स्त्री. (व.) एक पानमळ्यांत होणारा कंद हा उपवासास खातात. [पिंड]

**पेंडी**—स्त्री पार्सल; सणंग; मालाचा बांधलेला गठ्ठा [पिंड]

**पेंडें**—न. १ मोत्यांच्या सरांची माळ. २ बिरडें; मुदन (दावणाची, दावणीची, गाड्याच्या घोडकीची वगैरे). ३ (कों) एका गटींतील, मेळांतील, परस्पर संबंध असणारी मंडळी; टोळी;

जूट; झुंड; जमाव. 'पंच, वादी, साक्षीदार असें सगळें पेंडेंच पेंडें उठून आलें.' ४ (विणकाम) जुंपणी आणि अटणी जोडणारी दोरी; बैला अथवा बैलीची दोरमुदन. ५ (ढोरांचा धदा) गोफण मारण्याकरितां कातडयाची केलेली वस्तु–आंगठा [सं. पिंड; का. पेणे=गुंडाळणें; प्रा पेंड=वलय]

**पेंडोळा–ळें**—पुन १ (दोर, नवार इ०ची) गुंडाळी; वेटोळें; गुंडी. २ भारा इ० बांधण्याचें साधन; पेंढीचें बंधन (वळलेल्या गवताचें, ओल्या सालीचें, लवचीक वेलाचें). ३ शेताची हद्द, सीमा दाखविणारा बांध, कड, रस्ता, रेषा इ०. ४ पेंडाची वळ, एका खेडयाहून दुसऱ्या खेडयाकडे जाणाऱ्या ओझ्यानें लादलेल्या वाहनांची किंवा वेठीस धरलेल्या लोकाची राग. ५ (ल.) क्रम; परंपरा; (यावरून) रूढी, वहिवाट; नित्यक्रम [पेंड १]

**पेंढ**—पु. १ पेंड अर्थ १ पहा. २ पेंड अर्थ २ पहा. ३ एक प्रकारचा निवडुंग. ४ –न. (कों) नारळ, पोफळ, माड, सुपारी इ०चें झाड (या शब्दाचा उपयोग रोप लावण्याच्या किंवा गणती करून कर बसविण्याच्या संबंधांत करतात) ५ पेंड अर्थ ४ पहा. [पेंड]

**पेंढ**—स्त्री. (गो.) पेंड अर्थ १ पहा [पेंड]

**पेंढका–की–कें**—पुस्त्रीन. भारा; पेंडका पहा.

**पेंढर–रा–री**—पुस्त्री. एक प्रकारचें झाड; याच्या फळास पेंढरें किंवा तूप केळें म्हणतात.

**पेंढा–डा**—पु १ दुधाचा खवा करून त्यांत साखर घालून तयार केलेली मिठाई; दूधपेंढा २ डोंगराच्या माथ्यावरील किंवा उतरणीवरील कांहींसा उंच व सपाट भाग. [हिं.] **पेंढवणी**–न. पेढयांचें ताट धुवून काढलेलें पाणी. [पेंढे+पाणी] **पेंढेघाट**–पु. पेढयाच्या आकाराचें रत्न (मोती किंवा माणिक). [पेढा+घाट] **पेंढेघाटी**–वि. पेढयाच्या आकाराचें (रत्न, जवाहीर, डबा).

**पेंढा**—पु. १ (कों.) भाताचें तृण; भात्याण. २ भात्याणाचा भारा, मोठी पेंढी. ३ भात्याणाच्या तीन घाडाचा भारा. ४ जोंधळे, भिजत घालून व अंबवून तयार केलेलें एक पेय; गुरांच्या किंवा माणसांच्या करिता भातेणापासुन तकार केलेलें एक पेय. [सं. पिंड्=गोळा होणें] **०भरून ठेवणें**–मेलेला वाघ, लांडगा यांच्या कातडयात गवत, भुसा भरून तें दाखविण्याकरितां ठेवणें.

**पेंढार–रा–री**—नपु १ लुटारू लोकांची टोळी, समुदाय, पेंढारी लोक. हे लोक घोडेस्वार असून अनेक मिळून गांव, देश लुटीत असत. २ (विशेषतः) पेंढारी लुटारूंची धाड (क्रि० घालणें). ३ गाई–म्हशीचे कळप घेऊन फिरणारे अहीर वगैरे. [सं पिंडार=गवळी]

**पेंढी**—स्त्री. १ बसण्याकरितां, जेवणाचीं ताटें, देव वगैरे ठेवण्याकरितां जमीनीवर केलेली उंच जागा. २ सराफकट्टा; सराफाची बैठक, बसण्याची जागा; सराफ, हुंडीवाला यांचें दुकान. ३ (गुज.) दुकान. ४ (अर्थशास्त्र) पैशाचा व्यवहार करणारी संस्था. (इं.) बॅंक. [सं. पीठ =आसन] **०वाला**–पु. पैशाचा, भांडवलाचा व्यापारी; पेढीचा मालक.

**पेंढी**—स्त्री. १ गवत, कडबा वगैरेची जुडी, लहान गड्डा, कापलेल्या जोंधळयाच्या ताटांची मुटींत मावेल अशी गड्डी २ पेंडें अर्थ १ पहा. ३ (कर्ज, व्याज वगैरेचें) ओझें; भारा. (क्रि० जमणें; होणें; असणें). (गो.) वस्त्राचा गठ्ठा. [पेंढा] (वाप्र) **जळत्यांत पेंढी टाकणें**–कलहास उत्तेजन देणें **०काडी**–स्त्री. (व्यापक) पेंढया. 'पेंढीकाडी मागायला बळुते आले.' [पेंढी द्वि.]

**पेंढें**—न. (विणकाम) १ बैलीच्या गुलडयाला अडकविलेलें धातूचें कडें किंवा दोरीची मुदन. दोरीचें एक आठबोटें रुंदीचें वाटोळें कडें केलेलें असतें व तें आट, चाळ, तनकूल, गुलडा वगैरेस ताण देण्यासाठीं उपयोगी पडतें २ ढेंकणी आणि वही यांना सांधणारा दुवा.

**पेंढ्या**—पु. एक प्रकारचा निवडुंग

**पेंढ्या**—पु. एक खेळ यात प्रत्येक मुलाजवळ एक एक पेंढी (गवताची) असावी लागते. हा फक्त पावसाळयांतच खेळतात. –मराठी खेळाचें पुस्तक ११७.

**पेण**—स्त्री. (प्र.) पाणकोळी पहा.

**पेण–णें**—न. १ मिरवणुकीच्या वेळीं पालखी उभी करण्याचें एक ठराविक ठिकाण, प्रवासांतील मुक्कामाची जागा. 'देवा तव कृपे वांचून। मीं न पावेंचि हें पेण।' –कथा २१. २ मुक्काम; मजल, टप्पा; मजलीवर थांबणें. 'करा एक वेळे पेणें। मग नलगे येणें जाणें।' [सं. आप्यायनम्]

**पेत्राल, पेत्रॅल**—न. (गो.) रॉकेल; घासलेट [इं. पेट्रोल, पोर्तु. पेत्रोलिओ]

**पेत्रोलो**—स्त्री. (गो.) एक फुलझाड.

**पेद्**—स्त्री. (गो.) शेताच्या (खाचराच्या) बांधाची कड मजबूत व्हावी म्हणून लावण्यांत येणारा चिखल

**पेंद**—न. (कों.) गवत, भात वगैरेचा जुंबडा; तृणादिकांचा एका बीजापासून अनेक अंकुर फुटून होणारा विशिष्ट समुदाय; नारळाचा घड. [सं. पिंड; म. पेंड] **०काढणें**–भातशेतांची, लावणी नंतर बेणणी करणें. **पेंदारणें**–अक्रि. (कु.) १ पेंद होई अशा रीतीनें विस्तृत होणें; विस्तारानें वाढणें (गवत वगैरे). २ झुबकेदार पेंदांनीं आच्छादित होणें (जमीन). [पेंद]

**पेदिद्**—पु. (गो.) मागणी; शब्दटाकणी.

**पेंदी–धी**—स्त्री. १ प्याला, भांडें वगैरेची बैठक, बूड. २ उडविण्याच्या पतंगाचा खालचा भाग. ३ कलमबंदी; पेंदवी. (क्रि० करणें; बांधणें) **०पतंग**–पु. पेंदी असलेला कागदाचा पतंग.

**पेदीद्**—पु. (गो.) पत्त्यांनीं खेळण्याच्या जुगाराचा एक प्रकार. [पोर्तु. पेदिदो]

**पेंवूर**—न. कोंकणांत होणारें एक झाड. यास ज्येष्ठ, आषाढ महिन्यांत पेरूएवढीं फळें येतात याचा रंग हिरवा असतो. यांची भाजी करतात. -वगु ४.८०.

**पेद्रो**—पु. (गो) स्मशानरक्षक

**पेंदो**—पु (कु) खेकडयाचा मगज किंवा पाय.

**पेद्रू**—वि दुर्बल; कमकुवत; निर्बल, भित्रा. 'वसईच्या किल्ल्यावर भगवा झेंडा रोंवतांना भेदारलेल्या एखाद्या पेद्रूला ... विचारलें असतें तर .. ' -नि ९५. [पोर्तु. पेद्रो]

**पेंधा**—पु. गोळा. -शर. -वि. मोडका; पांगळा. 'जे अनंगु तो पेंधा। निकवडा नुसधा।' -ज्ञा १३ ९८०. [पेंड] **पेंधें**—न. पडित जागेंत, शेतात उगवणारें गवत.

**पेनसिल**—स्त्री. १ दगडी पाटीवर लिहावयाची दगडी कांडी. २ (कागदावर लिहावयाची) शिसपेनसिल. [इं]

**पेनसी**—वि. (नंदभाषा) पन्नास 'तुम्हाजवळ पेनसी भुरके (रुपये) मिळतील काय?'

**पेनेत**—न (गो.) बायकांच्या कानांतील एक दागिना; ईअररिंग. [इं पेंडंट]

**पेन्शन**—न. ठराविक मुदतीपर्यंत चाकरी केल्यानंतर तहाहयात मिळणारा बैठा पगार. [इं.]

**पेपर**—पु. १ कागद. २ (परीक्षेचें) प्रश्नपत्रक ३ वर्तमानपत्र [इं.]

**पेपरमिंट**—न. १ पुदीन्याचा किंवा एका विशिष्ट वनस्पतीचा अर्क. २ हा घालून केलेली मिठाई. [इं.]

**पेपाणी, पेपेरें**—स्त्रीन (पानाची) पिपाणी; वाजविण्याची पोंगळी; पुंगी; नळी, शिटी. [ध्व.]

**पेमनें**—पुस्त्रीन. (व.) (निंदार्थी) पाणचट पातळ पदार्थ. 'साबुदाण्याचें पेमनें शिजविलें आहे, लागेल तर खा.'

**पेय**—स्त्री. (कु.) गुरांच्या पोटांतील एक रोग.

**पेय**—न. पिण्याचा पदार्थ. -वि पिण्यायोग्य, सारखें. [सं]

**पेर**—स्त्री. (कों. गो.) पेरूचें झाड -न पेरू; जांब. [पेरू]

**पेर**—पु. १ बैलांकडून मळलीं जावींत म्हणून खळयामध्ये कणसें वगैरे पसरणें; पात; अशा रीतीनें पसरलेलीं कणसें. (क्रि० घालणें). २ (पेरल्याप्रमाणें) धान्य, फुलें, कागद, वस्त्रें, निरुपयोगी वस्तु यांची पडलेली पखळण; पसरण (क्रि० घालणें; करणें; होणें; पडणें). अशा रीतीनें पडलेल्या वस्तू -स्त्री बीं; बीज; पेरणी. [पेरणें] **म्ह०** पेर तसें फळ.

**पेर, पेरकें**—न. १ बोट, ऊंस, वेळू इ० चें कांडें; तुकडा; पेरें; वेळू वगैरेच्या दोन गांठीमधील भाग. 'चौऱ्यांयशी लक्ष योनी। तियें कांडा पेरां सादणी।' -ज्ञा १४.१०७. २ बोटाच्या टोकांचा रोग. [सं. पर्व] ०**कंड**-(व) ज्वारीच्या ताटाचें, धांडयाचें पेर.

**पेरअळू**—न. एक झाड; गेळ.

**पेरओल**—स्त्री. पेरवल पहा.

**पेरकूं**—न. १ मोडलेलें, खडबडीत, निरुपयोगी पेर, कांडें; बोरू. २ (ल.) खेंकटें; अडचण, त्रास; लचांड. (क्रि० लावणें, लागणें; येणें; बसणें; जडणें). [पेर+कांडें]

**पेरकूट**—न. एकप्रकारचा निवडुंग. [पेर+कूट]

**पेरगांव**—स्त्री. (गो.) जाहिरात; दवंडी. [पेरणें, पसरणें] ०**कार**-पु. (गो.) दवंडी पिटणारा.

**पेरण**—न. पाण्याच्या आश्रयास वाढणारें सुंदर पानांचें झाड. हें सावलींत ठेवून यास पाणी घातल्यास हिरवेंगार राहतें. [इं फर्न]

**पेरण-णें**—न. (प्र.) पेहरण [सं. परिधान]

**पेरणें**—उक्रि. १ उगवण्यासाठीं जमीनींत बीं टाकणें, लावणें. २ पसरणें; पसरून टाकणें; फेंकणें. सांडणें. ३ (ल) पाया घालणें; आरंभ करणें, उत्पन्न करणें. ४ (ल.) पसरणें; फैलावणें (बातमी, खबर, चुगली, कंडया इ०). ५ (ल.) विद्यादि गुण प्रसृत व्हावयासाठीं शिष्यादिकांस शिकविणें. ६ (ल) अधिक प्राप्तीच्या इच्छेनें (व्याजाच्या बोलीनें) धन इ० दुसऱ्यास देणें. [सं. प्र+ईरय्; प्रा पेर, पइर; हिं पेरना] **पेरणी-पेरा**-स्त्रीपु. शेतांत बीज पेरणें; पेरणी करणें; बीजारोपण. **पेरीव**-वि. १ पेरल्यामुळें उगवणारें; सहजगत्या, आपोआप जें उगवलें नाहीं तें. २ पेरलेली (जमीन). ३ पेरलेलें (बीं, धान्य) **म्ह०** जसें पेरावें तसें उगवतें **पेरवल**-स्त्री. बीं पेरण्यायोग्य असा जमीनींतील ओलावा. [पेर+ओल]

**पेरवी**—स्त्री. पैरवी पहा.

**पेरसवाणा**—वि (व.) खिन्न; उद्विग्न. 'आईवांचून इतका वेळ राहिल्यानें मूल पेरसवाणें झालें.'

**पेरसोन**—वि ज्याचे कान मोठे व डोळे मनुष्यासारखे आहेत असा (घोडा), हें अशुभ लक्षण. होय. -अश्वप १.१०४.

**पेरा**—पु. (सोनारी) सोन्याच्या कांबीच्या गोल सळया बनविणें (आंगठी इ० करण्यासाठीं). [पेरें] **पेरांची अवटी**-स्त्री. सोनाराची अवटी; एक प्रकारचा पेरे किंवा सांधे असलेला एक पंचरस धातूचा तुकडा. याला आडवे रवे असतात. वावाची अवटी आणि बेटणी पहा.

**पेराज**—स्त्री. (कों.) (नाविक) होडीच्या काठांवर आडवी, जाड ठोकलेली फळी. ही सर्व गलबतांस नसते. [पेरें?]

**पेराव-वा, पेरावणी**—पुस्त्री. पेहराव; पेहरावणी पहा.

**पेरुजा, पेरोज-जा, पिरोजा**—पुन. वैदूर्य; एक रत्न. 'पांची पेरोज हीरे माणीकें।' -धवळे, उत्तरार्ध ५० [फा. फिरूझा]

**पेरू**—पु. जाबाचें झाड, फळ [ पोर्तु ]

**पेरू**—न. जमीनीवरील एक पक्षी; टर्की. –गृशि २.१०.

**पेरें**—न १ पेर-पेरकें अर्थ १, २ पहा. २ पेन्याच्या अवटीवर ठोकून ठसे, छेद पाडलेली सोन्या–चादीची सळई [सं. पर्व]

**पेरुळन्या**–पु चरकात घालावयाचीं उंसाचीं पेरीं तोडणारा.

**पेर्ण**—स्त्री. ( गो ) सरकस.

**पेऱ्या**—पु. एक जातीचा घेवडा [ पेरें ? ] –कृषि ५८६.

**पेर्वी**—स्त्री (गो.) एक जुन्या काळचा दागिना ०**वेट**–न (गो.) पेर्वी करण्याचें सोनाराचें एक हत्यार

**पेल**—पु तोलण्या–सावरण्याची क्रिया. (प्र.) पेलाव पहा.

**पेलकट**—न. निंदा; आरोप, आळ, ( क्रि० घालणें; येणें ).

**पेलण-णी**—नस्त्री. १ तोल राखणें; पेलणें, समतोल. ( क्रि० राखणें, ठेवणें ) २ वजन, वर्चस्व; जोर ( क्रि० चालवणें, चालणें ).

**पेलणें-नें**—न (कों) छपरावरील गवत इ० न उडावें म्हणून त्यावर आडवी ठेवलेली ताड इ०ची फांदी या कामाकरितां जर जंगली लाकडाचा उपयोग केला असेल तर तें आडवें न ठेवतां मुगळापासुन लोंबतें ( वरून खालीं असें ) ठेवतात.

**पेलणें**—सक्रि. १ समतोल राखणें; तोल संभाळून धरणें; स्थिर, समतोलात राखणें ( ओझें, उभी काठी इ० ). २ मुद्गल, लेजीम इ० शरीर दृढ करण्यासाठीं फिरविणें ३ ( ल. ) निभावणें; झेपणें, रेटणें, पार पाडणें ( अडचणींतून ), आटपणें, चालविणें; व्यवस्था लावणें ( पेसा, शक्ति, बुद्धि इ० कांच्या जोरावर ). ४ दामटणें, हाकलणें. पुढें लोटणें ( मनुष्य, जनावर ); पुढें रेटणें, ढकलणें, धकविणें ( सैन्य ), दवडणें, पाठविणें ( दूत ) ५ लोटणें 'राम पहाया पेलती।' - वेमीस्व ९ ७३. ६ घर, खांब इ० एका अंगावर कलणें ७ तयार होणें 'तंव पुढां वाढी पेले। नवेया देहांची।' –ज्ञा १५ १६०. ८ भरणें. –मनको [ सं प्रेर् प्रेरण, प्रा पेरण, पेल्लण; पेल्लइ ] **पेलाव, पेल**–पु. १ उचलणें, तोलणें ( वाहून न्यावयाचें ओझें ); शरीर पेलणें किंवा समतोल राखणें ( उडी मारण्याच्या वेळीं ); शरीराचा तोल २ ( यत्नाचा कामाशीं मेळ बसण्याकरितां ) निश्चित व संघटित यत्न [ पेलणें ]

**पेलव**—स्त्री. ( कों ) पेळू

**पेलवान**—पु (प्र.) पहिलवान. पहा. [ हिं. ]

**पेला**—पु. १ धातु, कांच, माती इ० चें पाणी, पय पिण्याचें भांडें; प्याला. २ ( विणकाम ) ताण्याच्या सुनांचे आलटून पालटून वर–खालीं होण्यामें त्यांत पेल्यासारखा उत्पन्न होणारा आकार ३ ( शिवण ) मरदारी अंगरख्याचा (छातीवरील) पेल्यासारखा गोल भाग. 'गिर्वाणावरून उजवे कडील पेल्याच्या आकारास त्या आकाराची पट्टी बसवावी.' –शिकशि २.२०. [ वैदिक सं. पेरु, फा प्याला ]

**पेला, पेलें**—पुन. ( कु. कों. ) काटयांचा, झाडांच्या डहाळयांचा कुंपणाकरितां बांधलेला भारा, ओझें. [ पेलणें ]

**पेली**—स्त्री. १ ओली साल, लांकूड. 'कलियुगांतीं कोरडीं। चहू युगाचीं सालें सांडी। तंव कृतयुगाची पेली। देव्हडी पडे पुढती।' –ज्ञा १५.१२९ २ उत्पत्ति. –शर.

**पेळू**—स्त्री. केसांच्या जटा; जटाच्या केसांचा झुबका. पेळू पहा.

**पेलोवेली**—स्त्री. वाढ; वृद्धि. 'पाठीं रूपपत्र पेलोवेलीं। चक्षु लाबतें कोडें घाली।' –ज्ञा १५ १०२.

**पेल्याड**—स्त्री. ( गो. ) पैलतड; पलीकडील जागा. [ पैलाड ]

**पेल्ल**—पु. ( गो ) चेंडू.

**पे(पें)व**—न. धान्य सांठविण्याची जमीनींतील कोरडी विहीर; जमीनींतील कोठार. 'काय मुख पेंव श्वापदाची धांव। नित्य तुझें नाव नुच्चारिता।' –तुगा ९०४. [ ? ] ०**फुटणें-उघडणें**–भराभर बाहेर पडणें; गोळा होणें 'भिकाऱ्याचें–ब्राह्मणांचें–मुंग्याचें–पेंव फुटलें.' ०**भरणें**–(बायकी) चातुर्मासात देवापुढें सुमारें कोळवेंभर धान्य मावेल असे दोन खळगे काढून एकात तांदूळ व एकांत दाणे असे रोज घालून उदक सोडणें. **पेवांत पडणें**–मोठ्या त्रासात, संकटांत पडणें. ०**बुड**–स्त्री. पेव उपसुन धान्य काढतांना गांवचा कुळकर्णी व महार यांना हक्क म्हणून त्यांतून थोडें धान्य द्यावें लागते तें.

**पेवगो**—पु ( कु. ) एक पक्षी

**पेवडी**—स्त्री पिवडी; पिवळा रंग, पळसाचीं फुलें गोमूत्रात भिजवून तयार केलेला पिवळा रंग. [ पिवळा ]

**पेवणें**—अक्रि. ( राजा. ) पोहणें. ( गो. ) पेवप; पेवचें.

**पेंवणी**–स्त्री ( राजा ) पोहणें (क्रि० मारणें; टाकणें). [ पोहणें ]

**पेवंदी-धी**—स्त्री. झाडाचें कलम बांधणें; कल —धा—वि. १ कलम केलेलें ( झाड ) २ ठिगळ लावलेला; ठिगळाचा. [ फा. पेवंद ]

**पेवली**—स्त्री. (व) विडयाचीं पानें ठेवण्याची टोपली. [ पेव? ]

**पेशा-शें**—पुन १ एक वनस्पति. २ एक औषध.

**पेश**—वि. वजनदार; दरबार वगैरे मध्यें मान–मान्यता असलेला; सन्माननीय ( माणूस इ० ). 'राजकारणांत बहुत पेश.' –पेद२१.९१ [ फा. पेश् ] ०**करणें**–पुढें ठेवणें; सादर करणें (अर्ज इ० ); अर्पण करणें. 'बंदगीस पेश केली.' –इमं ६५. ०**कदमी**–स्त्री. १ पुढें पाऊल टाकणें; प्रगति. 'दिवसेंदिवस त्याचे फौजेची पेशकदमी आहे' –रा ६.४३७. २ पहिली हालचाल; युद्धाची हालचाल. 'जितका मुलूख आपले काबूंत येईल तितका पुर्तेपणें बंदोबस्त करून मग पुढें पेश–कदमी करणें ठीक आहे.' –दिमरा १.१८०. ३ आगळीक. 'आम्हांकडून अंतर नसतां तिकडून पेश–

कदमी झाली तेव्हां इकडून पेशकदमीची तर्तुद करणें प्राप्त झालें.' -ख ८.४०२८ [फा] ०कार-पु १ मदतनीस, नायब. मुतालीक, अर्ज पेश करणारा, व्यवस्थापक, प्रधान, मुनीम. २ (व.) फडणीस; अवल कारकून; नायब तहशीलदार [फा.] ०कारी-स्त्री. नायबी, मुतालिकी. 'यास्तव कालिकादासास सफूशिकन् खानाची पेशकारी सांगितली' -रा १ ५४. ०दस्ती-स्त्री १ व्यवस्था; पैरवी. 'मोहिबाकडून असें अमलात येत असता सरकार तर्फेनें पेशदस्ती होत नाहीं.' -रा १० १२८. २ चाल पेशन्देश-पु. दूरदृष्टि, पूर्ण विचार पेशामद-स्त्री. प्रगति; बढती. 'काम मोठें हौसला थोडा, कसेंही करून पेशामद करावी म्हणून बोलावयास जातात.' -रा ५.११. [फा. पेश्+आमद्]

**पेश(ष)कबज, पेशकबाज**—न एक प्रकारची कट्यार. 'तिणें पेशकबज चालविलें तें माडीवर लागू जाहलें' -ऐटि १.१६. [फा. पेश्कब्ज्]

**पेशकश(स्क)-ष, पेशकसी-शी**—पु देणगी, मानपान, वंशपरंपरागत हक्क इ० मिळाला असता त्याबद्दल सरकारास द्यावा लागणारा नजराणा, खंडणी, रकम. 'त्या फर्देवर पातशहानीं दस्तक केलें माकूल पेशकस सरकारांत दिधलिया देऊं.' -दिमरा १.२४०. [फा. पेश्कश]

**पेश(ष-स)कळी**—स्त्री अंगरख्यास पुढच्या अंगास लाविलेला त्रिकोणाकृति तुकडा; पुढच्या बाजूला येणारी कळी. 'पेषकळयांची तिरपी बाजू जोडावयाची.' -शिकशि २.२८ [हिं]

**पेशखाना, पेशखेमा**—पु.प्रवासात अगोदर पुढें पाठवावयाचे डेरे वगैरे मुक्कामाचें व बिऱ्हाडाचें सामान, प्रस्थानमंडप 'नेरल्याहून पांच कोस तेथें पेशखेमा पाठविला आहे.' -दिमरा १.८६. [फा. पेशखाना, पेश्खैमा]

**पेशगी, पेश्गी, पेसकी**—स्त्री. आगाऊ दिलेली खर्ची; इजाऱ्यापैकीं आगाऊ द्यावयाची रकम. 'स्वारास एकेक महिन्याची पेशगी बिलाकसूर देणें.' -रा १.३७. [फा. पेश्गी]

**पेशजी-र्जी**—क्रिवि (पत्रव्यवहारांत) पूर्वी, मागें; वर्तमान काळाचे पूर्वी; मार्जी 'पेशजी आपली पत्रें आलीं व हालीही तुमचीं पत्रें आलीं.' -रा ८.१२४. [फा. पेश्+अर्झी]

**पेशबंद**—पु. घोड्याचें खोगीर न सरकण्याकरिता बांधावयाचा पट्टा; परोबंद. -राव्य ५ १४. [फा.]

**पेशमान, पेश्मान**—वि. कष्टी; दुःखी; दिलगीर; पस्तावलेला. 'खान ... स्वामीची खंत चित्तांत आणून पेश्मान जाहला.'-चित्रगुप्त ४५ [फा. पेश्मान्] **पेश्मानी**-स्त्री. पस्तावा; दुःख. 'सर्वांनीं तीर्थरूपाचे आज्ञेचे आधीन रहावें हें ज्यास अमान्य त्याजकडेच पेश्मानी, बुद्धिदोष, दूषण.' -चंद्रचूड दप्तर १३९. [फा]

**पेशर(स्र)फ्त**—वि. यशस्वी. 'यांची गोष्ट पेश्रफ्त जाली नाहीं' -रा ५.६५. [फा.]

**पेशवा, पेश्वा**—पु मुख्य प्रधान; साताऱ्च्या छत्रपतींचे मुख्य प्रधान; पंतप्रधान; मराठ्यांच्या राज्यातील मुख्य प्रधान. [फा.] **पेशवाई**-स्त्री प्रधानकी; पेशव्यांचा अंमल, कारकीर्द, पदवी. **पेश्वायगिरी**-स्त्री प्रधानकी 'पेश्वायगिरीचीं वस्त्रें तुम्हास देतों.' -भातृसंग्र १०. **पेशवेशाही**-वि. पेशवे थाटाचें. 'अफ्तागीर घ्यावें पेशवेशाही.' -भातृसंग्र ६५.

**पेश(ष)वाज, पेशवात-द**—पु पुढें खुला असलेला झगा (विशेषत नर्तकी स्त्रियाचा) दोन दोन पेशवाज मात्र ठेविले' -रा ५ १८०. [फा पेश्वाझ्]

**पेशा**—पु धंदा, उद्योग, वृत्ति, रोजगार; बाणा, काम; खातें. (समासांत) कारकून-शागीर्द-चाकर-पेशा उदा०पांढरपेशा= मजूर किंवा शेतकरी नसलेल्या लोकांचा वर्ग [फा.]

**पेशा(सा)ब**—पु मूत्र, पिशाब (क्रि० करणें) [फा]

**पेशीन**—वि. पूर्वीचें 'सनद असनाद पेशीन मुकरर जाणोन -थोमारो ६५ [फा]

**पेषण**—न दळणें, जात्यातील दळण. 'दळण कांडण पेषण चाळणें।' -सारुह ३.५२ [सं.] **पेषणें**-उक्रि. दळणें, पिसणें.

**पष(स)णूक**—स्त्री (को.) पिशाच्च दुसऱ्यावर घालणें, दुसऱ्यास उपद्रव देण्याकरितां भूत उठविणें [सं प्रेषण]

**पेस**—स्त्री (राजा) फाक, तुकडा, शकल (कांकडी इ०चें).

**पेसणें**—उक्रि. १ पेषणूक पहा २ फोडी करणें; चिरणें

**पेसपाड**—स्त्री. ताळतंत्र -शर.

**पेस्तर**—वि पुढील; पुढील काळचा; आगामी, भावी. (समासात) पेस्तर-साल-वर्ष-मास-दिन-रोज 'पेस्तर सालीं शत्रू आपण पहातच आहों.' -पाब ४४. २ पुढील (वर्षे). 'पेस्तर-जमाबंदी-वसूल-इस्तावा-लावणी-मुजरा-हिशेब.' [फा. पेस्तर]

**पेह**—पु पोटफुगी; जलोदर 'पेहाचें पोट विस्तीर्ण।'-दा ३.६.२०. [फा]

**पेहरणी-णें, पेहरा**—(प्र.) पेरणी-णें, पेरा पहा.

**पेह(हि)रणें**—उक्रि. परिधान करणें; अंगांत घालणें; पांघरणें. [हिं पहिरना] **पेहरण, पेहरणें**—स्त्रीन. सद्रा; कुडतें, पैरण; लहान मुलाचें अंगडें. [सं. प्रावरण; फा. पैरहन्]

**पेह(हि)राव, पेहरवा**—पु पोशाख; पोशाखाची तऱ्हा; पेराव. 'कलावतीण. .उच्च पेराव करून साबाजी अनंताच्या घराप्रती जाण्यास तयार जहाली.' -भाइसं[?] २११. 'पेहरवा करिन मी आपला भोळा मऱ्हाठी.' -सला ३८. [सं परिधा; तुल० प्रा. परिहा, हिं. पहिरना; गु. पेहरवुं; सिं. पेहरणु; पं पहिरणा]

**पेहें**—न. पेय पदार्थ. ' तया ओरसे वेतुसे पेहें।' -ऋ २. [सं. पेय]

**पेळ**—स्त्री. (कु.) अंगण, खळें इ०च्या भोंवतालची वरवंडी.

**पेळणी**—स्त्री. भांड्यांचें तोंड रुंदावण्याचें हत्यार. -बदलापूर ९६.

**पेळा**—पु. (गो.) एक जातीचा लहान मासा. -मसाप ३.३.

**पेळी**—स्त्री. (गो) कडधान्याचें कढण; कट.

**पेळी**—स्त्री. (गो.) बांबूच्या वेळांची किंवा वेताची लहान करंडी; संबळी; पेटारा (स्नानसंध्येचें सामान ठेवण्याचा).

**पेळू-ळूं, पेळव-ए**—पुस्त्री. १ (कों.) कापसाची वळी; सुंभ वळावयाकरितां काथ्याचा वातीसारखा केलेला आकार. २ गुरांचा एक रोग. **पेळूं**—न. (कों.) गुरांच्या पेळूसारखें मनुष्यास होणारें खांडूक, उठाणू. [पीळ]

**पेळेर**—पु. (गो.) काश्याची पितळी.

**पेक्षां**—उभ हून; अपेक्षया. ' या पेक्षां हा उत्कृष्ट आहे.' [सं. अपेक्षया]

**पेक्षां, पक्षीं**—क्रिवि. ज्याअर्थी; त्याप्रमाणें; म्हणून, असें झाल्यामुळें. (ज्या, त्या, या शब्दांस जोडून प्रयोग). ' ज्या पेक्षां तुम्ही आलां त्या पेक्षां वस्तू दिली पाहिजे.' [सं पक्ष]

**पै**—स्त्री. आण्याचा बारावा भाग; पैशाचा तिसरा हिस्सा; अर्धी. [पैसा]

**पै**—स्त्री. (मुद्रण) त्यांच्या त्यांच्या घरांत न टाकतां एकत्र गोळा झालेले, अर्थात् निरुपयोगी निरनिराळ्या अक्षरांचे टाईप.

**पैं**—क्रिवि. (काव्य) पादपूरक, वाक्यालंकारार्थक अव्यय; याचा अर्थ खात्रीनें, निश्चितपणें असा होतो.' पैं आयुष्यहीना जीवातें। शरीर सांडी जेवी अवचितें।' -ज्ञा १५२९१. [सं. वै]

**पैक-कु**—पु. समुदाय. ' म्हणूनि प्राणियांच्या पैकीं। पडिली श्रद्धा अवलोकीं।' -ज्ञा १७.६१. [का.]

**पैकडी**—स्त्री. (राजा) मधमाशा राहतात तो पोळ्याचा भाग.

**पैक(ख)णें**—सक्रि. (काव्य, अशिष्ट) वाट पाहणें; मार्ग-प्रतीक्षा करणें. [सं. प्रेक्षण]

**पैका**—पु १ पैसा; द्रव्य. ' समर्थी म्हणती पैका वेंचूं।' -अमृत (नवनीन पृ. ४४३). २ रुपयाचा चवथा भाग किंवा शिवराईचा बारावा भाग. ३ (व.) पैसा; चार कवड्या. [लॅ. पेक्यु-पेक्युस=पहिला अर्थ पशु, नंतर पैसा. पेक्युनिया=पैसा. इं. पेक्युनियरी] **पैकेकरी**-पु. श्रीमंत; धनाढ्य मनुष्य, ज्याच्याजवळ पैसा आहे असा मनुष्य. **पैकेपूत**-पु. पैशाकरितां मी तुमचा मुलगा आहे असें म्हणणारा. [पैका+पूत] **पैकेपूर**-वि पैशांनीं परिपूर्ण; अत्यंत श्रीमंत, धनाढ्य. ' घरंदाज कुळ शुद्ध प्रथमवर सुरूप पैकेपूर।'-प्रला १०२. [पैका+पूर्ण] **पैकेवान्**-वि श्रीमंत

**पैका(खा)ना**—पु. संडास; शौचकूप. [फा. पाखाना]

**पैकाना**—पु. (राजा; कों.) नारळ वगैरेच्या पान, विरी, डहाळ्या इ०चा (घाण वगैरे लोटण्याचा) खराटा. [फा पाखाना]

**पैकाळा**—पु. (कों.) घरकाम, मालमत्तेचें संरक्षण इ० करण्यासाठीं ठेवलेला पगारी किंवा भाडोत्री नोकर. [पैका]

**पैकीं**—शभ. मधील; मधला; आंतला; अनेकांतून एक. ' समस्तांही यज्ञांच्या पैकीं। जपयज्ञ तो मी ये लोकीं।' -ज्ञा १०.२३२. [का. पैक; पैकी]

**पैग(गा)म, पैगमबर, पैगमबरी नवसागर**—पेगम इ० पहा.

**पैंगळ**—पु. किडा; पिंगूळ (गो.) पैंगीळ. [पिंगूळ]

**पैगामा**—पु. हवलाढवल; धुमाकूळ; दंगा. ' अशी ताकीद देवावी कीं तुमचे फौजेपैकीं कोणी पादशाही मुलखांत पैगामा करूं नये.' -रा ८.७७. [फा.] ०**पैगामी**-स्त्री. बोलाबोली; जाबसाल; प्रश्नोत्तर. ' दोन चार रोज पैगामा पैगामी जाली.' -रा २०.३८.

**पैंगुली**—स्त्री. एक फुलझाड बैंगुली पहा.

**पैज**—स्त्री. १ होड; शर्यत. (क्रि० करणें; लावणें; घालणें). २ पण; प्रतिज्ञा; एखादी गोष्ट करण्याची प्रतिज्ञा करणें व अपयश आल्यास शिक्षा, दंड भोगणें. ' परी पैजेवीण आवेशरस। सहसा जाण उपजेना।' -मुसभा १४.१२. ३ करार; ठराव; वायदा; बोली. (क्रि० मारणें; करणें; पाडणें; बोलणें). [देशी ? पोर्तुजिप्सी. पार्ने=नशीब] **पैजेचा विडा**-पु. एखादें बिकट काम करण्यास कोण धजतो हें पाहण्यासाठीं दरबारांत विडा मांडीत व ज्याची काम पुरें पाडण्याची छाती असे तो उचली; यावरून अवघड काम करण्याची प्रतिज्ञा करणें.' विडा पैजेचा उचलूं नको।'-अफला ६०.

**पै(पैं)जण**—पु. स्त्रिया किंवा कबूतरें यांच्या पायांतील रुप्याचा एक दागिना, वाळा; तोरडी; नूपुर. ' सोनियाचा पैंजण। मुकुटमणि केला हीण।' -तुगा २२६८. [हिं.]

**पैजार**—स्त्री. विशेषतः मुसलमानी पद्धतीचा जोडा, पायपोश पहा. ' मेरे रामको नाम जो लेवे बारोबार त्याके पाऊं मेरे तनकी पैजार।' -तुगा ४३८ [फा.] ०**खाऊ**-वि खेटरखाऊ; हलकट; क्षुद्र; नीच; निर्लज्ज; कुप्रसिद्ध (मनुष्य). ०**पगडी-पागोटें**-स्त्रीन. विशेष रीतीनें पैजाराच्या डौलानें बांधलेलें पागोटें. [फा. पैजार+हिं. पगडी]

**पैजाळ**—वि. उग्र; प्रखर. 'तळीं सुदलीं भासना सात प्रेतें। शिरीं बांधिले व्याल पैजाळ जेथें।' -मुरामा युद्ध २१३. [सं. प्रज्वल]

**पैठ**—पु. १ परिपाठ. २ रीतरिवाज. ३ प्रस्ताव; मार्ग; प्रवेश होणें ४ (व.) पद्धत. पैठा पहा. [सं. प्रविष्ट; प्रा पइट्ठ=मार्ग, रस्ता; हिं. पैठा; आर्मेजि. पेजेल=आंत शिरणें]

**पैठणी**—स्त्री. १ रेशमी, रुंद, नक्षीदार जरीकाठी, पैठण गांवीं विणलेलें लुगडें. ' पैठणि नेसूनि शाल पांघरली।' -कमं २.

–वि. १ पैठण गांवासंबंधीं, गांवाचें (पागोटें इ०). २ (ल.) पोकळ; खोटा; दिखाऊ; लबाडीचा. [सं. पत्तन, प्रतिष्ठान] ०**आदर**–पु. वरवरचा, बाह्यात्कारी आदर; खोटा, दिखाऊ, सत्कार. 'पुरे करा पैठणी आदर, वरवरी हो।' –प्रला १०७.

**पैठा**—पु. प्रवेश; शिरकाव. 'भीतरीं जाहला पैठा। मारिला व्याधीचा कुरठा।' –कालिकापुराण २७.२. [सं. प्रविष्ट; प्रा. पइट्ट=मार्ग, रस्ता; हिं. पैठा; आर्मेजि. पेजेल=आंत शिरणें] ०**करणें**–प्रविष्ट करणें; स्थापणें. 'ते निजभक्ति माझी जननी। ज्या पैठा केलों जनार्दनीं।' –एभा २५.५५५. ०**होणें**–प्रवेश करणें; जाऊन पोहोंचणें; परिणामकारक होणें. 'काम कामिका चपळदृष्टी।...। संधि साधूनि विंधे हृटीं। ते नव्हेचि पैठी हरिरंगीं।' –एभा १२.१५३. **पैठणें**–अक्रि. १ प्रविष्ट होणें. २ बसणें. 'मग पैठें होइजे महापदीं। निजात्मयोगें।' –स्वादि १०.४.६१. [हिं. पैठना]

**पैण**—स्त्री. नायट्यासारखा एक रोग; आगपेण.

**पैण**—स्त्री. (काव्य) पैज; होड; शर्यत; करार. (क्रि० करणें; घालणें). [सं. प्रतिज्ञा; प्रा. पइण्णा=शपथ] ०**भोगणें-बाळगणें-पाळणें-धरणें-मारणें-१** (पैजेस तयार असणें) आग्रहानें, निश्चयानें पाठपुरावा करणें; एखादी गोष्ट करण्याची धमक बाळगणें. २ एखाद्याबद्दल तिरस्कारयुक्त आदर असणें.

**पैण**—न. (कों.) वाळलेलें गवत. पयेण, पय्राण पहा.

**पैत**—वि. (नंदभाषा) सात. **साडे पैतगंडे**–तीस संख्या

**पैतृक**—न. १ पितरांचें श्राद्ध. [सं.] **पैतृक, पैत्र**–वि. पूर्वजासंबंधीं; वाडवडिलांसंबंधीं. [सं.]

**पैत्य**—न. पित्त. [पित्त] **पैत्तिक**–वि. पित्तासंबंधीं. [सं.]

**पैदरपै, पैदर्पै**—क्रिवि. लागोपाठ; एका मागून एक. 'पैदर्पै विनंतिपत्रें सेवेसी पाठवितों.' –दिमरा १.८. [फा. पै-दर-पै]

**पैदा**—वि. १ मिळविलेलें; संपादित; प्राप्त केलेलें; निर्माण केलेलें. 'काणवानी मस्ती पैदा करून.' –इऐ ५.१००. [फा.] ०**गिरी**–स्त्री. उकळणूक; (बहुधा जुलमानें गोळा केलेला) वसूल; बलात्कारानें घेतलेलें धन. 'दरीं वस्त पनालेस विजापुराहून एक हवाल्दार गैरमहसूल पैदागिरी कबूल करून आला.' –इऐ ५.१००. [फा.] **पैदास-स्त**–स्त्री. १ नफा; फायदा; मिळकत. २ उत्पत्ति; उत्पन्न; उपज; निपज. ३ (व.) 'पैदास्ती वरील नेमणुकीमुळें साहुकारांस उपद्रव होऊन साहुकारी बुडेल.' –मराआ ३६. अमदानी. [फा. पैदाइश्]

**पैन**—पु. घोड्याचा एक रोग; शिंगाडा. यानें कानांत मांस वाढतें, छेद बंद होतात, पिंवळें पाणी निघतें. –अश्वप २.१३५. पैण पहा.

**पैन**—न. (कों.) पैण; वाळलेलें गवत.

**पैवंदी**—स्त्री. १ बंधन; व्यवस्था. 'स्नेहाचे वृद्धीची पैवंदी करीतच आहों.' –दिमरा १ ३९. २ पेवंदी पहा. [फा. पैवंद=संबंध]

**पैमाल**—वि. (ना.) कःपदार्थ; तुच्छ. [पाय+माल]

**पैमाश-ष-स, पैमाशी-षी, पैमायष**—स्त्री. शेत जमीनीची मोजणी व नोंदणी; मोजणी; जमीन-धारापद्धति टरविणें; सर्व्हे आकारणी. 'तीस वर्षांच्या पैमाषीची चाल मोडून कायमधाऱ्याची पद्धत सर्वत्र स्थापावी.' –आगर ३.११८. [फा. पैमाइश्] ०**आकार**–पु. जमीन मोजणीनंतर बसविलेला धारा. ०**खातें**–न. जमीनमोजणीचें खातें. ०**दार**–पु. मोजणीकामगार.

**पैर**—क्रिवि. (गो.) परवां. 'तो पैर आयलो' [परवां]

**पैरण**—स्त्री. (कु.) सदरा; अंगरखा. 'सरी बिंदली आंगडें पैरण।' –श्रीकृष्णाचा पाळणा ३. [सं. प्रावरण; हिं. पेहरना]

**पैरव-वी**—पुस्त्री. १ जाण्यायेण्याचा राबता; जाणें-येणें; दळणवळण. २ संबंध. 'कितेक हुजूर येणार ते नाउमेद होऊन केलेली पैरवी सोडतील.' –राज १२.६७. ३ व्यवस्था. 'तदुत्तर महाराजांनीं राज्याचा बंदोबस्त करावयाची हिंमत धरिली आणि पैरवीस लागले.' –चित्रगुप्त ७५. ४ विचार; वाटाघाट; चर्चा. (क्रि० घालणें; ठेवणें). 'पुढें ते कागद हस्तगत करून घ्यावेत या पैरवीत आहेत.' –ख ९.५०४२. ५ पाठलाग. 'चहूंकडून तंग करून खुश्कींत पुन्हां पैरवी न करीत ऐसे केलें असता पातशाहींत नक्श.' –दिमरा १.६३. ६ मागेंजाणें. ७ ढवळाढवळ. [फा. पैरवी]

**पैरा**—पु. १ (राजा. कु.) मजूरी करणारा; रोजकरी; हातकाम्या. २ हंगाम; पाळी (तापाची) ३ इरजीक; वारंगुळा पहा.

**पैरें**–न. १ (राजा) दिवसाच्या बोलीनें मजूरीवर लाविलेली स्त्री किंवा मुलगा. २ रोजंदारीचें एका दिवसाचें काम, मजूरी. (क्रि० घालणें). ०**पण**–न. १ पैरें केल्याबद्दलची मजूरी. २ पैऱ्याचें काम.

**पैराव-वा**—पु. पोषाख; पेहराव; तो करण्याची विशेष तऱ्हा, रिवाज. [हिं. पेहराव] **पैराव(वि)णें**–सक्रि. पोषाख, वस्त्र देणें. 'सर्व आपुलें दळ पैराविलें.' –मब ३९.

**पैल**—वि. (काव्य) दुसरा; समोरचा; पलीकडचा (तीर, किनारा, बाजू). 'पैल तीर-थड-पार.' –क्रिवि. पलीकडे. 'हा अश्वत्थामा पैल पाहे।' –ज्ञा १.१०७. ०**तड**–न. (कों.) पलीकडील किनारा, तीर. [पैल+तट] ०**थड-डी**–स्त्री. पैलतड. ०**पार**–क्रिवि. (काव्य) पलीकडच्या बाजूस, तीरावर; पलीकडे. 'पोत पालवी कां पैलपारीं।' –मुविराट ६.१०३. –पु. पलीकडील तीर, बाजू. [पैल+पार] **पैलती**–क्रिवि. (काव्य) पलीकडल्या तीरावर. 'पैलती खोबळीमाजी साचार। जिव्हाळा दिसतो पाणियाचा।' [पैल+तीर] **पैला**–वि. (काव्य) दुसऱ्या, समोरच्या, पलीकडच्या तीराचा, बाजूचा. [पैल] **पैलाड**–स्त्री. समोरचा, पलीकडचा किनारा, बाजू. –क्रिवि. पलीकडे. 'पंपासरोवर पैलाड

बेटीं।' -दावि ४८. [पैल+आड] **पैलाडी**-क्रिवि. पलीकडचा. 'मग समुद्रापैलाडी देखे।' -ज्ञा ६ २६९. **पैलीकडचा-ला**, **पैलीकडील**-वि. पलीकडल्या स्थळासंबंधीं, काळासंबंधीं; दूरच्या बाजूचा, तारखेचा. **पैलीकडून**-क्रिवि. पलीकडून; दूरच्या, पलीकडच्या काळापासून, बाजूपासून. **पैलीकडे**-क्रिवि. पलीकडे, दूरच्या, पलीकडच्या बाजूला, वेळेला. [पैल+कडे]

**पैल**—वि (प्र.) पहिला; आरंभाचा; प्रथमचा. -क्रिवि प्रथमतः; आरंभीं; सुरवातीस. [पहिला]

**पैलटकर**—वि. पहिलटकर पहा.

**पैलवान**—पु. मल्ल; पहिलवान पहा [सं. प्रथम, प्रा. पहल; म. पहिला]

**पैलू, पहिलू**—पु. १ बाजू; कोन (विशेषतः रत्नाचा) २ रत्नाची एक बाजू; हिरा, माणिक इ० कांस कोन पाडिले असतां दोहों कोनाच्या मधील सपाट भाग, बाजू. [फा. पहलू] ०**दार**-वि. घासून पैलू पाडलेलें, पैलू असलेलें (रत्न इ०)

**पैवंद-दी-धी**—पेवंद-दी पहा

**पैवस्ता**—क्रिवि. (ना. व) तीन वर्षांपूर्वी; तिगस्ता. 'पैवस्ता लग्न झालें.'

**पैवस्ती**—स्त्री. १ पत्र, पत्रव्यवहाराचें पुडकें इ० मिळाल्याची, दाखल झाल्याची मिति, तारीख; दाखल झाल्याची नोंद (ही ज्यास पत्र इ० मिळालें तो स्वतः लिहीत असे); दाखला, पोंच. २ पोहोंचणूक, येणें; आगमन. 'पुन्हा खुरकींत त्यांची पैवस्ती न होय ऐसें जालें असतां सर्वास चांगलें.' -दिमरा १ ४४. ३ वसती; राहणें. 'ह्या गांवांत पन्नास वर्षे पैवस्ती आहे' ४ दळणवळण; संबंध 'मी राहतों पुण्यास परंतु मुंबईस पैवस्ती पुष्कळ' [फा. पैवस्त्]

**पैशाच, पैशाचिक**— वि. पिशाच्चासंबंधीं, भुतांविषयीं (उपद्रव इ०). [सं] **पैशाच विवाह**-पु विवाहाचा एक प्रकार. कन्या पळवून किंवा जबरदस्तीनें लाविलेला विवाह. अष्टौविवाह पहा. [सं.]

**पैशु(शू)न्य**—न. १ दुष्टपणा; दुराचरण. २ चहाडी; ठकबाजी, द्वेषबुद्धि; दोषदृष्टि. 'तया टाविती इटालें। पैशून्याचीं।' -ज्ञा १६.४०१. ३ गुप्त दुर्गुण, दोष; व्यंग; न्यून; बिंग. (क्रि० काढणें; पाहणें; निघणें) ४ अप्रतिष्ठा व्हावयाजोगा दुराचरणादि दोष प्रसिद्ध करणें. [सं.] ०**काढणें**-दुष्कृत्यें, व्यंगें, उणेपणा, न्यून उघडकीस आणणें. ०**पाहणें**-दोष काढण्याकरितां टपून बसणें; छिद्र पहाणें

**पैष्टी**—स्त्री. पिठापासून तयार केलेलें मद्य. -वि. पिठाची. [सं]

**पैस**—पु. १ जागा; स्थळ; मोकळी, विस्तृत जागा. 'पैस धरूनी चाला ठाकत ठायीं ठायीं।' -तुगा ४६३. २ प्रसार; विस्तार; फैलाव. 'एऱ्हवीं विकाराचेनि पैसे। करी कीर इंद्रियांचेयाचि ऐसें।' -ज्ञा ७.४७ ३ पाऊल; मार्ग; प्रवृत्ति. 'जेथ पुढील पैस पारुखे। मागील स्मरावें तें ठाके।' -ज्ञा ६.६०. -वि. १ प्रशस्त; विशाल; विस्तीर्ण; अघळपघळ; असंकोचित. २ (कों.) दूर; लांब 'पैस असे तोचि कळे।' -सिसं ९.२७५. -क्रिवि. दाटी, अडचण न होई अशा रीतीनें; ऐसपैस; प्रशस्तपणें; मोकळेपणें (बसणें, वस्तु पडणें). -उद्गा. (रस्त्यावरच्या लोकांस संबोधून) दूर व्हा! बाजू हटा! रस्ता सोडा! [सं. प्रसृ; किंवा पार्श्व] **पायां पैस नसणें**-अतिशय गर्दी असणें. **पैसणें**-क्रि १ प्रवेश करणें. 'तरी मज आंत पैसो। दिठी तुझी।' -ज्ञा ९.७०. २ मरून जाणें. -शर. ३ पसरणें; फैलावणें.

**पैसा**—न. तांब्याचें नाणें; एक दिडकी; (नाशिक, खा. कों.) दोन दिडक्या ढब्बू २ द्रव्य; धन, संपत्ति. पैका. ३ तीन रुक्याचें अथवा साडेसात बिघ्याचें जमीन मोजण्याचें एक माप ४ एक प्रकारचा किडा; वाणी पहा [हिं पैसा; इटालियन, स्पॅनिश, तुर्की पिआस्त्र=एक नाणे पैका पहा] (वाप्र.) **पैशापायली-पासरी**-अतिशय स्वस्त; मातीमोल. '(आमच्या) लोकांत किताबी विद्वान पैशापासरी या मोलानें विकू लागले' -नि ०**न जळणें**-पैसा न संपणें 'त्याच्या घरांत जळतां जळणार नाहीं इतका पैसा आहे.' ०**मरणें**-निरुपयोगी होणें, व्याज, फायदा न मिळता मुद्दल देखील परत येण्याची अशक्यता. **पैसे उडविणें**-अनावश्यक वस्तूंत, चैनींत पैसे खर्चणें **पैसे काढणें**-कर्ज काढणें 'लोकाचे पैसे काढून तुला कापड घेऊन दिलें आहे.' -नामना ७६. **पैसे खाणें**-लांच घेणें; मालकाच्या पैशांत अफरातफर करणें. **पैसेच पैसे**-१ पुष्कळ पैसे २ नुसते पैसे (आणखी दुसरे कांहीं नाहीं). सामाशब्द- **पैसा अडका-रुका**-पु. (व्यापक) पैसा; नगदी रक्कम [पैसा+अडका] **पैसेकरी-पूर-वान्-वाला**-वि श्रीमंत; धनाढ्य; मातबर; (व) पैसदाज. ०**खाऊ**-वि. १ खर्चाचा; मौल्यवान् (पदार्थ) २ पैसे खाणारा; डल्ला मारणारा.

**पैसार**—पु. १ प्रशस्त रस्ता; मार्ग 'ऐसा पवनाचेनि पाठारें। येतां धारणेचेनि पैसारें।' -ज्ञा ६.५८. २ विस्तार; प्रसार. 'सुखाचा पैसारु जोडे।' -ज्ञा ७.१५५. ३ अवकाश. [सं. प्रसा?]

**पैसाव**—पु १ विस्तृतपणें पसरणें. २ कमी झालेली दाटी, गर्दी; दाटीनंतरचा मोकळेपणा, असंकोचितपणा. [सं. प्रसृ]

**पैसावणें**-अक्रि. मोकळें, सुटें होणें; पसरणें, फांकणें; विस्तारणें; दूर, लांब होणें. [पैसाव] **पैसाविणें**-सक्रि गर्दी कमी, पातळ होणें.

**पैसाळू**—पु. आयात माल. याचे उलट निकाळू=निर्गत माल. -वि माल आयात होण्याजोगा (बंदर). [पैसा+आळु]

**पैसें**—क्रिवि. बळानें; योगानें. 'त्या दिव्यचक्षूचेनि पैसें। चहूंकडे जंव पाहत असें।' -ज्ञा ११.२६५.

**पैह(हा)म**—क्रिवि. वारंवार; वरचेवर; निरंतर; एका मागून एक. 'याचे बयान मुफसल पैहम आं साहेबास कलमी करण्यांत आले.' -पयाव ४७८. [फा. पैहम्]

**पो-पों**—पु. एकदम पडलेलें शेण; शेणाचा लगदा, मोठी पोयटी. [ दे. प्रा. पोह=बैलाच्या शेणाचा ढीग; कच्छी पोह ]

**पों**—क्रिवि. सनई इ० सारखा आवाज होऊन. [ ध्व. ]

**पोइशी**—स्त्री. ( वैशाखांत ) वायव्येकडून वाहणारा वारा.

**पोई**—स्त्री. पाणपोई. ( प्र ) पोय. धर्मपोईचें उदक जाण।' –मुवन ( नवनीत पृ १९५ ).

**पोईड**—न. ( राजा कु ) नदींत मिळालेला ओघळ; नाला

**पोऊळ**—स्त्री. देवळाच्या भोंवतालची भिंत, पोंवळ.

**पोक**—पुन. एक मासा; बिचेरें.

**पोंक-ग**—न. कुबड; पोंग; पाठ, भिंत, भांडें इ०कांस आलेला बांक, वक्रता. २ –वि ( कों ) वांकलेला, नमलेला; वाक आलेला ( मनुष्य, इमारत इ० ). [ प्रा दे पोंक्क ] **पोकणें**-अक्रि पाठीस कुबड असणें; इमारत इ० वांकणें, झुकणें **पोंक्या**-वि कुबडा

**पोकटा**—पु. कोंवळा नारळ. खांकट–टा पहा.

**पोंक(का-को)टी**—स्त्री कोंवळें पोफळ; सुपारी.

**पोकडो**—स्त्री. ( कों. ) मधमाशाचें जाळें, घर, पोंवळें.

**पोंकण**—न. ( कों. ) धान्यांतील कीडखाद दाणा; पोकळ धान्य. [ पोंकळ ]

**पोकळ**—वि. १ भरीव नव्हे तो. २ ( ल ) रिकामा;शून्य; फुसका; ढिला; सैल; वरकरणी; अर्थहीन; फोल (वचन); निरर्थक; व्यर्थ (भाषण); बिन फायद्याचा; फोल ( धंदा, उद्योग ), हलका; सोपा; क्षुद्र ( नकाराच्या निषेधार्थी योजतात ). 'हें काम कांहीं पोकळ नाहीं !' ३ अनिश्चित; अनिर्णीत, पुरा न केलेला ( हिशोब, बाब ); मोघम; पुळपुळीत ( भाषण ). [ सं. पुष्कर; हिं. पोला; गु. पोलु ] **०खर्च**-पु. हिशेबांतील खर्चाची कल्पित, बनावट, खोटी बाब. **०जमा**-स्त्री. जमेची कल्पित बाब. **०जमाखर्च**-पु. जमेचा व खर्चाचा ( न मिटलेला ) तसाच पडलेला हिशेब. **०जमीन**-स्त्री. भुसभुशीत जमीन. **०धोत्र्या-भट**-पु. ( निंदार्थी ) विद्या, धन, बुद्धि या विरहित ब्राह्मण; नुसता धोतरबडव्या मनुष्य. **०ब्रह्म**-न. ( ल. ) दिखाऊ, पोकळ काम, भाषण, बाब इ० **०सूत्री**-वि. नेभळट; गबाळग्या; अव्यवस्थित ( मनुष्य ). **पोकळापोकळ-ळी**-वि. पोकळ; ( ल. ) वरकरणी; निरर्थक; निष्फल; निर्जीव; निकस; रिकामा; लभ्यांश नसलेला. [ पोकळ द्वि. ] **पोकळि(ळी)स्त**-वि. १ अनिश्चित; अनिर्णीत, दिखाऊ; हिशेबांत न धरलेला (जमाखर्च). २ मोघम; निरर्थक; संदिग्ध (भाषण). **पोकळी**-स्त्री. १ पोकळपणा. २ पोकळ जागा; अवकाश; ढिलेपणा. **पोकळीस, पोकळाखालीं जाणें**-फुकट, व्यर्थ, निष्फळ होणें ( एखादी गोष्ट साधण्याचे प्रयत्न ). **पोकळी(पोळकी)**-स्त्री. कागदाची नळी ( बाण, काडतुसें ठेवण्याकरितां ) **पोकळीक**-स्त्री. पोकळ पणा; रितेपणा; व्यर्थपणा.

**पोकळा**—पु. हातभर उंचीची एक पालेभाजी. देंठ तांबूस असून माठासारखा. पानें तादुळज्यासारखीं, भाजी किंचित् आंबट.

**पोंका**—पु ( कु ) माश्याच्या गळ्यांतील पिशवी. हिचा रांध्यासाठीं उपयोग करतात . [ पोंक=कुबड ? ]

**पोकू**—वि ( नंदभाषा ) चार; ४. 'सेलू पोकू आणि ढकार आवारू खूण सांगती सत्वर।' –भवि ४२.४६.

**पोकें**—न. ( कों ) मधमाशाचें मोहोळ.

**पोक-क्ता, पोख्त-ख्ता**—वि. १ प्रौढ; वयात आलेला; समंजस. २ पूर्ण, निपुण; पटाईत; वाकब; निष्णात. ३ पक्की; पक्व; चांगला विचार केलेली ( बब, गोष्ट ) ४ विपुल; प्रचुर; मुबलक; भरपूर; पुष्कळ, उदड; अतोनात. 'त्यास येथें पोख्तें सामान असलें पाहिजे.' –पेद ३.१८९. ५ बळकट; मजबूत; भक्कम ( इमारत ); जाड; भरीव, भक्कम (भांडें), वजनदार, मोठें (ओझें); मोठी; प्रशस्त; प्रचंड (वस्तु). [ फा पुख्त् ] **पोक्ता जिन्नस**-पु. विपुल; पुष्कळ असलेला ( खाद्य ) जिन्नस, वस्तु. **०दाणा**-पु. मुख्य दाणा; खाण्याचें मुख्य धान्य. **पोक्त(ख्त)गी**-स्त्री. पक्वता; मजबुती; कायमी. 'आपले स्नेहाची पोक्तगी करावी.' –दिमरा १.३. [ फा. पुख्तगी ]

**पोंख, पोंखट**—न. (कों.) शेवट ( वस्तु, रांग, गांव इ०चें ).

**पोखंड**—न. पोफळाच्या विरीचा तुकडा. ( प्र. ) पोवखंड. [ पोय+खंड ]

**पोखणें**—न. पोषण; लालनपालन –सक्रि. पुष्ट करणें; वाढविणें, पोसणें. 'तरी कर्मयोगी केवीं अतिरसु । पोखीतसां पुढती ।' –ज्ञा ५.२. –अक्रि. पुष्ट होणें. 'आणि सौभाग्य पोखलें ।' –ज्ञा १ ३५. [ पोसणें ]

**पोख(खा)र**—नपु. सरोवर, तळें. [ सं. पुष्कर; प्रा. पोक्खर ]

**पोखरण-णी**—स्त्री. १ लहान सरोवर; तळें; हौद. 'कां आंगीं कीं निर्मळपणीं । हारपलिया या पोखरणी ।'–अमृ ४.३९. २ एक औषधी फुलाचें झाड. [ सं पुष्करिणी ]

**पोखर, पोखार-रा**—नपु. १ भोंक; नळा; पोकळी ( झाड, भिंत, बंधारा इ०त उंदीर, किडे यांनीं पोखरून केलेली ). २ खरडून, कुरतडून, खणून काढलेली घाण; धूळ; चूर्ण; पीठ. ३ खडकांत, जमीनींत पोखरलेलें विवर. –वि. १ पोकळ केलेली; पोखरलेली ( जमीन, धान्य इ० ) २ ( ल. ) भुसभुशीत; सहज नागरली, खणली जाण्याजोगी ( जमीन ). ३ फुगलेला; तरारलेला ( वडा इ० ) 'तळींव वडे पोखरे । दह्यांत घालोनियां वाढिले ।' –नव ९ १२० [ पोखरणें ] **पोखरणें**-सक्रि १ खणून, खरवडून, उकरून, कोरून पोकळ करणें. २ ( ल ) पोखरून खाणें; बुचाडणें; मुंडणें; टोपसाल काढणें. **पोखरणें**-न. झाडाची ढोली; खडकाची पोकळी; विवर ( जमीनींतील )

**पोखराज**—पु. (गो) पुष्कराज (रत्न). [सं पुष्कराज]

**पोग, पोगारी**—पुस्त्री. १ ताडास जेथून फळें येतात तो गाभा. –कृषि ७५८. २ कोंब, भातरोपास दोन पानांतून फुटणारी सुरळी.

**पोंग**—न कुबड. पोंक पहा. **पोंगणें**–अक्रि. पोंक, कुबड असणें. **पोंगा-ग्या**–वि (कों) पोंक, कुबड असलेला, पोंक्या.

**पो(पों)गडा**—पु. वयात न आलेला मुलगा; तरुण पोरगा; १६ वर्षें वयापर्यंतचा किंवा त्याच्या आतील मुलगा. [सं. पौगंड] **पोंगडी**–स्त्री. सोळा वर्षांच्या आतील कुमारी. (खा) मुलगी (स्वतःची). [सं. पौगंडी]

**पोगर-रा**—पु १ पत्र्याला भोकें पाडण्याची लोखंडी छिनी, पोलादी खिळा (कासारी) भांड्याला भोकें पाडण्याचा एक जाड खिळा.' भोकें पोगरानें पाडूं नयेत.' २ (चाभारी) चामड्याच्या चाक्या पाडण्याचें पोलादी हत्यार. –बदलापूर १८६

**पोगरदम्या**—वि (व) गेलेला 'पोगरदम्या वाटला आहेस.'

**पो(पों)गा**—पु कणीस बाहेर येण्यापूर्वी येणारी पोटरी, अंकुर; कोंब.

**पोंगा**—पु. सापाचें पिलूं.

**पोंगा, पोंगाडा**—पु. १ (ना.) गिरणी, कारखाने यांची शिटी. २ एक वाद्य. [ध्व]

**पोगाडा**—पु (कों.) अळवाचा, कासाळूचा देठ [पोगा]

**पोगिरा**—पु कोरण्याचें हत्यार. [पोखरणें]

**पोगी**—स्त्री. १ नारळास शेवटच्या पानांच्या झुबक्यांतून येणारा मोख (कोंब); नारळ, सुरमाड इ०चा कोका २ फोगी; शिडाची जीभ; गलबतावरचें त्रिकोणाकृति निशाण (शीड). [सं पूग]

**पोघर**—वि (व.) पोकळ. 'ही नळी पोघर आहे' [पोखर]

**पोच**—पु कोंकण किनाऱ्यावर आढळणारा एक समुद्रसर्प

**पोंच, पोंचविणें, पोंचणी-णें, पोचता**—(प्र) पोहोच, पोंहचणें इ० पहा.

**पोंच**—पु. १ दूरदृष्टि; शहाणपण. २ पोंचल्याबद्दलचा लेख; पावती. [हिं. पोहोंच; म पोंचणें]

**पो(पों)चट**—वि. १ पोंचा: चेंचका; पोचारा; खळगा पडलेला. २ पोकळ; निःसत्त्व; निर्जीव; टणक नसलेलें (धान्य इ०). ३ (ल.) निःसत्त्व; निःस्सार; निर्जीव; दुबळा. [गु पोचा] म्ह० बाभळीचा कांटा पुढें तिखट आणि मागें पोचट.

**पोचं(चुं)डी**—स्त्री. (प्र.) पुरचुंडी पहा.

**पो(पों)चा**—पु. घावटा; ठोका; भांडें, दागिना इ०कांस पडलेली खळी; भांड्याचा खळगा. [हिं. पोंचा] **पो(पों)चलणें**–सक्रि (भांडें, दागिना इ०कांस) पोंचा पडणें, येणें **पोंचारणें**–सक्रि. (कों.) (कपडे धुतांना ते) हातानें चुबकणें, मुठीनें ठोकणें **पोचा(चे)रा**–वि. पोचा, ठोका असलेला.

**पोंची**—स्त्री. १ मणगट, मणिबंध. २ पुरुषांच्या मनगटावरील अलंकार. [हिं. पहुंची] ०**ओळखणें**--एखाद्याचें पाणी, शक्ति, आवांका, सामर्थ्य, दम इ० जाणणें, ओळखणें. ०**जाणणें-ताडणें-पाहणें**–एखाद्याचें सामर्थ्य जाणणें, कसाला लावणें.

**पोंजड-डा**—वि. (कु) घाणेरडा; ओंगळ; खराब (मनुष्य). **पोंझडा**–वि. (गो.) ओंगळ; अभद्र बोलणारा.

**पोंझा, पोझट-डा**—वि फोपशा; फुगीर. यावरून (उलट अर्थीं) अशक्त; निर्बल; दुर्बळ; सामर्थ्यहीन.

**पोट**—पु. १ अन्नाशय, उरापासून बस्तीपर्यंतचा, ज्यामध्यें अन्नोदकादि किंवा गर्भ राहतो तो शरीराचा भाग; बरगडीच्या खालचा व कंबरेच्या वरचा भाग; उदर. २ कोठा; अन्नपचनाचें स्थान; जठर ३ (ल.) गर्भ; गर्भाशय. 'तुझें ओझें नऊ महिने मी पोटांत वाहिलें हो!' ४ (ल) गर्भारपण उदा० पोट येयें. ५ (ल.) कोणत्याहि वस्तूचा फुगीर भाग कोणत्याहि गोष्टीचा पुढें आलेला भाग. उदा० घटाचा, पापण्याचा इ०; उदा० गडव्याचें, घागरीचें पोट. ६ वस्तूचा पोकळ भाग, पोकळी, दरा; खळगी; खांच. ७ खोलवा; साठवा; वव; कवळ; खातें; समावेश करण्याचा गुण, शक्ति; मुख्य किंवा आंतील बाजू; मुख्य कृत्याच्या अंगभूत इतर कृत्यें नदीच्या पात्राचा मध्य. ' वरप्रस्थान, वाक्दान इ० हीं सर्व विवाहाच्या पोटचीं कर्में.' ८ (ल) मन; हृदय; बुद्धीचें, विकाराचें स्थान. ' ज्याच्या पोटीं खर विष, मुखीं आज्य हैय्यंगवीन।' –वि. वा. भिडे. [सं. पुष्ठ; पुट दे पोट्ट; प्रा. पोट्ट; का होट्टे; तुल० हिं. गु पेट] (वाप्र.) ०**करणें**–(जनावर) गाभण राहणें; लठ्ठ बनणें ०**करणें-फुगणें-येणें-वाढविणें**–व्यभिचारानें गर्भार होणें. ०**गळ्याशीं लागणें**–फार जेवल्यानें पोट आकंठ भरणें **पोट(टा)चें दुःख काढणें-सोसणें**–भुकेची वेदना सोसणें. **पोटचें पाडणें**–कृत्रिम उपायांनीं गर्भपात करणें; पोट पाडणें. ०**जाणें-ढाळणें**–ढाळ, रेच, जुलाब होणें. 'हगलें नाहीं पोट गेलें.' ०**जाळणें**–१ (निंदार्थी, वैतागानें) पोट भरणें. ' समर्थांची लाल घोटूं नको तर काय करूं. हें पोट जाळावयाचें आहे ना?' २ दुसऱ्याचें नुकसान करून आपला फायदा करून घेणें.' ह्या वेळीं मला बढती मिळावयाची, पण त्या शंकररावानें आपलें पोट जाळलें ना!' ०**जिरणें**–गर्भ शमन होणें; वाढूं लागलेला गर्भ पोटांत जिरणें.'त्या स्त्रीचें पोट जिरलें.' ०**जिरविणें-झाडणें-पाडणें-मारणें-सांडणें**–(औषध घेऊन) गर्भपात करणें. ०**तडीस लागणें**–पोट गळ्याशीं लागणें पहा. ०**दुखणें**–(ल.) (दुसऱ्याचें चांगलें पाहून) मत्सर वाटणें; असह्य होणें; वाईट वाटणें. ' खरचणारानें खरचतें आणि कोठावळ्याचें पोट दुखतें.' ०**धरणें**–जुलाब बंद होणें. ०**धरूधरून हंसणें**–अतिशय हंसणें. ०**नकटें आहे**–पोट

लाजबीज कांहीं जाणत नाहीं ( भूक लागली असतां, वात्सल्यप्रेमानें कळवळा आला असतां). ०**पाठीस लागणें**–पोटाला मिळविण्यासाठीं उद्योग करावा लागणें. ' पोट लागलें पाटीशीं । हिंडवीतें देशोवेशीं । '–तुगा ४१९६. ०**पाठीस लागणें–पाताळास, रसातळास जाणें,पोटाची पत्रावळ होणें**–खावयास न मिळाल्यामुळें पोट खपाटी जाणें, पोटास खळगी पडणें; पोट–पाठ एक होणें ०**पिकणें**–१ प्रसुत होणें; मूल होणें ' त्या मुलीचें एकदाचें पोट पिकलें. ' २ गर्भार असणें. ०**फुगणें**– १ अजीर्णादिकामुळें पोटांत वायु सांठून पोट मोठें होणें. २ ( ल. ) एखादी गुप्त बातमी कोणाला तरी सांगण्याला संधि न मिळाल्याकारणानें अस्वस्थता वाटणें. ३ गरोदर होणें. ०**फुटणें**–खरोखरी पोट फुटल्याप्रमाणें पोटाला वेदना होणें. ' हंसता हंसतां आमचीं पोटें फुटलीं. ' ०**फोडणें**–गुप्त बातमी फोडणें, उघडकीस आणणें ०**बांधणें**–उपासमार करणें; पोटाला चिमटा घेणें. ०**बांधून चाकरी करणें–पैसा जमविणें–जेवणें–खाणें–खरचणें**– पोटास न खातां नोकरी करणें, पैसे जमविणें इ० ०**बाहेर पडणें**–जेवणाचा खर्च परभारां भागणें. ' त्या व्यापारांत पोट बाहेर पडून दहा रुपये मिळतात. ' ०**बाहेर पाडणें**–गुप्त गोष्ट चारचौघांत उघडकीस आणणें, फोडणें. ०**बुडणें**–चरितार्थाचें साधन नाहींसें होणें. ' यंदा पाऊस चागला पडला नाहीं, माझें पोट बुडालें ' ०**भर अन्न, अंगभर वस्त्र मिळणें**–माणसाच्या निर्वाहाला आवश्यक अशा वस्तु मिळणें. ०**भरणें**–१ इच्छा तृप्त होणें, पोटाची गरज भागणें; भरपूर जेवणें. ' माझें पोट भरलें, आतां जिलब्याचा आग्रह करूं नका. ' २ चरितार्थ चालविणें. ' माझ्या सामर्थ्यें भरिल आजि पोटातें । '–मोआदि २६.१४. ०**मोठें करणें**–( ल. ) दया दाखविणें; कृपाळू होणें. ०**सरणें–सुटणें**–१ रेच होणें. ०**सुटणें**–१ वातानें दोंद वाढणें; खायला, प्यायला यथेच्छ मिळत असल्यानें दोंद येणें. २ ( ल. ) उदरनिर्वाहाचा खर्च बाहेर पडणें, अंगावर न पडणें. **पोटाखालीं जाणें–येणें**–ओढया होऊन जाणें; विधवेनें पाट लावला असता पहिल्या नवऱ्यापासून झालेल्या मुलानीं तिजबरोबर जाणें. **पोटाचा कपोता वळणें**–अतिशय रोड, कृश होणें. **पोटाचा चाकर, पाईक**–पोटाकरितां मजुरी करणारा. **पोटाचा डमामा, नगारा होणें**–पोटांत वायु धरल्यामुळें पोट फुगणें. **पोटाच्यापाठीस लागणें**–चरितार्थाचीं साधनें मिळविण्याकडे सर्व वेळ, शक्ति खर्चणें. **पोटाचें पाणी होणें**–जोराची हगवण लागणें. **पोटांत आग पेटणें**– अतिशय भूक लागणें. **पोटांत कालवणें**– पोटांत ढवळणें, पोटांत गडबड होणें. **पोटांत कावळे ओरडूं–कोकावूं–तोडूं–टोचूं लागणें**, **पोटांत कोंबडीं चरूं लागणें**–अतिशय भूक लागणें; भुकेनें जीव व्याकूळ होणें. **पोटांत खडबडणें**–भूक लागणें. **पोटांत गोळा उभा राहणें**–संकट येणें; भीति वाटणें; पोटांत धस्स होणें. **पोटांत घालणें–घेणें, पोटीं घालणें**–( अपराध, चूक) क्षमा करणें. ' पोटीं घालावा त्वा, जोडा, माझ्या नसेचि अपराधा । '–मो. **पोटांत जावप**–( गो ) पोटांत दुखणें. **पोटांत ठेवणे**–गुप्त ठेवणें, कोणाला कळूं न देणें **पोटांत–स डोकें घालणें**–आश्रय, कृपा संपादणें. **पोटांत तडस भरणें**–पोटास कळ लागणें ( फार खाल्यामुळें). **पोटांत तोडणें**–( ल ) दयेनें पोटात कळवळणें, दुःख होणें ' तुझें गरिबीचें बोलणें ऐकलें म्हणजे पोटांत कसें तडातड तोडतें. ' –नामना ११२. **पोटांत धाक पडणें**–भीति उत्पन्न होणें. ' माझ्या पोटांत धाक पडला आहे. ' –मृ ६९. **पोटांत धोंडा उभा राहणें**–अतिशय भीति वाटणें. ' तिला पहाताच माझ्या पोटात एवढा थोरला धोंडा उभा राहिला '–पण लक्षात कोण घेतो. **पोटांत पाय शिरणें**–खचून जाणें; भ्रांत होणें, भाबावणें. 'त्याच्या मरणाची खबर ऐकिल्यापासुन याचे पायच जणों पोटात शिरले आहेत ' **पोटांत पोट**–मुख्याच्या पोटात असलेला, गौण (मनुष्य, वस्तु) **पोटांत पोट करणें**–आपल्या उपजीविकेमधून दुसऱ्याचें पोट भरणें. **पोटांत पोट चालणें**–एकाच्या अन्नात, निर्वाहात दुसऱ्याचा समावेश होणें. **पोटांत ब्रह्मराक्षस असणे–उठणे**–खा खा सुटणें. **पोटांत भडभडणें**–दुःखानें ऊर भरणें. ' अंध म्हणे या पुत्रव्यसनें पोटांत फार भडभडतें । ' –मोशल्य ४.४९. **पोटांत शिरणें–निघणें**–१ ( दुसऱ्याची ) मर्जी संपादन करणें. २ दुसऱ्याच्या गुप्त गोष्टी काढून घेणें **पोटांत शूळ उठणें–सलणें**– ( ल. ) मत्सर, हेवा वाटणें, दुसऱ्याचें बरें पाहून वाईट वाटणें. **पोटांतील पाणी न हालविणे**–एखादी गोष्ट गुप्त ठेवणें. **पोटांतून उगळणें–कळवळा येणे**–मायेचा पाझर फुटणें. **पोटा येणें**–पोटीं जन्म घेणें. ' पोटा येऊनिया चाग । उत्तमांग पावला । ' –एरुस्व १७२. **पोटाला कुंकू लावणें**–( व. ) गर्भारपणींच भावी संततीचा वरवधूंचा वाङ्निश्चय करणें. **पोटाला गांठी देणें**–चिक्कूपणानें, दारिद्र्यामुळें पोटाला पुरेसें न खाणें. **पोटाला पाटा बांधणें**–पोटाला चिमटा घेणें, भुकेच्या वेदना बंद करण्यासाठीं धोतरानें पोट बांधणें. **पोटावर उठणें–मारणें–येणें, पोटाआड येणें, पोटावर पाय देणें**–मारणें, दुसऱ्याचें उदरनिर्वाहाचें साधन काढून घेणें; प्राप्ति कमी करणें. **पोटावारी नोकरी करणें, राहणें**–फक्त जेवण घेऊन नोकरी करणें. **पोटा(ट)शीं धरणें**–१ प्रेम, ममता करणें. २ मदत करणें; पोषण, सांभाळ करणें. ३ ( झाडासंबंधीं तंट्यांत) झाडास कवटाळून देवाची शपथ घेणें, वाहणें इ० **पोटा(ट–टि–टे)शीं राहणें–असणें**–गर्भार असणें, राहणें. **पोटास अन्न ढोंगास वस्त्र मिळणें**–निर्वाहाचें अगदीं किमान साधन मिळणें; निर्वाहाच्या अगदीं आवश्यक वस्तू मिळणें. **पोटास तडस लागणें**–फार

जेवल्यामुळें अस्वस्थता वाटणें. **पोटास बिब्बे घालणें-चिमटे घेणें**-पोटाला न खातां राहणें; उपास काढणें. **पोटास येणें**-उदरीं येणें, जन्मणें; मूल होणें. 'केला पहा, कसा हा येउनि पोटास घात लेकानीं।'-मोउद्योग ४.७९. **पोटीं-पोटांत**-(आल्याच्या-गेल्याच्या-दिल्याच्या-केल्याच्या) तर्फे, आनुषंगिक. **पोटीं उतरणें**-जिरणें. **पोटीं खोसणें**-(ना.) कनवटीला बांधणें; कडोस्तीला लावणें **पोटीं घालणें**-अपराध क्षमा, माफ करणें. 'अपराध कोटि पोटीं घालाया मुकुट पाय ते करितों।' -मोस्त्री ६ ६३. **पोटीं जन्मणें**-(आई-बापापासून) जन्म पावणें; उदरीं येणें **पोटीं धरणें**-आवड धरणें; स्वीकारणें. 'पुण्य मार्ग पोटीं धरीं।' -दा ५ ८.२४. **पोटीं-पोटांत पडणें**-१ भक्षस्थानीं पडणें. २ शरीरांत खिळणें (रोग, गोवर, देवी, ताप, खरूज इ०) ३ स्वत.च बळकाविणें (पैका, द्रव्य). ४ जेवणात खर्च होणें. ५ पोटात मुरणें, नाहींसें होणें (औषध); (दूध) पोटांत तसेंच राहणें (रेच करणें) **पोटीं वागविणें**-एखाद्याला सतत आपल्याबरोबर वागवून त्याची काळजी वाहणें. 'हें पांगुळें वागवितोसि पोटीं।' -सारुह १.८ **पोट्यां चालणें**-(गो) मुलानें, पोट सरपटत चालणें. **थंडा पोटानें**-मित्रभावानें; सलोख्यानें; चिरडीशिवाय; अकसाशिवाय; रागा-क्षोभा-शिवाय. **भरल्या पोटीं-पोटानें**-जेवणानंतर लागलींच (काम करणें, चालणें इ०) **रिकाम्या पोटीं-पोटानें**-जेवल्याशिवाय. **म्ह०** पोटचा(चें) द्यावा पण पाठचा देऊं नये=प्रत्यक्ष आपलें मूलहि सोडावें, पण आश्रयास आलेल्या माणसास सोडूं नये. साधितशब्द-**पोटचा**-वि. १ औरस; स्वतःचा. स्वजात; एखाद्याच्या पोटीं जन्मलेलें (मूल). 'पोटचें द्यावें पण पाठचें देऊं नये.' २ पासून जन्मलेला, झालेला. 'हा कोणाच्या पोटचा?' ३ अंतर्भूत, समाविष्ट असलेलें 'साष्टीच्या पोटचे साठ गाव आहेत.' **पोटचा गोळा-लोळा**-पु स्वत चें पोटचें मूल; पोर, नऊ महिने पोटांत बाळगलेलें मूल 'विचार पडला कसा पोटचा गोळा तोडावा.' -विक ४०. **पोटचें ज्ञान**-न १ नैसर्गिक, उपजत, स्वाभाविक ज्ञान; न शिकतां, संपादितां अंगीं असलेलें ज्ञान. २ अंगची हुशारी, शहाणपण ३ स्वतःची बुद्धी, अक्कल, समज इ० **पोटाचा अदळ**-वि. शौच्याला लागली असतां क्षणभरसुद्धां धीर धरवत नाहीं असा. (ल.) ढिल्या संवईचा. **पोटाचा पाईक-पायक**-पु पोटाचा चाकर; पोटपाईक पहा. सामाशब्द- ०**उक(का)ल**-स्त्रीपु. मन मोकळें करणें. (क्रि० करणें). ०**कटार-री**-स्त्री. १ पोटांत कट्यार, सुरा खुपसून घेऊन आत्महत्या करणें; आत्महत्या. (क्रि० करून घेणें). २ कट्यारीनें दुसऱ्यास भोसकणें (क्रि० करणें) ०**करपी**-स्त्री. (बायकी) एक शिवी; पोटजाळी. [पोट+करपणें] ०**करीण**-स्त्री. व्यभिचारानें गरोदर झालेली स्त्री. ०**कली-कुली-कूळ**-स्त्रीन. १ (निंदार्थी) लहान पोट. २ पोटकुळी पहा. ०**कांब**-स्त्री. बांबूची आंतल्या बाजूची चिरटी, कामटी. याच्या उलट पाठकांब. ०**किडा**-पु १ (झाड, फळ इ० च्या) आंत राहणारा किडा. २ (ल.) गुप्त गोष्टी, गुह्यें जाणणारा मनुष्य. ०**कुळी**-स्त्री पोटाची बाजू; कनवटी; कडोस्ती; ज्यावर धोतर, लुगडें आवळलें जातें तो भाग (तेथें कांहीं खोवण्याच्या संबंधानें उपयोग) 'त्याची पोटकुळी म्यां चाचपून पाहिली'-क्रिवि.प्रमाणेंहि उपयोग होतो. ०**कूळ**-न (निंदार्थी) पोट. ०**कूळ**-न. दुसऱ्याकरितां जामीन राहणारा मनुष्य; संगतीचा, परिवारांतील माणूस ०**खण**-स्त्री. (कु.) अधाशीपणा. ०**खर्च**-पु. खाण्यापिण्याचा, जेवणाचा खर्च; पोटगी खर्च. ०**खर्ची**-स्त्री. प्रवास इ०प्रसंगीं खाण्यापिण्यासाठीं घेतलेले पैसे. ०**खराब**-वि. मध्यें (खडक, वाळवंट, घळ, पायवाट इ० मुळें) खराब असलेली, लागवड न होण्याजोगी (जागा, जमीन). ०**खराबा**-पु. (कों) वहित जमीनीच्या पोटीं ओसाड, खराब असलेली जमीन ०**खीळ-खिळा**-स्त्रीपु १ शिवाळेची आंतील खीळ, याच्या उलटबोळ खीळ. २ आंतील, मधली खीळ, खुंटी. ०**गडी**-पु. १(सोंगट्याचा खेळ) खेळणाराच्या हाताखालचा व त्यास मदत करणारा गडी, आगगडी, पिट्टू. २ (ल.) मदतनीस; रिकामी झालेली जागा भरून काढणारा गडी. ०**गळ**-स्त्री.(राजा.) खाजणाच्या बाधाच्या आंत पाणी साचणारा चर. ०**गुजारा**-पु. नुसती गुजराण; निव्वळ उपजीविका, निर्वाह; क्षुद्रवृत्ति. ०**गुमास्ता**-पु. मुख्य गुमास्त्याचा मदतनीस. (इं) सबएजंट. ०**घडी**-स्त्री. गर्भार आहे असें दिसावें म्हणून वाझोट्या स्त्रीनें पोटावर बांधलेली घडी. ०**घर**-न (सोंगट्यांचा खेळ) पटाच्या बाजूवरील घराच्या तीन ओळींपैकीं मधल्या ओळींतील शेवटचें (खालचें) घर. ०**चक**-पु. मोठ्या शेताच्या अंतर्भूत असलेलें पण दुसऱ्याच्या मालकीचें लहान शेत, जमीनीचा विभाग; शेताचा पोटविभाग. ०**जामीन, पोटचा जामीन**-पु. जामीनाच्या पोटातला जामीन; खाजगी जामीन; आंतील जामीनदार; परत जामीन. ०**जाळ**-पु. आईची माया; मातृवात्सल्य; पोटच्या पुत्रादिकांचा नाश झाल्यामुळें होणारा शोक. [पोट+जाळ] **म्ह०** पाठजाळ पुरवेल पोटजाळ पुरवत नाहीं. ०**जाळू**-वि. (ल) चहाडखोर; पोटासाठीं हलकें काम करणारा. 'पोटजाळू माणसांच्या हातून महाराजांचा हेतु सिद्धीस जाईल.' -विक्षिप्त ३.१०७. ०**जीभ**-स्त्री पडजीभ; आंतील बाजूची, घशांतील जीभ. ०**झांकणी-णें**-स्त्रीन. (बायकी) १ लग्नांत सुनमुखाच्यावेळीं वराच्या आईकडून वधूच्या आईला लुगडें देण्यांत येतें तें. २ तो विधि. ०**टाळा**-पु. (ढोराचा धंदा) दोन अधोडीमधील तुकडा. ०**तिडीक**-स्त्री. १ पोटांतील कळ; पोट दुखण्याची वेदना. २ (ल.) कळकळ; आस्था. ०**दुखणें**-न. अजीर्ण वगैरे कारणानें पोटांत वेदना होणें; पोटशूळ; मुरडा. ०**दुखा-दुखी**-पुस्त्री. १ (कों.) पोटशूळाची व्यथा;

नेहमींचें पोट दुखणें. २ (ल.) दुसऱ्याचें बरें पाहून झालेलें दुःख; हेवा; मत्सर ३ गरज; मागणी; हांव. 'वैद्याची-दलालाची-कारकुनाची-लांचेची-मिळकतीची-पोटदुखी.' ०नर-पु. मोत्याच्या आंतल्या पडद्याच्याहि आंत जो नर असतो तो. ०नळ-नअव. पोटांतील नळाचे वर जाणारे आणि खालीं जाणारे भाग; नळाचा आजार, दुखणें. याच्या उलट पाठनळ. ०पडीत-न. लागवड केलेल्या जमीनीमधला पडीत तुकडा. ०पाईक-पायक-वि. पोटार्थी; उपजीविकेकरितां काम, नोकरी करणारा; काम करण्याची जरूर असलेला (मनुष्य). ०पाणी-न. पोटाची तजवीज, व्यवस्था ०पु(पू)जा-स्त्री. १ खाणेंपिणें; भोजन (क्रि० करणें). २ (ल.) लांच देणें. ०पोशा-सा-वि. पोटार्थी; पोटभरू; खादाड. 'न करितां आळसी पोटपोसा।' -दावि ४३७. ०फुगी-स्त्री. १ व्यभिचार करून गरोदर होणारी, झालेली स्त्री. २ पोट फुगणें, दब्ब होणें; पोटात गुबारा धरणें. ३ नेहमींचें पोट फुगणें, पोट फुगण्याचा रोग ४ दुसऱ्याचें चांगलें झालेलें पाहून वाईट वाटणें; हेवा; मत्सर. ५ आकस; खुनस; चुरस. ०फू(फु)ग-स्त्री. कांहीं गुप्त गोष्ट फोडण्याची उत्कंठा (त्यामुळें पोट फुगणें). [पोट+फुगणें] पोटफुगी झाडणें-गुप्त गोष्ट फोडणें. ०फोड-स्त्री. १ मन मोकळें करणें. २ गुप्त गोष्ट फोडणें, प्रसिद्ध करणें ३ एखादें कोडें उकलणें [पोट+फोडणें] ०फोडें-वि. एकदां व्यायलेलें (जनावर) [पोट+फोडणें] ०बंदा-वि. पोटार्थी; फक्त पोटाकरितां काम, चाकरी करणारा. ०बांधणें-णी-नस्त्री. पोटास बांधण्याचें वस्त्र (विशेषत. बाळंतीण स्त्रियांकरिता, मुलांकरितां). ०बाबू-पु १ पोटपोशा; पोटभरू; खादूनंदन; पुखानंद २ पोटाला मिळालें म्हणजे बाकीच्या गोष्टींविषयीं बेफिकीर असणारा. [पोट+बाबू] ०बुड-स्त्री. १ निर्वाहाच्या साधनांचा नाश; वृत्तिनाश. २ वाजवी-किंवा अपेक्षित रकमेपेक्षां कमी रक्कम उत्पन्न येणें; नुकसानी. 'अशा बोलीचा व्यापार आम्ही करणार नाहीं, त्यात आमची पोटबुड आहे.' ०बेरीज-स्त्री. हिशेबाच्या पोटांतील संख्यांची बेरीज. ०भर-स्त्री. उदरपूरण; तृप्तस्थिति. -क्रिवि. पोट भरेपर्यंत; (क्षुधेची) तृप्ति होईपर्यंत; (ल.) गरजेची, इच्छेची तृप्ति होईपर्यंत. ०भरणा-भरती-स्त्री (राजा कु.) (अन्नादिकांनीं झालेली) पोटाची भरती; पोट भरणें; क्षुधेची तृप्ति. 'गुरांची पोट-भरती पावसांत होते.' ०भराई-स्त्री. (ना.) पोट भरेपर्यंत खाणें. ०भरावा-पु उदरनिर्वाह. 'पोट भराव्या कारणें। नाना विद्या अभ्यास करणें।' -दा ६.१.२०. ०भरू-वि. ज्यापासुन पुष्टि मुळींच नाहीं पण नुसतें प्राणधारणेपुरतें पोट भरणारें किंवा रुचकर नसून भरपूर पोट भरणारें (अन्न). ०भरू-भऱ्या-वि. पोटबाबू पहा. ०भाडेचिठ्ठी-स्त्री. पोटभाडेकऱ्याकडून घेतलेली भाडेकऱ्यानें खंडचिठ्ठी, भाडेचिठ्ठी (घर इ०ची). ०मंडळ-न. मूळ मंडळाची शाखा; मदतनीस मंडळ; पुरवणीमंडळ. 'संयुक्त राज्यघटनेचें एक पोटमंडळ नेमण्यांत आलें.' -के २.१२.३०. ०मांडणी-मांडावण-स्त्री. पोटसर, लग आणि कांबेरे घराचीं पाखीं न दबावीं म्हणून प्राय. त्यांच्या मध्यजागीं खांबावर लगा घालून उभें केलेलें काम. ०मारा-पु उपासमार; पोटाला चिमटा घेणें; पोटाची आबाळ. ०म्हातारा-वि. पोटाच्या, अन्नाच्या आबाळीमुळें म्हाताऱ्यासारखा, अशक्त झालेला. ०रकम-स्त्री पोटांतील बाब; पोटातील सदर, कलम. ०वहीत-वि. मध्यें मध्ये लागवड केलेली (जमीन) याच्या उलट सबंधवहीत. ०वाइ(ई)क-वि. पोटभरू पहा ०वांटा-पु. पोट वाटणी; मुख्य वांटयांतील केलेला वाटा. ०वांटेकरी-पु. पोटवाटणीचा मालक, दुय्यम वाटेकरी. ०वाढवी-वाढी-स्त्री. व्यभिचारानें गर्भार झालेली स्त्री [पोट+वाढविणें] ०शूळ-सूळ-पु पोटदुखी; मुरडा. ०सर-पु. पोटमांडणी पहा. ०सरकत-स्त्री पोटभागीदारी; पोटवांटा. ०सरकती-वि. पोटभागीदार; पोट वाटेकरी. ०सरू-स्त्री. पोटजाळी; एक शिवी. 'राड मुलखाची पोटसरू।' -राला ४६. [पोट+सारणें (दुसऱ्यापुढें)] ०हिस्सा-पु. पोटवांटा. पोटांतून-क्रिवि. मनापासुन; खरोखरी. 'मला हा बेत कांहीं पोटातून आवडला नव्हता.' पोटापाण्याचा बंदोबस्त-पु. निर्वाहाची केलेली व्यवस्था, तजवीज. पोटार्थी-पु. पगार न घेता नुसत्या जेवणावारी राहणारा नोकर. पोटबाबू पहा. [पोट+अर्थी] पोटावर्त-पु. घोड्याच्या पोटावरील भोंवरा. हें अशुभ लक्षण होय. -वि असें चिन्ह असलेला (घोडा). [पोट+आवर्त] पोटाळ-वि. मोठया पोटाचा; ढेरपोटया, दोंदील (माणुस). पोटाची आग-स्त्री. भूक. 'एखादीनें पोटाच्या आगीमुळें असें केलें तर असो मेलें!' -फाल्गुनराव. पोटया-वि. १ पोटभरू पहा. २ पोटचा (मुलगा). ३ (व) पाटाच्या स्त्रीचा पूर्वघरचा, पाटकरणीबरोबर येणारा मुलगा. 'एक पोटया मुलगा आईबरोबर आला.

**पोटकुळी**—(गो) एक वनस्पति, हिला तांबडीं फुलें, फळें येतात

**पोटळणें**—अक्रि. १ (कों.) गाभण होणें; पोट मोठें होणें (गर्भ वाढीस लागल्यामुळें-मादीचें). २ धान्याच्या कणसांत दाणा भरणें; (दाण्यानें) कणीस भरदार होणें. -सक्रि. वर चढताना कवटाळणें (माड, ताड इ०); घट्ट पोटाशीं धरणें (पैसा, मालमत्ता इ०); (सामा.) प्रेमानें कवटाळणें; घट्ट पकडणें; धरणें (क) पोटाळणें. [पोट]

**पोटगा**—पु. (गो.) सुंगटासारखा मोठ्या पोटाचा एक जातीचा मासा [पोट]

**पोटगी-गें**—स्त्रीन. (राजा.) १ पोटखर्चाकरितां घेतलेले पैसे किंवा आवश्यक वस्तु; पोटखर्ची. २ उपजीविकेचें, निर्वाहाचें साधन; जीवनोपाय; अन्नवस्त्र. (व.) ठराविक वेतन. ३

कामाकरितां गरगांवच्या कचेरींत जाणाऱ्या गांवकामगारानें गांवखर्चाच्या रकमेंतून घेतलेला पैसा. [ पोट ]

**पोटडी**—स्त्री. (प्र.) पोटळी.

**पोटरा**—पु भरलेलें धान्य न उकललेलें कणीस

**पोटरी**—स्त्री. १ गुडघा व पायाचा घोटा यांच्या मधला मागचा मांसल भाग; हाताच्या पुढचा मांसल भाग २ (प्र.) पोटरा. ३ पोटडी; पोटळी. [ सं. प्रकोष्ठ ]

**पोटर्की**—स्त्री. (व.) गर्भ अर्धवट आंत असलेलें पीक.

**पोटला**—पु. बकऱ्याच्या पोटाचा भाग; या भागांतील मांस. –बदलापूर ३२५ [ पोट ]

**पोटवा**—पु. (ढोरांचा धंदा) जनावराच्या पोटाची (कातड्याची ?) जागा.

**पोटशी**—स्त्री. गरोदर. 'त्याची बायको पोटशी आहे.'

**पोटस्त-स्थ, पोटिस्थ**—स. १ प्राप्तीचें अप्रत्यक्ष किंवा गौण साधन; किरकोळ, शिवाय मिळकत, प्राप्ति. २ (क्र.) उदर निर्वाह; उपजीविका. [ पोट+स्थ ]

**पोटस्तें**—क्रिवि. पोटास्तव; पोटासाठीं 'पोटस्तें करणें घडे। सेवा कुटुंबाची।' –दा ८.१०.३. [ पोट ]

**पोटळा**—पु. १ पोटांतील आंतडीं किंवा त्यांचा गोळा; कोथळा. २ (काव्य) वायूनें उत्पन्न झालेली फुगवटी (अवयवाची). 'वामांगीं वायूचा पोटळा.' [ पोट ]

**पोटळा-ळी**—पुस्त्री. १ वरचेवर डोळ्यावर ठेवण्याकरितां केलेली औषधाची पुरचुंडी २ मोटली; गाठोडी. पुरचुंडी पहा. (गो) बोचकें (क्रि० बांधणें). [ पोट दे. प्रा. पोट्टल; हिं. पोटली ]

**पोटा, पोटव्या गहू**—पु गव्हाची एक जात. [ पोट ]

**पोटा**—स्त्री. दाढीमिशी असणारी स्त्री; पुरुषी स्त्री. [ सं. ]

**पोटाग**—स्त्री १ आस्था; अगत्यवाद; कळकळ; काळजी. २ खरी ममता; आंतड्याची माया. [ पोट+आग ]

**पोटांतलें**—न. (सांकेतिक) चीप नांवाचा लहान मुलांना पोटांत होणारा विकार. याचे प्रकार तीन–पोटांतलें, डबा व सुशी.

**पोटारा**—वि. १ (कु.) विशाल; प्रशस्त (भांडें). २ (राजा.) फक्त पोटाची काळजी करणारा. [ पोट ]

**पोटारी**—वि. (गो) अधाशी. [ पोट ]

**पोटाशीं, पोटिशीं**—वि. गर्भार. [ पोट ]

**पोटाळणें**—अक्रि पोटळणें. (–अक्रि.) पहा. –सक्रि. १ पाळणें; पोसणें; खायला घालणें. २ कवटाळणें; मिठी मारणें; पोटाशीं धरणें. 'तुका म्हणे केलें सन्मुख वदन। देखतां चरण पोटाळीन।' –तुगा १६६३. ३ (ल.) कुरवाळणें; लाड करणें. [पोट] **पोटाळणी**—स्त्री. १ पालन–पोषण. २ अलिंगन; कोडकौतुक. [ पोटाळणें ]

**पोटाळा**—पु आंतडी; पोटळा अर्थ १ पहा. –वि. पोटरा अर्थ १ पहा. [ पोट ]

**पोटिस्त-स्थ**—न. (प्र.) पोटस्त पहा.

**पोटीं**—क्रिवि. १ (हिशेब) टिपलेल्या जिनसांच्या निरनिराळ्या रकमा असणाऱ्या सदरामध्यें [ पोट ] २ अंगभूत; नंतर; पासून; योगें. 'अनुभवाचें पोटीं–आल्या गेल्याचे पोटीं–परिचय पडतो–सारें होतें.' [ पोट

**पोटोळी**—स्त्री. (प्रा.) पोटळी पहा.

**पोट्या**—(विणकाम) किनारीचा मधला भाग. [ पोट ]

**पोठरा-री**—पोटरा-री पहा.

**पोठरा**—पु. (कासारी) भांड्याच्या ज्या भागावर ओळी, रेघा करतात तो भाग. –बदलापूर ९७.

**पोड**—पु. (गो.) दोरी [ पेड ]

**पोडा**—पु. (कों.) माडाच्या झांपाला जेथून पात्या फुटतात त्याच्या मागील दांडा. 'पोडयाचा दर शेंकडा आठ आणे आहे.' [ प्रस्फुट ! ]

**पोंडा, पोंडाऊस**—पु. उंसाचा एक प्रकार. [ पुंडा ]

**पोंडी**—स्त्री. पोंढी पहा.

**पोढूर**—वि. (गो.) निष्ठुर; निर्दय.

**पोंढ-ड, पोंढा**—पु. १ (राजा. कों.) (ल) विहिरींतून काढलेलें किंवा पाटांतून आणलेलें पाणी सांठविण्याचा हौद; जेवतांना भातावर कालवण घेण्यासाठीं केलेली खळी; चोडें कुजत घालण्यासाठीं खाजणांत खणलेली खळी. २ आगर शिंपण्यासाठीं जे दांडे करतात त्यांत पाणी रहावें म्हणून खणलेली खळी. (नदींत, पाटांत); पाण्याकरिता केलेला किंवा झालेला खड्डा; माडाचें आळें; झाडाच्या बुंध्यांत खणून बाजूस माती घालून पाणी राहण्यासाठीं केलेली जागा; घराचे मोरीचा डबरा. ३ डोक्याचा मागील भाग. [ सं. कुंड; राजा. कोंड=खळगा ] **पोंढी-डी**—स्त्री. (कों.) १ लहान खळगा; खळी २ डोक्याच्या मागील खळी; खोलगट भाग. **पोंढळणें**—अक्रि. (कों.) खोल जाणें (उपासामुळें डोळे इ०). –सक्रि. (कों.) (नारळीचीं, पोफळीचीं लहान रुजवणीचीं झाडें) उपटून पोंढांत नेऊन लावणें. [ पोंढ ] **पोंढें**—न. भाताचें रोप लावण्याकरितां केलेला खोलगट जमीनीचा लहान तुकडा; भाताचें खाचर. [ पोंढ ]

**पोणसुला**—पु. (गो.) व्रतबंध समारंभाचा चौथा व शेवटचा दिवस. [ पळसुला ? ]

**पोत**—पुस्त्री. १ कांचेचा, (क.) सोन्याचा, दगडाचा मणी. २ –पु. स्त्रियांच्या गळ्यांतील मोत्यांचा मण्यांचा, दागिना; माळ; गळेसर. [ दे. प्रा. पोत्ती=काच, शीशा ]

**पोत**—पु. १ अनेक चिंध्या गुंडाळून केलेला भुत्याचा कांकडा. यास लोखंडाची विडी जोडली म्हणजे मशाल होते. 'कौंडयाचे खेळती पोत झळाळा.' -राला १०२. २ (हत्याराचें, काठीचें इ०) अग्र; शेवट; टोंक; शेवट. शेवटचा भाग (वस्तूचा). **पोत, पोंत**-पु न १ पोंथ. जखम वगैरेतून पू इ०काढून धुण्यासाठीं घालावयाची वात. २ (ल.) फाळानें पडलेलें भोंक [का. पोतु=जाळ]

**पोत**—नपु वीण; विणकाम (वस्त्राचें); खेटणी; घट्टपणा; विणकामाची सफाई. 'सूत पोत पाहून धोतर घ्यावें.' [हिं.]

**पोत**—पु नौका; होडी. 'निज विरहार्णवीं पोत। प्रेरुनिया आम्हासि येथें। आणिलें तुवां।' -रास १८२७ [सं.]

**पोत**—पु. बालक; पुत्र. 'सुग्रीवासि तराया घेऊनियां जाय अंजना पोत।' -मोरा १.३१. [सं. पुत्र] **पोती**-स्त्री. मुलगी; कन्या. **म्ह०** [सं पुत्री] 'नात तसी पोती खाण तसी माती.'

**पोत**—पु पोतें, थैला; मोठी पिशवी; गोण [फा. पोता]

**पोत**—स्त्री. (कु) तुंबडी (शरीरांतील दूषित रक्त काढून टाकण्यासाठीं बांधतात).

**पोतकडां**—पु. (गो.) आंतडीं

**पोतडी-डें**—स्त्रीन. पिशवी; सोनार, सराफ यांचीं वजनें, तराजू वगैरे जिन्नस ठेवण्याची पिशवी; बटवा; पुरचुंडी; गाठोडें 'आतां कृपा भांडवल सोडीं। भरीं मति माझी पोतडी।' -ज्ञा १४.१७. [पोतें]

**पोतंडी**—स्त्री. १ पोटळी अर्थ १, २ पहा. २ ऊन पाण्यानें शेकण्यासाठीं वस्त्राचा केलेला बोळा. (क्रि० देणें; लावणें) 'पोतंडीचा शेक.' [फा. पोता=कापडाचा बोळा?]

**पोत(ते)दार**—पु. नाणेपारखी; द्रव्यपरीक्षक; सरकारांत आलेले रुपये इ० नाणें पारखणारा अधिकारी 'पोतदार यांणीं पारख करावी. -वाड सनदा १२५. गांवचा सोनार, सराफ. [फा.]

**पोतदारी**-स्त्री. पोतदाराचें काम, अधिकार, **हक्क इ०**

**पोतनीस**—पु. खजीनदार; सरकारी पोत्यावरचा अधिकारी 'पोतनीस यांणीं पोते-जमा-खर्च लिहिणें करावें.' -वाड सनदा १२५. [फा पोतनवीस] **पोतनिशी**-स्त्री. खजीनदारी; पोतनिसाचें काम, अधिकार. 'आमच्या तरुण विद्वानांचे विद्वत्तेचे चीज सभेची चिटणिशी किंवा पोतनिशी करण्यापलीकडे नाहीं.' -नि ४४४. [फा. पोतनविशी]

**पोतरा**—वि. पोरका;

**पोतराज**—पु शेंदूर फासून लहंगा नेसून मरीआईच्या नांवानें भीक मागणारा महार, मांग; कडकलक्ष्मी [पोत=मशाल+राज]

**पोतवड, पोतवड जमीन**—स्त्री. (डांगदेश) नुकतीच लागवडीस येत चाललेली जमीन. पडित जमीन लागवडीस आणल्या नंतर तिसऱ्या वर्षी तीस म्हणतात.

**पोतां-त्यां, पोत्यांनिशी**—क्रिवि. स्वतः; जातीनें; खुद्द. [गु पोता=स्वतः]

**पोतां**—न. (कों.) (अशुद्ध) पोतें. [फा. पोता]

**पोतास**—पु. भीमसेनी कापूर. 'तयां तत्वज्ञां चोखटां। दिवी पोतासाची सुभटा। मग मीचि होऊनि दिवटा। पुढां पुढां चालें।' -ज्ञा १०.१४२ [पोत=दिवटा?]

**पोती**—स्त्री (गो.) पिशवी; थैला. 'पाशिकें पोतीं वागुरा।' -ज्ञा १६.३४५. [फा. पोता]

**पोती**—स्त्री. (ना.) चुलीवर भांडें जळूं नये म्हणून त्याच्या बुडाला लावलेला मातीचा, राखेचा लेप.

**पोतीपूर्णीमा, पोतें**—(प्र.) पोवती पूर्णीमा, पोवतें पहा.

**पोतें**—न. १ धान्य इ० भरण्याचा पडमाचा थैला; गोण; मोठी व जाड पिशवी, कोथळा. २ सरकारी खजिना पोंचविण्याची पिशवी. ३ (ल.) तिजोरी; खजिना. 'जे देणें तें वरातीनें द्यावें अगर पोत्यांतून रोख ऐवज द्यावा.' -सभासद २४. 'पोतें आहे खांद्यावरी।' -दावि १९२. ४ जिल्ह्याच्या खजिन्यांत गावचा खजिना नेण्यासाठीं तयार केलेली थैली. ५ एक माप. [सं. पोतव; फा. पोता] **०खाद**-स्त्री. पोत्यांतील (साखर इ०) माल पोत्यास चिकटल्यामुळें आलेली मालाची तूट; नुकसान. **०चाल**-स्त्री. चालू नाणें; सरकार खजिन्यांतील चलन. -वि त्या चलनाचा; पोतेचालीचा (रुपया, पैसा, नाणें इ०). **०झाडा**-पु. खजिन्याच्या पैशांचा हिशेब.

**पोतेअलग**—वि. वृषण अलग असणारा किंवा त्यावर केंस असणारा (घोडा) हें अशुभ लक्षण आहे. -अश्वप ११०४.

**पोतेरें, पोतारें**—न. १ शेणमातीनें चूल, घर इ० सारविण्याचें फडकें २ असें सारवण; शेणशितोडा; (कु) 'तेतेरा ३ (ल) क्षुद्र, क्षुल्लक वस्तु. 'शरीर नव्हे तें पोतारें।' -गीता २९०५ [पोत]

**पोथ-थी**—स्त्री. (व.) अळू (भाजी). 'पोथीच्या पानाच्या वड्या.' [हिं. पोथी]

**पोंथ**—पु. १ क्षत-छिद्रांत सूत घालून वाहविण्याची वात, खीळ; सुत्रण. पोत; वात. २ फाळानें पडणारें भोंक. [पोत]

**पोथंडी**—स्त्री. पोतंडी पहा.

**पोथळा**—पु. (व.) जोडा.

**पोथा**—पु. (कर) (ल.) मोठी पोथी. 'पोथा नीट ठेव' [पोथी]

**पोंथा**—पु (राजा.) १ शेणाचा, विष्टेचा पोहो. २ (ल.) (निंदार्थी) सुस्त मनुष्य; वातुळ शरीराचा माणूस.

**पोथी**—स्त्री. १ पुस्तक; ग्रंथ; हस्तलिखित. २ तांबड्या शाईप्रमाणें उपयोगांत आणावयाचा लाख, लोध्र इ०कांचा रंग; त्यांत भिजविलेला पोळीच्या आकाराचा कापूस; पोळी पहा. [सं पुस्तक; प्रा. पोत्थअ; तुल० हिं. पं. पोथा; गु. पोथी; सिं. पोथु; बं. पुथी-

ती] ०वाचा–वि. पोथी वाचणारा; पुराणिक. 'हरिदास, पुराणिक किंवा पोथीवाचा ... ' –खेया (माहितीचें टिप्पण) ४. ०पाठ–वि. पोथीवरून म्हणायाजोगा पाठ येतो असा (ग्रंथ, विषय) याच्या उलट मुखपाठ ०पुस्तक–न. (सामा.) कोणत्याहि आकाराचें पुस्तक, हस्तलिखित इ०

**पोंद-दी**—नस्त्री. (कु. कों.) बूड; तळ (भांड्याचें). [पेंदी]

**पोंवाडा**—पु. मोठा पोंचा; ठोका; खळगा.

**पोंवी-धी, पोंधा, पोंद्या-ध्या**—वि. फोंपशा; मांसल; सुटलेला, पुष्ट पण शक्तिहीन; सुस्त; बश्या व आळशी (मनुष्य).

**पोदोन**—पु (गो.) धर्मपिता. [पोर्तु. पॅाद्रिन्हो]

**पोद्या**—क्रिवि. निष्फळ; व्यर्थ; फुकट; वायां.

**पोंधा**—पु. रुमणीची खुंटी; हळीस आणि नांगर याचा जेथें जोड होतो तेथील खुंटी.

**पोपट**—पु एक पक्षी; राघू, शुक; कीर. [सं. पुट्=बोलणें] ०पंची-पंचीविद्या–स्त्री. अर्थज्ञानावांचून केवळ शब्दोच्चार; केवळ शब्दज्ञान; (ल.) अल्पविद्या. ' अलीकडची जी पोपटपंची तीस पूर्वी मुळीच थारा न मिळून ...' –नि १०७. (क्रि० करणें= बडबडणें; अर्थ न समजता पाठ केलेलें असेल तें म्हणून दाखविणें.) ०पंडित–पु. तुटपुंज्या, उसन्या ज्ञानावर विद्वानाशीं स्पर्धा करणारा. ०ज्ञान–न. पोपटासारखें शिकविलेलें तुटपुंजें ज्ञान. **पोपटी**–वि. पोपटाच्या रंगाचा

**पोपट-टी**—स्त्रीपु. (ना. व.) कडवे वाल; पावटा. **पोपटी**–स्त्री. (कों.) वाल इ०काच्या शेंगा मसाला घालून, तळून किंवा भाजून केलेला खाद्य पदार्थ.

**पोपटणें**—अक्रि. (व.) दिलें पडणें.

**पोपटी**—स्त्री तांबडसर जातीची कवडी [पोपट]

**पोपटी**—स्त्री. (कों.) शिमग्यामध्यें घरोघरचे पदार्थ आणून करावयाचें सहभोजन.

**पोपडा**—पु. १ सारवलेल्या जमीनीचा, भिंतीचा खपला; उखिरवळी; सुटलेला पापुद्रा. २ जखमेवरील खपली. [सं. पुड्= सोडणें; सुटणें]

**पोपडी**—स्त्री. दायट्यांत उगवणारें रोप. दायठा पहा –बदलापूर २९४.

**पोपडेंदोडकें**—न (ना.) घोसाळें.

**पोपणें**—सक्रि. विकणें. –मनको. [ओपणें ?]

**पोपती**—स्त्री. (विणकाम) १ मागावर सूत ताणून बसविण्यापूर्वी कुंच्यानें तें साफ करण्याची क्रिया; (क) सांदणी. २ (नाशिक) दहाबारा लुगड्यांसाठीं तयार केलेला गुंडाळलेला उभाराचा ताणा.

**पोपन(ण)स, पोपनी(णी)स**—न. १ एक फळ; चकोत्रें; पपनस. २ त्याचें झाड. पपनस पहा.

**पोपय-या-ई, पपैया**—पु. पपईचें झाड व त्याचें फळ. हें झाड उष्ण देशांत होतें. फळ साधारण नारळाच्या आकाराचें असून मधुर असतें. पपई पहा. [हिं. पपैया; मलायी ?]

**पोपली, पोपो-पी**—स्त्री. (कु. राजा.) लहान मुलासाठीं दूध घालून केलेली व निखाऱ्यावर भाजलेली कणकेची चांदकी. [सं. अपूप]

**पोपा**—पु. (गो) वडा. [सं. अपूप]

**पोपिसो**—पु. (गो.) फुप्फुस.

**पोंपेरें**—न. लहान मुलांनीं तोंडानें वाजविण्यासाठीं ताड किंवा केळीचें पान याची केलेली पिपाणी; पेपाणी; पेंपेरें. [ध्व.]

**पोपेला**—न. पुढील दांत नसलेला घोडा. –अश्वप १.१०४.

**पोफळ**—स्त्री १ सुपारीचें झाड. २ सालीसुद्धां असलेली सुपारी. [सं. पूगीफल, पुष्फल; प्रा पोप्फळ; फा पूपल; अर. फौफल] ०घालणें–पैज मारणें; देवापुढें सुपारी ठेवून प्रतिज्ञा करणें.'लटकें वाग्जाल। ना म्हणसी तरि पोफल। घातलें आहे। ' –ज्ञा १३.२०. ०गांठ–स्त्री १ दोरीच्या पदरांस दिलेली एक प्रकारची गांठ. २ वस्त्र नेसण्याचा, अंगावर घेण्याचा एक प्रकार, पद्धत. ' पोफळगांठी सेले नेसलियां। सुंदरी तिशां। ' –शिशु ६५४. **पोफळी**–स्त्री· पोफळ पहा.

**पोफळी**—वि. मोठ्या चौकटींचें (वस्त्र); फणीचीं तीन घरें काळीं, एक घर पांढरें, एक तांबडें, एक पांढरें असा उभार अडवण तीन घरें काळीं, एक पांढरें, एक तांबडें असें. किनार कोणतीहि (असें लुगडें). [पोफळ]

**पोफाळें**—न (गो.) लहान ओहोळ, नाला इ० कांवरून पलीकडे जाण्याकरितां बांधलेला पोफळी–नारळीच्या लाकडांचा पूल.

**पोबारा**—पु. (तिफाशी खेळ) फाशातील एक दान; पवबारा पहा. ' परी ते पोबारा खरेपणी। असतां क्षोभली मृडानी। ' –नव २५.४०. ०करणें–पवबारा करणें पहा.

**पो(पों)भाळणें**—सक्रि. चोळणें; गोंजारणें. ' पोभाळितां चरे अंतरीचें दु:ख। लासें फांसें मुख उघडावें। ' –तुगा २११७.

**पोम**—न. १ अंगीं विद्या नसतां माजविलेलें ढोंग; स्तोम; अवडंबर; देखावा; भपका. २ पोकळ प्रसिद्धि; रिकामा लौकिक, ख्याति. [का. पोम=फुगणें] ०बाहेर पडणें-फुटणें–स्तोम, ढोंग उघडकीस येणें. ०माजविणें-वाढविणें–स्तोम वाढविणें.

**पोमरी**—स्त्री. (कों.) ढगांच्या दिशेनें किंवा वायव्येकडून येणारा वारा. [हेट. पोयस=वायव्य दिशा]

**पोमा डेंगी हाकलणें**—सक्रि. (व) आपलेंच म्हणणें खरें करणें. ' तो आपलीच पोमाडेंगी हाकलतो. '

**पोमिनी**—स्त्री. (महानु.) एक झाड; वेली; पद्मिनी. ' एकें पोमिनीचीं पानें करितां ती। ' –दाव २१२.

**पोय**—स्त्री. १ पोफळीच्या पानाच्या देंठाजवळचा पसरट भाग (याचा द्रोण करतात). विरी; पवली, पोगी. नारळाचा कोंब; माडाचें बोंड; नारळीच्या फुलावरचें आच्छादन. २ (कु) नारळीच्या पेंडीचा जाड पापुद्रा. 'पोयींतून माडी काढतात' ०**कर**-वि. (कों.) प्रथमतः ज्यास पोय आली असा (माड) ०**कापो**-पु. (कों.) माडी काढणारा भंडारी. [पोय+कापणें]

**पोय**—स्त्री. धर्मपोई; पाणपोई.

**पोय**—स्त्री. १ (कु.) पोयाड; नदीला जाऊन मिळणारा ओहोळ; नदीला मिळणारा फांटा, अरुंद खाडी. २ (गो.) शेतांत खारें पाणी राखण्याकरिता केलेली खळी [दे.]

**पोयतीपूर्णिमा, पोयतीपुनव, पोयतें**—(प्र) पोवती पूर्णिमा इ० पहा.

**पोयस**—स्त्री. (हेटकरी. नाविक) वायव्यदिशा. **पोयशी (सी)वारा**-पु. (कों.) उत्तर व पश्चिम यामधून वाहणारा वारा हा चैत्र महिन्यात सुरू होतो

**पोयें**—न झाडाच्या ढोलींत, खबदडात, बिळात लागलेलें मोहोळ; मधाचें पोळें

**पोर**—पु. लहान मुलगा; पोरगा. १ -स्त्री. लहान मुलगी; पोरगी. लहान मूल; बच्चा. २ जनावराचें लहान पिल्लूं; पाडस; बछडें. -वि. (गो.) पोरका, अनाथ. [सं. पुत्रक; का. पोर] **म्ह**० पोरा आणि बुद्धि तेरा. ०**कट**-वि पोरासारखें; पोराला शोभणारें **पोरका**-वि १ लहान मुलाचें; मुलाला, शोभणारें; भव्य, गंभीर, प्रौढ इ० नव्हे तें (भाषण, वस्त्र इ०). २ (कों) आईबापांवाचून असलेला; अनाथ उदा० 'बापपोरका, आई-पोरका.' ०**किडा-पु.** धान्य खाणारा एक लहान किडा; टोका; क्षुद्र कीटक. ०**खाद्या**-वि. जिचीं मुलें लवकर मरतात अशी (स्त्री) ०**खेळ**-पु. १ मुलांचा इटीदांडू इ० खेळ. २ पोरासारखें हंसणें, उड्या मारणें इ० ३ घेणें देणें इ० व्यवहाराचें मर्यादा सोडून मनरवी वर्तन. ४ (ल.) सहज करतां येणारी गोष्ट **पोरगा**-पु. १ मुलगा; पोर. २ खिजमतगार पोर; पोऱ्या; लहान वयाचा नोकर. ३ स्त्रीवेष घेतलेला नाचणारा पोर. ४ लेकवळा; गुलाम [पुत्रक] **पोरगी**-स्त्री. मुलगी. **पोरगें**-न. लहान मूल ०**गळ**-वि. पोरकट पहा ०**चेष्टा**-स्त्री. पोरखेळ अर्थ २ व ३ पहा. मुलांचें नाचणें, बागडणें. ०**जिन्नस**-पुस्त्री. (निंदार्थी) लहान मुलगा; पोरसौदा, पोर. **पोरटा-टी-टें**-पुस्त्रीन (निंदार्थी किंवा रागानें) पोरगा-गी-गें; कारटा. ०**पिसा**-वि. १ पोरांचा अतिशय शोकी; मुलाची फार आवड असणारा. २ अपत्यप्राप्तिसाठीं अतिशय उत्कंठित झालेला ०**पिसें**-न. १ पोरांचा बेसुमार शोक २ अपत्यप्राप्तीसाठीं बेसुमार उत्कंठा. ०**बुद्धि**-स्त्री. अपक्व बुद्धि -वि. अपक्वबुद्धीचा. ०**वट**-वि. पोरांच्या आचारविचारासारखा; पोरकट पहा. [पोर+वत्] ०**वडा-वाडा-वंडा-पु** पोरांचा समुदाय; मुळमुळाट; मुलांचा पुष्कळ भरणा असलेलें कुटुंब; घर, गाव, राज्य इ० च्या कारभागमध्यें प्रौढ, अनुभवी मनुष्य नसल्यामुळें होणारी अव्यवस्था, किंवा अननुभवी लोकाचें प्राधान्य 'नुस्ता पोरवडा घरीं न कवडा विर्त्ती बरा नीवडा।' -असु ५ [पोर+वाडा=घर] ०**वय**-न लहानपण, लहान वय 'संसार सुखास अहल्या आंचवली पोरवयांत।' -विक १६. ०**वाला**-वि. १ मुलेंबाळें असलेला (कुटुंबी पुरुष-स्त्री). २ (ल.) लेंकुरवाळें; फाटे फुटलेलें (हळकुंड). ०**समजूत**-स्त्री. लहान मुलाची बुद्धि; अल्प समजूत. ०**सौदा**-पु लहान मुलगा, पोरजिन्नस 'हा पोरसौदा असून बरा शहाणा आहे' -वि पोरवय, मुलासारखा [पोर+फा, सौदा=माल] **पोरांडी-डें**-स्त्रीन (उपहासानें) पोर वडा पहा [पोर+राड] -वि पोरें व बायका मात्र आहेत असें. [सं पुत्ररंड] **पोरापोरका**-वि आईबाप आणि मित्र नसलेला, अनाथ (मुलगा). [पोरका+पोर] **पोरापोरीं, पोरासोरीं**-क्रिवि १ पोरामध्यें, पोरांकडून, पोरानीं. २ एका मुलापासुन दुसऱ्या मुलाला अशा रीतीनें वंशपरंपरेनें (वतन, वारसा इ० जाणे). **पोरीटोरी**-स्त्रीअव. (निंदार्थी) मुली. 'पोरीटोरी गोरी काळी साऱ्या पाहुनि कविराय बाला।'-राला ५४. **पोरेंबाळें-लेकरें-सोरें**-नअव. मुलें लेकरें; (व्यापक) मुलेंबाळें [सं. पुत्रक+सोदरक] **पोरो**-वि. (कु) पोरका, आईबाप नसलेला. **पोरोडा**-पोरवडा पहा. **पोर्या, पोऱ्या**-पु १ पोरगा अर्थ १ ते ३ पहा. २ (कों.) पोरकिडा. ३ (प्र) पोद्दार पहा ४ बताणा, बच्चा पहा.

**पोर**—न. (ना.) मागील वर्ष. [हिं. सं. पूर्व?] **पोरुं**-क्रिवि. (गो.) गेल्या वर्षी.

**पोरका**—पु. (व.) पावसापासून भिंतीचें संरक्षण करण्याकरितां पळसाच्या फांद्यांवर माती घालून केलेला थर.

**पोरकें-क्या**—न (नाविक) सुकाणूजवळची तिसरी, कल्मीच्या मागची व तिच्या पेक्षा लहान काठी किंवा शीड.

**पोरचाळवणी**—स्त्री एक पक्षी.

**पोरदिस**—क्रिवि. (कातोडी) गुदस्ता -बदलापूर १२८. [परवां, पूर्व दिवस]

**पोरसणें**—सक्रि (कों.) अजमासानें ताडणें.

**पोरसावणें**—सक्रि. (गो.) कपडा जळल्याचा वास येणें.

**पोरा-री**—पुस्त्री टोका. पोरकिडा पहा. 'जेथ मंगळाचिया अंकुरीं। सवेंचि अमंगळाची पडे पोरी।' -माज्ञा ९.५०३. **पारी** पहा [पोर=लहान मूल]

**पोरा**—वि. लावल्यावाचून आपल्या आपण उगवलेलें; रानटी; जंगली (झाड). [सं पूर्व] **पोरें झाड**-न. जंगली, रानटी झाड; तृण **पोऱ्यो**-वि. (गो) आपोआप उगवलेला; (ल) निरुपयोगी.

**पोरुणें**—न (कु.) कण्हणें 'तो ताप आल्यापासून एकसारखा पोरुतो.' [ध्व]

**पोर्णें**—वि. (गो) जुनें; पुराणें [सं पुरातन; हिं पुराना]

**पोर्तुचें**—सक्रि (गो.) परतणें; उलट करणें. [परतणें]

**पोर्पाळ**—वि. (गो) १ उजाड. २ (गो) बेलगामी.

**पोर्ले. पॉर्ल**—न. (गो) चुलीच्या आसपासची जागा.

**पोर्शी**—क्रिवि (गो) परस्पर. [हिं. अरस-परस]

**पोल, पोलकट, पोलट**—न. १भरदार दाणा नसलेलें धान्य; विशेषतः भात; हलका दाणा; फोलपट; भरडीचा कोंडा; (प्र. फोल). २ शोभेची दारू साठविण्याचें मातीचें भांडें; पोकळ नळी (दारूच्या बाणाची) 'बाणाची पोलें लोखंडी, बांबूची किंवा जाड कागदाची असतात.'—अग्निक्रीडा १३ —वि. १ पोकळ; फोल (दाणा); हलकें पोकळ धान्य असलेली (धान्याची रास). २ कोय किंवा गुठी नसलेला (आंबा, फणस इ०) ३ (गो.) फुकट झालेलें; पळिज; फलकट. [सं पुल्=उंच होणें]

**पोलक**—पु (सातारा) लखोटा, लिफाफा. नेवाश्याकडे गालिचा म्हणतात. [पोल=पोकळ]

**पोलकें**—न. बायकांची चोळीवजा बंडी. [इं. पोल्का]

**पोलणें**—अक्रि. नाहीशी होणें (थंडी, पडसें) प्र फोलणें. [पोल=पोकळ]

**पोलपेढ, पालपेड, पोलवा**—स्त्रीपु (गो.) एक मासळी.

**पोला**—वि. पोकळ; पोलकट पहा. [हिं. पोल=पोकळ]

**पोला-लो**—पु. (कु) गाल. 'माजो पोलो सुजला'

**पोलाटी**—स्त्री. (कों) छातीशीं पंख असणारा लहान मासा.

**पोलाद**—न. कार्बन घालून कठिण व लवचीक केलेलें लोखंड; तिखें. [फा. पु(फु)लाद्] **पोलादी**—वि. पोलादाचें.

**पोलिस्त**—स्त्री. १ लागवड केलेली जमीन. २ शेताच्या उत्पन्न वरचा पाटलाचा आणि महाराचा हक्क

**पोली**—वि. (वों) मेलेली व वाळलेली (लीख, ऊ) याच्या उलट सपुट=जिवंत, वळवळणारी ऊ. [पोल=पोकळ]

**पोलीस**—पु शिपाई; स्थानिक बंदोबस्ताकरितां ठेविलेला शिपाई. —न. बंदोबस्ताचें खातें [इं.] **०अम्मलदार**—पु जिल्ह्याचा मुख्य पोलीसअधिकारी **०खातें**—न कोतवालीचें काम 'पोलीसखातें म्हणजे म्हारकी खातें अशी लोकांची समजूत असून...'—टिले २.४०४.

**पोलू**—वि (गो) पातळ. [पोल=पोकळ]

**पोलें**—न. एका चौरस काठीचें अथवा बिघ्याच्या एक चाळिसांश हिश्शाचें जमीनीचें माप. [इं. पोल]

**पोलेगाद**—न (गो) सवा इंच लांबीचें परिणाम.

**पोल्योपोल्यो**—न. (व.) ढिलाई; पोकळपणा. 'पोल्यो पोल्यो सांपडलें म्हणून असे माजला!' [पोल=पोकळ]

**पोल्हार-रा**—नपु. पायाच्या अंगठ्यांत घालण्याचें बायकाचें एक चांदीचें भूषण. 'अनवट जोडवीं पोल्हारें। कानीं बांधली एकसरे।'—ह १९.६७.]

**पोव, पोवटी**—पुस्त्री. (राजा.) शेणाचा, विष्टेचा पोटो, ढीग. [पोहो]

**पोव**—पु. (कों.) वळचणीपासून मुगळा (आढ्या) पर्यंत एकापासून एक असे छपरास आलटून पालटून दिलेले (गवत, टहाळ इ०चे) थर. (क्रि० घालणें).

**पोंवई**—स्त्री. (प्र.) पोई; धर्मपोई.

**पोवखंड**—न पोफळीच्या पोयीची चिरटी. ग्रंथ, पोथी इ०ला अथवा कागद सुरक्षित ठेवण्यासाठीं पुठ्ठीपत्राप्रमाणें हिचा उपयोग करतात पोय पहा [पोय+खंड]

**पोवची**—स्त्री पोंची, मनगटावर बांधण्याचा दागिना 'मुद्रिका पोवची धगधगिती।'—वेसीस्व ९.१४. २ (व.) स्त्रियांच्या हातातील जवा नांवाचा दागिना. [हिं.]

**पोवटी**—स्त्री. (गो.) पोटरी.

**पोवडा**—पु. (कों) माडाच्या फांदीचें मुळाकडचें शेवट; बुडखा पोय पहा.

**पोवणी-णें**—पोहणी-णें पहा.

**पोवणें**—सक्रि. (केळीचीं पानें इ०) विस्तव, ऊन, वाफ इ०चा शेक देऊन नरम करणें [पोळणें]

**पोवणें**—सक्रि. (विणकाम) फणी-ओवीमध्यें ताण्याचे धागे ओवणें. [ओवणें?]

**पोंवणें**—सक्रि. (कों.) पोहणें; तरंगणें.

**पोवतें-ती**—नस्त्री. १ श्रावणी पौर्णिमेस (व इतर दुसऱ्या महिन्यात) देवास अर्पण केलेला (चार अथवा पांच कापसाच्या धाग्यांचा) दोरा; या महिन्यांत घालावयाचें नवें जानवें; उत्सवाच्या किंवा व्रतांच्या प्रसंगीं ब्राह्मणांनीं आणि इतरांनीं गळ्यांत, हातांत, मनगटात, घातलेले पवित्र दोरे. २ स्त्रियांचा पोतीचा, मोत्यांचा गळ्यांतील एक दागिना. ३ लग्नांत शूद्रांनीं गळ्यांत घालावयाचे पिवळे दोरे; गंडा. [सं. पवित्र] **पोवती पूर्णिमा-पुनव**—स्त्री. श्रावणी पौर्णिमा. या दिवशीं पोवतें घालतात.

**पोवन**—पु. (गो.) सावरीन (नाणें). [इं पौंड]

**पोंवप**—सक्रि. (गो.) पाऊस पडून घरात गळणें.

**पो(पों)वरी**—स्त्री. पांवा; मुरली; बांसरी. [पोवा]

**पोवली**—स्त्री. १ सुपारीची विरी; पोय पहा. २ (गो.) पोफळीच्या पानाचा पसरट देंठ.

**पोंवशोंवचें**—सक्रि ( गो ) कुजण्यास लागणें; विरविरीत होणें [ पोंवसॉ ] **पोंवसॉ**-वि ( गो ) कुजण्यास लागलेला ( मासा ) **पावलुटाग**-स्त्री. ( गो ) घाण; दुर्गंध; कुजट वास

**पो(पों)वळ, पो(पों)वळी**—स्त्री. १ देवळाच्या भोंवतालची भिंत. २ ( कों. ) पाट, कालवा यात पाणी सोडण्याकरिता ठेवलेलें दारें; दार

**पोवळीं-ळें, पोंवळीं-ळें**—न प्रवाल, पोळें. एक कीटक जन्य तांबडया रंगाचा दगड, एक रत्न [ सं प्रवाल ] **पोवळ पाटली**-स्त्री. ( बायकांचा हातांत घालावयाचा ) पोंवळें सोन्यांत मढवून केलेला एक दागिना; पाटली. [ पोंवळें+पाटली ] **पोंवळ सर**-पु. पोवळयाचें केलेलें कंकण. [ पोवळें+सर ] **पो(पों)वळा**-वि धूसर किंवा पोंवळयाच्या रंगाचें ( जनावर, गाय, बैल ) **म्ह०** ढवळयाजवळ बांधला पोवळा वाण नाहीं पण गुण लागला

**पोवा**—( कों ) १ सापाचें पिलू. २ ( छप्पर शिवणें, कुंपण करणें वगैरे कामात ) दाभणाप्रमाणें उपयोगी पडणारी काठी.

**पोवा**—पु समूह; जमाव ( यात्रेकरू, भिकारी, यांचा ) ' पोवा वरी पोवा येऊनि जाती । ' -दावि १६३. [ सं प्रवाह ? ]

**पोवा**—पु. १ (सामा ) केळफुलाचें आवरण; पोफळीची विरी. २ करडईवर पडणारा रोग. -कृषि ३६३.

**पो(पों)वा**—पु अलगूज; पांवा; वेळूची पिपाणी. [ ध्व ]

**पो(गो)वाडा**—पु पवाडा पहा.

**पोवाणी, पोवाळी**—स्त्री. ( कों. ) पोहणें; ( प्र. ) पोवणी. ( क्रि० टाकणें ). [ पोहणी ]

**पोवी**—स्त्री ( कों. ) ( प्र ) पोई, पोय.

**पोवें**—न दगड, झाड, लांकूड वगैरेच्या सांधींत मधमाशांनीं केलेलें मधाचें पोळें; मोहोळ. [ पोयें ]

**पोशा**—वि. १ (विद्यार्थी) पोसलेला; पालन केलेला; स्वतःच्या-प्रमाणें वाढविलेलें ( मूल ). २ गबदुल; पुष्ट; फोपशा; खाऊन स्वस्थ बसणारा. [ सं. ] पोषण ]

**पोशाक-ख-ग**—पु पेहराव; अंगावर घेण्याचीं वस्त्रेंप्रावरणें; शोभेसाठीं अंगावर घालावयाचीं वस्त्रें. [ फा. पोशाक् ] **०करणें**—वर सांगितलेलीं वस्त्रें अंगावर घालणें, घेणें. **०पट्टी**-स्त्री. सन्मानार्थ द्यावयाच्या पोशाकांच्या खर्चाकरितां बसविलेली पट्टी, कर. **पोशाकी-खी-गी**-वि. छानदार; दिखाऊ; आकर्षक पण कवडी-मोल: मिजासी: डामडौली. पोशाकाच्याच उपयोगी· तादृश टिकाऊ नसलेलें ( भांडीं. वस्तु, मनुष्य इ० ). **पोशाकी नांव**-न. औपचारिक परिपाठांतील नांव;व्यावहारिक नांव पहा. **पोशाकी वस्त्रं-दागिने**-नपुअव शानदार, सणवारीं घालण्याचे दागदागिने.

**पोशिंदा**—वि. आश्रयदाता; पालनकर्ता; प्रीतिपूर्वक पोसणारा. ' लाख मरोत पण लाखांचा पोशिन्दा न मरो. ' -राजसंन्यास ७३. [ फा. ]

**पोशीदा**—वि. आच्छादित; गुप्त; गैरमाहित ' पंतप्रधाने यांसी घरोब्याचा प्रकार पोशीदा नाहीं ' -रा ५ १४५ [ फा. ]

**पोशीश-स**—वि. गुप्त. ' कित्येक पोशीश मसलतीच्या मज्मुनावास्ते अजम राघो विठ्ठल यास फिरस्ताद केले असत ' -पया व २८७. [ फा. पोशिश्=आच्छादन ]

**पोशेणें**—अक्रि. धान्याचें कणीस बाहेर पडणें [ प्रवसणें ]

**पोशेर-रें**—पुन. (कों.) मोठें, तांबडें व कांटेरी कमळ.

**पोशेवचें**—सक्रि. १ (गो.) हातांनीं घासणें. २ (गो ) काढून घेणें.

**पोषणें**—सक्रि. पोसणें; संभाळणें; आश्रय देणें; खाऊंपिऊं घालणें. [ सं. पोषण ] **पोषक**-वि. १ पोसणारा; पालन करणारा; आश्रय देणारा. २ पुष्टि देणारें. **पोषण**-न १ पालन, संवर्धन; अन्नादि देऊन रक्षण करणें, प्रतिपाल, आश्रय २ ( ल ) भक्ष्य. -शर. ३ बढती -शर. [सं. पुष्=पोसणें] **पोषणीय**-वि. पोषण, पालन किंवा संवर्धन करण्यास योग्य. **पोषित**-वि पोसलेला; संभाळलेला; बाळगलेला **पोष्णा**-वि १ दत्तक २ खावयास घालण्याच्या अटीवर ठेवलेलें व स्वतःच्या उपयोगांत आणलेलें ( दुसऱ्याचें जनावर ). ३ ( माण ) दुसऱ्याचे जिवावर जगणारा. **पोष्य**-वि. १ ज्याचें पोषण करावयास पाहिजे असा ( पुत्र, कन्या इ० ) २ पूर्वीच्या पत्रव्यवहारांत वयानें वडील मित्र किंवा आश्रयदाता इत्यादींना पत्र लिहितांना लिहिणाराच्या नांवापूर्वी हा शब्द लिहीत असत; आश्रित [ सं ] **०वर्ग**-पु. ज्याचें पोषण केलें पाहिजे अशांचा ( मुलें, चाकर इ० चा ) समुदाय.

**पोषाक-ख-ग, पोषाकी-खी-गी**—पोशाक; इ० पहा.

**पोष्ट**—न १ टपालकचेरी २ टपाल. [ इं. पोस्ट ]

**पोस**—पु (गो ) खरवस [सं पीयूष] **चांदण्याचा पोस**-पु नुकतें पडूं लागलेलें चांदणें. -शर

**पोसणें**—सक्रि पोषणें पहा.

**पोसणें**—अक्रि. १ जोरानें वाढणें, पुष्ट होणें; भरभराट होणें; लठ्ठ होणें. ' पोसे शरीर दोंदिक । ' -नव २४.१५४. २ पूर्ण वाढ होणें; पक्वदशेस येणें ( प्राणी, झाड इ० ) [ सं पुष्, प्रा. पोस, पोसण ] **पोसका-गा**-वि. ( गो ) दत्तक; संभाळलेला; पोसावयास घेतलेला ( मुलगा ). **पोसकेपण**-न. ( गो ) दत्तक पद्धति **पोसणा-णें-ण्या**-पुन. पोष्णा पहा. ' होईन सरता । संतामाजीं पोसणा । ' -तुगा १५०३.

**पोसर**—न. ( सामा. ) एक प्रकारचें कमळ. पोशेरें पहा.

**पोसवणें**—अक्रि. कणीस बाहेर पडणें; पसवणें. [ सं. प्रसव ]

**पोसिंदा**—वि. पोशिंदा पहा.

**पोसूं**—न. ( गो ) नाचणीचें लोंगर. [ पसवणें ]

**पोस्ट**—पु १ (छापखाना) छापण्याचा कागद. आकार २०×१६ इंच –मुद्रण ९६ 'बँक पोस्ट पेपर.' २ टपाल. पोष्ट पहा.

**पोस्त**—न १ नोकरांचाकरास सणावारीं–विशेषतः होळीच्या सणानिमित्त दिलेला बक्षिसीचा पैसा किंवा दारू २ त्या पैशाची श्रमपरिहारार्थ दिलेली मेजवानी. ३ नेहमींपेक्षा जास्त किंवा दक्षतेनें काम करण्याबद्दल दिलेला पैसा, चिरीमिरी ४ शाई बोळून किंवा वाळून जाऊं नये म्हणून दौतींत ठेवलेली चिंधी; शाईत काजळ घोटण्याकरिता (पुरचुंडी करण्याकरिता) घ्यावयाचें फडकें ५ (कों) सर्व गावानें शिकार करून, घरोघरचें धान्य जमवून करावयाचें सहभोजन. [सं. पुष्टि; हिं. पोस्त=अफूचें बोंड] ०पिंड–पु दुसऱ्याच्या जिवावर चैन करणारा; पंक्तिपठाण; परान्नपुष्ट **पोस्तबोंड**–न. अफूचें बोंड. **पोस्ती, पोस्त्या**–वि. १ निशाबाज, झिंग्या; दारूबाज २ वृथापुष्ट, गलेलठ्ठ

**पोंहचणें**—अक्रि. १ पोंचणें, पोहोंचणें; दाखल, प्राप्त होणें २ हातीं येणें, पावणें. ३ (ल) समजणें; अर्थ कळणें; जाणणें, अवगत होणें 'तर्कांम, खुगेन पोंहचणें.' [हिं पोंहचना] **पोंहच**–स्त्रीपु १ पावती. २ येणें, पावणें; हातात येणें (येणें असलेला पैसा). ३ पावलेला पैसा, दाणा इ० 'पोंहच वजा करून बाकीचे रुपये घे' ४ –पु. (ल) टप्पा; अटोका; आवाका; सामर्थ्य. 'जसजसा कोणाच्या बुद्धीचा पोंहच तमतमें त्याला समजतें.' **पोंहचता**–वि पोहोंचलेला; प्राप्त झालेला 'मला तुम्हाकडला कागद पोंहचता झाला' **पोंहचविणें**–सक्रि पोहोंचतें करणें; पावता करणें; नेऊन घालणें (माणूस, जनावर, वस्तु) **पोंहचेला**–वि. (ल.) दूरवर पाहणारा, दूरदृष्टि, दूरवर पोंहच असलेला.

**पोंहची**—स्त्री १ मनगट पोंची पहा २ पुरुषाच्या मनगटावर बांधण्याचा एक अलंकार, पोंची 'मुक्ताशेखर पोंहच्या धुकधुक्या हीरांगदे उज्वले।' –मारुह ३४२ [हिं]

**पोहटा**—पु १ पुरामध्यें नदीच्या पाण्यास येणारी फुगवटी, फुगणें; पूर. 'ओढयाला पोहटा आला.' वरील प्रमाणें नदीचें पाणी फुगल्यामुळें कांठावरच्या जमीनींत पडलेलें भगदाड, घळी २ खाडीपासून दूरवर गेलेला तिचा फाटा. ३ मळीची जमीन गद्दी पहा. ४ शेणाचा गोळा; पोहो **पोहटी**–स्त्री. शेणाचा लहान पोहो २ खाडीची शाखा, पोहडी; पूर आलेल्या नदीचा लहानसा फाटा, प्रवाह. **पोहटीची माती**–स्त्री शेणाच्या पोहोला चिकटलेली माती; ही खताकरितां उपयुक्त असते; पुरामुळें आलेला गाळ

**पोहणें**—अक्रि १ हातापायानीं पाणी तोडून नदी वगैरेंत तरणें २ तिरणें; तरंगणें, पेवणें ३ परिपूर्ण होऊन निरंतर वर्तणे, गर्क असणें (शास्त्र, संपत्ति इ० मध्यें) –सक्रि. पोहून नदी ओलांडणें. [सं. प्लवन; प्रोहण] (वाप्र.) **पोहणारा बुडतो, लिहिणारा चुकतो, शहाणा नडतो, खेळणारा पोळतो**–जो पोहणारा असेल तोच बुडतो इ० (असे परिणाम घडतात म्हणून त्या त्या गोष्टी कोणी करूं नयेत कीं काय? तर कराव्या) **पोहणी**–स्त्री. १ पोहणें २ पोहण्याचा एक दम; एक सुरकांडी 'नदीच्या त्या तीरापासुन एके पोहणीनें या तीरास आलों' –वि पोहण्याजोगी खोल (नदी), पोहून जाण्याजोगा खोल (प्रवाह) **पोहणीस घालणें**–जनावरास नदी वगैरेच्या पाण्यांत घालणें **पोहनाव**–वि पायउतारानें जातां येत नमून नावेच्या साहाय्यानें जाता येण्याजोगें पोहणी (–वि.) पहा

**पोहणी**—स्त्री. घाण, दुर्गंधी (शेण इ०ची) [पोहो=शेणाचा]

**पोहती**—स्त्री. लहान पोहो

**पोहरण**—स्त्री (व) लांबण; दीर्घसूत्रता 'पोहरणीं पडलें काम, आतां केव्हां होईल कोणीं सांगावें?'

**पोहरणें**—पुक्रि डब्ब होणे, फुगणें (पोट), फुगणें (माती, भिंत इ० भिजविली असतां)

**पोहरा**—पु विहिरींतून पाणी काढण्याचें लाकडी किंवा धातूचें भांडें [सं. अपोहर, पयोधर]

**पोहा**—पु. मेळा; थवा, पोवा, समुदाय (यात्रेकरू, भिक्षेकरी यांचा 'पोहा चालतो अपार।' –दावि ४५ [सं. प्रवाह]

**पोहा**—पु. साळीवर ऊन पाणी घालून कुटून चपटा केलेला भाताचा दाणा पोहे याचें एकवचन [सं पृथुक; प्रा. पुहुअ, सिं पेहूं]

**पोहाडणें**—सक्रि (व) पोहणीं घालणें. 'उन्हाळ्यात बैल पोहाडतात' [सं प्लवन]

**पोहिटी, पोहिटीची माती**—पोहटी इ० पहा.

**पोही-हे**—स्त्री (प्र) पाणपोई पहा. 'पोह्या अन्नछत्र घालुनियां घरीं। दंडितो बाहेरी आलियासी।' –तुगा १२१६. [पोई]

**पोहे, पोहू**—पुअव पोहा पहा [सं पृथुक]

**पोहो**—पु शेणाचा पो, पोहटा, विष्टेची रास.

**पोहोंच, पोहोंचणें, पोहोंचता, पोहोंची, पोहोटी, पोहोडी, पोहोमी, पोहोणें, पोहोरणें, पोहोरा**—पोहंचणें, पोहच इ० पहा.

**पोहोडा**—पु. (व ना) भाजून वाळविलेला हुरडा [पोहा]

**पोहो फाकणें**—सक्रि. (व) अरुणोदय होणें 'पोहो फाकला म्हणजे निघा' [सं प्रभात]

**पोळ**—पु १ देवाला वाहिलेला, पितरांच्या नांवानें सोडलेला खोंड याचे अंगावर त्रिशूलादि चिन्हें डागतात; वसु 'रचूनि महत्त्वाचें खरें। मळी एकें कालुगेनि पोळें।' –ज्ञा १३.३९. २ (ल.) वृथापुष्ट मनुष्य; आळशी, लठ्ठ, निरुपयोगी माणूस. –वि. माजलेला; मोकाट. [देप्रा. पोआल=बैल] ०जत्रा–स्त्री १ पोळ सोडलेला बैल, रेडा यास देवीपुढें बळी देणें. २ (ल.)

पिटवणूक; शत्रूंच्या सैन्याची कत्तल व दाणादाण. 'याप्रकारें मल्हारराव याचे फौजेची पोळजत्रा झाली.' -भाब ८१. पोळा पहा.

**पोळ**—स्त्री. १ नुसत्या दगडांची रचलेली (माती, चुना इ० शिवाय) भिंत २ आळी; बोळ [सं प्रतोली; गु ]

**पोळ**—न (गो.) जमीनमोजणीच्या मापाची काठी. [इं. पोल]

**पोळ**—पु (ना ) मोठी पळी, पळा [ पळा ]

**पोळ**—पु ( बैलगाडी ) लांब, सरळ व व टोळया गाडीच्या दाडया प्रत्येकी.

**पोळ-ळें**—न. (कों.) मोहोळ.

**पोळकी**—स्त्री १ कागदाची नळी (बाण, काडतूस, फटाकडा इ०करिता केलेली). पोल, पोलकट अर्थ २ पहा २ (क ) लखोटा; लिफाफा [ हिं पोल=पोकळ ]

**पोळणें**—अक्रि. १ भाजणें, होरपळणें, जळणें; अग्निस्पर्श होणें, चटका लागणें. २ (ल) हातीं घेतलेल्या कामात तोटा, नुकसान लागणें, चट्टा बसणें. ' जामीन राहून मी एकदां पोळलों ' ३ (ल.) दु.खानें व्यथित होणें [दे का होळे-तेजस्वी असणें, चकाकणें]

**पोळभाज**-स्त्री. (शेतकी) जमीन भाजण्याचें काम; भाजवणी [ पोळणें+भाजणें ] **पोळींव**-वि पोळलेलें; भाजलेलें; जळलेलें.

**पोळपाटली, पोळसर, पोळा-ळें**—(उत्तरेकडे) पोवळपाटली, पोवळसर इ० पहा.

**पोळा**—पु. आषाढ शुद्ध १४, श्रावण व॥ ३० व भाद्रपद व॥ ३०या दिवशीं बैलास शृंगारून पूजाअर्चा करून थाटानें मिरवितात तो उत्सव, सण. [ दे॰प्रा पोअलय, पोळ ]

**पोळा**—पु १ मधमाशांचें पोळें २ आडाच्या पानावर मुंगळे, उंबील, हुरण यानीं केलेलें घरटें.

**पोळा**—पु १ घर इ० जळत असतां त्यांतून वाऱ्यानें वर उडणारा तृणादि समुदाय २ ( कों ) दाढीचा, जमीन भाजण्यासाठीं त्यावर पसरलेलें गवत व पानाचे डाहळे वगैरे याचा जळल्याशिवाय राहिलेला भाग. [ हिं. पोळ=पोकळ ]

**पोळा**—पु. (कों ) केळीच्या पानांत घालून विस्तवावर भाजलेला पोकळा अथवा शेवग्याचीं फुलें; पानपुडा; लहान मुलांचें एक खाद्य; शिजविलेला भात. [सं. पुलाक ]

**पोळी**—स्त्री १ कणीक भिजवून, लाटून भाकरी सारखी केलेली चपाती, कणकेचा उंडा आणि उकडीचें पुरण यांची केलेली चपाती २ मोहोळाचा-मध नसलेला पोळीच्या आकाराचा भाग ३ (ल.) एखादा दाबून पोळीसारखा केलेला पदार्थ ४ लाख, लोध्र, अळिता इ०कांच्या रंगांत भिजविलेला, पोळीच्या आकारासारखा केलेला आणि वाळलेला कापूस. हा वाटेल तेव्हां पाण्यांत भिजवून याची तांबडी शाई करतात. ५ (ल.) कांबळी; बैलाच्या गळयाखालीं सुटलेला भाग; पवळी. [ सं. पोलिका, पुलिका; बं. पुलि; का. होळ्ळु=लाटणें, होळिगे-पोळी ] (वाप्र.) ०पडणें-(प्रा.) दग्ध होणें. ०पिकणें-चैन होणें; कांहीं दिवस सुग्रास अन्न मिळण्याचा योग प्राप्त होणें (आपल्या) **पोळीवर तूप ओढणें**-दुसऱ्याच्या फायद्याकडे लक्ष्य न देतां आपला फायदा करून घेणें; अप्पलपोटेपणा करणें; एकट्यानेंच सगळें गिळंकृत करणें सामाशब्द- **पोळतवा**-पु. पोळी भाजण्याचा तवा. [ पोळी+तवा ] **पोळपाट-पाट**-पु पोळी लाटण्याचा लांकडी गोल पाट [ पोळी+पाट ] ०**तुकडा**-पु (सामा ) पोळी इ० खाद्य पदार्थ [ द्वि ] ०**वरण**-न १ पोळी व वरणाचें जेवण २ (ल ) साधें जेवण. **पोळ्यापाठक**-पु (विनोदार्थी) पोळया करणारा माणूस (दुसऱ्या कोणत्याहि कामास निरुपयोगी या अर्थी )

**पोळें**—न (कों ) मधमामाशाचें मोहोळ; मधुकोश. [पोळी]

**पोळो**—पु ( गो ) अंबोळी ( खाद्यविशेष ) [ पोळी ]

**पोळोव**—पु ( गो ) तोंडीलावण्यातील दाट रस

**पौ**—पु फाशावरील एक या संख्येचें चिन्ह, पव [ हिं पव ]

**पौगंड**—न मनुष्याची पांचपासून १६ वर्षांपर्यंतची, वयात येईपर्यंतची अवस्था, जवानी, वाढती दशा, बाल्यावस्था व तारुण्य याच्या मधील स्थिति [ सं. ]

**पौंची**—स्त्री पोंची, पोंहची पहा

**पौठ**—स्त्री १ (गो ) पोटरी २ (गो ) बरोबरी; तुलना ' ताजी पौठ धरूं नजो=त्याची सर येणें शक्य नाहीं '

**पौंड**—पु १० रुपये किंवा थोडें जास्त किंमतीचें एक इंग्रजी नाणें, सॉव्हरिन [ इं. ]

**पौढणें**—अक्रि (काव्य) लवंडणें, आडवें होणें, पहुडणे पहा (विश्रांति किंवा झोपेकरिता ) ' मी पिउन पौढल्ये नका ग मज हालवूं । ' -ऐपो ३१६. [ पहुडणें ]

**पौण, पौणकें, पौणशहातारी**—पाऊण, पाऊणकें इ० पहा.

**पौतिपूर्णिमा, पौतें**—पोवतीपूर्णिमा, पोवतें इ० पहा.

**पौत्र**—पु नातू (बहुधा मुलाचा मुलगा) [सं ] **पौत्री**-स्त्री नात (बहुधा मुलीची मुलगी). [ सं ] **पौत्रिकेय**-पु पुत्रिकासुत

**पौनू**—सवि (नंदभाषा) सात. ' पौनू मुरके (रुपये) आठ दिवसानीं तो देणार आहे. '

**पौन:पुन्य**—न पुन:पुन करण्याची क्रिया; पुनरावृत्ति [सं ]

**पौनरुक्त्य**—न. भाषणाची, बोलण्याची पुनरावृत्ति [सं. ]

**पौनर्भव**— पु दोन वेळ लग्न झालेल्या स्त्रीचा मुलगा. अक्षत किंवा क्षतयोनि अशा पुनर्भूच्या ठायीं सवर्णापासून जन्मलेला मुलगा. बारा पुत्रातील सहावा [ सं ]

**पौबारा**—पु ( फाशांचा खेळ ) पवबारा पहा. [ पवबारा ]

**पौर**—वि १ पुरवासी; नागरिक. २ -वि शहरांत बनविलेला; उत्पन्न केलेला; नगराचा; नगरी; नगरासंबधी. [ सं. पुर-पौर ]

**पौराणिक**—पु. पुराणिक पहा. -वि. पुराणासंबंधीं; पुराणांतील. [ सं. ]

**पौरुष**—न. १ पराक्रम; शौर्य; पुरुषाचा गुण; पुरुषत्व २ शक्ति; सामर्थ्य; जोम. ३ –पुल्लीन मनुष्याच्या उंचीसंबंधी दोनही हात वर करून हाताच्या बोटापर्यंतची उंची. –वि मर्दानी, मानवी; मनुष्याचा; मनुष्यविषयक [ सं ] ०**वाद**–पु व्यक्तीचें इच्छास्वातंत्र्याचें मत किंवा त्याचें समर्थन; स्वतः च्या प्रयत्नानें मनुष्य आपला उत्कर्ष किंवा अवनति करून घेतो असें मत; प्रयत्न वाद. याच्या उलट दैववाद; प्रारब्धवाद [ सं. ] **पौरुषवादी**–पु. वरील मताचा **पौरुषेय**–वि पौरुष ( –वि. ) पहा [ सं. ]

**पौरोहित, पौरोहित्य**—न पुरोहिताचें काम [ सं ]

**पौर्णमासी, पौर्णिमा**—स्त्री पूर्ण चंद्राचा दिवस; शुक्ल पक्षातील शेवटचा दिवस उत्तरहिंदुस्थानांत अद्याप पौर्णिमांत महिना मानतात. [ सं पूर्ण+मास ]

**पौर्वापर्य**—न पूर्वापर, मागला पुढला संबंध [ सं. ]

**पौल**—पु ( राजा ) संतति; गाय, म्हैस इ०चें वासरूं.

**पौंश्चल्य**—न. व्यभिचार; वेश्यावृत्ति. [ सं ]

**पौष**—पु. चैत्रादि महिन्यांतील दहावा महिना [सं.] **पौषी**–स्त्री. पौषांतील पौर्णिमा –वि. पौषासंबंधीं.

**पौष्टिक**—वि. १ पुष्टिकारक; बलवर्धक; तेजस्कर; पोषक; धातुपुष्ट करणारें. २ श्रेयस्कर; आयुष्यवर्धक; संपत्तिदायक; सुखकारक ( यज्ञ–याग, धार्मिक विधि इ० ) [ सं ]

**पौळ–ळी**—स्त्री कुंपणवजा दगडाची लहान भिंत; पोवळी; आवार; तट. पोवळ अर्थ १ पहा ' तेथ सप्त पौळीं । रत्नतेजाची बाहाळी । ' –शिशु ३२२. [ का. पौली=आवाराची भिंत ]

**प्याज**—पु कांदा. [ फा पियाज़ ] **प्याजी**–वि. कांद्याच्या रंगासारखें; किंचित् गुलाबी रंगाचें; फिकट गुलाबी; पाटल. 'जहनेबादी पोषाख गुलाबी प्याजी । ' –सला ३८. [ फा. पियाज़ी ]

**प्यॉड**—न. ( गो. ) वारूळ.

**प्यॉर्**—स्त्री ( गो. ) लहानशी भिंत.

**प्यादा**—पु १ पायदळांतील शिपाई; पायशिपाई; पाईक. ' पळतील त्यास धरून परिच्छिन्न डोचकीं मारणें, सर्दार अगर प्यादा न म्हणणें. ' –ब्रच ७७. २ ( बुद्धिबळांचा खेळ ) हलकी सोंगटी; मोहरींखेरीज करून इतर कोणतेंहि बुदबळ; प्यादें. ' राजा प्रधान पशुप्यादा कटक । बुद्धिबळीं अवघे काष्ठयेक । ' –भारार्थबाल ११.२५४ [ सं पदातिः; फा पियादा ] ( वाप्र. ) **प्याद्याचा फर्जी होणें**–हलका मनुष्य मोठ्या पदवीस चढणें; रंकाचा राव होणें ( बुद्धिबळांच्या खेळांत प्याद्याची समोरच्या अखेरच्या घरापर्यंत प्रगति झाली म्हणजे त्या घरचें मोहरें मेलें असल्यास त्यास उठवितां येतें, यावरून ). **प्यादगान**–नअव. पायदळ. ' पाटील बाबापासीं वीस पंचवीस हजार स्वार प्यादगान मिळून आहे. ' –दिमरा १.२४१. [ फा. पियादगान् ] **प्यादगी**–स्त्री. १ पाईकपण. पायदळाचें काम. २ पाइकाचें वेतन ' यांचा रोजमुरा कजा ( =काजीपणा ) व नेवकजा (=दुय्यम काजीपणा) व प्यादगी टक्के तीनशें साडेसात यास जागा जकात कसबे मज्कूर देविले असेत ' –वाडसनदा १४१ **प्यादाजवादा**–पु प्यादा इ० शिपाई. **प्यादें**–न. प्यादा अर्थ २ पहा. **प्यादेगिरी**–स्त्री. पाइकी. ' या प्रान्तीचे तमाम मुसलमान लोक प्यादेगिरीचें कसब करून पोट भरतात.' –रा ५ ६६ **प्याद्–प्यादे–मात**, **प्यादी**–स्त्री. १ (बुद्धिबळ)प्याद्यानें शह देऊन राजाचा केलेला कोंडमारा; प्याद्याच्या शहानें केलेली मात २ ( ल. ) पराभव. ' समजतात जरी येतात प्यादेमात कुच उरात रसासले । ' –अफला ८१

**प्यान, ढ्याप**—न. ( कु कों ) खोऱ्याच्या एका हिसक्यांत येणारा मातीचा भाग [ पेंड; ढेप ]

**प्यार**—स्त्री १ प्रेम; माया; ममता; प्रीति २ प्रीतिपात्र; रखेली [ हिं. प्यार; तुल० सं प्रियकर] **प्यार, प्यारा**–वि. प्रिय; आवडता; शोकीन; खुश झालेला; प्रेमाचा लाडका ' आम्हांवर कां रुसला पंचीप्यारा । '–ऐपो १२४.

**प्यारा, प्यारिग्राफ**—पु. मजकुरांतील विवक्षित भाग; लेखपरिच्छेद; लेखांतील तोडलेला भाग. [ इं. पॅरिग्राफ ]

**प्याला**—पु १ पेला; ( धातु, कांच, माती इ०चें ) पाणी इ० पिण्याचें लहान भांडें. 'ज्याहा घ्यावयासी प्याले सहूगी ( दगडी ) उत्तम ... पाठवून देणें. ' –रा ६ ३९२. २ काना; रंजकीचा पेला [ वै. स. पेरु; फा. ] ०**मतवाला**–पु ( व ) झिंगलेला; दारू पिऊन मस्त झालेला. ०**पिणें–घेणें**–मुसलमान होणें (कारण हिंदूस मुसलमान करतांना काझी त्यास प्याल्यामधून कांहीं पेय पाजतो यावरून). **प्यालेदार**–वि छातीवर येणारा भाग प्याल्यासारखा शिवलेला ( अंगरखा ).

**प्यास**—स्त्री.तहान, तृष्णा. (अक्षरशः व ल.). [सं. पिपासा हिं.]

**प्याहा**—पु. १ प्लीहागुल्म. २ पानथरी; प्लीहा. ' एका प्याहा पानथरी । ' –गीता १३.२४९५. [ सं. प्लीहा ]

**प्र**—एक उपसर्ग; हा उपसर्ग शब्दांस लागून पुढील मुख्य अर्थ होतात–(अ) अधिक गति, ( आ ) आधिक्य; प्रकर्ष; अतिशयता ( फार, पुष्कळ इ० ) श्रेष्ठता; उच्चपणा. [ सं. ]

**प्रा; प्रो**—( संक्षेप ) परगणा; प्रमाणें.

**प्रां**—( संक्षेप ) प्रांत.

**प्रकट**—वि. १ उघड, स्पष्ट. ' कीं परमधाम प्रकट । ' –ज्ञा १. ३०. २ जगजाहीर; विख्यात; प्रसिद्ध; नांवाजलेला. 'अवेंचु अमोघ सिद्धी । तूं प्रकट कृपानिधी । ' –ऋ ५०. ३ –क्रिवि उघडपणें; स्पष्टपणें; जाहीरपणें; साक्षात्. ' प्रकट महाभैरवसा नाचत गेला ... । ' –मोकर्ण ४५.३०. [ सं. ] **प्रकटावयव**–वि. आच्छादन नसलेला; उघड्या शरीराचा. 'निजमाता बाळवयसेसी । प्रकटावयवी लाडवी पुत्रासी । ' –एभा २२.४८०.

**प्रकटणें**—उक्रि. १ प्रसिद्ध करणें; जाहीर करणें; उघडकीस आणणें. २ दाखविणें (उघड रीतीनें); प्रदर्शित करणें; प्रकट करणें. ३ गुप्तस्थिति टाकून बाहेर येणें; स्पष्टपणें दिसणें; उघडपणें बाहेर येणें. 'परी आम्हांसाठीं होसील सगुण। स्तंभासी फोडून प्रगटसी।' [प्रकट] **प्रकटित**-वि. जाहीर, प्रसिद्ध केलेला; उघड, स्पष्ट केलेला, विख्यात. [सं.]

**प्रकंद**—पु. (गो.) अतिशय काळजी. [दे] **प्रकंदचें**—भक्रि. (गो.) अतिशय काळजी वाहणें.

**प्रकंपन**—पु वारा; वायु. [सं.] **प्रकंपित(वक्षःस्थळ)**—न. (नृत्य) नृत्याच्या वेळीं दोनहि पायांच्या चवड्यावर उभें रहावयाचें व पुन्हा टाचा जमीनीवर टेकावयाच्या. असें करण्याच्या वेळीं वक्ष.स्थळ वर खालीं होऊं लागतें ती स्थिति जोरानें श्वासोच्छ्वास घेत असताना उरानें हलणें हंसणें, रडणें, फार श्रम, भय वाटणें, वगैरेच्या वेळीं हा अभिनय करितात. [सं]

**प्रकर**—पु समूह, समुदाय [सं.]

**प्रकरण**—न १ खातें; शाखा, कामाचा वर्ग, विभाग 'राज्यकारभाराचें प्रकरण निराळें, सावकारीचें प्रकरण निराळें.' २ अध्याय; भाग; परिच्छेद; खंड, स्कंध; पर्व; कांड; कागदपत्र ३ विषय; मुद्दा; बाब; गोष्ट. 'युद्धप्रकरणीं गोष्टी करा.' ४ बाबत, काम; गोष्ट, उद्योग 'लग्नप्रकरणीं चार हजार रुपये खर्चिले.' ५ पक्ष; मंडळ, मंडळी, विशिष्ट मतानें किंवा विचारसरणीनें वागणारे लोक समुच्चयानें. ६ (ल. उप.) विद्या, कुल, जाति, गुण, अवगुण इ० गोष्टींनीं असामान्य असा मनुष्य, जाडा विद्वान; प्रस्थ; धेंड. 'तुकाराम एक मोठें प्रकरण होऊन गेलें.' ७ हा शब्द गोष्ट, प्रस्थ, कांहीं हेतु इ० अर्थी पुष्कळ ठिकाणीं योजतात. जसें- 'मुसलमानाचें प्रकरण निराळें हिंदूचें प्रकरण निराळें.' 'घरीं चार भाऊ आहेत चौघांचीं चार प्रकरणें निराळीं आहेत' ८ नाटकाच्या दहा प्रकारांपैकीं एक. याचें संविधानक विस्तृत असून त्यांत सर्व रस व नाना प्रकारचीं पात्रें असावीं लागतात. उदा० मृच्छकटिक व मालती-माधव हीं नाटकें. [सं.] **प्रकरणोपात्त**-वि. चालू विषयास किंवा कामास धरून असलेलें; प्रसंगास अनुसरून असलेलें. [सं. प्रसंग+उपात्त]

**प्रकर्ष**—पु. उत्कर्ष; श्रेष्ठता; आधिक्य; अतिशयपणा; कोणत्याहि गुणाची किंवा गोष्टीची परिणति, विपुलता [सं.]

**प्रकांड**—वि १ उत्कृष्ट; श्रेष्ठ; उत्तम; उच्च दर्जाचा. २ विशाल. प्रचंड पहा. [सं.]

**प्रकाम**—वि. अतिशय; पुष्कळ; भरपूर; आकंठ [सं.]

**प्रकार**—पु १ भेद; जाति. २ तऱ्हा; मार्ग; रीति, पद्धत म्ह० एक गहूं प्रकार बहु. ३ (गणित) रीति; पद्धत. ४ वर्तणूक, प्रसंग. 'हें ऐकल्यावर एखादा भलताच प्रकार व्हावयाचा.' —रत्नकांता ४.४. [स.] **०करणें**-निरनिराळया रीतीनें त्रास देणें, सतावणें, पीडणें.

**प्रकाश**—पु. १ उजेड; तेज; चमक, अंध.काराचा लोप. २ (शब्दशः व ल.) फैलाव; विस्तार; प्रसार. ३ फुलाचा विकास; प्रफुल्लता. ४ ज्ञान; विषयाचें रहस्य; बुद्धीचा विकास. ५ बातमी, खबर इ०चा फैलाव, प्रसार. ६ सत्य प्रकट करणें; सत्यान्वेषण. ७ चित्; चैतन्य; आत्मज्ञान. 'सत्ता प्रकाश सुख। या तिहींतिहीं उणें लेख।' -अमृ ५१. ८ प्रसिद्धि; ख्याति. 'समस्त लोकशिकतां। प्रकाश झाला चहूं राष्ट्रीं।'-गुच ४६.५. ९ (नाटय) उघड भाषण; पात्रानें प्रथम स्वगत भाषण करून नंतर दुसऱ्या पात्राबरोबर भाषण करणें. [सं.] सामाशब्द- **०क**-वि. १ प्रकाशणारा; तेज देणारा; चकचकीत करणारा. २ स्पष्ट, विशद करणारा; जाहीर करणारा. प्रसिद्धिकर्ता. [सं.] **०कण-परमाणु**-पु सूर्य व दुसरे तेजस्वी पदार्थ यापासून निघणाऱ्या प्रकाशाच्या किंवा तेजाच्या असंख्य सूक्ष्म परमाणूंपैकीं प्रत्येक; तेजपरमाणु **०जन्यशक्तिमापकयंत्र**-न. प्रकाशाच्या किरणाची तीव्रता मोजण्याचें यंत्र, किरणविकारकत्वमापक; किरणतीव्रतामापक (इं.) ॲक्टिनॉमिटर **०त्व**-न. प्रसिद्धि; ख्याति; नांवलौकिक. 'प्रकाशत्व चहूं राष्ट्रीं थोर। समस्त येती दर्शना।' -गुच ३०.१६ [प्रकाश+त्व-प्रत्यय] **०दाम्ल**-न. स्फुर नांवाच्या अधातुरुप मूलद्रव्याचें आम्ल; स्फुरकाम्ल; (इं.) फॉस्फरिक ॲसिड. **०दर्शन**-न. (प्रकाशलेखन) जागृत काच उजेडांत ठेवणें; (इं.) एक्सपोझर. **०पुंज**-पु. मोठया प्रकाशगोलातील दुर्बिणींतून दिसणारे लहान तेजाचे बिंदू. **०प्रतिबंधक**-वि अपारदर्शक; प्रकाशाभेद्य; प्रकाशरोधक; (इं) ओपेक् **०भेद्**-वि. (पारदर्शक नसून) उजेडास वाट देणारा; उजेड जाऊं देणारा; -इं. ट्रॅन्सल्यूसंट. **०मान**-वि. प्रकाशणारा; तेजस्वी; चकचकीत [प्रकाश+मान-प्रत्यय] **०मापकयंत्र**-न. प्रकाशाची तीव्रता मोजण्याचें यंत्र; (इं.)फोटोमिटर **०लेखन**-न. प्रकाशाच्या साह्यानें चित्रें काढण्याची कृति; (इं.) फोटोग्रॅफी. **०वृत्त**-न. सूर्याचें प्रकाशित जें गोलार्ध त्यास अप्रकाशित गोलार्धापासून निराळें करणारें वृत्त; (इं.) सर्कल ऑफ इल्यूमिनेशन. **०व्यतिकरण**-न. प्रकाशलहरी एका दिशेनें जात असता विरुद्ध दिशेनें जर तशाच प्रकाशलहरी येत असतील तर त्या दोहोंचा संयोग होऊन त्या ठिकाणीं प्रकाशाच्या ऐवजीं काळोख दिसतो. याच चमत्कारास प्रकाशव्यतिकरण अगर विकृति असें म्हणतात. 'ए. ए. मिचेलसननें प्रकाशाचें व्यतिकरण करून त्या योगानें प्रकाशाच्या लहरींची लांबी मोजली.' -ज्ञाको (प) २३२. **०शास्त्र**-न. दृष्टिशास्त्र; दृक्‌शास्त्र; दर्शनानुशासनशास्त्र; (इं.) ऑप्टिक्स्. **०शोषण**-न. दूर अंतरावरून एखाद्या वस्तूचा प्रकाश येत असल्यास मधल्या वातावरणांत त्याचे किरण शोषले जाऊन प्रकाश कमी तेजस्वी दिसतो; अगर प्रकाशित वस्तूच्या समोर

दुसरें द्रव्य अगर वस्तु ठेवल्यास त्याकडून प्रकाश शोषला जाऊन मंद होतो. या शोषणक्रियेस प्रकाशशोषण असें म्हणतात. (इं.) अब्सॉर्प्शन ऑफ लाईट. -ज्ञाको(प)२३३. **प्रकाशाची विकृति**-स्त्री. प्रकाश सरळ रेषेपासून वक्र होणें, प्रकाशाचें अपभवन होणें; (इं) डिफ्रॅक्शन ऑफ लाईट. **प्रकाशाचें ध्रुवीभवन**-न. प्रकाश एकरूप करणें. (इं.) पोलरायझेशन ऑफ लाईट. **प्रकाशाची शलाका**-स्त्री किरणछटा, अंशुजाल; किरणजाल; (इं) पेन्सिल ऑफ रेज. **प्रकाशाचें पृथक्करण**-न. प्रकाशाच्या रंगाचें पृथक्करण, विघटन; (इं) डिकंपोझिशन ऑफ लाईट.

**प्रकाश(शि)णें**—उक्रि १ चकचकणें; चमकणें; झळकणें. २ (ल.) उघडकीस येणें, प्रकट होणें, ३ तेजस्वी करणें; उजेड देणें; प्रकाश देणें; सूर्यप्रकाशानें पदार्थ दिसे असा करणें, ४ (ल.) स्पष्टीकरण करणें, उदाहरण देऊन उघड करणें, प्रकट करणें, दाखविणें; उघडकीस आणणें, प्रसिद्ध करणें. 'अंतरीं शुचित्व पूर्ण वसे। तें बाह्यकर्मीं स्वयें प्रकाशे। तें शुचित्वचि अनायासें। परमार्थदशे प्रकाशी।' -एभा ३.३९७. [प्रकाश] **प्रकाशित**-वि. १ प्रकाशलेला; तेजस्वी झालेला; तेजोमय. २ प्रसिद्ध, उघड केलेला. [सं.] **प्रकाशी**-वि. प्रकाशणारा; तेजस्वी. 'प्रकाशिया प्रकाशी बोजा। तो झळकत तुझा निजदंतु।' -एभा १.५ **प्रकाश्य**-वि. प्रकाशित, प्रकट, उघड, प्रसिद्ध करण्यास योग्य, जरूर, इष्ट, (शब्दशः व ल.) 'जो प्रकाश्येंवीण प्रकाशु।' -ज्ञा १५.५४५.

**प्रकाळ-ळा**—पु उशीर; विलंब 'आतां प्रकाळा काइसा।' -उषा १८.१७. [सं प्र=परिवर्तित+काळ] **प्रकाळणें**-अक्रि. (महानु.) लांबणें; बराच वेळ टिकणें. 'मग संभोगसुखें प्रकाळेली। रात्रीं तेयां।' -शिशु २२९ [प्रकाळ]

**प्रकीर्ण**—वि. १ नानाविध, विविध, निरनिराळ्या विषयांनीं युक्त (पुस्तक, अध्याय, भाषण इ०) २ विस्तृत केलेला, विशद केलेला; उघड केलेला. ३ विखुरलेला, विसकटलेला; अस्ताव्यस्त पडलेला. ४ सर्वत्र प्रसिद्ध किंवा जाहीर झालेला. [सं]

**प्रकृत**—स्त्री. १ (प्र) प्रकृति; शरीरावस्था; तब्यत. २ स्वभाव [सं. प्रकृति] -वि. १ चालू; प्रस्तुत; सांप्रत; हल्लीं; प्रचलित. 'आमच्या देशांतील वैष्णवांचीं काव्यें प्रकृत दूषणापासून मुक्त आहेत असें नाहीं.' -नि ८१९. २ -क्रिवि सध्या, ह्या प्रसंगीं; हल्लीं. [सं] ०**स्वर**-पु शुद्धस्वर पहा; **प्रकृतार्थ**-पु. चालू विषय; हातीं घेतलेला विषय. **म्ह०** द्वौ नञौ प्रकृतार्थं दढयत.=दोन नकारांचा एक होकार होतो.

**प्रकृति**—स्त्री. १ शरीर किंवा मन ह्यांचा मूळस्वभाव; मूळधर्म, अवस्था, स्थिति: स्वभाव; शरीर; तब्यत. वैद्यशास्त्रांत सात प्रकारच्या प्रकृती सांगितल्या आहेत: वातज, पित्तज, कफज, वातपित्तज, वातकफज, कफपित्तजप्रकृति आणि समधातु किंवा सम प्रकृति. ह्यांशिवायहि बऱ्याच प्रकारच्या प्रकृती आहेत. उदा० उष्ण सीत-उग्र-मंद-कोमलप्रकृति इ०. २ पदार्थमात्राचा मूळधर्म, मूळस्वभाव किंवा मूळस्थिति. 'जंव प्रकृतीचें अधिष्ठान। तंव सांडी मांडी हें अज्ञान।' -ज्ञा ३५३. 'तियें आघवींचि मागुतीं। जिवंत भेटली प्रकृती।' -ज्ञा ११.६६६. ३ (तत्त्व) विश्वाच्या उत्पत्तीचें कारण, मूळकारण; समवायीकारण; ह्याच्या उलट अध्यात्मिक कारण; सर्व सृष्टींतील पदार्थांचें मुख्य मूळ. 'जगांतील सर्व पदार्थांचें जें हें मूलभूत द्रव्य त्यास सांख्यशास्त्रांत प्रकृति असें म्हणतात.' -गीर १५५. ४ (वेदांत) माया; आदि माया; ब्रह्माची जग उत्पन्न करण्याची इच्छाशक्ति, अविद्या. 'म्हणोनि आघवें। मार्गील मज आठवे। मी अजुही परि संभवें। प्रकृतियोगें।' -ज्ञा ४.४४. ५ (व्याकरण) शब्दाचें किंवा धातूचें प्रत्यय लागण्यापूर्वीचें मूळ रूप. ६ पृथ्वी, आप्, तेज, वायु, आकाश, मन, बुद्धि आणि अहंकार हे आठ पदार्थ; अष्टविधाप्रकृति. ह्यापैकीं पहिले पांच, ज्यांस पंचमहाभूतें असें म्हणतात, त्यांचा पंचसूक्ष्मभूतांशीं (गंध, रस, रूप, स्पर्श आणि शब्द इ०शीं) मूलकारण म्हणून संबंध लावून व मन, बुद्धि अहंकार तसेच ठेवून दुसरी अष्टविधा प्रकृति होते. पंचमहाभूतें पहा. ७ राज्यकारभाराचीं सात अंगें-स्वामी, अमात्य, सुहृद्, कोश, राष्ट्र, दुर्ग, आणि बल. ह्यांत आणखी प्रजेचा अंतर्भाव करितात पहिल्या सातांना सप्तविधाप्रकृति व आठांना अष्टविधाप्रकृति असें म्हणतात. ह्याचाहि पुन्हा अंतःप्रकृति (स्वामी, अमात्य आणि सुहृद्) व बहिःप्रकृति (कोश, राष्ट्र, दुर्ग बल आणि प्रजा) असे भेद आहेत. ८ प्रजा; रयत. 'दुसरे दिवशीं प्रकृति प्रार्थिति येऊनि आपुल्या पतितें।' -मोवन १३.१०४. ९ एक छंद १० कांहीं एक व्यवहाराचा सामान्यतः चाललेला प्रकार. [सं.] (वाप्र.) ०**ताळ्यावर येणें**-(आजार, राग, द्वेष इ० मुळें झालेला) तब्यतीचा बिघाड, मनःसंताप इ० नाहींसा होणें. **प्रकृतीचा ताळ बिघडणें-नासणें-सोडणें, प्रकृतीनें ताळ सोडणें-टाकणें-ताळ्यांतून जाणें**-१ तब्यत बिघडणें; शरीराचा जोम, कस, स्वास्थ्य, तेज इ० कमी होणें, नाहींसें होणें २ भांडणास सुरवात करणें, होणें; रागावणें; क्रोधाविष्ट होणें. **प्रकृतीनें चालणें-जाणें-वागणें-असणें**-एखाद्याच्या मर्जीप्रमाणें, स्वभाव, मन, इच्छा इ० प्रमाणें वागणें; (आपल्या) स्वभावानुरूप, मर्जीप्रमाणें वागणें. **प्रकृतीवर टाकणें-ठेवणें-असूं-देणें** आजार वगैरे नैसर्गिक रीत्या बरा होऊं देणें. सामाशब्द-०**गत**-वि. प्रकृतीच्या किंवा मायेच्या स्वाधीन झालेला; मायोपाधिक 'आणि हाचि प्रकृतिगतु। सुखदुःखभोगी हेतु।' -ज्ञा १४.३४. ०**ज**-वि. उपजत; जन्मतः; स्वाभाविक. '...भय मुलांमध्यें प्रकृतिज असतें' -वीति २६४. ०**दोष**-पु जन्म, मृत्यु इ० शारीरिक विकार,

‘तैसा मनुष्य लोकाआंतु। तो जरी जाहला प्राकृतु। तऱ्ही प्रकृतिदोषाची मातु। नेणिजे तेथ।’ –ज्ञा १०.७९. ०**परिहार**–पु प्रकृतीसंबंधींचा सर्व विचार, खुलासा, स्पष्टीकरण. ‘तयावरी सप्तमीं। प्रकृतिपरिहार उपक्रमीं। भजति जे पुरुषोत्तमीं। ते बोलिले चाऱ्ही।’ –ज्ञा १०.२८ ०**पुरुष**–पु. १ जगताच्या उत्पत्तीस कारणीभूत असलेले माया व आदिपुरुष. ‘सृष्टीला आदिकारण प्रकृतिपुरुष।’ २ स्त्रीपुरुष ‘प्रकृतिपुरुष चालिले मेळ। श्रीगुरुदेवदर्शना।’ –सप्र ८.४०. ०**प्रलय**–पु. कल्पांतीं होणारा सृष्टीचा विलय; महाप्रलय. ०**मंत**–वि शरीरानें युक्त, शरीरवान् ‘नातरी प्रकृतिमंतु होउनी। इंद्रिया लळा देउनी।’ –ज्ञा ३.१९४. ०**विकार**–पु माया–कार्य; जग. ०**विकृतिभाव**–पु. प्रकृति व विकृति याचा परस्पर संबंध. ०**स्वभाव**–पु. १ मनुष्याचा मूळस्वभाव. २ पदार्थाच्या अंगचा नैसर्गिक गुणधर्म **प्रकृत्यंश**–पु (ज्योतिष) कोणत्याहि गोलाच्या अंगीं असलेला जडपदार्थाचा अंश [प्रकृति+अंश]

**प्रकृष्ट**—वि. उत्कृष्ट; उत्तम; श्रेष्ठ [स]

**प्रकोप**—पु. १ कफ, वात, पित्त इ० शारीरिक दोषांची अतिशय वाढ, आधिक्य, वर्चस्व. पित्तप्रकोप, वातप्रकोप, धातुप्रकोप इ०. २ दंगा; बंड. ३ चित्तक्षोभ; राग, क्षुब्धता; क्रोध. [सं]

**प्रकोष्ट**—पु. कोपराखालचा हाताचा भाग याच्या उलट प्रवेष्ट (कोपरावरचा हाताचा भाग) [सं]

**प्रक्रिया**—स्त्री. १ रीति; सरणी, पद्धति, मार्ग, चाल (कार्य इ० ची). २ (व्या.) शब्दाच्या मुळरूपापुढे प्रत्यय वगैरे लावून शब्द सिद्ध करण्याची कृति ३ संधिलोप वगैरे होण्याच्या पूर्वीचें शब्दाचें रूप. [सं.]

**प्रखर**—वि. १ अतिशय ऊष्ण, तीक्ष्ण, तीव्र, कडक (औषध, तपकीर इ०). २ भयंकर; तीव्र, अनावर; मनस्वी, उतावीळ पगाची. –क्रिवि. चलाखपणें; चुणचुणीतपणें; रोखठोकपणें; स्पष्टपणें (उत्तर देणें). [सं.]

**प्रखेळ**—वि. (गो.) परमार्थ न साधणारा.

**प्रख्या**—स्त्री. प्रसिद्धि; कीर्ति; ख्याति; लौकिक [सं. प्र+ख्या] **प्रख्यात**–वि. प्रसिद्ध; सर्वश्रुत; नांवाजलेला. [सं.] **प्रख्याति**–स्त्री. प्रसिद्धि; कीर्ति; नांवलौकिक. [सं.]

**प्रगट, प्रगटणें**—प्रकट, प्रकटणें पहा. [प्रकट अप]

**प्रगंड**—पु बाहु; हात; प्रकोष्ठ. **प्रगंडास्थि**–पु. दंडाचें हाड; भुजास्थि; प्रकोष्ठास्थि. [सं. प्रगंड+अस्थि]

**प्रगणा**—पु. (प्र.) परगणा पहा.

**प्रगति**—स्त्री. सुधारणा; उत्कर्षाची स्थिति. [सं] ०**कारि**–वि. पुढें पुढें जाणारें; सुधारणाप्रिय. ‘अहो प्रगतिकारि हें युग नवें उदेलें पहा।’ –चंद्रिका ४.४.१५. ०**प्रिय**–वि. सुधारणाप्रिय; उत्कर्षेच्छू. ‘नंतर (ग्लॅडस्टन) प्रगतिप्रिय (लिबरल) पक्षाला मिळाला.’ –विचावि १५६.

**प्रगमनशील**—वि. सुधारणाप्रिय; प्रगतिप्रिय. ‘परंतु या विचारसरणीस न जुमानतां बहुतेक सर्व प्रगमनशील राष्ट्रांनीं जोडसभेच्या पद्धतीचाच स्वीकार केला आहे.’ –वस्व ११९ [सं.]

**प्रगल्भ**—वि. १ पूर्ण वाढलेला, प्रौढ; परिपक्व २ धीट; धाडसी; निश्चयी, उत्साही ३ शहाणा, गंभीर; खोल, अगाध (ज्ञानाचा मनुष्य). [सं] ०**विचारशक्ति**–स्त्री पूर्णतेस पोंचलेल्या विचाराचें सामर्थ्य, जोर ‘इंग्रजी शिक्षणानें प्राप्त झालेली प्रगल्भविचारशक्ति याचा उपयोग ..’ –टिले २४३४ **प्रगल्भता**–स्त्री. आधिक्य; पूर्णता.

**प्रगाथ**—पु. एक वैदिक वृत्त.

**प्रगाथ**—पु. (अप.) प्रघात पहा.

**प्रग्रह**—पु. (चंद्र, सुर्य इ० काचें) ग्रहण. [सं]

**प्रघट, प्रघटणें**—(अप) प्रकट, प्रकटणें पहा.

**प्रघट्टक**—न एखाद्या विषयाची मांडणी व त्यावर केलेली चर्चा, वादविवाद, ग्रंथाचे किंवा भाषणाचे विस्तृत पाडलेले विभाग.

**प्रघात**—पु १ परिपाठ, शिरस्ता; प्रचार, सर्वत्र रूढ असलेली गोष्ट २ चाल; रीत, रूढी, संप्रदाय. ‘अर्धवट शास्त्रोक्त प्रघात प्रचारात आले’ –टि ४ १०. ३ पद्धत; धर्ती; दृम, रूढ असलेली तऱ्हा किंवा मार्ग [सं.]

**प्रचंड**—वि. १ श्रेष्ठ, परमावधीचा, आतोनात, पराकाष्ठेचा; आत्यंतिक, कमालीचा; भारी उदा० प्रचंड–क्रोध–पराक्रम–वायु–विद्या–औदार्य इ० २ जोरदार; आवेशी. जबरदस्त, दांडगा ‘हा प्रचंड पंडित आहे’ ३ भयंकर, अनर्थकारी. ‘तें प्रचंड अरण्य’ ४ फार मोठा, अवाढव्य, विशाळ ‘तैसीं जियेतियेकडे। तुझीं वक्त्रें जीं प्रचंडें।’ –ज्ञा ११ ३४४ [सं]

**प्रचलन**—न प्रचार, प्रसार, फैलाव. ‘रामदासाप्रमाणें प्रवृत्तिमार्गाचें संतांनीं प्रचलन केलें.’ –टि ४.४९६ [सं. प्र+चल्]

**प्रचलित**—वि. १ भटकणारा; अस्थिर; चलन पावणारा, च्युत. ‘प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी।’ –राम करुणाष्टकें नवनीत १७०. २ चालू; रूढ. [सं.]

**प्रचार**—पु १ चाल; रीत; शिरस्ता; परिपाठ; प्रघात; रूढी २ गति; वर्तणूक; व्यापार. ‘कीं मावळलिया दिनकरु। सरे किरणांचा पसरु। तैसा मनोजयें प्रचारु। बुद्धींद्रियाचा।’ –ज्ञा १६.१८४. ३ प्रसिद्धि, प्रसार; जाहिरात, परिस्फुटता. [सं.] ०**क**–पु. प्रचार करणारा; (चळवळ, मत, तत्त्व, कार्य इ० विषयीं) माहिती सांगून प्रसार करणारा. ‘अंधेरीआश्रमाप्रमाणें येथेंही फक्त प्रचारक तयार करण्याचें शिक्षण का देत नाहींत.’ –केले १.३६६. [स] **प्रचारित**–वि प्रचारांत असलेलें, वहिवाटलेलें; रूढ; सामान्य; सर्वसाधारण [सं.]

**प्रचि(ची)त, प्रचीति**—स्त्री अनुभव; खात्री; प्रत्यंतर, विश्वास; पडताळा. 'माझी मज असे घडली प्रचीत। नसेल पतित ऐसा कोणी।' –तुगा ३५६ [सं प्रतीति]

**प्रचुर**—वि. पुष्कळ; विपुल; भरपूर समासांत युक्त, पूर्ण, व्याप्त इ० अर्थी योजतात 'जल-वृक्ष-धान्य-सुवर्ण विद्वत्ताप्रचुर' इ० [सं]

**प्रच्छन्न, प्रच्छादित**—वि झाकलेला; लपलेला, गूढ; गुप्त; अप्रकट. 'ती राज्यघटना गुलामगिरीचाच प्रच्छन्न प्रकार मानला आहे.' –के २ १२ ३० [सं] ०**पातक**–न. गुप्त पातक

**प्रच्छादणें**—सक्रि झाकणें, आच्छादणें; लपविणें **प्रच्छादन**–न. १ झांकणें, लपविणें; आच्छादन, आवरण २ घोड्याच्या डोळ्यांमधील काळें व पांढरें वर्तुळ. –अश्वप १.६१ [सं]

**प्रजणें**—उक्रि. १ मारण्यासाठीं सिद्ध करणें; परजणें (तरवार). 'ते प्रजुनी उभा ठेला।'–उषा १५.६५. २ हत्या करणें; मारणें; छेदणें; परजणें पहा. 'मग प्रजीलें महाकाळें।' –उषा १७.१३. [सं. प्रेरय्]

**प्रजन**—पु. (महानु) परदेश. 'संसाराचा प्रजनीं। तुं साडुनि जात प्रभु श्रीचक्रपाणि।' –भाए १२८. [सं परजन]

**प्रजन्य, प्रजंन**—पु. (ल.) पर्जन्य; पाऊस. 'वीज पडे हिंव पडे। प्राणी प्रजंनी सांपडे।'–दा ३.७.५१.'भक्तवत्सला मुरारि। प्रजन्य आणिला ते अवसरीं।' –देवसंत ३५. [सं. पर्जन्य]

**प्रजळणें**—अक्रि १ जोरानें जळणें २ (ल) जळफळणें; दुष्टावा करणें. 'दाहीजें प्रजळतीं वैरी चिंतीति आन।'–वसा ४. [सं. प्रज्वलन]

**प्रजा**—स्त्रीअव. १ रयत, लोक. 'जयातें सकळ लोक प्रजा। होऊनि सेविती।' –ज्ञा १०.२३९ २ संतति; मुलेंबाळें. 'आणि प्रजा जे जाली। तियें वस्ती कीर आलीं।'–ज्ञा १३.५९६.'बाप प्रजा असी जी पितरांसि भवार्णवांत सुतरी, ती।' –मोआदि ११. ६. [सं.] **म्ह**० यथा राजा तथा प्रजा सामाशब्द– ०**द्रोह**–पु. राजानें केलेला प्रजेचा गुन्हा. 'सध्याच्या पीनलकोडांत प्रजाद्रोहास शिक्षा सांगितलेली नाहीं तरी परमेश्वराच्या कोडांत प्रजाद्रोहाची शिक्षा सांगितली असेल.' –टिसु १५६. ०**पति**–पु १ ब्रह्मदेव. 'हेंही असो प्रजापती। शक्ति जे सृष्टिकरिती।' –ज्ञा १७ ३३५. २ दक्षकर्दमादि ऋषींपैकीं प्रत्येक. ३ राजा. 'शिवाजीरावसारखा प्रजापती कोणी निर्माण झालाच नाहीं असें म्हणावें लागतें.' –विक्षिप्त ३ २२६. ४ शिश्न; पुरुषाचें जननेंद्रिय. 'तोंड गायीचें प्रजापति गाढवाचा.' [सं] ०**पत्य**–न प्राजापत्य पहा. ०**परिषद्**-स्त्री प्रजेच्या मताबद्दल चर्चा करण्याची महासभा. 'हें प्रजापरिषदेचें आठवें अधिवेशन आहे' –के १६.४ ३०. ०**भाग**–पु. उत्पन्नापैकीं रयतेचा भाग [सं.] ०**सत्ताक**–वि लोकांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींनीं चालविलेली (राज्यपद्धति). ०**साधन**–न. प्रजोत्पत्ति; वंशवृद्धि. 'आणि कुळें शोधूनि दोन्ही। कुमारेंचि शुभलग्नीं। मेळवीजती प्रजासाधनीं हेतु जरी।' –ज्ञा १६ ३०३.

**प्रजोत्पत्ति**–स्त्री १ मैथुनद्वारां संततीचें जनन. २ संतान; संतति. **प्रजोत्पादन**–न प्रजोत्पत्ति अर्थ १ पहा. [सं.]

**प्रजी**—स्त्री. तरवार, ढाल, पट्टा इ० ची मूठ; खोबळा; परज पहा. 'घे घे प्रजी हाती येरु।' -उषा ३६ ७७. [परज]

**प्रजव(ज्वा)ळणें**—उक्रि १ जळणें; प्रदीप्त होणें; जाळणें. 'जैसा घरीं आपुला। वानिवसें वन्ही लागला। तो आणिकांहीं प्रज्वळिला। जाळूनि घाली।' –ज्ञा १.२५८ २ (ल) जळफळणें; रागावणें; कोपणें. 'ऐसें वचन ऐकोनी। ईश्वर प्रज्वाळला मनीं।' –गुच ४९ २१. [सं. प्रज्वलन] **प्रज्वलन**-न. जळणें; पेटणें; पेटविणें (शब्दशः व ल). [सं] **प्रज्वलित**–वि पेटविलेला; जळणारा; जळत असलेला; प्रदीप्त (शब्दश. व ल). [सं.]

**प्रणणें, पर्णणें**—सक्रि १ (काव्य) विवाह करणें; वरणें; पाणिग्रहण करणें (विशेषतः वरानें) 'स्वयंवरा आली उर्वशी। ते मागौती पाठविली साधुसीं। परी बुद्धि ठेली कैसी। जे हेची प्रणावी।' –शिशु २०२. 'पर्णूं म्हणती पांचाळपुत्री। तें नावेक विलोकूं।' –मुविराट ४१.१८. २ (ल) स्वीकार करणें; घेणें. 'कौरव प्रणून अपकीर्ति। जाते झाले स्वस्थळां।' –मुविराट ६. १७०. [सं. परि+नी]

**प्रणत**—वि. १ नमलेला; वांकलेला. २ (ल) नम्र; विनयशील; शरण आलेला. 'प्रणत प्रतिपाळु। हे खेळु जयाचा।' –ज्ञा १२.२४२ [सं.] ०**पाळ**–वि शरण आलेल्याचें रक्षण करणारा. 'ऐसा प्रणतपाळ कृपावोधीं। दुसरा जगीं असेना।' –एभा ५. ३७८. ०**वत्सल**–वि. गरिबाचा व शरण आलेल्यांचा आश्रयदाता. 'अगा प्रणतवत्सला म्हणति त्या जना पावलां।' –केका ९ [सं.]

**प्रणति**—स्त्री. १ नमस्कार; नमन; वंदन. 'तैसा तुझिया प्रणतीं। मी पूर्ण जाहलों श्रीनिवृत्ति।' –ज्ञा १७.२०. २ (ल.) नम्रता; लीनता; नम्रपणा. [सं.]

**प्रणती**—स्त्री. पणती पहा.

**प्रणय**—पु. प्रेम; प्रीति; लळा. [सं.] ०**कोप**–पु. नवराबायकोमधील लटका राग; आपल्या प्रेमाच्या मनुष्यानें आपली समजूत करावी म्हणून त्याच्यावर केलेला खोटा राग; रागाचा नखरा. **प्रणयिनी**–स्त्री. प्रिया; प्रियकर स्त्री. पुल्लिंगी रूप प्रणयी पहा. **प्रणयी**–वि. प्रेम करणारा; प्रेमी; प्रेमीजन; प्रियकर. 'प्रणयिजनाशीं एकनिष्ठतेनें वागण्याचा उपदेश परिणामकारक रीतीनें करणारा गुरु प्रेम हा एकच होय.' –जन्मरहस्य ३३. ०**जन**–पु प्रियव्यक्ति; प्रेमपात्र; प्रियकर.

**प्रणयन**—न. १ नेण्याची, न्यावयाची क्रिया. २ पुरस्कार; प्रचार; प्रसार. 'या शास्त्राचें ग्रंथरूपानें प्रणयन यापूर्वी आपल्या देशांत कधींहि झालेलें माहीत नाहीं.' –नि २५१. [सं.]

**प्रणव**—पु. १ ओंकार. 'प्रणवरूपिणी मूळप्रकृति । परि कोपेल त्रिभुवनपति ।' 'प्रणवाचिये पेठे । जाहलें शब्दब्रह्म माजिठें ।' -ज्ञा ६.१०९. २ प्राणायाम. -ज्ञा १८ ३३६. ३ वायविशेष; पणव पहा. [सं.]

**प्रणाम**—पु. नमस्कार; वंदन [सं]

**प्रणालिका, प्रणाली**—स्त्री १ पाट, नळ; गटार; पन्हळ; परिनालिका. २ (ल.) नेहेमींची ठराविक व्यवस्था, पद्धत, माडणी; रूढ झालेला, योग्य मार्ग, रीत, क्रम, परिपाठ परंपरा. परिनालिका पहा [सं]

**प्रणिधान**—न. (एखाद्या गोष्टीकडे किंवा गोष्टींत)मन लावणें, घालणें; ध्यान; चिंतन. [सं.]

**प्रणिपात**—पु. नमस्कार; वंदन; दंडवत. [सं.]

**प्रणियणें**—क्रि. वरणें; परिणणें, प्रणणें पहा. 'जो बैसला द्विज गणांत कलानिधी तो । म्यां आपणें प्रणियला गुणवारिधी तो ।' -आसी ३६. [सं परिणय]

**प्रणीत**—वि बनविलेला; केलेला; रचलेला. समासात-उत्तरपदांत योजितात. जसें:-व्यासप्रणीत, गौतमप्रणीत इ० [सं]

**प्रणीता-ति**—स्त्री. यज्ञांतील एक पात्र हें समंत्रक पाण्यानें भरून अग्नीच्या उत्तरबाजूस ठेवावयाचें असतें. हें लांकडी, चौकोनी पाळयाच्या आकाराचें असून याला मूठ असते. 'रक्तमांसाप्रणी तया । भर भरों ।' -ज्ञा १७.९६ ९८ [सं]

**प्रणु**—पु परिणय; विवाह; लग्न 'रामप्रणुसंभ्रमानें । दुंदुभी तुरें लागलीं ।' -वेसीस्व ९.३९ [सं. परिणय]

**प्रत**—स्त्री. १ नक्कल; किता; मूळ वस्तूची प्रतिकृति. प्रतिलेख; मूळाबरहुकूम बनविलेली दुसरी वस्तु. २ अनेक पुस्तकांपैकीं एक पुस्तक; एक नग ३ ज्या लेखावरून किंवा पुस्तकावरून दुसरा लेख किंवा पुस्तक लिहितात तो मूळ लेख, पुस्तक इ० 'सर्वच प्रत लिहून कंपोज करणें पुरवेल.' -केले १.२२६. ४ एक चित्र पाहून त्यासारखेंच काढलेलें दुसरें चित्र. ५ पुस्तक; ग्रंथ. 'भागवताची प्रत आम्हांस पाहिजे.' ६ नमुना; मासला; जात; तऱ्हा. 'या प्रतीची साखर आणीत जा.' ७ गुणाप्रमाणें केलेला, पाडलेला प्रकार; जात. 'आंब्याच्या चार प्रती केल्या आहेत.' ८ विभाग; वर्ग; दर्जा (आकार, महत्त्व यांवरून). 'सन १७५० इसवीचे अगोदरचे जे सरंजाम लोकांकडे चालत असतील ते वंशपरंपरा चालवावे व त्या सर्व सरंजामांची पहिली प्रत करावी.' -इनाम ३९ ९ संच; गंज; गठ्ठा; समूह; गट. १० समारंभाच्या वेळीं निमंत्रित व उच्च दर्जाच्या पाहुण्यांस, शिष्टांस देण्यासाठीं योजिलेल्या दक्षिणा-आहेरांतील सर्वांत उत्तम गट. [सं. प्रति] ०**खाडा**-पु. १ एखाद्या मोठ्या कामाचा किंवा निरनिराळ्या गोष्टींचा (जमाखर्च, निरनिराळ्या वस्तू०चा) खातेवार हिशेब. (क्रि० ठेवणें; काढणें; लावणें; मिळवणें) २ अशा तऱ्हेनें ठेविलेला हिशेब. (क्रि० निवणें; लागणें; मिळणें). ०**बंदी**-स्त्री. जमाबंदीच्या गुणावरून पिकाच्या मग दुराप्रमाणें केलेलें वर्गीकरण 'धारवाड जिल्ह्यांत प्रतबंदी सुरू होती.' -इनाम ९. ०**वार**-क्रिवि गटानें; वर्गवारीनें; घटका प्रमाणें (माडणें, सांगणें; लावणें) ०**वारी**-स्त्री. एखाद्या प्रातातील जमीनीच्या वर्गवारीचा तक्ता **प्रतीचा**-वि. एकाच प्रकारचा, वर्गाचा, सांचाचा.

**प्रत**—शअ. १ स; ला, तें; कडे; दिशा, उद्दिष्ट दाखविणारा प्रत्यय 'तो ग्रामाप्रत गेला;' 'राजा प्रधानाप्रत बोलतो.' 'गजानन महाराज, चरणाप्रत वंदन करितों.' 'सूत्रधारा, तुजप्रत कल्याण असो.' -रासक्रीडा १. २ उद्देशून; करितां; साठीं. 'घराप्रत तीन रुपये दिले.' ३ प्राप्य स्थलादि बोधक प्रत्यय; ला. 'ही वाट संपून आम्ही घराप्रत होऊं तेव्हांच्या साऱ्या गोष्टी.' प्रति पहा. [सं. प्रति]

**प्रतणें**—सक्रि. भाजणें (घाईघाईनें व अपुरा), परतणें 'नीबरसें प्रतुन गदु कीजे । दुमोडे ।' -वैद्यक पृ ७६. [सं प्र+तप्]

**प्रतरणा**—स्त्री. (प्र) प्रतारणा पहा.

**प्रतान**—पु. १ वेल; लता 'प्रतान कोमल निजशीलाचा खालीं ढासळलेला ।' -बंदीशाळा २ लतेचा बारीक तंतु; धुमारा; पागोरा, ताणा ३ विस्तार; प्रसार. [सं. प्र+तन्]

**प्रताप**—पु. १ योग्यता, अधिकार, प्रभुत्व. २ वैभव; प्रभाव. सामर्थ्य; प्राबल्य ३ शौर्य; पराक्रम; वीर्य, पौरुष. 'हा संग्रामु काय म्हणिपे । कीं स्वर्गुचि येणें रूपें । मूर्त कां प्रतापें । उदो केला ।' -ज्ञा २ १९२ ४ सामर्थ्य; शक्ति; गुण; परिणाम (औषध इ०चा) 'पापें जळावया समस्त । नामामाजी प्रताप बहुत ।' -रावि १ १५६. ५ उष्णता; दाह. 'सुटला प्रतापाचा वारा ।' -उषा ७४८३१ 'प्रौढ प्रतापदिनकर' ६ धारवाड वगैरेकडे प्रचारांत असलेलें सुमारें दोन रुपये किंमतीचें एक नाणें; अर्धा होन -शिचप्र १०३. [सं] ०**उधळणें**-अंगचे दुर्गुण प्रकट करणें. गुण उधळणें पहा. 'त्यांच्या शहाणपणाचा प्रताप त्यांना घरांत उधळूं दे.' -विकार. ०**महिमा**-पु एखाद्याचें शौर्य, पराक्रम, सामर्थ्य इ०चें तेज, माहात्म्य, मोठेपणा; शौर्याचा प्रभाव [स.] ०**रुद्र**-वि भयंकर, उग्र शक्तीचा पराक्रमाचा. (मारुतीचें एक स्वरूप; डावा हात कमरेवर, उजवा उगारलेला व पायाखालीं जंबुमाळी राक्षस तुडविलेला). 'प्रताप रुद्र मारुती । सूर्यमंडळ धरिलें हातीं ।' -रावि ३.२३६ [सं.] ०**लंकेश्वर**-पु. एक औषधी मात्रा ०**वराळी**-पु. (संगीत) एक राग. ह्यांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पचम, तीव्र धैवत हे स्वर लागतात. आरोहांत गांधार, निषाद वर्ज्य व अवरोहांत निषाद वर्ज्य. जाति औडुवषाडव वादी ऋषभ, संवादी पंचम.

गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर. ०वान्, प्रतापी–वि. १ पराक्रमी; सामर्थ्यवान; शौर्यशाली; शक्तिवान् २ परिणामकारक; गुणकारी; जहाल, कडक (औषध इ०) [सं.] ०वीर–प्रतापरुद्र पहा. –रामदासी १५ १७२. ०शूर–वि. वीर्यशाली; धाडसी. ०सिंह–वि. सिंहाप्रमाणें पराक्रमी राजा, योद्धा इ०स उद्देशून योजावयाचें विशेषण. –पु. विशेषनाम. विशेषतः अकबरकालीन मेवाडचा महाराणा (मृ १५९७) [सं.] ०सूर्य-प्रतापार्क–वि. शौर्य व पराक्रम यांत सूर्यासारखा (राजा, योद्धा इ०). 'अयोध्येचा राजा दशरथ। तो प्रतापार्क रणपंडित।' –राबि ३ ६३. [सं.]

**प्रतारक**—वि. प्रतारणा करणारा; लबाड; लुच्चा. [सं.]

**प्रतारण, प्रतारणा**—नस्त्री. फसवणूक; लबाडी; लुच्चेगिरी; कपट. 'आटु वेगु विंदाणु। आशा शंका प्रतारणु।' –ज्ञा १३.२७१ 'त्याशीं प्रतारणा करतो तो एकपक्षी नव्हे तर सर्वस्वी चोर ठरतो.' –टि ४.४८९. [सं. प्रतारण] **प्रतारणें**–अक्रि. फसविणें; ठकविणें; वंचणें. [प्रतारणा] **प्रतारित**–वि. फसविलेला; ठकविलेला; वंचित [सं.]

**प्रति**—एक उपसर्ग (अभि याच्या उलट). याचे अर्थ पुढीलप्रमाणें होतात. १ ऐवजीं; बदला; च्या जागीं. २ प्रत्येकीं; दर एकास. 'प्रतिगृहास पांच पांच रुपये दिले.' ३ दिशा; उद्दिष्ट स्थल; कडे, दिशेनें; वर. ४ परत; माघारीं; पुन्हां. ५ तुल्य; समान; तद्रूप, प्रमाणें. 'तो ब्राह्मण प्रतिसूर्य आहे.' –शअ. दिशा, गमनोद्दिष्ट दाखविणारा प्रत्यय. स, ला; कडे; प्रत पहा. 'योजी हिताप्रति निवारुनि पापकर्मे।' –वामनस्फुट श्लोक-नवनीत १४६. [सं]

**प्रति**—स्त्री. बरोबरी, जोड. 'प्रति नाहीं त्याशीं करी पराभव।' –शिवगीता ६१. [सं.]

**प्रतिकंचुक**—पु शत्रु. विरोधी. प्रतिकुंचक पहा. [सं.]

**प्रतिकाय**—पु. प्रतिमा; प्रतिबिंब; चित्र; प्रतिकृति. [सं]

**प्रतिकर-रूं**—पु अनुभव; प्रतीति. –मनको.

**प्रतिकार**—पु १ प्रतिक्रिया; विरुद्ध दिशेनें, उलट प्रयत्न, व्यापार २ उपाय, इलाज, दूरीकरण, निरास ३ विरोध, प्रतिबंध; अडवणूक 'तो प्रतिकार म्हणाल कोणता तर सर्वांनीं देशी कपडा वापरावयास लागावें' –टि १ ५१०. ४ सूड; अपमानाची, दुःखाची फेड: उसने फेडणें [सं] **प्रतिकारक**–वि. १ प्रतिक्रिया करणारा, उलट उपाय योजणारा, प्रतिबंधक, विरोधक २ सूड उगविणारा; प्रतिफल देणारा. [सं.] **प्रतिकारक कारण**–न. (कायदा) आपलें कार्य उत्पन्न करून दिलेलें कार्य उत्पन्न न होऊं देणारें, अडथळा आणणारें कारण –न्यायप २८.

**प्रतिकाश**—पु प्रतिबिंब; दर्शन 'प्रळयशब्दें प्रत्यक्ष नाश। ज्यासी पुन्हां नाहीं दर्शन प्रतिकाश।' –स्वादि १३.५.१२. [सं]

**प्रतिकुंचक**—वि. प्रतिकूल; विरुद्ध. 'जयास सागावा विवेक तोचि जाणावा प्रतिकुंचक।' –दा १९.६.५. –पु. रिकामी लुडबुड, मध्यस्ती, ढवळाढवळ करणारा; त्रास देणारा. [सं. प्रतिकंचुक]

**प्रतिकूल-ळ**—वि. विरुद्ध; उलट; विरोधी; विपरीत; विषम (माणूस, प्रसंग, घटना इ०) याच्या उलट अनुकूल. 'प्रतिकूल होइल कैसा कृष्णदेव मातें।' –सौभद्र. –न. विवाहादि मंगल कार्याचा निश्चय झाल्यावर अशौचादिकामुळें येणारी अडचण. [सं.]

**प्रतिकृति**—स्त्री. १ प्रतिमा; प्रतिबिंब; प्रतिरूप; चित्र; नक्कल; प्रतिकाय. २ प्रतिक्रिया पहा. [सं.]

**प्रतिक्रिया**—स्त्री. १ परतफेड; बऱ्यावाईट गोष्टीचें प्रतिफल; प्रतिकार, उलट क्रिया; क्रियांतर २ प्रतिपक्षाच्या क्रियेवर केलेला उपाय, तोड; इलाज; उपचार, विरोध 'कीं स्फुरे हननक्रिया प्रतिक्रिया।' –यथादी ४ १५०९. प्रतिकार पहा. ३ (शाप.) प्रत्याघात; उलट क्रिया. (इं.) रिॲक्शन. 'ज्याप्रमाणें क्रियेनें प्रतिक्रिया उत्पन्न होते ...' –टिले ४ ४९२. [सं.]

**प्रतिगामी**—वि. १ विरुद्ध; उलट; विरोधी 'तथापि प्रतिगामी स्वरूपाचीं देखील कांहीं उदाहरणें दाखवितां यावयाचीं नाहींत असें नाहीं. –वस्व ७२ २ पिछेहाटीची; पुच्छ प्रगतीची. [सं.]

**प्रतिगृहीत**—वि १ स्वीकार केलेलें; स्वीकृत. २ कबूल केलेलें; परवानगी, मान्यता दिलेलें, पसंत, मान्य. [सं]

**प्रतिग्रह**—पु. १ देणगीचा स्वीकार, दान घेणें 'तुका म्हणे व्हावें लवकरी उदार। मी आहें सादर प्रतिग्रहा।' –तुगा ९७२. २ स्वीकार; मान्यता, पसंति; कबूली. ३ (कायदा) देणगीचा प्रत्यक्ष ताबा मिळणें ४ (कायदा) देणगीच्या मालाचा कबजा घेण्याची लायकी, अधिकार [सं प्रति+ग्रह्] **प्रतिग्रहि(ही)ता**–वि. दान घेणारा. 'आपणचि विकूनि दुहिता। कीं न मम म्हणे पिता। तो सुटे कीं प्रतिग्रहिता। जांवाई शिरकं।' –ज्ञा १८.२३४. **प्रतिग्राहक, प्रतिग्राही**–वि. १ स्वीकार करणारा; दान इ० घेणारा. २ कबूल करणारा; मान्यता, परवानगी देणारा. [सं.] **प्रतिग्राह्य**–वि. स्वीकार करण्यास, घेण्यास योग्य; शक्य; लायक स्वीकारणीय [सं]

**प्रतिघात**—पु एका पदार्थावर दुसरा पदार्थ आपटला असतां उलट वेग उत्पन्न व्हावयाजोगा त्यावर जो तडाखा बसतो तो; प्रतिक्रिया; प्रतिकार, उलट प्रहार; प्रतिबंध, प्रत्याघात; प्रतिक्षेपण [सं.]

**प्रतिघातक**—वि. प्रतिक्रिया करणारा; प्रतिकारक; उलट प्रहार करणारा. [सं]

**प्रतिछाया**—स्त्री. १ पडसावली; पडछाया. २ प्रतिबिंब. ३ पुतळा, चित्र, प्रतिमा. [सं.]

**प्रतिजाप**—पु उलट उत्तर; जबाब. [सं. प्रति+फा. जाप]

**प्रतिजिह्वा**—स्त्री. पडजीभ. [सं.]

**प्रतिताल**—पु. (संगीत) विषम पहा

**प्रतिती**—स्त्री प्रतीति पहा.

**प्रतिदान**—न. १ मोबदला; परतफेड. २ परत दिलेली देणगी; उलट अहेर. [ सं. ]

**प्रतिदिन-दिनीं**—क्रिवि. रोजरोज, दररोज [ सं प्रतिदिन ]

**प्रतिदोकडा**—पु. दोकड्याचा किंवा कच्च्याचा कोणताहि अपूर्णांक

**प्रतिद्वंद्वी**—वि १ विरुद्ध जाणारा; आड येणारा; प्रतिस्पर्धी; उलटपक्षी. २ अर्थांतरन्यासरूप; अर्थांतरमय. [ सं. ]

**प्रतिध्वनि, प्रतिनाद**—पु.पडसाद; प्रतिशब्द **प्रतिध्वनित, प्रतिनादित**-वि. पडसाद, प्रतिशब्द देणारा, दिलेला; पडसादानें युक्त

**प्रतिनायक**—पु मुख्य पुढाऱ्याच्या विरुद्ध बाजूचा पुढारी, नायकाचा प्रतिस्पर्धी.

**प्रतिनिधि**—पु १ प्रतिमा; चित्र; प्रतिकृति; प्रतिमूर्ति; प्रतिरूप. २ ( ल. ) नायब; मुतालिक; राजाच्या जागीं असणारा अधिकारी, वकील, मुखत्यार, मदतनीस, दुय्यम; हाताखालचा मारुति व गरुड यांचे मुखवटे व दोन आबदागिरी हीं प्रतिनिधित्वाचीं चिन्हें होतीं. ३ एकाच्या बदली घेतलेला दुसरा माणूस किंवा पदार्थ. ४ संस्थेनें विशिष्ट कामासाठीं, आपल्या वतीनें काम करण्यासाठीं नियुक्त केलेला माणुस. ( इं ) डेलेगेट 'राष्ट्रीय सभेचे जे प्रतिनिधी येथें जमले आहेत ते मध्यमस्थितींतील गृहस्थ आहेत असा माझा समज आहे. ' ५ मराठ्यांच्या राजमंडळांतील अष्टप्रधानाहून वरचें पद. औंधचे संस्थानिक प्रतिनिधि घराण्यांतील आहेत. ६ जामीन, करारदार [ सं ]

**प्रतिपत्-पदा**—स्त्री. शुक्ल, कृष्ण पक्षांतील पहिली तिथि [सं ]

**प्रतिपत्ति**—स्त्री १ आदर; मान. २ संपादणूक; उपार्जन. ३ ( ल. ) मेजवानी 'हें असोतु या बोलाची तारें भलीं। वरी कैवल्यरसें वोगरलीं। हीं प्रतिपत्ति मियां केली। निष्कामासी।' –ज्ञा ६ २२ ४ साधन; पद्धति; विधिविधान 'तया कोणें प्रतिपत्तीं। विवाह केले।'–ज्ञा १६.३०४. [सं. ]

**प्रतिपथ**—पु. रूपांतर. 'तेचि रसाळ कथा। मऱ्हाठिया प्रतिपथा। आणिजेल आतां। अवधारिजो।' –ज्ञा १२.२४६. [सं.]

**प्रतिपंथी**—वि. विरोधी; विसंगत. 'मग त्यांणें ( माधवरावानें ) त्या सखारामबापूला आपल्ये प्रतिष्ठेस प्रतिपंथी असा जाणोन ..' –मराठ्यांचीबखर पृ २८९–९०. [सं. प्रति=उलट+ पंथ=मार्ग ]

**प्रतिपद**—न. १ समानार्थक शब्द; पर्याय. २ विवेचन; फोड. 'एवं सर्वशब्दाचें प्रतिपद। कृत्स्न म्हणे गोविंद।'-यथादी १८.६३२. –वि प्रत्येक शब्दाची; शब्दागणिक; सविस्तर.'टीकायाची विशद। मार्गें जालीं प्रतिपद।'–यथादी १८.६७४. [सं.]

**प्रतिपदीं**—क्रिवि. पावलोंपावलीं; क्षणोक्षणीं ( शब्दशः व ल. ). 'प्रवृत्तीचिये राजबिदीं। अवस्थाभेदप्रमदीं। कीजत आहे प्रतिपदीं। सुखाचें लोण।' -ज्ञा १८ १०६९ **प्रतिपदोक्त**-वि. शास्त्रादिकांच्या ठिकाणीं तदर्थ शब्द योजून ज्याचें विधान केलें आहे तो (तपशीलवार सांगितलेला, विशेष वर्णिलेला प्रसंग, गोष्ट). [ सं. ]

**प्रतिपक्ष**—पु १ ( कायदा, वादविवाद इ० ) विरुद्ध, उलटबाजू, पक्ष; प्रतिस्पर्धी. २ प्रतिपक्षी पहा [ सं. ]

**प्रतिपक्षी**—पु १ ( कायदा, वादविवाद इ०) विरुद्ध पक्षाचा इसम, प्रतिवादी. २ प्रतिस्पर्धी; दुसऱ्या गोष्टीच्या विरुद्ध व नाशास कारण असलेली एखादी गोष्ट ३ शत्रु [ सं. ]

**प्रतिपादक**—वि प्रस्थापित करणारा, पुराव्यानें सिद्ध करणारा ( वादविवादी, मुद्दा इ० ). [ स ]

**प्रतिपादणें**—उक्रि १ सिद्ध करणें; प्रस्थापित करणें; पुष्टि देणें, प्रमाणानें खरा करून देणें. २ सर्वस्वीं दुसऱ्याच्या स्वाधीन, हवालीं करणें; कायमचा देऊन टाकणें; बहाल करणें. ३ बोलणें; सांगणें 'आधींचि विवेकाची गोठी। वरी प्रतिवादी श्रीकृष्ण जगजेठी।' –ज्ञा ४ २ [ प्रतिपादन ]

**प्रतिपादन**—न. १ हरकतींचें, दोषाचें निरसन करून स्वतःचें मत सिद्ध करणें, प्रस्थापित करणें; विवेचन आत्मसमर्थन. २ दान; देणगी देणें [ सं ]

**प्रतिपादित**—वि सिद्ध, प्रस्थापित, समर्थन केलेला [ सं ]

**प्रतिपाद्य**—वि सिद्ध करण्यालायक, जोगा, शक्य, समर्थनीय; प्रस्थाप्य, प्रतिपादनीय 'तैसा प्रतिपाद्यु जो ईश्वरु। तो होआवयालागी गोचरु।' –ज्ञा १६ १०३. [ सं ]

**प्रतिपाल-ळ, प्रतिपालन**—पुन ( अन्नवस्त्रादि द्वारां ) संरक्षण, संवर्धन, संगोपन; पालनपोषण (शब्दश. व ल ) 'प्रतिपाळु तरी पाटाचा।' –ज्ञा १७ १८३. [स प्रतिपाल, प्रतिपालन]

**प्रतिपालक**-वि. संरक्षण, संगोपन; पालनपोषण करणारा [ सं. ]

**प्रतिपाल(ळ)णें**—उक्रि पोसणें; पाळणें; पालनपोषण करणें; संरक्षण करणें; सांभाळणें. 'म्हणोनि भूतें हन सृजावीं। कां सृजिलीं प्रतिपाळावीं।' –ज्ञा ९ १२२. [ प्रतिपालन ]

**प्रतिपालित**—वि. संरक्षण केलेला; पोसलेला; संवर्धित ( शब्दशः व ल ). [ सं. ] **प्रतिपाळ, प्रतिपाळक, प्रतिपाळण, प्रतिपाळणें**-प्रतिपाल वगैरे पहा.

**प्रतिपुस्तक**—न. भाषांतर; नक्कल.

**प्रतिप्रसव**—पु. सामान्य निषेधाचा विशेष गोष्टीपुरता पुन्हां केलेला विधि; प्रतिबंधक कायद्याच्या बाबतींत सवलत; निषेधात्मक गोष्टींचें पुन्हां प्रतिपादन. [ सं. ]

**प्रतिप्रक्षेपक, प्रतिप्रक्षेपणीय**—वि (शाप.) परत पाठविणारी, धातूवर ज्वाळा फेंकणारी (भट्टी). -पदा १५१. (इ) रिव्हर्बेरेटरी.

**प्रतिफल-ळ**—न. फेड; मोबदला; उलट फळ. 'त्या साधनांचा तो जसा उपयोग करील, तसें त्यास प्रतिफळ प्राप्त होईल' -ज्ञानि (प्रस्तावना) १. [सं. प्रति+फल]

**प्रतिफलन**—न (प्रकाश) परावर्तन. 'ग्रह स्वतःप्रकाश नाहींत, त्यांवर सूर्याचा प्रकाश पडून त्याचें चंद्रावरच्या प्रमाणें प्रतिफलन होतें.' -मराठी सहावें पुस्तक ३२०.

**प्रतिफलित(प्रेरणा)**—स्त्री. दोन किंवा अधिक प्रेरणांस समतोल धरिते ती' (इं) बॅलन्सिंग.

**प्रतिफळणें**—क्रि फलद्रूप होणें; अनुरूपपणानें फळणें; सिद्ध होणें 'एथ प्रतिफळे भावना। आपुलाली।'-ज्ञा ४ ७६. [प्रतिफल]

**प्रतिबद्ध**—वि अडथळा झालेला, प्रतिकार केलेला; प्रतिबंध झालेला; मज्जाव केलेला; अडविलेला [सं]

**प्रतिबद्धक**—वि. प्रतिबंध करणारा; आड येणारा; प्रतिबाधक पहा 'हे विषमता तुजपाशीं। कृष्णसुखाशी प्रतिबद्धक।' -एरुस्व १३ ४२.

**प्रतिबंध, प्रतिबंदी**—पुस्त्री. १ अडथळा; विरोध; अडवणूक; अडकाठी, प्रतिकार; विघ्न. २ अडवणूक, थाबवणूक, नियंत्रण; अवरोध, अडथळा केलेली स्थिति. ३ (यंत्रशास्त्र) ज्या कारणानें चलन पावलेल्या पदार्थाचें चलन कमी होतें अथवा नाहींसें होतें किंवा उलटें होतें त्यास प्रतिबंध म्हणतात -यंमू २१९. (इं) रेझिस्टन्स. [सं प्रतिबंध] **प्रतिबंधक**-न. अडथळा; अडवणूक; विरोध, विघ्न. [स] -वि प्रतिबंध करणारा; अडथळा, प्रतिकार; अडवणूक करणारा; निवारक [सं] **०कारण**-कार्यनिवारक कारण, स्वतः कोणतेंहि कार्य उत्पन्न न करितां केवळ आपल्या अस्तित्वानेंच दिलेलें कार्य घडवूं देत नाहीं असें कारण. -न्यायप २८. **प्रतिबंधन**-न. अडचण; विघ्न; अडथळा. अधिक खादलिया अन्न। तें प्रतिबंधन गुरुसेवें।' -एभा १७.३१०. **प्रतिबाधक**-वि. १ विरोध, अडथळा, मज्जाव, प्रतिबंध करणारा; अवरोध करणारा. २ मार्गांत येणारा; प्रतिकूल असणारा, कार्यनाश करणारा

**प्रतिबिंब**—न. पाणी, आरसा इ० ज्या पृष्ठभागावर दिसतें तें पदार्थाचें प्रतिरूप; पडछाया. [सं.] **प्रतिबिंबणें**-अक्रि १ पडछाया पडणें; प्रतिबिंबित होणें; स्वरूप उमटणें 'जैसी प्रतिबिंबे छाया। निजांगाची।' -ज्ञा ७ १५ २ भासणें; वाटणें. 'माझे अव्ययत्व तरी न नसे। परी होणें जाणें एक दिसे। तें प्रतिबिंबे मायावशें। माझ्याचि ठायीं।' -ज्ञा ४ ४'५ [प्रतिबिंब] **प्रतिबिंबित**-वि पडछाया पडलेले; प्रतिबिंब पडलेलें; प्रतिभासित. [सं]

**प्रतिभट**—पु १ स्पर्धा, बरोबरी करणारा माणूस. २ शत्रु; प्रतियोद्धा. [प्रति+भट-योद्धा] **प्रतिभटणें**-अक्रि स्पर्धा, बरोबरी करणें; झगडणें; भांडणें. 'असे ज्याचें त्याशीं प्रतिभटति जे पामर पिसे।' -वामनस्फुटश्लोक नवनीत १३४ [प्रतिभट]

**प्रतिभा**—१ प्रतिबिंब; स्वरूपांतर, छाया 'जैसें सरोवर आटे। मग प्रतिभा नाहीं।'-ज्ञा ५ १५६ २ कल्पना; मानसिक प्रतिमा; काल्पनिक चित्र. ३ अनुभव; प्रतीत 'कीं आत्मराजाचिये सभे। गीते वोडविले खांबे। मज श्लोकप्रतिभे। ऐसे येत।' -ज्ञा १८ १६६५. ४ उच्च प्रकारचें ज्ञान; अलौकिक बुद्धि; स्फूर्ति. ५ कांति; तेज. **०वान-शाली-संपन्न**-वि. श्रेष्ठ बुद्धिमान; अतिशय हुशार; बुद्धिमान.

**प्रतिभास**—पु १ प्रतिबिंब, प्रतिरूप 'ब्रह्म करि निराभास। परि माया अविद्या तिया साभास। म्हणुनि तेथें उठति प्रतिभास। परब्रह्माचे।' २ प्रतिभा अर्थ २ पहा. [सं.]

**प्रतिभासणें**—क्रि. दिसणें; वाटणें; प्रतीत होणें. 'अहो पाहतां कीर प्रतिभासे। एथ नवलावो काय असे।' -ज्ञा ११। २२९. [प्रतिभास]

**प्रतिभिंत**—स्त्री समोरची भिंत. 'कां प्रतिभिंती चोखाटे समोरिल चित्र उमटे।' -ज्ञा १५.४४४.

**प्रतिभू**—पु. जामीन; हमीदार. [सं.]

**प्रतिम**—वि. सारखा; एखाद्याची प्रतिमा असणारा. बहुव्रीहि समासाच्या उत्तरपदांत योजितात जसें:-एतत्प्रतिम-तत्प्रतिम-सूर्यप्रतिम-सिंहप्रतिम इ०

**प्रतिमंडल**—न. १ (गणित) केंद्रपराङ्मुख वर्तुळ; विक्षेपवर्तुळ, उपकारक वर्तुळ. (इं) एक्सेंट्रिक सर्कल २ प्रतिबिंब. 'नातरी सूर्यप्रतिमंडळ। जैसेनि धरी सलिल।' -ज्ञा १३.९०८.

**प्रतिमल्ल**—पु जोडीचा पहिलवान; प्रतियोद्धा; शत्रु; प्रतिभट. 'तेथ रागी प्रतिमल्लाचा। गोसावी सर्व दळाचा।'-ज्ञा १८.४९०.

**प्रतिमा**—स्त्री. १ सादृश्य; साम्य; बरोबरी; उपमा. 'याची प्रतिमा त्यास येणार नाहीं.' २ धातु पाषाण इ० कांवर कोरलेली देवादिकांची मूर्ति. 'लिंग कां प्रतिमा दिठी। देखत खेंवों अंगेष्टी।' -ज्ञा १७ २०४. ३ प्रतिबिंब. ४ चित्र. ५ नक्कल ६ चिन्ह; खूण. [सं] **एकेप्रतिमेचा**-वि. एका सांचाचा किंवा शिक्क्याचा; एका घडणीचा, नमुन्याचा. 'हा व तो एकया प्रतिमेचे आहेत.'

**प्रतिमावाद**—न. ललित लेखनांत व प्रत्यक्षांत (जें इंद्रियगम्य तें) तफावत न पडतां प्रत्यक्षाचें हुबेहूब चित्र काढणें याविषयीं दुराग्रह -प्रतिभासाधन.

**प्रतिमान**—न. लेखकाच्या कल्पित सृष्टींत जीं पात्रें वावरतात त्या प्रत्यक्षांतील (जें जें इंद्रियगम्य तें तें) स्त्री-पुरुषाचा गाळीव नमुना. -प्रतिभासाधन.

**प्रतिमुख**—न. प्रतिबिंबांतील मुख. 'पै बुद्धिभेदाचा आरिसा। तया हातोनि पडिला वीरेशा। म्हणौनि प्रतिमुखाभासा। मुकला तो।' –ज्ञा १४.३०४. [सं.]

**प्रतियुति, प्रतियोग**—स्त्रीपु. (ज्यो.) पृथ्वीच्या एका बाजूस सूर्य व दुसऱ्या बाजूस ग्रह असून त्यापासून भूमीकडे येणाऱ्या रेषात १८० अंशांचा कोन होत असलेली स्थिति. –सूर्य २४ [सं]

**प्रतियोगी**—पु. १ शत्रु; प्रतिस्पर्धी. २ विरुद्ध बाजूचा इसम; विरुद्ध व नाशकारक पदार्थ किंवा गोष्ट. 'ऐसीं सदादि प्रतियोगियें। असदादि तिन्हीं द्र्यें।' -अमृ ५ १२ ३ जोडीचा भाग; जोड; पूरक भाग; उतारा. -वि. १ जशास तसा वागणारा; दुसरा आपल्याशीं, जसा वागतो त्याचप्रमाणें त्याच्याशीं वागणारा. २ मागून; नंतर येणारा; अनुयोगी याच्या उलट. अनुयोगी पहा [सं.] ०**सहकारिता**–स्त्री (राजकारण) परिस्थिति जितकी अनुकूल किंवा प्रतिकूल तितक्याच अनुकूल प्रतिकूलतेनें वागणें, दुसरा ज्या प्रमाणें वागेल त्या प्रमाणेंच त्याच्याशीं वागणें. (इं) रेस्पॉन्सिव्ह कोऑपरेशन याला प्रतिशब्द म्हणून केसरीनें मॉटग्यू–चेल्मस्फोर्ड सुधारणांच्या वेळीं योजिला. पूर्ण सहकारिता नव्हे व पूर्ण असहकारिताहि नव्हे तर याच्या मधील मार्ग. 'प्रतिध्वनी सहकारिता श्रेष्ठ कां प्रतियोगी सहकारिता श्रेष्ठ हे राजकीय विषय आहेत.' –नाकु ३.१७

**प्रतिरव**—पु. १ (कायदा) विरुद्ध तक्रार; मालकीहक्काविरुद्ध तक्रार, भांडण, झगडा २ प्रतिध्वनि. [सं.]

**प्रतिरूप**—न. प्रतिमा; चित्र; कोणत्याहि पदार्थाचें सदृशरूप.

**प्रतिरूपक**—न नाटक, कादंबरी इ०त कांहीं फेरफार करून नवीन बनविलेली कादंबरी, नाटक इ०; रूपांतर. 'शेक्सपियर कवीच्या नाटकांचीं मराठी प्रतिरूपकें' –शेक्सपिअर नाट्यमाला, तुफान प्रस्तावना पृ. ४४.

**प्रतिरोध**—पु १ अडथळा; थांबवणूक; प्रतिबंध. २ अडथळा, थांबवणूक, गतीला प्रतिबंध झाल्यामुळें होणारी स्थिति. [सं.] **प्रतिरोधक**–वि. अडथळा करणारा; विरोधक.

**प्रतिलेख**—पु लेख, पुस्तक इ० ची केलेली हुबेहुब नक्कल; (इं.) कॉपी.

**प्रतिलोम**—पु. १ उलट क्रम, व्यतिरेक. 'अनुलोम प्रतिलोम। विवंचना वाटेल दुर्गम।'–एभा २४.६०३. २ उच्च वर्णाच्या स्त्रीचा नीच वर्णाच्या पुरुषाशीं झालेला विवाह उदा० ब्राह्मणीचा क्षत्रिय, वैश्य, किंवा शूद्र पुरुषाशीं; क्षत्रियेचा वैश्य किंवा शूद्र पुरुषाशीं; वैश्येचा शूद्राशीं. याच्या उलट अनुलोम (पहा). 'उत्तम वर्णाची जे नारी। हीन वर्णाचा गर्भ धरी। तिची संतती संसारीं। अभिधान धरी प्रतिलोमज।'–एभा २०.३०. –वि. १ (लोम=केंस याच्या वळणाच्या उलट) नैसर्गिक मार्गाच्या विरुद्ध; प्रवाहाच्या विरुद्ध दिशेचा; उलटा; विपरीत; विरुद्ध. २ (ल) नीच; हलका; क्षुद्र, दुष्ट. ३ हीन जातीच्या पुरुषापासून उच्च जातीच्या स्त्रीस झालेला. [सं प्रति+लोम=केंस] ०**ज**–वि. प्रतिलोम अर्थ ३ पहा 'वर्णाश्रमांमाजील गुज। प्रतिलोमानुलोमज।'–एभा २०.२९ ०**प्रमाण**–न व्यस्त प्रमाण. –मराठी ६ वें पुस्तक (आवृ. २) पृ. १७१ ०**विवाह**–पु उच्च वर्णाच्या स्त्रीचा हीन वर्णाच्या पुरुषाशीं झालेला विवाह. प्रतिलोम (–पु) अर्थ २ पहा.

**प्रतिवचन, प्रतिवाद**—नपु. १ उत्तर, जबाब 'तेथें देवें पुशिला जो प्रश्न। त्याचें कोण दे प्रतिवचन।'–एभा २९.४८८. २ आक्षेपास उत्तर; विरुद्ध भाषण. [सं.]

**प्रतिवदन**—न. प्रतिबिंब. 'कां प्रतिवदन जैसें। आरसेनि।' –ज्ञा १३.९०७.

**प्रतिवादी**—पु १ (कायदा.) ज्या इसमाविरुद्ध दिवाणीदावा लागलेला असतो तो; वादीची ज्या विरुद्ध तक्रार असते तो माणूस. २ प्रतिपक्षी. ३ वादविवादात प्रत्युत्तर देणारा, उलट जबाब देणारा; प्रतिस्पर्धी. [सं]

**प्रतिवार्षिक**—वि. दर वर्षी करावयाचा, येणारा किंवा होणारा; सांवत्सरिक. [प्रति=प्रत्येक+वर्ष]

**प्रतिविधा**—पु प्रतिक्रिया करण्यासाठीं केलेलें एखादें कृत्य, व्रत, संस्कार, अनुष्ठान इ०

**प्रतिविभूति-ती**—स्त्री. सामान्य, गौण विभूति (ऐश्वर्यादि) 'येथ विभूती प्रतिविभूती। प्रस्तुत अर्जुना सांगिजेती।' –ज्ञा १० ४१.

**प्रतिविशवा**—पु. विशव्याचा पोटविभाग; विशवा पहा.

**प्रतिवृत्त**—न. १ केंद्रपराङ्मुख वर्तुळ. प्रतिमंडल अर्थ १ पहा. २ (सभा, संमेलन इ० ची) हकीकत; अहवाल, रिपोर्ट. 'प्रतिवृत्ताच्या सालीं कार्यकारी मंडळाच्या दहा बैठका झाल्या.' –के १७.६.३०.

**प्रतिशब्द**—पु १ पडसाद; प्रतिध्वनि; प्रतिनाद 'साद घातलिया आकाशा। नेदी प्रतिशब्दु जैसा।' –ज्ञा १७.२७९. २ एका शब्दाला जोड द्यावयासाठीं द्विरुक्ति करून योजिलेला दुसरा तत्सदृश शब्द. जसें:–भाकरी-बिकरी, धारणधोरण; दगडबिगड इ०. उपशब्द पहा ३ एखाद्या शब्दाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठीं योजिलेला त्याच अर्थाचा दुसरा शब्द; पर्याय; समानार्थक शब्द.

**प्रतिषिद्ध**—वि. १ मनाई केलेला; निषिद्ध; त्याज्य. २ अमान्य, नाकारलेला; रद्द; आक्षिप्त. [सं] **प्रतिषेध**–पु. १ मनाई; मज्जाव. २ निषेध; नकार; त्याग ३ निवारण; प्रतिबंध. [सं] **प्रतिषेधक**–वि. मनाई, निषेध करणारा; नाकारणारा. 'तैसिं अविद्येसन्मुखें। सिद्धचि प्रतिषेधकें।' –अमृ ६.६८.

**प्रतिषेधणें**–उक्रि १ मनाई करणें; निषेधणें. २ नाकारणें; वर्जणें; इनकार, प्रतिबंध करणें. [प्रतिषेध]

**प्रतिष्टंभ**—पु. अडथळा; विरोध; हरकत. [सं.]

**प्रतिष्ठणें**—सक्रि. १ (काव्य) देवळांत मूर्तीची यथाविधि स्थापना करणें; स्थापणें; समंत्रक प्राणप्रतिष्ठा करणें. 'वेदाधारें बोलती। केवळ धर्म प्रतिष्ठिती।'–ज्ञा २ २४५. २ ठेवणें; मांडणें. 'घटिका प्रतिष्ठिली अंतरीं।' ३ अधिकाराच्या, मानाच्या जागीं एखाद्याची स्थापना करणें. –अक्रि. (काव्य) असणें; राहणें; थांबणें; चालू असणें. 'तें ज्ञान हृदयीं प्रतिष्ठे।' –ज्ञा ४.१९०. [प्रतिष्ठा]

**प्रतिष्ठा**—स्त्री. १ मान; कीर्ति; पत, लौकिक; प्रसिद्धि; मोठेपणा; ख्याति. 'नाना पुरतिये प्रतिष्ठेलागीं। सानीव धरूनि आगीं।'–ज्ञा १ ४६.२ अधिकाराच्या, बहुमानाच्या जागीं एखाद्याची स्थापना ३ एखाद्या देवतेच्या सन्मानार्थ उभारलेल्या स्मारकाची स्थापना. ४ देवादिकाच्या मूर्तीची यथाविधि स्थापना; प्राणप्रतिष्ठा 'प्रतिमाप्रतिष्ठेसि पहाहो। प्रकट आयुर्भावो मंत्रमात्रें।' –एभा १.१७०. ५ नवीन बांधलेल्या घरात राहण्यास जाण्यापूर्वी करितात तो विधि; घरभरणी. ६ भ्रष्ट झालेल्या देवादिकाच्या मूर्तीची पुन्हां स्थापना. ७ वसतिस्थान; गृह. ८ डौल; आढ्यता; अभिमान (क्रि० करणें, मिरवणें; बाळगणें). ९ देवळास मिळालेली नेमणूक, वर्षासन इ० १० हुंडा देऊन मुलीचें लग्न लावणें. ११ आयुष्यांत स्थिर, कायम, स्थायिक होणें. १२ (सामा.) स्थिरता; स्थैर्य; कायमपणा; स्थापना. 'बुद्धी धैर्या होय वसौटा। तरी मनातें अनुभवाचिया वाटा। हळु हळु करी प्रतिष्ठा। आत्मभुवनीं।' –ज्ञा ६.३७८. १३ (निंदार्थी) अप्रतिष्ठा, अपमान. [सं.] **म्ह०** कुचेष्टेवाचून प्रतिष्ठा वाढत नाहीं **पंधरा प्रकारच्या प्रतिष्ठा**–दिमाखानें व गर्वानें फुगून जाणें, फाजील, अतोनात डौल; मिजास; आढ्यता. सामाशब्द- **०नाम, प्रतिष्ठित नाम**–न. व्यवहारात आदरार्थी योजावयाचें टोपण नाव. (दादा, तात्या, नाना बापू, अण्णा इ०). व्यावहारिकनाव पहा. **०वस्त्र**–न. १ सभा, दरबार इ० ठिकाणीं प्रतिष्ठेनें घेऊन जावयाच्या उपयोगी पोषाख. उंची, भारी, सुंदर, छानछोकीचा पोषाख. २ उंची पोषाखांतील एक वस्त्र.

**प्रतिष्ठापन-ना**–स्त्री. प्रतिष्ठा अर्थ ४ व १२ पहा.

**प्रतिष्ठापना**—स्त्री. (ख्रि.) आचार्याची एखाद्या मंडळीवर यथाविधि केलेली स्थापना, योजना (इं.) इन्स्टॉलेशन्. 'नियमानुसार भरलेल्या कौन्सिलच्या सभेनें नेमलेल्या उपासनापद्धतीप्रमाणें आचार्याची प्रतिष्ठापना करावी.' –कोंघवनि १५.

**प्रतिष्ठिणें**—उक्रि. स्थापन करणें; प्रतिष्ठणें पहा. 'आली महादेवी तिनें गौरीहार प्रतिष्ठिला।' –वसा ४६. [प्रतिष्ठा]

**प्रतिष्ठित**—वि. १ सन्मानानें, आदरानें वागविलेला; मान दिलेला. २ मानाला पात्र असलेला; सन्माननीय; आदरणीय; संभावित. ३ सुंदर; भपकेदार; मान्यतेचा (पोषाख). ४ अधिकाराच्या जागीं स्थापिलेला किंवा नेमलेला (माणूस). ५ यथाविधि स्थापिलेली; प्राणप्रतिष्ठा केलेली (देवाची मूर्ति). ६ प्रसिद्ध; प्रख्यात; नावाजलेला; लौकिकवान. ७ साध्य झालेला; संपूर्ण झालेला. ८ (लग्न, उद्योगधंदा इ० च्या योगानें आयुष्याच्या मार्गाला लागून) स्थिर, दृढमूळ, कायम, स्थाईक झालेला ९ वर्षासन, नेमणूक दिलेलें (देऊळ, देवस्थान इ०), हुंडा दिलेली (कन्या). १० सर्वांस आवडणारा. ११ (निंदार्थी) अहंमन्य, शिष्ट; मिजासखोर; आढ्यताखोर. [सं.] **प्रतिष्ठेखोरपणा**–पु (निंदार्थी) शिष्टपणा; प्रतिष्ठितपणा; मिजासखोरपणा; अहंमन्यता. 'मुसलमान लोकांत प्रतिष्ठेखोरपणा, आळस ... इत्यादि अवगुण बऱ्याच अंशानें वसत आहेत' –आगर ३ २२५.

**प्रतिसहकारपक्ष**—पु सरकारशी कामापुरता सलोखा जोडून प्रसंगविशेषीं विरोध करणारा, प्रतियोगी सहकारिता करणारा पक्ष. 'प्रतिसहकारपक्षाचें धोरण असें आहे की, जेव्हां आपला अभिमान राखून सरकारशीं सहकार्य करता येईल तेव्हां तें करावें.' –के १७.५.३०. [सं. प्रतिसहकार+पक्ष]

**प्रतिसारण**—न (शाप.) पदार्थाचे अणु ज्या शक्तीनें आंदोलन पावून दूर सरतात ती शक्ति. (इं.) रिपल्शन्. 'दु.संकोच्य प्रवाही पदार्थाचे परमाणु निरंतर एकमेकांचें प्रतिसारण करीत असतात.' –मराठी ६ वें पुस्तक (१८७५ आवृ. २ री) पृ. ८६. [सं. प्रति+सृ]

**प्रतिसांवत्सरिक**—न. मृताचे मृततिथीस दरवर्षी करावयाचें श्राद्ध. –वि. दरसाल होणारी, करावयाची (गोष्ट, विधि, इ०).

**प्रतिसूचना**—स्त्री. आधीं केलेल्या सूचनेत फरक करणारी सूचना. 'सर्व सूचना व प्रतिसूचना अनुक्रमानें अध्यक्षानें सभेपुढें मांडल्या पाहिजेत.' –टि ३.२३५.

**प्रतिसूर्य**—पु. १ सूर्यबिंबाची प्रतिकृति. २ (ल.) विद्वान्, तेजस्वी माणूस.

**प्रतिस्पर्धा**—स्त्री. १ चढाओढ; बरोबरी; एखाद्याच्या वरचढ होण्याची, त्यास मागें टाकण्याची इच्छा, प्रयत्न. कोणेकाबरोबर स्पर्धा. (क्रि० करणें; धरणें; मांडणें). २ मत्सर; द्वेष. [सं.]

**प्रतिस्पर्धी**–वि. १ मत्सरी; द्वेषी २ चढाओढ, बरोबरी, स्पर्धा करणारा. ३ सामनेवाला; प्रतिवादी; प्रतिपक्षी. [सं.]

**प्रतिस्फटि(दि)क**—वि सरसासारखा चिकचिकीत; पिच्छल; जिलेटिनप्रमाणें दिसणारा. (इं.) कोलोइड.

**प्रतिहत**—वि. १ मार खाल्लेला; तडाखा दिलेला; जखमी केलेला. २ मागें हटविलेला; मागें किंवा खालीं लोटलेला. ३ परावृत्त; माघारा फिरलेला. ४ निराश झालेला; भ्रष्टसंकल्प; खंडित मनोरथ; कुंठितगति. 'कुळ उद्धरील समस्त। विषयीं प्रतिहत तें केलें।' –एभा ९.३७९. ५ नष्ट झालेला. [सं.]

**प्रतिहर्ता**—पु सोमयागांतील सामकगणांतील ऋत्विज.

**प्रतिक्षागृह**—न. भेटीस येणारांना भेट होण्यापूर्वी बसण्यासाठीं असलेली जागा. (इं.) वेटिंगरूम. 'प्रतिक्षागृहांतील ... सामान व्यवस्थित रीतीनें लाऊन ठेवावें.' -ऐरापुप्र ९.४५७.

**प्रतिक्षिप्त**—वि. प्रतिबिंबित, परावर्तित. [सं.] ०**क्रिया**-स्त्री परावर्तनक्रिया. 'मीलनस्थानांचें म्हणजे प्रतिक्षिप्त क्रियांचें ...' -विचावि ६.

**प्रतिज्ञा**—स्त्री. १ वचन; करार; ठराव; अमुक गोष्ट अमुक रीतीनेंच घडेल किंवा मी अमुक करीनच इ० रूप एखाद्यानें ठासुन केलेलें विधान; निश्चय. २ पैज; पण; होड. 'तरी अवधान एक वेळें दीजे। मग सर्वसुखासि पात्र होइजे। हें प्रतिज्ञोत्तर माझें। उघड ऐका।' -ज्ञा ९.१. ३ (कायदा) शपथपूर्वक केलेलें विधान; कबूली; सत्यास स्मरून सांगणें. ४ (न्याय.) साध्याचा निर्देश, प्रमेय, उपपाद्य; सिद्ध करावयाचें उपपादन; सिद्धांत. ५ शपथ [सं.] ०**भोगणें**-प्रतिज्ञा करणें; वचन देणें; ठराव, करार करणें. 'आम्ही पुस्तकास आरंभ करतेवेळीं अशी प्रतिज्ञा भोगलेलीहि कोठें आम्हास आठवत नाहीं.' -नि ६३८. ०**पत्र**-न. दस्तऐवज; कबुलायत. (इं.) ॲफिडेव्हिट. ०**विरोध**-पु (न्याय.) पूर्व पक्षाची किंवा उपपाद्याची अमान्यता. **प्रतिज्ञात**-वि. १ ज्याच्या संबंधानें प्रतिज्ञा केली आहे असें; कबूल केलेलें; मान्य केलेलें. २ ठासुन सांगितलेलें; उपपादन केलेलें.

**प्रतीक**—न. १ मूळ ग्रंथ, विवरण किंवा टीका करण्यासाठीं मूळग्रंथातील घेतलेलें वाक्य, पंक्ति, पद इ०. २ प्रतिपक्षाच्या विधानातील खंडनार्थ घेतलेला अंश, मुद्दा. ३ उदाहरण; दाखला देण्यास, सादृश्य दाखविण्यास पुढें केलेली गोष्ट, बाबत. ४ चिन्ह; खूण. 'मन हें सुद्धां एक दैवतच असुन परब्रह्माचें प्रतीक म्हणून त्याची उपनिषदांतूनच उपासनाहि सांगितली आहे.' -गीर १२५.

**प्रतीकार, प्रतीकारक**—प्रतिकार, प्रतिकारक पहा.

**प्रतीचा**—वि. गुण, जाति इ० नीं बरोबरीचा; समानगुण.

**प्रतीची**—स्त्री. पश्चिम दिशा; मावळत [सं.] **प्रतीचीन**-वि. पश्चिम दिशेकडील; मावळतीचा; पश्चिम. [सं.]

**प्रतीत**—स्त्री. अनुभव; खात्री; प्रतीति पहा. -मनको. -वि. अनुभवलेलें; दिसुन आलेलें; अनुभवानें किंवा पाहणी करून खरें ठरलेलें; प्रत्ययास आलेलें; सिद्ध केलेलें; ज्ञात. [सं.] **प्रती(ची)ति**-स्त्री. १ अनुभव; खात्री; प्रत्यय; शोध; अंतरास, मनास पटलेला दाखला; प्रत्यय; अनुभवानें अवलोकनानें झालेली, खात्री; एखाद्या गोष्टीबद्दल किंवा एखाद्याच्या स्वभावाबद्दल कोणीं केलेलें विधान खरें आहे असें आढळून येणें. 'कामभोगांती विरक्ती। ऐसें मूर्ख मा विवेक बोलती। ते अधःपातीं घालती। हे मज प्रतीति स्वयें झाली।' -एभा २६.१६६. २ प्रत्यक्ष जाणीव, ज्ञान; छाप; अवलोकन. 'मेर्यादि शब्दाचे ठायीं वर्णाची प्रतीति होत नाहीं.' ३ चमत्कार; अद्भुत कर्म; साक्षात्कार. ४ प्रसिद्धि; ख्याति. 'ऐसी ययां वेदांतीं। निरूपणभाषाप्रतीती।' -ज्ञा १५.९०. [सं.]

**प्रतीतीस येणें**-१ अनुभवास येणें; अवलोकनांत येणें. २ खात्रीपूर्वक निश्चित होणें; तंतोतंत जुळून खात्री होणें.

**प्रतीप**—न. (साहित्य) एक अर्थालंकार. ह्यात प्रसिद्ध उपमेयाची उपमा दिलेली असते; नेहमीच्या उपमान-उपमेयाची अदलाबदल असते. उदा० 'तुझ्या लोचनासारिखें पद्म तेंही। बुडालें जलीं कीं बहू खोल डोहीं। प्रिये त्वन्मुखासारिखा चंद्र त्यातें। घना मेघमाला पहा लोपवीते।' [सं]

**प्रतीयमान**—वि अनुभवास किंवा निदर्शनास येत आहे असा; ज्याची जाणीव होत आहे असा. [सं.]

**प्रतीहार**—पु. राजवाड्यावरील द्वारपाळ [सं.] **प्रतीहारी**-स्त्री. अंतःपुराच्या द्वारावर असलेली स्त्री द्वारपाळ; वेत्रवती. [सं]

**प्रतीक्षणें**—सक्रि. वाट पाहणें; अपेक्षा करणें. [सं. प्रति+ईक्ष्] **प्रतीक्षा**-स्त्री. १ वाट पाहणें २ अपेक्षा. 'ऐशी प्रतीक्षा हृदयांत ठेवा।' -वामन, नृसिंहदर्पण २४ [सं.]

**प्रतोद**—पु. १ चाबूक; कोरडा; असुड. 'भीष्मवधाया धावे हरि हस्तें कवळुनि प्रतोदास।' -मोभीष्म १०.९५. २ छायेवरून वेळ मोजण्याचें सोटयासारखें यंत्र; छायायंत्र; शंकुयंत्र. [सं.]

**प्रत्य**—क्रिवि. उलट. 'आलें परि प्रत्य आपणाशि कैसें उचित हे होये।' - गीतांचंद्रिका १.२९. [सं. प्रत्यक्]

**प्रत्यई-हीं**—क्रिवि. दररोज, प्रतिदिवशीं, 'कुंड धूता शुद्ध होतें। यास प्रत्यई धुईजेतें।' -दा ३ १.१५. [सं. प्रति+अहन्]

**प्रत्यक्**—वि. १ पुढचा; पुढला, नंतरचा; पश्चात्कालीन २ पश्चिमदिशेकडील. ३ (स्थल, काल, जीव, पदार्थ, भाग इ० त) सर्वत्र व्यापून राहणारा; सर्वव्यापी (आत्मा, शिव, जीव यांस जोडून). ४ साक्षात्; प्रत्यक्ष. 'नामया शरण भगवंतासी। भगवंत तरी प्रत्यक् त्यासी।' -एकनाथ आनंदलहरी ११९. [सं.] ०**ज्योति**-स्त्री. आत्मप्रकाश. 'प्रत्यक्ज्योतीची वोवाळणी। करिसी मनपवनाचीं खेळणीं।' -ज्ञा १२.६. ०**दर्शन-दृष्टी**-नस्त्री. मागें पहाणें; पुढें पाहणें; पश्चिमेकडे पाहणें. ०**प्रतीति**-स्त्री. आत्मज्ञान ०**बुद्धि**-स्त्री. अंतर्मुख झालेली बुद्धि; मी अंतर्यामीं(आत्मा) आहें अशी बुद्धि. 'मग देहाहंतेचें दळें। साडूनि एकेचि वेळे। प्रत्यक्बुद्धी करतळें। हातवसावे।' -ज्ञा १५ २५८ ०**बोध**-पु. आत्मज्ञान; प्रत्यगात्मा व ब्रह्म एकच आहेत असें ज्ञान. 'जे प्रत्यग्बोधाचया माथया। सोहंतेचां मध्यान्हीं आल्यां।' -माज्ञा १६. १०. ०**मुखपण**-न. अंतर्मुखवृत्ति. 'येथ प्रवृत्ति वोहटे जिणें। अप्रवृत्तिसी वाधावणें। आतां प्रत्यङ्मुखपणें। प्रचारु दिसे।' -अमृ ९.२८. **प्रत्यगात्मा**-पु. १ देहांत व्यापून राहिलेलें ब्रह्म.

२ त्वंपदार्थे लक्ष्य. ३ कूटस्थ. [प्रत्यक्+आत्मा] **प्रत्यगावृत्ति प्रत्यक्वृत्ति**-स्त्री. आत्माकारवृत्ति अंतर्वृत्ति, अंतर्मुखता; सोहं अशी स्वस्वरूपाकार वृत्ति 'मग प्रत्यगावृत्तीचीं चोखटें। लाविलीं गंगेचेनि तटें।' -ज्ञा १८ १०१७. [प्रत्यक्+आवृत्ति, वृत्ति]

**प्रत्यंग**—न १ शरीराचा गौण अवयव. 'मग तळवे तळहात शोधी। उर्ध्वीचे खंड भेदी। झाडा घे संधी। प्रत्यंगाचा।' -ज्ञा ६. २३२. २ विषयाचा पोटविभाग. [सं]

**प्रत्यंचा**—स्त्री. धनुष्याची दोरी. 'धनुष्याची प्रत्यंचा ओढिली असतां ती धनुर्धारीच्या कानापाशीं येते.' -हिंलइ ५ [सं] **०चढविणें**-धनुष्यास दोरी लावून तें सज्ज करणें. 'तिच्या स्वयंवराकरितां या धनुष्याला प्रत्यंचा चढविणें हाच पण तूं जाहीर कर.' -धनुर्भंग नाटिका, पृ. ६.

**प्रत्यंतदेशगमन**—न. समुद्रापलीकडील प्रदेशांत जाणें. [सं]

**प्रत्यंतर**—न. १ पुरावा, खात्री, पुष्टि देणारी एखादी गोष्ट; दाखला; उदाहरण; दृष्टांत, प्रमाण; आधार. २ अनुभव; खात्री [सं]

**प्रत्यय**—न १ अनुभव, खात्री; प्रतीति 'सद्परिवारें पळती कामक्रोध। कीं प्रत्यया येतां ब्रह्मानंद।' -पाप्र ४५.२१. २ भरंवसा; श्रद्धा; निष्ठा; आत्मविश्वास ३ (व्याकरण.) नाम व धातु यास विशेष अर्थ उत्पन्न करण्यासाठीं त्याना जोडून येणारा शब्द. [सं.] **प्रत्ययास येणें**-पटणें; अनुभवास येणें 'म्हणोनि जळो हें झुंज। प्रत्यया नये मज।' -ज्ञा १ २०८. **०प्रतिभू** पु. खात्रीलायक जामीन; विश्वासप्रतिभू [सं] **प्रत्ययित**-वि. विश्वास टाकलेला; भरंवसा टाकलेला; विश्वस्त. [सं.] **प्रत्ययी**-वि. विश्वसनीय; भरंवशाचा, खात्रीचा; पतीचा. [सं] **प्रत्ययीभूत प्रमाण**-न. अनुभवास, दाखला म्हणून येणारें उदाहरण, दृष्टांत, विधान.

**प्रत्यवाय**—पु १ पापीपणा; गुन्हेगारी. २ जें करावें तें न केल्यामुळें किंवा जें करूं नये तें केल्यामुळें उत्पन्न होणारा दोष; नुकसान; हरकत; विधिनिषेध. 'जे प्रत्यवाय तंव गळे। स्वाधिकार बहुवें उजळे।' -ज्ञा १८.१२२. ३ विघ्न, अडथळा. 'जो एकदां संकल्प केला तो कितीही प्रत्यवाय आले तरी तडीस नेऊन पोंचवणें ...' -नि ७३२. [सं.] **०जाणें**-अक्रि. १ आलेला बाध दूर करणें. २ निश्चयास येणें. **प्रत्यवायता**-स्त्री. दोष; पाप. 'कर्माकर्म-प्रत्यवायता। हे सज्ञानासीच सर्वथा।' -एभा ११. ११६४. **प्रत्यवायी**-वि. दोषी; अपराधी; पापी. [सं.]

**प्रत्यस्त्र**—न. धनुर्वेदाचा एक प्रकार. 'शस्त्र, अस्त्र, प्रत्यस्त्र, परमास्त्र या विद्या त्यांस चांगल्या अवगत होत्या.' -हिंलइ १७

**प्रत्यहीं**—क्रिवि. दररोज; प्रतिदिवशीं [प्रति+अहन्]

**प्रत्यक्ष**—न. जाणीव; ज्ञान; डोळे, कान इ० इंद्रियांनीं होणारें ज्ञान; विषयगोरचता. 'शब्दाचें प्रत्यक्ष श्रोत्रेंद्रियावांचून होत नाहीं.' -शब. समक्ष; देखत; पाहतां पाहतां. -क्रिवि साक्षात्; खरोखर; वास्तविकपणें; वस्तुतः; स्वतंत्रपणें; जातीनें; स्वतः. 'मी तिकडे प्रत्यक्ष गेलों.' 'हा माझा प्रत्यक्ष बंधु आहे.' -वि. दिसणारें, प्रगट; हजर; उपस्थित; इंद्रियगोचर 'तरी प्रथम श्रीगुरुमूर्ति। प्रत्यक्ष करावी याचे हातीं।' -नव १६.१२९. [सं. प्रति+अक्षि] **म्ह०** १ प्रत्यक्षास प्रमाण कशाला? २ प्रत्यक्ष तें खरें. सामाशब्द- **०कर**-पु. कर देणारा व कर सोसणारा या व्यक्ती एकच असतात असा कर. जमीनीवरील कर हे प्रत्यक्ष करापैकीं आहेत. **०तः**-क्रिवि. साक्षात्; समक्ष; धडधडीतपणें; उघडपणें; समोर; इंद्रियाना गोचर होईल असें. [सं] **०ता**-स्त्री. समक्षता, प्रगटता, इंद्रियगोचरता [सं.] **०दर्शन**-न (देव, व्यक्ति इत्यादिकाची) साक्षात् भेट, स्वरूपगोचरता **०दर्शी**-त्रि. १ घडलेली गोष्ट ज्यानें स्वतःच्या डोळयानीं पाहिली आहे असा. २ एखाद्या गोष्टीचा स्वतः अनुभव घेतला आहे असा **०प्रमाण**-न. डोळयांनीं दिसणारा पुरावा. **०प्रमाणवाद**-पु अनुभवानें मिळणाऱ्या ज्ञानावर सर्वस्वीं अवलंबून असणारा तत्वज्ञानाचा एक पंथ (इं.) पॉझिटिव्हिझम् **०सिद्ध**-वि. इंद्रियगोचर. पुराव्यावर प्रस्थापित केलेलें **प्रत्यक्षी**-वि. पाहणारा; द्रष्टा; स्वतः किंवा जातीनें पाहणारा, जाणणारा. [सं.]

**प्रत्याख्यान**—न इनकार; मनाई; निराकरण, झिडकारणें; दूर सारणें. [सं] **प्रत्याख्यात**-वि १ इनकार केलेलें, नाकबूल केलेलें; नाकारलेलें; नापसंत म्हणून दूर सारलेलें 'तिच्या (कौमुदीच्या) तेजापुढें पूर्वीचीं अल्प तेजें प्रत्याख्यात होत्सातीं निष्प्रभ होऊन गेलीं.' -नि ५०८. २ प्रसिद्ध, नावाजलेला, सर्वश्रुत [सं.]

**प्रत्याघात**—पु प्रतिक्रिया; उलट परिणाम; उलट प्रहार; प्रतिकार. [सं.] **प्रत्याघातक**-वि प्रतिक्रिया, उलट परिणाम, उलट प्रहार करणारा. [सं.]

**प्रत्याम्नाय**—पु मुख्यत्वेंकरून जें प्रायश्चित्तादि कर्म सांगितलें तें तसें घडणें शक्य नसल्यास त्याच्या ऐवजीं द्रव्यदान किंवा इतर जें अनुष्ठान केलें जातें तें. [सं. प्रति+ऐवजीं+आम्नाय=बोललेलें]

**प्रत्यारंभ**—पु नित्यनेम; दररोज करावयाचें गीतापाठादिकांसारखें पुण्यकर्म. [सं. प्रति+आरंभ]

**प्रत्यालीढस्थान**—न (नृत्य) आलीढस्थानाप्रमाणें उभें राहणें उजवा पाय कुंचित व डावा पाय पाच ताल पुढें ठेवणें. आलीढस्थानाप्रमाणेंच यांत अभिनय सुचित होतात. आलीढस्थान पहा. [सं.]

**प्रत्यावर्तन, प्रत्यावृत्ति**—नस्त्री. १ वारंवार, वरचेवर करणें, पुन:पुन: करणें; माघारीं येणें; उलट अवस्था. 'कृष्णरूपीं वेधल्या वृत्ती। प्रत्यावृत्ती हरि पाहती।' -एरुस्व ६.२७. २ पुन्हां जन्मास येणें; पुनर्जन्म. 'तंव प्रत्यावृत्ती येरझारें। आत्मसाक्षात्कारें खुंटली।' -एभा २.३१९. [प्रति+आवर्तन, आवृत्ति]

**प्रत्यासत्ति**—स्त्री. विशेष दळणवळण; सहवास; घरोबा, नातें; संबंध. 'हा लुच्चा आहे, याची प्रत्यासत्ति इतकी कामाची नाहीं.' [प्रति+आसत्ति=सान्निध्य] **०न्याय**-पु वाक्यात जो अर्थ स्पष्ट किंवा पूर्ण उक्त नाहीं तो संदर्भावरून पूर्ण करून घेण्याची सरणी. वाक्याचे ठिकाणीं साकांक्षपदाच्या शक्तीमुळें जो अनुक्त अर्थ अन्वित व्हावयाचा, तो त्या प्रकरणात वाक्यांतराच्या ठिकाणीं जो उपस्थित आहे तोच अन्वित व्हावा इतर न व्हावा, अशा अर्थाविषयीं उपस्थिताचाच अन्वय होणें.

**प्रत्यासन्न**—वि अगदीं जवळ असलेला; निकट संबंध असलेला; समीपस्थ. [प्रति+आसन्न=बसलेला]

**प्रत्याहत**—(संगीत) गातांना ध्वनींत खंड पडूं न देता इच्छित उच्च स्वरापासुन इच्छित नीच स्वराकडे जाणें. घसिट पहा

**प्रत्याहार**—पु. १ आपापल्या विषयाचा संसर्ग न करता इंद्रियांचें चित्ताच्या स्वरूपास अनुसरून राहणें; इंद्रियांची अंतर्मुखता; इंद्रियदमन 'मग प्रत्याहाराचा अधाडा। जो बुद्धीचियाही पाया निसरडा।' -ज्ञा ६ ५६ 'स्वविषयासंप्रयोगे चित्तस्वरूपानुकारइवेंद्रियाणां प्रत्याहारः' -पातंजलसूत्र पा २. सू. ५४ २ प्राणायामभूमिकेच्या पूर्णावस्थेंत गुरूपदिष्ट पद्धतीनें कुंडलीसहित प्राणवायु चरणांगुष्ठापासुन ब्रह्मरंध्रापर्यंत चढविण्याचा व पुन्हा उतरविण्याचा क्रियाभ्यास, अष्टांगयोगापैकीं पांचवें अंग 'प्रत्याहारादि अंगीं। योगें अंग टेंकिलें योगीं।' -अमृ ९ २७. ३ प्राणायामाचा विरोध नाहींसा करणारा शरीरांतील एक वायु; प्रत्याहाररेचकपवन. ४ नियमन. ५ परत घेणें, प्रत्यादान, अपहरण. [सं.] **०न्याय**-पु संक्षेप.

**प्रत्याह्निक**—वि दररोज निघणारें; दैनिक. 'मुंबईच्या एका प्रत्याह्निक इंग्रजी पत्रांतील टीकेवरून हें उघड आहे' -टि १.३८१. [सं.]

**प्रत्युत**—क्रिवि. १ एवढेंच नव्हे तर; आणखी; शिवाय; खेरीज. 'ह्याजवर तूं उपकार करितोस परंतु हा प्रत्युपकार कोठें करणार? प्रत्युत शिवी देईल' २ दुसऱ्यापक्षीं; उलटपक्षीं. [स.]

**प्रत्युत्तर**—न. १ उत्तरास दिलेलें उत्तर, उलट जबाब; प्रतिवचन. 'तेथ प्रत्युत्तरें बोली। श्रीकृष्णें जी चालविली।' -ज्ञा १८.७४. २ (सामा.) उत्तर; जबाब. [सं.]

**प्रत्युत्थान**—न. १ भेटीस आलेल्या मनुष्याच्या सन्मानार्थ आसनावरून उठणें २ युद्ध, वादविवाद इ० मध्यें प्रतिपक्ष्याचा पराभव करण्यासाठीं उठणें. [सं.] **प्रत्युत्थित**-वि भेट घेण्यासाठीं किंवा पराभूत करण्यासाठीं उठलेला. [सं]

**प्रत्युद्गम, प्रत्युद्गमन**—पुन. भेटीसाठीं, दोन हात करण्यासाठीं सामोरें जाणें. [सं.] **प्रत्युद्गत**-वि. सामोरा गेलेला; पुढें गेलेला. [सं.]

**प्रत्युद्वाह**—पु. आपली मुलगी दुसऱ्याच्या मुलाला देऊन त्याची मुलगी आपल्या मुलाला करून घेणें, असें लग्न; साटेलोटें. [स]

**प्रत्युपकार**—१ दुसऱ्यानें आपणावर केलेला उपकार फिटावा म्हणून त्याजवर केलेला उपकार. उपकाराची फेड. 'योगयागें शिणतां अपार। प्रत्युपकार कदा न घडे।' -एभा २९.१७१. [सं.]

**प्रत्युपस्थान**—न. नव्यानें सुरवात करणें; आपला पराभव करावयास उठलेला किंवा ज्यानें आपला पराभव केला त्याच्या पराभवासाठीं उठणें; गेलेला हक्क पुन्हां मिळविण्यास सज्ज होणें. [सं.]

**प्रत्यूष**—न. प्रातःकाल; पहाट. [स.]

**प्रत्यूह**—न. विघ्न; संकट. 'श्रीरामनाममंत्रश्रितचिंतामणि करील हें पूर्ण। चूर्णप्रत्यूहाचें रसिकांचें चित्तही सुखी तूर्ण।' -मोआदि १.१०. [सं]

**प्रत्येक**—वि. पृथक्पृथक्; दरएक; हरएक. -क्रिवि. एकेक; एकएकटा; एकामागून एक. [सं] **०चैतन्य**-न. व्यक्तिगतचैतन्य; चराचरचैतन्य ह्याच्या उलट पूर्णचैतन्य. [सं.]

**प्रथक**—वि. (अप) वेगळा; निराळा; भिन्न; (प्र.) पृथक् 'तव प्रथकु संतभाव। ऐसें गमे।' -ग्रंथराज ७.१०२. [सं. पृथक्]

**प्रथम**—वि पहिला; पूर्वीचा; आरंभींचा; मुख्य; स्थल किंवा काल यामध्यें आधींचा. -क्रिवि पहिल्यांदा; आरंभीं; अगोदर; प्रथमतः. [सं.] **म्ह०** प्रथमग्रासे मक्षिकापात=इच्छित गोष्ट साध्य होण्याच्या प्रारंभींच कांहीं तरी विघ्न येणें. सामाशब्द-**०खरेदी**-स्त्री. इतर गिऱ्हाइकापूर्वी खरेदी करण्याचा अधिकार, अग्रक्रयाधिकार **०चरण**-पु पहिली पायरी, अवस्था, नुकतीच सुरवात; प्रथमावस्था; एखाद्या कालाच्या चार विभागापैकीं पहिला विभाग. **०तः**-क्रिवि पहिल्यानें, आरंभीं, सुरवातीला; अगोदर **०दर्शनीं**-क्रिवि. कांहीं एक कार्याच्या आरंभीं, सुरवातीला; प्रथमावस्थेंत; सकृद्दर्शनीं 'म्यां लिहावयास पोथी घेतली, प्रथमदर्शनीं चूक पडली.' **०दशा**-स्त्री १ आरंभ; सुरवात. 'वार्षिये प्रथमदशे। वोहळल्या शैलाचें सर्वांग जैसें।' -ज्ञा ११.२४७. २ बालपण. **०दिवस**-पु. कांहीं एक कार्याची प्रथमावस्था; प्रथमचरण. 'इतके दिवस वाद सांगतो पण अजून प्रथमदिवस आहे.' **०पार्श्वास्थि**-पु. जबड्याचें खालचें हाड **०पुरुष**-पु. १ (संस्कृत व्या.) क्रियापदाच्या धातूचें कोणत्याहि काळीं तृतीयपुरुषाचें रूप बनविणारा प्रत्यय. २ (संस्कृत व्या.) तो, ती इ० चा पुरुष; तृतीयपुरुष. ३ (मराठी व्या.) बोलणारा स्वतः; मी, आम्ही इ० चा पुरुष. **०वयसा**-वि. तरुण. 'कीं लावण्यामृतसागर। प्रथमवयसा।' -कथा १ ८.५३. **०वयसाकाळ**-पु. तारुण्य. 'कीं प्रथमवयसाकाळीं। लावण्याची नव्हाळी।' -ज्ञा १.४२ **०वर**-पु. १ ज्याचें प्रथमच लग्न होत आहे असा नवरामुलगा. याच्या उलट बिजवर, तिजवर इ० २ ज्याचें विवाहास योग्य वय झालें आहे असा मुलगा.

०**स्वन**–न. बोलण्याचा साधा, नेहमींचा स्वर **प्रथमा**–स्त्री. १ (व्या.) पहिली विभक्ति; क्रियापदाच्या कर्त्याची विभक्ति. २ संबोधनाची विभक्ति ३ कोणत्याहि काळाचा प्रथम पुरुष. [सं.] **प्रथमारंभ**–पु सुरवात; मूळारंभ; सुरवातीची पहिली अवस्था. [सं.] **प्रथमाक्षरी**–वि. (कऱ्हाड ह्या शब्दाचा आरंभ क ह्या पहिल्या वर्णापासुन होतो त्यावरून) कऱ्हाडे ब्राह्मणाबद्दल औप रोधिक शब्द.

**प्रथा**—स्त्री. १ रूढि, प्रघात; सर्वसाधारण चाल, पद्धति; सरणी. 'निःसंगत्वादि प्रथा। कैसेन होती।' –रास १ ६९. २ प्रसिद्धि कीर्ति; प्रख्याति. 'तुझेनि पाडे पाहतां। आणिकाचि काय कथा। पुरुषोत्तम हे प्रथा। तुजचि कां घडली।' –रास १.९९९. ३ लोकमत; सर्वसाधारण भावना ४ लोकसमाज ५ अनुभव; बुद्धि; प्रतीति. 'किंबहुना ऐसी प्रथा। वाढती देखसी पार्था।' –ज्ञा १८. ५७४. ६ स्थिति. –शर [सं.] म्ह० जी प्रथा पडली ती अंगीं जडली. **प्रथित**–वि. प्रसिद्ध; कीर्तिमान्, नांवाजलेलें; प्रसिद्ध केलेलें, उघडपणें जाहीर केलेलें [सं.] **प्रथिति**–स्त्री. प्रसिद्धि; सर्वत्र आवड; ख्याति [सं]

**प्रथुत**—अ. सत्वर. –मनको

**प्रद**—वि. (समासांत) देणारें; बहाल करणारें; कायम करणारें. जसें:–सुख–दुःख–धन–विद्या–शोक–प्रद [सं प्र+दा=देणें]

**प्रदखेणा**—स्त्री प्रदक्षिणा. –खिपु [सं. प्रदक्षिणा]

**प्रदर**—पु. स्त्रियांचा एक रोग; धुपणी ह्यांत निरंतर रजःस्राव होतो याचे रक्तप्रदर व श्वेतप्रदर असे दोन भेद आहेत शिवाय सूक्ष्मभेद कृष्णप्रदर, धातुप्रदर, पूयप्रदर, पूयाभ, रक्तप्रदर इ० आहेत. [सं]

**प्रदर्शन**—न १ दाखविणें; आविष्करण करणें, दर्शविणें. जसें–भय–दैन्य–गुण–दिक्–प्रदर्शन २ (ल.) तमाशा; देखावा 'लिंगायत पुढारी अधिकाऱ्यापुढें राजनिष्ठेचें प्रदर्शन करितात.' –के २७५ ३०. ३ अनेक प्रकारच्या नैसर्गिक किंवा कारागिरीच्या वस्तू व्यवस्थित रीतीनें मांडून ठेवणें; किंवा त्या जेथें मांडून ठेवतात ती जागा. [सं.] **प्रदर्शक**–वि. दाखविणारा; प्रदर्शित करणारा; आविष्करण करणारा. जसें:–गुण–भय–लोभ–प्रदर्शक. [सं.] **प्रदर्शविणें**–सक्रि. दाखविणें; दृष्टीस पडेल असा करणें; प्रकट करणें; (ल.) वरवर देखावा करणें. [प्रदर्शन]

**प्रदक्षिणा**—स्त्री. १ देव, ब्राह्मण इ० कांस आपल्या उजव्या हाताकडे करून त्यांच्या भोंवतालीं घातलेली फेरी. 'प्रदक्षिणा ते अवघे तिला हो।' –वामन वेणुसुधा प्रसंग २ ३. २ कधीं कधीं उजव्या हाताचा संबंध न ठेवतां घातलेली फेरी. उदा० सोमसूत्री प्रदक्षिणा. [सं.] म्ह० लक्ष प्रदक्षणा आणि पैसा दक्षिणा. **प्रदक्षणें**–अक्रि. प्रदक्षिणा घालणें. 'प्रदक्षिणूनी आदरी स्तुतीतें।' –देकृष्णजन्म ४८. [प्रदक्षिणा] **प्रदक्षिण**–क्रिवि. पूर्व, आग्नेय, दक्षिण, नैर्ऋत्य, असा क्रम धरून (केलेलें गमन); उजव्या बाजूनें; प्रादक्षिणिक. [सं.]

**प्रदान**—न देणें; देणगी. जसें:–अन्न–वस्त्र–गो–द्रव्य–विद्या–दक्षिणा–प्रदान. [सं] **प्रदाता**–वि. देणारा; दाता; उदार; दिलदार; दानशूर; औदार्यशाली (समासांत) विद्या–धन–दान–प्रदाता. [सं]

**प्रदीप**—पु. दिवा. [सं.] **प्रदीपन**–न. पेटविणें; चेतविणें; ज्वलन. [सं] **प्रदीप्त**–वि. १ चांगलें पेटलेलें, जळत असलेलें, प्रज्वलित. 'पहिलें वैराग्यइंधन परिपूर्तीं। इंद्रियानळीं प्रदीप्तीं।' –ज्ञा ८.४८. २ उज्ज्वल; तेजस्वी; प्रकाशमान. [सं]

**प्रदेश**—पु विशिष्ट मर्यादांनीं नियंत्रित असा भूमि, शास्त्र, कला इ० चा भाग; प्रांत; जागा. 'एथ एकैकाचिया प्रदेशीं। विश्व देख विस्तारेंशीं।' –ज्ञा ११.१५० [सं]

**प्रदेशिनी**—स्त्री हाताच्या आंगठ्याजवळचें बोट, तर्जनी. [सं]

**प्रदोष**—पु १ सायंकाळ; रात्रीचा प्रारंभसमय; तिन्हीसाजाचा समय; सूर्यास्तानंतरच्या दोन घटिका. 'प्रदोषीं असे मज्जनाचीच चाड।' –कमं ४.१०३. २ त्रयोदशीस नक्तव्रत करून सायंकाळीं शिवपूजा करण्याचें व्रत. प्रदोषाचे शनि व सोम (शनिवारीं येणारा व सोमवारीं येणारा) असे प्रकार आहेत. ३ चतुर्थी, सप्तमी आणि त्रयोदशी ह्या तिथि पूर्वरात्रींत असतां पाळावयाचा अनध्याय. [सं.] ०**काल**–पु. संध्याकाळ. [सं.] ०**चर**–पु राक्षस. [सं.] ०**पूजा**–स्त्री. सायंकाळची पूजा. **प्रदोषोपोषणें**–न अव. (ख्रि.) सणाच्या आदल्या दिवशीं करावयाचे उपवास. (इं) व्हिजिल्स्. 'ॲंग्लि० कन्...चर्चच्या प्रार्थनासंग्रहांत...कित्येक विशिष्ट दिवसांच्यापूर्वी करावयाचीं प्रदोषोपोषणें सांगितलीं आहेत.' –उमं ३. [प्रदोष+उपोषण] **पक्षप्रदोष**–पु. त्रयोदशीस संध्याकाळीं शिवपूजा करण्याचें व्रत.

**प्रधान**—पु. १ मंत्री; दिवाण; अमात्य, सचीव इ० राजाचे मुख्य मदतनीस प्रत्येकी; राजाचा सल्लागार; कारभारी. 'संकट पडलें कांहिं सुचेना प्रधान पूज्याला।' –ऐपो ३९७. २ (बुद्धिबळ क्रीडा) बुद्धिबळाच्या खेळांत राजाचा कारभारी किंवा दिवाणजी. वजीर पहा. ३ गोंड जातींतील कवि, भाट –वि. १ मुख्य; श्रेष्ठ; उत्तम; वरिष्ठ. 'यालागीं प्रधाना जिया रूढा। तिया विभूती आइकें।' –ज्ञा १० २११. २ जोराचा; प्रबळ; महत्त्वाचा. ३ प्रमुख; विशेष महत्त्वाचा असलेला; प्रचुर; युक्त (बहुव्रीहि समासांत उपयोग). 'कांहीं वृक्ष फलप्रधान असतात कांहीं पुष्पप्रधान, कांहीं पत्रप्रधान.' [सं] ०**देवता**–स्त्री. कर्मांतील मुख्य देवता.

**प्रधान**—न. प्रकृति; जगाचें उपादानकारण; माया. 'प्रधानापासाव महदादिद्वारा। नाना विकारांचा पसारा।' –एभा २२. ३४६. [सं.]

**प्रध्वंस**—पु. समूळ उच्छेद; पूर्ण नाश. [सं] **प्रध्वंसभाव**-पु. पदार्थाचा समूळ नाश झाल्यामुळें उत्पन्न होणारा अभाव; अवस्था. [सं]

**प्रपंच**—पु. १ जग; मानवी कृत्यांची मोठी रंगभूमि; जीवांनीं उत्पन्न व्हावें, मरावें, अनेक सुखदुःखादि भोगावें इत्यादि रूप जो व्यवहार ईश्वरी मायेपासून उत्पन्न झाला तो २ संसार; मनुष्याचा बायका, मुलें, घर, शेत इ० रूप खटला. 'तैसें विचारितां निरसलें। तें प्रपंचु सहजें सांडवलें।' -ज्ञा २.१३१. ३ कपट; प्रतारणा; वंचना; फसवणूक; लबाडी. ४ भेदभाव, पक्षपात; पंक्तिप्रपंच. 'दोघी स्त्रिया जयासी। त्यांत ठेवी प्रपंचासी।' -गुच २८.२६. ५ माया; भ्रम; अविद्या. ६ विस्तार; व्याप, पसारा; पाल्हाळ. ७ तपशीलवार कथन, विवरण किंवा स्पष्टीकरण. [सं.] ०**तळमळ**-स्त्री. संसारांतील दगदग; त्रास; कष्ट; ताप. 'सोडुनि प्रपंचतळमळ। करी निश्चळ हरिभजन।' ०**ता**-स्त्री. पक्षपातीपणा; भेदभाव. 'कृष्णाकडे आमुचा पिता। जिवें भावें तिकडेच माता। कार्याकारण प्रपंचता। मिथ्या दाविती आम्हांकडे।' -एरुस्व ६.४८. [प्रपंच+ता (भाववाचक नामाचा प्रत्यय)] ०**दुःख**-न. संसारासंबंधीं दुःख; त्रास; भोग. 'ज्यास लाधलें अंतर्सुख। तो न मानी प्रपंचदुःख।' ०**निर्वाह**-पु. संसारात अगदीं जरूर अशा वस्तूंची तरतूद; संसारयात्रा चालविणें. ०**बेडी**-स्त्री. (ल) पत्नी; स्त्री; बायको. 'आतां राहिलें तें घेणें उड्या। पाईं जुडल्या कीं प्रपंचबेड्या।' -दावि ३४. ०**माया**-स्त्री. मृत्युलोकासंबंधीं वाटणारा मोह, अशाश्वत गोष्टींची मनुष्यास वाटणारी शाश्वति; संसारांतील मोह; भ्रम; भ्रांति. ०**स्वार्थ**-पु. इहलोकांतील स्वार्थ; आपमतलब; अप्पलपोटेपणा. 'प्रपंचस्वार्थ करूनि निश्चितीं। एकास एक गुरगुरति।' **प्रपंचार्थजमीन**-स्त्री प्रापंचिक कृत्याचा खर्च भागविण्यासाठीं बहाल केलेली जमीन. माफीजमिनीपैकीं पोटविभागाचा हा एक पोटभेद आहे. **प्रपंची**-वि. १ संसारांतील गोष्टींत निमग्न; ऐहिक सुखांत दंग झालेला; संसारी. २ संसारासंबंधीं; सांसारिक. [सं.] **प्रपंचीक**-वि. संसारासंबंधीं; संसारिक. 'प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी।' -राम ५१. [सं. प्रापंचिक]

**प्रपद**—न. पावलाचा पुढील भाग; पायाच्या बोटाजवळील प्रदेश; चवडा. 'ज्याच्या मुकुटरत्नकिरणें साचार। प्रपदें ज्याचीं उजळलीं।' -शिली १.७२. [सं]

**प्रपा**—स्त्री. पोई; जलशाला. [सं.] ०**सन-स्थान**-न. पाणपोई. 'अति रमणीय प्रपास्थानें। मायामय निर्मिलीं।' -मुवन, हरिश्चंद्राख्यान १९९ (नवनीत पृ. १९४).

**प्रपाण**—पु घोड्याचा वरचा ओंठ. -अश्वप १.६१.

**प्रपादणी**—स्त्री. १ सिद्ध करणें; प्रस्थापित करणें; निश्चयानें प्रतिपादन. २ निश्चयपूर्वक, प्रतिज्ञापूर्वक बोलणें, बजाविणें. [प्रपादणें]

**प्रपादणें**—सक्रि. १ सिद्ध, समर्थन करणें; पुष्टि देणें २ बजावून, निश्चयपूर्वक सांगणें; बाजू राखण्यासाठीं बोलणें. 'कां अज्ञान भ्रांतीस प्रपादून। कैसें साधकास होईल ज्ञान।' [सं. प्रपादन]

**प्रपिता**—पु. बापाचा बाप; आजा. [सं.] **प्रपितामह**-पु. बापाच्या बापाचा बाप; बापाचा आजा; स्वतःचा पणजा. 'तोंपर्यंत कायदे नाहीं कायद्याचे प्रपितामह आले तरी ...' -टि ४.९३. [सं.] **प्रपितामही**-स्त्री. बापाची आजी; स्वतःची पणजी. [सं.]

**प्रपिता**—पु एक औषधी वनस्पति.

**प्रपोटक**—पु. घोड्याच्या पायाचा एक रोग. -अश्वप २ ३८.

**प्रपौत्र**—पु. मुलाच्या मुलाचा मुलगा; नातवाचा मुलगा; स्वतःचा पणतू. [सं.] **प्रपौत्री**-स्त्री. मुलाच्या मुलाची मुलगी; नातवाची मुलगी [सं.]

**प्रफुल्ल, प्रफुल्लित**—वि १ फुललेलें; उमललेलें; विकसित. २ (ल) आनंदित [सं.]

**प्रबंद**—पु (प्र.) प्रबंध पहा. 'चातुर्य नाहीं प्रबंद नाहीं। भक्तिज्ञान वैराग्य नाहीं।' -दा १.६.१५

**प्रबंध**—पु १ (संगीत) गाण्यांतील एक चीज चीज पहा २ काव्य, श्लोक, निबंध इ०ची रचना; छंदोबद्ध रचना. 'तें वोवियेचेनि प्रबंधें। सांगेन मी।' -ज्ञा ६.४९७. ३ काव्यग्रंथ; (सामा) ग्रंथ. 'म्हणोनि माझे नित्य नवे। श्वासोच्छ्वासही प्रबंध हो आवे।' -ज्ञा १८ १७३४. ४ भाषण; गोष्ट; कथा. 'आतां निरोपीन प्रबंधु। अवधान दीजे।' -ज्ञा १२.१९. ५ कथन; सांगणें 'कृष्ण विष्णु हरि गोविंद। या नामाचे निखळ प्रबंध।' -ज्ञा ९ २१०. ६ अखंडपणा; सातत्य. [सं.] ०**गाननिष्णातता**-स्त्री. प्रबंधगायनांतील प्रावीण्य. ०**होड-होडा**-पुस्त्री. कवित्व करण्याची पैज. 'तो वाचस्पतीशीं करी। प्रबंधुहोडा।' -ज्ञा १०.८.

**प्रबल-ळ**—वि. अतिशय बलवान; सामर्थ्यवान; बलिष्ठ. 'जयजय देव प्रबळ। विदळितामंगळकुळ।' -ज्ञा १८.२. २ अतिशय; भरपूर; विपुल. 'तेणें हर्षें हर्षिजेना प्रबळ। न चढे जळ जळाब्धी।' -एभा ८ ६३ [सं. प्रबल] **प्रबलता**-स्त्री. सामर्थ्य, शक्ति; बल. 'आशा म्हणजे पुरुषार्थाची प्रबलता आहे.' -संन्याशाचा संसार पृ ३३ **प्रबळणें**-अक्रि. (काव्य.) बळकट, समर्थ होणें; जोरानें वाढणें; जोरदार होणें. 'जेथ विवेकें विषयो होय क्षीण। तेथ वैराग्य प्रबळे परिपूर्ण।' -एभा २९.५४१. [सं. प्रबल]

**प्रबुद्ध**—वि. १ प्रौढ; पूर्णावस्थेला आलेला; पूर्ण वाढ झालेला (मनुष्य, मन, ज्ञान, बुद्धि इ०). 'ऐसे तिघे जण प्रबुद्ध थोर जाले।' -पंच ११ २ (यावरून ल.) अतिशय बुद्धिमान्; शहाणा, विद्वान्; हुषार. 'तरी तैसें हें प्रबुद्धा। सोहोपें नोहे।' -ज्ञा १७.५०. ३ निद्रितावस्था जाऊन पूर्णपणें जागा, हुशार झालेला (अक्षरशः व ल.); आत्मज्ञान पावलेला. [सं.]

**प्रबोध**—पु. १ जागृति; जागेपणा; निद्राभाव, जागरूकता; सावधानता, शुद्धीवर आलेली स्थिति 'तरी प्रबोधु जंव नोहे। तंव निद्रे काय अंतु आहे।' –ज्ञा १५.२२५. २ जागें करणें. शुद्धीवर, भानावर आणणें; जागृत करणें. ३ यथार्थ ज्ञान; जाणीव 'मूढमतीचा प्रबोध। मानी उर्वशीचा अपराध।'–एभा २६.१९४. ४ सूचना, परिचय, उपदेश; कळविणें; सांगणें. ५ प्रकाश. 'मी आनंदाचा आनंद। मी बुद्धीचाही प्रबोध।' –एभा १६.२७१. –वि. विकसित करणारा; उमलविणारा. 'नमो विशदबोधविद्रदा। विद्यारविंदप्रबोधा।' –ज्ञा १०.१. [सं] **प्रबोधोत्सव** -पु. विष्णूस जागृत करण्यासाठीं कार्तिक शुद्ध दशमी ते पौर्णिमेपर्यंत करितात तो उत्सव [सं] **प्रबोधक**–वि. १ जागृत करणारा २ ज्ञान देणारा. 'भागवतशास्त्र गुरुपाशीं। अभ्यासावें आदरेंसीं। दृढनिश्चयेंसीं प्रबोधक।' –एभा ३.५०३ [सं] **प्रबोधणें**–उक्रि. १ जागृत होणें, करणें 'नातरी प्रबोधलिये वेळे। स्वप्नींची डिंडी मावळे।' –ज्ञा १५.३१५. २ ज्ञान सांगणें; उपदेश करणें 'ऐशा विरक्तांसी प्रबोधी गोठी। करी उठाउठी स्त्रीकाम।' –एभा २६.२४८. **प्रबोधन**-न. १ जागें करणें; उठविणें २ शिकवण; उपदेश. 'शिष्यप्रबोधनीं समर्थु। यथोचितु निजभावें।' –एभा ३.२९८ [सं.] **प्रबोधित**–वि. १ जागा केलेला; उठविलेला २ शिकविलेला; पढविलेला; उपदेशिलेला. [सं.] **प्रबोधिनी**–स्त्री. कार्तिक शुद्ध एकादशी या दिवशीं विष्णु जागा होतो. [सं.]

**प्रभंजन**—पु (काव्य) सोसाट्याचा, तुफान वारा; प्रचंड वायु. '...जराजलदजाळ-। प्रभंजन। –ज्ञा १८.१ [सं]

**प्रभव**—पु. १ पराक्रम; बल, प्रभाव; ऐश्वर्य; वैभव; उत्कर्ष, उच्चत्व २ मूळकारण; उत्पादक कारण. ३ प्रवर्तक कारण. ४ उगमाचें स्थान. 'भागीरथीचा प्रभव हिमालय' ५ उत्पत्ति; जन्म 'तैसा जगत्प्रभवीं पंडुसुता। हेतु मी जाणें।' –ज्ञा ९.१३१. ६ (काव्य) सुखदुःख ७ साठ संवत्सरांतील पहिलें. [सं.] **प्रभवणें**–अक्रि. १ प्रभाव चालणें; समर्थ असणें. 'एथ महाशोषु न प्रभवे। मारुताचा।' –ज्ञा २.१४६. २ उत्पन्न होणें; जन्मणें. [प्रभव] **प्रभवी**–स्त्री. (काव्य) प्रभव. –मनको.

**प्रभा**—स्त्री. १ प्रकाश; तेज, कांति, दीप्ति (विशेषतः फांकलेली, पसरलेली). 'आता बिंबा आणि प्रतिबिंबा-। माजीं कैंची हें म्हणों नये प्रभा।' –ज्ञा १५.५४२ २ छाया; सावली. ३ कीर्ति; लौकिक; प्रसिद्धि ४ शोभा. 'कानीं कुंडलांची प्रभा।' –गणपतीची भूपाळी पृ ३. ५ स्वतःबद्दलची जाणीव ज्ञान; निश्चय 'तैसा ज्ञानरूप आत्मा। ज्ञानेंचि आपुली प्रभा। करितसे सांड मा। ऐसा बंध।' –अमृ ३.२३. ६ (चुकीनें रूढ) परवा; फिकीर; किंमत; महत्त्व 'मी कोणाची प्रभा बाळगीत नाहीं.' किंमत पहा. [सं] ०**कर**–पु. सूर्य. [सं.] ०**वान्**–वि. तेजस्वी, कांतिमान्; प्रकाशणारा; चकचकीत. [सं.] ०**हीन**–वि. निस्तेज 'का रवि राहुग्रस्तु। प्रभाहीनु।' –ज्ञा १.२७० **प्रभावळ**–स्त्री १ मूर्तीच्या पाठीमागें चांदी इ० धातूंची करितात ती महिरप. २ (ल) मोठ्या लोकांच्या सभोंवतालची मंडळी 'त्याच्या इतर सद्गुणांची प्रभावळ त्यांना किती शोभा देते!' –चंद्रग्र २१ [स प्रभा=तेज+आवलि=ओळ] **प्रभोत्सर्जक**–पु. (रसायन) ज्यास कांहीं काळ प्रकाश दाखविला असता जो अंधारात परत प्रकाश देतो असा पदार्थ. (इं.) फॉस्फरेसंट. [प्रभा+उत्सर्जक]

**प्रभाग**—पु. (गणित) भागाचा प्रतिभाग; अपूर्णांकाचा भाग. [सं] ०**जाति-जातिअपूर्णांक**–स्त्री.पुभव. (गणित) ज्यांत अपूर्णांकाचे अपूर्णांक असतात ते अपूर्णांक उदा० $\frac{1}{2}$ चा $\frac{1}{3}$. ०**जातिसवर्णन**–न. (गणित) प्रभागजाति अपूर्णांकांचें समच्छेद रूप [सं]

**प्रभात**—स्त्री. सकाळ, पहांट; प्रातःकाळ; अरुणोदयाचा काळ; उषःकाळ. 'प्रज्ञाप्रभातसूर्या। सुखोदया।' –ज्ञा १८.१. [सं.] ०**फेरी**–स्त्री. प्रातःकाळीं स्त्रीपुरुषांचा जो मेळा रस्त्यानें देशभक्तिपर व प्रचारात्मक पदें गात जातो तो 'लहान मुलांची प्रभातफेरी काढून स्वदेशप्रचाराच्या जाहिराती वाटवाव्या.' –के १०.६.३०. ०**मेघाडंबर**–न. १ प्रातःकाळचें मेघाचें पटल. २ (ल) पोकळ बढाया, वचनें, भीति इ० थापेबाजी. [सं] ०**रात्र**–स्त्री पहांट.

**प्रभात**—पु. (गान) एक राग ह्या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात जाति संपूर्ण-संपूर्ण वादी मध्यम, संवादी षड्ज. गानसमय प्रातःकाल [सं]

**प्रभाव**—पु. १ ऐश्वर्य; वैभव; मोठेपणा; तेज. २ सामर्थ्य; पराक्रम; प्रताप; शौर्य. 'तें प्राणिये तंव स्वभावें। अनादिमायाप्रभावें।' –ज्ञा १७.५६ [सं.]

**प्रभास**—न द्वारकेजवळील एक पुण्यक्षेत्र. 'धर्मानुज अर्जुन प्रभासाला।' –मोकृष्ण ८६.१. 'ठाकोनि आला प्रभासेसी।' –एरुस्व १४.१९.

**प्रभास**—पु. झरोक्यांतून येणारा उजेड. [प्रभा?]

**प्रभाळ**—स्त्री (गो.) देवास कौल लावतांना लावलेल्या पाकळ्यांपैकीं एक पाकळी. [प्रभावळ?]

**प्रभु**—पु. १ धनी; स्वामी; मालक. 'कोणी येके ग्रामी अथवा देशीं। राहणें आहे आपणासी। न भेटतां तेथिल्या प्रभुसी। सौख्य कैचें।' –दा ६.१.२. २ राजा. ३ देव; ईश्वर. 'प्रभु त्यातें मर्मी शरहाणी।' –मो रामायणें. –वि. समर्थ; कर्ता. [सं] ०**त्व**–न (राज्यकर्ता, अधिकारी, अमलदार इ०ची) जागा; पदवी; स्थान इ०. [सं प्रभु+त्व=भाववाचक नामाचा प्रत्यय] ०**भोजन**–न. (ख्रि.) हा एक संस्कार किंवा साक्रमेंत आहे. ह्यांत ख्रिस्तानें नेमून दिल्याप्रमाणें भाकर व द्राक्षारस देतात व घेतात. हा संस्कार

खिस्ताच्या मृत्यूचा दर्शक आहे आणि योग्य प्रकारें तें भोजन करणारे, दैहिक व इंद्रियगोचर रीतीनें नव्हे तर विश्वासानें त्याच्या शरीराचे व रक्ताचे व त्यापासुन होणाऱ्या सर्व लाभाचे वाटेकरी होतात आणि त्यायोगें त्यांचें आत्मिक पोषण होतें व त्यांच्या-ठायीं ईश्वरी अनुग्रहाची वृद्धी होते असें प्रॉटेस्टंट खिस्ती लोकाचें मत आहे. ०शक्ति–स्त्री. युद्धाच्या तीन शक्तींपैकीं एक. राजाचें सामर्थ्य; द्रव्यबल व सेनाबल अशा त्याच्या दोन शाखा आहेत. मंत्रशक्ति, उत्साहशक्ति पहा. ०संमित–वि. (धन्याप्रमाणें) अधिकारयुक्त; जोरदार; खणखणीत; बादशाही; अंमलदारीचा (शब्द, वाक्य, भाषण, आज्ञा). [सं.]

**प्रभु**—एक जात; परभू

**प्रभून**—वि. पुष्कळ, विपुल. [सं.]

**प्रभूति**—स्त्री १ (काव्य) बाहुल्य; पुष्कळपणा; वैपुल्य. २ आकार. –मनको.

**प्रभृति**—क्रिवि आदि; पासून. जसें:–अद्यप्रभृति; जन्मप्रभृति, तत प्रभृति, बाल्यप्रभृति; शिर प्रभृति इ०. 'एवं इये उपरतीं। ज्ञानचिन्हें मागुतीं। अमानित्वादि प्रभृति। वाखाणिलीं।' –ज्ञा १३ ८४९ २ इत्यादि; आयत्वेंकरून. [सं.]

**प्रभेद**—पु भिन्नप्रकार, रीत. 'याचरी आदी। पांचवटयाची बाधी। बाधली प्रभेदीं। पंचभूतिकीं।' –ज्ञा १३.४६ [सं.]

**प्रमत्त**—वि. १ गर्विष्ठ; उन्मत्त (अधिकार, संपत्ति इ०मुळें); मगरूर; बेफाम झालेला. 'ऐसा स्वधर्मुक्रियारहितु। आधिलेपणें प्रमत्तु।' –ज्ञा ३.१०७. २ झिंगलेला; कैफ चढलेला; निद्रेत असलेला; धुंद; गाफील. [सं. प्र=मद्=माजणें]

**प्रमथ**—पु शिवाच्या गणापैकीं एक वर्ग. 'स्वर्गभोगीं महातत्पर। यजी देवपितर प्रमथादिक।' –एभा २१.३३०. [सं.] ०नाथ–पु शंकर; शिव. [सं.]

**प्रमद**—पु. (अप.) प्रमाद. [सं. प्रमाद]

**प्रमदा**—स्त्री. १ तरुण व सुंदर स्त्री 'प्रमादीं पाडी सर्वार्थी। हे प्रमदानामाची निजख्याती।' –एभा २९.५६६. २ (सामा.) स्त्री. [सं.] ०वन–न. स्त्रियांकरितां करमणुकीची स्वतंत्र बाग, जागा.

**प्रमय**—न. (महानु.) छंद; वृत्त. 'पदप्रमयाचें गुंफणें। स्यामा भुजबंधातें जिणे।' –भाए २६. [प्रमेय]

**प्रमा**—स्त्री. १ यथार्थ ज्ञान; निश्चित ज्ञान. 'जें सकळ भाग्याची सीमा। मोक्षलाभाची जें प्रमा।' –ज्ञा १८.९०१. २ समजूत जाणीव; बुद्धि. 'जें देहखंडा नाम आत्मा। ईश्वर पाषाण प्रतिमा। ययापरातीं प्रमा। ढळो नेणें।' –ज्ञा १८.५६७. ३ प्रमाण 'अविद्या नाशी आत्मा। ऐसी नव्हे प्रमा।' –अमृ ६.४१ [सं. प्र+मा=मोजणें]

**प्रमाण**—न. १ पुरावा; दाखला; आधार; साक्ष; वादग्रस्त विषयाचा निर्णय करणारा लेख, भाग, साक्ष इ०. 'आणि उदो अस्ताचेनि प्रमाणें। जैसें न चलता सूर्याचें चालणें।' –ज्ञा ४.९९. प्रमाणाचे आठ प्रकार आहेत:–१ प्रत्यक्ष, २ अनुमान, ३ उपमान, ४ शब्द, ५ अर्थापत्ति, ६ अनुपलब्धि, ७ संभव, ८ ऐतिह्य (किंवा ५ भोग, ६ लेख, ७ साक्ष्य, ८ दिव्य). २ यथार्थ ज्ञानाचें साधन; निश्चय; प्रमा उत्पन्न होण्यास कारणीभूत जें आप्तवाक्य, अनुमान इ०. 'अर्थापत्ति उपमान। इतिहास परिशेषादि प्रमाण। तयासी हि स्वतंत्र कवण। प्रमाण तो बोलेल।' –विवेकसिंधु ३ आधार: प्रत्यंतर; पुरावा; निश्चितपणा; खात्री. 'तो आज येईल उद्यां येईल हें सांगवत नाहीं. त्याचें येण्याचें प्रमाण नाहीं.' ४ कसोटी; कठिण प्रसंग; तप्त दिव्य. ५ सीमा; मर्यादा, इयत्ता; निश्चितपणा; तंतोतंत बरोबर संख्या इ०. 'शब्द किती आहेत त्याचें प्रमाण कोण्हास लागलें नाहीं.' ६ परिमाण; आकार; विस्तार, (औषधाचा) टक; मात्रा. ७ माप (वजन, लांबीरुंदी, वेळ इ० चें).. ८ एखाद्या वस्तूचा निश्चितपणा, विभाग इ० ठरविण्याचा नियम. ९ (गणित) त्रैराशिकांतील पहिली संख्या, दोन॰ समान॰गुणोत्तरांची मांडणी. १० सर्वमान्य, ग्राह्य, आज्ञा, उपदेश, सल्लामसलत घ्यावयास योग्य असा शब्द, माणूस, वचन, ग्रंथ इ० 'धर्म म्हणे गा भीमा! तुज जरि आम्ही प्रमाण तरि सोडी।' –मोवन ९.६४. ११ शपथ; वचन 'वैश्य म्हणे तियेसी। प्रमाण द्यावें आम्हासी।' –गुच ३३.७१ १२ ज्ञान; यथार्थ ज्ञान 'तैसें प्रमाता प्रमेय। प्रमाण जें त्रय। तें अज्ञानाचें कार्य। अज्ञान नव्हे।' –अमृ ७.४६ १३ (चुकीनें) फर्मान हुकूम. 'बाच्छाय पाठविलें प्रमाण। वजीर बोलावा तमाम।' –ऐपो १०. १४ अंत:करण. –हंको –वि खरें, योग्य; बरोबर; सत्य; न्याय 'हें माझें भाषण प्रमाण आहे' –क्रिवि. मान्य; कबूल. 'सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण' [सं.] म्ह० नैको ऋषिर्यस्यवच: प्रमाणम्। सामाशब्द– ०गणित–न. त्रैराशिक. ०चैतन्य–न सप्त चैतन्यांतील आभासचैतन्याचें अंत:करणचैतन्य नामक तिसरें अंग. ०दिवा–पु प्रमाणरूपी दिवा; लामणदिवा. 'प्रमाणदिवेयाचेनि बंबाळें। पांतां तरळैले वेदांचे डोळे।' –शिशु ९ ०पत्र–न. अधिकारपत्र, मुख्याच्या सहीचें पत्रक. 'ज्यांच्याजवळ प्रमाणपत्रें असतील त्यानाच वर्गणी द्यावी.' –के १२.७ ३०. ०फल–न. त्रैराशिकांतील चौथी संख्या; उत्तर ०भूत–वि. १ प्रमाण म्हणून घेतां येईल असें; इयत्ता ठरविणारें. २ (यावरून) खरें; सत्याला धरून असलेलें भूत पहा ०मद्यार्क–पु. (प्रमाणाइतकी) पुरी तेजदारू; पुरी कडक दारू. (इं.) प्रुफ स्पिरीट. ०सूत्र–न. लग्नाचे वेळीं वधू व वर यांची उंची ज्यानें मोजतात तें सूत **प्रमाणांक**–पु त्रैराशिकांतील पहिली राशि. बाकीच्या दोन राशींस मध्यांक आणि इच्छांक अशीं नांवें आहेत. प्रमाण+अंक] **प्रमाणालंकार**–पु प्रमाण अर्थ १ पहा. [प्रमाण+अलंकार] **प्रमाणीभूत**–वि. प्रमाणभूत पहा.

**प्रमाणगी**—स्त्री. (अप.) परवानगी. 'प्रमाणग्या आपण देववील्या।' –सारुह ३.३१. [फा. परवानगी]

**प्रमाणिक**—वि. खरा; इमानी; सचोटीचा; विश्वासु; प्रामाणिक; नेकीचा (माणूस, काम, व्यवहार इ०). [सं. प्रामाणिक]

**प्रमाणिका**—स्त्री. एक समवृत्त. याच्या चरणांत आठ अक्षरें व ज, र, ल, ग हे गण असतात 'तया वनात एकली। विलासिनी विलोकिली। मदें भरोनि डोलतो। तियेसि हंस बोलतो।' र२३.

**प्रमाणें**—शअ. १ एखाद्याला अनुसरून. २ सारखें; सदृश; अनुरूप [प्रमाण]

**प्रमाता**—वि. सिद्ध करणारा; आधार, पुरावा दाखविणारा, दर्शविणारा. [सं.]

**प्रमातामह**—पु. आईच्या बापाचा बाप; पणजा. [सं]

**प्रमातामही**–स्त्री. आईच्या बापाच्या बापाची स्त्री; पणजी [सं.]

**प्रमातृचैतन्य**—न. सप्तचैतन्यांतील आभासचैतन्याचें जडास चेतविणारें चवथें अंग. [सं.]

**प्रमाथी**—पु. साठ संवत्सरांपैकीं एक [सं.]

**प्रमाद**—पु. १ दुर्लक्ष्य; हयगय; अनवधानता; भ्रम; विस्मृति; असावधपणा. 'जेथ कामक्रोधांची जोडी। प्रमाद कोडी क्षणक्षणां।' –एभा २०.१३४. २ चूक; कसूर; गुन्हा; अपराध. 'हें झुंज नव्हे प्रमादु। एथ प्रवर्तलिया दिसतसे बाधु।' –ज्ञा २.३१. ३ मगरुरी; माजुरीपणा; गर्विष्ठपणा; उन्मत्तपणा. ४ (शब्दशः व ल.). कैफ; अंमल; मद. [सं] **प्रमादी**–वि. दुर्लक्ष्य करणारा; निष्काळजी; बेसावध, हयगय करणारा; गाफील. [सं.]

**प्रमित**—वि. १ प्रतिपादलेलें; समर्थन केलेलें; सिद्ध केलेलें. २ मोजलेलें; मापलेलें; प्रमाणबद्ध; परिमित. 'तें द्वादशांगुळप्रमित। अतिक्रमूनि चालिलों त्वरित।' –स्वादि १०.३.४२. [सं.]

**प्रमीत**–न. प्रमाण. 'पीकाचे धरून कांहीं प्रमीत। नीभावणी त्यामाने पाहिली।' –पैमा १.३८.

**प्रमिति**—स्त्री. १ यथार्थ ज्ञान; अनुभवसिद्ध ज्ञान; प्रमा. २ मोजणें; मोजमाप; मोजदाद; गणती. [सं.]

**प्रमुख**—वि. १ मुख्य; वरिष्ठ; श्रेष्ठ; प्रधान. २ अत्युत्तम; उत्कृष्ट. ३ (समासांत) अग्रभागीं असलेला; शिरोभागीं असलेला. 'विष्णुप्रमुख देव महादेवापासीं गेले.' [सं.]

**प्रमुदित**—वि. आनंदित; आल्हादित; हर्षित; खूष. [सं]

**प्रमेय**—न. १ प्रमाणांनीं सिद्ध करावयाचा विषय; सिद्ध करण्याची गोष्ट. २ प्रतिपादिलेलें तत्त्व, विषय. 'अष्टादश पुराणें। तींचि मणिभूषणें। पदपद्धती खेवणें। प्रमेयरत्नांचीं।' –ज्ञा १.५ ३ सिद्धांत. 'प्रमेयमहापूरें। हे मतिगंगा ये थोरें।' –माज्ञा १४. २२. ४ तात्पर्य; सारांश. ५ अर्थ. 'प्रस्ताविलें बरवें। प्रमेय तें जी।' –माज्ञा १८ २९७. ६ ज्ञान. ७ (महानु.) दृष्टांतग्रंथ. [सं.] ०चैतन्य–न. सप्तचैतन्यांतील आभासचैतन्याचें पांचवें अंग. ०त्व–न. विषयत्व. 'विषो नाहीं कोणाही। जया प्रमेयत्वचि नाहीं।' –अमृ ५.१६. –वि. १ सिद्ध करावयाचें; सिद्ध करण्यास योग्य किंवा शक्य. २ ज्ञेय. 'तैसें प्रमाता प्रमेय। प्रमाण जे त्रय।' –अमृ ७.४६. [सं.]

**प्रमेह**—पु. एक धातुरोग; परमा, ह्यांत लघवीचा रंग, प्रमाण इ० कांत फरक होतो. ह्याचे मधुमेह, परमा इ० एकवीस प्रकार आहेत; ते असे–उदक, इक्षु, सांद्र, सुरा, पिष्ट, शुक्र, सिकता, शीत, शनैर्, लाला, क्षार, नील, काल, हरिद्रा, मंजिष्ठ, रक्त, वसा, मज्जा, हस्ति, मधु, प्रमेह किंवा मेह. [सं.] **प्रमेहित, प्रमेही**–वि. प्रमेहाचा विकार ज्यास झाला आहे असा. [सं.]

**प्रमोद**—पु. १ आनंद; आल्हाद; सुख. २ सांठ संवत्सरांपैकीं चवथें. [सं] **प्रमोदित**–वि आनंदित; आल्हादित, सुखी [सं]

**प्रयत**—वि. नम्र. [सं.]

**प्रयत्न**—पु. १ मोठा यत्न; परिश्रम, कष्ट. २ शिणवणारें काम, परिश्रमाचें कृत्य, दीर्घोद्योग. ३ (संगीत) गातांना स्वरोच्चारण करावयाच्या अगोदर श्वास आंत घेण्याची व नंतर बाहेर सोडण्याची क्रिया. आभ्यंतरप्रयत्न व बाह्यप्रयत्न पहा ४ (सामा.) श्रम; यत्न; खटपट; कांहीं कार्यार्थ केलेली धडपड. [सं] म्ह० प्रयत्नीं किंवा प्रयत्नांतीं परमेश्वर सामाशब्द–०वाद–पु नशिबावर हवाला न ठेवतां प्रयत्न केल्यानेंच इष्ट परिस्थिति व फळ प्राप्त होतात हें मत. यालाच पौरुषवाद असें नांव आहे. याच्या उलट दैववाद किंवा प्रारब्धवाद. ०वादी–पु प्रयत्नवादाप्रमाणें चालणारा किंवा त्याचें समर्थन करणारा. ०वान्, प्रयत्नी–वि १ (कामकाजात) तत्पर; दक्ष; उद्योगी; चिकाटी धरणारा; धाडसी. २ परिश्रम, कष्ट करणारा; कर्म किंवा क्रिया करणारा. याच्या उलट नशिबावर हवाला ठेवून स्वस्थ बसणारा. [स.]

**प्रयाग**—पु १ एक पवित्र क्षेत्र. हल्लींचें अलाहाबाद नांवाचें शहर. येथें गंगा व यमुना या दोन नद्यांचा संगम होतो व पाताळांतून वाहणारी सरस्वती नदीहि येथें येऊन मिळते असा समज आहे. समासांत दोन नद्यांच्या संगमाच्या पवित्र स्थानांच्या नांवापुढें हा शब्द योजतात उदा० देव-नंद-कर्ण-प्रयाग. 'प्रयागीं कवेत घेऊन। येऊन लागेन चरणांबुजीं।' –प्रला २१४. २ (ल.) संगम; ऐक्यता 'युक्ति योगाचें आग पावे। ऐसें प्रयाग जेथ होय बरवें।' –ज्ञा ६ ३५७. [सं.] ०माधव–पु. प्रयाग क्षेत्रांतील वेणीमाधव दैवत. 'म्हणोनि भलतेणें एथ सद्भावें नाहावें। प्रयागमाधव विश्वरूप पहावें।' –ज्ञा ११.१०. ०वट–पु गंगायमुनांच्या संगमावर असलेला अक्षय्य वटवृक्ष हल्लीं हा संगमावर नसून जवळच्या किल्ल्यांत आहे. 'म्हणोनि कृष्णार्जुनसंगमीं। प्रयागवटु जाहलों।' –ज्ञा १०.१६. ०वळ–पु. प्रयाग क्षेत्राचा तीर्थोपाध्याय.

**प्रयाण**—न. १ जाणें; गमन; निघणें. 'जीवप्रयाणाची सुमुहूर्तता। भक्तिनवरत्नाचें तारूं बुडतां।' –एरुस्व ५.८३. २ मजल. 'एकभावें राजा आपण। ध्यावया श्रीगुरुदर्शन। प्रयाणावरी की प्रयाण।' –गुच ६०.१६७. ३ (ल) मरण; मृत्यु. 'आणि नियता अंतःकरणीं। तूं जाणिजसी देहप्रयाणीं।' –ज्ञा ८.५. [सं.] **०समय**–पु. मरणाची वेळ; मरणसमय.

**प्रयास**—पु आयास; कष्ट; श्रम; प्रयत्न. 'ताल राखता खांबसुत्रा। लेपाच्या करा प्रयास काय।' –एभा ६.१४. [सं.]

**प्रयुक्त**—वि. १ (समासांत) एखाद्या गोष्टीपासुन प्राप्त झालेलें; उद्भवलेलें; कार्यकारणसंबंधीं; औपाधिक, प्रेरित जसें:–पापप्रयुक्त दुःख; प्रीतिप्रयुक्त तप; चौर्यप्रयुक्त दंड इ०. २ योजिलेला; नेमिलेला. ३ युक्त; नियुक्त; सहित; संपन्न [सं]

**प्रयुक्ति**—स्त्री. परिणाम; शेवट; मुख्य हेतु; ध्येय. [सं]

**प्रयुंजणें**—सक्रि. योजणें; लावणें 'नामींचीं अक्षरें तिन्ही। कर्मा आदिमध्यनिदानीं। प्रयुंजावीं पैं स्थानीं। एहीं तिहीं।'–माज्ञा १७.३५४. [सं. प्रयोजन; म. प्रयोजणें]

**प्रयुत**—न. दशलक्ष; १०००००० ही संख्या. 'त्याच्या परिघावर जर सूत्र वेष्टिलें तर त्याची लांबी अनेक प्रयुतें मैल भरेल.' –मराठी ६ वें पुस्तक पृ. १ (आ. २, सन १८७५). [सं.]

**प्रयोक्ता**—वि. लावणारा; योजणारा, नियोजित करणारा; व्यवस्था करणारा प्रयोग पहा [सं]

**प्रयोग**—पु १ (मंत्र, अस्त्र, औषध इ०ची) योजना; लावणें; योजणें; एखाद्याकडे–वर–विरुद्ध लावणें, उपयोग करणें. 'विश्वामित्रानें त्या अस्त्रांचा प्रयोग वसिष्ठावर केला' २ रचना, मांडणी (शब्द, वाक्यांतील अवयव इ०ची) ३ मंत्र, तोडगा, मंत्राचा प्रयोग; चेटूक. 'त्यापासीं प्रयोग आहे.' ४ मंत्र; तोडगा इ०ची योजना, उपयोग करणें. 'त्यानें मजवर प्रयोग केला.' ५ (व्याकरण) वाक्यामध्यें कर्तृप्रधान, कर्मप्रधान, भावप्रधान या भेदांमुळें क्रियापदांत कर्ता, कर्म व भाव यांच्या अनुरोधानें विकार होऊन वाक्यरचनेचा जो प्रकार होतो तो. प्रयोग चार आहेत– कर्तरि, कर्मणि, भावे आणि भावकर्तरि. ६ विस्तारपूर्वक स्पष्टी करणानंतर केलेलें विधान; अनुमानावरून काढलेला नियम, सूत्र. ७ (आज्ञा, नियम इ० ची) प्रत्यक्ष क्रिया; कांहीं गोष्ट सिद्ध करण्याकरितां जो संस्कार करावा लागतो तो किमयाची क्रिया जसी सांगितली तसा आम्ही प्रयोग करून पाहिला परंतु साधत नाहीं.' ८ परिणाम; शेवट; पर्यवसान ९ रीत; पद्धत; सरणी. १० अनुष्ठान. ११ (शब्दाचा) उपयोग; वापर. 'तूं करणें याचा बहुतु। प्रयोगु तेथ।' –ज्ञा १७.३०५. १२ नाटक रंगभूमीवर करून दाखविणें. 'त्यांनीं कालिदासकृत विक्रमोर्वशीय नाटकाचा प्रयोग करून दाखविला.' –विवि ८.९. १०४. १३ कर्म; कृत्य. 'विवेकयोगें सकळ प्रयोग। करीत जावे।' –दा १७.७.१९. १४ (काव्य) यत्न; श्रम; कष्ट. [सं.] म्ह० प्रयोगशरणाः वैय्याकरणाः **०पाठी**–वि. विवाहादि कर्मांचे प्रयोग मात्र ज्यास पाठ येतात परंतु ते ज्या आधारावर किंवा कारणास्तव केलेले आहेत हें समजत नाहींत असा. **०शाळा**–स्त्री. रससंस्कारगृह, रसायनकर्मगृह. **०सिद्धशास्त्र**–न. प्रयोगात्मक शास्त्र; प्रयोगज्ञान; परीक्षात्मक शास्त्र. **०सिद्धसारणी**–स्त्री. सरलसारणीसूत्र. (इं.) एंपिरिकल फॉर्म्युला. **प्रयोगी**–वि जादुटोणा, जारणमारणादि कर्म करणारा. 'नित्य मायबाप जाती तृणा लागीं। पाळितां प्रयोगी जाण तोषे।' –ब १४.११.

**प्रयोजक**—वि १ कार्यप्रवर्तक; कर्त्यास क्रियेच्या ठाईं प्रवर्तविणारा; प्रधान, आदिकरण. २ करविता प्रेरक, प्रेरणा देणारा, घडवून आणणारा. योजिणारा [सं] **०क्रियापद**–न (व्या.) जेथें क्रियेच्या मुख्य कर्त्यास अन्याच्या प्रेरणेनें गौणत्व येऊन अन्यच मुख्य कर्ता असतो तें क्रियापद. **०शक्ति**–स्त्री. रासायनिक आकर्षणाचें माप. (इं.) बॉंड.

**प्रयोजणें**—सक्रि. (काव्य) योजना करणें; योजणें; लावणें; एखाद्याकडे–वर उपयोग, प्रयोग करणें; वापरणें. 'विचारूनि मनीं। पाहिजे तें प्रयोजावें।' –तुगा ३२४५. [सं. प्रयोजन] **प्रयोज्य**– वि. १ योजण्यास, परिणाम करण्यास, उत्पन्न करण्यास शक्य, योग्य, इष्ट; संभवनीय २ (व्या) प्रयोजक. [सं.] **०धातु**–पु. प्रयोजक क्रियापद पहा **०प्रयोजकभावसंबंध**–पु. योजिलेलें व योजणारा या उभयताचा संबंधविशेष.

**प्रयोजन**—न. १ जरूरी, गरज; आवश्यकता. 'पण तसें महाराष्ट्रीयानीं म्हटलें नसल्यामुळें त्याचा विशेष विचार करण्याचें प्रयोजन नाहीं.' –मसाप २ २ १०६ २ कारण, साधन; आधार; प्रसंग; निमित्त. 'पैं नानाप्रयोजनशीळें। दीर्घें वक्रें वर्तुळें।' –ज्ञा १३.१०६०. ३ हेतु; उद्देश. 'निवडणुकी जर सरकार लांबवीत नाहीं तर त्या ते लांबवितात असें म्हणून निषेध करण्याचें काय प्रयोजन?' –सासं २.२६५. ४ लग्न, मुंज, ब्राह्मणभोजन इ० रूप कार्य, जेवणावळ. ५ अनुबंधचतुष्टयांतील शोकापगमन आणि आनंदावाप्ति या उभयरूपानें तिसरें अंग. [सं.]

**प्ररुद्ध**—वि. पूर्णपणें झांकलेलें, आच्छादिलेलें. 'तैसें ज्ञान तरी शुद्ध। परी इहीं असे प्ररुद्ध।' –ज्ञा ३.२६३. [सं. प्र+रुध्]

**प्ररोचना**—स्त्री. नाटकाचा हेतु, त्यांतील युक्ति इ०चा उपक्षेप; प्रस्ताव. [सं.]

**प्ररोह**—पु. १ वृक्षादींचा अंकुर. २ उदय; वाढ. 'अन्नास्तव भूतें। प्ररोह पावती समस्तें।' –ज्ञा ३.१३४. ३ उदय. ४ उत्पत्ति. [सं.]

**प्रर्जी**—पु. रोग. 'प्रर्जीरोग इतीरितः।' –राज्यको ३.१९.

**प्रलपणें**—अक्रि. निरर्थक बोलणें; बडबडणें. [सं. प्रलपन]

**प्रलंबक**—पु टांगणारा: लोंबत, अधांतरीं ठेवणारा [सं.]

**प्रलय**—पु. १ कल्पांताच्या वेळीं (४३२०००००० वर्षांच्या मुदतीनंतर) होणारा जगाचा अंत. २ मृत्यु, लय: विध्वंस; संहार; (सामा.) नाश. ३ (ल.) अतिशय नासधूस; धूळधाण; अनर्थ; कहर; धुव्वा; महामारी, दुष्काळ, टोळधाड, दरवडा, लूट इ० रूप आपत्ति. 'लढाईचा–जुलमाचा–उंदिरांचा–पोपटांचा प्रलय.' 'पावसानें प्रलय मांडला.' 'जरीमरीनें प्रलय केला.' ४ निरतिशयता; अमर्यादता: अपरंपारता. असामान्यता; अतिशयता: पराकाष्ठा. 'खेळण्याचा – गाण्याचा – शिकण्याचा – लिहिण्याचा – पिकाचा–धान्याचा–प्रलय.' ५ मूर्च्छा; एकाएकीं बेशुद्ध होणें; घेरी, झीट; नष्टचेष्टता. अष्टभाव पहा ६ अनर्थ. [सं प्र+लय] ०**काल**–पु. १ कल्पांताच्या वेळीं होणाऱ्या जगाच्या प्रलयाचा काळ. २ अत्यंत भीतिप्रद व अकाळविक्राळ स्वरूपाचा मनुष्य; राक्षस. ३ (ल.) जिवंत अवदसा: कर्कशा; कृत्या; कैदाशीण; अत्यंत भांडखोर बायको. ०**भैरव**–पु प्रलयकाळचें भूत, पिशाच, राक्षस. 'म्हणौनि एकी बोंब सुटली द्वारीं। प्रलयभैरवांचां।' –शिशु १०८१. ०**वीज**–स्त्री. १ अतिशय गडगडाट करणारी, भयंकर वीज. २ (ल) भयंकर किंवा भीतिप्रद मनुष्य. ३ चलाख, तरतरीत, उत्साही मनुष्य. ४ सुंदर व वेड लावणारी स्त्री: प्रलयसौदामिनी असाहि प्रयोग आहे. ०**वेताळ**–पु प्रलयकाळचें एक भूत पिशाच्च. 'तंव जाला रे जाला जगबोलु। भणौनि बोबाइला प्रलयवेताळु।' –शिशु १०८०. **प्रलयाग्नि, प्रलयआग**–पुस्त्री. १ अतिशय मोठी आग, वणवा. २ (ल) प्रलयवीज पहा. **प्रलयांबु**–न. प्रलयकाळचें पाणी. 'कायि प्रलयांबूचा उन्नावो। वोघु मानी।' –माज्ञा १८.४३. [सं.]

**प्रलाप**—पु. असंबद्ध, निरर्थक बडबड (झोप, शोक, मद, इ० तील); व्यर्थ भाषण. 'हा प्रलाप स्त्रीजातीनें करावा.' –भाब ७४. [सं.] **प्रलापणें**–अक्रि. (काव्य) विसंगतपणें बोलणें, बडबडणें; बकणें. [प्रलाप]

**प्रलोकित-दर्शन**—न. (नृत्य.) नृत्यामध्यें बाहेरच्या बाजूस वळून पाहणें. [सं.]

**प्रलोभ**—पु. अतिशय लोभ. 'तेथ तळु घे स्वानंदें। प्रलोभाचा।' –ज्ञा १५.१०४. [सं.] **प्रलोभन**–न. १ फूस; आमिष; मोह; मधाचें बोट दाखविणें, लावणें. २ (विजेचें) प्रवर्तन; उपपादन.–वि. मोह, लालूच, आमिष दाखविणारा; फूस लावणारा [सं.] **प्रलोभविणें**–सक्रि. मोह पाडणें. **प्रलोभित**–वि. मोहित; मोह घातलेला; लांचावलेला.

**प्रवक्ता**—पु. १ (ख्रि.) देवाच्या संदेशावर भाष्य अगर प्रवचन करणारा. २ भविष्यवादी. ३ (ल.) बोलणारा.

**प्रवचन**—न. पुराणें, उपनिषदें इ० तील कांहीं भाग घेऊन त्यांतील सिद्धांतांची फोड करून श्रोत्यांस समजावून सांगणें; विवरण, व्याख्यान. 'केळकरांचीं गीतेवर प्रवचनें सुरू आहेत.' –के ३१. ५ ३०. [सं.] ०**कार**–पु प्रवचन करणारा.

**प्रवण**—वि १ उतरता; सखल; कललेला. (समासांत) दक्षिण-प्रवण. २ आसक्त, तत्पर; परायण. 'ज्या समयीं ईश्वरभक्तिप्रवण चित्त होतें त्यासमयीं विषयवैराग्य होतें' ३ तयार; सिद्ध, उन्मुख. [सं.]

**प्रवर**—पु. गोत्रांतील मुख्य पूर्वज, गोत्रप्रवर्तक ऋषि प्रवरांत एक प्रवर, द्विप्रवर, त्रिप्रवर व पंचप्रवर असे प्रकार आहेत –वि. मुख्य, प्रधान: श्रेष्ठ; उत्कृष्ट. [सं.] **प्रवरैक्य**–न. दोन किंवा अधिक घराण्यांत प्रवरांचा समानपणा किंवा ऐक्य. हें लग्नाच्या वेळीं अयोग्य मानितात. [प्रवर+ऐक्य]

**प्रवरा**—स्त्री. अत्यंत गोड पाण्याबद्दल प्रसिद्ध असलेली नदी. ही टोकें गांवीं गोदावरीस मिळते. म्ह० प्रवरापान गंगास्नान

**प्रवर्त**—पु. १ देवघेव, व्यापार: व्यवहार. 'इसाळयानें गेलें शेत। प्रवर्त बुडाला जेथिचा तेथ।' –एभा २३ १२८. २ मार्ग 'माजी कर्माकर्माचिया व्यवहारीं। प्रवर्तु दावी।' –ज्ञा ७.२६. [सं.] **प्रवर्तक**–वि १ उत्पादक; मूळप्रेरक; पुरस्कार करणारा. 'ह्याला प्रसविणाऱ्या कालाचा तो प्रवर्तक बनतो.' –भाऊ ३६. २ उत्तेजन देणारा; नेट देणारा; उठावणी करणारा. ३ पंच; लवाद. ४ (कर्ना.) खेड्याचा मुख्य; पाटील [सं.] ०**कारण**–न. परिपोषक कारण; पूर्वस्थितिकारण; पूर्वतयारी करणारें कारण. (इं.) प्रिडिस्पोजिंग कॉज. ०**वेष्टन-वेटोळें**–न हें एक विजेच्या योगानें चालणारें यंत्र आहे. याचा उपयोग वैद्यशास्त्रांत, विद्युत्ध्वनिवाहक यंत्रांत पुष्कळ होतो. (इं.) इंडक्शन कॉईल. –ज्ञाको. (प) २५० –**कार्याचार्थ**–पु. धर्म, मत, पंथ इ० चा संस्थापक. **प्रवर्तणें**–अक्रि. १ तयार होणें; उद्युक्त होणें 'मी नेणतु त्यापरीं। प्रवर्तें येथु।', –ज्ञा १.६८. २ चालू होणें; चाल पडणें; (कांहीं काम) चालू असणें, सुरू झालेलें असणें. 'या यज्ञदानादि क्रिया। ओंकारें साचायिलिया। प्रवर्तती।' –ज्ञा १७ ३६७. ३ (काव्य) आरंभिणें; सुरू होणें. 'निशा प्रवर्तली सकळ। ब्रह्मांडकरंडा भरलें काजळ।' –शिली २.३५. ४ चालणें; जाणें. [प्रवर्तन] **प्रवर्तमान**–वि. उद्युक्त; व्यापलेला; वर्तणारा; चालणारा; हालचाल करणारा. [सं] **प्रवर्तित**–वि. १ चालू केलेला; पुरस्कार केलेला; रूढ केलेला. २ उत्तेजन दिलेला; उद्युक्त केलेला; भर दिलेला. [सं.] **प्रवर्त्यमान**–वि. चालू असलेला; सुरू असलेला: चालविणाराच्या किंवा व्यवस्थापकाच्या हाताखालीं असलेला (धंदा). [सं.]

**प्रवर्तन**—न. १ आरंभिणें; सुरवात, चालू करणें; पुढें करणें. २ उत्तेजन, उद्युक्त करणें; भर देणें. ३ वागणूक; कामधंदा; उद्योग; ऐहिक कर्म. ४ उपपादन. [सं.]

**प्रवसणें**—सक्रि. कुरवाळणें; थापटणें. 'कोडीसवाणे पाये धाकुलें। रायें हातें प्रवसीले।' -उषा ७०८. [ सं. प्र+मृश् ]

**प्रवसर**—पु. मोह. -शर

**प्रवस्कंध**—पु. ज्याची मर्यादा मेघमंडळापासुन सूर्यमंडळापावेतों आहे असा सप्तस्कंधातील दुसरा स्कंध. [ सं. ]

**प्रवह्लिका**—स्त्री. उखाणा; कोडें; कूटप्रश्न; प्रहेलिका [सं ]

**प्रवाद**—पु. १ लोकवार्ता; वदंता; लोकात झालेला बोभाटा; अफवा. २ उल्लेख 'म्हणौनि प्रवादु तया। नैष्कर्म्यु ऐसा।' -ज्ञा १८.९७८. ३ संज्ञा. 'तैपा सुखप्रवादु बरलु। विषयिकु हा।' -ज्ञा ५.११६. ४ बोलणें; भाषण [ सं. ]

**प्रवाल-ळ**—नपु. पोंवळें. 'प्रमेयप्रवाल सुप्रभ। द्वैताद्वैत तेचि निकुंभ।' -ज्ञा १.१७. [सं.] ०**भस्म**-न. प्रवाळाची भट्टी लावून केलेलें भस्मरूप औषध.

**प्रवास**—पु १ स्वदेश सोडून अन्यत्र जाणें, देशाटन; परदेशसंचार २ परदेशांत केलेला तात्पुरता वास. परदेशांत प्रवास करताना राहणें ३ परदेश -मनको. [ सं. ] **प्रवासणें**-अक्रि प्रवास करणें; देशाटन करणें; परदेशांत तात्पुरतें राहणें. [ प्रवास ] **प्रवासिक**-पु. प्रवासी 'प्रवासिकांतें स्वगृहा जाया। त्वरा करूनिया नित्य।' -मेघदूत भाषांतर ८३. (मराठी ६ वें पुस्तक पृ. ४३७) **प्रवासी**-पु प्रवास करणारा; मुशाफर; पांथस्थ; उतारू. -वि. कष्टी 'अश्वत्थ सेवा बहुत दिवस। करितां झालें मी प्रवासी।' -गुच ३९.३४. [सं] **प्रवाशाचें झाड**-न. एक सुंदर पानांचें झाड -बागेची माहिती पृ ११६

**प्रवाह**—पु. १ जल, वायु अग्नि इ०ची गति किंवा एका दिशेकडे गमन, ओघ; वाहणें. जसें:- जल-उदक-रक्त-दुग्ध-प्रवाह २ (ल) कामाकाजाची सरणी, ओघ ३ भाषणाचा अखंडपणा; अकुंठित ओघ. ४ कामधंदा; उद्योग; हालचालीचें जीवन. ५ (प्रेम, बुद्धि इ०चा) कल; झोक; प्रवृत्ति ६ ओढ; पक्षपात; प्रवृत्ति; धाव. [ सं ] **प्रवाहांत पडणें**-जनसमुदायाच्या वर्तनाप्रमाणें किंवा रूढीप्रमाणें वागणें. सामासिक शब्द- ०**पतित**-वि. (शब्दशः व ल.) प्रवाहांत पडलेला, प्रवाहाप्रमाणें जाणारा; परिस्थितीप्रमाणें वागणारा, गतानुगतिक. 'या कर्मभूमींत कर्म निसर्गतः प्रवाहपतित असून अपरिहार्यहि आहे.' -टिसू ५० ०**पतित कर्तव्य**-न ओघाओघानें आलेलें कार्य; प्रसंगोपात्त कर्म 'हें प्रवाहपतितकर्तव्य करीत असता त्यांत कोणास दुखवावें लागल्यास त्याची जबाबदारी आमच्यावर येत नाहीं.' -टि ३. २९२ **प्रवाहित्व**-न. वाहतें राहण्याचा धर्म; द्रवता; जलरूपता. **प्रवाही**-वि. वाहणारें; पातळ; द्रवरूप [सं] ०**मूत्र**-न. जनावराचें मूत्र. **प्रवाहे मूत्रित**-वि १ वाहत्या पाण्यांत मुतलेलें. २ (ल.) व्यर्थ, निष्फल केलेली (खटपट, काम, प्रयत्न इ०). ०**वायु**-पु. द्रवरूप, जलरूप वायु. (इ) लिक्विड गॅसेस.

**प्रवाहण, प्रवहाण**—न होडी; नाव; तर. 'तृषार्ता पाणियें जिणें। का पुरीं पडलिया प्रवाहणें।' -माज्ञा १८.७०५. [प्रवाह] **प्रवाहणें**-अक्रि १ (काव्य) वाहणें; घसरणें २ वहिवाट चालू राहणें. 'तेणें जन्ममरणांची वाट। घडघडाट प्रवाहे।' -एभा ३.१३५

**प्रवाळ**—न. १ प्रवाल पहा. २ पल्लव; अंकुर. -कशको [सं]

**प्रविलाप**—पु नाश, नाहींसें होणें (गिळंकृत किंवा शोषण केल्यामुळें); शोषण [ सं. ]

**प्रविविक्तभोग**—पु स्वप्नस्थान किंवा मनोराज्य यातील अस्पष्ट भोग. [ सं. ]

**प्रविष्ट**—वि. १ (शब्दशः व ल.) शिरलेला; घुसलेला. २ पोहोंचलेलें; पावलेलें (पत्र) ३ निमग्न. [ सं. प्र+विश् ]

**प्रवीण**—वि चांगली माहिती असलेला; निपुण; निष्णात; हुशार; कुशल; पारंगत; वाकबगार; चतुर. 'वंगराजा रणप्रवीण। कोपें चालिला घेऊन बाण।' -एरुस्व ९ ५१. [ सं. ]

**प्रवृत्त**—अक्रि १ उद्युक्त; चालू असलेला, तयार; अधिष्ठित; स्थापित २ कार्यामध्यें व्यग्र झालेला, गुंतलेला; तत्पर; कामांत असलेला. ३ सांसारिक; ऐहिक. जीवनकलहविषयक; प्रापंचिक [सं] **प्रवृत्तणें**-अक्रि (काव्य) एखाद्या कार्यांत व्यग्र होणें; उद्युक्त, तत्पर होणें. [ प्रवृत्त ]

**प्रवृत्ति-त्ती**—स्त्री १ प्रस्थापना; व्याप्ति; परिपाठ; प्रघात; रूढी जसें:-कर्म-काल-देश-धर्म-आचार-प्रवृत्ति २ चाल; गति; गमन, आरंभ; सुरवात ३ निमग्नता; चळवळ; हालचाल; एखाद्या कामात गुंतलेलें असणें ४ संसार; प्रपंच, संसारांतील आसक्तता, आत्मस्वरूपाचा विसर पडून प्रापंचिक व्यवहारोन्मुखतारूप जीवाची विशेषवृत्ति, बहिर्मुखवृत्ति याच्या उलट निवृत्ति 'आंतुला चित्ताचे अंगवरी। प्रवृत्ति पेलोनि माघारी।' -ज्ञा १६ ९१. ५ (ल) प्रवाह; ओघ; प्रगति. ६ कल; ओढ; धाव· झोक (प्रेम, बुद्धि, मन इ०चा). ७ आसक्ति; पक्षपात, ओढा ८ कर्ममार्ग 'तेथें भ्रमेंसहित पळाली भ्रांती। क्रियेसहित गळाली प्रवृत्ती।' -एभा १३.४२१. ९ प्रेरणा. 'तो साधी चिद्रुपु। कर्मप्रवृत्तीचा संकल्पु।' -ज्ञा १८. ४५७. १० प्रेरक; प्रेरणाहेतु 'म्हणोनि ज्ञान ज्ञेय ज्ञाता। हे त्रिविध गा पांडुसुता। होयचि कर्मा समस्तां। प्रवृत्ति येथ।' -ज्ञा १८.४८५. ११ प्रघात; रूढी 'तरी हें प्रवृत्तीचें बोलणें। प्रत्ययास आणी उणें।' -दा ९ ७ ११. १२ बातमी. -शर १३ कर्म; क्रिया. [सं. प्रवृत्ति] ०**निमित्त**-न (व्या. न्याय) विशिष्ट अर्थानेंच शब्दाचा उपयोग किंवा रूढि होण्याचें कारण [ सं. ] ०**मार्ग**-पु. प्रापंचिक व्यवहाराचा मार्ग; ऐहिक सुखासंबंधींचा उद्योग; धार्मिक क्रिया, विधी, आचार इ०. याच्या उलट निवृत्तिमार्ग. ०**रोचक**-वि प्रवृत्ति करणारें; एखाद्या गोष्टीकडे मन वळविणारें. 'तेवीं वेद बोले जें फळ। तें प्रवृत्तिरोचक केवळ।' -एभा १८ ३६०. ०**स्वातंत्र्य**-न इच्छास्वातंत्र्य

**प्रवृत्तिकास्त**—पु शेतकीचा उद्योग करणारी एक जातिसमुदाय. 'अंबष्ठ आणि मूर्धावसिक्त । प्रवृत्तिकास्त आणि सारस्वत । इत्यादि नावें जे वर्तत। ते जाण समस्त अनुलोमज।'–एभा २०.३३.

**प्रवृद्ध**—वि १ पूर्णपणें वाढलेला; प्रौढ; प्रगल्भ २ वाढलेला, विस्तारलेला; विस्तीर्ण केलेला; वृद्धिंगत; वाढविलेला (शब्दशः व ल.) [सं.]

**प्रवेश**—पु. १ शिरणें; निघणें, शिरकाव २ शास्त्र, कला इ० मध्यें झालेला बुद्धीचा शिरकाव ३ रंगभूमीवर पात्राचें येणें. ४ नाटकांतील अंकाचा पोटभाग ५ दार [सं.] म्ह० चचुप्रवेशे मुसलप्रवेशः. **०परीक्षा**–स्त्री १ प्रवेश करण्याच्या पात्रतेची कसोटी. २ मॅट्रिक्युलेशन व तत्सदृश परीक्षा. **प्रवेशक**–पु. १ पूर्वरंग; नांदी. २ मुख्य पात्र रंगभूमीवर यावयाच्या अगोदर श्रोत्यांना संदर्भ कळविणाऱ्या हलक्या दर्जाच्या पात्राचा प्रवेश ३ प्रस्तावना; उपोद्घात; उपन्यास –वि. प्रवेश करून, मिळवून देणारा (शब्दशः व ल.) [सं.] **प्रवेशणें**–अक्रि. प्रवेश करणें; शिरणें; शिरकाव करणें; घुसणें. 'तैसीं महापापें कुळीं । प्रवेशती ।'–ज्ञा १.२५१. [सं. प्रविश्] **प्रवेशन**–न १ शिरणें; शिरकाव करणें. २ (नृत्य) नृत्यामध्यें बुबुळें अशीं करावयाचीं कीं तीं दिसेनाशीं होतील. हा अभिनय हास्य व बीभत्सरसद्योतक आहे.

**प्रवेष्ट**—पु कोपरापासून वरचा हात. प्रकोष्ठ पहा. [सं.]

**प्रशम**—पु. १ (राग, लोभ इ०चें) सांत्वन, समाधान; उपशम; शांति. २ विश्रांति; विश्राम, विसावा [सं] **०न**–न. १ समाधान; सांत्वन; उपशमन. २ सांत्वन करणारें; शमविणारें; दुःख, व्याधि, वेदना दूर करणारें; उताऱ्याचें औषध. 'घृत हें पिताचें प्रशमन होय.' [सं.]

**प्रशंसणें**—सक्रि स्तुति करणें, गुणवर्णन करणें, वाखाणणें.' जें भगवद्गीता म्हणिजे । जे ब्रह्मेशानी प्रशंसिजे ।'–ज्ञा १ ५५. [सं. प्र+शंस्] **प्रशंसक**–वि. स्तुति, प्रशंसा करणारा; स्तावक. [सं] **प्रशंसनीय**–वि. स्तुतीस पात्र, योग्य; स्तुत्य; वाखाणण्याजोगें; श्लाघनीय [सं.] **प्रशंसित**–वि स्तुति केलेला; प्रशंसा केलेला; वाखाणलेला. [सं.]

**प्रशंसा**—स्त्री. स्तुति; वाखाणणी; तारीफ; नांवाजणी; वाहवा. [सं.] **०पात्र**–वि. स्तुति करण्यास योग्य; प्रशंसनीय.

**प्रशस्त**—वि. १ स्तविलेलें; वाखाणलेलें. २ ऐसपैस, विस्तीर्ण; मोकळी (जागा, भांडें) ३ पुरण्याहतकें मोठें; अघळपघळ; सैल; मोकळें (वस्त्र). ४ मनमोकळें, स्पष्ट; खुलें (भाषण). ५ उदार; थोर; दिलदार; उदात्त (मन, स्वभाव). ६ विपुल, अतिशय; भरपूर; रेलचेल; पुष्कळ (उपाय, साहित्य, सामुग्री). ७ योग्य; बरोबर; ठीक, वाजवी; समाधानकारक (कृति, धंदा, वागणूक इ०). 'वृत्ति गुंतली तयाची। आतां प्रशस्त न वटे।' –दा ३.४.२८. ८ स्तुत्य; बरोबर; उत्कृष्ट; कौतुकास्पद; श्रेष्ठ. 'तरी ओंकार तत्कारीं । कर्म केलें जें ब्रह्मशरीरीं । जें प्रशस्तादि बोलवरी । वाखाणिलें।' –ज्ञा १७ ३७८. ९ निर्दोष; दोषरहित. –क्रिवि. स्वैर; मोकळेपणें, स्वतंत्रपणें (भटकणें, पडणें, शिव्या देणें, चोरी, बाहेरख्यालीपणा करणें इ०) [सं] **०वाटणें**–पसंत पडणें; मोकळें व बरें वाटणें; ठीक, वाजवी वाटणें; आवडणें.

**प्रशस्ति-स्ती**—स्त्री. १ स्तुति; प्रशंसा; तारीफ, वाहवा. २ पत्राचा गौरवपर लिहिलेला प्रास्ताविक भाग; अलकाब. ३ प्रसन्नता. 'आत्मबोध प्रशस्ती । हे तिये दशेची ख्याती ।' –ज्ञा १८. १०९५ ४ समाधान. 'जयाचें नांव तीर्थरावो । दर्शनें प्रशस्तीसि ठावो ।' –ज्ञा ६.१०२. ५ महत्त्व; पूज्यत्व. 'अथवा संभ्रमाचिया आयिती । स्नेहो जैसा ये व्यक्ती । कां दर्शनाचिया प्रशस्ति । पुण्यपुरुष ।' –माज्ञा १३.१८२. [सं.]

**प्रशंस्य**—वि. स्तुति करण्यास, वाखाणण्यास शक्य, पात्र, आवश्यक, योग्य; स्तुत्य; श्लाघनीय. [सं.]

**प्रशांत**—वि. १ शांत, स्तब्ध; बंद पडलेला, थंड. २ काम, क्रोध इ० विकार ज्याचे शमले आहेत असा. ३ मृत; नष्ट [सं.]

**प्रशिष्य**—पु. शिष्याचा शिष्य. [सं.]

**प्रश्न**—पु. १ विचारणा; सवाल; चौकशी; विचारपूस; पृच्छा. २ शुभ किंवा अशुभ दर्शविणारें चिन्ह; शकुन 'असे सातही उत्तम प्रश्न झाले।' –कचेसुच ५ ३ भविष्यांतील गोष्टींसंबंधानें ज्योतिषी वगैरेंचा घेतलेला सल्ला; मुद्दा; बाब. ४ विचारलेल्या भविष्याचें सांगितलेलें भाकित किंवा उत्तर. 'जोशाचा प्रश्न उतरला.' ५ कोडें. कूट 'आपल्याला काय प्रश्न विचाराल हा मोठा प्रश्नच आहे' –भावबंधन पृ. ३३ ६ अथर्वण वेदांतील एका उपनिषदाचें नांव [सं.] **०उठविणें**–प्रश्न टाळणें. **०पाहणें**–भूत आणि भविष्य गोष्टींचें ज्ञान फलज्योतिष, रमल इ० शास्त्रांवरून करून घेणें. **०सांगणें**–ज्योतिषशास्त्र वगैरेवरून विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर सांगणें; कूटप्रश्न, कोडें इ० सोडविणें. **०माला, प्रश्नावलि-ळी**–स्त्री. प्रश्नाची परंपरा, मालिका. [प्रश्न+माला, आवलि] **प्रश्नार्थक सर्वनाम**–न (व्या) प्रश्न विचारतांना ज्या सर्वनामाचा उपयोग करितात तें. उदा० कोण, काय. **प्रश्नालंकार**–पु. बाहेरून वाक्य प्रश्नासारखें दिसतें पण वस्तुतः वक्त्याचा त्या गोष्टीविषयीं पक्का निश्चय असतो अशा ठिकाणीं होणारा अलंकार. उदा० 'जें झाकिलें अनंतें दिव्यें भव्यें सदंबरें सुघडें । तें माधुकाय काय क्षुद्रमती करिल नागवें उघडें ।' 'कळी करि सुनिर्मळीं परम उग्र दावानळीं । तयांत अविशुद्ध मी शलभ जेविं दावानळीं । व्रणार्थ पशुच्या शिरावरि वर्नी उभे काकसे । स्मरादि रिपु मन्मनीं अहि न काळ मेका कसे ।' –केका २१. [प्रश्न+अलंकार] **प्रश्नोत्तरजाति**–स्त्री. अनेक प्रश्नांचें एकच उत्तर; जो प्रश्न तेंच उत्तर इ०

नानाविध प्रश्न व उत्तरें याचे प्रकार हा चित्र म्हणून एक प्रकारचा अलंकार होतो. ‘ अरे, ही तर एका प्रकारची प्रश्नोत्तरजातीच आहे बरें. ’ –कमं १ २२. **प्रश्नोत्तरी**–स्त्री. प्रश्न विचारण्याच्या वेळेच्या ग्रहदशेवरून केलेलें भूतभविष्य टिपण किंवा जन्मपत्रिका [ प्रश्न+उत्तर ] **प्रश्नणें**–क्रि विचारणें –शर

**प्रश्रय**—(महानु.) शौच. ‘नंतर प्रश्रयाची वृत्ति।’ –पूजावसर

**प्रष्टव्य**—वि विचारण्यास शक्य, पात्र, योग्य; आवश्यक. [सं ]

**प्रष्टा**—वि विचारणारा; पृच्छक; चौकशी करणारा [ सं. ]

**प्रसऊ**—न ( महानु ) प्रसवतें द्वार. ‘ जे वेदाचा उगऊ। पूर्णबोधाचा जीऊ। ब्रह्मविद्ये प्रसऊ। जे परवाचा।’ –ॠ १. [ प्रसव ]

**प्रसक्त**—वि. आलेली; प्राप्त झालेली; ठेपलेली, गुदरलेली ( वेळ, उद्योग इ० ) ‘ प्रसंगीं प्रसक्त जें सुखदुःख तें भोगणें अवश्य आहे ’ [ सं ]

**प्रसक्ति**—स्त्री (न्याय ) लक्ष्यादिकाचे ठायीं लक्षणादिकांची प्राप्ती; प्रवृत्ति, कल, व्याप्ति; योग्य असणें, लागू पडणें. [ सं. ] **प्रसक्तानुप्रसक्तीनें**–क्रिवि (कल्पनांच्या) अनुषंगानें; सान्निध्या-मुळें; चालू प्रसंग सोडून दृष्टांतासाठीं घेतलेल्या दुसऱ्या विषयाच्या अनुरोधानें ( बोलणें इ० ); विचाराचा इतर विचाराशीं किंवा विषयाचा इतर विषयाशीं संबंध आल्यामुळें ( वादविवादात विषयां-तराबद्दल योजितात ).

**प्रसंग**—पु. १ योग्य वेळ, काल, संधि, योग्य स्थल किंवा परिस्थिति. ‘जें कार्य करणें तें प्रसंग पाहून करावें ’ २ येऊन ठेपलेली वेळ, आकस्मिक किंवा एकाएकीं उद्भवलेला काल, कठिण परिस्थिति, संकट. ‘ युद्धाच्या प्रसंगीं शूर भीत नाहीं ’ ३ विपत्ति. आपत्काल, कांहीं दुर्निर्वह संकटाचा समय. (क्रि० पडणें. येणें; गुदरणें, उद्भवणें) ‘ त्या गृहस्थावर प्रसंग गुदरला आहे. ’ ४ योग; संबंध; दळण-वळण, व्यवहार ‘ तुमचा आमचा नेहमीं घेण्यादेण्याचा प्रसंग आहे. ’ ५ नित्य, वारंवार दिसणारी, घडणारी गोष्ट; नित्य आढ-ळून येणें, नित्य संबंध, गाठ. ‘ कोंकणांत भाताशीं प्रसंग, देशांत भाकरीशीं प्रसंग ’ ६ ( वादविवाद, चर्चा इ० साठीं ) सभा; जमाव; एकत्र जमणें. ‘ काल पंडित मिळाले होते आणि एकादशीविषयीं मोठा प्रसंग झाला ’ ७ (भाषण, पुस्तक इ० चा) विभाग; प्रकरण; अध्याय ‘वर्गे ऋचा श्रुति स्मृति। अधे स्वर्ग स्तबक जाती। प्रसंग मार्ने समास पोथी। बहुधा नामें।’ –दा १२ ५ ४. ८ चर्चेचा विषय. ९ ( ल ) लाभ, प्राप्ति. ‘ कां वार्षिये आणिजे मेघु। मेघें वृष्टिप्र-सगु।’ –ज्ञा १८ ३५५. १० कथा; गोष्ट ‘बरें ऐसा प्रसंग जाला। जाला तो होऊन गेला।’ –दा १४ ८.१. ११ भाषणाचा ओघ ‘ म्हणोनि आम्हीं हा प्रसंगु। आदरिला।’ –विपू १.८७. १२ (ल) भेद; प्रकार. ‘ स्थूळाचें मूळ तें लिंग। लिंगामध्यें हे प्रसंग।’ –दा १६.७ ३५ १३ (ल.) फलप्राप्ति. ‘ याकारणें ज्ञानमार्गे। कळाया धरावा सत्संग। सत्संगेंविण प्रसंग। बोलोंचि नये।’ –दा ४ ४.२१ १४ सुरतसुख, मैथुन; संयोग ‘ ओठ कांहो सुकले गोपी-मानस राजीवभृंगा । प्रवर्तला कांहीं म्हणा तुम्ही रात्रीं स्त्रीच्या प्रसंगा।’ –होला १४ १५ युद्ध, सामना. ‘ भीष्मद्रोण निमाले येउनि पडला प्रसंग कर्णाशीं।’ –स्फुट आर्या [ सं. ] ( वाप्र ) **०घडणें**–संग, संयोग घडणें; संभोग होणें; सुरतसुख भोगणें. **०थाटणें**–चांगल्या तऱ्हेनें पार पाडणें ‘न ये गातां नीट अर्थान्वय सांगूं। थाटूनि प्रसंगु भरू रंग।’ –दावि २७३. **०मारून नेणें–काढणें–संपादणें–शेवटास लावणें**–वेळ मारून नेणें; संकटांतून किंवा अडचणींतून यशस्वी तऱ्हेनें पार पडणें. **प्रसंगास येणें**–अगदीं निकडीच्या वेळीं येणें; अगदीं जरूरीच्या किंवा योग्य वेळीं येणें; ऐनप्रसंगीं येणें **प्रसंगीं असणें–राहणें–वागणें–चालणें–निभणें**–वेळेवर हजर असणें. सामाशब्द–**प्रसंगता–तः**–क्रिवि. ओघानें, प्रसंगानुसार ‘ जी व्यापकपण बोलतां। निरुपाधिक जें आतां। स्वरूप प्रसंगता। वोलिले देवो।’ –ज्ञा १५.४४६. [ सं प्रसंगत. ] **०मान**–न. प्रसंगास उचित असें कार्य, गोष्ट; योग्य वेळ ‘ विद्या उदंडचि सिकला। प्रसंगमान चुकतचि गेला। तरी मग तये विद्येला। कोण पुसे।’ –दा १२.२ ३०. **०वशात्–वशें**–क्रिवि १ वेळेनुसार, प्रसंगानुसार, कारणपरत्वें, कर्मधर्मसंयोगानें. ‘अजाण जाणिजे कैसें। ऐसें म्हणिमी प्रसंगवशें।’ २ कदाचित् –शर **०विशेषीं**–क्रिवि कारणपरत्वें: कांहीं विशिष्ट समयीं **०संगति**–स्त्री. प्रस्तुत विषयाच्या निरूपणाच्या ओघानें आलेला दुसऱ्या विषयाचा संबंध ‘ ब्रह्मज्ञानाचे प्रकरणीं विषयाचें विवरण प्रसंगसंगतीनें केलें पाहिजे ’ **०साधणारा**–वि संधीचा उपयोग करून घेण्यांत हुषार, वेळेचा उपयोग करणारा **०सिद्धि**–स्त्री एखादें कार्य करीत असतां दुसरें कार्य सहजासहजीं केलें जाणें किंवा घडून येणें **०ज्ञान**–न १ प्रसंगानें प्राप्त होणारें ज्ञान; प्रसं-गोपात्त येणारें ज्ञान २ समयसूचकता; हजरजबाबीपणा. **०ज्ञानी**–वि १ वेळ, प्रसंग जाणणारा, प्रसंगाचें महत्त्व ओळखणारा. २ सम-यसूचक; हजरजबाबी **प्रसंगागत**–वि प्रसंगाला, वेळेला साजेल अशा वेळीं आलेला, येऊन पोहोंचलेला, घडलेला. [प्रसंग+आगत] **प्रसंगानुरूप**–क्रिवि. प्रसंगाला साजेल, योग्य दिसेल असा; प्रसंगानुसार; वेळेनुसार **प्रसंगावधान**–न संकटसमयीं भांबावून न जाणें; योग्य वेळीं युक्ति सुचणें. ‘ प्रत्यक्ष प्रसंगच प्रसंगावधान शिकवीत असतो ’ –शिवपावित्र्य नाटक ८८ [ सं. ] **प्रसंगोपात–त्त**–क्रिवि योग्य वेळीं; प्रसंगाच्या ओघात; यथाकाळीं; प्रसंगानुसार; प्रसंगाच्या अनुरोधानें. ‘ तुम्ही मुजरत गोष्ट काढूं नका प्रसंगोपात निघाल्यास बोला. ’ [ प्रसंग+उपात्त ]

**प्रसज्यप्रतिषेध**—पु ( पंडिती ) सदृश किंवा भिन्न गोष्टीची आज्ञा, परवानगी न देता विशिष्ट गोष्टीचा केलेला निषेध. याच्या उलट पर्युदास. [ सं. ]

**प्रसन्न**—वि. १ संतुष्ट; समाधानयुक्त; अनुकूल प्रवृत्ति असलेला; प्रसादित; आराधित. 'किं कुलांगना लक्ष्मी प्रसन्न।'—दावि ४५४ २ आनंदी; आल्हादित; प्रफुल्लित ३ आनंददायक; संतोष देणारें; अनुकूल. ४ स्वच्छ; शुद्ध, साफ; चकचकीत, निरभ्र; धुकें, धूळ इ० रहित (आकाश). ५ शांत, निर्मळ; झुळझुळ वाहणारा (प्रवाह, ओढा) [सं] ०**चित्त**-वि. संतुष्ट; आनंदित मनाचा; आनंदी ०**मुख-वदन**-वि आनंदित व समाधानयुक्त चेहऱ्याचा ०**मुखराग**-पु (नृत्य) हास्य, शृंगार व अद्‌भुत रसाचे प्रसंगीं चेहऱ्यावर दाखविलें जाणारें तेज **प्रसन्नार्थत्व**-न. अर्थाचें सुलभत्व: सहजार्थत्व. 'या दोहोंत शृंगाराचा विषय आहे पण आमच्या पंडितास शब्दाचें प्रसन्नार्थत्व व एकार्थत्व कधींहि सहन होत नसतात'—नि २७

**प्रसभ**—पु बल; तेज; सामर्थ्य. 'म्हणौनि तुमचां कृपाआशीर्वादीं। विश्व कीर्ती आभुतें वंदी। जैसे याज्ञिका अधिकार सुरपदीं। प्रसभवन्हिप्रसादें।'—कृमुरा ७२.५२ [सं]

**प्रसर**—पु १ विस्तार; प्रसार; फैलाव; वाढ, वृद्धि. 'तैसा स्वरूपाचिया प्रसरा--। लागीं प्राणेंद्रियशरीरा।'—ज्ञा १६.१०८. २ पसारा, पदार्थ अस्ताव्यस्त पडणें; विसकटणें; पसरणें. ३ प्राप्ति. —मनको. -हंको [सं.]

**प्रसरण**—न १ विस्तार; फैलाव; प्रसार; वृद्धि. २ पसरणें; विखुरणें, विसकटणें; पसारा. ३ उष्णतेचा पदार्थाशीं संबंध झाला असता त्याच्या ठिकाणी जो फुगण्याचा धर्म उत्पन्न होतो तो. (इ) एक्स्पॅन्शन [सं] ०**गुणक**-पु पदार्थ किती प्रसरण पावतो हे दर्शविणारा अपूर्णांक (इ) कोइफिशंट ऑफ एक्स्पॅन्शन्. ०**योग्यता-शीलत्व**-स्त्रीन ठोकलें असता फुटल्यावाचून पसरण्याची किंवा वाढण्याची (धातूची) योग्यता; घनवर्धनीयत्व. (इं) मॅलिॲबिलिटी. **प्रसरणें**-अक्रि. पसरणें; फैलावणें; विस्तार, वृद्धि पावणें; विखुरणें (शब्दशः व ल.). [प्रसरण]

**प्रसर्पित(करण)**—न (नृत्य) उजवा हात रेचित करून, डावा हात लताख्य करणें व पायाचे तळवे जमिनीवर सरपटत पाय पुढें पुढें नेणें.

**प्रसव**—पु. १ बाळंत होणें; प्रसूति. 'आसन्नप्रसव गरोदर। स्वयें सुकुमार पुसों लाजे।'—एभा १.३५५. २ जन्म; उत्पत्ति. ३ अपत्य; संतान [सं.] **प्रसव(वि)णें**-उक्रि. १ जन्माला येणें; जन्मणें. २ जन्म देणें; प्रसूत होणें; बाळंत होणें. ३ (ल.) उत्पन्न होणें, करणें. 'बीज शाखातें प्रसवे।'—ज्ञा ९.२९२. ४ (काव्य) कांहीं एक गोष्ट अभिव्यक्त होणें किंवा करणें. [प्रसव] ०**काल**-पु. बाळंत होण्याचा समय; प्रसूतिसमय ०**धर्मिणी**-स्त्री. (ल.) प्रकृति; माया. 'आणि हिच्यापासूनच सर्व पदार्थ प्रसव पावतात किंवा उत्पन्न होतात म्हणून प्रसवधर्मिणी, हीं न.वें प्रकृतीस देत असतात.'—गीर १५८ ०**वेदना**-स्त्री बाळंतपणाच्या वेळीं स्त्रीस येणाऱ्या वेणा. **प्रसवती**-स्त्री जन्म देणारी; आई; माता. 'देखा बालकाचिया धणी धाइजे। का शिष्याचेनि जाइलेपणें होइजे। हे सद्गुरुचि एकलेनि जाणिजे। कां प्रसवतिया।'—ज्ञा ८.५५. —वि. उत्पन्न होणारी, करणारी; प्रसविणारी 'तेव्हां गुणप्रसवती माया। शोधितसत्वें आणिली लया।'—एभा १० ३५५ [प्रसव]

**प्रसाद**—पु १ कृपा; अनुग्रह 'जीचा प्रसाद देतो वाचस्पतिची जडासही पदवी।'—मोआदि १.४ २ कृपा म्हणून देव, गुरु, साधु इ० कडून मिळालेली फळें, फुलें, तांदूळ इ० रूप वस्तु. ३ देवास अर्पिलेल्या अन्नाचा उरलेला (भक्तांस वांटावयाचा) भाग. 'सत्यनारायणाचा तीर्थप्रसाद घेऊन घरीं जा' ४ पुराण, कीर्तन इ०च्या समाप्तीनंतर वाटतात ती मिठाई, फळें इ०. ५ देवाला शुभाशुभ विचारतांना-कौल लावतांना-देवाच्या मूर्तीला चिटकवितात तीं फुलें, तांदूळ इ० रूप वस्तु, कौल. ६ स्वच्छपणा; निर्मलता; चकचकीतपणा. ७ (ल) मानसिक पावित्र्य ८ (साहित्य) सरळ रचनेचा गुण; स्पष्टार्थता; सुबोधता. 'या गुणास संस्कृतांतील साहित्यग्रंथांत प्रसाद असें पारिभाषिक नांव आहे.'—नि १३८. ९ देणगी; बक्षीस दिलेली वस्तु. 'प्रसादकंठीं प्रभु सेवकांहीं। घ्यावा नसे भूषण अन्य कांहीं।' १० प्रसन्नता. ११ साक्षात्कार. [सं]

**म्ह**० १ गुरविणीचीं शितें प्रसादावारीं गेलीं. २ प्रसादोपि भयंकरः =दुष्ट लोकाची कृपादेखील भीति उत्पन्न करणारी असते. ०**मिरविणें**-लोकांत कीर्ति होईल अशी कृपा करणें. 'मिरवा प्रसाद लोकीं जिरवा मनिं रोष मज इला निरवा।'—मोआदि ११.५८. ०**पाकळी**-स्त्री (गो) देवाचा कौल **प्रसादन**-न. स्तुति वगैरे करून खुष करणें; आराधना; अनुकूल करणें; संतुष्ट करणें. [सं.] **प्रसादि(दी)क**-वि (अप) प्रासादिक पहा. 'देवाचेन प्रसन्नपणें। जें जें घडे बोलणें। ते ते अत्यंत श्लाघ्यवाणें। या नाव प्रसादिक।' —दा १४ ३.६. [सं. प्रासादिक] **प्रसादित**-वि. खुष केलेला; संतुष्ट केलेला; आराधित. [सं.] **प्रसादी**-वि. देव, साधु इ०कडून भक्तास आशीर्वाद म्हणून मिळालेलें (फळ, फूल इ०). [प्रसाद] ०**भक्त**-पु केवळ प्रसाद मिळावा म्हणून बनलेला भक्त.

**प्रसाध(धि)क**—पु. १ पोषाख चढविणारा. 'खाशास कपडे घालण्याचें काम प्रसाधिकाकडून होत असतें.'—ऐरापुप्र ११ ५६८. २ शागीर्द 'मुख्य प्रसाधक यांनीं भोजनाचा प्रसंग लक्षात घेऊन ...'—ऐरापुप्र २.३०५. [सं.]

**प्रसाधनगृह**—न पोषाखघर; कपडे करावयाची जागा. 'महाराणीसाहेब यांच्या प्रसाधनगृहांत स्वारीच्या वेळीं शोभेल असा ... पोषाख.'—ऐरापुप्र ११.५६८. [सं.]

**प्रसार**—पु. १ पसरणें; विस्तारणें; फैलावणें; विखुरणें. २ विस्तार; पसारा; वृद्धि; वाढ; विस्कटलेली किंवा पसरलेली स्थिति.

[ सं. ] **प्रसारण**-न. १ पसरणें; विस्तारणें; विखुरणें. २ ( पिशाच-बाधा ) घालविणें; नाहींशी करणें [ सं. ]

**प्रसारणें**—सक्रि. पसरणें; विखुरणें; दूरवर पसरणें; विसकटणें. **प्रसारता**-स्त्री. (संगीत) गातांना हातपाय पसरणें. **प्रसारिणी**-स्त्री. १ (संगीत) अकराव्या श्रुतीचें नांव **प्रसारित**-वि. पसरलेलें; विस्कटलेलें; विस्तारलेलें; विखुरलेलें. २ काढून टाकलेलें; घालविलेलें; नाहींसें केलेलें ( भूत, पिशाच्च इ० ). [ सं ] **०बाहु**-पु. (नृत्य) अंचितबाहु छातीसमोरच तिर्यक् होणार नाहीं असा पसरणें. **०पार्श्व**-न. ( नृत्य. ) नृत्यामध्यें दोन्हीं पायाच्या चवड्यावर उभें राहिलें असतां कमरेपासून खाद्यापर्यंतचा भाग उंच होतो ती स्थिति. हर्षातिशय दाखविण्याच्या वेळीं हा अभिनय करितात.

**प्रसिध्द**—वि. १ सर्वांस ठाऊक असलेला; विख्यात, जाहीर; सार्वजनिक; रूढ. २ स्पष्ट, उघड, स्वच्छ ३ अस्तित्वांत असलेला; वर्तमान 'शशविषाण, वन्ध्यापुत्र इ० पदार्थ असिद्ध, इतर सर्व प्रसिद्ध' -क्रिवि उघडपणें; सार्वजनिकपणें; डोळ्यांदेखत 'ही बायको प्रसिद्ध व्यभिचार करूं लागली.' [ स. ] **लोकप्रसिध्द रूढीप्रसिध्द**-वि. लोकांत प्रसिद्ध असलेलें; लोकप्रिय. **शास्त्र-प्रसिध्द**-वि. शास्त्रात नित्य आढळणारी; शास्त्रमान्य. याप्रमाणेंच ग्रंथ-देश-विश्वप्रसिद्ध. **प्रसिध्दि-ध्दी**-स्त्री. १ ख्याति; कीर्ति; प्रसिद्धपणा. २ व्याप्ति; रूढि; वहिवाट; प्रचार; परिपाठ [ सं. प्रसिद्धि ] **०पत्र**-न. कोणतीहि गोष्ट प्रसिद्धीस आणणारें पत्र; जाहीरनामा; जाहीर खबर; जाहिरात

**प्रसुप्त**—वि गाढ झोपीं गेलेला; निद्रिस्त. [ सं. ]

**प्रसू**—स्त्री प्रसूत होणारी स्त्री. -हंको [ सं. ] **प्रसूत**-वि. १ बाळंत झालेली, प्रसवलेली. २ जन्मलेलें; उत्पन्न झालेलें [सं.]

**प्रसूति-ती**—स्त्री. १ बाळंत होणें; प्रसवणें. २ जन्म; उत्पत्ति; उत्पन्न होणें; प्रसव; उद्भव.' तेवीं शरीरीं जीवाची प्रसुती। अव्यक्त व्यक्तीं प्रवेशे।' -एभा १२ २९५. [ सं. ] **०वायु**-पु. प्रसुति-काळ येऊन ठेपला असतां गर्भ बाहेर पडण्यास कारणीभूत असा पोटांत उत्पन्न होणारा वायु. **०वैराग्य**-न. १बाळंतपणाच्या वेदनां मुळें त्या वेळेपुरती स्त्रीस आलेली विरक्ति. २ यावरून (ल.) अल्प-काळ टिकणारें वैराग्य. **०व्यथा**-स्त्री. बाळंतपणाच्या वेळची वेदना; वेणा; प्रसूतिवेदना **प्रसूतिका**-स्त्री १ नुकतीच प्रसूत झालेली स्त्री; बाळंतीण. २ जिला एकच मुलगा आहे अशी स्त्री [सं.]

**प्रसृत**—वि. पसरलेलें; विसकटलेलें [ सं. ] **प्रसृत(पुट)**-न. (नृत्य) नृत्यात खालच्या वरच्या पापण्या फार दूर नसून थोड्या पसरणें. विस्मय, हर्ष व वीररसद्योतक हा अभिनय आहे. [ सं ]

**प्रसृति**—स्त्री. हाताचा पसा. [ सं ]

**प्रस्त**—न. प्रस्थ पहा. 'प्रपंचप्रस्तीं जाऊं नये।' -दा १४. १.५२.

**प्रस्ताइ**—क्रिवि. बहुतेक; म्हणून. -ख्रिपु.

**प्रस्ताय**—स्त्री. ( कों. गो. ) लचांड; भानगड; शुक्रकाष्ठ.

**प्रस्तार**—पु. १ ( विरू. ) प्रसार; पसरणें; विस्तार, फैलाव २ ( गणित ) एकीकरण. ३ ( संगीत ) मात्रांचे भेद चिन्हांनीं लिहून दाखविणें व गणितपाशाच्या रीतीनें तालाच्या अनेक प्रका-रच्या रचना करून सर्व प्रकार काढणें [ सं ]

**प्रस्ताव**—पु. १ विषयाची व्याप्ति; कथन; उल्लेख; वर्णन, निरूपण. २ प्रसंग; अवसर; योग्य काळ. ( क्रि० चालणें; होणें; असणें ). ' केवढा माझा उवावो। करितां कोण प्रस्तावो। केलि-याही आवो। काय येथ।' -ज्ञा १८.६२२. ३ आरंभ; उपक्रम, सुरवात. ' तरी आद्यसारिखा प्रस्तावो। करीन पहा हो कथेचा।' -एभा १.१८०. ४ (हिं) ठराव. 'पाचवे अधिवेशनमें सन १९१३ में यह प्रस्ताव स्वीकृत हुआ' -के २५ १०.३५. ५ प्रस्तावना ( ग्रंथ, भाषण, कथा इ०ची ) ६ गोष्टः प्रसंग ' असो आता हा प्रस्तावो। आधीं अज्ञानाचा धाडोळा घेवों।' -अमृ ७ ७. ७ पसारा. ' पिंडब्रह्मांडात्मक प्रस्ताव। तुमचेनि जी सद्गुरु।' -स्वादि १३.४.५ ८ सिद्ध करण्याचा आधार [सं.] **०करणें**-( व ) दिलगिरी, खेद व्यक्त करणें.

**प्रस्तावणें**—अक्रि. १ पश्चात्ताप पावणें; ( विरू. ) पस्ता-वणें. ' चित्तीं प्रस्तावला वैष्णव तुका।' ' आळशी तेचि साक्षपीं होती। पापी तेचि प्रस्तावती।' -दा १.१०३३. २ उपक्रम करणें, सांगण्यास आरंभ करणें; सुरवात करणें ' हा फळहीवरी उपावो। का पा प्रस्तावीतसे देवो।' -ज्ञा १८ १२२९. [प्रस्ताव]

**प्रस्तावन, प्रस्तावना**—नस्त्री. १ नाटकाच्या आरंभीं सूत्रधार आणि एखादें पात्र यांचें संभाषण; पूर्वसूचना. २ ग्रंथ, भाषण, कथा इ०च्या आरंभीं केलेलें विषयाचें दिग्दर्शन, उपोद्घात ३ आरंभ. [ सं. ]

**प्रस्तावा-वा**—पु. पश्चात्ताप; घडलेल्या गोष्टीबद्दल दुःख, खेद; पस्तावा. ' पुढें वृद्धीस तत्वता। गर्भी प्रस्तावा होता।' -दा ३.५.५४. ' हरुषकाळीं विषमकाळीं। पर्वकाळीं प्रस्ता वकाळीं।' -दा ४.३.५. ' केल्या कर्मांचा प्रस्तावो। ज्याच्या हृदयीं नुपजे पहा हो।' -मुआदि ७.१२१. [ सं. पश्चात्ताप; हिं. पछतावा; म पस्तावा ]

**प्रस्ताविणें**—सक्रि. ( काव्य ) कथा, भाषण, विषय इ०स सुरवात करणें, आरंभ करणें. [ प्रस्तावन ]

**प्रस्ताविणें**—अक्रि. पश्चात्ताप होणें ( एखाद्या वाईट कृत्या-बद्दल ) अत्यंत खेद होणें; पस्तावणें [ पस्तावा ]

**प्रस्तु**—पु प्रस्थ; स्तोम -शर.

**प्रस्तुत**—न. व्याख्यान, बोलणें, चर्चा इ०चा विषय. ' तरी तेतुलेही सिद्धांत। इये शास्त्रीं प्रस्तुत।' -ज्ञा १८.१२४१. [ सं. ]

**प्रस्तुत**—वि. १ तयार; सिद्ध; घडलेलें; वाट पहात असलेलें; चालू २ विवादासाठीं, चर्चेसाठीं घेतलेला; वर्णिलेला (विषय). [सं]

**प्रस्तुत**—क्रिवि. तूर्त; आता, सध्या, हल्लीं. 'परी मागील असो देवा। आतां प्रस्तुतीं उकलु देखावा।' –ज्ञा ५६. [सं]

**प्रस्थ-स्त**—न. १ लग्न, मुंज इ० प्रसंगीं दिलेलें ब्राह्मणभोजन. २ (कोणी थोर मनुष्य प्रवासास जाण्यास निघतांना किंवा लग्न कार्याच्या वेळीं होणारी) गडबड; गोंधळ; घाई. ३ विद्या, संपत्ति, वक्तृत्व इ० गोष्टीमुळें असामान्य असा माणूस. ४ (ल.) ढोंग; स्तोम. ५ (ल.) धेंड; प्रकरण. ६ खटलें; घरदार; जमीनजुमला. 'प्रपंचप्रस्तीं जाऊं नये।' –दा १४.१.५२ ७ आसन; स्थान. 'माझें प्रस्थ खरोखरच डळमळायला लागून मी भांबावून गेलों.' –नाकु ३.३. ८ धान्य मोजण्याचें एक माप; (६४ तोळयांचा) एक शेर, कोठें १ पायली तर कोठें १ अधोली. 'गजरथ हय एक एक। गोसहस्र याच्या पृथक। रत्नें प्रस्थभार एक एक कनक। ऐसी दक्षिणा प्रारंभीं।' –जै १९१ [सं] **०करून ठेवणें–माजविणें–वाढविणें**–दुसऱ्यावर छाप बसेल असा भपका करणें; नसतें महत्त्व माजविणें; अतोनात तारीफ करणें.

**प्रस्थान**—न. १ जाणे, निघणें; गमन; प्रयाण. 'प्रस्थान केलें तत्क्षणीं।' –रंयोवा १.२२९. २ प्रवासास निघण्याचे वेळीं शुभ मुहूर्त नसल्यास तत्पूर्वी एखाद्या शुभवेळीं शेजाऱ्याच्या घरीं राहून नंतर प्रवासास निघणें ३ प्रवासास निघावयाचें असेल तो दिवस अशुभ असल्यास त्यापूर्वी शुभदिवशीं तांदूळ, पैसा, हळकुंड इ० पदार्थांची पुरचुंडी करून ती दुसऱ्याच्या घरीं ठेवतात ती प्रवासास जातांना ही पुरचुंडी बरोबर घेतात. 'जरा मृत्यूचें प्रस्थान। धवलचामरेंसि आलें जाण। मागुनि यावया आपण। वेळा निरीक्षण करितसे।' –एभा ९.२६५. ४ प्रवासास निघणें. ५ आगमनाचें चिन्ह, ठाणें. 'निद्रालस्याचें नये प्रस्थान। तैसें करावें प्राणधारण।' –एभा १८.२४८. ६ (ल.) मरणें. (क्रि० गुंडाळणें; अटपणें; बांधणें; नदीवर चालणें). ७ (देवपूजेचीं उपकरणीं, दुकानांतील वस्तु, धंद्याचीं हत्यारें, लेखनाचें साहित्य इ० वस्तु) पसरलेल्या असणें; मांडलेल्या असणें. ८ ईश्वरप्राप्तीचे निरनिराळे मार्ग, पद्धती (योग, सांख्य, वेदांत इ०). ९ कोणत्याहि प्रकारचा मोठेपणा व प्रमुखपणा असलेला मनुष्य; अत्यंत पराक्रमी वीर; विद्वान् मनुष्य; मोहरा; धेंड, प्रकरण; प्रस्थ १० उच्चाटन. [सं.] **०करणें**–निघून जाणें. **०ठेवणें**–१ उतरणें; बिऱ्हाड ठेवणें. २ निघून जाण्याची तयारी करणें **०चालणें**–मरणें **०त्रय-त्रयी**–नस्त्री. उपनिषदें, वेदांत (ब्रह्म) सूत्रें व भगवद्गीता- हे तीन ग्रंथ. **प्रस्थानी वऱ्हाडी**–पुअव. लग्नाच्या मिरवणुकींतील वरपक्षाकडील लोक

**प्रस्थापन**—न १ स्थापना; कायम करणें; घट्ट बसविणें; खिळविणें. २ पाठविणें. [सं.] **प्रस्थापना**–स्त्री स्थापना. [सं.] **प्रस्थापित**–वि. १ घट्ट; पक्कें; कायम केलेलें; स्थापित; स्थापिलेलें. २ पाठविलेला. [सं.]

**प्रस्थित**—वि. प्रवासाला जावयास निघालेला; जाण्यासाठीं प्रस्थान केलेला. [सं.]

**प्रस्फुट, प्रस्फुटित**—वि. १ फुललेलें; उमललेलें; प्रफुल्लित; विकसित. २ (ल.) पसरलेलें; पुष्कळ लोकांस माहीत झालेलें, जाहीर झालेलें. ३ स्पष्ट, सरळ झालेलें; उघड झालेलें. [सं.]

**प्रस्र(स्रा)व**—पु १ पाझर; प्रवाह; धार. २ मूत्र [सं]

**प्रहजळणें**—अक्रि. (सर्पानें) रागानें फूत्कार करणें; फुसफुसणें. 'द्वारांशीं भुजंग प्रहजळे अंगीं। जीव त्या प्रसंगीं केवीं राहे।' –ब ६२. [सं. प्रज्वल्]

**प्रहर**—पु. सबंध दिवसाचा आठवा भाग; तीन तास [सं.] **०दिवस येणें**–(ल) पापाचा घडा भरणें. 'होळकरी जुलमी वेड प्रहर दिवस येईपर्यंत जाणार नाहीं.' –विक्षिप्त ३.१५९.

**प्रहरविणें**—सक्रि पिटणें; हांकणें 'मग रथु प्रहरविला। सारथिआं करवी।' –शिशु ९७८. [सं. प्रहार]

**प्रहर्षण**—पु (साहित्य) एक अर्थालंकार. जेथें यत्न केल्यावांचून कार्य सिद्ध होणें किंवा इच्छितार्थापेक्षां अधिक अर्थाचा लाभ होणें इत्यादिक वर्णन केलें असतें तेथें हा अलंकार होतो. उदा० १ क्षुधार्थ फिरता मार्गीं। राजा बोलवि त्या गृहीं। इच्छाभोजन दे त्याला। विप्र संतुष्ट जाहला।' २ 'पंडु म्हणे एक तरीहि दारक। होवो मला जो नरकासि तारक। त्या जाहले पांच सुत प्रहर्षण। यन्नाममात्रें दुरिताघमर्षण।' [सं.]

**प्रहर्षिणी**—स्त्री. एक वृत्त याच्या चरणात १३ अक्षरें आणि म, न, ज, र, ग हे गण असतात. उदा० 'अंगानें सरल तसाच तो मनानें। कालानें चल न तसाच तो धनानें। विद्येनें सरस तसाच तो मतीनें। उक्तीनें चतुर तसाच तो कृतीनें।' [सं.]

**प्रहसन**—न. १ एक हास्यरसप्रधान रूपक; फार्स. याच्या संविधानकांत व्याजोक्ति व एखाद्या गोष्टीचा उपहास केलेला असतो. २ मोठा हंसा. [सं.]

**प्रहात**—पु. सोंड. 'आसुडी गजाचे प्रहात। पायें देउनी उपडी दांत।' –उषा १५८३.

**प्रहार**—पु. १ मारणें; ताडन २ आघात, तडाखा; रट्टा. ३ कठोर शब्दांनीं मारलेला टोमणा. 'दंडप्रहार सोसवेल पण शब्दांचा प्रहार सोसवत नाहीं.' [सं.] **प्रहारणें**–सक्रि. १ (काव्य) मारणें; ठोकणें; घाव घालणें २ (हत्यार) चालविणें 'यमदंड प्रहारावा जों ते वेळां।'

**प्रहास**—पु १ मोठा हंसा. २ रंगेलपणा; चैनबाजी. ३ उपहास; थट्टामस्करी. [सं.]

**प्रहुड**—वि. मोठा; प्रौढ. 'प्रहुड प्रतापी व्हावा शिष्य।' –दावि ३५३. [सं. प्रौढ] **०ता**–स्त्री प्रौढि; कीर्ति; महत्त्व. 'संकीर्तनाची प्रहुडता ऐमी।' –दावि ३१७.

**प्रहेणक**—न वायन; वाण; पाहुणकी; सासुरवाडीहून जांवयास आलेला खाऊ

**प्रहेलिका**—स्त्री उखाणा; कोडें; कूटप्रश्न. [सं.]

**प्रह्वाण**—न. (महानु.) तारू; नाव. 'वेसन–सागरिंचें प्रह्वाण बुडालें। पाडवांचें।' –भाए ११५. [सं. प्रवाहन]

**प्रळपन**—न बोलणें; प्रलपन 'ऐसें बोलोनि वचन। पुढें करी प्रळपन।' –गीता १.५७१ [सं. प्रलपन]

**प्रळय–यो, प्रळयकाळ, प्रळयवीज, प्रळयसौदामिनी**—प्रलय इ० पहा. [सं. प्रलय] **०अग्नि, प्रळयाग्न**–पु. १ प्रलयकाळचा अग्नि. २ यावरून फार मोठा, भयंकर व संहार करणारा अग्नि. 'परम तेजस्वी प्रळयाग्न। पुंजाळ लक्ष विजांचा।' [सं. प्रलय+अग्नि] **०चपला–ळा**–स्त्री १ प्रलयकालची वीज. २ (ल) यावरून कोणतीहि मोठी वीज 'प्रळयचपळें उमाळे उठति। तेवि दिव्य कुंडलें तळपति।' ३ (ल) प्रलयवीज पहा. याप्रमाणेंच प्रळय मेघ–वात–वृष्टि–ज्वाला–दुंदुभि इ० सामासिक शब्द काव्यांत आढळतात. **प्रळयांबु**–न. प्रलयकालचा पूर. 'जैसा प्रळयांबूचा उभडु। बुडवूनि विश्वाचा पवाडु।' –ज्ञा १६ १३८. [सं प्रलय+अंबु]

**प्रक्षाल(ळ)णें**—सक्रि (वस्त्र, भांडे इ०) धुणें. [सं. प्रक्षालन] **प्रक्षालन**–न. धुणें. 'चरण प्रक्षाळना ठेविलें अंबू।' –एरुस्व १५ १४८. [सं प्र+क्षाल्] **प्रक्षालित**–वि धुतलेलें. [सं.]

**प्रक्षिप्त**—वि. १ फेकलेला, सोडलेला; टाकलेला. २ पूर्वीच्या ग्रंथांत मागाहून घातलेला (वाक्य, श्लोक, शब्द इ०). 'दुसऱ्या सर्गांतील हा भाग प्रक्षिप्त आहे' –मसाप २.२ ११३. [सं. प्र+क्षिप्] **०आकाशीचारी**–न. (नृत्य) उजवा पाय कुंचित करून वर उचलणें व दुसऱ्या पायाच्या डाव्या बाजूस अंचित करून असा टाकणें कीं पोटऱ्यांचें स्वस्तिक होईल. [सं.]

**प्रक्षेप**—पु. १ फेकणें; टाकणें; उडविणें. २ घुसडून देणें. 'या सुवर्णांत तांब्याचा प्रक्षेप केलासा दिसतो.' ३ घुसडून दिलेला भाग. 'या सुवर्णांत जो धात्वंतर प्रक्षेप झाला आहे तो काढिला म्हणजे सोनें निर्मल होईल.' ४ -वि. प्रक्षिप्त पहा. [सं. प्र+क्षिप्] **प्रक्षेपण**–न. १ फेकणें; टाकणें. २ निश्चित करणें; ठरविणें; नक्की करणें. [सं.] **प्रक्षेपणें**–सक्रि. टाकणें; सोडणें; फेकणें; प्रक्षिप्त करणें. [प्रक्षेपण]

**प्रज्ञा**—स्त्री. १ विचारशक्ति किंवा आकलनशक्ति; ज्ञान; शहाणपण. 'अर्जुना येसणें धेंडें। प्रज्ञापमरेंसीं बुडे।' –ज्ञा १८. २८९. २ बुद्धि; अक्कल; ज्ञान. 'ऐसा हरिखशोकरहितु। जो आत्मबोधभरितु। तो जाण पां प्रज्ञायुक्तु। धनुर्धरा।' –ज्ञा २ ३००. [सं.] **०चक्षु**–पु. १ जन्मांध असलेला. २ धृतराष्ट्र 'म्हणतोमि तूं हि मीही कीं प्रज्ञाचक्षुचें सदा शिव हो।' –मोउद्योग ६.१२. –वि. जन्मांध असल्यामुळें बुद्धि हेच ज्याचे डोळे आहेत असा. [सं] **०प्रभात**–स्त्री बुद्धिरूप प्रातःकाळ. 'जयजय आचार्या। समस्त सुरवर्या। प्रज्ञाप्रभातसूर्या।' –माज्ञा (पाठभेद) १४ १ **०वान्**–वि. शहाणा; हुशार. **०वेली**–स्त्री बुद्धिरूप वेल 'माझी प्रज्ञावेली वेल्हाळ। काव्यें होय सुफळ।' –माज्ञा १४ २१. **प्रज्ञात**–वि. शहाणा; हुशार; बुद्धिवान; धूर्त, तरतरीत [सं]

**प्राक्**—क्रिवि १ पूर्वी; अगोदर; पूर्वकाळीं; पूर्वस्थलीं. २ पूर्वदिशेकडे [सं] **०तन**–वि १ अगोदरचा; पूर्वीचा· प्राचीन काळचा २ पूर्वजन्मीचें 'यापरी योगीआपण। प्राक्तनसंस्कारें जाण।' –एभा २८.४२६ **प्राक्कपाल**–न पूर्वगोलार्ध **०पश्चिम**–वि. पूर्वपश्चिम असलेलें, पसरलेलें **०संबंध**–पु पूर्वी केलेलें पापपुण्य व हल्लींचें बरेंवाईट भोक्तृत्व यामधील संबंध. **०संस्कार**–सध्याच्या जन्माला येण्यापूर्वीचे मनुष्याचे मागील जन्मीं घडलेल्या कृत्यांचे घडलेले संस्कार, परिणाम. **०स्वस्तिक**–न क्षितिजाचा पूर्वबिंदु **प्रागभाव**–पु वस्तु उत्पन्न व्हावयाच्या अगोदरचा अभाव अभाव पहा [प्राक्+अभाव] **प्राङ्मुख**–वि. १ पूर्वदिशेकडे तोंड असलेला. २ (पराङ्मुखबद्दल चुकीनें) विन्मुख. 'कीं मीं कृपिणें प्राङ्मुखें। होउनि वंचिजे तुज।' –ऋ ५०

**प्राकट्य**—न प्रसिद्धि; जाहीर होणें; प्रकटपणा; उघडकी. [सं प्रकट]

**प्राकर्णिक**—वि प्रस्तुत। चालू विषयासंबंधीं; प्रकरणविषयक. [सं]

**प्राकाम्य**—न अष्टसिद्धींपैकीं एक (ज्या ज्या सुखाची इच्छा करावी तें तें सुख अमर्याद प्राप्त होणें) अष्टमहासिद्धि पहा. [सं]

**प्राकार**—पु कुंपण; वई; तट; कोट; पोंवळी; आवार. 'तेथ त्रिवर्गाचा अणुआरु। जाइऊ निघाला जो अपारु। तो महाभारत प्राकारु। भोंवता केला।' –ज्ञा १८.३६ [सं.]

**प्राकाश्य**—न अष्टसिद्धींपैकीं एक ऐकून ठाऊक असलेल्या स्वर्गादि पारलौकिक स्थानीं, व दिसण्याजोग्या इहलोकाच्या स्थानीं भोग व दर्शनाचें सामर्थ्य येणें. [सं]

**प्राकृत**—वि. १ सामान्य; नेहमींच्या प्रचारांतला; साधा; नेहमींचा 'हासे बोले तैसा नव्हे अनंत। नये प्राकृत म्हणों यासी।' –तुगा ९४. २ प्रकृतीपासून (मायेपासून) उत्पन्न झालेलें. 'तैसे प्राकृत प्रकृतीं मिळे। कल्पक्षयीं।' –ज्ञा ९.१०४ ३ मूळचा; स्वभावसिद्ध; स्वाभाविक; नैसर्गिक; अकृत्रिम ४ निरक्षर; अशिक्षित; अडाणी; अज्ञानी 'तीए स्थानिची महिमा। केवि वर्णवे

प्राकृता आम्हां । ' –ऋ ४१. ५ क्षुल्लक; हलकें; क्षुद्र; कनिष्ठ. 'उत्तम मध्यमप्राकृतमेळ । वंरी, परी छळ करूं नेणें । '–एभा १०.२१३. ६ सामान्य मनुष्यासारखा देहधारी; शरीरयुक्त. 'तैसा मनुष्य लोकाआंतु । तो जरी जाहला प्राकृतु । ' –ज्ञा १०.७९. ७ संस्कृत भाषेपासुन झालेली किंवा संस्कार पावण्यापूर्वी स्वाभाविक जनांची भाषा; जनभाषा. ( देशी भाषा, मराठी, बालभाषा इ० ). ' साक्षरेचा बोलू केला । परी तो कडूपणा नाहीं आला । तैसा ग्रंथू प्राकृत भाषा जाहला । असे संचला स्वानंदू । ' –एभा ९ ४९३. ' ग्रंथ प्राकृत दिसतो परि न प्राकृत विलोकितां नीट । ' –मोमोष्म १२. ८०. ८ प्रकट –मनको. ९ प्रापंचिक; संसारांतील. ' पां प्राकृताही अमृतपाना । ना न म्हणवे जी । ' –माज्ञा १०.१९१. [ सं. ] ( वाप्र. ) ०बोलणें, प्राकृतावर येणें–असभ्यपणाची भाषा बोलूं लागणें; शिवीगाळीवर येणें सामाशब्द– ०तारा–पु. (नृत्य) स्वाभाविक स्थितींत असलेलें बुबुळ. ०दृष्टि–स्त्री. १ चर्मचक्षु; नेहमींची सर्वसाधारण दृष्टि. ' प्राकृत दृष्टीनें पाहिलें असतां ईश्वर दृष्टीस पडणार नाहीं. ' २ लौकिक दृष्टि; सामान्यपणें विचार करणें; सर्वसाधारण दृष्टीनें झालेली जाणीव ' जे देखिति प्राकृतदृष्टि गुरूला ते शिष्य न करावे. ' ०हेंदरें–वि. गचाळ; गबाळ; अजागळ; घाणेरडा; बावळा; गयाळ. 'तेथ येर प्राकृतहेंदरें । केविं जाणों लाहे । ' –ज्ञा ९.३८०. प्राकृतिक–वि १ प्रकृतीसंबंधीं; प्रकृतिविषयक. २ स्वाभाविक; नैसर्गिक; अकृत्रिम ३ सामान्य; साधा; प्रचारांतील; रूढींतील. ०प्रलय–पु. १ स्वाभाविकपणें, कालांतरानें होणारा सर्व विश्वाचा नाश; विध्वंस; पंचमहाभूतांचा ईश्वराचे प्रकृतींत होणारा लय, निसर्गाचा संपूर्ण नाश. [ प्राकृत= नैसर्गिक+प्रलय ] प्राकृत्या–वि. सामान्य विद्यार्थी; ज्यास संस्कृत येत नाहीं व जो मराठी ग्रंथ वाचतो तो.

**प्राक्तन**—न. दैव; नशीब; प्रारब्ध. ' जैसें देहाचें प्राक्तन । तैसें होय अशनवसन । ' –एभा ३.४९९. [ सं. ] **प्राक्तनाची गति**–स्त्री. नशिबाची गति; दैवयोग. ' प्राक्तनाची विचित्र गति । विधीनें लिहिलें उचितीं । ' **प्राक्तनाची दोरी**–स्त्री. नशिबाचा धागा. 'एवम् तूच अवघा सत्ताधारी । हलविसी प्राक्तनाची दोरी । '

**प्रागतिक**—वि. ज्याची प्रगति होत आहे असा. [ प्रगति ] **प्रागतिकपक्ष**–पु. राजकारणांत हळु हळु प्रगति व्हावी अशी खटपट करणारा पक्ष; ( ल. ) मवाळ पक्ष ' देशांतील प्रागतिक पक्ष आपल्या बाजूकडे ओढून घेण्याचा नोकरशाहीचा प्रयत्न फसला. ' –के १०.६.३०.

**प्रागल्भ्य**—न. १ प्रौढपणा; पूर्णावस्था; मोठेपणा; पूर्णता. २ शहाणपणा; समंजसपणा; चातुर्य ( वक्तृत्व, वागणूक इ० चें ). ३ हिंमत; धिटाई; धैर्य; पाणीदारपणा. ' तें प्रागल्भरूप तेजा । जिये कर्मी गुण तुजा । ' –ज्ञा १८.८६०. [ सं. ] **प्रागल्भ्यता**–स्त्री. प्रौढपणा; शहाणपण ' हें अनुभवैकवेद्य तत्त्वतां । शब्दप्रागल्भता सरेना । ' –एभा २८.२७६. [ सं. ]

**प्राघु(घू)णिक**—वि. १ अल्पकाळ टिकणारा: क्षणभंगुर; अचिर. यावरून २ ( ल ) पाहुणा. [ सं. ]

**प्राची**—स्त्री. १ पूर्वदिशा. ' सूर्यें अधिष्ठिली प्राची । जगा राणीव दे प्रकाशाची । ' –ज्ञा १५ १२. २ सरस्वतीनदीच्या पूर्व व आग्नेय दिशेकडील दिल्ली व बनारस यांमधील प्रांत. [ सं ]

**प्राचीन**—न. दैव; प्रारब्ध; पूर्वकर्म 'आणि मातलिया इंद्रियांचे वेग । कां प्राचीनें खवळले रोग । ' –ज्ञा १६.१९२. –वि. १ पूर्वदिशेकडील. २ पूर्वीचा; अगोदरचा; गतकाळचा; पुरातन; जुना [ सं ] ०दोरी, **प्राचीनाची दोरी**–स्त्री. जिचें बरेंवाईट फळ ह्या जन्मात भोगावें लागतें अशी पूर्वजन्मांतील कृत्याची मालिका; प्रारब्धकर्म. ' आपण राहोनिया दूरी । हालवी प्राचीनाची दोरी । ' –एरुस्व १२.३५ ०लिपिविद्या–स्त्री. प्राचीन लिपी ओळखण्याची विद्या. ( इं ) पॅलिऑग्रॅफी ०संस्कार–पु प्राक्संस्कार पहा **प्राचीनावीति**–स्त्री उजव्या खांद्यावर टेकलेलें व डाव्या कुशीवर लोंबणारें असें जानवें असलेली स्थिति –वि. उजव्या खांद्यावर टेकलेलें आणि डाव्या कुशीवर लोंबणारें जानवें धारण करणारा. [ प्राचीन+आवीतिन् ]

**प्राचु(चू)र्य**—न विपुलता; पुष्कळपणा; बाहुल्य: समृद्धता. [ सं प्राचुर्य ]

**प्राच्य**—वि. पूर्वदिशेचें; पूर्वदिशेसंबंधीं [ सं. ]

**प्रांजल- ळ**—वि. १ स्पष्ट; सहज कळण्यासारखा ( उच्चार, बोलणें इ० ). ' साधनमार्गे अध्यात्मनिरूपण । प्रांजळ बोलावें । ' –दा ४.२.१६. २ स्वच्छ; सुवाच्य; सुगम ( लेखन ) ३ निर्मळ; निष्पाप; निष्कपट; शुद्ध ( अंतःकरण ) ४ स्पष्ट; उघड; सचोटीचें ( भाषण ). ५ स्वच्छ; शुद्ध; गढूळ, घाण नसलेलें (पाणी, जागा). ६ प्रामाणिक; सरळ; सच्चा (माणूस इ०). 'एकें अनावरें प्रांजळें । सव्यापारें एकें निश्चळें । ' –ज्ञा ११.१२५. ७ सोपें; सुलभ; सरळ. ' जो परिणामींचा निर्वाळा । अचुंबितु ये फळा । आणि अनुष्ठिता प्रांजळा । साविया चि । ' –ज्ञा ५.७. ८ अनुकूल; स्वाधीन. 'एकत्र वर्तती खेळेंमेळें । निजप्रांजळें सख्यत्वें । ' –एभा ११.१६५. ९ ( सामा. ) स्पष्ट; शुद्ध; पवित्र. ' नाना पदपदार्थ प्रांजळें । नित्य नवे देखती डोळे । ' –एभा २.३६१ ०पण–न. स्पष्टता; शुद्धपणा. ' तथापि हल्लींच्या लेखांत एकदोन गोष्टी विलक्षण दिसल्यामुळें त्याचा आम्ही प्रांजलपणें उल्लेख केला होता. '–टि ४.१२३.

**प्राजापत्य**—न. १ एक प्रकारचें प्रायश्चित्त. २ एक विशिष्ट यज्ञ,होम. ३ पापाचें परिमार्जन व्हावें म्हणून ब्राह्मणास दिलेलें गोप्रदान. ४ ( भिक्षुकी सांकेतिक ) चार ही संख्या ( प्रजापती(ब्रह्मा)ला चार तोंडें आहेत यावरून ). –पु. विवाहाच्या आठ प्रकारांपैकीं

एक. –वि. प्रजापतीसंबंधीं. [ सं. ] ०**विवाह**–पु. विवाहाच्या आठ प्रकारांपैकीं एक. त्यांत ह्या कन्येशीं धर्माचें आचरण कर किंवा प्रजोत्पादनार्थ कन्यार्पण असें म्हणून मुलीचा बाप वरास कन्या अर्पण करितो. अष्टविवाह पहा

**प्राज्य**—वि. १ पुष्कळ. २ वृद्धिंगत झालेलें. [ सं. ]

**प्रॉटेस्टंट पंथ**—पु ख्रिस्ती धर्मसुधारणेच्या ( रेफरमेशन ) वेळीं जीं तत्त्वें प्रतिपादण्यांत आलीं त्यांना अनुसरणारे जे ख्रिस्ती धर्मपंथ ( चर्चें ) आहेत त्यांना हें सर्वसाधारण नांव आहे. [ इं. प्रॉटेस्टंट+सं. पंथ ]

**प्राड्विवाक**—पु न्यायाधीश; न्यायमंदिरांतील मुख्य अधिकारी. [ सं. ]

**प्राण**—पु १ देहांतील पांच वायु; प्राण, अपान, व्यान, उदान व समान. २ शरीरांतील पाच वायूंपैकीं पहिला; हृदयांतील वायु. 'तैसी प्राणजयें कर्मेंद्रिया । खुंट गती।' –ज्ञा १६.१८३. ३ एक बेचव, रंगहीन व वासरहित वायु. ह्याचें अस्तित्व हवेंत, पाण्यात कित्येक खनिज पदार्थांत व सेंद्रिय वस्तूंत असतें हा वायु सर्व प्राण्यांस व वनस्पतींस अत्यावश्यक आहे. –ज्ञाको (प) २५५. ( इं. ) ऑक्सिजन. ४ श्वास; फुफ्फुसांत घेतलेली किंवा सोडलेली हवा, उच्छ्वास 'प्राण म्हणजे पुढें जाणारा म्हणजे उच्छ्वास-वायु –गीर ६७८. ५ वायु, वारा ६ जीव. ७ (ल ) अत्यंत प्रिय वस्तु. 'महाराजांचा प्राण तर आपण.' –रत्न २१. अधिक लाक्षणिक अर्थांसाठीं जीव शब्द पहा. ८ ( संगीत ) तालास लागणारी आवश्यक आणि महत्त्वाची गोष्ट. हे प्राण दहा आहेत–काल, मार्ग, क्रिया, अंग, ग्रह, जाति, कला, लय, यति व प्रस्तार [ सं. ] ( वा.प्र. ) ०**असणें**–अत्यंत प्रिय असणें. 'दुर्गादेवीची तर ती खरोखर प्राणच होती.' –विवि ८.१.६. ०**उरणें**–केवळ जगणें; कसें तरी जगणें. ०**ओकणें**–१ अत्यंत दुःख करणें. २ एखाद्या गोष्टीचा अतिशय छंद असणें. ०**ओवाळून टाकणें**–सर्वस्व अर्पण करणें 'चारुदत्ता, या तुझ्या गुणावरून प्राण ओवाळून टाकावे असें वाटतें.' –मृ ४७. ०**काढून ठेवणें**–परोपरीनें विनविणें; हट्ट घेणें. 'करंजा घाल म्हणून प्राण काढून ठेविला पण नाहीं हो ऐकिलें.' –कफा ३. ०**खाणें**–अतिशय त्रास देणें; त्रासून सोडणें. 'तू ... आमचा दोघांचा प्राण खाल्लास.' –नामना ९९३ ०**जाणें**–मरणें. ०**ठेवणें**–एखाद्या गोष्टीवर अंतःकरणपूर्वक प्रेम करणें; जीव कीं प्राण असणें. ०**डोळ्यांत उतरणें**–प्राण जाण्याचा प्रसंग येऊन ठेपणें. 'तरुणाचे प्राण शेवटीं डोळ्यांत उतरण्याचा प्रसंग येतो.' –भावबंधन पृ २२ ०**देणें**–प्राणत्याग करणें; मरणें. ०**न ठेवणें**–प्राण देणें; मरणें. 'मी प्राण ठेवणार नाहीं.' ०**फुटणें**–अतिशय उत्कंठा असणें; तीव्र इच्छा होणें. 'तैसें देखावें वाटे पाहावया प्राण फुटे।' –दावि १५५. ०**वाहणें**–एखाद्यासाठीं सर्वस्व अर्पण करणें. 'प्राण वाहिला पायावरी।' ०**सोखणें**–१ तहानेनें व्याकुळ होणें; तहानेनें जीव कासावीस होणें. २ एखाद्या गोष्टीचा ध्यास, रुखरुख लागणें; एखाद्या गोष्टीची तीव्र इच्छा धरणें. ०**सोडणें**–प्राण देणें; मरणें **प्राणाचा वाली**–जीविताचा मालक; प्राणनाथ; नवरा. **प्राणापेक्षां कठीण**–मरणापेक्षांहि वाईट. **प्राणाशीं गांठ**–प्राण धोक्यांत पडणें; प्राणसंकट. ( क्रि० घालणें; पडणें; होणें ). **म्ह**० असंगाशीं संग प्राणाशीं गांठ. **प्राणाशीं जाणें**–( आकस्मिक घाला आल्यामुळें ) प्राणास मुकणें. **प्राणें उत्तीर्ण होणें**–मरणें. 'तेथ उत्तीर्ण होईल प्राणें । परी तें कमळदळ चिरूं नेणें।' –ज्ञा १.२०२ **प्राणें जाणें**–प्राण देणें. 'आतां मी जाईन प्राणें । पुत्राविण व्यर्थ जिणें।'–कथा १.४.१०१. **उघड्या डोळ्यानें प्राण न जाणें**–आपल्या डोळ्यांसमोर एखादा अन्याय होत असता स्वस्थ न बसवणें. सामाशब्द– ०**खाऊ**–वि. ( प्राण खाणारा ) प्राणावर बेतणारा; प्राण धोक्यांत येईल इतका कष्टप्रद किंवा त्रासदायक; जीवघेणा; प्राणघेणा. [ प्राण+खाणें ] ०**घात**–पु. १ ठार मारणें; प्राणहत्या; हिंसा. २ ( ल. ) नाश; विध्वंस ०**घातक–की**–वि. जीवनाचा नाश करणारा; जिवावर बेतणारा; जीव धोक्यांत आणणारा; प्राणघेणा. ०**घेणा**–वि. १ प्राण घेणारा; जीव घेणारा. २ ( ल. ) अतिशय लोचट; अतिशय कष्टप्रद ( काम, भिकारी इ० ).' असली प्राणघेणी लढाई कोठें बोलली आहे काय ?' –मि ९१३. [प्राण+घेणें] ०**घोष**–पु. ( काम बंद केले असता ) कामात होणारा मोठा आवाज. ०**जय**–पु. वायूचा निरोध. 'तैसी प्राणजयें कर्मेंद्रियां । कुंठे गति।' –मसाज्ञा १६ १८३. ०**जीवन**–न. १ जीवनाचा आधार. २ चरितार्थाचें साधन ३ पति; प्रियकर; जार. ०**तर्पण**–न प्राणांचें समाधान; भुकेची शांति. 'गुरुआज्ञा जें दीधलें अन्न । तेणें प्राणतर्पण करावें।' -एभा १७.३०८. ०**त्याग**–पु. १ प्राण सोडणें; मरणें. २ प्राण देणें; आपल्या प्राणांचें बलिदान करणें. ०**दान**–न. एखाद्याला जिवावरच्या संकटांतून सोडविणें. ०**द्यूत**–न. (ल.) भयंकर किंवा कजाखीची लढाई. ०**धर्म**–पु. भूक व तहान. –**हेको**. ०**धारण–धारणा**–नस्त्री. १ जिवंत राहणें; जगणें, 'आम्ही कंदमूल खाऊन कसें तरी प्राणधारण करितों.' २ (योग.) श्वासाचा निरोध करणें. ३ जीवन ०**नाथ–पति–प्रिय–प्यारा**–पु. पति; नवरा. 'प्राणनाथाचिया आधीं । विरहणीतें जिणेंही बाधी।' –ज्ञा १८.९२०. २ आर. ०**नाहो**–पु. नवरा; पति. 'होवोनि माझा प्राणनाहो।' –मुआदि १७.१३६. ०**पंचक**–न. प्राण, अपान, व्यान, उदान, समान यांचा समुदाय. ०**पूजा**–स्त्री. ( ल. ) जेवण; भोजन. ०**प्रतिष्ठा**–स्त्री. १ दक्षिणाचार विधीच्या प्रसंगीं मंत्रादिकांनीं माती, काष्ठ, पाषाण इत्यादिकांच्या देवतेच्या मूर्तीत

प्राणांची स्थापना करण्याचा विधि. हा चक्षुरुन्मीलन विधीबरोबर करितात. २ स्थापना. 'दक्षिणेंत शिवाजीनें मराठी राज्याची प्राणप्रतिष्ठा केली.' ०मय-वि. पंचप्राणयुक्त; सजीव. ०मय-कोश-पु. आत्म्याच्या पंचकोशांपैकीं दुसरा कोश. पंचकोश पहा. ०मित्र-पु. १ नवरा; पति; जार. २ जिवलग मित्र 'उत्तरेसि वैश्रवण। प्राणमित्र शिवाचा।' ०यात्रा-स्त्री. चरितार्थ; उपजीविका. ०याम-पु. (प्र.) प्राणायाम पहा. ०रक्षण-न. जीवितरक्षण; जगणें; प्राणधारण. ०लिंग-न. गळ्यांत असलेलें महादेवाचें लिंग. -शिपु. ०वायु-पु. पंचप्राणांपैकीं पहिला वायु; प्राण पहा. ०वियोग-पु. मरणसमयीं शरीरापासून झालेला प्राणाचा वियोग ०विसावा-पु. अत्यंत आवडता मनुष्य (पति, जार, मित्र इ०) 'प्राणविसाव्याची भेट इच्छितसें।' -रत्न ४.३. २ प्राणाचें विश्रांतिस्थान. ०संकट-पु. प्राणघातक, दारुण, संकट, बिकट परिस्थिति; जिवावरची गोष्ट. ०सखा-पु. प्राणविसावा. ०संदेह-पु. दारुण परिस्थिति; प्राण जाईल किंवा राहील अशा तऱ्हेची संशयास्पद स्थिति; प्राणांतिक संकट. ०सा-वि (प्राणाप्रमाणें) अत्यंत आवडता. [प्राण+सा=सादृश्यदर्शक प्रत्यय] ०सांडण-स्त्री. प्राणाची ओवाळणी. 'ऐसियावरून प्राणसांडण करूं।' -हावि १०७. [प्राण+सांडणें] प्राणाचा गिऱ्हाईक-पु प्राणघातक शत्रू; हाडवैरी.. प्राणांत-पु १ आयुष्याची अखेर शेवटची अवस्था; आयुष्याचा अखेरचा काल २ अत्यंत भयंकर संकट. 'लढाईंत जाणें हा केवळ प्राणांत आहे' ३ (समासांत) प्राणांत-जेवण-यातना-व्यथा-समय ४ जिवावरची गोष्ट प्राणाशीं गांठ. 'थोर प्राणांत वोढवला।' ५ आयुष्याचा किंवा प्राणाचा शेवट; मृत्यु; मरण. 'मच्छ तळमळति तुटतां जीवन। प्राणांत वोढवे त्यालागोन।' [प्राण+अंत=शेवट] प्राणांतदंड-पु देहांत-शासन; फांशीची शिक्षा. प्राणांतबुद्धि-स्त्री. धोक्याचा किंवा घातुक सल्ला. (क्रि० सांगणें; सुचविणें) प्राणांति(ती)क-न. जीविताचा शेवट; मरणकाल. -वि. घातक; भयप्रद; प्राण घेणारें; अति संकटमय (आजारीपण, संकट इ०). [प्राणांत] प्राणांतिक अवस्था-स्त्री. मरण येतें कीं काय अशी स्थिति; प्राणसंकट; जिवावरची गोष्ट प्राणात्यय-पु १ (प्र.) प्राणनाश. २ (विरू) प्राणत्याग. प्राणापदी-स्त्री. (महानु) प्राणसंकट. 'श्रीकृष्णा सांडितां प्राणापदी जाली। ते सांघों नेणिजे।' -शिशु २३१. [प्राण+आपदा] प्राणायाम-पु. (योग) भूः, भुवः इ० सात व्याहृती म्हणून उजव्या नाकपुडीनें श्वास आंत घेणें, पुनः त्या सात व्याहृती म्हणून श्वास कोंडून धरणें व पुनः त्या व्याहृती म्हणून डाव्या नाकपुडीनें श्वास बाहेर सोडणें. या तीन क्रियांस कुंभक, पूरक व रेचक असें म्हणतात; श्वासाच्या गतीचा निरोध. 'येईं प्राणायामाचेनि आडकंठें। बरीतां गा।' -ज्ञा ६.५५ (द्राविडी)प्राणायाम-पु प्राणायाम करतांना उजव्या हातानें नाकपुडी धरावयाची असते. त्यासाठीं सरळ, समोरून हात न घेतां डोक्याच्या मागच्या बाजूनें हात नेऊन तो पुढें आणून नाकपुडी धरणें. यावरून (ल.) त्रासयुक्त, आडमार्गानें केलेली कोणतीहि गोष्ट 'वेताळ पंचविशी हा ग्रंथ मूळचा संस्कृत, त्या भाषेंतून याचा तर्जुमा फारसी भाषेंत झाला, तींतून इंग्रजींत, इंग्रजींतून मराठींत केवढा द्राविडी प्राणायाम!' -नि. प्राणायामी-वि प्राणायाम करणारा 'एक अपानु प्राणीं अर्पिती। एक दोहींतेही निरुंधिती। ते प्राणायामी म्हणिपती। पंडुकुमरा॥' -ज्ञा ४.१४६. प्राणासन-न (योग) उजवी मांडी मोडून व डावा पाय जमिनीवर टेकवून बसणें. उजव्या पायाचीं बोटें डाव्या जांघेंत भरून डावा पाय डाव्या हाताच्या खांद्यावरून काढून तो पाय जमिनीवर टेकणें व हात जमिनीवर टेकणें -संयोग ३३१. [प्राण+आसन] प्राणाहुति-ती-स्त्री भोजनाच्या आरंभीं पांच प्राणांना देतात ते पांच किंवा सहा घास. 'तत्प्राण जाण हरिले निजविक्रमानें। प्राणाहुती मागत पांच अनुक्रमानें।' -आपू४०. [प्राण+आहुति] प्राणेश, प्राणेश्वर-पु. १ पति. नवरा. 'वोखटें मरणाऐसें। तेंही आलें अग्निप्रवेशें। परी प्राणेश्वरोद्देशें। न गणीची सती।' -ज्ञा १६.१८७ २ जार; उपपति; प्रियकर. ३ प्रभु; स्वामी; मालक. 'आतां मज जाणें प्राणेश्वरासवें। मी माझिया भावें अनुसरलें।' -तुगा ६८५ [प्राण+ईश, ईश्वर] प्राणेश्वरी-स्त्री १ प्रकृति. 'जो प्रियुचि प्राणेश्वरी। उलथे आवडीचिये सरोभरीं।' अमृ १.२ २ बायको. [प्राण+ईश्वरी] प्राणोत्क्रमण-न. प्राण निघून जाणें; मरण; मृत्यु. [प्राण+उत्क्रमण] प्राणोपासना-स्त्री उपासनेचा एक प्रकार. 'पुरुषविद्या, पर्यंकविद्या, प्राणोपासना इ० प्रकारची उपासना उपनिषदांत वर्णिली आहे.' -गीर २०७ [प्राण+उपासना]

प्राणतिया-स्त्री मातीचें उथळ पात्र; परत, थाळी; परळ -हंको.

प्राणन-न. जीवन. 'प्राण्यांचें प्राणन फार दिवस चालणें नाहीं' -विवि ८.१.४६.

प्राणिज-वि. प्राण्यापासून उत्पन्न झालेलें [सं. प्राणी+ज=उत्पन्न झालेलें] ०अन्न-न. प्राण्यापासून उत्पन्न झालेलें अन्न; मांसादि भक्ष्य (इं) ॲनिमल फूड. ०उष्णता-स्त्री. शारीराची उष्णता, शारीरिक उष्णता; अंगाची उष्णता. (इं) ॲनिमल हीट. ०कोटि-स्त्री. प्राणिजाति (इं.) ॲनिमल किंगडम. ०द्रव्य-पदार्थ-नपु. प्राण्यापासुन उत्पन्न झालेलें द्रव्य. (इं) ॲनिमल मॅटर. प्राणिया-पु. प्राणी. 'जें शास्त्रें वाचूनि आणिकें। प्राणिया स्वमोक्षु न देखे।' -ज्ञा १७.३५. [प्राणी]

प्राणी-पु १ कोणताहि सजीव पदार्थ; जीव. २ गाय, म्हैस, बैल, वाघ ०. ३ जखम, शे इ० मध्यें उत्पन्न होतात ते

बारीक बारीक जंतु; कृमि ४ (ल.) अद्वितीय, अलौकिक पुरुष. 'बाळाजी बाजीराव प्रधान, केवळ निधान, होते प्राणी।'–ऐपो ४१७. [सं. प्राणिन्] ०करण, **प्राणिलीकरण**–न. प्राणिल करणें; प्राणवायुयुक्त करणें. (इं.) ऑक्सिडेशन. **प्राणिकोटी**–स्त्री. प्राणिजाति; जीवसृष्टि (इं.) ॲनिमल किंग्डम. **प्राणितापढाळु**–न प्राण्यास ताप देण्यासारखें झोंकाचें बोलणें 'उरोधु वादबळु। प्राणितापढाळु। उपहासु चाळु। वर्मस्पर्शु।' –ज्ञा १३.२७०. **प्राणिद्**–न कोणतेंहि मूळद्रव्य आणि प्राण यांचा संयोग होऊन मिळालेल्या रसायनास प्राणिद म्हणतात. बहुतेक सर्व मूलद्रव्यें प्राणाशीं संयुक्त होऊन प्राणिदें होतात. –ज्ञाको (प) २५६. (इं) ऑक्साइड. **प्राणिदीकरण**–न ज्वलनासच शास्त्रीय भाषेंत प्राणिदीकरण म्हणतात. ही क्रिया बहुतेक ज्वालायुक्त व उष्णतायुक्त असते.–ज्ञाको (प) २५६. (इं) कंबश्चन. **प्राणिद्यूत**–न कोंबडे, एडके, बैल इ० च्या झुंजीवर खेळावयाचा जुगार **प्राणिपूजा**–स्त्री. प्राणिरूप ईश्वरावतार पूजेपासून तों मारलेल्या प्राण्याच्या हाडांना दिलेल्या मानापर्यंतच्या सर्व गोष्टींना प्राणिपूजा हें नाव देता येतें मनुष्याला उपयुक्त, घातुक किंवा क्रूर, मानवी आत्मे, शकुन देणारे प्राणी यांस पूज्य मानून त्यांची पूजा करण्याचा प्रघात कित्येक देशांत आहे –ज्ञाको (प) २५७. **प्राणिल**–न. शरीरास पोषक असें द्रव्य. (इं) व्हिटॅमिन. **प्राणिशास्त्र**–न. जीवशास्त्र; जीवविज्ञान; प्राण्यासंबंधाचें शास्त्र. (इं.) झुऑलॉजी. **प्राणिहिंसा**–स्त्री जिवंत प्राण्यांना ठार मारणें; जीवनाश. **प्राण्यांच्या चार जाती**–स्त्रीअव मणक्याचे प्राणी (घोडा, मनुष्य इ०), संधिमयप्राणी (खेकडा, विंचु इ०), मृदुकाय प्राणी (गोगलगाय), ताराकृती प्राणी (पोंवळ्याचा कीटक, स्पंजाचा किडा इ०).

**प्रांत**—पु. १ देशाचा मोठा विभाग; इलाखा इ० प्रदेश. देश पहा. २ भाषा, चालीरीति, हवापाणी इ० बाबतींवरून होणारा देशाचा विभाग. ३ स्थल; जागा; स्थान. ४ शेवट; अंत; अखेरची स्थिति. 'कीं रामकथेचा प्रांत। वाल्मीकमुनी जाणतसे।' –रावि ८.५ ५ कड; काठ, हद्द; सीमा; मर्यादा; शीव. 'परी तो संवचोराचा सागातु। जैसा नावेक स्वस्थु। जंव नगराचा प्रांतु। सांडिजेना।' –ज्ञा ३.२११. ६ शेवटचा, टोकाचा भाग; अग्र ७ जिल्ह्यांतले तीन चार तालुके मिळून मुलकी कामासाठीं केलेला जिल्ह्याचा पोटविभाग. ८ जिल्ह्याच्या वरील पोटविभागाचा अधिकारी; डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर. ९ मुकाम. 'प्रांतावरी नीट पाववीं नेऊनि।' –दावि ९०. १० समूह; थवा; समुदाय. 'प्रांत तेथ फिरती अबलांचे।' –आशबरी ५. ११ (ल.) नाश; अत्यंत नाश. अखेर 'यादवकुळासि आला प्रांत। हें जाणे श्रीकृष्णनाथ।' –एभा ३०.७५. १२ वेळ; समय. 'पाहाटप्रांतवरी येतां कीर्तन।' –दावि १७३. १३ भाग. 'पाहतां पाहतां प्रांतें। समाधान पावे चित्तें।' –ज्ञा ११ ५२५ १४ हस्तगत केलेला टापू; प्रदेश. 'जो आकळे गुणाआंतू। त्यासि ते गुण करिती प्रांतू।' –एभा ७.१९३. १५ परिणाम –शर [सं] ०**पहाणें**–आयुष्याचें सार्थक करण्याची सोय पहाणें. 'भ्रांत नसें जालों जों, तो मीं पाहेन आपुला प्रांत।' –मोआश्रम २.४२. ०**भाग**–पु. बाजूचा किंवा शेवटचा भाग; कड; काठ; शेवट; हद्द; सीमा. ०**भाषा**–स्त्री प्रांतिक भाषा; देशभाषा; विशिष्ट प्रांताची बोली. (इं) डायलेक्ट. ०**शिरस्ता**–पु. मुलुखशिरस्ता. ०**साहेब**–पु कलेक्टरच्या हाताखालील प्रांताचा अधिकारी. प्रांत अर्थ ८ पहा. 'श्री. कुळकर्णी यास प्रांतसाहेबानीं दोन महिन्यांची कैदेची शिक्षा दिली.' –के १४ ६.३०. ०**स्थ**–वि. प्रांतांत राहणारा; प्रांतवासी; देशवासी. ०**हीन**–वि अमर्याद; अपार; अनंत 'कीं विवेकामृतसागरु। प्रांतहीनु।' –ज्ञा २.३७४. **प्रांतिक**–वि. प्रांतातील; प्रांतासंबंधीं. [प्रांत] ०**परिषद्**–स्त्री. प्रांतातील लोकप्रतिनिधींची बैठक 'बेळगाव येथें भरलेली ... प्रांतिक परिषद सर्वतोपरी अपूर्व होती.' –टि ३.३२८. ०**सरकार**–न प्रांताची राज्यव्यवस्था पाहणारें सरकार 'शिल्केंतील पैशाचा विनियोग प्रांतिक सरकाराना देणगी देण्याकडे करितात' –के १६.४ ३०.

**प्रातः**—क्रिवि. पहाटेस; उजाडताच; सकाळीं, प्रातःकाळीं [सं. प्रातर्] ०**काल–ळ**–पु पहाट; सकाळ; प्रभातकाल, पहाटेच्या २ घटकांपासुन ६ घटकांपर्यंतचा काळ; दिवसाच्या पांच भागापैकीं पहिला भाग. पराण्ह पहा **प्रातर्भोजन**–न सकाळचें जेवण; न्याहारी. **प्रातर्विधि**–पु शौच, मुखमार्जन, स्नान इ० सकाळीं आटोपण्याच्या गोष्टी **प्रातःसंध्या**–स्त्री. त्रैवर्णिकानीं करावयाची सकाळची संध्या दुसऱ्या दोन मध्यान्हसंध्या व सायंसंध्या. ०**स्नान**–न. अगदीं सकाळीं करावयाचें स्नान ०**स्मरण**–न. पहाटेस देवाचें नांव घेणें; प्रातःकालचें हरिस्मरण **प्रातराश**–पु सकाळचा फराळ किंवा जेवण; न्याहारी. [प्रातर्+आश]

**प्रातिकूल्य**—न. प्रतिकूलपणा; विरोध; वैरभाव; जरूर अशा पदार्थांची उणीव. जसें:–द्रव्य–लोक–काल–देश–प्रातिकूल्य. [सं.]

**प्रातिभासिक**—वि. वास्तविक नसता भ्रमामुळें तसें दिसणारें; समरूपः सारखें दिसणारें. [सं.] ०**सत्ता**–स्त्री. वरवर दिसणारें अस्तित्व; वास्तविक नसुन तसें भासणारें अस्तित्व, वस्तुसत्ता पहा.

**प्रातिलोम्य**—वि प्रतिलोमपणा; विरुद्धपणा; उलटा क्रम. [सं. प्रति=विरुद्ध+लोम=केंस]

**प्रांती**—स्त्री शेवट; समाप्ति. –शर.

**प्रातीची**—स्त्री. पश्चिम दिशा. [सं. प्रतीची] **प्रातीचीन**–वि. पश्चिमदिशेकडील; पाश्चिम. [सं.]

**प्रांतु**—पु. (महानु.) मार्ग; वाट. 'जेआंचां आम्हीं नेणौं प्रांतु। अशा भणे।' –दाव ४४१. [प्रांत]

**प्रातुपाहारू**—पु. पहांटची वेळ, प्रातःकाळ 'रात्रि प्रकाळली जाला। प्रातुपाहारू।' –धवळे पूर्वार्धे ६७ [सं प्रातर्+प्रहर]

**प्रात्यायिक**—वि. १ अनुभवानें ओळखीचा किंवा माहिती असलेला. २ विश्वास ठेवणारा; भरंवसा ठेवणारा. [सं.]

**प्रात्याह्रिक**—वि. दैनिक; दररोजचें. 'आमच्या मुंबईच्या प्रात्याह्रिक पत्रांतील असल्या खटल्यांच्या बातम्या वाचाव्या.' –आगर ३ १०६ [सं]

**प्राथःकाळ**—पु (प्र) प्रातःकाळ; पहांट; सकाळ 'प्राथःकाळीं उठोनि सज्जन।' –दावि ४०१ [सं प्रातःकाल]

**प्राथमिक**—वि. पहिलें; आधींचें; सुरवातीचें. आरंभींचें [सं] ०**शिक्षण**–न. मुलाला अगदीं आरंभीं देतात तें देशी भाषेचें शिक्षण. 'हें शिक्षण ज्या अर्थी नुसत्या प्राथमिक शिक्षणानें पुरें होत नाहीं...' –केले १.७४. ०**हुकुमनामा**–पु दाव्याचा पूर्णपणें निकाल करतां येण्यापूर्वी आणखी काम चालवावयाचें असतां केलेला हुकूमनामा.

**प्राथमिका**—स्त्री. तर्जनी. हाताचें चौथें बोट; आंगठ्याजवळचें बोट. [सं.]

**प्रादक्षिण्य**—न (ब्राह्मण, देवाची मूर्ति इ०स) उजव्या बाजूनें फेरी घालणें; (विरू.) प्रदक्षिणा. [सं.]

**प्रादुर्भाव**—पु. १ दृग्गोचर होणें; दृष्टोत्पत्तीस येणें. २ अस्तित्वात येणें; उत्पन्न होणें. 'आज याचे शरीरांत ज्वराचा प्रादुर्भाव दिसतो.' ३ उत्पत्ति, जन्म ४ आरंभ; सुरवात. ५ अवतार. 'नोहे तयाच्या प्रादुर्भावो। तो साभिलाष भिल्लांचा गावो।' –ज्ञा १८.६७४ [सं.] **प्रादुर्भूत**–वि. दृग्गोचर झालेला; दृष्टोत्पत्तीस आलेला; उत्पन्न झालेला; पसरलेला. [सं.]

**प्रादेश**—पु. अंगठा व त्याजवळील बोट यांच्या टोकांतील महत्तम अंतर; हीं दोन बोटें ताणून एकमेकांपासून दूर धरलीं असतां त्यांमधील अंतर; वीत; टीच. [सं] ०**मात्र**–वि. वीतभर; टीचभर.

**प्राधान्य**—न. १ मुख्यत्व; वर्चस्व; श्रेष्ठत्व; महत्त्व. २ वैपुल्य; अधिकपणा. 'देहीं ज्या गुणाचें प्राधान्य। तैसेंचि कर्म निपजे जाण।' –एभा ११.२३९. [सं.]

**प्रापक**—वि. देणारा; पोंचविणारा; मिळवून देणारा; बहाल करणारा. [सं. प्र+आप्+क]

**प्रापंच, प्रापंची**—(अशिष्ट) प्रपंच, प्रपंची पहा.

**प्रापंचिक**—वि. १ प्रपंचविषयक; ऐहिक; सांसारिक. २ कुटुंबवत्सल; संसारी [सं.]

**प्रापण**—न. १ देणें; प्राप्तकरून देणें; पोंचविणें; नेणें. २ (रसा) उष्णतेच्या स्थलांतरांपैकीं ही एक पद्धति आहे. यांत उष्णता, उष्ण झालेल्या द्रव्याच्या परमाणूंच्या गतीनें पसरते. (इं.) कन्व्हेक्शन् –ज्ञाको १०१. [सं.]

**प्रापित**—वि. संपादित; प्राप्तकरून दिलेला; पोंचविलेला. [सं]

**प्राप्त**—वि १ मिळविलेलें; संपादन केलेलें; संपादित. २ पोहोंचलेलें; आलेलें; येऊन दाखल झालेलें. 'सूर्योदयास मी डोंगरापासीं प्राप्त झालों.' ह्या अर्थी ह्या शब्द समासांत पूर्वपदीं योजतात जसें:–प्राप्त–श्री–यौवन–राज्य–यश इ० ३ येऊन ठेपलेलें; उद्भवलेलें; भोगास आलेलें. 'मला दुःख प्राप्त झालें.' ४ जरूर; आवश्यक; भाग. 'सरकारचा हुकूम आला म्हणजे जाणें प्राप्त.' ५ पूर्ण अवस्थेला पोहोंचलेला; 'तैसी प्राप्तेंही पुरुषें। इंद्रियें लाळिलीं जरी कौतुकें।' –ज्ञा २.३५०. ६ (ल.) सिद्धि पावलेला; कृतार्थ. ७ बळकट. –स्त्रिपु [सं.] ०**कर्म**–न. अधिकारानुरूप भागास आलेलें कर्म. 'कां प्राप्तकर्म साहिजे। येतुलेनि नैष्कर्म्या होईजे।' –ज्ञा ३ ४६ ०**काल, प्राप्तावसर**–वि. समयोचित; प्रसंगोचित; कालानुरूप [प्राप्त+काल, अवसर] ०**कालवचन**–न. हजरजबाब; योग्य वेळीं दिलेलें योग्य उत्तर. ०**व्यवहार**–वि बालपण जाऊन वयांत आलेला. व्यवहारज्ञ पहा. **प्राप्तार्थ**–वि. कृतार्थ; कृतकृत्य 'देखें प्राप्तार्थ जाहले। जे निष्कामता पावले।' –ज्ञा ३.१५५. [प्राप्त+अर्थ]

**प्राप्त**—स्त्री. नफा; फायदा; मिळकत; प्राप्ति. [सं. प्राप्ति]

**प्राप्तव्य**—न. ध्येय, अंतिम हेतु; साध्य. 'स्वदेशाचें स्वातंत्र्य हें आमचें प्राप्तव्य आहे.' –टिळ्या. –वि मिळविण्यास योग्य, शक्य; मिळविण्याजोगें; संपादितव्य [सं.] **प्राप्तव्यांश, प्राप्त(व्यां)श**–पु. फायदा; नफा; मिळकत. [प्राप्तव्य+अंश]

**प्राप्ति-प्ती**—स्त्री १ मिळकत; लाभ; फायदा; नफा. 'जे साम्यापरौती जगीं। प्राप्ति नाहीं।' –ज्ञा ६.४१०. २ प्राप्तपणा; प्राप्तस्थिति, सिद्धि; सफलता. ३ येणें; उद्भवणें, प्राप्त होणें; भोगास येणें (सुख, दुःख इ०). ४ अष्टमहासिद्धीपैकीं एक; सर्व प्राण्यांच्या इंद्रियांशीं त्या त्या इंद्रियाच्या अधिष्ठात्री देवतांच्या रूपानें संबंध घडणें. 'अणिमा महिमा लघिमास्थिती। या तिन्ही देहसिद्धींची प्राप्ती। प्राप्तिरिंद्रिय जे वदंती।' –एभा १५.४३. ५ प्राज्ञा; सामर्थ्य; छाती; किंमत; बिशात; प्रतिष्ठा; लाग; पाड. 'मजबरोबर बोलायला त्याची काय प्राप्ति?' 'नाहींतरी काय प्राप्ती मानवाची। कंदर्पे हरावया।' –जै २२.३४ [सं प्राप्ति] ०**कर**–वि. प्राप्ती करून देणारा; लाभकारक. 'तंव लविमला डावा डोळा। बाहु स्फुरती वेळोवेळां। हें तंव चिन्हें गे गोपाळा। प्राप्तीकरें पैं होती।' –एरुस्व ५.७६. ०**पुरुष**–पु. ज्याला भगवत्स्वरूपाचा साक्षात्कार झाला आहे असा साधुपुरुष. ०**वरील कर**–पु कामधंद्यांच्या वर, अगर इतर मार्गानें एखाद्या इसमास अगर संस्थेस जें वार्षिक उत्पन्न येतें त्यावर सरकारकडून विशिष्ट प्रमाणांत घेण्यांत येणारा कर. **प्राप्त्यंश**–पु लभ्यांश; फायदा; मिळकत; नफा. [सं. प्राप्ति+अंश].

**प्राप्य**—वि. मिळविण्यास योग्य, लायक, शक्य; संपादनीय. —न. फळ; साध्य. 'या यज्ञक्रिया तरी आनानीं। परी प्राप्य तें एक।' —ज्ञा ४ १५०. [सं.]

**प्राबल्य**—न. प्रबलता; प्रबलपणा; सामर्थ्य; वर्चस्व; बडेजाव. [सं.]

**प्रामाणिक**—वि. १ खरा, सच्चा; इमानी; सत्यनिष्ठ, विश्वासुक (मनुष्य, व्यवहार इ०). २ सप्रमाण; आधारयुक्त. ३ जो प्रश्नाशिवाय आपल्या पदरचें भाषण करीत नाहीं तो. [सं.] ०पणा—पु खरेपणा; सच्चेपणा; सत्यनिष्ठता; विश्वासुपणा. 'जे जे धंदे प्रामाणिकपणें चालवितां येतात ते ते सारे सारख्या योग्यतेचे स्रोत' —सहचारिणी नाटक २२.

**प्रामाणिक**—शअ. प्रमाणें 'स्वल्प होते तदुल कणिक। वरकड त्या प्रामाणिक।' —गुच (पाठभेद) ३८ ११.

**प्रामाण्य**—न १ सप्रमाणता; सत्य; न्यायीपणा, वस्तुस्थितिदर्शकत्व. २ खरेपणा; सत्यता; विश्वसनीयता; प्राजलपणा. ३ आधार, पुरावा; प्रमाण [सं.] ०ग्रह—पु खरें, योग्य, न्याय्य आहे असें मानणें; मान्य करणें; प्रमाण धरणें; सप्रमाण मानणें; विश्वासणें [सं.] ०निश्चय—पु. सत्य, बरोबर असल्याची खात्री. [सं.]

**प्रामादिक**—वि. चुकीचें; दोषयुक्त; चुकांनीं व्याप्त [सं.]

**प्रॉमिसरी नोट**—स्त्री. १ सावकाराकडून कर्ज घेऊन तें कांहीं ठराविक व्याजासह परत देण्याबद्दल त्यास लिहून दिलेली वचनचिठ्ठी. 'त्याच्या प्रॉमिसरी नोटा पार जाळून टाकतो' —नाकु ३.४१. २ सरकारला कर्ज काढण्याची जरूरी लागते तेव्हां कांहीं ठराविक व्याज देण्याचें वचन देऊन जो दस्तऐवज विकतात तो. [इं.]

**प्राय**—वि. १ (समासांत) सारखा; तुल्य; सम; सदृश; प्रमाणें. असें—मृत्यु—वज्र—अमृत—विष—जात—गत—प्राय. २ बहुतांशानें युक्त असलेलें; विपुल. 'कांकडी, कलिंगड, केळें हे पदार्थ प्रायः जलप्रायच आहेत.' [सं]

**प्रायः, प्रायशः**—क्रिवि. १ बहुतकरून; बहुधा; बहुतांशीं; सामान्यपणें; साधारणतः. २ बहुतेक; विशेषेंकरून. 'प्रायः आमचें जाणें दहा दिवसांनीं होईल.' [सं. प्रायस्]

**प्रायवंत**—वि. (कों.) म्हातारा —ख्रिपु. [प्राय (कों.)= वय+वंत=प्रत्यय]

**प्रायशां-सां**—क्रिवि. बहुतकरून; प्रायः; प्रायशः 'प्रायशा जे धनबद्धक। त्यांसि इहलोकीं नाहीं सुख।' —एभा २३ १७०. [सं. प्रायस्]

**प्रायश्चित्त**—न. १ पापाच्या निराकरणार्थ करावयाचे यज्ञ, उपवास, तप, दान इ० विधि; पापक्षालनार्थ केलेलें कर्म; दंड. परिमार्जन; शुद्धि. 'आणि विषयांचें विष उलंडूनि। जे सर्वेंद्रियां प्रायश्चित्त देऊनि।' —ज्ञा ८.१०४. २ सर्व दोषांचें व चुकांचें निरसन करण्यासाठीं यज्ञाच्या शेवटीं केलेला होम. ३ (ख्रि.) येशू ख्रिस्तानें मरणदंड भोगून देवाचा व मनुष्याचा घडवून आणिलेला समेट. (इं.) ॲटोनमेंट 'जो प्रायश्चित्ताचा मेंढा त्याच्या प्रायश्चित्ताप्रीत्यर्थ अर्पिण्यांत येईल त्याशिवाय आणखी हा खंड वेगळा. —गण ५.८. [सं.] **प्रायश्चित्ती**—वि प्रायश्चित्त घेणारा; प्रायश्चित्तास योग्य, पापक्षालन करणारा.

**प्रायिक**—वि. १ सामान्य; सर्वसाधारण; बहुतकरून, बहुधा असणारा. २ (चुकीनें) विरळा; क्वचित् आढळणारा. ३ अर्धवट; अस्पष्ट 'अशा प्रकारच्या प्रायिक पुराव्यावर उभारलेलें ...' —साक्रेतिसाचे संवाद २६१. [सं.]

**प्रायोपवेशन**—न. कांहींच अन्नग्रहण न करतां एकासनीं बसून मरणाची वाट पहाणें. परिमार्जनाचा किंवा धार्मिक पुण्यप्राप्तीचा हा एक मार्ग आहे. [सं प्राय+उपवेशन=बसणें] **प्रायोपविष्ट**—वि. प्रायोपवेशन करणारा 'प्रायोपविष्ट असतां'—वेणुसं

**प्रारब्ध**—न. १ बऱ्यावाईट कर्माचें ह्या जन्मांत भोगावें लागणारें फळ; संचितप्रारब्ध (पूर्वजन्मीं केलेल्या कृत्यावरून ठरविलेलें) व क्रियमाणप्रारब्ध (ह्या जन्मात केलेल्या कृत्यावरून ठरविलेलें) असे प्रारब्धाचे भेद आहेत शिवाय अनिच्छाप्रारब्ध, परेच्छाप्रारब्ध व स्वेच्छाप्रारब्ध असेहि आणखी भेद आहेत 'प्रारब्धकर्मणांभोगादेवक्षयः' ''संचितापैकीं जेवढ्या भागाचीं फलें (कार्यें) भोगण्यास सुरवात झाली तेवढेंच प्रारब्ध होय.' —गीर २६८. २ नशीब; दैव; भाग्य. ३ (ल.) कपाळ. 'राघोबादादानें प्रारब्धावर मारलें नारायणरावास दिला ढकलून।' —गापो १००. [सं] ०उघडणें—दैव उघडणें; चागली ग्रहदशा येणें; सुखाची प्राप्ति होणें. 'यदीय प्रारब्ध प्रगटच असें हें उघडलें।' —सारुह १.५६. सामाशब्द— ०गति—स्त्री. नशिबाच्या चक्राकार गतीबरोबर फिरणें; आकस्मिक गोष्ट; दैवाचा फेरा. ०फुटका—वि. फुटक्या नशिबाचा; कमनशिबी; दुर्दैवी. ०योग—पु. १ नशिबाचा योग; दैवयोग. २ यदृच्छा; आकस्मिक गोष्ट. ०वाद—पु. दैव हेंच श्रेष्ठ असें मानणें याच्या उलट प्रयत्नवाद किंवा पौरुषवाद दैववाद पहा. ०वादी—पु प्रारब्धवादाच्या तत्त्वाप्रमाणें चालणारा किंवा त्याचें समर्थन करणारा. ०सूत्र, प्रारब्धाचा दोरा—नपु. नशिबाचा धागा किंवा सांखळी.

**प्रारब्ध**—वि. आरंभिलेलें; आरब्ध; सुरवात केलेलें [सं.]

**प्रारंभ**—पु. आरंभ; सुरवात. [सं.] **प्रारंभणें**—उक्रि आरंभणें; आरंभ करणें; सुरू करणें; सुरवात करणें [प्रारंभ]

**प्रार्थक**—वि. १ याचना, विनवणी करणारा; मागणारा २ प्रार्थना करणारा [सं.]

**प्रार्थ(र्थि)णें**—उक्रि. १ याचना करणें; याचिणें; मागणें; भिक्षा मागणें. २ विनंति, अर्ज, प्रार्थना करणें; विनविणें. 'तैसा तुम्हीं मी अंबिकारिला। सज्जनीं आपुला म्हणितला। तरी उणें सहजें उपसाहला। प्रार्थु-कायी।' —ज्ञा १.६५. ३ मिळविणें. 'सुभट प्रार्थावा

परदमनीं गमनीं तुरंग चालकसा । '-मोभीष्म १ १०२. [ प्रार्थना ]

**प्रार्थन, प्रार्थना**-नस्त्री १ याचना; मागणें. २ विनंति; विनवणी ( क्रि० करणें; मांडणें ). ' प्रार्थना बहुत आगमनाची मांडली । ' ३ ( ख्रि. ) ईश्वराशीं जीवात्म्याचें संभाषण; तसेंच आपलीं पापें पदरीं घेऊन व देवानें दिलेल्या दयेच्या देणग्या कृतज्ञतापूर्वक कबूल करून त्याच्या इच्छेनुरूप असणाऱ्या गोष्टींसाठीं खिस्ताच्या नांवानें आपल्या विनंत्या सादर करणें. ' अनुभूति भक्ति स्वर्गाचेंच द्वार । परमसुंदर प्रार्थना हें । ' -उसं ३११ [ सं. ] **प्रार्थनीय**- वि. प्रार्थना करण्यास योग्य, लायक; विनंति, याचना करण्याजोगें. [ सं. ] **प्रार्थित**-वि याचिलेला; विनंति केलेला [सं.] **प्रार्थ्य**- वि याचना करण्यास योग्य, शक्य, आवश्यक; विनंति, प्रार्थना करण्याजोगा [ सं ]

**प्रालब्ध**—न. ( अप ) दैव; नशीब; प्रारब्ध पहा. [सं. प्रारब्ध]

**प्रावण्य**—न. १ उतार; उतरण, बांकडेपणा. २ (ल.) प्रवृत्ति; कल; झोंक, आसक्ति; ओढ. [ सं प्र+अवनम ]

**प्रावरण**—न. पांघरण्याचें वस्त्र; पांघरूण. 'तप्तसुवर्णासमान । उभयपीतांबर जाण । एक कासे विराजमान । दुजा प्रावरण शोभत ।' -एभा ३०.२०१. [ सं. ]

**प्राव(वा)रणें**—सक्रि. (शाल वगैरे पांघरूण) अंगावर टाकणें; पांघरणें; आच्छादणें. ' प्रावारून उषा तुषारपटला सुर्यप्रतीक्षा करी । ' -केक ६४. [ प्रावरण ]

**प्रावी(वि)ण्य**—न. नैपुण्य; कौशल्य; शास्त्र, कला इ०मध्यें निष्णातपणा; दक्षता. [ सं. प्रावीण्य ]

**प्रावृट्, प्रावृष-षा, प्रावृट्‌काल**—पुस्त्रीपु वर्षाकाल; पावसाळा. [ सं. ]

**प्रावृत्त**—वि. १ आच्छादिलेलें; झांकलेलें; गुरफटलेलें. २ वेढा, गराडा घातलेलें. [ सं ]

**प्राशक**—वि. ( समासांत ) प्राशन करणारा; पिणारा. [ सं. ]

**प्राशणें**—उक्रि. प्राशन करणें; पिणें; शोषणें; शोषून घेणें. [प्राशन] **प्राशित**-वि प्यायलेला; प्राशन केलेला; शोषून घतलेला.

**प्राशन**—न. १ पिणें; पान. ' नयनद्वारें प्राशन । करूनि हृदयीं आणिती कृष्ण । ' -एरुस्व ६.१९. २ शोषण; शोषून घेणें ३ (ल.) नाश. ' क्रोध खवळल्या दारुण । बुद्धीचें तत्काळ नामें ज्ञान । तेव्हां विवेकाचें प्राशन । करी जाण महामोह । '-एभा २१.२१७. [ सं ] **प्राशनीय**-वि पिण्यास, प्राशन करण्यास योग्य; पानीय; शोषण करण्यास योग्य [ सं ]

**प्राशस्त्य**—न. १ प्रशस्तपणा; ऐसपैसपणा; अघळपघळपणा; विस्तृतता. २ स्पष्टपणा; मोकळेपणा; उघडपणा ( भाषण, वागणूक यांचा ). ३ थोरपणा; औदार्य; उच्चपणा (भावना, मन इ० चा). ४ विपुलता; समृद्धता; पुष्कळपणा ( साधन, उपाय, सामुग्री इ० चा ). [ सं ]

**प्राश्चित**—न (अप) प्रायश्चित्त पहा. 'अथवा प्रसाद सेविता । प्राश्चित पडे । ' -दा ५ २ ५९ [ सं. प्रायश्चित्त ]

**प्राश्निक**—पु. ज्योतिषी -वि १ शकुनासंबंधीं; शुभाशुभ लक्षणविषयक. २ शकुन, दृष्टांत इ०चा उलगडा करण्यांत कुशल. [सं.]

**प्रास**—पु. एक शब्दालंकार. यांत त्याच त्या अक्षरांची पुनरावृत्ति होते. अनुप्रास पहा. उदा० 'अन्या धन्या कन्या अन्याय न्याय जाणत्या होत्या । ' [ सं. प्रास ] **प्रासाला प्रास**-यमकाला यमक

**प्रास**—पु भाला. 'याशिवाय अन्य आयुधें सांगितलीं आहेत तीं प्रास, परशु ... हीं होत. ' -हिंलइ ९ [ सं. प्र+अस् ]

**प्रासंगिक**—वि १ प्रसंगानें आलेला, प्रसंगविषयक; नैमित्तिक ' प्रासंगिक गोष्ट संपवून प्रकृत कथा चालू या. ' २ प्रसंगानुरूप. समयोचित; विषयानुरूप. ३ प्राप्तकाल; प्राप्तावसर. [सं.]

**प्रासाद**—पु १ राजवाडा, राजमंदिर ' तेवींचि एखादा प्रासादु । कां करावा अश्वमेधु । ' -ज्ञा १४ २३२ २ देऊळ; देवालय. ' कीं प्रासादाचेनि मीषें । आकाशा मांच बांधले जैसें । '-ज्ञा १६. [ सं ] ०**प्रतिष्ठा**-स्त्री. नव्या देवालयाचा उद्घाटनसमारंभ.

**प्रासादणें**—सक्रि. प्रतिष्ठापना करणें; प्रतिष्ठापणें. ' हनुमानमूर्ति पुरातन निद्रिस्थ उठविली । ब्रह्मदेवें त्रेतायुगीं पुजूनि जे प्रासादिली । ' -सप्र ३ ३८.

**प्रासादिक**—वि. १ देव, सत्पुरुष इ० पासून प्रसाद म्हणून मिळालेलें ( फूल, फळ इ० ); थोरांच्या कृपेनें मिळालेलें. २ ईश्वरकृपाविशिष्ट; प्रसादयुक्त ( ग्रंथ, काव्य, वैद्य, गुरु ) ३ प्रेमळ. -शर. [ सं. ] ०**कविता**-स्त्री. प्रसादगुणानें युक्त कविता; ईश्वरी प्रसादानें रचिलेली व श्रवण केली असतां ज्ञान होणारी कविता. 'प्रासादिक कविता ऐकोनि कानीं । श्रोते आश्चर्य करिती मनीं । '[सं.]

**प्रासूतिक**—वि. बाळंतपणासंबंधीं; प्रसूतिविषयक. [ सं ]

**प्रास्ताविक**—वि १ समयोचित; विषयानुरूप; प्रस्तावनारूप. २ योग्यपणें सुरवात केलेलें; योग्य वेळेला उध्दृत केलेलें. । सं. ]

**प्रास्थानिक**—न. प्रवासास जाण्याच्या वेळीं शुभ मुहूर्त नसल्यास प्रवासास निघण्यापूर्वी तांदूळ, हळकुंड, पैसा इ० ची पुरचुंडी करून दुसऱ्याच्या घरीं ठेवितात ती. प्रस्थान पहा. [ सं. ] -वि. प्रस्थानासंबंधीं; गमनविषयक ( मुहूर्त, साहित्य इ० ).

**प्राही**—स्त्री. ( कों ) ( प्र. विरू ) पराई पहा.

**प्राह्ण**—पु दिवसाच्या तीन भागांपैकीं पहिला भाग. [ सं ]

**प्राज्ञ**—न. सुषुप्ति अवस्थेचा अभिमानी जीव. ' जीवू अवस्थांचा अभिमानी । हेंही न घडे जीवा लागुनी । विश्व तैजस प्राज्ञ तिन्ही । अवस्थाभिमानी हे तिहींचे । ' -एभा ११ १९७ -वि.

शहाणा; हुषार; विद्वान्; बुद्धिमान्. [सं.] **प्राज्ञाभिमान**-पु. सुषुप्ति अवस्थेतील अभिमान. [प्राज्ञ+अभिमान] **प्राज्ञाभिमानी**-पु. सुषुप्ति अवस्थेचा अभिमान धरणारा जीव. [प्राज्ञ+अभिमानी]

**प्राज्ञा**—स्त्री. १ तीव्र बुद्धिमत्ता; ज्ञान; धूर्तपणा. २ योग्यता; महत्त्व, पर्वा, किंमत; सामर्थ्य; मगदूर; लायकी; मातब्बरी ' सभेमध्यें मजशीं भांडायाला काय तुझी प्राज्ञा ? ' [सं.]

**प्रिंट**—पु. (मुद्रण) छापा; ठसा; छापण्याचें साधन. ' ह्या मसुद्याचा प्रिंट मला प्रेसमध्यें छापावयाचा आहे. ' [इं.]

**प्रिथिवी**—स्त्री. जग; पृथ्वी. -शक ६०२चा. विक्रमादित्य ताम्रपट. [सं. पृथ्वी]

**प्रिन्सिपल् सदरअमीन**—पु. जिल्ह्याच्या न्यायाधिशाच्या हाताखालचा दिवाणीकोर्टातील न्यायाधीश; मुनसफ; सबजज्ज.

**प्रिन्सिपॉल**—पु. मुख्याध्यापक, मुख्य. [इं]

**प्रिय**—पु. पति, नवरा; जार; प्रियकर ' तरी स्वाधिकाराचेनि मार्गे। आलें जें मानिलें आंगें। पतिव्रतेचेनि परोथवेंगें। प्रियातें जैसें। ' -ज्ञा १८.५८६. (काव्य) आनद -हंको -मनको. [सं.] -वि. आवडतें; प्रेमाचें; सुखकर. [सं.] ०**करणें**-खूष करणें; संतोषविणें. सामाशब्द- ०**कर**-पु. पति; नवरा; कांत; जार. 'प्रियकराची धनदौलत व अधिकार थोडा थोडा वापरण्यास सुरवात करावी ' -मानाप ६२. **प्रियंकर**-वि. प्रेमास चालना देणारें; आदरास उत्तेजन देणारें. [सं.] **प्रियतम**-न. (नाट्य.) पति; नवरा; जार; प्रियकर; नायक. -वि. अत्यंत प्रिय. [सं. प्रिय+तम=तरतमदर्शक प्रत्यय] ०**तमा**-स्त्री. १ स्त्री; घरधनीण; गृहिणी. २ जारिणी; प्रेमपात्र; नायिका. [सं] ०**पात्र**-वि. आवडता; लाडका. ' तों तेथें देखिला समीरसुत। जो ज्ञानी भक्त विरक्त। जो श्रीरामाचा प्रियपात्र। प्राणाहूनि पलीकडे। ' -ह ३१.१३. ०**वंत**-पु. प्रियकर. ' होऊं काय उतराई दासी आपली प्रियवंता। ' -होला १४६. ०**वादी**, **प्रियंवद**-वि. गोड बोलणारा; मधुरभाषी. [सं.] **प्रियाभिमानी**-स्त्री. अत्यंत प्रेमाची स्त्री. [सं. प्रिय+अभिमानी] **प्रियोत्तम**-पु. पति; कांत; नवरा. 'जो प्रज्ञेचा प्रियोत्तमु। ब्रह्मविद्येचा विश्रामु।' -ज्ञा १७.३३. -वि. अत्यंत आवडता; प्रीतिपात्र. [प्रिय+उत्तम]

**प्रियंगु**—पु. राळा (धान्य). [सं.]

**प्रियंवदा**—स्त्री. एक वृत्त. याच्या चरणांत १२ अक्षरें आणि न, भ, ज, र हे गण असतात. ' मुनिजनीं मदनसा दिसे सये। मज गमे वर तुझ्या मनास ये। जनकजेस रिझवूनिया तदां। वदतसे निजसखी प्रियंवदा। '

**प्रिया**—स्त्री. १ गृहिणी; बायको. २ जारिणी; प्रेमपात्र. ३ नायिका. -वि. आवडती. [सं] **प्रियारूं**-वि. (महानु) प्रिय. 'तैसा मनुष्यदेहाचा आकारूं। बाहिजे दृष्टीं प्रियारूं। भीतरूं कुडा। ' -ज्ञाप्र ७४९. **प्रियु-यू**-वि. प्रिय; आवडता. ' श्रेष्ठ सज्ञानी प्रियु भगवंता। ' -दावि २५७. -पु. पति; नवरा; पुरुष. ' जो प्रियूची प्राणेश्वरी। उलथे आवडीचिये सरोभरीं। ' -अमृ १.२.

**प्रियेव, प्रेस**—पु. (गो.) किंमत. [पोर्तु. प्रेसो]

**प्रीणन**—न. संतोष; तृप्ति; खूष करणें. [सं.]

**प्रीत**—स्त्री. १ प्रीति; प्रेम. २ आवड. ' भक्ताच्या वाक्याची प्रीत नारायेणा। ' -रामदासी २.१३३. -वि. १ आवडतें; प्रिय असलेलें. २ संतुष्ट; तृप्त; खूष केलेला. [सं. प्रीति]

**प्रीति**—स्त्री. १ प्रेम; स्नेह; माया; दया. २ मर्जी; कृपा. ३ आवड; शोक; सौरस्य; एखाद्या गोष्टींत संतोष मानणें. ' फणस टाकुनि रसाळ। प्रीतीनें घेतलें कनकफळ। ' ४ ज्योतिषशास्त्रांतील सत्तावीस योगांपैकीं दुसरा योग. योग पहा. ५ (संगीत) बाराव्या श्रुतीचें नांव. ६ (रसायन) एकमेकांशीं मिळण्याचा धर्म. (इं.) ॲफिनिटी. [सं.] ०**लावणें-लावून घेणें**-एखाद्याचें प्रेम संपादन करणें. सामाशब्द- ०**कर**-वि. प्रेम करणारा. ' तुका म्हणे आम्ही जिवाच्या उदारा। झालों प्रीतिकरा गोविंदासी। ' -तुगा ३०७. ०**कलह**-पु प्रेमाचें भांडण; थट्टेंत केलेलें भांडण; प्रेम कलह. ०**त्रास**-पु. आवडनावड. ' तैसाचि द्विविधरसु। उपजवी प्रीतित्रासु। ' -ज्ञा २.११८. ०**दत्त**-वि. नववधू सासू-सासरा यांना नमस्कार करावयास जाते त्यावेळीं त्यांनीं प्रेमानें तिला दिलेलें (स्त्रीधन). ०**दान**-न. एखाद्याची विद्या, शौर्य इ० गुणांवर संतुष्ट होऊन दिलेलें बक्षीस; प्रेमाची खूण. ०**पात्र**-न. १ आवडतें माणूस; २(ल) बायको. ' प्रीतिपात्र गेलें मरणें। तयालागीं जीव देणें। ' -दा २.६.१०. ०**मान्-वान्-वंत**-वि. प्रेमळ; मायाळू; दयावान्; प्रीतियुक्त; प्रेम करणारा ०**वाद**-पु अंतःकरणांत कांहीं किल्मिष नसता केलेला वादविवाद. ०**विवाह**-पु वधूवरांच्या पत्रिका वगैरे न पाहता त्यांचीं गोत्रें व मनें एकमेकांशीं जुळून होणारा विवाह. ०**षडाष्टक**-न. (ज्योतिष.) सिंह-मीन, तूळ-वृषभ, मकर-मिथुन, मेष-वृश्चिक, व धन-कर्क ह्या दोन दोन जोड राशी; हें विवाहांत शुभकारक आहे. ०**श्राद्ध**-न. मातापितरांच्या नावानें केलेलें एक प्रकारचें श्राद्ध. ०**संगम**-पु. समोरासमोरून येणाऱ्या दोन नद्यांचा संगम. ०**सन्मान**-पु. प्रेमानें दिलेला मान किंवा आदर. **प्रीतीचें नाम-नांव**-न. (लहान मुलांस) लाडिकपणानें दिलेलें नांव. **प्रीत्यर्थ**-शअ. (मूळ अर्थ प्रीतीसाठीं, प्रेमामुळें परंतु रूढ अर्थ) करितां; साठीं; मुळें; एखाद्याच्या उद्देशानें. ' शेताप्रीत्यर्थ हजार रुपये खर्च पडला. ' [प्रीति+अर्थ]

**प्रु(प्रू)फ**—न. (मुद्रण) जुळलेला मजकूर शुद्ध आहे कीं नाहीं हें पाहण्याकरितां टाइपांस शाई लावून साध्या कागदावर त्याचा जो उठाव काढतात तो; खर्डा; कच्चें मुद्रित. ' चष्मा लावून प्रुफ तपाशीत बसतो. ' -मोर ३२. [इं.] ०**करेक्टर**-पु. (मुद्रण) जुळविलेल्या मजकुराचा खर्डा शुद्ध आहे कीं नाहीं हें तपासणारा. [इं.]

याको. ५. १२

**प्रेंखोलित(करण)**—न. (नृत्य) पाय कुंचित करून वर करणें व पुढें मागें हलवून खालीं टाकतांना अंचित करणें व त्रिक फिरवितां फिरवितांच उडी मारणें. [सं.]

**प्रेत**—न. १ शव; मुडदा. २ सपिंडी, उत्तरक्रिया इ० होऊन पितर होण्यापूर्वीचा मृत जीव. [सं] सामाशब्द– **०कर्म–कार्य–क्रिया**–नस्त्री. और्ध्वदेहिक विधि. **०कला–ळा**–स्त्री. १ मरण-समयीं तोंडावर येणारा फिकटपणा २ (ल.) भीति, आजार, फजीती इ०मुळें चेहऱ्यावर दिसणारा निस्तेजपणा 'तेथें (महा-राष्ट्रांत) 'एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत सर्व बाबतींत प्रेत-कळा आली होती... '–टि ४·२८२. **०ज**–वि. (प्रेतापासून उत्पन्न झालेला. परशुरामानें श्राद्धासाठीं प्रेतापासून उत्पन्न केला यावरून) चित्पावन किंवा कोंकणस्थ ब्राह्मणाबद्दल उपाहासानें योजितात. [सं.] **०दीक्षा**–स्त्री. प्रेतकळा. 'आक्रूरा गोपिकांस शिकविलें हरी मागत भिक्षा । आक्रुरा । गोकुळाच्या जनास दिधली प्रेतदिक्षा ।'–होला १२ **०नाथ**–पु यम 'यमपुरी वोस पडे । म्हणोनी रडे प्रेतनाथ ।'–एभा आनंदलहरी ३८ **०भूमि–वन**–स्त्रीन. स्मशान; मसणवटा. [सं.] **०यात्रा**–स्त्री. प्रेत स्मशानांत नेण्यासाठीं जमलेला, प्रेताच्या मागून जाणाऱ्या लोकांचा जमाव. 'प्रेतयात्रा निघाली तेव्हां बराच लोकसमूह जमला.' **०संस्कार**–पु. मृत मनुष्याच्या शरीराची विल्हेवाट लावणें; मृतांना पारमार्थिक सुख प्राप्त करून देणें व मृताच्या पश्चात् त्याच्या आप्तांना मृताच्या अशौचापासून मुक्त करणें. **०साया**–स्त्री. प्रेतछाया. 'तया प्रेतसायाचा पाखालु । रंकपणाचा उजालु ।' –एकनाथकृत २०६. **प्रेतावरील पान**–न. (ल.) अत्यंत क्षुल्लक परंतु अत्यंत अशुभ वस्तु. **प्रेताशौच**–न. प्रेत वाहून नेल्यामुळें होणारा विटाळ. [प्रेत+अशौच] **प्रेत्या**–पु. (तिरस्कारार्थी) और्ध्व-देहिक कर्म सांगणारा ब्राह्मण; कारटा. [प्रेत]

**प्रेत्न–त्नु**—पु. प्रयत्न. 'तोडावया स्वप्रबंधन । नलगे आणीक साधन । तयास प्रेत्न जागृतीवीण । बोलोंचि नये ।'–दा ८.७.६३. [सं. प्रयत्न]

**प्रेम**—न. १ प्रीति; माया; दया; स्नेह; सौरस्य २ दैवी प्रेम; प्रेमाची तदाकार अवस्था. ३ पुत्र वगैरेच्या ठिकाणीं असलेली अत्यंत प्रीति; प्रीतीचा उमाळा. (क्रि० येणें) [सं.] सामाशब्द– **०कल्हार**–न. प्रेमरूपी कमळ. 'मुखीं दंत तेजागळा भानु लोपी । तया पाउलीं प्रेमकल्हार वोपी ।'–मुरामाबाल ९. **०घाई**–स्त्री प्रेमामुळें झालेली उत्सुकता; उतावीळपणा; क्षुब्धता; धांदल **०टांगा**–वि. ज्याचें प्रेम गुंतलें आहे असा. 'फुलांचिया भोगा–। लागीं प्रेमटांगा । तें करेयाचा गुडघा । तैसें होईल ।' –ज्ञा १३. ५५७. [प्रेम+टांगणें] **०तत्त्व**–न. वास्तविक, खरी प्रीति 'प्रेम-तत्त्व विस्तारिलें ।' **०पात्र**–न. प्रीतीचें माणूस. 'तुझें दुसरें कुणी प्रेमपात्र आहे का?'–निचं १.४. **०पान्हा**–पु. १ मूल पाहतांच मातेच्या स्तनांतून गळूं लागतें तें दूध २ प्रेमाचा पाझर **०पूर**–पु. अलोट प्रेम; अत्यंत प्रेम वाटणें. 'रघुवीर आलिंगिला मानसी । प्रेमपूर न सावरे ।' **०पेहे**–न. प्रेमपेय. 'पाजी प्रेमपेहे वाहे तया अंकीं । म्हणे हे लाडकी तान्ही माझी ।'–निगा १६२. **०फांसा**–पु. प्रेमामध्यें गुरफटणें, प्रेमपाश. **०भाक**–स्त्री. प्रेमाचें वचन; शपथ. 'त्याला प्रेमभाक नाहीं कां म्हणंत?' –मोर २६. **प्रेमाश्रु**–पुन अत्यंत प्रेमामुळें येणारे अश्रु; आनंदाश्रु. [सं. प्रेम+अश्रु] **प्रेमल–ळ**–वि ईश्वरभक्ति, कथा इ० विषयीं अत्यंत प्रेम असलेला; प्रेमयुक्त; मायाळू; दयावान् 'म्हणोनि प्रेमळाचा सखा । स्फुंदस्फुंदोनि रडतसे ।'–ह १८.१२०. [प्रेम] **०स्थिति**–स्त्री. (काव्य.) प्रेमळपणा; मायाळूपणा

**प्रेमा**—पु १ प्रेम, प्रीति 'राजा, तुझा प्रेमा पाहून मी संतुष्ट झालों '–रत्न १४. २ प्रेमानें ओथंबून जाणें: प्रेमपान्हा; एखाद्या विषयीं वाटतें तें उत्कट प्रेम (क्रि० येणें) ३ प्रेमाचा विषय; प्रिय मनुष्य. –शार. [स] **प्रेमाथणें**–अक्रि. प्रेमांत बुडून जाणें 'नाना त्यांचें प्रेम जें प्रांजळ । तेंही योजलें प्रेमजळ । त्या जळीं तो जळदनील । प्रेमाथिला होत्साता ।'–रास ५ ६३४. [प्रेम]

**प्रेय**—न. इंद्रियास प्रिय असें ऐहिक सुख –गीर ९३. [सं.]

**प्रेरक, प्रेरयिता**—वि. १ पाठविणारा; गति देणारा. २ उत्तेजन, चेतना, स्फूर्ति देणारा; प्रेरणा करणारा. [सं.]

**प्रेरण, प्रेरणा**—नस्त्री १ पाठविणें. २ प्रवृत्त करणें; उत्तेजन; स्फूर्ति, चेतना; प्रोत्साहन; उठावणी 'जाणोनि मायेचें मिथ्यात्व पूर्ण । तिचें प्रेरण आणि आवरण ।'–एभा २९.७७१. ३ आज्ञा. 'जो मधुकैटभमर्दन । जो मुरारि मधुसुदन । जो परमात्मा श्रीकृष्ण । तो करी प्रेरण प्रभासे ।'–एभा ३०.९९. ४ (यंत्रशास्त्र) ज्या कारणानें स्थिर पदार्थाच्या अंगीं चलन उत्पन्न होतें अथवा चलन पावलेल्या पदार्थाचें चलन कमी होतें किंवा फिरतें त्यास प्रेरणा म्हणतात. (इं.) फोर्स. [सं.] **०क्रिया**–स्त्री. प्रयोजक धातु. [प्रेरण+क्रिया] **०त्रिकोणसिद्धांत**–पु. विवक्षित कणावर कार्य करणाऱ्या प्रेरणांचीं परिमाणें व त्यांच्या दिशा त्रिकोणाच्या तीन बाजू क्रमानें दर्शवितील तर त्या प्रेरणा त्या कणास समतोल धर-तील. –यंस्थि २८. **०पृथक्करण**–न. एका प्रेरणेचा विघात करून अनेक घटकप्रेरणा काढण्याची रीत; प्रेरणाविघात. –यंस्थि ६. **०संचरत्व**–न. प्रेरणेचा संचार कांहीं फरक न पडतां एकाच रेषेंत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं होणें. –यंस्थि ९. **प्रेरणैकी-करण**–न. अनेक प्रेरणांची फलितप्रेरणा काढण्याची रीत; प्रेरणा-संघात. –यंस्थि ९. [प्रेरणा+एकीकरण]

**प्रेरणें**—सक्रि. १ पाठविणें. २ उद्युक्त करणें; प्रवृत्त करणें; प्रोत्साहन देणें. मनांत उरविणें; भाग पडणें. 'इंद्रियां प्रेरितां वारितां ।

हे सत्य आधीन हृदयस्था । ' -एभा ११.११४७. [ प्रेरण ] **प्रेरित**-वि. १ पाठविलेला २ उत्तेजन दिलेला; उत्तेजित; प्रोत्साहन दिलेला. [ सं. ] **प्रेरिता**-वि १ पाठविणारा. २ चेतना, प्रोत्साहन देणारा; प्रेरक. [ सं. ]

**प्रेष**—पु. १ उत्तेजन; प्रोत्साहन, उठावणी; सुचविणें. ( क्रि० करणें ). २ निरोप. ' स्वामीकडे विसूभाऊनीं- प्रेषही पाठविला. ' -अस्तंभा ४७ ३ हुकूम; आज्ञा. (श्रौतकर्मांत मंत्र म्हणण्याविषयीं ) ४ संधान. ' पण त्याच्याकडून हा प्रेष होता. ' -अस्तंभा १६०. ५ जासूद. -शर. ६ तगादा; जाच. ' न धरितां प्रेषे कवणीं ही । ' -दावि १४०. [ सं. प्रेष्य ] ०क-वि. पाठविणारा. ०मंत्र-पु. ( याज्ञिक. ) मोक्षाप्रत पाठविणारा मंत्र. [ प्रेष= पाठविणें+मंत्र ] **प्रेषोच्चार**-पु. संन्यास घेतेवेळीं तो घेणाऱ्यानें केलेला प्रेषमंत्राचा उच्चार ' भूता अभयदानपुरस्कर । संकल्पपूर्वक प्रेषोच्चार । ' -एभा १८.७६ [ प्रष+उच्चार ] **प्रेषण**-न पाठविणें. [ सं. ] **प्रेषणीय**-वि. पाठविण्यास योग्य, लायक. [ सं. ]

**प्रेषणें**—सक्रि. ( काव्य ) पाठविणे. ' श्रीराम जसा प्रेषी शिकवुनि सामोक्ति अंगदा साच्या । '-मोउद्योग ६१५. [ प्रेषण ] **प्रेषित**-वि. १ पाठविलेला. २ कामाचा अधिकार देऊन पुढें पाठविलेला. ३ ( ख्रि. ) नव्या करारात ख्रिस्ताच्या प्रथम शिष्यास प्रेषित म्हटलें आहे. ४ ( ख्रि. ) धर्मोपदेशक; येशू ख्रिस्ताचें एक नाव. ( इं. ) ॲपॉसल. ' आपण स्वीकारलेल्या धर्माचा प्रेषित व मुख्य याजक येशू याजकडे लक्ष लावा. ' -इब्री ३ १. [ सं. ] **प्रेष्य**-पु सेवक. -वि पाठविण्यास शक्य, आवश्यक. [ स. ]

**प्रेष्ण**—पु. ( अप ) प्रश्न ' पुसें आदरें साधकु प्रेष्ण ऐसा । ' -राम १६४. [ सं प्रश्न ]

**प्रेस**—पु. छापखाना; मुद्रणालय. [ इं. ] ०ॲक्ट-पु. छापखाना, वर्तमानपत्रें यासबंधींचा कायदा. [ इं. ] ०मन-पु. कंपोज केलेला मजकूर छापण्याच्या यंत्रावरून छापून देणारा मनुष्य. [इं.]

**प्रेसिडेंट**—पु. अध्यक्ष; सभापति. [ इं. ]

**प्रेक्षक**—वि. १ पाहणारा; अवलोकन करणारा; विचारी. २ नाटक, तमाशा इ० पाहावयाला आलेला माणूस. [ सं. ]

**प्रेक्षण, प्रेक्षा**—नस्त्री १ अवलोकन; विलोकन, लक्ष्य देणें; विचार करणें. २ पाहणें. ३ ( ल ) विचार; ध्यान; चिंतन [सं.] **प्रेक्षावान्-वंत**-वि. १ दूरदर्शी. २ विचारी, चौकस; हुशार; कसून पाहणारा. **प्रेक्षणें**-सक्रि १ अवलोकणें, नजर टाकणें; पाहणें. २ नजर असणें; लक्ष्य असणें. [ प्रेक्षण ] **प्रेक्षित**-वि. १ अवलोकित; लक्ष्य दिलेलें; चिंतित. २ पाहिलेलें [ सं. ]

**प्रोक्त**—वि. बोललेलें; सांगितलेलें; म्हटलेलें. ' ऋषि-देव-शिव-प्रोक्त. ' [ सं. ]

**प्रोज**—न. गद्य. ' संतापाचें प्रोज ज्या कर्कश भेसूर स्वरांत सुरू असतें. ' -नाकु ३.२९. [ इं. ]

**प्रोत**—पु. मागावर विणण्याचें उभें सूत; ताणा. ' ओतप्रोत पटीं । तंतु जेवीं । ' -ज्ञा १०.२६४. [ सं. ]

**प्रोत्स(त्सा)हन**—न उत्तेजन; चेतवणी; प्रवर्तन; चेतना. [स.] **प्रोत्साह**-पु उत्साह; उठावणी; आवेश; प्रबोधन. [सं.] **प्रोत्साहक**-वि. उत्तेजन, देणारा, प्रोत्साहन देणारा; उद्बोधक. [ सं. ] **प्रोत्साहित**-वि. चेतना, उत्तेजन, प्रोत्साहन दिलेला; उद्बोधित [ सं. ]

**प्रोथ**—पु. घोड्याच्या ओंठावरील भाग. -अश्वप १.६१.

**प्रोफेसर**—पु. १ एखाद्या शास्त्रांतील निष्णात. २ उच्च-विद्यालयांतील अध्यापक. [ इ. ]

**प्रोषित**—वि. बाहेर गेलेला; गैरहजर; गांवाला गेलेला. [सं.] ०भर्तृका-वि. जिचा पति गावाला गेला आहे अशी (स्त्री )[सं. ]

**प्रो(प्रौ)ष्ठपदी**—स्त्री. भाद्रपद शुद्ध पौर्णिमा. [ सं. प्रोष्ठपदी]

**प्रोक्षण**—न. शिंपडणें; सिंचन. [ सं. ] **प्रोक्षणें**-सक्रि. शिंपडणें; सिंचन करणें. [ प्रोक्षण ] **प्रोक्षित**-वि. शिंपडलेलें; सिंचन केलेलें. [ सं. ]

**प्रौढ**—वि. १ पूर्ण वाढलेलें; परिपक्व; पूर्णावस्था प्राप्त झालेलें ( शरीर, मन, माणूस इ० ). ' म्हणे अर्जुना परियेसीं । जो हा अभिलाषु प्रौढ मानसीं । ' -ज्ञा २.२९१ २ पोक्त; वयोवृद्ध; प्रगल्भ. मोठें. ' तेंचि विस्मरण कैसें । निजबालत्व प्रौढवयसें । ' -एभा २२. ४३७ ३ ( ल. ) थोर; पूज्य; सन्माननीय. ४ मोठा; भव्य; नांवलौकिकाचा (मनुष्य). ५ अलंकारिक; सुशोभित; सुरेख(शब्दरचना). ६ सभ्य; समंजस; शिष्टसंमत (चाल, रीत ) ७ समर्थ. ' म्हणोनि ज्ञाना कर्मा कर्तेया । पातेजों नये धनंजया । जे दोन्ही बांधती सोडावया । एकचि प्रौढ । ' -ज्ञा १८ ५१८ ८ धीट. -शर. [सं.] ०ता-स्त्री १ मोठेपणा; पोक्तपणा; प्रगल्भपणा. ' वचनाची प्रौढता करून घेतली. ' -ख १२८८. ०प्रताप-पु. पराक्रमी; वीर्यशाली; सामर्थ्यवान्; शस्त्रास्त्रांत कुशल. ०वर्ण-पु. अक्षरांचा उच्चवर्ण; ट वर्ग व जोडाक्षरें.

**प्रौढणी**—स्त्री. तरुण स्त्री. ' तयें प्रौढणीलागि दृष्टीस नाणी । ' -दावि २९२. [ प्रौढ ]

**प्रौढा**—स्त्री १ तीस ते पन्नास वर्षांपर्यंतची स्त्री. ' प्रौढा चेली बोडकी धर्मपत्नी । ' -कंम १ ३६ २ मदनावस्थेनें जिची लज्जा जिंकली आहे अशी नायिका-[ सं. ]

**प्रौढि-ढी**—स्त्री. १ प्रौढपणा; पूर्णता; प्रगल्भता ( शरीर, मन इ०ची) २ मोठेपणा; कीर्ति; थोरवी 'जे बळें प्रौढी पौरुषें । भीमार्जुनांसारिखें । ' -ज्ञा १ ९७. ३ सामर्थ्य; पराक्रम; प्रबलता. ' तैसी सर्वंवृद्धिवैभवीं । बुद्धिचि एकली बरवी । बुद्धीही बरव नवी । इंद्रियप्रौढी । ' -ज्ञा १८.३४८. ४ भारदस्तपणा; प्रगल्भपणा; सुशोभितपणा ( भाषा, चालरीत इ०चा ). ५ आढ्यता; अभिमान.

'परी प्रौढी न बोलें हो जी। तुम्हां सर्वज्ञांच्या समाजीं।' –ज्ञा ९.२. ६ महिमा; महत्त्व. 'मुद्रेची प्रौढी ऐशी। तेचि सांगिजेल आतां परियेसीं।' –ज्ञा ६.१९२. [सं. प्रौढि] ०वाद–पु धाडसाचें विधान; पूर्ण विचार न करतां दिलेलें मत.

**प्लँचेट**—न. मृत मनुष्याशीं संभाषण करण्याचें एक यंत्र 'प्लॅंचेटमधून संदेश पाठविले.' –नाकु ३.५. [इं]

**प्लॅ(फ्ला)टफॉर्म**—पु फलाट; स्टेशनवर गाडी ज्या ठिकाणीं उभी राहते ती ओटयासारखी जागा 'फ्लाटफार्मावर उभी पलटण। ताकीद सर्वांला।' –गापो २७. [इं. प्लॅटफॉर्म]

**प्लव**—पु १ नाव; नौका: होडी 'सांगें प्लवेंचि काय बुडिजे। कां मार्गी जातां आडळिजे।' –ज्ञा २.२२३. २ बेडूक. 'सापानें धरिला प्लव न जगे बडबडसि तूं जसा पानें।' –मोकर्ण २७.२. [सं.]

**प्लवंग**—पु. साठ संवत्सरांपैकीं चाळीसावा संवत्सर. [सं]

**प्लवं(व)ग, प्लवंगम**—पु. १ वानर. 'आनंदें नाचति प्लवंगम।' २ बेडूक. [सं]

**प्लक्ष**—पु. उंबरवृक्ष. 'सरल कुटज वटवृक्ष सातवण प्लक्षदाडिमी चांफा।' –नरहरि, गंगारत्नमाला, १४७ (नवनीत पृ. ४३२). [सं.]

**प्लॉट**—पु. १ कथानक. 'याच प्लाटवर सर्वोत्तम नाटक लिहिणाराला गंधर्वकंपनीनें पांच दहा हजाराचें बक्षीस लावून पहावें.' –नाकु ३.४०. २ कटकट. ३ जमिनीचा तुकडा. [इं.]

**प्लीहा**—स्त्री. १ पाणथरी (इंद्रिय व त्याचा रोग) २ कौळ; गुल्म: पोटांत होणारा एक रोग [सं.]

**प्लुत**—पु (संगीत) ज्याचा तीन मात्रा इतका लांब उच्चार आहे असा आकारादि स्वर. [सं.]

**प्लुति**—स्त्री. (पक्षी, बेडूक इ०नीं) उडी मारीत चालणें, उडी. [सं]

**प्लेग**—पु एक प्रकारचा सांथीचा रोग; ग्रंथिज्वर [इं.]

**प्लेना**—पु. (मुद्रण) प्रेसवर फॉर्म असतांना टाईप सारखा करण्यासाठीं तो ठोकण्याकरितां उपयोगात आणावयाचा लांकडाचा ठोकळा. [इं. प्लेन]

**प्वाट**—न. (कु.) पोट. [पोट]

---

# फ

**फ**—बाविसावा वर्ण; पचा महाप्राण. अक्षरविकासः–याच्या चार अवस्था आहेत. पहिली अशोकाच्या गिरनार शिलालेखांत. दुसरी मंदसोर लेखांत (इ. स. ५३२); तिसरी पाली गांवच्या दानपत्रांत (इ स. ४७७–७८) व चौथी ग्वाल्हेरच्या हद्दींत ललितपूर गांवानजीक सांपडलेल्या सीयडोनी लेखांत (इ.स.९०३). –ओझा

**फइलाव, फइलावणें, फइसल**—फैलाव, फैलावणें, फैसल इ० पहा.

**फई**—क्रिवि. (कों.) सन्निध; जवळ. 'तेचा फईकडे.'

**फईल**—पु. (खा.) पेठ; विशेषतः स्टेशनजवळील हमाल वगैरेंची वस्ती. –भात्रे ७.१ ते ४. [इं. फाइल]

**फऊज, फऊजदार इ०**—फौज, फौजदार, इ० पहा.

**फ(फं)क**—न १ कोंवळें फळ. 'काजूचें फंक.' २ कच्चा काजू. ३ कोंवळी मिरची.

**फक-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. पोहे इ० पदार्थ खातांना, गुलाल वगैरेची फक्की उडवितांना होणाऱ्या आवाजाचें, क्रियेचें अनुकरण करून. (क्रि० खाणें; टाकणें; फेंकणें). [ध्व. फक! तुल० अर. फक्क=जबडा]

**फकड**—वि. स्वतंत्र; मोकळा; मोकाट; आडकाठी नसलेला; विशृंखल (स्तुति अथवा निंदा करण्याच्या दृष्टीनें उपयोग). (प्र.) फक्कड पहा.

**फकडी**—स्त्री. १ फुलांच्या पाकळयांची रांग, ओळ किंवा घेर. २ एकेरी पाकळीचें फूल किंवा फुलझाड. उदा० जास्वंद. ह्याच्या उलट गेंद. –वि. १ संख्यावाचक उपसर्ग लावून बनणारें विशेषण. जसें:–एक फकडी=एकेरी पाकळयांचें, दुफकडी=दुहेरी पाकळयांचें; तिफकडी; चौफकडी, बहुफकडी; अनेक फकडी इ० २ एकेरी पाकळीचें.

**फकडी**—वि. फकिरी; द्राक्षाची एक जात.

**फकण्या**—वि (व.) कफल्लक. फकना पहा. [फकणें]

**फकत-स्त**—क्रिवि. फक्त; केवळ; निवळ; नुसता; मात्र; निखालस. [अर. फक़त्]

**फकना, फकन्या, फकनेभाई**—वि. १ निर्धन, दरिद्री; भूकेकंगाल; फाकेमस्त. २ उसनी ऐट आणणारा फकड. [फका, फाकणें]

**फकफक-कां, फकाकां फकाफक-फकां**—क्रिवि. पोहे इ० सुके खाद्यपदार्थ खाताना गुलाल इ० पदार्थ हातांत घेऊन, फकदिशी इ० फेंकतांना, जोरानें व पुष्कळ ओकतांना इ० वेळीं होणाऱ्या आवाजाचें, क्रियेचें अनुकरण होऊन. (क्रि० खाणें; घालणें; टाकणें; फेंकणें; ओकणें). [ध्व. फक द्वि]

**फकफकाट**—पु. फक्, फक् असा आवाज. 'मधूनच एंजिनाची एखादी किंद्री शिटी व नंतर फकफकाट.....कर्णपटलावर पडत होता.' –समर्थ अंक–करमणूक ५.४.२९. [ध्व. फक्]

**फकरूड**—न (कु.) अगदीं कोवळें फळ; फक पहा. [फक+रूड=अल्पार्थी प्रत्यय]

**फका**—पु फक्का पहा [ ध्व. फक्, तुल० अर. फक्क=जबडा ]

**फकेवरी**-वि. तोंडांत मावेइतका ( घांस, इ० ). 'गव्हाचिया होती परी। फकेवरी खाऊं नये।' -तुगा २७८१.

**फकाट**—वि. (व. ना.) १ फांकलेले, दूर केलेले(पाय). 'पाय फकाट केले.' २ रुंद. [ फाकाटणें ]

**फकांड-डी-ड्या**—वि. (गो.) १ टवाळखोर, खुषमस्कऱ्या; थट्टेखोर फकाण पहा. २ बडबड्या; पोकळ गप्पा मारणारा; गप्पीदास.

**फकांडी**—स्त्री. आधारहीन व अर्थहीन बोलणें; पोकळ बडबड; निव्वळ गप्पा ( अनेकवचनी प्रयोग ) (क्रि० मारणें).

**फकाण**—न. (गो.) मस्करी; थट्टा -वि टवाळ. फकांड पहा.

**फकाणा, फकांदा**—पु. पोहे इ० कोरडया पदार्थांचा घास. फक्का पहा.

**फकाणा**—न. (गो.) टवाळकी; थट्टा.

**फकाफक-फकां**—क्रिवि. फकफक पहा.

**फकारी**—वि. (गो.) गप्पा झोंकणारा; गप्प उठविणारा.

**फकिका**—स्त्री. (प्र. फक्किका) कांहीं एका अर्थाच्या प्रतिपादनार्थ छंदोलंकारादिरहित ग्रंथकारानें रचिलेलीं वाक्यें; गद्यविवेचन, फक्किका पहा.

**फकिराणा**—पु. १ फकीराच्या चरितार्थासाठीं दिलेली इनाम जमीन. 'कार्किर्दी-दर-कार्किर्दी फकिराणा चालला असे; सदहूप्रमाणें चालवणें' -रा १५.१३१ २ दानधर्म. [ फा फकीराना ]

**फकिरी**—स्त्री. १ फकीराची वृत्ति, व्यवसाय. २ मोहरममध्यें फकीरांना द्यावयाची भिक्षा. 'गारपीरचे लष्करांतील शिपाई व गंगाधरशास्त्री यांजकडील माणसें मोहरमची फकिरी मागावयास आले; सबब मशारनिल्हेनीं लष्करवाले यांस रुपये दहा व शास्त्री यांजकडील माणसास पाच एकूण पंधरा रुपये दिल्हे -पया १२६. ३ मोहरममध्यें फकिराची दीक्षा घेतात ती; गळयांत नाडा बांधणें इ० ४ दारिद्य; भिक्षावृत्ति; भीक. -वि. फकीरासंबंधीं; फकीरविषयक. [ अर. फकीर् ] ०दौलत-संपत्ति-स्त्री. (भिक्षेकऱ्याची संपत्ति); चंचल, अस्थिर संपत्ति; एके जागीं फार वेळ न राहाणारी लक्ष्मी. ०बाणा-पु भिक्षेकऱ्याचा धंदा, वृत्ति. भिक्षां देही; दारिद्य. (क्रि० धरणें; घेणें; बाळगणें).

**फकिरी, फकिरी द्राक्ष**—न द्राक्षाचा एक प्रकार; फकडी.

**फकी-क्की**—स्त्री. १ (प्र फक्की) फक्का याचें अल्पतादर्शक रूप. लहान घास; फका. २ चूर्ण; पूड. ३ चुन्याची कळी उमलल्यावर त्याची होणारी भुकटी [ ध्व. फक ]

**फकी**—स्त्री. (गो.) बढाई. [ सं. फक्क्=फुगणें ]

**फकीर**—पु. १ मुसलमानी धर्माचा भिक्षेकरी साधु; यवन भिक्षु; प्रपंच राहून विरक्त होत्साता ईश्वरभजनीं लागलेला यवन. २ मोहरमामध्यें (हिंदु किंवा मुसलमान) फकीराचा वेष व वृत्ति धारण करणारा इसम; डोल्याच्या दिवसांत त्या प्रीत्यर्थ अंगावर नाडे घालणें, उपास करणें, भिक्षा मागणें इ० रूप व्रत करणारा मनुष्य ३ संसारापासुन व जगाच्या त्रासापासुन अलिप्त राहणारा इसम ४ पुढें कोणी नाहीं असा जो संसारांत एकाकी तो; फटिंग, सोटभैरव. ५दरिद्री; भणंग; भिकारी; गरीब; कंगाल. [ अर फकीर् ] ०फुकरा-पु. फकीर, गोसावी वगैरे भिक्षेकरी लोकांबद्दल व्यापक अर्थाचा शब्द; (सामा.) गोरगरीब. '(मन्सुरअली) उदास वृत्तीनें अतीत-अभ्यागत, फकीर-फुकरा यांस द्रव्यदान व अन्नदान करीत आपण जात्या आपले स्वकर्मी उजूतबाजू करून सावध होता.' -भाब ५२. [ फकीर+फुकरा=फकीरचें अव. गरीबगुरीब प्रमाणें द्विरुक्ति ]

**फकिरी-बाणा**-फकिरी पहा

**फकोडा**--वि (विरू.) फाकडा पहा.

**फक्कड**—वि १ फकड शब्द पहा. लोकांस न जुमानतां किंवा त्यांची अपेक्षा न धरितां उत्साहानें स्वतंत्रपणें, वर्तणारा; स्वतंत्र; कोणाचीहि, कशाचीहि आस्था संबंध नसलेला २ फांकडा; चैनी; रंगेल. फांकडा पहा. 'हे (रामजोशी) पहिल्यानें मोठे फक्कड, रंगेल व फंदी होते.' -नि ३१४. ३ सुंदर; छान; सुरेख. [ सं. फक्क् ? ]

**फक्कण-न-र**—क्रिवि. फकाफक पहा. (क्रि० खाणें; फेकणें इ०). [ ध्व. फक् ]

**फक्का**—पु. तोंडांत भरलेला बकाणा; फाका; फकाणा (पोहे, पीठ, चूर्ण किंवा कोणतहि कोरडा पदार्थ याचा) (क्रि० मारणें). [ ध्व. फक्. हिं. ]

**फक्किका**—स्त्री. १ (वादांत) सिद्ध करावयाचा मुद्दा, प्रतिज्ञा, पूर्वपक्ष. २ पुरी चौकशी केल्यावाचून बनविलेलें मत; पूर्वग्रह ३ सिद्धांताभास; खोटें असता खरें भासविण्याचा प्रयत्न; हेत्वाभास. ४ कपट; लबाडी; लुच्चेगिरी. फकिका पहा. [ स ]

**फक्की**—स्त्री. लहान फक्का; चूर्णादिकांचा थोडा किंवा लहान घास; फक्का पहा. [ फक्का ]

**फक्टरी**—स्त्री. कारखाना; गिरणी. [ इं. ]

**फक्त, फकस्त**—क्रिवि. केवलत्ववाचक शब्द; केवळ; निवळ; नुसता; मात्र; निखालस. 'फक्त यजमानास बोलवा, मंडळीस नको.' (गो.) फक्कत. [ अर फकत् ]

**फग**—स्त्री. १ सोईची वेळ; सुसंधि. २ मोकळीक; फुरसत. (क्रि० फावणें). **फगणें**-अकर्तृकक्रि. १ संधि सांपडणें. २ सवड सांपडणें; फावणें; मोकळीक असणें. फावणें पहा.

**फंगडा**—पु. फनगडा पहा.

**फ(फं)गरूड, फंगाड**—नपु. १ आडेवेढे; मिथ्याविवाद; तकरार; हुज्जत; उगीच चिकित्सा; निराधार व निष्कारण उपस्थित केलेली अडचण २ विषयांतर करणें; अप्रासंगिक बोलणें; बहकणें.

३ बोलण्याची किंवा भाषणाची लपेट, बोलण्यांतील छक्केपंजे; वाक्छल, वक्रोक्ति. ( क्रि० फोडणें; लावणें ). फनगडा पहा. [का. पंग, पंगड=भिन्न, फाटे फुटलेलें ]

**फँचॉ**—वि. ( गो. ) राखुंडा; वरच्या ओंठास भेग असलेला; ओठतुटया.

**फंजट, फंजरट, फंजरूट, फंज्या**—नस्त्रीअव. पोंचट. ( विरू. ) पंजट पहा.

**फजर**—स्त्री. सकाळ. –क्रिवि. उद्यां सकाळीं; उदईक. [अर. फज्र ]

**फजल**—स्त्री १ कृपा; मेहेरबानगी 'खुदाचे फजलनें इतकियावर इंग्रजांची तंबी होईल.' –रा १९ १०५ २ (व.) (ल.) सुबत्ता; सुकाळ. 'जिकडेतिकडे पावसानें फजल केली.' [ अर. फझ्ल् ]

**फजितवाण**—वि फजीतखोर. 'एक उदार एक कृपण। एक नामांकित एक फजितवाण।' –मक २७ ७८. [ फजिती ]

**फजिता**—पु १ फजिती पहा. २ वाईट तऱ्हेनें तयार केलेला खाण्याचा पदार्थ; पाणी, पीठ इ० च्या आधिक्यामुळें किंवा पदार्थ स्वादिष्ठ होण्यास आवश्यक मसाला, फोडणी इ० नसल्यामुळें वाईट लागणारा आंबरस, वरण, सांबारें इ० पदार्थ. ३ आंब्याचें गातळ रायतें. ४ ( खा ) आंब्याचा रस काढल्यावर राहिलेल्या कोया पाण्यांत कोळून जो रस होतो तो. 'फजिता ओरपला, मग निपाण्या रस घेतला'

**फजि(जी)ती**—स्त्री १ अपमान, अपकीर्ति; अप्रतिष्ठा; पच्ची; तमाशा. ( क्रि० होणें; उडणें ) २ हबेलंडी; गळहाटा; फटफजीती, गोंधळ; संकटकाळीं कसें करूं, काय करू असें वाटण्यासारखी जी अवस्था ती. ३ दुर्गति, वाईट स्थिति. फज्जा पहा. [ अर. फझीहत् ] **फजितीचें जिणें**–गरीबीचें, क्षुद्रपणाचें, निकृष्टावस्थेचें अपमानकारक जीवन.'

**फजिंदार**—पु मालकीची जमीन असलेला इसम; जमीनदार. [ पोर्तु. फाजेंदा+दार प्रत्यय ]

**फजीत**—स्त्री. अपमान; मानखंडना. फजिती पहा. –वि. लज्जित; विरमलेला; ओशाळलेला; आपली फजिती झाली असें ज्याला वाटतें तो, कांहीं व्यवहारापासुन मूर्खपणाचा दोष ज्याचे पदरीं आला आहे तो. (क्रि० होणें; पावणें; करणें) [अर. फझीहत] ०**खोर**–पु नेहमीं फजीत पावणारा किंवा उपहासास पात्र होणारा; कितीहि फजिती झाली तरी न शरमता पुन:पुन: तसेंच करण्याचा स्वभाव असलेला; नेहमीं हंसें करून घेणारा. 'छी म्हणतां येसिल चोरा फजीतखोरा दारापाशीं। मंत्पती हा मोठा वाट, करूं नको थाट, मारला ज.शी।' –राला ८२. [ फजीती+खोर प्रत्यय ] ०**वाडा**–पु. अतिशय फजीती; सर्वत्र उपहास, अप्रतिष्ठा 'इथें तिऱ्हाइताच्या घरीं बोलल्याने सर्व फजीतवाडा होईल असा विचार करून ...' –भयंकरदिव्य. [ फजीति+वडा, वाडा ( वृद्धिवाचक ) प्रत्यय ]

**फजीन**—न. वाडी, शेत इ० स्वत:च्या मालकीचें ठिकाण. [ पोर्तु. फाझेंदा ] ०**दार**–पु. ठिकाणदार; फजिंदार पहा.

**फजूल**—वि. ( ना. माळवी ) फाजील; निष्कारण; व्यर्थ; फुकट. [ अर. फझूल् ]

**फज्जा-ज्या**—पु. भोग्या पहा.

**फज्जा-ज्या**—पु. फजिती पहा. [ अर. फजीह् ]

**फज्जी**—वि. ( ना. व. ) शेवटचा. 'वर्गात त्याचा फज्जी नंबर आहे.'

**फट**—स्त्री. दोन पदार्थांचा घट्ट संयोग न झाल्यामुळें, त्यामध्यें राहिलेला अवकाश; भेग; चीर; खांच २ ( ल. ) रिकामी, शिलकी जागा; कूस ( बोलण्यांत, लिहिण्यांत ठेवलेली ); ठोकळपणें, भरमसाट बोलतांना ठेवलेली कमीजास्त जागा. 'शंभर ब्राह्मणांची भरती झाली असें यजमानास सांगितलें परंतु दोन ब्राह्मणांची आंत फट आहे.' ३ किंचित् वेळ, फावला वेळ; फुरसत. [ सं. स्फट्; प्रा. फट्; ध्व फट् ] ०**फावणें**–संधी येणें, मिळणें, सांपडणें.

**फट**—स्त्री. १ ( राजा. ) बाहणा; बहाणा; निमित्त; सोंग; ढोंग. २ ( गो. ) गप्प; खोटी गोष्ट. [ ध्व. फट् ]

**फट-ट्**—उपपद रांड, लंडी, फजिती इ० शब्दांशीं व तत्सदृश शब्दांशीं आधिक्यार्थी उपयोग करतात 'रांडेजवळ रांड गेली आणि फटरांड झाली' 'हें काम जो न करील तो फटलंडी.' 'त्याची फटफजीती उडाली इ०'

**फट**—स्त्री. फजीती; तमाशा. 'पाच पोरें तीन ढोरें शेजाऱ्याचे घरीं। घरचा पति सोडियेला फट संसारीं।' –मध्व५४५. ०**म्हणणें**–१ धिक्कारणें; अपमानणें. २ रागानें बोलणें; खेंकसणें. **म्ह**० फट म्हणतां ब्रह्महत्या.

**फटक**—क्रिवि. फटीक; आधिक्य किंवा अतिशयत्व दाखविण्याच्या दृष्टीनें पांढरा या शब्दाशीं योजितात. जसें:–पांढराफटक=स्फटिकासारखा पांढरा. [ सं. स्फटिक ]

**फटक**—क्रिवि. चालतांना होणाऱ्या ( फटक फटक अशा जोडा इ०च्या ) आवाजासारखा आवाज होऊन. [ ध्व. ]

**फटकडा**—पु. १ फटाका ( स्फोटक दारूनें भरलेला ). २ ( ल. ) लहान, आटपशीर, टुमकेदार, बांधेसूद, चलाख इसम.

**फटकडी**—स्त्री. १ लहान फटाका ( दारूचा ). २ ( ल. ) सुबक, ठेंगणी, ठसकेबाज, सुंदर स्त्री; नखरेबाज स्त्री; चुणचुणीत व बांधेसूद मुलगी. ३ उडी; झडप ( घोड्याची ). ( क्रि० मारणें ). ४ ( घोडा वगैरेच्या ) शेंपटीचा फटकारा; झपाटा. (क्रि०मारणें). ५ एक प्रकारची तोफ. 'फटकडीचा मुर्चा तयार करविला आहे.' –पेद ३.८७.

**फटकडी**—स्त्री. तुरटी; फटकी. [ सं. स्फटिक+खंड; म. फटक+खडी; हिं. फटकरी ]

**फटकडी**—स्त्री. ( कु ) कडधान्याशिवाय जास्त खोबरें घालून केलेली आमटी. [ फंट+कढी ]

**फट(ट्)कण-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. १ एखादा पदार्थ खालीं पडतांना, बार उडतांना उडी मारतांना किंवा इतर प्रसंगीं फट अशा होणाऱ्या आवाजानें युक्त २ (ल.) तडाक्यासरशीं; चटकन त्यानें मी जातांच फटकर पाच रुपये दिले. ' [ ध्व. फट्; सं. स्फट्; प्रा फट्ट ] ०**बोलणें**–विचार न करतां, एकदम बोलणें.

**फटकणें**—अक्रि १ सटकणें; झुकाडी देऊन निघून जाणें: निसटणें. २ फुटून बाहेर पडणें; वेगळें होणें विभक्त राहणें या अर्थी फटकून राहणें किंवा असणें असा प्रयोग रूढ आहे. ३ बाहेर येणें, निघणें; पळणें. 'पळतां कृप कृतवर्मा द्वारीं एकासही न फटकों दे. ' –मोसौप्तिक २ ३६ –उक्रि १ ( धान्य इ० ) सुपामध्यें घालून पाखडणें. २ ( विस्तव इ०कांस ) पंख्यानें वारा घालणें; झडपणें. **फटकून**–क्रिवि. दूर; एकीकडे; वेगळेपणानें ( क्रि० राहणें; असणें; वागणें ) ' मंडळींत जेव्हां कलह होऊं लागला तेव्हां मी कंटाळून फटकून राहिलों. '

**फटकणें**—न पंखा, विंझणा; व्यजन; झडपण. [ सं. स्फट्; प्रा. फट्ट. म. फटकन् ध्व. फट्; हिं. फटकना ]

**फटकफटक**—क्रिवि. सैल जोडा पायांत घालून चालतांना किंवा सूप इ०नें धान्य पाखडतांना वारंवार होणाऱ्या शब्दाचें अनुकरण होऊन. ( क्रि० चालणें; वाजणें इ० ) [ ध्व. फटक ]

**फटकफळी**—स्त्री. १ लहान मुलांकरितां खेळण्याची बंदूक, नपटी; नेपटी. असाणा इ०कांचें फळ किंवा पाल्याची गुंडाळी इ० आंत घालून गजानें ती रेटली असतां जीपासून आवाज होतो अशी वेळूची नळी. २ ( ल. ) चटकचांदणी; सुंदर स्त्री; फटाकडी पहा. [ ध्व. फटक+फळी ]

**फटकर**—न. १ फाटकें कांबळें, घोंगडें किंवा पांघरावयाचें वस्त्र वगैरे. फटकूर पहा. २ मुडकें; वाभारा; लत्ती; चिरफळी; चिरगूट; चिंधी; चिंधडी. [ फाटणें ]

**फटकळ**—न. अशुभ गोष्ट घडून येणें; दुर्घटना. –शर. –वि. १ तोंडानें वाटेल तसें ( अभद्र शिवराळ, वगैरे ) बोलणारा; मागें पुढें न पाहतां एखाद्यास शिवी देण्याचा किंवा बीभत्स भाषण करण्याचा स्वभाव असलेला; तोंडचा–हातचा–पायाचा–फटकळ पहा. २ कडकावणारा; धडकावून, बेधडक बोलणारा; तोंडाचा हलका; फटया पहा. ३ स्वतंत्र बाण्याचा, वृत्तीचा; कोणावर अवलंबून नसणारा; एकांडा ४ ( प्राय: कवितेंत ) घाणेरडें; खराब; वाईट ( भाषण, मनुष्य इ० ). ' कळलें त्यांसि कर्में फटकळ तें. ' –मोआदि २८.१. ५ अशुभ; विषम ( काळ ). ' काळ मोठा फटकळ आला ' –ख २९९९. फटकाळ पहा. ६ व्यर्थ बडबड करणारा; बडबड्या. ' वदला, नरकपिभय दाखविसी म्याड न हा फटकाळा। ' –मोरा रामायणपंचशती ३०५ [ फटकन ] ०**काळ**–पु. वाईट, प्रतिकूल, विषम वेळ; दुर्दैवाची, आपत्तीची वेळ, संधि अथवा योग. फटकळ अर्थ ५ पहा.

**फटका**—पु. १ फटकारा, प्रहार; तडाखा ( काठी, छडी, चाबूक, तोबा, शस्त्र वगैरेचा ) २ फटकारा शब्दाच्या प्राय सर्व अर्थी उपयोग करितात. ३ एक प्रकारची तलवार. ही सडक पण आंखूड असते ४ आवेशयुक्त पोवाडेवजा पद; एक चुरचुरीत, उपदेशपर काव्य. ' गावयास अनंतफंदिचे फटके मागें सरूं नको। ' –अफला ६१. [ ध्व. फट ]

**फटका**—पु. दरवाजा; वेस ( गावाची, पेठेची ). फाटक पहा. [ हिं. फाटक ]

**फटकाफटकी**—स्त्री. ( का. ) थोडीशी मारामारी, शिवीगाळ इ० व्यवहार; भांडण; झगडा; कटकट; बाचाबाच; खटखट. [ फटका द्वि. ]

**फटकाफटकीं**— क्रिवि.फटक्यासरशीं;तडकाफडकीं,झटक्याबरोबर; क्षणांत. [ फटका द्वि. ]

**फटकारणी**—स्त्री. १ भरकाडणें; झपाटणें; झपाट्यासरशीं उरकणें. २ फटकारा मारणें; धुडकावून लावणें; हांकलपट्टी फटकारणें चें धातुसाधितनाम.

**फटकारणें**—उक्रि. १ शिताफीनें व झटपट करणें,तडाख्यासरशीं संपविणें, उरकणें. २ मोठ्या कुशलतेनें, प्रतिष्ठेनें, सहज मिळविणें. साध्य करणें; संपादन करणें. ३ फटकारा मारणें (शब्दश: व ल. ) ४ भराभर धुणें ( कपडे ) फटकारून टाकणें असाहि प्रयोग रूढ आहे. [ फटकारा; हिं. फटकारना ]

**फटकारा**—पु. १ तडाखा, फटका ( काठीचा, छडीचा, चाबकाचा, तलवारीचा ); फटका पहा. २ ( ल. ) जोराचा, कुशलतेनें केलेला प्रयत्न, परिश्रम. ' पहिल्या फटकाऱ्यास मीं हजार रुपये मिळविले. ' ३ झडप; झपाटणें ( भुतानें अगर पिशाच्चानें). ४ झपाटा; जोर ( वाऱ्याचा किंवा सांथीच्या रोगाचा ). ५ पावसाची जोराची सर. ६ झटका; भिरका; झणकारा ( हाताचा, सुपाचा, वस्त्राच्या पदराचा ). ७ सुं सुं करीत जाणें; धडाका ( बंदुकीच्या गोळ्याचा अथवा बाणांचा ). ८ सामान्यत: दणका; चलाखपणाची, आवेशाची कृति. ९ विंचवाच्या नांगीचा तडाखा; विंचू चावणें. १० पित्ताची उचल; पित्त होणें. ११ लावणीची अनुप्रासबद्ध चाल. [ ध्व. फट+कृ–कार ] **फटकाऱ्याचा पाऊस**–पु. पावसाची जोराची सर; याच्या उलट भिजपाऊस.

**फटकावणें**—क्रि. फटकारणें पहा.

**फटका(कू)ळ**—वि. १ ( सामा. ) फटकळ पहा. ' गृध्र म्हणे रे कोठें नेसी माझ्या सुनेसि फटकाळा। ' –मोवन ११.३८,

२ व्यर्थ. 'फटकाळ तो देव्हारा फटकाळ अंगारा । फटकाळ विचारा चाळविलें । ' -तुगा ३५६६. ३ लाजीरवाणें. ' कर्णापुढें पळावें हें तों मरणापरीस फटकाळ ।' -मोकर्ण ३९.४०. [फटकन, फटकळ]

**फटकिरॉ-रो**—वि (गो.) असत्यवादी [फट]

**फटकी**—स्त्री. तुरटी; फटकडी [सं. स्फटिक; हिं.; गो.]

**फटकी**—स्त्री. (गो.) उपाय; दाद (क्रि० साधणें).

**फटकी**—स्त्री. (कु.) पटकी; कॉलरा. पटकी पहा.

**फटकुरी-कुरें-कूर**—स्त्रीन १ पटकूर; जुनें व फाटकें कांबळें, घोंगडें. २ तुच्छता दर्शविण्यासाठीं (सामा) कांबळयाला किंवा घोंगडीला म्हणतात. ३ फाटकें जाजम, तरट, सतरंजी किंवा अशाच प्रकारचा बैठकीचा तुकडा (गो.) फटें. [सं. पट+म. कुरप्रत्यय]

**फटकुरो**—पु. १(कु.) एका माशाचें नांव २(गो.)बागुलबोवा.

**फटकुऱ्या-र्या**—वि अंगावर फटकुरी, फाटकें वस्त्र वापरणारा; अंगावर चिंध्या लोंबत असलेला; अगदीं दरिद्री; घोंगडया (निंदार्थी वापरतात).

**फटक्या जोडा**—पु. (व.) पुणेरी जोडयासारखा फट्फट् आवाज करणारा जोडा. [ध्व. फटक्+जोडा]

**फटक्या सोंबल(सोमल)**—पु. एक अत्यंत पांढऱ्या वर्णाचा क्षार. [सं. स्फटिक+सोमल; म फटकी+सोंबल]

**फटंग**—पु. (सामा.) फटिंग पहा.

**फटफजिती**—स्त्री. १ अत्यंत निकृष्टावस्था; दुःखकारक व शोकाकुल स्थिति; अपमानकारक, लाजिरवाणी स्थिति; दैना; त्रेधा. २ पुरी फजिती; पच्ची; बोऱ्या; छीःथूः. ' तिसऱ्या जॉर्ज राजाच्या इंग्रेजी अकलेच्या मुत्सद्यांनीं अमेरिकेंत जी आपली फटफजीती करून घेतली... ' -नि १००५.

**फटफट**—स्त्री एखाद्या महत्त्वाच्या कार्यांत, व्यवहारांत, उद्योगी आयुष्यांत प्रसंगानें येणारे आघात, धक्के, चपेटे; धकाबुकी; प्रहार. जसें.-जिंदगानीची -संसाराची - देण्याघेण्याची-जिवाची-फटफट. [ध्व. फट द्वि.]

**फटफट-फटां**—क्रिवि. फटफट अशा एकसारख्या तडा ख्यांच्या, फटकाऱ्याच्या, शिब्यांच्या इ०आवाजानें;फळें वाऱ्याच्या योगानें पडताना, जोरानें शिंकतांना, दोरी तोडतांना, लांकडें जळत असताना, काठी इ०नीं मारतांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण करून. [ध्व. फट द्वि.]

**फटफटणें**—क्रि रात्र संपून चांगलें दिसूं लागणें; उजेडणें; प्रातःकाल होणें; फटफटीत उजेडणें. रात्र-काळोख फटफटणें= अंधार, काळोख वितळणें, नाहींसा होत जाणें. आभाळ दिशा, फटफटणें=दिवस उगवूं लागल्यामुळें आकाश किंवा दिशा प्रकाशमान दिसू लागणें. दिवस फटफटणें=चांगलें उजेडणें. आभाळ-ढग-पाऊस-धुकें-धुई-फटफटणें=आकाश स्वच्छ होणें; ढग, पाऊस, धुकें इ० नाहींसें होणें. [सं. स्फट्=विस्तारणें, फुटणें; प्रा. फट]

**फटफटणें, फटफटें**—न. विस्तव फुलविण्यासाठीं कळकाच्या कांबीचा केलेला पंखा; झडझडणें. [ध्व. फटफट]

**फटफटीत**—वि. १ अत्यंत पांढरें (आधिक्य-दर्शक शब्द) पांढरा शब्दाशीं जोडून योजितात. जसें:-पांढरा फटफटीत. फटक पहा. २ फिकट; निस्तेज; आजाऱ्यासारखा दिसणारा. ३ तेजोहीन; फिका; किरणहीन (दिवसां दिसणारा चंद्र). ४ सार्धें; उघडें; पांढरें (कुंकू किंवा गंध नसलेलें कपाळ). ५ प्रकाशित; उजळलेला; पांढरा चक्क (सूर्य उगवतांना दिशा, आकाश). ६ स्वच्छ; सुरेख; शुभ्र (पावसाळी ढग वितळून गेल्याबर पडणारा प्रकाश) ' आभाळ फटफटीत झालें. ' [सं. स्फट्; प्रा. फट] ०उजेडणें-होणें-फटफटणें; सकाळ होणें.

**फटफटें**—न १ लहान मुलांचें एक खेळणें; फळीचा तुकडा व काटकी घेऊन किंवा केळीच्या डांगचा दांडा टाटोळा छिलून एकमेकांवर आपटून आवाज करतात तें साधन. २ पक्षी उडवून लावण्याचें शेतकऱ्याचें साधन. खटखटें पहा. [फटफट]

**फटमर**—वि. भितरा; भ्याड; फजीतखोर; अब्रूला कलंक लावणारें. ' पाठीवरी घाम म्हणती फटमर । निधडा अंगें शूर मार पावे । ' -तुगा ३८२.

**फटरांड**—स्त्री. हलकट वेश्या. फट पहा.

**फटलंडी**—पु. हलकट मनुष्य. फट पहा. ' फटलंडी म्हणे तुका । एक न साहावे धक्का । ' -तुगा २७०८. **फटलंडीचें काम**-अति गर्ह्य कृत्य. ' नांव बदलून देईन. ' या अर्थी उपयोग करतात. ' हें मी न केलें तर फटलंडीचें काम. '

**फटवण**—स्त्री. १ फसवणूक; ठकवणूक. २ लबाडी; युक्ति; डाव; कपट. ३ मुलांची समजूत करण्यासाठीं त्यांना दिलेली मिठाई, खाऊ वगैरे. [फटविणें]

**फटवणें-विणें**—क्रि मिषादिकानें वंचित करणें; फसवणें; ठकविणें. ' आतां नको मज खोटयानें फटवूं । कोठें येऊं जाऊं वेळोवेळां । ' -तुगा १२६५. [सं. फट=फसव्या]

**फटसट-सटां**—क्रिवि. १ अभद्र, अपशब्द बोलून; तोंड टाकून. २ फटकळ रीतीनें; फाडफाड. (क्रि० बोलणें; करणें). [ध्व]

**फटसाळ-सूळ**—वि. विचार न करितां स्पष्टपणें मनांतील गोष्ट उघड बोलणारा; भडभडया; तोंडाचा फटसूळ असाहि प्रयोग येतो; फटकळ पहा.

**फंटा**—पु. १ (ना.) मोठी फांदी. २ काटेरी निवडुंग, नागफणा. ' फंटयाचें कुंपण जागेभोंवतीं झालें. ' [फांट]

**फटाकडा-डी**—पुस्त्री. फटाका; लहान नळी (स्फोटक दारूनें भरलेली). -वि. फक्कड; छानदार. फाकडा पहा. **फटाकडी**-वि. चुणचुणीत; चटकदार. हुषार (बाई, मुलगी). ' मिऱ्याबानी पोर आहे पण कशी बोलते ! फटाकडी जणु ! '

**फटाकफळी**—स्त्री. १ फटकफळी पहा. २ फटकडी; चुणचुणीत पोरगी.

**फटाका**—पु. १ फटाकडा, फटाकडी, दारूचा बार; फटाकी. (क्रि० सोडणें). २ हातानीं दाबला असतां होणारा कागदी फुगा. ३ (घोड्याच्या) शेंपटाचा फटकारा, तडाखा. (क्रि० मारणें). ४ (ल.) हुषार व चुणचुणीत मुलगा, मुलगी किंवा स्त्री [ध्व. फटक; हिं फटाका-खा]

**फटांगा**—वि. १ आडवातिडवा; फताडा; विस्तृत रीतीनें पसरणारा (लहान वृक्ष, झुडुप इ०). २ आखूड, थपकट, पसरट व झुपकेदार (शिंगें इ०).

**फटाटणें**—क्रि. १ फटफटणें, उजळणें (सूर्य अथवा चंद्र उगवताना दिशा किंवा आकाश). २ चांगला प्रकाशणें (उगवणारा सूर्य अथवा चंद्र). -अकर्तृकक्रि. फटफटीत उजाडणें फटफटणें पहा.

**फटाटां, फटाफट-फटां**—क्रिवि. एकसारखे प्रहार करतांना, शिव्या वगैरेचा भडिमार करताना, सोसाट्याच्या वाऱ्यानें फळें पडतांना, तसेंच कोणत्याहि क्रियेपासून फटफट असा शब्द होतांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन. फटफट-फटां पहा.

**फटाडा**—वि. खुजट व पसरट; बुटका व रुंद; थबकट; बसकट. फताडा पहा.

**फटावळ**—स्त्री (झाडावरून फळाचें) जलद, एकामागून एक पडणें; पटपट पडणें. [ध्व. फट]

**फटाशी-स**—स्त्री. (गो.) तिरफळें घालून बार उडविण्याची नळी. फटकफळी पहा.

**फटास**—स्त्री. (गो.) मनीषा; हेतु.

**फटिंग, फटिंगभाई**—पु. जगांतील व्यवहारापासून अथवा प्रपंचापासून अलिप्त राहणारा मनुष्य; कुटुंब किंवा परिवार वगैरे नसलेला, एकाकी इसम; झोटिंग; सोटभैरव. -वि. १ निःस्पृह; विरक्त; बेपर्वा. 'हा कवीही रामजोशासारखाच मोठा फटिंग होता असें म्हणतात.' -नि ३१६. २ (गो) फसव्या. [सं. स्फटिक]

**फंटी**—स्त्री. (ना.) लहान फांदी. फांटा पहा.

**फटीक**—पु. स्फटिक. पुढील शब्द पहा.

**फटीक, फट्ट**—क्रिवि. आधिक्य दाखविण्यासाठीं पांढरा या शब्दाशीं जोडून योजितात. फटक पहा. 'पांढरा फटीक=स्फटिकासारखा पांढरा. [सं. स्फटिक]

**फटुकनळी**—स्त्री. फटकफळी पहा.

**फटू**—विशेषनाम (गो.) ज्याचें मूल जगत नाहीं अशास मूल झालें असतां हें नांव (फटविणारा या अर्थाचें) ठेवतात.

**फटें**—पु. (गो) घोंगडी; जुनी घोंगडी. फटकूर पहा. **फटेंकार**-पु (गो.) जुनी घोंगडी पांघरणारा गरीब शेतकरी फटकुऱ्या पहा.

**फटोंचें**—क्रि. (गो) खोटें बोलणें. फटविणें पहा. [गो. फट]

**फटौणी**—स्त्री. फसवणूक; फटवण पहा. [गो. फट]

**फट्टा ओढणें-घालणें-पाडणें**—क्रि. पट्टा शब्द पहा

**फट्ट्या**—पु. फटिंग पहा.

**फट्या, फट्ट्या, फट्या बावरा**—वि. धीट व बेफिकीर; पूर्ण स्वतंत्र; निर्भीड; आपलीं मतें कितीहि अप्रिय असलीं तरी तीं धडकावून बोलून दाखविणारा. [फटकण]

**फट्याळ**—वि. (कों.) (सामा.) फटकळ पहा.

**फड**—पु. १ सरकारी कामाची, व्यवहाराची, राबत्याची जागा, ठिकाण. जसें:-न्यायकोर्ट, देवघेवीचा कट्टा, बाजार, चावडी नाकें, लिलावाचें घर इ० २ याचा निंदार्थीहि उपयोग होतो. उदा० खेळण्याचा फड=जुवा खेळण्याचें घर; नाचण्याचा फड; गाण्याचा किंवा ख्याली खुशालीचा फड इ०. ३ (व्यापकपणें) तालीमखाना, सर्कस, क्लब, वादविवादाचा, गप्पांचा इ०चा, अड्डा, जागा. ४ शेतांतील धान्य सारा बसविण्यासाठीं ज्या ठिकाणीं जमविलें जातें ती जागा; धान्याच्या, मालाच्या रूपानें सरकारी सारा ज्या ठिकाणीं आणून दिला जातो ती जागा; कोठार. (सामा) मालाच्या विक्री-तपासणीची जागा. ५ मोठ्या उद्योगधंद्याची, कामाची जागा. उदा० कारखाना, गोदी, छापखाना इ०. ६ लागवड; पीक; शेत (ऊंस, वांगीं, मिरच्या, खरबुजें इ० चें). ७ शेतमळ्यांतील उभें पीक. ८ (ल) जोरांत, जोमात सुरू असणें (एखादें काम); कामाचा रगाडा. (क्रि० चालणें; पडणें; घालणें; मांडणें) ९ मंडळी, कंपू; टोळी, ताफा, संच (नटांचा, नाच्याचा इ०). १० सभा, मंडळ, बैठक 'फड नासोंच न द्यावा। पडला प्रसंग सावरावा। अतिवाद न करावा। कोणी येकामी।'-दा ११ ५.१२ 'आपुल्या संवगडिया सिकवूनी घाई। तेणें सतत फड जागविला रे।' -तुगा २४३ ११ (व.) कणसांचा ढीग. १२ (कों.) धान्याचें कोठार. १३ सरकारी व्यवहाराची जागा; निरनिराळ्या खात्यांच्या दप्तरखान्याचा समुदाय (त्या त्या खात्यावर देखरेख करणाराला फडणीस म्हणतात) [हिं; तुल० म. फडणें] ०**उलगडणें**-१ सामना संपणें (कुस्त्याचा वगैरे) -खरादे ६४. २(ल.) एखाद्या गोष्टीची चर्चा वगैरे संपून बैठक उठणें. ०**पडणें**-१ एखादें काम पूर्ण रंगात, जोमात असणें २ कडाक्याच्या वादाचा विषय होणें. ०**मारणें-राखणें-संभाळणें**-जुना डौल संभाळणें, वाहणा करणें; सोंग आणणें (बाईट स्थिति झांकण्यासाठीं). ०**मारणें-संपादणें-मारून नेणें**-एखाद्या विषयाची चर्चा चालली असतां किंवा समाजापुढें प्रसंगास अनुसरून असें बोलून किंवा कृति करून वेळ मारून नेणें, साजरी करणें, सभा जिंकणें; विजयी होणें. **फडाच्या मापानें**-क्रिवि. भर मापानें, भरपूर सांडोसांड माप घालून. **फडास येणें**-सार्वत्रिक चर्चेचा विषय होणें;

जाहीर चर्चा होणें; चारचौघांत येणें. [ हिं. पहड ] **फड संपादणी**–स्त्री. फड मारून नेण्याचा व्यापार; प्रसंगास योग्य आणि शोभेल असा देखावा किंवा डौल दाखविणें; फड संपादणें पहा.

**फड**—पु १ खजुरीच्या फांदीचें टोंक, तुकडा, पान, हीर. २ निवडुंगाचें पान; फडा [ फडा ]

**फंड**—पु. द्रव्य; संपत्ति; पैसा, द्रव्यनिधि. 'राष्ट्रीयसभा सर्वांनां हवी पण फंड देण्याला लोक तयार नाहीं.' –टि ४ १४४ [ इं. ]

**फडकणी**—स्त्री फडफडणें; फडकणें. [ फडकणें ]

**फडकणें**—अक्रि. १ वाऱ्यामध्यें फडफडणें (निशाण, पताका, वस्त्र इ० ); फडफड करणें; सरसरणें; कडकडणें ( कपडे इ० ). 'जहाज अद्‍भुत श्रीरामचरण । त्यावरी ध्वज विराजमान । रात्रंदिन फडकतसे ।' २ जोरानें अंकुर किंवा वोंब येणें, जोरानें वाढणें ( शेतांतील पीक इ० ). ३ भीतीनें कापणें, दचकणें. 'अपमाना चिये आडके। देखोनि न फडके भयभीतु।' –एभा ११ ४३४ ४ झोंकांत जाणें, येणें, असणें ५ जाणें; उडून जाणें, पुढें जाणें; निसटणें. 'पुनरपि फडके तो फारसा दूर नाहीं । जवळ जवळ ऐसा भासला हंस कांहीं।' –र २२ [ ध्व. फड ! फड ! ]

**फडकरी**—पु १ खेळकऱ्यांच्या, नटांच्या, तमासगिरांच्या इ०) कंपूतील मनुष्य; फडांतील इसम २ फडाचा, सरकारी ठिकाणाचा, कारखान्याचा मालक, अधिकारी; फड पहा ३ किरकोळ विक्री करणारा ( विशेषत: धान्याची ) ४ ( गुऱ्हाळावर नेण्यासाठीं ) उंसाच्या फडांतून उंस कापून देणारा.–कृषि ४७३ [फड+करी प्रत्यय ]

**फडका**—पु १ फडकें; चिरगूट; धडपा, वस्त्राचा तुकडा २ चिंधी; फाटका, जुना तुकडा, लक्तर ३ लुगड्याच्या आंतून नेसण्याचा परकर; घागरा. ४ झटका; झटकारा (पंखा, हात इ० चा) [ फडकें ] **०काढणें**–तुकडा तोडणें. **०फाडणें-फाडून देणें**–( ल ) स्पष्ट किंवा रोखठोक उत्तर देणें; खडखडीत बोलणें.

**फडका**—पु. दुफण; एक प्रकारची पाभर; पेरणीचें औत. यास दोन फण असून एका वेळीं दोन रांगांत बीं पडतें. –कृषि २५७

**फडकानी**—वि. ( माण. ) मोठे कान असलेली ( मढी ).

**फडकाविणें, फडकविणें**—क्रि १ फडफडावयास लावणें; फडफडविणें. (निशाण वगैरे ) २ भडकाविणें, जोरानें थप्पड किंवा चपराक देणें (गालावर, थोबाडांत). 'त्यानें दोन थोबाडांत फडका विल्या.' ३ ( प्राय: ) फरकाविणें. [ फडकणें ]

**फडकी**—स्त्री. १ लहान मुलांची पांघरण्याची रंगीत शाल; पीतांबरासारखें उंची वस्त्र. २ ( खा. ) लहान मुलींचें पसाडा( परकरा )वरून साडीसारखें नेसावयाचें वस्त्र; ओढणी. [ फडका ]

**फडकी**—स्त्री. तुरटी. फटकी पहा.

**फडकें**—न १ कापडाचा तुकडा; चिरगूट; चिंधी; लहान फडका; पटकूर. २ लुगडें. –बदलापूर १२८.

**फडकें**—न. ( गो. ) एक मोठ्या जातीचा मासा: यास दोन मोठे पंख असतात. –मसाप ३.३.

**फडच्या-ड्या**—पु ( विप्र. ) फडशा पहा.

**फडझडती-झाडणी**—स्त्री. १ कोणत्याहि फडाचा, सरकारी कामाचा केलेला निरानिपटा; फडाच्या जागेची तपासणी २ ( ल. ) जोरानें, खडसावून रागें भरणें. ( क्रि० काढणें, घेणें ). ३ निरनिराळ्या फडांची झडती घेणें; पुनतपास करणें, निरनिराळ्या फडाचे हिशोब घेणें ( आलेल्या मालाचा, विक्रीचा, दराचा इ० ). ४ तमासगिराच्या दोन फडांमधील, टोळीमधील भांडण, झगडा ५ ( व्यापक ) कसून परीक्षा घेणें; छाननी करणें [ फड+झडती, झाडणी ]

**फडणवीस, फडणीस**— फडनीस पहा

**फडणिशी-सी**—वि फडनिशी-सी पहा

**फडतर**—स्त्री ( महानु. ) लहान फोड; तुकडा; काप 'तोन्वि दधीभाताचा उंडा वामकरीं । आवळें वेलें आलेआंन्विआं फडतरीं।' –दाव ३८५. [ फाडणें; सं. स्फट्; फडा; देप्रा फड्ड=अंश, हिस्सा; गु. फाडिउं ]

**फडतरणें**—उक्रि. ( महानु ) विभागणें; विस्तारणें 'किंबहुना चराचराचेनि मीषे। फडतरैलें चीद्दप पढियासे। '–भाए ७००. [ फडतर ]

**फडत( ता )ळ, फडतार**—न. १ भिंतींत चौकटी, दारें बसवून केलेलें कपाट. २ सरकत्या झडपांची खोली; जसें:–दुकानाची खोली. ३ खोलीचे सरकते झडपे, ढांपणें

**फडतु(तू)स**—वि. ( व ना वों ) टाकाऊ, गचाळ; निरुपयोगी हलक्या दर्जाचा; फालतू.

**फडत्कार**—पु १ जोराच्या वाऱ्यानें फडफड असा होणारा वस्त्र, निशाण, पंखा इ०चा आवाज. २ फडफड आवाज (शेपटाचा). (क्रि० करणें). 'वाजवी पुच्छाचा फडत्कार।' –नव १५.१२७. ३ जोराचा मार (छडीचा, चाबकाचा इ०). [ ध्व. फड्+कार प्रत्यय ]

**फड( र )दा**—पु ( कों ) भिंतीतील खांबावर, टेकणाऱ्या वहालांच्यामध्यें फट झांकण्याकरितां फळ्या बसवितात त्या. फरदा पहा. [ पडदा ]

**फडनविशी, फडनवीस**—फडनिशी, फडनीस पहा.

**फडनीस**—पु. १ एक सरकारी अधिकारी; वरिष्ठ हिशेबनीस; मुख्य दफ्तरदार. पूर्वींच्या राजवटींत दफ्तरें इ० ठेवणें; सर्व खात्याचे हिशेब तपासणें, देणग्या देणें, हुकूम सोडणें इ० कामें यास करावीं लागत. हल्लीं 'फायनॅन्स मेंबर'ला म्हणतात. याला प्रांतांतील सर्व खात्यांचे हिशेब तपासून जमाखर्चाचा ताळेबंद तयार करणें, जमा, आणि खर्च यांचा मेळ घालणें हीं कामें असतात. २ मामलेदार

कचेरींतील वरिष्ठ कारकून; हेड कारकून **फडनिशी-सी**—स्त्री १ फडनिसाचें काम. २ फडनिसाचा अधिकार, हुद्दा, दर्जा.

**फडपूस**—स्त्री सरकारी, जाहीर उघड चौकशी. [फड+पुमणें]

**फडफड**—स्त्री. फजीती; घोंटाळा. -शर.

**फडफड**—स्त्री. फडफड असा आवाज; फडकणी-णें पहा. 'कलकल कलहंसें फार केला सुटाया। फडफड निजपक्षीं दाविलें कीं उडाया।' -र १०. -क्रिवि निशाण, पंखा, जाड कागद, सुप, शिव्यांचा, बंदुकीचा भडिमार, जोराचे प्रहार इ०च्या आवाजाचें अनुकरण होऊन. (क्रि० चालणें; करणें; उडणें; हालणें; वाजणें) [फड! फड!]

**फडफडणी**—स्त्री. फडफडाट; फडफड; फडकणी. [फड फडणें]

**फडफडणें**—क्रि १ (पंख, जाड कागद, सुप, बंदुकीचा भडिमार इ० चा), फडफड असा आवाज होणें, करणें: फडफड हालतांना, झाडतांना, पाखडतांना वाजणें २एखाद्यावर तोंड सोडणें; ताशेरा झाडणें; शिव्याशाप देणें. ३ लग्न इत्यादिक कार्यानें प्राप्त झालेल्या अधिकारानें एखाद्यावर रागावणें. ४ (गो.) चडफडणें; पश्चात्ताप करणें. [फडफड] 'म्ह० आभाळ कडकडतां न भ्याला सूप फडफडतां भिईल काय?

**फडफडवणी. फडफडावणी**—स्त्री. १ फाडफाड मारणें (चाबूक, छडी इ०नीं). २ शिव्याशापांचा भडिमार; चडफड. ३ फडफड आवाज

**फडफडविणें, फडफडाविणें**—उक्रि. १ छडी, चाबूक इ० चा तडाखा देणें. २ खडकावणें: एखाद्यावर रागानें ओरडणें. ३ (वादविवादात) वरचढपणा, पाडाव करणें. ४ घाईनें, कसेंतरी, अपुरेपणें करणें ५ फडफडावयास, फडफडाट करावयास लावणें. [फड! फड!; फडडणें]

**फडफडाँ**—क्रिवि. फडफड पहा.

**फडफडागत, फडफडाव**—स्त्रीपु. (व्यापक) मालमत्ता; इस्टेट; जिंदगी (जमीनजुमला, गुरेंढोरें, कुटुंब व परिवार इ०); संसाराचें खटलें.

**फडफडाट**—पु मोठा भडिमार (बंदुकांचा, शिव्यांचा, लाथाबुक्यांचा इ०); फडाड. [फडफड]

**फडफडीत**—वि अगदीं मोकळा, कठिण, व कोरडा (चांगला न शिजविलेला भात, सांजा इ०)

**फडफरमा(र्मा)श-स**—स्त्री १ राजेलोकांच्या किंवा अधिकाऱ्यांच्या हुकुमाप्रमाणें ते गांवीं आले असतां त्यांना दिलेली फळफळावळ, भाजीपाला इ० सरबराई; डाली; नजराणा; भेट. २ सरकारनें किंवा सरकारी अधिकाऱ्यानें रयतेकडून घेतलेला लहान-सहान जिन्नस किंवा काम; वेठ. ३ शेतांत तयार झालेल्या पिकाचा थोडासा नमुना सरकारांत भरावा लागे तो (हा एक सरकारी हक्क असे); ऐन जिनसी नजर. 'आजती फडफरमास वगैरे मिळोन ....' -वाडबाबा १.२४८. 'गांवचा अंमल करार केला देखील वेठ बेगार व फडफर्मास बीतपशील.' -समारो १ २०९. [फड+ फा. फरमाइश्=हुकूम]

**फडशा**—पु. १ निःशेष, बेबाक करणें; फेड (कर्जाची); २निकाल; बंदोबस्त; खलास करणें (काम, व्यवहार इ०). ३बाकी न ठेवतां खर्च करून टाकणें; निरानिपटा करणें (पुरवठ्याचा, खाण्याचा पदार्थ, बेगमी इ०चा). (क्रि० करणें, होणें). ४ नाश; निर्दलन; संहार [हिं. फरचा] ०**उडणें**-संपणें. ०**उडविणें-पाडणें**-संपवून टाकणें; संहार करणें. 'आम्ही चवघाजणांनीं पाऊणशें केळ्यांचा फडशा उडविला' ०**चालविणें**-संहार किंवा नाश करण्याचा क्रम ठेवणें. 'अनेक दुर्मतांनीं व दुराग्रहांनीं महारोगा-प्रमाणें या देशाच्या बुद्धीचा, नीतीचा व शरीरसामर्थ्याचा हजारों वर्षें फडशा चालविला आहे.' -आगर.

**फडशाफारक**—पु. पूर्ण निरानिपटा; शेवटचा निकाल, बंदोबस्त (वादाचा, खटल्याचा) -वि. पूर्णपणें, अखेरचा निकाल लावलेला व ठरविलेला; अगदीं निश्चित; ठाम. [फडशा+फारिघ]

**फडस उडवणी**—स्त्री. एक मुलांचा खेळ. -मराठी खेळांचें पुस्तक. १२७.

**फडसूळ**—वि. १ फटदिशीं स्वतःच्या मनांतील विचार मोकळेपणें बोलून दाखविणारा; भाबडा; उथळ. फट-साल सुळ पहा २ दरिद्री; कृश; निकस; बिनफायद्याचा (देश जमीन, शेत इ०). ०**विकरी**-स्त्री निष्फल, भिकार विक्री. याच्या उलट कुडसाळ विक्री=विपुल, भरभराटीची, मोठी विक्री.

**फडा**—स्त्री. १ दहाचा आकडा असलेली नागाची फणी. 'वाटे अहिच्या गेला लावुनि रद दिव्यखेचर फडेतें।' -मोभीष्म ९.४५. २ (आलें, हळद, वेखंड इ० चें) अनेक कांड्याचा, कुड्यांचा पसरट कांदा, गड्डा. -पुस्त्री निवडुंगाची फणी; निवडुं-गाचें पान. [सं. फटा; प्रा. फडा]

**फडा**—पु. १ खजुरीच्या, शिंदीच्या झाडाच्या झावळीचा तुकडा; झाडाच्या फांदीचें टोंक, पात, हीर. फड पहा. २ (ना.) (शिंदीच्या पानांची) केरसुणी. [सं. फटा; प्रा. फडा; तुल० प्रा. फड=अंश]

**फडा(वा)निवडुंग**—पुन. फण्या निवडुंग पहा.

**फडाका**—पु. १ फडफडाट (पंख, निशाण, जहाजाचें शीड इ० चा). २ झटका; फटकारा; झणकारा (वस्त्राचा). ३ पावसाची जोराची सर; तिचा आवाज ४ धडधडाट; खडखडाट; आपटणें; आदळणें (प्रचंड वाऱ्यांत वस्तू इ०). ५ भडिमार (शब्दांचा, शिव्यांचा). 'तोंडाचा-शिव्यांचा-भांडण्याचा फडाका.' फडाडां (-क्रिवि) पहा. [फड]

**फडाड**—पु मोठा आवाज; धूमधडाका: भडिमार ( बंदुकीच्या गोळयाचा, शिव्यांचा, तडाख्यांचा, बोलण्याचा इ० ). [( फडफड चें अतिशयत्व द्योतक )].

**फडाडां, फडफड, फडाफडां**—क्रिवि. चाबूक इ० चे तडाखे मारतांना, फटाक्याचे फडफड शब्द होतांना, बंदुकांचा भडिमार होतांना, पावसाच्या जोराच्या सरी पडतांना, शिव्या इ० चा भडिमार करतांना होणाऱ्या शब्दाचें अनुकरण होऊन फडफड पहा'

**फडी**—स्त्री १ नागाची लहान फडा, फणी. २ ( व ) जेथें जूं बांधतात तो धुऱ्याचा भाग. [ फडा ] ०**फिदारणें**-१ नागानें आपली फडा बाहेर काढणें. २ (ल ) डोळे वटारून पाहणें.

**फडी**—स्त्री. ( खा ) केरसुणी. [ फडा ]

**फडी**—स्त्री. निकाल; खुलासा 'येचि आतां घडी । करूं बैसों तेचि फडी.' –तुगा १३५६

**फडें**—न. १ गोफणीची वादी. २ गोफणीस मध्यें खडा ठेवण्याकरिता सर्पाच्या फणेसारखी विणलेली जागा. [ फडा ]

**फडें**—वि. ( कु ) सम ( संख्या ).

**फडेकार**—पु. (बडोदें) विभागणी, पडदा 'फळयाचा फडेकार घालून केलेली खोली.' –स्वारीनियम ७.

**फड्डी**—स्त्री. (कवडयाचा खेळ) तोंड वर करून किंवा उपडी पडलेली कवडी; याच्या उलट चितकवडी ( पहा ).

**फड्डी**—वि. शेवटचा ( खेळगडी ). [ हिं. फड्डी=शेवटीं ]

**फडया**—पु (धान्य इ०ची) किरकोळ, फुटकळ विक्री करणारा. [ हिं. फड़िया ]

**फडया निवडुंग-निवडुंग**—पुम. फडा, फण्या असणारा निवडुंग, फण्या निवडुंग [ फडा+निवडुंग ]

**फण**—पु. १ एक प्रकारचें दांताळें; गुठें. याला बहुधा चार दांते असतात. २ वरील आउताचा एक दांत पाभरीचा पन्हळ; दाणा खोल जाण्याकरितां जमीन उकरणारा, पाभरीस लावलेला लोखंडी फाळ-पत्रा; ३ –पुन फणी; फडा [ सं. फण ]

**फण**—पु. (व ) जोंधळयाची कापणी केल्यावर त्याचा जमीनींत उरलेला खुंट, सड. 'जवारीचा फण पायाला लागला.' [का पणे] ०**कट**–न. (व.) जोंधळा, बाजरी इ० च्या ताटाचा तुकडा, धसकट

**फणकर**—पु. वणजारी मराठे. –मसाप २.२.१४२.

**फणका, फणकारा**—पु. १ विंचवाच्या नांगीचा प्रहार, तडाखा; नांगी मारल्यानें होणारी आग, वेदना. ( क्रि० मारणें ) २ मीठ, मिरची इ० जखमेस किंवा शरीराच्या कोमल भागास स्पर्श झाला असतां होणारी आग. ३ ज्वरादिकांमुळें अंगाची होणारी तलखी; काहली. ४ रागाची उसळी; झणकारा; संताप.(क्रि० येणें; होणें ). [ फण ! आगीच्या धगधगीचें दृश्य, ध्वनि ]

**फणकारणें**—अक्रि. १ फणकाऱ्यानें बोलणें. २ फटकारा मारणें.

**फणकाविणें**—क्रि. फणका, नांगी मारणें (विंचवानें); डसणें. 'तो विंचुवें फणकाविला।' –दा १८.१०.२३. [ फणका ]

**फणकु(कू)ट**—न. ( तिरस्कारार्थी ) जाड दात्यांची, ओबडधोबड फणी. 'आणा फणकूट, घालं द्या वेणकूट, जाऊंद्या सुनकूट माहेरां' ( सुन माहेरीं निघतांना तिला उद्देशून सासूचें बोलणें ) [ फणी+कूट प्रत्यय ]

**फणगडा**—पु १ फांटा ( क्रि० फुटणें; वळविणें; फिरविणें ). 'ह्या कारभाऱ्यानें माझ्या कामाला फणगडा फोडला.' ३ उपस्थित झालेली, आणलेली हरकत; अडचण; अडथळा; सबब. ( क्रि० फोडणें ). 'हा कोणतेंहि काम पडलें असतां सतरा फणगडे फोडणार.' ४ विषयान्तर करणें. ५ इतर अर्थी फांटा पहा.

**फणणें**—उक्रि. फण किंवा कुळव यानीं शेत नांगरणें. [ फण ]

**फणवें**—न. गांवकुसवाजवळ उगवणारें गवत.

**फणफण**—स्त्री. १ दाहामुळें होणारी ठुसठुस. २ विंचवानें नांगी मारल्यामुळें होणारी वेदना. ३ ( ना. ) संताप; मनस्ताप.

**फणफण-फणां**—क्रिवि खदखदणाऱ्या पदार्थापासून ( गाण्याच्या सुराप्रमाणें ) निघणाऱ्या आवाजाचें किंवा रागानें पुटपुटत असता होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन.

**फणफणणी**—स्त्री. १ गाण्यासारखा आवाज काढणें. फदफदणें; फसफसणें; धुसधुसणें २ फुणफुण; दाह; जळजळ. [ फणफणणें ]

**फणफणणें**—क्रि. १ संताप, दाह, जळजळ, काहील होणें (ज्वरानें, क्रोधानें, कडत पदार्थ खाल्ल्यानें, विषारी प्राणी चावल्यानें ). 'नाना त्वेषानें फणफणत निघून गेले.' –अस्तंभा ६. २ ( पदार्थ आंबत असतांना ) फसफसणें; फदफदणें; खदखदणें; आवाज करणें. [ फणफण ]

**फणफणाट**—पु अंगाचा दाह होणें ( तापांत ); जोराची ठसठस, जळजळ; (पदार्थ आंबत असतांना) खदखदणें; फसफसणें. फणफण-णी पहा. [ फणफण चें अतिशयदर्शक रूप ]

**फणफणीत**—वि. १ (ताप, क्रोध, दंश इ०नीं) फणफणणारा. २ खदखदणारा; फसफसणारा. [ फनफण ]

**फणशा**—वि. १ चलाख; तडफदार; हिंमतवान. २ निश्चयी; करारी; बाणेदार; निर्भय ( फणशा हें धनगरांतील एक आडनांव आहे व या शब्दाचा मोठा, श्रेष्ठ, प्रसिद्ध या अर्थी पुष्कळदां उपरोधपूर्वक उपयोग करतात ). [ फणस पासून विशेषनाम ]

**फणशी-सी**—स्त्री. फणसासारखें एक जंगली झाड. –वि. फणसासंबंधीं; फणसाचें. [ फणस ]

**फणस**—पु. १ एक झाड. २ त्याचें फळ. 'घोस असे फणसांचे षण्मासाचे कितेक वरसाचे।' –र ८. ( हा वृक्ष मोठा

असून तो डोंगरी जागेंत बहुधा होतो. याच्या बरका, कापा व रसाळ अशा जाती आहेत. [ सं. पनस; प्रा. फणस; हिं फनस ]
**फणसट**–न. ( निंदार्थी ) फणस. **फणसपोळी, फणसाचा साठा, फणसाचें साठ-ट**–स्त्रीपुन. बरक्या फणसाच्या गऱ्यांतील आठळ्या काढून ते वाटून करतात ती पोळी, साटें **फणसंबें, फणसांबा, फणसांबें**–नपुन. फणसाच्या झाडाच्या खोडावर वाढलेलें अळंबें. याचा औषधात उपयोग आहे [ फणस+आंबा ]
**फणसूळ**–न. ( गो. ) फणस.

**फणस**—पु. एक मुलींचा खेळ. –मराठी खेळांचें पुस्तक ३२६.

**फणसुला**—पु. १ (कु.) सिताफळ. २ (कु.) पळसुला; मौंजीनंतर ब्रह्मचारी काशीयात्रेस जातांना करण्याचा विधि.

**फणा**—स्त्री. १ नागाची फणी, फडी; फडा २ (कों )केळयाचा घोंस; घड. ' एका फण्याला केळीं किती ? ' ३ ( कों ) गोठ्यातील जमिनीवरील शेण इ० खरवडण्याचें लोखंडी हत्यार. ' फणा घेऊन जमीन खरड आणि नीट झाड ' ४ (गो.) बाहेर दिसणारी दांतांची कवळी. ५ ( गुऱ्हाळ ) उकळत्या रसावरील मळी काढण्याचें शिपतर, पाटी. ६ विणलेला कपडा (गोणपाट इ०) गुंडाळण्याची फळी. –पु. आल्याचें, हळदीचें कुडी असलेलें मूळ. [ सं. प्रा. ]

**फणाडी**—वि. ( नाशिक ) फणी तयार करणारा. [ फणी+आडी प्रत्यय ]

**फणाण**—पु. १ तापानें, क्रोधानें कडत व तिखट पदार्थ खाल्यानें होणारी आग, दाह, फणका. २ आंबविलेले पदार्थ फसफसतांना होणारा आवाज, फणफण. [ फण ! फण ! ]

**फणाणणें**—अक्रि. तीव्र दाह, जळजळ होणें; फणफणणें पहा. [ फणाण ]

**फणी**—स्त्री. १ नागाची फडा. २ –पु. फडा असलेला सर्प. 'शिणलीं सहस्र तोंडें । शेषफणी ऐसें भ्रंडें । '–तुगा ३७५९.[फणा]
**फणिमौळि**–पु. (महानु ) सर्पश्रेष्ठ. 'सेलारा फणिमौळी। उर्णनाभि झीळि। '–भाए २६८. ०**वर**–पु. १ श्रेष्ठ सर्प; शेष. २ लक्ष्मण.
**फणींद्र, फणिंद्र**–पु (महानु ) शेष. ' म्हणौनि उचका फणिंद्र। रची शब्दसागरातें। ' -भाए ९. **फणींद्रबाळी**–स्त्री. एक दागिना; बाळी. ' नागबाळ्या फणींद्रबाळ्या हातीं हातसर। '–अफला ५५.
**फणीपाळ, फणिपाळ**–पु पृथ्वीला आपल्या फणीवर धारण करणारा; शेष.' पाताळ सांडुनि फणिपाळ। '

**फणी**—स्त्री. १ केंस विंचरण्याचें दाते असलेलें साधन; कंगवा; विंचरणी. २ कापड विणण्यासाठीं जींत दोरे ( ताणे ) ओंवतात ती चौकट. ही बोरूच्या चोयांची केलेली किंवा लोखंडी तारांचीहि असते; मागाची फणी ३ पिंजण्याचें यंत्र; साधन. ४ काहिलीला चिकटलेला गूळ खरवडण्याचें साधन. ५ केळयांचा घड; फडी. [ देप्रा. फणग, फणिह ] **म्ह०** (गो.) फणी गेली केस उगींक=कामाचा मनुष्य कामाला गेला. सामाशब्द– ०**करंडा**–पु. चांदीच्या पत्र्याची लहान फणी व त्याचीच कुंकवासाठीं केलेली लहान डबी ( विवाहसंस्कारांत वापरतात ). **फणेरें, फण्यारें**–न. १ शिवणकामाचें सामान ठेवण्याचें जुगदान, पिशवी २ ( फणी, करंडा, आरसा इ० ) वेणीफणी करण्याचें साहित्य ठेवण्याची बायकांची पिशवी, झोळणा.

**फणीचेंडू**—पु चेंडूफळीचा खेळ. –मराठी खेळांचें पुस्तक. ३७

**फणोले**—पुअव. १ खिरीकरितां सपीठाच्या पीठाचे केलेले गहुले. २ (बे.) फेणया; फेणिया. ३ दुधात भिजविलेल्या रव्याची बारीक गोळी ती कोऱ्या फणीचे दात्यावरून सरकवावयाची म्हणजे वरून रेखा उठतात. [ फणी+ओलें प्रत्यय ]

**फण्णा**—पु पूर्ण फडशा; पूर्णपणें खलास फस्त होणें; करणें. ( प्र. ) फन्ना पहा.

**फण्णागोळे**—पु. ( गो ) एक प्रकारचें पक्वान्न

**फण्या**—पु. लांकूड करवतीनें कापतांना आंत घातलेली पाचर.

**फण्यानिवडुंग**—पुन फड्या निवडुंग पहा.

**फतई**—स्त्री. (ना.) एक प्रकारचें जाकीट, फितवी. [अर. फतूही]

**फतकण-ल**—स्त्री १ थबकण; आसनमांडी घालून प्रशस्त बसणें. (क्रि० मारणें; घालून बसणें). २ (ल.) अव्यवस्थितपणें वेडेंवांकडें बसणें [ ? सं. प्रस्थ; प्रा. पत्थ म फत+कण, कल प्रत्यय ]

**फतमाय**—स्त्री. ( निंदार्थी ) फोपशी, आडव्या अंगाची व ठेंगू स्त्री. [ फतिमा=विशेषनांव ]

**फतरडा, फतरा**—वि फताडा पहा ' आमचा फतऱ्या हुषार आहे '

**फतऱ्या**—पु ( व. ) कपाशीच्या गाडीचें वजन करतांना वजनदार फत्तर उचलण्यासाठीं ठेवलेला नोकर. फत्तर पहा.

**फतवा**—पु १ वादग्रस्त प्रश्नावर काझीनें दिलेला निकाल. २ न्यायाधीशाचा निवाडा, हुकूम. [ फा. फतवा ]

**फताडा**—वि. १ पसरट; विस्तारलेलें ( झुडुप ). २ बसकट; फाद्या असलेलीं; फाटे फुटलेलीं (शिंगें किंवा अशीं शिंगें असलेलें जनावर ). ३ रुंदट; थबकट (तोंड, चेहरा इ०). ४ चापट; रुंदट; पसरट ( शेंगा, कांहीं फळें, निवडुंग इ० ) (बहुधां निंदार्थी उपयोग). ५ (सामा.) विशोभित; बेडौल. [ सं. प्रसृत; प्रा. पत्थड ]

**फतुला**—पु ( कों. ) १ नपुंसक; षंढ. २ ( ल. ) नेभळा.
**फतुलाई**–स्त्री. १ (कों.) षंढपणा. २ (ल) नेभळेपणा; बुळेपणा.

**फतुला**—वि.(व.) चैनी. 'बापाच्या जिवावर हे फतुले आहेत.'

**फतू**—स्त्री. कुडतें; जाकीट. –राव्य २.२७. [ अर. फतूही ]

**फते-त्ते**—स्त्री. विजय; सरशी; यश; उत्कर्ष. ' ईश्वरें अशा तऱ्हेनें आमची फत्ते करविली ' –रा ८.५. –वि. १ यशस्वी; विजयी. (क्रि० होणें). २ काबीज, हस्तगत. ' स्वामींचे पुण्येंकरून

जागा फत्ते आहली. ' -ख १.३. [ अर फत्ह् ] ०**मिळविणें**-जय मिळविणें; कार्य सिद्धीस नेणें. ०**होणें**-यशस्वी होणें; जिंकणें, उत्कर्ष पावणें ( उद्योग, धंदा, मसलत ). ०**जंगबहादूर**-पु एक पदवी. -मगचिथोशा५२ [फा ] सामाशब्द- ०**नशीब**-वि. विजयशाली. 'फत्तेनशीब व साहेब-हिंमत आहेत; करितां हरएक प्रकारें फिरंगियाचे फौजेस तंग करितील. '-चिरा १८. [ फा. फत्ह्-नसीब् ] ०**नस्रत**-स्त्री. यश; विजय ' मोहिबांच्या फत्ते-नस्रतीच्या कित्येक खबरा कलमी केल्या त्या मालुम होऊन खुरवक्त जालों. ' -ऐटि २.६५. [अर. फत्ह्-नुस्रत् ] ०**नामा**-पु विजयाची वार्ता कळविणारें पत्र ०**बाजी**-स्त्री. यश; विजय. ' शिंदे यांजकडील फत्तेबाजीचें वर्तमान तुम्ही लिहिलें. '-ख ८.४३७३. ०**लशकर-लश्कर**-न. नेहमीं यशस्वी होणारा माणूस. अपेशी माणसालाहि उपरोधानें लावतात. -वि ( ल ) स्थूल, बोजड शरीराचा ( मनुष्य, जनावर इ० ).

**फतेमारी**—स्त्री. जलद चालीचें लहान गलबत. तीन ते पांच पर्यंत शिडें असणारें गलबत. [ हिं. पातीमारी=पत्रवाहक. पोर्तु. पातामार; गो. पातमार. म पातमारी ]

**फतोल्या फोडणें**—क्रि. ( व ) फांटे फोडणें; शंकाकुशंका काढणें. ' उगीच फतोल्या फोडतो, करणें काहीं नाहीं. '

**फत्तर-रा**—पु. १ पत्थर; दगड; धोंडा ( शब्दशः व ल. ) ' तूं तेथें जातोस परंतु तुला फत्तर मिळावयाचा नाहीं ' २ (ल) बुद्धीचा जड; मठ्ठ इ०. ' तो पोर केवळ फत्तर आहे. ' अनेकवचनी फत्तरे, फतऱ्या अशींहि रूपें रूढ आहेत [ सं. प्रस्तर; प्रा. पत्थर; हिं. पत्थर ] ( वाप्र ) ०**ची रघ**-( व. ल. ) टाळतां न येणारी किंवा अढळ गोष्ट; दगडावरची रेघ. सामाशब्द- ०**पूजा**-स्त्री. (ल.) दगड मारणें; दगडमार, शेणमार करणें इ०. ०**फोड**-स्त्री. १ दगड फोडणें. २ (ल ) कठिण, फार मेहनतीचें काम करणें उदा० मूर्खास बोध, शास्त्रविद्या इ० -वि. कठिण; दु.साध्य, अवघड ( काम ).

**फत्तारी रोटी**—स्त्री. रोटीचा एक प्रकार. ही शेरभर वजनाची असून एक इंच जाड असते. हिचा परिघ सुमारें एक फूट असतो. -गृशि २ १७.

**फत्ते, फत्तेमारी, फत्तेलशकर**—फते, फतेमारी इ० पहा.

**फत्य**—न. यश; फते पहा.

**फत्या**—पु. रात्रीं गस्त घालतांना पहारेकऱ्यांनीं एकमेकांना देण्याचा सोटा (पहारेकरी सावध राहण्यासाठीं ही योजना असे).

**फत्या**—पु. ( अशिष्ट ) नपुंसक; बुळा मनुष्य.

**फत्या, फत्याई**—स्त्री. जय; विजय; सरशी. फते पहा. 'फत्याई झाली.'-विवि ८.४.७७ [ फा फते ] **फत्या बुरूज**-पु. सर्वांत मोठा बुरूज.

**फंद**—पु १ कट; बेत; बंड; कारस्थान ( बहुधा व ईट गोष्टींचें, सरकार इ०च्या विरुद्ध ). ( क्रि० रचणें; करणें; योजणें ). ' वादभेद निंदा हे फंद काळाचे । गोवितील वाचे रिकामिकें । ' -तुगा ३५७. ' फसाद लावविणें मुनासब नाहीं ज्या प्रकारें फंद मोडेल तें करावें. ' -रा ५.१७७. २ दुर्गुण; व्यसन; वाईट संवय; ढंग (द्यूत, जुगार, सुरापान, परस्त्रीगमन इ० ). ३ छंद; नाद; खोड. ' दे टाकुनि हे छंद वावुगे फंद विषयाची काय मजा । ' -अफला ६१. ४ प्रेमसंबंध; प्रेमविलास; चोरून परस्त्रीशीं संबंध ठेवणें 'वाटतो तुशी करावा फन्द । गडे हा पूर्वीचा ऋणानुबन्ध । ' -पला ३२. ५ धुंदी; उन्माद. 'यशाच्या फंदात निमग्न झाले होते, तों गर्वाचें घर खालीं. ' -भाव ८२. ६ कौटिल्य; फसवणूक. ७ थट्टा; कुचेष्टा. -शर [ फा फन्द् ] ०**छंद**-पुअव. छक्केपंजे; फसवणूक; ठकबाजी. ( प्र. ) छंदफंद पहा. ०**फरेब**-पु. कौटिल्य; लबाडीचे डावपेच. 'व-फजल-इलाहि औंमेहेर्बो दूरंदेश व कुलाहूपोश याचे फंदफरेबास खूब वाकीफ. ' -पया ४६३ [ फा. फन्द+फरेब ] ०**फरेबी**-वि. कुटिल; धूर्त; लबाड ०**फितुरी-फितूर**-स्त्रीपु १ ( व्यापक ) कट; फितूरी; बंडखोरपणा; दगलबाजी; स्वामिद्रोहाचें कारस्थान; दगा इ०. २ बंडाळी; क्रांति. ०**फुरई**-स्त्री १ ( सामा ) बंडावा; दगलबाजीचीं, स्वामिद्रोहाचीं कृत्यें. २ बंडखोरीबद्दल दंड. [ फंद द्वि ] **फंदी**-वि. १ वाईट नाद असलेला, छंदी; व्यसनी (माणूस). दगलबाज; फंदफितूर करणारा. ' दोघेहि फन्दी व मकरी. त्यांची उपेक्षा करणें सलाह दौलत नाहीं ' -रा १९.१००. ३ विलासी; शोकी; चैनी ४ ( व. ) लुच्चा. [फंद] ०**छंदी**-वि ( प्र. ) छंदी-फंदी. दुष्ट कारस्थानें रचण्याकडे प्रवृत्ति असलेला; कुलंगडीं करणारा. ०**फाकडा**-वि. छानछोक, नखरेबाज; चैनी; विलासी. [ फंद ]

**फदफद-फदां**—क्रिवि (निंदार्थी) उगाच; दुष्टपणानें, मत्सरानें खदखदां हंसताना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण करून. फिदिफिदी; खदखदा ( क्रि० करणें; हंसणें ). [ ध्व फद ! फद ! ]

**फदफदणें**—क्रि. १ खदखदणें; फसफसणें (आंबतांना-पदार्थ). २ टचटचणें; ठुसठुसणें (फुटावयास आलेलें गळूं ). ३ (गाय, म्हैस इ०नीं ) मोठयांदा आवाज करून हगणें; पो घालणें. [ फद ! फद; हिं फदफदाना ]

**फदुक्या**—पु कुचकामाचा माणूस.

**फदूल**—वि फोपशा; लंबेभारती; वातपुष्ट.

**फद्दल**—वि. ( माण. ) फारसें काम न करतां फत्कल मारून बसणारी.

**फद्या**—पु. पैसा; एक तांब्याचें नाणें ( चार पैचें, मुंबईत रूढ ) -वि कुचकामाचा; निरुपयोगी; दुबळा.

**फन**—न. १ नांगराच्या दांड्याचें, दांताचें टोंक ( ज्याला फाळ बसविलेला असतो तें ) २ चात; तर्कु ३ ( व ) जोंधळयांची कापणी झाल्यावर जमिनींत राहिलेलाखुंट. फण पहा. ०**सावळी**-स्त्री. ( व. ) फन सावडण्याचें एक आऊत.

**फनगड-गडा**—पु. १ फांटा २ झाडावर दोन खांद्या जेथें फुटतात ती जागा; दुबेळें; दुबेळकें. फणगडा पहा.

**फनम**—पु. लहान चांदीचें नाणें. फल्म पहा.

**फना-ना**—पु. १ (खाऊन, खर्चून) फडशा; निःशेष, नाहींसा होणें, करणें; खलास. २ लुटून, मोडूनतोडून, जाळून वगैरे नाश करणें, सत्यनास. 'शहर लुटोन फना केलें.' –मदरु १.७३. 'पूल पालख्या तमाम केल्या फना.' –ऐपो १३८ –वि. नष्ट; उध्वस्त; फस्त. [अर. फना=नाश] ०**बाजी**–स्त्री. नाशकारक खेळ.

**फन्न**—पुस्त्री. तीन फणांची पाभर; तिफण. फण पहा. [फण–न]

**फॅन्सी**—वि १ सुबक; सुरेख; सुंदर. 'आमचे दुकानीं फॅन्सी पातळें व लुगडीं मिळतील'–जाहिरात ८४ (–के १६.४.३०). २ नकली, दिखाऊ (माल) [इं.]

**फपोला**—वि. फोपसा; स्थूल, वातपुष्ट. [फप्प, भप्प+ल प्रत्यय]

**फप्प**—भप्प पहा [फुगण्याचा आकार. तुल० इं. पफ]

**फफय्या**—वि. (कों) निरुपयोगी; कुचकामाचा [? हिं. फफ=पडीत टेवलेली जमीन+अय्या; किंवा पंपय्या]

**फयदा**—पु (कु) (गोट्यांचा खेळ) जेथें उभें राहून गोट्या टाकतात ती जागा.

**फर**—नस्त्री. १ (कों.) खवाट्याचें हाड; अंसफलक. २ मांडीचें हाड; जंघाफलक. फरा पहा [सं फल; प्रा. फर=तक्ता, फरा]

**फरक**—पु. १ अंतर, भिन्नत्व; असमानता २ फेर; विरोध; भेद; तफावत; विपरीतता. ३ फट; अवकाश, जागा; रीघ. 'फरक देखिली जागा रोही वाड्यांत शिरलें।' –ऐपो ६९ 'लोक फरक करून.' –पया ३९३. क्रिवि. वेगळा; निराळा; आडबाजूस; दूर. [अर. फर्क्] ०**करणें**–१ जागा मोकळी करणें; दूर करणें; घालविणें; मोडणें (गर्दी इ०). २ वेगळेपणा करणें; दाखविणें. ०**होणें**–१ वाटेंतून बाजूला होणें–सरणें; मार्ग देणें. २ भिन्नत्व वाटणें, भासणें. **फरकणें**–क्रि. १ बाजूला होणें; वाट देणें. २ (क्व) आवाज करून जाणें; फरकन निसरणें, घसरणें. ३ फरक होणें. [फरक; तुल० प्रा. फरक्किद=हललेला]

**फरक**—पु. (गवंडी) कोंपरा; शेवट (भिंतीचा). [इं फोर्क]

**फरकटणें**—अक्रि. ढुंगण सरकवीत, घाशीत जाणें. फरफटणें पहा. [फरर्! फरर्]

**फरकटणें**—उक्रि. भरभर लिहिणें; खरडणें; घाईनें लिहिणें. (प्र.) भरकटणें पहा [फर्र!]

**फरकटा-डा**—पु. फरगडा पहा.

**फरकड-काड**—स्त्री १ (ना) धांदल; तिरपिट; तारांबळ (क्रि० मचणें). २ (साप इ०) सरपटणाऱ्या प्राण्यांचें मार्गावर उमटलेलें चिन्ह. फरकंडा अर्थ ३ पहा

**फरकंड**—स्त्री फरपटत नेल्याचें चिन्ह, फरपटा. (क्रि० पडणें).

**फरकंडा**—पु. १ धांदोटी; चिंधी (वस्त्राची). २ धादल; घोंटाळा; तारांबळ. (क्रि० घालणें; पाडणें; पडणें). ३ फरकंड; फरकड; फरपटत नेल्याचें, गेल्याचें चिन्ह (साप इ०चें). फरकड पहा

**फरकणें**—अक्रि. उभें राहणें; फडकणें. 'रोमांच जंव फरके। तंव तंव आंग सुरके।' –ज्ञा १८ १६०३ [फडकणें]

**फरकणें**—फिरकणें पहा.

**फरकन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि फाडणें, ओढणें, घसरणें इ० क्रियांच्यावेळीं होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन.

**फरकाविणें**—क्रि. १ नटवेबाज पणानें, डौलानें (फाटेल, पळेल इ० काळजी न करता) शालजोडी इ० उंची वस्त्र धारण करणें, नेसणें. २ भडकाविणें (तोंडांत इ०). फडकाविणें पहा [ध्व. फर!]

**फरकी**—स्त्री मुख्य धान्यात दुसऱ्या जातींचें धान्य थोडथोडें मिसळून पेरणें; पिकाचें मिश्रण उतवडा पहा [फरक]

**फरगटा-गडा-गाडा**—पु. १ वांकडी लिहिलेली ओळ; वाकडी तिकडी रेघ; फाटा; फराटा (क्रि० ओढणें; फोडणें; काढणें). २ (अ. व) लपेटी; ओरखडे; भरकाडे, फरकाटे (क्रि० फोडणें). ३ (ल.) (कामामध्यें) अडचणी करणें; अडथळे; आक्षेप; फांदाडे, फांटे. [फर!]

**फर(क)गत-गाद**—न. एक प्रकारचें लढाऊ जहाज, गलबत. 'त्या समयीं फिरंगी याचें आरमार, व फरगत येऊं नये.' –वाडसमा २.६७ [फ्रें फ्रेगात; इं फ्रिगेट]

**फरगूट-ड**—न. (नवें, जुनें) फडकें; चिंधी; धडपा चिरगूट पहा

**फरजंद**—पु. १ मुलगा; पुत्र. 'किल्ल्यात हरजी महाडिक याचा फरजंद टेवून...' –मराचिथोरा ७० २ मुलगी. [फा. फर्झन्द्=मूल]

**फरजी**—पु. (हिं) (बुदबळक्रीडा) राजाचा वजीर 'प्याद्याचा फरजी'=रंकाचा राव या अर्थी [फा फर्झी]

**फरडा**—वि. पटाईत; निष्णात; निपुण; कुशल (वक्ता, गवई, लेखक इ०) [फर!+डा प्रत्यय]

**फरड**—पु. (कर) (क्व) (खेळ) वट्टया; विशिष्ट (अर्धवर्तुल) आकृतीची दगडाची कपारी; ठिकरी. 'त्यानें फरड फेकून राज्य घेतलें.'

**फरडूक, फरडुकें**—न १ खुबीचें भाषण; नर्मोक्ति. २ चुटका; बोधपर गोष्ट; म्हण; दृष्टांत; सुक्त ३ उपाख्यान; प्रस्तुत विषयांतून निघणारें अप्रस्तुत, लहानसें कथानक; आडकथा; आख्यायिका [फरडा] ०**फोडणें**–फांटे फोडणें; अडथळे आणणें; बयाद, सबबी सांगणें. **फरडुक्या**–वि विनोदी, रसिक भाषण करणारा; विनोदी म्हणींचा इ० भरपूर सांठा जवळ असलेला व प्रसंगीं त्याचा बोलण्यांत उपयोग करणारा. [फरडूक]

**फरतळ-ताळ-तार**—न. (प्र) फडताळ पहा.

**फरतोडा**—पु. १ (ना. व.) झाडाची फांदी; शाखा. २ झाड तोडल्यानंतर त्यास फुटणारा अंकुर. ३ फांटा; फरगडा.

**फरद, फर्द**—पुस्त्रीन १ जोडीपैकीं एक (विशेषतः शाली, धोतरें, विशिष्ट दागिने इ० ); एकेरी वस्त्र. ' अहो शालुच्या फरदा चवलिचा खुरदा काय गोष्ट चांगली. ' –ऐपो ३७२. २ ल्हानसें लेखन; तक्ता; यादी; कॅटलाग. [ अर फर्द् ]

**फरदखजूर**—पु एका जातीचा खजूर ( यांतील बी फार ल्हान असते ).

**फरदा**—पु. १ तक्ता; फळी. २ दरवाज्याचें, खिडकीचें एक दार. फळी. ३ चिठ्ठी. ' घडी भरल्यावर यम काढिल कीं फरदा. ' –देप १८६ ४. फडदा पहा. [ अर. फर्द् ]

**फरप(फ)ट**—स्त्री. १ जमीनीवरून ओढत, घसटत नेलेल्याची खूण. 'तिची पडली फरपट त्यांत बुडालें तरिभुवन.'–(धवशा)मसाप १.३ सापाची फरपट=सापाच्या सरपटीनें जमीनीवर उठलेली चिन्हें, रेघा. २ तंगडी इ० धरून जमीनीवरून फरफर ओढणें, ओढीत नेणें. (क्रि० काढणें). ३ (ल. व सामा ) माग; छडा. (क्रि० जाणें; मोडणें ). ४ रीत; क्रम; वहिवाट; परंपरा. ' मागून फरपट अशी चाल्त आली ' [फर+पट=पट्टा, पाट] **फरपटत चालणें**–फरफटणें पहा. **फरपटत**–पु. रेघ; खूण. फरपट पहा.

**फरप(फ)टणें**—अक्रि. १ घसटत जाणें; सरपटत चालणें. २ पोटावर, ढुंगणावर सरपटणें (जमीनीवरून). **फरप(फ)ट**–क्रिवि. १ घसटत; खरडत; ओढत. २ पोटानें, ढुंगणानें जमीनीवर सरपटत ( जाणें ).

**फरफर**—स्त्री. १ फरपट पहा. २ हाल; ओढाताण. ' काय तिची फरफर चालविली आहे तुम्ही ? ' [ फर ! द्वि. ]

**फरफर-फरां**—क्रिवि. ओढणें, फाडणें, घासणें इ० क्रिया होतांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन. घसडत; फरफटत. फराफर पहा. ' ओढूं नको फरफरा, घेऊं दे सांवरूनियां पदर। ' –मोसभा ५ ७ [ ध्व. फर द्वि. ]

**फरफरणें**—अक्रि. फरफर असा आवाज करणें–निघणें–होणें. फरफर, फराफर पहा. [ फर ! ]

**फरफरणें**—अक्रि .फुरफुरणें; लवणें; स्फुरण पावणें (पापणी, कातडी इ० ) [ सं. स्फुर् ; प्रा. फुर ]

**फरफरव(वि)णें**—उक्रि. ( आवाज होईल अशा तऱ्हेनें ) जमीनीवरून ओढणें, खेचणें; फरफर ओढणें.

**फरमा, फर्मा**—पु १ ( मुद्रण ) मजकूर जुळवून त्याची चेसीमध्यें घट्ट बसविलेलीं, छापलीं जावयाचीं पृष्ठें; ठशांचा संच (चेस असेल त्याप्रमाणें ८–१२–१६ पृष्ठांचा फर्मा होतो). २ नमुना; प्रत. ३ सांचा; प्रकार; पद्धत; रचना; आकृति; घडण. 'ठायिं ठायिं शोभती हौद एक फर्म्याचे। ' –ऐपो ४२३. [इं. फॉर्म] **०जमविणें**–मजकूर छापण्यापूर्वी कागदावर सर्व पृष्ठांचे आकडे एकावर एक (मागच्या व पुढच्या बाजूचे ) असे आणणें व दोन्ही बाजूंचा मजकूर सारखा करून घेणें.

**फरमान-ना, फर्मान-ना**—पुन. राजाचा हुकूम; आज्ञा; सनद; आज्ञापत्र ( वतन, नेमणूक इ० संबंधीं ). ' यांसही फर्मान आला आहे '–रा ८.२१७.[फा. फर्मान; हिं फरमाना] **०बाडी**–स्त्री. फर्मान घेण्यासाठीं जागा, दरबार; दरबार–डेरा. 'त्यानें बलमगडसन्निध येऊन फर्मान–बाडी उभी करून फर्मान खिलत घेतला. ' –रा ६.५९२. [ फा. फर्मान्+बाडी=घर, बारी ]

**फरमा(वि)वणें, फर्मा(वि)वणें**—उक्रि. ( राजादिक मोठ्या माणसानीं) आज्ञा करणें; हुकूम करणें, करावयास सांगणें; आज्ञापिणें. 'रविवारीं कूच करून पेडापुरावर मुकाम फर्मावणार.'–रा १.१५६. [ फा. फर्माना; हिं. फरमाना ]

**फरमाश(स), फर्मास**—पु १ ( राजादिकांची ) आज्ञा; हुकूम, फर्मान. २वरिष्ठांना अर्पण केलेली वस्तु; नजराणा ३–पुस्त्री. (गो ) कुळाकडून येणारा हक्काचा नजराणा. ४ –स्त्री हुकमी वस्तु; पाठविण्यास आज्ञा केलेला जिन्नस; मागणी. 'श्रीमंत स्वामीची फर्मास दिल्लीहून आणिली...पांच पोरी उत्तम आणविली '–रा ३ १५०. –वि. अत्युत्कृष्ट; इर्साल फरमाशी पहा ' काशीचा गुलाब साखरकंदाची गैरजरुराती. उत्तम फर्मास जरूर रवाना करणें. ' –रा १.२४८ [ फा फर्माइश् ] **फरमाशी–सी, फर्माशी–यसी**–स्त्री. १ नजर; अधिकाऱ्यास दिलेली देणगी; फर्मास पहा. २ मागणी. 'गांवगन्ना स्वार वसुलास गेले त्यांचा खर्च रोज व खुराकी किरकोळी फर्मासी वगैरे पांच हजार. ' –रा ११.५९१४. ३ एक तऱ्हेचा कर, पट्टा. ' वेठ–बेगारी फर्मायसी देखील ठाणेपट्टी. ' –ख १५.१३५. –वि. १ हुकूम देऊन, सांगून करविलेला(जिन्नस); मुद्दाम काढलेलें, बनविलेलें (वस्त्र इ०); सांगीचा; काढीव. २ (ल. ) अति उत्कृष्ट; इरसाल; पहिल्या प्रतीचा. [ फा फर्माइशी ] **०चोपमार**–पु. खर्पूस मार; जोराचा मार; हग्यामार.

**फरमिंदा**—पु. ( विरू. ) फामिंदा पहा.

**फरल**—न. ( गो. ) माडाच्या बुंधाचा उभा चिरलेला भाग. फराल पहा.

**फरश-स**—पु कुऱ्हाड; कुऱ्हाडीसारखें शस्त्र; परशु; फरशी. ' फरश घेऊनि हातीं. ' –मुवन १६.५६. [ सं. परशु; हिं. फरसा; गु फरसी ] **०धर**–पु. फरस धारण करणारा; परशुराम. 'फरशधरें अतिपराक्रमें कुंभिनी केली निःक्षेत्री। ' –ऐपो २६५. **फरशी**–स्त्री. १ कुऱ्हाड; फरश पहा. २ मोठी पटाशी; ( कु. ) फरसी –वि. परशूचा ठसा असलेला ( रुपया इ० नाणें ). ' देति धाडून करभार ढिगाचे ढिग कोरे फरशी। ' –ऐपो ३०४. [ फरश ]

**फरशी**—स्त्री. १ दगडी चीप. २ दगडी चिपांनीं केलेली जमीन; फरसबंदी. [ अर. फर्श् ]

**फरस**—पु. १ मोठी फरशी; दगडी चीप. २ फरशी केलेली जमीन; चिरेबंदी भूमि. [ अर. फर्श्; तुल० सं. परुष; प्रा. फरुस ] ०बंदी–स्त्री. १ चिरेबंदी; फरशीकाम. २ गवंडीकाम. –वि. १ फरशीचें. २ बांधकामाचें; गवंडीकामानें बांधलेलें.

**फरसपेटी**—स्त्री. (खडीकाम, विणकाम) वस्त्रें इ०च्या कांठावर काढलेली विशिष्ट वेलबुट्टी, नकशी.

**फरसबी**—न.श्रावणघेवडा; याच्या जातीः–चांभारी घेवडाः–याची शेंग लांबरुंद व चपटी असते. श्रावणी, भादवी घेवडाः–याचा श्रावण-भाद्रपदांत हंगाम असतो. शेंग अरुंद, चपटी व लांबट असते. फ्रेंचबीन्स्. [ फरस=चापट ( अर. फर्श् )+बी; किंवा फ्रेंच=फरास+बीन्स ]

**फरसाळें**—वि. भिन्न रुचीचें, स्वादाचें. 'आणि गोड आंबट मिळे। तेथ रसातर फरसाळें। उठी दोहीं वेगळें। दोहीं जिणतें।' –ज्ञा १८.२४५.

**फरळ**—न. (कों.) नाचणी, हरीक इ० चा कोंडा; टरफल.

**फरळ**—न. (व.) १ पसरट व झुपकेदार अशी झाडाची तोडलेली फांदी. २ (व.) वेल उंच चढण्याकरितां लावलेली काटकी. ३ पेरणीनंतर वरम बुजविण्याकरितां फिरविण्याची फास. [ फर+ळ प्रत्यय ]

**फरा**—पु. १ खांद्याचें हाड, अंसफलक २ मांडीचें हाड; फर पहा. ३ ओळ; रांग; समुदाय; पंक्ति (माणसें, जनावरें इ० उभीं राहिलीं असतां होणारी). 'फडकयांनीं तवा फरा बांधुन।' –ऐपो २७७, 'संगें ऋषीचा फरा।' –भासी ९. ४ कपाळावर कसा तरी (नीटनेटका नव्हे असा) ओढलेला कुंकवाचा पट्टा; फराटा. ५ मुलांच्या कपाळावर बांधायाचें भूषण; पिंपळपान; पिंपळवन. 'सीतापतीचे निजशिरीं। राम शिरोमणी शिरावरी। चिद्रत्नाच्या अलंकारीं। फरा त्यावरी शोभत।' –भाराकिष्किंधा १३.६३. 'रत्नखचित फरा भुज गौरीकुमरा।' –आरती गणपतीची [ सं. फलक, प्रा. फरअ ]

**फरा**—पु. १ धान्य मापण्याचें साधन, माप; मण (१६ किंवा १२ पायलीचा). २ (कोंकणांत कांहीं भागांत फरी) अर्धा मण. ३ खडी, मुरुम, माती वगैरे मापण्याचें २५ घनफुटांचें माप.

**फराकणें**—क्रि. (व.) निवळणें. [ फरक ]

**फरा(ग)त**—स्त्री. १ मुक्तता; स्वास्थ्य; आराम. 'किरतीचा मुकदमा, तर अलीजाह यांचा मसेला, यापासोन फरागत होऊन त्याचाही फैसला करण्यांत येईल.' –रा ५ १३०. २ –वि. (व.) १ मोकळा; रिकामा. 'गांवाबाहेर शौचास जाण्यास फराकत मैदान.' २ ऐसपैस. –क्रिवि. १ स्वस्थ; स्वस्थपणानें. २ तपशीलवार. [ अर. फराघत् ]

**फराकी**—स्त्री. नीट बसतां यावें म्हणून खोगिरावर घातलेली गादी; खोगिरगादी.

**फराखिन्दह**—वि. उभारणारा. –अदिलशाही फर्मान. [ फा. ]

**फराट**—पु. १ जमीनींत पेरलेलें बीं मातीनें झांकून टाकण्याचें आऊत. २ (व.) ज्वारी पेरण्याचें एक तीन फणी लांकडी अवजार.

**फराटा**—पु. (ल) (सामा.) फरगडा; फाटा. (क्रि० ओढणें; फोडणें; काढणें). [ ध्व. ]

**फरांडा**—पु. (व.) झपाटा (चालण्याचा इ०); फेंक. 'एक फरांडा मारला तर येथपर्यंत आलों.' [ फर! फराटा ]

**फरांडा**—पु. (व.) फाडीचा, एका बाजूनें घडविलेला दगड. 'भिंतीसाठीं फराडे घेऊन त्याची रास घातली.' [ फरा ]

**फरांडी**—स्त्री. चामडें ज्यावर कापतात तो लांकडी ठोकळा.

**फराफर-फरा, फरारां**—क्रिवि. फाटणें, फाडणें इ० क्रियांच्या, तसेंच ओरपणें, ओढणें इ० क्रियांच्या आवाजाचें अनुकरण होऊन (क्रि० झाडणें, हालणें, फाडणें; ओरपणें; ओढणें; फेडणें; पादणें). फाफर पहा [ ध्व फर! ]

**फरामोश-ष**—वि विसरलेलें; विस्मृत. 'या दोन्ही बाबती फरामोश करून आमची मुखालीफत कबूल कराल तरी...' –चिरा २३. [ फा. फरामोश् ] **फरामोशी**—स्त्री. विसर; विस्मृति. 'यास फरामोशी केली न पाहिजे' –ब्रप २३४. [ फा. ]

**फराया**—स्त्रीअव. (व) काटया.

**फरारा**—पु १ पताका; निशाण; बावटा; फडकणारें निशाणाचें वस्त्र. 'फ फरारा जरताचा' –ऐपो ९३. २ लोंबणाऱ्या वस्त्राचा सोगा; फडफडणारें फडकें [ ध्व. फर! ]

**फरारी**—वि १ घर व जमीनजुमला सोडून गेलेला; देशत्याग केलेला, परागंदा; पळून गेलेली (रयत, प्रजा, लोक). २ हातीं न लागणारा; गुन्हा करून पळून गेलेला (कैदी, लबाड माणूस, आरोपी). [ अर. ] ०होणें–पळून जाणें.

**फरारी**—स्त्री. १ अंतःकरणाची ओढ. २ आधिक्य; थोरपण. ३ भरभराट. 'आणि पैं तयाची परी। जीविताची फरारी। देखोनि जो नकरी। मृत्युचिंता।' –ज्ञा १३.७३६. ४ भरमसाठ बोलणें, बोलण्यांतील भराऱ्या; थापेबाज बडबड. 'नीळिमा अंबरीं। कां मृगतृष्णालहरी। तैसें वायाचि फरारी। वावो जाहलें।' –ज्ञा १३.१०५. 'जैसें बोले तैसें करी। त्यातें वंदिजे हरहरीं। येर ते बोलाची फरारी।' –भाराबाल ३,२०. ५ गर्व.

**फराल**—न. (कु.) माडाच्या बुंधाचा उभा चिरलेला अर्धा भाग [ फरा? ]

**फरावान**—वि. अपरिमित –आदिलशाही फर्मान. [ फा. ]

**फरा(रां)शीस-सी(सि)स**—पु. फ्रेंच मनुष्य. 'फराशीस पुढे गेले गरनाळा भरगोळयाचा मार।' –ऐपो ११३. –वि.

फ्रेंच. 'तो तेथून एका फरासिस शिपायानें चोरून नेला होता.' –मराठी ६ वें पुस्तक पृ. ११४. [फ्रें. फ्रांसेस]

**फरास, फराशी**—पु. बिछायती घालणें, तंबू ठोकणें, झाडून काढणें इ० कामें करण्यास नेमलेला श्रीमंतांच्या घरांतील नोकर. अस्तरणक –राव्यको ३.२३. [अर. फर्राश्] **फरासखाना**–पु. १ तंबू, जाजमें, बिछायती इ० सरंजाम (समुच्चयानें). २ डेरे, कनाथा. बिछायती इ० सामान ठेवण्याची जागा; अस्तरणागार –राव्यको ३.२३. 'तमाम रिचला फरासखाना।' –ऐपो २१५ [फा. फर्राशखाना]

**फरासपेठ**—स्त्री. (बे.) लुगड्याच्या काठांतील नक्षीचा एक नमुना, प्रकार. याचे चिक्की आणि गोडू असे दोन भेद आहेत.

**फराळ**—पु. १ अल्पाहार; थोडा आहार करणें; उपाहार. २ फळफळावळ व पोहे, पीठ इ० पदार्थ. ३ (विनोदानें) लिहिण्यांत, बोलण्यांत, म्हणण्यांत शब्द गाळणें; शब्द, अक्षर खाणें 'तुम्ही घाईनें म्हणतां यामुळें कांहीं पदांचा फराळ होतो.' [सं. फलाहार; फळाहार–फळार–वर्णव्यत्यसानें फराळ]

**फराळा**—पु. (ना.) (धोतर इ० वस्त्र) बरेंचसें फाटणें; चिंध्या निघणें; फाळा. [ध्व. फर!]

**फरी**—स्त्री. धान्य मोजण्याचें माप; अर्धा फरा, अर्धामण.

**फरी**—स्त्री. लहान ढाल. व्यायामशाळेंत तलवारीचे हात गदगा घेऊन शिकण्यासाठीं या चामड्याच्या ढालीचा उपयोग करतात.

**फरी**—स्त्री. गुरांची मांडी; फरा. [फरा]

**फरीद**—पु. १ कुटुंब, आप्तसंबंधी वगैरे कांहीं एक नसलेला इसम; फटिंग; सडा (प्राय: निंदार्थी उपयोग–कारण कोणताहि पैशाचा व्यवहार अशा माणसाशीं करणें धोक्याचें समजलें जातें). २ मोकळा; रिकामा (कामावरच्या वेळेखेरीज) (शिपाई लोकांच्या वापरण्यांतला शब्द). [अर. फर्द]

**फरें**—न. १ खांद्याचें हाड; अंसफलक. २ मांडीचें हाड; जंघाफलक. फरा पहा. [फरा]

**फरें**—न. फरेंमरें पहा.

**फरेब**—पु. कौटिल्य; कपट; लुच्चेगिरी. 'तऱ्हेतऱ्हेचे मकर व फरेब दाखऊन.' –पया ४६५ [फा. फरेब्] ०देणें–फसविणें. –मौज २.६.३०. [तुल० फा. फरेब्–द्] **फरेबी**–वि. लबाड; कुटिल; विश्वासघातकी. 'टोपीकरांची जात बेइमान व फरेबी.' –पया ४६६. [फा.]

**फरेंमरें**—न. (मुलींचा) एक खेळ. विशिष्ट आकृति काढून नऊ नऊ खड्यांनीं हा खेळतात. या खड्यांना वुला म्हणतात. तीन वुला एका रेषेंत सांध्यावर आल्या म्हणजे फरें होतें. जिचें फरें होतें ती दुसरीचें एक मरें (वुला) घेते. [फरा=ओळ+मरणें]

**फरेल, फोलेर**—पु. (गो) दीपस्तंभ; दीपगृह. [पोर्तु. फारोल]

**फरेवाड**—वि (माण.) गुडघ्याच्या वर वाजवीपेक्षां जास्त वाढलेला. [फरा+वाढ]

**फरोख–खत**—वि. विकलेलें; विक्रीत. 'निमे तक्सीम बरोबस्त फरोख दिली' –चन्द्रचूडदप्तर १.१९. [फा फरोख्त्] ०करणें–विकणें. ०खत–पत्र–न. विक्रीचें पत्र; खत; खरीदखत. **फरोख्ती–खती**–स्त्री. विक्री; विक्रय; विकत देणें. 'फरोख्ती केली असे.' –रा १३.९२. [फा. फरोख्त्]

**फरोड**—पु. १ विस्तार; पसारा; व्याप्ति (काम, विषय इ०ची). (क्रि० घालणें; पसरणें; फैलावणें; पडणें; माजणें; वाढणें). २ (व.) व्यास. [फड]

**फरोदस्त**—पु. (वादन) तेरा मात्रांचा व सहा अंतऱ्यांचा (विभागांचा) ताल.

**फर्क**—न. डोकें. –आदिलशाही फर्मान

**फर्खुन्दह**—वि. शुभ. –आदिलशाही फर्मान.

**फर्गोल**—पु रूदार पायघोळ अंगरखा; ओव्हरकोट. 'सकलात् न मिळे यास्तव स्वामीचा फर्गोल पांघरता पाठविला असे. –रा ८.११०. [फा फर्घूल्]

**फर्जं(र्झ)द**—पु. १ मूल; फरजंद पहा २ लेंकावळा; दासीपुत्र. ३ (गो.) गुलाम. 'लेंकरा–फर्जन्दा सुद्धां.' –रा १५.२७९. [फा. फर्झन्द]

**फर्जित**—वि. (सोंगट्यांचा खेळ) फुकट; बिनहिशेबी. (क्रि० जाणें). 'तोड करावयाची म्हटली म्हणजे ती अशी कीं, एका पक्षाकडच्या सर्व सोंगट्या लायून झाल्यावर एका पत्ताचें दान पडून फर्जित जावा लागतो.' –मराठी खेळांचें पुस्तक पृ. ३६९. (टीप).

**फर्जी**—पु. १ बुद्धिबळांच्या खेळांतील वजीर. फरजी पहा. 'प्यादाखालीं फर्जी गेला। तुका म्हणे डाव झाला।' –तुगा. २ वजीर, राजाचा प्रधान (प्राय:जुन्या कवितेंत). 'मर्जी पाहुनि अर्जी करी फर्जी जैसा गाजे। श्रीकृष्ण पांडवांचे घरीं ऐसा साजे।' [फा. फर्झी]

**फर्जेंत**—(गो.) फर्जंद पहा.

**फर्त**—स्त्री. अतिशयितता. –आदिलशाही फर्मान.

**फर्द–फर्मादी**—पुलीन. १ लेख; एकेरी पत्र. 'येथें जामिरीची फर्द लिहून घ्यावी तरी आपणापाशीं मोहरही नाहीं आणि तुम्हाकडेही कांहीं आश्रय दिसोन येत नाहीं.' –रा ८.२१७. २ गोल कांकडाचा काढलेला तक्ता. लफ्फा पहा. ३ फरद पहा. [फा. फर्द]

**फर्दा, फर्मान, फर्मावणें, फर्मासी, फर्मोस**—फरदा, फरमान इ० पहा.

**फर्न**—न. पाण्याच्या आश्रयानें वाढणारें, सुंदर पानांचें एक झुडूप. हें झाड सावलींत ठेवून यास पाणी घालण्यानें हें हिरवेगार

राहतें. सोनेरी, रुपेरी अशा याच्या जाती आहेत. मेचा, पेरण पहा. [ इं. फर्न; तुल० सं. पर्ण ]

**फर्नांडीन, फर्नांदीस**—पु. ( पोर्तु. ) आंब्याची एक जात; अंबा पहा. [ पोर्तु. फर्नांदीश् ]

**फऱ्या**—पु. गुरांचा एक स्पर्शजन्य रोग; गुरांना होणारा पंटकी वगैरेसारखा आजार. -के १६.६.३१.

**फर्याद, फर्यादी**—स्त्री. तक्रार. -आदिलशाही फर्मान. फिर्यादी पहा.

**फॅर्र**—न. ( गो. ) इस्तरी. [ पोर्तु. फेरा ]

**फर्रास**—वि. ( व. ) बोलण्यांत पटाईत; अधिक बोलणारा. फरडा पहा.

**फर्लो**—स्त्री. कांहीं वर्षांच्या नोकरीनंतर मिळणारी सवलतीची रजा [ इं ]

**फर्शी**—पु कुऱ्हाड; परशु; फरशा पहा. ' फर्शी घेऊनि करीं निकराचा। छेदिला नर सहस्रकरांचा।' -किंगवि ४९. [सं. परशु]

**फर्श-र्ष, फरस, फर्शी**—पुस्त्री. १ फरस-शी. बैठक; बैठकीची मोठी सतरंजी. 'रोशनमहालाचे सहजामध्यें चांदणीचा फर्श होऊन ( नबाब ) बरामद झाले.' -रा ५.२००. २ विरेबंदीची जमीन; लाद्यांची जमीन. 'सभामण्डप व भोंवतालचा फरस.' -रा १४.५६ [अर. फर्श् ]

**फर्शाचा**—पु फरासखान्याचें सामान. -स ५ २६२८. [ अर. फर्श्=बिछायत ]

**फर्सूल**—न. ( गो. ) लहान कुऱ्हाड. [ सं. पर्शु ]

**फर्हत**—स्त्री. आनंद; हर्ष 'हमेशा खत-किताबत फर्हत आवा करीत आवी.' -पया ४६७. [ अर. फर्हत् ] **०नमत**—वि. आनंद देणारें, आनंददायक. ' आँसाहेबांकडून खत फर्हतनमत आलें.' -रा १०५. [ अर. फर्हत्-नमत् ]

**फल**—न. १ फळ ( वृक्षादिकांचें ). ( याचे लक्षणेनें पुष्कळ अर्थ निघतात ). २ (ल.) संतान; संतति; प्रजा ३ फायदा; लाभ. ४ प्राप्ति; उत्पत्ति; निष्पत्ति; कोणताहि व्यापार, क्रिया यापासून निष्पन्न होणारी गोष्ट. ५ परिणाम; शेवट; अखेर. ' तसेंच त्या लेखाचें अगर ग्रंथाचें कांहीं फल.' -गीर २२. ६ ( गणित ) त्रैराशिकांतील दुसरें व चवथें पद; दिलेलें प्रमाण, दर व उत्तर; प्रमाणांक व उत्तरांक ७ भाला, बाण इ० शस्त्राचें टोंक, अग्र; हत्याराचें पातें. ८ नांगराचा फाळ. ९ वर्तुळाचें क्षेत्रफळ. [सं.] सामाशब्द-**०ग्रंथ**-पु. शकुन, मुहूर्त, लक्षणें इ० कांचीं शुभाशुभ फलें सांगणारा फलज्योतिषाचा भाग, असा ज्योतिषग्रंथ. **०ज्योतिष**-न. ग्रहांच्या व नक्षत्रांच्या विशिष्ट स्थितीमुळें मनुष्यावर होणारे परिणाम सिद्धांतरूपानें सांगणारें शास्त्र; ज्योतिष ( ज्योतिष हा शब्द खगोलविद्या आणि खगोलांपासून मिळणाऱ्या फलांचें ज्ञान या दोहोंसहि लावितात तेव्हां फलज्योतिष ही संज्ञा इंग्रजी ॲस्ट्रॉलॉजीला प्रतिशब्द म्हणून नवीन बनविण्यांत आली). **०त्यागी**-वि. आपल्या श्रमाचें फळ (तें मिळण्याच्या वेळींच) मुद्दाम सोडणारा; फलाची इच्छा न करणारा. **०द-रूप-प्रद**-वि. १ फल देणारें; फायद्याचें ( काम, प्रयत्न, युक्ति, उपाय ). ' निगमागमद्रुमफळ। फलप्रद।' -ज्ञा १८.२. २ फायदेशीर, परिणामकारक झालेला; सफळ; गुणावह. 'सफल फलद कर्म त्याज संन्यास साचा। म्हणुनि उमज होतो कथेच्या रसाचा।' **०प्रदान**-न. विवाहांतील एक समारंभ; वाङ्निश्चयाच्या वेळीं नवरीच्या ओटींत नवऱ्याच्या बापानें नारळ वगैरे घालणें. **०न्यास**-पु. आपण केलेल्या कृत्याबद्दल किंवा विशिष्ट सत्कृत्याबद्दल मिळणाऱ्या बक्षिसाची आशा सोडणें; त्यावर हक्क न सांगणें, फलत्याग; निष्कामकर्म. **०भोग्य**-वि. फलांच्याद्वारां, निष्पत्तीवरून, उपभोग घेतां येणारें ( फळझाड, पैसा, वतनवाडी ); याच्या उलट स्वतःभोग्य. **०मान**-न. फलनिष्पत्ति. **०वांछा-च्छा**-स्त्री. फळाची, परिणामाची इच्छा; मोबदल्याची आशा. याच्या उलट फलन्यास. 'त्यजुनिहि फलवांछा काम्यकर्मे करीती। प्रिय हरिस नव्हे ते सर्व ह्या लोकरीती।' -वामन, कात्यायनी व्रत ७०. **०वान्**-वि. फलप्रद; फलद्रूप. **०शर्करा**-स्त्री. फळांपासून काढलेली साखर; (इं.) फ्रुक्टोज. **०श्रुति**-स्त्री. १ व्रत, स्तोत्र, इ० पुण्यकारक कृत्यापासून मिळणारें फळ सांगणारें शास्त्र, ग्रंथविभाग. २ फल; फायदा; निष्पत्ति. 'गोष्ट झाली खरी पण आता रागें भरून फलश्रुति काय ?' [ फल+श्रुति=शास्त्र ] **०क्षम-क्षेम**-वि. १ फलें धारण करण्यास योग्य; फलद ( शब्दशः व ल० ) २ फलदायक; लाभप्रद; कल्याणप्रद. [सं. फलक्षम] **फलाकांक्षा**-स्त्री. फलेच्छा, आशा; फलवांछा. [सं. फल+आकांक्षा] -**कांक्षी**-वि. फलाची, मोबदल्याची इच्छा करणारा. **फलाफल**-न. फायदा-तोटा; नफा-नुकसान. [ फल+अफल ] **फलाशा**-स्त्री. फल मिळण्याची इच्छा, आशा (सुपरिणाम, बक्षीस इ०ची). **फलाहार**-पु. थोडा उपाहार करणें; फराळ; फळफळावळ, पोहे, इ० पदार्थ खाणें; असल्या पदार्थांचें भोजन. [सं. फल+आहार] **फलित**-न गर्भित अर्थ; ध्वनि. -वि. १ फळ आलेला (वृक्षलता इ०). २ (ल.) फायदेशीर, फलद्रूप झालेला ३ ध्वनित; गर्भित; अध्याहृत ( गूढ अर्थ इ० ). [सं.] **०प्रेरणा**-स्त्री. दोन किंवा अधिक प्रेरणांच्या इतकेंच कार्य करणारी प्रेरणा; फलोन्मुख प्रेरणा; परिणत प्रेरणा. (इं.) रिझल्टंट. -यंस्थि ६. **फलितार्थ**-पु १ गर्भितार्थ; ध्वनितार्थ. ' म्हणोनि ते बुद्धि रचूं। मतवाद हे खांचूं। सोलींव निर्वचूं। फलितार्थुचि।' -ज्ञा १३ १०४९. २ फलश्रुति; अर्थ २ पहा. [ फलित+अर्थ ] **फलोत्पत्ति**-स्त्री फायदा; नफा; किफायत. [ फल+उत्पत्ति ] **फलोदय**-पु फळ येणें, दिंडू लागणें. [ सं. फल+उदय ]

**फलक**—पु. १ फरा; मांडीचा भाग. –अश्वप १.६२. २ फळा; तक्ता. ' चित्रफलक. ' [ सं ]

**फलकट**—न. १ पोकळ धान्य; फोलकट पहा. 'जैसें कण आणि फलकट। दोहींसि वाढी एकवाट।' –एभा १३.६२०. २ अशा धान्याचा साठा; संचय रास. ' जैसी चाळणी पीट गाळूनि सर्वेही। फलकट ठेवी आपणातें।' –वि. असार; व्यर्थ; फोल; खोटें; वायफळ. ' रचतें खचतें संचितें। असार रितें फलकट।' –तुगा ७१३. ' हें काय सांगावें फलकट। जैसें जेवण जालिया उच्छिष्ट।'–कथा ४.८ ८. [ फोलकट ]

**फलकणें**—उक्रि. ( ना. ) ( वेळू इ० चे ) दोन भाग करणें; फाळणें पहा. [ सं फल्=फाटणें, फोडणें ]

**फलकाई**—स्त्री. (व ) फलफल पदर हालवीत चालणारी स्त्री. ' आल्या फलकाई. ' [ ध्व. फलक+आई ]

**फलकारा**—पु १ (व ) पदराचा वारा २ वाऱ्यानें उडणारा पदर. ' दिव्याला फलकारा लागला. ' [फलक+वारा; फलक+आरा प्रत्यय] **फलकारे मारणें**-क्रि ये जा करणें. 'साहेबाच्या अंगावरून दहा पांच वेळां उगीच इकडून तिकडे नांवाला चार कागद हातांत घेऊन फलकारे मारले कीं ... तयार. ' –फाटक नाटयछटा २.

**फलकाव(वि)णें**—उक्रि. ( प्र. ) फरकाविणें पहा

**फलंग-लांग**—स्त्री. उडी; टांग. (क्रि० मारणें). [हिं. फलांग]

**फलफिलाल**—क्रिवि. याचक्षणीं; तावडतोब. [ अर. ? बिल्फिल ]

**फलम**—पु. १ सोन्याचें एक लहान नाणें. हें पुतळीपेक्षां कमी किंमतीचें म्हणजे सुमारें तीन रुपये किंमतीचें असतें. होनाचा दशांश; फलम. ' सहासैष्ट होन साडेसहा फलम दोन आणे याचे वांटणीचा मुलुक .. '–समारो १.३४०. २ लहान चांदीचें नाणें, दक्षिण हिंदुस्थानांत रूढ, फनम असेंहि नांव आहे. १२॥। फनम= १ रुपया. [ हिं. ] **फलमाची माळ**-स्त्री. ( गळयांत दागिना म्हणून घालण्याची ) फलम नाण्याची माळ.

**फलवा**—पु एक औषधी वनस्पति. [ हिं. ]

**फलाखी**—स्त्री. वैपुल्य: समृद्धि याच्या उलट हलाखी 'पातशाहास अर्जी श्रीमंताची पोटगी–फलाखी याची मान्य केली.' –रा ६ ५५९ [ फा फराखी ]

**फलाटिण, फलानेल**—स्त्री. लोंकरी मऊ वस्त्र; लोंकरी कापड [ इं फ्लॅनेल ( साटिणप्रमाणें फलाटिण रूप झालें असेल ) ]

**फलांडी**—स्त्री ( कों. )डोलीच्या उभ्या वाशांच्या टोंकांना बांधलेले लाकडाचें आडवे वासे, दांडकी, प्रत्येकी ( हे दोहोपेक्षां जास्त गडी डोली उचलण्यास असल्यासच बांधतात ). ' फलांड्यां-शिवाय चौघेजण डोली कशी उचलणार. ? '

**फलाणबिस्ताण**—न. १ हें तें; ही ती वस्त. २ सटरफटर: अडगळ. ३ कांहींचे कांहीं, निरर्थक, फाल्तू गोष्टी. [फा. फलान् द्विरु.]

**फलाणा**—सना. अमुक; अमका; कोणी; कांहीं ( तुच्छता-दर्शक शब्द ). ' स्वामी तो परमहंस ! सुखदुःखातीत स्वामी असतां क्षणक्षणां फलाण्यानें फलाणें जाहलें, इत्तीमुळें फलाणें गेलें याप्रकारें लिहून पाठवितात याचा विचार काय ? ' –ब्रच ३२. [फा. फलान्; अर. फुलान] ०**बिस्ताणा**-वि अमुकतमुक; कोणीएक; कोणीतरी.

**फलानी-णी**—स्त्री. फलाटीण; लोंकरीचें कापड. –मुंव्या १२३ [ इं. फ्लॅनेल ]

**फलुस**—स्त्री. एक फळांतील साखर; फलशर्करा; ( इं. ) फ्रुक्टोज. साध्या साखरेपेक्षां ही गोड व पचण्यास हलकी असते. हिचा उपयोग मधुमेह विकारावर होतो. ' –ज्ञाको(फ) ७. [ सं. फल+उस प्रत्यय ]

**फल्गु**—स्त्री. १ फल्गु नावाची एक पाणी नसलेली नदी. –वि २ ( ल. ) असार; निःसत्व. ३ क्षुद्र; तुच्छ. [ सं. ]

**फल्लम**—पु. फलम पहा.

**फवणें**—क्रि. प्राप्त होणें; फावणें; मिळणें. पवणें पहा. ' त्या आण वेदगर्भीच्या श्रुती। श्रुतिरूपें माझी नव्हेचि प्राप्ति। तैं परतल्या म्हणोनि नेति नेति। माझी सुखसंगती न फवेची। ' –एभा १२. १६३. [ पावणें ]

**फवारा**—पु. १ पाण्याचें उडणारें कारंजें. ' फवारे रुप्याचे व तांब्याचे मजालस पाहून लावीत जावें.' –पया २८६. २ कारं-ज्याचें तोंड; भोंकें भोंकें असलेलें बोंड. ३ कारंज्यांतून व छिद्रान्वित तोंडावाटें पाणी उडणें; जलोत्क्षेप. [ अर. फव्वारा ]

**फॅशन**—स्त्री. नवीन चाल; रीत; ढंग; प्रथा; प्रचार. [ इं. ]

**फशाळा**—वि.१ फसविलेला; वंचित. २ लुबाडलेला; ज्याच्या टाळूवरून हात फिरविला आहे असा. [ फसणें ] **फशाळी**-स्त्री. १ फसविणें; ठकविणें; लबाडी करणें. २ फसवणूक; ठकवणूक; ठकबण. ( क्रि० करणें; होणें ). [ फसणें ]

**फशीं**—अ जाळयांत; फासांत. [फांसची अनियमित सप्तमी] ०**देणें**-सक्रि. फाशांत पाडणें; अडविणें; फसविणें. ०**पडणें**-अक्रि. फाशांत पडणें; फसुन संकटांत सांपडणें; फसणें. ' सराईम धान्य घेतलें नाहीं यामुळें फशीं पडलों. ' ०**पाडणें**-सक्रि. फसवून संक-टांत, अडचणींत पाडणें.

**फसकटणें, फसकणें**—अक्रि निष्फळ होणें; सिद्धीस न जाणें (सल्ला, मसलत, उपाय, योजना, आशा); फिसकटणें [ध्व.फस ! ]

**फस-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. धान्यादिकांच्या गशींत हात खुपसतांना, पोतें फुटून धान्य इ०बाहेर सांडतांना, चिखलांत बुडताना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण [ ध्व. फस ! ]

**फसकल**—स्त्री. आसनमांडी–मांडा घालून प्रशस्तपणें बसणें; प्रशस्त, अघळपघळ. मांडी घालणें. ( क्रि० मारणें; घालून बसणें ) फतकल पहा. [ हिं. फसकट ]

**फसकळ**—वि. मऊ व दबणारा; एखादा पदार्थ फसकन् कांहीं आंत बुडण्याजोगी (दलदलीत जागा, दाट चिखल). [ध्व. फस]

**फसकी**—स्त्री. १ (हिं.) भाजीपाला, धान्य इ०वरील तें विकणाऱ्याकडून सरकारी अधिकाऱ्यानें वसूल केलेला कर (एका मणास एक पसा अशा तऱ्हेनें घेतात तो). २ योग्य वजनावर किंवा मापावर दिलेलें आणखी थोडेसें धान्य; वर्तावळा; केणें. ३ (कों) भाताचें माप घेतांना मापाच्या मेहनतान्यासाठीं, तसेंच मापाच्या गणतीसाठीं बाहेर काढण्यांत येणारें दर मापागणिक एक ओंजळभर धान्य. खोताच्या नोकरास फसकीचा हक्क मिळतो. ४ प्रसंगविशेषीं किंवा उजळणीच्या दिवशीं शाळेंतील विद्यार्थ्यांनीं पंतोजीस दिलेलें ओंजळभर धान्य. ५ श्रावण महिनाभर किंवा वर्षभर बायकांनीं प्रत्येक सोमवारीं शिवाला वाहिलेली धान्याची मूठ.; 'घे फसकी, दे लक्ष्मी'

**फसगत, फसगप(फ)त, फसगफलत, फसगयफ(ब)त**—स्त्री. फशीं पडलेपणा; फसणूक, फजिती; फसल्याची-लुवाडला गेल्याची स्थिति. [फसणें+गति, गफलत, गैबत] **फस मामला**-पु. नुकसानीचा धंदा; नुकसानीची, फसवणुकीची जागा, स्थिति, काम. (क्रि० पडणें; बसणें; होणें; करणें). [फसणें+मामला]

**फसणें**—क्रि. १ रुतणें; गुतणें; अडकून पडणें; फसकन आंत जाणें (चिखल, रेती इ०मध्यें). २ (ल.) जाळ्यांत सापडणें; संकटांत, अडचणींत अडकणें. ३ ठकविलें जाणें. ४ (दिलेलें कर्ज, ठेव इ०) बुडणें; डुबणें. ५ नुकसान पावणें; तोटा येणें (धनको, व्यापारी इ० नीं) ६ प्रगति, भरभराट न होतां मूळपदावर असणें, राहणें; प्रतिकूल परिणामयुक्त होणें (बेत, अंगीकृत कार्य, उलाघाल, उद्योग इ०). [ध्व फस! हिं. फंसना] **फसण**-स्त्री. १ चिखलाची रुतण, रुपण. २ (ल.) जाळें; फांसा; फशीं पाडणारी, फसविणारी गोष्ट, योजना. **फसणी, फसणूक**-स्त्री. १ रुतलें जाणें. २ (ल.) गुंतून पडणें; गुरफटलें जाणें (शब्दशः व ल.); फसणें फसगत पहा. [फसणें]

**फसफशी(सी)त**—वि. १ स्निग्धता, चिकणाई नसलेला; सुका; भुसभुशीत (माती, पीठ, तपकीर, वाळू इ०) २ अतिशय ओला; थलथलीत; लबलबीत (पिठाचा गोळा, पातळ कणीक, माती इ०). [ध्व. फस!]

**फसफस-फसां**—क्रिवि वाळूवरून किंवा दाट चिखलांतून चालतांना, पुष्कळ मुततांना, आंबलेल्या किंवा फेंस येणाऱ्या पदार्थांचा फसफस शब्द निघतांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन. [ध्व फस!]

**फसफसणें**—अक्रि. १ फसफस आवाज होणें, करणें (फेंस येतांना किंवा जनावरें इ० जोरानें फळफळ मुततांना). २ आंबून फुगणें. ३ फेंस येणें. ४ (कु) निराशा होणें. ५ ओंफस होणें; सिद्धीस न जाणें; फसणें (बेत, कार्य इ०). [ध्व. फस!]

**फसल**—स्त्री. १ पिकांचा हंगाम; मोसम. 'स्वराज्याचा अंमल फसलीचे फसलीस ... फडच्या करीत जाण्याविषयीं जागीरदार व आमील जमीदारांस इनायत-नामे व्हावे.' -रा ५.१९५. २ पीक. 'अम्ब्याची फसल बारमाही चाल्ती करितों.' -रा ७.२१०. ३ घोड्यास पोषक अन्न म्हणून दिलेले ओल्या हरबऱ्याचे घाटे, टहाळे; हरभऱ्याचा ओला चारा. ४ ल्हान मुलांचें पुष्टिकारक अन्न (तूप, खारिक इ०). [अर. फस्ल्] **०खरीफ**-स्त्री. खरीपाच्या हंगामांत येणारें पीक. **०हंगाम**-पु. १ पिकाच्या हंगामाचे दिवस. २ धान्यें पिकल्यावर त्यांच्या क्रयविक्रयाचा काळ, हंगाम, दिवस. [अर. फस्ल्+फा. हंगाम्]

**फसली-स्ली**—न. एक मुसल्मानी शक. (याचा आरंभ मृगास म्हणजे ज्येष्ठ अथवा इंग्रजी जून महिन्याच्या सुमारास होतो. उत्तरेकडे प्रथम अकबरानें हा १५५६ त सुरू केला, तोच शहाजहाननें दक्षिणेंत १६३६ त सुरू केला. फस्लींत मृगापूर्वी ५९१ व मृगानंतर ५९० मिळविले म्हणजे इसवी सन होतो -वि. हंगामी; मोसमांतील [फा. फस्ली] **०सन(न्न)-साल**-न. १ हंगामाचें किंवा सुबत्तेचें साल; उत्पन्नाचें वर्ष २ फसली वर्षगणना, शक. दक्षिणेंतील फसली साल व इतरत्र चालणारें फसली साल यांत दोन दोन वर्षांचा फरक आहे.

**फस(सा)विणें**—उक्रि. ठकविणें; भोंदणें; छकविणें. [फसणें प्रयोजक] **फसवण**-स्त्री. फसवणूक पहा. **फसवणी-णूक**-स्त्री. ठकविणें; ठकबाजी; फसविण्याचा व्यापार. [फसविणें] **फसवे-गिरी**-स्त्री. १ (कायदा) ज्यांत स्वार्थ असून दुसऱ्याचें नुकसान होण्याचा किंवा त्यास इजा होण्याचा संभव असतो असें कोणतेंहि वर्तन, कृत्य; ठकबाजी. २ फसविण्याचा व्यापार, धंदा. **फसव्या**-वि, फसविणारा; ठकविणारा.

**फसाट**—न. (व) अनिष्ट, वाईट परिणाम; नाश; घात. **०काढणें**-बिघडविणें. 'कामाचें फसाट काढलें.'

**फसाट**—पु. (ना. व.) बैलगाडीचा मागचा भाग. 'आम्ही फसाटांत बसलों'

**फसाटी**—स्त्री. (व.) दोरास बांधलेला कांट्यांचा भारा; फरळाचा फास (ज्वारीचे पेरणीनंतर वरम पडतात ते बुजवण्याकरितां). एका फसाटींत चार दोटे असतात. [फास+काटी]

**फसांडी**—स्त्री. १ (व.) श्रमानें आलेला थकवा. २ फजीती. [ध्व. फस]

**फसाद, फसादखोर, फसादी**—फिसाद पहा.

**फसाव**—पु. १ रुतण्याची, फसण्याची जागा (चिखलाचा, दलदलीचा भाग, रस्ता इ०). २ फासांत, गोत्यांत घालणारें काम, उद्योग. फसण पहा. [फसणें] **फसावा**-पु फसगत; फसविलें जाणें; फसवणूक. 'संस्थानाकडे याचा फसावा भारी जाहला.' -समारो २.११६.

**फसाफस-फसां, फसासां**—क्रिवि. मोठ्यानें फसफस करीत. फसफस पहा.

**फसाहत**—स्त्री. वक्तृत्व. –आदिलशाही फर्मान.

**फस्की**—स्त्री. १ फसकी पहा. २ (गो.) बात; थाप.

**फस्त**—स्त्री. (गो.) इज्जत, अब्रू **फस्ती काढप**–(गो.) १ इज्जत घालविणें २ भानगड. **फस्तीक पडप**–(गो.) भानगडींत पडणें.

**फस्त**—वि. पस्त पहा. लुटणें, जाळणें, खाणें इ० द्वारां पूर्ण विध्वंस, नाश, फडशा, निश्शेष झालेला; उध्वस्त; ओसाड. (क्रि० लुटणें; जाळणें; पाडणें; खाणें; नेणें, करून टाकणें व निर्दलन, लूट; फन्ना आणि नासाडी या अर्थाचीं क्रियापदें). 'पेंढाऱ्यांनीं गांव लुटून फस्त केला.' [फा. पस्त्]

**फस्त**—स्त्रीन. शीर (नाडी) तोडून रक्त काढणें. 'हकिमांनीं फस्त सोडविली, तत्क्षणीं प्राण निघोन गेला.' –दिमरा १. २५१. 'त्याचें फस्त खोलून रक्त काढलें असतां ...' –घाको १७४ [अर. फस्द्]

**फहमिन्दा**—फामिंदा पहा. 'कोणी जमीदारीचे कसबांत फहमिंदा न जाहला.' –रा १९.१०५. [फा. फहमीदा]

**फळ**—न १ सर्व अर्थी फल पहा. २ फलप्रदान पहा. ३ वाफेवर शिजविलेला, रोट. (व.) उकडलेल्या पिठाचा अर्धगोलाकृति भक्ष्य पदार्थ. आषाढी अमावास्येस करितात तो. 'वरणावर फळें टाकलीं; आतां होतील.' ४ (व) कन्यादानाचा विधि; साडे. ५ तेलफळ 'तों निजगजरेंसीं फळ। यादव घेऊन आले तात्काळ। मंडपीं थैमले वऱ्हाडी सकळ। भीमकें तेव्हां पूजियेलें।' –ह २४ १९६. [सं फल] **म्ह०** पडत्या फळाची आज्ञा–परवानगी (परवानगी देणाऱ्याच्या मनांत सुद्धां नसलेल्या कृत्यांची गृहीत धरलेली संमति) **०ताड**–पु फळें धरणारें ताडाचें झाड. हें मादी जातीचें असतें. **०त्यागी-प्रदान**–(प्र.) फलत्यागी, फलप्रदान पहा. **०फळावळ-फळोरा**–स्त्री. (समुच्चयार्थी) फळें; अनेक प्रकारचीं फळें; फळावळ पहा. [फळ द्वि.] **०भाजी-शाक**–स्त्री. ज्यांच्या पानांचा खाण्याकडे उपयोग नसून फक्त फळांचाच होतो अशा भोपळा, वांगें इ० भाज्या. याच्या उलट पालेभाजी. **०शोभ(ब)न**–न. प्रथम ऋतु प्राप्त झाल्यावर गर्भशुद्धी करितां व गर्भधारणा सुकर व्हावी म्हणून करावयाचा विधि; गर्भाधानसंस्कार; ऋतुशांति. (कु.) फळसोबाण. 'शांती फळशोबन बारसें।' –दा १४.१.५३. [सं.] **०श्रुती-श्रुत**–स्त्री. फायदा; नफा; लाभ फलश्रुति पहा. [सं फलश्रुति] **फळादेश**–पु. १ फायदा; लाभ; फळ. २ परिणाम. 'याचा फळादेश या प्रकारचा जाहला.' –भाव ४४. [सं. फल+आदेश] **फळार, फळाहार**–पु. फराळ; फलाहार [सं. फल+आहार] **फळावळ-ळि**–स्त्री. नानाप्रकारचीं फळें: फळफळावळ. 'पात्रीं रत्नमणी फळावळि त्रिडे खर्जूरही खोबरें।' –आपू १९. **फळाशा**–स्त्री. फळप्राप्तीची आशा. [सं. फल+आशा] **फळास-फळां येणें**–फलद्रूप होणें; सफल होणें; फायदा मिळणें; फायदेशीर होणें. 'कोटि जन्मींचें पुण्य जाण। फळासीं आलें आज तुझ्या।'

**फळ**—न. १ भाला, बरची इ० चें पातें २ बाणाचा लोखंडी फाळ. 'अस्मद्योगास तसें तव संदर्शन जसें शरास फळें।' –मोअनु १.११. ३ कुंभाराचें थापटणें. [सं. फल]

**फळँ**—न. (गो) फळी.

**फळकट**—वि. (कु.) फळकर पहा.

**फळक(ग)ट**—वि. १ गबाळपणानें घातलेला (पोशाख). २ अव्यस्थितपणें चालविलेलें (काम). ३ भोंगळ; शिथिल; ढिलें (आचरण, वर्तन). ४ हलकें; नि:सत्व; असार (भूस इ०). –न. फोलकट; फोल. फलकट पहा. 'सर्वेचि खुजटपण सांडिलें। रूप आणिकचि मांडिलें। दैत्यें फळकट काढिलें। मजूर जाहले मायेचे।' –एरुस्व २.१६. [फोलकट] **०नेशा**–वि. (पोषाखांत) नीटनेटका नसलेला; बिन चापचोपीचा; अव्यवस्थित. [फळकट+नेसणें]

**फळकण-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि मूत्र, रक्त, दूध, पाणी, धान्य, वाळू इ० पदार्थ एकाएकीं लोट बाहेर पडे असें सांडतांना, वाहतांना होणाऱ्या आवाजासारखा शब्द होऊन. [ध्व. फळ]

**फळकर**—वि. फळण्याच्या वयास आलेली; गर्भधारणेच्या स्थितीस पोंचलेली (गाय, म्हैस इ०). [फळणें+कर प्रत्यय]

**फळकवणी**—न. (निंदार्थी) पाणी जास्त झालेला पातळ पदार्थ (वरण, ताक, सांबारें इ०). [फळकण+पाणी]

**फळण**—स्त्री. गाई-जनावरांचा वर्षांतील फळण्याचा काळ, हंगाम; फळण्याचे दिवस. [फळणें] **फळणावळ**–स्त्री. फळविणाऱ्यास दिलेली किंमत, पैसा. [फळणें] **म्ह०** अटक्याची कोंबडी टका फळणावळ. **फळणी**–स्त्री. मादीचें फळणें; फळण्याचा व्यापार. **फळणें**–अक्रि. १ (शब्दश: व ल.) फळ येण्याच्या स्थितींत असणें. २ (प्राय: ल.) लाभदायक होणें; सफल होणें (काम, युक्ति). ३ प्रसन्न होणें; पावणें (दैव). ४ समृद्ध, भाग्यवान् होणें (मनुष्य). 'तीं (गुल्में) न जातांच औषधें केलीं। गति फळली कर्माची।' ५ पुरें होणें; फळास येणें. 'तेज पहा वचनाचें ज्यासि फळाया न लागली घटिका।' –मोआदि ११.६०. ६ नर जातीकडून संभोगिली जाणें; मैथुनसंस्कार मिळणें; गाभण राहणें (गाय, म्हैस इ०). 'आमची गाय नुकतीच फळली.' [सं. फलन; प्रा. फलण]

**फळणी**—स्त्री. (कों.) (दारें, खिडक्या इ०) झांकण्याची क्रिया. **फळणें**–उक्रि. (कों.) झांकणें, बंद करणें (दारें इ०). 'दार फळ'=दार लाव.

**फळणी**—स्त्री. (गो.) धूळ घातलेला लिहिण्याचा फळा; धूळपाटी. [सं. फलक=तक्ता, फळा]

**फळफळ-फळां,फळाफळ-फळां**—क्रिवि. फळकण पहा. (फळकणपेक्षां हे शब्द आवाजाचें आधिक्य दर्शवितात).

**फळफळणें**—अक्रि. १ पुष्कळ आणि आवाज करून मुतणें (जनावरानें). २ भळभळ पाणी सोडणें (भांडें इ० कानें). ३ घळघळ वाहणें, जोरानें बाहेर येणें (फाटलेल्या पिशवींतून धान्य इ०). ४ प्रसन्न होणें; पूर्ण अनुग्रह असणें; उदयास येणें, उघडणें (दैव). 'त्याचें नशीब आतां फळफळलें.' ५ फायदेशीर असणें (धंदा); भरभराट होणें (कामाची). [ध्व. फळ द्वि.]

**फळफळाट**—पु. १ उत्कर्ष; भरभराट २ सद्दी. ३ विपुलता; प्राचुर्य; समृद्धि. फळफळण्याचा अतिशय.

**फळफळीत**—वि. १ कठिण व प्रत्येक कण वेगळा झालेला; फार मोकळा; फडफडीत (भात इ०). २ वाळलेला व भुसभुशीत (अपुरा भिजविलेला चुना, माती). ३ फार पातळ; पाणचट(ताक इ०). फिळफिळीत पहा.

**फळयेतण**—न. (गो.) गर्भाधान.

**फळयो**—पु. (गो.) एक औषधि.

**फळवला, फळोला**—पु. क, च, ट, त, प हे अक्षरांचे पांच वर्ग प्रत्येकी.

**फळवाट**—स्त्री. (चांभारी) चामडें कापण्याची फळी. [फळी+वट प्रत्यय]

**फळशी**—स्त्री. एक क्षुप.

**फळा**—पु. १ नांगराचा फाळ. २ मोठी फळी. यावर खडूनें लिहितात ३ (ल.) वाळल्यानंतर ज्याचा कागद होतो अशा (ताग इ०) द्रव्याचा थर. ४ (खा.) मूठ असलेली चापट फळी; फळ; थापटणें. हिनें मडकीं ठोकतात. [सं. फलक; प्रा. फलअ]

**फळाटी**—स्त्री. कापशीचा वाळलेला खुंट, काटकी. (प्र.) पळाटी, पळ्हाटी पहा. [पळहें+आटी(काठी)प्रत्यय]

**फळाटी**—स्त्री. (खा.) मडक्याच्या कांठाजवळचा भाग ठोकण्याचें साधन, हत्यार; थापटणें; फळा. [फळ+काठी]

**फळांडी**—स्त्री. (कु.) पायतण नीट करण्याचे वेळीं चांभारास लागणारें लांकूड.

**फळाफळ**—स्त्री. (कों.) जिकडेतिकडे घाईचें बंद करणें (दुकानें, दारें, खिडक्या इ०). [फळणें]

**फळी**—स्त्री. १ लहान फळा; लांकडाची रुंद पट्टी; तक्ता. २ रंधलेली पट्टी. ३ दार, खिडकी इ०चें पान; झडप. ४ बाजू; पक्ष; 'दुफळी.' ५ ओळ, पंक्ति, रांग; दुसऱ्याचा प्रवेश न होऊं देण्याजोगी कटाक्षानें उभी राहिलेली पंक्ति (पशु, मनुष्य, मेघ इ०ची). (क्रि० धरणें; बांधणें; येणें). 'फोडल्या होळकरांनीं फळ्या रावरंभासि लागल्या गोळ्या मारल्या पठाणाच्या टोळ्या।' -ऐपो २४४. ६ समूह; संघ; जूट; कंपू. 'आले बांधोनि फळी शाल्व-जरासंध दंतवक्रादि बळी।' -मोकृष्ण ५३.१४. ७ झोंबी; युद्ध. (क्रि० घेणें). 'जया केसरी पाहतां अश्रु गाळी। करी मत्त त्यासी फळी बे श्रृगाळी।' -वामनविराट ७.८ ८ खेळ. ९ विणकाम ठासून बसण्याकरितां ठोकण्याचें साधन. [सं. फलक=फळा, फळी] (वाप्र.) ०घेणें-युद्धास सिद्ध होणें. -शर. ०फुटणें-सैन्याची रांग मोडणें. 'पळालें फळी फूटली राक्षसांची।' -राक १.६५ ०फोडणें, फोडून आणें-रांग तोडून मधून आणें. ०मांडणें-सैन्याची रांग लढाईस उभी करणें. 'आम्ही कर्णप्रमुख स्वजयार्थें मांडिली रणांत फळी।' -मोकर्ण १४.९.

**फळें**—न. भाला, बाण इ०चें लोखंडी पातें, टोंक; फळ [फळ]

**फळें**—न. १ (कों.) ओबडधोबड कापलेली फळी २ साध्या फळीचा केलेला ओबडधोबड झोंपाळा. ३ सुकाणू. ४ विहिरींत तळभागीं बसविलेली लांकडी चौकट. ५ (वे.) माती ओढण्याची फळी. शेतीचें एक आउत. [फळी] ०पडणें-पिशाच्चबाधेमुळें बेशुद्ध पडणें (कल्याची षष्ठी). **फळ्यांचा खेळ**-पु. (हेट.) आट्यापाट्यांचा खेळ. **फळ्यार बसवप**-क्रि. (गो.) एका जागेवर गप्प बसविणें.

**फाईल**—स्त्रीन. मिसल; फेरिस्त; नोंदवही; कागदपत्रांची चोपडी. 'अशा वेळीं रजिस्ट्रेशन ऑफिसमधील वषानुवर्षांची फाईलें शोधावीं व तपासावीं लागतात.' -धका १४ [इं.] ०करणें-१ वहींत घालून ठेवणें; गोठवणें. २ दफ्तरीं दाखल करणें, नोंद करणें. ३ कागदपत्र, तक्रार इ० नुसती ठेवून देणें; त्यासंबंधीं कांहीं न करणें.

**फाक**—न. (कु) कोंवळें फळ. फक-फंक पहा.

**फा(फां)क**—स्त्री. १ आंबा, खरबूज, भोपळा इ० फळांचा किंवा सुरणादि कंदांचा फुलाच्या पाकळीसारखा लांबट तुकडा; (सामा.) लांबट तुकडा. २ शिमग्यांत बोंब मारण्यापूर्वी जीं बीभत्स वचनें म्हणतात तीं प्रत्येक; शिमग्यांतील शिवी. ३ घोणस किंवा फुरसें (सापाच्या जाती) यांच्या अंगावरील पट्टा; डाग. ४ विस्तार. 'हें बहु जें जें जल्पिजेल। तेथें कथेसि फांक होईल।' -ज्ञा ५.१७३. (याच ओंवींतील फांकचा अर्थ माडगांवकरी ज्ञानेश्वरींत अंतर, प्रतिबंध असा दिला आहे). [फांकणें]

**फा(फां)कट**—न. साधारण, कसें तरी केलेलें ओबडधोबड वार; झापा; फाटक. -वि. फांकलेलें; इतस्ततः पसरलेले; रुंदावत गेलेले (पाय, शिंगें, फांद्या, रस्ते इ०). [फाटक वर्णव्यत्यास]

**फा(फां)कटणें**—अक्रि. पसरणें; (पाय, दुबेळकें इ०) दोन अवयव मध्यें ताण बसेल असे दोहोंकडे दोन पसरणें. [फाकणें]

**फा(फां)कटी**—स्त्री. पाय इ० दोन अवयव फांकटल्यामुळें होणारी स्थिति. फेंगारेपणा; रुंदावलेली स्थिति; मोठा तणावा, ताण.

**फांकटून उभा राहणें**-पाय फांकून, फेंगडे करून उभें राहणें, चालणें [ फांकणें ]

**फाकट**—वि. फालतू; निष्फळ. 'जे बोलती फाकट गोष्टी।' -शिक २१. फांकड पहा.

**फाकटणें**—क्रि. लागणें. -शर.

**फांकड**—न. (राजा.) वांकडें, तिव्याचें, हरकतीचें, वितंडवादाचें बोलणें; हरकत; आडफाटा; फंगरूड; वाकूछल; फरड्क. [ सं. फक्क्; हिं. फांकी ]

**फाकडपसारा**—पु. धंद्याचा अस्ताव्यस्त मांडलेला-पडलेला पसारा; फापट पसारा. [ फाकणें+पसारा ]

**फांकडा**—वि. १ फक्कड; चलाख; पाणीदार; तडफदार. २ हुशार; कुशल; निष्णात. ३ ऐटबाज; अक्कडबाज.' फांकडा शिपाई बाजी।' -विक १०. ४ सुंदर; गुलजार; मारू; फक्कड. फांकड़ असेंहि रूप आढळतें. [ फक्कड; हिं. फांकडा ]

**फांकडी**—वि. (राजा.) वितंडवादी; हरकती आणणारें, फांटे फोडणारें ( भाषण, माणूस ) [ फांकड ]

**फा(फां)कणें**—अक्रि. १ निरनिराळ्या दिशांनीं सर्वत्र पसरणें; विस्तार पावणें; सर्व जागा व्यापणें. ' कर्णीचीं कुंडलें झगझगीत। प्रभा फांकत दशदिशा।' २ विसकटणें. ३ भटकणें; सैरावैरां जाणें; एकावरच केंद्रीभूत न होतां चहूंकडे पसरणें ( दृष्टि, बुद्धि, ज्ञान, मन इ० ). ४ फुलणें. ' एऱ्हवीं जाईचियां फुलां फांकणें।' -ज्ञा १८ २५७. ५ विषयांतर करणें; पाल्हाळ लावणें. ' कथेसी फांकलों सर्वथा। तो कोपू न मानावा श्रोतां।' -एभा ९.४३९. ६ दूर होणें; वियोग होणें. ' आजी दिसे हरी फांकला यांपाशीं। म्हणऊनी ऐसी परी जाली।' -तुगा ४५ ७ रुंदावणें; ताणलें जाणें, असणें; रुंद विस्तृत होत जाणें (पाय, शिंगें, फांद्या, रस्ते इ० ). ८ (मन) आकांक्षायुक्त असणें; इच्छा दूरवर पोंचणें, जाणें. ९ वितुळणें; आसरणें ( घट्ट बेडका ). १० पातळ होणें, द्रवणें ( थिजलेलें रक्त ). ११ वाढणें; वृद्धिंगत होणें. ' तुमचें ऐश्वर्य त्रिजगीं फांके।' -मुसभा १.३३. १२ प्रकाशित होणें ( दिशा ). -उक्रि फोडी करणें; फांकी काढणें. [ सं. स्फातीकृत; प्रा. फाईकय=फैलावलेलें ]

**फा(फां)कणें**—उक्रि. हातांत घेऊन तोंडांत भरणें; फक्का मारून खाणें ( पोहें इ० पदार्थ ); फांका मारणें. [ फांका ]

**फाकताई**—घोड्याचा रंग. -अश्वप १.२८.

**फांकरूट**—न. वाक्य; लेख परिच्छेद; कलम; निबंधांतील एक पूर्ण भाग; प्रकरण. [ फांक ]

**फांकरूट**—न. बरेंच विस्तृत व मोठें चंद्रसूर्या भोंवतीं पडणारें खळें, तळें.

**फा(फां)कळी**—स्त्री. १ फांक; फोड; छकल; शकल; पाकळी. २ (कु.) (लांकडी) पट्टी; फळी. [ फांक ]

**फा(फां)का**—पु. तोंडांत बकाणा भारण्यासाठीं हातांत घेतलेला पदार्थ ( धान्य, पीठ, साखर इ० ); घास.

**फा(फां)का**—पु. उपास; जेवणाचा खाडा; उपासाचा दिवस. ' दिवसेंदिवस अन्न मिळेनासें जाहलें, चार चार फांके पडूं लागले.' -पाब ३०. -वि. रिकामा; निरर्थक; फुकट; रिता; खाली; बाद; कोरा; कोरडा. ' नित्य विकरी होती असेंच कांहीं घडत नाहीं एखाद दिवस फांका जातो.' [ अर. फाका=दारिद्य; अभाव ] ०**मारीत फिरणें**-कांहीं लाभ इ० नसून व्यर्थ भटकणें. **फाकेकशी-सी**-स्त्री. उपासमारी. 'जोतसिंग खंदाकर यास फाकेकसी होत आहे.' -रा ५.११८. [ फा. फाका+कशी ] **फाकेबाज-मस्त**-वि. दारिद्र्यानें गांजलेला असून बाहेर तसें न दाखविणारा; थोर मनानें पूर्वीप्रमाणेंच वागणारा. **फाके मस्त**-वि. (व.) ज्याला फाके ( उपवास ) पडूनहि जो मस्तासारखा राहतो तो. **फाकेकंगाल-मस्त**-वि. (ना.) भुकेकंगाल; अठराविश्वे दरिद्री. **फाकेशीर**-वि. उपाशी. (फा.) -ऐच १.९.

**फाकाटणें**—अक्रि. फाकलें जाणें; वेगवेगळें होत, जाणें. एकमेकापासून दूर, अलग असणें. फाकटणें पहा.

**फांकाफांक**—स्त्री. विस्कटलेली स्थिति, अस्ताव्यस्त पसारा; पांगापांग. [ फांकणें ]

**फांकावा**—पु. विकास. ' अविद्या नाशी उन्मेखु। फांकावा तैसा।' -अमृ ६.६०. [ फांकणें ]

**फांकी**—स्त्री. पूर्ण वाक्य; पूर्ण सिद्धांत, विधान. फक्किका पहा.

**फांकी**—स्त्री. १ वाघ, कांडार, मांजर इ० च्या अंगावरील पट्टा. २ (चांभारी) अर्धे कातडें; अधोड पहा. फांक पहा.

**फांकी**—स्त्री. (गो.) गप्प.

**फाक्ता**—पु. घोड्याचा रंग. -अश्वप १.२७.

**फाक्या**—वि. १ (व.) उडाणटप्पू. २ फाजील; चैनी; चं भिंगी; फक्कड.

**फाग**—पु. १ होळीच्या वेळीं नाचणाऱ्या मुलींनीं वगैरे म्हटलेलीं कृष्णाचीं गाणीं; वेश्या-कंचनींचीं शृंगारपर गाणीं: लावण्या. २ शिमग्यांतील अपशब्द; अश्लील वाक्प्रयोग; उखाणे. फाक पहा. ' शिकला फाग मारी हाका। रांडा पोरें मेळवी लोकां।' -तुगा २७९९. ३ (सामा.) होळीचा सण; शिमगा. [ सं. फल्गु; प्रा. फगु ] ०**पट्टी**-स्त्री. होळीसंबंधीं वर्गणी.

**फाग**—न (कु.) कोवळें फळ ( विशेषत: काजूचें ). फक, फंक.

**फाग**—स्त्री. होडी अडकविण्याची दोरी. पाग पहा.

**फागल**—न. (कु.) एक वेल व तिचें फळ. हें कार्ल्यासारखें असून त्याची भाजी करतात.

**फागळण**—स्त्री. (कु.) एका वेलीचें नांव.

**फांगळा**—पु ( प्रां. ) पांगलेली, पसरलेली, विस्कटलेली स्थिति, अवस्था. ( क्रि० पडणें; पाडणें ). फंगडा पहा. [ पांगणें ]

**फागुर**—पु. (गो. कु.) अंकूर; फूट. ' आंब्याक आतां फागूर येवुंक लागल्या. ' पागोरा पहा.

**फागोटा**—पु. ( कों ) पोफळीच्या तुऱ्याचें वेष्टण; पोफळीवरील शिपूट विरीच्या आंतल्या बाजूला ज्या पातळ आच्छादनामध्यें गुंडाळलेलें असतें तें. ' मुंज झालेले लंगोटी नेसणारे मुलगे फागोटयाची लंगोटी सोंवळयासाठीं वापरतात. '

**फांज**—स्त्री. १ शहर-गांवाभोंवतीं असणारा तट. ( सामा. ) भिंत; कोट. फांजी अर्थ २ पहा. 'सप्त चक्रेंसीं सात बुरुज । रचूनि केला कोट सज्ज । अवयव सफेली स्वरवर्णी फांज । देहदुर्ग पन्नासिलें । —स्वादि १०.२.२२. २ खार जमिनींतील पावसाचें पाणी वाहून जाण्यास मूळ बांधास दरवाजा ठेवतात. या दरवाजाचे दोन्ही बाजूस दगड-चुन्याचे बुरूज बांधतात, ते प्रत्येकी. 'फांजास उघडझापाचे दरवाजे ठेवितात ' [ सं. पाश; म. फास; हिं. फांज ]

**फ़ांज-जी**—स्त्री. एक प्रकारची भाजीची वेल; फाद. ही पावसाळी असुन हिचीं पानें लहान अळवाच्या पानासारखीं असतात.

**फांजणें**—उक्रि. १ टरकावणें; फाडणें; चिरणें; पिचणें; तोंड उकलणें. २ (मशाल चांगली जळावी म्हणून दिवटीचें) तोंड फांकणें; उमलणें; ज्योत मोठी करणें. ३ बीं पेरण्याकरिता शेत तिफणीनें साफ करणें. ४ (खोगीर इ०वर ) निरनिराळया आकृती दोऱ्यांनीं काढणें; विणणें.

**फांजणें**—उक्रि. पाजण लावून ताणा ताठ करणें. पाजणी पहा.

**फांजणें**—अक्रि. (घोडा, हरिण इ०नें) उडी मारणें. फांदणें पहा.

**फाजल**—वि. विद्वान्; शहाणा. ' सर्व गोष्टीनें तुम्ही पढे फ़ाजल आहां व सर्व किताब् जाणून अकल-पूर ... ' —राज ३.१८६. [ अर. फाझिल् ]

**फांजी**—स्त्री. १ अडथळा; अडचण; प्रतिबंध. (क्रि० मारणें; पाडणें; पडणें ). २ नगरकोट; गांवकुसूं; प्राकारवेदिका. फ़ांज पहा. ' उभारिती दुर्गे दारवंट फांजी । ' —तुगा १००. [ फांज ]

**फाजील**—वि. १ अधिक; वाजवीपेक्षां जास्त; जादा. 'माजी मामलेदारांचीं फाजिलें सरकारांत ... पांचसात लक्ष रुपये बुडाले.' —थोमा २.२५४. २ उत्पन्नांत वाढलेलें ( द्रव्य ). ' त्याजकडे फाजील होतें तें माफ करून आणखी बक्षिसें उदंड दिधलीं. ' —चित्रगुप्त ११९. ३ शिल्लक; उरलेलें. ४ चावट; अतिप्रसंग करणारा; वायफळ बोलणारा; अशिष्ट. [ अर. फाझिल् ] ०पणा—चावटपणा; बेशिस्तपणा. [ फाजील+पणा-प्रत्यय ]

**फाट**—न. ( पटवेकरी ) गोंडयाकरतां उपयोगांत येणारें खरें रेशीम.

**फाट्**—स्त्री. ( बे. ) ( घाण्याला जुंपलेली, बैलाची ) जोडी. शको. ५. ३५

**फाट**—पु. बंदुकीचा बार; फट. [ ध्व. फट ]

**फाट, फाटफट-फटी**—स्त्री (कु.) पहांट; प्रभात. [पहाट]

**फाट**—स्त्री (गो.) पाठ; मागील भाग. [पाठ] **फाटल्यान**—क्रिवि. (गो.) मागाहून. **फाटल्याबशीन**—क्रिवि. (गो.) मागच्या बाजूनें.

**फा(फां)ट**—पुस्त्री. १ हरकत; अडथळा; आडफांटा. २ दोष; अपुरेपणा. (क्रि० घेणें). ३ भाषण, लेखन इ०कांत पूर्वोत्तर पडलेला स्पष्ट विरोध, अंतर, फरक. ४ जुळत आलेला जो पंचाईत इ० व्यवहार त्यांत प्रतिकूल होणारा मनुष्य. (भागीदाराचें किंवा मित्राचें) वेगळें होणें. ५ फूट; वियुक्तता; परस्परभिन्नता. ६ भेग; उकल; तोंड; भगदाड, फट; अंतर ७ ( सराफी ) मोत्याच्या वरच्या बाजूचा फुटका भाग; भेग. ८ (बे.) ( गवंडी काम ) दरवाजे अगर खिडक्यांचीं दारें उघडण्याकरतां सोडलेला भिंतीचा उतरता भाग; दारामागील ( पसरट ) भिंत. [ फाटणें ]

**फांट**—पु. ( नाविक ) वल्ह्यानें नावेचें तोंड फिरविणें, मागें चालविणें. ( क्रि० धरणें; करणें ).

**फांट**—न. काढा; अर्क ( औषधी ). [ सं. ]

**फाटक**—न. जुनेर; जुनें; फाटकें वस्त्र. [ फाटकर ]

**फाटक**—न १ साधें, ओबडधोबड दार, झापड; कवाड इ० ( बाग, कुंपण इ० चें ). २ रस्ता बंद करण्यासाठीं रोंवलेलीं उभीं आडवीं लाकडें. ३ शहरची वेस; मुख्य दरवाजा. [ हिं. ]

**फाटकर**—वि. ( राजा. ) जीर्ण; फाटकें ( वस्त्र ). [ फाटणें ]

**फाटकळ, फुटकळ**—स्त्री. फाटक्या तुटक्या वस्तु; अगडबगड; सटरफटर, किरकोळ चीजवस्त. -वि. १ फाटकेंतुटकें; जुनें; जीर्ण. २ पडकें; मोडकें; टाकाऊ ( व्यापक ). [ फाटणें+फुटणें ]

**फाटका**—वि. १ फाटलेला, भोकें पडलेला; विदीर्ण; विदारित. २ ( ल. ) खराब झालेलें; उतरलेलें; रोड; कृश (शरीर, परिस्थिति इ० ). ३ मोडकळीस आलेला; क्षुद्र; हलका झालेला; गरीब; हीन ( धंदा, व्यवहार इ० ). ४ (व.) नंगा. [ फाटणें ] म्ह० फाटक्याला शिववेना आणि दुबळयाला देववेना. ( वाप्र. ) **फाटक्या अंगाचा**—वि. रोड; कृश; पातळ अंगाचा; रोडका; हाडक्या. **फाटक्यांत पाय घालणें-शिरणें-जाणें**—एखाद्या वाईट गोष्टींत दुसऱ्या वाईट गोष्टीची भर पडणें. उदा० अगोदरच संतापलेल्या मनुष्याला आणखी संतापण्याचें कारण घडणें. अगोदरच दुःख भोगीत असलेल्या मनुष्यावर आणखी पीडा, संकटें येणें; नेहमीच्या दुखण्यांत तापाची भर पडणें इ० ' दूध तापांत खाल्लेंस तर जसा फाटक्यांत पाय. '

**फाटकातुटका**—वि. फाटलेला व तुटलेला; मोडकातोडका ( जुन्या, नादुरुस्त वस्तूंविषयीं म्हणतात ). [ फाटणें+तुटणें ]

**फाटकूल**—न. ( कु. ) गप्पा.

**फा(फां)टणें**—अक्रि. १ फाडलें जाणें; टरकणें; चरकणें; (ताण बसल्यानें) भेद होणें. २ (ल.) फुटणें; दुभंग होणें; वेगळें होणें; भिन्न होणें; (एकतंत्रानें चालणाऱ्यांचा) भिन्नभाव होणें. ३ (छाती, हृदय, काळीज-भीति, काळज्या, दुःखें इ० नीं) उलणें; विदीर्ण होणें; मोठा धक्का बसणें. ४ वाढणें. ' किंबहुनां इहीं आटें । आर्गी हा अधिक फांटे । परी शिंपीचि येवढें उमटे । रुपें जेवीं ।'–ज्ञा १५.१०६ ५ इतस्ततः पळणें; दाणादाण होणें. ' जिकडे जिकडे पाहे तिकडे तिकडे भयें चमू फाटे ।'–मोशल्य २ ७६. ६ (डोळे, नजर, मन, इच्छा इ०) फांकणें; भटकणें; परिभ्रमण करणें. सैरावैरां जाणें, करणें ७ (कफ, रक्त इ०) वितळणें; आसरणें; फाकणें; पाणी होणें. ८ पोहोंचणें. ' येथ जिभेचा हात फांटे । तंव जेवितां गमे गोमटें ।'–माज्ञा १८.२४९. [सं. स्फट्; प्रा. फट्]

**फाटफूट**—स्त्री. १ छेद; फूट; चीर; तडा; दोरा (नाणें, फळ, भिंत, जमीन यातील). २ (भागीदार, सैन्य इ० तील) फूट; वेगळें होणें; जूट न राहणें; भिन्न दिशास जाणें. –वि. तडा, चीर, दोरा असलेलें; तडकलेलें, भेगललेलें (नाणें इ०). [फाटणें+फुटणें]

**फाटफूट**—न. १ फटाके, बंदुका वगैरेचा होणारा आवाज. २ (ल.) लढाई. [ध्व.]

**फाटबाजू**—स्त्री. कमानीच्या दगडाची (दर्शनी व मागील खेरीज इतर) बाजू. –मॅरट ४६.

**फा(फां)टा**—पु. १ अंकुर; फूट. ' देहधर्माचा नुठे फाटा । ज्ञानगर्वाचा न चढचि ताठा ।'–एभा २.४३९. २ हात; शाखा; फांदी; ओघ; प्रवाह; विभाग; कांड (झाड, नदी, रस्ता, डोंगर, इ० चा). ' बुद्धिवृत्तीचा फाटा ।'–विउ २.४४. ३ काना, रेघोटी; फराटा; (लिहिलेलें अक्षर खोडण्यासाठीं त्यावर मारलेली) ४ विषयांतर; अवांतर कथा. ५ अतिशय बडबड. ' हिचियें वेहीं संचाराचा ताठा । मुखीं सुटलासे फांटा ।'–भारा बाल ५.३१. ६ गैरहजिरी; अनुपस्थिति. (क्रि० देणें). ७ लांकडें; सर्पण. ८ (ना.) वासा. ९ (नंदभाषा) रुपयाचा सोळावा हिस्सा, आणा. [फाटणें] (वाप्र.) ०देणें–१ बुट्टी देणें; न जाणें. ' चिंतूनें आज शाळेला फाटा दिला.' २ वगळणें; कमी करणें; काढून टाकणें; नाहींसा करणें; खोडणें. ' लिहितांना त्यानें गोविंदरावाचे नांवास फाटा दिला.' ०फुटणें–१ (मंत्रबळ, पिशाच्च इ० नीं) वेड लागणें. ' वीरभद्र म्हणे तूं काय करिशी । मरणकाळीं फांटा फुटला तुजसीं ।'–नव ७.३९. २ फांकणें; प्रसार होणें. ' जैसें डोळयां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे ।'–ज्ञा १.२३. ३ एका कामांतून दुसरें काम निघणें. ' तुका म्हणे वाटे । नको फुटों देऊं फाटे ।' ०भरणें–१ बहकणें; बडबड करणें. ' स्वधर्ममार्गी चालावया नर । वेद स्वर्ग बोले अवांतर । ते फाटां भरले अपार । स्वर्गतत्पर सकाम ।'–एभा २१.३१८. २ भटकणें. ' भ्रमणाच्या मोडी वाटा । न भरें फाटा आडरानें ।'–तुगा ३३८४. ३ वेड लागणें; फाटा फुटणें. (**मुखीं-तोंडीं-तोंडाला)फांटा भरणें**–तोंडाचा पट्टा सुरू होणें; तोंडानें बडबड सुरू करणें. ' म्हणौनि मुखीं भरला फांटा । बडबडे चोहटा भलतेंचि ।' **फाटे फोडणें**–अडथळे, हरकती आणणें, काढणें; सबबी सांगणें.

**फाटाफाट-फूट**—स्त्री. विभक्त, वेगळें होणें (मित्र, सैन्य इ०); वाताहत; ताटातूट; फाटफूट पहा. [फाटणें+फुटणें]

**फांटी-टें**—स्त्री. रुंद व उघडी टोपली, पाटी, हारा. पाटी पहा.

**फांटी**—स्त्री. १ डहाळी; फांदी; लहान शाखा; फूट; लहान फांटा (झाड, नदी, रस्ता इ० चा). ' फाटी फांटीसी आदळत ।' –दावि २६२. २ फाटा; टाळा. ' वेउनी प्रपंचासी फाटी ।'–ब ५२३. ३ लाकडें; सर्पण; फांटें पहा. [फाटणें]

**फाटुकलें**—न. महाबळेश्वराच्या आसपास डोंगरावर आढळणारें एक प्रकारचें फूल एप्रील व मे मध्यें याचा हंगाम असतो.

**फा(फां)टें**—न. जळाऊ लांकूड; सरपण; काटकी; ओंडा; ढलपा. [फांटा]

**फाटोवाड**—पु १ मोठेपणा. –शर; २ स्पष्टता; वेगळेपणा. ' परि तेंचि ऐसेनि निवाडे । जैसें भेसळलें खर कुडें । मग काढिजे फाटोवाडें । पारखूनियां ।'–ज्ञा ९.४३. –वि. १ पुष्कळ. २ स्पष्ट –शर. [फाट+वाड=मोठा]

**फांट्या**—वि. अडथळे, विघ्नें, हरकती आणणारा. [फांटा]

**फाड**—पु. १ (एखादा अवयव, पोट, गळूं इ०) कापण्याची क्रिया; कापून पाडलेली चीर, भेग; जखमेचा छेद. २ (ल.) शंकेचें निरसन. ३ एखाद्या विषयांतील बारीकसारीक गोष्टी सुद्धां तो विषय विशद, स्पष्ट करणें; परिस्फोट; स्पष्टीकरण; विवेचन; फोड. ४ (एखाद्या व्यवहारांतील, कामांतील) गुंता नाहींसा करणें; उलगडा पाडणें. ५ पृथक्करण. –स्त्री. १ (कों.) फोड; तुकडा. २ अर्धा चिरा; एकाच बाजूनें घडून सारखा केलेला दगड. [सं. स्फट्; प्रा. फड; म. फाडणें; देप्रा. फड्ड=छिद्र; अथ ?]

**फाड**—न. पांचांचा समुदाय. फाडें पहा. [दे. प्रा. फड्ड= समुदायविशेष]

**फाड**—पु. (गो.) मोठी बरणी.

**फाड**—पु. फोड; उलगडा. ' तुम्ही त्या कोड्याचा फाड कराल तर आमची कन्या तुम्हांस वरील.' [फाडणें]

**फाडकण-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. तोंडावर मारणें, फटाका वाजणें इ० आवाजाचें अनुकरण होऊन; ताडकन्; भाडकन् इ०. [ध्व. फाड]

**फाडकी**—स्त्री. (चांभारी) कातड्याचा एक प्रकार. अधोड पहा.

**फाडणें**—उक्रि. १ विदारणें; टरकावणें; तुकडे करणें; चिरणें, फाटेल असें करणें. २ (ना.) काढणें 'कीर फाड' =रेघ काढ. [सं. स्फाटय्, पाटय्; प्रा. फाड; हिं. फाडना] (वाप्र) **फाडून खाणें**-(एखाद्यावर) (ल.) तुटून पडून त्रास देणें; छळणें. **डोळे फाडणें**-डोळे वटारणें. **पट्टी फाडणें**-कुळाकडील वसूल घेण्या करतां अमक्यापासून अमूक घ्यावें अशी यादी लिहिणें

**फाडा**—पु. (उजळणींतील गुणाकाराचा) पाडा-ढा. [पाडा] **०वाचणें**-१ बारकाईनें व सविस्तर हकीकत सांगत बसणें; इत्थंभूत कथन करणें. २ (अडचणींची, नुकसानींची) क्रमवार यादी सांगणें, वाचणें.

**फाडा**—पु. १ (गो.) वस्त्राचा तुकडा. २ (गो.) माडाच्या अगर पोफळीच्या कांडाचा, लांकडाचा तुकडा.

**फाडावाडे**—फाटोवाड पहा. -शर.

**फाडी**—स्त्री. १ फाड; एका बाजूनें घडविलेला दगड; लहान घडीव दगड. २ खाडकी; तोड. [फाड] **०काम**-न. (स्थापत्य) थरांचें खांडकी काम.

**फाडी**—स्त्री. ठराविक नगांचें माप; विशिष्ट नगांचा समुदाय. साधारणतः पाच नगांची फाडी होते. फाडें पहा.

**फाडीव**—वि. १ ज्याचा कांहीं भाग फाडलेला आहे असें (कापड); फाडून अवशिष्ट राहिलेलें. २ मूळ नगापासुन फाडलेला, कापलेला, तोडलेला (भाग, तुकडा). [फाडणें]

**फाडीवाडी, फाडोवाडें**—क्रिवि. स्पष्टपणें; पुष्कळ. फाटोवाड पहा. -शर.

**फाडें**—न १ विशिष्ट समुदाय; साधारणतः छकडी; पंचकडी; पांचुदा (फळें, रुपये, गोवऱ्या इ० चा). २ (गो.) जोडी; वस्तुद्वय [प्रा. फड्ड=समुदाय]

**फाडो**—(गो. कु) फाडी पहा.

**फाडोवाड**—पु. फाटोवाड पहा **फाडोवाडीं-डें**-क्रिवि. १ स्पष्टपणें; मोकळेपणानें. -एभा २०.२७२ 'तें तुम्हीं सकळ फाडोवाडीं। सांगितलेंचि स्वसुखसुरवाडीं।'-स्वादि १३.४.९. २ अनेकप्रकारें; पुष्कळ. 'ऐसें धन सांचिलें फाडोवाडें।'-एभा २३.८७. [फाड+वाड=मोठा]

**फाढोरी**—स्त्री. शेतकीचीं आउतें.

**फाणपट**—स्त्री. (कों.) पहाट. पाहाणपट पहा.

**फाणस, फाणूस**—पुन. कंदील; झांकलेला, वारा न लागणारा दिवा. 'फाणूस लावावे त्यांत मेणबत्त्या लावाव्या.'-पया २८५. 'फाणसें झाडें फिरंगाणी काम बिलोरी। लाऊन मेणबत्त्या भंवताल्या हारोहारी।'-प्रला ९२. [अर. फानूस]

**फाणाफाण**—स्त्री. (ना.) पांगापांग; दाणादाण.

**फॉण्ण**—न. (गो.) फोडणी. (प्र.) फोण्ण. [सं. स्फोटन; प्रा. फोडण; गो. फोण्ण]

**फांत**—पु १ (गो.) जमिनीचा तुकडा; पट्टी. २ (गो.) कुणगा; मिळकत. फांती पहा. [पोर्तु. फातिआ]

**फातकील**—स्त्री. (कों.) फतकल पहा.

**फातमाय**—स्त्री. (निंदार्थी) लठ्ठ व बोजड अंगाची स्त्री. फतमाय पहा.

**फा(फां)तर**—स्त्री. १ (कु.) कपडे धुण्याचा, स्नानाचा दगड. २ चटणी इ० वाटण्याचा पाटा. [सं. प्रस्तर; प्रा. हिं. पत्थर; म. फत्तर]

**फातर**—न. १ (ना.) (फळाची) साल. २ मुलांना लावण्यांत येणारा एक निंदाव्यंजक ग्राम्य शब्द.

**फातरफोडी**—स्त्री. (गो.) एक प्रकारची वेल.

**फातारें**—न. (गो) वरवंटा.

**फा(फां)ती**—स्त्री. १ (गो.) फुलांचा गजरा; वेणी. २ (गो.) पावाचा पातळ तुकडा. (सामा.) तुकडा. फांत पहा. [पोर्तु. फातिआ]

**फातुल्ली-तुळी**—स्त्री. (गो.) गोटा; गुंडा. [फातर]

**फांतें, फांतोड**—नस्त्री. (गो. कु.) पहाट. [पहाट]

**फांतें**—न. (बे) हिंदूच्या घरीं बकरीं कापण्याचा मुसलमानी मुल्लांचा हक्क. कर्नाटकांत हा एक बलुतेदार आहे. मुसलमानानें फातें न घालतां बकरें कापल्यास कर्नाटकांतील शूद्र तें खावयास निषिद्ध मानतात. फात्या पहा.

**फातोर**—पु दगड. फत्तर पहा

**फात्या**—स्त्री. १ कुराणाचा आरंभ; कुराणांतील पहिला सुरा; (मृताकरितां हा वाचतात); फात्याचें पठण. २ नैवेद्य समर्पण; बळी. 'मुलाणानें फात्या न दिला तर बकरें मुर्दाड रहातें म्हणजे तें हलाल होत नाहीं'-गागा ११३. ३ प्रार्थना. 'काल जुमा होता व मिर्जा मनुचा दिवस फात्याचा होता म्हणून वजीर ... नाहीं.' -पेद २१.१४९. ४ (निंदार्थी) अर्थशून्य वाचाळता; बडबड. (क्रि० मारणें; देणें, करणें; पाडणें) [अर. फातिहा] **हलवायाच्या घरावर फात्या देणें-मारणें**-दुसऱ्याचा माल उदारपणानें देणें; हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवणें.

**फात्या**—पु १ (कों) बडविलेला रेडा, बैल. २ दुबळा; अशक्त.

**फात्यावयलो**—वि. १ (गो.) उजाडल्यानंतरचा. २ शेवटचा. [फांतें=पहाट] **फात्यावेर**-क्रिवि. (गो.) पहाटेस. [फांतें+वरीं]

**फात्रेल**—न. (गो.) राकेल; केरोसीन. [फत्तर+तेल]

**फात्रांवचें**—क्रि. (गो) दगड मारणें. [पत्थर, फातर]

**फांद**—स्त्री. १ फांदी; शाखा. २ एक प्रकारची भाजी.

**फांद**—स्त्री. (कों.) तटाची भिंत; फांज.

**फांदकुळेर**—क्रिवि. (गो.) पाठंगुळीं. [पाठकुळीं; गो. फाट=पाठ+कुळीं]

**फांदडणें, फांदाडणें**—उक्रि. १ (कु.) फाडणें; टरकाविणें; दोन तुकडे करणें; चिरणें. २ (ल.) (एखाद्यावरील) प्रेम, लोभ, नाहींसा करणें; मर्जीतून उतरविणें; बुद्धिभेद करणें. –अक्रि. (खड संलेल्या, छाटलेल्या झाडाला) फांद्या फुटणें. [फांद–फांदडा]

**फांदडा, फांदाडा**—पु. १ (झाडाची) मोठी फांदी; शाखा. २ (अव.) (भाषणांत). विषयांतर; अवांतर कथा; फाटे फोडणें. (क्रि० येणें; फोडणें) ३ हरकत; आडकाठी. [फांदी]

**फांदणें**—अक्रि. उडी मारणें; उधळणें (घोडा, हरीण इ० नीं) फांजणें. [सं. स्पंदन; प्रा. फंदण; हिं. फंदना]

**फांदणें**—उक्रि. १ पसरणें; विखुरणें. २ फांजणें पहा.

**फांदलावचें**—क्रि. (गो.) (झाडाच्या फांद्या) सभोंवार पसरणें; फादणें. [फांदी]

**फांदा**—पु. १ झाडाची डेळकी; ज्या ठिकाणीं दोन खांद्या फुटतात तो झाडाचा भाग २ (ल.) अडचण; संकट; घोंटाळा. (क्रि० पडणें) 'परि पडलों फांदां। बहुतां दिसां।'–शिशु २०१. [हिं. फांदा=संकट] **फांद्यांत घालणें–पाडणें**–गोंधळांत घालणें, पाडणें; कचाटींत, पेचांत घालणें, पाडणें. **फांदा मारणें**–(ना.) एखादी वस्तु लुबाडणें; घबाड मिळविणें.

**फांदाडणें, फांदाडा**—फांदडणें, फांदडा पहा.

**फांदाडणें**—अक्रि. (माण.) लुबाडणें; फसविणें.

**फांदाफांद**—स्त्री. पागापांग पहा. [फादणें द्वि.]

**फांदी**—स्त्री. १ (झाडाची) खादी शाखा. २ (दिवा वगैरे अडकविण्याकरितां) भिंत, खांब इ०कास लावलेला आंकडा. **फांद्या फोडणें**–१ फाटे फोडणें; विषयांतर करणें; आडकथा सांगणें. २ पोकळ सबबी आणणें; अडथळे, हरकती सांगणें. **फांदोफांद**–क्रिवि. प्रत्येक शाखेला–पासून–कडे–मध्यें. 'तूं हिंडलास फादो फाद, मी हिंडलों पानोपान.' **फांदोरी**–स्त्री. डहाळी; लहान खादी. [फांदी लघुरूप]

**फानवटा**—पु. (कों.) उन्हाळ्यांत गुरें बांधण्यासाठीं शेतांत, अंगणांत, झाडाखालीं घातलेला मांडव.

**फानस–नूस**—पु. कंदील. फाणस पहा.

**फा(फां)पटपसारा**—पु धद्याचा, उद्योगाचा अवाढव्य विस्तार; कामाचें अवडंबर. [+पसारा]

**फापडणें**—उक्रि. पाखडणें. –शर. [ध्व.]

**फा(फां)पर**—न. पसरलेला व्रण, जखम; त्वचेवर पसरलेलें, चिडलेलें खरूज, विब्बा इ० संबंधीं जें क्षत तें. [हिं. फांफड]

**फांपर**—पु. (गो.) लत्ता.

**फांपरणें**—अक्रि. (कों.) खरचटणें: दगड वगैरे कातडीला घासून जखम होणें. [फांपर]

**फांपरणें, फांपसणें**—अक्रि. चोळवटणें; घांसटणें; खरडणें; चेंदामेंदा होणें; चिरडणें.

**फा(फां)परा, फांपा**—वि. तोतरा; बोबरा; अडखळत बोलणारा. [ध्व. फा! फा!]

**फापरी**—स्त्री. कुंडींत वाढणारी एक वनस्पति.

**फांपसणें**—उक्रि. १ चुरडणें; चोळणें, मळणें; जोरानें हाताळणें. २ फार रागें भरणें; झाडणें; ताशेरा झाडणें; खरडपट्टी काढणें.

**फॉपळ**—न. (गो.) सुपारी (प्र.) पोफळ पहा.

**फॉपावणें, फांपाइणें**—अक्रि. १ (झाडाला) भरगच्च पालवी येणें; फोफावणें. २ लठ्ठ होणें; वाढणें, पुष्ट होणें. फुगणें (माणूस, जनावर). ३ (ल.) विस्तारणें; फैलावणें. 'देखणें वृत्तीची गजगजा। फांपावत चालली।'–वेसीस्व ११.२१. 'सद्गुरु अंतरीं विचारी आधीं। म्हणे याचे ठायीं असे दृढ बुद्धि। तेणें हा फापावला त्रिशुद्धि। यासी कांहीं सुचेना।' –स्वादि १०.१.४२. [फाप! हिं. फांपना]

**फापाळें**—न १ (कु) विहिरीतून पाणी काढतांना पाय देण्यासाठीं घातलेलें आडवें लांकूड. २ (गो.) ओढ्याच्या कांठावर ओलांडून जाण्यासाठीं घातलेले माड–पोफळीचे तुकडे. [पाय+फळी]

**फापुडचें, फापुडणें**—क्रि. १ (गो.) झाडणें; केर काढणें; झटकणें. २ (गो.) फोडणें; विस्तारानें टाकणें. **फापुडणी**–स्त्री. (गो.) केरसुणी.

**फा(फां)प्या**—स्त्री. १ (अव.) स्फुंदणें; हुंदके; आंचके. २ हळहळ; र र करीत असणें. 'पेंडाऱ्यांनीं सर्वस्व नेतांच फांप्या मारीत बसले' (क्रि० मारणें; देणें, करणें; फुटणें). ३ (ल.) अचाट पण निष्फल यत्न. [फाप! तुल० इं पफ्]

**फाप्सावचें, फाप्सुंचें**—सक्रि. (गो.) उध्वस्त करणें; नखांनीं ओरखडणें **फाप्सावणी**–स्त्री. (गो.) उध्वस्त करण्याची क्रिया; नखांनीं ओरखडण्याचें काम.

**फांफर, फांफरणें, फांफरा, फांफा, फांफ्या**—फांपर, फांपरणें इ० पहा.

**फा(फां)फर**—स्त्री. लाथ; लत्ता. फांपर पहा. 'म्हणे। तंव शमि चालिला फांफर। मारावया।'–कथा ३.६.१९.

**फांफळें**—न. (कु.) विहिरींतून पाणी काढण्याचे वेळीं पाय टेकण्याची फळी. फांपाळें पहा. [पाय+फळी]

**फां फां जावप**—क्रि. (कु.) उघडकीस येणें.

**फाफू**—फें फें पहा.

**फाफू, फांफु**—न. मंत्र घालतांना फुंकर घालण्याचा आवाज. २ (ल.) मंत्रतंत्र; गौडबंगाल; टाणाटोणा; गारूड; छाछू. [ध्व.] ०करणें–उधळपट्टीनें भरमसाट खर्च करून नाहींसें करणें (द्रव्य, धान्य इ०).

**फाम**—स्त्री. चित्ताची स्थिरता; अवधान; देहभान; शुद्धि; समज; अक्कल; याच्या उलट बेफाम. [अर. फह्म्]

**फाम**—पु. (गो.) ख्रिस्ती लोकांचा उत्सव [पोर्तु. फामा]

**फामटणें**—क्रि. दपटणें.

**फार्मिदा**—पु. १ प्रकृतीवर परमेश्वराचें श्रेष्ठत्व सांगणारा तुरेवाला (तुरा लावणी गाणारा) –वि. २ फुशारकी मारणारा; गर्विष्ठ (माणूस). ३ (लबाडींत) निष्णात; पटाईत; अट्टल (विद्यार्थी). ४ हुशार; तरबेज. फरमिंदा पहा. [फा. फह्मीदा]

**फार्मिदा-दी**—स्त्री. पुरुषाप्रमाणें धीट व अधिकार चालविणारी स्त्री.

**फायदा**—पु. नफा; लाभ; किफायत; प्राप्ति. [अर. फाइदा]

**फायश**—स्त्री. जाहीराणा; प्रसिद्धी. 'हें पत्र एकांती वाचून ठेवावें, फायश जाल्यानें येथें सेवकाची पत राहणार नाहीं.' –मदबा १.११९. [अर. फाश्]

**फाया**—पु. १ अत्तराचा बोळा २ अत्तर लावण्यासाठीं बारीक चोईच्या टोकाला कापूस लावून देतात ती काडी. [हिं.]

**फार**—न. (बंदूक, तोफ यांचा) बार; भर; पेट. (क्रि० सोडणें; सुटणें). [इं. फायर]

**फार**—पु. १ (राजा.) मुसळाचा, बरच्याचा घाव, प्रहार. (क्रि० देणें; लावणें; घालणें). २ (गो.) आटयापाटयांच्या खेळांतील मारहाण. [सं. प्रहार]

**फार**—वि. १ प्रसृत; विकसित. 'तैसी चंद्रसूर्यादि थोरें। इयें तेजें जियें फारें। तियें जयाचेनि आंधारें। प्रकाशती।' –ज्ञा १५.३११. २ स्पष्ट; उघड. 'जैसें शिंपीपण हारपे। तंव तंव खरें होय रुपें। कां दोरी लपतां सापें। फार होइजे।' –ज्ञा १५.३१०. ३ पुष्कळ; बहुत; विपुल. –क्रिवि. अतिशय. [सं. स्फार; प्रा. फार] म्ह० फार झालें हासूं आलें. **फारकरून**–क्रिवि बहुतांशीं; मुख्यत्वेंकरून; बहुधां **फारफार विचारणें**–एखाद्याची पुष्कळ आठवण काढणें. 'माझ्या स्त्रीला फार फार विचारिलें.' –मृ.९७.

**फारक**—वि. फारीक पहा.

**फारक(ख)त, फारक(ख)ती**—स्त्रीन. १ कर्जफेडीचा कागद; ऋणमोचनपत्र. २ मालमत्तेच्या भागावरील सोडलेल्या हक्काचा दस्तऐवज; सोडचिठ्ठी; संबंध तुटल्याविषयींचा कागद; वांटपत्र; वांटपपत्र. ३ ताटातूट; असंबद्धता; विलगपणा. (क्रि० करणें; होणें). 'शिक्षण व राजकारण यांची पुरी फारकत ...करण्याच्या हेतूनें ...' –केले १.२०१. [फा. फारिघ्–खत्ती]

**फारकाय**—स्त्री. (गो.) फेड.

**फारफेर**—पु. एकमेकांतील कमीअधिकपणामुळें पडणारें अंतर. फेरफार पहा.

**फारंवचें, फारवूचें, फारोंवचें**—क्रि. (गो.) छिद्र करणें; भोंक पाडणें, टोपचें पहा.

**फारशी-सी**—पु. इराणचा रहिवासी; पारसीक; पारशी लोकांचे इराणांतील मूळ पुरुष. –स्त्री. इराणमधील भाषा. –वि. इराणविषयक; फारशी भाषेंतील, भाषेचा, भाषेसंबंधीं [सं. पारस, पारसीक; फा. फारसी]

**फारस**—पु स्वार. –आदिलशाही फर्मान. [फा.]

**फारसनीस**—पु. फारशी भाषा जाणणारा कारकून; चिटणीस; पारसनीस.

**फारांवचें**—क्रि. (गो) (उखळांत) खडणें; हळू कांडणें. [सं. प्रहार; म. फार]

**फारांवचें**—क्रि. (गो.) बंदुक मारणें. [इं. फायर. म. फार]

**फारावणें**—क्रि (कु) वश करून घेणें.

**फारिखत, फारिखती**—फारखत इ० पहा.

**फारिंग**—न. (गो.) एक प्रकारचें झाड; याचीं पानें एरंडाच्या पानासारखीं असतात. याच्या मुळांची भाजी करून खातात.

**फारी**—स्त्री. (व.) गोन्याचा (गोणीचा) एक भाग.

**फारीक-ख**—वि. १ वारलेलें; फेडलेलें (कर्ज). 'उत्सवप्रसंगीं कर्जवाम होईल तर श्रीकृपेनें फारीक होईल.' –रा ८.१२०. २ मिटलेला; समेट झालेला; बंद पडलेला (भांडणतंटा, चौकशी इ०). ३ खर्चलेला; संपलेला; खाल्लेला (पैसा, धान्य, अन्न इ०). ४ पावता; चुकता; आदा. 'खंड फारीक झाल्यावर थोडीबहुत त्यांची मेहमानी करून बहुमानें त्यांस त्यांचे स्थळास पाठवून द्यावें' –मराआ २३. ५ मुक्त. [अर फारिघ्=मुक्त] ०**करणें**–फेड करणें; फेडणें, हिशेब चुकता करणे]

**फारूनफेरून**—क्रिवि. या बाजूचे त्या बाजूला करून; फिरवाफिरवी करून. फेरूनफारून पहा. [फेरणें द्वि]

**फारोळ**—स्त्री. (व) भानगड.

**फारोळा**—पु. फाळा; चिंधी; चिरफळी; चिंधोटी. [फाळ]

**फारोळा-ळें**—पुन. पाभरीच्या दात्याचें, फणाचें लोखंडी टोंक; फाळ 'फास फारोळे ईडया फाळ। ऐसे जे जे पाहेतो निश्चळ।' –पैमाषेंदु.

**फार्म**—पु शेत; जमीन. 'सरकारी फार्म हा एक अद्यापि मनोरंजक फार्सच आहे.' –टि २ ३६४. [इं.]

**फॉर्म**—पु १ छापलेला मसुदा; नमुना. २ माहिती भरावयाचें पत्रक. 'छापील फॉर्म अर्जदारानें मागवावेत.' –के १७.६.३०. ३ विशिष्ट आकार; आकृति. ४ चौकट; (कॉंक्रीट वगैरे ओतण्यासाठीं केलेली) ५ फर्मा पहा. [इं.]

**फार्मास**—स्त्री. (गो.) दवाखाना. [पोर्तु. फार्मासिआ; इं फार्मसी]

**फार्स**—पु. १ सोंग; बतावणी; थट्टेचा प्रकार 'कायद्याचें वाटेल तें कलम वाटेल त्यावर लादण्याचा हा नुसता फार्स आहे.' —के १६.४.३०. २ प्रहसन; नाटकाचा एक चुटका. 'करंजांचा मनोरंजक फार्स.' (संपा. का. म. थत्ते, १८८८). [इं.]

**फालकुनो**—न (कु.) चांभाराचें एक हत्यार.

**फालतू, फालतूक**—वि. १ ज्यास्त; शिल्लक; उरलेलें; अधिक; अनावश्यक. २ वरकड पहा ३ बिन महत्त्वाचा; क्षुद्र (माणूस). [हिं]

**फालस**—न. खोटें, बनावट मोती. [इं. फाल्स]

**फालसा**—पु. एक वृक्ष व त्याचें फळ; उत्तरहिंदुस्तानांत याची विशेष उत्पत्ति होते. पक्क फळें पिंपरीच्या फळासारखीं असून तीं खातात उन्हाळ्यांत या फळांचें सरबत करतात [सं परुष; हिं.] ०भात-पु. फालशाचा रस घालून केलेला भात —गृशि ३७३.

**फालें**—न (बे.) पहांट.

**फालेटूं**—न. (कों.) नांगराच्या खुंटावर फाळ बसविल्यानंतर त्यावर एक निमुळता लांकडाचा तुकडा ठेवतात तो. लहान लांकडी फाळ. 'नांगराचें फालेटूं लवकर झिजतें त्यामुळें लवकर लवकर बसवावें लागतें.' [फाळ]

**फाल्गुन**—पु १ चैत्रादि महिन्यांतील बारावा महिना. २ अर्जुनाचें नांव [सं.] ०**वाद्य**–न. बोंब; शंखध्वनि (फाल्गुन महिन्यांत होळीच्या वेळीं बोंब मारतात त्यावरून). ०**वाद्य करणें**–बोंब मारणें. **फाल्गुना-नी**–वि. फाल्गुनविषयक. **फाल्गुनी**–स्त्री. १ फाल्गुन महिन्यांतील पौर्णिमा; होळी पौर्णिमा. २ प्रथमचीं पूर्वा व उत्तरा नक्षत्रें.

**फाल्या**—वि. १ (व) फालतू २ बाताड्या. 'हा फाल्या आहे याच्यावर विश्वास न ठेवावा.'

**फाल्या, फाल्यां**—क्रिवि (गो. कु.) उद्या फालें पहा. [पहाट] म्ह० (गो.) एका निजून फाल्या जायना=एकदां निजल्यावर उजाडत नाहीं (मध्यें केव्हांतरी जागें होतो) म्हणजे एकदाच करून काम संपत नाहीं. **फाल्याचा**–वि. उद्यांचा.

**फाव**—पु. १ प्राप्ति; लाभ. २ अनुभव. 'तैसें रज तम विनाशे। तिजें जें उत्तम दिसे। तें सत्त्व हें आपैसें। फावासि ये।' —ज्ञा १७ ३१६ ३ अवकाश [सं. प्राप्; प्रा. पाव; म. फावणें]

**फॉव**—पु (गो) पोहे.

**फावटी**—स्त्री (व.) संधि; योग्य वेळ. 'तुम्हीं असें केल्यानें त्याला फावटी सांपडल्ये.' फावती पहा. [फावणें]

**फावटीक येवप**—(गो) मजुरीनें ओझें वाहून नेणें.

**फावंड**—स्त्री. (व.) सबब, निमित्त; बहाणा 'समजावया आले भरत भावंड। तेथेंचि फावंड रचिलें ता।' -मन्व ७८ [फावडी]

**फावडा**—पु मोठें लांकडी फावडें; पावडें. फावडी पहा.

**फावडी**—स्त्री. १ खोरणें; (शेण, लीद इ० काढण्याचें) लहान पावडें; खोरें. हें बहुधा लांकडी असतें. २ जोगी, फकीर, मान भाव इ० वापरतात ती वांकडी किंवा आंकड्याची काठी. हिला झोळी अडकवितात. 'कुबडी फावडी कवळून पाणी। नाथपणी मिरवला।' —नव १७ ८५ ३ लोखंडी खोरें; पावडें. ४ उंसाच्या रसावरील मळी काढतांना उपयोगांत आणिलें जाणारें लांकडी आऊत. ५ दंड किंवा जोर काढतांना दोन्ही हात ज्या लांकडी ठोकळ्यावर ठेवतात ते प्रत्येकीं; हत्ती. ६ शेतात माती ओढण्याकरतां केलेलें लांब दांड्याचें खोरें. ७ (नांगर, कुळव, कोळपें इ० च्या) दांडीला बाजूंनीं आधार देणाऱ्या दोन काठ्यांबद्दल सामान्य शब्द. ८ अनर्थकारक स्थिति; कष्टप्रद अवस्था; दैना; दुःखद स्थिति; दुर्दशा. [हिं]

**फावडें**—न. १ (सामा.) फावडी पहा. २ (ल.) पीडा; आगलाव्या; त्रास देणारा इसम. (वाप्र) (कामात किंवा बोलण्यांत) **फावडें घालणें**–एखाद्याच्या कामांत किंवा भाषणांत फांदाडे फोडणें; फाटे फोडणें. **फावडें लावणें, फावड्यावर-फावड्यानें पैसा ओढणें**–संपत्तींत लोळणें; चिकार पैसा मिळविणें. 'सुमारें ५० वर्षांमागें ज्यांनीं वऱ्हाडात वकिली केली त्यांनीं फावड्यानें पैसे ओढिले.'

**फावणें**—क्रि. सवड सांपडणें; वेळ, संधि, मोकळीक मिळणें. 'दावाया अजि। विश्वतारक तुम्हां स्वामी बरें फावलें।' —मोकृष्ण ६९.११. —अक्रि. १ प्राप्त होणें; मिळणें. 'जें शब्दातीत स्वभावें। तें बोलींचि जरी फावे। तरी आणिकें काय करावें। सांगें कथा।' —ज्ञा ५ ६८. २ अनुभवास येणें; समजणें.' मोटकें गुरुमुखें उदैजत दिसे। आणि हृदयीं स्वयंभचि असे। प्रत्यक्ष फावों लागे तैसें। आपैसयाचि।' —ज्ञा ९ ४९. ३ (कु गो.) योग्य असणें. ४ योग्य, सोपें, सोईचें, व्यवहार्य वाटणें 'माझा हात फावेल तेव्हां करीन एव्हां करीत नाहीं.' ५ जिंकलें जाणें; लाभणें. 'कालत्रयातीत केवळ फावलास हो जी।' 'आजपर्यंत केलें तें फावलें.' [प्रा. फव्वीह=यथेष्ट लाभ प्राप्त करणें; गु. फाववुं; सं. प्राप्]

**फावती**—स्त्री. (राजा.) उद्योगांतून सुटका; गडबडींतून काढलेली फुरसत; मोकळीक; रिकामपणा. [फावणें]

**फावल**—पु. सुस्वाद. —शर.

**फावा**—स्त्री. प्राप्ति. फाव पहा. 'स्वयें दर्शनाचिया सवा। अवधियाची जाती फावा। परी निजात्मभावा। न मोडतांही।' —अमृ ७.२५५. [सं. प्राप्; प्रा. पाव] ०**जाणें**–अक्रि. ठसणें; समजून जाणें. 'तरी सांग पां पांडवा। हा शास्त्रसिद्धांतु आघवा। तुज एकचित्तें फावा। गेला आहे।' —ज्ञा १८.१५४०.

**फॉवॉ**—पु. (गो.) नाचणींतील गोंडा.

**फॉवाळॉ**—पु. (गो.) मासळी.

**फाविंदा**—वि. १ (.निंदार्थी ) अट्टल; पक्का; इरसाल; लबाडीच्या कामांत वस्ताद. २ संपन्न; निपुण; निष्णात ( चांगल्या अर्थी ). [ फामिंदा ]

**फा(फां)शी**—स्त्री. १ फांस; सुरगांठ; निसरगांठ; सरकफांस. २ फासावर चढविण्याची शिक्षा. [ सं पाश ]

**फा(फां)शी**—स्त्री. वेळच्यावेळीं पाणी न पाजल्यामुळें गुरांना होणारा रोग. या रोगांत फुप्फुसें फुगतात हा संसर्गजन्य आहे [ सं. स्पर्श; प्रा. फास=रोग ]

**फास**—स्त्री. कुळवाचा एक भाग; कुळवाला बसविलेली लोखंडी पट्टी पास पहा. ' फास फारोळे ईडया फाळ ' –पैमाषेंदु.

**फा(फां)स**—पु. १ सरकगांठ; पाश. ' काळाचे बरे गळां फासे । ' –मोकर्ण ६.५२ २ वाघर; वागुरा, ( पशुपक्षी पकडण्याची ) फासकी; जाळें ३ ( खा. ) वडाग घालतेवेळीं कांटे उचलण्याकरता घ्यावयाचें लांकूड. ४ फांद्याचा, डहाळ्यांचा भारा. ५ ( व ) काटयाच्या १० ते १२ फसाटया: काटयांचा ढीग, भारा. ६ ( ल. ) पाय मागें ओढणारा, स्वतंत्र, मोकळा राहूं न देणारा उद्योगधंदा; परिवार; लोढणें; मायापाश. [ सं. पाश; हिं. बं फांस ] ( वाप्र ) **फांशी देणें**–१ फांसावर चढविणें; जीव जाण्यासाठीं टांगणें. २ ( ल. ) अडकविणें; घोटाळ्यांत घालणें, पाडणें. **फांशी जाणें-चढणें-पडणें** -फांसावर लटकाविला जाणें; गळफांस लागणें. **फांशी भरणें-येणें-लागणें**–गुंतणें; कचाटींत सांपडणें.

**फासका**—पु (क.) फांस; फासा; वेढा [फास] **फासकी**—स्त्री. पशुपक्षी पकडण्याकरितां केलेलें जाळें. [ फास ]

**फासटणी, फांसटा-फांसट**—स्त्री. पायपिटी; कंटाळवाणी, श्रमाची चाल. [ फासटणें ]

**फासटणें**—उक्रि. १ (शरीराला भस्म, भांडयाला राख इ०) जोरानें लावणें; फासणें; लपेटणें. २ ( राजा. ) पायपिटी, चालण्याचे श्रम करविणें; पाय झिजविणें. ' कांहीं लाभ नसतां उगीच पाय फांसटींत जातो कोण ? ' ३ ( ल. ) फसविणें; एखाद्या व्यवहारांत लबाडीनें गुंतविणें; भूलथापा देणें. [ फासणें ]

**फासडा**—पु. गुंतागुंत; दोऱ्यांचा गुंता, गांठ; जाळें. [फास]

**फासडा**—पु. खिडकी, दरवाजा इ० भिंतींत घट्ट बसावीं म्हणून त्यांस मारलेली खुंटी.

**फासडें**—न एक शेतकी आउत; नांगरलेल्या जमिनींतील ढेंकळें फोडण्याकरतां फिरविला जाणारा लांकडी ओंडा.

**फासण**—स्त्री. ( गो. ) धमनींतील ठणका; ठसठसा. [ध्व.]

**फासणी, फांसडी, फांसणी**—स्त्री. १ ( तुंबडी लावण्यापूर्वी ) रक्त वाहण्यास सुरुवात व्हावी म्हणून केलेला बारीक छेद; घाय; चीर ( बहुधा अनेकवचनी प्रयोग ). ' फाड रक्त फासणी । गुल्हडागांची जाचणी । ' -दा ३.७.३३. ' जैसें खांडुक झालें हाताvar । त्यावरी फासण्यांचे मार । ' २ छेदन; कापणें (क्रि० करणें) **दुःखावर फांसड्या टाकणें-मारणें**–दुःखावर डाग देणें.

**फा(फां)सणें**—उक्रि. १ घासणें, चोळणें, लावणें, फासटणें ( अंगाला उटणें, भस्म, भांडयाला राख इ० ) २ ( कु. ) पुसणें. [ सं. स्पृश–स्पर्शन; प्रा. फासण ]

**फा(फां)सणें**—उक्रि. १ गुंतविणें, अडकविणें; गुरफटणें. २ ( ल. ) फसविणें; ठकविणें; भुलविणें. [ फास ]

**फां(फा)सणें**—उक्रि. १ ( क ) (लेखणी, बोरू इ०) पिचणें; पिंजणें; फासटणें. २ चिरणें; फासण्यांनीं कापणें. [ हिं. फासना ]

**फा(फां)सणें**—अक्रि (गुरांना पाणी वेळेवर व पाजल्यामुळें) घुसमटणें; गुदमरणें. [ फाशी ]

**फासफूस**—स्त्री. धुसफूस; कुरकूर. [ ध्व. ]

**फासफूस**—स्त्री. १ फोल; भूस. २ ( ल. ) गाळ; गळ्हाटा, कचरा. [ फूस द्वि. ]

**फासला**—पु. अतर. ' नवलूर म्हणोन गांव धारवाडापासुन एक कोसाच्या फासल्यानें आहे.' –ख ८.४३८९. [अर. फासिला]

**फासव**—न फांसुं पहा.

**फा(फां)सळी**—स्त्री. बरगडी.

**फा(फां)सळी**—स्त्री. फांसणी; शरीरातील रक्त काढण्याकरतां केलेली बारीक चीर. [ हिं. फांसु ]

**फा(फां)सा**—पु. १ पाश; फास पहा. ' तुझे पायीं पावे ऐसा । जेणें उगवे हा फासा । ' –तुगा १२०९. २ पकड; अडकवण; आंकडा (सरी, नथ इ० दागिन्यांचा ). ३ अडकविण्यासाठीं ठेवलेलें छिद्र, कडें; हुल ज्यात घालतात ती कडी; अंगठी. ४ पशुपक्षी यास धरावयाकरिता केलेलें जाळें; वागुरा. ५ (ल) एखाद्या माणसास फसविण्यासाठीं केलेली युक्ति; पेंच [सं. पाश] **०घालणें–पसरणें**–( ल. ) जाळें पसरणें ( अडकवण्यासाठीं ). **०टाकणें**–पकडण्यासाठीं फास टाकणें.

**फासा**—पु सोंगटया इ० खेळांस उपयोगी असा हस्तिदंती तुकडा. यावर चारी बाजूंवर अनुक्रमें १,२,५ व ६ असे ठिपके असतात. [ सं. पाशक ] म्ह० फासा पडे सो डाव राजा करे सो न्याय. **फासा उमगणें-जाणणें-समजणें**–( ल. ) गूढ बेत, लबाडी ओळखणें; डाव ओळखणें. **०उलटा पडणें**–प्रतिकूल गोष्ट घडणें. **०टाकून पहाणें**–(ल.) नशिबाची परीक्षा पाहणें; धाडस करणें. **०टाकणें**–१ आमिष टाकणें. २ (खरेदीविक्रीमध्यें) आपल्या सुचना करणें; भाव, मागणी इ० सांगणें; आपलें म्हणणें कळविणें. **०सोयीचा पडणें**–अनुकूल गोष्ट घडणें.

**फासाटणें**—क्रि. फासटणें पहा.

**फासा(सो)टी**—स्त्री. फांस; जाळें. 'सप्रेमें अनुभव घेतां दिठी। तुटे फासोटी भवबंधा।' –भवि ५०.६२ [सं. पाश]

**फासाडणें**—सक्रि. १ गुंतविणें; अडकविणें. २ तोंडाला पानें पुसणें; फसविणें. [फांस]

**फांसारडें**—न. (कु.) फांस

**फासावणें**—उक्रि. चिरणें. 'फासावेना तरि दुःख घेतें वाव। मग होतो जीव कासावीस।' –तुगा २७७८. [फासणें=चिरणें प्रयोजक]

**फांसुं**—न. नदी, समुद्र इ० चा फाटा; खाडी, ओहोळ.

**फांसूक**—लहान खाडी.

**फा(फां)सेपारधी**—पु. १ पशुपक्ष्यांना जाळयांत अडकवून धरणारा. २ (ल.) दुसऱ्यास कपटानें पेंचांत धरणारा; फसव्या.

**फा(फां)सोळी**—स्त्री बरगडी. फासळी पहा. **फासोळीस उजळ टिक्या**–वि. बरगडयांवर पांढरे ठिपके असलेला (घोडा) हें अशुभ चिन्ह होय.

**फास्क**—स्त्री (गो.) सांपळा. [सं. पाशक; पोर्तु. फास्किआ]

**फास्की**—स्त्री. (गो.) चौकट. [पोर्तु. फास्किआ]

**फाळ**—पु. १ नांगराचा अवयव; नांगराचे शेवटास लावावयाचें लोखंडी पातें. २ (ल.) मोठया, जाड व रुंदट ठोकाचा बोरू, लेखणी. ३ भाला इ० शस्त्रांचें अग्र. फळ पहा. 'सर्व स्वारांच्या हातात तीक्ष्ण फाळ लावलेले लांब भाले होते.' –स्वप ८८. [सं. फाल]

**फाळ**—स्त्री. १ कुऱ्हाडीनें काढलेला लांकडाचा मोठा तुकडा; ढलपा. २ चिंधी; चिरफळी; कापडाचा अरुंद लांब तुकडा. ३ भाग; तुकडा. 'करूनि दोन फाळी तारिला कृष्णें।' –एभा ३१.३३८. **फाळवट**–न. फाळका; केळीच्या पानाचा एका बाजूचा तुकडा.

**फाळकं(कां)ब**—पु. नांगराचा आकडा व लोखंडी फाळ यांना जोडणारा लांकडी तुकडा; फाळेद्दं; फाळवंड. [फाळ+कांब]

**फाळका**—पु. १ मोठा तुकडा (लांकूड, फळ इ० चा). २ केळीच्या पानाचा (डांगेचा) एका अंगाचा तुकडा (जेवण्याकडे उपयोगी). ३ (विणकाम) सुत उकलण्याचें बांबूचें केलेलें रहाटवजा साधन. यावर सुताची कळी घालून उकलतात. ४ (कु.) नौकेचा खालचा भाग. [फाळ] **फाळकी**–स्त्री. १ लहान फाळका. २ जमिनीचा अरुंद भाग; पट्टी. [फाळका अल्पत्व]

**फाळट, फाळवट**—न. १ फाळेद्दं. २ नांगराच्या फाळास तुच्छतादर्शक शब्द. [फाळ] **फाळटणें**–सक्रि. नांगराच्या फाळानें कापलें, घांसटलें जाणें (बैल इ०).

**फाळणी**—स्त्री. १ जमिनीवरील फाळा (धारा) शेताच्या उत्पन्नावर बसविलेला कर. २ विभागणी; वांटणी [सं. स्फाटन; प्रा. फालण]

**फाळणें**—उक्रि. १ फाडणें; टरकाविणें. 'आणि गोंवी गेलिया अवळी। झगटलिया अंग फाळी।' –ज्ञा १८.३५५. २ साऱ्याची रक्कम वांटून देणें; ठरविणें. ३ (सामा.) वांटणें; विभागणें. [सं. स्फाटन; प्रा. फालण]

**फाळवट, फाळवटणें**—फाळट व फाळटणें पहा.

**फाळवंड**—न. (सांगली) फाळकांब; फाळेद्दं.

**फाळा**—पु. १ फाडून काढलेला वस्त्राचा तुकडा; चिंधी; चिरफळी; धांदोटी. २ वाधडा; वाभारा. (क्रि० काढणें; निघणें; जाणें). ३ कातलेल्या रेशमाची गुंडी; वळी; मोठी परती. अशा १४ वळयांचा एक थाक किंवा अर्धा शेरिया होतो. ४ कर; सारा. 'फाळा लाविला उदंड।' –दावि ३७७. ५ वांटपाचा भाग; हिस्सा. **फाळा फाडणें**–पट्टीचें, साऱ्याचें वांटप करणें.

**फाळा**—पु नांगराचें पातें; फाळ पहा.

**फाळी**—स्त्री. १ शकल; तुकडा. 'शस्त्रें करूनि समान फाळी। अर्पिल्या दोघींच्या करतळीं।' –मुसभा ६.२६. २ जमिनीची लहान पट्टी. ३ (गो.) चिंधी; फडकें. [फाळा अल्पत्व]

**फाळी**—स्त्री. (व.) फळी.

**फाळुकें**—न. (महानु.) लहान वस्त्र; फडकें. 'पाह्मंटचि उडुनि फाळुकें झाडोनि जाओं लागे।' –सूत्रपाठ १२०. [फाळका]

**फाळेद्दं, फाळेदू, फाळोटा**—नपु. नांगराचा फाळ घट्ट बसावा म्हणून त्यावर बसविण्याचें लांकूड; फाळेद्दं पहा. फाळट; फाळवट. [फाळ]

**फाळोरा-रें**—पुन. प्राभरीच्या दात्याचें लोखंडी टोपण; टोंक; फारोळें. [फाळ]

**फिकट, फिक्कट**—वि. १ अंधक; पुसट. २ कांहींसा फिका. ३ पिकुटलेला; बेचव. फिका पहा.

**फिकर, फिकीर**—स्त्री. काळजी; कळकळ; आस्था; आंच चिंता; विचार. 'जशी अवस्था बघुन जनाच्या मनिं पडल्या फिकरा।' –प्रला ७३. [अर. फिक्र्] **फिकीरमन्द**–वि. चिन्ताक्रांत. 'बडेसाहेबांनीं ही खबर ऐकून बहुत फिकीरमंद जाले.' –पदमव ६९. [फा. फिक्र्-मंद्]

**फिका, फिक्का**—वि. १ फिक्या रंगाचा; पिकुट; उभरंग; उभरा; उण्या रंगाचा. २ चवीला कमी गोड; साधारण बेचव (अन्न, खाद्य). ३ कोमेजलेला; निस्तेज; म्लान. ४ पाणी, जोम नसलेला; मद्दड; गरीब; बावळट. ५ नीरस; फारसें परिणामी नसलेलें (भाषण इ०). [हिं. फिका; तुल० सं. पक; प्रा. पिक्क] **०पडणें**–निस्तेज, कमजोर होणें. 'रघोजीचा पक्ष नानांच्या अभावीं फिका पडला.' –विवि ८.७.१३७.

**फिक्का**—पु. मजकूर. –रा १६४. [अर.]

**फिजारणें**—उक्रि. फेंकणें; टाकणें; झुगारणें.

**फिंजारणें, फिंजारी**—पिंजारणें, पिंजारी पहा.

**फिट**—पु. विटीदांडूच्या खेळांतला दांडू. -शर. फिटी अर्थ ३ पहा.

**फिटकर-री**—स्त्री. तुरटी. फटक पहा. [ हिं. ]

**फिटणें**—अक्रि. १ सुटणें; सुटें, सैल, ढिलें होणें ( वस्त्र, गांठ इ० ). ' आवरि तुज्या करानें फिटतां गमनेंकरूनि कटिवसन ' -कमं १.३९. २ ( ऋण, देणें इ०तून ) मुक्त होणें; फेडलें जाणें ' म्हणूनि म्हणती भले न ऋण जन्मदेचें फिटे । ' -केका ९५ ३ क्षीण होणें. ४ उघडणें. ' तंव ब्रह्मस्थानींचें वेगें । फिटले सहजे । ' -ज्ञा ६.२७९. ५ ( नवस, संकल्प इ० ) पूर्ण होणें; फेडणें. ६ ( शंका, शपथ, उपकार इ० ) निरसन होणें. ' करूं हा रस सेवन वाणी । फिटे तो धणी तुका म्हणे । ' -तुगा ६९६. [ सं. भ्रंश्- भ्रष्ट; प्रा. फिट्ट ] म्ह० शेरास सवाशेर भेटे मनचा संशय फिटे.

**फिटंफाट, फिटाफीट**—स्त्रीन. परतफेड, देणेंघेणें बरोबर; निःशेषता. -वि. फेडलेला; उसनें पूर्ण रीतीनें परत केलेला, निःशेष झालेला. [ फिटणें द्वि ]

**फिटफिटें**—वि. ( गो. ) तुटणारें. [ फिटणें ]

**फिटयतलों**—वि. ( गो. ) फेडणारा.

**फिटाल**—वि. ( व. ) निस्तेज; फिका ' माझी गोष्ट मग फिटाल पडली. '

**फिटी**—स्त्री. फेड. ' आणि पाहून स्वयें कृपादृष्टि । मग दुःखक्लेशाची झाली फिटी । ' -नव १४.१३०. [ फिटणें ]

**फिटी**—स्त्री १ भोंक बुजविणारी खुंटी; दट्टया. २ पाचर; निमुळता लांकडी तुकडा; खिटी. ३ ( राजा. ) विटी; इटी

**फिटुल**—स्त्री. ( कों. कुण ) ठिणगी; स्फुलिंग.

**फिट्ट**—पु. ( राजा. ) फिटी; इटी; विटी.

**फिड्ल्**—न. एक प्रकारचें गजानें वाजवावयाचें इंग्रजी पद्धतीचें तंतुवाद्य. [ इं. ]

**फिणफिण**—स्त्री. १ रागाची धुसफूस; फुणफुण. २ गुणगुण. ३ खदखद; फिदफिद. [ ध्व. ]

**फिणफिणणें**—अक्रि. १ रागानें फणफणणें, जळफळणें. २ गुणगुणणें. ३ खिदखिदणें; फसफसणें ( आंबलेला पदार्थ ). ४ जळजळणें; धगधगणें ( शरीर इ० ). [ ध्व. फिण ]

**फितणें**—अक्रि. १ दगलबाजीनें, विश्वासघातानें फितूर होणें; विरुद्ध पक्षाला जाऊन मिळणें. २ ( लहान मूल-खाऊ इ० दाखविल्यामुळें ) फसला जाणें; ठकविला जाणें. [ अर. फित्न ] **फितवण, फितवणी, फितावणी**-स्त्री. फितूर करणें; एकीमध्यें भेद पाडणें, फूट पाडणें. [ फितविणें ] **फितविणें, फितावणें, फित्याविणें, फित्येविणें**-सक्रि. एखाद्याला फोडणें; फितूर व्हावयास लावणें; आपल्याला अनुकूल करून घेणें. [ फितणें ]

**फितनती**—स्त्री. भांडाळी. [ अर. फित्न; म. फितणें ]

**फितना**—पु. एक सुवासिक दारू; हींत पुष्कळ द्रव्यें मिसळलेलीं असतात.

**फितवा, फितावा**—पु. १ भेद; फूट. ' काय बोल बोलूं फितवा । घरामध्यें केला फितवा । ' -मध्व ९७. २ बंड; वैमनस्य; बिघाड. ३ फितुरी, फितवणी पहा. [ फितणें ] ०**पांजरा**-पु. फितूरी; फितवाफांदडा. ' फितवा पांजरा कांहीं चालेना गलिम हो चिंता करी । ' -ऐपो ३५५. [फितणें+पांजरा=फांदी] ०**फांदडा**-फितवाफादा. -चित्रगुप्त ३६. ०**फांदा**-स्वामिद्रोह; दगाबाजी; कारस्थान. -सभासद २२.

**फितवी**—स्त्री. एक प्रकारचें जाकीट. फितई पहा. [ अर. फितूही ]

**फितुरणें**—उक्रि. फितुर होण्यास, बंड करण्यास उठविणें; फितुर करणें. **फितुरणें**-अक्रि. फितुर होणें. [ फितूर ]

**फितूर, फितुरी**—पुस्त्री. १ फितवा; स्वामिद्रोह; स्वपक्षत्याग; दगाबाजी. २ शैथिल्य; बेशिस्त. -वि. फितूर झालेला; हरामखोर; स्वामिद्रोही, बंडवाला. ' फितुरी पळुनि आले दक्षणांत । ' -ऐपो १३०. [ अर. फुतुर् ] **फितुरी-ऱ्या, फितुरखोर**-वि. फितूर होणारा; स्वामिद्रोही; विश्वासघातकी; निमकहराम; विरुद्ध पक्षास जाऊन मिळणारा. [ फितूर ]

**फितूरफांदा**—पु. ( व्यापक ) फंदफितूरी. [ फितूर+फांदा ]

**फित्तारीख**—क्रिवि. तारखेस. -आदिलशाही फर्मान.

**फित्नाफिसाद**—पु दगा; उठावणी. 'मज्बूत होऊन फित्ना-फिसाद बर्पा करितील. ' -पयाव ४८२ [ अर. फित्न+फसाद् ]

**फित्ने अंगेजी**—स्त्री द्रोह. चिथावणी; बखेडा; फितुरी. ' फित्ने अंगेजीनें तुम्हास सामील होऊन निमकहरामी पदरीं घ्यावी हें युक्त नाहीं. ' -जोरा ५७ [ अर. फित्न-अंगेझी ]

**फित्यावणें, फित्येवणें**—स्त्री. ( राजा ) फितविणें पहा.

**फित्रत, फित्रीत**—स्त्री. क्रांति; बखेडा; निर्नायकी. ' ते वेळे शहाजीचे फित्रीत जाली ' -रा १८ ३४. [ अर. फत्रत् ]

**फिदफिद**—स्त्री. वेडगळपणाचें मोठयानें हांसणें; दांत काढणें. -क्रिवि. ( निंदार्थी ) मोठमोठयानें; वेडगळपणें (हंसणें). [ ध्व ]

**फिदफिदणें**—अक्रि. १ फदफदणें; फसफसणें; चरचरणें, चढचढणें. २ ( पिकलेला फोड ) तडतडणें; ठणकणें. ' खरजेनें फिदफिदलेले हात व कंबर पाहण्याचा ज्याला कंटाळा असेल ... ' -आगर ३.९. फदफदणें पहा.

**फिदवी**—पु. एकनिष्ठ सेवक; अनन्यसेवक. ' श्रीमंतराव पंत प्रधान हुजूरचे फिदवी. ' -दिमरा १.३६. [ अर. ]

**फिदा**—वि. १ आसक्त; अत्यंत अनुरक्त झालेला; आषक. ' जीव प्राण तुझ्यावर फिदा । ' -प्रला १९७. २ खूष; प्रसन्न.(क्रि० होणें). ' सदा हरि कविरायावर फिदा । ' -राला ८७. [अर फिदा]

**फिदाई**—स्त्री. अनुरक्तता; आसक्ति. -वि. अत्यंत निष्ठेचा, एखाद्या गोष्टीसाठीं जिवावर उदार झालेला. [ फा. फिदाई ]

**फिंदारणें**—उक्रि. १ पसरणें; मोठे करणें; फेंदारणें पहा डोळे, नाक यांना जोडून उपयोग उदा० डोळे फिंदारणें=डोळे वटारून पहाणें, रागानें बघणें. नाक फिंदारणें=रागानें नाकपुडया फुगविणें; नाक फेंदारणें. (केंस, शेंपूट, पीस याला जोडून उपयोग). केंस फिंदारणें=केंस विसकटणें, पिंजारणें. शेंपूट फिंदारणें=शेंपूट थरथरावणें, ताठ करणें. पिसें फिंदारणें=पिसारा पसरणें, उघडणें २ पिंजारणें पहा.

**फिदालखोर**—वि १ वल्गना करणारा; फुशारकीच्या गोष्टी, प्रौढी सांगणारा. २ फिदीफिदी हंसणारा. [ ध्व. फिद ! ]

**फिदालग**—वि (गो.) चैनी; खुशालचेंडु [पोर्तु. फिदाल्गो]

**फिनफिन**—न. ( खा. ) लांकडास समांतर खांच पाडण्याचें हत्यार. हें रंध्यासारखें असतें.

**फिनाईल, फिनेल**—न. एक दुर्गंधीनाशक द्रव्य. [ इं. ]

**फिरक**—स्त्रीपु. १ गाण्यांतील कंप, लकेर. ' कंठ तुझा मंजूळ सुमंगित फिरक स्वरामधें स्वर फिरती । ' -प्रला २३६. २ इकडेतिकडे जाणें; सरकणें; हलणें ३ वळणें; अंग इकडे तिकडे करणें; हालचाल. ४ हलण्याला किंवा फिरण्याला जागा. 'ही दाटी फिरक पडूं देत नाहीं.' ५ मोकळीक; फुरसत. ६ फरक याबद्दल चुकीनें उपयोग. ७ (विणकाम) तारांची सांध कायम राहण्यास दोन्ही बाजूंस कामट्या घालतात त्या कायम राहण्यास त्यास अडकविण्यासाठीं दोन्ही बाजूस दोन ळच्या आकाराचे आकडे करतात ते प्रत्येकी. [फिरकणें]

**फिरकं(कां)डा-डी**—पुस्त्री. १ (ल.) चक्कर; भ्रमंती; गिरकी; २ गोंधळ; घोंटाळा; अडथळा ( धंद्याचा, कामाचा, माणसाचा इ० ) ( सप्तमींत प्रयोग ). [ फिरणें ] **फिरकंड्यांत-घालणें-पाडणें**-मंडलाकार गति; हेलपाटा; पूर्वस्थली येणें; निष्फल प्रवास.

**फिरकणें**—अक्रि. १ जाणें; फेरा, वळसा घेणें; हालचाल करणें; संचार करणें. 'तो किल्ल्याभोंवतें माणूस फिरकूं देत नाहीं ' २ सरणें; अंग इकडेतिकडे वळविणें. ' त्या दाटीमध्यें फिरकायला जागा नाहीं.' ३ येणें; भेटणें. 'तो महिन्यांत इकडे फिरकला नाहीं.' [फिरणें]

**फिरका**—पु. १ (व.) ( ग्रहाचा, परिस्थितीचा ) फेरा. २ फिरकंडा पहा.

**फिरकी**—स्त्री. १ गाण्यांतील लकेर; कंप; फिरक. २ नाचण्यांतील फेरा; गिरकी. ३ मळसूत्राचा अवयव; नर. ४ पाळणा, कठडा इ० ची कातीव खुंटी. ५ आंसावर फिरणारी कोणतीहि लहान वस्तु; फिरकिरें, गिरगिरें, भोंवरा इ० ६ दरवाजाच्या कुलपाची मूठ. ७ सोनाराचा लहान ताजवा रास्त वजन दाखविणारा कांटा. ८ कातणें इ० कांस गरगर फिरवायाजोगा चक्राकार अवयव असतो ती; करंज्या, शंकरपाळे इ०स मुरड घालण्याचें साधन. ९ मराठ्यांच्या पागोट्याची कळी. 'नवीन तऱ्हा मारली डोईला पदर पागोट्याची फिरकी।' -होला १७. १० जमीनपहाणी खात्यांतील एक भाग; जमीन मोजणीदारांची टोळी. ११ बुरडी पंख्याची दांडी. -बदलापूर ९४. १२ (जरतार धंदा) बारीक रीळ. १३ (मातकाम) मातीचें चित्र पाटावर ठेवून तें एका गोलाकार फिरणाऱ्या लाकडी चौफुल्यावर ठेवतात ती. १४ ( विणकाम ) हातमागावरील ताण्याचीं सुतें सरकूं नयेत म्हणून घातलेला आडवा जाड दोरा. १५ माळेला बांडी (लोटे) बाधण्यासाठीं लांकडाची काटी असते ती; खापेकड. -मसाप २.२५२ -वि. १ फिरणारी २ फिरकीदार [ फिरणें ] **फिरकी पगडी**-स्त्री.कळीची पगडी. 'निमाजामा फिरकी पगडी माजी शोभे पटका।' -आपद ३९. **फिरकीदार**-वि. कळी असलेले. **फिरकीचें फूल**-न. डोक्यांत घालण्याचें मळसूत्राचें सोन्याचें फूल.

**फिरंग**—स्त्री. ( काव्य ) तलवार. ' ढाल फिरंग विशाल धनू शर चालत चालवि दोनहि बाहे ।'-आसी २९ -स्वादि १० २.१३.

**फिरंगण, फिरंगाण**—न १ फिरंगी लोकांचा मुलूख (विशेषतः पोर्तुगीजाच्या अमलाखालील ) 'कुलाबा फिरंगाण। ' -ऐपो १४४ २ फिरंग्यांचें राज्य, अधिकार ३ फिरंगी लोक [फिरंगी] **फिरंगाणी**-वि फिरंगाण संबंधीं (चाल, भाषा इ०).' दोन कंपू फिरंगाणी. ' -पया ५५.

**फिरंगी**—पु. १ ( सामा. ) युरोपियन मनुष्य; टोपीवाला. 'फिरंगी अघाडीस घातले । ' -ऐपो २७६. २ (विशेषत:) पोर्तुगीज. ३ (गो.) युरेजियन. (हे स्वतःस म्हणवून घेतात). [फ्रँक फा फिरंगी] **०न्याय**-पु. (गो ) अगदीं चेंगटपणें चालणारा व पुष्कळ खर्चाचा न्याय, खटला. **०बाभूळ**-पु. एक कांटेरी झाड. याच्या खांद्या सुरूच्या झाडाप्रमाणें असून यास बारीक शेंगा येतात. साल सुवासिक असते **०लोह**-पु. १ पोलाद; तिखें. २ तलवार. 'तुका म्हणे नाहीं नम्रता अंगीं । नव्हे ते फिरंगी कठिण लोह। ' -तुगा २३९३.

**फिरंगूट**—न. ( तुच्छार्थी ) फिरंगी.

**फिरचेल**—न. ( गो. ) दोन वाशांमध्यें तुळईवर बसविलेली उभी फळी.

**फिरणें**—अक्रि. १ वळणें; दुसऱ्या दिशेस तोंड करणें. २ परत येणें. ३ मंडलाकार चालणें; गिरकी घेणें ( चाक इ० ). ४ चक्कर येणें; ( डोकें ) भ्रमण होणें. 'मला सभ्यां फिरूं लागलें आहे.' ५ इकडेतिकडे, मागेंपुढें जाणें, करणें; चालणें; हिंडणें; भटकणें. ' किती फिरावें तुजविण आतां ? धीर क्षणभर ना धरवे । ' ६ प्रवास करणें; देशाटन करणें; एकापासून दुसऱ्याकडे जाणें. ' मी शंभर घरें फिरलों. ' ७ नवी दिशा घेणें; वळणें. ८ पालटणें; बदलणें; फरक पडणें. ' एक पाऊस पडतांच झाडांची नवली फिरली. ' ९ नाकारिलें जाणें; परत पाठविलें जाणें. १० (हुकूम, आज्ञा इ०चा) प्रसार होणें; एकानंतर दुसऱ्यास दाखविणें. ११ उलटणें; विरुद्ध होणें. 'आतां भाऊच माझ्यावर फिरला.' १२ रस होणें; पितुळणें.

११ देणें लागणें; हिशेबानें यावे असें होणें. 'माझ्याकडे तुमचे किती रुपये फिरतात ते एकदां सांगा.' [फिर; हिं. फिरना; सं. परि]

**फिरत**—स्त्री. (संगीत) तानेचा एक प्रकार.

**फिरता**—वि. १ भोंवतीं फिरणारा, गिरक्या घेणारा; वेढे घेणारा २ बदलणारा, लहरी; चंचल. ३ परत, पुन्हां येणारा; वरचेवर येणारा. 'फिरती पाळी.' ४ फिरतीवर असलेला, राहणारा; फिरस्ता, फिरती असलेला. 'फिरता-कारकून-कारभारी-सुभेदार.' 'फिरता सुभा'; 'फिरती स्वारी.' ५ सभोंवार जाणारा, हिंडणारा; इकडेतिकडे जाणारा. 'फिरती-फौज-आसूद-पहारा.' ६ बदलणारा; बदलत असलेला. 'फिरता-दिवस-दुपार-वेळ.' इतर अर्थांकरितां फिरणें पहा. ०रंग-पु. प्रकाशाप्रमाणें वेगवेगळा दिसणारा रंग (पातळ; कापड इ०चा). **फिरती**-स्त्री. पर्यटण; दौरा; स्वारी. [फिरणें]

**फिरतें**—न (व.) लाटणें.

**फिरवणी**—स्त्री १ फिरणें; बदलणें २ (विणकाम) कापड गुंडाळण्याच्या लाकडास (धून) अटक करण्याची खुंटी; खीळ या दोन असतात.

**फिरवान**—वि उलटलेला. 'धन्यावर चाकर झाले फिरवान।' -अफला ६९ [फिरणें]

**फिरवाफिरव**—स्त्री. १ वरचेवर उगीच नेणेंआणणें, काढणें घालणें, ठेवणें-उचलणें इ० व्यापार; फेरफार. २ (मुद्रण) जुळविलेला मजकूर फिरविणें; खालवर करणें. [फिरविणें द्वि.]

**फिरविणें**—सक्रि. १ फिरण्यास लावणें; तोंडाची दिशा बदलणें; बाजू बदलणें. २ भोंवतीं फिरण्यास लावणें; प्रदक्षिणा घेण्यास लावणें. ३ हिंडविणें, फिरावयास लावणें, घेऊन जाणें. ४ आंतील बाजू बाहेर करणें; उलटविणें; उलथून टाकणें. ५ परत पाठविणें. 'फिरवुनि सुमंत्र उतरला श्रीगंगेत राम।' -मोरामायणें पृ. ४३. ६ फरक करणें; बदलणें (निरनिराळ्या अर्थांच्या फरकानें योजतात) [फिरणें प्रयोजक]

**फिरसें**—न. १ (गो.) जिवाणू. २ (ल) नसती भानगड. [फुरसें]

**फिरस्त-स्ता, फिरिस्ता**—पु. १ प्रवासी; परक्या ठिकाणचा; फिरता माणूस; यात्रेकरू. २ फेरीवाला; एक स्थळीं दुकान न घालतां घरोघर हिंडून जिन्नस विकणारा. [फिरणें; तुल० फा. फिरिश्त=प्रेषित, मिशनरी]

**फिरस्ताद**—वि. पाठविलेला; नियुक्त. 'राघो विठ्ठल यांस फिरस्ताद केले असत.'-पया ३८७. [फा. फिरिस्तादन्=पाठविणें]

**फिराद**—स्त्री. फिर्याद पहा. 'आलों महीवर फिराद अशी कराया।'-र २५. ०होणें-फिर्याद होणें पहा. 'रामोजी व दयाजी बाबूर पादशाहापाशीं फिराद जहाले.' -रा १५ १३.

**फिरून, फिरोन**—क्रिवि. १ परत; माघारीं. 'येतां फिरोनि समुदाय पथीं तयांचे।' -र ३. २ दुसऱ्या वेळीं; पुनः. [फिरणें]

**फिर्याद**—स्त्री. १ अपराधनिवेदन; न्यायाची मागणी; तक्रार; चौकशीअर्ज. २ (कायदा) कोणा मनुष्यानें-तो मनुष्य माहीत असो किंवा नसो-अपराध केला आहे असा मॅजिस्ट्रेटकडे तोंडी किंवा लेखी सांगितलेला मजकूर किंवा पोलिसचा रिपोर्ट. (क्रि० ठोकणें; करणें). [अर. फर्याद्] ०होणें-फिर्याद करणें; न्याययाचक होणें. 'सूर्या कुंभार हुजूर आऊन फिर्याद आला.' -रा ६.१८. ०जाणें-येणें-फिर्याद करण्याकरतां जाणें, येणें. **फिर्यादी**-वि. दावा करणारा; वादी.

**फिलनाळा**—स्त्री. हत्तीवरील तोफ 'दुराव्या फिलनाळा सुतरनाळा या खेरीज ... असा चालता तोफखाना सज्जिला.' -मराभा ६. [अर. फा. फील्=हत्ती+नाळ=तोफ]

**फिलफिली रोखण**—स्त्री. (कु.) सुताराचें एक रोखण्याचें हत्यार.

**फिलफौर**—क्रिवि. तावडतोब; लवकर; त्वरेनें. -ऐटि १.५९. [फा. फिल् फौर्]

**फिलसाण**—न. (गो) कुजल्याची, कुजट घाण, वास.

**फिलोक्सेरा**—पु द्राक्षावरील रोग. -कृषि ५१८.

**फिल्टर**—न. द्रवपदार्थ गाळण्याचें साधन; गाळणी. [इं.]

**फिल्म**—स्त्री (सिनेमांतील) फोटो घेण्यासाठीं केलेली विशिष्ट पट्टी (ही सेल्युलॉइडची असते); चित्रपट. [इं.]

**फिल्वाके**—क्रिवि. खरोखर; वस्तुतः. [अर. फिल्वाकिअ]

**फिल्सांव**—न. (गो.) वर छपाई. [पो. आफरिसाव]

**फिल्हाल**—अक्रिवि. सध्यां. 'फिल्हाल इतका मजकूर समजण्यांत आला.' -पदमव ११८. [अर.]

**फिशरत**—स्त्री. फिसरत पहा.

**फिशारकी, फिशारखोर, फिशारणें, फिशारी**—फुशारकी इ० पहा.

**फिशाळ**—वि. (गो.) निष्णात; तरबेज; दर्दी.

**फिश्श, फिश्शो. फिस्**—उद्गा. (एखाद्या गोष्टीला महत्त्व नाहीं असें दाखवावयाचें असेल तेव्हां करावयाचा आवाज) छत; थुत्; ऊंः. [ध्व]

**फिश्शी**—वि. वेडगळ; मूर्ख; अर्धवट.

**फिसकटणें, फिसकणें**—अक्रि. १ (मैत्री, निष्ठा इ०चा) त्याग करणें; प्रतिकूल, पराङ्मुख होणें; दूर जाणें. २ (करार, बेत, योजना इ०) निरर्थक होणें; मोडणें; बिरणें; फसणें; बिघडणें. ३ लाथा मारूं लागणें व दूध न देणें; बिथरणें (गाय). ४ बेफाम, अनावर होणें; बिथरणें (घोडा). [ध्व. फसक, फिस्]

**फिसकणें**—अकि. मांजराचें फिसकारणें; फुसफुसणें; खिसणें. [ ध्व. फिस् ]

**फिसका, फिसकारणें, फिसकारा, फिसफिसणें, फिस्स**—फुसका इ० पहा.

**फिसकाविणें**—उकि. एखाद्याच्या स्नेहामध्यें फूट पाडणें; फोडणें; मन फिरविणें, उडविणें, बदलविणें. [ फिसकणें ]

**फिसकें**—न. गळू; केसतूड; पुवाळलेलें किंवा पुवास आलेलें दुःख; वर पापुद्रा असून आंत पू, पाणी असलेलें उठाणूं [ फिस ]

**फिसफिस**—स्त्री. १ मांजराचें फिसकणें; फिसकारणें. २ (ल.) अंगावर वसकन् येणें. [ध्व ] **फिसफिस-फिसां**-क्रिवि वस्दिशीं, फणफणून; फिसकारून; चिडचिडेपणानें.

**फिसरत**—स्त्री. विश्वासघात; हरामखोरी; वचनद्रोह. -वि. बेइमानी; विश्वासघातकी.

**फिसरा**—वि.बेइमान;विश्वासघातकी; खोटा, बिन भरंवशाचा.

**फिसाइत-हत**—स्त्री. दंगा. -पाव ८. 'कोंकणांत लखम सांवत फिसाहत करून वसाहत होऊंन वेई.' -इमं १२१. [फिसाद]

**फिसाद, फसाद**—स्त्री. १ बंड; दंगा. ( क्रि० उठणें; पडणें; होणें; चेतणें; वाढणें ). 'परंतु कधीं कधीं फिसादीच्या गोष्टी बोलतात.' -वाडबाबा २.३३. २ दंगाधोपा; अंदाधुंदी; तंटा-बखेडा. 'तो एक-व-एक घरांतील फिसाद उभा राहिला.' -रा ५.१४५. ३ (कारकुनी) लिहिण्यात, हिशेबांत तफावत; गफलत. ४ न जुळणें; गैरसमजूत (क्रि० होणें; पडणें; चेतणें; वाढणें; उठणें). [अर फसाद्] **फिसादी, फिसादखोर**-वि. १ बंडखोर, फितुरी; उलटणारा; द्रोही. 'फिसादी सहा हजार लोकांनिशीं पळून गेला.' -ऐटि १.५९. २ दांडगा; दंगेखोर; उच्छृंखल. [-अर. फसाद् ]

**फिसालत**—स्त्री १ कारस्थान 'शिंदे यांचें व बायाचें हरएकविशीं मिटों देऊ नये याप्रमाणें आंतून फिसालती होत्या' -ख ११ ५७७२. २ फितुरी. फिसाद पहा.

**फिस्कारणें**—क्रि. फुसकारणें. 'तीं आकळिलिहीं पादीं। फिस्कारू करिती।' -गीता १४९४.

**फिस्की**—स्त्री. (व.) कुत्रीचें पिल्लूं ( मादी ). 'आमच्या कुत्रीला फिस्की आली.' [ ? ]

**फिळकवणी**—न. फळकवणी पहा.

**फिळफिळीत**—न. पाणचट; फळकवणी; पातळ (ताक इ०)

**फी**—स्त्री. १ मोबदला; मेहनताना; कामाबद्दलची ठराविक रक्कम. २ शिकण्याबद्दल लागणारी रक्कम. ३ कर; दस्तुरी; हक्क 'गुरचराईला सरकारांत फी भरावी लागते.' -के २६.७.३०. [इं.]

**फी**—क्रिवि. मध्यें. -आदिलशाही फर्मान. [ फा. ]

**फीं**—स्त्री. (गो ) कलाबतु. [ पोर्तु. फिओ ]

**फीट**—स्त्री. फेड (कर्ज, उपकार इ० ची); परत करणें. [फिटणें]

**फीट**—स्त्री. दोरा गुंडाळण्याची पट्टी; कांबटी. -न. (राजा.) पाचर; फटींत बसविण्याचा लांबट लांकडाचा तुकडा. [ फाट-टा ]

**फीट**—स्त्री. झीट; अपस्माराचा झटका. [ इं. ]

**फीत**—स्त्री. नाडी; पट्टी; लेस; रेशीम, सूत इ० विणून टाली-सारखा पट्टा करतात तो; मगजी. [ पोर्तु. फिता ]

**फींत**—स्त्री. स्फीति, स्फीत पहा.

**फीर**—स्त्री.(कों ) माघार; परावृत्ति; मागें, परत फिरणें. [फिरणें]

**फीरोझी**—स्त्री. यश. -आदिलशाही फर्मान. [फा.] **फीरोझमन्दी**-स्त्री. यशस्विता. -आदिलशाही फर्मान.

**फील**—पु. हत्ती; गज. 'एक जंजीर फील.' -पया ३८४. [अर फील्; फा. पील्] **०खाना**-पु. हत्तीखाना; गजशाला. **०नाळ**-स्त्री. हत्तीवरील तोफ.

**फींव**—पु. हार, माळ इ०च्या टोकाला किंवा फुलें, मोतीं, मणि इ० ओघळूं नये म्हणून केलेला गोलक.

**फीस**—फुसका पहा.

***फुआ**—पु. (खा.) आते(फुई)चा नवरा. [ हिं. फुपा-पू, फुप्फु-फू ]

**फुइजी, फुई**—स्त्री. १ (बायकी) आत्या. 'व्याहि जांवई फुई मावशी।' -अमृत ७३. २ नवऱ्याची आई; सासू [ हिं. फुप्फी ] **०भाऊ-बहीण**-पुस्त्री. आतेभाऊ-बहीण.

**फुई**—स्त्री. तुषार; शिंतोडा. 'थेंब फुई मोजावे। अणुरेणु किती।' -दा ११.७.५ [ ध्व. फूः ]

**फुईच**—स्त्री १ (कातकरी) आत्या २ मामी -बदलापूर ११६.

**फु(फुं)क**—पुस्त्री. फुंकर; तोंडानें घातलेला वारा. ( क्रि० मारणें ). 'आणि फुंकें भाता फुगे।' -ज्ञा १३.६६४. [ फुंकणें. सं. फूत्+कृ; प्रा. फुक्क ] **०नळी**-स्त्री. फुंकणी; धमनी.

**फुकट**—वि. १ वृथा. २ फुकटचा पहा. -क्रिवि १ व्यर्थ; विनाकारण; निरर्थक. २ पैशाशिवाय किंवा श्रमाशिवाय ( मिळा-लेला, दिलेला ). ३ मोबदल्याशिवाय; मोफत (केलेलें काम इ०). [ सं. फूत्कृतम् ? ] म्ह० फुकट आणि चोखट=पदार्थ फुकट मिळावा आणि तो चांगला पण असावा (अशी इच्छा करणें). **फुकटचा**-वि १ मोफत; श्रमाशिवाय, पैशाशिवाय मिळणारा. २ अनायासें, सहज घडणारें 'हें काम फुकटचें नव्हे.' **०खाऊ-खोर, चोंट, फुकट्या**-वि. १ बिन परिश्रमानें, बिन मोबदल्यानें आयतें फळ मिळावें म्हणून पुढें आलेला; निलाजरा(इसम) २ दुसऱ्याच्या जिवा-वर मजा मारणारा. ऐतखाऊ पहा **०पसारा**-वि फुकट हांस-ण्याचा ज्याचा स्वभाव तो. **०फजिती**-स्त्री. नुकसान, श्रम, तिरस्कार, अपमान इ० याच फक्त लाभ होणारा. धंदा, गोष्ट इ०. **०फाकट-वारी-फुका**-क्रिवि फुकट; मोफत; मोबदल्याशिवाय.

[ फुकट द्वि. ] ०फाकट ब्रह्मज्ञान–न. बिन मोबदल्यानें, श्रमानें मिळणारें आध्यात्मिक ज्ञान ( हें असें कधींहि मिळत नसतें निषेधार्थी प्रयोग ). 'फुकट ब्रह्मज्ञान–मिळत नाहीं–सांपडत नाहीं–साधत नाहीं. ०बिसनी–वि. पदराला खार न लागतां चैन चालविणारा फांकडा; व्यसनी ( मनुष्य ); फुकटचोद. म्ह० फुकट बिसनी तमाखू उसनी. ०शाई–वि. मोफत; फुकट; पैसा खर्च न होतां मिळणारें. [ फुकट+शाही प्रत्यय ] **फुकटा, फुकटया**–वि. १ मोफत; फुकटशाई. २ (ल.) कुचकामाचें. ३ मोफत घेणारा; फुकटखोर. [ फुकट ] **फुकटाई**–स्त्री. मोफतपणा; फुकटपणा. ( क. पंचमीविभक्तींत उपयोग ). **फुकटाईनें–खालीं–वारी–फुकटाईचा**–क्रिविवि फुकट; विना मोबदला मिळालेला, केलेला. **फुकटाफुकट, फुकटाफुकटी, फुकटावारीं**–क्रिवि. मोफत वारीं; फुकटफाकट. [ फुकट द्वि. ]

**फुंकटॉ**—पु. ( गो. ) फळी ठेवण्यासाठीं भिंतींत पुरलेला लांकडी ठोकळा.

**फुंकण, फुंकणू**—न. ( राजा. ) फोल दाणा. ( विशेषतः तांदूळ ); आंतील अंश किडीनें खाल्ल्यामुळें पोकळ, हलकें झालेलें धान्य. [ फुंक ]

**फुकणी**—स्त्री ( व. ) वाण; ददात. (क्रि० पडणें ). 'घरांत काय फुकणी पडली आहे ? ' [ फुंकणें ]

**फुंकणी**—स्त्री. १ फुंकून विस्तव फुलविण्याकरितां बांबू, पितळ इ० ची नळी. २ सर, माळ इ० करितां सोन्याचा अगर कांचेचा नळीच्या आकाराचा मणी, तुकडा ३ फोल धान्य; फुंकण. (वाप्र. ) **हातपायाच्या, हाडाच्या फुंकण्या होणें**–अतिशय कृश होणें.

**फु(फुं)कणें**—उक्रि १ फुंक मारणें; तोंडानें फूं फूं करणें; फुंकर घालणें. २ सनई, कर्णा इ० मुखवाद्यें (तोंडानें) वाजविणें. ३ चेतविणें; पेटविणें; जाळून भस्मसात करणें (देश, गांव, तमाखू रसायन इ० ). ४ भाता चालविणें; आंतून वारा येईल अशा रीतीनें हालविणें; वारा भरणें. ५ (पैसे, दौलत) उधळणें; उधळपट्टी करणें. ६ मंत्राची फुंक मारणें; मंत्र घालणें. ७ प्रेत जाळणें; दहनविधि करणें; कशी तरी प्रेताची विल्हेवाट लावणें.(विधियुक्त कर्म न करता). ८ कसें तरी विकणें ( कितीही कमी किंमतीला ). [ सं फूत्+कृ, प्रा. फुक; दे प्रा. फुंका; हिं फूंक ] म्ह० दुधानें भाजला तो ताक फुंकून पितो (वाप्र.) **कान फुंकणें**–१ मंत्रोपदेश सांगणें. २ मन वळविण्यासाठीं कांहीं गोष्टी सांगणें, चहाडी करणें. **बातमी फुंकणें**–बातमी विवक्षित स्थलीं पोचेल असें लेखादि द्वारा करणें. **गडी फुंकणें**–(खेळांत) गडी फू करणें; मैत्री तोडणें ( यासाठीं लहान मुलें गाल फुगवून वर बुक्या मारून फूत्कार करतात ). **फुंकून पाय टाकणें**–दूरवर पाहून, बहुत विचारानें वागणें.

**फुकफुक**—पु. ( गो. ) भीति; धाकधूक. [ ध्व. ] **फुकफुकचें, फकफकचें**–( गो.) छाती धडधडणें; भीतिग्रस्त होणें.

**फुंकर, फुंका, फुंकारा**—पु. तोंडानें घातलेला वारा; फुंक. ( क्रि० मारणें ). [ फुंग ] **फुंकरणें, फुंकारणें**–सक्रि. ( अग्नि, कढत अन्न इ० वर ) तोंडानें वारा घालणें; फुंकर मारणें. –अक्रि. दम लागणें; धापा टाकणें (जनावरानें ) [ सं. फुंकृ; फुंकर ]

**फुका, फुकां, फुंका, फुकासाठीं**—क्रिवि. १ ( काव्य.) फुकट; मोफत. २ नफ्याविना; व्यर्थ. 'मुकावा फुका पुरींच्या सुखा।' –विक ८८. [ दे प्रा. फुक्का=मिथ्या, फूंक ]

**फुकाचा**—वि क्रिवि. १ फुका. २ अनायासें; सहज. 'फुकाचा सापडला उपवास। पातकी यासी।' –कथा २.९.७५. 'फुकाचें मुखीं बोलता काय वेंचे।' ३ फुकटचा पहा. म्ह० (व) फुकाची कढी धाऊ धाऊ वाढी, बारकाचा भात आखडला हात=पंक्तींत वाढतांना भेद करणें; पंक्तिप्रपंच करणें.

**फुकार**—पु. मंत्र फुंकणें; छाछू करणें. 'जुकार बहुश्रुति फुकार करिती विकार न कळति सुरासुरा।' –आमह्रा २९. [ फुंकर ]

**फुंकार, फुंकरा**—पु. १ फुंकर पहा. २ सापाचा फूत्कार; फुसकारणें. ( क्रि० मारणें; टाकणें; देणें; करणें ). [ फुंकर ]

**फुकारा**— पु. कोर्टांत वादी–प्रतिवादींनां हजर राहण्याकरतां चपराशी जी हांक मारतो ती. ( प्र. ) पुकारा पहा.

**फु(फुं)की**—स्त्री. ( एकीबेकीच्या खेळांत ) रिकामी मूठ; मुठींत कांहीं न धरणें; मुठींत वस्तूचा अभाव.

**फुंकें**—वि (गो ) फुकट पहा. ०सवाय–वि. ( गो ) अतीं स्वस्त **फुंकटयार, फकटयार**–वि. ( गो. ) रिकामा

**फुंग**—पु. अभिमान; फुगारा. 'रागद्वेष मनीं जाणिवेचा फुंग। न धरिजे संग अधर्माचा।' –ब ४६७. [ फुगणें ]

**फुगट**—वि. फुगीर; किंचित् फुगलेलें, सुजलेलें. [ फुगणें ]

**फुगटणें**—अक्रि. १ फुगणें; भरून येणें. २ ( ल ) रागानें, गर्वानें फुगणें; ताठरणें. ( उपहासार्थी फुगणें याच्या सर्व अर्थांनीं योजतात ) [ फुगणें ]

**फुगडी**—स्त्री. १ मुलींचा एक खेळ. यांत एकमेकींचे हात किंवा दंड धरून व पाय जुळवून गरगर फिरतात (किंवा एकमेकीसमोर बसून उडया मारीत पुढें जातात ); खेळतांना तोंडानें कांहीं उखाणे म्हणतात किंवा 'फुगडी फू' असा शब्द काढून ताल धरतात ( क्रि० घालणें ). 'फुगडी खेळग लाखोटा। घर माझा आंगोठा।' –भज ३२. २ (ल )वेडयाप्रमाणें इकडे तिकडे हिंडणें, फिरणें. ३ धांगडधिंगा. म्ह० कानांत बुगडी गावांत फुगडी.

**फुगणें**—अक्रि. १ फुगीर होणें; फुगवटी येणें; वारा आंत भरल्यामुळें पदार्थ मोठा होणें. २ ( पोट, पिशवी गांठोडें इ० चें ) आवरण ताणलें जाऊन स्थूल होणें, भरणें, वर येणें. ३

(गतिनिरोधामुळें ओढा इ० तील जल) तुंबणें; (पाणी) चढणें. ४ रुसणें; रागावणें. ५ उन्मत्त होणें; फुशारणें; ताठा भरणें; तरारणें. 'विषयांसीं संग घडो ज्या तें सेवुनि मदें। कुत्री फुगती। -मोअश्वमेध १.५१. ६ प्रफुल्लित होणें; आनंदित होणें. 'जो ध्यान सुखभरें फुगला।' -मोशांति ६.२९ ७ (अधिक विवक्षित अर्थ शिरल्यामुळें एखादें प्रकरण इ०) मोठा होणें, वाढणें. ८ लठ्ठ, स्थूल होणें (अंगानें). [सं. फूत्कृ; प्रा. फुक्क; ध्व. फू फू!]

**फुगदर, फुगुदोर**—पु. (गो.) एक दागिना. [पोर्तु. आफोगादोर]

**फुगरा**—वि. फुगलेला; फुगीर. [फुगणें]

**फुगराई**—स्त्री. फुशारकी; शेखी; वटवट; बडबड. [फुगारा]

**फुगरूड**—फंगरूड पहा.

**फुगवटा-टी**—पुस्त्री. १ सूज; उंच झालेला, वाढलेला भाग; फूग. २ फोपसेपणा. ३ तुंबलेली, चढलेली स्थिति (पाण्याची) [फुगणें]

**फुगवणी**—स्त्री. १ अतिशयोक्ति; मोठें होणें; वाढ; फूग. २ अतिशय स्तुति करून चढविणें [फुगविणें]

**फुगवणी**—न. फुगलेलें, तुंबलेलें पाणी. [फुगणें+पाणी]

**फुगवशी**—फुगवटा पहा.

**फुगविणें**—सक्रि. १ स्थूल, फुगीर, मोठा करणें; फुगावयास लावणें. २ (ल.) अतिशय स्तुतीनें चढविणें. [फुगणें प्रयोजक]

**फुगा**—पु १ (भाजल्यामुळें येणारा) फोड २ फुगारा; फुगवून केलेला आकार. ३ कोणतीहि फुगलेली वस्तु. ४ बुडबुडा; लहान मुलांच्या खेळण्यांतील तोंडानें फुगविण्याचा रबरी गोळा. ५ प्रवाहाचा फुगलेला भाग; तुंबारा. ६ हजारा, कारंजें इ०चा फुगीर मुखावयव. ७ राग, घुस्सा. ८ (ल.) अभिमान; ताठा. (क्रि० येणें) ९ घोडयाच्या गुडघ्याखालील सूज १० खोटें मोतीं. ११ डिंकाची जात. -मुंव्या ४६ १२ सोनें गाळण्याकरतां वापरण्यात येणारा चंबू; सुरईसारखी बाटली. -वि. १ फुगलेला; फुगीर. २ (ल) गर्वानें, अभिमानानें ताठलेला [फुगणें]

**फुगाई**—स्त्री. राग 'उत्तर केलें धरुन फुगाई।' -सला ७२. [फुगणें] **फुगारणें**-अक्रि फुगणें; फुगीर होणें. [फुगणें]

**फुगारा**—पु. १ फुगा अर्थ १, २. ५, ७ पहा २ फुगलेला भाग. ३ फुगलेपणा; फुगीरपणा (भाकर इ० चा) ४ ताठा; पोकळ डौल 'नको मानसीं ज्ञानगर्वे फुगारा।' -दावि १७४ [फुगणें]

**फुगारॉ**—पु (गो.) गुदमरणें [पोर्तु आफोगार] **फुगार जावुंक-करूंक**-क्रि. (गो.) गुदमरणें: गुदमरायास लावणें. [पोर्तु आफोगार] **फुगारमार**-पु तोंड दाबून बुक्क्यांचा मार; कोंडमारा; गुद्दमारा.

**फुगांव**—पुअव. (गो.) कांजण्या; विस्फोटक. [पोर्तु. फोगो]

**फुगी**—स्त्री. (समासांत उपयोग) फुगवटा. [फुगणें] **फुगांचें खाण**—न. (कों) वातूळ खाणें.

**फुगीर**—वि. १ (कांहींसा) फुगलेला; आकारानें मोठा झालेला. फुगरा पहा. २ पुढें; बाहेर, वर आलेला; वाढलेला ३ (ल) गर्वानें ताठलेला; घमेंड चढलेला. [फुगणें] ०**चोट**—वि. १ (अशिष्ट) फोपसा मनुष्य. २ अभिमानानें, गर्वानें फुगलेला. ०**दोडका**—वि. वढाईखोर. 'फुगीर दोडका बायकांमधीं।' -पला ४.३१. ०**पण**—न ताठा; आढ्यता; अहंकार. 'म्हणे गुरूचा प्रताप वर्णून। फुगीरपण मिरवितसे।' -नव १८.१४५.

**फुगीव**—वि. १ फुगीर अर्थ १, २ पहा २ तुंबलेलें; सांचलेलें (बंधारा घातलेलें पाणी). [फुगणें]

**फुगु**—पु. फुगी; फुगवटा. 'अपानु माघौता मुरडला। तो सर्वेचि वरी साकडला। धरी फुगु।' -ज्ञा ६.२१४. [फुगणें]

**फुगें**—नं. १ वाटोळें फिरणारें पाणी; भोंवरा. २ प्रवाहाला घातलेला बांध; बंधारा. (क्रि० घालणें). ३ (कु.) देवीचे फोड फुगणें. [फुगणें] ०**मोती**—न. नकली, खोटें मोतीं.

**फुगोटी, फुगोशी**—स्त्री. फुगवटी-शी पहा.

**फुगोर**—पु (गो) रुसून बसणें. फुगारा पहा.

**फुग्या(फेण्या)**—स्त्रीअव. एक पक्कान्न. 'फुग्या फेण्याचे परिकार।' -वेसीस्व ८.११७. [फुगणें+फेणी]

**फुंज**—पु. अभिमानानें फुगणें; ताठा; गर्व. 'ते समई उतरे। फुंज मीपणाचा।' -दा ६ १०.१६ [फा.]

**फुंजणें**—अक्रि १ स्फुंदणें. 'आक्रन्दे रडे आणि फुंजे।' -दा ३ ८.२६ २ गर्वानें फुगणें; गर्वाने ताठणें. 'जालिया जेणें आनंदें। फुंजों नेणें।' -ज्ञा १८.५९२ [सं. स्फुन्द्]

**फुंजारणें**—उक्रि फिंजारणें पहा.

**फुंट**—(गो.) फूट पहा.

**फुट, फुटअमल, फुटगांव, फुटजहागीर**—फूट इ० पहा.

**फुटक**—क्रिवि. फुटकळ; वेगळेपणें; तुटक. -वि. १ चीर किंवा तडा गेलेलें (नाणें, भांडें इ०) २ फुटलेली; भेगललेली; तडा गेलेली (भिंत, बांध इ०). ३ तुटकें; मोडकें (यंत्र). ४ अपुरा; अर्धवट (संच, ग्रंथ). [सं. स्फुट्; प्रा. फुट] ०**पात्र**—न. तडा गेलेलें, फुटलेलें भांडें.

**फुटकर**—न फुटलेलें भांडें. -वि. १ फुटका पहा. २ फुटकळ; तुटक; किरकोळ; बारीकसारीक. ३ पांगलेलें; विस्कटलेलें; जूट नसलेलें (सैन्य इ०). [फुटणें]

**फुटकळ**—वि. १ भेगललेली; फुटलेली (भिंत, बांध इ०). फुटक अर्थ २ पहा २ विभाग पाडलेलें; गटांतील; मोठ्या सांठ्यांतील एकदम; थोडें; घाऊक नव्हे असें; लहान प्रमाणाचें. 'माल घाऊक घेतला तर थोडा स्वस्त पडेल पण फुटकळ घेतल्यास महाग

पडेल.' ३ सामान्य हिशेबांत न घेतलेल्या (खर्चाच्या बाबी). ४ अर्धवट; अपूर्ण; मालांतील एखादा दुसरा; सुटा; इकडलातिकडला; किरकोळ. 'ज्ञानकोशांतील फुटकळ भाग मिळूं शकतात.' –क्रिवि किरकोळीनें; विभागश: (खरेदी, विक्री).

**फुटकळ**—वि. फटकाळ पहा.

**फुटक(कु)ळणें**—अक्रि. पुटकुळ्यांनीं भरणें (अंग). [फुटकळी]

**फुटक(कु)ळी**—स्त्री. पुटकुळी; पुळी; लहान फोड. [सं. स्फुट्; म. फुटणें] **फुटक(कु)ळ्याचा दांथर**–पु. अंगावर उठलेला पुरळ. पुटकुळ्या उठणें.

**फुटका**—वि. असभ्य; अशिष्ट; ग्राम्य (भाषण, बोलणें).

**फुटका**—वि. १ फुटलेला; छिन्नभिन्न. २ किरकोळ; हिशेबांत नसलेला (वेळ, खर्चाची बाब इ०) ३ टांक आंत घुसणारा किंवा लिहिलें असतां शाई पसणारा (कागद); लवकर फुटणारी, पसरणारी (शाई). ४ जाड व अस्पष्ट (लिखाण, अक्षर हा शब्द कागद, शाई, अक्षर व लेख यांना सारखाच लावतात). ५ अंध; मंददृष्टि; अंधत्व आलेला (डोळा). ६ मुळींच नाहीं किंवा कमी ऐकूं येणारा; बधिर (कान). ७ वाईट; अभागी (नशीब, दैव). [फुटणें] (जवळ) ०मणी–कवडी–फोड–नसणें–अतिशय दरिद्री असणें. 'माझ्या बायकोच्या अंगावर फुटका मणि देखील राहिला नाहीं.' **फुटका डोळा काजळानें साजरा करणें**–(ल.) युक्तीनें अवगुण झांकणें. **फुटकी तिनिसांज**–स्त्री. सूर्यास्ताची वेळ; ऐन संध्याकाळ. **फुटक्या तिनिसांजा**–क्रिवि. ऐन संध्याकाळीं. **फुटकें कपाळ–नशीब–दैव**–न. १ दुर्भाग्य. २ वैधव्य.' **फुटक्या कपाळाची–दैवाची**–वि. दुर्दैवी; कपाळकरंटी; विधवा **फुटक्या मनाचा**–वि. चंचल; अनिश्चित स्वभावाचा; दुर्बल मनाचा.

**फुटखोत**—पु. फुटकळ खोत; थोड्या भागाचा जमीनसाऱ्याचा मक्तेदार. 'सरखोत व फुटखोत पुढें सुटीचा 'कण्या राहिला नाहीं म्हणून कबजे मागतात...' –वाडसमा ३.१५५. [फुटणें+खोत]

**फुटंग**—वि. (गो.) पडीत; नाकीर्द.

**फुटगुढ्या**—पु. एक हलकी जात व तींतील व्यक्ति हे वसईच्या आसपास आढळतात.

**फुटणावळ**—स्त्री. (राजा. कुण.) एक वर्षपर्यंत झाडाचें उत्पन्न (फळें इ०) घेण्याबद्दल द्यावयाचें द्रव्य. [फूट]

**फुटणें**—अक्रि. १ मोडणें; तुटणें; तुकडे पडणें; तडा जाणें; उकलणें; तडकणें; चीर पडणें; भंग पावणें; एकदम दुभंग होणें (सरळ व व्यापक अर्थी). २ अंकुर येणें; कोंब, मोड येणें; रुजणें. ३ (दांत) हिरड्यांच्या बाहेर येणें ४ (दहीं, दूध इ०) चोथा पाणी होणें; घनांश व द्रवांश वेगळे होणें. ५ फुटका असणें (कागद, शाई, अक्षर, लेख); शाई पसरणें; ओल्या कागदानें, शाई शोषणें, फैलावणें; अक्षर व लेख मोठें, अस्पष्ट उतरणें. फुटका पहा. ६ (रस्ता इ० चे) फाटे, शाखा होणें; विभागला जाणें. ७ फूट(संधिवात) विकारानें आजारी पडणें, मोडून येणें, ठणकणें (अंग-ताप येण्याच्या वेळीं). ८ घमघमणें; दरवळणें (वास) ९ (गुप्त गोष्ट) प्रसिद्ध, जाहीर होणें १० फूट पडणें; विस्कळित होणें; पांगणें (सैन्य, संस्था इ०). ११ भांडण होऊन वेगळें होणें, बिघाड उत्पन्न होणें. १२ (खांडुक, गळूं इ०) तोंड पडून वाहूं लागणें. १३ बाहेर पडणें, उगवणें; दिसूं लागणें (काजण्या, पुळ्या इ०) उगवणें; उद्भवणें; बाहेर येणें. 'रात्री माजी रक्षिले नगर। तंव पूर्वेस फुटले रविकर।' –कथा २.२.६१. 'स्त्रीला फुटलें नाहीं रडे।' –विक २९. १४ (आवाज, गळा इ०) घोगरा होणें; चिरकणें; बदलणें; 'कंठ फुटला' (ल.) बोलता येऊं लागणें; वाचाळता उत्पन्न होणें. १५ (हात, पाय, ओठ इ०) तडकणें; भेगा पडणें. १६ (नारळ, फणस, पोफळ इ०)पूर्ण वाढ होऊन फळें दिसूं लागणें. १७ (डोळे, कान इ०) जाणें; आपापलें काम करण्यास असमर्थ होणें. १८ (मन, विचार इ०) फांकणें; फाटे फुटणें; एकावधान न राहणें. १९ मर्यादा सोडून बाहेर येणें; अमर्यादा होणें; 'शरधी जलधी फुटले कीं दैवें पाश एकदा तुटले।'–मोभीष्म ३.५९. २० बाहेर निघणें; वेगळें होणें; अलग होणें.' 'मासा जळावेगळा फुटे। तें दुःख वाटे रायासी।' –भारा बाल ८ ३५. २१ सरणें; सरकणें 'फुटे न पद कंचुकी भिजलि अंग रोमांचिलें।' –रसकल्लोल अकक पृ २ १६७. [सं. स्फुट; प्रा. फुट; सं. स्फुटन; प्रा. फुट्टण; हिं. फूटना] **दिशा फुटणें**–उजेडणें.

**फुटफाट**—स्त्री. (क्व.) फटाफट पहा.

**फुटफुट, फुटफुटणें**—पुटपुट, पुटपुटणें पहा.

**फुटमुकासा**—पु किरकोळ मुकासा अंमल. 'निंबाळकर यांस सरलष्कर सांगोन जमावाचे बेगमीस खेरीज फुटमुकासे मुकासा व जकाती निमे सरंजाम दिल्हा असे.' –वाडबाबा १.१७१. [फूट+मोकासा]

**फुटरा**—वि. १ एकदम, सतत मोडणारा; तुकडे पडणारा; भेगलणारा; फुटीर (विप्र). २ (थंडी इ० मुळें) फुटणारा; चिरा, भेगा पडणारा (पाय, अग इ०) ३ फुटून लाह्या बनणारें(जोंधळा, वरी इ० धान्य). [फुटणें]

**फुटलासा**—वि. (व) (हृदय, छाती) फुटेल इतका: फार; खूप. 'बाळ खेळण्यासाटीं फुटलासा रडला.'

**फुटवण**—न. (कु) मसाल्याविरहित मांसरस. फुंर्टो पहा.

**फुटवा**—पु (कों.) नवी पालवी; फूट. [फुटणें]

**फुटळ**—स्त्री. (राजा.) कण्या; तांदूळ सडताना झालेले धान्याचे तुकडे. [फुटणें]

**फुटा**—वि.क्रिवि. फुटकळ पहा. [ फुटणें ]

**फुटा**—न. एक वस्त्र. 'फुटा परित्येजणें.'-ॠ १०९ [सं. पट्ट]

**फुंटॉ**—वि (गो ) नुसता; साधा; दूध नसलेला चहा. [ गो. फुंटॉ=नुसता+वणी = पाणी ] **फुंटोकडी**-स्त्री. ( गो. ) खोबऱ्याचा रस नसलेली कढी

**फुटागूळ**—पु. ढेप फुटून तुकडे केलेला, बारीक गूळ.

**फुटाणा**—पु. १ भिजवून, भाजून खाण्यालायक केलेला हरभऱ्याचा दाणा. २ ( ल. ) चलाख; तीव्र बुद्धीचा, चपळ मुलगा; तरतरीत,तडफदार मुलगा. [ फुठणें+दाणा. सं. स्फुटन; प्रा. फुट्टण-] (वाप्र ) **फुटाणे उडणें-फुटणें**-जोरानें, ताडताड, बोलणें;सरबत्ती उडणें, झडणें. **फुटाणे करणें**-एखाद्याला अतिशय भारी, वरचढ असणें; एखाद्यास विकत वेण्याघेण्याजोगा असणें. **फुटाणे फोडणें**-(ल ) (ना ) पटापट उत्तरें देणें. **फुटाणे भाजणें**-(ल ) जुलूम करणें; गाजणें **(भाषणाचे-शब्दाचे-वाणीचे) फुटाणे भाजणें**-शब्दाचा भडिमार करणें; सरबत्ती उडविणें. **फुटाण्यासारखा उडणें**-१ रागानें, गर्वानें जोरदार रीतीनें अंगविक्षेप करणें. २ फार चिडणें; चिडखोर असणें, रागामुळें त्वरेनें कांहीं कार्यास प्रवृत्त होणें. **फुटाणगार**-फुटाणे भाजणारा. -राव्य १०.११.

**फुटाणी**—स्त्री १ ठिपक्या ठिपक्यांची, बुट्ट्यांची पैठणी; उंची रेशमी वस्त्र 'नेसाया रंगी फुटाणी घे साळू।' -सला ४६. २ (विणकाम) एक प्रकारची वीण. फणींतील दोन ताणे काळे, दोन तांबडे असें उभार, व आडवणहि तसेंच, किनार कोणत्याहि प्रकारची; या विणीचें लुगडें. -वि. ठिपके (फुटाण्यासारखे) असलेलें (चीट इ०)

**फुटाफूट, फुटाफाट**—स्त्री. १ संघांतून एकेकाचें विभक्त होणें; फूट, भेद (संघ, संस्था इ० कांत). २ पांगापांग; दाणादाण (सैन्याची) ३ मोडतोड; फूटतूट. [ फुटणें द्वि. ]

**फुटार, फुडार**—वि. (गो.) भावी; पुढचें; पुढील पहा.[पुढें]

**फुटाळ**—न. ( कों.) झाडावरून पडून फुटलेलें फळ (विशेषतः आंब्याचें ). [ फुटणें ]

**फुटाळी**—स्त्री. भेग.

**फुटाळू**—वि. १ ( लाह्यासाठीं भाजलें असतां ) सहज फुटणारें ( धान्य ). २ ठिसूळ ( लांकूड, दगड ). [ फुटणें ]

**फुटी**—स्त्री. १ तेज; विकास; दीप्ति. 'तेथेंचि कृष्णमेघांचिया दाटी। मार्जी कल्पांत विजूंचिया फुटी।' -माज्ञा ११.२०४. ( पाठभेद ). २ भेद; फूट. [ फुटणें ]

**फुटीर**—वि. १ फुटरा पहा. २ उकललेला; दुभंगलेला. 'पृथ्वीचा पापुद्रा पुष्कळ ठिकाणीं वांकडातिकडा दबला जाउन फुटीर होतो.' -भू १०९. ३ जीर्ण; ज्याच्यावरील सोनें किंवा चांदी निघून आंतील रेशीम दिसतें असा ( कलाबतू ). ४ फटी पडलेलें; मोडलेलें तुटलेलें, ( कुंपण इ० ). [सं. स्फुटितृ; प्रा. फुट्टिर]

**फुडचा, फुडला, फुडा, फुडां, फुडार, फुडारी,फुडी, फुडील, फुडून,फुडें**—पुढचा इ० पहा. (हीं रूपें दक्षिण कोंकणांत, कुडाळप्रांतांत प्रचलित आहेत). [ पुढें ] म्ह० ( गो. ) फुडलें जोत तसें फाटलें जोत=पुढले लोक करतात तसें मागील लोकही करतात **फुडत, फुडती, फुडताई**—स्त्री. ( व.) घाई; जलदी. 'मोठ्या फुडतीनें निसटला.' **फुडवट**-वि. ( राजा. ) पहिलारू; पहिल्या विणीची, वेताची ( गाय, म्हैस इ० ). **फुडसून**-क्रिवि. (कु ) पुढून. **फु.डा**-पुक्रिवि. पुढा, पुढां पहा. -वि. प्रमुख. 'ऐसा सौभद्रु वेगाडा । पांडवांमाजी फुडा।' -गीता १.४५१. [ पुढें ]

**फुडिया, फुडे**—क्रिवि. खरोखर. 'इये पदें नव्हती फुडिया। गगनाचियाचि घडिया।' -ज्ञा ७.१९५. **फुडी**-वि १ (महानु.) स्पष्ट; खरी. 'जाणीव असोनि फुडी।' -ज्ञाप्र २२९. २ पक्की; पूर्ण; निर्धाराची. 'तेव्हेळी आसु जाली फुडी। जिआवेआर्ची।' -ॠ १०२. [ सं. स्फुट; प्रा. फुड ] **फुडेपण**-न निश्चय. 'परिस आतां फुडेपणें। मन तें ऐसें।' -ज्ञा१३ १०३.

**फुण**—क्रिवि. (महानु.) पुन्हां; पुनरपि. 'कीं जन्मैलि देवांचा चरणीं। तें उतावेलु फुण असें मणीं।' -दाव १७४. [ सं.पुनर्; प्रा. पुण ]

**फुणकें**—न. ( व. ) वाटल्या डाळीचा उकडीव वडा.

**फुणगा**—पु ठिणगी; फुणगी पहा. **फुणगी**-स्त्री. १ ठिणगी २ ( ल. ) भांडणाचें मूळ; कलागतीचा पाया. ( क्रि० टाकणें; लावणें). ३ (ल.) जाज्वल्य स्त्री, मुलगी. [फुण ? तुल. सं.स्फुलिंग]

**फुणफु(फ)ण**—स्त्री. मुख्य ( दंश, दाह इ०चें ) दुःख थांबल्यानंतर त्या दुःखाच्या जागीं होणारी जळजळ, आग; चुरचुर; फणफण. ( क्रि० लागणें; होणें; करणें ). [ फुण ! फुण !] म्ह० आधीं करतें चुनचुन मग करते फुणफूण ! **फुणफुणणी**-स्त्री. फुसफुसणें; फुणफुणणें. [ फुणफुणणें] **फुणफुणणें**-१ रागानें संतापून, डोळे इ० लाल करून, नाक फेंदारून, सुस्कारे टाकणें; फणफणाट करणें; जळफळणें. २ ( विंचु चावल्यानें, कडक औषधानें ) जळजळणें; दाह होणें; भणभणणें. ३ ( फोडणी इ०चा ) खमंग, सणसणीत वास, भपकारा सुटणें. [ फुण ? फुण ! ] **फुणफुणाट**-पु. अतिशय दाह; जळजळ, फुणफुण. [ फुणफुणणें ]

**फुण्णा, फुण्णेदार**—फुल्ला, फुल्लेदार पहा.

**फुतकें**—न. ( कु. ) ताडीचें भांडें; बुदलें.

**फुतफुत**—स्त्री. ( गो. ) गुजगोष्ट; कुजबूज. [ फुतफुतणें ]

**फुतफुतणें**—अक्रि. कुजबुजणें; कानगोष्टी करणें. [ ध्व. फुत ]

**फुतु**—पु. स्फुलिंग; ठिणगी. [ ध्व. फुत् ]

**फुंद**—पु. १ हुंदका; दाबलेलें रडें. ( क्रि० चालणें; निघणें; येणें; राहणें; जिरणें ). २ अभिमान; गर्व; ताठा; आढ्यता; प्रौढी; मिजास. ( क्रि० येणें; भरणें ). 'जानोजी भोसले यांचे स्नेहाचा

वगैरे मोठा फुंद जाला आहे.' -पेद २०.१३८ -वि. १ फुगलेला; फुगीर. २ (ल) गर्वानें ताठलेला. [सं. स्पंद; स्फुंद; प्रा. फंद फुद] **फुंदणी**-स्त्री. स्फुंदणें; स्फुंदून रडणें. [फुंदणें] **फुंदणें**-अक्रि. १ हुंदके घेत रडणें; स्फुंदणें; उसासे टाकणें. 'लाविले गोपाळ फेरी चहूंकडे। हांसे फुंदे रडे कोणी धाकें।' -तुगा ६९ २ घमेंड करणें [स्फुंदन; स्पंदन; प्रा. फुंद, फंद] **फुंदफुंद, फुंदे, फुंदुफुंदु स्फुंदु**-क्रिवि. स्फुंदूनस्फुंदून. 'रडे फुंदफुंदे धरी पाद पद्मा।' -वामन भरतभाव [फुंदणें]

**फुंवणा**—पु. फुन्ना पहा.

**फुवना, फुवाणा, फुदाना, फुदिना**—पु. पुदिना पहा.

**फुंवेल**—न. (कों.) दिवा.

**फुन**—अ. (महानु.) पुनः. फुण पहा 'फुन वाचा रसाळा। --शिशु २७. [सं. पुनः]

**फुनकाटणें**—क्रि. (कर.) रागावणें.

**फुनगा**—पु. ठिणगी, फुणगा पहा. **फुनगानी**-स्त्री १ (व) विस्तवाची ठिणगी. २ (ल) चहाडी; फुणगी पहा 'फुनगान्या फोडत हिंडतो.'

**फुनसी**—स्त्री. (ल.) लहान पुटकुळी; पुळी

**फुन्ना**—पु. गोंडा (रेशीम इ०चा); झुपका. [हिं.] **फुन्नेदार**-वि. झुपकेदार, गोंडा असलेला

**फुपणें, फुफणें, फुंफणें**—अक्रि १ (फुकणींतून) फुंकणें. २ (सापाचें) फूत्कार करणें; फुमकारणें; फुसफुसणें ३ (घोड्याचें) फुरफुरणें. ४ (तापानें, रागानें) फणफणणें 'ज्या भवरोगांचेनि दर्पें। फुंफात तापलीं त्रिविध तापें।' -एभा १०२ ५ धापा टाकणें. [ध्व. फु! फु!]

**फुपाट-टा, फुंपाटा**—१ विस्तव विझल्यानंतरची राख; फार तापलेली राख (चूल, शेगडी इ०तील). २ उन्हानें तापलेली वाळू, खडे. ३ (ल.) हलकी, सुकी जमीन; भुसभुशीत राखेसारखी जमीन. ४ रस्त्यावरील धुरळा; धूळ. ५ (ल.) फुशारकी; बढाई; भपका; पोकळ देखावा. (क्रि० करणें) [फु! फु!] म्ह० आगींतून निघाला व फुपाट्यांत सांपडला

**फुंपाट**—पु. फोंफाट; फुस्कारा; फों फों असा शब्द फुंफाट पहा. 'हृदयपेटारींचा सर्प। फुंपाटें उठिला कंदर्प।' -मुआदि २८.१२. [फूं! फूं!] **फुंपाटणें**-अक्रि फुस्कारणें; फुंपणें पहा 'जैसा डंवचिला काळसर्पू। फणा काढी फुंफाटे।' -मुआदि ३०.४२

**फुपा(फा)वणें**—अक्रि. कडकडणें; आग पाखडणें; ताशेरा झाडणें; रागावणें [फु! फु!]

**फुप्फुस**—न शरीरांतील श्वासयंत्र; छातींतील स्पंजासारखा अवयव. हीं दोन असून छातीच्या आंतील बाजूस असतात यात रक्तशुद्धी होते. [सं.]

**फुफरट**—वि. (व.) निर्विष (साप).

**फुफा**—स्त्री. फन्ना; फडशा; पूर्ण नाश (द्रव्य, अन्न इ०चा). -वि. राखेसारखा उडून जाणारा -क्रिवि. उधळून [ध्व फु! फु!]

**फुफाट, फुंफाट**—पु. फू फू, फो फो असा शब्द, आवाज. 'नरनाथ कामनासर्पू। फुंफाट करीत उठला।' -मुक्तेश्वरहरिश्चंद्राख्यान ७९. (नवनीत पृ. १८७) -क्रिवि. फोफाट्यानें; फुगून जोरानें आवाज करीत. 'नदी फुफाट भरून चालली.' 'गाडी (गाडीचे बैल) फुफाट चालली.' **फुफाटणें**-क्रि. १ जोरानें फुस्कारा सोडणें. फुंपणें पहा. 'क्रोधें वृष हि फुफाटे।' -मोकृष्ण ३६.७. २ फुपावणें पहा.

**फु(फुं)फारा**—पु. फूत्कार 'क्रोध कालिया नाग होय खरा। वत द्वेषाचा फुंफारा।' -एभा ५.१००. [ध्व फु! फु!]

**फुफु**—स्त्री. फुसकारा -क्रिवि १ फुमकारून; फुसफुसून. २ फणफणाटानें. ३ फुंकर घालून [ध्व] ०करणें-क्रि. (ल.) थट्टेनें उडवून देणें (तुल. इं पूः पूह्) ०वात-पु (महानु.) गर्जना. 'तो फुफुवातेंनि जृंभणाखें। पिशा केला तुआ।' -शिशु ४५७.

**फुयजी, फुयी**—स्त्री. फुइजी, फुई पहा.

**फुरई, फुरोई**—स्त्री. दंड; कर; दंडासाठीं आणलेली वसुली. (सामा) दंड या पूर्वशब्दाला जोडून योजना. दंडफुरई पहा. 'सदरहु कौलाशिवाय खंडफुरोईचा जमा आकारता आकारेल.' -बाड समा १८

**फुरकट, फुरकूट, फुरगूट**—नपु १ रुसवा, रोष. २ ताठा; अभिमान (क्रि० चढणें; येणें)

**फुरकटणें, फुरकुटणें, फुरगुटणें, फुरंगुटणें**—अक्रि. १ मनात कुढणें, रुसून बसणें, दुर्मुखणें २ गर्वानें फुगणें; मदोन्मत्त होणें, चढेलपणानें वागणें. 'बहु फुरकटलासे बोल बोले उताने।' -अकक २ कृष्णकौतुक १५ [फुरकट]

**फुरकणें**—अक्रि रुसणें फुरकटणें पहा.

**फुरकणें**—अक्रि. १ भुरकणें; फुर्र् असा आवाज काढून भुरके मारणें; ओरपून खाणें; २ ओठ मिटून फुर्र् असा तोंडानें आवाज काढणें, करणें, फुरकी वाजविणें. [फुरका]

**फुरका**—पु. १ भुरका, भुरक्यासाठीं हातांत घ्यावयाच्या पेयाचें प्रमाण (क्रि० मारणें) 'सांप्रतकाची कथिका। करोनि झाली रसिका। जीचा घेतां फुरका। रुची आणी मुखातें।' -ज्ञे ९४. ५९ २ ओरपताना, भुरकताना होणारा आवाज. [ध्व. फुर्र्!]

**फुरकी**—स्त्री १ ओठ मिटून तोंडानें (लहान मुलांनीं) काढलेला आवाज, (मुलांनीं असा अवाज करणें हें आगामी रोगाचें लक्षण समजलें जातें). २ फुरका; भुरका. [ध्व. फुर्र्.]

**फुरकूट, फुरगूट**—न. १ उत्पन्न केलेलें विघ्न; काढलेली अडचण, उपाधि, लचांड. (क्रि० फोडणें). २ अवांतर, भाकड कथा; विपयांतर. (क्रि० काढणें)

**फुरकूट-गूट**—न. कसबा; फुरकट पहा. (क्रि० येणें; चढणें)

**फुरकया-का**—वि. १ भुरकणारा. २ फुरकी वाजविणारा.

**फुरगुलें**—न. (हेट.) तव्यांत फुलविलेली लाही.

**फुरडा-डी**—पुस्त्री. कसर; पाण्यांत होणारा एक कंदविशेष. हा खातात.

**फुरहूक, फुरहुकें, फुरहुक्या**—फरहक इ० पहा.

**फुरण**—न. १ कंप; फुरफुरणें; लवणें. (डोळ्याची पापणी, डोळा). २ (मारणें, लढणें, भारणें इ० संबंधीं) स्फुरण; आवेश. (क्रि० येणें; चढणें). 'ऐसें म्हणतां कपिनाथा। फुरण आलें ते काळीं।' –रावि १८.२४६. [सं स्फुरण; प्रा. फुरण]

**फुरणें**—अक्रि. १ फुरफुरणें; कंप होणें; लवणें (डोळा). २ (भांडण, मारणें, बोलणें इ०संबंधीं) स्फुरण चढणें स्फुरण पहा [फुरण]

**फुरताई**—स्त्री. (व) जलदी; घाई. [सं. स्फुर्त; हिं फुर्त= चपलता]

**फुरफुर**—स्त्री १ फुरफुरणें. २ करवंटी इ० जळताना होणारा आवाज; तडतडणें. ३ स्फुरण; आवेश. –क्रिवि फुरफुरण्याचा वाचक. [ध्व. फुर्र! सं. स्फुर]

**फुरफुरणें**—अक्रि. १ (घोड्यानें, गाढवानें) खेंकाळणें, श्वास जोरानें सोडणें. २ (करवंटी इ० तेलकट पदार्थ जळताना) तडतडणें; फुर्र असा आवाज होणें. ३ तोंडानें फुर्र् असा आवाज करणें फुरकी वाजविणें. ४ स्फुरणें, (डोळा) लवणें. ५ (ल.) अत्यंत उत्सुकतेमुळें, अगर आवेशानें हात, पाय, तोंड इ० मारणें, धांवणें, बोलणें इ० साठीं स्फुरण पावणें. ६ उतावळा होणें. **फुरफुरणी**–स्त्री. धातुसाधितनाम

**फुरफुराट**—पु जोराची फुरफुर; फुरफुरण्याचा, फुरकीचा मोठा आवाज.

**फुरफुरी, फुरफुरं, फुरफुर**—स्त्रीन. हरभऱ्याच्या पिठाचें तळून केलेलें तोंडीलावणें. [फुरफुर]

**फुरवंट**—वि. (बे) पहिलटकरीण (म्हैस, गाय). फुडवट पहा.

**फुरशीस**—स्त्री. (क.) पुरशीस पहा.

**फुरसूद, फुरसूत, फुर्सत, फुर्सती**—स्त्री १ रिकामपण; सवड; (उद्योगापासून) मोकळीक. २ मधला रिकामा वेळ. ३ पाहिजे असलेला जास्त वेळ; अवधि; अवकाश. 'त्यासि सारा तपा आकार तुम्हास करावयासी आजीपासून फुर्सत पुढील पावेतों दिली आहे.' –रा १५ ३६९. ४ संधी; काबू. [अर. फुर्सत्]

**फुरसुग**—न. (कातोडी) बाळंतपण. –बदलापूर १२८.

**फुरसें**—न. कोंकणांतील एक विषारी साप. रंग पिंगट किंवा भुरकट असून डोक्यावर त्रिशूळासारखे पांढरे पट्टे असतात. [फुर्र्! फुस्!]

**फुराण**—न. (प्र.) स्फुरण फुरण पहा. 'हरि गिरी परि ठाण। बळें चालिलें फुराण।' –दावि ४९६.

**फुरार**—(कों नाविक) दोरी झिजूं; कांचूं नये म्हणून काचण्याजोग्या एखाद्या जागीं बारीक दोरीनें विशिष्ट तऱ्हेनें गुंडाळतात तें.

**फुरारणें**—(फुरफुरणेंचा अतिशय) फुरफुरणें पहा

**फुर्तादु**—पु (गो.) एक प्रकारचा आंबा. [पोर्तु.]

**फुर्लेर**—न. (गो) फुललेलें अळंबें. [फुलणें]

**फुर्सदर्गा**—स्त्री. भर पगारी रजा.

**फुलका, फुलकी**—पुस्त्री. फुगलेली लहान चपाती, लहान व बिन घडीची पोळी. [सं. फुल्ल; म फुलणें]

**फुलकार**—पु. (कों. गो) फुलें विकणारा

**फुलकारी, फुलगोटा, फुलचोचे, फुलछडी इ०**—फूल शब्दामध्यें पहा.

**फुलकें**—न. १ फाल धान्य २ एक प्रकारचीं फुलें. [फूल]

**फुलगा**—वि (गो) नित्य नवा पोशाख करणारा; हौशी.

**फुलगुडे**—पुअव (गा) हळदकुंकू लावून पानाच्या द्रोणांतून फळफळावळ वगैरे देण्याचा सौभाग्यलक्षणाचा प्रकार; फुलविडे.

**फुलजी**—पु. १ फुलवून दिल्यामुळें अनुकूल झालेला; स्तुतीनें फुललेला. २ शेखोजी; प्रतिष्ठित. 'त्यावर फुलजी होऊन बसला शिपाई म्हणे मी शुरा।' –पला ८३. [फूल+जी प्रत्यय]

**फुलझाडणी**—स्त्री. (ना.) केरसुणी. [फुल+झाडणी]

**फुलणी**—स्त्री. फुलणें (पासून धातुसाधित नाम) पहा.

**फुलणें**—अक्रि. १ (कळी) उमलणें; विकासणें. २ फुलांचा बहर येणें; मोहोर येणें. 'का वांझ फुलीं फुललें। झाड जैसें।' –ज्ञा ९.४३४. ३ (भात, जोंधळा इ० ची) लाही होणें. ४ (काळी जमीन, चुना, धान्य इ० भिजल्यानें) फुगणें. ५ शरीरावयव फुगीर होणें; सुजणें. ६ (सूर्य उगवतांना दिशा) उजळणें; फांकणें. ७ अभिमानानें किंवा गर्वानें फुगणें; ताठा भरणें; हर्षानें, स्तुतीनें चढून जाणें. ८ खूष दिसणें; मुद्रा प्रफुल्लित दिसणें. ९ हातोड्यानें ठोकल्यानें खिळ्याचें डोकें फुलासारखें पसरट होणें; खिळा पक्का होणें. १० (घोडा, गाय इ०कांच्या) अंगावर पांढरे ठिपके उठणें; अंग पांढऱ्या ठिपक्यांनीं भरणें, व्यापून जाणें. ११ (माणसांच्या इ०) दाटीनें जागा भरून जाणें. 'नाट्यगृह काल फुललें होतें.' १२ (देवी, फोड, कोड इ० नीं) सर्व अंग व्यापणें. १३ कापडावर फूल येणें; तंतूंच्या बारीक बारीक गुठळ्या बनणें. १४ वार्धक्यामुळें केस पांढरे होणें, होत जाणें. १५ विंचरल्यानें केस मोकळे होणें; जटा नाहींशा होणें. १६ मांजराच्या शेपटीप्रमाणें केस वर उभे राहणें; पिंजारला, उभारला असणें (पिसारा इ०). फुलफुलणें पहा. [सं. प्रा. फुल्ल किंवा सं. स्फुट्; प्रा. फुल]

**फुलपणें, फुलपैणें**– अक्रि. फुलावर येणें; फुललेलें असणें) (शेत). [फूल]

**फुलफुल**—स्त्री. (ना.) एखाद्या गुप्त गोष्टीची परिस्फुटता; वाच्यता. [सं स्फुट्; प्रा. फुल. फूल द्वि.]

**फुलफुलणें**—अक्रि. १ विस्तीर्ण होणें; फांकलें जाणें (राख, लोम. हर्ष इ०नीं डोळे, नाकपुडया इ०) २ (चेहरा) आनंदी व सतेज दिसणें. ३ (स्तुतीनें, हर्षानें) फुगणें; फुशारलें जाणें. ४ उत्साहित होणें; खुलणें; स्फुरण येणें [फुलणें द्वि]

**फुल(ला)वणी**—स्त्री. १ फुलविणें (पासून धातुसाधित नाम) पहा. २ प्रफुल्लितपणा. —मनको. 'ग्रंथप्रकाशाची फुलावणी।' —विपू ५ ८१.

**फुलवरा**—पु. १ फुलांची माळ २ धान्याला येणारा मोहोर; फुलोरा, फुलौरा पहा. ३ देवावर टांगलेलीं फळें, खाद्य पदार्थ इ०ची माळ. फुलोरा पहा. 'तुज मी फुलवरा बांधिला।' [फूल]

**फुलविणें**—उक्रि उमलविणें; फुगविणें (फुलणें पासून प्रयोजक रूप) पहा [फूल] **फुलवून काम करून घेणें**–एखाद्याची पोकळ स्तुति करून त्याला खूष करणें व त्याच्याकडून इच्छित कार्य साधून घेणें. वेळवावर बसविणें. खंडेराव करणें.

**फुलसा**—वि १ (व. ना.) पांढरा; शुभ्र २ स्वच्छ; निर्मळ; पुसून साफ केलेला. 'फुलसे कपडे घालावेत.' [फुल+सा=सारखा]

**फुला**—स्त्री. गतिप्रकार; पुलका गति पहा. —अश्वप १.१८५.

**फुलार**—वि १ फुलासारखा हलका; सैल; न दाटणारा. २ हलकी व फुगीर (भाकरी इ०). ३ हलक्या जातीचें, दर्जाचें (सूत इ०). ४ हलका; दिखाऊ, नाजूक. ५ (मो) गोड (तांदूळ) उत्तम प्रकारें शिजलेली (पेज) [फुलणें]

**फुलारणें**—अक्रि १ (माप, पोतें, गांठ इ०) सैल भरणें. २ (फुशारकीनें, स्तुतीनं) फुगणें; फुगविणें; लडावणें; लाडकावणें; चढवणें. फुलारून घेणें–असा रूढ प्रयोग

**फुलारमाळी**—पु. एक माळी जात व तींतील व्यक्ति; (सामा.) फुलबागा तयार करणारा, फुलांचा धंदा करणारा मनुष्य.

**फुलारी**—पु फुलमाळी. —स्त्री. एक गुप्त उपरोधिक बोलण्याची अगर लिहिण्याची पद्धति. यांत प्रत्येक अक्षरापूर्वी फूल हा शब्द घातलेला असतो.

**फुलिका**—स्त्री. १ टिकली; चमकी. २ विकास. [सं फुल्लक]

**फुलिंग**—नस्त्री. ठिणगी. [सं. स्फुलिंग; प्रा फुलिंग]

**फुलियाण**—न. (गो.) एक प्रकारचें गवत.

**फुलिसकेप**—पु. १६×१३ इंच आकाराचा व ८×१३ अशा आकारांत दुमडलेला लिहिण्याचा कागद (जुने कागद कारखानदार विदुषकाच्या टोपी(फूल्सकॅप)चें चित्र वॉटरमार्क म्हणून योजीत यामुळें कागदाला तसें नांव पडलें) [इं. फूल्स् कॅप]

**फुली**—स्त्री. १ कागद, कापड, धातु इ०वर काढलेलें फूल; पुष्पाकृति. २ लिह्याची एक आडवी–उभी रेघ. ३ एक खूण; चिन्ह; चौफुली. ४ (अ) फुलण्याचा भर. —हंको. —मनको. (आ) संयोग. (वंझा) 'तेथ वोहटे ना चढे। ऐसा परिपूर्णचि आवडे। परी ते फुली जेव नुघडे। मेघांनदींची।' —ज्ञा १५.१२०. ५ अवस्था; दशा. 'नुघडतां बाळपणाची फुली। जेणें मियां अदानवीं सृष्टि केली।' —ज्ञा १०.२८९. ६ एक प्रकारचा फुलाच्या आकाराचा दागिना. 'नागोत्रें श्रवणीं विराजति फुल्या....।' —अकक २ सीतास्वयंवर ४३ ७ (गो.) तृणाची एक जात. ८ (व) मिरच्याची लागवड करण्याची लांब दोरी. या दोरीला विवक्षित अंतरानें खुंट्या लाविलेल्या असतात खुंट्यांच्या अंतरावर मिरच्यांचीं रोपें लावितात. [फूल] (वाप्र.) **०घालणें–पाडणें**–१ (ल) थांबविणें; विघ्न आणणें; गति खुंटविणें. २ खोडणें; चूक करणें (कोठें चुकल्यास तेथें उभी आडवी रेघ मारतात यावरून वरील अर्थ). **०भरणें**–(चांभारी) टोपर व शेंडी यांच्या मध्यभागीं रेशीम भरणें. **फुल्या पाडणें**–(सोनारी) सोनें गाळण्यापूर्वी हिणकस सोनें व चांदी मिसळून त्याचा रस पाण्यांत पाडणें (रस पाण्यांत पडतांना थेंब लाहीच्या आकाराचे दिसतात त्यावरून). **०फाटा**–पु. खोडल्याची खूण म्हणून मारलेली फुली. खोडणें; बाद करणें (क्रि० देणें).

**फुली**—(राजा.) कागदाचे पांच ताव, पंचकडी.

**फुलें**—अव. १ (ना.) मेलेल्या माणसाचीं प्रेतदहनानंतर गोळा केलेलीं हाडें. २ (सोनारी. बे.) तुशीचा भाग. [फूल]

**फुलेल**—न. अत्तर; सुगंधी तेल; फुलांनीं सुगंधित केलेलें तेल. 'परिमळें धुशरें फुलेलादिक।' —वेसीस्व ६ ६५ [फूल+तेल]

**फुलोरा, फुलौरा**—पु. १ फुलवरा; पुष्पगुच्छ; फुलांचा हार. २ फुलांचा बहर; मोहर; धान्य वगैरे पेरल्यानंतर त्या पिकास फुलें येणें. 'भावाचा फुलौरा होत जाये। मतिवरी।' –ज्ञा १.२७. ३ (व.) सणांत देवावर फळें, करंज्या वगैरे टांगून ठेवण्याची लोखंडी अगर कामटीची चौकट फुलवरा पहा.

**फुल्येण, फुलेण**—न. (को)जनावरांच्या उपयोगाचें आणि चांगलें गवत (शाकारणीच्या गवताहून भिन्न असें). [फूल+तण]

**फुल्ल**—वि. (गो.) अतिशय; फार (पांढरा). 'धवा धवों फुल्ल.'

**फुल्लट**—स्त्री. (गो) पहिल्टकरीण. फुडवट पहा. [प्रा. पहिल्ल?]

**फुल्ला**—वि. शरीरावर पांढरे ठिपके असणारा (घोडा). —अश्वप १ २७. [फुलणें]

**फुल्लार**—न (काव्य.) पुष्प; फूल; कमळ 'सहस्रदळीं नव फुल्लारें। विकसलीं तें भुंकारें।' —मुआदि १८.३. —वि. १ विकसित; फुललेलें; उमललेलें. २ फुलार पहा. [फुल्ल. फुलणें]

**फुल्लिंग**—न. ठिणगी; फुलिंग. पहा [सं. स्फुलिंग]

**फुल्लेदार**—वि. फुलासारखी विस्तृत 'फुगडी फुल्लेदार। भाई शिलेदार।' —मसाप २.२३३. [फुल]

**फुशाडा**—पु. (मुंबई) गुधडा. 'कामानें त्याचा फुशाडा पाड-लात.' [ हिं फुसडा=चिंध्या ]

**फुशारकी, फुशारी**—स्त्री १ शेखी; बढाई; आत्मस्तुति. ( क्रि० सांगणें ) २ पोकळ डामडौल, प्रतिष्ठा; बडेजाव; देखावा. ( क्रि० मिरविणें, बाळगणें; मांडणें, दाखविणें; करणें ). **फुशार-खोर**-वि १ पोकळ बढाई मारणारा २ रिकामा डौल, देखावा करणारा. [ फुशार+खोर ] **फुशारणें**-अक्रि फुशारी सांगणें, मिर विणें. [ फुशारी ]

**फुसकट**—न. कोंडा; भूस; फोलकट; नि सत्व धान्य, फुसका पदार्थ. -वि. फुसका पहा [फुस !] (वाप्र) ०**काढणें-पाडणें**-दुर्दशा करणें; रग जिरविणें

**फुसकटणें**—अक्रि. फिसकटणें पहा.

**फुसकणें**—अक्रि १ ( दोरी, दोरा, काठी इ० ) फसदिशीं मोडणें, तुटणें २ बिनसणें; अपुरी राहणें; मोडणें ( योजना, व्यवहार ). ३ ( बंदुक इ० ) न उडणें; नेम चुकणें. ४ ( सामा. ) हुकणें, चुकणें ( नेम, वार यत्न इ० ) [ ध्व फुसक ]

**फुस-कन-कण-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. १ फुसक्या पदार्थाचें मोडणें, तुटणें, फुसकली सोडणें इ० वेळीं होणाऱ्या आवा जाचें अनुकरण करून. २ कोणत्याहि गोष्टींतील आकस्मिक अप यशाचा द्योतक शब्द. ३ बंदूक, तोफ याचा बार न होतां फुसका-आवाज होउन. [ ध्व. ]

**फुसका, फुसकापुरी फुसकुल**—वि. १ सहज, फसकन तुटणारा, मोडणारा २ कमजोर, ठिसूळ; भुसभुशीत; निर्जीव. ३ निःसत्व; पोकळ; निरस; निकस; (माणूस, पदार्थ, भाषण इ०) [ ध्व ] म्ह० फुसकी शंका-फुसकें समाधान **फुसका इंचा अंबारा**-पु. (विटीदांडूच्या खेळांत टोला हुकला असता म्हणतात) चुकणें; अपयश, निष्फळ यत्न **फुसक्या बाता मारणें**-निरुपयोगी रिकाम्या गोष्टी बोलणें

**फुसकारा**—पु. १ फूं फूं शब्द; फूत्कार; फिस्कारा ( साप, गुरूं, मांजर, रागावलेला माणूस इ०चा) २ धाप; सुस्कारा; जोरानें श्वास टाकणें ( क्रि० येणें; टाकणें ) **फुसकारणें**-अक्रि १ (सापानें) फूत्कार करणें. २ (रागावलेल्या मांजरानें) फिस्कारणें ३ मोठ्यानें धापा टाकणें; धापणें [ फुसकारा ]

**फुसकी**—स्त्री १ फुसकुली; हळूच सोडलेला अपानवायु बारीक पाद ( क्रि० सोडणें ) २ (ल) आडून हळूच केलेली निंदा; अपरोक्ष कुत्सित टीका. ( क्रि० सोडणें; मारणें). [ ध्व. फुस् ]

**फुसकुला**—वि. फुसका पहा

**फुसकुली**—स्त्री. १ शब्द न होतां हळूच पादणें; फुसकी ( क्रि० मारणें; सोडणें ). २ ( ल. ) बारिक खोंच; व्यंगोक्ति; दुस-ऱ्यांस लागणारें परंतु आडून, हलकेंच केलेलें कुत्सित भाषण; प्रच्छन्न टीका, निंदा ( क्रि० सोडणें ). ३ ( गो. ) क्षुद्र गोष्ट. [ध्व. फुस !]

**फुसडा**—पु. भुसडा पहा.

**फुसडी**—स्त्री. १ चाबकाची दोरी; वादी. २ लोंबता किंवा सुटलेला ( कापडाचा ) दोरा. ३ ( लांकडाची ) ढलपी.

**फुसफुशीत**—वि १ कमजोर; फुसका; लवकर मोडणारा, तुटणारा. २ भुसभुशीत; वाळवंट ( जमीन ). [ ध्व फुस ! द्वि. ]

**फुसफुस**—स्त्री १ फूत्कार; फुसफुसणें २ कुजबूज; कान-गोष्ट ३ मुळुमुळु रडणें; मुसमुस ४ धुसफुस; चरफड. [ ध्व. ]

**फुसफुसणें**—अक्रि १ फुसकारणें; फिसकारणें; फूत्कार करणें (साप, मांजर, घूस इ० नीं) २ चिडून अंगावर येणें; खेकसणें. ३ कुजबुजणें; कानगोष्टी करणें ४ हळूहळू रडणें; मुसमुसणें. ५ चरफडणें; धुसफुसणें. ६ ( ओलें लाकूड जळतांना ) फुरफुरणें [ ध्व फुस् ! ]

**फुसलावणी**—स्त्री. लालूच, आमिष. ( क्रि० देणें; करणें; लावणें ) [ फुसलाविणें धातुसाधित नाम ] **फुसलाव(वि)णें**-उक्रि १ ( खोटी स्तुति, लालूच इ० नीं ) वश करून घेणें; आप-लासा करणें; आपल्या बाजूला वळविणें. २ समजूत घालणें; बाबा-पुता करणें. [ हिं फुसलाना ] **फुसलाव्या**-वि फूस लावणारा; वश करून घेणारा [ फुसलाविणें ]

**फुसाड, फुसाडा**—नपु (व) फुसडा; भुसडा पहा. 'काम करून करून फुसाड पडलें त्याचें.'

**फुसांडणें**—अक्रि (ना) स्फुंदणें; दुःख करणें.

**फुसुक**—स्त्री. फुसकन निघून जाणें; हुसुक पहा. [ध्व. फुस ]

**फुस्कांवणें**—क्रि (गो.) ओढणें; शिलगावणें (विडी इ०).

**फुस्तांव**—पु (गो.) एक प्रकारचें कापड. [ पोर्तु. ]

**फुस्स**—उद्गा. (साप, मांजर इ०चें) फूत्कारणें, फिसकारणें इ०चा ध्वन्यनुकारी शब्द. [ ध्व. ]

**फुळकवणी**—न फळकवणी; फिळकवणी पहा.

**फू, फूं**—स्त्री. फूत्कार, रागाचा सुस्कारा -उद्गा ( सर्पादि-कांच्या ) फूत्काराच्या आवाजाचा ध्वन्यनुकारी शब्द. -क्रिवि फुंकारण्याच्या आवाजानें (वाप्र) ०**उडविणें**-एखादी गोष्ट ( फुंकरानें देखील उडविण्याइतकी ) हलकी मानणें; तृणवत् लेखणें; क्षुःपदार्थ समजणें ०**करणें-उडविणें-करून टाकणें**-चट करणें; उधळणें; खलास करणें; उधळपट्टी करणें. ०**पडणें-होणें**-१ तापांत जोरानें श्वास टाकणें; सुस्कारे टाकणें; कण्हणें. २ फुर-फुरणें (घोडा) ०**होणें**-१ उधळलें जाणें; खलास होणें; वाऱ्या-वारी जाणें; उडणें. २ रुसून, फुगून बसणें. ३ गर्वानें ताठणें. ०**होणें-भरणें-भरून चालणें**-गर्जना करीत, फोफाट्यानें वाहणें (तुडुंब भरलेली नदी). **फू-कर-कन-दिशीं**-क्रिवि. फूकरून; झटकन; चटकन; क्षणांत. ( क्रि० उडणें; जाणें; पळणें ).

**फूग**—स्त्री. १ सुज, फुगवटा; फुगीरा; फुगणें. २ ( कों. ) वाहतें पाणी तुंबावें म्हणून घातलेला बांध. [ फुगणें ]

**फूंच**—स्त्री १ (गो.) हलका तंबाखू २ बहिशेप. [पोर्तु फयुंचो]

**फूट**—स्त्री १ तड; भेग; चीर (दगड, भांडें, नाणें यांच्यावरील). २ सडतांना मोडलेले तांदूळ इ० धान्य; कणी. ३ –स्त्रीन लोणच्याकरितां योग्य असा कोंवळा आंबा, कैरी. ४ (सामा) आंब्यास तुच्छतादर्शक शब्द. 'पन्हें फुटाचें मज्ञा मिळ्ञा।' –अमृत ३५. ५ झाडावरून पडून फुटलेलें फळ. ६ वातविकारानें होणाऱ्या तीव्र वेदना (ह्या वेदनांनीं अवयव फुटतो आहे असें वाटतें) (क्रि० लागणें). ७ भेद; पृथक्त्व (एखाद्या पदार्थांतील अवयवांचें); बेबनाव; दुही; वेगळें होणें (संघ, संस्था इ०तील) ८ (गुप्त गोष्टीची) परिस्फुटता; वाच्यता; फैलाव. ९ (झाडें, वनस्पती यांना) पालवी फुटणें; अंकुर, कोंम, धुमारा (क्रि० फुटणें). १० (राजा. कुण) एक वर्ष फळें घेण्याच्या करारानें घेतलेलें झाड. ११ –न शेंदाड, चिबूड, चिभुड इ० खरबुजाची हलकी जात. १२ (सोनारी) मिश्रणानें ठिसूळ झालेल्या सोन्यास तापविण्याच्यावेळीं पडणारी भेग. –जनि ३२४. [सं स्फट; प्रा फुट]

०**अमल**–पु. १ अनेक अधिकाऱ्यांचा अंमल, बारभाई अंमल; अंमलविभागणी. २ गावांतील विभागित सत्ता; एकाच प्रजेवर विभागलेला निरनिराळा अंमल. अंमल पहा. ०**गांव**–पुन. १ ज्यात वस्ती, घरें पांगलेलीं आहेत असें गांव. २ ज्या जिल्ह्यांत आहे त्या जिल्ह्याच्या अधिकारांत नसणारें गाव ३ एकाच जिल्ह्यांत किंवा विभागात न येणारें गांव ४ एका बाजूला पडलेलें, वसलेलें गाव. ०**जहागीर**–स्त्री भोंवतालच्या प्रदेशापासुन वेगळी असणारी जहागीर; जमिनी जहागीर पहा ०**तूट**–स्त्री. १ मोडतोड; फुटलेपणा; तुटलेपणा इ० रूप दोष २ फुटलेल्या वस्तूंचा समुदाय [फुटणें+तुटणें]

**फूट**—न. पाठीचें मास [सं पृष्ठ]

**फूट**—पु १ लांबी मोजण्याचें एक माप, बारा इंच; पाऊल. 'फुट म्हणजे कुंपणी कदम् स्पष्ट। जाणते जन बोलती।' –पैमा ५.९. [इं] ०**पाथ**–पु पायरस्ता, मोठ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस असलेला फरसबंदी रस्ता. [इं.] ०**बॉल**–पु १ पायानीं उडवून खेळण्याचा मोठा रबरी चेंडू २ अशा चेंडूनें खेळावयाचा खेळ [इं. फूट=पाय+बॉल=चेंडू] ०**लाइट**–पु (नाट्य) रंगभूमीच्या कडेला पात्रांच्या समोर तळाशीं असणारा प्रकाश; तलप्रकाश: पायासमोरचे दिवे [इं फूट=पाय, तल+लाईट=उजेड]

**फूत्कार**—पु. १ रागाचा आवेशयुक्त फुंकर, सुस्कारा, २ फुसफुस आवाज; फुसफुसणें; फुसकारणें (साप, मांजर, म्हैस इ० रागावलीं असतां). 'फूत्कार करि उदंड व्याळ न तो काय कोपला यमदंड।' –मोकृष्ण १६ ३२. **फूत्कारणें**–अक्रि. फुसकारणें.

**फूद**—स्त्री (गो) स्त्रियांचें गुह्येंद्रिय; योनि; फोदा.

**फूम**—स्त्री (गो) गिलीट; मुलामा. [पोर्तु. फ्युमो]

**फूय**—स्त्री. (व कुण) फुई. पहा

**फूर**—पु सद्दी, बंदेजाव. 'नव्या देवाचा फूर मोठा.'

**फूल**—न १ पुष्प; मोहोर २ ठिणगी (विशे लोखंडाची); फुलासारखा अग्नीचा आकार (शोभेचे दारूकामांतील) ३ कापडावरील बारीक लव; केंस, तंतु; ज्या कापडाना फूल आहे अशीं कापडें बहुतेक डबल पन्ह्याचीं असतात. ४ (अव प्रयोग) (गाय, घोडा, इ०च्या अंगावरील) पांढरे ठिपके ५ पावसाळ्यात दगडावर, लांकडावर उगवणारी छत्रीसारखी एक वनस्पति. ६ बुबुळावर दिसणारा पांढरा ठिपका, शुक्ल हा एक नेत्ररोग आहे. ७ एक विशिष्ट रानवनस्पति. ८ उदाचें धुरकट; उदाचा जमलेला धूर. ९ जस्ताची लाही १० सुपारीची चांगली कातरण; चांगली कातरलेली सुपारी. ११ बिबा पेटवून त्याच्या तेलाचा पाडलेला थेंब. १२ ओव्यापासुन बनविलेलें एक औषध १३ अंडाशय; ज्यांत गर्भ तयार होतो तो पोटाचा भाग (सामा.) गर्भाशय (क्रि० वाकडें पडणें). १४ (कों) घाण पाण्यांत झालेले चक्राकार किडे. १५ स्फटिक. –शर. १६ (खा.) देशी दारू १७ घन स्वरूपांतून द्रव रूपात न जातां वायुरूपात गेलेला पदार्थ. १८ सोनें, रुपें इ० धातूचीं किंवा हस्तिदंत, कापड लाकूड, कागद इ०कांची शोभेकरितां केलेली पुष्पाकृति; फुलासारखी वस्तु, दागिना. [सं.; प्रा. फुल्ल; फूल] **म्ह०** आकाशींचें फूल त्याचें कुणाएवढें खूळ ०**गळ(ळ)णें**–योनि, गर्भाशय स्थानभ्रष्ट होणें ०**झडून जाणें**–१ फुलवरा गळणें २ गालिचा इ०ची लव निघून जाणें (दिव्याळ.) ०**टाकणें**–दिवा मालविणें (दिवा मालविण्यासाठीं त्यावर फूल टाकीत-असें संस्कृत काव्यावरून दिसतें). ०**नाहीं फुलाची पाकळी देणें**–आपल्या ऐपतीप्रमाणें यथाशक्ति देणें; (भरपूर योग्य रक्कम, मोबदला देण्याची ऐपत नसल्यामुळें काहीं थोडा भाग देतांना प्रयोग). ०**बाहेर पडणें–निघणें**–(गुप्त गोष्ट) बाहेर फुटणें. जाहीर होणें. ०**येणें**–(वाई) उन्हानें तापून जमीन सकस होणें. ०**वाहणें**–लग्नांत मुलगी वरास अर्पण करणें; कन्यादान करणें **फुलांत घालून ठेवणें–राखणें–जपणें**–अत्यंत काळजीपूर्वक व दक्षतेनें ठेवणें; नेणें **फुलाऱ्यास येणें**–फूल येणें **फुलें बढविणें**–मंडावळ बांधणें. –बदलापूर १४७ **फुलें देणें**–(ल) बाह्यात्कारें मान्यता देणें; सन्मान करणें 'ममलत ठीक केली, आणि उगेच फुलें द्यावी म्हणोन शिंदे होळकर व सुरजमल जाट यांस विचारणा केली.' –भाब ११६ **फुलें माळणें**–१ (कु) पहिल्या गरोदरपणांत स्त्रीची पाचव्या महिन्यांत ओटी भरणें. २ फुलांची माळ करणें **फुलें विकलीं (वेचलीं) तेथें गोवऱ्या विकणें**–जेथें पूर्वी वैभवानें दिवस घालविले तेथें दरिद्री स्थितींत राहणें; वैभवाचा काळ जाऊन दारिद्र्य येणें. सामाशब्द– **फूलक(का)री**–पु. माळी. ०**कारी**–स्त्री. प्रत्येक अक्षरापूर्वी फूल शब्द जोडून बोलण्याची,

लिहिण्याची सांकेतिक भाषा. -वि ज्यावर फुलाच्या आकृती आहेत असें (कापड, कागद इ०). ०कोबी-स्त्री एक प्रकारची भाजी; कोबीचा एक प्रकार. (इं.) कॉली फ्लॉवर ०गुडे-पु (गो.) हळदीकुंकू, फळफळावळ देण्याचा एक सौभाग्यचिन्हाचा प्रकार; फुलविडे. ०गोटा-पु एक प्रकारची रवाळ पिठीसाखर. ०चोचे-पुअव. तुंबडी लावण्याच्या आगेवर फासण्या मारतात त्या. (क्रि० घेणें; देणें; मारणें). ०छडी-स्त्री. फुलांनीं गुंफिलेली छडी, काठी; फुलांचा छडीदार गुच्छ. फूलजी-पु. गर्वानें ताठलेला, अहंमन्य माणूस (फुलाप्रमाणें फुगणारा, ताठणारा व दिमाख दाखविणारा मनुष्य). फूलझगरें-न १ गोंवऱ्यांचा विस्तव २ जळते निखारे. ०झडी-फुलबाजी; एक प्रकारचें शोभेचें दारूकाम (ल) नाजुक स्त्री. 'कंठामध्यें पिक दिसे अशिग तूं रूपसुंदर फुलझडी।' -होला १०४ [फूल+झडणें (पडणें)] ०झाड-१ फुलें येणारें झाड; ज्याचें फूल हेंच मुख्य आहे असें (कण्हेर, जास्वंद, मोगरा इ०) झाड; याच्या उलट फळझाड. २ एक प्रकारचें शोभेचें दारूकाम. [फूल+झाड] ०धर-पु माळी. -शर ०दान-दाणी-नस्त्री. फुलें ठेवावयाचें भांडें. (इं) फ्लॉवर पॉट [फूल+फा. दान्] ०दावरी-स्त्री. एक फुलझाड व त्याचें फूल. ०पगडी-स्त्री. १ लहान, सुंदर व भारी किंमतीचें पागोटें. २ (ल.) हलकी, क्षुद्र वस्तु ०पगर-न डोक्यांत घालण्याचा फुलाच्या आकाराचा दागिना. ०पत्री-स्त्री (व्यापक) देवाला वाहण्याच्या उपयोगी फुलें, पानें इ०. ०पांखरूं-न. चित्रविचित्र पंखांचा फुलांवर उडत असणारा बारीक प्राणी; पतंग याच्या चार अवस्था असतातः-१ अंडें, २ अळी किंवा सुरवंट, ३ कोश, ४ फुलपांखरूं. ह्याच्या पुष्कळ जाती आहेत. ०पात्र-न. पाणी पिण्याचें भांडें; रामपात्र (हें पितळी असून याचा आकार साधारणतः फुलासारखा असतो) ०फासणी-ण्या-फूलचोचे पहा. ०बडवा-पु. (महानु) फुलें पुरविणारा 'फुलबडवा श्रुतिपति।' -शिशु ५१. [फूल+स. वटुक; प्रा वटुअ; म. बडवा] ०बरडा-बर्डा-पु. झाडावरून कच्ची काढून शिजवून वाळविलेली एक प्रकारची सुपारी. बरडा पहा ०बाग-पुस्त्री फुलांसाठीं केलेला बाग [फूल+बाग] ०बाजी-स्त्री १कागदाच्या नळींत शोभेची दारू भरून तयार केलेला दारूकामांतील एक प्रकार ही पेटविली असतां फुलें गळतांना दिसतात. २ (घट्टेलें) तंबाखूची विडी. ०वाडी-स्त्री फुलबाग 'करिं धरून सुहृज्जन फुलबाडीमधें शिरली।' -गाला ५५ [फूल+वा-वाडी सं पुष्पवाटिका] ०बासन-बासन-न उंची जिन्नस कापड मळूं नये म्हणून त्याला गुंडाळलेलें साधें कापडः बासन. ०वाळ्या-स्त्रीअव. वाळ्यांचा एक प्रकार; एक दागिना 'फुलवाळ्या बक्षिसा वाळ्यांचा प्रकार।' -अफला ५५. ०बिसणा-णी-नी-वि १ अतिशय नाजुक, कोमल. २ पोशाखी; चुस्त ऐट मारणारा; मिजासी; अक्कडबाज; छेलछबेला. 'त्याच्यानें श्रमाचें काम होत नाहीं तो फुलबिसनी आहे.' [फूल+हिं. बिसणी=नाजुक, छबेला] ०माळी-पु. फुलारी; माळी. ०मेंगा-पु षंढ; नपुंसक; हिजडा. ०वात-स्त्री. फुलाच्या आकाराची कापसाची वात. ही निरांजनांत लावतात. ०विडे-पुअव. (गो.) हळदीकुंकवाचा समारंभ फुलगुडे पहा. ०सर-पु. फुलांचा हार 'फुलां फुलासरां लेख चढे। बुलीं बुजी अंगुळी न पडे।' -ज्ञा १८.५७. फुलांची जाळी-स्त्री. फुलें गुंफून केलेली डोक्यावर बांधावयाची जाळी. फुलार माळी-पु माळ्यांची पोटजात; फुलमाळी पहा. फुलारी-पु. माळी, फुलमाळी. 'तों फुलारी आला ते वेळां। तेणें हरिकंठीं घातल्या माळा।' -ह १९.५९. -स्त्री. १ फुलकारी भाषा. फुलकारी पहा. २ (व) फुलांची परडी. फुलेलें-वि. (प्रा.) फुलाचें. फुलोडी-स्त्री. फुलाप्रमाणें नाजूक स्त्री फुलझडी पहा. 'चाले ठुमकत ती मादबान फुलोडी।' -प्रला ९३. फुलसाखर-स्त्री. उंसाचा रस आटवून थोडा पातळ राहिला असतां मडक्यांत भरून घडवंचीवर ठेवल्यावर आंतील काकवी गळून वरील भागांत जी पांढरी साखर होते ती. -कृषि ४८२.

फुला माळणें—क्रि (गो.) १ गरोदर स्त्रीचें ओटीभरण करणें; यावेळीं त्या स्त्रीला फुलांनीं सजवितात २ प्रशंसा करणें; भुलविणें. [फुलें+माळणें]

फूस—स्त्री. १ वाईट काम करण्यास चोरून, गुप्तपणें दिलेलें उत्तेजन; मदतीचें आश्वासन (विशेषतः ज्याच्यावर दाब ठेवण्याची, शिक्षा करण्याची जबाबदारी आहे त्याचें); वाईट कृत्याकडे केलेला कानाडोळा. (क्रि० देणें; लावणें; मिळणें). २ संधि; अनुकूल वेळ, मोकळीक; सवड. (क्रि० येणें; फावणें; मिळणें, सांपडणें; होणें). 'पंतोजीची नजर जरा चुकली कीं पोरांना फूस सांपडली.' -पुन. १ रद्दी सामान; सटरफटर; अडगळ. २ आळसाचें कृत्य, भाषण -पु. मोड आलेला नारळ किंवा ताडफळ यांच्या पोटांतील असणारा फुसफुशीत अंश, गर [ध्व]

फूस—वि. १ फुसका; ठिसूळ. २ लेचापेचा, क्षुद्र [फुसका]

फूस—फुसकन पहा.

फूसफास—वि रद्दी; टाकाऊ; भिकार; पोकळ (माणूस, जनावर, वस्तु). -स्त्री. १ पोरचेष्टा; पांचट भाषण (क्रि० लावणें; मांडणें) २ क्षुल्लक, टाकाऊ गोष्ट ३ मुसमुसणें, चरफड [ध्व]

फें—अ. १ तुच्छता; तिरस्कार दर्शक अव्यय. 'तुला फें तुझ्या बापाला फें' २ दमणूक; हताशपणा किंवा शरण आल्याची कबूली दर्शविण्यासाठीं काढलेला उद्गार. फेंफें पहा. [ध्व]

फेक—अ पांढरा यांतील अर्थाचें आधिक्य दाखविणारा शब्द पांढऱ्या शब्दाला जोडतात. 'पांढराफेक'

फेकगुडूडू—पु. एक प्रकारचा मासा.

**फेंकटी**—स्त्री. ( गो. ) कटिभाग.

**फे(फें)कणें**—उक्रि. १ झुगारणें; दूर टाकणें; उडविणें; प्रक्षेप करणें; झोकणें; भिरकावणें. २ (घोडा इ०) जोरानें पळविणें; दौडत चालविणें; भरधांव सोडणें. ३ ( जासूद इ० ) जलदीनें पाठविणें; लवकर पोंचेल असा पाठविणें; वेगानें धाडणें; तावडतोबीनें रवाना करणें. ४ ( पागोटें ) हालविणें; डौलानें डोकीस घालणें. [ सं. प्रेंखण. हिं. फेंकना ]

**फेंकारणें**—क्रि. ( महानु. ) हलणें; बारलें जाणें. 'फेंकारते कुंचें जवंदड। वळवेंयानें।' –शिशु ५२८. [सं. प्रेंखण; म. फेंकणें]

**फें(फे)गडा पावडा**—वि. १ ( व. ) धनुष्याकृति; वांकडा ( पाय ). २ धनुष्याकृति पाय असलेला; पाय वांकवून, फाकून चालणारा ( मनुष्य ). 'एक दांतिरें राखोंडें फेंगडें।' –दाव २८६. –क्रिवि. वाकड्या पायांच्या मनुष्याप्रमाणें ( चालणें ).

**फेट**—पु. घोळ; कांठ; किनार (विशेषत: ल. उपयोग). [ हिं. फेंट ] ०गळ्यांत घालणें–पकडणें; घट धरणें. ०धरणें–रागानें पकडणें, धरणें.

**फेंट**—न. ( राजा. ) लाकडाचा निमुळता तुकडा. ( पाचरे प्रमाणें उपयोगी पडणारा ).

**फेंट**—न. ( कु. ) कुर्ली(खेकडा)चा एक लहान प्रकार.

**फे(फें)टा**—पु. पटका, लहान पागोटें. १०–१५ हात लांब व अर्धापाऊण हात रुंद असें डोक्याला बांधण्याचें वस्त्र. याहून रुमाल वेगळा असतो. [ सं. पट; हिं. ]

**फेटाळ**—वि व्यसनी: बाहेरख्याली.(पुरुष, स्त्री) [फेट=काठ]

**फेटाळणें**—सक्रि. १ धुडकावणें; हांकलणें. २ विचारांत न घेणें; हाणून पाडणें ( अर्ज, ठराव ). [ सं. स्फिट्; हिं. फेटना. ]

**फेंटोल**—पु. ( ना. ) मुलाचा एक मैदानी खेळ

**फेड**—स्त्री. १ ( कर्ज, उपकार इ० ) परत, मोबदला देऊन टाकणें; निरास करणें; ऋणविमोचन. २ पूर्ति (नवस, वचन इ०ची). [फिटणें] म्ह० अपकाराची फेड उपकारानें करावी. **फेडणें**–सक्रि. १ नेसलेलें वस्त्र, बांधलेली गांठ इ० ) सोडणें; सैल करणें. 'फेडी वस्त्र सतीचें जेव्हां उघडें करावया आंग।' –मोकर्ण ४९.७. २ (महानु.) परिहारणें; उतरणें; हरण करणें. 'जी हाची तुमचा पाहुंनह। जें एकें बळें फेडावा भारू। उमपपणाचा।' –शिशु ७५. ३ ( कर्ज, उपकार, नवस शंका इ० ) बाकी न ठेवणें; नि:शेष करणें; फेड करणें. 'तरी माझे मनीचा भावो। तो फेडाजी संदेहो।' –कथा १.२.१६. ४ कातरणें; काढणें. तंव त्याचि नखें फेडावया वारिकु घरासि आला।' –पंच ५.१. ५ दूर करणें; नाहींसें करणें; उघड करणें. 'फेडिला बोलियांचा कवळ। धुतला गुणदोषांचा मळ।' –तुमा ७१२. ६ स्वच्छ करणें; शिकरणें; धुणें; काढून टाकणें ( नाक, शेंबूड, घाण ). ७ एका भांड्यांतून दुसऱ्या भांड्यांत घालणें, ओतणें. [ फिटणें प्रयोजक; सं. स्फिटित; प्रा. फिडिअ ] म्ह० होतील बाळ तर फेडतील काळ.

**फेंड, फेंडर**—पु ( गो. ) फेंस. फेण पहा.

**फेंड–डा**—स्त्री. (ना व) ढुंगण; कुला; टिरी. 'फेंडा हालवितो उरास बघतो जो वांकडें चालतो।' –भकक २. रसकल्लोल ८१. **फेंडकाड**–स्त्री. ( तुच्छतादर्शक ) फेंड पहा.

**फेडा**—पु मृदगाचा पुडा; नडचें; बोंडी; पूड [ फेट ]

**फेडावेढी**—स्त्री. एक नेसलेलें वस्त्र सोडून दुसरें नेसणें पुन्हां पुन्हां सोडणें व नेसणें हा प्रकार 'सहजेंचि नेटुगा दाटुगा। फेडी वेढी नाहीं श्रीरंगा।' –एरुस्व १५ ७८ [ फेडणें+वेढणें ]

**फेंडोरी**—स्त्री. ( गो ) एक प्रकारची पोळी फेणोरी पहा.

**फेण**—पु १ फेंस; फेन. 'फेण फुगे हेलावे। सैरावेग उदक धावें।' –दा ११ ७.५ २ ( ल ) विष. 'बचनाग सोमल अहिफेण।' –पांप्र ८ १०२. [ सं. फेन ] **फेणणें**–अक्रि. फेसणें; फेंस येणें, फेंसळणें. [ सं. फेन; म. फेण ]

**फेणी**—स्त्री. १ उकळणाऱ्या उंसाच्या रसावरील फेसाळ मळी. २ ( गो. ) माडाची दारू; माडी; हलकी दारू. 'लेकानों एक एक कटी फेणी तर आगाऊच वसूल केली आहात!' –सह्याद्री २०१. [ सं. फेन ]

**फेणी**—स्त्री. १ पापडी; पापडासारखा तांदुळाचा बनविलेला एक पदार्थ. २ तारफेणी, एक खाद्यविशेष. ३ मोठा बत्तासा [ दे. प्रा. फीणिया=एक पक्वान्न; हिं. फेनी; गु. फेणी. तुल० सं. फेन ]

**फेणो**—पु. ( गो. ) केळयांची फणी.

**फेणोरी**—स्त्री. ( गो. ) फेंडोरी; एक प्रकारचें पक्वान्न; पोळी. [ सं. फेन+पुरी ]

**फेतुका**—पु. ( व. ) पेंड.

**फेती**—स्त्री. ( गो. ) कारागिराची मजुरी, घडणावळ. [पोर्तु.]

**फेतीस**—न. ( कु. ) पत्यांच्या खेळातील लबाडी.

**फेंद**—पु. (प्रा.) तफावत; फरक, (हिशेब, हकीगत इ०मधील) ( क्रि० पडणें ). [ सं. स्पंद्; प्रा. फंद ]

**फेंद**—पु. ( प्र. ) फंद पहा.

**फेंदका**—पु. ( ना. ) शेंबडाचा लोळा.

**फेंदड**—न. ( व. ) चिपड, डोळयांतून येणारा पू.

**फेंदडणें**—सक्रि. १ ( प्रां ) (प्रजा, नोकर, स्त्री इ०स) फितविणें; भुलविणें; मन फिरविणें. २ ( कामावरून, ) काढून टाकणें; कमी करणें

**फेंदडणें**—अक्रि. चपटें होणें, असणें. फेंदरणें पहा.

**फेंदडणें, फेंदरणें, फेंदाडणें, फेंदारणें**—उक्रि. (नाक) रागानें फुगविणें; पसरिणें; वर करणें; मुरडणें.

**फेंवणें**—अक्रि. १ हलके सरकणें; सरपटत जाणें २ ( ल ) रेंगाळणें; सावकाश चालणें फेंरत चालणें, फेंदीखाली चालणें— असेहि प्रयोग होतात.

**फेंवरणें**—सक्रि. नाक बसकें चपटें,फताड होणें, असणें.[फेंदरा]

**फेंवरा**—वि. १ बसकें; चपटें; शिमरें ( नाक ). २ नकटया, बसक्या नाकाचा ( मनुष्य ).

**फेंदू**—वि. लठ्ठ व आळशी; ताकद नसून नुसता फोफसा.

**फेंदू**—पु. १ झुरळ, विंचू इ० प्राणी चिरडून झालेला चेंदा, लगदा. २ मास, फळें, इ० पदार्थ कुजून लिबलिबित, मऊ होणें व त्यांना पाणी सुटणें; (विरू.) मेंदू; बेंदू पहा.

**फेन**—पु. फेंस, फेण पहा. [ सं ] **फेनिल**–पु रिठा; रिंगें. याचीं फळें साबणाऐवजीं वापरतात. –वि. फेंसयुक्त; फेंसाळलेला. [ सं. फेन ]

**फेपरआई**, **फेपराई**—स्त्री. ( उप. ) तोतरा, फापरा. [ फेपरें+आई ]

**फे(फें)परा**—वि. रुंद नाकाचा, फेंदरा

**फेपरा**—वि. फेंपरें, घुरें, येत असलेला; फेपरेकरी. 'जो पारधी बहुजीव संहारी। तो फेपरा होय संसारी।'–शिली २.१.३२.

**फे(फें)परी, फेपडी**—स्त्री एखाद्याच्या बोलण्याला रागानें व तिरस्कारानें योजावयाचा शब्द. बडबड; जल्पना. ( क्रि० बंद करणें; होणें ). 'तुझी फेपरी बंद करीन.' [ फें. फें ] **०वळणें**– बोलतांना गोंधळून जाऊन अडखळणें; बोबडी वळणें.

**फे(फें)परें**—न. १ अपस्मार रोग, तोंडाला फेंस व अंगाला कंप अशा रीतीनें येणारी मूर्च्छा; झटका. २ पिशाच्चबाधेमुळें येणारा अशा प्रकारचा झटका. ( क्रि० येणें; लागणें). [ ध्व. फें ! फें] **फेपरेकरी**–पु. फेपऱ्या, फेपरें येणारा मनुष्य, अपस्मारी; अप स्माराचा रोगी. **फेपऱ्यादेवी**–स्त्री. ज्या आल्या असतां अप स्माराचे झटके येतात अशा देवी. देवी पहा. (क्रि० येणें; निघणें; फुगणें ) [ फेपरें+देवी ]

**फेपणा**—वि. चपटया, बसकट नाकाचा.

**फेफळ**—स्त्री. प्रतिज्ञा. –मनको.

**फे फे**—स्त्री. १ त्रेधा; तिरपीट; असहाय, शरणागताची स्थिति बेबें. २ अपमानास्पद स्थिति. –अ. अतिशयित श्रम, अगतिकत्व, दुबळेपणा दाखविणारा उद्गार. [ ध्व. ]

**फेर**—पु. १ रिंगण; वर्तुलाकार, दौड करीत किंवा इकडे तिकडे फिरणें ( घोड्यानें ); फेरफटका. ( क्रि० धरणें; घालणें) २ फरक; भिन्नता; असमानता ३ भेद: विसंगतपणा तफावत; अंतर ४ ( आजार, मनाची स्थिति किंवा वृत्ति इ० मध्यें पडलेला ) फरक; बदल; पालट. ( क्रि० पडणें; घेणें ) 'त्याचे तापाला फेर पडला.' ५ वाक; वळण; बाक. ( रस्ता, काठी इ० चा ). ६ गाण्यांत निराळे स्वरभेद, खाचखोचा दाखविण्याची शक्ति 'त्याचे गळयांत फेर चागला आहे.' ७ परीघ ( वर्तुळाचा ) ८ घेर; घोळ; कांठ (परकर, अंगरखा इ० चा). ९ रंगण धरून गाणें व नाचणें. (नागपंचमीस बायका फेर धरतात तसा ) (क्रि० धरणें; घालणें; घेणें). १० (राजा.) फेरा; सभोंवती वेढणें; वाटोळें गुंडाळणें; वळसा; विळखा; वळ; पीळ ( दोरीचा, कापडाचा–काठीभोंवती, स्वतःभोंवतीं ). ११ बकऱ्याच्या पोटांतील एक भाग. –क्रिवि. पुनः; परत; माघारी. [ वे. प्रा फिर, फेरण; हिंफेर] ( वाप्र. ) **०उलटणें**–( चांभारी ) उलटा शिवलेला जोडा सुलट करणें **०घेऊन मुतणें**–बाईटपणात ( शिकवणीवर ) ताण करणें जसें:–कोणी उभ्यानें मुतावयास सांगितलें असता वाटोळें फिरतफिरत मुतणें **०घेणें**–( चाभारी ) तळ व तजा एक ठिकाणीं शिवणें. **०जुंपणें**–(चाभारी) तळ व तजा एके ठिकाणीं शिवण्यास सुरवात करणें **०देणें**–फिरवून आणणें. 'चाबूक स्वारांनीं श्रीमंताचे घोडे फेर देऊन आणावे.' –डुकराची शिकार १४. सामाशब्द– **०करवत**–पु आडवाकरवत ( पहा ). ( दोन मनुष्यांनीं चालविण्याचा, चौकट असलेला किंवा नसलेला ). **०गोष्ट**–स्त्री उलट उत्तर; दांडगाईचें, उद्धटपणाचें उत्तर (कनिष्ठ दर्जाच्या मनुष्यानें दिलेलें) **०घोंगडें**–न. १ ( एखाद्याची घोंगडी त्याच्या अंगावरून काढून ओढाताण करणें, फाडणें, फेंकणें इ०रूप ) अवहेलनेनें, अपमानानें वागविणें २ अशा तऱ्हेनें वागविला गेलेल्या मनुष्याची स्थिति. ( क्रि० करणें; होणें) **०घाई**–स्त्री ( ल ) १ चाकरानें, हाताखालच्या मनुष्यानें दांडगाईनें दिलेलें उत्तर; वरिष्ठाशीं उद्धटपणाचें वर्तन ( क्रि० करणें ). २ पुन्हां हल्ला, उलट खाणें ( पराभूत शत्रु, परावृत्त संकट यानीं ). (क्रि० करणें) **०पगडी**–स्त्री. १ फेरघोडी पहा. २ ( बाईट अर्थी ) सामना; स्पर्धा; चढाओढ. ३ कबूल केलेली गोष्ट न पाळणें. ४ मन फिरणें (बाईट तऱ्हेनें) ५ बाईट मार्गाला लागणें ६ ( शब्दशः ) अदलाबदल. **०बगडी**–फेरपगडी ( अर्थ ) पहा. **०घोडें**–न. प्रत्युपकार; सूड ( क्रि० घेणें ) **०तपासणी**–स्त्री. ( कायदा ) उलट तपासणीनंतर साक्षीदाराची–ज्या पक्षकारानें त्यास हजर केलें त्याकडून झालेली पुन्हां तपासणी. **०निवडणूक**–स्त्री. एकदां निवडणूक झाल्यानंतर पुन्हां लवकरच करावयाची निवडणूक **०पत्र**– न पत्राचें उत्तर; पत्रोत्तर. 'फेरपत्र पाठविलें दांतीं धरून यावें तृण।'–ऐपो ११५ **०पाळी**–स्त्री १ एकावरून दुसऱ्यावर अशी फिरत येणारी पाळी; बारी २ पुन्हां आलेली पाळी **०पाळीनें**– क्रिवि फेरफेरानें; अदलून बदलून; बारगीपारगीनें **०फटका**– पु. १ चक्कर; रंगण; घोड्याची रपेट, इकडे तिकडे दौडणें. २ हिंडणें; भटकणें; फिरणें ३ ( ल ) उपयोग; चालविणें; योजणें (स्वतःची बुद्धि, अनुभव ). **०फार**–पु. १ फेरबदल; पालट; बदलाबदल; दुरुस्ती. २ फरक; तफावत; अंतर ( हिशोबांत, सांगण्यांत, आजारांत,

मैत्रींत ). [ फेर द्वि ] ०बदल-पु. फरक; फेरफार. ०बदली-स्त्री. १ अदलाबदल; आलटापालट. २ फौज, तुकडी यांतील शिपायांची आपसांतील बदली; पालट; एकानें येऊन दुसऱ्याला मोकळीक देणें. ०मोबदला-मोबादला-पु नगास नग देऊन घेणें; अदलाबदल; विनिमय. ०लागवड-स्त्री. पुन्हां पेरणी 'निदान फेर-लागवडीवर सरकारचा हक्क नसावा.' -के १४.६.३०.

फेरबसविण्याचें खुरपें-( चांभारी ) खुरप्याची एक जात.

फेरणें—सक्रि. १ वाटोळें, रंगणावर, इकडे तिकडे फिरविणें; (घोडयास) दौडत नेणें. २ या बाजूकडून त्याबाजूस, इकडून तिकडे, खालवर, कांहीं काळ चाळणें, चाळवा देणें ३ ( ना. ) शाकारणें. ४ बदलविणें. [ फिरणें प्रयोजक; दे. प्रा. फेरण; हिं. फेरना ]

फेरणी—स्त्री. पहिल्यापासून शेवटपर्यंत परत पाळी येणें, करणें; पुन्हांपुन्हां आवृत्ति. 'पहिल्या फेरणीस जितकीं अक्षुदें सांपडलीं इतकीं दुसऱ्या फेरणीस सांपडणार नाहींत.' [ फेरणें ]

फेरवडी—स्त्री. बटाटे वडा. -गृशि १ ८१ [ फेरणें+वडी ]

फेरा—पु. १ वेढा; वळसा; विळखा, पीळ; घेर. २ चक्कर; प्रदक्षिणा; वर्तुळाकृति मार्ग; गिरकी ३ ( रस्त्याचे, नदीचें इ० ) बांक; बांक; वळण; वांकण; वळसा. ४ रिकामा हेलपाटा; चक्कर; फेरी; व्यर्थ येरझार. ५ ( ल. ) अडचण; संकट; घोंटाळा; पाश. ( याअर्थी सप्तमी विभक्तींत उपयोग जसें-फेऱ्यांत ) ( क्रि० घालणें; पडणें; सांपडणें ). 'हेमाप्सरी सुंदरी । येता देखांबि विवरीं । मयासुर पडिला फेरीं । भाग्यें करीं आलीसी ।' -भारा किष्किंधा १५.५९. ६ वर्तुळाचा परीघ. ७ चौऱ्यायशी लक्ष योनींत जन्ममरण. 'चुकेल चौऱ्यायशीचा फेरा । ऐसें महात्म्य गंगेचें ।' -भूपाळी गंगेची. [ फिरणें ] फेराची आरी-स्त्री. ( चांभारी ) खालचें तळ व वरचें तळ शिवण्याचें हत्यार.

फेरि(री)स्त—न. टांचण; यादी; सूची, अनुक्रमणिका; फाईल; फर्द; पट; फर्दा. 'सन १८३५ सालीं हें दप्तर प्रांतवार व माहालवार लावून फेरिस्त तयार करण्यास्तव अमानतदार याचे स्वाधीन केलें.' -इनाम ५९. [ फा. फिहरस्त ]

फेरिस्ता—पु. १ प्रभुप्रेषित; पैगंबर; देवदूत. २ -विशेषनाम एक सुप्रसिद्ध फारशी इतिहासकार. [ फा. फिरिश्त ]

फेरी—स्त्री. १ चक्कर; प्रदक्षिणा; वळसा; एखाद्या वस्तूच्या भोंवतीं दुसऱ्या वस्तूनें फिरणें. २ एका ठिकाणीं येणें; गिरकाडा; फेरफटका. ३ पाळी; वारी. ४ गस्त; घस्त; एकसारखें शहरांतून किंवा सभोंवार पहाऱ्याकरितां फिरणें. ५ वर्तुळ; मंडल [ फेरा ] ०कर-पु. घस्त घालणारा. 'तेथें आले फेरीकर । मग खालीं काढोनि क्रूर । मार देती ।' -कथा २.९.११८. ०वाला, फेरेकरी-पु. १ फिरता; फिरस्ता; फिरणारा. २ विक्रीचा माल घेऊन दारोदार हिंडणारा. ३ फिरता भिक्षुक, भिकारी.

फेरूनफारून—क्रिवि. वरचेवर पालट करून; उलथापालथ करून; या बाजूचा त्या बाजूकडे फिरवून; फारूनफेरून. [ फेरणें द्वि. ]

फेराजी निशान-ण—न. विजयशाली, विजयचिन्हांकित ध्वज; विजयध्वज. [ फा. फिरुझी-निशान् ]

फेर्नांदीन—पु ( गो ) एक कलमी आंब्याची जात; फर्नांडिस फर्नांदिन पहा. [ पोर्तु. ]

फेल—न. ( कों. ) दाणा पोसला नसलेली पोंचट शेंग; वाल इ०ची, हरबऱ्याचा घाटा; पोची शेंग. [ फोल ]

फेलाव, फेलावणी, फेलाविणें—फैलाव इ० पहा.

फेस—स्त्री ( राजा ) फाक; फाकळी; फोड; लांबट तुकडा.

फे(फें)स—पु १ फेन; फेण, साबणाचें पाणी, दूध, मद्य इ० द्रव पदार्थावर येणाऱ्या असंख्य लहान बुडबुडयांचा समूह. [ सं. फेन ]

फेसकट—न ( तुच्छता तिरस्कारार्थी ) फेस [ फेस+कट प्रत्यय ]

फेसट—वि. १ फेसाळ; फेसयुक्त; थोडें फेनिल. २ फेसकट पहा.

फेसणा, फेसणी—स्त्री फेस आणण्याची क्रिया; फेसाळणें. [ फेसणें ]

फेसाळ, फेसाळ—वि. फेसानें युक्त; लवकर किंवा पुष्कळ फेस येणारा; फेसट पहा, [ फेस ]

फेस—पु ( क ) बाभळ इ०च्या शिऱ्याचा, काटक्या कुडक्यांचा भारा, ओझें; काटेरी फांद्या-डहाळ्यांचा भारा फस पहा

फेसणी—स्त्री ( राजा ) फोडी तुकडे करणें ( भोपळा इ०च्या ) [ फेस ] फेसणें-उक्रि ( राजा ) फोडी करणें, तुकडे करणें [ फेस [

फेसणें, फेसळणें—अक्रि. फेस येणें, फेसानें युक्त होणें -उक्रि फेस आणणें, हलके होण्यासाठीं घोटणें ( तूर इ० पदार्थ ) [ फेस ] फेसळणी-स्त्री. फेस येणें, फेसाळ करणें; फेसणी पहा.

फे(फें)साटा—स्त्री १ तोड केलेल्या काटेरी झुडपाचा भारा. २ पेरलेल्या जमिनींतील बीं झाकण्यासाठीं त्यावरून फिरविण्याचा काटेरी भारा; काटेरी झुडुपाचा बनविलेला कुळव. ३ दातालें पहा. ही फणीसारखी असून जमीन नांगरल्यावर डिखळें फोडण्यास हिचा उपयोग करतात' -राको २२०. [ फ्रेस ] म्ह० गाडीची वाट फेसाटीनें मोडावी=हातांत असेल त्या साधनानेंच एखादी गोष्ट करावी.

फे(फें)साटणें—सक्रि. ( पेरलेलें शेत ) फेसाटी फिरवून झांकणें. फे(फें)साटणी-स्त्री. पेरलेल्या शेतांत फेसाटी फिरवून पेरलेलें बी मातीनें झाकण्याची क्रिया.

फेसाड—१ ( ना. ) धांदल; तिरपीट; त्रेधा. २ ( व. ) तकलीफ; श्रम [ फेस; तुल० देप्रा. फेस=त्रास, डर ]

फेस्क—न. ( गो. ) आगपेटी. [ पोर्तु. फॉस्फोरो ]

फेस्त—स्त्री. ( गो. ) ख्रिस्ती लोकांचा सण, जत्रा. [ पोर्तु फेस्ता; इं. फीस्ट ] म्ह० १ फेस्तकरितां गांव आनी ह्जिगाराचें नांव=एखादी गोष्ट गांवानें करावयाची पण नांव मात्र पुढाऱ्याचें

पुढें यावयाचें. २ फेस्तापुढें काम=कामाच्या आधीच आरडाओरड. ०कापड-न. (गो.) उंची लुगडें

**फैज**—पु. कृपा. [अर. फैझ्] ०बक्ष-वि बक्षिसें देणारा ०बक्षी-स्त्री. कृपादान. 'साहेबानें फैजबक्षी करून लवकर जाब गाठवावयाविषयीं अहल्कारांस आज्ञा सादर जाली पाहिजे' -पदमव ११२. [फा. फैझ्बख्शी]

**फैटण**—स्त्री. एक प्रकारची चार चाकांची गाडी. [ग्री. फाएथॉन; इं. फाएटन]

**फैना**—क्रिवि. (कर.) उत्तम; उत्कृष्ट; चांगलें.

**फैर**—स्त्री. (बाण, बंदूक, तोफ इ०) अस्त्रांचा सारखा मारा, शिलग, झाडणी. 'बाण बंदुकीचे फैर झडती तोफेचे गोळे पडे जसे गार।' -ऐपो १२०. [इं. फायर]

**फैल**—पुस्त्री. १ कार्य 'कोठी सिद्ध जाल्यावर फैल करावा ऐशी यांची चाल।' -ऐटी ३.१५. २ अंमल; सत्ता. 'यांत जो फैल मजूबुदीनें कर्तव्य तो करणें.' -ऐच ११५. ३ मोकाट वर्तन; बदफैल. ४ दंगा; बंड; तंटा; बखेडा. -शिदि ८३. [अर. फिअल] ०मचविणें-करणें-(ना.) नाना तऱ्हेचे रंगढंग करणें. ०जामीन-पु. दुष्कृत्य, दुर्वर्तन याबद्दल जातमुचलका; शांततेनें वागण्याबद्दलचा जामीन [फा. फिअल-इ-झामिनी] ०जामिनकी-जामिनी-स्त्री. फैलजामिनाची हमी; जमानत; जामीन व्यवहार.

**फैल**—पु. १ (कों.) टोळी; समूह. 'रस्त्यावरील काम करणाऱ्या मजुरांचा फैल' २ मजूरांची स्टेशनजवळची वस्ती. [इं. फाईल] फैलावर घेणें-धरणें-१ सारखें कठीण कामाला जुंपणें; शिक्षा करणें. २ कान उघाडणी करणें. ३ रिंगणावर धरणें; कैचींत, चिमटयांत धरणें.

**फैलाव-वा**—पु. १ प्रसार; विस्तार (जखम, वंश, लागण, व्यवहार, विषय, भाषण इ०चा), (शब्दशः व ल.) २ व्यापणी; मांडणी. 'इंग्रजी विद्येचा जो एवढा फैलावा आपल्या लोकांत हल्लीं झाला आहे.' -नि ६. ३ लांबण-ड लावणें; दिरंगाई करणें. (क्रि० घालणें; मांडणें; करणें; दडणें). [हिं.] फैलावणी-स्त्री. फैलावण्याचा व्यापार; पसरणें; विस्तार होणें. [फैलाविणें] फैलावणें-अक्रि. पसरणें; दूरवर जाणें; विस्तारणें. [हिं. फैलाव] फैलाविणें-उक्रि. पसरविणें; दूरवर नेणें. [हिं. फैलाव]

**फैसल, फैसला-ल्ला**—स्त्रीन १ निवाडा; निर्णय; निकाल; न्यायाधिशानें कारणासह दिलेला निर्णय (इं. जज्मेंट). 'व्याकरणाच्या तर्फे फैसला न होतां प्रचाराच्यातर्फे होईल.' -नि १२४. २ ऋणमोचन; कर्जाचा फडशा. [अर. फैसला] ०करणें-१ निवाडा करणें; निकाल देणें. २ पुरे करणें; फडशा पाडणें. 'हें काम फैसल एका दिवसांत करून.' -ख ८७५. फैसलनामा-पु. भांडणाचा लेखी निर्णय; वादाच्या बाबतींत सरकारी हुकूम. [फा.] फैसलपत्रक, फैसलेपत्रक-न. निकाल लागलेल्या खटल्यांची (मामलेदार वगैरेने दिलेली) यादी

**फोक**—पु. १ सरळ ओली खादी; फाटे, गाठीं वगैरे नसलेली लहान डहाळी; शिरपुटी. 'कोरडे पारंब्या फोक।' -दा ३.७.६४. २ लांब सडक छडी; पानें काढलेली (शिंदीची) फांदी (हांकणें, मारणें यासाठीं उपयोग). -वि १ सडपातळ पण मजबूत अशा अर्थी तरुण शब्दापुढें योजितात. उदा० तो नवा तरणा फोक आहे. २ सडपातळ. 'पातळ पुतळी फोक तनुशेंग सडक चवळी। रंग लवथवित सदा पिवळी।' -प्रला १७०

**फोक**—पु एका माशाचें नाव.

**फोक**—पु. पातळ व पुष्कळ हगणें; रेच, ढाळ. (क्रि० जाणें).

**फोकट**—वि. (कु.) फोल; खोटा. [फुकट?]

**फोकणी, फोंकणी**—स्त्री विरळ पेरणी, बीं उडवून फेंकून पेरणें (कोंकणांतील भातपेरणीप्रमाणें.) [फोकणें] फो(फों)कणें-उक्रि. बीं विरळ वि॰ळ पडावें म्हणून पसरून फेकून पेरणें. 'बीं फोंकलिया सेत। तरी मग तिफणी नागर कासया।' -स्वादि १९.१.५९. फोकणें-बातमी इ० सर्वत्र प्रसिद्ध होईल असें करणें. [फेंकणें] फोकीव-वि. फेंकून पेरलेलें (बीं). [फोकणें]

**फोकनाड**—(नाग.) थाप; वायफळ बोलणें. (क्रि० सोडणें).

**फोकरणें, फोकारणें**—सक्रि. १ पुकारणें; हांक मारणें. 'धांवा फोकरीतु बोले तैसें। दीक्षांप्रति।' -ऋ ३७. २ प्रगट करणें. 'तैसा दृष्टादृष्टाचा सखा। धर्मु जाला तो फोकारिजे देखा।' -ज्ञा १६.२२२. ३ वर्णन करणें. [सं. पूत्+कृ; प्रा पुक्कर; पोक्कर; पुकारणें]

**फोकलणें**—उक्रि. फोकानें मारणें. [फोक]

**फोकली**—स्त्री. (अश्लील) स्त्रीचें जननेंद्रिय. 'फोकलीच्या' अशा शिवींत उपयोग. [का. पुकळी]

**फोकवण**—स्त्री. ढाळ, रेच होणें; पाण्यासारखें शौचास होणें; ढेंढळ. [फोकलणें] फोकलणें-अक्रि. हगवण लागणें; ढेंडाळणें.

**फोकस**—पु. (फोटो.) केंद्र प्रकाशकेंद्र; लेन्समधून जाणारे किरण ज्या ठिकाणीं एकत्र होतात तें ठिकाण. [इं]

**फोकाटा**—पु. १ (ना.) फोक. २ खूप उंच मनुष्य; शेकाटा. फोकाटी-स्त्री. १ लहानसा फोक; शिपटी; डहाळी; छडी. २ (ल.) सडपातळ, नाजुक मनुष्य. [फोक] फोकाटणें-उक्रि. फोकाटीनें मारणें. [फोकाटी]

**फोकांडा, फोकांडी**—पुस्त्री. ढेंडळणी; जोराचा ढाळ, रेच. (क्रि० लागणें; जाणें) [फोक] फोकांडणें-क्रि. (व.) रेच होणें; फोकलणें. [फोकांडा]

**फोकाण्या, फोकायत्या**—स्त्रीअव. (व.) गप्पा; बाता. (क्रि० सोडणें).

**फोकी**—फोगी पहा.

**फोकोटी**—स्त्री. ( कों. ) वाढ होण्यापूर्वीच गळलेली सुपारी

**फोखूत**—वि विकलेलें. फरोक्त पहा -शर.

**फोग**—पु. १ ( गो. ) शोभेचें दारूकाम. २ ( ल. ) खरडपट्टी [ पोर्तु. फोगो ] **फोगेर**-पु. ( गो. ) दारूसामान बनविणारा.

**फोगवर**—वि. ( गो. ) लड्ड ( स्त्री ).

**फोगार वचप**—क्रि १ ( गो ) फुकट जाणें. २ मरणें.

**फोगी**—स्त्री. गलबताच्या नाळेवर असणारें त्रिकोणाकृति शीड.

**फोगेट-त, फोगोट, फोगोती**—स्त्री. १ ( गो. ) फटाकडा; फटाका. २ खरडपट्टी; खडसावणी [पोर्तु फोगेता] **फोगोत्यान वाट मारप**-१ फटाकड्यांनीं वाट मारणें. २ ( ल. ) कष्टसाध्य गोष्ट सहजासहजीं साध्य करण्याचा आव आणणें.

**फोट**—पु १ टांचेमधील चीर; भेग २ फोड; गळूं. [सं. स्फोट]

**फोटो, फोटोग्राफ**—पु सूर्यप्रकाशाच्या साहायानें क्यामेऱ्यानें काढलेलें छायाचित्र [ इं ] **फोटोग्राफर**-पु फोटो काढणारा; छायाचित्रकार. [ इं. ]

**फोंड**—पु (राजा गो ) डोह; खळगा; खड्डा; पाण्याची खळी पोंड-ढ पहा. लघुत्वरूप फोंडी **फोंडकूल**-( गो ) फोंड पहा.

**फोड**—पु १ गळूं; उठाणूं; व्रण; भाजल्यामुळें किंवा खरूज इ० रोगानीं शरीरावर उठणारे बुडबुडयासारखे आकार. २ पापड इ० भाजले असता त्यावर, उंबराच्या पानावर दिसणारे वर आलेले फोडाप्रमाणें फुगारे. ३ परिस्फोट; वाच्यता; गुप्त गोष्ट बाहेर फुटणें. ४ विशद करून सांगणें; स्पष्टीकरण; खुलासा. ' हें उदाहरण मला फोड करून सांग ' -स्त्री. १ तुकडा; फोडून केलेला भाग; फाक; शकल ( फळें, कंद इ०चें ). २ ( राजा. ) ओबडधोबड काढलेले तुकडे. ' लांकडाची फोड. ' ३ भेद; वियुक्तता. [ सं. स्फोट; प्रा. फोड; हिं. फोडा ]

**फोडणी**—स्त्री. १ तेल किंवा तूप तापवून त्यांत हिंग, मोहरी, कारळे, मेथ्या, हळद इ० पदार्थ तळून त्याचा चुरका भाजी, आमटी इ० पदार्थास खमंगपणा, स्वाद येण्याकरतां देतात ती. २ ( ल. ) विडा ( यांत लवंगा वगैरे फोडणीचे कांहीं पदार्थ असतात ). ' चूर्णावीण फोडणी घाली वदनीं । ' -मुक्ते. मूर्खाचीं लक्षणें २२. ३ फोडणें; विभागणी; भाग करणें; तुकडे करणें. [ फोडणें ] ०देणें-(ल ) झाडून टाकणें; रागानें बोलणें. ' यानां आतां चांगली फोडणी द्यावी असें मनांत आणून मी गर्जना केली. ' -नाकु ३.३९. ०दामा-पु. ( काशी. ) चिवडा.

**फोडणें**—उक्रि. १ चिरणें; तुकडे करणें; जोरानें वेगळें करणें; विध्वंस करणें. २ (घराला, भिंतीला, पेटीला) फट, भगदाड, भोंक पाडणें; फोडणेंमोडणें. ३ ( घाव घालून ) तोडणें; भेदणें; तुकडे करणें; खांडणें; छेदणें. ४ (फोड, गळूं इ०) फाडणें; भोक पाडून पू वगैरे बाहेर काढणें. ५ ( डोळे ) बाहेर काढणें; खांचा करणें; दृष्टिनाहींशी करणें. ६ (गुप्त गोष्ट) उघडकीस आणणें; प्रसिद्ध करणें. ७ स्पष्ट करणें; उलगडून दाखविणें. ८ ताक विस्तवावर तापवून त्याचें चोथापाणी करणें ( फोडणें याचा क्रियेची आकस्मिकता व सपाटा दाखविण्याकरितां उपयोग करतात. मोडणेंतोडणें पहा). [सं. स्फुट्; सं. स्फोटन; प्रा. फोडण; म. फुटणेंचें प्रयोजक, हिं. फोडना] (वाप्र.) **फोडून काढणें**-खूप मारणें. ' चांगली फोडून काढतें तुला. ' -नामना ८१. **पाणी फोडणें**-पाण्याला मार्ग करून देणें. **डोळे फोडून पाहणें**-निरखून पाहणें; डोळे ताणून पाहणें. **फोडलेलें पान**-न. पत्याच्या खेळांत उतारें टाकलेलें पान. **फोडा व झोडा**-फूट पाडून नंतर दोन्हीही पक्ष क्रमानें हाणून पाडणें. इंग्रजी डिव्हाइड अँड रूल याला प्रतिशब्द. ' फोडा व झोडा ही इंग्रजांची राज्य मिळविण्याची राजनीति. ' -के ३.५.३०.

**फोडनिशी, फोण्णिशी**—स्त्री. ( गो. ) स्पष्टीकरण; विवेचन. फोड पहा. [ सं. स्फोटन ]

**फोंडवळी**—स्त्री. १ डोक्यावरील केसांचे समाप्तीस मानेच्या मध्यभागीं जी लहानशी खळी असते ती. २ ( सामा. ) लहान खळी, खळगा. पोंढवली पहा. [ फोंड=खळी ]

**फोडशी**—स्त्री. रानांत उगवणारी एक प्रकारची पालेभाजी. कांद्याच्या पात्यांप्रमाणें हिला पात्या असतात.

**फोंडसावंती**—स्त्री. ( कु. ) (सावंतवाडी करावरून) अरेरावी; अंदाधुंदी ( बाजीरावीप्रमाणें ). [ फोंडसावंत आडनांव ]

**फोडसें**—न. फुरसें ' जो लाटणें ऐसा न लवे । पाथरु तेवीं न द्रवे । गुणियासि नागवे । फोडसें जैसें । ' -ज्ञा १३.७२५.

**फोंडळणें**—क्रि. खोल जाणें (उपासानें पोट इ०) पोंढळणें पहा.

**फोंडारा**—पु. ( गो. ) लहान डोह; लहान खड्डा. फोंड पहा.

**फोडाळ, फोडेला**—वि फोडांनीं, पुळयांनीं भरलेला [फोड]

**फोडाळणें**—न गुरांना होणारा एक रोग. -अक्रि. फोड, पुटकुळया उठणें. [ फोड ]

**फोडी**—स्त्री. १ सुपारीचें खांड. ' मी नेदीं फोडी । '-भाए १३८. २ कवडी. ३ देवीची पुटकुळी; पुळी; फोड. [ फोड ] ०पान-न. पानसुपारी; विडा. ' असो सारिली आरोगणा । हडपिये दीधलें फोडिपाना । ' -कथा ४.१७.९७. **फोडया**-स्त्रीअव. देवी. ( क्रि० येणें; कानपणें; जिरणें ).

**फोंडी**—स्त्री. ( राजा ) दोन शिंगांमधील जागा; पोंढी पहा.

**फोडीव**—वि. फोडलेलें; तुकडे केलेलें. फोडणें पहा.

**फोफो**—पु.(कों.)नारळीचा, पोफळीचा उभा चिरलेला तुकडा.

**फौत**—स्त्री. ( गो. ) पोत. [ पोर्तु] ०करप-देंड, मांडी इ० शरीराच्या विशिष्ट भागीं कृतीनें फोड काढून तो फोडून त्यावर हळद लावतात. या व्रणांतून दररोज शरीरांतील दूषित रक्त वाहून

आऊन प्रकृति निरोगी राहते. शरीरातील दूषित रक्त काढण्याचा एक प्रकार. **फोंतीर पान मारप**-(गो) जखमेवर मीठ घालणे.

**फोतड**—स्त्री. (व) फजिती. (क्रि० उडणें).

**फोतर**—न. १ (ना. व.) फोलकट; सालपट; साल; पापुद्रा. २ (ल.) मुलांना लावण्यांत येणारा निंदाव्यंजक शब्द. ' फातर त लयच येलून राह्यल आहे ! '=तें पोर जास्तच खोडकरपणा करून राहिलें आहे.

**फोद्री, फोद्रा**—स्त्री. (अश्लील) स्त्रीचें जननेंद्रिय (शिमग्यात उच्चारतात). **फोद्लणें, फोद्यालणें, फोद्वळणें, फोदाळणें**-क्रि. (फोदा शब्दापासुन बनविलेल्या) अचकटविचकट शिव्या देणें, झंबाडणें **फोद्लपट्टी, फोदालपट्टी**-स्त्री अचकट विचकट शिवीगाळ करणें; भासडणें; झंबाडपट्टी (क्रि० काढणे)

**फोनो, फोनोग्राफ**—पु १ बोलणाऱ्याच्या ध्वनीसारखा हुबेहुब ध्वनि काढणारें, गाणारें यंत्र, ध्वनिलेखनयंत्र. २ (ल.) एकसारखी टकळी लावणारा माणूस. [इं]

**फोपणा**—पु. (व) फोदा, स्त्रीचें जननेंद्रिय.

**फोपनीस**—न (कों) पपनस; लिंबासारखें एक मोठें फळ.

**फोपय**—पु. पपैया; पपई (झाड व फळ). [पपयी]

**फोप(पु)ला**—पु. (व.) फोड (भाजल्यामुळें येणारा, देवीचा) [सं. पुष्फल; हिं. फफोला]

**फोपशा-सा**—वि. स्थूल; पोकळ; लठ्ठ; फुगीर अंगाचा परंतु अशक्त. [फोप्प=फुगलेली स्थिति. तुल० इं. पफ्]

**फोपस**—वि. पोकळसर; पोकळ; फुसका. ' ऋतुकाळावीण फोपस । मेघ जैसे । ' -कथा ५.१३.१९

**फोपळ**—स्त्री. (हेट.) पोफळ पहा

**फोपा**—पु. १ घाईनें वेडीवाकडी बनविलेली भाकरी; आरोळी; फुगी. २ ओबडधोबड लावलेली गोवरी, शेणी. ३ लठ्ठ इसम; फोफशा, फुगलेला इसम.

**फोपाटणें**—अक्रि श्वासोच्छ्वास करणे.धापा टाकणें.[फोफाटा]

**फो(फों)पाटा**—पु. कढत राख; धूळ; फुंपाटा पहा. [प्रा. पुप्फुआ; म फुंपाटा]

**फोपावणें**—अक्रि. फोंफावणें पहा.

**फोपाळें**—न. (कु.) लाठीचें, पाय ठेवण्याचें आडवें लांकूड.

**फोपी**—स्त्री. (कर.) रव्याची लहान पुरी; पोपी.

**फोंपी**—स्त्री. (गो.) फणसाच्या गऱ्यामध्यें असणारी पात.

**फोपीस**—नपु फुप्फुस. ' वायूचें घर फीपीस जाण । ' [सं. फुफ्फुस]

**फोंपू**—पु. (व) फुंपाटा; तापलेली राख, धूळ. [फुंपाटा]

**फोंपूट**—न. (गो) ओंठास किंवा तोंडांत येणारा फोड,फुगा.

**फोपेटा**—पु १ फुंपाटा. २ (राजा.) घासटून किंवा भाजल्यामुळें निघालेला कातडीचा तुकडा (क्रि० जाणें).

**फोंपेटी, फोफेटी**—स्त्री. एक प्रकारची वनस्पति; कांहीं भागांत हीस कपाळफोडी म्हणतात. **फोपेटें, फोफेटें**-न. फोफेटीचें फळ.

**फोपेणें**—अक्रि. (राजा.) फोड उठणें; फोड आल्यामुळें कातडी फुगणें; बिब्बा, शेराचा चीक इ० लागल्यानें फोड येणें. **फोप्योंचें**-क्रि. (गो) झाडाचा चीक लागल्यामुळें कातडी जाड होणें.

**फोपेरें**—न. अळू, सुरण इ० कांची देठी [फो ! फो ! किंवा पोंवा-कारण हें पोकळ असुन पाव्यांप्रमाणे वाजवितात]

**फोपै**—पु. पपई; पोपई; पोपया; पपैया.

**फोंफडा**—पु. (व) बुडबुडा. [पोपडा]

**फोफशी**—स्त्री. सुज; फुग. 'वातानें अंगावर फोफशी चढते.' -वि. फोपशा पहा

**फोफळी**—वि. (तंजा.) लुगड्याची एक जात, प्रकार; पोफळी पहा.

**फोफाटा, फोंफेटी, फोफेटें**—फोपाटा इ० पहा.

**फोंफा(पा)र**—पु (गो.) लाथ; खोट.

**फोफावणें**—अक्रि १ फों फों करीत जाणें (बाण, बंदुकीची गोळी, फटाका इ०) २ फुसकारणे (सापानें); फुंपणें. ३ फुगणें; फोपसें, वातपुष्ट, थोदल्या होणें. ४ (नदी) भरून जाणें फोंफों वाहात जाणें. ५ लवकर कोंब फुटणें, वाढणें (झाड) [ध्व. फो ! फो !]

**फोंफें**—न. (गो.) जिभेवरील तोंडाची पोकळी; टाळा; आटळा; तालु

**फोमणी**—स्त्री (अश्लील) योनि; स्त्रियांचें जननेंद्रिय.

**फोर**—पु १ छत; कम्हर. २ गोव्याकडील ख्रिस्ती बायका गळ्यांत घालतात तो दागिना. हा तावडया खड्यांच्या माळेंत हिरव्या खड्याचें पदक घालुन व सोन्याच्या तारेंत गुंफून केलेली असतो [पोर्तु. फोरो]

**फोर**—पु (नाविक) रोजाच्या खालच्या अंगास रोजाच्या आकाराचें जें दुसरें लांकूड जोडतात तें.

**फोल**—न. १ हलका, पोकळ दाणा. २ टरफल; आंतील दाणा काढून घेतल्यावर राहिलेलें दाण्याचें (भात, हरभरा इ०) साल; कडधान्याच्या दाण्यावरील साल. ३ कोंडा; भुसा; तूस. ४ (ल.) पोकळ व अविश्वासाचें बोलणें, वचन; निरर्थक बडबड. ५ निष्फल श्रम, प्रयत्न. -वि. खोटें; व्यर्थ; कोरडें; निःसत्व. ' दुःशासना न याचे ऐकावे बोल फोल हा बाळ । '-मोसभा ५.६२ [का. पोळ्ळु] ०**कट**-न. टरफल; हलकें, पोकळ, पोचट धान्य. ' ऐसें सांडिजे फोलकट । ' -विउ ७.२१. -वि व्यर्थ; पोकळ. ' बाकीच्या शास्त्रांचा फोलकट पसारा काय करावयाचा ? ' -गीर ११. [फोल]

**फोल**—स्त्री. (गो.) कागदाचा ताव; बंद. [पोर्तु फोल्हा] ०**काप**-पु (गो.) कागदाचा लखोटा.

**फोलणें**—उक्रि. टरफल, साल काढणें; धान्य सडून, भरडून वरील फोलकट, कोंडा काढणें; सोलणें. **फोलून फोलून खाणें**-१ सावकाश, हळू हळू सोलून खाणें. २ (ल.) युक्तीनें व दुसऱ्यास न समजूं देतां त्यापासून हळू हळू तत्त्वांश हरण करणें, काढून घेणें. [ फोल ]

**फोलणें**—अक्रि. पडसें, थंडी, खोकला इ० आणें. [ फोल ]

**फोलीण**—न. ( गो. ) टिनच्या पत्र्याची पेटी

**फोलो**—पु ( छाप. ) चार पृष्ठांचा फर्मा. [ इं फोलिओ ]

**फोव**—पु. ( गो. राजा. कुण ) पोहे. **फोवांडपख**-पु. ( गो. ) दिवाळी ( फराळाला पोह्यांचे निरनिराळे प्रकार करण्याची रीत आहे. त्यावरून ख्रिस्ती लोकात हा शब्द रूढ आहे )

**फोव घालणें**—( बकरी ) विणें —बदलापूर २५९.

**फोवा**—पु. ( ना. ) तेल-अत्तरादिकाचा बोळा, फाया.

**फोवो**—पु. ( कों. ) नाचणीचा कोंडा.

**फोस, फोंस, फोसें, फोसकट**—वि. ( राजा. ) फुसका, फोल; पोकळ; व्यर्थ, कमकुवत; निरुपयोगी. ' विस्तारिली वाचा फळेंविण वेल । कोरडेचि बोल फोस वांझे । ' —तुगा १०८३ [फुस्?]

**फौ**—पुभव. फोव, पोहे. [ पोहे ]

**फौकारणें**—अक्रि. कीर्ति सांगणें. —मनको. [ फोकारणें ]

**फौज**—स्त्री. सैन्य; पलटण; सैन्याची तुकडी. ' समुद्रतीरा वानरफौज । आजी पातली पाहिजे । ' —मुवन १५.१६२ [ अर. फौज् ] ०**दार**-पु. १ चोरी, शिंदळकी, मारामारी इ० गुन्ह्यांची चौकशी करण्याकरतां ठेवलेला सरकारी अधिकारी; पोलिसअधिकारी कोंकणात पोलीसपाटेलाला म्हणतात. २ सैन्यावर हुकुम चालविणारा किंवा ज्याच्याजवळ सैन्य आहे असा मनुष्य ३ महात; महातावरील मुख्य. [फा. फौज्दार] ०**दारी**-स्त्री. १ फौजदाराचा अधिकार. २ गुन्ह्याबद्दल खटला. —वि. गैरमुल्की गुन्ह्यासंबंधीं; दिवाणी नव्हे असा; चोरी, मारामारी, शिंदळकी, खून इ० गुन्ह्यासंबंधीं ( खटला, कोर्ट, कायदा इ० ). ( इं ) क्रिमिनल. **फौजदारी कायदा**-पु. ज्या कायद्यानें गुन्हेगारांना गुन्हा करण्याबद्दल शिक्षा सांगण्यांत येते किंवा गुन्हे कोणते हें ठरविण्यांत येतें तो. —चक्र १६२. ( इं ) क्रिमिनल लॉ. फौजदारी फिर्याद; दावा; लोकांच्या हक्कांना बाधक असा गुन्हा केल्याबद्दल भरलेली फिर्याद किंवा केलेला दावा ( इं. ) प्रॉसिक्यूशन. ०**दारी विषय**-पु गुन्ह्याची बाब; फौजदारी खटला; दिवाणी नव्हे असा खटला. ०**नशीन, फौजेनशीन**-क्रिवि. फौजेनिशीं; ससैन्य. 'परंतु राजाराम तिकडे जाऊन पुन्हां पूर्ववत् फौजनशीन जाले.' —मराचिथोशा ४२. ०**फांटा**-पु सैन्य व त्याबरोबर असणारें, लागणारें साहित्य; फौज, तोफखाना, शिबंदी वगैरे; सैन्य; जमाव. ०**बंद**-वि. लढी फौज ज्याजवळ आहे असा; लढाईस सज्ज असें सैन्य ज्याजवळ आहे असा; ससैन्य. ०**बंदी**-स्त्री. लढाईकरितां सैन्य घेऊन सिद्धता; तयारी; फौज तयार करून राज्य संरक्षण करणें. [ फा. ] ०**सरंजाम**-पु फौजेच्या खर्चासाठीं व किल्ल्याची व्यवस्था राखण्यासाठीं दिलेली नेमणूक. फौजनिर्वाहार्थ दिलेलें उत्पन्न. याच्या उलट जात सरंजाम ०**सलतनत**-स्त्री. फौज; सैन्य. ' बेजरबी घोडी चालवून हैदरखान याची फौज सल्तनत सर्वत्र बुडवून गारत केली. ' —ख ४.१७९८. सल्तनत पहा. **फौजी**—वि सैन्यविषयक; लष्करी. 'मुल्की आणि फौजी इंग्रज अधिकारी यावेळीं खजिन्याच्या रक्षणाच्या बाबतींत मोठ्या काळजींत होते.' —सन १८५७पृ. ३३५.

**फौंड-डी**—स्त्री ( व ) वखर, तिफण, फराटा अगर डवर याला पुढच्या बाजूला लावलेलें लांकूड. —मसाप २.२५३.

**फौंड्री**—स्त्री धातूच्या ओतकामाचा कारखाना; विशेषत: छापण्याचे खिळे पाडण्याचा कारखाना. [ इं. ]

**फौत**—पु मृत्यु. [ अर. फौत् ] ०**होणें**-मरणें, मृत्यु येणें. ' एका रोजीचें खावयास नाहींसें जालें अजी संबब आपला भर्तार् रानोजीराव फौत जाहला. ' —रा १७.१

**फौरन**—स्त्री. ( व. ) जरुरीचा हुकूम. —क्रिवि. ( व. ) सत्वर; लवकर. [ अर. फौर, फौरन् ]

**फ्याफ्या, फ्यांफ्यां**—उद्गा. फेंफें पहा.

**फ्यांट**—स्त्री. ( कर. ) अडचण.

**फ्रेंच**—वि. फ्रान्समधील लोकांसबंधीं-विषयीं. [इं.] ०**कट**-पु नाकाच्या रुंदीइतकी मिशी; अर्ध्या मिशा ठेवणें. ' तावडतोब फ्रेंचकट करून ज्वालामुखी पद म्हणूं लागतो. ' —नाकु ३.३६. ०**पॉलिश**-न लांकडावर देण्याचें एक पॉलिश, रोगण. [ इं. ]

**फ्रेम**—स्त्री. चौकट ( फोटो इ० ची ). [ इं ]

**फलानेल**—न ( गो ) लोंकरीचें मऊ कापड; फलाणी [पोर्तु]

---

# ब

**ब**—पु. १ वर्णमालेंतील तेविसावें व्यंजन. याच्या पांच अवस्था— १ ली अशोकाच्या गिरनार लेखांत २ री कुडेश्वरच्या लेखांत ( इ. स ६६१ ). ३ री प्रतिहार बाउकच्या जोधपूर येथील लेखांत ( इ स. ८३७ ). ४ थी जपानांतील होर्युजीच्या मठांत सांपडलेल्या उष्णीषविजयधारणीच्या ताडपत्री ग्रंथांत. ५ वी चालुक्य भीमदेवाच्या दानपत्रांत. या शेवटच्या अवस्थेतील ' ब ' आणि 'व' यांत कांहींच भेद नसल्यामुळें 'व' पासून 'ब' निराळा काढण्यासाठीं त्यांत एक टिंब देऊं लागले. पुढें याच टिंबाची तिरकी रेघ बनून आजचा 'ब' तयार झाला. २ —स्त्री. लहान मुलाचा आईस हांक मारण्याचा शब्द.

**ब**—अ. फारशी पूर्वगामी अव्यय. ला-एं, सह अथवा नें या अर्थी 'ब-जमियत'=सैन्यासह [फा. बि, बा]

**बं**—अ. शिवाला हांक मारण्याची खूण. [ॐ]

**बा**—(संक्षेप) १ बद्दल. 'फुलघाट मिनेगार बा मल्हारजी होळकर हिरे शहत.'—थोमारो १.१५९. २ बरोबर. ३ ब-मोजिब ४ बरहुकूम.

**ब-अजे**—अ. इतर. —आदिलशाही फर्मान [फा.]

**ब-अद**—क्रिवि. त्यानंतर. —आदिलशाही फर्मान. [फा.]

**ब-अदहू**—क्रिवि त्यानंतर. —आदिलशाही फर्मान. [फा.]

**ब-अब्रु(ब्रू)**—क्रिवि. अब्रूसहित; प्रतिष्ठेनें. 'मिर्जा इस्माईल बेगास ब-अब्रू ठेवावें.'—दिमरा २ २६. [फा. बा-आब्रू]

**ब-अमल**—क्रिवि. रीतीप्रमाणें; नेहमीसारखें. 'तरी ब-अमल दिवाणचे बन्दगीस मालूम करून फर्मान लिहविला.'—रा १६.३२. [फा.]

**ब-इज्जत, ब-हुरमत-हुर्मत**—क्रिवि. सन्मानानें; आदरपूर्वक. 'माष्टीन यास बइज्जत व हुरमत पुण्यांत ठेविलें.'—ख ३५६५. [फा]

**ब-इन्साफ**—क्रिवि. न्यायाला; निकालास. —आदिलशाही फर्मान. [फा.]

**बइलका, बईल**—बइ व बई यांनीं सुरवात होणाऱ्या शब्दांबद्दल बै पहा.

**ब-इल्लत**—क्रिवि. कारणानें, साठीं.—आदिलशाही फर्मान. [फा.]

**ब-इस्म, बेशमी**—क्रिवि अमक्या (इसमा)च्या नांवानें. [फा.]

**बई**—स्त्री १ (लहान मुलांच्या भाषेंत) आई २ वयांत आल्यावर आईस लडिवाळपणानें संबोधण्याचा शब्द [बाई]

**ब-ई-सबब**—क्रिवि. या कारणास्तव—पयाव ३८४. [फा.]

**ब-एक**—क्रिवि एकदम. 'मग ब-एक अशी कस्त करावी कीं फुर्सत घेऊं न द्यावी.'—ख ८४३५६. [फा.]

**बक**—पु. एक पक्षी; बगळा. 'देवासी शरण कां रे नवजासी तैसा। बक मीना जैसा मनुष्यालागीं।'—तुगा २६७६. [सं] ०**ध्यान**—न १ बगळ्यासारखें ध्यान (बगळा डोळे मिटून तळ्याच्या कांठीं ध्यानस्थ बसल्यासारखा दिसतो पण त्याचें तें ध्यान तळ्यांतील मासे वगैरे भक्ष्याकडे असतें) २ (ल) बोके संन्यास; साधुत्वाचें अथवा धर्माचें ढोंग; कार्यसिद्धीसाठीं पोटांत लोभ ठेवून बाह्यात्कारें शांतपणा दाखविणें (क्रि० लावणें मांडणें) ०**ध्यानी**—वि. धर्माचें किंवा साधुत्वाचें स्वार्थाकरितां खोटें ढोंग करणारा; दांभिक. **ब(बं)कनळी**—स्त्री. (सोनारी) तोंडाला बगळ्याच्या मानेसारखी बांक घेतलेली—जोडकामांत उपयोगी पडणारी पितळी बारीक फुंकणी ०**बंधनन्याय**—पु. सरळरीतीनें करतां येणाऱ्या गोष्टीकरितां आडव्यातिडव्या मार्गाचा केलेला अवलंब (बगळयास धरणें झाल्यास, एकदम न धरतां प्रथम त्याचे डोक्यावर लोणी टाकून तें त्याच्या डोळ्यांत उतरून त्यास दिसेनासें झाल्यावर धरतात, त्यावरून) ०**मौन-व्रत-वृत्ति-विद्या-संन्यास**—नस्त्रीपु. बकध्यान पहा —वि. बकध्यानी ०**व्रती**—वि बकध्यानी.

**बक**—पु मूल, पिल्लूं (माणसांचें, पशूंचें). [सं. अर्भक]

**बक**—स्त्री. (बहुधां अव बका असा प्रयोग) वटवट; लेखप्रमाण विरहित तोंडी भाषण; बकबक, बाजारगप्प [सं. वाक्; हिं. बक] **म्ह०** हजार बका आणि एक लिखा **बकवाद**—पु. गप्पाष्टक; पोकळ निरर्थक भाषण. ०**वादी-वाद्या**—वि. बकणारा; बडबड्या; बकवाद करणारा.

**बंक**—स्त्री. १ चौकी; पहाऱ्याची चौकी. २ अटक; पहारा. 'तुला कोठेंहि बंक अटक नाही।'—र २६ [सं.]

**बँक**—स्त्री. १ पेढी; ठेवी सुरक्षित ठेवण्याचें ठिकाण. बँकेचे, सराफी, ठेवीची, सावकारी इ० प्रकार आहेत. २ पेढीची जागा, इमारत [इं]

**बकई**—स्त्री. वस्तऱ्याप्रमाणें असलेला चाकू. [सं वक्र]

**बकच्छायी**—स्त्री. (गो) थट्टा.

**बकट भैरू**—पु. १ मंदबुद्धीचा माणूस. २ मड; ठोंब्या; खुळचट (ग्राम्य).

**बकटमोडीचा**—वि. एक शिवी.

**बकटें**—न. (ग्राम्य) पुरुषाचें जननेंद्रिय.

**बकणी-णा**—स्त्रीपु. १ तोंडांत घालण्याकरितां घेतलेली पीठ वगैरेची मुष्टि; फक्की, शुष्क खाद्यद्रव्याचा घास (क्रि० मारणें). २ असल्या कोरड्या पदार्थाचा बोकाणा (क्रि० भरणें) 'तोंडांत बकणा भरल्यामुळें शब्द बोबडा निघतो.' [ध्व.?]

**बकणें**—अक्रि. अहंकारानें बडबडणें; वटवटणें; पुष्कळ व पोकळ बाता मारणें; तोंडाला येईल तें बोलणें [सं वाक्; हिं. बकना]

**बकतणें**—अक्रि. राहणें. —शर.

**बक(ख)तर, बकन(खत)तर**—न. लोखंडी जाळीचें अथवा लहान लहान कड्यांचें चिलखत. 'तमाम अंगांत चिलखतानें घालून व बस्तरें घालून.'—भाब १०. [फा. बक्तर] ०**पोस**—वि. चिलखत घातलेला. 'दहा हजार स्वार बख्तरपोस'—शासेह १४. **बख्तऱ्या-बकऱ्या**—वि. चिलखत घातलेला.

**बकंदी, बकमा**—स्त्रीपु. मुष्टीचा, बुक्कीचा मार. [बुक्का]

**बकमा**—स्त्री. जल्पना; बडबड; वटवट; निरर्थक भाषण, गप्पा. [हिं. ध्व] **बकयक-बकां**—क्रिवि. १ घाईनें व उतावीळपणानें; खातांना किंवा ओकतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें ध्वनि

होऊन; अधाशीपणानें; उतावीळपणानें. २ निरर्थकपणें; बचावचां (बोलणें) ०खाणें–गपांगपा खाणें; मटकावणें. बकबकणें–अक्रि. बडबडणें; वटवट करणें. बकबक्या–वि. पुष्कळ बडबडणारा.

**बकमार-माल**—स्त्री. मोठ्या तोंडाची लहान बंदूक; मोठें पिस्तूल.

**बकरम**—न. (ना.) एक जाड कापड (कॉलर इ० शिवतांना याचा उपयोग करितात). [इं.]

**बकरा-री-रें**—पु. बोकड. बकरी व तिचें पिलूं; करडूं. [सं बर्कर, वर्कर; प्रा वक्करो] **बकरकसाई**–पु बकऱ्याचें मास विकणारा; बकर-खाटीक ०कुदाई–स्त्री. १ करडाप्रमाणें, बकऱ्याप्रमाणें नाचणें, उड्या मारणें. (क्रि० करणें). २ कज्जा इ० प्रसंगीं दुर्बळ मनुष्यास अनेकांनीं बकऱ्याप्रमाणें बुकलून मारणें [बकरा+कुदणें] ०कुदी–स्त्री १ पट्ट्याच्या खेळांतील एक प्रकार. २ पाण्यात उडी मारण्याचा एक प्रकार ३ बकऱ्याप्रमाणें वर उठून पुढें उडी घेणें, घुसणें. (क्रि० कुदणें; करणें; मारणें) [बकरा+कुदणें] **बकरकुदीवर येणें**–अक्रि (ब.) (ल.) लढण्यासाठीं निकरावर येणें 'पळतां येईना तेव्हां आला बकरकुदीवर.' ०खाद्–स्त्री. बकऱ्याची झांबडणी, धाड (बागेवर, मळ्यावर). **बकरतान**–स्त्री बकऱ्याच्या बें-बें अशा ध्वनीसारखें गाणें; बेचव व नीरस तान घेऊन गाणें ०मोड–स्त्री. (मल्लविद्या) एका हातानें हनवटीस व दुसऱ्या हातानें जिकडे मान मुरगळावयाची असेल त्या बाजूच्या कानावर हात ठेवून मान मुरगळून किंवा पिरगळून पाडणें. ०सठ-ट–स्त्री. मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी, चंपाषष्ठी या दिवशीं खंडोबापुढें बकरीं बळी देतात.

**बकरा**—वि. क्रिवि (कु.) जरा; थोडासा; थोडें.

**बकल**—न. १ कचकल; पट्ट्याची कडी. २ गळ्यांतील पट्ट्यावरचा बिल्ला. 'अंमलदारांचीं बकलें चांदीचीं करण्यास हरकत नाहीं.' –(बडोदें) खानगीखातें १०५. [इं.]

**बकलणें**—सक्रि. कुटणें; बुक्क्या मारणें; बुकलणें. [बुकलणें]

**बंकवरी**—स्त्री. एक तृणधान्य; वरींतील एक भेद.

**बक(ख)वा, बकवाद**—पुस्त्री. १ बकबक (–स्त्री.) पहा. २ (ल.) भांडण; वाद; गोंधळ. 'उठावयाला तकवा नाहीं बकवा सारा धनि चाकर झुंझती।' –ऐपो ३६६. ३ –स्त्री. अफवा; पोकळ बातमी 'तो येणार अशी मी बखवा ऐकली.' [हिं.]

**बकस-स्**—स्त्री. द्वेष; द्रोह; आकस. (क्रि० बांधणें; धरणें; बाळगणें). [फा. बरअकस]

**बंकळ**—न. (गो.) शूद्रांच्या कानांतील बाळा.

**बंका**—पु. पहारेकऱ्यांची अथवा चौकीदारांची रांग (किल्ल्याभोंवतालची). 'बंकीं रिघे तव तया दिसताति बंके.'–र ३९. ०ईत–पु चौकीपहारा करणारा शिपाई; राजाच्या तंबूभोंवतालचा शिपाई.

**बकाट**—न अंसफलक; फरा; खवाटा.

**बकाण-णा**—पु. लिंबाची एक जात. हा मोठा असून पानें कडुनिंबासारखींच पण किंचित् मोठीं असतात. लांकूड इमारतीस उत्तम. ह्याचीं झाडें खानदेशांत जास्त यास कवड्यानिंब असेंहि म्हणतात. [हिं. बकायन; गु. बकान]

**बकाणा**—पु. बकाणी. बोकणा, बकाणा पहा. [ध्व]

**बकांवा-वी**—पुस्त्री. बकंदी पहा. (क्रि० देणें; मारणें; लावणें; बसवणें) [ध्व.]

**बकाया**—स्त्रीभव. डबड. 'हा लोक हो कसमसा करितो बकाया.' –अकक २. हरिराजकृत मुद्गलाचार्य विरचित रामार्याचें भाषांतर २६. [ध्व.]

**बकाबक-बकां**—क्रिवि. बुक्क्या मारतांना, ओकतांना, पोह इ० सुके पदार्थ घाईनें, उतावीळपणें खातांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन; भडाभड [ध्व.]

**बकाय-उमर-दराज**—स्त्री दीर्घायुष्याची शाश्वती. 'तेथील बन्दोबस्त जाल्यास बहुत दाब व लौकिक व बकायामूर-दराज.' –पया ४७६. [फा. बका-इ-उम्र्-इ-दराझ्]

**बकाया**—पु. शेष; बाकी; येणें असलेली बाकी रकम. 'फीचा पांच आणे बकाया मजकडेस आहे.' [हिं]

**बकार**—पु (उप) कामावरून काढणें; बरतर्फ करणें. (क्रि० देणें) (बरतरफीचें आद्याक्षर व यावरून). **बॅकार**–वि. (गो.) बेरोजगार; रिकामा; बेकार **बकारी**–वि. कामावरून काढून टाकलेला; बरतर्फ केलेला; बेकार. (क्रि० करणें; होणें). [फा. बेकार]

**बकारा**—पु गस्त घालणाऱ्याचा शब्द. 'काल रात्रीं बकारा ऐकूं आला नाहीं.' [हिं]

**बकाल, बक्काल**—पु. १ दुकानदार; व्यापारी; उदमी; धान्य, किराणा माल, कपडा इ०चा व्यापारी. बहुधा वाणी शब्दास जोडून प्रयोग. याचा एकेरी प्रयोग तिरस्कार दर्शवितो. 'दुकाळ त्यामधि बकाळ मंडळी ठकपरिस ठक भली।' –ऐपो ३७१. २ –न. दुकानदारांची मंडळी-कंपू-समुदाय. [अर. बक्काल=भाजीविक्या] ०वस्ती–स्त्री. दुकानदार व व्यापारी लोकांची वस्ती. **बकाली**–स्त्री. दुकानदारीचें काम; दुकानदारी; व्यापारपेशा. –वि. १ दुकानदारासंबंधीं. बकाल पहा. २ गचाळ; असंस्कृत; अव्यवस्थित (दुकानदाराची वही). ३ गयाळ; बिन टापटिपीचें (मनुष्य, काम, जागा).

**बकालणें**—उक्रि. बुकलणें; बुक्क्या मारणें. [बुकलणें]

**बकासुर**—पु. १ (ल.) एक राक्षस. २ (ल) अतिशय खादाड मनुष्य; अधाशीपणानें खाणारा इसम. [सं.]

**बकाळी**—स्त्री. एक जंगली फुलझाड.

**ब-किफायत**—क्रिवि. फायद्यासाठीं. –आदिलशाही फर्मान. [ फा. ]

**बक्री**—स्त्री. एक फुलझाड.

**बकी**—स्त्री. १ बगळ्याची मादी; बगळी. २ ( ल. ) पूतना. 'अजामिळ अघासुर गजवधू बकी पिंगळा।' –केक २. [ सं. बक ]

**बकुल-कुळ, बकुळी**—पुस्त्रीन. १ एक फुलझाड व त्याचें फूल; ओवळ; याचीं पानें आंब्याच्या पानासारखीं. फुलें लहान, पांढरीं, चक्राकृति व मध्यभागीं छिद्रान्वित. वास मधुर. फळें बदामाएवढीं, किंचित् गोड व तुरट. फुलांचा अत्तराकडे व सालींचा व बियांचा औषधाकडे उपयोग. लांकूड गलबताच्या उपयोगी. [ सं. बकुल ] **बकुळीचें फूल**–न. एक मुलींचा खेळ –मराठी खेळाचें पुस्तक पृ ३०७.

**बकोरा**—स्त्री. ( बे ) इरल्याच्या आंतील जाळी.

**बकोळी**—स्त्री. एका जातीचा सुरवंट. याचा रंग हिरवा असून हा उत्तर हिंदुस्थानांत आढळतो. –कृषि १७४.

**बक्कल**—पु. अडकवणें. ०**कान**–पु. विजारीचे काजे पाडलेले बंद. हे कोटाच्या गुंड्यांत अडकवले म्हणजे कोट व विजार जोडली जाते

**बक्काल**—बकल पहा.

**बक्(खत)र**—न. चिलखत. बक्तर पहा.

**बक्री(करी)द**—स्त्री. मुसलमानी जिल्हेज महिन्याची दहावी तारीख; बलिदानाचा दिवस; सण. [ फा. बकर्-ईद् ]

**बक्(ख)शी-षी-बक्षी गहूं**—पु. उत्तम जातीचा गहूं [ हिं ]

**बख**—पुस्त्री. १ बाजू; कूस. २ –न. बगल. [ सं. बक्ष ]

**बखत-क्त, बख्त**—पु १ वेळ; काळ; प्रसंग; हंगाम; ( शेवटचा अर्थ सोडून सर्व अर्थी ) वेळ पहा. २ ( ल. ) भाग्य; सुदैव. [ अर. वक्त ] म्ह० बखत पडे बांका तो गद्धेकु कहना काका=संकटाचे वेळीं तुच्छ माणसाचें सुद्धां आर्जव करावें लागतें. ०**वार-बार**–वि. दैवशाली; सुदैवी; भरभराटीचा, तालेवार. 'बख्तवाराची चाकरी करून मजुरा करून घ्यावा. याच उद्देशें आलों आहे.' –पेद ९.७७. [ फा. बखतावर; बख्त्-यार ] ०**वारी**–स्त्री दैवानुकूल्य; तालेवारी; सुदैव. 'ऐसे सक्तीनें बख्तवारीच्या बळें जोरावारी केली.' –रा १५.२४ [ फा. बख्तावरी; बख्त्यारी ] **बख्तियार**–वि. दैवशाली. आदिलशाही फर्मान. [ फा. ]

**बखतर, बखतऱ्या**—बक्तर पहा.

**बखतिर**—क्रिवि. मनाला. –आदिलशाही फर्मान. [ फा. ]

**बखं(खां)दणें**—स्त्री. ( राजा. ) कोंपरापासुन बरच्या बाहूनें प्रहार करणें. **बखं(खां)डी**–स्त्री. बरच्या बाहूनें दिलेला धक्का, प्रहार. ( क्रि० मारणें ).

**बखया**—स्त्री. रिकामी जागा; न व्यापलेली जागा ( खेड्यांतील, घराभोंवतालची इ० ). [ बखळ ]

**बखर-खेर**—स्त्री १ देशी भाषेंत, गद्यांत लिहिलेला इतिहास, कथानक अगर चरित्र २ हकीकत; बातमी. 'बखेर पादशाहास लेहून.' –रा १५.१३. ३ ( ल. ) अर्ज. [ अर. खबर ]

**बखल**—न. ( कों. ) १ फुटकें, पोंचटलेलें धातूचें भांडें. २ कपची; ढलपी; तुकडा. 'नारळाचें-डोकीचें-बखल उडालें.' [ भक्कल ]

**बखल**—स्त्री १ खोलगट जागा. २ तळ; बूड. ३ पोकळी. [ सखल ? [

**बखलणें**—सक्रि १ बुकण्या मारणें; बुकलणें; कुमलणें. २ ( महानु. ) ढकलणें. 'ब्रह्मादिकाचिया बरिपडी। बखलुनि कवणाचें ताट काढीं।' –भाए १३२. [ बख ]

**बखला**—पु १ निराळा केलेला पापुद्रा. २ साल, कवची काढणें; सोलणें. [ भकल ]

**बख(ख्ख)ळ**—स्त्री. १ उघडी, मोकळी जागा, अंगण. २ घरें इ० न बांधलेली किंवा लागवड न केलेली जागा. ३ पडून राहिलेली किंवा पडीक जागा; पडक्या घराची मोकळी जागा. ४ ( ल. ) विस्तीर्ण व वैराण प्रदेश; ओसाड जागा ५ घरांतील, त्या भोंवतालची रिकामी जागा. ६ ( विरू. भकाळी, भकाटी) उपासामुळें पोटाला पडलेली खळी, खळगा. ( क्रि० पडणें, बसणें ). ७ छपर, भुई इ०वरील पोकळ, खोलगट जागा (क्रि० पाडणें; पडणें). [ का. बक्कल=मोरी, गटार ] –वि. १ खुली स्वच्छ ( जागा ). २ पुष्कळ; विपुल; मुबलक ( संख्येनें, परिमाणानें ). 'त्या विहिरीला बखळ पाणी आहे.' [ भकळ ]

**बखा**—स्त्री. वजन; महत्त्व; प्रतिष्ठा; किंमत; पाड. 'मी यमाला भिणार नाहीं मग तुझी बखा काय !' [ अर. बका=किंमत ]

**बखाड**—पु. ( व. ) अवर्षण. [ सं. वर्षाव-वर्खावबखाव-ड ]

**बखाडी-टी**—स्त्री. शरीराची एक बाजू; मुख्यत्वें बरगड्यां खालचा प्रदेश. [ बख; तुल० सं. वक्षोस्थि ]

**बखारी**—स्त्री. (व.) सामान, अडगळ, धान्य वगैरे ठेवण्याकरितां भिंतींत, जोत्याखालीं केलेलें तळघर; बळद. [ बखार ]

**बखुद**—क्रिवि. स्वतःला. –आदिलशाही फर्मान. [ फा. ]

**बखेडा**—पु. १ कलह; वाद; भांडण; कटकट. २ त्रासदायक, चीड आणणारें काम. लांबा पहा. ३ सुरळीतपणें चाललेल्या कामांत आलेली अडचण, विक्षेप; दुर्दशा. [ हिं. ] **बखेडखोर**–वि. भांडखोर.

**ब-खैरियत**—क्रिवि. सुखरूप; सुरक्षितपणें. 'छ ११ रोजीं कहीं गेली ते बखैरीयतीनें येऊन पावली.' –चिरा २६.

**बखोटा**—पु. आंब्याचा सांधा; काखुटा. [ बख ]

**बख्शी–षी–बक्षी**—पु. फौजेचा मुख्य अधिकारी; सेनापति [फा. बख्शी] ०**गिरी**–बख्शीचा अधिकार; काम. [फा. बखशीगरी]

**बख्शी(षी)स, बक्षीस**—न. १ देणगी (हाताखालचे नोकर इ०स द्यावयाची). २ क्षमा; क्षमा करणें (क्रि० करणें; देणें) –वि माफ. [फा. बख्शीस्]

**बग**— स्त्री. (अशिष्ट) शरीराची बाजू; बगल. मुख्यत्वें विभक्ति प्रत्यय लागून उपयोग. जसें:–त्या बगेस, ह्या बगेस. [बख]

**बग**—वि. पर, पंख न फुटलेला; अजातपक्ष. [बख]

**बॅग**—स्त्री. १ थैला; थैली; पोतें. २ पिशवी; कसा. ३ (ल.) खलिता. [इं.]

**बॅग**—स्त्री. (गो.) कमीपणा. [सं. व्यंग]

**बॅगई**—स्त्री. (खा) झोपाळा; पाळणा [हिं.]

**बगड**—स्त्री. १ असडीक, न काडलेले तादूळ, करड २ भाताचा कोंडा. [बगडे]

**बगड–डा**—नपु. कमर; पाठीचा कमरेजवळील भाग. याचा प्रयोग पेकट, पेकाड, खट्टा या शब्दांप्रमाणें मोडणें, मोकळा करणें–होणें, ढिला करणें–होणें (सामर्थ्य, दम, गर्व इ० मोडून टाकणें) या क्रियापदांशीं जोडून तिरस्कारार्थी होतो. खट्टा (–पु.) पहा. [का. बगह=ओरखडणें, बगुु=वाकणें] ०**मोडया**–वि. मोडलेल्या पाठीचा; कमर कमजोर झालेला (निंदार्थी अशिष्ट शब्द). [बगड+मोडणें] **बगडा–ड्या**-वि. १ मुरडलेला किंवा वांकडा झालेला (बाहू, हात). २ हात वांकडा झालेला (मनुष्य) ३ (काव्य). सुंदर; देखणा; सुबक

**बगड भावार्थी**—वि. भगलभावार्थी पहा

**बॅगड**—पु. (कों.) एक प्रकारचा मासा

**बॅगडी, झाड बॅगडी**—स्त्री. मध्य आणि कांठ यांच्या दरम्यान पैठणीवर काढलेलें जरतारीचें नक्षीकाम किंवा वेलबुट्टी.

**बगणें**—बघणें पहा.

**बगदा**—पु (व.) पीठ; भुगा; लगदा [लगदा]

**बग(गै)र**—शअ. शिवाय; खेरीज; वांचून; विना.[फा. बिघैर]

**बगर–रा**—नपु. (विरू.) बगड, बगडा.

**बगरविणें**—सक्रि. (ना.) पसरविणें (बिछाना इ०).

**बगरा**—पु. (बे.) भाताबरोबर पिकणारा भातजमीनींतील जोंधळा.

**बगल**—स्त्री. १ काख. २ अंगरखा, बंडी इ०च्या बाहीला लावलेली कळी किंवा तिकोनी अगर चौकोनी पट्टी. ३ लंगड्या माणसाची कुबडी. ४–न. बाजू. ५(मल्लविद्या)जोडीदाराच्या उजव्या बगलेंतील खड्यांत जंघियानें मारणें. [फा. बघल] (वाप्र.) ०**देणें**–एका बाजूला होणें, सरणें. ०**मारणें**–१ सैन्याची एक बाजू पराभूत करणें, कापणें. २ एके बाजूस होणें, वाट देणें. 'आम्हांस गिरच्यानें वाट देऊन एकीकडे बगल मारून जाहला.' –भाब ११३. ०**दाखविणें, बगल–ला वर करणें**–आपल्या जवळ कांहीं नाहीं हें सिद्ध करण्यासाठीं बाहु वर करून दाखविणें; दिवाळें वाजल्याचें प्रसिद्ध करणें. **बगलेंत असणें**–१ (एखाद्याच्या) आश्रयाखालीं किंवा वशिल्याचा असणें. 'जो कोणा तरी थोर माणसाच्या बगलेंत असेल त्याला सारे लोक नमून असतात.' २ अंकित असणें; मुठींत असणें. **बगला मारणें**–क्रि. (कृषि.) डोळे, मोड, अंकुर पुसून काढणें; डोळे काढून टाकणें (एखादी वस्तु) **बगलेंत घालून चतुःसमुद्रांचें स्नान करून येणें**–(ल.) ती वस्तु आपल्या खिजगणतींत नाहीं असें धरून वागणें **बगलेंत धरणें**–आपल्या आश्रयाखालीं घेणें **बगलेंत मारणें**–छाती व बाहू यांच्यामध्यें दाबून धरणें; काखोटीत मारणें. **बगलेंतील गोष्ट**–स्वकपोल कल्पित गोष्ट. **(गोष्ट) बगलेतून काढणें**–खोटी गोष्ट बनवून ती खरी करून सांगणें; बात झोकणें; बनावट गोष्ट करणें. **ह्य**० तें काम, त्याच्या बगलेंतलें आहे=तें त्याला सहज करतां येण्याजोगें आहे याशिवाय जास्त वाप्र. साठीं काख पहा. सामाः शब्द– ०**थैली**–स्त्री. खाकेंत अडकविण्याची पिशवी. ०**बच्चा**–पु १ सर्वस्वी दुसऱ्याच्या तंत्रानें चालणारा; दुसऱ्याचा हस्तक. २ वशिल्याचा माणूस. ०**बंद**–पु. (अंगरखा इ०चा) काखेखालील आवळण्याचा बंद. [फा.] ०**बिल्ली**–स्त्री. १ लाडिकपणें वागविलेलें मूल, आवडतें मूल. २ (कांहींच्या मतें) काखमांजर. ३ (ल) वशिल्याचा मनुष्य. [हिं. बिल्ली=मांजर] ०**भावार्थी**–वि. दिसण्यांत गरीब, साधाभोळा पण संधि सांपडली कीं बगलेंत मारून लांबविणारा; भगलभावार्थी; कावेबाज. ०**भिस्ती**–स्त्री. १ चामड्याची पाण्याची पिशवी (पखाल) बगलेंत नेणारा याहून पाठीवर पखाल वाहणारा निराळा. २ (विनोदानें) शिजलेला परंतु अधिक दिवस ठेवल्यामुळें नासलेला भाजीपाला, दहीं इ० पदार्थ. [हिं. बगल बहस्ती] **बगला, बगलेक**–अ. (गो.) पाशीं, जवळ; कडे.

**बगलाविणें**–सक्रि. चोरलेला माल बगलेंत मारून चालतें होणें.

**बगली**–स्त्री. १ छातीला मांडीच्या घर्षणामुळें पडणारें क्षत, व्रण. २ (बगलेखालीं आणून) मुद्‌गल खेळण्याचा एक प्रकार. ३ कुस्तींतील एक डाव; आपला एक हात जोडीदाराच्या मानेवर ठेवून दुसऱ्या हातानें त्याच्या हाताचा पंजा धरून तो वर वळून बगले खालून जाऊन त्याला चीत करणें. ४ पाय घसरल्यानें उंटास होणारा रोग. ५ मल्लखांबाची एक उडी. –वि. वरील प्रमाणें घसणारा (उंट). **बगल्या**–वि. १ दुसऱ्याच्या हाताखालीं चाकरी करणारा; मुत्सद्दीस; हस्तक; अर्ध्यावचनांत, अर्ध्या मुठींत असणारा; पार्श्वक; होयबा; अंकित. ०**चोर**–पु. बाह्यतः प्रतिष्ठेनें वागून संधि मिळाली कीं बगलेंत मारून नेण्यास (चोरण्यास) तयार असलेला इसम.

**बगला**—पु विशिष्ट आकाराची आरबी नाव, होडी.

**बंगला**—पु. १ उन्हाळ्यांत रहावयाचें घर. २ विलासमंदिर. ३ टुमदार व चारी बाजूंनीं मोकळें असलेलें, एक किंवा दुमजली घर. [ हिं. ] ०**खातें**–न. इमारतखातें. ०**गाडी**–स्त्री. अंबारीवजा छप्पर असलेला जुना रथ. –ऐरापुप्र ९ ५१५.

**बंगला**—पु. (नां ) उत्तरहिंदुस्थानांत होणारी एक विड्याच्या पानांची जात. हीं पानें फार तिखट व उष्ण असतात. [ बंगाल ? ]

**बंगलाट–ठ**—न १ खोटा आरोप; कुभांड: आळ. ( क्रि० घेणें; घालणें; आणणें; उचलणें ) २ धाडसाची उलाढाल किंवा मसलत ( पैसा मिळविण्याकरिता केलेली ). **बगलांटी–ट्या, बंगला ठकार**–वि. १ ( रा. ) कुभांडखोर; खोटा आरोप करणारा. २ ( गो. ) खोटें बोलणारा. ३ साहसाच्या मसलती करणाराशीं संबंध ठेवणारा किंवा त्या स्वतः करणारा [ प्रा ]

**बगली**—स्त्री. ( वेरडी ) दाराच्या चौकटीजवळ हात जाण्यासारखें पाडलेलें भोंक. [ बगल ? ]

**बगलूस**—पु बगल. ' आपले बगलुसांतून मोरआंवळ्याचा डबा काढून. ' –मौनयौवना ४५. [ बगल ]

**बगवें**—न ( व ) लांकडी लहानशी पेटी, करंडा ( रत्नें इ० ठेवण्याकरितां ).

**बॅंगळ**—वि (गो.) अजागळ; कुचकामी [बेंगम्ळ] ०**पण**–न. ( गो. ) अजागळपणा.

**बगळा**—पु लहान कीटक व मासे खाणारा एक पक्षी. [सं बक]

**बगा**—पु १ प्रकार. ' परि तें एकबगी थोडें । ' –ज्ञा ११. ४०४. २ आकार. ' तैसा सैन्याचा यया बगा । मोडतां वेळ न लागेल पै गा । ' –ज्ञा ११.४६८. ३ संबंध ' आणिक पै दैवबगें । चित्त देती सांख्ययोगें । ' –ज्ञा १३.१०३९. ४ मार्ग. ' परी चोखी ते कैसी सांगे । पै घेवों जातां बोलबगें । कानींचियेही लागे । हातींचा मळु । ' –ज्ञा १८.७६९.५ देखावा. ' कां गंगायमुना उदक । वोघबगें वेगळिक । ' –ज्ञा १८ ५२. ६ पक्ष. ७ उपाधी. [ प्रा. ]

**बगाड**—न १ नवसाचा गळ; जमीनींत पुरलेल्या, चाकाच्या गाड्यांत पक्का बसविलेल्या खांबावरील आडव्या लांकडांत असलेला आंकडा पाठींत खुपसून त्यावर लोंबकळणें. ( क्रि० घेणें; लागणें ). खंडोबा इ० देव नवसास पावल्यावर नवस फेडण्यासाठीं देवापुढें हा विधि करतात; हल्ली हा विधि बंद केला आहे. 'गुदस्ता महाराचे बायकोनें हणमंताजवळ बगाड लाविलें ... ' –थोमारो २.१३५. २ वरील प्रकारचा नवस. ' दगडाच्या देवा बगाडी नवस । ' –तुगा २९७०.

**बगाड, बखाडी**—स्त्री. १ ( व. ) खाटेचा सांगाडा. २ (व.) मोट ओढण्याकरितां जीवर चाक बसविलेलें असतें अशी विहिरीवर लावलेली लांकडी चौकट. [ बख ]

**बगार, बगारणी**—पुस्त्री. बघार, बघारणी पहा

**बगार**—न. पहाडांतील खोरें.

**बगालभैरव**—पु. ( संगित ) एक राग. यात षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत हे स्वर असतात. जाति षाडव षाडव. वादी धैवत. संवादी ऋषभ; समय प्रातःकाल.

**बंगाली**—वि बंगाल संबंधीं; बंगालप्रातांतील (जिन्नस वगैरे ) [ हिं. बंगाली ] ०**केळ**–स्त्री. केळीची एक जात; हीं केळीं फार गोड व सुवासिक असून पिकल्यावर त्यांवर काळसर पिवळा रंग चढतो व सालीवर ठिपके असतात. ०**दृष्टबंधन–विद्या**–न. बंगाली जादू ' जसें ग बाई बंगाली दृष्टबंधन । ' –राला १३. ' नट ठकडे बंगाली विद्या घेतली सखे प्रियकरे । वळेंच वेड लाविलें । ' ०**सन**–पु हा सन मेषसंक्रांतीस सुरू होतो त्या संक्रांतीस सुरू होणाऱ्या महिन्यास वैशाख म्हणतात तामील प्रांतींत यासच चैत्र म्हणतात हा खिस्ती शकानंतर ५९३ वर्षांनीं सुरू झाला **बंगालें**–न मोठें व लांबोळ्या जातीचें वागें; त्याच्या देटाला कांटे नसतात.

**बंगालें**—न. नक्षत्रमाळा; ( लग्नांत वधुवरांच्या मिरवणुकीमध्यें न्यावयाच्या ) **बंगाळी**–स्त्री शूद्र लोकांच्या लग्नांत वधुवरांच्या मिरवणुकींत उंच काठीच्या वरच्या टोकास बाधून खालीं लोंबत सोडलेलें पागोटें.

**बगी**—स्त्री एक किंवा दोन घोड्यांची, दुचाकी किंवा चौचाकी गाडी, टांगा. ०**खाना**–पु. गाडीखाना.

**बंगी**—स्त्री. १ खांद्यावरून सामान इ० वाहण्याची कावड, भारयष्टि. २ बाहेरगावीं रेल्वे–पोष्टमार्फत पाठविण्यासाठीं माल भरून तोंड शिवलेला करंडा, पुडकें. [ हिं बहन्‌गी ]

**ब(गि)गीचा**—पु लहान बाग. [ फा. बाग्चा ]

**बगुणां–णें**—पुन. मोठ्या तोंडाचें–स्वयंपाकाच्या उपयोगाचें पातेलीसारखें धातूचें भांडें. **बगुणी**–स्त्री. पातेली; लहान बगुणें. [ सं. बहु+गुण ]

**बगें**—न. १ संबंध. ' रवी दुजेपण आलें । तोय बगें । ' –ज्ञा १५.३३८. २ आकार. ३ लूट. ४ हांवरेपणा. [ प्रा. ]

**बंगो**—पु. ( कु. ) एक जातीचा मासा.

**बगोटा–टें**—पुन. बाहुमूल; बाहुवटा; धडाला जेथून हात फुटतात तो भाग; हाताचा खुबा. [ हिं. ] **बगोटी–टें**–स्त्री.(कों.) (अशिष्ट) मान किंवा मानेचा मणका; नरडें; मानगुटी. **–धरणें, बगोटीस बसणें**–मानगोटी, गळा धरणें; पिच्छा पुरवणें. **बगोटें**–न. १ ( कों ) बगोटा पहा. ( क्रि० धरणें; ओढणें; छपटणें; दुखवणें ). २ बगोटी पहा.

**बग्गर**—क्रिवि. ( गो. ) एकसारखें; पुनःपुनः. [ सं. वर्ग ]

**बघ्रणें**—सक्रि. १ ( ग्राम्य ) अवलोकणें; पाहणें. २ –अक्रि. नजर लावणें; नजर फेकणें. [ सं. पश्य ! ]

**बघाटी**—स्त्री. ( ढोरी ) मोटेच्या घेरात पोटब्याच्या बाजूस कमी पडणाऱ्या भागास लावलेलें कातडें.

**बघार, बघारणी**—पुस्त्री.(व.) भाजी इ०स मसाला इ० घालून तापविलेल्या तेलाची, तुपाची यावयाची फोडणी. [ हिं. बगहार ]

**बघारणी**—स्त्री ( व. ) फुगवून सांगणें; अतिशयोक्ति करणें. 'बघारणी नको लावूस आपल्या बळाची.' **बघारणें**-सक्रि. १ बढाई, बाता मारणें. २ ( अन्न इ० ) शिजवून तयार करणें. 'आज काय काय बघारलें आहेनें ?' **बघाऱ्या**-वि. (व) बढाई मारणारा.

**बच**—स्त्री. चिनई मोत्यांच्या १२ लडी ( मोजण्याचें कोष्टक १ बच=१२ लडी ); एका लडींत ५० तें २०० पर्यंत दाणे असतात –मुंव्या १२१

**बच**—न. वेखंड. –अश्वप २.१०८.

**बचक, बचकण, बचका**—स्त्रीपु. १ ( राजा. ) ( राशींतून धान्य इ० घेण्यासाठीं ) पसरलेला पालथा कमलाकार हात; हाताचा कवळा; ( गो ) बचकॉ=पंजा. ( क्रि० मारणें ). २ भरलेली मुठ; बचक्यातून आणलेला पदार्थ ( परिमाण ). **बचकेंत पाणी धरणें**-(ल) अयशस्वी प्रयत्न करणें; अशक्य गोष्ट करूं पाहणें.

**बचकणा-णी**—वि. लहान; छोटेखानी; लहान मुलास योग्य ( वस्त्र, जिन्नस ). [ हिं. बचकाना ]

**बचकणी**—स्त्री. १ लहान मुलाचा रेशमी धोतरजोडा. 'सतरंज्या अति विस्तृता बचकण्या आलोकिलें चांदवे.' –साऊ १.४६. २ ( कों. ) मद्याचा शिसा. [ हिं. बचकाना. का. बच्चकणि ]

**बच-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. पाय चिखलांत बुडतांना, घसरताना होणाऱ्या आवाजाप्रमाणें ध्वनि होऊन. [ ध्व. ]

**बचकपट्टी**—स्त्री. लहानसें नुकसान, उणीव भरून काढण्याकरितां बसविलेला हलका कर, पट्टी. [ बचक+पट्टी ]

**बचका**—पु. ( राजा. ) बचक पहा.

**बचकुटी**—स्त्री. ( गो. ) गाल.

**बचडा-डी-डें**—पुस्त्रीन. (माणूस, पशु यांचें) लहान बच्चें; पिलूं; पोर; प्रायः लडिवाळपणें प्रयोग. 'गाईकी बचडी खाते।' –ऐपो ५०. [ सं. वत्स; फा. हिं. बच्चा ]

**बचतुर**—पु. ( गो. ) मूर्ख; बेअक्कल. [ बे+चतुर ]

**बचनाग-क**—पु. एक विषारी झाड व त्याचें मूळ. ही वनस्पति डोंगरांत किंवा ओढयाच्या कडेस होते. मुळया फार विषारी असतात. बचनाग शुद्ध करून रसायनांत वापरतात. 'किं बचनाग मुखीं घालिंगा। प्रथम गोड वाटे तत्त्वतां।' [ सं. वत्सनाभ; हिं. बचनाग ] **बचनागाची कांडी**-स्त्री. (ल) उपद्रवी माणूस

**बचबच, बचमंगळ**—स्त्री. गोंधळ; घाण; अव्यवस्था; गडबडगुंडा; बजबजपुरी; बेबंदशाही (काम, वस्तु, मनुष्यें यांची); अपमानास्पद दशा; हास्यास्पद अवस्था. 'अवघें बचमंगळ केलें। म्हणती एकाचें आपुलें.' –तुगा ६२१. [ ध्व. ] **०होणें**-बोभाटा होणें. **बचबचपुरी**-स्त्री. बचबच; गोंधळ; अव्यवस्था.

**बचबचीत**—वि. पचपचीत; गिलगिलीत ( चिखल, भात, तोंडीं लावणीं, फळें ). [ ध्व ]

**बचंभट, नाऱ्या**—पु. ( नाटय. ) पौराणिक नाटकांत विश्वामित्र इ० ऋषींचें सोंग घेणारा वृद्ध मनुष्य तो बचंभट, व त्या ऋषींच्या शिष्याचें सोंग घेणारा एक लहान पोर तो नाऱ्या. यास 'लटकीच्या नाऱ्या' असें म्हणतात. हीं दोन्ही पात्रें हास्यरसोत्पादक असत.

**बचाव**—पु. १ संरक्षण; तारण. २ सुटका; मुक्तता; तगणें; सुरक्षितपणें ( संकटातून ) पार पडणें; निभाव. ३ समर्थन. ४ उपाय [ हिं. बचाऊ ] **बचावणी**-स्त्री. रक्षण; बचाव; निभाव. **बचावि(व)णें**-सक्रि. १ राखणें; तारणें; संभाळणें. २ –अक्रि. वांचणें; सुरक्षित राहणें. [ हिं बचाना ]

**बचे(छे)री, बछरी**—स्त्री. फजिती; दुर्दशा; बेअब्रू; अपमान; उपहास; फच्ची; थट्टा; मस्करी; टर. (क्रि० करणें; होणें). [ प्रा. ]

**बचेली, बचली-चाली-च्याली**—स्त्री. अवदा; मुख्यत्वें ( पशु इ०चें ) खालचें आभाड. बेचाळी पहा.

**बच्चा-च्गा**—पु. १ लहान पोर; पिल्लूं ( मनुष्य, पशु इ०चें ). २ घेर वाढविण्यासाठीं अंगरखा इ०स लावलेला कापडाचा तुकडा कळी; जोड ३ जमीनींत खळी करून कवड्या, पैसे इ० खेळतात त्या खेळांतील एक शब्द. ४ गाडीच्या चाकाच्या मोठ्या झालेल्या भोकात बसविलेला ठोकळा ५ ( ल. ) पागोटें मोठें दिसण्यासाठीं किंवा त्यास घाम लागूं नये म्हणून वरील पागोटयाचे खालीं घातलेलें जुनें अथवा लहान पागोटें. [सं. वत्स; फा. बच्चा] **बच्चींबच्चीं**-नअव. लहान मुलें. **बच्चा( च्गा )जी-राम, बच्चमजी**-उद्गा. ( उपहास किंवा तिरस्कारार्थी शब्द ) राजश्री ! बेटया ! **बच्चेबाज**-पु. गुदमैथुन करणारा. **बच्चेबाजी**-स्त्री. गुदमैथुन; पुंमैथुन. [ फा. बचा+बाज ]

**बच्चा**—पु. ( कर. ) ( गोटयांचा खेळ ) बळया; दंड म्हणून घेतलेली गोटी. 'बच्चा टाक.'

**बच्छान**—स्त्री दुःखकारक स्थिति; गळहाटा; दैना. [ फा. बद्‌शान ]

**बच्या**—पु. ठुशीच्या किंवा वज्रटीकेच्या पेटीचे सर साधेसुत बसविण्यासाठीं माळेच्या मेरूप्रमाणें मधोमध घालावयाची विशिष्ट पेटी ( ठुशीचा बच्या मापटयाच्या आकारासारखा व वज्रटीकेचा चार गोलाकार मण्याच्या पेटीसारखा असतो ). [ बच्चा ]

**बछ(छे)डा-डी-डें, बछ(छे)रा-री-रें**—पुस्त्रीन. १ सामान्यतः गाय, घोडी, म्हैस, इ०चें पोर; शिंगरूं; वासरूं. २ मूल (लडिवाळपणानें उपयोग). [हिं. बचहिडा, बचहरा; तुल० सं. वत्स]

**बजडा-रा**—पु (काशी) एक प्रकारची नाव [हिंदी-बजरा]

**बजबज**—पु. (गो.) घोटाळा; बलबल; अनवस्था. **बजबजपुरी**-स्त्री. बचबच, बचमंगळ पहा. (गो.) बेजबेज. 'पाश्चात्य-विद्येच्या संसर्गानें आमच्या देशांत जी चोहोंकडे बजबजपुरी माजली आहे...'-नि ४४७. ०**करणें-माजविणें**-अव्यवस्था, घोटाळा, गोंधळ करणें. ०**मोडणें**-घोटाळा, अव्यवस्था घालविणें.

**ब-जमियत**—क्रिवि. सैन्यासह. 'तिकडे बाघ ब-जमियत आहे.' -ख १२.६३९९. [फा ]

**ब-जया, बजा-बज्या**—क्रिवि. १ ठिकाणीं. 'मादण्णापंत व अकण्णापंत म्हणजे ब-जया पादशाही.' -सभासद ६८. २ वस्तुतः 'श्रीमंत ब-ज्या स्वामीच.' -रा ६.५६९. [फा. ब-जाय्]

**बंजर, बंजर जमीन-रान**—बनजर पहा.

**बजरं(जां)ग**—पु. मारुती; हनुमान. [सं. वज्रांग] ०**बली**-पु. हनुमान्, मारुती. [सं. वज्रांगबलिन्]

**बजरबट्टु-बट्टू**—पु. १ एक ताडाचें झाड. हें सीलोन-मलबारकडे होतें पानें मोठीं असून त्यांच्या चटया, पंखे इ० करतात. २ त्या झाडाचें फळ अथवा बीं त्याचे मणी इ० करतात. हें औषधी आहे. ३ हनुमान्. ४ (ल.) खुटखुटीत व बळकट मुलगा. [सं. वज्रवटु; सिं. भचर बटु]

**बजवय्या**—पु वाद्यें वाजविणारा. [हिं.]

**ब-जा(जां)-जा-ज्या, ब-जाहां**—क्रिवि. १ रास्त; योग्य 'त्यास हे गोष्ट ब-ज्या आहे' -दिमरा १.५.२ मुकर; कायम. 'बजा आणिली (=केली)' -इम २३६. ३ स्वतः; खुद्द; जातीनें. 'सरदाराकडून काम रटेना तेव्हा बजाहां महाराज गेले.' ४ मार्फत, वतीनें [फा. ब-जा] ०**सावकार-धनी**-पु. स्वतःचे हिंमतीवर व्यापार, सावकारी इ० करणारा.

**बजाख-ग, बजागी**—वि. १ रागीट; तामसी. २ भांडखोर; भांडकुदळ; कजाख 'त्वरित उठ म्हणे हे कन्यकेला बजागी।' -सारुह ४.६१. [हिं. बजाक=एक साप]

**बजाज**—पु. कापडाचा व्यापारी; कापड विकणारा. 'सारे बजाज मिळून वर्षभऱ्या लुगडें एक.' -थोमारो २.२८९. [अर. बज्जाझ्] ०**खाना**-पु. वाण्यांची पेठ. 'इंदूरच्या बजाजखान्यांत गर्दी होऊन...' -विक्षिप्त १.५७ **बजाजी**-स्त्री. बजाजाचें काम; कापडाचा व्यापार. -वि, १ बजाज, त्याचें काम या संबंधीं. २ (कापडविक्यांच्या आपल्या मालाची स्तुति करण्याच्या चाली वरून ल०) दिखाऊ; बामडौली [फा. बज्जाझी]

**बजाडणें**—सक्रि. १ (व.) वाजविणें. २ (ल.) मारणें; चोप देणें [हिं बजाडना; तु० सं वादनम्]

**ब-जान(नी)ब**—क्रिवि. १ यांसी; प्रति. 'ब-जानीब कार्कुनानी हाल व इस्तकबाल.' २ कडे; बाजूस. [फा. ब-जानीब्]

**बजार**—पु. (व.) जिरें, लसूण, मीठ, मिरची इ० पदार्थ तेलांत तळून त्याचा पाटयावर वाटलेला ओला मसाला; बघार, बघारणी पहा. 'जरा बजारा पुरा न परि तुज उरावयाचा।' -अमृत ५३. [हिं. बघार]

**बंजारी**—पु (व.) वणजारी; एक जात व तींतील व्यक्ति.

**बजाव(वि)णें**—सक्रि. १ संपादणें; करून टाकणें; करणें. 'सुज्यायद्दौला यानीं खुर्निशात बजावून.' -रा ३.१८९. २ हडसून खडसून सांगणें; निक्षून फर्माविणें; सक्त आज्ञा करणें, ताकीद देणें. ३ वाजविणें (वाद्य) ४ (कायदा) हुकमाप्रमाणें करणें; अमलांत आणणें (हुकुमनामा, नोटीस इ०). ५ आठवण देऊन अंगीं लावणें (दुष्कृत्य, गुन्हा). ६ दुर्घट काम अंगावर घेऊन सिद्धीस नेणें [फा. बजा=जागीं, आवर्दन्=आणणें, हिं. बजाना] (वाप्र.) **बजावून ठेवणें, बजाजत लावणें**-(व.) सांगून ठेवणें. **बजावणी**-स्त्री. १ संपादणी; कार्यपूर्ति; तामिली. २ आज्ञा करणें; ताकीद. ३ वाजविणें (वाद्य). ४ अम्मलबजावणी; अमलांत आणणें. ५ शाबिती; अंगीं लावणें (गुन्हा).

**बजावर्द**—पु. पत्राच्या आरंभींचा फारशी मायना. याच्या पुढें पुष्कळदां 'मारूज मी दारद' (=नम्र विनंति करतों) हे शब्द येतात. मराठींत याचा स्पष्टार्थ कांहीं नाहीं [फा. बजा-आवर्दा=पुरा करून, आटोपून]

**बजिद-द, बजीत**—वि. १ निकड लावणारा. 'सेवक खानाजवळ या गोष्टीकरितां नित्य बजीद आहेत.' -रा १.३७. २ आग्रह करणारा; हट्ट धरणारा. 'कळम्बचे मुकामीं उभयतांस बजीद झालों कीं चलावें.' -रा ५.१७. ३ दीन; श्रमी. 'वेढा पडला म्हणोन घाबरेपणें गळा पडोन बजीद झाल तर यांणीं किल्ल्याचें कांहींच करणें नाहीं' -ख १.२१०. ४ हट्ट. 'विदुर यांस वर्तमान खोटेंसें समजल्यावर आपले जागां फार बजीद होऊन....' -ख १०५३२०. ५ जिंकलेला; पराजित; वश झालेला. [सं. विजित; फा ब जिद्द] **ब(बा)जीत-द होणें**-आग्रह करणें: कृपा भाकणें. 'बाजीद होऊन जमान देऊन' -भाद्विसंवृ ५०. **बजिदगी-बजि(जी)दी**-स्त्री. १ अजिजि; आर्जव. 'लाटसाहेब बहादुरानें तमाम बजिदगीनें लिहिलें' -रा १०.२५२. 'त्यांनीं वकील पाठवून बहुत बजिदी केली.' -ख १००६. २ विनवणीचा आग्रह. 'सत्वर येणें येविसी बहुत बजीदी केली.' -पेद १८.८८.

**बजिन्न(नं)स**—क्रिवि. १ धडधडीत; हेटकून; साफ; उघड-उघड. २ तात्पुरता. ३ मुद्दाम; दादून. ४ खुद्द; स्वतः; जातीनें; प्रत्यक्ष. 'त्यासी ब-जिन्नस नजरबेगखांजी यांणीही पत्र सेवेसी लिहिलें आहे.' -रा ८.२११.५ प्रत्यक्ष; हुबेहुब. 'लिहिलें आलें

त्याची ब-जिन्स नकल करून पाठविली आहे.' -ख ५.२२९८. ६ -वि. अस्सल; खरा; अकृत्रिम; चोख (सही, दस्तैवज, पावती, हजुवात, जमाखर्च, खातें इ० सोदा, लुच्चा, लबाड, चोर, हरामी इ०). [फा. ब-जिन्स्] ब-जिन्सही-क्रिवि. प्रत्यक्ष. -आदिल शाही फर्मान.

**बजेट**—न. पुढील जमाखर्चाचें अंदाजपत्रक; वर्षाच्या अगाऊ जमाखर्चाचें तपशीलवार पत्रक. [इं.]

**ब-जोरमर्दी**—क्रिवि. शौर्यबळानें; पराक्रमानें. 'बख्तसिंगजीनीं जोधपूर घेतलें तें ब-जोरमर्दीनें घेतलें.' -रा १०.२१९. [फा.]

**बज्जात-द्**—वि. (ना.) बदमाश; हलकट [फा. बे-इज्त]

**बट**—१ स्त्री. (अंबाडी, ताग, इ० कांचा) एकत्र जमविलेला अथवा विकण्यासाठीं तयार केलेला तंतूंचा समुदाय; पेड. २ -स्त्री. (ल.) केसांच्या जटा; वेणीचे पेड-आवळणारे केस. ३ -पुअव. डोकीवरील लहान व आखूड केस. ६ -न. एक प्रकारचें लोखंड. [सं. वट] ०वेणी-स्त्री. डोकीच्या बाजूच्या केसांच्या बटांची घातलेली वेणी.

**बट**—न. पाथरवटाच्या ठुलकीची पोलादी अणी; छिनी. [ध्व]

**बट्ट**—पु. १ लहान तट्टू. २ (कों.) खेळण्याची मोठी गोटी. -वि. लहान पण मजबूत. [सं. बटु]

**बट, बटला, बटलई-लुई-लोई**—पु. १ (व.) लहान लोटा; वाटोळ्या बुडाचें लहान घडीव भांडें; चरवी; कासांडी. 'माही पानी तायाची बटलोई दवडली.' 'स्माझी पाणी तापविण्याची चरवी हरवली. २ बुटकुली. 'बटलोईंत तूप ठेव.' [सं. बटु]

**बॅट**—पु. १ (गो.) देवीची प्रतिमा व मयूरपिच्छांचा गुच्छ घेऊन घाडपण करणारा. २ (ल.) (गो.) फटिंग.

**बॅट**—स्त्री. (क्रिकेट) मूठ असलेली दाडफळी; दांडू. [इं.]

**बटई**—स्त्री. १ एकाचें भांडवल व दुसऱ्याचे श्रम याप्रमाणें मिळून केलेल्या शेतीची पद्धत. २ खर्च व उत्पन्न दोहोंचा समसमान वाटा घेणें. ३ शेतीबद्दलची पाती; निम्मे हिस्सा. [हिं. बाटना=विभागणें]

**बटक(कु)ळ, बटकुली, बटकू(कु)र-कुरें**—नस्त्रीन. १ (निंदार्थी) बटीक; दासी; मोलकरीण. २ -पु. बटकीशीं संभोग करणारा. [बटीक] बटिकरी-बटकी, बटीक-स्त्री मूळची गरत असून पुढें व्यभिचारी झालेली स्त्री व तोच धंदा चालविणारी तिची मुलगी; दासी; मोलकरीण; कुणबीण. 'आहेत कितव पुष्कळ, पुष्कळ त्यांच्या गृहांत बटकीही।'-मोसभा ५ ३३ बटकीचा-पुअव. दासीपुत्र. (ग्राम्य शिवी). 'किती सांगों तरी न मानिती बटकीचे।' -वावि ४५०. बटक्या, बटुकऱ्या-रा-पु. दासीशीं संभोग करणारा. म्ह० देव झाले लटके ब्राह्मण झाले बटके. बटीक धंदा-काम-न. हलकासलका, दासपणाचा धंदा. बटीकपुरा-पु. गांवातील दुराचरणी स्त्रियाची पेठ; (सिवराळपणें) स्त्रियांचा जमाव. बटीकपोर-पु. बटकीचें मूल (मुलगा, मुलगी).

**बट(टा)की**—स्त्री टिमकी, दवंडी. 'गावांत बटकी वाजवून जाहीर दवंडी पिटीत.' -घका २०९. [ध्व.]

**बटंग**—पु. (कों.) (सोनारी धंदा) सळे, आंगठी इ० वर नक्षी करण्याचें साधन; एकप्रकारचा लोखंडी हातोडा. [ध्व]

**बटछपाई**—स्त्री. १ वजनें, मापें व नाणीं यांवर-तीं खरीं आहेत याबद्दल-सरकारी अधिकाऱ्यानें मारलेला शिक्का किंवा छाप. २ वजनें इ० वर छाप मारण्याबद्दल द्यावयाचा कर. 'मापें तेलांचीं, व गज यांचें बटछपाईचें काम.' -वाडसमा ३.२३३. ३ वरील शिक्का मारण्याचा हक्क. [हिं. बटछपायी]

**बटण**—न. कांच, शिंप, लांकूड इ० ची गुंडी; बिरडें. [इं. बटन]

**बटणावळ**—स्त्री. बट्टा; चलनी नाण्यांचा वर्तावा; अदलाबदलीची किंमत. [बट्टा] बटणें-अक्रि. अदलाबदल होणें (नाणें). बटविणें पहा.

**बट(टा)बट-बटां**—क्रिवि. एकदम निसटतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. [ध्व.]

**बटबटीत**—वि. मोठाले व विद्रूप (डोळे).

**बटमोगरा-री-रें**—पु. मोगऱ्याची एक जात व त्याचें फूल.

**बटलर, बुटलेर**—पु. यूरोपियनांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था ठेवणारा नोकर; बावर्ची. [इं. बटलर]

**बटली**—वि. हिणकस; निकृष्ट; बट्टा पडणारें (नाणें). [बट्टा]

**बटवट, बटवटणें**—बडबड, बडबडणें पहा.

**बटवडा**—पु. वांटणी; वांटणें; वेणें (मजुरी, पगार) [हिं. बाटना] बटवडेपत्रक-पत्र-न. पगाराचा, वांटणीचा तक्ता, पत्रक.

**बटवा**—पु. (सुपारी वगैरे करितां); झोळणा; चारपांच कप्प्यांची पिशवी. हिला झांकदोरा व उघडदोरा लाविलेला असतो; पैसे ठेवण्याचा कप्पे असलेला कसा. बटवी-स्त्री. लहान बटवा. [हिं. बटवा; का. बटवे]

**बटवाल**—वि. भ्रष्ट; दोषी; अनाचारी. 'बटवाल कुबुद्धी।' -दा २.३.३०. [प्रा.]

**बट(टा)विणें**—सक्रि. एका जातीचें नाणें देऊन त्याच जातीचें पण हलक्या किंवा भारी किंमतीचें नाणें बट्टा देऊन घेणें, नाण्यांची अदलाबदल करणें. ०वणी-स्त्री. नाण्यांची अदलाबदल. [बट्टा]

**बटाई**—स्त्री. बट्टा; बटाव; चलनें बदलण्याची किंमत, वर्तावा. [हिं. बट्टा]

**बटाई**—स्त्री. १ ऐन जिनसी सारा; निम्में उत्पन्न स्वतःस ठेवून बाकीचें निम्में सरकारास, मालकास देण्याचा ठराव. अर्धलीनें

घेणें. -मसाप २.१४०. २ वांटा. 'त्या गांवीची बटाई करावी.' -वाडबाबा १.२०७. [ हिं. बटयी ]

**बटांगा**--पु. ( सोनारी ) मणी करण्यासाठीं केलेले अर्धाले भाग; हे खाळण्यानें करतात.

**बटाटा-टें**—पुन. एक वर्तुलाकृति कंद. याचें उत्पत्तिस्थान दक्षिण अमेरिका. तेथून याचें बीं यूरोप व हिंदुस्तानांत आलें. [ स्पॅनिश, अमेरिकन, इंडियन बटाटा; इं. पोटॅटो ] **बटाटेभात**-पु. बटाटे व मसाले घालून स्वादिष्ट केलेला भात. -गृशि ३७४.

**बटाव-ऊ**—पु. १ बटाई; अदलाबदल, तिची किंमत; हुंडणा-वळ; बट्टा. २ बट्टा घेणारा. 'वाणी बटाव अनाथ दीन।' -भवि ४०.६१. [ हिं. बटाऊ ]

**बटाव-ऊ**--वि. स्वैर; दुराचारी; सोदा; बदफैली; ( मुख्यत्वें गाण्यांत, लावण्यांत रूढ ).

**बटी, बरटी**—स्त्री. एक प्रकारचें तृणधान्य

**बटु, बटुक**—न. १ मुंजीच्या कालापासून सोडमुंजीच्या वयांत येण्यापर्यंतच्या वयांतील ब्राह्मणाचा मुलगा; ब्रह्मचारी. २ लहान मुलगा. 'पुजी बळी मग म्हणे बटुवामनातें।'-वामन, वामनचरित्र ८. [सं ] ०**भोजन**-न. मुंजीमध्यें मुंज झालेल्या बटूंना दिलेलें भोजन. ०**वस्त्र**-न. मुंजीचे वेळीं बटूला अंगावर घेण्यास दिलेलें वस्त्र. ०**वामन**-पु बटु **बटुकरण**-न. उपनयनसंस्कार; मुंज.

**बटुरी**—स्त्री. वटवाघूळ. [ सं वट ]

**बटुवा**—पु. बटवा पहा.

**बटेर**—पु. एक गोजिरवाणा पक्षी; याचा रंग गवतासारखा असून वर काळया रेघा असतात.

**बटो**—पु. ( कु. ) डाग; कालिमा. 'कुळाक बटो लावलेयान.' [ बट्टा ]

**बट्ट**—पु. मानेचा उंच भाग. [ सं अवटु ]

**बट्टा**—पु. १ नाण्यांची बटाई; बटाव. २ डाग; कलंक; दोष; वैगुण्य. 'मराठींत ग्रंथ लिहून आपल्या इंग्रजी विद्वत्तेस बट्टा आणणें तर त्यांस अगदीं आवडत नाहींच' -नि २१. [ सं वृत्-वर्तन; सिं. भटा; हिं. बट्टा ] ०**लागणें**-कमीपणा येणें ०**खाऊ**, -**बट्टेखोर**-वि. १ कमी किंमतीचें; बट्टा देणें भाग असलेलें ( नाणें ). २ कालिमा, कलंक लागलेला ( माणूस, वंश, कुल ). ०**सट्टा**-पु.चलनी नाणीं बदलून देणें, घेणें. **बट्टाई**-स्त्री. बटाव, बटाई पहा. **बट्टाविणें-वणें** सक्रि बटविणें पहा **बट्टे होणें**-अक्रि. ( वे ) नासणें. **बट्टेबाज**-वि. १ कालिमा, कलंक लागलेला. २ शठ; सोदा; लुच्चा; धूर्त. ३ रंडीबाज, छिनाल; स्वैर (पुरुष अथवा स्त्री). 'तुम्ही तर बट्टेबाज तुम्हाला मी पाहिजे घटकाघटकी।' (चुकीनें उपयोग)बच्चेबाज; गुदमैथुन करणारा. ०**बाजी**-स्त्री. १ रंडीबाजी; छिनाली; स्वैरता ( स्त्रीची अथवा पुरुषाची ). २ सोदे-गिरी. शाठ्य. ३ बच्चेबाजी; गुदमैथुन.

**बट्टा**—पु. कापडाचा लहानसा तुकडा, चिंधी ( रत्नें इ० गुंडा-ळण्याकरितां घेतलेला ). [ हिं. बस्ता; सं. वस्त्र]

**बट्टी**—स्त्री. १ लहानशी ढेप अथवा वडी ( गुळाची इ० ). २ खोबऱ्याची वाटी. ३ साबणाची वडी. ४ चांदीची वीट. ५ ( सामा ) वाटीच्या आकाराचें भांडें इ० [ हिं ]

**बट्टी, बाटी**—स्त्री. ( खा. ) एक पक्वान्न; रानशेणींत भाज-लेले कणकीचे गोळे. हे कुसकरून, तूपसाखर घालून त्याचे लाडू करून खातात किंवा वरणाबरोबर नुसतेच खातात. [ सं. वटिका ]

**बट्टीदार**—वि. ( ना. ) भरीव ( फळ इ० ).

**बट्ट्याबोळ**—पु. १ गोंधळ; गडबड. २ ( कर. ) त्रास.

**बॅठँ**—न. (गो ) न वाळतां तयार केलेला भात. -वि. ( गो. ) निरर्थक.

**बठ्ठ**—वि. १ मंद व आळशी; मठ्ठ. २ सुस्त [ मठ्ठ ]

**बठुर**—वि. ( व. ) टणक; कडक; जून; निब्बर.

**बठ्ठा**—पु धरणें घेऊन बसणें (तगाद्याकरितां, भिक्षेकरितां इ०). (क्रि० घेणें). [ हिं बैठा ]

**बठ्या**—वि. ( व. ) १ चालतांना मध्येंच बसणारा ( बैल ). २ (व.) बसून किंवा काम न करितां खाणारा. [ हिं. बैठा ]

**बंठ्या**—पु. ( व. ) गब्रू; लठ्ठ.

**बड**—पु धन काढण्याकरितां सारख्या आकाराच्या मोत्याचें वेगवेगळें वजन करण्याची क्रिया.

**बॅड**—वि. ( गो. ) वांशिक; परंपरेचें.

**बंड**—न. धरण; बांध; बंधारा. [ इं. ]

**बॅंड**—पु एक इंग्रजी वाद्य; वाद्यसमूह. [ इं. ]

**बंड**—न. १ सरकारविरुद्ध उठावणी; दंगा; बेदा २ टोळी अथवा कंपू ( बंडखोर, लुटारू, दरवडेखोर यांचा ). ३ साधुत्वाचें सोंग, ढोंग; थोतांड 'ज्यासी माझे प्राप्तीचें कोड। तो वांछी बंड। ऋद्धिसिद्धीचें।' -एभा १५.१८५. ४ पाखाड मत. 'भेदावीं स्वानुभवें वेदांतीं असीं सुखें बंडें।' -मोअश्व ३.७७ ५ आघात -मनको ६-पु दंगेखोर; राजद्रोही; पुंड; लुटारू. ७ तोतया; खोटें ढोंग करून सिंहासन बळकावणारा. ८ आडदांड; हट्टी; खट्याळ; दांडगाई करणारा मुलगा. ९ उन्मत्त; मस्तवाल मनुष्य. 'बंड पाषांड तस्करू। अपहारकर्ता।' -दा २.३.१९. १० खूळ. 'लोकभ्रमाचें बंड अडाण्यांत आहे.' [ फा. बंद ] ०**खोर**-वि. दंगेखोर; राज द्रोही ०**फरोशी**-वि बंडेफरोशी पहा. ०**वाला**-पु. बंडखोरांच्या टोळीपैकीं एक; बंडखोर; लुटारू. **बंडेफरोशी**-वि. १ बंडखोर; दंगेखोर; राजद्रोही; बेबंद. २ द्वाड; फार त्रास देणारा. [ फा. ]

**बडक**—न. (गो )म्हातारें जनावर, मरावयास टेकलेलें जनावर. [वर्द्धक ?] **बडक आवप**-क्रि. (गो.) रोड व म्हातारें होणें. **बडक-ग**-न. १ ( गो. ) गाईचें प्रेत. २ -वि. बडका; अतिशय रोडाव-लेला. **बडकुंचें**-क्रि. ( गो. ) कृश होणें.

**बडका**—पु. बेडका; कफासहित थुंकी. [ध्व.]

**बडखुला**—पु. (राजा.) एखाद्याच्या हाताखालचा नांवाचा मदतनीस परंतु स्वतः शंख किंवा मूर्ख; नामधारी मदतनीस; धेडा. [बडा+खुळा]

**बडगा**—पु. १ सोटा; दंडुका (क्रि० मारणें) २ एक झाड म्ह० मांजरानें दूध पाहिलें पण बडगा पाहिला नाहीं ०दाखविणें-(ल.) स्वकार्य साधून दुसऱ्यास ठकविणें

**बडगा**—पु (व) पोळ्याचे दुसरे दिवशीं एका मडक्यांत कवड्या, बिब्बे, केंस, फुलें, डांस, पिसवा, हळदकुंकू घालून तें मोठ्या पहांटे कोणास न दिसतां दूर गावाबाहेर नेऊन फोडतात व आंतील पदार्थ जाळून, टाकतात. हा विधि केल्यानें कोणतीहि पीडा, रोग इ० होत नाहीं असा समज आहे. रोगराई नेरे बडग्या नेगे मारवत्त किंवा इडापिडा खासी, खोकला घेऊन जारे मारबोद असें सकाळीं व ढेकूण पिसवा, डास घेऊन जारे बडग्या असें सायंकाळीं ओरडतात; मडकें फोडणें. **बडग्या**-पु. (ना) मारबदीच्या मिरवणुकींतील पुरुषरूप प्रतिमा

**बडगा-गी**—पु.स्त्री. (कु.) चवळी धान्य. ही गोमातकांत पिकते. दाणा उडदायेवढा असुन रंग तांबूस असतो.

**बडगी**—पु. (बे) सुतार

**बडण**—न ब्राह्मणांतील कुळाचार; प्रतिमंगलकार्यानिमित्त करावयाचें कृत्य. बोडण पहा. यांत कणकेचे केलेले वेण्याफण्यादि अलंकार व तेलच्या इ० पांच अन्नें एका पाटींत भरून तींत कणकेचा दिवा लावून ते सर्व झांकून देवीपुढें ठेवतात. पांच सवाशणी जेवणास बोलावून त्यांस हळदीकुंकूं, दक्षिणा देतात. हें बडण दुसरे दिवशीं सासुरवासिनीनीं खावयाचें असतें. बडणाच्या आदले रात्रीं गोंधळ असतो. माहेरवासिनीनें बडणांतील दिवा पहावयाचा नसतो अथवा अन्न उष्टवावयाचें नसतें. -मसाप १.२७३ [सं. बल्=धान्य साठविणें; जपणें, बडन-ण; सं. वर्धनम्]

**बडतर्फ**—वि. बरतरफ, पदच्युत; काढून टाकलेला. [फा. बर्तरफ्] **बडतर्फी**-स्त्री. बरतरफी; पदच्युतता.

**बडती**—स्त्री. बढती पहा.

**बडदा**—पु. जिभेस झोंबणारा एक पांढरा कंद. हा डांग प्रांतांत होतो.

**बडदी शेंग**—स्त्री. (तंजा.) शेवग्याची शेंग.

**बडबड**—स्त्री. १ वटवट; बकबक; जल्पना; टकळी. २ बेशुद्धींत बोलणें, बरळणें. [ध्व.] **बडबडया**-वि. बडबड करणारा; बोलघेवडा. (गो.) बक्षबक्षॉ. **बडबडणी**-स्त्री. बडबड अर्थ १, २ पहा. **बडबडणें**-१ वटवट करणें; टकळी चालविणें; निरर्थक भाषण करणें. २ चावळणें; बरळणें. ३ (गो.) बक्षबक्षचें.

**बडबडा**—पु. (व.) गवताची एक जात.

**बडबडीत**—वि पीठ अधिक झाल्यामुळें स्वादरहित झालेलें; बिघडलेलें (कढी, सांभारें इ०).

**बडंबा**—पु व्यर्थ गलबला; कोलाहल; बडबड. 'मग नामरूपाचा बडंबा। करिती वायां।' -ज्ञा १५ २७६. [प्रा.]

**बडबीज**—न. १ कमळाच्या एका जातीचें बीं; मखाणा. २ (लहान बीजामधून विस्तृत होणाऱ्या वटवृक्षावरून ल) मोठा विस्तार; अतिविस्तृत स्वरूपाचा धदा अथवा अतिशय गुंतागुंतीचें व त्रासदायक काम ३ अतिशय उत्पन्नाचीं कांहीं विशिष्ट धान्यें. ४ आया-बहिणींना शिव्या देणारा निर्लज्ज मनुष्य [बड+बीज]

**बडम**—न. १ पांचसहा भाज्या एकत्र शिजवून तयार केलेली पातळ भाजी. २ (कर.) अनेक खाद्यपेयवस्तूंचा संग्रह.

**बडमी, बडंमी**—स्त्री. लहान गंजी (गवत, कडबा, करडई इ० ची); लहान रास.

**बडयेर काढप**—अक्रि. (कों.) मारीत राहणें; झोडपत बसणें.

**बंडल**—न. गांठोडें; गठडें; मोटली. [इं]

**बडवडणें**—सक्रि. (अशिष्ट) (प्र) वडवडणें, ओढवणें.

**बडवणी**—स्त्री. १ ताडन करणें; मारणें; झोडपणें, आपटणें. २ बडवण्याचें, मारण्याचें हत्यार) (चोपण्याझोडण्याची काठी इ०) ३ जोंधळ्याचीं अगर बाजरीचीं कणसें बडवून दाणे काढणें. [ध्व बडविणें] **बडवणें**-न. बडवण्याचें साधन; ठोकणें; चोपणें; सोटा. **बडव(वि)णें**-सक्रि १ चिरडणें; ठोकणें. २ झोडपणें; मळणें (धान्य) ३ काठीनें मारणें; दांडकणें. (गो.) बडवचें, बडौचें ४ खच्ची करणें (बैल इ०चा अंड एका भक्कम दोरीनें आवळतात. आणि दोराच्या दोन्ही बाजूस दोन मुसळें बांधतात, वृषणाच्या खालच्या मुसळावर पाय ठेवून वरचें मुसळ वर ओढतात व पद्धतीनें वृषणाच्या शुक्रवाहिनी शिरा ठोकतात. त्यामुळें वीर्यस्तंभन होऊन वृषण बारीक होतें). ५ जोरानें आपटणें (चिरगुटें-दगडावर धुतांना). ६ लांब, लंबे करणें. [सं. वृध्; का. बडि] **बडवण्या**-स्त्रीअव. (जोराच्या पडणाऱ्या सरीवरून) मूळ नक्षत्रावर पडणारा पाऊस. **बडवा-व्या**-पु. पंढरपूरच्या विठोबाचा ब्राह्मण पुजारी. 'कुसुम वाटिके माजी बाळ। बडवियासंगे पातला।' मु हरिश्चंद्राख्यान ३८५. [बडविणें, ठोकणें, दांडकणें-देवाभोंवतीं गर्दी करणाऱ्यांना बडवे काठीनें बडवून मागें सारतात] **बडव्याचा**-वि. झोडलेला; काठीनें बडविलेला. याच्या उलट खळ्याचा तुडविलेला; (धान्य, दाणा). [बडविणें]

**बडवा(वे)वार**—पु. (गो.) बढाई; बडेजाव, आढ्यता [प्रा.]

**बडवार**—पु बडिवार पहा.

**बडस**—पु. कफाचा, शेंबडाचा बेडका.

**बडसवें**—क्रि. (गो.) मेजवानी देणें.

**बडहंस**—पु. (संगीत) सारंगाचा एक प्रकार. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात जाति षाडव-षाडव. वादी पंचम. संवादी षड्ज गानसमय माध्याह्न. [ सं. ]

**बडा**—वि. १ मोठा; थोर. २ जंगी. म्ह० १ बडा घर पोकळ-वांसा. २ बडे बापके बेटे=बापाच्या मोठेपणावर डौल मिरविणारा मनुष्य. 'विलायतेंतून आणलेल्या गव्हर्नरांमध्यें बडेबापके बेटे आणि कपाळकरंटे पुष्कळ आहेत.' –केले १.१८१. [ सं. वृद्ध; प्रा. वड्ढो, वड; हिं. बडा ] **बडीस्वारी**–स्त्री. (ल.) ढेंकूण. –राको

**बंडा**—पु १ एका जातीच्या अळवाचा कांदा. २ ढटकर; टोला; रोडा. ३ (व.) धान्य वगैरे सांठविण्याची जागा; कोठार.

**बॅडॉ**—पु. १ (गो.) न सोललेली सुपारी. २ (गो.) ठरलेली बिदागी.

**बडाई, बडाव**—स्त्रीपु. बढाई, बढाव पहा.

**बंडाई**—स्त्री. राजद्रोहाचीं, पुंडाईचीं, कायद्याविरुद्ध कृत्यें.

**बंडाळ-ळी**—स्त्री १ क्षोभ; हूल; सार्वजनीक अव्यवस्था. २ गोंधळ; दंगल (कामाची, माणसांची). ३ (एकमत नसल्या-मुळें किंवा द्रव्यादिकांच्या अभावामुळें होणारें). दुःख; अडचण; ओढघस्तता; तारंबळ; गैरसोय; हयगय. 'त्याचे घरीं जेवणाची बंडाळी असते.' –वि. ओढगस्त. 'या नात्याच्या गुंडाळ्यानें गुंडाळुनि बंडाळचि झालों.' –अमृत १६.

**बडि-डी, बडिया, बडियाना, बढिनाग**—पु. कवड्या साप. 'दोराचिया सापासी। डोंबा बडीना गव्हाळा ऐसी।' –ज्ञा ७.१६३. [ प्रा. ]

**बंडि**—स्त्री. (ना.) एक प्रकारची बैलगाडी; लढे.

**बडि(डी)याळें**—न. (गो.) मधाचें लहान पोळें.

**बडिवार**—पु. १ थोरवी; वैभव; तेज; महत्त्व; श्रेष्ठता; कीर्ति. (क्रि० सांगणें; हाकणें; गाणें; आणणें; दाखविणें; लावणें). 'तुका म्हणे तुझा ऐसा बडिवार। शिणे फणीवर वर्णवेना।' २ निंदा कर्तव्य असतां अतिशयोक्तीनें वर्णिलेला मोठेपणा; प्रौढी. 'याची बायको सारा दिवस बडिवार सांगत असत्ये.' ३ डौल. 'ऐसें बडिवारें बोलत।' –गुच ४४.२४. [ फा. बडि+वार ]

**बडिश**—न. मांसे धरण्याचा गळ. 'विषयमहाग्रहाचे तोंडीं। मीं सांपडलों बडिशपिंडी।' –एभा २०.३५०. [ सं ]

**बडी**—स्त्री. १ (राजा) आंकडी; शेकाटी; शेकाटा. (फळें, फुलें काढण्याचा). २ (कों.) काठी; छडी. ३ (कों.) दांडी (सोवळें वाळत घालण्याची) (कु.) ४ गवत गोळा करण्याची टोंकदार काठी. ०**हातांत घेवंप**–(गो.) मारण्यास हात उगारणें.

**बंडी**—स्त्री. १ बंददार व घोळ नसलेला कमरेपर्यंतचा अंग-रखा; बाराबंडी. २ (खा.) परकर नेसल्यावर डोकीवरून पदर घेण्याचें वस्त्र.

**बंडी**—स्त्री. (व.) एक प्रकारचा लांब गाडा; दमनी; छकडा, सामानाची गाडी. त्याला लहानगड असेंहि म्हणतात. [ ते ]

**बंडी-ड्या**—वि. १ बंडखोर; बंडखोरांच्या टोळीचा पुढारी होण्यास नेहमीं तयार असणरा; नवेंच लचांड उठविणारा. २ अवखळ; स्वच्छंदी; हट्टी; दुराग्रही (विशेषतः मूल). [ बंड ]

**बडीव**—वि. बडविलेला; सूत भरण्यासाठीं बडवून साफ केलेला (जोठ इ० वस्त्र). बडवीव, (प्र.) [ बडविणें ]

**बडीशे(शो)प**—स्त्री. एक औषधी धान्य. या झाडाचीं पानें बारीक कोथिंबिरी सारखीं असतात झाडाच्या तुऱ्यास बडीशोपेचे दाणे येतात. यांचा उपयोग मसाल्यांत करतात. अर्क अमांशावर गुणकारी आहे. [ हिं. बडीशोफ ]

**बडे(डि)जाव**—पुस्त्री. प्रतिष्ठा; उत्कर्ष; मोठेपणा; आढ्यता. 'ज्याला मिळेना भाकर अर्धी। त्याला बसायाला घोडी जर्दी। त्याचे बडेजाव आठचारदी। सर्वेच त्यावर झाली गर्दी।' –अ. राजाच्या मिरवणुकींतील चोपदारांची पुढें चला! वाढा! वैभवांत नांदा इ० अर्थाची ललकारी. [ हिं बडेजाव-ऊ ] ०**करणें**–क्रि, एखाद्याचा गौरव करणें; त्याची प्रतिष्ठा वाढेल असें करणें.

**बडेल**—न, वडे तळलेलें तेल. बढेल पहा.

**बडोदा**—पु. (कर.) वरगा; दोन्ही भिंताडापर्यंत असलेला अखंड वासा, वरगा पहा. 'घराला बडोदे घातले आहेत.'

**बड्याबाजेचा ढेंकूण**—पु. (ल.) स्वतःची लुच्चेगिरी, ढोंग नाकबूल करण्यांत शेखी मिरवणारा; शेंदाडशिपाई.

**बढ(ढा)ई**—पु. सुतार. [ सं. वर्धकि; हिं ; का. बडिगे ]

**बढत**—स्त्री (संगीत) लहान लहान स्वरसमुदायांनीं एक एक दोन दोन स्वर नवे घेऊन तयार केलेली तान; आलाप. [ हिं. ]

**बढती**—स्त्री. १ वाढ; वृद्धि; चढती कळा. २ प्राप्ति; लाभ. [ हिं. ]

**बढया**—पु. १ (कों.) शिपाई. २ गाडीच्या दांड्या उच-लून ज्यावर ठेवतात ते शिपाई प्रत्येकी; घोडा. –मसाप २.२५२.

**बढर**—नपु. एक झाड व त्याचें फळ.

**बढाई-इकी, बढाव**—स्त्रीपु. आत्मस्तुति; फुशारकी; प्रौढी. बडिवार पहा. (क्रि० सांगणें; करणें; दाखविणें; मिरविणें). [ हिं. ] (वाप्र.) ०**भोगणें**–क्रि. फुकटच्या मोठेपणाची कीर्ति उपभोगणें किंवा त्याचा डौल घालणें. ०**मारणें**–क्रि. तशी स्थिति नसतांना आपला मोठेपणा सांगणें. ०**ई(य)खोर**–वि. शेखीबाज; फुशारकी मारणारा; नसती प्रौढी सांगणारा.

**बढे(ढ्ये)ल**—न. १ (कों.) वडे, घारगे इ० तळून कढईत राहिलेलें तेल. २ (ल.) तळून राहिलेलें तेल. ३ (व.) फोडणी (जिरें; मोहरी इ० घालून) दिलेलें तेल. ४ –वि. (व.) ताप-विलेलें (खाण्याच तेल). [ वडा+तेल; वड=व्याड+तेल ]

**बळ्या**—पु. (कों.) आखूड व घणसर लांकडाचा तुकडा; सोटा; दांडकें.

**बणक**—स्त्री. (गो.) केवडयाचें झाड व पान.

**बॅणखॅण**—स्त्री (गो) तुरुंग; कैदखाना. [ बंद+खण ]

**बणगी**—स्त्री. १ बाजरीचें गोंड, कचोळें. २ बाजरीचा बारीक दाणा. ३ अशा दाण्यांची लहान रास, ढीग. ४ (कों.) एक लहान उडवी, गंजी (गवत, भात, वरी, नाचणी इ० च्या पेंढयांची) [ का. ]

**बणवी**—पु. वणवा. [ वणवा ]

**बणा**—पु. (वे.) उंसाच्या शेताचा भाग.

**बॅणॉ**—पु. (गो.) फणस लवकर पिकण्यासाठीं त्याच्या देंठा-जवळ ठोकतात तो खुंटा.

**बणीम**—पु. (माण.) कडब्याचा एकत्र रचलेला ढीग.

**बण्या**—पु. बाणदाराचें हत्यार. [ बाण ]

**बत**—न. ऊन, सुर्याचे प्रखर किरण -शर.

**बत**—पु. खेद. [ सं. प्रा. ]

**बत-अद्दी**—क्रिवि. जबरदस्तीनें. -आदिलशाही फर्मान.

**बतक**—स्त्री. एक प्रकारचें पाण्याचें भाडें (मातीचें, काचेचें).

**बतक, बतका, बतखल**—बदक; बदका; बदखल पहा.

**बॅतकाठी**—स्त्री. (गो.) अंगांत संचार झालेल्या माणसानें हातांत घेतलेली काठी. [ बेत, वेत ]

**ब-तंग**—वि. जेर; लाचार, गतिहीन. 'चौफेर फौजा ठेऊन तीनचार दिवस बतंग केला.' -रा ४.५२. [ फा. ब-तङ्ग ]

**बतणें**—अक्रि. (कों.) (गोटयांचा खेळ) एका गोटीपासून दुसरी गोटी अमुक अंतरावर रहावी हा नियम मोडून तिचें अंतर सुटणें, खेळण्याच्या उपयोगी नाहीं अशा जागीं येणें. वीत, पाऊल इ०चे अंतरानें गोटयांचें बतणें होत असतें.

**बतना-बताणा-ना, बताडा**—पु. बच्चा पहा. मोठया पागोटयांत घालावयाचें आंतील पागोटें. 'तिवट चुनडी समेत बतना व तुरा मुकेसी।' -वाडसमारो १.११९. [ का. बॅट ]

**बतमतेल**—न. बुंदाचें, कॉफीचें तेल. -अश्वप २.१०८.

**ब-तरीक**—भ. १ नियमाप्रमाणें. 'यास्तव पुण्यासंनिध स्थळ निर्वेध बतरीक करून द्यावें.' -वाडबाबा १.५५. २ म्हणून. 'त्यास ब-तरीक नजरबंद ठेविले आहेत.' -दिमरा १.१२२ ३ दाखल. 'ब-तरीक मेजवानी म्हणून हत्ती एक घोडा दिल्हे.' -दिमरा १.११४. [ फा. ब-तरीक् ]

**बतवा**—स्त्रीअव. (कु.) बाता; गप्पा. [ बाता ]

**बता**—पु. (राजा.) विरू. बत्ता (कुटण्याचा). 'चूर्ण करील तुम्हाला धर्म बता, भंगवेश हा खल हो।' -मोभीष्म १.२१.

**बॅतॉ**—पु. (गो.) साखी पेटी.

**बताण**—न. (नाविक) पट्टणास फळया बसवितेवेळीं त्यामध्यें राहिलेला पोकळ भाग-पोकळी वांकें घालतांना लांकडांनीं भरून काढणें.

**बताणा-डा**—वि. सामान्य रीतीपेक्षां आकार इ०नें मोठा; विशाळ; अवाढव्य; अफाट; प्रचंड.

**बताजांव**—पु. (गो.) लष्करी पलटण [ पोर्तु. बॅटल्हो; इं. बॅटॅलियन ]

**ब-तारीख**—भ. तारखेस 'ब-तारीख छ० २' -रा १६. ५९. [ फा. ]

**बताल्या**—पु (व.) बडबडया [ बाताडया ]

**बतावणी**—स्त्री १ अभिनय करणें; सोंग घेणें, आणणें; वेष धारण करणें. २ हावभाव; अभिनय; भाषण. ३ सोंग; ढोंग; बहाणा; थाप. ४ बजावून सांगितलेली गोष्ट ५ कीर्दीवरून केलेली जमाखर्चाची कच्ची खतावणी. [ हिं. ] **बतावण्या**-वि. नट; मुख्यत्वें रंगदार अभिनय करून हास्योत्पादक सोंग आणणारा. [ बताविणें ] **बतावि(व)णें**-सक्रि. १ अभिनय व हावभाव करून सोंग आणणें. २ तिखटमीठ लावून सांगणें; अतिशयोक्तीनें किंवा सजवून वर्णन करणें (एखाद्या देवाची, वीराची दंतकथा). (क्रि० सांगणें; दाखविणें; बतावून सांगणें-दाखविणें) ३ दाखविणें ४ धमकी देणें. [ हिं बताना ]

**बता(त्ता)सा**—पु. साखरेच्या पाकाची फुग्यासारख्या पदार्थाची मिठाई. [ हिं ] **बत्तासफेणी-नी**-स्त्री. एक प्रकारची मिठाई [ हिं. ]

**बॅताळ**—पु (गो) वेताळ; अकाळविकाळ माणूस [ वेताळ ] ०**वक्रो**-पु (गो) धटिंगण, लाबरुंद माणूस.

**बती**—स्त्री. (विरू.) बत्ती पहा.

**बतेला**—पु. १ पन्नास ते पाचशे खंडी वजन नेणारें जहाज, गलबत; कच्छी, खारवी वगैरे लोकांचें गलबत. 'बतेला सावकारी रूपोरल इंग्रज मुंबईकर याजकडील.' -वाडसमा २ ६१ २ (कों.) पडाव. [ पोर्तु. बातेलॉ ]

**बत्ता-त्या**—पु. १ (कों) कुटण्याचें, खलण्याचें दगडी किंवा लोखंडी साधन; दस्ता. २ गोटयांच्या खेळांतील एक शब्द. बतणें पहा. ३ मोठें तपेलें (भातचें, वरणाचें). ४ (ओतकाम) पोकळ समईच्या मधला भाग ओतण्यासाठीं उपयोगांत आणलेला लोखंडी बार. [ प्रा बत्त; फा. बत्ता ]

**बत्तिशी-सी**—स्त्री. १ बत्तिसांचा समुच्चय उदा० (अ) दांतांची संख्या; (माणसाच्या तोंडांत एकूण बत्तीस दांत असतात त्यावरून) दातांची कवळी. 'पूषाची पाडोनि बत्तिशी। घातली होमीं।' -कथा ३.११.१५३ (आ) वयाची बत्तिशी; बत्तीस वर्षे वयाचा काळ. 'आम्ही बत्तिशींत होतों तेव्हां पांच मणांचें

ओझें उचलीत होतो.' (६) तागयाची, जाळयाची लांबी. उदा० बत्तीस हात लांबीचा तागा. २ (ल) बोलणें; भाषण: भविष्य. 'तो बोलला होता कीं तुमचें कार्य होईल त्याप्रमाणें कार्य झालें तस्मात् त्याची बत्तिशी चांगली आहे.' ३ स्त्रियांचें एक व्रत; बत्तीस पौर्णिमा. [बत्तीस] म्ह० तेहतिशी करीत नाहीं अशी बत्तिशी करिती!=तेहतीस कोटी देवांच्यानीं जें होत नाहीं तें बत्तीस दांतांनीं (तोंडानें) होतें (अशिष्ट भाषणात प्रयोग). (वाप्र.) ०दाखविणें-क्रि. हंसणे (हंसतांना दांत दिसतात यावरून) ०पाडणें-हालविणें-१ दात घशांत घालणें. २ थोबाडींत मारून दांत पाडणें; सारे दात पडतील इतक्या जोरानें थोबाडीत मारणें. ०रंगविणें-१ दातांतून रक्त निघेल इतक्या जोरानें थोबाडीत मारणें २ (ल.) विडा खाऊन तोंड व हिरडया रंगविणें. ०लवणें-(वाईट गोष्टीचे) भाकीत करणें. ०वठणें-घडून येणें; घडणें (अशुभ गोष्ट). ०हालविणें हालणें-अनिष्टसूचक भाषण करणें; वाईटाचें भाकीत करणें. ०मसाला-पु. घोडे, उंट इ०स देण्याचा बत्तीस औषधें एकत्र करून तयार केलेला मसाला. बत्तिसा-पु. १ बत्तिशी मसाला. २ बत्तीस द्रव्यांचा बाळंतिणीस यावयाचा काढा. ३ (ल) पुष्कळ पदार्थांचें मिश्रण.

**बत्ती**—स्त्री. १ वात (दिव्याची, मेणबत्तीची). २ (ल.) दीप; दिवा. ३ (फटाका, बाण, हातनळा इ० च्या) वातीचें तोंड. ४ वात (जखमेंत घालावयाची); पोत. ५ उभें फाटलेलें अर्धे पागोटें; अरुंद पन्ह्याचें पागोटें; अरुंद व ७५ ते १२५ हात लांबीचें पागोटें. ६ दारूची, डांबरी वात (सुरुंगासाठीं) (क्रि० घालणें; पसरणें). ७ छपरबंदांचा तिघांचा संच. यातील एक पानें हांथरतो, दुसरा त्यांजवर गवत घालतो व तिसरा त्यावर कांबीट ठेवून तें सर्व बांधून आंवळतो; बांबूची काठी; कांबीट. [सं. वर्तिका; हिं. बत्ती] (वाप्र.) ०देणें-पेटविणें; शिलगाविणें. ०लागणें-(कामाला, घराला, संपत्तीला, रोजगाराला इ०) आग लागणें, जळणें. तिच्या पोटीं पाठीं बत्ती लागो-एक शिवी. (एखादीच्या) संततीला व भावाबंदाना लवकर बत्ती लागो (लवकर मरोत). ०लावणें-१ गृहादिकांस आग लावणें. २ (ल.) वैमनस्य उत्पन्न करणें; कज्जा लावणें.

**बत्तीस**—वि. ३२ ही संख्या; तीस अधिक दोन. [सं. द्वात्रिंशत्; प्रा बत्तीस] ०हालविणें-पाडणें-दांत पाडून टाकणें. ०अक्षरी मंत्र-पु. 'कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने। प्रणतक्लेशनाशाय गोविन्दाय नमोनमः।' हा मंत्र. ०गुणी-लक्षणी-वि. १ सर्वगुणसंपन्न; शास्त्रांत सांगितलेल्या सर्व शुभ लक्षणांनीं युक्त. हीं लक्षणें बत्तीस आहेत. 'बत्तीस लक्षणी सावित्री कुवारी जन्मली।' -बसा २८. २ (उप.) अत्यंत मूर्ख; नालायख. ०क्रिया-स्त्रीअव. वृक्ष, पशु, मनुष्य, संसेचन, संहरण, स्तंभन, दृति, भस्मीकरण, सांकर्य, पार्थक्य, तरी, नौ, नौका, अध्वपथ, घंटापथ, सेतु, शकुंत, विमाननयन, वासः, कुटी, मंदिर, प्रासाद, दुर्ग, कूट, आकार, आपण, राजगृह, आराम, देवालय, नगररचना, युद्ध इ० विद्या. -मसाप १.२.६ बत्तीस शाम पळोप-क्रि. (गो) पुष्कळ काळ जगून पुष्कळ अनुभव घेणें.

**बत्त्या**—बत्ता पहा.

**बथ(थु)वा, बाथला**—पु चाकवताची भाजी [हिं]

**बथ्थड**—वि मंद बुद्धीचा; बुद्धिहीन

**बद**—पुन. १ गर्मीमुळे होणारें गळूं किंवा उठाणूं २ (गोटयाचा खेळ) गोटी टाकण्यासाठीं केलेली लहानशी खाच, गल ३ (व) टेंगणी, सखल जागा. ४ -स्त्री (विटीदांडू) पांचव्या दांडूचें अंतर किंवा टोला (क्रि० मारणें) [हिं बद]

**बद**—न. (व) भुकटी, पीठ 'रोळें'चं बद विकत मिळतें'

**बद**—वि वाईट, नीच (विशेषत: समासांत उपयोग) [म वध. फा बद; इं बॅड] सामासशब्द- ०मल-अ(म)ल-अमली पुस्त्री. १ दुष्कर्म, व्यभिचार, अविवाहित स्त्रीशीं गमन 'सन्तु जाधवीण, तिने बद-अमल केला.' -ख ८.४२१३ २ हरामखोरी. 'बद-अमली करून बसल्यास रुपये श्रीमन्तांचे सुटतात असें नाहीं.' -ख ७.३७५५. ३ गैरवर्तणूक; बेबंदशाही. 'मुलकांत बद-अमली जाली आहे.' -दिमरा १.२२४. [फा.] ०अहदी-कौली-स्त्री. १ वचनभंग; शब्दाप्रमाणें वर्तन न करणें 'टिपू बहादूर यांनीं बद-अहदी केल्यास तिहीं सर्कारांनीं येक होऊन त्याची तम्बी करावी.' -रा ७.२ २ गैर-सलूक; अमैत्री. [फा] ०कर्म-ख्याली-नस्त्री. बद अम्मल, व्यभिचार [फा] ०ख्याली-वि. बदफैल, व्यभिचारी ०गोई-स्त्री अपभाषण, निंदा 'लाइणी-बद-गोई केली.' -रा २०.२२०. [फा.] ०दिली-स्त्री. १ भ्याडपणा. २ वहीमखोरी. ०दील-वि १ भ्याड २ संशयी; वहीमखोर. -हिंब २६१. [फा.] ०दुवा-स्त्री बेदुवा; शाप. 'बद-दुवा दिल्ही कीं या दोघाचा खाना खराब.' -मदरु १.११८ [फा.] ०नकशा-क्षा-क्ष-नाम-नामी-पुनस्त्री पाणउतारा; मानखण्डना; दुर्लौकिक; अप्रतिष्ठा; बेअब्रू 'लोकांत बद-नक्ष होय तें न कीजे.' -रा ८.२१३. [फा.] ०नजर-स्त्री. १ वाईट दृष्टि; कुवासना. 'दर्यामध्यें टोपीकरांची बद-नजर.' -वाडमा १.३४०. २ वैर. -ख ७ ३५६६. ३ बेभरंवसा; बेविश्वास. [फा.] ०नाम-वि. बेअब्रू असलेला, झालेला; मानखण्डित; कुप्रसिद्ध. 'पुढें ऐसी बद-रहा वर्तणूक करून बद-नाम न होणें.' -रा १५.३८१. [फा.] ०नियत-नेत-नेक-स्त्रीपु. स्वामिद्रोह; हरामखोरी. 'महाराजांचे पायाशीं सेनापतीनें बद-नेत धरिला.' -मराचिथोशा ४९. [फा.] ०नियती-वि. स्वामिद्रोही; दुष्ट हेतूचा. 'परन्तु जैपूरवाला प्रतापसिंग बद-नियती.'

–जोरा ९. ०**फैल**–पु १ कुकर्म; दुर्वर्तन; दुर्व्यसन २ स्वामिद्रोह 'नाहींतर बदफैल करून फन्द कराल तर जावली मारून तुम्हास कैद करून ठेऊं' –ऐस्फुले १.२४. ३ –वि. कुकर्मी; रंडीवाज [अर. फिअल्=कर्म] ०**फैली**–स्त्री. १ बदफैलाचें कर्म; (मुख्यत्वें) रंडीबाजी; सोदेगिरी. २ गैरवर्तन ३ –वि. कुकर्मी; व्यभिचारी; पापाचरण करणारा. ०**बोई–बोय**–स्त्री १ घाण; दुर्गंध. २ (ल.) बेअब्रू; अपमान, दुर्लौकिक. [फा. बदबू] ०**मस्त**–वि. १ गर्वानें मत्त झालेला; धुंद, उन्मत्त २ बंडखोर. 'गलीम बहुत बदमस्त जोरावर जाहला' –पाब १२ [फा] ०**मस्ती**–स्त्री. १ उद्धटपणा, ताठा; अभिमान, मगरूरी; अरेरावी. २ बंडखोरी, बंड [फा] ०**मामला–ली**–पुस्त्री. १ कहराचें व दंडेलीचें वर्तन, दाडगाई (मुख्यत्वें पैशाच्या मागणीचा प्रतिकार करणारांचें) २ अन्याय 'साष्टीचें ठाणें इंग्रजानें बदमामली करून घेतलें.' –वाडसमा २.१९ ३ हरामखोरी; बेइमानी. ४ गोंधळ; अव्यवस्था. ५ भित्रेपणा. –वि. १ लुच्चा; हरामखोर. 'इंग्रज फार बद-मामली आहेत.'–रा १२ ६. [फा] ०**मास–श–ष**–वि. १ वाईट रीतीनें उपजीविका करणारा. २ (ल.) दुराचरणी; गुंड; पुंड. [फा. मआश=उपजीविका] ०**माशगिरी**–स्त्री. गुंडगिरी; पुंडपणा. ०**रंग**–पु. १ नष्ट, भग्न झालेला मान, ऐश्वर्य, थाटमाट. २ ऐश्वर्य इ० च्या भंगानें झालेला अपमान; मानखंडना; उपहास. ३ बेरंग. ०**रस्ता–रहा–राह**–पु. वाईट किंवा गैर चाल, बर्तन; अन्याय. 'हे बदरहाची कैफियत.' –ख ७.३५७०. [फा.]

**बदराई–राह–हा–ही**–वि १ वदकर्मानें वागणारा; कुमार्गी. 'बदराईच्या पाडी दाढा। लागे तुकयाचा हुंदाडा।'–तुगा २८२४. २ –क्रिवि कुमार्गानें 'कोणी बद–राह वर्ततील तर तुम्हां लोकानीं बुद्धिवाद सांगावा' –रा ८ १२६ [फा] ०**लाम–नाम–नामी, बदलौकिक–वकर–वकरी–वक्र–वक्री**–नपुस्त्री. १ दुर्लौकिक; बेअब्रू; अपकीर्ति; बदनामी. २ अयोग्य आरोप; दोष; ठपका; दुर्निमित्त. (क्रि० घालणें; ठेवणें; आणणें; येणें) –वि. कलंकित; दुर्लौकिक झालेला. 'आम्हास बदलाम करूं नये.' -ख १०.५६२९. 'नबाब बुद्धिवन्त होत्साता हे बुद्धी वृद्धापकाळीं करून बद वक्र करून घेतला.' –ब्रप ४५. [फा.] ०**वखत**–वि. दुर्दैवी. [फा.] ०**सलूक**–पुस्त्री. गैर वर्तणूक; अन्याय. [फा] ०**सल्ला**–स्त्री. वाईट मसलत. ०**सल्लागार**–पु वाईट मसलत देणारा. [फा.] ०**सुरत**–वि. अवलक्षणी मुद्रेचा; कुरूप. [फा.] ०**सूर**–वि. वाईट स्वराचा, आवाजाचा; बेसुर (गाणें, वाद्य) [फा.] ०**हवई**–स्त्री. १ खोटी बातमी; हवेंतील गप्प. –वि. विशेष खोटी; अगदींच वाऱ्यावरची. 'अशा बदहवई आवया उठवितील त्यात जीव नाहीं.' –ख १.१९३. [फा] ०**हवा**–स्त्री दुर्दिन; वाईट हवा. [फा.]

**बद्**—क्रिवि. पुरतेपणीं; पुरा होईतों; काठोकांठ इ० [बद् ध्व]

**बंद्**—पु. १ बांधण्याचें साधन; दोरी; फीत; नाडी. २ बंध; बंधन; मर्यादा; शिस्त. ३ (ल.) बेडी; शृंखला; आळा; कोंडी. ४ अटक; कैद. 'बळें तोडिला, बंद त्या त्रीदशाचा।' ५ अंगरखा, बंडी इ० स बांधण्यासाठीं लावलेला कसा. ६ नियम; कायदा; अट; शासन. '... लिहिण्यास कांहीं नियम व बंद असतील असें साप्रतचे दफ्तराचे स्थितीवरून वाटत नाहीं.' –इनाम ४८. ७ संधि, बोटाचा सांधा; पेरें ८ देशी कागदाच्या तावाची घडी; दोन वरखी कागदाचा ताव; कागद दुमडल्यावर त्याचे प्रत्येकी होणारे दोन भाग, घडया. त्यावरून दुबंदी, तिबंदी, चौबंदी इ० 'बंद कागदाचा कोरा असे।'–चागदेवचरित्र ३.२०. ९ (गंजिफाचा खेळ) हातातील एका रंगातील अगदीं खालचा हुकूम; राजा, वजीर याच्या शिवाय वरच्या दरजाचें पान. १० (ल.) जमाव; राग, टोळी. 'बंद कापिला गोसाव्याचा।' –ऐपो ३९२. ११ (इमारत) भिंतीच्या रुंदीचा एक दगड किंवा वीट. (इं.) हेडर. –मॅरट ४६. १२ (बैलगाडी) सुंभाची दोरी. १३ (हिं.) भरती –शर. [सं बन्ध; फा. बन्द] –वि १ रोधलेला; अडविलेला, मना केलेला (रस्ता, वाट). २ थांबलेलें (काम) ३ लावून घेतलेलें (दार इ०). (वाप्र.) **बंदा खालीं बसणें, सहस्र बंदाखालीं बसणें**–बंधानीं, कर्तव्यतेनें (विशेषतः शपथेच्या, वचनाच्या) बांधलें जाणें. **भरल्या बंदांत–बंदाखालीं–बसणें**–जाणूनबुजून, नांदत्या घरांत, भरल्या घरात बसुन, वचन पुरें न केल्यास, खोटें बोलल्यास अनिष्टाचा प्रसंग येणार असें माहीत असुनहि शपथ घेणें, वचन देणें, खातरीनें सागणें या अर्थी (स्वतःचें म्हणणें खरें आहे हें शपथप्रमाण करून दाखविणाऱ्या मराठी वाप्र. पैकीं हा एक आहे. याच्या सारखेच पुढील वाप्र. आहेत–ही काळीरात्र झाली (चालली) आहे; हा रामपहारा आहे; भरल्या तिन्हीसाजा; भरती रात्र झाली; सुर्य तपतो आहे; मी अन्नावर बसलों आहे; रक्ताची आण; खोटें बोलेल तर जीभ झडेल; तुमचे पाय समक्ष इ०) **भरल्या बंदांत–बंदा खालीं**–क्रिवि. भरल्या, वसत्या घरांत, घराखालीं (रडणें, भांडणें इ०चा निषेध कर्तव्य असतां प्रयोग). सामाशब्द– ०**खण–खाना**–पु. बंदीखाना, कैदखाना; तुरुंग. ०**ख(खु)लास–सी**–पु बंधन, कैद यांतून मुक्तता. –वि. कैदेंतून सोडलेला; बन्धमुक्त. 'अगोदर...गुलामाची बंदखलासी करून.'–दिमरा १.३०७ [अर. खलास्=सुटका] ०**छोड**–पु बनछोड पहा. ०**लेख**–पु. नियम, कायदे यांचा ठरावबंद, तक्ता. ०**शाळ–ळा**–स्त्री. तुरुंग; बंदीखाना. 'वसुदेवदेवकीची बंद फोडिली शाळ।' –तुगा ४८२.

**ब(त)दक**—पु. एक पक्षी; पाणकोंबडा; कलहंस. याचीं अंडीं व मांस खातात. [फा. बतक्] ०**मुख**–वि. बदकाच्या चोंचीसारखें लांबट तोंड असणारा (घोडा). हें शुभलक्षण आहे.

**बद्-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. मृदु व थलथलीत पदार्थाचा कठिण पदार्थाशीं संबंध होतांना, लोणी, शेण इ०चा गोळा पडतांना, चिखलांत पाय घसरतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. [ ध्व. ]

**बद्कशा(श्या)म**—पु (शुभकारक) घोडा. 'दोन्ही धडेस धट सुबूक देखणे कान अखूड, जबडा रुंद तो बदकश्याम तुरंग.' 'परम रागीट कुमाईत। बदकश्याम स्थिर चालत।' –ह २२.४५. [ बदकशान या नांवाच्या शहरावरून ]

**बद्(त)का**—पु १ मुष्टिप्रहार; ठोसा, गुद्दा. २ (लोणी, शेण, चिखल इ०) मृदु पदार्थाचा लहान गोळा. [ ध्व. ]

**बद्(त)खल**—न. दबलेली, खोलगट, अथवा सखल जागा, तळ, पात्र; लवण. 'तें गाव बदखलांत आहे.' –स्त्री. फतकल; ऐसपैस घातलेली मांडी –वि १ खोलगट (जमीन). २ ठेंगू (माणूस, जनावर) ३ थबकल; बसकट (ताट, इमारत इ०).

**बंदगी**—स्त्री १ दास्य; सेवा, चाकरी; गुलामगिरी 'यादगार बेग रावसाहेबाचे बंदगीस गेला आहे.' –रा १.६३. २ मायन्यातील आरंभींचा स्तुतिवाचक शब्द. 'बंदगीस अर्ज रोशण होय.' –रा ६.१५७. ३ वंदन; नमस्कार; सलाम [ फा ]

**बंदगी, बंगी**—स्त्री. गांठोडें; पारसल. 'दोन बंदग्या दार्लिबें गुजरली.' –रा ७.१३३. [ फा. बुन्ना=सामान; फा. बंद=बद्ध ]

**बदगुलें**—न. (व.) लहू मनुष्य, लहंमारती (तिरस्कारानें) 'बदगुलेच्या बदगुलें टाग्यांत कसें मावलें!' [ बद=गाट ]

**बद्गें**—न. १ फोल, कचरा; सालपट (ग्राय. धान्यें, कडधान्यें, फळें इ०चा). २ रेव, माती; गाळ, खडा, गदळ (धान्यातील, साखरेतील, दारूतील). ३ क्षतांतील पू अथवा लस. ४ उष्टें (पानांत राहिलेलें)

**बद्घें**—सक्रि. १ (गो.) दर अथवा किंमत ठरविणें २ (गो) परवडणें. ३ (गो) वश होणें. ४ (गो.) जुमानणें. [ बघणें ]

**बद्डणें**—सक्रि. चोपणें; मारणें [ सं बंधु ]

**बदबद-बदां**—क्रिवि. सरबरीत पदार्थ (दहीं, आंबरस, पू इ०) ओततांना किंवा बाहेर पडतांना, ढिला अथवा फुटका मृदंग वाजवितांना, बदका मारतांना, पोकळ जमिनीवरून चालतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन, धपाधप. (क्रि०वाजणें; करणें, पडणें, मारणें). **बदबदणें**–अक्रि. १ बदबद आवाज होणें (फुटक्या नगाऱ्याचा इ०). २ पू इ० पिकणें (उठाणू, गाठ इ०तील) ३ पडशामुळें जड, भरलेलें, कोंदलेलें होणें (डोकें, नाक इ०). [ध्व.] **बदबदीत**–वि. बदबद आवाज करणारा (फुटलेला मृदंग, भांडें इ०).

**बद्दर**—वि. (व) जून; निब्बर.

**बदर**—वि. अजीर्ण करणारें. –शर.

**बदर**—न. बोरीच्या झाडाचें फळ; बोर. [सं.] **बदरी**–स्त्री. बोरीचें झाड. **बदरीकेदार**–पुन. हिमालयाच्या शिखरावरील एक पवित्र स्थान; बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक आहे. बारा ज्योतिर्लिंगें पहा.

**बंदर**—न. १ गलबतें कांठास लावण्यास व मालाची चढउतर करण्यास सोईचें समुद्रकिनाऱ्यावरील ठिकाण किंवा असें ठिकाण असलेलें शहर; समुद्रकिनाऱ्यावरील, खाडीवरील उतरण्याची जागा, धक्का. २ समुद्रकिनारा [ फा. बंदर ] (वाप्र.) **०करणें**–१ मधल्या बंदरांत नांगर टाकून जहाज तात्पुरतें थांबविणें. २ बंदरात किंवा कोठेंहि जहाज नांगरणें **०वहाणें**–तुफानामुळें बंद झालेलें बंदर खुलें होणें, असणें. सामाशब्द– **०कांठ-ठा-किनारा**–पु. समुद्रकिनारा; समुद्राचा कांठ, तीर. **०वाट**–स्त्री. समुद्राच्या, खाडीच्या बाजूनें असलेला रस्ता. **०लई-लही**–वि. इच्छित बंदरास पोंचलेला; जलमार्गानें, खुशकीनें बंदरांत दाखल झालेला (माल इ०). **बंदरी**–वि. १ बंदरांत आलेला; आयात (माल). २ बंदरासंबंधीं. ३ (कु.) हुषार; धूर्त; जाणता; **बंदरी जिन्नस**–पु. १ परदेशी माल. २ (सांकेतिक) मासळीचा कुटा. **बंदरी मेवा**–पु बदाम, बेदाणा इ० सुका मेवा.

**बंदर**—न. १ वानर; माकड. २ (ल) हुषार; धूर्त; चाणाक्ष; चलाख (डावपेचांत). [हिं.] **०वाला**–पु वानर, माकडें व बोकड ह्यांचे खेळ करणारा मुसलमान. –गांगा १२१.

**बदर(द्र)का**—पु. १ सोबत व संरक्षण करण्यासाठीं घेतलेला सरकारी शिपाई–प्यादाचा पहारा. 'सरकारांतून दस्तक व बदरका घेऊन.' –ख३५७३. २ सोबती. 'बद्रका प्रयोजन नाहीं.' –चिरा ४५. ३ तंबूच्या खांबावरील टोपण [ फा. ]

**बदरख-खा, बदरस**—स्त्री. बादरखा, बादरस पहा [फा.]

**बदरा**—पु. एक प्रकारची होडी, नाव; गलबत. [हिं. बजरा]

**बदरा-री**—पुस्त्री. १ (सराफांची) पैसा ठेवण्याची पिशवी. २ कोथळा. 'दारूस बदरे.' –ख ३४८२. ३ घोड्यावरील गोणी. [अर. बद्रा]

**बद्(द्द)ल**—पुस्त्री १ पालट; फेर; फरक; अंतर (क्रि० करणें). २ मनाचा पालट, फेर. (क्रि० घेणें). ३ आपल्या वचनापासून फिरणें; माघार; उलट. (क्रि० खाणें). –वि. उलट; भलतें. 'इकडून ऐवज पावला असतां बदल गोष्ट सांगितल्यास ऐवज माघारा घ्यावा.' –ख ११.५६६०. –शअ. १ करितां; बदला; विनिमयानें. २ जागीं; ऐवजी. 'पागोट्याबदल हा शेला देतो.' ३ कारणें; साठीं. 'अध्ययनाबदल त्या गावांत राहणें प्राप्त आहे.' ४ मुळें. 'पावसाबद्दल हत्ती, घोडे, उंटें बहुत मेलीं.' –मराचियोद्धा ६२. [अर. बदल्] **०देणें**–सक्रि. मोबदला देणें; खर्चाकरितां देणें. 'बदल देणें वतनांत लोकांनीं.' –वाड–शाछ १. **बद्दल, बदलावण,**

**बदलाचें लग्न**—न. साटेंलोटें; दोन घराण्यांनीं परस्परांच्या घरीं मुली देणें व त्याच्या करणें. **०खातर**–शअ. साठीं; कारणें; मुळें **०मुशारा**–पु. रोख, ऐनजिनसी, जमिनीच्या रूपानें सरकारी नोकरांस दिलेला पगार, वेतन, मुशारा. **बदलणें**–सक्रि १ पालटणें; फेरफार करणें. २ फिरविणें; परतणें, वेगळें बनविणें. ३ एक सोडून दुसरें घेणें **बदलूनबदलून, अदलून बदलून**–क्रिवि. आलटून पालटून. **बदलणें**–अक्रि. १ (सामान्यत· व ल.) बदल होणें. २ उलटणें, बंड करणें. ३ नाकबूल जाणें. ४ परत फिरणें (प्रतिज्ञेपासुन, कृत्यापासुन). **बदलून–उलटून–फिरून पडणें**–अंगावर येणें; प्रतिकूल होणें. **बदला**–पु. १ बदलून घेण्याकरिता परत केलेलें नाणें. २ सुड; फेड; उट्टें; प्रतिक्रिया (क्रि० घेणें). ३ मुशारा; वेतन. ४ एकाच्या ऐवजीं दुसरें घेणें. ५ रोख्याची किंमत वाढेल या अपेक्षेनें 'बैल' नें तो खरेदी केला असता पटावटीच्या वेळीं व्यवहार पुढें ढकलण्यासाठीं द्याव्या लागणाऱ्या व्याजाचा दर. –वा. गो. काळेकृत व्यापारी उलाढाली. –शअ. करितां; जागीं; कारणें **बदलाबदल–ली**–स्त्री. विनिमय; अदलाबदल; उलटापालट **बदला मुबादला**–पु. चलन, पैसे बदलणें; सराफी. **बदलाई**–स्त्री. उलटापालट. **०करणें–बदलाईस येणें**–१ माघार घेणें; परत फिरणें (कामापासुन). २ प्रतिकूल होणें; नाकबूल करणें (हक्क इ०). **बदली**–पुस्त्री. १ बदलणें; फिरवणूक; पालट (संत्रीपाहारा, संरक्षक, सैन्याची टोळी इ० चा). २ तात्पुरती सुटका करण्यासाठीं दिलेला मनुष्य, टोळी. ३ बदल्या; एकाबद्दल दुसरा दिलेला मनुष्य ४ दुसऱ्या स्थळीं नेमणूक. ५ मोबदला; विनिमय [हिं.]

**बदला**—पु (अडत) आलें वजनावर वाढविताना निरुपयोगी म्हणून काढलेला माल. [बदल ?]

**बदला**—वि. कमी गोलवट; चपटें किंवा थोडें लांबट आकाराचें; हलक्या जातीचें, ढबदार (मोतीं). **०गोळवा मोतीं**–न. थोडें गोलवट पण वरील कवच साफ, मऊ नसून खडबडीत असलेलें मोतीं. **०बाट मोतीं**–न. साधारण पाढरें, अगदीं सफेत, अगदी लाल पिवळें, खुलतें व गोलवट जातीचें मोतीं.

**बंदसया**—पु. मांडीपाशीं हुक्याप्रमाणें दिसणारें घोड्याचें एक हाड. –अश्वप २.३१८.

**ब–दस्तूर**—अ. प्रमाणें; पूर्ववत् 'किल्ल्याचा बन्दोबस्त ब–दस्तूरीं चालत आहे –रा १०.३४२. [फा.] **०साबिका**–क्रिवि. पूर्वबहिवाटीप्रमाणें. –रा ८.२१८. [फा.]

**बंदा**—पु. १ दासीची पुरुषसंतति; (गो.) रखेलीची संतति. २ आवडता दास; सेवक; गुलाम. 'सागेन मर्दाची ख्यात बंदा बाजीबा म्हणवितो।' –ऐपो ६३. ३ (गो.) दासासारखा वागणारा; देवळी. ४ (गो) गाणाऱ्यांची एक जात. –वि. (ल.) उपकृत; उपकारबद्ध. [फा. बन्द]

**बंदा**—वि. १ लहान नाण्यांत न मोडलेला; अखंड; सबंद (रुपया, मोहोर, अधेली इ०). २ निश्चित; नियमित; ठराविक; नेमलेली (चाकरी, कर्तव्य, वेतन). [फा. बन्द]

**बंदाटी**—स्त्री. १ (का.) एक खुजें व झुपकेदार झाड. माशांना घाबरविण्याकरिता हें नदीच्या पाण्यावर आपटतात. २ बंद बांधण्याचें साधन. ३ वेताची काठी. [सं बंध ?] **०घालणें**–(मारकट जनावराची धार काढतांना) काठीला दोरी बांधून ती त्याच्या शिंगास अडकविणें **बंदाटणें**–सक्रि (कर.) बांधणें.

**बदाड**—स्त्री. (व) सखल जागा –वि. पुष्कळ. [खबदाड]

**बदाडणें**—न झोडपण्याचें, मारण्याचें हत्यार. –सक्रि. (अशिष्ट) सडकणें, झोडपणें, चोपणें; मारणें (काठीनें, चाबकानें, मुठीनें) [ध्व.]

**बदाफळ**—न (मऊ झालेलें फळ पडताना बद आवाज होतो त्यावरून ल) जंगी, फोपशा, थलथलीत मनुष्य [ध्व.]

**बदाबद–बदां**—क्रिवि. जलद व लागोपाठ पडणाऱ्या पदार्थांच्या किंवा जोरानें बुक्क्या मारण्याच्या, निसरड्या जमीनीवर पाय निसरून माणसें इ० पडण्याच्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन; बदबद पहा [ध्व] **बदाबदी**–स्त्री १ अनेकांनीं परस्परांस बुक्क्यानीं वगैरे बदाबद मारणें; बुकलाबुकली. २ सोंगट्यांचा, चेंडूचा एक खेळ. [बदाबद]

**बदाम**—पुन १ कठिणकवचयुक्त एक पौष्टि· फळ व त्याचें झाड. कडवा व गोडा अशा याच्या दोन जाती आहेत बदाम खाण्यास पौष्टिक असुन साल जाळून दातवण करितात तेल औषधी आहे २ (पत्त्याचा खेळ) बदामाच्या आकृतीचें तांबड्या रंगाचें पान [फा बादाम्] **बदामी**–वि. १ बदामासारखा (रंग). २ बदामी रंगानें रंगविलेलें (वस्त्र). ३ बदामाच्या आकाराचा (पदार्थ). **बदामी खरवाई**–स्त्री (सोनारी) विशिष्ट घाट देण्यास उपयोगी, गाडीच्या आंखासारखी बदामी आकाराच्या टोंकाची कांब. **बदामी हलवा**–पु बदाम मिश्रित हलवा

**ब–दिमाख**—क्रिवि ऐटीनें; ऐटदार; छानछोकीनें. 'पाच हजार खासा ब–दिमाख पोशाख करून बसले' –होकै १०४. [फा]

**बंदि(दी)स्त–स्ती**—स्त्री. १ सामान्यत. इमारत; इमला. २ रचना; बांधणी; घडण (इमारतीची इ०). ३ व्यवस्थित, नियमित रचना. ४ बंदोबस्त 'सदरहू किल्ल्याची व कोटाची बंदीस्ती करून.' –मसाप २ १४०. ५ फाइलीच्या, कागदाच्या पुडक्यांच्या मुखपृष्ठावर अंक, खूण घालून त्यांचें अंकन, हिशेब करणें. –न. ६ ठराविक वेतन, पगार. [सं. बंध; फ. बंदश्]

**बंदि(दी)स्त–स्थ**–वि. १ कुडलेला; गवंडीकामानें बंद केलेला; बांधलेला. 'ह्या घरांत चार खण बंदिस्त, पांच खण मोकळे' २ बांधून काढलेली, तोंडाचे जागीं गवंडीकाम असलेली (विहीर,

तळें, बंधारा). ३ बांधलेलें; भोंवतीं भिंती घातलेले; तटबंदी, गवंडी कामानें सुरक्षित केलेलें (घर, आवार, बाग, वाडगें). ४ ठराविक; नियमित; निश्चित. ५ बंद; निगडित, निरुद्ध. ६ तुरुंगात टाकलेला; कैद केलेला. ७ स्त्रीसंभोगरहित; नैष्ठिक ब्रह्मचर्य धारण करणारा. ८ सुव्यवस्थित-रचित-नियमित-शासित (राज्य, सैन्य संस्था) ९ चोख, चांगल्या रीतीनें ठेवलेला, चालविलेला, आटोपिलेला (हिशेब, खटलें, काम). १० सुशिक्षित, आकलित; शासित **बंदिस्त लेख**-पु पुस्तकांतील लेख याच्या उलट मोकळा लेख. **बंदिस्ती**-वि १ मजबूत, भरींव, भरभक्कम चिरेबंदी (इमारत) २ नियमित; व्यवस्थित, बरोबर (वर्तन, क्रिया, काम).

**बदी**—स्त्री. १ आळ; आरोप २ कपट 'त्याच्या मनांत बदी नाहीं.' -चिमा ३६. [फा. बद=वाईट]

**बदी**—स्त्री. गली; जमीनींत खणून केलेला खळगा; गल. -मराठी खेळाचें पुस्तक पृ २८.

**बंदी**, **बंदी(दि)जन**—पु राजादिकाची स्तुति करणारा; स्तुतिपाठक, भाट; वैतालिक (भाट प्रत्यक्ष दरबारांत येऊन राजाची स्तुति करतात व स्तुतिपाठक, वैतालिक, बंदीजन हे पडद्यांतून स्तुति करतात) 'हातीं घेउनी पादुका। उभा बंदिजन तुका।' -तुगा २७८ [सं.]

**बंदी**—स्त्री १ अडथळा, प्रतिबंध; मनाई. 'त्याला येथें येण्याची बंदी आहे.' २ उपरम; थांबविणें; बंद ठेवणें (काम, चाल) ३ रतीब; उक्ता (दूध, तूप इ०चा) 'आमच्या येथें दोन शेर दुधाची बंदी आहे' ४ तुरुंग, कैद, बंधन. ५ -पु. कैदी; कारागृहांत ठेविलेला [सं. बंध; फा. बंदी] **बंदी घालणें**-तुरुंगात, कैदेंत टाकणें 'रावणें बंदीं घातलें इंद्रासी।' -एभा ९.१५. **बंदीखाना-शाळा**-पुस्त्री कारागृह, तुरुंग. 'कामक्रोध बंदीखाणीं। तुका म्हणे दिले दोन्ही' -तुगा २११३. ०**पाल**-पु. तुरुंगाधिकारी, जेलर ०**मुदत**-स्त्री ठराविक, नियमित काल (हुंडीच्या फेडीचा), तारखेपासूनची मुदत. याच्या उलट कच्ची, खुली मुदत. ०**मोक्ष**-पु. बंधनातून सुटका. ०**वान-स्थ**-पु. कैदी

**बदीक, बुदीक**—न. १ (गो.) कुणगा. २ डोंगरी धान्यें.

**ब-दील-खातर**—क्रिवि समाधानासाठीं; मनाच्या खातरी करितां. 'ब-दील-खातर हजरतीचे एवढ्यावर ठराव झाला.' -रा ५.३१ [फा.]

**ब-दील-माहीद**—क्रिवि. अनन्यभावानें. -वि अनन्य भाव ठेवणारा. -इमं. [बदिल+अर मुवह्हिद्]

**बदू**—पु गोट्याच्या खेळांतील जमिनींतील गल, बद; खळगा.

**बंदूक-ख**—स्त्री. १ दारूच्या योगानें गोळी मारावयाचें, लोखंडी नळी, दस्ता असलेलें यंत्र, नळीयंत्र. -राज्य ४.१७. २ (विरू.) तोड्याची बंदूक. [तुर्की बंदुक; फा. बंदूक्] (वाप्र.) ०**उडणें**-बंदूक पेटून तींतील गोळी जोरानें सुटणें ०**डांमणें**-मारलेल्या जनावरास खाण्याकरितां वाघ परत येईल तेव्हां बंदूक त्याचे अंगावर उडावी म्हणून ती त्या मारलेल्या जनावराजवळ पुरणें. ०**दार**-पु. बंदूकवाला शिपाई

**बंदेज-स**—नवि. १ बंधेज पहा २ -पु बंध; बंदोबस्त. 'राज्याचा खर्चेवेच बंदेज बांधून.' -गोबुकै २३ [फा. बंदिश्]

**बंदेशेट**—पु. (गो) सोनारजातीपैकीं लेकवळे.

**बंदेस्ती**—स्त्री (कों.) बांध वगैरे घालून शेताची व्यवस्था करणें; पेटाऱ्यानें माती ओढून जमीन सारखी करणें वगैरे **बांध बंदिस्ती करणें**-शेतांतील उंच जागेवरील माती खणून ती बांधावर घालणें व सखल जागीं पसरणें.

**बंदोबस्त, बंदोबस्ती**—पुस्त्री. १ ठरावणूक, ठाकठिकी; व्यवस्था 'येथें तुमच्या खर्चाचा व जायदादीचा बंदोबस्त करून देऊं.' -दिमरा १.२८०. २ आळा; नियमन; शासन ३ तजवीज. 'रात्रीची दगाबाजी करील, यास्तव छबिन्याची बंदोबस्ती चांगली असावी' -ख ४.१५१०. ४ कैद; शिकस्त. ५ चालीचा व्यवस्थितपणा. ६ मर्यादशील वर्तणूक, आचरण. ७ योग्य मांडणी; सुव्यवस्थित स्थिति; पद्धतशीरपणा. ८ निकाल. [फा. बंदुबस्त्]

**बद्द**—क्रिवि. पूर्णपणें; अगदीं; चरचरीत; थेट. 'तो गांव एथून बद्द चार कोस आहे.' बलक पहा. [सं. बद्ध]

**बद्द**—वि. १ न वाजणारा (रुपया इ०). २ निंद्य [सं अवद्य]

**बद्दल**—बदल पहा.

**बद्दी**—स्त्री. (व.) १ निंदा; बदनामी, दुर्लौकिक. 'कोणाची बद्दी करूं नये.' २ वाईट ग्रह; कपट. 'त्याच्या मनात बद्दी आली.' [फा]

**बद्दू**—वि. १ बेअब्रूचा; दुर्लौकिकाचा; वाईट. २ दुर्गंधीचा; बेचंव; खराब झालेला. ३ डाग लागलेला; कलंकित. 'त्याचें नांव बद्दू झालें किंवा केलें.' [फा बद=वाईट]

**बद्दू**—वि. (अपराधामुळें, लज्जेमुळें) निग्रह केलेला; दाबलेला; दरारा बसलेला; प्रतिबंध केलेला; वाईट मानला गेलेला. 'मी ह्या दुष्टाचे संगतीस लागून त्या गृहस्थाचा मात्र बद्दू झालों.' [सं. बद्ध] ०**होणें**-क्रि. कलंकित होणें.

**बद्ध**—वि. १ बांधलेला; जखडलेला. २ (ल.) कंबर बांधलेला; तयार [सं.] ०**क**-पु. १ मलावरोध; बद्धकोष्ठ. २ जाचणारें कृत्य; दुष्कर्म. -वि. १ कोंडणारा; अडविणारा. २ त्रासदायक; उपद्रवी. ३ बद्धकोष्ठ असलेला. ४ कृपण; चिक्कू. 'नविसंबे भांडारा। बद्धकु जैसा।' -ज्ञा १३.५०१. [सं.] ०**कटाक्ष**-न. १ (रोंखलेली, आणि क्रोधाची दृष्टि) कायम व प्राणांतिक वैर; हाडवैर; वैमनस्य. २ एकाग्र लक्ष, दृष्टि. -वि. असला द्वेष, असलें लक्ष असणारा. [सं.] ०**कुष्ठ-कोष्ठ**-न. शौचास साफ न होण्याची सवय; मलावरोध;

साखळा. -वि. कोठा साफ नसलेला; अवरुद्धमल. [सं] ०ता-स्त्री. बंधन. [सं.] ०पद्मासन-न. आसनाचा एक प्रकार पद्मासन घालून हात पाठीकडून फिरवून उजव्या हातानें उजव्या पायाचा व डाव्या हातानें डाव्या पायाचा आंगठा धरणें. याच्या योगानें शिरा साफ होतात, पाठीला पोक काढून बसण्याची संवय नाहींशी होते, श्वासोच्छ्वास चांगला होऊं लागतो -संयोग ३१७. [सं.] ०भौमिचारी-न (नृत्य) पोटऱ्याचें स्वस्तिक करून उभें राहणें व माडया हालविणें. [सं.] ०मंत्र-वि. मंत्र म्हणून बद्ध केलेला; जखडलेला. [सं.] ०मुष्टि-वि १ मूठ मिटलेला. २ (ल) कृपण; कंजूष; चिक्कू. [सं] ०मूल-वि १ खोल व दृढ मुळें असलेला; मुळें खोल गेलेला २ पक्का, दृढ व सुरक्षित झालेला (वृक्ष, रोग, अधिकारी) [सं] ०वैर-न. बद्धकटाक्ष अर्थ १ पहा. -वि. बद्धकटाक्ष असलेला [सं.] ०शस्त्र-वि हत्यारबंद; सन्नद्ध; सायुध. [सं] बद्धांज(जु)लि-ळी-वि १ हात जोडलेला (विनंति करण्याकरितां किंवा आदर दाखविण्याकरिता) २ -स्त्री. हात जोडण्याची क्रिया 'पुढें उभा असा मारुति। बुद्धांजुळी करोनियां।'[सं] बद्धान्न-न. पचण्यास कठीण पदार्थ (गहू, उडीद, हरभरा इ० चा). [सं.] बद्धायु-वि आयुष्याची नियमित मुदत असलेला [सं] बद्धि-वि बांधलेला; अडकलेला [सं.]

बद्या, केडऱ्या, बोड्या—पु. (व.) बकरीयेवढा लहान बैल.

बंध—पु १ नियम; कायदा, शासन; करार २ (व्यापक) आळा; निर्बंध. ३ मर्यादा; सीमा; हद्द; इयत्ता ४ श्लोक लिहिण्याची एक पद्धति, विशिष्ट आकृतीच्या कोठ्यांत विशिष्ट प्रकारें याचीं अक्षरें लिहितात पद्मबंध, वापीबंध, चक्रबंध इ० याचे प्रकार आहेत ५ दोरीचा, फितीचा तुकडा, बंद; बांधण्याचें साधन ६ बंधन; बांधणें ७(ल.)साखळी शृंखला,बेडी;अडथळा,विरोध जसें-मोहबंध, मायाबंध, भवबंध इ०. ८ कैद. 'तोडावे बंध सबळ सोडावे भूप हात जोडावे।'-मोसभा १.१०६ ९ रचना, बांधणी. 'मुगुटावरी स्तबक। ठायीं ठायीं पूजाबंध अनेक।'-ज्ञा ११.२२०. १० (योग) विशिष्ट मुद्रा, मूलबंध; उड्डियानबंध 'माजि घंटिका लोपे। वरी बंधु जो आरोपे। तो जालंधरू म्हणिपे। पंडुकुमारा।'-ज्ञा ६.२०८. ११(बुरडी) सुपाची सळई व वीण ज्या कामटीनें एकत्र विणतात ती कांब [सं.] ०त्रय-न. उड्डियान (नाभिस्थानीं); मूल (गुदस्थानीं) व जालंधरबंध (कंठस्थानीं). 'भेदिलें बंधत्रय। कुंडलिणीयोगें।'-स्वादि१०.५.३८.[सं] ०मोचन-न. प्रतिबंधांतून मुक्तता. -वि. बंधापासुन सोडविणारा. [सं.] ०क-न. गहाण. -वि. बंधन करणारें 'तेवीं बंधकीं कर्मी सुटिजे। नामें येणें।'-ज्ञा १७.३६६ ३ लोभी. [सं] ०की-स्त्री १ दासी. २ व्यभिचारिणी. [सं.]

बंध—पु. (महानु) महाभाष्य.

बधणें—अक्रि १ मताप्रमाणें, इच्छेनुसार करणें, अनुकूल होणें; वश होणें. 'द्यावा कुठारकल्पद्रुमसा हा वर मला बधोपाय।' -मोभीष्म१.८५. २ जुमानणें, आवरणें; ऐकणें. 'बधेना मी कोणासहि न जरि दुर्भाव शमला।'-मोकृष्ण ७२ ६. ३ घडणें; घडून येणें; जमणें. 'संबंध त्यासीं तुजशीं बधावा।'-सारुह ३ ७. ४ पड घेणें; कचरणें. 'झोंबी खेळावयास तो बधायाचा नाहीं.' ५ बाधा होणें. 'जैसा मंत्रज्ञु न बधिजे। भूतबाधा।'-ज्ञा २.२३४.

बधवि(व)णें-सक्रि. १ घडविणें, साधणें; संपादणें. २ समजाविणें. ३ अनुकूल, वश करणें. ४ (ना) मालाची परीक्षा करून किंमत, भाव ठरविणें. [बधणें]

बंधन—न १ गांठ देणें, न हालेसा करणें; बांधणें; जखडणें २ गांठ दिलेली, बांधलेली स्थिति. ३ निर्बंध, बंद. बंधारण, बंध (शब्दश· व ल). ४ लग्नानंतर होणारा वधूवराचा एक सोहळा. आठ, दस, सोळ, मास या शब्दास जोडून उपयोग उदा० आठबंधन, दसबंधन इ० आठ नहाण पहा. [सं]

बंधाटी—स्त्री. १ दोरीचा, चऱ्हाटाचा तुकडा. २ लवचिक फादी. ३ (सामा.) बांधण्याचें साधन. ४ (कों. घाटी) पावसापासुन भिंतीचें रक्षण व्हावें म्हणून गवतानें आच्छादिलेली काटयाची ताटी; तट्टी. ५ (व.) छपराचे वासे, गवत वगैरेस आधार म्हणून बांधलेल्या आडव्या काटक्या. [सं. बंध]

बंधान—न. १ ताबा; सत्ता 'बंधान राज्याचें चहुंकडे।' -दावि २१०. २ (ल.) आक्रमण केलें बंधान राष्ट्राचें।'-दावि १६०. [सं बंधन]

बंधानी—पु तोफखान्यावरील कामगार 'पन्नास बंधानी, -वाडबाबा ११७९ [वे.]

बंधारण—न. १ कायदा; शासन, कानू; विधि. २ नियम; मर्यादा; ठराव '... दुमाले गांव किती व नक्त खर्च किती या विषीं बंधारण करून...'-इनाम ५० ३ (गु) धारा. ४ (गु.) गोटवण. ५ (गु) व्यसन. ६ (गु) पाटा [सं. बंध+धारण]

बंधारा—पु. १ बांध, धरण, धक्का २ शेताचा बांध. ३ वाहतें पाणी थोपविणें. ४ थोपविलें गेल्याची स्थिति. (क्रि० घालणें; करणें; होणें). [सं बंध]

बधिर—वि. १ बहिरा. २ स्पर्शानभिज्ञ; संवेदनशून्य; सुन्न; जड [सं. बधिर; प्रा. बहीरो]

बंधु—पु १ सख्खा किंवा चुलत भाऊ. २ स्वजन; नातेवाईक; आप्त; बांधव; संबंधी. ३ (चुलत, आते, मामा, मावस या शब्दास जोडून) चुलत्याचा, आतेचा, मामाचा, मावशीचा मुलगा. ४ सोबती; सवंगडी; सहाध्यायी; सहोद्यमी. (समासांत) गुरुबंधु; विद्या-कर्म-व्रत-जाति-धर्म-शाला-बंधु. ब्रह्म-क्षत्र-वैश्य-शूद्र-बंधु ५ (समासांत). संरक्षक; पालक; मित्र; उपकारकर्ता. उदा० दीन-अनाथ-विश्व-जगत्-बंधु. [सं.] ०जन-पु. भाऊ;

नातेवाईक; बांधवजन. –अव. संबंधी; नातेवाईक; दायाद. [ सं. ] ०त्रय–पु. मावसबंधु, मामेबंधु व आतेबंधु अशा भावांचें त्रिकूट. [सं ] ०त्व–न. १ भावाचें नातें. २ पराकाष्ठेचें सख्य; भाऊपणा; मैत्री [ सं ] ०राज–पु स्तुति किंवा निंदा या अर्थानें भावास म्हणतात. [ सं. ] ०वर्ग–पु १ बंधुजन पहा. २ –अव. (उप ) भाऊ. ' मी चांगली गोष्ट केली तथापि आमचे बंधुवर्गाचे मनास येत नाहीं. [सं.]

**बंधुला**—पु. दासीपुत्र. [ सं. बंधुल्क ]

**बंधुवा**—पु. ( बायकी ) भाऊ; बंधु. ' जरी कृपा आली बंधुवा। तरी एवढें सोडिल।' –ह २.१६५. [ हिं. बंधवा ]

**बंधे(दे)ज**—पु. १ आळा; धरबंध; आडकाठी. ' कांहीं बंधेज राहिला नाहीं. ' २ –नअ अनिश्चित व प्रमाणाबाहेर होणाऱ्या वीर्यस्खलनाचा निग्रह करणारें औषध; वीर्यस्तंभक औषध ३ स्त्रियांपासून पूर्णपणें, पुष्कळ अंशीं दूर राहणें; स्त्रीसंगपराङ्मुखता, ब्रह्मचर्य. –वि. १ स्तंभक, निग्रह करणारें औषध. ' बंधेज चूर्ण वापरा. ' २ ऊर्ध्वरेता; ब्रह्मचारी. [ अ. ]

**बन**—न. ( काव्य ) झाडी; जंगल; अरण्य; राई; फड, आगर. –पु. गोसाव्यांचा एक पंथ आणि त्यांतील व्यक्ति. [ सं. वन ] ०कर–पु माळी; फुलझाडें इ० लावणारा; वनकर. ' बन-करांचिआं आंडौरीं। ' –शिशु २५५ ०करी–पु. ( काव्य ) अर-ण्यांत राहणारा, त्यांत वारंवार जाणारा; तें तोडणारा, राखणारा; विपिनक. 'तरी वनकरी आणूनि निश्चित। शिक्षा निश्चित करावी।' ०केळ, बनेळ–स्त्री. रानकेळ; केळीची एक जात. ०चर–पु. जंगली, रानटी माणूस ' बनावरी बनचराची सत्ता। ' –दा २०. ४.२५. [ सं ] ०जर–न. १ लहान झुडपांचें जंगल; रानझाडी. २ झुडपांनीं व्यापिलेली जमीन ( बनजर जमीन, शेत, रान). ३ माळजमीन; ओसाड, नापीक जमीन. [हिं ] ०जार–जारा–री–पु. वणजार–री; एक जात व तींतील व्यक्ति. हे लोक नेमाडांतील व माळव्यांतील बैल आणून खानदेशात विकतात व बैलावरून धान्याची ने–आण करतात. [ वनचारी ] ०तगर–स्त्री. रानतगर; तगरीची एक जात. **बनबनकी लकडी**–स्त्री. ( अनेक भिन्न वनांतील लांकूड) एकाच कामांत स्वतंत्रतेनें गुंतलेल्या भिन्न मतांच्या, विचा-रांच्या माणसांची जमात. [ हिं ]

**बनई**—स्त्री. निरगुडी. –राको

**बनगी**—स्त्री. १ ( सामा. ) बणगी. २ ( व. ) लहान फाटा.

**बनछोड**—पु. एक आंब्याची जात. हा पुणें जिल्ह्यांत कढूस, धायरी येथें होतो. झाड सरळ वाढतें. –कृषि ६७८.

**बनड**—पु. ( व. घाटी ) लहान मुलास आळविण्याचा शब्द. [ वन्या ? ]

**बनणें**—अक्रि. १ केलें जाणें; घडून येणें; सिद्ध होणें; साधलें, संपादलें जाणें; अनुकूल होणें. ' गतवर्षी घर बांधणार होतों पण साहित्य मिळालें नाहीं म्हणून बनलें नाहीं. ' २ फुरसत मिळणें. ३ ( भांडण वगैरे ) जुंपणें; पेटणें. ४ एखाद्या स्थितींत येणें; केलें–उतरलें जाणें, होणें. ' त्याचा रंग चांगला बनला. ' ५ लठ्ठ व बळ-कट होणें; द्रव्यवान्, भाग्यवान् होणें. ६ जुळणें; जमणें; पटणें. ' त्याचें बाहेरचे माणसाशीं बनतें पण घरचे माणसाशीं बनत नाहीं.' ७ नटणें; शृंगारणें. ' असी चट्टी पट्टी करून बनून कोणीकडे गे चालीस.' ८ खांदा बदलणें (हमाल, गडी यानीं). ९ घटनेस येणें; योग्य स्वरूपात, स्थितींत येणें (व्यापार, चाकरी, हातीं घेतलेलें काम, चालू बाब ). १० (ल.) फसणें. [ सं. बन् किंवा भूत; प्रा. भन; हिं. बनाना ] (वाप्र.) **बनीं बनणें**–१ सजणें. २ सज्ज होणें; कंबर बांधून तयार असणें (चाकरीस, कामास). **बनून ठनून चालणें**–उंची व घवघवीत पोषाखानें मिरविणें. **बनून राहणें**–वि. होऊन राहणें. ' त्यांतील प्रत्येकजण केवळ धर्ममूर्ति बनून राहिला आहे. ' –नि ६२९. **बनेल**–वि. ( ना. ) स्वयंसिद्ध; उघड; स्पष्ट; कायम टिकणारा. **बनेल तेथपर्यंत**–क्रिवि. होईल तेथपर्यंत. **बनेल तेव्हां**–क्रिवि. फावेल त्या वेळीं **बनाव**–पु १ परस्परांचा चांगला समज, ऐकमत्य; मेळ; जम. संघटितपणा; अनुकूलभाव; सख्य ( मनुष्य, गोष्टी, गुण यांचा ). ' आणि अत.पर बासवाडेकराचा त्याचा बनाव बसत नाहीं. ' –वाडबाबा १.२८. २ भव्य रचना; थाटमाटाची मांडणी; सुसंघटितपणा. ३ प्रसग. ४ तहाचें बोलणें. [ हिं ] **बनावट, बनोट**–स्त्री. १ मांडणी, रचना; घाट; बांधणी; धाटणी ( इमारतीची, कवितांची इ० ). ' कवनीं ज्यांच्या बंद बनोटे। ' -ऐपो २२७. २ सुत; वीण; पोत ( कापडाचा ). ३ रचना; मांडणी; ठेवण; मांडण्याची पद्धत, व्यवस्था; करण्याचा अनुक्रम ( जागा, काम, विधि, उत्सव यांचा ). ४ बनावणी; सजवणूक; नटणें; भव्य पोशाखानें निघणें. वक्तृत्वाच्या डौलानें व अलंकारिक रीतीनें कथन करणें. ५ (ल.) कुभांड; थोतांड; कृत्रिम, बनाऊ गोष्ट. –वि. बनाऊ; नकली; खोटी; रचलेली; कृत्रिम. ( समासांत ) बनावट–अर्जी–साक्षी–साक्षीदार–मुद्दा–वही–जमा–खर्च इ० ' बनावट सबब सांगून माझा घात केला. ' [ हिं. ] **बना-वणी**–स्त्री. बनविण्याची क्रिया; अलंकृत करणें इ० बनावट अर्थ ४ पहा. [ बनाविणें] **बना(न)विणें–वणें**- सक्रि १ शोभविणें; सज-विणें; नटविणें. २ तयार करणें; नमुनेदार घडणें, वळविणें. ३ थाटानें मांडणें, निघणें. ४ प्रशस्त शब्दविस्तारानें, पुष्कळ अलं-कार व अर्थवादयुक्त असें सांगणें. ' गोष्ट जरी नीरस असली तरी बनवून सांगितली म्हणजे गोड लागत्ये. ' ५ फसविणें. ' हे लोक आपल्याला बनविताहेत ' [बनाव] **बनाऊ(घट)लेख, बनीव**–पुवि. १ खोटी सही किंवा मोहर करून दस्त करणें, खऱ्या दस्तांत लबाडीनें फेरफार करणें, किंवा वेडया, अंमल चढलेल्या माणसाची सही घेऊन दस्त करणें. (इं.) फोर्जूड डीड; २ केलेला;

रचलेला; घडलेला. ३ (ल.) खोटी रचलेली; पदरची (गोष्ट). ४ बनावट; कृत्रिम. ५ थाटलेला; नटलेला. ६ परिष्कृत भाषापद्धतीनें व मोहक अभिनयानें अलंकृत (दंतकथा, व्याख्या, निवेदन, भाषण). [ बनणें, बनविणेचें धातुसाधित नाम ]

**बनशिळी**—स्त्री. वाचाळ बायको.

**बनशी-सी, बनूशी**—स्त्री. १ मुरली. २-पु कृष्ण.-वि गव्हाची एक जात; याचा दाणा मोठा, बिनपोटी, पिवळा जर्द व तेजदार असतो. [सं. वंश, वन]

**बनात**—स्त्री. सकलाद; एक प्रकारचें लोंकरीचें वस्त्र [हिं.; सं. ऊर्णा] **बनाती**-वि. सकलादीचा; बनातीचा (बटवा, टोपी इ०)

**ब-नाम-म्**—क्रिवि. या नांवाचा; नांवानें; बेस्मी. ' याची लेक ब-नाम जानी. ' -बाब-शाछ २१८. [फा. ब-नाम्]

**बनियन्, बन्यान**—पु. (माण) जाकीट; कबजा; घामोळें; बिन बाह्यांचा गंजिफ्रॉक. [सं. वणिज; म वाणी; गु वनिया हे वापरतात यावरून]

**बनिस्ती**—स्त्री १ (गो.) बंदिस्ती; सुव्यवस्था. २ (निदार्थी) निकाल; मोक्ष. [बंदिस्त]

**बनीलो कापूस**—पु. लांब धागा व कमी सरकीचा कापूस

**बने(नै)टी**—स्त्री. दोन्ही टोंकाना चिंध्यांचे बोळे पेटवून खेळण्याची काठी; बंधाटी. [हिं.]

**बनोसें**—वि. फिक्या डाळिंबी रंगाचें (पागोटें) [बनोजी= बनोसी]

**बन्दह**—पु. गुलाम; चाकर. -आदिलशाही फर्मानें [फा]

**बन्नाखालीं बसून सांगणें**—सक्रि. (ना.) शपथपूर्वक, ईश्वरसाक्ष सांगणें. बंदाखालीं पहा.

**बन्नावणें**—सक्रि. (व.) मारणें. 'खूब बन्नावलें त्याला' [हिं. बनाना; म. बनविणें]

**बन्नी, बनी**—पु. वर्षभर टिकणारा कापूस. -कृषि ३८४.

**बन्नूसी**—वि. (विणकाम) लुगड्याच्या किनारीचा एक प्रकार. वहींतील तीन ताणे जांभळे व एक पांढरा असे उभार व एक पांढरा व तीन ताणे तांबडे अशी आडवण या प्रकारची परतनी (किनार).

**बंप(फ)र**—पु. पाणी पिण्याचा पेला [इं.]

**ब-पोशाख**—वि. पोशाखी; पोशाख केलेला 'मजालसींतून फरास फिरणें ते ब-पोशाख असावे. ' -पया २९६. [फा.]

**ब-फजल-इलाही**—क्रिवि. ईश्वरी कृपेनें. 'ब-फजल-इलाही आँमेहेरबाँ दूरन्देश व कुलाहपोश याचे फन्द-फरेबास खूब वाकीफ. ' -पया ४६३. [फा. ब-फज्लि-इलाही]

**ब-फर्जन्दानत**—क्रिवि. वंशपरंपरेनें. [फा.]

**बफावणें**—अक्रि. (व.) चिडणें; रागावणें. 'माझ्यावर बफावला. '

**बंफाळा**—वि. (व.) ओबडधोबड. 'बंफाळया दांताचा.'

**ब-बडवणें**—अक्रि. (कर.) अतिशय मार देणें; मार-मारणें. 'त्याला ब-बडवून पिट्ट पाडला.' [ध्व. बडवणें द्वि.]

**बंब**—पु. १ आग विझविण्याचें, खोलांतूर पाणी वर काढण्याचें यंत्र; पंप. २ संबळापैकीं धूम नामक एक भाग. दुसरा भाग झील चौघड्यांतील मोठें वाद्य. 'बंबावर चोप मार.' ३ अपकीर्ति; कुप्रसिद्धि. 'त्याच्या नांवाचा बंब झाला-वाजला' ४ पाणी तापविणें, रंग साठविणें इ०चें एक विशिष्ट आकाराचें मोठें पात्र. ५ रंग उडविण्याची कळकाची पिचकारी. 'धुमधार अनिवार मार भर बंबाच्या फटकाऱ्यांचा. '-ऐपो १९९ ६ धुराडें. 'आगगाडीच्या बंबांतील धुराखेरीज दुसरा कोणता धूर आज नजरेस पडला. '-टिले १.१७०. -वि स्थूल; लठ्ठ, वळकट मोठा, अगडबंब. 'त्याचें केवढें हो बंब शरीर हें.' -क्रिवि कडेपर्यंत; काठोकाठ, पूर्ण; तुडुंब. 'बंब फुगलें' [हिं. बंबा; पोर्तु. पॉंपा] ०वाजणें-फजिती, दुर्लौकिक होणें; शेवटीं कांहीं नाहीं असें होणें. ०वाजला, दिवा लावला- (व.) कोणता पराक्रम केला या अर्थी प्रश्नार्थक शब्द **बंब्या**- वि. १ ठोंब्या, धष्टपुष्ट पण विचाररहित २ बंबू.

**बंब**—पुन. (वे.) बीं पेरण्याच्यापूर्वी शेतात उगवलेलें एक गवत; मागील सालच्या राहिलेल्या बियांचें उगवलेलें रोप.

**बंब(म)महादेव**—उद्गा भिक्षा मागताना म्हणावयाचा गोसाव्यांचा शब्द. -वि (ल) दांडगा, (मनुष्य). [ब्रह्म+महादेव]

**बंबर्दा**—पु (गो) दारुडा, दारूबाज माणूस [पोर्तु.]

**बबब**—उद्गा. अबब, चमत्कारासंबंधीं उद्गारवाचक शब्द. [ध्व.]

**बबरची-र्ची, बबर्जी**—पु आचारी, स्वयंपाकी (विशेषतः) मांसाचे पदार्थ राधणारा; बट्लर. [फा. बावर्ची] ०खाना-पु. स्वयंपाकघर.

**बॅबॉ**—पु. (गो.) मोठा बेडूक.

**बंबाड**—वि. (व) पुष्कळ. 'बंबाड झाडें आहेत.' [बंभाळ]

**बॅबाधर्से**—सक्रि. (गो) भय दाखविणें; भेडसावणें. [भेडावणें]

**बंबाळ**—पुन (सामा.) बंभाळ पहा.

**बंबाळ**—पु. १ समुदाय २ मोठा नाद. -वि. १ जंगी; अफाट, अवाढव्य; राक्षसी; जबर; विस्तृत; मोकाट पसरलेला, मोठा. 'प्रमाणाचा बंबाळ दिवा।' -भाए ५४०. २ उधळपट्टी करणारा; उडाऊ (मनुष्य, त्याचें वर्तन, हेतु, काम, संस्था, खर्च). ३ (रक्तानें) भरलेलें; वाहणारें. उदा० रक्तबंबाळ बंभाळ पहा. ४ (काव्य.) मोठा (आवाज). ५ तेजोमय; तेजाळ; झगझगीत. 'पाचही दिवटिया बम्बाळ। हातीं धरूनि वैकुण्ठपाळ।' -मुआ १८.१४९. ०दि(दी)वा-पु (महानु) मोठा दिवा; लामणदिवा.

' आठाइतेआं वेवा बंबालुदीवा । ' -शिशु १५३. [ध्व ] **बंबाळी**-स्त्री. १ जंगीपणा; अफाटपणा, विस्तृतता. २ पराकाष्ठेचें वैपुल्य; चंगळ ( मेजवानीचे प्रसंगीं अन्नाची ). ३ धुमश्चक्री; धुमाळी; अप्रतिबद्ध वर्तन. ४ बेपर्वाई; चैन; उधळपट्टी ( खर्चाची )

**बबी**—पु.स्त्री. लहान मुलगा-गी. [ इं. बेबी ]

**बंबुऱ्या, बंबू, बंब्या**—पु. ( ल. ) पुरुषाचें जननेंद्रिय. [ बंब ]

**बंबू, बंब्या**—वि. मूर्ख; वेडा. ' वेडबंबू. ' [ बंब ]

**बंबूचा खिळा**—पु. बोंड, माथा असलेला खिळा; गुलमेख.

**बब्बेल**—न. ( गो ) बिब्याचें तेल. [ बिब्बा+तेल ]

**बंब्या**—पु. बंद केलेल्या, शिवलेल्या पोत्यांतील धान्य, माल यांचा नमुना पाहण्यासाठीं उपयोगांत आणावयाचें साधन. यास लांकडी मूठ असून पुढें टोंकदार व पन्हळ असलेला लोखंडी भाग असतो.

**बंभर**—पु. भ्रमर; भुंगा. ' पीतां मरंद उदरंभर बंभराचें । ' -र ९. [ सं. भ्रमर ]

**बभ(ब)रा, बभ्रा**—पु. १ गवगवा; बोभाटा; गुप्त गोष्टीची प्रसिद्धि; स्फोट. २ उपहास; दुर्लौकिक. ' खळ होते, साधूंचा करणार बळें सभेंत बभ्रा ते । ' -मोसभा ४.२. ॰**करणें**-बोभाटा करणें; गुप्त गोष्ट उघड करणें.

**बंभा(बा)ळ-ळें**—पुन. १ भडभडणारा भडका (आगीचा); धडधडाठ; लोट. २ दिपवणारी प्रभा; लोळ; झोत, लखलखाट ( दिव्यांचा ). ' पैं दीपाचिया बंबाळीं । कां चंद्र हन जें उजळी । ' -ज्ञा १५.३०८. ३ मोठा आवाज; घोष, गर्जना; गोंगाट; हलकल्लोळ. ' ऐसा अद्‌भुत तूरबंबाळु । ऐकोनि ब्रह्मा व्याकुळु । ' -ज्ञा १.१३६. ४ पुष्कळ व जोराचा प्रवाह (रक्ताचा, रसाचा, द्रवाचा). ५ आकस्मिक उसळी; भपकारा ( उग्र वासाचा ). -वि. मोठा; लखलखीत. उदा० बंभाळ जाळ उठला-उजेड पडला. [ प्रा. बंब ]

**बभुत, बिभूती**—स्त्री ( हिं ) विभूति; भस्म. ' शैली शृंगी कंथा झोळी बभुत लगाया तनमो । ' -दत्तपदें १८. [ सं. विभूति ]

**बंभोला**—पु. ब्रह्मरूपी भोळा शंकर; गोसाव्याचा म्हणावयाचा वाक्प्रचार. [ सं. ब्रह्म; प्रा. बंभ+भोला ]

**ब-मजकूर**—क्रिवि. म्हटल्याप्रमाणें; पूर्ववत्. 'बक्षी मजकुराची नियत ब-मजकूर कायम असल्यास...' -दिमरा २.९७. [ फा. ]

**बंमठस**—वि. ( ना. ) मूर्ख, अक्कलशून्य; मूढ.

**ब-मय-ये, बमै**—क्रिवि. सहित; सह; सुद्धां. ' ब-मय कुटुम्बासुद्धां. ' -राज १०.२६५. [ ब+अर मअ=सह ]

**ब-मसामअ**—क्रिवि. कानास; कानावर. -आदिलशाही फर्मानें. [ फा. ]

**ब-मिनत**—क्रिवि. १ मिनतवारीनें; आर्जवानें. ' अगर ब-मिनत आपणाशीं राजकारण लाऊन ... ' -पया ४८३. २ उपकारसहित. [ फा. ]

**ब-मु(मो)(जि)जीब, ब-मूजिब**—क्रिवि. प्रमाणें; अनुसार; बरहुकुम ( मुख्यत्वें लेखात ). 'काजीपणाचा हक्क दस्तूर ब-मोजिब कल्याणभिवंडीप्रमाणें घेत जाणें. ' -वाडबाबा १.१०. [ फा. ब-मूजब् ]

**ब-मुरुवत**—क्रिवि. माणुसकीस अनुसरून. ' ब-मुरूवत हजरतीची भीड त्यास गालब. ' -रा ५ ७२. [ अर. मुरूवत्=माणुसकी ]

**ब-मुवाफिक**—क्रिवि. प्रमाणें.-आदिलशाही फर्मानें. [ फा. ]

**बम्म**— वि. ( व. ) पुष्कळ.

**बय**—स्त्री. ( व खा ) आजीबाई; आजी. [ बया ]

**बयतन**—न. ( व. खा. ) सर्पण, जळण. [ सं. ज्वल्; गु बळवुं यावरून खा. बयणें=जळणें+तण(न)=गवत ]

**बयतें, बयत्या**—( कों. ) बलुतें, बलुत्या पहा.

**बयला-ली**—बैला, बैली पहा.

**बया**—पु पक्षिविशेष; एक पक्षी.

**बया**—स्त्री १ आई, वडील बाई यांस आदरानें हाक मारण्याचा शब्द 'आई आई बयाबया म्हणती ।'-नव १०.९२. २ (लाडीकपणानें) लहान मुलगी ३ ( ल. ) धिडका; आकाबाई [ बाई ]

**बयाज**—पु सविस्तर हकीकत; तपशील. ' यांचा बयाज सबनिसांनीं बोलून ल्याहावा. ' -वाडबाबा १.१८१. [ फा. ]

**बयाणा-णो-ना**—पु. १ सचकार; विसार; आगाऊ दिलेला पैसा. २ निवेदन; हकीकत, खरी गोष्ट सांगणें. ३ सबब, समजुतीसाठीं सांगितलेली कंटाळवाणी गोष्ट. ( क्रि० सांगणें; वाचणें ) ४ राजेरजवाडे थाटानें चालले असता त्यांच्या पुढें चोपदारांनीं म्हणावयाचें स्तुतिपर वाक्य. ५ ( चि. कु. ) उखाणा [ अर. बैआना, फा. बयान ] ॰**बांधणें**-क्रि विक्रीचे जिन्नसावर (मुख्यत्वें दागिने-जवाहिरांवर) आपली मोहोर, शिक्का करणें (मोहोर करणारानें देऊं केलेल्या किंमतीपेक्षां जास्त किंमत दुसरीकडे न मिळाल्यास ते त्यासच द्यावयाचे अशा खुणेकरितां).

**बयाद्-ज, बयादल**—पुस्त्रीन. १ विस्तार; तपशीलवार सांगणें. २ सबब; निमित्त. ' बयादीवर बयादी चालविल्या.'[अर. बयाज ] ॰**सांगणें-लावणें-दाखविणें**-अडचणी आणणें; आक्षेप काढणें; सबबीदाखल व समजुतीदाखल लांबलचक गोष्ट सांगणें. ॰**खोर, बयादी-जी**-वि. कंटाळवाण्या पुनरावृत्तीची; लांबलचक सांगण्याची, स्पष्टीकरणाची संवय असलेला; पाल्हाळ्या; दीर्घसूत्री; सबबी सांगणारा. ॰**खोरी**-स्त्री. शब्दपाल्हाळ इ०कांचे ठिकाणीं आसक्ति. ॰**वार**-क्रिवि विस्तारानें; तपशीलवार; व्यवस्थेशीर.

**बयादाटून**—क्रिवि. ( व. ) विनाकारण. -बशाप ५२.१.

**बयान-ण**—पु. १ विस्तार; तपशील. ' तुमचे योग्यतेची वृद्धी असावी याचा आम्हांस किती सन्तोष याचा बयान नलगे.' -रा ५.११. २ वर्णन; तारीफ. ' रावजी शेवटचे ऐसे जे जाले

त्यांचा बयान काय लिहूं ?' -रा १० १३९. ३ (ना.) जबानी; म्हणणें. [अर. बयान्] ०अर्ज-पु. सांगणी. (क्रि० करणें, सांगणें). 'हेजीब जाऊनु राजभुवरासी हे हकीकती बयाण-अर्ज केले.' -इमं १०. ०वार-वरा-क्रिवि. तपशीलवार; सविस्तर. 'खबर बहुत बयानवार लिहिली' -रा १५.३१ [फा.] ०तहरीरी-पु लेखी जबाब.

**बयाबया**—क्रिवि. (व) उगीच; खोटेंच; थट्टेनें; दाटून. 'हें भांडण बयाबया झालें.' [बळें बळें ?]

**बयावल**—न विस्तार इ०. बयाद पहा.

**बर**—स्त्री (गो.) बरगडी. -खिपु

**बर**—पुस्त्रीन. पूयप्रधान द्रव्य; मुख्यत्वें रक्तमिश्रित पू. (क्रि० वाहणें; जमणें, साचणें; भरणें; धरणें).

**बॅर**—स्त्री (गो.) भिंतीवर शेवटच्या थरांत रचलेली नक्षी केलेल्या चिऱ्याची, दगडांची रांग. [वर ?]

**बरईक**—स्त्री. चांगलें नांव, चांगली कीर्ति (क्रि० संपादणें; मिळविणें; मिळणें). [बेंर]

**बरक**—न. मेंढयांची लोंकर आणि बोकडाचे केस यांच्या मिश्रणापासून विणलेलें वस्त्र. अधिक बारीक व तलमदार बरकास कुर्क म्हणतात.

**बरकडी**—स्त्री. बरगडी; फांसळी.

**बर-कण-कन-कर-दिर्नी-दिर्शी**—क्रिवि. चिखल, शेण इ० मध्यें पाय भरणें इ० क्रियांच्या आवाजाप्रमाणें ध्वनि होऊन. [ध्व.]

**बरकणी, बरकना, बरकोण**—स्त्री. (कु.) एक लहान जातीची होडी; क्रीडानौका. [पोर्तु बरकिन्हा, बरकेता]

**बरकत-खत, बर्कत**—स्त्री. १ सिद्धि; यश; सुपरिणाम; लाभ २ यशस्विता; भरभराट, भाग्यशालीपणा. 'ज्याचें दैव अनुकूल नाहीं त्यास कोणत्याही व्यवहारांत बरकत येत नाहीं.' ३ भरभराटीचें आधिक्य; कल्पनेपेक्षां अधिक नफा, प्राप्ति, फायदा (कामांत, धंद्यांत) ४ कोणतीहि वस्तु मापतांना एक या संख्ये-करितां मंगलार्थ उच्चारतात; लाभ [सं. भृ-भर; अर. बरकत] म्ह० नियत तशी बर्कत=बुद्धि तशी समृद्धि. ०सोडणें-(शेतानें) आपली मातबरी, सुपीकपणा गमावणें, टाकणें.

**बरकत्या-ता, बरखत्या-खट्या**—पु. (कों) भाताची पेंढी बांधण्यासाठीं भात्याणाचा, गवताचा केलेला बंद, दोर.

**बरकंदाज, बर्कंदाज**—पु. बंदूकवाला शिपाई; बदुकीनें नेम मारणारा, गोळीबार करणारा इसम. 'चौकशीनें एक हजार पावेतों बरकंदाज निवडक.' -समारो २.४. [फा. बर्कअंदाज] बरकं-(क)दाजी-स्त्री. तोडयाची बंदूक सोडणें; निशाण मारणें; गोळयांचा भडिमार. [फा.]

**बरकशी-कस, बर्कशी**—स्त्री. १ स्पर्धा; चढाओढ; भांडण. 'बलवंताबरोबर बरकस लावणें ती विचारें करून लावावी.' २ आकस, चुरस; वैर; शत्रुत्व (क्रि० बाधणें; धरणें; बाळगणें; चाल वणें) 'माझ्या घरच्याची तुझी आधींच किरे बरकशी।' -राला ६३ [फा. बर्आकस] ०धरणें-राग धरणें.

**बरका**—वि. १ मऊ; बिलबिलीत; घट्ट नसलेला (एक प्रकारचा फणस, त्याचें झाड, फळ व गरा) (गो.) बरकय. २ पिठूळ चिभूड. [का. बक्के]

**बरका**—पु (कु) कफ; बेडका. [बेडका]

**बरकाळी**—स्त्री. धांदोटी; चिंधी; धुडका.

**बरखाड**—स्त्री. (व.) न्यूनता; वाण. 'भाताची बरखाड आली पंक्तींत।' [बरखास्त ?]

**बरखा(का)स-स्त, बर्खास्त, बर्खास**—वि. विसर्जित; उठलेली; मोडलेली; समाप्त झालेली (सभा, कचेरी इ०). 'कचेरी बर्खास व्हावी.' -रा ६.५१०. [फा बरखवास्त]

**बरग**—पुन. १ एक धान्य; ज्वारी, बाजरी, नाचणा इ० चें बीज. 'बरगासाठीं खादलें शेण। मिळता अन्न न संडी।' -तुगा ३११९. २ -पु (ल) केसामध्यें गोचिडया, उवा पडणारा, गुरांस होणारा मनुष्या रोग; गोचीड; ऊ. 'बरग पडोनि मेलीं गुरें। भांडीं नेलीं म्हणावें चोरें।' -भवि ४९ ९३. ३ (गो) लांकडाचा भुसा करणारा कीटक. ४ -न. (गो.) न कुजलेलें लांकूड. ५ (महानु.) दुष्काळ; अवर्षण. 'बरग पडिलें कव्हणी एकीं वरुषीं।'-भाए ४२०. ०पडणें-अक्रि. दुष्काळ पडणें. बरगे(ग्वे)ण-न. बरग धान्याचा पेंढा; भात्याण. [बरग+ताण]

**बरगडी, बरगडा-ळा**—स्त्रीपु फासळी; छातीचें हाड. बरगडया, बरगडे-ळे मोडणें-१ बरगडयांचीं हाडें मोडणें; (ल.) अति श्रम करणें; अति श्रमानें भागणें, थकणें. २ (ल) नम्र व विनीत करणें; नरम करणें; खोडकी जिरविणें; अभिमान उतरविणें (हाडें घुसडून, यथेच्छ ठोकून).

**बरगण**—स्त्री. (व.) नुकसान; तोटा. 'सट्ट्यांत बरगण भरावी लागली.'

**बरगळ, बरंगळ**—वि. दूरदूर; विरळ; घट्ट नसलेल्या विणीचा (कपडा, चटई, वीण, दांत, ओळ). [सं. विरल ?]

**बर(रं)गळणें**-अक्रि १ विरळ विणीचा, रचनेचा, ठेवणीचा असणें (कपडा, दांत इ०). २ बहकणें; विसंगत बोलणें; बडबडणें. ३ उत्कंठित, अधीर होणें. ४ (प्राय: बारगळणें) भडकणें.

**बरगळभूत, बरगळलें-गळेल-बरगेल-ळ भूत**—न. भुकेलें माणूस; भुकेनें; उत्कंठेनें कावराबावरा झालेला मनुष्य. बरगळेल-वि. भुकेला; अधीर; उतावळा. म्ह० बरगळेल भूत कोडोळयावर राजी.

**बरगा**—पु १ इमारतीलाकडाचा चौकोनी तुकडा; दोन तुळयावरील आडवी कडी, वासा इ० २ भिंतींत बसविलेला खांब [ हिं ] **०मोडणें**-बडगा मोडणें

**बरची-छी-शी, बर्ची-र्छी-र्शी, बर्चो**—स्त्रीपु एक प्रकारचा लहान भाला; अंकुश. लढवय्या इसमाच्या डोक्यापेक्षां जास्त उंचीचें, लोखंडी दांड्याचें व शेवटास त्रिधारी गुप्तीप्रमाणें केलेलें भोसकण्याचें शस्त्र. 'बिचवा लवंगी गुरगुज सांग सोटा बरची फेंकिती।'-ऐपो १०९. 'बरछी सरशी मारी नैनाची पाहून हजारों अलम फिदा।'-पला ८३२ [ हिं. बरछी ]

**बरज**—पुन. ( राजा. ) बरग पहा.

**बरजोर, बर्झोर**—वि सख्त, बलाढ्य 'बर्जोर नतिजा वेऊन.' -ब्रच ५७ [फा. बर्झोर] **बरजोरी**-स्त्री (गु.) बळजबरी.

**बरट-टा**—पु चिखल 'मग दुःखाचेन बरटें बोंबले।' -माज्ञा ७८८. [ बरबट ] **बरट बोंबळणें**-सक्रि. सारवणे.

**बरटी-ड**—स्त्रीपु भातशेतांतील एक तृणधान्य; पांढरें, बारीक वरी-राळ्यासारखें असणारें धान्य याचें कणीस नागली-प्रमाणें असतें 'शेतींतील निंदन काढलें होतें तरी सुद्धां बरड चुकून राहिला.' **म्ह**० तुरीबरोबर बरड चिरडला जातो.'

**बरड, बरडखरड, बरडा-डी**—स्त्री. १ माळ जमीन, भरड. 'वेधतां कठिणशा बरडातें।' -किंगवि २६ २ (को ) भाताचें आवण काढल्यावर पुन्हां आवणासाठीं दुसऱ्या वर्षापावेतों पडीत टाकलेली जमीन. [ ता बरडु=रुक्षता ] -वि १ आंत मुरुम, गोटा, वाळू व तांबडी माती असणारी. ओसाड; नापीक; निकस (जमीन) 'कर्माकर्माचे गुंडे। बांध घातले दोहींकडे। नपुंमकें बरडें। रानें केलीं।' -ज्ञा १३.४७. २ भाकड 'कीं कामधेनु पयःपान। बरड गायीस मागतसे।' -भवि १०१२२. ३ ओबडधोबड; खडबडीत. 'कीं बरड गोटे चिंतामण। परी अभंग जाहले कीं।' -भवि १०५. ४ (ल.) देवीचे वण असलेला ( चेहरा ). [ बरड द्वि. ] **बरडरान**-न. माळरान.

**बरड**—पु. धान्य, लांकूड इ० स उपद्रव देणारा किडा **बरडणें**-अक्रि १ किडणें, (धान्य, लांकूड इ० ) किड्यांनीं पोखरलें जाणें. (गो.) बरडुंचे, बडूडुचें. २ ( ल. ) देवीचे वण, खळया पडणें. [ बरड=कीड ]

**बरड बोंबल्या**—वि. (व.) गुप्त ठेवावयाची गोष्ट सांगत सुटणारा; बोंबाबोंब करणारा. [ ओरडणें+बोंबलणे ]

**बर(रं)डा**—पु. (व. कु ) ऊवें अंडें; अंडें; लिखा.

**बरडा, बरडी सुपारी**—पुस्त्री. जून पोफळांची शिजवून, वाळून तयार केलेली सुपारी.

**बरडेल**—न. वडे तळून काढल्यावर राहिलेलें तेल; बडेल [ वडा+तेल ] **०काढणें**-अक्रि. ( ल ) मारणें. -रावो.

**ब(भ)रणी**—स्त्री. चिनी मातीचा लांबट घट, उभट भांडें. 'एखादा न देखे तक्र स्वप्नीं। त्यासी मिळे क्षीरभरणी।'-गुच १३.६. [ सं भरण ? ]

**बरतरफ-र्फ, बर्तर्फ**—वि. कामावरून काढलेला; पदच्युत. 'मुरादखान याची फौज अगदी बर्तर्फ केली.' -ख १.२२४. **बरतरफी, बर्तर्फी**-स्त्री. चाकरीवरून दूर करणें, काढणें. [ फा ]

**बरतर**—वि. जास्त मोठा. -आदिलशाही फर्मानें. [ फा ]

**बरतावा**—पु (व.) कारभार; कारकीर्द. [ हिं. ]

**बरदार, बर्दार**—वि. वाहणारा; नेणारा मुख्यत्वें हिंदी व फारशी शब्दाशीं फक्त समासांत प्रयोग. उदा० बेले बरदार; शिके-बरदार; निशाण बरदार ( निशाण नेणारा ). [ फा ]

**बरदास्त-र्दास्त**—स्त्री. १ आदरसत्कार; पाहुणचार, सत्कार (पाहुण्याचा इ०) (क्रि० करणें; राखणें). २ निगा; देखरेख करणें, जोपासना; व्यवस्था ठेवणें; शुश्रूषा करणें (मुलें, गुरें, जिन्नस यांची). 'तूर्त जखमाची वगैरे बर्दास्त होत आहे.' -ख ११.६०१२. -वि. (व ) सह्य; खपण्याजोगें 'बरदास्त होणार नाहीं' =सहन होणार नाहीं. 'भाऊसाहेबांस हें बर्दास्त न होता ...' -होकै [ फा बर्दाश्त ]

**बरप**—क्रि. (गो.) लिहिणें. [ का बरिदु ] **बरपी**-पु. लेखक; लिहिणारा.

**बरफ, बर्फ**—न १ थिजलेलें पाणी. हें दोन प्रकारचें असतें, निसर्गजन्य व कृत्रिम. २ हिम, नीहार. ३ ( ल ) त्वचेवर बारीक पुटकुळ्या, मसुऱ्या, पुरळ येणें. उदा० देवीचें-मसुऱ्यांचें-फोडांचें-बरफ बाहेर पडलें ४ दाट उगवणारें गवत, झाडपाला, केस इ०. 'शेतामध्यें गवताचें बरफ झालें.' [ फा. बर्फ ] **०दाणी**-स्त्री. बर्फ ठेवण्याची पेटी.

**बरफी, बर्फी**—स्त्री. १ निसर्गजन्य बर्फाची वडी. २ नारळाचा चव, खवा, साखर याची केलेली एक प्रकारची खाण्याची मिठाई. [ फा बर्फी ] **नारळाची बरफी** स्त्री. नारळ घालून केलेली बर्फी **बर्फीचुरमा**-पु तळलेल्या रव्याचे मुठे पाटयावर वाटून भुगा करून त्यांत तूप, साखर, खवा व बदाम, पिस्ते इ० घालून त्याचे कापून बर्फीप्रमाणें केलेले तुकडे. -गृशि १.४४३

**बरबट**—पुन. १ (व.) आंबे, चिंचा इ० कोळून दाट केलेलें पाणी; ताक इ० आंबट पाणी; पन्हें; रायतें. 'चिंचेचें बरबट पितो.' २ बकऱ्याच्या मांसाचा रस्सा, सांभारें. ३ चिखल. 'मग दुःखाचेनि बरबटें बोंबले।' -ज्ञा ७.८८.

**बरबटणें**—अक्रि. १ बरबट, चिखल इ० कांनीं लिप्त होणें. २ -सक्रि. (ना.) शेणानें किंवा मातीनें सारविणें. [ बरबट ]

**बरबटी**—स्त्री. (व.) चवळीच्या शेंगेसारखी एक शेंगांची जात. [ बरबट ]

**बरबडा-डी-डें**—पुस्त्रीन. एक जंगली झाड व त्याचें बीं; एक तृणधान्य व त्याचें गवत. याच्या बियांची भाकरी होते.

**बरबरणें**—अक्रि. १ पूयमय होणें; पूयरक्तवत् द्रव्यें गळत असणें (क्षतें, फोड इ० कांतुन); शेंबूड गळणें (नाक इ०तून) २ पिकल्यानें किंवा कुजण्यानें मृदु, स्रवणारें, पचपचीत होणें (लिंबू, फणस इ०) [ध्व.] **बरबर-बरां**-क्रिवि. निचरे, वाहे, गळे, स्रवे अशा रीतीनें (क्रि० वाहणें; चालणें; शिकरणें; हगणें). **बरबरीत**-वि. १ गलगलीत; बिलबिलीत; स्रवणारें; मऊ (पातळ शेण, चिखल, नासकें फळ). २ बरबरलेलें; शेंबूड गळणारें (नाक) ३ लाळ गळणारें (तोंड, क्षत)

**बरबाद, बर्बाद**—वि १ बिघडलेलें; नाश झालेलें; नष्ट; ओसाड, वाताहत झालेलें. 'गढी खोदून बर्बाद केली.' -होकै १४. (सामा) नासलेलें. २ रद्द, बंद केलेला. 'पुढील तहनामा झाल्यानंतर मागील तहनामा बर्बाद होतो.'-रा ७ ३. ३ ओसाड [फा. बर्बाद] ०**करणें**-सक्रि. धूळधाण, नासाडी करणें. **बरबादी**-स्त्री. नासाडी.

**बरमदंडा**—पु. कंटिचुबक; एक काटेरी झुडुप. [स. ब्रह्मदंड]

**बरमा-म्हा, बर्मा**—पु. १ दोरीनें ओढून फिरवून भोंक पाडण्याचें यंत्र; सामता; वेधन; गिरमिट. २ दारूच्या बाणाचें तोंडाकडील भोंक. [फा. बर्मा] **बर्मदान**-वि भोंक पाडण्यांत कुशल. 'भण्डारी चांगले बर्मदान.' -वाडसमा २.९.

**बरलीमाड**—पु. सुरमाड -बागेची माहिती पृ ४.

**बरलेख**—क्रिवि. लेखाप्रमाणें; लिहिल्याप्रमाणें [फा बर्+ सं. लेख]

**बरव**—स्त्री. बरवेपणा; शोभा. 'जैशी नाकेवीण बरव। कां शिरेंवीण अवयव।' -एभा १४.२५७. [सं. वरम्, म. बरवा]

**बरव(वं)ट-टा, बरंवटा**-वि. गोजिरवाणें; सुंदर; चांगलें; देखणें; छान; सुरेख; उत्कृष्ट; उत्तम. 'ठाइं ठाइं बरवट। निभृत मंडीत घाट।' -ॠ १८. **बरवणें**-अक्रि. शोभणें. 'प्रतिबिंब किंवा अनुमापक। तैसें द्वैतमिसें येक। बरवतसे।' -अमृ १.२६. **बरवंटा**-वि (ल.) पतिव्रता; शुद्धाचारी. 'आम्ही गौळणी बरवंटा। जातों मथुरेच्या हाटा।' -होला ९. **बरवा-वी-वें**-वि. १ (काव्य) चांगला; छानदार. 'बरविया बरवंटा घनमेघसांवळा। वैजयंती माळा गळां शोभे।' -तुगा ३ २ सुंदर; नामी; निवडक इ०. [बरा] म्ह० बाहेर बरवा आंत हिरवा. ०**काळ होणें**-(व.) काळ अनुकूल होणें; आर्थिक परिस्थिति अनुकूल येणें, भरभराट होणें. **बरवेपण**-न. सौंदर्य. 'मग अलंकारीं बरवेपण। निवाडु दावी।' -ज्ञा १.४४.

**बरवा**—पुस्त्री (राग.) या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्रधैवत, कोमल व तीव्र निषाद हे स्वर असतात जाती औडव-संपूर्ण. वादी ऋषभ, संवादी पंचम. गानसमय सर्वकाळ. [सं. वरम्?]

**बरवाळणें**—अक्रि. फिरणें. 'सज्जूनि आपुलाले भार। बरवाळले संग्रामा।' -मुआदि २३.११७.

**बरसकाळा**—पु. (ना.) पावसाळा. [सं. वर्षाकाल]

**बरस(सा)न**—न. १ मस्तकातील थंडी; शैत्य; पडसें. २ पडश्यामुळें नाक इ० गळणें. (क्रि० येणें; वाहणें). [सं. वर्षण]

**बरसात, बर्सात**—स्त्री. १ पावसाळा; पाऊसकाळ. २ वर्षाव; वृष्टि. ३ घोड्यास होणारा शैत्य रोग; घोड्याच्या चार खवाटयांवर होणारें दर्द. -अश्वप २ २४०. ४ (पावसाळ्यांत) घोड्याच्या डोळ्यांच्या रक्षणासाठीं केलेली कातडी झापड, पडदा. [सं. वर्षर्तु, वृष्=पाऊस पडणें] **बरसादी डगला**-पु. (बडोदें) पावसाळ्यांत पोषाखावर वापरण्याचा डगला; (इं.) रेनकोट.

**बरह(र्ह)क-क्क**—वि बरोबर; युक्त; न्याय्य; योग्य. -क्रिवि. बरोबर रीतीनें, न्यायानें, हक्काप्रमाणें. 'मनसुबी मनास आणून बरहकइनसाफ करून उत्पन्न होईल.' -वाडबावा २.२. [फा. बर्हक]

**बरहु(र्हु)कूम**—क्रिवि. आज्ञेप्रमाणें, बेतानें, सारखें 'बर्हुकूम याद' -वाडबावा २.६६. 'धनी हुकूम करील त्या बरहुकूम चालावें.' [फा. बरहुक्म]

**बरळ**—न. भरड दळलेलें पीठ. -वि. १ विरळ विणीचा, अतिशय जाडाभरडा (कपडा). २ भरड दळलेलें (धान्याचें पीठ). [बरड]

**बरळ**—स्त्री. १ विसंगत भाषण (झोंप, ताप, दारूची निशा यातील). २ निरर्थक बडबड, वटवट; जल्पना. -वि. १ असंबद्ध (भाषण); मूर्खपणाचें भाषण करणारा; भ्रमिष्ट; मूर्खपणाचें (भाषण) 'ऐसें बोलती ते बरळ ज्ञानहीन।' २ भटकणारा; आडमार्गाला जाणारा; छादिष्ट. 'गुरुतें वाचा बरळ। विनवीत असे।' -विपु २ ६. ३ भ्रांत. 'जीव आधींचि समळ। वरि विषयेंसंगें होति बरळ।' -भाए ६२१. [ध्व.] ०**जाणें**-अक्रि. चाचरणें; मंत्र म्हणताना चुकणें. 'देखा मंत्रज्ञु बरळु जाय।' -ज्ञा १.१९०. **बरळणें**-अक्रि १ असंबद्ध भाषण करणें; भलतें भलतें बोलणें (झोंपेंत, तापांत, निशेंत). २ बडबडणें; चावळणें. ३ स्वच्छंद फिरणें; भटकणें; भलत्या मार्गाला जाणें. 'इंद्रियें बरळों नेदावीं।' -ज्ञा ३.११६ **बरळणी**-स्त्री. बडबड (झोंपेंतील).

**बरा**—पु. कोवळा दुंबा; लठ्ठ शेपटीचा मेंढा.

**बरा**—वि. १ चांगला; गुणांचा; मध्यम वर्गाचा; चालण्याजोग; योग्य. २ ठीक प्रकृतीचा; आरोग्य असणारा; रोगनिर्मुक्त. ३ सुमाराचा; बराच; पुष्कळ नसला तरी पुरेपूर. ४ (ल.) शहाणा. 'केवळ बाळचि इच्छी विधुसि धरायासि कां बरा इच्छी।' -मो उद्योग १०.३. -क्रिवि. १ वेळेवर; वक्तशीर. 'तूं बरा आलास.'

२ चांगल्या, नीट रीतीनें. ' वेव म्हणे बैस बरा। ' –मोभीष्म ४. १९ [सं. वरम्] **बरा घेणें**–चांगल्या तऱ्हेनें, खूप देणें (मार, ठपका इ०). खरडपट्टी काढणें. **बऱ्यावर असणें**–एखाद्याचें चांगलें इच्छिणें. **बऱ्या बोलानें–वाजीनें**–क्रिवि गोडीगुलाबीनें राजीखुषीनें; स्वतःची चूक कबूल करून. ' या चळवळीवरील अत्याचाराचे आरोप बऱ्याबोलानें परत घ्यावेत. ' –के २७.५.३० **बऱ्याशा झाडाची साल काढून न्हावप**–(गो.) चांगल्या माणसाच्या आधारानें राहणें. **बरावाईट**–वि. १ साधारण चांगला; मध्यम; बरासा; चालचलाऊ २ (कु ल.) आत्महत्या; मरण. ' जिवाचा बरावायट करूंक बगता ' **बरीगत–गती**–स्त्री घडगत; आशाजनक स्थिति (बहुधां नकारार्थी प्रयोग) 'त्या रोग्याची बरी गत दिसत नाहीं. ' **बरें**–न. १ कल्याण; क्षेम; भरभराट २ हित; नफा; फायदा; चांगलें. –क्रिवि १ ठीक; चांगलें; योग्य; मान्य २ पादपूरणार्थक शब्द. 'काय बरें यास उदाहरण ? ' ३ ठीक, फार चांगलें; होय (रुकार, कबुली, मान्यता इ० विवक्षित असतां) [बरा] **म्ह०** ज्याचें करावें बरें तो म्हणतो कर माझें खरें. **(एखाद्यास–ला) बरें मागणें**–चांगलें व्हावें अशी इच्छा, प्रार्थना करणें. **०पाहणें**–क्रि. चांगलें म्हणून समजणें; कल्याण चिंतणें. ' पंढरीचे ब्राह्मण देखतील कोणी। बरें मजलागोनी न पाहती। ' –तुगा. **बरेंपण आवप**–क्रि. (गो.) मैत्री जमणें **बरेंवाईट**–न दैवानें येणारें दुखणें; मरण; नाश इ०; आरोग्यादिक बरें व रोगादि वाईट.

**बराए**—क्रिवि विषयीं. –आदिलशाही फर्मानें. [फा.]

**बराक**—स्त्री. चाळ; खोल्यांची रांग; छावणी. [इं बरॅक्]

**बराडी**—वि. १ पराकाष्ठेचा खादाड; आधाशी. ' हे तो विख्यात खोडी खरचि न कवडी काय देतो बराडी। ' –किंसुदाम ७४ २ हावरा; आशाळभूत. 'कृपा कराल ते थोडी। पायां पडिलों बराडी। ' –तुगा ५५१ [वऱ्हाड, बिरड]

**बराडी**—स्त्री (व.) ताग काढून घेतलेली काडी; सणकाडी.

**बराडोल**—पु. भोंक पाडण्याचें हत्यार. –राको.

**बरात**—पु. १ चंगकांचनी नामक गंजिफाच्या खेळांतील तिसरा रंग. २ –स्त्री. खजिन्यांतील पैशाची मागणी; हुंडी. ३ (तुर्कीनें) लग्नाची वरात. [फा. बरात]

**बराद**—स्त्री (गो) पत्त्यांचा संच [पोर्तु. बराथो]

**बरा(रो)बर**—वि १ सम; तुल्य, सारखा; समान. २ तंतोतंत; अचूक; मिळणारा; न्यूनाधिक नसलेला (हिशेब, हकीकत). ३ युक्त; योग्य; न्याय्य; रास्त; चांगला. ४ सपाट, सारखा; सम; सरळ; नियमित; व्यवस्थित; यथायोग्य; सारखा; अनुगुण –क्रिवि. १ समवेत; समागमें; मिळून; एकाच वेळीं २ समपातळींत; तंतोतंत रीतीनें; सुरेख रीतीनें; न्यायानें; ठाकठीकपणें; नीटपणें; खरेपणानें; नेमका इ०. [फा. बराबर्] **बरोबरचा–बरीचा**–वि १ सारखा, सम; तोलाचा. २ एकाच वेळेचा, पदवीचा. ३ सोबतीचा; संगतीचा; संगती. **०होणें**–अक्रि. १ साफ जाणें; पूर्णपणें संपणें, व्यय होणें. २ चिरडलें जाणें; चुराडा होणें; तुकडे तुकडे होणें; उध्वस्त होणें; पूर्ण नाश केला जाणें (शब्दशः व ल).

**बरा(रो)बरी**–स्त्री. १ समता; सारखेपणा; (बुद्धिबळ क्रीडा) एका बाजूची दुसऱ्या बाजूवर मात होणें, अशक्य नाहीं अशी स्थिति होणें; (कोणत्याही खेळांत) एका बाजूमारखा दुसऱ्या बाजूचा डाव होणें. २ समानता; नियमितपणा, एकरूपता ३ समसमानपणा (व्यापारात–नफातोटयाचा इ०). ४ तुलना; स्पर्धा. ' हीन जनासी बराबरी। बोल बोले सरोत्तरीं। ' –दा २.१.५२. [फा बराबरी] (वाप्र.) **०करणें**–स्पर्धा करणें; तोलास तोल देणें. टक्कर मारणें. **०पाहणें–करून पाहणें**–तोलून पाहणें; तुलना करणें **बराबरीचा, बरोबरीचा**–वि सारख्या गुणांचा, धर्माचा, वीर्याचा, कौशल्याचा; जोड; तोल.

**बरामत**—स्त्री. बलामत; खोटा आरोप (क्रि० येणें; आणणें; घालणें) [फा.]

**बरामद**—स्त्री. १ व्यवस्था; निकाल 'कामाची बरामद होईल. ' –रा १०.१८३. २ निर्गत मालावरील जकात. –वि. १ आगत; आलेला. 'मागती नबाब बरामद होऊन इंग्रजी सहा सर्दार यांची मुलाजमत झाली. ' –रा ५ १४१. २ अधिष्ठित. ' कुर्सीवर नबाब बरामद जाले.' –रा ७ ८४. [फा. बरामद्]

**बराय, बराई–ये**—क्रिवि. १ साठीं; करितां. 'बराय तिजारत. ' –पदमव ११३. २ स्वतः; जातीनें; खुद्द; प्रत्यक्ष. ' तो बराय अर्ज खातरेस आणून...' –थोमारो १.३३७ [फा. बराइ]

**बराय(ई)खुद**–क्रिवि. स्वतःच्या विचारानें; स्वतः; जातीनें. ' इन्साफ बराई खुद (शब्दशः स्वतःच्या विचारानें) जातीनें पहावी. ' –रा १५.२९८. [फा. बराय+खुद]

**बरावर्द–वर्दी**—स्त्री. वरावर्द पहा.

**बरास**—न. १ (व.) शंभर चौरस फूट अथवा दहा फूट लांब, दहा फूट रुंद जागा. २ शंभर घनफूट. ३ (गो) २५ घनहात. [पोर्तु.]

**बरासकापूर**—पु कापराची एक जात. –मुंव्या १५५.

**बरी**—स्त्री आंगरख्याच्या घोळाची एक बाजू होणाऱ्या दोन तिकोनी तुकड्यांपैकीं पुढचा तुकडा; पेषकळी. ' भवताले घोंस जरीचे। सारे पडदे एक बरीचे। तुम्ही केवळ लाल हरीचे। ' –प्रला १६६

**बरी**—पु (माळवी) उडदाचा वडा वगैरे.

**बरीक**—क्रिवि. वाक्यालंकारार्थी प्रयोग जेव्हां सजातीय पदार्थसमुदायांतून विवक्षित गुणांचा एकच पदार्थ अपेक्षित असतो तेव्हां उपयोगांत आणतात. मात्र; तेवढा; सत्यतः; खातरीनें;

वास्तविक; तत्त्वतः; गृहीत धरून; अंगीकार करून. 'हे सगळे दागिने वाईट आहेत. हा बरीक चांगला.' 'तद्रीति सम कवि म्हणो ग्रामहरीच्या बरीक रीतीतें।' -मोसमा ५.३१. [बरा]

**बरू**—पु. बोरू; तृणविशेष; ज्याची लेखणी करतात असें ताट. 'नाना देसीचे बरू आणावे।' -दा १९.१ १६ [प्रा. बरुअ]

**बरोद्**—पु. तुळईवर ठेवावयाची लांकडी कडी. 'यांत फरशा बरोदावर ठेवतात' -मॅरट ५६.

**बरोंचें**—क्रि (गो.) लिहिणें. बरप पहा.

**बर्करार, बर्करारी**—पुस्त्री. निश्चितपणा; कायमपणा. 'बर्करारीचीं वचनें शिवाजीमहाराजास सांगावीं.' -चित्रगुप्त ९ [फा. बर्करार्]

**बर्का**—पु (वांई) हरळीसारखें गवत.-मसाप ३.३ -वि.रसाळ.

**बर्खास**—क्रिवि. १ खास; स्वतःची २ मुद्दाम 'बर्खास चिठ्ठी घेऊन पाठविली पाहिजे' -रा १०.४२२. [फा]

**बर्खुर्दार**—वि १ फळ खाणारा, उपभोक्ता. २ चिरंजीवी -राव्यको ८.४५. [फा बर्खुर्दार्] **बर्खुर्दारी**-स्त्री. उपभोग [फा.]

**बर्गी**—पु लुटारू; गनीम. 'बर्गे लोकांची चाल लढण्यास तोंड द्यावें आणि कमजोर जाला म्हणजे पळून जावें. -भाब १०९.

**बर्गुजर**—स्त्री. दिरंग; निष्काळजीपणा. 'बर्गुजर न करणें.' -रा १०.३६३. [फा.]

**बर्गोवचें**—अक्रि. (गो.) लांकडाचा भुगा होणें. बरग पहा.

**बर्जा**—वि. मान्य; योग्य. 'दुतर्फा दोस्ती चालावी हें बर्जा.' -रा १०.१२८. [फा. बर्जा]

**बर्जेस**—पु. (छापखाना) बारीक टाईप. हा टीपांच्या उपयोगी असतो. [इं.]

**बर्तख्त**—क्रिवि तख्तावर 'दिल्लींत पातशाहा बर्तख्त बसवावा.' -दिमरा १.२६९. [फा.]

**बर्तर**—वि. श्रेष्ठ; उच्चतर. 'पादशाही हुकूम बर्तर म्हणोन.' -चित्रगुप्त ७०. [फा.]

**बर्ताव-वा**—पु. (व.) चाल; रीत; पद्धत. [हिं.]

**बर्दार**—बरदार पहा.

**बर्निश**—पु. (सोनारी) भांड्यावर पॉलिश करण्याचा गोल रंधा. [इं.]

**बर्निस्बती**—क्रिवि प्रमाणें. 'तें बर्निस्बती साल मज्कूर दुमाला कीजे.' -रा १५.१३८ [अर निस्बत्=संबंध]

**बर्पा**—क्रिवि. उभा; सुरू असलेला. 'हंगामा बर्पा केला.' -ख ७.३५६७.

**बर्फ, बर्फी**—बरफ, बरफी पहा.

**बर्बद्राण**—स्त्री. (गो.) उग्र वास.

**बर्बर**—पु. म्लेंच्छांतील एक जात व तींतील व्यक्ति. [सं.]

**बर्बरदेश**-पु. आफ्रिकेंतील बार्बरी संस्थान -अश्वप १.३४.

**बऱ्या**—क्रिवि. (नामपुरी) वर.

**बर्ल, बर्लु**—न. १ (गो.) भुईनळा. २ पीप. ३ (बे) शिरी. -वि (निंदार्थी) अतिशय दारू पिणारा. [पोर्तु. बॅरील]

**बर्वक्त-ख्त**—क्रिवि वक्तशीर; वेळेवर 'मस्लहत उम्दी बर्वख्त तद्बीर् होऊन.' -पया ४६९ [फा]

**बर्सात-ती**—बरसात-ती पहा.

**बर्हम**—वि दिक्, मग्न. 'मर्जी बर्हम होते.' -रा ५.८. [फा बर्हम्]

**बऱ्हाणपुरी**—वि. बऱ्हाणपूर शहरचें (कापड, जरतार इ०).

**बर्हि**—न दर्भ; दर्भमुष्टि. श्रौत व स्मार्त यागांत दर्भमुष्टि पसरून त्यावर हवनीय द्रव्य ठेवतात. 'कुंडमंडप वेदिका सुलक्षण। इध्मा बर्हि त्रिसंधान।' -भाराबाल २.६९. [सं.]

**बर्हि**—पु. मोर; मयूर. [सं]

**बल-ळ**—न. १ सामर्थ्य; जोर; शक्ति; कुवत; क्षमता (शब्दशः व ल.). (समासात) तारा-ग्रह-लग्न-गुरु-बल (चंद्र, तारा इ०ची अनुकूलता); तसेंच द्रव्य-विद्या-बुद्धि-बाहु-मनुष्य-पुण्य-बल इ०. २ सैन्य; फौज; दळ. 'त्यावरि दुर्योधन बल पंचविससहस्र पाठवी राजा।' -मोभीष्म ५.११. [सं] ०**कुबल-ळ**-स्त्री. धोक्याचा व अडचणीचा काळ; संकटसमय; परीक्षेची वेळ. कालकक्षा, वेळ अवेळ पहा -क्रिवि. धोक्याच्या अडचणीच्या वेळीं. 'आम्हास बलकुबल पडल्यास कुमक करावी.' -माराचिथोरा ६३ [बल=शक्ति+कुबल=अशक्तता] ०**ठा**-पु बळ; शक्ति. -वि. बळकट; सशक्त; बलाढ्य. ०**दर्प**-पु शक्तीचा गर्व [सं.] ०**वत्तर, बलोत्तर**-वि. अतिशय बळकट; मजबूत; समर्थ; शक्त, बलाढ्य (मनुष्य, विशेषतः दैव, वेळ, परिस्थिति, घडलेली गोष्ट) [सं. बलवत्+तर] ०**वान्-वन्त**-वि. बळकट; सशक्त [सं.] ०**हा**-पु इंद्र; बल दैत्याचा हननकर्ता. 'कलहाकरितां मजसी भंगचि पावेल सामरहि बलहा।' -मोद्रोण १२ ८९. [सं.] ०**क्षय-क्षयवात**-पु. शक्तिपात करणाऱ्या वातविकाराचा क्षोभ [सं.] **बला(ळा)ढ्य**-वि. बलवान्, सशक्त. [सं] **बला(ळा)त्कार**-पु जुलूम, जबरी; जबरदस्ती. [सं.] **बलाबल**-न. १ अन्योन्य शक्तता व अशक्तता; बळाची तुलना (वादी पक्षांची, विधिनिषेध पक्षांची, वादग्रस्त गोष्टीच्या अनुकूल-प्रतिकूल कारणांची). 'हे दोन पक्ष आहेत त्यांत बलाबल पाहून सबल पक्ष असेल तो घ्या.' २ शक्ति; उपाय; साधन. 'जे कांहीं करणें तें बलाबल पाहून करावें.' ३ सामर्थ्य; आगची शक्ति, उत्कृष्टता (वस्तूंतील, मनुष्यातील). [सं. बल+अबल] **बलाय, बलायकी**-स्त्री (गो.) बल; आरोग्य **बलियाड**-वि बलिष्ठ. 'जे कीं बलियाडे सुभट।' -गीता १.४९८. **बलिष्ठ**-वि प्रबल. अतिशय बळकट. [सं] **बली-ळी**-वि.

सशक्त; बलवान्; पराक्रमी. [सं.] **बलीकटु**-वि. बळकट. 'आमचा वैरी बलीकटु '-पंच ३.१.

**बॅलॅ**—न. (गो.) गूळ. [भेली ?]

**बलक, बलब**—पु. १ चीक; चिकट पदार्थ (अंडें इ० कांतील) २ गूळ इ० चा द्रव. ३ मगज; गीर. [हिं.]

**बलक**—विक्रिवि. (ग्राम्य) थोर; मोठा; पूर्ण; चरचरीत; तब्बल, जबर; बळकट; चरब, बद्द (कोस, मजल, ओझें, माप, शेर इ०).

**बलकांव**—न. १ (गो.) सोपा. २ घरापुढील दारासमोर दोन्ही बाजूंस बसण्यासाठीं केलेली उंच जागा, कट्टा. [पोर्तु]

**बलकी**—स्त्री. खांब इ०च्या कोपऱ्यावरची खोबण.

**बलकी-लिक-ल्की, बलक, बलकें-ल्कें**—क्रिवि निदानीं; इतकाच नव्हे तर आणखी; देखील; किंबहुना.'३०० पडोत बलकी ३५० पडोत, पण घोडा घ्यावयाचा.' [फा. बल्कि]

**बलग(गा)ट**—न (चि) आरोप; बालंट; किटाळ; संकट

**बलंगी**—स्त्री. बाजरीच्या निबुराचें कसपट, गोंड; तें दातांत अडकल्यानें होणारें दुःख. 'हिरडी सुजे भरे बलंगी।' –दा ३.६.१८.

**बलंगी**—स्त्री. कुस्तीचा एक पेंच (क्रि० भरणें).

**बलछडा**—पु १ लांकडाचा जाड व लांब वासा (शिडी, इ० साठीं). २ भाल्याचा दांडा. ३ (ल.) भाला

**बलबल, बलबलपुरी**—स्त्री. १ दंगलीचें, धुमाकुळीचें ठिकाण; बाजार. २ अव्यवस्था; अंधेरनगरी, गोंधळ; अंदाधुंदी; नियम इ०कांकडे दुर्लक्ष; बेशिस्ती. (क्रि० मांडणें; होणें; करणें) 'राजेलोक ऐषआरामी झाले म्हणजे.. सगळी बलबलपुरी होऊन जाते.' –बाजी. [बलबल+पुरी=शहर] म्ह० बलबलपुरी आणि टमटम राज्य.

**बलबलीत**—वि मऊ; दबणारें, बिलबिलीत, गिजगिजीत व चिघळणारें (फळ इ०). [ध्व.]

**बल(ल्ल)म**—पु. आखूड भाला. 'खासे यांच्याकरितां ... बल्लम स्वारींत पाठविणें.' –(बडोदें) डुकराची शिकार १४.

**बलवणें**—अक्रि. बोलवणें. 'वाचे नो बलवे सुहृन्मुखें या उत्तरा दे वदे।' –विठ्ठल, रसमंजरी ४२. [बोलवणें]

**बलवा**—पु. १ गलबला; दंगल, कोलाहल; तंटा; तक्रार; बंड. २ (ल) कुप्रसिद्धि. ३ अव्यवस्था (काम, हिशेब, व्यवहार यांची). ४ उपद्रव. [हिं.]

**बलवार**—पु. छप्परबंदाची जात व तींतील व्यक्ति.

**बला**—स्त्री. भिस्त; आधार. 'पक्षकाराची बला वकिलावर.' –मौज अं. ३ (१९३५). [सं बल]

**बला, बलाय-ई**—स्त्री. १ संकट, इडापिडा. 'कोणी कांहीं समजावील आणि आपल्यावर येखादी बलाई येईल.' –मदरु १ १२१. त्रास; दुःख; पीडा (माणूस, प्रसंग, यांपासून). २ आळ; बालंट; आरोप. (क्रि० घालणें; आणणें) [अर बला] म्ह० शाहण्याची बलाय दूर **बला-या घेणें**-क्रि. इडापिडा घालविण्यासाठीं बोटें मोडून दृष्ट काढणें 'उभारूनि बाह्या बला घेते बसुनिया।' –सला ३७. 'कितीक रूपवंत्या मुख पाहुनी बलाया घेती।'–पला ९२. **बलागत**-स्त्री आकस्मिक येणारें संकट; लचांड; पीडादायक मनुष्य, धंदा इ०. (क्रि० येणें; घालणें; आणणें) **बलादुरी**-स्त्री. संकट दूर होण्यासाठीं ओंवाळून टाकलेला पदार्थ. 'बायकांनीं... बला-दुरी व सतगें करून ओवाळिलें'–चित्रगुप्त ११४.

**बलां(ला)ट-ड**—न. वृथारोप; आळ, बालंट; तुफान. (क्रि० घेणें; घालणें) [दे.] **बलांटी-ट्या, बलांट-लाट-लांड-खोर, बलांडा-डी-ड्या**-वि तुफान घेणारा, आळ घेणारा.

**बलांडा**—वि. (कों.) बलवान; विद्यादि गुणानीं मोठा. [सं. बलाढ्य]

**बला(व्हा)णी, बलावणी, बलाणी**—स्त्री. १ (राजा.) देवळाच्या गाभाऱ्याच्या, सभामंडपाच्या भिंतीला लागून असलेला ओटा. 'वरी बलाणी इंद्रनीळाची।' –कथा ४.१८.२१६. २ (कों) रहाटगाडग्यें फिरविणाराची बसण्याची जागा. [दे]

**बलामत**—स्त्री. १ मिथ्या आरोप. २ बलागत या अर्थी योजतात बला शब्दांत बलागत पहा. [फा बरामद; अर. बलामत]

**बलाय(इ)बस्तर**—न. १ सटरफटर वस्तू. २ लबाडीनें मिळविलेली मिळकत (जमाखर्चांतील).

**बलांव**—न. (ह्रेट.) कोडबीपेक्षां मोठी होडी. [पोर्तु. ?]

**बलाविणें, बलाविणेंकरी**—बोलाविणें, बोलावणेकरी पहा.

**बला(ळा)हक**—पु. मेघ. [सं.]

**बलि-ळी**—पु. १ देव, पिशाच यांना अर्पण करावयाचें अन्न, पशु, पक्षी इ० (क्रि० देणें). २ बलिदानाचे वेळचें देवपूजेचें साहित्य (पुष्पादिक). ३ बलि नामक राजा; दैत्य; महाबलि पहा. –वि. बळकट; सशक्त. [स.] ०**दान-प्रदान**-न. १ बली अर्पण करणें; दान; शांति इ० कांत उडीद मिसळलेल्या भातावर किंवा कोहळ्यावर गुलाल टाकून त्यावर जळता कांकडा लावून तो शिसरांत ठेवून तो मनुष्यादिकावरून ओवाळून देवतास अर्पण करितात तें भक्ष्य. 'पीडा निवारूं बळिदान देणें।' –दावि १७२. २ नजराणा. 'कांहीं बळिदान अंगीकारा माझें।'–एभा ४.१००. [सं.] ०**प्रतिपदा**-स्त्री कार्तिक शुद्ध प्रतिपदा. [सं.] ०**हरण**-न. भूतयज्ञ

**बलिग**—वि. सक्त; करडा. –आदिलशाही फर्मानें. [फा.]

**बलीवर्द**—पु. अंडिल बैल; न बडविलेला बैल [सं.]

**बलु(लो)तें**—न. १ गांवांतील बारा वतनदारांना अथवा हक्कदार कारूंना शेतांवर त्यांच्या हक्काबद्दल गांवकऱ्यांनीं नेमून दिलेला धान्याचा, बागाइताच्या उत्पन्नाचा वांटा; गांवकऱ्यांच्या गरजा भागविण्यासाठीं कारूंना कुणब्याकडून मेहनताना म्हणून मिळणारा पिकाचा वंशपरंपरागत वाटा. २ (कांहीं ठिकाणीं) पाटील कुळकर्णी इ० गांवच्या पिढीजात कामगारांचा हक्काचा वांटा ३ वरील बारा वतनें:–कांहीं महारबलुतीं (मुसलमानी व मराठी राज्यांत मिळणारीं):–१ सितादेवी किंवा उभ्या उसाचा भाग. २ वेशीवरची देणगी. ३ शिमगीपौर्णिमेस होळीचा नैवेद्य. ४ वेंद्र-आषाढी पौर्णिमेला धान्य ५ हातशेकणें=गुऱ्हाळावरील भट्टीचें बलुतें. ६ मृत जनावरांचे अवशेष ७ घरटक्का. ८ दफनाचे खड्डे खणण्याचे पैसे. ९ खळयावरील दाणे १० पेवाच्या तळाचे दाणे. इ० –अस्पृ ३७. 'येश जय प्रताप कीर्ति । हे अयोध्येचीं बलुतीं।'–वेसीस्व ६.६३. [का बल=उजवा+कुह=देणें; बलुता= उजव्या हाताचा हक्क म्हणून देणें] **बलु(लो)तेदार, बलु(लो)त्या, बलु(लो)लौता**–पु. बलुत्यावर हक्क असणारा गांवचा वतनदार; सरकारी कामगार पाटील, कुळकर्णी इ० कांहून हे भिन्न असून बारा आहेत:–१ सुतार, २ लोहार, ३ महार, ४ मांग (ही पहिली किंवा थोरली कास किंवा वळ. यांपैकीं तिघांचा धान्याचे चार पाचुंदे किंवा कणसासह २० पेंढ्यांवर हक्क आहे व महाराचा ८ पाचुंद्यांवर हक्क आहे), ५ कुंभार, ६ चांभार, ७ परीट, ८ न्हावी, (ही दुसरी किंवा मधली कास किंवा वळ या प्रत्येकाचा तीन पाचुंद्यांवर हक्क आहे), ९ भट, १० मुलाणा, ११ गुरव, १२ कोळी (ही तिसरी किंवा धाकटी कास किंवा वळ. या प्रत्येकास दोन पाचुंदे मिळतात) याप्रमाणें पुढील बारा अलुते आहेत–तेली, तांबोळी, साळी, माळी, जंगम, कळावंत, डवऱ्या, ठाकर, घडशी, तराळ, सोनार, चौगुला. हेहि हक्कदार आहेत (मात्र यांचा हक्क ठराविक नाहीं). कांहीं ठिकाणीं पुढीलप्रमाणें बलुतेदार आढळतात:–पाटील, कुळकर्णी, चौधरी, पोतदार, देशपांड्या, न्हावी, परीट, गुरव, सुतार, कुंभार, वेसकर, जोशी. यांत सुतार, लोहार, चांभार, कुंभार ही पहिली कास. न्हावी, परीट, कोळी, गुरव ही मधली कास आणि भट, मुलाणा, सोनार, मांग ही तिसरी कास होय. कोंकणांतील बलुतेदार यांहून थोडेसे निराळे आहेत; इंदापूर परगण्यांतील बलुतेदार पुढीलप्रमाणें आढळतात –पहिली कास-सुतार, लोहार, चांभार, महार. दुसरी कास–परीट, कुंभार, न्हावी, मांग. तिसरी कास–सोनार, मुलाणा, गुरव, जोशी, कोळी, रामोशी. एकूण १४. पंढरपूर प्रांतांतील बलुतेदार.– थोरली वळ –महार, सुतार, लोहार, चांभार. मधली वळ–परीट, कुंभार, न्हावी, मांग. धाकटी वळ–कुळकर्णी, जोशी, गुरव, पोतदार. ग्रँटडफ याच्या मतानें–सुतार, लोहार, चांभार, मांग, कुंभार, न्हावी, परीट, गुरव, जोशी, भाट, मुलाणा हे बलुतेदार व सोनार, जंगम, शिंपी, कोळी, तराळ, वेसकर, माळी, डवऱ्यागोसावी, घडशी, रामोशी, तेली, तांबोळी, गोंधळी हे अलुतेदार आहेत पुष्कळ जागीं महारास पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या वळींत धरतात हल्लीं आढळणारे अलुतेदार किंवा नारू:–सोनार, मांग, शिंपी, भट, गोंधळी, कोरगू, कोतवाल, तराळ हे आहेत तथापि अलुतेदार व बलुतेदार हे निरनिराळ्या जिल्ह्यांत वेगवेगळे आहेत; त्यामुळें त्यांची एकवाक्यता होणें कठिण वरील कास म्हणजे, गांव ही गाय असून तिचें पीक ही कास होय; आणि बलुतेदार हीं या गाईच्या कासेला पिणारीं वासरें. 'अहो जीवु एथ उखिता। वस्तीकरु वाटे जातां। आणि प्राणु हा बलौता। म्हणोनि जागे।'–ज्ञा १३.३४. [सं बली+ अपत्य=बलुत्या ?]

**बल्यामारी**—उद्गा. (व) पर्वा, दिक्कत, फिकीर नाहीं या अर्थी. 'या तंट्यापायीं घरदार गेलं तरी बल्यामारी.' [बला= पीडा ?]

**बल्यांव**—न. (कों.) एक प्रकारची लहान होडी. वलांव पहा.

**बल्ल**—न. (गो.) पीप.

**बल्लम**—पु. बलम पहा. 'बल्लम बाण बोथाट्या।'–ऐपो २००. [हिं. बलम]

**बल्लव**—पु १ गोपाळ, गवळी. 'वनीं खेळती बाळ ते बल्लवाचे।'–वामन, वनसुधा १.१६. २ आचारी; विराटाच्या घरीं भीमानें आचारीपणा करीत असतांना धारण केलेलें नांव [सं.]

**बल्ला**—पु. १ (बे.) सापळा. २ फांसा. [का बळ्ळी]

**बल्लाळतांटी**—स्त्री. (महानु.) कनात. 'गाडेयांचिया निहटी। घातली बल्लाळतांटी।'–शिशु ५६९

**बल्ली**—स्त्री. १ उथळ पाण्यांत होडी पुढें लोटण्यासाठीं उपयोगांत आणावयाची दांडी, वासा; ताज. २ नावेची डोलकाठी. ३ (व) लाकडी दांडी; वांसा.

**बल्ल्या**—पु. १ (कर.) बच्चा. २ (मुलांत रूढ) देडादाखल द्यावयाची गोटी. 'वल्ल्या दे.'

**बल्वा-ळवा**—पु. दंगा बलवा पहा. 'ज्यांणीं बलवा केला, त्यांत शामील जाले असतील त्यांचेंहि पारिपत्य करणें.'–रा ७. ४१. [फा. बल्वा]

**बल्हारी**—स्त्री (व.) सामर्थ्य; थोरपणा; मोठेपणा. 'काय तुमची बल्हारी सांगावी.' [हिं. बलिहारी]

**बव**—न (ज्योतिष) अकरा करणांपैकीं पहिलें. [स]

**ब-वकूफ**—पु शहाणा [फा. बा–वकूफ]

**ब-वक्त(ख्त)-नेक**—क्रिवि. शुभ समयीं, प्रसंगीं; वेळेवर; योग्यवेळीं. 'खत मसरत-नमत पाठविलें तें ब-वख्त–नेक पोंहचलें'–पया ४८०. [फा.]

**ब-वजूद**—क्रिवि. असूनहि; शिवाय. 'ब-वजूद टॉमस मोष्टीन ... पुण्यांत आला असतां ...' -ऐटि १.५८. [फा बा-वुजूद्]

**ब-वजे**—क्रिवि. उत्कृष्ट रीतीनें; वहिवाटीप्रमाणें. [फा.]

**बवर्ता**—पु सफेत व काळया केसांत लाल केस असलेला घोडयाचा एक रंग. -अश्वप १.३२.

**ब-वाईक**—क्रिवि खरेपणानें. -आदिलशाही फर्मानें. [फा.]

**ब-वाजवी**—क्रिवि योग्यतेनुरूप. 'ब-वाजवी ताकीद होईल' -रा १५.१५६ [अर]

**ब-वाशि(सी)र**—स्त्री मूळव्याध. -अश्वप २.१९५ [हिं]

**ब-शर्त(र्थ)-र्ती**—स्त्री. १ पराकाष्ठेचा यत्न; जबरदस्त आणि निश्चयाचा प्रयत्न. 'त्यानें ग्रास ब-शर्तीनें वांचविलें.' २ अट. 'ब-शर्तीची याद' -पया २५१. -वि. अटीवरील. 'ब-शर्ती हुण्डया.' -रा १९.३२. -क्रिवि. १ निश्चयाच्या प्रयत्नानें; आस्थेनें; आवेशानें. 'त्या प्रांतांत ब-शर्त अम्मल बसविला.' २ निःसंशय; खातरीनें; बिनचूक. ३ (शर्तीनें, पैजेनें) निश्चितपणें, पूर्णपणें; अगदीं. उदा० ब-शर्त लबाड-लुच्चा-सोदा इ० ४ अटीप्रमाणें. 'तुमचें काम ब-शर्थ झालें.' -हब ५६. ५ अटीवर. 'परंतु ब-शर्थ मशारनिल्हेचीं कुटुंबें शहरांत दाखल व्हावीं.' -रा १०.२६५. [फा. ब-शर्त्]

**बशा-इया**—पु. १ मालकाच्या गैरहजिरीत घराच्या, शेताच्या राखणीस ठेवलेला महार. २ बसून फुकट वेळ घालविणारा; आळशी. [बसणें] **०खाणें**-अक्रि. अडकून बसणें.

**बशारत**—स्त्री. शुभ वार्ता; खुशखबर. 'अशी आम्हास बशारत जाली आहे.' -रा १.६३. [अर. बशारत्]

**बशी-सी**—स्त्री. लहान ताटलीसारखें पसरट भांडें (विशेषतः चहापिण्याचें). 'कपबशी' (गो) काचेचें तबक. [पोर्तु बसिया. हिं. बासन]

**बॅशॉ**—वि. (गो.) निरर्थक.

**बस-स्स**—क्रिवि पुरे; पुरेसा; ठीक. 'ग्यासांवर युरोपीय पंडितानीं अलीकडे जो चोरीचा चार्ज आणला आहे तोच बस आहे.' -नि ५००. -स्त्री. (अशिष्ट) वैपुल्य; रेलचेल; कमाल. 'त्यानें गाण्याची बस करून दिली.' [फा. बस्] (वाप्र.) **०करणें**-अक्रि. थांबणें; विरमणें; राहणें. **बस भाई**-उद्गा. १ थांब! पुरे बाबा! २ तृप्ति. कंटाळा दाखविण्यासाठीं योजतात (क्रि० होणें. कर्त्याची षष्ठी). [हिं. बसभाई]

**बस**—पु. १ दृढता; निश्चितपणा; कायमपणा. २ स्थिरस्था वरतेची स्थिति; जम; वजन; छाप; पगडा. (व.) बसोटी. (क्रि० बसणें). 'ज्या व्यवहारांत ज्याचा बस बसला तो त्यास सुकर.' [बसणें] **बसक**-स्त्री. १ आसन; आस्तरण; बैठक; बिछाईत (जाजम, खुर्ची इ०). २ बैठक; खुर्ची; तळखडा; (सामा.) आधार. ३ बसकी; तळ; बुड; पाय; बुंधा, अडणी. 'या दऊतीची बसक लहान म्हणून आपटते.' ४ बसकी; बाजारांत घातलेल्या दुकानावरील कर, पट्टी. ५ बसकीची जमीन; सपाट, सखल जमीन; दरी; बदखल ६ जमीनीचा खोलगट भाग; लवण. ७ जमीनीवर ठाम बसून राहणें (थकल्यामुळें, हट्टानें-मनुष्यानें, पशूनें) (क्रि० घेणें; मारणें). **बसक**-वि. सखल; खोलगट (जमीन). **बसकट**-स्त्री. दमल्यामुळें, हट्टानें, (तगादेवाल्यानें ऋणकोला) रोखण्याकरितां जमीनीवर थबकल घालून बसणें; हातपाय मोकळे सोडून बसण्याची क्रिया; बैठक (क्रि० घेणें; मारणें). 'ही म्हैस उभी आहे तों दूध काढा. एकदा बसकट मारली म्हणजे उठणार नाहीं' -वि. १ सखल, थपकट; चपटें; सपाटसर; याच्या उलट उभट, उभार. २ बसकें; फेंदरें. नकटें (नाक). **बसकट नाक्या**-वि फेंदरा; नकटा. **बसकण**-न १ आस्तरण; बैठक बसक (-स्त्री) पहा. २ बसकट, थबकल (-स्त्री) पहा. **०कण-घेणें-मारणें**-सिद्धीच्या निराशेनें हातीं घेतलेलें काम सोडून देणें. **०क(का)र-कूर, बस्क-(स्का)र**-स्त्रीन हांतरी; चटई; जाजम, घडवंची; मुलांनीं शाळेंत बसावयास आणलेलें गोणपाट इ० आसनाप्रमाणें पसरलेली, ठेवलेली कोणतीहि वस्तु. (हेट.) बस्टुक. [सं. विष्टर] **०कल**-स्त्रीन. बसण्यास फुरसत, वेळ; सवड; संधि (बहुधा नकारार्थी प्रयोग). 'तो सारा दिवस फिरतो त्यास क्षणभर बसकल सापडत नाहीं.' -वि. १ कमी उंचीचें; आखूड व पसरट; नीच व सपाट. २ बसकें; फेंदरें; नकटें (नाक). ३ खोलगट; खालपट (जमीन). **०का**-स्त्री. १ (राजा.) बैठक; आसन; खुर्ची. २ तळ, पाया (वस्तूचा). -वि. १ बेताच्या उताराचा; आडव्या घाटाचा; याच्या उलट पाणढाळ; खर. २ सपाट; थबकट. **०की**-स्त्री. १ विटीदांडूच्या खेळांतील एक शब्द. २ बसका अर्थ १ व २ पहा. ३ चुंबळ. -वि. चुंबळीसारखें बसकट (पागोटें). 'तिवट बस्की साधें.' -समारो १.२०१. **०कीचा**-वि. १ तळ, पाया, बैठक, असलेला. २ बसण्यालायक (घोडा, बैल, गाढव). **०कूर**-स्त्रीन. बसकर पहा. **बसकेचा**-वि. तळ, पाया, बैठक, आधार असलेला. **०कोळी**-स्त्री. बसकट मातीची घागर. 'यथाविधीनें त्या येरी। बसकोळया घागरी।' -तुगा २८०. **बसण**-स्त्री. (कर.) बसण्यास घेतलेली लाकडी वस्तु **बसणी**-स्त्री. १ बसणें; बैठक; मांडी ठोकून बसणें. 'एका बसणीस म्यां शंभर बंद लिहिले.' २ बूड; आसन. ३ (कों.) लहान पाट. **०फुगडी**-स्त्री. बसून घालावयाच्या फुगडीचा खेळ. 'बस फुगडी बसुंगा। चतुर भुंगा लालुंगा। एक पाय खोलीतो। सीताराम बोलीतो।' -मसाप २.२३४.

**बसकल**—स्त्री. (कों.) माशांची एक जात. हे ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्यें पकडतात.

**बसणें**—अक्रि. १ बैठक मारणें. २ ढुंगण, गुडघा, घोटा इ० ज्यावर टेंकणें. ३ खालीं बूड टेंकणें; उपविष्ट होणें; बसक घेणें; पंख आकुंचित करून राहणें; विश्रांतीसाठीं खालीं टेंकणें (पशु, पक्षी यानीं) ४ उद्योगधंदा, काम वगैरेशिवाय असणें; रिकामटेकडा, निरुद्योगी असणें. ५ फुकट वेळ घालविणें. ६ खुर्ची इ० बैठकीवर अधिष्ठित होणें. ७ (शब्दशः व ल०) वर पडणें, असणें. 'अंगावर धूळ बसली.' ८ (विशेषतः ल०) एखाद्यास भारभूत होणें; एखाद्यावर अवलंबून असणें. ९ तळीं जाणें; स्थिरावणें १० खालावणें; कमी होणें (नदीचें, विहिरीचें पाणी) ११ बोथट होणें (शस्त्राची धार). १२ स्थिरावणें (एखाद्या मार्गांत, स्थितींत); (ल०) रमणें. 'तदुपरि मग तीचें चित्त कोठें बसेना।'—सारुह ३.५९. १३ स्थिरावणें (पाऊस, उष्णता, ताप) १४ ऱ्हास, अपकर्ष होणें; खालावणें; काढतें घेणें; श्रेष्ठता गमाविणें; वैभव कमी होणें. १५ सवयीनें निष्णात किंवा तरबेज होणें; अंतःप्रवेश होणें (हाताचा, दुसऱ्या अवयवाचा, बुद्धीचा, ज्ञानाचा); चांगलें समजणें. 'हें गाणें माझें बसलें.' १६ (ल.) अंगावर येणें; पडणें 'मार-खर्च-तोटा-बसला' १७ योग्य होणें; विवक्षितपणें जुळणें; मिळणें; पटणें, जडणें; बरोबर होणें; लागू पडणें (सांधेजोड, युक्ति, हिकमत, हिशेब) १८ खचणें; बुडणें; बिन किफायतीचा होणें; नासणें; तोटा येणें (व्यापार, धंदा यांत) १९ घोगरा, बदसूर, खोल व अस्पष्ट होणें; बिघडणें (कंठ, गळा, घसा, आवाज). २० स्थापित होणें (अम्मल, सत्ता). २१ जोम, जोर मिळविणें (पिकानें). २२ पार जाणें; समूळ नाहींसें होणें. २३ दबणें; कमी होणें; चेपणें (गळू). २४ आरंभ करणें २५ प्रमाण ठरणें. २६ प्रहार लागू पडणें; फटकारा लागणें (चाबूक इ० चा). [सं उपविश्; प्रा उवइस, बइस; फ्रें जि. बेश; आर्मेजि. वेस] म्ह० बसूं जाणे त्याला उठ कोण म्हणे=ज्याला कोठें व कसें बसावें हें कळतें त्याला 'उठ' म्हणून कोण म्हणेल? **बसतां लाथ उठतां बुक्की, उठतां लाथ बसतां बुक्की**-सर्वदा मार. **बसले(ल्या)घडीचा**-वि. पुष्कळ दिवस एकसारखा घडी घालून ठेवलेला व त्यामुळें कोरेपणा व झकपकपणा गेलेला कोरा (कपडा). याचे उलट ताण्याचा=कोराकरकरीत. [बसणें+घडी] **बसले राहून**-क्रिवि. बसून. 'महाराज खिडकींत नेहमीं बसले राहून दिवस मोजीत.'—विक्षिप्त १.१३१. **बसत्या महिना**-वि. चाकरी न करितां दरमहाचा दरमहा मिळणारा (पगार). **बसांत आणणें**-सक्रि. स्वतःच्या ताब्यांत आणणें. 'दहाजणी मी बसांत आणिल्या प्रेमाचें पाजुन पाणी।' —पला १४ **बसून आंतील टांग (मारणें)**-स्त्री (मल्लविद्या) जोडीदारानें आपल्यास खालीं धरल्यास आपल्या एका हातानें जोडीदाराच्या कोपरावरून हात घालून त्याचा हात घट्ट धरून ज्या हातानें आपण जोडीदाराचा हात धरला असेल त्याच बाजूच्या आपल्या पायानें जोडीदारास वर ढकलून व त्याच्या हातास आपल्याकडे ओढून झटका देऊन त्यास चीत करणें. **बसून बाहेरील टांग (मारणें)**-स्त्री. (मल्लविद्या) जोडीदारानें आपल्यास खालीं धरल्यास जोडीदाराच्या कोंपरावरून आपला हात घालून त्या हातानें त्याचा हात घट्ट धरून त्याच बाजूच्या आपल्या पायानें जोडीदाराच्या पिंडरीस बाहेरून आपला पाय टेकून त्याच्या धरलेल्या हातास एकदम आंत झटका देऊन त्यास चीत करणें. (टांग=गुडघ्यापासून घोटयापर्यंतचा पायाचा भाग).

**बसणें**—न. बसण्यासाठीं पसरलेली, ठेवलेली कोणतीहि वस्तु; बैठक. **बसता**-वि. बसण्याच्या उपयोगी (घोडा, बैल इ०).

**बसंत**—पु. १ गाण्यांतील एक राग. २ वसंतऋतु. [हिं.; सं. वसंत] **बसंत-ती**-वि. केशरी; कुसुंबी; पिंवळा (कपडा किंवा रंग). 'डोईस बसंती फेटा दुपेटा बसंत ग।'—प्रला ९४.

**बसन**—न. (ढोर) जनावराच्या मागील फऱ्याची जागा, चौक.

**ब(बे)सनेकड**—न. (कों.) मुळकुळ्यामध्यें घातलेला दांडा. रहाटास बैल लावावयाचा नसल्यास ह्या दांड्यानें रहाट फिरवितात. मुळकुंड्याजवळ बसनेकडाशीं काटकोनांत जोखड बांधतात

**ब-सरंजाम**—क्रिवि. सरंजामासहित. [फा]

**बसर**—वि. (व.) हार गेलेला; पराजित. 'कोणाला बसर जाणार नाहीं तो.' [ओसर] **०येणें-जाणें**-अक्रि. हरणें; पराभूत होणें. [ओसरणें-बसरणें-बसर]

**बसराई**—वि. १ बसरा शहरचीं (रेशमी वस्त्रें, मोत्यें, फळें). २ केळींची एक जात. हें केळें बारीक व लांब असतें. याचें बीं बसऱ्याहून आलेलें आहे.—कृषि ४८८. **०चोखे मोतीं**-न. बसरा येथील सुकुमार, तेजस्वी व गोल मोतीं. [फा.]

**बसला वाटा-भाग**—पु (कर.) फाळयासहित उत्पन्नांतील मालकीचा विशिष्ट भाग (खर्चवेंचाविरहित). हा कडधान्यापुरताच असतो.

**बसव**—पु लिंगायत धर्माचा मुख्य उत्पादक हा धर्म शिवोपासक आहे. [सं. वृषु=बैल] **बसव(स्व)ण्णा, बस्वण्ण-ण, बसवा**—पु. जंगमांच्या देवळांतील पूजेचा नंदी; बैल. 'कसाबाचे आळी मांडिलें प्रमाण। बस्वण्णाची आण तया काई।'—तुगा ३०६८.

**बसवंत**—न. उपास्य दैवत 'सांडीं या विषयाची घाई रे। येणेंचि खेळे बसवंत होसी।'—तुगा २४३. [प्रा.]

**ब-सवाब**—वि उचित. 'त्याचा जबाब ब-सवाबच येईल.' —रा ५.८५. [फा.]

**बसविणें**—सक्रि. १ बसायास लावणें. 'नजावन करावया बसविलें नखाग्रीं धरा।'—केका ५. २ पक्कें करणें; बांधणें; स्थिर करणें (कोणत्याहि स्थितींत). ३ माथीं मारणें; सोंपणें; लादणें. ४ थंड करणें; शमविणें; स्थिर करणें; विश्रांति घेण्यास लावणें.

५ भोगावयास लावणें, वर आणणें; गुदरविणें ( कांहीं अनिष्ट ). ६ योग्य करणें, जमविणें, लावणें; जुळविणें; मिळविणें. ७ स्थापणें ( राज्य, सत्ता, कानू, विधि, वहिवाट ) ८ (बायको) न्हाणवलीस मखरांत ठेवणें ( गर्भाधानाच्या पूर्वी ). [ बसणें ] **बसवी**–स्त्री. १ ( बाजारांत बसणारी ) वेश्या; कसबीण, निर्लज्जत्वादि गुणविशिष्ट गरती स्त्री २ जंगम मताची कसबीण –शास्त्रीको. ३ देवळी; मुरळी. [ बसणें ]

**ब-साअत-नेक**—क्रिवि. शुभ घटिकेला [ फा. ]

**बसालत**—स्त्री. संधि; स्नेह [ अर. विसाल् ] **०ती**–वि. स्नेहाचा; मैत्रीचा. 'खान कुम्पनीचे बसालती सिल्सिल्यांत दाखल जाला आहे.' –रा १०.२५१.

**ब-सिका-खास**— क्रिवि खास शिक्यानिशीं. 'फर्मान ब-सिका-खास.' –रा २०.३६५. [ फा ]

**बंसी**—स्त्री. बांसरी; पांवा; वेणू, मुरली. 'अधरीं धरिसी बंसीला।' –मध्व १४६ –पु. कृष्ण. [ हिं.; सं. वंश ]

**बसु(सो)ला-ली**—पुस्त्री. सुताराची तासणी; वाकस. [ हिं. बसुला ]

**बसो**—पु. उसाची एक जात. –कृषि ४५०.

**बसोल**—पु. ( व ) मढविणारा

**बस्त**—पु बोकड. 'कंस दैत्य हे बस्त सकळ। बळी घेसी तयांसी।' –ह १४ ७. [ सं. ]

**बस्त व-भाव**—पु. वस्तभाव –आदिलशाही फर्मानें. [ फा ]

**बस्त(स्ता)न**—न. १ रचना, व्यवस्था; बेत; बस; जम. ( क्रि० बसणें ). 'स्नानाचें–जेवण्याचें–निजण्याचें–वस्तान बसलें.' २ बंदोबस्त; स्थिरावलेपणा; निश्चिति; कायमची जागा घेणें धरणें. ( क्रि० बसणें ) ३ ठरणें; पडणें ( प्रमाण ): यावरून सरासरी; मध्यम प्रमाण; वाटणीचें प्रमाण, दर ( क्रि० बसणें ) 'पंधरा रुपयांचें पंचवीस माणसांत बस्तान चांगलें बसलें.' ४ जम; ताळा ( हिशेब, हकीकत यांचा ); खऱ्या गोष्टींशीं मिळणी; मेळ ( बातम्याचा, इतिहासांचा, वर्णनाचा ), योग्य, ठीक होणें (सामान्यतः). ( क्रि० बसणें; जमणें; मिळणें ). ५ संबंध; प्रमाण. 'आकाशांतील गोलांच्या गतीवर मनुष्यास होणाऱ्या इष्टानिष्ट गोष्टींचें बस्तान असण्याचा संभव दिसतो.' –नि २३९ [ फा. बस्तन=बांधणें, आवळणें ] **०बिघडणें**–अक्रि. बिघाड होणें; घडी बिघडणें.

**बस्तनी**—स्त्री. वेष्टनी. –राज्यको ८.११०. [ हिं ]

**बस्तरवार**—पु. (ना. खा.) बृहस्पतवार; गुरुवार; बिस्तरवार

**बस्ता**—पु. गट्ठा ( कापसाचा, कागदाचा इ० ). 'त्याचा बस्ता भरून ठेवावा स्वामीसी।' –रामदासी २.५७. थैली; गांठोडें, दप्तर [ फा. बस्ता ] **बस्त(स्ता)न**–पु. ठाण; दिंड.

**बस्तानी**—स्त्री. टोंकास दोरी बांधलेली काठी; मुलांना शिक्षा करण्याचें गुरुजीचें साधन.

**बस्ति-स्ती**—स्त्रीपु. १ खालच्या पोटाचा भाग; खालचें पोट; ओटीपोट; मूत्राशय. २ बस्तियंत्र (कोठा साफ करण्याचें). –न. बस्तिनलिका. –स्त्री. १ बस्तीची नळी. २ पिचकारी. ३ गुदद्वारात पिचकारीनें पाणी सोडून मलोत्सर्ग करविण्याची क्रिया. [ सं. ]

**बस्ती**—स्त्री. जैन लोकांचें देऊळ. 'जरीं लागला पाठीं हस्ती। तरीं न रिघावें बस्ती।' [ बसणें ? ]

**बहकणें**—अक्रि. १ भकणें; रस्ता चुकणें; भटकणें; भलत्या वाटेस लागणें. २ ( ल. ) नीतिभ्रष्ट होणें; वांकडें पाऊल पडणें. ३ चुकणें; घसरणें. ४ बेसुमार चढणें; अमर्याद होणें; आटोक्याबाहेर जाणें ( किंमत, करार ). ५ ( काव्य. ) सर्वत्र पसरणें; फांकणें; दरवळणें ( सुगंध ) 'अयोध्येमाजी सुवास बहकत।' –रावि १०२१. ६ बरळणें; वाहवणें; भ्रमांत पडणें. [ हिं. बहकना ]

**बहकणी, बहक(का)वणी**–स्त्री. चुकणें; भटकणें; भुलवणी.

**बहक(का)विणें**–सक्रि. १ भलत्या वाटेस लावणें; भटकावयास लावणें (शब्दशः व ल०). २ गोंधळविणें, घाबरविणें. **बहका**–पु. ( ना. ) घोटाळा; धांदल.

**बहंगी**—स्त्री. १ खांद्यावरून वहावयाची ओझ्याची कावड; बंगी; पेटारा. २ ( ल. ) कावडींतून नेण्याचें ओझें. [ हिं. ]

**बह(हं)गुण**—न. ( व. ) रुंद तोंडाचें पातेलें. [ बहुगुणी ]

**बहडणें**—क्रि. (ना.) वाढणें; पुढें होणें. [ हिं. बढना, सं. वर्धन ]

**बहर**—पुस्त्री. १ हंगाम; वैपुल्याचा काळ; भर; धुमी; जोम; उत्कर्षाची पूर्णता, तजेला ( उत्पन्न, सौंदर्य, आरोग्य, मान, संपत्ति, खेळ, उद्योग यांचा ). 'रुन्द छातिवर बुन्द गेन्द जणु गुलाब बहरासधि फुलती।' –प्रला. २ पराकाष्ठेचा रंग; मौज ( नृत्यादिकांची ). [ फा. बहार=वसंत ] **०मारणें**–क्रि. आनंदांत मौज मारणें; पूर्ण सुखोपभोग घेणें. **बहरामन्द**–वि. सुखी, संपन्न. [ फा. ] **बहरी**–बहारी पहा.

**बहरी, बहरीससाणा**—बहिरी, बहिरीससाणा पहा.

**ब-हर्गीज-हरगीज**—क्रिवि. कधींहि; बिलकूल. 'हा मजमून ब-हर्गीज मौकूफ करूं नये.' –रा ७.२३. [ फा. ]

**बहव(व्ह)स**—वि. १ बेकैद; ओढाळ; उच्छृंखल; फटिंग. २ निष्काळजी; बेकायदा; बेबंद; जुलमी स्वैर, स्वेच्छाचारी ( सामान्यतः मनुष्य, काम, राज्य ) [ ब+वास, वसणें ]

**बहस**—स्त्री. चर्चा. –आदिलशाही फर्मानें. [ फा. ]

**बहळ-ल**—वि. १ प्रचुर; विपुल; पुष्कळ. 'आनंदामोद बहळ। सात्विकाचें मुकुळ।' –ज्ञा १५.६. २ पुष्ट. 'चिन्मात्र तेजें बहळ। नित्य निर्मळ सदैव।' –एभा ९.२०७. ३ विस्तृत; प्रशस्त; विस्तीर्ण; मोकळी (इमारत, मैदान, प्रवेश). [सं. बहुल; का. बाहळ]

**बहा**—स्त्री. किंमत; खर्च. ' कागद-बहासरसाल रुपये पंचवीस देविले जातील. ' –सासं२. जुले ९१ [ फा. बहा ]

**बहाईपंथ**—पु. एक मुसलमानी धर्मपंथ. हा १८४४–४५ मध्यें इराणांत उदय पावला. याचा उत्पादक मिर्झाअली महंमद होय. हल्लीं हा पंथ अरबस्तानांत प्रबल झाला आहे. –ज्ञाको (ब) ६२.

**बहाचर**—वि. १ (व.) वात्रट. २ लावालावी करणारा.

**बहाड**—न. समुद्र, खाडी यांच्या कांठची भरतीची खारी जमीन

**बहाड**—न (प्र.) बाड; सारग्रंथ; कोडपत्रें इ०

**बहाण**—स्त्री. (कों) नावेचा कांठ, कड; बाण; बाणी.

**बहाणा-ना**—पु मिष; ढोंग; खोटी सबब; निमित्त. 'राजश्री भाऊंचे पत्राचा बहाना लावतील ' –ख ५ २४७६. [ फा. बहाना ] ०**करणें**-क्रि. खोटें बोलून एखादी गोष्ट लपविणें.

**बहा(हि)णा**—वि. (व.-घाटी) लाडक्या मुलीस म्हणतात.

**बहाणें**—सक्रि. (काव्य.) हाक मारणें; बोलावणें. ' दुर्योधन ये स्वयें बहायाला ' –मोउद्योग ७ ८८. [ सं. आवाहन ]

**बहात्तर**—वि. सत्तर आणि दोन. [ हिं. ] ०**खोडी**-स्त्री. घोड्याचे बहात्तर दोष, वाईट लक्षणें अशुभ लक्षण पहा ०**जुलूम**-पु. पराकाष्ठेचा जुलूम. ०**भोंवरे**-पुअव. ' केसाचीं बहात्तर वलयें (घोड्याचीं). यापैकीं बासष्ठ अशुभ व दहा शुभ ०**रोग**-पुअव. देशी वैद्यकांतील रोगांचे बहात्तर प्रकार. म्ह० बहात्तर रोगांचा खंडोबा=अनेक रोग एकाच वेळीं असलेला रोगी

**बहाद(दु-द्दु)र**—वि. १ धीट; धाडसी छातीचा; शूर. २ प्रवीण; निष्णात; निपुण; हुशार; वस्ताद; पटाईत. [ फा बहादुर् ] **बहाद(दू-द्द)री**-स्त्री. शौर्य; पराक्रम. [ फा. ] **बहादुराई**-स्त्री. शाबासकी; बक्षीस ' खंडेराव महाराजास मिळाली बहादुराई। ' –गापो ५

**बहाद(दा)री**—स्त्री. बाहीदारी; हमी; जिम्मा. **बहांदरी**—स्त्री. गायकवाडींतील आरब सरदारांची जामीनकी.

**बहादूरखानी कागद**—पु.एक जातीचा दौलताबादी कागद.

**बहादुरीतोडी**—पु (राग) यांत षड्ज, कोमल ऋषभ, कोमल गांधार, तीव्र मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाती संपूर्ण-संपूर्ण. वादी मंद्रस्थानचा धैवत व संवादी मध्यस्थानचा गांधार. गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर.

**बहानक**—न. तसर व फरोक यांच्या वजावाटीनंतर ऐनजिनसी धान्यरूपी साऱ्याची नक्त किंमत; वसुली गल्ल्याची नाण्यांत किंमत. [ फा. बहा+नक्द् ]

**बहानचोत-द्**—वि. एक शिवी. [हिं. बहेन=बहीण+चोदणें]

**बहार**—पु. बहर पहा.

**बहार**—स्त्री. कमाल; उत्कृष्टता. ०**दारी**-स्त्री. सौंदर्य. ' हिमालयादि स्थानांचे वर्णनांत बहारदारी बरीच दिसून येते. ' –विवि ८ ७.१२३. **बहा(ह)री**-वि. १ मेजवान्या, खेळ, आनंद व सुख यांत रमणारा. २ वासंतिक.

**बहार**—पुस्त्री. १ बहर पहा. २ एक राग यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत ऋषभ व अवरोहांत धैवत वर्ज्य. जाति षाडव-षाडव वादी मध्यम, संवादी षड्ज गानसमय वसंतऋतूंतील रात्रीचा तिसरा प्रहर. [ फा. बहार; सं विहार ]

**बहारम**—वि. रुष्ट; खप्पा; दिक्क बर्हम पहा. 'राजे मजकूर बाहेर जाऊन राहिल्यामुळें मर्जी बहारम ' –रा ५ १८० [ फा. ]

**बहाल, भाल**—न १ तुळई, सरा. २ अवेलापासून चूल निराळी करणारा चुलीचा अवयव

**ब-हाल**—वि. १ प्रसन्न; खूष. २ पूर्ववत् कामावर नेमलेला. ३ क्षमा केलेला. ४ बक्षीस दिलेला ' कसबे मजकूरची मोकदमी तुम्हास बहाल करून.' –रा १५ २७८. ५ पुन्हा स्थापिलेलें; परत दिलेलें. ' वतन बहाल वजारी.' –थोमारो १ ६५. ६ (व) कायम असलेला, टिकलेला. –क्रिवि. पूर्ववत् ' याजकरितां लाडाचे चौथे दफेची इमारत ब-हाल ठेवणें जरूर.'–रा ७ ९२. [ फा बहाल ] ०**करणें**-सक्रि. १ कृपावंत होऊन देणें. २ खालच्या कोर्टाचा हुकुमनामा कायम करणें. **(मामलत, सनद इ० कोणा एकास)** ०**करणें**-एखाद्यास पुन्हां तो अधिकार देणें. ०**मर्जी**-स्त्री प्रसन्नता; खुशमर्जी. **बहाली**-स्त्री. १ अनुकूलता; प्रसन्नता. २ स्थापना; ठाम करणें (अधिकारांत, उद्योगांत). ३ क्षमा; माफी; कृपा. ' मशारनिल्हेस बहालीचीं पत्रें पाठविलीं. ' –दिमरा १. १२०. ४ (मागें तगिरी शब्द जोडून) एखाद्या कामावरून कमी केलेल्या नोकराची कामावर पुनः नेमणूक. तगिरी बहाली पहा, पुन नेमणूक (सरकारी अधिकाऱ्यांची, नोकरांची) 'जनेल इष्टवरिष्ट यास हिंदुस्थानचे फौजेचा बहाली-वर्तर्फीचा मुख्त्यार केला आहे.' –दिमरा १ १२८. ५ बढती कमान; बढती; उत्कर्ष. 'जीवबादादा परशुरामपंताची दिसदिस बहाली ।' –ऐपो २२५. **बहाली-मेहेरबानगी**-स्त्री दया; लोभ

**बहाला, बहावा, बहावा पंचक, बहावेपंचक, बहाळा**—बाहमध्यें पहा.

**बहाळ, बहाळणें**—बाहळ; बाहळणें पहा.

**बहाळी**—स्त्री. विपुलता; समृद्धि; भर; उत्कृष्टता. ' अगा वृक्षासि। पाताळीं। जळ सांपडे मुळीं। तें शाखांचिये बाहाळीं। बाहेर दिसे। ' –ज्ञा १३ १७९. [ सं. बहुल ]

**बहिः, बही**—क्रिवि. बाहेर; बाहेरच्या बाजूस (समासांत) बहिःप्रवेश; बहिर्भाग; बहिष्कार इ० [सं.] ०**करण**-न. चक्षुरादि दहा इंद्रियें. [ सं. ] ०**प्रीति, बहिर्ममता, बहिर्लोभ**-स्त्रीपु.

वरकरणी प्रीति, माया. [ सं. ] **बहिरंग**-न. बाह्य स्वरूप. -वि. परका; अपरिचित; दूरचा; आपल्या कुळाच्या, अनुयायांच्या विस्तारात नसलेला. याच्या उलट अंतरंग [सं] **०रंगपरीक्षण**-न विशेष खोलांत न जातां वरवर केलेलें आलोचन. [सं.] **०रंगोपासन**-न. बाह्य उपासना. ही संपद्विधि, आरोपविधि, संवर्गविधि व अध्यासविधि अशी चार प्रकारची आहे; कर्मभक्ति. [ सं. ] **०रवसा**-पु बाहेरची (भूत, पिशाचांची) बाधा. **बहिरवा(र्वा)स, बहीरवास**-पु. १ बाहेर राहणें. २ ( महानु ) बाहेरच्या उपयोगाचें नेसावयाचें वस्त्र; उत्तरीय वस्त्र 'चोखट बहिरवास वेढीति।' -पूजावसर [सं.] **०रानीं**-क्रिवि. उघडया मैदानांत; मोकळेपणें (भटकणें). **०रायाम वात**-पु. एक प्रकारचा धनुर्वात. यांत रोग्याची छाती पुढें येऊन पाठीकडे कमान होते. अंतरायाम वात पहा [सं] **०रुपद्रव**-बहिरवसा पहा. [ सं ] **बहिर्कोप**-पु ( प्र बहिःकोप ) वरपांगी धारण केलेला खोटा राग [ सं. ] **बहिर्गृह**-न पडवी; ओसरी; ओटी; ढेलच-ज; देवडी. [ सं ] **०र्दंत**-पु ओठाच्या बाहेर आलेला दांत. [ सं. ] **०र्दाह**-पु. शरीराची काहली; याच्या उलट अंतर्दाह [ सं. ] **०र्दिशेस-भूमीस जाणें**-अक्रि. शौचास जाणें. **०र्द्वार**-न व्यभिचार; रांडबाजी. **बहिःप्रकृति**-स्त्रीअव. राज्यकारभाराचें एक अंग. कोश, राष्ट्र, दुर्ग, वल आणि प्रजा इ० याशिवाय दुसरी अंतःप्रकृति प्रकृति अर्थ ७ पहा. [ सं. ] **०र्भाव**-पु. बाह्य भाव, डौल, स्थिति, देखावा, हेतु [ सं ] **०र्भूत**-वि. बाह्य; बाहेरील. 'मनाची गणना कोण्हीं इंद्रियांत करितात कोणी त्याहून बहिर्भूत असें गणतात.' [ सं ] **०र्भूमीची व्यथा**-स्त्री. ( ल. ) हगवणीचा उपद्रव **०र्मुख**-वि बाहेर तोंड असलेला; बाह्य, प्रापंचिक गोष्टींकडे कल असलेला, विषयासक्त याच्या उलट अंतर्मुख. [ सं. ] **०र्लंब**-वि. विशाल कोणाचा. **०र्लापिका**-कोडें; गूढ, ज्याच्या अर्थपूरणासाठीं बाहेरचें पद इ० घ्यावें लागतें अशी कूट कविता. अंतर्लापिकेच्या उलट [सं.] **०र्वक्रपृष्ठ**-न गोलाचें पृष्ठ बाहेरच्या बाजूनें पाहिले असतां दिसणारा आकार. -सूर्य ८ **०र्वर्ती**-वि. १ बाहेर राहणारा, असणारा. २ (ज्यो ) श्रेष्ठ; सूर्याभोंवती होणाऱ्या पृथ्वीप्रदक्षिणेच्या मंडलाबाहेर असणारा ( ग्रह ) बुध, शुक्र या शिवाय बाकीच्या ग्रहांस बहिर्वर्तीग्रह म्हणतात. [ सं. ] **०र्विकार**-पु. १ ( ल. ) उपदंश; गर्मी. २ बाह्य, शारीरिक आजार [ सं. ] **०र्व्यसन**-न. बहिर्द्वार पहा. [ सं. ] **०र्व्यसनी**-वि व्यभिचारी; रंडीबाज [ सं. ] **बहिस्त्रिक(करण)**-न. नृत्याचा एक प्रकार. **बहिःस्नेह**-पु दिखाऊ, खोटी प्रीति, ममता. [ सं ]

**बहि(हे)दा, बैदा**—पु बंड; दंगा; गोंधळ; दंना. [ हिं ]

**बहिरक बेरक**—स्त्री. निशाण; ध्वज, एका निशाणाखालील टोळी (अरबांची). 'शिबंदीचे लोक पोलीसखात्यांत गेल्यानें त्यांचे बेडे व बहिरकी राहिल्या नाहींत.' -( बडोदें ) ऐरा, प्रस्तावना ९५.

**बहिरम**—पु (व) भैरव 'बहिरमची यात्रा भरते' [सं. भैरव]

**बहिरव**—पु. १ (राग) भैरव. २ भैरव; बहिरोबा (एक देव). 'बहिरव खंडेराव। रोटी सुटीसाठीं देव।' -तुगा ७९१. **बहिरवी**-स्त्री. भैरवी रागिणी. [ सं. भैरव ]

**बहिरा, बहीर**—वि १ फुटका ( कान ) २ ज्याला मुळींच ऐकूं येत नाहीं किंवा कमी येतें असा. ३ वेदनाक्षम; सुन्न; संवेदनारहित ( अवयव ). [ सं. बधिर] **म्ह०** ( व. ) बहिऱ्याकानीं कुयऱ्या, अडक्यावायती मोहऱ्या=बहिऱ्याला ऐकूं येत नाहीं. तेव्हां त्यास उद्देशून म्हणतात. **०पिसा**-वि. बहिरा व वेडा; पिसाट. **बहिरंभट**—वि बहिरा.

**बहिरागी**—पु बैरागी पहा

**बहिरावणें, बहिरणें**—अक्रि. १ बधिर होणें. 'दिशाचक्र बहिरैलें। घाई निशानाचां।' -शिशु ५८५. २ वेदनारहित, सुन्न होणें. [ बहिरा ]

**बहिरी, बहिरीससाणा, बहिरससाणा-ससा**—पु १ ससाणा; एक मांसभक्षक पक्षी. याच्या पाठीचा रंग पाऱ्यासारखा असून मध्यें काळे ठिपके असतात दुसऱ्या पक्ष्यांची शिकार करण्यासाठीं हा बाळगतात 'बाज बहिरी सोनार।' -दावि २४४. २ (ल.) हुषार व धीट माणूस. **०बोका**-पु. चलाख; वस्ताद; छाप बसविणारा इसम ( बहिरीससाण्याप्रमाणें डोळे असलेला, मांजराप्रमाणें चपल).

**बहिरी**—पु. भैरव देव; बहिरोबा. [ सं भैरव ]

**बहिरीबे(व्य)था, बहिरी**—स्त्री. सुनबहिरी नावाचा रोग. यानें त्वचेला बधिरता येते.

**बहिरोबा**—पु. १ भैरव देव. २ (ल.) बहिरा मनुष्य. [ सं. भैरव ] **०ची सेवा असणें**-अक्रि. बहिरा असणें.

**बहिर्बुणगे, बहिरी, बहीरबुणगें**—न. फौजेंतील बाजारबुणगे; गर्दी. 'भले भले सरदार त्यांनीं बहिरींत तोंडें घातलीं।' -एपो २७९. [ हिं. बहीड बुनगाह् ]

**बहिष्कार**—पु १ जातीबाहेर किंवा वाळीत टाकण्याची क्रिया. ( क्रि० घालणें ). २ (सामा ) बाहेर ठेवणें; असहकारिता. 'विनवणीस बहिष्काराची पुरवणी देऊन ...' -टि ३.१०. ३ त्याज्य ठरविणें; अंगिकार न करणें ( वस्तू इ० ). 'परदेशी मालावर बहिष्कार पुकारला' [सं.] **०वादी**-वि. बहिष्कार पाळणारा बहिष्कारवादी विद्यार्थ्यांनीं कॉलेजें सोडलीं.'-केले १.३२२. [ स ] **०णें**-सक्रि. वाळींत टाकणें. 'असो जैसा पुत्र भ्रष्टला। तो सर्वी जैसा बहिष्कारिला।' -ह. २०.८६. [ सं. ] **बहिष्कृत**-वि. १ जातीबाहेर, वाळींत टाकलेला. २ बाहेर ठेवलेला; वर्ज्य केलेला.

**बहीण**—स्त्री. १ आपल्याच आईबापांची कन्या; भगिनी. २ चुलत–आते–मामे–बहीण इ० ३ वडील बहीण. ४ ( निंदार्थी ) गुणांत, वर्तणुकींत एखादीची बरोबरी, वरचढपणा करणारी स्त्री. [ सं. भगिनी; प्रा. बहिणी; गु. बेन; सिं. भेणु; पं. भैण; फ्रेंजि फेन ] **म्ह०** बहिणीमुळें भावोजी सोयरा. **०जवाई–जांवाई**–पु ( व. ) मेहुणा; बहिणीचा नवरा. **०तीज–बीज**–स्त्री. कार्तिक शुद्ध तृतीया आणि द्वितीया; भाऊबीज. बीजेस बहीण भावास ओवाळते व तीजेस भाऊ तिची वस्त्रालंकारांनीं संभावना करतो. **०पणा**- पु. मेहुण्याचें नातें. ‘ ऐसा कष्टविला आमुचा पति । त्या बहिणपणा आग लागो । ’ –जै ७१ १०१. **०भावंडें**–नअव भाऊ आणि बहिणी ( समुच्चयानें ) **०भावा**–पु (राजा ) एकाच आईकडून नातें; भाऊ, बहीण; सहोदरपणा. **म्ह०** बहीणभाव्या व सासु जावया. **०लेक**–पु. ( ना ) बहिणीचा मुलगा; भाचा. **०वळा**–स्त्रीअव. बहिणींची मालिका. [ बहीण+ओळ] **बहिणीस**–स्त्री. ( कों. ) ( अशिष्ट) बहीण. **बहिणुली**–स्त्री. लाडकी बहीण. ‘द्रौपदि हे बहिणुली । ’–देप ४८. **बहिणोई**–पु ( व. ) बहिणीचा नवरा; मेहुणा. [ बहीण+नाहो ( –नवरा ) बहिणोहो–बहिणोई ]

**बहीफळ**—न. श्रीफल. [ हिं. ]

**बहीर**—स्त्री. अघाडीचें सैन्य; बिनी. [ हिं. ]

**बहु**— वि. १ पुष्कळ; अतिशय; अनेक. (समासात) बहुपाद= पुष्कळ पायांचा; बहुभुज=पुष्कळ हातांचा; बहुप्रिय=पुष्कळांस प्रिय; बहु–भक्ष–गुण–तंत्री–पर्ण–पत्र इ० २ –क्रिवि. फार; अधिक. ‘ तैसा कुरुपतिचा मी कीं बहु राज्यार्पणादि यदुपकृती । ’ –मोभीष्म १२.५९. [सं.] **म्ह०** बहुरत्ना वसुंधरा. **०कशास**–क्रिवि. फार काय. ‘ हरी व्यसन पाप हें बहुकशास काया धवा । ’–केका ७४. **०ऋणी**–वि. पुष्कळांचा देणेकरी; बहुत ऋण असलेला. **म्ह०** बहु उवा त्यास खाज नाहीं, बहुऋणी त्यास लाज नाहीं. [ सं. ] **०काल**–क्रिवि. पुष्कळ वेळपर्यंत; बहुतकाळ. **०कोण**–पु. चोहोंपेक्षां जास्त बाजूंची सरलरेषाकृति. –महमा ७. **०गुणित**–वि अनेक मिळून एकाप्रमाणें दिसणारा. –ज्योतिःशास्त्राचीं मूलतत्त्वें. **०गुणी**–वि १ पुष्कळ गुण असणारा; पुष्कळ गोष्टी ज्यास करतां येतात असा; पुष्कळ कामीं किंवा उपयोगी लावतां येण्यासारखा ( मनुष्य, वस्तु ). २ एक श्लेषात्मक रचना; ठोंब्या; बईल. ‘ बहुगुणी ईश्वरभजनीं लक्षाचा मनुष्य मोटेयोग्य. ’ या वाक्यांतील पहिल्या तीन शब्दांतील आद्याक्षरें घेतल्यास बईल असा शब्द बनतो व तो मोटेयोग्य म्हणजे मोट ओढण्यास योग्य ठोंब्या असा श्लेष यांत आहे. [ सं. ] **०चक**–वि. वाचाळ; बडबड्या; चावट. ‘ बहुचकासीं करूं नये। मैत्री कदां । ’ –दा २.२ २५. [ सं. बहुवाचक] **०चकै**–स्त्री. भ्रमिष्टपणा; चावटी; बहकलेपणा. ‘ बहुचकै ज्ञातया । आणिली जेणें । ’–ज्ञा १८.५३९. **०जिन(स)सी**–वि. आंत पुष्कळ जिन्नस असणारा; अनेक प्रकारचा. ‘ दशक अष्टादशक बहुजिन्नसी । ’ –दा १८. **०त्र**–क्रिवि. पुष्कळ मार्गांनीं, ठिकाणीं. [ सं. ] **०त्व**–न. १ पुष्कलता. २ ( प्रबंध ) रागालापांत एखादा स्वर अनेक वेळां घेणें. [सं ] **०दुधी**–वि. पुष्कळ दूध देणारी (गाय, म्हैस). ‘अखुडशिंगी अल्पमोली बहुदुधी अशी ( गाय ) मिळणें कठीण. ’ [ बहु+दूध ] **०धा**–वि. (काव्य) नाना प्रकारचा. ‘ पाहें मुनिप्रसादें करुनि चमत्कार उदित बहुधा मीं । ’ –मोअनु ७ ९७. –क्रिवि. १ पुष्कळ मार्गांनीं, प्रकारांनीं. २ पुष्कळ अंशीं, बहुतकरून, बहुशः; बहुतेक [सं ] **बहुधा नाहीं**–क्रिवि. क्वचित्, बहुशः, कधींहि न; फार क्वचित्. **बहुधाकार**–पु.अव. १ अनेक प्रकारचे आकार. ‘ ऐसे बहुधाकारी वर्तती । बहुचि होउनी । ’ –ज्ञा ९.२५८. २ –न. ( ल. ) जग. **०धानक**–स्त्री. माया; प्रकृति. ‘ गुणत्रयरूपी पदार्थभेदाचीं बीजें तींत आहेत म्हणून बहुधानक. ’–गीर १५८. **०धान्य**–पु साठ संवत्सरांतील बारावा संवत्सर. **०नायकी**–स्त्री. पुष्कळांचें राज्य, सत्ता; बहुराजकी; ( ल ) झोटिंगपादशाही; अंदाधुंदी. बारनायकी पहा. **०पतिकत्व**–न. एक पति जिवंत असतां दुसरा किंवा अनेक पति करणें. [सं ] **०पत्नीकत्व**–न. लग्नाची बायको जिवंत असता दुसऱ्या एक किंवा अनेक स्त्रियांशीं लग्न करणें. [सं.] **०पाद–पादी प्राणी**–पु. अनेक पाय असणारा प्राणी. या वर्गांतील प्राण्याच्या पायाला अणीदार टोंक असतें व पुढील दोन पायाच्या पंजात विषाच्या गाठी असतात. गोचीड, घोण हे या वर्गांत येतात. [सं ] **०प्रजा**–वि. पुष्कळ संतति, मुलेंबाळें, परिवार असलेला. [ सं. ] **०प्रद**–वि. उदार; सढळ हाताचा. [ सं. ] **०बीज**–वि. पुष्कळ बियांचा [सं.] **०बोलका**–वि वाचाट; बडबड्या. **०भाग्य**–(राज्य, कुटुंब इ०ना कारण असें ) पुष्कळांचें दैव. [ सं. ] **०भाष(स)–भाषी**–वि. १ बहुबोलका. २ पुष्कळ भाषा जाणणारा; दुभाषी. [ सं. ] **०मत**–न. साधारणतः अधिक लोकसंख्येचें मत; अर्ध्यापेक्षां अधिक मतें. –वि. पुष्कळांस मान्य. ‘ भीष्म म्हणे बा ! बहुमत साधुचि, न तसे सदा असु ज्ञात्या । ’ –मोभीष्म १.८१ [सं.] **०मान**–पु. आदर; मान; सन्माननीय आगतस्वागत [ सं ] **०मूत्रता**–स्त्री. मेहाचा एक प्रकार; बहुमूत्ररोग [ सं. ] **०मूत्रमेह–रोग**–पु. बेसुमार मूत्रस्राव होणारा रोग; मधुमेह. यांत कृशत्व, घाम येणें, तोंडास दुर्गंधि, जीभ, डोळे व कान यांस ओलसरपणा, खोकला, अरुचि, कोरड, दाह, थकवा इ० विकार असून लघवी पिवळी होते. [सं.] **०मूल्य–मोली**–वि. मौल्यवान; उंची **म्ह०** बहुमोली अल्पसंतोषी. **०युक्पद**–वि. (गणित) पुष्कळ पदांचा [ सं. ] **०ये**–वि. बहुत. ‘ तेथ परिवारु बहुये । अघडता कीं । ’ –अमृ ९ ३८. [ सं. बहु] **०रंगी**–वि १ नानारंगी; चित्रविचित्र. २ बहुगुणी, हरहुन्नरी. ३ प्रसंगानुवर्ती; वेळ पडेल तसें वागणारा [ सं. ] **०रत्नावसुंधरा**–नानारत्नावसुंधरा पहा [ सं ] **०राशिक**–न ( गणित ) संयुक्त व साधें गुणोत्तर यांचें समीकरण. [ सं ] **०राशिप्रमाण**–

न. एखाद्या परिमाणाचें दोन किंवा अधिक परिमाणांशीं असणारें प्रमाण. [ सं. ] ०**रूप**–न. १ नाटय; अभिनय; सोंगें घेणें; विडंबन इ०. २ जगदाकार; विश्व. ' जो भेटतखेंव सरे। बहुरूप हें। ' –अमृ २.९. –वि. अनेक प्रकारचा, रूपांचा; नानाविध. [ सं. ] ०**रूपत्व**–न. ( रसा. ) अनेकाकारत्व. इं. ऑल्ट्रोइझम, आल्ट्रोपी यास प्रतिशब्द. ०**रूपी**–पु. नाचणारे, सोंगें आणणारे, नकल्ये इ० लोकांच्या वर्गांतील एक व्यक्ति; नाना प्रकारचीं सोंगें घेऊन उपजीविका करणारा. ' कळावंत बहुरूपी। '–दावि ४७४. ०**वचन**–न. (व्या.) अनेकवचन; अनेकत्वद्योतक वचन. [सं.] ०**वचनान्त**–वि. शेवटीं बहुवचनी प्रत्यय असलेला ( शब्द, क्रियापद ). [सं ] ०**वस**–स्त्री. १ वेश्या; कसबीण. २ गवगवा; बोभाटा; गाजावाजा. ( क्रि० करणें ). –वि. १ वाचाळ. २ ( काव्य. ) मोठा; बहुत; पुष्कळ; फार; नानाविध; विस्तृत. ' तैसा बहुवस संसार। ' –एभा २२.४६०. –क्रिवि. १ पुष्कळअंशीं. ' म्हणे हें आवडे बहुवस। ' २ (प्राय: बहवस ) बेबंद; स्वैर इ०. ३ सर्वज्ञ. –मनको ०**वसपण**–न. १ सर्वज्ञता. ' आपुलेनि बहुवसपणें। श्रीकृष्ण म्हणे। ' –ज्ञा ६.१०७. २ सर्वत्र राहण्याचा धर्म; व्यापकता. ' कीं वायूचिया बहुवसपणें। अभ्रीं दिगंत लक्षिजे येक क्षणें। ' –स्वादि १०.२.३५. ०**वार–वारें**–क्रिवि. पुष्कळदां, अनेकवेळ; अनेकप्रसंगीं. ' प्रियाकुचतटीं जिहीं न बहुवार पत्रावळी। ' –केका ७. [ सं. ] ०**विध**–वि. पुष्कळ प्रकारचा; नानाविध. [ सं. ] ०**वें**–क्रिवि. फार; पुष्कळ. ' तया ठासी बहुवें पाडें। मागांचि तूं। ' –ज्ञा १७.१२. [ प्रा. ] ०**व्रीहि**–पु. ( व्या ) एक समास. यांत कोणतेंहि पद प्रधान नसुन सबंध सामासिक शब्द त्याहून निराळ्या अशा नामाचें विशेषण असतो. उदा० चतुर्भुज; शशिशेखर इ०. [ सं. ] ०**शः–शा**–क्रिवि पुष्कळअंशीं; बहुतकरून; बहुधा. ' बहुशा छेदिता जो दशकंठ। ' –दावि १७४. [ सं. ] ०**श्रुत**–वि. ज्यानें पुष्कळ ऐकिलें आहे असा; पुष्कळ गोष्टींचें थोडथोडें ज्ञान असलेला; सामान्य माहिती असलेला. [ सं. ] ०**सम्मत**–न. सामान्य मत, अभिप्राय. ( क्रि० पडणें; होणें; असणें; घेणें ) ०**साल–ळ**–क्रिवि. १ (काव्य ) पुष्कळ. 'बहुसाल मारिले भुरके।' –मोउद्योग ७.७७. २ नित्य; नेहमीं; सदोदित; वारंवार. ३ पुष्कळ वर्षेपर्यंत; लांब अवधिपावेतों. ०**सालपण**–न. नानाप्रकार. ' गुरु ऐसें जें म्हणणें। तेंही आहे बहुसालपणें। ' –एभा ३.२७५. ०**सुखवाद**–पु ( तत्त्वज्ञान ) आधिभौतिक सुखवादांतील एक श्रेष्ठ पंथ; जनहितवाद; पुष्कळांचें पुष्कळ सुख अगर हित जेणें करून होईल तें करणें अशा प्रकारचें नीतितत्व. ' बेंथाम, मिल्ल वगैरे पंडित ' बहुसुखवाद ' पंथाचे पुरस्कर्ते आहेत. ' –ज्ञाको (ब) ६७. [ सं. ] ०**क्षम**–वि. अतिशय सोशीक; धीराचा [ सं ] ०**ज्ञ**–वि. पुष्कळ जाणणारा. [ सं. ]

**बहुगुणें–णी**–नस्त्री. रुंद तोंडाचें धातूचें भांडें. [ बहु+गुण ]

**बहुडणें**—अक्रि. १ मागें फिरणें, सरणें. 'वृद्धाप्य तरी बहुडे। तारुण्याची गांठी विघडे। ' –ज्ञा ६.२६०. २ उडणें. –सक्रि. निरोप देणें; बोलाविणें; परत पाठविणें. ' गरुडा आळंगूनी बहुडविलें. ' –तुगा ५२.

**बहुडा–डु**—पु ( कृपादृष्टीचा ) वर्षाव. ' हे भेटी नव्हे बहुडा। मेघाचा केला। ' –ज्ञा ११ ६७०.

**बहुडा**—पु. बदलण्यासाठीं खजिन्यांतून परत पाठविलेले पैसे; बदला; परत; परतबहुडा असेंहि म्हणतात. कळवी पहा. ' प्रेम देउनि बहुडा झाला। तुका म्हणे विठ्ठल बोला। ' –तुगा २७६. [ गु. ]

**बहु( हू )त**—वि. पुष्कळ; प्रचुर; फार; अनेक. [ सं. बहु किंवा प्रभूत; प्रा. बहुत्त; हिं बहोत ] ०**करून**–क्रिवि. पुष्कळ अंशीं; सामान्यत:; पुष्कळदा; प्राय:. ०**काळीं–दिवशीं**–वि. जुना; पुरातन; पुष्कळ दिवसांचा. ०**धाराचें निवडुंग**–नपु. पुष्कळ धारा असलेला निवडुंग. निवडुंग पहा. ०**वीणि**–वि. पुष्कळ अपत्यें प्रसविणारी. ' म्हणौनि पहिलेयाचि वेळा। बहुतवीणि जाली। ' –भाए ३१४. [ बहुत+वीण ] **बहुतावें**–न. ( कों. ) (एखाद्या कामांत ) वाजवीपेक्षा जास्ती व्यवस्थापकांचा, कर्त्यांचा संबंध असणें; बारभाईपणा. ' मसलतीचे कामावर बहुतावें कामाचें नाहीं. ' **बहुतेक**–वि. अनेक; कित्येक; पुष्कळ. ' माझीं लेकरें बहुतेक मेलीं। महा दुष्काळें करूनियां ( ' –ह २९.१८८. –क्रिवि. ( काव्य ) बहुतकरून; पुष्कळअंशीं; हजार वाटयांनीं. [ बहुत+एक ]

**बहुरणी**—स्त्री. गाभणें जनावर. –वि. गाभण (गाय, म्हैस इ०).

**बहुल–ळ**—पु. चैत्रादि महिन्यांतील वद्य पक्ष. –वि. १ वद्य(पक्ष). २ ( काव्य. ) पुष्कळ; फार; अतिशय. [ सं. ] ०**स्वर**–पु ( संगीत ) रागांतील वादी स्वर.

**बहुली**—वि. सुंदर.

**बहुली**—स्त्री. नाचणीची हलकी जात.

**बहुलें**—न. बोहलें; लग्नांत, मुंजींत घातलेली चतुष्कोण वेदी. यावर वधूवर, बटु बसतात व होम करितात. याची लांबी–रुंदी ५।४ आणि उंची एक हात असुन ती मुंजींत मुलाच्या हातानें व लग्नांत मुलीच्या हातानें मापितात. ' ऐसें संवादाचा बहुलां। लग्न दोघांचिया आंतुला। ' –ज्ञा १८.१५७८. [ बहुल–भोंवतालें; भवालय, बाहुवलय ? ]

**बहुळणें**—अक्रि. व्याकुळ होणें.

**बहेचवजह**—क्रिवि. कोणत्याहि रूपानें. –आदिलशाही फर्मानें. [ फा ]

**बहेतल, बह्या, बह्याड, बह्यताड**—वि. ( व. ) मूर्ख; वेडसर; बावळट; पिसाट. ' [ हिं. बेहकना, बहेकेल ]

**बहांशीं**—क्रिवि. बहुतेक. [ बहु+अंशीं ]

**बव्हाशी**—वि. भाधाशी; खादाड. [ सं. बहु+अश्=खाणें ]

**बळ**—न. १ जोर; सामर्थ्य; शक्ति; क्षमता. बल पहा. २ सैन्य 'पळती बळें समस्तें ' –मोकर्ण २.१. [सं. बल] **म्ह०** जिकडे बळ तिकडे न्याय. **०करणें**--क्रि.१ जोरावर येणें; जुलूम, जबरीचे उपाय योजणें. २ सर्व शक्ति लावणें, लागू करणें. **०धरणें**–क्रि. नेट धरणें दम धरणें; शक्ति मिळविणें. **०बांधणें**–क्रि १ नेट धरणें. २ कंबर बांधणें; तोंड देण्यास, यत्न करण्यास तयार होणें; शक्ति कमाविणें **बळाचा**–वि. १ बळकट. २ दुसऱ्याचा जोर असणारें (बुद्धिबळ) **बळास येणें**–क्रि. जुलूम करण्यास आरंभ करणें; हमरीतुमरीवर येणें. सामाशब्द– **०कट**–वि. १ मजबूत; दृढ. २ जोराचा; झपाटयाचा ( पाऊस ). ३ भयंकर; घोर ' धावे कुरुपति तेव्हां राया! संग्राम होय बळकट कीं । ' –मोशल्य ३.११. –क्रिवि. १ झपाटयानें; पूर्णपणें; अतिशय. ' मी बळकट जेवलों. ' २ घट्ट; पक्का ' हा सांधा बळकट बसला. ' [ सं. बल+का कट्टु ] **०कटी**–स्त्री. १ सामर्थ्य; शक्ति. २ दृढता; जोर; टिकाऊपणा; मजबुती; सहन, प्रतिबंध करण्याची शक्ति ( मनुष्याची, वस्तूंची ) **०कटून**–क्रिवि. घट्टपणें; गच्च; आवळून (क्रि० धरणें; बांधणें). **०कुबळ**–न. बलकुबल पहा. **०गंड**–वि. दांडगा. **०गाढा**–पु. बलिष्ठ; बलाढ्य. ' एक शत बळगाढे । ' –मुआदि २६.९९ **०गें**–न. (गो.) पाठबळ; शक्ति **०जोरी-जबरी**–स्त्री. १ बलात्कार २ जुलूम; दांडगाई. ३ ( कायदा ) कोणा मनुष्यास गति येण्यास, बदलण्यास किंवा बंद होण्यास अंगबळानें कारण होणें; ( इं. ) फोर्स. **०ताड**–पु. नर जातीचें ताडाचें झाड. **०त्कार**–पु (प्र.) बलात्कार. ' बळत्कार राया करावा सितेला । ' –राक १.१५. [ सं बलात्कार ] **०दर्प**–पु. सामर्थ्याचा, शक्तीचा गर्व. ' येका सुटला बलकंप । गेला बळदर्प गळोनि । ' [ सं. ] **०पोंचा**–स्त्री हाताची शक्ति. **०बंड**–वि. दांडगा. [ प्रा. ] **०भद्र-भद्रा, बळि(ळी) भद्र**–पु. १ कृष्णाचा वडील भाऊ; बळिराम. २ ( ल ) मजबूत मनुष्य. ३ शिवाचा एक गण. ' केली गर्जना बळिभद्रें । ' –एरुस्व ५ ३९ –वि. ( ल. ) कपाळकरंटा; कुलक्षणी. ' स्वप्नीचा अनुग्रह गुरु केला शुद्र । तोही बळिभद्र ज्ञानहीन । ' –ब ४६. [सं. बलभद्र] **०मस्त**–वि. शरीरबळाच्या गर्वानें फुगलेला. **०मस्ती**–स्त्री. शक्तीचा गर्व; मद. **०मोड**–पुस्त्री. ( प्राणी, वनस्पति, रोग इ० इ० कांच्या ) शक्तीचा ऱ्हास. ' चांगलें झाड वाढत होतें पण गुरानें तोंड लावल्यापासून त्याची बळमोड झाली. ' –वि. कमजोर झालेला; ऱ्हास झालेला. **०लिक**–स्त्री ( कों. ) अशक्तता व आजार. ' ऐकु मनुक्षु एकुणचाळीस बरसे वेळी बळलिके पडुनु रेंगत होता. ' –ख्रिपु २.२७. **०वणें**–क्रि. बळकावणें. [ प्रा. ] **०वंत-वान**–वि. बळकट; बलाढ्य; शक्तिमान; समर्थ. [ सं. ] **०वत्तर**–वि. बलवत्तर पहा. **बलाढ्य, बळात्कार, बळाबळ,** **बळिष्ठ**–बलाढ्य इ० पहा. **बळाधिक**–वि. ( गो. ) बळवंत; बलिष्ठ. **बळार्थ**–पु पराक्रम; बळाचें काम. ' वयसा तरी येतुलेवरी । एऱ्हवीं बळाचा बळार्थ करी । ' –ज्ञा ६.२६१. **बळावणें**–अक्रि. १ बळकट, जोरदार होत जाणें; जोरानें, झपाट्यानें, जोमानें, अतिशयानें वाढत जाणें २ –सक्रि. बळकट करणें. ' दाटुनि कीं हो ! बळाविला बंध । ' –मोशल्य ३.१७. **बळकावणें**–अक्रि. शक्तीनें, बळानें वाढणें. बळावणें पहा. **बळकावि (व)णें, बळकविणें**–सक्रि. बलात्कारानें, अन्यायानें ताबा घेणें; उपटणें; अन्यायानें वहिवाटणें; दाबून ठेवणें. [ बळ ] **बळाबळ**–स्त्री. विपुलता, जोर; शक्ति ( माणसें, पैसा, सैन्य इ० ची ).

**बळ**—स्त्री. १ बल पहा. २ देवतेस अर्पिलेली वस्तु; बलि. ( क्रि० वाहणें; लोटणें, अर्पणें ). ' देवास माणसाची बळ द्यावी. ' –विधवाविवाह पृ. १३. –न. ( बे. ) लक्ष्मी देवतेसाठीं मारलेल्या रेडयाचें शिर गावाभोंवतीं फिरविणें [ स. बलि ]

**बळई**—पु. गांवच्या सीमा दुरुस्त करणें, गांवाला सरपण पुरविणें इ० कामें करणारा महार [ हिं. ]

**बळग**—न ( बे. ) आप्तेष्ट; आप्त, सोयरेधायरे.

**बळगार**—पु ( बे. ) कासार.

**बळगी**—स्त्री जाडेंभरडें हलक्या किंमतीचें लुगडें. –वि. भिकार; टाकाऊ ' मग भलतीशीं बळगीं दोन घोडीं होतीं ... ' –भाव ७१. [ बळ=गेलेलें ? ]

**बळचें**—क्रि ( गो. ) पसरणें.

**बळद्-त**—न. ( राजा ) धान्य सांठविण्याची भिंतींतील पोकळ जागा, कोठार. यांत वरून धान्य ओतून खालच्या बाजूस असलेल्या भोकातून तें काढतात 'दोन मण गहू आहेत बळतांत । ' –राक १.२. २ भुयार; जमीनींतील पोकळ जागा ३ लांकडें इ० अडगळ ठेवण्याची जागा. ४ ( कों ) सोवळयाचे, खरकटे पदार्थ, खरकटीं भांडीं ठेवण्याची, व घोळी घातलेली जागा. ५ ( व. ) गुराची वैरण साठविण्याची जागा. [ का; सं. बिल ]

**बळदणें**—क्रि सांवरणें, भरणें. ' तूं वाटेल तसें नागडें नाचावें व मी तें बळदावें हा कोटला न्याय ? ' [ बळद ]

**बळया, बळ(ळ्)यानीं**—क्रिवि. ( कु. गो. ) बळेंच, मुद्दाम. [ बळ ]

**बळय**—पु. ( बे. ) एक प्रकारचा मासा.

**बळवाय**—पु. दंगा. ' प्राणाचे गिऱ्हाईक भेटलियावरी बळवाय आम जाला. ' –रा ६.३७७ [ हिं. बलवा=बंड ]

**बळस-सें**—पुन. जन्माच्या वेळीं बालकाच्या, पशूच्या तोंडांतून निघणारा पाढरा व चिकट द्रव; नाकातोंडांतून निघणारा फेंस, मळ. ' विष्टा मूत्र आणि बळस । ' –दा ३.५.४४. [का. ?]

**बळसट**–न. १ घट्ट कफ; चिकट रक्ताचा सांकळा. २ कोणताहि आजार, रोग, साथ इ० मिरवणूक काढून गावाच्या वेशीबाहेर पोंचविणें.

**बळाणां**—न. ( चि.) बळद —मसाप २.४.३६६.

**बळा(ला)णी**—स्त्री ( चि ) बसण्याकरितां ( बांकाप्रमाणें केलेला ) चिरेबंदी ओटा —मसाप २ ४.३६६

**बळार**—स्त्री. ( गो. ) मोठा वगळा.

**बळाहक**—पु. मेघ, ढग. [ सं बलाहक ]

**बळी**—पु प्रसिद्ध दानशूर बळी राजा 'छळी नृपवळी, बळी तरिच तो नसे आटला।'—केका ७६. [ सं बलि ] **०बंधन**—पु बळीला बंधन करणारा; बळीच्या बंधनात राहिलेला. वामन. ' अतुलबळें प्रबळु । बळिबंधनु ।' —ज्ञा १२ २४१. **०राजा**-पु. कुणबी; शेतकरी ( हा धान्य पैदा करून दुनियेच्या पोटापाण्याचा भार उचलतो म्हणून ). —गांगा ७ **बळिराजाचा धर्म**-पु शेतकऱ्याचें दान.

**बळी**—पु. ( कों. ) दलदलींत राहणारा एक पक्षी.

**बळी**—स्त्री. ( बे. ) रेशमाची पट्टी.

**बळी**—पु. ( कोष्टी, कर. ) सुत उकलण्याच्या रहाटावरील सुताचे पांचशें पंचवीस (दोऱ्याचे) फेरे; सात तोबे, थोक ' आठ लुगडीं विणलीं म्हणजे एक बळी सूत शिल्लक राहतें '

**बळी-ळि**—पुस्त्री. १ बलि पहा. देवतेस अर्पण करावयाची वस्तु ( पशु इ० ). (क्रि० देणें). 'बळी नेदूनि आम्हासी । हे जाऊं पाहती पूर्ण पदासी ।' —एभा ४ १५४. २ (ल ) आहुति, होम. ' जीववधें साधूनि बळी । भूत प्रेत कुळें मैळीं ।' —ज्ञा १७.८०. ३ —पु कर; पट्टी. ' इतरांची काय कथा ? जे देणार त्रिखर्वं बलि बा गा ।' —मोसभा ३.३१. [ सं बलि ] **०देणें**-भक्ष्य म्हणून अर्पण करणें. ' तुका म्हणे बळी । जीव दिला पायांतळीं ।' —तुगा ९९१. **०पडणें**-क्रि. भक्ष्यस्थानीं पडणें; नाश पावणें; मरणें. **०चा बकरा**-वि. ( कर. ) मुर्दाड. **०दान-प्रतिपदा**-बलिदान, बलिप्रतिपदा पहा. **०राणा**-पु. (बायकी) प्रसुतीच्या अकराव्या दिवशीं विटाळ फिटल्यावर पाटावर काढलेल्या तांदुळाच्या दोन बाहुल्यांची पूजा करून ती सुवासिनीच्या ओटींत घालण्याचा विधि **०हरण**—न. १ भूतयज्ञ; देवतांस रोज भूमीवर दिलेल्या भाताच्या मंडलाकार आहुती (वैश्वदेवाच्या आहुती कुंडांतील अग्नींत टाकतात व या भुईवर विशिष्ट क्रमानें घालतात ) २ (ल.) पोथीच्या समासाभोंवती टिप्पणीवजा किंवा चुकाच्या शुद्धीकरणार्थ लिहून सर्व पोथी चितार्ड करणें. ( क्रि० घालणें) [ सं बलिहरण ] **०घालणें**-क्रि. पोथी, पुस्तक चितार्ड करून टेवणें

**बळी**—वि १ बळकट; बळवान 'एकसरें गिरी धरिला गोपाळीं। होता भाव बळी आम्हीं ऐसा ।' —तुगा ७०. २ बुद्धिबळें खेळण्याचा एक प्रकार, जोरी डाव. [ बळ ] **म्ह०** बळी तो कान पिळी **०आ-या**—पु. बळवान माणूस. —वि. बलिष्ठ; बलाढ्य. ' बापु बळिआ अभिमानु । कांहीं एकु न करवी ।' —शिशु ७४२. —क्रिवि. दृढपणानें. **०करण**—न. १ बळकट, निरोगी करणें. 'आतां कदर्थवित व्याधि । बळीकरणाचिया आधी । आपपर न शोधी । सद्वैद्यु जैसा ।' —ज्ञा १६ १४१. २ उतार; कमजोर; कमी होणें [ प्रा. ] **०याड**—न शिपाई ' साचळ होतां बळियाडें । धांवणियासि निघाले ।'—देवदासकृत संतमालिका ९. **०याडा-ढा**—वि. बळकट; बलाढ्य; दृढ निश्चयाचा ' पागाचे प्रचंड बळियाडे ।' —कुमुरा २५ ८. **०यावणें**—क्रि बळकावणें ' सतराविचेचें पाणियाडे । बळियाविलें ।' —ज्ञा ९ २१४. **०ये**-वि. ( महानु ) बळकट. ' पार्थु म्हणे बळिये पाये सरिसे पळिभद्र वसुदेवो नंद ।' —धवळे पूर्वार्ध ५०. **०येपणा**—पु बळकटपणा; सामर्थ्य.

**बळूखार**—पु एक खार. —मुंव्या १३८.

**बळें**—क्रिवि १ जोर, जुलूम, जबरी, सक्ति यांनीं २ दाटून; बुद्धिपूर्वक, मुद्दाम, जाणूनबुजून 'उदारपण वानिलें अजि गुरूपहासा-बळें ।' —केका ७० ३ दंडोयमाने ४ आश्रयानें ' तरेन तुमच्या बळें भव महानदी नाविका ।' —केका २२ [ बळ ] **म्ह०** आपल्या बळें बांधावी कास आणि कोणाची धरूं नये आस. —नि ४३१. **बळेंचा, बळेंबळेंचा, बळयाबळयांचा**—वि बळानें काढलेला; ताणलेला; ओढून आणलेला, मनापासुन नव्हे असा; कृत्रिम; अस्वाभाविक ( अर्थ इ० ) [ द्वि ]

**बळो**—पु. ( कु ) एका माशाचें नांव.

**बळोत्तर**—वि बळकट, बलवत्तर पहा.

**बळोवळी-ळि**—क्रिवि. (महानु.) एकसारखें नेटानें 'क्षिर सागरीं घरडहुली । देव न करिते बळोवळी ।' —भाए२२२. [ बळ ]

**बक्षिशी-सी**—स्त्री. बक्षीस पहा.

**बक्षी-कशी-ख्शी**—पु १ सेनापति, सेनाध्यक्ष. २ उमेदवाराची शिफारस करून मन्सब देवविणारा. ३ सैन्यांतील शिपायांचा पगार वाटणारा. [ फा. बख्शी ] **०गिरी**-स्त्री. सेनाधिपत्य

**बक्षी**—न. ( नाशिक ) लवकर तयार होणारी विड्याच्या पानांची एक जात.

**बक्षीगहूं, बक्षी**—पु. बकशी गहूं पहा. [ हिं. ]

**बक्षी(कशी, ख्शी)स, बक्षिशी-सी**—नस्त्री. १ पारितोषिक; इनाम; देणगी ( कमी दर्जाच्या किंवा हाताखालील माणसास दिलेली ). (क्रि० करणें). २ क्षमा; माफी. (क्रि० करणें; देणें). ' तिचे पायावर डोई ठेऊन झाले अन्याय बक्षीस करून घेणें.' —ब्रप २८७. ३ ( कायदा ) दान; देणगी. —घका४६. —क्रिवि. बक्षिसाच्या रूपानें. —वि. माफ. [ फा. बख्शिश ] **०पत्र, बहालपत्र**—न बक्षीस दिल्याचा लेख. 'बक्षीस दिल्हें तें बक्षिसपत्र किंवा बहालपत्र.' —भाअ १८३३.

**बा**— पु. १ ( काव्य व कुण. ) बाप; जनक; वडील. 'वधिले सारोह अयुत हयगजहि तुझ्या महाकथें बा नें ।' —मोभीष्म

११ ५६. २ संबोधन ( लहान मुलें किंवा तरुणाबद्दल प्रेमानें योजतांना ); बाबा ! बाळा ! अहो ! ' बा ! तुझा चालना काळ खायाला मिळती सकळ । ' ' आज्या बा न म्हणावें गहिंवर येतो तयाहि माज्या बा । ' -मोआदि ३४ ७२. ३ बहुमानार्थी मनुष्य, देव इ० च्या नावापुढें योजावयाचा प्रत्यय उदा० गणोबा; गोंदबा, विनोबा इ०. ४ थट्टेनें परंतु आदरार्थी नामास जोडावयाचा प्रत्यय उदा० वाघोबा, नागोबा; वेडोबा. [ सं. पाद-पाअ-बाअ-बा पाद=श्रेष्ठत्व दर्शक पदवी. उदा० गोविंदपाद -भाअ १८३५ ] म्ह० बाचा बा गेला नी बोंबलता ओंठ गेला **बा ब्रवणें**-अक्रि ( अश्लील ) मध्यें पडून बिघडविणें; भलतीच गोष्ट करणें; घाण करणें **मागून पुढून बा च नवरा**-१ मुलाचें लग्न करण्याची वेळ आली असतां आपलेंच लग्न लावणाऱ्या विधुर बापाबद्दल योजतात यावरून २ ( ल ) आपमतलबी मनुष्य.

**बा**—स्त्री ( गो ) आई; म्हातारी स्त्री. [ बाई ]

**बाआगळा**—वि. (त्यापेक्षा) वरच्या दर्जाचा; अधिक चांगला; उत्तम. ' येथें असला धोतरजोडा मिळेल म्हणून काय विचारतोस, याचा बाआगळा मिळेल ' [ बा=बाप+आगळा=पलीकडचा ]

**बाइक्या, बाइल्या**—वि. १ नेहमीं बायकांबरोबर असणारा; रांडयाराघोजी. २ नामर्द, पुरुषत्वहीन. ३ बाईलबुद्धया; बायकोच्या तंत्रानें चालणारा [ बायको, बाईल ]

**बाइणी**—स्त्री. बायदा; लगादा. 'जैसा समर्थु आणि ऋणिया। मार्गी आला बाइणिया । ' -ज्ञा १८.२५२.

**बाइनवार**—क्रिवि. ( ना॰ ) अनुक्रमानें. [ बाईन=अनुक्रम ]

**बाइ(य)लर**—पु तापक; वाफेच्या यंत्रांतील पाण्याची वाफ ज्या भागात बनते तो भाग. [ इं. बॉयलर ]

**बाइलीचें पान**—न. विडयाच्या पानाची एक जात जनीचें पान पहा.

**बाई**—स्त्री. १ सामान्यतः स्त्रियांच्या नावापुढें आदरार्थी योजण्याचा शब्द. ' रमाबाई आली आणि आकाबाई गेली ' २ वडील जाऊ; आई; मोठी बहीण; परकी प्रतिष्ठित स्त्री. ३ स्त्रीशिक्षक; मास्तरीण; शिक्षकीण ४ मैत्रीण; सखी. ' अगाई ! हा बाई ! त्वरित वरि जाईल पळुनी । ' -र २१. ५ ( बायकी ) पादपूरणार्थक उद्गार. ' दिलेन् धाडून् बाई पैसे. ' ६ (ल.) रखेली. ७ -स्त्रीअव. अंगावर उठणाऱ्या देवी; फोडया (क्रि० येणें). [ सं. भगवती-बभवई-बावी-बाई किंवा भवती-बअई=बाई ] म्ह० बाई आल्या पणांत आणि बोवा बसले कोनांत. ०बाई-उद्गा (बायकी) आश्चर्य, जिकीर, कमाली इ० दर्शविण्याचा उद्गार. ' बाई, बाई ! शर्थ झाली.' **बायाबापडीचा**-वि. दुबळया व निराश्रित स्त्रीचा

**बाई(इ)ल**—स्त्री. १ पत्नी; बायको; लग्नाची किंवा पाटाची स्त्री. ' न म्हणे बाइल याला कीं ठेवा रामकृष्ण बाई ठयाला । ' -मोकृष्ण ३९ ३२. २ ( घाटावर ) ठेवलेली स्त्री; रक्षा. [ बाई ] म्ह० लहानपणीं आई आई, थोरपणीं बायला बाई. ०**काम**-न गृहिणीचें काम; घरकाम; घरधंदा. ०**काम्या**-वि. केवळ घरकाम किंवा बायकी काम करणारा, त्यात हुषार (पुरुष) ०**खाट्या**-वि १ स्त्रीलंपट, अति संभोगी, रंडीबाज २बायकोमाऱ्या; ज्याच्या पुष्कळ बायका मेल्या आहेत असा. [बाईल+खाट] ०**खाया**-वि. बाईलखाटया अर्थ २ पहा. [ बाईल+खाणें ] ०**गांठ**-स्त्री बायकी गाठ; सामान्य गाठ; साधी गांठ [ बाईल+गांठ ] ०**पिसा**-वि बाईलवेडा पहा. ०**पिसें-वेड**-न. अत्यंत स्त्रीलंपटता; संभोगाबद्दल आसक्ति; रंडीबाजपणा ०**बडगा-भिडंग**-पुन. मुलेंबाळें, गुरेंढोरें, चीजवस्त इ० मोठें कुटुंब, खटलें, पसारा (व्यापक अर्थानें ). ०**बंदा-बांध्या-बुध्द्या**-वि स्त्रीच्या, बायकोच्या तंत्रानें चालणारा; स्त्रीवश; बायकोचा गुलाम असलेला. ०**बुद्धि**-स्त्री. १ बायकी ज्ञान, शहाणपणा, अक्कल, समजूत. २ बायकी मसलत, सल्ला, बेत, विचार. ३ ( ल ) कोते व अपरिपक्व विचार. [ बाईल+बुद्धि ] ०**बोल्या**-वि. जनानी आवाजाचा ( पुरुष ). [ बाईल+बोलणें ] ०**भाड्या**-वि. बायकोवर पैसे किंवा नोकरी मिळविणारा [ बाईल+भाडें ] ०**भुला**-वि. स्वतःच्या बायकोचा पराकाष्ठेचा शोकी; स्त्रीलंपट; स्त्रीवेल्हाळ. [ बाईल+भुलणें ] ०**माणूस**-न १ बायकोमाणूस; स्त्री. २ भार्यासक्त किंवा रंडीबाज मनुष्य ३ षंढ; नपुंसक. ०**माऱ्या**-वि. १ बायकोचा जीव घेणारा २ बाईलखाटया अर्थ २ पहा [ बाईल+मारणें ] ०**वेड**-न. बायकोचें वेड, कामुकता, उत्कट कामवासना. [ बाईल+वेड ] ०**वेडा**-वि स्वस्त्रीलंपट; विषयवासनेनें भुलून गेलेला; रंडीबाज. [ बाईल+वेडा ] **बायला-ल्या**-वि. बाइक्या पहा.

**बाईस**—स्त्री. कारण [ अर बायेस. ]

**बाउला-ली-लें**—पु पुतळा; बाहुला-ली-लें. 'काई तृणाचा बाउला । ' -माज्ञा १८ ४३८. [ प्रा बाउल्ली ]

**बाऊ**—पु. भीतीदायक वस्तु, लहान मुलांना ज्याची भीति वाटते अशी कोणतीहि वस्तु, प्राणी इ० उदा० साप, विंचु, किंवा, भुत, बागुलबोवा, फोड, जखम इ० ' वृद्धातें बाळें म्हणती बाऊ। हा सुखगौरऊ वार्धक्या । ' -भारा बाल ९.७३. [ बावा ] (वाप्र.) ०**करणें, करून ठेवणें-सांगणें-दाखविणें**-क्षुद्र गोष्टीला नसतें महत्त्व देऊन भीति दाखविणें, भयप्रदर्शनार्थ हलकी गोष्ट फुगवून सांगणें. ०**दाखविणें**-भीति दाखविणें; भिवविणें; संकटाची भीति घालणें. ०**वाटणें**-भीति वाटणें. 'ज्या लोकमताचा पुष्कळांस बाऊ वाटतो ... ' -आगर

**बाऊर**—स्त्री ( कु. ) वृक्षाची छाया; ढगाची छाया, आभुट.

**बाऊल**—पु १ ( कों ) रानमांजर; जंगलीमांजर. २ बाऊ पहा.

**बाऊस**—न खादा; बाहुमूल; बाहुवटा; बाहुटा [ सं बाहु ]

**बाऊळ**—स्त्री. १ (राजा.) डोंगरावर, खडकावर बरीच माती असलेली सखलवट व फक्त भातपिकाची जमीन. हिची भाजावळ करावी लागते, बावीळ, खारी २ –न. (कु.) नदीकांठची भाजी-पाला करण्याची मळईची जमीन, मळई.

**बाएस**—स्त्री. (राजा. चि.) बायको; पत्नी. [बाईल]

**बाक, बांक**—पु १ (हिं.) वक्रता, वळण; वांकण; वाक. २ डोंगरावरील वळणें असलेला रस्ता. ३ (ल) भांडण; मनातील तेढ; बिघाड; बेबनाव. 'त्याचा व आमचा अलीकडे बांक पडला आहे' ४ एक प्रकारचा खंजीर [सं वक्र; हिं. बाक] ०दार-वि १ बाक, वाकडेपणा असलेला, तिरकस; वांकलेला. २ (ल) बेबनाव असलेला, वांकडें असलेला. ०दारी–स्त्री. १ तिरकसपणा, वांकडेपणा. २ (ल) बेबनावाची स्थिति; भांडण; वाकडें.

**बांक**—पुन. बसण्याची लांबट व ठेंगणी चौकी; बसण्याचें साधन. [स्वीडिश व जर्मन बांक; पोर्तु बॅंको]

**बाक**—न. नदीच्या भाटीवर होणारें दाट पानांचें एक झाड.

**बांककांड**—न उलंडीचें आडवें लांबट लांकूड. [वक्रकांड]

**बॉकडें**—पु (गो) बात; थाप; गप्प.

**बांकडा**—वि धाडसी; साहसी; बांका; दंडेल; उरफाटशा काळजाचा; भीति न बाळगणारा; दबला न जाणारा [बाका]

**बांकणें**—अक्रि १ वांकणें; बाक येणें, असणें, खालीं झुकणें; ओणवें होणें; नमणें २ (ल) बेमुर्वतखोरपणानें वागणें; मित्रत्व सोडून असणें, वांकडें अगर वैमनस्य असणें (वाक्यांत ह्या क्रिया-पदाला ऊन प्रत्यय लागून पुढें दुसरें क्रियापद येतें. जसें--बांकून असणें-वागणें-वर्तणें-चालणें-राखणें इ०) [हिं.]

**बाकधुक**—स्त्री धाकधुक, छातींत धडधडणें; बागधुग [ध्व.]

**बाकर**—न (व) खाज; करंज्यांत घालावयाचें पुरण. ०वडी-स्त्री. एक खाद्यपदार्थ; पक्वान्न, करजी.

**बाकर-रा-रां**—वि. (चि कों) जरा; थोडें; थोडावेळ.

**बाकरु**—पु. (महानु.) विनोद. 'तुजसी केला बाकरु।' –धवळे उत्तरार्ध १०.

**बाकस**—स्त्री. चिपाड; चोइटी; चोथा. 'रस चोखून घेईजे। बाकस थुंकोनि सांडिजे।' –एरुस्व १४.१२८. –वि. नि:सत्व; रसहीन; बेचव; कमजोर; निकस; गुणहीन. 'उसामध्यें घेइजे रस। येर तें साडिजे बाकस।' –दा ६.३.९. [बेकस]

**बाकस**—स्त्री. (कों.) काडयांची पेटी. [इं बॉक्स]

**बांका**—पु. कर्णा नांवाचें वाद्य; काहला. (क्रि० वाजविणें). [सं. वक्र] ०ईत, बांकेकरी–पुस्त्री. कर्णा वाजविणारा (हा देवळांत किंवा राजा अथवा मोठ्या माणसाजवळ असतो) बांकी–स्त्री लहान कर्णा.

**बाका-कां**—वि. १ धाडसी; शूर; धीट; पटाईत (मनुष्य). 'बाका शिपाई' २ आणीबाणीचा प्रसंग. 'प्रसंग बांका खरा पण तो टाळला पाहिजे.' ३ बळकट, असाध्य; अवघड. 'अवघड गड बाका किल्ला।' –ऐपो १९०. [सं. पाक=आपत्ति]

**बाकाबाकी**—स्त्री. भांडण; तंटा; बोलाचाल.

**बाकाळी-ळ**—स्त्री. एक रानटी फुलझाड; बकाळ.

**बाकी**—स्त्री. १ शेष; शिल्लक. २ उरलेली रकम; शिल्लक राहि-लेली रक्कम; शिल्लक भाग. –वि राहिलेला; उरलेला; आणखी. [अर. बाकी] ०ओढणें–१ कर्जाची रक्कम, देणें असलेली रक्कम मागील वहीवरून चालू वहीवर घेणें. २ (व.) अडखळत बोलणें. ०ठेवणें–मर्यादेंत असणें; ताब्यांत राखणें. ०न ठेवणें–१ भीड मुर्वत न ठेवणें; मर्यादा न राखणें; सर्व कांहीं करून चुकणें. २ कर्जफेड करणें. ०थकणें–लोकांकडचें येणें तुंबणें. ०पूज्य करणें–देणें असलेली सर्व रक्कम फेडणें; देणें-घेणें पुरें करणें. ०चा–वि. शिल्लक राहिलेला; उरलेला. ०दार–वि. ज्याकडे बाकी येणें आहे असा (कूळ, रयत). ०साकी–स्त्री. शिल्लक (रक्कम).

**बांकुटणें**—अक्रि. (राजा.) कोमेजणें; वाळणें; सुकणें; टव-टवी नाहींशी होणें. [बाळकुरणें ?]

**बाकू**—पु. (गो.) तांबडा बगळा. [सं. बक]

**बाकू(को)स**—वि. नि.सत्व; नीरस; बेचव, बाकस.

**बाकेराव**—वि. (गु.) बढाईखोर; फांकडा; डौलानें वाग-णारा, चालणारा. [बाका]

**बॉक्स**—स्त्री. (इं.) नाटकगृहात सर्व कुटुंबाकरिता किंवा मित्र मंडळीकरिता प्रेक्षकांच्या जागेंत मुद्दाम केलेली जागा. [इं.]

**बाखर**—पु. १ पुरण; सारण (करंज्या-साटोऱ्या घालण्याचें, खोबरें, खसखस गूळ किंवा साखर इ०चें बनविलेलें). बाकर पहा. 'बाखरांचें वाण। सांडुं हें जेवूं जेवण।' –तुगा ८०५. २ (व.) पाटवडींत भरण्याचा मसाला; मक्याचे दाणे किसुन केलेली उसळ किंवा कोहाळयाच्या मोठ्या फोडींची मसालेदार भाजी. ०वडा–पु (व.) हरभऱ्याच्या पिठाचा बाखर घालून तळलेला वडा.

**बॉखरणी**—स्त्री. (गो.) एक शेतांतील काम. [बखरणी ?]

**बाखल्ल, बाखलें**—न. (गो.) अडगळ ठेवण्यासाठीं भिंतींत किंवा भिंतीखालीं ठेवलेली पोकळ जागा; बळद; अंबार.

**बाखळा**—पु. (व.) जादूचें सामान.

**बाग**—न. (कों. व.) बांक; वळण; वक्रता; लवण. 'फडा पुच्छ वांकुडा बाग।' –एभा १२.३८३. [सं. वक्र] ०ट–वि. किंचित् वक्र. ०णें–अक्रि. १ (कों.) वांकणें; लवणें; झुकणें; वांकडेंतिकडें होणें. २ (ल.) शरण येणें; हार जाणें. ०वणें–अक्रि. (गो.) वांकणें.

**बाग, बागदोर**—पुस्त्री. बागदोर; लगाम; कासरा. [हिं.

**बाग**—पुस्त्री १ बगीचा; उद्यान; उपवन. २ –न. (गो.) माडांचें भाट; नारळीचें आगर. ३ पुणें–मंडईतील गाळेवाले दरसाल एक जेवण फाळापट्टीनें करतात तें. [फा. बाघ्] ०**पाडणें**–(कों) बागेंतील सर्व नारळींवरील नारळ काढणें. ०**बगी(गि)चा**–पु फुलबाग; मळा; आगर. [फा. बाघ्] ०**बान्–वाला**–पु. १ बागाईत करणारा माळी; बागेचें काम करणारा. २ फुलें, फळें, भाजी इ० तयार करून व विकून त्यांवर आपला निर्वाह करणारी जात. [फा.] ०**शाई**–स्त्री. घराभोंवतीं केलेली लहानशी बाग. [बाग+शाई] **बागाइतदार**–पु अव. बागांची लागवड करणारे; बागाचे हक्कदार मालक **बागाइती**–वि. १ फळझाडें व भाजी-पाला यांची लागवड केलेली किंवा लागवडीस योग्य असलेली (जमीन, शेत). याच्या उलट जिराईती. २ सभोंवार पुष्कळ बागाईत जमीन असलेला (गांव). ३ बागाईत जमिनीवर काढलेलें (पीक) ४ बागेच्या जमिनीसंबंधीं **बागाई(य)त**–स्त्रीन. विहिरीच्या अगर पाटाच्या पाण्यावर केलेली फुलझाडांची, फळ-झाडाची किंवा भाजीपाल्याची लागवड; पाटस्थळ; बागेची जमीन, लागवडीस योग्य असलेली जमीन; बागेंतील उत्पन्न. ‘आयतें आहे पाटस्थळ। जागा वहीत केवळ। बागाइताचा अम्मल। कोण्ही करूं जाणेना।’ –मध्व ४०२. [फा. बाघात्; बाघ्चें अव]

**बांग**—स्त्री. १ कोंबड्याचें आरवणें (विशेषतः सकाळचें). २ गुराख्यांचा एक खेळ. ३ (मुसलमानी) प्रार्थनेला बोलावण्यासाठीं करावयाचा पुकारा; निमाजासाठीं केलेला पुकारा. (क्रि० देणे). ‘कोठें महजीद (मशीद) आहे तेथें स्मरण करून बांग देतात व कोठें देवालय आहे तेथें घंटा वाजवितात.’ –वाड–सनदा १५०. [फा. बांग्] ०**सलवात**–पु. (मुसलमानी) प्रार्थनेला बोलाविण्या-साठीं मुअझ्झिन् मशिदींतून जो पुकारा करितो तो.

**बागई**—वि. लहान–मोठें. ‘तर्फ नांदगांव मरूड येथील बागई घरटिपेची पाहाणी.’ –वाडबाबा १.२०९.

**बागट**—न. तलवारीला तुच्छतादर्शक शब्द.

**बागड**—नपु. (व.) मिसळण.

**बांगडखार**—पु. कांच वितळविण्यासाठीं किंवा बांगड्या करावयास उपयोगी पडणारा खार. [बांगडी+खार]

**बागडणें**—अक्रि आनंदानें नाचणें; उड्या मारणें; खेळणें (कुत्री–मांजरींचीं पिलें, कोंकरें इ० नीं). **बागडा**–वि. (काव्य.) खेळकर; नाचणारा; उड्या मारणारा. ‘ वेडीं बागडीं भाविकें भणगें।’ –मुसभा ७.१०.

**बांगडा**—पु. समुद्रांतील लहान व पांढरा मासा. याच्या जांब बांगडा व करटा बांगडा अशा दोन जाती आहेत. **बांगडी पाग**–न. असले मासे पकडण्याचें जाळें.

**बागडिया**—न. गाणें; गीत. ‘ दिंडी पताका मकरंद। नाना बागडियांचे छंद।’ –ज्ञागा २२१. [बाग–बाघ]

**बागडी**—स्त्री. चेष्टा; चाळे; क्रिया; खेळ; क्रीडा. ‘पायां पडती वेंगडी। हात वळती मुरकुंडी। वरवेपणा बागडी। नाचविजेल।’ –ज्ञा १३.५७०. –पु. माकडाचे खेळ करणारा इसम; बहुरूपी. [बागडणें]

**बांगडी**—स्त्री. १ चुडा; कंकण; बायकांनीं हातांत घालावयाचें कांचेचें किंवा सोन्याचें वलय (क्रि० भरणें; घालणें). २ दोरीचें वेटोळें किंवा कडोळें. ३ (राजा) मळसूत्राचा पेंच; उंसाच्या चरकांतील नवरी. ४ भिक्षेकऱ्यांची एक जात किंवा त्यांतील एक व्यक्ति. ५ बैलगाडीच्या चाकाच्या तुंब्याच्या दोन्ही तोंडांनां बाहे-रून बसविलेली लोखंडी मायणी. ६ बटाट्यांतील एक रोग; चक्र. ७ उंसाची एक जात. ८ फोनोग्राफची तबकडी; प्लेट. (वाप्र) ०**बंद होणें**–(व) अत्यंत शांतता होणें (बायकांची निजानीज). ०**फुटणें**– १ पति मरणें, वैधव्य येणें; (ल) माणसें मरणें (पति मेला असतां स्त्रिया बांगड्या फोडतात त्यावरून.). ‘नऊ लाख बांगडी फुटली.’ –पेशव्यांची बखर. २ फजीती होणें; नक्षा उतरणें; हानि होणें **बांगड्या भरणें**–नामर्द होणें; पराक्रमशून्य होणें. (**दुसऱ्याचे बायकोस) बांगड्या भरणें**–उसन्या वस्तुवर पैसा खर्च करणें; कांहींहि परत मिळणार नाहीं अशा ठिकाणीं पैसा वेंचणें, खर्च करणें. ०**वाढणें–वाढवणें**–(बायकी) बांगडी फुटणें (फुटणें हा शब्द अशुभ समजून त्याबद्दल वाढणे, वाढवणें हा योजितात). ०**मखर**–न मध्यें एक व बाजूला चार मिळून पांच पांच बांगड्यांची किनारी असणारें मखर. [बांगडी+मखर] **बांगड्या भरलेला चौक**– बांगड्याचा लहानसा ओटा. ‘महाराणीसाहेब यांचें न्हाणें झाल्या-वर स्वारी बांगड्या भरलेल्या चौकावर श्रीमहाराज सरकार यांज-समवेत बसते.’ –प्रसुतिकृत्यादर्श पृ. ८. ०**प्रिंटिंग मशीन**–न. (मुद्रण.) प्रिंटिंग मशीनचा एक प्रकार; अल्बियन हँडप्रेस. ०**सिंगापुरी**–स्त्री. एक रेशमाची जात.

**बांगडुली**—स्त्री. (गो.) लहान बांगडा मासा.

**बांगडो मारणें**—(काशी) (यात्रेकरूंच्या बोलण्यांत रूढ) टिचकणें; टिचकी मारणें.

**बागदार**—स्त्री. १ गुप्ती. २ विळी. [फा.]

**बागधारी**—स्त्री. घोड्याची चाल. –अश्वप.१.१९४.

**बागनेट**—स्त्री. बंदुकीस खोंवावयाची संगीन. [इं. बेयोनेट]

**बागबरी**—पु. घोड्याचा एक रंग. –अश्वप १.२८.

**बागबूक**—स्त्री. भीतीचा दचका. भागभूक पहा.

**बांगर**—पु. (राजा.) अंड न वडविलेला बैल, रेडा; सांड.

**बांगरसट–ठ**—स्त्री. चंपाषष्ठी; मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी. [बांगर+षष्ठी]

**बांगराळें**—न. बांगडीला वर्तुळ आकार देणारा लांकडी ठोकळा. [बांगडी+आलय]

**बागलकोटी**—वि. बागलकोट येथील (रुपया, नाणीं, वजें).

**बागा**—पु १ (प्रां.) आकार; मार्ग, कृति. 'जाणिजे आचरितेनि बागें।' –माज्ञा १३ २४४ २ संबंध 'परि बोधाचेन मेळें। पाणी उजू पण वाकुडें जालें। रवी दुर्जेपण आलें। तोय बागें।' –माज्ञा १५ ३३८ [का. बगे=रीत, मार्ग]

**बांगा**—स्त्री. (नामपुरी) वांग; बांब; आंग आखडणें; चमक निघणें

**बाँगॉ**—पु (गो) कळी, कमलिनीचा कंद; बोंड.

**बागी**—स्त्री. वळण; वाक. [बाग] ०**बळ**–न कंप, कांपरें. 'माथा आदरी सिरों। बागीबळ।' –माज्ञा १३ ७५७. ०**व**–वि. वाकलेला; वाकडा. ०**वणें**–सक्रि. वांकविणें

**बागी**—वि. बंडखोर; स्वामिद्रोही; उपद्रवी; दरोडेखोर. 'शहानवाज खान बागी होऊन दौलताबाद बळाऊन बसला आहे.' –रा १.१५०. [अर. बाघी]

**बागु**—स्त्री वाट; मार्ग. 'निगे ऐसा बागु। पडता कां देवा।' –अमृ ७८० [का. बगे=रीत; मार्ग]

**बागुरडा**—पु एक किडा; झुरळ.

**बागुल**—न. (व.) रवंथ.

**बागूल**—पु रानमांजर; बाऊल.

**बागूल, बागूल बावा**—पु १ मुलांना भय दाखविण्यासाठीं कल्पिलेला एक भयंकर प्राणी, भीति वाटण्याकरितां उभा केलेला पुतळा, आणिलेलें सोंग. 'कृष्णा राही रे उगला। नाहीं तरी सांगेन त्या बागुला।' –भज ३३.२ (ल.) पोकळ भीति. 'जो तो या लोकमताच्या बागुलबोवाला भिऊन दडून बसेल तर कोणत्याही समाजाला उन्नतावस्था येणार नाही'.–आगर. ३ बागूल, बगुल्या, लहान मुलाचें प्रेमानें ठेवलेलें टोपणनांव [स्लाव्हानिक बोगु=देव, बग्=भूत]

**बागेसरी, बागेश्री, बागेश्वरी**—स्त्री. १ एक राग यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गाधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत पंचम वर्ज्य, जाति षाडव-संपूर्ण, वादी मध्यम, संवादी षड्ज ह्याच्या दुसऱ्या प्रकारांत पंचम स्वर अजिबात गाळतात, जाति षाडव-षाडव. तिसऱ्या प्रकारांत पंचम स्वर आरोहांत व अवरोहांत घेतात जाति संपूर्ण-संपूर्ण. ह्यांपैकीं पहिला प्रकार विशेष रूढ आहे. गान-समय मध्यरात्र २ सोनाराची शेगडी; काळम्मा. 'मध्वनाथ म्हणे बागेसरीपुढें। सोनें बरवें कुडें निवडतें।' –मध्व ४९८.[स. व्याघ्रेश्वरी] ०**धारजणी असणें**–(ल.) विशेष परिश्रम किंवा बुद्धिमत्ता याशिवाय श्रीमंत होणें

**बागोंवचें, बागोंचें**—सक्रि (गो) वाकविणें [स. वक्र]

**बाग्या**—वि. (व) मूर्ख; कोणाकडूनहि सहज फसला जाणारा; भित्रा. [हिं. भागना=पळणें]

**बाघेकरी**—वि. (को) पूर्वापार काहीं हक्कसंबंध नसून नवीन येऊन गावांत राहिलेला; वतनदार नव्हे असा; उपरा.

**बाघोडा**—पु मुलांचा एक खेळ

**बाच, बांच**—पु. १ भयाची धडकी, भीति; दरारा. (क्रि० खाणें). 'प्रथम मी शरीन असें म्हणत होता, पण मग लागलाच बांच खाल्ला.' २ आदरयुक्त भीति, दरारा. (क्रि० खाणें; घेणें). [बाचकणें] ०**कणी**–स्त्री एकदम भीति घेणें, दचका; गोंधळांत पडलेली स्थिति; बुचकळयात पडणें ०**कणें**–अक्रि घाबरणें; दचकणें; भीति, दरारा, तिटकारा इ० चा परिणाम मनावर एकदम होणें, गोंधळांत किंवा बुचकळयात पडणें; चकित होणें; विचकणें. ०**कावि(व)णें**–सक्रि एकदम भीति दाखविणें, भिवविणें; भेदराविणें.

**बाचकुटणें**—अक्रि १ नासणें; कुजणें; विघडणें; आंबणें (फळें, दूध, खाण्याचे पदार्थ इ०). २ कुपथ्यामुळें दुखण्याचा प्रकोप होणें; भडकणें नेत्ररोगामुळें डोळे किंवा एखाद्या विकारानें इतर अवयव अधिक दुखूं लागणें.

**बाचकें**—न. १ (माण) रुंद तोंडाचें गाडगें, मडकें. २ गाठोडें, बोचकें. ३ लहान पोतें; लहान गठ्ठा.

**बाचट, बाचटणें**—बाचोट व बाचोटणें पहा.

**बाचटणें**—अक्रि. बाचकणें; एकदम भिणें; दचकणें.

**बाच(स)टु**—पु. १ (महानु) धक्का. २(ल) परिणाम,टोला. 'या बोलाचा बाचटु। न साहेच उद्धवदेव सुभटु।' –भाए ७१.

**बाचडा**—पु बासडा पहा

**बाचणूक, बाचणी**—स्त्री. १ कज्जा; कलागत; बाचाबाच. २ बरळणें, भलतेंसलतें बोलणें; बडबड. [सं. वाक्, वच्=बोलणें] **बाचणें**–अक्रि. १ भांडणें; आरडाओरड करणें, तंडणें; खडाजंगी करणें. २ बरळणें; बावचळणें; असंबद्ध बोलणें. **बाचरट-ठ, बाचारा**–वि. बडबड्या; बोलका; पाल्हाळ लावणारा; बोलण्यांत ताळतंत्र नसलेला. **बाचळणें, बाचलणें**–अक्रि १ देहभान विसरणें; गोंधळून जाणें; शुद्धि न राहणें २ निसवणें; स्वच्छंद आणि बदफैली होणें. ३ झोपेंत बरळणे; अद्वातद्वा बोलणें. [सं वाचाल] **बाचाबाच, बाचाबाची**–स्त्री. जोराचें भांडण; हमरीतुमरी; वाग्युद्ध, उत्तरप्रत्युत्तर. [बाचणें]

**बाँचॉ**—पु. (गो.) ओठांची कड; कांठ.

**बाँचावणी**—स्त्री. (गो.) शस्त्रानें टोंचणें [बोंचणें]

**बाची**—स्त्री. (बे.) लांकूड तासण्याची तासणी; वाकस.

**बाचुकणी, बाचुकणें**—बाचकणी, बाचकणें पहा.

**बाचुटणें, बाचोटणें**—बाचकुटणें पहा.

**बाचो(चू)ट**—न. १ कुपथ्य; अपथ्यकर खाणें. २ कुपथ्याचा दुष्परिणाम; कुपथ्यानें वाढलेला विकार. ३ (धुरामुळें) दृष्टीची मंदता.

**बाचोट**—वि. शिळापाका; बेचव; नीरस. [ बासट ]

**बाच्छाई**—स्त्री. बादशाही; सार्वभौमत्व. ' शिंदे बाच्छाई तकत थेट ठेविली दृष्ट। ' -ऐपो ४३५ [ फा बादशाही ]

**बाज**—स्त्री. १ खाट; खाटलें; बाजलें. २ (गो) पलंग [ सं वह् ] **बाजट, बाजलें**-न. लहान खाट **०वट**-न. १ लहान खाट. २ बाजेची दोरी. -पु. ३ ( कों ) चौरंग.

**बाज**—पु भय; भीति; दरारा, वचक. ( क्रि० खाणें ) ' बंड मनुष्यें आणील बाजा (खाटा)। मार वेतील टाकून बाजा(भीति)। दक्षिण देशीं मरेल राजा । क्षेत्रभंग होईल। ' -अफला २४.

**बाज**—पु बहिरीससाणा, श्येन पक्षी [ फा बाझ् ]

**बाज**—पु पीक ( विशेषत: फळें व फुलें यांचें ), बहार; बहर; बार. [ वै सं वाजयति ] **म्ह०** कडव्या झाडास बहु बाज. **बाजणें**-अक्रि बहार, पीक येणें; फळें धरणें, फुलणें. **०वट**-वि भरपूर पिकणारें, बहारदार; खूप फळणारें. ( **झाड,** पीक ).

**बाज**—न ( नाविक--हेट ) तीन ते पांच पर्यंत शिडें असणारें गलबत.

**बाज**—न तंतुवाद्यातील मुख्य तार या तारेवर डाव्या हाताचीं बोटें टेवून वाद्य वाजवितात. [ सं वद्-वादन ]

**बाज**—कर्तृत्व दाखविणारा प्रत्यय; करणारा. हा हिंदी व फारसी शब्दांना लागतो उदा० दारू-कुर्रे-अक्कड-दगल-बाज. [ फा. बाझ्=खेळाडू ]

**बाज**—क्रिवि. उलट; उलट पक्षीं ' बाज गुन्हाई माझें वतन घेऊन. ' -रा १५.१६. [ फा. बाझ् ]

**बाज**—क्रिवि. नंतर. ' बाज बरसात याचें पारिपत्य करूं ' -होकै १२. [ अर बाद ]

**बाजकें**—न. लहान गाठोडेवजा बांधून, बंद करून पाठवयाचा किंवा आलेला माल. बाचकें अर्थ ३ पहा [ हिं ]

**बाजगीर**—पु. कर वसूल करणारा. [ फा. ? ]

**बाजत, बाज(जि)द**—क्रिवि. १ शिवाय; आणखी. ' मी एक घोडा देईन बाजत कांहीं देणार नाहीं. ' २ नंतर; पुढें. 'बाजत बरसात मसलत शेवटास आईल.' -मराचिथोशा ६८. ३ पत्रांत सलाम लिहिल्यानंतर हा शब्द लिहितात. उदा० 'सलाम बाजत सलाम '=अनेक नमस्कार. [ फा. ]

**बाजदादन**—वि. परत; परतीसंबंधीं. ' प्रांत मजकूरचे हिशेबी बाजदादन खर्च लिहून देणें. ' -बाड-दुसरे बाजीराव ५.२१४. [ फा. ]

**बा-जमियत**—वि. ससैन्य. ' गुलाम बा-जमियत हजर होता. ' -रा ५.१३२. [ फा. ]

**बाजरवाडा**—पु. अफूचें पीक काढण्यापूर्वी ज्या जमिनींत बाजरीचें पीक काढतात ती जमीन. [ बाजरी+वाडी ]

**बाजरा-री**—पुस्त्री बाजरीच्या मोठ्या दाण्यास बाजरा व लहान दाण्यास बाजरी म्हणतात; एक खाद्य धान्य; सजगुरा [ हिं. ]

**बाजवट**—पु बाजूबंद नांवाचा दागिना. [ बाज=बाजू+वत् ]

**बाजा**—पु १ वाद्यें वाजविणें; सुरसनई, समेळ इ० वाद्यांनें एकदम वादन किंवा गजर. २ बेंडबाजा ( क्रि० करणें; होणें; रडणें; ओरड करणें ) [ हिं; सं वाद्य ] **०करणें**-(ल ) बोंब मारणें; ओरडणें.

**बाजांगूळ**—स्त्रीन. ( कों ) बांडगूळ पहा

**बाजार**—पु. १ मंडई; हाट, पण्यवीथिका, दुकानें मांडून क्रयविक्रय जेथें चालतो तो; पेठ, गंज ( बाजार, हाट व गंज यांच्या अर्थांत थोडा भेद आहे. बाजार म्हणजे रोज किंवा आठवड्यानें किंवा नियमित वारीं भरणारा. हाट म्हणजे फक्त नियमित वेळींच भरणारा बाजार व गंज म्हणजे बाजारपेठ. २ खरेदीविक्री, क्रयविक्रयाकरिता जमलेला समुदाय. ३ (ल ) प्रसिद्धि, बोभाटा, बभ्रा; गवगवा. ४ (ल.) गोंधळ; पसारा; अव्यवस्था; अव्यवस्थित कुटुंब किंवा घर. ५ (ल कु ) मासळी. [ फा. बाझार ] **म्ह०** बाजारात तुरी भट भटणीला मारी. (वाप्र.) **०करणें**-पाहिजे असलेली वस्तु बाजारात जाऊन विकत आणणें, घेणें **०मांडणें**-अनेक पदार्थ इतस्ततः अव्यवस्थितपणें पसरणें. **०भरविणें**-अनेक माणसें-ज्याचा कांहीं उपयोग नाहीं परंतु घोंटाळा मात्र होतो अशीं-एके ठिकाणीं गोळा करणें. **०भरणें**-( ल. ) कलकलाट करणें; गोंधळ माजविणें; पसारा पसरणें. **गेला बाजार तरी**-किमानपक्षीं; निदान; कमीतकमी; बाजार होऊन गेल्यावर विकला तरी. ' गेला बाजार तरी त्या पागोटयाचे पाच रुपये मिळतील. ' **बाजारच्या भाकरी भाजणें**-नसत्या उठाठेवी करणें; लुडबुड करणें; विनाकारण मध्येंच तोंड घालणें. **(वेड्यांचा) बाजार पिकणें**-बलबलपुरी होणें; सर्वच मूर्ख माणसें जमणें; टमटम राज्य होणें. **बाजारांत पांच पायलीनें (विकणें मिळणें)**-अत्यंत स्वस्त दरानें, मातीमोलानें (नकारार्थी योजना). **उभ्या बाजारांत**-भर बाजारांत; सर्वासमक्ष ( जाहीर करणें, सांगणें ) सामाशब्द- **०अफवा-अवाई-गप्प-बातमी**-स्त्री निराधार बातमी; कंडी, निराधार वार्ता, चिलमी गप्प. [ फा. बाजार+अर अफवा, अवाई, गप्प ] **०करी**-वि बाजारांत विकणारा किंवा विकत घेणारा ( मनुष्य); दुकानदार किंवा गिऱ्हाईक. [ बाजार+करणें ] **०खोर**-वि (नाग.) जगाला तमाशा दाखविणारा; खाजगी गोष्टी चवाठ्यावर आणणारा. [ फा ] **०चलन-चलनी**-वि बाजारात चालू असलेलें, चालणारें ( नाणें ) **०निरख**-पु. १ बाजारभाव; बाजारांतील दर. -**वि** अट्टल; बिलंदर. 'बाजारनिरखा सोदा.' -क्रिवि प्रसिद्धपणें; सर्व लोकांत; गाजावाजा करून; बेइज्जत करून. ( नेहमीं वाईट अर्थानें उपयोग ) ( क्रि० करणें ). ' त्याची बाजारनिरख फजिती झाली.' **०पट्टा**-पु.(गुळाची अडत) कसर; दरशेंकडा साधारणत: १२

आणेप्रमाणें कापलेली रक्कम. ०फसकी-गी-स्त्री. बाजारांत विक्रीसाठीं येणाऱ्या मालावरील सरकारी पट्टी ( पसाभर धान्य घेणें ). ०बट्टा-पु. प्रमाण मानलेल्या नाण्याशीं बाजारांतील इतर नाण्यांचे दर, प्रमाण ०बसका-पु. बाजारांतील दुकानांवरील कर. -वाडमा ९.७० ०बसवी-बसणी-बुणगी-बुंदगी, बाजारचोखाट, बाजारीण-वि. वेश्या; कसबीण. [ फा. बाझार+सं. उपवेशनी ] ०बसव्या-वि. ( ल. ) निर्लज्ज; अडाणी व दांडगा; शिवराळ व भांडखोर; असभ्य. ०बुणगें-न. १ फौजेबरोबर असणारी अवांतर माणसें; फौजेबरोबर असणारे दुकानदार इ० गैरलढाऊ लोक; कारखाना. २ कामाशिवाय जमलेला मनुष्यसमुदाय. ३ (ल) फटकुऱ्यांचा अगर चिंधोट्यांचा गठ्ठा; वस्तवार; निपटारा; सामुग्री. [फा. बाजार बुन्गाह् ] ०बैठक-स्त्री. बाजारांतील किंवा यात्रेंतील दुकानावरील कर. ०भरणा-भरती-पुस्त्री. १ बाजारांत फक्त ठेवण्याच्या किंमतीची परंतु मोलहीन, कुचकामाची वस्तु; खोगीरभरती. २ ( ल. ) नीच व निरुपयोगी मनुष्य. ०भाव-पु. बाजारांत चालू असलेला दर; बाजारनिरख. ०मशहूर-वि. बाजारांत लहानापासून थोरापर्यंत सर्वांना माहीत असलेला; गाजावाजा झालेला; प्रसिद्ध. ०वाडा-पु. १ बाजार भरण्याची जागा; मंडई. २ ( ल. ) अव्यवस्थित कुटुंब किंवा घर. ०शिरस्ता-पु. बाजारांतील सामान्य वहिवाट, चाल, ( रिवाज दर इ० चा ). [ बाझार+फा. सरिश्ताह् ] ०हाट-स्त्री. बाजारपेठ; बाजारखरेदी. बाजारी-वि. १ बाजारा संबंधीं; बाजारचा; पेठेंतील. २ ऐकीव. ' कागदो पत्रींचें वर्तमान नव्हे बाजारी आहे. ' -ख ८.३९७६. ३ ( ल. ) नीच; हलकट; असंभावित; लुच्चा. ४ सामान्य; साधारण; भिकार; बाईट ( वस्तु ).

बाजिंदा—वि. १ खेळाडू; लुच्चा; हट्टी; खोडकर. ' रडे एकचि हा हरि मोठा बाजिंदा । ' -निर्गुणाचा पाळणा. २ धूर्त; निष्णात; निपुण, फसवणूक करणारा. ( निंदार्थी ) फरडा; बहाद्दर; जहांमबाज; फाविंदा. ३ बजवय्या. [ फा. बाझन्दा ]

बाजी—स्त्री. १ पत्ते, गंजिफा, सोंगट्या यांचा खेळ, क्रीडा; २ ( ल. ) सरशी; बाणा; बाजू; डाव. ' एकवेळ बाजी विस्कटली म्हणून पराक्रमी पुरुष स्वस्थ बसत नाहींत. ' -ख ११.६१००. ३ ( पत्त्याचा खेळ ) रंग; बाजू. ४ हात किंवा वाटलेले पत्ते; जिंकलेला डाव. ५ खेळाची समाप्ति. ६ ( ल. ) मसलत. ' यासाठीं अवघ्यांनीं साहित्य पुरवून बाजी सेवटास न्यावी. ' -पेद ५.२४. ७ ( ल. ) बाणा. ८ घोड्याची एक चाल. ( क्रि० धरणें; चालणें; येणें; जाणें; उभारणें). ९ (ल ) सवय; व्यसन अशा अर्थी शब्दाला जोडून उपयोग. उदा० दारू-सट्टे-बाजी इ० [ फा. बाझी ] ०अंगावर येणें-देणें-हरणें; हरविणें. ०कार-वि. कर्ता; उत्पादक. ' सर्वांचे सम्मतें या करण्याचे बाजीकार रघुनाथ विश्वई. ' -रा ७.३९. [ फा. ]

बाजी—पु. १ एक नांव. २ (कु.) धनगरास मारावयाची हांक.

बाजीग(गा)र—पु. गारुडी; जादूगार. -वि. उलटणारा. ' माघीन बाजीगार होऊन... ' -ख ३५७०. [ फा बाझीगर् ] बाजी(जे)गरी-गारी-गिरी-स्त्री. १ गारुडीविद्या; चेटूक; मंत्रतंत्र; नजरबंदी; हातचलाखी; इंद्रजाल. 'माया मिथ्या बाजीगरी। दिसे साचाचिये परी। ' -दा ६ ८ २४. २ पत्ते, सोंगट्या खेळणें; द्यूत; जुगार. -वि. १ रिकामा; कुचकामी; निकस; बाईट ( वस्तु, पदार्थ ). २ ( ल. ) निरर्थक; पोकळ; मूर्खपणाचें ( भाषण, वागणूक, उद्योग ); वरकरणी; ढोंगी; बेजबाबदार (माणूस). [फा. बाझीगरी]

बाजीद—वि. लाचार; दीन बजिद् अर्थ ३ पहा. ' बाजीद होऊन ... ' -बाडशाह १.८४.

बाजीराई-रावी—स्त्री. दुसऱ्या बाजीराव पेशव्याप्रमाणें थाटमाट आणि विलास. ०धोतरजोडा-पु. हातहात रुंद रेशीमकांठी धोतरजोडा. बाजीरावनाना-पु ( कों. ) श्रीमंत मनुष्य. बाजीरावाचा नातू-पु. १(थोरले बाजीराव पेशव्याचे नातू दुसरे बाजीराव यांना आयतें राज्य मिळालें असता त्यांनीं तें घालविलें. यावरून) श्रीमंत परंतु मूर्ख व मिजासखोर माणूस. बाजीरावाचा बेटा-पु. ( ल. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या नांवावरून ) गर्भश्रीमंत.

बाजु(जू)बंद—पु. १ दंडाला बांधण्याचा स्त्रियांचा दागिना. 'बाजूबंद जोडी हातसर। ' -तुगा २९६९. २ (फुलमाळी) दंडाला बांधण्यासाठीं केलेली फुलांची माळ. [ सं बाहु=बाजु+बंध ]

बाजू—स्त्री. १ बाहु; भुज. २ भाग; पैलू ( वस्तूचा ); कड; कांठ; किनारी; मर्यादा. ' त्रिकोन चौकोन इ० कांच्या बाजू. ' ३ एखाद्या पदार्थाचा कोणत्याहि एखाद्या विभागाच्या विरुद्ध असलेला भाग. ४ ( ल. ) पक्ष; फळी; कड; तर्फ; चढाओढीच्या सामन्यांतील एक पक्ष. ( क्रि० राखणें; सांभाळणें ). ५ मोठी सतरंजी; जाजम (पूर्वी खोलीच्या एका बाजूला पुरेल अशा सतरंजीला म्हणत ). ६ मदतनीस; साहाय्यकर्ता; आश्रयदाता; सहाय्यक. ' यशवंतराव बाजू सांग ज्या मर्दाला । ' -ऐपो ७९. ७ ( पत्त्यांचा खेळ ) खेळांतील रंग; हात; गंजिफांतील एका रंगाचीं १२ पानें, बाजी. ८ गाडीच्या साटीचीं लांबीच्या बाजूला असलेलीं दोन लाकडें. त्याच्या उलट करोळे=साटींतील रुंदीचीं लाकडें. ९ संकट; अडचण; विघ्न; पेंच. [ सं. बाहु, फा. बाजु ] ०मारणें-आपल्या पक्षाची सरशी करणें; स्वीकृत पक्ष यशस्वी करणें. ०राखणें-अब्रू संभाळणें; नांव राखणें; फजिती किंवा दुर्लौकिक न होऊं देणें. ०राहणें-अब्रू किंवा नांव राहणें. ०वर खेळणें-अंगावर येणें-फजिती होण्याची वेळ येणें, पराभव होण्याचा रंग दिसणें. ०चा देखावा-पु. (इमारत) पार्श्वनिदर्शन. ०मारणारा-मारून नेणारा-वि. घेतलेला पक्ष यशस्वी करणारा; आपला पक्ष सिद्धीस नेणारा. ०स-क्रिवि. एकीकडे.

**बाजे**—वि. कांहीं; अवांतर; इतर; वरकड; किरकोळ. ' बाजे मरातब कृष्णराव यास कलमी केले. ' -रा १०.१६७. [ फा बअझि] **०खर्च**-पु मुख्य हिशोबानाहेरील खर्च; किरकोळ खर्च; वरकड खर्च. **०लोक**-पुअव. लष्करांतील बिन लढाऊ लोक; सटर फटर लोक. [ हिं. ] **०वतनदार**-पु. जोशी, उपाध्या, जंगम, सेटया, पोतदार, काजी, मुलाणा, पाटील, मुजावर, कुंभार, सुतार, कासार, न्हावी, तेली, महार, चांभार, मांग, परीट, मेहतर इ० वतनदार. -मसाप २.१३८.

**बाजोट**—न. ( खा. ) पलंग. हा नवारीनें विणलेला किंवा रिफांचा असतो. [ बाज ]

**बाजोड**—पु. ( व. ) ढेंकूण; खटमल [ बाज ]

**बाझ**—पु ( कों. ) पीक ( फळें किंवा फुलें यांचें ); बहर. [ सं वृधु-वर्धू, बाज ] **०णें**-अक्रि. ( कों. ) फळें, फुलें धरणें; लाग, बहर येणें, बाजणें **०वट**-वि. ( कों. ) ज्यास पुष्कळ लाग घेतो असें; पुष्कळ फळें, फुलें देणारें; ( झाड ).

**बाट**—पु १ अपवित्रपणा, विटाळ, वाटणूक; स्वजातींत वावरण्याची अयोग्यता ( बाटण्यामुळें ) ( क्रि० पडणें, असणें ) २ डाग, कलंक, दोष; ठपका; दोष देण्याचा प्रसंग, वेळ (क्रि० ठेवणें; पडणें; असणें; लागणें ). -वि. १ लबाड; लुच्चा; लबाडींत व हलकटपणांत हुशार, धूर्त. ' उलीसेंच पोर बाट मोठें । थोरपण असून वहाड खोटें । ' -भज १०५. २ बाटगा; बाडगा; दांडगा; उच्छृंखल, तसेंच कडक, तल्लख, शिरजोर, आवरण्यास कठीण ( मनुष्य घोडा, बैल इ० ) [ सं भ्रष्ट; हिं ] **०गा -बाडगा**-वि. १ बाटलेला; भ्रष्ट; पतित, आचारविचारशून्य, स्वजातींत वावरण्यास अपवित्र, अयोग्य. २ ( हलकटपणाच्या व नीचपणाच्या कामांत ) हुशार; धूर्त, कुशल; चलाख. **०गेला, बाडगेला**-वि. बाटगा पहा. **०गी**-वि. १ बाटलेली. २ व्यभिचारिणी **०णूक, बाटणी**-स्त्री. भ्रष्टता; भ्रष्ट होण्याची किंवा केला गेल्याची क्रिया; विटाळ. [ वाटणें ] **०नाट**-पु. विटाळ; बाटगेपणा; भ्रष्टता ( व्यापक ). ( क्रि० पडणें, होणें; असणें ). [ बाट+नाट ] **०वडा, बाटोडा**-पु. बाटाबाट; सर्वत्र भ्रष्टाकार; जिकडेतिकडे झालेली भ्रष्टता; ( सामा. ) बाटणूक. **बाटाबाट**-स्त्री. बाटवडा पहा. पवित्र व अपवित्र यांमध्यें भेद न पाळल्यानें किंवा व्यभिचारामुळें झालेला भ्रष्टाकार. **बाटीव, बाटवा**-वि. बाटलेला; भ्रष्ट झालेला; धर्मभ्रष्ट. **बाटणें**-अक्रि. धर्मभ्रष्ट होणें ( दुसऱ्या जातीशीं अगर धर्माच्या मनुष्याशीं वैषयिक संभोग, अन्नव्यवहार किंवा निषिद्ध पदार्थ सेवन यामुळें ) स्वजातीशीं व्यवहार करण्यास अपवित्र व अयोग्य असणें; ( एखादी वस्तु ) उपयोगास अयोग्य किंवा अपवित्र होणें. **बाटविणें**-सक्रि. विधिपूर्वक धर्मभ्रष्ट करणें; दुसऱ्या धर्मांत नेणें; अमंगलता आणणें; भ्रष्ट करणें ( वस्तु किंवा मनुष्य ); ( गो ) बाटौंचें.

**बाट**—न. मोतीं तोलण्याचें वजन व त्यांचा समूह जसें-१ आणा=१ तांदूळ वजनाइतका ४ आणे=पावरती, १६ आणे=१ रती, २४ रती=१ टाक, १ टाक=२२ क्यारेट इ० वजनाचा गट. -जनि ( पासि शब्द ) ९.

**बाट**—पु ( कों ) एक जातीचा मासा.

**बाट**—पु. गंज; संच ( वस्तूंचा ). -के ११.१०.३५

**बाटली**—स्त्री. कांचेची शिसी; कुप्पी. [ इं. बॉटल ]

**बाटी**—स्त्री. ( महानु ) निर्माल्य झालेली माळ. ' जि तुझिये मुगुटीचिया बाटी । ' -भाए १५७. [ बासट=शिळें ? ]

**बाटी**—स्त्री. ( माळवी ) मैदा, दूध, मीठ, तूप यांचें मिश्रण मळून त्याची (गोवरीच्या) विस्तवावर भाजलेली आहारोळी; गाक्कर.

**बाटु(ट्ट)क**—न. जोंधळयाचें कणीस निसवण्यापूर्वीचें ओलें ताट, चिपाड; ओला कडबा. ' चारितो सरस बाटुक याते । ' -किंगवि २३. -वि. (व) आंखूड; दुटकें. 'बाटुकनाक्या.'[बुटकें]

**बाटुक**—पु. ( व. ) खाऊ.

**बाटयोंचें, बाट्योंचें**—सक्रि. (बो) (पदार्थावर) बुरा येणें; केणशी येणें. [ बाटणें ]

**बाठ, बाटी, बाठी, बांठी**—स्त्री. आंब्यांतील कोय (आंतील बीजासहित कवच ). [ हिं. ]

**बांठ**—स्त्री. (कों.) आंब्यांतील कोयीचें नुसतें कवच. **बाठळ, बांठ(ठा, ठ्या)ळ**-वि बाठ झालेला; कोय पक्की झालेला (आंबा). **बाठळणें, बांठाळणें**-अक्रि. आंब्यांत बाठ पूर्ण तयार होणें; आंबा पक्का होणें.

**बांठ**—स्त्री. ( नाविक ) रांजण; मोठें मडकें. [ का. ओट्टे ]

**बां(बा)ठा**—पु. १ ( कों ) आंब्यातील कोय (कवच बीजासह) २ ( ल. ) आघातामुळें शरीरास आलेलें टेंगूळ. ३ जटा; गांठ; केंसाचा किंवा तंतूंचा झालेला गुंताडा; काथ्याकरितां कुजत घातलेल्या चोडात राहिलेला कठिण भाग. -वि. धट्टाकट्टा; दांडगा; मजबूत; दृढ; निढावलेला. [ का. ओट्टे ] **म्ह०** साठा आणि बाठा.

**बाठा**—पु. ( जुन्नरी ) खेंकडा ( नर ).

**बांठूक**—न. ( कों. ) आंब्याच्या बाठीसारखें बळकट, जोरदार व ठेंगणें माणूस किंवा जनावर; बळकट, कसलेलें शरीर. [बांठा]

**बाड**—न. टाचणांची वही; सारग्रंथ; निरनिराळया शास्त्रीय ( वैद्यक, ज्योतिष इ० ) ग्रंथातील निवडक भागाचें किंवा उध्दृत केलेल्या वेंच्यांचें पुस्तक; सर्वसंग्रह. [ सं. बाढ=मोठें ]

**बाड**—स्त्री. कड किंवा धार ( शस्त्राची किंवा हत्याराची ), (मूळची धार असल्यास क्रि० देणें; चिरणें इ० व पुन्हां धार तीक्ष्ण करणें अशा अर्थी क्रि० लावणें असें योजतात). -स्त्रीन. १ (ल.) कड; हद्द; तंबूभोंवतालचें आवरण ( शेर, निवडुंग इ० चें किंवा कनाथीचें ): तंबूची कनाथ, पडदा; तंबू. ( क्रि० चिरणें ). (सामान्यतः):

कुंपण. ( क्रि० घालणें ) २ शिपायांची रांग. ०मारणें-(गो.) थापा देणें.

**बाड**—स्त्रीपुन. (ल ) एखादें वाईट कृत्य करण्याकरितां खोट्या आश्वासनांनीं एखाद्याला उत्तेजन देणें, चेतविणें; अशा तऱ्हेचें उत्तेजन किंवा प्रोत्साहन. ( क्रि० देणें ) -न. १ तरवार इ०चें म्यान २ थाप; गप्प; निरर्थक गोष्टी; चकाट्या; थापा. (-अव. बाडा ) ( क्रि० मारणें; झोकणें; हाकणें; हाणणें; फेंकणें; सांगणें ).

**बाड**—( व. ) ( कापूस वटण्याचें जिनिंग मशीन येण्यापूर्वी अशा जागीं पूर्वी हातरीवर कापूस वटीत असत परंतु हल्ली गुरें बांधतात यावरून ) बखळ; आवार; मोकळी जागा; गोठा; कापसाचें आखें दाबण्याची जागा. -स्त्री. ( गो. ) स्थावर संपत्ति.

**बाड**—वि. धूर्त; लबाड. [ अर. बयाझ्; हिं. बाड ] **बाड असणें**-( व. ) गाडीचें चाक चाकोरीच्या बाहेर असणें.

**बांड**—वि. १ रोगामुळें चेंबट व खुरटलेलें (पीक किंवा बारीक झालेलें धान्य; डाळ वगैरे). २ बळकट; तेजस्वी; धष्टपुष्ट; जवान 'राज्यव्यवस्थेंतील मोठ्या जागा विलायतेंतील तरुण बांडांस मिळतात.' -टि १.३१९ ( मनुष्य ). (याच्या मागें कधीं तरणा शब्द येतो किंवा येत नाहीं ). ३ जाडेंभरडें वस्त्र किंवा कापड. ४ ( प्राय. ) बंड; बंडखोर; बंडया. [ का. उंडिग, उंडिगी, उंडगी= रिकामा, निरुपयोगी ]

**बांड**—पु. १ सुती व हलक्या किंमतीचें लुगडें; लुगडा; उणास लुगडें ( किनार सुती असलेलें ). २ कांदा, नागवेल इ० झाडांस येणाऱ्या तुऱ्याचा दांडा; पोगाडा ( फुलांचा किंवा झाडाचा ). ३ बाटुक; कणसावांचून असलेलें जोंधळ्याचें ताट; ज्यावर रोगामुळें कणीस आलें नाहीं किंवा ज्याचें कणीस गुरांनीं खाल्लें आहे किंवा कापलें आहे असें जोंधळ्याचें अगर बाजरीचें ताट ४ जळाऊ लाकडाचे वाटोळे तुकडे; न फोडलेले लांकडी ओंडके. ५ -जमीन. धान्य न होतां केवळ कडबाच होणारी जमीन; ज्यांतील पीक खराब आलें आहे किंवा गुरांनीं खाल्लें आहे असें शेत, पीक. ६ वांग्याची एक जात. [ हिं. ]

**बाँड**—( गो. ) कपाळ. ०भद्र-न. भद्राकरण.

**बाँड**—पु. १रोखा; बदलऐवज; कायद्यानें बांधून घेतल्याबद्दलचा लेख; करारपत्रक. २ विद्यार्थ्यांचा किता. [ इं. ]

**बाडकीन**—न. ( मुद्रण ) अशुद्ध टाईप काढण्याकरतां दाभणाच्या आकाराचें एक हत्यार. [ इं. ]

**बाडगा**—वि. १ उमेड; निर्दय; आडदांड; जुलमी; उन्मत्त; अत्याचारी; शिरजोर. 'आवा नणदा बाडग्या सासरासासु मोठी निर्दय।' -होला ९९. २ आवरण्यास कठिण; उच्छृंखल; स्वैर; हट्टी ( मनुष्य, पशु ). ३ बाटगा; भ्रष्ट; बाटलेला. [बाटगा] **बाडगेला**-वि. ( अशिष्ट ), बाडगा.

**बांडगा-गें**—पु.न. खोगिराचा किंवा मुटीचा पाठीवरून बांधावयाचा पट्टा; पाटबंद. याच्या उलट उराटी-ठी=छातीवरील पट्टा.

**बांडगी**—स्त्री. १ स्वयंपाकाच्या उपयोगी, ताटाच्या आकाराचें मातीचें भांडें. २ ( निदार्थी ) तोंड. [ हिं. ]

**बांडगूळ**—न. बांदें; बांदागुळ; झाडाचें कुरट; झाडावर वाढणारें दुसरें लहान झुडुप; परोपजीवि वनस्पती. याच्या पुष्कळ जाती आहेत [ सं बंदा ]

**बाडणें**—अक्रि ( वे. ) वोमेजणें. [ बांधणें ? ]

**बांडफरीद**—पु. १ (निदार्थी) ब्रह्मचारी. २ सोदा; लुच्चा; भटकभैरव; उडाणटप्पू माणूस. [ बांडा+अर फर्द=एकटा ]

**बाडबिछा(शा)द, बाडबिछाना, बाडबिछायत**—स्त्री. पु.स्त्री. एकंदर सामानसुमान, चिरगूटपाघरूण; सटरफटर वस्तु; डेरे-राहुट्या इ० 'बाडबिशाद त्याचे हातास लागली.' -ख ७.३६१५ [ हिं बाड+बिछायत ]

**बाडस**—पु. खांबाचा टेंकू; स्तंभपीठ [ बाड ]

**बाडा**—पु कनाथीचा परीघ. 'बाडा बारा तेरा कोसांचा... बसला.' -रा ७.१०८. [ बाड ]

**बांडा**—वि. १ पांढऱ्या, काळ्या किंवा तांबड्या रंगाचा परंतु वर निराळ्या रंगाचे पट्टे किंवा ठिपके असलेला (पशु, कपडा); काळा-पांढरा. २ ( सामा. ) बंड; बंडखोर, बंडया. ३ आखूड, तोटका. [ हिं ] ०भुरका-वि. कांहींसा बांडा; किंचित् बांडा. **बांडा, बांडेभाई, बांडुकला**-पु.. ( ना. ) ( निंदार्थी ) मुसलमान.

**बाँडॉ**—पु. ( गो. ) लहान नारळ [ बांडा=आंखूड ]

**बांडाळ**—वि. (व.) नाठाळ; उनाड. 'हरणा बैल जरा बांडाळ आहे.' [ बंड ]

**बाडी**—स्त्री. १ आवार; परसूं; पडीतजमीन. २ कुंपण; तट; भिंत. ३ ( व. ) मळा. [ सं. वाटिका हिं. ]

**बाडी**—वि. १ बाडविषयक-संबंधीं ( औषध, वही ). २ शास्त्र पूर्णपणें न शिकतां सुसते त्यांतील उतारे पाहून तुटपुंजें ज्ञान संपादन केलेला ( विशेषतः ज्योतिषी, वैद्य ). [ बाड ]

**बांडी**—स्त्री. १ पिकाची खराबी; नुकसानी, नापिकी. पीक-नुकसानी पहा. २ (व.) कणीस बाहेर न पडतां वांझ राहिलेलें ताट; बांड. ३ ( व. ) तूट; टंचाई; नपूर. 'पोळीची बांडी आली.' ४ (ना.) कमरेपर्यंत लांब व अर्ध्या बाह्यांचा कोट. ५ (ठाणें) पोहरा; मडकें; ताडी काढण्याचें मडकें. ६ ( व. ) सुताची लाटी. ७ ( ल. ) दुर्गे-गुजा. [ बांडा=आखूड ]

**बॉडीगार्ड**—पु. शरीररक्षक; हुजऱ्या; हुजूरहशम. [ इं. ]

**बांडुक**—पु. ( कु. ) बेडूक. [ सं. मंडूक ]

**बाडें**—न. (ना. व.) वांकडें; शत्रुत्व; वांकुली. –क्रिवि. वांकडें; रस्ता सोडून. ' गाडी बाडी चालते. '

**बांडेलें**—वि. कणसें न आलेलें. ' बांडेल्याचें जागां जालें पीक। ' –तुगा १०४६. [ बांडा ]

**बॉड्डॉ, बोड्ड्यो**—पु. ( गो. चित्पा. ) मुलगा.

**बाढ**—वि. अत्यंत; दृढ; पुष्कळ; थोर. ' वक्तृत्व जरी बाढ- केलें। ' –मुआवि १२.२. [सं.] –उद्गा. सत्य; बरोबर; होय. [सं.]

**बाढचीर**—स्त्री. रुंद तलवार. [बाड=कड+चिरणें–धार तयार करणें–देणें ]

**बाण**—पु १ धनुष्यानें मारण्याचा तीर; शर; सायक; विशिख. ( क्रि० मारणें ). २ अग्निनलिका; लोखंडी, कागदी किंवा कळकाच्या नळींत दारू भरून तिला काठी बांधून तयार केलेलें आयुध; कळकी बाण; आतषबाजीचा एक प्रकार. ३ शिवलिंग हें नर्मदा नदींत सांपडतें. याची शिव समजून पूजा करतात ४ घरदार, कुटुंब, इष्टमित्र किंवा धन वगैरे कांहीं नसलेला मनुष्य सडाफटिंग; सडेसोट. ५ गलबताची वरची कड; बहाणी; बहाण. –स्त्री. (गो.) होडीचा कांठ. ६ पांच संख्या (मदनाचे अरविंद, अशोक, च्यूत, नवमल्लिका किंवा मोगरा व नीलोत्पल हे पाच बाण आहेत त्यावरून). ' असो बाणसंख्या दिवसांत। ' ७ क्रांतिवृत्तापासुन अंतर. ८ (गो.) पंचा, धोतर याचा रंगीत कांठ. ९ (ल.) सुर्याचे किरण प्रत्येक. 'उगवला दिनराज बाण आले चौबारा। ' –ब ६०५. १० (ल.) महत्त्वाचा मुद्दा (क्रि० गमावणें; हातचा गमावणें). 'भलता प्रसंग आल्यास हा बाण त्यानें शिल्लक ठेविला होता. ' –इंप १७८ –वि. सडेसोट; घरदार सोडलेला; निर्वाण ( माणूस ). [ सं. ] ०दार, बाणाईत–पु ( दोन्ही प्रकारचे ) बाण वाळगणारा; बाण फेकणारा शिपाई; तिरंदाज. ०पंचक–न वर सांगितलेले मदनाचे पांच बाण. [ बाण+पंचक ] **बाणाकार**–वि. बाणाच्या आकाराचा; बाणाच्या गतीच्या आकाराचा: समकलछिन्नाकार; समकक्षछिन्नाकार [ सं. बाण+आकार ] **बाणाटी**–स्त्री. बाण

**बाणक रेशीम, बाणक**—न एक हलक्या जातीचें रेशीम. **बाणक मोठी लडी रामपुरी**–स्त्री. पिवळया रंगाच्या रेशमाचा एक प्रकार. –मुंव्या ५७.

**बाणगी**—स्त्री. दुसऱ्याचा अंदाज काढण्याकरितां केलेली सूचना.

**बाणगुसी**—स्त्री. लष्करी पोषाक व सरंजाम ( मुख्यत्वें अधिकाऱ्यांचा ) ०**हरणें–सांडणें–देणें–जाणें**–लष्करी कामावरून काढला जाणें. ०**घेणें–आणविणें–अस्त करणें**–लष्करांतून काढणें; कमी करणें; पहाऱ्यांत ठेवणें; कैदेंत ठेवणें. [ बाणा=गणवेष+गुसी=तरवार ]

**बाणणें**—अक्रि. १ भिनणें; प्रवेशणें; भिडणें; प्रतीतीस किंवा अनुभवास येणें; पटणें; मनांत पुरतेपणीं ठसणें (अभ्यास, पाठ इ० ). ' बाळपणींच जयाच्या शस्त्रास्त्ररहस्य मानसीं बाणे। ' –मोशाति ६.३१ २ परिधान करणें; अंगांत घालणें. ' कां जिये एकी वस्तूलागीं। बाणोनि ज्ञानाची वज्रांगी। ' –ज्ञा ६ ४७५ ३ शोभणें; योग्य दिसणें; ठीक बसणें. ' सांबासी श्रीमद। अतिवरिष्ठ बाणला। ' –एभा १.३४६ ४ स्वीकारणें. ' कीं भक्ति सुखालागीं। आपणचि दोहीं भागीं। वांटूनियां आंगीं। सेवकें बाणी। ' –ज्ञा १२.१८६. ५ स्थिरावणें, शमणें ' प्राप्तभोगें तृष्णा न बाणे। ' –एभा १७.२२६. ६ बाणा बाळगणें. [ बाण=तीर ]

**बाणफरीद्**—पु. ( विरू ) बांडफरीद पहा

**बाणा**—पु १ अभिमान; शेखी; आढ्यता; डौल ( एखाद्या विशेष गुणाचा, अधिकाराचा इ० ) (क्रि० बाळगणें). २ पोषाक; वेष; पोषाकाची तऱ्हा. ३ एक प्रकारचा दारूचा बाण. ४ (विणकाम) वस्त्रांतील आडवा धागा; आडवें सुत; आडवट; आडवण. ५ ( जरतारी धंदा ) विन वळलेलें रेशीम ६ लांकडी मूठ व आड धारेचें पान असलेला पट्टा; एक हत्यार. [ हिं. ] **बाणाईत, बाण्याचा**–वि. प्रतिष्ठा मिरविणारा; आढ्यता बाळगणारा; मोठा दिमाख दाखविणारा (प्रावीण्य, विशेष गुण याचा) अभिमान बाळगणारा. [ बाणा ] **बाणी**–स्त्री. १ बाणा; अभिमान; शेखी; डौल. (क्रि० बाळगणें). २ आणीबाणीची वेळ; निकराचा प्रसंग. ३ जन्मस्वभाव; मनःस्थिति. [बाणा] ०**वर येणें**–आपला रागीट स्वभाव दाखविणें; चिडून जाऊन रागावणें. ०**चा**–वि. बाण्याचा; बाणेदारपणा दाखविणारा; मोठी आढ्यता दाखविणारा. ०**दार, बाणेदार**–वि अभिमान राखणारा; दिमाख दाखविणारा (एखादें कार्य पार पाडून); दुसऱ्याचें चित्त वेधून घेणारा.

**बॉणांवचें**—क्रि. ( गो. ) परसांतील गवत उपटून टाकणें. [ वेणणें ]

**बाणी**—स्त्री. पद्धति, रीति ( गाणें, वाचन इ० ची ); ध्रुवपद गायनाची पद्धति ह्या वाण्या चार आहेत त्या–खंडार, नोहार, डागुर व गौडार ह्या होत [ सं वाणी ] ०**चा**–वि. चांगल्या आवाजानें पुराण वगैरे सांगणारा, गाणारा ०**दार**–वि. ( गायन, वाचन इ० ) मोहक रीतीचें; आकर्षक पद्धतीचें.

**बाणी**—स्त्री १ कड; तीर; कांठ: किनारा २ (कों.) होडीचा कांठ; बहाण; बहाणी. ' दोनी तारुनें भरिती। बाणी उदकासीं मेळती। ' –ख्रिपु २.२५.३६.

**बात**—स्त्री गप्प: निरर्थक गोष्ट; पोकळ बोलणें; थाप. [सं. वार्ता; हिं ] म्ह० बातची बात व कुरापतची कुरापत. **बाता उडविणें–झोंकणें–फेकणें–हाकणें**–खोटया वाराच्या पसरविणें; कंड्या पिकविणें. **बाता कुटणें–खवाळणें–छाटणें–मारणें–ह्याणणें**–गप्पा मारणें; थापा मारणें; निरर्थक गोष्टी बोलत बसणें. **बात–बाता खवाऱ्या–खवाय्या, खवाल्या, बात**

फुट्या, बातखोर, बाताड्या, बातेखपाल, बातेखानी–बातेफर्मास, बातोना, बात्या, बात्या(त्ये)रा–वि. गप्पा मारण्याची सवय असलेला; गप्पिष्ट; थापेबाज; गप्पीदास; खोट्या बातम्या बनवून पसरविणारा; कंड्या उठविणारा (गो.) बातयाॅ; बातयो. ०चित–स्त्री. संभाषण; गप्पागोष्टी. 'तुम्हासवें बातचित। कोण करील महाराजा।' –नव १७ १४८.

**बात**—क्रिवि. (व.) लवकर; जलद. 'बात स्वयंपाक कर.'

**बातन**—क्रिवि. अंतस्थ; गुप्तपणें; 'बातन निजाम अलीचें राजकारण लाविलें.' –रा १.१६०. [अर. बातिन्]

**बातमी**—स्त्री. खबर; वार्ता; हकीकत; वर्तमान [सं वार्ता] ०ठेवणें–राखणें–खबर मिळण्याचें साधन ठेवणें; लक्ष ठेवणें; टेहेळणी राखणें. ०फोडणें–फुंकणें–फोंकणें खबर प्रसिद्ध करणें; हकीकत जाहीर करणें ०दार–नीस–वि १ बातमी लिहून पाठविणारा; बातमी देणारा; वर्तमान पत्राना बातम्यांचा पुरवठा करणारा; अखबरनवीस. २ परराज्यांतील बातमी पुरविणारा, गुप्त हेर, दूत.

**बात(ती)ल**—वि. १ खोटी; निराधार; रद्द; पोकळ; व्यर्थ (गोष्ट, हकीकत). २ खोटी हकीकत सांगण्याची आवड असलेला; एखादी गोष्ट अतिशयोक्तीनें सांगणारा [अर. बातिल्]

**बातॉ, बातॉळें**—पुन (गो) लांकूड कोरणारा किडा. **बात्यौचें, बरगुचें**–क्रि (गो) फळ्या, लाकूड इ० भुसभुशीत होणें.

**बातुला**—वि खोटें [बात]

**बातेरी**—स्त्री १ तोफखाना २ वीज उत्पन्न करण्याचा पात्रसंचय [इं ब्याटरी]

**बातेला**—पु. लहानसें आरमार, आरमारी जहाज [पोर्तु. फ्लॉटिला; इं. फ्लोटिला]

**बाथ**—स्त्री. (महानु.) प्रवासाच्या वेळची शिदोरी, अन्न 'तूं बाथे वीण हृषीकेषी। जीवा जाता सीं।' –शिशु ९८. [पांथ ?]

**बॉथॉ**—पु (गो.) भोंक; छिद्र

**बाद**—क्रिवि. काढून टाकलेला, वजा, कमी केलेला (पट, यादी, संख्या यांतून) (क्रि० घालणें; पडणें; करणें). 'माझें नाव पटास होतें तें बाद पडलें.'–क्रिवि. नंतर; पश्चात् 'आम्ही ताकीद केलिया बाद... मुंबईकर पन्हा देणार नाहींत' –ख ७.३५७०. [अर बअद्] ०णें–सक्रि. कमी करणें; वजा टाकणें ०करणें–१ कामातून किंवा उपयोगांतून काढून टाकणें; रद्द करणें. २ मारणें; आऊट करणें (खेळतांना गडी) ३ (फिर्याद, दावा) काढून टाकणें ०बाकी–स्त्री. १ वजा केल्यानंतर राहिलेली बाकी; बाशीलबाकी २ वजाबाकी. ३ हिशेब पुरा करणें; (कर्ज, अपराध इ० ची) बाकी काढून टाकणें.

**बाद**—पु. (गो.) शीण, बाधा [बाधा] ०चें–भोंवणें, बाधणें.

**बांद**—पु. (प्र.) बांध; बंधारा; धक्का (क्रि० घालणें). [सं. बंध] ०बंदस्ती–स्त्री. बांध; बंधारा; कुंपण इ०; तें घालण्याचें काम.

**बादखासा**—वि १ मध्यम प्रतीचा; खाशांकरितां नसलेला (मुख्यत्वें विडा). २ पुरतें न पिकलेलें परंतु हिरवें नव्हे असें (विड्याचें पान).

**बांदगूळ**—न. बांडगूळ पहा.

**बादज**—क्रिवि. नंतर; पुन्हां; यापुढे. वाजत हा. 'दादासाहेब बादज बरसात येतील.' –इमं २६०. [फा. बादज़्]

०सलाम–क्रिवि. बाजन अर्थ ३ पहा.

**बादणें**—अक्रि बहर येणें. बाजणें पहा.

**बांदन**—न. पोट; मुख्यत्वें बस्तीचा भाग; ओटीपोट.

**बादपडावल** —पु. खूणखाण; चिन्ह

**बांदर**—पु. (व.) वानर [उर्दू बंदर]

**बॉद(दे)र**—न (गो.) फाटकें वस्त्र; चिंधी.

**बादरखा–रख, बादरस**—स्त्री. तंबूच्या मधील खांबावरील लाकडी टोपण किंवा लांकडी वाटोळा तुकडा; या खांबाला असलेलें भोंक; भोंकाला बळकटी देणारा कातड्याचा वर्तुळाकार तुकडा. [फा.]

**बादरायण**—पु (बोरवनांत–बदरीवनांत जन्मलेले) कृष्णद्वैपायन; व्यास [सं.] ०संबंध–पु अति लांबचा, दूरचा, ओढूनताणून काढलेला संबंध (एकदा एका मनुष्याकडे एक लुच्चा गेला व मी तुमचा संबंधी आहे असें म्हणूं लागला संबंध विचारल्यावर त्यानें पुढील श्लोकातील संबंध सांगितला 'अस्माकं बदरीचक्रं युष्माकं बदरीतरु.। बादरायणसंबंधात् यूयं यूयं वयं वयम्।.' म्हणजे आमच्या गाडीला बोरीच्या लाकडाचें चाक आहे व तुमच्या दारांत बोरीचें झाड आहे हा बादरायण संबंध).

**बांद(दा)री**—स्त्री. १ क्षितिज २ सह्याद्रीच्या पायथ्याजवळील प्रदेश. बांदरी, मुऱ्हें व मावळ असे तीन भाग सह्याद्रीचे केले आहेत; त्यांतील बादरी म्हणजे सह्याद्रीचा पश्चिमेकडील पायथ्यापासुन शिखरापर्यंतचा सर्व भाग [बाधणें+रेषा]

**बांदरी**—स्त्री हमी; जामिनकी; जिम्मा. (क्रि० देणें). [बाहीदारी]

**बादल** —पु. ढग; मेघ; अभ्रपटल. [फा.]

**बादला**—पु. सोन्याची किंवा चादीची तार. मुलामा दिलेली रुप्याची तार; विस्तवावर पिवळी केलेली तांब्याची तार (कलाबतूकरता काढलेली व चपटी केलेली). [हिं.] **बादल्याच्या तुरा**–पु जुन्या जरीच्या सोन्यापासून तयार केलेल्या टिकल्या. **बादली**–वि. सोनें, रुपें, तांबें याच्या तारांचें, कांहीं सूत, रेशीम व कांहीं जर मिळून विणलेलें, मध्यें जरीच्या काड्या असलेलें, भरजरी. 'बेगमेनें श्रीमंतांस उंची पोशाख देऊन एक बादली वस्त्र दिलें' –थोरले मल्हारराव होळकर चरित्र पृ २६.

**बादला-लें**—पु पाणी भरण्याची कातडयाची एक मोठी पिशवी. ही पखालीच्या अर्ध्याइतकी असून बहुधा तिकाटण्यावर बसविलेली असते. 'खायाला पडले घट्टे बादले वाहतां।' –पला ८०. [ हिं. ] **बादली**-स्त्री. पाणी काढण्याचें भांडें; बालडी; बाल्टी; बकेट

**बांद(ध)वडी, बंदिशाडी, बांदो(दौ, धौ)डी**—स्त्री. (काव्य) बंदिखाना; तुरुंग; बंदिवास; परतंत्रता; अधीनता 'दुःख बांदवडी आहे हा संसार। सुखाचा विचार नाहीं कोठें।' –तुगा ३६५५. –वि. अधीन; अवलंबून असलेला; बंदा; ताबेदार 'अथवा आघ्रयाचिये बादवडी। क्षुधा तृषा कोंडी।' [ बांधणें ]

**बांदवडी**—स्त्री शेताचा बाध बादाड पहा [ फा ]

**बादशहा, बाच्छा**—पु पातशहा; राजाधिराज; सार्वभौम राजा (मुसलमानी, परकीय राजासंबधींच फक्त उपयोग). [ फा. बाद्शाह् ] **०ची ओळख देणें**-(ल.) लाच देणें; मूठ दाबणे (रुपयांवर बादशहाचा छाप असतो यावरून) **०जादा**-पु युवराज. [ फा ] **बादशाही, बाच्छाई**-स्त्री पातशाही; राजपद; राजकीय अधिकार; बादशहाचा अधिकार-पद. –वि. १ बादशहासंबंधीं, राजकीय २ मुसलमान बादशहानें दिलेली (सनद, शिक्का इ०) ३ (ल) उत्तम; भव्य, उच्च प्रतीचा; विलासी, सर्वश्रेष्ठ.

**बांदा**—पु गुलाम; बंदा. [ सं. बंध ]

**बाँदा**—पु (गो.) रोपटीं लावलेली रांग [ बाध=किनारा ]

**बांदागूळ, बांदूळ, बांदें**—स्त्रीन बांडगूळ; (कु) बादा. [ बंदा ]

**बांदा(दो)टी, बांधोळी**—स्त्री. (कों.) ल्हान बाध; धरण. [ बाध ]

**बांदाड**—न. १ शेताचा न नांगरलेला भाग; बाध; कड. २ (ल) अशा जागेवर वाढणारें गवत. ३ शेताच्या कडेनें सोडलेली वाट. [ बाध ]

**बादाडी**—स्त्री. १ (कों.) वल्हें अडकविण्याच्या खुंटीस बांधावयाची दोरी. २ (गो.) होडीवरील आच्छादन. [ बांधणें ]

**बादाबुदी-बादी**—स्त्री. १ हिशोबाची बाकी काढणें; राहिलेली शिल्लक. २ वजाबाकी. [ बाद द्वि. ]

**बादाम**—स्त्री. १ बदामाचें झाड. २ –नपु. बदाम पहा. [ बदाम ] **०गोळा**-पु. बदाम (फळ). **बादामी**-स्त्री. बदामाचें झाड. –वि बदामी; बदामाचा रंग, स्वाद, आकार याप्रमाणें असलेला.

**बादामचिनी**—स्त्री एक औषधी.

**बादिकार**—पु. (गो.) बाधा.

**बा(ब)दिमाख**—वि. १ चढेल; दिमाखाचा; ताठयाचा. २ (ह्यावरून ल.) श्रेष्ठ; उत्तम; अत्युत्कृष्ठ. [ फा. ]

**बादियान**—पु एक प्रकारचें झाड व त्याचें फूल. हीं वाळलेलीं फुलें मसाल्यांत घालतात

**बांदी**—स्त्री. दासी; गुलाम स्त्री बटीक [ हिं ] **०चा**-पु दासीपुत्र; लवंडीचा. 'एकासी म्हणे मी तुझे बांदीचा।' –तुगा ३०५७. [ सं बंदी ]

**बांदी**—पु. (गो.) खाजणाचा एक भाग

**बादोड**—पु. (खा.) ढेंकूण.

**बांदोड्याचो दौलो शिरोड्याची काईल**—(गो.) इकडचें तिकडचें साहित्य जमविणें.

**बाद्या**—पु. (ना.) बैट्‌ल खेळण्यासाठीं जमिनींत केलेली खांच; गल. [ बद=खड्डा ]

**बाध**—पु. हरकत, प्रत्यवाय, प्रतिबंध, दोष, अडथळा, विरोध; शब्दादि प्रमाणानीं एखाद्या कृत्यास असणारा प्रतिषेध (हा शब्द दोष, दोषत्व या अर्थींच वापरला जातो). 'हें झुंज नव्हे प्रमादु। एथ प्रवर्तलिया दिसतसे बाधु।' –ज्ञा २.३१. [ सं. बाध्=प्रतिबंध करणें ]

**बांध**—पु. १ बंधारा, धक्का; धरण, ताल (क्रि० घालणें). २ शेताची उंच केलेली हद्द, मर्यादा, शेताच्या कांठावरून किंवा बाजूनें असलेली वाट. ३ बंधन; बांधणें; आवळणें ४ बंद, दोरीचा किंवा नाडीचा तुकडा; कोणतेंहि बाधण्याचें साधन, बंधन. ५ (ल.) बेडी; शृंखला ६ बांदाड. [ सं. बध=बाधणें ] **०काम**-न दगड, विटा, चुना, माती इ०नीं एकत्र बांधलेली भिंत, तट इ० **०ण**-न. १ नदीचा थोडासा प्रवाह अथवा ओढा ज्या जमिनीतून वाहतो व जीस बाध घालून पाणी व त्याबरोबर आलेली मळी जींत आडवून धरतात ती जमीन विशेषत भाताचें शेत २ –नस्त्री. शेतांतील माती पाण्याच्या प्रवाहानें वाहून जाऊं नये म्हणून आडवा घातलेला बाध. ३ पाटाच्या पाण्याकरिता बांध घालणें. (क्रि० करणें; घालणें) ४ बांधणें; बंधन; बंद ५ दागिन्यास तारेच्या कडींत लोंबत्या बाधलेल्या रत्नाचें काम –जनि परिभाषा ११०. ६ (कों.) निरण. **०बरो(रू)ळी**-स्त्री शेताची मर्यादा दाखविणारा प्रत्येक कोनावरील मातीचा ढीग, ओटा **०बांधोळी**-स्त्री. बांध; बंधारा, धक्का; ताल इ० बद्दल व्यापक अर्थाचा शब्द. [ बांध+बांधोळी ] **०वाट**-स्त्री. १ भाताच्या शेताच्या बांधावरील वाट २ फरशी केलेला किंवा बाधलेला रस्ता. **बांधणावळ**-स्त्री. १ (इमारत इ०) बाधण्याबद्दलची मजूरी. २ बांधणी; बांधण्याची तऱ्हा, पद्धत. [ बांधणें ] **बांधणी**-स्त्री १ बांधण्याची क्रिया. २ बांधायाची तऱ्हा, पद्धत (घर, विहीर, पागोटें, गाठोडें इ०). ३ (कों) बांधण; बांध; बंधारा; ताल. ४ (ल.) विहित, योग्य किंवा ठराविक मार्ग. ५ शेतांतील कडेचा, मधला मार्ग किंवा पायवाट. ६ बांधण्याचें साधन; नाडी; दोरी इ० –वि. बांधणासंबंधीं;

बांधणांतील विकासंबंधीं. [बांधणें] **बांधा(धे)रा**–पु. १ शेताच्या कडेला घातलेला बांध. २ प्रवाहाला अडविण्यासाठीं घातलेला बाध; धरण. ३ बांध घातल्यानें फुगलेलें पाणी; (क्रि० घालणें; करणें; होणें). **बा(बां)धारी**–पु. १ डोंगरावरचा प्रदेश; शिखरांची, किल्ल्यांची रांग. 'रांगणा किल्ला व कोंकणबांधारीचे किल्ले ...।' –मराविथोरा ४१. २ बंधन; बंधारा **बांधप**–न. (राजा.) बांधण्याचें सामान किंवा साधन; घराचें ओंबण इ० बांधण्याकरतां लागणारें सुंभ, दोर इ० [बांधणें] **बांधावळ**–स्त्री. १ बनावट, घडण; रचना; बांधणी (घराची इ०). २ रचना; जुळणी; मांडणी (लेख, ग्रंथ, कविता इ०ची).

**बाधक**—न १ अडथळा; प्रत्यवायकारण; आक्षेप; हरकत; दोष. 'जे बाधका येइजतसे स्तुती। बोलाचिया।' –ज्ञा १६.१७. २ (महानु.) आरोप. 'बाधकें ठेउनि नम्रुतीं। राउळें नेली सर्व संपत्ति।' –भाए ७२६. –वि. प्रतिरोधक; अडथळा आणणारा, करणारा; मार्गांत आडवा येणारा, बाधा उत्पन्न करणारा; आचणारें; प्रतिकूल [सं. बाध्=प्रतिबंध करणें; बाधणें]

**बांध(धा)टणें**—अक्रि. (राजा.) बांठळणें; बाठ पूर्ण तयार होणें; पक्व होणें (आंबा).

**बाधणें**—उक्रि. १ बाधा करणें; दुःख देणें; अपकार करणें; दूषित करणें. २ खाल्लेलें अन्न किंवा केलेलें कर्म न पचणें; त्यापासून पीडा उत्पन्न होणें; बाधक होणें; रोग किंवा दुःख यांची पीडा होणें. ३ पिशाचानें पछाडणें; झपाटणें. (विष, शाप, मंत्रतंत्र, दुष्कृत्य, स्वतःचें दुष्कृत्य किंवा पाप यांचा) वाईट परिणाम होणें; इजा पोहोंचणें. ५ प्रतिकार करणें; अडथळा उत्पन्न करणें; मोडा घालणें; अडचण करणें. ६ अपकार होईल अशा रीतीनें क्रिया करणें; इजा पोंचणें, पोहोंचविणें. 'नदीची थंडी एथवर बाधली' ७ निरसणें. –हंको. 'अहो आत्मेनि जें बाधे। तेंचि आत्मेनसि नांदे।' –अमृ ७.३० [सं. बाध्=पीडा करणें] **बाधन**–न. प्रतिकार; अडथळा; मनाई; मोडा. (विशेषतः तर्कशास्त्र व व्याकरणांत).

**बांधणें**—न. (राजा.) पाण्याच्या प्रवाहाची दिशा बदलण्याकरतां घातलेला बांध; असा बांध घालण्यासाठीं उपयोगांत आणिलेलें गवत व गाळसाळ इ० [सं. बंध]

**बांधणें**—उक्रि १ आंवळणें; एकत्र करणें; तांगडणें; अडकवणें. २ गांठ देऊन आवळणें; गांठ मारणें. ३ नाल मारणें; पायबंद घालणें(घोड्याला) ५ (पागोट्यास) घड्या घालून नीट आकार देणें; गुंडाळणें. ६ (बाध इ० घालून पाणी) अडविणें ७ (नियम, कायदे, रीति, वेळ इ०) योजणें; स्थापन करणें; प्रचारात आणणें ८ बांधून घेणें; रोधणें; जखडून टाकणें; आखणें (कायद्यानें, नियमानें). 'त्याचा सारा वेळ बांधलेला असे.' –नि ९९८.९(घर, भिंत, जहाज इ०) रचणें; उभारणें; बनविणें. १० (धरण, रस्ता इ०) बांधून पक्का करणें. ११ (काव्य, व्याख्या, ग्रंथ) रचणें; रचना करणें; जुळणी करणें. १२ (तर्क, कल्पना, बुद्धि, युक्ति) योजणें; रचणें; बनविणें, एकत्र करणें. १३ बनविणें; वस्तूंना आकार देणें (जोडे, मिठाई इ०) १४ (वैर, मत्सर, द्वेष) धरणें; बाळगणें; मनांत ठेवणें. १५ मंत्रानें ताप न येईल किंवा न दिसेल असें करणें; मंत्रानें थांबविणें; बंद करणें. [सं. बंध्; पोर्तु. बडेलार] म्ह० बांधली शिदोरी व सांगितलें ज्ञान पुरत नाहीं. **बांधली गांठ**–स्त्री. बंद केलेली पैशाची पिशवी; राखून ठेवलेले, साठविलेले पैसे; सांठा; संचय. [बांधणें+गाठ] **बांधल्या कमरेचा**–वि. कमरबंद; तयार; सावध.

**बांधरीनाख**—वि दोन्ही कानांमध्यें आणि डोक्यावरील केसांत असलेला भोंवरा (घोड). –अश्वप १.१०१.

**बांधव**—पु. भाऊबंद; सोयरेधायरे [सं]

**बाधवाई**—वि. (व) अवास्तव; वाजवीपेक्षां जास्त. [बाध]

**बाधा**—स्त्री. १ पीडा; त्रास; दुःख; विकार.' न निश्चय कधीं ढळो कुजनविघ्नबाधा टळो।' –केका ११९. २ भूतपिशाचापासुन होणारा त्रास, दुःख. ३ दोष; पाप 'एवं एका स्तुती एका निंदा। करितां आदळे अंगीं बाधा।' –एभा ३.५३९. ४ निरास; नामरूपसत्यत्व बुद्धीचें हनन –हंको. [सं. बध्- बाध्=प्रतिबंध करणें; म. बाधणें] **बाधिका**–वि. भ्रांतिष्ट; बाधा झालेला. [बाधणें] **बाधित**–न. दोष; पाप; निषिद्ध कर्म 'बळी अबळ'तें खाये। हेंचि बाधित जरी होये।' –माज्ञा १६.३०२. –वि. १ विरुद्ध; कुंठित; प्रतिषिद्ध; बाध आलेलें; बाधक (विशेषतः तर्क व व्याकरण शास्त्रांत याचा उपयोग). २ मिथ्या; खोटें 'गुरुकृपें जो सज्ञान। त्यासि देहाचें बाधित भान।' –एभा १३.४७१

**बांधा**—पु. १ शरीराची ठेवण; ढब; आकार; रूप; बनावट; घडण; रचना. 'शरीर अविवेचा बांधा।' –तुगा ७३९. २ गुळाची ढेप; खडा; भेली. 'गुळाचा बांधा।' –अमृ ७.१४४. –वि. १ बंदा; न मोडलेला; सबंध (रुपया इ०). २ (ल.) कायम; निश्चित; बांधलेली (नोकरी, काम). [बांधणें]

**बांधाटी**—स्त्री. १ बंधन; दोर. 'मेणसूत्राच्या बांधाटी। आवळावें बुबुद्ध।' –मुआदि ३५.५५ २ ओंबण वगैरेंस बळकटी आणण्यासाठीं त्यास मध्यें मध्यें बांधलेल्या उभ्या काठ्या प्रत्येकी. ३ शेताच्या बांधावरून बाजूनें किंवा मधून जाणारा रस्ता पायवाट. [बांधणें]

**बांधाबांध-बांधी**—स्त्री. आवराआवर, प्रवासाची तयारी; (गाठोडीं, बोचकीं, वळकुट्या इ०) घाईनें बांधणें. [बांधणें द्वि.]

**बांधी**—स्त्री. १ बंधन; नियम. 'अधिकें अंगवंच ओवर्धी। सेवेची मांडे बांधी।' –माज्ञा १८.१५५. २ (व) मोतास,

असलेला बांध. [बांधणें] ०करणें-क्रि. कालकाम करतांना एखाद्या पदार्थावर असें काम करावयाचें असेल तसा तो पकडणें.

**बांधील**—स्त्री. (कों.) भाताची कापणी (लाणी) झाल्या-नंतर त्याचे भारे बांधण्याची क्रिया. -वि. अंकित; ओशाळा; केलेल्या कृपेमुळें बांधलेला; उपकाराचें बंधन असलेला. 'वैयाक-रण हे प्रयोगाचे बांधील आहेत.' -नि १२५.

**बांधीव**—वि. १ बांधलेला; रचलेला; मुद्दाम बांधलेला; पक्का (रस्ता, तळें, विहीर) २ सांगीचा; मापाप्रमाणें किंवा नमुन्या-बरहुकूम बनविलेला (जोडा, वहाण इ०). ३ चांगल्या आकाराचा किंवा बनावटीचा (जोडा, वहाण इ०) ४ मध्यें शिसें इ० हलक्या किंमतीची धातु घालून बनविलेलें (सोन्याचें किंवा रुप्याचें नाणें अगर लगड). [बांधणें]

**बांधें**—न. (कों.) मालक नसल्यामुळें गावजमिनींत सामील केलेली पडित जमीन. **बा(बां)धेकरी**-पु. १ राहत्या गावांत बापजाद्याचें किंवा स्वतःचेंहि वतन किंवा जमीन नसलेला मनुष्य. २ एका गावांत राहून दुसऱ्या गांवची जमीन करणारा मनुष्य. 'गांवचा वतनदार असोन खोत परागंदा जाहला आहे आणि गांवची खोती बांधेकरी करीत असेल त्यास स्वामित्व करार करून ल्यावें.' -वाडथोमारो २ ४४ ३ (कों.) नवीन वस्ती करणारा किंवा पडीत जमीन लावणारा शेतकरी.

**बांधें, बांधाळें**—न. वाडपूळ. [सं. बंध]

**बांधेशुद्ध-सूद**—वि. चांगल्या, रेखींव, यथाप्रमाण बांध्याचा; आटोपशीर शरीराचा. [बांधा+शुद्ध]

**बांधोडी**—पु. (व.) गुलाम. 'बांधोड्यासारखें याच्या घरीं काम केलें तरी नाव मिळत नाहीं.' -वि. (व.) बांधलेलें; नेमकें; मोजकें. 'हा गडी बांधोडी काम तेवढेंच करतो.' [बांधणें]

**बाध्य**—वि. प्रतिबंध किंवा प्रतिकार करण्यास योग्य; दूष्य; दूषणीय; बाध करण्यास योग्य; बाधणारा. [सं.]

**बानगें**—न (माण.) एक वर्षाच्या आंतील बकरा.

**बानयान**—न. (गो.) गंजिफाक; तंग कुडतें; बनियन पहा. [सं. वणिज; म. वाणी; गु. वनिया हे वापरतात यावरून]

**बानवसावाघळी**—स्त्री. वाघळी नांवाच्या समुद्रांतील माशाची एक जात.

**बाना**—पु. बाणा; वस्त्रांतील आडवें सूत, रेशीम आडवण.

**बानात-ती**—बनात-ती पहा

**बानालाधा**—पु. लाठीचा एक प्रकार (हा जाड वेताचा किंवा भरींव बांबूचा असून त्याला तीन गट्ट, ल्ट्ट) बसविलेले असतात. -संध्या ६७. **बाना हत्याराचा**-एक हत्यार. याची लांबी (दांडा व पातें मिळून) पन्नास इंच असते. याची पाती एका मुठींत बसविलेली असते. पाते १९ इंच लांब असून मुठीपासून खालीं अरुंद होत जाऊन शेवटास टोंक असतें. -संध्या ६७.

**बानी**—स्त्री. (वे) गुऱ्हाळांत उंसाचा रस सांठविण्याचें लोखंडी भांडें, कोळंबें. (बानी साधारणपणें १६ घागरींची असते व अशा दोन बान्या रस एका काहिलींत घालतात).

**बान्नां**—न. (गो.) ओटीपोट; बेंबीखालील पोटाचा भाग

**बान्शी**—स्त्री. (कोळी) दाते असलेला विळा लावलेला बांबू. गुजा ६८. [सं. वंश]

**बान्हा**—पु. बहाणा; मिष; सोंग; ढोंग. 'मिथ्या असा तेथ करूनि बान्हा। घेऊनि घे शीघ्र मनोज्ञ कान्हा।' -आपू २०. [बाणा]

**बाप**—पु. १ पिता; जनक. २ (बापासारखा) चुलता. (धृतराष्ट्र भीष्मास म्हणतो) 'कीं माझा वधिला शिखंडिनें बाप।' -मोकर्ण १.१२. ३ (काव्य.) संस्कृतांतील तात शब्दाप्रमाणें अनुकंपाहेत्वदर्शक संबोधन (लहानाला किंवा सत्कारार्थी योजतात). 'जरी स्वधर्मैकनिरत। वर्ताल बापा।' -ज्ञा ३.१०२ -वि फार; पुष्कळ; मोठा. 'बापु उपेगी वस्तु शब्दु।' -अमृ ६.१. -उद्गा. आश्चर्य किंवा दुःख यांचें दर्शक. 'बाप! अज्ञानाची भुलि कैसी।' -भाए ३ १५. [सं पिता, वप्तृ; प्रा. बप्प, बप्पो; का. बाप्प; पोर्तु.जि. पतरों, पात (पितृशीं जास्त जुळणारा); आर्मेजि. बाप] म्ह० बापास बाप म्हणत नाहीं तो चुलत्यास काका कोठून म्हण-णार? 'बापासि बाप न म्हणे ऐशासी काय होय आजोबा।' -मो. (बाप्र.) **बाप(च)शेटीची पेंड**-स्त्री. हवी त्यानें हवी तितकी न्यावी अशी वस्तु; फुकट मिळालेली व वाटेल तशी खर्चिली जाणारी वस्तु, संपत्ति; विपुल व सुसाध्य वस्तु. (बापशेट नांवाच्या श्रीमान व उदार गृहस्थाच्या नांवावरून हा शब्द रूढ झाला असेल). ०**होऊं लागणें, म्हणविणें, बाप होऊन (करणें, बोलणें)**-बापाची किंवा मोठेपणाची जागा घेणें; वर मोठेपणा मिरवणें. **(एखाद्याचा) बाप होणें-बाप लागून राहणें**-एखाद्यापेक्षां वरचढ असणें; त्रास देणारा असणें. **बापाचा माल**-एक शिवी; कोणीं उधळेपणानें दुसऱ्याचा माल खर्चू लाग-ल्यास त्यास म्हणतात. **बापावरून पावणें**-बापाच्या नांवानें, बापावरून शिव्या देणें **बापास बाप न म्हणणें**-वाजवी गोष्टींत कोणाचीहि मुर्वत न धरणें. **बापास बाप न म्हणणारा**-भीड मुर्वत न धरणारा; खडखडीत स्वभावाचा. ०**आजांचा धर्म**-पु. पूर्वजांचा धर्म; पिढीजात आलेला धर्म. **बापई**-पु. (माण.) बाप्या; वयांत आलेला पुरुष. ०**घर**-न. माहेर 'मग आप-घर त्यागूनि बापघरीं केली वस्ति।' -सप्र ११.४९. ०**जन्मांत-जन्मीं**-क्रिवि. सर्व आयुष्यांत; जन्मापासून आजपर्यंत. 'मी बाप-जन्मीं कोणाचें उणें उत्तर बोलून घेतलें. नाहीं' [बाप+जन्म] ०**जादे-दादे**-पुअव. वाडवडील; पूर्वज 'दिल्ली याचे बापजाद्याची नाहीं, जो सामर्थ्यवान् होईल त्याची दौलत असें आहे.'

-गोखंचिशाव १२. [फा बाब्=पिता+अर. जद्=आजोबा] ०पण-न. सामर्थ्य; पितेपण. 'तरि बापपण आपुलें कां दाखविजेना।' -ऋ ३४. ०पोरका-वि बाप मेल्यामुळें पोरका बनलेला. ०भाऊ-पु. भाईबंद; भाऊबंद; नातेवाईक; दायाद (वतनांतील वांटेदार). ०भावकी-स्त्री. १ भाऊबंदकी; नातें. २ दाट परिचय; परमस्नेह. ०भ्रम-पु मोठा भ्रम. 'बापभ्रमाचें विंदान। केवढे सायास पक्षियाचे।' -जै ७७.५४. [बाप=मोठा+भ्रम] ०माय-स्त्री. (काव्य.) बाप आणि आई (हा शब्द विशेष रूढ नाहीं रूढ शब्द मायबाप, आईबाप, मातापिता हे आहेत). 'जैसी अबला सासुरां राहे। चित्तीं आठवे बापमाये।'

बापया-य-पु. बाप्या; पुरुष. बापयोद्धा-पु. मोठा योद्धा. 'बापयोद्धा तो निःशंक।' -जै ७५.१२६ [बाप=मोठा+योद्धा] ०रोटी, बापु(पो)ती-स्त्री. (हिं.) (शब्दशः अर्थ-बापाची भाकरी, अन्न). वडिलोपार्जित चालत आलेली वतनवाडी, मालमत्ता बापा-पु १ (खा.) बाप. २ बापाचें संबोधन; (आदरार्थी हाक मारतांना) अहो! अरे! 'अर्थाचा दास पुरुष अर्थ नव्हे पुरुषदास बापा हें।' -मोभीष्म १.९०. ३ (कों.) एक पिशाचदेवः बापदेव. बापाजी-पु. (संबोधन) मोठ्या माणसाला हाक मारताना म्हणतात 'बापाजी! आम्ही हीं चित्रें तुमचा अनुग्रह चितारी।' -मोउद्योग ११.५२. बापाला-पु. (गो.) मावशीचा नवरा. बापाशीक झंवरी-वि. (हेट.) एक शिवी बापाशीं संभोग करणारी. बापिक-पु. कुलपरंपरागत धर्म; हव्यकव्य; कुलधर्म.-वि कुळांतील, कुलपरंपरागत. 'एथ स्वामीचें काज। ना बापिकें व्याज।' -ज्ञा १२.६७. बापु-वि. मोठा. -उद्गा. बापरे; अरे बापरे! 'बापु! वळा वानु नैसी।' -ऋ ६. बापु(पू)रज(झ)दा-वि. वंशपरंपरा. 'बापूरजदा चेत जाऊन...' -बाडथोमारो २.१०६ बापु(पो)लभाऊ-भाव-पु. (गो.) चुलत भाऊ. बापु(पो)लयों-पु. (गो.) चुलता. बापुला, बापु(पू)य-स-पु (गो. कु. कों.) बाप. बापू-पु. आदरार्थी पुरुषास म्हणतात. बापोलभैण-स्त्री (गो.) चुलत बहिण. बाप्या, बाप्यो-पु. बाप होण्याच्या वयाचा, वयांत आलेला पुरुष; प्रौढ. (-अव. बापे-प्ये). बाप्यामाणूस-पु. पुरुष. याच्या उलट बाईमाणूस.

बापडा, बापडीक—वि १ गरीबबिचारा; सौम्य; निरुपद्रवी. २ मूर्ख; वेडगळ; दुबैल; दीनवाणा; अनाथ. 'जयास ब्रह्मादिक वंदिती। तेथें मानव बापुडें किती।' -दा १.२.२७. ३ बाप नसल्यानें पोरका. -उद्गा. औदासिन्य किंवा निष्काळजीपणा दाखवितांना योजितात. 'करणार तर कर बापडे, माझें काय गेलें.' [वेप्रा. बप्पुड; गु. बापडुं] म्ह० आपलें तें बापडें आणि दुसऱ्याचें तें कातडें=आपलें मूल मात्र गरीब व कोंवळें आणि दुसऱ्याचें मार खाण्याला धडधाकड. बापुडवाणा-णी-वि १ गरीब; निराधार; निराश्रित. 'कशी टिकावी तेथें वाणी मग बापुडवाणी।' -विक ३. २ केविलवाणा; कींव येण्याजोगा (आवाज, भाषण इ०). बापुडा, बापुडीक-वि. बापडा पहा. [बाप+उडॉ=टाकलेला]

बापया-पिया, बापू, बापेया—पु. बापया; चातक पक्षी. 'भरिले सरिता समुद्र चहूंकडे। परि ते बापियासि कोरडे। कां जैं मेघौनि थेंबुटा पडे। तैं पाणी कीं तया।' -ज्ञा १०.१८३. [प्रा.]

बापूया—पु. (व.) 'पेरते व्हा' असा शब्द काढणारा पक्षी. [सं. वप्=पेरणें]

बाप्तिस्मा—पु. ख्रिस्ती धर्माची दीक्षा; पिता, पुत्र व पवित्र आत्मा ह्यांच्या नावानें करण्यात येणारा प्रक्षालनविधि. 'मग बाप्तिस्मा घेतल्यावर येशू लागलाच वर आला' -मत्त ३.१६. [ग्री. बॅप्टिझो=शिंपडणें, बुडविणें; इं बॅप्टिझम्]

बाफ(प)ळी—स्त्री एक पालेभाजी व तिचें बीं. ही भाजी वातहारक असुन झाड लहान व बीं चपटकें-हुलग्यासारखें असतें. त्यापासुन तेल काढतात -वगु ४ ९५ [सं. हिंगुपत्री]

बाफळया —न (व.) फोलकट; धान्याचा सत्त्वांश काढल्यानंतर राहिलेला भाग.

बाफोर, वाफोर, बाफर—पु. (गो.) वाफेनें चालणारी लहान आगबोट. [पोर्तु.]

बाफ्ता—पु. एक प्रकारचें रेशमी कापड. 'पंचवीस बाफ्ते उंच खाशा पोशाकायोग्य.' -वाडबाबा २.१५३. [फा. तुल० सं. वे]

बाब, बाबत्—स्त्री. १ कलम, मुद्दा; प्रकरण; भाग. २ क्रम; प्रकरण; गोष्ट; विषय (विशेषतः साध्या व कचेरीसंबंधीं कागदपत्रांत योजितात). ३ कर; पट्टी; रक्कम; खंडणी; जकात. 'युद्धांत जिंकुन नबाब बसविली बाब करून धुळधाणी।' -ऐपो ४१७. ४ (गो.) रिवाज; रीत. [अर. बाब्]

बाब—पु. (कु.) बाबू; नांवापुढें आदरार्थी योजतात. जसें:- यशवंतबाब, फटबाब. [बाप]

बॉब—स्त्री. (गो.) ओरड; हाकाटी. [बोंब?]

बांब—स्त्री. एक औषधी वनस्पति हिचीं पानें लहान, कडू व थंड असुन रंग तांबुस-हिरवा असतो आणि त्याचा घट्ट कल्क होतो. ही वनस्पति पाणथळ जागेंत, नदीकांठीं होते, सं. जलब्राह्मी.

बांब—(कों.) पीक, धान्य यांचा नाश करणारा किडा. हा हरभऱ्याच्या डाळीप्रमाणें पिंवळसर रंगाचा असतो.

बॉंब—न. (गो.) मोठी बेंबी. [बेंबी]

बॉंब—पु. भयंकर स्फोटक द्रव्य घातलेला दारूचा गोळा; दुळपी गोळा. याचा स्फोट झाला असतां जवळ असणाऱ्या

इसमांवर आंतील टांचण्या, काचेचे तुकडे इ० वस्तु यांचा मार बसतो व इतर स्फोटक द्रव्यांनीं इजा होते. [इं]

**बांबट**—स्त्री. (राजा. कु) पावसाळी हवा; ढगामुळें आलेला अंधार; बांभळ.

**बाबडली, बाबडी**—वि. (व.) कुजट; न शिजणारी. 'बाबडली डाळ शिजत नाहीं.'

**बाबडा**—वि. १ मुलासंबंधीं लडिवाळपणें बाबा याच्या ऐवजीं योजावयाचा शब्द. २ (कों.) बापडा; गरीब; बिचारा; दुबैल

**बाबडें**—वि. भाजलेलें; अंकुर न फुटणारें (बीं). 'बाबडें बीज पेरिल्या शेतीं। पिकास नाडलें निश्चितीं।' –एभा २१.३१२.

**बाबत-द**—स्त्री. १ कलम; बाब; मुद्दा; प्रकरण; लक्ष्यांत ठेवण्याची गोष्ट. २ खर्चाचा सविस्तर हिशोब; पाल्हाळ, सबबींची, निमित्तांची मालिका (क्रि० सांगणें, लावणें, मांडणें, आणणें) –क्रिवि. मुळें; करितां; बद्दल; विषयीं 'त्या कर्माबाबत शंभर रुपये दंड बसला.' [फा.] **०वार, बाबतवार**–क्रिवि कलमवार, अनुक्रमानें. **०वारी**–स्त्री. हिशोबांत किंवा नोंदणीपुस्तकांत लिहिली गेलेली कोणतीहि वस्तु, मालमत्ता; कर किंवा जमीनमहसुलाची यादी. **बाबती**–स्त्री. १ वसुलाची कोणतीहि बाब; एखाद्या विशिष्ट बाबीवर बसविलेला जादा कर. २ (अव.) देशमुख देशपांडे इ० कांचे मुलखावर असणारे हक्क. मराठयांची चौथाई. चौथ पहा [फा.]

**बाबत**—वि. (गो.) टाकाऊ; हलका; मूर्ख.

**बाबर**—पु. १ बाबरझोटिंग; एक पिशाच्च. 'खेळतां बाबर धावोनि येती। तेही देती आशीर्वचन।' –नव १०.२८. २ (ल.) विस्कटलेलें केंस; झिंज्या. [सं. बर्बर, प्रा. बब्बरी=केश] **०झोंटी**–स्त्रीअव (काव्य) अस्ताव्यस्त मोकळे सुटलेले केस; झिंज्या, झिपऱ्या. 'बाबरझोटिया केसाळ। तेचि नदीमाजी शेवाळ।' –एरुस्व १०.८१.

**बाबर**—स्त्रीन. चिरमुटलेला किंवा आकुंचन पावलेला द्विदल धान्याचा दाणा किंवा अशा धान्याचा ढीग. –वि चिरमुटलेलें; विस्कळीत झालेलें. **०झोंटी दाढ विक्राळ**–अकाळविकाळ इसमाला म्हणतात. **०हो(हों-ओं)ट-ठ**–पुअव. जाड ओंठ. [सं बर्बरोष्ठ] **०हो(हों-ओ)ट्या-ठ्या**–वि. जाड ओंट असलेला. 'प्रायः शिद्दी बाबर ओंठये असतात.' **बाबरी**–स्त्री. (काव्य.) मोकळे सुटलेले केस; झिपरी; झुलपें.

**बाबरणें**—अक्रि. बाबर होणें (द्विदल धान्य) चिबणें; चिरमुटणें; पूर्ण वाढ न होणें.

**बां(बा)बर**—न. (कु.) दलदल; चिखल; दलण; नेहमीं चिखल असणारी जागा.

**बाबरी**—स्त्री. (गो.) कडधान्य; एक प्रकारचें भात. –वि. अर्धवट पिकलेलीं (फळें).

**बाबरू**—वि. (नंदभाषा) बारा. 'सुताचा भाव बाबरू आहे'

**बां(बा)बल-ळ**—न. १ (महानु) दाट वन; वनसमूह. 'ना तरि देखौनि रविमंडळ। विकाशे कमळांचें बांबळ।' –भाए १८. २ आधिक्य, वृद्धि. 'तेथ बांबळ पडे अभिनव। विकारांचें।' –ज्ञा १५.१०१. (क्रि० पडणें). **बा(बां)बल(ळ)णें, बा(बां)बळ(ळे, ळै)जणें**–सक्रि १ बांबळ पडणें; वृद्धि होणें; (झाडाला) पुष्कळ कोंवळी पालवी फुटणें. 'हिरिया निघती निमिखें। बाबळैजुनी।' –ज्ञा १५.१८५. २ विस्तारणें; पाल्हाळ लावणें.

**बाबला-ल्या**—वि. लाडका-क्या (लहान मुलांना लाडिकपणें किंवा तुच्छतेनें म्हणतात) [बाबा]

**बाबा**—पु. १ वडील माणूस किंवा बाप, वडील भाऊ याबद्दल आदराचा शब्द. २ मुलगा, बाळ (लहान मुलास लाडिकपणें म्हणतात.) [बाप] **०पुता(बाई)करणें**–क्रि गोंजारणें; लाडीगोडी लावणें; गोडीगुलाबीनें आर्जव करणें; मन वळविणें; दादा बाबा करणें, हातापाया पडणें. **०लोक**–पु मुलें (युरोपियन लोकांचे चाकर त्यांच्या मुलांस म्हणतात) **०वाक्य**–न. वाडवडिलांचें मत. 'ज्या इतिहासकारांचे लेख कसोटीला लागले नाहींत तेही त्याच प्रतीतील मानून त्यांचे लेखांस बाबावाक्यांची योग्यता देणें प्रशस्त नाहीं' –विवि ८.८.१४४. [सं. वच्-बोलणें] **म्ह०** बाबा वाक्य प्रमाणम्=ज्यास स्वतःचें मत नाहीं व जो वाडवडिलांचा शब्द हाच आधार मानतो आणि त्याखेरीज दुसरें प्रमाण मानीत नाहीं त्याच्या उपहासार्थ योजतात.

**बाँबा**—वि. (गो.) व्यवहारशून्य; वेडा; मूर्ख. [बंब ?]

**बाँबाट**—स्त्री (गो) गोंगाट [ध्व]

**बाँबाडों**—पु. (गो.) बुडबुडा; फुगा 'मनशाचें आयुष्य बॉबाडयाभाशेन.' [सं. बुद्बुद]

**बाबिन-ण**—स्त्री. सूत गुंडाळण्याची लाकडाची अगर पत्र्याची पोकळ काडी; फिरकी. [इं.]

**बाबियॉ-यो**—पु. (गो.) एक प्रकारचा कलमी मोठा आंबा.

**बाबी**—स्त्री. लाडक्या मुलीस म्हणतात. [इं. बेबी]

**बाबुना**—पु. एक औषधोपयोगी वनस्पति. 'गुलेबाबुना.' –मुंव्या १५६ [फा बाबुनाह्]

**बांबुर्डा**—पु. (कु.) कुर्लीचें (खेकडयाचें) लहान पोर.

**बा(बां)बुळी-ळ**—स्त्री. शेवाळ; गोंडाळ. 'परी उदकीं जाली बाबुळी। ते उदकातें जैसी झांकोळी।' –ज्ञा ७.६०.

**बाबू**—पु. १ मुलाला लडिवाळपणानें म्हणतात. २ सभ्य गृहस्थ (बंगालमध्यें सन्मान्य गृहस्थाला या नांवानें हांक मारतात). ३ लहान मूल; बाहुला; भावला. [बं.] **म्ह०** बाबूके भाई दरवेशी=संबंध मोठ्या माणसाशीं असला तरी बंगाल मनुष्य असणें या

अर्थी 'कोश वर्गणीदाराच्या हातीं समग्र जाऊन पडला व साऱ्या राष्ट्राच्या अभिमानास कारण झाला; पण कोशकारांची अवस्था काय? ... ते नेमके पूर्व स्थितीशीं येऊन भिडले म्हणजे बाबुके भाई दरवेशी ही अवस्था काहीं चुकली नाहीं' -वि.

**बांबू**—पु. वेळू; कळक; चिवा; माणगा बाबू हें उष्ण कटिबंधांत उगवणारें झाड असून त्याचा दांडा सरळ व पुष्कळ लांब असतो याच्या अनेक जाती आहेत याचा उपयोग घरें बांधण्याकडे, चटया व बुरुडकाम इ० कडे होतो. याच्या रांध्यापासुन कागदहि तयार करतात [इं]

**बांबूट**—स्त्री. (कों.) विडुळलेला आंबा; जून न होता पिकल्यासारखा दिसणारा आंबा. **बांबुटणें**-अक्रि. (कों.) विडुळणें; आंबा इ० फळें न पिकतां पिवळीं होऊन कुजूं लागणें.

**बाबे**—शअ. करिता; बाबत; साठीं, संबंधानें; बद्दल. 'तुमचे बाबे लक्ष्मण बल्लाळ याणी हुजूर येऊन ...' -बाडसमा १.७.

**बांबोट, बांबट**—स्त्री. उथळ पाण्यात चालणारी बाफेची, चंब असणारी नांव. [पोर्तु. बॅबोट]

**बॉब्द**—न. (गो.) बोगदा. [पोर्तु.]

**बाब्या**—पु. (कों.) बाबला-ल्या पहा. 'बाब्या खातो बारा वडे पण वाढतो कोण!'

**बाब्री**—स्त्री. (गो) बाबू, वेवनळ इ० वनस्पतींना दूरदूर पेरें असण्याचा प्रकार.

**बाभ(भू)ळ-ळी**—स्त्री.एक कांटेरी वृक्ष. हा हिंदुस्थानांत सर्वत्र आढळतो. वाढ कोरड्या हवेंत होते. याचा गोंद, साल, लाकूड इ० उपयोगी आहेत. याच्या जाती चार-देवबाभूळ; विकर; पुळाटी व रामकांटी. [सं. बब्बुल] म्ह० ज्या गावच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी=दोन्ही झाडांना कांटे असतात यावरून एखादा मनुष्य बढाया मारूं लागला म्हणजे आम्ही तुला पक्के ओळखून आहों असें सुचविण्यासाठीं योजतात. (एकाच गांवातील लोक परस्परांना चांगले ओळखतात याअर्थी). ०बुडणें-(ल.) तोटा होणें; दुसऱ्याच्या कृत्यांत विनाकारण ढवळाढवळ करणाऱ्या इसमाला धुडकावून लावताना योजतात. 'ज्यां चोरी केली त्यांस मार खाल्ला त्यांत तुझी काय बाभूळ बुडाली?' ०स कांटा लावणें-सर्वप्रसिद्ध डाकूवर दोषारोप करणें; बदमाषाला बदमाष म्हणणें. **बाभुळीचा कांटा**-पु. (ल.) आरंभीं धीट व फुशारकीच्या गोष्टी सांगणारा परंतु लवकरच कच खाणारा, माघार घेणारा इसम; आरंभशूर.

**बांभुरडा**—पु. ब्राह्मण शब्दाचें तुच्छतादर्शक रूप.

**बाभ्रव्य**—न एक गोत्रनाम -पु. रत्नागिरीकडील ब्राह्मणांची एक पोटजात व तींतील व्यक्ति.

**बाम**—स्त्री. १ एक प्रकारचा मासा; वाम. २ एका झाडाचें नांव. -पु. (गो.) पिकाची नासाडी करणारा एक कीटक.

**बाम**—पु. शरीराच्या दुखऱ्या भागावर चोळण्याचें एक मलम. [इं]

**बामण**—पु. १ (प्र.) (अशिष्ट) ब्राह्मण. २ बामणजाई; ब्राह्मणांतील एक हलकी जात. ३ (गो) सारस्वत ब्राह्मण. [सं. ब्राह्मण] म्ह० (गो.) बामणाक दिली ओसरी बामण हातपाय पसरी. ०जण-जणकी, बाह्मण जण-ब्राह्मण शब्दामध्यें पहा. ०जाई-पु. (व.) ब्राह्मणापासुन झालेला विदूर. 'बामणजायाचें एक घर गावात आहे.' [सं. ब्राह्मण+जात=झालेला] ०दंड-पु. (कु) ब्राह्मणांवर बसविलेला कर (हा कर एका काळीं कुडाळदेशकर आद्य गौड ब्राह्मणावर पाच वेळ बसविण्यात आला होता). ०बुद्ध-स्त्री (गो.) धूर्तता, मुत्सद्दीपणा. [सं. ब्राह्मण+बुद्धि] **बाम(म्ह)णी**-वि. पांढरा (कित्येक झाडें, प्राणी यांच्या पांढऱ्या जातीबद्दल योजितात) बामणी-काकडी-सरडा-पाल इ० **बाम(म्ह)णी(ण) हुरडा, बामण वरडा**-पु. (कुण.) ब्राह्मणाला दान म्हणून यावयाचा जून झालेला आणि भाजण्यास कठीण असा हुरडा, निरुपयोगी जोंधळे. **बामुरडा**-पु (तुच्छतेनें) ब्राह्मण. **बाम्हणी, बामणी**-स्त्री. एक लहान झाड (बामणीचें लाकूड ओपटाखालीं जाळीत नाहींत).

**बांय, बांर्य**—स्त्री. (गो.) विहीर; बाव. [सं वापी]

**बाय-यॅ**—स्त्री. १ (राजा. कुण.) आई. २ (गो.) ताई (लडिवाळपणें). ३ बाई [बाई]

**बायक-ख**—पु. गंजिफांच्या डावांतील हुकूम. [फा.]

**बा-यक्-दिगर**—क्रिवि. एकमेकाशीं. 'बा-यक्-दिगर मन्सबा करूं लागले कीं ...' -पया ४७३.

**बॉयकॉट**—पु. बहिष्कार; गुडगुडी बंद करणें. 'बॉयकॉट हा द्वेषमूलक नाहीं.' -टिले ३.३.१५२. (आयर्लंडमधील कॅ. बॉयकॉट नांवाच्या गृहस्थावर १८८० मध्यें घातलेल्या बहिष्कारावरून हा शब्द उपयोगांत आला). [इं.]

**बायकांडें**—न. (नाविक) उलांडीच्या दोनहि बाजूंस बांधावयाचे दांडे. [बाही+कांड]

**बायको**—स्त्री. १ स्त्री; नारी; अबला; बाई २ पत्नी; लग्नाची स्त्री. ३ झाडांतील जे दोन भेद आहेत त्यांतील फळें देणारें झाड. पुरुष झाडाला फळें येत नाहींत. झाडांत असे दोन भेद आहेत. [दे. बायकु हा शब्द कुणब्यांत रूढ आहे] म्ह० १ बायकांत पुरुष लांबोडा ०करणें-लग्न करून बायको मिळविणें; लग्न लावणें. सामाशब्द- ०माणूस-न. स्त्रीजन; बायको. याच्या उलट पुरुषमाणूस. ०वेल्हाळ-वि. बाइलवेडा; स्त्रीलंपट; बायकोविषयीं आसक्त; रांडव्यसनी; (गो.) बायकॉलो. **बायकांचें शास्त्र**-बायकी शास्त्र; स्त्रियांमध्यें चालू असलेलें पण धर्मशास्त्रांत नसलेले विधी आणि नेमधर्म यांबद्दल चेष्टेनें म्हणतात. **बायको**

अवळ पट्टा खेळणारा–पु घरामध्येंच फक्त शौर्य दाखविणारा. **बायकी**–वि. बायकांसंबंधींचें; बायकोस शोभणारें **बायक्या–ड्या**–वि. १ नेहमीं बायकांत असणारा, बसणारा; बायकोच्या आज्ञेंत वागणारा; स्त्रीवश; बाइलबुद्ध्या २ नपूंसक; नामर्द; स्त्रिया प्रमाणें चालणें, बोलणें किंवा वागणें असलेला. **बायजण**–वि. बायक्या. **बायरू**–स्त्री. बटिक.

**बांयखुरी**—स्त्री (गो.) बाजूबंद, वांकी

**बायणी**—स्त्री. वायदा. 'भोग डांका भाका बायणिया।' –स्वादि २ २.३. [सं वाणी ?]

**बायबल**—न १ ख्रिस्ती लोकांचा धर्मग्रंथ; पवित्रशास्त्र, याचे दोन विभाग आहेत:–जुना करार:–याचे ३९ भाग असून हा मूळ हिब्रू भाषेंत लिहिला होता नवा करार:– याचे २७ भाग असुन हा मूळ ग्रीक भाषेंत लिहिला होता [इं]

**बायरावणें**—सक्रि वेगळें करणें · [प्रा]

**बायल**—स्त्री बायको; बाईल. ,बायलेसि म्हणे अगे कांगे।' –दा १३ ९ २१ [बाईल] **०गोवो-ग्रॉवॉ**–वि (गो.) बाइलवेडा; स्त्रैण. **०बॉई-बोलो**–वि. (गो.) बाइलबुद्धीचा. **बायलेक येवप**–(गो) तारुण्य प्राप्त होणें **बायलेचो भावोजी**–पु. (गो) बाईलवेडा

**बॉयलर**—पु पाण्याची वाफ करण्याचें निरनिराळ्या आकाराचें व पोलादी पत्र्यांचें केलेलें एक पात्र; तापक; बाष्पपात्र. [इं]

**बायशा**—वि (व) हट्टी; नादिष्ट.

**बायसिकल**—स्त्री पायानें चालविण्याची दुचाकी गाडी [इं]

**बॉयस्काउट**—पु १ बालवीर. २ या नावाची एक मुलांना उत्तम नागरिक होण्याकरितां शिक्षण देणारी लॉर्ड बेडन पॉवेल यांनीं काढलेली संस्था. [इं]

**बाया**—पु १ ज्याला शाई लावलेली नसते तें तबल्याचें अंग; बाह्या २ पानाशीं पान जोडून घरटें करणारा पक्षी.

**बाया**—स्त्री. १ (राजा) बाई; आई किंवा आईसारखी स्त्री. २ देवी; फोडया. **म्ह०** (गो.) बायेची जोड न्हाणाक नी खाणाक.

**बायो**—स्त्री (कों.) बाई; स्त्री.

**बायोनेट**—न. बागनेट; संगीन. [इं बेयोनेट]

**बारूक**—स्त्री. (कों. नाविक) फत्तेमारी.

**बार**—स्त्री. परवानगी 'तुमचें मन बार देत नसिलें तरी कौलबोल घेऊनु पुत्राबराबरी लोक देऊनु पाठविजे '–रा १५ ३६७

**बार**—स्त्री. १ खेप; पाळी. 'मशीं पोरा घे रे बार।' –तुगा २५६. २ बढाओढीनें श्लोक इ० म्हणण्याची मुलांची क्रिया, घोष. (क्रि० घालणें; टाकणें) ३ छंद; हव्यास; नाद. 'पहिले पहारा रंगासी आले। सोहं सोहं सें बार घेतलें।' –तुगा २५७. ४ फुलांचें अत्तर किंवा सुवासिक तेलें काढण्यांत जे अनेक संस्कार करतात ते प्रत्येक. –क्रिवि. (आवृत्तिदर्शक) वेळां; वार; बहुधा संख्याविशेषणाशीं जोडून योजतात. जसें एकबार=एकदां, एकदम 'तेलीण सांचवी धारोधार, करम नेई एकही बार' [सं. वारम्]

**बार**—पु. १ बंदुकींत ठासलेली दारू. २ दारूचा स्फोट, धडाका. ३ त्या स्फोटाचा आवाज; बंदुकीचा आवाज; मोठा आवाज. (क्रि० सोडणें; उडविणें). ४ बंदुकवाला शिपाई; पायदळ. ५ घास; बोकाणा. 'ते तंबाखूचा बार भरून स्वस्थ पडून होते '–नाकु ३.२. ६ (सोनारी) हत्यारांचा संच [सं भृ–भरणें] **०उडविणें**–१ (ल) अकल्पित रीतीनें कठिण काम फत्ते करणें २ कार्यभाग करून टाकणें. **०देणें**–(ल) मान्य करणें. 'तुझ्या बोलण्यास मी बार देत नाहीं.' **०देणें-ठासणें-भरणें**–१ पढवून ठेवणें; अमूक प्रश्नाला अमूक उत्तर दे असें सागून ठेवणें २ कांहीं हेतु साधण्यासाठीं सर्व सधानें किंवा वशिले गुप्तपणें बाधून ठेवणें **०भरणें**–१ बंदुकींत दारू ठासून ती उडवावयाला तयार करून ठेवणें २ (ल) चिलमींत तंबाखू भरणें; विडा, तंबाखू इ० खाणें.

**बार**—पु फळें, फुलें इ०कास येणारा बहर, भर. 'मी नार। फार सुकुमार। बार काय जाहाला।' –प्रला २१८. [बहर] **०धरणें**–वृक्षादिकांनीं, फलपुष्पादिकांनीं बहरणें.

**बार**—पु. नोंद; लेख्य –राज्यको ८.१०४ [फा. बार] **०करणें**–१ नोंद करणें; बारनिशी करणें. असल्या पत्रावर 'बार' असा शब्द लिहिणें; कीर्दीतील रकमा खतावणींत ज्या त्या खात्यात दाखल करणें. २ (ना.) संपविणें; पूर्ण करणें

**बार**—पु (बे.) चाबूक; चामड्याची वादी. [का. बारु]

**बार**—पु. (कों.) १ ओझें. २ भार; जडपणा; वजन. ३ –म. तुळई; बहाल. ४ (कु.) इटीदांडूच्या खेळांतील दांडू [सं. भार]

**बार**—पु. १ धातूचा किंवा लांकडाचा अगर इतर पदार्थाचा लांबट तुकडा, कांडी, दांडी २ खेळाचें साधन, सळई अगर काठी. 'सर्कशींतील बारांचें काम पाहून आम्ही थक्क झालों.' 'सिंगलबार, डबलबार.' ३ साबणाचा लांबट तुकडा. [इं.]

**बॉर**—न. १ (गो.) बोर (फळ). २ (गो) सुकलेल्या मांसाचा तुकडा. [सं. बदरी]

**बारई**—पु. (व) तांबोळी, बारी.

**बारकरी**—पु. (खा.) शेतांतील पाटाचें पाणी वळविणारा. बारेकरी पहा. [सं. द्वार]

**बारकश-स, भारकस**—न. मोठें व्यापारी गलबत; महागिरी [फा बारकश्]

**बारकशी**—स्त्री. (व.) बारावंदी. [बारा+कसे=बंद]

**बारकस**—वि. अधिक बारीक; नाजूक (धान्य, पीठ, साखऱ्या इ०) [बारीक]

**बारका**—वि. (कों) बारीक. **बारकाई-बारकी**-स्त्री. १ बारकावा; सूक्ष्मदृष्टि; बारीकपणा; गुप्तपणा; चौकसपणा; नाजुकपणा. २ कंजूषपणा, कृपणता (गो.) बारकाय, बारीकसाण. [फा.] **बारकावणें**-अक्रि. कृश होणें; बारीक होणें. 'शरीर बारकावलें' 'पाऊस बारकावला.' [बारीक] **बारकावर**-वि. (कु) मध्यम; बारीक (सूत धान्य इ०) **बारकावा**-पु. बारकाई; चौकसपणा

**बारकें**—न. बाराचा समुदाय, डझन [बरा]

**बारकोल**—पु (बे.) चाबूक [का]

**बारखी**—स्त्री (व) मोठा वासला; मोठा वासा [बार]

**बारखू(खो)ण**—स्त्री. (गो) सर्दी, शैत्यविकार

**बारगण**—न. (व) तांबोळयाची विडयाच्या पानांची पाटी. 'बारगणांत पानें मिळतील' [बारी=तांबोळी]

**बारंगपाटी**—स्त्री आटयापाटयाच्या खेळांतील मधली पाटी; सुरपाटी.

**बारगळ**—वि १ उनाड; भटक्या; स्वच्छंदी; आवरण्यास कठिण; उच्छृंखल. (मनुष्य किंवा पशु) २ बेकायदेशीर, बेतालपणाचें; अनियंत्रित(भाषण, वर्तन, कृति इ०) **बारगळणें**-अक्रि १ स्वच्छंदीपणानें वागणें; ताबा झुगारून देणें २ निकामी होणें; भ्रष्ट होणें; मध्येंच नाहींसा होणें. 'ती शास्त्रोक्त मर्यादा उल्लंघिली कीं लोण बारगळलें'-नि ७६३. ३ खेळतांना हद्दीच्या बाहेर जाणें. [बाहेर+गळणें; बारणें=बाहेर जाणें] **बारगा**-वि १ बारगळ २ हेकट, माथेफिरु, कायदा, नियम इ० न पाळणारा

**बारंगी**—स्त्री (व.) माडीचा सज्जा [सं बहिः+अंग]

**बारगी(गीं)र**—पु धन्यानें दिलेल्या किंवा सरकारी घोडयावर बसणारा लष्करांतील शिपाई; अश्ववाह. शिलेदाराच्या उलट. 'यवन पागा बारगीर जमला।'-ऐपो १११. -वि. दुसऱ्याचें मागून आणलेलें 'कासया मी आता वंचूं हें शरीर। आहे बारगीर जायजणें।'-तुगा १७९१. [फा. बार्गीर; फा. बारा=घोडा] **बारगिरी**-स्त्री. बारगिराचें काम किंवा धंदा. -वि. बारगिराचें किंवा त्याला शोभणारें, त्याच्या योग्यतेचें **पंक्तिबारगीर**-पु यजमानाच्या पंक्तीस जी उपरी मंडळी असतात त्यांतील प्रत्येक.

**बारगो**—वि. (गो.) बाहेरख्याली; उडाणटप्पू [बाहेर+ सं गम्=जाणें]

**बारजो**—पु. (कु.) होडी (मालवणामध्यें हा शब्द फक्त तांबडया कंदिलाच्या होडीला लावितात) [इं. बार्ज्]

**बारटी**—स्त्री. एक तृणधान्य; बरटी पहा.

**बारड**—वि. (व.) वयस्क; प्रौढ

**बारडी**—स्त्री. धुसळखांबाची दोरी; पारडें

**बारडी**—स्त्री बादली. [इं बकेट]

**बारणी**—स्त्री. (बे.) चामडयाची पट्टी.

**बारणी**—स्त्री. (गो.) खंड, खंडणी. **बारणें**-क्रि. (गो.) खंड ठरविणें.

**बारणी**—स्त्री. वारी; खेप; पाळी.

**बारणें**—सक्रि. (कों) (अक्षरशः किंवा ल.) ओझें, घालणें, वजन घालणें; लादणें; ओझें, भार, काम, उद्योग, दंड इ०. 'घर्मबिंदु बारेले हृदयींच।'-स्वादि ६.२.१९. [सं. भार]

**बारदान**—न १ (माल सांठविण्याचें) पोतें, डबा, पींप, गाठोडें इ० २ (कों.) जहाजावरील माल, माणसें इ० ओझें. भरगत; भरताड; भरत (जहाज, गाडी, पशु इ० चें) ३ तरट; गोणपाट; गठ्ठयाचें वेष्टन; रिकामें पोतें. ४ (व. खा.) कापसाच्या गाठीची बोंदरी. [फा. बार्दान]

**बारदानी**—स्त्री (नाविक) पावसाळी वारा.

**बारदार**—पु सैन्यांतील बंदुकवाला-बरकंदाज शिपाई. -वि १ फळें येण्याच्या पूर्ण भरांत असलेलें, लागतें किंवा बहरलेलें (झाड). २ बरदार; ओझें वाहून नेणारा. [सं भार, फा बार्]

**बारदार**—वि. पाळी किंवा बारी घेणारा बारीदार (विशेषतः महार.) [बारी=पाळी+दार]

**बारदेश**—पु गोव्याकडील एक प्रांत. [बारा=अनेक+देश] ०**कार**-वि बारदेशांत राहाणारा. **बारदेशी**-वि बारदेशासंबंधीं; बारदेशांतला

**बारनिशी-सी**—स्त्री. १ नोंद; टिपण; नोंदी करण्याचें काम. २ बारनिसाचा हुद्दा किंवा काम [फा. बारनविशि] ०**करणें**-सक्रि नोंद करणें; कागदपत्र, हुंडी इ० बार करणें; सरकारी आवक जावक दप्तरात टिपून ठेवणें व त्यांवर बार असा शब्द लिहिणें **बारनीस**-पु सरकार दप्तरीं नोंद झाल्याची खूण म्हणून सनदा, रोखा वगैरेवर 'बार' (नोंदलें) अशीं अक्षरें लिहिणारा अधिकारी [फा. बार्+नविश्-लिहिणारा]

**बारबंड-डा-डया, बारबुं(पु)डा-डी**—वि. उनाड; बारगळ; बेशिस्त वर्तन करणारा, खटयाळ.

**बारबार**—क्रिवि वारंवार; पुन्हांपुन्हां; परत; वरचेवर. 'तार तार भारबार कारभार फार बारबार पार करी।'-राला ४. [हिं.; सं वारंवार]

**बारव**—स्त्री पायविहिर; पायऱ्यांची विहीर. 'बारव आहे वरल्या रानीं।'-मध्व ४०२.

**बारसें, बारसा**—नपु. मुलाच्या जन्मापासून बाराव्या दिवशीं करावयाचा नामकरणविधि. **बारसो**-न. (गो.) दत्तविधान **(एखाद्याच्या) बारशास जेवणें**-एखाद्यापेक्षां वयानें मोठें असणें; एखाद्यापेक्षां जबरदस्त, सरस, हुषार, अधिक अनुभवी असणें; डावपेचांनीं न फसणें. **बारस, बारशी**-स्त्री १ कोणतीहि

द्वादशी तिथि ( विशेषतः कार्तिकशुद्ध ). २ ( कु. ) सावज मारल्या-नंतर बाराव्या दिवशींचा समारंभ

**बारा**—पु १ कुंभाराच्या भट्टीचें खालचें तोंड. २ बंदराच्या समोरचा भाग. [ सं. द्वार ]

**बारा**—वि. १२ ही संख्या. [सं द्वादश; प्रा. बारह] (वाप्र ) **०करणें, बाराचे करणें-म्हणणें, बाराचा फाडा वाचणें, बाराचे लेख वाचणें**-सफाईनें किंवा धूर्ततेनें पळून जाणें· पोबारा करणें. **०गोष्टी-कथा सांगणें-करणें-गाणें, बारापंधरा करणें-सांगणे, बाराबशिशा लावणें**-असंबद्ध बोलणें;खोटया सबबी सांगणें; कांहीं तरी सांगणें; धरसोडीनें बोलणें, उडवाउडवी करणें; भाकडकथा सांगणें. **०वाजणें**-(ल.) उतरती कळा लागणें; समाप्त होणें; नाश होणें; दिवाळें निघणें **०वाजविणें**-( ल ) नाश करणें, विध्वंस करणें **०वाटा करणें**-उधळून लावणें; उध-ळणें. **०वाटा पळणें-होणें**-१ अजिबात नाहींसा होणें. २ चारी दिशांनीं सैरावैरा पळणें, दाणादाण होऊन पळत सुटणें; (सैन्य इ०) ' फजिलखान बारा वाटा । '–ऐपो २१ **०वाटा उधळिला जाणें**-पैसा, संपत्ति, सांठा इ० खर्च होणें **०वाटा मोकळ्या होणें**-मनमानेल तसें वागण्यास पूर्ण मोकळीक असणें. **म्ह०** पळ-णारास एक वाट; शोधणारास बारा वाटा **०गांवचा(पिंपळा-वरचा)मुंज्या**-एके ठिकाणीं न राहतां सदां भटकत असणारा **०गांवचें(बंदरचें)पाणी प्यालेला**-लफंग्या; वस्ताद; चवचाल, बारा बंदराचें पाणी प्यालेला; फार प्रवास केल्यानें चतुर व धूर्त बनलेला. **०घरचे बारा**-भिन्न भिन्न स्थळाचे भिन्न भिन्न प्रकृतीचे एकत्र जमलेले लोक, परस्परांशीं कोणत्याहि नात्यानें संबंध नाहीं असे लोक. **०मांडवांचा वऱ्हाडी**-पु. सदोदित अनेक ठिकाणीं अनेक तऱ्हेचीं कामें असलेला इसम. **बारावें वर्ष पालटणें किंवा लागणें**-( ल. ) बारा वर्षाच्या मुलाप्रमाणें वर्तन करणें. **म्ह०** १ उदीम करतां सोळा बारा; शेती करतां डोईवर भारा. **बारनायकी**-स्त्री १ अव्यवस्थित राज्य, बंडाळी; अराजकता २ शिरजोर लोकांच्या कारभारामुळें कामांत होणारा घोटाळा **बार-भाई**-स्त्री. (ल.) १ अनेक मतांच्या, स्वभावांच्या लोकांनीं मिळून केलेलें काम; अनेकांच्या हातीं असलेली सत्ता. २ गोंधळ; अव्य-वस्था. **बारभाईचा कारखाना-कारभार-खेती**-पुस्त्री १ अव्यवस्थित कारभार किंवा स्थिति. २ लोकप्रतिनिधींचा कारभार ( नारायणराव पेशव्यांच्या वधानंतर नाना फडणवीस, सखाराम बापू इ० मुत्सद्यांनीं चालविलेला कारभार ) ' बारभाईचा कारभार दिल्लीस आजपर्यंत कोणत्याहि गृहकलहानंतर चालला नाहीं ' –भाऊ ९६. ३ (ल.) गोंधळ; ज्या कामांत किंवा उद्योगांत पुष्कळ मंडळींचें अंग असतें आणि प्रत्येक जण यजमानासारखे हुकूम सोडीत असतो परंतु त्या हुकुमांची बजावणी मात्र कोणी करीत नाहीं अशा तऱ्हेचा गोंधळ. **म्ह०** ( व. ) बारभाईची खेती प्रजा-पती लागला हातीं=घरांत कारभार करणारे पुष्कळ असले व कोणीच जबाबदार नसला तर फायदा होत नाहीं. **बारभाईची गाडी**-स्त्री. उतारूंची व टपालाची घोडागाडी ( इंग्रज कुंपिणीच्या पहिल्या अमदानींत ही गाडी मुंबई-पुणें याच्या दरम्यान होती ). **बार-भाईचें कारस्थान**-न अगदीं भावासारखी एकमतानें वागणारी जी मंडळी तिनें केलेलें कारस्थान; श्री. नारायणराव पेशवे मारले गेल्यानंतर राघोबादादांच्या विरुद्ध कारभारी मंडळीनें केलेला कट. **बारमास, बारमहा, बारमाही**-क्रिवि. वर्षभर; बारा महिने; सतत. –वि. बारामहिन्यांचें [ बारा+सं. मास; फा. माह् ] **बार-वर्षी(रशी)सोळवर्षी(रशी), बारावर्षे, सोळावर्षे**-पुभव. ( बारावर्षांचे व सोळा वर्षांचे ) अननुभवी तरुणांची सभा; ज्या व्यवहारांत एकहि प्रौढ मनुष्य नाहीं व सर्व एकजात तरुण आहेत अशी मंडळी. सामाशब्द- **बारा अक्षरी**-१ रेशमाची एक जात २ बाराखडी **०आदित्य**-पुभव ( बारा सूर्य ) वर्षांतील सूर्याचीं बारा रूपें **०कशी**-स्त्री बार(रा)बंडी–दी; बारकशी. [ कसा=बंद ] **०कारू**-पुभव. बलुतेदार पहा. **बाराखडी, बारख(ख)डी**-स्त्री. व्यंजनापासुन १२ स्वरांच्या मिश्रणानें पूर्ण होणाऱ्या अक्षरांची मालिका. [ बारा+अक्षरी ] **०गणी**-स्त्री. जमीन मोजण्याचें साठ बिघ्यांचें एक माप **०जन्म**-क्रिवि. बारा जन्मांत; कधींहि नाहीं. **०जिभ्या, बारजिभ्या**-वि. अतिशय खोटें बोलणारा; बडबड्या; विसंगत बोलणारा. [ बारा+जीभ ] **०ज्योतिर्लिंगें**-नअव. शंकराचीं प्रसिद्ध १२ लिंगें तीं १ सोरटी सोमनाथ ( काठेवाड ). २ मल्लि-कार्जुन ( मोंगलाई ). ३ महाकालेश्वर ( उज्जनी ). ४ ओंकार अमलेश्वर ( ओंकार मांधाता ) ५ परळी वैजनाथ ( मोंगलाई ). ६ भीमाशंकर ( पुणें जिल्हा ). ७ अवंढया नागनाथ ( मोंगलाई ). ८ काशीविश्वनाथ (काशीस) ९ त्र्यंबकेश्वर ( त्र्यंबक–नाशीक ) १० केदारेश्वर ( हिमालय ) ११ घृष्णेश्वर ( वेरूळ–मोंगलाई ). १२ रामेश्वर ( मद्रास इलाखा ). **०तेरा**-पु. भाषणांतील असंबद्धता ( क्रि० लावणें; सांगणें; बोलणें ) **०द्वारी, दारी**-स्त्री. १ बारा दारें असलेला एक प्रकारचा उन्हाळयांत राहण्याचा हवाशीर बंगला किंवा १२ पायवाटा असलेली विहीर. २ ( ल ) धंदाउद्योगांतील अव्यवस्थितपणा, पसारा. [ हिं. बारादारी ] **०पांच**-पु. ( कु. ) कुडाळदेशकर ब्राह्मण राजवटींतील बारा नाईक व पांच देसाई मिळून एकंदर सतरा मानकरी. **०बंदी, बारबंदी-डी**-स्त्री बारा-बंद असलेला अंगांत घालण्याचा एक कपडा; बारकशी. **०बलुतीं-तें**-नभव बलुतेदार पहा. **०बळी-वळी**-पु जन्मापासुन बाराव्या दिवसाचा एक विधि; बारसें. ' गरोदरेसि प्रसूति होये। पुत्रजन्में सुखावली ठाये। तेही बाराबळी जैं पाहे। ते भोगूं लाहे पुत्रसुख। ' –एभा १२ ६०३. **०बावती**-स्त्रीभव. १ वरिष्ठ किंवा मुख्य

अधिकाऱ्याचे वसुलापैकीं बारा हक्क २ विवाह किंवा मोहतूर इ०कांच्या वेळचे पाटलाचे बारा हक्क ( विडा, टिळा, शेला, वाटी, गणसवाशीग इ० ). ३ शेतकरी किंवा महार यांचे लग्न इ० बाबतींतील बारा हक्क. ४ बारा बलुतेदारांपैकीं प्रत्येकाचे बारा हक्क. ५ ( ल. ) लंगड्या सबबी, पाल्हाळिक व मूर्खपणाचें भाषण; गडबडगुंडा ( क्रि०सांगणें ). **०बाबू–बापू–भाई(बारभाई)–घरचे बारा**–निरनिराळ्या उद्देशांचा व भिन्नभिन्न स्वभावांचा परंतु एका कार्याकरतां एकत्र झालेला लोकसमूह; तसेंच या लोकांचा ( घोटाळ्यांचा) कारभार; अनेकांच्या हातीं असलेली सत्ता **०बाविशा**–स्त्रीअव ग्रामाधिकाऱ्यांचे हक्क. ' गांवामध्यें बाराबाविशा रामजी पालटाच्या आहेत. ' [ बारा+बावीस ] **०बोड्याचा**–वि. ( कुण ) एक शिवी; जारज **०भट**–वि. सदोदित आगंतुकी करणारा. **०भुजां-भुजांबळ**–न. (गो ) पुष्कळ शक्ति. [बारा+भुज=हात] **०महाल**–पुअव. राज्यकारभाराच्या सोयीसाठीं केलेलीं सरकारी कामांचीं निरनिराळीं १२ खातीं. हीं पुढील प्रमाणें:–पोतें, कोठी, पागा, दरजी, टंकसाळ, सौदागिरी, इमारत, हवेली, पालखी, थट्टी, चौबिना व शरीमहाल **०महिने**–पुअव.वर्षाचे महिने:–चैत्र,वैशाख, ज्येष्ठ, आषाढ( आखाड ), श्रावण, भाद्रपद ( भादवा ), आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष(शीर), पौष(पूस), माघ, व फाल्गुन( शिमगा ). हीं नांवें अनुक्रमें पुढील नक्षत्रांवरून पडलीं आहेत:–चित्रा, विशाखा, ज्येष्ठा, आषाढा, श्रवण, भाद्रपदा, आश्विनी, कृत्तिका, मृगशीर्ष, पुष्य, मघा, फाल्गुनी दर पौर्णिमेस या या नक्षत्रीं चंद्र असतो. बारा महिन्यांचीं प्राचीन संस्कृत नांवें:–मधु, माधव, शुक्र, शुचि, नभस्, नभस्य, इष, ऊर्ज, सहस, सहस्य, तपस्, तपस्य. –क्रिवि बाराहि महिनेपर्यंत, सगळ्या वर्षभर. **बारा महिने तेरा काळ**–क्रिवि. सदोदित; नेहमीं **०मावळें**–नअव. पुण्यापासून शिरवळपर्यंतचीं सह्याद्रीच्या पूर्व उतरणीवरील १२ खोरीं तीं:–अंदर, नाणें, पवन, घोटण, पौड, मोसें, मुठें, गुंजण, वेळवंड, भोर, शिवतर व हिरडसमावळ. –मुलांचा महाराष्ट्र २०. **०माशी**–वि. वर्षाच्या सगळ्या महिन्यांत येणारें किंवा असणारें ( आंबा, फणस, फूल इ० ). **०माशी खरबूज**–न खरबुजाची एक जात. **०रांड्या**–पु रंडीबाज मनुष्य **०राशी**–स्त्रीअव ( ज्यो. ) क्रांतिवृत्ताचे बारा विभाग मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धन, मकर, कुंभ व मीन. **०लग्नें**–नअव. (ज्यो.) ज्या वेळीं जी रास क्षितिजावर उदयस्थानीं असते तें त्या वेळचें लग्न याप्रमाणें १२ लग्नें आहेत. बाराराशी पहा **०वफात**–पु रबिउलावल महिन्यातील बारावा दिवस या दिवशीं महमद पैगंबराची पुण्यतिथि असल्यानें हा दिवस मुसलमान लोक सण म्हणून साजरा करतात. [ अर. वफात=मृत्यु] **०वा**–पु. माणसाच्या मृत्यूच्या बाराव्या दिवशीं करावयाचा श्राद्धादि विधि –वि. अनुक्रमानें मोजलें असता ११ व्या पुढील. **०वा बृहस्पति असणें**–(ल.) वैर असणें; उभा दावा असणें ( जन्म राशीपासून बाराव्या राशींत गुरु असल्यास तो त्या माणसास फार दुःख देतो त्यावरून ). **०वाडी**–स्त्री. चपलांची, वहाणाची एक जात, प्रकार. **०सहस्री**–पु. बाराहजार फौजेचा सरदार. ' आटोळे सेना–बारा सहस्री । ' –मराचिथोरा ५२. **०सोळा**–स्त्रीअव. सूर्याच्या बारा व चंद्राच्या सोळा कळा. ' आटूनियां हेमकळा । आटणी आटल्या बारासोळा ।' –एरुस्व ७५०. **०हक्कदार**–पुअव. हक्क असलेले खेड्यांतील वंशपरंपरेचे बारा हक्कदार:–देशमुख, देशपांडे, कुळकर्णी, पानसरे, शेट्या इ० **०क्षरी**–स्त्री. बाराखडी पहा ' बाराक्षरि एकासारखी । ' –ऋ ७६. [ बारा+अक्षर ] **बारु-रो-ला-ली, बारोला-ली, बारोळा**–वि बारा पायल्यांचा ( मण, खडी, माप ) **बारोत्तर**-वि. एखाद्या संख्येहून अधिक बारा. ' शके बाराशतें बारोत्तरें । ' –ज्ञा १८.१८१०. [ बारा+उत्तर ] **बारोत्रा**–पु. १ व्याजाच्या रकमेचा बारावा भाग ( या भागाची सूट देतात ). २ दरसालदरशेंकडा बारा या दराप्रमाणें व्याज. [ बारा+उत्तर ]

**बाराआणे**—( ल ) नपुंसक.

**बारिदगी**—स्त्री. घोड्याचा एक रोग. यांत गुद लाल होऊन त्यावर फोड उठतात व रक्त वाहातें. –अश्वप २.११८

**बारी**—पु विड्याचीं पानें विकणारा; तांबोळी. [ हिं. ]

**बारी**—स्त्री. १ दोन डोंगरामधील धोक्याची खिंड. २ रानांतील धोक्याची वाट. ३ कुंपणांतून केलेली अडचणीची वाट. ४ खिडकी. (खा) कपाट. ५ समुद्राचा धक्का, बंदर [ सं. द्वार; हिं; गु आर्मे जि बर ] **चोरांची बारी**–चोरांचा उपद्रव असलेली वाट.

**बारी**—स्त्री १ वेळ; खेप; पाळी. २ कामाची पाळी, पालट ( महाराची गांवकामाची ). ३ सोंगट्यांच्या खेळातील एक डाव. ४ ( व. ) साप आंगांत आणण्याचें गाणें-मंत्र नागपंचमीस म्हणावयाचें नागोबाचें गाणें. [ बार–बार=वेळा ]

**बारी**—स्त्री. डवूर फिरविण्यासाठीं डवूर मुसळाच्या भोंकांत घातलेला वांसा. डवूर व डवूर मुसल पहा. [ बारें+वांसा ]

**बारी**—पु छत्र धरणारा. 'मीचि बारी मी कन्हेरी । '–एभा १२ ५६१ [ प्रा ] **०पण**–न. छत्र धरण्याचें काम. ' छत्र मी आणि करीन । बारीपण । ' –ज्ञा १३ ४१६ [ बारी=तांबोळी ? ]

**बारीक**—वि १ सूक्ष्म; ज्याची जाडी कमी आहे असा; पातळ; कृश ( खांब, शरीरावयव सूत इ० ) २ एकंदरींत आकारानें लहान असलेला (दाणा; सुपारी, लवंग, डोळा इ०.) ३ तलम सूत असलेलें ( वस्त्र इ० ) तलम, पातळ ( कण, अवयव ). जाड भरड नसलेलें ( पीठ इ० ) ४ ( ल. ) गुप्त; गूढ ( बातमी ). ५ ( ल. ) एकदम लक्षांत न येणारा ( भेद, अर्थ ). ६ कमी; रुट; खप्पा.

'श्रीमंत स्वामींची बहुतच मर्जी बारीक जाली आहे.' -रा १.२२८. [फा. बारीक्] म्ह० (व) बारिकगळी सकनयळी= फार हळू बोलणाऱ्या सुनेला सासु असें म्हणते ०कातणें-१ हिशेबांत किंवा वागण्यांत फार बारकाईनें पाहणें; कांटेकोरपणानें वागणें; फाजील चोखपणा करणें २ अत्यंत कृश किंवा किडकिडीत होणें. (एखाद्यावर) बारीक कातणें-गोड गोड बोलून फसविणें; दयाळुत्वाचा व सभ्यतेचा आव आणून एखाद्याला बुडविणें, त्याचा नाश करणें. ०पाहणें-पैसे किंवा खर्च याकडे फार बारकाईनें पाहणें; खर्चाच्या अगदीं क्षुल्लक किंवा किरकोळ गोष्टींकडे लक्ष पुरविणें; चिक्कूपणा करणें. ०कुटाळ-वि. सभ्यपणाचा आव आणून निंदा करणारा; धूर्तपणानें व गुप्तपणानें बालंट घेणारा; आळ घालणारा (उपरोधिक बोलण्यानें). ०कुटाळी-स्त्री. गुपचुपपणें घेतलेलें बालंट. ०जोर-पु. (गो.) क्षयरोग. [बारीक+सं. ज्वर] ०दृष्टि-नजर-स्त्री (ल.) फाजील हिशोबी पाहणी; चिक्कूपणा. ०निरीक-सारीक-शिरीक-वि. किरकोळ; बारीक. [बारीक द्वि.] ०मोठा-वि. बारीक आणि मोठा; कांहीं बारीक कांहीं मोठा. ०रडणें-रडें-न. हळू आवाजानें रडणें; मुसमुसणें; मुळुमुळु रडणें. ०राव-पु. काडीपहिलवान; सडपातळ कृश मनुष्य. ०साय, साण-पु. (गो.) चौकसपणा; सूक्ष्म दृष्टि. ०हंसणें, हंसें-न. स्मित करणें; गालांतल्या गालांत हसणें; मोठा आवाज न करतां हसणें.

**बारीश**—स्त्री. वृष्टि, पाऊस. 'बारशीच्या जोरामुळें माघारी कूच करून गेलों.' -पया ३८४. [सं. वर्षाव; फा. बारिश्] बारिशेचा शद्त-पु. पावसाची झोड.

**बारु(रू)द-त**—स्त्री. बंदुकीची दारू. [फा बारुत्] ०खाना-पु. बंदुकीचा व तोफेचा दारुगोळा ठेवण्याची कोठी -ख ३६०२.

**बारें**—न. १ पाणी वाहण्याकरितां बांधामध्यें पाडलेलें भोंक, द्वार; पाण्याच्या पाटांतून बाजूला फोडलेला बारीक प्रवाह. सामान्यतः लहान द्वार, वाट. २ (व.) शेत; नंबर. 'बाजरीचें बारें' [सं. द्वार] ०बांधणें-अक्रि. (दरबारांत किंवा दरबारचे इ०) आपल्या विरुद्ध असलेल्या दुष्कृत्यांची ओरड थांबविणें (लांचलुचपतीनें किंवा उपकार कृत्यांनीं). बारेकरी-पु. शेताच्या वाफ्यांतून पाणीपुरवठा करणारा.

**बारोटिआ**—पु. दरवडेखोर; डकाईत. 'एखाद्या काठेवाडी बारोटीआनें गिरनारच्या रानांत आपणास पकडिलें ...' -नीति २२५. [गु.]

**बार्क**—न. (गो.) तारूं; जहाज [पोर्तु.; इं. बार्ज; फा. बरिकेश]

**बार्कस**—न. व्यापारी मालाच्या वाहतुकीचें जहाज. [फा. बार्कस्] बार्कशी-पु. मालाची वहातूक करणारा.

**बार्बेल**—पु. एक मासा. -प्राणीमो ८१.

**बार्याब**—क्रिवि. दर्बारीं हजर. 'गुलाम अमियतसुद्धां हुजूर बार्याब होतो' -रा ५ १५०. [फा. बर्याब्]

**बार्हस्पत्य**—न. एक नीतिशास्त्रावरील ग्रंथ; दंडनीति. [सं. बृहस्पति, हा या शास्त्राचा कर्ता मानला जातो त्यावरून]

**बार्हा**—क्रिवि. वारंवार. 'आम्ही हुजुरांत बार्हा अर्ज मालूम करितों कीं...' -रा २२ ६२. [फा. बार्हा]

**बाल**—पु. (फिनिशियन लोकांचें मुख्य दैवत) सूर्य. 'त्यानें बालाचें एक भवन शोमरोन येथें बांधलें.' -रा १६.३२. [हिब्रू. बाल-प्रभु; धनी]

**बाल**—पु. १ केंस 'हूं सुप्त सर्पिणीतें मेली मानूनि ओढ हे बाल।' -मोसभा ५.१८. २ (सोनारी धंदा) हातोड्याचा वरच्या बाजूचा पाचरीसारखा भाग (यानें कोणताहि धातु ठोकून जलद वाढवितां येतो). [सं बाल; हिं.] ०बाल-क्रिवि. केसागणिक; पूर्णपणें 'बाल बाल-गुन्हेगार-अपराधी-पापी-खुश-बोलणारा-शिवी देणारा. ०ठेवणें-(ना) (इंग्रजीपद्धतीप्रमाणें) डोक्यावर केंस राखणें. ०चें कापड-न. केंसाळ कापड. ०बाल खूष होणें-अतिशय प्रसन्न होणें; अत्यंत संतुष्ट होणें. ०बाल बोलणें-सांगणें-एकसारखी बडबड करणें; वटवट लावणें. ०चीप-फूट-स्त्री. १ (नाणें वगैरेमधील) केंसासारखी बारीक चीर, तड. २ दगडाची लांबट पट्टी. ०फूट, फुटका-वि. केसाइतकी बारीक चीर-भेग-तडा-फूट ज्याला आहे असें नाणें. बालें(लां)बाल-वि. पूर्ण; शंका घेण्यास केसभरहि जागा नाहीं इतकी; पक्की. बालागणीत-क-क्रिवि. १ केसागणिक, प्रत्येक केसाला. २ (ल.) अविरत; एकसारखें (शिव्या देणें, खोटें बोलणें इ०). [बाल+सं. गण्-मोजणें] बालाग्र-न. केसाचें टोक. -क्रिवि. यत्किंचितहि; केंसाच्या टोंकाइतकें. [स. बाल+अग्र-टोंक]

**बाल, बालक**—न १ लहान मूल; अर्भक; अज्ञान मूल. २ -पु. मुलगा (दांत आल्यापासुन सोळा राखीपर्यंतचा). -वि. (सामासांत) लहान; अल्पवयी; अज्ञान, कोंवळा; नुकताच उदय पावलेला (सूर्य इ०). [सं.] म्ह० सं. बालादपि सुभाषितं ग्राह्यम्। =चांगलें भाषण मग तें लहान मुलाच्या तोंडांतून निघालें असलें तरी ग्रहण करावें. ०क्रीडा, लीला-स्त्री. खेळ. ०गोपाळ-पुअव. लहानमोठीं मुलें. ०ग्रह-पुअव. १ लहान मुलांना पीडा करण्यांत आनंद मानणाऱ्या देवता या नऊ आहेतः-स्कंद, स्कंदापस्मार, शकुनि, रेवती, पूतना, गंधपूतना (अंधपूतना), शीतपूतना, मुखमंडिका व नैगमेय. -योर २ ६५५. २ आंकडी; एकरोग. ०चंद्र-पु. शुक्ल पक्षांतील पंचमी-षष्ठीचा चंद्र. [सं] ०चरित-त्र-न. लहानपणच्या क्रीडा किंवा खेळ; बाळलीला. [सं.] ०त्व-न. बाल्य; बालपणा. 'बालत्व आहे वय वाढण्याचें।' ०परदेशी-पर्द(र्दे)शी-स्त्री. १ लढाईंत पडलेल्यांच्या कुटुंबास-मुलांच्या

संगोपनासाठीं सरकारानें दिलेला पगार, वर्षासन, नेमणूक इ०; बाल-परामर्ष. 'चौघे सरवंत पाणपतावर पडले सबब त्यांचे बायकांस बालपरवेशी सालीना रुपये ...' -वाडमा २.२५७. २ बाल-पणापासून जोडलेली चाकरी, मित्रत्व, आश्रितत्व इ०चा संबंध किंवा तत्संबंधीं चाकर, मित्र, आश्रित इ० [सं. बाल+फा परवरिश्=पालन] ०**बुद्धि**-स्त्री. पोरबुद्धि; पोरसमजूत. -वि. अज्ञान; पोरकट समजुतीचा. ०**बोध**-वि. लहान मुलांना देखील समजेल असें; सोपें; सुगम; सुलभ; याच्या उलट प्रौढबोध. 'यांतील विषयाची रचना मूळ ग्रंथकर्त्यानेंच बालबोध ठेविली.'-यंस्थि १. ०**बोध, बाळबद**-स्त्री. १ देवनागरी लिपि (मुलांनाहि समजण्यासारखी) याच्या उलट मोडी लिपी. -वि. १ साधा; निरुपद्रवी; प्रामाणिक; शुद्ध; द्वेष, अवगुण विरहित (माणूस इ०). २ स्पष्ट; सरळ; खुल्या दिलाचा; जुन्या चालीचा (व्यवहार, भाषण, वर्तणूक, वळण). ३ मुलांना शिकण्यास सोपी (भाषा, लिपि इ०). ०**बोध घर**-न. ज्या घरांत सर्व माणसें सरळमार्गी आहेत व ज्यांत आधुनिक ढंग, चारगटपणा इ० शिरलेले नाहींत असें घर. याप्रमाणेंच बालबोध घराणें; बालबोध कुटुंब हे प्रयोग रूढ आहेत. ०**बोध माणूस**-पु. सरळ मार्गानें चालणारा, छक्केपंजे माहीत नसलेला; साधा माणूस. ०**ब्रह्मचारी**-पु. लहानपणापासून ज्याला स्त्रीसंग घडला नाहीं व ज्याचें लग्नहि झालेलें नाहीं असा मनुष्य. ०**भाषा**-स्त्री. १ लहान मुलांची भाषा: त्याची बोलण्याची पद्धत-उदा० हम्मा=गाय. पापा=भाकरी इ०. २ एखाद्याची लहानपणापासून बोलण्याची भाषा; मातृभाषा. ३ संस्कृताची अपभ्रंश होऊन झालेली भाषा (ही नाटकांतून स्त्रिया व हलक्या दर्जाचीं पात्रें यांच्या तोंडीं घातलेली असते). ०**मित्र**-पु. १ लहानपणापासूनचा मित्र, लहानपणीं असलेला मित्र २ नुकताच उगवलेला सूर्य; कोंवळ्या किरणांचा सकाळचा सूर्य. ०**रंडा-रांड-विधवा**-स्त्री. लहान वयांत, नहाण येण्यापूर्वी जिचा नवरा मेला अशी स्त्री. [सं.] ०**रोग**-पु. लहान मुलांना होणारा रोग किंवा विकार. [सं.] ०**वाचा**-स्त्री. लहान मुलांची भाषा; बालभाषा. [सं.] ०**सरस्वती**-पु. लहानपणापासून अत्यंत बुद्धिवान् असलेला पुरुष. ०**सूर्य**-पु. उदयकालचा सूर्य 'बालसूर्याचेनि उजाळें। तैसी कवळें टांचांचीं।' -एरुस्व १.२१. [सं.] ०**हत्या**-स्त्री. बालहिंसा; बालवध; लहान मुलाला ठार मारणें. [सं] ०**हत्यारा**-पु. लहान मुलाला मारणारा; बालहत्या करणारा. [बाल+हन्तृ] ०**हरीतकी**-स्त्री. कोंवळे कोवळे बाळविलेले हिरडे; बाळहिरडा. [सं.] **बालातप**-न. सकाळचें सूर्यकिरण; सकाळचें कोवळें ऊन. [बाल+आतप] **बालाभ्यास**-पु. लहानपणीं करावयाचा अभ्यास; लहानपणीं केलेला अभ्यास. [सं.] **बालाभ्यासी**-वि. लहानपणापासून अभ्यास केलेला, शिकलेला [सं.] **बालार्क**-पु १ बाल सूर्य. २ त्याचें कोवळें ऊन; कोवळे किरण. **बालि(ले)श**-वि. अज्ञानी; अननुभवी; अल्पवयी, पोरकट; मूर्ख. 'स्वपर बळाब नेणुनि बालिश बहु बायकांत बडबडला' -मोविराट ३.३९. [सं **बालिशता**-स्त्री. मूर्खपणा; पोरकटपणा. 'अस्मदहितहित इच्छिं लाविसि आम्हां दहांत बालिशता।' -मोसभा ४.३३. **बालोप-चार**-पु लहान मुलाना योग्य असें औषध किंवा औषधाच योजना; हलकें व सौम्य औषध; उपचार इ०. [सं] **बालोप-चारी**-वि. सौम्य, लहान मुलाना देखील योग्य असें औषध इ० **बालोपवीत**-न. लहान मुलाचें जानवें. [सं.] **बाल्य, बाल्या-वस्था**-नस्त्री १ बालत्व, बालपण; वयाच्या पाच वर्षांपर्यंतच काल. २ कौमार्यावस्था; तारुण्यप्राप्तीपर्यंतचा काल (सोळा वर्षं पर्यंतचा काल). [सं.]

**बॉल**—पु. (गो.) १ एक प्रकारचा आंबा २ एक प्रकार [पोर्तु.]

**बॉल**—पु. चेंडू; गोळा; गोटा; गोल. [इं.]

**बालगुंडा**—पु. शक्ति अजमावण्यासाठीं मल्लानीं उचलण्याच गुंडगोळा; धोंडा; गोटी. [बल+गुंडा]

**बालड्या**—पु तोफेच्या गाडीला अडकविलेली पाण्याच कातड्याची पिशवी, बादली. [बादली]

**बालजबूल**—पु (ख्रि) सैतान; भूताचा राजा. 'भूतांच अधिपति बालजबूल याच्या योगानेंच हा भुतें काढतो.' -मत्त १२ २४. [हिब्रू. बाल झबूब-माशांचा स्वामी, नरकाचा प्रभु]

**बाल(लं, लां)ट**—न. खोटा आरोप; आळ; कुभांड. (क्रि घेणें; घालणें) 'कसें घेतलें हेंचि बालंट मोठें।' -आकू ३० -वि. (व.) खोटा; वात्रट. 'मतिमंद व्यापारी पोर मी बालट' -दावि २०७. **बालंटास किंवा बालटावर येणें-सरणें**-एखाद्याचें वचन किंवा करार मोडणें **बालंटखोर, बालंटी-ट्या बालंड-डी**-वि. खोटा आरोप करणारा; कुभाडी; थोतांड्या बालंटाचा; कुभाडाचा; तुफानाचा.

**बालतीम**—पु. (गो.) ख्रिस्ती धर्मदीक्षा. [पोर्तु बॅप्टिझम

**बालदार**—वि. पीळदार (पगडी). -शर.

**बालदी-टी-डी**—स्त्री. १ गलबतावर उपयोगांत आणता ते चामड्याचें-पाणी उपसण्याकरता भांडें. २ पाणी काढण्याकरत किंवा ठेवण्याकरतां उभट आकाराचें-कडी असलेलें भांडें; निराळ्य आकाराचें गंगाळ; बादली; बकेट. [इं. बकेट]

**बालधोंड**—स्त्री. १ अतिशय मोठा खडक किंवा दगड. २ (ल.) मोठी पीडा; त्रास; बालंट; खोटा आरोप.

**बालंपेच, बालमपेच**—पु. १ एक कठिण पेच. २ पागोट अक्कडबाज दिसावें म्हणून त्याला दिलेला एक प्रकारचा पीळ **बालंपेची पागोटें**-वि. बालंपेच असलेलें पागोटें; पेशवाईतील

पागोट्याचा एक प्रकार. ' रघुनाथराव यांनीं गयावळास भरजरीची किनखाबी आंगरखा ... बालेपेची पागोटें ... याप्रमाणें वस्त्रें देऊन ... ' -तीप्र १३४.

**बालबसव**—पु. ( बे. ) संध्याकाळीं गांवातून भिक्षा मागत वर्षभविष्य सांगत फिरणारा लिंगायत महंत [ का. ]

**बालबीज**—न. मुद्रा, कासलीचें बीं.

**बालमखिरा**—पु खिऱ्याची एक जात; एक प्रकारची काकडी, वाळूक. [ हिं. ]

**बालर**—पु. ( छाप. ) टाइपास शाई लावणारा; हॅंडमशीन हातांनीं फिरवावयाचें असेल त्यावेळीं तें फिरविण्याचें काम करणारा. [ इं. बॉल=गोळा ]

**बालव**—न. ( ज्यो. ) सात करणांतील दुसरें करण.

**बाला**—पु. नाण्यांचा ठसा, शिक्का; नाण्यावरील ठशानें उठलेला छाप.

**बाला**—वि. विभक्त; उंच, अलग. [ फा. बाला=उंच, वर ] ॰**देणें-मारणें-हांकणें**-फसवून पळून जाणें; हातावर तुरी देऊन पळून जाणें; पळून जाऊन दगा देणें; फसविणें **बाला होणें**-अलग होणें **बालाबाला**-क्रिवि. १ (ना.) थेट; परस्परें; परभारें. २ फसवून; कपटानें; गुप्तपणें.

**बाला**—स्त्री. १ पांच ते सोळा वर्षांची मुलगी. २ तरुण स्त्री (स्त्रियांच्या बाला, मुग्धा, प्रौढा अशा तीन अवस्था आहेत ) [सं.]

**बालाईया(जा)फत**—स्त्री. अवांतर मिळकत; खेरीज प्राप्ति; प्र इजाफत [ फा. बाला+इजाफत ]

**बालांट, बालाट, बालांटखोर, बालांटी-ट्या, बालांड, बालांडखोर, बालांडी**—बलाठ, बालंट इ० पहा

**बालांडणें**—सक्रि. (गो ) ओलांडणें. [ सं. उल्लंघन=वलांडणें ]

**बालांडो**—पु. (गो.) देवळाचा सोपा. [ पोर्तु; इं. व्हरांडा ]

**बालांत**—न. वं, भं, मं, यं, रं, लं, या 'ब' पासून 'ल' पर्यंत सहा वर्णांनीं चिन्हित अशा सहा पाकळ्यांचें स्वाधिष्ठान चक्र हें लिंगस्थानीं आहे. याची अधिष्ठात्री देवता ब्रह्मा होय. ' लिंगीं स्वाधिष्ठान षड्दलान्वित। तेथ बालांत सा मातृका विराजत। ' -स्वादि ९.३.५५. [ ब+ल+अन्त ]

**बाला(ले)तंगी-ग**—स्त्री. खोगीर आवळण्याचा पट्टा [फा ]

**बालाबगुला, बालाबगळा**—स्त्री. एक क्षुद्र देवता.

**बालायेश**—स्त्री. सर्फराजी; बढती; अधिक मानाची जागा मिळणें. ' फितुरियास जागा देऊन त्याची बालायेश करणें हे कोणते रियासतींतील चाल आहे ? ' -ख ७.३५७१. [फा. बालाइश् ]

**बालिका**—स्त्री. मुलगी. [ सं. ]

**बालिष्टर**—पु. ( अशिष्ट ) कायदेपंडित. [ इं. बॅरिस्टर ]

**बालिस्त, बालीस**—स्त्री. उशी; तक्या. ' लोडें बालिस्तें पलंग सुपत्ति। परी नाहीं लंगोटी नेसावया। ' -तुगा २१२८. [ फा. बालिश्त्, बालिश ]

**बाले**—पु. मांगांतील एक पोटजात -अस्पृ ४७

**बालेकिल्ला**—पु. डोंगरी किल्ल्याचा उंच पोट किल्ला, सर्वांत वरचा भाग; उपरकोट. [ फा. बाला=उंच ] **बालेघाट**-पु. घाटमाथा; घाटावरील प्रदेश. [ फा. बाला+घाट ] **बालेभिंत**-स्त्री. मुख्य भिंत, चांदई हिऱ्यावर सर्व घराचा भार अवलंबून असतो.

**बालोद्यान शाळा**—स्त्री किंडर गार्टन पद्धतीची शाळा. ( किंडर गार्टन हा शब्द जर्मन असून त्याचा अर्थ मुलांचा बाग असा आहे, मुलांना शिक्षण देण्याची ही नवीन पद्धति जर्मन पंडित फ्रेडरिक फ्रोबेल यानें काढिली ).

**बालोभा जोडा**—पु मारवाडी जोडा

**बाल्दी**—न बैलाचें कातडें

**बाल्या**—पु. (कों ) कुणबी वगैरे जातींतील घरकाम करण्याकरितां ठेवलेला मनुष्य; पोऱ्या [ सं. बाल ]

**बॉल्स**—न. ( गो. ) खिसा [ पोर्तु. ]

**बाल्होऱ्या**—वि. (व. ) लुडबुड्या. ' हा बाल्होऱ्या तेथें कारभारी आहे. '

**बाव**—पु. ( गो. ) व्रण.

**बांव**—पु. एक मुलींचा खेळ. -मराठी खेळांचें पुस्तक पृ.३४५.

**बाव, बावडी-ली**—स्त्री ( कों ) विहीर; मोठ्या तोंडाची विहीर; पायऱ्या असलेली विहीर ' जाल्या तीर्थरूप बावी नदी कूप। अवघें गंगाजळ जालें। ' -तुगा १८४१. [ सं वापी; का. बावी; गु हिं बाव(डी); सिं. बाइ; पं बाउ(डी) ] ॰**उपसणी, उसपणी**-स्त्री विहीरींतील चिखल, गाळ, केरकचरा इ० काढून ती स्वच्छ करणें. ॰**उपसणें, उसपणें**-न विहीरींतील चिखल गाळ इ० काढण्या करतां उपयोगी अशी टोपली, बालदी किंवा इतर कोणतेंहि भांडें. ॰**खोल**-न कोरडी व अर्धवट होऊन गेलेली विहीर.

**बावका**—वि. ( कु ) कोमेजलेला; सुकलेला; वाळून गेलेला; बावलेला. [ बावणें ]

**बावक्या-क्यो, बावगा**—पु ( गो ) रानमांजर

**बावकांड**—न. ( नाविक ) होडी समतोल राहण्यासाठीं जी उलांडी बांधलेली असते, ती ज्या दोन किंचित् बाकदार वांशांनीं बांधतात त्यांतील प्रत्येक

**बावकूफ्**—वि शहाणा. [ फा बा-वकूफ् ]

**बा-वक्र, बा-वकर**—वि प्रतिष्ठावन्त; कीर्तिमान् [ फा बा-वकार् ]

**बावखं(क, ख)ड, बावखट-ट, बावकडा**—पुन. १ खांद्याच्या वरचा भाग, बाहुमूलाचा संधिप्रदेश २गाडीच्या साटींतील

४ लांकडांपैकीं लांबीचीं दोन लांकडें; गाडीच्या वरल्या बाजूच्या लांकडी बाजवा; कठडा; लोखंडी आसाच्या वरखालीं लांकडें असतात त्यापैकीं वरचें लाकूड. ३ बावकांड पहा [सं. बाहु+काष्ठ-खड]

**बावखैराती**—वि. स्वैर; भटक्या; स्वैर वर्तनाचा. -क्रिवि. स्वैरपणानें; स्वच्छंदीपणानें; मोकाटपणानें. [ बाव=वारा+खैराती उधळून टाकलेले ]

**बावचळ**—पु वायचळ; वेडगळपणा; विक्षिप्तपणा. [बाव= वारा+चळ=वेड ] ०णें-अक्रि. १ बडबडणें; बरळणें. २ (ल) भ्रमिष्ट होणें; घाबरणें; गोंधळून जाणें; वायचळणें, बेभान होणें 'कायदेभंगामुळें नोकरशाही अगदीं बावचळून गेली आहे.' -के २.१२.३०. ३ गैरशिस्त व दुराचारी मार्गानें चालणें-वागणें.

**बाव(व)चा, बांवचा, बावचळा**-पु १ विचका; विसकट; घोंटाळा. 'सगळ्या कामाचा बावचा केलास.' २ वहीम, तर्क; संशय; संभव. (क्रि० जाणें; पडणें, होणें; वाटणें, भासणें ).

**बा(बां)वची**—स्त्री १ एक झाड; उंची दोन हात असून पानें साधारण लहान, बीं काळसर व मिऱ्याहून बारीक असतें व त्याचें तेल काढतात. त्याचा उपयोग सुगंधी पदार्थांत व अंगाला उटी लावण्याच्या कामीं करतात. -वगु ४.९८. २ बावचीचें बीं. ३ (कों.) गवारी; गवारीच्या शेंगा ४ एक प्रकारचें गवत, लव्हाळा [सं. बाकुची; हिं. गु. बावची; का. वाऊचि ]

**बा-वजूद**—क्रिवि. असें असूनहि. 'बा-वजूद अब्दालीची गडबड दिवसेंदिवस अधिक.' -रा १.१२४. [फा. बा वुजूद् ]

**बाव(व्ह)टा**—पु १ निशाण; ध्वज; झेंडा. २ बाहुटा; हाताचा वरील भाग. [सं. बाहु; हिं.] ०हकारणें-(नाविक) आपलें निशाण दाखविणें.

**बा(बां)वटया**—स्त्रीअव. गैरलागू उत्तरें, सरळ प्रश्नाचीं वाकडीं व विसंगत उत्तरें 'याला कोठून आला म्हणून विचारलें तर त्यानें हजार बांवटया लावल्या.'

**बावडा-ळा**—पु (ना. व.) ढेंकूण.

**बावडा**—वि. १ (कों.) बापडा; दीनवाणा; गरीब, वेडगळ; मूर्ख. २ सौम्य; निरुपद्रवी [ बापडा ]

**बावणें, बावडणें**—अक्रि १ (कों) कोमेजणें; सुकणें; खराब होणें; टवटवी नाहींशी होणें. २ मावळणें. 'पश्चिमे बावडे दिनकरू।' -स्त्रिपु १.३४.१०१.

**बावधनी**—वि. लुगडयाचा एक वाण; याची किनार रेशमी मोठी व चारकोयरी असते.

**बावन**—न. वांतीं; ओकारी; बासी बावन. [ सं वमन ]

**बावन**—नपु. उत्तम सोनें, बावनकशी सोनें. 'बावनासि केवीं कसवटी। उणें करूं शके।' -कथा ४.१६ १३. [ सं. पावन ]

**बावन-न्न, बावनचंदन, बावनया, बावना**—न उत्तम प्रकारचें चंदन; मैलागर चंदन. 'मोळिकारा धांडोळिता रानें। जेवि मोळिए जोडिलें बावनें।' -ऋ १०. [ पावनाचा अपभ्रंश; पावन=शुद्ध, पवित्र करणारा; धूप. पावन हा शब्द चंदनाचा वाचक बनला असावा ]

**बावन-न्न**—वि. ५२ ही संख्या ०कस-न. उत्तम सोनें. 'बावनकसाची नाणीं।' -वेसीस्व ७ ५७. [बावन+कस] ०कशी-वि. १ अतिशय शुद्ध व उत्तम, बावन वेळां शुद्ध केलेलें; (सोन्याच्या शुद्धतेचे बावन कस धरले तर) बावनहि कस ज्याचे उतरतात असें. 'सोनेंच बावनकशी न कसें म्हणावें।' -र ६. २ (ल) पवित्र, निर्दोष; प्रामाणिक, (मनुष्य, पदार्थ इ०). [ बावनकस ] ०खण(खा)णी-स्त्री. (पुणें) वेश्याची गल्ली (शुक्रवार पेंटेंत खाजगीवाल्याच्या पिछाडीस बावनखणांची एक चाळ होती तींत वेश्या राहात असत त्यावरून ) ०बत्तिशा-बाविशा-स्त्रीअव. बाराबाविशा पहा. ०बीर-पु १ एक देवता समूह. २ पराक्रमी किंवा हुषार इसम. ३ (नाग निंदार्थी) शूर; पराक्रमी म्ह० एक ठेंच खाई तो बावनबीर होई, बावन ठेंचा खाई तो गद्धा होई. [हिं] ०मातृ(त्रु)का-स्त्रीअव. ॐ कारापैकीं अ, उ, म या तीन मात्रा व वरील बिंदु ही अर्धमात्रा मिळून साडेतीन मात्रा व त्यापासून पुढें बावन १६ स्वर व ३६ व्यंजनें मिळून ५२ मातृका. ॐकार आणि स्वर व व्यंजनें मिळून ५२ मूळाक्षरें. 'आकार उकार मकार। अर्धमात्राचे अंतर। औटमात्रा तदनंतर। बावन मात्रुका।' -दा १२.५९. [ बावन+मातृका अक्षर ] ०मुद्रा-स्त्रीअव. चंदनाच्या गंधाच्या मुद्रा, ठसा. 'बावनमुद्रा बुद्धिसमुद्रा परखुणमुद्रा सुवर्णमुद्रा दे आमुच्या।' -पला ४. बावन्नी-स्त्री. (गो.) पत्त्यांच्या खेळांत तेरा हात करून मिळालेला विजय.

**बावनी**—स्त्री. (व.) कांटेरी लहान झाड (दामोदरयापासून उगवलेलें). 'त्या बावरात बावन्या फार झाल्या.'

**बावबंदी**—स्त्री. स्वैरपणा; उनाडपणा. -वि. स्वच्छंदी, उनाड. -क्रिवि. स्वच्छंदानें, अनियंत्रितपणें, स्वैर. 'तो बावबंदी फिरतो.'

**बावर**—पु. १ अनिष्टासंबंधीं शंका; संशय. (क्रि० जाणें). २ कल्पना; विचार. (क्रि० येणें) [सं. भ्रम] बावरणें-अक्रि. घाबरणें; गोंधळणें; गडबडून जाणें (भय, आश्चर्य, दुःख पिशाच्चबाधा यानीं). म्ह० बावरली गाय काटे खाय=संकटांत सांपडलेली स्त्री वाटेल तें करण्यास धजते. बावरणी-स्त्री. गोंधळून जाणें; गडबडून जाणें. बावरा-वि. बावरलेला; गोंधळलेला; भांबावलेला. 'प्रसन्न बहु होतमां परि कराल हो बावरें।' -केका ६८.

**बावर्त**—न. घोडयाचा एक रंग. -अश्वप १.२८.

**बावला-ली-लें, बावले भोरपी, बावले भोरीप**—बाहुला इ० पहा.

**बावली**—स्त्री. चित्त्यानें केलेल्या शिकारीचें मास.–चिमा ३७.

**बावलें**—न. (नाविक) डोलकाठी सरूं नये म्हणून तीस दोन बाजूंनीं लाविलेलीं लांकडें.

**बावसा**—पु. १ धाक; भीति; दरारा (क्रि० पडणें). २ भय किंवा दराऱ्याचा परिणाम; दचका, (क्रि०भरणें; घेणें; धरणें; बसणें). ३ वहीम; अंदेशा; तर्क; विचार. बावचा अर्थ २ पहा. (क्रि० पडणें; येणें; जाणें; भासणें)

**बाव(व्ह)ळा, बावसा**—पु. बाहुटा; खांदा. [सं. बाहु]

**बावळा**—वि. १ वेडसर; मूर्ख; खुळचट. २ साधा. 'वेष धरावा बावळा। अंतरीं असाव्या नाना कळा।'–दा. [हिं बावला] **बावळीमुद्रा**–स्त्री दिसण्यात वेडगळासारखा चेहरा व हावभाव; दिसण्यात वेडा माणूस म्ह० बावळी मुद्रा आणि देवळी निद्रा= दिसण्यांत बावळा पण खरोखर व्यवहारचतुर

**बावळें**—न छाया; साउली. [बाहुलें]

**बावा, बावाजी**—न. १ तपस्वी, जोगी, गोसावी, गुरु, बाप, विद्वान मनुष्य किंवा वडील माणूस इ० च्या पुढें हा शब्द लावण्यात येतो २ (कों.) लहान मुलास लाडिकपणानें लावण्याचा शब्द. 'माझा बावा असं रे काय करतो?' ३ (गो) मोटा भाऊ

**बावा-व्हा**—पु एक औषधी झाड; बाहव्याचें झाड. [बाहवा]

**बावाकांठो**—वि. (तंजा) लुगडयाच्या किनारीचा एक प्रकार.

**बावांचे**—पुअव. गैरलागू उत्तरें; बांवटथा; भावालें; गोंधळून सांगितलेल्या सबबी, ढोंगी किंवा मानभावी उत्तरें. (क्रि० फोडणें; लावणें; घेणें)

**बॉवाळ**—पु (गो) गलका; गडबड. **बॉवाळचें**–क्रि. (गो.) गडबड करणें; बरळणें.

**बाविशी**—स्त्री (खा.) मूळव्याध. [फा बवासीर]

**बावी**—स्त्री बाव; पायविहीर; शेतांतील विहीर. 'असो हें पोखरणी बावी। जेआ श्रीचरणकमळें बरवीं।'–ऋ १८ [सं.वापी]

**बावीस**—वि. २२.ही संख्या. [हिं बे+वीस सं द्वाविंशति]

**बावीळ**—स्त्री. (कों) कातळावर माती टाकून बनविलेली किंवा कातळावरील खळग्यांत माती साचून झालेली शेतजमीन. खरी, बाऊळ पहा.

**बावें**—न सुकाणूं हातात धरण्याचा दांडा, बावा **बावेकरी**– पु. सुकाण्या; सुकाणदार; कर्णधार.

**बाव्हला-ली-लें, बाव्हलेभोरपी, बाव्हलेभोरीप**– बाहुला, बाहुले भोरपी–भोरीप इ० पहा.

**बाव्हळ, बाव्ह(व, ह)ळा, बावखंड**—पु. हाताचा खांद्या-जवळील भाग. [सं. बाहु]

**बाशा**—पु १ धडका; दचका; भीति २ अंदेशा; वहीम; संशय. ३ –पुस्त्री. (कों.) प्रकृतींत थोडासा बिघाड; किंचित् दुखणें.

**बाशिंग**—न. १ लग्नाचे वेळीं कित्येक जातींत नवरा व नवरी याचे कपाळावर बांधण्याचें, कागदाचें व बेगडीचें केलेलें भूषण; गव्हाचे चिकींत दहापांच सुतें घालून वधूवरांचे मस्तकावर बाधाव्यास भूषण करतात. 'कां विजूचे कपाळीं। बाशिंग बसलीं बांधावें।'–एभा ११.३६. २ पोळयाचे वेळीं बैल शृंगारताना त्याच्या कपाळावर बांधण्याचीं बेगडी व कागदी भूषणें. ३ घोडयाच्या कपाळावरील त्रिकोणाकार तीन भोंवरे; हें शुभ लक्षण आहे. ४ (ढोराचा धंदा). घोडयाच्या कपाळास बांधलेला बाद्यांचा झुपका. ५ बाशिंगी झाडाचें पान [सं भाल+शृंग] म्ह० उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग **कामाचें बाशिंग कपाळीं असणें**–एखादें काम करण्याची विशेष प्रकारची योग्यता असणें; एखादें काम एखाद्यानेंच करावें असें ठरलेलें असणें **०बळ**–न. एखाद्याचा विवाह होण्यास लागणारी दैवाची अनुकूलता 'त्याचें बाशिंगबळ उभें राहिलेसें वाटतें, त्याचें लग्न होणार' **बाशिंगा**–वि १ पुरुषाहून प्रकृति श्रेष्ठ मानणारा व कलगी (लावणी) म्हणणारा. २ बाशिंग नावाचें शुभचिन्ह कपाळीं असलेला (घोडा) **बाशिंगाकार**–वि. बाशिंगाच्या आकाराची (जमीन इ०). [बाशिंग+आकार] **बाशिंगी**–स्त्री. आब्याच्या झाडावरील बाशिंगाकार पानांचें बाडगूळ. ही एक औषधी आहे

**बाशी**—वि शिळी. कोमेजलेली; निर्माल्य झालेली. 'बाशी भाकर' [सं वस्–वास]

**बाशी-सी**—स्त्री. ताट, ताटली; बशी. [पोर्तु. इं. बेसिन]

**बाशीबावन**—न अपचनामुळें येणारी ओकारी; उल्टी.

**बाष्कळ-ल**—स्त्री ऋग्वेदाची एक शाखा. –वि. १ (या शाखेचे प्रतिस्पर्धी यांना दूषण देण्यास हा शब्द योजीत यावरून) स्वैर; स्वच्छंदी, वागण्यांत आणि बोलण्यांत तारतम्य नसलेला; चावट २ वायफळ, वायफट, असंबद्ध (बोलणें, आचरण इ०). 'बाष्कळ खेळाचा हव्यास भारी।'–दावि ४०३. ३ खोटें; अप्रामाणिक –हंको [म बाष्कल] म्ह० बाष्कळ जमा व पुष्कळ खर्च **बाष्कळणें**–अक्रि स्वैराचार करणें; मनास येईल त्याप्रमाणें वागणें, बाष्कळ होणें **बाष्कळता**–स्त्री. बाष्कळपणा; मन मानेल तसें वागण्याचा गुण 'परंतु हीं लक्षणें न घेतां। अवलक्षणें बाष्कळता। तेणें त्यास पढतमूर्खता। येवो पाहे।' –दा २.९.४२. **बाष्कळपंत**–पु विदूषक. 'विवाहसामग्री करायाला अनामधेय बाष्कळपंत येतो.' –कल्याणनाटक.

**बाष्ट**—वि. ओशट, बासट. 'नखविष आणि हिंगुळें। बाष्ट आणि वावडें।'–दा ३.६.४८. [सं. वास]

**बाष्प**—नपु. १ कंठ भरून येण्याची, गहिंवरल्याची अवस्था. 'आंग जाहलें रोमांचित। कंठीं बाष्प पै दाटत। शरीर चळचळां कांपत। पडली मूर्च्छित धरणीये।' –एरुस्व १६८. २ वाफ

[ सं. ] बाष्प(पी)भवन-न. वाफ होणें; विशिष्ट उष्णमानाच्या- खालीं उष्णमान असतांना जर एखाद्या पदार्थाचें वायुसदृशअवस्थेंत रूपांतर होऊं लागलें तर त्या वायुसदृश अवस्थेंतील द्रव्यास बाष्प हें नाव आहे. बाष्प होण्याच्या क्रियेस बाष्पीभवन म्हणतात **बाष्पस्नान**-न अंगाला वाफारा देऊन घाम काढणें. **बाष्पानयन**-न. एखाद्याचे अश्रू पुसणें; एखाद्याशीं समदुःखी होऊन त्याचें सांत्वन करणें [सं. बाष्प+आनयन] **बाष्पीकरण**-न वाफ उत्पन्न करणें.

**बा(बां)स**—पु. १ कळक; बांबू; ठोकर; ( डोली, मंडप इ० कांच्या उपयोगी असा विवक्षित आकाराचा ) 'फास गळ्यामधि बास पाठीवर लोह हुडा लाविती।' -ऐपो ३६७. २ उसाची एक जात; हा कळकासारखा असतो. -कृषि ४५० ३ (चाभारी) पृष्ठूच्या पाठीच्या कण्यावरील कातडें [ हिं ; सं. वंश ]

**बास**—उद्गा. बस्स; पुरे; अधिक नको

**बासकरी**—स्त्री. ( खा ) सोनाराची शेगडी; बागेसरी पहा.

**बासगां**—न. ( राजा. कुण. ) बाशिंग. 'त्यानंतर बासगां बांधून झाल्यावर कुळ ठेवणारें जोडपें कन्यादान करतें.' -मसाप ४.२५५.

**बासचें, बाजचें**—अक्रि. ( गो ) खोटें बोलणें; कबूल न होणें; बाचाबाच करणें; बाचणें; नाकबूल करणें.

**बासट, बासूट**—न. १ ज्या पदार्थावर किंवा जो पदार्थ खाल्ला असतां दुसऱ्या खाल्लेल्या पदार्थास विकार होतो असें परस्परविरोधी पदार्थ-मिश्रण 'पुरणाच्या पोळीवर ताक बासट आहे.' २ कुपथ्यामुळें नवीन उत्पन्न झालेला विकार ३ विष; कालकूट; पुष्कळ विषें एकत्र करून बनविलेला पदार्थ 'नाना विषवर्गु एकवटु। तया नाव जैसा बासटु।' -ज्ञा १६.२१६ -वि. १ परस्पर विरोधी; अपायकारक. २ ओशट; बेचव; वास मारणारें; आंबलेलें, शिळें ३ बेचव; निरस, न रुचणारें भाषण. [ हिं ] **बासटणें**-अक्रि. १ बाचकुटणें. २ माखणें; चोपडणें; विषात घोळणें. 'तया द्वेषाचेनि काळकुटें। बासटोनि तिखटें। कुबोलाची सदटें। सुति काढें।' -ज्ञा १६.४०४.

**बासठ-ष्ट**—वि. ६२ ही संख्या [ सं. द्विषष्टि ]

**बासटें**—न कालकूट विष; बाणाग्राचें विष. 'वर्मस्पर्शाचें बासटें जाण। विंधितां निंदेचे बाणबाण।'-एभा २३ ६० [ बासट ]

**बास(सं)डा**—पु १ बास; वांसा. बांबू; लांब कळक २ भाला. 'पेंढार बासडेवाला होळकर शत्रूला दबदबा।' -ऐपो २३३. [ सं. वंश; हिं बांस ]

**बासन**—न. १ आच्छादन; आवरण; गाठोडें किंवा पोथी बांधण्याचा रुमाल. ( गो. ) बासाण. 'नाना गोफ नाना बासनें।' -ज्ञा १९ १२० २ गाठोडें; कपडे बांधून ठेवलेलें बोचकें. ( ल ) प्रचंड, अवाढव्य, विस्तीर्ण असा किल्ला, शहर, तोफ, कारखाना, खातें, पेढी इ० 'सरस बासन ( किल्ला ) वजनदार, पाहुणे मेले बहुत फार।' -ऐपो १८५. ४ ( ल ) प्रतिष्ठित मनुष्य; बडें प्रस्थ; दुढ्ढाचार्य. ५ ( व ) दागिना. 'अंगावर रात्रीं बासन ठेवूं नको बरं.' [ सं. वसन; वस्=आच्छादन करणें; का बासनि. ] **बासनी**-वि गाठोडें बांधण्यास योग्य, कपडे बांधून ठेवण्याच्या उपयोगाचा ( रुमाल, खारवा इ० )

**बासन-णें**—न १ भांडें; मोठें भांडें ( धातूचें, मातीचें ). 'खिस्मतगार हांडाबासन संभाळावयास गुंतले' -भाव ९७. २ ( व ल ) वाय ३ रखेली. [ सं भाजन ]

**बासर**—वि १ भटक्या; स्वच्छंदी, अमर्यादित; ओढाळ. पाय सांडुनिया फिरतो बासर। स्वामिसेवा चोर होऊनिया।' -तुगा ११०२ २ बासें; शिळें ( अन्न ) [ बासट ]

**बांस(सु)री**—स्त्री मुरली; पावा; अलगुज [ सं. वंश ]

**बासष्ट**—वि ६२ ही संख्या. [ सं. द्विषष्टि ]

**बांसा, बांसडा**—पु (ना व ) बांस; वेळू; कळक [सं. वंश]

**बासिंग, बासिंगबळ, बासिंगकार, बासिंगी**—बाशिंग इ० पहा.

**बासीउलटी**—स्त्री. आदल्या दिवशींचें न पचलेलें अन्न सकाळीं ओकून पडणें; अजीर्णानें सकाळीं होणारी वांती. [ बासें ]

**बासुं( सु-सों )दी**—स्त्री दूध आटवून त्यांत साखर व बदाम, पिस्ते इ० मसाला घालून केलेलें पेय.

**बासूट**—वि. ( व ) बासट पहा

**बासें, बासा** - वि १ शिळें ( अन्न ). २ ( कों ) कोमेजलेलें ( फूल ) [ हिं बासी; सं वस्-वास ]

**बास्कळ**—वि १ ( गो. ) ( प्र ) बाष्कळ. २ खोटा; खोटें बोलणारा. [ बाष्कळ ] **०खाणें**-सक्रि. ( माण. ) मांस खाणें.

**बास्ता**—क्रिवि. ( व ) नंतर; मग. 'अगोदर जेव बास्ता फिरावयास जा.'

**बाह, बाहा, बाही, बाहे**—स्त्री. बाहु; हात. 'आदिशून्य तरोनि जावें। केउतें बाहीं।' -ज्ञा १० १७८ [ सं. बाहु ]

**बाह(हा)णें**—सक्रि. १ ( काव्य ) बोलावणें; हाक मारणें 'धेनुवत्सें तुला बाहती माधवा।' -भूपाळी. २ -अक्रि. आरोळी मारणें, देणें; आवाज करणें; ओरडणें. 'तव कोकिळा बाहती सुंदर।' [ सं. आह्वान; वि+आ+ह्वे=हांक मारणें ]

**बाहणें**—सक्रि. पेलणें; वाहणें. 'मत्स्ययंत्र गगनोदरीं। धनुष्य बाहूनि भेदन करी।' -मुआदि ३९.८०. [ सं. वह्=वाहून नेणें ]

**बाह(हा)त्तर**—वि. ७२ ही संख्या. [ सं. द्विसप्तति ]

**बाहदार-दारी**—विप्र. बाहीदार व बाहीदारी पहा.

**बाहदाल**—क्रिवि. (ना.) निदान; पण; परंतु 'तें सोनें, बाहदाल पितळ तरी असेलच.' [?]

**बाहरी**—स्त्रीवि. बहर, बहरी, बहार.

**बाहलकंबन**—वि. मानेच्या दोन्ही बाजूस आयाळ असलेला (घोडा)

**बाहला**—पु. दूध काढण्याचे वेळीं गाईचे पाय बांधण्याची दोरी; भाला. (क्रि० घालणें; बांधणें; लावणें) 'स्वयें वासरूं गाय दुहितां। बाहला न लगे सर्वथा।'–एभा २९ ९९७ [बाहु]

**बाहवा**—पु. एक औषधी झाड याला पिंवळीं फुलें व हातभर लांबीच्या काळया शेंगा येतात शेंगांतील मगज काळा व चिकट असून औषधी आहे झाडाची सालहि औषधी व कातडी कमावण्याच्या उपयोगी आहे. –झाको (व) १०० [सं आरग्वध] **बाहवा-ये पंचक**–न. काढयात घालण्याचीं बाहवा इ० पांच औषधें.

**बाह(हा)ळ**—स्त्री. उपरणें, पासोडी इ० अंगाभोंवतीं गुंडाळून डाव्या खांद्यावर त्याचा शेवट घेण्याची पद्धत (क्रि० घेणें; घालणें; टाकणें). (देशावर बाहाळ घेणें–टाकणें याचा अर्थ पांघरणें असा करतात). [सं. बाहु]

**बाह(हा)ळ**—पु. विस्तार. 'तो गीतेचिया बाहळीं। वेदबीज गेलें पाहाळीं।'–ज्ञा १८.१५११. –वि. १ पुष्कळ २ तापवून पातळ केलेलें (तूप, काकवी, मध इ०). [सं. वह्] **बाह(हा)ळणें**–अक्रि. बाहळ किंवा उष्णतेनें पातळ होणें, द्रवरूप होणें.

**बाहळा**—वि बाडा; अंगावर ठिपके किंवा पट्टे असलेला (बैल, कुत्रा).

**बाहाकणें**—अक्रि. (महानु) स्फुरणें, भरून राहणें 'बाहा काति आणु आणी परिमळीं।'–दाव १५९.

**बाहाड, बाहाण, बाहाणा, बाहाणें, बाहात्तर, बाहादूर, बाहाद्दर, बाहार, बाहाल**—बहाड, बहाण इ० पहा

**बाहाला, बाहावा, बाहावापंचक, बाहाळा**—बाहला, बाहवा, बाहवापंचक, बाहळा इ० पहा.

**बाहारी**—स्त्री. (खा.) सून.

**बाहा(हि)ळी**—स्त्री. १ साजुकपणा. २ महत्त्व. ३ अतिशयपणा; बाहुल्य; भर. 'तेथ सप्त पौळीं। रत्नतेजाची बाहाळी।' –शिशु ३२२. [सं. बहुल]

**बाहिजु**—क्रिवि बाहेर. 'बाहिजु भीतरी ये दोन्ही नाहीं।' –ज्ञागा २९५. [बाहिर+उजु; सं. बाह्य+ऋजु] **बाहिजे**–क्रिवि. (महानु.) बाहेरील; वरचा. 'बाहिजे दृष्टी प्रियारूं। भीतरूं कुडा।' –ज्ञाप्र ७४९.

**बाहिरी**—स्त्री. व्यभिचारिणी स्त्री. [बाहेर] **बाहिरची**–वि. बाहेरची (विटाळशी). **बाहिरबाहिरा, बाहिरीबाहिरी**–क्रिवि. परभारा, बाहेरचेबाहेर. 'काटियां कांटी झाडावी। बाहिरीबाहिरी।'–शिशु ४९४. **बाहिरभूमिस**–क्रिवि. शौचास, परसाकडेस 'तंव तो तपोधन मात्रा ठेउनि। बाहिरभूमिस दुरि गेला।' –पंच १.२८

**बाही**—स्त्री. १ (खांद्यापासुन मनगटापर्यंतचा) सबंध हात. २ अंगरख्याचा हात; अस्तनी. 'रक्तवस्त्रें भिजली बाही।'–ऐपो १६१. ३ दाराच्या चौकटीचे दोन बाजूचे दोन उभे खांब. 'दारापासीं येवोनि त्वरित। बाह्यासी लाविले दोन्ही हस्त।'–मह्किकथा ५२३ ४ बाजू 'कुंचे ढळती दोहीं बाहीं।'–तुगा २७८ ५ (व.) मत; बाजू. 'आमच्या बाहीं तो मेला.' ०**देणें**–खांदा देणें, मदत करणें; हातभार लावणें. ०**धरल्याची लाज धरणें**–आश्रयास आलेल्याचें धर्मबुद्धीनें रक्षण करणें; त्याची बाजू घेण्यांत अभिमान धरणे **बाह्या थापटणें-पिटणें-मारणें**–लढण्याला तयार असल्याबद्दल दंड थोपटणें; कुस्तीला तयार असणें **बाह्या (बाही) फुरफुरणें-फुरारणें-उसासणें-उडणें**–अंगांत लढण्याची खुमखुमी येणें, मारामारीला उत्सुक असणें. ०**दार**–वि. १ प.ठीराखा; मदत करणारा; बाजू घेणारा २ हमी देणारा; जामीन होणारा, राहणारा. ०**दारी**–स्त्री १ मदत; पाठिंबा २ जामिनकी, हमी, जिम्मेदारी (क्रि० करणें). ०**दुट्टा**–पु १ चोळीच्या बाह्या होण्याइतका खणाचा किंवा कापडाचा तुकडा २ चोळीच्या दोन्ही बाह्या, अस्तन्या. ०**बळ**–न मनगटातील ताकद, शरीरसामर्थ्य; बाहुबल

**बाही देणें**—(खा.) पीक खोळपून काढणें.

**बाहीचा वसूल**—पु गांववसुलाच्या, पोत्याच्या रकमेपेक्षा खजिन्यात अधिक येणारी रक्कम. यांतूनच पाटील व कुलकर्णी यांचे पगार देत असत

**बाहीर**—क्रिवि बाहेर [सं बहिः]

**बाहु**—पु १ सबंध हात; भुज २ वरचा हात; दंड ३ सरळरेषांनीं बनलेल्या आकृतीची बाजू; बहुकोनाची बाजू ४ काटकोन त्रिकोणाचा पाया ५ भुजशब्द अर्थ ५ पहा ६ (नृत्य.) खांद्यापासून मनगटापर्यंतचा भाग. नृत्यामध्यें बाहूच्या योगानें केले जाणारे पुढील दहा अभिनय सांगितले आहेत–१ अधोमुख, २ ऊर्ध्वसंस्थ, ३ तिर्यक, ४ अंचित, ५ अपविद्ध, ६ प्रसारित, ७ स्वस्तिक, ८ उद्वेष्टित ९ मंडलगति व १० पृष्ठानुसारी. [सं.] ०**ज**–पु. क्षत्रिय. 'प्रभु बाहुजकुलमणि।'–आय २८. [वै. 'बाहूराजन्यः कृतः।'–ऋग्वे १० १०८.] ०**दंड**–पु. १ वरचा हात; दंड. २ सबंध हात. 'हीरागर्दे शोभति बाहुदंडीं।'–सारुह ८.१५२. [सं.] ०**बल-बळ**–न. शरीरसामर्थ्य; मनगटांतील ताकद–शक्ति; कपट, मंत्रतंत्र युक्ति इ० निरपेक्ष केवळ शारिरिक शक्ति. [सं.] ०**भूषण**–न. दंडांत बांधण्याचा अलंकार. [सं.] ०**मूल**–न. खाक; काख, बखोटा.

[ सं.] ०युद्ध–न. द्वंद्वयुद्ध; मल्लयुद्ध; कुस्ती [ सं. ] ०वट–न. १ हात. –शर २ दंडावरील दागिना 'वाकि, बाहुवटें, बाजुबंद, बाळी।'–आपू १८. ०वीर्य–न. बाहुबल [ सं ] ०स्फुरण–न. बाहूनां स्फुरण चढणें; हात शिवशिवणें ( युध्दाकरता इ० ). [ सं.] बाहुटा–टी–पु न. १ बाहुमूला( खाके )पासून कोपरापर्यंतचा हात २ खांद्याच्या साध्याचा भाग, बखोटा. ३ स्त्रियांचें एक बाहुभूषण; वांकी बाहुळा–पु ( राजा ) बखोटा; बाव्हळा; बाहू–पु हात; भुज ( अशुद्ध ) बाहुझोंबी–स्त्री द्वंद्वयुद्ध; कुस्ती. 'तुम्हीं बाहुझोंबी घेतां म्हणोन।' –ह १९.१४० बाहूफुगणें–(एक शौर्याचें लक्षण ) हात फुरफुरणें. बाहे–पु १ बाहु; हात. 'सप्राणें आफळली बाहे।' –उषा १४१९ २ (ल.) आधार. 'मोडूनि श्रद्धेची बाहे।' –ज्ञा १७४१४

**बाहुटा**—पु निशाण; ध्वज; पताका [ हिं. ]

**बाहुला**—पु १ कापड, लाकूड, माती यांचा बनविलेला पुतळा; पुरुषाची प्रतिकृति (विशेषतः मुलींच्या खेळण्यांत), भावला २ बुजगावणें. 'कां तृणाचा बाहुला। जो आगरामेरें ठेविला। तो साचचि राखिता कोल्हा। मानिजे ना।'–ज्ञा १८.८३८ बाहुली –स्त्री. १ पुतळी. खेळण्याची भावली २ डोळ्यांतील पुतळी डोळ्यात दिसणारें प्रतिबिंब; त्या प्रतिबिंबाची जागा. ३ मोटेचा चाकदांडा ज्यांवर बसविलेला असतो ते दोन खांब; बुटली ४ ( व. ) तसबीर. [ वे बहुली, बाहुली ] ०देणें–दुष्कृत्य करण्यास प्रवृत्त करणें; दुष्कृत्यास प्रोत्साहन देणे. बाहुलें–न. बाहुली अर्थ १ व ३ पहा बाहुलेंभोरपी–पु कळसूत्री बाहुल्यांचा खेळ करणार मनुष्य. बाहुलेभोरीप–न. कळसूत्री बाहुल्यांचा खेळ

**बाहुलें**—न लग्नांतील बोहलें; बहुलें 'आला मंडपिं भूपती मग त्वरें तें बाहुलें निर्मिलें।'–अकक २ अनंत, सीतास्वयंवर ९९.

**बाहुल्य**—न. विपुलता; समृध्दि; अतिशयता [ सं. ]

**बाहेजमा**—स्त्री. उपऱ्या लोकांवर बसविलेला कर; खेड्यांतील मूळचे रहिवासी नव्हत अशा लोकांवर बसविलेला कर [ सं बाह्य= बाहेरील. वरकड+अर. जमा ]

**बाहेर**—क्रिवि. १ आंतल्या बाजूहून भिन्न ठिकाणीं; आंत नव्हे असें. उदा० घराबाहेर. २ विशिष्ट देश–काल–मर्यादा उल्लंघून; शिवाय; वेगळा. उदा० महिन्याचे बाहेर; शिरस्त्याबाहेर. ३ स्त्रीनें आपल्या नवऱ्यासबंधीं बोलतांना योजावयाचा शब्द. 'बाहेर सांग कीं जेवायाचें झालें आहे.' याच्या उलट नवरा जेव्हां आपल्या पत्नीसंबधानें बोलतो तेव्हां तो घरांत हा शब्द वापरतो [ सं बहिस्; प्रा बहिरो; म. बाहिर बाहेर ] म्ह० बाहेरचे शत्रु पुरवतात पण घरांतील भेद पुरवत नाहीं –टिले १ ३६. ( बाप्र ) ०करणें–विकून टाकणें; काढून टाकणें. दूर करणें ( जिन्नस, माल- मत्ता इ० ). ०काढणें–हद्दपार करणें 'दाहिजे प्रजळती वैरी चिंतिती आन। बाहेर काढिले।'–वमा ४ ०जाणें–१ (स्त्रियांच्या भाषेत) लघवीला जाणें २ परसाकडे जाणें, बहिर्दिशेस जाणें. ०निघणें–पडणें–विवाहित स्त्रीनें आपला नवरा सोडून परपुरुषाकडे जाणें, घर सोडणें, गृहत्याग करणें. ०बसावयास जाणें–१ मित्राच्या घरीं बसण्याकरतां जाणें २ शौचास जाणें; बहिर्दिशेस जाणें. सामाशब्द– ०कोट–पु १ बाहेरील तट किंवा किल्ला; आंतल्या तटाच्या बाहेरील तट २ आंतील तट व बाहेरील तट याच्या दरम्यानची जागा. ३ किल्ल्याच्या बाहेरील प्रदेश. ०ख्याल–पु रंडीबाजी; बहिर्व्यसन [ फा खियाल् ] ०ख्याली–स्त्री. व्यभिचार, रंडिबाजी –वि. १ छिनाल; रंडिबाज; बदफैली; व्यभिचारी २ बाहेरचा नाद–छंद–चटक–तलप–व्यसन–वेड–संवय असलेला ०गांव–पुन मोठ्या गावाच्या बाहेर असलेला लहान गांव, उपग्राम ०चार–पु स्वैराचार; रंगेलपणा; बदफैलीवृत्तीनें राहणें. घरचारच्या उलट. ०चारी–वि स्वच्छंदी; रंगेल; घराबाहेर स्वैर वागणारा; रांडबाज ०चाल–चाली, बाहेरची चाल–स्त्री. ज्योतिषशास्त्रविषयक वेळ, काल. नक्षत्रांची विशिष्ट संज्ञा सूर्य नक्षत्रापासून चालू नक्षत्रापर्यंतच्या सात सात नक्षत्रांचे गट करून त्यांतील पहिल्या बारांस आंत चालीचीं आणि पुढील तिहीस बाहेर चालीचीं नक्षत्रें म्हणतात आंतचाल पहा ०बट्टा–पु नाण्याची देवघेव करताना मिळालेला फायदा ( याच्या उलट आतबट्टा=नुकसान ): नाण्याच्या अदलाबदलीच्या वेळीं द्यावयाची वटणावळ. ०भि( भी )तर–क्रिवि. बाहेर किंवा आंत: बाहेरील बाजूस किंवा आंतील बाजूस; आंतबाहेर; कोठेंहि किंवा कोणत्याहि ठिकाणीं. 'तो घोडा कोठें बाहेरभितर असेल त्यास शोधून आण.' [ हिं ] ०मुदी–स्त्री बाह्यशोभा, देखावा; बहिरंग –वि बाहेरून डौल करणारा. 'तुका म्हणे बाहेरमुदी। आहाच गोविंदी न सरती।'–तुगा २८८० [ सं. मोद=आनंद ] ०रव, बाहेरव, बाहेरवसा, बाहेरवासा–पु बाहेरची बाधा पहा ०वाटेची असणें–व्यभिचारी, बाहेरख्याली असणें 'तारा बाहेरवाटेची आहे'–ह्रप, झांकलीमूठ १२८. ०वार–न. ( राजा. ) बाहेरील आवार; बाहेरील बाजू, प्रवेश, आंगण. [बाहेर+आवार] ०वारा–क्रिवि ( राजा ) ( घराबाहेरील किंवा आवाराबाहेरील ) मोकळ्या जागेंत–जागेवर; बाहेर [ बाहेरवार ] ०सवडी–स्त्री. बाह्यदृष्टि. 'हेंचि पहावयालागीं। नावेक वोलिलों बाहेरसवडिया भंगीं।' –ज्ञा १० ३२६ –क्रिवि. बाह्यत.; वरपांगी. बाहेरचा–वि. १ बाहेरील बाजूचा; बाहेरील २ परका; तिऱ्हाईत; कुटुंबांतील नसलेला ( नौकर इ० ). ३ हलक्या जातीचा ( अस्पृश्य. महारमांग, भंगी इ० ) ४ न्हावी ( ब्राह्मण विधवा स्त्रियांच्या भाषेंत ). बाहेरचा छंद–नाद–पु. रंडीबाजी. बाहेरची–वि ( बायकी )

विटाळशी ( क्रि० होणें; बसणें ). **बाहेरची पीडा**-स्त्री. उपदंश, गर्मीचा रोग **बाहेरची बाधा, बाहेर बाधा**-स्त्री भूतबाधा, भुतानें, पिशाच्यानें इ० झपाटणें. ( क्रि० लागणें; होणें, असणें ). **बाहेरचें**-न. (बायकी) भूतबाधा **बाहेरला, बाहेरील**-वि. १ बाहेरचा पहा. २ पृष्ठभागावरला **बाहेरली, बाहेरली पीडा-बाधा**-बाहेरची पीडा पहा. **बाहेरलें**-न. १ (व) भूत पिशाचाची बाधा, पीडा, त्रास. २ (व. ल.) नपुंसक. **बाहेरा**-पु (जंबिया) आपल्या हातातील जंबियानें जोडीदाराच्या उजव्या कानशिलावर केलेला वार. **बाहेरील**-वि. बाहेरचा पहा. **बाहेरील टांग**-स्त्री. (कुस्ती) आपल्या एका हातानें जोडीदाराचा हात आपल्या बगलेंतून घेऊन आपल्या दुसऱ्या हातानें त्याचें मनगट धरावें. आपल्या ज्या बगलेंत जोडीदाराचा हात धरला असेल त्याच बाजूच्या आपल्या पायाने जोडीदाराचा गुडघ्यापासून घोटयापर्यंत पाय अडकवून त्याला झोका देऊन पाडणें. **बाहेरून**-क्रिवि. बाहेरच्या बाजूनें; बाहेरच्या बाजूकडून. **बाहिरलू**-वि. बाहेरचा. ' आंगौनि एकुणा झोलु। फेडिताचि तो बाहिरलु। ' -अमृ २.४८.

**बाहो**—पु. बाहु, हात.

**बाहोला-ली-लें**—बाहुला इ० पहा

**बाह्य**—पु. १ इंद्रियगम्यविषय; बाह्यविषय; जडद्रव्य ' जयातें बाह्याची भाष । नेणिजेचि निःशेष । ' -ज्ञा ५.१३०. २ इंद्रिय. -वि. बाहेरील; बाहेरचा. ( बाह्य शब्द उत्तरपदीं येऊन बाहेरील, पलीकडचा, विषय नसलेला इ० अर्थी याचे इतर पुष्कळ समास होतात. उदा० आचार-इंद्रिय-पंथ-जाति-धर्म-रीति-लोक-विचार-शास्त्र-संप्रदाय-विधि-व्यवहार-प्रमाण-बुद्धि-ज्ञान-बाह्य ). -क्रिवि. बाहेरच्या बाजूस. ' नाना परींच्या घेतल्या कुंथी। तरी अंतर-शोभा बाह्य फाकती। ' -एरुस्व १५.३७. [ सं. ] **०गोल**-वि ज्याचा पृष्ठभाग गोल असून बाहेर आलेला आहे असा. याच्या उलट अंतर्गोल. **०प्रयत्न**-पु. शब्दोच्चार करण्यात श्वासाच्या होणाऱ्या दोन मोठ्या क्रियापैकीं दुसरी-ओठाबाहेर पूर्ण शब्दोच्चार होण्याची-वागिंद्रियाची क्रिया. यात एकंदर वागिंद्रियाचे निरनिराळे अकरा प्रयत्न आहेत. आभ्यंतरप्रयत्न पहा. **०लिंग**-न. (गो) बाह्याग. **०वटे**-क्रिवि बाह्यात्कारी. [प्रा] **०स्थिति**-स्त्री. ( एखाद्या वस्तूची, बाबीची ) बाहेरील स्थिति, अवस्था. [ सं. ] **०स्फूर्ति**-स्त्री. बाहेरील वस्तूचें अस्तित्व समजण्याचें ज्ञान; बाहेरील वस्तूंचा भास; बाह्यज्ञान. ' बाह्यस्फूर्ति मावळली। ' -एरुस्व १८७. [ सं. ] **बाह्यात्कारीं**-क्रिवि १ बाहेरील बाजूस; बाहेरून. २ (ल.) उघडपणें; मोकळेपणें. ३ बाह्यतः; वरवर; दिसण्यांत वरपागीं ( मनापासुन, प्रामाणिकपणें नव्हे असें ). ' हे दोघे बाह्यात्कारीं गोडीनें बोलतात परंतु आंतुन द्वेष आहे. ' [ बाह्य+आकार ] **बाह्योपचार**-पु. (वैद्यक) पोटांत न घेतां शरीराला बाहेरून करण्याचा इलाज, औषधयोजना [ सं. बाह्य+उपचार ]

**बाह्या**—( महानु ) बाहुबळ, बाहू. 'मोक्षाचा बाह्या गेला।' -भाए ९१ [ सं. बाहु ]

**बाह्या**—पु डगा, पखवाजाची; धुमाची बाजू; धुमाडा; हा डाव्या हातानें वाजवितात म्हणून यास हें नांव पडलें हा लांकडी किंवा बहुधा तांब्या-पितळेचा असतो. वरचें मोकळें तोंड कातड्यानें मढविलेलें असून त्यावर तसुभर व्यासाची वर्तुळाकार शाई घातलेली असते. [ हिं. बाह=डावा; सं. वाम, हिं. बाय ]

**बाह्व**—पु बाहवा पहा.

**बाळ, बाळक**—न. १ बालक; लहान मूल. २ -पु मुलगा; शिशु. ' जसा वारावा चपळ बाळ बापानें। ' -मोभीष्म ११ ६९. -वि १ लहान; अल्पवयी. २ मूर्ख. ' पंडित न गमसि जरि बहु पांडित्यहि करिसि दिससि बाळ मला। ' -मोकर्ण ४१ १८. ३ अजाण. ' तुमजे बाळासि किमपि ... । ' -मोमौसल ११. [ सं. बाल=मूल; बाल+क=बालक ] **म्ह०** असतील बाळ तर फेडतील काळ **०आंबा**-पु कच्चा किंवा हिरवा आबा. **०कडू-डूं**-न १ लहान मुलाना किराईत वगैरे कित्येक कडू औषधें ( विशेषत सकाळीं ) उगाळून पाजतात तें; घुटी. २ (ल.) लहानपणीं मिळालेलें शिक्षण किंवा वळण. **बाळकडू असणें**-उपजत प्रवृत्ति किंवा गुण असणें; गोडी असणें. ' कोळशाच्या मुलाना पोहोण्याचें बाळकडूच असतें. ' **बाळका**-पु. गोसाव्याचा शिष्य [ बालक ] **०क्रीडा**-स्त्री लहानपणींचे लहान मुलाचे खेळ. [सं बालक्रीडा] **०खुंट**-पु. केळीच्या खुंटास नवीन फुटणारा कोंभ; मोना. **०गळा**-पु. लहान मुलाचा बारीक आवाज, न फुटलेला आवाज. **०गुंडा**-पु. बालगुंडा पहा. **०गोपाळ**-पुअव. १ (कृष्णाचे खेळगडी, गवळ्यांचीं पोरें यावरून ). लहान मुलें; लहानमोठीं एकत्र जमलेलीं मुलें. २ एकत्र जमलेलीं गावातील लहानथोर माणसें. ' महाराज, हे सर्व बाळगोपाळ मिळाले आहेत. त्याजवर आपण दया करावी. ' [ बाळ+गोपाल=गवळी ] **०चरित-त्र**-न. लहानपणचें चरित्र; बालक्रीडा. [ सं. ] **०छंद**-पु. लहान मुलानें घेतलेला चाळा, हट्ट. [ सं. ] **०टोळ**-पु. लहान व हिरवा टोळ. **०टोंक-ढोंक**-पु. बगळा. **०ताड**-पु. नर जातीचा ताड. यास फळें यत नाहींत **०दशा**-स्त्री. बाल्य; बाळपण; बाल्यावस्था. ' लोपली उघडे बाळदशा। ' -ज्ञा ६.२६०. [ सं. ] **०दांत**-पुअव. लहानपणचे किंवा पहिले दांत; दुधाचे दात **०दृष्टि**-स्त्री. तारुण्यांतील बारीक व लाबची वस्तु जिनें दिसते अशी दृष्टि; जोमदार दृष्टि. [ सं. ] **०पणचें लोणी**-न. पहिल्यानें व्यालेल्या गाईच्या किंवा म्हशीच्या दुधावरील लोणी. **०परवेशी-पर-**

वशी-परवशी-स्त्री. बालपरवेशी पहा. ०पाठ-पु. लहानपणीं शिकलेली विद्या; लहानपणींची शिकवण. [सं] ०फूट-न १ बाळआंबा. २ रुपया इ०कांस असलेली बारीक चीर. ०फोक-पु (नाजुक किंवा कोंवळी फांदी यावरून) तरुण; तरणाबांड, आडबाप्या ०बद्-बोध-वि. बालबोध पहा. ०बंद्-न बाळबोध, देवनागरी लिपी. ०बोध किस्ता-पु. (ल) उदार धोरण. 'मी मुंबई इलाख्याचा कारभार चालवितांना.. एल्फिन्स्टन यांनीं घालून दिलेला बाळबोध किस्ता वळवीन.' -टिले १४३६ ०बोध वळण-न. साधी रीत; जुनी, सनातनधर्माची रीत. ०बुद्धि-स्त्री मुलाची बुद्धि -वि. पोरकट समजुतीचा. अज्ञानी, पोरबुद्धि; लेकुरबुद्धि ०बेल-न. बेलाचें कोंवळें फळ. ०ब्रह्मचारी-भाषा-मित्र-इ० बालमध्यें पहा ०भिकारी-पु जन्मापासून भिकारी. याच्या उलट गर्भश्रीमंत ०भूक-स्त्री. (मुलाची भूक यावरून) वरचेवर, घटकेघटकेला लागणारी भूक. ०भोंक-न. १ बगळा; बाळढोंक. २ (ल.) लांब मानेचा इसम; लांबमान्या. ०भोग-पु. १ प्रात:काळची पूजा झाल्यानंतर देवाला अर्पण केलेला उपहार. २ (यावरून ल) लहान मुलांचा सकाळचा फराळ. ३ अशा नैवेद्याचे किंवा फराळाचे पदार्थ. (क्रि० देणें; करणें). ४ (सामान्यत:) हिस्सा; वांटा; भाग. (क्रि० करणें). ०मति-स्त्री. अज्ञान 'रत्नें म्हणोनि भरि इंगळ जेंवि खोळे। घे काळ बाळमति पाहति लोक भोळे।' -आपू २९. ०मायणी-स्त्री. गाडीच्या चाकाच्या आंतील बाजूचा वसु, आंतील वसवी; कणा आखरींत भक्कम करण्याची लोखंडी चाकी(माण) बाळमाइनी ०मुकी-स्त्री.१ मेजवानीच्या किंवा फराळाच्या वेळीं गुपचूप वानगी म्हणून राखून ठेवलेला एखादा जिन्नस किंवा घास २ असा राखून ठेवलेला नसेल त्यास दंड द्यावा लागणें किंवा दिलेला दंड (क्रि० लागणें). ०मुंज्या-पु. लहानपणापासून मुंज्या; मोठा झाला असला तरी अविवाहित किंवा ब्रह्मचारी असलेला मनुष्य. ०रंडा-रांड-विधवा-स्त्री. बालरंडा पहा ०राजा-पु पुंड, धीट किंवा दांडग्या मुलाला लाडिकपणें लावण्यात येणारा शब्द. [सं] ०लेणें-ल्याणें-न. लहान मुलाच्या अंगावर घालावयाचे बिंदली इ० दागिने. 'विषयाचें बाळलेणें।' -शिशु ९२. ०वाटी-स्त्री १ सकाळचा अल्पोपहार, न्याहारी; बाळभोग. (क्रि० झोकणें; चढविणें; करणें; खाणें; होणें) २ वाटा; भाग; हिस्सा. ०वैद्य-पु. लहान मुलांचा वैद्य. ०शब्द्-पु. लहान मुलांसारखें बोलणें, आवाज, उच्चार. 'बाळशब्दें खेळवील तनुजाला।' ०शिर-न. (कों.) बाळंतिणीला तिच्या मुलाकरितां धर्मार्थ दिलेलें दूध, भांडीं व इतर आवश्यक वस्तू इ० [सं. बाल+क्षीर] ०सरस्वती-स्त्री. बालसरस्वती पहा. ०सवत-स्त्री (बायकी) लहानपणापासूनची सवत. [बाल+सं. सपत्नी] ०स्वार-वि. १ लहानपणापासून घोड्यावर बसणारा. २ (ल.) लहानपणापासून एखाद्या शास्त्रांत किंवा उद्योगधंद्यांत प्रवीण असलेला; जन्माभ्यास असलेला. ०हिरडा-हरडा-डी-हुतकी-पुस्त्री. बालहरीतकी; कोवळा बाळबिलेला हर्डा; हें एक औषधी फळ आहे. ०भारी-हिरडा पहा. [सं. बालहरीतकी] बाळांबा-पु बाळआंबा पहा. बाळाभ्यास, बाळाभ्यासी-बालाभ्यास, बालाभ्यासी पहा. बाळामराई-स्त्री. आंब्याच्या लहान झाडांची बाग. [बाळ+आमराई] बाळायती-वि. बाळ; लहान. 'त्या बाळायती गोपीतें। हरिलें दैत्य वेषें तेथें।' -रास २.३६०. बाळेभोंक-न. बाळभोंक; बगळा. बाळेभोळे-वि. अज्ञ आणि भोळसर. 'माया दुस्तर शास्त्रप्रसिद्धी। तेथें बाळेभोळे स्थूळ बुद्धी।' -एभा ३.२२४. बाळोपचार, बाळोपचारी-बालोपचार-री पहा.

बाळकी—स्त्री. (गो.) उचकी.

बाळकें—न. १ छाया. २ प्रतिबिंब. -मनको [प्रा]

बाळगण—स्त्री (मुलें, गुरेंढोरें इ०कांचें) पालन; जोपासना. [बाळगणें] बाळगणा-वि. (राजा.) लहान मुलाची किंवा गुरांवासरांची काळजी घेणारा; लहान मुलांना संभाळणारा. [बाळगणें]बाळगणावळ-स्त्री मुलें, गुरें इ० बाळगण्याबदल द्यावा लागणारा पैसा, मजुरी. बाळगणें-सक्रि. १ संभाळणें; वाढविणें; काळजी घेणें; पालन करणें २ राखणें; पदरीं ठेवणें; आश्रय देणें (सैन्य, परिवार इ०स) ३ धरणें; राखणें; जवळ असणें; ठेवणें (अभिमान, गर्व, कर्ज इ०). 'तो विद्या बाळगतो.' 'पैका असून कर्ज कां बाळगतां?' बाळगील-स्त्री. १ (कों) मुलें, गुरें इ० संभाळण्याचें काम किंवा कष्ट. २ (ल) जीं संभाळण्याची जबाबदारी आपणावर आहे व जीं संभाळण्यांत फार श्रम व त्रास होतो अशीं मुलें किंवा गुरें इ० समुच्चयानें

बाळगुंडा—बालगुंडा पहा.

बाळणें—सक्रि. (कापडाचें दुकान) विकलेली वस्तु विकत घेणाऱ्याला देणें; त्याच्या स्वाधीन करणें; विकणें.

बाळणें—सक्रि. (व) जाळणें (कापूर, ऊद, उदबत्ती, राळ इ०). [गु.]

बाळणें, बाळंद्रा—नपु. (गो. कु) देवळासमोरील मंडपाला दोन्ही किंवा चारी बाजूंनीं बसण्याकरतां केलेला चिरेबंदी कट्टा; बलाणी. यावर मतमानकरी बसतात.

बाळंत—स्त्री. १ नुकती प्रसूत झालेली स्त्री (क्रि० होणें). २ (व.) आपली फाजील काळजी घेणारा मनुष्य; स्वत:चें नेहमीं कोडकौतुक करणारा इसम. 'आली बाळंत डोकें गुंडाळून.' [सं. बालवती]०काढा-पु बाळंतिणीस वैद्यकांत सांगितलेला द्यावयाचा काढा. ०खोली-स्त्री. बाळंत होण्याची खोली; ज्या खोलींत बाळंत स्त्री असते ती खोली. ०घर-न.१ज्या खोलींत किंवा घरांत स्त्री

बाळंत झाली आहे त्याला सोहेर फिटेपर्यंत (दहा दिवस) म्हणतात. २ बाळंतखोली. ०**चुडा**–पु. बाळंतिणीचा सोहेर फिटल्यानंतर तिला भरावयाच्या बांगडया. ०**निंब**–पु. निंबाची एक जात; कडु निंब. ०**पण**–न. १ प्रसुति. २ बाळंतिणीची चाकरी; सुश्रूषा. ३ (ल.) एखादें कार्य होऊन गेल्यावर त्यासंबंधीं पुढें करावयाची व्यवस्था. ०**बोळ**–पु. काळा बोळ; हा एका झाडाचा वाळलेला डिंक असून बाळंतिणीला देतात. **बाळंत(ते)र, बायंटेर**–पुन (गो.) बाळंतपण. **बाळंत रोग**–पु. बाळंतिणीस होणारा क्षयरोग; सुतिकारोग. याचीं लक्षणें:–ज्वर, अतिसार, ग्लानि, शूळ, अशक्तपणा इ०. हा रोग कष्टसाध्य आहे. ०**विडा**–पु. बारशाला किंवा त्यानंतर बाळंतिणीस तिच्या इष्टमित्रांनीं, नातेवाईकांनीं द्याव याचा विडा, ओटी, खण, कुंची, बाळलेणें इ० ०**शेप-शोप**–स्त्री. शेपेचा एक प्रकार; यापासून औषधी तेल निघतें ही स्निग्ध व गोड असते. पानथरी, जंत व मूळव्याध या रोगावर व वातकफावर उपयोगी आहे. [ सं. शतपुष्पिका; हिं. सोयासोयेके बीज] **बाळंतीण**–स्त्री. नुकतीच प्रसुत झालेली स्त्री, बाळंत **बाळं(ळां)तें, बाळवतें**–नअव. बाळंतिणीच्या मुलाचीं आणि तिचीं वस्त्रें इ० ' त्रिभुवनपाळा बाळात्याचें पांघरवीजे लुगडें वो।' –मध्व २३

**बाळंदा-धा**—पु. १ मुलें वाढविण्यांत, त्यांची जोपासना करण्यांत भोगावा लागणारा हरएक प्रकारचा त्रास किंवा काढाव्या लागणाऱ्या खस्ता. २ हरएक प्रकारचा त्रास देणारीं मुलें, गुरें, बायका इ० खटलें. ३ लहान मुलांचें लेणें; अंगावर घालण्याचे दागिने. [ सं. बाल+धा=धारण करणें ]

**बाळदिंडु**—न. (तंजा.) केळीचें काल. [ का. बाळेदिंडु; बाळे=केळें+दिंडु=काल ]

**बाळदी**—वि. बैल किंवा गाय यांच्या कातडयाचा (जोडा). याच्या उलट म्हसरी. ०**जोडा**–पु. उंची जोडा; अधोडी जोडयाहून उच्च प्रतीचा जोडा.

**बाळ(ळी)बुगडी**—स्त्री. दागदागिन्याबद्दल व्यापक अर्थाचा शब्द. बाळी व बुगडी.

**बाळंबोळ**—क्रिवि. तोंडोतोंड; कांठोकांठ; पूर्ण माप भरून. (क्रि० घालणें; भरणें; भोजणें; मापणें).

**बाळवणें**—सक्रि. (व.) चोरणें. ' आमचें पुस्तक कोणीतरी बाळवलें.' [ फा. बाला ]

**बाळवांगी**—स्त्री. वेलवांगी पहा.

**बाळसंतोष**—पु. भिकाऱ्यांचा एक वर्ग किंवा त्यांतील एक व्यक्ति. हे भिकारी बाळसंतोष हा शब्द मोठ्यानें म्हणून जुने कपडे मागतात. यांच्या अंगावर नाना रंगाचीं वस्त्रें असतात ' बाबा बाळसंतोष, बाबा बाळसंतोष, नाम घेतां हरती दोष।' –दावि ५०१. [ सं. बाळ+संतोष ] (वाप्र ) उघडाबोडा बाळसंतोष–वि. १ निर्धन. २ ज्यास कोणी मागेंपुढें नाहीं असा.

**बाळसांगाडा**—पु. (मल्लविद्या) आपल्या एका पायावर जमिनीवर असलेल्या जोडिदाराचा घोटा धरून पाय उचलून आपला पाय जोडीदाराकडील पायाच्या आंतील घोटयाकडील बाजूनें घालून जोडीदाराच्या पायाचा पंजा आपल्या जांगाडयांत धरून व आपला गुडघा जमिनीवर टेंकून जोडीदारास मारणें. [बलसांगड=माणसाला जोरानें दाबून अडकवून टेवणें, यावरून झाला असावा ]

**बाळसें**—न १ मूल साधारणतः एक वर्षाचें होईपर्यंत त्याच्या अंगावर दिसणारी पुष्टता; तान्ह्या किंवा लहान मुलांचा गुबगुबीतपणा; लठ्ठपणा. (क्रि० घेणें; येणें) ' ऐसें लेंकरूं एक। प्रसवली हे वेख। जयाचें तिन्हीलोक। बाळसें गा।' –ज्ञा १४.१०६. २(ल.) टवटवी; तजेला; नवीनपणा; कांति (तारुण्याची किंवा बाल्यावस्थेची) [ बाळ ] ०**दार**–वि गुटगुटीत; गुबगुबीत; लठ्ठ; बाळसें घेतलेला; गोंडस.

**बाळसावणें, बाळसणें**—अक्रि. १ गुबगुबीत होणें, लठ्ठ होणें; बाळसें येणें (तान्हें किंवा लहान मूल). २ (विशेषतः बाळसणें) माता होणें; (ल.) मूल होणें. ' बाळसलीस आतां पोरपणा करूं नको.' ३ (विशेषतः बाळसणें) पोरकटपणा करणें, मुलाप्रमाणें पोरकटपणानें वागणें [ बाळसें किंवा बाल ]

**बाळा**—स्त्री. बाला; तरुण स्त्री, नकतेंच लग्न झालेली लहान मुलगी; तारुण्यावस्थेस पूर्ण आली नाहीं अशी स्त्री. 'जैसें न सांगणेवरी। बाळा पतीसी रूप करी।' –ज्ञा १५ ४६८. [ सं बाला ]

**बाळा**—पु. बैलाला लडिवाळपणानें किंवा प्रेमानें लावण्यांत येणारा शब्द [ बाल ] **बाळया हाकणें-मारणें-देणें**–धावणें; पळणें; (मोटकरी मोट भरली म्हणजे बैलानीं ती ओढावी म्हणून बाळया असा खुणेचा शब्द उच्चारतो त्यावरून –मोल ). बाला हांकणें (म्हणजे फसवून पळून जाणें हा शब्द ) व बाळा हाकणें हा शब्द एकच असावा.

**बाळा**—स्त्री.अव. क्षुद्रदैवतें. ' जाखमाता मायराणी। बाळा बगुळा मानविणी।' –दा ४ ६.१६.

**बाळा**—पु. कानाचे चाफ्याचे भोकांत घालण्याचा चंद्रकोरी आकाराचा, दोन्ही बाजूंनीं रत्नजडित असा पुरुषाचा दागिना.

**बॉळॉ**—वि. बाहुळा; बांडा; तांबडया अगर काळया रंगावर दुसऱ्या रंगाचे पट्टे किंवा ठिपके असलेला (बैल, गाय इ०)

**बाळॉ**—पु (गो.) शाई अगर कोणत्याहि पातळ रंगाचा थेंब अगर ठिपका.

**बॉळॉ**—पु. (गो.) एक प्रकारचा मासा; (कलींचें) पिल्लू.

**बाळांडचें-बाळांदप**— सक्रि. (गो.) ओलाडणें.

**बाळांत घर-चुडा-निंब-पण-बोळ-रोग-विडा-शेप-शोप-बाळांतीण बाळांतें**–बाळंत. बाळंत घर पहा. म्ह० बाळांतीक वैजीण ही जायच. =बाळंतिणीला सुईण ही पाहिजेच.

**बाळांदर**—न. ( गो ) झाडावर राहणारा मुंगसासारखा प्राणी. हा कुशीस असलेल्या पातळ चामडीच्या योगाने पक्ष्यासारखा उडून जातो.

**बाळाणेनसीं**—क्रिवि (महानु ) सज्जामध्यें; ग्यालरींत; माडीवर. ‘ करूनि शृंघाररचना । बैसली बाळाणेनसी । ’ -भाए ३७८. [ सं. अलिंद, आलिंद ]

**बाळिंगा**—पु तरणा एडका; मेंढा ( विशेषत· झुंज खेळणारा ) २ (ल.) जवान तरुण ३ ( ल ) खूप मोठा दगड.

**बाळी**—स्त्री. ( काव्य ) कन्या; मुलगी; तरुण स्त्री. ‘ नेऊं पाहसी भीमकबाळी । ’ -एरुस्व ८ २७. [ सं बाला ] **बाळी भोळी**-वि. भावडी ‘ तेथें जावें तें बाळीभोळीं । ’ -दावि २८१.

**बाळी**—स्त्री. कर्णभूषण, कानांतील एक अलंकार. **०बुगडी**-स्त्री. बाळयाबुगडया इ० बारीकसारीक दागिने.

**बाळें**—न. (राजा.) म्हातारचळ; म्हतारपणचें भ्रमिष्टासारखें किंवा मूर्खासारखें आचरण [ बाळ ] **बाळेणें**-अक्रि खुळा वणें; म्हातारचळ लागणें वेडा होणें; झोपेंत वडबडणें [ बाळें ]

**बाळेला**—वि वेडसर झालेला. ‘ शोधी वनीं, प्रभु गमे श्री· विरही जेंवि वृद्ध बाळेला । ’ -मोवन ११.५८. [ बाळ ]

**बाळेणें**—अक्रि. विस्तार पुष्कळ होऊन फळें कमी लागणें. (फळभाजी इ०स).

**बि**—अ. ( कुण. ) सुद्धां, हि. ‘ मी बि गेलों. ’ [ सं अपि; प्रा. बि ]

**बिक**—न. १ बळ; सामर्थ्य; शक्ति. ‘गुणा सगुणपणाचें बिक । बहुवस एथ । ’-ज्ञा १ ३८. २ सौंदर्य, शोभा. ‘ योवनभारभरें बिक दाटे । संपन्न योगलीळा । ’ -दावि ११. ३ तेज; शोभा. -शर ४ डौल; ऐट ‘ हय रथ गज वहनादी उष्ट्र बसुनि मिर विसी बिके। ’-देप ६७. [सं. अभिख्या-भिख्या-बिक-राजवाडे ]

**बिकट**—वि. १ कठिण, अवघड; ( अनेक अर्थांनीं. उदा० किल्ला घेण्यास, डोंगर चढण्यास, काम करण्यास, धडा-हिशेब समजण्यास, गोष्ट घडण्यास इ० ). ‘ बिकट वाट वहिवाट नसावी धोपटमार्गा सोडुं नको । ’ -अफला ५९. २ त्रासदायक. ३ दुर्बोध. ४ अजिंक्य. ५ दु:साध्य. ६ भयंकर; निकराची; रसाकसीची (झुंझ, लढाई इ० ). ‘ अमृतरायाच्या लोकानीं । बिकट केली खणाखणी । ’ -ऐपो ८६. [ सं. विकट; तुल० का. बिक=घट्ट+कट्टु= बाधणें, बिक्कट्टु ]

**बिक(के)ण**—नस्त्री (गो. कारवारी) फणसाच्या गऱ्यांतील बी; फणसाची आठोळी; बिंगट. [ बीं ]

**बिकणी**—स्त्री. ( गो ) वायंगणांत बी विस्करण्याची क्रिया

**बिकलम**—न. १ लेखक-कारकुनाकडून लिहविलेल्या पत्रावर शेवटीं यजमान स्वत: सहीबजा जीं चार अक्षरें, रेघ इ० काढतो तें मालकाचें हस्ताक्षर. २ कधीं कधीं लेखाच्या, पत्राच्या शेवटीं लेखक हा शब्द लिहितात. -क्रिवि कलमवार; तपशीलवार [फा. बि+कलम् ] **०जुलूम**-वि. जुलमानें लिहिलेलें ‘ आपणांस नेऊन रजावंद नसतां लेहून घेतलें. मग आपण बिकलमजुलूम म्हणून दहशत खाऊन गैरहजीर होऊन तुमचे भेटीस आलों. ’ -रा २० ४२०.

**बिकुण, बिकुड**—पु. ( गो ) ढेकूण. [ ढेकुण द्वि. ]

**बिंग**—न. ( शब्द:व ल. ) १ दोष; उणीव; उणेपणा; व्यंग; न्यून, कमतरता. २ गुप्त गोष्ट; गुह्य; रहस्य ( वाईट अर्थानें ). [ सं व्यंग ] **०बाहेर काढणें-पडणें**-गुप्त गोष्ट, रहस्य उघडकीस आणणें, येणें ‘ खाडिलकरी मेनकेनें मात्र त्या भगवंताचें बिंग बाहेर काढलें. ’ -नाकु ३ ४१. **बिंगा**-वि सदोष; अपूर्ण; उणा; व्यंगयुक्त. ‘ कांहीं कर्नाटदेश तेलंगा, जगला परि बिंगा । ’-राला १०५ [ सं व्यंग ] **बिंगें**-न. १ दोष, उणेपणा, कमतरता; न्यून (कोणत्याहि गोष्टीच्या उत्कृष्टपणास किंवा पूर्णतेस जरूर असलेल्या एखाद्या गोष्टीचा ) अभाव बिंग पहा. ( क्रि० पाडणें; करणें; पडणें) ‘ त्यानें प्रयोजन चांगलें केलें परंतु तूप घाणेरें होतें एवढें बिंगें पडलें. ’ २ कोणतेंहि गैरशिस्त, नीतिभ्रष्ट वर्तन, कृति [ सं व्यंग ]

**बिंग**—पु. ( कों. ) एक प्रकारचा मासा.

**बिगट**—वि. कठिण; अवघड; (विरू ) बिकट पहा. **बिगटच्या**-वि. हेकट; तिरसट; व्यवहारास कठिण.

**बिंगट**—न. ( गो ) फणसाची आठोळी. बिकण पहा.

**बिगटणें**—अक्रि. १ ( प्र ) बिलगणें; चिकटणें. २ अगदीं जवळ येणें; गळयात पडणें. [ का. बिगिट=घट्ट असणें ]

**बिगटी**—स्त्री. ( विरू. ) विटकी पहा.

**बिगड, बिग(गा)डणें, बिगडाबिगड, बिगाड**—बिघड, बिघडणें इ० पहा.

**बिगर**—शअ. शिवाय; खेरीज; वांचून ‘ तुमच्या बिगर हें काम होणार नाहीं. ’[ अर. फा. ब-घैर; हिं. बिगर ] **०इयत्ता**-स्त्री. ( इयत्तेवांचून ) उजळणी शिकणाऱ्या मुलांचा वर्ग; बालवर्ग; शिशुवर्ग; बिगारी.

**बिगार**—स्त्री. १ मोबदला किंवा मजुरी न देतां सरकारनें किंवा सरकारी अधिकाऱ्यानें करवून घेतलेलें काम; वेठ. २ सक्तीनें काम करावयास लाविलेल्या इसमानें, जनावरानें वाहून नेलेलें ओझें. ३ (ल.) निष्काळजीपणानें कसेंबसें केलेलें काम; इच्छा नसतांना केलेलें, काम. ४ सक्तीनें; नाखुषीनें केलेला उपकार. [फा. बेगार-री] म्ह० बैठेसे बिगार भली=रिकामें बसण्यापेक्षां दुसऱ्याचें काम केलेलें बरें. **०खातें**-न. बिगारीनें करविलेल्या कामाचा बिगारी लोकांचा हिशेब ठेवणारें खातें. **०धन**-वि. ( व. ) फाल्तु. **बिगारी**-पु. १ वेठीस धरलेला माणूस; सक्तीनें कोणतेंहि काम करावयास लाविलेला इसम. २ हमाल; मजूर; कूली.

**बिगिबिगी, बिगी बिगीन**—क्रिवि. (कुण) लवकर लवकर. 'न्यारिचा वकुत होईल मैतरणी बिगिबिगी चाल।' –यशोधन. [सं. वेगेन; तुल० का. बिगि, ब्यागे=लवकर]

**बिघडणें**—उक्रि. खराब करणें; नुकसान करणें; सडविणें; नासविणें. –अक्रि. १ खराब होणें; वाईट होणें; नासणें २ (ल.) वैमनस्य, बेबनाव उत्पन्न होणें; सोईनें न वागणें. ३ (शरीरप्रकृति) नादुरुस्त होणें. ४ वेगळें होणें. 'ते दोन्ही जडतां न ते विघडती आश्चर्य वीरोत्तमा।' –आसेतु ३४. [सं. विघटन]

**बिघडाबिघड**—स्त्री. १ सर्वसाधारण खराबी; नुकसान. २ खराब झालेली; नाश पावलेली स्थिति (वस्तु, मसलत, कामकाज इ०ची). [बिघडणें]

**बिघा(घ्रा)ड**—पु. १ खराबी; नाश; नासाडी; वाईट, नुकसानकारक स्थिति. 'जैसें दुग्ध पवित्र गोड। परी लवण स्पर्शतां परमद्वाड। तेवी तूंनें घडून बिघड। आलें आहे महाराजा।' –नव १६ १५१. २ बेबनाव; भांडण, वितुष्ट; वैमनस्य. 'का कीं तूं, प्रणयें बिघाड लटिका जेव्हा मशीं दाविसी।' –केक ७१. [सं. वि+घट्]

**बिघाडणें**—(विरू.) बिघडणें पहा.

**बिघा**—पु १ जमिनीच्या मोजणीचें परिमाण; वीस पांड किंवा चारशें चौरस काठ्या हें परिमाण निरनिराळ्या प्रांतांत भिन्न आहे. पुण्या-मुंबईकडे ३९०० चौ. यार्ड, गुजरार्थेत २९५० चौ यार्ड व बंगालमध्यें १६०० चौ. यार्ड म्हणजे एक बिघा होतो २ वीस पांड जमीन. [सं विग्रह] ०**बिघोटी**–स्त्री. बिघा शब्दाची द्विरुक्ति. बिघा पहा. ०**वणी, बिघ्रवण**–स्त्री. १ बिघ्याच्या मापानें केलेली जमिनीची मोजणी २ बिघ्याच्या मापानें बसविलेला शेतसारा, फाळा, तरमबंदी. [बिघा] **बिघोटी**–स्त्री. (तिरस्कारार्थी) बिघा.

**बिचकटणें**—उक्रि. १ (प्रा.) (जमीन) वरवर उकरणें, खणणें. २ (विरू.) विचकटणें पहा.

**बिचकणें, बिचकटणें, बिचकावणें**—अक्रि. घाबरणें; दचकणें; बुजणें; एकदम भीति वाटणें; भयभीत होणें. 'चितनीं बिचकतां मन।सविवेक बुध्दिबलें आण।' –एभा १४.५०१. [सं. वि+चक्; हिं. बिचकना]

**बिचकणी, बिचकावणी**—स्त्री. दचकणी; संभ्रांत स्थिति; भिणें; बिचकणें (धातुसाधित. नाम).

**बिचका-क्या**—वि. सहजासहजीं बिचकणारा; दचकणारा; बुजरा; बुजरट. [बिचकणें]

**बिचकाव(वि)णें**—उक्रि. भिवविणें; भीति दाखविणें; भयभीत करणें; दचकाविणें. [बिचकणें] **बिचकावणी**–स्त्री. एकदम भिवविणें; दचकाविणें. [बिचकाविणें]

**बिचवा-वा**—वि. १ तल्लख; हुषार; तरतरीत (मूल) २ चपळ; चलाख; तुरतुर धावणारें (घोडें) ३ (व्यापक) जलद, भरभर चालणारी; फर्डी (लेखणी) [बिचवा]

**बिचरें**—न. एक प्रकारचा मासा. पोक पहा.

**बिचल**—स्त्रीपु. १ बिघाड; (चांगल्या गोष्टीचा वाईट गोष्टींत) बदल; फेरफार. २ माघार, कच. (क्रि० खाणें) [सं वि+चल]

**बिचलणी**–स्त्री १ रस्ता मोडणें, आड जाणें, बाजूस वळणें. २ योग्य, सरळ किंवा सभ्य सरणी सोडून त्याच्या विरुद्ध सरणीस लागणें. [बिचलणें] **बिचलणें**–अक्रि. १ सरळ मार्ग सोडून वाईट मार्गानें जाणें; गैरशिस्त, दुर्वर्तनी बनणें; बिघडणें. २ भ्रमिष्ट होणें; खुळावणें, वेडसर होणें ३ माघार खाणें; वचनभंग करणें, करार सोडून मार्गे हटणें ४ बिथरणें [सं विचलन; हि. बिछलना]

**बिचवा, बिचोबा-वा**—पु ज्याला मध्यें खांब नाहीं असा डेरा, तंबू 'क्षण एक आपानीं आराम केला। बिचोव्यांत भाऊनीं गांठिलें।' –अफला १७. –पेद १८ १७३. [फा. बीचोबा]

**बिचवा**—पु १ विंचवाच्या आकाराची लहान, वाकडी कट्यार 'बिचवा लवंगी गुरगुज साग सोंटा बरची फेंकिती।' –ऐपो १०९. २ (ल) लहान परंतु भरभर चालणारी लेखणी (मुलांत रूढ) ३ लहान परंतु हुषार, तरतरीत माणूस ४ पायाच्या आंगठ्यांत घालावयाचें वळें. ५ डोंगराळ प्रदेशांत होणारें एक लहान झाड. याचा आकार विंचवाच्या नांगीप्रमाणें असतो. (ठाकुर लोक त्यास कोंबडा म्हणतात.) [सं वृश्चिक, हिं बिछुआ] –वि बिचवा पहा.

**बिचारा**—वि. १ गरीब, अनाथ, दीन. २ दुर्बळ; बापडा; कींव करण्याजोगा ३ क्षुद्र, पामर ४ निरपराधी. [फा; तुल०हि. बे सं. चार=गमन]

**बिच्छात-द**—स्त्री (विरू) बिशात पहा

**बिछाइ(य)ती, बिछायत**—वि १ दुकान न घालतां आपला माल पेठ, बाजार यांत विकण्यास नेणारा २ रस्त्याच्या कडेला किंवा घराच्या पायरीवर माल मांडून विकणारा (उदमी, व्यापारी); गैर दुकानदार; फेरीवाला 'बिछायती वाणी' –बाडसमा ३. १३५. 'अडत मजूरी, व्याज वगैरे जे जे खर्च आम्हास घ्यावे लागतात त्याची खुलासेवार माहिती आमच्या बिछाइत लोकाकरिता दिली आहे' –मुंव्या (प्रस्तावना) १. ३ (व) माल खरेदीसाठीं गांवोगांव फिरणारा (अडत्या, दलाल). ४ (अडत) ज्याला ऊंसाकरितां पेंड वगैरे घेण्यासाठीं आगाऊ पैसे देतात तो (शेतकरी). –वि. अशा तऱ्हेच्या व्यापाऱ्यांसंबंधीं, व्यापारविषयक (माल इ०). [बिछायत]

**बिछाई(य)त**—स्त्री. १ बसावयासाठीं आंथरलेलें जाजम, सतरंजी इ० बैठक. –सभासद ५८. २ मालमत्ता. ३ शेज, बिछाना. [अर. बिसात]

**बिछा(छो)ना**—पु निजावयासाठीं पसरलेली गादी, रुजामा ० अंथरूण, शेज; शय्या [सं वि+स्तृ; हिं. बिछौना] **बिछाने मजला**-पु (नाविक) खलाशांच्या उपयोगाकरितां झुलते बिछाने टांगण्याचा मजला; हा तोफामजल्याखालीं असतो (इं.) **बिछोन्यासन्न जिरणें**-(व) रोगी अतिशय अशक्त होऊन त्यास उठण्याबसण्याची शक्ति नसणें, अंथरुणाला खिळणें.

**बिछावणी**—स्त्री (सतरंजी, जाजम इ०) जमिनीवर पसरणें किंवा आंथरणें [बिछाविणें] **बिछव(वि)णें**-सक्रि १ (सतरंजी, जाजम, गादी इ०) जमीन, पलंग इ०वर पसरणें, आंथरणें, घालणें. 'गेली महालामध्यें दिला पलंग बिछाऊन। शेजारी निजले दोघे लई प्रीत लाऊन' -पला ७९. २ पाडणें; चीत करणें, जमीनदोस्त करणें; लोळविणें ३ संपवून टाकणें, खलास करणें; फडशा करणें [हिं बिछाना; बिछवाना]

**बिजक**—न (मालाबरोबर बांधलेली) किंमत इ०ची तपशीलचिठ्ठी, अंकपट्टी, आंखपट्टी. बीजक पहा. [सं बीजक]

**बिजणें**—न. बीं विरूढणें; रुजत घालणें. -मनको [बीज]

**बिजन**—नस्त्री कत्तल; नाश; कतलाम. -वि. निष्प्राण; ठार 'आपल्या साठ बायकांस एकएकीस बोलावून आणून तर्वारीनें छादून बिजन केल्या.' -ऐस्फुले ६४. [फा. बी+जान्=प्राण]

**बिजंबर्त्ता**—स्त्री. (व.) मार; मारकूट

**बिजबंद**—पु सबजाचें बीं. -मुंग्या ११० १५७.

**बिजली**—स्त्री १ वीज; विद्युत् २ विजेसारखी तेजस्वी, तडफदार व सुंदर स्त्री 'ती बिजली आपल्या हातीं येईल तर काय बहार ...' [सं विद्युत्; प्रा. विज्जु, विज्जुली; हिं बिजली]

**बिजली**—स्त्री मुलाच्या अर्धेंटुकटें नावाचा खेळ खेळतांना आखलेल्या घरात टाकण्यासाठीं घेतात ती दगडाची चीप, खापरी किंवा लांकडाचा तुकडा.

**बिजवई**—स्त्री. (खा.) बी-बियाणें. [बीज]

**बिजवट**—न. १ पुरुषाचें प्रजोत्पादक वीर्य, रेत. २ बीज; उत्पत्तिकारण; ताणा. 'बिजवट चांगलें असलें म्हणजे पोर चांगलें होतें.' ३ संतान; संतति; थळ; थळी; (घोडा, बैल इ०ची) अवलाद. 'हा घोडा काठेवाडी घोड्याचें बिजवट आहे.' [बीज+वट प्रत्यय]

**बिजवड**—न. १ ज्याच्या बीजापासून जो झाला तो (आंबा लता इ०) 'हा आंबा बनछोडाचा बिजवड आहे.' २ बीज; अवलाद. बिजवट पहा. -पु शेताची पुन्हां पेरणी; एक पीक कापून घेतल्यावर पुन्हां त्यांतच केलेलें पीक. (क्रि० करणें) -पुन. एकाच जमीनींत काढलेल्या पहिल्या पिकाचा दुसऱ्या पिकावर जो साधकबाधक परिणाम होतो तो; पूर्वीच्या पिकाचा जमिनींत अवशिष्ट राहणारा गुणधर्म; बिवड. 'तागाचा बिजवड सर्वदा, चांगला.' [बीज]

**बिजवर**—पु. १ दुसऱ्यांदा लग्न करणारा, केलेला पुरुष. आजन्म ब्रह्मचर्य पाळलें नाहीं तरी निदान बिजवरांचे पुनर्विवाह बंद केले पाहिजेत.' -टि ४.१४४. 'पेटयांचा गोंडा पाठीवर लोळे। बिजवराची बायको मांडीवर लोळे।' -फुगडीचा उखाणा २ ज्याचें लग्नाचें वय होऊन गेलें आहे असा पुरुष; पूर्ण प्रौढ मनुष्य. [बिजा+वर]

**बिजवरा**—पु. (बिजेच्या चंद्राप्रमाणें) लहान मुलांच्या आणि स्त्रियांच्या कपाळावरील एक दागिना (याला जोडून बिंदी शब्द येतो). 'भाळीं सुंदर शोभतो बिजवरा भांगीं सुमुक्ताफळें।' -अकक २, अनंतसीतास्वयंवर ४४. [बीज=द्वितीया]

**बिजा**—वि. दुसरा [सं. द्वितीय; प्रा. बिइज्ज; गु. बीजो] म्ह० इजा, बिजा, तिजा. **बिजाईत**-वि. दोन वेळां व्यालेली (गाय, म्हैस इ०); दुजाईत [गु.] **बिजावळी**-स्त्री वेगळेपणा; भेद, भिन्नता; अंतर. 'तैं तन्हि गा सुवर्मा। बि(वि)जावळी आत्मया कर्मा। अपाडें जैसी पश्चिमा। पूर्वेसि कां।' -माज्ञा १८.२६९.

**बिजाकार**—पु. ताणा; बिजवट; खाण; उत्पत्तिस्थान; उगम. [सं. बीज+आकर]

**बिजाखर**—न. (महानु) रहस्यमय मंत्र. 'मि होडेचा पांचाखरी। परा-वाचेचां बिजाखरीं।' -भाए ७७३. [सं बीजाक्षर]

**बिजागरी, बिजागरें**—स्त्रीन. दार, खिडकी, पेटी इ० चें झांकण उघडतां व लावतां येईल अशा रीतीनें तें जोडण्याची साधेपट्टी; ही नरमादीहून भिन्न असते. इं. हिंजेस.

**बिजाळू**—वि. बीं पेरून केलेलें; कलमानें तयार केलेलें नव्हे असें (झाड, रोपटें). [बीज+आळू प्रत्यय]

**बिजि(झि)क**—न. एक प्रकारचा पत्त्यांचा खेळ; पाट. यांत दोन, चार किंवा सहा असे इसम खेळतात व दोन किंवा चार पत्त्यांचे जोड घेतात. [इं. बेझिक्]

**बिजें**—न. १ आगमन; येणें. (क्रि० करणें). 'तुवां मित्रापाशीं केलें बिजें।' -कुमुरा ५.१७. २ गमन; जाणें. 'वर्षाकाळ सरेल त्यावरि बिजें कीजे मना मानल्या।'- निमा ४.३५. 'देवें एथ केलें बिजें।' -शिशु ७२५. [सं. व्रज्; प्रा. वच्च; गो. वचणें]

**बिजेबारें**—न. १ (कों.) वधू आणि वर यांच्या राशींत संबंध राशिमंडलाचें-बारा राशींचें अंतर असणें; द्विर्द्वादशक. २ (ल.) हाडवैर; उभा दावा. [बिजा+बारा]

**बिजोरा**—पु एक दागिना. बिजवरा पहा.

**बिझाईत**—स्त्री. मालमत्ता. [अर. बिझाअत्; बिसात्]

**बिट**—पु बिष्टा पहा. 'चालतां चालतां किंवा ओझें वाहतां वाहतां बिट वासेल-निघेल-बाहेर पडेल.'

**बिटका**—पु वायुविकृतीमुळें हात, पाय इ० मध्यें येतो तो पेटका, वळ.

**बिटका**—वि. १ अगदीं लहान आकाराचा; बुटका (आंबा, पेरू, कणीस, नारळ इ०). २ लहानसा; टुमदार; लहान व सुरेख; छकुला; चिमणा; पिटुकला; बिट्टा (पदार्थ, मूल)

**बिटकी**—स्त्री. १ गू, शेण इ० दुर्गंधी पदार्थाचा लहानसा गोळा. २ (गहूं, बाजरी, मका, जोंधळा इ० चें) लहान कणीस, तुरा. ३ अगदीं लहान जातीचा आंबा. ४ लहान आंबा, पेरू इ० फळ ५ अगदीं ठेंगणा मनुष्य; ठेंगू; बुटका मनुष्य ६ (खा) दूध विरजण्याचें अगदीं लहान मडकें. [? पिटें; तुल० सं विड= तुकडा. प्रा. दे बिट्ट=बेटा; लडका]

**बिटकी**—(गो) प्रवासी सामानसुमान ०**उभारप**–क्रि. गाशा गुंडाळणें.

**बिटारणें**—अक्रि. १ (अशिष्ट) खोडकर, व्रात्य; द्वाड होणें (मुलें, गुरें यांच्या संबंधीं प्रयोग) २ नाश पावणें, बिघडणें; अव्यवस्थित होणें (जमीनजुमला, कारभार इ०) [सं. विष्ठा; म. बिट्टा]

**बिटिंग बांधणें**—क्रि. (सोनारी) मण्यांचीं दोन टरफलें एकमेकांवर अशा तऱ्हेनें बसविणें कीं त्याचे सांधे एकमेकांशीं भिनतील व अशा तऱ्हेनें जुळवून झाल्यावर तीं सवाण्यांत धरून स्लेटपाटीवरच्या चऱ्यांत फिरवून दाबून घेणें.

**बिटी-ट्टी**—स्त्री. १ बिटकी अर्थ १ ते ५ पहा. २ सागरगोट्याच्या खेळांत एक सागरगोटा वर उडवून जमिनीवरून एकदम उचलून घेतलेल्या दोन सागरगोट्यांची जोडी. ३ (नंदभाषा) शंभर 'आज मी बिट्टी भुरके (रुपये) हुंडी करून पाठविले' ४ दारूनें भरलेली कागदाची सुरळी ५ (कों) एकावर एक रचलेल्या नाण्याचा एकत्रित समूह, चळत 'विसाविसाच्या बिट्या लावल्या'–चैत्रावळ (महाराष्ट्रशारदा जून १९३५). ६ कागद वगैरेच्या विशिष्ट संख्येची गड्डी ७ पिवळ्या कण्हेराच्या फळांतील बीं [बिटकी]

**बिटोरी**—स्त्री. १ गहूं, जोंधळा, बाजरी, मका इ०चें अगदीं लहान कणीस; बिटकी. २ दारूचा लहान तोटा, बाण; बिटी ३ (विटीदांडूचा खेळ) लहान विटी. ४ शेणाचा लहान पोहो. ५ लहान लेखणी वगैरे [बिटी]

**बिटो-ट्यो**—स्त्री. (गो) मुलींचा एक खेळ

**बिट्टा**—पु. मलविसर्जनाची इच्छा नसतां किंवा प्रयत्न न करतां गुदावाटे भीति, अति कष्ट इ० कारणामुळें बाहेर पडलेला मळ. ०**घासणें-ताणणें-मोकळा होणें-बाहेर पडणें-निघणें**–१ हगणें २ (ल) गाळण उडणें; अति श्रम, भीति इ०नीं सुखेनासें होणें, जीव नकोसा होणें, खंगणें इ०. 'सुपें टोपलीं बिगार वाहतां वाहतां बिट्टा वासला।'–अफला ६८. [? सं. विष्टा]

**बिट्टा**—वि लहान; छोटा विशेषत. लहान मुलांना म्हणतात. बिट्टी, बिट्टू अशीं नांवेंहि आहेत. [बिटका]

**बिट्टी**—स्त्री. (व) कणकेचा जाडा पानगा; बट्टी.

**बिड**—पुनस्त्री. घराच्या गवती छपराच्या कोपऱ्याना पानें, गवत इ०चा घातलेला पेंढा. (क्रि० बांधणें) [सं. पिंडा]

**बिडका**–पु. गठ्ठा; भारा. 'बिडका घेऊन कुरणातून आलों.' [बिंडा] **बिडकें**–न गवत, रोपटीं, काटक्या इ० चें जुडगें; लहान बिंडा. [बिंडा अल्पार्थी]

**बिडगौ**—पु. १ (महानु) दुर्ग २ समूह. 'शमदमाचा करूनि मेळावा। इंद्रियाचा बिडगौ जिणावा।'–भाए २१२. [का बिडिय=समूह]

**बिडती**—स्त्री १ पेंच, पंचाईत; अडचणीची स्थिति, संकट, कचाटी २ दोहोंकडून संकटप्रसंग येणें 'पुढें वाघ मागें अस्वल अशा बिडतींत सापडलों' [का. बिडते=अवकाश, अवसर]

**बिडबिडणें**—अक्रि गिडबडून जाणें, लिडबिडणें 'राघवणी चुलीपुढें। पऱ्हे उन्मादती खातवडे। तैसीचि यें नाकाडें। बिडबिडती।'–ज्ञा १३ ५६२ [बदबदणें]

**बिडलवण**—न एक प्रकारचें मीठ; काळें मीठ, पादेलोण. [सं विटलवण; बीड+लवण]

**बिडवई**—पु १ तळाचा रक्षक; छावणीचा अधिकारी २ हितकर्ता; तारक; कैवारी. 'जन्मा येऊनि तया लाभ झाला। बिडवई भेटला पांडुरंग।'–तुगा २३३६ [का. बीडु=तळ, छावणी]

**बिडा**—पु १ (दोरी, सुत इ० चें) वेटोळें; भेंडोळें २ (गवत, काटक्या इ० चा) भारा; गठ्ठा. 'पत्रावळीचे किती बिंडे आहेत?' ३ खडक, जमीन इ० वरचा उंचवटा, टेंकाड. ४ डोंगराचा सुळका; कडा ५ (समासात) सौंदर्यवाचक पद. उदा० राजबिडा=राजासारखा बिंड असणारा [सं. पिंड; हिं बींडा]

**बिडा(ढा)र**—न घर, वसतिस्थान (विरू.) बिऱ्हाड पहा. 'आणि वायूसि एके ठायीं। बिढार जैसें नाहीं।'–ज्ञा १२.२११. [का बीडार(बीडु=आर)] ०**कर-करू, बिढारी**–वि दुसऱ्याच्या घरीं बिऱ्हाडानें उतरणारा, राहणारा. 'गृहीं येवोनि बिढारकर। कां वो जाहला।'–कथा १११.१०३.

**बिडाल-ळ, बिडाल(ळ)क**—पु. मांजर. 'कीं मूषकालागीं बिडालक। बैसे टपत तयापरी।'–रावि १.१०८. [सं. बिडाल, बिडालक]

**बिडी**—स्त्री. १ कैद्याच्या पायांत अडकविण्याची शृंखला; कडी; सांखळी; बेडी २ पायांत घालावयाचा चांदीचा एक साखळ्या-वाळ्याप्रमाणें दागिना; वलय. 'नाना ते विद्युल्लतेची बिडी। कीं ते अग्निज्वाळांची केवळ घडि।'–स्वादि ९.५.३. ३ (ल.) पाश; बंधन; लोढणें; पायगुंता; अडथळा: विघ्न. ४ (कुलाबा) चाकांत ठोकतात तें वाटोळें लोखंडाचें पंचपात्रें; वसवी.

[हिं.] (वाप्र.) रुपेरी बिडी=(ल.) नोकरीचाकरी; सेवावृत्ति (पगाराच्या शृंखलेनें नोकरी करणाऱ्या माणसाचें स्वातंत्र्य मर्यादित असतें यावरून). सवामणाची बिडी. -स्त्री. १ अतिशय जड अशी पायांतील शृंखला. २ (विवाहित स्त्रीचें पुरुषावर जन्मभर ओझें राहतें यावरून ल.) पत्नी; बायको. 'अठरावें वर्ष पुरें होऊनहि पायात सवामणाची बिडी ठोकली नाहीं असे मुलगे आतां पूर्वीपेक्षां जास्त सांपडतील.' -निचं.

**बिडी**—स्त्री. धूम्रपानार्थ केलेली, तंबाखू भरलेली टेंभुरणी इ० च्या पानाची कागदाची नळी; (विरू.) विडी.

**बिडी**—वि. बीड नांवाच्या धातूची बनविलेली (तोफ इ०). 'तिनशें तोफा थोर अखंडी। पंचरशी आणि बिडी लोखंडी।' -ऐपो २२५. [बीड]

**बिडी**—वि. बीड शहरासंबंधींचें (कापड इ०). [बीड=एक निजाम हद्दींतील गाव]

**बिंडी**—स्त्री. गवती छपराच्या कोपऱ्यांना घातलेला गवताचा पेंढा; बिंड पहा. (क्रि० बांधणें).

**बिडीस**—न आमिष. [सं. बडिश; प्रा. बिडिस]

**बिंडोळें**—न. बिंडा; गुंडाळी (विरू.) भेंडोळें पहा.

**बिणकूल**—न (गो) बारीक भोंक.

**बिणाणी, बिणणें**—(विरू.) बेणणी, बेणणें पहा.

**बिणाद**—पु १ रस्ता; बिदी; वाट; मार्ग. २ (ल) (महानु) जवळपणा, सान्निध्य; समीपता. 'मीळे मुनीची मांदी। तरि निंदास्तुतिची होय गवांदि। म्हणौनि कव्हणाचां बिणिदीं। न रीगावें तुवां।' -भाए १८५ [बिदी=गल्ली]

**बितणें**—अक्रि १ जवळ येऊन ठेपणें; अगदीं जवळ येणें. 'लग्न तर उद्यावर बितलें आणि साहित्य तों झालें नाहीं.' २ गुदरणें; कोसळणें (संकट, धोका, कर्तव्य, पेंच इ०) 'तो प्राणावर बितलें तरी खोटें बोलणार नाहीं.' ३ सुरू होणें. (लढाई, भांडण, वाद इ०). ४ घडणें; होणें; घडून येणें (अनिष्ट गोष्ट, वृत्तांत इ०). 'तरी अन्यस्थानीं वृत्तांत बितला। तो म्यां कां नेणिजे।' -वि ४.३५. ५ ठसणें; बिंबणें (मन, अंतःकरण, भावना इ०वर). 'गुरूचा उपदेश ह्या शिष्याच्या मनांत बितती.' ६ गोट्या व कवड्या यांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. [सं. वृत्-वर्तणें; हिं. बीतना; म. बेतणें]

**बितप(फ)शील, बितफ्शील**—क्रिवि. बारीकसारीक बाबतीसह; सविस्तर; विस्तृत; तपशीलवार [फा. बि-तफ्सील्]

**बितमाम**—क्रिवि. पूर्णपणें; तमाम पहा [बि+तमाम]

**बि-तर्जुमा**—क्रिवि नियमानुसार -रा १५ २७१. [फा. बि+तर्जुमा]

**बितैन, बितानबीत**—स्त्री. (कारकुनी) बंदाच्या चार रकान्यांपैकीं पहिल्या रकान्याच्या मध्यापासून चवथ्या रकान्याच्या मध्यापर्यंत ओढलेली आडवी रेघ. [फा. ?]

**बितं, बित(त्ती)म**—वि. १ खरी; बरोबर; बिनचूक. २ खात्रीलायक; नक्की; खात्रीची (बातमी, खबर इ०) [अर. बातम्]
**०बातमी**—स्त्री. १ नक्की बातमी. २ सविस्तर, पूर्ण माहिती; बातमी. 'अवदलीच्या हालचालीची बितंबातमी समजण्यास मराठ्यांस कांहींच मार्ग नव्हता.'

**बित्तू**—पु. एक कवड्यांचा खेळ. -मखेपु १२५.

**बिथर**—वि. (प्रां.) गैर; बेशिस्त; अव्यवस्थित (भाषण, वर्तन) **बिथरणी**-स्त्री चुकणें; बिथरणें (धातुसाधितनाम) पहा. [बिथरणें] **बिथरणें**-अक्रि. १ प्रतिकूल होणें, बिघडणें; उलटणें; फिसकटणें (काम, धंदा, मार्ग इ०) २ (.ल) गैरशिस्तपणें वागणें; वाईट मार्गास लागणें. 'हा सोईनें वागतो आहे तों बरा. एकदा बिथरला तर शंभरास ऐकणार नाहीं.' ३ (सोईनें वागण्याचा) चांगला स्वभाव सोडून दुर्वर्तनी, खोडसाळ बनणें (जनावर). -सक्रि. प्रतिकूल करणें; (स्नेह, आज्ञाधारकता, पुण्यमार्ग इ० पासून) पराङ्मुख करणें; वाईट फंदास लावणें. [हिं. बिथरना; तुल० सं. वितर्जन]

**बिंद**—पु. (अशिष्ट) १ बिंदु; थेंब. २ पुरुषाचें वीर्य किंवा त्याचा एक थेंब. ३ अश्रु. 'नेत्रावाटे वाहे बिंद। याचा डोळा लागेना।' -एकनाथ, कृष्णपदें. [सं. बिंदु]

**बिंद**—न. (बे.) प्लेगची गाठ. [सं. पिंड; म. बिंड]

**बिंदगा**—पु. (बे.) पाणी भरण्याची लहान घागर; कळशी. बिनगा पहा. [का. बिंदगी]

**बिंदडी-ली**—स्त्री. १ (कापूस, कापड इ०चा) लहान गठ्ठा; गांठोडी; बस्ता. २ (गवत, पाला, काटक्या इ०चा) लहान भारा. [बिंडा अल्पार्थी; सं. बिंदु]

**बिंदडें**—न. (क.) (व्यापाऱ्यांत रूढ) लुगडीं, कापड इ०चा गठ्ठा. 'बिंदडी. बिंदडें सोडा.' [बिंडा]

**बिंदलों**—पु. (गो.) मातीचें भांडें; लहान कलश; बिंदगा.

**बिंदलें, बिंदली**—नस्त्री १ लहान मुलाच्या मनगटांत घालावयाचा पाटलीसारखा एक सोन्याचा दागिना. २ (राजा.) लहान बिंदु; अनुस्वाराचें, विसर्गाचें टिंब. [बिंदु]

**बिंदवा**—पु. (प्रां.) धाब्यावर पसरावयाची (विशेषतः विटाच्या भट्टींतील) धूळ, धुराळा, माती.

**बिदा**—वि. १ पाठविलेला; रवाना केलेला. २ जाण्यास परवानगी दिलेला (पाहुणा). (क्रि० करणें) [अर बिदाअ]

**बिदा, बिदाई-की-गी, बिदायकी, बिदागिरी**—स्त्री. १ रवानगी; पाठवणूक, रवाना. (क्रि० करणें, घेणें). 'तुम्हासही

बेकैदी चालल्यानं इजा यावी सबब आमच्या खावंदांनीं आम्हांस रूमशामहून बिदा करून पाठविलें. ' -पाब १६. २ निरोप देणें; बोळवण. ' नारू बरे झाले म्हणजे तुम्ही बिदागी करूं ' -पेदसभा ४. ३ निर्यात; बाहेर पाठविणें ' येल्ची मज्कुराची बिदा बिलायतेस करणार. ' -विमरा २.७९ ४ निरोप देतांना, पाठवणी करतांना संभावना म्हणून दिलेलें पारितोषिक, देणगी, अहेर, बोळवणी. ' नंतर विडे देऊन बिदागिरी केली ' -रा १२.१९५ ५ गुणिजनाना त्यांच्या गुणांची चहा करण्यासाठीं दिलेलें बक्षीस; देणगी. [ अर. बिदाअ ] **बिदा करणें**-१ पाठवणी, बोळवण करणें; निरोप देणें २ काढून टाकणें.

**बिदाती**—वि. नवीन. ' तरी तुम्ही मुसलमानी कामकाज महजबाप्रमाणें बिलाहरकत करून हक्क लवाजिमा बिदाती असाम्या वगैरे. ...'-वाडमा २.१०६. [ अर. बिदा, बदायत=प्रारंभ ]

**बिदानं(न)द**—(बाप्र) जाणोत; जाणावें कीं; त्यास कळावें कीं; आज्ञा कीं. याअर्थी शब्द. [ फा बि-दानन्द ]

**बिंदावनी, बिंदी, बिनी**—स्त्री. १ ( कों. ) कपाळपट्टी. २ दारास दिलेली वरची आडवी पट्टी. ३ दाराची मधली उभी पट्टी

**बिदी**—स्त्री. १ ( खेड्यांतील, गांवातील ) रस्ता; गल्ली. बीद पहा. ' इंद्रियग्रामींचे राजबिदीं। ' -ज्ञा ७.१०६. २ (ल.) गांवांतील रस्त्यांतून वाहणारें घाणेरडें पाणी. ' परि गंगेच्या संबंधीं। बिदी आणि महानदी। ऐक्य तेवीं माझ्या बोधीं। शुभाशुभांसी। ' -ज्ञा १८.१२५२. [ सं. वीथि; का. बीदि ] **बिदोबिदी**-क्रिवि. १ रस्तोरस्तीं; गल्लोगल्लीं. ' हरिच्या ह्या कैशा पडियल्या छंदीं। हिंडली बिदोबिदीं बाजारेंसी। ' -ब २९४. २ सर्वत्र; चोहोंकडे. ' नंद धांवे बिदोबिदीं। गौळी हुडकती सांदोसादीं। ' -ह २.१२४.

**बिंदी**—स्त्री. १ स्त्रियांच्या कपाळावरील मोत्यांचा एक अलंकार. २ सैन्याची आघाडी; बिनी. ' ज्याचा नगाऱ्याचा घोडा पुढच्या बिंदीला, निशाणाचा हत्ती पुढच्या बिंदीला.' -सासंइ ७. [ सं. बिंदु=भुवयांमधील भाग, फा. बीनी=नाक ]

**बिंदु**—पु. १ थेंब; टिंब; लेखणी इ०नीं उठविलेला ठिपका; अनुस्वार किंवा विसर्गबोधक चिन्ह. ३ मध्यबिंदु; केंद्र. ४ (भूमिति) ज्याचे भाग करतां येत नाहींत किंवा ज्याला स्थिति असून महत्त्व लांबी रुंदी इ० नाहीं तो. ५ घोड्याच्या कानाच्या खालीं सहा अंगुलावर जो भाग असतो तो; कानाचा पृष्ठभाग. [ सं. ] **बिंदूचा सिंधु करणारा**-वि. १ (ल.) ( एका थेंबाचा समुद्र करणारा ) कवि २ अलंकारिकपणानें अतिशयोक्ति करणारा माणूस. **बिंदुकुली, बिंदुकलें**-स्त्रीन. १ बिंदु, थेंब, वाटोळें चिन्ह. २ चंद्रबिंदु. [ बिंदु अल्पार्थी ] **बिंदुली**-स्त्री. चंद्रबिंदु; बिंदुकली पहा. **बिंदुलें**-न. १ कंकण. -शर. २ बिंदु; थेंब. ३ शून्य; पूज्य. ' मग जाती व्यक्ती पडे बिंदूलें। जेव्हां भाव होती मन मीनले। ' -ज्ञा ९.४६१. [ बिंदु ] **बिंदे**-न. ( अशिष्ट ) पुरुषाचें वीर्य किंवा वीर्याचा एक बिंदु; बिंद पहा.

**बिंदुकली**—स्त्री. १ झाडाच्या फांदीवर उगवणारी दुसऱ्या प्रकारची वनस्पति; बांडगूळ. -कृषि ६९३. २ ( कों ) डिकशी ( मोहोरलेली ).

**बिंदूल**—न. ( गो. ) मातीचें भांडें; लहान बिंदलॉ.

**बिंदोरी**—स्त्री. (खा.) पालखी इ० वहनाची ( आंतील मूर्तीसह ) मिरवणूक.

**बिंद्रु**—न. राजचिन्ह; चिन्ह. -शर. [ सं. बिरुद ]

**बिंद्रावनी सारंग**—पु ( संगीत ) एक राग. ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल मध्यम, पंचम, कोमल निषाद, तीव्रनिषाद, हे स्वर येतात. गांधार व धैवत वर्ज्य. जाति औडुव-औडुव. वादी ऋषभ, संवादी पंचम. गानसमय मध्यान्ह. ह्याचे अवरोहांत धैवताचा अल्पप्रयोग विवादी या नात्यानें क्वचित् होतो

**बिधी, बीध**—स्त्री. रस्ता; गल्ली. बिदी पहा [ सं वीथि ]

**बिन**—पु. मुलगा; पुत्र; बल्द याचा उपयोग फक्त कागदोंपत्रीं करतात. जसें-रामभट्ट बिन कृष्णभट्ट [ अर. इब्न; फा. बिन ]

**बिन**—क्रिवि. (अ) शिवाय; खेरीज; वांचून; विना. हा शब्द पुष्कळ वेळां नामाच्या मागें लावतात. जसें-बिन अपराध-घोर-तोड-दिक्कत इ०. (आ) कधीं कधीं हा शब्द क्रियापदाच्या भूतकालाच्या रूपापुढें येतो जसें-' मी रुपये घेतल्याबिन जाणार नाहीं. ' (इ) कधीं कधीं हा शब्द (राहित्याचा बोध असताहि) निरर्थक म्हणून योजतात. जसें-बिन पैशावांचून मौज. [सं. विना] **०आफत**-क्रिवि. ( जमाबंदी ) काहीं अडचण किंवा हरकत न आल्यास ( कामगिरी करतां येईल ) **०कद(दे)ली**-स्त्री. दुफाशीं खेळांत जुगल्यानंतर कदली पडावी ती न पडल्यानें झालेला पराजय. -वि. ज्याला कदली पडली किंवा पडत नाहीं असा ( खेळणारा, खेळ ). **बिन कदलीवर येणें**-( ल. ) भांडणाला सुरवात करणें, तिरगीमिरगीवर येणें; चिरडीस जाणें. **०कामी-खाली**-क्रिवि. (ना) विनाकारण; व्यर्थ. **०खोट**-क्रिवि. १ निःसंशय. २ बिनधोक. **०घोर-धोक**-क्रिवि. भीति, शंका किंवा कचर न बाळगतां; निश्चित. ' मुलानें संसार संभाळल्यानें मी आता बिनघोर झालों. ' **०जोड**-वि. १ जोड नसलेलें; एकसंधी. २ अद्वितीय. **०जोरी**-वि. १ ( बुद्धिबळें ) दुसऱ्या मोहऱ्याचा किंवा प्याद्याचा आधार नसलेलें. २ मारामारीचा (डाव). **०डाकिल**-वि. १ बिन डाकाचें; एकसंधी; अखंड. २ ( ल. ) शुद्ध. ' बिनडाकिल दागिने अमोलिक प्रभाकराचे ठरले। ' -ऐपो २२७. **०तक्रार**-क्रिवि. तक्रार न करतां; मुकाट्यानें; निमूटपणें. **०तोड**-स्त्री. सोंगट्यांच्या खेळांतील दुसऱ्याची एकहि सोंगटी न मारतां येणारी हार; पराजय. -वि. १ ज्यावर उपाय किंवा इलाज चालत नाहीं असा; आणीबाणीचा. ' प्रसंग बिनतोड आहे. ' -चंप्र ६. २ बरोबर लागू पडणारें; बिनचूक. ३ सर्वोत्कृष्ट; अप्रतिम. बिनजोड पहा. **०दाद**-

क्रिवि. दाद न लागतां; बेधडक; प्रतिकाररहित ' त्याजवर धनवान लोक अनेक वेळां जुलूम बिनदाद करूं शकतात ' -नि ५२. ०**दिक्कत**-क्रिवि. १ बेधडक, अविचारानें; बेलाशक ' घरच्याघरीं बसुन जगांत चाललेल्या लहान मोठ्या गोष्टींवर बिनदिक्कत टीका करण्याची ... प्रो गोळयांची हौस अनावर आहे कीं... ' -टि ४ २३७ २ बेफिकीर. बिनघोर पहा ०**घोक**-क्रिवि. बिनघोर पहा. ०**पोटी**-वि पगार किंवा मजुरी घेतल्यावांचून केलेली; निर्वेतन ( नोकरी, मजूरी ) -क्रिवि पोटाला न मिळतां ( नोकरी करणें ). ०**भाड्याचें घर**-न. ( उप ) तुरुंग; कैदखाना. ०**मजुरी**-वि. १ पगार न घेता केलेली; बिनपगारी ( नोकरी ). २ श्रमाचें काम, मजुरी इ० माफ असलेली साधी (कैद, ठेप, सजा) ०**मोजबा-बी**-वि १ ज्याबद्दल हिशेब द्यावा लागत नाहीं असें २ सरकारांत रुजू न झालेलें; न नोंदलेलें ( घर, शेत इ० ). ३ बेजबाबदार; बिनहिशेबी ( बदली माणूस ) ०**रेष-रेषा-रेषी**-वि रेषा किंवा केसर नसलेला ( आंबा ) ०**वार(री)स**-वि. वारस, कायदेशीर हक्कदार किंवा मालक नसलेला ०**वारसा**-पु वारसाचा किंवा इतर हक्काचा अभाव. निवारसा पहा ०**शर्त**-क्रिवि. कांहीं अट न घालतां. ०**शाई**-स्त्री. ( ना व. ) शिसपेनसील. ०**सूट**-क्रिवि. १ ( बे. ) विचार न करता; एकदम; बेछूट २ सूट, मोकळीक न देता. ०**हुली**-स्त्रीवि. फाशांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. हूल म्हणून सोंगट्या खेळण्याचा एक प्रकार आहे.

**बिनकूल**—क्रिवि ( कु. ) ( प्र. ) बिलकूल. मुळींच; अगदीं. [ अर. बिल्कुल्ल् ]

**बिनगा, बिनगी**—पुस्त्री मातीची, तांबें इ० धातूची विशिष्ट आकाराची कळशी; लहान घागर बिंदगी पहा

**बिनबाजा**—पु ( ना ) बेंडबाजा पहा.

**बिन(ना)सणें**—सक्रि. बिघडविणें; नासविणें; खराब करणें; नुकसान करणें; नाश करणें. -अक्रि. १ बिघडणें; नासणें; नुकसान, दुखापत होणें; खराब होणें. २ ( ल. ) नादिष्ट बनणें; तऱ्हेवाईक, स्वैर, अवखळ होणें ( माणूस, जनावर ) ३ वाईट मार्गांत शिरणें; दुर्वर्तनी होणें. ४ वांकडें येणें; बिघाड उत्पन्न होणें; वितुष्ट येणें; बेबनाव होणें; वांधा येणें. ५ निष्फळ होणें; व्यर्थ होणें; फसणें; फिसकटणें ( युक्ति, बेत, उद्योग, योजना ). [सं वि+नश्; हिं. बिनास] **बिन(ना)सणी**-स्त्री बिघडणें, नासणें.

**बिना**—पु समासामध्यें, बाजूच्या कोऱ्या जागेंत लिहिलेली टीप; प्रकरणाचा मथळा [ बिनी; तुल० अर. बिना=पाया, मूळ ]

**बिना अलियह**—आणि यावर -आदिलशाही फर्मानें. [ फा. ]

**बिनाइटी**—स्त्री. बनेट; हें एक मर्दानी खेळांतील बोथाटीसारखें परंतु थोडें निराळें हत्यार आहे. ' लगी बाण बोथाट्या दाट। बिनाइट्याचा खळखळाट।' -ऐपो २२६. [तुल० हिं. बनैटी=हातांत धरून फिरविण्याची, दोन्ही टोकांस पेटलेली मशाल]

**बिनाखी**—स्त्री. १ काळजीपूर्वक व बारकाईची पाहणी; तपासणी; चौकशी. ( क्रि० करणें ). ' इमला अजमासें बिनाखी. ' -वाडमा २.१७५. २ अशा तऱ्हेनें चौकशी करून झालेला निश्चय, ठराव. ३ ( किंमत, खर्च इ० चा ) अजमास, किंमत. (क्रि० करणें). [ फा. बीनाई ]

**बिनाबर**—शअ. साठीं; करितां. ' बिनाबर मुलाजिमत शोरसाहेब आले. ' -पदमव ११६. [ फा. बिनाबर् ]

**बिनाबरान**—शअ. म्हणून; प्रमाणें. ' तरी बिनाबरान मालूमात मनास आणून तुम्हांस कौल मर्हमत केला आहे. ' -रा १७.३३. [ फा ]

**बिनामी**—वि १ खोटें; बनावट. २ दुसऱ्याच्या नांवावर केलेला ( व्यवहार ). बेनामी पहा. [हिं ] ०**व्यवहार**-पु. आपल्या पैशानें आपल्याकरितां, फक्त दुसऱ्याच्या नावानें मिळकत विकत घेणें. सरकारच्या किंवा सावकाराच्या धाकानें मिळकतीचा बचाव व्हावा म्हणून बहुशः बिनामी व्यवहार होतात.

**बिनी**—स्त्री १ सैन्याची आघाडी; म्होरप; बिन्दी. ' धायगुडे थोरात पांढरे लगड होते बिनीला।' -ऐपो १९१. २ पागोट्याचें केळें; कपाळावर येणारा पुढचा भाग. ३ दार, खिडकी इ० च्या चौकटीचा वरचा भाग. ४ दार, खिडकी इ०च्या दोन फळ्यांतील फट बुजविण्याकरितां एकीस जी उभी पट्टी ठोकतात ती. ५ समासांत लिहिलेला सारांश किंवा प्रकरणाचा लहान मथळा बिना पहा. ६ नाकावरची टोपी; नासात्राण. ' टोपास बिन्या वगैरे बावन्न बिरदे सिद्ध होऊन गोटाबाहेर निघाले. ' -भाब ५६. [ फा. बीनी=नाक ] ०**वर असणें**-सर्वांच्या पुढें असणें. **बिनीचा**-वि १ पुढचा; अघाडीच्या भागाचा. २ (ल.) मुख्य; अग्रगण्य; पहिल्या प्रतीचा ( सैनिक, गवई, चोर, सोदा, भामटा ). ०**दार**-वि. ( नाक असलेलें ) वळीच्या खालच्या बाजूस पुढें आलेला भाग असलेलें; बिनी किंवा केळें असलेलें(पागोटें). [फा.] ०**पट्टी**-स्त्री. नासात्राण; घोणात्राण. -राव्यको ४.१६. ०**वाला**-पु १ बिनीतील शिपाई, इसम २ सैन्याच्या हालचाली व तळ देण्यासंबंधानें मराठ्यांच्या सैन्याच्या आघाडीवरील अधिकारी. ( इं. ) क्वार्टरमास्टर-जनरल.

**बिफरणें**—अक्रि. १ स्वैर व स्वच्छंदी बनणें; भडकणें; मोकाट सुटणें. २ बेशिस्त, अव्यवस्थित बनणें. ३ त्रुटित होणें; ऱ्हास पावणें ( कामधंदा ). बिथरणें पहा. [ हिं. बिफरना=तिरसट होणें ]

**बिफळ**—न. एक फळ. [ हिं. ]

**बिंब**—न. १ चंद्र, सूर्य, ग्रह इ०चें मंडळ. 'धूम्ररजांची. पिंजरीं। वाजतिया वायूतें जरी होकारी। कां सूर्यबिंबामाझारीं। आंधारें

शिरे।' -ज्ञा ९.१२५. २ सूर्यमंडल. 'जैसें बिंब तरी बचकें एवढें। परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडें।' -ज्ञा ४.२१५. ३ आरसा, पाणी इ०च्या पृष्ठभागावर ज्याचें प्रतिबिंब दिसतें तो पदार्थ. याच्या उलट प्रतिबिंब. ४ राज्यादि अधिकारावर असतां पराक्रमादि गुण असोत किंवा नसोत पण ज्याच्या उपस्थितीमुळें खालच्या माणसांना शोभा येते, आवेश चढतो असा पुरुष, पदार्थ. 'सरदारलोक जाऊन लढाई देतील परंतु राजाचा पुत्र उगीच बिंब म्हणून बरोबर घ्यावा.' ५ (साहित्य) दृष्टांत, प्रमाण इ०नीं प्रतिपादन करावयाचा विषय; प्रतिपाद्य अर्थ. ६ मूर्ति; प्रतिमा. 'तो चालतें ज्ञानाचें बिंब। तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ।' -ज्ञा १०.७७. ७ ओंकाराची अर्धमात्रा. 'तंववरी तो समीरु। निराळीं कीजे स्थिरु। मग लमीं जेविं ॐकारु। बिंबीचि विलसे।' -ज्ञा८.११६. ८ प्रतिबिंब; प्रतिच्छाया. ९ (पिकलेलें) तोंडलें. [सं] ०दान-न. जन्मराशीस रवि किंवा चंद्र असता ग्रहणाच्या वेळीं शांत्यर्थ करावयाचें सोन्यारुप्याचें बिंबदान. ०प्रतिबिंबभाव-पु. बिंबभूत व प्रतिबिंबभूत अर्थाचा परस्पर संबंध. ०फळ, बिंबा(बी)फळ-न. पिकलेलें तोंडलें. 'अधर दोन्ही जाले सधर। बिंबफळें रंगाकार।' -एरुस्व ७ २८. 'भासे मनांत मजबिंबफळभ्रमानें।' -र १५ बिंबाधर-पु (काव्य) तोंडल्याच्या फळाप्रमाणें असलेले ओंठ; तांबडे ओंठ. -वि. बिंबाप्रमाणें लाल ओंठ असणारी (स्त्री, सुंदरी). 'मधुरा, बिंबाधरा।' -शारदा. [बिंब+अधर] बिंबोष्ठ-पु. खालचा ओंठ. 'बिंबोष्ठ तळहस्तें स्पर्शोनी। श्रीधर नाम उच्चारावें।' -गुच ३६.१५८. [बिंब+ओष्ठ]

**बिंब-बी**—न.स्त्री. नागरमोथा. भातखाचरांत, दलदलींत उगवणारें त्रिधारी गवत.

**बिंबट**—न. १ बिब्ब्याचें बोंड. २ बिब्ब्याच्या आकाराचा आणि वर्णाचा ठिपका (बिबळ्या वाघाच्या अंगावरील). ३ चित्ता; बिब्या वाघ. [बिबा] **बिबटा**-वि. बिब्ब्याप्रमाणें अंगावर ठिपके असलेला (वाघ, चित्ता, मांजर). **बिबटें**-न. १ बिब्ब्याप्रमाणें दिसणारा ठिपका. २ बिब्ब्याचें बीं.

**बिंबणें**—अक्रि. १ (ज्ञान, शिक्षण इ० मनांत) ठसणें; उतरणें; परिणामकारक होणें. 'विसंबू नये सर्वथा ब्रह्मविद्या। तरी बोध बिंबोनि नाशे अविद्या।' २ भासणें; उत्पन्न होणें. 'तैसें सकळ हें मूर्त। जाण पां मायाकारित। जैसें आकाशीं बिंबत। अभ्रपटळ।' -ज्ञा २.१६८. ३ उमटणें. -तुगा. [बिंब] **बिंबित**-वि. १ (शब्दशः) प्रतिबिंबित; परावृत्त. २ (विरू.) बिंबलेलें; ठसलेलें. [बिंब]

**बिंबत**—स्त्री. (कु.) राख; बिबुत. (प्र.) विभूत. [सं. बिभूति]

**बिंबला-ली**—स्त्री. एक प्रकारचें झाड. **बिंबलें**-न. बिंबल्याचें फळ. हें आंबट असून याचें लोणचें घालतात. शाको. ५. ४८

**बिंबली**—स्त्री. (कु.) एक प्रकारचें रानगवत.

**बिबवा**—पु. एक प्रकारचें औषधी फळ; बिब्बा. याचें तेल अंगाला लागलें असतां उततें. ह्या तेलानें परीट खुणा करतात. [सं. भल्लातक; हिं. भिलावा; बं. भेला; गुज. भिलामा; उत्कल. भल्लिप; प्रा. बिडी; भिलवना; पोर्तु. कों. बिबो] (कामावर) ०घालणें-मार्गांत विघ्न उपस्थित करून काम बिघडविणें, कामांत हरकत आणणें; कुंठित करणें; मोडा घालणें. **बिबव्याचें शेवतें देणें**-बिबा दिव्यावर जाळून त्याच्या तेलाचे कांहीं थेंब दुधांत किंवा लोण्यांत पाडून देणें. जुलाब थांबविण्यासाठीं हें देतात. शेवतें पहा. **बिबवी**-स्त्री. बिबव्याचें झाड. **बिबवेल**-न बिब०याचें तेल [बिबवा+तेल] **बिबी-ब्बी**-स्त्री १ बिब्ब्याचें झाड २ पिकलेला बिबा. **बिबीची माळ**-बिबीच्या फळांची माळ **बिबोटी**-स्त्री. बिब्याचें बोंड.

**बि(बिं)बळा**—पु. एक जंगली झाड. बिवळा पहा.

**बिबळा, बिबळावाघ, बिबळ्यावाघ, बिब्यावाघ**—पु. अंगावर बिब्ब्यासारखे ठिपके असलेला वाघ, चित्ता.

**बिबा-ब्बा**—पु १ भेला; भिलावा. बिबवा पहा. २ (ल.) चिडखोर गृहस्थ. 'चिडका बिब्बा चीडला, तेलांत जाऊन बुडला.' ०घालणें-(कामांत) अडचणी उपस्थित करणें; (काम) बिघडविणें. ०चिडणें-(ल) रागावणें. ०फांसणें-(ल.) मोडा घालणें; अडचणी उपस्थित करणें. 'नाहीं तर, न जाणों, ती यायचीच तिकडे बिबा फांसून.' -मोर १०. ०येणें-बिब्बा अंगावर फुटणें, उतणें. **बिबेल**-बिब्याचें तेल. **बिबोटी**-बिब्याचें बोंड बिबट अर्थ १ पहा.

**बिबॉ-बो**—पु. (गो) सुकण्यापूर्वीची काजूची बी. कोंवळा काजू; ओला काजू गर.

**बिबॉ**—पु (गो.) लुगड्याचा लहान चौकोन, घडी.

**बिबी-ब्बी**—स्त्री एक झाड याच्या साल-पानांपासून डिंक निघतो व तो कातडी कमविण्याच्या उपयोगी आहे.

**बिबी-ब्बी**—स्त्री. १ कुलीन मुसलमान स्त्री. २ थोर मुसलमान गृहस्थाची बायको. [फा. बीबी] म्ह० बिबी आये उमरी तो मिया चले कबरी.

**बिबु(बू)त**—स्त्री (कु गो) अभिमंत्रित राख; अंगारा; भस्म. [सं. विभूति]

**बिबूड**—नस्त्री बींबूड पहा [बी+बुडणें]

**बिभा-भी**—(राजा.) (विरू) बिबवा-वी पहा

**बिभ(भि)त्स**—वि. (अप.) बीभत्स पहा. [सं. बीभत्स] ०दृष्टि-स्त्री. (नृत्य) किळसवाणी गोष्ट पाहिली असतां पापण्या व डोळ्याच्या दोन्ही कोपऱ्यांतील भाग आकुंचित होतात तसें करणें. हा बीभत्सरसाचा अभिनय होय.

**बिभास**—पु. (संगीत.) एक राग. ह्याचे दोन प्रकार आहेत. पहिल्यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, पंचम, कोमल धैवत

हे स्वर लागतात. जाति औडुव-औडुव वादी धैवत व संवादी गांधार. गानसमय प्रातःकाळ. दुसऱ्यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी धैवत व संवादी गाधार गानसमय प्रात.काळ. 'सप्तस्वर षड्राग रागिणी बिभास आळविला।' -वेप ८५

**बिभीतक**—पु १ एक प्रकारचें झाड किंवा त्याचें फळ २ (विरू.) बिब्बा; त्याचें झाड. [सं.]

**बिभूत**—स्त्री शेण, लांकूड इ०ची राख, कपाळावर लावण्याचें भस्म; विभूत. [सं विभूति] म्ह० बिभतीचें मूळ रेडयाच्या गांडींत.

**बिम**—पु. (गो) एक प्रकारचें गवत.

**बिमा, बिमेदार**—विमा, विमेदार पहा [हिं]

**बिमारी**—स्त्री. आजार; बेमारी. [फा. बीमारी.]

**बिमुखी**—स्त्री. दुतोंडी जातीचा एक साप; माडुळ [हिं. बे-बी+मुख]

**बियंबी**—स्त्री. (राजा.) कोंवळया आंब्याची खारवून ठेवलेली कैरी; बेहंबी. [बी+आंबा]

**बियवणी**—न. (राजा) पिकलेलीं कोकंबें फोडून त्यांतील गिराचें करतात तें सार, पन्हें. [बीं+पाणी]

**बियाणें**—न १ लागणीसाठीं ठेवलेलें उसाचें कांडें, बेणें. २ मनुष्य, पशु इ० चें उत्पत्तिकारण, बीज; (गुणदोष वंशांत उत्पन्न करणारें). 'आमचे घरचे गुरांचें बियाणेंच असें आहे कीं जें गुरूं होतें तें दुधाळ होतें.' [सं बीज] **बियाणें, बियावळ**-नस्त्री. मुद्दाम चांगलीं म्हणून पेरावयासाठीं ठेविलेलीं बीजें, बीं **बियाण्यास नसणें**-पूर्णपणें संपणें; खलास होणें; फन्ना होणें.

**बिरकांडी**—स्त्री (विणकाम.) विणकऱ्याचा धोटा [भिरें+कांडी]

**बिरकुंड-डें**—न. (विरू.) बिरखुंड-डें पहा.

**बिरकूल**—न. १ लहान तोंडाची व फुगीर पोटाची बांबूची पाटी. २ बुरकूल पहा.

**बिरखं(कं)ड-डें, बिरखंडा**—नपु. (विरू.) बिरखुंडें पहा

**बिरखडणें**—उक्रि. ओरखडणें (कागद, भिंत इ०), रेघोटया, चित्र इ० काढून चितारणें. -अक्रि घाईघाईनें वेडेंवांकडें लिहिणें; (श्लोक, वाक्य इ०) खरडणें. [बिरखडी]

**बिरख(खु)डी**—स्त्री. १ निष्काळजीपणानें काढलेलें चित्र, आकृति; कागद, भिंत इ०वर ओढलेली रेघोटी. 'त्या नकाशावर बिरखुडया ओढल्या' -बाळ २.४०. २ ज्यास वळण नाहीं असें घाईघाईनें लिहिलेलें वाकडेंतिकडें अक्षर; भरकटून लिहिणें. [भिरें+खोडणें]

**बिरखुंड-डें**—न १ गाभा; भेंड; (बोरू, जोंधळयाचें ताट इ०चा) गीर; मगज. २ दाणे काढून घेतलेलें मका, जोंधळा, बाजरी यांचें कणीस, बिरबुंटा **बिरखुंडा**-पु बिरखुंड अर्थ २ पहा.

**बिरगावणें**—अक्रि (व.) रागावणें; बिथरणें.

**बिरजणें**—अक्रि. (व) येऊन ठेपणें; तयार होणें. 'तो तेथें येऊन बिरजला तेव्हां आम्हांस विचार पडला' [विराजणें; सं. वि+राज्]

**बिरंजी**—स्त्री (ना.) तारखिळा; चूक.

**बिरंजी**—वि. पितळी -दिमरा २.१६५. [फा. बिरंज्=पितळ]

**बिरजुमाल**—क्रिवि एकत्र; एकवट; समाईकींत असलेलें शेत, जमीन, मालमत्ता इ०. [अर बर्र=जमीन+जुम्ला=समुदाय] **बिरजुमाली**-वि एकवट; समाईक असलेलें (शेत घर इ०).

**बिरडा**—पु बिरडें अर्थ १ पहा

**बिरडी-ढी**—स्त्री भिजत घालून मोड आणलेला पावटा किंवा वाल. **बिरडें-ढें**-१ मोड आलेल्या पावटे, वाल इ०कांची उसळ. २ (यावरून) कोणतेंहि पातळ कालवण.

**बिरडी**—स्त्री १ घुसळण्याची दोरी. 'वासुकीची यास बिरडी। मग समुद्र मथिला कडोविकडीं।' -ह७.१८४. २ गुंडी; बिरडें. 'ते व्हेळीं काकणांचां हातीं। मौक्तिकांची बिरडी सुढिलवती।' -शिशु ६५६

**बिरडें-ढें**—न. १ (अंगरखा, सदरा इ०ची) गुंडी किंवा गुंडी घालण्याचें भोंक, काजें, वळसा. २ (दावें इ०च्या) वळशात अडकवावयाची गांठ ३ गांठ (चोळी इ०). -भाए २३३. 'ज्याचिया कृपादृष्टीपुढें। जीवशिवांचें फिटे बिरडें।' -एभा २४. ४२. ४ घोंटाळा; कोडें 'कणावेगळा कोंडा न वाढे। तेवीं पुरुषावेगळी प्रकृति नातुडे। हें प्रकृतिपुरुषांचें बिरडें। तुजवेगळें निवाडें निवडेना।' -एभा २२.२३८. ५ (हेट.) लहान आकाराचें कडबोळें. ६ बिरडी पहा.

**बिरडें**—न. समूह; थवा. 'मार्गे पावलें बिरडें राक्षसांचें।' -गीता २.२१५

**बिरद**—न. (विरू.) बिरीद; बिरुद पहा. **बिरदाईत**-वि. विशिष्ट विद्या, गुण इ०मध्यें वाकबगार (पंडित, पुराणीक, गवई, इ०); कांहीं श्रेष्ठ गुणाबद्दल चिन्ह धारण करतो तो [सं. बिरुद] **बिरदावळी**-स्त्री. गुण, पराक्रम, श्रेष्ठता इ०दर्शक चिन्हांची माळ; बिरुदावली पहा.

**बिरबल**—पु. १ अकबर बादशहाच्या एका हुषार व चतुर प्रधानाचें नांव. २ (यावरून) चतुर व धोरणी मनुष्य. ३ (कु.) नकटा. 'ह्या बिरबलाचें नांव काय ठेविलें!' **बिरबली**-स्त्री. युक्ति; खुबी. 'त्यानें बिरबली लढवून काम केलें.' [बिरबल]

**बिरबाहुटी**—स्त्री १ कुंकवाचा किडा; सोनकिडा; ताम्रकृमि २ (ल.) छानछबेली. 'ज्ञान अंजन घालून डोळां ल्याली बिरबाहुटी।' -पला १३.९५. [ हिं. बीरबहुटी, बीरबहूटी ]

**बिरबिटी**—स्त्री. ज्याचा गोळा करतां येत नाहीं पण जें साधारणपणें घट्ट आहे असें शेण, लोणी, कालवलेलें पीठ इ०कोण ताहि लिबलिबीत पदार्थ. [ बरबट ]

**बिरबिर-रां**—क्रिवि. (विरू.) भिरभिर पहा.

**बिरबिरीत**—वि. बिरबिटीरूप; ज्याचा गोळा बनविता येण्याजोगा नाहीं असें, लिबलिबीत; पातळसर

**बिरंबु(बो)टा, बिरमु(मो)टा**—पु ज्याचे दाणे काढून घेतले आहेत असें मक्याचें कणीस; बिरखुंड

**बिरंबोळा**—पु. १ एक वन्य वनस्पति. २ त्याचा कांदा: कंदयुक्त मूळ.

**बिरमत**—स्त्री (गो.) ब्रह्महत्या. [ सं ब्रह्महत्या अप ]

**बिरमत**—न. (कु.) लचाड; आळ. बिरामत, बलामत पहा.

**बिरमुटी**—स्त्री. (कों गो.) चितूर; एक प्रकारचा किडा. बिरबाहुटी पहा.

**बिरयां**—क्रिवि. (गो.) वरचढ करण्यासाठीं; इरेनें; इरेस. **बिरयांक लागून काम करप**-इरास पेटून काम करणें [सं. वीर्य]

**बिरवण**—स्त्री. (कों) आकृति; नक्षीकाम (लाकूड, भिंत, कापड, भांडें इ० वरील) कोरीवकाम किंवा नक्षीकाम. -स्त्रीन. (कु.) बीबिरवण पहा. **बिरविणें**-सक्रि. (सोनें, चांदी, सोन्याची तार, रेशीम इ० च्या) नक्षीकामानें सजविणें, (वस्त्र इ० स) शोभा आणणें. [ बिरवण ]

**बिरसुडणें**—उक्रि १ (खोड, फांदी इ० चीं) पानें तोडून, ओरबडून काढणें, भिड(र)सुडणें पहा. २ पानें (किडींनीं) खाऊन फाया पर्णरहित करणें.

**बिरेस्तार**—पु. (गो.) बृहस्पतिवार; गुरुवार [ म. बृहस्पति+वार; अप. ]

**बिराड**—न. (कु. गो.) बिऱ्हाड पहा

**बिराणा**—पु. बंदुकीच्या दारूचा दाणा, कण. [ हिं. बिरनी =लहान दाणा ] ०**दारू, बिराण्याची दारू**-स्त्री. रवेदार, कणीदार बंदुकीची दारू.

**बिराणा**—पु. वीरपुरुष; वीरभद्र. [ वीरराणा ]

**बिराणा**—पु. (गवई लोकांत रूढ) तबल्यावरच्या शाईमध्यें पडणारी चीर. 'बिराणा मोठा पडला' [तुल० का बिरि=फुटणें, तडकणें ]

**बिराणा-ना**—वि. परका; तिऱ्हाईत; अनोळखी; एखाद्याचें कुटुंब, नातें, देश इ० तील नव्हे असा. 'तो आम्हांस बिराणा आहे.' [ हिं. बिराना ]

**बिरादर**—पु भाऊ; भाऊबंद (सनदा, रोखे, दस्तैवज इ० मध्यें वापरतात). 'नाईकवाडी कसबे मजकूर याचे बिरादरीत विठोजी बिन हसाजी.'-शाछ १ १५२ [फा. बिरादर्] ०**भाऊ**-पु (व्यापक) जातभाई, नातलग, सगासोयरा **बिरादरी**-स्त्री १ बंधुसमाज, जमात २ भाऊपण; बंधुभाव 'बिरादरीसारखी चाल उभय दौलतींची आहे.' -रा ५ ८६ ३ भाऊबंदकी 'खाशाची बोली तैनात बरहुकूम बिरादरी.' -वाडबाबा १.५५ [ फा ]

**बिरामण**—पु. (कु) ब्राह्मण. [ सं. ब्राह्मण ]

**बिरामत**—स्त्री. खोटा आरोप; आळ. (क्रि० घालणें, आणणें; येणें). बलामत, बलागत पहा. [ फा बर्-आमद् ]

**बिरार**—पु. विकार

**बिरार**—पु (महानु.) स्पर्धा 'मुदिया चे हीरे। आंगुळिया तेजा चे वानसरे। करितांति बिरोरें। एकमेकें सी।'-शिशु ४०३.

**बिरियाणी, बिर्याणी**—स्त्री मांसमिश्रित मसालेभात, एक मुसलमानी पक्वान्न. पुलावा पहा [फा. बिर्यानी ]

**बिरी**—स्त्री स्त्रियांचा कानातील एक दागिना. [ हिं बीर ]

**बिरी**—स्त्री. (गो) पोंवली; पोफळीच्या पोयेचा द्रोण. विरी पहा [ बिरी ]

**बिरीज बिरीज होणें**—अक्रि (व) टेंकीस येणें, तकलीफ पावणें 'पैशासाठीं बिरीज बिरीज झाला.'

**बिरी(रु)द**—न. १ विद्या-कलादि गुणांत श्रेष्ठत्व असल्याचें चिन्ह म्हणून हात, दंड इ०स बांधतात तो दोरा, गंडा, बाहुभूषण. 'उष्ट्रानीं बिरिदें बांधोन। तुंबरापुढें मांडिलें गायन।' -एभा ५८३ 'जिवाचे धास्तीनें बावन ब्रिरुदांचे धणी, भले सर्दार, घोडे सोडून जीव जगविण्याकरिता पहाडात शिरले.' -भाब ९१. २ ब्रीद; बाणा, प्रतिज्ञा; अंगीं असलेल्या गुणाबद्दल वाटणारा अभिमान. 'परी अर्जुना तुझेनि वेधें। मियां वेवपणाची बिरुदें।' -ज्ञा १८.१३७२. ३ चिन्ह. ४ नावलौकिक, कीर्ति. 'तेथोनि तीर्थी शिरोमणी ऐसें बिरुद जालें।' -दाव १७५. [ स विरुद ] ०**वंत**-वि यशस्वी. -शर. **बिरुदाई(यि)त**-वि. प्रतिज्ञा करून पाळणारा; बाणेदार; बाणा बाळगणारा ब्रिदाईत. 'ऐशीं मिळोनि बिरुदायितें। आलीं बदरिकाश्रमा समस्तें।' -एभा ४.८० **बिरुदावलि**-स्त्री. बिरुदाची माळ. [ सं. विरुद+आवलि ]

**बिरुस**—वि. (बे.) कठिण [ का. बिरसु ]

**बिरोजा**—पु. निळया, हिरव्या रंगाचा एक पाषाण. यास रत्न म्हणतात. यांत भविष्य समजण्याचा अद्भुत गुण आहे अशी समजूत आहे.

**बिरोबा**—पु. १ (अशिष्ट) भैरव २ खंडेराव; खंडोबा. लोक खंडोबाच्या ठिकाणीं ५२ बीर आहेत अशी कल्पना करीत असल्यानें

बीर शब्दापासुन हा शब्द तयार झाला असेल. [ सं. भैरव; म. बीर, सं. वीर ]

**बिर्जे**—( कों. ) माशाची एक जात. हे मासे आक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात पकडतात.

**बिर्जूमाल**—वि ( राजा. कुण. ) समाईक, बिरजुमाल पहा

**बिर्मत**—स्त्री. ( गो. ) खोटा आरोप; आळ. बिरामत पहा. ०**घेवप**-( गो ) आरोप ठेवणें; आळ घालणें. ०**फुटप**-( गो. ) प्रायश्चित्त भोगणें.

**बिर्मुट-टी**—स्त्री. ( गो. ) एक प्रकारचें फुलपाखरूं

**बिर्मुट-टी**—स्त्री दाडू मारण्याचा एक प्रकार. [सं. वीरमुष्टि; म. वीर+मूठ ]

**बिऱ्हाड**—न. १ रहावयासाठीं भाड्यानें घेतलेली जागा, घर, खोली इ०. 'हें आमचें बिऱ्हाड हवाशीर आहे.' २ एखाद्या ठिकाणीं उतरून कांहीं काळ राहणें; मुक्काम, वसति; वास्तव्य 'ह्या खोलींत दुसऱ्याचें बिऱ्हाड आहे ' ३ बिऱ्हाडकरूचें सामानसुमान, खटलें, चीजवस्त, संसार 'आम्हीं येथून बिऱ्हाड उचलून तिकडे नेलें.' ४ तळाचा किंवा व्यापारी मंडळीच्या फिरत्या स्वारीचा निराळा भाग; एकाच व्यापाऱ्याच्या सामानाचा (माल, तंबू, गुरें इ०चा) एकटा स्वतंत्र समुदाय (तळावरील किंवा वाटेवरील). ५ भाड्यानें, भाडेकऱ्याप्रमाणें राहणें. 'आम्ही तेथें बिऱ्हाडानें आहों ' ६ भाड्यानें दुसऱ्यांच्या घरात राहणारें कुटुंब; भाडेकरू ७ गुप्तपणा; स्पष्टपणें न बोलतां चोरून ठेवलेला मुद्दा, मजकूर 'घरोब्यानें बोलत असतां आंत बिऱ्हाड ठेवणें चांगलें नव्हे.' [बिड(ढा)दूर पहा] ०**आटोपणें**-१ गाशा गुंडाळणें निघून जाणें. २ मरणें. ०**उचलणें**-एखाद्या ठिकाणाहून आपली चीजवस्त घेऊन निघून जाणें; तळ हलविणें. ०**करणें**-१ कायमचें वास्तव्य करावयाच्या उद्देशानें आपल्या सामानासुमानासह बायकामुलांसह एखाद्या ठिकाणीं राहणें २ एखाद्याच्या इच्छेविरुद्ध त्याच्या घरीं किंवा शरीरांत ठाणें करून राहणें. 'कफानें माझ्या छातींत बिऱ्हाड केलें आहे.' **चिंचवाचें बिऱ्हाड पाठीवर**-फारसें लटांबर जवळ नसणें. सामाशब्द- ०**करी-करू**, **बिऱ्हाडू**-पु १भाड्यानें बिऱ्हाड करून राहणारा इसम. २ बिऱ्हाडाचा मालक किंवा रहिवाशी. बिऱ्हाड अर्थ ४ पहा. ०**खर्च**-पु. बिऱ्हाड करून राहण्याबद्दल येणारा, जागेचें भाडें वगैरेचा खर्च. ०**बाजलें**-न बाडबिस्तरा; सामानसुमान; चीजवस्त; बोचकें (प्रवाशी इसमाचें); खटलें. **बिऱ्हाड बाजलें संगातीच असणें**-घर, बायकांमुलें इ०पासुन अलिप्त, मोकळें असणें; मागें लटांबर नसणें, सडेसोट असणें.

**बिल**—न. १ भोंक; बीळ; उंदीर, घूस, साप इ०चें राहण्याचें घर. २ श्वापदादिकाची गुहा. बीळ पहा. [ सं. ]

**बिल**—न १ विकलेल्या जिनसांची किंवा केलेल्या कामाबद्दलची याद व त्याबद्दलच्या पैशाची मागणी. २ कौन्सिलांत चर्चिला जावयाचा कायद्याचा मसुदा, खर्डा. ३ पत्रक; याद; तपशील. [ इं. ]

**बिल्एकरुई**—क्रिवि. एकनिष्ठपणें. ' तरी बिल्एकरुई दप्तर चित्तारूढ करितील ' -रा ६.६०२. [ फा. बिल्+यकरूई ]

**बिलकावणें**—अक्रि. (कु.) ऐटीनें रिकामें फिरणें; चैन करणें.

• **बिलकू(कु)ल**—क्रिवि. १ शिल्लक न राखतां; पूर्णपणें; एकूणएक. ' गुजारत परशराम खंडेराव याजकडे वाडा शुक्रवार येथील भोजनखर्चाचें वगैरे बिलकूल...' -वाडदुबा ४२. २ अगदीं; मुळींच ( नाहीं ). [ अर. बिल्कुल्ल् ]

**बिलग**—वि. वेगळा; निराळा; पृथक्; विभक्त. विलग पहा. [ सं. विलग्न; म. विलग; हिं. बिलग ]

**बिलगणी**—स्त्री. चिकटणें; भिडणें. इ० [ बिलगणें ]

**बिलगणें**—अक्रि १ चिकटणें; अगदीं जवळ राहणें, जाणें. २ कवटाळणें; मिठी मारणें; घट्ट धरणें; आवळणें. ३ (ल.) निश्चयानें चाल करणें; धांवून जाणें; ( मारावें, घ्यावें, लुटावें इ० कारणासाठीं ) एखाद्याच्या अंगाला झोंबणें. [ सं विलग्न; विलग्ग; हिं. बिलगना ]

**बिलंद-दी**, **बिलंदर**—वि. १ मुख्य; प्रधान; श्रेष्ठ; पहिल्या-प्रतीचा २ उंच; दुर्गम; बेलाग; अथांग. ' असीरगड किल्ला, मातबर बिलंद आहे. ' -पारसनीस ब्रप ६४ ' पहाडी किल्ला असा एका दिवसात यावा असें कांहीं नाहीं; किल्ला फार बिलंदर आहे.' -चंद्रचूड दप्तर १ १११. ३ ( ल. ) पक्का; अट्टल; ठकबाज ( लुच्चा, भामटा, चोर ). जसें-बिलंद-चोर-सोदा-भंगट-हरामी. ' रमाकांत कारभारी हा बिलंदर लुच्चा असल्यामुळें त्याचे पक्षास बरेच लोक होते ' -निचं [ फा. बुलंद ]

**बिलंदी**—स्त्री. गाण्यांतील एक ताल. [ फा. बुलंदी ]

**बिलंपद**—न. विलंब कालांत तंतुवाद्य वाजविण्याचा एक प्रकार. -कला १३७. [ सं. बिलंबित. विलंब+पद ]

**बिल्लिल**—अ. ( गो. ) मांजरास बोलाविण्याचा एक शब्द. [ ध्व. ]

**बिलबिलणें**—अक्रि. अगदीं मऊ, नरम, बिलबिलीत होणें ( फळ इ० ) [ बिलबिलीत ]

**बिलबिला**, **बिलबिलीत**—वि. १ नरम; चेपण्याजोगा; लिबलिबीत; शिळें झाल्यामुळें, अतिशय पिकल्यामुळें, चोळवटल्यामुळें फारच मऊ असें ( फळ, गळूं इ० ). २ (ल.) कष्टाच्या कामामुळें दीन, गरीब झालेला; निर्वीर्य झालेला (माणूस, जनावर इ०). [ लिबलिबीत; लबलब अनुकरण वाचक ]

**बिलंबी**—स्त्री. एक फळझाड.

**बिलमोगरा**—पु. बटमोगरा. ' फोवीन मोती। घालीन वारा। हाकलीन वारा। बिलमोगरा बिलमोगरा। ' -मसाप २.२३३.

**बिलवर, बिलोर, बिल्वर, बिल्लोर**—पु. १ उंची कांच; स्फटिक. २ एक खनिजविशेष. ३ एक प्रकारची उंची कांचेची बांगडी. ' मी तुला तुझ्या हाताची बिलोरांची एक जोडी आणीन. ' –मराठी ६ वें पुस्तक (१८७५) १९१. ४ साधारण लांबट आकाराचे पैलू पाडलेली सोन्याची बांगडी [अर. बिल्लौर] **०खाना**–पु. कांचेचें सामान संभाळण्या-ठेवण्याचें खातें **बिलवरी बिल्वरी, बिलोरी**–वि. कांचमण्याचें; स्फटिकाचें; कांचेचें. [फा. बिलौरीं] **०आरसा**–पु. चांगल्या कांचेचा, पैलू असणारा आरसा.

**बिलवा**—पु. बिब्बा; भिलावा पहा.

**बिला**—अ. वांचून; विरहित; शिवाय, विना. [अर.] **०उजूर**–क्रिवि. हरकत न घेतां. ' बिला उजूर व बिलाकसूर दुंबाला करून चालुं देणें. ' –गोइसा १५.–रा१९.११५ **०कसूर**–क्रिवि. १ चूक, हयगय न करतां; बिनचूक. ' सेवक लोकांचीं वतनें नेमस्त करून त्याप्रमाणें बिलाकसूर पाववावी. ' –मराआ १२. २ निःसंदेह. –राव्यको ८.२१. **०महसूल**–क्रिवि जकात माफीनें. 'सामान जंगी सरकारांत मतलुब आल्यास... वेपारी याज पासोन बिलामहसूल खरीदी करण्याची परवानगी असावी. ' –रा ७.९४. **०शक**–क्रिवि. नि.संदेह; बेलाशक. ' तुम्ही फौजसुद्धा बिलाशक जाऊन सर खेलीस सामील होणें. ' –पया ४८६. **०हरकत**–क्रिवि. बिनहरकत; हरकत न घेता. ' तरी तुम्ही मुसलमानी कामकाज महजबाप्रमाणें बिलाहरकत करून हक्क लवाजिमा ... ' –वाडमा २.१०६. **०हुज्जत**–क्रिवि. बिनतक्रार. ' बिलाहुज्जत वर्तावें. ' –ऐटी २.७४.

**बिलामत**—स्त्री. खोटा आरोप; आळ; कुभांड; बलामत; बलागत पहा. (क्रि० आणणें; घालणें; येणें ). ' अशा प्रकारच्या व्रतवैकल्यांच्या व ब्राह्मण भोजनांच्या उद्योगांत अकस्मात् भलतीच बिलामत गळयात यावी. ' –पेशवेकालीन महाराष्ट्र ३८३. [फा. बर्+आमद्]

**बिलायती**—पु. (व.) पिंवळा धोतरा; याच्या मुळया औषधी असतात.

**बिलायती**—वि. (विरू.) विलायती पहा.

**बिलावर-ल**—पु. (संगीत.) एक राग. ह्या रागात षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण संपूर्ण. वादी धैवत, संवादी गांधार गानसमय दिवसाचा पहिला प्रहर. अलैय्या, कुकुभ; देवगिरी, नट, यमनी, शुक्ल, सर्पदा इ० प्रकार आहेत [हिं.] **०थाट**–पु. (संगीत.) एका थाटाचें नांव; ह्याचे स्वर येणेंप्रमाणें असतात. शुद्ध षड्ज, शुद्ध ऋषभ, शुद्ध गांधार, शुद्ध मध्यम, शुद्ध पंचप; शुद्ध धैवत, शुद्ध निषाद. **०सप्तक**–न. स्वरसप्तक पहा.

**बिलासखानी तोडी**—स्त्री.(संगीत.) एक राग. ह्या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात जाति संपूर्ण-संपूर्ण वादी धैवत, संवादी गांधार. गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर.

**बिलिंद, बिलिंदी, बिलिंदर**—बिलंदर इ० पहा.

**बिलिमारो**—पु (गो.) जत्रेंत पैशासाठीं तळी घेऊन फिरणारा एक नट.

**बिलू**—न. (कु गो.) लहान मांजर. [सं. बिडाल, प्रा. बिलाड-ल; हिं बिल्ला=बोका]

**बिलोरी**—वि. १ घोडयाच्या रंगांपैकीं एक. –अश्वप २८. २ बिलवर पहा [बिलवर]

**बिलोरीधोतरा**—पु धोतऱ्याचा एक प्रकार.

**बिल्कू(ल्कु)ल**—अ. सर्वस्वीं, मुळींच; अगदीं; बिलकूल. –पदमव ८५. ' आला मागत शुल्क मुल्कचि मशीरुल्मुल्क बिल्कुल्कसा। ' [अर. बिल्कुल्ल]

**बिल्फैल, बिलफैल**—अ खरोखर; वस्तुतः; अगदीं. ' बिल्फैल नातवान. ' –रा १५ २४८. [अर. बिल्फिअल्]

**बिल्मक्ता**—क्रिवि मक्त्याप्रमाणें; करारप्रमाणें. ' बिलमख्ता खंडणी केली ते कबूल असोन.' –रा १८.५३. [अर. बिल्+मक्ता]

**बिल्याण, बिलियाण**—पु विवक्षित आकाराचा व पैलू पाडलेला विलायती हिरा, तरतरा. [इं ब्रिलियंट; फ्रें. ब्रिला]

**बिल्(ल्ला)स**—स्त्री. (ना. व) वीत ' बिल्लसभर कापड चोरलें. ' [फा. बिलिश]

**बिल्ला**—पु १ शिपायाच्या पट्टयाला छातीच्या भागावर असलेली धातूची तबकडी, चपरास; छातीवर लावण्याचें पदक. २ खूण; निशाणी, तिकीट. ' पोरांचा बिल्ला गळयात बांधल्याशिवाय इंद्र तेथें येऊं देणार नाहीं ' –नाकु ३ ८३ [हिं.] **बिल्लेकरी**–पु बिल्ला असलेला शिपाई; चपराशी; जासूद.

**बिल्ली**—स्त्री. भाटी; माजर 'बुडाल्या कुलांगनाच्या भेली। पतीला करून ठेविली बिल्ली। ' –पला ६७. [सं. बिडाल; प्रा. बिलाड-ल, हिं.]

**बिल्व**—पु. १ बेल; बेलाचें झाड. हें शंकरास प्रिय असतें. ' मंदरामल बकुल बिल्व कुट अशोक चंदन जाती। ' –नवनीत (नरहरीगंगारत्नमाला) ४३२. २ बेलाच्या झाडाचें पान. ३ बेलाचें फळ; बेलफळ ' दृढ बिल्व पीनस्तन । वरी मुक्ताजाळी विराजमान। ' –मुआदि १९.२१ [सं.] **०पत्र**–न. १ बेलाचें तीनपानी दल. २ (खडीकाम) वस्त्रावर खडीनें काढलेली बेलाच्या पानाची आकृति.

**बिल्ह**—न. (व.) गुरांना बांधण्याकरितां त्यांच्या गळयापुरतें उपयोगांत आणलेलें दोरखंड. बिरडें पहा.

**बिवड**—पु. १ बीज; कोंब; वीर्य. २ बीजापासून झालेला माणूस, प्राणी, झाड इ०. ३ मुख्य धान्य पेरण्यापूर्वी काढलेलें आड पीक. ' तागाचा बिवड सर्व मालास चांगला. ' ४ खत. ५

पिकांचा क्रम; पाळी. ६ खत किंवा पहिलें पीक यामुळें तयार झालेली उत्तम जमीन. ' आतां श्रीकृष्णवाक्यबीजा निवाडु। आणि संजय सात्त्विकाचा बिवडु। ' -ज्ञा १८.१३३ ७ बेवड पहा.

**बिभड, बिवड जमीन**-स्त्री. जिच्यावर पूर्वी आड पीक काढलें आहे अशी बीजपोषक जमीन. [ सं. बीज+वृध्; प्रा बीअ+वड्ढ ]

**बिवलकरी**—वि. १ ( पेशवाईअखेर फडांतील बिवलकर नावाच्या कारकुनानें घालून दिलेलें अक्षराचें वळण. हें सोपें व सुंदर असे यावरून ). बिवलकराच्याप्रमाणें काढलेलें साधें, गोंडस ( अक्षर, कित्ता, वळण, लिहिणें इ० ). बिवलकरी वळणाचीं मोडी अक्षरें साधीं व गोल असून गोंडस दिसतात. हें वळण जनोबाभट्टी वळणापेक्षां निराळें आहे २ ( ल. ) साधी, सरळ, बाळबोध वागणूक, वळण. [ बिवलकर=आडनांव ]

**बि(बिं)वळा**—पु एक जंगली वृक्ष.

**बिवळा**—पु. १ ( रुजावयासाठीं जमीनींत पुरलेलें ) नागवेलीचें वेटोळें, केळ इ०चा खुंट; वाढतें कलम. २ (कों) पानवेल. ३ दोन ते सहा कुडव धान्य मावेल एवढी बियाण्यासाठीं राखून ठेविलेल्या बीजांची भातेण इ० मध्यें बांधलेली मुडी. मुडी पहा ०**उतरणें**-एखाद्याचें फुगलेलें पोट ओसरणें, उतरणें. **बिवाळो**-पु ( कु गो. ) लहान मुडा; मुडी

**बिवाडा**—पु ( कों. ) (नाविक) गलबताच्या कांठास आंतील जास्त जाडीचा व कमी रुंदीचा दुरमीण ठोकतात तो.

**बिशप**—पु १ ख्रिस्ती धर्माध्यक्ष, धर्माधिकारी. 'पॉलिकार्पेला आपल्या मंडळीच्या कार्यासंबधानें इतर बिशपाना सागायला फार आवडे.' -ज्ञानो ३१ १ १९१८. २ बुद्धिबळाच्या खेळांतला उंट. [ इं ]

**बिशा(सा)द्-त**—स्त्री. १ मालमत्ता; सामान; सामुग्री. ' नाहींतरी मालबिसातीची तमा न धरितां भांडियाचे माराखालीं तराडें फोडून टाकून सलाबत पाडावी. ' -मराआ ३८. -पेद २० ३. २ पैसा, इस्टेट; जिंदगी. ' वडिलांचे वेळची जी काय बिशाद होती ती आम्ही सर्वांनीं वांटून घेतली.' ३ किंमत; मोल; महत्त्व ' पागोट्याची बिशाद तो काय आणि भांडतां कशास ? ' ' शंभर रुपये म्हणजे बिशाद काय ? जातां जातां मिळवूं. ' ४ सामर्थ्य; ताकद; मजाल, प्राज्ञा; हिंमत; छाती. [ अर. बिसात् ]

**बिशी**—स्त्री. १ होणारा खर्च सारखा वांटून घेऊन एकत्र भोजन करणाऱ्याचें मंडळ; खाणावळ; ( इं. ) क्लब. २ मंडळींतील सर्व आसामींनीं आपापले दरमहाचे पगार आळीपाळीनें एकाच्या स्वाधीन करणें. ( क्रि० करणें ). भिशी पहा. [ गु. वीसी ]

**बिस**—न. कमळाचा देठ. [ सं ] ०**तंत-तु**-पु. १ कमळाच्या देंठांतील धागा. ' जैसा कमळमृनाळ बिसतंत। तेसा सूक्ष्म नाद अत्यंत । ' -एभा २१.४०४. ' जे मुक्ताफळ भोजन करिती बिसतंतु भक्षुनि फराळ। ' -मोकर्ण २८ १७. २ कमळाचा देंठ.

**बिसिनी**-स्त्री. कमलिनी. ' सविता बिसिनीसि वरी कीं भेटे तो गुणज्ञ ती कविता। ' -मोकृष्ण ८६.२७. [ बिस ]

**बिसखपरा**—पु. एक औषधी वनस्पति. [ हिं ]

**बिसनी**—पु व्यसनी; दुराचारी; व्यभिचारी; हलकट; बाहेरख्याली. ' तेवढयांतच नथ मुरकी। बिसनीची नजर तरकी। बेदर्दि दुरुन गुरकी। ' -प्रला १११. -वि. (बे.) चांडाळ. [ सं. व्यसनी ] म्ह० फुकट बिसनी आणि तंबाखू उसनी. ०**बेखर्ची**-वि पदरचा पैसा खर्च न करतां लोकांच्या पैशानें व्यसनें भागविणारा.

**बिसलटा-लूटा**—पु. (तंजा) लग्नापूर्वी वरपक्षास वधूगृहीं जेवणाचें आमंत्रण. [ का. बिसलु=ऊन+ऊटा=जेवण ]

**बिसा**—वि. ( व. ) सुस्वभावी; सुशील. [ फा बेह्=चागला ]

**बिसाट**—वि. १ अनियमित; यदृच्छेनें होणारें. 'तेवीं कारणहेतुयोगें। जें बिसाट कर्म निगे। ' -ज्ञा १८.३७५ २ भलतें; स्वैर उच्चारलेलें. ' तयाचें बिसाट शब्द। सुखें म्हणों येती वेद। ' -ज्ञा १८.१६४५. **बिसाटणें**-अक्रि. पसरणें; फांकणें; फैलावणें.'आपुला वसौटा जाळुनी। बिसाटे वन्ही। '-ज्ञा १८.६२४. [ सं. विस्तृत ]

**बिसाद्-दी**—स्त्री. जिनगी; बिशात पहा. ' नैबानें कुल बिसादी लुटून खालसा केली. ' -इमं ३३.

**बिस्कि(स्कु)ट**—न. गव्हाचें केलेलें एक वडयांप्रमाणें हलकें खाद्य. [ इं. बिस्किट ]

**बिस्तरवार**—पु. ( अप. ) गुरुवार; बृहस्पतिवार [ सं. बृहस्पतिवार ]

**बिस्तरा**—पु. पथारी; अंथरूणाप्रमाणें कांहीं साधन. [ फा. तुल० सं. विस्तृ-स्तर ]

**बिस्म, बिस्मत**—स्त्री. ( शाप. ) एक धातु. याचा औषधी उपयोग आहे [ इं. बिस्मथ ]

**बिस्मिल्ला**—पु. १ मुसलमानांत मुलाच्या अगर मुलीच्या पांचव्या वर्षी घोडयावरून मिरवणूक काढून मशीदींत नेऊन बिस्मिल्लादि कुराणाचे कल्मे पढवितात तो उपनयनसदृश विधि. ' याचे कन्येची बिस्मिल्लाची शादीसाठीं रविवारीं रात्रीं मेहदी निघाली. ' -रा ५.५७. २ मंत्र म्हणून विधिपूर्वक हत्या करणें. ' मुर्गीस बिस्मिल्ला तो कशास ? ' -हौकै ११. ३ कार्यारंभीं परमेश्वराला नमन; श्रीगणेशायनमः. [अर. बिस्मिल्ला=परमेश्वर. बिस्मिल्ला-हिर्रहमानिर्रहीम्=दयाळू व कनवाळू अल्लाच्या नांवानें ]

**बिस्या(स्या)र**—वि. फार; पुष्कळ. ' बिस्यार खुशवक्ती हांसील जहाली. ' -पया ३८४;४००. [ फा. बिस्यार् ]

**बिस्वक-बिस्वा**—पु पांडाचा किंवा पादाचा विसावा भाग; एक चौरस काठी; पाद हा बिघ्याचा विसावा भाग आहे. ' आणि गढी-कोट जिमी-बिघा बिस्वा-जागा तनखा वगैरे बराबर

वाटून घ्यावा.' -वाडबाबा १.२२. [सं. विंशति; म विस्वा; हिं. विस्व=बिघ्याचा २० वा हिस्सा ]

**बिह(हि)णें**—अउक्रि. (अप.) भिणें. 'ना तरी पवनु मेघासी बिहे। कीं अमृतासी मरण आहे।' -ज्ञा २.१४ -अमृ ७५६. [सं. भी; प्रा. बिह; हिं. बिहे इ० ] **बिहालेपण**-न. (महानु) भीति. 'तें बिहालेपणें महेशें लपविलें। समुद्रा माजीं।' -शिशु २३९.

**बिहरी**—वि. (भि.) दुसरी. 'तिर्यी बिहरी येय्यी पोयरों चोई लिईन आली.' -भि २३.

**बिहाग**—पु (संगीत) एक राग ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. आरोहात ऋषभ, धैवत वर्ज्य. जाति औडुव-संपूर्ण. वादी गांधार, संवादी निषाद. गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर. ह्या रागांत तीव्र मध्यमाचा अल्पप्रयोग विवादी म्हणून केलेला दिसतो.

**बिहागरा**—पु (संगीत) एक राग. ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गाधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत व कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत ऋषभ धैवत वर्ज्य. जाति औडुव-संपूर्ण. वादी मध्यम, संवादी षड्ज. गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर. या रागांत दोन मध्यम व दोन निषादांचा प्रयोग होतो.

**बिहांबा-बी**—पुस्त्री. मिठांत मुरलेला आंबा; बेहंबी. [ बीं+आंबा ]

**बिहावा**—पु. भीति. [ बिहणें; भिणें ]

**बिहिती**—स्त्री. भीति. 'भवसिंधूचेनि माजें। कवणासि धाकु नुपजे। येथ जरी कीं माझे। बिहिती हन।' -ज्ञा १२.८८. [ सं. भीति ]

**बिही**—न. एक फळझाड, ०**फळ**-न. एक आंबटगोड फळ.

**बिहीक, बिहो**—स्त्रीपु. भय. -मनको [ सं. भी; प्रा. बिह ]

**बिळगा**—वि. काळा पांढरा मिश्र. [ का. बिळी=पांढरेपणा ]

**बिळूक**—न. भोंक; बीळ. 'ह्या कागदाला दोन बिळकें आहेत; त्या भिंताडाला पारेनें (पाहारीनें) बिळूक पाड.' [ बीळ ]

**बी**—स्त्री. १ बीज; फळाच्या आंतील जो कठिण अंश तो. २ अंड; वृषण. ३ गळूं इ०तील आंतील भाग, गाभा. ४ लसणीची पाकळी. [ सं. बीज ] ०**मोडणें**-समूळ उच्छेद करणें; समूळ नाहींसें करणें. ०**रुजणें**-परिणामकारक होणें; यशस्वी होणें; फलद्रूप होण्याच्या पंथास लागणें. ०**रुतणें**-(हुद्दा, अधिकार, जागा, धंदा इ०त) प्रवेश होणें. **बियांबा-ब्यांबा**-वि. १ पेरावयासाठीं बाजूस काढून ठेविलेलें (धान्य, दाणे, फळें इ०). २ मूळच्या उत्तम बीजाचा, वीर्याचा; असंकीर्ण; अस्सल; शुद्ध ३ अस्सल; अट्टल, पक्का; (चोर, भामटा, लुच्चा). ४ ज्यांत फार बिया आहेत असें (पेरू इ० फळ). ५ बियाजें म्हणून राखून ठेवण्यास योग्य. [ बी ] **बियाडकू-बियार्क**-न. (गो.) कोंब आलेला नारळ.

**बीं**—न. १ (समुच्चयार्थी) बीजें; (भाजी, गवत इ०चें) रोपें. २ पेरावयासाठीं राखून ठेवलेलें धान्य. पेऱ्याचें बीज, बियाणें. म्ह० १ बीं तसा अंकुर २ (कों.) बीं तसें भात. ३ बिया, दाणे, क्षुद्र फळें, आठळ्या, मुळें, कलमें, पानें इ० उत्पादनाचें मूळ म्हणून मानलेली कोणतीहि वस्तु. ४ कापसासारखे ढग; कसर; खार (क्रि० निघणें; विरणें; वाहणें). [ सं. बीज; प्रा. बीअ; हिं. बीया ] ०**फेंकणें**-बीं फेंकून पेरणी करणें. ०**दाणा शिळटणें**-पेरलेलें बीं न उगवणें; फार पाऊस पडून जमीनीस गारठा आला असतां पेरलेलें बीं गारटून न उगवणें ०**बियाणें-बिरवण-बेणें-ब्याणें-भरण-भरणा**-नपु. पेरण्यासाठीं किंवा रोपे लावण्यासाठीं राखून ठेविलेलीं बीजें, मुळें, कांदे, कलमें इ० (समुच्चयानें) ०**बिवळा**-पु १ बीं बियाणें. 'यंदा शेतभात कांहीं करणार होतों, परंतु बींबिवळा कोठें मिळेना म्हणून सोडलें.' २ मुडी; बिवळा अर्थ ३ पहा. ०**बुडी-बूड**-स्त्री. १ पीक बुडणें; अजीबाद बियापुरेसेंहि न पिकणें. नाश पावणें २ (ल.) नायनाट; उच्छेद; कुलक्षय. 'तुका म्हणे अरी योगाची तांतडी। आशेची बीबुडी करीं आधीं।' -तुगा २७२७. [ बीं+बुडणें ] ०**बेवळा**-पु. बी बियाणें. बीबिवळा पहा. 'बी-बेवळा उसनापासना आणावा आन् कष्टांत मरावं.' -खेया १३. ०**भरण**-न. १ पेरणी. २ गर्भाधान; संग. 'होईल कधीं बींभरण। आटवीन चरण।' -प्रला २१८.

**बी**—स्त्री. (गो.) द्वितीया; बीज. बे पहा. [ प्रा. बि; हिं. बे]

**बी**—अ. सुद्धां; देखील; हि. 'तुझा हुद्दाबिद्दा मला कायबी नग.' -बाय २.२. २ शिवाय; त्याचप्रमाणें; आणखी. [सं. अपि; फ्रें.जि. वी ]

**बीक**—न. १ आवड; गोडी. 'वेधें परिमळाचें बीक मोडे। जयाचेनि।' -ज्ञा ६.१५. २ सामर्थ्य; बळ; अधिकार. 'तुज वडीलपणाचें बीक।' -कथा ३.१४.१८७. -ज्ञा १३.७००. ३ शोभा; तेज; सौंदर्य. 'सुख जेथ सुखावलें। स्वानंदासी बीक आलें। -स्वादि ४.३.८५. -ह ७.३. ४ भूषण. 'सज्जनपणाचें अंगीं। बीक जया।' -ज्ञाप्र १०८. -भाए ४६. बिक पहा.

**बीकरान्, बीगायत**—वि. अमित. -आफर्मानें.

**बीगार**—स्त्री. वेठ; बिगार पहा. -आफर्मानें

**बीच**— अ. मध्यें; आंत; मधील. [ हिं ] म्ह० बीचमे मेरा चांदभाई=मध्यें आपलेंच घोडें पुढें ढकलणें.

**बीज**—स्त्री. द्वितीया; शुक्ल किंवा कृष्णपक्षांतील दुसरी तिथि. भाऊबीज. 'बीजेपासुन चढत्या कला।' -राबि १.३७. [ सं. द्वितीया; प्रा. बीइज्ज, बिज्जय; गु. बीजू ]

**बीज**—न. १ बी; फळाच्या आंतील कठीण भाग. २ धान्यादिकांचें बीं. 'मुडाहूनि बीज काढिलें। मग निर्वाळलिये भूमीं पेरिलें।' -ज्ञा ९.३६. 'शुद्धबीजा पोटीं। फळें रसाळ गोमटीं।'

–तुगा २२७२. ' बीज तैसें फळ येत असे गोड । ' -ब १२३.२. ३ खाण; कुल; बिजवट बी. ४ पुरुषाचें वीर्य; रेत. ५ कारणीभूत किंवा मूळ मुद्दा; गोष्ट, क्रिया, मूल; कारण; उगम; आधार; निमित्त. ' दर्शना बीजें तेथें । जाणीव आणी । ' –अमृ ७ ११९. ६ खोल हेतु; भाव; इंगित; वर्म; अभिप्राय; गूढार्थ. ' हे तुम्ही म्हणतां ह्यांत बीज काय ! ' ' नातरी अर्जुना हें बीज । पुढति सांगिजेल तुज । ' –ज्ञा ९.३४. ७ संख्या किंवा परिमाणें यांबद्दल अक्षरें योजून करावयाचें गणित; बीजगणित. ८ गूढमंत्राक्षर. 'परी स्यां अभ्यासिला जो सबीज । तो स्वामी ऐकावा । ' –जै ६३.१७. [सं.] **म्ह०** यथा बीज तथा अंकुर=बीज तसा अंकुर; झाड तसें फळ. **भ्रष्ट किंवा भर्जित बीज–अंकुरत नाहीं, भर्जित किंवा भ्रष्ट बीजास अंकुर नाहीं, भाजलें बीज उगवत नाहीं, भाजलेल्या बीजास मोड येत नाहीं**–निष्काम, निस्स्वार्थी, निवळ अध्यात्मिक, ईशप्रीतिप्रेरित अशा कृत्यांना फळ येत नाहीं म्हणजे पुढल्या जन्मीं मिळणारें चांगलें वाईट फळ येत नाहीं. त्यांच्या कर्त्याला श्रेष्ठ सुख जो मोक्ष तोच प्राप्त होतो सामाशब्द– **०कणिका**–स्त्री. लहान बीज. ' सविस्तर वटत्व जैसें । बीजकणिकेमाजीं असे । ' –ज्ञा ९.४१०. **०कोश, बीजाशय**–पु फुलांतील एक भाग; बीजाची पिशवी. [बीज+कोश, आशय=सांठा] **०गणित**–न. गणिताचा एक प्रकार; अव्यक्त गणित; बीज अर्थ ७ पहा. ( इं. ) आलजेब्रा. **०गर्भ**–वि. स्वाभाविक; प्रकृतिज. ' बीजगर्भ गुण अर्थात् आपल्यामध्यें संक्रांत होतात. ' –नीति ३३१. **०बेंदूर**–पु. १ शूद्रांचे विधी; उत्सव; चाली संप्रदाय इ० समुच्चयानें (क्रि०करणें) ' आपण आपले कुणबी आपणांस आपला बीजबेंदूरच बरा. ' २ शेंदूर, गूळ; बैलाचीं चित्रें, फुलांच्या माळा इ०चे नजराणे शेतकरी लोक पाटील, कुळकर्णी, देशमुख इ०ना देतात तो. [बीज आणि बेंदूर हे दोन सण] **०भरण**–न. बीं भरण पहा **०भाव**–पु बीजरूप अव्यक्त. ' जयासी कां बीज भावो । वेदांतीं केला ऐसा आवो । ' –ज्ञा १५.५१२. **०मंत्र**–पु. १ (महानु) जादूटोणा; मंत्रतंत्र. 'जिए कामाचेनि बीजमंत्रे । फीटेति ना । –शिशु ८०१. २ मूलमंत्र. **०मार**–वि. पेरलेल्या बीजाइतकेंसुद्धां धान्य देत नाहीं अशी (जमीन). [बीज+मारणें] **०मुद्रा**–स्त्री. बीजाचा आकार; बीजाकार. ' कां बीजमुद्रेआंतु । थोके तरू समस्तु । ' –ज्ञा १३ ९५. **०वर्म**–न. मुख्य गोष्ट; रहस्य. **०संस्कार**–पु. एखाद्या प्राचीन सर्वमान्य ग्रंथादिकांत उणा किंवा अधिक फरक करणें. ' त्यानें पूर्वीच्या ग्रंथांत सुधारणा केली आहे; ही सुधारणा कोठें स्वतंत्र रूपानें दिली आहे व कोठें बीजसंस्काराच्या रूपानें सांगितली आहे. ' –टि ४. ४१२. **बीजांकित**–वि. बीजाक्षरानें अंकित, लांछित, परिवेष्टित. ' रामनाम बीजांकित । ' [ सं. बीज+अंकित ] **बीजांकुरन्याय**–पु. १ परस्परांत असलेला कार्यकारणसंबंध; जसें–बीजापासून अंकुराची उत्पत्ति आणि अंकुरापासून बीजाची उत्पत्ति. ' आधीं झाड कां बी. ' याप्रमाणें दोन परस्पर संबद्ध गोष्टींची कालानुपूर्वता ठरवितां येत नाहीं तेव्हां दृष्टांत देतात. ' अभिमानी जो विश्वास । तो चतुराननाचा अंश । त्यासीं ऐक्य मानी हा विश्वास । बीजांकुरन्यायें । ' २ जसें बी तसें फळ; जसें कर्म तसा परिणाम. [ बीज+अंकुर+न्याय ] **बीजांकुरभाव**–पु. बीजाची अंकुरावस्था. ' घन-अज्ञान सुषुप्ती । तो बीजांकुरभावो म्हणती । ' –ज्ञा १५.८९. [बीज+अंकुर+भाव ] **बीजारोप–रोपण**–पुन. १ बीज पेरणें. २ कोणत्याहि कार्याचें किंवा परिणामफलाचें मूळ घालून ठेवणें. 'करी राम कथा बीजारोपण। ' –रावि १. [सं. बीज+आरोप, आरोपण] **बीजाक्षर**–पु. १ मूळाक्षर. २ मंत्राक्षर; मंत्राचें आद्याक्षर. बीज अर्थ ६ पहा. [ बीज+अक्षर ] **बीजिका**–स्त्री. बीज; बी. ' जे भवद्रुमबीजिका । जे प्रपंचाची भूमिका । ' –ज्ञा १५.८२.

**बीजक**—न. १ कापड इ०च्या गठ्ठयांत घालतात किंवा वर लावितात ती किंमत, वजन, जात इ० ची चिठ्ठी; आंकडा; ( इं. ) लेबल. २ यादी; पट्टी; टाचण. [ सं. ]

**बीजन**—स्त्री. (निरपराध जित लोकांची कत्तल. बिजन पहा). ' कानपूर सर केल्यानंतर त्यांनीं तेथें जी सररास बीजन केली. ' –सन १८५७. पृ. ३९१. [ बिजन ]

**बीजपूरक**—पु. एक औषधी. महाळुंगी, लिंबुणी किंवा कोकंबी. [ सं. ]

**बीज(च)बंद**—वि. मध्यभागीं पेच घालून धागा बांधलेली ( विडी ). [ हिं. बीच=मध्यें ]

**बीजावळी**—स्त्री. भिन्नता. –हंको. [ हिं. बीजा=दुसरा ]

**बीजें**—न १ गमन; जाणें. ( क्रि० करणें ). ' मग बीजें केलें मुरारी । सभामंडपासी । ' –शिशु ७२४. २ आगमन; येणें. 'आड पडे म्हणे घरा । बीजें कीजो । '–ज्ञा१३.३७५.–कथा४.१७.३१. [ सं. व्रज् ]

**बीट**—पु. एक प्रकारची विलायती गड्डेभाजी; विलायती गोड मुळा. यापासून साखर होते. [ इं. ]

**बीट**—पु. विभाग; तुकडा. ' बीटाची विभागणी व्यक्तींच्या नांवांवर व्हावी. ' –के १४.६.३०. [ इं. ]

**बीट**—पु. ( राजा. ) पुकारा; लिलांव. ( क्रि० करणें ). [ इं. बिड् ]

**बीट**—न. ( कों ) ( सुतारी ) एक सुतारी हत्यार; गोलची; डोलमीठ. ( क्रि० मारणें ). [ इं. बिट् ]

**बीड**—न. १ अशोधित, अशुद्ध लोखंड. २ ओतींव लोखंड, ( इं. ) कास्ट आयर्न. ३ तांबें इ०चे पत्रे ज्यावर वाढवितात, घडवितात तो ठोकळा; ऐरण; मोठा चौरस तुकडा. ४ एक क्षार; काळें मीठ; बिडलवण. [ तुल० सं. व्यंड=पोलाद ]

**बीड**—स्त्रीन. ( कों. ) गाड्यावर भरलेलें गवत इ०स आंवळावयाची जाडी दोरी.

**बीड**—न. १ नमुना; माप, परिमाण २ जात. वीड पहा. 'त्या बिडाचा धोतरजोडा असला किंवा त्या बिडाचें पागोटें असलें तर काढ.' [ विडी=कडें ]

**बीड**—स्त्री. ( व. ) गवत वाढलेली पडीत जमीन. 'पुढील वावरापल्याड बीड आहे.'

**बीण**—न. ( गो. ) भोंक, बीळ पहा.

**बीत**—स्त्री. मुलगी; कन्या. कागदपत्रांत बापाच्या नांवापूर्वी योजितात. जसें—'लालबीबी बीत सैयद अहमद सुभेदार पोलीसकोर.' [ अर. बित् ]

**बीत(ओळ)**—स्त्री. ( जमाखर्च ) कागदाच्या दोन्ही अंगांस सारखी कोरी जागा सोडून काढलेली रेघ

**बीत**—स्त्री. जम; बस्तान. 'फार मेहनत बीत बसावयास लागली.' –पेद १९.६१

**बीद्-ध**—स्त्री. १ रस्ता; गल्ली, मार्ग (गांव, खेडें इ०तील) बिदी पहा. 'दुरी जाऊनि बीदी बसति।' पूजावसर. २ ( कों. ) गटार. ३ ( कु. ) विटीदांडूच्या अगर गोट्यांच्या खेळांतील लहान खळगा; गल. [ सं. वीथि; हिं. बीद ]

**बीन**—पुन. ( संगीत ) एक तंतुवाद्य. याच्या दांडीच्या दोन टोकांस दोन भोपळे असतात व मध्यें दांडीवर २० पडदे असतात. [ सं. वीणा; हिं. बीन् ] ०**कार**–पु बीन वाजविणारा.

**बीन**—स्त्री. लेखाचा मथळा, एका बाजूस, समासांत दिलेला सारांश.

**बीन**—बिन पहा.

**बीभत्स**—पु. नवरसापैकीं एक रस. किळस उत्पन्न करणाऱ्या वर्णनांत हा रस असतो. उदा० 'कावळे प्रीतीनें खातातीं शेंबूड। विष्टा वाटे गोड डुकरांशीं।' नवरस पहा –वि. १ किळसवाणें; ओंगळ; घाणेरडें; अभद्र ( कृत्य, वस्तु, भाषण, वक्ता इ० ). २ भीतिप्रद; भयानक; राक्षसी; क्रूर. ३ ( कायदा ) जेणेंकरून मन अपवित्र दुराचारी बनेल असा ( मजकूर, कृत्य ). [ सं. ]

**बीमार**—वि. १ बेमार पहा. २ दुःखित; व्यथित. [ फा. बीमार् ]

**बीर**—स्त्री. एक प्रकारची पिण्याची दारू. [ इं. ]

**बीर**—पु. हिंदुस्थानी भाषेंतील एक छंद. 'नाना पदें नाना श्लोक। नाना बीर कडक।' –दा १२.५५. [ सं. वीर ]

**बीर**—पु. १ मंत्रसाध्य पिशाचदेवतांचा एक वर्ग किंवा त्यांतील व्यक्ति. 'रामसूर्यादिमहादेव। बावन्न बिरादि पै गेले।' –नव १०.३८. २ ( ल. ) भर; चढ. 'यासाठीं कोणता बीर भरतील न कळे.' –पेद २०.८९; २१.९६. [ सं. वीर ] ०**भरणें**–(एखाद्याच्या) अंगांत भुताचा संचार करविणें. ०**भरणें-देणें**–(ल. एखाद्यास ) उत्तेजन देणें चेतविणें; उठविणें ( भांडण, दुष्कृत्य करण्यास ). ०**कंगन**–न. ( व ) दंडास बांधावयाचें कंकण; वीरकंकण. [ वीरकंकण ] ०**भाटीव**–पु वीरश्रीचें भाषण 'बीरभाटिव विनोद। प्रसंगें करावे।' –दा ४.२ १४ [ वीर+भाट ] ०**मंत्र**–पु. १ बीर वश करून घेण्याचा मंत्र. २ आद्. 'युनिव्हर्सिटीच्या किताबातहि काहीं बीरमंत्र आहे कोण जाणे.' –नि ८०३ ०**विद्या**–स्त्री. जादुटोणा. –घावो. ०**सिद्धी**–स्त्री. एक सिद्धी. 'पूर्वी असे त्या सर्व बीरसिद्धी।' –दावि ४४९.

**बीरबाव(हु)टा**—पु. कुंकवाचा किडा; सोनकिडा, ताम्रकृमि. इंद्रगोप. बिरबाहुटी पहा. [ हिं. बीरबाहुटी, बीरबहूटी ]

**बीरवांगें**—न. ( व. ) टोमाटो; बेलवांगें

**बील**—पु १ अंड्यातील गिलगिलीत पदार्थ, बलक २ मऊ व रसाळ फळांतील गीर; नासलेल्या फळातील बिलबिलीत भाग.

**बीवळ**—न. बीं, बीज 'अमृत काढिलें तये वेळीं। पाहे बीवळ।' –कथा २ १४.२७. बिवळा पहा.

**बीस**—वि. वीस पहा

**बीस्त**—वि वीस, विसा. [ फा ]

**बीहार्मा**—न. सप्तालूची एक जात –कृषि ७२८.

**बीळ**—न (राजा ) टोपली, सूप, शिपतर इ० करावयासाठीं काढलेलीं बांबूचीं पातळ पातीं 'बुरुडानें काठीचीं बिळें काढिलीं.'

**बीळ**—न. १ उंदीर, घुस, साप इ० चें राहण्याचें ठिकाण; भोंक. २ वाघ, सिंह इ०ची गुहा [सं. बिल] ०**उघडणें**–१ घरटें, पोळें इ० उघडें पडणें; खुलें होणें; पेंव फुटणें. २ मुंग्या इ०चें पेव फुटणें. ०**पाडणें**–(ल ) काहीं हेतु साधण्यासाटीं संधान जुळवून ठेवणें; लग्गा लावणें. म्ह० ( गो ) बिळात ना रीघ आणि शेंपडेक बांधता सूप ( उंदराला स्वतःला बिळांत शिरण्यास वाव नाहीं आणि शेंपटीला सूप का बांधतो) शक्तीबाहेर काम करण्याचा आव आणणें.

**बुक**—न. पुस्तक; ग्रंथ [ इं. ] ०**सेलर**–पु. पुस्तकें विकण्याचा धंदा करणारा. [ इं. ] **बुकिश**–वि पुस्तकी, पुस्तकापुरतें. वरवरचें, तात्पुरतें. [ इं. ] ०**नाटक**–न. गद्य नाटक. ०**पंडित**–पु. (उप. ) निवळ पुस्तकी ज्ञान मिळविलेला ( अव्यवहारी ) विद्वान्; पुस्तकीज्ञानपटु. 'जरा धीर धरा असें सांगणारे कांहीं बुकिशपंडित आमच्यांत पुष्कळ निघतील.' –टि ३ ७३.

**बुकटी, बुकणा**—स्त्रीपु ( औषध इ०चें ) चूर्ण; पूड; भुकी. [ हिं. बूकना=चूर्ण करणें ]

**बुकटी**—स्त्री. ( गो. ) निकड.

**बुकडुल**—पु ( कों. ) माशाची एक जात हे आक्टोबर, नोव्हेंबर महिन्यांत पकडतात.

**बुकण**—न. बाजरीच्या कणसांतील दाण्याभोंवतालचें तूस; गोंडण; गोंड.

**बुकणा**—पु. (कों.) (अशिष्ट) ढुंगण; कुल्ला; बोचा; मागचा भाग. ०**हत्ती, बुकणा**-पु १ बाहेर दिसणारे सुळे नसलेला हत्ती २ (ल.) ठेंगणा; ढेरपोटया; लठ्ठ पुरुष किंवा स्त्री.

**बुकणी**—स्त्री. १ (सामा) पूड; चूर्ण. २ अबीर; बुक्का

**बुकणी**—स्त्री. (गो) जनावरांनीं डोक्यानीं दिलेला धक्का; बुकलणी, ढुसणी. [हिं. बुकणी]

**बुकणी**—स्त्री (गो.) केळयांची कोशिंबीर.

**बुक(का)लणें, बुकणें**—उक्रि. बुक्क्यानीं मारणें 'बुकली भीम, बुकलिति जैसें यज्ञांत बोकडाला हो।' -मोवन ९४७. [बुकी] **बुक(का)लणी**-स्त्री. बुक्क्या मारणें; बुकलणें [बुकलणें] **बुकलाबुकल**-स्त्री. लाथाबुक्क्यांनीं बेदम मारणें [बुकलणें द्वि]

**बुकलेट**—न. मुख्य ,पिकांत मिसळलेलें दुसऱ्या जातीचें पीक; उतवडा. -इरिगेशन खातें.

**बुकलो**—पु. (गो.) बोका. (प्र.) बोकुल. [हिं बिल्ला= बोका] ०**संन्यास**-पु. बोकसंन्यास पहा.

**बुका-क्का, बुक्की**—पुस्त्री. १ बुकणी; चूर्ण. 'बरें तर, मज-जवळ ही हिरवी बुकी आहे, हिला सोनामुखी म्हणतात.' -बाळ १.७०. २ काळया रंगाचें एक सुगंधी चूर्ण. अबीर पहा. 'चोवा चंदन मोगरेल अतर श्रीखंड खंडे बुका।' -सारूह ३.४२. [हिं. बुकना; गु. भुकी] **बुका लावणें**-(कथेकऱ्यानें पूर्वरंग संपवला म्हणजे त्यास बुका लावितात. यावरून ल.) रजा देणें; निरोप देणें; घालविणें.

**बुका-क्का, बुकी-क्की**—पुस्त्री. १ मूठ; मुष्टि. २ ठोसा; गुद्दा. 'क्रोधें तो कीश तालप्रभुभुज विभुचें वक्ष ताडी बुक्यांनीं।' -मोकृष्ण ६७.२१ ३ (व.) नाश. [ध्व.; दे. प्रा. बुक्का=मुष्टि] **बुकाडा**-पु. १ (कु) मोठी मूठ. २ फार जोराचा बुक्का; धपका. **बुकांदा**-पु. बुक्का; ठोसा; गुद्दा (अल्पार्थी बुकादी). [बुकी]

**बुकांडो**—पु. (कु.) मानगुटी. बोकांडी पहा.

**बुका(क)णा**—पु. बकाणा, बोकणा पहा.

**बुकांदो**—पु (गो.) एक औषधी कंद. कोळकांदा पहा.

**बुकाले, बुकाल्ल-ल्लु**—न. १ (गो.) टोपडें; कुंचडें. २ शेंबी. [पोर्तु. बोकिल्हा]

**बुकेफ(फु)रोष-स**—वि. १ सुगंधो; सुवासिक. २ सुगंधी वस्तू विकणारा; गंधी.

**बुगडी**—स्त्री १ स्त्रियांचें एक कर्णभूषण. 'बुगडया झुबुकबाळयाच्या जोडें। लेणें कानाचें।' -देवदास, मामावर्णन ४. २ मिरचीची एक जात. ३ वस्त्राच्या काठांतील फुलांची एक वीण. म्ह० बुगडया गेल्या पण भोकें राहिलीं. 'बुगडया गेल्या पण भोकें राहिलीं म्हणीप्रमाणें बोणतीहि चाल त्या कारणाबरोबर नष्ट होत नाहीं.' -निचं.

**बुगडी**—वि तांदुळाची एक जात.

**बुंगबुंग**—क्रिवि. मृदंग, पखवाज इ०च्या आवाजानें. 'बुंगबुंग रव तुंग मृदंगी। संग संग नटता स्वकुदंगी।' [ध्व.]

**बुंगी**—स्त्री. मुलाचें मूत्रेंद्रिय; बुल्ली; नुन्नी.

**बुचकणें**—उक्रि. १ ओरबाडणें; बुचाडणें. २ (ल.) लुटणें; नागविणें. ३ (कु.) (धान्याची रास, पीठ इ०) वरचेवर हात घालून विचडविणें· चिवडणें.

**बुचकणें**—अक्रि. विचकणें; दचकणें; एकदम भीति वाटणें.

**बुचक(कु)रणें**—सक्रि नख इ०नीं ओरबाडणें; ओचकारणें. **बुचक(कु)रा**-पु. नख इ०चा ओरबडा, ओरखडा. [विचकरणें]

**बुचक(कु)ळणें**—अक्रि.उक्रि. १ पाणी इ०मध्यें बुडवून बाहेर काढणें; बुडविणें. २ (ल) गढून जाणें; निमग्न होणें (शास्त्र, ग्रंथ, विषय इ०त) ३ संस्कार झालेला असणें (शास्त्र इ० चा). ४ (ल.) गोंधळणें; भ्रमात पडणें; घुटमळणें; साशंक होणें. [ध्व. बुच्=डुबप्रमाणें] **बुचक(कु)ळा**-पु. १ संशयित स्थिति; गोंधळ. २ भ्रम; संशय (क्रि० येणें; वाटणें) **बुचकळयांत पडणें**-साशंक होणें; पेचांत पडणें; संशयित होणें. **बुचक(कु)ळी**-स्त्री. पाण्यांत मारलेली बुडी. (क्रि० मारणें). 'रामनामाची बुचकळी। आणिक नलगे ती आंघोळी।' -मसाप २.२२. **बुचकळया खाणें**-(बुडणाऱ्या इसमानें) गटंगळया खाणें; धडपडणें.

**बुचका**—पु. १ (केस, तंतु, सूत इ०चा) पुंजका; जुमडा; गुंता. 'घेऊं गालगुचका उपटित शेंडीचा बुचका रे।' -सला ८३. २ (पानें, अंकुर इ०चा) झुपका. [सं. पुंज; तुल० इं. बंच] **बुचक(कु, को)ली, बुचुकली, बुचकी**-स्त्री. १ लहान बुचका. २ मांजराच्या पुढच्या पायाचा पंजा. ३ लहान मुलाचा पंजा.

**बुचका**—पु. बचक पहा.

**बुचका**—वि. चोंबडा, लुतरा या अर्थी चहाड शब्दापुढें येतो.

**बुचटणें**—न. बूच; बोळा; दट्टया; झांकण; गुडदी. [बूच] -सक्रि. गुडदी मारून बंद करणें (तोंड इ०).

**बुचडा**—पु. १ स्त्रियांच्या डोकीवरील केशांच्या रचनेचा एक प्रकार; अंबाडा. २ गवत, भाताच्या काडया इ० ची दोरीनें बांधलेली पेंढी. [सं. वि+चूडा; तुल० म. बुचका; इं. बंच]

**बुच(चे)डी**—स्त्री १ कांबळें इ०स एका बाजूस जुणून त्यास दोरी बांधून डोकीवर घेण्यासाठीं करतात ती खोळ. २ अशा खोळीचा डोकीवरचा भाग. ३ (माण.) बाळविण्यासाठीं शेतांत उभ्या केलेल्या कणसासह कडब्याच्या पेंढ्यांचा जुडगा. [बुचडा]

**बुचडी**—स्त्री. (कु.) बीं पेरण्याची एक पद्धत.

**बुचबुच**—स्त्री. १ (ढेकूण, पिसवा इ० चा) बुजबुजाट; विपुलता. २ (भिकारी, कर्जदार इ० ची) गर्दी; दाटी. [ध्व.]

**बुचबुच-बुचां, बुचुबुचु-चू**—क्रिवि. १ ढेकूण, पिसवा इ० च्या बुजबुजाटाप्रमाणें हालचाल, आवाज करून). २ एखाद्या पदार्थांत हात, बोटें इ० वरचेवर घालून (चिवडणें), बचाबचा. [ध्व.] **बुचबुचणें**—अक्रि. १ (ढेकूण, उवा इ० चा) बुजबुजाट होणें. २ (डोकें, बिछाना इ० त) उवा, ढेकूण इ० फार होऊन वळवळत असणें. [बुचबुच] **बुचबुचाट**—पु. १ (पिसवा, ढेकूण इ० चा) सुळसुळाट; अतिशयितता; विपुलता. २ (कामाची) निकड; गर्दी. ३ (भिकारी इ०ची) गर्दी; दाटी; झुंबड. [ध्व. बुचबुच] **बुचबुचि(ची)त**—वि. भरपूर; गच्च; विपुल. 'एकें हिरवीं कर करितें। येकें बहुबीजें बुचबुचितें।' -भारा किष्किंधा १५.६१.

**बुचबुचाव(वि)णें**—उक्रि. (वस्त्र, भांडें, शरीर इ०) हलक्या हातानें धुणें, घासणें; पाण्यांत नुसतें बुडवून काढणें. [ध्व. बुच]

**बुचा-च्या**—वि. १ (नेहमीं असणारा दागिना इ० नसल्या-मुळें) भुंडा, लांडा; उघडा; रिकामा (हात, कान). २ शिंगमोडका, कानतुटका, डोकें फुटका इ० प्रकारचा ३ नागवा; निलाजरा. 'तुका म्हणे आतां लाजधरी बुच्या।'-तुगा २९५१. [हिं बूचा=कानतुटका] **०कारभार**—पु. १ अधिकार नसतां एखाद्या कामांत हात घालणें; रिकामी अरेरावी. २ लांडा कारभार; अनधिकृत लुडबुड. **०कार-भारी**—पु बुचा कारभार करणारा. म्ह० बुचे कारभारी आणि नकटे चौधरी. **बु(बुं)ची**—स्त्री. (व.) अलंकाररहित स्त्री; भोंगळी.

**बुचाड**—न. (मळणीपूर्वीचा) कणसांसह कडब्याच्या पेंढ्यांचा ढीग; उडवी; कडब्याच्या पेंढ्यांची एक रास. [बुचका-डा]

**बुचाड(ट)णें**—सक्रि. १ (अंगावरचें वस्त्र, अलंकार इ०) जोरानें हिसकणें; ओढून काढणें; नागविणें. २ (ल) लुटणें; लुबाडणें. ३ (पानें, पिसें इ०) ओरबाडून काढणें [बुचा] **०गोबाडणें**—उक्रि. पूर्णपणें लुटणें; सर्वस्वी नागविणें. [बुचाडणें द्वि.]

**बुचू-जू**—पु. (कों.) बूच; दट्या; झांकण; गुडदी. [बूज]

**बुच्ची, बोंची**—स्त्री. (व.) घोड्याच्या कपाळावरील शेंडी; चोटी.

**बुजकणें, बुजग(गा)वणें**—न. १ पशु, पक्षी इ०ना भिव-विण्यासाठीं शेतांत उभें केलेलें बाहुलें किंवा कांहीं शब्द करणारी वस्तु, बागुलबोवा. 'यशबुजगवणें वे भक्तासि शिवों न काळकागातें।' -मोउद्योग ८.६१. २ भीतिदायक गोष्ट, पदार्थ, व्यक्ति इ०. 'वाटेनें चोराची गांठ पडली असतांहि तरवार उपयोगी पडेलसें प्रमाण नाहीं पण बुजगवणें आहे म्हणून बाळगावी.' ३ अत्यंत कुरूप व भीतिप्रद माणूस. [बुजणें] **बुज(झ)वणें, बुजा(झा)वणें, बुझावण**—न. बुजकणें (सर्व अर्थी) पहा. 'झाले ते यमदूतही बुजवणें शेतीं तृणाचें जसें।' -निमा १.१८. [बुजणें, बुझणें=दचकणें]

**बुंजका**—पु. पुंजका पहा.

**बुज(झ)ट, बुजरट, बुजरा, बुजा(जी)र**—वि १ सहज घाबरणारा; कारणाशिवाय दचकणारा; भितरा, बुजणारा 'त्याला (समाजाच्या गाड्याला) ओढणारीं तट्टें फार बुजरट असतात' -आगर १.१०१. २ लाजरा; धीट नसणारा. [बुजणें] **बुजणी**—स्त्री. दचकणी; बिचकणें; भीति. [बुजणें] **बुज(झ)णें**—अक्रि. दचकणें; एकदम भीति वाटणें; घाबरणें 'ह्मसे विजय मनिं म्हणे का गोपसख्या मला बुजाल्या हो।' -मोविराट ४८७ [प्रा. बुज्ज=डरणें; तुल० इं. बज् (फ्रें. बूगे पासून)] **बुज(झा)वणी**—स्त्री. बुजणी; दचकविणें; भिवविणें. [बुजविणें, बुजाविणें] **बुज(झ)विणें, बुजा(झा)विणें**—उक्रि. दचकविणें; घाबरविणें; भिव-विणें; भीति दाखविणें. [बुजणें]

**बुज(झ)णें**—अक्रि. छिद्र, मार्ग इ० बंद होणें, भरलें जाणें.

**बुज(झ)णें, बुजविणें**—उक्रि. बंद करणें; भरून टाकणें (भोंक, मार्ग, भाडें इ०). 'सवेचि आणील रघुनंदन। पाषाणीं सागर बुजवोन।' 'मर्शी पोरा घे रे बार। तुझे बुजीन खालील द्वार।' -तुगा २५६. [सं. बद्ध; प्रा. बज्झ. तुल० प्रा. बुज्जण=स्थगन] **बुझाविणें**—अक्रि. बंद होणें; मिटणें. 'तेवींचि नाहीं बुझाविलीं। अर्जुन द्वंद्वें।' -ज्ञा १३.१५.

**बुजतेलोया अबलग**—वि. घोड्याचा एक रंग. सर्व शरीर पांढरें असून त्यांत काळसरपणा असलेला, कान आयाळ व दूम काळी व पोटाखालीं काळें व चारी पायावर काळी झांक असलेला (घोडा). -अश्वप १ ३२. [फा बोझ्=मळकट रंगाचा+तेलिया+अवलख्]

**बुजबुज-बुजां, बुजबुजणें, बुजबुजाट**—बुचबुच इ० पहा.

**बुंजरी**—स्त्री बुजणें; बुजणी 'नभीं कुंजरीं बुंजरीं घेत आटी। मुखें वासुकीच्या निघे ज्वाळ मोठी।' -मुरामायण बाल ९९. [बुजणें]

**बुजरु(रू)क-रा**—वि. १ थोर; वजनदार. बुजुर्ग पहा. 'बुज-रुगापासून पंडित अजम बाजीराव पंडित प्रधान यासी ...' -थोमारो १.६५. २ (व.) बुढुक ३ (मुसलमानांत रूढ) सर्वपित्री तिथि. [फा. बुझुर्ग्]

**बुजाडणें**—अक्रि (व.) बुजणें.

**बुजुर्ग**—वि. थोर; वृद्ध; बुढुक. 'अज कदीम मोहीबांचा व ई जानेबाचे बुजुर्गीचा येखलास कमाल चालोन आला आहे.' -रा ३.९०. [फा बुझुर्ग्] **बुजुर्गी**—स्त्री थोरवी; मोठेपणा. 'नबाबांनीं तर बुजुर्गीस लाजीम तो मार्ग सोडला.' -रा ५.३१. [फा. बुझुर्गी]

**बुझ(ज)णें**—अक्रि. १ समजणें. 'हा सहोदर बुझे अरुणाचा।' -किंगवि १२. २ जाणणें; आकलन होणें. 'पाठीं जें निषिद्ध म्हणिपे। तेंही बुझावे स्वरूपें।' -ज्ञा ४ ९१. [स. बुध्; प्रा बुज्झ

हिं सिं बुझना, बुझणु, गु बुझवुं. बं बुझिवा] **बुज(झ)वणी, बुजा(झा)वणी, बुज(जा)वणें** स्त्रीन. समजूत; शिकवणूक. [बुझविणें] **बुज(झ)विणें, बुजा(झा)विणें**-उक्रि शिकविणें, विशद करणें; समजाविणें; समजूत घालणें 'प्रमुदित मग माता कन्यकेला बुझावी।'-सारुह २१०८ 'न जाणे न नेणे अशा पामराला। बुझावूं शकेना विधाता तयाला।' -वामन स्फुटश्लोक **बुझावण-णी**-स्त्री १ समजूत, एकवाक्यता; (गो कों) बुजावण 'जेथ नानामतां बुझावणी जाहाली। एकमेकां शास्त्रांची अनोळखी फिटली।' -ज्ञा ९.२७४ २ समजावणी 'रुसलेति तरी होईल बुझावणी। तांतडी करूनि साधावें हें।'-तुगा १२२४.

**बुट**—पु कापडावरील नकशी बुटा पहा. 'श्रीमंत मोत्याचे बुट सोन्याचे कट सजीवले हुट हत्ती घेतले।' -ऐपो ४३६ [बुट्टी]

**बुटएटक, बुटखीळ, बुटखिळा**—बुटेएटक, बुटेखील पहा.

**बुट-कण-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि पाणी इ० मध्यें जड पदार्थ पडत असता किंवा बाहेर निघाला असतां होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन; डुबकन [ध्व]

**बुट(टुं)क(ग)णा, बुटुंगा**—वि बुटका; ठेंगणा; ठेंगू. [बुटका]

**बुटका**—वि १ आखूड; ठेंगणा; गिड्डा; खुजा. २ ज्याचें टोंक, शेंडा, मोडला आहे असा [तुल० का. पट्टु=लहानपणा] **बुटकी**-स्त्री मिरचीची एक जात ही फार बारीक असते. -कृषि ५६८. **बुटकुला-ली-लें, बुटुकला-ली-लें**-बुडकुला इ० पहा. **बुटबेंगण**-न फारच ठेंगणा व लठ्ठ माणूस; ठेंगू [बुटका+ बेगन=वांगें]

**बुटकुळी**—स्त्री बुडी, डुबकी, बुचकळी. (क्रि० मारणें). [ध्व बुट!] **बुटकुळ्या खाणें**-(बुडणाऱ्या माणसानें) गटं गळ्या खाणें.

**बुटटकी**—स्त्री १ (स्वत:ची) रिकामी, फाजील वढाई, फुशारकी. २ पोकळ डौल, प्रतिष्ठा; ऐट (क्रि० मिरवणें, मांडणें; करणें)

**बुटणें**—न. (कु) भाताची एक जात

**बुटणें**— न. बूच; दट्टया; झाकण; गुडदी.

**बुटणेर**—पु. युरोपियनाच्या घरचा आचारी, कोठवळा; बबर्जी. 'बुटणेरसाहेब यांचेंच प्राबल्य जास्त चालत असतें -नि ६१. [इं. बटलर]

**बुटबु(बू)ट-टी**—स्त्री. १ पुटपुट. कुजबुज २ पावसाची पिरपिर ३ कानांत सांगितलेला मंत्र 'मंत्र यंत्र कांहीं करिसी बुटबुटी। तेणें भूतसृष्टी पावशील।' -तुगा २५०१. [ध्व] **बुटबुट-बुटां**-क्रिवि १ टपटप, रिपरिप असा आवाज करून (पाऊस ० पडणें) २ पुटपुटत; कुजबुजत. [ध्व.] **बुटबुटणें**-अक्रि. १ टपटप, रिपरिप पडणें (पाऊस इ०) २ पुटपुटणें; गुणगुणणें; कुजबुजणें. [बुटबुट]

**बुटबुटीत**—वि. १ (कु) चांगला न शिजल्यामुळें टणक राहिलेला. टचटचीत (तांदूळ, डाळ इ०). २ (कों.) बुळबुळीत.

**बुटली**—स्त्री १ धातूचें लहान भांडें; तपेली. २ मोटेच्या चाकाचा आस किंवा चरख्याची सळई ज्या दोन खुंट्यांवर ठेवितात त्यापैकीं प्रत्येक [का बटलु=वाटी] **म्ह०** दीड बुटली उरीं फुटली **०भट**-पु (व) बटु; ब्रह्मचारी.

**बुटा, बुटी, बुट्टी**—पुस्त्री कापडावर रंगाचे ठसे उठवून अगर विणून काढलेलीं फुलें, नक्षी. 'हारा वर्णी कुसुम पदरास। बुटालिंगी मिरवली।' -नव २३.१५ [फा बोता; हिं बूटा] **०दार, बुटेदार**-वि. बुट्या, नक्षी असणारें; नक्षीचें.

**बुटारणा**—वि. ठेंगणा; आंखूड; गिड्डा; खुजा.

**बुटी, बुट्टी**—स्त्री. १ (ल.) एक औषधी वनस्पति. २ गुप्त व रामबाण औषध, मंत्र, तोडगा इ०. ३ (ल) अडचणीच्या वेळीं उपयोगी पडणारा द्रव्य, विद्या इ० चा सांठा. ४ भांगेचा घोटा. ५ माल; मिळकत. -राको. [हिं.] **०देणें**-गुप्तपणें उत्तेजन देणें.

**बुटी बुट्टी**—स्त्री पाटी; टोपली. [का]

**बुटें**—न. गाडीच्या कण्यावरील फळी. **०काढून-नेऊन-हरून ठेवणें**-(ल.) एखाद्या कामाचें जरूर असें साधन काढून घेणें, नाहींसें करणें. **०गहाण ठेवणें**-अत्यंत जरूर अशी वस्तु दुसऱ्याच्या स्वाधीन करणें **०एटक**-न. गाडीचें बुटें न हलावें म्हणून बांधावयाची दोरी. **०खीळ-खिळा**-स्त्रीपु. गाडीचें बुटें व कणा याना जोडणारा खिळा.

**बुट्टण**—न (व.) बुटणें पहा.

**बुट्टा**—वि. ठेंगणा; बुटका; आंखूड (माणूस, पदार्थ).

**बुट्टा**—पु ठिपका. बुट्टी पहा. [बुटा]

**बुट्टा**—पु पाटा पहा.

**बुट्टा, बुट्टी, बुट्टीदार, बुट्टे, बुट्टेदार**—बुटा इ० पहा.

**बुट्टाण**—स्त्री. (गो.) बकरा, वाघ इ०च्या अंगाची किंवा नासलेल्या दुधाची घाण **बुट्टी**-स्त्री साधारण लहान कान असलेली मेंढी.

**बुट्टी, बुट्टीस मारणें**—गुंगारा देणें चुकविणें; सुट्टी घेणें; टाळणें (विशेषत: शाळेंतील मुलांत रूढ).

**बुट्टी**—स्त्री. १ (व.) गाडीच्या साटीच्या पुढच्या भागाला असणाऱ्या दोन खुंटांपैकीं प्रत्येक. २ बुटली अर्थ २ पहा.

**बुंठण**—न. खुंठ; बुंधा; थोटण. **बुंठा**-वि. थोंटा, खुंटासारखा केलेला, ज्याचें अग्र तुटलें आहे असा (पदार्थ, अवयव, झाड). [बुंधा]

**बुड**—स्त्री. बूड पहा.

**बुड**—न. (गो.) पाणकोंबडा.

**बुडकणें**—अक्रि. पाण्यांत बुडया मारणें, डुंबणें. [ध्व बुडक]

**बुडकली-ळी, बुडकी**—स्त्री बुडी (क्रि० मारणें).

**बुडका**—स्त्री. नदी-ओढयाच्या कांठीं किंवा तळांत पाणी सांचण्यासाठीं केलेली खांच; लहान विहीर बुडकी पहा

**बुडकुला-ली-लें**—पुस्त्रीन. १ सुमारें शेरभर पाणी मावेल एवढें मातीचें भांडें; लोटकें २ लहान तपेली; धातूचें लहान भांडें ३ रहाटगाडग्याची लोटी. 'माझ्या राहाटाची बाई बुडकुली घर धन्यानें बाईल कुटली।' -भज ५५ ४ बोळकें **बुडकुलें**-पु लहान मुलांच्या खेळातील माती, लाकूड इ०चा कोणताहि पदार्थ (घर, ताटली इ०). [बुटका]

**बुडखा**—पु. १ झाड इ० चा बुंधा; फांद्याच्या खालचा मुळापर्यंतचा भाग. २ तळ; मूळ; पाया; उगम; आधार (पदार्थ, काम, व्यापार इ० चा). [सं बुध्न; प्रा बुंध, बुद्ध, म बूड]

**बुडगा**—वि (ना. व.) म्हातारा. [सं वृद्ध; प्रा. बुड्ढ; हिं. बुड्ढा]

**बुडण**—स्त्री १ बुडण्याची जागा (पाणी, काम, व्यापार इ०त) (शब्दशः व ल. उपयोग). २ नुकसान; तोटा (व्यापार, उद्योगधंदा इ० त). **बुडणूक**-स्त्री बुडण्याची क्रिया; बुडलेली स्थिति (शब्दशः व ल.) **बुडणें**-अक्रि. १ पाणी इ० द्रव पदार्थांत खोल जाणें; अंतर्धान पावणें. २ (ल.) (काम, उद्योग, अभ्यास इ०त) गढून जाणें; गर्क होणें; निमग्न होणें 'देहीं जयांची अहंता। बुडोनि ठेली।' -ज्ञा १५.४२६ ३ (ल) (दु.ख, काळजी, चिंता, कर्ज इ० नें) व्याप्त होणें; जर्जर होणें, आकुल होणें. 'नता करुनि मुक्तही म्हणसि मी बुडालों रिणें।' -केका ११ ४ (ल.) (मनुष्य, पीक, गांव, देश, व्यवहार, पैसा इ०) नष्ट होणें; नाश पावणें; नाहींसें होणें. 'तेवीं समूळ अविद्या खाये। तें ज्ञानही जै बुडोनि जाये।' -ज्ञा १५.४४० ५ निष्फळ होणें, फुकट जाणें; गमावणें; निरुपयोगी होणें. 'समयास जर तुम्ही तेथें पोंहचलां नाहीं तर तिकडील दक्षिणा बुडेल आणि घरचे कामाचा दिवसही बुडेल.' ६ (ल.) (ग्रंथ, नाणें, चाल, धर्म इ०) बंद पडणें; प्रचारांत नसणें; अंमलांतून जाणें. ७ (दिवस) संपणें; शेवटास जाणें. ८ (सूर्य इ०) मावळणें. [सं. बुड्=लेपणें; प्रा बुड्ड] **म्ह०** चढेल तो पडेल पोहेल तो बुडेल. **बुडतठाव**-पु. मनुष्य इ० बुडून जाण्याइतकी पाण्याची खोली याच्या उलट छातीठाव, कमरठाव. **बुडता**-वि. १ बुडणारा; उतरता; ऱ्हास पावणारा. असें बुडता पाया-काळ-व्यापार-धंदा-दौलत इ० २ आंत टाकलेला पदार्थ बुडेल इतकें (पाणी, तूप, तेल). [बुडणें] **म्ह०** बुडत्याचा पाय खोलांत-खोलाकडे=खालावलेल्या माणसाची प्रवृत्ति आणखी अपकर्षाकडे होत जाते. **बुडता काळ**-पु नुकसानीचा काळ; ऱ्हासकाळ; संकटकाल; पडता काळ. 'बुडत्या काळीं हात देणारे थोडेच' -विवि ९.८.७१ **बुडता पाया**-पु उतरत्या कळेचा, ऱ्हासाचा आरंभ. (क्रि० लागणें; होणें). **बुडचा-ला**-वि. तळचा; बुडाकडील **बुडालेल्या घरचा मोड**-पु. कुटुंबांतील सर्व माणसें मरून जाऊन शिल्लक राहिलेला एकच मनुष्य.

**बुडबु(बू)ड**—स्त्री. तोंडाची पुटपुट; बुटबुट पहा [ध्व.] **बुडबुड-डां**-क्रिवि १ बुडबुडयाच्या आवाजाप्रमाणें, बुडबुड असा आवाज करून २ बुटबुट पहा. [ध्व] **बुडबुडगंगा**-स्त्री. भरभर-स्नान; दंडस्नान, मुसळस्नान, धोपटस्नान.

**बुडबुडणें**—अक्रि १ बुडबुडयाच्या आवाजासारखा आवाज होणें. २ हलक्या व अस्पष्ट आवाजात बोलणें; पुटपुटणें. ३ (गो.) पाण्यात डुंबणें [बुडबुड]

**बुडबुडा**—पु. १ पाणी, दूध इ० मध्यें वारा गेल्यानें जो वाटोळा आकार उत्पन्न होतो तो, फुगा २ भाजलेल्या त्वचेवर येणारा फोड (क्रि० निघणें; होणें) ३ (ल.) नश्वर; अल्पकाल टिकणारी गोष्ट. क्षणभंगुर संसाराला बुडबुडयाची उपमा देतात. ४ टकबाजी; सोंदेगिरी, (इं.) बबल [ध्व ; सं. बुद्बुद]

**बुडवणी, बुडवणूक**—स्त्री. १ बुडविणें; बुडविण्याची क्रिया (शब्दशः व ल०). २ बूड; नाश; अधःपात. 'धर्ममार्ग पापपरिणामी असून तो देशास बुडवणूक आणणारा असा त्याचा ग्रह आहे.' -नि ४२०. [बुडणें] **बुडवणी**-वि. भांडयाला दोरी न लावता हातानेंच भांडें बुडवून भरून घेता येईल इतकें खोल (पाणी, विहीर, टाकें इ०). **बुडविणें**-उक्रि. १ पाणी इ० मध्यें पदार्थ घालणें न दिसेसा करणें; बुडण्यास लावणें २ (ल) मग्न करणें; बुचकळणें ३ (आयुष्याचा) नाश करणें; निरुपयोगी बनविणें. 'आपण मरून गेला व बिचारीला व्यर्थ बुडविली' ४ बंद करणें; बंद पाडणें, थांबविणें. ५ नुकसान करणें; फसविणें; लुबाडणें. [बुडणें] **बुडव्या, बुडवणा-ण्या**-वि. नाशास, ऱ्हासास कारणीभूत; बुडविणारा (मनुष्य).

**बुडसळ**—पुन पानें झडून वाळलेला वृक्ष; शुष्ककाष्ठ; खोड. 'तेवींचि भोगक्षयें मागिलें। पडती देहाचीं बुडसळें।' -ज्ञा १५.१६०. [बुडखा]

**बुडस्थळ**—न. १ नुकसान होण्याचा संभव असलेला धंदा, व्यापार इ० धाडसाचें; धोक्याचें काम. 'समुद्रातील व्यापार हें मोठें बुडस्थळ आहे.' २ बुडल्यामुळें झालेलें नुकसान; नाश; हानि; दुरवस्था 'यंदा घरीं बसलों त्यामुळें चहूंकडून बुडस्थळ झालें.' ३ बुडित व्यापार. [बुडणें+स्थळ]

**बुडळणें**—सक्रि. बुडविणें. 'तैसी अविद्येची उकळी। जया जीवजातातें बुडळी।' -भाए ५५६.

**बुडाव**—(नाविक कों.) दुरमीणास व वांकझाडीस ठोकलेले आंखूड खिळे [बूड]

**बुडी**—स्त्री. १ बुद्धिपुरःसर पाण्यांत शिरणें; बुचकळी; बुडकी. (क्रि० मारणें; देणें) २ (खा.) (कुंभारी) कुंभारी चाक ज्या दगडी खळग्यांत फिरतें तो खळगा. [बुडणें] म्ह० साधली तर उडी नाहीं तर बुडी. ०**मारणें-देणें**-१ पाण्यांत जाणें व कांहीं काळ पाण्यांतच राहाणें. २ (ल.) कांहीं काळ पळून जाऊन दडून बसणें. 'यानें चार घटका बुडी मारली.' ३ कांहीं साध्यास्तव प्रयत्न करणें. **शंभरबुड्या मारून गांड कोरडी दाखविणारा**-(राजा.) कोणेकं कर्म यथेष्ट करूनहि लोकात अलिप्तपणें वागणारा.

**बुडी-ढी**—स्त्री. भाला, बरची इ० चा दांडा; पात्याच्या उलट बाजूचें टोंक. [बूड]

**बुडी**—स्त्री (कु) मासे पकडण्यासाठीं समुद्राच्या तळीं लाविलेलें जाळें (क्रि० मारणें). [का. बुट्टी=मासे, फुलें इ०ची टोपली]

**बुंडी**—वि. दुष्ट; कडवा. 'साठसहस्र पठाण बुंडी।'-ऐपो २२५.

**बुडीत**—न. १ बूड; नुकसान; हानि. २ जें परत मिळण्याची आशा नाहीं असें कर्ज; बुडालें अशा बुद्धीनें देणें. 'गुहागरकरांची मुलगी तुम्ही करणार तर दोनशें रुपये बुडीत द्या आणि तीनशें रुपये कर्ज द्या म्हणजे घडेल.' ३ कांहींएक फायदा न होतां धंद्यांत बुडालेली रक्कम. -वि. बुडालेलें; नुकसानीचें; गमावलेलें. [बुडणें] ०**कूळ**-न. घेतलेलें कर्ज फेडूं शकत नाहीं असें कूळ; दिवाळखोर ऋणको. ०**खत**-न. नमूद केलेलें कर्ज परत मिळण्याची आशा नाहीं किंवा मुदतीबाहेर गेलेला असा कर्जरोखा. ०**खर्च**--पु. १ ज्याचा मोबदला मिळणार नाहीं असा खर्च २ (जमाखर्च) बुडालेला, गमावलेला पैसा. ०**खातें**-न बुडीत कुळांच्या नोंदणीचा वर्ग, यादी. ०**बाकी**-स्त्री वसूल न होण्याजोगी बाकी. 'त्या दुकानदाराचें दुकान बसण्यास बरीचशी बुडीतबाकीच कारण झाली.'

**बुडीद**—पु. पाण्याची खोली मोजण्याचा ओळंबा. [बुडणें]

**बुडुख**—न. १ झाड इ० चा बुंधा; बुडखा; मुळखंड. 'जैसा खांडुनिया शाखा। मग तयाचिया बुडुखा। कुंप कींजे।'-ज्ञा १३. २१८. २ तळ; पाया; बुडें (भांडें, वस्तु इ० चा). ३ एखाद्या कामाचा, प्रसंगाचा सुरवातीचा भाग, आरंभ, उगम. ४ लहान मूळ, आरंभ, आधार. [बूड] म्ह० वडिलांचें बुडुख आणि नाचे तुडुक तुडुक=थोडासा वडीलपणा मिळाल्याबरोबर दिमाख चढणें.

**बुडुढंग**—पु. (ना.) मोठा पतंग.

**बुढ्ढा**—वि. म्हातारा; वयस्क. [सं. वृद्ध; प्रा बुड्ढ] म्ह० बुढ्ढी घोडी लाल लगाम. ०**मंगळ**-पु. (काशी) रंगपंचमी झाल्यावर प्रथम येणाऱ्या मंगळवारीं होणारा होलिकोत्सव. हा उत्तरहिंदुस्थानांत-विशेषतः काशीक्षेत्रीं-फार मोठ्या प्रमाणावर होतो. -तीप्र १०२. [हिं.]

**बुणगा, बुणगें**—पुन. १ सैन्याच्या सामुग्रीचा तळ; खेलखाना. 'रोहिलीयाचें बुणगें व खजिना आहे, तो लुटून टाकावा.' -भाब ४८. २ सैन्याबरोबरचे उदमी इ० बिनलढाऊ अवांतर लोक. बाजारबुणगें पहा. 'पायदळ तोफासंगें। टाकिलें पिछाडीस बुणगे।' -ऐपो २२३. -पया ९०. [फा. बुन्गाह्] **बुणुगबाजार**-न. बाजारबुणगें पहा. 'बुणुगबाजार लष्कर उतरे तीन कोसावर।'-ऐपो ३४१.

**बुणगा**—वि. १ बुटका; ठेंगणा. २ लहान; छोटा; थोडा (पदार्थ). बुंद शब्दांत बुंदका पहा. [सं. बिंदु, म. बुंद]

**बुणगी**—स्त्री. बाजरीचें गोंड, टोपण; कचोळें.

**बुणगुलें**—न. धान्य सांठविण्याची लहान कणंग, कणगुलें.

**बुत्**—पु. मूर्ति. [फा.] ०**परस्त**-वि. मूर्तिपूजक. [फा. बुत्परस्त (बुत्=मूर्ति)] ०**परस्ती**-स्त्री. मूर्तिपूजा. 'मुसलमान होऊन जो बुत्परस्ती करील त्या सजा तो खिताब-मोजीब आणखीच आहे.' -ब्रप २३५. [फा.] ०**फरोश**-वि. मूर्तीचा विक्रय करणारा; धर्माचा सौदा करणारा. [फा. बुत्फरोश्] ०**फरोशी**-स्त्री. मूर्तीचा विक्रय; धर्माचा व्यापार. [फा] ०**शिकन**-वि. मूर्तिभंजक. [फा बुत्शिकन्] ०**शिकनी**-स्त्री. मूर्तिभंजन करणारा. [फा.]

**बुंत**—स्त्रीपु. बुंथ पहा.

**बुत-कण-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि मऊ पदार्थ परस्परांवर आदळल्यामुळें होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज करून. [ध्व.]

**बुतका**—पु. गुद्दा; बुक्का; ठोसा. [ध्व. बुत-द्]

**बुतारा**—पु. (कों.) मोठी केरसुणी; झाडणी. **बुतारी**-स्त्री. लहान बुतारा.

**बुतांव**—पु. १ (गो.) एक प्रकारचें लालसुपारीच्या आकाराच्या फुलाचें झाड. २ गुडी; भुतावें; बिरडें. [पोर्तु. बोतांव]

**बुतिज**—न. बाटलीच्या आकाराची चिनी मातीची बरणी. [पोर्तु. बोतिजा]

**बुत्ता, बुत्ती**—पुस्त्री. (ना.) (विटीदांडूचा खेळ) विटीला टोला लगावण्यापूर्वी ती उंच उसळविणें. [हिं. बुत्ता]

**बुत्ती**—स्त्री. (बायकी) खेडेगांवांतील सासुरवाशीण अगर माहेरवाशीण गांवास जातांना तिच्याबरोबर दिलेले खाद्यपदार्थ. [हिं. बुत्ती=पाथेय. तुल० सं. भुक्ति; वृत्ति]

**बुंथ, बु(बुं)थी**—पुस्त्रीन. १ डोक्यावरून सर्व शरीरावर आच्छादनार्थ घेतलेलें वस्त्र; ओढणी; खोळ. 'कनकांबराची घेऊन बुंथी। बैसली सती कौसल्या।' २ बुरखा; घुंगट; खोळ (घोंगडी इ०ची). (क्रि० घेणें; मारणें; ओढणें; सारणें). 'काळी कांबळी गुंतून बुंथी।'-नव १३.१२३. ३ आश्रयस्थान; निवासघर. 'जैसी आभाळाची बुंथी। करूनि राहे गभस्ती।'-ज्ञा ६.२५१. ४ रूप;

वेश. 'होतों दाशरथी तुम्ही वसुमती घ्या वानराच्या बुथी।' –निमा १.२. ५ गवसणी; आच्छादन. (ल.) बंधन. 'गगना घालूं शके बुंथी।' –कूमुरा ३९.५४. [सं. अवगुंठन] **बुंथी पांघरणें**–स्त्रियांनीं लुगड्यावरून आंगभरून दुसरें वस्त्र पांघरणें; शेला इ० घेणें. **बुंथड**–स्त्री. वस्त्रप्रावरण; पोशाख. 'गाढव गाढविसि बुंथड। न करी अलंकार मोथड।' –एभा १३.४२१.

**बुथारी**—स्त्री. बुतारी पहा.

**बुंद्**—न. बूड; तळ; खालचा भाग. [फा बुन्न, बुन्याद; म. बूड] **०घेणें**–(उष्णता सहन व्हावी म्हणून) चुलीवर ठेवावयाच्या (खापर इ०च्या) भांड्याच्या बुडाला माती, राख इ०चा लेप करणें.

**बुंद्**—पु. कॉफी नांवाच्या झाडाचें बीं. **बुंदाचा चहा**–पु. (कर.) कॉफीचें बी उकळून केलेलें पेय; उकळलेल्या कॉफीचें पाणी, अर्क; कवा. **बुंदाचें तेल**–न. बतम तेल; कॉफीपासून केलेलें तेल. –अश्वप २.१०८. **बुंदिन**–न. (शाप) चहा, कॉफी, कोको, ही उकळल्यानंतर त्यात सांपडणारा एक क्षार; (इं) कॅफीन.

**बुंद**—वि. १ (सौंदर्य, श्रेष्ठत्व, अप्रतीमत्व, दाखविण्यासाठीं प्रमाण म्हणून योजतात) सुरेख; गोंडस; सुंदर; अप्रतिम. 'नाजुक रुपडें बुंद मुखोटा नवतीची लाली।' –होला १०१. २ लाल या विशेषणापुढें त्या रंगाचें आधिक्य दर्शविण्यासाठीं योजतात 'पागोट्याचा रंग लालबुंद आहे.' **बुंदक(ख)डा**–वि. सुंदर व देखणा (स्त्री किंवा पुरुष). **बुंदडा**–वि. बुंदखडा; सुरेख, भपकेदार; गोंडस वस्तु

**बुंद**—पु. थेंब; बिंदु. 'दुधाचे घागरी मद्याचा हा बुंद। पडिलिया शुद्ध नव्हे मग।' –तुगा २८६४. [सं. बिंदु; हिं. बुंदा] **म्ह०** बुंदसे गई सो हौदसे नहीं आती. **बुंदका**–पु. थेंब; ठिपका. –शर. –वि. लहान; आंखूड, बुणगा पहा. **बुंदकी**–स्त्री. (कापड, कागद इ०वरचा) लहान ठिपका; बुट्टी 'बुंदकीचा गजभर चिरा जो तुटला।' –ऐपो ५४.

**बुदकणें**—उक्रि. १ (कों.) बुकया मारणें; बुकलणें; बदकणें पहा. २ बदडणें. 'चेंडूच्या खेळांत त्याला मी बदकून काढतो पहा.' [बुदका] **बुदका**–पु. १ (कों.) गुद्दा; ठोसा; बुक्का. २ बत्ता. 'चुना इ० बुदक्यानें कुटणें.' –राको [ध्व. बुद!]

**बुदकें**—न. (गो.) पुंजी.

**बुंदगा, बु(बुं)दगुला**—वि. बुटका; बुणगा पहा. 'मोदळी बुदगुर्ली ठेंगणें ठाण। अति दीर्घ जाण न करावी।' –एभा ११. ११८५. **बुंदगुलें**–न. लहान व विशिष्ट आकाराचें धातूचें भांडें.

**बुदबळ**—न. बुद्धिबळाच्या खेळांतील राजा, वजीर, हत्ती इ० प्रत्येक मोहरें, सोंगटी. [सं. बुद्धिबल] **बुदबळें-बुदबळानें खेळणें**–बुद्धिबळाचा खेळ खेळणें.

**बुदबुद**—स्त्री. बुडबुडे फुटणें; (पदार्थ नासल्यामुळें) बुडबुडे येऊं लागण्याची स्थिति. (क्रि० सुटणें). –पु. बुडबुडा. 'निळा म्हणे ठेविलों ऐसा। जळिंचा बुदबुद जळींचि जैसा।' –निगा १६५. **बुदबुद-बुदां**–क्रिवि. बुडबुडे येऊन गदगदां; खदखदां. **बुदबुदणें**–अक्रि. (जखम, गळूं इ०) कृमींनीं व्याप्त होणें, बुजबुजाट होणें.

**बुदरुक**— वि. बुद्रुक पहा. 'मोकदम मौजे चांदे बुदरुक तर्फ पेडगांव याचे नांवें कौल लिहून दिला.' –समारो १.७.

**बुदला-ली-लें**—बुधला इ० पहा.

**बुंदी**—स्त्री. हरभऱ्याचें पीठ भिजवून पातळ करून तें झाऱ्यांतून तुपांत पाडून तळलेली कळी. (अव.) बुंद्या. 'चोटी मुग दळ बुंदी विशेष।' –नव ९ ११७. [सं. बिंदु; हिं. बुदिया] **बुंदीचा लाडू**–पु साखरेच्या पाकांत बुंद्या घालून केलेला लाडू; एक पक्वान्न. **०पाडणें**–बुंदीच्या लाडवाच्या कळ्या पाडणें. 'हजार पानांच्या बुंदी पाडीन.' –मोर १४.

**बुंदेला**—वि. बुंदेलखंडासंबंधीं. बुंधेला पहा.

**बुद्दा**—पु. अति कष्टामुळें होणारा शक्तिपात; शीण; थकवा. (क्रि० पाडणें; पडणें; होणें).

**बुद्ध**—पु. १ बौद्ध धर्माचा संस्थापक शाक्यमुनि; गौतमबुद्ध. २ विष्णूचा नववा अवतार; बौद्धावतार. –स्त्री. (अप.) बुद्धि पहा. 'दुसऱ्याची बुद्ध ऐकत निमित्याशी।' –ऐपो १५७. –वि. १ ज्ञानी; विद्वान. 'तेवीं शुद्ध बुद्ध नित्य मुक्त। हा विसरोनि निजस्वार्थ।' –एभा १३.२२८. २ जाणला, समजला गेलेला (अर्थ.) [सं. बुध्=जाणणें]

**बुद्ध**—अ. शेळी किंवा मेंढी यांची संख्या लिहावयाची असतां संख्यावाचक विशेषणापूर्वी योजावयाचा शब्द; नग हा शब्द विसाच्या आत योजतात व त्याच्या पुढें माच शब्द योजतात. 'शेळी बुद्ध एक; मेंढीं बुद्ध दोन.' सर, नग, नफर, रास पहा.

**बुद्धबृहस्पति**—पुअव. १ (प्र.) बुधबृहस्पति. श्रावण महिन्यांतील दर बुधवारीं आणि गुरुवारीं स्त्रिया पूजितात त्या बुध व बृहस्पति यांच्या प्रतिमा, चित्रें. २ (यावरून) बुधबृहस्पतीचें व्रत किंवा पूजा. ३ मामा व भाचा एकत्र आले असतांना म्हणतात (कहाणींतील भिक्षेस येणाऱ्या मामाभाच्याच्या जोडीवरून).

**बुद्धि**—स्त्री. १ पदार्थाच्या स्वरूपाचें ज्ञान करून देणारी, सारासार विचार करणारी व एखाद्या गोष्टीचें आकलन करणारी मानसिक शक्ति. २ ज्ञान; जाणीव; आकलन; शहाणपण; समज. 'चाग तें उराउरीं मार्गो। देवासि कीं बुद्धि सांगों।' –ज्ञा ११.५४९. ३ विचार; निश्चय; मन; मत. 'काल देतों म्हणाला, आज बुद्धि फिरली.' 'जयास नाहीं दृढबुद्धि। तो एक मूर्ख।' –दा २.१.३७. ४ मत; समजूत; अमुक गोष्ट अमुक रूपाची

किंवा गुणाची आहे असा ग्रह. 'हा निळयाचा दुसरा। या बुद्धी हातु घातला विखारा।' –ज्ञा ९.१४८. ५ इच्छा; भावना; अंतःकरणप्रवृत्ति. (क्रि० होणें). 'कोणत्या वेळीं काय बुद्धि होईल हें कोणीं सांगावें?' ६ बेत; संकल्प; युक्ति; उपाय; इलाज. 'त्यास हें सांगावें वर्तमान। तो बुद्धि पूर्ण सांगेल।' ७ (समासांत) भाव; दृष्टि; नजर. जसें–अपकार–उपकार–तिरस्कार–पूज्य–हित–बुद्धि; काच–काष्ठ–चर्म–बुद्धि गुरु–पितृ–मातृ–मित्र–शत्रु–बुद्धि. ८ मानणें; समजणें. [सं.] **म्ह०** ज्यास बुद्धि नाहीं त्यास भांडवल नाहीं (वाप्र.) **०फांकणें**–१ गोंधळणें; आश्चर्यचकित होणें. २ ज्ञान, आकलन वाढणें. **०सांगणें**–शहाणपणाच्या गोष्टी सांगणें; उपदेश करणें. **बुध्दीनें स्वर्गास जाणें**–नुसत्या ज्ञानाच्या जोरावर मोठीं कृत्यें करणें व श्रेष्ठत्व संपादन करणें. **बुध्दीस लागणें**–एखाद्याच्या तंत्रानें चालणें, इच्छेनुसार वागणें. **बुध्दीशीं वैर करणें**–स्वतःच्या अंतःकरणाच्या सदिच्छेविरुद्ध प्रयत्न करणें; मनात येतें त्याप्रमाणें न वागणें. **बुध्दीचा खंदक**–पु. पूर्ण मूर्ख माणूस. **बुध्दीचा खोटा**–वि. दुष्ट; वाईट मनाचा. तुल०. 'पाखरूं हे मारणें बुद्धि खोटी।' –र ११. **बुध्दीचा जड**–वि. मंद बुद्धीचा. **बुध्दीचा सागर**–पु. १ अत्यंत विद्वान, हुषार माणूस. 'भले बुद्धिचे सागर नाना। ऐसे नाहीं होणार।' –ऐपो ४३९. २ (ल.) अत्यंत मद्व व मूर्ख मनुष्य. **बुध्दीचा विकास**–बुद्धीचा विशाळपणा. 'बायकापोराच्या ऐवजीं देशाचा संसार करण्याची बुद्धि होणें हा त्या बुद्धीचा विकास आहे.'–टिसू १६८. सामाशब्द– **०कौशल–ल्य**–न. बुद्धीचा चलाखपणा; विलक्षण हुषारी; बुद्धीची तीव्रता. [सं.] **०गम्य**–वि. बुद्धीनें जाणता येण्या जोगें; तर्क्य. गम्य पहा [सं.] **०ग्रह**–पु. मनाची समजूत; जाणीव; मत. **०ग्राह्य**–वि. बुद्धीला ग्रहण करतां येण्यासारखें; बुद्धिगम्य [सं.] **०चापल्य**–न. बुद्धीची तीव्रता; चलाखपणा; तरतरीतपणा. [सं.] **०चालक**–वि. (काव्य) मनास किंवा इच्छेस चालना देणारा. [सं बुद्धि+चालक] **०तत्त्व**–न. महत्तत्व. 'उभयसंगु पहिलें। बुद्धितत्त्व प्रसवलें।' –ज्ञा १४.९१. [सं.] **०नीत**–स्त्री उपदेश, सल्ला, उपाय, मार्ग इ० विषयीं सूचना. **०पाटव**–न. बुद्धीचा तीव्रपणा, चलाखपणा. [सं] **०पुर.सर–पूर्वक**–क्रिवि. मुद्दाम, जाणूनबुजून; बुद्ध्या. 'बुद्धिपुरःसर पाप केलें आणि सहज घडलें यांत अंतर आहे.' [सं.] **०पुरस्कर**–क्रिवि. (अप.) बुद्धिपुरःसर पहा. **०प्राबल्य**–न. बुद्धीची पूर्ण वाढ, परिपक्वदशा. [सं.] **०प्रामाण्यवाद**–पु मानवी बुद्धि हेंच सर्व ज्ञानाचें प्रमाण व उगमस्थान आहे असें मानणारें मत. (इं.) रॅशनॅलिझम् **०बळ**–न. १ बुद्धीचें सामर्थ्य, शक्ति. २ ज्यांत बुद्धीची शक्ति लागते असा एक खेळ. यांत लष्करी डावपेंचाची भाषा असून पटावर मोहरीं मांडून हा खेळ खेळण्यांत येतो. देशी व युरोपियन असा याच्या दोन तऱ्हा आहेत. 'जेंवि बुद्धिबळें वाडें कोडें। मिथ्या राजा प्रधान हत्ती घोडे।' –भारा. बाल. ११.२४९. ३ बुद्बळ पहा. **०बोध**–पु. जीव आणि ईश्वर. 'भेदनदीचां दोहीं थडीं। आरडातें विरहवेडी। बुद्धिबोध।' –माज्ञा १६५. **०भेद**–पु. १ हेतूचा, उद्देशाचा बदल. २ मनाचा, मनोवृत्तीचा बदल; मतपालट. ३ वैमनस्य; द्वेष; कलह 'बुद्धिभेद उत्पन्न करणारे वाद उत्पन्न होऊन दुही माजते.' –टि २.४३४. [सं.] **०भ्रंश**–पु. १ विचारशक्तीचा नाश; मानसिक गोंधळ; भ्रम. 'बुद्धिभ्रंश होऊनि रावणें। सीताहरण पैं केलें।' २ बुद्धिभेद पहा. [सं] **०मंद**–वि. ज्याची बुद्धि जड आहे असा; जडबुद्धि. **०मांद्य**–न. बुद्धीचा जडपणा, मंदत्व. [सं.] **०मंत–वंत–मान्–वान्**–वि. तीव्र बुद्धीचा; हुशार; तरतरीत; शहाणा; तैलबुद्धि. **०योग**–पु. १ निष्कामकर्मयोग. 'आता बुद्धियोगु निश्चित। अवधारी पां।' –ज्ञा २.२३०. २ ज्ञानयोग. [सं.] **०वाद**–पु. उपदेश; सल्ला; शिफारस; सूचना. (क्रि० सांगणें, करणें). 'एके यतीनें येवोनी। बुद्धिवाद सांगितला।' –गुच ३३.५. [सं.] **०विलास**–पु १ कल्पनेचा खेळ. २ मनाचें किंवा बुद्धीचें भटकत फिरणें. [सं.] **०विषय**–पु. १ बुद्धीनें जाणलेली, समजलेली गोष्ट. २ बुद्धिग्राह्य गोष्ट; मानसिक शक्तीनें ग्रहण करण्याजोगी, मानसिक शक्तीच्या ग्रहणाचा विषय होणारी गोष्ट. [सं.] **०वैभव**–न. बुद्धीचें श्रेष्ठत्व, उच्चपणा, शक्ति. [सं.] **०स्थ**–वि. उद्देशिलेलें; योजिलेलें; कल्पिलेलें. [सं.] **०स्वातंत्र्य**–न. स्वतंत्र विचार; मनोवृत्तीचा मोकळेपणा. 'ईश्वर मनुष्यास बुद्धिस्वातंत्र्य देतो.' –टि २.४२२. **बुद्ध्यंकित**–वि. बुद्धीच्या आज्ञेत राहणारा; बुद्धिवश. [सं बुद्धि+अंकित] **बुद्ध्यतीत**–वि बुद्धीच्या आटोक्याबाहेरील; बुद्धीला न समजेल असें. [सं बुद्धि+अतीत] **बुध्द्यारूढ**–वि. समजलेलें; जाणलेलें. [बुद्धि+आरूढ] **बुद्ध्या**–क्रिवि. १ मुद्दाम; जाणूनबुजून; बुद्धिपूर्वक. २ मनानें, स्वेच्छेनें; जाणीव असतांना (समासांत उपयोग). [बुद्धि]

**बुद्बुद**—पु. बुडबुडा. 'जळांत उपजे जैसा फेण। बुद्बुद राहे कोठें स्थिर।' –गुच २१३. **बुद्बुदाकार**–वि. बुडबुड्याच्या आकाराचा. गर्भधारणेनंतर तिसऱ्या दिवसाचें गर्भाचें स्वरूप. [सं. बुद्बुद+आकार]

**बुद्रुक–ख, बुजुरुग**—वि. १ पूज्य; सन्माननीय; थोर; वृद्ध (वय, विद्वत्ता, अनुभव इ० नीं). २ एकाच नांवाच्या दोन गांवांपैकीं मोठें. असें–हिंगणेंबुद्रुक. याच्या उलट खुर्द. 'सबब याजला मौजे शिरोली बुद्रुक पैकीं एक चावर जमीन इनाम ...' –समारो १६४. ३ एकाच नांवाच्या दोन इसमांपैकीं मोठा, वडील. ४ वृद्ध; दुबळा; असमर्थ. 'मी आतां बुद्रुक झालों आहें तेव्हां कारभार तुम्हींच पाहावा हें बरें.' [फा. बुझुर्ग]

**बुद्रुंत**—वि (गो. कर्मा.) बुद्धीनें व अनुभवानें प्रौढ; बुद्धिवंत पहा.

**बुध**—पु. सूर्यमालेंतील एक अंतर्ग्रह; नवग्रहांतील चवथा. हा सूर्याच्या अति जवळ आहे. [ सं. ] ०**वार**–पु. सात वारांपैकीं एक वार; सौम्यवासर. [सं ] म्ह० नवऱ्यास नाहीं थाग बुधवारचें लग्न. **बुधवारणें**–अक्रि. (म्हैस) बुधवारीं विणें. हें वेत अशुभ समजून वासरूं ब्राह्मणास दान देतात. [ बुधवार ] **बुधाष्टमी**–स्त्री. १ शुक्र पक्षांत बुधवारीं येणारी अष्टमी. २ स्त्रियांचें एक व्रत. व्रत आचरणाऱ्या स्त्रीनें या व्रताची कथा जेवतांना ऐकावयाची असते व कथेंत नरकाचा उल्लेख येतांच जेवताना उठावयाचें असतें. क्वचित अंचवून पुन्हां जेवावयाचा परिपाठ आहे. [ सं. बुध+अष्टमी ]

**बुध**—अ. संख्यावाचक विशेषणापूर्वी योजावयाचा शब्द (विरू.) बुद्द पहा.

**बुध**—वि. (व्यापारी, सांकेतिक) पाच (भाजीपाल्याच्या व्यवहारात योजतात).

**बुध**—वि. शहाणा; विद्वान; ज्ञाता; पंडित. ‘ बुध अन्योन्य म्हणति कां जातां या हाचि नाक–वास वसा।’ –मोसभा १८. –स्त्री. बुद्धि पहा. म्ह० आगळ बुध वाणिया पाछळ बुध बामणिया. ‘ विद्येसंबंधीं प्रत्येक गोष्टींत दक्षिणी लोकांचें पाऊल पुढें असून इतरांचें मागें असे, ती स्थिति बदलून आमचे गुजराथी बंधु आगळ बुध वाणिया पाछल बुध बामणिया ही म्हण खरी करूं पाहत आहेत.’ –निबंधचंद्रिका. [ सं. ] ०**वंत**–पु १ (कों) पुढारी; महाजन. –ख्रिपु. २ कर्नाटकातील बेडगू जातींतील जातपाटील. –गांगा. ३ बुद्वत पहा.

**बुंध**—न. १ (झाड, गवत, केरसुणी इ० चा) मुळाकडचा भाग; बुडखा. २ पायथा; तळ; बूड; खालचा भाग. बुंधा पहा. [ सं. बुघ्न; प्रा. बुंध. तुल० फा. बुन ] **बुंधट**–न. पेंढावर सार वण्यासाठीं वापरतात ती जीर्ण व आखूड फडयाची केरसुणी. **बुधनाल**–स्त्री. झाडाच्या बुंध्याशीं नालाप्रमाणें वांकवून बांधून मारणें ‘ टांगणें टिपऱ्या पिछोडे। बेडी बुधनाल बोलदंडे।’ –दा ३.७. ६७. [ बुध+नाल] **बुंधा, बुंधारा**–पु. १ (झाड इ०चा) खालचा भाग, बूड, तळ, पायथा. २ (ल.) मूळ; पाया; उगम; आरंभ; उत्पत्तीचें कारण. [ बुंध ] **बुंधाड**–न. (विरू.) बुडखा पहा. **बुंधारणें**–उक्रि. केरसुणीच्या बुडख्यानें मारणें. [ बुंधा ]

**बुधला**—पु १ तेल, तूप इ० ठेवण्याचें, लहान तोंडाचें चर्मपात्र; कातड्याची बाटली. २ (व.) ज्याभोंवतीं आरे बसविलेले असतात तो चाकाचा मध्यभाग; तुंबा. ३ मुंडकें; डोकें [ हिं. बुदला; तुल० इं. बॉटल ] म्ह० बुधलाभर तूप खाऊन बुधल्याचा माल नाहीं. **बुधलेमार**–पु. १ दारूनें भरलेले बुधले ओळीनें ठेवून बार उडविणें. २ दारू भरलेल्या बुधल्यांशीं बांधून त्या दारूस आग लावून मारणें. ‘ मोघरीमार बुधलेमार। चौखरून डंगारणें मार।’ –दा ३.७.६५. [ बुधला+मारणें ]

**बुधली**–स्त्री. १ सुगंधी तेलें, अत्तरें इ० ठेवावयाचें चर्मपात्र; लहान बुधला २ मशालीवर तेल ओतण्यासाठीं तोटी असलेलें चामड्याचें किंवा धातूचें भांडें ३ (सामा.) लहान भांडें. [ बुधला अल्पार्थी ] म्ह० तोंडी तीळ गांडीस बुधली ०**उताणी पडणें–भोंवतीं गेणें**–(ल) एखाद्याची लबाडी उघडकीस येणें **बुधलें**–न. १ तेल, तूप इ० ठेवण्याचें चर्मपात्र. २ (व) बुधला अर्थ २ पहा.

**बुंधी**—स्त्री. १ बुरखा २ बुंथी पहा ‘ उ्ळखी जालेंयां बुंधी काइसीं। जाण राया।’ –शिशु ७८. सोंग; वेश.

**बुंधी**—पु (कों.) वोंवळे बांबू.

**बुंधेला**—वि १ बुंदेलखंडात राहणारा (इसम) २ (ल.) मूर्ख; मद्र; अडाणी. ३ रेंगाळणारा; सुस्ताईचा; ढिला (इसम, कारभार).

**बुंधेला**—वि. बुधले वगैरे तयार करणाऱ्या लोकांच्या जातीचा (इसम) [ बुधला ]

**बुनगा**—पु. बाजार बुणगे ‘तमाम फौजा सारी। बुनगे घातलेंस माघारी।’ –ऐपो १२७.

**बुनगा, बुनगुला**—वि. बुणगा पहा.

**बुनगुलें**—न. धातूचें लहान भांडें.

**बुनणें**—उक्रि. विणणें. [ हिं. बुनना ] **बुनकर**–पु. (व.) विणकरी; कोष्टी **बुनावट**–स्त्री. वस्त्राची वीण; विणण्याची तऱ्हा.

**बुनियाद, बुना(न्या)द**—स्त्री. १ जोर, शक्ति; जोम. २ (ल) बिशाद. मजाल. ‘ ह्याची काय–किती बुनियाद आहे कीं हा हजार रुपये खर्च करील ’ ३ वजन; किंमत; प्रभाव; महत्त्व. ४ भांडवल. साधन; कोणत्याहि कामास लागणारी सामुग्री. ५ पाया. ‘ कार्यभाग उरकावयाची बुनियाद घातली होती ’ –पेद २१ १४१. ६ आरंभ; सुरवात.‘त्यास आपण बुनादीपासून आपले वतनाचें वर्तमान व कागदपत्र तमाम दाखविले.’ –रा ८.४४. ७ स्वभाव; शील. ‘ हलक्या गोष्टी आम्हाकडील नवाब व रुक्नुद्दौला हैदरखाच्या वकिलाशीं बोलत असल्यास त्याचा प्रकार, बुनियाद कशी आहे तें कळतच आहे.’ –ख १०७४. ८ (व.) हद्द; सीमा; मर्यादा. ‘ ह्या गाडीची किंमत शंभर रुपये असेल, बुनियाद झाली.’ –वि. जुनाट; फार प्राचीन काळापासून चालत आलेला; जुना (मनुष्य, हुद्दा, मालमत्ता इ०). [फा. बुन्याद्] **बुन्याद होणें**–(व) अखेर होणें. **बुनियादी, बुना(न्या)दी**–स्त्री. मूळापासूनची सर्व हकिकत. ‘ आपले वडिलानींही कुल बुनादी सांगितली होती.’ –रा १५.७५. –वि. जुना; मूळापासून चालत आलेला. ‘ याची देशमुखी अव्वलादी–बुनादी होती ऐसें आपणांस ठावकें आहे.’ –रा १५.७५. **बुनादीचें**–वि. प्राचीन; अनादि काळचें. ‘ तुका म्हणे बुनादीचें। झालें साचें उजवणें।’ –तुगा ४०४७.

**बुबा**—स्त्री. (व.) आत्या; बापाची बहीण. [हिं. बूबू=बहीण]

**बुबू**—स्त्री. वरच्या दर्जाची मुसलमान स्त्री; बिबी. [हिं. बीबी]

**बुबू(बु-ब)ळ**—न. १ डोळ्यांतील मांसगोलक; नेत्रपिंड. २ डोळ्यांतील काळा भाग. 'नेत्र जैसें कमळ । ऐसें सदां सोज्वळ । बुबुळ अलिकुळ । शोभा दिसे । ' –कथा १.२.१५५. [सं. बुद्-बुर-बुब्बुल-बुबुल. –भाअ १८३२; सं. बुद्=पाहाणें ]

**बुभां**—न. (कु.) एक प्रकारचा मासा.

**बुभुक्कार**—पु. वानराच्या ओरडण्याचा शब्द. भुभु कार पहा 'अठरा पद्में वानर करिती बुभुक्कार । ' –रामाची आरती [ ध्व. भु.+करणें ]

**बुभुत्सु**—वि. बोधाची इच्छा धरणारा; जिज्ञासु 'श्रीगुरु भेटोनि करी पाडु । बुभुत्सु तैसा । ' –ज्ञा १८ ९६८. [ सं बुध् ]

**बुभुक्षा**—स्त्री. खाण्याची इच्छा; भूक; क्षुधा. 'मुमुक्षा जया तया मुक्ति । बुभुक्षा तया वेसी भुक्ति । ' –यथादी १ ४८. [सं. भुज् ] **बुभुक्षित**–वि १ ज्याला भूक लागली आहे असा; भुकेला; क्षुधित. २ (ल.) गरीब; गरजू. [ सं. ] **बुभुक्षु**–वि. भुकेला, क्षुधित. 'त्यावरि उठता गमला सुबुभुक्षु व्याघ्र भीम, शश हो ते।' –मोभीष्म ५.२७. [ सं. ]

**बुयार्डी**—स्त्री. (गो.) मासळीची एक जात.

**बुयांव**—न. (गो.) बरणी. [ पोर्तु. बाओ ]

**बुर, बुराडी**—पुस्त्री. (व.) अळशीच्या रोप्याचा वाळलेला बुंधा. 'बुरानें घर शिवलें.'

**बुर**—न. १ भुस्सा; कोंडा; भुगा. 'चोरीं तुझा काढिला बुर। वेगळें भावा घातला दूर । ' –तुगा २९९७. २ विगलित स्थिति. बूर पहा. (क्रि० निघणें). 'धरूनियां धीर लाजे बुर निघाला ।' –तुगा १६३. –वि. घामट. –शर

**बुरकणें**—अक्रि. १ (म्हैस, बैल, डुकर इ०) ओरडणें; डरकणें. २ मूर्खपणानें, गैरसावधपणानें (रहस्य, भलतीच गोष्ट इ०) बोलून जाणें. [ ध्व. ]

**बुरकत**—न. (कों.) (नाविक) चौकोनी परंतु लांबट शीड. शिडाप्रमाणें ही उभी न करतां आडवी हांकारतात.

**बुरका-खा**—पु. १ मराठे, मुसलमान इ० च्या स्त्रिया तोंडावरून घेतात तो वस्त्राचा पदर; पडदा; अवगुंठन. (क्रि० घालणें; घेणें). २ (पालखी, हत्ती इ० वरील) वस्त्राचें आच्छादन. ३ प्रवासी गाडीचा चवरडोल; चांदवा; घटाटोप. [ अर. बुर्कअ ]

**बुरकूल**—न. १ कापड फार धुतलें गेल्यामुळें त्याचे निघालेले तंतू; वस्त्रावरचें फूल. २ डोक्यावरचे पिंजारलेले केस ३ कच्चें सुत, दोरी इ० चीं धसकटें. ४ वाळलेला दोडका, घोसाळें इ०च्या सालीच्या आंतील तंतुमय भाग. [ बूर ! ]

**बुरखी**—स्त्री भुरकी पहा.

**बुरखुंड**—न. मका, जोंधळा इ०चे दाणे पाडून घेतलेलें कणीस. बिरखुंड अर्थ २ पहा.

**बुर(ं)ग**—न. (काव्य) शाहीर लोकांचें एक वाद्यविशेष. 'ढोल टिमक्या बुरंगें पाही । ' –भारा किष्किंधा ९.३६.

**बुरंग(गू)ट, बुरंग(गू)ळ, बुरंगें**—न. अत्यंत बारीक पाऊस; बुरबुर. (क्रि० येणें; पडणें; लागणें; चालणें; वाहणें). [बुर, बुरंट]

**बुरंग(गा)ळणें**—अक्रि. १ स्वच्छंदानें, ताळतंत्र सोडून वागणें; स्वेच्छाचारी, उनाड बनणें. २ (म्हैस इ०नें) ओरडणें; बुरकणें. ३ बरंगळणें पहा.

**बुरगुंडा-डी-डें**—पुस्त्रीन. (खा, वैदू बैकाडी.) मूल. (मुलगा; मुलगी). [ ते. तुल० गो. बुरगें ]

**बुरजी**—स्त्री. (बुद्धिबळें) एका पक्षाचीं राजाशिवाय सर्व मोहरीं मरून डाव अंगावर येणें. [ फा. बुर्द ]

**बुरजी**—वि. कुत्र्याची एक जात.

**बुर(ं)जी**—स्त्री. बाजरीचा पूर्ण न पोसलेला दाणा; खुरटलेली बाजरी. पूर्ण पोसलेल्या बाजरीस लाटण्यासारखी असें म्हणतात. [ तुल० का. बरगु=बाजरीची एक जात ]

**बुर(ं)ट, बुरटें**—न. दाट गवत व झाडेंझुडपें असलेलें गर्द स्थळ. **बुर(ं)ट**- वि. १ दाट, गहन; किर्र (झाडी, रान, अरण्य). २ खुरटलेलें; वाढ खुंटलेलें (झाड). ३ खुरटी; थोडें दूध देणारी; आटलेली (गाय.) याच्या उलट दुधाळ. 'जो बुरट गौतमी कासे खालीं । सर्व पदार्थ महि जे उद्धरिली । ' –नव १९ ४६ **बुरटा**–पु. रोगामुळें खुरटलेलें, वेडेंवाकडें वाढलेलें झाड किंवा फळ. [ सं. वृथा; हिं. ब्रथा ]

**बुर(ं)ट**—वि. बुरसटलेला; बुरशी आलेला. [बुरा] **बुरट(ड)णें**–अक्रि. बुरसटणें; बुरशी येणें; बुरसणें. 'जें कां सांचुनि ठेविलीं बुरटलीं उष्टीं जुनीं आपुलीं । ' –निमा १.५०. **बुरटा चोर**–पु. उचल्या; किरकोळ चोरी करणारा; भुरटेचोर. **बुरटी चोरी**–स्त्री. किरकोळ चोरी; उचलेपणा; भुरटेचोरी.

**बुरड**—पु. (विरू.) बुरूड पहा. **बुरडी, बुरडीच**–वि. बुरडानें बनविलेला (टोपली इ० पदार्थ).

**बुरडचें, बुरडुंक**—उक्रि. (गो.) ओरबाडणें; बुचाडणें.

**बुरडें**—न. एक प्रकारचा मासा.

**बुरडी**—स्त्री. गुऱ्हाळघरांत दिवा ठेवण्यासाठीं असलेलें तिकटें, घोडी.

**बुरणू(ण)स**—पु. १ न विणतां खळ लावून, लादून, दाबून केलेलें पिंजलेल्या लोकरीचें वस्त्र. २ रग, कांबळी यासारख्या लोकरीच्या पांघरुणालाहि म्हणतात. [ सं. ऊर्णायु ] **बुरणुशी**–वि. बुरणुसासंबंधीं; बुरणुसाचें बनविलेलें.

**बुरदंड**—पु. (विरू.) भुरदंड पहा.

**बुरबुर**—स्त्री. १ तोंडांतल्यातोंडांत बोलणें; पुटपुट; कुरकुर. (क्रि० लावणें; करणें). 'जाणिवेच्या भारें चेंपला उर । सदा

बुरबुर सरेचिना।'–तुगा ३०७०. २ बारीक पाऊस; धुईधुई पडणारा पाऊस; रिपरिप. [ ध्व. ] **बुरबुर-बुरां**-क्रिवि. बारीक पाऊस, मंदवाऱ्याची झुळुक, फार आवाज न करतां व जोरानें धांवणें, पुटपुटणें इ०च्या आवाजाप्रमाणें आवाज करून. [ ध्व. ] **बुरबुरणें**–अक्रि. १ हलक्या आवाजांत बोलणें; पुटपुटणें; कुरकुरणें. २ बारीक थेंबाच्या रूपात पाऊस पडणें; पाण्याचे तुषार पडणें [ बूर, बुरबुर ] **बुरबुरी**-स्त्री. १ पुटपुट; कुरकुर. २ बारीक पाऊस.

**बुरबुरणें, बुरबुरी**—बरबरणें, बरबरीत पहा. **बुरबुरा**—पु. जखम, गळूं इ०तील रक्तमिश्रित वाळलेला पू.

**बुरबुरणें, बुरबुरी**—बुरसणें, बुरसा पहा.

**बुरम**—पु. एक फुलझाड.

**बुरमुळा**—पु. एक कंद; बिरंबोळा पहा.

**बुरयाँटा**—पु (कु ) अतिशय लहान व स्वच्छ असा मासा.

**बुरलही**—स्त्री (वाई) हरळीसारखें एक प्रकारचें गवत.

**बुरलूक**—न. (कु.) मांसाचें वाळलेलें टेंगूळ, अवाळूं.

**बुरशी-सी**—स्त्रीपु १ दमटपणामुळें पदार्थावर होते ती सूक्ष्म वनस्पतिरूप वाढ; बुरा; केनशी; कॅडशी; भुरी. (क्रि० येणें; चढणें ) २ दांतावरील किटण [सं. बुरा] **बुरशेल-ला**-वि १ ज्याला बुरशी आली आहे असा; बुरसलेला. २ (ल ) घाणेरडा; ओंगळ; गचाळ (मनुष्य.) **बुरसटणें**-अक्रि. घाणेरडे, ओंगळ होणें (विशेषत तोंड, शरीर). **बुरसणी**-स्त्री. बुरसणें; बुरशी येणें. **बुरसणें, बुरसावणें, बुरशेणें**-अक्रि. १ बुरशीनें युक्त होणें, बुरा येणें. २ साका चढल्यामुळें जीभ, कीट चढल्यामुळें दांत घाणेरडे होणें, असणें. [ बुरशी ] **बुरसा**-पु. १ बुरशी; केनशी; भुरी; घाण. २ बुरशीमुळें पडणारा डाग ३ आरशावरील पारा गेल्यामुळें झालेला कांचेचा उघडा भाग. –वि. घाणेरडा; ओंगळ; गचाळ. **बुरसाविणें**-सक्रि. १ मळ, बुरशी, कीट, साका, इ०नीं (अंग, भांडें, जीभ, दांत इ०) युक्त करणें. २ हिडीस, ओंगळ दिसें असें करणें. 'हा स्नान करतांना अंग चोळावें तें चोळीत नाहीं, बुरसावून मात्र येतो.' [ बुरसा ]

**बुरा**—पु साखरेचा एक प्रकार. (प्र.) बुरा साखर. [ हिं. बुरा ]

**बुरा**—पु. (ना.) १ लोंकर तयार करण्यापूर्वीचे मेंढयांचें केंस. २ केंसांचा झुपका.

**बुरा, बुरू**—वि. १ वाईट. विशेषतः भला ह्या शब्दाबरोबर योजतात. 'भल्या बुऱ्या मारी। होतां कोणी न विचारी।'–तुगा ३७४०. २ (चुकीनें उपयोग) बुळा; नपुंसक ३ कृतघ्न 'नाना वसो घातला चारू। माथां तुरंबिला बुरू।'–ज्ञा १७२८९. ४ बुरशी; साका; कीट; मळ. [ हिं ] **बुराई, बुरपणा**–स्त्रीन. वाईटपणा. विशेषतः भलाई, भलेपणा ह्या शब्दाबरोबर योजतात.

**बुरेहाल**-पुअव. पराकाष्ठेचे हाल; दुर्दशा; दैना; फजीति. [ हिं. बुरा+अर. हाल् ]

**बुराक-ख**—पु. १ भोंक; वेज (मोती, हिरा इ०चें). २ (भाडयाला पडलेलें) लहान छिद्र. ३ (सामा.) भोंक; छिद्र. 'बुराख एक ठेऊन आपले टकल्येवर न्हालो.' –लोक २.४८. ४ अपकीर्ति; बदनामी; फजीति (क्रि० उडणें; होणें). [ फा. बुराख्; पोर्तु बुरासो; गो बुराक] ०**खांच**-स्त्री. (पाथरवट.) वेशी अगर दरवाजे यांचीं दारें बसविण्यासाठीं दगडाला ठेवलेलें भोंक.

**बुरांगळ**—स्त्री. (व.) किरकीर; चऱ्हाट; पाल्हाळ.

**बुरां(रू)ट, बुराड**—( –न. व –वि. ) बुरंट पहा.

**बुरांटॉ-डॉ**—पु. १ कांटे असलेली माशाची एक जात. २ अशा लहान माशाचा थवा

**बुरांड**—पु अंडवृद्धि. [सं बृहदंड] **बुरांड्या**-वि. बुरांडाची व्यथा असलेला.

**बुराणजी कापशा**—वि. (व.) स्वतःला फाजील महत्त्व देणारा (मनुष्य); अहंमन्य. 'कोण विचारतो बुराणजी कापशाला' [ बुऱ्हाण+कापसे=विशेषनाम ]

**बुराना**—वि. (व.) जुना. [ हिं. बुरा; पुराना ]

**बुरींग-ज**—पु. (गो ) बुरूज [ पोर्तु. बुरींज ]

**बुरीचें जाळें**—न. (कों ) होडया किंवा तराफे यावर पसरलेलें मासे पकडावयाचें जाळें, ह्या जाळयाचा दगडाचा नांगर असतो त्यास पिरगा म्हणतात. हर्णेकडे ह्या जाळयास विलाची जाळें असें म्हणतात

**बुरु(रुं)ग**—न एक वाद्य बुरग पहा 'नफेरिया आणि बुरुंग.' –कुमुरा ७७.२९

**बुरुंग(गू)ट-ड, बुरुंग(गू)ळ**—न. बुरंगट पहा.

**बुरू(रु)ज**—पु १ कोटाच्या तटबंदींत मजबुतीसाठीं, बचावासाठीं व माऱ्यासाठीं जागोजाग केलेली वर्तुलाकार बंदिस्त जागा; हुडा २ या आकाराची सैन्यातील शिपायांची रचना; व्यूह 'झर झर झर झर बुरुज बांधुनी।'–ऐपो २१८. ३ (सोंगटया) पगड डावांत एका रंगाच्या सोंगटया जिंकणें. ४ बुद्धिबळाच्या खेळांतील हत्ती. ५ बुद्धिबळातील एक डाव. बुरजी पहा ६ (ल.) संरक्षणाचें मजबूत साधन 'तोफेचा बुरूज बांधिला गारपिरावर।'–ऐपो ४३६. [ अर. बुर्ज, (अव ) बुरूज् ] **बुरजांत जाणें**-राजा व हत्ती यांच्यामधील मोहरीं निघालेलीं असून हत्तीच्या दिशेकडील राजाच्या दोन घरांवर मारा नसला म्हणजे राजाशेजारीं हत्ती व त्याच्या पलीकडे राजा असा डाव टाकणें. ०**बंदी**-स्त्री. बंदूकवाल्या शिपायांच्या तुकडयांची रचना.' बुरूजबंदी चोंहोकडे केली आणि रेजगण भरून तोफा ठेविल्या होत्या त्या त्यासमयीं

सोडिल्या.' -ख ८०६ **बुरजी तुरा**-पु. बुरुजाच्या आकारासारखा फुलाचा गुच्छ

**बुरूड**—पु. १ कळक, वेत इ०च्या काबीच्या सुप, टोपल्या इ०जिनसा करणाराची जात व या जातींतील व्यक्ति. २ (खा.) मागांतील एक पोटजात. -अस्पृ ४७. [ बोरू ]

**बुरूम, बुरुब**—पु. (विरू.) मुरूम पहा. **बुरंबट, बुरंबी**—वि. मुरमट पहा.

**बुरूस**—पु. डोळयातील मळ, चिपडें, गू. [ बुरसा ? ]

**बुरेला**—वि १ (ना.) स्नान न केलेला. २ दुर्मुखलेला [ बुरा ]

**बुऱ्हू**—पु. (गो.) पत्त्याच्या खेळाचा एक प्रकार. [पोर्तु ब्यूरों]

**बुऱ्हा**—पु. (प्र ) बुरा पहा

**बुल, बुली**—स्त्री. १ (गो.) ल्हान शिशी २ (कु.) किटली, चहादाणी. [ पोर्तु ब्यूल. मूळ सिंहली शब्द ]

**बुल-लें**—स्त्रीन. १ (ना व) धान्य सांठविण्याची मातीची लहान कोठी. २ लहान कणगी, उडवें.

**बुलकावणें**—अक्रि. (व.) त्रासून सोडणें. गुलकाविणें अर्थ २ पहा

**बुलंगा**—पु. सैन्यसंभार. -राव्यको १०.१.

**बुलंद**— वि. उंच; दुर्गम; बेलाग. 'वसई जागा व का बुलंद, सुरुंगाचा उपाय नाहीं' -ब्रप ७८ [फा. बुलंद्] **बुलंदी**-स्त्री. उंची. 'दोनी मंडप बुलंदीस कमी याजमुळें गर्मिणा भारी; हजमा भारी होता.' -ख १०.५४४५ [फा ]

**बुलबुल, बुलबूलबोचा, बुलबूल**—पु. १ एक गाणारा पक्षी. २ (लहान मुलाची) बडबड, जीभ वळवळ करणे. (क्रि० लावणें, माडणें, करणें) -क्रिवि एकसारखी बडबड करून; जिभेची टकळी लावून (लहान मुलांनीं बोलणें) (क्रि० करणें; बोलणें). [फा. बुल्बुल्] **बुलबुल चष्मी**-वि (बुलबुल पक्ष्याच्या डोळयासारखे) एका विशिष्ट प्रकारचे कांठ ज्याला आहेत असें (वस्त्र) 'या धोतरजोडयाचे रेशमी कांठ बुलबुल चष्मी विणकरीचे आहेत.' [फा बुलबुल्+चष्मा=डोळा]

**बुलाक-ख**—पु नाकपुडयांमधील पडद्यास भोंक पाडून त्यांत घालावयाची मुसलमान स्त्रियांची एक मोत्याची नथ, लोलक [फा. बुलाक्]

**बुलाखा**—पु. (व.) रागानें नाक व डोळे वर चढवून धरून केलेली चर्या. [ ? बुलुक्=मोठा डोळा ]

**बुली, बुल्ली**—स्त्री. १ लहान मुलाचें जननेंद्रिय; चोंटकुली, मिरची. २ त्या आकाराचा मुलांच्या कमरेला (सांखळीला) असलेला चांदी-सोन्याचा दागिना. [का. बुल्ल-ल्ली=पुरुषाचें इंद्रिय ]

**बुलीर**—(कों. नाविक) परगाण पुढें-मागें ओढण्यासाठीं त्याच्या बुंध्यास बांधलेली दोरी.

**बुलेती**—स्त्री. (कों. नाविक) वल्हें अडकविण्याची नावेवरील खुंटी.

**बुल्दा**—पु १ शहर. २ प्रांत. 'औरंगाबादचे बुल्याचे सुभेदारीचें काम.' -रा ७.२२१. [फा बल्दा ]

**बुवा**—पु १ बाबा; मोठा व सन्मान्य मनुष्य, बोवा 'हे हरिदासबुवा आले आतां कथेस सुरवात होईल.' २ साधु; संत; गुरु ३ बागूल; बाऊ; मुलांना भीति दाखविण्यासाठीं कल्पिलेला एक प्राणी ४ एक आश्चर्यवाचक उद्गार. 'वा! माडीवरील दिवाणखाना तर खूप डौलदार आहे बुवा!' ५ (धडेनें) उंदीर; घूस [बाबा] ०**बाजी**-स्त्री (निंदाव्यंजक) गुरुगिरी; बोवा, साधु बनून आपलें प्रस्थ माजविण्याची क्रिया.

**बुशे(से)त**—न. (गो ) लहान डबी; टिनच्या पत्र्याची पेटी. फोलीण पहा [पोर्तु. बोसेता ]

**बुहारा**—वि. (व.) एक बायकी शिवी. 'बुहारी मेली! मरतहि नाहीं लवकर!' [ ? बुरसा, बुरशी ]

**बुळकट**—वि. १ (कु.) तेल, तूप इ० चोपडलें गेल्यामुळें बुळबुळीत, निसरडा झालेला. २ वेडसर, दुर्बळ. -शर. ३ बुळा पहा.

**बुळ-कण-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. सैलपणें गेल्यानें एखाद्या वस्तूच्या बाहेर पडण्याच्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. 'खुंटीवर पागोटें ठेवावयास गेलों तों बुळकन खुंटी हातांत आली.' [बुळ!]

**बुळकणें**—अक्रि. १ अतिसार इ० विकृतीमुळें एकदम व पातळ शौचास होणें; पिळकणें. २ (फळ) नासणें आणि त्यातून चोथापाणी बाहेर पडणें. ३ (जखम, गळू इ०) वाहूं लागणें. ४ (कु.) (दोरीची गांठ, लाकडाचा सांधा इ०) सैल पडणें; एकदम सुटणें; निखळणें [बुळकण ]

**बुळका**—पु. एक जलचर प्राणी; गाधा मासा; घडयाळ मासा.

**बुळका**—वि १ सैल; ढिला; खिळखिळीत झालेला (सांधा, गाठ, इमारत, यंत्र, माडणी, सांगाडा). २ (ल.) निष्काळजी; ढिला; गबाळ; अव्यवस्थित (कारभार, व्यवहार, वचन, कर्ता इ०). [बुळकण ]

**बुळका, बुळकां(कं-कुं)डी, बुळक-की**—पुस्त्री. १ अतिसारामुळें एकदम व आपोआप बाहेर पडणारा पातळ मळ; हगवण. २ फुटलेल्या किंवा फाटलेल्या पात्रातून, बारदानांतून बाहेर पडत असलेल्या पदार्थाची धार. ३ गुरांचा एक स्पर्शजन्य रोग, पटकी, देवी इ० [बुळकण ]

**बुळबु(बु)ळ**—स्त्री. १ बुळबुळीतपणा; स्निग्धता; ओशट-पणा; निसरडेपणा. २ गळती; टपटप पडणें; ठिबकणें; पाझरणें; थेंबथेंब पडणें. (क्रि० लावणें; माडणें; वाहणें; लागणें; सुटणें; चालणें; होणें) **बुळबुळ-ळां**-क्रिवि. पावसाची बुरबुर, (छपर, भांडें, दाण्याचें पोतें, नाक इ० च्या) सारख्या गळण्यानें किंवा ठिबकण्यानें, जखमेंतील घाण पदार्थाच्या वाहाण्यानें, ढेकूण, ऊ, पिसु इ० च्या, अंगावरील वस्त्र इ०मध्यें होणाऱ्या हालचालीनें होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन. **बुळबुळणें**-अक्रि. १ (केस, शरीर इ० मध्यें) उवा, पिसवा इ०चा बुजबुजाट होणें. २ (जखम, फळ इ० मध्यें) कृमि वळवळत असणें. [बुळ !] **बुळबुळपंचांग**-पु (गो) अजागळ, बावटळ मनुष्य. **बुळ-बुळाट, बुळबुटाण**-पु. (कु.) बुळबुळीतपणा; तेलकटपणा; ओशटपणा. **बुळबुळाविणें**-सक्रि १ तेल, तूप इ० नीं बुळ-बुळीत करणें. २ कसेंबसें धुणें, घासणें, विसळणें (वस्त्र, अंग, भांडें) [बुळबुळ] **बुळबुळीत**-न तुळतुळीतपणा; तेलकटपणा; निसरडेपणा; बुळबुळीतपणा. 'हाताचें बुळबुळीत अद्याप जात नाहीं.' -वि १ तेलकट; चिकट; तुळतुळीत. २ निसरडा; घस-रडा ३ गरीब; भितरा; शेळपट ४ कमजोर; नीरस; पाणचट (वर्तणूक, भाषण, लेख इ०).

**बुळबुळी**—स्त्री. एक वनस्पति

**बुळवो**—पु (गो.) दलदल.

**बुळा**—वि. १ नपुंसक; षंढ; नामर्द 'नामें बृहन्नडा-तो होय धरुनिया करांत कंबु बुळा ।' -मोविराट १२२ २ (ल.) सैल; ढिला; निष्काळजी; अव्यवस्थित. बुळका पहा

**बुळी**—स्त्री. गंजिफांतील हलकें पान. नादर पहा

**बुळीद-न**—पु (प्र) बुडीद, गळ पहा.

**बू**—पु १ लहान मुलास भीति दाखविण्यासाठीं बुवा, बाऊ ह्या अर्थी हा शब्द योजतात २ (बालभाषा) दूध. ३ पोकळ दिमाख; शुष्क देखावा; बढाई. ०**बाहेर पडणें, दाखविणें**-ढोंग, स्तोम उघडकीस येणें ०**दाखविणें**-१ कांहीं तरी बाऊ दाखवून भीति दाखविणें; भेडसावणें. २ एखाद्या चांगल्या वस्तूचें पोकळ प्रदर्शन करणें.

**बूच-बूज**—पु. १ गुडदी; दट्या; बुटणें. २ बुजवणी; भर; भरपाई. 'त्याची बूज करावया न अगदीं कोणी कसें राहिलें!' -केक ५३.

**बूज**—स्त्री. (गंजिफांचा खेळ) मागील डावांत लागलेलीं व चालू डावांतून यावयाचीं पानें. [बुजणें]

**बूज**—स्त्री. १ (गुण, शौर्य, विद्या इ० मुळें होते ती) मान मान्यता; सन्मान; आदर; पूज्यभाव; परामर्ष. (क्रि० राखणें; करणें). 'गरिबाची करीत होता बुज ।'-ऐपो १३८. २ आठवण; जाणीव. 'ययालागीं स्नेहें करुनि बुज धर्मे झडकरी । असे पाचारीलें बुत मज सर्वे चालचि तरी ।' -कीर्तन १.१७. [सं. बुध; हिं. बोझ; म बोज]

**बूट**—पु. १ भांगेचा पुष्पगुच्छ, फुलवरा. २ वस्त्रादिकावर पानें, फुलें इ० ची काढलेली नक्षी; वेलबुट्टी. 'कांठ किनारी बूट जरी आधीं परीटघडीचें ।'-प्रला ९६ ३ नवीन व चमत्कारिक कल्पना; युक्ति; खूबी; टूम; विचार इ० 'असा एक बूट काढिला होता कीं, नवऱ्याकडे जाण्यास बायको नाखूष असल्यास ... '-टि ४.४४. ४ नवीन कविता, गाणें. 'प्रभाकरानें बूट प्रियकर गाइला ।'-प्रला ९८. [हिं बूटा] ०**काढणें**-एखाद्याविरुद्ध कारस्थान रचणें, खलबत करणें. ०**बाहेर पडणें**-रहस्य, गुप्त योजना उघडकीस येणें. ०**चित्र**-न (फुलावेलाचीं) नक्षीदार चित्रें. 'जेथें सुंदर बूटचित्र दिसती त्रैलोक्य चित्रें बरी ।' -निमा १ ३९.

**बूट**—पु. एक जलचर. याचें डोकें हातोडीसारखें असतें

**बूट**—पु. (गो.) चटका; विस्तवाचा डाग ०**दिवप**-(गो.) जनावरांच्या विशिष्ट रोगावर बांबूच्या कोंवळया व जळत्या काडीनें डाग देणें.

**बूट**—स्त्री. (गो.) नुकसान बूड पहा (क्रि० लावप)

**बूट**—न. गुराना घालावयाचें पेंड, कोंडा, सरकी इ० चें भिज-वून केलेलें मिश्रण; अंबोण.

**बूट**—पु. इंग्रजी तऱ्हेचें पादत्राण; विशेषतः चढाऊ जोडा. [इं.]

**बूटवैंगण**—न. बुटवैंगण पहा.

**बूटी**—स्त्री. (काशी) भाग. बुटी अर्थ ५ पहा. [हिं.]

**बूड**—स्त्री. १ (व्यापार इ० तील) तोटा. २ (व्याज, बट्टा इ० संबंधीं) नुकसान. ३ बुडीतखर्च; बुडीतकर्ज; बुडालेला पैका. ४ नुकसान; तोटा; हानि (क्रि० येणें; लागणें; होणें). [बुडणें]

**बूड**—न. १ तळ; पाया, कोणत्याहि वस्तूचा खालचा भाग. 'घुसळितां लागलें ऊन । बूड पर्वताचें ।'-कथा २.५.२. २ चुली-वर ठेवावयाच्या भांड्याच्या खालच्या बाजूस राख, माती इ० चा करतात तो लेप (क्रि० घेणें). ३ कुटुंबाचा, जातीचा, वंशाचा, मूळपुरुष ४ वतनांत भागी असणारें अगदीं पहिलें व हयात अस-णारें कुटुंब. 'ह्या गावांत पाटिलकीचीं मुख्य चार बुडें आहेत.' ५ अशा कुटुंबाकडील वतनाचा हिस्सा. [सं बुध्न] ०**टेंकणें**-थोडा वेळ बसणें. ०**जड**-वि. १ (जड बुडाचा) (ल.) श्रीमंत; संपन्न; समृद्ध. २ प्रतिष्ठित; वजनदार; सन्माननीय. **बुडीं**-क्रिवि खालीं; तळीं; अधोभागीं 'पळों जातां लवडसवडी । व्याघ्रें झडपें पडिला बुडीं ।'-सुआदि ३४.५१. दृष्टीबुडीं=दृष्टीखालीं-समोर. 'पडिलिया दृष्टीबुडीं । मायबापाचें ठेवणें काढी '-एभा १७.२०८. **बुडील**-वि तळचा; खालचा; बुडाकडचा.

**बूड**—पु (गो.) पाणकोंबडा.

**बूथ**—स्त्री. ( विरू. ) बुथ, बुंथी पहा.

**बूंद**—पु १ थेंब; बिंदु. २ कॉफीचें बीं. ३ बुंद पहा

**बूदह**—वि.क्रिवि झालेला; होऊन –आदिलशाही फर्मानें.

**बूध**—स्त्री. ( अशिष्ट ) बुद्धि पहा. 'बरी बूध देवानें मला दिली.' –बाळ २.१०५ [ सं बुद्धि ]

**बूध**—अ. ( विरू ) बुद्ध पहा

**बूर**—पु १ चुराडा. २ अतिशय कामामुळें येणारा थकवा, क्षीण; थकलेली स्थिति; पिठ्ठा; भुस्कूट. ( क्रि० निघणें; पडणें; काढणें). 'भाराखाले निघेल बूर। पोरें म्हणती घोडीकुर।'–मध्व १७७. [ हिं बूर=कोंडा, टरफल ]

**बूर**—न ( गो ) वाढलेला अंडाशय; बुराड पहा

**बूरबट**—न ( माण ) मांसाचें कालवण बरबट पहा.

**बूरा**—वि. वाईट; अयोग्य बुरा पहा.

**बृद**—न. ( विरू ) बिरुद, बिरीद पहा

**बृंहण**—न १ (वैद्यक) पौष्टिक द्रव्यें इ०नीं वीर्यवर्धन, शरीरपोषण करण्यासंबंधींची वैद्यकशास्त्रांतील एक शाखा ह्याच्या उलट कर्शन. २ (सामा.) वाढविणें [ सं. बृहत्-बृंहण ]

**बृहत्**—वि. मोठा; जाड; लठ्ठ; विस्तृत ( सामासात ) बृहच्छरीर; बृहदुदर; बृहदंड; बृहत्कथा इ० [ सं ] **बृहदक्ष**–पु. दीर्घ वर्तुळाचा मध्य व दोन्ही केंद्रें यांतून जाणारा मोठा व्यास [बृहत्+अक्ष ] **बृहल्लुब्धक**–पु. मृगनक्षत्राच्या दक्षिणेस असलेला सर्वांत मोठा तारा, मृगव्याध [ सं बृहत्+लुब्धक ]

**बृहती**—स्त्री १ रिंगणीचें झाड. २ डोरलीचें झाड ३ ढुंगण ४ गुद, अपानद्वार. ५ विश्वावसुच्या वीणेचें नाव [ सं ]

**बृहस्पति**—पु १ देवांचा गुरु. 'विस्मित जाहला बृहस्पती। आश्चर्य मानिती सुरवर।' –एरुस्व ३ ७ २ नवग्रहांपैकीं पांचवा ग्रह. ३ (ल.) उत्तम वक्ता; विद्वान्. ४ ( ल ) मूर्ख. 'हे बृहस्पती अशा एकेक विपरीत गोष्टी करणारे आहेत कीं अनुमान करतां येत नाहीं.' –विक्षिप्त १५२. [ सं.] **०वार, बृहस्पतवार**–पु. गुरुवार. **बोलून बृहस्पति**–वि. मूर्खपणाची व बाष्कळ बडबड करणारा.

**बे**—वि दोन. याचा उपयोग फक्त पाढ्यांत किंवा संख्यावाचक शब्दांना जोडून समासात होतो ''बे एके बे, बे दुणे चार.' 'बेवीस'=बावीस. [हिं. बे, बा; तुल० सं. द्वि,द्वा; प्रा. बा, बि, बे]

**बे**—शअ वांचून; विरहित; अभाव दाखविणारा उपसर्ग. याचा फारशी किंवा हिंदी शब्दांशीं समास होतो व हा शब्द नेहमीं पूर्वपद असतो. [फा. बी; तुल० सं. विना; हिं. बिन] ज्यांच्या पूर्वपदीं बे शब्द येतो असे अनेक सामासिक शब्द आहेत त्यांतील कांहीं पुढें दिले आहेत. सामाशब्द– **०अकली**–वि. मूर्ख; बेवकूब. [ फा. बी+अक्ल् ] **०अदब–बी**–स्त्री. अपमान; असभ्यता; अमर्यादा; अनादर. [ फा. बी+अदबी ] **०अदाई**–स्त्री. स्वामिद्रोह; विरोध. **०अबरु–अब्रू**–स्त्री दुर्लौकिक; अपकीर्ति; फजिती. [फा: बी+आब्रू] **०अंबस**–क्रिवि. वृथा; व्यर्थ; निष्फळ. **०आब**–पु अपमान; बेअब्रू. –वि. अपमान झालेला. [ फा. बी+आब् ] **०आराम**–वि. अस्वस्थ; आजारी. [ फा. बी+आराम् ] **०आरामी**–स्त्री. अस्वास्थ्य [फा.] **०इज्जत–ती**–स्त्री. अप्रतिष्ठा. **०इज्जती**–वि. गैरअब्रूदार; हलकट. [फा.] **०इतबार**–पु. गैरविश्वास; गैरभरंवसा. [फा ] **०इतला**–क्रिवि गैरमाहीत; बे–दखल, बडतर्फ. 'त्याचे कार्कून बे–इतला केले.' –रा १०.११० [ फा ] **०इनसाफ–इनसाफी**–पुस्त्री. अन्याय; न्यायाचा अभाव. –वि. अन्यायाचा; अन्यायी [ फा. ] **०इमान–इमानी, बेमान**–वि. कृतघ्न; अप्रामाणिक; बेभरंवशाचा. [फा. बी+ईमान्=अधर्मी] **०इमानी–इमानकी**–स्त्री. खोटेपणा; अप्रामाणिकता; कृतघ्नता; विश्वासघातकीपणा **०इलाज**–वि. निरुपाय; नाइलाज. [फा.] **०उजूर**–क्रिवि १ कांहीं सबब न सांगता; बिनतक्रार. 'या दिवसांत पोटास न मिळे तेव्हा लोक चाकरी बे–उजूर कैसी करितील?' –रा १०.५७ २ विलंबरहित; बेधडक. [ फा. ] **०कदर**–क्रिवि. निर्धास्तपणें **०कम–ब–कास्त**–क्रिवि. कांहीं कमी न करतां; साद्यन्त; जसेंच्यातसें. [ फा. बी+कम्+उ+कास्त ] **०करारी**–स्त्री. अनिश्चिती; तहमोड 'त्याजकडून बेकरारीच्या चाली सुरू होतात.' –रा ७१९ **०कस**–वि नि.सत्व; कमजोर; बेचव; शुष्क. **०कानू**–स्त्री अन्याय; जुलूम. **०कानून–कानू**–वि. बेकायदेशीर; कायद्याचा भंग करून केलेलें [फा.] **०कायदा**–पु. कायदेभंग; कायद्यासंबंधाचा अभाव **०कायदा–कायदेशीर**–वि. नियमबाह्य; गैरकायदेशीर; जुलमी; नियमाचें उल्लंघन करणारा; नियमाला सोडून असलेला [ फा. बी+काइदा ] **०कार**–वि. १ निरुद्योगी; बे–रोजगारी; रिकामा. २ ( ब. ) निरर्थक, व्यर्थ; उगाच. ३ ( ल ) हैराण; निरुपयोगी. 'तिन्ही मोर्चे मिळोन निमे माणूस दुखणियानीं बेकार आहे.' –पेद ३.१८. [ फा ] **०कारचावडी**–स्त्री.(कों.) रिकामपणाच्या, निरर्थक गप्पागोष्टी. **०कारी**–स्त्री रिकामपणा; निरुद्योगिता; बेरोजगारपणा [ फा. बीकारी ] **०खिलाफ**–पु. मैत्री; सख्य; संशयनिवारण. [ अर. खिलाफ्=वैर ] **०कुफी**–स्त्री. मूर्खपणा, गाढवपणा; मौर्ख्य [फा. बेवकुफी] **०कुसूर**–क्रिवि. न चुकतां, बिलाकसूर; पूर्णपणें [ फा. बी+कुसुर] **०कूब**–वि. मूर्ख, वेडगळ, वेडझंवा [ फा. बेवकुफ ] **०कैद**–स्त्री. शिस्तीचा अभाव, स्वैर वर्तन; अव्यवस्थितपणा; कायदा, नियम किंवा शिस्त यांचें उल्लंघन.॰ –वि. बेशिस्त; स्वैर; अनियंत्रित. –क्रिवि. स्वैरपणानें; कोणत्याहि तऱ्हेचा कायदा किंवा नियम न मानतां. [ फा. बी+कैदी ] **०कैदी**–वि. स्वैर, कायदा, नियम, नियंत्रिण इ० न पाळणारा; बेशिस्त. **०कौली**–वि. बिगर कौलाचा;

अभयपत्रविरहित. ०**खत्रे**–क्रिवि निःशंकपणें. 'बेखत्रे हुजूर यावें.' –जोरा १०५ ०**खबर**–क्रिवि असावध; गाफीलपणें. [ फा. बी+खबर् ] ०**खबर्दार**–वि. गैरसावध. [फा.] ०**खर्च–खर्ची**–वि १ खर्च केल्याशिवाय झालेलें, केलेलें; फुकटंफाकट २ खर्ची जवळ नाहीं असा; निर्धन, कृपण. [ फा. बी+खर्च् ] ०**खातरी**–स्त्री अविचार. 'चार कोटींची मालियत जवळ असता कंजूषपणानें सर्दारास बेखातरीनें निरोप दिल्हा.' –जोरा १०९. ०**गर्द**–वि. वृक्षरहित; झाडी नसलेलें. 'मुलूख अगदीं वीसपंचवीस कोसपर्यंत बे-गर्द, बेचिराख जाहला.' –पाब १४. [ फा. बगिर्द ] ०**गार–गारी**–बिगार, बिगारी पहा. ०**गुन्हा**–पु. गुन्ह्यापासून मुक्तता, सुटका. –वि. गुन्हा नसलेला; अपराधांतून मुक्त झालेला. –क्रिवि. गुन्हा नसताना. 'बक्षीस बेगुन्हा कैद केलें.' –जोरा १०५ [फा ] ०**गुमान–नी**–वि. बेपर्वा; गर्विष्ठ; उन्मत्त; निःशंक, मुर्वत नसणारा [ फा. बेगुमान् ] ०**चतुर**–वि. मूर्ख ०**चरक**–क्रिवि निर्भयपणें; धडाक्यानें; निर्भीडपणें; बेधडक. ०**चव**-वि. रुचिहीन; कवकवीत; नीरस; निचव. ०**चाड**–वि. चाड नसलेला; लज्जाहीन. उद्धट ०**चिराख–ग**–वि. दीपहीन; ओसाड; उध्वस्त; वस्तीरहित, उजाड. [ फा. बी+चिराघ्=दिवा ] ०**चूक**–वि बिनचूक; बरोबर; चुका केल्याशिवाय. [ फा. बी+हिं. चूक ] ०**चैन**–वि. अस्वस्थ; कांहींहि सुचत नाहीं असा. [फा. बी+हिं. चैन] ०**चोबा**–पु खांबाशिवाय असलेला लहान तंबू. [ फा. बीचोबा ] ०**छूटपणा**–पु आळा, बंध नसणें; स्वैराचार; स्वच्छंदीपणा. ०**जबाब**–क्रिवि उद्धटपणानें; बेपर्वाईनें (बोलणें, उत्तर देणें). [ फा. बी+जवाब् ] ०**जबाबदार**–वि. स्वतःवरची जोखीम न ओळखणारा; जोखीम न ओळखून स्वैर वागणारा. **बेजबाबदार राज्यपद्धति**–स्त्री लोकमतास जबाबदार नसलेली राज्यपद्धति ०**जबाबी**–वि. १ उद्धट; उर्मट; बेमुर्वतखोर. २ तासाचे ठोके न देणारें (घड्याळ). [ फा. बी+जवाब्=निरुत्तर ] ०**जरब**–क्रिवि. निर्भयपणें; निःशंकपणें; बेधडक; जोरानें; उठाव करून; धाक न बाळगता. 'आमच्या भले लोकांनीं बेजरब घोडीं घालून कित्तूरकरास मोडून वोढ्यापर्यंत नेऊन घातला.' –ख ५.२३८८. [ फा. ] ०**जात**–वि. (अशिष्ट) हलक्या किंवा निराळ्या जातीचा. ०**जान**–वि. निर्जीव; ठार. [ फा. ] ०**जाब**–वि. बेगुमान; बेमुलाजा; बेजबाबदार. [ फा. ] ०**जाबता**–पु. अन्याय; ठरावाविरुद्ध गोष्ट; अविचारी भाषा. 'आम्ही टोंचून घेणार नाहीं, असेना असे मरून जाऊं असे बेजाबता बोलत होते.' –टिकळचरित्र, खंड १. ०**ज्यहा–जा–जहा**–वि. फाजील; अनाठायीं; अनुचित; अयोग्य; अमर्याद; अकालीन; दुष्ट; उधळपट्टीचा. [फा बी+जा] **बेजार**–वि १ हैराण; त्रस्त; दमलेला; थकलेला (श्रम, दुःख, कटकट यांमुळें). २ दुखण्यानें हैराण झालेला; दुखणाईत. [ फा. बीझार् ] **बेजारी**–स्त्री त्रास, हैराणी; थकवा. ०**डर**–न ड्रेडनॉट नांवाचें जंगी लढाऊ जहाज. –वि न भिणारा; न डरणारा. बेग्ड पहा [ हिं. डर ] ०**डौल**–वि. कुरूप; बेढब; घाट किंवा आ ार चांगला नसलेला. ०**ढंग**–पु. दुराचरण; स्वैराचार; बेताल वागणूक; सोदेगिरी. [हिं ] ०**ढंग–गी**–वि. दुराचरणी; व्यसनी; स्वैराचारी. [ हिं. ] ०**ढब**–वि बेडौल; कुरूप; विक्षिप्त, ढबळशाई, चांगला घाट, आकार नसलेला; ओबडधोबड [हिं.] ०**तकवी**–वि असमर्थ; ना–तवान. [ फा. बेतक्विया ] ०**तकसी( र्शी )र, बेतक्शी(तकसी)र**–स्त्री. अपराधापासून, गुन्ह्यापासून मुक्तता. –वि. निरपराधी; नाहकः निर्दोषी. [फा. बी+तक्सीर] ०**तमा**–स्त्री. १ निर्लोभि वृत्ति. २ बेफिकीरपणा, बेपरवा; उदासीनपणा –वि. १ निर्लोभी; निरिच्छ. २ बेपरवा; बेगुमान; गर्विष्ठ; निष्काळजी; बेसावध; काळजी, कळकळ न बाळगणारा –क्रिवि. बेगुमानपणें 'खांद्यावर टाकून पदर बोले बेतमा । लमाऱ्या नवऱ्याशीं बोले बेतमा ।' –पला. [फा ] ०**तमीज**–वि (ना ) उद्धट, असभ्य [ फा. बे+तमीज ] ०**तर्तूद**–स्त्री तजविजीचा अभाव, अव्यवस्था. ०**तऱ्हा**–स्त्री. असाधारणपणा; वैलक्षण्य, चमत्कारिकपणा. –वि विलक्षण; चमत्कारिक; असाधारण; भारी, अतिशय 'याउपर उपेक्षा करून कालहरण केलियास नबाबाचे दौलतीस बे–तऱ्हा धक्का बसेल.' –रा ५.१६६. [ फा. बी+तरह् ] ०**ताब**–वि असमर्थ; क्षीण; हतधैर्य 'मातुश्री अहल्याबाई यास शैत्यउपद्रव होऊन पाचसात दिवस बे–ताब होती.' –मदबा १ २१८.[फा. बी+ताब्]०**ताल–ळ**–वि १ गायनात तालाला सोडून असलेलें (गाणें–बजावणें) २ ताल सोडून गाणारा, वाजविणारा. ३ (ल.) अमर्याद; अनियंत्रित; स्वैर; उधळ्या [ हिं ] ०**तालूक**–वि गैरसंबंधीं; संबंध नसलेला; भलता. [ फा. बे+तअल्लुक=संबंध ] ०**दखल**–वि. १ अधिकारच्युतः बेइतला २ गैरमाहीत. [ फा. बी+दख्ल् ] ०**दम**–वि. दम कोंडला जाईपर्यंत, निपचीत पडेपावेतों दिलेला (मार); थकलेला, दमलेला; निपचीत. [फा.] ०**दरद–दी–दर्द–दर्दी**–वि. १ बेफिकीर; बेगुमान; मागेंपुढें न पाहणारा; भय न बाळगिता स्वच्छंदपणें वागणारा. २ बारीकसारीक विचार न पाहणारा. ३ निर्घृण; क्रूर; दया नसलेला. [ फा ] ०**दस्तूर**–पु. अन्याय; नियमाविरहित गोष्ट; गैरशिरस्ता. ०**दस्तूराई**–स्त्री. (गो.) उधळेपणा. [ फा. ] ०**दाणा–दाना**–पु. १ आत बी नाहीं असें द्राक्ष हें लहान, गोड, गोल, बिनबियाचें असतें २ सुकविलेलें द्राक्षः किसमिस. [फा.] ०**दाणा डाळिंब**–न. दाण्यांत बीं नसलेलें डाळिंब. ०**दाद**–स्त्री बेबंदशाही; अन्याय; जुलूम. [ फा ] ०**दार**–क्रिवि. जागृत; तयार. 'नबाब बेदार जाले.' –रा ७.८३. [ फा. ] ०**दावा**–पु. सोडचिठ्ठी; नामागणी; हक्क सोडणें. ०**दावा पत्र–फारखती**–नस्त्री हक्क सोडल्याबद्दल, नसल्याबद्दल

लिहून दिलेला कागद; सोडचिठ्ठी. ०**दिक(क्क)त**-क्रिवि. बेलाशक; बिनहरकत; बिनतकार; बेउजूर; नि.शंकपणें. [फा.] ०**दिल-दील**-वि. उदासीन: असंतुष्ट; दु:खी; कष्टी. [फा.] ०**दील होणें**-बिथरणें. ०**दिली**-स्त्री. १ असंतुष्टता; औदासीन्य; निरुत्साह. २ रुष्टता; मनाचा बेबनाव. ०**दुवा**-स्त्री अवकृपा; शाप. [अर.] ०**धडक**-क्रिवि. बिनधोक; निर्धास्तपणें; निर्भय; बेलाशक [हिं.] ०**घरी**-वि. घरबंद नसलेला; नियंत्रण नसलेला; मोकाट; स्वैर. [बे+घर] ०**नवा**-वि. अधीर; असहाय; निर्धन; भुकेला. 'पादशाहा बेनवा होऊन खानास लिहीत.' -मराचिथोरा ५३. [फा.] ०**नहाक-नाहक**-क्रिवि. विनाकारण; उगीचच्याउगीच; कारण नसतांना; हकनहक, हकनाहक पहा. ०**निगा**-स्त्री. दुर्लक्ष; अपरक्षण. [फा.] ०**निसबत**-क्रिवि. बेलाशक; कांहींहि विचार न करतां; मनांत कोणातीहि शंका न बाळगतां, बेपर्वाईनें; एकदम. [फा.] ०**निहायत-न्याहत**-क्रिवि. नि.सीम; अपार, पराकाष्ठेचा. [फा.] ०**पडदा**-वि. १ पडदा नसलेला; उघडपणें; कोणत्याहि तऱ्हेची गुप्तता न राखतां. २ (ल.) मानखंडित. क्वचित् नामाप्रमाणें उपयोग करितात.-पु १ उघड गोष्ट; स्पष्ट गोष्ट. २ (ल.) मानखंडना. [फा.] ०**परवा-पर्वा**-वि. निष्काळजी; निर्भय; बेगुमान. [फा.] ०**परवाई-पर्वाई**-स्त्री. निष्काळजीपणा; बेगुमानी; स्वैरवृत्ति. [फा. बी+पर्वाई; तुल० सं. द्विप्रव्राजिनी] ०**पाया**-वि. गैरकायदा; नियमाविरुद्ध. ०**फंदी**-वि. १ व्यसनी; दुराचारी; स्वैर. २ खटयाळ; उच्छृंखल; खोडकर (मूल). ०**फाम**-वि. १ बेसावध; बेशुद्ध. २ निश्चिन्त; गाफिल; अनावर; मग्न; तुफान; बेभान. 'शत्रू माघारा गेला म्हणून बेफाम नाहीं, सावधच आहों.' -ख ७.३३१०. [फा. बी+फह्म्] ०**फामी**-स्त्री. गैरसावधपणा; गाफिली; निश्चिन्ती; खातर्जमा; दुर्लक्ष. 'या विश्वासावर बेफामी जाली याजमुळें दगाबाजीनें निघोन गेला' -दिमरा १.२५२. ०**फायदा**-वि. गैरफायदेशीर; तोटयाचें; अव्यवस्थित. ०**फिकि(की)र**-स्त्री. निष्काळजीपणा. -वि. १ निष्काळजी; बेपर्वा; अविचारी. २ निश्चित, निर्धास्त; संतुष्ट. [फा. बी+फिक्र] ०**फिकिरी**-स्त्री. निष्काळजीपणा; गाफिली; निःशंकपणा. ०**बंद**-पु. अराजकता; शिस्तीचा अभाव; गोंधळ. 'हुजरातीमध्यें बेबंद सर्वथा होऊं देऊं नये.' -मराआ १४. -वि. अव्यवस्थित; मुक्त; व्यवस्था, बंदोबस्त, कायदा, शिस्त इ० नसलेला; बेशिस्त; अराजक. [फा.] ०**बंदशाई-ही, बेबंदाई-बंदी**-स्त्री. १ अव्यवस्था; गोंधळ; मोंगलाई; अनायकी; अंदाधुंदी; अराजकता. २ जुलूम. 'सांगुं किती दुनियेवर बेबंदी। ही मस्लत खंदी।' -राला १०६. ०**बदल**-वि. १ बदललेला. २ बंडखोर. 'गुलाम कादरखान पादशाहासी बेबदल होऊन ...' -दिमरा १.२००. [फा.] ०**बनाव**-पु. भांडण; तेढ; तंटा; बिघाड. ०**बरकत**-स्त्री. अवनति; हलाखी; तोटा. [फा.] ०**बहा**-वि. अमोल; किंमत करतां येणार नाहीं असें. [फा.] ०**बाक**-वि. निर्भीड; बेडर. [फा.] ०**बाक-ग, बेबाकी**-स्त्री. अशेष फडशा; कर्जाची पूर्ण फेड. -वि. निःशेष; संपूर्ण; कांहींहि शिल्लक, बाकी न ठेवतां फेडलेलें (कर्ज). [फा.] ०**बारत**-स्त्री. बेइतबार; अविश्वास. ०**बुनियाद-बुन्याद**-स्त्री. अन्याय; राखरांगोळी; नाश. 'आम्ही मदारुल महाम व फरांसीस तिघे मिळून इंग्रेजाची बेबुनियाद करूं.' -रा १०.१९९. [फा. बुनियाद्=पाया] ०**बुदी-बूद**-स्त्री १ नाश; खराबी; अभाव. २ नाबूद. [फा.] ०**भरंवसा-भरोसा**-पु. अविश्वास; संशयितपणा; खात्री नसणें. [हिं.] ०**भरोशी**-वि. खात्री किंवा भरंवसा अगर विश्वास ठेवतां येणार नाहीं असा, फसव्या. ०**मजगी**-स्त्री. वितुष्ट; अरुचि; बेबनाव. 'पादशाहांची व गुलामकादर याची बेमजगी होऊन ...' -दिमरा १.१९९. [फा.] ०**मनसबा-मन्सबा**-पु. अविचार; खराब मसलत. [फा.] ०**मब्लग-मुब्लक-मोब्लक**-वि. असंख्य; अपरिमित. [अर. मब्लघ्] ०**मरामत**-स्त्री नादुरुस्ती. 'आरमाराची बेमरामत जाली.' -वाडसमा २.१९५. -वि. नादुरुस्त; दुरुस्तीची जरूर असलेलें; दुरुस्तीवांचून असलेलें; अव्यवस्थित [फा.] ०**मर्जी**-स्त्री. इतराजी; अवकृपा; मर्जीविरुद्ध वर्तन [फा.] ०**मलामत**-वि. कीर्तिवान्. [अर. मलामत=दूषण] ०**मस्लत**-स्त्री. अविचार. 'स्त्रीनायक, बालनायक आणि बेमस्लत, तीन गोष्टी येके ठिकाणीं; चौथा अहंकार; तेव्हां ईश्वर त्या सर्दारीची अब्रू ठेवील तर ठेवो' -खलप २.७०. [फा.] ०**मान-मानी-मानकी-गी**-बेइमान इ० पहा. ०**मानगिरी**-स्त्री. बेइमानी; हरामखोरी. ०**मार**-वि. १ मार किंवा हल्ला करतां न येण्यासारखा (किल्ला). २ अतिशय; कमालीचा; जोरदार; विपुल; भरपूर, बेसुमार इ०. उदा० बेमार-पाऊस-वारा-ऊन्ह-धूळ-लढाई-पीक-धान्य-आंबे इ० (पडतो-सुटला-पडतें-उडते-चालती-झालें-पिकले इ० क्रियापदांस जोडून उपयोग). ३ आजारी; दुखणाईत. ४ थकलेला; दमलेला; बिमार. ५ (व.) वस्ती नसलेलें; उपयोगांत नसलेलें (घर, वस्तु). [फा] ०**मारी**-स्त्री. १ आजार; आजारीपण; दुखणें. २ शीणभाग; थकवा; अशक्तता ०**मालूम**-वि. माहीत न होण्याजोगें; दिसणार नाहीं, ओळखतां येणार नाहीं, शोधतां येनार नाहीं असें; जाणण्यास कठिण; हुबेहुब. 'नवीन माहितीचा जुन्या पद्धतीशीं बेमालूम सांधा जोडणें कठिण आहे.' -टि ४.२७१. [हिं.] ०**मुनासीब-मुनासब**-वि. अयोग्य; गैरवाजवी; बुद्धीला न पटणारें; अयुक्त. [हिं] ०**मुन्सफी**-स्त्री. अन्याय. 'हिंदू मुसल्मान, ईश्वराचे घरचे दोन्ही धर्म चालत असतां मुसल्मानानें हिंदूचे जाग्यास उपद्रव करावा हे बे-मुन्सफी.' -पया १०. [फा.] ०**मुरवत-मुर्वत**-क्रिवि. असभ्यपणें शिष्टाचाराला सोडून; भीड, पर्वा इ० न बाळगतां. [फा.

०**मुरवत-ती**, ०**मुर्वत-त्ती**-वि. कठोर; निर्दय; निर्भीड; निर्भय; बेमुलाजा. [ फा. मुरूवत्=माणुसकी ] ०**मुलाजा-मुलाहिजा**-क्रिवि. कांहीं न पाहतां; दयामाया सोडून; निष्ठुरपणें; बेमुर्वतपणें. [ अर. मुलाहझा=पर्वा, विचार ] ०**मोताद्**-वि. बेसुमार; असंख्य; अपरिमित. [ अर. मुअत्‌द्‌=संख्या, परिमित ] ०**मोर्यी(ई)न-मोइनी-मोहीन**-वि. १ अनियमित; ठरावबाह्य. २ अपरिमित, असंख्य. [ फा. बी+मुअय्यन् ] ०**मोहर**-स्त्री. बिन शिक्क्याचें; शिक्का नसलेलें; गैरमोहरबन्दी. ' कित्येक दफ्तरें सर्वमोहर व कितेक बे-मोहरेचीं. ' -रा, खलप २.९. [ फा. ] ०**मोहीम**-वि. मोहीम न करणारा; उपजीविकेकरतां किंवा धंद्या-उद्योगाकरितां खटपट न करणारा; घरबशा; बाहेर न जाणारा. [ फा. ] ०**रंग**-पु. विरस; खराबी; मौजेचा (मान, कीर्ति, सौंदर्य इ० चा) भंग; अपमान; फजीति. -वि. ज्याचा रंग बिघडला आहे असा. [ हिं. ] ०**राजी**-वि. असंतुष्ट. [ फा. ] ०**रुखसत**-क्रिवि. पर्वानगीवांचून. [ अर रुख्सत्=परवानगी ] ०**रू(रों)ख**-पु. १ दुसरीकडे तोंड फिरविणें; दिशा बदलणें. २ प्रेमाचा अभाव. -वि. अप्रसन्न; उदासीन; रुष्ट; विन्मुख. [ फा. रुख्=दिशा ] ०**रोजगार-री**-वि. निरुद्योगी; बेकार; रिकामा. [ फा. ] ०**लगाम-मी**-वि. १ लगाम नसलेला. २ लगामाला दाद न देणारा. ३ (ल.) अनियंत्रित; स्वैर; मोकाट; बेताल. ४ आडवळणी; जाण्यायेण्यास सोयीचें नसलेलें; एकीकडे असलेलें; गैरसोयीचें ( शेत, घर ) -क्रिवि. एकीकडे; एका बाजूला; आडरस्त्यावर. [ फा. बी+लिगाम् ] ०**लगामीं पडणें**-१ भलत्या मार्गाला लागणें; बहकणें; स्वैर बनणें. २ हयगय होणें; आबाळ होणें. ०**लाग**-पु. निरुपायाची किंवा नाइलाजाची स्थिति. ' माझा बेलाग झाला. ' -वि. १ जो घेण्याला किंवा ज्यावर मारा करण्याला कठिण आहे असा; दुःस्साध्य; अवघड; बळकट ( किल्ला ). २ दुःसाध्य; दुराराध्य; अप्राप्य; आचरण्यास कठिण असा (विषय). ३ सुधारण्याला कठिण; निरुपायाचा; दुःसाध्य ( रोग, विषय ). -क्रिवि. १ मदतीवांचून; उपायावांचून; निरुपायानें; नाइलाजानें. २ निराधार; आधारावांचून. ३ तडकाफडकीं; लावडतोब; एका क्षणांत. [ फा. बी+म. लागणें ] ०**वकर-वक्र**-वि. फजीत; मानखंडित; अपमानित. [फा. बीवकार् ] ०**वकरी**-स्त्री. मानखंडना, अप्रतिष्ठा; निर्भर्त्सना. [फा.] ०**वकूब (फ)बेकूब**-वि. मूर्ख; खुळसट; अजाण; अडाणी; अज्ञान. [ फा. बेवकूफ ] ०**वकूबी-फी**-स्त्री. मूर्खपणा; मूढता. ०**वजे**-स्त्री (व.) गैरसोय; गैरव्यवस्था; गैररीत; विलक्षण प्रकार. [बिवजेह] ०**वतन**-क्रिवि. हद्दपार; जलावतन. [अर. वतन्=जन्मभूमि] ०**वसवसा-वस्वसा-वस्वास**-क्रिवि. निर्भयपणें; निश्चिन्त; शांतपणें; बेफिकर; निर्भीडपणें. [ अर. वस्वास, वस्वसा=भीति, काळजी ] ०**वारशी-वारशीक-वारीस**-वि. ज्यावर कोणाचा हक्क, वारसा नाहीं असा; निवारशी; योग्य हक्कदार, मालक किंवा वारस नसलेला. [ अर. वारिस् = वडिलोपार्जित संपत्तीचा हक्कदार ] ०**वारसा**-पु. वारसाहक्क नसणें; वारस नसणें. ०**वारा**-पु. कर्जफेड; कामकाज उरकून टाकणें; उलगडा; सांठा, पैसाइ० चा निकाल लावणें. [हिं.]०**शक**-वि. १ निर्धास्त; निःशंक; धीट. २ निर्लज्ज. -क्रिवि. १ निःशंकपणें; बेलाशक; निःसंशय २ निर्लज्जपणें. [फा. बी+शक्क् ] ०**शरम-र्म**-वि. निर्लज्ज; पाजी; निलाजरा [फा. बे+शर्म् ]०**शरमी-र्मी**-स्त्री. निर्लज्जपणा; पाजीपणा. ०**शर्त**-स्त्री. बिनशर्तपणा. -क्रिवि बिनशर्त; अट न ठेवतां; आढेवेढे न घेतां. [ अर. शर्त् = अट, नियम ] ०**शिरस्ता**-पु. गैरवहिवाट; गैररीत; वहिवाटीच्या विरुद्ध. [ फा सरिश्ता = वहिवाट, नियम ] ०**शिस्त**-स्त्री. अव्यवस्था -वि. गैरशिस्त; अव्यवस्थित; अनियमित ( मनुष्य, वर्तन, भाषण ). [ फा. ] ०**शुद्ध**-वि. गैरसावध; ( मूर्च्छा इ० कांनीं ) शुद्धीवर, भानावर नसलेला; धुंद; अचेतन; जड. [ फा. बी+सं. शुद्धि ] ०**शुभह**-क्रिवि. निःसंशय. ' बेशुभह शिकस्त खाऊन फरारी होतील.' -पया ४८२ [ फा. ] ०**शौर**-वि. बेअकली; मूर्ख; बेवकूब. [ अर शुऊर्=अक्कल ] ०**सतर**-वि. अप्रतिष्ठित; मानखंडित. [ अर. सित्र = पडदा ] ०**सनद्-सनदी**-वि. बेकायदेशीर; सनदेविरहित ' श्रीमंत दादासाहेब येऊन त्या उभयतांसी सल्रक करणार नाहींत व बे सनद पैसाही मागणार नाहींत. ' -रा ६ ३८२.०**समज**-पु ( ना. ) गैरसमज. -वि. अडाणी. [ हिं. ] ०**सरंजाम**-वि. सामुग्रीविहीन; शिबंदीशिवाय. [फा.] ०**सरम-स्त्रम**-(अशिष्ट) बेशरम पहा.०**सावध**-वि. १ लक्ष नसलेला; तयार नसलेला; निष्काळजी; गैरसावध. २ बेशुद्ध; शुद्धीवर नसलेला. [ हिं. ] ०**सुमार**-वि. अमर्याद; अतिशय; अपरिमित; मर्यादेच्या, अंदाजाच्या बाहेर. [फा. बीशुमार् ] ०**सुमारी**-स्त्री. अपरिमितता. ०**सूर**-वि. बदसूर; सुरांत नसलेला (आवाज-गाण्याचा, वाजविण्याचा). [ हिं. ] ०**हंगाम**-पु. १ अवेळ; भलता काळ-वेळ. २ ( ल. ) दंगा. ' हे बेहंगाम करणार ' -ख १२०५. [ फा. ] ०**हतनमाल-हतन्माल-हनतमाल**-पु. बेवारशी म्हणून सरकारांत जमा झालेला माल, संपत्ति. [ फा. बी+तन्+माल् ] ०**हतन-माधाशी**-स्त्री. बेहतनमाल व बटछपाई या संबंधींच्या कामाचें खातें. ०**हतर-हत्तर-हेत्तर**-वि. अधिक चांगलें; श्रेयस्कर. [ फा. बिह्‌तर; तुल० इं बेटर ] ०**हतरी-हेत्तरी**-स्त्री. बरेपणा; सुधारणा. ०**हद्-द्द**-स्त्री. पराकाष्ठा, अमर्यादपणा; अतिशयितता; बेसुमारपणा. -वि अतिशय; पराकाष्ठेचा, बेसुमार; अमर्याद; निःस्सीम [फा. बी+हद्द ] ०**हया, हय्या**-वि. उद्धट; निर्लज्ज; बेशरम; निलाजरा. [फा ] ०**हाल**-पु. दुर्दशा. -वि. दुर्दशाग्रस्त; दुःखार्त. ' चिमटयानें मांस तोडून बेहाल करून मारिला. '-जोरा ८५. [फा. बी+हाल्] ०**हिम्मत**-

स्त्री. मूर्खपणा. [ हिं. ] ०**हिम्मत-ती**-स्त्री. भ्याडपणा. [ हिं. ] -वि. हतधैर्य; भ्याड; भित्रा. ०**हिसा(शो)ब**-वि. १ अयोग्य; गैरविचाराचें; अनुचित. २ अगणित; हिशोबाबाहेरील, हिशोब करतां येणार नाहीं असें. [ फा. ] ०**हुकूमी**-स्त्री. अवज्ञा; बंडखोरी. ०**हुजूर**-क्रिवि. १ एखाद्याच्या गैरहजेरीत. २ ( चुकीनें ) एखाद्याच्या समक्ष. [फा.] ०**हुर्म(रम)त-ती**-स्त्री. अप्रतिष्ठा, मानखंडना; अपमान; अकीर्ति. -वि. मानखंडित; पत घालवून बसलेला; मान नाहींसा झालेला. [ फा. ] ०**हुशार**-वि गाफील; गैरसावध. ०**हुशारी**-स्त्री. बेसावधपणा, गाफिलगिरी. [ फा. ] ०**होश-ष**-वि. बेशुद्ध; धुंद; तर्र; गाफील; मूर्ख; विचारशक्ति नाहींशी झालेला. [ फा. बीहोश् ] ०**होशी**-स्त्री. बेशुद्धी.

**बें**—न. शेळी, मेंढी, वासरूं इ०चा ओरडण्याचा आवाज. [ ध्व. ] ०**करणें-म्हणणें**-( ल. ) हार खाणें; अभिमान सोडून मी हरलों असें म्हणणें, दाखविणें; पराभव होऊन हताश होणें.

**बे, अबे**—संबोधन अरे ! हे ! ए ! ( आज्ञार्थी किंवा बेपर्वाई दाखवितांना योजतात ). [ हिं. ]

**बेक**—न. विरोध; निषेध; एक या शब्दावरून झालेला त्या शब्दाच्या उच्चाराला जुळता परंतु अर्थानें त्याविरुद्ध असा शब्द. आपण जें बोलतों त्याविरुद्ध किंवा विसंगत असा दुसऱ्यानें घेतलेला अर्थ. 'मी एक म्हटलें तर तो बेक म्हणणार, तो माझे आज्ञेंत कसा वागेल.' 'मी सांगितलें एक आणि तूं समजलास बेक.'

**बेकटा**—पु. ओलवून टरफल काढलेला दाणा ( गव्हाचा, जोंधळ्याचा ).

**बेकनाट**—पु. ( कों. ) व्याजबट्टा करणारा. [ वै. सं. ]

**बेकी**—स्त्री. १ समसंख्या; एकीबेकीच्या खेळांतील एक शब्द. २ दुही; तंटा; भांडण. ३ शाळेंतील लहान मुलें शौचास जाण्यासाठीं परवानगी विचारतांना हा शब्द योजीत. लघुशंकेला जावयाचें असतांना एकी हा शब्द योजीत. [ बे=दोन ]

**बेखांदी-दें**—स्त्रीन. ( कर. ) लहान मेढ. [ बे+खांदी ]

**बेग**—स्त्री. १ लगाम. २ नियंत्रित सत्ता; अधिकार; हुकमत ( क्रि० धरणें; हातीं राखणें; स्वाधीन असणें ). ३ ( सोनारी ) बिजागर. [ सं. वागा; का. बिगी=बंद; हिं. बाग ]

**बे(बें)गड**—स्त्री. जस्ताचा अतिशय पातळ व रंगविलेला चकचकीत पत्रा; वर्ख. [ का. बेगडे ] **बेगडी**-वि. १ बेगड लाविलेला; बेगड लावून सुशोभित किंवा भपकेदार केलेला. २ ( ल. ) दिसण्यांत भपकेदार पण आंतून हलका; पोकळ; नकली; दिखाऊ; तकलादी. ३ ( ल. ) खोटा; ढोंगी. 'बेगडाचा रंग राहे कोण काळ।' -तुगा ८६२. 'आमच्या बेगडी सुधरकांच्या प्रथम व्याख्यानाचा भपका पाहून लोक दिपले होते.' -टि ४.१२२.

**बेगडा**—पु. सोबती. -शर.

**बेगनी**—स्त्री. (व.) विरलें (इरलें) वगैरे उचलण्याकरितां लावावयाचें लाकूड.

**बेगम**—स्त्री. १ अविवाहित स्त्री; वयांत आलेली कुंवार स्त्री. २ सरदारपत्नी; राणी; सन्मान्य गृहस्थाची पत्नी. [ तुर्की बेगम= सरदारकन्या, सर्दारपत्नी ]

**बेगमी, बेजमी**—स्त्री. १ निश्चिती; निश्चिन्तपणा; लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा असल्यानें होणारी समाधानवृत्ति. २ पुरवठा; संग्रह; साठा ( विशेषतः धान्याचा ). [ हिं. ]

**बेंगरूळ**—वि. बावळा; खुळसट. 'ह्या अपटुडेट फॅशनच्या बॅरिस्टरला तुझ्यासारखी बेंगरूळ बायको काय उपयोगाची?' -सु २३

**बेगवटा**—पु. ( महानु. ) पोट. 'परिमळ गगणा चित्रें बेगवटे। माजि माअे ना।' -शिशु ७६९.

**बेगसार**—क्रिवि. ( गो. ) लवकर. म्ह० ( गो. ) बेगसार झुरे त्याची नखलामी उरे=जो लवकर मरतो त्याची मागें खूण उरते. [ सं. वेग ]

**बेगीं, बेगीन, बेगीनें, बेगून, बेगें, बेगीबेगी, बेगोबेग**—क्रिवि. ( कुण. ) लवकर; सत्वर; तांतडीनें; बिगिबिगि; झटपट; वेगानें. [ सं. वेग ]

**बेगें**—न. खिडकी; गवाक्ष; द्वार. 'तंव ब्रह्मस्थानीचें बेगें। फिटलें सहजें।' -ज्ञा ६.२७९. [ प्रा. ]

**बेंग्या**—पु १ टुमणें; ससेमिरा. 'माझ्यामागें तुम्हा सारखा बेंग्या लागलेला असतो.' २ गोट्यांच्या खेळांतील एक प्रकार.

**बेच**—न. पानांत फुटलेलें पान. 'जिव्हे आतींची असोसें। निघती बेंचें।' -ज्ञा १५.१०३. [ बेचक ]

**बेंच**—न. १ बसण्याचें बांक; घडवंची. २ न्यायाधिशांचें मंडळ; न्यायासन ( दोन किंवा अधिक मॅजिस्ट्रेट एकत्र बसून बनलेलें फौजदारी कोर्ट ). [ इं. ]

**बेचक-की, बेचकळी, बेचकुळी, बेचकुळें, बेचकूल-ळ, बेचकें, बेचंगळ, बेचांगळें**—नस्त्री. १ झाडाच्या दोन खांद्यांच्यामधील जागा; दुबेळकें; बेळकें; बेळकी; बेळकें. २ हाताच्या किंवा पायाच्या दोन बोटांमधील अंतर किंवा जागा. ३ गुडघा, हात, कंबर, मान यांच्या बांकाच्या किंवा लवणीच्यामधील जागा, अंतर. [बीच+अंगुली -शर.] **बेचकुळींत, बेचंगळ्यांत**-क्रिवि. १ बेचकांत; दुबेळक्यांत. २ ( ल. ) अडचणींत. ( क्रि० सांपडणें, धरणें ).

**बेचण-णें, बेचन**—न. विक्री. ( क्रि० करणें ). [ सं. विक्रय; हिं. ] ०**देणें**-विकत देणें. ०**देणें**-विकत देणें. ०**पत्र**-न. विक्रीखत, विक्रीचा दस्तऐवज. [ हिं. बेचन+सं. पत्र ] **बेचावण(ळ)**, **बेचाळ**-स्त्री. विक्री योग्य रीतीनें झाल्याबद्दलचा शेरा किंवा नोंद;

नियमाला धरून खरेदीविक्री झाल्याचा लेख. असा शेरा, हुंडी, करारनामा, मक्तेपत्र, खत इ०वर मारतात. [ हिं. बेचना=विकणें ]

**बेचरणें**—अक्रि १ ( खरूज, नायटा, इसब इ० ) पसरणें. २ केस डोक्यावर अस्ताव्यस्त विखुरणें; अस्ताव्यस्त होणें. [ सं. वि+चर् ]

**बे(बें)चळ, बेचाड-ट**—न. जुंबाड; झुबका. ' मग अणियांचें बेंचळ। अर्धी दावी।' –ज्ञा १५.९३. [प्रा.]

**बेचाळ, बेचाळीस**—वि ४२ही संख्या. [सं.द्विचत्वारिंशत्] **बेचाळीस**–पुअव. बेचाळीस पिढया ( मातृवंशाकडील एकवीस व पितृवंशाकडील एकवीस ). ( या शब्दाचा उपयोग शपथ घेतांना किंवा शिव्या देतांना करतात ). ' तूं बेचाळीस स्मरून बोल. ' ०**उध्दरणें**–एखाद्याच्या बेचाळीस पिढयांना उद्देशून शिव्या देणें. ( **कागद, पत्र, लखोटा इ०वर** ) **बेचाळीसचा अंक असणें**–पत्रांत मृत्यूची बातमी असणें. **बेचाळीसचा अंक घालणें**–१ बेचाळीस पिढयांनां शिव्या देणें. २ ( पत्रावर,पाकिटावर ) बेचाळीसाचा आंकडा लिहिणें ( अशा करितां कीं पत्र ज्याच्या नांवाचें असेल त्यानेंच तें उघडावयाचें आहे हें सुचविण्याकरितां ).

**बेचाळी, बेचाळें-ळ**—नस्त्री. १ जबडा; चर्वण करण्याचे मुखाचे जे दोन भाग त्यांतील खालचा. विशेषतः पशूसंबंधीं व रागानें किंवा तिरस्कारानें मनुष्यासंबंधीं बोलतांना योजितात. ' उणा शब्द बोललास तर बेचाळी फोडून काढीन. ' २ हनुवटी व खालचा ओठ यांमधील खळगा. बचेळी, बचळी पहा.

**बेजबी**—वि. व्यर्थ.

**बेजें, बेंझें**—न. १ युक्ति; वर्म. ' चुकल्यां त्यागाचें बेंझें। केला सर्व त्यागहि होय वोझें।' –माज्ञा १८.१३४. २ दुबेळकें; फाटक. [प्रा.]

**बेजोर**—क्रिवि. जोरानें; जोरावारीनें. [ फा. बी+झोर् ]

**बेझोर**—पु हा दगड कांहीं प्राण्यांच्या शरीरांत ( विशेषतः इराणी रानबकऱ्याच्या शरीरांत ) सांपडतो. हाडापासूनहि कृत्रिम बेझोर तयार करतात. बकरा, उंट, मासा, साप यांपैकीं ज्याच्या शरीरांत सांपडला असेल त्याप्रमाणें हा खडा निरनिराळ्या प्रकारचा असतो. सर्पाच्या शरीरांत सांपडलेल्या खड्याला सर्पमणि म्हणतात. खरा पौरस्त्य बेझोर अंडाकृति व अक्रोडाहून लहान असतो. हा गुळगुळीत व चकचकीत असून थरांचा बनलेला असतो. हा सर्व ओलावा आकर्षण करून घेतो. यावरूनच याच्या अंगीं विष उतरण्याचा धर्म आहे अशी समजूत आहे. –ज्ञाको ( ब ) १५९.

**बेट**—न. १ सर्व बाजूंनीं पाण्यानें वेढिलेली जमीन; द्वीप. २ एकाच प्रकारच्या झाडांचा समुदाय, जूट; जुंबाड. उदा० केळी, वेळू, दर्भ इ०. ३ ज्यां वृक्षादिकांच्या मुळांस अंकुर फुटून अनेक वृक्षादि होतात असा केळी, वेळू, दर्भ यांचा समुदाय. ४ ( ल. ) ( मित्र किंवा नातलगाचा ) समुदाय; गर्दी; दाटी. ' बेट सावंतांचें भारी पडलें. मुकाशाचे नात्यानें गांवची वेठबेगार घेत गेले. ' [ सं. द्वीप; का. ब्यट्ट; सिं. बेटु ] **बेटीं लागणें**–१ ( पोहणारा ) तडीस लागणें; उथळ पाण्यांत येऊन पोंहोचणें. २ ( ल. ) ( एखादें काम ) निश्चित स्वरूपाला, रंगारूपाला, आकाराला येणें.

**बेटका**—पु. बेकटा; ओलविलेला गहूं, जोंधळा.

**बेटकुळी**—स्त्री. १ (वयानें किंवा आकारानें) लहान बेडकी. २ दंड किंवा पायाच्या पिंढरींतील स्नायूंच्या आकुंचनामुळें येणारा गोळा. (क्रि० काढणें; उठवणें; दाखवणें). ३ बेटकुळीप्रमाणें उडया मारण्याचा एक मुलाचा खेळ. –मराठी खेळांचें पुस्तक पृ १२९.

**बेटणें, बेटमोरा**—नपु सोनाराची आवटी. **बेटणें**–उक्रि. पत्र्यावर शिक्का उठविणें, उठणें; पत्रा, दागिना इ० वर छाप किंवा ठसा उमटविणें, उमटणें; आवटीवरील ठसा धातूच्या पत्र्यावर उठवून घेण्यासाठीं तो आवटीवर ठोकणें. **बेटणी**–स्त्री. १ ठसा उमटविण्याची क्रिया. २ सोनाराची आवटी. [ बेटणें ] **बेटीव**–वि. शिक्का मारलेला; ठसा उठविलेला; छाप मारलेला; आवटीवर किंवा बेटणीवर ठोकलेला. याच्या उलट थळीव

**बेटवनी**—स्त्री. ( कैकाडी, सांकेतिक ) कुऱ्हाड.

**बेटा**—पु १ मुलगा; पुत्र; छोकरा. २ पादपूरणार्थक शब्द. बेटा किंवा बेटयाचा हा पादपूरणार्थक किंवा अलंकारिक शब्द म्हणून वापरण्याचा पुष्कळ प्रघात आहे. उदा० 'काय बेटा घोडा चांगला आहे ! ' [ हिं.; वे. प्रा. बिट्ट; सिं. बेटो ] **बेटी**–स्त्री. कन्या; मुलगी ( या शब्दाचा वरील अर्थी क्वचितच उपयोग होतो. परंतु वाक्यालंकार म्हणून बेटाप्रमाणें उपयोग करितात ). [हिं.] **म्ह०** पहिली बेटी मालाची (धनाची) पेटी. ०**व्यवहार**–पु. सोयरीक.

**बेटाड**—न. १ बेट याचें तुच्छतादर्शक रूप. २ मुळयांचें जुंबाड; मुळें व तंतू यांचा गुंता. ३ (शेतांतील किंवा मैदानावरील) तोडलेला, अलग ठेवलेला, उंचवटयाचा भाग. ४ ( ल. ) मोठें व लांबवर विस्तार पावलेलें घराणें, टोळी, संघ; जमाव; गर्दी [बेट]

**बेठण**—न कापडाच्या गांठीभोंवतीं गुंडाळलेलें वस्त्र; बस्ता; वेष्टन. [ सं. वेष्टन ]

**बेठी**—न अर्धवट पिकलेलें फळ.

**बेठें शीत, बेठें-बेठा भात**—नपु. ( गो. ) पेज न काढतां केलेला भात ( गोव्याकडे भाताचे तांदूळ शिजले म्हणजे त्यांतील सर्व पाणी काढून टाकतात )

**बेंड**—न. १ उठाणूं; गळूं; सूज; स्फोट. २ मोठी बेंबी; उंच वाढलेली बेंबी. ३ काजू, बेंडमोंवरा इ०चें मागील देंठ, बोंड ४ गुदभ्रंश होऊन पश्चिमद्वारानें बाहेर आलेला आंतडयाचा भाग. ५ [illegible] किंवा गर्भनाडीचें वेटोळें. ६ (माण.) कडब्याच्या बुचडया [illegible] अगोदर बुचडीचे पोटांत कणमाळ असा उभा केलेला कडबा [illegible]

विहिरीच्या तोंडाभोंवतालीं बांधलेला दगडी कठडा. ८ (ल.) गुप्त गोष्ट. [हिं.] ०फुटणें-बाहेर येणें-पडणें-गुप्त गोष्ट उघडकीस येणें; परिस्फोट होणें. **बेंडा, बेंडया**-वि. मोठी बेंबी असलेला. **बेंडाळणें**-अक्रि. फुगणें; फुगवटा येणें; फुगीर होणें; बेंड उठणें.

**बेडका, बेडका**—पु. बडका; खाकरा; थुंकलेला कफ.

**बेडकां**—न. (कु.) एकत्र बांधलेले दोन असोले नारळ; नारळांची सांगड.

**बे(बें)डकी**—स्त्री. १ लहान बेडूक; बेडकांतील मादी. २ दंड किंवा पायाच्या पिंढरींतील स्नायूचा जोराच्या आघातानें येणारा गोळा. ३ दंड किंवा पाय यामधील स्नायूच्या आकुंचनामुळें स्पष्ट दिसणारा गोळा; आंगठ्याच्या मुळाचा मांसल भाग. ४ घोड्याच्या पायाची गांठ. [बेडूक] **बेडकीचें कुलूप**-न. एक प्रकारचें कुलूप त्याच्या उलट नळीचें कुलूप. **बे(बें)डकुळी, बेंडकोळी**-बेडकी पहा.

**बेडग**—न. (माण.) लहान लहान झुडपें तोडण्याचें हत्यार.

**बेडगा**—पु (जुन्नरी) दोन फांटे असलेलें लांकूड पुरून केलेली शेताच्या कुंपणांतील वाट; दुबेळकें; बेडें. यांतून फक्त माण सासच जातां येतें.

**बेड(द)णें**—सक्रि. १ (व. ना) कोंडणें; बुजविणें; बंद करणें. २ (बैदुलांचा खेळ) एका गोटीचा दुसरीला स्पर्श होणें.

**बेडदोरी**—स्त्री. (भरतकाम) वेणीप्रमाणें विणलेला जरतारी बंद (हा मिलिटरीप्रमाणें कोटपाटलोणीवर शिवतात).

**बेडभोंवरी-रा**—स्त्रीपु. एक प्रकारची वेल व तिचें फळ.

**बेडर**—बेरड पहा.

**बेडया-बेडा**—पु (व.) कोंबडीं, बदकें ठेवण्याचें खुराडें.

**बेडा**—पु. १ रोठा; पूर्ण पक्व झालेली सुपारी, असोली सुपारी २ (कों) बेडें; गोठा. [हिं. बेडा=तराफा] ०पार जाणें-असणें-होणें-करणें-(ल) ध्येयप्राप्ति करून घेणें; स्वतःचे हेतु सिद्धीस नेणें.

**बेडा**—पु बांधकामांत दोन दगडांमध्यें बसविलेला दगडाचा लहान तुकडा.

**बेडा**—पु. १ (गो.) वर्षाची ठराविक वेणगी. २ (ना.) परिवार; समुदाय; गावांचा किंवा जहाजांचा समूह. [बेहडा]

**बेडा**—पु (आदराथीं) दर्यावर्दी; खलाशी; तांडेल.

**बेडागुळी**—स्त्री बांडगूळ पहा.

**बेडी**—स्त्री (गो.) सुकलेली सुपारी. बेडा पहा.

**बेडी**—स्त्री. १ शृंखला; हस्तबंधन; पादबंधन; पादशृंखला. २ एक चांदीचा दागिना; पायांत घालण्याचें नवसाचें चांदीचें कडें ३ (सामान्यतः हाताची, हात किंवा हत या शब्दांना जोडून) हातकडी; हातखोडा. ४ (ल.) बंधन; लोढणें; ओझें; ब्याद; लचांड. 'भवविपिनीं बेडी कसी। सोडवी हरि जो करासि क्षोंबे डिकसी।' -मोकृष्ण ४१.९. (आपल्या हातानें आपल्या पायांत) बेडी घालून घेणें-आपण होऊन आपल्यावर संकट ओढवून घेणें. ०सुळी-स्त्री. (माण.) घोड्याचे पुढील पायाच्या गुडघ्यावर गोम असणें. [हिं.]

**बेडू**—वि. ठेंगणा पण धष्टपुष्ट (मनुष्य, पशु).

**बेडूक**—पु. मंडूक; बेडकी. हा गोडया पाण्यांत राहणारा प्राणी आहे. याचें अंग गार व गिळगिळीत असून आकारानें लहान, डोळे बटबटीत, जबडा मोठा, जीभ उलटी ओंठाच्या बाजूस चिकटलेली असते. रंग भोंवतालच्या वस्तूंशीं जमे असा पालटणारा असतो. हा डरांवडराव असा आवाज करतो. बेडकाचे विषावर शिरसीचें बीं त्रिधारी निवडुंगाचे चिकांत वाटून त्याचा दंशावर लेप लावतात. -योर २.७०७. [सं. दर्दुर, मंडूक; सिं. डेडड]

**बेडें**—न. १ (कों.) गाईचा गोठा. २ (राजा) बेळें; बेळी. दुबेळकें; कुंपणाच्या आंत जाण्याकरितां केलेलें दुबेळक्याचें दार; कुंपणांतील वाट. 'भववासियांचें बेडें।' -गीता २.१८३८.

**बेडया, बेरडया**—स्त्रीअव. (व. कुण.) जोल्या; जोतीं; जुंपण्या (बैलांना जुंवास जोडण्याकरितां).

**बेणाका**—पु. मोटवणाच्या दोन्ही मुदलींत, बाहुलींत बसविलेला लांकडी तुकडा, कादूक.

**बेणणी**—स्त्री. तण काढण्याची, बेणण्याची क्रिया; शेतांतील अगर अंगणांतील गवत उपटून टाकण्याचें काम; निंदणी; भागलणी [बेणणें] **बेणणें**-सक्रि. १ शेतांतील निरुपयोगी गवत इ० काढणें; भागलून काढणें. २ (देशाच्या दक्षिण भागांत) बीं पेरणें.

**बेणबाजा**—पु. इंग्रजी लष्कराचें एक वाद्य. [इं. बँड+सं. वाद्य]

**बेणा-णी-णें**—वि. उघडा; दिसूं लागलेला; वरील आच्छादन दूर केल्यामुळें दिसणारा. (क्रि० पडणें). 'पाणी ओसरलें म्हणजे खडक बेणा पडतो.' [फा. बीना=पाहणें] **बेणावणें**-अक्रि. गैरविल्हेस पडलेला पदार्थ इ० दिसूं लागणें; तोंड दाखविणें उगवणें; उमटणें (माणूस, दुर्गुण इ०). 'संध्याकाळीं माघारा येतों म्हणून गेला तो पंधरा दिवसांनीं बेणावला.'

**बेणारी**—पु. पंढरीच्या विठोबाच्या पूजेच्यावेळीं मंत्र म्हणून कलशपूजा घेणारा इसम. -क्षार.

**बेणें**—न. बियाणें; पेरण्याचें बीं. [बियाणें]

**बेणें**—न. (खा.) दरवाज्याच्या फळीला मजबुतीकरतां मारलेली आडवी पट्टी.

**बेत**—पु. १ योजना; रचना; नमुना; युक्ति. २ कारण; उद्देश; हेतु; मसलत. ३ पद्धत; रीति; व्यवस्था; मांडणी; टापटीप. ४ रूप; आकार; रूपरेषा; वळण; आराखडा (पुढील कामाचा काढलेला, योजलेला). [सं. हेतु; हिं.] **बेताचा, बेतबेताचा**-वि. १ रीतीचा; पद्धतशीर; योग्य व ठराविक नमुन्याप्रमाणें असलेला.

२ मध्यम साधारण; प्रमाणशीर; योग्य प्रमाणाचा; योग्य किंमतीचा. ३ जुळता; जुळणारा; जमणारा; माप, चालीरीती, स्वभाव इ०शीं जुळता. ४ अल्पस्वल्प; अगदीं थोडा; तात्पुरता; क्षणिक; अर्धवट. ' त्यांचा ईश्वरावर बेताबेताचाच विश्वास आहे. ' –टि ४.३१४. **बेतावर असणें**–निश्चय,ठराव, व्यवस्था, बेत, योजना, नियम यांना धरून असणें; नियमाप्रमाणें असणें. **बेतबात**–पु. व्यवस्था; टापटीप. **बेतवार**–क्रिवि. पद्धतशीरपणें; नेमस्तपणानें. **बेताबेत**–क्रिवि माप, आकार, तऱ्हा इ० बाबतींत तंतोतंत जुळणारा. २ (क्र.) तंतोतंत जुळणें. **बेत्या**–वि. नेहमीं भलतेच बेत, योजना करणारा, युक्त्या लढविणारा **बेतणें**–सक्रि. १ माप घेणें व कापणें (अंगांस घालावयाचे कपडे) २ मुस्कटांत मारणें थोबाडीत मारणें. **बेतणी**–स्त्री. १ माप, आकार, रूपरेषा इ० ची आंखणी, मोजणी ( अंगात घालावयाच्या कपड्यांची ) २ कपडा मापाप्रमाणें फाडणें, कापणें. **बेतनीचा**–वि जमणारा; जुळता (मापानें, बनावटीनें इ०) ( बेताचा ह्या अर्थी उपयोग ). **बेतीव**–वि. १ बेताप्रमाणें केलेलें; योजनेनुसार असलेलें. २ मापाप्रमाणें बेतलेले, कापलेले ( कपडे ). **बेतविणें**–सक्रि. १ माप घ्यावयास लावणें. २ तोंडांत थप्पड, चपराक लगाविणें. ' तोंडावर जेव्हां दोन बेतविल्या तेव्हां कबूल झाला. '

**बेत**—पु. वेताची छडी; वेत [ सं. वेतस् ] **०ऊंस**–पु. उसाची एक जात; हा ऊंस बोरू किंवा वेताप्रमाणें दिसतो

**बेतणें**—क्रि. बितणें; प्रसंग येऊन पोंचणें

**बेताळ**—पु (कों.) तामसी देवता; भुतांचा राजा; वेताळ.

**बेताळ, बेताळीस**—वि. बेचाळ, बेचाळीस पहा.

**बेताळामण**—पु. (व्यापार) एक माप. या मणाचें वजन १५६८ सुर्ती रुपये असतें. –मुंव्या १०२.

**बेती, बेतीन**—स्त्री. सोंगट्यांच्या खेळातील एक दान. दुफाशी खेळांत दोन्ही फाशांवर तीन तीन ( प्रत्यक्ष दोन दोन ) पडणें. ' बाई बे तीन बोलली । '–ऐपो ३१. [ बे+तीन ]

**बेतुम**—पु. ( गो. ) कांचा घट बसविण्यासाठीं केलेला रांधा; लांबी. [ पोर्तु ]

**बेतो**—पु. ( गो. ) साधी पेटी.

**बेथु–थू**—वि. दांडगा; अडदांड; जवान; बळकट. 'वरी भीमसेन बेथु। तो आइला असे सेनानाथु।' –ज्ञा १.१२०. [ बेढ ]

**बेथूड**—वि. कुरूप; विद्रूप; वेडावांकडा; ओबडधोबड.

**बेद, बेदाड**—स्त्री. दलदल; ओलाव्याची जागा.

**बेदड–डा**—पु. सैन्याबरोबर असलेली लुटारू जात; चोरीचा धंदा करणारी एक जात. 'बेदड चालिली छापे घाट चालेना तिळभर।' –ऐपो १२१. [ बेरड ]

**बेदर–री**—स्त्री. एक झुबकेदार गवत.

**बेंदर, बेंदलु**—न. ( गो. ) आंबा, फणस यावरील बांडगूळ; वृक्षादनी.

**बेदरी**—स्त्री. एक फळझाड.

**बेदरी**—वि. बेदर गांवीं बनविलेला किंवा त्या गांवासंबंधींचा ( पिकदाणी, गुडगुडीचा पेला व इतर लोखंडी जिन्नस इ० ).

**बेंदरी**—स्त्री. जोतें बांधतांना जे तीन बांधकामाचे थर घालतात त्यांतील अगदीं खालील किंवा पहिला थर. त्यानंतरच्या दोन थरांना पेटी व पाटथर अशीं नांवें आहेत. बेंदरीतील दगडांना बेंदरी खाडकी असें म्हणतात.

**बेदरीशाळू, बेदरशाळू, बेदरी**—पुस्त्री. शाळूचा प्रकार.

**बेदाड**—न. मुळाचा झुबडा; जुंबाड (दूरवर पसरणाऱ्या गवताच्या मुळ्यांचा उदा० हरळी, कुंदा, मोळ, दर्भ इ० ). –वि. ( जमीन–शेत–रान–जागा इ० शब्दांशीं समास होऊन उपयोग) बारीक गवत असलेली; वनस्पतींचा मुळवा असलेली; बारीक सारीक झुडपांची; पाळें व मुळ्या यांनीं भरलेली.

**बेदू**—पु. १ मेंदू. २ मगज; गाभा; फळातील गीर. ३ बिलबिलीत झालेलीं फळें, मांस इ०. ४ ( झुरळ, विंचू इ०चा ) चेंदामेंदा; लद्दा; जखमेंतून बाहेर येणारें मांस. [ मेंदू ]

**बेंदूर**—पु. पोळा; एक सण. निरनिराळ्या देशाच्या चालीप्रमाणें आषाढ, श्रावण किंवा भाद्रपदांतील अमावास्या. या दिवशीं बैलांची पूजा करून यांना शृंगारून त्याची मिरवणूक काढतात.

**बेंदल**—न. ( गो. ) परान्नजीवी; दुसऱ्याच्या अन्नावर पोसला जाणारा; आईतखाऊ.

**बेना**—पु बयाणा. –वि. उघड, स्पष्ट. –शर.

**बेने–इस्रायल**—पु मुंबई इलाख्यातील ज्यूधर्मी जात व व्यक्ति.

**बेपटी**—स्त्री. ( व. ) बोळ. ' बेपटींत घर मिळालें.' [ बे+पट्टी ]

**बेपरवा**—पु मोत्याचे सर एकत्र करून केलेला, डोक्यास एके बाजूस घालण्याचा बायकांचा दागिना.

**बेपार**—पु. व्यापार; उदीम. [ सं. व्यापार; हिं. बेपार ]

**बेपारी**–पु. व्यापारी; दुकानदार; देवघेवीचा धंदा करणारा.

**बेफाटी**—स्त्री. ( व ) बेळी; बेडें पहा.

**बेबकांचा खेळ**—पु. ( गो. ) भाकरीचा खेळ.

**बेबकी**—स्त्री. ( गो ) बेडकी.

**बेबट**—न. १ मोठी बेंबी; उंच बेंबी. २ बेंबी या शब्दाचें तुच्छतादर्शक रूप. ३ जनावरांची बेंबी. [ बेंबी ]

**बेंबटणें, बेंबणें**—अक्रि. (राजा.) वासरूं किंवा मेंढरूं यांनीं भयामुळें बें बें असें ओरडणें; आक्रोशणें. ' मुकेपणीं बेंबात । '–एभा २१.२२९. [ ध्व. किंवा सं. बिद्=आक्रोशणें ]

**बेवडो**—पु (गो.) दारूबाज. **०आवप**–दारूबाजीनें गुंगी येणें.

**बेबल**—न. (कु.) सुताराचें एक हत्यार.

**बेबली**—स्त्री एक फळझाड. **बेबलें**–न. बेबलीचें फळ

**बेबहार**—वि. बहारदार; बहारीचा; सुंदर. 'बेबहार गुलाबी तरू भोती सरू चंपक मोगरा।'–पला ४.२२. [फा.]

**बेबळ-ल, बेबळें**—वि. १ ढिला, निःशक्त; लुळा; निर्जीव २ विव्हल; क्षीण. 'सर्वांगा कांटाळा आला। अति संतापु उपनला। तेथ बेबळ हातु गेला। गांडिवाचा।'–ज्ञा १.१९७. [सं. विव्हल]

**बेबळणें**–अक्रि. १ भेदणें; फुटणें; तुकडे होणें. २ विव्हल होणें.

**बेबा**—पु. एक प्रकारचें फुलपाखरू.

**बेबारा**—पु. बोभाटा; एखादी गोष्ट उघडकीस येणें. [बोंब]

**बेबारा**—पु. बेवारा पहा.

**बेबावचें**—सक्रि (गो.) भिवविणें; भीति दाखविणें.

**बेबावणें**—अक्रि. बेंबटणें पहा. [बें.]

**बेबी**—स्त्री लहान मुलगी; कुकुबाळ; लेकरूं. [इं] ०**कॅप**–लहान मुलाची टोपी. [इं.]

**बेंबी**—स्त्री. नाभी; पोटाला ज्या ठिकाणीं गर्भनाल जोडलेला असतो तो पोटाचा अवयव. [सं नाभि] ०**चा देंठ पिळणें-पिळून दुखूं लागणें, नाभीच्या देंठापासून कळवळा येणें-माया येणें**–अतिशय कळवळा येणें ०**चें उखळ होणें**–(ल.) चमचमीत खाण्यानें व सुखाच्या राहणीनें लठ्ठ होऊन दोंद सुटणें. ०**च्या देंठापासून**–क्रिवि. अगदीं अंतःकरणापासून; खऱ्या भावानें. ०**पासून जोर करून बोलणें**–शक्य तितक्या जोरानें बोलणें; सर्व शक्ति खर्च करून बोलणें; ओरडणें.

**बेबुदी**—स्त्री. बेगमी; साठा; संग्रह. [फा बिहबूद]

**बें बें**—नक्रिवि वांसराचें, मेंढराचें ओरडणें. (क्रि० करणें).

**बेबे, बेबो**—पु. (गो) बेडूक.

**बेबेरी**—स्त्री. (गंजिफांचा खेळ) डावाचीं पानें वांटून झाल्यावर एखाद्याला सुर्ख्या अथवा राजा आला नसेल (व कोणास पानें देणें नसेल) तर तो डाव न खेळतां पुन्हां गल्लत करून पानें वाटणें.

**बेबेवचें**—सक्रि. (गो) झोंपेंत बरळणें. [ध्व.]

**बेर**—पु. (आगरी, कों.) एक प्रकारचें जाडेंभरडें गवत.

**बेर, बेरणी**—स्त्री (राजा.) दुसरी नांगरणी (पहिली नांगरट उभी झालेली असली म्हणजे दुसऱ्यानें आडवी नांगरणी करतात या दुसऱ्या नांगरणीला म्हणतात); उखळणी. [बे=दोन]

**बेर**—न (माण.) पाभरीच्या नळीचें धान्य पडण्याचें जमिनीजवळील भोंक.

**बेर**—स्त्री. (व.) बांगडी.

**बेरकट**—न. १ बाईट व बेरीच्या योगानें घट्ट झालेलें तेल किंवा तूप. २ बेरी; ओशट पदार्थांतील मळ. –वि. बेरी असलेलें; रेंदाचें; मळानें युक्त (तेल, तूप). [बेरी+कट] ०**णें**–अक्रि. समई, दिवा, तेलाचें भांडें इ० तेला-तुपांतील बेरीमुळें बाईट होणें; भांडें, दिवा इ०वर बेरी बसणें. **बेरकूट, बेरकुटणें**–बेरकट व बेरकटणें पहा.

**बेरकट**—वि. बहिरट; कमी ऐकूं येत असलेला. [बहिरा]

**बेरका, बेरकी**—वि. १ लुच्चा; हुषार; चलाख; धूर्त. २ मिश्रबीजाचा. [का.]

**बेरकी**—स्त्री. एक प्रकारचें गवत.

**बे(बै)रंग**—न. (ना.) तिकीट न लावलेलें, नॉटपेड पत्र.

**बेरजून काढणें**—क्रि. (बे.) वेंचून काढणें.

**बेरट**—न. १ रेंदा, बेरी असलेलें तेल, तूप; गाळ, घाण इ० असलेलें तेल, तूप २ (खा.) लोणचें.

**बेरड**—पु. धंदेवाईक लुटारू किंवा त्यांची जात; रामोशी; चोरी हा उपजीविकेचा धंदा असणारे लोक; यांची वस्ती कर्नाटकांत अधिक आहे [बेडर; तुल० का. बड्डर] **बेरडाई, बेरडगिरी-बेरडाव-वें**–स्त्रीन बेरडांचा लुटारूपणा; बेरडांची पुंडाई. (क्रि० सुटणें; माजणें; मातणें; उठणें).

**बेरड**—स्त्री. गोंधळ; मिश्रण; सबगोलंकार; पंचमेळ.

**बेरड**—स्त्री लीख. (विरू.) (अव. बेरडा) लिखा; उवांचीं अंडीं. (क्रि पडणें; होणें).

**बेरडी**—स्त्री. (ना. व.) बैलाच्या गळ्यांतील जोतें, जुपणी.

**बेरणें**—अक्रि. १ (ना.) पसरणें; फैलावणें; जिकडेतिकडे होणें (फक्त दाट उगवणाऱ्या गवतास उद्देशूनच उपयोग). २ आडवी नांगरट करणें.

**बेरसा**—वि. दांडगा; विचारशून्य. 'बेरसा गाढव माय ना बहिण। भुंके चरीविण भलतेंचि।'–तुगा ४१२७.

**बेरहड्डी**—स्त्री. घोड्याचा एक रोग; व्रण; हडद्यावणें. –अश्वप २.२६१.

**बेरी**—स्त्री. १ ओशट पदार्थांतील मळ;तेला-तुपांत असणारा मळ, घाण इ०; बेरकट. २ गुळाची मळी.

**बेरीज**—स्त्री. १ मिळवणी; निरनिराळ्या संख्या एकत्र करून झालेली संख्या;मिळवणूक; जमा. २ मिळवणी करावयाची क्रिया; दोन किंवा अधिक सजातीय संख्या एकत्र करणें. (क्रि० घेणें; करणें) [फा. बरीज्] ०**भरती**–स्त्री. ठराविक संख्या पुरी होण्याकरतां (भरण्याकरितां) केलेली भरती; इष्ट संख्या दाखविण्याकरितां लबाडीनें घातलेली खोटी भर.

**बेरू**—वि. (व.) खुनशी; मनांत डाव धरणारा.

**बेरोजा**—पु. एक औषधोपयोगी पदार्थ. [फा. फिरोजाह्]

**बेल**—पु. बिल्ववृक्ष. शंकराला बेल प्रिय असल्यामुळें हें झाड पवित्र मानलें जातें. याला त्रिदलें येतात. या झाडाचीं फळें, पानें, साल व मुळ्या औषधी आहेत. २ बेलाच्या झाडाचें पान. –न.

बलफळ. [सं. बिल्व] **०घालणें**-(व.) (ल.) विनाकारण गांवांत भटकणें. **०काचरी**-स्त्री. कोंवळ्या बेलफळाचे वाळविलेले कातळे, काप (हे औषधी आहेत). **०पत्र**-न. बेलाचें (त्रिदल) पान. (घरावर, मालावर, पदार्थावर) **०पत्र ठेवणें**-वस्तूवरचा हक्क सोडणें. **०पत्री रुपया**-पु. बेलाच्या पानाच्या छापाचा रुपाया. **०पानी टीक-टिका**-स्त्री. स्त्रियांचा गळ्यात घालण्याचा एक दागिना; या दागिन्यांतील प्रत्येक पेटी बिल्वदळासारखी असते. बिल्वदळी टिका असेंहि म्हणतात. **०फळ**-न. १ बिल्व वृक्षाचें फळ. २ बेलफळाच्या आकाराची तपकिरीची डबी. या फळाच्या कवचीची केलेली, तपकीर इ० ठेवण्याची पेटी, डबी इ०. **०भंडार**-पु. १ देवावरील बेल व भंडार हातानें उचलून करण्याचा शपथविधि. २ अशा रीतीनें घेतलेली शपथ; देव साक्ष ठेवून घेतलेली आणभाक. (क्रि० काढणें; उचलणें) [बेल+भंडार=हळदीची पूड] **०वात**-स्त्री. तीन सुतांची पीळ घालून केलेली, चार बोटें लांबीची वात; ह्या वाती एक लक्ष करून देवापुढें जाळतात.

**बेल**—पु. घोड्याला होणारा एक रोग. —अश्वप २ २९०

**बेल**—न. (व.) पिकाच्या दोन ओळी; रांगा.

**बेलकडें**—न. (कों.) खेंकडा; कर्कट.

**बेलका-कें**—पुन. (कु) हळद, कुंकू इ० पदार्थ ठेवण्यास उपयोगी पडणारा पोखरलेला नारळ; बेलें; बेला.

**बेलखरूज**—स्त्री. मोठे फोड येऊन चिघळते व मोठीं चकंदळें पडतात अशी ओली खरूज.

**बेलटी**—स्त्री. (कों.) टाळकें; डोक्याबद्दल तुच्छतादर्शक शब्द. 'तूं लबाडया करतोस परंतु तुझी बेलटी फोडून टाकीन.'

**बेलटें-टी**—न. (कों.) नारळ, डोकें यांना तुच्छता—तिरस्कार दर्शक शब्द; करटी; नरोटी [बेलफळ]

**बेलणें**—न. (व.) लाटणें. 'पोळ्या लाटण्याकरतां मला बेलणें आणून दे.' [हिं. बेलन]

**बेलतवस, बेलतौस-तवसें-तौसें**—स्त्रीन. एक रानवेल व तिचें फळ.

**बेलतेल**—न. जवसाचें उकळलेलें तेल. [इं. बॉइल्ड+म. तेल]

**बेलदा**—पु. (कु.) समुद्रखेंकडा.

**बेलदार**—पु. १ पाथरवट; खाणींतील दगड खणून काढणारा; खणत्या; दगड फोडणारा. कर्नाटकांतील ह्या धंदा करणारी एक जात. २ (व.) मातीचें काम करणारा गवंडी. [फा. बेल्=कुदळ+दार]

**बेलफाटा**—पु. (व.) लाकडास फुटलेला दुसरा फाटा.

**बेलभाण**—वि. (गो.) दुरुस्त करतां न येणारें.

**बेलवटी**—स्त्री. कुंपण; बंधन; खीळ. 'आनंदें वोसंडिली सृष्टी। तेणें बाधेसि पडली बेलवटी।' —एभा ९.४२४.

**बेलवल**—स्त्री. उंचवटयाची जमीन.

**बेलवांगी-वांगें**—स्त्रीन. टमाटयाचें झाड व फळ.

**बेला**—पु. नारळ, बेलफळ इ० आंतून कोरून तयार केलेलें पात्र; डहू [हिं.] **बेल्यांत मडक्या भरणें**-(ल.) गोंधळ करणें; गडबड करणें; धुमाकूळ घालणें.

**बेला, बैला, पेला**—पु १ (कों) ओझें उचलण्यासाठीं एका काठीच्या मध्यावर बसविलेली एक लहान चौकट असलेलें साधन. २ अशा साधनानें एका मनुष्याला पेलेल, वाहून नेतां येईल इतकें ओझें, (विशेषत:) कांटींचा भारा.

**बेलाकसूर**—वि. १ नि:शंक. २ अविचारी; साहसी. —क्रिवि. नि:शंकपणें, बेलाशक; बेधडक; अविचारानें. बिलाकसूर पहा. [अर. बिलाकुसूर]

**बेलापुरी रुपया**—पु. बेलापूर येथें पाडलेला अंकुशी रुपयांतील एक प्रकारचा रुपया.

**बेलाशक**—क्रिवि. बेधडक; नि:शंकपणें; निष्काळजीपणें; निर्धास्तपणें; अविचारानें. [अर.]

**बेलिफ**—पु. नाझरच्या हाताखालचा एक कामगार; समन्स लावणारा व बजावणारा शिपाई, कारकून. [इं.]

**बेलिया**—पु. १ मोगऱ्याच्या जातींतील एक फुलझाड. २ त्या झाडाचें फूल. ३ त्या फुलापासून काढलेलें तेल, अत्तर. [हिं.]

**बेली**—स्त्री. १ करवंटी; नरोटी; नारळीपात्र २ तांबडया व काळसर सुताच्या चौकटी असलेलें लुगडें. ३ (गों.) चिकट गुळाची (गुळपापडीची) वडी. **बेली-ल्या**-वि. तांबडया व काळ्या रंगाच्या सुताच्या चौकटी असलेलें (लुगडें); तांबूस व काळसर तांबूस (रंग).

**बेली**—पु. (जुन्नरी) खेकड्याची जात. ही सर्वांत लहान असून डोंगरांत अगर सपाटीवरहि असते. ह्या जातीच्या खेकडयांचा रंग पाढरा असतो. 'बेली धावांत (बिळांत) आहे.'

**बेलें**—न. राजे इ० बडे लोक बाहेर निघाले म्हणजे धर्म करण्याकरतां जो पैसा, पैशाची पिशवी बरोबर घेतात ती. [फा. बेला] **०बरदार**-पु वरील बेलें (पैसा किंवा त्याची पिशवी) जवळ बाळगणारा मनुष्य. [फा]

**बेलें**—न. बेला; भांडयाप्रमाणें उपयोगी पडणारा, गुडगुडीच्या उपयोगी पडणारा पोखरलेला नारळ; डहू.

**बेल्ही**—स्त्री. कोळपें; पिकांतील गवत काढण्याचें हत्यार.

**बेल्हीं**—नअव. नांगराचे तास; पाणी सांचावें म्हणून नांगरानें पाडलेले खोल चर.

**बेवड**—स्त्री. १ बीजांची भेसळ; मुख्य बियाण्याच्या बरोबर पेरलेलें दुसरें बीं; दुसऱ्या धान्याबरोबर त्याच जागीं पेरलेलें उपधान्य. २ पीक चांगलें येण्यासाठीं एक वर्षाआड एक दुय्यम

पीक काढतात त्यास बेवड म्हणतात. 'तंबाखूचा बेवड पिकाला चांगला.' ०करणें–ताग, उडीद, कारळे यांसारखें पीक करून तें जमीनींत गाडणें; जमीनींत सेंद्रिय द्रव्यांचा सांठा वाढविणें. बिवड पहा.

**बेवडा**—पु. देशी दारू.

**बेवरा**—पु. बेवारा पहा.

**बेवलकरी**—वि. बिवलकरी पहा.

**बेवाडें**—न. (कों.) र्हदीच्या बाजूस पोटमांडवणीपर्यंत भिंती चढवून काढलेला पोटमाळा; दुपाखी व चौपाखी यांच्या दरम्यानची छपराची रचना.

**बेवीस**—वि. बावीस ही संख्या. [ हिं ]

**बेश**—वि. चांगलें; छान; योग्य; उत्तम; ठीक; युक्त.–क्रिवि. योग्यपणें; चांगल्या रीतीनें; युक्तपणें; सुकीचें, वाईट नव्हे अशा रीतीनें. [ फा ] ०खासा–वि. फार चांगलें; उत्कृष्ट; अगदीं योग्य. [ फा. बेश+अर. खासा ]

**बेशमी, बेश्म**—क्रिवि नांवानें; नावें (दस्तऐवज, अर्ज, करारपत्रें इ० मध्यें फक्त याचा उपयोग करतात). 'दस्तक बेशमी नारायण चौगुले.' [ फा. ब+इसम+इ=बिस्मि=चा, नांवाचा माणूस ]

**बेशाक**—नस्त्री. शाकबेशाक ह्या शब्दाबद्दल मराठे वगैरे अडाणी लोकांच्या तोंडीं असलेला शब्द.

**बेष, बेषक, बेषखासा, बेस, बेसक**—बेश इ० शब्द पहा.

**बेष्ट**—स्त्री. (ना. व.) वांकुली. ०लावणें–वेडावून दाखविणें. 'मला बेष्ट लावतोस ?'

**बेसक**—न. स्थान; बैठक. [ बसणें ]

**बेसकट**—न. (कों.) फाटक (पावसाळ्यांतील, तात्पुरतें, काटेरी झुडपाचें केलेलें).

**बेसन**—न. १ हरभऱ्याच्या डाळीचें पीठ. २ पिठलें. ३ हरभऱ्याच्या पिठाचें केलेलें पक्वान्न, लाडू इ० [ हिं. ] ०तोरणें–साखरचडया–नस्त्री. बेसनाचीं निरनिराळीं पक्वान्नें.

**बेसनेकड**—न. रहाटगाडग्याच्या मुळकुंड्यास मारलेलें आडवें लांकूड.

**बेसंवरो**—वि. (गो.) अत्युत्तम. [ बेस+बरें ]

**बेसर**—न. नासापुष्प; नाकांतील एक अलंकार; नथ, चमकी मोहोरणी, बुलाख इ० 'तेही बेसरयुक्त फार मिरवे त्या ओष्ठबिंबावरी।' -निमा १.२५. [ हिं. ]

**बेस्मी**—बेशमी पहा.

**बेह(हा)डणें**—अक्रि. (आंबा, फळ, कणीस इ०) झाडावर पिकून तयार होणें.

**बेह(हे)डा, बेहाडा**—पु. एखाद्या खात्यांतील नोकरचाकर, त्यांचा पगार, हुद्दा इ० बद्दलचें तपशीलवार पत्रक, अंदाजपत्रक; नेमणूक; सरकारी नियम इ० सरकारी अधिकाऱ्यासाठीं बांधून दिलेले, सरकारी कामकाजाच्या वहिवाटीचे नियम. 'सालमजकुरीं गडबडीमुळें बेहेड्याचे नेमणुकेपेक्षां जास्ती लोक ठेवणें.' -वाडसमा ४.२. [ हिं. ] **बेहडापार**–क्रिवि. पत्करलेलें कार्य कसेंहि करून शेवटास नेऊन. ( क्रि० करणें; होणें )

**बे(ब्या)हडा, बेहेडा, बेहाडा**—पु. एक औषधी झाड व त्याचें फळ. (फळांना हेळ्याचीं किंवा धटिंगाचीं फळें म्हणतात). याचें झाड फार उंच वाढतें व विस्तारहि बराच होतो. फळाच्या आंत मगज असतो त्यानें गुंगी येते. याचा लेह खोकल्यावर औषधी आहे. या झाडाला डिंक येतो. फळांचा कातडीं कमावण्याकडे उपयोग होतो. [ सं. बिभीतक; प्रा. बहेडओ, बहेडय; हिं. बहेडा ]

**बेहडा, बेहाडा**—वि. १ टणक; निबर. २ पक्व झालेलें. ब्याहडा पहा.

**बेहंबी, बेहांबी**—स्त्री. आंब्याची खारवलेली किंवा खारांत ठेवलेली कोंवळी कैरी. [ बी+आंबा ]

**बेहबुदी, बेहबुदी-धी, बेहबूद**—स्त्री. १ सुस्थिति; भरभराट; मजबुती; सुव्यवस्था. 'दौलतीची बेहबूद कशांत हें पुरतें समजून आम्हांशीं बोलावें.' -रा ५.७५. २ जोपासना करणें; तरतूद पाळणें; चांगली निगा राखणें; संभाळणें; पालनपोषण करणें (मुलें, आश्रितवर्ग, गुरें इ० चें). ( क्रि० करणें; राखणें; ठेवणें ). [ फा. बिहूबूद् ]

**बेहरम**—क्रिवि. साशंक; रुष्ट; खट्टू; घाबरून गेलेला; गोंधळून गेलेला. [ फा. बर्हम् ]

**बेहलावा**—स्त्री (संगीत) आलापाच्या धर्तीची तान.

**बेहळा**—पु. १ सैल भारा; जुडी; पुंजका (काटेरी झुडपांचा, गवताचा). २ झुबका; घोंस; घड (कांदे, लसुण इ० चा). ३ भेळा; एक रानटी झाड.

**बेहाय**—क्रिवि. अतिशय; फार. 'तो माझ्या भाषणानें बेहाय खुष झाला.' [ फा. ? ]

**बेहाळ**—वि. (बायकी) शिवराळ; अश्लील; अभद्र; बीभत्स.

**बेहुड**—स्त्री. (माण.) बेवड पहा.

**बेहुदा**—वि. (ना.) उद्धट; असभ्य. [ हिं. ]

**बेहेड**—स्त्रीन. पाण्याच्या प्रवाहानें पडलेली खळगी; दरी.

**बेहेदा**—पु. बैदा पहा. [ बैदा ]

**बेहेस्त**—पु. स्वर्ग. [फा. बिहिश्त] ०मकान्–वि. स्वर्गस्थ; कैलासवासी.

**बेह्या**—वि. (व.) निलाजरा. [ बाह्यात ? ]

**बेळ**—न. अर्धा आणा.

**बेळ, बेळसा**—न. बांबूची काढलेली पातळ चिरफळी (टोपल्या हातऱ्या इ० विणण्याची); बीळ.

**बेळ**—स्त्री. (कु.) समुद्रकाठची रेताड जागा. [सं. वेला]

**बेळ**—न. (व.) १ दुबेळकें; बेळें. बेडें. २ दुबेळकें लावून फक्त मनुष्यें जाण्याजोगा केलेला कुंपणांतील रस्ता. [बेळकें]

**बेळ**—न. (गो.) तरंगाच्या( देवळांतील देवतेच्या चिन्हांच्या खांबा)पुढें शिपडण्यांत येणारें अन्न. तरंग पहा.

**बेळकें**—न. १ दुबेळकें; दोन फाटे फुटलेलें लांकूड; फांद्यांचा चिमटा; बेफांटा. २ (विणकाम) आरसड ठेवण्याचें लांकडी साधन [का. बेळे] **बेळफाटा-टी**-पुस्त्री. (व.) दुबेळकें.

**बेळशी(सौ)चें**—क्रि. (गो) आंबणें; कुजणें; वास येणें; बेळसटणें. [बळस] **बेळसुटाण**-स्त्री (गो.) शिजविलेला पदार्थ शिळा होऊन कुजल्याची–आंबल्याची घाण.

**बेळा**—पु. तांदुळाची एक जात.

**बेळा**—पु. (बे.) लाकूड साफ अगर गुळगुळीत करण्याचा लहान रंधा

**बेळूस**—वि. (कु.) बेचव. ०**होणें**–नासणें; आंबणें.

**बेळें**—न. (गो.) एक पक्वान्न.

**बेळें**—न. १ दुबेळकें; कुंपणाचा आडा; फक्त माणसाना जातां येतां येईल, अशा प्रकारची रस्त्याची अडवणूक; बेडें; डेळकें मग तें देहाचें बेळें। वोलांडूनि एकेचि वेळें। संवतुकी कांटाळें। माझें जालें।'–ज्ञा १४ ५१. २ काकपद: पोथी, पत्र लिहितांना मध्यंतरी सुटलेले शब्द वर किंवा अन्यत्र लिहिले आहेत हें दाखविणारें चिन्ह. ३ हातमागाच्या ताण्याला खालीं आधारभूत असलेला जो आडसर तो ज्या दोन खुंटयावर बसविलेला असतो त्यापैकीं प्रत्येक [का.]

**बेळेंबोळें**—न. (लिंगाईत) गूळ व भात (हे दोन्ही जिन्नस मेजवानीच्या वेळीं प्रथम वाढण्याची चाल आहे) [का. बेल्ल=गूळ]

**बैकार**—पु. (महानु.) बहिष्कार. 'अहल्ल्यातु कवी बकार। वाणितांति निरतर।' –दाव २८. [सं. बहिष्कार]

**बैंगण-न**—न. वांगें; वांग्याची भाजी. [हिं] **बैंगणी-नी**–वि. वांग्याच्या रंगासारखें; सर्व अभार काळें व आडवण सुपारी रंगावर असलेलें (लुगडें).

**बैंगुली**—स्त्री. एक फूलझाड.

**बैठक**—स्त्री. १ बसण्याची क्रिया. २ ढुंगण टेंकून बसणें. ३ (चर्चा–विचार–करमणूक इ०करिता) जमलेली सभा ४ परिषद सभा इ०चे) काम करण्याचे दिवस. ५ कांहीं कामासाठीं अन्य कामें सोडून एके ठिकाणीं केलेली अवस्थिति; एखा या कामाचा कांहीं काळ बसून विचार करणें. 'हे काम उभ्याउभ्यांनीं होणार नाहीं तुमची आमची चार घटका बैठक झाली पाहिजे.' ६ बसण्याची पद्धत; आसन ७ बसण्याच्या उपयोगाची कोणतीहि वस्तु; बसण्याकरता पसरलेलें जाजम, सतरंजी, बिछाईत, पाट, खुर्ची, खोगीर इ० ८ एखाद्या वस्तूचें बूड; तळ; खालचा भाग (ज्यावर ती वस्तु किंवा पात्र टेंकतें तो). ९ बाजारांत बसणाऱ्या दुकानदारावरचा कर. १० दमल्या–भागल्यामुळें, भीतीनें, निरुपायानें एकदम मारलेली थबकल; बसकण. (क्रि० मारणें) ११ व्यायाम करण्याचा एक प्रकार; उठण्याबसण्याचा व्यायाम; शाळेंतील मुलाला सांगितलेली शिक्षा; उठबशा. १२ गाण्याची मजलस, बसून गाणें. १३ गमनामध्यें कांहीं कार्यानिमित्त झालेला मुक्काम, पडलेला खंड. १४ करमणुकीसाठीं अनेकांनीं जुळणें; जुळण्याची जागा. १५ (व.) दिवाणखाना १६ खेडेगावांत एखाद्याद्रुकट्या इसमाला गांवसभा भरविणें झाल्यास त्या गावच्या रिवाजाप्रमाणें त्यानें गावकऱ्यांना द्यावी लागणारी रक्कम. [सं उपविश्; प्रा. बइट्ठ; हिं. बैठना] ०**मारणें**-(ल) १ ठीया देणें; पुष्कळ काळ बसून राहणें; अंग मोडून काम करणें. २ उठाबशाचा व्यायाम घेणें; उठाबशा काढणें. **एका बैठकीस**-क्रिवि. मध्यें न उठतां, कांहीं कामासाठीं एका ठिकाणीं बसून (काम संपविणें). **बैठणें**–अक्रि. बसणें. 'तैसीं नित्यनैमित्तिकें। कर्में जियें आवश्यकें। तयाच्या विषीं न शके। बैठला उठूं।' –माज्ञा १८.५९७ [हिं. बैठाना]

**बैठा**—वि. १ बसलेला; बसकट 'तूं उभा ना बैठा।'–माज्ञा ११.२७७. २ बेकार; कामाशिवाय घरीं बसून राहिलेला. [बैठणें] **म्ह०** (व.) बैठेसे बिगार भली=अगदींच रिकामें बसण्यापेक्षां थोडेंबहुत मिळेल तें काम चांगलें. ०**गुणाकार**–पु. गुणाकाराचा एक प्रकार; गुणकांतील प्रत्येक अंकानें गुण्याला गुणून येणारे गुणाकार एकाखालीं एक असे मांडून त्यांची बेरीज न करता तोंडीच गुणून तोंडीच बेरीज घेऊन केलेला गुणाकार कोष्टकी गुणाकार, भावरा गुणाकार व कपटसिंधु पहा. ०**ठेप-कैद-सजा**-स्त्री. साध्या कैदेची शिक्षा; नुसता तुरुंगवास. ०**पगार-मुशारा**–पु. चाकरीशिवाय मिळणारा पगार; पेन्शन ०**पहारा**–पु. फक्त बसून करण्याचा पहारा, देखरेख. याच्या उलट टेहळता पहारा. ०**पहारेकरी**–पु. बैठा पहारा करणारा शिपाई. ०**भागाकार**–पु भागाकाराचा एक प्रकार. भाजक व भागाकार यांचे गुणाकार न मांडतां मनांतल्यामनात ते भाज्यांतून वजा करून फक्त बाकी लेवढी मांडून केलेला भागाकार. ०**भात**–पु पेज न काढतां केलेलें पाणी घालून केलेला भात. ०**रोजगार, बैठी चाकरी**–पुस्त्री. घरदार किंवा गांव सोडावें लागणार नाहीं असा धंदा, चाकरी. **बैठी कीर्द**–स्त्री मुदतीचा जमाखर्च लिहून शिल्लक काढतात ती कीर्द. ०**वही**–स्त्री. जींत रोजच्या खर्चाची बाकी एकदम लिहून ठेवतात अशी रोजवही; हींत व्यवस्थित शिल्लकसाखळी काढीत नाहींत **बैठें खातें**–न. एकदा दाखल करून विल्हेस लावलेलें खातें अगर

सदर. **बैठे घडीचा**-वि. बसल्या घडीचा; बरेच दिवस दुकानांत पडून राहिलेला.

**बैठा**—पु. लांकूड साफ करण्याचा रंधा; बेळा.

**बैत**—स्त्री. दोहरा; सयमक दोन ओळी; फारशी भार्षेतील श्लोकासारखी कविता. 'या ग्रंथाच्या बैता तीस हजार आहेत' -ऐस्फुले २.४५. [अर. बैत]

**बैतण**—न (खा.) जळाऊ लांकडें; सर्पण; बयतन पहा.

**बैतन**—वि. बेवारशी. 'जयपुरासारखें राज्य बैतन हातीं लागलें' -होकै १३. [फा. बीतन] **०मावाशी-माल, बैतक्ष्माल**-पु बेवारशी, सरकार जमा माल. बेहतमावाशी, बेहतमाल पहा [अर बैतुल्माल]

**बैतें, बैत्या**—वि. (कों.) बलुतें, बलुत्या पहा.

**बैतेकरी-करू-दार**—बलुतेदार पहा.

**बैद्**—पु. लुटारू. [सं. व्याधि; म. ब्याद ? हिं.]

**बैद्र**—स्त्री. गोराड्ची एक जात. -न. गोराड्चें फळ

**बैदा**—पु. १ दंगा, बंडाळी, फितुरी इ० राज्यांतील सामान्यत: भानगड; तंटा; गोंधळ; अंदाधुंदी; घोंटाळा. २ (खा.) अडगळ. 'बैद्यांत विंचुकाट्याचा हात नको घालजो.'

**बैदा**—पु. १ कोंबडीचें अंडें. २ घोड्याचा एक रोग; पुढील पायाचें मनगट सुजणें व गांठीप्रमाणें दिसणें. [हिं बैद]

**बैदुल**—पु. खेळण्याची गोटी. [सं. वर्तुल ?]

**बैरक-ख**—स्त्री. १ निशाण; झेंडा. २ एका निशाणाखालीं गोळा केलेलें सैन्य (विशेषतः अरबाचें); अरबांची लष्करी तुकडी. 'सैमागमें आपले कडील अरबांच्या बैरखा नेहमीं दोन दिल्या आहेत.' -रा १०.१७३. [अर. बैरक्]

**बैरागी**—पु. विरक्त पुरुष; गोसावी; संसार सोडून तपाचरण करणारा भक्त. [सं. विरागी] **बैरागडा**-पु. तिरस्कार किंवा तुच्छता दाखविणारें बैरागी शब्दाचें रूप.

**बैराट**—वि. बहिरा; बहिरट. 'नणद ते बैराट कानीं असें।' -अकक २ विठ्ठल रसमंजरी ३०. [बहिरट]

**बैल**—पु. १ वृषभ; बलीवर्द; खोंड; वसु; बाल्यदशा ज्याची संपली आहे असा गाईच्या जातींतील नर. २ (ल) निरक्षर; निर्बुद्ध, मठ्ठ डोक्याचा मनुष्य. ३ बेला अर्थ २ पहा. [सं. बलीवर्द; दे. प्रा. बइल्ल] **०आंतबाहेर घालणें**-बैलाची अदलाबदल करणें **०गाईस दाखविणें**-(माण.) बैलाकडून गाईला फळविणें. **बैलास कुकडें होणें**-(माण.) बैलाच्या नरड्यांत व जिभेवर कांटे येणें. **बैलास करंदफोड उठणें**-बैलाचें पोट दुखण्यानें पाठ तणाणणें. **-स मांजरी होणें**-(माण.) बैलाच्या गळ्याजवळ गांठी होणें. **म्ह०** बैल गाभणा तर म्हणे नववा महिना. (अतिशय बुशामत करणें याअर्थी वापरतात). सामाशब्द-**०का-क्या**-पु. १ बैल हांकणारा; गाडीवान. २ गुराखी; पशुपाल; गुरें राखणारा. **०खांदा-खांदे**-पुन. (बैलाचा खांदा. गाडीवाल्याच्या हातांतील कासरा जुंपलेल्या दोन्ही बैलांच्या खांद्यावरून तिरका व सारख्या अंतरावर असा असतो त्यावरून) तिरकी दिशा; एखाद्या वस्तूपासून, इसमापासून किंवा स्थळापासून सारख्या अंतरावर व तिरक्या रेषेमध्यें असलेल्या वस्तूंची किंवा दोन खेड्यांची स्थिति; अशा रीतीचें खेडें, वस्तु. **०खांद्या**-वि. बैलाच्या खांद्याप्रमाणें खांदे व मान असलेला; बारीक व लहान खांद्यांचा (रेडा). **०घाट**-पु. ज्यावरून ओझेंवाले बैल जाऊं-येऊं शकतात असा घाट, डोंगरांतील चढण; साधारण चढणीचा रस्ता. **०घाटा**-स्त्री (वाई) एक वनस्पति.

**बैलट**—न. बैल शब्दाचें तुच्छतादर्शक रूप. **०दाम**-पु. बैलाच्या विक्रीवरील कर. **०पाडा**-पु (समुच्चार्थी) बैल व पाडे. **०पाळणा**-पु. (ल.) त्रासदायक, कंटाळवाणें, कष्टाचें काम; दगदगीचें काम. (क्रि० घालणें; लावणें; मांडणें; करणें; पडणें; होणें). **०बांडा**-पु गाईबैल; गुरेंढोरें. 'त्या रस्त्यानें बैलबांडा वाहूं लागला. [बैल द्वि.] **०बेगारी**-पु सार्वजनिक कामाकरितां वेठीला धरलेले बैल. **०भिस्ती**-पु. बैलावरून पाणी वाहणारा पाणक्या; बैलाच्या पाठीवर माकण घालून पाणी भरणारा मनुष्य. **०मळणी**-स्त्री. धान्याच्या कणसांवरून बैल फिरवून केलेली मळणी. **०मार्ग-रस्ता-वाट**-स्त्रीपु. ओझ्याचे बैल जाण्यायेण्याजोगा रस्ता. **०मान्या**-पु. (वाणी, कु.) आकाशांतील गुरु ग्रह (कारण या ग्रहाला शुक्र समजून व हा उगवलेला पाहून पहाट झाली असें वाटून प्रवासास निघतात. पण पुष्कळ प्रवास केला तरी दिवस उगवत नाहीं आणि बैल वगैरेंना फार त्रास होतो यावरून). **०रहाट**-पु. बैलानें फिरविण्याचें रहाटगाडगें. **ठेचलेला बैल**-पु. बडविलेला बैल; भाद्या बैल; खच्ची केलेला बैल.

**बैल**—पु. (शेअर बाजार) वायद्यानें रोखा विकत घेतल्यानंतर त्याबद्दल किंमत न देतां नफ्यानें तोच रोखा पुन्हा विकूं इच्छिणारा इसम. -बा. गो काळेकृत व्यापारी उलाढाली. [इं. बुल]

**बैला, बैली**—पुस्त्री. १ डोकीवरून ओझें नेतांना तें समतोल राखण्याचें एक लांकडी साधन. एक लांब दांड्याच्या मध्यभागीं एक खुंटी आणि जाळी असते, जाळींत ओझें ठेवतात. हा दांडा हातांत धरतां येतो व त्यामुळें ओझें डोक्यावरून उचलतां येतें व जमिनीवरहि सहज उतरितां येतें. बेला पहा. २ सुताच्या ताण्यास पाजण करतेवेळीं सूत खळ लावणाऱ्याच्या छातीइतक्या उंचीवर लांबवर ताणले जाण्यास सुताच्या दोन्ही बाजूस दोन उभ्या करतात त्या चौकटी; खळ लावलेलीं ताण्याचीं सुतें ताणलेल्या स्थितींत ठेवण्याचे जे दोन घोडे ते प्रत्येक, हे घोडे दोन काठ्या गुणिलेचिन्हाच्या (×) आकारांत मध्यावर बांधून त्यांच्या वरच्या शेवटास एक आडवी काठी बांधून केलेले असतात ३ तिफणीची दोरी.

**बैसक-का-कार**—स्त्री. (काव्य) १ बैठक; बसकर; गालिचा, सतरंजी, चटई इ० बसण्याकरितां पसरलेली वस्तु, आसन 'वऱ्हाडां बैसका पाये प्रक्षाळूनी तळीया उचलुनी। पुस्पें फळें ताबाळें वीशेष।'—धवळे, उत्तरार्ध १५. २ बसण्याची तऱ्हा, पद्धत; बसणें. 'कांहीं पडती बहुत। परि बैसका न सोडी पर्वत।' ३ सत्कार; आदरानें बसवून घेणें; बसविणें. 'भीमकें केला बैसकार।'—कथा १८.१४८. [बैसणें] **बैसकासन**—न. घोड्यावरील बैठक; जीन. 'पृष्ठीं मिरवलीं बैसकासनें।' [बैसणें+आसन.] **बैसणा**—वि. बसणारा. 'विजाती देखोनि नयना। सोहंभावें भुंकेन जाणा। भजन थारोळा बैसणा। गुरुदारीं सुणा मी होईन।'—एभा १२.५८१. [बैसणें] **बैसणाइत**—पु (महानु.) अधिपति; राजा. 'तो राजूर रोहिणखेडिचा बैसणाइत।'—ऋ १३५ **बैसणी**—स्त्री बैठक; आसन. 'स्थावरां हि तळवटीं। बैसणी घे।'—माज्ञा १६ २६२. **बैसणें**—अक्रि. (काव्य) बसणें. (व्यवहारांत फक्त आज्ञार्थी एकवचनीं प्रयोग). 'कां तेजचि मूर्त बैसलें। आसनावरी।'—ज्ञा ६.२५८. —नअव. बैठक. आसन. 'व्यापकाचीं बैसणें। जिये स्थानीं।'—ऋ ७९. [सं. उपविश्] **बैसतखेवो**—क्रिवि. बसल्या बरोबर. 'आघवें अभ्यासुं सरे। बैसतखेवो।'—माज्ञा ६.१९१. **बैसीनणें**—अक्रि. (महानु) बसणें. 'पाहूनेरूं साऱ्हैनि श्री अनंतु। बैसीनिलें चित्रशाळे आतु।'—शिशु १६७.

**बेहबुदी**—स्त्री. सामान्यतः बेहबुदी पहा.

**बो**—अ. (ना.) बुवा. 'का बो?'=कां बुवा? [तुल० सं. भो]

**बोई**—स्त्री. १ (राजा कु.) लसणाची पाकळी; लिंबाची फोड. २ दह्याची कवडी.

**बोईरूप**—पु. (कु.) रांपणीच्या मधल्या पाट्याच्या मध्यभागीं बांधलेल्या दोरखंडाच्या शेवटास जो नारळ बांधतात तो. [इं. बॉय् रोप]

**बोउलां**—न. बोहलें. 'आतां बोउलां करावा।'—वसीस्व १०.८६.

**बोकचा-चें, बोकसा, बोगसा**—बोचका व बोचकें यांचीं वर्णविपर्यासानें झालेलीं रूपें. बोचका-कें पहा.

**बोकड**—पु. बकरा. [सं. बुक्क; दे. प्रा. बोक्कड] ०**खाडी**—स्त्री. अव्यवस्थित व बेशिस्त कारभार करणारी मंडळी, सभा अगर असा कारभार करण्याची जागा; धिंगामस्ती, टवाळकी इ० जेथें चालतात अशी जागा. ०**दाढी**—स्त्री. १ (बोकडाची दाढी) फार वाढलेली दाढी (निदार्थी). २ गालांवर नसून फक्त हनवटीवर येणारी दाढी. ०**दाढ्या**—वि. बोकडदाढी असलेला. ०**बीज**—पु. आपल्या भावांबहिणींना आईवरून शिव्या देणारा. **बोकडी**—स्त्री. (गो.) बकरी.

**बोकडणें**—अक्रि. १ (भाजी इ०ची) वाढ खूप होऊन फळें मात्र कमी धरणें. २ (मुलें) जोरानें वाढीस लागून सडपातळ व उंच बनणें.

**बोकडणें**—अक्रि. (ना.) ओरबाडणें.

**बोकड्यॉ**—पु. (गो.) एक वृक्षविशेष.

**बोकडे मारप**—क्रि. (गो.) थापा मारणें; बढाई मारणें.

**बोकणा-ना, बोकणी**—पुस्त्री १ बकाणा; तोंडात घातलेला पोहे, चुरमुरे इ० चा मोठा घास. (क्रि० मारणें; घालणें; भरणें; गिळणें; खाणें; उगळणें). 'अवघा बोकणा भरिला। पुढें कैसें।'—दा १८.५.९. २ तोंड किंवा भोंक बंद करण्यासाठीं घातलेली किंवा भरलेली कोणतीहि वस्तु; गुडदी. (क्रि० घालणें; भरणें; धरणें). [का. बॉक्कण] **बोकणावणें**—सक्रि. (कर.) अधाशीपणानें खाणें.

**बोकंवळ**—नपु. धिंगाणा; धुडगूस; धुमश्चक्री; खिदळणें; धांगडधिंगा. —वि. धष्टपुष्ट; अगडबंब; गलेलठ्ठ; राक्षसी (मनुष्य, पशु किंवा वस्तु).

**बोकमार**—न. मोठें पिस्तुल; मोठ्या तोंडाची लहान बंदूक. [पोर्तु.]

**बोकल**—न. (कों.) विहिरीचें बांधकाम व वरील कलाकुसरी.

**बोकलणें, बोक(का)ळणें**—अक्रि. १ इकडेतिकडे भटकणें; आनंदानें उड्या मारणें; धिंगामस्ती करणें; खिदळणें; आनंदाच्या ओरडण्यानें गोंगाट करणें; नाचणें; बागडणें (गुरें, मुलें इ०). २ विशिष्ट पदार्थ, तऱ्हा, धर्म, सोंवळें इ० चा प्रसार सपाटून होणें; प्रस्थ माजणें, वाढणें.

**बोकलणें, बोक(का)ळणें**—अक्रि (रागाच्या बोलण्यांत) सपाटून खाणें, खूप खाणें; ठासून खाणें बोकांदणें पहा. [ध्व. बकबक ?]

**बोकला**—पु. (गो) एक जातीचा लहान मासा.

**बोकशी**—स्त्री. (कों) नदींतील मासे धरण्यासाठीं केलेली एक प्रकारची टोपली.

**बोकसा-सें**—पुन. बोचकें; गाठोडें.

**बोक(कु)ळ**—स्त्री. बकुळीचें झाड. —न. बकुळीचें फूल.

**बोका**—पु. १ मांजरांतील नर. २ (ल.) गब्हलठ्ठ, खाऊन खाऊन माजलेला, धिप्पाड मनुष्य किंवा पशु; (कोणताहि) राक्षसी पदार्थ. म्ह० शिक्याचें तुटलें, बोक्याचें पटलें किंवा शिंकें तुटलें आणि बोक्याचें फावलें=शिंकें तुटलें असतां दूधदुभतें बोक्याला ज्याप्रमाणें आयतें खाण्यास मिळतें त्याप्रमाणें एखाद्याचा अकल्पित रीतीनें आयता फायदा होणें. **बोकेझुंज-झुंज**—स्त्रीन. मांजरांचें भांडण, झुंज, झोंबी. **बोकेसंन्यास**—पु. संन्यासाचें ढोंग: खोटा संन्यास; लोकांना फसविण्याकरतां घेतलेला खोटा संन्यास. **बोकेसंन्यासी**—पु दांभिक संन्यासी; ढोंगी साधु. बोका ज्याप्रमाणें मोठा साधुत्वाचा डौल घालून मुकाट्यानें बसतो पण उंदीर नजरेस पडतांच त्याचें साधुत्व सुटपटून तो त्याच्यावर

झड१ घालतो त्याप्रमाणें लाभाची संधि येतांच आ लें खरें स्वरूप प्रगट करणारा; संभावितपणानें आपले कपटविचार झाकणारा.

**बोका**—पु मूत्रपिंड. [सं. वृक्क]

**बोका**—पु छाती, ऊर. **बोके(का)फोड**-स्त्री. १ कांहींहि फायदा नसता जोरानें ओरडणें; रिकामी उरस्फोड करणें. २ (ल.) निष्फळ शिकविणें; निष्फळ प्रयत्न [बोका+फोडणें]

**बोका(कू)ड**—न (कु) बोकड; बकरा.

**बोकांडी-डें**—स्त्रीन. मानगुटी; मान (वाघ, शत्रु, पिशाच्च इ०संबधींचा उपद्रव असतां धरणें, बसणें इ० क्रियापदांशीं जोडून प्रयोग). 'वाघानें बोकांडी-धरली-फोडली-सोडली' 'हा त्याचे बोकांडीं बसला.' [बोका ? मांजरें आपलीं पिलें नेताना त्यांच्या मानगुटी धरून उचलून नेतात त्यावरून ?] ०**धरणें**-एखाद्याला दु:खदायक कचाटींत धरणें; एखाद्याचे हात जखडून टाकणें. त्याला स्वेच्छेनें वागूं न देणें. **बोकांडीस बसणें**-१ मानगुटीस बसणें. २ पिच्छा पुरविणें; एखाद्यानें कांहींएक गोष्ट केल्याशिवाय त्याला न सोडणें

**बोकाणा, बोकांदा**—पु पोहे इ०चा तोंड भरून घेतलेला घास, मोठा घास; बोकणा (क्रि० मारणें) [का. बोक्कण]

**बोकांदणें**-उक्रि १ (गो.) बोकणे मारणें; मोटमोटे घास घेणें; अधाशीपणानें खाणें २ (रागाच्या भरांत) दडपून खाणें; **बोकलणें**; ठांसुन भरणें **बोकांदळ**-बोकंदळ पहा

**बोकू, बोतू**—पु (गो) (बालभाषा) शेळीचें पोर, करडूं. [बोका]

**बोकें**—न. (गो) बगळा. [सं बक]

**बोकेडा**—पु एक झाड.

**बोकेर**—न. (को.) एका जातीचा मासा.

**बोक्वा**—पु बोचकें, गाटोडें 'बापूनें खुर्दखताचा बोक्वा आपल्या घरास नेला.' -रा २०.१३८ [तुल० बुक्चा]

**बो(बों)खा**—पु शेंडा; डिगी; तुरा, कोंब; अंकूर [सं अभ्यंकुर: ?] **बोंखडणें**-अक्रि. अतिशय खतामुळें झाड व पानें खुरटून जाणें, वाढ न होणें [बोंखा] **बोख(खा)डणें**-सक्रि. झाडाचीं पानें व शेंडे तोडणें, ओरबाडणें; नखानीं किंवा इतर साधनांनीं तोडून टाकणें. **बोंखरी, बोंखी**-स्त्री (को) लहान कोंब; नवा अकुर; कोंवळी डिरी. [बोखा याचें लघुत्वदर्शक रूप]

**बोखा(का)डा, बोखे(के)डा**—पु एक झाड; बोकाडा हीं झाडें बरीच मोटीं व खातेरीच्या झाडाप्रमाणें असतात व फळेंहि तशींच असतात. हीं कोंकणांत फार आहेत. याला काळा उंबर भुईदोडी, भुईउंबर, गांडयाउंबर अशीहि नांवें आहेत. -वगु ४.११०

**बोखार-रें**—पोकळी; घळ, खोदरा [सं. पुष्कर=आकाश]

**बोखारणें**—सक्रि १ (महानु) झांकणें. 'बोडुनि बोलें चांबडें। बोखरिजे चहुंकडे।' -भाए ४०३. २ -अक्रि. (व) रागावणें; चिडणें.

**बोखारा**—पु. १ डोक्यावरून व तोंडावरून घेतां येईल अशा तऱ्हेनें घडी घातलेलें वस्त्र (क्रि० घेणें; ओढणें). 'पासोडीचा-शेल्याचा-शालीचा-लुगडयाचा-वस्त्राचा-बोखारा.' २ (सामान्यतः बुरखा) आच्छादनाचें कापड; आवरणाचें वस्त्र (हत्ती, गाडी इ० वर घालण्याचें). ३ खोलींतील एका कोपऱ्यांत दोन भिंती घालून त्यास दार लावून बनविलेलें कपाट, फडताळ.

**बोंगडा**—पु. (राजा.) पूर्णपणें न उमललेली फुलाची कळी; फुगीर झालेली लवकरच उमलणारी कळी.

**बोग(गा)ण-णी-णें, बोघ(घा)णी-णें**—स्त्रीन. रुंद तोंडाचें भांडें; बगुणी; पातेली-लें. (तंजावरकडे लग्नात वधूमाय वधूच्या हातीं बोगण देऊन बहुगुणी ऐस असा आशीर्वाद देते). [सं. बहुगुणी]

**बोगदा**—पु. १ डोंगराच्या पोटांतून आरपार नेलेला रस्ता. २ भिंतींतील खिंडार; भगदाड. ३ वैयासाठीं केलेलें तळघर. ४ भिंत, जमीन यातील भुयार, तळघर (दारू इ०जिन्नस ठेवण्याचें). [फा. बुघाझ्; तुर्की बोघोझ्=चिंचोळी समुद्रपट्टी; पोर्तु. आबोगदा]

**बोंगर**—वि (व) अनभिज्ञ; अडाणी.

**बोगा**—पु. (कु) उंचवट पापुद्र्याखालीं असणारें भोंक.

**बोंगा**—पु. १ अर्धवट फुललेली कळी; बोंगडा; फुगीर कळा. २ नाळ. गर्भनाडी (फुगलेली, पुढें आलेली) ३ पोटाचा फुगीर भाग. पोटाचें डेरकें, गर्भारपणांतील पोटाचा फुगीरपणा; गर्भिणीचें मोठें व अव्यवस्थित पोट. (क्रि० वाढणें; फुगणें) ४ धोतराच्या अगर लुगडयाच्या निऱ्याचा फुगीरपणा. ५ मोठें, बेढब पागोटें. ६ कापड विणताना शेवटीं राहिलेले किंवा ताण्यांतील खराब झालेले सुताचे तुकडे; गुंता. **म्ह०** अंगापेक्षां बोंगा मोटा. **बोंगा, बोंगाडा**-वि १ धष्टपुष्ट; मोटा, स्थूल; गलेलठ्ठ. २ मोठा; बोजड; स्थूल; अवजड (अंगरखा, वस्तु) **बोंगाडया, बोंग्या**-वि. (व) मदबुद्धि, वेडसर, मठ्ठ; मूर्ख, बावळट.

**बोगार**—पु. कासारांतील एक पोटजात व तींतील इसम. [का.]

**बोगारणी**—स्त्री. फोडणी. [प्रा.]

**बोंगाळा, बोगाळणें**—बोकाणा, बोकांदणें पहा.

**बोगोटी-टें**—स्त्रीन. बगोटी व बगोटें इ० पहा.

**बोगोणी, बोघोणी, बोगोणें, बोघोणें**—स्त्रीन. बहुगुणी, बहुगुणें, बोगण पहा.

**बोंच**—न. १ कांटा इ० बोंचल्यामुळें पडलेलें भोंक किंवा झालेली इजा, जखम. २ -स्त्री. (राजा.) काटयाचें अणकुचीदार

टोंक. ३ (कु.) पक्ष्याची चोंच. [बोंचणें] **बोचकडणें, बोचकणें, बोचकरणें, बोचकुरणें, बोचकाडणें, बोचकारणें**-सक्रि. १ नखानें, पंजानें, ओरबाडणें; ओरखाडणें; फाडणें. २ धरणें; पकडणें. ३ पंजात धरून ओरबाडणें; (विशेषतः) हत्यारानें खरडून टाकणें. **बोचकरणें-कारणें-कुरणें**-(विशेषतः राजापुराकडे) गवत, रोपटी, मुळया इ० नखानीं ओरबाडणें; पंजांत धरून एकदम उपटणें; तोडणें. **बोचकडा, बोचकरा, बोचकाडा-रा, बोचकुरा**-पु. नखानें, पजानें काढलेला ओरखाडा, ओरबाडा; पांची बोटांनीं एकदम घेतलेला बिचकुरा. (क्रि० घेणें; काढणें; ओढणें) **बोचकणें**-सक्रि. १ टोंचणें; बोचणें; खुपसणें. २ बोंचविणें; खुपसविणें; कोणताहि अणुकुचीदार पदार्थ भोंसकणें. [बोचणें] **बोचका**-पु हातानें, तोंडानें काढलेला लचका, तुकडा उदा० मासाचा इ० (क्रि० घेणें; तोडणें; काढणें). **बोचलणें**-सक्रि. १ हलकें टोचणें; बोचणें; बोचावणें; हलूच भोंक पाडणें. २ चोंच मारणें; टोकरणें.

**बोचक**—वि. बडबडया; वाचाळ, फार बोलका. [सं वाचाट]

**बोचका-कें**—पुन. गाठोडें; चापचोप घडया न घालता बांधलेलें गाठोडें. [तुर्की बुक्चा] म्ह० बोचकें कीं डोचकें. **बोचक्यांतला उंदीर**-वि. (ल.) एखाद्या कामाची, कारभाराची बाहेरील व अंतस्थ सर्व परिस्थिति माहीत असलेला; गुप्त व बारीक सारीक गोष्टी सुद्धा जाणणारा.

**बोचकूल**—न. (गो) पंजा. [बचक]

**बोंचखिड, बोंचरखंड-डा-डी, बोंचरखिंड(खेंड)-डा-डी**—स्त्री. बोथरखिड; दातातील खिड; दोन दाताच्या ओळीमधील फट. 'दंतपाटी उखळली। तेणें बोंचरखिंडी पाडली।' -दा ३.२.३९. **बोचखिडया, बोंचरखिडया**-वि. दाताच्या ओळींत फट, खिड असलेला. [का बोच्चु=दंतविहीन माणूस]

**बो(बों)चणी**—स्त्री. १ खुपसणें; टोंचणें; घुसविणें २ टोंचून बोलणें; जाचणी; मनाला लागेल असें बोलणें.

**बोचणें**—उक्रि. १ (कों.) टोंचणें, भोंक पाडणें; इजा करणें; आंत घुसणें. २ (एखादें टोंकदार हत्यार) खुपसणें; भोसकणें; ३ (ल.) टोमणा मारणें; टोमण्याचें बोलणें मनाला लागणें; मनाला लागेल असें बोलणें; शब्दप्रहार करणें [सं व्रूस्=हिंसा करणें; तुल० इं. ब्रुझ्]

**बोचर**—न. १ (व.) धार बसलेलें हत्यार. २ दात पडलेला मनुष्य.

**बोचरडा, बोचरा, बोथरा-बोंचिरें**—वि (सर्व किंवा कांहीं) दांत पडलेला; दांत नसलेला; दोन दांतांमध्यें फट राहिली आहे असा. 'पाहे पां लोहाचे चणे। जें बोचरिया पडती खाणें। तें पोटभरणें कीं प्राणें। शुद्धी होय।' -ज्ञा १२.७०.

**बोंचरडें-बोंचाडीं**—न. (कु.) एका पक्ष्याचें नाव.

**बोंचरणें**—सक्रि. १ नखानीं, पंजांनीं धरून फाडणें, बोचकारणें २ ओरखडणें (कु) झाडाचे सर्व शेंडे तोडणें; झाडाचे बोंखे ओरबाडणें; पाला, डिऱ्या इ० खुडून झाड बोडकें करणें.

**बो(बों)चा**—पु. (अशिष्ट) ढुंगण, गुदद्वार, अपानद्वार; गाड. [?] **बोचाळू**-पु (अश्लील) गांडभराऊ; गुदमैथुनार्थ बाळगलेला पोऱ्या; बोचू; लवंडा. **बोचू**-पु १ बोचाळू, हिजडा. २ -वि. मूर्ख; वेडसर; नादान; घाणेरडा; म्रःकथित् (कारभार, काम, कारखाना, धंदा, उदीम इ०)

**बोचा**—पु. (व) पोचा; भाडें पडल्यामुळें किंवा हपटल्यामुळें भांड्याचा आंत गेलेला भाग

**बोचांडणें**—अक्रि (व) तृप्ति होणें, वासना शमणें; इच्छा तृप्त होणें. [सं. वाछा ?]

**बोंचावचें**—क्रि. (गो.) कुदळीनें जमीन टोंचणें, वरवर खणणें; खणल्यासारखी करणें

**बोंचावणी**—स्त्री. (गो) जमीन वरवर खणण्याची क्रिया.

**बोचेबुलबुल**—पु बुलबुलबोचा पहा.

**बोचेरा**—वि. तीक्ष्ण अग्राचा, अणकुचीदार, टोंकदार; बोंचण्यासारखें टोंक असलेला.

**बोचो**—पु १ (गो.) बोंचडी; पशूचें निमुळतें तोंड. २ हनुवटी. ०मडुप-(गो) मुरका मारणें.

**बोज**—पु. १ वजन; महत्त्व; योग्यता; किंमत; मोठेपणा. 'हातीं घेतलेल्या कामाचा बोज त्यास चांगला कळतो.' -नि ९. २ मान; प्रतिष्ठा; लौकिक, कीर्ति; वाखाणणी; पत, बूज पहा. (काम किंवा उद्योगधंद्यांतील) 'माझी कोण बोज जाला हा शेवट। बेखोनिया वाट आणिका लागे।' -तुगा १९७०. [हिं; म. बूज]

**बोजड**—वि. १ मोठें; अवजड; न पेलण्यासारखें (शरीर, अवयव) २ सैल व मोठें; आटोपशीर नसलेलें (ओझें, गांठोडें). ३ ओबडधोबड; चांगलें, कलाकुसरीचें नसलेलें (खोदकाम इ०) ४ सामान्यतः अवजड; बेताबाहेरचें; अव्यवस्थित; प्रमाणांत नसलेलें; आटोपशीर नसलेलें. ५ फार जाडेंभरडें; अतिशय जाड (कापड, साल, कातडी). **बोजवारा**-पु. दुर्दशा; गोंधळ; फजीती; वजन नाहींसें होणें.

**बोजवार**—पु. भाजींत, लोणच्यांत घालण्याचा हिंग, जिरें, मिरीं, हळद इ० घालून केलेला मसाला. [सं. वेसवार]

**बोजा-झा**—पु १ ओझें; वजन. 'मग काढिला बोजा। श्रोणिताचा।' -भाए ७६१. २ कर्ज; गहाणवट; हक्कसंबंध. 'इतर मिळकतीवर त्यांना बोजा उत्पन्न करावा लागला. -के २.८.३०. [हिं. का. ओज्जे]

**बोजा-झा**—पु. मद्य; एक अमली, मादक पदार्थ. 'कीं बोझा काढिला जैसा। आनंदरतीचा।' -भाए ७९७. [फा. बोजाह्]

**बोजार**—न. (राजा.) आंब्याचें मोहरीचें लोणचें.

**बोट**—स्त्री. १ वाफेच्या किंवा तेलाच्या यंत्रानें चालणारी मोठी होडी. २ लहान गलबत; नौका. [इं.] **०लागणें**-बोटीच्या प्रवासामुळें भोंवळ इ० येऊन ओकारी वगैरे येणें; त्रास होणें.

**बोट**—न. १ हाताची किंवा पायाची अंगुलि किंवा आंगठा. २ बोटाच्या रुंदी, जाडी किंवा लांबीइतकें परिमाण. ३ बोटभर, अगदीं थोडें, बोटाला चिकटेल इतकें परिमाण. उदा० मधाचें बोट; तुपाचें बोट. ४ (ल.) डाग; काळिमा; अपकीर्ति; बोटाचा ठिपका उठेल एवढा डाग. उदा० गालबोट. 'रूपसा उदयलें कुष्ट। संभाविता कुटीचें बोट। तया लाजा प्राणसकट। होय जैसें।' -ज्ञा १६.१७८. [का. बोट्टु; सं. पुट?] **म्ह०** पांच बोटें कोठें सारखीं असतात काय? किंवा पांचीं बोटें सारखीं नसतात=एक वस्तु दुसरीसारखी कधीं नसते. (वाप्र.) **०करणें-दाखविणें**-बोटानें एखाद्या वस्तूचा निर्देशकरणें; सुचविणें. **(०एखाद्याकडे) दाखविणें**-भलत्यालाच दोषी ठरविणें. **०शिरकणें**-एखाद्या कामात प्रवेश मिळणें; चंचुप्रवेश होणें (पुढील मोठ्या फायद्याच्या दृष्टीनें). **०लावल्यानें पोट येणें**-(व.) (ल.) थोडक्या बोलण्याचा राग येणें. **बोटावर नाचविणें**-आपणाला पाहिजे त्याप्रमाणें एखाद्याकडून सर्व गोष्टी करून घेणें; एखाद्यास पूर्णपणें ताब्यांत ठेवणें; हवें तसें खेळविणें. **बोटें मोडणें**-१ बोटाचीं पेरें किंवा सांधे मोडून त्याचा आवाज काढणें, करणें. २ (ल.) जागच्याजागीं चरफडणें; निभर्त्सना करणें; शापणें; ठपका ठेवणें. 'विधिवरि बोटें मोडुनि कोपें खातात दांत बाहेर।' -मोस्त्री ४.२६. **दोन बोटें स्वर्ग उरणें**-अभिमानानें फुगून जाणें; गर्वानें ताठून जाणें; अतिशय श्रीमंत असणें. **त्याचीं बोटें त्याच्याच डोळ्यांत घालणें**-त्याच्याच सांपळ्यात त्याला पकडणें; त्याच्याच युक्तीनें त्याला धरणें. **या बोटाची थुंकी त्या बोटावर करणें**-लटपटपंचीनें एखाद्या वस्तूचें स्वरूप निराळें भासविणें; फसविणें; बोलण्यात किंवा कृतींत मेळ नसणें. (मुलें पालथा हात करून मधल्या बोटाला थुकी लावतात व मग अलीकडचें एक बोट एकदां व पलीकडचें एक बोट एकदां अशीं बोटें त्या मधल्या थुंकी लावलेल्या बोटास जुळवून दाखवितात. या योगानें जी थुंकी एकदां अलीकडील बोटावर दिसते तीच दुसऱ्यांदां पलीकडील बोटावर दिसल्याचा भास होतो यावरून). सामाशब्द- **०का**-वि. १ बोथट; बुटका; ठेंगणा. २ बोट्क; आंखुड व सरळ चिंच येणारें (झाड). **०काम**-न. घरांतील किंवा संसाराचें अगदीं बारीकसें काम, उद्योग. **०खत**-न. हिशोबाच्या निरनिराळ्या बाबींच किंवा खात्यांचें केलेलें पत्रक किंवा टांचण; या बाबी लिहिण्याकरतां आंखलेला कागद. **०घेवडा-डी**-पुस्त्री. एक प्रकारचा घेवडा आणि त्याचा वेल. **०चेपा**-वि. १ बोटानें दबला किंवा चेपला जाणारा; चेपला जाईल इतका शिजलेला किंवा पिकलेला (भात, फळ, आंबा इ०). २ (ल.) थोड्याशा प्रयत्नानें साध्य होण्याच्या स्थितीस आलेलें (काम). [बोट+चेपणें] **०धरणी माप**-न. धान्य मोजतांना मापाच्या वर डाव्या हाताचें बोट धरून भरलेलें माप. अशा रीतीनें अधिक माप भरून घेणें हा एक हक्क असे; वरीलप्रमाणेंच पण बोटाऐवजीं आडवा हात धरणें. या दोन्ही मापांच्या उलट रास्ती माप. **०धारी**-वि. बोटाच्या रुंदीइतका रुंद व ज्यांत कांहीं नक्षी नाहीं असा काठ किंवा किनार असलेलें (धोतर). 'कासे कसिला पीतांबर। बोटधारी।' -कथा २.११.९०. **बोटवा**-पु. १ गव्हाच्या पिठाचा तांदुळाच्या आकाराचा खिरीकरितां केलेला गव्हला. २ सुमारें करंगळीच्या टोंकाइतकें लांब व रुंद असें कपाळास लावलेलें कुंकूं. **बोटवात**-स्त्री. बोटांवर पीळ देऊन एक प्रकारची वळलेली, देवापुढें जाळण्याची कापसाची वात. **बोट(टा)ळ(ल)णें**-उक्रि. फळें इ० बोटांनीं दाबून टणक किंवा मऊ आहेत हें पाहणें; चिवडणें; दाबलीं गेल्यानें बिघडणें; चिवडल्यानें वाईट होणें. **बोटावरील जोर**-पु. फक्त बोटें टेंकून काढण्याचा दंडाचा एक प्रकार. **बोटांचे ठसे**-पुअव वहिमी गुन्हेगारांच्या हातांच्या बोटांचे छाप घेण्याची सरकारी रीत यांवरून गुन्हेगारांचा शोध लावता येतो. **बोटा एवढें पोर**-न अगदीं लहान वयाचें मूल. **बोटी**-स्त्री. १ बोटवे किंवा शेवया करण्याकरतां गव्हाच्या पिठाची केलेली गोळी, लाटी. २ सुत काढण्यासाठीं घेतलेली कापसाची लडी. ३ सुकवून खारवलेला मासा. ४ (कोंबड्याचें इ०) शिजविलेलें मांस. [हिं.; फा] **बोट्क**-न. १ आंखूड व सरळ चिंच; कोंगाळेंच्या उलट. २ एक चिंचोका असलेला एकच पेऱ्याचा चिंचेचा तुकडा. ३ थोंट्क; बुंठण; थोंटण; ठुंठण (वात, दोरी इ०चें). [का. बोट्ग]

**बोटक**—पु. एक मुलींचा खेळ. -मराठी खेळांचें पुस्तक पृ ३३४.

**बोटाळणी**—स्त्री खारवट जमिनींतील बेणणी. -कृषि ७३१.

**बोटी**—स्त्रीअव. (छाप.) छापील कागद दाबांत ठेवतांना त्यास मृदुता येण्यासाठीं त्यांत कांहीं जाड गुळगुळीत असे कोरे कागद मधून मधून घालतात त्या. [?]

**बोंठण, बोंठूक**—न बुंठण; थोंट्क; थोंटण; खुंटारा; खणपूस. [का. बोड्ग] **बोंठा**-वि. थोंट्क झालेला; थोंटा (बुंधा).

**बोड, बोडसें**—न (कुत्सितार्थी) डोकें; टकलें; टाळकें; डोचकें; डोसकें; टकुरें, बोडकें. [सं. बुध्न; का. बोट्ट; तलगु. बोळी, बोडी=हजामत केलेलें डोकें] **बोड करणें**-१ हजामत करणें. २ खोड मोडणें; नरम करणें. **बोडका**-वि. १ डोक्यास कांहीं एक

न घातलेला; उघड्या डोक्याचा. २ डोकीवरील केंस काढलेला. 'डोई बोडका शिखा नष्ट।'—नव १८.३३. ३ ज्या योगानें एखाद्या पदार्थाच्या शिरोभागीं शोभा येते तें नसलेला; शेंड्यावर, शिखरावर, डोक्यावर कांहीं नसलेला. उदा० शेंड्यावांचून झाड; शिंगावांचून गाय; बोटाशिवाय हात, पाय; डोक्यावर केंस नसलेली स्त्री; झाडाशिवाय टेकडी; छप्पर नसलेलें घर इ०; त्याप्रमाणें ज्याची बायको मेली आहे असा; विधुर. [सं. बुध्न; का. बोड] म्ह० हातीं धरल्यास रोडका, शेंडी धरल्यास बोडका. ०कांदा–पु. पाती नसलेला कांदा. याच्या उलट पातीचा कांदा. ०देवी–स्त्री. विधवा स्त्री. ०निवडुंग–पु. निवडुंगाच्या अनेक जातींपैकीं एक जात. बोडकाविणें–सक्रि. १ झाड इ० च्या फांद्या तोडून नुसता खुंट उभा ठेवणें; झाड भुंडें करणें; छाटणें. २ सर्वस्वी लुटणें; नागविणें. ३ हजामत करणें. बोडकी–स्त्री. केशवपन केलेली स्त्री; विधवा स्त्री. म्ह० बोडकी आरशांत पाहे, सहदेव म्हणे कांहीं तरी आहे. बोडकूल, बोडकें–न. १ (निंदार्थी) डोचकें. २ बोडकी. बोडकें भात, बोडका–नपु. एक प्रकारचें भात; कोथिंबिरें भात बोडणें–सक्रि. १ (निंदेनें) हजामत करणें; मुंडणें; वपन करणें. २ शेंडा छाटणें; भुंडा करणें. ३ बुचाडणें; नागविणें; लुटणें. ४ खरडपट्टी काढणें; भोसडणें; फजीती करणें. 'सोंगाच्या नरकाडी। तुका बोडोनिया सोडी।'—तुगा२८१९. [का. बोडिसु] बोडणी–स्त्री. १ हजामत २ लूट; नागवण. ३ खरडपट्टी; ताशेरा. 'झाली बोडणी विटंबना।'—तुगा ७३०. बोडंती–स्त्री. बोडणी. बोडभद्र–न. (गो.) भद्राकरण; हजामत. बोडविलुळणी–स्त्री. बोडणी. बोडसा–सें–पुन (निंदार्थी) डोचकें.

बोंड—पु. १ कापूस, अफू इ० झाडाचें फळ; बीजकोश; अशा आकाराच्या निरनिराळ्या वस्तू. २ बिब्बा, काजू इ०च्या मागील फळ, अवयव. ३ वरील आकाराचें हरभरा इ० च्या पिठाचें तळून खाण्यासाठीं केलेलें खाद्य; भजें. ४ पळीचें टवळें; ठाणवईचें वाडें. ५ केळफूल. ६ मक्याचें कणीस. ७ शिस्नाची किंवा स्तनाची बोंडी, अग्र; टोंक. ८ (कों.) लहान नारळ. ९ सुरुंगाच्या पहारीस भोक पाडण्यासाठीं जें पोलाद भरतात तें. १० (नाविक कों.) जहाजाच्या शिडाचें आखूड व जाडें टोंक. याच्या उलट पात; परभाणाचा खालचा भाग. ११ कर्णफुलाप्रमाणें कानांत घालण्याचा बायकांचा दागिना. [का. बोंडु] बोंडें येचणें–(ल.) (अपराधाची आणीव असल्यानें) तोतरें बोलणें; बोलतांना अडखळणें. बोंडगहूं–पु खपल्या गहूं. ०गा–गी–स्त्री. केतकीचें झाड. ०बोळी–स्त्री. एक वनस्पति. ०निवडुंग–पुन. फड्यानिवडुंग; बोंडें येणारा निवडुंग. ०फळ–पु. १ डावांत मारलेली किंवा मेलेली सोंगटी २ (निंदेनें) नारळ, ज्या ठिकाणीं कांहीं तरी मूल्यवान वस्तु द्यावयाची त्या ऐवजीं दिलेला नारळ. 'तुझ्या हातास काय बोंडफळ लागावयाचें आहे!' ०बाहुलें–न. (लाडिकपणें) लहान मूल. ०बाळी–स्त्री. कानांत घालण्याचा स्त्रियांचा दागिना. ०यारी, बोंडयारी–स्त्री. (नाविक) शिडाच्या कोपऱ्यांना ते ताणण्याकरितां बांधलेली दोरी; परभाणाचें बोंड घोंसाखालीं दबण्यासाठीं बोंडास अडकविलेली यारी. ०लें–न. लहान मुलास दूध पाजण्याचें गोकर्णासारखें पात्र. ०वेल–स्त्री. (बाई) हरळीसारखें तांबडें गवत. ०शी–स्त्री. बोंडी; टोंक. बोंडा, बोंडारा–पु. (कों.) कोंवळा नारळ; लहान नारळ. (कु) कोंवळा गळलेला, खराब झालेला नारळ. बोंडू–न. (कों) काजूचें रसभरित फळ. हें बीच्या मागें असतें. बोंडेंखाऊ–वि. नामर्द; फटलंडी; भागूबाई; भित्रा.

बोडकी—स्त्री. १ (व.) करडई. २ (कों) घायपातासारखें एक झाड

बोडकी—स्त्री. (व.) पुढें टोंक नसलेला जोडा; हा कुणब्यांच्या बायका घालतात.

बोडण—स्त्री म्हसरांनीं लोळण्याचें चिखलाचें डबकें.

बोडण—न. महालक्ष्मीच्या किंवा आराध्यदेवतेच्या नांवानें पांच सुवासिनी व एक कुमारिका यांनीं परातींत दूध, दहीं, वडे, भात, पोळ्या, मध इ० एकत्र कालविण्याचा एक नैमित्तिक विधि. बडण पहा (क्रि० भरणें). [सं. मुट्=चुरडणें, मर्दन करणें; मोटन]

बोडद—न. १ (नाविक) जहाजाची किंवा बोटीची बाजू; अर्धें अंग उदा० उजवें बोडद; डावें बोडद. २ (ल.) कज्जा–तंटा यांतील प्रत्येक पक्ष. [इं. बोर्ड]

बोडखा, बोडखाविणें, बोडखी—बोडका इ० पहा.

बोडसा–सें—पुन. लांकडें तोडण्याची मोठी कोयती.

बोडा—पु. (अशिष्ट) पुरुषाचें जननेंद्रिय; शिश्न. म्ह० माळाचा कडा, गरीबाचा बोडा. बोडेफकीर–पु. (निंदेनें) अगदीं निर्धन माणूस; घरदार नसलेला, सडेसोट, फटिंग पुरुष.

बोंडा—पु. बुडी; डुबकी (क्रि० मारणें; देणें).

बोडी—स्त्री. (महानु.) वीस कवड्यांचें एक नाणें. 'भाळों· आळिभा चिंतामणी। बोडिअे वचकूं।'—शिशु ३३०.

बोडी—स्त्री (महानु.) डबकें; लहान तळें. 'तुम्हा बोडी गंगासमानचि होआवी।'—सूत्रपाठ ११५.

बोंडी, बोंडशी–सी, बोंडूस–क—१ नाक, वान, बोट, शिश्न इ० चें वाटोळें टोंक किंवा अग्र. २ अशा रीतीच्या मोदक इ० पदार्थाचें टोंक; अग्रभाग. ३ मागच्या पान्या लहनसहन पुढें लहान राहिलेलें केळफूल; केळफुलांतील अगदीं आंतील भाग ४ कोणत्याहि लांबट पदार्थाचें वाटोळें टोंक. ५ (गो.) नारळीची पोय. ६ (व.) तिळाचे दाणे ज्यांत असतात तें बोंड. [बोंड] बोंडूक–न. लहान बोंड, लहान बोंडी.

**बोडू**—पु. काजूचें रसभरित फळ; याला पुढीलभागीं बी असते. बोंड अर्थ २ पहा

**बोडेर**—पु १ (गो.) पिवळ्या चोचीचा पोपट; याला कंठ (गळ्याभोंवतालची काळी रेघ) नसतो. २ (ल.) व्यवहारशून्य अगर निर्बुद्ध मनुष्य; रिकामा मनुष्य

**बोड्या-ड्यो-ड्या**—पु. मुलगा.

**बोण**—पु. १ गव्हाची भिजलेली कणीक 'लावावें मांद ळयासि। कां बोण।' -मोसभा ४ ११७. २ (ना.) खरकटें वगैरे रेचा ढीग; उकिरडा. [बोनें]

**बोणक**—स्त्री. (गो) केतकी.

**बोणार**—पु (गो.) तांबट

**बोणी**—स्त्री (गो.) भवानी; दुकान उघडल्यानंतरची पहिली विक्री. **०करप**-(गो.) (ल) सुरुवात, प्रारंभ करणें.

**बोणें**—न. भोजन; प्रसाद; पक्वान्न; (सामान्यतः) बोनें; नैवेद्य; बली. 'यालागीं ग्रंथसुवर्णाच्या तार्टी। रसाचीं बोणें वाटी।' -ज्ञाप्र ५३. [बोनें]

**बोंथ**—स्त्री १ बुरखा; सर्व अंगाभोंवतीं गुंडाळलेलें कापड अगर वस्त्र; तोंडावरचा पदर. (क्रि० घेणें; मारणें) २ चित्रकाराचें पीस, कुंचली ३ (गो) भोंकांत बसविण्याचा बोळा, गुडदी ४ (गो) वस्त्राची लहान चोमडी, गुंडाळी. ५ (गो) बारीक कांदा. [मं बुंथी] **बोंथारणें**-अक्रि. बुरखा घेणें; बोंथानें आच्छादिलें जाणें; झाकणें

**बोंथट-रा, बोथा, बोंथा**—वि. धार नसलेला; धार गेलेला; धार बसलेला [बोंथा] **बोंथणें, बोंथटणें**-अक्रि. बोंथट होणें; धार बसणें. २ कमी होणें; शिथिल होणें; तीक्ष्णता कमी होणें. 'सेवाधर्मामुळें त्याच्या स्वाभिमानादि मनोवृत्ति थोड्याबहुत तरी बोथटल्या असतात.' -टि २ ५८२. **बोथविणें**-सक्रि. धार घालविणें.

**बोथरखिंड-बोथरखेंडें**—स्त्रीन दांतांच्या ओळींत पड लेली खिंड अगर फट; दांताच्या रांगेंतील मधलेच दांत पडल्यानें झालेली खिंड [बोंथरा+खिंड] **बोथरखंड-डा-डो, बोंथर-खिंड्या, बोंथखिंड्या, बोंथरा-ऱ्या**-वि. दांताच्या ओळीं-मध्यें फट, खिंड पडलेला; दांतपडका, बोंचरा.

**बोथरणें**—सक्रि १ झोपेंत बरळणें. 'नको बोथरों या भया-चेनि नावें।' -मुराम युद्ध ५ १५८. २ गर्जणें.

**बोंथरा, बोंथारा**—पु (कों.) बोंथ १ अर्थ पहा. डगला किंवा कफनीप्रमाणें उपयोग करावयाचें वस्त्र. [बोंथ]

**बोथरी**—स्त्री. (ना) गोधडी

**बोथलें**—न. सासरीं जाण्यास निघालेल्या मुलीबरोबर दिलेल्या वस्तूंचें बोचकें.

**बोथाटी**—स्त्री. काठीच्या दोन्ही टोकांस चिंध्यांचे, लांक-डाचे गोळे बांधून ती फिरविण्याचा खेळ; अशी गोळे बसविलेली काठी. **०वरदार**-पु. बोथाटी फिरविणारा मनुष्य; मिरवणुकीमध्यें बोथाटी घेऊन जाणारा इसम.

**बोंथी**—स्त्री १ टोंक; अणकुची. २ चितार्‍याची कुंचली; पीस. ३ (कु) गुडदी; भांडें, धुण्याची दगडी कुंडी इ०स भोंक पडलें असता त्यांत घातलेला बोळा; चोंथा. ४ काथ्याचें केलेलें पायपुसणें; तव्यास तेल लावण्यासाठीं घेतलेली नारळाची शेंडी; पुसणी. ५ बोथ अर्थ १ व बोंथरा पहा. (क्रि० घेणें; मारणें). ६ (गो.) लहान बोळ. **०केळ**-स्त्री. केळीची तीनधारी फळाची एक जात **०केळें**-न. वरील केळीचें फळ. हें केळें आंखूड, गुटुंगळें, जाड सालीचें व त्रिधारी असतें.

**बोद**—स्त्री. चार कांबळीं, आठ घोंगड्यांचा समुदाय.

**बोद**—पु (माण.) खांबाच्यावरील लांकडी उथळें व तुळई यांमध्यें बसविलेला लांकडी तुकडा; वंडकी, टिटवी.

**बो(बों)द**—न १ मृदंग, पखवाज इ०स लावावयाची भिज-विलेली कणीक, ही बोद आवाज येण्यासाठीं लावतात **बोद-वि.** १ बेचव, नीरस; मंद २ कर्णकठोर, मंजुळ नसलेला; बदबदीत (आवाज) ३ खणखणीत नव्हे अशा आवाजाचा (रुपया, मृदंग इ०). **बोदरें, बोदेरें**-न. जास्ती शिजल्यामुळें झालेला भाताचा लगदा.

**बोद**—न. कवडी, हस्तिदंताचा तुकडा इ० जुगाराच्या खेळांत (द्रव्यस्थानीं) मोजण्याकरिता घेतात तो.

**बोदगा**—पु एक प्रकारचें गवत

**बोदड**—वि. बोजड पहा.

**बोद(ध)णें**—अक्रि. (ना.) तृप्त होणें; पोटभर खाणें.

**बोदय**—पु. तांबूस रंगाचा एक लहान मासा.

**बोंदर-दार**—न. (कु) जीर्ण वस्त्र; फाटकें वस्त्र; जुनापुराणा; पुष्कळ वापरलेला व घाणेरडा कपडा; जुनेर (एकवचनी स्वतंत्र, पुढील शब्दांशीं जोडून) 'धोतराचें-लुगड्याचें-पागोट्याचें-शेल्याचें-चोळीचें-खणाचें-बोंदर.' **बोंदर, बोंदरा**-वि. निष्का-ळजी; गचाळ; घामट; घाणेरडा; गैदी; अव्यवस्थित कपडे घालणारा, वागणारा (व.) बोदान्या. **बोंदरी**-स्त्री १ तरटाची मोटी पिशवी; पोतें, गोणपाट. २ (खा) गोणपाटाच्या पिशवींत भरलेला कापूस, एका बोंदरीचें वजन अंदाजें दीड मण असतें.

**बोंदा**—(व.) शिंदीच्या झाडाच्या बिया.

**बोदी**—स्त्री. बोथी केळ पहा.

**बोध**—पु. १ जाणीव; समजूत; बुद्धि; प्रज्ञ; आत्मबोध. 'म्हणोनि अतिशयें विषयो सेवावा। तैसा बोधु नोहावा।' -ज्ञा ६.१४८. २ स्पष्टीकरण; विशदीकरण; समजावणी; माहिती

सांगणें. ३ चित्स्वरूप; ब्रह्मज्ञान; पूर्ण माहिती. ' जे तूंचि तूं सर्वा यया । मा कोणा बोधु कोणा माया । ऐसिया आपेंआप लाघविया । नमों तुज । ' -ज्ञा १४.६. ४ उपदेश; मार्ग; सुचना; परिचित करणें. ५ जागृति; जागेपणाची स्थिति; जागृत अवस्था; प्रबोधित अगर प्रबुद्ध स्थिति. ' जागणें जैसें आना । बोधाचेनि । ' -ज्ञा १५.५२९. ६ फुलाचें उमलणें. [ सं. बुध्=जाणणें ] ०गम्य-वि समजण्याच्या कोटींतलें; ज्ञान होण्याच्या किंवा समज पडण्याच्या आटोक्यांत असलेला; याच्या उलट बोधागम्य. ०नीय-वि. स्पष्ट करून सांगण्यास योग्य; समजविण्यासारखें; शिकविण्यास योग्य; माहिती करून देण्यासारखे. बोधणें-सक्रि. (काव्य) बोध करणें; स्पष्टीकरण करणें; समजाविणें; शिकविणें; ज्ञान सांगणें; माहिती देणें; उपदेश करणें ' आतां ऐसियापरी बोधसी । तरी निकें आम्हां करिसी । ' -ज्ञा ३.१३. -अक्रि. जाणणें; समजणें; बोध होणें; ज्ञान होणें; जागृत होणें. ' तो वीवेकु वेठला । किं प्रबोधु बोधला । ' -भाए २५३. [सं.] ०क-वि. १ समजावून सांगणारा; अर्थ स्पष्ट करणारा. २ उपदेशक; बोध करणारा; शिकविणारा; सुचविणारा. ३ जागृति करणारा; जागें करणारा. ०शक्ति-स्त्री. दुसऱ्यास बोध करण्याची शक्ति; शिकविण्याची योग्यता; अर्थ स्पष्ट करण्याची लायकी. बोद्धा-वि. जाणणारा; समजणारा. बोधन-ना-नस्त्री. १ बोध करणें; उपदेश करणें; माहिती सांगणें; दिशा दाखविणें; सूचना; मसलत. २ जागृति; जागें करणें. ' अशी आदिलशहाचे बोधनेवरून त्याकडे आले. ' -तंजावर येथील मराठी शिलालेख. [ता. बोधनै] बोधपर-वि. उपदेश करणारें; बोध करणारें बोधलेपण-न. ज्ञानसंपन्नता. ' येणें थोर बोधलेपणें । तयासि गा देहीं असणें । ' -ज्ञा १४.३१८. बोधविणें-सक्रि. जाणविणें; सुचविणें; माहिती करून देणें; समजाविणें; शिकविणें; दाखविणें. बोधव्य, बोध्य-वि. स्पष्ट करण्यास, सांगण्यास, शिकविण्यास शक्य, जरूर, योग्य; बोध करण्यासारखें. बोधा-पु. उपदेश; मार्ग; ज्ञान. [ बोध ] बोधागम्य-वि. जाणण्यास कठिण; न समजण्यासारखें; अतर्क्य. बोधाभास-पु. १ ज्ञानाचा आभास. २ (ल.) जीव. -हंको. बोधित-वि. बोध केलेला, केला गेलेला; शिक्षित; सांगितलेला; समजाविलेला किंवा समजलेला. बोधिनी-स्त्री. कार्तिक शुद्ध एकादशी. या दिवशीं विष्णु जागृत होतो -वि बोध करून देणारी; समजाविणारी. बोध्य-पु. ज्ञानाचा विषय; जाणण्याची गोष्ट, पदार्थ. ' तैसा बोध्यजात गिळितु । बोधु बोधें ये मज आंतु । मिसळला तेथ सांधंतु । अबोधु गेला । ' -ज्ञा १८.११०६.

**बोधगें**—न. मूग, उडीद, मटकी यांचा कोंडा, भूस

**बोधलाबावा**—पु. डेरपोठ्या, गबदुल मनुष्य. [ बोधला-एक विशेषनाम+बावा ]

**बोधावा**—पु. शुभवर्तमान. -शर. [ बोध ] शको. ५. ५३

**बोन, बोनें, बोनेवटी**—न. १ (महानु.) नैवेद्य; पक्वान्न, अन्न; भात. बोणें पहा. ( क्रि० दाखविणें ). ' मकरंदाची बोनेवटी । भ्रमरु केवि आरोगी । ' -भाए २२०. ' देवो बोनयाच्या अवसरीं । लोभें कीर आठवण करी । ' -ज्ञा ११.५५१. २ मृदंगाला लावण्याची भिजविलेली कणीक. बोण पहा. ( क्रि० लावणें ). ३ (बायकी) मंगलागौरीच्या पूजेच्या वेळीं देवीस वाहिलेले कणकेचे आमले, खामले, हाराडेरा, नागोबा, पाटावरवंटा इ० पदार्थ. दुसऱ्या दिवशीं हे सर्व निर्माल्यातून काढून गायीस घालितात किंवा खातात ४ (व.) बोडण; दहिंभात. ५ गाळगाळ; उष्टेंखरकटें. [ का. बोन=भात, अन्न ]

**बोनस**—पु. १ बक्षीस; बक्षीस म्हणून दिलेली जास्त रकम. २ (विमा.) तोषिक; वर्धन; वर्धित; व्याजाशिवाय दिलेला नफा. [इं.]

**बोपला**—पु. (व.) अतोनात सुजलेला शरीराचा अवयव. ' रात्रींतून एकाएकीं पायाचा बोपला झाला नी भयंकर ठणका लागल्या. '

**बोपला**—पु. (व.) छपरीच्या वगैरे खांबावरचा सुमारें एक-एक फूट लांबीचा ठोकळा.

**बोपा**—पु १ (व) फाजील लाडावलेला मुलगा; बाब्या. २ (व.) जिव्यावर फाजील प्रेम आहे अशी वस्तु. ' पायाला फोड झाला तर बोपा बोपा करून घेऊन बसल्यानें काय होणार ? ' [ बाप ? ] ०पाळणा-पु. (व.) तान्ह्या मुलाची प्रकृति ठीक राहण्यासाठीं सटवाईस वाहावयाचा लाकडाचा लहान पाळणा व लाकडी बाहुली.

**बोंब**—पु. (गो.) बोम; लहान मुलास दूध पाजण्याचें कांचेचें भांडें. [ पोर्तु. एंबिगो ]

**बोंब-म**—१ (नाविक) नाळेवरचें शीड. २ नाळेवरील लहान शीड लावण्यासाठीं असलेलें लाकूड; नाळेवरील डोलकाठी. ०पाटली-स्त्री. (नाविक) दाटयावर लांकडी बोंब अडकविण्यासाठीं एक आडें ठोकतात तें. याच्या मध्यावर खालच्या अंगास खांचा ठेवितात, कारण बोंब व आडें यांस बांधणारी दोरी या खांचेंतून भरून घेतात. ०बाटली-हांजा-स्त्रीपु. नाळीवरचें शीड वर करण्याची दोरी.

**बोंब**—स्त्री. १ तोंडावर हात मारीत मारीत काढलेला मोठा आवाज; शंखध्वनि ( अति दुःख, महत्संकट, तक्रार किंवा शिमगा यावेळीं केलेला ) ( क्रि० मारणें; ठोकणें ). २ हाकाटी; दुर्भिक्ष. ' यंदा पाण्याची फार बोंब उडाली. ' ३ पुकारा; गलबला; ओरडा. [ देप्रा. बुंबा ध्व. बं ] म्ह० ( राजा ) मृगाआधीं पेरावें व बोंबेआधीं पळावें. ०उठणें १ बोंब लागणें पहा. २ भुमका उठणें; जाहीर होणें ०पडणें-वाजणें-होणें-१ ओरडा होणें; हाकाटी होणें; न मिळाल्यामुळें बोभाटा होणें. २ अत्यंत प्रयासानें मिळणें; दुर्भिक्ष होणें. ( कोणेकाच्या नांवाची ) ०पडणें-एखादें दुष्कर्म अमक्यानें केलें असा बोभाटा होणें. ०पाडणें-

(ना.) (अ‍ारोपिक) शतकृत्य करणें; दिग्विजय करणें; दिवे लावणें. ०लागणें-कळ उठणें; वेदना होणें, बोंब उठणें; वेदनांनीं ओरडण्याइतकें दुःख होणें. (एखाद्याच्या नांवानें)बोंब मारणें- एखादी वाईट गोष्ट अमक्यानें केली असें सांगत सुटणें काय बोंब मारली-(व.) कोणती कर्तबगारी केली ! बोंबलणें- अक्रि. १ बोंब मारणें; बोंब ठोकणें. २ (एखादें कार्य किंवा मसलत) फसणें; शेवटास किंवा पूर्णत्वास न जातां मध्येंच निःशेष होणें; काहींएक निष्पन्न न होणें. ३ (व.) टेंभलणें; मोठ्यानें रडणें बोंबलता-वि. बोंबलणारा; बोंब मारणारा म्ह० रडत्याची शेती बोंबलत्याचें दुभतें. बोंबलपट्टी-स्त्री. १ मोठा आरडाओरडा; हाकाटी; गलबला. २ स्वतःची फुशारकी; आत्मस्तुति; आत्मश्लाघा. बोंबल बाराखडी-स्त्री अंगीं मुळींच विद्वत्ता नसून पांडित्याची ऐट दाखविणें बोंबलभिक्या-वि. कपाळ करंटा; कमनशिबी; दुर्दैवी [बोंबलणें+भीक] बोंबल्या-वि. १ नेहमीं बोंबलण्याची किंवा आरडाओरड करण्याची संवय असलेला; बोंबलणारा. २ नेहमीं फुरफुरणारा (घोडा) म्ह० (व.) येरे माझ्या मागल्या पाप न जाई बोंबल्या. बोंबल्या गणेश-हणमंत-पु. १ वाचाळ, वटवट्या, तोंडाळ इसम. २ गुप्त गोष्ट मनांत न ठेवणारा मनुष्य ३ नेहमीं अमंगळ बोलणारा, अभद्रभाषी, रड्या माणूस. [बोंबलणें+गणेश-हणमंत] बोंबळी-स्त्री बोंब. -शर. बोंबाबोंब-स्त्री. भयंकर हाकाटी; आरडाओरड (अनर्थामुळें झालेली). 'कां मग बोंबाबोंब।'-टिळक. [बोंब द्वि] बोंबाळ-पु गोंधळ; धांदल; दंगलधुमाकूळ, गडबड; धामधूम (मेजवानी इ०मध्यें) म्ह० गावांत लगीन कुत्र्याला बोंबाळ. बोंबाळणें-उक्रि. १ गोंधळात सांपडणें; त्रासांत अडकणें; गोंधळून जाणें; गडबडून जाणें २ गोंधळ करणें; गडबड उडवून देणें; गोंधळांत पाडणें; त्रास देणें बोंबो-वि. (गो.) वेडा; मूर्ख. बोंब्या-पु. १ गयेमधील एक पंडया; हा यात्रेकरू आले म्हणजे त्यांच्या पुढें बोंब मारीत जातो. २ हाकारा करणारा नोकर 'त्यांत बोंब्या निघून गेला।'-ऐपो ५२. ३ (थोडयाशा दुखापतीमुळें किंवा भीतीमुळें) मोठी ओरड करणारा; बोंबलणारा ४ काम फत्ते करून न येणारा (एक शिवी)

**बोबकणें**—अक्रि. १ तोंडांत कोंबणें; बोकाणा भरणें (तिरस्कार्थी). २ (यावरून सामान्यपणें) खाणें. बोबका-टा-पु बोकाणा; मोठा थोरला घांस (क्रि० भरणें; घेणें; मारणें)

**बोबडा**—पु. हरळीच्या जातीचें गवत

**बोबडा**—वि. १ अस्पष्ट उच्चार करणारा; सर्व वर्ण स्पष्टपणें उच्चारतां न येणारा (मनुष्य); स्पष्टोच्चारास असमर्थ असलेलें (वागिंद्रिय); अस्पष्ट वर्णोच्चार असलेलें(भाषण). २ अर्धवट शिजलेला. (डाळ, तांदूळ). [ध्व. ब-ब?] बोबडकांदा-वि. बोबडे बोलणारा (इसम). बोबडणें-सक्रि. बोबडें बोलणें. बोबडी-स्त्री. (भयानें, गोंधळानें, जीभ आंखडल्यामुळें होणारा) अस्पष्टोच्चार; अस्पष्ट वाणी; बोलण्याची तारांबळ (क्रि० वळणें; पडणें). 'वेदांतासी पडे बोबडी।'-विउ ७.५५ ०वळणें- भयानें अस्पष्ट उच्चार निघणें (ल) फार घाबरणें.

**बोंब(बा)डा**—न. बुडबुडा; फुगारा [सं बुद्बुद]

**बोंबणें**—उक्रि १ भांडें (जाळ मंद लागावा व तें काळें होऊं नये म्हणून) मातीनें अगर राखेनें माखणें; लिंपणें; सारवणें. २ तळण्याकरता पिठानें माखणें; पिठांत बुडवून काढणें (बटाटा, वांगें इ० चे काप) ३ शेण, माती, चिकी इ० नीं भोंक बुजविणें; बुजवून टाकणें; बंद करणें ४ भरणें; लिप्त होणें; माखलें जाणें. 'मग दुःखाचेनि बरबटें बोंबलें।'-ज्ञा ७.८८.

**बोंबति**—न (महानु) वाद्य. 'दुमदुमितीं बोंबतिआं। घनघनितीं ताबकिआं।'-शिशु ५२४. [ध्व. बोंब]

**बाबरी**—पु एक लहान मासा.

**बोबऱ्या**—पु आंब्याची एक जात; खोबऱ्यासारखा लागणारा आंबा. -कृषि ६७.

**बोबल**—न (राजा) डोळ्यांतील बुबूळ; डोळ्यांतील बाहुली. [बुबूळ]

**बोबळ**—न बोंबाळ.

**बो(बों)बाणें**—अक्रि. बोभाइणें; बोभाटणें; मोठ्यानें बोलणें, हाक मारणें, गाजावाजा करणें; बडबड करणें. 'जैसी पिकली तुती आदरें। बोभात निघे।'-ज्ञा १३.३०४ [ध्व बोंब]

**बोंबाळ-ळी**—बबाळ-ळी पहा

**बोंबी**—स्त्री. बेंबी [सं. नाभि] बोबली-स्त्री. (गो. ना.) बेंबी. ०पिकप-(गो.) (ल.) तारुण्य येणें.

**बोंबील**—पु. (गो.) लांकडाला भोकें पाडणारा भुंगा.

**बोंबील**—पु. १ माशाची एक जात (या जातीचे मासे आक्टोबर-नोव्हेंबरमध्यें पकडले जातात). २ वाळविलेला मासा. [पोर्तु बॉमेल]

**बोभाइणें, बोभाणें**—उक्रि. १ (काव्य) मोठ्यानें हांक मारणें; बोलावणें. २ ओरडणें; ओरड करणें; हाकाहाक करणें. 'आपले परावे कोणी नेणें भोंवतीं। त्यांच्या नावें बोभे बोभे हा हो श्रीपति।'-तुगा १३१. 'कृष्णातें पार्थातें कर्णहत समस्त वीर बोभाती।'-मोकर्ण ३९ ३५. [बाहणें] बोभा-स्त्री. (काव्य) हाक 'तुका म्हणे झालों निराळा। आतां गोपाळा वेऊं बोभा।' -तुगा२०२ बोभाट-टा-पु. १ प्रसिद्धि; गवगवा; बोलबा. (गुप्त गोष्टीचा). २ गर्जना, घोष; गजर. 'आगेंसीं बोभाटु। सांडिती मेघ।'-ज्ञा १८.७३४ ३ ओरड; हाकाहाक; हाकाटी. 'बाहणें बोभाट वर्माविण।'-तुगा १४. ४ गाऱ्हाणें; कागाळी; तक्रार.

'तुझे कथिति गोपिका विविध तीस बोभाट ते।'-केका ८६ ५ गांवगुडकी. [बोभ+आट प्रत्यय] म्ह० काम थोडें बोभाट मोठा **बोभटणें**-अक्रि. १ वाजणें; गर्जणें; गाजणें. 'रुणझुणा वाजती नेपुरें।वाकी बोभाटती गजरें।'-दा १२२३. २ हांक मारणें, बोलावणें; ओरडणें. 'उंच स्वरें बोभाटत।'-गुच १६ ६४. ३ बोभाटा होणें; कुप्रसिद्धीस येणें; बोलवा होणें **बोभावणें**-अक्रि १ (काव्य) घुबडानें, कोल्ह्यानें आवाज करणें, ओरडणें, घुमणें; कोल्हेकुई करणें. बोभाइणें पहा. 'राजमंदिरीं अमंगळ। दिवाभीत बोभावती।' २ मोठ्यानें ओरडणें; हांक मारणें. 'ते वेळीं महा विष्णूतें। बोभाविलें आक्रान्तीं।'-मुआदि ६ २२. **बोभाविणें**-अक्रि. (काव्य) मोठ्यानें ओरडून हांक मारणें. बोभाणें पहा. 'एकमेकांतें बोभाविति।'

**बोम**—पु १ तोंड शिवलेल्या पोत्यातील धान्याचा नमुना पाहाण्याकरता आत खुपसता येण्यासारखें टोंकदार व खोबण असलेलें एक लोखंडी हत्यार. बऱ्या पहा. २ (कों. नाविक) बोंब पहा

**बोय**—स्त्री १ वास; गंध २ (ल) वासाची लकेर; रुचि, छटा. 'इंग्रजांचे मगजांतील बोय येती कीं तुम्ही कुमकेस न आलां तरी काय गेलें?'-ख ८.४३५२. ३ सार; अंश. [फा. बोय्]

**बोय**—स्त्री. १ (राजा.) दहीं. २ लसणाची, नारिंगाची पाकळी; फांक; फोड. ३ (गो.) बीं. [बी]

**बोय**—स्त्री (खा) बाई

**बोयटा**—पु (कों) किनाऱ्यालगतचा लहान मासा.

**बोयरा**—पु. समुद्रांत खडकाची, धोक्याची जागा दाखवि-ण्यासाठीं ठेवलेली तरंगणारी वस्तु [इं. बॉय] **बोयराप**-न. (नाविक) गलबताच्या नांगराबरोबर निशाणीकरिता पाण्यात सोडण्याचें लांकूड

**बोयें**—न. (कु) (अव बोंई) शेताची सीमा (हद्द) बरोबर करतांना उपयोगांत आणण्याची काठी; अशा तीन काठ्या पुरून सरळ रेघ मारतात (मोजणीच्या बावट्यासारख्याच या अस-तात)

**बोर**—नस्त्री एका जातीचें गवत **बोरीची डाळी**-स्त्री. बोर गवताची चटई

**बोर**—स्त्री १ एक कांटेरी फळझाड. याचें फळ सुपारीएवढें, वाटोळें व रुचकर असतें झाडास उत्तम डिंक (लाख) येतो. लांकूड नांगर, गाडे इ०स उपयोगी असतें. याच्या दाडेबोर, चणेबोर इ० जाती आहेत. २ बोराच्या आकाराचा बायकांचा वेणींत घालण्याचा सोन्याचा दागिना. 'राखडि सुंदर मृद बोरही।'-अमृत ५५. ३ काळसर, तांबूस रंग; बोरासारखा रंग (घोड्याचा) याचे प्रकार दोन:-तेल्या बोर आणि तांबडा बोर 'भला घोडा अस्सल काबूलचा लाल बोर टाकमतुर्की।'-पला. -न. १ वरील झाडाचें फळ २ बोराएवढें भजें. -वि. काळसर तांबूस असा; बोराच्या रंगाचा (घोडा). 'भाऊसाहेब बोर घोडीवर स्वार झाले.'-भाब ११५. [सं. बदरी=बोरीचें झाड; बदर=बोर (फळ), प्रा. बोअर, बोर; हिं बेर] म्ह० ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी. (वाप्र) **बोरांतील कीड, आळी**-१ (ल) नाजुक व फार सुंदर स्त्री. २ लठ्ठ व आत्मसंतुष्ट मनुष्य **बोरीस बोरें आणणें**-१ (खोडकर मुलास) बोराप्रमाणें झाडास लटकवून देणें; झाडास टांगणें; झाडाला बांधून ठेवणें २ अशक्य म्हणून समजण्यात आलली गोष्ट शक्य कोटींतील करणें. 'रामड्या पैसे देत नाहीं म्हणतां ठीक आहे, मी बोरीस बोरें आणीन' (त्याच्याकडून पैसे वसुल करीन). सामाशब्द- ०कंडा, कंठा-पु एक कंठा; घोड्याच्या अंगावरील सामान ०कांटी, बोराटी, बोरांटी-स्त्री बोरीची कांटी, फांदी, काठी, बोरीचें शिरें. [बोर+ काठी] ०कूट-बोरें वाळवून सार इ० करण्याकरितां कुटून ठेवलेली पूड ०खडा-पु मुलींच्या सागरगोट्याच्या खेळातील एक पारिभाषिक शब्द ०न्हाण-न फाल्गुन शुद्ध पौर्णिमा किंवा रंग-पंचमीच्या दिवशीं वर्षाच्या आंतील मुलास बोरें, द्राक्षें, चुरमुरे व मिठाई एकत्र करून त्यानें स्नान घालणें. ०माळ-स्त्री बोराच्या आकाराच्या सोन्याच्या मण्यांची गळ्यांत घालण्याची माळ

**बोरंगाळी**—वि. (महानु.) थोडथोडा; अल्पसा; झिमझिम (पाऊस). 'बोरंगाळी बोरंगाळी पाऊस येताय.'-पैठण, लीलाचरित्र ४७

**बोरड**—न (कु.) नारळीचें जुनाट झाड.

**बोरद**—न. (नाविक) बोडद पहा.

**बोरपी, बोरीप**—भोरपी, भोरीप पहा.

**बोरबार-रा**—पु १ खटपट; शीण. २ सुखदुःख -हंको [प्रा.]

**बोरशा**—पु खानदेशांतील एक प्रसिद्ध आंबा -कृ ६७९.

**बोरशी-सी**—स्त्री. १ (विरू.) बुरशी २ दांतावरील किटण; घाण; बुरा

**बोरा**—पु. हिरवें, कच्चें, टणक फळ; दोडा.

**बोरा**—पु (महानु.) लाल खडा 'जैसा अंबाडापुरिचा बोरा। होय सगात्र सेंदुरा।'-भाए ६४५

**बोरा, बोरिया, बोऱ्या**—पु १ पोती, गोणपाट इ० कर-ण्याच्या उपयोगी कापड; अशा कापडाचें केलेलें पोतें, तरट, बिछाईत; जाजम; बारदान; गोणपाट. २ शिंदी, ताड इ०च्या पात्यांची चटई; आंथरी. 'काय महर्घ तृणाचा बोऱ्या।'-अमृत ११७ ३ लोंकर इ० ची जाड बैठक; बुरणूस; सुताचा विणलेला झोऱ्या ४ (बे.) साळी, भात ठेवण्यासाठीं तुराट्या इ० चीं विणलेली कणग; बोहरीं. (सामान्यत:) बोहरा किंवा बोहरी. ५ (ल.) फजीती. -वि. १ दिवाळखोर. २ अनाथ; दुर्बळ; गरीब;

कंगाल (माणूस); भिकार; (पदार्थ). [फा. बूरिया] **०उडणें-होणें-वाजणें** फजीती होणें; अप्रतिष्ठा होणें; पत उडणें; बोजवारा होणें **०बागवान**-वि. कंगाल **०भाई**-वि. कफल्लक. **बोरी**-स्त्री. १ सराफ लोकाची पैसे ठेवण्याची लाब पिशवी; कसा. २ चटई.

**बोरी**—स्त्री. बोरीचें झाड. [सं. बदरी]

**बोरू**—पु. १ लेखणी करण्याच्या उपयोगाचें जाड काडाचें तृण; बरू. बोरूची कसईप्रमाणें बेटें नदीच्या किंवा ओहोळाच्या किनाऱ्यास होतात; याचें ताट जोंधळ्याप्रमाणें दिसतें. काळा व पांढरा अशा याच्या दोन जाती आहेत. घरांतील कूड, लेखणी, पत्रावळी लावण्याच्या चोयी वगैरे कामीं उपयोग -वगु ४ ११२. २ (व.) तागाची एक जात; सोनताग.

**बोर्ड**—पु १ फळा; तक्ता. २ जेवणखाण. ३ सभा; संघ; मंडळ. उदा० बोर्ड ऑफ ट्रेड=व्यापारी मंडळ; मेडिकल बोर्ड= वैद्यकमंडळ. [इं.]

**बोर्डिंग**—न भोजनवसतिगृह. -शर [इं.]

**बोऱ्ये**—न. (कों.) बैल गाडीच्या गाताच्या खालची आडवी लांकडी फळी.

**बोल**—पु (गो.) एक प्रकारचा आंबा.

**बोल**—पु. १ बोलणें; भाषणांतील अवयवभूत जे शब्द किंवा जीं वाक्यें तीं; वाणी; भाषण. २ शब्द. पूर्वीचें भाषण; बोलून दाखविलेलें मनोगत; मत; विचार; वचन. 'केला म्यां सत्य बोलिला बोल।' -मोआश्व २ १३४. 'परिसोनि बोल कानाहीं।' -मोउद्योग ११.२३३. ३ दोष; दोषारोप; निंदा; टपका. 'भीष्म-धृतराष्ट्र-विदुर-द्रोण-कृप-नृपासि बोल तो लावी।' -मोसभा ५ ४५. ४ वाद्यावर प्रहार करून काढलेला विशिष्ट ध्वनि. उदा० तबल्याचे बोल. (क्रि० काढणें; वाजविणें) ५ वर्णन. 'असोत हे बोल। चालतां जालें नवल।' -शिशु ५५५ ६ गाऱ्हाणें. 'आर्ताबोलाची साटवण।' -ऋ ९६. [सं. ब्रू; म बोलणें; वे. बोल=कलकल] **म्ह०** बोलाचीच ढी बोलाचाची भात। जेवोनिया तृप्त कोण झाला। (खरें कांहीं न देता फक्त तोंडाची कोरडी सहानुभूति दाखविल्यानें कोणाचें समाधान झालें आहे काय!) **०करणें**-(महानु) बोलणें; भाषण करणें. 'तंव तो लक्ष्मी कांतु। धाकुटियासी बोलु करितु।' -शिशु १७५ **०ठेवणें-लावणें**-दोष देणें, लावणें; नांवें ठेवणें 'लावियला म्यां दुःखीं बाई त्या ईश्वरासही बोल।' -मोकृष्ण ८३.३६. **०बोलणें**-आपलें म्हणणें काय आहे तें स्पष्टपणें सांगणें. **०लागणें**-दोष लागणें, बट्टा लागणें; कालिमा लागणें. 'तरि भरत कुळगुरूंच्या लागेना बोल काय गा महिम्या।' -मोउद्योग ३.५०. **बोलांत बोल नसणें**-बोलण्यांत मेळ नसणें; बोलण्यांत विसंगति असणें. **बोलाफुलास गांठ पडणें**-१ फूल ... आणि फल पडण्याला एकच गांठ पडणें. २ सहज म्हणून बोललेली गोष्ट काकतालीयन्यायानें घडून येणें. **बोलले बोल सिध्दीस नेणें**-दिलेल्या वचनाप्रमाणें वागणें; सामाशब्द- **बोलगडा-गाडा**-वि. बोलका, बडबड्या; वाचाळ; वारेमाप बोलणारा; (शब्दशः गाडीभर बोलणारा). [बोलणें+गाडा] **०घेवडा-घेवडी**-वि. वाचाळ (मनुष्य अगर स्त्री); वटवट करणारा-री; फार बोलण्याचा स्वभाव असलेला. **०तान**-स्त्री. ज्या तानेमध्यें चीजेंतील अक्षरें विवक्षित स्वरांनें म्हटलीं जातात ती तान **०पुतळी,-माणकी**-स्त्री.फार बोलणारी, डौलानें बोलणारी स्त्री. **०भाक**-पु. वचन; शपथ; करार. **०भांड**-वि. १ आवेशानें बोलण्याच्या व भांडणाच्या कामांत पटाईत. २ यत्किंचित कारणावरून भांडावयास सिद्ध होणारा. **०वरी**-क्रिवि. शब्दांनीं. 'ज्यासि परब्रह्म आलें हाता। तोचि जाणें सद्गुरूची पूज्यता। इतरासि हे न कळे कथा। अनुमानता बोलवरी।' -एभा १३.७४६. **०वा-वाय**-पुस्त्री. (कों.) लोकवार्ता; वदंता; चारचौघांत प्रसृत झालेली बातमी. **बोलका, बोलिका**-वि. १ बोलणारा; चांगलें बोलणारा. २ फार बोलणारा; वटवट करणारा, वाचाळ; बडबड्या; भाट. ३ बोलूं शकणारा; बोलतां येत असलेला (पोपट, लहान मूल). ४ वक्ता; संभाषणांत भाग घेणारा; घुम्यासारखा न बसणारा. [बोलणें] **०का-चालका**-वि. बोलण्यास व चालण्यास येऊं लागलेलें (मूल). [बोलणें+चालणें] **बोलबाला**-पुक्रि. उत्कर्ष; वैभव; विजय; भरभराट; अभ्युदय, चढती कमान; कीर्ती. 'शत्रूवर बोलबाला। आले करून शहर पुण्याला।' -ऐपो २३७. (क्रि० होणें) [हिं.] **बोलाचाली, बोलाबोली, बोलाचाल**-स्त्री. १ संभाषण; बोलणें-चालणें. २ वादविवाद; भांडण; बाचाबाची; रागारागाचें भाषण. **बोलाचालीवर येणें**-भांडू लागणें; चिरडीस जाऊन बोलणें.

**बोलु-लू**—पु. बोल; वचन; शब्द. 'कैसे दीसती बोलु रसाळ तें आइकावें श्रोतां।' -शिशु १६. [बोलणें]

**बोलणें**—क्रि. १ शब्द उच्चारून मनोगत कळविणें. २ (पोपटानें) कानीं पडलेले किंवा शिकविलेले शब्द उच्चारणें. ३ (वाद्यानें) ध्वनि उत्पन्न करणें ४ म्हणणें; नांव देणें. 'पोथीला संस्कृत भाषेंत पुस्तक बोलतात.' ५ रागें भरणें; रागावणें; दोष देणें; बोल लावणें. 'मी येथून गेलों तर साहेब मला बोलतील.' ६ व्याख्यान देणें; सांगणें; म्हणणें; कथन करणें. [सं. ब्रू ?; प्रा. बोल्ल; देश्य. बोल्ल] **म्ह०** बोलेल तो करील काय, गर्जेल तो पडेल काय! **बोलणें फिरविणें**-बोलतां बोलतां आशय किंवा अर्थ बदलणें; बोलणें सावरणें. **बोलून घेणें**- दुसरा मनुष्य रागावेल असें वर्तन करणें; लोकांच्या रागास पात्र होणें. 'मी अद्याप कधीं कोणाचें उणें उत्तर बोलून घेतलें नाहीं.' **बोलण्यावर जाणें**-(एखाद्याच्या) बोलण्यावर विश्वास ठेवणें. **बोलण्यावरून बोलण येणें**-

वाढणें-एखादी गोष्ट बोलत असतां इतर गोष्टी सुचून अधिक बोलणें. विशिष्ट गोष्टीचा संदर्भ, उल्लेख यांमुळें बोलावें लागणें; वाद-विवाद होणें. **उत्तर बोलणें; उत्तर करणें**-उत्तर देणें; उत्तर यावयास लावणें. 'क्रोधें तुकयास बोले उत्तर। कैसें बुडविलें माझें घर।' **बोलून सुघड-भला-चांगला-मधुर**-बोलणें, वर्तन इ० मध्यें चांगला; सरळ, गोडबोल्या. **भाजीपाला बोलणें**-निरर्थक बडबड करणें; भाषणांत अर्थ नसणें **बोलणेंचालणें**-न संभाषण; व्यवहार, दळणवळण, लोकांशीं वागण्याची तऱ्हा **बोलून-चालून**-क्रिवि १ लोकांशीं वागण्याच्या बाबतींत: व्यवहाराला अनुसरून. २ उघडउघड; स्पष्टपणें, धडधडीत; आडपडदा न ठेवतां; उघडपणें, सांगूनसवरून. 'लागलें असतां बोलून चालून दोन रुपये मागून घ्यावे परंतु चोरून एक पैसाहि घेऊं नये' ३ मुद्दाम ४ सर्वथैव, कांहीं झालें तरी. **बोलतखेवो**-अ बोलल्याबरोबर 'ऐसें वाक्य जी बोलतखेवो। मागुता मनुष्य जाहला देवो।' -ज्ञा ११.६४०. **बोलता**-वि बोलणारा, सांगणारा म्ह० मारत्याचा हात धरवेल, बोलत्याचें तोंड धरवत नाहीं **बोलती**-स्त्री. वाणी. -शर. -वि बोलावयाची. 'आतां बोलती ते नवाई। सांगिजेल।' -ज्ञा १६.२९२

**बोलशी**—स्त्री १ दारू भरून ठेवण्याचें शिंग २ (कु.) न्हाव्याची धोकटी

**बोलशेव्हिक**—पु. समाजसत्तावादी, रशियाच्या अत्यंत जहाल प्रतीच्या क्रांतिकारक वर्गांतील मनुष्य [इं.]

**बोलाडवाघळी**—स्त्री समुद्रांतील वाघळी नावाच्या माशाची एक जात प्रकार

**बोलाव(वि)णें, बोलाविणें**—सक्रि १ हांक मारणें २ आमंत्रण देणें; निमंत्रण करणें -न आमंत्रण; निमंत्रण **बोला-वणूक-न** (सागी-कोळी) बोलावणें; आमंत्रण 'सगळे देवाना बोलावणूक काय केली।' -मसाप १.२. **बोल(ला)वणेकरी**-पु १ बोलावणारा, आमंत्रण देणारा माणूस. २ निमंत्रित लोकांना जेवणाला बोलविणारा मनुष्य

**बोलि(ली)गड-डा**—वि. बोलका. 'अतिशीतळ तो दारुण अग्नी। मुकें पुराणी बोलिगडें।' -एभा ११ ७४०

**बोली**—स्त्री १ भाषा; भाषाभेद; पोटभाषा; एकाच भाषें-तील विशिष्ट प्रकार २ करार; वचन, कंत्राट; ठराव. 'जाबसाल घेऊन बोली ठीक झाली.' -पया १०. ३ शब्द; भाषण; बोलणें; म्हणणें. 'आतां असो हे सकळ बोली। मागील आशंका राहिली।' -दा ८ ३ २५. ४ सोय; शक्यता. 'अशा पावसांत बाहेर पड-ण्याची बोली नाहीं.' [बोलणें] ०**बोलणें**-(व) किंमत सांगणें ०**सोडविणें**-करारांतून सुटण्याला वाट राखून ठेवणें; कराराला अपवाद ठेवणें. ०**चाली**-स्त्री. १ केलेल्या कराराच्या बाबतींत वाटाघाट; करारमदार करण्यासाठीं केलेली चर्चा. २ संदिग्ध बाबींचा निकाल लावण्याच्या उद्देशानें केलेली वाटाघाट [हिं बोलणें+चा० णें]

**बोलें**—न. (महानु.) बहुलें; बोहलें 'धडांचे बोलें करौनी।' -शिशु ४५८. [बोहलें]

**बोल्ट**—पु. पेंच असलेला खिळा, बोलट [इं]

**बोवण-णें, बोह(हो)ण**—न. मृदंगाला लावण्याच्या कण-केचा गोळा. [बोणें]

**बोवले**—न १ (राजा) कोनाडा. २ बोहलें; बहुलें.

**बोवलो**—पु (गो) गवताची गंज

**बोवा**—पु बुवा पहा.

**बोंवा**—पु (राजा.) लसणाची पाकळी.

**बोंवाळ, बोंवाळणें**—(बोंब शब्दांत) बोंबाळ बोंबाळणें पहा.

**बोस**—पु. (बायकी) मनातल्या मनात कुढणें; आकस; राग; घुस्सा; द्वेष. (क्रि० धरणें, करणें).

**बोसक**—स्त्री. (खा.) घाण.

**बोसका**—पु (व) तुकडा; कांडके.

**बोसका-कें**—पुन. बोचकें, गाठोडें.

**बोसकाडा**—पु (व) ओरखडा. **बोसकाडणें**-सक्रि. १ (व.) ओरखाडणें; बोचकारणें २ (दह्याचें) चोथापाणी होणें.

**बोहचक**—वि. १ वाचाळ; बडबड्या; वटवट्या. २ दुस-ऱ्याच्या कामांत लुडबुडणारा [सं. बहुवाचक]

**बोहण**—न. बोवण पहा.

**बोहणी-नी, भवानी**—स्त्री. १ दुकानदारानें सकाळीं दुकान उघडल्यावर होणारी पहिली विक्री. ही बहुधा रोखीची करतात, व तिच्यावरून लाभ-हानि समजते. 'शेर तांदूळ सारुके सजगणी। इतकीच रोख जाली बोहणी।' २ (ल) आरंभ, सुरवात. 'बोह-णियेसीचि येवढें। भारी जेथ।' -ज्ञा १८ ७८४. ३ लाभ. 'पावे सद्गति बोहणीसचि तया ज्ञानामृतें बोहणी।' -मृगीचरित्र १. [सं. भवानी का बोणी] ०**चे प्रहरीं-पाहरीं-पारीं**-बोहणीचे वेळीं. सकाळीं.

**बोहणें**—सक्रि (कुण) बोलाविणें; हांक मारणें; बाहणें. 'बोहता जवळि गाय ये गुरूं।' -अकक २. मुद्गलाचार्य विरचित रामार्याचें श्लोकबद्ध भाषांतर ३९. [बाहणें]

**बोहरणी**—स्त्री (व) केरसुणी.

**बोहरणें**—उक्रि. नाश पावणें भस्म करणें. -शर.

**बोहरपी. बोहोरपी. बोहरीप, बोहरूप, बोहोरीप**—भोरपी, भोरीप पहा

**बोहरा, बोहरी, बोहारी**—पु मुसलमानांतील एक जात व इसम हे लोक लोखंडी सामान, स्टेशनरी इ० चा व्यापार करतात [सं. व्यवहारी]

**बोहरी, बोहिरी**—स्त्री. १ देशाबाहेर घालविणें; देशवटा हद्दपारी. 'जाली तापासी बोहरी । ते परिएसा पां।'–ऋ १२ २ नाश; धुराडा 'नाचून केली बोहरी । त्या सर्पाचिया दर्पाची।' –रास ३ २१६. ३ वणवा; अग्नि. 'नाना वनामाजी बोहरी । कड सणी जेवीं न करी ।'–ज्ञा १८ ५५५. [ ? ] **बोहरा, बोहारा**– वि. (व ना.) अभद्र; कपाळकरंटा; सत्यनाश करणारा; त्रास- दायक व अप्रिय व्यक्ति.

**बोहला, बोहलें, बोहुलें**—न. बहुलें पहा

**बोह(हि)ली**–स्त्री. बोली; शब्द 'विकारांची संपिली बोहिली ।' –माज्ञा ९.२१५. [ बोली ]

**बोहिणें**— क्रि. बाहणें पहा.

**बोहोगणी-णें**—स्त्रीन. बहुगुणी-णें; बोगणी; बगुणें; पातेली.

**बोहोचक, बोहोण, बोहोणें, बोहोरी, बोहोलें**—बोह चक, बोहण इ० पहा.

**बोळ, बोळक**—पु अरुंद वाट; गल्ली (दुतर्फा घरामधील किंवा कुंपणामधील); खेंडुकली.

**बोळ**—स्त्री. (गो.) बागेच्या राखणीबद्दल नारळाच्या रूपांत द्यावयाची मजुरी.

**बोळ**—न. १ एक प्रकारचा औषधी चीक, डिंक. ह्याचे प्रकारः–(अ) पांढराबोळ व बाळंतबोळ. (आ) काळा, कडू बोळ, एलिया (इ) रक्त्या, तांबडा, हिरा बोळ. (ई) भेसा बोळ. (उ) कातबोळ हे आहेत (नुसत्या बोळ ह्या शब्दानें काळाबोळ समज- तात). 'जेणें प्रथमचि तुजला लागला बोळ खावा.'–मोकृष्ण २१३ 'क्षीरीमध्यें हिंग दुधामध्यें बोळ । तिथेंचि वोंगळ नाश केला ।' –तुगा ३०७५ २ दाट झालेलें दहीं, शाई, रंग इ० ३ धान्य, फळें इ० मधील गाळ साळ; टाकाऊ भाग; गदळ. ४ (गो) अंड्यातील बलक; बोळसो ५ चिकण मातीचा एक प्रकार. –वि बोथट. 'माझा चाकू बोळ आहे.' [सं बोल] **०घालणें– घालीत बसणें**–फार फार बोलून, हुज्जतघालून छाती दुखवून घेणें (आणि छातीवर बोळ घालण्याचा प्रसंग येणें). **(एखाद्या कामांत) ०घालणें-पाजणें-पाडणें-देणें**–काम बिघडविणें; कामाची खराबी करणें.

**बोळकुलें, बोळकें**—न. १ (मातीचें लांकडाचें, धातूचें) मुलींचें खेळण्याचें पात्र २ (ल.) दांत नसलेलें तोंड. 'तोंडाचें बोळकें झालें.' [ प्रा. बोलअ ]

**बोळखिळा, बोळखीळ**—पुस्त्री. गाडीच्या शिवाळीची बाहेरील खुंटी; आंतील पोटखीळ.

**बोळणें**—अक्रि. १ दाट होणें; गोठणें; सांकळणें; गोळे बनणें. बुळबुळीत होणें (रक्त, दहीं, काजळ, अळित्याची शाई). २ (गहूं बाजरी, हरभरा इ०तील) सत्वांश पूर्ण पोसलेला असणें. ३ (ल.) (ओळख, माहिती, परिचय) विसरली जाणें; स्मृतिपटलावरून पुसली जाणें; मंद होणें. ४ (व) शांत होणें, तीव्रपणा नाहींसा होणें, ५ (शस्त्र इ०) बोथट होणें. ६ पाभरीमधील बीं चाड्यातून घसरून खालीं पडणें. ७ (ना) फळ परिपक्व होऊन लुमलुशीत होणें. –सक्रि. १ तेल तूप इ०नीं (एखादा पदार्थ) चोपडणें; माखणें. २ (राजा.) शाई, दहीं, दूध इ०मध्यें (लेखणी, भाकरी इ०) बुचकळणें; बुडविणें. ३ भोंकामध्यें खुंटी, खिळा इ० घालून तें मोठें करणें.

**बोळणें**—न खराब व घाणेरडें झालेलें वस्त्र; हलकें व कमी किंमतीचें वस्त्र; बोळा [ बोळा ]

**बोळंबोळ**—क्रिवि. कांठोकाठ; अगदीं कांठापर्यंत. (क्रि० माप–घालणें; भरणें; मोजणें; मापणें).

**बोळवण-णी**—स्त्री. १ रवानगी; पाठवणी; निरोप देणें. २ नववधूचें नवऱ्याचे घरीं थाटामाटाचें प्रथम गमन 'तिची करावया बोळवण । कृष्णा आगीं आगवण ।' –एरुस्व १५.७४ ३ विवाहा- नंतर वरपक्षाच्या मंडळीची सत्कारपूर्वक करून दिलेली रवानगी. ४ गांवांत आलेल्या भुतांना अन्नादि बळी देऊन गांवकऱ्यांनीं त्यांची वाजतगाजत गावाबाहेर केलेली हकालपट्टी. ५ पाहुण्या- बरोबर थोडेसे जाऊन त्याची केलेली रवानगी; दिलेला निरोप. ६ पाठवणी; बिदागी; केलेल्या कामाबद्दल जातांना दिलेली रक्कम. ७ (व.) ब्राह्मणेतर जातींतील गर्भाधानाचा समारंभ. (क्रि० करणें). [ का. बोळु ] **बोळव(वि)णें**– १ आलेल्या पाहुण्यावरो- बर सत्कारार्थ थोडेसें चालून त्यास निरोप देणें; रवानगी करणें; पोहोंचविण्यास जाणें; विसर्जन करणें; घालविणें; पाठविणें. 'तीन पावलें मातापित्या बोळवाया आली।' –वसा ५५. २ (विनो- दानें) नाहींसे करणें; गमाविणें; (मित्र, आप्त, विद्या इ०) विसरून जाणें. उदा० 'त्यानें आपली आई बोळविली आणि स्वस्थ बसला.' ३ नथ, सुंकलें इ० दागिन्यांचा फासा दुमडून घट्ट बसविणें; एकरूप करून टाकणें; फांसा कशांतहि अडकणार नाहीं किंवा निघणार नाहीं असा बसविणें. ४ बुजविणें; बंद करणें. **बोळावा-वी**–पु. १ मुक्कामापर्यंत पोचविण्यासाठीं बरोबर आलेलीं माणसें; सोबती; लवाजमा; पहारा. 'पुसतां चुका होतो वाटा । सवें बोळावा गोमटा ।' –तुगा २४६६ २ बोळवण; बोळ- वणी; रवानगी ३ बिदागी; पाठवण.

**बोळसों**—पु. (गो.) एक प्रकारची मासळी.

**बोळा**—पु १ चिंध्यांची गुंडाळी; चुना देणें, भोंक बुज- विणें, भिंत सारविणें, इ०साठीं कापडाचा केलेला गोळा; पोतेरें. लहान मुलाच्या तोंडांत दुधांत बुडवून दिलेली चिंधी. २ कागद इ०वर शाईचा, रंगाचा, इ०पडलेला ठिपका, डाग. ३ जुनें व घाणे- रडें वस्त्र; ज्याची घडी व्यवस्थित न करतां कसा तरी गोळा केला आहे असें वस्त्र, कागद, पानें इ०. **०फासणें-फिरविणें**–

१ पुसून टाकणें; पुसून स्वच्छ करणें. २ (ल.) नाहींसा करणें; बिघडविणें; पूर्वीचें रूप बदलून टाकणें. ३ नामंजूर करणें. 'पण येथेंच सर्व मुद्यांवर बोळा फासला गेला.' -सासं २ ३१. **बोळ्यानें दूध पिणें**-(अगदीं लहान मुलाला स्वतः दूध पितां येत नसल्यामुळें त्याला बोळ्यानें दूध पाजावें लागतें. यावरून ल.) स्वतःची अक्कल नसल्यानें दुसऱ्याच्या सांगीप्रमाणें चालणें; बुद्धिहीन असणें.

**बोळी**—स्त्री. (माण.) बोळकें.

**बोळीहोण-न**—पु एक जातीचा होन (नाणें).

**बोळूं**—न भाकरी, पोळी, थालीपीठ इ० खातांना कोरडेशास तूप, लोणी, दहीं इ० घेतात तें. [बोळणें]

**बोळून जाणें**—(व) विटणें; विटून जाणें. [बोळणें]

**बोळें**—वि. (कर.) व्यवस्थित आकाराचें नसलेलें; कातीवकोरीव नव्हे असें: ओबडधोबड; कड नसलेलें 'बोळें लाकूड स्वस्त मिळतें.' [का :]

**बौ**—पु. बाऊ; मुलांना भीति दाखविण्याचा शब्द.

**बौढणें**—अक्रि. लयास जाणें. -हंको

**बौध्द-ध्द्य**—पु. १ विष्णूचा नववा अवतार. २ बुद्धानें स्थापिलेला धर्म. ३ बौद्धधर्मानुयायी मनुष्य. -वि. बुद्धीनें कल्पिलेला; कल्पित; कल्पनेंतील. **बौध्दावतार घेणें-धरणें**- कोणी कितीहि वाईट केलें तरी न रागावतां, उपेक्षेनें मौन धरणें.

**बौलें**—न. (महानु) बहुलें. 'पढियेसी यादवांसहितु। बौलां बैस तूं द्वारकेराया।' -धवळे उत्तरार्ध १३.

**बौहडा**—पु वृष्टि. 'आइकें द्वारकापुरसुहाडा। मज सुकृतया जी झाडा। हे भेटी नव्हे बौहडा। मेघाचा केला।' -माझा (पाठ) ११.६७०. [बहळ; सं भृ=भरणें]

**बौ(बो)हें, बौटें**-वि. बहुत; पुष्कळ. 'आणि तेणें आपुलेपणाचेनि मोहें। तुम्ही संत घेतले असा बौहें।' -माझा ९.१७. [सं बहु]

**ब्यहस्तनशीन**—वि. स्वर्गवासी. [फा. बेहस्त+नशीन्]

**ब्यहाग**—पु. एक राग; बिहाग पहा.

**ब्या**—उद्गा. १ ओरडणें; अगतिकत्वाचा, दीनपणाचा शब्द. (क्रि० करणें; होणें). २ -क्रिवि. ब्या करून. [ध्व.]

**ब्याडगा**—पु (जुन्नरी) कुदळ.

**ब्याणा-ना**—पु. बयाणा-ना; सचकार. [हिं.] ०**बांधणें**-क्रि. अमुक किंमत आल्यास दुसऱ्यास विकावा, नाहीं तर तो माझा, असा एखाद्या पदार्थाविषयीं त्याच्या मालकाशीं संकेत करून त्यावर आपली मोहोर करणें.

**ब्याणें**—न. (राजा.) १ बियाणें; पेरण्याचें बीं २ उपटून दुसरीकडे लावण्यासाठीं केलेलें मिरची इ०चें रोप, झाडाचें कलम, हुंडा. [बी]

**ब्याण्णव, ब्याणौ**—न. ९२ ही संख्या.

**ब्याध-द्**—स्त्री. १ रोग; आजार. २ (ल.) पीडा; त्रासदायक गोष्ट; त्रास्य माणूस. [सं. व्याधि]

**ब्यायशी**—वि ८२ ही संख्या.

**ब्यारिस्टर**—पु. विलायतेंत परीक्षा दिलेला, एक प्रतीचा वकील [इं.]

**ब्याह(हा)डा, ब्याहडी**—वि. बहुतेक पिकलेला (झाडावरील आंबा, फळ). २ जास्त पिकलेला व कठीण, निबर (हुरडा, धान्याचे दाणे, विशिष्ट वनस्पति).

**ब्याह(हा)डा**—पु. (प्र.) बेहडा; बेहड्याचें झाड, फळ.

**ब्याहां**—वि. निर्लज्ज. [फा. बेहया]

**ब्याळ**—पु. अर्धा आणा.

**ब्याळ, बेहाळ**—वि. १ निंदक: शिवीगाळ करणारा. (व.) खोडकर; अवलक्षणी. २ बीभत्स बोलणारा, विचकट (मनुष्य, भाषा, मुख्यत्वें स्त्रियात).

**ब्याळु**—स्त्री. (नगरी) तिसऱ्याप्रहरचा फराळ.

**ब्र**—उद्गा. चकार शब्द; अवाक्षर. (क्रि० काढणें). 'एव्हां तूं बोलतोस पर सभेमध्यें तुझ्या तोंडांतून ब्र निघायाचा नाहीं.' [ध्व.]

**ब्रम**—पु. (शाप.) एक रासायनिक मूलद्रव्य. 'ब्रोमीन' यास प्रतिशब्द.

**ब्रश**—पु. कुंचला-ली. (क्रि० करणें). [इं.]

**ब्रस्पतवार**—पु. (अशिष्ट) गुरुवार. [सं. बृहस्पतिवासर]

**ब्रह्म**—न. १ सततत्त्व; जगत्कारण; सच्चिदानंदरूप वस्तु. बाह्यसृष्टीच्या बुडाशीं असणारें नित्य द्रव्य. -गीर २२१. २ चार वेद ३ (समासात) ब्राह्मण. ४ (ल.) जातिभेद किंवा सोंवळेओंवळें मोडल्यानें होणारा घोंटाळा; भ्रष्टाकार. ५ नवल; गूढ; अद्भुत अथवा दुर्ज्ञेय गोष्ट. 'याचेच गाण्यात तुम्हास काय ब्रह्म वाटलें आहे न कळे.' ६ ब्रह्मवेत्ता. ७ (ल.) विष्णु; कृष्ण. 'ब्रह्मासहि गहिंवरवी महिवरवीरेंद्र पाडुची भार्या।' -मोउद्योग ७.४४. ८ ईश्वर; परमात्मा. [सं. बृह्=वाढणें] (वाप्र) ०**मिळणें-सांपडणें-हातीं लागणें-प्राप्त होणें**-क्रि. (ल.) पराकाष्ठेची आश्चर्यकारक, उत्कृष्ट गोष्ट सांपडणें, मिळणें. सामाशब्द- ०**कटाह** पु. जगत्; ब्रह्मांडरूप कढई 'तेथ ब्रह्मकटाह शतकूट। हो पाहत असे।' -ज्ञा १.१४७. [सं] ०**कन्या**-स्त्री. १ सरस्वती. २ अहिल्या. [सं.] ०**कप(पा)ट**-न १ त्रासदायक, संतापजनक काम; पेंच. २ पिच्छा न सोडणारें दुर्दैव. 'माझे पाटीसीं ब्रह्मकपाट लागलें.' ०**कर्म**-न. ब्राह्मणाचीं धार्मिक कर्तव्यें. [सं.] ०**काष्ठ**-न. मांदार. 'गंडक्यादि शिळामूर्ती। कां कां दारु ब्रह्मकाष्ठव्यक्ती।' -एभा २७९९. ०**गांठ**-स्त्री. १ जानव्यास दिलेली गांठ; पवित्र ग्रंथि. २ नेमानेम. ३ (ल) घोंटाळा. ४ न मोडणारा संबंध. [सं] ०**गिरि**-पु. ज्यापासून गोदावरीचा उगम झाला तो नीलकंठ पर्वत. [सं.] ०**गिन्हा-न्हो**-

पु ब्रह्मराक्षस. 'वताळ खंडाळ लागला। ब्रह्मगिऱ्हो संचरला।' –दा ३ २.२८. **०गोल–ळ–गोल(ळ)क**–पु. सृष्टि; जगत्; ब्रह्मांड. [सं] **०ग्रह–हो**–पु १ (प्र.) ब्रह्मगिरा–ऱ्हा; ब्रह्मराक्षस २ (ल.) वर्णसंकर, अत्यंत घोटाळा. [सं] **०घातक–की**–वि. १ ब्रह्महत्या करणारा २ (ल) ब्रह्मद्वेषी [सं] **०घोटाळा**–पु. आचारविचाराची अव्यवस्था; फार गोंधळ. **०घोष**–पु १ वेदघोष; मोठ्यानें वद म्हणणें. २ ब्रह्म मताचा (जगदीश्वरवादाचा) घोष उपदेश [सं] **०घोळ**–पु. १ जातिभेद, शुद्धाशुद्धता इ०च्या उपेक्षेनें झालेला घोटाळा, अव्यवस्था. 'त्या प्रयोजनात सोंवळया–ओंवळयाचा विचार राहिला नाहीं. सर्व ब्रह्मघोळ झाला.' २ गोंधळ; अव्यवस्था (पुष्कळ माणसें एकदम बोलण्यापासून उत्पन्न झालेला). पराकाष्ठेचा गोंधळ. **०घ्न**–वि ब्रह्मघातक [सं.] **०चर्य**–न. १ चार आश्रमापैकीं पहिला, मुंजीपासुन लग्नापर्यंतचा–ब्राह्मणाचा आश्रम २ स्त्रीसंग न करण्याचें व्रत (आजन्म किंवा व्रतांगत्वेंकरून); एकपत्नीव्रत. [सं] **०चर्यस्खलन**–न. स्त्रीसंगपरित्यागव्रताचा भंग (मुख्यत्वें ब्राह्मणाचा) **०चारी**–पु १ मुंजीपासुन लग्नाच्या कालापर्यंत सांगितलेले नियम पाळणारा ब्राह्मण; मुंज झालेला मुलगा; बटु २ स्त्रीसंगपरित्यागाचें व्रत आजन्म किंवा कांहीं कालपर्यंत करणारा ब्राह्मण. 'सोळा सहस्र गोपी भोगून ब्रह्मचारी.' ३ (उप.) पूर्ण रतिलंपट; व्यभिचारी असुनहि अव्यभिचाराचा व पावित्र्याचा डौल करणारा. [सं.] **०चोटली**–स्त्री. फारच लहान अशी पेटी, दागिना, ताट, भांडें इ०. **०जन**–पु ब्राह्मण. 'तधवा रचिले ब्रह्मजन। तयां वेद दिधलें शासन।' –ज्ञा १७.३३९ **०जीवी** पु. वेद शिकवून, आर्त्विज्य इ०करून उपजीविका करणारा ब्राह्मण. [सं.] **०झांट**–न (अश्लील) शष्प या अर्थी क्वचित् प्रयोग –क्रिवि कांहीं देखील; थोडेसेंहि. (क्रि० देणें; मिळणे. प्राप्त होणें इ०). **०टाळी**–स्त्री. १ योगाचा एक प्रकार; टाळींत (डोक्याच्या वरच्या भागांत) आत्मा नेणें. २ (ल) रेंगाळणी; दीर्घसूत्रीपणा. (क्रि० देणें; लावणें; मांडणें). **०तत्त्व**–न आत्मतत्त्व; तात्त्विक सत्य; पदार्थमात्राच्या सत्तेला आधारभूत असें ब्रह्म. [सं.] **०ताल**–पु. एक ताल. यांत २८ मात्रा व १४ विभाग असतात. **०तेज**–न. १ सामान्य माणसाहून निराळें असें ब्राह्मणाच्या अंगचें तेज; तेजस्विता. २ ब्राह्मणाच्या अंगचें विद्यादि सामर्थ्य. [सं.] **०दंड**–पु. प्रायश्चित्त, श्राद्ध, तीर्थविधि इ०कांच्या अधिकारार्थ ब्राह्मणास द्यावयाचें द्रव्य. [सं.] **०दंड–डी**–पुस्त्री. एक औषधी; कांटेचुबक; उंटकटारी; अधःपुष्पी. ही पारदबंध करते. **०दत्त**–वि. ब्रह्मदेवानें दिलेलें [सं] **०दिन**–पु. १ ब्रह्मदेवाचा दिवस. २ वर्षप्रतिपदेच्या दिवशीं केलेलें गत व भावी मन्वादिकांचें श्रवण, अवलोकन; वर्षफलवाचन. [सं.] **०देव**–पु. १ ब्रह्मा; त्रिमूर्तीपैकीं रजोगुणात्मक पहिला; सृष्टिकर्ता. २ गावच्या सोनार, सुतार, जिनगर इ०कांनीं बसविलेला व ब्राह्मण पुजारी असलेला ग्रामदेव; ब्राह्मणदेव [सं] **०देव होणें**–क्रि. (ल.) ( .) विवाहित होणें. **०द्रोह द्वेष**–पु ब्राह्मणांचा द्वेष. [सं] **०द्रोही–द्वेषी**–वि. ब्राह्मणांचा द्वेष करणारा. [सं] **०नंदन**–पुअव. ब्रह्मदेवाचे मानसपुत्र (नारद–वसिष्ठादिक). [सं.] **०नंदिनी**–स्त्री. ब्रह्मदेवाची कन्या; सरस्वती; अहल्या. 'तरी अहल्या ब्रह्मकन्यापूर्ण। गौतमाची निजपत्नी।' –रावि ७.१२९ [सं] **०निर्वाण**–न. ब्रह्मांड लय होऊन त्याशीं एकरूप होणें; मोक्ष. [सं.] **०निष्ठ**–वि ब्रह्मचिंतनांत निमग्न झालेला. [सं.] **०पद–पदवी**–नस्त्री. ब्रह्मनिष्ठतेचा अधिकार; पद; पदवी; अतिशय उच्च पद किंवा स्थान. (क्रि० पावणें; मिळणें, प्राप्त होणें). [सं.] **०पाश**–पु. ब्रह्मदेवाचा पाश; एक पुरातन शस्त्र. [सं] **०पिशाच–पुरुष**–नपु. ब्रह्मराक्षस [सं] **०पिसा**–वि. ब्रह्मराक्षसानें झडपलेला. **०पिसें**–न. ब्रह्मराक्षसानें झडपल्यामुळें उत्पन्न झालेलें वेड. **०पीडा**–स्त्री. (ल.) अतिशय पीडा देणारा, त्रासदायक, द्वाड मनुष्य; अतिशय दुःख किंवा त्रास. **०पुरी**–स्त्री. बहुतेक ब्राह्मणांची वस्ती असलेला गांव; विद्वान् व तपोनिष्ठ ब्राह्मणांनीं [illegible]लेली जागा, गल्ली, पठ. [सं.] **०प्रलय**–पु. १ ब्रह्मदेवाच्या प्रत्येक शंभर वर्षांच्या अंतीं होणारा सर्व विश्वाचा विनाश यात ब्रह्मा सुद्धा नाश पावतो. २ (ल) मोठा अनर्थ; संकट. [सं.] **०प्राप्ति**–स्त्री. ब्रह्माची प्राप्ति; ब्रह्मात जीवात्म्याचा लय; जीवास होणारा स्वस्वरूपसाक्षात्काररूप लाभ. [सं.] **०बंधु**–पु भ्रष्ट व बहिष्कृत ब्राह्मण. [सं.] **०बळ**–न. ब्राह्मणाचें तेज. 'क्षात्रबळाहुनि शक्रा! परम गुरु ब्रह्मबळ पहा नीट।' –मोअश्व १.९१. **०बिंदु**–पु (ल.) वेदपठन करतांना उडालेली ब्राह्मणाची थुंकी. [सं.] **०बीज**–न. ब्राह्मणवीर्यापासून उत्पन्न झालेला कोणीहि माणूस. [सं.] **०भाव**–पु. ब्रह्मस्थिति. 'परि अनुभविलिया ब्रह्मभावा। गंवसणी होऊनि।' –ज्ञा ८.२१०. [सं.] **०भावना**–स्त्री. सर्व चराचर ब्रह्म आहे असा ग्रह; अद्वैतमताचा स्वीकार. [सं.] **०भुवन**–न. ब्रह्मदेवाचा सत्यलोक. **०भूत**–वि. अद्वैतानुभवसंपन्न 'एवं ब्रह्मभूत ही होऊनी।'–यथादि ५.१८. **०यज्ञ**–पु. १ वेदाध्ययन. २ ऋषियज्ञ पहा. [सं.] **०योनि**–स्त्री. काशींतील एका खडकांतील लांब व अरुंद असें भोंक. या मधून प्रत्येक यात्रेकरूस जावें लागतें. जातांना जर तो मध्येंच अडकला तर तो पापी असें समजतात. तेथेंच रुद्रयोनि नावाचें एक दुसरें भोक आहे [सं.] **०रंध्र**–न. ज्यांतून मृत्यूनंतर आत्मा निघून जातो असें टाळूवरील गुप्त छिद्र; योगसामर्थ्यानें जेथून प्राण नेतां येतो असें मस्तकांतील गुप्त छिद्र; दहावें इंद्रिय. 'आकळलेनि योगें। मध्यमामध्यमार्गें। अग्निस्थानौनि निगे। ब्रह्मरंध्रा।' –ज्ञा ८.९४. [सं.] **०रस**–पु. १ दैविक ज्ञानाचा आस्वाद; वेदाभ्यासानें होणारा आनंद. २ ब्रह्मानंद. [सं] **०रात्रि**–स्त्री. ब्रह्मदेवाची

रात्र. ही देवांच्या सहस्र युगांबरोबर असते. [सं.] ०राक्षस-पु. १ विद्वान् पण अभिमानी ब्राह्मणाचें मरणोत्तर झालेलें पिशाच २ सामान्यतः ब्राह्मणाचें पिशाच [सं] ०रेखा-षा-लिखित-लेख-स्त्रीनपु. १ ब्रह्मदेवानें प्रत्येक प्राण्याच्या कपाळावर लिहिलेलें त्याचें नशीब; दैव; कधींहि न टळणारी गोष्ट २ (ल.) खातरीचें व निश्चयाचें भाषण, वचन इ० 'माझें बोलणें हें ब्रह्मरेषा आहे. कधींहि खोटें होणार नाहीं.' [सं.] ०र्षि-पु. १ ब्राह्मण जातीचा ऋषि पुरातनकालीं हा शब्द त्यांच्या विख्यात पावित्र्यामुळें ब्राह्मणांस लावीत असत. २ ब्राह्मण असून ऋषि; ब्राह्मणांतील सत्पुरुष [सं] ०लोक-पु. ब्रह्म्याचा लोक; सत्यलोक [सं.] ०वर्चस-वर्चस्व-न. १ वेदाच्या अभ्यासापासुन व व्रतपालनापासुन उत्पन्न होणारा पवित्रपणा; तेज. 'ब्रह्मचर्यव्रत धरणें। ब्रह्मवर्चस्व चढे तेणें।' -एभा १७.३३४. २ ब्राह्मणाची श्रेष्ठता, वैलक्षण्य. [स] ०विद्-वि. ब्रह्मज्ञानी; ब्रह्मवेत्ता (पुरुष). ०विद्या-स्त्री. आत्मज्ञान. [सं.] ०वीणा-पु. १ विशिष्ट प्रकारची वीणा; नारदाची महती वीणा २ मस्तक [सं.] ०वृत्ति-स्त्री १ ब्रह्माकार वृत्ति २ ब्राह्मणाची उपजीविका. [सं.] ०वृंद-पु १ ब्राह्मणाची सभा, समुदाय. २ (ल.) धर्मशीलतेनें, विद्वत्तेनें श्रेष्ठ असलेला ब्राह्मण [सं] ०वेत्ता-वित्-वि. ब्रह्मज्ञानी. [सं.[ ०शाप-पु ब्राह्मणाचा शाप. [सं.] ०शाला-ळा-स्त्री. वेदशाळा. 'केली जैसी वदनीं। ब्रह्मशाळा।' -ज्ञा १७.२२२. [सं.] ०संतर्पण-न. ब्राह्मणभोजन. ०सदन-न. ब्रह्मलोक ०संपदा-स्त्री. दैवी संपत्ति. ०सभा-स्त्री. ब्रह्मदेवाची सभा. [सं] ०संबंध-समंध-द-पु. ब्रह्मराक्षस. ०संविति-स्त्री ब्रह्मज्ञान. [सं.] ०साम्राज्य-न. विस्तृत, बलाढ्य अधिराज्य, अंमल; सम्राटाची सत्ता. ०सायुज्य-न. ब्रह्माशीं एकरूपता. [सं] ०साक्षात्कार-पु ब्रह्माची प्राप्ति; ब्रह्मदर्शन, निर्गुण साक्षात्कार. [सं.] ०सुख-न. ब्रह्माचें सुखः ब्रह्मरस. [सं.] ०सुत-पु. नारदऋषि. ०सूत्र-न. १ ब्रह्मदेवानें नेमलेली व्यवस्था, मार्ग; ईश्वरी नेमानेम. २ जानवें; यज्ञोपवीत. 'ब्रह्मसूत्रेंवीण ब्राह्मण। संन्यासी नव्हे दंडेवीण।' -भारा, बाल १०.६२. ३ लग्नाबद्दलचा ईश्वरी नेमानेम; ब्रह्म्यानें टरवून ठेवलेलें दैव. 'ब्रह्मसूत्र असेल तर त्या मुलीशीं ह्याचें लग्न होईल.' ४ (लग्न ठरवितांना) नवरानवरीची उंची मोजण्याचें सूत्र; प्रमाणसूत्र. ५ व्यासकृत वेदान्तसूत्रें. 'तो न पढो कां ब्रह्मसूत्र।' -ज्ञा १७.८५. [सं.] ०सूत्राची गांठ-स्त्री. दैवानें बांधलेली गांठ; लग्नाविषयीं ब्रह्म्यानें ठरविलेला पूर्व संकेत. ०सृष्टि-स्त्री. ब्रह्मदेवानें निर्मिलेलें जगत्, याच्या उलट विश्वमित्र सृष्टि. [सं.] ०स्थान-न. १ ब्रह्मदेवाच्या उत्पत्तीची जागा. २ बेंबी. ३ सहस्रदळकमळ; ब्रह्मरंध्रचक्र. 'तया अनाहताचेनि मेघें। मग आकाश दुमदुमों लागे। तंव ब्रह्मस्थानींचे वेगें। फिटलें सहजे।' -ज्ञा ६.२७९. [सं.] ०स्व-न. १ ब्राह्मणाची मालमत्ता. २ ब्राह्मणाचें घेतलेलें कर्ज ३ (सामा) कर्ज. 'त्याचे कालक्षेप चालत नाहींत, कमी जाहल्यामुळें ब्रह्मस्वही वहुत जाहलें.' -समारो १.३३. [सं। ०हृदय-न. एक नक्षत्रपुंज [सं.] ०हत्या-स्त्री. १ ब्राह्मणाचा वध, व त्यामुळें लागलेलें पातक. २ (ल) एकसारखें पाठीस लागलेलें दुर्दैव. [सं] म्ह० हैक-फट् म्हणता ब्रह्महत्या=क्षुल्लक कारणानें, प्रसंगानें मोठाले अनर्थ उद्भवणें ०हत्यारा-वि. ज्यानें ब्राह्मण मारला आहे तो. [सं.] ०ज्ञान-न. १ जगाचें कारण व आधार असलेल्या ब्रह्माचें ज्ञान. २ दैविक, अध्यात्मिक, विशुद्ध ज्ञान. ३ (ल) फुकट शहाणपणाच्या गोष्टी. [स.] म्ह० लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडा पाषाण. ब्रह्मज्ञानी-ज्ञ-वि. १ ब्रह्म जाणणारा. २ लोकांस ब्रह्मज्ञान सांगणारा. [सं.] ब्रह्माकार-पु जग आणि सर्व वस्तु ब्रह्मरूप आहेत असें मानणें. 'ब्रह्माकार-बुद्धि-दृष्टि-मन-वृत्ति.' [सं.] ब्रह्माची गांठ-स्त्री. लग्नाविषयीं ब्रह्मदेवानें ठरविलेली योजना, नेमानेम. ब्रह्मांड-न. १ जग, चवदा लोक; विश्व. चतुर्दशभुवनें व सत्यलोक पहा २ डोक्यावरील टाळू; ब्रह्मरंध्र 'ब्रह्मांडीं बैसली गोळी।' -ऐपो ८६. ३ -वि. प्रचंड; विस्तृत; अमर्याद. (समासांत) ब्रह्मांड-नदी-पर्वत-पाषाण-वृक्ष-साप-हत्ती-काम-कारखाना-कारभार-पसारा-कर्ज-खर्च-संसार [सं.] ब्रह्मांडांत न माणें-मावणें-क्रि. अतिशय असंख्य, मोठा, अफाट इ० असणें. ब्रह्मांडकटाह-पु विश्व; ब्रह्मांड. अंडकटाह पहा. [सं.] ब्रह्मांड गोलक-गोल-पु विश्व, ब्रह्मगोल. [सं.] ब्रह्मांड मंडप-पु. ब्रह्मांडाचा मंडप, गोल; विश्व. 'ब्रह्मांडमंडपा माझारीं। जिची प्रतिमा नाहीं दुसरी।' ब्रह्मांडज्ञान-न. जगाचें ज्ञान (मुख्यत्वें मानवी शरीराच्या अभ्यासापासुन व ज्ञानापासुन मिळालेलें); पिंडज्ञान. [सं] ब्रह्मानंद-पु. १ ब्रह्माचें सुख. २ ब्रह्माच्या ठिकाणीं लय झाला असतां होणारा आनंद. ३ (ल.) अत्यानंद, परमानंद. 'त्याचे ग्रंथ पाहतां विशेष। ब्रह्मानंद उचंबळे।' [सं.] ब्रह्मानंदी टाळी लागणें-क्रि. सच्चिदानंदरूपांत तल्लीन होणें. ब्रह्मासन-न. १ ब्रह्मचिंतन करण्यास योग्य असें शरीराचें आसन, ठेवणें, बसण्याची पद्धति २ अष्टाधिकारापैकीं एक; वतेकीपणाचा हक्क. [सं.] ब्रह्मास्त्र-न. १ ब्रह्मदेवाचें शस्त्र; त्याच्या मंत्रानें अभिमंत्रित केलेली काडी, बाण अथवा कोणतीहि वस्तु. 'नरकें ब्रह्मास्त्र सोडिलें जाण। तेंही गिळिलें अवलीळा।' २ ब्राह्मणाचा शाप. [सं.] ब्रह्माहमस्मिबोध-पु मी ब्रह्म आहें असा बोध. 'जें ब्रह्माहमस्मिबोधें सणाणें।' -ज्ञा १५.२५९. [सं] ब्रह्माक्षर-न. त्रयमूर्ति ईश्वराचें पवित्र आणि गूढ नांव. ओम् पहा. [सं.] ब्रह्मिष्ठ-वि ब्रह्मचिंतनांत निमग्न झालेला [सं] ब्रह्मीभूत-वि. स्वत. ब्रह्म झालेला; ब्रह्माशीं एकरूप झालेला, मृत संन्यासी [सं] ब्रह्मोपदेश-पु ब्रह्माचा निर्गुण ध्यानात्मक पूजेचा उपदेश. [सं.]

**ब्रह्मा**—पु. १ तीन देवांपैकीं पहिला; ब्रह्मदेव. 'हे आदि पुरुषाची माया। ब्रह्मेयाही नयेचि आया।' -ज्ञा १ २०३ २ २७ यागांतील पंचविसावा योग. ३ यज्ञांतील श्रौतस्मार्त, यागांतील सर्व कर्मे यथासांग पार पाडण्याविषयीं जबाबदारी वाहणारा व त्यांतील चुकांबद्दल प्रायश्चित्तरूप याग करणारा ऋत्विज. ४ (प्रशंसा) अघटित घटनासामर्थ्य अंगीं असलेला मनुष्य उदा० कलियुगाचा ब्रह्मा. ५ (गो) एक पिशाच [सं] ०ॐ–पु. स्तुतिपाठ; हरिः ॐ. 'तंव भाटीं ब्रह्मा ॐ केला। तेभा चैद्याचा दशु पसाया दीधला।' –शिशु १०२९.

**ब्रह्मा-र्मा**—पु सुताराचा बरमा; सामता. 'मध्वनाथ म्हणे चतुराननब्रह्मा। सुताराचा ब्रह्मा नाममात्र।' -मध्व ४९९. [फा.बर्मा]

**ब्रह्मी**—स्त्री. १ (कों.) खरसांबळी नांवाची औषधी वनस्पति हिच्या शेंगा खातात. २ ब्रह्मयाची एक शक्ति.

**ब्राकेट**—पु. १ तुळई, खाब याच्यामध्ये बसविलेला लोखंडी अथवा बिडाचा धीर २ कंस. [इं.]

**ब्रांडी**—स्त्री. विलायती दारू. [इं.]

**ब्राह्म**—वि. १ ब्रह्मदेव किंवा ब्राह्मण यासंबंधीं (शस्त्र, तेज, मंत्र इ०). २ बंगाल्यांतील केशवचंद्रसेन यांनीं स्थापिलेल्या ब्रह्मसमाज नांवाच्या पंथातील मनुष्य. [सं] **ब्राह्म-म्ही मुहूर्त**–पु. चार घटका रात्रीपासून सूर्योदयापूर्वीच्या दोन घटिकापर्यंतचा काल. 'चिंतीन त्वद्विजय ब्राह्ममुहूर्ती उठोनि सतत मी।' –मोभीष्म १.९५. [सं.] ०**विवाह**–पु. वरापासून कांहीं मोबदला न घेतां त्यास सालंकृत कन्यादान करण्याची विवाहपद्धति. [सं.] **ब्राह्मी संपत्ति**–स्त्री. १ दैवी संपदा (वैराग्य, दया, क्षमा, तितिक्षा इ०) २ विशुद्ध, पवित्र असें कृत्य. [सं.] **ब्राह्मी स्थिति**–स्त्री. ब्रह्माशीं एकरूपता; ब्रह्मैक्य; जीवनमुक्तावस्था. [सं]

**ब्राह्मण**—पु. १ आर्यांच्या चार वर्णांतील पहिला वर्ण; द्विज; विप्र. कांहीं शब्दांपूर्वी हा शब्द जोडला असतां उज्वल, तेजस्वी असा अर्थ दर्शविला जातो. उदा० ब्राह्मणहिरा=पहिल्या प्रतीचा तेजस्वी हिरा; ब्राह्मण भांग–सबजी–पिंपळ इ०=शुद्धतम जातीची भांग इ०. ब्राह्मणांच्या जातींचीं कांहीं नांवें त्या त्या वर्गाच्या शब्दाखालीं दिलीं आहेत. पंचगौड व पंचद्रविड पहा. २ ब्रह्मस्वरूप जाणणार। 'करितो ब्रह्मनिरूपण। जाणती ब्रह्मसंपूर्ण। तेचि जाणावे ब्राह्मण। ब्रह्मविद.' –दा ६.४.७६. ३ दैव अथवा पितृकार्यांत भोजनार्थ आमंत्रित व्यक्ति. ४ भिक्षुक. [सं.] (वाप्र.) **म्ह०** काळा ब्राह्मण गोरा शूद्र यास पाहून कांपे रुद्र. ०**घालणें**–क्रि. ब्राह्मणास भोजन देणें. ०**वाढप**–क्रि. (गो.) ब्राह्मण घालणें सामाशब्द– ०**कासोटा**–पु. (राजा.) खालच्या जातीच्या स्त्रियांनीं ब्राह्मणांच्या स्त्रियांसारखें वस्त्र नेसणें. ०**की–जनकी**–स्त्री ब्राह्मण लोकांचें कर्तव्य, पद. ०**घेवडा**–पु. (सांकेतिक) बोंबीलमासा. ०**चांडाल**–पु. जातिबाह्य ब्राह्मण (अन्य जातीची स्त्री असलेला अथवा आई ब्राह्मण व बाप शूद्र असलेला मनुष्य). [सं.] ०**जन**–पु ब्राह्मणाच्या घरीं शागीर्दपणा करणारा ब्राह्मण; पाणक्या; धोतरबडव्या. [सं.] ०**जनकी**–स्त्री. ब्राह्मणजनाचें काम; ब्राह्मणकी. ०**जाई**–पु. ब्राह्मणापासून हलक्या (किंवा शूद्र) जातीच्या स्त्रीच्या ठायीं उत्पन्न झालेला अशांची जात अथवा एक व्यक्ति. ०**थर**–पु ब्राह्मणांस योग्य (असे पोशाख कपडे इ०.) थर शब्द पहा ०**दिव्य**–न. पवित्र ब्राह्मणाचे पाय धरून घेतलेली शपथ. [सं.] ०**देव**–पु. (राजा.) ब्राह्मण पुजारी असलेला एक ग्रामदेव; गुरव, घाडी, राऊळ ज्याचा पुजारी आहे अशा देवाहून भिन्न. ०**दोक**–वि. ब्राह्मणानें आणलेलें; उपयोग केलेलें, स्पर्श केलेलें (पाणी, भांडें, कोणतीहि वस्तु). याच्या उलट कुणबी दोक. [ब्राह्मण+उदक] ०**बढाई–यी–बढायकी**–स्त्री ब्राह्मण जातीचा गर्व, अभिमान, बडेजाव ०**भोजन–संतर्पण**–न. धर्मार्थ ब्राह्मणांस भोजन घालणें. [स] ०**संबंध**–पु. ब्रह्मसंबंध पहा. [सं.]

**ब्राह्मणाई**–स्त्री. १ ब्राह्मणाचें वर्चस्व, प्राबल्य, प्राचुर्य. २ ब्राह्मण जातीचा ताठा, डौल. **ब्राह्मणाऊ**–वि. ब्राह्मणास योग्य, उचित, शोभणारा, विहित. **ब्राह्मणादिकजाति**–स्त्रीअव. हिंदूंच्या चार मोठ्या जाती; ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र. इ० [सं.] **ब्राह्मणी**–स्त्री. १ ब्राह्मणजातीची; स्त्री. २ (गो.) (ल.) उपहारगृह; चहाचें दुकान. 'ब्राह्मणी खाणी'=चहाच्या दुकानांत फराळ केला. –वि. ब्राह्मणासंबंधीं (चाल, वेष, भाषा इ०). **ब्राह्मण्य**- न. १ ब्राह्मणांचा समुदाय. २ ब्राह्मणपणा. 'ब्राह्मण्य रक्षावें आदरें।' –दा ४.२.२०. [सं.]

**ब्राह्मी**—स्त्री. १ एक औषधी वनस्पति. अपस्मार व रक्त शुद्धीवर उपयोगी आहे. २ कित्येक झुडपांचें सामान्य नांव. [सं.]

**ब्रीं**—स्त्री. (गो.) एक प्रकारचें कापड. [पोर्तु.]

**ब्रीद-दु**—न. १ व्रत; प्रतिज्ञा; शील; बाणा. बिरद, बिरीद पहा. (क्रि० पाळणें; सत्य करणें). 'देविका-ताट-काढा हें ब्रीदु माझें। तिहीं लोकीं।'–शिशु ७६. २ बाण्याचें दर्शक चिन्ह (पदक, कडें, बिल्ला इ०). 'पदीं राघवाचे सदां ब्रीद गाजे.' -राम २९. [सं. बिरुद] **ब्रिदाईत**–वि ब्रीद पाळणारा. **ब्रीदावळी**–स्त्री. गुणानुवाद प्रतिज्ञेची ओळ. बिरुदावलि पहा.

**ब्रूस**—पु कुंचा; कुंचली. [इं. ब्रश]

**ब्रेक**—पु. गाडी थांबविण्याचें साधन; आडकण; खरडी. [इं.]

**ब्रेड**—स्त्री. भाकर; पाव. [इं.]

**ब्लँकेट**—न. गरम पांघरूण, घोंगडी. [इं.]

**ब्लाऊज**—पु. एक प्रकारचें पोलकें. [इं.]

**ब्लॉक**—पु. १ भाग; खण. २ लाकडाचा ओंडा; ठोकळा; टोणका. –राको. ३ कायम ठशाचा ठोकळा. (इं.) प्रिंट. ४ आगगाडीचा एक भाग. [इ.]

**ब्वा**—पु. बावा; बुवा.

**ब्वांड**—न. १ ( कु. ) केळफूल. २ बीं काढलेलें काजूचें फळ. [ बोंड ]

**ब्वाब**—स्त्री ( कु ) मोठ्यानें आरडाओरड करणें.

**ब्वाम**—पु. १ ( कु. ) बोंम; बोंब. २ स्तनाचे सड.

---

# भ

**भ**—चोविसावें व्यंजन. अक्षरविकास –याच्या पांच अवस्था आढळतात त्या. १ ली गिरनार शिलालेख २ री नाणेघाटांतील लेख ( ख्रि. पू २ रें शतक ). ३ री ख्रि. पू. १ ल्या शतकाच्या सुमागचा मथुरेचा जैनलेख ४ थी समुद्रगुप्ताचा अलाहाबाद येथील स्तंभावरील लेख ५ वी हैहय जाजल्लदेवाच्या वेळचा लेख ( इ स. १११४ ).

**भ**—न. १ नक्षत्र. २ मेषादि राशि [ सं. ]

**भक**—पुन. १ पिशाच, ग्रामदेवता इ० कास दिलेलें अन्न, भक्ष्य; बळि ' देवाला कोंबडें भक दिल्हें मग मला सोडलें. ' २ ( अशिष्ट ) खाद्य; भक्ष्य, अन्न. ३ ( गो ) अधाशीपणा; खादाडपणा; आहार [ सं भक्ष्य ] ०चें-सक्रि. १ ( गो ) जास्त आहार करणें. २ ( कों ) पिशाच्चबाधेनें रोडावत जाणें.

**भक(क्)-कण-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. एकदम अग्नि पेट घेताना, धुरळा उडतांना, धूळ, फक्की दूरवर जात असतांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन.

**भकणी-णें**—बहकणी, बहकणें पहा. ' कितीएकास दुसरा मार्ग सापडला ते ते भकोन आडरानांत पडले. ' –भाव १२४. **भकवणी, भक(का)विणें**–बहकवणी, बहकविण पहा.

**भक(भा)भ(का)ग)**—स्त्री. १ ( मिरच्या, मिऱ्यें इ० खाल्ल्यानें, लावल्यानें होणारी ) आग; जळजळ. २ भूक वखवख ३ त्रास. –वि. ( व ) भयाण

**भ(क)(का)ल**—न ( बे ) अर्धा नारळ, नारळाचें [illegible]. बहकळ ]

**भ[illegible]लणी-णें** --बहकणी बहकणें पहा

**भ[illegible]णें**—उक्रि ( महानु ) ढकलणें: [illegible] तिएं लाजे चा स वामीं भकल्लिलीं ' –शिशु ६०७ [ बहकणें ]

**भकलणें**—क्रि. खाणें [ सं. भक्ष ]

**भकवणी भकविणें, भकाविणें**—बहकवणी–णें इ० पहा.

**भकळणें, भकळी**—भकाटी भकाळी पहा.

**भकाका**—क्रिवि. धूळ भुकटी इ० उडतांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन. [ ध्व ]

**भकाट**—न. उपासामुळें खोल गेलेला शरीराचा, पोटाचा भाग; ( पोटाची ) खळगी. (क्रि० बसणें; पडणें; पाडणें). ' गाईला कोण्ही वैरण घातली नाहीं म्हणून तिची भकाटें बसलीं. ' [ सं. भग=भोंक ] **भकाटें भरणें**–क्रि पोट भरणें. **भकाटी, भका(क)ळी**–स्त्री. १ ( फार दिवसांच्या उपवासानें ) पोट आंत, खालीं जाण्याची अवस्था. ' पोट भकाटीस, भकाळीस गेलें. ' ' पोटाला भकाळी पडली किंवा पोटाची भकाळी झाली. ' २ बाखल किंवा बाजू खोल गेल्यानें झालेला खळगा, उपासानें पडलेली पोटाची खळगी ( क्रि० बसणें; पडणें; पाडणें ). ३ कुशी. ' मेहनतीनें भकाट्या जशा उडतात तशा ह्या उडत नाहींत. ' –अश्वप १.२२३. **(पोट)भकाटीस जाणें**–क्रि. पोटांत अन्न नसल्यामुळें त्यास खळी पडणें; पोट खोल जाणें.

**भकांडा-डी**—पुस्त्री झोकांडा; झोकांडी ( क्रि० जाणें ).

**भका(कां)द-ध**—स्त्री बहकणें. ' कर्म उपासनेचा अभाव। तेथें भकाधेसि जाला ठाव। ' –दा ५.२ ५७ [ हिं. बहकना ]

**भका(कां)द्या-ध्या**–स्त्री. कुचेष्टा, निंदा ' वेदाध्ययन संहिता-रुचि। भकाद्या करिती तयांची। ' –तुगा ४१४९.

**भका(क)भक-भकां**—क्रिवि. अग्निज्वाला भडकतांना, ओकतांना, धूळ वगैरे उधळतांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन. [ ध्व ]

**भकारी**—स्त्री. १ ( ल. ) भाकरी. २ भांग [ भकार ]

**भकाविणें**—सक्रि. १ कुमार्गाकडे नेणें; भलतीकडे नेणें. २ घाबरविणें; गोंधळविणें [बहकाविणें; हिं बहकाना] **भकावणी**–स्त्री. बहकावणी.

**भकास**—वि. ओसाड; उजाड; निर्जन; शून्य ( गांव, घर इ० ) ( क्रि० पडणें ). ' पैस अवकाश आकाश। काहींच नाहीं जें भकास। ' –दा ८ १.२६. [का. बक] **भकाशा मारणें** अक्रि ( व ) भयाण वाटणें ' मुलें नसल्यानें घर भकाशा मारतें '

**भका(क)ळणें**—क्रि १ ( राजा ) ( उपवासानें ) पोट आंत जाणें, खोल जाणें. २ बखल पोटाचा अमण (मनुष्य' भकाळी)

**भकाळी**—स्त्री भकाटी पहा

**भकी**—स्त्री ( गो ) तावडी: पेंच

**भकील भोजन**—न अन्नवस्त्र. ' भकील भोजनाची चिन्ता। –ख्रिपु २ २८ ८१

**भकूट**—न लग्न इ० कर्तव्य असतां वधूवरांच्या राशि त्याचें शत्रुत्व मित्रत्व इ० पाहणें: घटित. [ सं. भ=नक्षत्र+कूट ]

**भक्कम**—वि १ बळकट: घट्टमट्ट. दांडगा; दृढ: जंगी: मोठा ( मनुष्य, वस्तु, ओझें दागिना इ० ) २ पुष्कळ: प्रचुर: विपुल; रगड [ का. बक्खळ ]

**भकळ** –वि खपाटीस गेललें ( पोट )

**भक्त**—नपु. शिजविलेले तांदूळ, इतर धान्य; शिजविलेला, पक्व, भात. –वि. शिजविलेला (भात). [सं.] ०**द्वेष**–पु. अन्नाचा तिटकारा [सं.]

**भक्त**—पु. भजन-पूजन करणारा, उपासक; निष्ठावंत पूजक, सेवक; परायण उदा० भगवत्-गुरु-हरी-पितृ-भक्त. 'भक्त म्हणिजे विभक्त नव्हे।' –दा ४.९.६. –वि भजलेला; सेविलेला. [सं. भज्=पूजणें] ०**कामकल्पद्रुम-काजकैवारी-जनाभिमानी**–पु. भक्ताच्या इच्छा परिपूर्ण करणारा: त्यांच्या कामाचा कैवार घेणारा; त्याचा संरक्षक (देव, गुरु, साधु) [सं] ०**भाविक**–पुअव. (व्यापक) पूजक; भजक ०**राज**–पु भक्तश्रेष्ठ. ०**वत्सल**–वि भक्तास अनुकूल, प्रसन्न; भक्तावर अति प्रेम करणारा. [सं.] **भक्तालय**–न. भक्तरूपी मंदिर 'ऐशा भक्तालयीं चोखटीं।' –ज्ञा १८.१५०९.

**भक्ति**—स्त्री. १ पूजा; भजन २ अंत:करणाची प्रवृत्ति; तत्परता; श्रद्धा (धर्ममार्गात) ३ आवड; प्रीति; शौक; आसक्ति; निष्ठा. ४ ऐक्य. –हंको. [सं.] ०**बसणें**–क्रि. मान्य होणें; योग्य, चांगला, उचित वाटणें; प्रीति वाटणें. **भक्तीचें दुकान घालणें-मांडणें-पसरणें-करणें**–क्रि भक्तीचा डौल, आव घालणें. **भक्तीनें आवडणें**–क्रि. पराकाष्ठेचा आनंद होणें; अत्यंत शोकी असणें. ०**प्रेम**–न. भक्तीचें प्रेम; भक्तियुक्त प्रीति, आसक्ति. ०**भाव**–पु. १ भक्तीचा, पूज्यतेचा भाव; भक्तियुक्त वृत्ति; भक्तियुक्तता. २ आसक्ति, शौक; प्रवृत्ति. [सं.] ०**मान्-मन्त**–वि. १ धार्मिक; भजनशील. २ आसक्त; तत्पर. ३ श्रद्धाळु; निष्ठायुक्त. [सं] ०**मार्ग**–पु १ भक्तीनें मुक्ति मिळविण्याचा मार्ग, संप्रदाय; श्रवण, कीर्तन इ० साधनांनीं ईश्वराची केवळ भक्ति केल्यानें मुक्ति मिळूं शकते असें ह्या मार्गाचें तत्त्व आहे. ज्ञानमार्ग व कर्ममार्ग या दोहोंहून भक्तिमार्ग हा भिन्न आहे. २ भक्तितत्त्व; भक्तीनें देवत्व मिळविण्याचा प्रकार. ३ विधीकडे, कर्मकांडाकडे लक्ष्य न देतां केलेली भक्ति [सं.] ०**मार्गी**–वि. भक्तिमार्गास अनुसरणारा. [सं] ०**योग**–पु उपासना [सं.] ०**वेड**–न. भक्तीशिवाय कांहीं न दिसणें; अंधभक्ति. ०**हीन**–वि. भक्तिशून्य; भक्ति नसलेला. **भक्तीण**–स्त्री १ भक्ति करणारी स्त्री; विशेषत: देवी, भैरोबा इ० देवळांतील झाडलोट करणारी बाई (हिच्या ठिकाणीं रोग बरे करण्याची इ० शक्ति असते असें मानतात). २ कलावंतीण. **भक्त्या**–पु. देवभक्त; देवऋषी.

**भॅक्रॉपण**—न (गो.) भेकडपणा. [भॅक्रॉ]

**भॅंक्रा**—पु. (गो) एक वन्य जनावर; भेकरें.

**भक्स(स्स)ण-णी**—स्त्री (गो) क्षमा; माफी.

**भंखार**—पु (राग.) यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल व तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत व निषाद असे याचे स्वर आहेत. जाति संपूर्ण-संपूर्ण, वादी पंचम, संवादी षड्ज, समय रात्रीचा तिसरा प्रहर

**भग**—पु न. (अशिष्ट) भक; भक्ष [सं भक्ष]

**भग**—न पु १ क्षत: व्रण (मुख्यत्वें उपदंशापासुन झालेला). २ योनि; स्त्रियांचें उपस्थ. 'भगद्वारा चालवीं संसारू।' –एभा ८.२५८. [सं] ०**वड-वाड-वळ**–न मोठें भोंक; खिंड; जमीनींत पडलेला खड्डा. २ जखम, व्रण ०**देव**–वि. (ल) बाहेरख्याली (माणूस). ०**पाळ**–वि. विषयासक्त. 'चेल्याचा सुकाळ। पिंडदंड भगपाळ।' –तुगा २८१९. ०**भाग्य**–न. स्त्रियेनें आपल्या स्वत:च्या आणि पुरुषानें आपल्या बायकोच्या, मुलीच्या इ० देहविक्रयानें मिळविलेली संपत्ति, श्रेष्ठता. [सं.] ०**भोग**–पु. योनिसुख ०**वृत्ति**–स्त्री वेश्यावृत्ति, भगजीविका. [सं] **भगल**–पु (ना) गोटया खेळण्यासाठीं जमीनींत केलेला खळगा. ०**लेपण**–न रतिविलास, इश्क. **भगळ-ळी**–स्त्री. चीर; भेग; भगदळ (विशेषत: जमीनींतील, इमारतींतील). **भगळ-भगाड-स**–स्त्रीन. १ मोठें, ओबडधोबड भोंक; खिंडार (भिंत, ताल, बंधारा यातील). २ रुंद तोंडाची जखम, क्षत.

**भग**—न ऐश्वर्य; नशीब. [सं.]

**भंग**—स्त्री. भांग. [सं. भंगा] **भंगट-ड**–वि. १ भांग पिण्याचें व्यसन असलेला २ (ल) अमर्याद, उधळेपणा करणारा. 'त्याचा खर्च भंगड आहे, अशानें तो कर्जबाजारी होईल.' ३ (व) उधळ्या. **भंगी**–वि भंगट. **भंगीचंगी**–पु. चंगीभंगी; व्यसनी; रंडीबाज. 'असा भंगीचंगी गृहवधु तया काय करणें।' –उमाविलास ४. **भंगेरा-री**–वि. भांग तयार करणारा, विकणारा **भंग्या**–वि. भंगट

**भंग**—पु १ फुटणें; मोडणें; नाश पावणें २ भेदणें; फोडणें; चिरडणें विध्वंस होणें: नासणें; बिघाड (वस्तु, सैन्य, काम याचा); मोडणें (वचन, कायदा, मंडळी, संघ इ०); कमी करणें; खचविणें (हिंमत). ३ असें करण्यानें झालेली स्थिति. ४ नुकसानीची भीति, संभव; अपाय. 'लाकडी काम करावें त्यापेक्षां दगडी कामास भंग नाहीं.' ५ पराभव. 'सोसिल इतर कसी वे मदिपूंची भंग राजि रामा जी।' –मोभीष्म ११ ३६. ६ तरंग; लाट 'गंगेसि भंग बहु पाणउतार होतो।' –र २ (सामासांत) आज्ञाभंग (आज्ञेचें उल्लंघन); आशा भंग (आशेचा मोड); उत्साहभंग (उत्साहाचा नाश); इच्छा-कार्य-गात्र-गृह-छंदस्-तपस्-तेजस्-धैर्य-नियम-प्रीति-मनस्-मान-राज्य-व्रत-शक्ति-सैन्य-स्नेह-भंग. [सं. भंज्=मोडणें] **भंगास जाणें**–क्रि. मोडणें; चकाचूर होणें. **भंगणी**–स्त्री. १ मोड; नाश. 'होय भंगणी द्वंद्वाची।' –एभा २३.९७७. ३ त्रेधा; दाणादाण. 'पडलां पंचाननाची घाणी। होय मदगजा भंगणी।' –एभा २९.७१. **भंगणें**–

उक्रि. १ मोडणें; नासणें; छिन्नभिन्न होणें; नाश पावणें भंग पहा. २ ढळणें; हलणें. 'पळ सात्यकी न भंगे आयंतीं सुदृढ हीरको-पळसा।' -मोकर्ण ९.११. ३ पराभव पावणें. 'मज साग संजया ते ज्या सामर्थ्यें रणीं न भंगति तें।'-मोभीष्म ६.४. [सं भंग; फ्रें जि. फंग, बंग] ०देश-पु. रणांगण. 'चूर्ण करील तुम्हांला धर्मवता, भंगदेश हा खल हो!।'-मोभीष्म १ २१ [सं] ०शिर-वि. फुटण्यासारखें. भंगुर. 'परंतु काचेचें भाडें भंगशिर आहे.' -अश्वप २.६१ भंगुर-वि. १ भंगलेला; वाकलेला २ (ल) नश्वर; क्षणिक ३ पळपुटा. 'रतिसंगरिं भंगुर हा कचपाश हो यासि तो पाठिकडे दडणें।' -अकक राधावर्णन २८. [सं]

**भगडतू**—पु. (व) एक खेळ

**भगण-न**—पु. १ मेषादि बारा राशी. २ नक्षत्रसमूह. 'परी सर्वांत श्रेष्ठ रामचंद्र। रोहिणीवर भगणात जैसा।' -राविं ८ ९६ ३ राशिमार्ग; राशिचक्र आक्रमण्यास लागणारा काल. [सं. भ= नक्षत्र+गण=समुदाय]

**भगत**—पु १ भजक; अनुयायी; उपासक. 'भगत परि राउळें। कीं सेविजताए।'-ऋ ८१. २ देवऋषी; देवभक्त्या; देवस्की करणारा; ज्याच्या अंगांत येतें तो. ३ (व.) निमग्न. [सं. भक्त] ०की-स्त्री भगताचे विधि, मंत्र इ० कर्म. ०राज-पु. (प्रेमानें, वात्सल्यानें) भक्त. ०वाडा-पु. देवाच्या पुजाऱ्याची राहण्याची जागा.

**भगंदर**—पु ज्यांत गुद व इतर गुह्य भाग यांच्या ठिकाणीं नाडीव्रण आणि सव्रण छिद्रें होतात असा रोग याच्या आठ जाती आहेत त्या:-अर्शस्, उन्मार्गी, किंवा उष्ट्रग्रीव, उष्ट्रशिरोधर, ऋजु, परिस्रावी, परिक्षेपी, शतपोनक, शंबूकावर्त [सं.]

**भगभग**—स्त्री १ (मिरची इ०) तिखट पदार्थांचा उपयोग केल्यानें उत्पन्न झालेली आग, दाह, जळजळ २ (ल) त्रास; उपद्रव; पीडा; रखरख. (क्रि० लागणें; करणें). 'मला कां तुझी भगभग?' ०णें-अक्रि. आग, जळजळ होणें (मिऱ्यें इ० उगाळून लावण्यानें, हात, डोळे, तोंड इ०ची). भगभगाट-पु. फार भगभग भगभगीत-वि. उष्ण; तिखट जाळ; चरचरीत, दाह करणारा (मसाल्याचा पदार्थ, अन्न इ०)

**भगर**—स्त्री. वरी, सावा, बरटी इ० धान्य (भरडून, कांडून कोंडा काढलेलें); वऱ्याचे तांदूळ. -वि (व) कणयुक्त. [भुगा] भगरा-पु. १ कुसकरलेली, भुगा झालेली कोरडी स्थिति (भाकर, पीठ, मिरीं इ०ची). २ कोरडा भुगा; चुरा; कुसकरा. ३ डाळीचें पीठ घालून, परतून केलेली मुळयाची भाजी. -वि. साधारण दळलेला; कुटलेला; वाटलेला; कुसकरलेला. भगराळा-राळ-पु. १ कुसकरलेलें, चूर्ण केलेलें, साधारण चुरलेलें द्रव्य; चुरा. भुगराळा पहा. २ -वि. (व.) कणयुक्त. [भुगा, भगरा]

**भगल**—स्त्रीन ढोंग; लबाडी; ढोंगी वर्तन. 'जाणों रणमरणाचें करउनि पुनरपि हरी भगल, बाहे।'-मोआश्रम ५ ३ [हिं.] (वाप्र) ०उडणें-क्रि ढोंग उघडकीस येणें. ०भावार्थी-वि. आंत कावेबाजी व बाहेरून निष्कपटीपणा, प्रामाणिकपणा दाखविणारा भगली-ल्या-वि १ ढोंगी, दांभिक; कपटी 'भगली ते फुगवीसी उरावरील गोळे।' -मध्व ३८२. २ खुषमस्कऱ्या. [भगल]

**भग(ग्ग)ल**—स्त्री (राजा. कु) उपहास; थट्टा; फजिती. (क्रि० करणें; मांडणें; उडवणें). 'विठू परशरामाचे छंद असेग बेबहारी। भगलीच्या उडाल्या भगल भणभण सारी।'-पला ८०. [हिं. भागना=भगील=पळालेला] ०उडणें-अक्रि (व.) फजीती उडणें ०उडविणें-सक्रि. (ना) थट्टा करणें, फजीती करणें; रेवडी उडविणें. भगली-वि. (गो) थट्टेखोर. भगेल-स्त्री. उपहास; विटंबना इ०

**भगवत्**—वि १ संस्कृत भगवान् याचें नपुंसकलिंगी रूप. २ भगवान् (ईश्वर) या शब्दाचें समासात होणारें रूप. उदा० भगवत्कृपा=ईश्वरी कृपा, भगवदिच्छा, भगवत्-सेवा; भगवद्रूप; भगवन्माया, भगवद्भक्ति, भगवद्भजन, भगवत्प्राप्ति इ० [सं. भग= ऐश्वर्य+मत् (वत्)] भगवंत-पु १ परमेश्वर; देव; षड्गुणैश्वर्यसंपन्न ईश्वर. 'यश श्री वैराग्य ज्ञान। ऐश्वर्य औदार्य हे षड् गुण। नित्य वसती परिपूर्ण। तो मी नारायण भगवंत।'-एभा १५.९७. २ (काव्य) अलौकिक सामर्थ्यवान् ऋषि, साधु इ० भगवंतपण-न. ईश्वरत्व (पालन करण्याचा स्वभाव). 'अंगींचें भगवंतपण। आठवीं बापा।' -ज्ञा ११.४४३. भगवती-स्त्री. १ पार्वती; देवी. २ (ल.) भगवती आई (तांबड्या मिरच्यांची पूड). ३ मृदंगावर वाजविण्याचा एक ठेका. याचे बोल:-त्ता धिगधी, त्ता धिग धित्ता. [सं.]

**भगवा**—वि. कावेच्या रंगाचा या रंगाचे कपडे बहुधा संन्यासी वापरतात. [सं भृगु] ०झेंडा-पु मराठ्यांचें निशाण. भगवें करणें-घेणें-क्रि संन्यासी होणें; संन्यास घेणें.

**भगवान्**—पु १ षड्गुणैश्वर्य संपन्न परमेश्वर; देव 'अभाग्याचा साथी भगवान' २ षड्गुणैश्वर्यसंपन्न या शब्दाच्या दोन व्याख्या आहेत त्या येणें प्रमाणें:-१ 'उत्पत्तिं प्रलयं चैव भूतानां मागतिं गतिम्। वेत्ति विद्यामविद्यांच स वाच्यो भगवानिति।' २ 'ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः। ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णा भग इतीरितः। सकल ऐश्वर्य, धर्म अथवा वीर्य, कीर्ति, द्रव्य, ज्ञान, वैराग्य हीं सहा भगें (ऐश्वर्यें) ज्यास आहेत तो भगवान् होय [सं. भग+वत्]

**भंगसाळ**—स्त्री. १ मोठा पण भयाण वाडा. २ (कों.) देवळाचा गाभारा व सभामंडप यांमधील प्रदेश. ३ भगदाड; भगदळ; रुंद भेग. ४ कुडाळदेशकर ब्राह्मण राजवटींत बांधलेला

कुडाळच्या नदीवरील संध्येचा घांट. ५ ( गो. ) शिल्पकामाच्या उपयोगी, लांकडाचा कारखाना.

**भंगसाळी**—पु. गुज राथी दुकानदारांचा एक वर्ग व व्यक्ति.

**भगसुर्वे**—सक्रि. ( गो. ) क्षमा करणें.

**भंगळ**—वि. भकाळ; सडपातळ. 'पोट भंगळ पातळ ।' –वसा ३८. [ भकाट ]

**भगळवणी**—वि. ( कु. ) तिखट

**भंगार**—पु १ ( कु ) लाडिकपणानें हाक मारण्याचें संबोधन २ ( व. ) कुळाचाराच्या दिवशीं देवाच्या नैवेद्यासाठीं केलेले कणकेचे तळलेले मोदक, फळें इ०

**भंगारा**—पु ( व ) दुखणें; आजार. 'घरभर भंगारा नी कोणा करूं अंगारा.'

**भगास**—न भगदळ, खिंडार, मोठा व्रण. –वि. ओसाड; निर्जन; वसति नसलेलें [ भग ]

**भगिनी**—स्त्री बहीण [ सं ] **भागिनेय, भागिनेयी**–पुस्त्री बहिणीचा मुलगा; भाचा–मुलगी, भाची.

**भंगी**—स्त्री. १ वळण; झोक; डौल; धाटणी; रीत. 'हेंचि पहावयालागीं । आवेक बोलिलों बाहेरिसवडिया भंगीं ।' –ज्ञा १०. ३२६ २ एकाच अर्थी केलेले वाक्याचे भिन्न प्रकार. 'तो जाऊव त्यानें जावें या भंग्या मात्र दोन परंतु अर्थ एकच.' –शास्त्रीको ३ क्रम 'श्लोकसंगतीची भंगी ।' –एभा ११ ६९०. ४ स्थिति व गति दाखविण्यासाठीं काढलेली खगोलाची आकृति, नकाशा [सं.]

**भंगी**—पु. मेहतर; झाडूवाला, हलालखोर [ हिं. ]

**भगीरथ प्रयत्न**—पु पराकाष्ठेचा व विस्मयकारक प्रयत्न. 'ही वस्तु मला भगीरथप्रयत्नानें मिळाली ' [ सं भगीरथ=एक राजा+प्रयत्न=उद्योग या राजानें स्वर्गातून मृत्युलोकीं भागीरथी आणली अशी दंतकथा आहे ]

**भगेंद्र**—पु इंद्र [ स भग+इंद्र ]

**भगेंद्र**—न भगंदर, त्यानें पडलेलें क्षत. [ स भंगदर ]

**भगोडा**—वि. ( व. ) पळपुट्या. [ हिं भागना=पळणें ]

**भग्गार**—क्रिवि ( गो ) फिरून फिरून, पुन पुन:

**भग्न**—वि १ भंगलेला २ ( ल. ) उधळलेला: खंडविखंड केलेला. फोडलेला, नष्ट. बिघडलेला नासलेला, पराभूत भंग पहा. [ सं भंज् ] ०**दंतोच्चारण**–अ. १ दांत पडून गेल्याप्रमाणें बोबडें बोलणें. २ अस्पष्ट उच्चार [ सं ] ०**नेत्र**–वि. दृष्टिमांद्य उत्पन्न करणारा ( सन्निपात, एखादा रोग). [ सं ] ०**मनोरथ**–वि. मनातील इच्छा पूर्ण न झालेला: निराश भ्रष्टसंकल्प 'त्वरित भग्न मनोरथ जालिया । नयनीं शोकनद्या स्फुट आलिया ।' [ स ]

**भचक्र**—न १ राशिमंडल २ नक्षत्रांचा समूह. मंडल [स]

**भंजक**—वि. मोडणारा; नाशकर्ता (शब्दश: व ल.) [सं. भंज ]

**भजणें**—सक्रि. १ आराधणें; पूजणें. 'अशा तुज न जो भजे मनुज धिक् तयाचें जिणें.' –केका ११. २ सेवा करणें 'तैसा आपलिया विस्मृती । आत्मा आपणचि प्रकृती । सारिखा गमोनि पुढती । तियेसीचि भजे ।' –ज्ञा १५ ३५४. ३ आचरणें; अनुष्ठान करणें 'आतां ययाचि कर्मा भजतां ।' –ज्ञा १८.६२८. ४ आदर बाळगणें; सत्कार करणें; मान देणें. 'पैं राजमुद्रा आथिलिया । प्रजा भजे भलतया ।' –ज्ञा १८.८४९ ५ अवलंबणें; आश्रय करणें 'परी जे विचारूनि पुनरावृत्ति । भजतीचि ना ।' –ज्ञा २. १७६. ६ घेणें; अनुसरणें; संमत होणें. 'भजे जसी वृषा कपिला ।' –मोविराट ६ ५८. ७ लग्न लावणें. 'गांधर्वेंचि वरातें भजल्या ।' –मोआदि १७ ४२ ८ भजनीं लागणें; मैथुन करणें. 'वंध्येतें भजतां जरि फळ तरि येईल यश कुनीतीतें ।' –मोशल्य ३.५४. ९ ( काव्य ) कबूल करणें; ग्रहण. मान्य करणें ( विवरण, अर्थ इ०). 'वाक्यांत भावार्थ असा भजावा ।' [ सं. भज्=पूजणें ] **भजता–भजक**–वि. भक्त, भजन करणारा. **भजती**–स्त्री. भजनाचा मार्ग 'परि ते भजती उजरी नव्हे ।' –ज्ञा ९.३४५ **भजन**–न. १ आराधना; पूजा; सेवा २ स्थापना करणें. 'करिति जनमेजयाचें अभिषेकुनि सविधि पितृपदीं भजन ।' –मोआदि ५ ८९. ३ भक्तीचें कृत्य म्हणून देवाचें नामस्मरण करणें. ४ देवाचें स्तोत्र, गीत. ५ आर्जव, खुशामत, मनधरणी करणें 'द्रव्यलोभें भजन-संबंधू ।' –एभा २६ ४५४ ५ (गणित) भागाकार. [सं ] **भजनीं–भजनास लागणें**–क्रि नादीं लागणें. **भजनपूजन**–न (व्यापक) १ पूजा २ सेवा [सं.] **भजनफल**–न (गणित) भागाकार. [सं.] **भजनशील**–वि. भक्तिमान; धर्मनिष्ठ; सत्कर्मपरायण. 'कीं दैत्य-कुलीं भजनशील । प्रल्हाद पूर्वी जन्मला ।' **भजनी**–वि १ भक्तिमान् : धर्मनिष्ठ २ धर्मभोळा; दांभिकाकडून सहज फसला जाणारा. **भजनीय, भज्य**–वि पूजन, आराधना, सेवा करण्यास योग्य. 'जाला मृत्यु भज्य कालोवा । भक्तिच्या घरीं ।' –अमृ ९.३०. [ सं ] **भजिनणें**–सक्रि. भजनीं लागणें. 'आणिकही गोपपंक्ति । स्नेहेंकरिं भजिनले ।' –रास १ ४६०.

**भंजन**—न १ मोडणें; फोडणें २ ( ल ) दाणादाण; मोड; विध्वंस निर्दाळण. विघात; नाश. भंग पहा. ३ तीव्रता नाहींशी करणारी, दोषापहारक वस्तु 'कडव्या सुरणास गोडा करण्यास भंजन राख ' [ सं भज् ] **भंजणं**–क्रि मोडणें; तुकडे करणें. 'प्रहरून शकट भजिला अंघ्रिघातें ।'

**भंजाडी**—स्त्री. ( व. ) सरकारी जंगल.

**भंजाळ**—न त्रास अडचण· लचांड [ सं. भवजाल ]

**भजें**—न हरभऱ्याचें पीठ भिजवून त्याचे लहान लहान गोळे तेल तूप इ०मध्यें तळून केलेलें खाद्य; बोंड: तळलेल्या हरभऱ्याच्या किंवा इतर पिठाचें रुचकर खाद्य.

**भजेडवणें**—सक्रि. १ विधवेचें वपन करणें. २ (ल.) एखा-द्याची खोड मोडणें.

**भट**—पु. (गो) लाकूड इ० पोंखरून नाश करणारा किडा. **०पडप-**अक्रि. किडे पडणें; अळया पडणें (लोणचें इ० कात) **भट पडो**-उद्गा जळो, मरो या अर्थी, रागानें व तिरस्कारानें योजावयाचा शब्द (कदाचित भट म्हणजे लाकूड पोखरणारा किडा याच अर्थी येथें भट शब्द असून चुकीनें ब्राह्मण असा अर्थ घेतला गेला असावा) **म्ह०** तुझ्या कामात भट पडो=कार्याचा नाश व्हावो [हि भट-भट्टी=जाळून नाश करणारी]

**भट**—पु १ ब्राह्मण, परंतु विशेषत: प्राय.भिक्षुकीवर निर्वाह करणारा. २ जोशी; ज्योतिषी; गणक. 'घटका तिथि भट सागता बरवा आहे मुहूर्त।'—ऐपो १३२. ३ भिक्षुक ब्राह्मणाच्या नावापुढें लावावयाचा प्रतिष्ठादर्शक शब्द जसें-रामभट इ०. [सं. भट्ट] **म्ह०** भटाला दिली ओसरी, भट हातपाय पसरी **०गोसावी-**पु संसाराचा त्याग करून धर्मनिष्ठ बनलेल्य ब्राह्मणास आदरार्थी म्हणतात **०पण, भटकी**-नस्त्री गावचें उपाध्येपण. 'करितां भटपण आधीं आला मजला उमाप तिटकारा।'—स्फुटआर्या. **०मार्ग-**पु. (महानु.) महानुभावपंथ. 'नको गा सीगणा. मज भटमार्गीचा उपदेसु असें:'—नागदेवाचार्यस्मृति १७३. **भटजी-**पु सामान्यत: ब्राह्मणास आणि विशेषत: वैदिकास संबोधण्याचा शब्द. **भटभाई-**पु. उपहासार्थी ब्राह्मणास संबोधण्याचा शब्द. **भटी-**वि. भटासंबंधीं, भटांचा **भटुरगा**-पु (निंदेनें) गुणहीन भटजी, भट. **भटूद्र-**पु. (निंदेनें) भट. **म्ह०** भादव्यांत भट्द्र आश्विनात तट्द्र (पुष्ट होतात) **भटोबा**-पु. व्यवहारज्ञान नसलेला ब्राह्मण. **भटोरखाना**-पु. (निंदेनें) ब्राह्मणाचा समुदाय, संघ. [भटोर, भट+खाना] **भटोरा-**पु. (निंदेनें) भट.

**भट**—पु. योद्धा; लढवय्या. 'आम्हाकडील जो भट म्हणसी तो करुनि संगरा मेला।'—मोभीष्म ५.१८. [सं भट]

**भंट, भंटोळें**—न (बे.) त्रिकोणाकृति दाढा असलेलें लांकूड; दुबळक असलेलें, दोन फाटे असलेलें लांकूड.

**भटई**—स्त्री. (व.) उन्हाळयांत होणारें लहान व काळया रंगाचें वांगें. [हिं. भटा=वांगें]

**भट-कण-कन-कर-दिशीं**—क्रिवि. १ पटकन; जलदीनें. २ भडकण अर्थ २ पहा.

**भटकणें**—अक्रि व्यर्थ हिंडणें; फिरणें, भटकया मारणें [हिं. भटकना; सं. भ्रश्-भ्रष्ट] **भटकभवानी-भैरव**-स्त्रीपु. भटकणारी स्त्री किंवा पुरुष. **भटके-कया**-पुस्त्रीअव. रिकामें हिंडण्या-फिरण्याची क्रिया. (क्रि० मारणें; मारीत फिरणें) **भटक्या-**वि. १ भटकण्यास संवकलेला. २ धुकार. **भटकणी**-स्त्री व्यर्थ हिंडणें, फिरणें इ०.

**भटमोगरा**—पु. एक फुलझाड मोगऱ्याची गेंददार जात. बटमोगरा पहा.

**भटा(ट्या)रखाना**—पु. १ जेवणावळींत किंवा मेजवानींत पवित्र व अपवित्र, उच्च व नीच, किंवा पृथक् स्वयंपाक करणाऱ्या लोकांच्या मिश्रणानें होणारी अव्यवस्था. २ भंडारखाना; खाणावळ; हॉटेल ३ स्वयंपाकघर. [हिं. भटियारखाना] **भटा(ट्या)री, भटियारी-**पु भटारखाना चालविणारा; खाणावळवाला. [हिं.] **भटारीण**-स्त्री खाणावळवाली.

**भटियार**—पु. (संगीत) एक राग यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गाधार, कोमल व तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत व तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी कोमल मध्यम. संवादी षड्ज. गान समय रात्रीचा तिसरा प्रहर.

**भटी**—स्त्री. भट्टी पहा.

**भटू(टो)र**—न. कृत्रिम धातु (तांबें, कथील, जस्त इ० कांचा). **भटोरी**-वि. भटोर धातूचा, कृत्रिम धातूचा केलेला. **भटोरें**-न. भदर किंवा भटोर धातूचें भांडें.

**भट्ट**—पु. १ विद्वान्, विद्यावान् मनुष्य. २ ही एक पदवी असून ती विद्वान् ब्राह्मणाच्या नावास जोडतात. ३ भट; भिक्षेवर निर्वाह करणारा ब्राह्मण. [सं.] **भट्टाचार्य**-पु. विद्वान् ब्राह्मणास गौरवार्थी म्हणतात. [सं]

**भट्टा**—पु आंत विस्तव असून बाहेरून झांकलेलें मातीचें भांडें. [हिं बट्टा; सं. भृष्टि]

**भट्टी**—स्त्री. १ चुलाण. २ लोहाराची साळ; सामान्यत: विस्तवाच्या भोंवतीं केलेलें मातीचें आवार (हलवायाचें, भडभुंज्याचें); धोब्याच्या सतेल्याचा चुला. ३ भबकारा. ४ (ल.) भट्टींत तयार केलेलें द्रव्य, एकदा तयार केलेलें परिमाण, घाणा. ५ तयार करण्याची युक्ति; खुबी; पद्धति; रीति; रचना, घडण; ढब. 'ही भट्टी चांगली उतरली' 'ह्या रसायणाची भट्टी त्या वैद्यास चांगली ठाऊक आहे.' 'शरीराची-पागोट्याची-मसलतीची-भट्टी.' ६ (केळीं, विड्याचीं पानें इ०) पिकविण्यासाठीं त्यांभोंवतीं गवत, केळीचें पान इ० गुंडाळून दाबून किंवा लिंपून ठेवण्याची क्रिया. ७ दारूचा कारखाना, गुत्ता. [सं भृष्टि; हिं.] **०बिघडणें-बिनसणें**-एखाद्या गोष्टींत क्रमभंग, चूक इ० झाल्यामुळें ती व्हावी तशी चांगली न होणें. **०साधणें**-१ स्वयंपाकाच्या पदार्थांवर अग्निसंस्कार योग्य प्रमाणात होणें. स्वयंपाक इ० उत्तम साधणें. २ (ल.) एखादें काम करण्याची खुबी, हातोटी साधणें, प्राप्त होणें. **०कुंभार**-पु. कुंभारांवरील कर. **०खुमार**-न. दारू, मद्य तयार करणारावरील कर. **०भाजणारा**-पु भडभुंज्या; कुंभार; भट्टी पेटविणारा.

**भट्टे भर**—न. (व) कडब्याच्या शंभर ते एकशेंपन्नास पेंढया.

**भट्या**—पु. एक जात, व तींतील माणूस.

**भट्यारंग**—पु. (माळवी) निळसर वांग्यासारखा एक रंग. [हिं. भटा=वांगें]

**भड**—न (व) कणीस काढून घेतलेलें ज्वारीचें ताट; कडबा; कापसाच्या शेतांतील ज्वारीचा धाडा. –स्त्री. हलकें व जळतांना तडतडणारें जळण. [ध्व भड !] **भडस**–स्त्री.(कों.) शेत जमीन भाजण्यासाठीं तीवर पसरलेलें जळण (काटक्या, पानें, तृण इ०), भडभुंज्यानें पोहे इ० भाजण्याकरितां चुलींत घातलेलें हलकें तडतडणारें जळण. **०भरणें**–भाताच्या जमीनींत राब पसरणें. **भडस-शा**–न एक प्रकारचें जाड व कमी प्रतीचें भात; भाकरीच्या उपयोगी भात. **०साची दाढ**–स्त्री झाडाच्या टहाळांची दाढ, हे टहाळ जमीनीवर पसरून शेणाच्या दाढीप्रमाणें यांवरहि गवत पसरावें लागतें **भडसाळ**–स्त्री. तादुळाची एक जात.

**भॅड**—न. १ (गो.) कंबर. २ (गो) पार असलेला पिंपळ.

**भंड**—पु. नट; कुशीलव; भांड; नटवा. [सं.]

**भंड**—न (विरू.) अभंड पहा.

**भंड**—न.पु. १ प्रायः कुभांड; तुफान; खोटा आरोप. २ त्रास. 'या पोरानीं फार भंड दिला आहे बुवा !' ३ (गो) लचाड. **तोंडाचें भंड करणें**–क्रि शिवराळ होणें.

**भंड**—न. विटबना, फजिती; उपहास; हंसें. 'दिवाळखोराचा माण्ड। पाहतां वैभव दिसे उदंड। परी तें अवघें थोताड। भंड पुढें।' –दा १० ८ २५. [सं भाड] **०खुलणें-फुटणें**–(व.) खरं तें बाहेर पडणें, गौप्य बाहेर येणें; गौप्य स्फोट होणें. **भंडमा (वा), भंडवा(व)डा, भंडोडा**–स्त्रीपु (कों.) विटंबना; फजीती; हंसें; धिडवडे. (क्रि० करणें; उडविणें; माडणें; होणें; उडणें) 'व्यंग जालिया भंडमा कीजेल। देवदेवताची।' –स्वादि ५.३. ५६. **भंडवाणें**–न. फजीती; फजीतवाणें. 'न सोसिता भंडवाणें। सहजचि होये।' –दा १२.२.१३. **भंडाई**–स्त्री. अपकीर्ति, फजिती. 'न व्हावी ते झाली आमुची भंडाई।' –तुगा ३१७. **भंडावा, भंडाळी**–पुस्त्री विटंबना; फजिती, उपहासं. (क्रि० करणें). **भंडिमा**–स्त्री. ढोंग; फजिती. 'ते जाण तत्त्वता अति भंडिमा।' –एभा ३ ३८८.

**भंड**—वि. १ भाडखोर; आग्रही; हट्टी. २ थट्टेखोर. ३ लबाड. [सं] **भं(भां)डाई**–स्त्री. भांडण; कज्जेदलाली. 'तुका म्हणे किती करिसी लंडाई। होईल भंडाई थोर पुढें.' 'वहिणी म्हणे आतां करीन भंडाई।' –व ४८८. **०उभंड**–न निरर्थक बडबड; पोकळ वल्गना. 'ज्याचे मुखीं भंडउभंड। तो येक मूर्ख।' –दा २.१.२७.

**भडक**—स्त्री. १ चकाकी; झळाळी; आग; चमक (क्रि० मारणें). २ आग. [हिं.] –वि. १ चकचकीत; भबूक; झळकदार; घवघवीत, तेजस्वी (तांबड्या व पिवळ्या रंगाची वस्तु, पदार्थ). २ प्रकर्षार्थी लाल या शब्दास जोडतात. जसें:–लाल भडक; लाललालभडक. ३ प्रकर्षार्थी तिखट शब्दास जोडतात. उदा० तिखट भडक; आगभडक. ४ चकाकणारें (सोनें, रुपें इ०कानीं); भबूक; झळक; ढबदार (पोशाख, तो घालणारा). **०आग**–स्त्री. चितेस दिलेला अमंत्रक अग्नि. **०जर**–पु. भरजर. **०दार**–वि. चकचकीत, लक; डोळ्यांत भरण्यासारखा (दागिना, पोशाख, मनुष्य).

**भड-कण-कन-कर-दिनीं-दिशीं**— क्रिवि. १ (कोंडा, पूड, विस्तव इ०) एकदम उधळताना, भडकताना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन; भडभड पहा. २ झटकन; जलद; पटकन्; फटकन् [ध्व.]

**भडकणें**—अक्रि. १ भडाडणें; भयंकर रीतीनें वर जाणें व पसरणें; मोठ्या जोरानें पेटणें (ज्वाळा); जोरानें उठणें (वारा). २ चोंहोंकडे पसरणें (प्रकाश, वास) ३ भग्न होणें; पागणें (सैन्य). ४ बुजणें; बेबंद पळणें (पशु); बुजून दूध देईनासें होणें (दुभतें गुरूं). ५ मोकळें सुटून यथेच्छ वागणें; आज्ञाभंग करणें; बावचळणें. ६ फार रागावणें. ७ भलतीकडे उडून जाणें (निरोप नेणारें कबूतर) ८ सुटणें अर्थ ३ पहा. ९ भटकणें; हिंडणें; फिरणें; भटक्या मारणें. [ध्व. भड !] **भडकणी**–स्त्री. भडाडणें; उधळणें; पेट, आग पसरत जाणें. **भडकतेल**–न. खरजेस लावावयाचें एक तेल; मलम, घायतेल पहा.

**भडका**—पु. १ भडाड; मोठी ज्वाळा; आगीचा पेट. 'अधर्माचा भडका उठी। योषिता दृष्टी देखतां।' –एभा १४.३६६. २ भयंकर आग; दाह (तिखट पदार्थाच्या सेवनानें, ज्वर, पित्ताधिक्य, क्रोध यानीं होणारा. 'उदरीं व्यथेचा भडका। शिवक्षोभें।' –कथा ६. १७८१. ३ वाऱ्याचा सोसाटा. ४ जोराची चपराक. ५ आवाज होणारा भपका (भुसाचा, भुकण्याचा) [ध्व; भड !] **भडकाग्न-ग्नि**–स्त्रीपु. भडाग्न पहा. **भडकावणी**–स्त्री. फिरविणें; भटक्या मारावयास लावणें (चकवून, कावेबाजपणानें).

**भडका(क)विणें**—सक्रि. झकविणें; छकविणें; ठकविणें; भोंदणें.

**भडकावि(व)णें**—सक्रि. १ (आवाज होईल अशी) तोंडात मारणें; चपराक देणें; चमकावणें (चपराक, थप्पड इ०). 'त्याचे तोंडीं जेव्हा एक भडकाविली तेव्हा तो उगा राहिला.' २ फेंकणें; झुगारणें. 'भूगोळदुर्गी पांचही यंत्रें। स्वसत्ता औषधीचीं पात्रें। भरोनिया स्मरारिमित्रें। भडकाविलीं दुष्टावरी।' –ह २६.१६. [भड=चपराकीचा आवाज] **भडकी**–स्त्री. १ उत्तेजन; भर; चिथावणी. (क्रि० देणें). २ उडीवर उडी घालून बोलणें (विक्रीच्या पदार्थाकरितां). (क्रि० देणें; करणें). **भडक्या**–वि. भटक्या.

**भडकी**—स्त्री. (व.) (करडीचें) तेल काढण्याची रीत.

**भडकीव**—वि. १ भितरा; बुजरा (पशु) २ बुजलेला; बिचकलेला.

**भडखंबा-भा**—पु. (महानु.) रणभूमीवर शेंदूर लावून उभा-केलेला खांब; विजयस्तंभ. 'तैसा प्रमदाचा भडखंबा। पुतळियेचेनि मिसें कीजे उभा।' –भाए ३६०. [ सं. भट+स्तम्भ ? ]

**भडखळ-ळी**—स्त्री. १ रणभूमि. 'भडखळीं राहुनि घे आदलु। विचारेंसीं।' –भाए ३६४. २ पहाऱ्याची जागा. [भट+स्थळ ? ]

**भडंग**—वि. १ सढळ हाताचा; उदार; दानशूर. २ उधळ्या; उडाऊ. [ हिं. ]

**भडंग**—न. (कु.) उष्ण (तेल).

**भडंग**—पु. (व.) मोठा पतंग. 'भडंग उडविण्याजोगा वारा आहे.'

**भडंग**—वि. (गो.) भडक. 'तांबडाभडंग' =लालभडक.

**भडंगभिकार-री**—नपु. १ उपजीविकेचें कांहींहि साधन नसलेला भिकारी, २ भिकाऱ्यांचा समुदाय. (क्रि० येणें; जमणें; मिळणें; दाटणें; चालणें). [ हिं. ]

**भडंगळ**—वि. भयाण असून अफाट, शून्य, ओसाड, निर्जन पण प्रचंड (घर, मैदान).

**भडगा**—पु. (राजा.) (प्र.) भडका.

**भडडड**—क्रिवि. तोफांच्या एकसारख्या होणाऱ्या बारांच्या आवाजाचें अनुकरण होऊन. [ ध्व. ]

**भंडपुराण**—न. लांबलचक व कंटाळवाणी गोष्ट; आश्चर्यकारक व अविश्वसनीय गोष्ट; चऱ्हाट; बडबड. [ भंड=देवीनें मारलेल्या एका दैत्याचें नांव; यासंबंधीं पुराणांत एक लांबलचक कथा आहे. ]

**भडभड-भडां**—क्रिवि. १ मोठयानें ओकणें, जखमेंतून रक्त घळघळा वाहणें, भळभळ पाणी ओतणें, निरर्थक निंदा, धमकावणी, बडबड करणें. वाटेल त्या बाजूनें लोकांनीं जलदीनें घुसणें, जलद पेटणें, मोठयानें धडकणें, अमर्याद खर्च करणें इ० क्रियांचें अनुकरण होऊन). झटकन; पटकन; फटकन. 'भडभड भलतेंच बोले।' तुकारामाचीं पदें. (नवनीत पृ. ४४८). २ तोफ इ० कांच्या आवाजाचें अनुकरण होऊन. (क्रि० वाजणें; उडणें). [ ध्व. ] **भडभडा-ड्या**-वि. मनास येईल तें, विचार न करतां बोलून टाकणारा. **भडभडणें**-अक्रि. १ भडाडणें (विस्तव). २ मोठयानें पेट घेणें (गृह, जळण इ०). ३ पुष्कळ जोरानें व आवाज करून वाहणें, फळफळणें; उफाळणें. ४ दुःखानें ऊर, अंतःकरण भरून येणें. **भडभडून येणें**-क्रि. शोकानें कंठ दाटून येणें. **भडभड (डा)वि(व)णें**-सवि. जोरानें पेट घ्यावयास लावणें. **भडभडाट**-पु १ आगीचा अतिशय भडका, डोंबाळा. २ दणका; धडाका; तडाखा; कडाका; गर्जना (तोफा, वादळ, शिंगिगाळ, निंदा यांचा); सामान्यतः मोठा, गंभीर व एकवटलेला, गोंधळाचा आवाज, गोंधळ. ३ दंगलीची, मजलसीची मौज; आनंद करणें.

**भडभडीत**-वि. फटफटीत; चकचकीत, स्वच्छ. (क्रि० उजाडणें).

**भंडभंड**—न. वृथा बडबड.

**भडभसक**—न. (व.) आडमाप.

**भडभुंजा**—पु. चुरमुरे इ० भाजके पदार्थ तयार करणारा, विकणारा. [ सं. भ्रष्टभुंजक; हिं. ]

**भड(डि-डे)मार**—पु. जोराचा व मोठा हल्ला; एकसारखा मारा (तोफा, बंदुकी, दगड, निंदा, अपशब्द यांचा). [ ध्व. भड+मार ] **भंडवा, भंडवाडा**-भंडमा पहा.

**भडवळ**—स्त्री. (कों.) जमीनींतील भेग; चीर.

**भड(डु)वा**—पु १ कलावंतीण नाचतांना किंवा गातांना मृदंग वाजवून साथ करणारा तिचा नोकर, साजिंदा. २ (ल.) कुटण्या. ३ स्त्री भाड्यानें देणारा. ४ (ग्राम्य.) एक शिवि; अपशब्द. [ सं. भर्याट, भट् (भाटक=भाड्यानें देणें); हिं. भडुआ; बं भेडुया ]

**भडस-सें**—न. (का.) १ भडका; भडाड; लोट; पूर; आधिक्य. २ उदय; उत्कर्ष. 'जैसे भाग्याचिये भडसे।' –ज्ञा ६.३५४ ३ महत्त्व; थोरपणा. 'एऱ्हवी ब्रह्मेपणाचिये भडसें। न चुकतीचि पुनरावृत्तीचे वळसे।' –ज्ञा ८.१५२. ४ उमाळा. 'गुरूसीं उपजे भडस।' –विपू १.६४. –स्त्री (महानु.) उत्कट इच्छा; हांव. 'परि माझी पुरवी भडस।' –भाए ६४३. –वि. ओबडधोबड. [ ध्व; भड ? ] **भडसवाणें**–न (महानु) हावभावयुक्त भाषणें, कोटिक्रम, चर्चा 'तार्किकाची भडसवाणें। तैसी बोलसी परपक्षदूषणें।' –भाए ५८४ [ भडस+वाणी ]

**भडस**—भड पहा.

**भडाका**—पु. भडका पहा. [ भड ! ]

**भडाग**—स्त्री. १ प्रेतास, चितेस दिलेला अमंत्रक अग्नि; भडाग्नि. २ (राजा.) तिखट; झोंबणाऱ्या पदार्थाच्या सेवनानें होणारा दाह. [ भड+आग ]

**भडाग्न-ग्नि**—पु. अमंत्रक चिताग्नि [ भड+अग्नि ]

**भडाड**—पु. १ आगीचा भडका; डोंब. 'होकां जे महाप्रळयींचा भडाडु।' –ज्ञा ११ ३०४. २ मोठ्या शब्दाचा दणका (तोफा, मेघगर्जना इ०कांच्या); मोठा व गंभीर असा एकवटलेला आवाज (सामान्यतः) [ भड ] **भडाडणें**-अक्रि. १ भडकणें; भबकणें; धडधडां जळूं लागणें (अग्नि). 'भडाडे क्रोधाग्निकरुनि मग तो तेच समयीं।' –मध्व ५८१. २ दणकणें; धडाडणें; मोठा शब्द करणें (तोफा इ०नीं) ३ जोरानें वाहणें: उफाळणें (रक्त इ०). 'मुखांतून शोणित भडाडलें।' **भडाडां, भडाभड-भडां**–क्रिवि जलद. झपाट्यानें व लागोपाठ पडणाऱ्या वस्तूंच्या आवाजाचें, मोठ्यानें पुन्हां पुन्हां ओकण्याच्या अवाजाचें, तोफांच्या

दणक्याचें, निंदा, धमकावणी व शिव्यांचा वर्षाव, तुफानी वारा इत्यादींच्या शब्दाचें अनुकरण होऊन.

**भंडार**—न. जामदारखाना; खजिना; भांडार. [ सं. भांडागार ] ०**भरपूर**–न. भरलेला आणि भरून वाहणारा खजिना, सांठा. या शब्दाचा गोसावी इ० लोक आशीर्वाद देताना उपयोग करितात. ' भंडारभरपूरकालकंटक दूर. ' **भंडारी**–पु १ जामदार. भांडार राखणारा; खजिनदार. २ –स्त्री भिंतींतील पैसे ठेवण्याचें फडताळ.

**भंडार**—पु हळदीचें चूर्ण. हें मुख्यत्वें खंडोबास वाहतात. ' मार्तंडा तुझे पाय मी पाहीन । पुजुनि सुमनें भंडार वाहीन । ' –मध्व ३१०. ०**उधळणें**–सक्रि. १ हळदीची पूड उधळणें. २ ( ल. ) स्तुति करणें. **भंडारा**–पु ( बायकी ) भोजनापूर्वी, तीर्थ घेण्यापूर्वी थोडी हळद घालून मंगळागौरीस वाहिलेली कणीक. **भंडारी**–स्त्री भंडारा ठेवण्याची पिशवी (खंडोबाच्या भक्ताची).

**भंडारा**—पु १ बैरागी, साधुसंत यांना दिलेलें भोजन २ भंडारखाना. ३ ( ल. ) धूळधाण. 'भंडारा उडवी रिपुचा।' –संग्रामगीतें ३५. ०**उठणें**–अक्रि.बराच बोलबाला होणें ०**करणें**– ( यावरून प्रसाद वाटून घेणें ल. ) चटणी करणें, खाणें ०**घालणें**– क्रि वारकरी व इतर लोक याना जेवण घालणें **भंडारखाना**–पु. १ सोवळें–ओवळें, शिष्टपणा इ० जेथें रहात नाहीं असा दंगलीचा जेवणसमारंभ. ' चिंचवडकर देवांचे घरीं भंडारखाना आहे. ' २ खजिना. [ भंडारा+खाना ]

**भंडाराउलटा**—पु ( हिं. ) (जंबिया) चड्डीच्या नाडीजवळ पोटाखालीं वाथ्याच्या जागेला भंडारा म्हणतात. आपल्या हातातील जंबियानें आपल्या डावीकडच्या अर्थात जोडीदाराच्या उजव्या बाजूवरील वाथ्यावर चड्डीच्या नाडीजवळ मारणें **भंडारासीधा**–पु ( हिं ) आपल्या हातातील जंबियानें आपल्या उजवीकडच्या अर्थात जोडीदाराच्या डावीकडील वाथ्यावर चड्डीच्या नाडीजवळ मारणें.

**भंडारी**—पु १ शूद्रांतील एक वर्ग व त्यांतील व्यक्ति हे ताडमाडापासून दारू काढतात २ ( नाविक ) जहाजावरील जेवण तयार करणारा इसम, खलाशी. **भंडारडा-ड्या**–पु (तुच्छतेनें) भंडारी **भंडारथल, भंडारव(वा)डा**–नपु. भंडारी लोकांची राहाण्याची जागा, मोहल्ला ' माड व भंडारथल देखील ' –वाडबाबा १.३. **भंडारमाड**–पु फळें येऊ न दारू, माडी काढण्यासाठीं राखून ठेविलेला माड याच्या उलट नारळमाड ( फळासाठीं ठेवलेलें नारळाचें झाड ). [ भंडारी+माड ]

**भंडाव(वि)णें**—सक्रि. अतिशय त्रास देणें, छळणें; सळो का पळो करून सोडणें. [ भंड ]

**भंडी**—स्त्री. १ दोन मुलांपैकीं एकानें कविता म्हटली असतां तिच्या शेवटीं येणारें अक्षर जिच्या आरंभीं अशी कविता दुसऱ्या मुलानें म्हणावयाची याप्रमाणें आलटून पालटून कविता म्हणण्याचा प्रकार. अशाच तऱ्हेनें कोणत्या तरी अटी ठेवून कविता म्हणणें. ( क्रि० लावणें; चढविणें, होणें ). २ फजिती; फसवणूक.

**भंडी**—स्त्री ( तंजा. ) गाडी. [ तामिळ वंडी ]

**भडू**— पु. ( व. ) मोठा वानर; वानरांच्या कळपांतील नर. [ हिं. बडा. सं भट? ] **भडेराक्षस**–पु. राक्षसी, रानटी, मांग हृदयाच्या क्रूर माणसास तिरस्कारानें म्हणतात. [ हिं. बडा+राक्षस ]

**भडोड-डू**—पु अन्न. [ प्रा. ]

**भडोळ-ळी**—स्त्री. ( कों. ) भडवळ; चीर; भेग ( जमीनींतील ). ' शेतांत फार भडोळया आहेत. '

**भॅड्रॉ**—वि ( गो. ) बहिरा [ सं. बधिर ]

**भड्डी**—वि ( गो ) माळ जमीन [ बरड ]

**भड्डुंचें, भरडुंचें**—क्रि ( गो ) भरड दळणें; भरडणें.

**भड्या**—पु. ( माळवी ) लुटारू [ हिं ]

**भण**—स्त्री. ( अशिष्ट ) बहीण; भगिनी. ' माझ्या भणीच्या कोवंशा । ' –ऐपो ८९. [ सं. भगिनी ]

**भणकणें**— अक्रि. ( व. ) बिघडणें; फिरणें. 'डोकें अभ्यासानें भणकतें. ' [ भडकणें ]

**भणका**—पु १ घोळका ( माशा, मधमाशा इ०कांचा ). २ (ल ) गुणगुणणारा आवाज; (सामान्यतः) घुमणारा नाद [सं भण्]

**भणभण**—स्त्री. १ गुणगुण आवाज ( माशांचा इ० ). २ ओसाडी; भयाणपणा ( जागेचा ). ३ सोसाटयाचा वारा; अशा वाऱ्याचा आवाज. –वि ओसाड **भणभण-भणां**–क्रिवि. गुणगुण आवाजाचें, वाऱ्याच्या सणसण आवाजाचें, अनुकरण. [ध्व.] (वाप्र ) **भणभण करणें**–अक्रि. १ शून्य, भयाण, ओसाड दिसणें ( घर, निर्जन अरण्य, गाव ). २ घो घो करणें (माशा इ०). **भणभण फिरणें**–स्वैरपणें इतस्ततः हिंडणें, भटकणें. **भणभणणें**–अक्रि १ गुणगुणणें; घोंगावणें ( मधमाशा, माशा इ०कांचा थवा ) २ ( ल ) दाणादाण होणें; दशदिशा पळ काढणें ( सैन्य इ० नीं ) ३ झणझणणें; सणसणणें ( मार, रोग इ०कांमुळें कान इ० ). ४ वाजणें; गरजणें ( वारा, तोफ ). ५ डोक्यांत, कानांत भणभण असा आवाज होणें. **भणभणविणें**–सक्रि १ मोटयानें गुणगुणणें, घोंगावणें, सणसणणें, वाजणें, गरजणें इ० क्रिया करावयास लावणें २ (जोराच्या टोलानें) झणझणण्यास, भिरभिरण्यास लावणें ( कान इ० ) ३ कानशिल भणभणे असा पदार्थ चाखविणें, डोक्यास चोळणें **भणभणाट**–पु १ गुणगुणाट कानठाळ्या बसविणारें घोंगावणें. २ शून्यता उदासपणा; भयाणपणा; ओसाडपणा (रिकामें घर, गाव, रुक्ष अरण्य याचा) **भणभ(णां)णित**–

वि. रिकामेपणामुळें, ओसाडपणामुळें उदास, शून्य दिसणारा (ओसाड गांव, इमला इ०). 'आश्रमात पाहती येऊन। दिसे शून्य भणभणित।' -रावि १६९ **भणभणया**-वि निरर्थक हिंडणारा भणभण फिरणारा. **भणाट(ण)णें**-अक्रि. मोठ्यानें गुणगुणणें, घोंगावणें, सणसणणें, वाजणें, गरजणें इ०. **भणाटा, भणाण-णा**-पु १ भणभणाट. २ पळापळ; पांगापाग; दाणादाण. 'इतुक्या उपरी भणाणा फौजेचा झाला।' -ऐपो ८८. ३ (विरू. भणाटा) पराकाष्ठेची घालमेल; अव्यवस्था (कामाची, धंद्याची) ४ नाश; ओसाडी. 'सात्यकि कुरुकटकांचा, पवन घनाचा तमा, करि भणाण।' -मोद्रोण १५.२७ **भणाण**-क्रिवि भणभण शब्द करून, घो घो आवाज करून 'भणाण-माशा उडाल्या-बसल्या-जमल्या-दाटल्या इ०.'

**भणक्या**-स्त्रीअव. निरर्थक हिंडणें, फिरणें; भटकी. (क्रि० मारणें) [भटकणें]

**भणं(ण)ग**-पु १ अनाथ; अतिशय गरजू मनुष्य, भिकारी 'पीतों हें रक्त तुम्हें हासत होतासि मज जसा भणगा।' -मोकर्ण ४५.२३. २ -स्त्रीन भयाण (इमारत); ओसाड (गांव). [हिं. भंडग; का. बगगु] ०**भिकार-री**-नपु. भडंगभिकार पहा

**भणणें**-क्रि म्हणणें; बोलणें 'तंव भणे उद्धवदेउ।'-शिशु ११५. [सं. भण्] **भणउ(औ)नि, भणौनि**-क्रिवि. म्हणून; करितां. 'भण उनि तेयां मदनाचें आवगणें।' -शिशु २६८ 'भणऔनि न करावां प्रसंगु।' -दाव ६२. **भणितु-त**-न. बोललेली, उच्चारलेली गोष्ट -वि. बोललेलें; म्हटलेलें 'आतांचि भणितु होतें।' -शिशु ११६. [भणणें] **भणिजणें**-सक्रि म्हणविणें. 'जें स्थान सेविती त्रीपुरुखु। अद्यापि भणिजताति।' -ऋ २३ **भणीपै**-क्रि म्हणावें. 'वैरीवना वनवा। तूं तें भणीपै।' -शिशु ५१७.

**भणदी-दें**-स्त्रीन. १ विस्तव घालून डोक्यावर घेतलेलें खापर; भदें 'नाहीं जाळीत भणदीं। उदो म्हणोनि आनंदी।' -तुगा १८१६. २ पोत; मशाल.

**भणभणणें**-अक्रि. चकचकीत, पूर्ण उजाडणें; दिशा उजळणें (सूर्य, चंद्र उगवतांना) **भणभणीत**-वि. (सूर्य, चंद्र यांच्या उदयानें) प्रकाशित झालेली (दिशा). ०**उजेडणें**-अक्रि. फटफटणें; पहाट होणें. ०**दुपार**-स्त्री भर दुपार; मध्याह्न **भणभण**-स्त्री. लखलखाट.

**भणीये**-क्रि. (महानु) सांगितलेलें काम करणें; मूर्तिनिष्ठ व्यापार; कर्तव्य. 'तुम्हां एकु भणीये गा।' -लीलाचक्रधर.

**भतका, भसका, भदका**-पु १ हलक्या हातानें केलेला प्रहार; धपका; गुद्दा; ठोसा. (क्रि० मारणें; देणें). २ फेंकलेला गोळा; बदका; लपका (शेणाचा). (क्रि० मारणें; घालणें). [ध्व.]

**भत्ता**-पु १ विशेष नोकरीसाठीं ठराविक पगारापेक्षां अधिक दिलेलें वेतन; खेरीज मुशाहिरा (लढाईवरील सैन्यास, चाकरास, हमालास) २ ज्याकडे सरकारी कामगार पाठविला असतो त्यानें त्या कामगारास ठेवलेल्या दिवसाबद्दल द्यावयाची पोटगी; प्रवास खर्च ३ सावकारानें दिवाणी तुरुंगात ठेवलेल्या माणसास सावकाराकडून मिळणारा खर्च. ४ केदी, कोर्टात साक्षीकरिता येणारा साक्षीदार, समन्स (कोर्टाचा हुकूम) बजावणारा पट्टेवाला इ० कांचा पोटगी खर्च. ५ निकृष्ट प्रतीचें खाणें; डाळें, मुरमुरें इत्यादि एकत्र केलेलें खाद्य [सं भज्=भक्त, हिं.] **भत्तेकरी**-पु भत्ता घेणारा (लष्करी शिपाई, पट्टेवाला, हमाल, बिगारी इ०).

**भंद**-न (प्र) भणदी, भदें भदें पहा

**भद-कन्-कर-दिनीं-दिशीं**-क्रिवि अनेक आकस्मिक आणि जलद क्रियाच्या, भडकणाऱ्या विस्तवाच्या, जोरानें पडणाऱ्या जाड व मऊ गोळ्याच्या आवाजाचें अनुकरण होऊन [ध्व.]

**भदभद**-स्त्री फुटक्या भांड्याचा आवाज.

**भदभद-भदां**-क्रिवि. बदबदा, तीव्र, जलद आणि लागोपाठ होणाऱ्या आवाजाच्या, तडा गेलेल्या, फुटलेल्या वाद्याच्या आवाजाचें, मऊ गोळा पडताना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन.

**भदभदणें**-अक्रि. बदबदणें; बद्द वाजणें (तडा गेलेलें वाद्य). भदभद पहा. [ध्व.]

**भदरणें**-सक्रि. भादरणें; बोडणें; कातरणें (केस इ०). **भदरंचामी**-स्त्री. (ना.) बोडंती; खरडपट्टी **भदरपीडा**-स्त्री. (व.) त्रास; दुःख.

**भदाड**-न. १ मगदाड; खिंडार. २ (सामा.) भोंक.

**भदाड-डें**-न. (व कुण.) मडकें (सामा तोंड फुटलेलें). [भदें] ०**वासणें**-अक्रि मोठ्यानें रडणें.

**भदाभद-भदां**-क्रिवि. बदाबद. भदभद पहा [ध्व]

**भदु(दा)ला, भदाडा**-वि. फोपसा; लठ्ठ झालेला.

**भ(भं)दें**-न. १ अर्धे मडकें, खापर. २ आंत विस्तव घातलेलें खापर गोसावी, गोंधळी लोक हें विशिष्ट प्रसंगीं घेऊन डोक्यावर नाचतात (क्रि० घेणें). 'मस्तकीं भदें जाळावें। पोतें आंग हुरपळावें।' -दा २.६.३० ३ वांकलेलें, फुटलेलें भांडें, फुटलेली टिमकी, कर्कश कंठ, कठोर आवाज, नासलेलें, बिघडलेलें काम, धंदा इ० कांस निंदेनें म्हणतात 'त्याचे एकदां लाख रुपये फसले त्यामुळें त्याच्या व्यवहाराचें भदें झालें.' [भदें= पोकळ] ०**घेणें**-सक्रि. शेताच्या, गांवच्या वादग्रस्त सीमेवर जाऊन तेथें वरील प्रकारचें खापर हातांत घेऊन शपथविधि करणें. **तोंडाचें भदें करणें**-शिवीगाळ करणें. ०**भर**-वि. (निंदार्थी) पुष्कळ.

**भदैवी**-स्त्री. कृपा; दया.

**भद्र**—पु हत्ती. 'मग भद्राचेनि महाद्वारें। उभे ठेलें।'-शिशु ५१०. [सं.] ०**जाति-ती**-पु. १ हत्ती. 'जेथ महामद भद्रजाती। आवरतीना।'-ज्ञा १.१३३. २ उत्तम घोडा.

**भद्र**—न १ भाग्य; शुभ; कल्याण. २ दोन खांबांच्या मधील भाग (देवळाच्या सभामंडपाच्या) ३ (गो.) मुख्य मंडपाच्या चारी बाजूस असलेले उतरत्या छपराचे सोपे प्रत्येक; सायवान. ४ सभागृह; दिवाणखाना; मंत्र्याची कचेरी. 'भद्रासि दैत्यमुदनी। एतां जाला।'-शिशु २३०. 'जेंवीं भद्रीं निजलेनि रायें।'-एभा २६५. ५ राज्य; सिंहासन. 'इकडे राव बैसला भद्रीं। बोलाविलें प्रधान गुरु मंत्री।'-कथा १८.८०. ६ अहमदाबाद येथील भद्रकालीच्या देवळाजवळचा भाग -वि. १ भाग्यवान्; सुखी. २ मंगल; प्रसन्न, अनुकूल; अनुगुण. ३ (सामा) हितावह; चांगला. [सं] **भद्रंकर-कारक-कारी**-वि. सुखकर; मंगल; अनुकूल. **भद्रकाली-ळी**-स्त्री. काली; दुर्गादेवी. ०**देश**-पु (इजिप्त) मिसर देश. -अश्वप १.३४. ०**पुरुष**-पु. महापुरुष. 'प्रस्तुत भद्रपुरुष हे आपल्या देशबंधूंच्या पारलौकिक हिताची एवढी कळकळ बाळगीत असता ...'-नि ३४०. [सं.] ०**मुस्ता-मोथा**-पु. एक सुवासिक गवत; नागरमोथा. [सं. भद्र+मुस्ता= मस्तक] ०**लोक**-पु. महाजन; शिष्ट लोक. **भद्रासन**-न. १ सिंहासन; तक्त. २ भक्तांचें आसन; योगासन. [सं.] **भद्राक्ष**-पु. एक वृक्षविशेष आणि त्याचें फळ. याच्या बीजाचे मणी करतात. हें बीं रुद्राक्षासारखेंच पण कांहींसें हलकें व जास्त ठिसूळ असतें. रुद्राक्ष व भद्राक्ष जरी एकच समजले जातात तरी वस्तुतः भिन्न आहेत. [सं.]

**भद्रंकरण**—न (मूळ संस्कृत शब्दाचा चांगलें करणें असा अर्थ आहे. मराठींत उप.) १ भादरणें; कडक तासडपट्टी; हजामत. २ शिवीगाळ [भादरणें]

**भद्रा**—स्त्री. १ (ज्यो.) सातवें करण (अनेकवचनी उपयोग) करण अर्थ ४ पहा. २ शुक्लपक्षांतील द्वितीया, सप्तमी, द्वादशी या तिथी. [सं.] **भद्रा नक्षत्रावर जन्मणें**-(व) अभागी, दरिद्री असणें. **(कपाळीं) भद्रा असणें**-लाभ होण्याची वेळ असतां दुर्दैवानें लाभहानि होणें. **भद्र्या, भद्र्या कपाळाचा**-वि. कपाळ करंटा; अभद्र लक्षणाचा; दुर्दैवी. [सं.]

**भंद्राज**—वि. (व.) मध्यम.

**भनभन**—स्त्री. भगभग; भणभण पहा.

**भनाना**—पु. हाहाकार. 'रिपू विक्रमे सर्व आला भनाना।' -वामन विराट ७.१७८. [ध्व.]

**भंपक**—पु १ (कर.) उचल्या; आगापिच्छा नसलेला मनुष्य. २ गांवढ्या; गांवढळ.

**भपका, भपकारा, भपकावणी-भपकी**—भबका इ० पहा.

**भपारी**—स्त्री. (व) गप्प; बात. 'भपाऱ्या सोडतो खूब.'

**भपुरा**—पु. १ सुज (शरीरावर, आलेली); सुजलेलें शरीर अवयव; (सामा.) फुगीर वस्तु २ मोठा आव; डौल. ३ पुरुषाचें जननेंद्रिय. -क्रिवि. जलद व मोठ्या फुगाऱ्यानें (क्रि० सुजणें; फुगणें). [ध्व; भप!] **भप्प(प)**-क्रिवि. सोसाट्यानें; भपकाऱ्यानें; झपाट्यानें. 'भप आग उडाली-भप आंग सुजलें. भपवास आला-सुरुंग उडला-उजेड पडला.'

**भबकणी**—स्त्री. १ भडकणी; फुगवण; सोसाट्यानें वाहणें; वाघ इ०नीं धापा टाकणें. २ एखादें वाईट काम करण्याविषयीं एखाद्यास दिलेलें उत्तेजन उठावणी. (क्रि० देणें). [भबकणें] **भबकणें**-अक्रि. १ उठाव होऊन जलद सर्वत्र पसरणें (आग, भुकणी, मिरच्यें, वारा, धूळ, बातमी इ०). २ सोसाट्यानें वाहणें (वारा). ३ धापा टाकणें; गर्जना करणें (उडी मारतांना वाघ, संतापलेला मनुष्य यांनीं). ४ (ना) भभकणें; संतापणें; तोंडाचा पट्टा सोडणें. [हिं. भबकना] **भबकावणी**-स्त्री. १ भडकावणी; सोसाटा; घोंघावणी (वाऱ्याची). २ (वाघानें) उडी मारतांना केलेली गर्जना. ३ (ल.) वाईट काम करण्याविषयीं उत्तेजन; चिथावणी. (क्रि० देणें; दाखविणें) **भबकी, भपकी**-स्त्री. १ झळ (अग्नि, इ० ची). भपकारा; दरवळ (मिरपूड इ० चा). २ (ल.) लौकिक वदंता; भुमका. (क्रि० उठणें). ३ उठावणी; चिथावणी, उत्तेजन. (क्रि० देणें; दाखवणें). ४ किंमत चढविणें; वाढविणें. (क्रि० करणें). ५ (हिं.) धमकी. ६ बढाई; ऐट. 'याचे अंगीं वाघाचें शौर्य नसुन भपकीची आवड मात्र होती.'-नि ६०२.

**भबका, भबकारा**—पु. १ आकस्मिक आणि जोराची झळ (अग्नि, उष्ण वारा, वाफ यांची). २ वाऱ्याच्या झुळकीनें, उधळण्यानें मिरच्या, मसाला, सुगंध वगैरेच्या भुकणीचा नाका तोंडांत शिरणारा लोट. ३ थाटमाट; ऐट.

**भब(प)कारा**—पु. मद्य किंवा अर्क काढण्याचें यंत्र, आसुतिपात्र; शुंडायंत्र.

**भंबाकू**—स्त्री. (व.) तंबाखूच्या, वांग्याच्या पिकांत होणारें एक प्रकारचें तण.

**भंबा(भा)डा**—पु. उधळपट्टी.

**भंबाळ**—बंबाळ पहा. 'महा पुच्छ तें ज्वाळ भंबाळ आला।' -राक १.८.८५.

**भबूक**—वि. चकचकीत; भडक; झकपक; लकलकीत, धगधगीत (तांबड्या, पिवळ्या रंगाचा पदार्थ); लाल शब्दास प्रकर्षद्योतनार्थ जोडतात.

**भंबेरी**—स्त्री. १ फजीति; टर; उपहास; निंदा; बचेरी. (क्रि० होणें; उडणें; वाजणें; करणें). गंजिफांच्या खेळांतील एक शब्द.

**भंबो-ब्या**—वि. १ बंब्या; मोठा आणि गलेलठ्ठ; अवजड बांध्याचा (मनुष्य). २ राक्षसी; अवाढव्य; जंगी (पदार्थ) **भंबोनाथ**-पु. मोठा, टोणपा इसम; ठोंब्या; मूर्ख.

**भंभाळ, भंभेरी, भंभ्या**—भंबाळ, भंबेरी, भंबो पहा.

**भंभाळा**—वि १ मोठा; प्रशस्त; अवजड; प्रचंड. २ अवाच्या सव्वा; उधळपट्टीचा. 'वाढता भंभाळा खर्च हुंडणावळीमुळेंच होतो.' -टि १.६४१.

**भमंडल**—न १ नक्षत्रमंडल; नभोमंडल. 'नक्षत्रें रिचवतीं भमंडळीं। बैसली मेघाची दांतखिळी।' २ भवृत्त; क्रांतिमंडल [सं]

**भय**—न. १ भीति; धास्ती; दहशत. २ भीतीचें निमित्त; धोका; जोखीम; संकट. 'या वाटेंत कांहीं भय नाहीं खुशाल जावें.' ३ भंग; नाश; मरण. 'या घरास सागवानी वासे घाला म्हणजे १०० वर्षे भय नाहीं.' [सं. भी=भिणें; भय] **म्ह॰** एक भय दोहो जागीं (दोहों पक्षांत परस्पर भीति असणें). **॰घेणें**-सक्रि. घाबरणें. **॰दाखविणें**-सक्रि. भीतीचें निमित्त दाखवून भिण्यास लावणें. **॰कंप**-पु भीतीनें कापणें. [सं.] **॰(यं)कर**-वि भयजनक; घोर; दारुण; जबरदस्त. [सं.] **॰कातर**-वि. भ्यालेला. [सं. भय+कातर] **॰चकित-भीत-भीर-भीरु**-वि. भ्यालेला पांचावर धारण बसलेला. [सं.] **॰पीडित**-वि भयानें पीडिलेला. [सं.] **॰प्रदर्शन**-न. १ भीतिदायक वस्तु, पदार्थ पुढें दाखविण्याची ठेवण्याची, क्रिया. २ भिवविण्यासाठीं ठेवलेली कोणतीहि वस्तु; बुजगावणें (लाकडी शिपाई, फटाकडा इ०) ३ स्वतःस भीति वाटली आहे असें दाखविणें; धास्ती घेणें. [सं] **॰प्रीति**-स्त्री. भयानें उत्पन्न झालेली प्रीति. [सं.] **॰भक्ति, भयेभक्ति**-स्त्री. भयानें उत्पन्न झालेली भक्ति; भावभक्तीहून भिन्न. [सं.] **॰विव्हल**-वि. भयानें, धास्तीनें अस्वस्थ, क्षुब्ध झालेला. [सं.] **॰शील, भयालू**-वि. भीरु; शंकेखोर; भ्याड; भित्रट; भित्रा. [सं] **॰स्थान**-वि. (व) भयंकर, भीतिप्रद **भयाकुल, भयाक्रांत, भयातुर, भयान्वित, भयार्त**-वि. भयानें व्याप्त, पीडित असा. [सं.] **भयांकृत**-वि. (गो.) भयंकर; भयानक **भयाणन**-न. भयपूर्ण उदासपणा; भीति उत्पन्न करणारा ओसाडपणा (ओस पडलेल्या घराचा, भयंकर अरण्याचा) -वि. ओसाड; उदास; उजाडीमुळें भयोत्पादक; घोर. **भयानक, भयावह, भयासुर, भ्यासुर**-पु नवरसापैकीं एक. -वि. भयंकर; घोर; दारुण; भयोत्पादक; भेसूर; भीतिदायक. 'देखे भयानक झांकियेलें डोळे।' -तुगा २०. [सं.] **भयानक(दृष्टि)**-स्त्री. (नृत्य.) एखादी भयंकर गोष्ट किंवा एकादें भयंकर श्वापद दृष्टीस पडलें असतां पापण्या निश्चल करून बुबुळें वरच्या बाजूस चालविणें व बाहुल्या चंचल करणें हिचा उपयोग भयानक रसांत करितात. [सं] **भयाभी(भि)त**-वि. भयभीत. **भयाभंगास जाणें**-अक्रि. तुकडे तुकडे होणें; रानोमाळ होणें; नष्ट, भग्न होणें (राज्य, सैन्य, संपत्ति). [भय भंग] **भयांभयां**-क्रिवि नीच वृत्तीनें; दीनपणानें (क्रि॰ करणें; करीत जाणें; फिरणें) [भय] **॰करणें-करीत जाणें-करीतफिरणें**-अक्रि अत्यंत नीच वृत्तीनें व विपत्तीनें दारोदार भिक्षा मागत हिंडणें. 'विद्या दरिद्रानें पीडित होऊन लोकांच्या नरकांत बुडून भयांभयां करीत अन्नाचे मागें हिंडतात' -बाळ २.१२९. **॰होणें**-अक्रि. अत्यंत हीन, दीन होणें, विपन्न स्थितींत असणें.

**भयाना-नी**—वि. बावळट.

**भय्या, भय्यन**—पु. भाऊ. पुरभय्या जातीसंबंधीं योजतात. पुरभय्या पहा [सं. भ्राता; हिं.]

**भर**—पु १ पूर्णता; प्राचुर्य; उत्कर्ष; सीमा; वैपुल्य; कळस; पर्व; ऊत; लोट; बहार; रंग (धान्य, तारुण्य, आरोग्य, मान, संपत्ति, खेळ, उद्योग यांचा). 'सति भर आनंदाला जो देतो तोचि भर विलापाला।' -मोसभा ७.५५. 'गाण्याला आतां भर आला आहे.' २ आवड; कल; मनोवृत्ति (उद्देश, इच्छा, प्रवृत्ति, आवड यांचा). 'पोराचा प्रायः खेळाकडे भर असतो.' ३ बार (बंदुकीचा). ४ माज; मस्ती; कामुकावस्था (पशूंची). ५ भरतें; उत्तेजन. ६ आवेश. 'यमानें त्या भरांत सावित्रीला पुत्रवती भव असा आशीर्वाद दिला.' ७ उत्साह; डौल. 'उभे सडे फौजेंत भरानें। -ऐपो २६७. ९ सपाटा. 'होतां द्विज भोजन भर दुंदुभिचा पळहि तो न रव राहे।' -मोआश्व ५ १३. ८ भार; ओझें. 'प्रपंच भर घे शिरीं करि कृपा पिता त्यावरी।' -केका ९४. ९ (दुखण्याचा) जोर; आवेग (शोकाचा). १० (गो.) नाद; फंद. 'भरीक पडचें.' ११ -स्त्री. भरती; भरताड (गलबताचें, गाडीचें); बुजलेली स्थिति; बूज (तालीची, जाड भिंतीची); पूरण; उणीव भरून काढणें (संख्येची, परिमाणाची). १२ आधिक्य. 'जेवणाच्या पदार्थांत कांहीं भर लागल्यास ते बंदरावर विकत घेत असुं.' -पाव्ह ४६. १३ भरून काढण्यासाठीं टाकलेली माती, दगड इ० (झाडाच्या मुळांवर, बांधाच्या, भिंतीच्या मध्यें इ०). 'पडवीची जमीन वीतभर खोल आहे, भर घालून ती ओटीच्या जमीनीबरोबर करावी.' १४ पूरण; पुरी करण्यासाठीं मिळविलेली संख्या, परिमाण, तुकडा इ० उदा० रकमेची, कापडाची मापाची भर. -क्रिवि. (शब्दाच्या पुढें जोडल्यानें) पर्यंत; इतकें; पूर्णपणें. उदा० तोळाभर सोनें; कोसभर वाट. मणभर-भयभर-प्रीतिभर-आनंदभर इ०. सायंत, इथून याअर्थी. उदा० तिथून पृथ्वीभर; गांवभर; महिनाभर इ० शब्दाच्या मागें जोडल्यास परममर्यादेपर्यंत, पूर्णतम, उच्चतम स्थितींत, असा अर्थ होतो. उदा० भर-अम्मल-आकार-वैराग्य-हंगाम-पीक-ओझें-

कचेरी-अमदानी-दौलत-कोस. ' मूठभर रुपये दिले=मुठीच्या पूर्णमानाइतके रुपये दिले. ' आणि ' भरमूठ रुपये दिले म्हणजे पराकाष्ठा करून मुठींत जितके राहूं शकतील तितके ( चोंदूनचोंदून भरून ) रुपये दिले असा अर्थ. [सं. भृ=भरणें; पोसणें; भर ] ०**करणें**-१ भरणें; कंठापर्यंत घालणें; तृप्त करणें; आपण न भोगतां दुसऱ्यास देऊन टाकणें. ' आपण स्वत: खाल्लें नाहीं, दान धर्महि केला नाहीं, शेवटीं चोराची मात्र भर केली ! ' २ न्यूनता पुरी करणें ०**घालणें-देणें**-उठावणी करणें; उत्तेजन देणें. चेत वणें. ०**घेणें** -आपणांस पुरेसें घेणें **(आपल्या)भरानें चालणें**-क्रि आपल्या स्वत:च्या ( अविचारी ) मार्गास अनुसरणें; स्वच्छंद वागणें. **भरीं घालणें-देणें**-प्रवाहांत, मार्गांत टाकणें; चेतविणें; नादीं लावणें. ' तमोगुणें भरी घातले से। ' -तुगा ५३९ **भरीचा**-वि. १ पूरक; भरपाई करणारा; भरतीचा, पुरवणीचा. २ पुरा करण्यास, भरून काढण्यास पुरेसा असलेला. **भरीं पडणें**-आत पडणें; सहकारी होणें; भुलून जाणें. भरीस पडणें पहा **भरीं भरणें**-१ अतोनात नादीं लागणें; पूर्णपणें ग्रासला जाणें; हांवभरी होणें. 'बहुमास भरीं भरला प्रियसख सचिवांसि विसरला निपट। ' -मोवन ४.९८. २ विनाकारण हट्टास पेटणें **भरीस घालणें**-१ न्यूनता नाहींशी करण्यासाठीं कमी असेल तें घालणें. २ चढविणें; उत्तेजन देणें. ' लोकीं भरीस घातलें। ' -दा ३.५.१३. **भरीस देणें**-तोंडापुढें करणें; नादीं लावणें. ' सर्व उदासीनपणें पाहति आम्हांसि देवुनी भरिला। '-मोआदि ४.८३ **भरीस पडणें**-१ भरतीस पडणें; ( एखादी गोष्ट, काम, मनुष्य इ०च्या ) कमीपणा, अडचणी भरून काढण्यासाठीं वेंचलें जाणें; खर्च होणें; नष्ट होणें; गडप, ग्रस्त केलें जाणें. ' त्याची सर्व संपत्ति राडाचे भरीस पडली ' अभिमानास पेटणें. 'मी बाळपणापासून संसाराच्या भरीस पडलों '(सकर्मक) भरीस घालणें. **भरून येणें**-१ मनांतून जाणें; विस्मरण पडणें ( शोक इ० ) २ पूर्ण वरी होणें ( जखम ). सामासिक शब्द- ०**अमदानी**-स्त्री. पूर्णावस्थेची अमदानी, कारकीर्द. ०**अमली**-वि पूर्णत्वानें सरकारच्या अमलाखालीं असणारा(गांव, जिल्हा, तालुका इ० ) ०**अम्मल**-पु. पूर्ण अंमल, सत्ता. ०**उभर**-स्त्री १ भरणें, उपसणें; भरणें व ओतून टाकणें. २ भरणें आणि रितें करणें उदा० एखादा पदार्थ घेतांना मापणें आणि खात्रीकरितां तो पुन: मापणें ' मापाची भरउभर केल्यास मोजलेला दाणा कमीजास्त होतच आहे. ' ३ ( ल. ) मिळविणें व गमावणें, खर्च करणें ' संसाराची भरउभरच आहे. '४ ( वाईट अर्थानें ) उठावणी, मथवणी; उभारणी; मन वळविणें; छाप बसविणें ( मत, उद्देश, विचार यांची ). ५ ( ल ) एखाद्या गोष्टीविषयीं विचार करणें, बोलणें. [ भरणें+उभरणें ] ०**कचेरी**-स्त्री मनुष्यांनीं पूर्ण भरलेली कचेरी. ०**कवळ्या**-पु ( गुऱ्हाळ ) एक इसम प्रथम चरकांत कांडें लावतो, व त्यांतील रस निघाल्यावर दुसरा इसम तेंच कांडें पुन: लावून उरलेला रस काढून घेतो यापैकीं पहिला इसम -कृषि ४७३. ०**कुंभ-कू(खू)म**-वि १ ( राजा. ) स्थिर, गंभीर, शांत, प्रकृतीचा. २ पुष्कळ. [ भर+कुंभ ] ०**कोंडा**-पु (कु) तूस (कणिकेंतील ). ०**खुम**-वि. ( गो. ) भरभक्कम. ०**खुमा**-स्त्री. स्वभावाची स्थिरता; विचारीपणा, अमत्तता; गांभीर्य. ०**गच्चा**-वि. भरचक्का व भरगट्टा पहा ०**गच्ची**-वि. सोनेरी, रुपेरी, कलाबतू ज्यांत फार विणली आहे असें ( कापड, अशा कापडाचा केलेला अंगरखा इ० ) ०**गच्ची जेवण**-न चांगल्या चमचमीत पदार्थांनीं पोट भरणें; आकंठ भोजन ०**ग(गी)त**-स्त्री १ भरती, भरताड ( गाडीचें, पोटाचें ) २ भरून काढलेली स्थिति ( धक्का, बंधारा, जाड भिंत यांची ) ३ पूरण; पूर्तता ( संख्या, परिमाण यांची ). -न बारदान; भरताड; ओझें; आंतील जिन्नस. ( गलबत, गाडी इ० च्या ) ( कों. ) पूर्ण. ०**गांव**-पुन. दाट वस्तीचा गांव; घरें जवळजवळ असून वस्ती मोठी असलेला भाग. ०**गोणी**-स्त्री. भरलेली, सबंध गोणी, पोतें; भरजकात बसण्याजोगी गोणी ०**गोळी**-स्त्री. गोळीचा टप्पा ( लांब पल्ल्याच्या बंदुका, तोफा यांच्या ). -क्रिवि. २ गोळीच्या अंतरावर, टप्प्यांत. ०**घोसानें**-क्रिवि. प्रतिष्ठा न गमावितां; ऐटीनें; चौघडा वाजवीत; चढत्या घोड्यानिशी. ' भर घोसानें श्रीमंत त्यावर पुण्यास येतां क्षणीं। ' -ऐपो ३९६. ०**चक्का**-वि. चांगल्या वस्तूंची चंगळ असणारी ( मेजवानी ); तब्बल; ओकारी येण्याइतकें; यथेच्छ ( भोजन ) चिकार; दाट भरलेला; गडगच्च; प्रचुर; विपुल(जेवण-अलंकार, वस्त्र, आंबे, लाडू, पीक, पाऊस, हंगाम, पावसाळा, उन्हाळा ). ०**चंदी**-स्त्री. १ घोड्यास खाण्यास देण्याचें भरपूर धान्य २ ( ल ) भरपूर अन्न. ०**चौक**-स्त्री. घोड्याची भरधांव चाल. ०**जमा**-स्त्री भरजमाबंदी; सर्व जमाबंदी ( देश, गांव इ०ची -सादिलवार; बूड इ०च्या वजा वाटीच्या पूर्वीची ). ०**जमीन**-स्त्री पूर्णधारा असलेली जमीन. ०**जरी**-वि. पूर्णपणें सोन्यारुप्याच्या कलाबतूचा केलेला. (कपडा,गोंडा, कापड ). ०**जवानी-जा(ज्वा)नी**-स्त्री. १ ऐन उमेदीचें वय. २ तारुण्याचा भर. [ भर+फा. जवानी ] ०**ज्यहा-ज्याहा-उयहा-झ्याल**-क्रिवि. भरदवड पहा. ०**डाव**-पु. (गंजिफा व बुद्धिबळ) पूर्ण स्थितींतील डाव ( भारी पानें खेळण्याच्या, भारीमोहरीं घेण्याच्या पूर्वीचा ). ०**तिन्ही सांज**-स्त्री. पूर्ण तिन्हिसांजाची वेळ; ऐन संध्याकाळ; याच्या उलट. फुटकी तिन्हिसांज ०**तीर**-पु. बाणाच्या फेकीचें अंतर, बाणाचा टप्पा. -क्रिवि. अमुक अंतरावर. ०**तोंडली**-स्त्री. सबंध; मसाला भरून केलेली तोंडल्यांची भाजी. ०**दंड**-पु. भूर्दंड; दुसऱ्याचा जिन्नस आपल्या हातून हरवला किंवा जामीनकी अंगास आली असतां भरावा लागणारा पैका. ०**दवड**-

**दौड - धांव - पल्ला - धूम - दपट**-स्त्री.पु. पूर्णदौड, धाव ( घोडयाची, मनुष्याची ).-क्रिवि. पूर्ण वेगानें ( दवडणें, धांवणें, दपटणें, हांकणें, पिटणें, चालवणें, दामटणें, काढणें, पळणें ). ०**दार**-वि. १ चांगला भरलेला; दळदार; गरभरू; टसठसीत २ पूर्ण वाढ झालेला; पिळदार ( माणूस, घोडा, छाती, दंड इ० ). ०**दोन-प्रहर**-पु ऐन दुपार. ०**दौलत**-स्त्री. संपत्ति आणि वैभव याची भरती, बहार. ०**धांव-चाल**-स्त्री. घोडयाची-जलद चाल, चौपायीं जलद धांवत जाणें. ०**नकशी-क्षी**-वि. १ पूर्ण नकशीचा (कांठ); असल्या काठांचा(कपडा). २ अतिशय कोरींव काम असलेला (स्तंभ, छत, चौकट इ० ). ०**नवती**-स्त्री. ऐन तारुण्याचा, हिंमतीचा भर, कळस, बहर. ०**पंचविशी**-स्त्री. मनुष्याची ऐनउमर; प्रौढदशा; पुरुषाची उमेदी, वय. ०**पायी-ई**-स्त्री. १ भरपावती (येणें असलेल्या रकमेची, सालाची ) २ भरपावतीची रसीद; प्रायः भरपाई भरून पावलों हे शब्द लिहून ) केलेला इकरार. ०**पायी (ई)झाली-लिहून देतों**-उद्गा. ( कंटाळा, अतितृप्ति दाखविणारे शब्द ) बस, पुरें करा. ०**पावलीं**-क्रिवि. भरचालीनें भरगतीनें. ( क्रि० पळणें; धावणें; चालणें; येणें; जाणें ). [ भर+पाऊल ] ०**पितळ**-वि. ( कु. ) पितळ, कलाबतू लावून शोभिवंत केलेलें (पायतन, वहाण) ०**पूड**-न वाहणाऱ्या फोडावर, उठाणूवर ( हवेंत उघडें पडल्यानें ) येणारी पातळ त्वचा. ( क्रि० धरणें; फुटणें; वाहणें; निचरणें; गळणें ). अशा रीतीनें बंद झालेलें सपूयक्षत. ०**पूर**-वि. १ पूर्ण भरलेलें; भरून काढलेले; चोंदलेलें. २ प्रचुर; मुबलक पूर्ण.३ गंभीर; भरघोंस (आवाज). [ हिं.] ०**पेट**-वि. भरपूर. ०**पोट**-क्रिवि. १ भरलेल्या पोटानें, पोटावर. २ पोटभर ( खाणें, पिणें ). ०**पोशाख**-पु. विशिष्ट दिवशीं किंवा प्रसंगीं घालावयाचा पोशाख; खास पोशाख. ०**बादली**-वि पूर्णपणें सोन्याच्या, रुप्याच्या कलाबतूचा केलेला ( गोंडा, कपडा, कापड). ०**बिंदु**-पु. आकाशांतील क्रांतिवृत्ताचे विषुवापासुन अति दूरचे बिंदु -सूर्य २१. ०**भक्कम**-वि १ प्रचुर; बहुत; मुबलक. २ अतिशय भरलेला, चोंदलेला; आकंठ भरलेला. ०**भार**-पु. पूर्ण भार, वजन. ' गुरूचा भरभार साहावया जाण।'-एभा १२. ५५९. ०**मजल**-स्त्री १ पूर्ण मजल ( प्रवासाची ). २ -क्रिवि भरमजलीनीं ( प्रवास करणें ). [ भर+अर. मन्झिल] ०**मज(जा)लस**-स्त्री. भरसभा; भरलेली कचेरी. [ भर+अर. मज्लस् ] ०**मजला**-पु. मोठा व उंच वरचा मजला ( घराचा ). -वि. मोठा व उंच असा वरचा मजला असलेलें ( घर ). ०**माहा**-क्रिवि सर्व महिना ' एक भरमाहा घास दाणीयाचे ऐवजीं ... ' -वाडबाबा १.१७६. ०**मूठ**-स्त्री. पूर्ण भरलेली मूठ ( धान्य इ०कानीं). ०**रद्दा**--वि.भरचक्का पहा. भर; मोठा; भक्कम; भारी या अर्थीहि योजतात. उदा० भररद्दा मजल-कोस-पल्ला. तबल, जबर, जरब शब्द पहा. ०**रस्ता**-पु. हमरस्ता. ०**रास**-स्त्री. १ शेतांत पिकलेल्या धान्याची एकत्र केलेली रास, ढीग. ( भागीदारांत वांटण्याच्या पूर्वींची ). २ ( सामा. ) रास, ढीग. ०**वयाचा**-वि. प्रौढ, पोक्त; भरजवानीचा; ०**वसूल**-पु. ( देश, गांव, जमीन इ०पासुन ) मिळालेला पूर्ण वसुल. ०**वसुली**-वि. ज्याचा भरवसुल ( कांहीं वजावाट न होता ) मिळाला आहे असा ( गांव, शेत इ० ) ०**वांगीं**-नअव. निरनिराळया फोडी न करतां चिरून, मसाला भरून केलेली सगळया वांग्याची भाजी. ०**वायकी**-स्त्री. ( व. ) वढाई. ०**शाई**-स्त्री. गंभीर आवाज निघण्याकरिता पखवाजाच्या मध्यभागावर लावलेला शाईचा जाड थर, याच्या उलट पाणशाई. ०**सांड**-वि. भरपूर, रगड. ०**सुगी**-स्त्री. ऐन हंगाम. ०**हाक**-स्त्री. १ भर आवाजानें मारलेल्या हाकेचें अंतर, टप्पा. २ -क्रिवि. अशा अंतरावर, टप्प्यावर.

**भरकट(ड)णें, भरकांडणें**—सक्रि. जलदीनें व सरासरी करून टाकणें; झटक्यासरशीं उरकणें; झपाटणें; रगडणें; खरडणें; (लिहिणें, नांगरणें, रेखाटणें, झारघिणें इ०). 'त्यानें दहा कागद एके घटकेमध्यें भरकटलें; हें वावर भरकाडून टाकलें.' [ भर; भरभर ] **भरकट(ड)णी, भरकांडणी**-स्त्री. झपाटयानें उरकणें; झपाटणें. **भरकटणें**-अक्रि. वहात जाणें; तर्क करीत गुटणें. ' सामान्य जनांनीं तेथपर्यंत न भरकटता दैवावर भरंवसा ठेवावा. '-नि १. **भरकंडणें**-अक्रि. खरडणें; भरकटणें; बिरखडणें. **भरक(कं)डा**-पु. लिहिण्यांतील फरगडा; फाटा. ( क्रि० काढणें; फोडणें ).

**भर-कण-कन-कर-दिनीं-दिशीं** —क्रिवि. १ पक्षी बसल्या जागेवरून अकस्मात उडण्याच्या, गवत अकस्मात भडकतांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन. २ एका क्षणात, झटक्यात, पळात. [ ध्व, भर ]

**भरका(कां)ड**—न. १ जलद व आवाज करून जळणारें जळण गवत, भूस इ०. २ भरकाड जमीन; रुक्ष आणि भिकार जमीन; ओलावा न धरणारी जमीन [ भर ? ]

**भरकांडा**—पु. १ गिरकी; चक्कर ( क्रि० मारणें ). २ फेरा, गिरका; भोवंडा ( क्रि० मारणें ). ३ ( ल. ) गिरकांडा; भोंवरा; घोंटाळा; चक्रव्यूह ( आंत शब्दासह क्रि० सापडणें, पडणें; घालणें; पाडणें ). ४ घेरा; वेढा ( भिकारी, तगाददार यांचा ). ( क्रि० घालणें ) ५ झोत; लोट, ( वाऱ्याच्या झटक्याचा ) ६ रगडणी, झपाटणी ( उदा० नांगर, लेखणी केरसुणी, कुंचली इ०झपाटयानें फिरवून होणारी ). जलद, झपाटयानें वाचणें; म्हणणें; बोलणें; लिहितांना झपाटयाचें विरखुडणें ( क्रि० मारणें; ओढणें; घेणें ).

**भरंग(गा)ळणें**— अक्रि. ( व ) १ घोटाळणें २ बडबडणें. ' मूर्ख मूर्खपणें भरंगळती।'-दा १९.७.२६.

**भरंजळ**—पु ( गो. ) एक प्रकारची मासळी.

**भरड**—पुस्त्री. १ सांजा; पिठाचे जाड कण; भरडा (गो) भड्रा. २ भरडलेली डाळ इ० 'जोग्या बोलावून पत्र पुजून भरड म्यां घातिला।' –भज ५९. ३ –स्त्री. आंखूड व जाड दोरी बांधून ओझें ओढीत नेण्याची क्रिया); असली आंखूड व जाड दोरी (क्रि० भरणें; घालणें). ४ –स्त्री रवण; रांग, माळ (गुरें, सैन्य यांची. ५ (गो) पाल्हाळ; चऱ्हाट. ६ –न. (राजा.) डोंगराळ जमीन, टेकडयामधील नापीकप्रदेश, माळ जमीन. –वि. १ जाड दळलेलें (धान्य). २ जाडाभरडा (कपडा इ०). ०कुमेर–स्त्री. (गो.) डोंगराच्या उतरणीवरील रान तोडून तेथील जमीनींत वरकस धान्यें पिकविण्याची शेतीची पद्धत. –सह्याद्रीच्या पायथ्याशी ३०५.

**भरडणें**—सक्रि. १ जाड दळणें. २ (ल) सरासरी व ओबड धोबड रीतीनें करणें; भरकटणें. **भरडण**–न. १ भरडण्यास घेतलेलें धान्य. २ जाड कणीदार दळण. 'दोन पायली भरडणाचें भरडण करावयाचें आहे.' **भरडणी**–स्त्री. जाड दळण इ० **भरडा**–पु. १ कळणा; भरडलेले तांदूळ व उडीद, इतर डाळी याचें मिश्रण. २ भरडलेली डाळ, धान्य. **भरडी**–वि. भरडलेली (डाळ, धान्य, औषधी मसाले, चुना); भरडयाची केलेली (थुली, भाकरी, पोळी, औषध) **भरडींव**–वि. भरडलेलें (धान्य, डाळ).

**भरडा**—पु. भाद्रपदात पिकणारा कुळीथ. –कृषि ३२७.

**भरड्डी**—स्त्री. (कों.) कण्हेरा; कण्यांचा पातळ भात; पेज.

**भरण**—स्त्री. १ (ना.) रांग; ओळ –स्त्री. (राजा. कु.) भरून काढण्याकरितां आत घातलेलें, मिळविलेलें द्रव्य. २ –न. (खा.) भरणें; खाबाचा माथा आणि पिढें, तुळई या दोहोंमध्यें भरलेला लाकडाचा तुकडा 'माणिकाच्या भरणी.' –ऐपो १५. ४ –न पोषण; पालन. 'तया एक जाणें फळ। देह भरण।' –ज्ञा १८.५६४. ५ वेतन; पोषणसाधन; निर्वाहसाधन. 'भोगिजती शब्दादिकें। विषयभरणें।' –ज्ञा १५.३६०. ६ एके वेळीं दिव्याच्या टवळयात, तळणाच्या कढईत घातलेलें (तेल, तूप इ०चें परिमाण; (बायकी) समईंत जळण्याकरितां वापरतात तें तेल. ७ भरणें या अर्थी विशिष्ट ठिकाणीं योजितात. उदा० घट, भांडें, गोण इ० भरणें; दिव्यास तेल, जात्यास दळण, बागेस पाणी इ० पुरविणें; झाडाच्या बुंध्याशीं मातीचे ढीग घालणें. (क्रि० करणें; घालणें). ८ भांडें, कळशी; घागर. 'दुभली क्षीर संतोषोम। भरणें दोन तये वेळीं।' –गुच २२.४८. ९ माप भरणें; मापणें १० भरलेली, पूर्ण केलेली स्थिति ११ एखाद्या वस्तूच्या पोटात भरण्याचें द्रव्य; पुरण; सारण (करंज्या, पोळया याचें). १२ भरण; सांठा १३ आयुष्य. 'अगा या दोन्ही सैन्यासीचि भरण पुरलें।' –ज्ञा ११.४९९ १४ भराभर; भरती. 'वायु मेघाचें भरण भारी।'–हंको. १५ समुदाय. 'भोगिजती शब्दादिकें। विषयभरणें।'–ज्ञा १५.३६०. [सं. भृ=पोसणें] ०दाज–वि. चांगलें भरलेलें आणि भक्कम (पीक, कणीस, दाणा, पेंढी इ०); धष्टपुष्ट; ऐवजदार (मनुष्य). ०पोषण–न. पालनपोषण; सांभाळ.

**भरणा**–पु १ पूर्ण करणें; भरणें; भरती; जमा करण्याकरितां जमवाजमव. 'सरकारचे मखत्याचा भरणा केल्यावर मी येईन.' २ पूर्ण केलेली स्थिति, भरती. ३ पूर्णपणें भरणें; (तिजोरी, पेढी इ० ठिकाणीं) भरलेले पैसे इ०. 'शेटजीच्या दुकानीं ऐवजाचा भरणा करून पावती आणून द्या.' ४ जमाव; एकत्र मिळालेला समुदाय, संख्या. उदा० ब्राह्मणांचा–ध्रुपदांचा भरणा; कूळ–शेत–घर–आऊत–बी-भरणा ५ भर धारा. (क्रि० लावणें; बसवणें; ठरविणें). 'शेताचा भरणा सातव्या वर्षीं होईल.' ६ दूध काढण्याची चरवी, भाडें; भरणें. 'हातीं भरणा घेऊन गोपाळ। धारा काढी त्वरेनें।'–ह ८.१०४. **भरणावळ**–स्त्री. १ भरण्याचें मोल, मजुरी. २ माल भरण्याची क्रिया. **भरणेकरी**–पु. १ पैसा भरणारा मनुष्य (तिजोरींत, पेढीवर इ०). २ पुंजीवाला. **भरणेपावती–याद**–स्त्री. भरलेल्या, पुरवलेल्या वस्तूंची (पैसे, द्रव्यें, माल) पावती. **भरणेवाईक**–वि. (पैसे, ज्ञान, गीतें, गोष्टी, हिकमती, युक्ति इ०चा) भरणा, सांठा असलेला. **भरण्याचा**–वि. १ उपयुक्त अशा वस्तु, कला यांचा सांठा असलेला. २ भरतीचा; परिमाण, संख्या पूर्ण करण्यास किंवा खळगी, जागा भरून काढण्यास योग्य (वस्तु). ३ सांठा; भरणा (पैसा, ज्ञान, गीतें, गोष्टी, युक्ती, हिकमती इ० चा) असणारा. ४ कमाली दरानें, भर धान्यानें फाळलेली (जमीन).

**भरणँ**—न. (गो.) दमा.

**भरणी**—स्त्री. १ भरणें (–क्रि.) पहा. २ भरण्याचें द्रव्य (माती, धोंडे इ०); भर. ३ सामग्री. 'आहारभरणी राक्षसा।' –एभा २५.३७३. ४ वस्ती. –शर. [भरणें] ०देणें–क्रि. खारीच्या काठास दरवर्षी वाहून गेलेल्या ठिकाणीं बाहेरील बाजूनें मातीची भर देणें. –कृषि २४५.

**भरणी**—स्त्री. १ सत्तावीस नक्षत्रांपैकीं दुसरें नक्षत्र. २ भरणीश्राद्ध. [सं.] ०चौथ–स्त्री. चौथभरणी पहा. ०श्राद्ध–न. मृततिथीपासून बारा महिन्यांच्या आंत भाद्रपद वद्यात भरणी नक्षत्रावर करावयाचें मृताचें श्राद्ध.

**भरणें**—सक्रि. १ पूर्ण करणें. २ बुजविणें; भरून काढणें (खळगा, रिकामी जागा, व्यंग). ३ आंत, वर, घालणें, ठेवणें (भरीत, भरताड, पूरणद्रव्य); ठांसणें (बार). ४ आंत ओतणें (रस, भुकटी, धान्य, वाळू इ०). 'सिंधु कवण भरी।' –ज्ञा १३.५६. ५ सर्वत्र माखणें, लिप्त करणें (तेल तूप, चिखल, धूळ, काजळ इ०–सामान्यतः अपवित्र घाणेरडया वस्तूंनीं). ६ पूर्ण करणें (कच्चे आकार, आराखडे, रकाने, घरें, तक्ते, कोष्टकें इ०). ७ भरणा करणें (देणें

असलेले पैसे इ०चा). ८ खूट, तोटा पूर्ण करणें; हानिनिष्कृति करणें. ९ घालणें, लेणें ( मुख्यत्वें दागिना ). 'बांगडया भरल्या, गोट भरले ' १० पुरा करणें ( नियतकाल, वायदा ). ' चार दिवस कमी आहेत ते भर मग चाकरी सोड. ' ११ ( सुतारी ) ( खा. ) तयार करणें ( बाज, खुर्ची इ० ). ' रामभाऊ माझी बाज भरून द्या. ' १२ मारणें; भोसकणें. ' पळतां तदुरीं शर शीघ्र भरी । ' –मोरा हर रमणीय रामायण २०. [ सं. भृ ] **भरणें**–अक्रि. १ अंगानें जाड, भरदार, दळदार होणें ( शरीर, फळें, दाणे ); भरून जाणें( कणीस) २ बरोबर असणें; तंतोतंत होणें ( ठराविक संख्या, परिमाण यांच्या इतकें ). ' तांदूळ चार पायली भरले. ' ३ पूर्ण, पुरा होणें ( मुदत, काल ). ' वर्षे, आयुष्य भरलें. ' ४ जड आणि बधिर होणें ( श्रमानें, बसण्यानें–गुडघे, पाय इ० ) ५ भरून निघणें( विहीर, खाच ); भरून येणें; मठारणें व भरून जाणें ( बरी होत जाणारी जखम, क्षत ). ६ रुपून बसणें; शिरणें; घुसणें (कांटा, बाण इ० ). ' गुरुसि त्यजुनि, व्यूहीं भीम, त्रिपुरीं जसा हरशर भरे । '–मोभीष्म ७.७ ७ संचरणें. ' दोघे पत्री पाशीं गुंतुनि भरले उडोनि गगनींच । ' –मोउद्योग ५.५५ ८ भरती येणें. ' का चंद्राचेनि पूर्णपणें । सिंधू भरती । ' –ज्ञा १३.१३८. ९ जमणें; एकत्र होणें, मिळणें, केला जाणें ( बाजार ). ' बाजार चांगला भरला. ' ' तो मोठा गांव आहे तेथें बाजार भरतो. ' [ सं. भृ, भरण ] **भरून येणें**–अक्रि. वर येणें ( उकळणारें द्रव द्रव्य ). **भरणें**–उक्रि. १ पात्रांत समाविष्ट करणें. २ गच्च करणें. ३ रंग देणें ( चित्र, कोष्टक इ०कांस ). भरणें. **भरत**–न. भरीत पहिल्या तीन अर्थी पहा. **भरताचें भांडें**–न. विशिष्ट मापाचें, परिमाणाचें भांडें. [ भरीत+ भांडें ] **भरतक**–न. १ पूरण; पुरें करणें ( संख्या, परिमाण ). २ भरगत; बारदान; भरताड. ३ सामान लादणें; भरणें ( गलबत, गाडी इ० कांत ). **भरताड**–स्त्री. १ सामानानें लादलेला तांडा ( गलबतें, गाडया, पशू इ० कांचा ). २ वरीलप्रमाणें लादलेली, भरलेली स्थिति ३ ( कों. ) पाणरहाटाचे भरून वर येणारे लोटे. याच्या उलट ' रिताड. ' **भरती**–स्त्री. १ समुद्राच्या पाण्याचा चढ. हा विशेषतः चंद्राच्या आकर्षणानें प्रत्यहीं दोनदां ( सुमारें १२ तास १५ मिनिटें इतक्या अवकाशानें ) होतो. ओहटी, सुकती यांच्या उलट. २ चढाई. 'गिलचांची झाली भरती । ' –संग्रामगीतें ६९. ३ पूरण; भरण; लादणी. ४ पूर्ण झाल्याची, लादल्याची स्थिति. ( गलबत, गाडी ). ५ नोंदणी. ( सैन्य, मजूर इ० ) ६ ( ल. ) भरभराट; वृद्धि. **भरती सुकती**–स्त्री. ( कों. ) भरती व ओहोटी; चढउतार. **भरतीखा**–वि. १ पूर्ण करण्यास, भरण्यास लावलेला, पाहिजे असलेला. २ फक्त परिमाण, संख्या पूर्ण करण्याच्या, खळगा, जागा भरून काढण्याच्या लायक ( वस्तु ). **भरतुक**–न. १ भरीत; बारदान; भरताड. २ ओझें वाहून नेण्या बद्दलचें भाडें. **भर(रि)तें**–न. १ पुरतेपणा; पूर्णता; पूर्ति ( गुन्हा, पाप, अन्याय यांची ); पराकाष्ठा ( ताप, अव्यवस्था, इ० काची ); सीमा ( शीण, आजार, दु ख इ० कांची ); सहनशक्तीपर्यंतची मर्यादा; दाहाची पूर्ण संवेदना ( शैत्याची–मुख्यत्वें ज्वरापूर्वी होणारी ); उमाळा; भरती ( शोक, दुःख, आनंद इ०ची ) ( क्रि० येणें ) भर अर्थ १ पहा ' आलें भरतें एवढें । तें काढूनि पुढती । ' –ज्ञा १८ २८९. २ समुद्राच्या पाण्याचा चढ. ३ वृद्धि. ' इतरांच्या जाळाया भरतें सुकृताधनातमा येतें । ' –मोमंभा ३.१४. **०येणें**–जोर येणें; समृद्धि प्राप्त होणें. **भरला भरला**–वि. १ चांगला भरलेला; समृद्ध; भरभरणारा ( संपत्ति, संतति, मित्र, कीर्ति इ०कानीं ); परिपूर्ण ( प्रजेनें राज्य, उत्पन्नानें शेत, देश व सामान, भाडीं यानीं घर ) **भरला भारला**–वि. पतदार; अब्रूदार; लायकीचा; वजनदार ( व्यापारी, मनुष्य ); भरभरीचा ( व्यापार, काम ). [ भरणें+भार ] म्ह० भरल्या गाडयास सूप जड नाहीं ! ' **भरलीसरली–सवरलेली**–वि ( बायकी ) बाळंतपणाचे दिवस नजीक आलेली; गर्भवती. **भरलें कुंकू**–न ( बायकी ) पूर्ण सौभाग्य. ' माझें काय वाईट होत आहे ? भरल्या कुंकवानें मी देवाघरीं जात आहें. ' **भरलं घर**–न पुष्कळ माणसें असुन भरभराटींत असलेलें इष्टमित्रांनीं व्यापलेलें असें कुटुंब. ' माग म्हणताचि म्हणे भरलें घर । ' –राक २.३८ **भरलें धरणें**–क्रि. गडप करणें; देवाला कौल लाविला असतां त्यानें उजवी, डावी न देणें. ' देवानें भरलें धरलें. ' **भरलें शेत**–न. भरपूर पिकलेलें शेत. **भरल्या ओटीनें**–क्रिवि. ( बायकी ) मुलाबाळासह सुखरूप. ' भरल्या ओटीनें बाळंतीण सासरीं जाऊं दे. ' **भरल्या घोसानें–बंदांत–मरणें**–तरणाताठा मरणें. **भरल्या पायांचा**–वि चिखलानें इ० मळलेले पाय असलेला; बाहेरून आल्यावर पाय न धुतलेला. **भरल्या पायीं**–क्रिवि. बाहेरून चालून आल्यावर पाय न धुता. **भरल्या पोटीं**–क्रिवि. पोट भरलेलें असतां. **भरलेल्या आंगाची**–वि. ( कों. ) गरोदर. **भरान येणें**–अक्रि. १ ( कु. ) दुःखाचे अश्रु येणें; हृदय भरून येणें. २ कफानें छाती भरणें. ' त्यंका खूप भरान इला. ' **भरवड**–स्त्री. १ ( कु. ) ओसाड जमिनींत भर घालून तयार केलेली जमीन. २ खारवट जमिनीपैकीं टणक जमिनींत रोहपेरा करतेवेळीं ती जमीन पावसाच्या पाण्यानें तुडुंब भरून काढणें. **भरवण**–न. १ एके वेळीं दिव्याच्या टवळ्यात, तळणाच्या कढईत घातलेलें तेलाचें परिमाण; एके वेळीं तळलेल्या, शिजविलेल्या पदार्थाचें परिणाम; एके वेळीं जमलेल्या काजळाचें परिमाण इ०. २ भूत काढण्याकरिता भुतानें झपाटलेल्या माणसावरून ओवाळलेलें द्रव्य ( कोंबडें, नारळ इ० ). **भराई**–स्त्री. १ भरण्याची किंमत. २ भरणें. **भराभर**–स्त्री. घाईचें भरणें. **भराव**–पु. १ भरण, पूरण ( खाच बुजविण्याची ). २ भरल्याची स्थिति

**भरावण-वळ**-स्त्री. (कों.) जमीन भाजण्याकरितां तिजवर गवत, काटया, छाट आणि शेण इ० पसरणें. **भराविणें**-सक्रि. १ शेणानें, घाणीनें चोपडणें, माखणें (हात, पाय, वस्त्र) २ भर विणें पहा. **भरीचा**-वि. १ विवक्षित माप पूर्ण भरेल इतका. २ निर्मेशिम्में पात्र भरलें असता तें पूर्ण भरेल इतका नवीन घालावयाचा (पदार्थ) **भरी(रि)त, भर्त**-न १ लादल्याची, भरल्याची स्थिति. २ भरलेला, भरावयाचा माल (पोतें इ० त); ओझें; बोजा. 'हें सामान दोहों बैलाचें भरीत आहे.' ३ लादणी, ओझें, भरताड ४ चिघळणाऱ्या जखमा, गाठी याची पूयमय व नासलेली स्थिति. ५ वांगें वगैरे भाजून दहीं घालून केलेली कोशिंबीर. (वांगीं इ०ची) **०पत्र**-न गलबतावरील भरताची (बारदानाची) यादी **भरुन देणें**-सक्रि खुटीची, तोटयाची निष्कृति करणें. **भरुन पावणें**-सक्रि पूर्णत्वानें पावणें; पुरी करून मिळणें (मागणी इ०).

**भरत**—न. तांबें, जस्त, कथील इ० धातू मिसळून केलेला कृत्रिम धातु. [सं. भृ] **भरताचें भांडें**-न. भरत धातूचें केलेलें भांडें. **भरती**-वि. भरत धातूचें केलेलें.

**भरतकाम**—न. कापडावर नक्षी, कशिदा काढण्याची कला; आकृती काढून त्या दोऱ्यानीं, तारानीं भरण्याचें काम; जिगाचें काम.

**भरतखंड-वर्ष**—न. हिमालयापासून समुद्रापर्यंतचा हिंदुस्थानचा भूविभाग; भारतवर्ष. [सं.]

**भरतशास्त्र**—न. १ नाटयशास्त्र; नाटक व अभिनय यावरील भरतमुनिकृत प्रमाणभूत ग्रंथ. २ नाटक व त्याचे प्रयोग यांचे नियम. [सं] **भरतशास्त्री**-वि. भरतशास्त्र जाणणारा.

**भरत्या**—पु (व) वरण शिजविण्यासाठीं कांसें अथवा पितळ या धातूंचा केलेला जाड लोटा. [भरत=मिश्रधातु]

**भरद्वाज**—पु. १ एक पक्षी; सोनकावळा; कुक्कुडकुंभा. २ एक ऋषि. [सं.]

**भरभर**—स्त्री. भरभराट; उत्कर्ष; बहर; कळस; भर. (क्रि० होणें; चालणें) 'हरिदासगृहींची उदंड भरभर ती।'-मोसभा १. ११. [भरणें] **भरभराट**-पु. पराकाष्ठेची भरभर अथवा उत्कर्ष. (क्रि० होणें; असणें; चालणें) **भरभरणें**-अक्रि. इष्ट, अनुकूल होणें (दैव, नशीब, विधि). 'त्याचें भरभरलेंसें दिसतें.'

**भरभर-भरां**—क्रिवि १ जलदीनें; झपाटयानें; गडबडीनें २ झपाटयाच्या व सपाटयाच्या आवाजाचें अनुकरण होऊन अथवा झपाटयाची क्रिया होऊन. [ध्व भर!]

**भरभरणें**—अक्रि. १ कडकड आवाज करून जळणें (शुष्क तृण, झुडुपें, काटे); झपाटयानें जळून जाणें; चेतणें; पेटणें. 'प्रभुचा प्रताप तो तन्मदकक्षीं हव्यभुज भरभरे हो।'-मोउद्योग ८.७१ २ चक्कर आल्यासारखें वाटणें; भणभणणें (डोकें). [ध्व; भर!]

**भरभरीत**—वि. १ भरड; जाड; शुष्क; अस्निग्ध (पीठ, गवत, केस) २ भरड, जाड, खरखरीत (कापड). -क्रिवि. (गो.) फरफरां.

**भरम**—पु. १ (अप.) चुकीची कल्पना; मिथ्याग्रह. भ्रम शब्दाचा अपभ्रंश. (क्रि० धरणें). २ वहीम; तर्क; भावना; मत; संभाव्य कल्पना अथवा विचार; (क्रि० धरणें, जाणें). ३ संशय; संदेह; किंतु (क्रि० बाळगणें, पाळणें). ४ पत; अब्रू; नांव. ५ भ्रम; दबाब, दरारा 'भरम राज्याचा या मोगलाजवळी राहिला नाहीं.'-पदे १०.२७ [सं भ्रम; हिं.] **भरम-भरमाचा भोपळा, भरमाची मोट**-पुस्त्री पक्क्या आधाराशिवाय वरवरची चांगली पत, अब्रू असणारा मनुष्य, काम, गोष्ट; दिसण्यांत ऐवजदार पण पोकळ, कवडीमोल वस्तु **भरमसाट**- वि. पुष्कळ; अमर्याद 'ती तोंडानें भरमसाट स्तुति करील'-नाकु ३ ३०. -क्रिवि. अविचारानें, भेदाभेद न करिता. **भरमाचें पोतें**-न. (विद्या, संपत्ति, भक्ति इ० विषयीं) बाह्य लौकिक असणारा परंतु खरोखर पोकळ मनुष्य इ० **भरमा भरमीं**-क्रिवि. १ बाहेरील अनुकूल प्रद्दानें, सामान्य समजाप्रमाणें; आभासावर (पैसा-विद्या आहे अशा). 'ह्यापाशीं एक पैसा म्हटला तर नाहीं भरमाभरमीं संसार चालवितो.' २ संशयावरून. 'भरमाभरमीं चोर धरला.'

**भरल-ळ**—पु माड, मेरला इ० झाडांच्या लाकडाचा, पाणी वाहून नेण्यासाठीं कोरून केलेला पन्हळ.

**भर लावणें**—न. १ (कों.) आगरात (नारळ इ०ची) पूर्ण अथवा ठराविक संख्येइतकी लागवड करणें. २ आगरावर बसविलेला भरधारा. याच्या उलट कमलावणें.

**भरवणी**—स्त्री. १ भरण्यास इ० लावणें. २ हातानें, चमच्यानें खाऊं घालणें; भरवणें. ३ वारंवार सांगून शिकविणें. ४ अन्नप्राशनाचा संस्कार. [भरविणें]

**भरवाड**—स्त्रीपु. एक धनगर जात; त्या जातीचा मनुष्य. भराड पहा.

**भरवि(व)णें**—सक्रि. १ भरणेंचें प्रयोजक. भरणें पहा. २ हातानें, चमच्यानें खऊं घालणें (लहान मुलास, आजारी मनुष्यास); तोंडांत घास देणें, हातानें घालणें (लहान मुलाच्या अन्न इ०). 'जोंवरि अर्जुन मारुनि तन्मांस शिवादिका न भरवीन.' -मोकर्ण ६.५८. ३ (ल.) वारंवार सांगून शिकविणें. [भरणें]

**भरंवसा, भरासा**—पु. १ विश्वास; प्रत्यय; इतबार; आश्वासन. २ खातरी; मनाचा निश्चितपणा; निःसंदेह. [सं. विश्रंभ; हिं.] **म्ह**० भरवशाचे म्हशीस टोणगा=पूर्ण भरवसा असलेल्या माणसापासून, गोष्टीपासून, शेवटीं निराश होणें. **०तुटणें**-अक्रि. विश्वास नाहींसा होणें. 'उतावेळी होसी म्हणवुनि तुटे हा भरंवसा।' -सारुह १.१२६. **भरंवशाचा**-वि. विश्वासु; इमानी. **-शाची**

मोट-म्हैस-चें कूळ-स्त्रीन. ज्यावर, भरवसा ठेवलेला आहे असा माणूस, गोष्ट.

**भरस**—पु. (गो.) मिसळ; भेसळ **भरसु(भर्सु)चें**-सक्रि. (गो.) मिसळणें; एकत्र करणें

**भरा**—पु धान्याचें एक माप. मालवणकडे १६० पायल्यांचा किंवा १० मणांचा भरा होतो. 'जेथ मरणाचे भरे लोटले.' –ज्ञा ९.४९६.

**भराका**—पु.१ पंखांची भरारी, झपाटा(उडणाऱ्या पक्ष्याचा) (क्रि० मारणें; उडणें; चालणें). २ सणाणणारी गिरकी (गोफणीची, हाताची). (क्रि० मारणें). ३ धांव, जोरानें घुसणें(शब्दशः व ल.); जलद आणि जोराचा यत्न, व्यापार 'घोडयावर बसलों आणि भराक्यासरसाच पुण्यास दाखल झालों.' ४ देवाचा, पिशाचाचा झटका, झपाटा; रागाचा, वाऱ्याचा, झटकारा, सनाटा; कामाचा, मारण्याचा, गाण्याचा धडाका इ०. ५ घन, दाट वृष्टि (दगड, बाण, भाले यांची). ६ झपाटा; गिरकांडा; झेंप; धडका; कोणतीहि आकस्मिक आणि वेगाची हालचाल. 'पिशाच संचरताच ह्या भराक्यासरसेंच विहिरींत उडी टाकली.' ७ अपानवायु सरणें; पादणें. (क्रि० सोडणें; सारणें). ८ (सामा.) झपाटा. झपाटा पहा. [ध्व] **भराक्यासरसा उठणें**-अक्रि. झपाटयाबरोबर उठणें. **भराक्यासरसा येणें-जाणें-पडणें**-अक्रि. भिरिरी, सणाण इ० आवाज करून, सपाटयानें किंवा वेगानें येणें, जाणें, पडणें. **भराटणें**-सक्रि. त्वरेनें करणें, भरकटणें; झपाटणें (एखादें काम); खाऊन चट करणें; झटकर फडशा पाडणें (अन्नाचा); घाईघाईनें कसेंबसें उरकणें, करणें. **भराटा**-पु. भर्रं आवाज होईल असें उडणें (पक्ष्यांचें); इकडेतिकडे झटकणें (हलका कचरा, जिन्नस), गोंगाटानें वाहणें, चालणें (वाऱ्याचें) आदळणें (पावसाच्या सरीचें); जलदीची, झपाटयाची, दणक्याची क्रिया. (धांवणें, जाणें, बोलणें, खाणें इ०) तांतड; निकड; झपाटा (काम करावयाचा); फडशा (लिहिण्याचा, कामाचा); गोंगाटाची, धडाक्याची हालचाल, क्रिया (क्रि० होणें; चालणें; लागणें उडणें; करणें;मांडणें;चालविणें;लाविणें; उडविणें) २ अत्यंत वैपुल्य; समृद्धि. (सुगीची, पिकाची); पिकाचा, धान्याचा, आंब्याचा, अमदानीचा भराटा.' –वि. प्रचुर; विपुल; जोराचा; भक्कम. 'भराटा-पीक-पाऊस–वारा.' ४ जलद केलेला व संपूर्ण फन्ना, फडशा (अन्नाचा, आडकामांचा). (क्रि० उडणें; होणें; करून टाकणें; करणें).

**भराड**—न. १ डौर वाजवून व नाचून देवापुढें भराडयानें केलेलें भजन, गोंधळ. 'कथा लावणी गोंधळ भराड गीत गाती अबळा।' –पला १३३. २ (व.) कुणबी लोकांत बकरा वगैरे मारून केलेलें नवसाचें जेवण. **भराडा-डी**-पु. १ गोसाव्यांचा एक पंथ; डौरी; गोसावी; भराड-गोंधळ घालणारा. अठरा अखाडे पहा. भराडी, गोंधळी, मुरळया, वाघे हे गांवाबाहेर पालें देऊन राहतात. यांच्याजवळ गाई, म्हशी, बैल, टोणगे, कोंबडया, बकरीं असतात व तीं ते विकतात. हे खंडोबा, बहिरोबा इ० देवांचीं गाणीं, पोवाडे व लावण्या गातात काहीं बैठकीचें गाणें, तमाशा करितात. –गांगा १२०. २ पुजारी. [सं. भरटक; भरवाड पहा.] **भराडी गौर**-स्त्री (ना) श्रावण महिन्यांतील मुलींचा गौरीचा उत्सव व खेळ वगैरे. **भराडी वोवसा**-पु एक व्रत 'विधिमंत्रें सुशील स्नान। सतीनें केलें आपण। मग भराडी वोवसा दान। करिती जाहली।' –कथा ३१२.७३.

**भराड**—न. (कु.) बरड, वरकस जमीन.

**भरांदो**—पु (कों.) नारळाला कोंब आल्यानंतर फळांत मिळणारा पदार्थ. [भरणें]

**भरापुरा**—वि. १ भरून चाललेला, चांगला भरलेला (गांव, विहीर, तळें, मळा इ०). २ (ल) विद्वान्; गुणसंपन्न;

**भराभर-भरां**—क्रिवि भरभर; झपाटयानें, झरझर [भृ]

**भराभरी**—क्रिवि. (राजा.) प्रमाणाइतकें; पूर्ण माप भरून. (क्रि० उतरणें इ०)

**भरार-रां, भरारून**—क्रिवि. १ झपाटयानें जाण्याच्या, चालण्याच्या विशिष्ट ध्वनीच्या, तसेंच झपाटयाच्या विशिष्ट क्रियेच्या (भरारणें, झटकणें, सोसाटयानें वाहणें, फडफडवणें, थोपटणें इ०) आवाजाचें अनुकरण होऊन. (क्रि० उडणें; उठणें; पळणें; निघणें, सुटणें; चालणें, सुजणें; फुगणें इ०) २ (ल) जलदीनें; झपाटयानें; सपाटयानें [ध्व. भर!] **भरारणी**-स्त्री. मोठयानें कडकड आवाज करून जळणें इ० भरारणें पहा **भरारणें**-अक्रि. १ झपाटयानें भरभरणें २ जलदीच्या हालचालीनें, भर्रं असा आवाज करून उडणें; भरारी मारणें. ३ (ल) (एखाद्या गोष्टीविषयीं) उत्सुकतेनें व आवेशानें मागें लागणें; नादीं लागणें; हुरळणें. ४ भडाडणें; पेटणें (आग, गवत); जोरानें वाहणें (वारा); रानोमाळ उडणें (धूळ, धूर, भुकणी); झपाटयानें व रगडावून उठणें (पुरळ); फुगणें; सुजणें (फोड, गाठ) ५ अतिशय तरारणें; भरभरणें (कामधंदा, व्यापार); वाढणें; वृद्धिंगत होणें. 'सौभाग्यश्री तुझी भरारो हे।' –मोआदि १२२०. भरारून या धातुसाधिताचा भरारच्या ऐवजीं पुष्कळदा उपयोग करितात. **भरारा**-पु १ वेगानें, झपाटयानें आणि उत्कंटेनें धावणें, घुसणें; हल्ला; पाठलाग; चाल; अभिनिवेश. २ सोसाटा. 'शिरीं उष्ण पाऊस वायू भरारा।' –कचेसुच पृ.२. **भरारी**-स्त्री. १ भरकन उडणें; उड्डाण(पक्ष्याचें); अति त्वरेनें उंच किंवा दूर जाणें. (क्रि० मारणें). २-पु. (सांकेतिक) रघुनाथराव पेशवे. (यांस त्यांच्या जलद स्वाऱ्यांवरून राघो भरारी असें म्हणत.) 'अटकेवर झेंडे न्याया आणितां कुठून

भरारी–यापुढें।'–विक १०. ०मारणें–क्रि. १ उडणें;उड्डाण करणें. २जलदीनें प्रवास करणें. ३ (एखाद्या गोष्टीचा) मधला भाग अजीबाद गाळून किंवा त्याकडे लक्ष्य न देतां एकदम पुढच्या भागावर जाणें; उडया मारणें. 'जी हकीकत घडली ती साद्यंत सांग भराऱ्या मारू नको.'

**भरावरी**—क्रिवि वरचेवर, वारंवार.

**भरावणें**—अक्रि बधिर, जड, ताठर होणें (शरीर, अवयव) [भारावणें]

**भरित**—वि. १ भरलेला, पूर्ण 'अंत.करण भरितु।' –ज्ञा २.२९२. २ पोसलेला [सं. भृ=भरणें]

**भरिभार**—पु. पूर्ण विश्वास; भरंवसा. (क्रि० ठेवणें)

**भरी**—क्रिवि. (गो) बाजूनें 'अणी भरी'=अणियाच्या बाजूनें [परी ?]

**भरीत**—भर पहा.

**भरींव**—वि. १ भरलेला; लादलेला २ भरदार; घन; ऐवजदार, गाभा, रस, दळ इ० असलेला, घट्ट व लठ्ठ; पोकळच्या उलट. 'जों जों दिसे उर भरींव तयाशि तों तों।' –र १५. [सं भृ= पोसणें, धारण करणें, भरणें] ०चिवा–पु चिवा नामक जातीचा नर बांबू; कागदी चिव्याच्या उलट पोकळ नसलेला बांबू.

**भरू-रूं**—स्त्रीपु १ भर; आवड; आसक्ति. 'कर्मी भरू होआवा तैसा।' –ज्ञा ३.१६९ २ विस्तार 'आतां भणे क्वी भास्करू। एथ कांइगा भरूं।' –शिशु ३०९.

**भरेकरी**—पु कापडाचा फिरता व्यापारी; कापड तयार करणारापासुन तें विकत घेऊन दुकानदारांस तें फुटकळ विकणारा उदमी. [भरणें+करी]

**भरो**—पु. १ (कु.) चार खंडींचें कुडाळी माप. २ लांकडाची मोळी. [सं. भृ+भारा]

**भरोभर**—स्त्री. (प्र) भरउभर पहा. **भरोभरी**–स्त्री. (काव्य) भरती; पूर्णता; पूर्ण पुरवठा केल्याची स्थिति 'संसाराची भरोभरी। मागें केली बहुता परी।' **भरोभरी-न**–क्रिवि. १ मापासमाप; परिमाणास परिमाण; बरोबरीनें. (क्रि० देणें; घेणें; उतरणें) 'गहूं दिले आणि भरोभरी तांदूळ घेतले' २ मापलेलें पुन्हा मापून (एकदां मापल्यावर परीक्षेकरितां) 'बाजाराचें माप घरचें माप भरोभरीनें अधिक उणें होतें. (राजा) भऱ्या भरी. [भरणें द्वि] **भरोवरी**–स्त्री १ सामुग्री 'सांगों ऐक प्रज्ञेचिया। भरोवरी।' –ज्ञा १८.८५५ २ आवड ३ गर्दी; दाटी 'जैसी कृमींची भरोवरी।' –विपु ४ ६०. –वि भरपूर; पूर्ण. –क्रिवि श्रमानें; आयासानें. 'संसाराचा हाट फिरतों दुकानें। भरोवरी धन मेळवितों।' –तुगा १९६५ [भरणें]

**भर्ग**—पु. १ महादेव. २ –न. तेज. [सं.] **भर्गोदेव**–वि (व.) मूर्ख. 'म्हणा कांहीं, बाकी मनुष्य भर्गोदेवच बरं कां!'

**भर्गत**—वि. (गो.) पूर्ण. [भर]

**भर्जणें**—सक्रि भाजणें. [सं. भर्जन] **भर्जन**–न. भाजणें. **भर्जित**–वि. भाजलेला.

**भर्णकुटॉ, भण्णकुटॉ**—वि (गो.) दमेकरी. [भरणें ?]

**भर्ता, भर्ता भ्रता)र**—पु १ पति; नवरा. २ पालन करणारा 'भर्ता आणि भोक्ता कर्ता आणि करविता।' –तुगा ६३०. [सं.] **भर्तृघात**–पु. नवऱ्याचा घात; पतिहत्या. **भर्तृत्व**–न. भर्त्याची स्थिति, त्याचा अधिकार, संबंध; पतित्व.

**भर्त्सणें**—सक्रि. (काव्य.) निंदा, कुत्सा, गर्हा करणें. [सं. भर्त्सन] **भर्त्सन-ना**–नस्त्री निंदा;तिरस्कार,हेटाळणी. **भर्त्सित**–वि निंदित, तिरस्कारलेला.

**भॅर्बो**—वि (गो) आमांश झालेला, असलेला (मनुष्य).

**भऱ्याचा**—वि १ भरणारा; पूर्ण करणारा; पूर्णपणें गुदरवणारा (कालविभाग दिवस, रात्र इ०); मागें जोडलेल्या कालदर्शक नामासह समासांत योजतात उदा० दिवसाभऱ्याचा उपोषित; महिन्याभऱ्याचा ज्वरग्रस्त; वर्षाभऱ्याचा उमेदवार इ० २ द्रव्यार्थी नामासह योजतात उदा० पैशाभऱ्याचा; रुपयाभऱ्याचा [भरणें]

**भऱ्यौचें**—अक्रि. (गो.) बहिरे होणें. [बहिरा]

**भर्वण**—वि. (गो.) पसरलेली; सांडलेली; शिंपडलेली (वस्तु). [भरणें]

**भल**—न. भाला, शूल, बाण इ०चें टोंक; फळ. [सं भल्ल]

**भल**—वि. १ चांगला; नामी; उमदा. भल–घोडा–गाजी–मर्द–भालेकरी–दांडगा–जेवण. ' २ पक्का; अस्सल, अट्टल; बिलंदर. उदा० भल–मोठा, भल–लुच्चा ३ मोटा; अफाट,अवाढव्य; विलक्षण उदा० भलओझें, भलगोणी. ४ प्रकर्षार्थी नामें व विशेषणें याजबरोबर योजतात उदा० भलमजेचा; भलनामी [भला] ०कई–क्रिवि (व.) भलतेंच; कोणीकडच्या कोणीकडे [भलतीकडे] ०कसा–वि (ना) विचित्र; विलक्षण. ०कुबल–पु. (माण) कठीण प्रसंग ०कोठें–क्रिवि कोठेंतरी; कोणी कडे तरी.

**भलता**—वि १ कोणीहि, कोणी तरी,कोणता तरी २ चालू विषयाशीं असबद्ध; अप्रस्तुत, विसगत; मन मानेल तसा. ३ काल, स्थल, परिमाण, साम्य इ० पुष्कळ विशेषणासह समासांत योजतात उदा० भलतीकडे; भलतीकडचा; भलतेवेळा; भलतसा; भलतेव्हां; ४ पुष्कळ; विलक्षण 'वाटे मज लाभ लता गुल्मतृणोद्भवहि येथ मजला भलता।' –मोकृष्ण ४७.११७ [भला]

**भलतयापरी**–क्रिवि मनाला वाटेल तसें; वाटेल त्या रीतीनें. 'तें आपुला अलंकारितु। भलतयापरी।' –ज्ञा १८२ **भलतसा**, **भलतसला**–वि १ कोणत्याहि जातीचा; वाटेल त्या जातीचा आणि प्रकारचा; वाटेल त्या सारखा २ –क्रिवि. कोणत्याहि रीतीनें, तऱ्हेनें; वाटेल तसल्या रीतीनें. [भलता+असा]

**भलतसें**–क्रिवि. कशाहि प्रकारें; वेडेवांकडें; जसें येईल तसें. 'म्हणोनि निगमस्तुता भलतसें तुला वानितो।'–केका ६० **भलतासलता**–वि. कोणी तरी; कोणता तरी (मनुष्य, बाब, वस्तु). [भलता द्वि.] **भलतीसवा**–क्रिवि. अव्यवस्थित, कोणत्याहि बाजूला. 'पडे दंडकाठी। देह भलतीसवा लोटी।' –तुगा ५५५. **भलतीसा-सी-सें**–वि. (व) पुष्कळ. **भलतें** –वि. १ हवें तें; कोणतेंहि. 'हे वरी भलतें करितु।'–ज्ञा १.२२५. २ कोणीहि. 'भलतया दुःख देतु जाये।'–ज्ञा १८. ६५६. ३ (ल) अगाध; अवघड. 'अथवा भलते गोष्टीस कच...' –पेद ३.१८३. **भलतेउतें**–अ. पाहिजे तेथें; पाहिजे तसें. 'जाळणें आगीचें भलतेउतें।'–ज्ञा १६.२८८. **भलतेएके**–वि. कोणी तरी. **भलतेणें**–वि. वाटेल त्यानें. 'भोगिजे भलतेवेळां। भलतेणें।'–अमृ ९.५५. **भलतेतुकें**–क्रिवि. पाहिजे तितकें. 'आणि पाणी हो कां भलतेतुकें।'–ज्ञा १८.८६२. **भलतेथ-ते-थें**–क्रिवि. वाटेल तेथें. 'मग भलतेथ भलतेव्हां।'–अमृ ७. १७६. **भल(ले)तेवढी**–वि. पाहिजे तेवढी. 'तरी हो कां भलतेवढी। वरिचील वाढी।'–ज्ञा १५४९. **भलतेव्हां**–क्रिवि. पाहिजे तेव्हां; वाटेल त्या वेळीं. 'मग भलतेथ भलेतव्हां।' –अमृ ७.१७६. **भलतेसणा**-वि. कोणताहि; पाहिजे तेवढा 'भलतेसणी हानिलाभु। न मनीं जेवीं।'–ज्ञा १६.७९. **भलतैसा**–वि. कसा तरी,कसाहि. 'सुंदर अथवा कुरूप ऐसा। वर मिळो भलतैसा।'–कथा १.३.९१. **भलतैसें**–वि. वाटेल तें. 'आतां भलतैसें करावें। द्रव्य मिळवून न्यावें।' –दा ३.४४५ **भलत्यास**–वि.कोणासहि; अनधिकाऱ्यालाहि 'सदैव भलत्यासही सुलभ आणखी गायका।'–केका ७५. **भलभलता**–वि. अनेक प्रकारांनीं भलता; वाटेल तो. 'चवघामध्यें योग्य असेल तेंच बोलावें भलभलतें बोलूं नये.' **भलयता-ती-तें**–वि. भलता. 'जऱ्ही तो जनु भलयता। भलयतें म्हणो।' –गीता १२.३३१.

**भलपणें**—अक्रि. हालणें.

**भलमाणसाई**—स्त्री. माणुसकी; सभ्यता; रीतभात, वर्तन यांत सात्विकपणा. [भला+माणूस]

**भला**—वि १ चांगला; सद्‌गुणी; योग्य; चांगल्या स्वभावाचा. 'चिकित्सक भला भला म्हणुनि फार वाखाणिला।'–केका ४४ २ सभ्य; पतवाला; अब्रूदार; चांगल्या मान्यतेचा, नांवाचा ३ (काव्य.) बरा. 'घावु भला होये।'–वैद्यक ७६. ४ जसा असावा तसा; योग्य गुणाचा, परिणामाचा; प्रशंसेस पात्र; नामी; उत्कृष्ट; उमदा; भव्य 'आज भला पाऊस पडला.' ५ मोठा; सपाटा. 'इतक्यांत शेजारच्या वारुळांतून एक भला मोठा नाग निघून...' ६ (व ल.) श्रीमंत ७ (व.) मोठा; पुष्कळ. 'हा भला खादबोका आहे.' –उद्गा. शाबास; भले. 'वत्सा! भला! जयपद नारायण सखा नरा! हो रे!।'–मोभीष्म ४.२४. [सं. भद्रक; प्रा. भल्लओ; अप. भल्लउ, हिं.] **म्ह॰** भले भले करून भागली व देवपूजेला लागली. **॰घेणें**–सक्रि. सपादून मारणें; निंदणें **भलें घेऊन फिरणें, पुसणें, विचारणें**–लुब्रेपणानें समदुःखी, मायाळू असणें; लचाळपणें दुसऱ्याच्या कल्याणाबद्दल काळजी बाळगणें. 'माझें भलें कां घेऊन फिरतोस!' **भला बुरा**–वि. चांगला अथवा वाईट 'तुक सकळाचें गोविंदाचें हातीं। कोण कोण गति भलीबुरी।' [हिं.] **॰माणूस**–पु १ अब्रूचा, प्रामाणिक, सभ्य, मनुष्य. २ (व) श्रीमंत, चागला मनुष्य **भलाइकी-यकी, भलाई**–स्त्री. १ चागुलपणा; सुजनता; सात्विकता; स्वभावाचें मृदुत्व, कोमलता. २ मोठेपणा. 'भली भलाई कर पण कांही अधर्ममार्गी शिरूं नको।'–अफला ६० ३ सन्मान्य प्रसिद्धि, कीर्ति. (क्रि॰ मिळणें; मिळवणें) **॰ईबुराई**–स्त्री चांगलेपणा किंवा वाईटपणा; बरेवाईटपणा. [हिं.] **भलाव(म)ण**–स्त्री. १ अब्रूपत्र; आपले ओळखीच्या पत असलेल्या माणसावर एखाद्यास गरज असलेली रक्कम देण्याविषयीं दिलेली चिठ्ठी, वरात. २ ओळखीचें पत्र; शिफारसपत्र २ आश्रय; मेहेरबानी, शिफारस. [भला] **॰वणपत्र**–न एक मनुष्य दुसऱ्या मनुष्यास उधारी देण्याविषयीं अखत्यार देतो तो लेख **॰वणी**–स्त्री. (गुज) शिफारस. **भलीबरी**–स्त्री. १ चांगलें व वाईट वर्तन; पत (मनुष्याचें); चागलेपणा व वाईटपणा (स्थल, धंदा इ॰ कांचा) [हिं] **भली भलाई(य), भलीभलायकी**–स्त्री. १ चांगलेपणा; सद्‌गुण; सदाचरण; स्वभावाचा चागुलपणा २ कीर्ति, सामान्य प्रसिद्धि, लौकिक; प्रशंसा. ३ खुशालीची हकीकत, आरोग्य; चालू काम, परिस्थिति याची बातमी [हिं.] **भलें**–उद्गा खाशी! नामी! चागलें? शाबास! 'भलें स्मरण जाहलें समयिं कंसदासीकरें।'–केका ३७ **भले बाप**–उद्गा उत्तेजन, स्तुति याविषयीं उद्‌गार. **भले लोक**–पु. राजे, सरदार इ॰ कांचे पदरीं जे मानकरी, शिपाई, शिलेदार इ॰ लोक असतात ते **भल(ले)री**–स्त्री. १ समुदायानें कष्टाचें काम करीत असलेल्या मनुष्यानीं तें हलकें जावें म्हणून गाणें म्हणणें, एकमेकास हाकमारणे व उत्तेजन देणें; भले रे दादा! भलेरे भाई! इ॰ उत्तेजनपर शब्द (माण) काढणीच्या वेळचें गीत; शेतकामें करण्यास उल्हास येण्यासाठीं गाण्याचें गीत (क्रि॰ घालणें) २ जोरदार व न खळणारा यत्न, कष्टाचें काम, झपाट्याची एकसारखी ओढ, धाव, नेट, ताण, दम (क्रि॰ लावणें; घालणें). ३ कृत्रिम, तोंडपुजेपणाची, मूर्खपणाची वाखाणणी; गाणें इ॰ कलेचे मर्म न जाणतां, तें उत्तम नसतां त्याची उगीच केलेली प्रशंसा; अवास्तव स्तुति. [भला+अरे] **भलोबा**–पु. लडिवाळपणाचा शब्द; चांगला, भला माणूस. [भला+बा]

**भलांडें**—न. आंत विस्तव घालून, गोसावी, गोंधळी डोक्यावर घेतात तें मडक्याचें बदखल; भदें; खापर.

**भल्ल**—न भाला, शूळ, बाण इ० कांचें टोंक; एक प्रकारचा बाण, भाला. ' श्रुतकर्मा मग तद्नु खंडुनि भल्लेंचि तच्छिर च्छेदी।' –मोकर्ण ९ २१ [सं.]

**भल्ला**—उद्गा. बरें! वाहवा! –वि. १ भला, चांगला या अर्थी योजतात. २ (व) खूप; जास्त

**भल्लातक**—पुन बिब्याचें झाड व त्याचें फळ. [सं] **०क्षार**–पु बिब्बे, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी; सेंधेलोण, पादेलोण व बिडलोण हे प्रत्येकी आठ तोळे घेऊन अंतर्धूमानें राख करून चूर्ण केलेला क्षार. हा जेवतेवेळीं तुपाबरोबर घेतल्यानें हृद्रोग, पांडुरोग, संग्रहणी, उदावर्त व शूल यांचा नाश होतो. –योर १ ४४५.

**भल्लु(ल्लू)क**—पु अस्वल. [सं.]

**भंव**—न १ भ्रमण. २ जन्ममरण. [सं भ्रम]

**भव**—पु. १ शंकर. ' भव राज्य करी। भवानीशीं।' –एभा २४ २४८. २ संसार ' भव नेणों। भव नेणों। सर्व हें ब्रह्मचि जाणों।' –हंको. ३ सुखदुःखें, उद्योग आणि घोर एतद्विशिष्ट अस्तित्व; मृत्युलोक. ' जे आवडोनि घेतलें। भवस्वर्गादिक।' –ज्ञा १४.४२. ४ जन्म; उत्पत्ति. ' पुढें अंतरीं सोडि चिंता भवाची।' –राम २६. ५ सत्ता; अस्तित्व. ६ पासुन उत्पन्न झालेला याअर्थी समासांत प्राचुर्यानें योजतात. उदा० देहभव (शरीरापासुन उत्पन्न झालेलें दु.ख इ०); मनोभव (मनापासुन उत्पन्न झालेला क्रोध इ०). तसेंच संसार या अर्थी पूर्वपदीं योजतात. उदा० भव–चक्र–सागर–बाधा–रोग–दु.ख–जाल–पाश–भंजन, भवानल; भवाटवि इ० [सं] सामाशब्द– **०गोवा**–पु संसाररूपी संकट ' करुणासागर नाम सत्य.करी उगवी भवगोवा।' –देप ३३. [सं.] **०च्छेदक**–वि संसाराचा नाश करणारा ' विठाबाई विश्वंभरे भवच्छेदके।' –तुगा १५७३. [सं] **०जनक–दायक**–वि. (दुसऱ्या) जन्मास कारणीभूत (पापकृत्यें. ह्यांना जन्मान्तराची शिक्षा व शुद्धी पाहिजे असते). [सं] **०डोह–डोहो**–पु प्रपंचरूप गर्ता, विवर, डोह **०तारीया**–वि. भवतारक **०नदी**–स्त्री १ गंगा. २ संसारनदी [सं.] **०पाशनिकृंतन**–वि (काव्य) प्रपंचाच्या पाशाचा छेद करणारा (ईश्वर). [सं] **०भंजन**–वि. संसाराचा मोह तोडणारा [सं.] **०भय**–न. अन्य जन्माचें, संसाराचें, भय. ' ज्याचें नांवाचें संकीर्तन। करी भवभयासी निकृंतन।' [सं.] **०भाव**–पु. संसाराचें अस्तित्व. ' तेवीं मिथ्या प्रतीति भवभावा।' –एभा ११.७३. [सं.] **०मोचक–मोचन**–वि. संसारापासून किंवा भिन्न आणि व्यक्तिविषयक अस्तित्वापासून सोडविणारा. ' तें तपोबळ जाण परि नव्हे भव मोचन।' [सं] **०मोचन**–न. मुक्ति. –वि. संसारापासून सोडविणारा [सं.] **०रोगनिरसनी वैद्य**–पु. संसारावरून मन उडविणारा, परमार्थसंबंधीं वैद्य (गुरू). [सं.] **०रोगी**–वि प्रापंचिक उद्योगरूप, सुखरूप आजार झालेला; असमाधानकारक रीतीनें त्यांत डुबलेला. ' भवरोगिया आरोग्य येणेंचि होय।' [सं.] **०व्यथा**–स्त्री. प्रापंचिक चिंता, दुःखें, श्रम, संताप; संसारदुःख [सं] **भवांतक**–वि. (सायुज्य मुक्ति होऊन) जन्मान्तराचा नाश करणारा (ईश्वर) [सं] **भवाब्धि**–पु. संसारसमुद्र. [सं.] **भवार्त**–वि. १ प्रपंचाचा वीट आलेला; प्रापंचिक दुःखांनीं व आभासांनीं कंटाळलेला. २ भवातुर; भवाक्रान्त; भवरोगी; भवदुःखित; भवपीडित. [सं.] **भवाभव**–पु. उत्पत्ति आणि नाश. [सं]

**भवई–य्या**—पु. एक जात व तींतील एक व्यक्ति. तमासगीर लोक. हे नटाचा व नर्तकाचा धंदा करितात. हे गुजराथ देशांतील आहेत ' शहरातील उत्तम गाणारणी यांचे नाच व भवई लोकांचे तमाशे सारी रात्र होतात ' –तीप्र ११७.

**भंवई**—स्त्री. भिवई; डोळ्याच्या वरच्या भागीं धनुष्याकार असलेली केशपंक्ति [सं भ्रू; हिं.] **०उचलणें**–रागानें पाहणें. **भंवयास गांठी घालणें, भंवया चढविणें**–क्रि. कपाळाला आठ्या घालणें. **म्ह०** भंवयांस गांठी तोंडास मिठी=नेहमीचा घुमेपणा व द्राष्टपणा; तसेंच कंजुषपणा, नतद्रष्टता दाखविणें याअर्थी.

**भ(भो)वंड, भवं(डी)**—स्त्री घेरी; भोंवळ; चक्कर; मूर्च्छा; गिरकी ' हें असो आंगीं भरलिया भवंडी। जैशा भोंवत दिसती अरडीदरडी।' –ज्ञा ९ ८१. [सं. भ्रमण] **०णें, भंवणें**–अक्रि. (सामा) भोवंडणें व भोंवणें. –सक्रि भोवंडणें; गरगर फिरविणें. 'पक्ष भवण्डितां भूगोल। चक्रीं पडे गरगरां।' –मुआदि ६.३६. **भवंडा**–पु. गरका; चक्कर; भोवळ **भंवणें**–अक्रि १ गरगर फिरणें. ' देह भंवतसे चाकीं सुदलें। जन्ममृत्यूच्या।' –ज्ञा १३.११०२. २ भोंवणें; हिंडणें; भटकणें. ' घेतलें भोंवे पिसें। होऊनियां।' –ज्ञा १८.५५१. **भंवे, भवें**–न. १ भ्रमण; भ्रम. ' तैसें बुद्धीसि होती भंवे। धनुर्धरा।' –ज्ञा २ ३२६. २ जन्ममरणाचे फेरे.

**भवंडु**—पु. एक अलंकार; फिरकीचें फूल. ' फणी शीसफूल गोंडा। राखडी भवंडु आणि दांडा।' –कथा ३.१२.२३.

**भवणें**—न. भोंवणें.

**भवणें**—न. उभवणें.

**भवणें**—अक्रि. अंगावर येणें; भोगावें लागणें. 'तें कर्म त्यांचें त्यांमीच। भवलें साच त्या भोंवतें।' –एभा १.२१०. [भोगणें]

**भं(भ)वता, भवताला–ली**—क्रिवि. भोंवता; भोंवताला; सभोंवतीं. [भंवणें] **भंवता–तीं–ते**–क्रिवि. सभोंवार; भोंवतीं. ' तयाचि भंवत्या उभ्या परमकौतुकें राहती।' –मोकृष्ण ५५. २७. **भं(भ)वतालचा**–वि. भोंवतालचा.

**भवति न भवति**—स्त्री. वादविवाद; वाटाघाट, चर्चा; खल. [सं. भवति=होतें+न भवति=होत नाहीं]

**भवन**—न. १ घर; वसतिस्थान. २ राहण्याचें, असण्याचें ठिकाण. ३ होणें; असणें. [ सं. ]

**भव(वा)न**—न. ( कुलाबा को. ) वारुळ. 'त्या भवानातून एक नाग बाहेर आला.' [ सं. भवन ]

**भवनीय**—वि. व्हावयास पाहिजे असें; होण्याजोगें. [ सं. भू+अनीय प्रत्यय ]

**भवभव**—स्त्री. उष्ण स्फुरण; भगभग; कंप ( दुःखानें, भुकेनें इ० पोटात होणारा ) ( क्रि० उठणें; होणें, वाटणें ). 'मळमळ सुटली भवभव करी आगीं, थरथरले जोबन।'–पला ९९ [ ध्व. ] **०णें**–अक्रि. भवभव, भगभग होणें.

**भवर्**—न. ( खा. ) जातीचें संमेलन.

**भवर**—स्त्री (व.) मजा. 'रात्रभर भवर झाली गाण्याची.'

**भवर**—पु. ( महानु ) भ्रमर; भुंगा. 'काई भवरासि कमळी।' –भाए १४. [ सं. भ्रमर ]

**भंवरकडी, भवरगांव, भंवरपाशीं, भंवरा, भंवरी, भंवळ, भंवाडा, भंवार, भंवारगांव इ०**—भोंवरकडी, भोंवरगाव इ० पहा.

**भंवरा**—पु. भ्रमर; भुंगा. 'आपणचि भंवरा। होआवें पडे।' –अमृ ५.४२. [ स. भ्रमर ] **भंवरी**–स्त्री. १ भ्रमरी. २ भ्रमण; भोंवरी; गिरकी; फेरा. 'एका पुढां भवरी दे।' –एभा ८.१९४. ३ (ल.) ( व. ) कापणी केलेल्या पिकाच्या, कडब्याच्या पेंढया एकीशीं एक उभ्या लावून वर्तुलाकार केलेला ढीग. –वि. ( माण. ) पांढऱ्या रंगाची ( म्हैस ).

**भ-वलय-भवृत्त**—न. क्रांतिवृत्त. [ सं. ]

**भवलें**—न. बहुलें; बोहलें.

**भंवाडा**—पु बभ्रा. [ प्रा. ]

**भवानी**—स्त्री. १ सौम्य रूप धारण केलेली पार्वती देवी. 'देउनि विजय-वर असा झाली अन्तर्हिता भवानी ती।' –मोभीष्म १.५०. २ बोहणी पहा [ सं ] **म्ह०** सवा रुपयाची भवानी व सोळा रुपयांचा गोंधळ. **०कवडी**–स्त्री. सामान्य कवडी. दद्दी-कवडी, सगुणी कवडी व भवानी कवडी अशा कवडीच्या तीन जाती आहेत.

**भवितव्य**—न. १ भावी आणि निश्चित गोष्ट; अवश्य होणारी गोष्ट. २ ( ल. ) दैव; प्रारब्ध; नशीब. [ सं.] **०ता**–स्त्री. पुढें घडणारी गोष्ट. [ सं. ] **भविता**–वि. पुढें होणारा; भावी. ( स्त्रीलिंगी रूप भवित्री ) [ सं. ] **भवितृत्व**–न. भवितव्यता. [ सं ] **भविजणें**–अक्रि. होणें. 'मग तयाहि वरी आदु भविन्नला। आकाशाचा।' –ज्ञा ६.३१४.

**भविष्य**—न. १ भावी गोष्ट. २ भावी गोष्टीविषयीं अगोदर केलेलें कथन; भाकीत. ( क्रि० सांगणें; बोलणें ). ३ ( व्या. ) पुढें येणारा काळ. ४ ( व. ) उत्पात. –वि. भावी. [ सं. भू ] **०काल**–पु. ( व्या. ) वर्तमान क्षणापुढें येणारा काळ. या काळीं असलेल्या क्रियापदावरून पुढल्या काळाचा बोध होतो. [ सं. ] **भविष्यद्वक्ता, भविष्यवादी**–वि. भाकित करणारा; भविष्य सांगणारा. [ सं. ] **०भविष्य**–पु ( व्या. ) विवक्षित भविष्य काळाच्या पुढल्या काळीं एखाद्या क्रियेचा व्यापार व्हावयाचा असता योजावयाचा भविष्यकाळ. उदा० करणार असेन. [ सं. ] **०भूत**–पु. ( व्या. ) एखादी क्रिया भूतकाळीं करावयाची होती, परंतु काहीं व्यत्ययामुळें ती सिद्धीस गेली नाहीं, अशा वेळीं योजावयाचा तो भविष्यभूतकाळ. उदा० करणार होतों. [ सं. ] **०माण**–वि. होणारें. 'का भविष्यमाणें जियें हीं। तींही मज· वेगळीं नाहीं।' –ज्ञा७.१६२. [ सं. ] **०वादी**–वि. ( ख्रि. ) १ संदेष्टा. 'भविष्यवादी स्वर्गी सारे लागति नाचाया।'–उस ७६ २ ( ख्रि ) आत्म्याच्या प्रेरणेनें गाणारा; काव्य करणारा. ३ ( ख्रि. ) ईश्वरी प्रेरणेनें पवित्र शास्त्रातील रहस्याचा उलगडा करणारा, ( इं. ) प्रॉफेट्. ४ अति दूरदृष्टि (पुरुष). [ सं. ] **०सूचक**–वि. १ पुढील गोष्ट आगाऊ दाखविणारा. २ पूर्वसूचक; अग्रसूचक; उद्बोधक. [ सं. ] **०ज्ञान**–न. पुढें होणाऱ्या गोष्टीचें ज्ञान. [ सं. ] **भविष्योत्तर**–न. भवितव्याचें भविष्य; भाकीत केलेली भावी गोष्ट. ( क्रि० सांगणें; कथणें; कथून ठेवणें; कथन करणें ). 'फिटे भविष्योत्तर आणि पावे सायुज्यता.' [ सं. ] **भविष्या**–वि. १ भविष्यद्वक्ता. २ दिवसगतीवर टाकणारा, ढकलपट्टी करणारा; चेंगट. ३ मागचें पुढचें अवधान नसावें, वारंवार भ्रांति पडावी अशा स्वभावाचा. [ सं. ]

**भव्य**—न. कल्याण; हित 'आशिर्वाद मजकडे या देइल भव्यकोटि केशवसा।' –मोभीष्म १.६९. –वि. १ ढबदार; धीट; दिखाऊ मुद्रेचा; सुरूप; देखणा. २ प्रशस्त; टोलेजंग. ३ भावी; होणारा; भविष्य. [ सं. ]

**भष्ट**—पु. ( गो. ) विटाळ; रजोदर्शनामुळें स्त्रियांस येणारी अस्पर्शता. **भष्टी**–स्त्री. ( गो. ) विटाळशी. [ सं. भ्रष्ट ] **भष्टुंचें**–अक्रि. ( गो. ) विटाळणें; भ्रष्टावणें; भ्रष्ट होणें. **भष्टेड कवळो**–पु. विटाळशीचें अंथरूण. ( अस्ताव्यस्त बिछाना ).

**भॅशांवचें**—सक्रि. ( गो. ) भेडसावणें.

**भस**—न. ( गो. ) जेवण.

**भसकचाट्ट, भसकया**—वि. दांडगा; धसकया; लाटण्या; अविचारी; रगडया ( माणूस ). [ ध्व भस ! भस !+चाट्ट ]

**भसकटणें**—अक्रि. बहकणें; वाट चुकणें; गहाळणें; गमावणें; सांडणें. –सक्रि. भोसकणें; घुसडणें.

**भस-कन-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. किंचित् प्रतिबंध करणाऱ्या पदार्थांत जोरानें शिरतांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन. [ ध्व ] **भसकणी**–स्त्री. १ खुपसणी; भोसकणी;

भोसणी. २ बहकणी; वाट चुकणें इ० **भसकणें**–सक्रि. १ जोरानें खुपसणें; भोसकणें, भोसणें २ बहकणें. भसकटणें पहा **भसका**–पु. १ प्राय भोसकून, भोसुन पडलेलें भोंक. २ (सामा.) भोंक (भिंत, कपडा, कागद इ० कातील).

**भसका**—पु (व) बचका; बुचकुली; भारा. 'भसकाभर-पीठ' [बचक]

**भसकापुरी**—स्त्री. १ भरभरीत; नीरस तपकीर, तंबाखू. २ वाळलेल्या मिरच्याची पूड, भगवती. ३ हलका व भुसभुसीत, कवडीमोल जिन्नस (धान्य, लाकूड, कपडा, सूत इ०) ४ भाज लेल्या धान्याचें पीठ.

**भसकावि(व)णें**—सक्रि. १ जोरानें आवाज करून भोसणें, खुपसणें, भोसकणें. २ भोंक पडेल अशा रीतीनें खुपसणें. [ध्व. भस!] **भसभशी(सी)त**–वि. १ रुक्ष व हलका; भस् आवाज करून उडण्यासारखी (तपकीर, भुकणी इ०). २ फुसफुशीत; विरणारा, भरभरीत, रुक्ष **भसभस-भसां**–क्रिवि. १ प्रचंड धूळ उडताना, रेती, चिखल इ० कांत पाय रततांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन. २ धसधस-धसां. **भसभोंगळ**–वि. शिथिल, ढिलें; थलथलीत (ओझें, गाठोडें, मास); शिथिल; ढिली, गबाळ, बेपरवा (काम करण्याची पद्धत). [भस+भोंगळ]

**भॅसडांवचें**—सक्रि. (गो.) भिवविणें [भिवडाविणें]

**भसमणें**—अक्रि. (व) तोरा खालीं उतरणें; निरुत्साह बनणें 'पहिल्यानें उतमात केली मग भसमला.' [भस्म]

**भसरा स्त्रा, भस्त्रिका**—पुस्त्री. १ योगपद्धतींत शरीरांतील वायु कांहीं वेळ बंद करण्याची, त्याचा निग्रह करण्याची पद्धति. २ (प्रायः) भसरें; धेंडाळी [ध्व.]

**भसरें, भस्त्रें**—न. १ परसाकडेचा उपद्रव; धेंडाळी (मुख्यत्वें अपचनापासून होणारी). २ ज्यांत गळा सुजतो, तोंड सडतें असा उष्णतेनें होणारा आजार. [भस!]

**भसाडा**—वि. १ भरड व जाड (गवत, सूत इ०). २ बेढब व बोजड (अक्षर, आकृति, चिन्ह, दागिना, वस्तु). ३ भरड; राठ; ओबडधोबड (काम). ४ ओबडकामी; धसक्या; रगड्या (कारागीर). ५ खाण्यापिण्यांत अशिष्ट आणि अर्वाच्य संबंधीचा. ६ गव्हार वर्तनाचा, चालीचा. ७ (खा.) मोठा; कर्कश. [सं. भस्; भस!] **भसाळ**–वि. १ जंगी; अफाट; अवाढव्य; राक्षसी. २ ओबडधोबड; बेढब; भसाडी (इमारत, जिन्नस) [भस!]

**भसाभस-भसां, भसासां**—क्रिवि. १ कापीत, काटीत, खापीत असतां–मऊ व दबणाऱ्या पिंडाच्या आवाजाचें, चिखलांत इ० निसरणाऱ्या पायाच्या शब्दाचें अनुकरण होऊन. २ धसाधस-धसां. [ध्व.]

**भसित**— न. भस्म; राख. 'खवळे प्रिय पुत्र भसित मिश्रित मधुच्याहि तज्ज्ञ तो पानें.' –मोआदि ९.३६. 'माला करीं हृदयभालासि तें भसित ...' –आराम ५. [सं.]

**भस्म**—न. १ राख; रक्षा; विभूति. २ वैद्यकक्रियेनें धातूची केलेली रक्षा. [सं.] **०क रोग**–पु. यांत कफ क्षीण झाला असतां स्वस्थानीं वाढलेलें पित्त वाताला अनुसरून जठराग्नीला अत्यंत वाढवितें. तहान, दाह, मूर्च्छा, भोंवळ, खोकला, सूज; मळ, शुष्क होणें, मोह व श्रम हीं लक्षणें होतात. –योर १.४८२. [सं.] **भस्मणें**–अक्रि. (काव्य) भस्म होणें. 'भस्मासुर भस्मला हे मात।' सामाशब्द– **०कोथळा**–पु. १ (ल) जंगी प्रमाणांत, अरबट चरबट अन्न गडप करणारें पोट २ खादाड, अधाशी मनुष्य. **०रंग-रंगी**–वि. भस्माच्या रंगाचा; भस्मी. **०रोग**–पु कितीहि खाल्लें तरी क्षुधा शान्त होत नाहीं असा रोग; जेवढें खावें तेवढें भस्म व्हावें पण अंगीं लागू नये असा रोग. **०रोगी**–वि. १ भस्मरोगानें पीडिलेला. २ (निंदेनें) पुष्कळ खाऊनहि किडकिडीत आणि रोगीच राहणारा. ३ सदा रोगी असलेला. [सं.] **०वर्ण**–वि. भस्माच्या रंगाचा. [सं.] **०सात्**–क्रिवि. भस्माप्रमाणें; भस्माच्या स्थितींत, स्थितीस. (क्रि० करणें; करून टाकणें; होणें). [सं.] **०सात् करणें**–सक्रि. जाळून राख करणें. **०स्नान**–न. पाण्याच्या अभावीं शरीराला भस्म चोळणें. जेथें वैद्यशास्त्ररीतीनें जलस्नान निषिद्ध केलें आहे तेथें स्नानाचा गौणकल्प. [सं.] **भस्मासुर**–पु. १ सर्वांस जाळून टाकण्याची शक्ति असलेल्या एका दैत्याचें नांव. 'तरी काय मी भस्मासुरु। अर्जुन म्हणे।' –ज्ञा २.३८. –वि. विध्वंस करणारा. ३ (ल.) अतिशय खादाड. [सं.] **भस्मी**–वि. १ भस्माच्या रंगाचा. २ सोनेरी कलाबतूच्या नक्षीनें अलंकृत (शेला, पागोटें इ० पोशाख). **भस्मीकरण**–न. (रसा.) एखाद्या द्रव्याचें भस्मांत रूपान्तर करणें. [सं.] **भस्म्या**–वि. (निंदेने) कितीहि खावयास घातलें तरी लठ्ठ होत नाहीं, अंगीं लागत नाहीं असा; ज्याचें पोट भरत नाहीं असा (मनुष्य); भस्मरोगी. **भस्म्या रोग होणें**–अक्रि. अति खादाडपणा करणें.

**भस्मारा**—पु. १ (व.) वस्त्रादिकांचा अव्यवस्थित ढीग. २ (ना.) चोळामोळा. 'लुगड्याचा भस्मारा.'

**भस्त्रा**—पु. भाता. [सं. भस्त्रा] **भस्त्री**–स्त्री. लहान भाता.

**भळ**—स्त्री. चीर; भेग; तडा; भगदाड.

**भळंद-दें**—न. चिंध्या व तेल घालून पेटवितात तें खापर, मशाल्याचें बदखल. भदें पहा. (क्रि० घालणें). 'टोंचिले गळ वाहिलीं भळंदीं।' –स्वादि २.२.२. **भळंद्या(दा)चा गोंधळ घालणें-करणें, भळंदें घेणें**–डोकीवर, हातावर भळंद घेऊन स्वैरपणें इकडेतिकडे नाचणें.

**भळभळ-भळां**—क्रिवि. धान्य, वाळू इ० गळतांना, रक्त, किंवा पातळ पदार्थ अरुंद तोंडांतून वाहतांना, अश्रुधारा वाहतांना होणाऱ्या शब्दाचें अनुकरण होऊन; भरभर. (क्रि० गळणें; पडणें; सुटणें; सांडणें; वाहणें; चालणें); 'डोळे गळती भळ-भळां।' -दा ३.५.३८. [ध्व.] **भळभळणें**-अक्रि. १ जोरानें वाहूं लागणें; भळभळां वाहणें. २ अनुकूल, प्रसन्न होणें (एखाद्याचें नशीब, दैव). 'राजश्रीचें भळभळलें.' **भळभळाट**-पु. दिखाऊपणा; घवघवीतपणा; मोठेपणा; भडकपणा (गंध, कुंकूं इ०; मुख्यत्वें तांबडे नक्षीदार कांठ यांचा). **भळभळीत**-क्रिवि. (गो.) भळाभळां
**भळभळीत**-वि. १ मोठा व भव्य; ऐटबाज; झळक; भडक; लकलकीत; घवघवीत (नक्षीदार कांठ, गंध, कुंकूं-विशेषतः पिवळी तांबडी, एखादी वस्तु). २ लकलकीत (सूर्योदयाच्या वेळची दिशा).
**भळाळणें**-अक्रि. १ मोठ्या प्रमाणांत, झपाट्यानें व मोठ्या आवाजानें वाहणें. २ अतिशय फळफळणें (एखाद्याचें नशीब).

**भळशींचें**—अक्रि. (गो.) शिजविलेला भात कालान्तरानें नासणें, बिघडणें.

**भक्‍लू**—वि. वेडा; अर्धवट; भोळसर; नेभळा; सहज फसणारा.

**भक्ष**—नपु. १ अन्न; भोज्य; खाद्य. २ आहार; जीवन; खाद. [सं. भक्ष्=खाणें; भक्ष्य] **भक्षक**-वि. खाणारा; भक्षी पहा. [सं.] **भक्षण**-न १ खाणें. २ भक्ष पहा. म्ह० भात भक्षणा पोळी दक्षिणा. **भक्षणीय**-वि खाण्यास योग्य; खाण्याजोगा. [सं.] **भक्षणें**-सक्रि. खाणें. [भक्षण] ०**स्थानीं**-क्रिवि. भक्षाच्या जागीं; अन्ना-ऐवजीं (वाप्र.) ०**स्थानीं टाकणें-सोडणें-उतरणें**-१ भक्षाच्या स्थानीं टाकणें; सोडणें; घशांत उतरविणें; गट्ट करणें; गडप करणें (विश्वासानें ठेवलेला पैसा, माल) ०**स्थानीं पडणें, उतरणें**-क्रि. १ भक्षाच्या स्थानीं पडणें; घशांत उतरलें जाणें; गट्ट केलें जाणें. २ (सलगीनें) खाऊन टाकणें; खाणें; खाऊन टाकलें जाणें; खाल्लें जाणें. **भक्षित**-वि. खाल्लेला. [सं.] **भक्षी**-वि. खाणारा; (समासांत) अन्न-तृण-फल-मांस-अल्प-बहु-मित-अमित-पथ्य-अपथ्य-कदन्न-परान्न-भक्षी [सं.] **भक्ष्य**-न. खाद्य; अन्न. -वि. खाण्यास शक्य, उद्दिष्ट, जरूर, योग्य; भक्षणीय. [सं.] **भक्ष्यभोज्य**-न. (व्यापक) भक्ष्य पदार्थ. **भक्ष्यभोज्यें**-नअव. खाद्यें. [सं.] **भक्ष्यभोक्ष्य**-वि. भक्षावयास व भोजनास योग्य (पदार्थ). [सं.]

**भा**—स्त्री. शोभा; तेज; प्रभा. [सं. भा=प्रकाशणें]

**भॉं, भॉंबॉं**—पु. (गो.) (बालभाषा) खाऊ.

**भाइज**—वि. बाहेर जाईल असें; प्रगट. 'हें सांगितलें गुज गुज। होवों नेदावें भाइज।' -कथा ४.६.४७. [सं. बाह्यज]

**भाई**—पु. १ भाऊ. 'आम्ही भाई हरि सोयरा जावई। अव-चियांच्या ठाईं केला एक।' -तुगा २५ २ (उद्योग, धंदा, जात इ० वैशिष्ट्य सांगताना) कोणीहि माणूस. जसें-कारकूनभाई; शिपाइ-भाई; भटभाई इ० ३ आदरार्थी उपयोग (बहुधां हिंदी-गुजरार्थीत) नानाभाई. ४ (साम्यवादी) मित्र, समान दर्जाचा मनुष्य. इं. कॉमरेड शब्दाला प्रतिशब्द. 'भाई डांगे.' [सं. भ्रातृ; प्रा. भाउ; हिं. गु. भाई] ०**चारा-दारी-पणा-बंदकी-बी**-पुस्त्री. १ भावाचें, भाऊपणाचें नातें. २ सलोख्याचा संबंध; मित्रत्व; स्नेह; बंधुत्व. **भाईबंदीनें सांगणें-विचारणें**-मित्रत्वाच्या, सलो-ख्याच्या नात्यानें, बाबापुता करून विचारणें. ०**बंद**-पुअव. १ नातलग; आप्त; भाऊबंद. २ एकाच व्यवसायातील किंवा संस्थेतील माणसें; व्यवसायबंधू. ०**राज-राय**-पु. (आदरार्थी) भाऊ; बंधुराज.

**भाई**—वि. (व.) खूप; पुष्कळ. [बहु]

**भाईण**—स्त्री. (हेट.) भावीण पहा.

**भाईभाई**—क्रिवि. (विरू.) भयाभयां पहा.

**भाउक**—पु. शृंगारचेष्टा. 'स्वामी केविं तुम्ही अधर्म करितां नेदी कदा भाउका।' -कीर्तन १ ८२. [सं. भावक]

**भाऊ**—संबोधन. (खा) अहो. [सं. भो-भात्रे ७.१ ते ४.]

**भाऊ**—पु. १ बंधु; भ्राता. 'मग जगदीश्वर तेथुनि त्याचा विन-वावयासि भाउ निघे।' -मोउद्योग ७.३४ २ (सांकेतिक) चुलत-बंधु, मामेबंधु, आतेबंधु, मावसबंधु इ० जवळचा नातेवाईक. ३ एकच धंदा, संस्था, व्यवसाय इ०तील माणसें; दोस्त; सहकारी. ४ एक बहुमानार्थी उपपद. जसें-हरीभाऊ, बाळाभाऊ इ० ५ सदाशिव-राव पेशवे -पया १४८. परशुराम त्रिंबक पटवर्धन. -पया ४९५. [सं. भ्रातृ; प्रा. भाउ] ०**गर्दी**-स्त्री. १ (पानिपत येथें भाऊसाहेब पेशवे यांनीं घनघोर युद्ध केलें त्यावरून ल) निकराचें युद्ध; 'सव्वा लक्ष फौजेनिशी भाऊगर्दी होऊन प्यादेमात कशी झाली.' -भाब १. २ (ल.) अंदाधुंदी; धामधूम. 'सवेंचि झाली भाऊगर्दी।' -अफला ६५. [भाऊ+फा. गर्दी=नाश] ०**पण-पणा-बंद-बंदकी-बंदी**-नपुस्त्री. १ बंधुत्वाची वागणूक. २ बंधुत्वाची स्थिति, संबंध. ३ (यावरून ल.) मित्रत्वाचें, सलगीचें नातें; सख्य. ४ भावाभावांतील वितुष्ट, तंटा. ०**बंद**-पु. नातेवाईक; दायाद; आप्त. ०**बहिणी**-स्त्री. एक मुलींचा खेळ. -मखेपु २९६ ०**बीज**-स्त्री कार्तिक शुद्ध द्वितीया या दिवशीं बहीण भावास बोलावून त्याचा सन्मान करते व भाऊ तीस द्रव्यवस्त्रालंकारादि ओवाळणी घालतो [भाऊ+बीज=द्वितीया] ०**वळ**-स्त्री. भाऊबंदांच्या क्रमानें वतनाचा प्राप्त होणारा भोगवटा. [भाऊ+आवलि] भाऊवळीनें असाहि प्रयोग रूढ आहे **भाऊ(ओ)जी, भाऊ-ओ**-पु १ नवऱ्याचा भाऊ; दीर. २ बहिणीचा नवरा. ३ नवऱ्याचा मित्र; दीराप्रमाणें असणारा इसम. ४ (कों.) बायकोचा भाऊ; मेहुणा. [भाऊ+जी=आदरार्थी प्रत्यय]

**भाऊक**—वि. ( प्र ) भावुक पहा.

**भाऊल**—न. ( गो. ) तरस.

**भाऊस**—पु. ( कों. ) ( अशिष्ट ) भाऊ पहा.

**भाओ**—पु. १ ( महानु. ) अस्तित्व ' जरि माजासीं मोटका चि आओ। तरि चराचरा कैसा भाओ। ' -शिशु ३१४. २ (इतर-अर्थी ) भाव शब्द पहा. [ सं. भाव ]

**भाक**—स्त्री. १ वचन; खात्री; आश्वासन. ( क्रि० देणें ) ' नारायणा आम्हा नाहीं वेगळीक। पूर्वील हे भाक साभाळिली। ' -तुगा ३११. २ परस्परातील ठराव; करार; ( आण शब्दाला जोडून येतो ) कबुलायत. ' जैसी पूर्वजांची भाक। पाळिती सत्य-वादी लोक। ' -एभा ७५६८. ३ केलेल्या नवसाची फेड होई पर्यंत देवापाशीं अनामत ठेविलेला पदार्थ. ४ भाषण; उक्ति ५ ( व. ) विनवणी. [ सं. भाषा ] **०उतरणें, भाकेस उतरणें**-वचनाप्रमाणें हातून कृति घडणें **०देणें**-वचन, कबूली देणें; शपथ घेणें. ' न करी चिंता वेळोवेळीं। म्हणोन भाक देतसे। ' -गुच १२.५३. **०सत्य करणें**-दिलेला शब्द खरा करणें, वचनाप्रमाणें कृति करणें. **भाकेस गुंतणें**-वचनात, शब्दात गुंतणें. ' यदुतिलक जिचे हा गुंतला पूर्ण भाके। ' -सारुह ४.४७. **०पालक**-पु. वचन पाळणारा. -ख्रिपु **०बाहण**-स्त्री. १ प्रतिज्ञा; वचन; शपथ(देवा-पाशीं घेतलेली). ' देवाला भाकबाहणीवर गुतविलें ' २ नवसाची फेड होईपर्यंत देवापाशी अनामत ठेविलेला पदार्थ ' भाक पहा. ' देवाची भाकबाहण ठेवली. ' [ भाक+बाहण ( द्विरुक्ति शब्द) ] **भाकणें**-उक्रि. १ भविष्य सांगणें. ' दिवटा सरवदा भाकून गेला। अंतरीं धोका लागला। ' -दा ३.७.५९. २ अभिवचन, आश्वा-सन म्हणून देवाजवळ काहीं वस्तु ठेवणें. ३ ( काव्य ) मागणें; इच्छिणें; दीनवाणीनें विनति करणें ( करुणा, कीव, काकुळति इ० शब्दाबरोबर उपयोग) ' भाकावी करुणा। विनवा वैकुंठीचा राणा। ' -तुगा ६७३. [ स. भाष ] **भाकणूक**-स्त्री १ देवाकडून मिळा लेलें उत्तर. २ ( क. ) भविष्य कथन. ३ बोलणें; सागणें. ४ कौल; शकुन. ५ विनवणी. [भाकणें] **भाकीत**-न. भविष्य ( क्रि० करणें; सांगणें ). [ सं. भाषित; भाकणें ]

**भाकड**—वि. १ म्हातारपणामुळें दूध देत नसलेली, आट-लेली ( गाय, म्हैस इ० ). ' का चिखलीं रुतली गाये। धड भाकड न पाहे। ' -ज्ञा १६.१४२ २ ( विऊन बरेच दिवस झाल्यानें ) दूध देईनाशी झालेली ( गाय; म्हैस इ० ). -एभा ११५५६. ३ ज्या दिवशीं काहीं धार्मिक व्रत, विधि नाहींत असा (धोंड दिवस) ४ ज्यांत काहीं फायदा होत नाहीं असा, निरर्थक ( धंदा, जमीन, प्रयत्न इ० ). ५ निरर्थक; निःसत्व ( अन्न इ० ). **०कथा**-स्त्री. १ एका कथेचें अनुसंधान चाललें असतां मध्यें निघणारी दुसरी कथा; आडकथा. २ रिकामटेकडें भाषण; वाष्कळ गप्पा; लाबलचक, नीरस, कंटाळवाणी हकीगत, गोष्ट इ० ' झाली ही सर्व भाकड-कथाच वाटतं ! वाहवा ! ' -नाकु ३.८६.

**भाकर-री**—स्त्री. १ जोंधळा, बाजरी इ०च्या पिठाचा चपटा आणि वाटोळा (जाड-पोळीसारखा) भाजून केलेला खाद्य पदार्थ. ' वीराची उत्पत्ति, वीराचें संगोपन व वीरांचें तेजोवर्धन स्वकष्टाच्या भाकरी करीत असतात. ' -सत्वपरीक्षा ७७ देशावर भाकर ( अनेक वचन भाकरी) व कोंकणात भाकरी ( अनेक वचन भाकऱ्या ) अशीं रूपें रूढ आहेत. भाकर शब्द थोडा अशिष्ट मानतात २ पाण्या-वर उडविण्याचा चपटा दगड आणि हा खेळ. [ सं. भक्ष्याहार ] म्ह० भाकरीस तोंड नाहीं भाडणास मूळ नाहीं **०पायानें खाणें-मोडणें**-मूर्ख, वेडगळ असणें. **भाकरीला भूक लागली**-जेवण वाट पाहात आहे. सामाशब्द- **०काला**-पु. भाकरी व इतर खाद्य पदार्थ याचा कुसकरा. दूधभाकरी. ' मुख प्रक्षालन करी। अंगिकारी भाकरकाला। ' -घन श्यामाची भूपाळी. **०खाऊ**-वि. (निंदार्थी ) भाकरी हें ज्याचें खाणें आहे असा ( शेतकरी, कुणबी इ० ) याच्या उलट भात खाऊ म्हणजे पाढर-पेशा. [भाकर+खाणें] **०तुकडा**-पु (क्षुद्रतादर्शक संज्ञा ) १ भाकरी. २ अन्न; जेवण. **०बडव्या**-वि. ( तिरस्कारार्थी ) दुसऱ्याच्या घरीं आचारीपणा करून उपजीविका करणारा; स्वयंपाकी. [ भाकर+बड-विणें ] **०मोड्या**-वि. १ भाकरखाऊ पहा. २ तुकडमोड्या. **भाक-रीचा खेळ**-पु. पाण्याच्या पृष्ठभागाला तीन चार वेळां स्पर्श करून पुढें जाईल अशाप्रकारें खापऱ्या किंवा चपटे दगड पाण्यावर फेकण्याचा मुलांचा खेळ. **भाकरीचा पिंड**-पु मुख्यत्वें भाकरी-वर पोसला गेलेला, भाकरी मानवणारा मनुष्य; भाकरखाऊ. **भाकरीची चाकरी**-स्त्री. पोट भरण्याकरितां करावी लागणारी नोकरी. ' कल्पनांचा सुखसंचार संपला आणि एकलकोंडा भविष्य-काळ व भाकरीची चाकरी डोळे फाडून दटावूं लागली. ' -तीन-आणेमाला १०. **भाकरीचें झाड**-न. एक प्रकारचें झाड. हें दक्षिण पॅसिफिक महासागराच्या बेटांतून होतें; यापासुन भाकरी करतात. **भाकऱ्या**-वि. दुसऱ्याच्या घरीं तुकडे मोडणारा; उपट-सुंभ. **भाकऱ्या भाजणें**-मुलींचा खेळ. -मखेपु ३८६. **लष्क-रच्या भाकऱ्या भाजणें**-नसत्या उठाठेवी करणें. ( पूर्वी ज्या ठिकाणीं लष्करी तळ पडे त्या ठिकाणच्या लोकाना भाकऱ्या भाज-ण्यास लावीत ). **भाकऱ्या निवडुंग**-पुन फडयानिवडुंग पहा.

**भाकस**—पु. (कों.) खाडीच्या पाण्यातील एक लहान मासा.

**भाका-खा, भाख**—स्त्री. ( विरू. ) भाक पहा. ' किंबहुना इया भाखा। द्वैताचा जेथ उपखा। ' -अमृ २.५४. ' नीश्चयों भाका जाला। एकमेकासि पुढारू। ' -धवळे पृ. ६.

**भाकार**—न. ( ल. ) लहान झुडपें असलेलें मोठें रान.

**भोंकांव**—न. ( गो. ) चोळणा; पायजमा.

**भाकाळा**—पु. खळगा. भकाळी पहा. ' तुला पोटभर अन्न मिळत नसेल हें तुझ्या पोटाला पडलेल्या भाकाळ्यावरून स्पष्ट होत आहे. ' –विंध्याचल पृ. १४१.

**भाग**—न. दैव; नशीब. भाग्य पहा. [ सं. भाग्य ] **भागा येणें, भागास येणें**–नशिबास येणें. ' बहिणी म्हणे कर्म हेंचि भागा आलें । दुसरा न चाले उपाय हो । ' –ब ५३७. **भागती भुगती**–स्त्री. दैवानें दिलेलें, नशीबांत असलेलें सुखदुःख. 'भागती-भुगती जशी साधेल तशी होईल ' [ भाग्य+भोग ]

**भाग**—पु १ शीण; भागवटा. २ खटपट. 'इतुलियाही भागु। अज्ञानाचा तरि तो मागु । ' –अमृ ७ ८०. [ भागणें ]

**भाग**—पु खच; पड; बांक. ( क्रि० देणें ). ' तंव भाग देऊ ततुखेणीं । केसी वोसरली धरणी । '–ख्रिपु १.२.१०७ [का. बागु]

**भाग**—पु. १ वांटा; हिस्सा; वाटयास आलेला पदार्थ. ' कीं मी भागवतांचा भाग असें आणिलें मनीं स्वामी । ' –मोसंशय रत्नमाला ८ ( नवनीत पृ. ३४९). २ (गणित) भागाकाराचें फळ ३ वाटणी, विभागणी करणें. ' या पेरूचे सारखे पांच भाग कर. ' ४ मुद्दा; हेतु; उद्देश; तात्पर्य; धोरण( भाषण इ०चें ). ५ अंश; विभाग. ६ कार्य; गोष्ट; प्रयोजन. ' आजच तें करावयाला पाहिजे होतें अशांतला कांहीं भाग नाहीं. ' –कोरकि ४६. ७ एखाद्याचें ठरलेलें काम, कर्तव्य कार्यभाग. ' भाग्यें एकाकी जय सांपडला साधि आपुल्या भागा । ' –मोकर्ण ४४.२४. ८ कर; सरकारी हिस्सा; टोल. ९ निवड; भेद. ' येथ वाच्य वाचकही । भागु न धरी । ' –ज्ञा १८ १६८१. १० प्रकार. ' येर माणुसपण तें भांब । लौकिक भागु । ' –ज्ञा १०.७७. [ सं ] **०असणें–पडणें**–उचित असणें; जरूरी पडणें. **०होणें, भागास येणें–पडणें**–प्राप्त होणें; वाटयास येणें. ' बा ! गा ! भागा तुझ्याचि यश आलें । '–मोवन १२.११४. **०तुटणें**-दुसऱ्याशीं केलेला व्यवहार निकालांत निघणें; संपणें. **०पाडणें**–हुकूम करणें; सक्तीनें करावयास लावणें. ' योग्य कारण दाखविल्यास अज्ञान मुलीला तिच्या सासरीं राहण्यास कोणतेंहि कोर्ट भाग पाडणार नाहीं. ' –मसाप २ १३५ **०फिटणें**-१ द्वैत भाव नाहींसा होणें. २ वाटयास येणें. ' जें महर्षी वाटलें । विरक्तां भागा फिटलें । ' –ज्ञा ५.१४७. **भागानें लागण करणें**–विशिष्ट हिस्सा घेण्याचें ठरवून शेतें लावणें. **०गर्भ**–पु. सारांश. –हंको. **०जाति–जाति अपूर्णांक**–स्त्रीपुअव. अपूर्णांकाचा एक प्रकार; साधा अपूर्णांक. [ सं. ] **०प्रभाग**–पु. मिश्र अपूर्णांक. [ सं. ] **०स्थळ**–न. करवसुलीची जागा; टोलनाकें. **भागाकार**–पु. १ (गणित) संख्येचे कांहीं नियमित प्रमाणानें भाग पाडण्याची क्रिया. २ भागून जी संख्या येते ती. [ भाग+आकार: भागणें ] **भागानुबंध**–पु. ( गणित ) अपूर्णांक मिळविलेली पूर्णांक संख्या. उदा० दोनपूर्णांक तीनचतुर्थांश. याच्या उलट भागापवाह. [ सं. भाग+अनुबंध ] **भागानुबंध पूर्णांक**–पुअव. पूर्णांक लिहून त्यापुढें अपूर्णांक लिहिला म्हणजे त्यास भागानुबंध पूर्णांक म्हणतात. –छअं ३८. **भागापवाह**–पु. अपूर्णांक वजा केलेली पूर्णांक संख्या. याच्या उलट भागानुबंध [ सं. भाग+अपवाह ] **भागाळी**–स्त्री. ( कों ) ( विभागणी केलेलें शेत, घर इ०चा ) भाग; हिस्सा. **भागिक**–वि. ( शाप ) अपूर्ण, आंशिक, अंशतः. (इं. ) फ्रॅक्शनल. 'भागिक–उर्ध्वपातन–स्फटिकीभवन इ०' **भागी, भागीदारी**–स्त्री. १ अनेकानीं समाइकीचा केलेला व्यवहार; पाती, सरकत. २ अशा व्यवहारातील भाग. ३ ( कायदा ) कांहीं माणसानीं आपली जिंदगी, मेहनत, चातुर्य कांहीं उद्योगात एकत्र करून त्यांपासून होणारा नफा वाटून घेण्याबद्दलचा केलेला करार. ( इं. ) पार्टनरशिप. **भागी, भागीन, भागीदार, भागील-दार**–पु १ पातीदार; सरकती २ हिस्सेदार; वाटेकरी. ' ऐसे नर-काचियें सेले । भागीन जे जे जन्मले । ' –ज्ञा १६.३७५.

**भांग**—पु. १ स्त्रिया इ० डोक्यावरचे केश विभागून मधोमध पाडतात ती रेषा. २ एक मोत्यांचा दागिना. ' सात शेर शेंदूर मस्तकीं थापिला । भांग मोत्यांचा भरला । ' –ऐपो ४८. [ सं. भंग] **०टिळा**–पु. १ वेणी–फणी, काजळकुंकू इ० स्त्रियांचा प्रसा-धनविधि; शृंगार; नट्टापट्टा. २ स्त्रियांचा एक दागिना ( कपाळा-वरचा)(गो ) भांगतिळो. ' भाळि भांग टिळा, नासिकीं सुपाणी । ' –आपू १८ **म्ह०** जिची सहज लिळा तिला कशास पाहिजे भांग-टिळा. **०पट्टी**–स्त्री. भांगटिळा. **०लीला**–स्त्री. मुंडावळ; ल्ला-मक. –राव्य २.२१२. **भांगवळ, भांगोळी**–स्त्री. १ ( कों. ) केंस, लोंकर इ० दोहींकडेस करून ( डोकें, केस इ० वर ) केलेली रेषा; भांग २ ( स्त्रियांच्या ) तोंडाच्या दोहोंबाजूकडील आंखूड केसांची रेषा, कानाजवळील आखूड–केंस [ भाग+सं. आवलि ] **०सळ–सळई–य**–स्त्री. कोरून भांग पाडण्यासाठीं केसामध्यें फिरवावयाची चांदी इ० धातूची काडी. ही लग्नात वराकडून वधूस देण्यांत येते.

**भांग**—पु. १ ओहोटी; सुकती. भांगमोड पहा. २ शुक्ल किंवा वद्य अष्टमीच्या दिवशीं होणारी उतरती ओहोटी ( समुद्राची ); कमी भरती. [ भंग ] **०भरू**–वि. १ ओहटीची. २ ( ल. ) सुकर; सुगम. ' भेटउनि नीट धन्य वाट करी भांग भरू । ' –आप ९१. **०मोड**–ओहोटी. भाग पहा. **भांगाची भरती, भांगाचें पाणी**–स्त्रीन. कमीभरती. भांग अर्थ २ पहा. **भांगटणें**–अक्रि. भंग पावणें

**भांग**—स्त्री. १ एक मादक वनस्पती. २ ह्या वनस्पतिपासुन केलेलें पेय; घोटा. ( क्रि० छानणें ). ' तुला या पुण्याच्या वाळ-वंटावर भांग छानत बसलेला पाहिला म्हणजे मला अन्नपूर्णा नग-रींतील आमच्या लहानपणची आठवण होते. ' –भाऊ २१. ३

भांगेच्या झाडाचीं वाळलेलीं पानें, शेंडे, कळया इ०; गांजा ( क्रि० ओढणें ). [ सं भंगा ] **भांगेमध्यें तुळस**-वाईट आईबापांच्या पोटीं झालेलें चांगलें अपत्य; वाइटांत चागली गोष्ट **भांग-भुरका**-पु १ भांग, गांजा, तंबाखू इ० निवळ चैनीचे पदार्थ (समुच्चयानें) ' पचीं पडे मद्यपान। भांगभुर्का हें साधन। '-तुगा २८१९. २ उधळपट्टी, नासाडी. ( क्रि० करणें ) ३ संसारातील कमी महत्त्वाचा, किरकोळ बाबतीचा खर्च. ( क्रि० करणें; खालीं उडविणें ) ' पैशाचा-मालाचा-जिंदगीचा-भांगभुरका केला ' **भांगीट-ड-ठ, भांगी, भांग्या**-वि. भांग पिण्याचें व्यसन लागलेला; भंगट.

**भांग**—पु मुलींचा एक खेळ -मखेपु ३३८.

**भागडा, भागडपाठ्या**—वि (व ) ज्याची पाठखोल-गट, मध्यें वाकलेली आहे असा [ भागणें=खचणें+पाठ ]

**भांगणी**—स्त्री. १ विभागणी; भाग करणें. २ बीं न पेरतां जाण्यायेण्यासाठीं वाट म्हणून ठेविलेली शेतांतील पट्टी; बिन पेरणीची ओळ. [ भागणें ]

**भागणें**—अक्रि १ श्रमणें; दमणें; थकणें; शिणणें. 'त्यामागें तीहि निघे धर्म म्हणे भागलीस जा परत। '-मोवन १३.६०. २ (ल.) खचणें; वांकणें; दबणें ( खांब, तुळई इ० ). ३ ( आजार, म्हातारपण इ० मुळें ) कृश, शक्तिहीन होणें; मेटाकुटीस येणें ( शरीर, मनुष्य ). ४ (ल ) चालणें; पुरें होणें; पुरें पडणें; निर्वाह होणें. ' पगार येतो इतक्यानें बिन्हाडखर्च मात्र भागतो. ' ५ फिटणें, नाहींसें होणें. 'दहा वर्षे रोजगार करून ऋण मात्र भागलें ' ६ सुखी, कृतकृत्य होणें. ' तुवां दीधला वैकुंठपीठ। मम मानस भागावया। ' -जै १४ २५. [ सं भंज्=मोडणें; तुल० का. व गिधु=वाकणें ] **भागलीक, भागवटा**-स्त्रीपु. ( कु. ) थकवा; शीण; दमणूक; दमलेपणाची स्थिति [ भागणें ] **भागशीण**-पु. अतिशय थकवा; शीण. ( क्रि० होणें; येणें ). **भागीह्लो**-वि. १ ( गो ) भागलेला २ कृश.

**भागणें**—उक्रि. ( गणित ) भाग देणें, एका संख्येतून दुसरी संख्या किती वेळा वजा जाईल हें संक्षिप्त रीतीनें पाहणें. [ भाग ]

**भागणें**—अक्रि. १ धावणें; जाणें. -मोसभा ५.७५ 'भागावें तेथवरी जिंकुनि त्यातें यशास त्यागावें। ' -कीर्तन १४१. २ पळणें [ हिं भागना ]

**भांगणें**—अक्रि. उधानाचे दिवस जाऊन समुद्र कमी पाणी भरण्याच्या स्थितीस, ओहोटीस येणें. [ भांग ]

**भांगणें**—सक्रि १ शेत इ० मध्यें पायवाट करणें. २ ( होडी, गलबत इ० नीं ) आपल्या गतीनें समुद्र, नदी इ० चें पाणी दुभागणें. ३ ( उभें पीक ) भांगलणें; कोळपणें; वखरणें; गवत काढणें ४ भगणें, फुटणें. [ भांग ]

**भोंगदां**—पु ( गो. ) दांक नसलेला कोयता.

**भागन**—न. (सूर्य इ० स) राशिचक्रांतून जाण्यास लागणारा काल भगण पहा [ सं ]

**भागभूक**—स्त्री. धाकधूक, धाकधूक पहा. (क्रि० होणें; उठणें; सुटणें ). [ ध्व. ]

**भांगय**—स्त्री. (गो.) कच्ची, सुकण्यास आलेली काजूची बी.

**भांगर**—पु ( कों ) गुरांचा गोठा.

**भांगराळणें**—अक्रि. ( व ) गोंधळणें; सुचेनासें होणें. ' तो धाईनें भांगराळला. '

**भांगलणी**—स्त्री. १ शेत बेणणें; निंदणें. २ ( शेताची ) वांटणी; विभागणी. ३ ( शेतांतून ) वाट करणें. [ भांगलणें ]

**भांगलणें**—उक्रि. ( शेत ) निंदणें. भागणें पहा.

**भागवणी**—स्त्री. १ थकविणें; दमविणें; श्रमविणें. २ कष्टाच्या व आंवाक्याच्या बाहेर अशा कामानें जर्जर करणें. [ भागविणें ] **भागवण्याजोग्या गोष्टी**-स्त्रीअव. अत्यंत कठिण व करावयास अशक्य अशा गोष्टी. **भागविणें**-उक्रि. १ दमविणें; थकविणें; कष्टविणें; श्रमविणें. ' शुक सांगे भागविला कृष्णें वाहोनि लांकडें काय। '-कीर्तन १.३. २ शक्तिहीन, सामर्थ्यहीन करणें; जोर, जोम नाहींसा करणें. ३ चालविणें; निर्वाह करणें. [ भागणें ]

**भागवत**—पु १ विष्णुभक्त; वैष्णव. २ भगवद्भक्त; भक्त. ' भागवतांचे रजःकण। जो मस्तकीं वंदीना आपण। ' -एभा ११ १२३१. ३ (तंजा.) हरदास; कीर्तनकार. ४ पौराणिक नाटकांतील सूत्रधार ' वत्सा भागवता, तुझें कल्याण असो. ' -किरातार्जुन अं. १ प्र. १. -न. अठरा पुराणांपैकीं एक. पुराण पहा. -वि. भगवद्विषयक; भगवानासंबंधीं. [ सं. ] **०ता**-स्त्री. भक्तपणा. ' या लागीं उत्तम भागवतता। त्यासीच तत्वता बाणली। ' -एभा २.६५६ **०धर्म**-पु निर्गुण व अचिंत्य अशा परब्रह्माचें सगुण रूप डोळयापुढें ठेवून त्याची उपासना व भक्ति केल्यानें मोक्षप्राप्ति होते अशा मताचा पंथ. रामानुज, मध्व, रामानंद, कबीर, वल्लभ, नामदेव, तुकाराम हे संत भागवतधर्मीय होत.-ज्ञाको भ १८. **०मंडळी**-स्त्री. पौराणिक नाटकें करणारी मंडळी. प्रथम सांगलीकडे नाटक मंडळी निघाली त्यावेळीं तिला हें नांव लावीत.

**भांगस**—स्त्री. ( व. ) अज्ञात, अडचणीची जागा; सांधकोंद. ' कोण्या भांगसींत ठेवला चाकू आतां दिसत नाहीं. '

**भांगलकवडी**—स्त्री. ( प्र. ) भोंगळकवडी पहा.

**भांगा**—पु. १ ( राजा. ) शेत. २ शेताचा तुकडा, भाग. ३ ( बे ) वांटा; विभाग. **०पाडणा**-शेतांतून वाट करणें.

**भागाड्या**—वि. पळपुट्या. ' शिंदे यांचे फौजेची हेटाळणी भागाडे म्हणून होळकराचे लोक करीत होते. '-भाब( नवी प्रत ) ९९. [ भागणें; हिं. भागना=पळून जाणें ]

**भागानगर**—न. दक्षिणेंतील हैद्राबाद शहर (भागा नावाच्या स्त्रीच्या स्मरणार्थ बसविलें म्हणून) **भागानगरास जाणें**-(ल.) पळून जाणें. [ भागणें=पळणें ]

**भागाभाग**—स्त्री १ वियोग; ताटातूट. २ पळापळ, धडपड; यातायात [भाग; भागणें ]

**भागाभाग**—पु (ना) ऋणानुबंध; दैवयोग [सं भाग्य]

**भांगार-रें**—न १ सोनें. 'तरी घडलें एकेचि भागारें।' -ज्ञा ६.९८. २ द्रव्य; पैसा 'तंव तो म्हणे फेरीकरा। मज नको करूं गा मारा। घरा जावोनि भागारा। मागा स्त्रियेसी।' -कथा २.९.११९. **भांगरी** -वि (गो.) सोनेरी. [ ? भगा; भू+अंगार ] **भांगार पेटप**-(गो) दागिने करणें. **भांगालें**-वि १ (महानु) सोनेरी; सुवर्णाचें. २ तांबड्या-पांढऱ्या ठिपक्याचें. 'निन्हा तेजाथिरीं भांगालीं।' -दाव २८०.

**भागावळ**—स्त्री (गो) परंपरागत देवकृत्य किंवा पिशाच्चकृत्य. [भाग ]

**भागीं**—अ. अंगें; स्वतः -मनको

**भागीरथी**—स्त्री. (भगीरथानें आणली म्हणून हें नांव) गंगा नदी. 'भगिरथें आणिली भागीरथी।' -सूर्यवंशी राजांची भूपाळी पृ. १५ [सं ]

**भागु(गू)बाई**—स्त्री. पळपुटा, भित्रा, पुचाट, नामर्द माणूस. 'अगोदर आरंभशूर आणि मागाहून भागूबाईप्रमाणें पलायन करणारे वीरपुरुष समाजसुधारणेला उपयोगी नाहींत.' -इंदुप्रकाश. [भागणें ]

**भांगेरो**—पु (कु.) एक झाड.

**भागेली**—पु. १ (कों) भागीदार; पातीदार २ वांटेकरी. समाइकीच्या व्यवहारात ज्याचा कांहीं ठराविक भाग आहे तो ३ (कु) शेताचें अर्धें उत्पन्न मालकाला देण्याच्या शर्तीवर शेत करणारा; खंडकरी. ४ कूळ; शेल्या. [भाग] **भागेलभाग**-पु (गो.) कुळाचा वांटा [भागेली+भाग]

**भांगो**—पु (राजा. कुण.) जमीनीचा तुकडा; भाग. [भाग]

**भांगारें**-न फाळणी.

**भागोटा**—पु (दैवज्ञ) लग्नांतील गांववाल्या पक्षानें जानवसवाल्या पक्षास एक वेळ जेवणास पुरेल असा द्यावयाचा शिधा -बदलापूर २३५.

**भागोडा**—पु. गांववाल्या पक्षानें जानवसवाल्या पक्षाला तो आल्यावर घातलेलें जेवण. -बदलापूर १११ [भागवटा]

**भांगोरा-रें**—पुन १ राखरांगोळी. 'आपणावांचुनि बाहेर पाहतां। जेथें तेथें भांगोरा।' -अमृत ११८. २ दिवाळें. (क्रि० वाजणें; होणें). [सं भंग]

**भांगोरें**—न. बनावट गोष्ट; बतावणी.

**भाग्य**—न. १ नशीब; दैव. 'म्हणे भाग्य ना माझें। आजि सुखिये नाहीं दुजें।' -ज्ञा १४ १५१. २ वैभव; ऐश्वर्य 'राखावीं बहुतांचीं अंतरें। भाग्य येतें तदनंतरें।' -दा १९.३ १८. [सं.] ०**खुलणें-फळणें**-भाग्यवान् होणें; सुखी होणें **भाग्यास चढविणें**-भाग्यवान् करणें; श्रीमंत व सुखी करणें. ०**पुरुष**-पु. भाग्यवान् मनुष्य; दैवशाली इसम; पुण्यात्मा. ०**लक्षण**-न. चांगल्या नशिबाचें चिन्ह ०**वान्-वंत-शाली**-वि १ दैववान्; सुदैवी; नशीबवान् 'भाग्यवंत म्हणूं तया। शरण गेले पंढरिराया।' २ पुण्यात्मा; पद्महस्ती ०**हीन**-वि दुर्दैवी, कमनशिबी **भाग्योदय**-पु उत्कर्षाचा काल. 'भाग्योदयें भजति त्या प्रभुदेवराया।' [सं भाग्य+उदय] **भाग्याचा भोपळा**-पु. दुर्दैवी, हतभागी माणूस.

**भाग्य**—वि भाग देण्यास योग्य, शक्य; भागण्यालायक.

**भाचर**—स्त्री भट्टी -शर [सं ]

**भाचा**—पु बहिणीचा मुलगा; स्त्रीच्या भावाचा, बहिणीचा किंवा नणंदेचा मुलगा. 'रे उत्तरा शकुनिचा या व्यूहांत न दिसे मला भाचा।' -मोविराट ४.७८ [सं. भागिनेय; प्रा. भाइणेज्ज; हिं. भानजा] **भाचरूं, भाच्चार**-न. भाचा, भाची पहा. **भाची**--स्त्री. पुरुषाच्या बहिणीची मुलगी; स्त्रीच्या भावाची, बहिणीची नणंदेची मुलगी. [सं भागिनेयी; प्रा भाइणेज्जी] **भाचेजावई**-पु. भाचीचा नवरा. **भाचेसून**-स्त्री. भाच्याची बायको

**भांचोद**—वि. (अश्लील) एक शिवी. [बहीण+चोदणें]

**भाज, भाजा**—स्त्री. (काव्य) बायको; पत्नी; भार्या. 'दिव्यासनीं रघुराज। सव्यभागीं सीता भाज।'-वेसीस्व १०.९५. [सं भार्या; प्रा. भज्जा]

**भांज**—स्त्री. आवड; संतोष 'सर्वस्व आपुलें अर्पूनि भांज। लळें पाळिले बहुत।' -स्वादि ३.३.२२.

**भांजगड, भांजगडणें, भांजगडखोर**—(प्र.) भानगड, इ० पहा

**भाजणें**—अक्रि पोळणें; चटका बसणें; जळणें; होरपळणें. -सक्रि १ अग्नीवर तवा, खापर इ० ठेवून भाकर, धान्य इ० शेकणें; पक्क करणें, पोळणें, परतणें. २ पोळणें; होरपळणें. ३ (ल.) गांजणें; छळणें; सतावणें; त्रास देणें. 'भरता तरि राज्य करिन जरि तू म्हणसिल न ईस भाजीन।' -मोवन १२.१५८. ४ (कों.) (सामा.) जाळणें ५ (राजा. कु.) छकणें; खोडणें (हिशेब). [सं. भ्रस्ज्; प्रा. भज्ज] **म्ह०** दुधानें भाजला तो ताक फुंकून पितो. **भाजकट, भाजट**-वि. १ किंचित् भाजलेलें २ भाजल्याचा वास येत असलेलें **भाजका-कें**-वि. १ भाजलेलें, शेकलेलें (धान्य इ०). २ भाजलेली; तापविलेली (जमीन, शेत इ०).

३ तापविलेला; शेकलेला; भाजलेला; परतलेला; पक्व केलेला(कोणताहि पदार्थ) भाजण-न १ भाजणें; शेकणें. २ खापर इ० त भाजण्यासाठीं घेतलेलें धान्य इ० ३ भाजावयासाठीं एकवार घालावयाचें धान्यादिकाचें परिमाण, हप्ता; घाणा ४ एकदा भाजण्याची क्रिया. [सं भ्रज्जन; प्रा भज्जण] **भाजणावळ**-स्त्री भाजण्याची मजुरी **भाज(जा)णी-नी**-स्त्री.१ चार पाच तऱ्हेचीं धान्यें भाजून एकत्र दळून केलेलें पीठ यांचें थालपीठ, कडबोळीं इ० करतात. २ भाजणें; शेकणें; भाजण्याची क्रिया. ३ पेरणीच्या अगोदर जमीन भाजण्याची क्रिया. ४ (महानु) किंचित उष्ण करणें, शेकणें; मिश्रित करणें. 'ब्रह्मविद्येचेनि कसें। कामतत्वा भाजनी दीसे।' -भाए ३४ **भाजणूक**-स्त्री. (ल.)छळणूक; पीडा; त्रास; गांजणूक. **भाजणें, भाजप**-न भाजणपहा. **भाजणें**-न ज्यांत धान्य भाजतात तें खापर. **भाजपी**-पु. (राजा.) पोहे, लाह्या इ० भाजणारा; (स्त्रीलिंगीरूप भाजपीण) **भाजपोळ**-स्त्री १ भात शेतकीसाठीं जमीन भाजणें इ० कामें. २ जाळपोळ; लूट करतांना घराला आग लावणें, माणसास भाजणें इ०क्रिया 'त्या गावांत पेंढाऱ्यांनीं फार भाजपोळ केली.' [भाजणें+पोळणें] **भाजभूज**-स्त्री. १ भाजणें; शेकणें. २ भाजलेलें धान्य. [भाजणें द्वि.] **भाजलेलें**-न. भाजून केलेले, धान्यादिकखपद्दार पदार्थ. **भाजवट**-स्त्री. १ बीं पेरण्यापूर्वी जमीन भाजण्याची क्रिया. २ भाजलेली जमीन -वि. १ भाजलेली (जमीन). २ भाजावयास पाहिजे अशी (जमीन). ३ (क्व)भाजलेलें, शेकलेलें (धान्य) **भाजा**-पु. (कों.) एका वेळीं भाजलेलें धान्याचें परिमाण, हप्ता; घाणा **भाजाणा**-पु. भाजलेला हरभरा इ० चा दाणा (सामान्यतः अनेकवचनी प्रयोग) [भाजणें+दाणा] **भाजावळ**-स्त्री. (कों.) भाजवट पहा. **भाजीव**-न. भाजलेलें, पक्व केलेलें धान्यादिक. -वि. भाजलेलें; शेकलेलें **भाजुक**-वि. १ पक्कें; भाजलेलें. २ (ल) चांगलें. 'भाजुक साजुक नाजुक राजसवाणें।' -अमृत ३५.

**भा(भां)जणें**—उक्रि. १ भागणें; विभागणें; वांटणी, भाग करणें. २ (गणित) भांजणी करणें [सं. भाजन] **भाजक**-वि. १ विभागणारा; भाग करणारा. २ भागणारी संख्या; जिनें भाज्याला भागावयाचें ती संख्या. [सं] **भा(भां)जणी**-स्त्री १ (गणित) विशिष्ट वजाबाकी किंवा भागाकार; हलक्या परिमाणाच्या अंकास भारी परिमाणाचें रूप देणें किंवा भारी परिमाणाच्या अंकास हलक्या परिमाणाचें रूप देणें ह्याचे दोन प्रकार आहेत-उतरती भांजणी व चढती भांजणी. २ वांटणी; वांटप; विभागणी. ३ कोळपणी; वखरणी. ४ (अशिष्ट) बिघडविणें; खराबी करणें; विचका करणें. (क्रि० मारणें). ५ वर्ग; भेद. 'राजस तामस सत्त्वगुणी। देवा दानवांची भांजणी।' -कथा ४.५.१७७. **भांजणी खांजणी-नी**-स्त्री. क्षयवृद्धि. 'भांजणी खांजनी। तुका साक्ष उरला दोन्ही।' -तुगा ३९१५. **भाजित**-वि. १ (गणित) भागलेला; भागला गेलेला. २ विभागलेला; वाटणी, वाटप केलेला. **भाज्य**-न (गणित) भाजकानें जिला भागावयाचें ती संख्या. -वि. विभागण्यास योग्य, जरूर, शक्य; ज्याची वाटणी करावयाची आहे असें. [सं.] ०रेषा-स्त्री दोन भाग निरनिराळे दाखविणारी रेषा. (इं) लाइन ऑफ डिमार्केशन.

**भांजणें**—अक्रि विष इ० उतरणें, नाहींसें होणें, शमणें. 'सवर्म हृदय कल्हारीं। तेथ कारुण्यवेळेच्या भरीं। लागला म्हणोनि लहरी। भाजेचि ना।' -ज्ञा २ ७१. [सं. भंजन]

**भाजन**—न १ (सामा.) पात्र; भांडें. 'तै देश काळ भाजन। द्रव्यही मिळे।' -ज्ञा १७.२७०. २ (ल) स्थान; आधार; गृह उदा० मान-सुख-स्तुति-भाजन. 'कैकयी असत्याचें भाजन।' -रावि १०.६१ ३ भागणें; भागाकार. [सं.]

**भाजा**—स्त्री. भाज पहा.

**भाजी**—स्त्री. १ मुख्य अन्न खातानां, फळें, मुळें, पाला इ० शिजवून, मसाला घालून तोंडीं लावण्यासाठीं तयार केलेला पदार्थ; शाक. पालेभाजी व फळभाजी असे हिचे दोन प्रकार आहेत. २ शिजवून खाण्याच्या कामीं उपयोगांत आणतात तीं फळें, मुळें, कंद, पाला इ०. ३ निसर्गानें मेलेल्या जनावराचें मांस. -शर. ४ विटीदांडूच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. चक्रपाणीच्या खेळांत आपल्या उजव्या हाताच्या मुठींत दांडू धरून मुठीवर दांडूस लागून इटी ठेवणें व मग ती थोडी वर उडवून तिच्यावर दांडू मारणें. ५ (ल.) चोळामोळा. म्ह० (व) भाजीसारखें परतावें आणि जगासारखें वर्तावें. (**कागद, पांघरूण इ०ची**) ०**करणें**-चोळामोळा करणें; अव्यवस्थित करणें. **भाजीकाची**-वि (भाजी कच्ची !) कोणताहि मनुष्य, परिस्थिति, पदार्थ इ० विषयीं नेहमीं नाखुषी दर्शविणाऱ्या इसमाबद्दल योजितात. नावडतीचें मीठ अळणी याप्रमाणें. **ओली भाजी आणि वाळली भाजी**-स्त्री. ताजी, हिरवी भाजी आणि सुकवून ठेविलेली भाजी. ०**दस्त**-पु. बाजारांत विकावयास आणलेल्या भाजीवरील कर. ०**पाला**-पु. १ शिजवून खाण्यास, तोंडी लावणें करण्यास योग्य अशीं फळें, कंद, पाला, मुळें इ० समुच्चयानें. 'दोचौ दिवसां मिळे तरण। भाजीपाला भक्षिती।' २ निरर्थक, तथ्य नसलेली गोष्ट. 'त्याचें बोलणें भाजीपाला.' ०**भाकर**-स्त्री. साधें, गरीबीचें अन्न (एखाद्यास जेवणाचें आमंत्रण देतांना घरच्या जेवणाबद्दल विनयानें योजितात).

**भाट**—पु. १ राजे, रजवाडे, सरदार इ०चीं स्तुतिस्तोत्रें गाणारांची एक जात व तींतील व्यक्ति. 'भाट वेताळ बंदीजन। ... निज शब्दार्थी चालिले।' -जै १०.४१. हा एक अलुतेदार असून घराण्यांच्या वंशावळी ठेवणें, लग्नें जमविणें, वाल्ल्या

वर्गाच्या लोकांस लग्नाचा मुहूर्त काढून देणें अशीं याचीं कामें असत -भाचसंवृ ६४. २ स्तुतिपाठक 'दिगंतीचे भूपति। भाट होऊनि वाखाणती।' -ज्ञा २.२१२. -वि. व्यर्थ, पोकळ बडबड करणारा (माणूस) [सं भट्=बोलणें; हिं ] **भाटकी**-स्त्री (कु) भाटपक्षी, एक प्रकारचा पक्षी (इं) लार्क. **भाटणें**-सक्रि वाजविणें -शर **भाटबोळीपणा**-पु. व्यर्थ बडबड. 'जळो ऐसी ब्रीदावळी। भाटबोळीपणाची।' -तुगा ९७७ **भाटि(टी)व**-स्त्री स्तुति, गुणवर्णन 'जयाचिये भाटिवेलागीं। मी कपिल जाहलों।' -ज्ञा १३.९५७. **भाटिवकी**-स्त्री. स्तुतिपाठकता. 'ज्याच्या पदासि वरदेवसमाज याची । ते ी मुखीं करिति भाटिवकी जयाची।' -आसी ७०

**भाट**—स्त्रीन. १ ओहोटीच्या वेळीं समुद्रातील किंवा पाणी आटल्यामुळें नदींतील उघडी पडणारी सपाट उंचवट जागा, लाग; खांडवा; दांडा. २ (कों.) उंसाच्या लागवडीसाठीं तयार केलेली जमीन ३ उंसाची लागवड. ४ -न (कों.) भाटलें; शेतजमिनीच्या आसपासची उंचवट्याची जमीन; पडित, बरड, उखर जमीन. हीत्र हलकीं धान्यें होतात. 'मग महाभूतांचें एक वाट। सैरा वेंटाळूनि भाट।' -ज्ञा १३ ४५. (गो.) नारळींची बाग. -सह्याद्रीच्या पायथ्याशी ३०६. **भाटकार**-पु. (गो.) भाटाचा मालक; जमीनदार. -सह्याद्री ३०६. **भाटलें**-न. १ भाट अर्थ ४ पहा. २ उसाच्या लागवडीसाठीं केलेली जमीन भाट अर्थ २ पहा **भाटवळ**-वि (कों.) भाट जमीन पुष्कळ असलेली (जागा). **भाटयाची जमीन**-स्त्री. गुजराथेंत ज्या ठिकाणीं नदीच्या पाण्यास फार वेग नसतो व जेथें पावसाचें पाणी निरनिराळया ठिकाणाहून वाहून येऊन त्याचा उंचवटा होऊन पुढें उन्हाळयात पाणी सुकून जी रिकामी होते अशी जमीन; भाट. -कृषि १६.

**भाटक**—न. भाडें; मजुरी; पगार. [सं.]

**भाटजांबु(भू)ळ**—स्त्री. एक औषधी झाड.

**भाटवरणा**—पु. एक जंगली झाड.

**भाटवा**—पु (ना. व.) वडील बहिणीचा नवरा.

**भाटॉ**—पु. (गो ) धुळीवर रचलेल्या काजूच्या बियांच्या रांगा रचून त्या तिरावून खेळतात. या खेळांत त्या रांगा अचूक तिराबण्यासाठीं म्हणून वापरतात ती जड व मोठी बी.

**भाटाळि-ळें**—स्त्री भाट; भाटी. 'नारदे कवळिआपैकि भाटाळि.' -शके १२८९ चा यादवांचा शिलालेख.

**भाटी**—स्त्री. १ भाट अर्थ १ पहा 'खलाशांना म्हणावें दमानें चालवा नाहीं तर भाटीवर लागाल बरें.' -शेक्स्पीअर नाटयमाला-तुफान भाषांतर पृ १ २ नदी, खाडी इ० च्या कांठची बागाईत, मळे इ० साठीं उपयोगी पडणारी सुपीक जमीन.

**भाटी**—स्त्री. मांजरी.

**भाटी**—स्त्री १ (गो ) दारू गाळण्याचा कारखाना, भट्टी. २ दारू गाळण्याचें यंत्र ३ घडाभर दारू.

**भाटीय-व**—न ऐक्य -मनको

**भाटु**—पु भट; भिक्षुक 'नामें खवणा भाटु आला।' -पंच १४३. [भट]

**भाटुं**—पु (महानु) भाट पहा. 'भणओनि असानेयां होइजे। पुढा भाटुं धाडिजे।' -शिशु ४७४. [भाट]

**भाटया**—पु गुजराथी लोकाची एक जात किंवा त्या जातीचा इसम. **भाटेशाई**-वि. पागोटयाची एक तऱ्हा. -मराठी तिसरें पुस्तक (१८७३) पृ. ६४.

**भाटयावाघळी**—स्त्री समुद्रातील वाघळी नावाचा मासा.

**भाड**—स्त्री. १ आपली बायको, बहीण इ० स उपभोगार्थ देऊन मिळविलेला पैसा; कुंटणपणानें मिळविलेलें द्रव्य. 'माते परीस थोर कथा। भाड घेता न लाजे।' -तुगा २४२८. २ दलाली. [सं. भाटक] ०**खाऊ, भाडया**-वि. घरच्या स्त्रियांच्या वेश्यापणावर निर्वाह करणारा. ही शिवी म्हणून वापरतात.

**भाड**—न १ धान्य इ० भाजण्याची भडभुंजाची भट्टी. २ ह्या भट्टीखालीं सर्पण घालणें. ३ भट्टींत घातलेलें सर्पण, जळण. (क्रि० घालणें; भोकणें). भड, भडस पहा. [भड; हिं. भाड]

**भांड**—पु १ नकला, नाटक, तमाशा, पशुपक्ष्यांच्या शब्दांचें अनुकरण इ० करून चरितार्थ चालविणारांची एक जात व तींतील व्यक्ति; विदूषक; बहुरूपी. 'कां भांडाचे तोंडीं भंडपुराण। त्यावरी आला शिमग्याचा सण।' -एभा ८.८२ २ कज्जेदलाल. -वि. बेशरम; निर्लज्ज (माणूस) 'सर सर परती झालीस आतां भांड। कैसें दाखविसी जगा या तोंड।' -तुगा १११. [सं. भंड, भांड] **म्ह०** रांड, भांड म्हैसा बिघडे तो होय कैसा.

**भांड**—न. १ भाडें; पात्र. 'गंगोदक जरी जालें। तरी मद्यभाडां आलें।' -ज्ञा १७.५२. २ मडकें; मातीचा डेरा. 'जैसी भांडघटशरावीं। तदाकारें असे पृथ्वी।' -ज्ञा १३.८७२. [सं.] ०**कोडबुळें-कोडोळें**-न. भाडयांत लाविलेलें थालीपीठ. ०**दोरा**-पु भांडयाला फास लाविलेली, विहिरींतून पाणी काढण्याची दोरी? 'कूपातरीं घालुनि भांडदोरा। शोभतसे सुंदर गोपदारा।' -अकक २ गोपीगीत १२.

**भांड**—स्त्री (व.) तोफ. भांडें पहा.

**भांड, भाण**—न (गो.) वरच्या ओठास जन्मतः पडलेली भेग भांडी पहा. **भांड्यॉ**-वि. (गो.) जन्मतः ज्याचा वरचा ओठ चिरलेला आहे असा (मनुष्य)· राखुंडा.

**भांड, भांडखोर, भांडगा-रा**—वि क्षुल्लक कारणावरून भांडण करणारा. 'म्हणाल तरि तत्पुता कशि तुम्हांसवें भांडगा।' -केका ३५ [भांडणें] **म्ह०** भांडाच्या गांडीखालून जाऊं नये.

**भांडकुदळ**-वि. भांडखोर. [भाडणें] **भांडकें**-वि. भांडखोर. 'जैसें आपण नम्र भांडकें। जगातें म्हणें।' -ज्ञा १८.१३५.

**भाड-कण-कन-कर-दिन-दिनीं-दिशीं**—क्रिवि एकदम; ताडकन; शब्द होई असें (वृक्ष, फल इ०नीं) पडणें किंवा तडकाफडकीं करणें, बोलणें इ०च्या ध्वनीचें अनुकरण होऊन. 'एकाएकीं महेंद्राला भाडकन फोटोग्राफी शिकण्याचा शोक लागला.' -पपप्रे ५७.

**भाडकल**—न. (हैद्रा.) डहळज पहा.

**भांडण**—न. १ तंटा; कलह; कज्जा; बखेडा. २ तंटा, कलह, कज्जा करणें. [भाडणें] **म्ह०** दोघाचें भांडण तिसऱ्यास लाभ. **०उकरून काढणें**-मागच्या गोष्टींचा उल्लेख करून व प्रतिपक्ष्याला क्षोभ येईल अशा गोष्टी बोलून भांडण उपस्थित करणें. **भांडणाचें तोंड काळें**-भाडणाचें दर्शनसुद्धां नको; भांडणाचा परिणाम लाजिरवाणा असतो. **भांडणें**-अक्रि. १ भाडण, तंटा, कलह, कज्जा करणें. २ युद्ध करणें; लढणें. 'मी भाडेन स्थिर हो तुजहि मजहि आजि आजि न परतणें।' -मोविराट ३.५०. [सं. भंड्=कलह करणें]

**भांडप्रतिभांडक**—पु. मोबदला; अदलाबदल; एक वस्तु देऊन दुसरी वस्तु घेण्याचा एक गणितप्रकार; साटेंलोटें. [सं.]

**भाडभीड**—स्त्री. मुरवत. भीडभाड पहा.

**भांडवल**—न. १ व्यापार, सावकारी इ०त घातलेला पैसा; द्रव्योत्पादनाचें साधन. २ (ल) (द्रव्य, बुद्धि, अक्कल इ० चा) साठा;ठेवा; पुंजी 'मागुती करावया भाडवला। बैसला तर्पी।'-कथा ३.७.७३. [सं. भांड; हिं.] **०बाहेर पडणें**-बेत, कट प्रगट होणें. 'आणि सर्व भाडवल बाहेर पडलं' -चंद्र १३६. **०शाही**-स्त्री. भाडवलवाल्याचें वर्चस्व. (इं) कॅपिटॅलिझम्. 'झारशाही, शिष्टशाही, दौलतशाही किंवा भाडवलशाई जशी वाईट ...' -सुवें १५७.

**भाडळी**—स्त्री. एक झाड. ह्याच्या काड्या चुडीप्रमाणें प्रकाशासाठीं पेटवितात.

**भाडळीमत**—न. सहदेवाची स्त्री भाडळी हिनें काढलेलें फलज्योतिषाचें मत, पद्धति.

**भांडों**—पु. (गो.) कुणगा [भांडें]

**भांडागार, भांडार, भांडारखाना-गृह**—नपुन १ द्रव्यसंग्रहाचें स्थान; खजिना; कोठार; द्रव्यकोश. 'अंतोरिया कुमरें। साडोनिया भाडारें।' -ज्ञा १.२२०. २ (सामा) खजिना; सांठा; संचयस्थान. 'तें मोक्षनिधीचें भाडार।' -ऋ ३८. सं. भाडागार, भाडार] **भांडागारी, भांडागारिक, भांडारी**-पु. खजिनदार; कोठारी; कोशाध्यक्ष. 'कुबेर तुझा भाडारी।' -ध्यं १९.

**भांडाभांड-डी**—स्त्री आपसातील तंटा; भांडण. [भांडणें द्वि.]

**भांडावणें**—अक्रि. १ भग्न होणें. २ बंद होणें; पडणें. 'का अंगहीन भाडावे। रथाची गती।' -ज्ञा १७.३८९. [भंड]

**भांडावा**—पु. योद्धा. -शर. [भांडणें]

**भांडाळ, भांडुका**—वि. भांडखोर.

**भांडी**—स्त्री. वरच्या ओठात जन्मतः असणारी फट. 'दुसऱ्याचें नासिक चेपलें। पडली भाडी।' -स्विपु २.२५.७१. [कों. भंड]

**भांडीर, भांडिक**—पु. गीतें म्हणणाऱ्या व वादनकुशल लोकाची एक जात. -मसाप १.१.१. **भांडीर, भांडीरी, भांडिकी**-स्त्री. कंबोज, मगध, गौड, महाराष्ट्र, कलिंग या देशाची संस्कृतमिश्र गीतभाषा. कांहीं ही जुनी मराठी भाषा म्हणतात. -मसाप १ अंक १ व ३.

**भांडुली**—स्त्री. लहान भांडें. 'कापुराची भांडुली परिमळें भरली।' -ज्ञागा ४५९. [भांडें]

**भाडें**—न. १ एखाद्याचें घर, जमीन इ०च्या उपयोगाबद्दल त्यास द्यावयाचें द्रव्य. 'राहेत देऊन कित्येक भाडें।' -सारुह ६.५३. २ कांहीं माल, मनुष्य इ० स घोडे, बैल, मनुष्य इ०नीं वाहून नेण्याबद्दल जें द्रव्य घेतात तें; किराया. ३ माल, मनुष्य इ०स द्रव्य घेऊन पोंचवून देण्याचें काम. [सं. भाटक; प्रा. भाडय] **जळतें घर भाड्यानें घेणें**-(ल.) धोका आहे असें प्रत्यक्ष दिसत असतां त्यात पडणें. सामाशब्द- **०करी**-पु. १ (जनावर, घर,गाडी इ०) भाडें घेऊन वापरावयास देणारा २ दुसऱ्याचें घर इ० भाडें देऊन वापरणारा. ३ (ल.) मजुरी घेऊन काम करणारा; भाडोत्री नोकर; मोलकरी; वेतन्या 'जर हलकें काम भाडे कऱ्याचें करीन तर अंगात शक्ति नाहीं.' -व्यनि ८७. ४ ज्याच्या नशिबीं फक्त कष्ट असतात व त्या कष्टापासून झालेला फायदा त्यास न मिळतां दुसऱ्यास मिळतो असा इसम; मजूर. **०चिठ्ठी**-स्त्री. शेत, घर, जमीन इ० कांहीं मुदतीपर्यंत वापरावयास देऊन त्याबद्दल केलेला लेखी करार. **०तोडें**-न. भाडें, वापरावयास दिलेल्या वस्तूबद्दलचा मोबदला इ० समुच्चयानें. [भाडें द्वि.] **०पट्टा**-पु. कांहीं काळपर्यंत एखादी मिळकत उपभोगावयाचा हक्क स्थावर मिळकतीच्या मालकाकडून दुसऱ्यानें घेतांना या हक्काबद्दल ठराविक रक्कम, पिकाचा अंश किंवा एखादी वस्तु भाडें म्हणून मालकास देण्याचा करार. **भाडवी**-वि. भाडोत्री. -शर. **भाडेल-(गो.)** ओझें वाहणारी स्त्री. **भाडेली**-पु (गो.) ओझें वाहणारा मजूर. **भाडोतरी, भाडोत्री**-वि. १ भाडें देऊन मालकाच्या घरीं राहणारा. २ पैसे घेऊन काम करणारा; मोलकरी. 'स्वभूमीच्या मोचनार्थ व स्वातंत्र्याप्रीत्यर्थ हातावर शीर घेतलेल्या वीराचा उत्साह परदेशापहार करूं पाहणाऱ्या अन्यायी राजाच्या आज्ञेनें नाचणाऱ्या भाडोत्री शिपायांस कसा येणार?' -शिवपाविव्य पृ. १३. [भाडें+उतरणें] **बिन भाड्याचें घर**-न. (तुरुंगांत राहणाऱ्या कैद्यांस भाडें द्यावें लागत नाहीं यावरून) तुरुंग.

**भांडें**—न. १ (धातु, माती, लांकूड, दगड इ०चें) पात्र; पातेलें; तपेली; मडकें इ०. २ (ल) तोफ. 'तैसींचि आत्मानुसंधानाचीं भांडीं। बुरुजोबुरुज टेविलीं अति कडाडीं।' –स्वादि १०.२.७. ३ नदीचें पात्र. ४ प्रसुतीनंतर किंवा कांहीं रोगानें बाहेर येणारा जननेंद्रियाचा भाग (विशेषतः पशूंचा). ५ नगारा, पडघम इ०चें गंगाळ, पडगा. ६ (ना. व.) दागिना; अलंकार. 'मुलीच्या अंगावर पंचवीस तोळयांचीं भांडीं आहेत.' ७ (व.) शेतीच्या कामांतील वस्तु. ८ (व. ल.) विहीर. [सं. भांड] **०फुटणें**–१ (ल) गुह्य फुटणें; उघड होणें; अब्रू जाणें २ (कु.) पुष्कळ जुलाब होणें; कोठा फुटणें. **०बाहेर येणें**–प्रसूतिसमयीं पशु इ०च्या जननेंद्रियाचा भाग बाहेर येणें; आंग बाहेर येणें. **भांडीं डागणें**–तोफेस बत्ती लावणें. '... सदरसरनोबत, हवालदार यासीं बंदुकीचा व भाडीं डागायाचा अभ्यास असावा.' –मराआ ३३. **भांड्याच्या तोंडीं-मुखीं उडविणें**–तोफेच्या तोंडीं देऊन ठार मारणें. 'का भांड्यामुखें उडवणें। या नांव आदि भूतिक।' –दा ३.७.७२. –शारो १९३. **भांड्यास भांडें लागणें**–शेजाऱ्याशेजाऱ्यात मतभेद, तंटे इ० होणें **भांडींकुंडीं**–नअव. भांडीं व इतर संसारोपयोगी सामानसुमान (समुच्चयानें).

**भाण**—पुन. नाटकासारखा काव्याचा एक प्रकार. ह्याचे दहा प्रकार आहेत. –नाटक, प्रकरण, भाण, प्रहसन, डिम, व्यायोग, समवकार, वीथी, अंक व ईहामृग. [सं.]

**भाण**—पु. १ (कारवारी) हंडा. –शर. २ (गो.) मोठी बरणी. [सं. भांड, भाजन?]

**भाण**—न. (कुंभारी) जेवण. 'पितरांच्या नांवीं लेका भाण भरावें' –बदलापूर ८०. भाणें पहा.

**भाणवशी**—स्त्री. दुभत्याचीं भाडीं ठेवावयाची घडवंची; उतरंड. **भाण(न)वस-सा, भाणोसा**–स्त्रीपु. १ चुलीच्या मागें दगड, माती, चुना इ०चा करतात तो ओटा. 'जेवीं ससा भाणवसा आला। तो मुके प्राणा।' –कथा ४.७.१२०. 'नजीब खान रोहिला ससें भाणवसियास सांपडतें तैसा आला आहे.' –भाब ४१. २ उतरंडीचें भाडें नीट बसावें म्हणून जमीनीवर केलेलें मातीचें कोंडाळें. ३ उतरंड लावण्याची जागा: उतरंडघर. 'शोभा आली भाणवसासी। कृत्रिम लक्ष्मी शोभली कैसी।' –एरुस्व १८.३५. ४ स्वयंपाकघर. 'जें जें मागेल भाणवसीं। सर्व आणूनि त्वा द्यावें।' –गुच ७.१८. –ऋ ३८. [सं. महानस] **भाणवसी**–पु. आचारी, स्वयंपाकी. 'शुद्ध विश्वासी भाणवसी। त्यासी सांगूनि शर्करारसीं।' –मुआदि २९.६१. **भाणशिरें**–न. १ स्वयंपाकिणीनें उपयोगांत आणलेला मळकट कपडा. २ भाताची पेज काढण्याच्या वेळीं तोंडास बाधतात तें फडकें. ३ व्यभिचारीण. ४ एक शिवी. [भाण; भाडें+चीर]

**भाणस**—पु. (कों.) १ काहीं जातींत लग्नाच्या वेळीं नवरीमुलीच्या बापाकडून नवऱ्यामुलाकडे सामान्यतः पंचवीस मडकीं पाठविण्यांत येतात तीं; गौरीहार; वही. 'पाहाती चोखट। भाणसा साजत।' –स्त्रीगीत १३ २ (सामान्यतः) दूधदुभत्यासाठीं असलेलें दीड–दोन शेराचें मातीचें भाडें; हें उभट असुन वर अरुंद असतें.

**भाणस जाणें**—व्यर्थ, वाया जाणें; बुडणें. 'पिक सर्व कोंवळें कापिलें। आमचें जीवित्व भाणस गेलें।' –गुच ४८.२४.

**भाणसाघर**—न. स्वयंपाघर. –शिपु.

**भाणा-ण**—स्त्री. बहीण. 'आक्षत भरली भाणा। दुजा ब्राह्मण मेहुणा।' –दा ३.३.१०. [सं. भगिनी]

**भाणूस**—पु भाणवस पहा.

**भाणें**—न. (काव्य) १ पात्र, भाजन. 'जें सकळ रोगांचें भाणें। वाढिलें आहे।' –ज्ञा ८.१४३. २ जेवण; अन्नानें भरलेलें ताट. 'वाढिलें ठायीचें भाणें। टाकोनिया धावें।' –तुगा ७२६. ३ जेवण; भोजन. –अक्रि. जेवणें, भोजन करणें. [सं. भाड; भाजन–भाअण–भाणॅ–भाणें –राजवाडे ग्रंथमाला. तुल० गु. भाणु]

**भात**— न एक तृणधान्य; टरफलासह तांदूळ; साळी. हळवें व गरवें अशा भाताच्या दोन मुख्य जाती; यांत पन्नास प्रकार आहेत. –पु. १ तांदूळ शिजवून करतात तें अन्न. याचे साधा भात, वागीभात, साखरभात इ० अनेक प्रकार करतात. 'अस्तमानीं कधीं रात्रीं भातभक्षिती पाटावरती।' –ऐपो ४०१. २ जोंधळयाच्या कण्या शिजवून करतात तें अन्न; जोंधळयाचा भात. ३ (ल.) नासकें, नासलेलें फळ ४ (ल.) चिघळत चाललेली जखम. [सं. भक्त; प्रा. भत्त=ओदन, पं. भत्त; सिं. भतु; हिं गु. बं भात] **०मोडणें**–(राजा.) भात विकणें. **०राबणें**–भाताचे भारे रचल्याबरोबर भात झोडलें तर मोडतें म्हणून काहीं दिवस उडवी तशीच टेवणें. –कृषि २३९. सामाशब्द– **०क(कू)ण**–पु. टरफल असलेला तादुळाचा दाणा; साळीचा दाणा. –न. तादुळात मिसळलेली किंवा त्यांतून निवडून काढलेली निवड; भातगोटे. **०करी–कार**–पु. भाताची लागवड करणारा शेतकरी. **०कांडे तांदूळ**–पुअव. लागेल तसें भात थोडें मुसळानें कांडून केलेले तादूळ. **०खळें**–न. भात झोडपण्यासाठीं व तुडविण्यासाठीं केलेलें खळें. **०खाऊ–भरू–भों(बो)कण्या–भोंक्या**–वि. १ भाकरखाऊंनीं प्राय. भात खाणाऱ्या लोकांबद्दल उपहासार्थ योजावयाचा शब्द; नुसता भात खाणारा, भरणारा माणूस. 'कोंकणच्या भातबोकण्यांना आपण कित्येक कामात चीत करूं.' –कोरकि ६६९. २ रिकामटेकडा; काहीं उद्योगधंदा न करतां खाणारा. 'सर्व भातखाऊ मिळालेत सारे।' –रामदासी २.५४. **म्ह०** कोंकण्ये आणि भातबोकण्ये. **०गोटा**–पु. १ टरफलें काढून टाकलेल्या तादुळांत राहिलेला टरफलासहित दाणा; भातकण. २ (गो.) शितकण.

**०जमीन**-स्त्री भाताच्या पिकास योग्य अशी जमीन. **०वणी**-स्त्री. (गो.) पेज. **०शेत-ती**-नस्त्री १ भात पेरावयाचें शेत. २ भाताच्या लागवडीस योग्य अशी जमीन; भातजमीन; खाचर. **०शेती**-वि भातशेतासंबंधीं (जमीन, वसुल, लोक इ०) **०साण**-स्त्री कुजलेल्या भाताची, कोंडयाची घाण. **भात(ते)ण, भात्या-(त्ये)ण**-न पेंढा; भाताच्या काडया; भाताचें पीक काढून घेतल्या-नंतर उरतात त्या काडया, गवत इ० [ भात+तृण ] **भातळ**-वि ज्यात बरेच भातगोटे राहिले आहेत असे ( तादूळ ). **भाताचा पिंड**-पु केवळ भातावरच पोसलेला इसम **भाताणी गवत**-न राबाला उपयोगी पडणारें भातगवत. पेंढयाची गूत वगैरे -बदलापूर ३१.

**भात**—स्त्री. १ चाल; रीत, तऱ्हा; पद्धत; ढब ( चालणें, बोलणें, वागणें इ० ची ) २ प्रकार; तऱ्हा; जात [ हिं. ] **भात-भातचा**-वि. तऱ्हेतऱ्हेचा; निरनिराळ्या प्रकारचा 'भातभातरें वात त्यांत बहु मान करीतो ।' -अमृतशुक २३ **भांती( तो )-भांतीं**-क्रिवि १ निरनिराळ्या मार्गांनीं, रीतींनीं २ निरनिराळ्या प्रकारानीं ( क्रि० बोलणें; छळणें इ० ) **भांतीभांतीचा**-वि. नानाप्रकारचा, तऱ्हेचा.

**भात**—स्त्री. लाब व दाट उगवलेलें कुसळाचें गवत.

**भांत**—स्त्री. ( प्रा. ) पत, नावलौकिक; कीर्ति. (क्रि ० राखणें, साभाळणें, टेवणें ).

**भातॅ**—न. (गो.)जेवण. **०मारप**-(गो )यथेच्छ ताव मारणें

**भात(तु)कली**—स्त्री १ लहान मुली स्वयंपाक, जेवण इ० संसारातील गाष्टींचें अनुकरण करून खेळतात तो खेळ; खेळांतला स्वयंपाक. २ ह्या खेळात करून खातात तीं खाद्यें (समुच्चयानें) [ भात अल्पार्थी ]

**भातकुलें, भातुकलें, भातकूल**—न. १ लहान मुलाना खाण्यासाटीं दिलेला जिन्नस; खाऊ. २ भातुकलीच्या खेळातील पदार्थ ( पीठ, पोहे इ० ) ३ चागलें, चवदार खाद्य. भातुकें अर्थ ३ पहा. [ भात, भातुकें ]

**भातकें**—भातुकें पहा

**भातड-डा, भातडी**—नपुस्त्री. ( काव्य ) बाण ठेवण्याची पिशवी; भाता. 'युद्ध मांडलें घोरांदर । सरले भातडीचे शर ।' -एभा ३०.१४४. [ भाता ]

**भातडी, भातोडी**—स्त्री. सोनार इ०चा अग्नि प्रज्वलित करण्याचा लहानसा भाता. [ भाता ]

**भातलवंडा**—पु चांगदेवाच्या कृपेनें एका विधवेस झालेला मुलगा. 'प्रसावेचि विधवेसी बाळ। जन्मविला केवळ भातलवंडा ।' -निगा १४१. -वि. (भात लवंडणारा) एक आडनांव. वरील विधवेस मुलगा झाला त्यावेळीं उत्सवाप्रीत्यर्थ केलेल्या अन्नसंतर्पणां-तील उरलेला भात नदींत लवंडून दिला या आख्यायिकेवरून हें एक आडनांव पडलें आहे [ भात+लवंडणें ]

**भातवडा-डी**—स्त्री. जोंधळयाचें भरड पीठ उकडून त्याचें पापडीप्रमाणें उन्हात वाळवून केलेलें एक खाद्य (मराठयात रूढ) जोंधळयाच्या कण्याची भाजीव मालपापडी. 'नाहीं भातवडा, तया दहिवडा कैचा! ग! तो जीवडा।' -आसु ५ [ भात+वडा-डी ]

**भातवडी रुपाया**—पु अंकुशी रुपयाचें एक चलनी नाणें. पूर्वी भातवड गावीं हें नाणें पाडीत असत [ भातवड ]

**भाता**—पु. १ सोनार, लोहार, ताबट इ० ची विस्तव प्रज्वलित करण्यासाटीं वारा भरण्याची पिशवी. ( क्रि० फुंकणें ) २ बाण टेवण्याची चामडयाची पिशवी. 'काय पिनाकपाणीचिया भाता। वायकांडी आहाती।' -ज्ञा ११ २०७. ३ प्रवासात स्वयंपाकाचीं भांडींकुंडीं टेवण्याची शिपाई, प्रवासी इ०ची चामडयाची पिशवी ४ शरीर भाजल्यामुळें त्या जागचें गळून पडतें तें कातडें [ सं. भस्त्रा, प्रा. भत्था ] **भाती**-स्त्री वारा घालण्याचा भाता. -शर [ सं. भस्त्री प्रा. भत्थी, हि. भाथी ]

**भाता**—पु ( अशिष्ट ) भत्ता पहा 'त्यास भात्याबद्दल एक रोजा रसानगी देण्याची यादी सुर्ती.' -समारो २ १४७

**भातार-रु-रू**— पु भ्रतार; नवरा 'जैसी भातारेंहीन वनिता। उपहती पावे सर्वथा।' -ज्ञा २ १९९ [ स भ्रतार ]

**भांती**—स्त्री. प्रकार; तऱ्हा. भांत पहा. 'हेचि आनि भाती। प्रमेय उपलवूं पुढती।' -ज्ञा १४.८६.

**भातुकें, भातु(तू)क**—न. १ ( काव्य ) भोजनाव्यतिरिक्त लहान मुलास देतात तें खाद्य; खाऊ; भातकूल. 'जे लोकत्रयाचें भातुकें। खेळताचि खाय कवतिकें।' -ज्ञा ३.२४८. २ अल्प उपाहार; फराळ; खाद्य ( पीठ, पोहे, लाडू, इ० ). 'मज भीक कांहीं देवा। प्रेम भातुकें पाटवा।' -तुगा ११८२ ३ चागलें, चवदार हलकें खाद्य. 'देई आवडीचें भातुकें।' -मुआदि १३.६. ४ भक्ष्य. 'देहा केंवि रिझे। हें काळाचें भातुकें।' -तुगा. ५ अन्न; आहार. 'कृष्ण दर्शनाचेनि भातुकें। ... माझें शरीर अजेय।' -जै ५५. ६ विवाहात वधूकडून वराकडे नेतात ते फराळाचे पदार्थ. -शास्त्रीको. [ भात ]

**भातें**—न. १ ठराविक पगारापेक्षां जो नोकरास माल, वाटखर्च, भाडेंतोडें इ० साठीं अधिक पैसा देतात तो; भत्ता. २ ( कायदा ) भत्ता. 'भातें वादीनें प्रथम द्यावें.' -न्यासे २४. ३ सावकार, सरकार इ० कडून आपणाकडे आलेल्या मनुष्यास आपण त्याच्या खोळंबा इ० च्या भरपाईसाटीं द्यावयाचें द्रव्य. भत्ता पहा. ४ पोटगी; खाद्य. 'ऐसें युक्तीचेनि हातें। जें इंद्रिया वोपिजे भातें।' -माज्ञा ६.३५२ ५ वतन -शर. [ सं. भक्त; हिं. ]

**भातें**—न. ( काव्य ) समुद्रादिकांस येते ती भरती. [स. भृत]

**भातें**—न. १ उरीं फुटलेल्या माणसास किंवा जनावरास पाजतात तें एक औषध. २ बांकेरी इ० औषधींचा कंद, मूळ.

**भातें**—न. (गो.) लहान भाता. [भाता]

**भातेरी**—स्त्री. (गो) खरडपट्टी [पोर्तु. बातेरिया; इं. बॅटरी]

**भातोडी**—स्त्री. बाण ठेवण्याचा भाता. भातड पहा.

**भात्या**—पु डिकाची एक जात. –मुंग्या ४६.

**भात्या, भातोटा**—पु. सोनार इ०चा वारा घालण्याचा भाता.

**भादरणी**—स्त्री. १ (म्हैस, मेंढी इ०च्या केसांची) कातरणी. २ हजामत करणें. [भादरणें]

**भादरणें**—उक्रि. १ (म्हैस, मेंढी इ० जनावर, कातडें, वस्त्र यावरील केंस, लोंकर, दशा; कापड विणताना शिलक राहिलेले दोरे) अंगाबरोबर कापणें; कातरणें; खरडून घासून काढणें; बोडणें. २ (निंदार्थी) हजामत करणें; केंस काढणें (डोकें, दाढी, इतर अवयव यांवरचे) ३ (ल.) तासडपट्टी, खरडपट्टी काढणें [सं भद्राकरण] **भादरपट्टी**–स्त्री १ तासडपट्टी; खरडपट्टी. (क्रि० करणें, काढणें) २ हजामत. [भादरणें+पट्टी]

**भांदरी, भारंजी**—स्त्री (वे) एक प्रकारचें झुडुप.

**भादरड**—स्त्री १ अफूच्या पिकासाठीं तयार केलेली जमीन. २ जींत पावसाळ्यात पीक न घेतां पडीत ठेवतात अशी जमीन. -कृषि ५०३.

**भादली**—स्त्री. नाचणीप्रमाणें एक हलकें तृणधान्य हें देशावर होतें याच्या भाकरी करतात.

**भादवड**—स्त्री. भाद्रपद महिन्याचा काल 'भादवडींत वासे तोडले म्हणजे लागत नाहींत.' [भादवा] **भादवडीचा**–वि भादवडींत तोडलेला (वासा, काष्ठ इ०).

**भादवा**—पु. भाद्रपद महिना. 'शुक्ल पक्षिचा मास भादवा।' –मध्व ५. [सं भाद्रपद; प्रा भद्दवअ; हिं. पं भादो] ०तीळ, **भादवा तीळ**–पु भाद्रपदात पिकणारा तीळ ०भट–पु भाद्रपद महिन्यांत जेवावयास बोलाविलेला ब्राह्मण. म्ह० भादवे भट्ट आखाडी तट्टू आणि पौषीं कुणबट्ट. **भादवी**–स्त्री (कों.) भाताची कापणी झाल्यानंतर राहिलेल्या मुळास फुटलेला अंकुर; दुसरें पी (क्रि० रुजणें). (गो कु) भादवो. –वि. भाद्रपद महिन्यासंबंधीं. **भादवी ताप, भादव्याची ताप**–स्त्रीपु. भाद्रपद महिन्यांत होणारा उष्मा. **भादवी लाकूड**–न भाद्रपद महिन्यांत तोडलेलें लांकूड. **भाद्या**–वि. भाद्रपद महिन्यांत जन्मलेला- (बैल, गाय, वासरूं इ०).

**भादवा**—पु (व.) वाढलेल्या झाडाच्या बुडांतून फुटणारी फांदी.

**भादवा**—वि. (व) उतार वयांत आलेला; म्हातारा.

**भादवी**—स्त्री. एक प्रकारचा मासा.

**भादव्येणें**—अक्रि. (कु.) ओलसर होणें.

**भादा-द्या**—वि (वाई) खच्ची केलेला, अंड बडविलेला (बैल) 'गाडीला भादा बैल बरा.' **भादा पडणें**–(व) नरम येणें.

**भादी**—वि. १ पूर्वी दोन तीन वेळा व्यालेली; विती; फळती; पहिलटकरीण नव्हे अशी (गाय, म्हैस इ०). २ चागली; नीटनेटकी. 'आघवाचि विषयीं भादी। परि साजवणी टेंकों नेदी।' –ज्ञा १३.६३७.

**भादूर**—वि. बहादुर पहा. 'पठाणाची फौज कुमरभादूर जोर झाला।' –ऐपो ८१.

**भाद्रपद**—पु चैत्रादि महिन्यांपैकीं सहावा महिना. [सं.] **भाद्रपदा-दी**–वि भाद्रपद महिन्यासंबंधीं (तिथि, वार इ०).

**भान**—न १ शुद्धि; सावधपणा; अंतःकरणाची जागृत स्थिति; जाणीव. 'नाहीं स्त्रीपुरुषभान। मी तूं पण कैंचें।' २ लक्ष; ध्यान; अनुसंधान; काळजी. 'प्रपंचाचें भान नाहीं जया।' –रामदासी २.७५. ३ आठवण, स्मरण. 'येविषयीं एका सावधान। ज्ञात्यासि देहाचें बाधीना भान।' –एभा १३ ५८२ ४ कल्पना; प्रतीति; समजूत; भावना. 'नगाऱ्याच्या शब्दावरून राजाची स्वारी चालली असें भान झालें' 'कृष्णध्यानीं निमग्न। नाठवेचि दुजें भान।' –जै ९६.४१. ५ चैतन्य. ६ अधिष्ठान 'मिथ्या कल्पनेचें भान। उडोन जाये।' –दा ७ ५.२७ ७ भास; आविष्कार. 'निज रूपाचें अदर्शन। तेंचि भान प्रकृतीचें।' –एभा ९ २८३. [सं.]

**भान**—पु. सूर्य. [सं. भानु]

**भान**—न. (व) जेवणाचें ताट; पात्र. म्ह० (व) भान्याची भूक अन् दृष्टीची माया [सं भाजन; म. भाण]

**भानगड**—स्त्री. १ गुंतागुंत; घोंटाळा; अव्यवस्था; गोंधळ; घुथडा 'ही तुमच्या वजांतील भानगड कांहीं उलगडत नाहीं' २ घोंटाळ्याचें किंवा भांडणाचें काम, प्रकरण ३ बाधा; तंट्याचें कारण 'त्याची माझी दहा रुपयाची भानगड पडली आहे.' [हिं भांजना] ०खोर, **भानगड्या**–वि घोंटाळा, अव्यवस्था, गोंधळ करण्यात आनंद मानणारा, भानगडी करणारा **भानगडणें**–उक्रि अव्यवस्थितपणा, घोंटाळा, गुंतागुत करणें; भानगडींत पडणें.

**भानगुली**—स्त्री. कणगुलीप्रमाणें कळकाच्या काबीचें विणलेलें पात्रविशेष 'कनगुली भानगुली सुपटोपली।' –भज ७४. [भाण अल्पार्थी]

**भानवडा**—पु एक प्रकारचा डाळीचा वडा. -गृशि ४५५.

**भानवस-सा, भानसी**—स्त्री. भाणवस पहा.

**भानसीण**—स्त्री. १ मानकरीण. 'ते समयीं उभयतां बायांचा व भानसिणी यांचा कोल्हाळ झाला.' –भाब ९४. २ स्वयंपाकीण. ३ दासी.

**भानसुरें**—(हेट.) भाणशिरें अर्थ १ व २ पहा.

**भाना**—पु. घराच्या भिंतींत गुप्तपणें पुरून ठेविलेलें पैशाचें भांडें; द्रव्याचा हंडा.

**भाना**—पु. बङाणा पहा.

**भानामती**—स्त्री. १ जादुगारी; हातचलाखी; गारुड्याचे खेळ २ (ल.) कला; युक्ति; कपट. ३ स्त्रीजादुगार. [सं. भानुमती] **भानामत्या**-वि. जादुगार; गारुडी.

**भानामती**—स्त्री. चूल

**भानार**—पु. भंडारा; मेजवानी.

**भानिल**—न (शाप) रंग तयार करण्यास उपयोगी असा सेंद्रिय पदार्थ. (इं) फेनाझाईन.

**भानु**—पु. १ सूर्य 'हा भीष्म गंगानंदनु। जो प्रतापतेजस्वी भानु।'-ज्ञा १.१०५ [सं.] **०नंदन**-पु १ यम २ शनि ३ सुग्रीव ४ कर्ण **०वार-वासर**-पु रविवार; आदितवार **०सप्तमी**-स्त्री. शुद्ध किंवा वद्य पक्षांतील आदितवारीं येणारी सप्तमी. हा दिवस फार शुभ मानितात

**भानु**—पु (योग) पिंगळा नाडींतून वाहाणारा वारा. 'मग शशी आणि भानु। ऐसा कल्पिजे जो अनुमानु। तो वातीवरी पवनु। गिवसितां न दिसे।'-ज्ञा ६ २४५.

**भानुमती**—स्त्री १ एका तालाचें नाव ह्यांत अकरा मात्रा व पाच विभाग आहेत. २ भानामती पहा

**भानें**—न. (हेद्रा व) जेवणाचें वाढलेलें पान. भाणें पहा

**भानोसा-स, भान्वसा**—पुस्त्री भाणवसा पहा **ससा भानोशीं येणें**-इच्छितवस्तु प्रयत्नाशिवाय बसल्याजागीं मिळणें.

**भाप**—स्त्री. (व) थाप; हूल

**भापझिरा**—पु. (व.) नदीच्या वाळवंटात केलेला झिरा.

**भांब**—स्त्री मोठी विहीर, भाम पहा

**भांब-भ**—स्त्री शोभा; सौंदर्य. 'अवयवकातीची भांब। तैसी दिसे।'-ज्ञा ६ २५३. 'तुम्हाविण व्यर्थेचि त्याची भांभ। -स्वादि १२.१८ [सं. भा]

**भांब**—न आभास; भ्रांति 'येर माणुसपण तें भांब। लौकिक भागु।'-ज्ञा १०.७७ [सं. भ्रम, प्रा भाम]

**भांबट**—वि (व) पडकें, मोकळीस आलेलें (घर, विहीर इ०). भाम, भामट पहा.

**भांब(भ)भूत, भांबर(ड)भूत, भांबरभुसका**—वि वेडसर; मूर्ख; पिसाट. भ्रमिष्ट (मनुष्य). 'सभेमध्यें साभिमान। भ भडभूत दशानन। बैसलाहे।'-मध्व ३७. [भांब] **भांबर मुत्या**-पु. (कों दादर) कडकलक्ष्मी; आसुडवाला भिक्षेकरी.

**भाबडा**—वि भोळा; साधा; सरळ मनाचा; निष्कपटी. 'लोक भाबडे म्हणून परराज्याचा जुलूम सहन करतात.'-नि २९९. [भाव]

**भांब(बा)वणी**—स्त्री. गोंधळणें; बुचकळ्यांत पडणें; कावराबावरा होणें. [भांबवणें]

**भांब(बा)वणें, भांभावणें**—अक्रि. १ (भय, हर्ष इ०नीं) स्वतःचें भान नाहीसें होणें; गोंधळणें; चुकणें; भ्रम पावणें. 'नहुषु स्वर्गाधिपति जाहला। परि राहाटीं भांबावला।'-ज्ञा१८.१४७९. २ घाबरणें; भयभीत होणें; भीतीनें, आश्चर्यानें चमकणें; गोंधळणें. [सं. भ्रम; प्रा. भाम; म भाव] **भांबा**-स्त्री. विकार; भ्रांति. भांब पहा. 'तैसी आत्मयासी भावा। अज्ञानाची।'-विपू ७.११५. **भांब्या, भांभ(ब)ळ-ळ्या**-वि. १ विसराळू. चुकणारा; भ्रमिष्ट. २ अव्यवस्थित; चुकणारा; निष्काळजी (मनुष्य, काम); वेंधळा.

**भाबी**—स्त्री. (व.) भावजय; भावाची बायको. [हिं भाभी]

**भांबुरडी**—स्त्री. एक औषधी वनस्पति.

**भाभापाडळी**—स्त्री. नपुंसक पुरुष.

**भाभी**—स्त्री. आट्यापाट्याच्या खेळातील एक पारिभाषिक शब्द. -मखेपु ११.

**भाम, भांब**—स्त्री (अशिष्ट) आठवण; स्मरण. [भान]

**भाम**—स्त्री चार मोटा चालतील एवढी मोठी विहीर; भांब.

**भाम**—पु. मेहुणा.

**भामँ**—न. (गो.) (बालभाषा) दागिना; अलंकार.

**भामटा**—पु (व.) जुनाट, अर्धवट बुजलेली विहीर

**भामटा-ट्या, भांबटा-ट्या**—पु. १ गुन्हेगार लोकाची एक जात व त्यातील व्यक्ति ह्या लोकाचा मुख्य धंदा चोरी करणें हा आहे. २ उचल्या; भुरट्याचोर; नकळत चोरी करणारा. ३ (ल.) लबाड, कारस्थानी माणूस.

**भामर**—न (व) पडसें

**भामसाळें**—न. (गु) लग्नात नवरदेवाची काढलेली रात्रीची मिरवणूक.

**भामा**—स्त्री. १ बायको; स्त्री. 'लुटोनि लोकांसहित भामा। धरिल्या भूपाळाच्या भामा।'-कीर्तन १.८. २ सत्यभामा; कृष्णाची एक राणी. 'वंदे भामा कोपें अतिविकळ चावूनि अधरा।' -वामन, भामाविलास१४ (नवनीत पृ १००) [सं] **भामिनी**-स्त्री १ रागीट, रागावलेली स्त्री. २ भामा अर्थ २ पहा [सं.]

**भाम्या**—पु (विद्यार्थी) यजुर्वेदी ब्राह्मणास धाम्या या शब्दाप्रमाणें योजितात.

**भाय**—स्त्री. (कों.) फांदी; शाखा. [बाही] **भायटी**-स्त्री. भायचें अल्पत्वदर्शक रूप.

**भाय**—वि. (व.) पुष्कळ [सं. बहु]

**भायकाळ**—न. (बे.) भोंक.

**भायंगीण**—स्त्री. (गो.) एक औषधी वनस्पति.

**भायताड**—पु (कों.) खांद्या असणाऱ्या ताडाची एक जात. [भाई+ताड]

**भायर**—क्रिवि. (गो.) बाहेर पहा ०**करप**-क्रि. (गो) हद्दपार करणें; बाहेर टाकणें ०**जावप**-शौचास होणें. ०**पडप**-मरणें. **भायरो**-वि. (गो.) बाहेर टाकलेला; बहिष्कृत.

**भायरी**—स्त्री जुलाबाचें औषध.

**भायलो-लो**—वि. (गो. कु.) बाहेरचा. [भायर] ०**लोक**-पुभव शूद्र लोक **भायली, भायली पीडा**-स्त्री. १ उपदंश-विकार. २ पिशाच्च्याचा उपद्रव.

**भायेस**—पु (गो.) (शूद्र लोकांत) वडील दीर [भाऊ]

**भार**—पु (बे) ताप.

**भार**—पु १ गुरुत्व; जडपणा. ज्या योगानें पदार्थ निराधार असता खालीं येतो तो पदार्थाचा धर्मविशेष. २ वजन तोलून काढलेलें परिमाण ३ कोणतीहि वजनदार वस्तु; दाब; दडपण 'कागद वाऱ्यानें उडतात त्यावर कांहीं भार ठेव' ४ (ल) (काम, उपकार, मेहेरबानी इ० चें) वजन; ओझें. 'तो भारु फेडावेआ जगन्नाथा। अवतरलासी तूं।' -शिशु १४७. ५ (ल.) ओझ्याप्रमाणें मानलेलें काम; दयेचें कृत्य; उपकार. ६ (ल) महत्त्व. गौरव; धन्यता; वजन ७ शैत्यादि विकारामुळें डोक्यास भासणारा जडपणा. 'आज माझे मस्तकास भार पडला आहे' ८ एक रुपयाच्या वजनाइतकें वजन. एक तोळा वजन. 'ही वाटी पंचवीस भार आहे.' ९ (समासांत पदलोप होऊन) विशिष्ट वजन. 'पैसाभार लोणी, ढबूभार साखर, वीस रुपये भार गूळ.' १० ओझें, वजन उदा० काष्ठ-तृण-पर्ण-भार. 'सोनसाखळीचा झाला भार।' -मसाप २.१ ११ (सैन्याचें एक अंग म्हणून) संख्या-बल. जसें-अश्वभार, कुंजरभार, दळभार, रथभार इ०. १२ (काव्य) कळप; तांडा, समूह 'वाटेसि गडगडता व्याघ्र। थोकती जैसे अजाचे भार।' १३ समूह; समुदाय; मेळा; गर्दी. उदा० गोभार, द्विजभार, भृत्यभार इ० 'आशीर्वचनीं जयजयकार। करूनि बैसला ऋषींचा भार।' -मुआदि १६.११०. १४ सेना; समूह. 'दळ-व्याचा भार कुरुंद्व्या मैदानीं गेला।' -ऐपो ६८. १५ भर; बहर. 'मग हें रसभावफुलीं फुलेल। नानार्थ फळभारें फळा येईल।' -ज्ञा ११.२०. 'नम्र होती फळभारें तरुवर सारे' -शाकुंतल १६ ओझें; काळजी; जबाबदारी; आधार 'सखे, मी सर्व भार परमेश्वरावर ठेविलेला आहे.' -रत्न २१. १७ व्यूह; बेत. 'ते पाहोन राजभुवरानें लष्कर पायदळ फौज करून भार रचिले.' -इमं ९ १८ आठ हजार तोळे वजन. (चार तोळे=१ पल; १०० पला=१ तुला; २० तुला=१ भार. 'रत्नें प्रस्थ भार एक एक कनक। ऐमी दक्षिणा आरभीं।' -जै १.९१ -वि. जड. 'मत्प्रश्न भार कां गमला?' -मोअश्व २.३०. [स. भार; फा बार] ०**कस**-नपु १ गाड्यावर किंवा उंट, हत्ती इ० च्या पाठीवर सामान कसून बांधण्याचा सोल, दोर २ वादळांत तंबू डळमळूं नये म्हणून त्याच्यावरून टाकून जमिनीस खिळविलेली दोरी. [तुल० फा बारकश्] ०**ग्रस्त-पीडित भाराकुल भाराक्रांत, भारान्वित, भारार्त**-वि (शब्दश व ल) ओझ्यानें पीडिलेला, त्रासलेला ०**दंडीचा**-वि वजनदार; भारदस्त. ०**दर्शक**-वि वजन दाखविणारें (परिमाण). उदा० मण, पौंड, तोळा, मासा इ०. ०**दस्त-दस्ती-दास्त-दार**-वि १ वजनदार; महत्त्वाचा. २ बहुमोलाचा; मूल्यवान् [भार+फा. दस्त इ०] ०**दस्ती-दारी**-स्त्री. १ वजन; महत्व २ हुकमत चालविण्याचें सामर्थ्य, अधिकार, सत्ता **भारंदाज**-वि. वजनदार, फायदेशीर; भरभराटीचा (माणूस, धंदा) [फा बार+अंदाज] **भारंदाजी**-स्त्री सार; महत्त्व; भरीवपणा; फायदेशीरपणा (मनुष्य, काम इ०चा). ०**दार**-वि निष्णात. प्रवीण; कामगार; महत्त्वाचें काम करावयाला जबाबदारी घेण्याला लायक, समर्थ. [हिं] ०**दारी**-वि. ओझें वाहणारा; ओझ्याचा 'जरूरियात प्रसंगीं भारदारी गाडे लागल्यास ..' -राजमहाल कामगारी कारकुनाच्या कर्तव्यासंबंधीं नियम पृ ६ ०**धडी**-स्त्री १ जड वस्तु; भारी सामान. 'भारधडी झाडून गेली परंतु वस्तीस मनुष्यें होतीं' -भाब ३०. २ गैरलढाऊ लोक. 'मल्हारराव यांचीं मुलेंमाणसें भारधडी इंदुरास राहिली' -भाब ९६ ०**ब(बा)रदारी**-क्रिवि. लवाजम्यासह 'औरंगाबादेहून देखील भारबारदारी दिल्लीस जात आहेत.' -शाछ १.२७ [भार+बरदार=वाहक] **भारंभार**-वि सारख्या वजनाचें; भारोभार 'हे रुपये यांचे आणि भारंभार चांदी घ्यावी' [भार+आणि+भार] ०**भूत**-वि १ जड, भार झालेला 'भारभूत होय जिणें...।' -विक ८२. २ (ल) निरुपयोगी, निरर्थक. ०**मान**-न १ गुरुत्व; जडपणा. याच्या उलट आकारमान २ हवेचा दाब मोजण्याचें यंत्र; भारमापक यंत्र (इं) बॅरोमीटर. ०**वाहक**-वि १ ओझें वाहणारा (मनुष्य, गाडी, जनावर इ०) 'कीं आले खर, भारवाहक असे पोटीं मनुष्याकृती।' -विक १२. २ (संसार, कामधंदा इ०चा) भार, जबाबदारी सहन करणारा. ३ अंगीं असलेल्या विद्यादि गुणांचा-द्रव्य मिळविणें इ० कामीं उपयोग न करणारा (माणूस); ओझ्याचा बैल ०**शांखळ-ळा**-स्त्री (महानु.) शृंखला. 'तो जुझारां गडे। पाईं भारशांखळ काढे।' -भाए ३५९. [भार+शृंखला] **भारोभार**-क्रिवि. सारख्या वजनाचें; भारंभार. [भार द्वि.] **भारकी-कें**-स्त्रीन (काटक्या, गवत, पानें इ०चा) लहान भारा, ओझें. [भारा अल्प.]

**भार**—पु. १ (गो.) अवसर; संचार (पिशाचाचा). (क्रि० काढणें). २ मंत्राचा प्रयोग, विनियोग. (क्रि० टाकणें; घालणें; फुकणें; लागू होणें). [भारणें] ०**दोरी**-स्त्री. गर्भ गलित न

व्हावा म्हणून कांहीं स्त्रिया कमरेला बांधतात ती भारलेली दोरी (सामा) भारलेली दोरी; गंडा 'बाधें कृपादृष्टिचि भारदोरी।' –भाए ७७५. –दा १४ १०.८ [भारणें+दोरी]

**भारकुण-कूम**—स्त्री (गो.) सरदी, शैत्यविकार

**भारंग-गी**—स्त्री. एक औषधी वनस्पति. [सं. भार्गी; हिं. भाङ्र्गी; गु भारंगि]

**भारजा**—स्त्री. भार्या; स्त्री, बायको. 'सुप्रसन्ना देवी राणी त्याची भारजा।' –वसा ३. [सं. भार्या]

**भारणशुद्ध, भार(रा)णसूद्-त**—वि १ वजनदार; सन्मान्य; पूज्य; सभ्य चालीचा; भारदस्त (माणूस, वर्तन, भाषण, पोशाख). २ (शब्दशः व ल) ओझें वाहून नेण्यास, जबाबदारीचें काम करण्यास लायक (जनावर, मनुष्य). [भरण–भार+शुद्ध]

**भारणी, भारांतर**—स्त्री (राजा) ओकतीच्या आडव्या दांडीच्या दुसऱ्या बाजूस असलेला वजनाचा धोंडा [भार]

**भारणी**—स्त्री (व.) बीं जमिनींत खोल जाण्याकरितां माती भरून तिफणीवर ठेवितात तें पोतें.

**भारणी** स्त्री. १ (शब्दशः व ल.) भुरळ; भूल; मोहनी. २ भुरळ पडणारा मंत्र; वशीकरणविद्या. भूल (क्रि० घालणें; टाकणें) 'तरी पढियंतयाची कहाणी। हे भुलीची भारणी। –ज्ञा १२ १५८ ३ नेत्रांनीं कांहीं पदार्थ पाहून सुखावण्याचा व्यापार [भारणें]

**भारणें**—उक्रि १ मंतरणें; (अक्षता पाणी, शस्त्र इ० मध्यें) मंत्रानें अचाट सामर्थ्य उत्पन्न करणें 'तेव्हा वीर सुशर्मा सौपर्णास्त्रें करूनि शर भारी।' –मोकर्ण ३३.४५ २ मोहून टाकणें: मंत्रानें स्ववश करणें ३ (ल) भुलथापानीं एखाद्यास वश करणें, नादीं लावणें **भारैणें**–क्रि भारलें जाणें 'बुद्धितत्त्वें भारैलें होय मन।' –ज्ञा १४ ९१.

**भारणें**—अक्रि जड होणें; भारावणें. 'जोखी तों खग भारला समपणें नोहेचि तो थारला।' –आशिबि २९ [भार]

**भारत**—न. १ हिंदुस्थान देश, भरतभूमि. 'ध्वजा कौपिनाची मिरवी भारतात थाटें।' –विक ७. २ एक ऐतिहासिक काव्यग्रंथ. महाभारत ३ (ल.) लांबलचक, कंटाळवाणी गोष्ट ४ गुतागुंतीचें, फार लांबलेलें काम [सं] **भारती**–वि. १ भारत पुराणासंबंधीं २ जंगी; अरेतुरेची; भारतीय युद्धाच्या तोडीची 'जेव्हां भारती लढाई मारली...'–इमं २५६. ०**वीर**–पु. लढाईत पाठ न दाखविणारा, पहिल्या प्रतीचा वीर (भारतांतील वीरांप्रमाणें). **भारतीय**–वि. हिंदुस्थानचा–संबंधीं.

**भारती**—स्त्री १ सरस्वती 'नाना कथारूपें भारती। प्रकटली असे त्रिजगतीं।'–ज्ञा १.३२ २ वाणी; वाचा 'जरी प्रकटे सिद्धसरस्वती। तरी मुकया आथी भारती।' –ज्ञा १.७८. ३ एक नाटय ग्रंथरचनाविशेष. –पु. गोसाव्यांची एक जात किंवा तींतील व्यक्ति. [सं]

**भारतुळव**—पु तुळव पहा.

**भारद्वाज**—पु १ एक पक्षी; कुक्कुडकुंभा; भरद्वाज. २ एक ऋषि ३ रत्नागिरीकडील ब्राह्मणांची एक जात व तींतील व्यक्ति. [सं.]

**भारवट**—स्त्री. (माण.) बोदाच्या वर बसवितात तो लांकडी ओंडा. भारोटा पहा.

**भारशिंग**—न. साबराचें शिंग

**भारा**—पु. १ (गवत, पानें, काटक्या इ० चा) गट्ठा; ओझें. २ (हिरवें गवत, पालेभाजी इ० ची) पेंढी; जुडी. [भार] **भारेभात**–न. भात झोडपल्यावर दर भाऱ्यागणिक अर्धा मण उतरलेलें भात. (क्रि० उतरणें. होणें) [भारा+भात]

**भारादिक**—वि. (गो) भारदस्त [भार]

**भारांवचें**—उक्रि. (गो) बहिष्कारणें, अपांक्त, अस्पृश्य, मानणें. [बाहेर]

**भारावणी**—स्त्री जड होणें [भारावणें]

**भारावणें**—अक्रि. १ अधिक जड होणें (भिजून, जास्त ओझें पडून–गाठोडें इ०) २ (सरदी, श्रम इ० मुळें) शरीर, शरीरावयव जड होणें, आखडणें (गो) भारावचें. [भार]

**भारिवसु**—वि (महानु) दु खी 'निन्हा दासु। होतसे भारिवसु। –भाए १३४ [भार=दुःख+वश]

**भारिवा**—वि (महानु) कठीण: दुर्गम 'मग निगावा चक्रवीहु। भारिवा तो।' –ऋ २९. [भार]

**भारी**—स्त्री. (कों) (गवत, काटक्या इ० चा) गट्ठा; ओझें. मोळी; भारा 'जे ज्ञान स्वयें बुडे। म्हणौनि भारी नावडे।' –अमृ ३ २४ [भार अल्पार्थी]–वि १ जड, वजनदार 'तत्काळ तन्मस्तक होय भारी।'- सारुह २ ७० २ (ल) फार किंमतीचा, महत्त्वाचा, योग्यतेचा ३ (ल) अधिक, मोठा (विद्या, शहाणपण शौर्य, सामर्थ्य इ० नीं). बलवान. 'हा शिपाई दहास भारी आहे.' ४ पुष्कळ; फार; अतिशय (क्रियाविशेषणासारखाहि उपयोग होतो) 'विंदानुविंद राजे त्यासीं करि युद्ध सात्यकी भारी।' –मोकर्ण ९.२. ५ कठीण 'म्हणौनि जीवितांत सेया। नोहेचि भारी।' –ज्ञा १५ ५८९. ६ अनिर्वाह्य, न झेंपणारा. 'हें काम त्यास कांहीं भारी नाहीं.' [भार] ०**पणा**–पु मोठेपणा; थोरपणा. याच्या उलट पोरपणा, हलकेपणा इ०

**भारुड**—पु न. १ (महानु.) धनगर. 'रत्नप्रभेचेनि कोडें। मेंढिया शृंगारीति भारुडें।' –ऋ ५४. २ कर्नाटकांत या नांवाची एक जात आहे. भरवाड पहा.

**भारूड**—न. १ लांबच लांब, गुंतागुंतीची, कंटाळवाणी हकीगत, वृत्तांत, कथा. (क्रि० लावणें). २ पंचाईत; संकट; विघ्न;

ड्याद (क्रि० येणें, येऊन पडणें). ३ त्रासदायक, कंटाळवाणा वाद. ४ अवघड, कूट कविता, लेख, रूपक इ० 'एकनाथी भारूड.' ५ (व्यापक) कुभांड; तोहमत (क्रि० आणणें, टाकणें, रचणें, काढणें) [भारत+रूढ; भरडणें ?]

**भारोट**—स्त्री (व.) खांबावरील आढवी चौकोनी मयाल; खांबावरील लाकडी उथळें व तुळई यामध्यें बसविलेला लांकडी तुकडा. बोद, भारवट पहा.

**भार्गव**—पु १ शुक्र नावाचा ग्रह. २ परशुराम. ३ गुजराथी ब्राह्मणाची एक जात व तींतील व्यक्ति. ४ (काव्य) कुंभार. 'भार्गव शाळेचे भाजन। आणि इंधनें आज्यादि।'–मुक्तेश्वर हरिश्चंद्राख्यान ३६१. (नवनीत पृ. २०३). [सं.] **भार्गव-वी**–पु. शुक्राचार्य. 'नमो आता हे कवी। व्यास वाल्मीक भार्गवी।' **भार्गवी**–स्त्री. १ लक्ष्मी. २ पार्वती. –वि. भार्गवासंबंधी. **भार्गवी वारुणी विद्या**–स्त्री. अध्यात्मविषयक विशिष्ट ज्ञान. 'याकरिता श्रुती। हे भार्गवीवारुणीविद्या म्हणती।' वामन –निगमसार १.४९.

**भार्या**—स्त्री. बायको; पत्नी; स्त्री. [सं.]

**भाल**—स्त्री. भाला, बर्ची, बाण इ० चें लोखंडी पातें, फळ 'कनकाची भाल कूपात। कासया व्यर्थ टाकावी।' –भवि ३७. ६८. [स. भल्ल] **म्ह०** सुवर्णाची भाल करडात घाल=नाजूक शत्रूवर नाजूकच हत्यार चालवावें.

**भाल**—पुन कपाळ. [सं.] **०पत्र**–न. मनुष्यकृत पुराव्यानें कज्ज्याचा निकाल लागला नाहीं म्हणजे दिव्य करण्याच्या वेळीं वादी किंवा प्रतिवादी यांची शपथपूर्वक जबानी व राजीनामा लिहिलेला कागद (हा दिव्य करणाराच्या कपाळावर बांधतात). –पेशवेकालीन महाराष्ट्र ४९१.

**भाल**—स्त्री. शपथ. 'श्री वैद्यनाथ देवाची भाल सकुटुंबीआ पडे।'–परळचा शिलालेख. शके ११०९.

**भाल**—स्त्री. (विटीदांडू) दुसऱ्यानें उंच परत फेकलेली विटी बरचेवरच परतविण्यासाठीं दांडूनें मारलेला टोला. (क्रि० हाणणें, मारणें).

**भाल**—स्त्री. एक वनस्पति.

**भाल**—स्त्री. (कों. नाविक) डोलकाठीजवळच्या दोन आढ्यांतील भाग.

**भाळ**—स्त्री. (कों.) तुळई; तुळवट बहाल पहा.

**भालगड, भालगडणें, भालगडखोर, भालगड्या**—भानगड इ० पहा.

**भालगांजा**—पु. गांजाची एक जात.

**भालदेव**—पु. (व.) महालक्ष्मीच्या दिवशीं पूजेकरितां आणतात तें लव्हाळें.

**भालदोरी**—स्त्री. पिशाचादिकांचा उपद्रव होऊं नये म्हणून हात, गळा इ०मध्यें बांधावयाचा अभिमंत्रित दोरा. भारदोरी पहा. 'भालदोरी करून गोरटी। घालिती हरीच्या निजकटी।'–ह ४. २०६ [भारणें+दोरी]

**भाला**—पु. लांब काठीच्या टोकाला पोलादी पातें असलेलें एक शस्त्र. 'साहेल काय वांटे जातो मर्मी शिरोनि शर भाला।' –मोभीष्म ८.२६ २ भाल्याच्या लांबीइतकें अंतर, टप्पा ३(कों) ज्यास कोळबें बसविलेलें असतें असा लाटेला लाविलेला तुकडा. [सं भल्ल] **म्ह०** खायावर भाला आणि उंबऱ्यास घाला **भालकाठी**–स्त्री. १ भाल्याच्या दांड्याच्या कामीं उपयुक्त अशी काठी २ निवळ दांडा (ज्याचें पातें मोडलें किंवा हरवलें आहे असा). [भाला+काठी] **भालाईत**–पु भालेवरी पहा. **भालदार**–पु राजा सरदार इ० बड्या मनुष्याजवळचा छडीदार सेवक, वेत्रधारी. याचें काम ललकाऱ्या देणें, बोलावणें करणें, ताकीद करणें इ० असतें. 'भांड भाट भालदार भवय्ये।' –ऐपो ६३६ **भालदारी**–स्त्री. भालदाराचे काम; भालदारपणा. **भालेकरी**·पु भाला धारण करणारा शिपाई. [भाला+करी] **भालेराई**–स्त्री. १ भालेरावाची सत्ता, अंमल खायावर भाला टाकून स्वच्छंदतेनें लूट व जुलूम करणाऱ्या लोकास भालेराव म्हणत २ (ल) कोणताहि साहसी जुलूम; दरोडेखोरी; पुंडाई ३ शिरजोरपणाचा व अंदाधुंदीचा कारभार; बेबंदशाही. 'त्यास पेशजीं भालेराई जाहली.' –समारो २.२४७.

**भाला**—पु. गाईचें दूध काढतांना तिनें लाथ मारूं नये म्हणून तिच्या मागील दोन्ही पायास बांधावयाची दोरी. (क्रि० बांधणें, घालणें, लावणें).

**भाली**—स्त्री. एक प्रकारचें गवत

**भाली**—स्त्री. १ (गो.) छत्रीची काडी २ तिराला असलेलें पोलादाचें पातें ३ (सामा.) तीर 'गुण वाजती रुणझुण। भाली येताती सणसणा।'–उषा ५६८.

**भालुंड**—न. दुतोंडें. –शर.

**भालू(लु), भालूक, भालुवा**—स्त्री. १ अस्वल. २ म्हातारी कोल्ही. 'तो रुधिर धूमयोनीं वर्षे भू कांपली रडे भालु।' –मोमंत्ररामायण, युद्ध ६२४. 'गावांत भुंकतील भालुवा।' –अफला २४. ३ (यावरून) हिडीस म्हातारी स्त्री. [स. भल्लूक] **भालूसारखा असणें**–रोड, अशक्त, किडकिडीत असणें.

**भालेभाल**—पु. मुलींचा एक खेळ. –मखेपु २२६.

**भालो**—पु. (गो.) कोळंब्याची उभी दांडी. [भाला]

**भाव**—पु. (कों.) भाऊ [भाऊ] **भावकी**–स्त्री. १ भाऊपणा; बंधुत्व; स्नेह 'मित्रास वंचिती मग कोठुन भावकी।' –ऐपो ३६९ २ समाईकांत हिस्सा, भाग. [भाऊ]

**भाव**—पु. बाजारांतील दर, दाम, किंमत 'आज बाजारात बाजरीचा भाव सहा शेर होता.' **०भक्ति**–स्त्री. बाजारातील दर,

दाम इ० संबंधींची हकीगत; बाजारगप्प. ' काय हो, आपण बाजारातून आलात, भावभक्ति कशी काय ! ' ०भगत–स्त्री. चलती, भरभराट, विपुलता इ०चा काल ( मनुष्य, कामधंदा, फळें इ०चा ) ' पंधरा दिवस आंब्याची भावभगत आहे. ' '

**भाव**—पु. १ भक्ति; श्रद्धा; निष्ठा, खात्रीची; भावना. ' माझे मज देती तैसें । परि आनानीं भावीं । '–ज्ञा ९.३५३. ' असे हो जया अंतरीं भाव जैसा । '–राम ३५. २ हेतु; अर्थ; मन; अंतःकरणप्रवृत्ति, उद्देश. ' न कळे तो तया सांगितला भाव । आपणासी ठाव नंदाघरीं । '–तुगा १० ३ अभिप्राय; आशय, धोरण, वळण; झोंक; गर्भितार्थ. ' रूप तसें विविध तिहीं कां केलें स्पष्ट साग भावातें । '–मोसभा ७.६६. ४ मनोविकार; मनोवृत्ति; भावना. जसें–शत्रु–बंधु–क्रोध–दुष्ट–भक्ति–मित्र–भाव. ५ अस्तित्व; असणें ' एवं कोणेहि परी । अज्ञानभावाची उजरी । ' –अमृ ७ ७७. ' जेथें धनाचा भाव तेथें विद्येचा अभाव असें प्राय: असतें. ' ६ प्रत्यय किंवा अनुबंध यामुळें होणाऱ्या फेरफाराशिवाय असणारा शुद्ध धात्वर्थ; धातूचा मूळ अर्थ. उदा० चाल इ० धातूपुढें णें हा प्रत्यय चाल धातूचा मूळ दाखवितो. ७ भावकुंडलीतील बारा स्थानापैकीं प्रत्येक; स्थान. कुंडली पहा. ८ नैसर्गिक स्थिति, धर्म, स्वभाव, प्रकृति. जसें–सत्वभाव; तमोभाव; रजोभाव. ' म्हणोनि सात्विक भावाची मादी । कृष्णाआंगीं अर्जुना आधीं । '–ज्ञा ८.५६. ९ विकार, वृत्ति, राग, क्रिया, चित्तवृत्ति, हावभाव इ०चा वर्ग. ह्याचे पाच प्रकार आहेत. विभाव, अनुभाव, व्यभिचारी भाव, सात्त्विकभाव, स्थायीभाव पैकीं विभाव, अनुभाव व स्थायीभाव हे अनुक्रमें रसाचीं कारणें, कार्यें व पूर्वरूपें आहेत. १० जीवाची स्थिति, दशा, अवस्था. जसें–उत्पत्ति, स्थिति, लय इ० ' ऐसें म्हणे त्यजुनि भाव अहो जिवाचे ।'–वामन भरतभाव ५८. ११ (शब्दाचा) धर्म, गुण, अस्तित्व, विषय, संबंध, अधिकार, अवस्था इ० ची स्थिति; संस्कृतांतील ता आणि त्व व प्राकृतांतील पण, पणा, वी हे प्रत्यय लागून झालेला शब्दाचा अर्थ. जसें–ब्राह्मणाधिष्ठित भाव तो ब्राह्मणपणा, उग्र–क्रूर–दृढ–सौम्य–शत्रु–बंधु–भाव ' जयाचेनि संगें ब्रह्मभावो । भ्रातासहि । ' –ज्ञा ६.१०२. १२ जन्म; अस्तित्वात येणें; उत्पत्ति. १३ (तर्क) पदार्थ. भाव किंवा भावरूप पदार्थ सहा आहेत–द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष आणि समवाय. सातवा पदार्थ अभाव. १४ रति; प्रेम ( काव्यांतील वर्णनाचा किंवा नाट्य प्रयोगाचा विषय ). १५ क्षमता; शक्ति; सामर्थ्य; पराक्रम ( शारीरिक किंवा मानसिक ) १६ माया; मिष; कपट, आव. ' ध्यान केल्याचा भाव करितो. ' –कर्म १. १७ लक्षण, प्रकार. ' द्वितीयाध्यायीं ब्रह्मोत्पत्ति । चारी युगाचे भाव कथिती । ' –गुच ५३.२०. १८ इच्छा. ' हाची भाव माझिया जीवा । पुरवी देवा मनोरथ । '–तुगा ६९९. १९ आवड. ' दुर्योधनें विषान्नें वाढविली भीम जेवला भावें । ' –मोआदि १९.१३. २० ( नृत्य ) अभिनय पहा [ सं. भू–भाव ] म्ह० जसा भाव तसें फळ. ०पाहणें– ( ना. ) परीक्षा करणें; अनुभव घेणें. ' मी साऱ्यांचा भाव पाहिला. या जगात कोणी कोणाचें नाहीं. ' ०भाजणें–१ दुष्ट हेतु तडीस नेणें. ' २एकाद्यानें केलेलें दुष्ट भावित प्रत्ययास येणें. ०सोडणें– १ ( भुतानें ) पछाडलेल्या माणसास सोडणें. २ मरणें; गतप्राण होणें. ३ नाशाच्या मार्गांत असणें. **भावाचा भुकेला**–भक्ति, श्रद्धा यांकरिता भुकेला. ' भावाचा भुकेला श्रीपति । आणिक चित्तीं नावडे त्या । ' सामाशब्द– ०कर्तरि–वि जेथें क्रियेचा केवल भाव तोच कर्ता असतो आणि क्रियापद नेहमीं नपुंसकलिंगी एकवचनीं असतें असा ( प्रयोग ). उदा० मला कळमळतें. ०कर्तृक– वि. ( व्या. ) भावकर्तरी प्रयोगाचें ( क्रियापद ). ०कुंडली–स्त्री. ( ज्यो. ) तनु, धन इ०चीं १२ स्थानें दाखविण्यासाठीं बारा राशींचीं घरें ज्यावर दाखविलीं आहेत असें वर्तुळ. कुंडली पहा. ०गर्भ– पु. १ ग्रंथांतील साराश. २ अंतस्थ हेतु. ०गर्भ–गर्भित–वि. १ ध्वनित; गर्भित अर्थाचा. २ ध्वनित अर्थ ज्यांत आहे असें; दिसतो त्यापेक्षां अधिक अर्थ असलेलें ( भाषण, लेख इ० ). ०चलित– वि. ( ज्यो. ) तन्वादिस्थानीं असून अंशे करून चलित झाला तो ( सूर्य किंवा इतर ग्रह ). ०भक्ति–भगत–स्त्री. १ मनःपूर्वक, श्रद्धा–प्रेमयुक्त, निष्कामपणें केलेली भक्ति; याच्या उलट भयभक्ति. २ एखाद्याविषयीं वाटणारें अत्यंत प्रेम; मनाची ओढ. ०वाचक नाम–न. ( व्या. ) प्राणी किंवा पदार्थ यांच्या गुणधर्माचा बोध करून देणारें नाम. [सं.] ०वाचकसंख्या–स्त्री. जात नसणारी संख्या; संख्या किंवा परिमाणें याचा हिस्सा, पट. ०शबल–न. भावनाविकाराचा गोंधळ; कालवाकालव; अनेक रसांचें मिश्रण. –वि. गोंधळलेल्या भावनाचा. [सं.] ०शुद्धि–स्त्री. अंतःकरणशुद्धि. ' तेणें भावशुद्धीचिया वाटे । विखुरले विकल्पाचे काटे । ' –ज्ञा ७.१७०. ०संकर–पु मिश्र, संकीर्ण भावना, मनोविकार. [ सं. ] ०संधि–पु. निरनिराळ्या, परस्परविरुद्ध भावना असलेल्या मनाची धरसोडपणाची अवस्था; अंतःकरणातील मिश्र रसप्रकार. [ सं. ] ०ज्ञ–वि. आशय, अभिप्राय जाणणारा; गुणज्ञ. ' पाहातयां भावज्ञा फावती गुण । चिंतामणीचे । ' –ज्ञा ६.२१.

**भावांतर**–न अर्थातील फरक, विसंगतपणा. [ सं. भाव+अंतर ]

**भावाभाव**–पु अस्तित्वनास्तित्व; खरेंखोटें; चैतन्य आणि जड. ' भावाभावारूप स्फुरे । दृश्य जें हें । ' –ज्ञा १८.११८६. [ सं. भाव+अभाव ] **भावाभास**–पु १ कृत्रिम प्रेम; कवि किंवा नाटककार यानीं केलेलें प्रेमाचें खोटें वर्णन किंवा प्रदर्शन. २ चुकीचा समज, ग्रह, कल्पना. [ भाव+आभास ] **भावार्थ**–पु. १ तात्पर्यार्थ; साराश. २ भक्तिसार. 'ग्रंथ वदावया निरूपणीं । भावार्थखाणी जयामाजी । ' –व्यं २. ३ श्रद्धा; विश्वास; भाव. ' जयाचा

भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा । ' -दा १.१.३८. ४ अंतःकरणाची निष्कपट वृत्ति; प्रामाणिकपणा. -क्रिवि. खरोखर; निःसंशय 'तो भावार्थे गावास गेला, मी आपल्यापाशीं का खोटें सांगेन ' **भावार्थी**-वि. १ भाविक. २ साधा; भोळा; सरळ स्वभावाचा. **भावि(वी)क**-वि. १ श्रद्धावान्; निष्ठावंत. २ संतुष्ट होणारा 'तिहीं यज्ञभाविकीं सुरीं । जे हे संपत्ति दिधली पुरी । ' -ज्ञा ३ १०४ ३ भक्तियुक्त अंतःकरणाचा. **भावि(वी)कजन, भावीजन**-पु. श्रद्धायुक्त, निष्ठावंत अंतःकरणाचा मनुष्य. ' अद्यापि दीपाचे झळाळ । भावीकजन देखति । ' **भावित**-वि १ कल्पिलेलें; चिंतिलेलें; कल्पित. २ ज्यावर भावना किंवा संस्कार केले आहेत असें (औषध). [सं.] **भाविला**-वि. संस्कार केलेला. -शर. **भावी-वे प्रयोग**-पु (व्या.) जेथें कर्त्यावरून अथवा कर्मावरून क्रियापद बदलत नाहीं व सामान्यतः त्याचें रूप नपुसकलिंगी एकवचनी असतें असा प्रयोग. ' मीं त्यास मारिलें. ' **भावुक**-न १ शृंगारिक बोलणें. २ कल्याण; हित; क्षेम. 'ऐसा भक्तमयूर घातकहि जो नेणें दुर्जी भावुकें । '-मोकृष्ण ५५ ५१. **भावु(वू)क**-वि. भक्तियुक्त; निष्ठावंत; भाविक. ' असोत तुज आमुचीं सकल भावुकायुवेळें । ' -केका ६४. **भावेभक्ति**-स्त्री. भावभक्ति पहा. **भावो**-पु. भाव पहा. ' म्हणोनि मज आत्मयाचा भावो । जिहीं जियावया केला ठावो । ' -ज्ञा १०.१४१. **भावो सरणें**-वाढूं लागणें. -शर. ' तेथ आदिसा पासौनि पार्था । आइकिजे ऐसीचि अवस्था । दुणावली हे यदुनाथा । भावो सरलें । ' -माज्ञा ६ ४८७. (पाठ). **भाव्य**-वि. उपासना करण्यास योग्य. ' जो इया लटकिया भूतग्रामा । भाव्यु सदा । ' -ज्ञा ९.८४.

**भावई-यी**—स्त्री. १ ज्येष्ठ महिन्यातील अमावास्या. २ (व.) सर्वांत कडक उन्हाळा असलेला महिना.

**भावई**—स्त्री. एक वनस्पतिविशेष.

**भावका, भावका देवी, भावकाई**—स्त्री. १ शूद्रांची एक देवता. २ (यावरून ल.) एक बायकी शिवी. ' भोकाड पसरायला काय झालं ग भावकाई ! ' -सुधन्वा ४९. म्ह० भावकादेवीस नाहीं नवरा आणि वेताळास नाहीं नवरी.

**भावजई-जय**—स्त्री. भावाची बायको; (गो.) भावज. [सं. भ्रातृजाया; प्रा. भाउजाया; हिं. भौजाई; सिं. भाजाई; हिं. गो. भावज]

**भावंड-डें**—न. १ एकाच आईबापाच्या संततीचें एकमेकाशीं नातें; भाऊ किंवा बहीण यांचें सामान्य नांव २ सावत्र भाऊ किंवा बहीण. ३ चुलत-आते-मामे-भाऊ-बहीण. ४ जवळचा नातेवाईक [भाऊ]

**भॉवडांवचें**—अक्रि. (गो.) फिरविणें; भोवंडविणें. [भोवंड]

**भॉवडावणी**-स्त्री. १ (गो.) भोवंडावणी. २ मिरवणूक. शाको. ५. ५९

**भावणें**—उक्रि. १ मानणें; समजणें; वाटणें; गणणें. ' बाळता तिळहि पदर भावी व्यजनासि साडग रामा जी । '-मोसभा ५.७७. २ कल्पिणें, मनांत समजणें; चिंतन करणें; विचार करणें. ' मनीं जें भावावें । बोलावें वाचें । ' -ज्ञा ८ ७६९. ३ योजणें; बेत करणें; उद्देशणें. ' हनुमंत भावी मनात पुच्छें बांधून आणावें । ' ४ इच्छा करणें. 'ऐसें जेणें जें भाविजे । तें फळ तेणें पाविजे । ' -ज्ञा ७ १४६. -अक्रि. १ (हवा, पाणी, अन्न इ०) मानवणें; हितकर होणें. ' एथील हवा मला भावत नाहीं. ' २ आवडणें; पसंत पडणें; मान्य होणें. ' असलीं कुजकीं भाषणें तुला बरीं भावतात ' -सक्रि १ भाव धरणें. ' भाउनि ते पावती । तन्मयतेतें । ' -रास १ ४७१ २ पुटें देणें. ' तेवीं जालेनि सुखलेशें । जीवु भाविलिया अभ्यासें । ' -ज्ञा १८.७७६. [भाव]

**भाँवताडॉ**—पु. (गो) फेरा; प्रदक्षिणा. [भोवतें]

**भावना**—स्त्री. १ कल्पना; मनाचा ग्रह. 'तैसी इये निर्मळ माझ्या स्वरूपीं । जो भूतभावना आरोपी । ' -ज्ञा ९ ७९. २ शरीरप्रकृतीची अवस्था. उदा०रोग-मरती-वाचती-चढती-भावना. ३ श्रद्धा, निष्ठा, भक्ति, पूज्यभाव; विश्वास. ' भावना राहिली एकाचिया ठायीं । तुका म्हणे पायीं गोविंदाचे । ' -तुगा २४. ४ रसायनादिकांस रसाचीं पुटें, अग्निपुटें इ० संस्कार करतात त्यापैकीं प्रत्येक. ' का कथिलाचें कीजे रूपें । रसभावनीं । ' -ज्ञा १८ ७७४. ५ (बीजगणित) गुणाकाराची एक रीत हिचे अंतर्भावना, समासभावना, तुल्यभावना असे प्रकार आहेत ६ जाति; प्रकृति; स्वभाव; स्वाभाविक धर्म. 'त्या आंब्याची भावनाच अशी कीं कोयीपाशीं आंबट असावें. ' ७ लक्षणांनीं युक्त असलेला रोग; निदानासह एकंदर रोग. ८ स्मृति, आठवण 'प्रसंगीं या नाहीं देहाची भावना । तेथें या वचना कोण मानी । ' -तुगा ३१४. ९ विचार ' न साहे वियोग करिती रोदना । अभिष्ट भावना देहाचिया । ' -तुगा १०९. १० अस्तित्व. ' भावना म्हणिजे अभाव नसावा । वाढूं नये गोवा अनित्याचा । '-हंको. [सं.] **भावनीय**-वि कल्पना, तर्क, विचार करण्यास योग्य, लायक. [सं.]

**भाँवरपागॅल**—न. (गो) एक प्रकारचें वाटोळें जाळें. [भोंवरा+गो. पागॅल=जाळें]

**भावला-ली-लें, भावलेभोरपी, भावलेभोरीप**—(प्र.) बाहुला इ० पहा.

**भावस**—पु (कु.) भाऊ; बंधु. ०सून-स्त्री. (व.) धाकट्या भावाची बायको.

**भावसरा**—पु. आश्रय. -हंको.

**भावसा**—पु वडील दीर.

**भॉवस्ताळॉ**—पु. (गो.) बाऊ; विकल्प.

**भावळ**—पु. (कों) भाऊ; बंधु. (प्राय: अनेकवचनी प्रयोग). ' दोघे भावळ रोजगारी आहेत. ' [भाऊ]

**भावळा**—वि. भाबडा; भोळा भाविक पहा. [भाव]

**भावा**—पु ज्येष्ठ दीर; नवऱ्याचा वडील भाऊ; (सामा.) दीर. ' असे तुझा दारुण जेष्ठ भावा।'–साछह ७ १०८ [भाऊ] **भावेदीर**–पु.अव नवऱ्याचे मोठे व लहान भाऊ वडील भावास भावा व धाकट्यास दीर म्हणतात. ' भावेदीर करितील उपहास। मग या जीवास उरी कैची।' –जै १७ ६३.

**भॉवाँ**—पु. (गो.) तळयाचें पाणी लवकर नाहींसें होण्यासाठीं बाधास पाडतात तें भोंक.

**भॉवांटी**—स्त्री. १ (गो.) एक प्रकारची मासळी. २ एक प्रकारची वेल.

**भावांड**—न. (विरू.) भावंड पहा.

**भावानगरी**—वि. भावनगरासंबंधीं (चलनी नाणें इ०).

**भावांसे**—पुअव. धरसोडीचीं व असंबद्ध उत्तरें; खोट्या व पोकळ सबबी, मुद्याला सोडून असलेलें भाषण (क्रि० फोडणें, लावणें, घेणें). [बाहु=फांदी, फांटा ?]

**भाविकणें**—अक्रि. मोल पावणें. -शर. [भाव]

**भावित**—न. १ दोन किंवा अधिक परिमाणांचा गुणाकार. २ असला गुणाकार असलेलें समीकरण.

**भावी-वि**—स्त्री. भविष्य; भाकित. (क्रि० सांगणें बोलणें, कथणें, उत्तरणें, प्रत्ययास येणें, मिळणें). –वि. पुढें होणारें; भविष्यकाळासंबंधींचें ' कृष्णा म्हणे समर्थ न कोणीही सुज्ञ भावि टाळाया।' –मोसभा ४ १०१. ' भावी होणार ते चुकत नाहीं.' [सं भावी]

**भावीण**—स्त्री. १ देवीच्या सेवेला जिणें वाहून घेतलें आहे अशी स्त्री; मुरळी; देवदासी. या वर्गांतील पुरुषाना देवळी म्हण तात. २ नायकीण, वेश्या. 'कलावंतिणी व भाविणी यांस निखालस संतति नसेल ... ' –गोमांतक रीतिभाती पृ. ९. [भाव] **भाविणीचा कासोटा**–पु (ल.) मालकाची परवानगी आहे किंवा नाहीं ह्याचा विचार न करता वाटेल त्यानें वापरावी अशी वस्त्र, पात्र इ० कोणतीहि वस्तु.

**भावू, भावूबंद, भावू, भावूजी, भाओ, भाओजी**—(प्र.) भाऊ इ० पहा.

**भावेस**—पु. नवऱ्याचा भाऊ; दीर. भावा पहा.

**भावो**—पु. (कु. राजा.) मेहुणा भावोजी पहा.

**भावोजी**—पु. १ बहिणीचा नवरा. ' अनृत नव्हे तें सत्यचि भावोजी! तुम्हि असें मनीं आणा।' –मोकर्ण ४१ ८९. २ दीर ' लक्ष्मण भावोजी मागें पुढें स्वामी।' –अभंगरामायण ११ [भाऊ]

**भाव्य**—न. भविष्य; भवितव्य. –वि. पुढें व्हावयाचें; होईल असें. [सं.]

**भाव्या**—पु. (व.) नवऱ्याचा वडील भाऊ. भावा पहा.

**भाव्या**—स्त्रीअव. जावा. -शर.

**भाव्या**—पु. गोंव्याकडील आंब्याची एक जात.

**भाशिं(सिं)ग**—न. बाशिंग पहा.

**भाशेन**--क्रिवि (गो) मतानें; दृष्टीनें, प्रकारें. [भास]

**भाष**—स्त्री. १ वचन; आश्वासन; भाक; शपथ. (क्रि० देणें, घेणें) ' भाष घेऊनि विश्वासेसीं। ऋषी गेला लपितेपासीं।' –मुआदि ५०.२४. २ परस्परांतील करार; एकमेकास दिलेलें वचन. (क्रि० देणें). ३ बोली; भाषा ' अवघें जगचि मी होये। तेव्हा तो मी हे भाष जाये।'–एभा ७ १४४. ४ भाषण. ५ नाव. ' ते वेळीं कुंडलिनी हे भाष जाये। मग मारुत ऐसें नाव होये।' –ज्ञा ६.३०१ [सं. भाषा] ०सत्य करणें–वचनाप्रमाणें वागणें. **भाषण**–न. १ बोलणें २ व्याख्यान; तोंडी विवेचन ३ संवाद. [सं] **भाषा**–स्त्री. १ मनातल्या कल्पना शब्दांच्या द्वारें बाहेर-प्रकटविण्याचें साधन; बोली. ' मनुष्याच्या मनोवृत्तीस किंवा अंत:करणास क्षोभ होऊन जे तरंग उटतात ते ज्या रूपानें प्रकट होतात तें रूप भाषा होय. '–नि १४६. २ व्याख्या. ३ (कायदा) वहिवाटींत जी वादीची अर्जी घेतात तिचा पर्यायवाचक शब्द. ' भाषा, प्रतिज्ञा, पक्ष हे अर्जीचे पर्यायवाचक शब्द जाणावे.' –मिताक्षरा व व्यवहारमयूख दायविभाग पृ १३ [सं] ०करणें–१ (कु.) उलट ग्रह करून फसविणें. २ बोलणें; उच्चार करणें. ०शास्त्र–न. भाषेच्या वाढीचा अभ्यास व त्याच्यावरून मानवजातीचा जो इतिहास याचा ज्या शास्त्रात विचार केलेला असतो असें शास्त्र. ०शैली–स्त्री. भाषाघाटणी; भाषेच्या अर्थ आणि ध्वनि या दोन अंगांची परस्पर अनुरक्ति. –प्रतिभासाधन. **भाषांतर**–न. एका भाषेंतील ग्रंथ, वाक्य इ०चा दुसऱ्या भाषेंत केलेला अर्थ; तर्जुमा. (क्रि० करणें). **भाषित**–न. भाषण; बोलणें; वचन; वाक्य. –वि. बोललेलें [सं.] **भाषी**–वि. (समासांत) बोलणारा. उदा० मितभाषी; मधुरभाषी; सत्यभाषी. [सं.] **भाष**–पु. भासपहा. **भाषांगराग**–पु. (संगीत) देशाच्या निरनिराळ्या भागांतील प्रचारावरून बनविलेला राग.

**भाष्ठाण**—स्त्री. भाजलेल्या किंवा जळालेल्या पदार्थास येणारी घाण. [भाजट+घाण]

**भाष्य**—न. १ सूत्रग्रंथावरील टीका, विवरण. २ (सामा.) टीका; व्याख्या; विवरण; स्पष्टीकरण. ३ वचन; शपथ. ' राया भाष्य करी सत्य। दे गा हें पुत्र अपत्य।' –कथा १.२.१०१. [सं.] ०कार–पु. १ भाष्य करणारा; शास्त्रीय ग्रंथांचें विशदीकरण करणारा. २ आद्य शंकराचार्य. ' भाष्यकारांतें वाट पुसतु।'

–ज्ञा १८.१७२२. ०दान–न. वचन; आश्वासन देणें. 'ऐसे दोघां मानलें मन। तयेस दीधलें भाष्यदान।' –कथा २.५.८२.

**भास**—पु निळया रंगाचा पक्षिविशेष [सं]

**भास**—पु. १ मनावर झालेला ठसा; समज; कल्पना. 'बाहेर कोणी आला असा मला भास झाला.' 'भास मला जाहला। पाहतां कपोला। इंदु तो नभींचा, सवि भूतलाला।' २ भ्रांति; शंका. नदी किंवा सरोवर यांचा भास होणें यास मृगजळ म्हणतात. ३ सादृश्य; सारखेपणा; एकरूपता. 'शरीरात ज्वराचा भास होतो–दिसतो.' ४ संभव. [सं.] **भासकता**–वि. प्रकाशकता. 'पाहे पा भास्य भासकता। आपुला ठाईं दावितां।' –अमृ १.५५. **भासणें**–अक्रि. १ भास होणें; वाटणें; दिसणें; प्रतीत होणें. 'परंतु मज भासलें म्हणुनि जोडितों मी करा।' –केका १८. २ वास्तविक किंवा संभवनीय वाटणें. **भासमान**–वि १ प्रकाशणारा; चकाकणारा. २ जाणवूं लागलेला; भासणारा **भास्य**–वि. प्रकाशला जाणारा 'पाहे पा भास्यभासकता।' –अमृ १ ५५.

**भास**—स्त्री. १ भाषा. 'पानकासस्त्र जपीनला। सुमरीलीं मंत्रभास।' –उषा ६१८ २ रीत; प्रथा, पद्धत; चाल. 'गजरेदार अंगरखे जाऊन पोकळ अंगरख्याची भास पडली.' –नि२८. ३ छाप; प्रभाव. 'जुनीं मतें यांची भास आतां बुडाली.' –नि५५

**भांस**—स्त्री (कों.) तांदूळ भरडले असतां आत्यांतून बाहेर पडतें तें कण्या, कोंडा इ०चें मिश्रण. **भांसकटणें, भांसकणें**–अक्रि. गहाळ होणें; भलतीकडे पडणें, टाकलें जाणें **भांसळ**–वि. ज्यांत भरडलेल्या भाताचे कण, कोंडा, तुरा इ० आहेत असें (कांडलेलें भात). [भेसळ] **भांसणणें**–अक्रि. करड, तांदूळ इ० भांसळ होणें. –उक्रि मिसळणें; मिश्रित करणें.

**भासट**—वि. भसभसीत; चिकण नव्हे अशी, भरड (माती). 'कौलेंविटांना माती भासट लागते' –बदलापूर ६६. [भस!]

**भासभूस**—स्त्री. फोल, भूस; सटरफटर वस्तु. (विरू.) फासफूस पहा. [भूस द्वि.]

**भासरा**—पु. (व.) नवऱ्याचा वडील भाऊ; दीर; भावा. [हिं. भासुर]

**भासुर**—वि. तेजस्वी. 'ज्याची भासुर भा प्रभाकरनिभा व्यापून लंघी नभा।' –आकं २ [सं.]

**भास्कर**—पु. सूर्य; रवि [सं.]

**भास्करी**—स्त्री. (विनोदानें) भाकरी (भास्कर शब्दाशीं आकार साम्य व अनुप्रास जोडून).

**भास्कळणें**—अक्रि. (कों.) गोंधळणें. [भासल?]

**भास्वत्**—पु. १ सूर्य. २ अग्नि. [सं.]

**भास्वर**—वि. तेजस्वी; प्रकाशणारा. [सं.]

**भाळ**—स्त्री. धोतर अंगावर घेण्याची एक तऱ्हा; खांद्यावर धोतर घेणें. (क्रि० घेणें, मारणें) 'गोविंदरावांनीं अंगावर धोतराची भाळ, घेतली'

**भाळ**—न. १ कपाळ; भाल पहा 'खेळे हा लाघवें सकळ। तयाच्या भाळ पायावरी।' –तुगा ६९७ २ नशीब; दैव. 'भोगावाचुनि न सरे जें असतें कर्म आपल्या भाळीं।' –मंत्ररामायण, उत्तरकांड ३६२ [सं. भाल] ०**पिटणें**–अत्यंत दु.ख झालें असतां कपाळ जमिनीवर आपटणें; फार दु.ख, शोक करणें. 'तें कळतां तच्छोकें रुद्र एकांतीं रडे पिटी भाळ।' –मोआदि ३ ३१. ०**फुटणें**–नशीब फुटणें; मोठी आपत्ति येणें, अभागी होणें. 'आपुलें फुटलें जरि भाळ।' –संग्रामगीतें १२५. **भाळीं लिहिणें**–कपाळीं असणें; नशिबांत असणें. 'सुखदु:ख घडे विधिनें लिहिलें पहिलेंच कीं असे भाळीं।' –मोकर्ण २.२८. सामाशब्द– ०**नेत्र**–पु. शंकर; शिव. ०**पत्र**–न दिव्य करण्यास राजी असणाऱ्याचें म्हणणें ज्या कागदावर लिहून आरोपीच्या कपाळावर बांधतात तो कागद [सं. भाल+पत्र] ०**लोचन**–वि १ शंकर. २ अयाळवळचण; ज्याची अयाळ दोन्ही कडे पडते असा (घोडा). –अश्वप १.९८.

**भाळणें**—उक्रि. भुलणें; मोहित, वश होणें; फिदा होणें; (विरू) भारणें पहा. 'काय मृगींही मृगजळा। भाळावें नाहीं।' –ज्ञा १८ ३८९. भारणें पहा.

**भाळणें**—उक्रि. (नंदभाषा.) विकणें.

**भाळवण(णी)पत्र–जबाब**—नपु. शिफारसपत्र, भलावण पहा.

**भाळा**—न. (राजा.) नाचणीचें गवत.

**भाळाभोळा**—वि. १ सरळ; साधा, निष्कपट; भोळा. 'भाळयाभोळया निजभक्तांसी। धर्म सांगसी भागवत।' २ भावडा, मूर्ख [भोळा द्वि.]

**भाळी**—स्त्री. (राजा) १ बांबूच्या कामटयाची चौकट (पदार्थ ठेवण्यासाठीं टांगलेली, मोडलेल्या अवयवाला बांधावयाची). २ देवाच्या मूर्तीवर छत्राप्रमाणें टांगलेली बांबूच्या कामटयांची चौकट.

**भाळी**—स्त्री. (कों) १ गवताचा भारा, गठ्ठा. २ भातेण इ०चा गठ्ठा, भारा.

**भिकट–ड, भिकूट**—वि. भितरा; भेकड; भीरु. [भिणें]

**भिक(कु)टणें**—सक्रि. झाडाच्या डहाळया, पानें ओरबडणें.

**भिकण**—न. (गो.) गऱ्यांतील बी.

**भिकणा**—उद्गा. (थट्टेनें) नकारार्थी उद्‌गार.

**भिकणी**—स्त्री. ढेंकूण बसण्यासाठीं लांकडी फळीस भोकें पाडून करतात तें साधन. ढेंकणी; ढेंकणास बसण्याची सच्छिद्र पट्टी.

**भिका**—भीक पहा. -वि. हलका; हिणकस. [भीक] **भिका वरख**-पु. भिकार वरख; बाईट कागदाचा अर्धा, सगळा बंद. भिकाबंद पहा. **भिकें, भिकेबंद**-नपु. भिकाबंद पहा. **भिकेसवता**-पु भिकारी. 'जगाचा जो नित्य दाता। तो आशेनें केला भिकेसवता।' -एभा ८.३१२. **भिका(खा)ळ**-स्त्री. (प्र.) भिक्षाळ; भिक्षावळ. 'मुंजीची भिकाळ'

**भिकाबंद**—पु. १ चिनी, पोर्तुगीज कागदाचा चतुर्थांश पूर्वी कचेऱ्यांत हे कागद वापरीत असत [भिकार+बंद]

**भिकार**—न. भिकाऱ्यांचा थवा, समुदाय, समुच्चयानें भिकारी लोक. -वि. दरिद्री, भिकारी; कंगाल; जीवनाच्या सामान्य सुखाविरहित (देश, गांव, खेडें); भिकारी; दरिद्री जसें–भिकारी-राज्य-जमीन-बाग-दौलत-पीक-हंगाम इ० [सं भिक्षु=मागणें] ०**काम**-न दरिद्री, भिकारी काम ०**खाना**-पु. १ भिकाऱ्यांची वस्तीची जागा २ भिकार घर, वसतिस्थान ३ (निंदेनें) भिकारी, दरिद्री मानलेलें घर. ०**खोड-चट-चाळा**-स्त्रीपु अशिष्ट, बिनसंभावित, भिकाऱ्यासारखी खोड, चाळा, चाल, रीत, ढंग, संबंध. ०**गंड**-न. भिकारी लोक ०**चेष्टा**-स्त्री. हलकट, क्षुद्र, घाणेरडें, गदळ, अयोग्य काम, कृत्य; निवळ रिकामा कारभार; बेफायदेशीर कृत्य. ०**चोट**-वि. १ (निंदार्थी) भिकारी; कृपण. २ दरिद्री; तुच्छ, पसंत नसलेला; (किंमत, बळकटी, पुष्कळता, इ०-कांत) कमी दर्जाचा; अपुरता (पदार्थ) ०**छंद**-पु बाईट नाद, संवय, खोड. ०**टोकार**-न. (व्यापक, सामा.) भिकारी लोक; भिकाऱ्यांचा व टोळभैरवांचा समुदाय [भिकार द्वि] ०**डा**-पु. (तिरस्कारदर्शक) भिकारी. ०**णें**-अक्रि. भिकारी, दरिद्री होणें ०**दासावर हुंडी**-स्त्री अत्यंत गरीब माणसाकडे केलेली पैशाची मागणी, विनंति. ०**पेठ**-स्त्री. मालाचा पुरवठा पूर्ण नसलेलें शहर. (समासात) भिकार-नगरी-पुरी-वस्ती इ० ०**बुद्धि**-स्त्री. भिकारी-बुद्धि; हलकी कल्पना, युक्ति, तोड, सल्ला, विचार. ०**भास**-स्त्री (गो) भिकार चेष्टा. ०**भोपळा**-वि. दुर्दैवी; कपाळकरंटा. ०**लक्षण**-न. हलकट व भिकारी लक्षण, चिन्ह; भिकार चाळा ०**लाड**-पु (भिकारी करण्यासारखे लाड) अतिशय कौतुक आणि लालन (प्रायः मुलाचें); मुलास बिघडविण्यासारखे लाड. ०**वाडा**-पु १ भिकाऱ्यांची राहण्याची जागा. २ भिकाऱ्यांचा समुदाय ३ भिकार दिसणारें घर, इमारत. ०**विकरी**-स्त्री. १ भिकार वस्तूंची विकरी. २ थोडकी विकरी: अतिशय लहान प्रमाणांतील किरकोळ विकरी. ०**सौदा**-पु. भिकार माल, वस्तु; कोणताहि बेफायदेशीर व्यापार, करार; भिकार खटलें, काम. ०**हट**-पु नीच, हलकट, अयोग्य खवखव, हाव, आग्रह. -**री-हाड**-न. १ (ल) भिकारी किंवा गरीब कुळी २ अत्यंत हीन असें जीवित; हाडाचें दारिद्र्य. हाडीमासीं खिळलेली दारिद्रता. **भिकारी**-पु १ भीक मागणारा मनुष्य. २ दरिद्री, कंगाल मनुष्य. ३ -वि. (निंदार्थी) कवडीमोल; तुच्छ; भिकारी (मनुष्य, स्थळ, वस्तु). ४ हिताची गोष्ट न ऐकणारा; लाभाविषयीं पराङ्मुख; तोटा, नाश करणाऱ्या कामाविषयीं तत्पर असा (मनुष्य इ०). म्ह० (व.) भिकाऱ्याला ओकाऱ्या=भिकाऱ्याला आवडता फार.

**भिकूण**—पु ढेंकूण.

**भिंग**—न. १ तावदान; सपाट कांच; आरसा. २ कांचेचा तुकडा. ३ अभ्रक. 'जैसा भिंगाचेनि घरें। दीपप्रकाशु नावरे।' -ज्ञा १४.३०८. ४ एक पांढरा समुद्रमासा. (वाप्र.) ०**देणें**-अभ्रकाचें पुट देणें. 'तरि तें मोतियासी भिंग देणें। तैसें होईल।' -ज्ञा १०.१४. **भिंगार-रा**-नपु कंदील; भिंगाचें घर; तावदान. 'का भिंगारी दीपु ठेविला। बाहेरि फाके।'-ज्ञा १३ १८२. [भिंग] **भिंगुलें**-न लहान आरसा, काच. 'भिंगाचें भिंगुळें।'

**भिंग(गो)री**—स्त्री. १ एक खेळणें; मध्यें आरी असणारें व कोकाटीप्रमाणें फिरविलें जाणारें वाटोळें तकट; भोंवरी. २ चाती. ३ भोंवरी नांवाची वेल व तिचें फळ. ४ एक किडा; भुंगा; भ्रमरी. भिंगोऱ्या म्हणती आमुचें घर।' -दा १.१०.३८. [ध्व.] (वाप्र.) (**पायास) भिंगरी असणें**-दिवसभर भटकण्याचा स्वभाव असणें. **भिंगरुट**-स्त्री. झिल्ली; मुरकूट; रातकिडा. **भिंगारणें**-सक्रि. झोंकणें; फेकणें; भिरकावणें, झुगारणें **भिंगारा**-पु. गिरीघोटी, गरगर फिरणे **भिंगारे, गाडे भिंगारे**-पुअव. १ ओवळया भोवळया. २ मोठी भिंगरी, कोयाळ. तिचें गुंगणें; टंकार. ३ एक खेळ **भिंगुरटी. भींगुरटी**-स्त्री भुंगा; भ्रमरी, भिंगोटी. 'भींगुरटी जेणें अर्थें। मियां गुरु केली येथें।' -भाए ४९९

**भिंगारी-रें**—वि (माण) सर्वांगावर पांढरे ठिपके असलेली (मेंढी, वासरूं) 'भिंगारें खेरें।' -ह १०.१९२.

**भिंगी**—स्त्री. (व.) पिंगट रंगाची जमीन.

**भिंगुळ. भिंगुळवाणें**—वि १ भयंकर; भयानक. 'तैसे अति भिंगुळवाणेंपण। वदनीं तुझिये।' -ज्ञा ११.३४६. २ उदासीन 'ओस जाल्या दिशा मज भिंगुळवाणें।' -तुगा १५५६. ३ विपरीत; विचित्र. 'जो जेयिचें गौरव नेणें। तयासि तें भिंगुळवाणें।' -ज्ञा १८ १६२६.

**भिंगोटा(टी), भोंगा**—पु. (व) भुंगा. [ध्व.]

**भिंगोल**—न चिकण मातीची, लुकणमातीची एक जात. ही तापवून हिजपासुन एक पांढरा रंग किंवा कपडे धुण्याचें द्रव्य काढतात.

**भिजक(ग)ट, भिजट, भिजका**—वि किंचित् भिजलेला (भिजण्यानें अपकार होईल तेव्हां योजतात). [भिजणें] **भिजण**-स्त्री. १ भिजत घातलेली डाळ, धान्य (भाजण्याकरितां, भरडून डाळ करण्याकरितां). २ उसळीसाठीं भिजत घातलेली असली डाळ,

धान्य. **भिजणूक**–स्त्री. भिजणें; ओलें होणें; भिजल्याची स्थिति. (क्रि० पडणें, होणें). **भिजणें**–अक्रि १ ओलें होणें; आर्द्र होणें. २ (ल.) ओलसर, दमट, सर्द, भरभराटीचें उत्कर्षाचें होणें (काम, स्थिति) ओला व कोरडा पहा. ३ लांच घेणें. [सं. अभिषेचनम् (सिच्=शिंपडणें); हिं. भीजना] (वाप्र.) (एखाद्याच्या घरीं) **हात भिजणें**–जेवण्याचा प्रसंग येणें. **भिजत कांबळें**–(कांबळें लोंकरीचें असल्यामुळें तें फार वेळ पाण्यांत ठेवल्याशिवाय भिजत नाहीं यावरून ल) (एखादें काम) लोंबत, अनिश्चित ठेवणें. (क्रि० घालणें, ठेवणें) **भिजत पडणें, भिजतकांबळें–घोंगडें पडणें**–(एखादें काम) लोंबत, अनिश्चित पडणें **भिज पाऊस**–पु. जमीन चांगली भिजवणारा पाऊस याचे उलट फटकऱ्याचा पाऊस **भिजवण**–न. १ भांड्यास चिकटलेलें अन्न, खरकटें इ० ओलें करून काढण्याकरितां भांड्यास लावलेली भिजलेली राख, माती २ भाकरी इ० कोरडा पदार्थ सुलभतेनें खाता येण्यासाठीं त्याबरोबर घेतात तें दूध, ताक इ० ३ ज्यांत दुसरा कोणताहि पदार्थ भिजविला जातो असा पदार्थ. [भिजविणें] **भिजवणी, भिजवणूक**–स्त्री. १ भिजविणें; भिजत ठेवणें २ भिजविलेपणा; आर्द्रपणा. **भिजवणी करणें**–सक्रि (कु.) नांगरण्यासाठीं जमीन भिजविणें. **भिजवाण**–स्त्री (कु.) जमीन भिजवून भात पेरणें. **भिजविणें**–सक्रि. १ ओलें करणें. २ (ल) एखाद्याचा हात ओला करणें; लांच देणें. [भिजणें] **हात भिजविणें**–सक्रि (ल.) लांच देणें. **भिजाणा**–पु. भिजलेला दाणा, पाण्यांत घालून फुगविलेला हरभरा इ०. (अनेकवचनी योजतात.) [भिजणें+दाणा] **भिज्वण**–स्त्री (गो.) तांदुळाशिवाय स्वैपाकास लागणारें सामान; शिधा.

**भिजूड**—वि. (गो.) भित्रा [भिणें]

**भिटीभिटी**—क्रिवि. कावराबावरा होऊन, रिकामपणें (क्रि० पाहणें).

**भि(भि)ड**—न टोळी; जमात, झुंड, थाटी [सं पिंड, म बिंड]

**भिडंग, भिडंगभिकार–री**—भडंग, भडंगभिकार पहा.

**भिडण**—न अर्धे कवाड; अर्धे ओझें (लांकडाचें, कडब्याचें).

**भिडणें**—अक्रि. १ लगत्यांत, जवळ येणें; जवळ असणें (मनुष्य, गोष्ट, काळ) २ चिकटणें; गच्च धरणें; बिलगणें; भेटणें. ३ पोहोचणें; जाणें. ‘पूर्वी ठरलेल्या मुक्कामाच्या जागीं अगाऊ भिडतात.’ –गुजा ३६. ४ कुस्ती करणें; झुंजणें. ‘या वेगळा आन वीर। मजसीं भिडों शकेना।’ –मुआदि ४१.१४४ ५ युद्ध करणें ‘वत्सा! किति नित्य पुससि? हूं भीड।’ –मोभीष्म ५.५९. [देप्रा. भिड] **भिडणें, भिडविणें**–उक्रि. १ लगत्यांत, जवळ आणणें; एकाजवळ एक मांडणें (तुलनेकरितां); एके ठिकाणीं जोडणें; ठेवणें. २ अंगावर चालून येणें; तोंड देणें; झगडणें; लढणें. ‘अर्जुन बृहन्नडा मी, भिडला ज्या चापपाणि सह देव।’ –मोविराट ७.७. ‘बळें नाटोपे कवणासी। तो भिडवी बल्लवासी।’ –मुविराट २ ४० ४ झोंबी लावणें; झगण्यास लावणें. ५ वेढणें; बांधणें; लपेटणें; झटकन लावणें (तरवार, ढाल, पट्टा, बंदूक, कटयार, जीन, खोगीर, काच्या, पडदळें, पोषाख इ०); लपेटणें; बांधणें (कांच्यानें, खोगिरानें, हत्येरानें, सरंजामानें–कमर, गाडी, घोडा फौज, माणूस इ०) ६ खुपसणें [देप्रा. भिडण] (**कागद**) **भिडणें, भिडविणें**–एक पत्र, कागद दुसऱ्यांत रेटणें, दपटणें ‘तुम्ही आपल्या लाखोट्यांत एवढा माझा कागद भिडून पाठवा.’ **भिडती–तू–त्या, भिडू**–पु मुलाच्या खेळांतील एक शब्द, खेळांतील जोडीदार. एका बाजूचा म्होरक्या ‘रामकृष्ण जाहले भिडती।’ –ह १४ १९४ **भिडन**–न. १ जनावराच्या पाठीवर लादलेल्या (लांकूड, कडबा इ०) ओझ्याचें अर्ध, एक बाजू. २ जेरबंद घट्ट ओढता यावा म्हणून त्याखालील पोकळींत भरण्याकरितां खोगिरावर, मुठीवर ठेवलेल्या कापडाच्या, अथवा कसल्या तरी घड्या. **भिडाऊ**–वि भिडणारा. ‘गेला तो मांड भिडाऊ’–संग्रामगीतें १०५ **भिडावून**–क्रिवि मिळवून. ‘मुसलमानांशीं छाती भिडावून लढण्याचें सामर्थ्य शिवाजीनें लोकांत आणिलें’ –नि २९९. **भिडिनणें**–अक्रि भिडणें; युद्ध करणें. ‘परशुरामेंसी रणांगणीं। भीष्म भिडिनला निर्वाणबाणीं।’ –एभा ९ ३९६.

**भिडसणें, भिडसुडणें, भिर(बिर)सुडणें**—सक्रि धसफसां, अपकारक रीतीनें छाटणें (फांद्या, पानें).

**भिडा**—स्त्री. इच्छा [सं अभिध्या]

**भिडां**—न. (चि.) दगडी काहील; आंबोळी, घावन वगैरे करण्याचें दगडी रुंदट पात्र

**भिडी**—स्त्री गोफण **भिंडीपा(मा)ल**–पु. गोफण–गुंडा. **भिंडिमाळा–पाळा**–स्त्रीअव (काव्य) एक शस्त्र ‘सडका पाश भिंडिमाळा थोर। घेऊन पुढें धावती।’ –ह २२ ३१ ‘करीं कोयतें कातिया भिंडिपाळा।’ –मुरामायण सुंदरकांड ५१ [सं]

**भिडू**—पु १ खेळणारा जोडीदार; गडी; एका पक्षाचा मनुष्य, एखाद्याच्या वतीनें खेळणारा माणूस. २ साहाय्यकर्ता. **०वांटून घेणें**–खेळांतील मुलांपैकीं दोघेजण एके ठिकाणीं बसतात व बाकीचीं मुलें दोघादोघांची जोडी करून बसलेल्या मुलांपासुन लांब जाऊन प्रत्येकजण आपणास कोणतें तरी नांव (चंद्र, सूर्य इ०) ठेवितो. याप्रमाणें सर्व जोड्यांतील मुलांनीं केल्यावर जोडींतील मुलें त्या बसलेल्या मुलाजवळ येतात व बसलेलीं मुलें त्यांनीं ठेवलेल्या नांववरून त्यांची मागणी करतात. याप्रमाणें आळीपाळीनें भिडू वांटून घेणें.

**भिडें**—न. १ ( राजा. कुण ) ( बांधकाम ) दोन दगडांच्या फटींत घट्ट बसवावयाचा तुकडा. २ मोठा जमाव. –मसाप २ ३६४. **भिडीं बांधणें**–क्रि (कु.) चिरे, दगड एकमेकांवर ठेवून चुना लावणें.

**भिंडेल**—न. ( कों ) कोकंबाच्या बियाचें तेल; कोकंबेल; भिरंडेल

**भिडोळी**—स्त्री ( बे ) भेग; चीर

**भिंडोळी**—स्त्री. ( गो ) जारकर्म करणारी स्त्री.

**भिणभिण, भिणभिणणें, भिणभिणवणें, भिणभिणाट, भिणभिणीत, भिणाण, भिणाणणें**— भणभण इ० पहा

**भिणभिणांक**—क्रिवि (कु )सकाळच्या संधिप्रकाशाच्या वेळीं

**भिणें**—सक्रि १ शंकणें; दहशत बाळगणें. ' पापाला भिऊन वागावें ' २ –अक्रि. भययुक्त होणें, भय पावणें. [ सं भय; प्रा बीहइ; ( बिहाला असें रूप ज्ञानेश्वरींत येतें ) फ्रें जि. बीएल ] म्ह० भित्यापाठीं ब्रह्मराक्षस=भिणारा माणूस आपणांवर विघ्नें ओढून घेतो. **भिणेंभिणें**–क्रिवि भीतीनें व धास्तीनें.

**भिं(भिं)त**—स्त्री १ दिवाल, भित्ति; मातीची किंवा दगड विटा वगैरेची उभी रचना २ नेत्रांस अंधत्व आणणारा विकार. [ सं भित्ति ] सामाशब्द– **भितखंड**–न ( ना ) भिताड **भितखांब, भिताडखांब**–पु भिंतींत बसविलेला खांब **भितड–डी**–स्त्री. ( कु. ) वळचण; घराच्या भिंतीच्या बाजूला काढलेली पडवी **भिंतनागोरी पाणी**–स्त्री. भिंतीजवळ नागोरीनें ( चेंडूनें ) खेळणें; दोन गड्यांनीं एक काठी व दोन चेंडू घेऊन भिंतीस लागून असलेल्या मोकळ्या जागीं खेळण्याचा एक खेळ. –मखेपु ५१ ०**फोड्या**–वि घरफोड्या **भितबड**–स्त्री. ( गों. ) भिंतीचा आधार ०**सरी**–स्त्री (कु ) भिंतीवरील लाकडाची पट्टी **भिंताड**–न. १ घराच्या भिंतीशिवाय दुसरी कोणतीहि भिंत, अनाच्छादित भिंत ( बाग, किल्ला, पडकें घर याची ), लहान भिंत २ (सामा.) भिंत ( तिरस्कारार्थी ). **भिंतीवरचें लिहिणें**–न काहीं प्रसंगीं स्त्रियांनीं भिंतीवर काढलेलीं गोपुरें, आकृति **भिंतीची चिमणी**–स्त्री भिंतीस लावण्याचा दिवा. **भितोडी, भिंती**–स्त्री. ( गो ) घरासभोंवारची, भिंतीला लागून असलेली जमिनीची पट्टी.

**भि(भीं)तर–रीं**—क्रिवि आंत, आंतल्या बाजूस ( गो ) भितूर. [ सं अभ्यंतर; दप्रा भित्तर: हिं. ] **भितरसवाई**–स्त्री. नफ्याची अपेक्षा असता आलेलें नुकसान. [ भितर+सवाई ] **भितेल्लों**– वि. (गो.) आंतील.

**भितरणें**—अक्रि भिणें. [ भितरा, भिणें ] **भितरा–रा, भिता**–वि. भीरु; भयशील; भेकड; भिणारा. ' कोपें म्हणे सुयोधन भीतो भीमासि सुत हा भितरा। ' –मोसभा ४.११२. [ सं. भी=भिणें ]

**भिंत(ता)ळा**—पु ( कों ) जळणाकरितां फोडलेला लाकडाचा तुकडा; ओंडा, ढलपा. **भितें, भितळें**–न. कोलीत; जळतें लाकूड, काष्ठ ' उल्बण म्हणजे जळतें भितें। ' –स्वादि २.४६१. ' जळत भितळें घेवोनियां। ' –ह १४.१३२ [ सं भिद्; प्रा.भित्त ]

**भिदुर**—न. वज्र. ' ऐसें वदे वचन तें कविहृदयाशिच न कांपवी भिदुर। ' –मोसभा ३.५८. –वि. मोडणारें; ठिसूळ. [ सं. भिद् ]

**भिनणें, भिन(ना)रणें, भिंद्णें**—अक्रि १ शिरणें आणि व्यापणें, सर्वत्र मुरणें ( तेल, दूध, पाणी इ०-शोषक पदार्थांत ). २ ( अंगांत ) आंत शिरणें (औषधें, विषें इ०–त्यांच्या स्वशक्तीनें, गुणानें ) ३ ( ल ) मुरणें, ठसणें ( शिकवण, बोलणें, उपदेश ). [सं. भिद् ]

**भिन्न**—न ( ग. ) अपूर्णांक [ सं ] ०**संकलन–व्यकलन–गुणन–भाजन** न. अपूर्णांकाची बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार अपूर्णांकांशीं पूर्णांकांच्या बेरजेस इ० हि लावतात. ०**वर्ग–घन**–पु अपूर्णांकाचा वर्ग, घन. ०**वर्गमूळ–घनमूळ**–न. अपूर्णांकाचें वर्गमूळ, घनमूळ ०**वर्गपरिकर्म**–न. अपूर्णांकाचें वर्गमूल काढणें. ०**परिकर्माष्टक**–न अपूर्णांकाच्या गणिताचे आठ मूळ नियम.

**भिन्न**—वि. १ भागलेला; विभागलेला; वेगळा केलेला २ निराळा; जुदा; वेगळा. ३ मोडलेला; फोडलेला; फुटलेला. ' नाते अखंडचि आयती। परि संगें भिन्न गमली होती। ' –ज्ञा ५४४. [ सं भिद् ] म्ह० भिन्न रुचिर्हि लोक =भिन्न भिन्न लोकांच्या आवडी भिन्न भिन्न असतात ०**अंधकार–काळोख**–पु गाढ अंधार. ०**खुर**–पु घोड्याच्या पायाचा रोग –अश्वप २.३८ ०**ता**–स्त्री भेदभाव ०**दुपार**–स्त्री. ऐन दोन प्रहरची वेळ; टळटळीत दुपार ०**पात्र**–न १ जेवणाचें पान आणि द्रोण हीं दोन निरनिराळ्या पानांचीं असण्याची स्थिति; असा निर्बंध एक पात्राच्या उलट २ निराळें पात्र. ०**भाव**–पु. १ द्वित्व; भेद ( मताचा, आत्म्याचा ) २ मी तूं पणाची भिन्नता; दुजा भाव. [ सं. ] **भिन्नोदर**–वि भिन्न गर्भाचा; वेगळ्या आईच्या पोटीं जन्मलेला. एकोदर, सहोदर, याच्या उलट [ सं भिन्न+उदर ]

**भिन्नावणें**—सक्रि ( व ) मारणें; भडकावणें. ' ऐकेना तेव्हा एक दिली भिन्नावून. ' [ भिनणें ] **भिन्नावणें**–सक्रि. ( व. ) जोरानें लगावणें, भडकावणें ( चापट ) **भिन्नावणें**–अक्रि ( व. ) रागास चढणें

**भिंबिरटें, भिंभिरकटें, भिभिरडें**—न. ( कों ) पहांटेचा अंधुक प्रकाश; चावपड, उजाडतां वेळचें झुंजुकमुंजुक.

**भिंबा**—पु. ( बे. ) नागरमोथा.

**भिभि(भी)स्त**—वि. भीरु; भेकड, भित्रा. [ सं. भीत ]

**भिमथडी-थड, भीमातीर**—स्त्री. भीमानदीच्या बाजूनें असणारी थड; भीमेच्या कांठचा प्रदेश. **भिमथडी**-वि भीमेच्या कांठचा. [ भीमा ] **भिमावळ**-पु. ( गयाशहरात राहणाऱ्या गयावळाप्रमाणें ) भीमेच्या तीरावर राहणारा पंड्या, क्षेत्रोपाध्याय

**भियोंवचें**—अक्रि (गो ) भिणें. **भियौनगुळी**-स्त्री (गो.) भीतीनें गाळण उडणें.

**भिरकं(कां)डा**—पु. १ गिरकाडा, फेक ( दगड, वारा, पाणी यांची ); चक्कर; गिरकी, भोवडा ( मुलांनीं अंगाभोंवतीं घेतलेला ). ( क्रि० देणें; खाणें ). २ तिरमिरी, भिरभिरी ( राग इ० विकारांनीं आलेली ). ( क्रि० येणें ) ३ निष्फळ येरझार; फेरा; गरका. ( क्रि० मारणें; देणें, पाडणें, घेणें; खाणें; पडणें ). ४ लहानशी फेरी, थोडें फिरून येणें ' तूं एथेंच बैस मी भिरकंडा मारून येतों ' ५ ( ल ) घोंटाळा; अडचण; फेरा. ६ झोंक; झोकांडी. (क्रि० जाणें ) ७ चिंधडी, धाधोटी ८ (विरू. भिरकांडा) फरकंड; फरपट ( फरफटविलेलें कांटेरी झुडुप, मृत पशु, जड लाकूड, साप यांची) (ओरबडल्यामुळें उठलेला ) अंगावरील ओरखडा; बिरखडा, भरकटा. [ ध्व. भिर ! ] **भिरकंड्यात पडणें**-घोंटाळणें; गोंधळणें. **भिरकंड्या उडविणें**-( ल ) गोंधळवणें; कुंठित करणें; निरुत्तर करणें; कोटिक्रमानें निंदेनें जेर करणें. **भिरकं(कां)डी**-स्त्री. १ भेलकंडा; भेलकंडी; झोक; झोकांडी. ( क्रि० जाणें ). २ निष्कारण, निष्फळ, इकडेतिकडे हिंडणें. ( क्रि० मारणें; खाणें ). ३ भ्रमण ( भोवरा, धंद्यातील कोल्हांट्या याचें). ( क्रि० घेणें; मारणें ). ४ रागाचा झटका; भिरभिरी; तिरमिरी **भिरकणें**-सक्रि प्राय. भिरकावणें. **भिरका**-पु भिरवडा ( दगड इ०चा ); भिरका व भराका पहा. या शब्दाशीं भिरका शब्द समानार्थक आहे; तथापि याचा प्रचार कमी आहे. **भिरकांडणें**-सक्रि. १ भोंवडणें, भिरकावणें; गोफणीनें फेकणें ( दगड इ० ). २ ( ल. ) जोरानें हाकणें (गाडी इ०). **भिरकांडा-डी**-भिरकंडा व भिरकंडी पहा. **भिरकांडें**-न. १ तिरमिरी; भिरभिरी; रागाच्या झटक्यानें आलेली चक्कर; डोळे फिरणें. २ गोंधळ; कामाचा गरगरा, घायकूत. ३ तगादेदारांची निकड आणि कटकट. **भिरकावि(व)णें**-सक्रि. १ गोफणीनें भोंवडणें आणि झोकणें. २ झुगारणें; फेकणें; झोकणें; भिरकाडणें. ' मग प्रेत त्याचें भोवडून । रागें दिधलें भिरकावून । ' ३ तिरस्कारानें, बेपर्वाईनें देणें; एखाद्याकडे झोकणें, फेकणें, टाकणें. **भिरकुटी**-स्त्री. भरकटा; लिहिण्यांतील लपेटी. ( क्रि० काढणें; ओढणें ). **भिरकें**-न. १ एक किंवा दोन माणसें बसण्याजोगी बैलांची, घोड्यांची गाडी. हिला साटी नसते; आंसावर दोन-एक फळया टाकतात व घोड्यावर बसतात त्याप्रमाणें बसतात. २ झीट; चक्कर; तिरमिरी; भिरभिरी. ३ भूतबाधा. **भिरगोरें**-न. १ भिरभिरें. २ गिरकी खाणें. ३ ( ल. ) गाजणूक; ओढाताण ( तगादेदार, मूल इ० कडून ); ( क्रि० लावणें, मांडणें, देणें, आणणें ) तोडतोडून खाण्याची, घोटाळ्यांत पडल्याची स्थिति. ( क्रि०होणें ) **भिर(रं)ड**-स्त्री. तिरमिरी, रागाचा आवेश ( क्रि० येणें ). **भिरडी**-स्त्री. १तिरिमिरी. २खरडपट्टी; निर्भर्त्सना ( क्रि० काढणें, उडविणें, करणें ).

**भिरकुडें-कूट-कुंड**—न बोंडांतील गाभा, गीर; भेंड.

**भिरड, भिरूड, भिरोड, भेरूड**—पु १ शेवगा, आंबा इ० वृक्षास कीड लागून होणारा रोग. 'येथें अंब्याना भेरूड झाला आहे. ' –राको २ ( व. )लाकूड कोरणारा एक किडा –न. (ना.) कीड लागून लाकडाचा भुगा पडतो तो **भिरडणें**-अक्रि आंबा इ० वृक्षास भिरड (किडीचा रोग) लागणें. **भिरडभुंगा**-पु कीड, वाळवी. ' बा आतुन लागला काळ भिरड भुंगा । ' –र.ला ९०.

**भिरड, भिरडणें**—भेरूड व भेरुडणें पहा

**भिरंड**—स्त्रीन ( कों ) रातंबीचें, कोकंबाचें झाड व त्याचें फळ. **भिरंडल, भिंडल**-न. ( गो. ) रातंबीच्या बियाचें तेल; सुकें कोकंबतेल; रातांबेल. **भिरंडी**-स्त्री रातंबीचें, भिरंडीचें बीं. **भिरण**-स्त्री. ( कु. ) कोकंबाचें झाड.

**भिरभि(र्भा)र-रां**—क्रिवि. १ भिरभिऱ्यानीं, भोंवऱ्यानीं इ० केलेल्या भिर ! भिर ! आवाजाचें अनुकरण होऊन. २ झपाट्यानें, तडाख्यानें, जलदीनें, अचानक. ३ भिर् आवाजानें. ( क्रि० टाकणें, फेकणें, झुगारणें, मारणें, गोफणीनें–धोंडे इ० ). ०**पाहणें**-सक्रि. कावरेबावरेपणानें इकडेतिकडे पाहणें ०**बोलणें**-घाईनें, जलदीनें बोलणें. ०**हिंडणें-फिरणें**-रिकामपणें इकडेतिकडे हिंडणें **भिरभिरणें**-अक्रि. १ झणझणणें; सणसणणें; भणभणणें; थरथर कांपणें ( कान, हात इ०–तडाखा बसल्यामुळें ). २ झणझणणें, सणसणणें; घणघणणें ३ शैत्यादि विकारामुळें शरीरास मुंग्या आल्यासारखें वाटणें. ४ तिरमिरी येणें **भिरभिराविणें**-सक्रि. भिर् असा आवाज होईल अशा रीतीनें भिरकून झुगारणें, फेकणें. **भिरभिरी**-स्त्री १ तीक्ष्ण वेदना; सणसण; तिडीक; अंगास मुंग्या आल्यासारखें वाटणें २ रागाचा उबाळा; घेरी, चक्कर याचा झटका. (क्रि० येणें). [भिर] **भिरभिरें**-न वाऱ्यानें मंडलाकार भिरभिर फिरणारें, कागद इ० काचें मुलाचें खेळणें. **भिरेरेवडी**-स्त्री फजीती; दुर्यो, विटंबना; उपहास; उपहासित स्थिति. ( क्रि० करणें, उडवणें ) **भिरंवडेकऱ्याचें पुस्तक**-न. अतिशय अव्यवस्थेनें पडलेल्या कागदांस आणि पुस्तकांस निंदेनें म्हणतात **भिराका**-पु. धाव; सपाटा; झपाटा; झटका; दम, ताण इ०. भराका अर्थ ३ पहा. **भिराडी**-स्त्री. रागाचा उबाळा. ( क्रि० येणें ). **भिरिंगी**-स्त्री. १ रागाची लहर. २ घेरी. ( क्रि० येणें ) **भिरिरि**-क्रिवि. भिर ! अशा आवाजानें. ( क्रि० फेकणें, मारणें–गोफणींतून दगड ). **भिरे**-न १ टोळधाड. २

(कों गो कु. ) पक्ष्यांचा, माशांचा समुदाय, थवा. **भिभिर**-वि. ( गो ) वळण नसलेलें ( अक्षर ). **भिमुट**-स्त्री. १ ( गो ) एक फुलपाखरूं २ ( गो ) दांडू मारण्याचा एक प्रकार.

**भिर्मोळी**—स्त्री. (कु ) एका वेलीचें नांव; हिचीं मुळें खातात

**भिरसुडणें**—सक्रि. ओरबडणें ( पानें इ० ). भिडसुडणें पहा.

**भिलेमाड, भिल्ल, भिल्लमाड**—पु. (गो.) माडाची एक जात.

**भिलकवडें**—न. एक पक्षी. हा ज्या पशूच्या पाठीवरून उडतो त्याची पाठ मोडते अशी समजूत आहे.

**भिलभिलचें**—अक्रि. ( गो. ) दृष्टि नजर, थरथरणें.

**भिलवडा**—पु भिल्ल शब्दाचें तिरस्कारदर्शक रूप.

**भिलागर**—न. ( कों. ) ख्रिस्ती चर्च.

**भिलाण, भिलांव-वें**—( प्र ) भिल्लाण, भिल्लांव-वें पहा.

**भिला(ल्ला)वा**—पु.न. १ बिब्याचें झाड. २ त्याचें फळ [सं. भल्लातक, प्रा. भल्लाय] **०घालणें**-(ल.) अडचण, आक्षेप काढणें. **भिल्लकु**-पु. भिलावा, बिबा 'न मिळे तया तेणें भिल्लकु।' –गीता १.२३०८.

**भिल्ल**—पु डोंगर, जंगल, खिंड इ० स्थलीं राहणाऱ्या व शिकार, लूट करून निर्वाह करणाऱ्या लोकाची एक जात व त्या जातींतील एक व्यक्ति [ सं ] **भिल्लटा, भिल्ल(ल)टी-णी**-स्त्री. ( काव्य ) भिल्ल जातीची स्त्री, भिल्लीण. 'उमा होऊनि भिल्लटी।' –एभा १२.१४८. **भिल्लाची हट्टी**-स्त्री. भिल्लाचें वसतिस्थान. **भिल्लाण**-न भिल्ल इ० लुटारू लोकाची राहण्याची, वस्तीची जागा. **भिल्लांव-वें**-न ( व्यापक ) भिल्लांनीं केलेले खून, चोऱ्या, नासधूस इ०. ( क्रि० उठणें, सुटणें, माजणें, मातणें, होणें ). भिल्लाची जमात, झुंड, टोळी. ( क्रि० जमणें, मिळणें ).

**भिल्लावणें**—सक्रि. भिजविणें

**भिवई**—स्त्री. भ्रुकुटी; भोंवई; भुंवई. ( वाक्प्रचाराकरितां भंवई पहा ). [ सं. भ्रू+वर्तिका, भ्रुकुटी ] **भिवया मोडणें**-डोळे मोडणें, मारणें; कटाक्ष फेंकणें. 'भिवया मोडुनि दावितसे ही नृत्याच्या चातुर्या।' –कमं ४.२३.

**भिंवण**—पु. ( कों. ) सर्पविशेष.

**भिं(भि)वरथडी**—स्त्री. भिवरा, भीमा नदीच्या दोन्ही तीरांचा प्रदेश –वि भिंवरेच्या, भीमेच्या कांठावरील प्रदेशाचा; भीमथडी. 'अस्सल जरदी घोडी भिवरथडी वर बसली चादणी।' –पला ४.२१.

**भिवविणें**—सक्रि. १ भेवडावणें; भेदरावणें. २ धमकी देणें; दपटणें; खडसावणें. [ भिणें ]

**भिशी**—स्त्री. १ (गुज.) भिशी; खाणावळ; जेवण्याचा क्लब. २ संचय करण्याची पद्धत. ३ (कर.) विशिष्ट मुदतीची पेढी. 'आज पांच रुपये भिशींत ठेवले.' बिशी पहा. [ गु. बीशी ]

**भि(भीं)स**—मनुष्याच्या, मेंढीच्या अंगावरील केश. **भिंसटी**-स्त्री. ( राजा. ) अव्यवस्थितपणें लोंबणारी, लांब आणि गुंतागुंत झालेली केसांची बट; झिपरी. **भिं(भि)साळ**-वि. केसाळ.

**भिसणें**—अक्रि. विखुरणें. –मसाप २.२४०. [दे. प्रा. भिसण]

**भिसळ**—स्त्री. १ मिसळ; मिश्रण करणें. २ मिळविलेला, मिसळलेला पदार्थ. ३ मिश्रित पदार्थ. ४ मंडळी; जूट; कंपू. [सं. मिश्रय; प्रा मिसल ] **०णें**-उक्रि मिसळणें: मिश्रित करणें.

**भिसें**—न. कमळाचा देंठ, दांडा; कमळाचा तंतु. [ सं. बिस; प्रा. भिस; हिं. भिस; फा. भेह; सिं. बिहु ]

**भिस्त**—स्त्री. महत्त्वाचा असा एखाद्यावर टेवलेला विश्वास; अवलंबन; एखाद्यावरील मनाचा दृढभाव; आधार; आश्रय. (क्रि० देणें, टेवणें, धरणें, बाळगणें, असणें ). मदार अर्थ २ पहा. [ फा. बेहेश्त=स्वर्ग ]

**भिस्ती**—पु. मसक, पखाल यांनीं पाणी वाहणारा, मुसलमान जातीचा पाणक्या. फरक दाखविण्यासाठीं खांद्यावरून पखाल वाहणाऱ्यास मसकभिस्ती व बैलावरून पखाल वाहणाऱ्यास बैलभिस्ती म्हणतात. एकटा भिस्ती हा शब्द दोहोंबद्दल सामान्यपणें योजतात. [ फा. बेहश्ती=स्वर्गीय ]

**भिस्मिल्ला**—पु. १ (मुसलमानी शब्दांच्या व समजुतींच्या गैरसमाजामुळें हिंदूंनीं दंगलीची व गोंधळाची भिसळाभिसळ दाखविण्यासाठीं योजलेला शब्द ) खिचडी; पंचमेळ; एकंकार; गोंधळ. २ चबढब; बिघडल्याची स्थिति ( गोष्टी, कामें, मसलती इ० कांची ) ( क्रि० करणें ). [ अर. बिसमिल्लाह्=ईश्वरी प्रार्थनेचा आरंभ ]

**भिहूड**—वि. भयशील; भीरु; भितरा. [ भय; भिणें ]

**भिळभिळ-ळां**—क्रिवि. सौम्य अशा वाहणाऱ्या अश्रू इ०च्या शब्दाचें अनुकरण होऊन. [ ध्व. ]

**भिक्षा**—स्त्री १ भीक; धर्म; भिकाऱ्यांस दिलेला पैसा, अन्न इ०. ( क्रि० घालणें, देणें ). २ धर्मार्थ संन्याशीं, योगी इ० कांस दिलेलें भोजन. ३ (ल.) करुणापूर्ण शब्दांनीं केलेली मागणी, मागितलेली वस्तु. 'तूं कोण्हावर रागें भरूं नको एवढी मला भिक्षा दे.' [ सं. भिक्ष् ] **म्ह०** भिक्षापती कीं लक्षापती. **भिक्षणें**-सक्रि. ( काव्य ) भिक्षा मागणें; याचना करणें. **भिक्षागृह**-न अनाथगृह; कंगालखाना. 'या कोटीवरून आम्हांस भिक्षागृहाची आठवण होते.' –नि ५१०. [ सं. ] **भिक्षाटन-ण**-न. भिक्षा मागत फिरणें; भैक्ष्य, भैक्ष्यचर्या. [सं. भिक्षा+अटन ] **०भाग्य**-न. (राजा.) भिक्षेचें भाग्य; भिक्षा मागण्यानें पैसा मिळावा असलें नशीब. [सं.] **भिक्षार्थी**-वि भिक्षेची याचना करणारा; भिकारी. [ सं. ] **०हारी**-वि. भिक्षेवर निर्वाह करणारा. [ सं. भिक्षा+आहार ] **भिक्षाळ, भिक्षावळ**-स्त्री. १ मुंजींत बटूनें आईजवळ भिक्षा

मागणें आणि तिनें व इतर सुवासिनींनीं त्यास भिक्षा (लाडू, फळें, द्रव्य इ० ) घालणें २ अशा रीतीनें मागितलेली भिक्षा. ३ ही भिक्षा घालण्याचा समारंभ. **भिक्षित**–वि. भिक्षा मागून आणलेला; याचित. **भिक्षेकरी**–पु. भिकारी. **भिक्षेश्वरी**–स्त्री भीक. म्ह० भिक्षेश्वरी किंवा लक्षेश्वरी. [सं ] **भिक्षोपजीवी**–वि. भिक्षेवर उपजीविका करणारा. [ सं. भिक्षा+उपजीविन् ]

**भिक्षु**—पु. संन्यासी. ( विशे. ) बौद्ध संन्यासी [ सं ]

**भिक्षुक**—पु. १ याजन, प्रतिग्रह व अध्यापन हीं कर्मे करून निर्वाह करणारा ब्राह्मण. २ ( सामान्यतः ) भिकारी. [ सं. भिक्ष्= मागणें ] **भिक्षुकांची धाम**–स्त्री. उत्कंठित अशा भिक्षुक ब्राह्मणांचा, सामान्यतः याचकाचा थवा, समूह **भिक्षुकी**–स्त्री भिक्षुक ब्राह्मणाचें काम, धंदा; भिक्षुकपणा; भिक्षुकाची वृत्ति. (समासांत) भिक्षुकी–कावा–अक्षर–खर्च–बाणा–बेत. याच्या उलट गृहस्थी पहा.

**भी**—स्त्री. भीति; भय. 'तैं होय फार भी मातें।'–मोभीष्म ११.६७. [ सं. ]

**भीऊस**—न. ( कों. ) पाखरें इ० येऊं नयेत यासाठीं शेतांत ठेवलेलें बुजगावणें [ भी ]

**भीक**—स्त्री. १ भिक्षा; दानधर्म. २ अभाव; कमताई; उणीव; वैगुण्य. 'सर्व गोष्टीची भीक आहे.' [ सं. भिक्षा; प्रा. भिक्खा ] म्ह० १ भिकेची हुंडी शिवयास चढत नाहीं. २ भीक नको पण कुत्रा आवर. (वाप्र.) **भीक असून द(दा)रिद्र(द्र्य)कां**–भिक्षेकऱ्याचा धंदा पतकरल्यावर मग अडचण का सोसावी ? **०काढणें**–क्रि. अडचण सोसणें, दारिद्र्य अनुभविणें. **०घालणें**–क्रि. १ (ल.) वचकून असणें. 'तो माझ्यावर आपला अंमल चालवूं पाहतो, पण मी कोठें त्याला भीक घालायाला बसलों आहे !' ३ मोजणें; मानणें; जुमानणें. 'बायकांच्या धमकावणीला का तुम्ही भीक घालणार ?' २ मागीतलेली वस्तु देणें; एखाद्याची विनति मान्य करणें (हा प्रयोग नेहमीं नकारार्थी असतो). 'मीं त्याला परोपरीनें विनविलें, पण त्यानें माझ्या शब्दाला भीक घातली नाहीं.' **०न घालणें**–क्रि अतिशय तुच्छ लेखणें. **०लागणें**–क्रि. १ फार मागणी असणें; अतिशय चणचणीचा असणें. २ भिकेस मिळणें; कमताई असणें. **भिकेचा डोहळा**–पु दारिद्र्य आणणारी हलकट, नीच, भिकार खोड, कृत्य, इच्छा. ( क्रि० लागणें, आठवणें, होणें ) **भिकेचे डोहळे होणें**–क्रि. दारिद्र्यादि दुर्दशा येण्यापूर्वी तदनुरूप पूर्वीच्या संपन्न स्थितीस विरुद्ध अशा वासना होणें ( ज्या प्रकारची संतति व्हावयाची असते त्या प्रकारचे डोहाळे–वासना गर्भारपणीं बायकांना होतात यावरून ). **भिकेवर लक्ष्य ठेवणें**–भीक मागण्याचा प्रसंग येईल अशा रीतीनें वर्तन करणें. आळशी, उधळा इ० बनणें. **भिकेवर श्राद्ध**–न. १ भिक्षेवर केलेलें श्राद्ध; भिकार, चुटपुटीत श्राद्ध. २ ( ल ) दिलेल्या, उसन्या घेतलेल्या, तुटपुंज्या सामग्रीवर भिकारपणानें चालविलेला धंदा, काम (क्रि० करणें, होणें). सामाशब्द– **०दु:ख**–न. भीक मागण्याची दु:खकारक स्थिति. **०पायली**–स्त्री. गांवकऱ्यांकडून महारास दिलें जाणारें धान्य. **०वरी**–स्त्री. भिक्षा; धर्म. ( क्रि० मागणें ). [भीक द्वि] **भी(भि)क बाळी**–स्त्री पुरुषाचा उजव्या कानांत घालावयाचा मोत्याचा दागिना. पूर्वी ही भिक्षा मागून मिळविलेल्या सोन्याची अथवा त्या पैशाचें सोनें घेऊन त्याची करीत **०मागता–माग्या**–वि भिक्षा मागणारा; भिकारी. म्ह० भीक मागल्या दहा घरें **भिकणें**–न. १ भिक्षा मागून मिळालेली एखादी वस्तु, भिक्षा. ( क्रि० मागणें ). २ जोशी, भक्त, उपाध्याय इ० कांस दिलेलें बक्षीस, इनाम ३ धर्मादाय ४ धर्मादाय म्हणून सरकाराकडून घेण्यांत येणारा कर. ५ बलुतेंअलुतें; बलुतेदार इ०स धान्य देणें. ६ जकातीच्या उत्पन्नांतील पतकीस दिलेला हक्क ७ भिकारीपणा; दारिद्र्य. ( क्रि० लागणें ).

**भीज**—स्त्री १ मसाला घालून खमंग करण्याकरितां, भाजण्याकरिता उसळीकरितां, भिजविलेले हरभरे, वाटाणे इ०. २ असल्या दाण्याची उसळ. ३ भिजणें. [ भिजणें ]

**भीड**—न. सुताराचें एक हत्यार; साधे दाबून बसविण्याचें हत्यार. 'खोवणदाते एकमेकांत भिडेनें दाबून बसवावे.' –मॅरट ५९. [ भिडणें=जोडणें ] **भीडका**·पु. अस्त्रविशेष **भीड पिल पिल**–न. ( सुतारकाम ) दोन फळयात सुरसे बसवताना दाबून धरण्याचें साधन [ भिडणें ]

**भीड**—स्त्री १ (ल) विरलता; टंचाई (महागाई मुळें होणारी). 'आज बाजारांत नाण्याची फार भीड आहे.' २ दाटी; गर्दी; चेपाचेप. 'देवळात मनुष्याची फार भीड झाली आहे' [ भिडणें? ]

**भीड**—स्त्री १ आदर, मान; मुरवत; चाड; मान्यतेचा, आदराचा भाव. ( क्रि० धरणें, राखणें, ठेवणें, उडणें, जिकणें, सुटणें इ० ). 'दरबारांत तुमची भीड आहे म्हणून साहित्यपत्र द्यावें' ४ वशिला; वजन. 'गोपाळराव तुम्ही थोडी भीड खर्च करा म्हणजे नोकरी मिळेल.' ५ आग्रह. 'दादांची भीड पडली म्हणून जेवावयास गेलों.' ६ लाज. 'राक्षस न धरील आमुची भीड।' –मोभीष्म ५५९. ७ भीति. 'श्रवण तरि करा मज जें सुचलेसे तेचि भीड तोडुनी।' –मोसभा ५४७. [ सं. भीत? ] **०खरचणें**–क्रि. आपणाविषयीं दुसऱ्याच्या मनांत असलेल्या आदरबुद्धीच्या जोरावर त्याला कांहीं विनंति करणें; त्याच्याजवळ कांहीं तरी मागणें. 'ऐसें भावूनि मनांत। भीड खरचिली दिवाणांत।' **०घालणें, भिडेस घालणें**–क्रि. एखाद्याचा आपणाविषयीं जो आदर असतो त्याच्या बळावर त्याला विनंति, आग्रह करणें; आर्जव, स्तुति इ० उपायांनीं अनुकूलता मिळविणें. 'न वाळिन

भिडस मी जरिहि कार्यलोभी तिला।' -केका १०. ०घेणें-क्रि (राजा. शेती) खाचरा(खाजणा)स बांहेरून मातीची पुस्ती देणें. ही दिली असता पाणी झिरपत नाहीं. ०चेपणें-मरणें-क्रि अतिपरिचयाच्या योगानें भीति, दरारा नाहींसा होणें; घरच्याप्रमाणें वाटूं लागणें. ०चेपणें-क्रि. एखाद्याच्या मनांतील भीति, पूज्यता, आदर दाबणें, निगृहीत करणें ०धरणें-क्रि. मान देणें; मोजणें; आदरानें, मान्यतेनें वागविणें; लाजणें; भिऊन, वचकून असणें; मर्यादेचें अतिक्रमण न व्हावें म्हणून जपणें. ०न तुटणें-क्रि. मनात नसतांहि दुसऱ्याच्या आग्रहाला बळी पडणें. ०वागविणें-क्रि भीड धरणें. 'श्रुतिनिष्ठांचीहि भीड वागविली।' -भक्तमयूरकेका पृ. १४. भिडेला गुंतणें-क्रि भिणें; संकोच बाळगणें; कचरणें; आग्रहाला बळी पडणें; मन न मोडणें भिडेचा-वि. मान्य; आदरणीय. सामाशब्द- ०कर-करी-खोर-स्वर-सरू-सारू-शील-साळू-सूळ-वि १ आदरशील; पूज्यता बाळगणारा २ भिडस्त; लाजाळू; विनयशील. 'साधू होय भीडखोर।'-विपू ७ ८९. ०भाड-मर्यादा-मुरव(वे)त-भीक-स्त्री १ पूज्यता; मान; मान्यता २ संकोच; मुर्वत; पर्वा. (क्रि०धरणें, राखणें, करणें, ठेवणें, असणें). भीडस-वि. भिडस्त 'आपण चित्तांत फार भीडस ती।' -मोआदि १५५१ भिडस्त-स्थ, भिडिस्त, भिडा-वि. १ दुसऱ्याच्या मतास, मर्जीस मान देणारा. २ लाजाळू; सभाभीरु; सलज्ज. 'तेलणीशीं रुसला वेडा। रागें कोरडें खातो भिडा।' -तुगा ३२८४. भिडावणें-अक्रि. दरारा, मान यानें दडपला जाणें; परकाष्ठेची भीड पडणें.

**भीण**—स्त्री भीति पहा. 'मातेचिया खादीं बाळ नेणे भीण।' -तुगा ३६०९ [ भिणें ]

**भींत**—स्त्री. (प्र) भिंत; दिवार; दगडाविटांची अगर मातीची उभी रचना, पडदी [ सं. भित्ति ]

**भीतर**—पु. १ आतला भाग. 'तया एकैकाचे भीतरीं पाहिजे।' -ज्ञा ८.२३. २ अंत करण. 'येचि चिंते माझा करपला भीतर।' -तुगा १६८०. [ सं अभ्यंतर, प्रा. भित्तर, हिं. भीतर ] ०ला-वि. आतील 'भीतरलें कृपेचेनि बळें।' -ज्ञा १३.२७४. ०भीतरा-वि आंतआंतला. भीतरेंवीणु-क्रिवि. अंतःकरणांत आवड असल्यावाचून. 'आहोजी भीतरेविणु।' -ऋ ४४. भीतर-रा-री-रीं-क्रिवि आत; मध्यें.

**भीति**—स्त्री १ भय; दहशत. २ वचक; धास्ती. ३ संदेह; आशंका. [ सं. भी=भिणें ] ०भंग-पु. निर्भयता. 'ते खांब नमस्करूनि आघवे। देखे भीतिभंगा।' -ऋ ५७ [ सं ] भीत-वि भ्यालेला; घाबरलेला 'भव-शीत-भीतिभीत-स्वाताला दाविला बरा पंथा।' -मोस्फुट आर्या ( नवनीत पृ २५४ ).

**भीम**—पु १ पांच पांडवांपैकीं दुसरा. हा फार शक्तिमान व खादाड होता. २ (ल.) धिप्पाड शरिराचा व अघाशी मनुष्य. ३ मारुति; बलभीम. 'भयासुर तो भीम सिंधू उडाला।' -राक १.८. -वि भयंकर; भयानक; भयावह; भय उत्पन्न करणारा ( माणूस, गोष्ट ). 'तव राक्षस उठले तातडी। भीम कोल्हाळ करिती।' [ सं. ] ०तुंबा-पु. ( ना. ) एक गोंडी वाद्य हें एकतारी असून याच्या दांडीच्या मध्यावर खालच्या बाजूस लहान भोपळा बसविलेला असून दांडीच्या वरील बाजूस उंच तिकोनी ५। ६ पडदे असतात. ०पलासी-पु (संगीत) एक राग. यात षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत ऋषभ आणि धैवत वर्ज्य. जाति औडव-संपूर्ण. वादी मध्यम. सवादी षड्ज. गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर. ०पाक-पु भीमाचा पाक म्हणजे खाण्याचे तामसी पदार्थ याच्या उलट नळपाक (सात्त्विक पदार्थ) ०रात्र-त्रि-स्त्री माणसाच्या वयाच्या ७७व्या वर्षाच्या सातव्या महिन्याची सातवी रात्र. ०सेन-पु. भीम अर्थ १ व २ पहा. ०सेनी ऊद-पु एक तांबडसर जातीचा ऊद. ०सेनी एकादशी-स्त्री. ज्येष्ठ शुद्ध एकादशी. भीम दुसऱ्या कोणत्याहि एकादशी न करता हीच करीत असे. ०सेनी कापूर-पु. कापराची एक जात.

**भीमाशंकर**—पु. बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक (पुणें जिल्हा). बारा ज्योतिर्लिंगें पहा. [ सं. ]

**भीरकाहूर आणणें**—क्रि. ( माण. ) भिरभिरा आणणे; बेजार करणें; त्रास देणें. [ भिर+काहूर ]

**भीरु**—वि. १ भितरा; शंकायुक्त; भयशील. २ भीति वाटलेला, भ्यालेला. (समासात) पापभीरु, रणभीरु. [ सं. भी=भिणें ]

**भीरू**—स्त्री. ( भित्री ). स्त्री; बाई. [ सं. ]

**भील**—पु. भिल्ल पहा. [ सं. भिल्ल ]

**भीषण**—वि. भयंकर; भयानक; घोर. [ सं. ]

**भीष्म**—पु. १ शौर्य, शहाणपणा, ब्रह्मचर्य व सत्यप्रतिज्ञा यांविषयीं एक पुराणप्रसिद्ध क्षत्रिय भारती योद्धा. २ (ल.) शूर, बुद्धिमान, इंद्रियनिग्रही, सत्यप्रतिज्ञ असा मनुष्य. ३ ( संकेत ) ढेंकूण. (कारण भीष्माच्या नेत्रांनीं जसा हिरा भग्न होई त्याप्रमाणें या प्राण्याच्या रक्तानें हिरा भंगतो असें म्हणतात ). [ सं. ] सामाशब्द- ०तर्पण-न दिपवाळीमध्यें नरक चतुर्दशीस भीष्माप्रीत्यर्थ करावयाचें तर्पण. [ सं ] ०प्रतिज्ञा-स्त्री. १ भीष्मानें आमरण पाळलेली अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा. यावरून २ (ल) खात्रीचें वचन; कधीं न मोडणारा निश्चय ३ घोर, अचाट प्रतिज्ञा. भीष्माष्टमी-स्त्री. माघ शुद्ध अष्टमी; भीष्माच्या पुण्यतिथीचा दिवस. [ सं. भीष्म+अष्टमी ]

**भी-भींस**—स्त्री १ लांब आणि राठ केस, लोकर (कुत्रा, बकरा, मेंढरू इ०च्या अंगावरील); दाट केस; जटा. २ (निंदार्थी)

मनुष्याच्या डोक्यावरील, दाढीचे फाजील वाढलेले केस; झुलपें. भिस पहा **भीश-स**-वि. केसाळ. ' रिसें कर्कशें भीस भिंगोळ-वाणी । ' -राक ११८.

**भीस** —स्त्री. (राजा.) भिशी पहा.

**भुइला-लो**—पु. एका राक्षसाचें नांव बाणकोट ते दाभोळ बंदराच्या दरम्यान कांहीं गांवात दरसाल श्रावण वद्य त्रयोदशीला सायंकाळीं याची प्रतिमा करून पूजा, धूपार्ती इ० करतात.

**भुई-ई**—स्त्री.१ जलस्थलमय गोल; भूगोल २भूमि. ३ जमीन या शब्दाखालीं दिलेल्या सर्व अर्थात व वाक्प्रचारात जमिनीच्या ऐवजीं भुई शब्दहि योजतात ४ शरीराची उंची, चण; बांधा, ठेवण. ' त्या माणसाची भुई टेंगणी आहे. ' [ सं भूमि; सि. भुइं ] **म्ह०** पळत्या पायाला भुई थोडी. ( वाप्र. ) **०उकरणें**–क्रि. भुई ओर खडणें, निष्कारण पायाचीं बोटें भुईवर ओढीत राहणें ( दोषी, गुन्हा शाबीत झालेल्या किंवा लाजलेल्या इसमासंबंधानें म्हणतात ) **भुईचा लहान**-वि खुजट; टेंगू; लहान चणीचा **भुईचा सावरणें**-क्रि. (ल.) भयंकर दुखण्यांतून बरें होणें, पुन आपल्या पायावर उभें राहणें. **भुईच्या तुकड्यावर राहणें**–कोठें तरी राहणें. **भुईत जाणें**--क्रि. खुजट, खुरटें होणें (प्राणी, वनस्पति). **भुई फोडून जाणें**-क्रि. ( लज्जेनें ) भुईत गडप होण्यास, तोंड लपविण्यास तयार होणें, असणें. **०बडविणें**-क्रि. (ल) तुफान घेणें; खोटा ठपका, आरोप करणें. ' साप साप म्हणून भुई बडवूं नये.' **भुई बोंम देऊन उठणें**-एखाद्याच्या पापाविरुद्ध लोकांनीं मोठ्यानें ओरडणें; पाप प्रसिद्ध होणें, करणें. सामाशब्द- **०आवळी**–स्त्री. एक झाड. हिचीं पानें लाजाळू सारखीं बारीक; उंची वीत दोन विती असते. फळें हिरवीं व नाचणीएवढीं, रुचि आंबट व कडवट असते **०कंद-कांदा**-पु. एक वनस्पति, कंद. **०काला**-पु. जमीन सारवण्यासाठीं एकत्र केलेलें शेण व पाणी; सारवण. **०कोट**–पु. मैदानावरचा किल्ला. डोंगरी किल्ल्याच्या उलट **०कोह(हा-हो-व्हा)ळा-कोह(व्ह)ळें**-पुन. भुईकोहळीचा कंद भूईकोहळयांत साधा भुईकोहळा व दूधभुईकोहळा अशा दोन जाती आहेत. याचा पाक शक्तिवर्धक आहे. -वगु ४.११६. **०कोहळी-कोव्हाळी**–स्त्री भुई कोहळयाचा वेल. **०घर**-न भुईखालील खोली; तळघर. **भुईचणे, भोयचणे**-पु अव. (तंजा.) भुईमूग **०चांपा-फा**-पु. एक फूलझाड. याला पानें फुटण्यापूर्वी भुईंतूनच दांडा येऊन त्यास फुलें येतात. **०चार**–स्त्री. (राजा) गुरांना खावयास योग्य असें हिरवें गवत, ओला चारा इ० **०छत्री**–स्त्री. एक वनस्पति; अळंबें; कुत्र्याचें मूत. **०ठाकूर**-पु. (निंदार्थी) खुजा, ठेंगू, वामन मूर्ति मनुष्य इ० **०तरवड**-पु. एक औषधी झाड; सोनामुखी. **०देणें**–न. जमिनीचें भाडें. **०नळा**-पु. दारूनें भरलेला मातीचा नळा. हा भुईवर ठेवून पेटविला म्हणजे दारूच्या ठिणग्या कारंज्यासारख्या उडतात **०नेत**–न. एका औषधीचें नाव **०पारणें**–न.(पानाशिवाय, ताटाशिवाय) भुईवरच जेवण्याचें व्रत. **०पाळणा**–पु. भुईवरचा पाळणा. घोडेपाळण्याच्या उलट. **०फुगडी**–स्त्री. एक मुलींचा खेळ -मखेपु २१८. **०फोड**-न भुईछत्री पहा. **०बिब्बा**-पु (बे.) एक प्रकारची वनस्पति. बिब्बा उतल्यास हिचा रस लावल्यानें तो कमी होतो. **०भाग**-पु (सरकारनें) पैशाच्या रूपानें धारा घेण्याऐवजीं जमीनीच्या उत्पन्नाचा घेतलेला भाग. **०भाटलें**-न. (कों.) १ ज्यामध्यें वरकस अथवा निकृष्ट धान्याची लागवड करतात अशी जमीन; वरकस जमीन; डोंगराळ आणि सखल जमीन. ' आगर व शेत व भुईभाटलें व महाजनकी ह्याचें उत्पन्न. ' २ ( कांहीं खतपत्रामध्यें जमिनी याअर्थी हा शब्द योजतात ) सर्व प्रकारच्या व सर्व उपयोगाच्या जमिनी. **०भाडें**-न. दुसऱ्याच्या मालकीच्या जमिनीवर इमारत बांधली असतां मालकीहक्काबद्दल द्यावयाचें भाडें, भुईदेणें. **०माडा**-पु. (कों) आपोआप बीज पडून उगवलेला रोपा. **०मीठ**-न. डोकेंदुखी, दंश इ०वर लावण्यास करतात तो चिकणमाती, मीठ व पाणी याच्या मिश्रणाचा लेप **०मूग**-पु १ एक कंद. याच्या वेलाचे ताणे जमिनीवर पसरतात, वेलास आलेल्या फुटून त्या जमिनींत गेल्यावर तेथें त्याच्या शेंगा होतात. भुईमुगाचा खाण्याकडे व तेल काढण्याकडे उपयोग होतो २ वेलाची शेंग **०रिंगणें**–न. सामान्यत: रिंगणें; लहान मुलाचें चोखणें. **०शेंग**–स्त्री. भुईमुगाची शेंग. **०सपाटी**–स्त्री. भूपृष्ठ **०सर**–न. भुई; जमीन ( घराची ) -क्रिवि. भुईच्या पृष्ठभागावर; भूपृष्ठाला लागून. **०सरपट-टां**–क्रिवि. भुईस लागून, भुईबरोबर ( वृक्षाची खादी, घराचें पाखें इ० असणें ); सरपट्या बाजूनें पण पृष्ठभागापासून दूर ( बाण, गोळी इ०कांचें जाणें ). [ भुई+सरपटणें ] **०सरपटा**–पु जमीनीवर पसरणाऱ्या एका वेलीचें नांव. **०सांड**–क्रिवि. ( राजा. ) भुईपासून थोडें वर (ओझें उचलणें); जमीनसाड.

**भुक्**—वि. खाणारा: भोगणारा; उपयोग करणारा. ( समासांत ) वायु-सर्प-भुजंग-पृथ्वी-ऐश्वर्य-भुक्. [ सं. ]

**भुकटा-टी, भुकणी, भुकी**–पुस्त्री. पूड; चूर्ण केलेला पदार्थ.

**भु-भुंक(क्क)ड**—वि. १ क्षुधित आणि गरजू; बुभुक्षित; अतिशय दरिद्री; उघडा, नापीक; भुक्स्ति पहा. २ वाईट; भिकार; निरुपयोगी; नादान ( जिन्नस, पदार्थ इ० ). ३ रोड; वाळका; किडकिडीत. 'दीसतो तदपि भुंकड बा हो । ' -विगवि २२. [भूक]

**भुकान**-वि. ( व. ) भयाण; ओसाड. ' भुकान खेडें. '

**भुंकण**—न. कुत्रें. ' तो सप्तजन्म होऊनि भुंकण । ' -स्वादि २.४.५१. [ ध्व. ] **भुंकणें**-अक्रि. कुत्र्याचें भोंकणें, ओरडणें. [ ध्व. सं. बुक्कन; प्रा बुक्कइ; हिं. ]

**भुकं(कां)दा**—पु. ( सामा. ) बुकांडा; मुष्टिप्रहार. [ ध्व. ]

**भुका**—पु १ नागरमोथा, वाळा, कचोरा इ०कांचें सुवासिक चूर्ण; (विरू.) बुका. २ भुकटी; पूड.

**भुका**—पु. (कोळी.) (गुरांच्या) केसांचा झुपका.

**भुकार**—वि. कुंभाराचें फिरतें चाक. –हंको.

**भुक्त**—वि १ भोगिलेला; उपयोग केलेला. २ खाल्लेला; भक्षित. ३ ओलांडलेला; उल्लंघन केलेला (तारे, ग्रह इ०कांनीं आकाशाचा प्रदेश) [सं. भुज्] **भुक्ति-क्ती**–स्त्री १ भोजन. (क्रि० करणें) 'आम्हा सोडोनि केवी भुक्ति।' –गुच १६,९८. २ अन्न 'बुभुक्षा तया तैसी भुक्ति।' –यथादी १४८ ३ भोग; उपभोग, भोगवटा 'भुक्ति मुक्ति परमार्थ। जें जें वाञ्छिजे मनांत।' –गुच ३९ ४ भोगवटा –शर. **म्ह**० अगोदर भुक्ति मग भक्ति.

**भुगताभागता**—स्त्री भोक्तृत्व; भोगण्याची अवस्था [भुक्ति]

**भुगभुग**—पु (गो.) दाह; आग (मिरचीनें, भाजल्यानें होणारी) भगभग पहा. [भगभग]

**भुगराळा**—पु १ चुरलेला, भुगा केलेला, भरडलेला पदार्थ; पीठ २ चुरलेला कागद, सुरकतलेला कपडा इ०. चुरल्याची, सुरकतल्याची स्थिति. ३ तुकडेतुकडे झाल्याची, फुटल्याची स्थिति (गाडी, भांडें, जिन्नस इ०कांची). ४ (अतिशयोक्तीनें) मोडल्याची, सांधे उखळल्याची स्थिति (हिंदळणें, फार दपटणें, कुदळणें इ०नीं शरिराची) (क्रि० होणें) [भुगा, भगरा] **भुगागी-पुस्त्री**. १ चूर्ण, पूड. [सं. भुग्न; प्रा. भुग्ग] २ (गो) राख. **भुगाभागा**–वि चूर्ण; बारीक द्रव्य; चुरलेला पदार्थ [भुगा द्वि] **भुगाळ**–वि भुगभुशीत; भुगा झालेला

**भुंगा**—पु १ भ्रमर. २ भुंग्याच्या आकाराचा स्त्रियांचा डोक्यातील अलंकार ३ झेंगट; पीडा; भुणभुण. ४ भ्रमण ५ वांईप्रांतीं प्रसिद्ध असलेल्या एका आंब्याची जात याच्या फार गोडीमुळें फळांत बारीक पाखरें होतात व तीं फळ कापल्याबरोबर उडून जातात –कृषि ६७९ [सं भृंग] **भुंगीर**–न भुंग्यानें पाडलेलें बारीक भोक 'त्यात (सागवानी लाकडात) भेगा, भुंगीर, गाठी व इतर कोणत्याहि प्रकारचें व्यंग नसावें' –मॅरट ७

**भुज**—पु १ सगळा बाहु (खांद्यापासुन हाताच्या बोटांच्या टोकांपर्यंत) २ भूमितीच्या बहुकोणी आकृतीची एक बाजू. ३ काटकोनत्रिकोणात कर्ण आणि कोटि यांच्याशिवाय राहिलेली तिसरी बाजू ४ दोन किंवा चार काटकोनांची भरती; तीन काट कोनांची पुरवणी. ५ समवृत्ताच्या ध्रुवांतून जाणाऱ्या मंडलाच्या धनुष्याची ज्या; ग्रहाचें समवृत्तापासुन अंतर. ६ वळण; बांक. ७ राशिचक्रांत नव्वद अंश किंवा त्याहून कमी अंतर. ८ (सामा.) बाजू [सं] सामाशब्द– ०**ज्या**–स्त्री. धनूची ज्या (इं.) सार्दन [सं.] ०**दंड**–पु बरचा, अथवा सगळा बाहु. 'प्रचंड डावा भुजदंड भारी सव्यें करें थापटी कैटभारी।' –वामन कालियामर्दन ४६. ०**बंध**–पु. बाहुभूषण. [सं.] ०**प्रतिभुज**–पु. चतुष्कोणांच्या दोन समोरासमोरच्या बाजू. [सं.] ०**बल-ळ**–न. १ बाहूचें सामर्थ्य. २ शारीरिक बळ, शक्ति. युक्ति, कुशलता यांच्या उलट. 'भुजबळें ब्रह्मांड। उर्वीवरी झाडीत।' ०**भोंवरी**–स्त्री. घोड्याच्या खांद्यावरील केसाचा भोंवरा. –वि. खांद्यावर भोंवरा असलेला (घोडा); खोडिलखांद. ०**वट-वटा**–नपु. १ खांद्याचा सांधा. (क्रि० उखळणें, हिसकणें, दुखवणें) २ पाटणीच्या दोन कड्यांमध्यें बसवावयाची फळी. [भुज+वत्]

**भुंजक**—वि उपभोग घेणारा; खाणारा. [सं भुज्] **भुंजणें**–सक्रि १ भोगणें; अनुभव घेणें. 'जो सभाधिसुख भुंजे। अखंडित।' –ज्ञा २२८८. २ उपयोग करणें. 'पुढती भुंजावा भावें येणें।' –ज्ञा १७२८८. [सं. भुज्] **भुंजीत**–वि. भोगिलेला. 'भुंजीत जीवपणाचे भवे।' –अमृ २.२.

**भुजक्कड**—पु (व.) दांडगा, भव्य पुरुष; धिप्पाड माणूस 'दिसायला भुजक्कड मूर्ति'

**भुजंग**—पु १ सर्प; नाग; ज्याच्या डोक्यावर दहाच्या आकड्याचें चिन्ह असतें असा मोटा साप. २ बटीक, राख बाळगणारा मनुष्य; जार ३ योग्य, क्षम, समर्थ, हुषार मनुष्य. ४ तापट क्रूर माणूस. [सं.] ०**त्रस्तरेचित(करण)**–न. (नृत्य) पायाचें भुजंगत्रासित करून दोन्ही हात डाव्या बाजूस रेचित करणें. [सं.] ०**त्रासिक(करण)**–न. (नृत्य) उजवें पाऊल कुंचित करून दुसऱ्या पायाच्या मांडीशीं असें ठेवावें कीं, त्यामुळें पायांचा त्रिकोण व्हावा, नंतर मांडी, गुडघा व कटि बाजूस वळविणें. [सं.] ०**त्रासित(आकाशी)**–न. (नृत्य) पाय कुंचित करून वर उचलून दुसऱ्या पायाच्या मांडीच्या पाठीमागें ठेवणें. नंतर मांडीकडील बाजूस असें वळावें कीं कोंपर व गुडघा हींहि वळल्यासारखीं दिसतील. [सं.] ०**प्रयात**–न एक वृत्त याच्या चरणांत बारा अक्षरें असून य, य, य, य असे चार गण असतात उदा० 'कुणी दुष्ट अंगास लावील हात। तरी दाखवावा भुजंगप्रयात॥' [सं]

**भुजणें**—सक्रि. (कुण.) (सामान्यतः) भाजणें.

**भुंजचें**—अक्रि. (गो.) घाबरणें; घाबरून सैरावरा धांवणें. [बुजणें]

**भुज(जि)पत्र**—न. १ (प्र.) भूर्जपत्र; भूर्ज वृक्षाची अंतरसाल. २ (ल) पातळ, झिरझिरीत, जुना, जीर्ण कागद, वस्त्र इ० [सं. भूर्जपत्र]

**भुजरी**—स्त्री ओलसर काळ्या मातींत उगवलेले साळी, गहूं यांचे अंकुर **भुजऱ्या**–स्त्रीअव. (परदेशी) श्रावणी पौर्णिमेला ज्यास अंकुर फुटले आहेत असें टोपलें, पाटी इ०त लावलेलें शेत डोक्यावर घेऊन फिरावयाचा विधि.

**भुजली**—स्त्री. गुरख्यांचें एक विशेष प्रकारचें शस्त्र. [ भुज= हात ]

**भुजा**—स्त्री. १ (काव्य) सबंध हात; बाहु भुज पहा २ (नाट्य) देव, राक्षस यांचीं मोगें घेगाराच्या दंडावर बाधावयाच्या पौराणिक नाटकांतील भूषणांपैकीं एक. या भुजा मातीच्या बनवून त्यावर कागदाचे थर देऊन मग त्या सोनेरी वस्त्र नें मढवितात. [ सं ] **भुजांतर**-न (काव्य) दोन्ही बाहूंमधील भाग. छाती; वक्षःस्थल. 'शिरला भुजांतरीं शर वल्मीकामाजि नागनायकसा।'-मो. ०**दंड**-पु. (महानु) भुजदंड 'मग आळींगौनि भुजादंडीं। बैसविला तो।' -भाए ७५. [ सं. ] **भुजोटा**-पु भुजवटा, भुजसंधि पहा.

**भुंजाड**—वि भाजलेलें; भर्जित -हंको [ सं. भ्रस्ज् ]

**भुंजारी, भुजारी-रा**—पु भडभुंजा; धान्य भाजणारा

**भुंजाजणें**—उक्रि.. भाजणें.

**भुंजीजणें**-सक्रि १ भोगणें. 'तेथ सकळ दु खधामें। भुंजीजती जियें मृत्युजन्में।' -ज्ञा १८.१२७०. २ उत्पन्न करणें. [ सं. भुज् ]

**भुटा-ट्टा**—पु. मक्याचें कणीस. [ हिं. ] **भुटे(ट्टे)खाऊ**-वि (निंदार्थी) गरीब; मूर्ख; भितरा ( चाकर, शिपाई, कारभारी). **भुटे(ट्टे)चोर**-पु. १ क्षुद्र चोर; भामटा; उंचल्या. २ मालकाच्या जिवावर आपलें कार्य साधून घेणारा; गोडबोल्या, आर्जवी व खुशामत करून पोट भरणारा माणूस. ३ ज्यापासुन कांहीं उपयोग, फायदा नाहीं असा आश्रित; आयतोजी; फुकटखाऊ.

**भुटाटकी**—स्त्री. १ भुताटकी; भूतबाधा. २ भुलावणी अवघी भ्रांतीची भुटाटकी।' -दा १७.४ २९ [ भूत ]

**भुट्टा**—पु. (कुस्ती) आपल्या जोडीदाराच्या हाताचा पंजा आपल्या हाताच्या पंजानें दाबून पिरगळून जोडीदारास मारणें. [ भुट्टा ] **भुट्टयाची टांग**-स्त्री (कुस्ती) मक्याच्या कणसाला आपण ज्याप्रमाणें पिरगळतों, त्याप्रमाणें कुस्ती करणाऱ्याच्या हाताचा पंजा आपल्या मानेवर आपल्याच हाताच्या पंजानें दाबून धरून पिळगटून टांग मारणें

**भुडकी**—स्त्री. १ नदी, ओढा, यांच्या कांठाशीं खणलेली, न बांधलेली, खड्डेवजा लहान विहीर, खांच (विशेषतः जमिनीस पाणी देण्यासाठीं) [ भुंडा ? ] 'जें न नदी करिल करिल तें भुडकी?।' -मोशल्य ३.५९. **भुडकें**-न. १ भुडकी २ (व) नाल्यांत खणलेल्या झऱ्याचें पाणी काढून तें नाल्याच्या कांठीं असलेल्या शेतांत नेण्याचा पाट, कालवा.

**भुडत्या**—पु. (व) दाणगट मनुष्य.

**भुडभुड-भुडां**—क्रिवि बुडबुड, बुडबुडां पहा. [ ध्व. ] ०**गा**-स्त्री. घाईघाईनें, बुदबुदलें केलेलें स्नान. ( क्रि० करणें ). ०**गाडगा**-पु (व) कसा तरी घाईनें उरकून घेतलेला संस्कार. 'लग्नाचा भुडभुड गाडगा एका दिवसात उरकणें भाग पडलें.' ०**गाडगें**-न १ घाईनें केलेलें स्नान २ अत्यंत लहान प्रदेश, शेत, पीक, व्यापार, धंदा इ०

**भुडळी**—स्त्री (व) जमिनीला पडलेली भेग [ हिं भुड ]

**भुंडा**—वि १ उघडा; नागडा; बुच्चा; नेहमीचें भूषण इ० नसलेला. २ शिंगें मुरडलेली, मागें आणि खालीं फिरलेली आहेत असा (बैल, इ०) ३ शिंगें, शेंडी, अग्र नसलेला ४ फक्त, निवळ; नेहमीचा उरावा, आधिक्य नसलेला उदा० भुंडा-रुपया-शेर-पायली-मण, भुंडे-शंभर-हजार इ०. **भुंडी गाय**-स्त्री. १ बिन शिंगी, मुरडलेल्या-मागें फिरलेल्या शिंगाची गाय. २ (ल गरीब, शांत, लीन मनुष्य

**भुणें**—न (गो) बीं काढून घेतल्यानंतर पिकलेलें काजूचें बोंड, काजूचें फळ.

**भुणभुण**—स्त्री. त्रास, तगादा; टुरटुर [ ध्व ]

**भुतणें**—क्रि १ भुलणें. 'जियें मूर्तिमंतें भुररीं। भूतलेया॥' -माज्ञा १७.२९६. २ घेरणें, व्यापणें. 'जैं भ्रांतिसेजे सुतला। तैं स्वप्नसुखें भुतला।' -ज्ञा ५.४७. ३ होणें ४ अनुभवणें. [ सं. भू- भूत ]

**भुतारा-री, भुतेरा**—पुस्त्री. (कों.) खराटा; दांड्यापर्यंत झिजलेली माडाच्या हिराची केरसुणी, सामान्यतः चिपाडाची, करबडांची केलेली केरसुणी.

**भुतावळ, भुताळ**—भूत शब्दाखालीं पहा

**भुतावळ-वळें**—स्त्रीन दारूकामाचा एकदम पेट, आताषबाजी

**भुतावें**—न. बटन; गुंडी बुतांव अर्थ २ पहा

**भुती**—स्त्री (माण.) पडदानशीन स्त्रियांचें अंग झाकून घेण्याचें वस्त्र. [ बुंथी ]

**भुती**—स्त्री (गो.) शिदोरी, परगांवीं जाताना बरोबर न्यावयाचें पाथेय [ भुक्ति ]

**भुत-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि बुदकन; जोरानें आदळणाऱ्या मृदु पदार्थाच्या आवाजाचें अनुकरण होऊन. [ ध्व. ]

**भुत्तु(त्तू)र**—वि (बे) आतील. -क्रिवि आंत [ भीतर ]

**भुदगा**—पु १ करपलेलें अन्न २ अन्न शिजवितांना जळालेलें भांडें ३ भुसभुशीतपणा. भुगा; नाश पावलेली स्थिति. 'कसरीनें शालजोडीचा अगदीं भुदगा झाला ' [ भुगा ]

**भुनास**—पु हत्तीस बांधण्याचा खांब.

**भुपकार**—पु. १ वानरांची आरोळी, शब्द ( क्रि० देणें ). २ (ल) भुमका; वदंता. ( क्रि० उठणें, होणें, करणें ) [ ध्व. ]

**भुपाळी**—स्त्री. (प्र.) भूपाळी पहा.

**भुंबरट**—वि. (व.) हलकी; निकस (जमीन).

**भुबी**—स्त्री (कु) एका माशाचें नाव.

**भुभु:कार**—पु भुपकार पहा 'भुभु:कार नादें ते वेळीं। डळमळिला भूगोळ।' [ध्व.]

**भुभुसणें**—अक्रि. उदयास येणें. –हंको [सं. भू, भस्=प्रकाशणें?]

**भुभुक्षा**—स्त्री. भूक; क्षुधा. [सं. बुभुक्षा] **भुभुक्षित**–वि. भुकेलेला; क्षुधित [सं. बुभुक्षित]

**भुभू**—स्त्री. (कातोडी) भाकरी –बदलापूर १२८.

**भुमकणें**—अक्रि १ गाजणें २ गरजणें (तोफ, वाघ इ०). [ध्व.] **भुमका-की**–स्त्री. अफवा; लोकवार्ता; बातमी (क्रि० उठणें, उडणें, होणें, निघणें, चालणें). [ध्व. तुल० इं. बूम]

**भुमका**—स्त्री १ (राजा) संरक्षणदेवता; स्थानदेवता (गांव, जमीन, स्थल यांची) २ (गो.) भूमि [सं. भूमि] **भुमपुरुस**–पु (गो) घर, वाडा, गाव यांचा मूळपुरुष [भूमि+पुरुष] **भुमा, भूम्या**–वि १ स्थानिक. 'भुमे रजवाडे यास पत्रें प्रविष्ट केलीं' –भाव १४. २ एका जागेंत फार दिवस राहिलेला (माणूस), जुना (रहिवासी) ३ (ल.) (स्थल, धंदा, गोष्ट यांचा) चांगला माहितगार; मार्गदर्शक. ४ वाटाड्या

**भुमखान-खाना**—नपु. (राजा) टोळ, मुंग्या, चिलटें, भिकारी इ० नाशकारक, त्रासदायक प्राण्यांचा थवा, समुदाय

**भुमरट**—स्त्री (व. घाटी) पिवळट रंगाची, खडकाची माती होऊन बनलेली जमीन.

**भुय**—स्त्री भुई, भूमि अधिक अर्थ व सामासिक शब्द यांसाठीं भुई शब्द पहा [सं. भूमि] **भुंयखांड**–स्त्री. (गो) मोठें खंड **भु(भुं)यार, भुयेर**–न १ डोंगराळ प्रदेशांतील जमीनीखालचें विवर; गुहा; कपार २ तळघर; जमिनीखालील खोली ३ वारूळ. [सं भूमिगृह=भुईघर; हिं.] **भुयाळ**–पु. स्थानिक रहिवासी 'वाट चुकल्या भुयाळासी। फेरा पडे चालों जाणत्यासी।' –एभा ११.११६८. [सं. भू+आलु] **भुयी**–स्त्री. जमीन; भुई पहा.

**भुंयार-रां**—स्त्री. (गो.) खर्चीसारखी व रेतीच्या रंगाची एक माशाची जात.

**भुरकण**—न, १ (राजा.) वाघाची गर्जना. २ (ल) जोराची ओरड, गर्जना; डरकी; आरोळी. (क्रि० फोडणें). ३ आवरून धरलेल्या रडण्याचा वेग अकस्मात् बाहेर पडल्यानें होणारा मोठा शब्द [ध्व. भुर!] **भुरकणें**–अक्रि. गर्जना करणें (वाघ इ०नीं) -सक्रि भुरें असा आवाज करून पिणें; भुरका मारीत खाणें (कढी, खीर इ०पातळ पदार्थ). [ध्व] **भुरका-की**–पुस्त्री. १ भुरें असा आवाज करून पातळ पदार्थ (कढी इ०) मुखानें आंत ओढणें; ओरपणें; भुरकणें (क्रि०मारणें, घेणें) 'आले ढेंकर दिधल्या मिटक्या बहुसाल मारिले भुरके।' –मोउद्योग ७.७७. २ झुरका (हुका इ० काचा). (क्रि०मारणें, घेणें). **भुरकाटणें**–अक्रि (कु) आनंदानें चढून जाणें; हुरळणें. **भुरकाड**–न. १ हलकें जळण; भुरेंकन जळणारें द्रव्य (काटक्या, धलप्या, गवत, लांकूड इ०) **भुरकाडी-ळी**–स्त्री. हलकी व शुष्क काठी, काडी, धलपी. [ध्व.] **भुरकाळ**–पु (बे.) एक प्रकारचें गवत. **भुरकन-कर-दिनीं-दिशीं**–क्रिवि विश्रांतिस्थलापासून पक्षी एकदम उडतांना, गवत इ० एकदम पेटताना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण करून, होऊन. भुरभुर पहा. [ध्व भुर्र!] **भुरकूट**–न. शुष्क धलपा, काटकीचा तुकडा; भुरेंकन जळून जाणारें लाकूड.

**भुरकणें**—न (कों.) अतिशय कोंवळा नारळ

**भुरका**—वि. १ मळकट, धुळकट; किंचित् पांढऱ्या रंगाचा. २ (अशिष्ट) पांढरा. –पु. १ पूड (विशेषतः तांबड्या मिरच्यांची). २ (नंदभाषा) रुपया. 'मला चार भुरके उसनवार मिळतील काय?' [सं अभ्र+क?] **भुरका(हरिणा)**–वि. भुरकट, एका विशिष्ट रंगाचा (घोडा). –अश्वप १२७ **भुरकट-ड**–वि. १ मळकट; धुळकट पांढरा; पांढुरका २ नाविक; भुकिस्त; रुक्ष (जमीन). –क्रिवि. अंधुकपणें; अस्पष्ट (दिसणारा) [भुरका] **भुरकाड**–न रुक्ष आणि भुकिस्त जमीन, भुकिस्त पण गुराच्या खतानें बनलेली विशिष्ट जमीन –वि निकस; भिकार (भुकिस्त जमीनीवरील गवत, पीक, उत्पन्न); रुक्ष; भुरुड; भुरकन ओलावा नाहींसा होणारी (जमीन)

**भुरका**—पु. १ बुरका-खा पहा. २ गाडीवरील पडदा. **भुरकी**–स्त्री. १ घोड्याचे डोळे व शरीर आच्छादणारा कपडा; झूल. २ पालखी, हौदा इ०कावरील कापडी आच्छादन; गलेफ. ३ गाडीचा टप, पडदा. **०गाडी**–स्त्री. झाकलेली गाडी; टपाची, पडद्याची गाडी.

**भुरकूल**—न. बुरकूल पहा.

**भुरके ढेंकूण**—पुअव कापसाच्या सरकींतील तेल शोषणारे किडे.

**भुरकोहल**—न (ना.) कोहळें. भुरा पहा.

**भुरगजी**—स्त्री. एक पक्षी. [भुर=भुरका]

**भुरंगुली-ले**—स्त्रीन. (कों.) भिजविलेल्या व भाजलेल्या भात इ० धान्याची लाही (प्रायः अनेकवचनी प्रयोग).

**भुरगें, भुर्गों**—नपु. (गो.) लहान मूल (मुलगा, मुलगी). बुरगें पहा. [सं. अर्भक; बुरगें] **म्ह०** (गो अशिष्ट) भुरगें ना बाळ चोट वाजयता टाळ=मूलबाळ नसलेल्यास उद्देशून म्हणतात. **०पण**–न बालपण.

**भुरडा**—पु. (कों नाविक) नाळीच्या वर बसविलेलें लाकडी टोपण; यास दोन भोकें असतात. त्यांतील एक कप्पीवरून नांगराचा दोर ओढला जातो

**भुरडी**—स्त्री. बगळयाच्या जातीचा पक्षी; ओरडी.

**भुरदंड**—पु १ हरामखोरीनें, लबाडीनें मिळविलेल्या मिळकतीवर बसविलेला दंड. २ स्वतःच्या, दुसऱ्याच्या दुर्दैवानें, बळजबरी-अविचारामुळें सोसलेला दंड, गुन्हेगारी; आपल्या हातून घडलेल्या नुकसानीची भरपाई (क्रि० घालणें, भरणें देणें, पडणें, बसणें). [सं भूरि=पुष्कळ किंवा ध्व भुर+दंड]

**भुरभु(भू)र-भुरां**—क्रिवि. १ गवत इ० हलकें जळण जलदीनें जळतांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण २ लोकाचे थवे उत्कंटेनें व स्पर्धेनें घुसताना, पक्षी एकदम उटताना, गवत इ० झटकताना, पोबारा करतांना, हलकें धावतांना इ० वेळीं होणाऱ्या आवाजाचें अनुकरण करून. [ध्व] **भुरभुरणें**-अक्रि १ भुरभुर जळणें (गवत इ०). २ भुरभुर उडणें; भरारणें (डोक्यावरचे, शरीरावरचे केंस) ३ -सक्रि हलक्या हातानें थोडथोडी पसरून टाकणें (पूड इ०).

**भुरभुरा, भुरभुरीत**-वि हलकें व शुष्क, भुरभुर जळणारें (जळण).

**भुरभुरळीत**—वि. (व) भुसभुशीत.

**भुरभुरा**—स्त्री भेसळ -शर.

**भुरभुशीत**—वि. फुसका; हलका (कपडा इ०)

**भुरभुसा**—पु बारीक भुकटा (करवतलेल्या, किडीनें खाल्लेल्या लाकडाचा) [बुरा+भूस]

**भुर(रु)र-री-रें**—पुस्त्रीन १ भूल, भ्रांति; भुरळ २ गुंगी, ग्लानि ३ पिसें, वेड. मद; उन्माद. **भुररें**-स्त्री चेटाळ; चेटूक: चेडें 'सभामोहन भुरीं चेटकें।' -दा ५.२.२ [भुरळ] **भुरेंकरी**-वि. भुरळ पाडणारा 'सुवर्णपथी भुरेंकरी।'-दा ३ ७ ४९

**भुरली**—स्त्री. (राजा.) एक चिमणीसारखें परंतु तिच्यापेक्षा मोठें पाखरूं. [ध्व. भुर्र]

**भुरली**—स्त्री. (कों.) फजीती, टर, रेवडी. (क्रि० उडणें, करणें, उडविणें).

**भुरलें**—न (कों.) एक सपक्ष लहान किडा हा जुने तांदूळ इ०त उत्पन्न होतो [भुर्र!]

**भुरवणी**—स्त्री. (कों.) गवंड्याची लहान करणी. [भुरवणें] **भुरवणें**-न (कों) १ गवंड्याची मोटया आकाराची करणी २ जमीन चोपण्याचें मोठें चोपणें

**भुरशी**—स्त्री. १ बुरशी; बुरा. २ दांतावरील किटण [बुरा]

**भुरसी**—स्त्री भूयसी (अप.); दक्षणा 'भिक्षुकाचा मान भुरशीपुरता.' -वाग्धीश्वरी ४.१०. पृ ७९१.

**भुरळ**— न. विरळ अभ्र; ढग; खार (क्रि० येणें, निघणें, जमणें, चालणें, वाहणें, विरणें) -न.स्त्री मोह; वेड. मोहिनी: भ्रम. 'पापपुण्य ऐसें कैसें। भुरळें घातलें।'-तुगा ४०७९ [भूल किंवा भुर्र] ॰णें-अक्रि. १ आभाळ, अभ्र, पाऊस नाहींसा होणें. २ मोह पडणें; मंत्रबद्ध होणें; ठकणें, फसणें. **भुरळें**-न भुरळ (-स्त्री.) पहा. (क्रि० पडणें, घालणें).

**भुरळणी**—स्त्री. मोठें करणें; रुंद करणें; खोल करणें (खिळा इ० कानीं छिद्र) **भुरळणें**-न छिद्र मोठें करावयासाठीं उपयोगांत आणावयाचें हत्यार, जिम्रस. -सक्रि १ खुंटी, खिळा, जळतें लोखंड इ० आंत घालून व फिरवून मोठें करणें (भोंक, छिद्र). २ वर लेखणी फिरफिरवून अधिक मोठें व जाड करणें (लेखातील अक्षर); रंग देऊन ठसटशीत करणें, उजळणें, उजरणें; नवें करणें (चित्र).

**भुरा**—पु. कोहळा.

**भुरा**—पु. १ भुगा (करवतलेल्या, किडीनें खाल्लेल्या लाकडाचा). २ बुरशी, बुरा. बुरा पहा.

**भुरा**—वि. फिक्या, तांबडसर, पिंगट रंगाचा [हिं] **भुराबासडा**-पु. उंसाची एक जात -शे ११६०

**भुराडा-टा**—पु. १ उडणाऱ्या पक्ष्याचा, जळणाऱ्या गवताचा, हलक्या द्रव्याचा, झाडलें असता उडणाऱ्या तुषाचा भुर, भर, भिर असा आवाज. २ (ल.) संपत्तीचा जलद नाश होणें. ३ कामाचा भरकाडा, सपाटा. (क्रि० उडणें, होणें) [ध्व. भुर्र]

**भुरावणें**—अक्रि. (कु.) आनंदानें हुरळून जाणें. भुरकाटणें.

**भुरावळ**—स्त्री. (गो.) समुदाय, पोरासोरांचा, बालगोपालाचा जमाव. [भुरगा+आवलि]

**भुरी**—स्त्री. द्राक्षावरील एक कीड.

**भुरी**—स्त्री. १ (कों) गोवरी इ०ची पांढरी राख, भस्म २ डोळ्यावरील अंधारी, भुरें पटल ३ अंगास लावण्याची चंदनादिकाची उटी 'तेवीं श्यामांगीं चंदनाची भुरी। -एभा १४.४८३ ४ पिठी साखरेचा एक प्रकार. ५ बुरशी, बुरा बुरा पहा. [हि.]

**भुरूखाणें**—क्रि (कु.) हुरळणें. [ध्व. भुर्र]

**भुरूंपत्री**—स्त्री. (गो.) अव्यवस्थित कागदपत्र.

**भुरुभुरु-रू**—क्रिवि. भुरभुर पहा. [ध्व.]

**भुर्कुटॉ, भुर्कटावणी**—पुस्त्री. (गो.) अत्यानंद; हर्षातिरेक.

**भुऱ्यावणें, भुऱ्योभुऱ्यो करणें**—अक्रि. व्यर्थ उत्कंटेनें, औत्सुक्यानें भरणें; अविचारीपणा, उतावीळपणा करणें, हुरळणें. [ध्व. भुरुभुरु, भुरभुरा]

**भुलणें**—अक्रि १ स्वतास विसरणें; वेडा होणें; बुद्धि गमावणें, मोहित होणें; लुब्ध होणें २ बेभान होणें (दारू, संपत्ति, मान, प्रीति इ० कानीं) -उक्रि विसरणें. 'जयाच्या आथींतीं भुलिजे। आपुली वाट।' -ज्ञा १८ ८०८. [सं भ्रश; प्रा भुल्लइ; हिं. भुलना]

**भु(भू)लथा(ता)प**-स्त्री. १ भरंवसा वाटण्याकरितां मारलेली गप्प. (क्रि० देणें). २ फसवणूक. **भुलवण**-स्त्री. १ (राजा) भुलविण्याची, मोहविण्याची क्रिया २ भुरळ; मोहित स्थिति (मंत्र, खुशामत इ०कानीं) (क्रि० घालणें, पडणें). ३ भूलथाप. **भुलवणा**- वि. मोहित करणारा; भुलविणारा. 'नेणता गोवळीं गोवळा। लाघवी

अबळा भुलवणा।' -तुगा ७३७. **भुलवणी**-स्त्री. भूल. भुलवण पहा **भुलवि(व)णें** सक्रि. १ विसरण्यास लावणें २ चुकविणें; घुलकावणी दाखविणें. 'जो सन्मार्गु भुलवी।' -ज्ञा १८.१०५६ ३ वेड लावणें; मोहविणें; छकविणें; भूल घालणें. 'जैसी मंत्रज्ञातें विवसी। भुलवी कां।' -ज्ञा २ ३१२ (गो) भुलसांवचें. **भुलसावणी**-स्त्री. (गो) भूल. **भुलाई, भुलावणी**-स्त्री. १ फसवणूक; हुलकावणी. **भुलाई**-स्त्री. (व) नटवी स्त्री **भुलाभटका**-वि. १ बेबंद आणि भटक्या. २ गोंधळल्यानें बहकणारा. [भुलणें+भटकणें] **भुली**-स्त्री. (काव्य) गुंगी; भुरळ; मोह, भ्रम; विस्मरणशीलता. 'रायासी अंतरीं भुली पडली। देखोनिया तियेतें।' -कथा १.८.१५२. **भुलीचें झाड**-न. (ल.) मोह भ्रम उत्पन्न करणारें भूत; भुताची बाधा. (क्रि० भेटणें). **भुलोबा**-पु. शेतात पांखरां-साठीं उभें केलेलें बुजगावणें. **भुश्यो**-उद्गा. खेळांतील तात्पुरती तहकुबी; थुश्शो. **भुल्ल(ल्लु)सचें**-अक्रि. (गो.) भ्रंश पावणें; वेड लागणें. [भूल]

**भुंवई**—स्त्री. १ भवई, भिवई पहा. २ (अभिनय) नाट्य व नृत्य ह्यामध्यें भुंवयांच्या अभिनयाचे सात प्रकार दृष्टीस पडतात, त्यांचीं नावें:- १ उत्क्षेप, २ पातन, ३ भ्रुकुटी, ४ चतुर, ५ निकुंचित, ६ रेचित, ७ स्वाभाविक. [सं. भ्रू; भ्रूवर्तिका; प्रा. भुवया-भुवँया-भुंवई]

**भुवन**—न. १ लोक; जग; ब्रह्मांड; गोल (मर्त्य, अमर यांनीं वसलेला). भुवनें चवदा आहेत-चवदा भुवनें, सप्तलोक व सप्तपाताल पहा. 'मारावया तिनें उगारिली काटी। भुवनें त्या पोटीं चौदा देखे।' -तुगा २०. २ जागा, ठिकाण. 'राजधानी भुवन। अमरावती।' -ज्ञा ९ ३२०. ३ घर; मंदिर. 'इंद्रभुवनातें पावलें म्हणे।' -ज्ञा २.३६३. ४ नगर; पुर. 'होतों द्वारकाभुवनीं।' -सौभद्र ५ उदक; पाणी. [सं.] सामाशब्द- **०दीप**-पु. ब्रह्मांडदीप; सूर्य [सं.] **०सुंदर**-वि. सर्व ब्रह्मांडात मनोहर. -ह ८.५६. देवतेचें अभिधान. 'आरती भुवनसुंदराची। इंदिरावरा मुकुंदाची।'

**भुवनेश्वरी शांति, भुवनेश्वरी**—स्त्री. कुयोगावर स्त्री प्रथमत: ऋतुस्नात झाली असता, भुवनेश्वरी प्रीत्यर्थ करावयाची शांति. ही गर्भाधान संस्कारास जोडून करतात. [सं.]

**भुवर्लोक**—पु. भूलोक व सूर्यलोक यामधील प्रदेश; पृथ्वीच्या वर व सूर्याच्या खालीं असलेला सिद्ध व ऋषि याचा राहण्याचा लोक. [सं.]

**भु-भुंशी**—स्त्री. (कों.) बारीक तूस; धान्याच्या कुसांचीं, खपल्यांचीं टोकें, तुकडे; भुसकट. [भूस] **भुसक(कु)ट, भुसकटा, भुसकुरा**-नपु. १ (कों.) भूस; तूस. २ चूर्ण (किडीनें खाल्लेल्या, करवतलेल्या इ० लाकडाचें). [भूस] (वाप्र.) **०काढणें-पाडणें**-सक्रि. (काम, पाणरहाट फिरविणें दामटणें, मारणें इ० खालीं) बेजार करणें; जेरीस आणणें (मनुष्य, पशु यांस). **०निघणें-पडणें-वासणें**-अक्रि. त्रासाच्या वागवणुकीखालीं जर्जर होणें. **भुसकाटणें**-अक्रि. (कु) बुजणें. **भुसकट, भुसका**-वि. १ पुष्कळ भूस असणारें; तुषयुक्त (धान्य). २ किडींनीं खाल्ल्यामुळें, जीर्ण झाल्यामुळें भुसभुसीत झालेलें (लांकूड). ३ (शब्दश: व ल) हलका; फुसका.

**भुसकट**—न. (व.) भूषण; मोठेपणा. [सं. भूष्]

**भुस-कण-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. १ कठिण व अणीदार वस्तू मृदु व किंचित् प्रतिबंधक अशा पदार्थात जोरानें शिरतांना, त्याबाहेर निघतांना होणाऱ्या आवाजाचाअनुकरण वाचक शब्द; झपकन. २ कांहीं झपाट्याच्या क्रियांच्या शब्दाचें अनुकरण. भसकण पहा. [ध्व. भस!]

**भुसका**—वि. (ना.) पांढुरका; धुळीनें भरलेला.

**भुसकाड्या**—पु. (ना.) आट्यापाट्या इ०खेळांत दोन्ही बाजूंनीं खेळणारा गडी.

**भुसकापुरी**—स्त्री. (प्र.) भसकापुरी पहा.

**भुस(सं)डा**—पु. घासलेली, चोळवलेली, जीर्ण आणि झिजलेली, खोमललेली व चेंचलेली, दमलेली भागलेली स्थिति (दांडग्या व बेपर्वा वागवणुकीखालीं वस्तूंची, जबर श्रमानें प्राण्यांची, शरिराची); चुराडा; पीठ; पिट्टा (क्रि० पाडणें, काढणें, पडणें, निघणें, वासणें). [भूस हिं.] **भुसंडा खेळ**-पु. १ भुसडा पाडणारी वागणूक; नास, बिघाड होईल अशा तऱ्हेनें कामास लावणें (प्राणी, वस्तु). (क्रि० खेळणें, करणें, लावणें, चालविणें). २ दांडगाईनें फेटाळणें; तिरस्कारणें (मुद्दा, मत).

**भुसतुकान**—न. (गो.) पुरातन कालचा एक वर. [सं. तुस]

**भुसभुशी(सी)त**—वि. १ हलका आणि वाळलेला; ठिसूळ; चिकणपणा नसलेली (जमीन, माती, लांकूड, दगड). २ फुसका (कपडा). [भूस]

**भुसभुस-सां**—क्रिवि. गवत तोडणें, केस उपटणें; कुजका, हलका कपडा फाडणें, हलकीं द्रव्यें इ० जळणें ह्या क्रियांच्या आवाजाचें अनुकरण; खडबडणाऱ्या, फडफडणाऱ्या, मृदु, उष्म वर्णाचें अनुकरण. [ध्व. भस!]

**भुसळण्याचें शेवाळें**—न. (कर.) तंबाखूचें पान.

**भु-भुंसा**—पु १ भूस; तूस. २ चूर्ण; भुसकट इ० (करवतलेल्या लाकडाचें). ३ भुसडा पहा [सं बुस; हिं.] **०डा**-पु. भुसडा. **भु(भुं)सार**-न. १ क्रयविक्रय योग्य असें खाण्याच्या उपयोगी धान्य, गवत, कडबा इ० कांस सामान्य शब्द. 'तांदूळ भुसारांत मोडतो कीं किराणांत?' २ धान्याचा व्यापार. 'मग तें सांडी भुसार।' -गीता २.२१५५. ३ भुसारी लोकांचा समुदाय; धान्याचे व्यापारी; धान्याचे उदमी लोक. 'भुसारास

जकात घ्यावयाचा पहिल्यापासुन शिरस्ता नाहींच ' -थोमारो २.६८. सामाशब्द- **भुसार पेठ**-स्त्री. गांवातील, बाजारांतील भुसाऱ्यांच्या दुकानांचा भाग; धान्याचा बाजार. **भुसार माप**-न. (भुसाराचें माप) रगडपट्टीचें, सढळ हाताचें, झुवतें माप **भुसार माफी**-स्त्री. धान्य, भुसार जिनसा याच्यावरील कराची माफी. **भुसारी**-पु. १ धान्याचा व्यापारी; गल्लेकरी; दाणेवाला; दुकान ठेवून किरकोळ विक्री करणारा, खेड्यांत धान्य खरेदी करून तें शहरच्या पेठांत नेऊन विकणारा व्यापारी. २ भात, तूर इ० धान्य विकत घेऊन त्याचे तांदूळ, डाळ इ० करून विकणारा उदमी. 'भुसाऱ्यानें धान्यसंग्रह केला। मोजितां व्यर्थ जन्म गेला।' ३ भूस विकणारा. **भुसारीपसरॉ**-पु (गो.) धान्याचें दुकान. **भुसारें**-न. भुसाची गंजी, रास (सामान्यतः कडब्याच्या पेंढ्यांनीं वेष्टिलेली व वरून आच्छादिलेली). **भुसी**-स्त्री. बारीक भूस; भुशी पहा. **भुसें**-न. १ बुरंगट; झिमझिम पाऊस. २ धुकें.

**भुसारचें**—क्रि. (गो.) जेवणें. **भुसावळ**-स्त्री. १ (गो.) भोजनभाऊ. २ लोकसमुदाय; मंडळी. **भुसाळणें**-क्रि. (नंद-भाषा कर.) जेवणें.

**भुळकं(कां)डी, भुळकुंडी**—स्त्री. बुळकांडी पहा.

**भुळभुळ-भुळां**—क्रि. धान्य, वाळू इ० गळतांना, रक्त, पाणी इ० अरुंद तोंडातुन वाहतांना, अश्रु पडताना, पाणी भळभळतांना इ० वेळीं होणाऱ्या आवाजाचें अनुकरण होऊन. [ध्व.] ०णें-अक्रि. शिवशिव उत्पन्न करीत त्वरेनें (अंगावर) इतस्ततः धावण्याची, फिरण्याची पिसा, माशा, ढेकूण यांची क्रिया. **भुळभुळीत**-वि. शुष्क, रुक्ष व मऊ; भुसभुशीत; भुगाळ (माती इ०).

**भुला(ला)बाई**—स्त्री. आश्विन महिन्यात मुली, बाहुला-बाहुलीपुढें गाणीं म्हणतात, खेळतात तो खेळ; भोंडला. [बहुल+बाई]

**भू**—वि. (समासांत उत्तरपदीं) पासुन उत्पन्न झालेला, होणारा असें- पद्मभू=कमळापासुन उत्पन्न झालेला; स्वयंभू=स्वतःपासुन उत्पन्न होणारा, स्वतःसिद्ध. [सं.]

**भू**—स्त्री. पृथ्वी; जलस्थलमय गोल. 'हांसोनि म्हणे नारद भूवरि तों हेचि दिव्यरुचि राजा।' -मोसभा १.२२. [सं.] सामाशब्द- ०**कंप**-पु. धरणीकंप. [सं.] ०**कमळ**-न. महाबळेश्वर येथें होणारें एक जातीचें फूल. ०**खंड**-न. भूलोकाचा भाग, तुकडा. [सं.] ०**खळें**-न. पृथ्वीरूप अंगण, खळें. 'राशी झाल्या भूखळीं।' -मुआदि ४९.११४. ०**गर्भ**-न. १ भुयार. 'कित्येक काळाचे उपवासी। इच्छित होते पंगतीसी। ते पावले मनोरथासी। भूगर्भीचें आले।' -वेसीस्व १२.५८. २ पृथ्वीचा आंतील भाग, पोट. ०**गर्भवास**-पु. गुहा इ० स्थळीं राहणें. [सं.] ०**गर्भशास्त्र**-न. पृथ्वीच्या पोटांत असणाऱ्या पदार्थासंबंधीं शास्त्र; भूस्तरशास्त्र. (इं) जिऑलजी. [सं.] ०**गर्भक्षितिज**-न. मूळ, वास्तविक क्षितिज; खगोलक्षितिज. [सं.] ०**गोल-ळ**-पु. १ जलस्थलमय गोल २ पृथ्वीरूप गोल; पृथ्वी. ३ पृथ्वीवरील देशांची माहिती; भूवर्णन. [सं] ०**गोलशास्त्र**-न. पृथ्वीसंबंधीं माहिती देणारें शास्त्र. यात भूस्तरशास्त्र, वातावरण शास्त्र, निरनिराळ्या देशांची भूस्तरदृष्ट्या सांस्कृतिक व राजकीय विविध माहिती व व्यापारी माल, साधनें, इ० माहितीचा समावेश होतो. [स.] ०**चंपक**-पु. भुईचाफ्याचें झाड व त्याचें फूल. [सं.] ०**चर**-वि. जमिनीवर फिरणारा, राहणारा; स्थलचर. (जलचर, जलस्थलचर, खेचर, यांच्या उलट). [सं.] ०**चरी**-स्त्री. योगाच्या चार मुद्रांपैकीं एक. [सं.] ०**चरीनयन**-पुअव. अधोदृष्टि. 'मूर्ति करावी अति दीन। खेचरी भूचरी जिचे नयन।' -एभा ११ १२८४. ०**चरीमुद्रा**-स्त्री नासिकाग्रावरून भूमीकडे नजर लावणें अशी एक योगांतील मुद्रा. 'कीं भूचरीमुद्रा योगेश्वर।' -ह ६.८९. [सं.] ०**चुंबकत्व**-न. पृथ्वीचा आकर्षण करण्याचा धर्म. (इं.) टेरिस्ट्रिअल् मॅग्नेटिझम् [सं.] ०**ज्या**-स्त्री. भूमध्यापासुन भूपृष्ठाचें जें अंतर तें. [सं.] ०**तल-ळ**-न. १ पृथ्वीचा पृष्ठभाग. २ (सामा.) भूलोक; पृथ्वी. [सं.] ०**तलविद्या**-स्त्री. भूपृष्ठासंबंधीं शास्त्र; (इं.) फिजिकल् जॉग्रफी. [सं.] ०**तैल**-न. पृथ्वीतून पाझरणारें तेल; शिलातैल. (इं.) पेट्रोलिअम्. ०**दिन**-नपु. सावनदिन पहा. [सं.] ०**देव**-पु. पृथ्वीवरील देव; ब्राह्मण. 'मिळविली कीर्ति आजवरी। ती बुडेल कीं भूदेवा।' -विक १६. [सं.] ०**देवी**-स्त्री. गांव, शेत, जागा यांची रक्षक देवता. [सं.] ०**धर**-पु. १ पर्वत; डोंगर. २ भूगोल मस्तकीं धारण करणारा शेष नामक सर्प. ३ राजा. [सं.] ०**प**-पु. १ राजा. २ भूपकल्याण राग. 'दीप भूपकल्याण तूं गाता प्रकाश साऱ्या स्थळीं पडती।' -प्रला २३७. ०**पकल्याण**-पु. एक राग. ०**पति-पाल(ळ)**-पु राजा. [सं.] **म्ह०** भूपतिर्वा यतिर्वा=मी राजा तरी होईन नाहीं तर यति तरी होईन. ०**परिघ**-पु. भूपृष्ठावरून जाणारें मोठें वर्तुळ. [सं.] ०**परिमाण**-न. भूमान पहा. [सं.] ०**पृष्ठ**-न. १ पृथ्वीचा पृष्ठभाग. २ सपाट जमीन; समथळ. (इं.) ग्राउंडलेव्हल. [सं.] ०**पृष्ठवर्णन**-न. (भूशास्त्र) पृथ्वीवर असणाऱ्या दोन मुख्य गोष्टी पाणी व जमीन, त्यांवरील सर्व बाजूनें असणारें वातावरण, याविषयीं शास्त्रीय माहिती व वर्णन; तसेंच त्यामध्यें दृग्गोचर होणारे निरनिराळे चमत्कार याविषयीं विवेचन ज्यांत केलें असतें तें वर्णन, शास्त्र. [सं.] ०**पृष्ठक्षितिज**-न. दृश्य असें क्षितिज. [सं.] ०**भा**-स्त्री. (ज्यो.) १ पृथ्वीची छाया. २ शंकुच्छाया. [सं.] ०**भाग**-पु. भूगोलाचा एक भाग. [सं] ०**भा बिंब**-न. पृथ्वीच्या छायेचें बिंब. [सं] ०**भार**-पु. भूमीस झालेला (पातकी जनांचा) भार. 'भूभार हराया सार, घेउनि अवतार, अत्रिच्या पोटीं।' -दत्ताची आरती. [सं.] ०**भुज**-

। राजा. [सं. भू+भुज्] ०भुजेंद्र-पु. सार्वभौम राजा; राजाधिराज सं. भूभुज+इंद्र] ०भृदरि-पु इंद्र. [सं भूभृत्+अरि] ०भ्रम-पु. पृथ्वीचें भ्रमण, गति (ग्रहांप्रमाणें) [सं] ०मक-पु. (ना) ग्रामाधिकारी; हा गावाच्या सीमेच्या देवतेची पूजा करतो व सरकारी कामगार गावीं आले असता त्याची व्यवस्था ठेवतो ०मंडल-ळ-न जलस्थलमय पृथ्वीरूप गोल [सं] ०मान-परिमाण-न पृथ्वीचें मान, माप [सं] ०मिति-स्त्री (गणित) जमिनीची मापणी, रेखागणित; भूमितींत शास्त्रीय पद्धतीनें चौरस, काटकोन, त्रिकोण वगैरे आकृति काढण्याचे नियम व सिद्धांत याचें विवेचन केलेलें असतें [सं.] ०मितिप्रमाण-मितिश्रेधी-मितिप्रमाणश्रेधी-मितिश्रेढी-स्त्री (गणित) जींत कांहीं एका विवक्षित पटीनें संख्या वाढतात किंवा कमी होतात ती पंक्ति, रेखागणितश्रेढी गुणोत्तरानें सारख्या संख्या वाढणें तें जसें- २, ४, ८, १६ इ० [सं.] ०रमलविद्या-स्त्री जमिनीवर रेघा किंवा आकृति काढून शकुन पाहण्याची विद्या. ०रुह-पु (काव्य) वृक्ष-वनस्पति. 'ठाण न चळे रणींहून। कुठारघायें भूरुह जैसा।' [सं.] ०लोक-पु इहलोक; पृथ्वी. सप्तलोक पहा. [सं.] ०वैकुंठ-पु पृथ्वीवरील वैकुंठ, विठ्ठलाचें (कृष्णाचें, विष्णूचें) नित्य वसतिस्थान असलेलें पंढरपूर इ० क्षेत्र 'सकळ तीर्थांचें माहेर। भूवैकुंठ निर्विकार।' -तुगा २५९१ [सं] ०व्यास-पु भूमध्यातून जाऊन भूपृष्ठास दोहों बाजूस मिळणारी रेषा. ०शलाका-शिर-स्त्रीन. जमिनीच समुद्रात गेलेलें टोंक; जमिनीचा चिंचोळा भाग. [सं.] ०सुर-पु. भूदेव; ब्राह्मण. 'मानुनि वेषें स्नातक भूसुर पूजावया उठे भावें।' -मोसभा १.९२ [सं] ०स्तरशास्त्र-न. यांत पृथ्वीवरील जमीन, पाणी, खडक यामध्यें होणाऱ्या घडामोडी व संशोधन, पृथ्वीच्या उदरात असलेल्या स्थितीबद्दल व द्रव्याबद्दल माहिती, वनस्पति, प्राणी याचा इतिहास इ० गोष्टींचें विवेचन केलेलें असतें, भूगर्भशास्त्र (इं.) जिऑलजी.

भूअरी—स्त्री. (महानु.) उगाळण्याची क्रिया. 'अनुलेपनाचिया भूअरी। मीं अहंकारातें घोनारीं।' -भाए १५९. [भोवरी]

भूक—स्त्री. १ क्षुधा; खाण्याची इच्छा. २ कामना; स्पृहा. ३ (ल) इच्छा, तळमळ 'म्हणौनि आपुलेंचि मुख। पहावयाची भूक।' -अमृ ७ ११५. [सं बुभुक्षा; प्रा. बुहुक्खा; पं. भुक्स; सि बुख; हिं. गु बं भूख, उरिया. भोक; आर्मेजि. बुखव, पोर्तु. जि बोक] म्ह० भुकेला कोंडा आणि निजेला धोंडा=चांगली भूक लागली म्हणजे कोंड्यासारखा बेचव पदार्थहि गोड लागतो आणि झोंपेला मनुष्य आला म्हणजे त्याला धोंड्यावरहि मऊ गादीवर निजल्यापेक्षां चांगली झोंप लागते. (वाप्र) ०धरणें-क्रि. १ भूक दाबणें, थांबविणें. २ भूक तृप्त, शांत होणें, थांबणें. 'चतकोरावर माझी भूक धरती काय!' ०मारणें-क्रि. भूक दाबून धरणें; तिची पर्वा न करणें; थोड्याशा खाण्यानें भुकेला मारणें ०हरपणें-अक्रि. भुकेचें भान न राहणें भुकेचा कोंवळा असणें-भूक रेटण्याचें सामर्थ्य नसणें. 'तो कोंवळ्या भुकेचा आहे.' भुकें मरणें-उपाशीं मरणें. ०मोड-स्त्री १ हलक्या व थोडक्याशा फराळानें भूक शमविणें; भूक धरणें. २ विलंबानें भूक घालविणें ३ वासना तृप्त करून ती घालविणें; मनशामोड; तृप्ति. ४ क्षुधेची तृप्ति होण्यापूर्वी झालेला अडथळा. ०लाडू-पु. प्रवासाच्या उपयोगी फराळाचे पदार्थ, शिदोरी तान-ल्हान लाडू पहा. भुकाळ-ळू-वि अन्नासाठीं हपापलेला; ज्याला भूक वारंवार लागते व ती लागली असता काळ कंटवत नाहीं तो. 'तया दुर्भराचियें धुरे। भुकाळु जो।' -ज्ञा १६ ३२३ भुकिस्त-वि. १ क्षुधित; अधाशी, फार भूक असलेला 'आले अतीत अभ्यागत। जाऊं नेदी जो भुकिस्त।' -दा ७ ७५३. २ (ल) गरजवंत; गरजू. ३ कंगाल ४ (ल) भुवड; भरड; रुक्ष, निझूर (जमीन). ५ सुनका; वांझट, अल्प, तुटपुटा, मुळींच कांहीं नसणारा (देश, गाव, बाजार, धंदा, श्रम, भाषण) ६ भिकार; क्षुद्र; ल्हान; कवडीमोल (प्राणी, वस्तु) म्ह० भुकिस्त गुरूं वळचणी उपसतें भुकी-वि. थोडीशी भूक राखून जेवणारा म्ह० १ भुकी तो सुखी. २ भुकी राखी चौथा कोन. भुकेकं(बं)गाल-वि. दरिद्रि; खावयास न मिळणारा; भुकेलेला व गरजू; अत्यंत गरजवंत; दुकळलेला; हतभागी, गरीब. [हिं.] भुकेचा मोटला-पु अत्यंत क्षुधेनें धाधावलेला माणूस, भूक कंटवत नाहीं असा मनुष्य. भुकेच्या तोंडा-क्रिवि. भूक लागली असता. 'आम्हा वेई भुकेच्या तोंडा।' -तुगा. (नवनीत पृ.४४८) भुकेजणें, भुकेणें-अक्रि १ क्षुधित होणें. २ (ल.) उत्कटेनें इच्छिणें; आशा करणें; धाधावणें; हांव सुटणें. भुकेला, भुकेजला-वि. १ क्षुधित. २ अतिशय उत्सुक. 'तोचि ऐकाया जीव हा भुकेला।' -र २६.

भूज—स्त्री. १ भुजा; सबंध बाहु २ (क्षेत्र मापनांत) एक बाजू (शेताची, जागेची). ३ (रसा.) लोहचुंबकाच्या ध्रुवामधील आडवी लोखंडी पट्टी [सं. भुज]

भूजपत्र—न. १ भूर्ज नांवाच्या वृक्षाची अंतर्साल. २ (ल.) अगदीं झिरझिरीत वस्त्र. [सं.]

भूत—वि. १ (व्या.) वर्तमान क्षणापूर्वी गेलेला काळ; भूतकाळ. २ गेलेला; झालेला. 'भूत भविष्य कळों यावें वर्तमान।' -तुगा २११२. ३ (समासांत उत्तरपदीं) झालेला; एखाद्याच्या स्थितींत शिरलेला आणि स्थित असणारा. उदा० पात्र-विषय-आधार-आश्रय-सिद्ध-साधन-भूत. समासांत पदांतीं ई प्रत्यय लागून कांहीं समास होतात. उदा० कारणी-प्रमाणी-शुद्धी-पवित्री-भस्मी-वशी-द्रवी-भूत इ०. [सं.] (वाप्र.) न भूतो न भविष्यति-विलक्षण गोष्ट जें कधीं नव्हतें व

कधीं होणार नाहीं अशी गोष्ट. ०**पूर्व**–वि. पूर्वी झालेला; मागील काळात असलेला, झालेला. [सं.] ०**भविष्य**–वि. १ झालेलें व होणारें. २ (व्या.) भविष्यकाळीं एखाद्या क्रियेचा व्यापार होऊन गेला असेल असा अर्थ ज्या क्रियापदाच्या रूपापासुन निष्पन्न होतो तो (काळ). [सं] ०**भूत**–वि (व्या) भूतकाळीं व्यापार होऊन संपला असा क्रियापदाच्या रूपापासुन बोध होतो तो (काळ) [सं.] **भूतलें**–वि. १ अनुभविलेलें; भोगलेलें. 'मग जीवें भूतलीं जियें संकटें।' –ज्ञा ११ ५७६. २ झालेलें; होऊन गेलेलें. 'तरि भूतलें आठवे।' –ज्ञा १३.१२२.

**भूत**—न. १ राक्षस; पिशाच; स्मशानांत संचार करणारी, झाडांवर वास्तव्य करणारी, प्रेतांस सजीव करणारी, मनुष्यें खाणारी एक दुष्ट योनि. कधीं कधीं देवास, मूर्तींत वास करणाऱ्या चित्कलेस लक्षणेनें हा शब्द लावतात. 'पंढरीचें भूत मोठें। भावार्थीया झडपी नेटें।' २ मृताची छाया; पिशाच; समंध 'तीं त्या पाहूं न शकति जेंवि नृहरिमंत्रजपपरा भूतें।'–मोभीष्म ५.१५. ३ (ल.) विटलेली खराब झालेली वस्तु. 'वाळले चिळले तुकडे विद्रून त्याचें भूत झालेलें.' –नामना ८०. ४ उपदेवतांचा एक विशिष्ट वर्ग, योनिविशेष. ५ पृथ्वी, आप, तेज, वायु; आकाश या पंचतत्त्वांपैकीं कोणतेंहि आदितत्त्व. 'ऐसी दोनी भूतें खाये।' –ज्ञा ६.२४०. ६ सृष्ट पदार्थ (सजीव, निर्जीव); कोणतेंहि द्रव्य, तत्त्व, कारण. 'सोळा सूक्ष्म भूतादि सत्रावा जीव' (पंचकर्मेंद्रियें, पंचज्ञानेंद्रियें, पंचतन्मात्रा, मन व जीव). ७ प्राणी. 'मजयुद्धाभिप्रायापासुनि मागें बळेंचि फिरवील। ऐसें भूत नसेचि त्रिजगीं...' –मोकर्ण २७.५४. ८ (कायदा) खरी, जशी घडली तशी गोष्ट. ९ (सोंगट्याचा खेळ) एकदा मारली गेली असुन पुनः डावांत बसलेली सोंगटी [सं भू=होणें] ०**घालणें**–मंत्रतंत्रानें एखाद्याच्या अंगांत भुताचा संचार, घरीं भूतबाधा करविणें. 'जनासि घालिती भूतें।' –दावि ४८० **भूत म्हणतां भूत लागतें, लागावयाचें**–भूत म्हणा म्हणजे भूत शिरलेंच, भूत पुढें दत्त म्हणून उभेंच. **भुतें नाचणें**–(घरांत, गावांत, रानांत) एखाद्या स्थलाचा भणभणीतपणा दर्शविण्या करितां उपयोग करितात. सामाशब्द– ०**के(खे)त-प्रेत**–न. (व्यापक) भूत; प्रेत; पिशाच; राक्षस इ० [भूत+केत(द्वि); भूत+प्रेत] ०**कोलीत**–न. पिशाच दीपिका. ०**खान**–न. (ल.) जिचे केस मोकळे अस्ताव्यस्त सुटलेलें, वस्त्र घाणेरडीं, आणि स्वरूप भयंकर व हिडिस आहे अशी स्त्री, मुलगी; विद्रूप मूल. [भूत+फा खान] ०**खाना**–पु. १ भुतें, पिशाचें आणि वेताळ यांचा उपद्रव असलेली जागा. २ भुतें, पिशाचें यांच्या खोड्या, चेष्टा व दुष्ट कृत्यें; भूतचेष्टा. (क्रि० उठणें, माजणें). 'जिकडे तिकडे भूतखाना उठला आहे, दुपारची बाहेर जाऊं नको' ३ भुतांचा समुदाय. ४ (ल.) एका ठिकाणीं गोळा झालेल्या मुलांचा जमाव. ५ अडाणी लोकांची दंगल. ६ भयंकर व हिडिस माणूस ७ (निंदेनें) घाणेरडी व अव्यवस्थित जागा. ८ फ्रीमेसन संस्था. [भूत+फा खाना] ०**खीच**–स्त्री भूतांची खिचडी; प्राण्याचा नाश 'नाना युगांतशक्तीचीं पात्रें। भूतखिचा वोटविलीं।' –ज्ञा ११.३४३. ०**ग्राम**–पु. १ स्थावर व जंगम वस्तू २ पंचमहाभूताचा समुदाय. [सं. भूत+ग्राम] ०**चेष्टा**–स्त्री. भुताचा खेळ, कृति, चमत्कार. (शरीरबाधा होणे, भ्रम होणें, ठेवल्या जागेवरून पदार्थ अकस्मात नाहींसा होणें इ०). [सं.] ०**जात**–न. जीवमात्र; सर्व प्राणी. 'तुवा जन्मौनि पोसिलीं। भूतजातें।' –ऋ ४५. [सं.] **भुतं(तां)डा**–पु. १ गांजणूक; कुतरओढ (खाष्टधनी, तगाददार इ० कांची). २ दबडगा, दगदग (कामाची) (क्रि० लागणें). ०**त्रय**–न पृथ्वी, आप व तेज. 'लोप आथी भूतमात्रा। देहींचा देही।' –ज्ञा ६.२९८ [सं.] ०**दया**–स्त्री. प्राणिमात्रावर करावयाची दया. ०**पति**–पु शिव; शंकर. [सं.] ०**पीडा**–स्त्री. भूतबाधा. [सं.] ०**प्रलय**–पु १ सर्व सजीव व निर्जीव वस्तूंचा नाश; सर्वगत प्रलय. २ भुताच्या बेसुमार चेष्टा. [सं] ०**प्रेत**–न. भूतकेत पहा. [सं.] ०**बाधा**–स्त्री. भुताची पीडा; भुतांनीं उत्पन्न केलेला रोग, दुसरी एखादी अनिष्ट गोष्ट. [सं.] ०**भाव**–पु प्राणिमात्र. तेवीं भूतभावीं नाशिवंत। अविनाश जें।' –ज्ञा ८.१७७ [सं.] ०**भावन**–वि. १ जग ह्या कल्पनेचा आश्रय. 'मी ये परीचा भूतभावनु। परी सर्व भूतासि अभिन्नु।' –ज्ञा ९ ८६. २ जग उत्पन्न करणारा, पालन करणारा [सं.] ०**यज्ञ**–पु १ पंचमहायज्ञापैकीं एक; वैश्वदेवांतील बलिहरण. पंचमहायज्ञ पहा. २ (विनोदानें) आपल्या देहातील पंचमहाभूतास बलिदान. जेवण, भोजन देणें. (क्रि करणें). [सं.] ०**वेळ**–स्त्री भर दुपार, मध्याकाळ व मध्यरात्र (या वेळीं भुतें बाहेर पडतात). ०**वैद्य**–वि. देवऋषी; पंचाक्षरी. [सं] ०**शुद्धि**–पूजेच्या, एखाद्या संस्काराच्या पूर्वी करावयाचा एक विधि. [सं.] ०**संचार**–पु. पिशाचबाधा, अंगात भूत येणें. [सं.] ०**सृष्टि**–स्त्री. १ भुतांच्या शक्तीनें उत्पन्न झालेली माया; ऐंद्रजाल. २ मांत्रिक, जादुगार, गारुडी यांनीं केलेली ठकवणूक, हातचलाखी, नजरबंदी. ३ भूतांचा समुदाय. ४ पंचमहाभूतात्मक जग; पंचमहाभूतांपासुन ईश्वराने उत्पन्न केलेलीं शरीरें; संयुक्त पंचमहाभूतें. ५ (ल.) अकस्मात् उत्पन्न होऊन क्षणांत नाश पावणारे, बुजबुजणारे कोट्यवधि प्राणी (माशा, आळ्या, कृमी इ०). [सं] **भुतांची घाई**–स्त्री. १ अंगांत आलेल्या भुताचें झपाट्याचें धापलणें आणि चलनवलन. २ मालमत्तेवर भुतांनीं केलेली धामधूम व खोडसाळपणा. 'तंववरिच भुतांची घाई। जंव मंत्रवादी नाहीं पावला।' **भुताची खिचटी**–स्त्री. दलदलीच्या जमीनींतून निघणारी दीप्तिमान हवा. ही सपक्ष सर्पासारखी

अंतरालांत उडाल्यासारखी दिसते. ( इं ) ड्रॅगुन. -राको ५८३. **भुताटकी**-स्त्री. १ एखाद्याचें वाईट, बरें करण्यासाठीं भुतांस कांहीं देऊं करून त्यांना उठवण्याची, घालण्याची, काढण्याची विद्या, धंदा; जादूगिरी; चेट्रक. २ भुतांचा व्यवहार, चेष्टा इ०. [ भूत+अटकी (का आटकी=खेळ) ] **भुताटक्या-की**-वि. भुताटकी करणारा. **भुताट(र)णें**-अक्रि. ( राजा. ) राग इ० मुळें भूत अंगांत संचरल्याप्रमाणें चाळे करणें. **भूतांत**-पु ( महानु. ) काळ; यम. ' तुज सदा भूतांत तो ही भीये। ' -गस्तो ६५. **भूतात्मा**-पु. १ शरीर; देह. २ जीवाचें व क्रियेचें उपादानकारण असें मूलभूत तत्त्व; प्राणिमात्रांचा आत्मा. ३ देव. [ सं. ] **भूताभास**-पु जग भासणें, जगाचा आभास ' आणि भूताभासु आधींच सरे। ' -ज्ञा ९८० [ स भूत+आभास ] **भुतारणें**-अक्रि. ( राजा ) भुताटणें. **भुतारा-री, भुतेरा**-पुस्त्रीपु भुतें काढणारा, पंचाक्षरी. **भुतारें**-न लहान भूत **भूतार्त**-वि भुतानें पीडिलेला. [ सं. भूत+आर्त ] **भुतावळ, भुताळ-ळें**-स्त्रीन १ भुतांची, पिशाचांची जमात. (क्रि० उठणें येणें. लागणें) २ (समुच्चयानें) भुतें आणि पिशाचें; त्यांचा सर्व गण, वर्ग ३ ( ल. ) लुच्चे, सोदे, शठ, भिकारी किंवा द्वाड आणि त्रासदायक मुलें यांची गर्दी, हलकट लोकांची टोळी (क्रि० माजणें, उठणें, जमणें) [ सं. भूत+आवलि ] म्ह० वेताळाचे मागें भुतावळ आहेच **भुताळा-ळ्या**-वि. दुसऱ्याचा नाश होण्याकरितां त्यावर भुतें घालणारा, पंचाक्षरी; चेटक्या. **भूतावळी**-स्त्री भुतावळ; भुतांचा समुदाय ' तैसें वीरश्रीचीये भूतावळी। नेदिजे देहदमनाची वळी। ' -भाए २२३. ' भूतावळी औठ कोटी। ' -दा २० ६ २६. [ सं. भूत+आवलि ] **भूताविष्ट**-वि. भूतसंचार झालेला. [ सं. भूत+आविष्ट ] **भूतावेश**-पु. भूतसंचार; पिशाचसंचार [ स भूत+आवेश ] **भूताहिती**-पु देव-पितर-आत्म-ऋण न देणारा. -हंको. [ सं ] **भुतेंखेतें**-नअव. भुतें, पिशाचें, हडळी, समंध इ०. **भु(भू)तोंडी**-स्त्री. १ पंचमहाभूतास म्हणजे देहाच्या घटकांस दिलेला भाग, घास, फराळ, अल्पाहार ( क्रि० देणें ). ' भुतांला भुतोंडी द्यावी मग निघावें ' २ भूतबळी ' ऐसे आसुरिये प्रकृतीचे तोंडीं। जे जाले गा भूतोंडीं। ' -ज्ञा ९ १८४ [ सं भूत+उंडी ] **भुत्या-भुता**-पु. भवानी देवीच्या भगतांच्या वर्गांतील एक व्यक्ति; देवीचा उपासक. हे गळयांत कवड्यांच्या माळा, अंगावर तेलकट वस्त्रें आणि हातांत पोत (जळता काकडा) घेऊन भिक्षा मागत फिरतात. **भुत्याचें झाड, भुत्या**-नपु. एक झाड याचें लाकूड जळतांना प्रकाश पडतो. दिवट्या, रव्या इ० करण्याकडे याचा उपयोग करतात. या लाकडाची रवी पुरली असतां तिला अंकुर फुटतो असें म्हणतात म्हणून या रवीच्या योगानें चेटकांचा प्रतिकार होऊन लोणी येतें अशा समजुतीनें लोणी घेण्याकरितां हिचा उपयोग करतात. **भूतोन्माद**-पु. भूतावेशामुळें उत्पन्न झालेलें वेड; यांत रोग्याचें संभाषण, पराक्रम, शक्ति व हालचाल, तसेंच तत्त्वज्ञान, शिल्पज्ञान इ० जाणण्याची शक्ति हीं अमानुष असतात. या उन्मादाच्या लहरींचा काल ठराविक असतो. -योर १.७३२. [ सं. भूत+उन्माद ]

**भूतकेश-केस-कूस**—पु एक झुडूप.

**भूतणें**—न. भूल; मोह. -हंको. -अक्रि. भुलणें.

**भूति**—स्त्री. १ शिवाच्या ठिकाणीं असलेली व तीव्र आणि मांत्रिक विधींच्या आचरणानें प्राप्त होणारी अलौकिक शक्ति. २ मोठेपणा; वैभव; ऐश्वर्य. ३ जन्म; उत्पत्ति. [ सं. भू=होणें ]

**भूपकल्याण**—पु. (संगीत) कल्याण रागांतील एक भेद. [सं.]

**भूपाळी**—स्त्री १ एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, पंचम, तीव्र धैवत हे स्वर लागतात. जाति औडुव-औडुव, वादी गांधार, संवादी धैवत. गानसमय रात्रीचा पहिला प्रहर. २ भूप रागांत पहाटे म्हटलेलें पद्य. ३ बंदिजनानीं गाइलेली स्तुति. ४ पहाटे म्हणावयाचीं ईशस्तवनपर पदें. [ भूप+आळविणें ]

**भूम**—न. १ मुंग्यांचें वारूळ ( विशेषतः वसरींचें ). २ सोनाराकडे घडावयास दिलेल्या सोन्यांतून कांहीं भाग त्यानें लबाडीनें काढून घेतला असतां त्या सोन्याचें वजन भरून काढण्याकरितां त्यानें त्यांत टाकलेली भर; लोहकीट. [ सं. भूमि ]

**भूम**—पु ( बे ) कर्नाटक व द्रविड देशांत विवाहामध्यें वधूवर व वर पक्षाकडील सौभाग्यवती स्त्रिया यांची एक पंगत; साधारणतः एकपात्रभोजनप्रकार.

**भूमका**—स्त्री. गाव, शीव, जमीन, जागा यांची अधिष्ठात्री देवता [ भूमिका ]

**भूमंगल**—वि ज्याच्या उरावर किंवा कंठावर चार पांच भोवरे असतात असा (घोडा), -अश्वप १.९२. असा घोडा नळाच्या घरीं होता.

**भूमा**—पु. १ अभेद बुद्धीनें सर्व पाहणें, ऐकणें व जाणणें. २ ज्याचा कधीं शेवट नाहीं असें सुख ' तो भूमा म्हणिजे अंतरहित सुख तें। ' -यथादी १२.५३३ [ सं. ]

**भूमि**—स्त्री. १ पृथ्वी २ जमीन जमीन शब्दाच्या बहुतेक सर्व अर्थी हा शब्द आढळतो. भुई पहा. ३ (भूमिति) बहुकोणाची बैठक, पाया; सामान्यतः पाया. ४ मूळ; मूळ आधार. 'कवण भूमि हें न चोजवे। ' -ज्ञा १०.४३. ५ मजला; माळा. 'भूमी निर्वाळलिया पुरा। प्रासादु जाहला। ' -ज्ञा १८.३९ ६ स्थान. 'आणि प्रकृतिजन्म-। भूमिका यया। ' -ज्ञा १४.१३८. [ सं. ] सामाशब्द- ०**कंप**-पु. भूकंप; धरणीकंप. [ सं. ] **भूमिका**-स्त्री. १ पृथ्वी. २ नाटकांतील वेष; रंगभूमीवर दाखविलेल्या सोंगाचा वेष; सोंग ३ स्थल ( क्रियेचें ); रंग, रंगभूमि; रणांगण. ४ आधार; जागा; माळा;

थारा. ' प पाणियाचिये भूमिके। पाणी तळपे कौतुकें।' -ज्ञा १३.६०९. ५ वेळ. ' अगा मावळलेनि अर्के। संध्येचिये भूमिके। ज्योतिदीप्ती कौतुकें। दिसे जैसी।' -ज्ञा १८.४२५. ६ अवस्था. ' तो आघवीयाचि भूमिका-। सर्व चाले।' -ज्ञा १८ १०४३.७ पायरी; मजला. ' अभ्यासीं प्रथम भूमिका।' -एभा १३ २५५. ८ स्थिति. ' तैसा आवडतिये भूमिके।' -अमृ ७.२६०. [ सं. ] ०गत-वि जमिनींत पुरलेलें. ' न सापडे झालें भूमिगत धन।' -तुगा १६४०. ०ग्रस्त-वि. १ पृथ्वीनें गडप केलेला; जमिनींत गडप झालेला. २ जमिनीनें ताब्यांत घेतलेला; पुरलेला ' द्रव्याचे चार भाग करावे, एक भूमिग्रस्त, एक धर्म, एक व्यवहार, एक आप्तविषय त्यांस.' [ सं. ] ०जा-स्त्री. सीता; जानकी. [सं ] ०तल-न भूपृष्ठ [सं. भूमि+तल] ०तैल-न. खडकतेल; घासलेट; राकेल; पेट्रोल. [सं.] ०देव-पु ब्राह्मण. ' पूजनहि घेत नाहीं का? हो! या भूमिदेवदासाचें।' -मोसभा १९७.[सं ] ०धर-पु. भूधर; पर्वत [ सं ] ०निक्षेप-पु जमिनींत पुरून ठेवणें. 'भूमिनिक्षेप जे करूं जाती।' -एभा २३.१३४ [ सं. ] ०भार, भूमीस भार-पु. १ पृथ्वीवरील (पातकी लोकांचा) भार. 'हरितिल सर्वाहि भूमिभारा हे।' -मोकर्ण ४६.१४. २ अतिशय दुष्ट, कवडीमोल मनुष्य. 'भूमिभार जालों केवळ। हें तू कृपाळ जाणसी।' [सं ] भूमिया, भूमा-म्या-पु. १ जमिनीचा मालक. २ गांवचा मूळचा रहिवासी; फार दिवसांचा रहिवासी; गांवचा मुख्य पाटील; पाटील वगैरे हक्कदार (गुजराथेंत व राजपुतान्यांत) ३ भिल्ल जातीचा वाटाड्या ४ ( संयुक्त प्रांतांत ) एक ब्राह्मणाची जात [ सं भूमि; भूमिज ] ०रुह-पु. वृक्ष.' अग्रण्य भूमीरुह हा चढाया।' -सारुह १६२. [सं.] ०शयन-शय्या-नस्त्री जमिनीवर निजणें. [सं. ] ०सुर-पु ब्राह्मण, भूमीवरील देव. ' तें मज सांगुनि तूंहि स्वयशें तो जेंवि भूमिसुर साजे।' -मोमंभा २.१००

**भूय**—स्त्री. ( गो ) ( ल ) तळपट; नि संतान.

**भू-भूंय**—स्त्री १ पृथ्वी २ जमीन; भुई. ' जो भुईंभेणें पळों जाये । तो जेथें पळे तेथें भूये।' -एभा २५१२. जमीन शब्दाखालीं दिलेल्या सर्व अर्थी योजतात. [ सं. भू; प्रा. भुई ] ०कांदो-पु. ( गो ) भुईंकांदा; औषधी वस्तु ०घर-न (कों.) भुयार; तळघर ०मूग-पु. एक कंद; भुईंमूग पहा.

**भूयः**—क्रिवि. पुन.पुनः [ सं. भूयस् ]

**भूयसी**—स्त्री. १ धार्मिक विधीच्या शेवटीं, जमलेल्या सर्व ब्राह्मणांस द्यावयाची दक्षिणा २ मोठाल्या देणग्या (सर्वसाधारण आर्थिक अडचणीच्या वेळीं वारंवार पुष्कळांस दिलेल्या ). [ सं ]

**भूर, भुरी**—स्त्री. १ ज्यामुळें डोळ्यांस भुरकट अंधुक दिसतें असा रोग; डोळ्यांवरील अंधारी; बुबुळावरील सारा; पातळ पांढरा पडदा. २ शाड्. -वि. १ भुऱ्या रंगाचा; भुरा. २ क्षणभगुरता. ' दिसे तें तें भूर दादा सांगो काय अंतीं।' -भज ४१. [सं.अभ्र?]

**भूरेवडी**—स्त्री एक लहान झाड

**भूर्ज**—पु वृक्षविशेष. हीं झाडें हिमालयावर सांपडतात याची साल कागदापेक्षाहि अधिक टिकाऊ असते [सं.] ०पत्र-न. १ भूर्ज वृक्षाची आंतरसाल. हिंदुस्थानांतील बरेच प्राचीन ग्रंथ भूर्जपत्रावर लिहिलेले होते. सौगंधिक व जंतुनाशक गुणहि याच्या अंगीं आहेत २ (ल ) विरलेला कपडा. ३ अतिपातळ कागद. [सं ]

**भूल**—१ ( वाई ) एक वनस्पति. -मसाप ३ ३. २ गुरांचा एकं रोग. -शे ६ ४६.

**भूल-लि-ली**—स्त्री १ गुंगी; बेशुद्धपणा ( मादक पदार्थांच्या सेवनानें उत्पन्न झालेला ) २ मतिमांद्य; मनाचा गोंधळ, घोटाळा; बुद्धिभ्रंश; भ्रम. ( क्रि० पडणें, घालणें ). ' तरी जिंतलें जैसें भुली। पिसें आलापु घाली।' -ज्ञा १८.२६. ३ चूक; विस्मरण [ हिं. ] भूलथा(ता)प-स्त्री. फसवणूक; ठकवणूक; मन वळविण्यासाठीं केलेली हिकमत ( क्रि० देणें ). थाप पहा. [ भूल+थाप ] भू(भु)लभूलैया-स्त्री. एक प्रकारची चतुष्कोणी किंवा वर्तुलाकार केलेली, व्यूहाप्रमाणें रचना; चार चंद्र व चार बिंदु यांच्या जुळणीनें साध्य होणारी रचना. याची मख्खी माहीत नसेल तर आंत सांपडलेल्या मनुष्यास बाहेर पडणें कठिण जातें.

**भूषण**—न. १ अलंकार (शब्दः व ल ); भूषविणारी, मंडित करणारी, शोभविणारी कोणतीहि वस्तु (रत्न, दागिना, सद्गुण, सुलक्षण, गुण, विद्या). २ अलंकार; मंडन; शोभा ३ अलंकृत, मंडित स्थिति ४ मंडन; शोभन (शब्दः व ल) [ सं भूष् ] ०दूषण-न. सिद्ध करणें आणि असिद्ध करणें; वादप्रवाद; खंडणमंडण स्थापणें व टीका करणें; ( पक्ष, प्रमेय इ० ) [ सं. भूषण+दूषण ] ०प्रद-वि शोभादायक. [ सं ] भूषविणें-उक्रि. मंडित करणें; शोभविणें; अलंकृत करणें. ( शब्दशः व ल ) भूषा-स्त्री. भूषण पहा ' धाडा भूषा वसनें दासी-दासाश्व-हस्ति-रथ-रत्नें।' -मोकृष्ण ८६.४०. [ सं. ] भूषावें-न. भूषण. भूषित-वि. अलंकृत, शोभविलेला.

**भूस**—पु (गो.) जेवण. [सं. बुस] भूस-माप-कापणी-स्त्री. ( गो. ) जेवण व हजामत.

**भू-भूंस**—न १ भुसकट; तूस २ ( ल. ) क्षुद्र पदार्थ.'मोक्ष त्याचे दृष्टीं भूस।' -एभा २०.४१०. ३ चूर्ण; पीठ ( किडीनें खाल्लेल्या लाकडाचें ). ४ धान्याविषयीं सामान्य संज्ञा. 'तांदूळ भुसांत मोडतो कीं किराण्यांत मोडतो.' ५ भुसडा पहा [ सं. बुस; बं. भूशि; गु. भुसो, भुस; पं. भुस; हिं. भूस, भूसा; सिं. बुहु, बुहो; फ्रेंजि. फुस ( गवत, पाला ) ] म्ह० वाऱ्यावर वरात भुसावर चिठी. ०भरणें-यथेच्छ कुटणें, मारणें, चोपणें. भुसानें

**अंग भरणें**–१ (ल) गबर असणें (सावकारापुढें प्रतिष्ठा मिरविणाऱ्या खळयांतील भुसानें अंग भरलेल्या कुळास किंवा कुणब्यास त्याला भरपूर उत्पन्न झालें या अर्थानें म्हणतात) २ पुष्कळ संपत्ति असल्यामुळें फुगणें. **भुसके लाडू**–पुअव. १ लाकडाच्या भुसाचे लाडू (दिसण्यांत लाडवासारखे, पण खाऊं लागल्यास निरुपयोगी यावरून ल.) २ नकली भाषण किंवा कृत्य. **भूसा**–पु. १ भुसकट (काड वगैरेचें). २ गुळाचा एक प्रकार –शे ७ ८९.

**भृकुटी**—स्त्री १ भ्रूसंकोच; भिवया चढविणें; आठ्या पडणें. (प्र.) भ्रुकुटी. २ भिवई. 'भ्रुकुटि वक्र करुनि बघत।'–सौभद्र. [सं.] **०भंग**–पु कपाळास आठ्या घालणें; रागाची दृष्टि. (क्रि० करणें). [सं.]

**भृंग, भृंगराज**—पु भ्रमर; भुंगा. [सं] **भृंग(गि)राज**–पु १ माका; हा औषधी आहे. २ एक पक्षी. काकाकव्वा **भृंगिराज होणें**–एका पिसानें मोर होणें.

**भृंगा-गी**—स्त्री. भांग. [सं. भृंग]

**भृंगी**—पु. एक शिवगण. [सं.]

**भृगु**—पु. १ शुक्र. २ पर्वतादिकांचा उंच तुटलेला कडा. [सं.] **०पतन**–न. कड्यावरून पडणें. 'कीं भृगु–पतन तसें हें जें तूं करणार त्या अरींत रण।' –मोकर्ण २६.२८. [सं.] **०पात**–पु. डोंगरावरून करून घेतलेला स्वतःचा कडेलोट. [सं] **०वार-वासर**–पु. शुक्रवार. [सं.]

**भृति, भृत्या**—स्त्री. १ मजुरी; पगार; भाडें २ पोषण. [सं भृ=पोसणें] **भृत्य**–पु १ मोलकरी; मजूर, वेतन घेऊन काम करणारा. २ सामान्यतः चाकर. 'स्वामिभृत्याचा न करी। संवादु काई।' –ज्ञा १८.८५ ३ भक्त [सं भृ=पोसणें] **म्ह०** भृत्यकृतं राजनि=चाकराच्या कृत्यांचा सर्व मान, अपमान धन्याला मिळतो.

**भृशुंडी**—स्त्री. एक शस्त्र. 'मुद्गर चक्रें भृशुंडीसी।' –जै १८ ८५. [सं.]

**भृष्ट**—वि भाजलेला. [सं. भ्रस्ज्]

**भें**—न १ भय, भीति. 'प्रकट न तें वृत्त करी जाणो होईल त्या स्वनिधिला भें।' –मोवन ७.८७. २ भयाचें कारण; धोका [सं. भय] **म्ह०** शें तों भें, हजार तों बाजार, लाख तों काख. **भेणें, भेनें, भेन**–क्रिवि भीतीमुळें; भयाच्या प्रभावामुळें 'सर्वाभेनें जावें पण प्रालब्धा भेनें कोठें जावें.' 'देण्याभेन मला सुचत नाहीं' ' **म्ह०** गोड गारा असत्या तर कोल्ह्या भेनें न उरत्या. **भेउर-उरें**–न. भय; भीति. 'हे भवा भेउरें। आघवेंचि।' –ज्ञा १३ १०४०. **भॅकड, भेक(का.कु)ड**–वि भितरा. **भेकणा**–वि. १ कळप २ भेसुर –शर.

**भेक**—न. बेडूक. 'स्मरादि रिपु मन्मनीं अहि न काळ भेका कसे।' –केका २१. [सं.]

**भेक**—न. तुकडा; चीर; फाक; फोड. **भेकणें**–सक्रि. चिरणें; (पदार्थाची) फोड काढणें. [भेग] **भेकल**–न. (कु.) तुकडा.

**भेकणें**—अक्रि. (रडणें या शब्दाबरोबर प्रयोग उदा० रडणें भेकणें) रडणें; रडून आकांत करणें. भेकाड पहा [ध्व]

**भेकर-रें**—न. हरिणाची एक लहान जात 'जंबुक चितळे रोही भेकरें कुरवाळुन धरणें।' –ऐपो ३१०.

**भेकाड**—न. वासलेलें तोंड. (विरू.) भोंकाड पहा.

**भेग, भे(भें)गर, भेगळा-ळी**—स्त्री. चीर; फट; तडा. [सं. भिद्, भेदक; प्रा भेणग] **भेगलणें**–अक्रि उलणें; चीर पडणें; तडकणें (जमीन, हात, पाय इ०).

**भेजू(झू)ड**—वि १ लाजाळू; चारचौघांत बोलणें, चालणें ० विषयीं धैर्य नाहीं असा. २ भितरा; भेकड [भें. देप्रा. भेज्ज=भीरु]

**भेट**—स्त्री. १ गांठ; माणसांचा संयोग; मुलाखत. २ परस्परांची गांठ घेतांना दिलेलें आलिंगन; मिठी. ३ मोठ्या मनुष्यास भेटावयास गेलें असतां द्रव्य, वस्त्र, फळें इ०चा दिलेला नजराणा. ४ श्रेष्ठास किंवा इष्टमित्रास दिलेली देणगी, उपायन; बक्षीस. [देप्रा. भिट्टन; हिं.] **०बकरा**–पु. १ (ल.) कोणी सरकारी अंमलदार, देशमुख आपल्या गांवीं आला असतां त्याला गांवकामगार, गांवकरी देतात ती भेट, देणगी. २ लग्नांत वधूची आई, वराच्या आईला लग्नास नेतांना किंवा रासनहाणाच्या वेळीं देते तो नजराण्याचा मान. (वरील प्रसंगीं प्राचीन काळीं प्रत्यक्ष बकराच देत). [भेट+बकरा] **०भलाई**–स्त्री. (ना.) भेटीगांठी; बोलणें इ० **भेटणें**–अक्रि. १ एखाद्याकडे मुद्दाम कांहीं कारणासाठीं जाणें; मुलाखत करणें; गांठ घेणें. २ आलिंगणें; कवटाळणें. ३ यदृच्छेनें कोणी कोणाला दिसणें; गाठ पडणें. ४ (खा. व) मिळणें; पावणें. 'मला अमुक पैसे भेटले.' **भेटतखेवो**–क्रिवि. भेटतांक्षणीच. 'जीवीं बांधे उदका। भेटतखेवो।' –ज्ञा १४.९५. **भेटविणें**–सक्रि. १ गांठ घालून देणें; संयोग करून देणें. २ कवटाळविणें. ३ अर्पण करणें. 'बोधोनि पांचाळ नरेश्वर। भेटवी उपायनें अपार।' –मुआदि ४५ ६६. **भेटाभेट**–स्त्री. परस्परांतील भेट, आलिंगन इ० [भेट द्वि.] **भेटि-टी**–स्त्री. १ (काव्य) भेट; मुलाखत; गांठ. 'भेटी लागी पंढरीनाथा। मनालागी तळमळ वेथा।' २ नजराणा; देणगी 'गोडी याची मज बहु भेटि उदरा! तुला गमे थोडी।' –मोकृष्ण ८१.१६.

**भेड**—न. भय; भीति. 'हा ठेवोवेन्हीं वियोगभेडें। जें बाळ तरि जगायेवढें।' –अमृ १.६. –वि. (काव्य) भित्रा; भेकड; भ्याड. 'ऐसिया जी विषयभेडा। नाहीं निजबोधू धडफुडा।'

-एभा ६.२१. [ सं. भी-भेकंड; प्रा. भेड ] ०चित-वि. धैर्यहीन ०पण-न. भित्रेपणा; भ्याडपणा. 'बोध न करवे परिपूर्ण। हें भेडपण झाल्याचें।' -एभा २९.८२९. ०स(सा)र, भेडसारु-वि (काव्य) भित्रा; भ्याड. भेडसावणें-न पक्षी, पशु इ०स शेतांतून हाकलून लावण्यासाठीं करतात तें मनुष्याकृति बाहुलें; बुजगावणें. भेडसाविणें, भेड(डा)विणें-सक्रि १ भिववणें; भीति दाखविणें. 'यदूभी व्याली अभेद्य प्रबळ परम जे यादवां भेड सावी।' -मोकृष्ण ७६.४. २ धमकी देणें भेडका-वि. भित्रा; भ्याड. 'ऐसा मी विश्वमूर्ती। भेडका जाहलों।' -ज्ञा ११.३८६

भेंड—पुन. १ बोरू, जोंधळा इ०चें ताट, यांतील भुसभुशीत आणि मऊ गाभा. २ (ल.) भुरुभुरु जळणारें, हलकें लाकूड. ३ साबणीसारखा साखरेचा केलेला एक खाद्य पदार्थ ४ -न. (राजा) डोळ्यातील गू. ५ -न मासे धरण्याच्या जाळ्याच्या शेवटास लावलेला तरंगणारा लाकूड इ०चा तुकडा, बोयरा. ६ -पु. कानाच्या पाळींत दागिना घालण्यासाठीं पाडलेलें भोंक मोठें करण्यासाठीं त्यात घातलेला बोरू इ० चा तुकडा (क्रि० घालणें). ७ (कों) चिवट व हलकें असे गाडया इ० करण्यास उपयोगी एक लाकूड. 'तो वाढोनि मोडला। भेंडू जैसा।' -ज्ञा १८५७५. (गो.) पारसा पिंपळ.

भेडकी—वि. (व.) ठेंगू व किडकिडीत बांध्याचा (मनुष्य).

भेडणें—अक्रि. आट्यापाट्या, विटीदांडू इ० खेळांत खेळाडूंची वाटणी करतांना दोन दोन खेळाडूंनीं भेडतूकडे जाणें. भेडतूती, भेडू-पु १ आट्यापाट्या, विटीदांडू इ० खेळांतील गडी वाटून घेतेवेळचा एका पक्षाचा नायक भिडू पहा. २ (तिरस्कारार्थी व विनोदानें) सभा, संमेलन इ० चा अध्यक्ष; मुख्य.

भेडलोमाड—पु (कु) माडाचा एक प्रकार.

भेडस—स्त्री. (गो.) जांभळाच्या झाडासारखें एक इमारतीच्या उपयोगी जंगली झाड.

भेडस(सु)णें, भेरसुडणें—सक्रि. भिडसणें, भिडसुडणें पहा.

भेंडा—पु. १ (इमारतीच्या उपयोगाची) मातीची कच्ची वीट; मातीचें ढेकूळ. 'संसारकांत झाला मग जसा सागरोदरीं भेंडा।' -मोकर्ण ३०.२७ २ घोड्याच्या गुडघ्यावर होते ती गाठ; भेंडी. ३ मुद्दल तुंबून फुगलेली रकम; ढीग (व्याज, कर्ज इ०ची). (क्रि० जमणें; करणें; घालणें; असणें; वाढणें; फुगणें; फेडणें; फिटणें).

भेंडा—पु. १ एक वनस्पतिविशेष. २ त्याचें फळ. ३ लांकूड पोखरून खाणारा एक किडा. भेंडा लागणें-भेंडावणें-भेंडा नांवाच्या किड्यानें लांकूड, झाड इ० खाल्लें जाणें. भेंडाळणें-अक्रि. १ लठ्ठ, फोपसें होणें. २ अशक्त, कमजोर होणें (अवयव).

भेंडा—पु. (गो.) कंबर. भेंडाक धरप-अक्रि. (गो. कमरेस धरणें भेंडावप-अक्रि. (गो.) संभोग करणें.

भेंडी—स्त्री. १ एक फळभाजीचें झाड व त्याचें फळ. २ भेंडा अर्थ २ व ३ पहा. ३ रानटीचें एक झाड; भिरंड. ४ ज्याचें लाकूड तांबूस रंगाचें असतें असा एक वृक्षविशेष. ह्याच्या पुष्कळ जाती आहेत. [हिप्रा. भिंडिया! हिं भंटा] ०बीज-न. भेंडीचें बीं. हें अठरा उपधान्यापैकीं एक आहे. भेंडवडा-पु (व) भेंडीचा वडा; एक खाद्य पदार्थ.

भेडु(डू)का—वि १ भयभीत. २ भेकड; भितरा.

भेडुसान—पु (गो) बहिरेपणा.

भेंडो(डा)ळें, भेंडो(डा)ळा—नपु. गुंडाळी; सुरळी; वळकटी (कागद, दोरा इ०ची). 'तुका म्हणे तोयें आपुलें भेंडोळें।' -तुगा १०२९. बिंडोळें पहा.

भेंडोळें—न. (हैं. मराठवाडा) जाड थालिपीठ. धापडा-डें पहा.

भेण—न. भय; भीति. 'मग भेणें भेणें जैसें। मुखीं झाडा याववयाचेनि मिसें।' -ज्ञा ११.१८३. ०भेण-क्रिवि. भीतभीत. 'मग तैसाचि भेण भेण। पुढती जोहारूनि चरण।' -ज्ञा ११.४९०. भेणें-उक्रि. भिणें; भीति वाटणें. -क्रिवि भीतीनें 'तदितर खग भेणें वेगळाले पळाले।' -र १०. भेणेंभक्ति-भीतीनें केलेली परमेश्वराची भक्ति. भेणेंभाव-पु. भीतिजन्य ईश्वरभक्ति,भेणेंभक्ति.

भेणीस—स्त्री. (कु.) बहीण. [सं. भगिनी; प्रा भइणी]

भेत, भेतूक, भेतकूल—नस्त्री फळ, लांकूड इ०चा तुकडा; चीर; फाक; फोड; चिरफाळी; ढलपा. भेक पहा. -न. १ (गो) बांबूचें चपटें पातें. बीळ पहा. २ (कु.) मीठ वगैरे लावून सुकविलेली आंब्याची फोड. [सं] भेतणें-उक्रि. (पदार्थाच्या) उभ्या चिरफळ्या, फाकी काढणें. भेतलणें-अक्रि. (राजा) उभें फाटणें, चिरलें, भेगललें जाणें. भेतळ-ळा, भेताळ-पु. (राजा) जळणाकरितां फोडलेलें लांकूड; सर्पण; लाकडाचा जाड, लांब ओंडा. (विरु.) भितळा पहा. भेताळा-पु (राजा. कु.) मोठी भेग, चीर, फट.

भेद—पु. १ विभागणें; वेगळे करणें; गट्टी फोडणें; विभक्त करणें (क्रि० करणें). २ विभागलेली, वेगळेपणाची स्थिति ३ अलग होणें; वेगळेपणा; पृथक्‌पणा; भिन्नता. 'शिळा स्फटिकाची न पालटे भेदें। दाऊनिया छंदें जैसी तैसी।' -तुगा १३. ४ फरक; अंतर; दुजा भाव 'तुज मज जननी हा सर्वथा भेद नाहीं।' -सारुह २.१०४. ५ फरक करणें; वेगळेपणा करणें; भिन्नता करणें; दुजाभाव. (क्रि० करणें). ६ वर्ग; जाति; प्रकार; विभाग; तऱ्हा. 'जरी वेदें बहुत बोलिलें। विविध भेद सुचिले।' -ज्ञा २.२६०. ७ मतभिन्नतेमुळें आलेलें वितुष्ट; बेबनाव; फाटाफूट; विरोध. 'त्यांतील एक फुटकी कवडी। भेदू पाडी सुहृदांसी।' -एभा २३.३५४ ८ वैर; स्नेह नाहींसा करणें; शत्रूस जिंकण्याच्या चार

प्रकारापैकीं एक. साम, दाम, दंड पहा. ९ एखाद्या गोष्टीपासून परावृत्त होणें, माघार घेणें; मन इ० त झालेला बदल, पालट. 'हा चाकरीस कबूल झाला होता तुम्ही त्याचा भेद केला म्हणून राहीनासा झाला.' १० गुप्त बातमी; रहस्य; फितुरी. 'दिल्लीचा भेद झाडून मजपाशीं आहे.' -भाब २५. ११ (तत्वज्ञान) फरक; वेगळेपणा; भिन्नता. त्याचे तीन प्रकार आहेत- स्वगतभेद (उदा० आंब्याच्या पानांशीं मंजरी भिन्न आहे); सजातीयभेद (उदा० आमवृक्ष हा बकुलाशीं भिन्न आहे); विजातीय भेद (उदा० वृक्ष हा दगडाशीं भिन्न आहे) 'विजातीय भेद ते ठायीं। नसे सजातीय भेद् कांहीं। स्वगतभेद् तोही नाहीं। भेदशून्य पाहीं ये रीतीं।' -एभा ९.१९२. १२ (व्या.) कर्ता कांहीं क्रिया स्वतः करतो किंवा दुसऱ्याकडून करवितो किंवा ती क्रिया करण्याचें कर्त्याला सामर्थ्य आहे हे अर्थ दाखविणारी क्रियापदाच्या रूपांत केली जाते ती भिन्नता. त्याचे मूळरूप, प्रयोजक व शक्य असे तीन प्रकार आहेत. [सं. भिद्= फोडणें] ०अर्थ, भेदार्थ-पु. दुसरा हेतु; खरें लपवून दुसरेंच सांगणें. 'तरी तुम्हास भेद अर्थ कासयास दाविते।' -कचेसुच ५. ०त्रय-त्रितय-न. भेद अर्थ ११ पहा. 'तैसा मी पूर्ण पुरातन भेदत्रय नाहीं।' -वेप १०४. [सं] ०दृष्टि-बुद्धि-स्त्री. (हें माझें हें दुसऱ्याचें, कार्य निराळें, कारण निराळें इ०रूप) दृष्टीची भिन्नता; निराळेपणा. [सं] ०प्रत्यय-बुद्धि-पुस्त्री. १ ब्रह्मापासून सृष्टि अगदीं स्वतंत्र आहे असा विश्वास, मत; द्वैतवाद २ भेददृष्टि पहा. [सं.] ०भाव-पु. भिन्नत्वाची बुद्धि, परकेपणाची भावना 'मग ते पाषाण सहसाही। भेद भाव न धरिती।' ०युति-योग-स्त्रीपु (ज्यो) योगांत सूर्य व खस्थ पदार्थ ह्यामधील दक्षिणोत्तर विवर त्यांच्या त्रिज्यांच्या बेरजेपेक्षां कमी असलें म्हणजे त्या खस्ताचें बिंब सूर्यबिंबाच्या आड येतें असा योग. -सूर्य २४. ०वाद-पु. परमात्मा आणि विश्व भिन्न आहेत असें तत्त्व किंवा त्याचें समर्थन; द्वैतवाद. [सं] ०वादी-पु. भेदवादाचें समर्थन करणारा; द्वैतवादी. भेदक-न. (कों.) सुपारीचें खांड. -वि. भेद करणारा; विभक्त, पृथक् करणारा. 'दक्ष धूर्त योग्य तार्किक। सत्य साहित्य नेमक भेदक।' -दा २.८.१३. [सं.] भेदणें-सक्रि. १ विभागणें; विभक्त करणें; वेगळें करणें (शब्दशः व ल). 'मग भेदिलें गुणीं तिहीं।' -ज्ञा १७.१९९. २ छेदणें; फोडणें, कोरणें. 'जैसा भ्रमर भेदी कोडें। भलतैसें काष्ठ कोरडें।' -ज्ञा १.२०१. ३ फरक; दुजा भाव करणें. ४ (औषध, विष इ० शरीरांत) भिनणें; जिरणें; मिसळणें. ५ आपल्या पक्षाकडे वळविणें; बुद्धिभेद करणें; फितूर करणें. 'तुज भेदिलें परांनीं स्पष्ट म्हणुनि बोलसी असें खोटें।' -मोकर्ण २७.४७. ६ मारणें. 'त्यासमयीं रघुराजें धरिला भेदावया शर क्षितिला।' -मोमंत्ररा उत्तर कांड ३७०. ७ टोंचणें. 'चापच्छेदी भेदी मर्मी निर्मी घडींत शतमाया।' -मोभीष्म ८.२३. भेदन-न. भिन्न, वेगळें करणें; पृथक् करणें. [सं.] भेदनीय-वि. विभक्त, वेगळें, पृथक् करण्यास योग्य, लायक. [सं.] भेदाभेद-पु. भिन्नभाव; भेदभाव; भिन्नता; फरक. 'ब्रह्मस्वरूपीं कांहीं भेदाभेद नाहीं।' [भेद+अभेद किंवा भेद; द्वि.] भेदि(दी)क-वि. हृदयापर्यंत खोल जाऊन पोंचणारें (वेदांतपर व गूढ अर्थाचें गाणें, पोवाडा, लावणी इ०) 'टाळ, वीणा, पखवाजावर गोड भजन करावें अथवा भेदिक लावण्या गाव्या ...' -खेया ५७. भेदित-वि. विभागलेलें; भिन्न, वेगळें, विभक्त केलेलें. [सं] भेदी-भेद्या-पु. १ गुह्य, मर्म, अंतस्थ गोष्टी जाणणारा (राज्य, स्थळ, कामधंदा इ० च्या). २ असल्या गुह्य गोष्टी फोडणारा; भेद करणारा, फितुरी. 'आधीच शहर खाली आणि नजीबखान तो केवळ भेद्या.' -भाब २६ भेद्य-वि. भेदावयास योग्य, शक्य; फोडण्यासारखा; विभागण्यासारखा. [सं.]

भेदड—वि. भितरा; भ्याड. [भें, भय]

भेदर-री—नस्त्री. (व.) बिरवांगें; टोमाटो.

भेदरणें—अक्रि. (एकाच स्थितींत राहिल्यामुळें गात्र इ०स) बधिरता येणें. (गो.) भेऱ्यौचें [बधिर]

भेद(दा)रणें—अक्रि. भिणें; घाबरणें; भीतीनें गांगरून जाणें; भयभीत होणें; भांबावणें. [भें] भेद(दा)रा-पु. १ भय; भीति; काळजी. (क्रि० सुटणें). 'विद्युत्पातें अति भेदरा। पक्षीव्रातें दाविती।' -मुआदि ६.४८. २ दहशत; वचक; धडकी; धास्ती; दरारा. (क्रि० घेणें, बसणें, होणें). भेभि(भी)स्त-वि. भितरा; भ्याड; भेकड. 'त्यांत आम्ही भेभिस्त तुझीं बोलाया वाटे भये।' -होला १८०. [भयभीत]

भेंवचें—अक्रि. (गो.) मेंढरानें ओरडणें. [ध्व.]

भेर—स्त्री. (राजा.) भेग; चीर; फट.

भेर—स्त्री. बोरीचें झाड; बोर पहा.

भेर, भेरी—स्त्री. १ मोठा नगारा; नौबत. २ कर्ण्यासारखें एक वाद्य. ३ (ल.) ढेर; फुगीर पोट. ४ झाडाचें पुढें आलेलें खोड. ५ अतिशय मोठा दगड. [सं. भेरी]

भेरका—वि. (व.) तिरळ्या नजरेचा.

भेर(ल)गा—पु. वृषण सुजून तें खालीं लोंबण्याचा विकार. अंडवृद्धि; अतगळ. (क्रि० उतरणें, ओसरणें, बसणें). [भेला=गोळा]

भेर(रु)ड—न. १ झाड, फळ इ० पोखरून नासाडी करणारा किडा (क्रि० लागणें). २ या किड्यामुळें झाड इ० स उत्पन्न होणारा रोग ३ (ल.) ज्यांत शरीर झिजत जातें असा रोग. ४ (ल.) सावकार इ०चा पैशासाठीं लागलेला तगादा; (सामा.) कटकट; तगादा. (क्रि० लागणें). [प्रा.] भेर(रु)डणें-अक्रि. भेरड नांवाच्या किड्यांनीं झाड पोखरलें जाणें.

भेरड—न. डोळ्यांतील गू, मळ.

**भेरंड**—स्त्रीन. एक वृक्ष व त्याचें फळ. भिरंड पहा. **भेरंडेल**–न. भेरंडाच्या फळांचें तेल; भिरंडेल.

**भेरडा**—पु. बेहेडा पहा.

**भेरला(ली)माड, भेलडामाड, भेरळ, भेरळीमाड, भेलामाड**—पु. माडाची एक जात; सुरमाड.

**भेरा**—वि. १ (राजा.) बहिरा; बधिर कानाचा. २ बधिर; सुना; निर्जीव; संवेदनाशून्य. [बधिर] **भेरकट**–वि. किंचित बहिरा; बहिरट. **भेरवाची सेवा असणें**–बहिरा असणें.

**भेरा**—पु. १ (व.) आडवे उभे दोन लांकडाचे तुकडे एकत्र जुळवून आणि मध्यभागीं भोंक पाडून त्यांत एक उभा दांडा लावलेलें चक्रासारखें, दोरीस पीळ देण्याचें साधन. २ (व.) खांबावरचा उथळा. ३ (व.) फक्त तुंबा व आरे लाविलेला चाकाचा भाग.

**भेरुता, भेरुवात**—स्त्रीपु. स्थूलता आणणारा एक वातविकार.

**भेल-ली**—स्त्री. (कों) गुळाची ढेप; थापटी. (व.) भेलकी.

**भेल**—स्त्री. १ मिसळ; मिश्रण; भेळ. २ भरतीला घातलेली, मिसळलेली वस्तु. [प्रा भेल] **भेलण**–न. भेल अर्थ २ पहा. **भेलणें**–उक्रि. मिसळणें; एकत्र करणें; मिश्रण करणें.

**भेलकंड-कंडा-डी**—नपुस्त्री. झोकांडी; झोक. (क्रि० जाणें, खाणें). **भेलकंडणें**–अक्रि. झोकांडी जाणें; अडखळत, हेलकावे खात चालणें.

**भेला**—पु. १ कडबा, सरम, गवत इ०चें लांबच लांब वेटोळें, गुंडाळा. ओलावा, लोणा यापासून धान्याचें रक्षण व्हावें म्हणून हा पेवांत धान्याभोंवतीं घालतात. (क्रि० घालणें, बांधणें, बसविणें). २ (क.) भेलगा पहा. ३ ढेप; रास; गोळा (गूळ, साखर, लोणी, खवा इ० चा). 'हातीं गुळाचा भेला। रसना चाटीतसे ज्याला।' –यथादी २.३६८. 'आधींच नैषधकथा नवनीत भेला।'–र २६.

**भेलांडा**—पु. (कु.) लहान मुलांस द्यावयाच्या बाळ औषधांतील, बाळगुटींतील समुद्र फळ.

**भेलोंड**—न. (व.) जबरदस्त दुःख, संकट.

**भे-भेव**—न. भय; भीति. (क्रि० वाटणें, लागणें). 'तंव शाखा कडाडली भेवो। नाना खेचर पळाले।'–मुआदि ५.११४. [सं. भय] **भेवाडणें**–सक्रि. (व.) भेडसावणें पहा.

**भेश-स**—स्त्री. तुकडा; फाक; भाग. –न. (कु.) भेस्कूट.

**भेश-ष-स**—पु. १ पोशाख; पेहेराव; वेष. २ पोशाखाची तऱ्हा. ३ सोंग; रूप; वेष. 'ऐसे नाना भेष घेउनि हिंडती। पोटासाठीं घेती प्रतिग्रह।'–तुगा २८३८. [सं. वेष; प्रा. वेस; हिं. पं. भेस]

**भेषज**—न. औषध. [सं.] **भेषजी**–पु. औषधें विकणारा; पसारी.

**भेषयाळें**—वि. (कु.) ज्याच्या भेशी, भेशी काढतां येतील इतकें जून झालेलें (शहाळें).

**भेषावप**—सक्रि. (गो.) भिवविणें; भेडसावणें.

**भेसक**—वि. मिश्रित; मिसळलेलें. 'रजचि तमभेसक। तेथ शूद्र ते गा।'–ज्ञा १८.८२९.

**भेसर**—वि. भितरा; भ्याड; भेकड. [भय]

**भेसळ**—स्त्री. मिश्रण; मिसळ; भेळ. **भेसळणें**–अक्रि. मिसळणें; भेळणें; मिसळणें पहा. 'पाठीं तेथेंचि तो भेसळला। तंव शब्दाचा दिवो मावळला।'–ज्ञा ६.३१४.

**भे(भें)सूड-सूर**—वि १ भितरा; भ्याड. २ भयंकर; भीतिप्रद; भयाण; अकाळविकाळ. [भें]

**भेळ**—स्त्री. भेसळ; मिसळ. भेल पहा. [हिं.] **भेळाभेळ**–स्त्री. मिसळलेली, मिश्रित स्थिति. **भेळणें**–उक्रि. मिसळणें; भेलणें.

**भेळा**—पु. १ भेला अर्थ १ पहा. २ एक जंगली वृक्ष.

**भैण, भैणुली**—स्त्री. (कु. कों) बहीण. [सं. भगिनी; प्रा. भइणी] **भैयनझंवरा**–वि. (हेट.) (शिवी) भानचोद याप्रमाणें.

**भैम**—वि. भयंकर; भीतिप्रद; भेसूर; दारुण. [सं.]

**भैय्या, भैय्यन**—पु. पुरभय्या पहा.

**भैरव**—पु. १ शंकराचा एक अवतार. विशेषतः असितांग, रुरु, चंड, क्रोध, उन्मत्त, कुपति (किंवा कपाल) भीषण आणि संहार हीं शंकराचीं आठ रूपें, मूर्ती. २ (सामा.) खंडेराव. 'भैरव। भगवती मल्लारी। मुंजा नृसिंह बनशंकरी।'–दा ४.५.७. ३ एक राग. ह्यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण–संपूर्ण. वादी धैवत. संवादी ऋषभ गायनसमय प्रातःकाल. ह्याच्या अवरोहांत कोमल निषादाचा अल्प प्रयोग विवादी ह्या नात्यानें केलेला दिसतो. ह्याचे अहीर, आनंद, गुणकली, प्रभात, बंगालशिव, रामकली, सौराष्ट्र, हिजेज इ० प्रकार आहेत. ४ स्त्रियांचें एक कर्णभूषण. –वि. भयंकर; भीतिप्रद; भीषण. 'पापासि काळ आणि भैरव दुष्टभावा।'–नरहरि, गंगाधररत्नमाला १५४ (नवनीत पृ ४३३). [सं.] **०गुंडा**–पु. (महानु.) मोठा दगड. 'नक्षत्रांचा भैरवगुंडा। केवि पाडिजे गगनीचा हुडा।'–भाए ५९४. **०चक्र**–न. भीषण परिस्थिति. **०जोगी**–पु. कानफाट्या गोसावी; हे भैरवभक्तहि असतात. **०थाट**–पु. (संगीत.) एका थाटाचें नांव. ह्याचे पुढील सात स्वर असतात–शुद्ध षड्ज, कोमल ऋषभ, शुद्ध गांधार, शुद्ध मध्यम, शुद्ध पंचम, कोमल, धैवत, शुद्ध निषाद. **०फेरा-री**–पुस्त्री. कानफाट्याची संध्याकाळची भिक्षेची फेरी. **भैरवाष्टमी**–स्त्री. कृष्णपक्षांतील अष्टमी. [भैरव+आष्टमी] **भैरवी**–स्त्री. १ एक राग. ह्यांत षड्ज, कोमल ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण–संपूर्ण. वादी धैवत. संवादी

गांधार. गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर. कोणी त्यास सार्वकालिक मानितात त्याच्या अवरोहांत तीव्र ऋषभ विवादी या नात्यानें दिलेला दृष्टीस पडतो. २ दुर्गादेवी· **भैरवीचक्र**-नपु. तंत्रशास्त्रापैकीं एक चक्र यंत्र 'भैरवीचक्रें बहुत केलीं। आणि साम्प्रदायाहातीं ही करविलीं।'-कथासा १४.१११. **भैरवी थाट**-पु.(संगीत) एका थाटाचें नांव. त्याचे पुढील सात स्वर असतात. शुद्ध षड्ज, कोमल ऋषभ, कोमल गांधार, शुद्ध मध्यम, शुद्ध पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद **भैरवी यातना**-स्त्री. काशीमध्यें जो मरण पावतो त्याच्या पदरीं जें पाप असतें त्याच्या निरसनार्थ भैरवापासून जी यातना सोसावी लागते ती **भैरी**-पु. भैरव नांवाचा देव

**भैरी**—पु बहिरा माणूस ०**वे(ठय)था**-स्त्री. त्वचेचें स्पर्शज्ञान नाहींसें होणारा रोग; बधिरता.

**भैरी, भैरीससाणा**—पु. एक पक्षी; बहिरीससाणा पहा.

**भैरूपी**—पु. अनेक सोंगें घेऊन उपजीविका करणारा; भोरपी; बहुरूपी. [बहुरूपी]

**भैरोजळप**—पु (कु.) भलतीच बडबड; फाजील वागणूक. [बधिरजल्पना]

**भैरोबा**—पु १ भैरव. २ बहिरा मनुष्य; बहिरोबा.

**भैषज्य**—न. औषधाची योजना; औषधोपचार. [सं.]

**भैसान**—वि (व.) फार मोठा; भयंकर 'नदीला भैसान पूर होता तरी त्यानें उडी टाकली.' [भय]

**भैक्ष-क्ष्य**—न. १ भिक्षा मागून मिळालेलें अन्न. २ भिक्षा मागण्याची वृत्ति, भिक्षेगिरी [स.] ०**जीविका-चर्या-वृत्ती**-स्त्री भिक्षा मागून उदरनिर्वाह करणें 'भिक्षुकवृत्ति आणि परतंत्रता हीं दोन्ही पत्करण्याइतका कोणी शहाणा निघेल असें आम्हांस वाटत नाहीं.'-टिळे २.७७

**भोइरा**—स्त्री उंबाऱ्या चुलाण्याची राख जेथें पडते ती जागा. [भुई]

**भोइ**—स्त्री. जमीन, भुई पहा. 'मग तूं राहे भलते ठायीं। जनीं वनीं खाटे भोई।'-तुगा ३३३७ [सं भू]

**भोई**—स्त्री. (अशिष्ट.) भुवई.

**भोई**—पु. १ पालखी, मेणा, डोली इ० वाहणाऱ्यांची जात व तींतील व्यक्ति डोलकर; कोळी; ढिवर. २ (सामा.) पालखी, डोली इ० वाहणारा इसम. ३ (ल.) पाळण्याच्या आधाराचे जे चार खूर ते प्रत्येक. ४ मुलांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द; भोग्या. [हिं.] ०**खाना-महाल**-पु. पालख्या, मेणे इ० जेथें ठेवतात व जेथें ते वहाणारे भोई राहतात ती जागा. ०**राज**-पु. (गौरवानें) भोई; पालखी इ० वाहणारा.

**भोईनखाल्या**—पु. (व.) हलक्या दर्जाचा मनुष्य. [भुई+खाणारा]

**भो(भों)क**—न. १ छिद्र; बीळ; वेज. २ (ल.) पोकळपणा; पोखरलेली स्थिति. 'बाहेर सावकारी मोठी दिसती परंतु आंत सारें भोंक आहे.' ३ (ल.) दरबार, संस्था इ० मध्यें प्रवेश, संधान, वशिला. [सं भूक; का बोक्के] **भोकणा**-वि. (ना. व.) आंधळा (तिरस्कारार्थी); एकडोळया. **भोकणें**-सक्रि. १ भोक पाडणें; छिद्र, बीळ करणें. २ खुपसणें; भोकसणें. **भोकसणें**-सक्रि. (विरू) भोसकणें पहा. **भोकसा-से**-पुन. (राजा) १ मोठें भोंक; भगळ; फट. (क्रि० काढणें; निघणें). २ व्यापारांत झालेला तोटा, नुकसान. (क्रि० निघणें). ३ वशिला.

**भो(भों)क**—पु. (राजा) १ कुत्र्याचें ओरडणें; भुंकणें २ (ल.) (लहान मुलानें) एकाएकी मोठ्यानें रडणें; किंकाळी, टाहो फोडणें. (क्रि० फोडणें). 'पोरानें रडें गिळलें पण आई दृष्टीस पडताच भोंक फोडलें' [भुंकणें] **भोकण**-न (लहान मुलानें) एकाएकीं मोठ्यानें रडणें; किंकाळी फोडणें. **भोकणी**-स्त्री. भुंकणें; कुत्र्याचें ओरडणें. **भोकणें**-अक्रि (कुत्र्याचें) ओरडणें; भुंकणें. **भोकभर**-क्रिवि. कुत्र्याचें भोंकणें ऐकूं जाईल तेथपर्यंत (अंतर). [सं. बुक्क]

**भो(भों)कर**—स्त्री. १ एक फळझाड; शेलवट. या झाडास पांढरा गोंद येतो. २ -न. भोकरीचें चिकट व रसानें युक्त असें फळ. याचे लोणचें होतें. ३ स्त्रियांचें एक कर्णभूषण. ०**डोळ्या**-वि. बटबटीत, मोठ्या डोळ्याचा. ०**बाळी**-स्त्री. स्त्रियांचें कर्णभूषण. **भो(भों)करी**-स्त्री भोंकराचें झाड.

**भो(भों)कसा-सें**—पुन १ मेलेल्या जनावराच्या कातड्यांतील मांस, हाडें इ० 'जेणें सत्याचा भोकसा काढिला। मग असत्य तृणकुटा भरिला।'-ज्ञा ३.२५०. २ (महानु) गवसणी; खोळ. 'थवथविता मांसा। घातला चामाचा भोकसा।'-भाए ७५८. ३ छिद्र; बीळ. [भोक]

**भोका, भोकेसंन्यास-सी**—बोका, बोकेसंन्यास-सी इ० पहा.

**भो(भों)काड-र**—न. रडणें, खाणें इ० प्रसंगीं वासलेलें तोंड (क्रि० पसरणें; वासणें; विचकणें; काढणें). [भोक=छिद्र]

**भो(भों)कू**-पु १ भोक; छिद्र. २ कुंपण, भिंत, वई इ० मध्यें पडलेलें भोक, खिंडार, वाट.

**भोक्ता**—वि. १ उपभोग घेणारा; भोगणारा २ अनुभविणारा. ३ खाणें, पिणें इ० सुखांची उत्कट आवड असलेला. ४ गुणज्ञ; मार्मिक; दर्दी. [सं.] **भोक्तव्य**-वि. भोगास आलेलें; भोगावयाचें (सुख, दुःख इ०). [सं.] **भोक्तृत्व**-न. १ प्रारब्धयोगानें जें भोगलें पाहिजे असें आपल्या नशिबीं ठरलेलें असतें तें. २ भोग; सहन करणें; अनुभविणें. ३ दैव; नशीब. [सं.]

**भोग**—पु १ उपभोग; सुखदुःखाचा अनुभव. (क्रि० घेणें; करणें). 'यां सकळांतें वधावें। मग जे भोग भोगावे।'-ज्ञा

१.२११. २ उपभोगिलेलें सुख किंवा दु:ख; विषय. ३ उपयोग; वापर; ताबा असणें. (क्रि० करणें; घेणें). 'तुम्ही या शाल-जोडीचा आजपर्यंत भोग घेतलात.' ४ उपभोगण्याचा, अनुभवि-ण्याचा कोणताहि विषय. 'झालों कर्मधर्मविरहित। मना आवडे तो भोग भोगीत।' ५ दैवगतीनें भोगावें लागणारें सुखदु:ख (क्रि० येणें; उठणें; उभा राहणें; उचलणें). 'भोग असेल तितका भोगून सारला पाहिजे' ६ (काळ, प्रवेश इ० चें) आक्रमण; ओलांडा. 'सूर्य प्राय: तीस दिवसांत एक राशीचा भोग करतो.' ७ आक्र-मण केलेली स्थिति यावरून ८ आकाशांतील रेखांश. ९ ताऱ्याचें शरवृत्त आणि उत्तरायणपातांतील शरवृत्त ह्या पातळ्यामध्यें जो कोन होतो त्याला त्या ताऱ्याचा भोग म्हणतात. –सूर्य १८. १० कष्ट; त्रास 'जरी मित्र आहे हरी तूमचा हो। तरी भोग का न सुटे आमुचा हो।' –कचेसुच ३. ११ सुखदु:खादि अनुभवाचें फळ, प्रारब्ध, दैव; नशीब. 'भजन घाली भोगावरी। अकर्तव्य मनीं धरीं।' –तुगा २९०४. १२ नैवेद्य 'तो भोग पारतंत्र्याचा।'–संग्रामगीतें १२. १३ मैथुनसुख. १४ शिजत असतांना भांड्याच्या वर आलेला भात. १५ नागाची फणा [सं.] म्ह० भोग फिटे आणि वैद्य भेटे. (वाप्र.) **०येणें**–दैवगतीनें सुखदु:खादि नशिबी येणें. 'आलिया भोगासी असावें सादर।' **०चढविणें–लावणें**–देवास नैवेद्य दाखविणें. **भोगास येणें**–(कोणतीहि गोष्ट) अनुभवण्याचा प्रसंग नशीबीं येणें. सामाशब्द– **०चतुष्टय**–न. चार प्रकारचे भोग; स्थूलभोग, प्रविविक्त भोग, आनंदभोग आणि निरानंद-भोग याचा समुच्चय. **०पति**–पु. (कायदा) एखादा पदार्थ ज्याच्या ताब्यात आहे असा मनुष्य; वस्तूचा मालक. [सं] **०भरणि–णी**–स्त्री भोग भोगणें; दु:ख सोसणें. 'अकळ प्रारब्ध भोगभरणि।' –ज्ञानप्रदीप २४७. **०भूमि**–स्त्री स्वर्ग; इंद्रलोक. [सं.] **०भोगवटा**–पु पदार्थाचा उपभोग; ताबा; वापर इ०. 'माझा बाप ह्या वतनाचा भोगभोगवटा घेऊन देशांतरीं गेला.' **०मूर्ति**–स्त्री. १ उत्सवांत मिरवावयाची मूर्ति; दिखाऊ शरीर. 'हे ही पांडुहि विदुरहि या यांच्या भोगमूर्ति, हे शिव रे!' –मोउद्योग ११ ६१. २ (ल) कांहीं एक न करतां लोकांच्या श्रमाचें फळ उपभोगणारा इसम; मालक; धनी. ३ एखाद्या संस्थेंत प्रत्यक्ष काम करणारा मालक. [सं.] **०लाभ**–पु. एखाद्यानें आपल्याकडे ठेव म्हणून ठेवलेल्या वस्तूपासुन झालेला फायदा. [सं.] **०वटा**–पु उपभोग; वापर; वहिवाट; कबजा; ताबा. **०वटदार**–पु (गो) जमिनीचा उपभोग घेणारा; धनी, वहिवाटदार **०विडा**–पु. नऊ पानें, नऊ सुपाऱ्या इ० घालून नऊ विडे करून ब्राह्मणांस किंवा सुवासिनीस मकरसंक्रांतीच्या दिवशीं स्त्रिया देतात त्यापैकीं प्रत्येक **०विलास**–पु. सुखोपभोग. चैनबाजी. [सं.] **०क्षम**–न शरीर. 'आणि तयाचि स्थिति तमीं। जे वाढोनि मिमती भोगक्षमीं।' –ज्ञा १४.२७४. –वि. भोगांना योग्य; भोगण्यास योग्य. 'निगे सांडूनि कोपट। भोगक्षम हें।' –ज्ञा १४.२१८. [सं.] **०क्षीण**–वि. ज्याचें प्रारब्ध संपलें आहे असें. 'पाठीं भोगक्षीण आपैसें। देह गेलिया ते न दिसे।' –ज्ञा १५ ३७५.' **भोगायतन**–न अंत:पुर 'देवाचिया भोगा-यतनीं। खेळतां आशंकेना मनीं।' –ज्ञा ११.५५२. [सं. भोग+आयतन] **भोगावळ**–न (गो.) पिशाच्यांना दाखवावयाचा वार्षिक नैवेद्य, देणें. [भोग+आवली] **भोगी**–पु साप. 'भोगी तुम्ही उपजलां जरि नागलोकीं।' –र ४१. –वि. १ भोक्ता; हौशी; विलासी; रंगेल. २ भोगणारा; सुखदु:खादि अनुभविणारा, सहन करणारा **भोगी**–स्त्री १ मकरसंक्रांतीच्या पूर्वीचा दिवस. २ नरक-चतुर्दशीच्या पूर्वीचा दिवस **भोगीचा विडा**–पु. (बायकी) भोगविडा पहा. **भोगीभूषण**–पु शंकर; शिव –हंको. **भोगी(गि)या**–वि भोग घेणारा 'स्वामी तुकयाचा भोगिया चतुर।' –तुगा १३४. **०राव, भोगीं(गें)द्र**–पु. शेष. 'टाकोनि कपट कुटिल भाव। स्वामीसी हांसे भोगिराव।' –ह ३.१८. **भोगोत्र, भोगोत्तर**–न. व्यक्तिश: उपभोगण्यासाठीं विशेषत: ब्राह्मणास दिलेलें इनाम (जमीन इ०). [सं. भोग+उत्तर] **भोग्य**–न. उपभोग, वहिवाट; वापर; ताबा; कबजा (क्रि० करणें). –वि. १ भोगण्यास किंवा सोसण्यास योग्य, जरूर, शक्य; अनु-भवनीय २ उपयोगी; उपभोगण्यासारखें; वापरण्याजोगें 'कांहीं भोग्य वस्तू गहाण ठेवशील तर व्याज हलकें पडेल.' ३ ग्रहादि-कांनीं आक्रमावयाचा राहिलेला (मार्ग). [सं.] **भोग्या**–पु. १ आंधळी कोशिंबीर; इरगीमिरगी इ० खेळामध्यें सर्वांनीं येऊन ज्यास शिवावयाचें असतें असा मनुष्य, दगड, खांब इ० लपंडाव, डोळेझाकणी इ० खेळांत दुसऱ्याचे डोळे झाकणारा २ वेश्येचा उप-भोग घेणारा. 'जसा भोग्या मिळेल तशी रात्र कंठावी.' [भोग] **०शिवणें**–एखाद्याकडून काहीं प्राप्त करून घ्यावयाचें असतां तें प्राप्त होत नाहीं असें समजलें असताहि त्यास वारंवार भेटणें, प्रयत्न करणें. **०भोंवर**–पु निर्लज्जपणें वेश्येच्या नादीं लागलेला पुरुष. म्ह० भोग्या भोंवर, लाटया ओंबर. **भोगणें**–सक्रि. १ उपभोगणें (सुखदु:ख); सोसणें, अनुभविणें; सहन करणें. २ उपयोग करणें; ताबा असणें; वापरणें. ३ उपभोगलें जाणें; मिळलें जाणें. 'त्या कुळाकडून पंचवीस रुपये व्याज आम्हास भोगलें.' –अक्रि. (ना) संपणें; पूर्ण होणें. 'आज ३० तारीख आहे. आज तुझा महिना भोगला.'

**भोंग**—न. (व) भोंक; छिद्र. [भोंक] –वि. (व) मूर्ख; अक्कलहीन.

**भोंग गा**—पु. एक पंखाचा किडा; भ्रमर; भुंगा. 'भोंगें गांधेलें माविती।' –दा १.१० ५५. [भ्रमर]

**भोगतृत्व**—न. (अप.) भोक्तृत्व पहा.

**भोग(गा)वती**—स्त्री. पाताळगंगा. [ सं. भोगवती ]

**भोंगळ**—स्त्री. तुतारी; पिपाणी; कर्णा. ' भेरी निशाण मांदळ। शंख काहळा भोंगळ। '—ज्ञा १.१३२. [ ध्व. ]

**भोंगळ-ळा**—वि. १ सैल; ढिलें; न आवळलेलें ( गाठोडें, गड्डा, पोशाख इ० ). २ सैल कपडे घालणारा; अजागळ (मनुष्य). ३ अर्धवट; मूर्ख ( मनुष्य ). ४ अव्यवस्थित; ढिलाईचा ( धंदा, काम ). ५ पोकळ; कमजोर; भरींव नसलेला ( वासा, खांब, दाणा इ० ). ६ हलकी; पोकळ ( कवडी ). ७ ज्याचें भोंक मोठें झालें आहे असा ( मोती ). ८ ( व. ) नागवा; नागडा; वस्त्रहीन; उघडा. [ भोंक ] ०**कवडी**—स्त्री. (ल.) अजागळ, वेडसर मनुष्य. ०**जमा-खर्च-रकम**—पुस्त्री केवळ दाखविण्यापुरता सरासरी अव्यवस्थित-पणें ठेविलेला जमाखर्च किंवा दर्शनी रकम; निश्चित नव्हे अशी रकम. ०**तारीख**—स्त्री. कोणत्याहि तारखेचा न जमलेला जमाखर्च. ०**पणा**—पु. सैलपणा; ढिलाई; अव्यवस्थितपणा. ' ... आणि फुकट भत्ता देणें यांत सरकारचा भोंगळपणा आहे.'—इनाम १३४. ०**भट**—पु. अजागळ, नेभळट ब्राह्मण; पोकळभट. ०**वही**—स्त्री. अव्यवस्थित जमाखर्चाची वही. ०**सुती-सूत्री**—वि. सैल; नेभळट; अव्यवस्थित; ढिलाईचा; अजागळ ( काम, धंदा, भाषण, वागणूक, वक्ता, मजूर इ० ). **भोंगळणें**—सक्रि. ( कों. ) ढिला, सैल, अव्यवस्थित होणें ( गड्डा, गाठोडें, पोशाख इ० ). **भोंगळी**—स्त्री. ( अशिष्ट ) गचाळ, नेभळट, अव्यवस्थित, हिडीस स्त्री.

**भोंगळी**—स्त्री. १ नळींतील पोकळी. (यावरून) २ नळी; नळकांडें; सुरळी; वळी. ' नंतर कागदाचे भोंगळींत भरून ... कडबोळीं करतात. '—अग्नि ३. ३ (कों.) पाणी वहावयासाठीं माड इ० झाडाचा पोखरलेला नळ. ४ पोकळी. ५ कवलारू घरांवरील कौलें पडूं नयेत म्हणून वळचणीस ठोकलेली पट्टी; गजभोंगळी पहा. ६ ( अशिष्ट ) ढुंगण; कुले. ०**कुलूप, भोंगळीचें कुलूप**—न. नळीच्या आकाराचें देशी कुलूप.

**भोंगळें**—न. अंबवण. —मसाप १.२.८.

**भोंगा**—पु. कारखान्याच्या एंजिनची शिटी. [ ध्व. ]

**भोंगा**—पु. नारळाच्या झाडास लागणारी कीड. —कृषि७५७. [ भुंगा ]

**भोंगाड**—न. ( व. ) भोंकाड पहा.

**भोंगाड्या, भोंग्या**—पु. ( व. ) बागुलबोवा; बाऊ.

**भोंगुळ**—पु. ( व. ) भुंगा; भ्रमर. [ भुंगा ]

**भोंगूं**—उद्गा. ( गो. ) असो! राहूं दे! नको! याअर्थी उद्गार.

**भोगोळ**—वि. ( गो. ) विशाल; अथांग. [ का. बक्कल ]

**भोवणें**—सक्रि. भोसकणें. ' शेलारमामा धांवत आला त्याचा भोंसुदेरे बोचा। '—ऐपो ५४. [ ध्व. ]

**भोज, भोजपत्र**—न. भूर्जे, भूर्जपत्र पहा. ' मग आणूनिया पुढें ठेविलें भोजपत्र उकलोनि। '—होला ६०.

**भोज**—न. १ उल्हास; आनंद. ' मग तया बोधाचेनि माजें। नाचती संवादसुखाचीं भोजें। '—ज्ञा १०.१२०. २ कर्तबगारी; करामत. ' जेणें जग आपुलेनि भोजें। नाचवीत असे। '—ज्ञा ३.२४९. ३ चिन्ह; मूर्ति; सोंग. ' परि पुढें बालभावें भोज। नाचत असे। '—ज्ञा ६.१२३. ४ प्रेम; आवड; कौतुक; आदर; संतोष; सुख. ' जयाचे वाचेपुडें भोजें। नाम नाचत असे माझें। '—ज्ञा ९.५०६. ५ वृद्धि; वाढ ' तैसेंचि सत्व रज। लोपोनि तमाचें भोज। '—ज्ञा १४.२००. ६ निधान; सांठा; ठेवा. ' अथवा दाविलें भोज। आनंदाचें। '—कथा १.६.१९३ ७ भोजन; जेवण. ' जेयां वाढलें राणिवेचें भोज। '—शिशु ३६०. ८ राज्य. ' व्हावें कीं सुखाचें भोज। ' —स्वादि १२.१. ९२. ९ भूषण; अलंकार. ' कवण वाईल मंत्रिपणाचें भोज!। ' —भाए १३३. १० मोठेपणा, महत्त्व; मोल. [ सं. भुक् ] ०**कोटदेश**—पु कच्छदेश.—अश्वप १.३४. ०**राजा**—पु. १ ( महानु. ) कंस राजा. ' करी कवलय पीडा भोजराजा निपातु '—गस्तो ६१. २ एक धारचा उदार राजा.

**भोजन**—न. जेवण; खाणें. [सं.] ०**खर्च**—पु. जेवणाचा खर्च. ०**दक्षिणा**—स्त्री. ब्राह्मणाला जेवूं घालून नंतर दिलेली दक्षिणा. [ सं. ] ०**पात्र**—न. १ ज्यांत जेवावयाचें तें ताट, केळीचें पान इ० रूप पात्र. २ तोंड. —वि. अन्न समर्पण करण्यास योग्य, लायक. ' पैसा वर्ज्य वरून सर्व जाती, जीव भोजनपात्र आहेत.' [सं ] ०**प्रिय-भाऊ, भोजन्या**—पु घरांत कांहीं एक कामकाज न करतां केवळ जेवणारा आळशी आणि निरुपयोगी माणूस. ०**भिक्षा**—स्त्री. भक्ष्य पदार्थांची भिक्षा. [ सं ] ०**विधि**—पु जेवणाच्या वेळीं करावयाचा विधि, व्रत, जेवणें; जेवणाची क्रिया. ०**वेळ**—स्त्री. जेवणाचा समय. **भोजनावसर**—पु. जेवणाची वेळ. [ सं. भोजन+अवसर ] **भोजनीय**—वि. १ खाण्यास योग्य, लायक; खाद्य. २ उपभोगण्यास योग्य ३ खाऊंपिऊं घालून पोसण्यास योग्य ( मातापितरें, मुलें इ० ). [ सं. ] **भोजनव्रता**—स्त्री. ( महानु. ) जेवावयाची जागा. ' त्या भेरवां उत्तरे भोजनव्रता। '—ऋद्धि ११६ **भोजिणें**—सक्रि. भोजन करविणें; जेवावयास घालणें. ' जिहीं निष्काम द्विज भोजिले। ते पावले सत्य लोक। '—एभा २४.२२५. **भोजी**—वि. (समासांत) खाणारा; भक्षण करणारा. जसें—अन्न-मित-अल्प-पथ्य-भोजी. [ सं ] **भोजें**—न भोजन; खाणेंपिणें. 'परिसूनि प्रेमाचें भोजें। धरी आवडी पोटीसी। '—मुआदि २४ ५८. **भोज्य**—न. खाण्याजोगी वस्तु; खाद्य; अन्न. ' कैं भोज्य नानापरी। कैं कोरड्या भाकरी। '—तुगा २७१७. —वि. १ खाण्यास योग्य, लायक २ भोजनीय अर्थ ३ पहा. [ सं. ]

**भोज्या**—पु. ( कों. ) ( तिरू. ) भोग्या पहा.

**भोट**—वि. १ (कु.) बावळट; वेडसर. २ (व.) नंगा; गुंड. **०मामा**–वि. (कु.) बावळट; वेडसर (मनुष्य). 'पण खाविलकरी मेनका कांहीं भोटमामा नाहीं?' -नाकु ३.९०.

**भोटो**—स्त्री. (गो.) काजूची मोठी बी.

**भोंड, भोंडणें, भो(भों)णें**—(प्र.) भोवंड (घेरी), भोवंडणें; भोंवणें इ० पहा. **भोंड जिरणें**–क्रि. (व.) मस्ती जिरणें.

**भोंड**—न. जोंधळा, बाजरी इ०च्या दाण्याचें टरफल; गोंड. **भोंडें**–नअव. भुसकट; कोंडा; फोल.

**भोंडगा, भोंडग्या**—पु. (कों.) (तिरस्कारार्थी) भंडारी.

**भोंडणी**—स्त्री. (व.) भाद्रपद शुद्ध पौर्णिमा.

**भोंडला**—पु. १ आश्विन महिन्यात मुली भिंतीवर, पाटावर, देवाच्या मूर्ती इ० चित्रे काढतात तीं समुच्चयानें. २ त्याच्यापुढें म्हणतात तीं गाणीं समुच्चयानें.

**भोडवॉ**—पु. (गो.) पोर; छोकरा. [बोडयो]

**भोंडा**—वि. १ (अशिष्ट) म्हातारा; वृद्ध; जीर्ण. २ ओका. (विरू.) भुंडा पहा. ३ छप्परबंदाच्या टोळींतील खोटें नाणें चालविणारा (मनुष्य). -गुजा ३६. **भोंडार**–न (कों.) (तिरस्कारार्थी) म्हातारा; म्हातारडा. **भोंडें**–वि. (व.) ओकें; सुनें.

**भोढभारूड**—न. अडचण; संकट; घोटाळा; पेंच; पंचाईत. (क्रि० येणें; येऊन पडणें). [भारूड द्वि.]

**भोत**—पु. १ धान्य साठवावयाचा, गोणपाट इ० चा मोठा थैला, पिशवी, पोतें. 'भोतगाडे रणगाडे भरून चालती स्वारींत।' -ऐपो १९९. २ भाजल्यामुळें त्या जागेवरील निघून जाणारी त्वचा ३ कातडें काढून त्यांत भुसा भरून तयार केलेली आकृति. 'आपुल्याचा भोत चाटी। मारी करंटी पारिख्या।' -तुगा ३१८२ ४ अंगाची त्वचा काढल्यानें बाहेर दिसणारा मांसपिंड; नखशिखांत अंगाचें कातडें काढणें. 'भोत आणी बोटबोटी। अथवा गळ घालणें कंठीं।' -दा ३.७.७३. ५ अनेक चिंध्या गुंडाळून केलेला व तेलांत बुडवून पेटविलेला ओंप्याचा काकडा; मशाल. ६ दोरी वळावयाजोगा घायाळाच्या पातीचा तंतु. [हिं.] **०सुजणें-होणें**–मार खाल्ल्यामुळें अंग सुजून भोताप्रमाणें होणें. **मारून भोत करणें, मारता भोत भरणें**–(भोताप्रमाणें अंग सुजेपर्यंत) खूप मारणें.

**भोता, भोतालचा, भोताला, भोतीं, मोंतें**—(प्र.) भोंवता इ० पहा.

**भोंदगिन्हा**—पु. १ भूत; पिशाच्च; समंध. (यावरून) २ (ल.) एखाद्याच्या मागें लागलेलें लचांड, त्रास, दुःख, दुर्दैव. 'हा भोंदगिन्हा माझ्या पाठीस लागला.' ३ अनिवार्य, कंटाळवाण्या कामाचा भर; कर्ज, संकट इ०चें वाटणारें ओझें; उपद्रवकारक तगादा. (क्रि० लावणें; लागणें).

**भोंदणें**—सक्रि. भुलथापांनीं, कपटानें, गोड बोलून वश करणें भुलविणें; फसविणें; फूस लावणें. 'जाणोनि अत्यनिष्ट क्षिप्र तय आंधळ्यासि भोंदाया।' -मोसभा ६ ६७. [हिं. भोंदना] **भोंदू-द्या**–वि. भोंदणारा; फसविणारा; दांभिक; ढोंगी.

**भोद्रा-द्री**—स्त्री १ (व) ओल्या जागेंत बसल्यानें अंगास येते ती बधिरता. २ मोळीविके इ० ओझ्याच्या खालीं डोक्यावर ठेवितात ती वळकटी, चुंबळ. [बधिर]

**भोनोशी**—स्त्री. (बे) तूप वाढण्याची तोटी असलेली झारी;

**भोप(व)शॅं**—न. (गो.) एक प्रकारची बारीक मासळी.

**भोपळा**—पु. १ एक प्रकारचें भाजीचें फळ. याचे काळा, पांढरा व तांबडा असे प्रकार आहेत. उंदराच्या विषावर काळ्या भोपळ्याचा वेठ उगाळून लावतात. कडू भोपळा म्हणूनएक भोपळ्याची जात आहे. वीणा, सतार याच्या डेऱ्यास याचा उपयोग करतात. २ वीणा इ०चा डेरा. ३ (व) नाट व खांबाच्या वरचें टोंक यामधील टोकळा. ४ (ल.) कमंडलु; तुंबा. (वाप्र.) **(भ्रमाचा)भोपळा फुटणें**–एखाद्या गोष्टींत कांहीं अर्थ असेल अशी जी समजूत ती कांहीं कारणानें त्या गोष्टीचें खरें स्वरूप उघडकीस येऊन दूर होणें. **(हातीं) भोपळा येणें**–दरिद्री होणें; भीक मागूं लागणें. **भोपळ्या एवढें शून्य**–अत्यंत अभाव. **भोपळ देवता**–स्त्री. लहान मुलाप्रमाणें खोड्या करणारी, भटक्या मारणारी वयस्क स्त्री. [भोंपळा+देवता] **भोंपळसुती**–वि. १ जें चालविण्यात बंदोबस्त, व्यवस्थितपणा, बारकाई, कुशलता इ० नाहीं असें (राज्य, कारभार, सावकारी, व्यवहार इ०) २ अव्यस्थित; अजागळ: निष्काळजीपणानें केलेला (पोषाख, कामकाज). ३ जाडेभरडें, राकट; ओबडधोबड (सामानसुमान, कामकाज). [भोंपळा+सूत] **भोंपळी**–स्त्री. भोंपळ्याचा वेल. **भोंपळी खरबूज**–न. एक प्रकारचें खरबूज. **भोंपळी मिरची**–स्त्री. एक प्रकारची जाड मिरची ही कमी तिखट असते. हिची भाजी करतात. **भोंपळ्या रोग**–अंगांत मेदोवृद्धि करणारा एक रोग; फोपसेपणा.

**भोपी-प्या**—पु. देवीच्या देवळांतील पुजारी. हा बहुधा शूद्र असतो. [का. बोप्पी]

**भोबडा**—वि. (व.) ज्याचे दांत पडले आहेत असा; बोथरा.

**भोबा-भा**—पु. १ उंडीण, मोगली एरंड इ०चें कच्चें, हिरवें त्वचेरहित फळ. २ कोंवळा, अपक्व भोंपळा.

**भोंबा**—पु लहान मुलांना भीति दाखविण्यासाठीं कल्पिलेलें एक भूत; बाऊ; बागुलबोवा. **०करणें-करून सांगणें**–भीति उत्पन्न करण्यासाठीं एखादी गोष्ट फुगवून सांगणें; बाऊ करणें.

**भोंवाड-ळ, भोम, भोमाड, भोंवाटा**—न. मुंगी, साप इ०चें वारूळ. [भूमि]

**भोंबारा**—पु. (व.) पडसें. [ध्व.]

**भोंबारा-री**—पुस्त्री. १ खरज सुराचें एक पितळी वाद्य. २ (क.) एखाद्या गोष्टीचा बोभाटा; प्रसिद्धि; जाहीरपणा. (क्रि० वाजविणें; वाजणें). [भों! ध्व.]

**भोंबी**—स्त्री. (अशिष्ट) धना; कोथिंबिरीचें बीं.

**भोंबी(भ्रू)ल**—पु. (राजा. कु) भुंगा; भोंवर पहा. [भ्रमर]

**भोंबो**—न. (गो.) तळयाला पाणी जाण्याचें मोठें दार.

**भोंभों**—क्रिवि. कुत्र्याच्या भुंकण्याच्या आवाजाप्रमाणें आवाज करून. [ध्व.] ०**करणें**-(ल.) एखाद्यावर शिव्यांचा वर्षाव करणें; एखाद्याच्या अंगावर मोठयानें ओरडणें.

**भोम**—पु लग्नसमारंभात इष्टमित्र व आप्त यास दिलेली मेजवानी. (क्रि० करणें) भूम पहा.

**भोम**—न. १ मुंग्याचें (वाळवीचें) वारूळ; भोमाड. २ सोनारानें घडवावयाच्या दागिन्यातून चोरलेल्या सोन्याबद्दल भरतीस घातलेलें लोहकीट; भूम पहा. [भूमि]

**भोम**—स्त्री. (कु.) डोंगराच्या पठाराखालीं असलेली दरी. [भूमि]

**भोमणें**—सक्रि. बोंबणें पहा.

**भोमवार**—पु. मंगळवार; (प्र.) भौमवार पहा.

**भोमा**—पु. एक जंगली झाड.

**भोय-ये**—स्त्री. १ भुई; जमीन; भूमि. 'मग जिंतिलिया हे भोये। पुरुष सर्वत्र जैसा होये।' -ज्ञा १८.९५५. २ (तंजा.) लुगडयाचें अंग; काठ व पदर खेरीज करून लुगडयाचा अवशिष्ट भाग, तवा [सं. भूमि] **भोयरें**-न. उंसाच्या गुऱ्हाळात चुलवणाखालीं राखेसाठीं केलेली खांच. -शर.

**भोय**—पु (कों. नाविक) अस्तमनाच्या पुढील भागावर गलबताच्या कांठापेक्षां एकदोन हात उंच, गोल किंवा चौरस असें लाकूड अस्तमनास दुसरी खाच पाडून उभें करतात तें. हे भोय तीन असतात. एक कलमीजवळ, दुसरा काठीजवळ व पुढील दाटयामागें तिसरा.

**भोय**—स्त्री. (व) भोंवळ; चक्कर; घेरी.

**भोयलण, भोयलंग**—न. (व.) हळद, मीठ व पाणी जमिनीवर घासून व गरम करून खरचटलेल्या जागेवर लावण्यासाठीं केलेलें औषध. [भू+लवण] **भोयार**-न. भुयार पहा.

**भोयाळ**—पु वाटाडया; वाट दाखविणारा. 'भोये पाय सिद्ध आहेती। भोयाळेवीण वृथा भ्रमती।'-एभा ३.८०८. [भुई]

**भोयो**—स्त्री. (गो.) थट्टा; निंदा.

**भोर**—पु (व) एक तांबूस भुरक्या रंगाचा पक्षी.

**भोर**—वि. काळया रंगाचें आधिक्य दर्शविण्यासाठीं जोडावयाचा शब्द असें-काळाभोर. [भोंवर=भुंगा] ०**वंडी**-स्त्री. (व.) काळसर, गाळवट जमीन.

**भोंरकडी, भोंरजाळी, भोंरा, भोंरी**—(प्र.) भोंवरकडी इ० पहा.

**भोंरगांव, भोंरपाशीं**--(प्र.) भोंवरगांव, भोंवरपाशीं इ० पहा.

**भोरडी**—स्त्री. क्रौंच पक्षी याचा जोंधळयाच्या पिकास फार उपद्रव होतो. 'शरीरसंबधाचें नातें। भोरडया बुडविती शेतातें।' -तुगा २९८८.

**भोरडी**—स्त्री. जिच्याभोंवतीं सोन्याची तार गुंडाळलेली आहे अशी आंगठी.

**भोरपी**—पु. बहुरूपी. 'भोरप्यानें सोंग पालटिलें वरी।' -तुगा २९१६. [सं. बहुरूपी]

**भोरंबी**—स्त्री. इमारती लांकडाचें एक मोठें झाड.

**भोरभेंडी**—स्त्री मुलींचा एक खेळ. -मखेपु पृ. २३४.

**भोरा**—वि. पांढुरका व तांबूस रंगाचा. [हिं.]

**भोरा**—पु भोंवरा (फिरविण्याचा).

**भोरी**—स्त्री उटी. भोवरी पहा. 'सर्वांगीं भोरि केली.'-धपू६९.

**भोरी(रु)प-भोरी**—न. १ बहुरूपी तमाशा, नाटक इ० खेळ; बाहुल्यांचा नाच, कसरत, सोंगें इ० बहुरूपी लोकांचा खेळ. २ मुलाचें नाचणें-बागडणें. [सं. बहुरूप]

**भोलांग-ड**—वि. (व. ना.) निर्जन; ओसाड; भयाण.

**भोव**—स्त्री. (ना.) भोवंड पहा.

**भोंव, भोंवटी**—स्त्री. (गो.) नदीस घातलेल्या बांधास पडलेलें भगदाड.

**भोवई**—पु. गुजराथी लोकांची एक जात किंवा तींतील व्यक्ति. भवई पहा.

**भोंवई**—स्त्री. भुंवई पहा. (गो) भोंवी. [सं. भ्रू] **भोंवई (यी)स गांठी घालणें**-क्रि. एखाद्या गोष्टीविषयीं नापसंति दर्शविणें. 'घाली होवुनि तिर्यग्दृक् नतमुख भोंवयासि तो गांठी।' -मोउद्योग १०.६८.

**भोवजाल**—स्त्री. (गो.) काळजी; फिकीर. [स.भवजाल]

**भो(भों)वंड-डी**—स्त्री. भोंवळ; घेरी; चक्कर. (क्रि० येणें; जाणें). 'भोवंडी दाटली संपूर्ण।' -मुआदि ३१.१३९. [भोंवणें] ०**जिरविणें**-रग; गुर्मी जिरविणें, नक्षा उतरविणें. **भोवंडणें**-सक्रि. १ फिरविणें, गरगर फिरविणें. 'वृक्ष भोंवडून सव्रागें।' -मुआदि १७.१०. २ (ल.) इकडून तिकडे चालण्यास, धावण्यास लावणें. 'घोडयानें मला पाटीमागून चार कोस भोवंडलें तेव्हां सांपडला.' ३ (गुरें इ०) हांकलून देणें; उधळून लावणें. 'भोवडा सकळ आवणांतुनि।' -निगा ९८. **भोवंडी दुकान**-न. (गो.) फिरतें दुकान. **भोंवंडावणी**-स्त्री. (गो.) मिरवणूक.

**भो(भों)वणें**—अक्रि. १ वाटोळें फिरणें; गिरगिरणें; भ्रमण करणें. 'भोंवरी देतां मंदराचळ । भोवों लागला विरंचीगोळ ।' –मुआदि ४.९१. २ घेरी; चक्कर; भोंवळ; डोळयाला येणारी अंधेरी. 'मला दिवसभर भोवतें.' ३ (ल) उपद्रवकारक होणें; प्रासणें; छळणें; सोसावें लागणें; त्रास होणें. 'ती चोरधाड वरकडांस सोडून त्या गरिबांस भोवली.' ४ घिरटया घालणें; घुटमळणें 'कामिक मेळ भोंवे भोंवता।'–मुविराट ३.६. [सं. भ्रमण; प्रा पं भोणा; सिं. भौणणु] **भोंवणी–नी**–स्त्री. फेरी; भ्रमण; चाल. **भोविन्नणें**–अक्रि. फिरणें. 'जैसी ते शुकाचेचि आंगभारें । नळिका भोविन्नली एरी मोहरें।' –ज्ञा ६.७६.

**भो(भों)वता–ती–तें, भो(भों)वताला**—क्रिवि. सभोंवार: सर्व बाजूंनीं; आसमंतात् **भोंवतड–ण**–स्त्री. (गो) सभोंवारचा टापू; आजूबाजूचा प्रदेश **भोंवतणी**–क्रिवि (गो.) सभोंवार **भोंवताडा**–स्त्री. (कों) जवळ व लांब असलेल्या वाटेपैकीं लांबची वाट. **भो(भों)वतालचा**–वि सभोंवारचा; सर्व बाजूंचा. **भोंवती**–स्त्री (राजा.) देवाच्या मूर्तीला प्रदक्षिणा घालण्यासाठीं गाभाऱ्यास चिकटून असलेली वाट

**भोवनी**—स्त्री. १ आरंभ; सुरुवात बोहणी पहा. २ चिन्ह; शकुन. 'लाभ अथवा हानी । थोडयामध्येंचि भोवनी ।' –तुगा ३३५३. [भवानी]

**भोवर**—स्त्री नारळीच्या कवाथ्यास, रोप्पास लागणारी कीड. –कृषि ७५७.

**भोंवर–रा**—पु १ भुंगा; भ्रमर. 'विसीफ भोवर गोन्चिड जाण ।' –दा ३.७.७ २ भुंग्याच्या आकाराचा स्त्रियांच्या डोक्यांतील एक दागिना. ३ (गो.) कलावंतिणीचा कुंडलाकृति नाच ४ नारळीच्या कोंवळया पानास लागलेली कीड. [सं भ्रमर]

**भोंवर**—शअ. सभोंवतालचें; आसपासचें; सभोंवारचें. 'समर्थें भोंवरवाडियांचीं शूद्र दंपत्यें आणविलीं ।' –सप्र १९ ७८. [सं. भ्रमण] ०**गांव**–पुन. आसपासचें एखाद्या गांवाच्या जवळचें गांव. ०**पाग**–न. (गो) एक वाटोळें जाळें. ०**पाशीं**–क्रिवि. जवळपास; सभोंवातलच्या प्रदेशांत; आसमंतात्.

**भो(भों)वरा**—पु. १ लहान मुलाचें, दोरी गुंडाळून गरगर फिरविण्याचें लाकडाचें एक खेळणें. २ मंडलाकार फिरणारें पाणी; आवर्त. ३ शरीरावरील केसांची मंडलाकार रचना ४ भोंवरीचें फळ. ५ मातींत खळी करून त्यांत राहणारा एक क्षुद्र कीटक. ६ शेंडीच्या भोंवतीं शोभेसाठीं राखतात तें केशवलय; घेरा; संजाप. ७ गाय, म्हैस इ० च्या अंगाला स्पर्श झाला असतां त्वचेवर उत्पन्न होतें तें वर्तुळाकार स्फुरण. ८ (क.) गिरकी; चक्कर; फेरा; वळसा. (क्रि० देणें; घेणें). ९ एक वनस्पति; तेड; पांढरें निशोत्तर. १० (काव्य) चक्र; (सामा.) चक्राकार फिरणारी कोणतीहि वस्तु. 'कुलालाचा भोवरा । जैसा भवे गरगरा ।' [सं. भ्रमर; अप भवंर; हिं. पं भौंरा] ०**करणें**–गाय, म्हैस इ० स स्पर्श झाला असता त्यानीं वर्तुळाकार स्फुरण करणें. **भोवऱ्यांत सांपडणें**–लवकर नाहींशा न होणाऱ्या संकटांत, अडचणींत गुंतणें. **(पायाला)भोंवरा असणें**–सारखें फिरत राहणें. **भोंवरकडी**–स्त्री गुरांच्या दाव्याला असते तशी फिरती कडी. **भोवरजाळी**–स्त्री. भोवऱ्याची दोरी. **भो(भों)वरी**–स्त्री. १ एक प्रकारचा वेल २ रानसालंमिश्री ३ पायांत कांटा मोडल्यामुळें तेथें जी वाटोळी गांठ उत्पन्न होते ती, चकंदळ. ४ कणेकडाचें टोंक रुखाच्या ज्या पोकळ भागावर टेंकतें तो भाग. ५ मंडलाकार भ्रमण, गिरकी; प्रदक्षिणा: वळसा, फेरा (नाचणारा, भोंवरा इ० चा) (क्रि० घेणें; देणें) ६ घोडयातील व्यंग (केसाचें वलय किंवा चकंदळ) ७ (अशिष्ट) मोहरीचें बीं. ८ झालर 'तो विणला पाट सुनानें । मोत्यांची भोंवरी ।' –वसा १५ ९ एक प्रकारचा दागिना; बुगडी 'पै आकारा नाम भोंवरी । येर सोनें तें सोनें ।' –ज्ञा १०.९०२ १० (ना.) एक लहान पाखरूं ११ बैलगाडीचें चाक. १२ (कों) भोंवार पहा. १३ (गो) टकळी; चाती.

**भो(भ)वरी**—स्त्री (महानु) उटी. भोरी पहा. 'सर्वांगीं एक्षदर्कमाची भोवरी देति ।' –पूजावसर

**भोंवरुला**—पु (कु.) फुगडीचा एक प्रकार

**भोवलणें**—सक्रि. भुलविणें. 'कुचमर्दी गोपिका धारी भोवलुनि गोवळया पोरी ।' –राला ३८. [भूल]

**भोवलें**—न. (विरू.) बहुलें पहा.

**भोंवस**—पु (गो.) डुकराचा जमाव, झुंड, थवा.

**भो(भों)वळ**—स्त्री. पित्तादि विकृतीमुळें येणारी ती घेरी; चक्कर; भोवंड. [सं भ्रमण; म भोवणें] ०**जिरणें**–नक्षा उतरणें; गर्वाचा परिहार होणें.

**भो(भों)वाडा**—पु. १ चक्कर; फेरा; वळसा. २ एखाद्याचा सार्वजनिक रीत्या झालेला अपमान; फजीतवाडा; धिंड (गुन्हेगार इ० ची गाढवावरून काढलेली), (विशेषतः) भोवाडापोवाडा. (क्रि० काढणें; मिरविणें; वाजविणें; निघणें; वाजणें). ३ पदार्थ फार डिवचला गेल्यामुळें त्याची होणारी नासाडी; कालवाकालव. ४ होळीच्या प्रसंगीं दवीच्या सोंगाची काढलेली मिरवणूक. (क्रि० मिरविणें; काढणें; निघणें; होणें). [भोवणें] **भोंवांडणें**–सक्रि. भोंवंडणें पहा.

**भोंवार**—स्त्री (कों.) पाणरहाट, तेल्याचा घाणा इ० भोंवतीं बैल इ० ची फिरण्याची वर्तुळाकार वाट, मार्ग [भोवणें] ०**गांव**–पुन. (प्र.) भोंवरगांव पहा.

**भोंशा**—स्त्री (हेट. नाविक) नांगर बांधलेली दुसरी लहान ।.

**भोंशा ऊंस, भोंस-सा**—पु ऊंसाची एक जात. **भोंस-** बोरूसारखें एक तृण.

**भोसकट-कटें, भोसकू**—नपु. १ (कों.) (भिंत इ०तील) ड, खिंडार; भगदाड. २ (कापड इ० स पडलेलें) मोठें, ओबड- बड भोंक [भोंक]

**भो(भों)सकणें, भोसकाविणें**—सक्रि १ एखाद्या पदार्थात णकुचीदार पदार्थ शिरकाविणें. २ तरवार, सुरी, सुई इ० दुसऱ्या दार्थात जोरानें खुपसणें ३ झाडाची फांदी, शरीरावयव इ० त्याच्या ठ्याहि कांहीं भाग निघेपर्यंत जोरानें उपटणें, हिसकणें. ४ बिघड- णें; खराब करणें [ध्व भस!] **भो(भों)सका, भोसकें**-पुन वेल) भोंकसा पहा **भो(भों)सणें**-सक्रि. (विरू) भोसकणें पहा.

**भो(भों)सडी**—स्त्री (अश्लील) स्त्रियांचें जननेंद्रिय; योनि सं भगद्] **भोस(सा)डणें**-सक्रि. खरडपट्टी करणें; शिव्या णें; फोदलणें. **भोसडपट्टी**-स्त्री. खरडपट्टी. (क्रि० काढणें). **भोसडीचा**-वि अपशब्द; शिवीप्रमाणें योजतात.

**भो(भों)सडी**—स्त्री भोंशा ऊंस. निपाणी ऊंसाची एक जात.

**भोंळ**—स्त्री. चक्कर; घेरी; भोंवळ. (क्रि० येणें). [भोंवळ]

**भोळा**—पु शंकर; शिव. 'ब्रह्मांडाहूनि वेगळा। कैलास निर्माण करी भोळा।' -एभा २४ २२९. -वि. १ साधा; सरळ मनाचा; निष्कपट अंत.करणाचा, दुसऱ्यावर विश्वास ठेवणारा. २ मूर्ख; वेडसर; अजागळ **भोळानंद्रो**-पु मूर्ख, वेडगळ, बावळट मनुष्य **०नाथ-शंकर-सांब-महादेव**-पु १ शंकर; शिव. २ अत्यंत भोळा, सरळ मनाचा मनुष्य **०भाव-भावार्थ**-पु साधेपणा; सरळ- पणा, निष्कपटीपणा म्ह० भोळाभाव सिद्धीस जाव. **०भावार्थी**-वि साधा; सरल; निष्कपटी. **०भासा**-पु १ चूक; चूकभूल; हयगय; दुर्लक्ष (क्रि० काढणें; निघणें; जाणें). २ नजरचुकीमुळें होणारा फायदा. -वि विसराळू; निष्काळजी; दुर्लक्ष करणारा. 'तुम्ही रुपये दिले त्याविषयीं मी भोळाभासा गेलों नाहीं.' [भोळा द्वि] **भोळाभासा घावा घ्यावा**-चूकभूल द्यावी घ्यावी. **०भाळा**-वि. भोळा पहा **०राजा**-पु साधा, निष्कपटी मनुष्य. **भोळवट, भोळसर**-वि १ कांहींसा भोळा; साधा. २ किंचित् वेडसर; अजागळ. **भोळसाविणें, भोळाविणें**-सक्रि फसविणें; ठकविणें. **भोळीव**-स्त्री (काव्य) भोळेपणा; सरळपणा; नेणतेपणा; निष्कपटपणा. 'घेऊनि भोळिवेची बुंथी। आपणा रक्षिजे सावधवृत्ती।' -मुआदि ३५.१४६. **भोळें**-न. १ नजरचूक; चूकभूल (हिशेब इ० तील) 'हिशेब चुकलास तर आणखी करून पहा. मला तुझें भोळें नको.' २ दुसऱ्याच्या नजरचुकीमुळें झालेला लाभ किंवा हानि. ३ भ्रम; भ्रांति; भुरळ; मोहनी. (क्रि० घालणें; पडणें). 'एक गोसावी काल आला होता त्यानें भोळें घालून दोन रुपये व पागोटें नेलें.' (लाभापेक्षा) **भोळ्याची आशा फार**-बाजवी नफ्यानें समाधान न होऊन दुसऱ्याच्या नजरचुकीनें होणाऱ्या फायद्याची आशा असणें. म्ह० गाढवाची गोणी खंडीचें भोळें. **भोळें भाग्य**-न. मूर्ख, अजागळ मनुष्यास श्रीमंत करणारें नशीब **भोळे भाविक**-पुअव. विश्वास ठेवणारे; श्रद्धाळु लोक. **भोळेंभासें**-न. भोळें अर्थ १ पहा. [भोळें द्वि.] **भोळ राज्य**-न. भोळा राजा पहा.

**भोक्ष्यमाण**—वि. भोगावयाचें; सोसावयाचें (सुख, दुःख इ०) [सं.]

**भौ, भोव**—वि. १ (गो.) पुष्कळ; जास्त; बहु. २ (ल. क्रियाच्या भावेंत) कमी; नाहीं असें. 'कुंकुम भोव झाला' [सं. बहु]

**भौकोस**—क्रिवि (गो) बहुतकरून; बहुतेक.

**भौतिक**—न पंचमहाभूताचें बनलेलें शरीर. 'आणि वाहतेनि भौतिकें। पापपुण्य येथें पिके।' -ज्ञा १३.१५६. -वि. १ भूता- संबंधीं; पिशाचासंबंधीं; पैशाचिक. २ पंचमहाभूतासंबंधीं. ३ विश्वासंबंधीं [सं.]

**भौम**—न. लबाडीनें दागिन्यांतील सोनें काढून घेऊन त्या ऐवजी भरीस घातलेला दुसरा हिणकस धातु, लोहकीट. भूम पहा.

**भौम**—पु एक पापग्रह; पृथ्वीचा पुत्र; मंगळ. 'नातरी भौमा नाम मंगळु। रोहिणीतें म्हणती जळु।' -ज्ञा १५.११६. [सं.] **०वार-वासर**-पु. मंगळवार.

**भौम**—वि भूमीसंबंधीं; पृथ्वीसंबंधीं. [सं.] **भौमिक**-वि. इहलोकींचा; भूमीसंबंधाचा; पृथ्वीसंबंधाचा [सं]

**भौमानेस्त**—वि (गो) माननीय; वंद्य [भोमान=बहुमान]

**भौरी फिरणें**—अक्रि (व) गवत, कडबा इ० ची गंजी, घर इ० आगीनें वेष्टून जाणें, वेढणें; आग लागणें. 'एकदां भौरी फिरल्यावर घरांतील सामान कसें निघणार?'

**भौस**—पु. (गो.) ग्रामसंस्थांतर्गत कृषिकर्मी यांचा संघ. [सं. भ]

**भौ(भौं)सळ**—स्त्री डुकरांची फेरी.

**भ्या**—न. भय; भीति. 'उदया पाण्यांत घालती। घालती मरणाभ्यानं।' -ऐपो ८३. [सं. भय] **भ्याड-डु**-वि. भित्रा; भेकड. **भ्यासूर**-वि. भयंकर; भीतिदायक; भीति उत्पन्न करणारा; भेसुर.

**भ्याडा**—वि. (अशिष्ट) भ्याहडा पहा.

**भ्यात**—पु. (कु.) बांबूचा अर्धा, चिरलेला भाग, भेत.

**भ्रतार**—पु नवरा; पति. [सं. भर्तृ]

**भ्रम**—पु. १ पित्तादिकानें गरगर फिरणें; फेरा; मंडलाकार गति, भोंवळ २ भटकणें; हिंडणें; भ्रमण. ३ फेरा; प्रदक्षिणा, गरका.

४ चूक; चुकीची कल्पना, मत; गैरसमज; विपरीत ज्ञान. ५ डोक्यांत होतो तो विचारांचा घोंटाळा; संदेह; विचारांचा विसंगतपणा; मनाचा गोंधळ. ६ (ल) योग्य मार्गापासून च्युत होणें; सत्पथ-भ्रंश; बहकणी. ७ वहीम; भ्रांति; अनुमान; आंदेशा. 'ज्याचा आम्ही भ्रम धरला होता तोच शेवटीं चोर ठरला.' ८ संशय; शंका; साशंक वृत्ति. 'हा ब्राह्मण किंवा शूद्र त्याविषयीं आम्हाला भ्रम आहे.' [सं] **भ्रमाचा भोपळा, भ्रमाची मोट-पुडी-पुडी** जें खरोखर चांगलें नाहीं तें चांगलें आहे असा एखाद्याचा झालेला चुकीचा ग्रह; पोकळ वस्तु. **भ्रमाचा भोपळा फुटणें**- एखाद्याच्या खोटया कल्पनेचें निरसन होणें. सामासिक शब्द- **०रस**-पु.१ दारू; सुरा; मद्य. २ (ल.) मोह. 'तेथ ब्रह्मरस आणि भ्रमरस। इहीं युक्त अमृतकलश।' -एभा १४.११ **०हत**-वि. भ्रमलेला; भ्रमिष्ट; भ्रांत. 'आतां जाहालिया भ्रमहत। जैसें पिशाचाचें चित्त।'-ज्ञा ५.५७. **०ज्ञान**-न चुकीचें ज्ञान; चूक; गैरसमज. [सं.] **भ्रमलेपण**-न. भ्रांति; मोहावस्था. 'तूं भ्रमलेपणें अंहकृति। यांसि घातु न धरिसी चित्तीं।' -ज्ञा २.९८ **भ्रमिष्ट-स्त-त**-वि. १ कैफ इ०नीं भ्रम झालेला. 'परि भ्रमिष्ट झाला द्विपंचवदन।' २ वेडसर; खुळा ३ ज्याचे विचार सदा घोटाळलेले असतात असा; सदा साशंक; गोंधळलेला. ४ खोटें; न चालणारें. 'कीं भ्रमित नाणें असेल पोटीं। सुलाख टोचितो निजबळें।' -भवि ५.९४. [सं. भ्रमिष्ट] **भ्रमी**-वि. १ भटकणारा; भटक्या. २ बहकणारा; चुकीच्या मार्गानें जाणारा. ३ सदा गोंधळलेला; शंकित [सं] **भ्रामक**-पु. लोहचुंबक. 'भ्रामकाचेनि संगें। जैसें लोहो वेढा रिगे।' -ज्ञा १८ १३११. [सं] -वि. घोटाळयांत पाडणारा; संशय उत्पन्न करणारा; भ्रमोत्पादक.

**भ्रमण**—न. १ मंडलाकार फिरणें, गरगर फिरणें. २ (शब्दशः व ल.). भटकणें; फिरणें; हिंडणें. 'नाहीं केलें तीर्थाचें भ्रमण। पाळिला पिंड करचरण।' -तुगा ६९२. ३ (ल) भ्रांति पडणें; बहकणें; कुमार्गास लागणें. ४ एक अशुभ मुहूर्त, अशुभ वेळ. [सं.] **०चक्र**-न. १ (काव्य) इहलोक सत्यस्वरूप आहे असा मनाचा खोटा ग्रह. 'जेणें ब्रह्मादि देवगण। भ्रमणचक्रीं पाडिले।' २ गति असणाऱ्या ग्रहांचें चक्र. 'भ्रमणचक्रीं न भवे। ध्रुव जैसा।' -ज्ञा १३.४८८. [सं.] **०प्रवाह**-पु. प्रापणप्रवाह. (इं) कन्व्हेक्शन करंट **०शील, भ्रमणीक**-वि. भटकणारा; भटक्या. **भ्रमणें**-अक्रि. १ चक्राकार फिरणें; गिरकी मारणें. २ भटकणें; हिंडणें. ३ (मनानें) धाव घेत सुटणें; भटकणें. ४ भलत्याच मार्गानें जाणें; चुकणें. ५ घाबरणें. 'भ्रमता सहस्रनयनहि परि धैर्यजलधि नदीज न भ्रमला।' -मोभीष्म ११.९९. ६ भुलणें; भुरळणें. 'नातरी महासिद्धिसंभ्रमें। जितला तापसु भ्रमें।' -ज्ञा १.२७१. ७ पाठ दाखविणें; माघार घेणें. 'वत्सा! जरि तूं युद्धीं न भ्रमसिल पावसील सुगतीतें।' -मोकर्ण ४.१९. **भ्रमता**-वि भटकणारा. 'ऐसेनि न राहतयातें राहवी। भ्रमतयातें बैसवी।' -ज्ञा ६.१६९. **भ्रमंती**-स्त्री. भ्रमण. [सं.]

**भ्रमर**—पु. १ भुंगा. २ केसांची मंडलाकृति; भोंवरा. ३ भोंवरा. [सं.] **०कीट**-पु कुंभारीण माशी. **०गुंफा**-स्त्री (योग) गोल्हाटावरील योगशास्त्रोक्त स्थान. गोल्हाट अर्थ २ पहा. 'तेथ औटपीठ गोल्हाट। सांडूनि भ्रमरगुंफा कपाट।' -एभा १२. ३५२. **०पडळ-ळी**-स्त्री. (काव्य) भ्रमरांचा समुदाय. 'भ्रमरपडळी रोमावळी। श्रीवत्स नव्हाळी तेचि पै।' [भ्रमर+पटल]

**भ्रमर(हस्त)**—पु. (नृत्य) हाताचा आंगठा व मधलें बोट यांचीं अग्रें एकमेकांस लावणें, तर्जनी वांकडी करणें, करंगळी आणि अनामिका उभ्या ठेवणें.

**भ्रमी**—स्त्री. विशिष्ट सैन्यसंख्याव्यूह एक भ्रमी=दहा हजार हत्ती, एक लाख रथ, एक कोटी घोडे, एक अब्ज पदाति. 'हयीं हयीं शतपदाती जाण। इतके मिळोनि एक भ्रमीप्रमाण।' -जै ३३.३०.

**भ्रंश**—पु. १ पतन; पडणें; गळणें. २ (ल.) अपकर्ष; ऱ्हास; नाश; च्युत होणें (महत्त्व, दर्जा, जात, सत्ता इ० पासून) चळ; वेड; खूळ. जसें-बुद्धि-ज्ञान-वैराग्य-शांति-भ्रंश. [सं.] **भ्रंशणें**-सक्रि. १ (काव्य) घोटाळयांत पाडणें; गोंधळविणें; चुकविणें. २ एखाद्यास त्याच्या स्थानावरून च्युत करणें. -अक्रि. १ गोंधळणें; बुचकळयांत पडणें. २ स्थानावरून च्युत होणें; भ्रष्ट होणें; चुकणें; भ्रम पावणें 'कीं तपोबळें ऋद्धी। पातलिया भ्रंशे बुद्धी।' -ज्ञा १.१८८. ३ नष्ट होणें; नाहींसें होणें. 'तिमिरावरुद्ध जैसें। दृष्टीचें तेज भ्रंशे।' -ज्ञा २.५६. **भ्रंशित**-वि. (विरू.) भ्रष्ट पहा. [सं]

**भ्रष्ट**—वि. १भाजलेला, शेकलेला. २ शिजविलेला. [सं. भ्रस्ज्]

**भ्रष्ट**—वि. १ पडलेला; सुटलेला; पतन पावलेला (सद्गुण, आचार, विचार, दर्जा, सत्ता, महत्त्व, योग्यता, पावित्र्य इ० पासून). २ घोटाळयांत पडलेला; गोंधळलेला; बुचकळयांत पडलेला. [सं.] **०मार्गस्थापक**-वि. (काव्य) धर्मासंबंधीं चुकीचा मार्ग स्थापन करणारा; धर्मबाह्य आचरणाचा संस्थापक. [सं.] **०संकल्प**-वि १ ज्याचा हेतु निष्फळ झाला आहे असा. २ स्वतःचा व्यवसाय, धंदा इ०त अयशस्वी झालेला. [सं.] **भ्रष्टाकार**-पु. सोंवळें ओवळें, अस्वच्छता, व्यभिचारादि दोष इ० न पाळल्यामुळें उत्पन्न झालेली अपवित्रता, अमंगलपणा. [भ्रष्ट+आकार] **भ्रष्टाचार**-पु. १ शास्त्रविहित आचारास सोडून असलेलें वर्तन; अनाचार. २ भ्रष्टाकार पहा. [भ्रष्ट+आचार] **भ्रष्टाचारी**-वि. शास्त्रबाह्य आचरण करणारा; अनाचार करणारा. [सं.] **भ्रष्टाभ्रष्ट**-स्त्री. सर्वसाधारण भ्रष्टाकार; अपवित्रता. [भ्रष्ट द्वि.] **भ्रष्टणें**-अक्रि. १ (काव्य) पतित होणें; खालीं येणें; च्युत होणें

(सद्गुण, योग्यता, पदवी इ० पासून) २ गोंधळणें; घुचकळ्यांत पडणें. ' होणाराची विचित्र गति। भ्रष्टली मति तयाची।' **भ्रष्ट विणें**-सक्रि. (काव्य) अपवित्र करणें; विधिपूर्वक बाटविणें. **भ्रष्टया**-वि. धार्मिक आचारविचारांप्रमाणें न वागल्यामुळें पूर्ण भ्रष्ट झालेला (मनुष्य).

**भ्रांत**—स्त्री. भ्राति पहा. ' ज्याला पडली भाऊची भ्रांत। ते राहिले रणांत।' –ऐपो १३०. –वि. १ चुकलेला; घोटाळ्यांत पडलेला; बहकलेला; गोंधळलेला; साशंक झालेला. ' जयाचेनि संगें ब्रह्मभावो। भ्रांता सही।' –ज्ञा ६.१०२. २ परिभ्रमण केलेला; गिरकी, वळसा घेतलेला ३ भ्रांतिष्ट पहा. [सं.] **०खोर-घट**-वि. भ्रांतिखोर, भ्रांतिवट पहा. **०हृदय**-वि. संशयी; शंकाकुशंकांनीं युक्त; शंकेखोर. [सं.] **भ्रांति-ती**-स्त्री. १ चूक; भूल; चुकीचा समज; मिथ्याज्ञान; भ्रम. ' देखे विवेकी जे होती। ते दोहींतेंही न शोचिती। जे होय जाय हे भ्रांती। म्हणऊनियां। –ज्ञा २.१०२. २ गोंधळ; घोंटाळा. ' दुर्जेना घालूनि अनिवार भ्रांति। भक्ता छळविसी तया हातीं।' ३ संशय; शंका; साशंकवृत्ति. [सं.] **०कट-कर-घट, भ्रांतवट**-वि. संशयास्पद; घोंटाळ्याचा; संशयित. ' आलों तर येईन असें भ्रांतिकर सांगूं नका. काय तें स्पष्ट सांगा.' **०खोर**-वि. शंकेखोर; संशयी. **०पटल**-न. (काव्य) भ्रम, मोह यांचें आवरण, आच्छादन, पडदा. **भ्रांतिष्ठ, भ्रांत्या**-वि. १ संशयित वृत्तीचा; संशयी; डळमळीत मनाचा; अनिश्चित विचारांचा. २ गोंधळलेल्या मनाचा; घोंटाळलेला; भ्रमिष्ट. ३ ज्या त्या गोष्टीविषयीं शंका घेणारा; शंकेखोर. ४ नेहमीं चुकणारा. [सं.]

**भ्राता**—पु. भाऊ; बंधु. (सामासिक शब्दांत भ्रातृ असें रूप होतें). [सं. भ्रातृ] **भातृजाया**-स्त्री. भावाची बायको; भावजय. [सं.] **०त्व**-न. बंधुत्व; भावाचें नातें; भाऊपणा. [सं.] **०हत्या**-स्त्री. भावाचा खून. [सं.] **०हत्यारा**-पु. भावाचा खून करणारा. **भ्रातृव्य**-पु. भावाचा मुलगा; पुतण्या. [सं.] **भ्रात्रीय**-वि. भावासबंधाचें. [सं.]

**भ्रुकुटी**—स्त्री. १ भुंवईचें आकुंचन. २ (सामा.) भुंवई. ३ (नृत्य) भुंवईचा एखादा भाग न उचलतां सबंध भुंवई एकदम उचलणें. [सं.] **०चढविणें**-उग्र मुद्रा धारण करणें. **०भंग**-पु. रागानें भिवया चढविणें; कपाळास आठ्या घालणें. [सं.]

**भ्रू**—स्त्री. भुंवई. [सं.] **०पल्लव**-पु. भुंवई. ' सहजें तिहीं संधी भेटी। जेथ भ्रूपल्लवां पडे गांठी।' –ज्ञा ५.१५२. [सं.] **०भंग**-पु. भ्रुकुटीभंग पहा. [सं.] **०मध्य**-पु. दोन भुंवयांमधील जागा. [सं.] **०लता**-स्त्री. (काव्य) भुंवई. 'भ्रूलता आठी घालुन। नेत्रयुगुल वटारले।' [सं.] **०संकेत**-पु. भुंवई वांकडी करून केलेली इशारत, सुचना; नेत्रसंकेत. (क्रि० दाखविणें; दावणें). ' अंगदादि भ्रूसंकेत। दाविता जाला ताराकांत।' [सं.]

**भ्रूण**—पु. गर्भ; गर्भावस्थेंतील बालक. [सं.] **०हत्या**-स्त्री. गर्भस्थ प्राण्याची हिंसा; गर्भपात. [सं.] **०हत्यारा**-वि. गर्भपात करणारा.